Barcode - 2990140052589
Title - Mahaaraashhtar~ Shabdakosha Da N
Subject - LANGUAGE. LINGUISTICS. LITERATURE
Author - Daate Raamakrxshhnd-a Yashavnt
Language - hindi
Pages - 554
Publication Year - 1935
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
2 990140 052589

# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_176584
UNIVERSAL LIBRARY

# महाराष्ट्र शब्दकोश

## विभाग चवथा

## ड—न

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.

प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४८१ शनिवार, पुणें २

मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस, ४८१ शनिवार, पुणें २,

किंमत १० रुपये

इ. सन १९३५ ] पुणें [ शा. श. १८५७

# संपादकमंडळ

श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्एल्. बी. (प्रमुख)

श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

श्री. आबा चांदोरकर.

श्री. चिंतामण शंकर दातार.

## प्रमुख शाखा-साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ ( वऱ्हाडी बोली ); गोमंतकसाहित्यसेवकमंडळ ( गोमंतकी ); वाङ्मयचर्चामंडळ ( कर्नाटकी. बेळगांव ); शारदोपासकमंडळ ( कोंकणी. मालवणी ); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ ( कुडाळी. पेडणें ); पुणें भाषाशास्त्रमंडळ ( व्युत्पत्ति ); शारदाश्रम ( महानुभावी. यवतमाळ ); हेटकरी भंडारीमंडळ ( दादर ), साहित्यसेवकमंडळ ( कऱ्हाड ). इ. इ.

# संपादकीय निवेदन.

**को वेद शब्द जलधेरखिलस्य पारम्. —वररुचि.**

सन १९३४ च्या डिसेंबरांत कोशाचा तिसरा विभाग बाहेर पडला; त्यावेळीं संपादकीय निवेदनांत म्हटलें होतें कीं, देशांतील आर्थिक मंदाईची अडचण निघून जाण्यास आणखीं ३—४ वर्षे तरी लागतील, ती स्थिति अद्यापि कायम आहे. पण तिच्यामुळें हा चौथा भाग बाहेर पडण्यास दिरंगाई मात्र झाली नाहीं; उलट हा भाग मागच्यापेक्षां थोडासा लवकरच बाहेर पडत आहे. याचें कारण, सध्याची परिस्थिति तूर्त तरी अपरिहार्य समजून संपादकांनीं व कचेरींतील इतर मंडळीनीं, परिस्थितीशीं तोंड देऊन कांहींहि झालें तरी कार्य पुरें पाडावयाचें, असा केलेला निर्धार हें होय.

संपादकमंडळ आपली जबाबदारी पूर्णपणें जाणून आहे, तशी महाराष्ट्रानेंहि ती जाणली पाहिजे अशी विनति पुन्हां महाराष्ट्रास नाइलाजानें करावी लागत आहे! कारण, तिसरा भाग प्रसिद्ध झाल्यापासून हा भाग प्रसिद्ध होईपर्यंत मंडळास नवीन असे ३४ भागीदार आणि ९९ वर्गणीदार लाभले; म्हणजे ही संख्या फारशी उत्तेजनकारक आहे असें म्हणतां येत नाहीं वर सांगितल्याप्रमाणें संपादकमंडळाचा निश्चय कायम असला तरी महाराष्ट्रानेंहि तो कायम टिकविण्यास मदत करावयास नको काय? झाली ही मदत संपादकमंडळी फिरतीवर गेल्यानेंच झाली आहे. परंतु संपादनकार्य लवकर करावयाचें तर प्रचारकार्य संपादकवर्गास करण्यास सवड सांपडत नाहीं. याकरितां प्रचारकाची अपेक्षा न करतां महाराष्ट्रीय जनतेनें ग्राहक होऊन, या शतकामधून एकदां होणाऱ्या ग्रंथास हातभार लावावा. सरकारी शाळांतून हा ग्रंथ घेण्यास मंजूरी मिळूनहि सरकारी शाळा अथवा कॉलेजें यांचेकडून मागणी आलेली नाहीं. यावरून या संस्थांची या कार्याबद्दलची उपेक्षा दिसून येते. त्या मानानें खासगी शाळांकडून आरंभापासून आम्हांस प्रोत्साहन मिळत आहे.

या भागांत 'ड' पासून 'न' पर्यंत अक्षरें आलीं आहेत; म्हणजे कोशाचें काम निम्यापेक्षां अधिक म्हणजे दोन तृतीयांश झालें आहे. उर्वरित कामास या गतीनें कमींतकमी दोन वर्षे लागावींत. तथापि शक्य तितक्या लवकर हें कार्य पूर्ण करण्याचा आमचा निर्धार आहे.

या विभागाच्या रचनेचें धोरण पूर्वीच्या भागाप्रमाणेंच आहे व पृष्ठसंख्या वाढली तरी काटकसर करावयाची नाहीं असा विचार आहे.

सर्व प्रकारें साहाय्य करणाऱ्या व्यक्तींचे आमचें मंडळ आभारी आहे, हें सांगावयास नको.

यशवंत रामकृष्ण दाते

# प्रस्तावना

## मराठी भाषेची उत्पत्ति

महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ।–दण्डी

**विषयप्रवेशः**—महाराष्ट्र शब्दकोशाच्या दुसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेमध्यें भाषाशास्त्रासंबंधी विवेचन करतांना, विशिष्ट मानवसमाजामध्यें भाषा प्रथम कशी उत्पन्न होते, त्या मानवसमाजाच्या आयुष्यक्रमाच्या, विस्ताराच्या, व स्थानान्तराच्या अनुरोधानें वगैरे भाषेच्या मूळ स्वरूपांत पुढें कसकसा बदल होत जातो, मूळ भाषेपासून अनेक भाषा-शाखा कशा बनत जातात व त्यांच्याहि पुढें अनेक पोटभाषा कशा बनतात; तसेंच समाजामध्यें निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या बोली प्रचलित होऊन मूळ भाषेची इतकी स्थित्यंतरें होतात कीं, या भाषावंशाचें मूळ शोधून काढणेंहि किती कठीण होत जातें यासंबंधीं विवेचन केलें आहे. तसेंच जगामध्यें ज्या निरनिराळ्या भाषा आज प्रचलित आहेत त्यांचे परस्परांशीं संबंध कोणते आहेत, निरनिराळ्या प्रदेशांत कोणते निरनिराळे भाषावंश प्रचलित आहेत व त्यांचा शाखाविस्तार कसा होत गेला आहे यासंबंधीहि तेथें विवेचन केलें आहे. प्रस्तुत स्थळीं आपणांस आपण जी आज मराठी भाषा बोलतों तिचा वंशविस्तार कसकसा होत आला आहे, या भाषावृक्षाच्या मुळाशीं कोणती मुख्य भाषा होती, तिचा शाखाविस्तार पूर्वी कसकसा होत गेला, मराठी भाषेचें या मूळ भाषेशी व तिच्या निरनिराळ्या शाखांशी कोणतें वांशिक नातें संभवतें हें पाहावयाचें आहे. तसेंच आज आपणांस प्रचलित असें जें मराठीचें स्वरूप परिचित आहे तसेंच तिचें स्वरूप पूर्वी होतें काय ? किंवा तिचीं यापूर्वी कसकशीं अवस्थांतरें होत गेलीं हेंहि पाहावयाचें आहे.

**आर्यांचें मूलगृहः**—आज आपण जी मराठी भाषा बोलतों ती आपले अत्यंत प्राचीन काळचे पूर्वज जे आर्य लोक ते जी भाषा बोलत असत तिचीं अनेक अवस्थांतरें होत होत बनलेली आहे. या आर्य लोकांचें मूलगृह कोठें होतें याबद्दल आतांपर्यंत अनेक विद्वानांनीं निरनिराळीं मतें प्रदर्शित केलीं आहेत. ते अत्यंत प्राचीन काळीं उत्तर ध्रुवाजवळ वस्ती करून राहत होते असें लो. टिळकांनी 'वेदांतील आर्यांचें आर्क्टिक प्रदेशांतील मूलगृह' या ग्रंथांत दाखविलें आहे. रा. नारायण भवानराव पावगी यांनी आर्य हे मूळचे भरतखंडांतीलच रहिवासी असून त्यांच्या उत्तरध्रुवापर्यंत वसाहती झाल्या होत्या असें प्रतिपादन केलें आहे. यूरोपीय ग्रंथकारांनीं अनेक निरनिराळे प्रदेश आर्यांचें मूळ वसतिस्थान म्हणून निर्दिष्ट केले आहेत. यूरोपचा वायव्येकडील भाग, आशिया व यूरोप यांचा संधिप्रदेश, उत्तर ध्रुवाच्या आसपासचा प्रदेश, आर्मेनिया व ऑक्सस आणि जक्सर्टीस नद्यांच्यामधील दुआब, कॉकेशस अथवा हिंदुकुश या पर्वतांचा माथा, सध्यां ऑस्ट्रिया-हंगेरीनें व्यापिलेला टापू व सैबेरिया यांपैकीं कोठें तरी आर्यांची अत्यंत प्राचीन काळीं प्रथम वस्ती असून तेथून ते जगाच्या निरनिराळ्या भागांत पसरले असें निरनिराळे संशोधक मानतात.

**आर्यांची मूलगृहकालीन भाषाः**—आर्य लोक आपल्या मूळ निवासस्थानांत वस्ती करून राहिले असतांना कोणती भाषा बोलत होते व तिचें त्या वेळचें स्वरूप कसें असावें यासंबंधींहि निरनिराळ्या विद्वानांचे निरनिराळे तर्क आहेत. भारतीय पंडितांच्या मतें त्या वेळचें भाषेचें स्वरूप ज्या भाषेमध्यें वेदांच्या संहिता उपलब्ध आहेत, त्या भाषेपेक्षां फारसें निराळें नसावें; उलट कांहीं पाश्चात्य विद्वानांचें मत असें आहे की सध्यां आपणांस वेदांमध्यें आढळणारें भाषेचें स्वरूप मूलगृहीन भाषेपेक्षां पुष्कळ निराळें असून तें बरेंच उत्तरकालीन व मूळ भाषेमध्यें बरेच फेरफार झाल्यानंतरचें बनलेलें आहे. वैदिक भाषेप्रमाणेंच मूलगृहीन भाषेच्या ज्या निरनिराळ्या शाखा आशिया व यूरोप खंडांत प्रचलित आहेत त्यांची परस्परांशीं तुलना करून व त्यांतील ध्वनींच्या उच्चारणपद्धतींत कसकसे फरक पडत गेले असावेत याचा अभ्यास करून मूळच्या भाषेच्या स्वरूपासंबंधीं कांहीं सिद्धांत भाषाशास्त्रज्ञांनीं काढले आहेत.

श्लेषर या पंडितानें तर या सिद्धान्तास अनुरूपन मूळ भाषेचें स्वरूप कसें असावें तें दाखविण्यासाठीं एक गोष्ट त्या भाषेंत लिहून दाखविली आहे. ती गोष्ट व तिचें तुलनेकरितां संस्कृत स्वरूप आणि मराठी अर्थ पुढें दिले आहेत.

**श्लेषरची मूलगृहीन भाषेंतील गोष्टः-- आविस् अक्वसस् क**– अविस् जरिमन् वर्ण न आ अस्त, ददर्क अकवंस्, तं वाघम् गरुम् वघंतम् तम् भारम् मघम, तम् मनुम् आकु भरंतम् अविस् अक्वबभजम्स आ-ववकत् : कर्द अध्नुते मइ विदंति मनुम् अकवम्स् अगंतम् अक्वासस् आ ववकन्तः श्रुधि अवइ वर्द् अघ्नुतइ विविद्वंत्-सवस्: मनुस् पतिस वर्णाम् अविसाम् करणंति स्वभ्जम् घर्मम् वस्त्रम् अविभ्जम्स् क वर्णा न अस्ति. तत् कुवुवंस अविस् अग्रम् आ भुगत्.

**संभाव्य संस्कृत रूपान्तर–अविः अश्वाश्चः**—अविः यस्मिन् ऊर्णा न आस्त ददर्श अश्वान् गुरुं वहन्तम् वाहनं महान्तं भारं एकं मनुष्यं च वहतः। अविः अश्वाभ्याम् अवोचत्। मानवं वहतः अश्वान् विदुषो मे हृदयं हन्यते इति। अश्वाः अवोचन्त शृधि अवे एतत् विदुषाम् अस्माकं हृद् हन्यते यत् (तव) मानवः पतिः अवीनाम उर्णा कृणोति स्वयं धर्म वस्त्रं बिभर्ति अविभ्यः च ऊर्णा न अस्ति। तत् शुश्रुवान् अविः अग्र अधावत्।

**मराठी भाषांतर—मेंढी व घोडे**–जिच्या अंगावरची लोंकर काढलेली होती अशा एका मेंढीनें मोठें वाहन ओढीत असलेले, मोठें ओझें नेत असलेले व एका मनुष्यास घेऊन जात असलेले कांहीं घोडे पाहिले. मेंढी घोड्यांस म्हणाली, 'घोड्यांना मनुष्यास वाहून नेतांना पाहून माझ्या मनास अत्यंत दुःख होत आहे.' घोडे म्हणाले, 'ऐक' ज्या वेळीं तुझा धनी जो मनुष्य स्वतःचे कपडे गरम करण्यासाठीं मेंढ्यांची लोंकर घेतो व मेंढीला कांहीं लोंकर राहत नाही असें आम्ही पाहतों त्या वेळीहि आम्हांस फार वाईट वाटतें.' हें ऐकून मेंढी पुढें पळून गेली.

**वैदिक भाषेच्या स्वसृ भाषाः**--वेदसंहितादि वाङ्मयांत आर्यांच्या भाषेचें स्वरूप दृष्ट होतें तें मूलगृह-कालीन भाषेच्या स्वरूपाबरहुकूम तंतोतंत नसलें तरी आज ज्या आर्यवंशीय भारतीय भाषा उपलब्ध आहेत त्यांमध्यें तें अत्यंत प्राचीन होय. तें लिखित वाङ्मयांत आज उपलब्ध आहे ही भारतीयांस फार अभिमानास्पद अशी गोष्ट आहे. वेद-वाङ्मय आज आपणांस उपलब्ध असल्यामुळें आर्य लोकांच्या एका काळच्या भाषेचें स्वरूप आपणांस निश्चितपणें दृष्टीस पडतें; परंतु आर्य लोकांच्या एकंदर परिभ्रमणाचा इतिहास पाहतां वेदकाल हा केवळ त्यांतील एक टप्पा म्हणतां येईल. आर्य लोक मूलगृहस्थानापासून फिरत फिरत भरतखंडांत येऊन स्थायिक होऊन आपल्या यज्ञयागादि संस्थांस व वेद-संहितादि वाङ्मयास स्थिर स्वरूप प्राप्त करून देईपर्यंतच्या कालांत त्यांचें अनेक परदेशांत व दीर्घकाल भ्रमण चालू होतें ही गोष्ट आतां स्पष्टपणें इतिहासज्ञांस व प्राचीन कथाभ्यासकांस ज्ञात झालेली आहे. भरतखंडामध्यें येऊन स्थायिक होण्यापूर्वी ज्या प्रदेशांतून ते आले त्यांपैकी भरतखंडास अतिशय जवळचा प्रदेश व भारतीय आर्यांस सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत जवळचे लोक म्हटले म्हणजे इराण व इराणी अथवा पार्शी लोकांचे पूर्वज हे लोक होत. या पारशी अथवा इराणी लोकांचे जे अत्यंत प्राचीन धार्मिक ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांची भाषा वैदिक भाषेशी अगदी जवळची असून कांहीं ध्वनि-नियम लाविले असतां एका भाषेचें रूपांतर दुसऱ्या भाषेंत सहजगत्या करतां येतें. उदाहरणार्थ, पुढें दिलेले उतारे पाहा.

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| तत् थ्वा पेरेसा एरेशमोई वओचा अहुरा। नेमंघ्हो आ यथा नेमं क्ष्मावतो। मझ्दा फ्रयाई थ्वावास। सख्येयात् मवईते अत ने अषा फ्रया दज्याई हाकुरेना। यथा-ने आ वोहू जिमत् मनंघ्हा॥१॥ | तत् त्वां पृसे ऋजु मे वच अहुर। नमस्यन् आ यथा नमे क्ष्मावन्तम्। मजदा प्रियाय त्वावान् शिष्यात् मावते। अत् नः अषा प्रिया दद्यात् सकरणं। यथा नः आ वहु जमेत् मनसा॥१॥ | हे अहुरा, मी तुला पुसतों तू मला खरें सांग। नमस्कार करणाऱ्या मीं तुझी भक्ति कशी करावी। तुझ्यासारख्यानें त्वत्प्रिय अशा मला शिकवावें। प्रिय अषानें आम्हांस मदत करावी। ज्यामुळें आमच्या मनांत सुबुद्धि उत्पन्न होईल.॥१॥ |
| तत् थ्वा०। कथा अंघ्हेऊश् | तत् त्वां०–कथम् असोः वहिस्तस्य पोर्वीम्। कथं सूध्यै यथा | हे अहुरा०–उत्तम आत्म्याचें |

बहिस्तह्या पवोऊर्वीम् ।
काथे सूईचाई ये ई पइतिपात् ।
हूवो जी अषा स्पेन्तो
इरिख्तेम् वीस्पाइब्यो, ।
हारो मइन्यू अहूमूवीश्
ऊर्वथो मझ्दा ॥२॥
तत् थ्वा० कस् ना जांथा पता
अपह्या पऊरुयेह्या ।
कस् ना खेंग स्तरेम चा दात अद्वानेम्,।
के या माओ उख्येइती
नेरेफसइती थ्वत् ।
ता चित् मझ्दा वसेमी
अन्याचा वीदुये ॥३॥

इति प्रति-असेत्। स हि अपः स्पेन्तः रिष्टं विश्वेभ्यः । दारः मन्युः अहुम्– विश् उर्वथः मजदा ॥२॥

तत् त्वां०–कः ना जनयिता पता अपस्य पौर्यः । कः ना खं तारां च दाति अध्वानं। कः यः मास् उक्षयति नृफ्क्षति तत् । तत् चित् मजदा वशामि अन्यत् च विदुये ॥३॥

उत्तमत्व करें असतें । तें मी करें मिळवूं शकेन । की ज्यामुळें मी ही ( स्थिति ) पालटूं शकेन । जींत पवित्र अषा नावडती आहे । आणि मलिन मन्यु प्रिय आणि आवडता आहे ॥२॥

हे अहुरा०–अपंचा जनिता आणि पुरस्कर्ता कोण आहे । सूर्य आणि ताऱ्यांना मार्ग कोण देतो । चंद्रास कोण वाढवितो व कमी करतो । हें व अन्य मी जाणावें असें इच्छितों ॥३॥

**बेहिस्तुन शिलालेखांतील भाषा:**—यापासून थोडें दूरचें पण संस्कृत भाषेशीं विशेष सदृश असें रूप आपणांस बेहिस्तुन येथें दारयवहुश् राजानें जे शिलालेख खोदून ठेवलेले आहेत त्यांमध्यें आढळतें. अवेस्ताची भाषा व बेहिस्तुनच्या शिलालेखांची भाषा यांमध्यें बराच फरक आढळतो; तथापि या दोन्ही भाषांची रूपें संस्कृतपासून फार दूर नाहींत हें त्यांचें जें संस्कृत रूपांतर दिलेलें आहे त्यावरून दिसून येईल. बेहिस्तुन लेखाचें संस्कृत रूपांतर करण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेक विद्वानांनीं केला आहे. त्यांपैकीं शापुरजी कावसजी होडीवाला यांनीं केलेलें रूपांतर प्राचीन महाराष्ट्र (वि.२ पृ. २०९) मध्यें उल्लेखिलेलें आहे. त्याचा थोडा भाग येथें देतों.

### बेहिस्तुनलेख

थातीय दारयव(हु)उश् क्षायथिय(:) पसाव(:) १ मर्तिय(:) मगुश् आह(:) गौमात(:) नाम(न). हौव्उदपतता हचा पैशिया(हु) उवादाया. अरकद्रिश् नाम(न्) कौफ(:); हचा अवदश्(:) वियखह्य माह्या १४ रौचाबिश् थकता आह(:), यदिय् उदपतता. हौव कारह्या अवथा अदुरुजिय(:) अदं बर्दिय(:)अमिय् कुरौश् पुथ्र(:)क(न्) बुजियह्या ब्राता. पसाव(:) कार(:) हरुव(:) हमिथ्रिय(:) अबव(:) हचा क(न्)बुजिया(:) अश्रिय् अबं अशिव(न्), उता पार्स (:) उता माद(:) उता अनिया दह्याव(:) क्षथ्रं हौव् अग्रबायता गर्मपदह्या माह्या ९ रौचाबिश् थकता आह(:) क्षथ्रं अग्रबायता. पसाव(:) क(न्) बुजिय(:) (हु)उव मर्शियुश अम्रियता.

### संस्कृत

शास्ति दारयवहुः क्षत्रियः पश्चा वा १ मर्त्यः मगुः आस गौमातः नाम्ना. असौ उदपतत् सचा पैशियाहुवादया अरकद्रिः नाम्ना कूपकः सचा अतः वियख्नस्य मासस्य १४ रुचाभिः (रुग्भिः) सक्ता(भिः) आस यदि उदपतत् असौ कारस्य एवं अथ अद्रुह्यत् अहं बर्दियः अस्मि यः कुरोः पुत्रः कंबुजियस्य भ्राता. पश्चा वा कारः सर्वः अमैत्रेय अभवत् सचा कंबुजियेन अभि एनं अच्यवन् उत पार्सान् उत मादान् उत अन्यान् देशान् क्षत्रं असौ अग्रभयत् गर्मपदस्य मासस्य ९ रुचिभिः (रुग्भिः) सक्ता(भिः) आस क्षत्रं अग्रभयत् पश्चा वा कंबुजियः स्वमृत्युना आम्रियत.

### मराठी

दारयवहुराजा आज्ञापित आहे कीं, नंतर एक 'मग,' मनुष्य गौमात नांवाचा होता, तो पैशियाहुवाद (पेशावर) हून उठला.अरकद्रि नांवाचा पर्वत (आहे);तेथून वियखन महिन्याचे चौदा दिवस झाल्यावर त्यानें बंड उभारलें. त्यानें सैन्याला अशा रीतीनें फसविलें कीं, 'मी कुरूचा पुत्र (व) कंबुजियाचा भाऊ जो बर्दिय तो आहें;' नंतर सर्व सैन्य कंबुजियाशीं शत्रु बनलें व त्याच्यासह पार्स(पार्शिया), माद (मीडिया) आणि इतर प्रांतांना गेलें. त्यानें त्या प्रांतांचें राज्य घेतलें; गर्मपद महिन्यांतील ९ दिवस पूर्ण झाल्यावर त्यानें तें राज्य घेतलें. पुढें कंबुजिय स्वमृत्यूनें मेला ( त्यानें आत्महत्या केली ).

**बोगोझकुइ येथील शिलालेखांतील उल्लेखः**—याप्रमाणें आपण याच्या पूर्वीच्या काळाकडे दृष्टि टाकल्यास आपणांस भारतीय आर्यांशीं संस्कृति, भाषा, वाङ्मय इत्यादि गोष्टींत एका काळी सदृश अशी दुसरी राष्ट्रेंहि आढळून येतील. उदाहरणार्थ, बोगोझकुइ येथील शिलालेखांत मेसापोटेमियाच्या वायव्य भागांत मितन्नी येथें खि. पूर्व पंधराव्या शतकांत अर्ततम, अर्तमन्य, सौस्सतर, सुतर्ण, सुबंधु, दसरत्त, सुवरदत्त, यशदत, इत्यादि आर्य नांवें धारण करणारे राजे होऊन गेल्याचा उल्लेख आहे. तसेंच हे राजे इंद्र ( इन्दर ), वरुण ( अ-रु-ण, अ-रु-व-ण ), मित्र ( मि-इत्-र ) आणि नासत्य किंवा अश्विन ( न-स-अत्-नि-इय ) इ. देवतांची पूजा करीत असल्याबद्दलचाहि उल्लेख त्यांत सांपडतो. या गोष्टीमुळें आर्य लोक आपल्या मूलगृहाकडून पूर्वेकडे ज्या मार्गानें सरकत गेले त्या मार्गांत मेसापोटेमियाचा वायव्य भाग असला पाहिजे. खि. पू. १८ व्या शतकांत बाबिलोन जिंकणाऱ्या कस्साईत लोकांत सुरिअस् ( संस्कृत सूर्य ), मरुत्तस् इ.सारखी आर्यदेवतानामें सांपडतात याचेंहि कारण वरीलप्रमाणेंच असावें. तसेंच बाबिलोनच्या पूर्वकालीन लेखांत उल्लेखिलेले व आर्यभाषा बोलणारे मंद किंवा मदलोक हे इराणांतील मिडिज लोकांचे पूर्वज असावे आणि ते आर्यलोक पूर्वेकडे प्रयाण करीत असतांना मेसापोटेमिया, कुर्दिस्तान व पश्चिम इराण यांत वसाहत करून राहिलेल्या आर्यांच्या एका टोळींपैकी असावेत असें मानण्यास हरकत नाही.

**संस्कृतच्या नातेवाईक भाषाः**—याप्रमाणें आपण मागें मागें शोध करीत गेल्यास वैदिक संस्कृतीचे पुरस्कर्ते जे भारतीय आर्य त्यांच्याशी सांस्कृतिक, सांप्रदायिक, विशेषतः भाषिक वगैरे अनेक प्रकारचें साम्य असलेलीं राष्ट्रें निरनिराळ्या प्रदेशांत पूर्वी निरनिराळ्या काली वास्तव्य करीत होतीं असें दिसून येईल. या संशोधनाच्या अनुरोधानें भाषाक्षेत्राचें अवलोकन केल्यास आपणांस निरनिराळ्या भाषांचीं कुलें, शाखा, उपशाखा वगैरे निश्चित करून मोठमोठ्या प्रदेशांस व्यापून राहिलेल्या महत्त्वाच्या भाषांचे वंशवृक्ष निर्माण करतां येतील. आशियाखंडांतील झेन्द अथवा अवेस्ता भाषेप्रमाणेंच यूरोपांतील ग्रीक, लॅटिन, विशेषतः लिथुआनियन व गॉथिक या भाषांतहि संस्कृत भाषेशी सदृश असे अनेक शब्द आढळतात. हिब्रू ही भाषा सेमेटिक व आर्यकुलाच्या बाहेरची आपण मानतों पण तीतहि संस्कृतसदृश बरेच शब्द आढळतात ही गोष्ट आपणांस परिशिष्टांत अशा शब्दांची यादी दिली आहे तीवरून दिसून येईल. यांपैकीं लिथुआनियन ही जर्मनीपलीकडच्या प्रदेशाची भाषा असून तिच्या मूळच्या स्वरूपांत फार थोडा फरक झाला आहे व ती आजहि संस्कृतशी बरीच जुळणारी आहे ही गोष्ट भाषाशास्त्रज्ञांनीं पुढें मांडली आहे. परंतु यासंबधी विस्तृत विवेचन करण्यास येथें अवकाश नसल्यामुळें व या विषयाचें दिग्दर्शन दुसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेंत केलें असल्यामुळें आतां आपण फक्त भारतीय आर्य भाषेच्या वैदिक स्वरूपापासून पुढें रूपांतर होत होत आजच्या मराठीचें स्वरूप कसें बनत गेलें हें पाहूं.

**वैदिक भाषेंतील स्थित्यंतरें:**—वैदिक वाङ्मयामध्ये जी भाषा आपणांस आढळते ती आर्यांच्या भाषेचें भरतखंडामध्यें त्यांची संस्कृति जेव्हां श्रेष्ठत्वाप्रत पोंचली होती त्या वेळचें एक स्वरूप होय असें वर म्हटलें आहे. तथापि वैदिक वाङ्मयामध्यें जें संस्कृत भाषेचें स्वरूप आपणांस आढळतें तेंहि एकच नाही तर त्यामध्येंहि आपणांस त्याच भाषेची थोडाफार फरक असलेलीं भिन्न भिन्न स्वरूपें दृष्टीस पडतात. वैदिक वाङ्मय हें सर्व एकाच कालखंडांत रचलेलें नसून त्याची निर्मिति अत्यंत दीर्घ कालामध्यें चालू होती. ऋग्वेदांतील सूक्तें व उपनिषदें या दोन वाङ्मयामध्यें भाषेच्या दृष्टीनें आपणांस पुष्कळच अंतर आढळेल. ऋग्वेदसंहितेचाच केवळ जरी आपण विचार करूं लागलों तरी त्या संहितेंतील सर्व सूक्तांची भाषा एकस्वरूपी नसून त्यामध्येंहि भाषेच्या दृष्टीनें फरक आढळून येतो व या दृष्टीनें सूक्तांच्या रचनेचा कालानुक्रम आपणांस लावतां येतो. ऋग्वेद संहिता हा अनेक सूक्तांचा संग्रह असून तीं सूक्तें निरनिराळ्या व कदाचित् एकमेकांपासून फार दूरच्या काली रचली गेलीं असावी व संहितेमध्येंहि त्यांचा अंतर्भाव भिन्न भिन्न कालीं होत गेला असावा हें त्यांच्या भाषेच्या स्वरूपावरून स्पष्ट होतें. यासंबंधीं निरनिराळ्या पाश्चात्य पंडितांचीं मतें पाहण्यासारखीं आहेत.

प्रो. पिशेल तर म्हणतो की, कांही सूक्तें सूत्रकालापेक्षां फारशी जुनीं नाहींत यांत मुळीच संशय नाहीं. उलट ब्रूनहोफर तर सामान्यतः सर्व सूक्तांची रचना एक हजार वर्षांत झाली असून ती खि. पू. २५०० ते १५०० च्या दरम्यान झाली असावी असें म्हणतो. म्हणजे पिशेलच्या मतें सर्व सूक्तांची रचना हिंदुस्थानांत झाली

असावी तर ब्रूनहोफरच्या मतें ती कास्पियन समुद्रापासून पंजाबपर्यंतच्या प्रदेशांत–विशेषतः उत्तर इराणांत–झाली असावी. असें दिसतें.

ग्रासमनच्या मतें दोन ते सात या मंडळांचा एक गट असून त्यांतील सूक्तांत विशिष्ट क्रम आढळतो. यावरून दोन ते सात हीं मंडळें सर्वांत जुनी असून १, ९, १० ही मंडळें संग्रहात्मक असून, सर्वांत उत्तरकालीन असावीं. ८ व्या मंडळाच्या रचनेंत कोणतीच व्यवस्था आढळत नसून तें या दोहोंच्या मधील कालांतील असावें. यापैकीं गोत्रमंडळाबद्दलचें ग्रासमनचें विधान बरोबर आहे. परंतु इतर बाबतींत तें तितकेंसें ग्राह्य नाहीं; कारण पहिल्या मंडळांतील ५१ ते १९१ या सूक्तांच्या अनुक्रमांत विशिष्ट पद्धति आढळते.

ग्रासमननें या विभागणीस विशिष्ट शब्दांच्या उपयोगाचें तत्त्व लावलें आहे. परंतु कांही सूक्तें त्यानें केवळ दुर्बोध व गद्यप्राय असल्यामुळेंच उत्तरकालीन म्हटलीं आहेत. लान्मन यानें नामांच्या अन्त्यभागांच्या संख्यांवरून सूक्तांचा कालानुक्रम लावण्याचा प्रयत्न केला आहे. उदा० अंती आ–औ ( द्वि. व. ); आसः–आः ( पु. प्र. ब. व. ); आ–आनि ( न. प्र. ब. व. ); एभिः–ऐः ( तृ. ब. ब. ) या जोड्यांपैकी उत्तरपदेंच फक्त अभिजात संस्कृतमध्यें आढळतात. यावरून अथर्ववेद हा अभिजात संस्कृतच्या अतिशय जवळ येतो व त्या मानानें ऋग्वेद हा पुष्कळ दूर जातो ही गोष्ट विशेषतः लान्मननें स्पष्ट केली. हेंच तत्त्व त्यानें ऋग्वेदांतील निरनिराळया मंडळांना लावून पाहिलें, त्यांत त्यास ग्रासमनप्रमाणेंच गोत्रमंडळें ( २ ते ७ ) ही सर्वांत जुनीं व ८ आणि ९ हीं त्यानंतरचीं व दहावें त्यांच्याहिपेक्षां अलीकडचें असावें असें दिसून आलें. परंतु त्यानें निरनिराळया मंडळांत जीं सूक्तें मागाहून अंतर्भूत केलीं गेलीं असावींत त्यांकडे लक्ष्य दिलें नाहीं. झिमरच्या मतें २ ते ८ ही मंडळें सर्वांत जुनी असून १ व १० हीं नंतरची असावीं. कारण यांमध्यें बाबिलोनमधील ज्योतिषपरिभाषा आढळते. ब्रुनहोफरनें ऋग्वेदांतील तुमन्त रूपांचा अभ्यास करून असें दाखविलें की धे(२), ध्यै(६१) ही अन्ती असलेली रूपें जुनी असून तये ( २१४ ), त्यै( ५ ), आणि तुम् ( ४ ), हीं अंती असलेलीं रूपें उत्तरकालीन अथवा ब्राह्मण-कालीन असावीत. यावरून त्यानें मंडळांचा कालानुक्रम पुढें दिल्याप्रमाणें लाविला. गौतम (४), भरद्वाज (६), वासिष्ठ (७), आत्रेय (५), वैश्वामित्र (३), भार्गव (२), आंगिरस (१, ८), व काण्व (१, ८). ब्रुनहोफरच्या अभ्यासावरून वरील अनुमान जरी निश्चितपणें ग्राह्य धरतां येत नाहीं तरी त्यावरून एवढी गोष्ट स्पष्ट होते की गोत्र-मंडळांत 'ध्यै'चा उपयोग ज्यास्त असून १ल्या व ८व्या मंडळांत 'तये' हें [illegible] अधिक आढळतें.

ओल्डेनबर्ग यानें ऋग्वेदरचनेचा अनुक्रम असा दिला आहे:–प्रथम १ ते ९ मंडळें, नंतर या मंडळांत पडलेली भर आणि नंतर दहावें मंडळ. हॉप्‌किन्स यानें कांहीं विशिष्ट ३, ७, १०, २१, २३ इत्यादि संख्यावाचक शब्दांच्या उपयोगावरून सूक्तांचा रचनाक्रम लावण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यानें स्वतःच आपल्या अनुमानासंबंधी ती कच्चीं असल्याचें विधान केलें आहे. या एकंदर संशोधनाचा निष्कर्ष अर्नोल्डनें असा काढला आहे कीं, सर्व अथर्व-वेद हा सर्व ऋग्वेदाच्या नंतरचा आहे. ऋग्वेदांतील दहावें मंडळ हें सर्वांत उत्तरकालीन आहे. १ ते ९ या मंडळांतहि कांही सूक्तें इतरांपेक्षां बरींच उत्तरकालीन असावींत; परंतु तीं कोणतीं हें स्पष्टपणें दाखवितां येणें बरेंच कठीण आहे. या नऊ मंडळांतहि आठवें मंडळ सापेक्षतः कांहींच्या मतें जुनें आहे तर कांहींच्या मतें उत्तरकालीन आहे. परंतु सातवें मंडळ हें बरेंच पूर्वकालीन असून प्रथममंडळ हें उत्तरकालीन असावें.

**ऋग्वेदसंहितेचे कालविभागः**––आर्नोल्डनें ऋग्वेदसंहितेचे कालानुरोधानें पांच विभाग पाडले आहेत. ते असे:––

( १ ) पहिल्या कालविभागांत जवळ जवळ निम्या ऋग्वेदसूक्तांचा अंतर्भाव होत असून, ह्यांत अनुष्टुभ् व तत्सदृश इतर वृत्तें आढळतात. जगती छंद क्वचितच् आहे. मित्र व वरुण ह्यांची सूक्तें बहुतेक याच कालविभागांत आढळून येतात; परंतु इंद्रसूक्तें व अग्निसूक्तें यांच्यापेक्षां तीं संख्येनें बरींच कमी आहेत. सामसूक्तांतहि इंद्रसूक्तें हीं अनुक्रमांत प्रथम असून संख्येंतहि सर्वांत अधिक आहेत. एकंदरींत या कालविभागाला 'इंद्रकालविभाग' अशी संज्ञा देतां येईल.

( २ ) दुसऱ्या कालविभागांत बहुतेक सूक्तरचना त्रिष्टुभ् छंदांत असून अग्निसूक्तें जवळ जवळ इंद्रसूक्तां-इतकींच आहेत. याला त्रिष्टुभ्-कालविभाग किंवा अग्निकालविभाग असें नांव देतां येईल. यांत ऋग्वेदाच्या सुमारें एकपंचमांश भागाचा अंतर्भाव होतो.

( ३ ) तिसऱ्या कालविभागांत बहुतेक सूक्तरचना त्रिष्टुभ् व जगती या दोन छंदांत असून दोन्ही छंदांतील सूक्तांची संख्या जवळ जवळ सारखी आहे. यांत प्रामुख्यानें वैश्वानर किंवा जातवेदस् जो अग्नि, सूर्य, उषस्, द्यावापृथिवी व आपः यांना उद्देशून सूक्तें रचिलेलीं आहेत. या सर्व सूक्तांत ऋग्वेदाच्या शें. ३० भागाचा अंतर्भाव होतो. या कालविभागाला पञ्चमहाभूतांसारख्या शक्तींच्या पूजेचा काल असें म्हणतां येईल.

( ४ ) चवथ्या कालविभागांत एकाच सूक्तांत त्रिष्टुभ् व जगती या दोन छंदांचें मिश्रण झालेलें आढळतें. या विभागांतील सूक्तें सृष्टींतील परंपरागत कनिष्ठ देवतांना उद्देशून आहेत. या विभागाला 'लोककथांचा काल किंवा बालसारस्वत काल' असें म्हणतां येईल.

( ५ ) पांचव्या कालविभागांत प्रामुख्यानें उत्तरकालीन अनुष्टुभ् छंद आढळतो आणि सूक्तांना मंत्रांचें स्वरूप दिलेलें आढळतें. यावरून यास 'मंत्रकाल' असें म्हणतां येईल.

आर्नोल्डनें निरनिराळ्या शब्दांच्या उपयोगांचा अभ्यास करून वरील रचनाकालाचे विभाग पाडलेले आहेत. उदाहरणार्थ, त्यानें असें दाखविलें आहे कीं, दर्शकसर्वनामांपैकीं 'स्य' आणि 'त्य' हीं बरींच जुनी असून एतद् व त्याचीं रूपें बरींच अर्वाचीन आहेत. तसेंच एन व अदस् हींहि उत्तरकालीन दिसतात. 'सर्व' हेंहि सर्वनाम उत्तरकालीन दिसतें. तसेंच बहु व त्याचे समास हेहि उत्तरकालीन असावे. 'कतर' व 'कतम' यांपासून झालेलीं रूपेंहि उत्तरकालीन असून त्यापेक्षांहि यतर, यतम व इतर हीं अर्वाचीन आहेत. अन्यतर हें तर मुळींच आढळत नाहीं. शब्दयोगी अव्ययांचीं तरतमान्त रूपें उत्तरकालांतच अधिक आढळतात. उपर आणि उपम हीं मात्र पूर्वकालीन दिसतात. अन्तर आणि अन्तम हींहि पूर्वकालीन असून अन्तरिक्ष हें तद्भव रूप मात्र उत्तरकालीं अधिक आढळतें. वितरम् हें दुसऱ्या व तिसऱ्या कालांत अधिक आढळतें. प्रथमपुरुषी एकवचनाचा उपयोगहि बराच उत्तरकालीन दिसतो. एक या शब्दाचा उपयोगहि उत्तरकालीन सूक्तांत अधिक आढळतो. उपमार्थी 'न' ह्या अव्ययाचा उपयोग पूर्वकालीन विभागांत म्हणजे पहिल्या व दुसऱ्या विभागांत अतिशय दृष्टीस पडतो. तिसऱ्या विभागांत त्यापेक्षां कमी प्रमाणांत आढळतो, आणि चवथ्या व पांचव्या कालांत तर तें जवळ जवळ अदृश्य होतें आणि अभिजात संस्कृतमध्यें तर हें लुप्तच होतें. 'सु' हें अव्ययहि प्रथमकालविभागांत विशेष दृष्टीस पडतें; पण पुढें पुढें तें क्वचितच आढळतें. 'अच' या शब्दाचा शब्दयोगी अव्ययासारखा उपयोग आरंभींच्या काळांत आढळतो, तर 'अपि' हा पुढील कालविभागांत अधिक आढळतो. अभिजात संस्कृतांत 'अपि' उभयान्वयी अव्ययाच्या स्वरूपांत सामान्यतः आढळतें, परंतु ऋग्वेद किंवा अथर्ववेदांत तें तसें आढळत नाहीं.

प्राचीनांच्या समजुतीप्रमाणेंहि ऋग्वेदसंहितेंत अंतर्भूत झालेली सूक्तें जरी एकाच दर्जाचीं मानलीं जातात तरी मुख्य संहितेंत प्रवेश न मिळालेलींहि कांहीं सूक्तें संगृहित केलेलीं असून तीं ऋग्वेदसंहितेस जोडलेलीं आहेत व त्यांस खिल अथवा पुरवणी म्हणून मुख्य संहितेपेक्षां गौण स्थान दिलेलें आहे. आठव्या मंडळांतील वालखिल्य या नांवानें संबोधल्या जाणाऱ्या अकरा सूक्तांच्या गटाचाहि संहितेंत अंतर्भाव होतो किंवा नाहीं याबद्दल मतभेद आहेच. गणपतकृष्णाजीच्या प्रतीत हीं पुरवणींत दिलीं आहेत. संहितेचें पारायण करतांना हीं सूक्तें वगळण्यांत येतात.

सर्वांत प्राचीन व अत्यंत परिश्रमानें, श्रद्धेनें व पाठभेदहि न होऊं देतां रक्षण केलेल्या ऋग्वेद संहितेची ही स्थिति, तर इतर संहिता, ब्राह्मणें, व उपनिषदें यांची रचना दीर्घकालपर्यंत होत असून त्यांमध्यें भाषेचीं निरनिराळीं स्वरूपें दृग्गोचर झाल्यास त्यांत मुळींच नवल नाहीं.

**व्यवहारांतील भाषांमधील रूपबाहुल्य.:—** आतां ही वैदिक वाङ्मयाची जी भाषा ती देखील ग्रांथिक अथवा वाङ्मयीन भाषा होय. व कोणतीहि भाषा जेव्हां वाङ्मयामध्यें समाविष्ट होते अथवा ग्रंथस्वरूप पावते तेव्हां ती अधिक ठाकठिकीचें किंवा शिष्ट स्वरूप पावते असा भाषाशास्त्राचा सिद्धान्त आहे. तेव्हां वैदिक भाषेचें जें स्वरूप आपणांस दृष्टीस पडतें तें तत्कालीन काव्यभाषेचें किंवा वाङ्मयीन, ग्रांथिक किंवा शिष्ट भाषेचें स्वरूप असलें पाहिजे. ज्यावेळीं हें वाङ्मय रचलें जात होतें त्यावेळच्या लोकांची प्रत्यक्ष व्यवहारांतील भाषा यापेक्षां थोडया फार शिथिल स्वरूपाची असली पाहिजे. तसेंच तत्कालीन समाज सामाजिक, राजकीय वगैरे बंधनांनीं आजच्यासारखा विशेष निगडित अथवा सूत्रबद्ध असणें संभवत नाहीं. तत्कालीन निरनिराळ्या जमातींमधील किंवा राष्ट्रांतील दळणवळण आजच्याइतकें

सुलभ असणें शक्य नाहीं; तेव्हां त्यांच्या भाषेंत अथवा विशेषतः बोलींतहि फारशी नियमबद्ध घटना असणें शक्य दिसत नाहीं; त्यामुळें आपणांस तत्कालीन बोलींत एकाच शब्दाचीं अनेक प्रकारची रूपें किंवा एकाच धातूचीं व्याकरणदृष्टया भिन्नभिन्न रूपें आढळणें शक्य आहे व त्याप्रमाणें प्रत्यक्ष ऋग्वेदांतहि हें रूपबाहुल्य आपणांस मोठ्या प्रमाणावर आढळतें. उदाहरणार्थ, तुवन्ताचीं रूपें करण्याचे त्यावेळीं निरनिराळे १६ प्रकार होते. तसेंच प्राकृत भाषांतहि हें रूपबाहुल्य आपणांस अधिक स्पष्टपणें आढळतें. याचें कारणहि हीं भिन्नभिन्न रूपें वापरणारे भिन्नभिन्न लोकसमाज एकमेकांशेजारीं रहात होते हेंच होय. उदाहरणार्थ, युष्मत् शब्दाचीं पंचमीच्या एक-वचनाची प्राकृत भाषेंतील रूपें पुढें दिल्याप्रमाणें आढळतातः—तुब्भ, तुम्ह, तुज्झ, तुहिंतो, तुरह, तईहिंतो, तइत्तो, तईतो, तईउ, तुवाहिंतो, तुवत्तो, तुवाओ, तुवाउ, तुवाहि, तुवा, तुमाहिंतो, तुमत्तो, तुमाओ, तुमाउ, तुमाइ, तुमा, तुहाहिंतो, तुहतो, तुहाओ, तुहाउ, तुहाइ, तुहा, तुब्भहिंतो, तुब्भतो, तुब्भाओ, तुब्भाउ, तुब्भाइ, तुब्भा, तुम्हाहिंतो, तुम्हतो, तुम्हाओ, तुम्हउ, तुम्हाइ, तुम्हा, तुज्झाहिंतो, तुज्झतो, तुज्झाओ, तुज्झउ, तुज्झाइ, तुज्झा.

तसेंच 'भू' धातूनें प्रथमपुरुषाचें वर्तमानकाळाचें अनेक वचन खालील भिन्नभिन्न प्रकारांनीं होतें:— होअमु, होआमु, होइमु, होएमु, होअमो, होआमो, होइमो, होएमो, होअम, होआम, होइम, होएम, होएज्जमु, होएज्जामु, होएज्जिमु, होएज्जेमु, होएज्जमो, होएज्जामो, होएज्जिमो, होएज्जेमो, होएज्जम, होएज्जाम, होएज्जिम, होएज्जेम, होमु, होमो, होम, होज्जमु, होज्जामु, होज्जिमु, होज्जेमु, होज्जमो, होज्जामो, होज्जिमो, होज्जेमो, होज्जम, होज्जाम, होज्जिम, होज्जेम, होज्ज, होज्जा.

**वेदपूर्वकालीन भाषेचें अवगमनः**—याप्रमाणें ऋग्वेदकालीन भाषा किंवा सामान्यपणें वैदिक भाषा ही निश्चित भाषा धरली तर ही भाषा ज्या भाषेचें वाङ्मयीन अथवा शिष्ट स्वरूप पावली असेल ती जानपद-भाषा त्या वेळची सामान्य भाषा असली पाहिजे. या भाषेचें मूळ स्वरूप आपणांस वैदिक भाषेमध्यें किंवा त्यानंतरच्या त्या भाषेच्या स्वरूपामध्यें जे बोलीचे अवशेष निरनिराळ्या रूपांमध्यें अथवा व्याकरणविषयक अगर इतर क्रियांमध्यें असलेले आढळतील त्यांवरून जाणतां येण्यासारखें आहे. व कदाचित् याच अभ्यासावरून आपणांस पूर्व वैदिक अथवा वेदकालीन लोक सूक्तरचनेच्या कालापूर्वी जी भाषा बोलत होते तिच्या स्वरूपाचेंहि अवगमन करतां येणें शक्य आहे.

वेदकालीन किंवा वेदपूर्वकालीन ज्या बोली प्रचलित असत त्यांमध्यें एकाच शब्दाचीं अनेक तऱ्हेचीं रूपें किंवा तोच शब्द निरनिराळ्या तऱ्हेनें उच्चार करण्याची पद्धत दिसून येते. व ही गोष्ट कांहीं अंशानें आजहि आपण शिष्ट भाषा सोडून लोकांची सामान्य व्यवहाराची भाषा पाहिल्यास दिसून येते. उदा० आपण ज्या शब्दाच्या उच्चारामध्यें 'ऐ' हा स्वर वापरतों त्याच शब्दाचा उच्चार प्राचीन किंवा वेदपूर्वकालीं 'ऐ'च्या ऐवजी पुढें दिल्याप्रमाणें निरनिराळे आठ स्वरसमुच्चय घालून करीत असत. जसें:—अइ, अई, आइ, आई, अए, अऐ, आए, आऐ, तसेंच अय्, आय् असेहि दोन प्रकार अधिक असत. तसेंच अउ, अऊ, आउ, आऊ, अओ, आऔ, आओ, अऔ, अव, आव, अशा तऱ्हेनें जे निरनिराळे बोलीतील उच्चार तेच प्रचलित भाषेंत औ या एकाच स्वरानें निर्दिष्ट होतात. हीच गोष्ट आपणांस मराठींतील असा किंवा ऐसा या शिष्ट शब्दांचीं जीं निरनिराळीं रूपें लौकिक व्यवहारांत आढळतात त्यांवरून प्रतीत होते. उदा०अइसा, अईसा, आइसा, आईसा, अएसा, अऐसा, आएसा, आऐसा, अयसा, आयसा. तसेंच ठउक, ठऊक, ठाउक, ठाऊक, ठओक, ठऔक, ठाओक, ठवका, ठावका. वरील आठ आठ स्वरसंघांपैकीं पहिल्या चार स्वरसंघांचा संधि पाणिनीकालीं अनुक्रमें ए आणि ओ असा झाला व पुढील चारांचा अनुक्रमें ऐ आणि औ झाला. संहित स्वर असंहित उच्चारण्याची पद्धत जी सामान्य लोकांत आजहि आपणांस आढळून येते ती पाणिनीय संस्कृत भाषेंत किंवा वाङ्मयीन संस्कृत भाषेंत बंद पडली.

वैदिक भाषेंतील स्वरांचे उच्चार असंहित राहिलेले तितउ, प्रउग यासारखे कांहीं बोलीतील शब्द त्याच स्वरूपांत मधूनमधून आढळतात. यापूर्वीच्या अवेस्ता भाषेंत तर असंहित स्वर विपुलतेनें आढळतात. उदा. अवे. अएईब्यो= सं. एभ्यः; अवे. दएव = सं. देव; अवे. पइरि ददइति = परिदधत्; अवे. पओऊर्वीम् = सं. पौर्व्वीम्; हीच पद्धति आपणांस प्राकृत भाषांमध्येंहि आढळते. तसेंच प्राणिनीय स्वरसंधिनियमांप्रमाणें जेथें ए, ओ, व अर असे

संधि व्हावयास पाहिजेत तेथें अनुक्रमें ऐ, औ, आर् असे संधि झालेले कांही शब्द संस्कृत भाषेंत आढळतात. उदा०. प्रष्ठ+ऊह= प्रष्ठौह, अक्ष+ऊहिनी अक्षौहिणी, स्व=ईर=स्वैर, ऋण=ऋण=ऋणार्ण. तसेंच पूर्ववैदिककाली इ, आ, हे स्वर असंहित उच्चारण्याची जेथें प्रथा होती तेथें 'या' असा संधि पाणिनीकालीं रूढ झाला. परंतु ही पूर्वीची लकब आपणांस मराठीच्या प्राथमिक अवस्थेंत आढळून येते. उदा० 'इआ पाटणी' असा प्रयोग आपणांस पाटण येथील शिलालेखांत आढळतो. तोच ज्ञानेश्वरकाली 'इया पाटणीं' असा झाला व आजच्या मराठीत 'या' अथवा 'ह्या' पाटणी असा झाला. याप्रमाणेंच मराठींतील तुआं, तुवां, त्वां ही रूपें किंवा मिआ, मिया, म्यां ही रूपें वरीलच गोष्ट सिद्ध करितात.

वेदपूर्वभाषेंत अ, ए व ओ स्वर असलेल्या शब्दांतहि संस्कृतमध्यें फक्त अ हाच स्वर राहिला ही गोष्ट आपणांस संस्कृत व ग्रीकमधील कांहीं शब्दांची तुलना केली असतां दिसून येईल. उदा० सं. अस्ति, ग्री. एस्ति; सं. पतिस्, ग्री. पोतिस्; सं. अम्बर. ग्री. ओम्ब्रॉस; हीच गोष्ट तालव्य नियमाच्या बाबतींत आपणांस स्पष्टपणें आढळून येते हें दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत दाखविलेंच आहे.

याप्रमाणेंच संस्कृत भाषेमध्यें जे कांहीं शब्दांच्या विभक्तीच्या बाबतीत रूपबाहुल्य दिसून येतें त्याचा मूलग्राही शोध केला असतां आपणांस असें आढळून येईल कीं ही रूपें वापरणारे निरनिराळे समाज असून त्यांमध्यें प्रत्येकी एका विशिष्ट तऱ्हेचीं रूपें प्रचलित असत, व तीं त्या त्या समाजांत मान्य असत. परंतु व्याकरणकारांस त्यांचें एकत्रीकरण करण्याच्या वेळीं या भिन्न भिन्न परंतु प्रचलित रूपांस वैकल्पिक म्हणून आपल्या व्याकरणांत मान्यता द्यावी लागली ही गोष्ट मत्यै, मतये; धेन्वै, धेनवे; मत्याः, मतेः इ. रूपांवरून किंवा तरस्थिवस् शब्दांतील तरस्थिवत्, तरस्थिवस् व तस्तुप् या तीन प्रकारच्या प्रत्ययपूर्व रूपांवरून दृष्टीस पडते. हा विशेष आर्य भाषांच्या बाल्यावस्थेंत होता. ग्रीक भाषेंतहि एकाच शब्दाची भिन्न प्रत्ययपूर्व रूपें असत ही गोष्ट दिसून येते. उदा०प्रथमा hudor, षष्ठी hudatos; तसेंच लॅटिन भाषेंत Jecur—liver, Jecinoris; iter—voyage, itineris याप्रमाणें 'रान्त' व 'नान्त' प्रत्ययपूर्वरूपें वैकल्पिक असत. तसेंच संस्कृतमध्यें 'ब्रू' धातूचीं कांहीं रूपें लुप्त होऊन त्यांच्या ठिकाणी 'आह' धातूचीं रूपें समाविष्ट झालीं. यावरून 'ब्रू' आणि 'आह' धातू वापरणाऱ्या दोन समाजांच्या भाषांचें एकीकरण झालें ही गोष्ट प्रतीत होते. तसेंच बुधकौशिक ऋषीनें वापरलेलें 'सीतायाः पतये' हें किंवा पाराशरस्मृतीतील 'क्लीबे च पतिते पतौ' वचनांतील पतौ हें अपाणिनीय रूप तत्कालीन भाषेत मान्य होतें हीहि गोष्ट वरील तत्त्वाचीच निदर्शक आहे. अशा गोष्टींवरूनच रा. वि. का. राजवाडे यांनीं संस्कृत भाषेच्या पूर्वकालीन स्थितीसंबंधीं पुढील अनुमानें काढिलीं आहेत.

( १ ) आर्य पूर्वजांची भाषा प्रथमारंभीं वचन, विभक्ति, किंवा लिंग यांच्या प्रत्ययांखेरीज होती म्हणजे अप्रत्यय होती. ( २ ) त्या अप्रत्ययकाळी आर्यपूर्वजभाषेंत सानुनासिक भाषा व निरनुनासिक भाषा असे दोन भेद झाले होते. [ही गोष्ट वर लॅटिन भाषेंतील 'रान्त' व 'नान्त' नामरूपें उल्लेखिलीं आहेत त्यांवरूनहि दिसून येईल.] (३) त्या कालीं वैदिक पूर्वज कंठ्य उच्चार फार करीत. 'स'चा उच्चार बहुतेक 'ह' सारखा असे. [संस्कृत भाषेंत ज्या शब्दांत 'स' असतो तेथें अवेस्ता भाषेंत 'ह' हा वर्ण आढळतो. उदा० सोम-हओम; सप्तसिंधु-हप्तहिंदु; सरस्वती-हरह्वती; इ. यावरूनहि हीच गोष्ट स्पष्ट होते.] ( ४ ) त चा उच्चार बहुतेक स सारखा असे. उदा० चमस् शब्द चमत् असाहि उच्चारिला जाई. ( ५ ) स चा उच्चार ऱ्ह सारखा होई व ऱ्ह चा उच्चार जवळ जवळ हसारखा असे. ह व उपसर्जनीय हे बहुतेक उच्चारांत सारखे असत. ( ६ ) 'अ' त महाप्राण घातला म्हणजे ह होई व 'ह' तून महाप्राण काढला म्हणजे अ उच्चार होई. [ बेहीस्तुन लेखांत- सं. अमैत्रेय :—हमिथ्रियः ] ( ७ ) आर्यपूर्वजभाषांत कालांतरानें प्रत्यय उत्पन्न झाले व प्रथम प्रत्यय वचनांचे झाले. ( ८ ) दोन निरनिराळे वचनप्रत्यय लावणारे दोन भिन्न समाज होते. पैकीं एक समाज स्, स् + स्, स् +स् +स् हे प्रत्यय लावी, दुसरा समाज म् व इ हे दोन प्रत्यय आणि ऱ्ह इ हा तिसरा प्रत्यय लावून शिवाय एक, दोन, तीन, ह्या माला लावून वचनें दाखवी. येणेंप्रमाणें दोन वचनप्रत्यय लावणारे दोन समाज होते. ( ९ ) तिसरा एक समाज होता तो स्, स्+ स्, व स् + स् + स् हीं संख्यादर्शक अक्षरें नामाच्या पाठीमागें उपसर्ग म्हणून लावी. ( १० ) या तिन्ही समाजांत अद्याप लिंगप्रत्यय व विभक्तिप्रत्यय लावण्याचा प्रघात पडला नव्हता. मनांत स्त्री—पुरुष भेद असे परंतु वैय्याकरणिक लिंग या समाजांना अद्याप माहीत झालें

नव्हतें. अशा कालीं उत्तमपुरुषवाचक व मध्यमपुरुषवाचक सर्वनामांची एकद्वित्रि वचनांचीं रूपें बनलीं गेलीं व तीं भाषेंत इतकीं दृढ झालीं कीं लिंगप्रकरणीं हीं दोन्ही सर्वनामें कायमचीं अव्यय ठरलीं. त्वं म्हणजे स्त्री, पुरुष कीं पोर त्याचा बोध त्वं या रूपानें होत नाहीं, तर इतर कोणत्या तरी ज्ञापकानें होतो. त्या कालीं स् हा संख्यावाचक शब्द योजणाऱ्या समाजाचे सर्व प्रातिपादिक शब्द हलन्त होते. गाव्, हरव्, गुरव्, देवय्, रमय्, मातर्, पितर्, नर, अभिजित्, प्रतिपद् असे सर्व शब्द हलन्त असत. म, इ व ऽइ हे प्रत्यय योजणाऱ्या समाजाचे शब्द हलन्त व अजन्त असे दोन्ही प्रकारचे असत. ( ११ ) उत्तमपुरुषवाचक व मध्यमपुरुषवाचक सर्वनामांचीं तिन्ही वचनांचीं रूपें प्रत्ययी समाजाच्या भाषेंत जशीं होतीं तशीं उपसर्गी समाजाच्या भाषेंतहि होतीं. ( १२ ) सर्वांच्या शेवटीं विभक्ति-प्रत्यय उदय पावले. वचनांची तीन रूपें रानटी आर्य भाषेंत होतीच. पैकीं एकवचनाच्या रूपापुढें विभक्तिप्रत्यय लागून निरनिराळ्या विभक्त्यांचीं एकवचनें बनत, द्विवचनाच्या रूपापुढें विभक्तिप्रत्यय लागून निरनिराळ्या विभक्त्यांच्या द्विवचनाचीं रूपें साधत व त्रिवचनाच्या रूपापुढें विभक्तिप्रत्यय लागून निरनिराळ्या विभक्त्यांचीं अनेक-वचनांचीं रूपें तयार होत. ( १३ ) अपत्यवाचक रूप करण्याकरितां मध्यें आ घालून वृद्धि दर्शवीत. उदा. पुत्र–प + आ + उत्र = पौत्र. यावरून वृद्धिनियम निघाला.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पाणिनीपूर्वकालीं ( १ ) साधी तुटक शब्दांची अप्रत्ययभाषा प्रथम असलेली दिसते. ( २ ) नंतर प्रथमवचनाचे प्रत्यय जन्मास आले. ( ३ ) नंतर विभक्तिप्रत्यय जन्मास आले. ( ४ ) नंतर लिंगभेद होऊं लागला. ( ५ ) तो परिपूर्ण होतो न होतो इतक्यांत पाणिनीय भाषा स्थिर म्हणजे मृत झाली.

**बोलभाषा व साहित्यिक भाषा:**—वैदिक भाषेचें जें स्वरूप आपणांस ऋग्वेदांत दिसून येतें त्यामध्यें अधिक स्वातंत्र्य व व्याकरणनियमांची शिथिलता दृष्टीस पडते. ऋग्वेदांतील सूक्तें एकमेकांपासून बऱ्याच दूर असलेल्या कालखंडांमध्यें व तसेंच भिन्न भिन्न प्रदेशांमध्यें तयार झालीं असल्यामुळें त्यांमध्यें व्याकरणविषयक रूपबाहुल्य व स्थानिक वैशिष्ट्य प्रचुरपणें दृष्टोत्पत्तीस येतें. या भाषेला जसजसें वाङ्मयीन अथवा ग्रांथिक स्वरूप प्राप्त होत गेलें तसतसें तिचें स्वरूप नियमबद्ध व कमी वैचित्र्ययुक्त होत गेलें असें उत्तरकालीन वैदिक वाङ्मयाकडे पाहिले असतां दिसून येतें. वैदिक भाषेस प्रातिशाख्यादि ग्रंथांनी अधिक नियमितपणा आणण्याचा प्रयत्न केला. याच प्रातिशाख्यांची पुढें व्याकरणग्रंथांत परिणति झाली व त्या मानानें भाषेस अधिकाधिक एकरूपता व नियमबद्धपणा ही प्राप्त होऊं लागलीं. या क्रियेची आपणांस पाणिनीकालीं पूर्ण वाढ झालेली दिसते. पाणिनीच्याहि पूर्वी इंद्रशाक-टायनादि अनेक व्याकरणकार होऊन गेले होते, व त्यांचे भिन्नभिन्न व्याकरणसंप्रदाय प्रचलित होते. या सर्व ग्रंथांचा व संप्रदायांचा परामर्ष घेऊन पाणिनीनें आपल्या व्याकरणाची रचना केली व जरी त्यानें केवळ अमुक शब्दाचें अमुक तऱ्हेचें रूप बनतें, विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट आदेश होतात इत्यादि तऱ्हेचे केवळ वस्तुस्थितिनिदर्शक नियम आपल्या ग्रंथांत नमूद करून ठेविले आहेत; व अमुक करावें व अमुक प्रत्यय लावावा अशा तऱ्हेचे विधायक नियम घातलेले नाहींत; तथापि पाणिनीनें तत्कालीन प्रचलित भाषेचें स्वरूप निश्चित केल्यामुळें त्यापुढील ग्रंथकारांस त्या विशिष्ट पद्धतीसच अनुसरून ग्रंथरचना करावी लागली. व पाणिनीच्या वस्तुस्थितिनिदर्शक सूत्रांसच नियमांचें स्वरूप प्राप्त झालें. याप्रमाणें संस्कृत भाषेचें स्वरूप नियमबद्ध बनून गेलें. तथापि हें पाणिनीय व्याकरणहि सर्वमान्य होऊन पूर्णपणें अनुसरलें जाण्यास कांहीं कालावधि अवश्य होता. व त्यामुळें कांहीं कालपर्यंत पाणिनीय नियमांस सोडूनहि रचना झालेली आपणांस संस्कृत वाङ्मयांत आढळून येते. प्रि. वै. का. राजवाडे यांनीं गीतेंतील अपाणिनीय प्रयोगांचें दिग्दर्शन आपल्या भांडारकर स्मृतिग्रंथांतील निबंधांत केलें आहे तें याच गोष्टीचें उदाहरण म्हणून देतां येईल. याप्रमाणें पाणिनीय कालापासून जसजसे आपण अर्वाचीन कालाकडे येऊं लागतों तसतशी आपणांस नियम-बद्ध व निरपवाद रचना करण्याकडे अधिकाधिक प्रवृत्ति झालेली दृष्टीस पडते; व त्या मानानें वाङ्मयीन अथवा ग्रांथिक भाषा अधिकाधिक कृत्रिम होत जाऊन अधिक पांडित्यपूर्ण व सौन्दर्ययुक्त करण्याकडे ग्रंथकारांची प्रवृत्ति आढळून येते व त्या मानानें ती क्लिष्ट व दुर्बोधहि होत चाललेली आढळून येते. यामुळें लोकांच्या सामान्य व्यव-हारास ती अधिकाधिक निरुपयोगी होत जाऊन अखेरीस तिला केवळ ग्रांथिक बद्धभाषेचें स्वरूप प्राप्त होतें.

अर्थात् संस्कृत भाषेचें रूपांतर होत असतांना समाजामध्यें लोकभाषा किंवा सामान्य लोकांची व्यवहाराची भाषा म्हणून कोणती तरी भाषा अस्तित्वांत असलीच पाहिजे. ही भाषा लोकव्यवहारास अधिक सुलभ व त्या मानानें व्याकरणादि नियमांनी विशेष जखडून न गेलेली अशी असावी. तसेंच तिचें स्वरूप भिन्न भिन्न प्रदेशांतहि स्थानिक परस्थिती-प्रमाणें निरनिराळें असलें पाहिजे; व त्याप्रमाणें आपण वेदकालापासून अलीकडील निरनिराळ्या कालखंडांचें निरीक्षण केल्यास अशीच वस्तुस्थिति आढळते. सामान्य लोकसमाजाचा व्यवहार या निरनिराळ्या स्थानिक बोलींतूनच चालू राहिला. संस्कृत भाषेला जसें पंडितीय विशिष्ट असें स्वरूप प्राप्त झालें तसेंच सांप्रदायिक स्वरूपहि प्राप्त झालें. त्यामुळें पंडितीय वैचारिक चळवळ त्या भाषेत चालू राहिली. याच वेळीं वैदिक धर्माची वाढ याज्ञ वर्गाच्या हातांत असल्या-मुळें वैदिक धर्ममूलक यज्ञयागादि संस्था व विधि यांचें स्वरूपहि अधिक अवाढव्य व सामान्य जनसमूहाच्या आवांक्याच्या बाहेर वाढत गेलें; यामुळें सामान्य जनसमूहाच्या पारमार्थिक उन्नतीस कांहीं तरी अल्प परिश्रमाचा व त्यांच्या आटोक्यांतील मार्ग असण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. व त्याचा परिणाम म्हणजे वैदिक धर्माविरुद्ध निरनिराळ्या कालीं प्रचलित झालेले संप्रदाय हा होय. अशा तऱ्हेचा सर्वांत महत्त्वाचा व प्रादेशिक दृष्ट्या अत्यंत व्यापक असा संप्रदाय म्हटला म्हणजे बौद्ध संप्रदाय होय. बुद्धाचा जन्म किंवा वंश यासंबंधीं कितीहि भिन्न भिन्न मतें असली तरी त्याचें कार्य सामान्य जनतेची ऐहिक व पारमार्थिक उन्नति घडवून आणणें हें होतें याबद्दल दुमत नाही. वैदिक धर्मातील यज्ञयागादि प्रचंड विधि अथवा तपश्चर्यादि खडतर मार्ग यांपासून पूर्णपणें अलिप्त व कोणत्याहि सामान्य मनुष्यास स्वतः आचरणांत आणण्यास सुलभ अशा मार्गानें आपली पारमार्थिक उन्नति घडवून आणणें प्रत्येक व्यक्तीस शक्य व साध्य आहे या तत्त्वाचा प्रसार बुद्धानें करण्यास सुरवात करून आपणांस असंख्य अनुयायी मिळविले; व या तत्त्वाचा प्रसार केवळ भरतखंडांत नव्हे तर तत्कालीन ज्ञात जगाच्या बऱ्याच मोठ्या भागावर झाला. या तत्त्वाच्या प्रचारार्थ बुद्ध व त्याचे अनुयायी यांस लोकांच्या प्रचलित अथवा सामान्य बोलीचा आश्रय करावा लागला; कारण त्यांस जो संदेश द्यावयाचा होता तो सामान्य लोकसमूहास द्यावयाचा असल्यानें त्यांच्याच भाषेत देणें आवश्यक होतें; यामुळें त्यांस त्यांच्याच मगध देशांत प्रचलित असलेली सामान्य बोली मागधी (नंतर धर्मसंगीतिकाली पाली) तिचाच अवलंब करावा लागला; यामुळें बौद्धधर्मीय विशेषतः बौद्धधर्माच्या प्राथमिक अवस्थेमधलें हीनयानपंथीय वाङ्मय पालीभाषेंतच रचलें गेलें. येथें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार प्रारंभीं केवळ तोंडी व्याख्यान-प्रवचनादि रूपानेंच झाला व त्याचें वाङ्मयांत ग्रथन बुद्धनिर्वाणानंतर कांही कालानें करण्यांत आलें; व पुनः जेव्हां हाच संप्रदाय आपली ग्रंथरचना संस्कृत वाङ्मयांत करूं लागला व महायान नांवाच्या पंथरूपानें मिरवूं लागला तेव्हां पुन्हां सामान्य जनतेपासून दुरावल्यामुळें भरत-खंडांतून नष्ट झाला. या बौद्धसंप्रदायाच्याहि पूर्वीपासून किंवा समकालीन जैनांचा पंथ प्रचलित होता. यांतील सर्वांत महत्त्वाचा व अखेरचा तिर्थंकर अथवा प्रचारक जो महावीर त्यानेंहि आपली कर्तव्यभूमि म्हणजे सामान्य जनसमूह व आपली प्रचाराची भाषा म्हणजे सामान्य जनसमूहाचीच भाषा जी अर्धमागधी तिचाच अवलंब केल्यामुळें या पंथाचाहि प्रसार भरत-खंडाच्या बऱ्याच मोठ्या भागावर झाला. त्या भाषेंतीलहि या पंथाचें बरेंच वाङ्मय आज आपणांस उपलब्ध आहे. याप्रमाणेंच या पंथांतील किंवा इतरहि सामान्य जनतेचे जे व्यवहार होत असत तेहि लौकिक बोलीमध्यें चालू असत; त्यामुळें अशा तऱ्हेच्या जानपदबोलीहि संस्कृत भाषेबरोबरच ठिकठिकाणी प्रचलित होत्या. अर्थात् या बोली व्याकरणादि नियमांनी फारशा बद्ध नसून त्यांचें स्वरूप स्थानिक असल्यामुळें भरतखंडाच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या नांवांनीं व भिन्न भिन्न स्वरूपांत प्रचलित होत्या. अशा तऱ्हेच्या अनेक बोलींचा उल्लेख निरनिराळ्या ग्रंथांत केलेला आपणांस आढळतो. या इतर बोलींना सांप्रदायिक वैशिष्ट्य नसल्यानें व ग्रंथरचनेची सर्वमान्य भाषा संस्कृत असल्यानें या लौकिक बोलींत फारशी ग्रंथरचना आपणांस आढळून येत नाहीं. यांसच सामान्यतः प्राकृत असें नांव दिलेलें आढळतें. परंतु त्यांस निरनिराळीं स्वतंत्र प्रादेशिक नांवेंहि होतीं. व यांतील कांहीं बोलींमध्यें थोडी फार ग्रंथरचनाहि झालेली दिसून येते. ( उदा० पैशाचींत बृहत्कथा ) व कांहीं भाषांतील त्रुटित उल्लेख कांहीं संस्कृत ग्रंथांत आढळतात. तसेंच संस्कृत नाटकांतून अमुक अमुक पात्राच्या तोंडीं अमुक अमुक प्राकृत भाषा घालाव्यात असे नियम पुढें ठरविले गेले.

**वेदकालीन बोलींचे विशेषः**—प्राकृत भाषा म्हणून ज्या निरनिराळ्या बोलींस संबोधण्यात येतें त्या वास्तविक लोकांमध्यें प्रचलित असलेल्या निरनिराळ्या देशभाषा होत्या. यांपैकींच एखाद्या बोलीस ( किंवा महत्त्वाच्या दोन तीन बोलींच्या मिश्र भाषेस ) तिच्यामध्यें वाङ्मयनिर्मिति झाल्यामुळें अधिक शिष्ट व सुसंबद्ध रूप प्राप्त होऊन 'संस्कृत' असें नांव मिळालें. तिच्या शिष्ट व सुसंबद्ध स्वरूपामुळें पुढील ग्रंथरचनाहि त्याच भाषेंत होऊं लागून ती भाषा समृद्ध व संपन्न झाली. परंतु लोकव्यवहार सामान्य बोलींतच चालू होता.

या प्राकृत भाषा अथवा बोली वेदपूर्वकालीं आणि वेदकालींहि प्रचलित असल्या पाहिजेत. किंबहुना वेदकालापासून ज्या सामान्य लोकांत बोली होत्या त्याच पुढें प्राकृत भाषा म्हणून संबोधल्या जाऊं लागल्या. या गोष्टीस आपणांस वेदांतच गमक आढळतें. उदाहरणार्थ जे विशेष आज आपणांस प्राकृत भाषांमध्यें आढळतात, त्याच विशेषांचीं उदाहरणें आपणांस वैदिक वाङ्मयांतहि मधून मधून दृष्टीस पडतात. यावरून वेदकालीन वैदिक भाषा बोलणाऱ्यांच्या भाषेवरहि तत्कालीन सामान्य अथवा जानपद भाषांचा परिणाम होत होता व कांहीं जानपद भाषांचे विशेष वैदिक लोक आपल्या भाषेंत वापरीत होते हें स्पष्ट होतें. असे विशेष पुढें दिले आहेत.

**वैदिक भाषेंत आढळणारे प्राकृत भाषांतील कांहीं विशेषः**—(१) प्राकृतामध्यें अनेक ठिकाणीं ऋकाराबद्दल उकार करितात; वैदिक भाषेंतहि तसाच प्रकार आढळतो. जसें.—वृन्द=वुन्द; ऋतु=उउ; पृथिवी = पुढवी. वैदिक साहित्यांत 'कृत' बद्दल कुट आढळतें.—(ऋग्वेद १. ४६. ४.)

(२) प्राकृतांत जोडाक्षरांतील एका वर्णाचा लोप होऊन त्या वर्णाचा पूर्वस्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ होतो. जसें—दुर्लभ = दूलह, विश्राम = वीसाम, स्पर्श = फास. वैदिक भाषेंतही असेंच होतें. जसें—दुर्लभ = दूळभ—( ऋग्वेद, ३. २. २. ), दुर्णाश = दूणाश ( ऋ. ७- १८, २९. )—शुक्लयजुः = प्रातिशाख्य; ३. ४३. श्रिथिरा—शिथिरा ( ऋ. ७—४क, २.)

( ३ ) व्यंजनान्त संस्कृत शब्दांतील अन्त्य व्यंजनाचा प्राकृतांत लोप होतो. जसें :— तावत् = ताव, यशस् = जस. वैदिक साहित्यांतहि असली उदाहरणें आढळतात. जसें:—पश्चात्=पश्चा ( ऋ. १.१२३.५;२.२७,११ वगैरे—अथर्वसंहिता १०-४-११.), उच्चात् = उच्चा ( ऋ. १. २४,१०; २८, ७; वगैरे तैत्तिरीयसंहिता—२. ३. १४.), नीचात् = नीचा—(ऋ. २.१३,१२;१४,४; ४.४,४; ३८,५; वगैरे. तैत्तिरिय संहिता २.२.१४.).

( ४ ) प्राकृतांत संयुक्त र् आणि य् यांचा लोप होतो. जसें—प्रगल्भ = पगब्भ. श्यामा = सामा. वैदिक साहित्यांतहि हें आढळून येतें. जसें:—अ-प्रगल्भ = अ-पगल्भ—(तैत्तिरीयसंहिता ४. ९. ६१.) त्र्यच = नित्रिच, (शतपथब्राह्मण, १. ३. ३. ३३.)

( ५ ) प्राकृतांत जोडाक्षरांच्या आधीचा स्वर ऱ्हस्व होतो. जसें :— पात्र = पत्र, रात्रि = रत्ति, साध्य = सज्झ. वैदिक भाषेंतहि असे प्रयोग आढळतात. जसें:— रोदसीप्रा = रोदसिप्रा—(ऋग्वेद १०. ८८, १०.) अमात्र = अमत्र—( ऋग्वेद ३. ३६, ४. )

( ६ ) प्राकृतांत संस्कृत 'द'चा 'ड' झालेला अनेक ठिकाणी आढळतो. जसें:—दण्ड = डण्ड, दंस = डंस, दोला = डोला. वैदिक साहित्यांत दुर्दभ = दूडभ,—वाजसनेयिसंहिता ३. ३६. पुरोडाश = पुरोदाश. शुक्लयजुः प्रातिशाख्य ३. ४४ अशीं रूपें झालेलीं आढळतात.

( ७ ) प्राकृतांत 'ध'चा 'ह' होतो. जसें:—बधिर = बहिर, व्याध = वाह; वेदभाषेंतहि अशी उदाहरणें सांपडतात. जसें:—प्रतिसंधाय = प्रतिसंहाय,—गोपथब्राह्मण २. ४.

( ८ ) प्राकृतांत संयुक्त व्यंजनांच्या मध्यें स्वराचा आगम होतो. जसें:—क्लिष्ट=किलिठ; स्व = सुव, तन्वी = तणुवी; वैदिकभाषेंतहि सहस्र्यः = सहस्रियः, स्वर्गः = सुवर्गः,—तै-संहिता ४. २. ३.; तन्वः = तनुवः, स्वः = सुवः,—तैत्तिरीय आरण्यक ७. २२. १; ६. २. ७. अशीं रूपें झालेलीं आढळतात.

( ९ ) प्राकृतांत अकारान्त पुल्लिंगी नामाच्या प्रथमेच्या एकवचनाच्या अन्तीं 'ओ' असतो. जसें:—देवो, जिणो, सो इ. वैदिक भाषेंतहि कोठें कोठें असें आढळतें. जसें:—संवत्सरो अजायत—ऋग्वेदसंहिता १०. १९०. २. सो चित्,—ऋग्वेद सं. १. १९१. १०—११.

( १० ) प्राकृतांत ' देव ' इ. अकारान्त शब्दांच्या तृतीयेच्या बहुवचनाचीं रूपें देवेहि, गभीरेहि, जेटठेहि; अशी होतात; वैदिक भाषेंत यांना अनुरूप अशीं देवेभिः, गम्भीरेभिः, ज्येष्ठेभिः इ. रूपें आढळतात.

( ११ ) प्राकृतप्रमाणें वैदिक भाषेंतहि चतुर्थीच्या स्थानी षष्ठी विभक्ति योजतात. चतुर्थ्यर्थे बहुलं छन्दसि —पाणिनी–व्याकरण २. ३. ६२.

( १२ ) प्राकृतांत देवा, वच्छा, जिणा इ. सारखीं पंचमीच्या एकवचनाची रूपें आढळतात, तर वैदिक वाङ्मयांतहि यासारखी नीचा, पश्चा, उच्चा इत्यादि रूपें दिसून येतात.

( १३ ) प्राकृतांत द्विवचनाच्या ठिकाणी बहुवचनहि योजितात. वैदिक भाषेंतहि ' इंद्रावरुणौ ' बद्दल ' इंद्रावरुणा ', ' मित्रावरुणौ 'च्या ऐवजी ' मित्रावरुणा ', ' यौ सुरथौ रथितमौ दिविस्पृशावश्विनौ ' बद्दल 'या सुरथा रथीतमा दिविस्पृशा अश्विना' व 'नरौ' बद्दल 'नरा' अशी द्विवचनी रूपांऐवजी अनेकवचनी रूपांसारखी रूपें आढळतात.

**संस्कृत ही भाषा व्यवहारांत योजिली जात होती काय ?**:—याच ठिकाणीं संस्कृत भाषा ही कधी काळी प्रचारांत असून बोलली जात होती काय ? या प्रश्नाचाहि अनुषंगानें विचार करूं. संस्कृत भाषा ही कधी तरी सामान्य व्यवहारांतील बोलण्याची भाषा होती काय याबद्दल अनेक विद्वानांकडून शंका प्रदर्शित केली जाते. व तिच्या ' संस्कृत ' नांवावरून ती सामान्य भाषेवर संस्कार होऊन बनलेली म्हणून केवळ लेखनाकरितां तयार केलेली कृत्रिम भाषा होय असें प्रतिपादन करण्यांत येतें. तसेंच तिला देववाणी म्हणूनहि संबोधण्यांत येतें. तथापि वेदकालीन किंवा तत्पूर्व व संहितांतील संस्कृत भाषा, ब्राम्हण ग्रंथ व उपनिषदें यांतील भाषा, आर्ष काव्यांतील भाषा आणि अभिजात संस्कृत भाषा ह्यांच्या स्वरूपांकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास त्यांमध्यें आपणांस किती तरी फरक पडलेला आढळून येईल. हा फरक ही भाषा केवळ वाङ्मयीन लेखनाची असून बोलण्याच्या व्यवहारांत नसती तर पडत गेला नसता. कारण केवळ वाङ्मयीन भाषा स्थिर स्वरूपाची असते. तीत क्वचितच बदल होण्याचा संभव असतो. वेदकालींहि ' नैगम ' व ' भाषिक ' अशा प्रकारची दोन संस्कृत भाषेची रूपें प्रचलित होती हें आपणांस यास्काच्या निरुक्तावरून दिसून येतें. तसेंच यास्कानें प्रांतभेदानुसार भाषेचें स्वरूप किंवा तींतील कांहीं शब्दांचीं रूपें वगैरे बदलतात ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन ती नमूद करून टेविली आहे. ' अथापि भाषिकेभ्यो धातुभ्या नैगमाः कृतोभाष्यन्ते । दमूनाः । क्षेत्रसाधा इति । अथापि नैगमेभ्यो भाषिकाः । उष्णम् । घृतमिति । अथापि प्रकृतयः एवैकेषु भाष्यन्ते। विकृतय एकेषु। शवतिर्गतिकर्मा कंबोजेष्वेव भाष्यते । कंबोजाः कंबलभोजाः । कमनीयभोजा वा । कंबलः कमनीयो भवति । विकारमस्यार्येषु भाषन्ते । शव इति । दातिर्लवनार्थे प्राच्येषु । दात्रमुदीच्येषु । (नि. २. १–३)

संस्कृत भाषेचीं प्रांतपरत्वें निरनिराळीं रूपें प्रचलित असून त्यांपैकीं कांहीं प्रांतांत अधिक शिष्ट असें रूप प्रचलित असे ही गोष्ट ब्राह्मण ग्रंथकारांनीहि नमूद करून टेविली आहे. उदा० शांख्यायन अथवा कौषितकी ब्राह्मणांत उत्तरेकडील प्रदेशांतील भाषा विद्वन्मान्य असून तिकडेच भाषा शिकण्याकरितां जातात असें विधान केलें आहे. 'तस्मादुदीच्यां दिशि प्रज्ञाततरां वागुद्यत उदञ्चउ एव यान्ति वाचं शिक्षितुम् । यो वा तत आगच्छति तस्य वा शुश्रूषन्त इति ।' (शां. ब्रा. ७. ६.) तसेंच असुर हे अशुद्ध बोलण्यामुळें पराभव पावले व असुर हे अशुद्ध भाषाभाषी होते ही तत्कालीन समजूत ' हेलयाहेलया इति पराबभूवुः या उल्लेखावरून आपणांस स्पष्ट होते व हीच गोष्ट पूर्वेकडील लोक अशुद्धभाषी होते म्हणून त्यांस असुर म्हटलें आहे यावरून प्रतीत होते. ' असुर्याः प्राच्यां ' [ श. ब्रा. ३. २. १, २३ ]

त्याप्रमाणेंच संस्कृत भाषेंत जे संधिसंबंधी नियम आहेत त्यांचेंहि कारण संनिहित स्वर हे सामान्यतः संयुक्त उच्चारण्याची सामान्य व्यवहारांतील लकब हेंच असलें पाहिजे. आजहि फ्रेंच भाषेंत पहिल्या शब्दाचीं शेवटचीं अक्षरें व पुढच्या शब्दाचीं आरंभींची अक्षरें जोडून बोलण्याची पद्धत आपणांस आढळते.

तसेंच कांहीं वाक्प्रचार जे सामान्यतः बोलीतच आढळतात त्यांचाहि उपयोग आपणांला संस्कृत भाषेंत केलेला आढळून येतो. उ०. खाद खादेति खादति । कुरु कुर्वेति करोति । खाखा खातो, करकर करतो.

राजशेखरानें काव्यमीमांसा ग्रंथामध्यें साहसांक राजानें उज्जयिनीमध्यें आपल्या अन्तःपुरांत संस्कृत भाषाच वापरली पाहिजे असा नियम केला होता असें म्हटलें आहे. 'श्रूयते चोज्जयिन्यां साहसांकोनामराजा तेनान्तःपुर एव संस्कृत भाषात्मको नियमः प्रवर्तितः।' (गा. ओ. सी. पृ. ५० )

तसेंच नाटक हें सामान्य व्यवहाराचेंच दृश्य प्रतीक असून नाटकांमध्ये नायक, देव, ब्राह्मण, ऋषि, राजे इत्यादि पात्रांच्या तोंडी संस्कृत भाषा घातलेली असते व हीं नाटकें जत्रा, उत्सव इ. प्रसंगी करण्यांत येत असत. अशा वेळीं ती समजणारे प्रेक्षक जर नसतील तर त्यांचा प्रयोग करणें निरर्थक ठरेल. परंतु असे प्रयोग ज्या अर्थी होत असत हें उत्तररामचरित्रादि नाटकांच्या प्रास्ताविक प्रवेशांवरून दिसतें, त्या अर्थी तीं नाटकें समजणारा श्रोतृवर्ग असला पाहिजे. संस्कृत भाषा कीर्तन, व्याख्यान, प्रवचन इत्यादिकांतून मधून मधून वापरण्याचा व्यवहार आजहि आढळतो. केवळ संस्कृत भाषेमध्यें वक्तृत्व करणारी मंडळी हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या प्रांतांतून आजसुद्धां आपणांस बरीच दाखवितां येतील. तसेंच संस्कृत भाषेंत निघणारीं नियतकालिकें मधून मधून आढळतात. यावरून संस्कृत भाषा ही पूर्वी लोकांच्या व्यवहारांत होती. एवढेंच नव्हे तर आजहि ती मृत झाली आहे असें म्हणतां यावयाचें नाही, मात्र व्याकरणादि नियमांनीं निगडित झाल्यानें लोकव्यवहारास अनुसरून तिच्यामध्यें जे वारंवार फरक व्हावयाचे ते होणें बंद झाल्यामुळें तिला स्थिर स्वरूप प्राप्त झालें आहे. आतां या बाबतीत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं संस्कृत भाषा ही भारतीयांची संस्कृतिवहनाची व ज्ञानपरंपरा कायम टिकविण्याची भाषा होती. भारतीयांचा ज्या विस्तीर्ण प्रदेशावर प्रसार झाला होता व त्यांनी जी आपल्या संस्कृतीची छाप अनेक मानवसमूहांवर बसविली होती त्या संस्कृतीचें रक्षण व प्रसार व्हावयाचा तर त्यांस या सर्व प्रदेशावरील संस्कृतिवाहक भाषा एकच असणें अवश्य होतें व तिचें स्वरूप शक्य तितकें स्थिर ठेवणें वरील हेतुस्तव प्राप्तच होतें. वारंवार बदलणारी भाषा फार विस्तीर्ण प्रदेशावर एका स्वरूपांत चालू राहणें शक्य नाही व त्या वेळी वाङ्मयाचा प्रसारहि आजच्या इतका सुलभ होणें शक्य नसल्यामुळें या भाषेवर त्यांचें कार्य होऊं शकलें. तसेंच ज्या विद्वानास इतक्या विस्तीर्ण क्षेत्रावर मान्यता मिळावयाची असेल त्यास याच भाषेंत ग्रंथरचना करणें जरूर होतें. व दीर्घकालपर्यंत देशी भाषेंत वाङ्मय तयार होत असतां उत्कृष्ट दर्जाचें व सर्वराष्ट्रीय वाङ्मय संस्कृतमध्यें लिहिलें जात होतें. उलट देशी वाङ्मय संस्कृतावलंबी होतें. आजहि बरेच विद्वान कीर्तीच्या लोभानें सामान्य जनतेची पर्वा न करतां देशी भाषेएवजी इंग्रजींत रचना करतांना आढळतात. तेव्हां संस्कृत भाषेनें त्या वेळीं सांस्कृतिकदृष्ट्या राष्ट्रभाषेचा प्रश्न सोडविला होता.

**आर्यांच्या भाषेवर इतर भाषांचा परिणामः**—आर्य लोकांच्या भाषेवर केवळ आर्यांतील सामान्य जनतेच्या भाषेचाच परिणाम झाला असें नव्हे तर आर्य लोकांचें जें उत्तर ध्रुवाकडील प्रदेशाकडून परिभ्रमण झालें व त्यांच्या मूलगृहापासून ज्या अनेक शाखा निरनिराळ्या प्रदेशांत पसरल्या त्यांच्यामध्यें मूलगृहकालीन भाषा जी प्रारंभीं सामान्यतः एकरूपाची असेल तीमध्यें परिस्थित्यनुरूप व ज्या निरनिराळ्या परकीय लोकांशी त्यांचा संबंध आला त्यांच्या संसर्गामुळें फरक पडत गेले असले पाहिजेत. व मूल भाषेच्या निरनिराळ्या शाखांची वाढ निरनिराळ्या तऱ्हांनीं झाली असली पाहिजे. व ही गोष्ट घडून आल्याचें आपणांस भिन्न भिन्न प्रांतीय आर्यसंभव भाषांची तुलना केली असतां स्पष्टपणें दिसून येते. भारतीय आर्यांची भाषाहि मूलगृहकालीन भाषेपासून विशिष्ट तऱ्हेनें विकास पावत आजच्या स्वरूपाप्रत प्राप्त झाली आहे. तसेंच या आर्य लोकांशीं त्यांच्या मार्गांत ज्या परकीय लोकांचा संबंध आला त्यांच्या संसर्गाचा व भाषांचा परिणामहि आपणांस त्यांच्या भाषेवर झालेला दिसून येतो. ऋग्वेदामध्येंहि जर्फरी, तुर्फरी, बृबु, बृसय, ताबुव इत्यादि शब्द असुर किंवा खाल्डि लोकांच्या भाषेंतून घेतलेले आढळतात. त्यानंतर ज्योतिषशास्त्रांतहि होरा, द्रेष्काण इत्यादि शब्द खाल्डिज्योतिषांतील घेतलेले दिसतात. याप्रमाणें फार प्राचीन काळापासून भिन्न संस्कृतींतील व भाषांतील अंश आर्यलोक ग्रहण करीत होते. नेम, पिक, तामरस हे शब्द वैदिक असले तरी ते मूळचे म्लेच्छ शब्द आहेत असा सिद्धान्त मीमांसकांनी जैमिनीसूत्रांत दिला आहे ( अधिकरण १।२।६ ). भरतखंडांत आल्यावरहि येथील स्थानिक लोकांच्या द्राविड भाषांतील शब्द संस्कृत वाङ्मयांत प्रविष्ट झालेले आपणांस आढळतात. मटची = टोळ हा कानडी शब्द तर उपनिषत्कालीच संस्कृत भाषेंत शिरलेला आढळतो. मटची हतेषु

कुरुषु. ( छांदो. १. १०. १. ) मूर्धन्य वर्ण संस्कृत भाषेनें द्राविड भाषेंतूनच घेतले ही गोष्ट विद्वन्मान्य आहे. याखेरीज अनेक द्राविड किंवा कोल लोकांच्या भाषेंतील शब्द संस्कृत भाषेनें घेतलेले पुढें दिले आहेत.

कपि = वानर, कर्मार = कारागीर, कला, काल, कितव = जुगार खेळणारा, कुट = झोंपडी, कुणास = कुंड = खळगा, गण, नाना = पुष्कळ, नील, नीहार = बर्फ, हिम, मेघ, बिल, बीज, मयूर, रात्रि, रूप, सायम्, वल्गु = देखणा, हे शब्द वैदिक भाषेंत आढळतात. तसेंच ब्राह्मण ग्रंथांत अटवी, अलर्क = एक प्रकारचें फूल, आडम्बर कम्बल, कुलाल, खड्ग = चित्ता, तण्डुल, तिल, फण = पेरा, मटची = टोळ, मर्कट, वलक्ष, बलक्ष = पांढरा, वल्ली, व्रीहि, शव हे शब्द आढळतात.

आतां जेथें दोन भाषांचा संबंध आला तेथें कोणते शब्द दुसऱ्या भाषेंतून घेतले हें ठरविणें कठीण असतें. विशेषतः संस्कृतसारख्या संपन्न भाषेनें दुसऱ्या भाषेंतून शब्द घेतले असावे ही गोष्ट लोकांस पटणें कठीण जातें. तेव्हां संस्कृत भाषेंतील परकीय, विशेषतः द्राविड शब्द कसे ओळखावे यासंबंधी काल्डवेल यानें पुढील नियम दिले आहेत त्यांवरून आपणांस असले शब्द सहज ओळखून काढतां येतील.

जेव्हां संस्कृत व द्राविडभाषा यांना साधारण असणारा एखादा शब्द (१) संस्कृतमध्यें कोणत्याहि प्रकारें व्युत्पादितां येत नसल्यानें अगदी अलग अथवा निराळाच दिसतो व द्राविड भाषेंत मात्र तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें व्युत्पादितां येत असून त्याच्याशीं दुसरेहि शब्द व्युत्पत्तिदृष्ट्या संबद्ध आहेत;

( २ ) किंवा असल्या एखाद्या शब्दाचा अर्थ, कल्पना इ.कांचे निदर्शक दुसरेहि शब्द संस्कृत भाषेंत आहेत; पण द्राविड भाषेंत तोच एक शब्द त्या अर्थानें रूढ आहे ( उ० नीर );

( ३ ) किंवा संस्कृतशीं वांशिक नातें बाळगणाऱ्या इंडोयुरोपियन भाषांत किंवा भाषेंत तो शब्द आढळत नसून प्रत्येक द्राविड पोटभाषेंत मात्र तो आढळतो;

( ४ ) किंवा त्या शब्दाची संस्कृत कोशकारांनीं केलेली व्युत्पत्ति स्पष्टपणें काल्पनिक आहे असें दिसतें व द्राविड भाषेंत मात्र तो शब्द किंवा तसले अनेक शब्द त्या किंवा तसल्या अर्थाच्या धातूवरून किंवा मूलशब्दांवरून व्युत्पादितां येतात;

( ५ ) किंवा द्राविड भाषेंत त्या शब्दाचा मौलिक अर्थ रूढ असून संस्कृत भाषेंत मात्र त्याचा लाक्षणिक किंवा अलंकारिक वा अप्रत्यक्ष अर्थ रूढ असेल;

(६) किंवा तामिल किंवा तेलगु पंडित संस्कृत भाषेच्या सर्वभाषाजननीत्वाबद्दलची आपली श्रद्धा बाजूला ठेवून तो शब्द मूळ द्राविड शब्दापासून निघालेला आहे असें ठासून प्रतिपादन करितात त्या वेळी किंवा ही सर्व कारणें किंवा यांपैकीं कांही कारणें जेथें स्पष्टपणें असतात त्या वेळी एकादा विशिष्ट शब्द द्राविड भाषेंतून संस्कृतमध्यें गेला आहे असें मानण्यास हरकत नाही. कांहीं बाबतीत द्राविडभाषांचें संस्कृतवरील ऋण आतां साधारणपणें विद्वन्मान्य झालें आहे. प्रो. बेन्फे आपल्या संस्कृत भाषेच्या व्याकरणांत म्हणतो, "संस्कृत ही अति प्राचीन भाषा असून तिचा विस्तार फार आहे. तिचें बोलभाषेचें स्वरूप नष्ट झाल्यानंतरहि बराच काळ तिचा धर्म व संस्कृति यांच्या प्रसाराचें एक साधन म्हणून उपयोग होऊं लागला व अशा स्थितीतहि तिचा, तिच्यापासून निघालेल्या भिन्नभिन्नप्रांतीय बोलींवर व मूलतः तिच्यापासून भिन्न असलेल्या बोलींवरहि बराच पगडा होता. त्यामुळें प्राकृत भाषांत प्रथम प्रविष्ट झालेलीं रूपें तींत शिरलीं एवढेंच नसून तिला ( संस्कृतला ) मूलतः अगदी परके असलेले शब्दहि तींत शिरले. संस्कृतला अगदीं परकीय असलेल्या या बोलींचें यथातथ्य ज्ञान झाल्यासच संस्कृतमधील परकीय शब्द निवडून काढतां येणें शक्य आहे."

विख्यात द्राविड भाषापंडित डॉ. गुंडर्ट म्हणतो कीं, "संस्कृतमध्यें द्राविड भाषांतील शब्द शिरले इतकेंच नव्हे तर संस्कृतमधील समानोच्चारी शब्दांशीं ते इतके बेमालुमपणें तद्रूप झाले आहेत कीं, संस्कृत भाषेच्या पावित्र्या-बद्दलच्या भावनेमुळें ब्राह्मणपंडित असले शब्द कसेतरी ओढून ताणून आर्य मूलशब्दापासून व्युत्पादण्याचा किंवा मूल-द्राविड धातूच संस्कृत आहेत असें भासविण्याचा अट्टाहास करितात!"

**प्राकृत भाषाः**—वर विवेचन केल्याप्रमाणें संस्कृत भाषेच्या स्थिर, दृढ व क्लिष्ट स्वरूपामुळें तिचा व्यवहार पंडित वर्गातच होऊं लागला व पांडित्यपूर्ण वाङ्मय त्या भाषेंत रचलें जाऊं लागलें; परंतु सामान्य जनांच्या भावन

व्यक्त करणारें वाङ्मय त्यांच्या बोलींत तयार होऊं लागलें व या बोलीस वाङ्मयीन स्वरूप प्राप्त होऊं लागलें व त्यांचें व्याकरण करण्याची वेळ आली. हीं व्याकरणें तयार करणारे सर्व संस्कृत पंडित असल्यामुळें त्यांच्या मनांवर संस्कृत भाषेचा पगडा विशेष होता. त्यामुळें सर्व प्राकृत भाषा संस्कृतसंभव आहेत अशीच त्यांची दृढ समजूत होती व तीस अनुसरून प्राकृत वैय्याकरणांनी प्राकृत शब्दाची व्युत्पत्ति ' प्रकृति ' म्हणजे संस्कृत व तीपासून झालेल्या त्या प्राकृत अशा अर्थाची केलेली आढळते. उदा० ' प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं ततः आगतम् वा प्राकृतम् । '–हेमचंद्र प्राकृत व्याकरण. ' प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं प्राकृतमुच्यते । '–प्राकृतसर्वस्व. ' प्रकृतिः संस्कृतं तत्र भवत्वात्प्राकृतं स्मृतम् । '–प्राकृत चंद्रिका. ' प्रकृते: संस्कृतायास्तु विकृतिः प्राकृता मता ।'–षड्भाषाचंद्रिका ' प्राकृतस्य तु सर्वमेव संस्कृतं योनिः । '–प्राकृतसंजीवनी. ' प्रकृतेः संस्कृतादागतम प्राकृतम् । '–रूपक परिभाषा. ' तद्भवा संस्कृतभवा सिद्धा साध्येतिसा द्विधा ' । वाग्भटालंकारटीका. ' संस्कृतं नाम दैवी वागन्वाख्याता महर्षिभिः । तद्भवस्तत्समो देशीत्यनेकः प्राकृतक्रमः ।' काव्यादर्श १-३३. ' संस्कृतं स्वर्गिणां भाषा शब्दशास्त्रेषु निश्चिता । प्राकृतं तज्ज तत्तुल्य देश्याधिकमनेकधा ।'–काव्यालंकार २. २.

परंतु प्राकृत ग्रंथकार व प्राकृत काव्यादि ग्रंथांचे वृत्तिकार यांनी प्राकृत ही सामान्य लोकांची भाषा होती या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें नाही. व त्यांनी प्राकृत याच मूळच्या भाषा असून त्यांवर संस्कार होऊन संस्कृत भाषा बनली ही गोष्ट विशेषत: दिग्दर्शित केली आहे, हें आपणांस त्यांनी केलेल्या प्राकृत भाषेच्या पुढील तऱ्हेच्या व्युत्पत्तींवरून दिसून येतें. ( १ ) प्राक्कृतं प्राकृतम् । ( २ ) प्रकृत्या ( स्वभावेन ) सिद्धं प्राकृतम् । ( ३ ) प्रकृतीनां ( साधारणजनानाम् ) इदं प्राकृतम्. याप्रमाणें प्राकृत ही स्वभावज लोकसमाजामध्यें निसर्गतः उत्पन्न होऊन वाढलेली भाषा होती असा त्यांचा आग्रह होता व भाषाशास्त्रदृष्ट्या हीच गोष्ट खरी दिसते. खेरीज त्यांनी प्राकृत भाषांची थोरवी पुढीलप्रमाणें वर्णन केली आहे:—' बालस्त्रीमंदमूर्खाणां नृणां चारित्र्यकांक्षिणाम् । अनुग्रहार्थं तत्त्वज्ञैः सिद्धान्तः प्राकृतः कृत: ।। ' हा आचार्य हेमचंद्रानें काव्यानुशासनाच्या टीकेंत उद्धृत केलेला एक प्राचीन श्लोक आहे. तसेंच ' बालस्त्रीमूढमूर्खादिजनानुग्रहणाय स : । प्राकृतान् तामिहाकार्षीत्—।। ' प्रभावकचरित्र. 'अकृत्रिमस्वादुपदैर्जैनं जनं जिनेन्द्र साक्षादिव पासिभाषितैः' ।–द्वात्रिंशद् द्वात्रिंशिका. १. १९. 'अकृत्रिमस्वादुपदां जैनीवाचमुपास्महे । '–हेमचंद्रकृत काव्यानुशासन. कविराजशेखरानें बालरामायणांत प्राकृतभाषेस ' गिर: श्रव्या दिव्याः प्रकृतिमधुराः प्राकृतधुरः ' असें म्हणून तीस संस्कृताची जननी म्हटलें आहे. व लाटदेशांत प्राकृताचा विशेष प्रचार होता असें वर्णन केलें आहे. ' यद्योनिः किल संस्कृतस्य सुदृशां जिव्हासु यन्मोदते । यत्र श्रोत्र पथावतारिणि कटुर्भाषाक्षराणां रसः ।। गद्यं चूर्णपदं पदं रतिपतेस्तत् प्राकृतं यद्वचः । तॉंल्लाटॉंल्ललिताङ्गि पश्य नुदती दृष्टेर्निमेषव्रतम ।। ' —राजशेखरकृत बालरामायण. ( १. ११ ) ' पठन्ति लटभं लाटाः प्राकृतं संस्कृतद्विषः । जिह्वया ललितोल्लापलब्ध-सौंदर्यमुद्रया' ( ११ ) तसेंच 'गौडाद्याः संस्कृतस्थाः परि चितरुचयः प्राकृते लाटदेश्याः ।' काव्यमीमांसा ३१. २०. ' सकलाओ इमं वाया विसंति एत्तो य णेंति वायाओ । एन्ति समुद्दं चिय णेंति सायराओ, च्चिय जलाइं ।। —वाक्पतिराजकृत गऊडवहो. रुद्रटकृत काव्यालंकारांतील एका श्लोकावर टीका करतांना जैन विद्वान नमिसाधूनें पुढीलप्रमाणें म्हटलें आहे. " प्राकृतेति । सकलजगज्जंतूनां व्याकरणादिभिरनाहितसंस्कारः सहजो वचनव्यापारः प्रकृतिः तत्रभवं सैव वा प्राकृतम् । ' ' आरिसवयणे सिद्धं देवाणं अद्धमाग्गहा वाणी ' इत्यादि वचनात् वा प्राक् पूर्वकृतं प्राकृतं बालमहिलादिसुबोधं सकलभाषानिबंधनभूतं वचनमुच्यते । मेघनिर्मुक्तजलमिवैकस्वरूपं तदेव च देशविशेषात् संस्कारकारणाच्च समासादितविशेषं सत् संस्कृताद्युत्तरविभेदानाप्नोति । अत एव शास्त्रकृता प्राकृतमादौ निर्दिष्टं तदनु संस्कृतादीनि । पाणिन्यादि व्याकरणोदितशब्दलक्षणैन संस्करणात् संस्कृतमुच्यते । "

प्राकृत भाषांचें व त्यांतील अकृत्रिम स्वादुता, मदुता, सरलता, बालादिबोधकारिता, महिलामनोवल्लभता, सर्वजनप्रियता वगैरे अनेक गुणांचें प्राकृत कवींनीं वर्णन केलें आहे. कर्पूरमंजरी सट्टकामध्यें कवि राजशेखर म्हणतो कीं, संस्कृत काव्य कठोर असून प्राकृत सुकुमार आहे व त्यांच्या कोमलतेंत पुरुष व स्त्री इतकें अंतर आहे. ( परुसो-सक्कअबंधो पाउअबंधो वि होइ सुउमारो । पुरिसाणं महिलाणं जेत्तियमिहंतरं तेत्तियमिमाणं । ). प्राकृतप्रकाशावरील प्राकृतमंजरी नांवाच्या टीकेंत म्हटलें आहे कीं ' अहो तं प्राकृतं हारि प्रियावक्त्रेंदुसुन्दरम् । सूक्तयो यत्र राजन्ते

सुधानिःष्यन्दनिर्भराः ।' तसेंच त्रिविक्रमदेवानें शब्दानुशासनामध्यें 'अनल्पार्थसुखोच्चारः शब्दसाहित्यजीवितम्। स च प्राकृतमेवेति मतं सूक्तानुवर्तिनाम्' असें म्हटलें आहे. शम्भुरहस्यांत 'प्राकृतं चार्षमेवेहं यद्धि वाल्मीकिशिक्षितम्' असा निर्वाळा दिला आहे. वज्जालग्ग नांवाच्या प्राकृतसुभाषित संग्रहांतहि प्राकृत भाषेचें गुणवर्णन अनेकप्रकारें केलें आहे.

राजशेखरानें ज्याप्रमाणें संस्कृतभाषा ही साहसांकानें अन्तपुरांत रूढ केल्याचें वर्णन आपल्या काव्यमीमांसेंत केलें आहे त्याप्रमाणेंच प्राकृत भाषेचा व्यवहार करणाऱ्या राजांचीहि उदाहरणें त्यानें त्याच ग्रंथांत दिली आहेत. 'श्रूयतेच कुन्तलेषु सातवाहनो नाम राजा । तेन प्राकृतभाषात्मकमन्तःपुर एवेति नियमः प्रवर्तितः' तसेंच भोज राजानें सरस्वती कंठाभरणांत आढ्य राजाच्या राज्यांत सर्व प्राकृत भाषेंत व्यवहार चालत होता असें वर्णन केलें आहे. 'कऽभूवननाढ्यराजस्य राज्ये प्राकृतभाषिणः ।' ( सर. कं. २. १५ )

आपणांस सध्यां महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची, पाली आणि अर्धमागधी इतक्या भाषा त्यांतील वाङ्मयाच्या रूपानें किंवा संस्कृत नाटकादि ग्रंथांतील पात्रांच्या तोंडीं असलेल्या भाषणांत दृष्टीस पडतात. प्राकृत भाषांचा प्रथम उल्लेख आपणांला भरतमुनीच्या नाट्यशास्त्रांत पुढीलप्रमाणें आढळतो. 'मागध्यवन्तिजा प्राच्या शूरसेन्यर्धमागधी । बाल्हीका दाक्षिणात्या च सप्त भाषाः प्रकीर्तिताः ॥' परंतु वररुचीनें महाराष्ट्री, पैशाची, शौरसेनी आणि मागधी या चारच प्राकृत भाषांचें व्याकरण आपल्या प्राकृतप्रकाशांत दिलें आहे. हेमचंद्रानें वरील चार भाषांशिवाय आर्ष, चूलिकापैशाची व अपभ्रंश यांचा उल्लेख केला आहे. दण्डीनें आपल्या काव्यादर्शांत महाराष्ट्री, शौरसेनी, गौडी व लाटी म्हणून प्राकृत भाषा सांगितल्या आहेत. प्राकृतसर्वस्वामध्यें मार्कंडेय प्राकृत भाषांचें प्रथम तद्भव, तत्सम व देश्य असें वर्गीकरण करतो व तद्भव भाषांचें पुन्हां भाषा, विभाषा, अपभ्रंश व पैशाच असें वर्गीकरण करून भाषांमध्यें महाराष्ट्री, शौरसेनी, प्राची, आवन्ती व मागधी; विभाषांमध्यें शाकारी, चाण्डाली, शाबरी, आभीरिका, व टाक्की; अपभ्रंशामध्यें नागर, व्राचड व उपनागर; आणि पैशाचमध्यें कैकय, शौरसेन व पाञ्चाल यांचा अन्तर्भाव करतो. याप्रमाणें तो भाषांचें सोळा वर्गांत वर्गीकरण करतो. व आणखी देशानुसार अनेक भाषा आहेत असें सांगतो. 'अतः षोडशधाभिन्नभाषा लक्ष्य प्रचक्ष्महे । वेद्या विदग्धैरपरास्तत्तद्देशानुसारतः॥' प्रा. स., पृ. ३. रुद्रटाच्या मतें निरनिराळ्या देशांमध्यें निरनिराळ्या अपभ्रंश भाषा प्रचलित होत्या. 'षष्ठोत्र भूरिभेदो देशविशेषादपभ्रंशः' यांपैकीं कांहीं नागर, उपनागर, द्राविड, टक्क, मालवी, पञ्चाली, कालिन्दी, गुर्जरी, वैतालिकी, काञ्ची, आभिरी, शाबरी वगैरे होत. प्राकृतचंद्रिकेमध्यें सत्तावीस प्रकारचे अपभ्रंश सांगितले आहेत. यांचीं लक्षणेंहि प्राकृतचंद्रिकाकारानें दिलीं आहेत. परंतु ती फारशी स्पष्ट नसून मार्कण्डेयानें त्यांतील फक्त नागर, व्राचड आणि उपनागर या तिहींमध्यें या सर्वांचा समावेश केला आहे. याप्रमाणें निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळ्या अपभ्रंश भाषा ज्या प्रचलित झाल्या त्यांपासूनच पुढें आज प्रचलित असलेल्या देशी भाषा उत्पन्न झाल्या.

आतां प्रथम या निरनिराळ्या प्राकृत व अपभ्रंश भाषांचा परस्पर संबंध व संस्कृत भाषेशी संबंध कितपत होता हे पाहूं. व त्याप्रमाणेंच प्रत्येक प्राकृत भाषेचे विशेष लक्ष्यांत घेऊं.

प्राकृत भाषा म्हणजे भरतखंडांतील निरनिराळ्या प्रांतांतील प्राचीन बोलीवर आधारलेल्या वाङ्मयीन भाषा होत. यांचें वर्णन प्राचीन वैयाकरणांनीं केलें व त्यावरून त्यांचें ज्ञान नंतरच्या ग्रंथकारांस झालें. याप्रमाणें या भाषा त्यांचीं व्याकरणें लिहिलीं गेलीं त्या वेळीं बोली म्हणून प्रचारांत राहिलेल्या नव्हत्या. या भाषांच्या व्याकरणांतील नियम म्हणजे केवळ प्रत्यक्ष बोलींत आढळणाऱ्या विशेष प्रवृत्तींच्या नोंदींच्या स्वरूपाचे होत. त्याशिवाय एकाच प्राकृत भाषेवर निरनिराळ्या बोलींचा परिणाम होत असे याचें कारण प्राकृत भाषांपैकीं महाराष्ट्री व अर्धमागधी या विशेष ज्ञात असून शौरसेनी त्यांच्यापेक्षां कमी व मागधी फारच कमी परिचित आहे. प्राकृत वाङ्मयांतील काव्य व भावगीतें यांचा प्रांत महाराष्ट्रीनें व्यापला आहे. यामुळें तींत तिच्या मूळच्या बोलीपेक्षां तत्कालीन इतर निरनिराळ्या बोलींतील शब्द किंवा विभक्तिरूपें अंतर्भूत होणें स्वाभाविक होय. यामुळें इतर प्राकृत भाषेच्या स्वरूपापेक्षां महाराष्ट्रीचें स्वरूप अधिक मिश्र बनलें आहे. इतर प्राकृत भाषांपेक्षां शौरसेनीचा अभिजात संस्कृत भाषेशीं निकटचा संबंध आहे. या भाषेंत संस्कृत शब्दांचाच भरणा विशेष असून इतर भाषांप्रमाणें बरेच प्रांतिक शब्द शिरून तीस दुर्बोधता

आली नाहीं. या भाषेतील विभक्तिप्रत्ययहि संस्कृत भाषेशीं बरेच जुळतात तर इतर भाषांत वैदिक भाषेप्रमाणें अनेक प्रकार आढळतात. वररुचीस हें शौरसेनी व संस्कृतमधील साम्य माहीत होतें व त्यानें ही संस्कृतवर आधारली असल्याचें नमूद केलें आहे ('प्रकृतिः संस्कृतम्' १२·२). या बाबतींत महाराष्ट्री व शौरसेनीमध्यें फार अंतर असून महाराष्ट्रीमध्यें प्रांतिक शब्द व विभक्तिरूपें ( प्रत्ययभेद ) अनेक असून तिचें अर्धमागधीशीं साम्य आहे.

उलट शौरसेनी व मागधी यांमध्यें थोडेसें नातें आहे. वररुचीनें ( ११.२ ) मागधी ही शौरसेनीवर आधारलेली आहे असें म्हटलें आहे व इतर व्याकरणकारहि तसें म्हणतात. तसेंच शब्द व विभक्तिप्रत्ययरूपें या बाबतींत दोहोंमध्यें साम्य आढळतें. उलट कांहीं महत्त्वाच्या बाबतींत दोहोंमध्यें भेद आढळतो. याचें कारण विदेहामध्यें आर्यांचा प्रसार प्रथम व दृढ झाला. गौडी व विदर्भी या भिन्न रीति प्रचारांत यावयासहि तेथील स्थानिक परिस्थिति कारण झाली. मगध व विदेह यांतील प्रचलित बोलींकडे पाहिल्यास त्यांतील प्राचीन बोली महाराष्ट्री व अर्धमागधीशीं विशेष सदृश असाव्या असेंच दिसतें व अर्धमागधी ही मागधी व महाराष्ट्री यांमधील दुवा असून तिचा महाराष्ट्रीशी अधिक निकटचा संबंध असावा असें वाटतें.

उत्तरकालीन ग्रंथकारांनीं या निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या बाबतींत बराच घोटाळा केला असल्यामुळें त्यांमधील परस्पर संबंध निश्चितपणें सांगणें कठीण आहे. उदा० महाराष्ट्रांतील कवि राजशेखर यानें शौरसेनीमध्यें महाराष्ट्रीय शब्द व रूपें घुसडलीं आहेत. तसेंच कांहीं बाह्यतः आढळणारे फरक हे वास्तविक नसून केवळ एकाच विशिष्ट प्रकारच्या परिणतींतील निरनिराळ्या अवस्था दाखवितात.

या प्राकृत भाषांचे सर्व जाणते लोक दोन वर्ग पाडतात. एक महाराष्ट्री व अर्धमागधी यांचा व दुसरा शौरसेनी व मागधी यांचा. हे वर्ग मुख्यतः दोन स्वरांमधील एकाकी व्यंजनाची प्रक्रिया व विभक्तिप्रत्यय यांमधील भेदावर पाडलेले आहेत. अल्पप्राण अघोष व्यंजन लुप्त होतें व त्याच्या जागी 'य' किंवा 'प' 'व' बद्दल 'व' येतो. वरील 'य' फक्त जैन लेखांत आढळतो. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत तें व्यंजन लुप्त होतें.

| संस्कृत | मराठी | संस्कृत | मराठी |
|---|---|---|---|
| कुंभकार | कुंभार | तडाग | तळें |
| जानामि | नेणो | बीज | बीं |
| शतम् | शं ( भर ) | पाद | पाय |
| कदली | केळ | सूची | सूय |

शौरसेनींत व मागधींत दोन स्वरांमधील 'त' चा 'द' होतो व इतरांत तो लुप्त होतो, असा वैयाकरणांचा नियम आहे. याप्रमाणें 'त' चा 'द' व 'थ' चा 'ध' होणें हा शौरसेनी व मागधी–आणि महाराष्ट्री व अर्धमागधीमधील फरक होय.

| संस्कृत | शौरसेनी | मागधी | महाराष्ट्री | अर्धमागधी |
|---|---|---|---|---|
| जानाति | जाणादि | याणादि | जाणाइ | जाणाइ |
| गत | गद | गद | गअ | गय |

परंतु मृदुव्यंजन येणें ही केवळ लोपापूर्वीची अवस्था आहे. नॉर्वेजियन भाषेंत स्वरांमधील 'द' चा सर्वत्र लोप होतो. या भाषेवर डॅनिश भाषेचा परिणाम झाला असून डॅनिशमध्यें स्वरांमधील 'त' चा 'द' होतो. परंतु नॉर्वेजियनमध्यें 'त' तसाच राहतो. पण डॅनिशमधून घेतलेल्या शब्दांत पूर्वीच्या 'त' चा झालेला 'द' ही लुप्त होतो. उदा० लेट–लेद्–ले; Danish–late–lade. Norw: la.

शौरसेनी व मागधीमध्यें 'त' चा 'द' होणें हें अर्धमागधी व जैनमहाराष्ट्रीमध्यें 'क' चा 'ग' होण्यासारखेंच आहे. अशोक–अशोग. वररुचीनें ( २.७ ) कांहीं ठिकाणीं महाराष्ट्रीमध्यें 'त' चा 'द' होतो असें म्हटलें आहे. यावरून 'त' ची भिन्न प्रक्रिया ही या भाषांतील भेद मानतां येत नाहीं.

पाश्चात्य अभ्यासक महाराष्ट्री व शौरसेनी या पश्चिम, आणि मागधी ही पूर्व अशी विभागणी करितात व अर्धमागधी ही या दोहोंमधील दुवा मानतात.

## पूर्व व पश्चिम यांमधील महत्त्वाचे फरक

| | विशेष | पश्चिमेंत | पूर्वेस | शौरसेनी | मागधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | स | स | श | केसेसु | केशेशु |
| २ | र | र | ल | राआ | लाआ |
| ३ | आद्य 'ज' चा य 'य' चा 'ज' | 'य' चा 'ज' | 'ज' चा 'य' | जाणे | याणे |
| ४ | पुंलिंगी अकारान्ताचें प्रथमा एकवचन | ओकारान्त | एकारान्त | पुरिसो, | पुलिशे |

वरील पहिल्या तीन बाबतींत अर्धमागधी पश्चिमेच्या तर चवथ्या बाबतींत पूर्वेच्या वर्गात पडते. परंतु ढक्की भाषेंतील विशेषांवरून ही विभागणी टाकाऊ ठरते.

शौरसेनी व मागधी या उत्तर व महाराष्ट्री आणि अर्धमागधी या दक्षिण अशी एक विभागणी सुचविण्यांत येते. तीहि मागधी व शौरसेनी यांमधील फार मोठ्या फरकामुळें त्याज्य होय.

महाराष्ट्री व शौरसेनी यांमध्यें साम्य आहे ही कल्पनाच तितकी खरी नाहीं. यांतील ध्वनिप्रक्रियेचे नियम भिन्न आहेत. महाराष्ट्रींतील विभक्तिप्रत्यय परिणत आहेत. शौरसेनींत तितके नाहींत. महाराष्ट्रींत प्रांतिक शब्दसंपत्ति फार आहे तर शौरसेनींत फक्त संस्कृत शब्दांचा भरणा आहे. भविष्यकाळाचीं रूपें निराळीं आहेत. इच्छार्थक कर्मणीचीं अन्ययें यांतहि फरक आहे. यावरून या दोन भाषा भिन्न आहेत. महाराष्ट्री व अर्धमागधीमध्यें वरील बाबतींत साम्य आहे म्हणून तिचें शौरसेनीपासून पृथक्त्व मानलें पाहिजे. थोडक्यांत, वैदिक आणि अभिजात संस्कृतमध्यें जो भेद आहे तोच महाराष्ट्री, अर्धमागधी व शौरसेनी यांमध्यें आहे व त्यांतील शब्दसंपत्तीवरून त्या भिन्न आहेत हें स्पष्ट होतें. तसेंच त्यांचीं विभक्तिरूपें व क्रियापदाचीं रूपें भिन्न आहेत. नाटकांतील नीच माणसें शौरसेनी बोलत नाहींत. मागधीबद्दल माहिती फार अल्प आहे, पण तिचें अर्धमागधी व महाराष्ट्रीशीं साम्य आहे. महाराष्ट्री, अर्धमागधी व मागधी या तिहीतहि 'ट' चा ल (ळ) होतो—पिशेल. विभक्तिप्रत्ययांतहि मागधीचें अर्धमागधी व महाराष्ट्रीशी साम्य आहे. पुत्तस्य, पुत्तहा; षष्ठी. मुहे=तोंडांत, कूवम्मि=कुव्यांत. सप्तमी करेज्जा हें रूप मागधी, महाराष्ट्री व अर्धमागधींत होतें; शौरसेनींत नाही. गुजराती व कोंकणी यांतील साम्यावरून त्यांच्या पूर्वजांचा मराठीशीं संबंध व्यक्त होतो. याप्रमाणें शौरसेनी हा एक व मागधी, अर्धमागधी व महाराष्ट्री हा एक असे प्राकृत भाषांचे दोन वर्ग पडतात. यांतील पहिला अभिजात संस्कृतशी शब्दसंपत्ति व विभक्तिप्रत्यय यांच्या बाबतींत निकट आहे तर दुसऱ्यांत अभिजात संस्कृतमध्यें न आढळणारे प्रांतिक शब्द पुष्कळ आहेत. व त्यांतील रूपबाहुल्यामुळें प्राचीन वैदिक भाषेशीं त्याचें साम्य आढळतें. परंतु या दोन वर्गात त्यांच्या सध्यांच्या देशी रूपांइतकाच भेद आहे.

अकारान्त पुल्लिंगी प्रथमेचें एकवचन, कांहीं व्यंजनांचे उच्चार, या बाबतींत महाराष्ट्रीचें शौरसेनीशीं व मुख्यत: अर्धमागधीशीं साम्य आहे. परंतु तिच्या स्वरूपावरून तिचें दाक्षिण व पूर्व यांमधील बोलींच्या वर्गाशीं निकटचें नातें दिसतें.

या प्राकृत भाषांत प्रथमस्थान महाराष्ट्रीस दिलें पाहिजे. कारण प्राकृत वैय्याकरणांनीं महाराष्ट्रीस अग्रस्थान दिलें आहे; एवढेंच नव्हे तर केवळ प्राकृत हा शब्द जेथें जेथें वापरला आहे तेथें तेथें त्या शब्दानें महाराष्ट्री भाषेचा निर्देश प्राचीन ग्रंथकारांनीं केला आहे. दण्डीनें महाराष्ट्रीचें महत्त्व पुढील श्लोकांत वर्णिलेलें प्रसिद्धच आहे.—'महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदु:। सागरः सूक्तिरत्नानां सेतुबंधादि यन्मयम् ॥' व वररुचीनें प्राकृतप्रकाश या व्याकरणग्रंथामध्यें शौरसेनी या महत्त्वाच्या भाषेचें व्याकरण सांगत असतांना त्या भाषेचे कांहीं विशेष देऊन पुढें 'शेषं महाराष्ट्रीवत्' या सूत्रानें बाकी सर्व नियमांकरितां महाराष्ट्रीचा हवाला दिला आहे व हेमचंद्रानें तर आपल्या सिद्ध हेमचंद्रांतील प्राकृत व्याकरणांत महाराष्ट्रीचेंच व्याकरण दिलें आहे. महाराष्ट्री हीच प्राकृतांतील काव्याची भाषा व शौरसेनी ही गद्याची भाषा म्हणून सर्व संस्कृत नाटककारांनीं मान्य केलेली आहे. चण्डाच्या प्राकृतलक्षणामध्यें हिचा नांवानें उल्लेख न करितां आर्षप्राकृत

अथवा अर्धमागधी व जैनमहाराष्ट्री इच्या लक्षणाबरोबरच या भाषेचीं लक्षणें दिलीं आहेत. क्रमदीश्वराचें संक्षिप्तसार, त्रिविक्रमाची प्राकृतव्याकरण-सूत्रवृत्ति, लक्ष्मीधराची षड्भाषाचंद्रिका व मार्कंडेयाचें प्राकृतसर्वस्व वगैरे प्राकृत व्याकरणग्रंथांत या भाषेचेच नियम दिलेले आढळतात व चण्डाखेरीज बाकीच्या सर्व व्याकरणकारांनीं याच भाषेचें मुख्यतः विवरण केलें असून शौरसेनी, मागधी वगैरे भाषांचे या भाषेशीं विसदृश असे नियम तेवढेच दिलेले आहेत. भरताच्या नाट्यशास्त्रांत महाराष्ट्री या नांवाचा उल्लेख नसून 'दाक्षिणात्या' म्हणून निर्दिष्ट केलेली भाषा हीच असावी असें वाटतें; परंतु प्राकृतसर्वस्व व प्राकृतचंद्रिका या ग्रंथांत महाराष्ट्री व दाक्षिणात्या पृथक्रूपानें उल्लेखिल्या आहेत. रुद्रटाचा काव्यालंकार, वाग्भटालंकार, पाइयलच्छीनाममाला वगैरे ग्रंथांतहि हेमचंद्राप्रमाणेंच 'महाराष्ट्री' या अर्थीच प्राकृत हा शब्द वापरला आहे. देशी नाममाला या कोशांतहि महाराष्ट्रींतीलच शब्दांचा संग्रह केलेला आहे. डॉ० होर्न्लेच्या मतें महाराष्ट्री ही महाराष्ट्र देशाची भाषा नसून राजपुताना, मध्यहिंदुस्थान वगैरे प्रांतांतून केवळ फार मोठ्या प्रदेशावर प्रचलित असणारी म्हणून तिला महाराष्ट्री हें नांव मिळालें असावें आणि म्हणूनच तिला मुख्य प्राकृत मानण्यांत आलें. परंतु दण्डीनें ही महाराष्ट्र देशाचीच भाषा आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. ग्रियर्सननेंहि महाराष्ट्रीपासूनच सध्यांची मराठी उत्पन्न झाली असें म्हटलें आहे व अर्वाचीन सर्व पंडितांच्या मतें महाराष्ट्री ही महाराष्ट्र देशाचीच भाषा मानली गेली आहे. हेमचंद्र वगैरे व्याकरणकारांनीं ही संस्कृतसंभव आहे असें म्हटलें आहे; परंतु प्राकृत भाषा ह्या त्या त्या देशांत संस्कृत बरोबरच बोलीरूपानेंच पृथक्पणें अस्तित्वांत होत्या यासंबंधीं विवेचन पूर्वी केलेंच आहे. रा. रा. भागवत यांनीं तर प्राकृत हा शब्दच पाअड म्हणजे प्रकट, स्पष्ट या शब्दाचें संस्कृत या शब्दाशीं जुळण्याकरितां केलेलें संस्कृतीकरण आहे असें म्हटलें आहे. महाराष्ट्राची वसाहत आर्यांनीं कोणत्या काळीं केली यासंबंधीं विवेचन तिसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेंत केलेंच आहे.

**महाराष्ट्रीः**—अशोक काळाच्या पूर्वीपासूनच महाराष्ट्रामध्यें आर्यांची वस्ती असून माहाराष्ट्री भाषा प्रचलित असली पाहिजे याबद्दल संशय नाहीं. प्राकृतप्रकाशाचा कर्ता वररुचि व कात्यायन हे जर एकच असतील तर महाराष्ट्रीमध्यें खिस्तपूर्व दुसऱ्या शतकाच्या पूर्वीच वाङ्मय रचलें गेलें होतें असें म्हणावें लागेल. परंतु महाराष्ट्रींतील संस्कृतोद्भव शब्दांमध्यें जो व्यंजनलोप दृष्टीस पडतो त्यावरून ती इतकी प्राचीन असावी असें वाटत नाहीं. वररुचीचें व्याकरण कदाचित् खिस्तीसनानंतरहि रचलें गेलें असावें. महाराष्ट्रीचा प्रभाव जैन धर्मग्रंथांची भाषा जी अर्धमागधी तिच्यावर व जैन महाराष्ट्री यांवर विशेषत्वानें दृष्टीस पडतो. आज महाराष्ट्रीमधील जें वाङ्मय उपलब्ध आहे तें सर्व खिस्तीसनानंतर रचलें गेलें आहे. चण्डाच्या प्राकृतलक्षण या व्याकरणग्रंथावरून महाराष्ट्रीमध्यें व्यंजनलोपाची ( कई हें रूप, कति, कपि, कवि, कृति या शब्दांबद्दल व 'मा' हें रूप मत्त, मद, मय, मृग, मृत या शब्दांचें होतें) जी प्रथा उत्तरकालीं दिसून येते, तितकी पूर्वी नसावी असें दिसतें. जैन अर्धमागधी व जैन महाराष्ट्रीमध्यें महाराष्ट्रीचें प्राचीन स्वरूप दृष्टीस पडतें.

भरतानें आपल्या नाट्यशास्त्रांत धूर्तपात्रांच्या तोंडीं अवंती व द्यूतकाराच्या तोंडीं बाल्हीकी या भाषा घालाव्या असें सांगितलें आहे. मार्कंडेयानें प्राकृतसर्वस्वामध्यें 'आवन्ती स्यान्महाराष्ट्री शौरसेन्योस्तु संकरात् ।' व 'आवन्त्यामेव बाल्हीकी किन्तुरस्यात्रलो भवेत्' असें म्हणून या दोन्ही भाषांचा महाराष्ट्रींतच अंतर्भाव केला आहे. व या भाषांतील कांहीं व्याकरणविशेषहि महाराष्ट्रीप्रमाणेंच दिलेले आहेत. महाराष्ट्री व संस्कृत या भाषांतील सादृश्य व इतर भाषांशीं तिची तुलना करतां यावी म्हणून महाराष्ट्रीचे कांहीं विशेष पुढें दिले आहेत.

**संस्कृत व महाराष्ट्री या दोहोंमधील भेदः—स्वर** (१) अनेक ठिकाणीं निरनिराळ्या स्वरांच्या ऐवजीं भिन्न भिन्न स्वर होतात. जसें:—समृद्धि = सामिद्धि; ईषत् = ईसि; हर = हीर; ध्वनि = झुणि; शय्या = सेज्जा; पद्म = पोम्म; यथा=जह; सदा = सइ; स्त्यान = थीण; सास्ना = सुण्हा; आसार = ऊसार; ग्राह्य = गेज्झ; आली = ओली; इति = इअ; पथिन् = पह; जिह्वा = जीहा; द्विवचन = दुवअण; पिण्ड = पेण्ड; द्विधाकृत = दोहाइअ; हरीतकी = हरडई; कश्मीर = कम्हार; पानीय = पाणिअ; जीर्ण = जुण्ण; हीन = हूण; पीयूष = पेऊस; मुकुल = मउल; भ्रुकुटि = भिउडि; क्षुत = छीअ; मुसल = मूसल; तुण्ड = तोंड; सूक्ष्म = सण्ह; उद्व्यूढ = उव्वीढ; वातूल = वाउल; नूपुर = णेउर; तूर्णार = तोणीर; वेदना = विअणा; स्तेन = थूण; मनोहर = मणहर; गो = गउ, गाअ; सोच्छ्वास = सूसास.

( २ ) महाराष्ट्रींत ॠ, ऋ, ऌ, ॡ या स्वरांचा सर्वस्वीं लोप झाला आहे.

( ३ ) 'ऋ' बद्दल खालीलप्रमाणें निरनिराळे स्वर होतात. क्वचित् रि होतो, जसें:–तृण = तण, मृदुक = माउक्क; कृपा=किवा; मातृ = माई; माउ, वृत्तांत = वुत्तंत; मृषा = मुसा, मूसा, मोसा; वृंत = विंट, वेंट, वोंट; ऋतु = उउ, रिउ; ऋद्धि=रिद्धि; ऋक्ष = रिच्छ; सदृश = सरिस; दृप्त = दरिअ.

( ४ ) ' ऌ ' च्या ऐवजीं ' इलि ' असें होतें. जसें:–क्लृप्त = किलित्त; क्लृप्न = किलिण्ण.

( ५ ) ' ऐ'चा प्रयोगहि महाराष्ट्रींत प्रायः आढळत नाहीं. ' ऐ ' बद्दल सामान्यतः ' ए ' व विशेष ( कांहीं ) ठिकाणीं ' अइ ' होतात. जसें:—शैल = सेल; ऐरावण = एरावण; वैद्य = वेज्ज; वैधव्य = वेहव्व; सैन्य = सेण्ण, सइण्ण; कैलास = केलास, कइलास; दैव = देव्व, दइव; ऐश्वर्य = अइसरिअ; दैन्य = दइण्ण.

( ६ ) ' औ ' चा हि प्रयोग महाराष्ट्रींत प्रायः होत नाहीं. त्याच्याबद्दल सामान्यपणें ' ओ ' क्वचित् 'उ' किंवा ' अउ ' होतात. जसें:—कौमुदी = कोमुई; यौवन =जोव्वण; दौवारिक = दुवारिअ; पौलोमी = पुलोमी; कौरव = कउरव; गौड = गउड; सौध = सउह.

असंयुक्त व्यंजनः—(१) दोन स्वरांच्या मध्यें असलेल्या क, ग, च, ज, त, द, य, व या व्यजनांचा प्रायः लोप होतो. जसें:–अनुक्रमें, लोक = लोअ; नग = णअ; शची = सई; रजत = रअअ; यती = जई; गदा = गआ; वियोग = विओअ; लावण्य = लाअण्ण.

( २ ) ( दोन ) स्वरांमध्यें असलेल्या ख, घ, थ, ध, आणि भ यांच्या बद्दल ' ह ' होतो. जसें:— शाखा = साहा; श्लाघते = लाहइ; नाथ = णाह; साधु = साहु; सभा = सहा.

( ३ ) स्वरांच्या दरम्यान असलेल्या ' ट ' चा ' ड ' होतो. जसें:—भट = भड; घट = घड.

( ४ ) स्वरांच्या दरम्यान असलेल्या ' ठ ' चा ' ढ ' होतो. जसें:-मठ = मढ; पठति = पढइ.

( ५ ) स्वरांच्या दरम्यान असलेल्या ' ड ' चा ' ल ' होतो. जसें:–गरुड = गरुल; तडाग = तलाअ.

( ६ ) स्वरांच्या दरम्यान असलेल्या ' त ' बद्दल बहुतेक ठिकाणी ' ड ' होतो. जसें:—प्रतिभास = पडिहास; प्रभृति = पहुडि; व्यापृत = वावड; पताका = पडाआ.

( ७ ) ' न ' बद्दल सर्वत्र ' ण ' होतो. जसें:—कनक = कणअ; वचन = वअण; नर = णर; नदी= णई; अन्य = अण्ण; दैन्य = दइण्ण.

( ८ ) दोन स्वरांमध्यें असलेल्या ' प ' चा कधीं कधीं ' व ' व कधीं कधीं लोपहि होतो. जसें:– शपथ = सवह; शाप = साव; उपसर्ग = उवसग्ग; रिपु = रिउ; कपि = कइ.

( ९ ) ( दोन ) स्वरांच्या मध्यें असलेल्या ' फ ' बद्दल कधीं ' भ ' तर केव्हां केव्हां ' ह ' तर, केव्हां केव्हां दोन्हीहि होतात. जसें:–रेफ = रेभ; शिफा = सिभा; मुक्ताफल = मुत्ताहल; सफल = सभल, सहल; शेफालिका = सेभालिआ, सेहालिआ.

(१०) स्वरांच्या मध्यवर्ती ' ब ' बद्दल ' व ' होतो. जसें:–अलाबू = अलावू; शबल = सवल.

(११) ( शब्दाच्या ) आरंभींच्या ' य ' चा ' ज ' होतो. जसें:–यम = जम; यशस् = जस; याति=जाइ.

(१२) कृदन्ताच्या ' अनीय ' अथवा ' य ' प्रत्ययांतील ' य ' चा ' ज्ज ' होतो. जसें:–करणीय = करणिज्ज; पेय = पेज्ज.

(१३) अनेक ठिकाणीं ' र ' बद्दल ' ल ' झालेला आढळतो. जसें:–हरिद्रा = हलिद्दा; दरिद्र = दलिद्द; युधिष्ठिर = जहुट्ठिल; अंगार = इंगाल.

(१४) ' श ' आणि ' ष ' बद्दल सर्वत्र ' स ' होतो. जसें:–शब्द = सद्द; विश्राम = वीसाम; पुरुष = पुरिस; सस्य = सास; शेष = सेस.

(१५) अनेक ठिकाणीं ' ह ' चा ' घ ' होतो. जसें:–दाह = दाघ; सिंह = सिंघ; संहार = संघार.

(१६) कधीं कधीं श, ष आणि स यांच्या ऐवजी ' छ ' होतो. जसें:–शाव = छाव; षष्ठ = छट्ठ; सुधा = छुहा.

(१७) अनेक शब्दांत स्वरसहित व्यंजनाचा लोप होतो. जसें:-राजकुल = राउल; आगत = आअ; कालायस = कालास; हृदय = हिअ; पादपतन = पावडण; यावत् = जा; त्रयोदश = तेरह; स्थविर = थेर; बदर = बोर; कदल = केल; कर्णिकार = कण्णेर; चतुर्दश = चोद्दह; मयूख = मोह.

संयुक्त व्यंजन:—( १ ) 'क्ष' बद्दल प्रायः 'ख' व कधीं कधीं छ अथवा झ होतो. जसें:-क्षय=खय; लक्षण = लक्खण; अक्षि = अच्छि; क्षीण = छीण, झीण.

( २ ) त्व, थ्व, द्व व ध्व यांच्याबद्दल कधीं कधीं अनुक्रमें च, छ, ज, आणि झ होतात. जसें:-ज्ञात्वा = णच्चा; पृथ्वी = पिच्छी; विद्वान = विज्जं; बुद्ध्वा = बुज्झा.

( ३ ) ऱ्हस्व स्वरापुढें येणाऱ्या 'थ्य' 'श्च' 'त्स' व 'प्स' बद्दल 'छ' होतो. जसें:--पथ्य = पच्छ; पश्चात = पच्छा; उत्साह = उच्छाह; अप्सरा = अच्छरा.

( ४ ) द्य, य्य व र्य च्या जागीं ज होतो. जसें:--मद्य = मज्ज; जय्य = जज्ज; कार्य = कज्ज.

( ५ ) ध्य आणि ह्य बद्दल झ होतो. जसें:--ध्यान = झाण; साध्य = सज्झ; गुह्य = गुज्झ; सह्य = सज्झ.

( ६ ) 'र्त' च्या जागीं प्रायः 'ट' होतो. जसें:--नर्तकी = नट्टई; कैवर्त = केवट्ट.

( ७ ) 'ष्ट' बद्दल 'ठ' होतो. जसें:--मुष्टी = मुट्ठी; पुष्ट = पुट्ठ; काष्ठ = कट्ट; इष्ट = इट्ठ.

( ८ ) 'म्न' बद्दल 'ण' होतो. जसें:--निम्न = णिण्ण; प्रद्युम्न = पज्जुण्ण.

( ९ ) 'ज्ञ' बद्दल 'ज' आणि 'ण' होतात. जसें:--ज्ञान = णाण, जाण; प्रज्ञा = पण्णा; पज्जा.

( १० ) 'स्त' बद्दल 'थ' होतो. जसें:--हस्त = हत्थ; स्तोत्र = थोत्त; स्तोक = थोव.

( ११ ) 'ड्म' व 'क्म' बद्दल 'प' होतो. जसें:—कुड्मल = कुंपल; रुक्मिणी = रुप्पिणी.

( १२ ) 'ष्प' आणि 'स्प' चा 'फ' होतो. जसें:-पुष्प = पुप्फ; स्पंदन = फंदण.

( १३ ) 'ह्व' बद्दल 'भ' होतो. जसें:—जिह्वा = जिब्भा; विह्वल = विब्भल.

( १४ ) 'न्म' व 'ग्म' चा 'म' होतो. जसें:-जन्मन् = जम्म; मन्मथ = वम्मह; युग्म = जुम्म; तिग्म = तिम्म.

( १५ ) 'श्म,' 'ष्म,' 'स्म' व 'ह्म' बद्दल 'म्ह' होतो. कश्मीर = कम्हार; ग्रीष्म = गिम्ह; विस्मय = विम्हअ; ब्राह्मण = बम्हण.

( १६ ) श्न, ष्ण, स्न, ह्न, ह्ण आणि क्ष्ण यांच्या ऐवजीं 'ण्ह' होतो. जसें:—प्रश्न = पण्ह; उष्ण = उण्ह; स्नान = ण्हाण; वह्नि = वण्हि; पूर्वाह्ण = पुव्वण्ह; तीक्ष्ण = तिण्ह.

( १७ ) 'ह्ल' बद्दल 'ल्ह' होतो. जसें:-प्रह्लाद = पल्हाअ; कह्लार = कल्हार.

( १८ ) संयोगांतील ( जोडाक्षरांतील ) पूर्ववर्ती ( प्रथम असणारे ) क, ग, ट, ड, त, द, प, श, ष, आणि स यांचा लोप होतो. जसें-भुक्त = भुत्त; मुग्ध = मुद्ध, षट्पद = छप्पअ; खड्ग = खग्ग; उत्पल = उप्पल; मुद्गर = मुग्गर; सुप्त = सुत्त; निश्चल = णिच्चल; निष्ठुर = णिट्ठुर; स्खलित = खलिअ.

( १९ ) संयोगांतील परवर्ती म, न, य यांचा लोप होतो. जसें:-स्मर = सर; लग्न = लग्ग; व्याध = वाह.

( २० ) संयोगांतील पूर्ववर्ती व परवर्ती अशा सर्व ल, व, आणि र चा लोप होतो. जसें: —उल्का = उक्का; विक्लव = विक्कव; शब्द = सद्द; पक्व = पक्क; अर्क = अक्क; चक्र = चक्क.

( २१ ) संयुक्त वर्णांतील अक्षरास जे जे आदेश होतात म्हणून वर सांगितले आहेत त्या आदेशवर्णाचें, आणि संयुक्त वर्णांतील एका वर्णाचा लोप होऊन जो दुसरा वर्ण बाकी राहतो त्याचें जर तो शब्दाच्या आरंभीं नसेल तर द्वित्व होतें. जसें:-ज्ञात्वा = णच्चा; मद्य = मज्ज; भुक्त = भुत्त; उल्का = उक्का.

परंतु तो आदेश अथवा शेष व्यंजन जर वर्गाचें दुसरें अथवा चौथें व्यंजन असेल तर द्वित्व न होतां त्याच्या पूर्वी आणि आदेशाच्या अथवा शेष व्यंजनाच्या नंतर त्या त्या वर्गांतील आदेशवर्णाच्या अथवा शेष व्यंजनाच्या आधींच्या व्यंजनाचा आगम होतो, जसें:-लक्षण = लक्खण; पश्चात् = पच्छा; इष्ट = इट्ठ; मुग्ध = मुद्ध.

**विश्लेषणः**—र्ह, र्श, र्ष यांच्यामध्यें आणि संयोगानंतरच्या ' ल ' पूर्वी स्वराचा आगम होऊन व्यंजनांचें विश्लेषण होतें. जसें:—अर्हत् = अरह, अरिह, अरुह; आदर्श = आयरिस; हर्ष = हरिस; क्लिष्ट = किलिट्ठ.

**व्यत्यय ( वर्णविपर्यय ):**—पुष्कळशा शब्दांत व्यंजनांच्या स्थानांची उलटापालट होते. जसें:—करेणू = कणेरू; आलान = आणाल; महाराष्ट्र = मरहट्ठ; हरिताल = हलिआर; लघुक = हलुअ; ललाट = णडाल; गुह्य = गुय्ह; सह्य = सय्ह.

**संधिः**—( १ ) समासांत कोठें कोठें ऱ्हस्व स्वराबद्दल दीर्घ स्वर आणि दीर्घ स्वराबद्दल ऱ्हस्व स्वर होतो. जसें:— अन्तर्वेदि = अन्तावेइ; पतिगृह = पइहर; यमुनातट = जँउणअड; नदीस्रोतः = णइसोत्त.

( २ ) पदांत पुढें स्वर असल्यास पूर्वस्वराचा लोप होतो. जसें:—त्रिदशेशः = तिअसीस.

( ३ ) संयुक्त व्यंजनाच्या आधींचा स्वर ऱ्हस्व होतो. जसें:—आस्य = अस्स; मुनीन्द्र = मुणिंद; चूर्ण = चुण्ण; नरेंद्र = णरिंद; म्लेच्छ = मिलिच्छ; नीलोत्पल = णीलुप्पल.

**संधिनिषेधः**—( १ ) उद्वृत्त ( व्यंजनाचा लोप होऊन अवशिष्ट राहिलेल्या ) स्वराचा पूर्वस्वराशीं प्राय: संधि होत नाहीं. जसें:—निशाकर = णिसाअर; रजनीकर = रअणीअर.

( २ ) एकाच पदांतील स्वरांचा संधि होत नाहीं. जसें:—पाद = पाअ; गति = गइ; नगर = णअर.

( ३ ) इ, ई, उ आणि ऊ यांच्या पुढें असमान ( विजातीय ) स्वर आल्यास संधि होत नाहीं. जसें:—वग्गेवि अवयासो; दणुइंदो.

( ४ ) ए आणि ओ यांचा पुढील स्वराशीं संधि होत नाहीं. जसें:—फले आबंधो; आलक्खिमो एण्हिं.

( ५ ) आख्यातरूपाच्या शेवटच्या स्वराचा पुढील स्वराशीं संधि होत नाहीं. जसें:—होइइह.

**महाराष्ट्रींतील नाम–विभक्तीचे नियमः**—( १ ) अकारान्त पुल्लिंगी शब्दाचें एकवचन ओकारान्त होतें. जसें:—जिनः = जिणो; वृक्षः = वच्छो.

( २ ) पंचमीच्या एकवचनाचे प्रत्यय त्तो, ओ, उ, हि, हे आहेत. किंवा प्रत्ययाचा लोप होतो. 'त्तो' हून अन्य प्रत्यय लागतांना ' अ 'चा ' आ ' होतो. जसें जिनात् = जिणत्तो, जिणाओ, जिणाउ, जिणाहि, जिणा.

( ३ ) पंचमीच्या बहुवचनाचे प्रत्यय त्तो, ओ, उ, आणि हि आहेत. ' तो 'खेरीज इतर प्रत्यय लागतांना पूर्वीच्या ' अ 'चा 'आ' होतो. ' हि ' प्रत्यय लागतांना ' ए ' हि होतो. जसें:—जिणत्तो, जिणाओ, जिणाउ, जिणाहि, जिणेहि.

( ४ ) पंचमीच्या एकवचनाच्या प्रत्ययाच्या ऐवजीं हिंतो असा स्वतंत्र शब्द पुढें योजितात व बहुवचनाच्या प्रत्ययाऐवजीं हिंतो व सुंतो हे स्वतंत्र शब्द योजिले जातात. जसें—जिनात् = जिणाहिंतो; जिनेभ्यः = जिणाहिंतो, जिणेहिंतो, जिणासुंतो, जिणेसुंतो.

( ५ ) षष्ठीच्या एकवचनाचा प्रत्यय ' स्स ' आहे. जसें:— जिणस्स, मुणिस्स, तरुस्स.

( ६ ) अस्मत् शब्दाच्या प्रथमेच्या एकवचनाचीं रूपें म्मि, अम्मि, अम्हि, हं, अहं व अहयं अशीं होतात.

( ७ ) अस्मत् शब्दाच्या प्रथमेच्या बहुवचनाचीं रूपें अम्ह, अम्हे, अम्हो, मो, वयं आणि मे अशीं होतात.

( ८ ) अस्मत् शब्दाच्या षष्ठीच्या बहुवचनाचीं रूपें णे, णो, मज्झ, अम्ह, अम्हं, अम्हे, अम्हो, अम्हाण, ममाण, महाण, आणि मज्झाण अशीं होतात.

( ९ ) युष्मत् शब्दाच्या षष्ठीच्या एकवचनाचीं रूपें तइ, तु, ते, तुम्हं, तुह, तुहं, तुव, तुम, तुमे, तुमो, तुमाइ, दि, दे, इ, ए, तुब्भ, तुम्ह, तुज्झ, उब्भ, उम्ह, उज्झ व उय्ह अशीं होतात.

**लिंगविपर्ययः**—(१) संस्कृतांत जे शब्द केवळ पुल्लिंगी आहेत त्यांपैकीं कित्येक शब्द महाराष्ट्रींत स्त्रीलिंगी आणि नपुंसकलिंगीहि आढळतात. जसें—प्रश्नः = पण्हो, पण्हा; गुणाः = गुणा, गुणाइं; देवाः = देवा, देवाणि.

( २ ) अनेक वेळां स्त्रीलिंगाच्या ठिकाणीं पुंल्लिंग होतें. जसें:—शरत् = सरओ; प्रावृट् = पाउसो; विद्युता = विज्जुणा.

( ३ ) संस्कृतांतील कित्येक नपुंसकलिंगी शब्द महाराष्ट्रींत पुंल्लिंगी आणि स्त्रीलिंगीहि आढळतात. जसें:—यशः = जसो; जन्म = जम्मो; अक्षि = अच्छी; पृष्ठम् = पिट्ठी; चौर्यम् = चोरिआ.

आख्यात:—( १ ) ति आणि ते या प्रत्ययांतील 'त' चा लोप होतो. जसें:–हसति = हसइ, हसए; रमते = रमइ, रमए.

( २ ) महाराष्ट्रींत परस्मैपद व आत्मनेपद असा भेद नाहीं. सर्व धातु उभयपदी आहेत.

( ३ ) भूतकाळाचे ह्यस्तन, अद्यतन व परोक्ष असे तीन भेद नाहींत. एकाच प्रकारचें रूप होतें. आणि भूतकालाच्या आख्यातरूपाऐवजीं 'त' प्रत्ययान्त कृदन्ताचाच प्रयोग अधिक होतो.

( ४ ) भविष्यकाळाचेहि संस्कृताप्रमाणें दोन प्रकार नसून एकच प्रकार आहे.

( ५ ) भविष्यकाळाच्या प्रत्ययाच्या आरंभीं हि होतो. जसें:—हसिष्यति = हसिहिइ; करिष्यति = करिहिइ.

( ६ ) वर्तमानकाळ, भविष्यकाळ, विध्यर्थ व आज्ञार्थ यांच्या प्रत्ययांऐवजीं ज्ज आणि ज्जा होतात. जसें:– हसति, हसिष्यति, हसेत्, हसतु = हसेज्ज, हसेज्जा.

( ७ ) भावे व कर्मणि प्रयोगाचे 'ईअ' व 'इज्ज' प्रत्यय आहेत. हस्यते = हसीअइ, हसिज्जइ.

कृदन्त:—शीलाद्यर्थक 'तृ' प्रत्ययाबद्दल 'इर' प्रत्यय आहे. जसें:–गन्तृ = गमिर.

( २ ) 'त्वा' प्रत्ययाऐवजीं तुम्, अ, तूण, तुआण, व त्ता हे प्रत्यय होतात. जसें:—पठित्वा, पढिउं, पढिअ, पढिऊण, पढिउआण; पढित्ता.

तद्धित:—'त्व' प्रत्ययाबद्दल 'त्त' व 'त्तण' असे प्रत्यय आहेत. जसें:—देवत्व = देवत्त, देवत्तण.

पाली:—यानंतर वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाची प्राकृत भाषा म्हटली म्हणजे बौद्ध धर्मग्रंथांची, विशेषतः हीनयानपंथी वाङ्मयाची पाली ही होय. पाली शब्द 'पंक्ति' शब्दापासून झाला आहे असें एक मत आहे. तसेंच त्याची व्युत्पत्ति पङ्क्ति = पंक्ति = पंति = पंण्टि = पंटि = पंलि = पल्लि = पालि अथवा पङ्क्ति = पत्ति = पट्टि = पल्लि = पाली (—पालिप्रकाश प्रवेशक, पृ. ६.) अशीहि केलेली आढळते. पंक्ति या शब्दाचा अर्थ ओळ असा आहे. प्राचीन बौद्ध ग्रंथकारांनीं आपल्या धर्मग्रंथांमध्यें ज्या वचनपंक्ती उद्धृत केल्या त्यांस अनुलक्षून पाली असा शब्दप्रयोग करीत असतात. त्यावरून त्यांच्या धर्मशास्त्राच्या भाषेस पाली असें नांव पडलें. कांहीं विद्वानांच्या मतें 'पालि' शब्द 'पल्लि' म्हणजे खेडें या शब्दावरून आला असावा. पाली ही ग्रामिक अथवा जानपद लोकांची भाषा असून ती खेडेगांवांतून प्रचलित असे. पहिल्या व्युत्पत्तीपेक्षां दुसरी व्युत्पत्ति अधिक सुलभ दिसते. व्हिक्टर हेन्री हा पाली शब्दाची व्युत्पत्ति पठ् = वाचणें या धातूपासून पुढीलप्रमाणें देतो. पठ = पठितः = पठिअ = पडिअ = पलिअ = पालिअ, पाली. रा. राजवाडे पाली शब्दाची व्युत्पत्ति 'प्रकट' या शब्दापासून साधतात. प्रकट = पाअड = पाअल = पाल; याचें स्त्रीलिंगी पाली = पाळी; म्हणजे जी स्पष्ट, सहजसुलभ व सामान्य लोकांत प्रचलित असणारी ती पाली होय असें त्यांचें मत आहे. विंडिशच्या मतें पाली भाषा मागधीचें वाङ्मयीन शिष्ट स्वरूप असून तिच्यावर संस्कृत भाषेची छाया बरीच आहे व इतर वाङ्मयीन भाषांप्रमाणें हीहि मिश्र बोलीच आहे.

डॉ. भांडारकर पाली भाषा ही मध्यकालीन संस्कृत भाषेपासून म्हणजे ब्राह्मण ग्रंथांतील भाषेपासून निघाली असें मानतात. पाली ही वेदकालीन भाषेच्या कोणत्याहि पोटभेदापासून निघाली नसून पाणिनीय भाषेची छाया ऊर्फ प्राकृत प्रतिकृति आहे; कारण पालीचा अक्षरशः व रूपशः तर्जुमा जसा पाणिनीय भाषेंत तंतोतंत होतो तसा वैदिक भाषेच्या कोणत्याहि पोटभेदांत होत नाहीं असें रा. वि. का. राजवाडे यांचें मत आहे. परंतु प्राकृत भाषा या सामान्य लोकांच्या बोली असून त्या संस्कृतपासून साक्षात् निघाल्या नसून त्यांवर संस्कृत भाषेचा परिणाम मात्र बराच झाला आहे हें आपण पूर्वींच दाखविलें आहे. आज आपणांस ज्या प्राकृत भाषा उपलब्ध आहेत त्यांमध्यें पाली ही सर्वांत जुनी भाषा आहे.

या भाषेच्या उत्पत्तिस्थानाबद्दलहि विद्वानांमध्यें मतभेद आहे. बौद्ध ग्रंथकार पाली ही मागधी भाषेपासून निघाली असून ती मगध देशांत प्रचलित असली पाहिजे असें मानतात. ओल्डेनबर्गच्या मतें पालीचें उत्पत्तिस्थान विंध्याच्या उत्तरेस नसून विंध्याच्या दक्षिणेस बरेंच दूर असलें पाहिजे. पाली ही विंध्याच्या पश्चिम व मध्य-भागामधील प्रदेशांत उदय पावली असली पाहिजे असें फ्रँकचें मत आहे. ल्यॉइच्या मतें पाली ही एकस्वरूपी भाषा नसून, तिचें उत्पत्तिस्थान उज्जयिनी किंवा हिंदुस्थानच्या पश्चिम भागांत कोठें तरी संभवतें. परंतु या भाषेचें मागधी प्राकृत भाषेशीं सादृश्य नसून पैशाची भाषेशी विशेष साम्य आहे असें डॉ० स्टेन् कोनो व ग्रिअर्सन यांचें म्हणणें आहे. व त्यावरून ज्या प्रदेशांत पैशाची भाषा प्रचलित होती त्याच प्रदेशांत ही उत्पन्न झाली असावी असें त्यांचें मत आहे. परंतु पैशाची भाषेच्या उत्पत्तिस्थानाबद्दलहि या दोन विद्वानांत मतभेद आहे. स्टेन् कोनोच्या मतें पैशाची भाषेचें उत्पत्तिस्थान विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील प्रदेश हें आहे, तर ग्रिअर्सनच्या मतें ती हिंदुस्थानच्या वायव्येकडील प्रदेशांत उत्पन्न झाली असावी व तेथें ती प्रथम प्रसृत होऊन तिचा कोंकणापर्यंत पुढें विस्तार झाला असावा. पाली भाषेचें अशोकाच्या गिरनार शिलालेखाशीं सादृश्य व पूर्वेकडील धौलिशिलालेखांशीं विसादृश्य यावरूनहि हीच गोष्ट प्रतीत होते. उदा० संस्कृत—राज्ञः, व कृतम्; पाली—राजिनो, रञ्ञो व कतम्; गिरनार—राञो व कतम्, धौलि—लजिने व कडे अशीं रूपें होतात. या बाबतींत प्रो० सुनीतिकुमार चतर्जी यांचें म्हणणें असें आहे कीं बुद्धाचीं सर्व उपदेशवचनें मागधी भाषेनंतर मध्यदेशांतील शौरसेनी प्राकृतमध्यें अनुवादित झालीं होतीं व तीच पालीभाषा या नांवानें ख्रि. पू. दुसऱ्या शतकापूर्वी प्रसिद्ध होती. परंतु आपणांस असें आढळून येतें कीं पाली भाषेचें शौरसेनी किंवा मागधी या दोहोंपेक्षांहि पैशाची भाषेशींच अधिक साम्य आहे, हें पुढील उदाहरणांवरून दिसून येईल.

| संस्कृत | पाली | पैशाची | शौरसेनी | मागधी |
| --- | --- | --- | --- | --- |
| ( क ) लोक | लोक | लोक | लोअ | लोअ |
| ( ग ) नग | नग | नग | णअ | णअ |
| ( च ) शची | सची | सची | सई | शई |
| ( ज ) रजत | रजत | रजत | रअद | लअद |
| ( त ) कृत | कत | कत | कद | कड |
| ( र ) कर | कर | कर | कर | कल |
| ( श ) वश | वस | वस | वस | वश |
| ( ष ) मेष | मेस | मेस | मेस | मेश |
| ( स ) सारस | सारस | सारस | सारस | शालश |
| ( न ) वचन | वचन | वचन | वअण | वअण |
| ( ट्ट ) पट्ट | पट्ट | पट्ट | पट्ट | पस्ट |
| ( र्थ ) अर्थ | अत्थ | अत्थ | अत्थ | अस्त |
| ( स् पु. प्र. ए. प्रत्यय) वृक्षः | रुक्खो | रुक्खो | रुक्खो | लुक्खे |

पाली भाषेची उत्पत्ति ख्रि० पू० सहाव्या शतकांत झाली असावी असें समजतात; परंतु त्या कालीं म्हणजे बुद्धाच्या जन्माच्या व धर्मप्रसाराच्या वेळीं मागधी ही लोकांची बोलभाषा होती व पाली ही बोलभाषा नसून बौद्धधर्म-ग्रंथांची वाङ्मयीन भाषा आहे व ती ख्रिस्ती सनाच्या चौथ्या किंवा पांचव्या शतकांत आपणांस दृश्य होणाऱ्या स्वरूपांत परिणत झाली असावी. या पाली भाषेपासूनच आधुनिक सिंहली भाषा बनली आहे.

**अर्धमागधीः**—यानंतर वाङ्मयदृष्ट्या दुसरी महत्त्वाची भाषा म्हटली म्हणजे महावीराची धर्मोपदेश भाषा अर्ध-मागधी होय. 'भगवंच णं अद्धमागहीए भासाए धम्ममाइक्खइ'—समवायांग सूत्र६०. अर्थात् महावीरानें जो धर्मोपदेश केला, तो लेखनद्वारां केलेला नसून व्याख्यानद्वारां केला; परंतु आज आपणांस सर्वांत जुने जे जैनधर्मग्रंथ आढळतात ते त्यानंतर बऱ्याच उत्तरकालीं प्रत्यक्ष लिहिले गेले आहेत. आपल्या वेदांप्रमाणें महावीराचीं धर्मवचनें तोंडीं पठन-परंपरेनें जैन यतींमध्यें चालू असून तींच पुढें ग्रंथरूपानें लिहिलीं गेलीं अशी त्यांची परंपरा आहे. परंतु हें श्वेतांबर-

पंथीयांचें विधान त्यांतीलच दिगंबरपंथीयांस मान्य नसून त्यांच्या मतें पूर्वांचे सर्व जैन धर्मग्रंथ लुप्त झाले असून प्रचलित जैन धर्मग्रंथ नव्यानें लिहिले गेले आहेत. श्वेतांबरपंथीयांच्या मतें जैन सूत्रग्रंथ महावीरनिर्वाणानंतर ९८० वर्षांनीं म्हणजे खि. स. ४५४ मध्यें काठेवाडांत वलभी या ठिकाणीं श्री देवर्धिगणी यानें लिपिबद्ध केले. परंतु तावत्कालपर्यंत त्यांचें वेदांप्रमाणेंच जैन मुनींनीं शिष्यपरंपरेनें पठनद्वारां मूळ स्वरूपांत रक्षण केलें.

वेदांप्रमाणेंच सूत्रग्रंथपठनाच्या शुद्धतेबद्दल या मुनीकडून काळजी घेण्यांत येत असते. तथापि मूळ सूत्रांमध्यें या पठनपरंपरेनें भाषाविषयक कांही फरक होणें संभवनीय आहे. कारण या सूत्रांस वेदांप्रमाणें शब्दप्राधान्य नसून अर्थप्राधान्य आहे व हे ग्रंथ सामान्य लोकांस समजण्याकरितां तत्कालीन बोलभाषेंत लिहिले होते. बोलभाषेंत कालानुसार फरक पडणें अपरिहार्य आहे; त्याशिवाय ती समजण्यास सुलभ राहणार नाहीं. तसेंच चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीत मगधदेशांत जें बारा वर्षांचें अवर्षण झालें त्या वेळीं जैन मुनि दक्षिण देशांत समुद्रतीरीं वास्तव्य करण्यास गेले होते त्या वेळीं या ग्रंथपठनाची परंपरा त्रुटित झाली होती. पुन्हां या अवर्षणाच्या कालानंतर पाटलीपुत्र शहरांत या जैन संघांचें एकत्र अधिवेशन होऊन निरनिराळ्या मुनींच्या स्मृतींवरून या ग्रंथांचें पुनर्लेखन करण्यांत आलें. यांपैकीं कांहीं मुनि दक्षिणेंतील महाराष्ट्र, कोंकण वगैरे भागांतहि उपदेशाचें कार्य करीत होते हें त्या भागांतील जैन धर्माच्या प्रसारावरून उघड होतें. अर्धमागधी भाषेचें दूरस्थ महाराष्ट्र देशाच्या महाराष्ट्री भाषेशीं जें विशेष सादृश्य दिसून येतें त्याचेंहि कारण हेंच असलें पाहिजे. यानंतर ८०० वर्षांनीं वलभी व मथुरा येथें जैन ग्रंथ लिपिबद्ध करण्याकरितां जैन मुनींची संमेलनें भरविण्यांत आली. या कालांत जैन संप्रदायाचा विस्तार भारतवर्षाच्या दूरदूरच्या प्रांतांत झालेला असून तत्तत्प्रांतीय भाषांचा परिणाम त्यांच्या ( धर्मोपदेशकांच्या ) भाषेवर झाला असला पाहिजे व यामुळेंच अंगग्रंथांच्या भाषेमध्यें—एवढेंच नव्हे तर एकाच अंगग्रन्थांतील भाषेमध्यें, किंबहुना वाक्यांमध्यें—भाषाभेद आढळून येतो. या उपपत्तीवरूनच अंग व उपांग ग्रंथांची कांही कांहीं ठिकाणीं थोडीफार विसंगति आढळून येते तिचेंहि स्पष्टीकरण होतें. समवायांगसूत्रादि ग्रंथांत जीस अर्धमागधी असें नांव दिलें आहे तीसच स्थानांगसूत्रादि ग्रंथांमध्यें ऋषिभाषिता असें म्हटलें आहे. यावरून हेमचंद्रानें तिला आर्षभाषा असें म्हटलें आहे. वस्तुतः हीं तिन्ही नांवें एकाच भाषेचीं आहेत. याच भाषेस याकोबीनें प्राचीन महाराष्ट्री अथवा जैन महाराष्ट्री असें नांव दिलें आहे. तथापि डॉ. पिशेलच्या मतें प्राचीन जैनसूत्रांची आर्षभाषा ही अर्धमागधीच होय. अर्थात् तिचें महाराष्ट्रीशीं अनेक बाबतींत साम्य आहे तरी तीस जैन महाराष्ट्री असें वेगळें नांव देण्याचें कारण नाही. ज्याप्रमाणें बौद्ध धर्मसूत्रग्रंथांची भाषा मागधी अथवा पाली ही नाटकांतील किंवा प्राकृत व्याकरणामध्यें निर्दिष्ट केलेल्या मागधीहून भिन्न आहे तशीच जैनधर्मसूत्रांची अर्धमागधी नाटकांतील किंवा प्राकृत व्याकरणांतील अर्धमागधीहून निराळी आहे. तथापि ज्याप्रमाणें बौद्धसूत्रांच्या भाषेला महाराष्ट्री न म्हणतां मागधीच संबोधिलें जातें त्याप्रमाणें जैन धर्मसूत्रांच्या भाषेलाहि महाराष्ट्री न म्हणतां अर्धमागधीच म्हणण्यांत येतें असें हरगोवनदास यांनीं प्रतिपादन केलें आहे. परंतु पं. बेचरदास दोशी यांनीं आपल्या प्राकृत व्याकरणाच्या प्रस्तावनेंत जैन आगम ग्रंथांची भाषा भरताचें नाट्यशास्त्र, वररुचि, हेमचंद्रादि प्राकृत व्याकरणकार, व अशोकाचे शिलालेख इत्यादींमध्यें अर्धमागधीचीं जी लक्षणें आढळतात त्यांस अनुसरून तिचें स्वरूप नसल्यामुळें तिला अर्धमागधी न म्हणतां प्राकृतच म्हणावें असें प्रतिपादन केलें आहे. परंतु प्राकृत म्हणजे जर महाराष्ट्री म्हटलें तरी तीपासून जैन आगम भाषा निराळी आहे हें आपण वर पाहिलेंच आहे व नाटकादींमधील भाषा कृत्रिम असणें शक्य आहे. तेव्हां हरगोवनदास यांचेंच मत अधिक ग्राह्य दिसतें. भरताच्या नाट्यशास्त्रांत ज्या सात प्राकृत भाषांचा उल्लेख आहे त्यांत अर्धमागधीचा उल्लेख असून ती नोकरचाकर, राजपुत्र व श्रेष्ठी या पात्रांच्या तोंडीं असावी असें सांगितलें आहे. परंतु या पात्रांच्या तोंडी असलेली भाषा व जैन सूत्रांची भाषा यांमध्यें बराच फरक आढळतो. मार्कण्डेयानें आपल्या व्याकरणांत ' शौरसेन्या अदूरत्वादियमेवार्धमागधी ' मागधीसच अर्धमागधी असें म्हटलें आहे. क्रमदीश्वरानें आपल्या प्राकृत व्याकरणांत ' महाराष्ट्री मिश्रा अर्धमागधी ' असें हिचें लक्षण दिलें आहे. परंतु हीं दोन्हीहि लक्षणें नाटकांतील पात्रांच्या तोंडीं असलेल्या भाषेबद्दलचीं आहेत.

अर्धमागधी भाषेत व महाराष्ट्री भाषेत पुष्कळच साम्य आहे. डॉ. होर्न्ले यांनीं अर्धमागधीस आर्ष प्राकृत असें म्हटलें असून ती नाटकांतील अर्धमागधी, महाराष्ट्री आणि शौरसेनी यांचें मूळ मानली आहे. तसेंच हेमचंद्रानें आपल्या प्राकृत व्याकरणांत आपल्या नियमांस जीं उदाहरणें दिली आहेत त्यांपैकी वाङ्मयांतील उदाहरणें महाराष्ट्री भाषेतील आहेत. परंतु जैन सूत्रांतील उदाहरणें देतांना त्यांस आर्षप्राकृत असें नांव दिलें आहे. त्यावरून ही जैन-सूत्रांची भाषा वाङ्मयीन महाराष्ट्रीपेक्षां प्राचीन असावी असें वाटतें. कांही लोक अर्धमागधी या शब्दाची व्युत्पत्ति 'अर्धी मागधी' अशी करितात ती चुकीची असून 'अर्ध्या मगधाची भाषा' ही व्युत्पत्ति वास्तविक आहे. अर्धमागध ह्या शब्दाची व्याख्या निशीतचूर्णिकेंत 'मगहद्धविसयभासानिबद्धं अद्धमागहं' अशी दिली आहे. परंतु अर्धमागधीचें सादृश्यमगधांतील मागधी किंवा शौरसेनी किंवा अर्वाचीन पूर्वहिंदी या भाषांशी नसून महाराष्ट्री किंवा अर्वाचीन मराठी या भाषांशी असण्याचें कारण वर सांगितल्याप्रमाणें जैन मुनींचा अवर्षणकालीं दक्षिण हिंदुस्थानांत घडलेला दीर्घकालीन निवास व त्यामुळें त्यांच्या भाषेवर व त्यांनी ग्रथित केलेल्या अंगग्रंथांतील भाषेवर झालेला महाराष्ट्रीचा परिणाम हें असलें पाहिजे. डॉ. भाण्डारकर यांनी अर्धमागधीची उत्पत्ति खि. पू. २ ऱ्या शतकांत झाली असावी असें म्हटलें आहे. डॉ. एस्. के. चतर्जी यांनी सर्व नाटकांतील सर्व प्राकृत भाषांचा व अर्धमागधीचा उत्पत्तिकाल खि. पू. ३ रें शतक हा दिला आहे. परंतु अश्वघोषाच्या नाटकांत जैन अर्धमागधी भाषा आहे असें डॉ. ल्युडर्सनें दाखविलें आहे व डॉ. याकोबी यांनी जैनसूत्रांची व मथुरा येथील शिलालेखाची भाषा यांचा काल खि. पू. ४ थें व ३ रें शतक असा दिला आहे. व हा काल वरील पाटलीपुत्रांत झालेल्या ग्रंथसंकलनाशी जुळणारा आहे. ही भाषा बहुतांशी महाराष्ट्रीशी जुळते पण तीत आढळणारे कांही विशेष पुढें दिले आहेत, त्यावरून अर्धमागधी ही वैदिक व अभिजात संस्कृत भाषेशी अधिक जवळ आहे हें दिसून येईल.

**अर्धमागधीचीं विशेष लक्षणें. वर्णभेदः**—( १ ) दोन स्वरांच्या दरम्यान असलेल्या असंयुक्त 'क' बद्दल प्रायः सर्वत्र 'ग' होतो. पण कोठें कोठें 'त' आणि 'य' हि होतो. जसें:—ग—प्रकल्प = पगप्प; आकर = आगर; आकाश = आगास; आकाशिका = आगाशी; प्रकार = पगार; श्रावक = सावग; विवर्जक = विवज्जग; निषेवक = णिसेवग; लोक = लोग; आकृति = आगई. त—आराधक = आराहत; सामायिक=सामातित; विशुद्धिक = विशुद्धित; अधिक = अहित; शाकुनिक = साउणित; नैषधिक = णेसज्जित; वीरासनिक = विरासणित; वर्धकि = वड्ढति; नैरयिक = नेरतित; सीमंतक = सीमंतत; नरकात् = नरताती; माडम्बिक = माडम्बित; कौटुम्बिक = कोडुंम्बित; सचक्षुष्केण = सचक्खुतेणं; कूणिक = कूणित; अंतिकात् = अन्तितातो; राहसिकेन = रहस्सितेणं. य—कायिक = काइय; लोक = लोय.

( २ ) दोन स्वरांमध्यें असलेला असंयुक्त 'ग' कायम राहतो. कोठें कोठें त्याचा 'त' आणि 'य' होतो. जसें आगम = आगम; आगमन = आगमण; आनुगामिक = आणुगामिय; आगमिष्यत् = आगमिस्स; जागर = जागर; अगारिन् = अगारि; भगवन् = भगवं; अतिग = अतित; सागर = सायर.

( ३ ) दोन स्वरांमध्यें असलेल्या असंयुक्त 'च' अथवा 'ज' बद्दल 'त' आणि 'य' होतात. जसें:—नाराच = णारात; वचस् = वति; प्रवचन = पावतण; कदाचित् = कयाति; वाचना = वायणा; उपचार = उवयार; लोच = लोय; आचार्य = आयरिय; भोजिन् = भोति; वज्र = वतिर; पूजा = पूता; राजेश्वर = रातीसर; आत्मजः = अत्तते; प्रजात = पयाय; कामध्वजा = कामज्झया; आत्मज = अत्तय.

( ४ ) दोन स्वरांच्यामध्यें असलेला 'त' प्रायः कायम राहतो. कोठें कोठें त्याचा 'य' होतो. जसें:— वन्दते = वंदति; नमस्यति = नमंसति; पर्युपास्ते = पज्जुवासति; जितेंद्रिय=जितिंदिय; सतत = सतत; भवति = भवति; अंतरित = अंतरित; धैवत = धेवत; जाति = जाति; आकृति =आगिति; विहरति = विहरति; पुरतः = पुरतो; करोति = करेति; ततः = तते; संदिशतु = संदिसतु; संलपति = संलवति; प्रभृति = पभिति; करतल = करयल.

( ५ ) स्वरांच्या दरम्यान असलेल्या 'द' बद्दल 'द'अथवा 'त' अधिकांशानें होतो. कधी कधी 'य' हि होतो. जसें:—द—प्रदिशः = पदिसो; भेद = भेद; अनादिकं = अणादियं. वदत् = वदमाण; नदति = णदति; जनपद =

जणवद; वेदिष्यति=वेदिहिती. त–यदा = जता; पाद = पात; निपाद = निसात; नदी = नती; मृषावाद = मुसावात; वादिक = वातित; अन्यदा = अन्नता; कदाचित् = कतातीं; यदि = जति; चिरादिक = चिरातीत. य— प्रतिच्छादन = पडिच्छायण; चतुष्पद = चउप्पय ( चौपाई, एक छंद ).

( ६ ) दोन स्वरांमध्यें असलेल्या 'प' चा प्रायः सर्वत्र 'व' होतो. जसें:—पापक = पावग; संलपति = संलवति; सोपचार = सोवयार; अतिपात = अतिवात; उपनीत =उवणीय; अध्युपपन्न = अज्झोववण्ण; उपगूढ=उवगूढ; आधिपत्य = आहेवच्च; तपक = तवय; व्यपरोपित = ववरोवित.

( ७ ) स्वरांच्यामध्यें असलेला 'य' प्राय: कायम राहतो. अनेक ठिकाणी त्याचा 'त' झालेला दृष्टीस पडतो. जसें:–य–वायव = वायव; प्रिय = पिय; निरय = निरय; इंद्रिय = इंदिय; गायति = गायइ. त—स्यात् = सिता; सामायिक = सामातित; कायिक = कातित; पालयिष्यन्ति = पालतिस्संति; पर्याय = परितात; नायक = णातग; गायति = गातति, स्थायिन् = ठाति; शायिन् = साति; नैरयिक = नेरतित; इंद्रिय = इंदित.

( ८ ) दोन स्वरांच्यामध्यें असलेल्या 'व' बद्दल व, त अथवा य हि होतो. व—वायव = वायव; गौरव = गारव; भवति = भवति; अनुविचिन्त्य = अणुवीति. त—परिवार = परिताल; कवि = कति. य— परिवर्तन = परियट्टण; परिवर्तना = परियट्टणा.

( ९ ) महाराष्ट्रीत स्वरांच्यामध्यें असंयुक्त क, ग, च, ज, त, द, प, य, व या व्यंजनांचा प्रायः लोप होतो. प्राकृत–प्रकाश इ. व्याकरणानुसार लोप पावलेल्या या व्यंजनाबद्दल दुसरें कोणतेंहि व्यंजन येत नाही. सेतुबंध, गाथासप्तशती आणि कर्पूरमंजरी इ. नाटकांच्या महाराष्ट्री भाषेंतहि हें लक्षण चांगलेंच आढळतें.

हेमचंद्राच्या प्राकृत-व्याकरणानुसार या लुप्त व्यंजनाच्या दोन्ही बाजूस 'अ' वर्ण (अ अथवा आ) असल्यास लोप पावलेल्या व्यंजनाबद्दल 'य्' होतो. 'गउडवहो'मध्यें तर वर सांगितलेल्या व्यंजनापूर्वी अ वर्णाहून भिन्न वर्ण असूनहि त्याबद्दल 'य' झालेला अधिक प्रमाणांत आढळतो. परंतु जैन अर्धमागधीमध्यें आम्ही वर सांगितल्याप्रमाणें त्या त्या व्यंजनाबद्दल भिन्न भिन्न व्यंजन येतें आणि कोठें कोठें तर तेंच व्यंजन कायम राहतें. हें खरें की, कोठें कोठें वर सांगितलेल्या व्यंजनाबद्दल अन्य व्यंजन होणें अथवा तेंच व्यंजन कायम राहणें याऐवजीं महाराष्ट्रीप्रमाणें त्या व्यंजनाचा लोपहि झालेला आढळतो. पण तो लोप वर सांगितलेल्या व्यंजनानंतर 'अ' अथवा 'आ' यांहून भिन्न स्वर असूनहि झालेला आढळतो. जसें:— लोक = लोओ; रचित = रइत; भोजिन् = भोइ; आतुर = आउर; आदेशि = आएसि; कायिक = काइय; आवेश = आएस.

( १० ) शब्दाच्या आरंभी अथवा मध्यें अथवा जोडाक्षरांत सर्वत्र 'ण' प्रमाणें 'न' हि होतो. जसें:—नदी = नई; ज्ञातपुत्र = नायपुत्त; आरनाल = आरनाल; अनल = अनल; अनिल = अनिल; प्रज्ञा = पन्ना; अन्योन्य = अन्नमन्न; विज्ञ = विन्नु; सर्वज्ञ = सव्वन्नु इ.

( ११ ) 'एव'च्या पूर्वी 'अम्' असल्यास त्याच्याबद्दल 'आम्' होतो. जसें:—यामेव = जामेव; तामेव = तामेव; क्षिप्रमेव = खिप्पामेव; एवमेव = एवामेव; पूर्वमेव = पुव्वामेव इ.

( १२ ) दीर्घ स्वरानंतर येणाऱ्या 'इति वा' बद्दल 'ति वा' अथवा 'इ वा' असें होतें. जसें:— इन्द्र मह इति वा = इदमहे ति वा, इंद महे इ वा.

( १३ ) 'यथा' आणि 'यावत्' शब्दांतील 'य' चा 'ज' अथवा लोप झालेला आढळतो. जसें:–यथाख्यात = अहक्खाय; यथाजात = अहाजात; यथानामक = जहाणामए; यावत्कथा = आवकहा; यावज्जीव = जावज्जीव.

**वर्णागमः**—गद्यांतहि अनेक ठिकाणीं समासांत उत्तरपदाच्या पूर्वी म् आगम होतो. जसें:–निरयंगामी, उड्ढंगारव, दीहंगारव, रहस्सगारव, गोणमाई, सामाइयमाइयांइ, अजहण्णमणुक्कोस, अदुक्खमसुहा इ. महाराष्ट्रीमध्यें केवळ पद्यांतच पादपूरणासाठीं म् आगम झालेला आढळतो; गद्यांत तर तो मुळीच आढळत नाही.

**शब्दभेदः**—( १ ) महाराष्ट्रीत ज्यांचा प्रयोग झालेला आढळत नाहीं असे अनेक शब्द अर्धमागधीमध्यें आहेत. जसें:–अज्झत्थिय, अज्झोववण्ण, अणुवीति, आघवणा, आघवेत्तग, आणापाणु, आवीकम्म, कण्हुइ, केमहालय, दुरूढ, पच्चत्थिमिल्ल, पाऊकुव्वं, पुरत्थिमिल्ल, पोरेवच्च, महतिमहालिया, वक्क, विउस.

( २ ) ज्यांचीं रूपें अर्धमागधींत व महाराष्ट्रींत भिन्न भिन्न होतात अशा शब्दांचीहि संख्या बरीच मोठी आहे. त्यांपैकीं कांहीं शब्द पुढें दिले आहेत.—

| अर्धमागधी | महाराष्ट्री | अर्धमागधी | महाराष्ट्री |
|---|---|---|---|
| अभियागम | अब्भाअम | नितिय | णिच्च |
| आउंटण | आउंचण | निएय | णिअअ |
| आहरण | उआहरण | पडुप्पन्न | पच्चुप्पण्ण |
| उप्पिं | उवरिं, अवरिं | पच्छेकम्म | पच्छाकम्म |
| किया | किरिआ | पाय ( पात्र ) | पत्त |
| कीस, केस | केरिस | पुढो ( पृथक् ) | पुहं, पिहं |
| केवच्चिर | किआच्चिर | पुरेकम्म | पुराकम्म |
| गेहि | गिद्धि | पुव्विं | पुव्वं |
| चियत्त | चइअ | माय ( मात्र ) | मत्त, मेत्त |
| छच्च | छक्क | माहण | बम्हण |
| जाया | जत्ता | मिलक्खु, मेच्छ | मिलिच्छ |
| णिगण, णिगिण | णग्ग | वग्गू | वाआ |
| णिगिणिण ( नाग्न्य ) | णग्गत्तण | वाहणा ( उपानह् ) | उवाणआ |
| तच्च ( तृतीय ) | तइअ | सहेज्ज | सहाअ |
| तच्च ( तथ्य ) | तच्छ | सीआण, सुसाण | मसाण |
| तेगिच्छा | चिइच्छा | सुमिण | सिमिण |
| दुवालसंग | बारसंग | सुहुम, सुहुम | सण्ह |
| दोच्च | दुइअ | सोहि | सुद्धि. |

शिवाय दुवालस, बारस, तेरस, अउणवीसइ, बत्तीस, पणतीस, इगयाल, तेयालीस, पणयाल, अढयाल, एगट्ठि, बावट्ठि, तेवट्ठि, छावट्ठि, अढसट्ठि, अउणत्तरि, बावत्तरि, पण्णत्तरि, सत्तहत्तरि, तेयासी, छलसीइ, बाणउइ, इ. संख्यावाचक शब्दांचीं रूपें अर्धमागधींत आढळतात. महाराष्ट्रींत अशीं होत नाहींत.

**नामविभक्तिः**—( १ ) अर्धमागधींत पुंल्लिंगी अकारान्त शब्दाला प्रथमेच्या एकवचनाचा प्रायः ' ए ' व क्वचित् ' ओ ' प्रत्यय लागतो. परंतु महाराष्ट्रींत फक्त ' ओ ' प्रत्यय लागतो.

( २ ) सप्तमीच्या एकवचनाचा स्सिं प्रत्यय आहे. महाराष्ट्रींत तो ' म्मि ' आहे.

( ३ ) चतुर्थीचे एकवचनांत ' आए ' किंवा ' आते ' असे प्रत्यय येतात; जसें:—देवाए, सवणयाए, गमणाए, अट्ठाए, अहिताते, असुभाते, अखमाते इ०. महाराष्ट्रींत हे प्रत्यय नाहींत.

( ४ ) अनेक शब्दांच्या तृतीयेच्या एकवचनांत ' सा ' आढळतो; जसें:—मणसा, वयसा, कायसा, जोगसा, बलसा, चक्खुसा. महाराष्ट्रींत यांच्याऐवजीं मणेण, वएण, काएण, जोगेण, बलेण, चक्खुणा अशीं अनुक्रमें रूपें होतात.

( ५ ) कम्म आणि धम्म शब्दांचें तृतीयेचें एकवचन पालींतल्याप्रमाणें कम्मुणा व धम्मुणा असें होतें. तींच रूपें महाराष्ट्रींत कम्मेण व धम्मेण अशीं होतात.

( ६ ) अर्धमागधींत ' तत् ' शब्दाच्या पंचमीच्या बहुवचनांत ' तेब्भो ' रूपहि आढळण्यांत येतें.

( ७ ) ' युष्मत् ' शब्दाचें षष्ठीचें एकवचन संस्कृतप्रमाणें ' तव ' असें होतें. तसेंच ' अस्मत् 'चें षष्ठीचें बहुवचन संस्कृतप्रमाणेंच ' अस्माकं ' असें होतें. हीं रूपें महाराष्ट्रींत नाहींत.

**आख्यात विभक्ति**—(१) अर्धमागधींत भूतकाळाच्या बहुवचनाचा प्रत्यय ' इंसु ' आहे. जसें:–पुच्छिंसु, गच्छिंसु, आभासिंसु. महाराष्ट्रींत हा प्रयोग लुप्त झाला आहे.

**धातुरूपें**—अर्धमागधींत आइक्खइ, कुव्वइ, भुविं, होक्खती, बूया, अब्बवी, होत्था, हुत्था, पहारेत्था, आघं, दुरूहइ, विगिंचए, तिवायए, अकासी, तिउट्टई, तिउट्टिज्जा, पडिसंधयाति, सारयती, घेच्छिइ, समुच्छिहिंति, आइंसु इ०. प्रभृति प्रयोगांत धातूंची प्रकृति, प्रत्यय इ०. ज्या स्वरूपांत आढळतात त्यांहून भिन्न स्वरूपांत ते महाराष्ट्रींत आढळतात.

**कृदन्त**—( १ ) अर्धमागधींत ' त्वा ' प्रत्ययाचीं रूपें अनेक प्रकारांनीं होतात.

( १ ) ट्टु. जसें:–कट्टु, साहट्टु, अवहट्टु इ.

( २ ) इत्ता. जसें:–एत्ता, इत्ताणं व एत्ताणं. जसें:–चइत्ता, विउट्टित्ता, पासित्ता, करेत्ता, पासित्ताणं, करेत्ताणं.

( ३ ) इत्तु. जसें:–दुरुहित्तु, जाणित्तु, वधित्तु.

( ४ ) च्चा. जसें:–किच्चा, णच्चा, सोच्चा, भोच्चा, नेच्चा.

( ५ ) इया. जसें:–परिजाणिया, दुरूहिया.

( ६ ) याशिवाय विउक्कम्म, निसम्म, समिच्च, संखाए, अणुवीति, लध्दुं, लध्दूण, दिस्सा इत्यादि प्रयोगांत ' त्वा ' चीं इतर भिन्नभिन्न रूपें दृष्टीस पडतात.

( २ ) ' तुम् ' प्रत्ययाबद्दल प्रायः ' इत्तए ' ' इत्तते ,' हे प्रत्यय आढळतात. जसें:–करित्तए, गच्छित्तए, संभुंजित्तए, उवसामित्तते, विहरित्तए इ.

( ३ ) ऋकारान्त धातूच्या ' त ' प्रत्ययाऐवजीं ' ड ' होतो. जसें:–कड, मढ, अभिहड, वावड, संवुड, वियड, वित्थड.

**तद्धित**—(१) ' तर ' प्रत्ययाचें रूप ' तराय ' होतें. जसें:–अणिट्टतराए, अप्पतराए, बहुतराए, कंततराए.

( २ ) आउसो, आउसंतो. गोमी, वुसिमं, भगवंतो, पुरत्थिम, पच्चत्थिम, ओयंसी, दोसिणो, पोरेवच्च, इत्यादि प्रयोगांत ' मतुप् ' व अन्य तद्धित प्रत्ययाचीं रूपें जैनअर्धमागधींत जशीं होतात त्यांहून तीं महाराष्ट्रींत भिन्न प्रकारचीं होतात.

अर्धमागधीत महाराष्ट्रीपेक्षां इतके अधिक व सूक्ष्म भेद, आणि विशेष आहेत कीं, विस्तारभयास्तव येथें उल्लेख करतां येत नाहीं.

**शौरसेनी**—भरताच्या नाट्यशास्त्रांत शौरसेनी भाषा नायिका व तिच्या सखी या पात्रांच्या तोंडी घालावी, असें सांगितलें आहे. भास, कालिदास वगैरेंच्या नाटकांमध्यें ही भाषा वापरलेली आढळते. अश्वघोषाच्या नाटकांतील शौरसेनी भाषा ही थोडी अधिक जुनी वाटते. या भाषेचा उल्लेख, दंडी, रुद्रट, वाग्भट वगैरे सर्व साहित्यग्रंथकारांनीं केलेला आहे. वररुचि, हेमचंद्र, मार्कण्डेय, क्रमदीश्वर व लक्ष्मीधर इत्यादि व्याकरणकारांनीं इचें लक्षण दिलेलें आहे. भरतानें विदूषकाच्या तोंडीं प्राच्या ही भाषा असावी असें सांगितलें आहे व प्राच्य भाषेचें जें लक्षण मार्कण्डेयानें आपल्या व्याकरणांत दिलें आहे त्यावरून ही शौरसेनीपासून फारशी निराळी दिसत नाहीं. दिगंबर जैनांचे प्रवचनसार, द्रव्यसंग्रह वगैरे ग्रंथांची भाषाहि एक तऱ्हेची शौरसेनीच आहे. ही श्वेतांबरांची अर्धमागधी व प्राकृत व्याकरणकारांची शौरसेनी यांच्या मिश्रणानें बनली आहे. हिला जैनशौरसेनी असें नांव देतात. या भाषेचें उत्पत्तिस्थान शूरसेन अथवा मथुरा देश हें होय. अश्वघोषाच्या नाटकांतील शौरसेनी अशोकलिपीकालीन असावी व भासाच्या नाटकांतील शौरसेनी व जैन शौरसेनी यांची उत्पत्ति खिस्ती शकाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत झाली असावी. या भाषेंत व महाराष्ट्रींत बरेंचसें साम्य असून त्यांमध्यें जो फरक आढळतो तो पुढें दिला आहे.

**शौरसेनीचे विशेष-वर्णभेद**—( १ ) स्वरांच्या मध्यवर्ती असंयुक्त ' त ' व ' द ' च्या जागीं ' द ' होतो. जसें:-रजत = रअद; गदा = गदा; (२) स्वरांमध्यें असंयुक्त ' थ ' असल्यास त्याचा ' ध ' व ' ह ' होतो. जसें:–नाथ = णाध, णाह. ( ३ ) ' र्य ' जागीं ' य्य ' आणि ' ज्ज ' होतात. जसें:–आर्य = अय्य, अज्ज. सूर्य = सुय्य, सुज्ज

**नाम-विभक्ति**---पंचमीच्या एकवचनाचे ' दु ' व ' दो ' असे दोन प्रत्यय असून ते लागण्यापूर्वी पूर्वीचा अकार दीर्घ होतो. जसें:-जिनात् - जिणादो, जिणादु.

**आख्यात**-( १ ) ' ति ' आणि ' ते ' या प्रत्ययाबद्दल अनुक्रमें ' दि ' आणि ' दे ' होतात. जसें:- हसदि, हसदे; रमदि, रमदे; ( २ ) भविष्यकाळाच्या प्रत्ययापूर्वी ' स्सि ' लागतो. जसें:-हसिस्सिदि, करिस्सिदि.

**सन्धि**---अन्त्य मकारानंतर ' इ ' अथवा ' ए ' असल्यास विकल्पानें ' ण ' चा आगम होतो. जसें:- युक्तम इदम् = जुत्तं णिमं, जुत्तमिमं; एवम् एतत् = एवं णेदं, एवमेदं.

**कृदन्त**---'त्वा' प्रत्ययाबद्दल ' इअ,' ' दूण ' व ' त्ता ' होतात. जसें:-पठित्वा = पढिअ, पढिदूण, पढित्ता.

**मागधी**---मागधी भाषा अशोकाच्या साम्राज्याच्या उत्तरेच्या व पूर्वेच्या मीरत, सहसराम, रामगड, धौलि, जौगड वगैरे ठिकाणीं अशोकाच्या शिलालेखांत आढळते. अश्वघोषाच्या त्रुटित नाट्यग्रंथांतहि या भाषेचें प्राचीन स्वरूप आढळतें व भास आणि कालिदास यांचीं नाटकें व मृच्छकटिक यांमध्यें नाटकी मागधी दृष्टीस पडते. बहुतेक प्राकृत व्याकरणांत मागधीची लक्षणें व उदाहरणें दिलेलीं आहेत. भरताच्या नाट्यशास्त्रांत राजाच्या अंतःपुरांत राहणारे, सुरंग लावणारे, अश्वपालक वगैरे पात्रांच्या तोंडीं व नायक आपद्ग्रस्त असतां त्याच्या तोंडी ही घालावी, असें सांगितलें आहे. परंतु मार्कण्डेयानें आपल्या प्राकृतसर्वस्वांत उद्धृत केलेल्या ' राक्षसभिक्षुक्षपणक-चेटाद्या मागधीं प्राहुः ' या वचनावरून भरतानें उल्लेखिलेल्या वरील पात्रांशिवाय भिक्षु, क्षपणक वगैरे लोकहि त्याच भाषेत बोलत, असें दिसतें. रुद्रट, वाग्भट, हेमचंद्र इत्यादि आलंकारिकारांनीं आपल्या ग्रंथांत या भाषेचा उल्लेख केला आहे. हिचें उत्पत्तिस्थान मगधदेश होय. मगधाच्या बाहेरहि अशोकाच्या शिलालेखांत ही भाषा आढळण्याचें कारण मागधी ही त्या वेळीं राजभाषा असावी व त्यामुळें अंतःपुरांत इत्यादि ठिकाणीं हीच भाषा वापरण्याचा प्रघात असावा. भिक्षु व क्षपणक हे विशेषतः मगधनिवासी असल्यामुळें त्यांच्या तोंडीं हीच भाषा नाटकांमध्यें घालणें स्वाभाविक दिसतें. नायकहि संकटकालीं किंवा आपत्तिग्रस्त असतां याच भाषेत भाषण करितो, असें भरतानें सांगितलें आहे. यावरून राजे लोकांचीहि स्वाभाविक भाषा हीच असावी, असें वाटतें. कारण सामान्यतः मनुष्य विपत्तींत किंवा संकटांत असतां व्यावहारिक भाषेपेक्षां घरगुती भाषेतच आपले सहज उद्गार काढतो. यावरून सामान्यतः नाट्यशास्त्र-कार भरत ज्या प्रदेशांत राहत होता तेथील लोकांची बोलभाषा त्या वेळीं हीच असली पाहिजे असें वाटतें. वररुचीनें 'शौरसेनीपासून मागधीची उत्पत्ति झाली' असें म्हटलें आहे. परंतु शूरसेन व मगध या दोन प्रदेशांतील प्रादेशिक भाषा असून ज्याप्रमाणें शौरसेनी ही मध्यदेशांतील वेदकालीन बोलभाषेपासून उत्पन्न झाली त्याप्रमाणेंच मगधांतील बोलीपासून मागधी उत्पन्न झाली असावी. अशोकाच्या शिलालेखांत व अश्वघोषाच्या नाटकांत प्राचीन मागधीचें स्वरूप आढळतें, व भासाच्या नाटकांत मध्ययुगीन मागधीचें स्वरूप दृष्टीस पडतें. शाकारी, चाण्डाली आणि शाबरी या मागधीचींच रूपांतरें होत. भरतानें शबर, शक वगैरेंच्या तोंडी शाकारी भाषा घातली आहे. परंतु मार्कण्डेयानें राजश्यालकाच्या तोंडीं ही भाषा असावी, असें म्हटलें आहे. भरतानें पुक्कसादि जातींची भाषा चाण्डाली आणि अंगारक, व्याध, लांकूडतोडे व कारागीर लोक यांची भाषा शाबरी असावी, असें सांगितलें आहे. या तीन भाषांचीं उदाहरणें जीं नाटकांत वगैरे आढळतात त्यांमध्यें व मागधी-भाषेत फारसा फरक आढळत नाहीं. मृच्छकटिकांतील माथुर व द्यूतकार यांच्या भाषेस 'ढक्की' असें नांव दिलें आहे. हीहि मागधीभाषेचें एक रूपांतर आहे. मार्कण्डेयानें ढक्की भाषेसच ' टाक्की ' असें म्हटलें आहे. ' प्रयुज्यते नाटकादौ द्यूतादि व्यवहारिभिः । वणिग्भिर्हीनदेहैश्च तदाहुष्टक्कभाषितम् ॥ ' मार्कण्डेयानें या भाषेचीं जीं विशेष लक्षणें दिलीं आहेत त्यांवरून ही अपभ्रंश असावी, असें दिसतें व हरिश्चंद्रानें तिला 'अपभ्रंश' असें म्हटलें आहे, असेंहि त्यानें सांगितलें आहे. मागधी व शौरसेनी यांमध्यें आढळणारे विशेष भेद पुढें दिले आहेत. बाकीच्या बाबतींत हिचें शौरसेनीशीं साम्य आहे.

**मागधीचे विशेष वर्णभेद**---( १ ) ' र 'बद्दल सर्वत्र ' ल ' होतो. जसें:-नर = णल; कर = कल.

( २ ) ष, श, स यांच्या जागीं तालव्य ' श ' होतो, जसें:---शोभन = शोहण; पुरुष = पुलिश; सारस = शालश.

(३) संयुक्त 'ष' आणि 'स'च्या जागी दन्त्य 'स' होतो. जसें:–शुष्क = शुस्क; कष्ट = कस्ट; स्खलति = स्खलदि; बृहस्पति = बुहस्पदि.

(४) 'ट्ट' आणि 'ष्ठ' यांच्याबद्दल 'स्ट' होतो. जसें:–पट्ट = पस्ट; सुष्ठु = शुस्टु.

(५) 'स्त,' आणि 'र्थ' बद्दल 'स्त' होतो. जसें:–उपस्थित = उवस्तिद; सार्थ = शस्त.

(६) 'ज,' 'द्य' आणि 'य' बद्दल 'य' होतो. जसें:–जानाति = याणादि, दुर्जन = दुय्यण, मद्य = मय्य, अद्य = अय्य, याति = यादि, यम = यम.

(७) न्य, ण्य, ज्ञ, ञ्ज च्याबद्दल ञ्ञ होतो. जसें:–अन्य = अञ्ञ, पुण्य = पुञ्ञ; प्रज्ञा = पञ्ञा, अञ्जलि = अञ्ञलि.

(८) शब्दाच्या आरंभीं नसणाऱ्या 'छ' चा 'श्च' होतो. जसें:–गच्छ = गश्च, पिच्छिल = पिश्चिल.

(९) 'क्ष' बद्दल 'स्क' होतो. जसें:–राक्षस = लस्कश; यक्ष = यस्क.

**नामविभक्ति**–(१) अकारांत पुल्लिंगी शब्दाच्या प्रथमेच्या एकवचनीं 'ए' होतो. जसें:–जिनः = यिणे; पुरुषः = पुलिशे.

(२) अकारान्त शब्दाचें षष्ठीचें एकवचन 'स्स' आणि 'आह' लागून होतें. जसें:–जिनस्य = यिणस्स, यिणाह.

(३) अकारान्त शब्दाचें षष्ठीचें बहुवचन आण, आहँ हे प्रत्यय लागून होतें. जसें:–जिनानाम् = यिणाण, यिणाहँ.

(४) अस्मत् शब्दाच्या प्रथमेच्या एकवचनाचें व बहुवचनाचें रूप 'हगे' असें होतें.

**पैशाचीः**—गुणाढ्याची सध्यां लुप्त झालेली बृहत्कथा पैशाची भाषेमध्यें लिहिलेली होती, असें मानतात. या भाषेची उदाहरणें प्राकृतप्रकाश, हेमचंद्राचें प्राकृत व्याकरण, षड्भाषाचंद्रिका, प्राकृतसर्वस्व वगैरे प्राकृत व्याकरण-ग्रंथांत आढळतात. तसेंच हेमचंद्राचें कुमारपालचरित्र, काव्यानुशासन व मोहराजपराजय नाटक इत्यादिमध्यें या भाषेचे नमुने आढळतात. भरतानें आपल्या नाट्यशास्त्रांत पैशाचीचा उल्लेख केला नाही; परंतु रुद्रट, केशवमिश्र वगैरे साहित्यशास्त्रकारांनी इचा निर्देश केला आहे व वाग्भटानें हिला 'भूतभाषित' असें म्हटलें आहे. हिचा उपयोग भूत, पिशाच्च, राक्षस, वगैरेंच्या तोंडी करावा, असा वरील ग्रंथकारांचा आदेश आहे. षड्भाषाचंद्रिकेंत ही पिशाच्च देशाची भाषा असें म्हटलें असून पुढीलप्रमाणें पिशाच्च देशांचें वर्णन दिलें आहे: 'पांड्य-केकय-बाल्हीक-सह्य-नेपाल-कुन्तलाः। सुधेष्णभोजगांधारहैवकन्नोजनास्तथा ॥ एते पिशाच्चदेशाः स्युः ॥' मार्कण्डेयानें प्राकृतसर्वस्वामध्यें प्राकृतचंद्रिकेंतील 'कांचीदेशीयपाण्ड्ये च पांचालं गौडमागधम्। व्राचडं दाक्षिणात्यं च शौरसेनं च कैकयम्। शाबरं द्राविडं चैव एकादशपिशाचजाः।' याप्रमाणें अकरा प्रकारच्या पैशाचीचा उल्लेख केला आहे. परंतु अखेरीस 'कैकयं शौरसेनं च पांचालमिति च त्रिधा पैशाच्यः' म्हणून तीनच पैशाची ग्राह्य धरल्या आहेत. वर उल्लेखिलेले देश इतके परस्परां-पासून दूर दूर आहेत कीं, त्यांमध्यें एकाच भाषेचा व्यवहार संभवत नाही. भिन्नभिन्न प्रदेशांत राहणाऱ्या एखाद्या जातीची भाषा अशा तऱ्हेची असूं शकेल. व पूर्वीचे पिशाच्चासारखे रानटी लोक निरनिराळ्या देशांत जसजसे पसरले तसतसा या त्यांच्या भाषेचा प्रसार दूरदूरच्या प्रांतांत होणें संभवनीय दिसतें. ग्रिअर्सननें पिशाचभाषा वायव्येकडे पंजाब व अफगाणिस्थानामध्यें प्रथम उत्पन्न होऊन नंतर तिचा विस्तार इतर ठिकाणी झाला असावा, असें म्हटलें आहे. व पिशाचपुर,-पिसाउर,-पेशावर या पेशावरच्या व्युत्पत्तीवरून हें संभवनीय दिसतें. परंतु डॉ. होर्नले यांच्या मतें द्राविडादि अनार्य लोक आर्यलोकांच्या भाषेचा जो विकृत उच्चार करीत ती पैशाची असावी, व मेये याच्या मतें ही दरदांची भाषा असावी. वररुचीनें शौरसेनी प्राकृतपासून पैशाची उत्पन्न झाली, असें म्हटलें आहे. मार्कण्डेयानें पैशाचीचे कैकय, शौरसेन व पांचाल असे तीन भेद करून शौरसेनी व संस्कृत या दोहोंपासून कैकयपैशाची व कैकय पैशाचीपासून शौरसेनी पैशाची उत्पन्न झाली, असें म्हटलें आहे. परंतु त्यानें जीं शौरसेनी पैशाचीचीं लक्षणें दिलीं आहेत त्यांवरून तिचें शौरसेनी भाषेशी विशेषसें साम्य आढळून येत नाहीं. तर उलट मागधी भाषेशीं साम्य आढळतें. याकरितां तिला वास्तविक मागधी पैशाची म्हटलें पाहिजे, असें हरगोवनदास यांचें मत आहे. प्राकृत वैय्याकरणांनी पैशाचीची उत्पत्ति

शौरसेनी अथवा संस्कृत भाषेपासून झाली असें म्हटलें आहे. परंतु या प्राकृत भाषांची उत्पत्ति निरनिराळ्या देश्य बोलींपासून झाली, हें आम्ही वर प्रतिपादन केलेंच आहे. पैशाची भाषेचें प्राचीन स्वरूप आज उपलब्ध नाहीं. बहुधा त्या भाषेंतच गुणाढ्याची बृहत्कथा रचलेली असावी. व ती त्यानें शालिवाहन राजास अर्पण केली यावरून ती दक्षिण भरतखंडांतहि प्रचलित असावी असें वाटतें. रा. काणे यांच्या मतें बृहत्कथेचें रूपांतर ज्या अर्थी सोमदेव व क्षेमेन्द्र यांनीं केलें आहे त्या अर्थी ती माळव्यांत प्रचलित असावी. रा. राजारामशास्त्री भागवत यांनी पिशाचीचा अवेस्ता भाषेशी संबंध जोडला आहे. आज जी व्याकरण, काव्य किंवा नाटक इ० कांमध्यें पैशाची भाषा आढळते ती मध्यकालीन असून ख्रिस्ती सनाच्या २ ऱ्या शतकापासून ५ व्या शतकापर्यंत प्रचलित असावी. या भाषेचें शौरसेनी भाषेशी साम्य असून या दोहोंमध्यें जो फरक आढळतो तो पुढें दाखविला आहे.

पैशाचीची साधारणपणें ज्या ज्या बाबतींत शौरसेनीशीं भिन्नता आहे तेवढेच विशेष खालीं दिले आहेत. ह्याशिवाय इतर सर्व बाबतींत पैशाचीचें शौरसेनीशी साम्य असल्यानें, ते येथें दिले नाहीत.

**वर्णभेद**—( १ ) ज्ञ, न्य आणि ण्य यांच्या स्थानीं ञ्ञ होतो. जसें:–प्रज्ञा = पञ्ञा; ज्ञान = ञ्ञान; कन्यका = कञ्ञका; अभिमन्यु = अभिमञ्ञु; पुण्य = पुञ्ञ.

( २ ) ण आणि न याबद्दल न होतो. जसें:–गुण = गुन; कनक = कनक.

( ३ ) त आणि द यांच्याबद्दल 'त' होतो. जसें:–भगवती = भगवती; शत = सत; मदन = मतन; देव = तेव.

( ४ ) 'ल' च्या स्थानी 'ळ' होतो. जसें:— सील = शीळ; कुल = कुळ.

( ५ ) 'टु' बद्दल 'टु' आणि 'तु' होतात. जसें:—कुटुम्बक = कुटुम्बक, कुतुम्बक.

( ६ ) महाराष्ट्रीच्या लक्षणांत असंयुक्त व्यंजनाच्या परिवर्तनाचे १ ते १३ व १५ आणि १६ नियम शौरसेनीलाच लागू पडतात; पैशाचीला ते नियम लागू नाहीत. जसें:—लोक = ळोक; शाखा = साखा; भट = भट; मठ = मट; गरुड = गरुड; प्रतिभास = पतिभास; कनक = कनक; शपथ = सपथ; रेफ = रेफ; शबल = सबळ; यशस् = यस; करणीय = करणीय; अंगार = इंगार; दाह = दाह.

( ७) यादृश इ. शब्दांतील 'दृ' ची 'ति' होते. जसें:—यादृश = यातिस; सदृश = सतिस.

**नाम-विभक्ति**–अकारान्त शब्दाच्या पंचमीचें एकवचन आतो, आतु लागून होतें. जसें:–जिनातु, जिनातो.

**आख्यात**–( १ ) शौरसेनींतील 'दि' 'दे' प्रत्ययांबद्दल अनुक्रमें 'ति', 'ते' होतात. जसें:–गच्छति, गच्छते; रमति, रमते.

( २ ) भविष्यकाळांत 'स्सि' च्या ऐवजीं 'एय्य' होतो. जसें: – भविष्यति = हुवेय्य.

( ३ ) भावे आणि कर्मणि प्रयोगांत 'ईअ' आणि 'इज्ज' च्या ऐवजीं 'इय्य' होतें. जसें:–पठ्यते = पठिय्यते; हसिय्यते.

**कृदन्त**–'त्वा' प्रत्ययाऐवजीं कुठेंकुठें 'तून' तर कुठें 'त्थून' तर कुठें 'ध्दून' होतात. जसें:–गत्वा = गन्तून; पठित्वा = पठितून; नष्ट्वा = नत्थून, नध्दून; तष्ट्वा = तत्थून, तद्धून.

**अपभ्रंश**—पतंजलीनें आपल्या महाभाष्यांत एकाच शब्दाचे अनेक अपभ्रंश होतात, असें सांगितलें आहे. 'भूयांसो अपशब्दाः, अल्पीयांसः शब्दाः' एकैकस्यहि शब्दस्य बहवो अपभ्रंशाः तद्यथा गौरित्यस्य शब्दस्य गावी, गोणी, गोता, गोपोतलिका इत्येवमादयो अपभ्रंशाः' म्हणजे एकाच गौः शब्दाचे गावी, गोणी, गोता, गोपोतलिका असे अनेक अपभ्रंश होतात. यांपैकीं गावी व गोणी या दोन शब्दांचा उपयोग प्राचीन जैनसूत्रग्रंथांत आढळतो. दण्डीनें आपल्या काव्यादर्शांत आभीर प्रभृति लोकांची भाषा अपभ्रंश असून शास्त्रांत संस्कृतभिन्न सर्व भाषांस अपभ्रंश म्हणतात असें सांगितलें आहे. 'आभीरादिगिरः काव्ये अपभ्रंश इति स्मृताः । शास्त्रे तु संस्कृतादन्यदपभ्रंशतयोदितम् ॥'—काव्यादर्श १.३६. संस्कृत व्याकरणकारांनी सर्वच प्राकृत भाषांस अपभ्रंश म्हटलें आहे, परंतु प्राकृत वैय्याकरणांनी अपभ्रंश भाषा म्हणून एक प्राकृत भाषाभेद मानला आहे. अपभ्रंश भाषा

विक्रमोर्वशी, धर्माभ्युदय इ. नाटकग्रंथांत, हरिवंशपुराण, पउमचरिअ, भविसयत्तकहा, महापुराण, विलासवइकहा इत्यादि अनेक काव्यग्रंथांत व प्राकृत व्याकरणग्रंथांत व प्राकृतपिंगल नांवाच्या छंदोग्रंथांत आढळते. डॉ. होर्नलें यांच्या मतें पैशाचीप्रमाणें आर्यांच्या संस्कृतभाषेचा अनार्यलोक जो अशुद्ध उच्चार करीत त्यावरूनच निरनिराळ्या प्रादेशिक अपभ्रंश भाषा तयार झाल्या व त्या महाराष्ट्रीहून प्राचीन असाव्यात. ग्रियर्सनच्या मतें संस्कृतभाषेप्रमाणेंच प्राकृतभाषा जेव्हां ग्रांथिक स्वरूपांत व व्याकरणनियमांनीं निबद्ध झाली तेव्हां सामान्य लोकांच्या बोलभाषेस जें स्वरूप प्राप्त झालें त्याच ह्या निरनिराळ्या अपभ्रंश भाषा होत. यांची उत्पत्ति खि.सनाच्या पांचव्या शतकाच्याहि पूर्वीपासून होत आली होती. या अपभ्रंशभाषा खिस्तीसनाच्या दहाव्या शतकापर्यंत साहित्यिक भाषा म्हणून प्रचलित असून त्यांच्याबरोबर ज्या बोलभाषा व्यवहारांत रूढ झाल्या त्याच आधुनिक हिंदी, बंगाली, गुजराथी, मराठी वगैरे भाषा होत.

**अपभ्रंश भाषाभेदः**—अपभ्रंशभाषेचे अनेक भेद प्राकृतचंद्रिकेमध्यें निर्दिष्ट केले आहेत. ते पुढें दिले आहेत. 'व्राचडो लाटवैदर्भावुपनागरनागरौ । बार्बरावन्त्य पांचाल्यटाक्कमालवकैकयाः ॥ गौडोड्रहैव पाश्चात्यपाण्ड्यकौन्तलसैहलाः । कालिंग्यप्राच्यकार्णाटकाञ्च्यद्राविडगौर्जराः ॥ आभीरो मध्यदेशीयः सूक्ष्मभेदव्यवस्थिताः । सप्तविंशत्यपभ्रंशा वैतालादिप्रभेदतः ॥' हे सत्तावीस भेद मार्कण्डेयानें आपल्या प्राकृतसर्वस्वांत प्राकृतचंद्रिकेमधून उद्धृत करून त्यांचीं उदाहरणें व लक्षणें पुढें दिल्याप्रमाणें दिलीं आहेत.

'टाक्कं टक्कभाषा नागरोपनागरादिभ्यो अवधारणीयम् । तु बहुला मालवी। वादीबहुला पांचाली। उल्लप्राया वैदर्भी। संबोधनाढ्या लाटी। ईकारोकारबहुला औढ्री। सवीप्सा कैकेयी। समासाढ्या गौडी। डकारबहुला कौन्तली। एकारिणीच पांड्या। युक्ताढ्या सेहली। हियुक्ता कालिंगी। प्राच्यातद्देशीय भाषाढ्या। ज(भ)ट्टादि बहुला आभीरी। वर्णविपर्ययात्कार्णाटी। मध्यदेशीया तद्देशीयाढ्या। संस्कृताढ्याच गौर्जरी। चकारात्पूर्वोक्त टक्कभाषाग्रहणम्। रत(ल)हभां व्यत्ययेन पाश्चात्या। रेफव्यत्ययेन द्राविडी। ढकारबहुला वैतालिकी। एओबहुला काञ्ची। शेषा देशभाषाविभेदात्।' परंतु ती इतकी असमाधानकारक व अस्पष्ट आहेत की, मार्कण्डेयानेंच त्यांचें पृथक् वर्णन न करितां सर्व अपभ्रंशांचा नागर, व्राचड आणि उपनागर या तीन मुख्य वर्गांत अंतर्भाव केला आहे. परंतु भिन्न भिन्न प्रदेशांत ज्या भाषा प्रचलित होत्या, त्यांचा स्वभाव भिन्न असून त्यांचा एका संघांत समावेश होणें बरोबर नाहीं. या सर्व अपभ्रंशभाषा निरनिराळ्या असल्या तरी त्या साहित्यनिबद्ध नसल्यामुळें त्यांची उदाहरणें मिळणें अशक्य आहे. म्हणूनच प्राकृतचंद्रिकाकार किंवा प्राकृतसर्वस्वकार यांनीं त्यांचें अधिक विवेचन करणें टाळलें आहे. मार्कण्डेयाची नागर अपभ्रंश हीच हेमचंद्रानें अपभ्रंश या सामान्य नांवानें निर्दिष्ट केलेली भाषा होय. व त्यानें दिलेल्या लक्षणांवरून व उदाहरणांवरून ती राजस्थानी अपभ्रंश अथवा रजपुताना व गुजराथ या प्रदेशांतील भाषा असावी.

व्राचड अपभ्रंशाची लक्षणें व उदाहरणें यांवरून ती सिंध देशाची भाषा असावी, असें दिसतें. उपनागर या भाषेचीं विशेष लक्षणें न देतां ती नागर व व्राचड यांच्या मिश्रणानें बनली आहे, असें सांगितलें आहे. याशिवाय मध्यदेशांत शौरसेनी अपभ्रंश आढळतो. महाराष्ट्री, अर्धमागधी, मागधी किंवा पैशाची यांच्या अपभ्रंशांचीं उदाहरणें आढळण्यांत येत नाहींत.

वर दिलेल्या निरनिराळ्या अपभ्रंशांची उत्पत्ति हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रदेशांत झाली आहे, हीच गोष्ट रुद्रट व वाग्भट यांनी आपल्या साहित्यग्रंथांत नमूद केली आहे. 'षष्ठोऽत्र भूरिभेदोदेशविशेषादपभ्रंशः।' –काव्यालंकार २.१२. 'अपभ्रंशस्तु यच्छुद्धं तत्तद्देशेषु भाषितम्।'–वाग्भटालंकार २.३. या निरनिराळ्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या अपभ्रंशभाषांपासून ज्या अर्वाचीन देश्य भाषा उत्पन्न झाल्या त्या सामान्यतः पुढीलप्रमाणें सांगतां येतील.

महाराष्ट्री अपभ्रंशापासून मराठी व कोंकणी, मागधी अपभ्रंशाच्या पूर्वशाखेपासून बंगाली, उडिया व आसामी व बिहारी शाखेपासून मैथिली, मगही व भोजपुरी; अर्धमागधी अपभ्रंशापासून पूर्वहिंदी म्हणजे अवधी, बघेली व छत्तीसगडी; शौरसेनी अपभ्रंशापासून बुंदेली, कनौजी, व्रज, कांगरू व पश्चिम हिंदी; नागर अपभ्रंशा-

पासून राजस्थानी, माळवी, मेवाडी, जयपुरी, मारवाडी व गुजराथी; पालीपासून सिंहली व मालदिवी; टक्की अथवा ढक्कीपासून लहंदी व पश्चिम पंजाबी; टक्की अपभ्रंशापासून पूर्व पंजाबी; व्राचड अपभ्रंशापासून सिंधी व पैशाची अपभ्रंशापासून काश्मिरी अशा निरनिराळ्या देश्यभाषा उत्पन्न झाल्या.

**नागर अपभ्रंशाचीं मुख्य लक्षणें–वर्णपरिवर्तन** ( १ ) निरनिराळ्या स्वरांबद्दल निरनिराळे स्वर होतात. जसें:–कृत्य = कच्च, काच्च; वचन = वेण, वीण; बाहु = बाह, बाहा, बाहु; पृष्ठ = पट्ठि, पिट्ठि, पुट्ठि; तृण = तण, तिण, तृण; सुकृत् = सुकिद, सुकृद; लेखा = लिह, लीह, लेह.

( २ ) स्वरांच्या दरम्यान असलेल्या असंयुक्त क, ख, त, थ, प आणि फ यांच्या ऐवजी अनुक्रमें ग, घ, द, ध, व आणि भ होतात. जसें:--विच्छेदकर = विच्छोहगर; मुख = मुघ; कथित = कधिद; शपथ = सवध; सफल = सभल.

( ३ ) आरंभी नसलेल्या असंयुक्त 'म' बद्दल विकल्पानें सानुनासिक 'व' होतो. जसें:–कमल = कँवल, कमल; भ्रमर = भँवर, भमर.

( ४ ) संयोगांत उत्तरपदी असलेल्या 'र' चा विकल्पानें लोप होतो. जसें:–प्रिय = पिय, प्रिय; चन्द्र = चन्द, चन्द्र.

( ५ ) कोठें कोठें संयोगांत उत्तरपदी असलेल्या 'य'चा विकल्पानें 'र' होतो. जसें:—व्यास = व्रास, वास; व्याकरण = व्रागरण, वागरण.

( ६ ) महाराष्ट्रीत जेथें 'म्ह' होतो, तेथें अपभ्रंशांत 'म्भ' आणि 'म्ह' असे दोन्ही होतात. जसें:–ग्रीष्म = गिम्भ, गिम्ह; श्लेष्म = सिम्भ, सिम्ह.

**नामविभक्ति**—१ विभक्तिप्रत्यय लागतांना ऱ्हस्व स्वराबद्दल दीर्घ व दीर्घाबद्दल ऱ्हस्व स्वर प्रायः होतो. जसें:–श्यामलः = सामला; खड्गाः = खग्ग; दृष्टिः = दिट्ठि; पुत्री = पुत्ति.

२ सात विभक्तींचे जे साधारणतः प्रत्यय आहेत ते खालीं दिल्याप्रमाणें आहेत. लिंगभेद व शब्दभेद यांवरून अनेक विशेष प्रत्यय होतात, ते विस्तारभयास्तव देत नाहीं.

| | एकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्रथमा | उ, हो | ० |
| द्वितीया | ,, ,, | ० |
| तृतीया | एं | हि |
| चतुर्थी | सु, हो, स्सु | हं, ० |
| पंचमी | हे, हु. | हुं |
| षष्ठी | सु, हो, स्सु, | हं, ० |
| सप्तमी | इ, हि | हिं. |

**आख्यातविभक्ति**

| | एक व. | बहु. व. |
|---|---|---|
| १ प्रथमपुरुष | उं | हुं |
| द्वितीय ,, | हि | हु |
| तृतीय ,, | इ, ए | हिं. |

२ मध्यम ( द्वितीय ) पुरुषाच्या आज्ञार्थी एकवचनाचे इ, उ, ए, हे प्रत्यय आहेत. जसें–कुरु = करि, करु, करे.

३ भविष्यकाळांत प्रत्ययाच्या अगोदर 'स' आगम होतो. जसें–भविष्यति = होसइ.

**कृदन्त**—१ 'तव्य' प्रत्ययाबद्दल 'इएव्वउं,' एव्वउं' आणि 'एवा' असे होतात. जसें:–कर्तव्य = करिएव्वउ, करेव्वउं, करेवा.

२ 'त्वा' बद्दल इ, इउ, इवि, अवि, एप्पि, एप्पिणु, एवि, एविणु होतात. जसें:—कृत्वा = करि करिउ, करिवि, करवि, करेप्पि, करेप्पिणु, करेवि, करेविणु.

३. 'तुम्' प्रत्ययाबद्दल एवं, अण, अणहं, अणहिं, एप्पि, एप्पिणु, एवि, एविणु, होतात. जसें :—कर्तुम् = करेवं, करण, करणहं, करणहिं, करेप्पि, करेप्पिणु, करेवि, करेविणु.

४. शीलाद्यर्थक 'तृ' प्रत्ययाबद्दल 'अणअ' असें होतें. जसें:—कर्तृ =करणअ; मारयितृ = मारणअ.

तद्धित:—'त्व' आणि 'ता' या प्रत्ययांबद्दल 'प्पण' होतें, जसें : देवत्व = देवप्पण; महत्त्व = वड्डुप्पण.

**देशी भाषांची उत्पत्तिः**—पूर्वी असें विवेचन करण्यांत आलेंच आहे कीं, वैदिक आर्य ज्या वेळीं भरतखंडामध्यें येऊन आपल्या संस्कृतीचा प्रसार करीत आपली वसाहत सर्व प्रदेशांमध्यें स्थापन करीत होते, त्याच वेळीं येथें मूळ वसाहत करून राहिलेल्या द्राविड, कोळ वगैरे लोकांच्या स्थानिक निरनिराळ्या बोली प्रचलित होत्या. त्या बोलींचा व आर्यांच्या भाषेचा एकमेकींवर परिणाम होत होता; व त्यामुळें आपणांस वैदिक भाषेमध्येंहि परकीय अथवा अवैदिक शब्दांचा प्रवेश झालेला आढळतो. तसेंच वैदिक आर्यांमध्येंहि वेदग्रंथांची वाङ्मयीन अथवा साहित्यिक भाषा व तत्कालीन आर्य लोकांचीच बोलण्याची भाषा यांमध्येंहि कांहीं फरक असणें साहजिक होतें व स्थानिक बोलीचा वाङ्मयीन भाषेपेक्षां आर्यांच्या व्यावहारिक भाषेवर अधिक परिणाम झाला असला पाहिजे. नंतर वैदिक भाषा जसजशी वाङ्मयीन व नियमबद्ध होत गेली तसतशी व्यावहारिक भाषा व त्या भाषेंतील अंतर वाढत जाऊन ती भाषा सामान्य लोकांस दुर्बोधहि होऊं लागली. ही गोष्ट आपणांस यज्ञांतील कांहीं आदेश व कांहीं मंत्रांचे विनियोग—यांस लैंगिक विनियोग म्हणतात. उदा० 'कुक्कुटोसि मधुजिह्व' या मंत्राचा सोम कुटण्याकडे विनियोग—हे त्यांच्या यौगिक अर्थास धरून नसून केवळ ध्वनि-साम्यावरून बसविलेले आहेत, यावरून दिसून येते. याप्रमाणेंच पुढें अभिजात संस्कृत व त्यानंतर निरनिराळ्या प्राकृत भाषा या सामान्य लोकांच्या व्यावहारिक भाषेस न वाङ्मयीन व व्याकरणबद्ध स्वरूप प्राप्त होऊन बनल्या व यांना स्थिर असें स्वरूप प्राप्त झालें. परंतु लोकांच्या बोली अथवा व्यावहारिक भाषा ह्या कालमान व परिस्थिति यांना अनुसरून व अनेक लोकांच्या संघटनामुळें आपलें अस्तित्व व्यवहारास सुलभ असें व अनेक लोकसमाजांच्या भाषांशीं देवाणघेवाण करीत, योग्य ते बदल करीत कायम ठेवून राहिल्या होत्या. ह्याच व्यावहारिक भाषा अथवा बोली आज निरनिराळ्या देशी भाषा या नांवानें प्रचलित आहेत. या देशी भाषांत आपणांस कांहीं निरनिराळ्या प्रादेशिक विशेषांबरोबरच वैदिक, संस्कृत व प्राकृत या सर्व भाषांचे विशेष प्राचुर्यानें आढळतात. केवळ आर्यवंशज लोकांच्या देशीभाषांवरच नव्हे तर द्राविड लोकांच्याहि ज्या आज देश्यभाषा प्रचलित आहेत त्यांवरहि संस्कृत व तत्संभव भाषांचा परिणाम विशेष रीतीनें झालेला आपणांस आढळतो व या प्रत्येक देशी भाषेंतील शब्दसंपत्तीमध्यें तत्सम म्हणजे संस्कृत शब्द जसेच्या-तसेच घेतलेले, तद्भव म्हणजे संस्कृतशब्दांपासून बनविलेले व देश्य म्हणजे मूळचे, असे तीन प्रकार आढळतात. तसेंच त्यांच्या लिपीहि संस्कृत ब्राह्मी लिपीपासूनच बनल्या असून कांहीं द्राविड भाषांचें व्याकरणहि संस्कृत व्याकरणपद्धतीस अनुसरून एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष संस्कृत भाषेंतहि लिहिलेलें आढळतें.

अशा तऱ्हेच्या निरनिराळ्या देशी भाषा प्रचलित होत्या यासंबंधी उल्लेख आपणांस महाभारतकालापासून आढळतात. महाभारतांत शल्यपर्वांत 'नानाचर्मभिराच्छन्नानानाभाषाश्च भारत । कुशला देशभाषासु जल्पन्तोऽन्योन्यमीश्वराः॥' महा. शल्य. ४६.१०३. त्याप्रमाणेंच भरताच्या नाट्यशास्त्रांत 'अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि देशभाषाविकल्पनम्।' व 'अथवा छन्दतः कार्या देशभाषा प्रयोक्तृभिः।' नाट्यशास्त्र १७, २४ व ४६ असा उल्लेख आढळतो. याप्रमाणेंच वात्स्यायनाच्या कामसूत्रांत संभाषणामध्यें संस्कृत व देशीभाषा या दोहींचाहि योग्य उपयोग करावा असें सांगितलें आहे. 'नात्यन्तं संस्कृतेनैव नात्यन्तं देषभाषया । कथां गोष्ठीषु कथयँल्लोके बहुमतो भवेत्॥'—कामसूत्र १. ४, ५०. त्याप्रमाणेंच विष्णुधर्मोत्तरामध्यें 'संस्कृतैः प्राकृतैर्वाक्यैर्यः शिष्यमनुरूपतः । देशभाषाऽऽद्युपायैश्च बोधयेत् स गुरुः स्मृतः ॥' असा उल्लेख आहे. त्याप्रमाणेंच मृच्छकटिकामध्यें अनेक देशी भाषांचा उल्लेख आला आहे [ दक्खिणत्ता अवत्तभासिणो खसः...म्लेच्छजातीनाम् अनेक देशभाषाभिज्ञा ६ ]. मुद्राराक्षसांतहि 'बहुविधदेशवेषभाषा' चा

उल्लेख आहे. कादंबरीतहि 'शिक्षिताशेषदेशभाषेण सर्व लिपिज्ञेन' असा उल्लेख आढळतो. काव्यानुशासनांत 'अपभ्रंश भाषानिबद्धसन्धिबन्धमब्धिमथनादि ग्राम्यापभ्रंशभाषानिबद्धावस्कन्धकबन्धं भीमकाव्यादि' (८. ३३०) असें म्हणून देशी व ग्राम्य भाषांचा उल्लेख केला आहे.

प्राकृत वाङ्मयांत तर देशी भाषांचा उल्लेख अनेक ठिकाणीं येतो व त्यांची संख्या अठरा सांगितलेली आढळते. 'संस्कृतं नाम दैवी वागन्वाख्याता महर्षिभिः। तद्भवस्तत्समो देशीत्यनेकः प्राकृतक्रमः॥'—काव्यादर्श १. ३३. 'संस्कृतं स्वर्गिणां भाषा शब्दशास्त्रेषु निश्चिता। प्राकृतं तज्ज तत्तुल्य देश्यादिकमनेकधा॥'—काव्यालंकार २. २. 'तते णं से मेहे कुमारे...अट्ठारसविहिप्पयार देसीभासा विसारए...होत्था;' तसेंच 'तत्थ णं चंपा ए णयरीए देवदत्ता णामं गणिया परिवसइ...अट्ठारसदेसीभासाविसारए'—ज्ञाताधर्म कथासूत्र पृ. ३८ व ९२. 'तत्थ णं वाणियगामे कामज्झया णामं गणिया होत्था...अट्ठारसदेसीभासाविसारया'—विपाकश्रुत पृ. २. ८. 'तए णं से दढपइण्णे दारए—अट्ठारस देसीभासा विसारए'—औपपातिक सूत्र, कलम १०९. 'तए णं से दढ पतिण्णेदारए—अट्ठारस विहदेसिप्पगारभासा विसारए'—राजप्रश्नीय सूत्र. १४८. शके ६९९ चैत्र कृष्ण चतुर्दशी म्हणजे विक्रम संवत् ८३५ च्या वर्षी रचलेल्या कुवलयमालाकथा नांवाच्या प्राकृत भाषेंत रचलेल्या एका ग्रंथांत कथानुसंधानानें तत्कालीन अठरा देशी भाषांचे नमुने दिले आहेत. या ग्रंथाची वि. सं. ११३९मध्यें लिहिलेली हस्तलिखित प्रत जेसलमीर भांडारामध्यें आहे. तीवरून श्री. लालचंद्र गांधी यांनीं आपल्या अपभ्रंशकाव्यत्रयीत उतारा घेतला आहे तो पुढें मूळ अपभ्रंश व त्याचें संस्कृत रूपांतर असा दिला आहे. त्यामध्यें जरी शेवटच्या श्लोकांत अठरा देशी भाषा असें म्हटलें आहे तरी पुढील सोळा भाषांचेच नमुने आढळतात. १ गोल्ल २ मध्यदेश ३ मगध ४ अन्तर्वेदी ५ कीर ६ टक्क ७ सिन्ध ८ मरु ९ गुर्जर १० लाट ११ माल्व १२ कर्णाटक १३ तायिक १४ कोसल १५ महाराष्ट्र १६ अन्ध्र व यांशिवाय खस, पारस, बब्बर या भाषांचा उल्लेख केला आहे.

(१) कसिणें णिट्ठुरवयणें बहुकसमरभुंजए अलज्जे य। 'अरे'त्ति उल्लवंते अह पेच्छइ गोल्लए तत्थ॥ (कृष्णान् निष्ठुरवचनान् बहुकसमरभुञ्जानानलज्जांश्च। अरे इत्युल्लपतोऽथ प्रेक्षते गोल्लकांस्तत्र॥)

(२) णय-णीति-संधि-विग्गहपडुए बहुजंपिरे य पयतीए। 'तेरे मेरे आउ'त्ति जंपिरे मज्झदेसे य॥ (नय-नीति-संधि-निग्रहपटुकान् बहुजल्पाकांश्च प्रकृत्या। 'तेरे मेरे आ ओ' इति जल्पतो मध्यदेशांश्च॥).

(३) णीहरीयपोट्टदुव्वणमडहए सुरयकेलितल्लिच्छे। 'एगे ले' जंपुल्ले अह पेच्छइ मागहे कुमारो॥ (निःसृतोदर-दुर्वर्ण-वामनान् सुरतकेलितल्लिप्सान्। 'एगे ले' जल्पाकानथ प्रेक्षते मागधान् कुमारः॥)

(४) कविले पिंगलणयणे भोअणकहमेत्तदिण्णवावारे। 'कित्तो किम्मो जिअ' जंपिरे य अह अंतवेते य॥ (कपिलान् पिंगलनयनान् भोजनकथामात्रदत्तव्यापारान्। 'कित्तो किम्मो जिअ' जल्पाकानथान्तर्वेद्यांश्च॥)

(५) उत्तुंग-थूलघोणे कणयवण्णे य भारवाहे य। 'सरि वा (पा) रि' जंपिरे कीरे कुमारो पलोएइ॥ (उत्तुंग-स्थूलघोणान् कनकवर्णांश्च भारवाहांश्च। 'सरि पारि' जल्पाकान् कीरान् कुमारः प्रलोकयति॥)

(६) दक्खिण्ण—दाण—पोरुस—विण्णाण—दयाविवज्जियसरीरे। 'एहं तेहं' चवंते टक्के उण पेच्छए कुमारो॥ (दाक्षिण्य—दान—पौरुष-विज्ञान—दयाविवर्जितशरीरान्। 'एहं तेहं' ब्रुवाणान् टक्कान् पुनः प्रेक्षते कुमारः॥)

(७) सललित—मिदु—मंदपए गंधव्वपिए सदेसगयचित्ते। 'व (च) उडयमे' भणिरे सुहए अह सेन्धवे दिट्ठे॥ (सललित—मृदु—मन्दपदान् गान्धर्वप्रियान् स्वदेशगतचित्तान्। 'चउडय मे' भणतः सुभगानथ सैन्धवान् दृष्टवान्॥

(८) वंके जडे य जड्डे बहुभोइ कठि (ढि) ण—पीण—सू (थू) णंगे। 'अप्पा तुप्पा' भणिरे अह पेच्छइ मारुए तत्तो॥ (बक्रान् जडांश्च जाड्ये बहुभोजिनः कठिनपीनस्थूलाङ्गान्। अप्पा तुप्पा' भणतोऽथ प्रेक्षते मारवांस्ततः॥)

(९) घयलो (ला) लिय पुट्ठंगे धम्मपरे संधि—विग्गहं णिउणे। 'णउ रे भल्लउं' भणिरे अह पेच्छइ गुज्जरे अवरे॥ (घृतलो( ला )लित पुष्टाङ्गान् धर्मपरान् सन्धि—विग्रहे निपुणान्। 'णउ रे भल्लउं' भणतोऽथ प्रेक्षते गौर्जरानपरान्॥)

( १० ) ण्हाउलित्त-विलित्ते कयसीमंते सुसोहियसुगत्ते । 'आहम्ह काइं तुम्हं मित्तु' भणिरे पेच्छए लाडे ॥ ( स्नातोलिप्त-विलिप्तान् कृतसीमन्तान् सुशोभितसुगात्रान् । 'आहम्ह काइं तुम्हं मित्तु' भणतः प्रेक्षते लाटीयान् ॥ )

( ११ ) तणु-साम-मडहदेहे कोवणए माण-जीविणो रोद्दे । 'भाउअ भइणी तुम्हे' भणिरे अह मालवे दिट्ठे ॥ ( तनु-श्याम-लघुदेहान् कोपनान् मानजीविनो रौद्रान् । 'भाउअ भइणी तुम्हे' भणतोऽथ मालवीयान् दृष्टवान् ॥ )

( १२ ) उक्कडदप्पे पिअमोहणे ए( प )यरोद्दे पयंगवित्ती य । 'अद्रि पोण्डि मं( न )रे' भणिरे पेच्छइ कण्णाडए अण्णे ॥ ( उत्कटदर्पान् प्रियमोहनान् पदरौद्रान् पतङ्गवृत्तींश्च । 'अद्रि पोण्डि म( न )रे' भणतः प्रेक्षते कर्णाटकीयानन्यान् । )

( १३ ) कुप्पासपाउअंगे मासरुई पाणमयणतल्लिच्छे । 'इसि किसि मिसि' भणमाणे अह पेच्छइ ताइए अवरे ॥' ( कुर्पासप्रावृताङ्गान् मांसरुचीन् पान-मदनतालिप्सान् । 'इसि किसि मिसि' भणतोऽथ प्रेक्षते तायिकानपरान् ॥ )

( १४ ) सत्थकलापत्तट्ठो( ट्ठे )माणी पिअकोवणे कढिणदेहे । 'जल तल ले' भणमाणे कोसलए पुलइए अवरे ॥ ( श( शा )स्त्रकलाकुशलान् मानिनः प्रियकोपनान् कठिनदेहान् । 'जल तल ले' भणतः कौशलिकान् प्रलोकतेऽपरान् ॥ )

( १५ ) दढ-मडह-सामलंगे सहिरे अहिमाण-कलहसीले य । 'दिण्णल्ले गहिल्ले' उल्लविरे तत्थ मरहट्ठे ॥ ( दृढ-लघु-श्यामाङ्गान् सहमानानभिमान-कलहशीलांश्च । 'दिण्णल्ले गहिल्ले' उल्लपतस्तत्र महाराष्ट्रीयान् ॥ )

( १६ ) पिअमहिला-संगामे सुंदरगत्ते य भोइणे रोद्दे । 'अटि पुटि रटिं' भणंते र( अ )न्ध्रे कुमरो पलोएइ ॥ ( प्रियमहिलासङ्ग्रामान् सुन्दरगात्रांश्च भोगिनो रौद्रान् । 'अटि पुटि रटिं' भणत आन्ध्रान् कुमारः प्रलोकते ॥ )

( १७ ) इअ अट्ठारस देसीभासाउ पुलइऊण सिरिअत्तो । अण्णाइं अ पुलएई खस-पारस-बब्बरादीए ॥ ( इत्यष्टादश देशीभाषाः प्रलोक्य श्रीदत्तः । अन्यांश्च प्रलोकयति खस-पारस-बर्बरादीन् ॥ )

**भारतीय आर्य भाषेचे कालविभागः**--आतांपर्यंत विवेचन केल्याप्रमाणें आपल्या आर्यभाषांची जी परिणती होत आली आहे तिचे थोडक्यांत साकल्यानें कालविभाग पुढें दिल्याप्रमाणें पाडतां येतील.

१ उच्चार व व्याकरण या दोहोंच्या दृष्टीनें पाहतां एकंदर भारतीय आर्य भाषेचे सोइस्कर असे तीन काल-विभाग करतां येतात. पहिल्या कालविभागास प्राचीन इंडो आर्यन काल असें नांव देतां येईल. या कालांत उच्चार व रूपें यांची विविधता किंवा प्राचुर्य दिसून येतें. यामध्यें पूर्ववैदिक व वैदिक असे दोन कालखंड करतां येतील.

२ दुसऱ्या कालविभागास मध्य भारतीयभाषा काल असें म्हणतां येईल. या कालांत प्राचीन व्यंजन-माला शक्य तितकी साधी करण्याची व व्याकरणरूपांची विविधता कमी करण्याची चळवळ झाली. या काल-विभागाचेहि पूर्व, मध्य व उत्तर असे तीन पोटविभाग करतां येतील.

३ तिसऱ्या कालविभागास अर्वाचीन भारतीय भाषाकाल असें नांव देतां येईल. दुसऱ्या कालविभागांत चालू झालेली व्याकरणरूपांची छाटाछाट इत्यादि स्वरूपाची चळवळ या कालांत पूर्णतेस पावून रूपांचें प्राचुर्य नष्ट होऊन प्रत्ययांचा उदय झाला. भाषेचें स्वरूप बरेंच पालटलें आणि भारतीय देशभाषा अस्तित्वांत आल्या.

पूर्व वैदिक, वैदिक आणि संस्कृत हीं पहिल्या कालविभागाचीं प्रतीकें होत. निरनिराळ्या प्राकृत भाषा व अशोकाच्या शिलालेखीय भाषा व पाली व ग्रांथिक प्राकृत भाषा यांचा समावेश दुसऱ्या कालविभागांत करतां येईल. दुसऱ्या व तिसऱ्या कालविभागांच्या संधिकालांत आपणांस ग्रांथिक अपभ्रंश भाषांचा समावेश करतां येईल. या ग्रांथिक अपभ्रंश भाषा प्राकृत भाषांच्या विकृत बोलीवर उभारलेल्या असत आणि यांच्याचपासून अर्वाचीन देशभाषांचा उगम झाला. यांचीच वर्षसंख्या अथवा कालमर्यादा दाखवावयाची असल्यास पुढें दिल्याप्रमाणें देतां येईल.

**१ प्राचीन भारतीय भाषाकालविभागः**—हा सामान्यतः वेदपूर्व व वेदरचनाकालापासून म्हणजे खि. पू. ५००० ते १५०० पासून बुद्धपूर्वकालापर्यंत म्हणजे खि. पू. ५०० पर्यंत मानतां येईल.

**२ मध्ययुगीन भारतीय भाषा कालविभागः**—हा साधारणपणें खि. पू. ५०० पासून इ. स. १००० पर्यंत मानतां येईल. याचे (अ) खि. पू. ५०० ते खि. पू. २००, (आ) खि. पू. २०० ते इ. स. २०० इतका उत्क्रांतिकाल, व खि. पू. २०० ते इ. स. ५००–६०० हा मध्यकाल व (इ) इ. स. ६०० ते इ. स. १००० पर्यंत उत्तरकाल असे पोटविभाग करतां येतील.

३ इ. स. १००० नंतरची कांहीं शतकें हा अर्वाचीन देशीभाषांचा काल.

**मराठी भाषेवर प्राकृत भाषांचा ठसाः**—याप्रमाणें निरनिराळ्या प्रादेशिक अथवा देशी भाषा भरतखंडाच्या भागांत फार प्राचीन काळापासून प्रचलित असून आजहि त्या निरनिराळ्या नांवांनीं प्रचलित आहेत. त्यांची जंत्री खानेसुमारीवरून दुसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेच्या परिशिष्टांत दिली आहे व तेथें त्या भाषा बोलणाऱ्यांची लोकसंख्याहि नमूद केली आहे. आपला प्रस्तुत विषय जी मराठी भाषा ती भरतखंडाच्या कोणकोणत्या विभागांत बोलली जाते व तिनें कोणता प्रदेश व्यापला आहे, व ती बोलणाऱ्यांची लोकसंख्या किती आहे इत्यादि माहिती तिसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेंत व परिशिष्टांत दिली आहे. मुख्यतः ही महाराष्ट्राची भाषा असून वेदकालापासून आजपर्यंत तिच्यावर आर्यांची बोलभाषा, वैदिक, संस्कृत व प्राकृत भाषा यांचा परिणाम होऊन तिचें सांप्रतचें स्वरूप बनलें आहे. या भाषेंतहि तत्सम, तद्भव व देश्य या तिन्ही प्रकारचे शब्द आढळतात. कांहीं संस्कृत शब्द वेदकालीन स्वरूपांतील तर कांहीं अभिजात संस्कृतकालीन असून प्राकृत भाषांमार्फतहि बरेचसे शब्द आजच्या मराठीमध्यें आलेले आहेत. त्यांत विशेषतः महाराष्ट्री म्हणून जी प्राकृत भाषांतील विशेष प्रौढ व वाङ्मयीन भाषा तीच मराठीची आधारभूत भाषा आहे. तथापि आर्यांची वसाहत दंडकारण्यांत अथवा महाराष्ट्रांत होण्यापूर्वी त्यांचें ज्या निरनिराळ्या प्रदेशांतून परिभ्रमण झालें त्या प्रदेशांतीलहि प्राकृत भाषांचा ठसा मराठीवर उठल्याच्या स्पष्ट खुणा आपणांस आढळून येतात. या आर्यांच्या परिभ्रमणाचा मार्ग विंध्य पर्वताच्या पूर्व आणि पश्चिम दोन्हीहि बाजूंकडून असा आहे. रामाच्या दण्डकारण्यांतील आगमनाचा मार्ग पाहूं गेल्यास विंध्यपर्वताच्या पूर्वेकडून तो आला असावा असें वाटतें व त्यानंतरहि आर्यांचे बरेच संघ त्या दिशेकडून येऊन महाराष्ट्रांत स्थायिक झाले असावेत. या दिशेकडून येणाऱ्या लोकांच्या भाषेवर मागधी व पाली या भाषांचा संस्कार झाला असला पाहिजे; व तशीं कांहीं चिन्हें आपणांस प्रस्तुतच्या मराठींत दृष्टीस पडतात व मागधीपासून बनलेली देशी भाषा जी बंगाली तिच्यांत व आजच्या मराठींत बऱ्याच सामान्य गोष्टी आढळतात, याचेंहि कारण हेंच आहे. याप्रमाणेंच कांहीं आर्य पश्चिमेकडून समुद्रमार्गानें किंवा गुजराथच्या बाजूनें येऊन महाराष्ट्रांत स्थायिक झाले व हें आगमन बऱ्याच अर्वाचीन काळपर्यंत चालू होतें, ही गोष्ट आपणांस पाठारे प्रभूंच्या बिंबराजाबरोबरच्या आगमनावरून दिसून येते. त्यामुळें त्या प्रदेशांतील प्राकृत भाषांचाहि कांहीं परिणाम महाराष्ट्रांतील महाराष्ट्री किंवा तदुत्तर महाराष्ट्री अपभ्रंश या महाराष्ट्रांतील भाषांवर झाला असला पाहिजे. या बाबतींत सिंधी भाषेचें मराठी भाषेशी असलेलें कांहीं बाबतींतील विशेष साम्य व कांहीं गुजराथी भाषेंतील सामान्य शब्द ही पुरावा म्हणून देतां येतील.

**भरतखंडांतील देशी भाषांचें वर्गीकरणः**— पूर्वी विवेचन केल्याप्रमाणें प्राकृतभाषांचे जे निरनिराळे गट करतां येतात त्यांपासून ज्या अर्वाचीन देश्यभाषा उत्पन्न झाल्या त्यांचे प्रादेशिक संघ पुढें दिल्याप्रमाणें पाडतां येतात. १ वायव्य संघः—काश्मिरी, लहंदी, सिंधी. २ दक्षिण संघः—मराठी. ३ पश्चिम संघः—गुजराती, पंजाबी, राजस्थानी, पश्चिमहिंदी. ४ उत्तर संघः—पश्चिमपहाडी, मध्यपहाडी, नेपाळी. ५ मध्य संघः—पूर्वहिंदी. ६ पूर्व संघः—आसामी, बंगाली, बिहारी, उरिया.

ग्रिअर्सनच्या मतें ३ व ४ हे संघ परस्पर संबद्ध असून त्यास अंतर्कुल असें म्हणतां येईल, १, २, व ६ या संघांस बाह्यकुल असें संबोधितां येईल. पूर्वहिंदी ही दोहोंमधील दुवा होय. हें वरील प्राकृत वर्गीकरणाशीं जुळतें. जर आपण वायव्य संघ सोडला तर बाकीच्या भाषांचे दोन वर्गः एक अंतर्वर्ग यामध्यें शौरसेनीशी संबद्ध व एक बाह्यवर्ग यामध्यें दक्षिण व प्राकृतभाषांशीं संबद्ध असे दोन वर्ग पडतील.

डॉ. हॉर्न्ले यांच्या मतें मराठीचें काहीं बाबतींत पश्चिम ( अंतर्वर्ग ) व इतर बाबतीत पूर्व ( बाह्यवर्ग ) यांशीं साम्य आहे; व कांहीं बाबतींत ती दोहोंपेक्षां भिन्न आहे. म्हणून तो मराठीचा एक स्वतंत्र वर्गच मानतो.

**मराठी व पश्चिम अथवा अंतर्भाषा यांतील साम्यः**——यांपैकीं सामान्यतः प्राकृतभाषांचे पूर्व आणि पश्चिम असे जे दोन संघ करतां येतात म्हणून वर सांगितलें त्यांमध्यें व मराठीमध्यें कितपत साम्य आहे याचा आतां आपण स्थूल मानानें विचार करूं. गुजराथी व पंजाबी या भाषांप्रमाणें मराठीतहि व आणि ब हे दोन वर्ण स्वतंत्र आहेत. दर्शक व संबंधी सर्वनामें पुंल्लिंगी प्रथमेच्या एकवचनांत पश्चिम हिंदीप्रमाणें ओकारान्त असतात, परंतु पूर्वेकडील भाषांत एकारान्त असतात. जुन्या मराठींतहि पुंल्लिंगी प्रथमेचें एकवचन उकारान्त किंवा ओकारान्त असतें. जसें:—नंदनु, रावो. यावरून महाराष्ट्री व शौरसेनीमध्यें ज्या बाबतीत साम्य आहे त्याच बाबतींत मराठी व अंतर्भाषा यांमध्यें साम्य आहे, हें स्पष्ट आहे. याखेरीज कर्त्याची विभक्ति, सकर्मक क्रियापदांचा भूतकाळीं कर्मणि उपयोग व हेत्वर्थ 'ण' प्रत्ययानें करणें या बाबतींतहि साम्य आहे. याखेरीज मराठीमध्यें 'व' प्रत्ययांत हेत्वर्थक रूपें आहेत त्याप्रमाणें गुजरातींतहि आढळतात व ही गोष्ट अंतर्भाषांतहि आढळते.

**मराठी व पूर्व अथवा बाह्यवर्ती भाषा यांतील साम्यः**——कोंकणी व बंगाली भाषांत 'अ'चा 'ऑ' असा उच्चार करितात. 'आ'मध्यें सामान्य रूप होतें. जसें:—खांब-खांबा-स; बाप-बापाचा. महाराष्ट्री बप्पस्स. तसेंच भूतकाळाचा 'ल' प्रत्यय हा महाराष्ट्री व अर्धमागधीमधील 'इल्ल'पासून आला असावा. याचें सर्वांत जुनें अर्धमागधीतील उदाहरण म्हणजे 'आणिल्लिअ' हें देतां येईल. हा 'ल' प्रत्यय मागधींत क्वचित् पण शौरसेनींत मुळीच आढळत नाही. भूतकालीन 'ल' प्रत्यय कधीं कधी गाळतात. उदा० चित्पावनी. मायरा = मारला.

यावरून मराठीचें पश्चिमेकडील भाषांशीं ( १ ) उच्चार ( २ ) कर्त्याची विभक्ति ( ३ ) अकारांत पुंल्लिंगी शब्दाचें एकवचन महाराष्ट्रीतल्याप्रमाणें ओकारान्त असणें या बाबतीत साम्य आहे व पूर्वेकडील भाषांशीं (१) आकारान्तामध्यें सामान्यरूप. (२) भूतकाळाचा प्रत्यय 'ल' या बाबतीत साम्य आहे. मराठींतील विभक्तिरूपांचें प्राचुर्य पूर्वेकडील भाषांत आढळतें; पश्चिमेकडील भाषांत तें आढळत नाही. मराठी भाषेमध्यें निरनिराळ्या प्राकृत भाषांपासून कोणकोणते विशेष आलेले आहेत ते आतां पाहूं.

**मराठीनें घेतलेलें संस्कृत व प्राकृत भाषांचें ऋणः**—मराठी भाषेंत दोन प्रकारचे वर्ण आहेत. महाराष्ट्री व अपभ्रंश या भाषांतून आलेले व थेट संस्कृत भाषेंतून आलेले. पहिल्या प्रकारचे वर्ण तद्भव शब्दांत आढळतात, तर दुसरे तत्सम शब्दांत आढळतात. ऋ, ॠ, ऌ, ए व औ हे स्वर अपभ्रंशांत आढळत नाहीत, परंतु मराठींत संस्कृतमधील सर्व स्वर आढळतात. विसर्ग अपभ्रंशांत नसून मराठींत आढळतो.

दंततालव्य व्यंजनें संस्कृतांत नसून महाराष्ट्री व अपभ्रंश यांत आढळतात. यः बद्दलचा जो किंवा ज्योतिष यापासून बनलेला जोइसी किंवा जोशी हे दंततालव्य उच्चार आहेत. जेथें केवळ तालव्य उच्चार असेल तेथें त्या वर्णास य जोडण्याचा प्रघात पूर्वीच्या मराठी लिखाणांत आढळतो. जसें:—विच्यार; 'च्यारीखाणी च्यारी बाणी,'-दा. १३. १, ३; 'स्वयंभु मुख्य वडिल च्यारि मनु,'-राज्ञा. १०. ९१. ळ हा वर्ण वैदिकभाषेंत आढळतो. परंतु तो संस्कृतमध्यें नसून प्राकृत व अपभ्रंश यांत व अर्वाचीन मराठींत आढळतो. श, व ष महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत नाहींत, परंतु ते मराठींत आढळतात.

संस्कृतमध्यें व्यंजनान्त शब्द आढळतात. महाराष्ट्री व अपभ्रंश यांत ते आढळत नाहींत. मराठीत तत्सम शब्दांत व्यंजनान्त शब्दहि आढळतात. परंतु तद्भव शब्दांत आढळत नाहीत. संस्कृतमधील द्विवचन पुढें कोठेंहि आढळत नाहीं. परंतु जुन्या मराठींत ( चिकुर्डे येथील ताम्रपटांत ) तें क्वचित् आढळतें.

मराठींतील सर्व विभक्तिप्रत्यय अपभ्रंशांतून आलेले आहेत. 'मी' या शब्दाचीं एकवचनी रूपें महाराष्ट्रीशीं जुळतात, पण अपभ्रंशाशीं तितकीं जुळत नाहींत; अनेकवचनी रूपें मात्र महाराष्ट्री व अपभ्रंश या दोहींशीं जुळतात. एकवचनाचें अनेकवचन साधण्याचे प्रत्यय मराठीनें प्रायः अपभ्रंश व क्वचित् महाराष्ट्रींतून घेतले आहेत. परंतु त्या भाषांत आकारान्त पुंल्लिंगी शब्द नसल्यानें त्या ठिकाणीं मराठीनें एतत् व इदम् या सर्वनामांपासून निघालेल्या

ए व अ या रूपांची मदत घेतली आहे. लिंगांच्या बाबतींतहि मराठीने महाराष्ट्री व अपभ्रंश या भाषांचें अनुकरण केलें आहे. आख्यातविभक्तींचीं रूपें बनविण्याची पद्धति मराठीनें अपभ्रंशापेक्षां महाराष्ट्रीपासून घेतलेली दिसते. मराठीमध्यें सामान्यत: आत्मनेपदाचा लोप झाला असून परस्मैपद प्रायः वापरलेलें आढळतें. परंतु कांही जुन्या रूपांत विशेषतः काव्यांतून आत्मनेपदी रूपें आढळतात. जसें:-म्हणे, झिजे, कांपे, गाजते, वाजते इत्यादि. करिजे, जाणिजे, नमिजे, होइजे इ०. सारखी विध्यर्थाचीं रूपें मराठींत महाराष्ट्रींतूनच करिज्जे, जाणिज्जे, णमेज्जा इ०. रूपांवरून आलेली दिसतात. मराठींतील इच्छार्थक रूपें महाराष्ट्रीतून व पौनःपुन्यवाचक रूपें महाराष्ट्री व अपभ्रंशांतून आलीं आहेत.

संस्कृत अभूत्पासून मराठींत आलेलें 'होता' हें रूप अर्धमागधीत ' होत्था ' या रूपांत आढळतें. मराठींत जिणुनि, हसुनि वगैरे पूर्वकालवाचक रूपें आढळतात. तीं अपभ्रंशांतील करवि, पालवि या रूपांच्या धर्तीवर बनलेलीं दिसतात. तसेंच करुनु, घेउनु, हसुनु हीं रूपें अपभ्रंशांत आढळणाऱ्या पिणु, विणु, यांच्या धर्तीवर बनलेली दिसतात. करूनिया, घेऊनिया हीं रूपें मागधींत जी य व इया या प्रत्ययांवरून रूपें बनतात, त्यांवरून बनलेलीं दिसतात. जातां, घेतां, देतां ही ता प्रत्ययान्तरूपें संस्कृतांतील ' त्वा ' प्रत्ययाचा अर्धमागधीतील ' क्ता ' व नंतर ' त्ता ' या प्रत्ययावरून बनलेली दिसतात. त्याचाच एक अपभ्रंश अर्धमागधीत त्ताणम् असा होतो त्यावरून होतांना, देतांना, जातांना यांसारखी रूपें बनलेली दिसतात.

तद्धित प्रत्ययांपैकीं च हा प्रत्यय संस्कृत तत्रत्य, अत्रत्य इ. शब्दांत आढळणाऱ्या 'त्य ' प्रत्ययावरून आलेला दिसतो. जसें:-तेथचा = तत्रत्य, एथचा = अत्रत्य. मतुप् अथवा ' जवळ असणारा, बाळगणारा, ' याअर्थी जो ' ल ', प्रत्यय आहे तो मराठींत आलेला आहे. मात्र त्यास विशेष अर्थ राहिला नसून तो सर्वसामान्य बनला आहे. उदाहरणार्थः-संस्कृत अंध, अंधल, अंधळा. एक, एकल, एकला. चांग, चांगला. श्याम सावळा; छाया, सावली; दादु, दादुला; अशाच प्रकारचा संस्कृत ' इल ' प्रत्यय महाराष्ट्रीत ' इल्ल ' व मराठींत इल या रूपानें आढळतो. सं. मध्य, महाराष्ट्री व अर्धमागधी मज्झिल्ल; मराठी मधील; सं. पुरस्, अर्धमागधी व महाराष्ट्री पुरिल्ल व मराठी पुढील; स. बहिस, अर्धमा. महाराष्ट्री बाहिरिल्ल, मराठी बाहेरिल.

म्हणितल, म्हणियल, म्हणाल, म्हंतल, म्हंटल या रूपांत संस्कृत, महाराष्ट्री, अपभ्रंश, जुनी मराठी, मध्यकालीन व अर्वाचीन मराठी ही परंपरा आढळते.

मराठींतील च, चि, या निश्चयार्थक शब्दयोगी अव्ययाचा संबंध महाराष्ट्रीतील चेअ, च्चिअ, च्च यांशीं दिसतो. यांपैकीं चेअ हें महाराष्ट्री व अर्धमागधीमध्यें आढळतें. छत्तिसगढीमध्यें याचें ' ऐच ' असें रूप आढळतें. शौरसेनींत याच्याऐवजीं ' जेव ' असें रूप आढळतें. हेंच पुढें गुजराथींत ' ज ' असें होतें.

**संस्कृत प्राकृतादि भाषांतून मराठींत आलेली शब्दसंपत्ति व त्यांतील रूपविकार:**—मराठीमध्यें अनेक शब्द संस्कृत भाषेंतून निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या द्वारें आलेले आहेत; तसेंच कांहीं शब्द साक्षात् संस्कृतमधूनहि मराठीनें घेतलेले आहेत. यांपैकीं कांही मूळच्या स्वरूपांत घेतले असून कांहींच्या स्वरूपांत तिनें आपल्या प्रकृतीप्रमाणें बदल करून घेतले आहेत. तसेंच कांहीं शब्द फारशी, अरबी, इंग्रजी, पोर्तुगीज वगैरे परकीय भाषांतूनहि घेतलेले आहेत. व त्यांच्या रूपांतहि निरनिराळे फरक आपल्या विशिष्ट लकबीप्रमाणें मराठीनें केलेले आहेत. या निरनिराळ्या क्रियांचें स्वरूप पुढें दिलेल्या उदाहरणांवरून थोडक्यांत दाखवितां येईल.

प्राकृतांत अगर अपभ्रंशांत संयुक्तव्यंजनापूर्वी ऱ्हस्व स्वर असेल तर मराठींत तें संयुक्त व्यंजन एकेरी होतें व त्याच्या मागील ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो. जसें:-कर्म, कम्म, काम; अग्नि, अग्गि, आग; अद्य, अज्ज, आज. प्रतिपद् पाडिव, पाडवा. परभाषेंतूनहि शब्द घेतांना मराठीनें अच्या ऐवजीं आ केलेला आढळतो. जसें:-अरबी महल्ल, मराठी महाल; इंग्रजी गटर, मराठी गटार. कुठें कुठें ' अ ' बद्दल ' इ ' केलेली आढळते. जसें:—संस्कृत पञ्जर, दत्त, मरिच; प्राकृत पिञ्जर, दिण्ण, दिन्न, मिरिअ; मराठी पिंजरा, दिन्ह, दिण्ह, दिन्नलें, दिल्हे, दीधलें, दिलें, मिरें, मिरची; अरबी जिरीअत्, मुशाहरा, शर्मन्दा; मराठी जिराईत, मुशाहिरा, शर्मिंदा; इंग्रजी वॅगन्; मराठी वाघीण.

मराठीत शब्दारंभीचा अ-कार किंवा अनुनासिकापूर्वीचा अकार अनेक शब्दांत विकल्पेंकरून 'इ' झालेला आढळतो. जसें:—ढ–डिकणें; झ–झिरा; रं-रिंगण; तेलं–लिंगा; नारं-रिंग. कोठें कोठें अ बद्दल उ केलेला आढळतो. जसें:– संस्कृत खण्डित; प्राकृत खुडिअ, मराठी खुडलें.

'अ' बद्दल ए, कुठें कुठें केलेला आढळतो. जसें:–संस्कृत कंदुक, शय्या; प्राकृत गेंदुअ, सेज्जा, सज्ज; मराठी गेंद, चेंडू, शेज, सेज. तसेंच 'अ' बद्दल 'ओ' केलेला आढळतो. जसें:—संस्कृत अर्प, अञ्जलि; प्राकृत ओप्प, अञ्जलि; मराठी ओपणें, ओंजळ.

अपभ्रंशांत व मराठींत संस्कृतांतील आकारान्त स्त्रीलिंगी नामांचा अन्त्य आ बहुशः अ होतो. जसें:— संस्कृत शुंडा, भिक्षा, परीक्षा; मराठी सोंड, भीक, पारख. तसेंच इतर अनेक शब्दांतहि 'आ' बद्दल अ झालेला आढळतो. जसें:-संस्कृत कुमार, संस्थापन, करांगुलि; प्राकृत, कुमर, सठवण, करांगुलि; मराठी कुमर, कुवर, सांठवण, करंगळी. अरबी चालाख, मुलाखात्, तालाव्; मराठी चलाख, मुलाखत, तलाव. मराठीत शब्दारंभी स्वर असल्यास कित्येक शब्दांत त्या स्वरांत महाप्राण मिसळतो. जसें:–इकडे, हिकडे; अल्फॉन्सो, हापूस; आपटणें, हापटणें; अस्तरी, हंतरी; अस्थि, हड्डी. 'आ' बद्दल इ, ए, व कुठें कुठें उ झालेला आढळतो. जसें:— संस्कृत आंदोलक, विना, शलाका, छागलिका, आभाणका; प्राकृत आंदोलअ, विणु (अप.), सलाआ, छाअलिआ, आहाणअ; मराठी इंदोळा, हिंदोळा, विणें, वीण, विन्हा, सळई, सळी, शेळी, उखाणा, आहाणा.

संस्कृत इ–ईकारान्त स्त्रीलिंगी शब्दातील अन्त्य स्वर बहुधा मराठींत गळून त्याऐवजी अकार येतो. जसें– कदली, केळ; पद्धति, पद्धत; कीर्ति, कीर्त; गोष्टी, गोष्ट; कोठें कोठें इ-ई बद्दल अ, आ झालेला आढळतो. जसें:– संस्कृत हरिद्रा, प्रतिशब्द, ईदृश; प्राकृत हलद्दा-द्दी, पडिसद्द, एरिस; मराठी हळद, पडसाद, असा. तसेंच अरबी काफिर्, गाफिल, वारिस्; मराठी काफर, गाफल, वारस. न्हस्व इ बद्दल ए झालेला आढळतो. जसें:–संस्कृत पिंड, सिन्दुर, मिथुन, विडंबन; प्राकृत पेंड, सेन्दूर, मिहुण, विडंबण; मराठी पेंड, पेड-ढ-ढी, पेंढा, शेन्दूर, मेहूण, वेड(डा)वणें अर. चिहरा, म. चेहरा; अर. बिहुतर, म. बेहत्तर; अर. तबीला; म. तबेला, ई बद्दल इ झालेली आढळते. संस्कृत कीटक, दीपक; प्राकृत कीडअ, दिवअ; मराठी किडा, दिवा; अरबी कबीला, गालीचा, मीरास; मराठी कबिला, गालिचा, मिरास. अशिष्टोच्चारांत शब्दारंभीच्या 'इ'चा 'वि' झालेला आढळतो व याच्या उलटहि प्रकार आढळतो. जसें:–इलाज, विलाज; ईश्वर, विश्वर; विचार, इचार. कोठें कोठें उ, ऊ बद्दल अ व दीर्घ ऊ बद्दल उ झालेला आढळतो. संस्कृत पुनः, यूथक, कूपक, चूडक; प्राकृत पुणो, पुणु, जूथअ, कूवक, चूडअ; मराठी पण, पूण, पुन्हां, जथा, जूट, जोडी, कुवा, चुडा; अरबी बुऱ्हान, मुआमलत्, साबून, नमूना, तूफान. मराठी बऱ्हाण, मामलत, साबण, नमुना, तुफान. कोठें कोठें उ, ऊ बद्दल ओ किंवा ए झालेला आढळतो. जसें:– संस्कृत मुक्त, गुच्छ, नूपुर; प्राकृत मुक्क, गोच्छ, नेउर; मराठी मोकळा, घोस, नेपुर; अरबी तुहम्त्, मुहर्; मराठी तोहमत, मोहोर. ऋ बद्दल अ, आ, इ, ई, रि, री, उ, ऊ, रु, रू झालेले आढळतात. जसें:–संस्कृत तृण, मृदु, तृष्णा, पृष्ठ, हृदय, गृध्र, भृंग, ऋण, ऋतु; प्राकृत तिण, मदु, मऊ, तण्हा, तण्ह (अप.), पिठ, पुठ, हिअअ, हियअ (अप.), गिद्ध, भुंग, भिंग, रिण, उतु, उदु; मराठी तण, मऊ, तहान, तान्ह, तान, पाठ, पुठा, पाठार, पठार, हिय्या, गीध, गिधाड, भुंगा, भिंगुरडें, भिंगरी, रीण, रितु, रुतु.'ए' बद्दल 'ए' व 'ओ' बद्दल 'ओ' केलेला आढळतो. संस्कृत शेवाल, तेल, गौर, औषध; प्राकृत सेवाल, तेल्ल, तिल्ल, गोर, ओसह (अप.); मराठी शेवाळ, तेल, गोरा, ओखद, ओशद.

कांही स्वरसंधिविशेष खालीं दिले आहेत. अ + अ = आ, आ + अ = आ. संस्कृत नायक, तिलक, अजगर; प्राकृत नाअक; तिलअ, अअअर; मराठी नाक, रामनाक, केमनाक, टिळक, टिळा, आर; अरबी मअना, मअजून्; मराठी माना, माजूम. आ, अ बद्दल आय, आव, आउ अशीं रूपें आढळतात. संस्कृत पाद, घात; प्राकृत पाअ, घाअ, घाय (अप.); मराठी पाय, पाव, पाउल, घाय, घाव, घाउक; अरबी जमाअत्, झिराअत्; मराठी जमायत, जिरायत. अइ, आइ बद्दल ए, ऐ होतात; तसेंच अ, आय बद्दल ए, ऐ होतात. संस्कृत नगर, जयजय, उपविष्ट, खदिर, मदनिका; प्राकृत नअर, नयर, जअजअ, जयजय, वइठ्ठ, खइर, मअणिआ, मयणिआ; मराठी नेर,

जेजेकार, बेठा, बेठा, ग्येर, ग्येर, खयर, मैना; अरबी आइना, पयूदाइश्; मराठी ऐना, पैदास; इंग्रजी हायकोर्ट, मराठी हैकोर्ट. अउ, आऊ बद्दल ओं, औं होतात. तसेंच अव, आव बद्दल ओ, औ होतात. संस्कृत चतुर्थ, मयूर, चतुर्, लवण, पादोन, अवनत; प्राकृत चउत्थ, मऊर, चउ, लोण, पाओण, पाऊण, ओणअ; मराठी चौथा, चवथा, मोर, चौ, लोण, पाऊण, पावणेदोन, पोणकी, ओणवा; अरबी-दवात्, मराठी-दौत; इंग्रजी-पाउंड्, मराठी-पौंड. इय, इअ बद्दल ई, य होतात; इ + इ = ई होते. संस्कृत दिवस, देवर, द्वितीया, स्थिति; प्राकृत दिअस, दिअह, देअर, दिअर, बिईजा, बीजा, ठिइ; मराठी दीह, दीस, दीय, दीर, बीज, ठी. अरबी व फारसी भाषेतील कांही शब्दांतील इय बद्दल ए आदेश होतो. अरबी तरबियत्, मराठी तरबेद.

आतां संस्कृत व प्राकृत मधून मराठीत शब्द येतांना त्यांच्या व्यंजनांत कोणकोणते फरक होतात तें पाहूं. शब्दामध्यें असलेल्या असंयुक्त क, ग, च, ज, त, द, प, य, व या नऊ वर्णांचा लोप होतो. व व्यंजनलोपानंतर शिल्लक राहिलेल्या स्वरांचे मागें स्वरसंधीच्या परिच्छेदांत सांगितल्याप्रमाणें संधि होतात. ( अ ) संस्कृत यूका, सुवर्णकार, सूची, राजा, सैन्यपति, आयुष्, वायन, नदी; प्राकृत जूआ, सोण्णआर, सुई, सूय, राआ, राया, राऊ, सेणवई, आउस, वाअण, नई; मराठी ऊ ( शब्दारंभीच्या य चा लोप झाला ), सोनार, सुई-यी, सूय, चुई-यी, चोय, राया-य, राऊ, राव, शेणवी, शेणवें, आऊक्ष, औक्ष, वाण, नई, नद्दी. अरबी व फारशी भाषेतील शब्दांचा अन्त्य ' ह् ' व क्वचित् इतर व्यंजनेंहि गळल्याची उदाहरणें आढळतात. जसें:—अरबी मुबाह, सलाह्, किलीह्, किताब्, कर्नाय; मराठी मुभा, सल्ला, किल्ली, कित्ता, कर्णा. शब्दमध्यस्थ 'ह' चा क्वचित् 'इ' कार अथवा लोप झालेला आढळतो. जसें:—अरबी सुराही, पहिल, मस्लहत्, सियाही; मराठी सुरई, पैल, मसलत, शाई. कधी कधी इकाराचा 'ही' झालेला आढळतो. जसें:—अरबी जलाई, कलई. मराठी जिल्हई कल्हई (आ) ख, घ, थ, ध, भ याबद्दल ह झालेला आढळतो. संस्कृत मुख, सखी, ओघ, पथिक, शिथिल, बधिर, गभीर, प्रभात, भवति; प्राकृत मुह, सही, ओह, पहिअ, सढिल, सहिल, बहिर, गहिर, पहाद, होदि, होई ( अप. ); मराठी मुखडा, मोहरा, मोरा, म्होरा, सही, सई, सयी, सऊ, ओहला-ळा, व्हाळ, ओघळ, पही, पई, पे, पयी, सढळ, ढिला, सैल, बहिरा, भैरा, बेरा, गहिरा, पहाट, होई, होतो. आरबी, फार्सी, इंग्रजी इत्यादि भाषांतून आलेल्या शब्दांत हा प्रकार आढळत नाहीं. परंतु कांहीं शब्दांत उच्चारास भरघोंसपणा आणण्याकरितां ह-कार घुसलेला आढळतो. जसें:—अरबी जलाई, मराठी जिल्हई; अरबी जागीर; मराठी जहागीर; आरबी कलई, मराठी कल्हई. (इ) क, ग, च, ज, इत्यादि अल्पप्राणांबद्दल ख, घ, छ, झ, इत्यादि महाप्राण होतात. संस्कृत क्रीडति, क्रीत, गृह, गृहीत्वा, ग्रास, ज्योतिर्लिंग, स्तबक, स्तोक, दुहितृ, पनस, बाष्प, निर्वाहण; प्राकृत खिल्लति, खिड्डइ, किरीत, घर, घेत्तूण, घेऊण, घस्स, जोटिंग, थवक्क, थोअ, थांव, धूय ( अप. ), फणस, बप्फ, निब्बाहण; मराठी खेळती, खरीद, घर, घेऊण, घास, झोटिंग, थवा, थोडें, धू, फणस, बाफ, निभावण. अरबी पस्त् मराठी फस्त, अल्प प्राणांत पुढील ' ह ' मिळून महाप्राणवर्ण झाल्याचीं उदाहरणें:— अरबी—मुबाह्, काहकाह्, गुनाह; मराठी—मुभा, खोखो, गुन्हा; इंग्रजी ॲबस्ट्रॅक्ट; मराठी अभिस्राक्त. संस्कृतोत्पन्न शब्दांतहि कित्येक शब्दांत विसर्गाचा 'ह' होऊन त्याचा मागील अल्पप्राणाशी मिलाफ होतो. जसें:— पुनः, पुन्हा; सद्यः, सध्यां. कित्येक शब्दांत हा विसर्ग किंवा हकार मूळचा असतो, कित्येकांत तो आगंतुक असतो व कित्येकांत तो उष्म्यापासून उत्पन्न होतो. हकारापुढें अनुनासिक किंवा अर्धस्वर आल्यास प्रथमवर्णांची उलटापालट होऊन, नंतर महाप्राणवर्ण बनतात. जसें:—तर्हि, तऱ्ही; विना, विन्हा; कल्लोल, कल्होळ; कृष्ण, कान्हा; स्नान न्हाण, नहाण; मुहूर्त, म्होतूर;

केव्हां केव्हां ख, घ, थ इत्यादि महाप्राणाबद्दल अनुक्रमें क, ग, त असे अल्पप्राण होतात. जसें:— खद्योत, खज्जोत, काजवा. संस्कृतोत्पन्न शब्दांमध्यें प्राकृतांत किंवा मराठीत असे आदेश फारसे आढळत नाहींत. परंतु अरबी—फार्सीमधून येणाऱ्या शब्दांत ख, ख्श, ख्त व घ, झ, फ यांस अनुक्रमें क, क्ष, क्त, व, ग, ज, प, असे आदेश होतात. जसें:—खिताब्, किताब; बख्शी, बक्षी; घझल्, गज्जल; काघझ्, कागद; घनीम्, गनीम; दफ्तर्, दप्तर, अर्झ्, अर्ज.

कोठें कोठें 'च' बद्दल 'ज' व 'ट' बद्दल 'ड' आणि 'ठ' बद्दल 'ढ' झालेला आढळतो. संस्कृत पंचक, कटाक्ष, कपाट, मठ, पीठ; प्राकृत पंचअ, कडक्ख, कवाड, मढ, पीढु(अप.); मराठी पंजा, पंज्या, कडाखा, कवाड, मढ, पिढें. कोठें कोठें ड, द,यांबद्दल अनुक्रमें ळ, ड होतात. संस्कृत पीडन, तडाक, गुड, दाडिम, दम्भ, दोहद, दोला प्रा. पीळन, तळाक (पाली); गुल, गुड, दालिम, डम्भ, दोहल, डोला; म. पिळणें, तळें, गूळ, डाळिंब, डंभ, ढब, डोहाळ, डोहळा, डोला, डोलारा. केव्हां केव्हां थ चा ढ अथवा ह हि होतो. शिथिल, सढिल, सहिल, सढळ, सइल, सैल, सहील. 'व' चा ब, 'प' चा 'व' आणि 'म' चा 'व' होतो. वापी, वावी, बाव, बावडी. गोपाल, गोवाल, गोवळ-ळा-ळी, गवळी. भ्रमर, भ्रवर, भंवरा, भोंरा. ग्राम, गाँव, गांव. चामर, चाँवर, चंवरी, चौंरी. श्यामल, सामल, सावँल, सांवळा. 'य' बद्दल 'ज' आणि 'न' बद्दल 'ल' होतो. यक्ष, जक्ख, जक्ख, जक्खड, जखीण. सद्यः + क, सज्जुअ, साजूक. नमन, लवण, लवणें. निंब, लिम्ब, लिंब. नवतीत, नोनीअ, लोणी. अरबी व फार्सी भाषांतूनहि शब्द घेतांना वरील फेरफार झालेले आढळतात. जसें:–[ क = ग ] तकाझा, तगादा; नकारा, नगारा; [ ज, झ = द ] आझ्‌माइश्, अदमास; गुझर्, गुदरणें; हौझ, हौद; [ द = ज ] खिद्‌मत्, खिजमत; नजन्दीक, नजीक. [ त = द ] बतक, बदक; ताकत्, ताकद; [ र = ड, ल ] कुर्ता, कुडतें; मुर्दा, मुडदा; खरीता, खलिता; मर्हम्; मलम. [ न = ल ] घनीम्, गलीम, [ स = द ] जासूस्, जासूद; [ श = स ] शत्रंजी, सत्रंजी; शम्शेर, समशेर, [श = छ] शबीह् छबी; शान्दार्, छानदार; [ स = श ] साबित्, शाबीत; सिहात्खाना, शेतखाना. मराठीनें प्रत्यक्ष संस्कृतांतून शब्द घेतांना प्राकृतांत न आढळणारे असे कित्येक व्यंजनादेश केलेले आढळतात. जसें:—[ स = च ] चमस, चमचा; सांग, चांग. बऱ्याच मराठी शब्दांत 'स' चा 'च' विकल्पानें होतो. जसें:—पेंच, फेस; खवचट, खवसट; खिसा, खिचा; उचकटणें, उसकटणें; चुई, सुई इत्यादि. [ष, श = छ] शकटक, छकडा; शावक, छावा; शाटी, छाती; शकल, छकल; उत्सव, उच्छव; सत्र, छत्र.

प्राकृतांत संयुक्त व्यंजनाच्या मागील स्वर बहुशः ऱ्हस्व असून, त्यावर नेहमी आघात येतो. मराठी संयुक्तांचें बहुशः एकेरी व्यंजन होऊन मागील स्वर दीर्घ होतो व उच्चार अघळपघळ व साफ होतो. संस्कृत–स्नुषा, विज्ञप्, सत्य, अश्रु, नग्न, मस्तक, वत्स, मर्द, भद्र; प्राकृत–सुण्हा, विण्णव, सच्च, अंसु, नग्ग, मत्थअ, वच्छ, मल्ल, भल्ल; मराठी–सून, विनवणें, साच, असूं-आसूं, नागडा-नागवा, माथा-माथें, बस्स-वच्छ-वांसरू, मळणें, भला.

स्वरभक्ति म्हणजे संयुक्त व्यंजनांतील अवयव मध्यें नवीन स्वर येऊन विभक्त होणें. संस्कृत-क्लेश, हार्द, स्मरण, स्वप्न; प्राकृत–किलेस, हारिद्र, सुमरण, सुविण; मराठी–किळस, हरिद्र, हारिद्र, सुमरण-सम्रण-सुमिरण, सुपीन. मराठींत प्रत्यक्ष संस्कृतांतून शब्द येतांना त्यांवर हा प्रयोग फारच झाला आहे. परंतु असे शब्द बहुधा अशिष्ट गणले जातात. जसें:—मार्ग, मारग; भक्त, भगत; धर्म, धरम; श्री, सिरी; हर्ष, हरिख, हरूख; वर्ष, बरीस. स्पर्शमणि, परिसमणि; चैत्र, चैतर. अरबी, फार्सी–इस्म, उर्स, जुल्म, झिक्र, फिक्र. मराठी–इसम, उरूस, जुलूम, जिकीर, फिकीर. केव्हां केव्हां मराठीत शब्द येतांना त्यांत अनुनासिक किंवा अनुस्वार घुसलेला आढळतो:–संस्कृत मार्जार, वक्र, मूर्धा. प्राकृत–मंजार, वंक, मुंढा; मराठी–मांजर; वांक, बांक, बांग; मुंडकें, मुंडासें. मराठींत प्रत्यक्ष संस्कृतामधून येतांना हा प्रकार मोठ्या प्रमाणावर झालेला आढळतो. जसें:—शारिका, साळुंखी; लवकुश, लवांकुश; घटी, घंटी; घोरतर, घोरंदर; कुट्टिनी, कुंटण; युद्ध, झुंज; नग्न, नंगा; पूजा, पुंजा; तुमुल, तुंबळ; समस्त, समदं; भित्ति, भिंत इ. कित्येक ठिकाणीं हा अनुनासिक वैकल्पिक असतो. जसें:–डीक, डिंक; शीक, शिंक; लिपणें, लिंपणें; करटा, करंटा; डमरू, डंबरू. कित्येक संस्कृत शब्दांत अनुनासिक असतां मराठींत त्याचा ओझरता अनुस्वार होतो. जसें:—चंचू, चोंच; अंचल, अंचळी; शृंखला, सांखळी; संकट, सांकडें; कण्टक, कांटा; दन्त, दांत; पच, पांच; तंतु, तांत. क्वचित् या बाबतींत विकल्पहि आढळतो. कम्बल, कांबळें, कामळें; दंभ, डंभ, ढब.

मराठींत संस्कृत व प्राकृतमधून शब्द येतांना द्वित्त व्यंजन एकेरी होतें. व एकेरी व्यंजन द्वित्त होतें. संस्कृत–उपरि, एकैक, एकल, मृत्तिका, वल्ली, पल्ली, भल्ल. प्राकृत–उवरी, उप्परी; एकमिक्क, एकल्ल, मतिआ, मट्टिआ;वेल्ली, पल्ली, भल्ल. मराठी वर, वरी, उप्पर; एकमेक, एकला, एकली, माती, वेल, पाली, पाल, भाला. मराठीचा कल उच्चार साफ व अघळपघळ करण्याकडे असल्यामुळें वर दिलेल्या शब्दांप्रमाणें द्वित्त वर्ण एकेरी करून मागील

अगर पुढील वर्णास दीर्घत्व दिल्याची उदाहरणें मागें दिलीच आहेत. परंतु आघात देऊन प्राकृत पद्धतीप्रमाणें कांहीं शब्दांत एकेरी व्यंजनास द्वित्त केलेलेंहि आढळतें:-ललाट, लल्लाट; जननी, जन्ननि; हठी, हट्टी; टपोर, टप्पोर; हाहाकार, हाहाक्कार; नटवा, नट्टवा; खट, खट्ट; कपी, खप्पी; सपाटून, सप्पाटून. एकेरीचा द्वित्त:—अरबी अक्ल्, रत्ल्, सलाह्, मुकाम्. मराठी अक्कल, रत्तल, सल्ला, मुक्काम. द्वित्ताचा एकेरी:—अरबी कुव्वत, दल्लाल्, मय्यित्, हुज्जत्. मराठी कुवत, दलाल, मयत, हुजत. कांटें कांटें 'ण' बद्दल 'न' आणि 'न' बद्दल 'ण' होतो. संस्कृत कर्ण, पर्ण, उष्ण, तृष्णा, अरण्य, काण. प्राकृत कण्ण, कन्न (अप.); पण्ण, उण्ह, तिण्हा, तण्ह, रण्ण, काण. मराठी–कान, पान, ऊन्ह, ऊन, तहान, रान, काना. 'न' चा 'ण'–शून्य, ज्ञान, अन्य, गान, सुण्ण, नाण, अण्ण, गाण; सुणें, सुनें, ग्यान, आण, आणीक, गाणें. [ न = ण ] अरबी–कुरआन्, दुर्बीन्, दाना (शहाणा), फुलान्. मराठी–कुराण, दुर्बीण, दाणा, फलाणा. कोठें कांटें शब्दांतर्गीच्या वर्णाचा लोप होतो. संस्कृत–उपविष्ट, अनंतर, अरण्य, उपरि, अधस्तात्, ईयत्ता, अधोऽधो. प्राकृत–पइट्ठ, णन्तर, णवर, रण्ण, उवरि, हेटठा. मराठी पैठा, पेठा, नंतर, रान, वर-वरी, हेट, हेटकरी, यत्ता, धों धों.

शब्दारंभी जोडाक्षर असल्यास त्यांतील वर्ण पुष्कळ वेळां गळतो. जसें:–प्रमार, पमार; श्वशुर, सासरा; ब्राह्मण, बामण; द्वार, दार; ज्वाला, जाळ इ. जोडाक्षराच्या पहिला अवयव स-कार असून त्याचा लोप न झाल्यास त्याच्या मागें 'अ' किंवा 'इ' स्वर येतो. जसें:–स्त्री, अस्तुरी; स्टेशन इस्टेशन; स्क्रू, इस्क्रू.

कधी कधी पूर्वापर वर्णाचा विपर्यास झालेला आढळतो. संस्कृत–महाराष्ट्र, लघु, ज्ञानप्रत्यभिज्ञान. प्राकृत–लहु, हलु, जाणपहिआण. मराठी–मऱ्हाठा, हलू, हलकें, जानपछान. अडाणी, अनाडी; चावट, वाचट; कुळकर्णी, कुर्कुळणी; अवघा, अघवा; नुकसान, नुसकान; उपसणें, उसपणें. अरबी–अमानत्, कुफ्ल्, मशहूर. मराठी–अनामत, कुलूप, महशूर.

मराठी उपान्त्य इ, उ हे (विशेषतः अकारान्त शब्द असल्यास) दीर्घत्वाकडे झुकतात. जसें:—अधिक. अधीक; कठिन, कठीण; दुग्ध, दूध; मधुर, मधूर; माणिक्य, माणीक; पुत्र, पूत. अरबी, फार्सी–काबिज, जवाहिर्, चाबुक्, जुल्ल, पुल. मराठी–काबीज, जवाहीर, चाबूक, झूल, पूल.

याप्रमाणें मराठी भाषा ही वेदपूर्वकालापासून ज्या बोली आर्य लोकांमध्यें प्रचलित होत्या व ज्यांतूनच शिष्ट व संस्कार पावलेल्या अवस्थेच्या रूपानें वैदिक व नंतर पाणिनीय अथवा तदुत्तर अभिजात संस्कृत ही भाषा प्रचलित झाली अशा एखाद्या बोलीतून प्रथम उत्पत्ति पावून नंतर तीवर संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व इतर स्थानिक व परकीय भाषा यांचा थोडाफार संस्कार होऊन आजच्या अवस्थेप्रत प्राप्त झाली आहे. संस्कृत व प्राकृतादि भाषांचा ठसा मराठीच्या व्याकरणावर स्पष्टपणें उमटल्यानें आपणांस दिसून येतें व हीच गोष्ट पुढें दिलेल्या उदाहरणांवरून अधिक स्पष्ट होईल. पुढील क्रम हा कालानुक्रमानें होणारें फरक दाखवितो.

( १ ) संस्कृत–जनो वृक्षात्फलानि गृह्णाति। पाली–जनो रुक्खम्हा फला गण्हति। प्राकृत–जणो वच्छाहि फलाइं गण्हइ। अपभ्रंश–जणु वच्छहे फलाइं गण्हइ। मराठी–जन वृक्षाहून फळें घेतो.

( २ ) संस्कृत–सागरः उपरि तृणं धरति तले रत्नानि गालयति। पाली–सागरो उपरि तिणं धरेति तले रण्णानि गालेति। प्राकृत–साअरो अवरि तण धरइ तले रआणाणि घालदि। अपभ्रंश–सायर उव्वरि तणु धरइ तलि रयणाइ घल्लइ। मराठी–सागर वर तणें धरतो, तळीं रत्नें घालतो।

( ३ ) संस्कृत–अरे शनकैः जल्प। अस्मादृशानाम् अन्तःपुरचारिणां सौभाग्यवृत्तान्तम् आकर्ण्य भर्ता कुपिष्यति। पाली–अरे सणिकं जप्प अम्हारिसानं अन्तोपुरचारिणं सोभाग्गवुतन्तं आकण्णेत्वा भट्टा कुपिस्सति। प्राकृत–अरे सणिअं जप्प। अम्हारिसाणं अन्तेउरचारिणं सोहग्गवतन्तमा अण्णिअ भट्टा कुविस्सदि। अपभ्रंश–अरे सणिकं जम्पि। अम्हारिसाणं अन्तेउरचारिणं सोहग्गवतन्त आकन्निअ भतार कुप्पेसहि। मराठी–अरे सुणूक जाप। आम्हांसारख्या अन्तःपुरचारींच्या सौभाग्याचा वृत्तांत ऐकून धनी कोपेल।

एखाद्या भाषेचें दुसऱ्या एखाद्या भाषेशी वांशिक नातें जोडावयाचें असल्यास केवळ शब्दसंख्येकडे लक्ष न देतां व्याकरणविशेष व वाक्यरचना यांकडे लक्ष दिलें पाहिजे, हा भाषाशास्त्राचा सिद्धान्त आहे. यावरून आपणांस

असें दिसून येईल कीं, मागें दिलेल्या उदाहरणांवरून मराठी भाषा ही महाराष्ट्री व महाराष्ट्री अपभ्रंश यांचेपासून प्रगत झालेली भाषा आहे. व तीत आज जरी इतर अनेक परकीय भाषांतील शब्द आढळत असले तरी तिची उत्पत्ति दुसऱ्या कोणत्याहि भाषेकडे साक्षात् जात नाही. मराठी भाषेमध्यें कांहीं कानडी किंवा द्राविड अथवा परकीय शब्द आढळतात या गोष्टीचा तिच्या उत्पत्तीशी कांहीं संबंध नसून इतर समाजाशी होणाऱ्या संसर्गामुळें जो कोणत्याहि एका भाषेवर परकीय समाजाचा परिणाम होतो तेवढ्यापुरताच आहे. व ज्ञानेश्वरी-सारख्या ग्रंथांत जरी कानडी शब्द आढळले तरी त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे. तसेंच दक्षिण महाराष्ट्रांतील मराठी भाषेवर जरी कानडी वगैरे भाषांचा परिणाम आपणांस कदाचित् विशेष झालेला आढळला तरी महाराष्ट्राचें केंद्र आज जरी पुणें, सातारा असलें तरी तें राजकीय घडामोडीमुळें तसें झालें आहे. वास्तविक महाराष्ट्राचें मूळ सांस्कृतिक केंद्र गोदावरीचा किनारा, विशेषतः पैठण, देवगिरी व विदर्भ हें होय व तेथील भाषेवर त्या मानानें कानडीचा परिणाम तितका झालेला आढळणार नाही. तेव्हां मराठीतील लिंगविचार, नामविभक्ति, क्रियापदविचार अथवा आख्यातविभक्ति, अव्ययें व आदेशप्रपंच या व्याकरणाच्या अंगांचा विचार केला असतां द्राविड भाषांशी असणारा मराठीचा विरोध व महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंशादि भाषांशी सुसंगत जुळणारा तिचा संबंध यांवरून मराठी ही संस्कृत, प्राकृत अपभ्रंशादि द्वारा परिणत झाली ही गोष्ट स्पष्ट होते. या प्राकृतादिकांचा काल व वर्णविपर्यय क्रम पाहावयाचा झाल्यास पुढील दोन उदाहरणांवरून तो स्पष्ट होईल.

१ संस्कृत वर्तते, कृत २ पाली वट्टति, कत ३ पैशाची वट्टति, कत ४ शौरसेनी वट्टदि, कत ५ मागधी वट्टदि, कड ६ महाराष्ट्री वट्टइ; कत यांमधील त ची द, ड मधून अ कडे परिणति कालानुसार उच्चारप्रणालीचा विकास दाखविते.

याप्रमाणें मराठी भाषेच्या उत्पत्तीचा विचार या भागांत केला. आतां तिची वाढ कसकशी होत गेली व तीमध्यें कालानुसार व प्रदेशानुसार कसकसे फरक पडत गेले, वगैरे गोष्टीचा विचार पांचव्या भागाच्या प्रस्तावनेंत करण्यांत येईल.

ही प्रस्तावना लिहिण्याच्या कामी पुढें दिलेल्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला आहे व त्या ग्रंथकारांचे आम्ही आभारी आहों. तसेंच संपादकवर्गापैकी रा. पुरुषोत्तम सावळाराम दीक्षित यांची या प्रस्तावनेच्या बाबतीतहि मदत झाली आहे.

(1) Dr. Grierson :—Linguistic Survey of India, Vol VII. (2) Dr. John Wilson :—Preface to Molesworth's Marathi into English Dictionary. (3) Dr. Pischel :—Grammatik der Prakrit Sprachen. (4) Jules Bloch :—La Formation De la Langue Marathe. (5) John Beames :—A Comparative Grammar of the Modern Aryan Languages of India. (6) Rev. Robert Caldwell :— A Comparative Grammar of the Dravidian Languages. (7) Jesperson:—Language. (8) Prof. Edward V. Arnold :— Historical Vedic Grammar. (9) Dr. R. G. Bhandarkar :—Wilson Philological Lectures. (10) Dr. P. D. Gune :—Wilson Philological Lectures (11) R. R. Bhagwat :—Wilson Philological Lectures. (12) Dr. Sarup :—Nighantu and Nirukta of Yask. (13) Dr. S. K. Chatterji :—The Origin and Development of Bengali Language.

( १ ) **वररुचिः**—प्राकृत प्रकाश. ( २ ) **चंडः**—प्राकृत लक्षण ( हॉर्न्लेनें संपादित ). ( ३ ) **हेमचंद्रः**—प्राकृत व्याकरण. ( ४ ) **मार्कण्डेय**—प्राकृतसर्वस्व. ( ५ ) **लक्ष्मीधर**—षड्भाषाचंद्रिका. ( ६ ) **पं. लालचंद्र भगवानदास गांधीः**—जिनदत्तसूरिविरचित अपभ्रंशकाव्यत्रयी. ( ७ ) **पं. हरगोविन्ददास त्रिकमचंद शेठः**—'पाईअ-सद्द-महण्णवो' या प्राकृत कोषाची प्रस्तावना. ( ८ ) **पं. बेचरदास जीवराज दोशीः**—प्राकृत व्याकरण. ( ९ ) श्री. **ज्योतीन्द्र मोहन चतर्जीः**—अथर्वणः जरथुस्त्रस्य गाथा. ( १० ) **रा. रा. राजारामशास्त्री भागवतः**—प्राकृत भाषेची विचिकित्सा. ( ११ ) रा. रा. **वि. का. राजवाडेः**—संस्कृत भाषेचा उलगडा.—ज्ञानेश्वरीची प्रस्तावना.—ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचें व्याकरण.—तिगन्त व सुबन्त विचार—गुण व वृद्धि या प्रकरणावरील निबंध. ( १२ ) रा. रा. **बाळकृष्ण अनंत भिडेः**—मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास. ( १३ ) रा. रा. **रा. भि. जोशीः**—मराठी भाषेची घटना. ( १४ ) रा. रा. **कृ. पां. कुलकर्णीः**—भाषाशास्त्र व मराठी भाषा.—मराठी भाषा उद्गम व विकास. ( १५ ) रा. रा. **डॉ. श्री. व्यं. केतकरः**—प्राचीन महाराष्ट्र भाग १ला.

**यशवंत रामकृष्ण दाते.**

# परिशिष्ट १

## संस्कृत व पाश्चात्य भाषा यांतील साम्य

| संस्कृत | झेंद | ग्रीक | लॅटिन् | लिथुयानियन | स्लाव्हॉनिक | गॉथिक | प्राचीन-जर्मन | हिब्रू | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अग्नि | | | इग्निस् | उग्निस् | ओगंज् | औह्नस् | | | |
| अन्त | | अन्त | अँटी | | | अंद् | | | इंग्लिश एण्ड्. |
| अन्तर् | अन्तरे | | इंटर् | | | उंदर् | | | |
| अष्टन् | | ऑक्टो | | अस्झतुनि | ओस्म्ज | अह्तौ | | | इंग्लिश एट् |
| उपरि | उपर | उपेर | सुपर् | | | उफर् | | | ,, ओव्हर् |
| ऊर्णा | | एरॉस्, एरिओन् | विलस् | विल्ना | | वुल्ला | वोल्ल | ओलाउन् | इंग्लिश वूल् |
| कदा | | कोते | क्वांदो | कद् | कोग्द् | | | | |
| ज्ञा | | ग्नो | ग्ना, ग्नो | झिन्नउ = मी जाणतों | झनजु | कौन् | | ग्निआ | इंग्लिश नो. |
| तिरस् | | | ट्रान्स् | तिएस् | | थोऱ्ह | | तर्, तैर् | |
| तृतीय | थ्रित्य | त्रितॉम् | टार्शिअम् | त्रेशिअस् | त्रेतिइ | थ्रिद्य | | त्रिउन्य | |
| त्रप् | | त्रेपो | टर्पिस् | त्रोपियु | त्रेपेत् | | | | |
| त्रि | थ्रि | त्रेइस् | त्रेस् | त्रिस् त्राइस | | थ्रेइस् | | तेओरा | इंग्लिश थ्री |
| दन्त | दन्तम् | ओदोन्स् | डेन्स | दन्तिस् | | टुन्थुस | झन्त् | देअद् | ,, डेन्टल |
| दारु, तरु, द्रु | दाउरु | डोरु | | देर्व | द्रेवो | त्रिउ | | दोहरि-आक् | इंग्लिश ट्री |
| द्वार | द्वर | थुर् | फोरेस् | दुर्यिस् | द्वेरी | दउर | तोर् | दोर् | ,, डोअर् |
| द्वि | द्व | दुओ | डयुओ | दु, द्वि | | त्वइ, त्वोस् | झेर | द, दो, दि | |
| धूम | | थुमॉस् | फ्युमूस् | दुमइ | दुमु | | दौम, तौम | | ,, फ्यूम |
| न | | नी | ने, नॉन् | ने | ने | नी, ने, नेइ | नि | नि | इंग्लिश नो. |
| नक्त | नक्तुरु = रात्रीचा | नुक्स अनेमि- | नॉक्स, नोक्तु | नक्तिस् | नोग्ति | नहतस् | | नोच्द | ,, नाइट् |
| नप्तृ | नप्तर | ओम् | नेपो(त)स् | | नेतिइ | निथियस् | नेफो | | |
| नव-नवीन | नव | निऑ-म् | नोवुस् | नौयेम | नोवु | निउयिस | | नुअ | इंग्लिश न्यू. |
| नव=नऊ | नवन | एन्नेअ | नोव्हेम | देव्यिन | | निउन | निउन | नओइ | ,, नाइन् |
| नु | नू | नू | नुम् | | नायने | नुह् | नु | | |
| पञ्चन् | पञ्चन् | पेंटे | क्विंके | पन्ति | | फिंफ | | कुइग् | |
| पद | पद् | पेदोन् | पेदुम् | पादस् | | फोटस् | फ्युओझ | | इंग्लिश फूठ; |
| परि | पइरि | पेरी | पेर | | | | फुरि | | जर्मन फुर् |
| पलित | | पेलॉस् | पालिओ | पल्व्हस् | | | फेलो | | ॲंग्लो सॅक्सन्– |
| पितृ | पतर | पतीर् | पतेर् पेटर | | | फदर | फतर्, फतेर् | अभइर् | फिदेर्; इं. फादर् |

| संस्कृत | झेंद | ग्रीक | लॅटिन् | लिथुयानियन | स्लाव्हॉनिक | गॉथिक | प्राचीन-जर्मन | हिब्रू | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम | | प्रोटोस् | प्रायमस् | पिरमस | | फ्रुम | | | |
| मध्य | मद्ध्य | मेस्सोस् | मेदिउस् | विदुस् | मेद्दु | मिद्जिम् | | | अँग्लोसॅक्सन् मिडड |
| मन् | मन् | मेनो | मॅनिओ | मेनु, मिनिउ | मिनेति | मन् | मिनिआ | मुइनिम् | |
| मातृ | | मितिर् | मेटर् | मोते | मति | | म्योतर | मथॅर | |
| मांस | | | | मेस | मान्सो | | मास्=अन्न | मॅस=अन्न | |
| मृ | मर | अम्बोरास् | मॉरिऑर् | मिर्ति | म्रेति | मोथ्रे | | मथॅम् | अँग्लोसॅक्सन. मॉर्थ |
| युवन् | | | जुव्हेनिस् | जौनस् = तारुण्य | जुनु | जुग्गस | | | ,, इऑग |
| रम् | रम् | इरम | | रमम | | रिमिम् | रव | रिअग्हेन् | ,, रेस्ट |
| रुधिर | | एरुथ्रो | रुबेर | रौद् | रुदइति | | रौट, रोस्ट | रुअध | ,, रेडॅ |
| लुभ् | | लिफ् | लुबेद् | लुब्ज् | लिउबिति | लिउब्स् | लिउबन् | | ,, लिओफ |
| वद् | | वदो | वदिस् | वदिनु=मी बोलावतो | वदिति | | | | |
| वम् | वम् | एमेओ | वोमो | वेम्जु | | | | | अँग्लोसॅक्सन् वम्मन्, इंग्लिश व्हॉमिट |
| वेद | | ओइद | व्हिडिओ | वेइझ्द | | वइत् | | | |
| शत | | एक्तोन | केंटम् | स्झिन्तस् | स्तो | हुड | | कंअत् | अँग्लोसॅक्सन् हुड; कँब्रोब्रिटन् कँट् |
| शर्करा | | सॅक्करोन | सॅकरम् | | | | | | |
| सप्तन् | हप्त | एप्त | सेप्टम् | सप्तीनि | | सिबुन | | सिॲक्त | अँग्लोसॅक्सन् संओफोन; इंग्लिश सेव्हन् |
| स्था | हिस्तामि, निष्टामि | इस्तामि | स्टो | स्तोति | स्तति | | स्ताम् | स्तद् | इं. स्टँड |
| स्नु | | नेओ | | स्नेगस् | स्नेग | स्नु | स्निउतन् | स्नुआधइम | ॲग्लोसॅक्सन स्निवन |
| स्व | ह्व | स्फे | से | सव् | सेब्जे | सिक् | सुअस् | | अँग्लोसॅक्सन् सिन्, स्व |
| स्वन् | | | सोनो | झ्वनु | | | | सिअन् | |
| स्वप | कप्, कप्न = झोंप | उप्नोस् | सोम्नस् | सप्नस् | | स्लेपन् | | स्वइन् | ॲग्लोसॅक्सन स्वेफिअन् |
| स्वसृ | | | सोरोर | सेस्सु | सेस्त्र | स्विस्तर | स्वेस्तर | | ,, स्वॲस्टर्; इग्लिश सिस्टर्; जर्मन स्वेस्तेर |
| हिम | झ्जओ, झिम् = हिंवाळा | क्सिअन् | हिएम्स | झेम | झिम = हिंवाळा | | | | |

# परिशिष्ट २

## प्राकृत भाषांतील विभक्तिरूपें—देव एकवचन

| विभक्ति | संस्कृत | पाली | आर्ष किंवा अर्धमागधी | महाराष्ट्री | शौरसेनी | मागधी | पैशाची | अपभ्रंश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथमा | देवः | देवो | देवो, देवे | देवो, देवे | देवो, देवे | देवे | देवे | देवु, देवो, देव, देवा |
| द्वितीया | देवम् | देवं | देवं | देवं | देवं | देवं | देवं | देवु, देव, देवा |
| तृतीया | देवेन | देवेन | देवेण | देवेण, देवेणं | देवेण, देवेणं | देवेण, देवेणं | देवेण, देवेणं | देवेण, देवेणं, देवें |
| चतुर्थी | देवाय | देवाय, देवस्स | देवस्स | देवस्स | देवस्स | देवस्स | देवस्स | देवस्सु, देवासु, देवसु देवाहो, देवहो, देव, देवा |
| तादर्थ्य चतुर्थी | | | देवाए, देवाय, देवस्स | देवाय, देवस्स, | देवाय, देवस्स | देवाय, देवस्स | देवाय, देवस्स | |
| पंचमी | देवात् | देवा, देवतो देवम्हा, देवस्मा, देवम्हा | देवा, देवतो, देवातो, देवातु, देवाहिंतो | देवत्तो, देवाओ, देवाउ देवाहितो, देवाहिंतो, देवाहि, देवा | देवादो, देवादु | देवादो, देवादु | देवातो, देवातु | देवाहु, देवहु, देवाहे, देवहे |
| षष्ठी | देवस्य | देवस्स | देवस्स | देवस्स | देवस्स | देवाह, देवस्स, देवाहँ, देवाण, देवाणं | देवस्स | देवस्सु, देवासु, देवसु, देवाहो, देवहो, देव, देवा |
| सप्तमी | देवे | देवे, देवस्मि, देवम्हि, देवम्हि | देवे, देवंसि | देवे, देवस्मि, देवम्मि देवसि | देवे, देवस्मि, देवम्मि, देवंसि | देवे, देवम्मि, देवस्मि, देवंसि | देवे, देवस्मि, देवम्मि देवंसि | देवि, देवे |
| संबोधन | हे देव | हे देव, देवा | हे देव, हे देवो | हे देव, हे देवा हे देवा | हे देव, हे देवो, हे देवा | हे देव, हे देवो, हे देवा | हे देव, हे देवो, हे देवा | हे देवु, हे देवो, हे देव हे देवा |

## प्राकृत भाषांतील विभक्तिरूपें–देव अनेकवचन

| विभक्ति | संस्कृत | पाली | आर्ष किंवा अर्धमागधी | महाराष्ट्री | शौरसेनी | मागधी | पैशाची | अपभ्रंश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथमा | देवाः | देवा, देवसे | देवा | देवा | देवा | देवा | देवा | देव, देवा |
| द्वितीया | देवान् | देवे | देवे | देवा, देवे | देवा, देवे | देवा, देवे | देवा, देवे | देव, देवा |
| तृतीया | देवैः | देवेभि, देवेहि | देवेहि, देवेहिं | देवहि, देवहिं, देवहिँ देवेहि, देवेहिं, देवेहिँ | देवहि, देवहिं, देवहिँ, देवेहि, देवेहिं, देवेहिँ | देवहि, देवहिं, देवहिँ, देवेहि, देवेहिं, देवेहिँ | देवहि, देवहिं, देवहिँ, देवेहि, देवेहि, देवेहिँ | देवेहिं, देवाहिं, देवहिं |
| चतुर्थी | देवेभ्यः | देवानं | देवाणं, देवाण, देवाहं, देवाह | देवाण, देवाणं, देवाहं, देवाह | देवाण, देवाण, देवाहँ, देवाह | देवाण, देवाणं, देवाहँ, देवाह | देवाण, देवाणं, देवाहँ, देवाह | देवाहं, देवहं, देव, देवा |
| तादर्थ्ये चतुर्थी | | | | देवाण, देवाणं देवाहँ, देवाह | देवाण, देवाणं, देवाहँ, देवाह | देवाण, देवाणं, देवाहँ, देवाह | देवाण, देवाण, देवाहँ, देवाह | |
| पंचमी | देवेभ्यः | देवेभि, देवेहि | देवेहिंतो | देवत्तो, देवाओ, देवाउ, देवाहि देवेहि, देवाहितो, देवेहितो, देवासुंतो, देवेसुंतो | देवत्तो, देवाओ, देवाउ, देवाहि, देवेहि, देवाहिंतो, देवेहिंतो, देवासुंतो, देवेसुंतो | देवत्तो, देवाओ, देवाउ, देवाहि, देवेहि, देवाहितो, देवेहितो, देवासुंतो, देवेसुंतो | देवत्तो, देवाओ, देवाउ, देवाहि, देवेहि, देवाहिंतो, देवेहितो, देवासुंतो, देवेसुंतो | देवाहुं, देवहुं |
| षष्ठी | देवानाम् | देवानं | देवाणं, देवाण देवाहं, देवाह | देवाणं, देवाण, देवाहं, देवाह | देवाणं, देवाण, देवाहं, देवाह | देवाणं, देवाण, देवाहं, देवाह | देवाणं, देवाण, देवाहं देवाह | देवाहं, देवहं, देव, देवा. |
| सप्तमी | देवेषु | देवेसु | देवेसु, देवेसुं | देवेसु, देवेसुं | देवेसु, देवेसुं | देवेसु, देवेसुं | देवेसु, देवेसुं | देवाहिं, देवहिं |
| संबोधन | हे देवाः | हे देवा | हे देवा | हे देवा | हे देवा | हे देवा | हे देवा | देवाहो, देवहो, देव, देवा |

# परिशिष्ट ३

## संस्कृत, प्राकृत, मराठी आणि इतर देशी भाषांतील सादृश्य

| संस्कृत | प्राकृत | मराठी | गुजराथी | सिंधी | हिंदी | बंगाली |
|---|---|---|---|---|---|---|
| अशीति | असीइ | ऐंशी | एंसी | असी | अस्सी | आशी |
| अष्टादश | अठरह | अठरा | अढार, अराड | अडह | अठारह | आठार |
| अहम् | अहम्, आम्ह | मी | हु | आऊं, आं | हो, हुं, मै | मुइ |
| एकादश | एआरह | अकरा | अगिआर | इकारहं, यारहं | इगारह, ग्यारह | एगार |
| एतावत् | एत्तिल, एत्तिअ | इतका | एटलो | एतिगो | इतना | एत |
| कः | कः | कोण | कोण, कओ | कोहु | कौन | के |
| कदल | कयल | केळ | केळ, केर | केविडो | केला | कला, कदिला |
| कार्पास | कप्पास | कापूस | कपास | कपाह | कपास | कापास |
| कुठार | कुहाड | कुऱ्हाड | कुहाडी, कुहाडो | कुहाडो | कुल्हाडी | कुडाल |
| कुत्र | कुत्थ | कोठें | कांहां | किति | कहां | कोथा |
| खर्पर | खप्पर | खापर | ... | ... | खप्पर | खावरा |
| गर्गरी | गग्गरी | घागर | घागर | घाघरि | गागर, गागरी | गर्गरी |
| गर्भ | गब्भ | गाभ, गाभा | गाभ | गभुं, गभु | गाभ | गाब, गाबा |
| गोपाल | गोवालि | गोवारी, गवळी | गोवाळ, गोवाळियो | गंवारु | गोवाळ | गोआला |
| चटका | चडथ | चिडी, चिमणी | चिडी | चिडी | चिडिया | चिडिया=पक्षी |
| चतुर्दश | चउद्दह | चौदा | चउद | चोडहं | चौदह | चौद्द |
| चत्वारिंशत् | चालीस | चाळीस | चाळीस | चालीह | चालीस | चल्लिश |
| चुल्ली | चुल्ली | चूल | चुलो | चुल्हि, चुल्हो | चुल्हा | चुलि |
| चूर्ण | चुण्ण | चुना | चुनो | चुनु | चूना | चुण, चूर्ण, चुना |
| चोक्ष | चोक्ख | चोख | चोख्खो | चोखो | चोखा | चोख |
|  | (दे) झगड | झगडा | झघडो | झागिडो | झगडा | झगडा |
| झाटन | झाडण | झाडू | झाडू | बुहारी | झाडू | झाँटा |
| तादृश् | तारिस | तसा, तैसा | तेवो | तिहडो | तैसा | तादृश |
| दंड=काठी, दांडी | डंड | दांड, दांडा | डांडो | डंडो | डांड, डांडा | डाँड |
| द्वादश | बारह | बारा | बार | बारहं | बारह | बारो |
| धूम | धूम | धूर, धूम | धूम धुमाडो धुवाडो | दूहां | धूआँ | धुयां |
| पचाशत् | पणासा | पन्नास | पचास | पंजाह | पचास | पंचास |
| बदर | बोर | बोर | बोर | बेरु, बेरि | बेर, बेर | बद्दर |
| बधिर | बहिर | बहिरा | बेहेरो | बोडो | बहरा, बहिरा | बहेरा |
| भ्रमर | भमर | भोंवरा | भमरो | भौंरु | भंवर, भौंर | भोमर |
| भूमि | भूमि, भुम्मि | भूय, भुई | भू, भोय, भुय | भु, भूई | भूम, भुई, भूं | भूम |


| संस्कृत | प्राकृत | मराठी | गुजराथी | सिंधी | हिंदी | बंगाली |
|---|---|---|---|---|---|---|
| यः | जो | जो | जे | जो | जो | जे |
| वयम् | वयम् | आम्ही | अम | असीं | हम | आमि |
| विंशति | वीसइ | वीस | वीस | वीह | बीस | विंश |
| शत | सत,सय,सअ | शें, शंभर | शो | सौ | सै, सौ | शत |
| शिथिल | ढिल्ल | ढिला | ढीलो | ढिगे, ढिलो | ढीला | ढल |
| शुष्क | सुक्क | सुका | सुको | सुको | सूखा | शुका |
| श्वशुर | ससुर | सासरा | ससरो | सहुरो | ससुर | श्वशुर |
| सः | सो | तो | ते | सो | सो, तो | से |
| स्कंध | खंध | खांदा | कांधो | कांधो | कांधा | कांधा |

## परिशिष्ट ४

प्राकृत भाषेच्या व्याकरणावर बऱ्याच संस्कृत कवींनी आतांपर्यंत रचना केली आहे. वाल्मीकीच्या नांवावर प्राकृत व्याकरणाची मूळ सूत्रें मोडतात. वाल्मीकि हा वैदिक छन्दानंतरचा अर्वाचीन अनुष्टुभ छन्दामध्यें रचना करणारा आद्य कवि गणला जातो म्हणून त्याचें नांव या संस्कृत वैय्याकरणांच्या दृष्टीनें अर्वाचीन भाषेच्या व्याकरणास दिलेलें दिसतें. शम्भुरहस्यामध्यें प्राकृत भाषेची थोरवी गातांना तिचा प्रचेतसपुत्र वाल्मीकि हा व्याकरणकार होता असें म्हटलें आहे ( को विनिन्देदिमां भाषां भारतीमुग्धभाषितम्। यस्याः प्रचेतसः पुत्रो व्याकर्ता भगवान् ऋषिः ॥ प्राकृतं चार्षमेवेद यद्धि वाल्मीकि शिक्षितम्। ) परंतु वाल्मीकीची ही सूत्रें उपलब्ध नाहीत. षड्भाषाचन्द्रिकाकार आपल्या प्रस्तावनेंत आपण मूळ वाल्मीकिसूत्रांवरच टीका लिहित आहों असेंच म्हणतो. मार्कंडेयानें शाकल्य व कोहल यांचा उल्लेख केला आहे. त्यानंतर वररुचीचा प्राकृत प्रकाश हाच सर्वात जुना ग्रंथ होय. वररुची म्हणजे जर कात्यायन असेल तर तो बुद्धपूर्वहि असू शकेल. त्यानंतर हेमचन्द्रानें आपल्या सिद्धहेमचन्द्र या संस्कृत भाषेच्या व्याकरणग्रंथाच्या आठव्या अध्यायांत प्राकृत भाषेचें व्याकरण दिलें आहे व त्यानंतरच्या अनेक ग्रंथकारांनीं त्यासच अनुसरून आपल्या ग्रंथांची रचना केली आहे. या सर्व ग्रंथांची यादी पुढें दिली आहे.

१ औदार्यचिन्तामणि—श्रुतसागर, २ प्राकृतकल्पतरु—रामतर्कवागीश, ३ प्राकृतकामधेनु—लंकेश्वर, ४ प्राकृतकौमुदी—?, ५ प्राकृतचन्द्रिका—कृष्ण पण्डित ( शेष कृष्ण ), ६ प्राकृतचन्द्रिका—करंज कवि सार्वभौम वामनाचार्य, ७ प्राकृतदीपिका—संक्षिप्तसार खण्ड ८ वर चण्डीदेव शर्माकृत टीका, ८ प्राकृतपाद—नारायण ( संक्षिप्तसार प्राकृतपाद ), ९ प्राकृतप्रकाश—वररुचि, [ प्राकृतप्रकाशवर टीका—प्राकृतमंजरी—कात्यायन, प्राकृतचन्द्रिका उर्फ प्राकृत मनोरमा—भामह, प्राकृतसंजीवनी—वसंतराज, ] १० प्राकृतप्राक्रियावृत्ति उर्फ व्युत्पत्तिदीपिका—हेमचन्द्र प्राकृताध्याय यावर टीका—उदयसौभाग्यगणि, ११ प्राकृत प्रदीपिका—नरसिंह, १२ प्राकृतप्रबोध—हेमचन्द्र—प्राकृताध्यायवर टीका—नरचन्द्र, १३ प्राकृतभाषांतरविधान—चन्द्र, १४ प्राकृतमणिदीप—अप्पयज्वन, १५ प्राकृतमणिदीपिका—चिन्नबोम्मभूपाल, अप्पय्य दीक्षित यांनी लिहिलेलें व ग्रथप्रकाशिनीमध्यें छापलेलें, १६ प्राकृतरहस्य उर्फ षड्भाषावार्तिक—? १७, प्राकृतरूपावतार—सिंहराज, १८ प्राकृतलक्षण—चण्ड, १९ प्राकृतलंकेश्वर—प्राकृतकामधेनु पहा. २० प्राकृतव्याकरण—समंतभद्र, २१ प्राकृतव्याकरण—शुभचन्द्र, २२ प्राकृत व्याकरणवृत्ति—त्रिविक्रमदेव ( मल्लीनाथ पुत्र ), २३ प्राकृतसंस्कार—? २४ प्राकृतसर्वस्व—मार्कण्डेय कवीन्द्र, २५ प्राकृतसूत्र—वाल्मीकि ( Oppert 3427, II 5961. ), २६ प्राकृताध्याय—हेमचन्द्र शब्दानुशासन अष्टमाध्याय, २७ प्राकृतानन्द—रघुनाथशर्मा, २८ प्राकृताष्टाध्यायी—मनोरमा—चन्द्रिकाटीका-नीलाम्बर मिश्र, २९ वाल्मीकिसूत्र—प्राकृत व्याकरण (Rice 26) ३० षड्भाषाचन्द्रिका—भाम ( Rice ), ३१ षड्भाषाचन्द्रिका—लक्ष्मीधर, ३२ षड्भाषामञ्जरी—? ३३ षड्भाषारूपमालिका—दुर्गणाचार्य, ३४ षड्भाषासुबन्तादर्श नागोबा—तंजावरच्या तुळाजीकरितां., ३५ संक्षिप्तसार—प्राकृतपाद—क्रमदीश्वर.

## परिशिष्ट ५
## इंडो इराणी ( आर्यन ) भाषावंश



॥ श्री ॥

# महाराष्ट्र शब्दकोश

## विभाग चवथा

## ड

**ड**—वर्णमालेंतील तेरावें व्यंजन. अक्षरविकासः—याचें पहिलें रूप अशोकाच्या गिरनार शिलालेखांत सापडतें. दुसरें रुद्रदामनूच्या गिरनार लेखांत (ट सारखें) (इ. स. २ रें शतक). तिसरें अलाहाबाद येथील स्तंभावरील लेखात (४ थें शतक) व चौथें धारावर्ष राजाच्या वेळच्या उडिया लेखांत (इ. स. १०२८) आढळतें.

**ड**—पुस्त्री. गुराख्यांची पोरें मानेवर-गळ्यावर बोटें दाबून (घसा दाबून) जो आवाज काढतात तो. (क्रि० घालणें). डह पहा.

**डई**—स्त्री. ढई पहा.

**डऊ**—पु.नारळ कोरून आंतील खोबरें काढून टाकून केलेलें पात्र. डव, डहू पहा.

**डऊक, डऊत, डऊर** इ०—हे (डऊ या अक्षरांनीं आरंभ होणारे) शब्द डौ मध्यें पहा.

**डक**—न. जाड कापडाचा एक प्रकार; हें ट्विलहून निराळें असून आरंभीं खलाशासाठींच हें तयार होत असे. [इं.]

**डंक**—पु. १ दंश; चावा; नांगीचा मारा. (क्रि० मारणें). २ (गो.) द्वेष. डंख पहा [सं. दंश्; प्रा. दं. डंक; हिं.]

**डकडक-डकां**—क्रिवि.१ पदार्थाचा सांधा, बंध इ० शिथिल, नादुरुस्त झाल्यामुळें हलण्याचा आवाज होतो तसा किंवा थलथलीत माणूस, उंट इ० चालतांना होतो तसा आवाज होऊन डगडग; डुगडुग; खिळखिळां; करकरां; गिरगिरां. (क्रि० जाणें; हलणें; वाजणें). 'हा खांब घट्ट पुरला नाहीं तर डकडक हलूं लागेल.' २ झपाट्यानें. 'जेवित जेवताही पाहे। झोंपी जाये डकडकां' –एभा २५.२८४. [ध्व. डक द्वि.] **डकडकणें**–अक्रि. खिळखिळें होणें; डगडगणें; डळमळणें; डुलणें; लटलटणें (खांब, इमारत); हलणें; करकरणें (ढिला सांगाडा इ०); गदगद हालणें; थरथर कांपणें (स्थूल शरीर). [डकडक] **डकडकीत**–वि. डगडगीत पहा.

**डकणें**—अक्रि. चिकटणें; लगटून राहणें; डगणें पहा. [डिक?]

**डकणें**—अक्रि. (व.) ओकणें; वांती होणें. [ध्व.]

**डकरणें**—अक्रि. (ना.) १ ढेंकर देणें. २ (व.) शक्तीचा गर्व वाहणें; अहंभाव दर्शविणें. [ध्व. हिं. डकराना=डरकाळी फोडणें; तुल०]

**डकल**—वि. (कु.) माहीत; ठाऊक; अवगत. [दखल]

**डकला**—पु. (प्रां.) नदीच्या कोरड्या पात्रांत खणलेला झरा; डहुरा; डबकें; पाण्यानें भरलेला लहानसा डवरा.

**डकली**—स्त्री. दिव्यांत तेल घालावयाची-अंब्याच्या कोयीची केलेली पळी; अशा सारखीच करवंटीची केलेली पळी. डवली पहा.

**डकवण**—न. १ खळ; गोंद; चीक; सरस; चिकटा; डिंक. २ चिकटविण्यास उपयोगी पडणारी वस्तु. [डकविणें]

**डकवाडकव**—स्त्री. कांहीं तरी डकविण्याची क्रिया.[डकविणें]

**डकवि(व)णें**—उक्रि. चिकटविणें; डिकविणें. [डिक]

**डंका**—पु. १ एक वाद्य; चौघडा वाजविणें संपल्यावर शेवटीं वाजवावयाची थोरली नौबत, नगारा. 'डंक्यावर टिपरी पडतां हुशार झाले।' –एपो २३५. २ (ल.) प्रसिद्धि; कीर्ति. (बहुधां वाईट कृत्यांची); गाजावाजा; बोंबाबोंब. (क्रि० वाजविणें). ३ संबळावर खर्ज सूर वाजविण्याची काडी (आंकडी नावाच्या काडीनें उच्च अथवा टीपेचा सूर काढतात). ०**देणें-वाजविणें**-उघडकीस आणणें; दांडोरा पिटणें; अपकीर्ति करणें (गोष्ट, माणूस यांची). [सं. ढक्का; प्रा. डक्क; हिं. डंका; ध्व.]

**डकाईत**—वि. १ चपळ; चलाख; हुषार; तीव्र; तयार. २ डाके घालणारा; दरोडेखोर; डाकू; लूटमार करणारा. [डाका]

**डकाक-कां, डकाडक-कां**—क्रिवि. १ डकडक पहा. डगडगत; खडखडत. २ डुलत; डुलक्या घेत; पेंगत (डुलक्या येतात, डोळे झांकतात इ० शब्दास जोडून). 'डकडकां डुलक्या देती।' –दा १८.९.३. [ध्व. डक]

**डकार**—पु. (उप.) ढकर; डकरणें. [ढकर]

**डकारणें**—अक्रि. डरकळी; गर्जना; डुरकाळी फोडणें. 'तीचेवरी चढुनि सिंह बहु डकार।' —गंगाधर, सकल्लोल १११ [ध्व.]

**डकांवडकांव**—क्रिवि. डकडक पहा. (क्रि० चालणें; जाणें). [ध्व.]

**डंकी-खी**—स्त्री. कुस्तींतील एक पेंच. (क्रि० मारणें; देणें).

**डंकी-खी**—वि. (गो.) दंशी; मनांत दंश, डाव ठेवणारा (साप, माणूस इ०). [सं. दंश; म. डंक]

**डंकीण**—स्त्री. (व.) पाणी उपसून काढण्याचा एक जातीचा पंप. 'शेतांतल्या विहिरीवर डंकीण लावली.' [इं. डॉंकी पंप]

**डंकी(खी)ल**—वि. डांकील; डांक लाविलेलें. [डांक]

**डकें**—वि. (मातकाम) छापील; ठशाचें; अवयव सुटे नसलेलें; ज्याचे अवयव शरीरास डकलेले आहेत असें (चित्र). [डकणें]

**डक्कलवार, डक्कलव्हलर**—पु. (माण.) मांगगारोडी किंवा व्हलर (होलार) मांगांचा गुरु. —गांगा २६. [? +होलार]

**डंख**—पु. १ विषारी प्राणी, किरडूं यांचा चावा, दंश; नांगीचा तडाखा; डंक (क्रि० करणें; मारणें). २ द्वेष; एखाद्यानें कोणी वाईट केलें असतां, त्यानें त्याचा सूड घ्यावा म्हणून मनांत सदैव ठेवलेला दंश, डाव; द्वेषभाव; सूडबुद्धि (क्रि० राखणें; ठेवणें; बाळगणें; धरणें). [सं. दंश; प्रा. डंक]

**डंख-ग**—पु. दंग; चुना किंवा पोहे इ० कुटण्याची लाट. [ध्व. हिं. डंखी]

**डंखउजाड**—पु. घोड्याच्या तोंडाच्या खालपासून पायापर्यंत असलेला भोंवरा. —अश्वप १.१०३.

**डंखणें**—उक्रि. दंश करणें; चावणें; डसणें; नांगी मारणें (विषारी प्राण्यांनीं). 'विषयविषधरीं हे डंखिली आजि भारी।' —सारुह ४.७. [सं. दंश]

**डंखीक**—वि. चारा-दाणा खाऊन मान हलविणारा; डुलणारा (घोडा). —मसाप २.२.५७.

**डंखीण**—स्त्री. १ डाकीण; चेटकीण. २ (ल.) (विशेषतः) अत्यंत कुरूप, हिडीस व चेट्टक करणारी ठाकूर जातीची स्त्री. ३ (ल.) क्रूर, जख्ख, कुरूप, भयंकर स्त्री; जखीण; हडळ. [सं. डाकिनी]

**डंखी(खे)ल**—वि. डंख केलेलें; पक्ष्यांनीं चोचीनें टोंचलेलें; किड्यांनी खाल्लेलें; उंदरांनीं कुरतुडलेलें (धान्य, फळ इ०) [सं. दंश]

**डग**—पु. १ (इमारत, खांब, ढिला दगड यांची) लटपटणें, हलणें, डगडगणें, खिळखिळणें इ० क्रिया; डुगडुग (क्रि० खाणें). 'माझ्या हातच्या इमारतीस डग नाहीं.' २ (ल.) डळमळण्याचा संभव, भीति; संकट, एकदम ढासळून पडणें, बूड येणें, फसगत, भीति, त्रास, धोका, नाश इ० होण्याचा; खराबी, नुकसान, पराभव, सत्यनाश किंवा वाटोळें होण्याचा संभव. 'मसलतीस-कामास डग नाहीं.' 'रुपयास डग नाहीं.' (=खोटा इ० नाहीं, तो चाललाच पाहिजे). —स्त्री. भीति; संशय; निराशा; अंदेशा; दिक्कत; शंका; विकल्प; किंतु. (क्रि० खाणें). [डगणें]

**डग**—स्त्री. सीमा; कांठ; कड; किनारा; मर्यादा.

**डग**—स्त्री. पाऊल; कदम; पावंडा; ढांग; ढेंग; टांग; झडप.

**डंग, डांग**—नपु. १ डोंगराळ मुलुख, डंगा पहा. २ डोंगराळ प्रांतांतील झाडीचा प्रदेश; निबिड अरण्य. [प्रा. डाग=काठी?]

**डगडग-डगां**—क्रिवि. १ हलत, डळमळत, लटलटत, लटपटत असतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० हलणें डगडग; झोक जाणें; झोप येणें इ०). २ मोठ्या प्रवाहानें; अतिशय (घाम येणें). डकडक पहा. [ध्व. हिं. डगडगना]

**डगडगणें**—अक्रि. गदगदणें. १ अतिशय उष्णतेनें आणि घामानें त्रस्त होणें; उबाळणें; उबगणें; उबणें. २ गदगदणें; गुदमरणें; शिजणें; अतिशय उकडणें. [गदगद]

**डगडगणें**—डकडकणें पहा.

**डगडगीत**—वि. घामानें नाहलेला; घामटा पडलेला.

**डगडगीत**—वि. १ खिळखिळीत; डळमळीत; कंपायमान २ गुटगुटीत; फोपश्या; अंग सुटलेला; गुबगुबीत. 'हा खाऊन पिऊन डगडगीत आहे.' [डगडग]

**डगडुवाल, डंगुलवाल**—न. (राजा.) कापडचोपड; बाडबिछायत; सामानसुमान इ० (व्यापक अर्थी)

**डंगण**—न. डांग पहा.

**डगणें**—अक्रि. १ कांपणें; थरथरणें; डगमगणें. २ (ल.) घाबरणें; भिणें; डरणें. 'चित्तें दोन अशा स्थलीं न डगशी कोंबावया तूं जरी।' —केक ८८. ३ खचणें; मोडणें; सुटून पडणें (तुळई, भिंत इ०); चळणें; ढळणें. 'तूं आपली श्रद्धा, भक्ति व धर्म यांपासून डगूं नकोस.' —पप्रे १२७. ४ भितेपणानें मान्य करणें; रुकार देणें; दबणें. ५ कचरणें; कांकू करणें. [ध्व. डक-ग]

**डगणें**—अक्रि. तगणें; चिकटणें; चिकटून राहणें. [डग. डिक]

**डगणें**—अक्रि. वरून टांग टाकणें; ओलांडणें. [हिं. डग=पाऊल]

**डगमग**—स्त्री. डळमळीतपणा; अस्थिरता; लटपट; चांचल्य; 'डगमग डगमग कामा नये।' —दा १४.४.१३. **डगमगमगां**—क्रिवि. डगडग-गां पहा.

**डगमगणें**—अक्रि. १ डळमळणें; लटलटणें; हलणें. २ भीतीनें कचरणें; गोंधळून जाणें; त्रेधा उडणें. [ध्व. डग द्वि; प्रा. डगमग; हिं. डगमगाना]

**डगर**—स्त्री. १ चढण अथवा उतरण (नदीच्या तीराची, टेकडीची); ढाळ. २ (क.) टेकडी; उंचवटा. ३ दरड; कडपा; कडा. ४ (संगीत) वरच्या सप्तकांतील आवाज काढणें; स्वर चढविणें. (क्रि० घेणें). **दोन्ही डगरीवर हात ठेवणें**—(दोन्ही पक्षांमध्यें

असलेल्या दुतोंडया मनुष्यासंबंधीं योजतात) दोन्हीकडचा फायदा पाहणें.

**डगर-रु**—वि. १ प्रसिद्धि; लौकिक. ' आणीकही येकु थोरु। यया अव्ययत्वाचा डगरु। ' –ज्ञा १५.११८. २ आळ; आरोप. ' परि सूर्यासि अंधकार। कैं जाला होता गोचर। तऱ्ही तमारि हा डगर। आलाचि कीं। '–अमृ २.३४.

**डगर-रा-री**—पु.स्त्री. १ डवरा. पाण्याकरितां खणलेला खड्डा; पाण्यानें भरलेली स्वाभाविक खळी. २ डबकें. ' मन कल्पी डगर। तें तरंगविना सागर। '–यथादि १८.९६९. ' पाहे खूण तरू तटाक, डगरी त्या आपुल्या वाटती। ' –आसु ३७.

**डंगर**—वि. १ (व.) वृद्ध; म्हातारा. ' हा बैल डंगर आहे. ' २ (खा.) उंच.

**डग(गा)रणें**—न. सोटा; लाठी.

**डंगरी**—न. (कों) एक प्रकारचें सुती कापड; खादी.

**डंगरु**—पु. प्रतिबंध; डगर-रु पहा. [ डगर ]

**डगला-लें**—पु.न. १ आंत कापूस भरलेला कंबरेपर्यंतचा लहान कोट, बंडी. ' निवडुन डगल्यांला नीलखा बेतवील्या। ' –सारुह ३.३९. २ (सामा.) लांब कोट, अंगरखा. [ डगळ. सं. दुकूल; हिं. डगला ]

**डगळ**—वि. डागळलेलें; नासलेलें. डागळणें पहा. [ डाग ]

**डग(घ)ळ**—वि. १ ढिला; शिथिल; ढिला बसणारा (अंगरखा, जोडा, खुंटी, ब्रूच); पोकळ; ढिली रचलेली (दगडी भिंत). २ मोठया आकाराचा (चेंडू, फळ, गोटी). ३ मोठें; ढोबळ (अक्षर). ४ (सामा.) स्थूल; भरींव; मोठया आकाराचें. ' आकारें नव्हती डगळें। ' –ज्ञा १७.१२७. ५ सढळ; उदार (खर्च करण्यांत, धर्मादायांत).

**डग(घ)ळणें**—अक्रि. कुजणें; सडणें; बुरबुरणें (फळ). डागळणें पहा.

**डग(घ)ळणें**—अक्रि. १ एकाएकीं कोसळणें (इमारत, दरड, विहीर). २ (ल.) सामर्थ्यहीन होणें; खचणें; अवसान सुटणें; जेरीस येणें. [ डगळ ]

**डग(घ)ळणें**—अक्रि. उफाड्यानें वाढणें; विस्तृत होणें. (वृक्ष). [ डगळ ]

**डग(घ)ळणें**—उक्रि. ओबडधोबड घडणें; फोडणें; तोडणें. (दगड इ०). याच्या उलट माठणें. [ वैसं दगल=तुकडा; देप्रा. डंगलं=पाषाण इ० चा तुकडा ]

**डग(घ)ळा**—पु. चांगली पालवी फुटलेली झाडाची कोंवळी फांदी, डाहळी; लहान फांदी, टहाळा.

**डगळीव**—वि. १ ओबडधोबड घडलेला (इमारती दगड). २ अशा दगडांनीं बांधलेली; कमजोर रचलेली (इमारत). [डगळ]

**डगा**—स्त्री. उडी; झेप. ' म्यां म्हटलें हा शिकारी मारील व्याघ्र टाकितो डगा। ' –अफला ७८.

**डंगा**—पु. (कों.) एक प्रकारचें गलबत, होडी; डंगी; डोंगा. [ देप्रा. डोंगी ]

**डगागणें**—अक्रि. (डगडगणेंचा अतिशय) उबणें; उकाडा होणें.

**डगागणें**—अक्रि. १ कांपणें; हलणें; डुगडुगणें (सांधे ढिले झालेली, निखळलेली वस्तु). २ खचणें; धीर सोडणें; डगणें अर्थ २ पहा. ३ पडणें; उतरती कळा लागणें; गळणें; तुटणें. [डगडगणें]

**डगाडग-डगां**—क्रिवि. (डगडगचा अतिशय) डगडग पहा.

**डंगाण**—न. डोंगराळ प्रदेश. डांग पहा.

**डंगारणें**—न. दांडकें; टिकोरें; डंगरणें पहा. ॰**मार-पु.** दांडक्याचा मार. ' चोखरून डंगारणेमार। '–दा ३.७.६५. [ देप्रा. डंगा=काठी ]

**डंगा(घा)ळ**—वि. लांब टांग्या; ढांगळ. [ डांग ]

**डंगाळा**—वि. (सामा.) उंच. [ डांग ]

**डगाळी**—स्त्री. (व) डाहाळी; फांदी. डगळा पहा.

**डंगी**—स्त्री. १ नाळीप्रमाणें मागचा भागहि चिंचोळा असलेली होडी; अरबी व आफ्रिकन गलबताचा एक प्रकार. हीं फार जलद चालतात. २ खांद्यावर वाहण्याची कावड. [ देप्रा. डोंगी=पानाचा डबा? ]

**डगूर**—पु. (राजा) जोखडास जुंपलेला डाव्या बाजूचा बैल; याच्या उलट हियो=उजव्या बाजूचा.

**डगूळ**—न. फणसाची एक जात

**डग्गा**—पु. बाह्या; तांबें, पितळ, खापर यांचें डेरेदार भांडें घेऊन त्यावर तबल्याप्रमाणें कातडी तोंड मढवून केलेलें वाद्य; तबल्याची शाई मधोमध असते व याची एका बाजूस असते. [ ध्व. सं. ढक्का ]

**डघळ-ळा, डंघाळ**—डगळ इ० पहा.

**डघळीव, डघळणें**—डगळीव, डगळणें पहा.

**डचक-का**—स्त्रीपु. १ धडकी; दचक; धसका; धक्का (भीतीनें, दुःखानें एकाएकीं बसलेला). (क्रि० बसणें). २ आगामी संकटाची पूर्वकल्पना, सूचना; हुरहुर; अपशकुन. (क्रि० येणें; वाटणें). ३ पोटांत एकाएकीं होणारी खळबळ, कालवाकालव. [ ध्व. डच! ] **डचकणें**—अक्रि. १ चकित होणें; चमकणें. २ भिणें; दचकणें; भेदरून जाणें.

**डच-कन-कर-दिशी-दिनि**—ढेंकर येतांना कर्पट घशाशीं येतांना, हलणाऱ्या भांड्यांतून पाणी डचमळतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. [ ध्व. डच ]

**डचकला**—पु. घोड्याच्या पुढच्या आणि मागच्या एका बाजूच्या दोन पायास बांधलेली दोरी; कळवा.

**डचकळणें**—अक्रि. १ डचमळणें. २ डचकळी येणें. डचडचणें पहा. [ डचक ]

**डचकळी**—स्त्री. १ ढेंकर. ( क्रि० देणें ) २ घशाशी येणें; आंबट, करपट ढेकर. ( क्रि० येणें ) [ डचक ]

**डचडच-डचां**—क्रिवि. १ ढेंकर, घशाशी येणें, यासारखा आवाज होऊन. २ पोटांत खळखळणें, भांड्यांतील द्रव पदार्थ हिसळणें यांच्या आवाजासारखा आवाज होऊन. 'पोट, पाणी, पखाल, भाडें डचडच करतें, हालतें.' [ ध्व. डच द्वि. ]

**डचडचणें**—उक्रि. १ घशाशीं जळजळणें; करपट ढेकरा येणें. ( कर्त्याशिवायहि हें क्रियापद येतें ). २ हलणें; हिसळणें. [ डचडच ]

**डचडचीत**—वि. १ हलणारें; डचमळणारें; हिसळणारें ( पाणी, द्रव पदार्थ ). २ तटाटून फुटण्याच्या बेतांत असलेलें; टचटचीत ( पखाल, कांहीं द्रवानें भरलेली पिशवी, पिकलेलें गळूं, द्राक्ष इ० ). [ डचडच ]

**डचणें**—अक्रि. डसणें पहा. [ सं. दंशन ]

**डचमचणें**—उक्रि. डचमळणें पहा. —शर.

**डचमळ**—स्त्री. हलणें; हिसळणें ( भांड्यांतील प्रवाही पदार्थ ). [ ध्व. ]

**डचमळणें**—अक्रि. वर उमळणे; हिसळणें; उचकळणें; हलण्यानें बाहेर येणें. —उक्रि. हलविणें; हिसकळणें; खळबळणें; बाहेर सांडणें ( हलवून-भांड्यांतील पाणी ). [ डचमळ ]

**डच्च**—वि. ( व. ) काठोकांठ; भरपूर; गच्च. [ ध्व. डच ]

**डच्चावून**—क्रिवि. ( व. ) भरून; खच्चून. 'डच्चावून पोतें भरलें आहे.'

**डच्चू**—पु. ( व. ) कपड्याला पडलेलें बारीक भोंक.

**डच्चू**—पु. १ नकार; टाळा. २ हकालपट्टी; डिच्चू. ( क्रि० देणें ).

**डझन, डझ्‍न**—न. १२ बारांचा समुदाय. 'काड्यांच्या पेटीचें डझन.' [ इं. डझन; तुल० सं. द्वादश; लॅ. डुओडेसिम; जुनें फ्रें. दोझीन फा. दुवाज़्दही ]

**डंडळणें**—उक्रि १ डळमळणें; चळणें; हलणें; डगमगणें. 'तेथ तिन्हीं लोक डंडळित। मेरुमांदार आंदोळित।' —ज्ञा ?. १५५. २ गडबडणें; घाबरणें 'नवीं देहाचीं होतां होळी। ज्ञाना न डंडळी निजबोधें।' —एभा १?.५१८. [ ध्व. महाराष्ट्री प्रा. डंडल ]

**डंडळणें**—उक्रि. धुंडाळणें; शोधणें. 'जवें डंडळी स्थान आखंडळाचें।' —किंशुक ५. [ प्रा. ढुंढल; म. धुंडाळणें ]

**डंडळविणें**—उक्रि. ( महानु. ) हलविणें; डळमळविणें. 'अष्ट भैरव आळविती, डंडळविती।' —चक्रधरसिद्धांत सूत्रें पृ. ११. [ डंडळणें प्रयोजक ]

**डप(ब)कण**—न. डबकें; पाण्यानें भरलेला खळगा. [ ध्व. डप्-ब् ! ]

**डपकी-कें**—स्त्रीन. १ तेल, तूप ठेवण्याची कातड्याची बुधली. २ पाण्याचें डबकें. [ तुल० हि. डबा; इं. डब्बर=बुधला ]

**डफ**—पु. एक चर्मवाद्य; कडें; मोठी टिमकी. लांकडी फळी वर्तुळाकार वांकवून तिचीं दोनहि टोकें एकत्र खिळविल्यावर या गोल कड्याची एक बाजू कातड्यानें मढवितात व हें वाद्य बनवितात. विस्तवावर शेकल्यानें याचा स्वर चढा होतो. लावणी म्हणण्यास याची चांगली साथ होते. [ फा. दफ् ] ०**खेळ्या**—वि. ( कों. ) डफावर नाच करणारा. —मसाप ४.४.२६०. ०**गाण**—वि. डफावर भजन करणारा. ०**गाणें**—न. १ डफावरील भजन, गाणें. 'डफ गाणें माची गाणें।' —दा १२.५.६. २ डफगाणाचें गायन. ०**घई-घाई, डबघाई**—स्त्री. १ डफावर म्हटलें जात असलेलें गाणें संपत आलें म्हणजे म्हणणारा घाईनें डफ वाजवितो यावरून २ ( ल. ) समाप्तीचा काळ; विनाशकाल. **डफघाईस, डबघईस-घाईस**—क्रिवि. ( डबघाईवरून ) मरणोन्मुख; दिवाळें काढण्याच्या, बुडण्याच्या, मोडण्याच्या, नाश होण्याच्या स्थितींत. ( क्रि० येणें ). 'एका व्यापारांत ( जॉनसन यास ) मोठी ठोकर लागून तो अगदीं डबघईस आला.' —नि ६५७. **डफडी-री, डफडें-रें**—स्त्रीन. ( डफ याचें लघुत्वदर्शक व क्षुद्रतावाचक रूप ). १ लहान डफ; टिमकी २ दोन डफडीं ( एकास हलका व दुसऱ्यास घुम म्हणतात. दोघांस मिळून हलका म्हणतात ). **डफऱ्यावर पडणें**—नांवाचा बोभाटा होणें. प्रसिद्धीस येणें ( वाईट अर्थानें ) **डफड्या, डफ्या**—वि. डफ वाजविणारा.

**डफड्या**—डबड्या पहा.

**डंफण**—न. डंका. —शर [ ध्व. ]

**डफरा**—पु. ( कु. ) दोन होड्या एकमेकींवर आपटूं नयेत म्हणून दोहोंच्यामध्यें दोऱ्याचें वेटोळें बाहेर सोडतात तें [ तुल० इं. बफर ]

**डफरावणें**—अक्रि १ ( कु. ) कांहीं तरी सांगणें; दडपून देणें; वेळ मारून नेणें; धुडकावणें. २ भीति दाखविणें. ३ ढकलणें ( होडी इ० )

**डफळ**—न. ( व. ) उकडलेल्या आंब्याचें लोणचें.

**डफळवाणी**—स्त्री. फुळकवणी; पाणचट पदार्थ; अतिशय पातळ पदार्थ ( ताक, दूध वगैरे ). [ डफळ+ सं. वन; म. वणी= पाणी ]

**डंफळा**—पु. ( बे. ) विणकामाचा एक प्रकार. पुतळीप्रमाणें डबल धागा असून आकारानें हा जवळजवळ पुतळीच्या दुप्पट असतो. चौकडा सिंगल धाग्याचा असतो.

**डफळा**—वि. एक प्रकारचा रंग. ' ढवळें; सावळें; चितळें। पोवळें पारवें डफळें। तैसींच रूपें घननीळें। असंख्यात धरियेलीं।' –ह १०.१९३.

**डंब**—न. १ (प्र.) डंभ, दंभ पहा. ढोंग; देखावा. २ रिकामा खटाटोप. [ सं. दंभ; प्रा. डंभ ]

**डंब, ड(डं)बक**—क्रिवि. परिपूर्ण; कांठोकांठ; भरपूर; डब्ब. ( क्रि० भरणें; फुगणें; मुजणें इ० ). [ ध्व. तुल० सं. डंभ्=जमविणें ]

**डबक-का-की-कें, डबकण, डबखल, डबगा**—नपुस्त्री. पाण्याचा खड्डा; डपकण पहा.

**डबकी-कें**—स्त्रीन. बुधली; डपकी-कें पहा. [ हिं. डबा ]

**डबकोणी-कवणी**—न. (ना.) (तिरस्कारार्थी) पुळकवणी; खाण्याचा जिन्नस फार पातळ व बेचव झाला असतांना म्हणतात.

**डबघर्णास येणें**—डफ(ब)घाईस येणें पहा.

**डबडबणें**—अक्रि. १ बदबद वाजणें; ढबढबणें ( ढिला पडलेला मृदंग, डफ इ० ). [ ध्व. ] २ कांठापर्यंत, तंतोतंत भरणें ( भांडें, नदी, विहीर ). ' रात्रीच्या पर्जन्यानें सकाळला विहीर डबडबली ' ३ अश्रूंनीं भरून येणें ( डोळे ). ४ पडसें इ० नीं बेजार होणें; थंडी होणें. [ ध्व. डब ! डब ! हिं. डबडबाना ] **डबडबीत**–विक्रिवि. भरपूर; आकंठ; कांठोकांठ. ( क्रि. भरणें ).

**डबडा-डें**—स्त्रीन. १ बुधला; बुधली; ( तेल, तूप इ० ठेवण्याचें ) चामड्याचें लहान भांडें: डप(ब)की-कें. २ जस्ताचें भांडें; इं. टिन्पॉट. [ हि. डबा ]

**डबड्या**—वि. क्षुद्र; टाकाऊ; अगदीं कांहीं उपयोग, योग्यता नसलेला.

**डबणें**—दबणें पहा.

**डबर**—पु. ( बांधकाम ) घराच्या पायांत भरावयाचा ओबडधोबड, अनघड दगडांचा समुदाय. [ इं. रबल ]

**डंबर**—न अवडंबर; विस्तार; डौल; आडंबर पहा. ' धमाचें माजवूनि डंबर।' –कक १०३. मेघ; जग इ० शब्दाशीं संयोग होऊन सामासिक शब्द बनतात. ' तो हा जगडंबरु। नोहे येथ संसारु।' –ज्ञा १०.१०७. [ सं. डंबर ]

**डंबरणें**—अक्रि. फुगणें; ताठ होणें; डब्ब होणें; डंबारणें पहा.

**डबरपोट्या, डबरा**—वि. ढेरपोट्या; दोंद वाढलेला. [ डबरा=खळगा, पोट ]

**डबरा**—न. गुबारा; फुगवटी; ( पोटाचो ). ( क्रि० धरणें). [ का. डब्बी ]

**डब(बु)रा**—पु. १ पाण्याचा खळगा; डबकें; डगरा पहा. २ कचरा टाकण्याकरितां खणलेला खड्डा. ३ ( गुऱ्हाळ घर ) रस धरण्याकरितां केलेला खळगा. ४ ( वे. ) खळगा. **डबरा-रें**–पुन. ( तंजा. ) पातेलें; वोगोणें. [ हिं. डबरा; तुल० का. डुबरी=वाटोळेपणा ]

**डबल**—वि. दुप्पट; दुहेरी; दुबार. [ इं ] ०**बीन**–घेवड्याच्या शेंगाप्रमाणें एक भाजी. [ इं. डबल बीन्स ] ०**मार्च**–पु. ( ड्रील ) दुडकी चाल; दोन पावलांत साधारण ४० इंचाचें अंतर ठेवून केलेली चाल. –संच्या ३०. [ इं. ] ०**रोटी**–स्त्री. पाव; इंग्रजी भाकरी. [ इं ]

**डबा, डब्बा**—पु १ जिन्नस वगैरे ठेवण्याकरितां चामडें, धातु इ०ची केलेली पेटी, करंडा; लहानशी पेटी; मोठी डबी. २ आगगाडीच्या रांगेंतील एक गाडी (माणसें बसावयाची किंवा मालवाहून नेण्याची). ३ लहान मुलांच्या पोटांत होणारा एक रोग; मुडदुस. [ का. डब्बी; फा. दब्बा; हिं. डबा, डब्बा ]

**डबाड**—न. डबकें; डबरा पहा.

**डबाबणें**—अक्रि. ( डबडबणें चा अतिशय ) बदबद व मंद वाजणें. [ ध्व. डब ]

**डंबारणें**—अक्रि. १ ( पोट ) फुगणें. २ ( आकाशांत ढग ) ओथंबणें: खालीं लोंबणें; झोलणें. ३ पुन्हां भरणें; पुन्हां पुवाळणें ( फोड ). [ डंबर ]

**डंबा(भा)रा**—पु. फुगवटा: फुगीरपणा: डब्ब होणें: फुगणें ( पोट ). २ (मेघांची) ओथंबलेली, झोलती स्थिति: खालीं लोंबणें; ( पाण्यानें ) गच्च भरलेली अवस्था. ३ धुस्सा: फुरगटणें: गाल फुगवून बसणें: कोधाची, धाकाची मुद्रा. ४ ( गळू, फोड ) पिकणें; पू धरणें; पुवाळणें; फुगवटा: सूज [ सं. डंबर ]

**डंबाळ**—पु. १ डौल: थाटमाट. ' तेथें बहुतें डंबाळें। पांडवूं साउमेयां आलें।' –शिशु ५७९. २ विस्तार: व्याप. ' पुराणाचें सरले डंबाळ।' –भाए ८६. [ सं. डंबर ]

**डबी, डब्बी**—स्त्री. १ अतिशय लहान पेटी; डबा. २ (ल.) देवळांतील तिजोरी: जामदारखाना. ३ देवापुढील ( दक्षिणेची, देणगीची ) पेटी. ४ जकात, दस्तुरी, कर इ० घेण्याची पेटी. उदा० यात्रा डब्बी पहा. ५ ( ना. ) आगपेटी. [ का. हिं. ]

**डबीर**—पु. (प्र.) दबीर: राजाचा खाजगी कारकून, कारभारी, लेखक; ( इं ) प्रायव्हेट सेक्रेटरी. ' पेशवे मुरनिस चिटणिस डबीर।' –तुगा ४४४३. [ फा दबीर ]

**डबुकें-गें, डबुलें, डबोलें**—न. १ सांठवून ठेवलेला पैसा; गंगाजळी; ठेव: गाठोडें: संचित धन. २ सांपडलेलें गुप्त द्रव्य: श्रम, शोध केल्यावांचून आलेली मिळकत: आयती प्राप्ति: अनपेक्षित लाभ. ( क्रि० लागणें: सांपडणें: मिळणें ). ' पैशाच्या: डबोल्यावर

बसलेले रक्षक नाग याविषयीं लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी कोणी ऐकल्या नाहींत.' -नि २१०. [ डबा ? ]

**डबुसा**—पु. ( कांहीं अरब लोकांच्या ) जहाजांतील मागच्या बाजूस केलेली एक लहानशी खोली किंवा छाया केलेली जागा. [ अर. दबूसा=जहाजावरील मागची खोली; हिं. डवस=जहाजावरील कोठी ]

**डबेंत राहणें-येणें-आणणें**—क्रि. ताब्यांत, हुकमाखालीं राहणें, असणें, आणणें, येणें. [ दवणें ]

**डंबेल**—पु. व्यायामाकरितां मुठींत धरून फिरवावयाचें जाड मुष्टिमुद्गल, रिंगणी; दोन्ही टोकांस वजन असलेला एक लहान दांडा. अशी जोडी घेऊन स्नायुबळकटीसाठीं व्यायाम करतात. [ इं. ]

**डब्ब**—क्रिवि. डंब; डम्म पहा.

**डब्बादवाली**—स्त्री. (शिपाई लोकांत प्रचारांत असलेली जुनी संज्ञा ) काडतुसाची पेटी व पट्टा. [ हिं. डब्बा=डबा+फा. दूआली=पट्टा ]

**डंभ, डंभी, डंभाई**—पु. डौल; थाट. सर्व अर्थी. दंभ पहा. 'डंभ पाहुन भक्तिवंत। उपचार मिरवती।' -नव १६.२८. [ सं. दंभ; प्रा. डंभ ] **डंभाचारानें येणें**-क्रि. डौलानें येणें. [ सं. दम्भ ]

**डभरा**—पु. ओबडधोबड खळी इ०. डोबरा, डोभरा पहा. [ डबर ]

**डंभारणें**—अक्रि. सुजणें; फुगणें इ०. डंबारणें पहा.

**डम**—न. १ (वाद्य) एक वाद्य; मोठा नगारा; ( याचा आवाज घुमण्यासाठीं याच्या आंतील बाजूस मेणाचें लुकण देतात ). २ समेळ. [ ध्व. का. डम=विशिष्ट ध्वनि, टम ]

**डमक**—न. (क.) डबकें; थिल्लर. 'अंगणांत डमक साठलें आहे' [ ध्व. डबक् ]

**डमडम**—स्त्री. भांडाभांड; दंगा; बोलाचाली. [ ध्व. डम ]

**डमडम**—न. ( को. ) एक पेय.

**डमर्णा**—स्त्री. ( पं. ) कपडे धुण्याची मोगरी.

**डमरू**—न. १ एक चर्मवाद्य; डौर ( हें वाळूच्या घड्याळाच्या आकारानें असतें ). २ डमरूच्या आकाराची वस्तू ( वाद्य, घड्याळ इ० ) [ सं. ] **०यंत्र**-न बारीक गळ्याच्या वर्तुळाकार भांड्यावर तशाच तऱ्हेचें दुसरें भांडें उपडें ठेवून तीं दोन एकमेकांत पक्की चिकटवून आंतील पदार्थांची वाफ करून ती पुन्हां थंडीनें प्रवाही बनविण्याचें एक यंत्र; ऊर्ध्वपातन यंत्र. अर्क काढण्यासाठीं असें यंत्र वापरतात. [ सं. ]

**डमामा**—पु. एक वाद्य; डंका. डम पहा. 'मत्स्यनाथा विजयी होउनी वाजवितों मी डमामा।' -मध्व ४८. [ ध्व. डम ]

**डम्म**—न १ फुगवटी; ताठरपणा. (ल.) ताठा. ( क्रि० करणें ) २ गाजावाजा; बभ्रा. -क्रिवि. डब्ब. १ तट्ट; ताणून. 'पोट डम्म फुगलें.' २ टण्ण; तट्ट झाल्यामुळें आवाज करून (नगारा). [ ध्व. डम ]

**डर**—पु. भीति; भय; धाक. 'स्वतंत्रतादेवीच्या निस्सीम उपासकांना चव्हाटे आणि मेखसू यांचा डर स्वप्नांतहि शिवत नाहीं.' -रणदुंदुभी ७७. [सं. दर; प्रा. हिं. डर] **म्ह०** कर नाहीं त्यास डर कशास? **डरणें**-अक्रि. भिणें; भयभीत होणें; भीति बाळगणें. [ सं. दर; प्रा. हिं. डर ]

**डर**—पु. ( ना. ) ढेंकर. [ ध्व. ]

**डरकण-कणी, डरका, डरकाणी**—नस्त्रीपु. ( वाघ, बैल इ०ची ) गर्जना; डरकाळी; आरोळी. (क्रि० फोडणें; मारणें; घालणें; करणें ). [ ध्व. डर, डरकणें ] **डरकणें**-अक्रि. १ गर्जना करणें; डरकाळी मारणें ( वाघ, बैल इ०नीं ). २ डरांव करणें (बेडकानें). ३ ( ल. ) आग पाखडणें; रागावून बोलणें. [ ध्व. डर ]

**डरकल**—न. ( कु. ) कफाचा बेडका, गोळा.

**डरकावणी**—स्त्री. भीति दाखविण्याकरितां, घाबरविण्याकरितां केलेली गर्जना; आरोळी. डरकण, डरकाळी पहा. [ध्व. डरकण ] **डरकावणें**-अक्रि. डरकणें पहा. भिवविण्यासारखें मोठ्यानें ओरडणें, गर्जना करणें; आरडाओरड करणें. -उक्रि. गर्जना करून, आरडून भिवविणें. [ डरकणें ]

**डरकाळी-डरकी**—स्त्री. डरकण पहा.

**डरंगळ**—स्त्री. १ अतिसार; हगवण. २ ढाळ; जुलाब. (क्रि० लागणें ). **डरंगळणें**-अक्रि हगवण लागणें; ढाळ होणें.

**डरडरावत-वून**—क्रिवि. १ घोरत. २ निर्धास्तपणानें; स्वस्थपणें. (क्रि० निजणें). [ध्व. डर, डुरडुर=घोरण्याचा आवाज]

**डरणें**—अक्रि. डरकणें; डुरडुर करणें. 'तुं वृथा कां डरतोसि।' -पंच १.२४. [ ध्व. डर ]

**डरपोक**—वि. भित्रा; भ्याड; भीरु; नामर्द. [ डर. हिं. ]

**डरवणी**—स्त्री. डरावणी पहा.

**डरव(वि)णें**—उक्रि. मोठ्या आरोळ्या मारून, आरडाओरडा करून भिवविणें.

**डरना**—पु. भुकणें; खिसणें; वस्सकन, फुस्सकन अंगावर येणें (रागानें मांजर, कुत्रें, सर्प व (ल) मनुष्य इ० याप्रमाणें). [ध्व डर]

**डरा**—पु ( राजा. ) नरजातीचा वानर; माकड.

**डरांवडरांव**—क्रिवि. बेडूक ओरडण्याच्या आवाजाचें अनुकरण करून. ( क्रि० ओरडणें ) [ ध्व. ]

**डरावणी**—स्त्री. १ बेडकाचें ओरडणें. २ डरावणें; भिवविण्यासाठीं मोठ्यानें ओरडणें; रागें भरणें. [ डराव ]

**डराविणें**—डरविणें पहा.

**डलगेवार**—पु. (व.) गुरांचा समुदाय. 'आमची गाय डलगे वारांत चरते.'

**डलरांड**—उद्गा. हर्ष; आनंद; जयप्रदर्शक उद्गार.

**डला**—पु. १ लहानसा गोळा; चेंडू; डिखूळ; अटलेला, जमलेला गोळा (चूर्णादिकांचा). २ गुप्त, सांठविलेला ऐवज; गांठोडें; मालमत्ता; भांडवल; डबोलें. ३ गोळा; तुकडा (चांगल्या वस्तूचा). लगा. (क्रि० साधणें; सांपडणें) [प्रा. डल=ढेकूळ; हिं. डला, ढेला] ०देणें-मारणें-क्रि. एखाद्याच्या पैशांचा अपहार करणें; पैशावर हात, ताव मारणें; पैसा लुबाडणें.

**डल्याबुरनसी**—न. घोडयाच्या स्वारीचें सामान. -अश्वप. [डली+बुरणूस]

**डली**—स्त्री. नमदा; बुरणुस; खोगिराखालचें घाम शोषणारें कापड; घामोळें.

**डव**—पु. १ लहान नारळ पोखरून तयार केलेलें पात्र; डहू. २ नारळाची पळी; डाव. ही नारळाच्या करवंटीला लांकडी मूठ लावून करतात; लांकडी डाव. [सं. दर्वी; प्रा. दव्वी; हिं. डवा]

**डवक**—स्त्री. १ (कों.) (जेवणाकरतां, खाण्याकरतां) तळहात खालीं करून पसरलेला हात; बचक. डौंक-ख पहा. २ बचकाभर मापाचा जिन्नस; बचका परिमाण. [डव]

**डंवकणें**—अक्रि. रोखून बघणें; टक लावणें. डौंकणें पहा.

**डवका**—पु. (व.) दोन्ही हातांत मावेल येवढें परिमाण; कवटा. 'पोकळ डवकाभर गवत आण.' [डवक]

**डवगा**—पु. (कर्ना.) मोठा बांबू; कळक. [का. डविगे]

**डवगा-घा, डंवगा-घा**—पु. शेतांतील उत्तम पीक आलेला भाग, जागा.

**ड(डं)वचणी, डवचणें, डवच(चा)लणें**—डौंचणी इ० पहा.

**डवडव**—स्त्री. दगदग; श्रम.

**डवडव-डवां**—क्रिवि. १ सपादून; सर्व शरीर भिजेल अशा तऱ्हेनें (घाम येणें). (क्रि० येणें; सुटणें). २ अतिशय; आधिक्यानें; बहारीनें (फुलें येणें).

**डवडवणें**—अक्रि. १ घामाघूम होणें; घामानें भिजणें; घाम निथळणें. २ बहर येणें; फुलून जाणें (झाड). ३ -अकर्तृक क्रि. अंधारी येणें (ढगांमुळें); झांकोळणें; आभाळ येऊन भयप्रद दिसणें. डवरणें पहा.

**डवडवित**—क्रिवि. पूर्ण; भरलेलें. 'डवडवित यशानें जाय आल्या पथीं रे।'-वामन, विराट ७.१९९. [डवडव]

**डवणा-ना**—पु. नरोटी, आंब्याची कोय यांस लांकडी दांडा बसवून केलेली पळी; डाव. डव पहा. [हिं. डवा; म. डव]

**डवणा-ना**—पु. (व.) द्रोण; डोणा पहा. [सं. द्रोण]

**डवर**—न. एक वाद्य. डमरू; डवरा; डौर पहा.

**डवर**—पु. (व.) डौरा; कोळपें; कोळपण्याचें एक लांकडी अवजार. **डवरणें**-सक्रि (व.) डवरानें कोळपणें.

**डवरणें**—अक्रि. १ झांकोळणें; मेघ खालीं लोंबणें, उतरणें; अंधारी पडणें. 'आभाळ, पाऊस डवरला.' २ फुलें, फळें, पानें. कणसें वगैरेंनीं झाडें बहरणें. ३ (ल.) (दागिने, देवी, पुटकुळया इ०नीं शरीर) गच्च भरून जाणें. '४ घामाच्या धारा चालणें; घामानें निथळणें. ५ (पोट) फुगणें; भरणें; मोठें होणें; सगर्भ होणें डौरणें पहा.

**डवरणें**—अक्रि. शोधक दृष्टीनें, न्याहाळून, खालवर पाहणें; टेहळणें (घार, हेर, गुप्त दूत; चोर इ०नीं).

**डवरणें**—उक्रि. (गो.) डेवरणें. (ओझें) खालीं टेवणें. -न. (प्र.) दवरणें; ओझें ठेवण्याकरितां केलेला ओटा, उंचवटा. धर्मकट्टा.

**डवरणें**—उक्रि. चोपडणें; माखणें; लिप्त करणें. 'श्रृंगारमंडित महावीर केशरकस्तुरी डवरले।'-वेसीस्व ९.६४.

**डवरा**—पु. १ (नदी इ० च्या कोरड्या पात्रामध्यें). पाण्याकरितां खणलेला खड्डा; पाण्यानें भरलेला मूळचा खड्डा. २ (कों.) झरा. ३ (प्रां) डबकें; खड्डा.

**डवरा**—पु. १ शेतकऱ्यांचा एक सण: देवकार्य; मेजवानी. हंगामाचें जेवण; नवें (यावेळीं मळणी झाल्यावर धान्य पुष्कळ भरावें म्हणून, पिशाच्चांना बकरा बळी दिला जातो). डहुरा; डाहोरा. (डहुरकरी, डवरी गोसावी हे गोंधळ करण्यास हजर असतात तेव्हां त्यांच्या नांवावरून हा शब्द बनला असेल). [डहुरा; डवरी]

**डवरा**—वि. १ अगदीं पडण्याच्या, गळण्याच्या बेतांतला; अतिशय झोल आलेला (ढग). २ फुगलेलें; भरलेलें (पोट, कूस). ३ पिकलेलें (उठाणू, गळू फोड इ०). [डवरणें]

**डवरा**—वि. मारकट; मारका.

**डवरा**—पु. डऊर; डौर; डहूर. डमरू पहा.

**डवरी-ऱ्या गोसावी**—पु. गोसाव्याची एक जात व तींतील व्यक्ति. गोंधळी; डौर वाजविणारा. हे गोसावी जोतिबाचे किंवा भैरोबाचे उपासक असतात. [डवरा, डौर]

**डवला**—पु १ (कों.) नरोटीची पळी: लांकडी डाव. २ (व.) एक माप [तेलाचें] [डव]

**डवला**—पु. डौल; गर्व; शेखी; तोरा; दिमाख. (क्रि० मिरविणें).

**डवला**—पु. एक झाड.

**डवला**—पु. डवरा पहा.

**डवली**—स्त्री. लहान डव; नरोटीची, लांकडी डाव; पळी. [डव]

**डवशीर**—पु.स्त्री. एक सुंदर झुडुप.

**डवळा**—पु. (वे.) जमिनीचा पोपडा (सारवल्यानंतर निघणारा).

**डवूर**—न. (कु.) गलबतें (पाण्यांतून) जमिनीवर काढण्याचें लांकडी यंत्र. याला मध्यें एक चार पांच हात लांकडाचें जाडें खोड तासून तयार केलेलें बसवितात व यास जमिनीवर नीट बसवून घट्ट बांधणी करतात. डहूर. ०**बाजू**—स्त्रीअव. चौकटीवजा तयार केलेल्या बाजू. ०**मूसळ**—न. जाडें लांकूड (डवूरामधील मुख्य भाग).

**डहुरा-डोन्हा**—पु. (अलिबाग) पाण्याचा खळगा.

**डव्हरा**—पु. नदींत पाण्यासाठीं खणलेली खांच; डवरा पहा.

**डव्हळणें, डव्हला**—ढवळणें, ढवळा पहा.

**डव्हळा**—पु. (व.) फार पाणी घातलेलें वरण, पीठ (आजारी मनुष्यास खाण्यास देतात तें कढण) 'आठ दिवस तो डव्हळयावर होता.'

**डव्हळा**—पु. मंथन. 'क्षीरसागरीं निजश्वासें करूनि डव्हळा। चौदा रत्नें काढिलीं'।—स्वादि ९.१.७. [ढवळणें]

**डंश**—पु. १ विषारी प्राण्याचा चावा, नांगीचा तडाखा, (क्रि० करणें; मारणें). २ (ल.) द्वेष; मत्सर (क्रि० राखणें; ठेवणें; धरणें). ३ डाव; कपट. [सं. दंश]

**डंशी**—वि. खुनशी; डाव धरणारा; द्वेषी; दांत धरणारा. [सं. दंश]

**डसकर, डसका-रा**—वि. चावरा (सर्प, घोडा, कुत्रा इ०). (क्रि० डसणें). [सं. दंश+कृ-कर]

**डसणें**—उक्रि. चावणें; चावा घेणें (विंचू, सर्प, घोडा, कुत्रा इ० नीं). —अक्रि. (ल.) चिकटणें; डकणें; बिलगणें. 'भव तीरातें हस्तें न्यावें चरणीं दृढ डसलों।'—दत्तपदें पृ. ११. [सं. दश्]

**डसवणें**—क्रि. १ एकजीव करून टाकणें; चिकटविणें; डकविणें. २ डसण्यास, चावण्यास लावणें. [डसणें प्रयोजक]

**डसाडुकर, डसाडोकर**—स्त्री. होळीच्या खेळांतलें अक्राळविक्राळ हडळीचें सोंग.

**डसा(सां)ण**—अ. आंबट अर्थाच्या शब्दाच्या पुढें झोंबणारें, डसणारें यासारखा (फळें, ताक इ० संबंधीं) हा शब्द वापरतात. ढाण पहा. 'हें ताक आंबटडसाण आहे.' [सं. दह्]

**डह**—पु. गळयावर हात मारून एक विशिष्ट आवाज काढतात तो. गुराखी मुलें खेळांत डह घालतात. ड पहा. [ध्व.]

**डह(हा)ण**—अ. अति आंबट (दहीं, ताक इ०). ढाण; डसाण पहा.

**डहळज**—न. १ (है. व.) दरवाज्याच्या चौकटीच्या खालची बाजू. २ दाराजवळील बैठक. [सं. देहली]

**डहा डहाणी, डहाण्या वाद्य, डहाळ, डहाळा, डहाळी**—डाह इ० पहा.

**डहाक**—न. (व.) गारपगारी लोकांचें वाद्य. [ध्व. सं. ढक्का] ०**पिटणें**—क्रि. दवंडी पिटणें. ०**वाजणें**—क्रि. एखाद्याच्या नांवाचा बभ्रा होणें.

**डहुरा**—सर्व अर्थीं डवरा पहा.

**डहुरी, डहूरकरी**—पु. डवरी गोसावी पहा.

**डहुळ**—वि. गढूळ. 'आकाश जालें डहुळ।' —वेसीस्व १.११९. [ढवळणें] **डहुळणें**—उक्रि. १ गढुळणें; ढवळणें पहा. २ गडबडणें; खवळणें. 'जें थितें हें डहुळलें। मानस माझें।'—ज्ञा ३.१४. 'धैर्य समुद्र डहुळला.'—भाव ८४. [ढवळणें]

**डहुळा**—ढवळा पहा.

**डहू**—पु. नारळाचा डोळा हें तोंड ठेवून आंतील खोबरें पोखरून काढून केलेलें पात्र. डव पहा

**डहूत**—स्त्री. दौत. [दऊत अप.]

**डहूर**—पु. १ डमरू; वाळूच्या घड्याळाच्या आकृतीचें एक वाद्य; मृदंगाकृति वाद्य. डवर, डौर पहा. २ जड वस्तु उचलण्याचें यंत्र. डवूर पहा.

**डहूळ**—डोळ पहा.

**डळडळीत**—वि. १ उंच; तुळतुळीत; लबलबित; फुटण्याच्या बेतांत असलेलें (पिकलेलें द्राक्ष, गळू, जार, बुडबुडा इ०). २ लटलट हलणारें; डळमळणारें; थलथलीत (मांस). [दलदल]

**डळण**—न. दळण(वळण) पहा.

**डळमळ**—स्त्री १ चंचलता; कांपरेपणा; लटपटीत स्थिति; लटपट. २ (ल.) अस्थिरता; अनिश्चितपणा. **डळमळणें**—अक्रि. १ (धरबंद, आधार सुटल्यानें) लटपटणें; हलणें; थरकांप होणें. २ (ल.) मोडकळीस येणें; डुलणें; अस्थिर होणें. ३ डोलणें; डुलणें (जहाज). ४ हलणें; हिसळणें; गचकळणें (भांड्यांतील पाणी). ५ डबडबणें; भरणें व भरत येणें. 'भीष्म द्रोणादिकांचे डोळे। अश्रुपातें डळमळती।'—मुसभा १४.१६५. ६ स्थानच्युत होणें; सिद्धीस न जाणें. 'त्यांची मामलत डळमळली.' [ढळणें; डुलणें]

**डळमळ-मळां**—क्रिवि. खिळखिळा होऊन; थलथलत; हलत; लटपटत (इमारत, पारा, मऊ मांस, राड इ०).

**डळमळीत**—वि. १ कांपणारा; लटलट हलणारा. २ फुसकी; मोडकी; बिन टिकाऊ; अस्थिर (इमारत). ३ (ल.) अनिश्चित; संदिग्ध; पोकळ; मुग्ध (भाषण, व्यवहार). —क्रिवि. १ तोंडोतोंड; कांठोकांठ (भांडें भरणें). २ खळखळ वाहात. 'जैसें गंगेचेनि वोघें। डळमळीत जळ जें निघे।'—ज्ञा १४.३१९. [डळमळ]

**डळा**—पु. (तेली जातींत) विवाहप्रसंगीं मुलाकडून मुलीकडे पाठवितात तो पोषाख. डाली पहा. -बदलापूर १७३.

**डळा**—पु. खडा. 'पोतास कापुराचा डला। जेवीं नातळे काउळा।' -एभा ११.३७९.

**डाई**—पुस्त्री. १ (सोंगट्या इ०चा डाव) खेळांतील जय; जिंकलेला डाव. उदा० माझा डाई तुजकडे राहिला. 'डाई आमुची नेदुनी। एथें आलासी पळोनी।' २ फांसा टाकणें; हात. ३ खेळण्याची पाळी. डाव पहा. ०**डाई पडणें**-(ल.) गुरफटणें; गुंतणें. 'खेळ खेळुन न पडे जो डाई। तोच उमजला आपल्या ठायीं।' -मध्व १६८. [डाव]

**डाई**—पुस्त्री. द्वेष; हेवा. (क्रि० पेटणें; पडणें). 'पडला पर-शत्रूच्या डाई । वासनेला मारुनि घाई।' -अमृत १८. [दावा किंवा सं. दाह; हिं. डाह-द्वेष]

**डाईक**—वि. दावा धरणारा; दीर्घद्वेषी. 'बहु डाईक दुर्मती। या नांव बद्ध।' -दा ५.७.३०.

**डाईज**—दाईज पहा. भाऊबंद; (माण)भाइज. [सं. दायाद]

**डाऊ**—पु. १ लग्नांत नवरानवरी सुपारी लपविण्याचा जो खेळ खेळतात त्यांतील सुपारी. २ गेरू; काव (यानें माकडें आपलीं तोंडें रंगवितात अशी समजूत)

**डाऊल**—न. (कु.) मोठी पळी. डवली पहा.

**डाक**—स्त्री. १ कथील, अभ्रक इ०कांचे तुकडे (हे चकचकीत असून देव्हारे, चित्रें यावर चढवितात); हिऱ्या-रत्नांचें सौंदर्य वृद्धिंगत करण्यासाठीं त्याखालीं बसविण्याचा चांदी, जस्त इ०चा तुकडा, पान, पत्रा. २ कृत्रिम जवाहीर बनविण्यासाठीं भिंगाखालीं लावलेला एक रंगीत पदार्थ. [हि.]

**डाक**—पु. १ (राजा.) शूद्र जातीमध्यें असलेली प्रेतसिद्धि. भूत-पिशाचविद्या; मृत मनुष्यास बोलावयास लावण्याचा विधि. २ वरील प्रसंगीं, तसेंच गोंधळाचे वेळीं उपयोगी पडणारें एक वाद्य, नगारा. [सं. ढक्का; गो. डांक=डाकीण; हिं. डाक] ०**भरणें**-मांड मांडणें; स्थापना, पूजा वगैरे करून वाद्यें वगैरे वाजविणें; अंगांत आणून बोलण्यास लावणें.' मुंजाबाची डाक भरोनी मेसाई आळविली हो।' -भज ५९.

**डा(डां)क**—स्त्री. १ टपाल; उतारू नेण्याकरितां घोडे, पळणारे मनुष्य ठेवून केलेली व्यवस्था. २ (साम.) टपाल; पोष्ट. ३ डाकचौकी पहा. ०**घर**-पु. (हिं.) टपालहपीस. ०**चौकी**-स्त्री. डाकेचीं घोडीं, माणसें उतरण्याची जागा; टपाल, उतारू नेण्याकरितां घोडे इ०बदलण्याची जागा; टप्पा. ०**पाती**-स्त्री. १ डाकचौकी; टप्पा. २ एकामागून एक रवानगी; माळ; माळका. (क्रि० ठेवणें; राखणें; बसविणें; मोडणें). ३ ठाणें; अड्डा (वाटेवरील चोरांचा). ०**बंगला**-पु. प्रवाशांना उतरण्यासाठीं केलेला सरकारी बंगला; (इं.) ट्रॅव्हलर्स बंगलो; मुसाफर बंगला ०**मार्ग**-पु.टपालमार्ग.

**डांक**—स्त्री. (गो.) डाकीण. [सं. डाकिनी; हि. डाक= डाकिनीचा पति]

**डांक**—पु. भांड्यांचा जोड बसविण्यासाठीं किंवा तोंड बंद करण्यासाठीं धातुरसाचा केलेला सांधा; जडण्याचा पदार्थ; कस्तर. 'तरि डांक देउनि सांदिलें। शिळेतें काई।' -ज्ञा ८.४३. -कथा ५.७.११. [सं. दंश; प्रा. डंक; हि. डांक] **डा(डां)कणें**-सक्रि. झाळणें; डाक लावणें; सांधणें. ०**पट्टी**-स्त्री. रुपें; कथील इ० पासून तयार केलेली पट्टी (डांक लावण्याकरितां). ०**पाती**-स्त्री. १ डांक-पट्टी. २ (ल.) एकी करणें; समेट करणें; समेट; मिटवामिटव. (क्रि० घालणें). ०**लग**-वि. १ डांक लागलेला; झाळलेला. 'कीं कसवटीं लावितां सुवर्णासी । डांकलग दिसे हीन कसी।' -भवि ४६.८. २ दूषित; मलिन; भ्रष्ट (अन्न, नांव, जात इ०) (ल.) डागाळलेला; डाग, चट्टे पडलेला; पूर्वी होऊन गेलेल्या रोगाच्या खुणांनीं युक्त (शरीर). [डाक+लागणें]

**डाकणें**—अक्रि. डागाळणें; काळे चट्टे पडणें (फळ, शरीर इ० वर). [डाग]

**डाकवचा-ता**—पु. (प्र.) डाकोचा, डाकोता, दाकोता; शूद्रांतील एक जात; डाकुता पहा.

**डाका**—पु. १ चोराचा हल्ला; दरवडा. (क्रि०घालणें; पडणें). २ (ल.) चोरांची टोळी. [हिं.]

**डाका**—१ डाक पहा. मरणानंतर बाराव्या दिवशीं प्रेतामध्यें जीव आणण्याचा विधि, पद्धत. (क्रि० घालणें). २ देवीच्या पूजनाचा प्रकार. 'डाका घालितां भवानी । घुमुं लागे प्रसिद्धपणीं।' -अमृ ५.३६. [सं. ढक्का; डाकिनी; हिं. डाक=पिशाच्च]

**डांका**—पु. डाक पहा. नगारा (डमरूच्या आकाराचा); डंका; कुंभार जातींत वाजविण्याचें लांबोळ्या आकाराचें चर्मवाद्य. 'डांका अनुहात गजरें। येउनी अंगासी संचरे।' -तुगा २८२. [स. ढक्का]

**डाकाईत**—पु. दरवडेखोर; डकाईत पहा. [डाका]

**डाकिनी, डांकीण, डांखीण**—स्त्री १ स्त्रीपिशाच्च; हडळ; जखीण; चुडेल. 'अहंदेहबुद्धि डांकीण। ममता सटवी दारुण।' -रावि १.१४५. २ डंखीण पहा. [सं. डाकिनी]

**डांकील, डांकीव**—वि. डांक लावलेला; झाळलेला; सांधलेला; डाकलग. [डांक] **डांकीलभांडें**-न. (ल.) ज्याच्या शिलाविषयीं शंका आली आहे असा, अब्रूला बट्टा लागलेला, ठपका आलेला माणूस. [डांकणें+भांडें]

**डाकु(को)ता, डाकोचा, डाकुलता**—पु. शूद्रांची एक जात व तींतील व्यक्ति; हे लोक हस्तसामुद्रिक, भविष्य, पंचांग सांगून डमरू कुडबुडें वाजवून भीक मागतात. ब्राह्मण पिता व गवळी

जातीची माता यांपासून झालेली ही संतति आहे असें म्हणतात. ‘डाकुलता होरा बतलावे।’ [ हिं. डकौत-तिया, डाक=वाद्य ]

**डांकुली**—स्त्री. चुटकी; टिचकी. ‘देखोनि वाती वांकुलिया। पंडितां डाकुलिया। वाजविती।’ –ज्ञा १७.१४. [ ध्व. डाक ]

**डाकू**—न. दरोडेखोर; लुटारू; डकाईत. [ हिं. ]

**डांकू**—न. १ एक वेल. २ एका जातीचा मासा.

**डाकोडाक**—क्रिवि. १ टपालाच्या पद्धतीनें; टपालघाईनें. २ (ल.) त्वरेनें; अगदीं घाईनें; मार्गांत न थांबतां. ३ उलट टपालीं. [ डाक द्वि. ]

**डॉक्टर**—पु. १ इंग्रजी औषधें देणारा वैद्य; आंग्लवैद्य. २ एक बहुमानाची पदवी; पंडित; शास्त्री; आचार्य; उदा० डॉक्टर भांडारकर, डॉ. गुणे इ० [ इं. ] ०**खाना**–पु. ( ना. ) दवाखाना.

**डांख-पट्टी-लग, डांखील**—डांक पहा.

**डाखळ**—पुन. १ (ना.) डाखळा. फांदी; डाहाळी. २ (ल.) अंकुर; तरंग; उमाळा. ‘तैसे दृश्याचे डाखळे। नाना दृष्टीचे उमाळे।’ –अमृ ७.१४३.

**डांखळ-ळा**—वि. चिकाळ; चिकानें भरलेला ( आंबा, काजू, इ० ). [ डिक; डिकाळ ]

**डाखळणें**—अक्रि. डाकणें. १ कुजून डाग पडणें ( फळ, इ० कांस ); डागळणें. २ जुनीं पानें टाकत असणें; झडणें ( आंब्याचें झाड इ० ). ३ ऱ्हास पावूं लागणें; मरूं लागणें ( झाड ). [ डाग, डागळणें ]

**डांखळणें**—अक्रि. १ डांक लावला जाणें; झाळला असणें; डाकील होणें ( दागिना ). २ डांक लावल्यामुळें हिणकस, अशुद्ध होणें (सोनें इ०). –उक्रि. १ डांक लावणें; सांधणें; जोडणें; झाळणें. २ डांक लावून हिणकस, भेसळ करणें ( सोनें इ० ). [ डांक ]

**डाखळणें**—अक्रि. ( आंबा, काजू यांच्या चिकामुळें ) घसा, इ० कास बाधा होणें; उतणें; अपाय होणें; डाग पडणें. [ डीक ]

**डाखा**—वि. डाव्या हाताचा जास्त उपयोग करणारा; डावखोरा. [ डावा ]

**डाखीण**—स्त्री. (नाविक) दक्षिणेकडील वारा. [सं. दक्षिण; प्रा. दक्खिण ]

**डांखीण**—डाकीण; डंखीण पहा.

**डाग**—पु. १ वस्तु; जिन्नस; नग; डागिना. २ शेताचा तुकडा; नंबर; एका मालकाचा हिस्सा. ३ सीमा, मर्यादा दर्शविणारा खांब; झाड इ० ४ (व्यापारी) बंगीचा माल; बंगी. ५ अलंकार; दागिना. ०**भरणें**–माल भरणें.

**डाग**—डाक पहा.

**डाग**—पु. १ खिळा इ० तापवून शरीरावर दिलेला चटका; डागल्याची खूण. २ खूण; टिपका; चट्टा; तीळ; वण. ३ शुभ्र वस्त्रादिकांवर शाई इ० चें पडलेलें चिन्ह. ४ पाप; कलंक. ‘भीतों बहु मानसांत डागातें।’ –मोआदि ११.८८. [ सं. दह्, दाह. तुल० फा. दाग़्=डाग ] ०**देणें**–क्रि. (ल.) वर्मीं लागेल असें बोलणें. मर्मावर घाव घालणें. ०**लागणें**–१ पाप, कलंक लागणें. २ खूण, वण पडणें.

**डाग**—पुस्त्री. चढण; उंचवटा; डांग अर्थ २ ते ५ पहा.

**डांग**—स्त्री. १ केळीचें सबंध पान. २ (कळकाची) आंकडी; मेढा; बुंध्यास वांकण असणारा वेळू (हातीं धरण्याच्या उपयोगी); कळकाच्या मुळापासून फुटलेला बाकदार कोंब; अशा आंकडीदार बांबूचा एक भाग. (डांग्या खोकल्यावर उगाळून देतात). ३ एक प्रकारचें गवत; तृण. ४ पोफळीच्या बागेंतील चार वाफ्यांचा एक भाग. ५ कळकाची दोन उभ्या दांडक्यांची चौकट; यावर कोष्टी आपली फणी तयार करितात. ६ ( कांहीं प्रांतांत ) विणकामांतील जुंपणी. जुंपणी ( –न. ) अर्थ ३ पहा. ७ टांग; ढांग. ( क्रि० टाकणें ). ८ लांब काठी; दंडा. ‘एऱ्हवीं दोरीचिया उरगा। डांगा मेळवितां पै गा।’ –ज्ञा १५.२५१. ‘डांगा यष्टिका भिंडिमाळीं।’ –मुआदि ३१.६० ९ ( व. ) फांदी; डहाळी. ‘विचित्रां डांगां झेलितीं करीं।’ –दाव ७०. फडा. ‘निवडुंगांचे डांग.’ –खरादे १११. [ जुका. डंके=काठी; दे. प्रा. डंगा=काठी; हिं. डांग ] ०**काठी**–स्त्री. आंकडी. डांग पहा.

**डांग**—पुन. १ देशावर उत्तरभागांत सह्याद्रि घाटाच्या रांगेनें असलेला जंगली, डोंगराळ व चढणीचा प्रदेश. ( ज्याप्रमाणें सह्याद्रीच्या दक्षिण भागांत मावळ त्याचप्रमाणें उत्तरभागांत डांग प्रदेश आहे. हा नाशिक व सुरत जिल्ह्यांत मोडतो ). २ (कों.) रस्त्याचा, जमिनीचा चढता भाग; चढण. ३ मुळाजवळची पर्वताची एकसारखी चढण. ४ टेकडीची चढण व उतरण. ५ उंचवटा; लहानशी टेंकडी; टेकाड. उंच-सखल, खाचखळगे असलेला भाग. ‘तिये न खेळती डांग निःखल वोहळाचिये।’ –भाए ६९१. ६ (कों.) खिंडीत, अथवा अरुंद दरींत असलेला झाडीचा प्रदेश. (सामा.) दाट झाडी. ‘दिव्यद्रुमांचीं डांगें दाटें।’ –मुआदि ४.१०८. ७ टेकडीचें शिखर, टोंक. ८ (माळवी) जंगल. ‘भोंवताली झाडीची डांग भारी होती.’ –भाब ३५. –वि. दांडगा; रानटी; दांड; उमेट; क्रूर. ‘कैसें सिकवावें त्या डांगा। हित आढळे ना अंगा।’ [ दे. प्रा. डुंगर; हिं. दांग. तुल० इं. डॉंगा=दरी, खोरें ( हा शब्द दक्षिण आफ्रिकन भाषेंतून इंग्रजींत आला ) ]

**डागडुगी-डुजी-डोजी, डागडूग**—स्त्री. नीट करणें; मोडतोडीची दुरुस्ती ( गिलावा, रंगसफेती इ० ); मरामत. ‘यंदां बंगल्याचे डागडुगीला शंभर रुपये लागले.’ [ डाग+फा. दोज़्=शिवणें, टाके मारणें ]

**डागडूग-डूक**—स्त्री. १ तापदायक चंचलता; अस्थिरता; धरसोड (कर्तव्याची जाणीव आणि कामाबद्दल नाखुषी या संबंधांत); मनाचे हेलकावे; अनिश्चय. २ डुगडुग पहा. [ ध्व. ]

**डांग(गा)ण**—न. जंगली प्रदेश; डांग ( डोंगराळ ) मुलुख. ांग पहा. [ डांग ]

**डागणी**—स्त्री. १ डाग; चरका. २ डाग देण्याचें लोखंडी ाधन ( कांब, खिळा ); डाहणी. [ डाग ]

**डागणें, डाग देणें**—सक्रि. १ भाजणें; चटका देणें; लासणें. : सरबत्ती लावणें; बत्ती देणें; झाडणें ( तोफ, बंदूक इ० स ). ३ ार्मस्पर्शी भाषणानें, झोंबण्याजोग्या भाषणानें दुसऱ्यास दुखविणें. ४ कलंक लावणें; ठपका ठेवणें; दूषण देणें. [ डाग ]

**डागमुशी**—स्त्री. खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

**डांगर**—स्त्री. काळया भोपळयाचा वेल. –न. काळा भोपळा.

**डांगर**—स्त्री. डांगरकूट; तिखट, मीठ व कांदा घालून कालवेलेलें उडदाचें पीठ ( तोंडी लावण्यास ). **०कूट**–उडदाच्या पेठाचें तोंडीलावणें. डांगर अर्थ २ पहा.

**डांगर**—स्त्री. ( गुज. ) भात; साळ.

**डांगर**—न. ( व. खा. ) खरबूज.

**डाग(गु)रटी**—स्त्री. १ डांगोरा; दौंडी. २ ( ल. ) प्रसिद्धि. 'या बोलाची डांगुरटी। तिथें प्रसिद्धी आली किरिटी।' –ज्ञा १८.२८१. [ डांगोरा ]

**डागरहारी**—स्त्री एक गायन पद्धति. ही तानसेनानें काढिली म्हणतात. –स्वरशास्त्र पृ. ८.

**डांगवण**—न. डोंगराळ मुलुख. डांग पहा. –वि. डांग देशासंबंधीं; डांग देशांतील. [ डांग+वण प्रत्यय ]

**डांगवी**—स्त्री. ख्याति; प्रसिद्धि. 'बहुत जोडिल्या पुण्यराशी। डांगवी झाली देशोदेशीं।' –महिकथा ३६.५९. [ ध्व. डंग–डांग ]

**डांगवीया**—वि. डोंगरी; दांडगी. 'कोठें म्हणतां लाज नाहीं डांगवीया घोडी।' –भज ३०. [ डांग ]

**डांगशी**—स्त्री. (कों.) लहान, बारीक फांदी; डहाळी. [डांग]

**डांगळ**—पु. एक जातीचा हरिण; सांबर.

**डांगळ**—वि. ( व. ) मोठा वाढलेला. 'डांगळ कडबा विकत घेणें फायदेशीर नाहीं.' ढांगळ पहा. [ डांग+ल प्रत्यय ]

**डागळ(ल)णें**—अक्रि. १ नासण्यानें, खराब होण्यानें डाग पडणें (भाकरी, फळें इ० स); नासणें; खराबणें. २ आजारामुळें काळवंडणें; कृश, कळाहीन होणें. ३ (भाकरी, पोळया इ०) भाजतांना करपणें, जळणें. [ डाग ]

**डांगळा–ळी**—पुस्त्री. १ लहान फांदी; डहाळी. २ वाकडया मुठीची काठी. [ डांग ]

**डागिणा–ना**—पु. १ डाग पहा. २ अलंकार; भूषणें. ३ नग; जिन्नस. ४ चीजवस्त; वस्त्र, भांडीं इ० वस्तू. 'भांडीं वस्त्रें शस्त्रें लहानसहान मिळून पन्नास डागिने झाले.'

**डागिन्शी**—वि. ( व. घाटी ) गरोदर. [ डाग+निशी ]

**डांगी**—वि. १ डांगप्रदेशांतील; डांगसंबंधीं; डोंगराळ. २ जंगलांत, डोंगरांत राहणारा. ३ माळव्याच्या पूर्व भागांतील अरण्यांतून राहणारी एक रजपूत जात; गोंड.

**डांगी**—स्त्री. ( व. ) झाडाची फांदी. [ डांग ]

**डांगी–गे**—पु. ( कों. ) जकातीकडील अधिकारी; याच्याकडे साधारणतः बैल मोजण्याचें काम असतें. डांग्या पहा.

**डागीणदार**—वि. ( ना. ) उपकारबद्ध; मिंधा.

**डागी(गे)ल**—वि. १ डागलेला; डाग लागलेला; कुजलेला. २ शिक्का, चरका, डाग दिलेलें ३ डाग पडलेला; मळलेला. [डाग]

**डागुरबाणी**—स्त्री. एक ध्रुवपद गायनपद्धति (ब्रिजचंद हा ध्रुवपद गाणारा प्रसिद्ध ब्राह्मण होऊन गेला. तो दिल्लीजवळ डागूर नांवाच्या लहान गांवचा राहणारा. त्याच्या नांवावरून हें नांव पडलें ). [ हि. ]

**डागोबा**—पु ( बुद्धाचा ) स्तूप; दांत इ० कांहीं अवशेष पुरून त्यावर उभारलेला खांब, मनोरा, समाधि, इमारत, स्मारक. [ पाली. डावग ]

**डांगोर**—पु. एक प्रकारचें गाणें.

**डांगोरा**—पु. १ दौंडी; दवंडी 'घाली विद्येचा पसारा। सुये सुकृताचा डांगोरा।' –ज्ञा १३.६५९. 'करारे हाकारा पिटारे डांगोरा' –कहाण्या पृ ६. २ प्रसिद्धि; लौकिक. 'दोषांमाजीं जया वीरा। वाडपणाचा डांगोरा। तो दंभु ऐसा।' –ज्ञा १६.२१७. [डंका] **०पिटणें–वाजविणें**–जाहीर, प्रसिद्ध करणें. 'चोरटा शिंदळ। ऐसा पिटं डांगोरा।' –तुगा १८५.

**डांगोरी(एकादशी)**—स्त्री. ज्येष्ठ वद्य एकादशी (या दिवशीं सर्वांनीं एकादशी पाळण्याबद्दल डांगोरा पिटीत यावरून नांव). [ डांगोरा ]

**डांगोळ–ळी**—पु ( कु. ) एक प्रकारचा मासा.

**डांग्या**—पु. जकाती कारकून, अधिकारी. हा पतकीच्या हाताखालीं असतो. यावरून डांगे हें आडनांव पडलें. डांगी पहा.

**डांग्या**—पु. पंढरीच्या विठोबाचा चोपदार. –शर. [ डांग= काठी ]

**डांग्या खोकला**—पु. एक प्रकारचा जोराचा खोकला ( विशेषतः लहान मुलांना होणारा ). यावर डांगळ (सांबर–याचें) शिंग किंवा डांग ( बांबूचा वांकडा कोंब ) उगाळून देतात म्हणून हें नांव पडलें असावें. [ डांग ]

**डांच**—पु डांस पहा.

**डांच**—पु ( शिवणकाम ) टांचलेलें, मुडपलेलें कापड. –काप्र २३.

**डाचणें**—उक्रि. १ डचडचणें; घशाशीं जळजळणें, येणें; पोटांत खुपणें; सलणें ( पित्तविकारामुळें, तिखट-मसालेदार पदार्थ खाण्यांत आल्यामुळें ). २ ( स्वतःचा मूर्खपणा किंवा दुसऱ्याचें वर्मी भाषण, पीडा यांच्या आठवणीमुळें ) मनांत सलणें; घोळत असणें; बोचणें; शल्य राहणें. ( या अर्थी अकर्तृक प्रयोगहि होतो ). ३ (जाचणें बद्दल चुकीनें) त्रास देणें: छळणें; गांजणें. [ध्व. डच; किंवा सं. दंश-दशन; म. डसणें ]

**डाचर**—वि. १ मोठा; अवजड; लठ्ठ; अगडबंब; धोंगाडा ( प्राणी ). २ फार वाढलेला ( वृक्ष ). ३ डाचाड पहा.

**डाचाड-ळ**—वि. मोठा; बेसुमार लांब; अवाढव्य; ऐसपैस; प्रशस्त (प्राणी, मनुष्य, वस्तू इ० ) याच्या उलट अटोपसर.

**डाजणें**—डाचणें पहा. सलणें. 'हा! हा! तो साधु मनीं अद्यापि असाधु-वाद-रव डाजे।' -मोवन १.७३.

**डाजणें**—अकर्तृक क्रि. उष्मा होणें; उकडणें; गुदमरणें.

**डाझणें, डाझळणें**—अक्रि. १ थोडें कच्चें व दडस राहणें; कांहीं कच्चें-पक्कें होणें (आघातानें-पिकण्याच्या स्थितींतील फळ). २ न पिकतां तसेंच दडस, ताठर राहणें (चोळवटल्यानें गळूं इ०).

**डाट**—( संगीत ) स्वर दाबणें; थोडा वेळ गाळणें.

**डाठरणें, डाडरणें**—अक्रि. ( क. ) ( प्र. ) दाटरणें पहा. घट्ट, आवळ होणें. 'उन्हानें जमीन डाडरून आली.' 'त्याचें करट थंडीनें डाडरलें.

**डाडाइणें**—अक्रि. गर्जना करणें: आरडओरड करणें. 'खवळैला कृतांतु डाडाइला। की निदुमुरा महाकाळु ओसानाइला।' -शिशु १००५.

**डांडोरा**—पु. केळीचा खुंट; खोड. [दांडा=डंडा]

**डांडोरा**—पु. डांगोरा. ढांढोरा पहा.

**डापका**—पु. ( व. ) सापळा. 'डापक्यांत उंदीर सांपडले.'

**डाफऱ्या**—पु. ( व. ) खुंटा.

**डा(डां)फरणें, डांभ(भा)रणें**—अक्रि.१ रागावणें; जळफळणें; चरफडणें; चवताळणें. २ अंगावर येणें; टाकून बोलणें; खेंखसणें. [ ध्व ]

**डा(डां)ब**—पु. १ माठ इ० पालेभाजीचा देंठ. २ झाडाची लहान फांदी. ३ खळयाच्या मध्यभागीं पुरलेला खांब; तिवडा. ४ ( बे. ) सोट. डांग पहा. [ डांभा ]

**डाबखिळा-खुंटा**—पु. (व.) गाडीचा कणा व बुटें यास आवळणारा खिळा.

**डाबडुबली**—पु. ( व. ना. ) सुरपारंबीचा खेळ. [ डाब ]

**डाबडूब**—क्रिवि. ( ना ) कांठापर्यंत; तोंडोतोंड.

**डांबणें**—उक्रि. १ पुरणें; हलणार नाहीं असा बसविणें (खांब इ० ). २ थांबवून ठेवणें; अडकवून ठेवणें; जखडणें. ३ डांभणें पहा. 'बाळयाला शाळेंत डांबून ठेवला पाहिजे.' [ डांब ]

**डाबर**—न. ( व. ) डबकें; डबरा पहा. 'घरापुढें डाबर सांचतें.' [ हि ]

**डांबर**—न. १ ( कों. ) मासांत शिरलेला मोठा कांटा ( कांटयाचा मोठेपणा दाखविण्यासाठीं अतिशयोक्तीनें योजतात).

**डांबर**—पु आंसाच्या वरची व साटीच्या खालची उभी फळी; बुटें. [ डांब ] ०**खिळा**-पु खोबळा व आंस यांना भोकें पाडून त्यांत बसवितात तो. डाबखिळा पहा.

**डांबर**—न. एक रोगण: डामर पहा. **डांबरट**-वि. डांबरासारखा. [ डांबर ] **डांबरबत्ती**-स्त्री. दारूची वात. [ डामर+बत्ती ]

**डांबरट, डांबऱ्या**—वि. निगरगट्ट. [ इं. डॅम्ड रॅट ]

**डांब(भ)रणें, डांबा(भां)रणें**—अक्रि. १ डब्ब होणें; सुजणें; कठिण होणें ( पोट, गळूं ). २ जड होऊन लोंबणें; झोलणें; तरंगणें ( ढग ) [सं. डंबर=गर्व, फुगोटा. (धातु सं. डंभ्=जमविणें) ]

**डांब(भ)रणें**—अक्रि.(कु.) खोटी गोष्ट खरी आहे असें बढाईनें सांगणें. [ सं. दंभ ]

**डांबरी, डांबुरकी, डांबुकी**—स्त्री. (बे.ना.) (बैलगाडी) बावखडा.

**डाबल-ले**—पु. ( ना. ) १ लहान डबी. २ ( विशेषतः ) कुंकवाचा करंडा. -विवि ५९.८. [ डबा, डबोलें ]

**डांबारा**—पु. सूज. डांभारा पहा.

**डांबीस, डँबिस**—वि. ठक; लबाड; हरामखोर. [ इं. डॅम ]

**डाबीडुबी, डागींडुगीं**—वि. ( मुंबई ) फुगीर व उंचीनें कमी अशी; ढुंबरी. ( मुलें )

**डा(डां)ब-भ**—पु (हत्यारें ठेवण्याचा) कमरपट्टा. 'तंव दापातियां धारांचें। मुदर्शन काढिलें डांबेचे।' -शिशु १०७८. 'वाघनख त्याच्या बोटाला। पांच हत्यारें डाभाला।'-ऐपो १६३. [ हिं. डाब ]

**डांभणें**—उक्रि. ( कों. ) १ बांधणें; बांधून ठेवणें ( बैल. ) २ मारणें; ठोकणें ( जमिनींत मेख, खुंटी इ० ) [ डांभा ] **वाघ डांभणें**-वाघ बंदुकीच्या तडाख्यांत सांपडेल असें संधान करणें. **बंदूक डांभणें**-( वाघ ) १ बंदुकीच्या अपाटयांत सांपडेल अशी बंदूक लागू करून ठेवणें.

**डांभा**—पु. १ दुबेळका खांब: मेढा. २ खुंटा; खांब ( कुंपणाचा, गुरूं बांधण्याचा ). ३ ( ल ) सोट; खोड. उ० जून ( माठाचा ) देंठ, ( शेवग्याची ) निबर, लांब शेंग इ० ४ उंच वाढलेलें, जोरदार पीक: उत्तम पीक आलेला शेताचा भाग. [ सं. दर्भ; प्रा. डब्भ: हिं डाभ ? ] ०**डचका**-पु. उत्तम, सोळा आणे पीक. ( क्रि० येणें ). डांभा अर्थ ४ पहा.

**डांभा**—पु. डौल; गर्व. 'त्या पादुकांचा गरुडास डांभा।' –सारुह ५.३०. [सं. दंभ; प्रा. डंभ]

**डांभारणें**—उक्रि. १ खांबास बांधणें, खिळणें. डांभणें पहा. २ तापून लाल झालेली ठिकरी (आमटी, ताक इ०) पदार्थात बुडवून तो पदार्थ गुणकारी करणें; ठिकरीची फोडणी देणें.

**डांभारणें**—अक्रि. चडफडणें. डांफरणें, डांवरणें पहा.

**डांभारा**—पु १ (पोट, गळूं यांची) फुगवटी; सूज; डब्ब होणें. २ (ढग) झोलणें; झोल येणें. (क्रि० धरणें). [सं. दंभ; प्रा. डंभ; म. डांभा+आरा प्रत्यय]

**डांभिक**—वि. (प्र.) दांभिक पहा.

**डामगा**—न. (कु.) एक प्रकारचें भात.

**डामडूक, डामाडूल, डामाडूळ**—स्त्री. १ दंगा; अराजकता; बंड. २ अनिश्चित, अस्थिर वृत्ति, स्वभाव; चंचल स्थिति (कार्याची). –वि. त्रस्त; उध्वस्त; अस्वस्थता उत्पन्न झालेला; दंगा झालेला. [ध्व. डाम, डुक; डोलणें द्वि; हिं. डामडोल]

**डाम(मा)डौल**—पु. १ लवाजमा; इतमाम; स्वारी; टामटूम; थाटमाट; सरंजाम. २ नीटनेटकेपणा; कपडेलत्ते व्यवस्थित घालणें; अंगावर अलंकार चढविणें. ३ स्वतःची छानछोकी; बडेजाव; मिजास; नखरा. (क्रि० करणें; लावणें; मिरविणें; लावणें). म्हुन तरी डामडौल करूं नये आपला प्रियकरा।' –सला ३. [डांभा+डौल]

**डामर**—न. एक प्रकारचें रोगण; डांबर. कांहीं झाडापासून; व कोळशापासूनहि डामर काढतात. याचा रंग अतिशय काळा असतो. (डामर पासून बनलेले शब्द डांबरमध्यें पहा). [हिं. डामर; इं. डॅमर]

**डामर**—स्त्री. (कु) विटी.

**डामरगा**—पु. एक प्रकारचें भात. डामगा पहा.

**डामरणें**—अक्रि. डांबरणें; डांभारणें पहा.

**डामारणें, डामारा**—डांभारणें, डांभारा पहा.

**डाय**—पु. एक झाड.

**डाय**—स्त्री. (कु) कुळथ्यासारखा एक प्रकारचा पळा.

**डाय**—पु. द्वेष. 'हतबुद्धिच हा डाया साधाया मानवे मुनिचहाडा या।' –मोकृष्ण ३६.२०. [डाव]

**डाय**—पु. डाव.' पुढें लो लागला खेळाचा। कळप मेळविला पोरांचा। आल्यागेल्या डायाचा। आनंद शोक वाहे।' –दा ३.२.२२. [डाव]

**डायण**—न. (गो.) पातळ, पिंवळा मोठा मासा –मसाप ३.३.

**डायपंच**—पु. ठसा व दाबानें तोडणारा किंवा भोंक पाडणारा चिमटा; पितळेचे पत्रे कापून त्यांस दाबून काढण्यासाठीं उपयोगांत आणण्याचें यंत्र. यानें पत्र्याला खोलगटपणाहि आणतां येतो. [इं. डाय+पंच]

**डायरी**—स्त्री. रोजनिशी; दिनवृत्त; दिनचर्या. [इं.]

**डायरेक्टर**—पु. १ खात्यावरील वरिष्ठ अधिकारी. २ व्यापारी कंपनीच्या कामाची देखरेख करण्यासाठीं भागीदार आपल्यांतील कांहीं जणांस विशेष अधिकार देऊन निवडतात त्यांपैकीं प्रत्येक; कंपनीच्या नियामकमंडळाचा सभासद, चालक; संचालक. ३ (सामा.) मार्गदर्शक; कर्णधार; चालक. [इं.]

**डायाडोल**—वि. भयभीत; त्रस्त; घाबरलेला. 'शहरचे लोक डायाडोल झाले आहेत. –पेद ६.१५७. [हिं. डां+वाडोल]

**डारखी**—स्त्री. (चंद्रपुरी) माजघरांतील दार.

**डारल**—पु. बांबूचा पाळणा (हा बहुधां कैकाडी वापरतात).

**डाल, डालगें**—स्त्रीन. मोठी बसकी, पसरट टोपली, हारा. हा बांबूच्या कामटयांचा करतात. [देप्रा. डल्ला; डल्लग; हिं. डाला–ली]

**डाल**—स्त्री. फीत; नवार; दाल.

**डालणें**—उक्रि. १ (कों.) (कोंबडया इ०) पाटीखालीं झांकणें. २ (ल.) (बायकोनें नवऱ्यास) धाकांत ठेवणें. [डाली]

**डालणें**—उक्रि. १ रचणें; रास करणें. २ सोडून देणें; त्याग करणें; टाकून देणें. [सं. तल्; हि. डालना]

**डाल(ला)न**—न. उंसाच्या चरकांतील नवरा–नवरी जेथें बसविली असते ती चौकट; प्लेट (जर नवरा–नवरीखेरीज माथे कळी असेल तर) आडवा दांडा. याच्या टोकांस बैल जुंपतात [डालें]

**डाल(ला)न**—नस्त्री. १ मांदण; नांद; उंसाचा रस सांठविण्याचें पात्र. यावर झांकावयाची टोपली. २ भुसाची नेआण करण्यासाठीं बांबूच्या कामटयांचा तयार केलेला मोठा हारा. –न. पाटी; दुरडी. [डाल]

**डाल(ला)न**—न. शेतकऱ्यांची बैल, औत वगैरे परस्परांस परस्परास देऊन सहकारितेनें काम करण्याची पद्धति. [डालें]

**डालपाटी**—स्त्री. १ (ना.) लहान डालें. २ रुंद तोंडाची मोठी पाटी; डाल पहा. [डाल+पाटी]

**डॉलर**—पु. (स्पेन) अमेरिकेंतील एक चांदी–सोन्याचें नाणें. याची किंमत साधारणपणें तीन रुपये असते. [इं.]

**डाली**—स्त्री. १ (पत्रावळी, द्रोणाकरितां–पानें इ०चा) भारा; ताटी; गठ्ठा. २ शिंकाळें; कावड. ३ कावडींतील एका बाजूचें ओझें; ४ फळांची करंडी; फळांची कावड. ५ (ल.) फळफळावळीची भेट. [सं. डलक; प्रा. डल्ल]

**डाली**—स्त्री १ मोठी टोपली. डाल पहा. २ आंबे, खरबुजें, रानशेंगी इ० घालण्याकरितां जनावरावर लादतात ती कामचलाऊ विणलेली हलकी पाटी; शिपतर. [ देप्रा. डल्ल; म. डाल ]

**डाली** —स्त्री. (व.) सामानभरतीची गाडी. 'आज कुटाराला डाली जोत.' [ हि. डाला ]

**डाली**—स्त्री. वैरभाव; स्पर्धा (क्रि० बांधणें). गरीबानें समर्थाशीं डाळी बांधूं नये.' **०वैर्**–वि. चढाओढ करणारा; प्रतिपक्षी. [ हि. ]

**डालें**—न. १ गाडग्यीं, मडक्यीं ठेवण्याकरितां गाढव वगैरे जनावरावर लादतात ती साटी; माकण. २ (व.) डाल, डाली पहा. 'डालभर कुटार बैलानें खाल्लें.'

**डालें** —न. (मावळी) इरजीक; डालनः वारंगोळें पहा.

**डाव**—पु १ खेळ (बुद्धिबळें, सोंगट्या, चेंडू इ०चा). २ (कवड्या, फांसे इ०) टाकणें; फेकणें; फेंक. (क्रि० टाकणें). ३ (फाशांनें) पडणें; दान. (क्रि० पडणें). ४ खेळण्याची वेळ, पाळी. ५ हार; पराभव. 'हा डाव तुम्हांवर लागला.' ९ खेळातील हात; पानें. ६ (राजा) खेळण्याचा पट (कापड, लाकूड, फळा, जमीन इ०वर काढलेला). 'तुझी कवडी डावाबाहेर गेली.' ७ (व) जाड, वजनदार कवडी ८ योग्य वेळ; प्रसंग; हंगाम; अनुकूल काल. ९ अंमल; चलती; अधिकाराची वेळ, दिवस; एखाद्याची पाळी; संधि. ८ अधिकार; ताबा; आटोका. १० द्वेषः मत्सरः वैर; डंख. 'जैसा महासर्पें धरिला डाव। त्याचेच फणेवर पडला पाव।' ११ डावपेंच; युक्ती; बेत; गुप्त हेतु; कपट. (क्रि० खेळणें). 'त्यानें डाव टाकून मला चांगलेंच फसविलें.' १२ (व.) वेळ. 'एक डाव आपण तेथें जाऊंच.' [फा. दाव्] (वाप्र.) **०देवाचा**–(खेळांत) देवाला पहिलें दान देणें. हुकलेला डाव देवाचा म्हणून पुन्हां खेळतात. 'लगेच तो म्हणाला हा डाव देवाचा. सुनंदाला हें आवडलें नाहीं' –सुदे ६. **०देणें**–क्रि. पाळी देणें. **०पडणें**–(प्रां.) १ प्राप्त होणें; घडणें. २ फांशानें खेळणें. 'मियां नक्षत्रीं डाव पाडावा। चंद्र चेंडुवालागीं दयावा।' –ज्ञा ११.५८१. **०फेडणें**–अंगावर आलेली बाजू फेडणें. **०बसविणें**–(सोंगट्या) रंगसही झालेल्या चारी सोंगट्या आपल्या पटावरील घरांच्या तीन रांगांपैकीं मधल्या रांगेंत विशिष्ट रीतीनें बसविणें. **०लागणें**–अंगावर बाजू येणें; हरणें. **०साधणें**–जिंकणें; द्वेषबुद्धीनें दुसऱ्याचें नुकसान करणें; कपटानें संधि साधून शत्रुस मारणें. **डावी पेटणें**–एखाद्यावर अतिशय रागावणें; जळफळणें. **गेला डाव**–(तरी) निदान; कमींतकमी. **म्ह०** फासा पडेल तो डाव राजा बोलेल तो न्याव.

**डाव** —स्त्री. कटवाः डव; पळी (लाकडाची). [ डव ] **म्ह०** १ डाव असतां हात भरूं(भाजूं)नये. २ पात्रांत असला तर डावेंत येईल.

**डाव**—पु. लोखंड तापवून केलेलें चिन्ह; डाग. [ डाग ]

**डाव**—पु. (कों.) एक प्रकारचें जहाज, गलबत. इंजजींत अरबी जहाजाला डौ(धौ) शब्द लावतात. [ इं. डौ ]

**डाव**—पु. मृत शूद्राचें कडक पिशाच, भूत.

**डावकें**—न. संचय; भांडवल; सांठा; गंगाजळी; पुंजी टावकें पहा.

**डावखुरा-खोरा**—वि. १ डावरा; डाव्या हातानें काम करणारा. (गो.) डावकुरॉ. २ (ल.) गैरशिस्त; अव्यवस्थित (कामधंदा.) [ डावा+खोर ]

**डावधाव**—धावडाव पहा.

**डावडावकचका**—पु. (मुलींच्या) खेळांतील एक संज्ञा. खेळांत ज्या मुलीवर डाव असेल ती जर नाकबूल झाली तर मुली डावडाव कचका, कुंभारी कचका, आमचा डाव फेडून द्या असें म्हणत तिला चिडवितात.

**डावपेंच**—पु. १ कुस्तींतील खुबीदार डाव; पेंच. मल्लांच्या युक्त्या. पेंच पहा. २ कावे; युक्त्याः खुब्याः लटपटी; छक्केपंजे. [ डाव+पेंच ]

**डावरणें**—उक्रि. (प्रां.) दटावणें; भीति दाखविणें; धमकावणी देणें. 'नाना रत्नांची फांकली प्रभा। तेणें डावरली सकल सभा।' –रामदास (नित्यनैमित्तिकविधिसंग्रहसोपान–सगुणोपासना).

**डावरा**—वि. डावखुरा; डावका; डाव्या हातानें काम करणारा. **०नेसणें**–क्रि. (लुगडें, धोतर इ०चा) कासोटा उजवीकडे आणणें. [ डाव+रा प्रत्यय ]

**डावरा**—पु. (कों.) दोन शिंगांपैकीं आकारानें एकसारखें नसणारें शिंग; बेडौल दिसणारें वांकडें शिंग. –वि. वांकड्या शिंगाची (गाय, म्हैस). [ डावा ]

**डावरा**—पु. शेतांत राशीच्या वेळेस बकरें मारून त्याच्या मांसाचें जेवण घालतात तोः ढवरा.

**डावल(ळ)णें**—उक्रि. १ जातांना (गांव किंवा इतर गोष्टी) डावे बाजूस टाकणें; डावी घालणें. २ (ल.) निष्काळजीपणानें, तिरस्कारानें बाजूस, दूर फेंकून देणें; बाजूला टाकणें. 'सहजांत हा रोजगार तुमचे घरीं चालून आला आहे, त्यास डावलूं नका.' ३ त्याग करणें; सोडून देणें; दुर्लक्ष करणें; अव्हेर, उपेक्षा, अनादर करणें 'भिकारीं सांडिलें त्याचें घर। अतिथी डावलिलें निरंतर।' –एभा २३.९२. ४ निष्काळजीपणानें दुसऱ्यावर सोंपविणें, टाकणें (काम, धंदा] ५ देवानें डाव्या बाजूचा कळा सोडणें, कौल न देणें. [ डावा ]

**डावली**—स्त्री. १ (लडिवाळपणें) मांजराचा पंजा. २ लांकडाची पळी; लहान डाव.

**डावा**—वि. १ सव्य; वामबाजूचा; उजव्याच्या उलट. २ कमी प्रतीचा; गौण. 'हा माल जरा डावा दिसतो.' **०घालणें**—क्रि. डाव्या बाजूस टाकणें, सोडणें; डावलणें. **डावी घालणें**-देव इ०कांस डावे बाजूनें प्रदक्षिणा घालणें. **डावी-डावी गुढी देणें**-विनंति अमान्य करणें; नाकारणें. **डावी उजवी देणें-सांगणें-बोलणें**-क्रि. नकार किंवा होकार देणें. [ देप्रा. डाव ]

**डावी**—पु. (ना.) लपंडाव इ० खेळांतील भोग्या.

**डावीउजवी, डावेंउजवें**—स्त्रीन. (कों.) चोरादिकांचा एकीकडला हात व एकीकडला पाय (डावा हात व उजवा पाय किंवा उजवा हात व डावा पाय) कापणें. (क्रि० करणें) [ डावा उजवा ] **डावें उजवें करणें**-पक्षपात करणें. **०कळणें**-वांकडें, सरळ समजणें; व्यवहारोपयोगी चातुर्य असणें. 'त्या ब्राह्मणास डावें उजवें कांहीं कळत नाहीं.

**डावीकडचें**—न. १ जेवावयाच्या ताटांत डावीकडच्या बाजूला जे मीठ, तिखट, कोशिंबीर, रायतें इ० तोंडीलावण्याचे पदार्थ वाढतात त्यांचा समुदाय. २ कोणतें तरी एक तोंडीलावणें. [ डावी+कड ]

**डावू**—पु. (राजा.) लग्नामध्यें नवरानवरीनें लपवून मग शोधून काढावयाची सुपारी. डाऊ पहा.

**डावेरी**—स्त्री. (गंजिफांचा खेळ) आपल्या डाव्या बाजूच्या गड्याकडून आलेली देणी.

**डांस**—पु १ गोमाशी. २ मच्छर; मुरकूट, चिलट. (हा कीटक क्युलिसिडा नांवाच्या वर्गातील असून अत्यंत त्रासदायक आहे.) ३ (कों.) दंश; चावा. (क्रि० घेणें). ४ चावलेला भाग. ५ (ना.) डाव; द्वेष. [ सं. दंशः प्रा. डांस; हिं. गु; डांस] **०धरणें**-क्रि. (ना.) द्वेष बाणणें; सूड उगविण्याच्या चिंतेंत राहणें.

**डांस-सा**—पु. चावा; दंश. डांस अर्थ ३ पहा. (क्रि० घेणें) 'त्या सापानें त्याचा डांसा काढला.' [ सं. दंश ]

**डासण**—स्त्री. माऱ्याची जागा. 'मोगलाचे आघाडीस डासण पाहून तोफांची मारगिरी करावी.'—पेद १.६२. [ डास ]

**डास(सा)ळणें**—उक्रि. १ डसणें; चावणें (डांस, गोमाशी, साप, इ०नीं). २ कुरतडणें; चावणें; दांत लावणें; नासून टाकणें (माकडानें-एकादें फळ इ०). [ डांस ]

**डाह-हो**—पु. दाह; अंतस्थ उष्णतेची वेदना; अंतर्दाह. 'अवलोकनें निवाला वाटे संसारजन्य जो डाहो।' —अकक २, सखारामतनयकृत रुक्मिणीस्वयंवर ५३. [ सं. दाह ]

**डाहण**—क्रिवि. अतिशय आंबटपणा दर्शविणारें अव्यय (फळें, ताक इ० संबंधीं वापरतात). ढाण पहा. **डाहण्या-वि.** अतिशय अंबट; ढाण (फळ, ताक). [ सं. दाह ]

**डाहण**—न. गरगट; घाण पाणी (मोरींतील, लघवीचें, इ०); घाण पाण्याचें डबकें; घाणी.

**डाहणी**—स्त्री. डागण्याचें लोखंडी हत्यार; डागणी. [ दाहन ]

**डाहण्या**—वि. (ढाण) ठिपके असलेला (सर्प, चित्ता). [दाह] **०वाघ**-पु चित्ता; बिब्या वाघ;

**डाहळ**—पु. झाडाच्या फांद्या, छाट, काट, कवळ. [सं. दल्]

**डाहळा**—पु. १ ओल्या हरभऱ्याचें रोप. २ वाटाणा, लाख यांचें रोप. ३ डाहळी; फांदी. [सं. दल्] **म्ह०** धरायाला डाहळी अन् बसायाला सावली (निराश्रित स्त्री, माणूस यांबद्दल वापरतात).

**डाहा, डाहाणी, डाहाण्या वाघ, डाहाळ, डाहाळा**—डाह इ० पहा.

**डाहारणें**—अक्रि. १ अंगाला लागणें. 'वावदळ पडूनि ठाये। साबलु डाहारला आहे।'—ज्ञा १७.१४३. २ प्रसिद्ध होणें, असणें; डाहोर होणें. 'मग इंद्रेतमि वाळलें। जें मीपणेवीण डाहारलें।' —ज्ञा १५.२६७.

**डाहारा**—पु. (व.) घाण पाण्याचें डबकें; डाहण. 'बैठकी समोरच डाहारा आला' [ डहुरा ]

**डाहाळी**—स्त्री. फांदी. 'यापरी निराळी। वाढे संकल्पाची डाहळी।'—ज्ञा १३.५०. [सं. दल. प्रा डाल=शाखा. हि. पं. बं. डाल-ला-ली; सिं. डारी-रो: गु. डाळी ] **डाहाळ्या पडणें**—(व.) लुळा पडणें; निर्बल होणें. 'ही वार्ता ऐकतांच त्याच्या हातापायाच्या डाहाळ्या पडल्या.'

**डाहूळ**—न. डबकें; डोह; लहानसें तळें.

**डाहोर**—वि. (व.) १ प्रसिद्ध. 'त्याचें नांव डाहोर झालें चोंहोंकडे.' २ (ल.) बद्द. [ डाहारणें ]

**डाहोरा**—पु. डवरा पहा.

**डाह्य**—वि. (कु.नाविक) पुष्कळ पाणी असलेला समुद्राचा भाग.

**डाळ**—स्त्री. हरभरा इ० द्विदळ धान्य भरडून द्विभाग करतात ती. देशावर डाळबद्दल दाळ शब्द रूढ आहे. दाळ पहा. [सं. दल] **०शिजणें**-(ल.) चालणें; अनुकूलता असणें; दाद लागणें; म्हणण्याप्रमाणें होणें. **०महाग करणें**-(क.) मस्तीला येणें; माजणें.

**डाळ**—पु. रास; गंजी; ढीग. [ सं. दल् किंवा तल्; हि. डला=ढेला; डालन ]

**डाळ, डाळी**— डाहळ डाहळी, पहा. —ज्ञा १५.९६. 'धरितां मूळ सांपडे डाळ।' —दावि २३१.

**डाळ-कण -गोटा -पिठ्या -पीठ -रोटी -भाजी -भोपळा-वांगें, डाळें**—देशांत ड्च्या जागीं द वापरतात; म्हणून हे शब्द दाळ इ० मध्यें पहा.

**डाळ**—स्त्री. (कुलाबा कों.) गवत, पेंढा रचल्यामुळें गाडी उलटूं नये म्हणून साटीहून सुमारें दोन हात रुंदी वाढवून दुसरी दांडक्यांची चौकट साटीवर बांधतात ती. —मसाप १.२.७.

**डाळगा**—पु. (क.) कळण्यापेक्षां मोठी कणी असलेली डाळ. ' डाळगा किती निघाला. '

**डाळदोडका**—पु. डाळ घालून केलेली दोडक्याची भाजी.

**डाळगी**—स्त्री. (कों.) मोठा हारा; मोठी पाटी. [ डाल-गें ]

**डाळगें**—न. १ कडवा (वाल) चाळण्याची बांबूची चाळण. २ मोठी टोपली. डालगें पहा.

**डाळणें**—उक्रि. १ रास करणें; ढीग लावणें; एकावरएक रचणें. ' कागद पसरलेले आहेत ते डाळून ठेव. ' २ टोपली, ताट इ० झांकण घालणें; झांकून ठेवणें; डालणें. (कोंबडें, इ०). ३ एके ठिकाणीं जुळविणें, ठेवणें; व्यवस्थितपणें लावणें, जोडणें. ' सत्रा तुकडे एका ठिकाणीं जेव्हां डाळावे तेव्हां अंगरखा होतो. ' ४ डांबून, अडकवून ठेवणें; कोंडणें. 'तो द्वाड मुलगा शाळेंत डाळला परता.' ५ (व ) मातीच्या भिंती पावसानें खराब होऊं नये म्हणून त्यांवर पळसाचीं पानें व माती टाकणें. [ डाळ ]

**डाळप**—न. (राजा.) रास घालणें, करणें. [ डाळ ]

**डाळंब-बा**—डाळिंब पहा.

**डाळा**—पु. रास; ढीग; चळत. ०**डाळणें**-(लग्न, संसार इ०च्या) सामानसुमानाची व्यवस्था, तयारी, जुळवाजुळव करणें; मांडामांड करणें; तडीस नेणें. ०**डाळ**-स्त्री. १ ढिगारा, रास करणें. २ जमवाजमव; जथाजथ ( शेत, इ०ची ) [ डाळ द्वि. ]

**डांळा**—(कु.) रुंद चटई. डाळी पहा.

**डाळिंब**—स्त्रीन. एक झाड व फळ; दाडिम; अनार. [ सं. दाडिम; प्रा. दालिम; हिं. बं. दालिम; ऑस्ट्रिक दालिम यावरून सं. दाडिम शब्द बनला. हें फळ इंडो-आर्यन नव्हे. तेव्हां शब्दहि आर्य भाषेंतला नाहीं ] ०**पाक**-पु. डाळिंबाच्या रसांत केशर, वेलदोडे इ० व कांहीं औषधें घालून केलेला पाक. ०**वान**-न. डाळिंबी रंगाचें लुगडें. ' डाळिंबवानें जासवानें । ' -वेसीस्व ९. १५०. [ डाळिंब+वाण ] **डाळिंबी**-वि. डाळिंबाच्या दाण्याच्या रंगा-आकाराप्रमाणें ( चीट ). [ डाळिंब ] **डाळिंबी बाळ्या**-स्त्रीअव. एक दागिना; एक प्रकारच्या बाळया. ' मोतीबाळया डाळिंबीबाळया त्या गंभीर. '

**डाळिंबी**—स्त्री. १ डाळीचा दाणा; अर्धा भाग. २ (मुलांच्या भाषेंत ) कातडीवर घासून आणलेला तांबडा ठिपका. ( क्रि० करणें; दाखविणें ). ३ वालाच्या विरडया प्रत्येकी [ डाळ ]

**डाळी**—स्त्री. १ चौकोनी व उथळ बांबूची पेटी. २ (कु.) चटई; आंथरी. (सावंतवाडी संस्थानांत 'डाळी' बांबूची असते पण इतर ठिकाणीं खजुरीची, ताडीची असते ). ३ (राजा. कु.) चटई, तटयाचा तुकडा (तीन हात रुंदीचा). ४ डांगळी; टोपली. ५ ( इतर अर्थी ) डाली पहा. [ डाली ]

**डाळीम, डाळीम पाक**—डाळिंब, डाळिंबपाक पहा.

**डाळुक**—स्त्री. (प्रा.) लहान डहाळी.

**डाळें**—न. ( भूस, केरकचरा इ० नेण्याकरितां ) खुली अथवा विरळ विणलेली पाटी. [ डाळी ]

**डाळें**—न. हरभरा इ० भाजून त्याचें फोल काढून टाकून जी डाळ करतात ती. [ डाळ ]

**डाळें**—न. (गो.) बुगडीचें भोंकर.

**डाळें करणें**—शेतीच्या कामासाठीं एकानें आपल्या बैलाच्या जोडीस दुसऱ्याचा घेऊन किंवा आपला दुसऱ्यास देऊन दोघांनीं मिळून सहकारितेनें काम करणें; वारंगुळा करणें. अशा प्रकारें गड्यांच्या देवघेवीसहि डाळें करणें म्हणतात. डालें, डालन.

**डिंक, डिक**—पु. बाभळ, खैर, शेवगा इ० झाडांचा चीक; गोंद; चिकट पदार्थ. ०**दाणी-नी**—स्त्री. गोंददाणी; डिंकाची बाटली. ०**वडा, डि(डिं)कोडा**-पु. बाळंतिणीसाठीं डिंक व इतर औषधें याच्या, लाडू वडया करतात तो. [ डिंक+वडा ] ०**वणी**-न. गोंदाचें पाणी. [ डिंक+पाणी ]

**डिकर**—वि. चिकट.

**डि(डिं)कव(वि)णें**—उक्रि. डकविणें; चिकटवणें ( गोंदानें ). (व.) डिकणें.

**डिकरा**—पु. (खा.) मुलगा. **डिकरी**-स्त्री. मुलगी. -भात्रै ७. १ ते ४. [ सं. डिक्करी=तरुणी ? ]

**डिकशी**—स्त्री. कोंवळा कोंब, देंठ, टोंक ( पान इ०चें ); टिकशी; कोम; अंकुर. २ अग्रभाग; टोंक.

**डिकामाली, डि(डिं)केमाली**—स्त्री. १ एक झाड व त्या झाडाचा औषधी चीक. [ डिंक+माली; गु. हिं. डिकामाली ]

**डिकाळ, डिकेरा**—वि. (राजा.) चिकट; चिकाळ (आंबा, फणस इ० फळें ). [ डिंक ]

**डिकोळी**—स्त्री. डिखळी; ढिकळी पहा.

**डिक्री, डिगरी**—स्त्री. निकाल; हुकूमनामा; दिवाणी कोर्टाचा निकाल. [ इं. ]

**डिक्शनरी**—स्त्री. कोश; शब्दकोश. [ इं. ]

**डिख-दाणी-वडा, डिखवणें**—डिंक पहा.

**डिख(खु)ळ, डिखळी, डिखुळणी, डिखोळी**—नस्त्री. १ भाताचें ढेंकूळ, गोळा. २ घट्ट विरजलेलें दूध; चक्का दहीं. ३ घट्ट केलेला आंब्याचा रस. ४ मातीचें ढेंकूळ. ' सन्योक्ति आयकों दे रे न शिळेला अपाय जो डिखळा । ' -मोसभा ५.११७. ५ (सामा.) गोळा; घट्ट अंश, भाग.

**डिंग**—पु. (कों.) रास; ढीग; गंज. [ डंग, डांग ]

**डिगडिग**—उद्गा. मुलांना लाडीकपणानें खेळविण्याचा शब्द.

**डिगदाणी-नी**—डिकदाणी पहा.

**डिंगर**—पुन. १ (काव्य.) मूल; बालक; लेकरूं. 'विठोबाचें आम्ही लाडिकें डिंगर। कांपती अमुर काळ धाकें।' –तुगा ३५७. २ (कर्ना.) नोकर; गुलाम. 'मारूं नको गा बळिभद्रा। दास डिंगर आम्ही तुझे।' एरुस्व १२.२०. –वि. प्रिय; लाडका. 'जो झाला हरीचा डिंगरू। त्यासि संसारू असेना।' –एभा २३.९२८. [सं. डिंगर=नोकर]

**डिंगरा**—पु पंढरपुरच्या देवासाठीं पाऊलघडी घालणारा. –शर [डिंगर]

**डिंगरी**—स्त्री. १ मुळ्याची शेंग; मोगरी. २ (कु.) लांकडी पाचर, खिळी (झाड घट्ट बसविण्याच्या उपयोगी).

**डिंगवडा, डिंगोडा**—पु. डिकवडा पहा. [डिंग=डिक+वडा]

**डिंगशी**—स्त्री. डिकशी पहा.

**डिंगळ-ळी**—स्त्री. पिवळीं फुलें असणारें एक झाड.

**डिंगी**—स्त्री. आधार, टेंकू. डेंगी पहा. [फा.]

**डिगोजी**—स्त्री. उपरणें; अंगवस्त्र; धोतर (५० वर्षांपूर्वी हा शब्द रूढ होता). [फ्रें. देगाजे; इं. अर्थ मेल, स्वैर]

**डिंगोरा**—पु. (व.) डिकाचा केलेला लाडू. डिकवडा पहा.

**डिंगोरा-ळी**—पुस्त्री. (कों.) लहान डोंग; गंज; डिंग. [डिंग]

**डिग्री**—स्त्री. १ भाग; अंश; एक परिमाण (उष्णतेचें, परिघाचें इ०). प्रमाणांक. २ (विश्वविद्यालयीन) पदवी. ३ टाईप जुळवितांना शिशाचे पातळ तुकडे उकार, वेलांटी हीं चिन्हें नसणाऱ्या अक्षरांवर (ओळींतील सर्व अक्षरांची सारखी जाडी राहण्यासाठीं) घालतात ते.

**डिचका**—वि. लद्दा; गोळा; गिचका पहा. **डिचकें**–न. गोळा; गिचका पदार्थ. उदा० भाताचें–वरणाचें–गाळाचें डिचकें.

**डिचकें**—न. (क.) पसरट भांडें.

**डिचकोली**—स्त्री. लहान पोट (विशेषतः मुलांचें) (भरणें, खपाटीस जाणें या शब्दास जोडून योजतात). 'भरली माझी डिचकोली। फाटली माझी चिंधकोली। असा माझा गोहो। नीत वर जावो।' **डिचकोलीची पत्रावळ**–(ल.) (रिकामें असल्यानें) खोल, चापट झालेलें पोट.

**डिचडिच, डिचिडिचि**—क्रिवि. पोटांत खळबळणें, हालणें इ० च्या आवाजासारखा आवाज होऊन. 'पोट डिचडिच–करतें–उडतें–हालतें.' [ध्व. डिच]

**डिचडिचीत**—वि. डिचका; गिचका; पचपचीत; लगदा झालेला (भात, भाजीपाला इ०).

**डिचणें**—अक्रि. (प्रां.) १ असंमत, अमान्य, अहितकर असणें. २ (ल.) अहितकर, दुष्परिणामी, वांकडें होणें.

**डिचा**—पु. (राजा.) १ एक पक्षी; पाणकावळा. २ (कु.) बगळा.

**डिजडणें**—अक्रि. (व.) रागावणें; वसकन् अंगावर येणें. शको. ४. ३

**डिटेक्टिव्ह**—पु गुप्तपोलीस; हेर; चार. [इं]

**डिंडिम-मा**—१ एक वाद्य; डंका; नगारा. २ (ल.) गडबड; गलबला; संभ्रम. 'तये खेवीं आटे डिंडिमा। सांसारिक हे।' –ज्ञा १६.४४३. [सं. डिंडिम]

**डिंडी**—स्त्री. १ पसारा. 'नातरी प्रबोधलिये वेळे। ते स्वप्नींची डिंडी मावळे।' –ज्ञा १५.३१५. २ स्वारी; छबिना; मेळा. [दिंडी]

**डिच्चू**—डच्चू पहा. (क्रि० देणें).

**डिप(फ)ळ**—न. (राजा. हेट) ढेंकूळ. डिखळ पहा. (गो) डिफाळ.

**डिप(फ)ळा**—पु. (हेट.) ढेंकळें फोडण्याचें लांकडी ओत.

**डिफाड**—न. (ना.) उंचवटा; टेंकाड.

**डिंब**—पु. १ (काव्य.) मुलगा; पुत्र; अपत्य. 'भूतें महाभूतांचें डिंब।' –एभा २.५७६ २ आकृति; मूर्ति. 'ते ब्रह्मविद्येचें चालतें डिंब।' –एभा २.१६८. ३ आभास 'सांडूनी कठिणत्वाचें डिंब। सचेतन सर्गजस्तंभ।' –एरुस्व १.२५. ४ उपद्रव. [सं]

**डिंबरी**—स्त्री. (राजा.) खडसा व रुमणी ह्यांतून इसाड पुढें निसटूं नये म्हणून त्याच्या मागें आडवी मारावयाची खुंटी; डिंगरी.

**डिंबर**—न बैलाचा शब्द; डुरकणी 'कीं वृषभ माजले डिंबरें। पुंफाटती अति रागें।' –मुआदि ३१६७. [ध्व. सं. डिंब]

**डिंबिया**—स्त्रीअव. (कों.) गुडघे. **(धरणीं) डिंबिया घालणें**–दंडवत घालणें. 'तव सकळीकीं कर जोडुनी। डिंबिया घातलिया धरणी।' –खिपु १.११७७

**डिंभ**—न. लेंकरूं; डिंब पहा. 'श्रीकृष्णरूपें डिंभें देखतां।' –दाव ३०५. –वि. मूर्ख; अज्ञानी. [सं.]

**डिम**—न. नाटक अथवा रूपकांतील एक भेद [सं]

**डिम**—पु. लुटुपुटीची लढाई; आवेशपूर्ण, उठावदार हल्ला [सं. डिंब]

**डिमडिम**—स्त्री. टिमकी. 'मग ढोल दुंदुभी शंखभेरी। शृंगें डिमडिमी काहळ मोहरी।' –जै १८.३८. –क्रिवि टिमकीच्या नादाचें अनुकरण करून [सं. डिंडिम]

**डिमदारी**—स्त्री. रणघाई; तुंबळ युद्ध. –शर. 'वाद्यघोष डिमदारींत।' –एपो २००. [ध्व]

**डिमरी**—स्त्री. (कु) खिटी, पाचर, डिंबरी पहा

**डियो**—उद्गा आनंद–हर्षसूचक उद्गार. [ध्व]

**डिरणें**—अक्रि. (महानु) अंकुरणें; कोंभणें. 'सर्वेचि दिसे डिरैली। प्रेमलता ते।' –भाग ७९४. [देप्रा. डीर]

**डिरंगी**—स्त्री. डिंगरी पहा.

**डिग-री-रू, डिहा**—पुस्त्री १ नवा, कोमल अंकुर, कोंब; मोड. (क्रि० फुटणें: निघणें; येणें) ' तो तिवणा अधोमुखु। डिरू फुटे।' –ज्ञा १५.९५. २शेंग; डिंगरी. [ देप्रा. डीर ]

**डिऱ्या**—पु. मोठें, पुढें आलेलें पोट; दोंद. [ डेरा ]

**डिंव**—पु. शब्द; ध्वनि. –शर. [ ध्व. ]

**डिवडिवीत**—वि. (राजा.) गरीब आणि दुर्बल; फार नाजूक; दिसण्यांत मोठें पण फार अशक्त: कोमल ( झाड, रोप ). [ डिवणें द्वि. ? ]

**डिवणें**—अक्रि. १ न मानणें, पचणें; बाधणें; त्रास होणें. (अन्न. इ० ). २ (ल.) अपायकारक, अहितकर होणें; बाधक होणें ( चोरी, वाईट कृत्य इ० ). ३ सलणें; खुपणें; डाचणें (अपमान, मानहानि, कटु आठवण इ० ). ४ (व.) डिवचणें; उपद्रव देणें; मारणें. ' आणि सिंहातेंहि संजीवकें शिंगें डिविलें।' –पं ४२. ' डिवेना डसेना बुजेना निर्मळ। परि अमंगळ स्वीकारीना।' –तुगा ४४१८.

**डिवरा**—वि. (व.) ऐटदार; रुबाबदार. ' डिवऱ्या मिशा.'

**डिवाळें**—न. (प्र.) दिवाळें पहा. ' न उठी तयाचें डिवाळें।' –गीता २.१९६७. ' अहा देवा वेळ आली। आता डिवाळयाची।' –दा ३.४.१२.

**डिवी, डिवरी**—वि. मारकट ( गाय ). ' डिवी लात्री बुजे बहु नेदी दुध। मुखी नाहीं शुद्ध विष्ठा खाय।' –तुगा ४४१८.

**डिसपीस**—पु. (कों.) (सुतारी) मातुल; स्क्रू काढण्याचें हत्यार. [ इं. डिस्प्लेस ]

**डिसेंबर**—पु. इंग्रजी वर्षाचा शेवटचा (बारावा) महिना. [ इं ]

**डिस्टेंपर**—पु. (इमारत बांधकाम) रंगाची जात. तेलाच्या ऐवजीं शिरस व कांहीं मुख्य रंग याच्याशीं तांबडा, पिवळा इ० रंग मिसळून केलेला मिश्र रंग. [ इ. ]

**डिस्ट्रिक्ट**—पु. जिल्हा. [ इं. ] ०**जज्ज**–पु. दिवाणी दावे, मोठाले फौजदारी गुन्हे यांचा निकाल देणारा, जिल्ह्यांतील वरिष्ट न्यायाधीश. ०**मॅजिस्ट्रेट**–पु. जिल्ह्याचा फौजदारी न्यायाधिकारी. ०**लोकलबोर्ड**–न. जिल्हापंचायत; जिल्ह्याची लोकनियुक्त सभा.

**डिळ, डीळ**—पु. (व.) १ छपराचा लहान खांब. २ (महानु.) डिरी; खांबोणी. ' मदन मंडपाचिआं डिळी।' –शिशु २९८. [ डिरी ]

**डिळडिळीत**—वि. १ लिबलिबीत; हालतें आहे असें दिसणारें ( पिकलेलें द्राक्ष, गर्भ, बुडबुडा ). २ डळमळीत, डळडळीत पहा.

**डीक-ग**—पु. डिक; गोंद. डिंक पहा. ०**दाणी**–स्त्री. गोंददाणी. (वाप्र.) **डिकास तेल**–(तेल ज्याप्रमाणें डिकांत बेमालूम मिसळतें तसें) अगदीं ठीक; बरोबर; जसें पाहिजे तसें.

**डीम**—पु. (दादर) ठमकारा. डौल. [ दंभ ]

**डीर, डिरी-रू**—पुस्त्री. १ अंकुर; कोंवळा कोंब; मोड डिरा–डिरी पहा. (क्रि० फुटणें, निघणें). ' भणौनि प्रेमाचां डीरीं खोडी। सांसिनली जेथ।' –ऋ ७३. २ कोंवळे पल्लव. ' त्रिगुणभूमी तिवणाडीरू। कोऽहंभावें वाढला थोरू।' –एभा ११.१८८.

**डीवणें**—उक्रि. धडकी मारणें; डिवणें पहा. ' मस्तकें डीवोनि पाडी धरणी।' –मुआदि २९.१०.

**डुई**—डोई पहा. [ डोई ] ०**देणें**–डोकें, मुंडी देऊन राहणें; नेट करणें. ' मर्दानीं दिल्या डुया घेतल्या लुटी रात्री समयाला।' –ऐपो २८४.

**डुक(क्क)र**—पुस्त्रीन. एक प्राणिविशेष; घाणीच्या जागी याला राहणें आवडतें. (–स्त्री. डुकरी, डुकरीण). [सं. शूकर] ०**कंद**–पु. एक औषधी वेल. याच्या कंदावर डुकराच्या केसांप्रमाणें राठ केस असतात. ०**दाढ**–स्त्री. तीव्र वेदनायुक्त, खाजणारा, एक व्रण; [सं. वराहदंष्ट्र] ०**खोपडें**–न (ना.) लहान खोपटें; मोडकेंतोडकें घर. ०**मुसळी, मुसांडी**–स्त्री. (डुकराप्रमाणें) उतावळेपणानें, सपाट्यानें घुसणें; मुसंडी मारणें; डुकराची धडक. (ल.) बेफामपणें एखाद्या कामाला हात घालणें, प्रवेश करून घेणें. ( क्रि० मारणें ).

**डुकरी**—स्त्री. १ (सातारा जिल्हा) जोंधळयाची हलकी जात. ही खरिपांत होते. –कृपि २६६. २ वरी धान्यांतील एक जात.

**डुकली-ळी**—स्त्री. पेंग; झोंपेमुळें डोकें झुकणें; झोंक जाणें. ( क्रि० खाणें ). झोंपेचा चुटका; किंचित झोंप. [ डुलणें, डुलकणें ]

**डुकळ**—पु (कु.) न्यूनता. [ सं. दुष्काल; म. दुकाळ ]

**डुंख, डुंखण-न**—न. (कों.) खच्ची केलेलें रोप; फांद्या तोडल्यामुळें भुंडा झालेला वृक्ष. [ डेंख–ण. खुडणें वर्णव्यत्यास ? ]

**डुंखणें**—उक्रि. (कों.) खडसणें; खच्ची करणें; छाटणें; विस्तार छेदणें. ' दोन बोरी डुंखल्या तेव्हां पेलाभर कांटी सांपडली.' [ डेंखण ]

**डुंग-गा-गी**—पुस्त्री. १ टेकाड; उंचवटा; चढ. २ ढीग; रास; गंज; डिग पहा. ३ (व.) वावराचा अलग लहानसा तुकडा, शेत. ४ (कों.) वाळवंट. ' आम्ही आज डुंगामध्यें खेळण्यास गेलों होतों.' [ डंग, डांग ]

**डुगडुग-डुगां**—क्रिवि. डगडग पहा.

**डुगडुग-डुगी**—स्त्री. १ धाकधूक; भीति: काळजी. २उत्कंठा; प्रबळ इच्छा; आकांक्षा. [ ध्व. डुग ]

**डुंगी**—पु. (कु.) खाडींतील जहाजें समुद्रांत नेणारा व आणणारा इसम.

**डुच-चू डुच्चू**—पु. (ना.) बूच.

**डुचका**—वि. १ उफराट्या बाहुल्यांचा; मंद दृष्टीचा; लहान डोळ्याचा. २ गजनेत्री. ३ लहान, बारीक (डोळे). [सं. दुष्कृत डुसकिअ; डुचकिअ; डुचक. -भाअ १८३४.]

**डुचमळणें**—उक्रि. डचमळणें पहा.

**डुडा**—पु. (कों.) एक (विणकर) पक्षी.

**डुडु**—क्रिवि. (ना.) १ रानडुकराच्या ओरडण्याचें अनुकरण करीत; डुरडुर २जनसमुदायाच्या आवाजाचें अनुकरण करून. -पु. हुतुतूचा खेळ. [ध्व.]

**डुडूळ**—पु. (प्रा.) (काव्य.) घुवड; दिवाभीत. 'कीं डुडुळें जेवि डोळसें। न लखिजे सूर्या।' -स्वादि १२.३.४०.

**डुबक**—पु. एखादा पदार्थ पाण्यांत पडल्याचा, भांडें बुडविल्याचा ध्वनि. [ध्व. डुब्]

**डुबक**—स्त्री. १ (पळून जाऊं नये म्हणून घोडा, म्हैस इ०चे) दोन पाय बांधण्याची क्रिया; पाय आवळणी. २ पाय बांधण्याची दोरी; भाला. **डुबकणें**-उक्रि. जनावराचे पुढील दोन्ही पाय बांधणें. [डुबक]

**डुबकणें**—न. मोठ्या भांड्यांत मावण्यासारखें लहान भांडें (बुडवून पाणी काढण्यासाठीं). -उक्रि. पाण्यांत खेळणें, बुड्या मारणें; डुंबणें पहा. [डुबणें]

**डुब-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. पाण्यांत एकदम बुडणाऱ्या, पडणाऱ्या वस्तूच्या, ढेरपोटावर मारल्यासारखा आवाज होऊन. [ध्व. डुबक]

**डुबकवणी**—न. (कु.) आंत भांडीं धुतल्यानें घाण, गढूळ झालेलें पाणी. [डुबकणें+पाणी]

**डुबकव(वि)णें**—उक्रि. १ भांडीं इ० बुडवून पाणी घाण करणें. २ पाण्यावर जोरानें मारणें; पाणी उडविणें. [डुबक]

**डुबकळणें**—अक्रि. बुडी घेणें, मारणें. -सक्रि. बुडविणें.

**डुबकळी**—स्त्री. बुचकळी; बुडी; डुबकी. (क्रि०मारणें; देणें; घेणें).

**डुबका**—पु. (कु.) उलंडीशिवाय असलेली लहान होडी.

**डुबकी**—स्त्री. १ बुडी; बुचकळी; (क्रि० मारणें; देणें). २ दडी; लपण्याची क्रिया. [हि.] **०घालणें**-१ (कों.) (मासे धरण्यासाठीं)पाणी गढूळ करणें. २ पाणी हातानें उधळणें, उडविणें; डुबकविणें पहा.

**डुबघाईस**—क्रिवि. (प्र.) डबघाईस पहा.

**डुबडुबीत**—क्रिवि. कांठोकांठ; कांठापर्यंत, सांडे-बाहेर वाहून जाई इतकें. (क्रि०भरणें; वाहणें). -वि बाहेर सांडणारें, वाहणारें.

**डुबणें**—अक्रि. १ बुडी मारणें. २ दिवाळें वाजणें; बुडणें; नाश पावणें. [ध्व. हिं. डुबना; तुल० का. डोब्बु=वरून आंत टाकणें]

**डुंब(भ, म)णें**—अक्रि. १ पोहणें; पाण्यांत खेळणें; जलक्रीडा करणें. २ (ल.) रमणें; गढून जाणें; निमग्न होणें (विद्या व्यासंग, धंदा इ०त). 'मी बारा वर्षें शास्त्रांत डुंबलों.'

**डुबर**—न. (बे.) कुल्ला; श्रोणीभाग. [का. डुबरी=वाटोळा आकार; वर्तुलता] **०तारुणें**-वि. खोडकी, रग जिरविणें.

**डुबरा**—वि. १ सुटलेलें; मोठें (पोट). २ ढेरपोट्या; मोठ्या पोटाचा.

**डुबवस्त**—स्त्री. दागदागिने. 'दहा बोटीं आंगठ्या डुबवस्तामध्यें गजबजली।' -सला ४१.

**डुबी**—स्त्री. बुडी; डुबकी पहा. (क्रि० मारणें; देणें). [हिं.]

**डुबूक**—क्रिवि. १ कांठोकांठ; भरपूर; तुडुंब. २ डुब् असा आवाज करून. [ध्व. डुब्]

**डुबे**—न. बागाईत जमीनींत वाफे, पाट काढण्याचें हत्यार; **०कोळपें**-न. (सातारा) एक प्रकारचें कोळपें.

**डुमडुम-डुमां**—क्रिवि. नगारा, टिमकी इ० वाद्यांच्या आवाजासारखा आवाज होऊन; डमडम. [ध्व. डुम]

**डुमडुमें**—न. ढुमढुमें; लहान मुलांची टिमकी.

**डुमणा**—वि. (तिरस्कारार्थी) लठ्ठ व खुजट; ढेरपोट्या व ठेंगणा (मनुष्य, जनावर).

**डुर**—न. (गुज.) शिरसूच्या शेंगांचें भूस. -कृषि १६.४.७.

**डुर-रा-री**—पुस्त्री. (कों.) डबकें; झरा; डहुरा; डवरा पहा. 'डुरे विहीरे पाझर। पर्वत फुटोन वाहे नीर।' -दा १६.४.७.

**डुरकण-णी-णें, डुरकाणी, डुरकावणी, डुरकी-डुरणें**—डरकण इ० पहा. 'घोडे हिंसती बैल डुरती।' -दावि २८१.

**डुरका**—पु. (कु.) डुर-डुरा पहा.

**डुरमा**—वि. १ ढेरपोट्या आणि खुजट. २ आंखूड व जाड (हात-पाय).

**डुरडुर**—स्त्री. १ बेडकांचा डरांवडरांव आवाज. २ आग पाखडणी; आरडाओरड; बडबड; चरफड. [ध्व]

**डुरडुर-रां**—क्रिवि. डुरडुर करीत.

**डुरडुरणें**—अक्रि. १ डरांव डरांव करणें; ओरडणें; (बेडूक इ०). २ फुसकारणें; फुसफुसणें (घोणस, साप). ३ (ल.) चडफडणें; तडफडणें; शिरा ताणणें; ओरडणें. [डुरडुर]

**डुरडुरा**—पु. (राजा.) फुरसें; सर्पाची एक जात; घोणस.

**डुऱ्या**—पु. (कृषि.) पडवळाची एक जात. याचें फळ हात-सव्वाहात लांब असतें.

**डुऱ्या**—पु. डिऱ्या पहा.

**डुलकणें**—अक्रि. डुलकी घेणें; पेंगणें. [डुलणें]

**डुलकी**—स्त्री. डुकली पहा. [डुलणें]

**डुलणें**—अक्रि. १ डुलत डुलत चालणें; झोकांड्या देत चालणें; २ पुढें-मागें-बाजूस कलणें, रेलणें, हालणें ( हत्तीवर, उंटावर बसलेला माणूस किंवा खुद्द हत्ती, उंट ). ३ हालणें. डोलणें. 'शिदोरीचें शिकें निश्चित। खांद्यावरी डुलत।' ४ बुडणें; गमावणें. हातांतून जाणे ( गहाण, ठेव, पैसा, वजन ). [ सं. दुल्; प्रा. डुल ]

**डुल्लण**—अक्रि. डुलणें, डोलणें पहा. 'मुक्तेश्वर प्रार्थनें मंत। स्नेहभावें डुल्लती।' -मुआदि २७.२३१.

**डुस**—स्त्री. (व.) सरकी पेरण्याची लांकडाची नळी; मोघण.

**डुळकणें**—अक्रि. १ ओकणें; दूध ओकून टाकणें, पडणें ( लहान मुलानें ). २ हागणें; पिळकणें ( लहान मूल ).

**डुळ-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. ( दूध इ० चा ) ओकून पडण्याच्या आवाजासारखा आवाज होऊन.

**डुळकवणी**—न. १ ओक; ओकून पडलेला पदार्थ. २ ( निंदाव्यंजक ) पाणी घातलेलें दूध, ताक इ०.

**डुळका**—वि. डुचका पहा.

**डुळकी**—स्त्री. ओकारी ( लहान मुलाची ). ( क्रि० येणें ). [ ध्व. ]

**डुळडुळ-डुळां**—क्रिवि. १ पोटांतील, भांड्यांतलें पाणी इ० हिसळण्याच्या आवाजासारखा अथवा गळवांतला पू थलथलण्यासारखा आवाज होऊन. २ ( भांडें; पोट; गळू इ० ) हालल्यानें होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन. ३ ( ना. ) ढळढळां.

**डुळडुळीत**—वि. डळडळीत पहा.

**डुळी**—स्त्री शिक्यावरलें भांडें. -शर.

**डुळूं, डुळू**—नपु. ( भांडें, कापड इ० ला पडलेलें ) लहान भोंक 'कणगीला पडलें डुळूं.' [ म. डोळा. तुल० का. डोळ-डोळ्कु; गदाड ]

**डू**—क्रिवि उतावळ्या डुकराच्या ओरडण्याचें अनुकरण. [ध्व]

**डू, डूव**—पुस्त्री. समृद्धि; वैपुल्य; बाहुल्य; विपुलता; चंगळ. ( क्रि० माणें; गाजणें; माजणें; मातणें ). [ डुबणें ]

**डूक-ग**—पु मनांतील अढी; वाईट ग्रह; दांत; रोष. -चंद्र ९४. [ हि. ]

**डूब**—१ ( व. ) हुलकावणी; थाप; झुकांडी. २ बुडी; बुचकळी ३ तोटा; बूड. ४ विटलेल्या वस्त्राला पुन रंग देणें. ५ पुन्हां दिलेला रंग; वस्त्रावर बसलेला रंग. ६ वैपुल्य; सुबत्ता. डू पहा. [ डुबणें ]

**डूल**—पु. एक कर्णभूषण; लहान मुलांच्या कानांतील लोलक असणारा एक अलंकार [ डुलणें ]

**डेअरी**—स्त्री. दूध मिळण्याचें ठिकाण; दुधाचा कारखाना, धंदा. दूधघर. [ इं. ]

**डेक**—वि. (सांकेतिक) सहा संख्या (मंडईतील व्यापारी शब्द).

**डेंकी**—स्त्री. १ ( नाव, भिंत, झाड इ०चा ) आधार; धीर; टेंका; पुस्ती; तीर. २ आधार, टेंका देणें

**डेंकी-खी**—स्त्री. ( कुस्ती ) आखाड्यांत मारावयाची एक उडी. डंकी पहा. [ डंख ]

**डे(डें)ख**—न. १ देंठ. ताट. २ मूळ; उगम (भाषण इ०चा).

**डेंखी लावणें**—आधार, उगम, मूळ शोधणें.

**डेंखान, डेंखण**—न १ (कों) खुडलेलें झाड, रोप; रोपाची खूड; खुंट. २ छाटल्यानंतर शिल्लक राहिलेला देंठ ( तंबाकू इ० पानांचा ). ३ ( प्रां. ) साग्र माठाचा देंठ [ डेंख ]

**डेग**—स्त्री. ( व. ) स्वयंपाकाचें मोठें भांडें; हंडा. तांब्याचें मोठें भांडें. 'तिथें डेगा आहेत थोर। तीन कळशींचा सुमार।' -गापो ५५. [ फा. देग् ]

**डेग**—स्त्री. ( कु. ) कडा ( घराच्या जोत्याची इ० ).

**डेंग**—स्त्री. केळीचें पान. डांग पहा.

**डेंग**—स्त्री. आधार; टेका डेंकी पहा

**डेंग**—वि. जड; ढ; ढोंगी. 'तुका म्हणे कुचर दाणा। तैसा म्हणा डेंग हा।' -तुगा २९१३.

**डेंगणें**—अक्रि. ( राजा. ) थकणें; दमणें; श्रांत होणें.

**डेंगणें**—न. ( ग्राम्य ) पुरुषाचें जननेंद्रिय; लिंग. [ तुल० का. डेंकणी=निशाणाची काठी ]

**डेंगरी, डेंगा**—स्त्रीपु (कु) खेंकड्याचा लहान पाय. [ढांग]

**डेंगळी**—स्त्री. एक तृणधान्य.

**डेंगाळणें**—अक्रि ( ग्राम्य शब्दापासून साधलेला ) आळसानें, सुस्तीनें, रेंगाळत काम करणें; रेंगाळणें; टंगळमंगळ करणें.

**डेंगी**—स्त्री. आधार; टेंकू; धीरा; पुस्ती. डेंकी पहा.

**डेंगूताप**—पु. एक प्रकारचा ताप, रोग; हाडमोड्या ताप. या तापांत हाडें फार दुखतात. [हा मूळ झांझीबारी शब्द स्पॅनिश भाषेंतून इंग्रजींत आला ]

**डेचकी**—स्त्री. डचकी; विचकी; दुवेळकी काठी.

**डेचकी-कें, डेचा**—स्त्रीनपु. ( क. ) रुंदट तोंडाचें भांडें.

**डेचा**—पु १ ( गा. ) शेंडा; टोंक ( रोप, झाड इ०चें ); डिकशी; डेख. २ माथा; कळस; डोकें. ( क्रि० काढणें; धरणें; पाहणें ). ३ अगदीं आणीबाणीची वेळ, प्रसंग; बरोबर मोक्याची वेळ, स्थळ; ऐनवेळ, संधी. 'सरखत्तीच्या डेच्यावर स्वारांनीं उडी घालून सरखत्तीचा डेचा धरला.' 'हा दरोडा ऐन डेच्यावर धरला.'

**डें(डे)ठ**—पु. देंठ पहा. [ हि. ]

**डेंडळ, डेंड(डा)ळणें, डेडळपट्टी, डेड डा)ळी**—ढेंढळ इ० पहा.

**डेंडारी**—स्त्री. १ ओकणें: ओकारी काढणें (सकाळच्या वेळीं बळेंनें). २ (ल.) (गिळलेली वस्तु) बाहेर ओकून टाकणें. ३ लांच परत करणें: भरपाई करणें; फेडणें.

**डेंडाळें**—न. आंतडें (बाहेर पडलें–फाडून काढलें असतांना म्हणतात).

**डेर्डी**—स्त्री. (खा. भिल्ली) पोट.

**डेडोर**—पु. (खा.) बेडूक. [सं. दर्दुर]

**डेपो**—पु. संग्रह; सांठा; कोठा: कोठार; वखार. 'बुक–डेपो.' [इं.]

**डेप्युटी**—वि. १ दुय्यम; असिस्टंट (कमिशनर, इन्स्पेक्टर इ०). २ डिपोटी: शाळातपासनीस. [इं.]

**डेप्युटेशन**—न. शिष्टमंडळ. [इं.]

**डेंबरणें**—अक्रि. मोठें होणें; फुगणें (पोट इ०). डंबारणें पहा.

**डेंबरा, डेभरा, डेमरा**—वि. १ ढेरपोट्या; मोठ्या पोटाचा: पोट सुटलेला. २ मोठें; सुटलेलें; फुगलेलें (पोट). ३ फुगलेला; सुजलेला (अवयव, मनुष्य, जनावर). [सं. डिब]

**डे(डें)बरें, डेमरें**—न. धिरडें: ढेंबरें पहा.

**डेब(बि)रो**—वि. मारकट. डवरा पहा.

**डेंबुक, डेमको**—पु. (कु.) चिखलांत राहणारा मासा. हा आंगठ्याएवढा लहान असून याचें अंग बुळबुळीत असतें.

**डेमी(कागद)**—पु. छापण्याच्या कागदाचा प्रकार (याचा आकार २२॥ × १७॥ इं. असतो.) [इं]

**डेरका–की**—पुस्त्री. १ मातीचा डेरा; खोजा. २ मोठें पोट. **पोटाची डेरकी**–स्त्री. वाटोळें गरगरीत, सुटलेलें पोट.

**डेरकें**—न. १ घागर. २ लहान डेरा, मडकें. ३ मोठें पोट; ढेरपोट. डेरका पहा. [डेरा]

**डेरा**—पु. १ मातीचा रांजण, माठ. २ (ल.) सुटलेलें पोट; ढेरपोट. ३ विण्याचा भोंपळा. ४ गोल घुमट: देवळाच्या कळसाच्या खालचा गोल भाग, डंबरी. ५ नगाऱ्याचें भांडें. ६ (भडबुंजी) कढईचा खोल भाग. ७ ज्यांत पाणी राहतें तो मोटेचा भाग (दुसरा भाग सोंड) ८ गवळी लोकांचा शिमग्यांतील एक खेळ. यांत रांजणाला चामडें लावून तें वाजवितात.

**डेरा**—पु. चिखल असलेली जमीन; दलदल.

**डेरा**—पु. १ मोठा तंबु; कापडी घर (क्रि० देणें). २ तळ; तात्पुरती वस्ती: (इं.) कॅप [हि.] ०**देणें**–क्रि. मुक्काम करणें: जेवण्याखाण्यास राहणें: तळ देणें. **डेरेदाखल**–क्रिवि. डेऱ्यांत मुक्काम; युद्धास निघणें. 'श्रीमंत कालच गारपिरावर डेरेदाखल झाले.' –भाऊ ४.२. **डेरेदांडे**–पुअव. तंबू; राहुट्या: छावणीचें सामान. 'कोठें डेरे दांडे कोठें उंट तट्टे राहिलीं।' –ऐपो ३९९.

**डेरी**—स्त्री. (कु.) लहान डेरा; पाण्याचें भांडें.

**डेल, डेलकी**—स्त्री. (मुंबई) बचक्याची काठी. डेळ पहा.

**डेलकर**—न. (राजा.) बेडका; खाकरा (कफाचा).

**डेला**—स्त्री. नकासगीराचें एक हत्यार. –शर

**डेलिया**—पु. (कु.) १ एक फूल. २ (सोनारी) कमळासारखें, डोक्यांत घालण्याचें सोन्याच्या पत्र्याचें फूल. [इं. डेहलिया]

**डेवगा**—पु. मोठ्या आकाराचा बांबू: डवगा पहा.

**डेवण–णं**—स्त्रीन. उतार; ढाळ; उतरण.

**डेवण–णं**—न. १ ठराविक वेळ, जागा. २ आणीबाणीचा प्रसंग; ऐन वेळ.

**डेवणें**—अक्रि. (अति जेवल्यामुळें) सुस्ती येणें: शरीर जड होणें: हातींपायीं येणें. **म्ह०** जेवल्यें आणि हातींपायीं डेवल्यें.

**डेवणें**—उक्रि. (प्रां.) टोमणा मारणें: नाकांत काड्या घालणें. डिवणें पहा.

**डेवणें, डेवरणें**—उक्रि. १ (वरील पदार्थ) खालीं टेवणें; उतरणें (ओझें इ०). २ उतारावरून खालीं येणें; उतरणें.

**डेविरा**—वि. मारका; डवरा पहा.

**डेस**—पु. यूरोपमध्यें गोड्या पाण्यांत आढळणारा एक मासा. –प्राणिमो ८१.

**डेहे**—उद्गा. (मुलांच्या खेळांत) छातीला बोट इ० लावून ओरडणें.

**डेहेला**—पु. (बडोदें) तबेला. [सं. देहली; गु. डेहेलो]

**डेळ, डेळकें, डेळकी, डेळी**—नस्त्री. १ बेळकें; दुबेळकें लांकूड; फांटे फुटलेलें लांकूड, मेढ. २ (ल.) आधार; मेढा.

**डेळमाथण**—न. (व.) शुभ कार्यातील जलकुंभ अथवा त्याचा पूजनविधि. 'उद्यां डेळमाथण व परवां लग्न असें ठरलें आहे.'

**डो**—स्त्री. डोई: डोकें. –शर.

**डों**—न. (महानु.) तेल काढण्याचें नारळाच्या करवंटीचें पात्र; डवला. 'तेथचि डों आणुनि देणें.' –ऋ १२२.

**डोई**—स्त्री. १ डोकें: मस्तक. २ (ल.) प्रत्येक माणूस: व्यक्ति: इसम. 'दर डोईस एक पैसा द्यावा.' ३ पूर्वज: मूळ पुरुष: पिढी. 'त्या गांवांत माझ्या पांच डोया झाल्या.' डोकें पहा. (वाप्र.) ०**उचलणें**–नांवलौकिकास चढणें. ०**उठणें**–डोकें दुखूं लागणें (कोंकणांत डोकें उकलणें म्हणतात). ०**उठविणें**–त्रास, उपद्रव देणें. ०**करणें**–हजामत करणें. ०**(वर) काढणें**–उदयास येणें: वैभवास चढणें. ०**खाजविणें**–१ त्रास, उपद्रव देणें. २ आठवण करण्याचा यत्न करणें: आठवणें. ०**चा चेंडु करणें**–(चेंडूप्रमाणें डोकें हालविणें) १ सपाटून शिव्या देणें: भडकणें: अति रागावणें. २ (डोकें चेंडूप्रमाणें करवूं देणें) मानहानी किंवा शिव्याशाप घेणें. ०**चें उखळ करणें**–१ आग पाखडणें: संतापणें. २ वाईट

रीतीनें वागविलें असतां सहन करणें. ०चे केस नाहींसे करणें–फजीति करणें. रागें भरणें. ०डोईचें खांद्यावर येणें–चिंता, काळजी दूर होणें, हलकी होणें; संकटाचें निराकरण होणें. ०चे वाटेनें कर्ज देणें–( कर्ज देण्याकरिता डोक्यानें चालणें ). १ ताबडतोब कर्ज फेडणें; २ कष्ट, हमाली करून कर्जफेड करणें. ०चे वाटेनें घेणें–नम्रतापूर्वक ( साष्टांग नमस्कार घालून ) घेणें, स्वीकारणें. ०चे वाटेनें देणें–नम्रतापूर्वक देणें. ०टेकणें–१ अत्याग्रह करून ( जेवावयास वगैरे ) बसविणें, राहविणें. २ थकणें; खचणें; अशक्त होणें. ३ आधार घेणें: आश्रय करणें. ०ठिकाणावर येणें–शुद्धीवर येणें. डोईत राख घालणें–फार रागावणें; चरफडणें: त्रागा करणें. ०तापविणें–उन्हांत डोकें तापवून घेणें; अत्यंत परिश्रम, त्रास घेणें. ०देऊन बसणें, डोई देणें–१ निश्चयानें, चिकाटीनें एखादें काम करण्यास बसणें; २ (निंदार्थी) लोचटपणानें आणखी गहणें, बसणें (पाहुण्यानें). ३ एखाद्याला बुडवून पुन्हां शांत असणें, कांहींच घडलें नाहीं असें दाखविणें: निर्लज्जपणें वागणें. ०देणें–मारणें–१ मदत करणें: सहाय्य करणें; २ निश्चयपूर्वक कामास बसणें. ०नें चालणें–अभिमानानें, ताठ्यानें चालणें; गर्व होणें, वाहणें. ०नें चालत येणें–नम्रपणानें येणें; नम्रपणा धरणें. ०पिटणें–शोक करणें. ०फोडणें–१ बारीक रीतीनें विचार करणें; डोक्याला त्रास करून घेणें. २ त्रागा करणें. ०फिरणें–१ वेडें होणें. २ रागानें बेफाम होणें. ०भणाणणें–डोकें फिरणें; भ्रमणें. ०मारणें–१ शिरच्छेद करणें. २ नुकसान करणें; बुडविणें; आशा भंग करणें. ०वर खापर–हंडी–फोडणें–फुटणें–( निरपराधी असतां) एखाद्याच्या माथीं दोष लावणें; (वाईट कृत्याचा). आळ, आरोप ठेवणें. ०वर घेणें–१ एखादी गोष्ट पत्करणें; त्याची जबाबदारी घेणें. २ वाईटपणा, दोष स्वतःवर घेणें. ०वर चढणें–एखाद्याला न जुमानणें; त्याविरुद्ध बंड करणें. ०वर दिवस–सूर्य–येणें–दुपार होणें. ०वर धूळ घालणें–१ चिंतेमुळें दुःखित होणें: दुःखाची दुस्सहता दाखविणें. २ एखाद्या कामाच्या पाठीमागें लागल्यामुळें अत्यंत हालअपेष्टा भोगणें. ०वर पदर येणें–१ वैधव्य प्राप्त होणें. २ (ल ) लोकांत येण्याची लाज वाटणें. ०वर बसणें–१ एखाद्याला न जुमानणें; विरुद्ध उठाव करणें २ वरचढ होणें: बढती मिळविणें. ०वर बसविणें–(बायको चाकर, मुलगा यांचा ) वाजवीपेक्षां जास्त गौरव करणें, त्यांच्या मतानें चालणें; अधिक मान देणें: फाजील लाड करणें. ०वर मिरें वाटणें–१ एखाद्याविरुद्ध उठून त्यावर वर्चस्व ठेवणें २ मुलींच न जुमानणें: वरचढ होणें. ०वर विळविणें–एखाद्यावर चुकीनें दोष लादणें; दोषारोप ठेवणें. ०वर शेकणें–व्यापारांत नुकसान होणें: धंदा अंगावर येणें. ०वर हात घेऊन येणें–रिकाम्या हातानीं येणें; इच्छित वस्तु न मिळाल्यानें निराशा होणें. ०वर हात ठेवणें–१ आशिर्वाद देणें. २ ( ल. ) फसविणें: लुबाडणें. ०वर हात ठेवून जाणें–सर्वस्वीं नागविले जाणें: (रिक्त हस्तें) कफल्लक होऊन निघून जाणें. ०वर हात फिरविणें–फसविणें; लुटणें. ०वर होणें–वरचढ होणें: जास्त अधिकार मिळणें. ०वरून पाणी जाणें–१ अनाथ, निराधार होणें: संकट व नुकसानीमुळें लाचार होणें. २ कळस, पराकाष्ठा, शिकस्त होणें. ०स पाणी लावून ठेवणें–शिक्षा भोगावयास तयार होणे, सज्ज असणें. (हजारांचे) डोईस पाणी लावणें–हजार लोकांना–ते म्हणतील तें करून, खूष ठेवण्याचा प्रयत्न करणें. म्ह० डोई धरला तर बोडका हातीं धरला तर रोडका (ज्याच्यापासून कोणत्याहि प्रकारें कांहींहि निष्पन्न होणार नाहीं अशा मनुष्याविषयीं ह्या म्हणीचा उपयोग करितात). सामाशब्द– ०ओझें–पेंडकें–भारा–नपु. डोक्यावरचें, डोक्यावर वाहून नेण्याजोगें ओझें. ०खरड्या–ताशा–वि. (निंदार्थी) न्हावगंड; हजाम. डोईचा–पु. ( बायकी-सांकेतिक ) न्हावी. ०जड–वि. १ श्रेष्ठ; प्रसिद्ध: सन्मान्य: भारी; वजनदार. २ अति मेहनतीचें; दुर्निर्वह: कठिण; भारी( काम ). ३ न जुमानणारा; बेपर्वा: बडखोर; बेसनदशीर. ०थडक–स्त्री. कपाळावरचें टेंगूळ. ०पट्टी–स्त्री. माणुसपट्टी; दर व्यक्तीवरील कर ( जिझियासारखा कर ). ०फोड–स्त्री. (डोकें फोडणें ). १ डोक्याला दिलेला श्रम. ( मूर्खमाणसाला शिकविण्याप्रमाणें ). २ उरस्फोड, त्रासदायक, कंटाळवाणें, जिकीरीचें काम; कपाळकूट.

**डोईफोड्या**—वि. १ फकीर-भिक्षेकऱ्यांचा एक पंथ व त्यांतील व्यक्ति. हे भिक्षेकरी कांहीं न मिळाल्यास स्वतःचें डोकें दगडावर फोडून त्रागा करतात. २ याप्रमाणें त्रागा करणारा, त्रासदायक: लोचट माणूस.

**डोक**—पु. ( कों. ) दलदलींत राहणारा एक पक्षी.

**डोकड्या**—पु (व.) मोठा मासा.

**डोकरा**—वि. वृद्ध; म्हातारा ( बहुधा निंदार्थी वापरतात ). [ सं दुष्कर; हिं. ]

**डोकरी–ण**—स्त्री. १ वृद्ध स्त्री: म्हातारी: थेरडी. २ ( ल. ) कुरूप, ओंगळ स्त्री. [ हिं. डोकरी ]

**डोकला**—पु. १ ( प्रां. ) नदीच्या पात्रांत पाण्याकरितां खोदलेला खड्डा. २ झरा: टांकी: कुंड.

**डोकसा–सें**—स्त्रीन. डोई: डोकें; डोचकें: मस्तक: वाक्प्रचार व सामाशब्द यांसाठीं डोई पहा. [ डोकें+सा–सें प्रत्यय ]

**डो(डों)का, डोकला–ली**—पुस्त्री. १ ( राजा. कों. ) ( निंदार्थी ) तंगडी: पाय. २ ( बे. ) डोका=गुडघा. [ तुल० का. डोकि=शरीर ]

**डो(डों)कावणें**—अक्रि. डोकें खुपसून बारकाईनें पाहणें; टोंकावणें ( पाहाणें या क्रियापदाबरोबर डोकावून पाहणें असा प्रयोग ). [ डोकें ]

**डोकी, डोकून**—स्त्रीन. डोकें; डोई पहा.

**डोकें**—न. १ सर्वअर्थी डोई पहा. २ बुद्धि; विचारशक्ति; (क्रि० चालणें). ३ लक्ष; गति. ४ (ल.) अग्रभाग; वरचा भाग; टवका; टाळू; उंचवटयाचा भाग. ५ नांगराचा एक भाग. [ ] **म्ह०** डोकें की फोकें (खोकें). वाक्प्रचार व सामाशब्द यांसाठीं डोई पहा. ०**असणें**–अक्कल असणें ०**उठव्या**–हट्टी; त्रासदायक; कटकटया (भिकारी). ०**कूट**–न. (ना.) माथेफोड. ०**खरडणें–तासणें**–अकुशलपणानें हजामत करणें. ०**बाज**–वि. हुषार; कल्पक. ०**भडकणें**–त्वेष, चीड येणें; अत्याचारी बनणें; रक्त तापणें. 'या अनत्याचारी चळवळींत कुणाचेंहि डोकें भडकूं देतां कामा नये.' –के २७.५.३०. **डोक्याचा**–पु. (कों.) न्हावी. डोईचा पहा. 'एक राजा सलो तच्या डोक्यांत सलें शिग...तें डोक्याच्याला उमगलें' –लोक २.२८.

**डोंगर**—पु. १ लहान पर्वत; टेंकडी; पहाड; घाट. २ (ल.) मेहनतीचें काम; काळजी करण्यासारखा आजार; कर्जाचा बोजा, पाप, गुण, संकट, त्रास यांचें आधिक्य. ३ (ल.) काजळाचा गोळा, रास (भांडयाच्या बुडावर धरलेली). ४ (कों.) डोंगराळ मुलुखांत प्रथम नाचणी पेरलेलें शेत. ५ (कों) शुष्क, डोंगराळ प्रदेश; नाचणी, वरी यांसारख्या पिकांच्या उपयोगी जमीन. [प्रा. डुंगर; गु. डुंगर] (वाप्र.) **डोंगर खणून(पोखरून)उंदीर काढणें**–अचाट परिश्रम करून त्याची फलश्रुति फारच अल्प झालेली दाखविणें. **डोंगरावरून उडी टाकणें**–क्षुल्लक गोष्ट करणें. उदा० हलकी देणगी देणें. **डोंगरीं दिवा लावणें**–(पेंढारी, लुटारू इ०ना भिऊन) डोंगरांत जाऊन राहणें, वस्ती करणें. **म्ह०** १ डोंगरास दुखणें आणि शिपींत औषध. २ दुरून डोंगर साजरा. सामाशब्द– ०**कठडा, कठाड–डी, कांठ, किनारा**–पु. डोंगराची कड, हद्द, सीमा; डोंगराच्या पायथ्याचा, आसपासचा प्रदेश. 'डोंगरकठाडयाचे गांवास रान लगत पडलें.' ०**कणगर–कंगर**–पु डोंगर पर्वत; डोंगराळ मुलूख; टेंकटया. ०**करी**–वि. डोंगरी; डोंगरांत राहणारे. 'डोंगरकरी कोण आहेत...यांची जोराची चवकशी चालू केली' –अस्पृ ४. ०**कोळी**–पु. डोंगराळ मुलुखांतील एक जात व तींतील व्यक्ति. ०**खिंडी**–स्त्री. खिंडींतील अरुंद मार्ग; घाट. ०**गांव**-पुन. डोंगरावरील, डोंगरामधील गांव. **डोंगरत**–क्रिवि. (व.) उत्तरस, उत्तरेकडेस 'तो डोंगरत गेला.' ०**दळे**–न. जंगल तोडून लागवडीस आणलेली डोंगरावरील जमीन. ०**पठार**–स्त्री. डोंगराच्या माथ्यावरचा सपाट प्रदेश. ०**रान**–न. डोंगराळ प्रदेश, मुलूख. ०**वट डोंगरट डोंगराळ**–वि. डोंगरांनीं युक्त; डोंगरी; डोंगरासंबंधीं, खडकाळ, (प्रदेश); पहाडी. ०**सरा–री**–स्त्री. डोंगरांची, टेंकडयांची रांग. **डोंगराचें लवण**–न. डोंगरांतील वळण अथवा वांकण. **डोंगरी**–स्त्री. १ लहान डोंगर; टेकडी. २ डोंगरी कापड पहा. –वि. १ डोंगरांवर पिकणारें, होणारें. २ डोंगरांनीं युक्त; डोंगराळ. ३ डोंगरासंबंधीं. [डोंगर] ०**कापड**–न १ डोंगरी किल्ल्याच्या (मुंबईच्या) मुलुखांत पूर्वी विकत असलेलें जाडेभरडें कापड. २ (ल.) हलक्या जातीचें व दराचें कापड. इंग्रजींतहि डुंगरी या नांवानेंच हें कापड प्रसिद्ध आहे. ०**ऊस, डोंगरी**–पु. एक जातीचा ऊस. –कृषि ४५०. ०**किल्ला**–पु. मुंबईचा फोर्ट जॉर्ज किल्ला. ०**बागायत**–न. (कों.) डोंगराच्या उतावरील बागाईत. ०**मिरी**–स्त्री. (राजा.) काळीं मिरीं, मिऱ्यांची एक जात.

**डोंगरें**—न. डोंगराळ मुलुखांत पिकणारें एक प्रकारचें भात.

**डोंगरपुळी**—स्त्री. (गो.) डोळयास होणारी पुळी; रांजणवाडी.

**डोंगशी**—स्त्री. खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

**डोंगळा–ळ**—पु. काळा मुंगळा; मोठ्या मुंगीची जात.

**डोंगा**—वि. वांकडा. 'ऊंस डोंग म्हणुनी रस नव्हे डोंगा।' [का. डोंका–कु=वांकडेपणा]

**डोंगा**—पु. एक लहान नाव, होडी; डोणी. [हि.] ०**ढकली**–वि. (व.) निष्काळजी; हयगयी (माणूस, कारभार) (डोंगा=नाव) एकदा पाण्यांत ढकलावा, पुढें त्याचें काय होईल तें होवो अशा वृत्तीचा). 'त्याचा सगळा कारभार डोंगाढकली' **डोंगी**–स्त्री. (काशी.) डोंगा; नाव; होडी. [हि.]

**डोंगुल्ली**—स्त्री. लहान डोंगर.

**डोघालणें**—अक्रि. गळयाला दोन बोटें लावून शब्द करणें. 'डोईस लहान चिधोटी डोघाल्लित यमुने कांठीं।' –राला ६६.

**डोचकी–कें**—स्त्रीन. मस्तक; डोकें; डोई; डोकसें. [डोकें, डोकसें] **म्ह०** डोचकें कीं बोचकें (बोचकें तरी किंवा डोचकें तरी मार.) =सोक्षमोक्ष करणें, कोणतें तरी एक ठरविणें (जान किंवा जमीन या प्रतिज्ञेप्रमाणें)

**डो(डौ)चणी, डो(डौ)चणें**—डवचणें, डौंचणी. डौंचणें पहा.

**डोचलणें**—उक्रि. (महानु.) सावध करणें. 'माया जीवातें विकेरें संचरे वीए, प्रसवे हालवी, डोचली डगळी लोटी।' –चक्रधरसिद्धांतसूत्रें पृष्ठ ६. [डोच(ल)णें]

**डोझ**—पु. औषधाचें एकवेळचें प्रमाण; औषधाचा टक; मात्रा; घोट; घुटका. 'ह्याचा फाजील डोझ झाल्यास तो अंगावर येतो...' –आगर ३.७४. [इं.]

**डोड**—पु. (महानु.) बुडत ठाय, स्थान. 'रसु डोड हा।' –भाए १९६. [डोह?]

**डोडी**—स्त्री. पीक. –मनको.

**डोण-णी**—पुनस्त्री. १ झाडाच्या खोडाचें द्रोणाप्रमाणें पोखरून कोरून केलेलें पात्र. २ सुरमाडाच्या जाड मुळीचा कोरून केलेला द्रोण, भाडें (लोणचें, मीठ इ० ठेवण्याकरितां): कोठिंबा: झाडाचें माठण. –स्त्री १ पोहरा तळ्यांतील पाणी शेतास घालण्याकरितां). २ दगडी–लाकडी कुंडी (पाण्याकरितां). ३ (कु.) लहान तारूं; डोणी पहा. [सं. द्रोण; तुल० का. डोणें=डोंगरांतील पाण्याचें टांकें; पोकळ भाग]

**डाणगा-गें**—पुन. (कु.) लहान डोण: लाकडाचें भांडें; डोण अर्थ २ पहा.

**डोण मिरची**—स्त्री. (कर्ना.) भोपळी मिरची: मोठी मिरची. [का. डोण्णे=लठ्ठ]

**डोणा**—पु. १ (तूप, तेल इ० ठेवण्याकरितां). केळ, पळस वगैरेच्या पानांचा केलेला द्रोण. २ (वे.) गाडीच्या आंसावरील जाड लांकूड; बुटें. ३ (बे.) आटविण्याकरितां कढविलेला उंसाचा रस निववण्याची लाकडी चौकोनी काहील, डोण. ४ (कु.) लाकडाचें भांडें. [डोण]

**डोणी**—स्त्री. १ नाव; डोण: डोंगा. पूर्वी देशी लोकांच्या कोणत्याहि नावेला 'डोणी' व युरोपियनांच्या नावेला जहाज म्हणत असत. 'तरावया मृगजळाची गंगा। डोणी लागीं धावतां दांगा–। माजी वोहळे बुडिजे पैं गा।' –ज्ञा १५.२५२. २ (तूप, इ० करितां) पानांचा द्रोण. ३ कुंडी; लहान हौद; माठणी; टांकी. [डोण: सं. द्रोणी]

**डोफा**—पु. (व.) पानांचा केलेला मोठा द्रोण. 'आमरसाला डोफा तयार करा.' [डोह ?]

**डो(डों)का**—पु. गुडघा; जानु

**डोब**—पु. १ (डुबी) बुडी. २ रंगीत वस्त्रास पुनः त्याच प्रकारचा रंग देण्याची क्रिया. डूब अर्थ ४ व ५ पहा. (क्रि० मारणें). [डुबणें; हि. डोब]

**डोव**—पु. (व.) डबकें. [हि. डोबा]

**डोब**—पु. (कु.) भात लावण्याची कातळावरील सखलट जमीन.

**डोंब, डोम**—पु. १ अतिशूद्रांतील एक जात व तींतील व्यक्ति. हे स्मशानांत चाकरी करून पोट भरतात. कांहीं लोक दोर, चटया, पंखे इ० विणून विकतात. कांहीं डोंबाऱ्यांचा धंदाहि करतात. 'डोंब समशानें राखती।' –दावि ७०. २ चांडाळ; महार. [सं. डुंब; डोंबः डोम, द्रप्राः डोंब=म्लेंच्छ. तुल० द्रा. डुंबा=राक्षस. फ्रेंचजिप्सी रोमः आर्मेनियनजि लोमः पालेस्टाईन दोम]

**डोंब**—पु. १ भयंकर आग; वणवा; आगीचा लोळ; मोठा जाळ (बहुधा आग शब्दाबरोबर योजतात). २ (ल.) उष्णता, दाह, ताप ह्यांची वेदना लाही; आग. 'अंगाचा डोंब.' –विभ. (आगीचें, तिखटपणाचें) आधिक्य, परमावधीदर्शक विशेषण, प्रत्यय: आग करावयाजोगा (तिखट पदार्थ). 'तिखट डोंब.' [का. डोंबी=समूह; गर्दी: अधिकता.] **०पाजळणें-होणें**–(शरीर) अत्यंत तप्त होणें: लाही होणें. 'बोल न निघे तिचे वदनी। परी हृदयी डोंब पाजळला।' –नव २१.१३६. **०मारणें**–आगीचा लोळ उठणें, पसरणें.

**डोंब**—स्त्री. (राजा.) मोरीच्या सांड पाण्याचा खड्डा: डबकें.

**डोंबअळी**—स्त्री. मोठी अळी (कीटक).

**डोबका**—पु. (बे.) भोंक. बीळ.

**डोबकाड**—न. (व.) लहानसें डबकें. [डोब]

**डोंबकावळा**—पु. १ (डोंबाप्रमाणें स्मशानांत असणारा) कावळ्याची एक जात. हा कावळा, हिडीस पण फार धीट दिसतो भांडण इ० प्रसंगीं ज्याग सोडविण्यास जातीय अनेक माणसें जमतात असा माणूस व ती जात. [सं. द्रोण+काकोल: म. डोंब+कावळा]

**डो(डों)बड-र**—स्त्रीन (निंदार्थी.) म्हैस: रेडी: म्हसरूड. (भाकड, निरुपयोगी म्हशीस म्हणतात). 'ऐशीं ज्ञानाचीं डोंबडें। आशा विटंबिली मूढें।' –तुगा २८८१.

**डोंबणें**—उक्रि (क.) डूब देणें; रंग देणें; कपडे रंगांत, पाण्यांत बुडविणें. [डुबणें; हि. डुबोना]

**डोंब(भ)र, डोंभार, डोंभरगण**—न.पु.न. खड्डा. 'तेथें लष्कराचा मुक्काम केला होता आलीकडील तोंडी खळ्या भारी दोन दोन डोंभरगणें सारख्या भारी –भाब ४३.

**डोंबरणें**—न. (व.) झाड, वेली यांस नवीन कोंब ज्या जागीं फुटतो ती जागा; कोंब. [डंबारणें]

**डोबरा, डोंबरा**—पु १ (भित, भांडें, कापड इ०ला) पडलेलें भोंक. २ खड्डा; खळगा (रस्त्यावरील, यांत पाणी सांचून डबकें बनतें). डबरा पहा. [डबरा]

**डोंबरी**—स्त्री. (बे.) खुंटयावरील लाकूड.

**डोंबरी**—वि. जाड: मोठ्या पोटाची, अंगाची: गोबरी 'विंचु आणी डोंबरेआ सर्पिणी। फुंकिती कालिया नागिणी।' –खिपु २.३८.२८.

**डोंबल-लें**—न. (कों.) १ (निंदार्थी किंवा थट्टेनें) डोकें; डोकसें. २ सौम्य शिवी. 'चला ! खेळ हे मांडले डोंबलाचे।' –केक ४९. [डोंबें]

**डोबा**—पु. १ डूब; रंगांत बुडविणें. २ (सामा.) बुडी. (क्रि० मारणें). [डुबू=बुडणें; हि. डोब]

**डोंबा**—पु. काळा साप. 'दोराचिया सापासी। डोंबा बडी ना गव्हाळा ऐसी। संख्या न करवे कोण्हासी।' –ज्ञा ७.१६३.

**डोंबा(भा)री**—पु. कोल्हाटी; कसरत करणारी एक जात.

**डोंबाळा**—पु. (कों.) गाडीच्या धुरेचा दोर आवळ करण्याकरितां साटीपासून जोकडापर्यंत जाड काठी अगर रीप बांधतात ती.

**डोंबाळा-ळी**—पु. वणवा; मोठी आग. डोंब पहा. 'डोंबाळा उठला भवती।' –संग्राम १३९. [डोंब+आळ प्रत्यय]

**डोंबाळी**—स्त्री. डोंबअळी पहा.

**डोंबी**—स्त्री. १ (राजा.) हट्टानें, चिकाटीनें झटणें; अडथळयास न जुमानतां पुढें रेटणें; आपलें घोडें पुढें दामटणें. (क्रि० करणें; मारणें; लावणें). २ जिकीरीची व त्रासदायक याचना, तगादा, कटकट. (क्रि० करणें; घालणें; घेणें).

**डो(डों)बूर**—पु. (तंजा.) खांच; छिद्र; भोंक. डोबरा पहा.

**डोंबें**—न. (आंत खोबरें तयार झालें नाहीं असा) गळून पडलेला कोंवळा नारळ.

**डोंब्या**—वि. १ चिकाटीचा; पुढें रेटणारा; झटणारा. २ तगादा लावणारा; डोकेंफोड्; लोचट; कटकटया. [डोंबी]

**डोंब्या**—पु. (कु.) मासे पकडण्याचें लहान जाळें.

**डोंब्या-नाग-सर्प-साप**—पु. एक जातीचा साप; हा अत्यंत विषारी असतो. [सं. डुंडुभ ? हिं.]

**डोभण**—न. पाण्याचें डबकें, खळगा.

**डोभरा**—पु. (प्रां.) डोबरा पहा.

**डोम, डोम-अळी-कावळा**—डोंब इ० पहा.

**डोमडा**—वि. (ना.) काळाकुट्ट; काळाकभिन्न. [हिं. डोमडा= डोंब जात] **म्ह०** (व.) डोमडी बायको एकाची गोरी बायको लोकाची.

**डोमल**—पु. १ (नांगराचीं अथवा गाडीचीं) चऱ्हाटें व बंद पिळवटून आवळ करण्याकरितां उटाळीप्रमाणें उपयोगी पडणारें एक लांकूड. २ वासा; गाडीची दांडी. डोंबाळा पहा.

**डोमल-लें**—न. डोंबल पहा.

**डोमाळें**—न. दांडी (गाडीची). डोमल पहा.

**डोम्या-नाग-सर्प-साप**—पु. डोंब्या नाग पहा.

**डोय-यी**—स्त्री. डोई पहा. 'दिसे एक डोयी जटाभार वाहे।' –नरहर गंगारत्न माला ४८ (नवनीत ४२१).

**डोयली**—स्त्री. (कों.) पळी; डवली (नारळाची करवंटी, कोय किंवा लांकूड याची केलेली). [डवली]

**डोर**—वि. नादमधुर; गंभीर; घौस (वाद्य, आवाज).

**डोर**—पु. डमरु; डौर पहा.

**डोरली-वांगी**—स्त्री. रानवांगें; वांग्याची एक जात; या फळाचा रंग पिवळा असून आकार सुपारीएवढा असतो. याची भाजी करतात. फळाचा औषधाकडे उपयोग होतो. झुडपाला कांटे असतात. 'बीज पेरूनियां तेंचि घ्यावें फळ। डोरलीस केळ कैचें लागे।' –तुगा ३६७६.

**डोरली रिंगणी**—स्त्री. एक प्रकारचें झाड.

**डोरलें**—न. १ डोरलीचें फळ; डोरलें वांगें. २ डोरलीच्या फळासारखा सोन्याचा डागिना.

**डोरलें**—न. गुन्हा; शाबीत झालेला आरोप. (क्रि० करणें; लावणें).

**डोरलें वांगें**—न. डोरल्यासारखें वांगें.

**डोरशीमुशी**—स्त्री. समुद्रांतील मुशी माशाची एक जात.

**डोरा**—पु. डवरा पहा.

**डोरी**—वि. सुंदर.

**डोल**—पु. पाण्याची वादली; पोहरा; पीप. 'डोल रुप्याचा दोर रेशमी जपून झपून पाणी भरशी।' –पला ४.४०. [हिं. डोल]

**डोल**—पु. (हेटकरी) गलबताची, नावेची डोलकाठी. [हिं. दोल]

**डोल**—पु. १ देवाचा डोलारा. डोल्हारा पहा. २ डोली. ३ कंप; कांप; हलणें. 'अगा वारा जरी वाजोनि वोसरे। तरी तो डोल रुखीं उरे।' –ज्ञा १८.४२३. ४ डुलणें; झोके खाणें; झोंका. (क्रि० देणें). 'तेणें समर्था येतसे डोल।' –दावि २८१. ५ विस्मय. ६ उत्तरहिंदुस्तानांतील देवाचा (राधाकृष्णाचा) एक उत्सव. हा आपल्या इकडील शिमग्याप्रमाणेंच फाल्गुनांत असतो. [सं. दोलय्; प्रा. डोल] **०ग्यारस**—स्त्री. भाद्रपद शुद्ध एकादशी. इंदुराकडे या एकादशीला सर्व मंदिरांतील देवांच्या मूर्तींची मिरवणूक प्रतिवर्षी निघण्याचा संप्रदाय आहे; ह्या एकादशीचें नांव. –विक्षिप्त १.११७.

**डोल**—पु. दुष्काळांत सरकार महार, जागले इ० ना रोकड किंवा धान्य खावटी देतें तो. –गांगा ९६. [इं.]

**डोल**—पु. (राजा. कोळी) लहान मासे पकडण्याचें जाळें.

**डोलकर**—पु. डोली वाहणारा; भोई. [डोली+कर]

**डोलकाठी, डोलखांब**—पु. १ (कों.) (नावेच्या, बोटीच्या) शिडाची काठी; डोल. २ जत्रेमधील निशाणाची काठी.

**डोलची**—स्त्री. डोल; कातड्याची पखाल; पोहरा. [हिं.] **०बेग**—पु. (पखालीचा धनी) मुसलमान. पखाल्यास व्याजोक्तीनें म्हणतात. घागरगडचा सुभेदार या संज्ञेप्रमाणें.

**डोलझा**—पु. (विणकाम) थूनास (विणलेलें कापड गुंडाळावयाच्या चौकोनी लाकडास) प्रतिबंध होण्यासाठीं ज्या दोन बाजूंस खुंट्या घालतात त्यापैकीं प्रत्येक. यानें थून उलट फिरत नाहीं.

**डोलणें**—अक्रि. सर्व अर्थीं डुलणें पहा. डुलणें आणि डोलणें या दोहोंत फरक आहे, तो असा कीं, आपण होऊन न हालणाऱ्या निर्जीव वस्तूस डुलणें हें क्रियापद योजतात व स्वतः होऊन, मुद्दाम अंगिकारलेल्या गतीस डोलणें क्रियापद योजतात. एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडील गतीस डुलणें–डोलणें तर पुढें-मागें होणाऱ्या गतीस झुकणें लावितात. 'ओलें गळ प्राज्य प्रेमाश्रुभरें करूनियां डोले।' –मोभीष्म १०.९८.

**डोलव(वि)णें**—उक्रि. १ डुलायास, डोलायास लावणें; हेल-कावे देणें; हलविणें. २ हलविणें ( मान, डोकें इ० ). 'शिखा डुलवी स्वअंगावर।' —नव १६.१०४. [ डोलणें प्रयोजक ]

**डोला**—पु. १ मुसलमानांचा ताबूत; ताजिया. २ डोली; पालखी, मेणा इ० वाहन. 'स्वारि सख्याची येईल कधीं मिरवत डोलांत। बसुनियां चौरंग डोलांत।' —प्रला १३४. ३ ( हिं. ) प्रेताचें वाहन; तिरडी. [ सं. दोला; हिं. ] ०**जाणें**—क्रि. ( शिवी ) मढें जाणें; मरणें. 'हात् तुझा डोला गेला.' ( मुसलमानांचा डोला हा प्रेतवाहनाचें प्रतीक आहे त्यावरून ).

**डोला(ल्हा)रा**—पु. डोल; लहानसा झोंपाळा; देवाचा पाळणा; झुलता देव्हारा. —एभा ९.२६६. 'अंतःकरणाचे डोल्हारीं। आत्मा निजविला श्रीहरी।' —देकृष्णजन्म ७९. [सं. दोला; हिं. डोला ]

**डोलावा**—पु. झोंका; तरंग; हेलकावा. 'बहिणी म्हणे येती सुखाचे डोलावे। जाणती अनुभवें जाणते जे।' —ब ४५. [डोलणें]

**डोली**—स्त्री. १ अशक्त, आजारी माणसास, बायकामुलांस नेण्याकरितां उपयोगांत आणावयाचें वाहन; पाळणा; डोंगर, घाट चढण्याउतरण्यासाठीं पूर्वीं अशा डोल्या असत. 'डोलीमाजी घातली तेधवां। कृष्ण दर्शनें तारावया।' —जै ६.५९. २ मेणा; पालखी; सुखासन. ३ ( हेट. नाविक ) घामत बाहेर टाकण्यासाठीं पेटीसारखी केलेली जागा. [ सं. दोली ]

**डोलीधारा**—स्त्रीपु. मासे मारण्याकरितां डांभे रोविलेले असतात त्यावरील कर. [ डोली+धारा=कर ]

**डोस**—पु. औषधाचें प्रमाण; मात्रा. डोज पहा. [ इं. ]

**डोसकी-कें**—नस्त्री. डोकसी; डोई पहा.

**डोह**—पु. नदी, तळें यांतील खोल भाग; खळगा; खोल पाण्याची जागा. —अ. काळा या शब्दास अतिशयोक्ति, आधिक्य दर्शविण्यासाठीं जोडण्यांत येणारा प्रत्यय. 'यमुनेचें पाणी काळें डोह आहे.' [ सं. संदोह ] **डोहांत पडणें**—संकटांत, पेंचांत सांपडणें. **म्ह०** डोहाच्या जागीं डोहो पडतील=कांहींहि सोंग केलें तरी माणसाचें खरें शील बाहेर पडणारच (खोटयाच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव सरतेशेवटीं बसेलच बसेल).

**डोहण**—न. १ ( कों. ) डोह; पाण्याचें डबकें; तळें. २ (ना.) डोणगें; गुरांना पाणी पिण्याकरितां बनविलेलें झाडाच्या खोडाचें पात्र.

**डोहणा**—पु. १ (कों.) अडथळा; विरोध; मोडता; विघ्न (चालू कामांत आणलेलें). ( क्रि० घालणें ). २ गोंधळ; बंड. 'मोंगलांचे मनांत राज्यांत डोहणा करावा असा आहे.' —पेद २०.१२८. ३ टोमणा.

**डोहन**—न. ( व. ) दोन छपरांच्या जोडावर ( मध्यें ) बसविण्याचा पन्हळ.

**डोह(हा)र**—पु. ढोर; कातडें रंगविणाऱ्या चांभारांची एक जात. ढोर पहा. 'जीनगर सलतानगर चर्मक। डोहर भाट बुरुड रजक।' —स्वादि ६.५.३८.

**डोहरा**—पु. नदी, ओढा इ०कांत पाण्यासाठीं खणलेला खड्डा. डवरा, डहुरा पहा.

**डोहलोटी**—स्त्री. ( व. ) ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा.

**डोहळणें, डोहळा**—ढवळणें; ढवळा पहा.

**डोहळतुली**—स्त्री. डोहाळे लागलेली गरोदर स्त्री. [डोहळा]

**डोह(हा)ळा**—पु. १ गर्भवती स्त्रीची वासना; इच्छा. 'वसिष्ठ म्हणे रायासी। धर्ममर्यादा आहे ऐसी। डोहळे पुसावे स्त्रियांसी। मागती त्यांसी तें द्यावें।' —भारा—बाल ४.३४. २ अयोग्य इच्छा; भलत्या गोष्टीवर वासना जाणें; छंद; हौस; शोक. ( क्रि० पुरणें; पुरविणें ). 'कैसे प्राप्तीचिये वेळे। निदैवा अंधळेपणाचे डोहळे।' —ज्ञा ६.७३. [सं. दोहद; प्रा. डोहला] **भिकेचा डोहळा आठविणें**—ज्यामुळें भीक मागावी लागेल असें ढंग करणें; व्यसनापायीं उधळेपणा करणें. **म्ह०** पोराचें चिन्ह डोहाळ्यावरून ओळखावें. **डोहळे(हाळ)जेवण**—न. डोहाळतुलीला मेजवानी. पहिल्या गरोदरावस्थेंत स्त्रीला डोहाळे लागूं लागले म्हणजे ( हल्लीं सातव्या महिन्यांत ), सुवासनींना बोलवून भोजनसमारंभ करतात तें.

**डोहा(हो)र**—पु. डोहर, ढोर पहा. 'डोहोर लोहार दासी बलुती बारा। उपदेशिती फारा। रांडा पोरें।' —तुगा ४०८.

**डोहारणें**—क्रि. (ना.) १ माल वाहून नेणें. २ (ना.) लबाडीनें दुसऱ्याची वस्तु लांबविणें.

**डोहो, डोहोण, डोहोणा, डोहोरा, डोहोळणें, डोहोळतुली, डोहोळा, डोहोळेजेवण**—डोह इ० पहा.

**डोळ**—पु. टरफल असलेली डाळ; अर्धवट भरडलेली, सडलेली डाळ; भरडा; चोख डाळीमध्यें क्वचित् सालासकट राहिलेल्या डाळिंब्या. —न. ( मनांतील डोळ ) संशय; वहीम; किंतु. ( क्रि० पडणें; येणें ). [ डोळा. वेप्रा. डोल=डोळा, जंतु, फल ]

**डोळ**—स्त्री. मासे धरण्याचें मोठें जाळें. हें समुद्रांत पुरलेल्या मेढयांनां लावितात.

**डोळकर**—पु. पालखी वाहणारे. डोलकर पहा. [डोली+कर]

**डोळझां(ढां)पणें**—न. ( कों. ) घाणा, रहाट वगैरेस जुंपला असतांना रेडा, बैल, यांच्या डोळयाला घालावयाची झांपणी; घोडयाची अंधारी. 'डोळझांपणें लावून मुद्दाम आडरानांत शिरण्यास जेव्हां मंडळी तयार झाली ...' —टि ४.२०९. [ डोळे+झांपण, ढापण ]

**डोळमीट**—न. भोंक पाडण्याचें एक लहान हत्यार; गिरमिट. [ इं. गिम्लेट ]

**डोळवस**—पु. डोळसपणा. ' आत्मा स्वयंप्रकाश । जेणें जन होय डोळस । तया डोळया डोळवस । ' विपु ७.११६.

**डोळस**—वि. १ डोळे, दृष्टि शाबूत असलेला. ' कां डोळसाचे धरूनि कर । अंधळा सत्वर चालतसे । ' २ (ल.) चतुर; हुषार; चलाख; काकदृष्टीचा; दूरवर दृष्टि पोंचविणारा; सूक्ष्मदृष्टि; चाणाक्ष. ' ज्ञान जी तुझेनि डोळस । ' –ज्ञा १४.१०. ३ तीक्ष्ण दृष्टीचा. 'म्हणे ऐक सकुमार राजसे । चंपककलिके परम डोळसे । ' ४ सुंदर डोळ्याचा. ' रंगा येई वो विठाई । सांवळिये डोळसे । ' –तुगा २८२. ५ स्वच्छ; प्रत्यक्ष. 'तें ज्ञान नोहे जाणावें । डोळस तम । ' –ज्ञा १८.५८१. ६ (थट्टेनें) डोळ असलेली (डाळ, वरण इ०). [डोळा] **डोळसता**–स्त्री. डोळे असणें; दृष्टि. ' देखणेपणेंवीण डोळसता । तोची माथां स्तबक । ' –एरुस्व १.६६. **डोळस वरण**–वि. डोळानें युक्त अशा डाळीचें वरण.

**डोळा**—पु. १ रंग, रूप वगैरे जाणण्याचें इंद्रिय; नेत्र; दृष्टि; नयन; नेत्रेंद्रियाचें स्थान. २ दृष्टि; नजर; लक्षः कटाक्ष. ३ लहान भोंक; छिद्र (कापड, भांडें इ० चें). ४ मोराच्या पिसाऱ्यावरील डोळ्याच्या आकाराचें वर्तुळ; नेत्रसदृशचिन्हः चंद्र; चंद्रक. ५ अंकुर, मोड फुटण्याची, येण्याची जागा (बटाटा, ऊंस, नारळ इ० स). ६ पायाच्या घोटयाचें हाड; घोटा. ७ गुडघ्याच्या वाटीजवळ दोन खळगे असतात ते प्रत्येक. ८ माहिती सांगणारा; ज्ञान देणारा (माणूस, विद्या इ०); बातमीचा, ज्ञानाचा उगम (शास्त्र, कागदपत्र, हेर, गांवचा महार इ०). ' धर्माधर्म ज्ञान समजण्याचा डोळा धर्मशास्त्र.' 'पांढरीचे डोळे महार.' ९ माशाच्या पाठीवरील खवला; सीताफळ, रामफळ, अननस इ० फळावरील खवला, नेत्राकार आकृति. १० (खा.) १६ शेराचें माप; परिमाण. एकतृतीयांश पायली (४८ शेरांची). १२ डोळे=एक माप व ६० मापें=एक साट). ११ कुंभाराच्या चाकांतील एक खांच. १२ (सोनारी) जिन्नसाच्या इतर अंगापेक्षां तोंडाशीं किंचित वाटोळा व डगळ असणारा भाग. १३ दुर्बिणीचें आपल्याकडे असलेलें भिंग. १४ जात्याचें तोंड. १५ मोटेस बांधावयाचें लाकण. १६ (विटीदांडू, कर). आर डाव; वकट, लेंड इ० मधील डोळयावरून विटी मारण्याचा डाव. (क्रि० मारणें). [देप्रा. डोल] (वाप्र) **डोळा उघडत नाहीं**–एखाद्या, गर्विष्ठ मगरूर माणसावद्दल किंवा पाऊस एकसारखा पडत असल्यास म्हणतात. **डोळा ओळखणें**–दुसऱ्याच्या मनाचा कल समजणें, आशय, अभिप्राय ताडणें. **डोळा काणा असावा मुलूक काणा असूं नये**–दृष्टीला अंधत्व असलें तरी चालेल परंतु अव्यवस्था असूं नये. **डोळा घालणें-मारणें**–१ डोळा मिचकावून खूण करणें. २ आपलें प्रेम व्यक्त करण्यासाठीं एखाद्या (बाई)कडे पाहून डोळे मिचकावणें. **डोळा चुकविणें**–दृष्टीस न पडणें; भेट घेण्याचें टाळणें; नजरेला नजर भिडूं न देणें. **डोळा ठेवणें**–एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा करणें. **डोळा जाणणें–समजणें–ताडणें**–मनांतील गोष्ट जाणणें. **डोळा देणें**–बारीक नजर ठेवणें. ' गृध्रासम डोळा दिधला. '–संग्रामगीतें ४१. **डोळा न फुटे काडी न मोडे या रीतीनें करणें**–अगदीं लक्षपूर्वक, कौशल्यानें काम करणें. **डोळा पाहणें**– डोळे वटारून पाहणें. **डोळा प्राण ठेवणें**–डोळयांत प्राण ठेवणें पहा. ' माझी माता शोकें करून । डोळां प्राण ठेवील कीं । ' **डोळा बांधणें**–दुसऱ्या झाडाच्या फांदीला सालीमध्यें खांच करून निराळया झाडाचा डोळा कापून बसविणें. **डोळाभर झोंप**–चांगली झोंप. **डोळे उगारणें – गुरकावणें** – डोळे वटारणें. **डोळे उघडणें** – आपलें कर्तव्य, हिताहित वगैरेकडे लक्ष वेधणें; सावध होणें. अनुभवानें; चट्टा बसल्यानें; नुकसान झाल्यानें शहाणें होणें. ' आतां तरी याचे डोळे उघडले असले म्हणजे पुष्कळच चांगलें झालें म्हणायचें.' –उषःकाल. **डोळे उरफाटणें – फिरणें – चढणें**– (श्रीमंतीमुळें) मदांध होणें. **डोळे(मोठे, केवढे)करणें**–डोळे वटारणें; रागावून पहाणें. ' मी नुसतें त्याचें नांव घेतलें मात्र तों बाईसाहेबांनीं केवढे डोळे केले तें तूं पाहिलेंस ना ! ' –फाल्गुनराव. **डोळे खाणें**–पेंगणें; डुलकी घेणें. **डोळेगांवचीं कवाडें लागणें**–(मी, तो इ०) अंध होणें. **डोळे चढणें**– (दारूनें, जाग्रणानें, उन्हानें, रागानें) डोळे उग्र दिसणें. **डोळे चढवून बोलणें**–रागानें बोलणें. **डोळे जळणें**–द्वेषामुळें बरें न पाहवणें; जळफळणें. **डोळे जाणें**–अंधत्व येणें. **डोळे झांकणें–ढापणें**–१ मरणें. २ दुर्लक्ष, हयगय करणें; कानाडोळा करणें; डोळझांक करणें. ३ डोळे मिटणें; प्राण सोडणें. **डोळे टळटळीत भरणें**–अश्रूंनीं डोळे भरून येणें. **डोळे तळावणें–खुडकणें**–डोळे लाल होणें, उष्णतेनें बिघडणें. **डोळे ताठणें**–अरेराव, मगरूर बनणें, होणें. **डोळे ताणून पहाणें, डोळे फांकणें**–तीक्ष्ण नजरेनें पाहणें. **डोळे तांबडेपिवळे करणें**–रागानें लाल होणें; उग्र नजरेनें, डोळे फाडून पाहणें. **डोळे निवणें, निववणें–थंड होणें**–एखादी ईप्सित प्रिय वस्तु पाहून समाधान पावणें; कृतकृत्य होणें. 'कृष्णा म्हणे निववले डोळे त्वां बा यदूत्तमा माजे।'–मोऐगिक ३.३१. **डोळे निवळणें**–१ डोळे येऊन बरे होणें; डोळे फिरून पूर्ववत् स्वच्छ होणें. २ (ल.) (वेडानंतर) पूर्ववत् ताळयावर, शुद्धीवर येणें. **डोळे पठारास, पाताळांत जाणें**–आजार, अशक्तता इ० मुळें डोळे खोल जाणें. **डोळे पांढरे करणें**–१ (डोळे पांढरे होईतोंपर्यंत) अत्यंत क्रूरपणाची शिक्षा देणें. २ मृत्युपंथास लागणें. **डोळे पापी**–डोळयांना नेहमीं विलासी, विषयी, कामुक असें मानण्यांत येतें; प्रथम पाप करतात ते डोळेच. **डोळे पाहून वागणें–चालणें**–एखाद्याच्या मनाचा कल पाहून वागणें; तब्येत ओळखणें. **डोळे पिंजारणें**–

**फिरारणें-फाडणें**-(रागानें) डोळे वटारणें; क्रूर मुद्रा करणें; **डोळे पुसणें**-१ रडावयास लागणें; वाईट वाटणें. २ सांत्वन करणें. **डोळे पांढळणें**-डोळे खोल जाणें. **डोळे फाटणें**-१ आशा जास्त जास्त वाढणें; महत्त्वाकांक्षी बनणें. २ आश्चर्यचकित होणें. **डोळे फाडणें**-१ रागावणें; डोळे वटारून पाहणें. २ अंतकाळीं डोळे निश्चल उघडे ठेवणें; डोळे थिजणें. **डोळे फिरणें**-१ घेरी, चक्कर येणें. २ (ल.) मगरूर, उन्मत्त होणें. ३ (मरण-समयीं) डोळे फिरवूं लागणें. ४ (करारासंबंधीं) बेत फिरणें; मत बदलणें; माघार घेणें. **डोळे फिरविणें**-(रागानें) डोळे वटारणें. चेहरा उग्र करणें; अवकृपेनें पाहणें. **डोळे फुटणें**-१ अंध होणें; डोळे जाणें. २ दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून मत्सरग्रस्त होणें. **डोळे फोडून वाचणें**-लक्षपूर्वक वाचणें. **डोळे बांधणें**-१ भारणें; नजरबंदी करणें (जादूटोणा इ०नीं). २ डोळयांत माती फेंकणें; फसविणें. **डोळेभर-डोळयांभर पाहणें, डोळे भरून पाहणें**-तृप्ति होईपर्यंत एखादी वस्तु पाहणें. **डोळे मिटणें**-मरणें; डोळे झांकणें. 'आदिमाये, माझ्या डोळयांनीं हें पाहण्यापूर्वी माझे डोळे कां मिटले नाहींत.'-बाय ५.२. **डोळे मुरडणें**-१ वांकडी नजर करून, संशयित नजरेनें पाहणें. २ काण्या डोळयानें पाहणें; एके बाजूस पाहणें. 'डोळे मुरडुनि सहज बघे ती।' -शाकुंतल अंक २. **डोळे मोडणें-मारणें**-१ डोळे मिचकावणें; डोळयानें खुणा करणें. 'डोळे मोडून वांकुल्या दावी। घुलकावित मान पै।' २ ऐटीनें, चोखंदळपणानें डोळे उचलणें, वर करणें; नखऱ्यानें पाहाणें. **डोळे येणें**-अंधत्व जाऊन दृष्टि प्राप्त होणें. **डोळे येणें-विणें**-डोळयांस रोग येणें. **डोळे लवणें**-डोळयाच्या पापणीचें स्फुरण होणें (शुभाशुभसूचक). पुरुषांचा उजवा व बायकांचा डावा डोळा लवणें हें शुभसूचक लक्षण समजतात. **डोळे लाल करणें-वटारणें**-१ रागावणें. २ एखाद्यावर उलटणें. **डोळे होणें**-माहिती होणें-सावध होणें (कामधंदा, अभ्यास इ० संबंधीं). **डोळ्या आड**-नजरे पलीकडे, पाटीमागें **डोळयांचा अंधार करणें**-उजेडांत चुकणें; धडधडीत चूक करणें. **डोळयांचीं खोगरें-डोळयांच्या खांचा-डोळयांची भिंत होणें**-कांहीं एक दिसेनासें होणें; दृष्टि जाणें. **डोळयांचें पारणें फिटणें-होणें**-उत्कंठेनें अपेक्षिलेली वस्तु पहावयास मिळणें; फार दिवस इच्छिलेली गोष्ट घडून येणें. **डोळयांच्या वाती करणें**-डोळे ताणणें; डोळयांनीं जास्त काम करणें. **डोळ्यांत कुरूप-कुरंद असणें**-असूया वाटणें; एखाद्याविषयीं मत्सरग्रस्त असणें. **डोळ्यांत-खुपणें-सलणें**-१ डोळयांस वेदना होणें. २ (ल.) मत्सरग्रस्त होणें; द्वेषबुद्धियुक्त, कलुषित मन असणें (दुसऱ्याचे गुण, धन इ० पाहून) **डोळ्यांत गंगाजमना येणें-डोळे भरून येणें**-रडूं येणें. **डोळ्यांत जहर उतरणें**-दुसऱ्याचें वैभव इ० पाहून हेवा वाटणें; डोळयांत सलणें, खुपणें. **डोळ्यांत तेल घालून जपणें**-अतिशय काळजीनें जपणें; लक्ष देणें; काळजी घेणें. **डोळ्यांत तेल घालून पाहणें**-सूक्ष्म नजरेनें पाहणें; पाळत ठेवणें; बारीक चौकशी करणें. **डोळ्यांत धूळ, माती घालणें-फेकणें**-फसविणें; नजरबंद करणें. **डोळ्यांत पाणी असणें**-लाज वाटणें; विनय, मर्यादा असणें. **डोळ्यांत पाणी नसणें**-लाज न वाटणें; आदर न वाटणें; निर्लज्ज बनणें. **डोळ्यांत प्राण ठेवणें**-एखादी गोष्ट पाहिल्यावर मग मरावयास तयार असणें; मरणापूर्वी एखाद्या गोष्टीची इच्छा धरणें. **डोळ्यांत प्राण येणें-उरणें**-१ मरणाच्या द्वारीं असणें. २ इच्छित वस्तु (माणूस इ०) पाहण्या-मिळण्याकरतांच केवळ फक्त प्राण गुंतलेले असणें. **डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नाहीं**-अतिशय, निबिड काळोख पडला असतां म्हणतात. **डोळ्यांत भरणें**-१ दृष्टीला आनंद, संतोष देणें. २ पटणें; मान्य होणें. **डोळ्यांत माती पडणें**-मत्सर वाटणें; द्वेष करणें. **डोळ्यांत मावणें-समावणें**-(डोळयांनीं खाल्ला जाणें) रागानें पाहण्यानें घाबरून जाणें. (नकारार्थी वाक्यांत उपयोग करतात). 'तूं किती डोळे ताणलेस तरी मी कांहीं तुझ्या डोळयांत मावणार नाहीं.' **डोळ्यांत वात घालून बसणें**-तातकळत, वाट पहात मार्गप्रतीक्षा करणें. **डोळ्यांत शरम नसणें**-निर्लज्ज बनणें. **डोळ्यांत हराम उतरणें**-एखाद्याच्या दृष्टीनें वाईट असणें. **डोळ्यांतील काजळ चोरणें**-पाहतां पाहतां चोरी करणें. **डोळ्यांतून उतरविणें**-अपमान करणें. **डोळ्यांतून पाणी काढणें**-रडणें; अश्रु गाळणें. 'असें वारंवार डोळयांतून पाणी काढीत राहूं नये.' -रत्न ४.४. **डोळ्यांनीं उजेडणें**-सारी रात्र जागून काढणें. **डोळयानीं मारणें**-प्रेमकटाक्षांनीं प्रहार करणें; प्रेमकटाक्ष टाकणें. **डोळयांनीं रात्र-दिवस काढणें**-एकसारखें जागत बसून रात्र-दिवस घालविणें. **डोळ्यानें भुई दिसेनाशी होणें**-उन्मत्त होणें (संपत्ति इ०नीं). **डोळयांपुढें काजवे चमकणें**-भोंवळ येण्याची भावना होणें; घेरी येणें. **डोळ्याला पाणी येणें**-अश्रूंनीं डोळे भरणें; वाईट वाटणें. 'आलें डोळयाला बहु वर्षाकालीं जसें नदा पाणी।' -मोशल्य ३०.२०. **डोळ्यांवर कातडें ओढणें**-१ एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें. २ बेदरकारपणें, बेफामपणें वागणें. **डोळ्यावर धूर येणें-धुरानें डोळे भरणें**-(अधिकार, संपत्ति इ० नें) ताठणें; फुगून जाणें. **डोळ्यांवर पडळ-मांद येणें-चढणें**-गर्वानें अंध होणें; गर्वानें कोणास न जुमानणें. **डोळ्यांवर येणें**-१ डोळयांत सलणें. २ (कीर्ति, पैका यांनीं) पूर्णपणें फुगून जाणें; धुंद होणें. **डोळ्याशीं डोळा मिळविणें-भिडविणें**-(एकमेकांकडे पाहणें) नजरेशीं नजर भिडविणें; उद्धटपणानें टक लावून पाहणें. **डोळ्याशीं डोळा लागणें**-झोंप येणें, झोपेनें

डोळे मिटणें. **डोळ्यांस टिपें येणें**–डोळयांत अश्रू येणें. **डोळ्यांस पाटा(पट्टा)बांधणें**–डोळे मिटणें; कानाडोळा करणें; न पाहिल्यासारखें करणें. **डोळ्यांस पाणी लावणें**–अनुकूल करून घेणें; संतोषविणें. 'आतांशा उगेच बाबाच्या डोळयांस पाणी लावण्यासाठीं इकडे येते.' –रत्न ३.३. **डाव्या डोळ्यानें**–१ तिरस्कारानें. 'डाव्या डोळयानें तुमच्याकडे पाह्याचेसुद्धां नाहींत.' –झांमू ६१. २ चोरून, वांकडया नजरेनें. **दोहीं डोळयांची मुरवत राखणें**–एखाद्याकडे पहावयास, नजर भिडवावयास भिणें, कचरणें. **दुसऱ्याच्या डोळ्यांत बोट टपकन जातें–शिरतें**–दुसऱ्याचे दोष चट्कन् कळतात. दोषैकदृष्टीबद्दल वापरतात. **रुप्याचे डोळे होणें**–डोळे पांढरे होणें; मरणोन्मुख होणें. **वांकडया डोळ्यानें पाहणें**–कानाडोळा करून पाहणें. भीतभीत पण उत्कट इच्छेनें पाहणें. **म्ह०** १ दोन डोळे शेजारीं भेट नाहीं संसारी=शेजारीं राहत असूनहि क्वचितच भेटत असलेल्या मित्रांसंबंधीं योजतात. २ डोळयांत केर व कानांत फुंकर=रोग एक व उपाय भलताच! ३ फुटका डोळा काजळानें साजरा=व्यंग झांकण्याचा प्रयत्न. सामाशब्द– **डोळुला**–पु. (लडिवाळपणें) डोळा. 'वाटुली पाहतां सिणले डोळुले। दाविसी पाउलें कैं वो डोळा।' –तुगा ८२९. **डोळे उजेडी**–क्रिवि. १ दिवसा उजेडी; अंधार पडण्याचे पूर्वीं; उजेड आहे तों. 'डोळेउजेडीं घरीं ये.' २ स्पष्टपणें; उघड; तोंडावर; आड पडदा न ठेवतां. 'तुझे मनांत काय तें डोळेउजेडी सांग.' [डोळा+उजेड] **डोळे झांक–की**–स्त्री. मुद्दाम दुर्लक्ष; कानाडोळा; हयगय; उपेक्षा. [डोळे+झांकणें] **डोळे झांकणी, डोळे झांकण्याचा खेळ**–स्त्रीपु. एक खेळ. **डोळे झांकणें–झांपणी–ढाळणें–ढांपणें–बांधणें**–नस्त्री. बैलाच्या डोळयावरची झांकणी; ढापणी. **डोळे फुटका**–वि. दृष्टि गेलेला; आंधळा. **डोळेफोड**–स्त्री. १ बारीक पाहणी, चौकशी; तीक्ष्ण नजर. २ डोळे त्रासले जावयाजोगी किचकट कामामध्यें मेहनत. –वि. १ डोळयांस त्रास देणारें (कलाकुसरीचें, बारीक काम). २ डोळयास हिडिस दिसणारी; ओंगळ (वस्तु). ३ डोळयांत भरणारी पण निरुपयोगी सुंदर पण टाकाऊ. 'ही गाय डोळेफोड मात्र दिसत्ये पण दूध तादृश नाहीं.' [डोळा+फोडणें] **डोळे भेट**–स्त्री. १ शेवटची भेट (मुलाची व मरणोन्मुख आईबापांची भेट); नुसतें एकदां शेवटचें डोळयांनीं पाहणें. २ ओझरती, उभ्या उभ्या भेट; घाईची भेट. ३ नजरानजर; दृष्टीस पडणें. 'डोळेभेट तरी दुरून देत जा नको करूं हयगय।' –होला १५१. **डोळे मिचका–क्या**–वि. डोळेमिचक्या; डोळे मिचकावणारा. **डोळेमोड**–स्त्री. नेत्रसंकेत; डोळे मिचकाविणें. **डोळेमोडणी**–वि. डोळे मोडणारी (मूढ होऊन); डोळे फिरविणारी. 'चौघी डोळेमोडण्या। लाजोनियां तटस्थ।' –ह ३.५. **डोळेलासु**–वि. डोळयांत अंजन घालणारा; वठणीवर आणणारा. 'साभिमानिआ देवां डोळेलासु।' –शिशु १५६. [डोळा+लासणें=डाग देणें] **डोळ्याचा त्रास–दाब**–पु. डोळयानें भीति घालणें; दाबणें; भेदक नजर. **डोळ्याचा पडदा**–पु. डोळयावरचें आवरण; नेत्रदोष. **डोळ्याचा मद**–पु. डोळयाची लाली, लालबुंदपणा (मद्यपान, क्रोध, गर्व इ० मुळें). **डोळ्याची खूण**–स्त्री. नेत्रकटाक्ष, संकेत. 'तुमच्यापैकीं कोणी तरी बाईनें डोळयाची खूण करून त्याला तेथून बाहेर काढला असेल.' –बाय २.१. **डोळ्याची जीभ**–स्त्री. पापण्यांच्या आंतील बाजूस अस्तराप्रमाणें असणारी त्वचा. **डोळयांतलें काजळ चोरणारा–नेणारा**–पु. वस्ताद; अट्टल चोर. –वि. अतिशय कुशल; हुषार; धूर्त. **डोळयादेखत–तां, डोळयापुढें**–क्रिवि. १ डोळयांसमोर; प्रत्यक्ष. 'माझ्या डोळयांदेखत तो निसटला.' २ प्रत्यक्ष; स्वतः पाहिल्यापैकीं; स्वतःच्या आयुष्यांतील, अनुभवांतील; जिवंतपणीं. 'म्हातारीचे डोळयादेखत पोराचें लग्न होतें म्हणजे बरें.' **डोळयांभर**–क्रिवि. डोळे भरून; अवलोकनानें नेत्र तृप्त करून (पाहणें); दृष्टि संतुष्ट करून. **डोळ्यांमागें–परभारें**–क्रिवि. पाठीमागें; गैर हजेरींत; अप्रत्यक्ष.

**डोळाफोडी**–पु. १ एका पक्षाचें नांव. २ मोठ्या जातीचा टोळ.

**डोळी**–स्त्री. डोली पहा. 'त्यजुनि विमानें ज्ञाता वरुनि करिल केविं यान डोळयातें।' –मोवन ६.१५.

**डोळू**–पु. १ छिद्र; भोंक (भाडें, कागद, कापड इ०स पडलेलें). २ भगदाड; भोंक (कुंपणास पडलेलें). [डोळा] **डोळूक**–पु. १ डोळ पहा. २ साप; मासा इ० चें डोकें.

**डौ**–पु. नारळाच्या डोळयावर भोंक पाडून आंतील खोबरें कोरून काढून केलेलें भांडें. डहूः डव पहा.

**डौंक–ख**–स्त्री. १ पीठ वगैरे घेण्याकरितां केलेली बचक; मूठ; पालथी ओंजळ. अशा प्रकारें घेतलेला पदार्थ; तेवढें माप, प्रमाण. डवक पहा.

**डौंकणें**–अक्रि १ डोळे वटारणें; मगरूरीच्या, धाकाच्या नजरेनें पहाणें. २ अतिशय क्षुब्ध होऊन, आवेगानें पाहणें (घोडयानें घोडीकडे); (दुसऱ्या घोडयावर) असूयेनें धावणें.

**डौंख**–पु. मत्सर; दावा; हेवा; डंख अर्थ २ पहा. (क्रि० धरणें; राखणें). [सं. दंष]

**डौंचणी**–स्त्री. टोचणी. [डौंचणें]

**डौ(डौं)चणें**–उक्रि. १ टोंचणें; बोचणें; भेदणें. २ (ल.) उठविणें; चेतविणें; उद्युक्त करणें. ३ टोंचून सूचना देणें; डवचणें पहा.

**डौंड, डौंडी**–स्त्री. डौंडी; दवंडी पहा. 'तंव डौंडीची वीरघंटा। सनसनिती जेगटां।' –शिशु ५२२.

**डौंडिंचें**—न. नगारा, डिंडिम. ' विरंचियेंचें डौंडिंचें बाजे । ' –शिशु ३५७.

**डौत**—स्त्री. दौत पहा.

**डौर**—पु. १ डमरु; एक वाद्य. याचा आकार मध्यें बारीक व रुंद तोंडाच्या मापी अच्छेरासारखा व दोन्ही तोंडें कातड्यानें मढविलेलीं असून तीं बारीक सुतळीनें जोडलेलीं असतात. वाद्याचा स्वर चढा करण्याच्या कामीं या सुतळीचा उपयोग होतो. ' याजसाठीं डौर म्यां धरियेले हातीं । तुका म्हणे तुम्ही गांठी सोडायाची खंती । ' –तुगा २९४. २ लहान मुलाचें खुळखुळा इ० खेळणें. हें डमरूच्या आकाराचें असतें. ३ गलबतावर नांगर वगैरे ओढून घ्यावयाचें यंत्र; गलबत किनाऱ्यावर ओढण्याचें यंत्र; डेकरी; हात ४ डमरूच्या आकृतीची कळाशी; दोन लांकडें अथवा फरशीचे दोन दगड एकत्र जोडण्याकरितां केलेला लोखंडाचा सांधा. ०कार–वि. डौर वाजविणारा भिकारी.

**डौर**—पु. झगा. 'केली विजार वरि डौरहि मौन सेवी ।' –र१०.

**डौर**—पु उपहास. ' ते आइकोनि डौर वाहे । विद्वांसु जो । ' –ज्ञा १३.८२५.

**डौरण**—न. कोळपणें –शर.

**डौरणें**—अक्रि. १ शोभणें; सजणें; डौलदार दिसणें ( वस्त्रालंकार, बहरः फुलें इ०नीं ). ' डौरली हे काया कृपेच्या वोरमें । नव्हे अनारिसें उद्धरलों । ' –तुगा २१७९. २ ( इतर अर्थी ) डवरणें पहा.

**डौरा**—पु. ( व. ) कोळपें; डवरा पहा.

**डौरा, डौहरा**—डवरा पहा.

**डौरी**—पु. डवरी; डौर वाजविणारा; गोंधळी; डौर वाजवून भिक्षा मागणारा; डवरी जात. [ डौर ]

**डौरी, डौऱ्याजोशी**—पु. डाकोता पहा.

**डौरीगोसावी**—पु. डौर वाजविणारे गोसावी; डवरी गोसावी पहा. हा खेड्यांतील एक अलुतेदार असतो.

**डौल**—पु. १ आकार; आकृति; ढब; घाट. ' त्या भांड्यापेक्षां या भांड्याचा डौल चांगला उतरला.' २ तऱ्हा; हातोटी; पद्धत; चाल ( भाषण इ०ची ). ३ मांडणी; घटाव; खुणा; चिन्हें; आडंबर. ( क्रि० घालणें; मारणें ). ' पावसानें डौल चांगला घातला. ' ४ ऐट; वढाई; भपका; तोरा; बढाया मारणें; चकपकपणा; थाटमाट. ५ दिखाऊपणा; रिकामा आव; डामडौल. ( क्रि० मिरविणें; दाखविणें ). ६ दौलत. ' तुमच्या कुल डौलाची दिवाणगिरी. '–वाडमा १.१४६. ७ मानमान्यता; प्रतिष्ठा. ' दरबारांत त्याचा डौल बरा आहे. ' ८ हुल्कावणी; आव. ' तेव्हांपासून नानांनीं राक्षसी कपट डौल दाखविले । ' –ऐपो ३९५. [ अर. डौल् ] ०डाम–डामडौल पहा. डौल अर्थ ३ ते ५ पहा. ०दार–वि. चांगल्या घाटाचा, आकृतीचा; सुंदर; सुबक; मोहक कृतीचा. **डौलामिया**–पु. डौली; डौलदार माणूस; शेखी मिरविणारा; बढाईखोर माणूस; ऐट करणारा, दिमाख दाखविणारा, अवडंबर माजविणारा माणूस. **डौली**–वि. डौलदार; ऐटबाज; बढाईखोर; छानछोकीचा. [ डौल ]

**डौल**—पुन. सही शिक्क्याचा कोरा कागद. डौलपत्रक पहा.

**डौला–ली**—पुस्त्री. डवला, डवली पहा.

**डौशीर**—डवशीर पहा.

**डौळ**—न. १ भरून द्यावयाचा फॉर्म, नमुना; सही–शिक्का केलेला कोरा कागद. २ लिखाणांत सुटलेली जागा ( सही करणारानें भरावयाची ) भरून काढणें. ३ वसुलाचा अंदाज, अजमास. [ अर. दौल् ] ०पत्रक–न. १ रकानें भरून द्यावयाचा कोरा फॉर्म, कागद. २ ( गुन्हे व वसुली न झाल्यामुळें ते ) रकाने कोरे ठेवून धाडलेलें हकीगतपत्रक.

**ड्रॉइंग**—न. रेखाकला; चित्रण; चित्रकला. [ इं. ]

**ड्रील**—स्त्री. कवाईत. [ इं. ]

**ड्रेनेज**—न. घाण पाणी, मलमूत्र इ० वाहून नेण्याचा नाला, गटार. [ इं. ]

---

# ढ

**ढ**—वर्णमालेंतील चवदावें व्यंजन. अक्षरविकासः—नागरी लिपीच्या वर्णमालेपैकीं ढ हें एकच अक्षर असें आहे कीं जें आपल्या मूळ स्वरूपांतच अद्यापीहि बहुतेक जसेंच्या तसें कायम आहे. मात्र प्रचलित ढचा शिरोभाग मूळच्या अक्षराहून अधिक बांकदार झाला आहे.

**ढ**—वि. १ अशिक्षित; अज्ञानी; अक्षरशत्रु. २ मठ्ठ; मूर्ख; ज्यास व्यवहारचातुर्य नाहीं तो. ' मोठा ढ जरी असला तरी वरचेवर डोळ्यांसमोरून व कानांवरून जाणाऱ्या गोष्टी त्याचे मनांत कांहींनाकांहीं तरी बिंबतीलच. ' –नि. [ गाढव चा संक्षेप ? ]

**ढई**—स्त्री. १ जोराचा व नेटाचा प्रयत्न; त्रास घेणें. २ जबर व्यासंग, लक्ष. (क्रि० देणें). ३ पुष्कळ दिवस ठाणें देणें; लोंचटपणें चिकटून राहणें ( पै–पाहुण्यानें ). ( क्रि० देणें ). ४ (व.) बुडी. ( क्रि० देणें; मारणें ).

**ढक**—ढग पहा.

**ढक**—पु. १ एकदम आवाज होऊन ढांसळणारा भाग (इमारत, नदीतीर, टेकडी इ०चा ). २ असा ढांसळून खालीं पडलेला ढीग.

**ढंक**—वि. फाजील, प्रमाणरहित उंच; मोठा; विस्तृत (मनुष्य, झाड, इमारत ). [ ढांग ]

**ढकढक-ढकां**—क्रिवि. ढगढग-ढगां. डकडक-डकां पहा.

**ढकल**—स्त्री. १ निष्काळजीपणानें, कसें तरी, वरवर केलेलें काम; चालढकलीचें काम. २ एखादें काम लांबणीवर, दिरंगाईवर टाकणें; आज-उद्यां असें करीत लांबविणें. ३ आग्रह; बळजबरी; ढकलणें. 'ढकल करुन कैसें धाडिलें द्वारकेसी।' -सारुह ७.२५. [ढकलणें]

**ढकलणी**—स्त्री. (क.) गाडी ओढतांना बैल विशेष मागें सरकूं नये म्हणून साटाऱ्यास जो आडवा वेळू बांधतात तो; ढकली. पुढच्या बाजूनें गाडींत बसतांना पाय देऊन चढण्यास याचा उपयोग होतो. [ढकलणें]

**ढकलणें**—सक्रि. १ रेटणें; सारणें; लोटणें (पुढें, दूर, बाजूस इ०). 'धरतिल, हय भय जरि तरि मम रथ तदभिमुख बा ढकल हातें।' -मोभीष्म ८.३९. २ (ल.) घाईनें, निष्काळजीपणानें धाडणें; उरकणें; लोटणें; चालढकल करणें (काम, धंदा यांची). ३ मोठ्या संकटांत, अडचणींत असतां कसे तरी (वर्षे, दिवस) काढणें; काळ कंठणें; संसारादिक खटलें चालविणें. ४ विवक्षित पदार्थसमुदायांत एखादा अविवक्षित पदार्थ घालणें, घुसडून देणें. 'पुणें चलनी शंभर रुपयांत दोन अलीबागी ढकलून द्या.' ५ अधिकारच्युत करणें; काढून टाकणें. ६ (करावयाचें काम) एकमेकांवर लोटणें; टोलवाटोलवी करणें; कोलणें. -अक्रि. १ वाळणें; खंगणें (शरीर). २ खलास होणें; (प्लेग, मरी इ० रोगानें) मरणें. ३ तोलणें; कोसळणें; ढांसळणें (इमारत, रास). [सं. ढौकू? हिं. ढकेलना] **ढकल-गुजर-गुजरण-गुजराण-गुजारा-री**-स्त्रीपु. १ कसा तरी उदरनिर्वाह करणें; (संकटांत अडचणींत) दिवस कंठणें. २ चालढकल. [ढकलणें+फा. गुज़रान्; म. गुजराण]

**ढकलचंद, ढकलपंचपांशी, ढकलापा, ढकल्या**—वि. निष्काळजी; दडप्या; बेजबाबदारीनें, घाईनें कसें तरी काम करणारा; (कामाधंद्यांत) चालढकल करणारा; ढकलपट्टी करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा. [ढकलणें]

**ढकलनंद-नंदन**—पु. १ आपलें काम दुसऱ्यावर टाकणारा, ढकलणारा; कामचुकार. २ ढकलचंद पहा.

**ढकलपंचविशी**—स्त्री. आपलें काम दुसऱ्यावर लोटणें, टोलविणें; चुकवाचुकवी (कामाची).

**ढकलपंच्यायशी**—स्त्री. उधळपट्टी; रेलचेल; पराकाष्ठा; सढळपणा (खर्चाचा, बोलण्याचालण्याचा, कामाचा).

**ढकलपट्टी**—स्त्री. १ (दिवस, महिने, वर्षे, काल) घालविणें; रेटणें; (संकटांत, हालअपेष्टांत) दिवस कंठणें. २ दुसऱ्यावर काम ढकलणें; चुकवाचुकवी; टोलवाटोलवी. ३ आजचें काम उद्यांवर टाकणें; लांबवणी; चालढकल. [ढकलणें+पट्टी]

**ढकलाढकल-ढकली**—स्त्री. १ धक्काबुक्की; रेटारेटी. २ (दिवस, काळ, आयुष्य) संकटांत कंठणें; कसा तरी काढणें. ३ (कामाची) चालढकल; आजचें उद्यावर टाकणें; दिरंगाई; लांबवणी. ४ टोलवाटोलवी; एकानें दुसऱ्यावर काम टाकणें. [ढकलणें]

**ढकली**—स्त्री. १ उतरणीच्या रस्त्यावर बैलांच्या पायास, शेपटीस चाक घसटूं नये, त्यांचें शेण गाडीला लागूं नये म्हणून पुढल्या करळीबरोबर दांडयांना जें आडवें लांकूड बांधतात तें; ढकल. २ चाकांना अडवून धरणारें लांकूड

**ढकशी**—स्त्री. (कों.) समुद्रकांठचा धक्का; ज्यावर लाटा आपटतात ती कांठची भिंत, उंच कट्टा, कडा.

**ढका**—पु. १ धक्का; जोराचा हिसका, हिसडा. 'जो पुढिलाचे ढक्यानीं पडे। तो त्यावरी कोपें वाडे।' -एभा २३.७८०. २ (ल.) दुर्दैवाचा, तापदायक सत्तेचा तडाखा. ३ नुकसान; इजा; नाश; अपकर्ष; ऱ्हास. (क्रि० लागणें). 'मुद्दलास ढका न लागेल असा व्यापार करावा.' [धक्का]

**ढकाडणें**—उक्रि. (कर्ना.) हांकलणें. [धकणें]

**ढकाढक-ढकां**—क्रिवि. १ (ढकढक-ढकां चा अतिशय) अतिशय डुलत; झुकत; हेलकावे खात. २ डुलकी घेत. 'ढकाढक डुकल्या येतात, डोळे झांकतात.'

**ढकार**—पु. (कों.) मोठा, घनदाट मेघ, ढग. [ढक]

**ढकार**—वि. (नंदभाषा) एक हजार. 'सेलू पोकू आणि ढकार। आवारू सांगती सत्वर।' -भवि ४२.४६. ०**वदन**-वि. एक हजार तोंडें असलेला; शेष. 'अठरा वर्णितां नव्हे लेख। तंव ढकार वदनाचा आला देख।' -भवि १८.९२.

**ढंकाळ**—वि. १ लांबटांग्या. २ प्रमाणाबाहेर, अतिशय, उंच; लंबूस. [ढांग] ०**पार्वती**-स्त्री. (निदार्थी) अतिशय उंच स्त्रीसंबधीं योजतात.

**ढकी, ढक्का-क्की**—धकी इ० पहा.

**ढक्कळणें**—अक्रि. (माण.) थकणें.

**ढक्का**—पुस्त्री. नगारा; मोठी नौबत, डमरु; 'ढक्काशूल कपाल सायक करी हांसोनि रोषोत्करी।' -आमा ४७. 'अनेक वाद्यांचे गजर। ढक्का गरजे त्यांत थोर।' [सं.]

**ढक्कू**—न. (माळवी.) आंबट वरण; पातळ आमटी.

**ढग**—पु. मेघ; अभ्र.

**ढग**—स्त्री. पाऊल; पद. (क्रि० टाकणें). [हिं. डग]

**ढग**—स्त्री. उंच जागा. -शर. -वि. फार उंच. [ढांग]

**ढंग**—पु. चाळे; चेष्टा; दुर्व्यसन; अयोग्य क्रम, वर्तन; वाईट नाद, छंद. [हिं.] **आपल्या ढंगावर येणें**-खरें स्वरूप प्रगट करणें; मूळ वळणावर जाणें.

**ढंगडया**—स्त्रीअव. (निंदार्थी) ढंग; चाळे; चेष्टा; खोडया. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). -वि. चेष्टेखोर; ढंगी; व्यसनी. [ढंग]

**ढंगधत्तुरा-धोत्र**—पुन. सोंग ढोंग; चाळे; फसवणूक; गारुड. [ढंग+सं. धत्तूर] **ढंगधोत्रेकरी**-पु. ढंगधत्तुरा करणारा गारुडी; ढोंगी; फसव्या (मांत्रिक, वैदू, गारुडी इ०).

**ढगढग**—स्त्री. उघड रीतीनें निंदा, बेअब्रू; धिडवडा; बदनामी. (क्रि० करणें). (व.) फजिती (एखाद्यास दिवाळ्या, लबाड, लुच्चा इ०). दूषणें देऊन त्याच्या नावाचा केलेला बोभाटा. 'तिच्या जिवाची ढगढग झाली.'

**ढगढग-ढगां**—क्रिवि. १ डळमळत; इकडे तिकडे हलत (खांब, इमारत इ०). २ झुलत; खालवर होत; झोके जात (चालतांना, उंटावर बसलें असतां). ३ (डोकें) डुलत; डुलकी घेत; उघडझांक करीत [ध्व.]

**ढगढगणें**—क्रि. (ना.) १ हलणें. २ पाझर फुटणें.

**ढगल्या**—पु. (चंद्रपुरी) पुढें आपली मुलगी त्यास देण्याकरितां आणून ठेवलेला माणूस; राबत्या.

**ढगळ**—स्त्री १ पाणीपाणी (खरबूज, भोपळा, कोहळा इ० नासल्यामुळें); आंतील बिलबिलीत भाग; वाईट गर. २ (राजा.) पातळ ढाळ; आंव; हगवण. ३ अमांश; अतिसार रोग. (क्रि० लागणें). [ढगळ]

**ढगळ**—पु एका झाडाचें नांव.

**ढगळ**—वि. १ मोठें; मोठ्या आकाराचें (वीं, दाणें, मोतीं, अक्षर; आकृति इ०); ढोबळ; स्थूल. २ ढेकळें असलेली, नांगरलेली (जमीन). ३ उधळया. डगळ अर्थ ५ पहा.

**ढगळ**—वि. उंच; लांब टांग्या. ढांगळ पहा.

**ढगळणें**—अक्रि. १ कुजणें; नासून जाणें; आंतील गराचें पाणी होणें; ढगळ होणें (भोपळा इ०). २ पातळ रेच, ढाळ होणें; हगवण लागणें. ३ शरीर थलथलीत होणें (वात इ० विकृतीमुळें). [ढगळ]

**ढगळा**—पु. (राजा.) फांदी; मोठी डाहळी. डगळा पहा.

**ढगाड-र**—न. मोठा, निबिड ढग. [ढग]

**ढगाढग-ढगां**-- क्रिवि. ढगढग-ढगां पहा.

**ढंगान्या**—वि. (व.) बेढंग्या. [ढंग]

**ढगाळ**—वि. ढगांनीं व्याप्त झालेला; मेघाच्छादित. [ढग]

**ढगाळ**—न. (कु) खेळण्याची मोठी गोटी.

**ढंगी, ढंग्या**—वि. १ छंदी; लुच्चा; दुर्व्यसनी; स्वैरवर्तनी. २ खोडकर; चाळे, चेष्टा करणारा; उपद्रवी. [ढग]

**ढगोजी**—पु. (माण.) महार जातीचा गुरु. याच्या जोडीचा मेघोजी. [ढग]

**ढंढारखाना**—पु. (व.) (तिरस्कारार्थी) अफाट जागा. 'वाडा एवढा ढंढारखाना पडला आहे नि राहणारा एकटा.'

**ढंढेरा**—वि. ढेरपोट्या; पोट सुटलेला.

**ढड्डा**—पु. (ना.) मोठा पतंग.

**ढणढण-ढणां**—क्रिवि. १ खणखण. ठणठण पहा. २ मोठा पेटलेला जाळ, दिवा यांच्या दृश्याचें काल्पनिक आवाजांत अनुकरण; मोठा प्रकाश होई असें (दिव्यानें जळणें); ढळढळ. [ध्व.]

**ढणढणणें**—अक्रि. १ ठणठण वाजणें; खणखणणें; झणझणणें. २ ढळढळ जळणें (दिवा). [ढणढण]

**ढणढणीत**—वि. मोठा; ढळढळीत जळणारा (दिवा); जोरानें पेटणारा, झकझकीत (अग्नि, जाळ).

**ढणढण्णा**—पु. (थट्टेनें) मूर्ख, अक्षरशत्रु पुरुष; ढ माणूस. [ढणढण+अण्णा]

**ढणाढण-ढणां**—क्रिवि. ढणढण-ढणां पहा.

**ढणक्या**—वि. (व.) मोठा (जाळ). [ढण]

**ढप**—स्त्री. ढब पहा.

**ढप(ब)घाई**—स्त्री. डफघाई पहा.

**ढपल**--पु. घोडयाच्या कपाळावरील वाटोळा टिळा. हा मोठा असल्यास शुभ चिन्ह मानतात. -अश्वप १.१०४.

**ढपला-ली**—पुस्त्री. धलपा; तुकडा; ढेपसा; ढलपा (दगड, गिलावा, गुळाची ढेप इ० चा). ढपली हें ढपला याचें अल्पत्वदर्शक रूप आहे.

**ढपळ**—वि. अतिशय मोठा. ढबल पहा.

**ढप(प्प)ळ**—न. पातळ भाजी, आमटी. ०**वणी**-न. १ बरेंच पाणी घालून पातळ केलेलें ताक; याला 'नीरमज्जिगे' (ताकपाणी) म्हणतात. २ पाणचट, बेचव कढी, आमटी इ० ३ घाण पाणी; गरगट. [का. ढपळं+पाणी]

**ढपळशाई**—स्त्री. १ चंगळ; वैपुल्य; उधळपट्टी; उधळपट्टीची राहणी. 'बेताबातानें खर्च करा, ढपळशाई करूं नका.' २ गोंधळ; घोंटाळा; अव्यवस्था; गडबड (कामा-घरदारासंबंधीं). -वि. १ विपुल; फाजील; अवासवा. २ गोंधळी; अव्यवस्थित. (कारभार).

**ढपळा-ळी**—ढपला-ली पहा.

**ढपेला**—पु. नगारा; नौबत. डफ पहा. 'फिरला मोंगलाचा ढपेला।' -ऐपो पृ. २२५. [हिं.]

**ढब**—स्त्री. १ मोठेपणा; ऐट; डौल; भपका; दिमाख (विशेषतः क्षुद्र, लहान गोष्टींचा). २ वागण्याची रीत; चालचलणूक; विशिष्ट ठेवण; पद्धति; मार्ग; तऱ्हा; प्रकार; धाटणी. 'वर्तमानपत्रांतीलच क्षणिक महत्त्वाच्या गोष्टी ...... घटकाभर गप्पा मारण्यास उपयोगी पडण्याकरितां लोक वाचतात व ही ढब पडून

गेल्यामुळें...पुस्तकें मागें पडली.' -नि १५. ३ मोठेपणा; महत्त्व; थोरवी (गर्वामुळें स्वतःला वाटणारी). (क्रि० सांगणें; लावणें; मिरविणें; दाखविणें). [हि.]

**ढबक**—न. (भित इ०) वरून पडलेला गोळा, पदार्थ, ढेकूळ. धबक पहा. [ध्व. ढब]

**ढबक-का**—नपु. मोठा तुकडा; फांक (भोंपळा, टरबूज इ० ची): गुळाचा खडा.

**ढबढब**—स्त्री. अव्यवस्था; दुर्दशा; गोंधळ. -शर

**ढबढब-ढबां**—क्रिवि. १ नगारा इ० च्या आवाजासारखा आवाज होऊन, डबडब. २ (विशेषतः) फुटलेल्या, सैल झालेल्या नगाऱ्याच्या निघालेल्या बदबद आवाजाप्रमाणें ध्वनि होऊन. [ध्व. ढब]

**ढबदार**—वि. १ टप्पोरा; सुरेख; घोंगदार; झोंकदार; डौलदार (मोती, अलंकार). २ भपकेबाज; दिखाऊ; डोळयांत भरणारें (कमी किंमतीच्या-हलक्या वस्तूंसंबंधीं योजतात). [हि.]

**ढबस**—वि. ढब्बू; मोठें; डेरेदार आकाराचें (पागोटें).

**ढबळ, ढबळशाई, ढब्बळ**—वि १ फार मोठा; अवजड; बेडौल; विशाल; प्रचंड (माणूस, जनावर, वस्तु). २ अफाट; अवाढव्य; फार पसाऱ्याचा (कारखाना, कामधंदा); अस्ताव्यस्त; अव्यवस्थित पसरलेलें (कामकाज). [ढब]

**ढब(ब्ब)ळशाई**—स्त्री. १ अवाढव्यपणा; अफाटपणा; आकाराचें बेडौल, मोठें प्रमाण; स्थूलता; बेढब मोठेपणा. २ (चुकीनें) ढपळशाई.

**ढबुला**—वि. लठ्ठ व ठेंगणा; वसका; वाटोळा; थबकड. (मनुष्य, भांडें, घर). [फा.]

**ढब्बकन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. भित पडली असतां, जड वस्तु पाण्यांत पडली असतां होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन. धाडकन पहा. [ध्व.]

**ढबू(ब्बू), ढब्बक**—पु. १ एक तांब्याचें नाणें (किंमत दोन पैसे); दोन शिवराई किंमतीचा पैसा; अर्धा आणा. -वि. १ (ल.) लठ्ठ; धष्टपुष्ट; अगडबंब; लठ्ठंभारती. २ (ना.) मठ्ठ डोक्याचा. [तेलगू ढब; का. डब्बु; हिं. ढबू] **म्ह**० १ दिखण्यांत ढब्बू चालण्यांत शिवराई=वास्तविक गुणांनीं कमी असून बाहेरून जास्त किंमत दाखविणारा. २ आयत गबू आणि पैसा ढबू.

**ढबाल**—पु. (बे.) एक प्रकारचें फूल; डेलिया; ढिलेरी. [इं. डेहेलिया]

**ढबालगी**—वि. (क.) दांडगी (म्हैस).

**ढब्बो**—वि. (कों.) (निंदेनें) ढमाल बायको. -मराठी भाषेचें व्याकरण पृ. ५४.

**ढम, ढम्म**—वि. अतिशय आळशी; जडः मठ्ठ (मनुष्य). -उद्गा. चमक मारली असतां तोंडांतून एकदम निघणारा आवाज. हाय पहा (क्रि० करणें). [ध्व.] **०भोपळा**-पु. (क.) शून्य (परीक्षेंत गुण, मार्क). (क्रि० असणें). 'गणितांत पाहावें तो ढम्मभोपळा!'

**ढम, ढमका**—उद्गा. १ (ढम) मोठ्यानें वायु सरणें; पाद. २ पादाचा आवाज. 'पादूं कशी ढम!' [ध्व. ढम]

**ढमका**—वि. अनिश्चित; अमुक; अमका (माणूस).

**ढमकें, ढमढमें**—न. मुलांचें एक चर्मवाद्य; टिमकी. [ध्व. ढम]

**ढमक्या**—वि. १ नपुंसक; षंढ. २ (व.) बायल्या; कर्तृत्वशून्य. 'मुलगा ढमक्या निघाला.'

**ढमढम-ढमां, ढमाढम-ढमां**—क्रिवि. १ नगारा, नौबत इ० वाद्यांच्या ध्वनीसारखा ध्वनि होऊन. (क्रि० वाजणें). २ वायु सरण्याच्या आवाजाचें अनुकरण. 'ढमढमे उत्तमे पादे०' इत्यादि विनोदी श्लोक. [ध्व. ढम]

**ढमढमणें**—क्रि. (चर्मवाद्य) ढमढम वाजणें. [ध्व.]

**ढमढमें**—न. ढमकें; टिमकी.

**ढमढेऱ्या**—वि. ढेरपोट्या.

**ढमाई**—स्त्री. मोठ्या पोटाची मुलगी, बायको. [ढम+आई]

**ढमामा**—पु. एक वाद्य. 'ढोल ढमामे तुरे जाणे। टाळ मृदंग वाजती।' -ब ४६६. [ध्व]

**ढमाल**—न. (कु.) उलाढाल. **ढमाली**-वि. (कु.) उलाढाल करणारा.

**ढमाल-ल्या**—वि. (निंदाव्यंजक) फार स्थूल; लठ्ठ; कापशा; फोपशा; अवजड; जाडजूड; अगडबंब. [ढम]

**ढर-कन-कर-दिनीं-दिशीं, ढरढर-ढरां, ढराढर-ढरां, ढरारां**—क्रिवि. पादणें, हगणें यांच्या आवाजासारखा आवाज होऊन. [ध्व.]

**ढरंगणें**- -(व.) हागवणें.

**ढलपा-पी, ढलपट**—पुस्त्रीन. लांकडाचा तुकडा; तासून निघालेला लाकडाचा भाग. ढपला पहा. ढलपी व ढलपट हीं रूपें ढलप्याचे अल्पत्वदर्शक आहेत. **म्ह**० आठ हात लाकूड नऊ हात ढलपी.

**ढवक**—न. (कों.) अर्धा. [सं. अर्धवत्]

**ढवढव**—स्त्री. १ गोंधळ; घोटाळा; अव्यवस्था; बजबजपुरी; भानगड; हास्यास्पद दुर्दशा (काम, वस्तु, मनुष्य इ०ची). २ ढवढववाडा पहा. **ढवढववाडा**—पु. विटंबना; दुर्लौकिक; धिंडवडे; अप्रतिष्ठा. (क्रि० होणें).

**ढवढवणें**—अक्रि. १ (राजा.) नासणें; चक्काचूर होणें; विफल होणें; फिसकटणें; फसणें; चुलींत जाणें (हातीं घेतलेलें

काम इ० ). 'आम्हीं ढेवालयाचें काम आरंभिलें होतें तें **ढवढवलें.**' २ नाहींसा होणें ( अधिकार ). 'त्याची **मामलत ढवढवली.**' [ ढवढव ]

**ढवंढाळ**—न. १ मसलती; हिकमती; उलाढाली; अचाट व धाडसाचीं कामें अंगावर घेण्याची क्रिया. २ पैसा उभा करण्यासाठीं सर्व प्रकार करणें: संसारांतील, आयुष्यांतील सर्व प्रकार, कामें ( सुखदुःखें इ० ). [ ढवळणें+ढाळणें ] **ढवंढाळी-ळ्या**-वि. १ हिकमती; धाडसी; उलाढाली करणारा; खटपट्या. २ ( गो. ) ढवळाढवळ करणारा. [ ढवंढाळ ]

**ढवसाॐ**—न ( महानु. ) आहुति· बळि. 'रणदेवतां ढवसाॐ केलें।' -शिशु ८४९.

**ढवसें**—वि. ( बे. ) जोराचें; सोसाट्याचें.

**ढवळ**—पु. एक झाड (याच्या देठाच्या पुंग्या, शिंगें करतात).

**ढवळणा-णें**—पुन. घाटणा; घाटाणा; टोंकाला फडकें इ० बांधलेली काठी: चाटू ( जोंधळे इ०च्या लाह्या, पोह्याचें भात हे भाजण्याच्या उपयोगी ). [ ढवळणें ]

**ढवळणें**—उक्रि. १ कालविणें; हलविणें: घाटणें; घोळणें ( पातळ पदार्थ, धान्य इ० ). २ ( ल. ) गोंधळ करून सोडणें; विसकटणें. उलथापालथ करणें: ढवळणें. -अक्रि. १ मळमळणें; पोटांत कालवणें; ढवळून येणें. 'माझें पोटांत ढवळतें.' २ मायेचा कळवळा येणें; मायेमुळें जीव तुटणें.

**ढवळा**—पु. बायकांचें गीत, गाणें: उत्सवगीत. 'मुहूर्तें स्थापी खांबाचा प्रकाशा। ढवळा गाऊन सुरेशा।' -स्त्रीगीत ६. [ सं. धवल ]

**ढवळा**—पु. १ गोंधळ: अव्यवस्था; नाश; विघाड; बोजवारा; बिचका: चुथडा (काम, मसलत यांचा). २ ( क्व. शब्दशः ) गढूळपणा; चबढव. [ ढवळणें ]

**ढवळा**—पु पांढरा रंग -वि. पांढरा; सफेत. 'ढवळे गाईचें दूध काढूं। एकल्या एक टोंबे मारूं।' -तुगा १८४. [ सं. धवल ] **म्ह०** ढवळ्यापाशीं बांधला पवळा, वाण नाहीं पण गुण लागला.

**ढवळाढवळ**—स्त्री. १ इकडेतिकडे हलविणें; ढवळणें; गोंधळ घालणें; व्यवस्था विघडविणें. २ भानगड: घोंटाळा: उलाढाल; दुर्दशा. [ ढवळणें; द्वि. ]

**ढवळार**—न. वाडा; हवेली; टोलेजंग घर. धवलार पहा. [ सं. धवल+अगार; म. ढवल+आर ]

**ढवळी**—स्त्री. एक झाड. ढवळ पहा.

**ढवा**—पु. १ हिजडा; नपुंसक. 'संगासि उर्वशीच्या स्वप्नीं तरि काय गा ! ढवा लाहे।' -मोविराट १.१३३. २ नायकिणीजवळ जो नोकर असतो तो; साजिदा.' हे तों अंगीं नाहीं चिन्हें। गाईलें वेश्येच्या ढव्यानें।' -तुगा २८७२. **म्ह०** मिणमिणा दिवा, कृपणाचा केवा, गाजराचा मेवा व हिजडयाचा ढवा हे चार अनुपयोगी. [ सं. धव=नवरा ]

**ढवाळ, ढवाळखोर, ढवाळकी, ढवाळी**—टवाळ इ० पहा. 'टवाळी ढवाळी निंदा। सांगणें घडे वेवादा।' -दा २.५.२५. -मोभीष्म १.६१.

**ढसकें, ढसकण**—न. ( व. ) शिजवून ठेवलेला पदार्थ ( भात इ० ). 'भाताचें ढसकें पडलें आहे, कोण खातो ?'

**ढसढस-ढसां, ढसाढस-ढसां, ढसासां**—क्रिवि. १ बेरचसें घटाघट पिण्याच्या आवाजाचें अनुकरण करून. २ मनसोक्त; पुष्कळशा रडण्याचें अनुकरण करून. [ ध्व. ]

**ढसर**—स्त्री. चंगळ; विपुलता; उधळपट्टी -शर.

**ढसळ, ढसाळ, ढसर, ढस्मर**—वि. १ पैसे इ० उधळणारा; उधळ्या; सढळ; उदार. 'तुका म्हणे बरा। आहे ढसाळ वेव्हारा।' -तुगा ३६७२ २ अति समृद्ध: विपुल; बृहत्. -स्त्री. समृद्धि; चंगळ; ढीगचेढीग; रेलचेल. [ ढस, ढासळणें ] **म्ह०** खाण्यापिण्याची तंगचाई नमोनारायणाची ढस्मर. **हाताचा ढसळ**-वि. सढळ हाताचा; उदार; दाता; मुक्तहस्त. **बोलण्याचा-बोलून ढसळ**-वि. अति बोलका; जिभेचा सैल.

**ढस(सा)ळणें**—अक्रि. १ ढासळणें; धासळणें पहा. २ विसरणें. -हंको.

**ढसासणें**—सक्रि. कोंबणें; गच्च भरणें ( भांडें; खोली इ० ); ढोसणें. बहुधा धसासून भरणें, चेपणें असा प्रयोग. -अक्रि. १ सपाटून पिणें. ढसासून पिणें असा प्रयोग. २ भाक्साबोक्शीं; सपाटून रडणें. [ ढस ]

**ढस्मा**—पु धिमा. ढिमा पहा. -मनको.

**ढळ**—पु. १ घसरण; निसरडें; घसरणें: घसरलेली अवस्था. २ चूक; एखादी गोष्ट करण्याची राहून जाणें: खंड; स्खलन. 'मनापासून कामात कधींहि ढळ पडावयाचा नाहीं.' [ ढळणें ]

**ढळकोनां**—( व. ) ( ढळकवणी ) अगदीं पातळ पाण्याचा अतिरेक आहे असा पदार्थ; ढळढळवणी.

**ढळढळ**—वि. पातळ. **०वणी**-( पातळ पाणी ) पाणचट, अति पातळ; बेचव पदार्थ. **म्ह०** ढळढळवणी शाबास ग सुग्रणी.

**ढळढळ-ढळां**—क्रिवि १ ढसढसां; भरपूरपणें; पुष्कळ ( रडणें ). २ ढणढण; झकझक ( दिवा जळत राहणें ).

**ढळढळणें**—अक्रि. प्रखरपणें, ढणढणीत जळणें ( दिवा ). [ ढळढळ ]

**ढळढळीत**—वि. १ स्वच्छ; ठळक; स्पष्ट (अक्षर, आकृति, चिन्ह, गळू इ० ). २ झगझगीत; चकचकीत; रखरखीत ( ऊन, दिवा ). -क्रिवि. प्रत्यक्ष; डोळ्यादेखत; उघड उघड. [ ढळढळ ]

**ढळढळून**—क्रिवि. ढळढळां; खळखळून. ' नेत्रीं आलें असु ढळढळून। हात झिडकावी राधिका।' –पला २. [ ढळढळ ]

**ढळणें**—अक्रि. १ चलित होणें; जाग्यावरून हलणें; घसरणें; स्थानभ्रष्ट, पदच्युत होणें; कलंडणें; डळमळणें; झुकणें. 'जैसी तीरीं नाव न ढळे। टेकलीसांती।' –ज्ञा ७.४. २ रेलणें; कलणें. ३ (शरीरप्रकृति) खालावणें; ढासळणें; खचणें. ४ माघार घेणें; दबणें; अपयश पदरीं येणें; कचरणें; हटणें. ५ चुकणें; न लागणें; अंतरणें (ध्येय, नेम यापासून). ६ (ल.) वजन कमी होणें; मागें पडणें; विसरलें जाणें; रूढींत नसणें (वर्चस्व आचार, नियम). ७ उडणें; वारली जाणें (मूर्तीवर चवरी). ' कुंचे ढळती दोहीं बाहीं। जवळी राही रखुमाई।' –तुगा २७८. ८ स्रवणें; गळणें (अश्रु). 'अश्रुबिन्दु ढळती नयनीं।' –मुआदि २३.२४. ९ वाहणें; सुटणें (वारा). ' म्हणूनि संवादाचा मुवावो ढळे। तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे।' –ज्ञा ९.२८. १० क्रम बदलणें; पुढें सरणें. ' हें कायसेनही न ढळे। अनादि ऐसें।' –ज्ञा ११.४९७. [ दे. प्रा. ढल=झुकणें; गळणें ]

**ढळता**—वि. १ कलणारा; झुकता (ताजवा, माप–घेणाऱ्याला फायदेशीर). २ उदार; सढळ (हात, वजन). [ढळणें] **ढळता-कांटा, ढळती दोरी, ढळती नजर**–पुस्त्री. (वजनाचा कांटा, मापाची दोरी झुकता सैल) सढळपणा. (ल) मोकळीक; स्वतंत्रता; सवड; सैल कारभार (चाकरी, काम इ० त). ' महाराजांनीं एजंटसाहेबांची ढळती नजर आहे हें धोरण ठेवून दिवसा ढवळ्या सडकून जुलूम चालवला.' –विक्षिप्त ३.२८१.

**ढळपा-पी**—स्त्री. धलपा–पी पहा.

**ढळाढळ-ळां, ढळांळां**—क्रिवि. (ढळढळचा अतिशय) ढळढळ पहा.

**ढळी**—वि. उतरती; निचरा होणारी; जमिनीचा गुणधर्म दाखविणारें विशेषण (जमीन, भुई, शेत, देश, रान इ० शब्दांबरोबर योजतात).

**ढळेपंज**—वि. फार म्हातारा (घोडा. घोड्याचा धंदा करणारे व जॉकी यामध्यें रूढ). [ हिं. ढलाहपंज ]

**ढाक**—स्त्री. (क.) थाप; गप्प.

**ढाक**—पु. कुस्तींतील एक डाव; ढुंगणी; आपल्या जोडीदाराच्या मानेवर हात ठेवून आपण जोडीदाराच्या खालीं येणार असें दाखवून आपल्या ढुंगणानें त्याला पाटीवरून खालीं ढकलणें.

**ढांक**—विक्रिवि. (निदार्थी) प्रमाणापेक्षां फाजील उंच; मोठा; अजस्र; अवाढव्य (माणूस, इमारत, झाड इ०). ढांगळ पहा. ' ही बायको केवढी ढांक.' ' हें घर केवढें ढांक बांधलें.'

**ढांक, ढांकें**—नस्त्री. १ (कों.) जुनें व वठलेलें झाड. २ लहान झाडाचें खोड; पानें तोडलेलें रोप; पानें नसलेल्या फांद्या, बुंधा. ३ डाहळी; फांदी. ४ द्राक्ष इ० चा वेल चढून पसरण्या साठीं वेलीजवळ पुरलेली काठी किंवा फांदी.

**ढांकण-णी, ढाकणें, ढाकांगाक**—झांकण इ० पहा. [ दे. प्रा ढक्क=आच्छादणें, बंद करणें; हिं. ढाकना ]

**ढाकणी**—स्त्री. सोनें, चांदी गाळल्यानंतर त्यास पुन्हां घनरूप येतांना जी आकृति होते ती. –अनि–पारिभाषिक शब्द ५. [ ढाक ]

**ढाका**—पु. राजघोळ (पालेभाजी) वरील रोग. पाऊस जास्त झाला असतां राजघोळीचीं पानें पांढरीं पडूं लागतात त्यास ढाका पडला असें म्हणतात. –कृपि ६४८.

**ढांकूळ, ढांकळ**—वि. १ (राजा.) जुनाट; वठलेलें (झाड, रोप). ढांक पहा. २ लांबटांग्या; उंच; ढांगळ पहा. [ ढांक ]

**ढांक्या**—वि. झांकणारा; झाकता.

**ढांग**—स्त्री. १ टांग; एक पाऊल. २ उभे राहिलें असतां दोन पायांतील (मांड्यामधील) अंतर. ' त्यानें त्यास ढांगेंत आवळिलें. ३ मांडी; पाय. ४ उडी.

**ढांग**—वि. १ (व.) अखेरचा; शेवटचा. या डावांत तो ढांग होता. २ (ना.) (वर्गांतील अखेरचा शेवटचा यावरून) ढ

**ढांगर**—न. वेलीस, लहान रोपास आधारभूत खांब; ढांक.

**ढांग(गा)ळ**—वि. १ लांब टांगा टाकणारा; लांबटांग्या. २ प्रमाणाबाहेर उंच; लेंबूस (माणूस, झाड). ढंकाळ पहा. ( ढांग )

**ढांगळणें**—उक्रि. (टांग टाकून जाणें) (ल.) झिडकारणें; उपहासपूर्वक वागविणें; उडवून लावणें (ढांगळ)

**ढांचेंढूं, ढांचेंढूंचें**—न. विसंगत उत्तर देणें. –क्रिवि. अप्रासंगिकपणें; अवास्तव रीतीनें; विसंगत; वेडेवाकडें (उत्तर देणें, बोलणें). [ ढां, ढूं ]

**ढांड(डा)ळ**—वि. १ धांडळ; लांबट व जाड (जोंधळ्याचें कणीस, ताट). २ उंच व धिप्पाड

**ढाडी**—पु मुसलमानांतील एक गाणारी जात किंवा तींतील व्यक्ति. धाडी पहा. [ हि ]

**ढांडुळा**—पु. शोध; झाडा. [ ढांढुळणें ]

**ढांडा(ढां)रा**—पु. दवंडी; डांगोरा; जाहीरनामा नोटीस.

**ढांढुळणें**—सक्रि. बारकाईनें शोधणें; धुंडाळणें पहा. (धुंडण्याचें ठिकाण व वस्तु या दोहोंबरोबर उपयोग). 'घर ढांढुळलें.' ' गाव ढांढुळला.' 'दागिना ढांढुळला.' [ सं. ढुंढन; प्रा. ढंढोल ]

**ढाण**—न. गाळ; रेंदा; चिखल. (पाणी वगैरे सांडल्यामुळें). –वि. आंबटओलें; ओलसर (कापड, लांकूड).

**ढाण**—न. काळा वण; चट्टा; डाग (शरीर, फळ इ० वर पडलेला). [ सं. दहन; प्रा. डहण ]

**ढाण**—न. (कों.) एक खाण्याजोगें गवत.

**ढाण**—अ.वि. आंबटपणा दाखविणाऱ्या शब्दास हें आधिक्यदर्शक उपपद जोडतात. अति आंबट ( फळ, ताक इ० ). [ डाहण ]

**ढाणक**—पु. नीच जात; महार, मांग. चांडाल इ० अंत्यज लोक. 'तुझीं लेकरेंवाळें पुढें विकील ढाणकाला।' –ऐपो १६०. **ढाणकास देणें-टाकणें-वांटणें-लावणें**–( मुलगी, मुलें-लेंकरें, रांडापोरें इ० ) ढाणक लोकांस देऊन टाकणें. ( ल ) टाकून देणें; कुत्र्याला घालणें या अर्थी. 'तुझा शिरच्छेद करून तुझी रांडापोरें ढाणकास देईन.' –भाव ३०. **ढाणकास जाणें**–पूर्ण नाश पावणें; चुलींत, मसणांत जाणें याप्रमाणें.

**ढाणकस**—वि. (मातारा, वाई ) धट्टाकट्टा; धिप्पाड; दांडगा

**ढाणा**—वि. ( क. ) धिप्पाड; दांडगा. **ढाण्या**–वि. अंगावर ठिपके, पट्टे असलेला ( वाघ, साप ). **ढाण्यावाघ**–पु. अंगावर पट्टे असलेला वाघ; खडयावाघ; चित्ता. डाहण्या वाघ पहा. मोठा क्रूर, पटाईत वाघ. 'जिथें किर्र झाडी; कडा घोर लागे। जिथें वाघ ढाण्या अहोरात्र वागे।' –शिवाजी १०. [ सं. दह–दहन ]

**ढाणी**—स्त्री. डाग देण्याच्या उपयोगी लोखंडी गज; डाहणी. [ सं. दह्, दाह ]

**ढाणें**—न. काळा डाग ( फळ, शरीर यांवरील ).

**ढाण्या**—वि. अतिशय आंबट ( फळ ). ढाण पहा.

**ढाप**—स्त्री. फांदी. 'तो खालीं न पडतां मधल्यामधें सावध होऊन झाडाच्या ढापीला धरून राहिला.' –वररुचीची कथा ( इस्लामपूरकरकृत ).

**ढांपण**—न. (शाकारणी) दोन उताण्या कौलांच्या रांगांच्या सांध्यावर टेवलेलें पालथें कौल.

**ढांपण-णी**—पुस्त्री. १ झांकण. टोपण. २ जनावराच्या डोळ्यावरील आच्छादन; झांकणी; झांपडी; अंधारी. झांकण पहा. [ सं. छादन; हिं. ]

**ढापणी**—स्त्री. झांकणें; लपविणें; बंद करणें. [ ढापणें; हिं. ]

**ढापणें**—उक्रि. १ टोपण लावून बंद करणें; झांकणें; झांकण लावणें. 'कोंवळें बोलतों मना आवरतें। डोळियाचें पातें ढापवेना।' –तुगा १४४. २ झांकणें; लपविणें; दडविणें. ३ दडपून, दाबून टाकणें. गुप्त राखणें ( एखादी गोष्ट ). [ सं. छादन; हि. ढापना ]

**ढापणें, ढापा**—नपु. १ झांकण; आच्छादन; टोपण. २ झांपडी; अंधारी. [ ढापणें ]

**ढापा**—पु. १ मोठें कौल; आढ्यावरचें कौल; कोनावरील कौल. २ जिना इ० बंद करण्यासाठीं योजिलेली फळी. ३ (शाकारणी) ढांपण पहा.

**ढाबळ**—स्त्री खबूतर टेवण्याची, पाळण्याची जागा.

**ढाय**—स्त्री. ( व. ) संचय. [ सं धा ]

**ढॉर**—न. (गो.) ढोर. गाईचें अगर म्हशीचें मढें ( प्रेत ) 'ढॉर पडलें कावळे जमले.' [ ढोर ]

**ढारदुर**—क्रिवि. ( व. ) (घोरण्याच्या आवाजावरून) गाढ. ( निजणें ). [ ध्व. ]

**ढाल**—स्त्री. १ शत्रूपासून बचाव करण्यासाठीं लढाईंत उपयोगी पडणारी कातडयाची किंवा कासवाच्या पाठीची केलेली वस्तु. २ निशाण ( सैन्याचें, मुख्य सरकारचें, किल्ल्यावरचें इ० ). ( क्रि० देणें ). 'ढाल दिली कात्रजेवर तळ पाहून.' –ऐपो ४४४. ३ ( बायकी ) घांटी, कंठमणि; कंठ. ४ (ल.) आसरा; छत्र; रक्षण करण्यास समर्थ असणारी व्यक्ति. 'तो गृहस्थ या गांवामध्यें मोठी ढाल आहे.' –न. स्त्रियांनीं केलेलें धाडसाचें काम; साहस. (क्रि० गिळणें). [ सं. ] **०देणें**–१ ( मुख्य निशाण उभें करणें ) (लढण्यास, भांडण्यास, वाद विवादास इ०) सज्ज होऊन पुढें उभें राहणें. 'दिल्या ढाला मैदानांत परांडयाच्या वाजुला।' –ऐपो २३४. २ आव्हान देणें; युद्धास बोलवणें. ३ प्रवासाची तयारी करणें. **उलटी ढाल देणें–फिरविणें**–१ बंड करून उठणें. २ लढाई संपवून सैन्य माघारें, परत फिरणें.

**ढाल**—न. जारणमारणांतील एक मंत्र, साधन; खेटक. 'केलीं नाना कवटालें। पुत्र लोभें केलीं ढालें।' –दा ३.३.४५.

**ढाल, ढालगज**—वि. १ (१ ज्याच्या गंडस्थळावर संरक्षणासाठीं ढाल बांधली आहे अशा लढाईंतील हत्तीप्रमाणें शूर, धीटमोल. २ ज्यावर सैन्याचें मुख्य निशाण आहे अशा म्होरक्या हत्तीप्रमाणें धीट). अमर्याद; निर्लज्ज; उद्धट (पुरुषाप्रमाणें वागणाऱ्या स्त्रीविषयीं अथवा तिच्या शिरजोर, धीट, उद्धट, स्त्री जातीला अयोग्य अशा वर्तनाविषयीं योजतात). २ वेछूट; दांडगी; ताळतंत्र सोडलेली (स्त्री, तिचीं कृत्यें ). ३ (बायकी) उपद्व्यापी; उलाढाली; दंगेखोर ( मुलें व त्यांच्या खोडया ). ४ अतिशय मोठी व स्थूल ( स्त्री ). ५ दंगेखोर; शिरजोर; बेकायदेशीर ( मनुष्य ). ६ ( सामा. ) निष्कारण उठाठेवी करणारा; फाजील. [ ढाल=निशाण+गज=हत्ती निशाणाचा हत्ती मोठा असतो यावरून.] **ढालगजपण**–न. उलाढाल, उठाठेव. 'तयासि द्रव्य पाहिजे म्हणोन। केलें असंभाव्य ढालगजपण।' –स्वादि २.२.१९. **ढालगज भवानी**–स्त्री. १ साहसाचें, आचरटपणाचें, अमर्याद, अनुचित कृत्य करणारी स्त्री. २ उलाढाली, उपद्व्यापी स्त्री.

**ढालकरी**–पु. १ सरकारी सैन्याचें, सरदाराचें निशाण बाळगणारा. निशाणसंरक्षक शिपाई. २ ज्याच्या जवळ ढाल आहे असा लढवय्या. ढालाईत; ढाल्या. ३ (ल.) काठी; आधार; कुटुंबांतील, समाजांतील कर्ता पुरुष; नेता; पुढारी.

**ढाल-काठी-खांब**—स्त्रीपु. १ निशाणाची ( विशेषत: सैन्याच्या मुख्य निशाणाची काठी). २ (ल.) समाज-राष्ट्र धुरीण; पुढारी; कुटुंबांतील मुख्य पोषणकर्ता.

**ढालपट्टा**—पु. (ढाल आणि पट्टा=तलवार) शिपायाचा लढाईचा सरंजाम. [ढाल+पट्टा]

**ढालपा-पी, ढालपट**—ढलपा पहा.

**ढालाईत**—वि. १ ढाल धरून, बांधून जाणारा. २ विशेषतः एखाद्या मोठ्या माणसाच्या, सरदाराच्या स्वारींतील शिपायांना म्हणतात. सोटे बारदार. ३ सैन्याच्या अग्रभागीं असणारें मोठें निशाण नेणारा.

**ढालू**—(संगीत) सुंथ पहा.

**ढाल्या**—वि. १ ढाल घेऊन सज्ज झालेला. २ ढाल-निशाण वाहणारा. ढालाईत पहा. ३ धाडसी; साहसी: मसलती: हिकमती; युक्त्या इ० नीं पूर्ण. [ढाल]

**ढाशावारा**—पु. पूर्वेकडील वारा. -योर १.६५१.

**ढास**—वि. रानवट; माळरान: नापीक (जमीन). [फा.]

**ढास**—पु (व.) गाडीच्या चाकावर, धुऱ्यावर बसविलेला भाग. ढासी पहा.

**ढा(ढां)स**—स्त्री. कोरडा खोकला (जनावरें, माणसें यांना होणारा). [हिं.]

**ढांस**—पु. १ (कों) चावा; दंश. डांस पहा. २ तोडलेला सर्व भाग. [सं. दंश: म. डास]

**ढा(ढां)सण**—न. १ (कों.) आधार; आश्रय: धीरा. २ आश्रयदाता; हितकर्ता. ३ (राजा.) ऐन आणीबाणीची वेळ; नेमकी संधि, वेळ. ४ नेमकी जागा 'ढांसणावर नीट हौदे चालविले.' -भाव ३४. ५ मोहरा. 'ऐसे कित्येक दुसरेकडे ढासण धरून गोळागोळी करीत होते.' -भाव ८५. ६ तोंड. 'यांचे फौजेचें ढासण खंदकास लागलें.' -भाव ४६.

**ढा(ढां)सणी**—स्त्री. ढांस; खोकण्याची क्रिया; खोकला (विशेषतः गुरांचा). (क्रि० करणें; लागणें; राहणें). [ढासणें]

**ढा(ढां)सणें**—अक्रि. खोकणें (घोडा; जनावर यानें).

**ढासण्या**—स्त्रीअव. गाडीच्या साटीचें सर्व सामान बांधण्याच्या दोऱ्या. या आखरीला आंवळलेल्या असतात. [ढासी]

**ढासरा**—वि. ढासणारा; खोकणारा· खोकरा (घोडा इ०). [ढास]

**ढासरा**—पु. ढोसरा: धसका: धास्ती; दुःखपूर्ण स्मृति, वेदना. (क्रि० धरणें; घेणें; बाळगणें; काढणें). 'पोरानें आईचा ढासरा धरला.' 'त्याला असा ढासरा बसला आहे, मनांतून जात नाहीं.'

**ढासल**—न. (व.) असटसा पातळ भात.

**ढासलें**—न. (व.) शिजवून ठेवलेला पदार्थ (भात इ०). ढसकें पहा.

**ढासळणें**—अक्रि. १ कोसळून पडणें (इमारत, विहीर, रास इ०). २ (ल.) बिघडणें; वाया जाणें; व्यर्थ होणें. धासळणें पहा. -सक्रि. रचलेल्या पदार्थांची रचना कोसळून पडायाजोगी शिथिल करणें.

**ढांसळाढांसळ**—स्त्री. पडापड; कोसळाकोसळ: पडझड.

**ढासी**—स्त्री. (व.) बैलगाडीची साटी; सांगाडा.

**ढासें**—न. (व.) गाडीच्या सांगाड्याच्या, बाजूस टेकावयाच्या कांबी: करळ्या. 'गाडींत ढाश्यापर्यंत माल भरला'

**ढाळ**—पु. १ पातळ विष्ठा; जुलाब; रेच (औषधानें, रोगानें झालेला). (क्रि० होणें). २ शौचास साफ होण्याचें औषध; रेचक. 'ढाळ आणी उखाळ देती। पथ्य कठीण सांगती।' -दा ३.७.३३. ३ उतार; उतरतेपणा (पाण्याचा, जमीनीचा). ४ तेज; पाणी (मोत्यांचें). 'मुक्तमणी ढाळ देत।' -वसीस्व ९.१२७. ५ आकार: घडण: घाटणी (भांडी: दागिने इ० ची). ६ शैली; पद्धति; तऱ्हा: रीत. (क्रि० पडणें) 'वोढाळाची ढाळ कोटी। मारला जाइल यासाठीं।' -अमृत २३ ७ अभिषेक. -हंको. ८ उष्णतेच्या झळा. ९ हापका: पूट. 'नाना लवणाचें जळु। होआवया दोनि चार वेळु। देऊनि सांडिजती ढाळु। तोयाचे जेवीं।' -ज्ञा १८.७७५. [ढळणें] (वाप्र.) ०देणें-१ नोकरास बडतर्फ करणें. २ टाळाटाळी करणें: चुकविणें. **ढाळाखालीं-ढाळीं पडणें, ढाळ पडणें-लागणें**-पद्धत, रीत पडणें. **ढाळाखालीं चालणें**-नेहमींप्रमाणें वर्तन करणें.

**ढाळ**—स्त्री. डहाळी; फांदी. [डहाळी]

**ढाळ**—पु. ढेप. 'जाले इक्षुरसाचे ढाळ। तरी लवण देणें किडाळ।' -ज्ञा १५.४५७.

**ढाळउखाळ**—पु. हागओक: ढाळ व ओकारी (क्रि० होणें; चालणें; देणें). [ढाळ+उखाळ]

**ढाळक**—न. शौच्यास साफ होण्याचें औषध. -वि जुलाब होणारें: रेचक (औषध). [ढाळ]

**ढाळणी**—स्त्री. १ नांगरलेली जमीन साफ करण्याची क्रिया. कुळवणी. २ पंख्यानें वारा घेणें. [ढाळणें]

**ढाळणें**—उक्रि. १ (चवरी, पंखा इ०) हलविणें: वारणें. 'वैदर्भी चामरातें धरुनि लसदुरोहार ढाळूनि सेवी।' -मोकृष्ण ६०.१. 'भरत शत्रुघ्न दोघे चवऱ्या ढाळिती' -विष्णुदासनामा पद. २ प्रकाशणें; सतेज दिसणें (मोतीं) ३ अश्रु गाळणें. 'घोडा असुं ढाळतो.' ४ टाकणें: फेंकणें. 'धर्मे प्रथम फासे ढाळी।'-मुसभा १४.३४. ५ घालणें; वर ओतणें: अभिषेक करणें. 'श्रीगुरुलिंगा ढाळी। ध्यानामृत।' -ज्ञा १३.३८६. -अक्रि. १ पडणें: गळणें (अश्रु). २ ढाळ होणें. [ढळणें; हे प्रा. ढाल=खालीं टाकणें; चवरी वारणें]

**ढाळणें**—उक्रि. १ साफ करणें; ढेंकळें मोडणें (नांगरलेल्या जमीनींतील). २ (व.) पाऊस पडल्यानंतर वखरणें. [ढळणें]

**ढाळदार**—वि. उतरता; उतार असलेला. [ढाळ+दार प्रत्यय]

**ढाळ(ळें)ढाळें**—क्रिवि. १ एका डहाळीवरून दुसऱ्या डहाळीवर. 'तो हळू हळू ढाळें ढाळें। केतुकेनि एकें वेळें।' –ज्ञा ३.४२. २ हळू हळू. 'तरी अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निराळें। नखी लागेल ढाळें ढाळें। वैराग्याची।' –ज्ञा ६.५७. [डहाळी]

**ढाळपेटी**—स्त्री. मेट्रिसवरून ठसा ढाळण्यापूर्वी ती ज्या पेटींत बसवावी लागते ती पेटी. (इं.) मोल्ड केस.

**ढाळा**—पु. १ पानें असलेली लहान फांदी; डहाळा; टहाळी. २ हरबरा, वाटाणा, लाख इ०चें गोपटें.

**ढाळी**—स्त्री. डाहळी; फांदी. 'बांधीव बुचडयाची लकब, पदर अति मुबक खोविला तिपदरी वेणीचा। चंदन ढाळीस जसा लपेटा काळे नागिणीचा।' –होला १०४. [डाहाळी] **म्ह०** बसायाला ढाळी न बसायाला सावली.' =निराधार स्थिति.

**ढाळाक**—वि. तेजस्वी.

**ढाळू**—वि. अतिशय उतरता, ढाळदार. [ढाळ]

**ढाळें**—अ. १ हळूच; हळू हळू. 'तंव वरिले कडोनि ढाळें। चंद्रामृताचें तळें। कानवडोनि मिळे। शक्तिमुखीं।' –ज्ञा ६.२४७. २ सहजरीतीनें 'ढाळेंचि काम होतें सदा।' –दा ११.८.१.

**ढाळेंढाळा-ळी-ळें**—क्रिवि. १ थोडें थोडें. 'मग नेमेंचि ढाळेंढाळा। पिकालागीं जळा काढिजे पाट।' –एभा ५.२१६. २ हळू हळू. ढाळें पहा.' ढाळें ढाळें चालणें।' –वि.उ ११.९५.

**ढाळया**—पु कळीला जोडलेला छपराचा पुरवणी भाग.

**ढाळया**—वि. (प्रां.) दवंडी देणारा, पिटणारा.

**ढिक(कु)ळी**—स्त्री. डिखळ; ढेंकूळ; लहान ढीग; गोळा (शिजलेला भात, दहीं इ० चा); गुठळी (रक्ताची). [डिखळ]

**ढिग(गा)र**—वि. (कुण.) पुष्कळ; विपुल; भरपूर; (लई या प्रमाणें अशिष्ट) [ढीग]

**ढिग(गा)र, ढिगारा**—पु. राशी; ढीग, गंज. (धान्या-दिकाचा). 'मोहरा पुतळया रुपयांचे जागोजाग पडले ढिगार।' –ऐपो १२३. [ढीग]

**ढिगा**—उद्गा. (को.) पुरे. [सं. स्थगू]

**ढिगावा**—पु. (कु.) आधार.

**ढिगाळ**—पु. (ढीगचा अतिशय) ढीगच्या ढीग. 'पडिले प्रेतांचे ढिगाळ। रक्त निम्नगा चालिल्या।' –जै ८७.२०. [ढीग+आळ प्रत्यय]

**ढिगी**—स्त्री. टेंकण; आधार; टेंकू (झाड, वेल इ० ना लांकडाचा वगैरे दिलेला). (क्रि० देणें; लावणें).

**ढिगोला**—पु. (ना) १ लहानसा ढीग. २ लहानसें टेंकाड. [ढीग]

**ढिप(पू)ळ, ढिवळ**—न. मातीचें ढेंकूळ; ढेपसें; डिखळ. 'तेणें वासनाढिवळ विरालें।' –रंयो ४.२६१.

**ढिम-म्म**—स्त्री. १ (दुसऱ्याच्या सांगण्यावरून) आपल्या उद्योग–संकल्पापासून निवृत्त होणें; मागें घेणें. चकित होणें. २ (दुसऱ्याच्या सांगण्यावरून) प्रवृत्त होणें (खाणें, देणें, करणें, म्हणणें इ० क्रियापदांबरोबर निषेधार्थी योजतात). 'मी त्यास इतकें बोललों परंतु त्यानें ढिम्म खाली नाहीं.' –वि.क्रिवि. धिमा; स्तब्ध; मुळींच न हलतां न ऐकतां. 'जशाचा तसाच ढिम्म उभा आहे.' –वज्राघात ११७. 'कोणी कांहीं करो हा आपला ढिम्म बसतो.'

**ढिमा**—पु. १ लहान वाटोळी टेंकडी; उंचवटा; जमीन सपाट खोदतांना माप घेण्यासाठीं मधूनमधून उंचवट ठेवतात ते. २ नदीमधील (बेटासारखी) कोरडी जागा.

**ढिमा**—पु. मुलामा. 'कळस ढिमाचे पोकळ। जळो वरील ते झळाळ।' –ज्ञा १३.४७०.

**ढिमा**—वि. मंद; सुस्त; जड. धिमा पहा.

**ढिमोरा**—पु. (जनावरांच्या) पाठीच्या कण्याचें शेवट; चौक; ढुंगण

**ढिरा**—पु. १ (दिरा) नवीन अंकुर; कोंब; न उकललेलें कोंबाचें टोक. २ (ल. को) घर शाकारतेवेळीं गवताच्या पेंढ्या वर उडविण्यासाठीं, हलविण्यासाठीं केलेली अणीदार काठी.

**ढिरी**—स्त्री. लहान ढिरा; कोंब; कोमल अंकुर; पानांचे उक-ललेलें कणीस. [ढिरा]

**ढिल**—वि. ढिला; शिथिल. –स्त्री. मंदपणा; दुर्लक्ष्य. ढिली पहा. (क्रि० देणें). ढिला पहा.

**ढिलता, ढिला**—वि. १ सैल; घट्ट, आंवळ नसणारा; खिळ-खिळीत. २ लेचापेचा; शिथिल; भोंगळ; हयगयीचा; अव्यवस्थित. ३ सुस्त; आळशी. 'तरी आंगें कर्मे ढिला। जो मनें विकल्पें भरला।' –ज्ञा १३.६७७. ४ चंचल; निश्चयरहित. 'होतां प्राप्त गुरुविरह कैसा न म्हणेल मानव ढिला हा।' –मोआश्रम २.४.५ मृदु; नरम. 'गरो गाटीं वरी ढिलीं। द्रवभावें आथिलीं।' –ज्ञा १७.१२८. [हिप्रा. ढिल्ल; तुल० सं. शिथिल; प्रा. सढिल] **कासोट्याचा ढिला**–वि. निःशंकपणें जारकर्मास प्रवृत्त असणारा; व्यभिचारी. **कमरेचा ढिला**–वि. षंढ; नपुंसक. [प्रा. सढिल]

**ढिलाई**—स्त्री. १ सुस्तपणा; मंदपणा. २ हयगय; दुर्लक्ष; अव्यवस्थित कारभार. [ढिला]

**ढिला कुमाईत**—वि. १ भाडोत्री (घोडा). २ भितरा; कम-कुवत; डगणारा (माणूस).

**ढिला माल**—पु. १ हलका, निरुपयोगी माल. २ (ल) दुर्बळ; नामर्द, षंढ, कुचकामाचा माणूस.

**ढिलाविणें**—उक्रि. सैल, शिथिल करणें. 'वसन ढिलावित सरळकंठ आकंठ भरित।' –अमृत ६२. [ढिला]

**ढिली दोरी**—स्त्री. लगाम सैल सोडणें; बंधन, वर्चस्व, ताबा कमी करणें; अंमल कडक न ठेवणें. (क्रि० देणें; सोडणें).

**ढिल्या**—वि. १ खिळखिळ्या शरीराचा; ज्याचे सांधे ढिले झाले आहेत असा. २ ज्याचा कारभार ढिला आहे असा (माणूस). [ढिला]

**ढिल्ली**—स्त्री. १ मंदपणा; सुस्तपणा; हयगय; चालढकल; दिरंगाई. (क्रि० करणें; पाडणें). २ (ल.) दुर्लक्ष; ढिलाई; शिथिलपणा. ३ बंधनें, कडक अंमल कमी करणें, काढून घेणें. ४ (नियमांत मिळालेली) सवड; मुभा. [ढिला]

**ढि(ढिं–ढी)वर**—पु. कोळी जात व तींतील व्यक्ति; धीवर. [सं. धीवर] **ढिवरी**–स्त्री. कोळीजातीची स्त्री. 'मग तो म्यां ढिवरीसीं रतविला।' –भज १०७.

**ढिसर**—वि. (व.) ठिसूळ पहा.

**ढिस(सा)ळ**—वि. १ उदार; सढळ; उधळ्या. धोताल पहा. २ अगडबंब; मोटा; अवजड; बोजड परंतु ढिसूळ, दुबळ; ढिला (मनुष्य, जनावर, लांकूड). ३ अफाट; अवाढव्य; विशाल. 'जगडंबर अतिढिसाळ। दुर्धर घडि मोडी सहज।' –देप २. [ढासळणें]

**ढिसळणें**—अक्रि. ढासळणें; कोसळणें (इमारत, विहीर, रास). ढासळणें, धासळणें पहा.

**ढिसा, ढिसूळ, ढिसूर**—वि. १ नाजूक; ठिसूळ (लांकूड). २ ज्याचे स्नायू बळकट नाहींत असा; फोफश्या.

**ढिसा**—पु. एक पक्षी; पाणकावळा; खंड्या; गण्या.

**ढिसाळ**—वि. ढसाळ. १ समर्थ; मोठें, प्रचंड. 'नाहीं येणें पाडें ढिसाळ। दुजें जगीं।' –ज्ञा ४.१७०. २ पोकळ. 'ब्रह्मयातें करूनीही तेजा। ढिसाळ गोष्टी करितोसी।' –नव १६.८०. ३ फोपशा. 'एक रोकडे एक ढिसाळ। होय सकळ आपण।' –ह १०.१९४. ४ (महानु) विशाल. 'हारवलीं अनंतब्रह्माडांचीं ढिसाळें।' –भाए ६५७.

**ढिसार**—वि. नरम (गूळ, माल). ढिसर, ढिसळ पहा.

**ढिसी**—स्त्री. (व.) जिच्या भोंवतीं सोपल गुंडाळतात ती काठी.

**ढीग**—पु. १ मोठी रास, संचय, गोळा; गंज. 'भी कृष्णा त्या मूर्ता पापाच्या त्रासदायका ढीगा।' –मोसभा ५.११६. २ (कुण.) ढीगच्याढीग; राशीच्याराशी; अतिशय मोठा संग्रह, साठा. ३ (ल.) गर्दी. 'मारीत ढिगांत लोटला।' –ऐपो ८७. –वि. समृद्ध; विपुल; पुष्कळ. 'बा, ढीग वेदना अनुभविल्या समरीं परंतु ती गाढी।' –मोउद्योग १३.८४. ०**करणें**–१ अनेक वस्तू एकत्र करणें; रास घालणें. २ (ल.) पुष्कळ, आटोकाट प्रयत्न करणें. ०**घालणें–पाडणें–लावणें**–१ ढीग रचणें; रास घालणें. २ (ल.) अतिशय, पुष्कळ करणें. (काम इ०).

**ढील**—स्त्री. १ शिथिलपणा; ढिलेपणा; मंदपणा. २ (ल.) हयगय; मुस्ती; टंगळमंगळ; आळस. (क्रि० होणें; असणें; करणें). २ चेंगटपणा; टोलवाटोलव, दिरंगाई. (क्रि० करणें; लावणें; मांडण). –वि. सैल; सुस्त; संथ; ढिला पहा. [ढिला] ०**देणें**–स्वातंत्र्य देणें; मोकळीक देणें; सैल सोडणें. ०**पडणें**–कामाला–कामाची हयगय होणें; दिरंगाई लावली जाणें.

**ढील**—न. १ दोंद; ढेर. (एखाद्या अजस्र व अवजड माणसाला किंवा वस्तूला आश्चर्यार्थी किंवा तिरस्कारार्थी लावतात). २ अवजड धूड. 'हें केवढें ढील हो!' [हि. डील; सं. अष्ठील]

**ढीव**—पु. (महानु.) १ धीवर; कोळी. [धीवर] **ढीवाचा अलंकार**–पु. नकली, खोटा दागिना. 'तैसा मनुष्यदेहाचा आकारु। जैसा ढिवांचा अलंकारु। वाहिजे दृष्टीं प्रियारु। भीतरू कुडा।' –ज्ञाप्र ७४९. २ ढीवरांचे, कोळ्यांचे अलंकार. ३ (ल.) पितळेचे बेगडाचे दागिने. 'ले विषयाची ढीव।' –भाए ६०३. [सं. धीवर=कोळी]

**ढीवर**—पु कोळी; धीवर; ढिवर पहा. –ज्ञा १६.३१८. 'काय केलें जळचरीं। ढीवर त्यांच्या घातावरी।' –तुगा ३१४४. [सं. धीवर]

**ढीवळ**—न. तुकडा. 'कर्पुराचें जैसें ढीवळ।' –गीता १३. ९८७. [डिखळ]

**ढुंकणें**—अक्रि. मुद्दाम पाहणें; डोकावणें; डोकें खुपसून, पुढें काढून पाहणें. **ढुंकून**–क्रिवि. १ मुद्दाम डोकें पुढें काढून, खुपसून. (क्रि० पाहणें). २ वढून; डोकावून. 'म्या त्याजकडे ढुंकून पाहिलें नाहीं.' [हि. ढुंकना=झुकणें] **ढुंकून न विचारणें**–बिलकूल दुर्लक्ष करणें. [टोकावणें, अथवा डोकें]

**ढुकणी, ढुमणी, ढुस्शी**—स्त्री. धडक; ढुसणी पहा.

**ढुंग**—न. ढुंगण; कुल्ला. 'ढुंगासीं लावोनि लंगोटी। त्रैलोक्यसृष्टि हिंडवसी।' [ढुंग=उंचवटा, टेकडी] **म्ह**० 'ढुंगणाचें सोडून डोकीस गुंडाळणें.' =निर्लज्ज असणें, होणें.

**ढुंग(गा)ण, ढुंग(गा)ड**—न. मोठें ढुंग, कुल्ला, मागचा भाग; कुल्ल्याचा विस्तार, मोठेपणा दाखविणारा शब्द. [ढुंग] **ढुंगणावर आपटणें**–मूर्खपणामुळें मोठी ठोकर बसून नुकसान होणें. **ढुंगणास हात पोहोंचणें**–स्वतंत्र बनणें; कोणाची जरूरी नसणें. मुलगा मोठा होऊन स्वैर–वर्तन करूं लागला असतां म्हणतात. **म्ह**० तोंडाच्या बाता ढुंगाड खाय लाता (कोणाचें तोंड

चालतें कोणाचा हात. त्या म्हणीच्या सारखीच म्हण. तोंडाचें काम फक्त गप्पा मारण्याचें असतें पण इकडे ढुंगणास खस्ता खाव्या लागतात या अर्थी.)

**ढुंगणमोडें**—न. १ एक प्रकारचें इरलें. हें वापरणारा वांकला कीं इरलें ढुंगणावरून आंत दुमडलें जातें व अशा रीतीनें मागची बाजू भिजली जात नाहीं. २ एक प्रकारची मुंगी (कमरेजवळ हिच्या शरीराचे दोन भाग वेगळे पडतात). [ढुंगण+मोडणें]

**ढुंगणा**—स्त्री. (निंदाव्यंजक) स्त्री (सामान्यतः मोठ्या ढुंगणाच्या स्त्रीस शिवी म्हणून योजतात). 'काळ्या सावळ्या गोऱ्या भुरक्या लहान खुऱ्या ढुंगण्या।' –सला ८१.

**ढुंडा(ढा)ळणें**—सक्रि. शोधणें; धुंडाळणें. ढांढुळणें पहा. [प्रा. ढुंढुल्लण=गवेषण]

**ढुड्ढाचार्य**—पु. दुड्ढाचार्य पहा. [का. दोड्ड=मोठा+आचार्य]

**ढुवा**—पु. टेकाड; उंचवटा.

**ढुमकें, ढुमढुम, ढुमढुमें**—न.ढमकें; टिमकी; (लहान मुलांचा) डफ. [ध्व. ढुम]

**ढुमढुम**—क्रिवि. ढमढम पहा. [ध्व.]

**ढुमढुमें**—न. ढमढमें पहा.

**ढुमणी**—स्त्री. १ वासरूं पितांना गाईस जी ढुसणी देतें ती; धसक २ वासरास शिंगें येण्यापूर्वी त्या जागीं डोक्यावर टेंगुळें दिसतात तीं प्रत्येक. ३ टक्कर; धडक. [ध्व ढुम=धडकीचा आवाज]

**ढुलकी**—स्त्री (ना.) गोंडी वाद्य; डफडी. [ढोल]

**ढुशी, ढुस्शी**—स्त्री. १ धडक; टक्कर; डोक्यानें मारलेली धडक (विशेषतः वासरानें-पितांना गाईस). ढुसकी–णी पहा. २ खुपसणें; शिरकाव.

**ढुस**—अ. ढुस्स पहा.

**ढुसकणी**—स्त्री. धक्के मारणें; ढुसकणें; खुपसणी. [ढुसकणें]

**ढुसकणें**—सक्रि. १ भोसकणें; खुपसणें; टोंमणें; रेटणें. २ डोक्यानें ढुशी, धक्का, मारणें. [ढुस]

**ढुसकी**—स्त्री. १ खुपसणी; रेटणें; धडक; धक्का; ढुसकणी; आघात. २ ढुशी देणें; ढुसणी (मूल, वासरूं यांनीं पितांना दिलेली). (क्रि॰ मारणें). [ढुस]

**ढुसणी**—स्त्री. ढोसणी. १ रेटणें; ढकलणें; भोसकणें; ढोसणें; खुपस; धडक. (क्रि॰ देणें; मारणें) २ जागृति; फिरून आठवण देणें, करणें (आश्रयदात्याला); टोंचणी. [ढुसणें]

**ढुसणें**—सक्रि. भोसकणें; खुपसणें; खोंचणें; आंत मारणें (शिंग, खिळा इ॰ अणुकुचीदार वस्तु). –अक्रि. डोकें पुढें घालून आंत घुसणें; मुसंडी देणें. [ढुस]

**ढुसा, ढुस्सा**—पु. गुद्दा; बुक्की; बुकांदा; ठोसा (मुठीचा).

**ढुसा**—पु. (व.) शालीसारखें मुती पांघरूण; धुशा. [हिं.धुस्सा]

**ढुसी**—स्त्री. मुसंडी; ढुशी पहा. [ढुसणें]

**ढुसे**—(व) तीफणी पाभर.

**ढुस्स**—अ.काळा या विशेषणाला जोडण्यांत येणारें आधिक्यदर्शक उपपद किंवा प्रत्यय. उदा॰ काळा ढुस्स. (=काजळाप्रमाणें काळा). 'काळीं ढुस्स चरांजन–नग–शिखरेशीं विवूनि आसविलें।' –मोवन १०.४१.

**ढुळका**—पु. (व.) ढुकली; ढुलकी.

**ढूस**—वि. (व.) अविचारी; हूड. 'मुलगा फार ढूस आहे, तो मारायला कमी करायचा नाहीं.'

**ढेंक**—स्त्री. (राजा. गो.) बैलाचा शब्द, ओरडणें; हंबरडा. –स्त्रीन. १ एखाद्याच्या अंगावर मोठ्यानें कर्कश ओरडणें. २ डरकणी; डरकाळी (वाघ इ॰ क्रूर प्राण्याची). (क्रि॰ फोडणें). [ध्व.]

**ढेक**—पु. (व) गर्व. 'आजकाल त्याला फार ढेक झाला आहे'

**ढे(ढें)कणी**—स्त्री. १ एक बागुरड्याप्रमाणें काळसर तांबडा किडा (याला ढेंकणाची आई समजतात). २ ढेंकूण धरण्यासाठीं अनेक छिद्रें पाडलेली लांकडाची फळी. हींत ढेंकूण जाऊन बसतात.

**ढेकणी**—स्त्री १ (विणकाम) वही (ओवी) वरची धनुकली (धनुष्यकृति भाग). यालाच अटण्याच्यादोऱ्या बांधलेल्या असतात. २ (चाळ्यासाठीं) चक्र नसलें म्हणजे त्याऐवजीं कामटीचे तुकडे असतात व त्यास नकशीच्या दोऱ्या बांधतात. या प्रत्येक तुकड्यास ढेकणी म्हणतात.

**ढें(ढे)कणें**—अक्रि. (राजा.) १ आवेशानें एखाद्यावर उसळणें, ओरडणें; शिरा ताणणें; अंगावर येणें. २ डरकाळी फोडणें. [ढेंक]

**ढे(ढें)कर, ढेंकूर**—पुस्त्री. पोट भरल्या–फुगल्यामुळें पोटांतील वायु कंठातून बाहेर येतांना होणारा आवाज. 'भालेपणाचें ढेकर। जेवीं देती जेवणार।' –विपू १.९. 'लइव्यंस झुणका भाकर। खाऊनश्यानी देउं ढेकर।' –सत्यविजय नाटक. **ढेकर देणें–देऊन बसणें**–परद्रव्याचा अपहार करून तें जिरविणें; ठेव म्हणून ठेवलेला पैसा गिळंकृत झाला, परत मिळणार नाहीं असें स्वच्छ सांगणें.

**ढेंकली**—स्त्री. ओकती.

**ढे(ढें)क(कू)ळ**—पु. डि(ख)ळूळ; मातीचा गड्डा. जमिनीचा ढबळा. **ढेकळाप्रमाणें विरणें**–तेजोहीन, हतवीर्य होणें; जिरणें. **ढेकळें फोडणें**–(पाणथळ जमीनींत) सऱ्या पाडणें.

**ढे(कू)ळी, ढिकळी**—स्त्री. १ लहान रास, गोळा; ढिकळी (भाताची) ढेंप. २ गठुळी; गुठळी.

**ढेका**—पु. घाण्याच्या लाटेवर बसविलेलें व वांकविलेलें लांकूड. –बदलापूर २२६. [देप्रा. हिं. ढेंका, ढेंक=एक पक्षी]

**ढेंकारणें**— क्रि. (कु.) मोठ्यानें ओरडणें; ढेकणें. [ प्रा. ढेक्कार=बैलाचा शब्द ]

**ढेकी**—स्त्री. डंख; चुना, पोहे इ० कुटण्याची योजना. कांडण्याकुटण्याचें (भडभुंजाचा डंख, डंग या प्रमाणें) साधन. [ हि. ढेंक=लांब मानेची चिमणी यावरून ]

**ढे(ढें)कूण**—पु. १ दंशक जातींतील एक स्वेदज कीटक याला लहानशी सोंड असून ती तो माणसाच्या अंगांत खुपसून रक्त शोषण करितो: खटमल; मत्कुण. २ (तिरस्कारार्थी) घाण्या, कुचका, पादरा, माणूस. [देप्रा ढेंकुण] म्ह० ढेकणास ढेकूण काय खातो=( हिंस्र पशू एके ठिकाणीं शांततेनें राहूं शकतात ). वाईट वाईटाला कांहीं करीत नाहीं. ०पिसा–स्त्री.अव. (व.) पूर्ण दारिद्र्य, दैना. [ ढेंकूण+पिसवा ]

**ढेंके**—न. ढीक–कें तेलाच्या घाण्याच्या लाटेवर असणारें व तिला खालीं दाबणारें वांकडें लांकूड ढेका पहा.

**ढेंग**—स्त्री. १ ढांग; पाऊल; टांग. 'एका ढेंगेंत ब्रह्मांड आटी। यवन धांवे त्याचिया पाठी।' –ह २२.१८८ २ उभे राहिलें असतां दोन पायांच्या मधील अंतर 'नाचता नाचता ससा वाघाच्या ढेंगांतून पळाला.' –लोक २.८४. ३ मांडी किंवा सबंध पाय. ४ जांघ; मांडीचा सांधा. **ढेंगा–गें पसरणें**–१ लांब लांब टांगा टाकीत चालणें. २ पाय पसरणें; ताणणें. 'हा ढेंगा पसरून निजला.'

**ढेंगमत**—न. नास्तिक, पाखंड मत; धोतांड मत. ठेंगमत पहा. [ ढोंग+मत ]

**ढेंगळणें**—सक्रि. १ ओलांडून जाणें; ढेंग टाकून पलीकडे जाणें. २ (ल.) गाळणें; वगळणें (हयगयीनें, अश्रद्धेनें). ३ नासणें; मोडणें; लाथाडणें; फोडणें. ४ झिडकारणें; धुडकावणें; धिक्कार करणें. ढांगळणें पहा. [ ढेंग ]

**ढेंगळा**—वि. (व.) हलगरजी; अव्यवस्थित. 'तेथें सगळा ढेंगळा कारभार'

**ढेंगा**—पु. ढुंगण; कुला; ढुंग पहा.

**ढेंगा(ग)ळ** —वि. १ लांबटांग्या. २ लांब टांगा टाकीत जाणारा. ३ (ल.) अत्यंत उंच. ढांगळ पहा. [ ढेंग ]

**ढेंगाळणें**—क्रि. (व.) रेंगाळणें; हयगय करणें. [ ढेंगळा ]

**ढेंगाळी**—(ना.) स्त्री. दिरंगाई.

**ढेंगूमेंगू, ढेंगोजी, ढेंगोजीमेंगोजी, ढेंगोमेंगो** —पु. १ (निंदार्थी) बढाईखोर; लब्धप्रतिष्ठित; रिकामा डौली; ढोंगी; तोतया; लुच्चा माणूस. २ महारांचा गुरु. [ ढेंग द्वि. ]

**ढेंडळ, ढेंड(डा)ळणें, ढेंडाळी**—ढेंढळ पहा.

**ढेंढ(ढा)ळ, ढेंढाळी** —स्त्री. जुलाब; ढाळ; हगवण; ढगळ २ अर्थ पहा. **ढेंढ(ढा)ळणें**–अक्रि. जुलाब, ढाळ होणें; एकसारखें परसाकडेला जात असणें. [ ढेंढळ ] **ढेंढळपट्टी**–स्त्री. (ग्राम्य) १ जोराचा जुलाब; ढाळ. २ बऱ्याच वेळा परसाकडेस जावें लागणें; हगवण; ढेंढळ.

**ढे(ढें)ढे**—न. १ थें(धें)डें, प्रस्थ; धेंड; मोठी आकृति. २ अवडंबर. ०**फिटणें**–पावसाळा सरणें. 'कां वार्षिये ढेंढें फिटे। जेव्हां शारदीयेचा अनुघडु फुटे।' –ज्ञा ९.१०२. [ धेंड ]

**ढेणा**—पु चांगला लठ्ठ, पुष्ट ढेकूण, ऊ. टेण्या पहा.

**ढेनस**—न. (ना.) एकप्रकारची फळभाजी धेंडसें.

**ढे(ढे)प**—न. १ मातीचें ढेंकूळ; डिखळ. २ जिराईत पिकाची जमीन. 'त्या गावांत २५ बिघे ढेप आहे.' ३ जमिनीच्या पिकावरून, उत्पन्नावरून मोजणी (विस्तारावरून): मुडा, खंडी, कुडव, अधोली असे या जमिनीच्या मापाचे भाग केलेले असतात. –स्त्री. १ उंसाचा रस कढवून विशिष्ट आकाराच्या तयार केलेल्या खळग्यांत ओतल्यावर थंड होऊन त्याचा बनणारा गोळा. गुळाचा मोठा खडा; भेली. २ पेंड, भात, धान्य, दहीं, जटाभार, कागद, पानें, गवत इ०चा गोळा, गट्टा, जुडा, खाप. 'ढेंप लावित असे टुक यातें।' –किगवि २२. ३ (गुरें, पाऊस आणि विस्तव यापासून संरक्षण व्हावें म्हणून) वर मातीची डिखळें घालून लिंपून ठेवलेली कडब्याच्या पेंढ्यांची गंज; ढेपण. [ वैसं. द्रप्स=बिंदु; हिं. ढेपा ] **ढेपेचें गुरूं**–न. १ (शब्दशः) पेंडीवर पोसलेली गाय, बैल. २ (ल) लांचखाऊ माणूस.

**ढेप**—न. (प्रां.) चेप; गर्दी; खेंच; समुदाय.

**ढेपझाडा**—पु. पिकास योग्य अशा लागवडीच्या जमीनीची नोंद (तरफ वगैरेंचे).

**ढेपण**—नस्त्री. १ (मा ) पुष्कळ कडबा एकत्र करून रचलेला ढीग. २ ढेप (–स्त्री.) अर्थ ३ पहा.

**ढेपणें** —सक्रि. १ रास करणें; ढीग रचणें २ (ल) ठासणें; दाबून, खच्चून भरणें (अन्न). –अक्रि. चिकटून, दाबून ढेप होणें. (कागद, पानें इ० ची): आत जाऊन घट्ट होणें, थिजणें (कढलेला गूळ निवाल्यावर). ३ कायम होणें (एखाद्या कामावर, जागेवर). ४ (ढेप=डिखळ, गोळा यावरून) बसणें; आसनमांडी घालणें (बसणाऱ्याचा आळस किंवा एखाद्या ठिकाणीं जाऊन परत येण्यास होणारा फार उशीर अथवा बोलणाऱ्याचा क्रोध इ० ह्या शब्दानें ध्वनित होतो). 'हा एढोला कोणीकडे जाऊन ढेपला.' ५ (व.) माती लावणें; लिंपणें; (झाडाच्या बुंध्याच्या) भोंवतालीं माती लावणें. 'आंब्याचें झाड ३–४ वर्षांचें झाल्यावर त्याला ढेपलें पाहिजे' [ ढेप ]

**ढेपपहाणी**—स्त्री. लागवडीच्या जिराईत जमिनीची पाहणी.

**ढेपफोडणें** —न (कों) लांकडी मोगर; हातोडा. नांगरलेल्या जमीनींतील ढेकळें फोडण्याचे कामीं याचा उपयोग करतात.

**ढेपवांगी**—स्त्री. वांग्याची एक जात; झाड. **ढेपवांगें**–न. त्याचें फळ.

**ढेपशी**—स्त्री. १ गोवरीची राखुंडी; तिचा तुकडा; ढेपसा. २ गुळाची ढेप. **ढेपूशी**–स्त्री. (राजा. कुग.) फणस उभा चिरून केलेला लांबट तुकडा. –मसाप २.३६१. [ढेंप]

**ढेपसा** —पु. १ राखुंडीचा तुकडा; ढेपशी. २ तुकडा 'विस्तवाचा, राखेचा ढेपसा.' ३ भिंतीचा ढासळून पडलेला मातीचा भाग, पोपडा; खपली. ४ ढेप (पेंड, भात, दहीं, इ०ची). [ढेप; तुल० वैसं द्रप्स=बिंदु. –ऋग्वे ६ ४३.३.]

**ढेंपळ-ळा-ळी**, **ढेंपुळी**, **ढेंपूळ**—नपुस्त्री. मातीचें ढेंकूळ; डिखळ. ढेपळी हें अल्पत्वदर्शक रूप आहे. 'हे पांसुचि ढेंपुळी विरचिना।'–ज्ञा १५.४०१.

**ढेपाळी-ळें**—स्त्रीन. गुळाच्या ढेपाचा सांचा; कढलेला उंसाचा रस घट्ट होण्याकरितां जींत ओततात ती खळी; गुळाची ढेप तयार करण्यासाठीं केलेला खड्डा; कोठें कोठें अशीं भांडींच जमिनींत पुरून त्यांत कढलेला रस ओततात. [ढेप+आळी–ळें]

**ढेपूस**—न. नदीच्या कांठचा–दरडीचा कपरा (पाण्याच्या ओघामुळें ढांसळून पडलेला); ढांसळलेल्या भिंतीचा भाग; ढेपसा अर्थ ३ पहा. [ढेप]

**ढेपूळ**—न. (कु) फणसाचा अर्धाभाग; ढेपूशी पहा. [ढेपळ]

**ढेप्या**—वि. चिकट; खनपटीस बसणारा; धरणें धरून बसणारा. [ढेप]

**ढे(ढें)बर**—न. (व.) पोटाचें सुटलेलें दोंद. [डेंबरा]

**ढेबरपोट्या**, **ढेंबरा**, **ढेमरा**—वि. पोट सुटलेला; मोठ्या पोटाचा. डेंबरा पहा.

**ढें(ढे)बरा**, **ढेमरा**—वि. १ मोठें; पसरट (नाक). २ अशा नाकाचा. ३ सुटलेलें; फुगलेलें; फुगीर (पोट). [डेंबरा]

**ढे(ड)बरी**—स्त्री. (व) चाकापुढें आखावर एक लाकडाची वाटोळी फिरकी लावतात ती.

**ढेंबराढेमाइ**, **ढेमाई**—स्त्री. (निंदाव्यंजक) अंगानें स्थूल अशी स्त्री; फतीमा.

**ढेबरें**—न. (कों. ठाणें) धुरांडीवर बसविलेलें लांकूड. याच्यावर साटी येते.

**ढें(ढे)बरें**, **ढेमरें**—न. एक प्रकारचें थालीपीठ. पिठांत तिखट, मीठ इ० घालून तव्यावर थापतात व त्याला थोडी भोंकें पाडून त्यांत तूप, तेल घालतात व भाजतात.

**ढेंबळा**—पु. (कु.) भोंक.

**ढेंबूस**, **ढेंगूस**—न. टेंबूस; टेंबूस, टेंगळ; टेंगूळ; उटंगळ; फुगीरपणा; उंचवटा (शरीर, झाड, जमीन इ० वरील). (क्रि० वाढणें; येणें; फुगणें; निघणें; राहणें; उतरणें).

**ढेम**—स्त्री. टेकडी; खडक. 'तैसे उंचौनि लोटिलें कामें। नेहटती क्रोधाचिये ढेमे।'–ज्ञा १६.३४१.

**ढेमणी**—स्त्री. ढुशी; ढुसणी; ढुमणी पहा.

**ढेमस**—न. (ना.) लहान चक्ती (मुळा, दोडका इ० भाजीची).

**ढेमा**—पु. १ नदींतील बेट किंवा कोरडी जागा; ढिमा अर्थ २ पहा. २ टेंगूळ. ढेंबूस पहा.

**ढेर**—पु. डोळ्यांतून बाहेर आलेला चिकट मळ; पू.

**ढेर**—स्त्री. १ मोठें पोट; दोंद. २ मोठ्या मोटाचा माणूस; तुंदिल तनु. ३ नेहमीपेक्षां मोठा फणस, नारळ इ० फळ. –स्त्रीपु. १ रास; ढीग. २ (व.) रांग. [हिं.]

**ढेरणें**—अक्रि. मळानें भरणें (डोळे, पापण्या इ०); डोळे हगणें. [ढेर]

**ढेरपोट्या**, **ढेरा-ऱ्या**—वि. मोठ्या पोटाचा; पोट सुटलेला. –स्त्री. ढेरपोटी. 'ढेरपोटीला जशी कांचोळी शोभत नाहीं. ...'–कमं १.३२. [ढेर+पोट]

**ढेरी**—स्त्री. १ (ढेरचें अल्प रूप) लहान रास, ढीग. २ (व.) (निंदाव्यंजक) ढेरकी; पोट. [ढेर]

**ढेल**—स्त्री. नाण्यावर पुसट किंवा अर्धवट दिसणारा छाप. ढेली पहा.

**ढेल**—नस्त्री. १ ढेरपोट्या माणूस. २ राक्षस; लठ्ठ्या; धूड. ढील पहा. –स्त्री. (अशिष्ट) राशीच्याराशी; ढिगावर ढीग. [हिं. ढील; ढेला]

**ढेलच-ज**, **ढेलेज**—स्त्री. १ मोठा कमानदार दरवाजा. २ देवडी; (इं.) पोर्च. 'ढेलजेंत बसले शिंपी म्होरकी शिवली।'–ऐपो ४३०. ३ पडवी. ४ घराचा उंबरा [सं. देहली; अर; दिहलीझ्]

**ढेला**—पु. नदींतील बेट; कोरडी जागा. ढिमा, ढेमा पहा.

**ढेली**—वि. १ पुसट, अस्पष्ट दिसणारा (नाण्यावरील छाप); ढेल. २ वरील शिक्का न दिसणारें; झिजलेलें (नाणें). [ढेल]

**ढेव**—स्त्री. (गो.) डोह; खाडा

**ढेस**, **ढेसा**—पु १ (प्रां.) कांडें; कांडकें; पेरें; कोम; डिकशी; डिरी. 'ढेसी ढेसी वोल्हावली। अमृतधारी वो माय।'–ज्ञागा ३७४. माठ, राजगिरा यांच्या झाडाचा जाड दांडा. २ (रायपूर) कमळाचा दांडा. याची भाजी करतात.

**ढेस**—वि. (महानु.) निबिड; धीट. 'तयांचा श्रृंगारू कांई वाणावा। ढेंसा कवणु तो जोधांचा मेळावा।'–शिशु ९४४.

**ढेसण**—स्त्री. (व.) गर्दी; दाटी. 'जत्रेंत माणसाची होते' [ढसणें]

**ढेसण**, **ढेंसे**—न. मांडीचा सांधा; कटिसंधि.

**ढेसणें**—उक्रि. ढोसणें; ठासून, दडपून भरणें; जोरानें कोंबणें; रेटणें. [ढोसणें] —अक्रि. गर्दी करणें. 'तुज करावया नमस्कार। पुढें ढेंस महासिद्धांचा संभार।' –एभा ४.१०६.

**ढेळके**—न. १ बेळक्याची, फांट असलेली काटी. २ दुफांटा; दुबेळकें (काटी; खोड इ०चें). डेलकें पहा.

**ढै**—स्त्री. ढई पहा.

**ढैसा**—पु. (महानु.) अंकूर. ढेस–सा पहा. 'तमाळांचे ढैसें.' –शिशु ३७५.

**ढोक**—पु. (ना.) गिधाडासारखा प्रेतें फाडून खाणारा एक पक्षी; करढोक. 'जगीं पाहतां सारिखे हंस ढोक।' –दावि ३८२.

**ढोक**—न. (गो.) काकवी घेण्याचें लांकडी पात्र.

**ढोक**—वि. १ (व.) हलका; कनिष्ठ प्रतीचा (दागिना इ०). 'ढोक सोन्याचे डागिने केले.' २ (क.) शेवटचा (नंबर); ढोकल.

**ढोंक**—न. १ जुना, वठलेला, वृक्ष. २ (ल.) वृद्ध दुर्बल माणूस (पुरुष किंवा स्त्री).

**ढोंक, ढोंकें**—न. १ तेलाच्या घाण्यांत लाटेवर असलेलें बांकदार लांकूड. २ चरकांतली नवरा व नवरीच्या वरची आडवी तुळई किंवा माथेफळी असल्यास त्यावरील मोठी लांब तुळई याच्या टोंकास बैल जुंपलेले असतात. –क्रिवि. अति मोठा; अवाढव्य. ढांक पहा.

**ढोंकचें**—क्रि. (गो.) दाबणें; कोंबणें. ढोसणें पहा.

**ढोंकण**—न. पाथरवटाचें एक हत्यार; दगड फोडावयाचें कुदळीसारखें एक साधन.

**ढोकणें, ढोकसणें**—क्रि. (ना.) गटगटां पिणें. ढोसणें पहा. [हिं. ढोकना]

**ढोकरो**—वि. (कु.) म्हातारा. [गु. डोकरो]

**ढोकल**—वि. (क.) ढोक; शेवटचा.

**ढोकलणें**—क्रि. ढकलणें. [हिं.]

**ढोकळा**—न. १ चण्याच्या भरडयाचा वडा. २ हरभरा, उडीद किंवा इतर कडधान्यें याच्या मिश्रणाच्या पिठाचें बनविलेलें भजें, बोंड. ३ मोठा (ढब्बू) पैसा. ४ (नंदभाषा) पैसा. ५ तांबडया किंवा दुध्या भोपळयाच्या किसांत डाळीचें पीठ घालून तें अळवाच्या किंवा कोबीच्या पानावर थापून तळून केलेली वडी. –गृशि १.३६२.

**ढो(ढों)कून**—क्रिवि. ढुंकून पहा.

**ढोंग, ढोंगसोंग**—न. १ दांभिकपणा; सोंग; पाखंड; खोटी बतावणी. २ सबब; कांगावा; मिष. ०धत्तुरा–पु. ढोंग; ढोंगीपणाची वर्तणूक; फसवाफसवी; चाळे; फसविण्यासाठीं (मंत्र इ०) युक्त्या. [ढोंग+धतुरा] **ढोंगी–ग्या, ढोंगीसोंगी**–वि. १ ढोंग करणारा; दांभिक; पाखंडी; लबाड. २ (आजारीपणा इ०चें) सोंग करणारा; कांगावखोर. [ढोंग]

**ढोंग, ढोंगण, ढोंगाड, ढोंगाण, ढोंगाणमांडे**—ढुंग पहा

**ढोंगण**—ढोंग पहा.

**ढोंगमत**—न. टेंगमत, टोंगमत पहा.

**ढोंगा**—पु. ढुंगण; कुल्ला. [ढुंग]

**ढोंगेरा**—वि. ढुंगणाखालीं असल्यामुळें मळलेलें, ढुंगणाचें पारोसें (वस्त्र, वस्तु). [ढोंग, ढुंगण]

**ढोंचणें**—सक्रि. ढुसणें; ढोसणें पहा.

**ढोंडी–ढी**—स्त्री. वाटोळा आकार; फुगा. 'आणि ते सर्वेचि मोडोनि ये ढोंढी। ब्रह्म गोळकांच्या।' –ज्ञा ८.२२.

**ढोढर**—न. (व.) अंदाज; बातबेत (खर्चाचा) 'खर्चाचें ढोढर नाही'

**ढोढोवाडा, ढोढो**—पुस्त्री. ढवढव; (एखाद्याविषयीं दिवाळखोर, लबाड असा) गवगवा; बोभाटा; ओरड. (क्रि० होणें) [ढवढव]

**ढोण**—न. १ मोठा ओंडा (जळाऊ लांकडाचा). २ (निदार्थी) मांसाचा गोळा, पिंड; स्थूल माणूस. –वि. (ल.) अवाढव्य; अगडबंब.

**ढोण**—स्त्री. जनावरास पाणी पाजण्याचें लांकडी पात्र; डोण–डोणी पहा.

**ढोणकूर, ढोणप, ढोणा, ढोणें**—नपु. ढोण; लांकडाचा ओंडका, टोकळा. 'हें ढोणकूर चुलींत कसें जाणार?'

**ढोणगीमोट**—स्त्री. दोन बैलांनीं ओढली जाणारी मोट.

**ढोणगें**—न. ऊसांचा रस धरण्याकरितां चरकाखालीं ठेवलेलें पात्र. [डोण]

**ढोणग्या आसूड**—पु. शेतकऱ्याचा लांब आसूड.

**ढोणशीर**—स्त्री. टांचेच्यावरील शीर; घोडशीर.

**ढोणस**—न. १ झाडाच्या खोडाचें कापूस काढलेलें मोठें लांकूड. २ अजस्र, भयंकर प्राणी; अजगरास म्हणतात. ३ झाडामधील ढोली.

**ढोणसकड**—वि. (राजा) (निदार्थी) फोपशा; स्थूलदेही; आळशी (मनुष्य, जनावर).

**ढोणा–ण्या**—वि. १ मोठा व गलेलठ्ठ; स्थूल व मंद; टोणपेश्वर. २ वयानें मोठा पण पोरकट (मनुष्य). टोणा–ण्या पहा. [ढोण=ओंडका]

**ढोणी**—स्त्री. एक जातीची नाव, डोणी. हिचें चित्र जुन्या नाण्यांवरून आढळतें. द्राविडी भाषांतून हा शब्द जुन्या काळापासून रूढ आहे. [डोणी]

**ढो(ढों)पर** —नपु १ गुडघा. २ (विशेषतः नाशकाकडे रूढ) कोपराची खीळ, कमरेचा खवाटा इ०अर्थी. जसें:—कोपराचें—खांद्याचें—बोटांचें—गालांचें—कमरेचें—टिरीचें—पायाचें ढोपर. ३ (व) ढुंगण. ४ (चांभारी) जोडयाचीं टोकें प्रत्येक. **उराचें ढोपर**—न. छातीच्या हाडाचें अग्र. ०**खळी**—स्त्री. गुडघ्याचा ढोसा—धडक; गुडघ्याचा मार (क्रि० मारणें; देणें). ०**खुंटी**—क्रिवि. गुडघे खालीं टेकून (क्रि० चालणें; येणें). **ढोपरखुंटी बसणें**—गुडघे टेकणें. **ढोपरखुंटीस येणें**—ढोपर टेकून उभें राहण्याच्या दशेस येणें, प्राप्त होणें ०**गोटी**—स्त्री. गोटयांचा खेळ ह्या खेळांत बोटांच्या पेऱ्यांनीं, ढोपरानीं गोटया पुढें ढकलतात

**ढोपरणें**—सक्रि. आगलीमध्यें गोटी ढोपरानीं ढकलणें [ढोपर]

**ढोपराची वाटी**—स्त्री. गुडघ्याची वाटी

**ढोपरी**—स्त्री. गुडघी नांवाचा एक रोग. [ढोपर]

**ढोपा**—पु. ढोंपर; गुडघा.

**ढोबचूल**—स्त्री. (व.) १ जमीनींत खोदलेली लांब चूल; चर. २ आगळ.

**ढोबर**—न. (व.) फुटकें भांडें; फुटक्या मडक्याचें खापर. ०**होणें**—(व.) पोकळ होणें.

**ढोबळ-ळा**—वि. १ जाड; मोठा; बोजड; ओबडधोबड. 'दास म्हणे रे झाड ढोबळें बीज तें सूक्ष्मरूपी।' —दावि ३३२. (क.) ढेरपोटया.

**ढोबळा**—पु. १ मोठें भोंक (भिंत, जहाज, फळी, कापड इ०स पडलेलें); खिंडार. २ खालचा आधार सुटल्यामुळें लोंबणारा, झोल झालेला छपर इ०कांच्या तुराटया इ०चा गठ्ठा, गळाठा.

**ढोमण**—न. ढुंगण; कुल्ला

**ढोमणें**—न. १ चाखत माखत व चिवडून केलेलें अन्नसेवन. २ चाखळलेली, चिवडलेली स्थिति; चिवडाचिवड.

**ढोर**—न. १ बैल, गाय, म्हशी, इ० जनावरांची जात, वर्ग; गुरेंढोरें. २ बैल; गाय; म्हैस इ० पैकीं प्रत्येक जनावर; गुरूं. 'जैसा ढोरु सवुडवुडीं। रुतला पंकीं।' —ज्ञा १३.७८३. [सि. ढोऊ]

**ढोर**—पु. एक अंत्यज जात किंवा तींतील व्यक्ति; मेलेलीं गुरें ओढून नेणारी जात. कातडें रंगविणारे, कमविणारे चांभार.

**ढोरआंबा, ढोरांबा**—पु (गो) एक वृक्ष. यास मार्गशीर्षच्या सुमारास वाटोळीं फळें येतात.

**ढोरकी**—(स्त्री.खा.व.) गुराखी. [ढोर]

**ढोरकोंडा**—पु. वरचें जाड टरफल; भुस्सा. 'या ज्ञानाचा ढोरकोंडा।' —एभा २९.५०५. [ढोर=जाडा + कोंडा=टरफल; भुसा]

**ढोरकोळी** —पु. मोठा काळसर रंगाचा कोळी (किडा).

**ढोरगा**—पु (राजा. कु.) गिधाड; गृध्र.

**ढोरगी**—न (कु.) गुरांचें कातडें. [ढोर]

**ढोरगुंज**—स्त्री. एक प्रकारची मोठी गुंज (झाड व फळ).

**ढोरगुरूं**—न. गुरूंढोर; गुरांना व्यापक शब्द. विशेषतः काळया रंगाचीं गुरें. [ढोर+गुरूं]

**ढोरजा** —पु (विणकाम) मागाच्या लाटेचें (कापड गुंडाळावयाच्या लांकडाचें) कुसूं ज्यांत बसवितात ते दोन खुंटे प्रत्येकीं.

**ढोरडॉक्टर**—पु जनावरांना उपचार करणारा डॉक्टर. 'तालुक्यात गुरांचा दवाखाना नसल्यास नजीकच्या दवाखान्यांतील ढोर डॉक्टर उपचार करतो.' —गांगा ७२.

**ढोरमळी**—स्त्री. (शेतकी) उंसाचा रस कढवितांना प्रथम येणारी मळी.

**ढोरवाडा**—पु. गुरांचा गोठा.

**ढोर्‍या**—वि. (राजा.) ढोरांची; गुरांढोरांसंबंधीं (हाडें, कातडें किंवा त्याचे तयार जिन्नस). [ढोर]

**ढोल**—पु. १ एक मोठें चर्मवाद्य. नगारा; भेरी; पडघम. २ (ल.) मोठें पोट; दोंद. ३ (ना.) निंदाव्यंजक संबोधन. [ध्व. सं. ढौल; प्रा. ढोल्ल; फा. दुहुल्] (वाप्र.) **वाजत ढोलानें**—राजरोस; मोठया थाटानें; उघडपणें; निर्भयपणें; जय जयकारानें.

**ढोल**—स्त्री. (झाड, टेकडी, जमीन इ० मधील) मोठें बीळ; गुहा; पोकळ जागा; विवर; भुयार. 'मग ते ब्रह्मगिरीचे शिखरीं। औदुंबराचे ढोलांतरी।' —कथा २.१०.१३८.

**ढोलआंबा**— पु. एक मोठें आंब्याचें झाड.

**ढोलक-की** —स्त्री. लहान ढोल, नगारा. ख्याल गाणारे साथीकरितां हें वाद्य वापरतात [ढोल]

**ढोलकें-गें**— न. डुमकें; लहान ढोल; ढोलकी. (वाप्र.) ०**फोडणें**—गुप्त गोष्ट उघड करणें ०**वाजणें**—गाजावाजा होणें; दुष्कीर्ति होणें ०**पिटणें**—स्तोम माजविणें; बडेजावी गाणें. 'एकानें सुधारणेच्या तत्त्वांचें ढोलकें पिटावें व त्याच्या बगलबच्चांनीं भोंवतीं उडया मारून ...' —टि ४ ७९. [ढोल]

**ढोलक्या**—वि ढोलकें वाजविणारा. [ढोल]

**ढोलखांब**—पु शेतांतून पक्षी हांकून लावण्याकरितां ज्यास वाजविण्याचा ढोल किंवा सूप बांधतात तो खांब. [ढोल+खांब]

**ढोलगुंज** स्त्री मोठी गुंज; ढोरगुंज पहा.

**ढोलची** —स्त्री. ढोलकी (तमाशांत वाजवितात.).

**ढोलज**—ढेलच-ज पहा.

**ढोलजी**—पु. ढोल वाजविणारा. [हिं.]

**ढोलमांजर**—पुन. मांजराची एक जात. कांडेचोर; ऊद; खवल्यामांजर पहा.

**ढोला**—पु. १ अकस्मात होणारा जबरदस्त तोटा, नुकसान (व्यापारांत वगैरे). (क्रि० बसणें). २ (ल.) फसवणूक: विश्वासघात. (क्रि० देणें). 'पावसानें ढोला दिला.' [ढोल=पोकळपणा]

**ढोला**—पु. (ना. व.) १ कणगा: धान्य सांठविण्याची कोठी. २ ढोल: ढोली: झाडाची पोकळी. [ढोल]

**ढोलार**—न. १ वठलेलें व पोकळ झालेलें झाड. २ दोंद: सुटलेलें पोट. ३ पोट पुढें आलेला, ढेरपोट्या माणूस किंवा पशु. [ढोल]

**ढोली**—स्त्री. ढोल; पोकळी; खबदाड; विवर; दरी (झाड, खडक, टेकडी इ० तील) [ढोल]

**ढोली**—स्त्री. (ना) ल्हान ढोला, कणगा.

**ढोली**—पु. (क.) ढोल वाजविणारा. [ढोल]

**ढोली**—स्त्री. दोनशे पानांचा जुडगा. [हिं.]

**ढोल्या**—वि. १ ढोल; ढेरपोट्या. २ ढोल वाजविणारा. [ढोल]

**ढोसकणी-णें, ढोसकी-णी-णें**—ढुसकणी इ० पहा.

**ढोसण**—स्त्री. (कों.) सोसाट्याचा वारा: विशेषत: जमीनीवरून येणारा (ईशान्य व आग्नेयीकडून).

**ढोसणें**—उक्रि. घटाघट, गटगट पिणें: ढसासा गिळणें:ओंकणें; एकदम चट्ट करणें. [ध्व. ढो! ढो! गिळण्याचा आवाज] **ढोसढोसून जाळणें**-(ल.) अत्यंत त्रास देणें: छळणें. [ढोसणें]

**ढोसरा**—पु. ढासरा पहा.

**ढोसरा**—पु. १ ठोसा; रपाटा; तडाखा. (क्रि० देणें; मारणें). २ टोमणा: व्यंगोक्ति. [ढोसणें]

**ढो(ढौ)सला**—पु. बांगडीचा एक प्रकार: एक ओबडधोबड बांगडी.

**ढो(ढौ)सा**—पु. १ गुद्दा: रद्दा; बुक्की· ठोसा. २ ढोसण पहा.

**ढोऱ्कया**—पु. एरंडाचें मोठ्या जातीचें बी. –कृषि ३५८.

**ढौढव, ढौढवणें**—ढवढव, ढवढवणें पहा.

**ढौळ**—न ढौल पहा.

---

# ण

**ण**—वर्णमालेंतील १५ वें व्यंजन अक्षरविकास:—याच्या सात अवस्था असून पहिली अशोकाच्या शिलालेखांत, दुसरी पहिल्या आणि दुसऱ्या शतकांतील कुशानवंशी राजाच्या लेखांत: दुसऱ्या पासून तिसरी, चौथी राजा यशोधर्मन् याच्या मंदसोर येथील लेखांत (स. ५३२) पांचवी उष्णीशविजयधारिणी या ग्रंथांत सांपडते. सहावें रूप हें उत्तरेकडील नागरी लिपींत रूढ आहे व यावरूनच प्रचलित रूप रुढ झालें.

---

# त

**त**—वर्णमालेंतील सोळावें व्यंजन; दन्त्य अथवा चौथ्या वर्गातील पहिलें व्यंजन; अक्षरविकास:–या अक्षराचें सर्वांत जुनें रूप अशोकाच्या शिलालेखांत, दुसरें रूप भट्टिप्रोलु येथील लेखांत, व (खि. पू. २ रें शतक), तिसरें रूप सराहा (चंबा राज्य) येथें सांपडलेल्या प्रशस्तीमध्यें (इ० स० १० वें शतक) आढळतें व हेंच रूप हल्लींच्या रूढ रूपाशीं पुष्कळ अंशीं जुळतें

**त**—अ. (ना.) तर [तर अल्प.]

**ता**—(सांकेतिक) १ तहत; तागाइत: पावेतों: पर्यंत. 'सलास सबैन ता खमस सबैन येकूण.'–भाव्र १०.३.११६. २ तर्फ 'देहाय ता पाठस'–रा १८.३२. ३ तालुका. ४ तमलमात. ५ तथा. ६ तपशील. ७ तहा=ला; चतुर्थी विभक्तीचा प्रत्यय 'ता मोकदमानी' =पाटलास. ८ तपे=कांहीं खेड्यांचा गट. 'ता वीरवाडी' ९ तालीक=नक्कल. १० तकसीम–शीम–तक्षीम=हिस्सा, भाग, वांटणी, बाजू, तट.

**तइनात, तइनातजाबता, तइनाती**—तैनात इ० पहा.

**तई-ई**—क्रिवि. (कवि.) तेव्हां; त्यावेळीं. ते पहा. 'वचन आपुलें सिद्धी नेई। तुका म्हणे तई मज कळसी।'–तुगा ७३६. [सं. तदा; प्रा. तइ]

**तई-ई**—क्रिवि. तेथें; तिकडे. –मनको. [सं. तत्र; प्रा. तइ]

**तई**—स्त्री. अन्न शिजविण्यास उपयोगी असें धातूचें किंवा मातीचें भांडें: तवी; तवली. –बदलापूर ६५. [म. तवी]

**तउरी**—वि. (क) तवरी पहा.

**तऊर**—पु. तवर. १ तोरा: आढ्यता: दिमाख: ऐट: गर्व. 'जोराचा–विद्येचा–धनाचा–अधिकाराचा तऊर.' २ तडखपणा; जलद राग येण्याचा स्वभाव: शीघ्रकोप ३ दिलदारपणा. अभिमान. ४ धिटाई: हिय्या· हिंमत [अर. तहव्वुर=राग. घाई]

**तकट**—न. १ दागिने इ० करण्यासाठीं ठोकून पातळ केलेला सोनें इ० धातूचा पत्रा: तबक. वर्ख २ (राजा.) ल्हान मुलामुलींच्या करगोट्यांत पुढें घालावयाचें पिंपळपान: एक दागिना. [फा. तख्त; म. तगट]

**तकट, तकट्न**—वि.क्रिवि क्रियेंतील आवेश, जोर, जलदी, चपळाई, भरगच्चपणा इ० निदर्शक असा क्रियापदावरोवर योजावयाचा शब्द· तडक पहा आवळून गच्च. उदा० तकट बांधणें= आवळून, गच्च बांधणें. तकट्न जेवणें=भरपूर. स्वच्छून जेवणें. तकट–पळणें–निघणें–धांवणें=एकदम पळत सुटणें; एकदम चालू लागणें इ०. 'पाठीवर घाव घेऊन तकट पळालेला इंग्रजी सोजीरहि आमच्या बाजीरावापेक्षां .. ... अधिक शूर असें ज्यास भासत नाहीं...'–नि ७०७. [तडक]

**तकटणें**—उक्रि. १ आवळणें; घट्ट बांधणें; तकटून बांधणें. २ सपाटून खाणें; पोटांत खच्चून भरणें; तकटून जेवणें. 'दोन शेर भात तकटावयाला पाहिजे, काम मात्र करायाला नको.' [तकट]

**तकट(ड)बंदी, तगटबंद-दी**—स्त्रीपु. १ कुंपण वगैरे घालून वेढलेली स्थिति; परिवेष्टण; आवरण. २ वेढा; कोंडमारा. ३ (ल.) तगादा, निकड लावणें; बोकांडीं बसणें. ४ सामानसुमान इ० घट्ट, आवळून बांधणें ५ (ल.) अटकाव, प्रतिबंध करणें; कोंडणें; कोंडमारा करणें. [तकट=घट्ट+बंदी]

**तकटी**—स्त्री. पदक; पिंपळपान; तकट अर्थ २ पहा. 'महामोलाचा हा पट तदुपरी पीत तकटी।' —निमा १.८३. [तकट]

**तकटें**—न १ दार, खिडकी इ० कांवरील ताटी, जाळी, चौकट. २ धातूचा पत्रा. तकट अर्थ १ पहा [तकट]

**तकडँ-डे**—क्रिवि. (माण. कुण.) तिकडे. याच्या उलट हकडँ. [तिकडे]

**तकडी**—स्त्री. चोवीस चिवट्यांचा (जाडयाभरडया सुताच्या गुंडाळयांचा) समुदाय

**तकणें**—सक्रि (व.) लुबाडणें; (एखादी वस्तु) फुकटांत मिळविणें.

**तकत**—शअ. (गो.) पर्यंत; पावेतों. उ० सांजवेळ तकत= संध्याकाळपर्यंत. [तो वक्त अप.? हि तक्=पावेतों]

**तकतक-तकां**—क्रिवि. चकचक; झकझक-झकां; लकलक. (क्रि० करणें) टकटक पहा. [दृश्यानुकरण. तक् द्वि.] **०करणें**—अक्रि. (व.) उत्कंठित होऊन वाट पाहणें; अस्थिर होणें 'तें मूल जाण्यासाठीं तकतक करतें.'

**तकतकणें**—अक्रि. १ चकाकणें; चमकणें; लखलख, झकझक करणें. २ (मनुष्य इ०कांचें शरीर) चमकदार, तुळतुळीत, सतेज दिसणें. [तकतक]

**तकतकी**—स्त्री. चकाकी; झकाकी; तुळतुळीतपणा; उजळपणा; चमक. [तकतक]

**तकतकीत**—वि. चकचकीत; तुळतुळीत, उजळ; चकाकणारें; मोहरेदार. [तकतकणें]

**तक(ख)तराव**—पु. (खा.) यात्रेंतून मिरवावयाची रथाप्रमाणें शृंगारलेली नाच-पोराच्या तमाशाची गाडी, तिजवरील तमाशा. तक्तरावा पहा. [फा. तख्त्+रवान्=चालता]

**तकदम**—वि. जुनें; मागील; गत; झालेलें. [अर. तकादुम]

**तकदीर, तक्दीर**—न. दैव; नशीब; अदृष्ट; भाग्य. [अर. तक्दीर्]

**तकपट्टी**—स्त्री. (व.) कपाशीच्या गाडीचें वजन, भाव, किंमत इ० तपशील लिहिलेली चिठ्ठी. [तग+पट्टी]

**तकमकणें**—अक्रि. (कु.) कासावीस होणें; कलकलणें. तगमगणें पहा

**तकरार-द, तक्रार**—स्त्री. १ (कायदा.) वादी-प्रतिवादी-फिर्यादी-आरोपी-भांडणारे दोन पक्ष इ०कानीं स्वपक्षसमर्थनार्थ केलेलें भाषण, लिखाण; (इं.) आर्ग्युमेंट. (क्रि० करणें; घेणें). २ हरकत; अडथळा करणें; अडचण; आक्षेप घेणें; कुरकुर. (क्रि० करणें सांगणें). ३ वादविवाद; भांडण; झगडा. ४ आक्षेप; फिर्याद; गाऱ्हाणें; ओरड. ५ (चुकीनें) दोषारोप; आळ. तकराळ पहा. ६ पुनरुक्ति. 'या प्रमाणें तक्रार करून सांगून पाठविलें.' —रा ५. २०६. [अर. तक्रार्] **०अर्जी**—स्त्री. (कायदा.) खालच्या कोर्टाच्या विरुद्ध वरिष्ठ कोर्टाकडे केलेला अर्ज; दाद मागणें. (इं.) अपील. **०खोर, तक्रारी-ऱ्या**—वि. नेहमी तक्रार करणारा; भांडणखोर; हुज्जतखोर. **०खोरी**—स्त्री. भांडखोरपणा.

**तकराळ**—स्त्री. १ वस्तुस्थितीचा विपर्यास करून सांगितलेली हकीकत; बनावटपणा. 'याचे भाषणांत तकराळ दिसतें.' २ दुसऱ्यास फसविण्याकरितां, गोत्यांत आणण्याकरितां रचलेलें कुभांड; आळ; तोहमत; दोषारोप; तकरीर. ३ तकरार पहा.

**तकरीब**—स्त्री. तक्रीब पहा.

**तकरीर, तक्रीर**—पु १ (एखाद्यावर आणलेला) खोटा आरोप, आळ. (क्रि० आणणें; येणें). हकीकत? 'चित्रगुप्त बरदास्त लिहितसे। विषयाची तकरीर.' २ तक्रार; स्वपक्षसमर्थन; कैफियत; करीणा. ३ (ल.) खोटया व लांबलचक सबबी. ४ प्रतिज्ञालेख, शपथेवरील जबानी. ५ वादीचा लेख त्यास दाखवून त्यावर त्याची सही घेत असत तो. —भाअ १८३२. ६ हकीकत; माहिती. 'फितूर केला होता त्याच्या तकीरा.' —वाडसमा ३.७१. [अर. तक्रीर]. **०कर्दे**—वि. १ तकरीर करणारा. २ निवेदित; सांगितलेलें. —वाडशाछ १७८. [अर. तकरीर+कर्दे] **०नामा**—पु. खटल्याची लेखी हकीकत; कैफीयत.

**तकलादी**—वि. १ लबाडीनें अथवा निष्काळजीपणानें, हात राखून, पूर्ण कसब खर्च न करतां तयार केलेलें (घर, पेटी, दागिना इ०); चालढकल करून बनविलेला. २ बनावट; नकली; न टिकणारा; तकलुबी; हलका. [अर. तक्लीदी]

**तक(ख)लीफ-प, तक्लीफ्**—स्त्री. (व.) श्रम; तसदी; त्रास; [अर. तक्लीफ्=तसदी]

**तकलुबी-पी, तकलोबी**—वि. दिखाऊ; खोटा; बनावट; जुजबी; हलक्या प्रतीचा. (माण.) तकलोपी. तकलादी पहा. [अर. तकल्लुब्]

**तकलें**—स्त्री. (गो.) डोकें; मस्तक; टकलें.

**तकवा, तक्वा**—पु. १ बळ; जोर; ताकद; उत्साह; हुषारी; कोशीस. 'मराठा तितुका मेळवावा। आपला महाराष्ट्रधर्म

वाढवावा । येविषयीं न करितां तक्वा । पूर्वज हांसती । ' –समर्थसंजीवनी ५९. २ उत्तेजन; आधार; धीर. ' एक तक्वा आपला धरिला आहे. ' –पेद २०.२९७. [ अर. तक्वियत् ]

**तकवी, तकवाई**—स्त्री. तगाई पहा. –गांगा १८९.

**तकवियत कौल, तकवेत कौल, तकवेत चिठ्ठी**—पु. स्त्री. कायदेशीर कौल तयार होईपर्यंत सरकारानें नोकरास, खेड्तास, कंत्राटदारास दिलेलें तात्पुरतें आश्वासनपत्र; मदतपत्र; [अर. तक्वेत्, तक्वियत=आश्वासन, समाधानी+अर. कौल्=वचन ]

**तकशी(सी)म, तक्सीम**—स्त्री. १ वतन, गांवचा खर्च इ० कांचा वांटा, विभाग, फाळणी, वांटणी, हिस्सा, भाग. २ विशिष्ट नियमांनीं संघटित असलेला समाज, संघ, वर्ग, जाति, मंडळ, कंपनी. [ अर. तक्सीम ] **०दार**–पु. वांटेकरी; भागीदार (जमीन, हक्क, मालमत्ता इ०चा). **०दारी**–स्त्री. १ तक्सीमदाराचा हक्क; वाटणी; भाग. २ तक्सीमदाराच्या हक्कानें मिळावयाचा द्रव्याचा हिस्सा; भागीदारी. [ तक्सीमदार ]

**तकशी(सी)र, तकशी(क्सी)र, तखशी(सी)र**—स्त्री. १ अपराध; गुन्हा; चूक; अन्याय २ न्यून; कमीपणा. [ अर. तक्सीर ] **०दार**–वि. गुन्हेगार; अपराधी; दोषी. [ अर. तक्सीर+दार ]

**तकस**—पु. ( राजा. कु. ) १ ( धक्का, तडाखा लागल्यानें झालेली ) इजा; जखम; व्यथा; त्रास; दुःख. २ (ल.) ( अपमान, उपहास, निंदा इ०कांनीं मनाला होणारी ) व्यथा; त्रास; आधि. ( क्रि० पोहोंचणें; पावणें; लागणें; बसणें ). [ सं. तक्ष्=तासणें ? ]

**तकसुबी**—स्त्री. लबाडी; फसवेगिरी. ' रांडेनं तकसुबी करून आली आहे. ' –भाईसंग्र १८३४.२११. [ अर. तकझ्झुब् ]

**तकाकणें**—अक्रि. (तकतकणेंचा अतिशय). प्रकाशणें; अतिशय तुळतुळीत दिसणें; लकाकणें. [ तकतक ]

**तकाकी**—स्त्री. (तकतकीचा अतिशय). तेज; चकाकी; उज्वलता. [ म. तकतकी ]

**तकावी**—स्त्री. तकवी; शेतकऱ्याला जमीनदारानें, सरकारानें कर्जरूपानें दिलेली आर्थिक मदत; तगाई पहा. –गांगा १८९. [ अर. तकावी ]

**तकिया, तक्या**—पु. १ मुसलमानी फकीराचें विश्रांतिस्थान, मठ; या ठिकाणीं तो रहातो व धर्मज्ञानाचा प्रसार करतो. ' अलीकडे धामधुमीचे सबबेनें मोहिबी आपला कदीम तकिया सोडून उपर घाटावर जाऊन नवाच तकिया बनविला आहे. ' –ब्रप ३३७. ' बळात्कारें हिंदुची मुलगी घेउनि । तकियांत बैसतां फकीरांनीं। क्रोधें समोंवतीं लाऊनि अग्नि। बोंबलित रहत ठेविलें तया। ' –दावि ४०३. २ पीर पुरलेली जागा; मशीदीसारखा एक प्रकार. ३ टेकण्यासाठीं भिंतीशीं उभी ठेवावयाची मोठी उशी, लोड. तक्या पहा. [ अर. तकिया ]

**तकीप**—वि. सिद्ध; सज्ज; स्थापित. –राव्य ८.४७. ' पहिली लढाई झाली फार ठीक । केले मोर्चे तकीप । ' –ऐपो १२६. [ तरकीब ? तहकूब अप ? ]

**तकुबी**—स्त्री. तात्पुरती मनाई; तहकुबी पहा. [ तहकुबी ]

**तकूब**—वि. तहकूब; तात्पुरतें बंद, रद्द, थांबवलेलें. ( क्रि० करणें; ठेवणें; होणें ). –न. तकूब चिठी पहा [ अर. तवक्कुफ्=कांहीं काळपर्यंत थांबणूक ] **०चिठी**–स्त्री. १ एखाद्या कुटुंबास सारावसुलीच्या अधिकाऱ्यापासून उपद्रव होऊं नये म्हणून कांहीं काळपर्यंत वसुलीचा तगादा बंद ठेवण्याचा सरकारी हुकूम, पत्रक, परवाना. २ कांहीं वेळपर्यंत आराम देणारें औषध. [ तकूब+चिठ्ठी ]

**तक्कट**—क्रिवि. चटकन; चुटकीसरसें; तावडतोब.

**तक्की लावणें**—क्रि. ( व. ) वजनाच्या काटयावर कपाशीच्या गाडया लावणें.

**तक्कू**—पु. आंब्याच्या फोडी ठेंचून, किसून त्यांस तिखट, मीठ लावून केलेली चटणी; कवठ इ०चा ठेंचा.

**तक्केफाड**—वि. ( व. ) ( नेहमीं तक्क्याशीं बसून राहणारा ) आळशी; सुस्त. [ तक्या+फाडणें ]

**तक्टो**—पु. ( गो. ) चटईचा लहान तुकडा.

**तक्त, तख्त, तखत**—न. १ सिंहासन; नृपासन. २ पीठ; मठ; गादी. शीखांमध्यें मुख्य गुरुद्वारांना म्हणतात. [ फा. तख्त् ] **०न(नि)शीन**–वि. सिंहासनारूढ; राज्यावर, गादीवर बसलेला. [ फा. तख्त्+निशीन्=बैस ] **तक्ताधिकारी, तक्ताधिपति**–पु. गादीवर असलेला; राजा. [ फा. तख्त+म. अधिकारी, अधिपति=मालक ]

**तक्त(ख्त)पोशी**—स्त्री. १ लांकडी कळाशीदार तक्त्यांनी केलेला कडीपाट–जमीन; पटई. ' नंतर तो गलबताच्या तक्तपोशीवर आपल्या पत्नीशीं संवाद करूं लागला. ' –कोरकि ६. २ तक्तपोशी केलेली खोली, माडी. [ फा. तख्तपोश्=फळ्यांची जमीन ]

**तक्तपोस**—पु. (ना.) लांकडी पलंगवजा मोठी बैठक. [ फा. तख्तपोश् ]

**तक्तरावा**—पु. लग्न इ० समारंभाच्या मिरवणुकींत नाचपोरे किंवा कलावंतिणी यांच्या ताफ्याकरितां केलेली फळ्यांची लांकडी चौरंगासारखी रचना. लग्नाच्या वगैरे मिरवणुकींत हा तक्ता माणसांच्या डोक्यावर किंवा गाडीवर ठेवतात. फिरता तमाशा; नाच. तकतराव पहा. [ फा. तख्त्=सिंहासन+इ०चा रवान्=चालणारें, हालणारें ]

**तक्ता**—पु. १ ( लांकडाची ) फळी; पाट. २ बागेंतील फुलझाडांचा ताटवा, वाफा. ३ लागवडीपैकीं एक भाग; पांडगा. ४ शाली इ०कांचा गठ्ठा. ५ कागदाचा ताव अथवा अर्धा कागद; (यावरून)

रकाने पाडून केलेलें निरनिराळ्या कोष्टकांचें यादी–हजेरी–इ०कां सारखें पत्रक; एकूण एक बाबींच्या तपशिलाचें सामान्य पत्रक; नकाशा; कोष्टक (रकाने पाडलेलें). ६ कागदाचा विशिष्ट आकाराच्या नमुन्याचा तुकडा. (ज्यावरून तसल्याच आकाराचे तुकडे कापतां येतात असा. तक्ती पहा. ७ लांकडी ओटा. ' वाणी लोकांच्या दारांपुढील पूर्वीपासूनचे ठेवलेले तक्ते उखडून टाकले. ' –विविधज्ञ १.१२१ ८ (ढोर.) सागळ, पेमी, पटे वगैरे बेतण्यासाठी केलेली लांकडी फळी. [फा. तख्ता]

**तक्ती**—स्त्री. १ कागदाचे विशिष्ट आकाराचे तुकडे करण्याकरितां प्रथम नमुन्याकरितां केलेला तुकडा; तक्ता अर्थ ५ पहा. २ अशा तुकड्यांची रास; पुस्तकाच्या पानांचा ढीग, चळत. [फा.] ०**पत्र**–न तक्ती अर्थ १ पहा. [फा. तक्ती+सं. पत्र= पान]

**तक्ती**—वि. तक्त्यांचा, फळ्यांचा केलेला. [तक्ता]

**तक्दमा**—पु १ आगाऊ पैका; विसार. ' तक्दमा वसूल घेतला. ' –ख ८५१ २ अग्राधिकार पहिला मान. –क्रिवि. आगाऊ. [अर. तक्दीम]

**तक्या**—पु १ तकिया पहा. २ आरामशीर टेकून बसण्याकरितां केलेला दगडी ओटा, ओटी इ०वर टेकण्याकरितां केलेला उंचवटा.

**तक्र**—न ताक. [सं.] सामासशब्द–०**कौंडिण्य न्याय**–पु. एका पदार्थाला दोन सजातीय विधी असतां त्यांपैकीं सामान्याला विशेषाचा जो बाध येतो तो. उदा० सर्वांस तक्र वाढा आणि कौंडिण्यास दहीं वाढा, या वाक्यांत दह्याच्या विधानानें तक्राच्याला बाध आला. ०**मंडूर**–पु ताकाच्या अनुपानाशीं घ्यावयाचा मंडूर (लोहकीटापासून केलेलें औषध.) [सं तक्र+ मंडूर] ०**योग**–पु. मीठ, हळद व मोहऱ्या हीं औषधें प्रत्येकीं २० तोळे घेऊन ४०० तोळे ताकांत टाकावीं आणि तें भांडें तोंड बांधून तीन दिवस तसेंच ठेवावें नंतर त्यांतील २० तोळे ताक दररोज प्यावें याप्रमाणें २१ दिवस केलें असतां पानथरीचा नाश होतो. –थोर २.१९८. [सं. तक्र+योग]

**तक्रार, तक्रारखोर**—तकरार इ० पहा.

**तक्रीब**—स्त्री संबंध तकरीब पहा. ' त्यास मजेल्याची तक्रीब लावणें निसबत नाहीं. ' –रा ५.१५७. [अर तक्रीब]

**तक्लादी**—वि. तकलादी पहा.

**तक्लीफ**—स्त्री. तकलीफ पहा.

**तक्लुबी, तक्लुपा–फा**—वि. दिखाऊ; बनावट; खोटा तकलुबी पहा. (कागद) ' तकलुबी अमेल. ' –रा ३.११७.

**तक्वा**—पु. जोर; उत्साह तकवा पहा. ' तुमचे लिहिल्याचे तक्व्यावरी पंधरा दिवस लोकांस उमेद होती. ' –रा १२.८३. [अर. तक्विया] ०**दिल्दारी**–स्त्री. उत्तेजन; उत्साहवर्धन; समाधान. ' संचणीचा वख्त आहे, तक्वादिल्दारी पाठवणें ' –रा १६.३३. [तक्वा+दिल्दारी]

**तक्वियतकौल, तक्वेतकौल**—पु तकवियत कौल पहा.

**तक्वेत**—स्त्री. समाधानी; खातजमा. ' साहेबीं तक्वेतीचें खुर्दखत सादर केलें ' –रा १६.३३. [फा.] ०**कौल**–पु. आश्वासनपत्र. तकवियतकौल पहा.

**तक्शी(क्सी)र**—स्त्री. तकशीर पहा ' तहमूल (सहन) करावयास तक्सीर केली नाहीं. ' –इमं ६७.

**तखत, तख्त**—न. तक्त पहा. ' तखत फोडुनि केली धुळधाणी। ' –ऐपो १२५. ०**नशीन**–तक्तनशीन पहा.

**तखतराया**—पु. तक्तरावा. ' तखतराया रथ हनीचा पुढें वाजे नौबतखाना। ' –ऐपो ६४०.

**तखता**—वि. तक्तासंबंधी; राजाचा; राजासारखा. ' तखती पैराव केला. ' –वसा ४८.

**तखदि(दी)र**—न. नशीब; दैव तकदीर पहा. ' माझ्या तखदिरात आहे तरी काय ? ' –सूर्यग्र १३५.

**तखलादी, तखलु(लो)बी**—वि. तकलादी पहा.

**तखली, तखलीव्याध, तखलें, तखलें दुःख, तखल्यारोग, तखील**—कथली, कथील यांपासून वर्णविपर्यासानें बनलेले शब्द. कथली, कथील इ० पहा.

**तखा**—पु. जनखा पहा

**तखान**—पु दरोडा. ' तंव तेथें चोर तखान घालुं आला। ' –पंच ३.१७.

**तखेक**—वि. तर्कानें समजणारें; कल्पनाग्राह्य; तर्कित. ' तियेन आपुलें पातक। सांडोनि दिधलें सकळैक। ऐसें वर्तमान तखेक। तयासी नाहीं गमलें। ' –ख्रिपु २.२३.९८.

**तखर**—तक्त पहा.

**तख्तराव–वा, तगतराव**—पु. तक्तराव, तक्तरावा पहा. ' मणिखचित अपारा पालख्या तख्तरावें। ' –सारुह ३.३६.

**तख्ता**—पु. तक्ता पहा.

**तग**—पु. टिकाव; निभाव; चिकाटी. (क्रि० निघणें; धरणें). ' गमले ते तग न निव सोसुनि कुलिशोत्थ दाह, तग ज्यातें। ' –मोभीष्म ७.१८. तगाव पहा. [सं. तक्=सहन करणें]

**तग**—पु. वजन करावयाचा मोठा तराजू. (वाप्र.) **तगी लावणें**–१ वजन करण्याकरितां कांट्यांत घातलें जाणें. २ (ल.) (एखादें काम) लोंबकळत, भिजत, राहणें–पडणें; (कोर्टांतील दावा इ०) अनिश्चितपणें अर्धवट अशा स्थितींत राहणें.

**तंग**—पु. घोड्याचें खोगीर आंवळण्याचा चामड्याचा पट्टा; घट्ट आवळलेला पट्टा [फा. तग्] ०**तोड**–वि. नग्नदीक्षा घेण्याच्या

बेतांत असल्यामुळें वस्त्राचे बंद तोडून टाकलेला (गोसावी इ० ). [ तंग+तोडणें ] ०तोबरा-री-तोब्रा-पुस्त्री. घोडयाला लागणाऱ्या जिन, तंग, तोबरा इ० जिनसा. ' घोडयाला तंगतोबरी जिनबंद कोरी। ' -ऐपो ४२९. [ तंग+तोबरा ] ०बार-बाहार-पु. खोगीर वगैरे घालून केलेली (घोडयाची) तयारी; जिनबंदी; ( क्रि० करणें ). ' दारु गोळी लोकांस वांटून तंगबार करून मुहुर्ते सिद्ध होऊन चालिले. ' -भाब १० ' तंगबाहार तयारी साऱ्या सैनेस। ' ऐपो ३३०. -वि. खोगीर वगैरे चढवून सज्ज केलेला (घोडा). २ (ल.) कंबर कसून प्रवासास निघण्यास सिद्ध झालेला ( मनुष्य ). [ फा. तंगबार=सामानाचें गाठोडें ]

**तंग**—वि. १ घट्ट; आवळ; आवळ होणारा ( अंगरखा, चोळी इ० ); दृढ. ' बरवा अंगीं राहे भाव । तंग तोचि जाणा देव । '-तुगा ३४५४. २ अडचणींत, पेंचात, सकटांत सांपडलेला (मनुष्य). (वाप्र.) ०करणें-१ आवळणें. २ (ल.) (एखाद्यास) पेंचात धरणें. ' प्रथमता झुन्जीं त्याग तङ्ग केला तव्हाच त्यास आच बसली. ' -ख ८४७. ०होणें-(गो) अस्वस्थ होणें (जीव); ग्लानि येणें; त्रासणें. 'फार वळां शौचास झाल्यामुळें जीव फार तंग आला आहे.' [ फा. तङ्ग् ] सामाशब्द- ०चाई -ची, तंगशाई-स्त्री. १ टंचाई; दुर्मिळता; अडचण; तंगी; तुटवडा. ' परंतु खर्चाची बहुत तङ्गचाई जाली. ' -इमं १२४. ' आपले अशा तङ्गचाईत बहुत उपयोगी पडले. ' -ख ११.६०००. २ विपन्नावस्था; ओढगस्त स्थिति. म्ह० खाण्यापिण्याची तंगचाई व नमोनारायणाची ढस्मर. [ फा. तङ्ग्+चाय् ] ०तंगीत-वि १ (प्रां.) फार घट्ट बांधलेला; फार आवळलेला. २ अंगाबरोबर, आटपशीर; बांधेसूद; सुटसुटीत; घटमूट. ३ (सामा.) तंग. ' उरी दोन्ही गेंद गुलाबी संगीत। वर कंचुकी ल्याली तंगतंगीत। ' -पला ४.४४. [ तंग द्वि. ] ०दार-वि. (अंगाशीं) दाट, घट्ट बसणारा (अंगरखा, चोळी इ० ); आवळ. [ फा ]

**तगट**—न. ( पिकांची, आंब्यांच्या फळांची ) पाहणी; मोजदाद; अंदाज; तकट. [ तगटणें ? ]

**तगट** —न. १ भरजरी वस्त्र. २ दागिने इ० करण्याकरितां ठोकून पातळ केलेला धातूचा पत्रा; तबकडी; वर्ख; पान. तकट अर्थ १ पहा. ' तया शक्तिचक्राच्या तगटीं। ' -भाए ५४८. 'नागलतिकापर्णातमें। जैशीं तगटें घडिलीं हेमें। ' -मुरंशु २४६. ३ ( महानु. ) अलंकार.

**तगट, तगटणें, तगटबंदी, तगटून**—तकट; तकटणें इ० पहा.

**तगटणी**—स्त्री. ( पिकांची ) पाहणी; मोजदाद; अंदाज. [ तगटणें=पाहणी करणें ]

**तगटणें**—उक्रि. ( पिकांची ) आणेवारी काढणें. पाहणी करणें. [ का तगवु=मागणी करणें ]

**तगटणें**—उक्रि. १ घट्ट बांधणें; आवळणें. तकटणें अर्थ १ पहा. ' तगटियेलीया कांचोळी । हारावळी त्या वत्यां। '-मुरंशु १९६. २ भिडविणें; भिडणें; चिकटून असणें. ' रणी उभा ठाकला । रथे रथ तगटिला । ' -कथा ६.१५.३०

**तगटणें**—अक्रि. झटणें; धावणें. ' गदादि आयुधीं ऐसा वेटे। अतिवेगें तगटे रणभूमीसी। ' -एभा ५.५२५. [ तडक ? ]

**तगटी**—वि. भरजरी; चांदीच्या पत्र्याची. ' शोभति तेमी तगटी निशाणें। ' -सारुह ७.५३. [ तगट ] ०निशाण-न जरि पटका झेंडा.

**तगड**—न. ( वे. ) चांदीचा, पितळेचा पत्रा; तकट, तगट पहा [ तगट ]

**तंगड-डी**—नस्त्री. पायाबद्दल योजावयाचा निंदाव्यंजक शब्द टांगडी पहा [ टांग ]

**तगडणें, तंगटणें**—उक्रि. पायपीट करणें, करावयास लावणें. तागडणें पहा. [ तंगडी ]

**तगडा**—वि. ( माळवी ) धिप्पाड, धट्टाकट्टा; बळकट. 'तगडा जवान ' [ सं तनु+कटाः हि तन+कडा ]

**तगणें** —अक्रि. १ टिकणें ( सुख व स्थैर्य यांनीं युक्त अशा स्थितींत राहणें; टिकून असणें. २ सहन करणें; टिकाव धरणें; दम, जीव धरून असणें; चिकाटी न सोडणें. कसेंबसें जिवंत असणें. ' परि वांटे मज परतुनि येतां वळ माजें न तगावें। '-मोरामायण पंचशती २२१. -न टिकाव; टिकणें. ' तरी विरक्तीव्रतूनि केहीं। ज्ञानासि तगणेंचि नाहीं। ' -ज्ञा १५.३२. [ तग ]

**तंगणें** —अक्रि. १ क्षीण होणें; रोडावणें. २ विपन्नावस्थेस, अवनतीस येणें; दारिद्र्ययुक्त होणें. ३ थकणें; दमणें. [ तंग; फा. तग्दौ=श्रम ? ]

**तगतगाट**—पु. झकपक; झगझगाट. ' दोन्ही मंडपीं थाटें थाट। पीतांबरें तगतगाट। अळंकारांचे लखलखाट। ' -वेसीस्व ८.२१. [ तकतकणें ]

**तगतगी(गि)त**—वि. तकतकीत; चकाकणारा; तकाकी असलेला. ' विलेपीला शुंडे तगतगित सिंदूर विलसे। ' -अकक २ गजगौरीव्रत ९. [ तकतकीत ]

**तगदमपट्टी**—स्त्री १ अनुमानधपका; मोघम अजमास; ठोकळ अंदाज २ हिशेब करण्यापूर्वीच कुळाकडे अगाऊ केलेली वसुलाची मागणी. ३ जबरदस्तीचा म्हणून मानला गेलेला कर. [ अर. तकद्दम, तक्दीम, तकदमा+पट्टी ]

**तगदमा**—पु. १ अधिकाराचा दराग, दबदबा; हुकमत चालेल असें वजन. (क्रि० होणें) २ अनुमानधपका; ठोकळ अंदाज. **तगदमा-में, तगदम**–क्रिवि १ अनिश्चित; अनिर्णीत; अद्यापि चालू असलेल्या स्थितींत; निकालांत न काढलेल्या स्थितींत (कोर्टांतील काम इ०); अनामत; मोघम. 'त्याचें उपाध्येपण तगदमा राहिलें' २ ठोकळ मानानें; सरासरी अंदाजानें; अनुमान धपक्यानें ३ अटपट; तावडतोब; एका अटक्यांत [अर. तक्दीम–अग्राधिकार, वर्चस्व]

**तगपिलपिलें**—न. (कों.) फळझाडांना सांध्याची खोवण पाडण्याचें सुतारी हत्यार. [इं. टंग+पिलपिलें]

**तगबग-मग**–स्त्री १ तळमळ; अस्वस्थता. 'कामभोगाचे तगवगें। डोळयां पातया पात न लागे।' –मुविराट ३.१३३. विषयो न मिळतां जीवा। तगबग सुटे।' –दा ३ १०.६१. २ (ताप इ०कारणीं शरीराची होणारी) काहली; अशांतता; तडफड; कासाविसी; तळमळ; व्याकुलता (क्रि० करणें). –क्रिवि. तडफडत; तळमळत; कासावीस होत. [अवस्थेतच्या दृश्यावरून. तुल० का. तग्गुमुग्गु=खालवर]

**तगमगणें**—अक्रि तळमळणें; (जीव) खालींवर होणें; तडफडणें; कासावीस, व्याकुळ होणें. [तगमग]

**तगर** पु. (प्रां. गहानु) एडका; मेंढा. 'एकु तगरांचीं झुंझणें दावितातिः।' –दाव ८६ [का.]

**तगर**—स्त्री. एक फुलझाड याच्या फुलास सकाळीं मात्र थोडासा वास येतो. मस्तकशूळावर तगरीचें मूळ उगाळून लावतात. –न तगरीचें फूल [सं]

**तंगराखण**—स्त्री. (कु) सुताराच्या रोखणीचा, रंध्याचा एक प्रकार. फळीला मधोमध पुढें येणारा भाग राखून दोन्ही बाजूचा भाग रंधून काढणारा रंधा. [इं. टंग+म. रोखण]

**तगवड**—स्त्री. (वे.) दोन लहान टेकडयांमधील दरी [का. तग्गु=दरी]

**तगवणा**—वि. १ (कों.) टिकाऊ; टिकणारा. २ एखादें दिवशी वापरावयाचा; ठेवणीचा; राखून ठेवलेला (पीतांबर, वस्त्र इ०). [तगणें]

**तगवणी, तगवणूक**—स्त्री. टिकविणें; पुष्कळ दिवस टिकेल अशा रीतीनें वापरणें. [तगविणें]

**तगवणें**—न. (कों.) (लग्नकार्यांत, सणावारीं नेसण्याच्या उपयोगी असें) पुष्कळ दिवस टिकणारें वस्त्र. उदा० पितांबर, पैठणी इ०. [तगणें]

**तगविणें** —उक्रि. टिकविणें; जपून वापरणें. [तगणें]

**तंगशाई**—स्त्री. तंगी; अडचण. तंगचाई पहा. [फा.]

**तगाई**—स्त्री. शेतकऱ्याला मदतीखातर सरकाराकडून, जमीनदाराकडून कर्जाऊ मिळालेला पैसा; तकावी. [अर. तकावी]

**तंगाडणें**—उक्रि. १ टांगडणें पहा. २ (व.) सुदृढ किंवा पुष्ट होणें. 'दुखण्यांतून उठल्यापासून जग तंगाडल्यासारखा दिसतो खरा.'

**तगादगीर-दार**—पु शेतकऱ्यांवर सरकारचे हक्क बजावण्यासाठीं नेमलेला कामगार; तगादाकामगार. [तगादा+अर. गीर किंवा फा. दार प्रत्यय]

**तगादणें**—अक्रि. (कों.) कंटाळणें; त्रासणें; (जगाला, एखाद्या कामाला) विटणें.

**तगादा**—पु. (पैशाच्या फेडीसाठीं, किंवा इतर कांहीं गोष्टींसाठीं लावलेली) निकड; निकडीची मागणी; लकडा; नेट. (क्रि० लावणें; लागणें). 'सन मज्कूरच्या स्वारीच्या हिशेबाचा तगादा तुम्हांसी कांहीं राहिला नाहीं.' –रा ६.१५४. [अर. तकाझा]

**तगाफली**—स्त्री. बेसावधपणा; गाफिली. 'तगाफली केलिया आपलें केलें पावाल' –रा १८.५०. [अर. तघाफुल्]

**तगारी**—स्त्री १ परात; थाळी; ताट. 'आमचें तगारींत जेवावें.' –मदरु १.१०८. २ (खा.) घमेलें; तगारें पहा. [फा. तघारी]

**तगारें**—न लोखंडी टोपलें; घमेलें [फा. तघारी]

**तगाव**—पु १ (एखाद्याबरोबर, एखाद्या ठिकाणीं, मुखानें, सोयीनें) ठरणें; टिकून राहणें; निभाव, टिकाव. २ सहन करणें; दिवस काढणें; टिकाव; तग; निभाव (क्रि० काढणें=कर्माची षष्ठी निघणें कल्याची पष्ठी). [तग]

**तंगावर्त**—पु (घोडयाला) तंगाखालीं असलेला वाटोळा भोंवरा. –अश्वप १.१०१. [तंग+सं. आवर्त=भोंवरा]

**तगि(गे)री** –स्त्री. १ (एखाद्याला) कामावरून, नोकरीवरून काढून टाकणें; हकालपट्टी; बडतर्फी; कायमची रजा देणें; (क्रि० देणें). 'तगिरी बदली हुजुरून व्हावी' -इमं ८८. २ बदली. [अर. तघीरी] (वाप्र.) (एखाद्याला) **तांगरीचें वस्त्र देणें**–कामावरून दूर करणें; बडतर्फ करणें; सामाशब्द– ०**बहाली**–पु. (सरकारी नोकराना) कामावरून काढणें व पुन्हा नेमणें इ० व्यवहार; कमती आणि भरती; बडतर्फी व नेमणूक. [तगिरी+बहाली=नेमणूक]

**तंगी** –स्त्री. घोडयाची झूल, गाशा, खुरगी इ० बांधण्यासाठीं असलेला लहान तंग, पट्टा, बंद. [तंग]

**तंगी**—स्त्री. १ (अंगातील कपडे इ० कांचा) घट्टपणा; अडसपणा. २ (द्रव्याची, जिनसांची) टंचाई; अडचण; ओढ. ३ चणचण; ओढाताण; गरिबी. ४ (व्यापार) तेजी; महागाई. [तंग]

**तगीर**—वि. कामावरून, हुद्यावरून काढून टाकलेला; बडतर्फ केलेला. (क्रि० करणें; होणें). ' प्रसंगें शिवराजें किल्ले हायचा सुबा तगीर केला।' –सप्र १८.२१. [अर. तघ्यीर]

**तग्ग**—न. (बे) खांच; खळगा. [का. तग्गु]

**तग्मा**—पु लौकिक; प्रतिष्ठा; वजन; कीर्ति ' आम्ही आजपावेतों मुसल्मानीचा तग्मा जतन करून आहोंत.' –दिमरा १. १५९. [फा. तघ्मा]

**तग्रग्र**—वि. क्रोधानें चवताळलेला; संतापानें चडफडणारा व डोळे वटारून पाहणारा. संतप्त; क्रोधाविष्ट. [गु.]

**तज**—स्त्री. दालचिनीचें झाड. –न. दालचिनीच्या झाडाची साल; दालचिनी. [सं. त्वच्, त्वचा=साल; प्रा. तजा; हिं. तज]

**तजकरनवीस, तजकरनीस, तजकरनीस**—पु. कोणी सरकारी नोकर लाचलुचपत खातो की काय याचा बारीक तपास करणारा मराठी राज्यांतील अंमलदार. [फा.] **०करनविसी, –करनिशी**–स्त्री. तजकरनिसाचें काम. [तजकरनीस]

**तजकरा, तजकरा**—पु. १ (तजकरनिसानें उघडकीस आणलेली) लांचलुचपत; खोटी नोंद; हिशेबांत लबाडी; पैशाची, जमाखर्चाची अफरातफर. (क्रि० काढणें). २ लबाडी; खोटेपणा. ' तजकरा करितों हरि हा खरा।' –हरिराजकृत मुद्गलाचार्य विरिचित रामार्याचें भाषांतर ४१. ३ लुबाडणें; परद्रव्यापहरण. ४ दंड. ' तजकरे घ्यावे, घरें बुडवावीं, नागवावें.' –मराचिसं १९. ५ पैशाच्या अफरातफरीमुळें निघालेलें येणें. ' बाळाजी वामन दामले याजकडे परगणे अकोले येथील तजकरा निघाला आहे.' –रा १४.५. [अर. तझ्किरा]

**तजकरा**—पु. सनद. 'दुमाला कीजे तजकरा उजूर न कीजे.' –रा १०.४७२ [अर. तझ्कीर]

**तजकीरनवीस**—पु. सनदा वगैरे लिहिणारा कारकून. [अर तझ्कीर]

**तजणें**—उक्रि. टाकणें; त्याग करणें;त्यजणें. सोडणें. 'लाज भय शंका जनीं नाहीं तजियेलीं दोन्ही।' –तुगा २९८. ' जनीं जल्प-वीकल्प तोही तजावा।' –राम १३०. [त्यजणें अप.]

**तजवीर**—स्त्री तसबीर पहा.

**तज(जि)ला, तजिल्ला, तजेला, तजि(जे)ली, तजिल्ली**—पुस्त्री. १ कांति; तेज; प्रकाश. चमक; झिलई. २ (चेहरा, झाडें, फळें, चित्रें इ० कांची) टवटवी. ताजेपणा; तकतकी. [अर. तजल्ली, सं. तेजस्; म. तेज] **तजि(जे)लीदार, तजेलदार**–वि. टवटवीत दिसणारें; कांतियुक्त; तकतकीत. [तजिला]

**तजवीज**—स्त्री. १ शोध. तपास; चौकशी. (क्रि० करणें). २ उपाय; उपाययोजना; व्यवस्था; हिकमत; युक्ति. ' वीज अचंचळ शीतळ जे तजवीज करी तुज हे नुमजे।' –र १६. ३ तारतम्यबुद्धि; विवेक; विवेचकबुद्धि. ४ निकाल; निर्णय; निर्णायक मत. ५ सामुग्री; सिद्धता (कार्याची). [अर. तज्वीझ्]

**तजा**—स्त्री. (चाभारी) कातडें; जोड्यावरील सागळ [सं. त्वचा; प्रा तजा] (वाप्र.) **०उजरणें**–जोड्यावरील सागळ व्यवस्थित कापणें. **०मोडणें**–सागळीस मोड पाडणें **तजे चिकटविणें**–सागळ व अस्तर एकत्र शिवणें.

**तजाऊफ**—वि १ चुकणारा. २ कमी. ३ कपटी. –शर. तजावज पहा.

**तजावज**—स्त्री. १ उल्लंघन; अतिक्रम. ' महूकूम अक्दसासी तफावत व तजावज न करूं.' –रा १२. २ अंतर; लांबीचा पल्ला. ' सात कोशींचे तजावजीनें पानगळ नजीक मुक्काम केला.' –रा ३ ३५१. ३ (ल.) कमीपणा; फरक. ' हरएक बाबें चालवावें म्हणून कलमी केलें तर दोस्तींचे जागा तजावज आहेसे नसें.' –ख्रप २३६. [अर. तजावुझ्]

**तजावजा**—स्त्री. अफरातफर ' दागिने यांची तजावजा होईल त्याची खबरदारी वरचेवर करीत जाणें. –वाडमा १.११५ –क्रिवि. १इतस्ततः विखुरलेल्या, अस्ताव्यस्त, विस्कळित स्थितींत; पांगापाग झालेल्या अवस्थेंत (माणसें, बेत, वस्तु इ०); परागंदा. ' मिरजेंतील थोर थोर मंडळी काहीं तजावजा जाली अशा प्रकारच्या अवया ऐकतो ' –ख १०.५३३७. २ गर्भगळित, घाबरलेल्या, गडबडलेल्या, भयचकित अशा अवस्थेंत (माणसें इ०). ' पुण्यांत लोक बहुत तजावजा जाहले आहेत.' –ख १० ५३४१. ' पेंढारी दहा कोसावर आले असें ऐकतांच लोक तजावजा झाले.'

**तजावत, तवावूज, तजावु(उ)जू, तजावत तफावत**—स्त्री. १ (ठरलेल्या पद्धतींत, क्रमांत झालेलें, केलेलें) उल्लंघन; अंतर; फरक; तफावत. कसर. तजावज पहा. २ (ल.) लबाडी; कपट. [अर. तजावुझ्]

**तजुबा**—पु. (ना.) रीत; धोरण. **तजुर्बेकार**–वि. (ना.) दर्दी; मर्मज्ञ [अर. तज्रिबा]

**तजेला**—पु. टवटवी. कांति; पाणी; तेज, तजला. तजिला पहा.

**तज्वीज**—स्त्री. १ तजवीज पहा २ काळजी; चिंता. ' राजा गईब जहाला ऐसें जाणून सागळाच पादशहास आश्चर्य वाटून बहुत तज्विजीत पडला.' –सभासद ८२. [अर तज्वीझ्]

**तज्ज्ञ**—वि. माहितगार, कुशल. जाणणारा. ' संतजचि अतिदुःसह ऐसें म्हणतील न तज्ज्ञ कां पविला।' मोभीष्म ८.३३. [सं. तत्=तें+ज्ञ=जाणणें]

**तंझीम**—स्त्री १ गुंफणें; (मोत्यें इ०) ओवणें; रचणें (कविता काव्य इ०) २ संग्रथन; एकी; संघटन. [अर. तन्झीम्]

**तट** —पु १ (व.) (नदीचा, समुद्राचा) कांठ, किनारा: तीर; सीमा: मर्यादा 'पांचाळकटक तेणें विदारिलें, तट जैसें महा वृषभें।' —मोकर्ण ४१.३३ २ टेकडीची, डोंगराची कड, उतरण. ३ गांव, किंवा इ०काच्या सभोंवतालचा कोट, भिंत ४ एखाद्या जातींत, समाजांत पडलेले पक्ष प्रत्येकी फळी: विरुद्ध भाव. ५ खेळांतील खेळाडूंची बाजू: पक्ष: संघ. ६ एखाद्या कार्यार्थ एकत्र आलेल्या लोकांची जूट: गंगनमत: कट. ७ तराजूच्या पारड्यांमधील तफावत, वैषम्य ८ (कों) खोळंबा; थांबणूक: अडचण: खोटी. ९ एके ठिकाणीं ठासून उभें राहणें: भिडणें: भिडवणूक: वेढा: गराडा. 'म्हणोन तट घालोन क्षणभर मारामार केली.' —भाव ६७. १० (कर.) (सोंगट्यांतील) डाव: बाजू. (क्रि० देणें) [सं.] **तटास लावणें**—(एखादी गोष्ट) जातीतील मतभेदास, तंट्यास कारणीभूत होणें. ०**बंदी**—स्त्री. किल्ला, गाव इ०कांच्या सभोंवतालीं संरक्षणार्थ बांधलेला मजबूत कोट; तटाचा बंदोबस्त. [सं तट+फा बंदी]

**तटस्थ–स्थ–स्त**—वि १ नदीच्या कांठी असलेला. किनाऱ्यावरील. 'देवें कांपविले बहु गर्जोनि जसे तटस्थ लोक नदें।'—मोभीष्म ४.३८. २ (ल.) दोहोंपैकीं कोणत्याहि पक्षास न मिळालेला (मनुष्य); तिऱ्हाईत; उदासीन. ३ (ल.) स्तब्ध. 'जाले तल्ध्यानीं तटस्थ।' —दावि १४३. ४ (ल.) थक्क: चकित: कुंठित 'जें देखतां स्वर्गीचे देव। तटस्त होती।' —दा ४.७.१८. ५ खोळंबून राहिलेला, पुढें किंवा मागें न जाणारा. ६ कांहीं हेतूनें अपक्षेनें उभा राहिलेला, थांबलेला. [सं. तट+स्था=उभें राहणें] ०**मुद्रा**—स्त्री. विचारमग्न; ध्यानस्थ माणसाची मुद्रा. [तटस्थ+मुद्रा] ०**लक्षणा**—स्त्री लक्षणेचा एक प्रकार: आगंतुक लक्षणा

**तट** —स्त्री. (व) १ हट्ट: आपलें म्हणणें खरें करणें २ निकड. [तट्ट]

**तट**—पु १ बोभाटा; दुष्कीर्ति 'जरी माझें कर्म वायां केली कटकट। झालें तैसें तट नाहीं आलें अनुभवा।' —तुगा ४२५. २ भांडण. तंटा पहा —वि. भांडखोर: कलहप्रेमी. [तंटा]

**तट–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि. १ तीक्ष्ण: हलका व जलद होणाऱ्या (उदा० दोरी तुटताना, ठिणगी उडताना होणाऱ्या) आवाजासारखा आवाज होऊन; तटतट पहा. २ घट्ट: आंवळून: तट्ट पहा. [ध्व. तट्]

**तटका** —पु १ संबंध. 'द्वैताचा तटका तोडिला।' —दा ५.९.२८ २ भीड: मुरवत. ३ तंटा. [ध्व. तट्] (वाप्र.) ०**तुटणें–राहणें**—थोडक्यांत आणि तावडतोब (एखाद्या गोष्टीचा) शेवटचा निकाल लावणें; तंटा मिटविणें. 'प्रपंच तटका तुटला मार्ग फुटला।' —दावि १०९. ०**तोडणें, तोडून टाकणें**—१ निक्षून, साफ, रोकडें उत्तर देणें भीड, मुरवत न धरितां स्पष्ट सांगणें. २ भांडण मिटविणें. निकाल करणें. ३ (एखाद्याचा) एकदम संबंध तोडणें. 'मी तोडुनि आलों तटका। तो जिवा लागला चटका।' —मध्व २२०. [ध्व. तट्]

**तटका**—वि (प्रां) ताजें (फळ, फूल, भाजी इ०).

**तटकारणें**—अक्रि १ (एखाद्यास) पुन्हां पुन्हां बजावून, हडसून खडसून सांगणें, बजावणें: सक्त ताकीद देणें. २ टिचकणें; टिचकी मारणें: टचकारणें. [ध्व तट्]

**तटकी–के**—स्त्रीन (कों क.) दारास, खिडकीस लावावयाची तट्ट्याची कांवट्यांच्या जाळीचा, काटक्यांचा झांपा: तट्ट्याचें दार. [का. तट्टी=बाबूचा चटई; तट्टा]

**तटगार**—पु. (वे) (विणकाम) हातमागावरील फणीचे तट बांधणारा. [तट+कार]

**तटणी**—स्त्री (क.) दारें, खिडक्या इ०कांचीं झडपें हलूं नयेत म्हणून त्यांना अडकवावयाची, दाराच्या चौकटीला बसविलेली लांकडी पट्टी: चिमणी: हूक [तटणें=थांबणें, अडणें]

**तटणें**—अक्रि. अडणें: खोळंबणें: थांबणें: थांबून राहणें; अडून बसणें. 'यावीण मागं तटलीं तुझि काय कामें।' —र ४३. —सारुह ३.३४. [सं तट]

**तटणें**—अक्रि. खेटणें: भिडणें; चिकटून असणें. 'अम्बारीस अम्बारी तटली होती.' —भाव ११६. [का. तट्टु=शिवणें]

**तटतट–तटां**—क्रिवि. १ परळांत लाह्या भाजतांना, दोरी अथवा टांके तुटतांना, कांहीं जिन्नस तळतांना, ठिणग्या उडतांना होणाऱ्या तट् तट् अशा आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० तुटणें: फुटणें: सुटणें: उडणें: उकलणें: चिरणें: तोडणें: फोडणें). २ (काव्य) एकदम तोडतांना, निराळा केला जात असतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन: सपासप; खाटखाट. 'सोडी बाणापाठीं बाण। राक्षसांचीं शिरें जाण। तटतटां तोडीत।' [तट् द्वि]

**तटतटणें**—अक्रि १ तुटण्याच्या, फुटण्याच्या बेतांत येईल अशा रीतीनें फुगणें: ताणलें जाणें: तट् असा आवाज होऊन फुटणें; तुटणें ३ तट् तट् असा आवाज करणें: फुटणें; तुटणें: सटकणें; उडणें. [ध्व. तटतट]

**तटतटसाण** —स्त्री. (गो.) टवटवीतपणा; तकतकी 'मासळीला बरीच तटतटसाण आहे'

**तटतटां** —क्रिवि तटतट पहा. 'जेणें फाडीलें तटतटां।' —उषा ९०७४ [ध्व]

**तटतटीत**—वि टचटचीत: ठांसून, खच्चून भरलेलें (पोट, पिशवी). फार ताणलेलें: ताठलेलें; फुटेल अशा रीतीनें भरलेलें. [तटतटणें]

**तटम, तटम्ब** वि. (व.) तुडुंब पहा. [तुडुंब]

**तटली**—स्त्री. (वे) एक प्रकारची जनानी चप्पल. [का. तट्ले=बायकी जोडा]

**तटविणें**—सक्रि. ( कर्ना ) अडविणें [ म. तटणें प्रयोजक ]

**तटा, तटो** -पु. ( कु. ) १ भात ठेवण्याकरितां उभी करून ठेवलेली डाळी. २ बांबूची जाड चटई; तट्या. [ सं तट; म. तट्या ]

**तंटा**—पु. १ वाद; भांडण; कलह; मतभेद; बोलाचाली; बाचाबाची. ' तंटे केले हें माझें तुझें उपाधी वो । ' –तुगा १४१. २ जिकीरीचें पण जरूरीचें काम, कामधंदा. ३ ( सावकारांचा ) तगादा; लकडा; निकड. ४ अप्रिय काम, प्रसंग. [ ध्व. हिं. टण्टा; सं. तण्ड् ] ०**उत्पन्न करणें**–भांडण उपस्थित करणें. ०**बखेडा**–पु. ( व्यापक ) बोलाचाली; भांडण; बाचाबाची; भांडाभांडी; कज्जा. [ हिं. टण्टा+हिं. बखेडा ] **तंटखोर–बाज**–वि. भांडखोर; कलहप्रिय. [ तंटा ]

**तटाक–ग**—न तळें; सरोवर. ' तया वनीं एक तटाक तोयें। तुडुंबलें तामरसानपायें । ' –र ८. [ सं. तटाक ]

**तटाक–ग** -पु. नदीचा काठ; किनारा; तट; तीर. [ सं. तटक= किनारा ]

**तटाटणें**–अक्रि. १ ( तटतटणेंचा अतिशय ) अतिशय फुगणें; ताणलें जाणें; तटतटणें. २ मोठ्या आवाजानें, जोरानें, फिरून फिरून फुटणें, तुटणें, तडकणें. [ तटतट ]

**तटाटां**—क्रिवि. तटतटां पहा.

**तटा(ट्टा)णी**—स्त्री. तट्टाची मादी; लहान घोडी. [ तट्टू ] **म्ह०** कोठें इंद्राचा ऐरावत, कोठें शामभटाची तटाणी=दोन गोष्टी मधील अतिशय मोठा विरोध दाखवितांना योजतात

**तटिनि–नी**—स्त्री नदी ' तटिनि आटल्या जसा मीन वो । ' –आपद ९३. [ सं. ]

**तटू**—पु. तट्टू पहा. ' केशिया मारिले तटू। बैल मारिला अरिष्टु । इतकियासाठीं वरिष्टु । केवीं सुभटु म्हणावा । ' –एरुस्व २.९.

**तटू–टु**—पु पांढऱ्या कापडाची एक जात. –मुंव्या १५३.

**तटोंगी**—स्त्री १ दाणे भरलेलें, चांगलें पोसलेलें धान्याचें कणीस. २ ( अशिष्ट ) वसा; गळा.

**तट्ट**—न. ( बे. ) ( विणकाम ) हत्यांत बसविलेली बोरूची फणी; गुताचे धागे समभाग प्रमाणावर बसण्याकरितां तयार केलेला बोरूच्या काड्यांचा सांचा

**तट्ट** –क्रिवि. १ तट् अशा आवाजानें फुटण्याच्या, तुटण्याच्या बेतांत येईपर्यंत (फुगलेलें, ताणलेलें); रटाट्न (पोट; पिशवी भरणें). (क्रि० फुगणें. ताणणें; भरणें). २ अवकाश, पोकळपणा न राही अशा प्रकारें. [ ध्व तट् ]

**तट्ट, तटतट**—पु ( गो. ) आंवळल्यामुळे होणारा त्रास. [ ध्व तट् ]

**तट्–कन–कर–दिनीं–दिशीं**—तटकन इ० पहा

**तट्टटणें**—( गो. ) तटतटणें पहा.

**तट्टटीत**—वि. ( गो. ) तटतटीत पहा.

**तट्टा, तट्टया**—पु. १ बांबूची चटई. २ तट्टी अर्थ १ पहा. [ तट्टी ]

**तट्टी**—स्त्री १ पडदा; बांबूची रंगीत ताटी; तट्टा; वाळ्याची ताटी. २ ( व. ) (ल.) शौचकूप; शेतखाना. ' तट्टीला गेला ' [ दे. प्रा. तट्टी; का. तट्टी=बांबू, चटई; हिं तट्टा=पडदा; सं. तट ]

**तट्टीस जाणें**–( व. ) शौचास जाणें.

**तट्टू–तट्ट**—पुन. १ घोड्याची एक लहान जात; लहान जातीचा घोडा. २ तिरस्कारदर्शक अर्थानें कांहीं शब्दांपुढें जोडतात. उदा० अंडलतट्टू; खंदातट्टू; खोंडल तट्टू, चुकारतट्टू इ०. [ हि टट्टू ] **म्ह०** भाद्रव्यांत भट्टू आश्विनांत तट्टू ( पुष्ट होतात ) =भाद्रपदांत श्राद्धीय जेवणें जेवून ब्राह्मण व आश्विनांतील हिरवें गवत खाऊन घोडे पुष्ट बनतात. सामाशब्द– ०**टार**–न. १ तट्टू; लहान घोडा. २ भिकार घोडा टार पहा. [ तट्टू+टार=घोडा ]

**तट्टू**—पु. पांढऱ्या कापडाची एक जात. –मनको.

**तट्टें**—न. एक प्रकारची गाडी. –घाको. तट्टू पहा.

**तट्या–ट्ट्या**—पु. बांबूची चटई; अंथरी; तट्टा पहा.

**तठ**—अ. ( कातकरी ) तेथें. –बदलापूर १४४. [ सं. तत्र ]

**तठि–ठें**—अ. ( खा ) तेथें. [ सं. तत्र ]

**तठल**—न. ( गो. ) पातळ जुतें; चप्पल; बारीक वहाण. तटली पहा.

**तड**—स्त्री. १ (समुद्राचा, नदीचा) किनारा; कांठ; तीर; तट. ' द्वैषें होय तडफडा, म्हणती चिताब्धिची अलभ्य तड फडा । –मोकृष्ण ३० २७. २ (एखाद्या कार्याची) अखेर; शेवट; पूर्णता; समाप्ति. ३ ( सावकाराचा देण्याविषयींचा कुळाला लागलेला ) तगादा; निकड; नेट. ( क्रि० लागणें; लावणें ) ' सावकारानें रुपयाविषयीं मोठी तड लावली. ' ४ अडचण; तंगी; ओढगस्तीची स्थिति. ' माझी एवढी तड ढळली तर येईन. ' [ सं. तट; प्रा. तड; उरि. तडा; सिं. तडो ] **तड नेणें**–शेवटाला आणणें, नेणें; समाप्त करणें. **तडीचा पोहणार**–वि १ कांठाकांठानें पोहणारा २ ( ल. ) साहस अथवा हिंम्या न करतां व्यवहार, धंदा करणारा, बिन धाडसी. ३ बेहिंमती; अंगीकृत कार्य शेवटास नेण्याची ज्यास धमक नाही असा ( मनुष्य ).

**तड–ट**—पु १ एखाद्या जातीतील, समाजातील कांहीं मतभेदामुळें पडलेल्या पक्षांपैकीं एक पक्ष. दुफळी तट अर्थ ४ पहा २ दळ; फौज; तुकडी. [ सं. तट ] **तडास लागणें**–(एखादी गोष्ट) जातीच्या दुफळीस कारण होणें; तटास लागणें

**तड**—पु. ( बे ) उशीर. [ का. ]

**तंड**—पु वाद; भांडण तंटा पहा. ' तंड वाचाळी बरवी नव्हे । ' –दावि ३४६. [ सं. तण्डा=मारणें. म. तंटा ]

**तडक**—स्त्री एकमारखा नेटाचा, आवेशाचा, जोराचा प्रयत्न (विशेषतः पळण्यातील): नेट; जोर (क्रि० मारणें). 'तेथून जी तडक मारली तो येथें उभा राहिलों ' –क्रिवि. १ जोरानें: तडाक्यानें नेटानें: एकदम सपाट्यानें: भडकून. 'गर्जत मेघ गडगडीनी । अवनीत तडक पडती।' –उषा १५४ १७४१. 'असंख्यात नटागोटें । तडक फुटती एकसरें।' –मुविराट ६. ६१३ २ अप्रतिबद्धपणें; सरळितः कांहीं अडथळा न होतां: विन हरकत ' अकबरी मोहोर सर्वत्र तडक चालते. ' ३ पुरेपूर. पूर्णपणें; पुरतेपणी. तब्बल 'तो गाव येथून तडक वीस कोस आहे.' ४ थेट नीट: कोठेंहि न थांबतां: सरळ मार्गानें. 'स्याली सकळेंहि वळें तडक पळाली न राहिलीं पळती।' –मोभीष्म ९ ६१. ५ भरपूरपणें विपुलतेनें; रेलचेलीनें (एखाद्या क्रियेचा अतिरेक, उद्रेक, जोर दर्शविण्यासाठीं या शब्दाची योजना करतात) [ध्व.] सामाशब्द– ०फडक–वि. १ चपळाईनें: तातडीनें केलेलें; उत्साहपूर्ण (काम, उपाय); उत्साही; चलाख: निश्चयी (मनुष्य); खरमरीत, खरपूस कडक; स्पष्ट (भाषण) ०मार–वि. चपळ. उत्साही, चलाख, जलदीनें काम करणारा: तरतरीत. ०सावित्री–स्त्री. चलाख आणि तरतरीत अशी लहान स्त्री; मुलगी [तडक+सावित्री]

**तडक**—पु. १ मोठा आवाज –शर. २ विजेचा कडकडाट: वीज. 'तडके बुजाली खेचरें।' –मुविराट ६.१६. [ध्व. तड्]

**तडकणी**—स्त्री. गोणीला असलेली, बांधलेली दोरी. ह्या गोणीच्या दोन्ही बाजूस दोन असतात. [तड्]

**तडकणें**—अक्रि १ (काच, लांकूड इ०) भंगलणें: फुटणें: चीर पडणें: भेगानी युक्त होणें २ कडाडून प्रकाशणें (वीज इ०) लवणें. 'व्योमीं तडके सौदामिनी।' –मुआदि ३१ ८१.३(ल) मन व्यथा पावणें: अंत.करणास व्यथा उत्पन्न होणें (भय इ० मुळें). ४ रागावणें. [तडक: हि. तडकना]

**तडकसांगी**—स्त्री (ना. व) गुरांचा एक प्रकारचा मानमोडीचा रोग –शे ११३

**तडकसोम**—स्त्री. एकदम उठणारी कळ, तिडीक, शिळीक. (क्रि० लागणें: उठणें) [तडक=तिडीक+सोम=चोंच: ओरडणें]

**तडकशी**—स्त्री (क.) तगादा, लकडा: दुमणें. (क्रि० करणें लावणें माडणें) –क्रिवि ताडकन पहा. **तडकशी–शी तोडणें–धरणें**–जाचणें. गाजणें. छळणें. जुलूम करणें; तगादा, दुमणें, ससेमिरा लावणें. [म. तड+फा. कशीरा=ओढणें]

**तडका**—पु. तडाखा. १ थंडीचा कडाका २ (कामांतील) चपळाई: उत्साह; चलाखी. ३ तडाका पहा. 'घोर वाघाचा तो कडका। गज पीटिलें तो तडका।' –वेमीस्व ८.०९. ०तोडणें–सक्त तगादा, नि०ड लावणें

**तडका**—क्रिवि. झटपट: ताबडतोब; तडाक्यानें: तडक (–क्रिवि) अर्थ १ पहा **तडकातडकीं**–क्रिवि. तडकाफडकीं पहा

**तडकॉ**—पु. (गो.) माणसाच्या अंगावर उठलेल्या देवीच्या फोडांतील लस टोचणें.

**तडकाफडकी**—स्त्री (भाडणाची) झटापट; खटका: खडकाखडकी (क्रि० उडणें; होणें; झडणें) [तडक द्वि० तडका+फडका; तडफड ?] –क्रिवि. एकदम; तात्काळ: जलदीनें: त्वरेनें. झटक्यासरशीं. (क्रि० करणें: मरणें: जाणें: देणें).

**तडकाविणें**—सक्रि १ कचकावून लगावणें: तडाका, रपाटा देणें: सडकावणें. 'मी त्याला चांगलाच तडकावला.' २ कडकडणें; कडकडून बोलणें ३ निर्भत्सना करणें. खडसावणें धमकावणें [तडक]

**तडकावून, तडकून**—क्रिवि. त्वरेनें: जलदीनें बेदरकारपणें. बेफामपणें; नि.शंकपणानें उत्साहानें (क्रि० बोलणें; धांवणें; करणें) [तडकाविणें]

**तडकी**—स्त्री १ (व.) तडाख्यानें झडप. २ गाडींत खत भरण्याच्या उपयोगाची तट्टी. [का तडिके]

**तडकी एरंडी**—स्त्री एरंडाची एक लहान जात: हिचें बीं उन्हांत वाळलें असतां तड् आवाज होऊन फुटतें. [ध्व. तड्+एरंडी]

**तडकीव**—वि. (क) तडकलेलें: भेग पडलेलें; चिरा पडलेलें [तडकणें]

**तडगा**—पु निरडी –बदलापूर १८४

**तडगी**—स्त्री मातीचा लहानसा घडा.

**तडज**—पुस्त्री. संसाराचा पसारा: प्रपंच: संसार: खटलें.

**तडजोड**—स्त्री. तोडजोड. १ काटकसर; घरजोगावणी: मितव्यय. २ (कायदा) भांडणाऱ्या दोन्ही पक्षांनीं थोडें नमतें घेऊन परस्परांत घडवून आणलेला सलोखा, समेट. (क्रि० करणें: पाडणें). 'योरल्या पिट, वर्क वगैरेंना सहाय्या मुत्सद्यांचादि सल्ला अमेरिकन लोकांशी तडजोड पाडून, तंटा मिटवून टाकण्याविषयींचाच होता ' –नि ७०३ ३ इतर अर्थी तोडजोड पहा [तोडणेंजोडणें]

**तडणें**—अक्रि. १ (उष्णतेनें तापलेले दगड, मडकें इ०) फुटणें; तडकणें तड्यानें युक्त होणें: भेगलणें. २ पडून, उ न किंवा किलच्या किलचा होणें. ठिकऱ्या उडणें [तडा]

**तडणें**—अक्रि. (व.) तिष्ठणें; वाट पाहणें.

**तंडणें**—अक्रि. भांडणें; कलह करणें: मोठ्यानें आरडाओरड करून वाद करणें. शुष्क वादविवाद करून भांडणें: झगडणें. 'वेदांतीयांशीं पापांडी तर्क। भागवतांशीं तण्डे कोक।' –मुरंगु २३६. [सं तड्, तण्ड्=ताडणें, मारणें] **तंडण**–न भांडण शब्दावरोबर द्विरुक्तीनें हा शब्द येतो

**तडतड**—स्त्री. १ फुटण्याची, तडकण्याची क्रिया, आवाज; (तळल्या जाणाऱ्या पदार्थांची) फुरफुर; तडतडाट; तिडतिड. २ (रागावून) खेंकसणें; धुसफुस; (लहान मुलें इ० कांचा) छांदिष्टपणा; कुतरओढ; गांजणूक. ३ (त्वचा, चामडी इ० कांचें) तडतडणें; फुटणें; दुखणें. ४ जिवाला त्रास. [ध्व. तड् द्वि.]

**तडतड-तडां**—क्रिवि. १ (एखादा जिन्नस तळतांना, फोडणी देतांना, भाजतांना होणाऱ्या) तडतड, अशा आवाजानें; सपाट्यानें छडी मारली असतां, एकदम बंदूक उडविली असतां, एखादा पदार्थ खडखडत असतां होणाऱ्या तड् तड् अशा आवाजानें. २ (जोरानें, आवेशानें, त्रिसाडघाईनें एखादा जिन्नस) फाडतांना, फोडतांना, तोडतांना, चावला जात असतांना, लचक तोडले जात असतांना, कुरतडतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० तोडणें; बोचकरणें; लुंचणें; चावणें; खाणें, डसणें; खाजवणें; फाडणें, फाटणें). 'कन्यादाही तडतड तोडुनिया भक्षिल्याचि मत्स्यप हा।' –मोस्त्री ४.६२. ३ चिरडीनें; तुसडेपणानें. वसकन (बोलणें इ०); फडाफड बोलून; कडकडून, तोंड टाकून (रागें भरणें, खरडपट्टी काढणें). ४ चलाखीनें; झटदिशीं, चपळाईनें; उत्साहानें (करणें, बोलणें, हालचाल करणें). [ध्व तड् द्वि.] (पोटात) **तडतड-तडां तोडणें**–(एखाद्याविषयीं) कळवळा येणें; कींव येणें; मन द्रवणें; आतडें तुटणें.

**तडतडणें**–अक्रि. १ फुटणें; तुटणें; भंगणें; तडकणें; तडतड वाजणें (फोडणी इ०); फुरफुरणें. 'तडतडिल्या नक्षत्रमाळा।' –दाव ७७८. 'तेणें आकाश तडतडी।' –वेसीस्व ४.२९. २ (थंडी इ० मुळें शरीराचे अवयव, चामडी, ओंठ) खरखरीत होणें; फुटणें; भगळणें; (फोड इ० मुळें) कातडी ताणली जाऊन दुखणें. ३ (केंस ताणले गेले असतां, जोरानें विंचरले असतां) तड् तड् असा आवाज करून मुळांत दुखणें. [ध्व. तडतड]

**तडतडविणें**—उक्रि. १ तडतडणें याच्या सकर्मक अर्थी योजतात. २ (एखाद्याच्या पाठीवर चाबूक इ०) ओढणें; कडकडविणें, कडकावणें. [तडतडणें प्रयोजक]

**तडतडा-तड्या**—वि. १ चिडखोर; तुसडा; रागीट; तिरसट स्वभावाचा २ हुज्जतखोर; तकरारी; चिकित्सेखोर. ३ तडतड वाजणारी, ठिणग्या उडणारी (दारू, काडी इ०). [तडतड]

**तडतडाट**—पु (तडतडचा अतिशय) १ फुटतांना, दुभंग होतांना, मोडतांना होणारा तड तड असा मोठा आवाज. 'आंसडोनि बळ उद्भटे। मधें उधडिला तडतडाटें।' –मुमभा ७.५५. २ झांजा इ० वाद्यांचा खणखणाट. ३ चडफडाट –शर. [तडतड]

**तडतडी**—स्त्री. १ एक वनस्पति. तेड; पांढरें निशोत्तर. २ तडतड वाजणाऱ्या दारूचा एक प्रकार.

**तडतडीत**—वि. शुष्क व तडतडणारा; खडखडणारा (कागद, पान). [तड! तड!]

**तडताथवड**—क्रिवि. तत्काळ; ताबडतोब; तत्क्षणीं –शर. [तड+तातडी]

**तडप**—स्त्री. (गो.) एक प्रकारचें वस्त्र; ख्रिस्ती बायका कमरे भोंवती गुंडाळतात तें वस्त्र. 'पाटाऊ म्यानवेधा तडप आणि घटचा भेद खंबायितांचे।' –सारुह ३.४१ [का तडपु]

**तडफ**—स्त्री. चलाखी. उत्साह; चपळता; तरतरीतपणा; कार्यदक्षता. सामाशब्द– **०दार**–वि उत्साही; कार्यक्षम; चलाख; तरतरीत. 'तडफदार बायकोला अपमानाची बातमी आपल्या नवऱ्याच्या गाळणींतून पोंचली म्हणजे तितकीशी झोंबत नाही.' –सवतीमत्सर ५. [हि. तडफ; सं तड्]

**तडफ**—स्त्री. (गो.) तर्फ; रंगभूमीच्या दोहों बाजूस उभे टेवलेल्या पडद्यापैकीं एक. [तर्फ=बाजू]

**तडफड-डा**—स्त्रीपु. १ धडपड; चरफड; हातपाय झाडणें; आदळ आपट. (क्रि० घालणें; करणें). 'तडफड तडफड करून प्राण सोडला.' २ (एखाद्यावर) रागानें कडकडणें, जळफळणें, धुसफुसणें, चडफडणें. ३ झटापट; ओढी. [ध्व. तड्+फड्; प्रा. तडप्फड; तडफड]

**तडफडणें**—अक्रि. १ धडपड करणें; हातपाय झाडणें, आपटणें; चडफडणें; तळमळणें २ जळफळणें; धुसफुसणें; चवताळणें. [तडफड]

**तडफडाट**—पु. (तडफडचा अतिशय.) जळफळ; चडफडाट; जोराची आदळ आपट; संतापातिरेक. [तडफड]

**तडबा**—क्रिवि. (कों.) फळें, भाज्या इ० कांचा जूनपणा, शुष्कता, कडकपणा इ० दाखविणाऱ्या विशेषणावरोबर योजावयाचें क्रियाविशेषण. उदा० 'हें वांगें जून तडबा आहे'

**तडम्**—वि. (वे.) तुडुंब. [तुडुंब]

**तडरक**—न (गो.) खोटी बात; भूलथाप. 'उगीच तडरक लावूं नये.'

**तडव**—पु. (व) सुताडा. झोऱ्या [का तडपु]

**तडवा**—पु लाथ; लाथेचा तडाखा; प्रहार; आघात; 'तडवा हाणौनि करी मारू। तरि आपुलेआंचा होये संहारू।' –दाव १०६ 'निष्ठुर मुष्टी हाणिती माथा' परस्परें तडवे देतां। अति निघाता पटले।' –भाराकिष्किंधा ५.७०. [सं. तड्=मारणें]

**तडवा**—पु. चांदवा; छत. 'जेणें गगनाचा वोढीन तडवा। माजीं लाविला प्रभाकर दिवा।' –स्वादि ६ ४.४२ [का. तडपु]

**तडवी**—पु (खा.) बाटून मुसलमान झालेला भिल्ल. –गांगा २०९.

**तडशा**—पु. (कों.) गाडीच्या साटीचा पोटखुंटा; तरसा पहा. –मसाप १ २.७.

**तडस**—पु. १ पावसांत डोक्यावर घेण्याच्या कांबळयाच्या खोळीची घडी उलगडूं नये म्हणून तिला लावलेली चोय, कांटा; (क्रि० भरणें; घालणें). २ –स्त्रीपु. पोट फार भरल्यामुळें, फुगल्यामुळें (पोटांत) टोंचल्यासारखी होणारी वेदना; तिडीक; रग (भरणें, लागणें क्रियापदांसह बहुवचनीं प्रयोग). 'पोटफुगी आणी तडस।' –दास ३.६.३२. 'उभ्यानें, उपाशी पोटीं पाणी प्याला म्हणून तडस भरले.'

**तडस**—क्रिवि. पोट फुगून आंतून टोंचल्यासारखी तिडीक–वेदना होईपर्यंत–होईल अशा रीतीनें. 'हार्तीचें रुधिरूं पिताती तान्हेले। तडस भरोनि।' –शिशु १०५६. 'गायीच्या कुशी तडस भरल्या.' [सं. तड्]

**तडसणी**—स्त्री. गोणीच्या दोन्ही बाजूंस बांधण्याकरितां असलेल्या दोऱ्यापैकीं एक. तडकणी पहा. [तडस]

**तडसळी**—स्त्री. कढईतून वड तळून काढावयाची टोंकदार काडी, सळई. [सं. तन्–तत+म. सळी]

**तडा**—पु. १ भंग; चीर; फट. (क्रि० जाणें). 'कीं ब्रह्मगोल वाटे विशिखाहीं दाटला तडा खातो।' –मोभीष्म ६.४६. २ (राजा. कु.) लाकूड, मडकें इ० तडकल्यामुळें उडणारी चीप, खलपी, धलपी. (क्रि० जाणें; उडणें; निघणें). [ध्व. तड्]

**तंडा**—पु. १ (मुंग्या, जनावरें इ०कांचा) समुदाय; घोळका–जमाव. २ तांडा; टोळी; तुकडी. [तांडा; का. तंड]

**तंडा**—पु. (बे.) मोठी वीट.

**तडाका–खा**—पु. १ (चाबकाचा, काठीचा) रपाटा; फटकारा; रट्टा; दुमा. २ (पाऊस इ०कांचा) जोराचा मार; सडसडून पडणें; संतत वर्षाव. ३ (तोफा, बंदुका इ०कांचा) धडाका; धडधडाट; भडिमार; दणाणणें; खणका ४ (एखाद्या मोठ्या कार्यांत होणारी) गडबड; धांवाधांव; गलगा; धामधूम. ५ (लढाई, वादळ वाद इ०चा) जोर; आवेग; आवेश; तीक्ष्णता; झपाटा; धडाका. 'भीष्म–श्वेताश्वांचा निरुपम मज वाटला तडाखा तो।' –मोभीष्म ६.४६. ६ अतिरेक; तीव्रता; कडाका. उदा० थंडीचा–उन्हाचा–पावसाचा–वाऱ्याचा–नदीचा तडाखा. ७ सपाटा; संततपणा; दीर्घोद्योग उदा० पढण्याचा–म्हणण्याचा–अभ्यासनाचा–गाण्याचा–तडाखा. ८ वेग. तडाका हा शब्द नेहमीं जोर, घाई, आवेश, आवाज व ढब इ०नीं युक्त अशी गति दाखवितो. हा शब्द व व याच्या समानार्थी धडाका हा शब्द यांतील फरक धडाका शब्दांत पहा. [ध्व. तड्; गु. तडा] **(एका) तडाक्यानें**–एका सपाटयांत; जोराच्या एकाच प्रयत्नानें एकदम; एका दमांत.

**तडाग–क**—पुन. तळें; तलाव; सरोवर. तटाक पहा. [सं. तटाक]

**तडांग**—क्रिवि. ताडताड; तडातड. 'तडांग तडांग तडांग हरिणें उडिया घेती।' –दावि १६३. [ध्व. तड्]

**तडाड**—पु. मारामारी; मारहाण. 'तडाड मळ पाटलानें केला।' –ऐपो ८३. [ध्व]

**तडाडणें**—अक्रि. १ तुटणें; फुटणें; दुभंग होणें; तडतड असा मोठा आवाज करून मोडणें; तडतडणें. 'नवखंड पृथ्वी अंबर। तडाडिलें तें काळीं।' 'ओढी घेतां तडाडी; निबिड दश दिशीं घोष मोठा झडाडी।' –आसी ६०. 'धाकें उदर तडाडी। कुतर्कांचें।' –दा ५.९.४६. इतर अर्थांसाठीं तडतडणें पहा. [ध्व. तड्]

**तडाडां, तडातड–डां**—क्रिवि. १ (तडतडचा अतिशय) तडतड (–क्रिवि.) पहा. 'असं तडातड बोलून घ्यायला झालं काय?' –इंप ६१. 'हाणिती तडातड लाथा।' –विक ९१. २ कडकडीत (क्रि० उपास करणें). [तडतड]

**तडातुडी, तडातोड–डा–डी**—स्त्री. १ ताडातोड ताडातुडी इ० पहा. ताटातूट 'मुक्त पावले साहेब नाना कशा केल्या देवा तडातोडी।' –ऐपो १३२. २ तोडफाड. 'आशा ममता देहीं बेडी। मुसरी करिताती तडातोडी।' –दा ३.१०.२. [तड्+तोडणें]

**तडाफडी**—क्रिवि. ताबडतोब; तांतडीनें; तडकाफडकीं. [तडफड]

**तडामोड–मोडा**—स्त्रीपु. (प्र.) तोडामोडा पहा. 'तुका म्हणे जीवा। होता तडामोडी देवा।' –तुगा ११६१.

**तडाल**—क्रिवि. (व.) ताडकन; तार्दिशीं. 'तडाल उडाल.' [ध्व.]

**तडावणें**—अक्रि. १ तडकणें; फुटणें; भंग पडणें; भंगलणें; दुभंग होणें; फाटणें. २ (पोटास) तडस लागणें; तटतटणें. 'भक्षिलें तुमचें अन्न। यालागीं तडावला अंगवण। आणिक होता तरी मरण। तत्काळीक पावता।' –मुविराट २.७२ [तडा]

**तडावणें**—अक्रि. टिकणें; अखेरीस, शेवटास जाणें; पार पडणें. [तट–तड]

**तडावा**—पु. छत; चांदवा. तडवा पहा. 'गगनाचा तडावा। कोणें वेढिला कधवां।' –ज्ञा १३.५५. तडवा पहा.

**तडित**—स्त्री. वीज; विद्युत; बिजली. [सं.] **०प्राय**–वि. विजेसारखें असणारें; झगझगीत. 'तडित्प्राय उत्तरी वस्त्र।' **०स्फुरण**–न. वीज चमकणें, लवणें.

**तडिया**—वि. (राजा.) (प्र.) तडया. तडया पहा.

**तडी(डि)तापडी**—पु. (ग्रामा.) गोसावी; तपस्वी; बैरागी; तीर्थवासी; भिकारी. 'तडितापडी दैन्यवाणें। आलें आश्रमाचेनी गुणें।' -दा २.७.१४. 'तडी तापडी संन्यासी।' -निमा १. १६५. [सं. तापसी; तापडी द्वि.]

**तंडुल**—पु. तांदूळ. [सं.] **०कुसुम-बलि-प्रकार**-पु. तांदूळ, फुलें इ० कांच्या निरनिराळया आकृती करण्याची कला. -ज्ञाको-क १५३. [सं.]

**तंडेल**—वि. दांडगा; आडदांड; रानवट; मगरूर; शिरजोर. [सं. तड्=मारणें; अथवा तण्ड् अथवा दंडेल]

**तंडेली**—स्त्री. दांडगाई; आडदांडपणा; दंडेली; दंडुकशाही. [तंडेल]

**तडूक**—स्त्री. (गो.) थाप; बात. **तडुकी**-वि. बाता मारणारा; थापाडया.

**तड्या**—वि. नदीकांठचा; समुद्रकिनाऱ्यावरील; जमीनीकडून वाहणारा (वारा). [तड=किनारा]

**तड्या**—वि. कोरडा; (ओंठ, गाल, त्वचा, जमीन इ० कांना) भेगा पाडणारा (वारा). 'बागाइतास जमीन ... तडया वाऱ्यापासून (पूर्वेकडील वाऱ्यापासून) व पाण्याच्या पुरापासून नुकसान होण्याचा संभव आहे अशी नसावी' -बागेची माहिती ४. [तडा=भेग; तडणें=फुटणें; किंवा तड=तीर किनारा यावरून]

**तढण-न**—स्त्री. १ (व) कमतरता; टंचाई. 'आजच्या पंक्तींत भाजीची तढण आली म्हणून भाजी पुन्हां करावी लागली.' २ (व.) ताण. ३ (व.) झाडांना पाणी देण्यास झालेला उशीर. [ताण; सं. तन्=ताणणें; प्रा. तड्ड?] **तढणीं लागणें**-अक्रि. (व.) ताण बसणें; ताणलें जाणें; तडस लागणें. 'पाणी फार प्याल्यानें पोट तढणीं लागलें.'

**तढव, तढा, तढू, तढो**—पु (ना. व.) जाड पण विशेष पीळदार नसलेल्या सुताचें एक प्रकारचें दणगट जाजम; सुताडा. तडव पहा.

**तढा**—पु. (व.) (प्र.) तडा; भेग. 'वियोग घनाचा घावो गाढा। लागलेआ म्हैसवा थरा जाए तढा।' -ऋ ९९. [तडा]

**तण**—न. १ गवत; पेंढा (विशेषतः भाताचा). 'कां तृणाचा बाहुला। जो आगरामेरें ठेविला।' -ज्ञा १८.४३८.? २ रानगवत; शेतांतील पिकांत उगवणारें निरुपयोगी गवत; रान. 'वत्सा धनंजया बहु झालीं तरि रोपितील काय तणें।' -मोकर्ण ८.३. [सं. तृण; प्रा. तण] **०खाईर**-वि. तृणाहारी; गवत खाणारा. 'आणि मी तणखाईर।' -पंच १.३८. [तण+खाणें] **०घर**-न. गवताची झोंपडी. [तण+घर] **०पोशा-षा-सा**-वि. केवळ तण, निरुपयोगी गवत पोसण्यास चांगला असा (थोडथोडा, विवक्षित वेळीं पडणारा पाऊस). [तण+पोसणें] **०मोड**-स्त्री. १ जमीन लागवडीस आणण्याकरितां तींतील झाडेंझुडपें, गवत इ० काढून साफ करणें. २ पडित जमीन तयार होण्यासाठीं कांहीं काळ खंडावांचून लागवडीस देण्याचा प्रकार. [तण+मोडणें] **०मोडीचें उत्पन्न**-न. पडित जमीनीचें पहिल्या लागवडीचें उत्पन्न. **०लोणी**-न. केवळ गवत खाणाऱ्या, रानांत चरणाऱ्या गुराच्या दुधापासून काढलेलें लोणी; याच्या उलट कणलोणी. हें ठाणबंद बांधलेल्या व सरकी इ० खाणाऱ्या गुराच्या दुधापासून निघतें. तणलोणी कणलोण्यासारखें सकस नसतें. **०वर**-पु. १ (कों.) जमीन भाजण्यासाठीं तिच्यावर पसरलेल्या, वाळलेल्या काड्याकुड्या, पानें, गवत इ०चा थर. २ जमीन भाजण्यासाठीं तिच्यावर काड्याकुड्या गवत इ० पसरण्याची क्रिया. दाढ पहा [सं. तृण+स्तृ-आस्तृ=पसरणें] **०सडी-सुडी**-स्त्री. १ गवताची काडी. २ (ल.) अति क्षुद्र वस्तु; शष्प. [तण+सडी=काडी]

**तणग्या लावणें** -क्रि. (क.) (तणगी=ताणण्याची क्रिया?) नखशिखांत पांघरूण घेऊन निजणें; ताणून देणें. 'त्यानें रात्रीं आठ वाजल्यापासून तणग्या लावला आहे.' [ताणणें]

**तणणें**—सक्रि. १ ताणणें; घट्ट करणें. २ रेशीम, सूत इ०चा ताणा घालणें; जवळजवळच्या सुतास वर खालीं अशा अढया पडण्याची क्रिया. ताणणें पहा [सं. तन्=ताणणें, पसरणें]

**तणणें**—अक्रि. भांडणें; झगडणें. (प्र.) तंडणें पहा. [तंडणें]

**तणतण-तणा**—क्रिवि. टणटण-णा पहा. **०करणें**-रागानें चरफडणें; तणतणणें. [ध्व. टण्; द्वि.]

**तणतणणें**—अक्रि. १ रागानें चडफडणें; फडफड बोलणें; तोंड सोडणें. २ (तुटण्याइतकें) आवळणें; ताणलें, चेपलें जाणें. ३ (उतरणीवरून, पायऱ्यावरून चेंडू इ०) उशी घेत जाणें; टुण्टुण् उडया मारीत जाणें. [ध्व. तण्, टण् द्वि.]

**तणतणीत**—वि. फार ताणलेला; फुटण्याच्या, तुटण्याच्या बेतांत येईपर्यंत फुगलेला; ताणलेला. [सं. तन्=ताणणें; ध्व. तण्?]

**तणफण**—स्त्री. क्रोधानें होणारी चडफड; जमीनीवर हातपाय आदळण्या-आपटण्याची क्रिया. (सामा.) तडफड पहा. [ध्व. तण्]

**तणवरणें**—अक्रि. ताणलें जाणें; (पोट, पिशवी इ०) रटादून भरलें जाणें; तटतटणें. [तणणें]

**तणवरणें**—उक्रि. (कों.) जमीन भाजण्याकरितां तिच्यावर गवत, पाचोळा इ० (तणवर) पसरणें. [तणवर]

**तणवी**—वि १ (राजा.) गवताची; गवती; केंबळी; छपरी; शाकारलेली. [तण]

**तणस**—न. शेतांत, रानांत माजलेलें निरुपयोगी गवत; तण. -स्त्री. १ (कों.) खळयावर इकडेतिकडे पसरलेले धान्याच्या ताटांचे तुकडे; गवताचा केर. २ (कों.) भात्याण; साळीचें गवत.

३ नाचणकांड, भूस इ० सारखें हलक्या धान्याचें गवत. ४ (कु.) गवताची गंजी. [ तण ]

**तणसरणें**—अक्रि. (कों.) (माणूस, जनावर इ०) शरीरानें भरणें; पुष्ट होणें; लठ्ठ बनणें. [ सं. तन्; प्रा. तण+सर प्रत्यय ]

**तणाणा**—पु. गायनाचे सूर गुणगुणणें. तननं पहा.

**तणाणां, तणातण-तणां**—क्रिवि. टणाटण इ० पहा.

**तणार**—न. गवताची झोंपडी. 'तरी लोकांचीं धवळारें। देखोनिया मनोहरें। असतीं आपुलीं तणारें। मोडावीं केवीं।' –ज्ञा ३.२२३. तणारा पहा. [ सं. तृण+गृह; प्रा. तण+आर=गृहवाचक प्रत्यय ]

**तणारणें**—सक्रि. (कों.) गवत इ० पसरणें; भोपळीचा वेल इ० पसरविणें. [ सं. तन् ]

**तणारा**—पु. १ (को.) भाताच्या पेंढ्याचा ढीग; गंजी २ (रत्नागिरीच्या आसपास) काटवलाची, गवताची गंजी. [तणार]

**तणाव-वा**—स्त्रीपु. १ तंबूची-मेखांस बांधलेली ताणदोरी 'कारभारी याचे पेचामुळें आमचे दौलतेच्या तणावा तुटत चालल्या.' –ख १.१४६ २ कोळ्याच्या जाळ्याचा तंतु, धागा. ३ मंडपाचा दोर. ४ (सामा.) आधाराचा दोर. ५ (ल.) साहाय्यकर्ता (प्रपंचास आधारभूत असलेला मनुष्य. [ अर. तनाव् ] **तणाव तुटणें**–१ (गातांना, बोलतांना, वाचतांना) कंठाला ताण पडणें २ आश्रयदाता, आधार नाहींसा होणें, गमावणें (कर्त्याची षष्ठी).

**तणावणें**—अक्रि. पाय पसरून निजणें; ताणून देणें. [तणाव]

**तणावा**—पु. १ ताठपणा; ताण; ओढ; खेंच. (क्रि० देणें). २ आक्रमणशक्ति. [ तणणें ]

**तणेली**—वि. तण असलेली; जींत गवत माजलें आहे अशी (जमीन). –शे ३.१. [ तण ]

**तण्हा(ह्न)र-रा-रें**—नपु. गवताची झोंपडी. तणार पहा. 'उभीलीं तह्नारें। निर्गुंडे। स्थूलदंहींचीं।' –शिशु ९४.

**तत्**—(सना.) तो; ती; तें; याचेंच तद् असें रूप पुढें स्वर अथवा मृदु व्यंजन आलें असतां होतें तद् पहा. [ सं. ]

**तत-थ**—क्रिवि. (माण.) तेथें 'नांगूर सुटीच्या आंत। पोंचाया होवें तत।' –यशवंतकविकृत यशोधन-न्याहारीचा वकुत. [ सं. तत्र; प्रा. तत्त; तत्थ ]

**तत**—पुस्त्री. १ दोरा; धागा; (वाद्यांतील) तार. तंतु पहा. 'तंत लागला मुळाचा। अवताराकडे।' –दा १८.८.६. २ प्राण; जीव; दम. ३ तार, तात लावलेलें वाद्य; उलट अर्थी वितंत. [सं. तंतु ] (वाप्र.) **ततीं प्राण उरणें-लावणें**–१ कंठीं प्राण येणें; आसन्नमरण असणें. २ (एखादी वस्तु) अतिशय जीर्ण होणें (पष्ठ्यंत कर्ता). **०गाणें**–न. ततुवाद्यावरील गाणें. 'ताळ तंबुरे तानमानें। ताळबद्ध ततगाणें।' –दा १४.४.१६. **०वाद्य**–न. तंतुवाद्य; तारा किंवा ताती लावलेलें वाद्य. उदा० तंबोरा; सुरसोटा; एकतारी; रुद्रवीणा; सतार इ०. [ तत+वाद्य ]

**तंत**—क्रिवि १ (एखादें प्रमाण, माप, गुण, संख्या इ० कार्शी) बरोबर जुळणारा; बरहुकूम; तुल्य; सारखा; हुबेहूब; तसाच; थेट; तंतोतंत. (क्रि० भरणें; उतरणें). 'स्वर तंत घन थाट तो दाट बैसला।' –दावि ५५६. २ कांठोकांठ; सांडोसांड; तुडुंब. ३ नक्की; पुरेपूर; बरोबर 'बारा वर्षें वाहिलें पाणी नाथा घरीं तंत।' –पला ३०. 'बारा तंत वाजले.' [ सं. तंत ] **ततंतत, तंत वितंत**–क्रिवि. समस्वर; स्वरैक्यानें युक्त अशा रीतीनें; तालबद्ध; समताल. 'तंततंत वितंत घन सुस्वर। चतुर्विध वाद्यांचा गजर।' –ह २.१२३.' तंत वितंत घनसुस्वर। वाद्यें वाजविती परम मधुर।' तंत म्हणजे तारांनीं युक्त व वितंत म्हणजे तारावाचून असलेलें वाद्य असाहि वरील तंतवितंत शब्दाचा अर्थ करीत असतात.

**ततबीर, तदबीर**—स्त्री. योजना; उपाय; युक्ति; प्रयत्न, तदबीर 'आता माझें काय ततबीर चालणार असे?' –इमं १२. [ अर. तद्बीर ]

**तंतरणें**—अक्रि. १ (अशिष्ट) भूलथापा देऊन फसविणें; फूस लावून नेणें; भुरळ पाडणें; फसवून लुबाडणें. २ संभोगणें; उपभोगणें. 'जीभ च्याटून नाकाला बोलमी नित तंतरसी भिकारणी।' –प्रला २४०. –अक्रि. (ना.) गर्भगळित होणें; घाबरणें; किंकर्तव्यतामूढ बनणें. [ सं. तंतु=दोरा; किंवा तंत्र=गूढ क्रिया ]

**ततक्षणीं**—क्रिवि. तत्क्षणीं; ताबडतोब; त्याच वेळेस; त्याच क्षणांत. (प्र.) तत्क्षणीं पहा. [ सं. तत्=तो+क्षण ]

**तताइन्या**—पु. (बडोदें) डुकराची एक जात. तातीरा, मूवन अशींहि यास नांवें आहेत याचें डोकें लहान, छाती रुंद व रंग उट काळा असतो.' –डुकराची शिकार ५.

**ततारा, तनारिक, ततार**—वि. कृश; किडकिडीत; क्षीण; बारीक; रोड. [ सं. तंतु=दोरा ]

**तताळ**—वि खोडकर, उनाड, अडदांड; द्वाड (मूल, स्त्री).

**तति, तंति, तती**—स्त्री. १ रांग; ओळ; समुदाय. 'फुलांसवें भृंग-तती तरंगती।' –र ८. २ तंत पहा. [सं. तंति] **०लागणें**–मार्गास लागणें; सुरळीत चालू लागणें. 'तूं लागसी आजिपसून तती।' –सारुह ७.१०४.

**तंती**—पु. विणकर; कोष्टी. 'समस्त भक्त सेवा करिती। त्यांत एक विणकर तंती।' –गुच ४४.२. [ तंतु ]

**तंतु**—पु. १ सूत; दोरा; धागा; सूत्र. 'कां वस्त्रपणाचेनि आरोपें। मूळप्रति तंतु हारपे।' –ज्ञा १८.५६४. २ (कातड्याची, मालीची, आंतड्याची) तात; तार. ३ (फुलांतील) केसर; ताणा; अगारी; तार. 'पद्माचा जो तंतु तो वारणाला। वारायाला

पैं म्हणे सिद्ध झाला।' –वामन–नीतिशतक १० (नवनीत पृ. १३४). ४ दोरासारखा किडा. ५ (ल) धागादोरा; धागा; संबंध; लागाबांधा. (क्रि० लागणें). ६ एखाद्या कुटुंबांतील एकच अवशिष्ट राहिलेला पुरुष. ७ वंश; संतति; मुलेंबाळें; अपत्य. ८ धोरण; सूत्र. [सं.] ०**कार**–पु तंतुवाद्य वाजविणारा. 'म्हणजे तो इसम सुप्रसिद्ध गवई तंतुकार असेल अगर ...'–ऐरापु ११. [तंतु+कार] ०**पटन्याय**–पु. तंतूवांचून पट नाहीं, किंबहुना तंतु विशिष्ट प्रकारें जोडले असतां त्याना पट हें नांव देतात अशा प्रकारें तंतूचा व पटाचा स्वभावसिद्ध व अभेद्य संबंध आहे, हें दाखविणारा न्यायशास्त्रांतील एक सिद्धांत. कायमचा स्वाभाविक लागाबांधा. [तंतु=धागा+पट=वस्त्र+न्याय] ०**मेह**–पु. (वैद्यक) १ लघवींतून धातूची तार जाण्याचा विकार. २ वरील प्रकारच्या विकाराचें मूत्र, रोग. [तंतु+मेह=मूत्र विकार] ०**वाद्य, ततवाद्य, तंतावाद्य**–न. वीणा, तंबोरा, इ० तारा, तात लावलेलें वाद्य; ततवाद्य पहा. ०**वाय**–पु. १ विणकर; कोष्टी. २ कोळी (किडा). [सं.]

**तंतुक**—स्त्री. तार; तात. 'शीर कापून आपलें देखा। यंत्र केलें करकमळिका। शिरा काढून तंतुका। रावणेश्वर गातसे।'–गुच ६.७१. [तंतु]

**तंतू**—पु. नर्मदा, यमुना या नद्यांत व इतर काहीं नद्यांतळ्यांत व समुद्रांत आढळणारा पुष्कळ हात असलेला दोरासारखा एक जलचर प्राणी. हा मनुष्यांना वेटाळून पाण्यांत ओढून नेतो असें म्हणतात याचे दांत भाल्यासारखे असून त्यांना तीक्ष्ण धार असते आणि त्यांच्या कडांना खांडे असतात. –मराठी ६ वें पुस्तक, पृ. २२६ (आवृत्ति २ री १८७५). [सं. तंतु]

**ततोतंत**—वि. १ सर्व बाबतींत जुळणारा; बरोबर संख्येचा, मापाचा, प्रमाणाचा; अगदीं साम्य असलेला. सारखा, तुल्य २ कांटोकांठ; सांडोसांड; पुरेपूर [तंतु]

**तत्कार**—पु. ओं तत्सत् या महामंत्रांतील दुसरा वर्ण तत्. 'तो प्रणवो आविर्णु बुझा। आणि तत्कारु जो दुजा।'–ज्ञा १७.३४२ [सं. तत्+कार]

**तत्काळ**—क्रिवि तावडतोब; त्याक्षणींच; लागलीच; तत्क्षणीं. [सं. तत्=तो+काल=वेळ]

**ततरणी**—स्त्री. (बे.) गेळा; ततराणी. [का. तत्राणी]

**तत्ता**—वि. (नाण.) हलकट. नीच; हलका; बे अब्रूचा (मनुष्य).

**तत्तांथंबा**—पु. (मारवाडी लोकांत रूढ). फसवेगिरी; मुद्दापाप देऊन फसविणें; भोंदगी. (क्रि० करून घेणें; करणें; मांडणें; लावणें). [हिं तत्ताथंबी=ढवळाढवळ]

**तत्तामाल**—पु. (एखाद्या पदार्थांतील) उत्कृष्ट अंश, सत्त्व; मगज; सार. [सं. तत्त्वः प्रा ; हिं. तत्त+माल]

**तत्तुल्य**—वि. त्याच्यासारखा; तत्सम. [सं. तत्=तो+तुल्य=सारखा]

**तत्त्व**—न. १ सत्य; वास्तविक स्वरूप; वस्तुस्थिति. 'असे हा कोणाचा कवण मजला तत्त्व न कळे।'–सारुह ७.८२. 'जाणें त्या जिष्णुलाहि तत्त्वानें।'–मोकर्ण २७.१८. २ (ल) प्रत्यक्ष अस्तित्व; उलट अर्थी माया. ३ (वेदांत). ब्रह्म; चैतन्यपण; जीवपण; विश्वाला चेतना देणाऱ्या परमात्मस्वरूपाशीं एकरूप असलेलें जीवात्म्याचें स्वरूप. 'तेंसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजें सांडवलें। मग तत्त्वता तत्त्व उरलें। ज्ञानियासी।'–ज्ञा २.१३१. ४ पंचमहाभूतें, पंचविषय, दशेंद्रियें, मन, अहंकार, महत्तत्त्व, माया, ईश्वर यांना सामान्य संज्ञा. यांपैकीं प्रत्येकाला म्हणतात. ५ (शब्दशः व लक्षणेनें) (एखाद्या पदार्थांतील) उत्कृष्ट अंश; सत्त्व; सार; मगज. ६ सारांश; तात्पर्य; सार. ७ (रसा) मूलद्रव्य, धातु. (इं.) एलेमेंट्. [सं. तत्=तो+त्व=भाववाचक नामाचा प्रत्यय] मामाशब्द– ०**ग्रह**–पु. १ सत्य, यथार्थ स्वरूपाचा बोध होणें. २ सार, मुख्यांश ग्रहण करणें; [तत्त्व+ग्रह=घेणें] ०**चिंता**–स्त्री. ब्रह्मचिंतन; वेदांत. 'कमी वेळ जो तत्वचिंतानुवादें।'–राम ५२. [तत्त्व+चिंता=विचार, मनन] ०**तः, तत्त्वता–तां**–क्रिवि. खरोखर; वास्तविक पहातां; निःसंशय; वस्तुत.. 'समस्त देव माता पिता। गुरुचि असे तत्वता।'–गुच २.२०८ [तत्त्व+तस् प्रत्यय] ०**निरसन**–न. (अक्षरशः व ल.) (एखाद्या वस्तूंतील, गोष्टींतील) सार काढून घेणें; तत्त्वग्रह. [तत्त्व+निरसन] ०**निष्ठ**–वि. १ ब्रह्मनिष्ठ. 'कीं तत्त्वनिष्ठु जैसा। नागवे भ्रांतिलेशा।'–ज्ञा ३.१२४. २ तत्त्वाला न सोडणारा; सत्यनिष्ठ. ३ विशिष्ट तत्त्वाप्रमाणें चालणारा; ध्येयवादी. [तत्त्व+निष्ठा] ०**मीलन**–न. मूलतत्त्वांचा मिलाफ, संमिश्रण. [तत्त्व+मीलन=एकत्र येणें] ०**वर्तक**–वि. (एखाद्या) तत्त्वाचा पुरस्कार करणारा; तत्त्व काढणारा, सांगणारा. 'कोणतीहि सुधारणा करणें ती तत्त्ववर्तकानीं आधीं केली पाहिजे.'–टि ४.१०२. [तत्त्व+वर्तक=निग्रावचन] ०**वाद**–पु. १ ईश्वराच्या अस्तित्वाविषयी वाद; ब्रह्म सत्य की माया सत्य वगैरे संबंधींचा वाद. २ तत्त्वाचा, तत्त्वासंबंधीं वाद. [तत्त्व+वाद] ०**वादी**–वि. तत्त्ववाद करणारा. ०**ज्ञान–विद्या**–नस्त्री १ परमात्मस्वरूपाचें ज्ञान. ब्रह्मज्ञान; यथार्थज्ञान; वेदांत. एक शास्त्र. (इं.) फिलॉसॉफी. २ एखाद्या विषयाच्या सामान्य तत्त्वांचा अभ्यास. ०**ज्ञानी–ज्ञ**–वि. १ ब्रह्मस्वरूपाचें ज्यास ज्ञान झालें आहे तो. २ तत्त्वज्ञान शास्त्राचा अभ्यासी; त्या शास्त्रांतील तज्ज्ञ. **तत्त्वार्थ**–पु. १ सारभूत अंश; सत्त्व; सार; मगज; गाभा. २ सत्य; खरेपणा; सत्य अस्तित्वानें युक्त अशी वस्तु; खरें अस्तित्व. ३ ब्रह्म; ब्रह्मरूप धन. 'आंतु

बाहेरि चोखाळु। सूर्ये तैसा निर्मळु । तत्त्वार्थाचा पायाळु । देखणा जो।' –ज्ञा १२.१७९. [ तत्त्व+अर्थ=सार: धन ]

**तत्त्वमसि**—स्त्री १ ( तूं ब्रह्मच आहेस ) सर्व वेदांताचें सार या चार अक्षरांच्या एक वाक्यांत आहे. यावरून २ ( ल. ) जगांतील सर्व व्यवहारांचा आदिकारण जो पैसा तो: सार; मूल्यवान वस्तु. ( सामा. ) द्रव्य. [ तत्=तें+त्वम्=तूं+असि=आहेस ]

**तत्पद**—न. ओं तत्सत या महामंत्रांतील किंवा 'तत्त्वम् असि' या तत्त्वज्ञानविषयक सूत्रातील ईश्वरवाचक तत् हा शब्द; ब्रह्म; ईश्वर. [ सं. तत्=तें+पद=शब्द ]

**तत्पदार्थ**—पु. परमात्मा: सर्वश्रेष्ठ: सर्वज्ञ, सर्वशक्तिमान असा वाच्य ईश्वर व त्याचें लक्ष्य ब्रह्म. 'जैसें त्वंपद हें आघवें। तत्पदार्थी सामावे।' –ज्ञा ११.६४८. 'तत्पदार्थ तो परमात्मा।' [ सं. तत्=तो+पदार्थ ]

**तत्पर**—वि. ( एखाद्या कार्यात ) निमग्न: तल्लीन ( एखादें कार्य करण्यास ) तयार: उत्सुक. [ सं. तत्=तें+पर=मोठें ]

**तत्पुरुष**—पु. ( व्या. ) एका समासाचें नांव; यांत दोन पदांपैकीं उत्तरपदाला प्राधान्य असून पूर्वपद उत्तर पदाचें वर्णन करितें किंवा पूर्वपद व उत्तरपद यांतील विभक्ति संबंधाचा लोप केलेला असतो. उदा० राजवाडा; वज्रगाळ इ०. याचे द्वितीया तत्पुरुष, तृतीयातत्पुरुष असे निरनिराळया विभक्तींवरून प्रकार झाले आहेत. उपपद, नञ्, कर्मधारय हेहि आणखी प्रकार आहेत. [ सं. ]

**तंत्र**—न. १ सूत; धागा: दोरा: तार; तात २ ( राजाचा, बड्या गृहस्थाचा ) लवाजमा: परिवार: इतमाम. ३ ताबेदारी; अनुवर्तन; चाकरी: पराधीनता; दास्य. 'स्वतंत्र.' 'परतंत्र.' ४ ( एखाद्याच्या ) वागण्याची पद्धत, धोरण, रीत. 'आमचें तंत्र निराळें तुमचें तंत्र निराळें' ५ दोन किंवा अधिक गोष्टी घडवून आणणारें एकच कारण, साधन. जसें–अनेक प्रश्नांचीं उत्तरें एकदांच देणारें एकच भाषण, वाक्य किंवा अनेक हेतू साधणारा असा एकच प्रयत्न, खटपट. उदा० पानें कां सडलीं ? घोडा कां अडला ? विद्या कां विसरलां ? या तिन्ही प्रश्नांचें उत्तर फेर नाहीं म्हणून हें आहे. 'प्रपंच आणि ईश्वरभजन तंत्रानें होत नाहीं.' 'मी काशीस गेलों आणि उदीम व यात्रा तंत्रानें झालीं.' ६ दुसऱ्या माणसाच्या आज्ञेप्रमाणें धोरण ( जें त्याच्या आश्रितांस संभाळावें लागतें तें ): आश्रितवृत्ति; अनुलक्ष्य; आधीनता. 'राजाच्या तंत्रानें प्रधानानें चालावें.' ७ धार्मिक विधींतील मंत्रानुसार हातानें करावयाच्या क्रियांचा समुदाय; (पूजा इ०कांतील) आचार. 'जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ। येर तो सकळ मूढ लोक।' –तुगा २५१४. ८ मंत्र, जारणमारण इ० विधि ज्यांत वर्णिले आहेत असा ग्रंथ. ९ प्राचीन धार्मिक वाङ्मयांतील मंत्रशास्त्रविषयक भाग. श्रुति, स्मृति व पुराणें यानंतर तंत्रवाङ्मयाला महत्त्व आहे. १० ग्रहांचीं स्थानें व गति ज्यांत सांगितल्या आहेत असा ज्योतिषशास्त्रांतील एक भाग. ११ कापड विणण्याचा माग. –टिळे ३.४६. १२ एक विशिष्ट संप्रदाय व त्याचें वाङ्मय. [ सं. ]

**तत्रत्य**—वि. त्या ठिकाणचा: तेथील; तेथला. [ सं. ]

**तंत्रपाठ**—पु. ( ग्राम्य सांकेतिक ) संभोग: मैथुन.

**तत्रशीं**—क्रिवि ( अशिष्ट ) जवळ: निकट; आसपास: आजूबाजूस; संनिध. ( वाप्र. ) **०उभा न करणें, राहूं न देणें**–( एखाद्यास ) समोर, जवळपास उभें राहूं न देणें; उभा न करणें. **०लागूं न देणें**–( आपल्या कामाचा ) कोणास मागमूस: पत्ता लागूं न देणें. [ सं. तत्र ]

**तत्राणी**—स्त्री. ( बे. ) (तेल इ० पातळ पदार्थ ठेवावयाचा) मातीचा गेळा. [ का. ]

**तत्रापि, तत्राप**—अ. तथापि; तरीसुद्धां: तदपि; तरी देखील. 'तत्रापि जे प्रिय बहू स्व–वधूचि माजीं।' –वामन–भामाविलास १७ ( नवनीत पृ १०१. [ सं. तथापि अप; सं. तत्र=तेथें+अपि=देखील ]

**तंत्री**—स्त्री. १ ( तंतुवाद्यांतील ) तार. 'ओंकार तो तिचा वीणा। त्रिमात्रा तिन्ही तंत्री गहना।' –भारा बाल १.१०. २ वीणा; सारंगी. –वि. १ तारा असलेलें ( वाद्य इ० ). २ विणून तयार केलेलें: कांतीव: सुताचें केलेलें. ३ तंत्र ज्याच्याजवळ आहे असा. ४ ( ल. ) कारस्थानी: धूर्त: कावेबाज; पाताळयंत्री: खोल स्वभावाचा. [ सं तंत्र=तार ] सामाशब्द– **०वाद्य**–न. तंतुवाद्य.

**तत्रैव**—क्रिवि. तेथेंच; त्याच ठिकाणीं [ सं. तत्र=तेथें+एव=च ]

**तत्व, तत्वज्ञान इ०**—न. तत्त्व इ० पहा.

**तत् शब्द**—पु. ( व्या. ) दर्शकसर्वनाम [ सं. तत्=तो ]

**तत्सत्**—न. १ तें ( ब्रह्म ) खरें ( अविनाशी ) आहे. २ ( ल. ) नाश; आहुति. ( ओं तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु अशा मंत्रानें आहुति टाकतात यावरून ) 'आठ पुत्रांचें पूर्ण तत्सत् होऊन माझा चंद्रगुप्त या पाटलिपुत्राच्या सिंहासनावर...' –चंद्र ४१ [ सं. तत्=तें+सत्=अस्तित्व असलेलें, सत्य ]

**तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु**—उद्गा जें जें मी करतों तें ब्रह्मार्पण असो, अशा अर्थी वाक्य. 'तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु। असें किती वेळां मी वदलों' –टिक १३९. [ स. तत्+सत्+ब्रह्म+अर्पणम्+अस्तु=असो ]

**तत्सम**—वि. त्यासारखा; तसाच. ( व्या. ) एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत आलेला. उदा० संस्कृतांतून मराठींत जसाचा तसाच आलेला ( शब्द, धातु इ० ). नदी, मति, प्रधान इ० संस्कृत

शब्द मराठींत तत्समवर्गांत मोडतात. याच्या उलट तद्भव. ग्रंथि= गांठ; चंचु=चोंच. [ सं. तत्=तो+सम=सारखा ]

**तत्साधक**—वि. तें साधणारा; त्याचें साधन करणारें जें (प्रमाण इत्यादिक) तें. –मिताक्षरा. [ सं. ]

**तत्क्षण–क्षणीं**—क्रिवि. त्याचक्षणीं; त्याचवेळीं; ताबडतोब; तत्काळ; त्याच क्षणांत; लागलींच. [ सं. तत्=तो+क्षण=एक कालविभाग ]

**तंथ**—पु. (व.) सत्त्व; अर्थ; महत्त्वाचा अंश. (प्र.) तथ्य; 'आतां त्या व्यापारांत कांहीं तंथ उरला नाहीं.' [ सं. तथ्य ]

**तथा**—स्त्री. संदेह; संशय; शंका; (अकरणरूपीं प्रयोग). उदा० 'तें कार्य होईल यांत तथा नाहीं.' [ सं. तथा ]

**तथा**—स्त्री. तथ्य. 'मी निःसंग झालें आतां। सोडून या लौकिकता। राहिली इथें काय तथा।' –होला ८४. [ सं. तथ्य ]

**तथा**—क्रिवि. १ तसें; त्याप्रमाणें; त्या रीतीनें; तसल्या पद्धतीनें. हा शब्द यथा या संबंधी पूर्वगामी शब्दाबरोबर योजतात. उदा० 'यथा राजा तथा प्रजा.' २ ठीक; होय; बरें आहे. [ सं. ] ०तथा–क्रिवि. यथायथा–जसजसा, ज्या ज्या रीतीनें याच्या उलट अर्थी तसतसा; त्या त्या प्रकारानें. [ तथा द्वि. ]

**तथापि**—उअ. तरीहि; तरी देखील; तत्रापि. [ सं. तथा=तसें+सं. अपि=देखील ]

**तथास्तु**—उद्गा. ठीक; होय; तसें होवो, असो. 'न करुनि विचार जावी मागें म्हणवुनि म्हणे 'तथास्तु' तिला।' –मोवन १३.७८. [ सं. तथा=तसें+अस्तु=असो ]

**तथ्य**—न. १ सत्य; सत्यांश; खरी गोष्ट. २ अर्थ; राम; उपयुक्तता 'त्यांत कांहीं तथ्य नाहीं.' –त्रि खरें; सत्य; यथार्थ 'ना भी तथ्य ते बोल आतां।'–दावि ३०९. तुज पथ्य तथ्य वचनें गुरुचीं नीचासि भासती श्रमदें।' –मोकर्ण २८.११. –क्रिवि. खरें पाहतां; वास्तविक. [ सं. ] **तथ्यांश**–पु १ उपयुक्त, महत्त्वाचा भाग. 'त्यांच्या पांडित्यप्रकारांतील तथ्यांश पाहूं.' –नि ६३१. २ सारांश; तात्पर्य. [ सं. तथ्य+अंश=भाग ]

**तद्–त**—(सना.) तृतीयपुरुषवाचक अथवा दर्शक–संबंधी सर्वनाम; तो, ती, तें; हें मूळचें संस्कृत सर्वनाम आहे. याचा मराठींत समासांत उपयोग होतो व यापुढें शब्द जोडतांना संधि नियमानुसार याचीं कांहीं ठिकाणीं तत्, तन् व तल् अशीं रूपें होतात. उदा० तत्पुरुष; तन्मय; तद्+लीन=तल्लीन [ सं. ] **तदंत**–क्रिवि. पूर्णपणें निखालस; अजीबात; समूळ; सर्वथा; सर्वांशीं; अगदीं [ सं. तत्+अंत=शेवट ] **तदनंतर**–क्रिवि. त्यानंतर; मग; तें झाल्यावर. [ सं. तत्+अनंतर=नंतर ] **तदनुगुण–रूप–सार**–क्रिवि. त्या प्रमाणें; त्यासारखें. [ सं. तत्+अनुगुण–रूप–सार ] **तदपि**–क्रिवि. तरी सुद्धां; तत्रापि; तथापि. [ तत्+अपि ] **तदाकार**–वि. त्या आकाराचा; त्या रूपाचा; तद्रूप. [ सं. तत्+आकार ] **तदीय**–वि त्याचा; तिचा; तत्संबंधीं; त्याविषयीं. **तदुत्तर**–क्रिवि. त्यापुढें; त्यानंतर; तदनंतर [ सं. तत्+सं उत्तर=पुढें, पुढील ] **तदुपरी, तदुपरांत, तदुपरांतिक**–क्रिवि. तेथून; तेथपासून; त्यावेळेपासून पुढें; तेव्हांपासून. [ सं. तत्+उपरि–उपरांत–उपरांतिक= नंतर, पुढें ] **तद्देशी, तद्देशीय**–वि. १ त्या देशाचा; त्या देशांतील. २ (ल.) परदेशीय. ३ पुरभय्या परदेशी [ सं. तत्+देशी ] **तद्भव**–वि. १ त्यापासून झालेला, होणारा. २ (व्या.) प्राकृत–देशी (धात्वादेश, धातु, शब्द इ०). उदा० सं. रक्षा शब्दापासून झालेला राख शब्द तद्भव आहे. [ तत्+सं भू=होणें ] **तद्वत्**–अ. त्यासारखें; त्याप्रमाणें [ सं. तत्+वत्=प्रमाणें ]

**तदबीर**—पु. प्रयत्न; तजवीज; युक्ति. तद्बीर पहा.

**तदा**—क्रिवि. तेव्हां; त्यावेळीं [ सं. ]

**तदारभ्य**—क्रिवि. त्या वेळेपासून; त्या दिवसापासून. [ सं. तत्+आरभ्य=आरंभ करून ]

**तंदारी**—स्त्री. (क.) १ गमजा. २ तंद्री. [ तंद्री ]

**तदारूक**—पु. १ इलाज; उपाय. 'तुम्ही व राव पंतप्रधान यांनीं खातरजमेनें दिल्हा तदारूक अंमलांत आणावा.' –दिमरा १.७. २ पारिपत्य; शिक्षा. 'राव पन्तप्रधान यांचा आम्हांस मोठा उपद्रव, व एकवेळ यांस तदारूक चांगले प्रकारें दिल्हा पाहिजे.' –रा ५.१५१. [ अर. तदारुक ]

**तंदीं**—क्रिवि. (माण.) तेव्हां; त्या दिवशीं; याप्रमाणेंच केव्हांबद्दल कंदी वापरतात. [ सं. तदा, तद्दिने; म. तदीं ]

**तंदुर(रु)स्त**—वि. निरोगी; निकोप प्रकृतीचा. 'मी आनंदी व तंदुरस्त आहे.' –आपटे–दिवाकर दृष्टि १०. [ फा. तन्=शरीर+फा. दुरुस्त्=निर्दोष; बरोबर ]

**तंदुर(रु)स्ती**—स्त्री. आरोग्य; निरोगीपणा. [ तनु+दुरुस्ती; फा. तन्दुरुस्ती ]

**तंदुरा लागणें**—क्रि. (माण.) रांग लागणें.

**तंदूर, तनूर**—पु. भट्टी लावण्याकरितां तयार केलेली बांधलेली जागा; भट्टी. [ अर. तन्दूर, तनूर=भट्टी ]

**तंदूल**—पु. तांदूळ. [ सं. तंडुल ]

**तदोत्तर**—क्रिवि. त्यानंतर; त्यापुढें; तदुत्तर. [ सं तदा= तेव्हां+उत्तर=पुढें, नंतर ]

**तद्धित**—वि. (व्या.) शब्दसाधित; धातूखेरीज इतर शब्दाला प्रत्यय लागून झालेला (शब्द); उदा० कृपावंत; धनाढ्य; राजकीय. धातूस प्रत्यय लावून केलेल्या शब्दास धातुसाधित किंवा कृदंत असें म्हणतात. [ सं. ]

**तद्(त्)बीर**—स्त्री. १ योजना; व्यवस्था; उपाय. 'तदनंतर जें तद्बीर होईल ते विनन्ती केली जाईल.' –रा १.१४७.

'मशार्निले येथें आलियावर तर्दुद व तदबीर पाहून बहुत संतोष जहाला.' -पया ५७. २ विचार 'टोपीकरांची जात मकरी व दगावाज, शायद-भुलावा देऊन कांहीं एक शक्कल नमूद करावी या तद्विरत असतील.' -पया ४६३. [अर. तद्बीर]

**तंद्रा**—स्त्री १ जाडय; आळस; मंदता; ग्लानि. २ झोपेची गुंगी; सुस्ती [सं] **तंद्रालु**-वि. आळशी; सुस्त; झोपेची गुंगी आलेला. [तंद्रा]

**तंद्री**—स्त्री. १ गुंगी; सुस्ती. २ (एखाद्या विषयाच्या मननांत आलेली) एकाग्रता; तल्लीनता. ३ जडत्व; विषयज्ञान न होणें. [तंद्रा]

**तधीं**—क्रिवि. त्या दिवशीं; त्या वेळीं; तेव्हां. 'कृप बोले काय मदराज तधीं।' -मोकर्ण ६.७५. [सं. तदा] **तधीपुन**-क्रिवि. तेव्हांपासून. 'दिले अमृत वांटून जेव्हां राहुचंद्राचा तधीपुन दावा।' -पला.

**तन, तनघर, तनमोड**—न. तण, तणघर इ० पहा.

**तन**—न. शरीर; देह. तनू पहा. 'सहज सुंदर नील तन।' -वेसीस्व ९.११. [सं. तनुः फा. तन्] (वाप्र.) **०देणें**-न. शरीर समर्पण करणें; छाती पुढें करून तोंड देणें; पुढें पडणें. 'इंग्रजापाशीं तोफांचा मार फारः तेव्हां लोकांनीं तन न दिलें.' -ख १०२४. **०मन**-न. शरीर व आत्मा (मन); सर्व शरीर. **०लागणें**-एखाद्या विषयाकडे अंतःकरणवृत्ति सर्वात्मना गुंतली जाणें. **०मनधन**-न. १ शरीर, मन व संपत्ति. २ (ल.) सर्वस्व; सर्व चीजवस्त 'तनमनधन माझें राघवा रूप तुझें।' -रामदास-करुणाष्टक 'तनमनधन कर देवाला अर्पण।' [तन+मन+धन] **०मनधनसमर्पण**-न. शरीर, मन व संपत्ति अर्पण करणें; सर्वस्व वाहणें; सर्वांवर पाणी सोडणें. [तन+मन+धन+समर्पण]

**तनई-य**—स्त्री. तनाई पहा.

**तन(ण)का**—पु. (व.) राग; रागाचा झटका; झनाटा. 'रामभाऊस त्या गोष्टीचा मोठा तनका आला.' [तणतण]

**तनखा, तन्खा**—पु. १ तंखा. सरकारी तिजोरींतून रकम देण्याचा हुकूम; वरात; सरकारी वसुलांतून तोडून दिलेलें उत्पन्न. २ प्राचीनकाळांत आदिलशाहीनें बसविलेली जमाबंदी, पट्टी. ही अकबराच्या कारकीर्दीत तोडरमल्ल यानें पुन्हां दुरुस्त केली. मलिकंबरानें केलेल्या प्रतबंदीस तनखा व भाऊंनीं बसविलेल्या पट्टीस कमाल म्हणत. 'तनखाही हद्दे तपियाचा दिवाणांत देत नाहीस.' -रा १५.२७१. ३ औरंगजेबाच्या कारकीर्दीत मक्केला यात्रेकरूंना नेणारीं जहाजें सुरतच्या बंदरांत जीं असत त्यांच्या खर्चासाठीं तोडून दिलेला वसूल. ४ वसूल; एखाद्या गावचा, परगण्याचा जमाबंदीचा, वसुलाचा तक्ता. ५ स्वामित्व; हक्क. ६ संबंध. (क्रि० तोडणें; तोडून टाकणें). 'त्या गृहस्थानें आपल्या बायकोचा तनखा तोडून टाकला.' ७ पगार; वेतन. ८ खर्ची. 'तुम्हाकडे सदारुल्मुलूक बहादूर यांनीं परगणे पालीम येथील ऐवजीं तन्खा केली त्या बाबत ऐवज येतो.' -रा २२.१०१. [फा. तन्ख्वाह्] सामाशब्द- **०दास्तान**-पु. वसुलाचा सांठा, गल्ला. 'गडोगडीं तनखा, तनखादास्तान, इस्ताद आदिकरून गडाच्या प्रयोजनाची वस्तुजात गडास संग्रह करून ठेवावेंच लागतें.' -मराआ ३४. [तनखा+फा. दास्तन=सांठा]

**तनगडणें**—अक्रि. (व) झोकांडया खाणें. [तंगडणें]

**तनघर**—न. तणघर पहा. 'मह्रा मंदिरें माडया तनघरें। झोंपडया अवघीं देव देवाइलें।' -तुगा १८४३. [सं. तृण+गृह] **म्ह०** (माण.) तन खाई धन=गवत (शेतांत) फार वाढलें म्हणजे तें काढण्यास बराच खर्च येतो. यावरून एखाद्या क्षुल्लक गोष्टीकडे वेळींच लक्ष्य न दिल्यास ती पुढें डोईजड होते.

**तनतणें**—तणतणणें पहा.

**तननं**—न. १ आवाज लावण्यासाठीं गाणें गुणगुणणें; सूर लावणें. २ (एखादें गाणें) आपल्याशींस गुणगुणणें. ३ गाणें; ताणा मारणें. 'तेव्हां गंधर्वमुखीं जिकडे तिकडेहि तननन तननं।' -मोवन १२.१६२. [ध्व.] **म्ह०** आधीं अननं मग तननं=आधीं पोटाची व्यवस्था व मग मौजेच्या गोष्टी.

**तनफुगी**—पु. (व.) गवतांत असणारा एक किडा. हा पोटांत गेल्यास जनावर फुगून मरतें असें म्हणतात. [तन=शरीर+फुगणें]

**तनमणी**—पु तन्मणी. स्त्रियांचें एक कंठभूषण. हिऱ्यामोत्यांचा, गळयांतील एक दागिना. [सं. तनु=सुंदर+मणि=रत्न]

**तनमोर**—पु एक प्रकारचा पक्षी. धाकटा तनमोर व मोठ तनमोर असे याचे भेद आहेत. [सं. तनु+मयूर]

**तनय**—पु. मुलगा; पुत्र; आत्मज; सुत. 'भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा। होतां वदे तनय आनकदुंदुभीचा।' -वामन, भीष्मप्रतिज्ञा. [सं.] **तनया**-स्त्री. कन्या; मुलगी; पुत्री. [सं.]

**तनयी**—स्त्री. राहुटी इ० कांचीं दोरी तनाई पहा.

**तनरी**—स्त्री. गाणें; गायन; तननं करणें. [ध्व. तननन]

**तनवी**—स्त्री. चेहऱ्यावरील आरोग्य; कांति, टवटवी; तजेला. निरोगीपणाची टवटवी, कांति (विशेषतः आजारीपणानंतर येणारी). (क्रि० पालटणें). [सं. तनु=शरीर; सुंदर]

**तनल**—न (व. कों.) पेंढा; तृण; धान्याचें काड; धान्याचीं ताटें. तणस पहा. [सं. तृण-तण]

**तनस(सु)डी**—स्त्री. १ गवताची काडी; ताट. २ (ल.) कपर्दीक; शष्प; क्षुद्रवस्तु. तणसडी पहा. 'आपलें द्रव्य मजजवळ ठेवा. तुमच्या एका तनसडीला हात लागायचा नाहीं.' ३ (माण.) सोललेली आंबाडीची काडी; सणकाडी. [सं. तृण; प्रा. तण+सडी=काडी]

**तनसळ**—स्त्री. (विणकाम.) सुत उकलून त्याचा ताणा करण्यासाठीं केलेली चौकट. फासे (धागे) घालण्यास या चौकटीवर खुंट्या बसविलेल्या असतात. [ सं. तन्+सळई ]

**तनाई-य-व**—स्त्री. १ तंबू इ० काचा तणाव्याचा दोर, दोरी. २ कपडे इ० सुकविण्यासाठीं ताणून बांधलेली (परटाची) दोरी; निशाणाचा खांब, मंडप इ० नीट उभा, ताठ रहावा म्हणून बांधलेला आधाराचा दोर, दोरी. ३ (ल) साहाय्यकर्ता; आश्रयदाता; आधारभूत व्यक्ति. [ अर. तनाब्; तुल० सं. तन्=ताणणें ] (वाप्र.) **तनया तुटणें** (उप.) ताणे तुटणें; बंद तुटणें; वैदिक कर्कश स्वरानें वेदघोष करूं लागले असतां अथवा गवई घसा खरडून ताना घेत असतां उपरोधानें हा वाक्प्रचार योजतात **तनया, तनाई, तनाय तुटणें**–(ल.) (एखाद्याचा) आश्रयदाता नाहींसा होणें; आधार तुटणें.

**तनाखोरी**—स्त्री. १ (ठेव म्हणून घेतलेल्या पैशाची, जिनसांची) अफरातफर; लाटालाटी; अन्यायस्वाहा करणें; विश्वासघात. 'नका करूं तनोखोरी। बाहेर पडतें हे चोरी।' –मन्व ५३०. २ नावड; वीट. 'तो यास तनाखोरीस येऊन...' –जोरा ५४. [ फा. ]

**तनाना**—पु. १ गाणें; गायन; तनने पहा. (क्रि० चालणें; करणें). 'होतां किशोर सुर तोच करी तनाना।' –देकृष्णजन्म ४६. २ चेष्टा. 'राधा म्हणे मनमोहना। भजसी लावूं नको तनाना।' [ ध्व. ]

**तनाम्ल**—न. (रसा.) कातडें कमविण्याच्या कामीं उपयोगी पडणारें एक अम्ल. (इं.) टॅनिक ॲसिड. हें बाभळीच्या सालीपासून काढतात. [ इं. टॅन+सं. अम्ल ]

**तनारी**—स्त्री. (कु.) गाण्याची लकेर; ननरी पहा.

**तनाव-वा**—स्त्रीपु. तणावा पहा

**तनावणें**—अक्रि. (व.) (शेतांत) तण माजणें; (शेत) तणानें व्यापलें जाणें. [ तण ]

**तनावणें**—अक्रि. निजणें; ताणून देणें. [ ताणणें ]

**तनु**—स्त्री. शरीर; देह. तन-नू पहा. 'तृणवत तनु सोनें ज्या पाषाण।' –तुगा ३७७. [ सं. ] ०**चतुष्ट्य**–न. देहाचे चार भेद (सूक्ष्म, स्थूल, कारण व महाकारण). 'तनुचतुष्टयनिदर्शनें। कैसीं तें ऐकावी।' –दा ४.१.२८. [ तनु+चतुष्टय=चारांचा समूह ]

**तनु**—वि. १ अल्प; थोडें. २ कृश; क्षीण. ३ सूक्ष्म; बारीक. ४ तलम; अतिशय पातळ. ५ नाजूक; कोमल. [सं.] ०**मानसा**–स्त्री. ज्ञानी जीवाच्या सात भूमिकांपैकीं मनास तनुत्व (सूक्ष्मपणा) आणणारी तिसरी भूमिका. –हंको. [ तनु=कृश+मानस=मन ]

**तनुज**—पु. पुत्र; मुलगा; तनय. 'गंधर्व म्हणे होता कुशिक तनुज गाधि कान्यकुब्जपति।' –मोवन ३२.२. [सं. तनु=शरीर+जन्=उत्पन्न होणें ] **तनुजा**–स्त्री. कन्या; पुत्री; मुलगी.

**तनुरात**—पु. एक प्रकारचा तवा. 'रोट्यांचे बरेच प्रकार तनुरात नांवाच्या तव्यावर भाजण्यांत येतात.' –गृशि २.१५. [ अर. तनूर=तवा, भट्टी ]

**तनू**—स्त्री १ देह; शरीर; तनु २ प्रकृति; तब्येत; देहस्वभाव. (क्रि० राखणें; संभाळणें; (प्रमाणें) वागणें) ३ शरीरप्रकृतीची काळजी, निगा; पथ्यापथ्य पाळण्याची खबरदारी; पथ्य. 'वैद्यानें मला तनूवर टेविलें. ४ नाजूक शरीरप्रकृति. [ सं. तनु ]

**तनू**—स्त्री. (व.) तकवा; ताकद; शक्ति. 'तनू आल्यावर मला कामधाम करतां येईल.' [ त्राण ]

**तन्न**—न. (गो.) भात वाढून शिल्लक राहिलेलें पाणी. 'तन्न गोरवांक दाखेतात.'

**तन्नाॅ**—वि. १ (गो.) हिरवा. २ तरणा; तरुण [ सं.; म. तरुण, तरणा ] ०**थाकुटाॅ**–वि. (गो.) तरणाताठा; नव्या नवतीचा. [ म. तरणा+थाकटा ] **तन्नपण**–न. तारुण्य.

**तन्ना-न्हा**—क्रिवि. (गो) तेव्हां; त्यावेळीं [ सं. तदा ]

**तन्नावणें**—अक्रि (व.) तोंडावरून पांघरूण घेऊन खुशाल झोंपणें; ताणून देणें. तनावणें पहा. [ ताणणें ]

**तन्नावा**—पु. (ना.व) तणावा अर्थ १ पहा.

**तन्निष्ठ**—वि. १ त्याच्या ठिकाणीं (देवाच्या, गुरूच्या ठिकाणीं) निष्ठा असलेला, टेवणारा. २ त्याच्याविषयींची; तत्संबधीं. 'अनन्योदकें धुवट। वासना जे तन्निष्ठ। तें लागलेंसे अचोट। चंद्नाचें।' –ज्ञा १५.३. [ सं. तत्=तो+निष्ठ=स्थित ]

**तन्मय**—न. स्वरूपैक्य. 'दिसे तन्मयाचें झळकत। एक छत्र।' –ज्ञा ९.२१७ –वि. तद्रूप; तदाकार; तल्लीन; (एखाद्या कार्यांत) पूर्णपणें दंग झालेला. 'एकोनि शारदेचें गायन। तन्मय विधि विष्णु ईशान।' [ सं. तत्+मय ]

**तन्मयता**—स्त्री. तल्लीनता; तद्रूपता; तदाकार स्थिति 'सम्यक् ज्ञान नुदैजतां। वेधेचि तन्मयता।' –ज्ञा १८.९२१. 'ऐसें स्वस्वरूप निरोपिता। शिष्यासी जाली तन्मयता।' [ तन्मय ]

**तन्मात्र**—न. पृथ्वी, आप, तेज इ० पंचमहाभूतांचें अतिसूक्ष्म रूप. उदा० पृथ्वीचें गंध, उदकाचें रस इ० सूक्ष्मभूत तत्त्वें. 'तैसींचि श्रोत्रादि तन्मात्रें। तिये अंगवसां गर्भपत्रें। लुळलुळितें विचित्र। उमळती गा।' –ज्ञा ११९९. 'इंद्रियें जन्मलीं रजोगुणीं। तन्मात्रा विषयो तमोगुणीं।' –एभा २८.६८. –वि. केवळ तेंच. [ सं. तत्+मात्र ]

**तन्मात्रा**—स्त्री. १ ओंकाराच्या मात्रा. २ शब्द, स्पर्श इ० पंचमहाभूतांचे सूक्ष्म मूलविषय. 'पुढां तन्मात्रा अर्धवेरी। आकाशाच्या अंतरीं। भरती गमे सागरीं। सरिता जैसी।' –ज्ञा ६.३०४. [ सं. तत्+मात्रा ]

**तन्यता**—स्त्री. ( पदार्थ ) ठोकून ठोकून त्याचा पातळ पत्रा बनवतां येण्याचा गुण; प्रसरणयोग्यता; प्रसारणक्षमता [ सं. तन्= पसरणें; तन्य=प्रसारणक्षम ]

**तन्वंगी**—स्त्री. सुंदरी; सुकुमार व सुंदर, बांधेसूद व सडपातळ स्त्री. [ सं. तनु=कृश. नाजुक+अंग=शरीर ]

**तन्वळ**—वि. (गो.) कच्चें; कोंवळें; अपक्क. [सं. तनु=लहान]

**तन्सो**—( गो. ) भांडीं घासण्यासाठीं भाताणाचा केलेला चोथा. [ म. तग, तन ]

**तन्हा, तनहा**—वि. एकटा. ' मुजाका नाहीं तन्हा यावयाचें करावें. ' –रा ५.२५. [ फा. तन्हा ]

**तन्हाई**—स्त्री. एकांत; एकलेंपण; विविक्तता. 'तन्हाईत बोलावयाचें किंवा कसें. ' –रा ५.२८. [ फा. ]

**तन्हार**—न. तणार पहा.

**तन्हारणें**—अक्रि. ( व ) ताण बसणें; ताणलें जाणें. –उक्रि. ताणणें पहा. [ सं. तन् ]

**तप**—न. १ शरीरशुद्धीकरितां, देवता प्रसन्न करण्याकरितां केलेलें देहदंडनयुक्त उपोषण इ० सारखें आचरण; ध्यान; मनन; कष्टसाध्य आचरण. २ सदाचरण; पुण्याचरण; पुण्य. ३ विहित, विशिष्ट कर्म; कर्तव्य ( ब्राह्मण, क्षत्रिय इ० वर्णाचें ). ४ बारा वर्षांची मुदत कालमान. 'एकांगुष्ठींही तपिजे । तपसाहस्रीं । ' –ज्ञा १७.४१५. 'बसवल कथं कथमपि आम्हां तप एक साजणा रानीं।' –मोवन २.६८. ५ ग्रीष्मऋतु. -शर. –वि. हें पद समासाच्या उत्तरपदीं असल्यास तापद, ताप देणारा असा अर्थ होतो. जसें– नेत्रतप=डोळ्याला ताप देणारा; भालतप=कपाळाला ताप देणारा; शिरस्तप, अंगतप; मनस्तप; चित्रंतप; अंतस्तप; बहिस्तप; पादंतप; इंद्रियतप. [सं.] (वाप्र.) **तपीं बसणें**–१ (अक्षरशः) धर्माचरणार्थ, पुण्यसंचयार्थ देहदंडयुक्त आचरण करणें. २ (ल.) अधिकारच्युत, बेकार होऊन घरीं बसणें. **(करून करून)तपीं बसणें**–एकसारखीं पापें करीत राहून त्यानंतर साधुवृत्तीचा आव आणणें. **तपें तपणें**–तपश्चर्या करणें. ' जे तीर्थें करितां भागले। अनंत जन्मीं तपें तपले।' सामाशब्द– **०निष्ठा**–स्त्री. (तपोनिष्ठा) तपानुष्ठान. ' मग करूनियां तपनिष्ठा। प्रसन्न केलें नीलकंठा। ' –कथा १.१२.१५६. [ तप+निष्ठा ] **तपश्चर्या**–स्त्री. तप; तपस्या; तपानुष्ठान; तपाचें आचरण; तप करणें; खडतर व्रताचरण; तपश्चिर्या असें अशुद्ध रूपहि प्रचारांत आहे. [ सं. तपस्+चर्= आचरणें ] **तपश्शाली**–वि. तपश्चर्येच्या प्रभावानें चमकणारा, शोभणारा; उग्र तपाच्या उत्कर्षानें व गुणानें युक्त. [ सं. तपस्+ शालिन्=शोभणारा ] **तपःसामर्थ्य, तपस्सामर्थ्य**–न. तपोबल; तपश्चर्येनें प्राप्त होणारें अलौकिक बळ. [ स. तपस्+सामर्थ्य ] **तपोधन**–पु. १ तप हेंच धन ज्याचें तो. २ (ल.) गोसावी; बैरागी; संन्यासी; तपस्वी. ३ गुरव; शंकराच्या देवळांतील गुरव. –बदलापूर ४७४. [ सं. तपस्+धन ] **तपोनिधि**–पु. १ तपश्चर्येचा सांठा. २ गोसावी, बैरागी इ०नां संबोधण्याचा शब्द; तपोधन. [ सं. तपस्+ निधि=सांठा ] **तपोबल**–न. तपाचरणानें आलेलें अलौकिक बल; तपःसामर्थ्य. [ सं. तपस्+बल ] **तपोलोक**–पु. सप्त स्वर्गलोकांपैकीं सहावा लोक. सप्तलोक पहा. [ सं. तपस्+लोक=जग ] **तपोवन**–न. तपश्चर्या करावयाचें वन; तपस्वी लोकांचें राहण्याचें स्थान. सिलोनचें जुनें नाव तपोवन असें आहे. नासिक येथील रामाच्या वास्तव्यस्थानाचें नांव. [ सं. तपस्+वन ]

**तपकडी**—स्त्री. (गो.) पितळेचें लहान तबक; तबकडी पहा. [ सं. स्तबक; अर तबक् पहा ]

**तपकणें**—अक्रि. थेंबाथेंबांनीं गळणें; झिरपणें; टपकणें. [ टपकणें; हि. तपकना ]

**तपकिरी**—पु. तपकिरीचा रंग. –वि. तपकिरीच्या रंगासारख्या रंगाचा. [ तपकीर ]

**तपकिऱ्या–र्‍या**—वि. १ तपकीर ओढणारा. २ तपकीर विकणारा. [ तपकीर ]

**तपकीर, तपकी(खी)ल**—स्त्री हुंगण्यासाठीं केलेली तंबाखूची पूड. ( क्रि० ओढणें ). [ सं. क्षारपत्रा=तंबाकू ]

**तपगणें**—अक्रि. ( प्रां. ) ठांसून भरलें जाणें; कोंबलें जाणें.

**तपणें**—अक्रि. १ ( सूर्य इ० कानें ) प्रकाशणें; तळपणें; चकाकणें. ' जेयाचेनि प्रतापें तपे सुर्यु । '–शिशु १५१. २ (ल)(राज्य इ० ) समृद्ध होणें; भरभराटीस येणें; उत्कर्ष पावणें. ३ ( ल. ) ( एखाद्यावर ) रागावणें; संतापणें; क्रुद्ध होणें. ४ ( काव्य. ) तपश्चर्या करणें; तप आचरणें. ' एकांगुष्ठींही तपिजे । तपसाहस्रीं ।' –ज्ञा १७.४१५. ५ तापणें; गरम होणें. [ सं. तप्–तपन ]

**तपन**—पु. सूर्य. 'ना ना मावळतेनि तपनें । नेहजती लोकांचीं दर्शनें । ' –ज्ञा १५.३६६. ' तद्दर्शनकामुक मी पुसता झालों उपाय तपनातें । ' –मोसभा १.३५. –न. १ ज्वलन; प्रकाशन; प्रकाशाचा, उष्णतेचा झगझगाट; उष्णता; प्रखरता; उष्णता बाहेर टाकणें, पडणें. २ ( व. ) ( सूर्याचें ) ऊन, उष्णता. (क्रि० पडणें; होणें ). ' तपनेंवीण प्रकाशु । जाड्येंवीण रसीं रसु । ' –ज्ञा १७. २२८. [ सं. ]

**तपराख**—स्त्री. थप्पड; चपराक. 'लाता तपराखा मेणमारा' –दा ३.७.६६.

**तपली**—स्त्री. ( कु. ) लहानसें तपेलें; तपेली पहा.

**तपलें**—न. ( गो ) तपेलें पहा. ( वाप्र. ) **०बुडप**–(तपेलें बुडणें ) फुकट जाणें; नासणें.

**तपशि(शे)ला**—पु. १ स्त्रियांचें एक वस्त्र. ( गो. ) एक प्रकारचें हिरव्या रंगाचें व रुंद धारीचें स्त्रियांचें वस्त्र. २ ( व. ) एक

प्रकारची रेशीमकाठी साडी. 'परिधान गोपिनीं करुन उंच तप शेले।' -प्रला २९. [तापता+शेला]

**तपशी(सी)ल**—पु. १ एखाद्या प्रसंगांतील, हिशेबांतील सर्व हकिगती, निरनिराळया गोष्टी, बाबी; सविस्तर वर्णन, नोंद. २ (ल.) पाल्हाळयुक्त वर्णन, कथन; चऱ्हाट; चर्पटपंजरी. ३ खोटी सबब; बहाणा; निमित्त; मिष. (क्रि० लावणें). 'तपशील सहसा न लावितां...रुपये व रसदेची तर्तूद जरूर करणें.' -रा १.३३५. [अर. तफ्सील्] ०**वार**—क्रिवि. साद्यंत; बारीकसारीक गोष्टीसुद्धां; सर्व तपशिलासह.

**तपस्या**—स्त्री. तपश्चर्या; तप. [सं.]

**तपस्वी**—पु. तपश्चर्या करणारा; तपी. [सं. तपस्विन्]

**तप(पा)ळ**—वि. १ तापट; तामसी; रागीट. २ तल्लख; काम करण्यांत चपळ; चलाख. (विरू.) तपीळ. [सं.तप+ल—ईल प्रत्यय]

**तपा**—पु. तालुक्याचा भाग, परगणा. (प्र.) तप्पा पहा. 'गोरेगांव तपियांत मुकाम...दोन मासैपर्यंत राहिलों' -पेद ३. १७५. [हिं. तप्पा=प्रांत, परगणा; सिं. तपो]

**तपास**—पु. १ चौकशी; शोध; तलास; विचारपूस. २ (कायदा) गुन्ह्याबाबत पुरावा गोळा करण्याकरितां पोलीस अंमलदार जें (चौकशीचें) काम करतात तें; (इं.) इनव्हेस्टिगेशन् [अर. तफह्हुस] ०**निशी**—स्त्री. तपासनिसाचा हुद्दा, काम. ०**नीस**—पु. १ (एखाद्या भागांतील) चोऱ्या, दरोडे इ० गुन्ह्यांची चौकशी करून सरकारांत कळविणारा हल्लींच्या पोलीस इन्स्पेक्टरसारखा (पूर्वीच्या राजवटींतील) अधिकारी; पोलीस इन्स्पेक्टर. २ तपासणारा अधिकारी; तपासणी कामगार; (इं.) सुपरवाइझर. [तपास]

**तपासणी**—स्त्री. १ चौकशी; बारीक शोध; तलास; तपास. २ (कायदा) फेरचौकशी; फेरतपासणी. ३ पाहाणी; परीक्षा;(इं.) इन्स्पेक्शन. ४ ताडून पाहाणें; ताळा घेणें. [तपासणें]

**तपासणें**—उक्रि. १ शोध, चौकशी करणें; बारकाईनें पाहणें. २ परीक्षा करणें, घेणें; झडती घेणें; तपासणी करणें. ३ बारकाईनें चूक इ० शोधणें; ताडून पहाणें. [तपास]

**तपिया**—पु. तपस्वी; तप करणारा; तपी पहा. 'भरत तपिया थोर अंगें। तेणें काळ कैसेनि रिघे।' -एभा २.१५४. [सं. तप्]

**तपी**—पु. तपस्वी; तप करणारा 'भागें भागीरथीचे कुळीं। विस्तीर्ण देखिली ऋषिमंडळी। तपी असती तये स्थळीं।' -मुआदि ३९.१२. 'जपी तपी तामस योगी।' -दा ४.१.१३. [सं. तपिन्]

**तपीठ**—न तांदुळाच्या पिठाचें एक मसालेदार पक्वान्न. [सं. पिष्ट]

**तपोनणें, तपिन्नणें**—सक्रि. तप करणें; तपणें अर्थ ४ पहा. 'तपें कोण तपीनलीं।' -रासं २.२०९. [तपणें]

शको. ४. ९

**तपीळ**—वि. १ तापट; तामसी; रागीट. 'मत्सरी खादाड तपीळ।' -दा ३.६.६४. २ कामांत हुशार, चलाख. तपळ पहा. [तप+ईल प्रत्यय] सामाशब्द- ०**पण**—न. तापटपणा; रागीटपणा. 'तपीळपण धरूं नये। भांडवितां भांडों नये।' -दा १४. १.१७.

**तपें**—शअ. तर्फे 'तपें तगूर' -वाडसमा ३ २६. ता अर्थ ८ पहा.

**तपेली**—स्त्री. लहान तपेलें.

**तपेलें**—न. १ पाणी भरण्याचें-स्वयंपाकाच्या उपयोगाचें विशिष्ट आकाराचें, तांब्यापितळेचें उभट भांडें. 'हांडे कुंभ पळया परात तवल्या गुंडे तपेलीं घडे।' -सारुह ३४३. २ (व.) तपेली; तांबलें. [सं. तप+आलय=तापविण्याचें स्थान; म. तप+आळें ?] ०**बुडणें**—(एखाद्याचें) निर्वाहाचें साधन नाहींसें होणें.

**तप्त**—वि. (अक्षरशः ल.) तापलेला; संतप्त झालेला; चेतविलेला; प्रक्षुब्ध. [सं.] ०**कांचन**—न. तापविलेलें, शुद्ध केलेलें सोनें. 'तप्तकांचन जैसें मुढाळ। तैसें निर्मळ निजांग तुझें।' [तप्त+कांचन=सोनें] ०**दिव्य**—न. दिव्य करण्याचा एक प्रकार; यांत हें दिव्य करणारा, 'ईश्वरा, मी जें सांगतों तें खरें असल्यास माझा हात भाजूं देऊं नकोस' असें बोलून आपल्या हातानें तापलेल्या तेलाच्या कढईंत टाकलेला पदार्थ (रवा) काढतो. दिव्य पहा. ०**दिव्यकरणें**-वर वर्णन केल्याप्रमाणें भयंकर दिव्य करण्यास तयार होणें; भयंकर शपथ घेणें. [तप्त+दिव्य] ०**मुद्रा**—स्त्री. मध्व संप्रदायी वैष्णव दीक्षा घेतांना तांब्या-पितळेच्या मुद्रा तापवून आपल्या अंगावर जीं चिन्हें उमटवितात त्यांपैकीं प्रत्येक; ज्या मुद्रेनें हीं चिन्हें उमटवितात ती. [तप्त+मुद्रा=चिन्ह, छाप] ०**लोह**—न. १ तापलेलें लोखंड. २ (तापलेल्या लोखंडाचा) एक प्रकारचा नरक. 'तप्तलोह भेटी। तुका म्हणे कल्पकोटी।' -तुगा ३१४१. [तप्त+लोह=लोखंड] ०**शूल-ळ**—पु. तापविलेला सूळ. 'तप्तशूळावरी घालिती। पायीं चेंडशिळा बांधिती।' [तप्त+शूल]

**तप्पा**—पु. एका मुख्य गांवाच्या आसपास असलेल्या दहावीस गांवांची वसुलाची वहिवाट करतां येईल असा परगण्यापेक्षां लहान प्रादेशिक विभाग; जिल्हा; परगण्याचा भाग. तपा पहा. [हिं. तप्पा; सिं. तपो]

**तप्राक**—स्त्री. चपराक. 'कितेक आपटोनि मारिले लात बुक्या तप्राका :' -दावि ५०१. तपराख पहा. [हिं. तफराख]

**तफजूल**—पु. कृपा; उपकार. 'मगर वजिरावर तफजूल होतो तो श्रीमन्ताचेच खातर्दास्त होतो.' -रा ६.६२०. [अर. तफज्झुल्]

**तफरका**—पु. बेदिल. तफ्रका पहा. 'कूळ तफरका होऊं न देणें.' -वाडबावा ३.२५५.

**तफरीक**—स्त्री. १ वांटणी. तफ्रीक पहा. 'मक्ता साला-बाद आहे त्याप्रमाणें तफरीक करून देऊं.' –पेद २०.११८. २ एक कर. –वाडबाबा ३.३५ [अर. तफ्रीक्]

**तफसील, तफसीलवार**—तपशील इ० पहा.

**तफहूस**—पु तपास; चौकशी; शोध. 'आंग्र्याच्या मार्फे-तीनें तफहूस करितां मोहिब्बांचीं गुरें यांमध्यें नमेत म्हणून आंग्र्यानें मालूम केलें.' –ब्रप २३६. [अर. तफहूहूस्]

**तफावत**—स्त्री. १ अंतर. (स्थल आणि काल यासंबंधीं) 'गिल्चाचा आमचा दोंकोसाचा तफावत होता.' –रा ६.४७०. २ (जमाखर्चांतील, लिखाणांतील) फरक; वैषम्य; न्यूनाधिक्य; विरोध; विसंगतपणा. ३ (कर्तव्य इ० बजावण्यांत) चूक; कसर; दोष; उणेपणा. ४ चूक; बरोबर नसणें. ५ भेद; फरक; विषमता; भिन्नता. ६ स्वामिद्रोह; हरामखोरी; दगलबाजी. 'मग त्यामध्यें एक मुसल्मान होता त्यानें तफावती केली.' –रा १५.६. [अर. तफावुत्] **०तजावज**–स्त्री. कमीपणा; अन्तर; न्यून. 'केव्हांही हर्देहाल मोहिब्याचे कामामध्यें तफावत–तजावज करणार नाहीं.' –ब्रप २४०. **०निशी–नीस**–तजकरनिशी, तजकरनीस पहा. [तफा-वत]

**तफ्रका**—वि. १ दाणादाण; परागंदा; हैराण. 'रोहिल्याचे अम्मलापासून वस्तीचे लोक तफ्रका जाले.' –दिमरा १.१६. २ बेदिल; भीतिग्रस्त. 'गोरगरीब आलम तफ्रका व परेशान आहे.' –रा ३.९०. [अर. तफ्रिका]

**तफ्रीक**—स्त्री. वर्गवारी; वांटणी. 'तरी कौलाप्रमाणें रयती-पासून तफ्रीक बहुकूम गुदस्ताप्रमाणें वसूल घ्यावा.' –रा ३. ४९१. [अर. तफ्रीक्]

**तबक**—न. १ पानसुपारी, पूजासाहित्य इ० ठेवण्याच्या उपयोगी असें चांदी इ० धातूचें ताटासारखें नक्षीदार पात्र. 'उत्तम फळ ठेवुनी तबका।' –नव १३.१२२ २ (ल.) जमी-नीचा वाटोळा तुकडा. ३ डोंगर, टेकडी इ०कांचा वाटोळा भाग. ४ सभामंडप वगैरेंच्या मायवानाचा प्रदेश वर्ज्य करून मध्यमागीं असलेला प्रदेश अथवा त्या प्रदेशाच्या खालचें स्थळ; छताचा चांदवा. ५ घेर. 'ते दिवशीं हल्ला जाली तेव्हां एक तबक घेऊन दुसरे तबकास लोक लागले.' –ख ४.१८२७. ६ जिना संपतो त्या ठिकाणीं उभें राहण्याकरितां केलेली जागा; तबकडी. [अर. तबक्]

**तबक**—स्त्री. विहीरीच्या भोंवतालीं बांधलेला गोल अथवा चौकोनी ओटा. (कों.) बेंड.

**तबकडी**—स्त्री. १ लहान तबक. २ समईच्या खालीं ठेवा-वयाची ताटली. ३ विशिष्ट प्रकारच्या दिव्याच्या कांचेच्या गोळ्याच्या (ग्लोबच्या) वरच्या बाजूस असलेला गोलाकार पत्रा. यास पांढरा रंग दिलेला असल्यामुळें प्रकाशकिरण फांकण्यास मदत होते. ४ पाळखींतील बसावयाची जागा. ५ जिना चढून गेल्यावर उभें राहण्यासाठीं केलेली रुंद पायरी, जागा; तबक. ६ तंतुवाद्यांत दर्शनी बाजूस भोंपळ्यावर बसविलेला तक्ता. ७ पान-सुपारीच्या डब्यांतील पाळयाच्यावर मध्यभागीं चुन्याची डबी बसवलेला पत्रा. [तबक]

**तबकणें**—अक्रि. टपकणें, तपकणें पहा. [हि. तपकना ध्व.]

**तबकफाड पेंच**—पु. (मल्लविद्या). कुस्तींतील डावाचा एक प्रकार, पेंच.

**तबंचा**—पु. तमंचा; पिस्तूल. [तुर्की]

**तबणें**—अक्रि. (माण.) (मनुष्य, जनावर इ०कानें एखाद्या-कडे) रागानें पाहणें. तमणें अर्थ २ पहा.

**तबदिली**—स्त्री. (कायदा) (मालमत्तेचें) स्थित्यंतर; बदली; हस्तांतर; देवघेव [अर. तब्दील्=बदली]

**तबदील**–नस्त्री. (कायदा) बदलणें; फिरविणें; दुरुस्ती; फेर बदल. –वि. फेरबदल केलेलें; दुरुस्त केलेलें. (क्रि० करणें). [अर. तब्दील्]

**तबर**—वि. (प्रां.) उन्मत्त; (शब्दशः व ल.) (गर्व, मद्य इ०नीं) धुंद.

**तबरंगु**—वि. हत्तीसारखा पुष्ट असलेला (घोडा). घोडयाच्या ७२ दोषांपैकीं एक. –अश्वप १.१०४.

**तबरूक**—पु. १ मोहरमांतील ताबुताच्या, एखाद्या पीराच्या नावानें प्रसाद म्हणून सरकारास, सरकारी अधिकाऱ्यास दिलेला नजराणा. २ थोराचा प्रसाद (आश्रितांना दिलेला). 'त्यास पातशहानीं तबरूक देवायाची आज्ञा केली.' –दिमरा १.१५२. [अर. तबर्रुक]

**तबल**—पु. कुऱ्हाड; परशु. [फा तबर्] **०दार**–पु (लष्करांतील) लांकूडतोडया, फरास. [फा. तबर्दार]

**तबल**—क्रिवि (विरू.) तव्वल; तब्बल पहा.

**तबलँ**—न. (गो.) ढोल; ढोलकें; तबला. [अर. तब्ला]

**तबलक–ख**—स्त्री. १ कागदपत्राचें पुडकें. २ कागद-पत्रांच्या पुडक्यास गुंडाळलेला दोरा, कागद. [अर तब्लक्]

**तबलक**—स्त्री. लहान ढोल; तबला.

**तबलजी–ची**—पु. तबला वाजविणारा. [फा.]

**तबला**—पु एक चर्मवाद्य. पखवाजाच्या खोडाचे समान दोन तुकडे करून एक तोंड बंद व एक मोकळें ठेवितात. मोकळें तोंड कातडयानें मढवून त्याचा मध्यभाग शाईनें मढवितात. गजऱ्यांतून व खालच्या बाजूस असलेल्या लोखंडी कडयांतून वादी ओवून तिच्या खालीं (पखवाजाप्रमाणें) आवाज कमजास्त करण्याकरितां गट्टे बसविलेले असतात. [अर. तब्ला]

**तबली**—स्त्री. सतारीच्या भोपळयाच्या वरील बाजूस वसविलेली लांकडाची फळी, तक्ता. -शर. तबकडी अर्थ ६ पहा.

**तबा**—स्त्री. प्रभा; तेज; प्रकाश. ' आल्या नागपुराहून फौजा भोंसल्यांच्या बाणांची तबा। ' -ऐपो २३३. [ फा. ताब् ]

**तबा**—वि. वाईट; नष्ट. [ फा. तबाह्=वाईट ] **०होणें**-(ना.) नाश; नष्ट होणें.

**तबाकतोड**—वि. ( व. ) बेमुर्वतखोरपणाचें; सडेतोड; तटकातोड. ( वागणें, आचरण ). ' तबाकतोड वागणें मला साधणार नाहीं. '

**तंबाकू-खू, तमाखु**—पुस्त्री. एक वनस्पतिविशेष. हिचें रोप सुमारें तीन फूट वाढतें; त्याची पानें वाळवून त्यांस पाणी लावून त्याचा उपयोग खाण्याकडे व ओढण्याकडे करितात. तंबाखूचें पान तीक्ष्ण व कफनाशक असतें. तंबाखूचे गळदर्णे, अकोल, मिद्रास व खुमासदार असे चार प्रकार आहेत. [ तुल० जपानी तावाको; इं. टोबॅको ]

**तबाब**—पु. (कर. सुतारी) लांकडी जिन्याच्या दोन्ही बाजूच्या फळयांपैकी एक. ' तबाबाला पायऱ्यांच्या खांचा पाडा. '

**तबियत तब्य(ब्ये)त**—स्त्री. १ प्रकृति; शरीरप्रकृति; शरीरस्वास्थ्य. २ मनाची प्रवृत्ति; कल; मर्जी; लहर; छंद. [ अर तबीअत् ] (वाप्र.) **०लागणें**-(एखाद्या गोष्टीकडे) मनाचा कल लागणें; मर्जी असणें; मन रमणें. **-तीनें चालणें, वागणें, असणें**-( एखाद्याच्या ) मर्जीप्रमाणें वागणें, चालणें, असणें. **-तीनें चालविणें-वागविणें-घेणें वापरणें**-( एखाद्या मनुष्याच्या, वस्तूच्या ) प्रकृतिमान, मगदूर इ० कडे लक्ष्य देऊन वागविणें, वापरणें इ० **०मांदगी**-स्त्री. आजार; आजारीपण. ' तबियत मांदगीमुळें बसण्याउठण्याची शक्ती पहिल्याप्रमाणें नाहीं ' -रा १२७. [ तबियत+मांदगी=आजार ]

**तबियती**—वि. लहरी; तऱ्हेवाईक; छांदिष्ट; स्वच्छंदी. [ तबियत ]

**तबी**—स्त्री. १ धमकावणी; दटावणी २ मार; चोप; ठोक; शिक्षा. ३ लढाई. ४ पराभव. ५ शिक्षा; पारिपत्य. ( क्रि० देणें; लावणें; पोहोंचविणें ). [ अर. तम्बीह् ] **०मार**-पु. खरपूस मार. [ तंबी+मार ]

**तबीक**—न. ( गो. ) वाशांवर शोभेकरितां बसविलेली फळी.

**तबीब**—पु. हकीम; वैद्य; बारीकसारीक जखमांवर इलाज करणारा शस्त्रवैद्य; हा बहुधा मुसलमान असतो. ' तबीब लावून जखमा बांधविल्या. ' -ख ६.२८३२. ' तबीबानीं वैद्यांनीं रसायण स्वहिताचें कुटलें। ' -ऐपो ३१२. [ अर. तबीब् ]

**तबीलदार**—पु. तबलदार पहा.

**तंबुर**—पु. एक चर्मवाद्य; ढोल; तंबूर पहा. 'तंबुर ताशे वाजती ढोल। ' -ऐपो २२२. [ अर. तंबूर ]

**तंबुरची-जी**—पु. तंबूर वाजविणारा. [ तंबूर ]

**तंबु(बो)रा**—पु चार तारा असलेलें एक तंतुवाद्य; वीणा; तंबूर; तंबोरा पहा. हें मूळ तुर्की आहे. [ अर. तंबूरा; वं. तानपुरा ]

**तंबु(बो)री**-स्त्री. लहान तंबोरा; वीणा. [ तंबुरा ]

**तंबुऱ्या**—पु. दुध्याभोपळयाची एक जात -कृषि ६०३. [ अर. तंबूर ]

**तंबू**—पु. कापडाचें तात्पुरतें एका खांबाचें घर. याच्या मोठ्या प्रकारास 'डेरा' म्हणतात. ' तंबू राहुट्या पृथकाकार। ' -नव १६. २४. [फा.] (वाप्र.) **०ताणून निजणें**-संसार इ०कांची काळजी सोडून निजणें, झोंप घेणें. -शास्त्रीको. **०ठोकणें-मारणें-देणें**-तंबू उभा करणें. **०पाडणें**-तंबू उतरणें; उभारलेला तंबू खालीं करणें.

**तंबूर**—पु. १ एक चर्मवाद्य; ढोल. २ ( ल. ) ढोलाचा आवाज ढोल पिटणें; इशारा; नगारा वाजणें. ' असें कळलें कीं मोंगलाला तंबूर झाला मानकऱ्याला केलें पुकार। ' -ऐपो ४३६. [ अर. ]

**तंबूरची**-पु. तंबुरची पहा.

**तबेत, तबेती-दी**—तबियत इ० पहा.

**तबेल, तबेलदार**—( कों. ) तबल, तबलदार पहा.

**तबेल**—पु. ( कों. ) तबला पहा. ( एखाद्या गोष्टीचें )**तबेल वाजणें**-एखादी गोष्ट प्रसिद्धीस, उघडकीस येणें ( विशेषतः दुष्कर्माच्या बाबतींत ). [ तबला ]

**तबेला**—पु. १ घोडा अथवा गाडी ठेवावयाचें घर; घोडशाळा. २ ( ल. ) ठाणबंद घोड्याची रांग; पागा. [ अर. तवीला ]

**तंबोरा-तंबुरा**—पु चार तारा असलेलें एक तंतुवाद्य. त्याचा खालचा भाग कडु भोपळयाचा केलेला असतो व त्यास लांकडाची निमगोल दांडी बसविलेली असते. त्या दांडीच्या टोंकाजवळील चार खुंटयांस तारा गुंडाळलेल्या असतात. चारांपैकीं पहिली पंचमांत, दुसऱ्या दोन षड्जात व शेवटची खरजांत लावितात. [ अर. तंबूर ] **०पेटी**-स्त्री. तंबोऱ्याच्या सुराचें व पेटीच्या आकाराचें एक वाद्य हीं पेटी ४,७,९. स्वरांची असते. [ तंबोरा+पेटी ]

**तंबोरी**—स्त्री. तंबुरी; तंबोऱ्यासारखें पण त्यापेक्षां लहान आकाराचें तंतुवाद्य. तंबोरीचा स्वर बराच चढा असतो. वारकरी, हरिदास, भजनी लोक व तमासगीर हिचा उपयोग करितात. बीनकारहि आपल्या साथीस हिचा उपयोग करितात. हिची बनावट व तारांची मिळवण तंबोऱ्यासारखीच असते. [ तंबोरा ]

**तब्दि(ब्दी)ल**—तबदील पहा.

**तब्बल-र**—स्त्री. ( कु. ) नेट; जोर; ताण; धाव; दम. ' घोड्यावर भरझाल हांकून एक तब्बल मारली. ' ' तूं तेथपावेतों तब्बल मारून ये म्हणजे पोट हलकें होईल. ' -विक्रिवि. विवक्षित

परिमाणानें मोजलें असतां कमी न भरतां थोडा अधिकच भरणारा (माप, वजन, ओझें, धान्य इ०); भरपूर; पुरेपूर; अगदीं पूर्ण-पणें. 'तब्बल कोश, तब्बल शेर वगैरे.' 'हा मार्ग तब्बल कोस-भर आहे' [अर. तवील=लांब, उंच]

**तब्यत, तब्येत, तब्यती**—तबियत इ० पहा.

**तब्लख**—न तबलख पहा.

**तब्ला**—पु. तबला पहा.

**तम**—पुन. १ (शब्दशः व ल) अंधार; काळोख; अंधकार. 'पडिलेआ भवतमीं निविडें। जिया प्रति–भवीं उजियेडें।' –ऋ २. –ज्ञा १६.३६९.'... जैसा रवि नामी तमा।' –तुगा ४८०. २ सत्त्वरजादि गुणांपैकीं तिसरा (ज्यापासून काम–क्रोधादि विकार उत्पन्न होतात तो) तमोगुण. 'तैसा बहुवसें तमें। जो सदाचि होय निमे। तेथ श्रद्धा परिणमे। तेंचि होऊनि।' –ज्ञा १७.६९. ३ (तमापासून उत्पन्न होणारें) अज्ञान: वेडेंपण; मूर्खपणा; मोह; अविचार. 'हें असो किती बोलावें। तरी एमें जें देखावें। तें ज्ञान नोहे जाणावें। डोळस तम।' –ज्ञा १८.५८१. 'तत्कृतबोधाहुनि मज गमलें तम अहित जरि तथापि हित।' –मोसभा ३.३६. ४ उन्माद; क्रोधाचा आवेश; गर्वाचा ताठा. (क्रि० गाणें; करणें; मांडणें). ५ मूर्च्छा; बेशुद्धि. 'वामुनि दांत मुखांत दहांत पडे, मति गाढ तमीं पचली।' –वामन–सीतास्वयंवर ११. [सं. तमस्]

०कूप–पु. १ (काव्य.) गाढ अंधारानें युक्त असा खळगा: खांच. 'कीं तमकूपीं पडला गभस्ती।' २ एक नरक. [तम+सं. कूप=आड] **तमारि–री**–पु सूर्य. 'रात्रीची चौपाहरी। वेंचलिया अवधारीं। डोळयां तमारी। मिळे जैसा।' –ज्ञा १८.९६७. [तम+अरि=शत्रु] **तमारिसुत**–पु. सूर्याचा पुत्र. १ शनि. २ यम. ३ वरुण. 'चालिला तेव्हां तमारिसुत।'

**तम**—एखाद्या गुणाची अतिशय उत्कटता; पराकाष्ठा; उत्कृष्ट-पणा दाखविणारा संस्कृत विशेषणास जोडावयाचा प्रत्यय. उदा० दुष्टतम=अतिशय दुष्ट; प्रियतम=सर्वांत प्रिय, अत्यंत प्रिय. [सं.]

**तम**—स्त्री. (गो.) पर्वा; क्षिति. तमा पहा.

**तमक**—स्त्री. (गो.) सोनें किंवा रुपें व तांबें मिश्र करून केलेला धातू; तमेक. [सं. ताम्रक ?]

**तमंचा**—पु. १ पिस्तूल; तबंचा. 'तमंच्यानें गोळी मारून ठार करूं.' –वज्राघात ११६. २ एक पेच. यामध्यें शत्रूच्या पोटांत शिरून आपल्या डाव्या हातानें कमरेवरून त्याचा लंगोट पकडून त्याच्या उजव्या बगलेंतून आपला डावा पाय पाठीवर चढवून त्याची डावी जांघ दाबून त्यास चीत करतात. [फा.]

**तमणें, तमतमणें**—अक्रि. १ शेखी मिरविणें; फुशारकी मारणें; वल्गना करणें. २ गर्वानें, रागानें बडबडणें; तणतणणें; जळफळणें. ३ (कर.) रागानें रोखून, टवकारून पाहणें. 'तुझा बैल माझ्या बैलापुढें आणूं नकोस, कारण तो माझ्या बैलावर तमतो.' ४ टक्कर देणें; भिडणें; तोंड देणें. 'कोण कोण सरदार ते न कळे। प्रलयकाल शत्रूशीं तमले।' –होला १८७. [सं. तम; अर. तम्म=पूर्ण; तंबी पहा.]

**तमतमाशा**—पु बडबड; चडफडाट; जळफळाट; शिरा ताणून बोलणें; प्रलाप; अरेरावी. (क्रि० करणें; मांडणें; लावणें). [तम+तमाशा]

**तमलो**—वि. (गो.) हटवादी; दुराग्रही; मताग्रही; मताभि-मानी. [सं. तुमुल ?]

**तमशेट**—वि. (व) तामसी; रागीट; तापट. [तम+शेट]

**तमसु(सू)क, तमस्सूक**—पु. तमासूक पहा.

**तमस्वी**—वि. १ क्रोधी; तापट; तामसी; रागीट. २ अंध-कारयुक्त; अंधार असलेलें. ३ (ल.) अज्ञानी; अंध. [सं. तमस्विन्]

**तमा**—स्त्री. १ फिकीर; काळजी; पर्वा; किंमत; एखाद्या गोष्टीबद्दल ती मोठी असें वाटणारें महत्त्व (अकरणरूपी प्रयोग. उदा० मला जिवाची तमा नाहीं). 'नाहीं जीवतमा वित्त गोता-सहित।' –तुगा ९९८. 'कार्यावर धनी बक्षीस देतो या उमेदी-वर वरकड चाकर जिवाची तमा न पाहतां स्वामिकार्यावर आंगे-जणी करितात.' –मराआ १२. [अर. तमअ]

**तमाकू–खू**—पुस्त्री. तंबाखू पहा.

**तमाखोरी**—स्त्री. तनाखोरी पहा.

**तमाचा**—पु थप्पड; चापटी. [फा. तबान्चा, तवान्चा, तमाचा]

**तमाम**—वि. पूर्ण; सफळ; पूर्णतेस पावलेला. 'तुमचें दैव तें आहे तमाम। आत्मसुखीं हो अंतर्याम।' –अमृत ३२. –क्रिवि. १ सर्व; सारें; अपवाद न करितां; झाडून; एकंदर. '... व तमाम येऊनु नऊगजी आसपास येऊनु उतरिले.' –इमं ७. 'तमाम लोकांस कळविण्यांत येते कीं ...' २ एका मागून एक; सारख्या वेगानें. 'तो सर्वांचीं डोकीं तमाम मारीत सुटला.' [अर. तमाम्]

**तमामा**—पु. (हमामा बद्दल चुकीनें ?) धिंगाणा; धिंगा-मस्ती; धुडगूस. हमामा पहा. 'जो गोकुळांत हरि घालितसे तमामा।' –देकृष्णस्तोत्र १. [ध्व.]

**तमामी**—स्त्री. १ संपूर्णता; सिद्धि; समाप्ति; इतिश्री; अखेर; अखेरी. २ फडशा; चट्टामट्टा. [अर.]

**तमामी**—स्त्री. जरीचें रेशमी कापड. 'सरपोस जरी जामे-वाराचा तमामी असा ताफ्ता.' –वाडसमा ३.११९. –वि. ज्यांत उभे धागे जरीचे व आडवे धागे रेशमाचे–कापसाचे आहेत असें (कापड, वस्त्र). [अर.]

**तमाल**—पु. एक प्रकारचें झाड. हीं झाडें पूर्वबंगाल आणि ब्रह्मदेश यांमध्यें पुष्कळ होतात. पानांना वास असतो. त्यांचा

भाजीपाल्यांत घालावयाच्या मसाल्यांत उपयोग करितात. [ सं. ] सामाशब्द– ०पत्र–न. १ तमालवृक्षाचें पान. याचा भाजीपाल्याच्या मसाल्यांत उपयोग करितात. २ (उप.) तंबाखू. [तमाल+पत्र] ०श्याम–वि. तमालवृक्षासारखा काळा, सांवळा ( कृष्ण ). 'तो अर्जुन म्हणे गा तमालश्यामा।' –ज्ञा १७.३४. [तमाल+श्याम=सांवळा ]

**तमाश(स)गिरी**—स्त्री. १ तमासगिराचा, खेळ करणाऱ्याचा धंदा; तमाशाचा धंदा. २ ( क्व. ) गमतीचें दृश्य; मौजेचा खेळ; गंमत. [ तमासगीर ]

**तमाशगी(गा)र, तमासगीर**—वि. १ तमाशा पाहणारा; मजा, गंमत पाहण्यास नेहमीं उत्सुक असलेला. 'कठड्याचे बाहेर तमासगीर लोकांस व्यवस्थेशीर उभें राहूं द्यावें.' –(बडोदें) पहिलवान लोक व कुस्त्यासंबंधीं नियम २४. २ ( ल. ) प्रेक्षक; तिऱ्हाईत ( गंमत पाहणारा )माणूस; बघ्या. ३ तमाशा करून उपजीविका करणारा तमाशेवाला ( गारुडी, जादुगार, डोंबारी, विदूषक, बहुरूपी इ० ). [ अर. तमाशा+गीर प्रत्यय ]

**तमाशा–सा**—पु. १ सोंगें घेणें, बाहुल्या नाचविणें, दोरावर चालणें इ० सारखे विदूषक, बहुरूपी, गारोडी, डोंबारी इ० काचे करमणुकीचे खेळ. २ गंमत; मजेदार दृश्य; आनंददायी प्रसंग. 'घे उपदेशा कोण तमाशा, गमत महेशा।' –अकक २ शिवरामकृत रामजन्म ३. 'पाहती सकल लोक तमासा।'–आशिवि ३३. ३ क्रीडायुद्ध; लटकी लढाई; कुस्ती. 'अरे कंचुकी, जेठयांचा तमाशा पहावयाची वासना आहे' –लक्ष्मीनारायण कल्याण नाटक ( शके १६०४ ). ( ग्रंथमाला ) ४ चमत्कार; आश्चर्यकारक गोष्ट. 'म्हणे अधरा भारा कैसा। चालतो हा न कळे तमासा।' –नव १३.५४. ५ पराक्रम. 'किल्ला घेतला तमाशानें।' –ऐपो ७३ ६ ( सामा. ) ( उप. ) खेळ; फजिती. 'काय आमच्या दैवानें आमचा तमाशा मांडला आहे.' –रप्र ८९. ७ लाज सोडून स्वैरपणानें केलेली चेष्टा, वर्तन. [ अर. तमाशा ] ०चा मनुष्य–पु. तऱ्हेवाईक, लहरी, विचित्र मनुष्य.

**तमासूक**—पु. १ ( एखाद्यास लिहून दिलेला ) करार; दस्तऐवज; लेख. २ स्वतःची सही; शिक्का; स्वदस्तुर असा चुकीचा अर्थ रूढ आहे. [ अर. तमस्सुक् ]

**तमिष्ट**—वि. ( व. ) तामसी; रागीट; क्रोधिष्ट. [ तम ]

**तमिस्रा**—स्त्री. अंधारी रात्र. [ सं. ]

**तमी**—स्त्री. रात्र. [ सं. तमस्=अंधार ]

**तमीज**—स्त्री. १ पद्धतशीरपणा; व्यवस्थितपणा; नीटनेटकेपणा. २ विवेक; जाणीव; बुद्धि. ३ अदब. [ अर. तमीझ्=विवेक, ज्ञान, बुद्धि ]

**तमोगुण**—पु भूतमात्रांत असणाऱ्या त्रिगुणांपैकीं अधोगतिदायक असा तिसरा गुण. यापासून अज्ञान, मूढत्व, कामक्रोधादिक विकार उत्पन्न होतात. तम पहा. [ सं. तमस्+गुण ] तमोगुणी–वि. १ तमोगुण ज्यांत आहे तें. २ तामसी; शीघ्रकोपी. [ तमोगुण ]

**तमोहर**—पु. सूर्य; तमारि. [ सं. तमस्=अंधार+हर=नाहींसें करणारा ]

**तय**—स्त्री. १ पूड; चूर्ण. २ मसालामिश्रित मांस. 'पुलाव्याचें चौथें साधन तय म्हणजे मसालामिश्रित मांस.' –गृशि २.१३८.

**तय**—स्त्री. ( गो. ) तृतीया; तीज. [ सं. त्रय; प्रा. तय ]

**तय**—क्रिवि. ( मळवी ) निश्चित, नक्की.

**तयनात, तयनातजाबता, तयनाती**—तैनात इ० पहा.

**तया**—सना. १ ( काव्य. ) त्याला. 'तया मज तो वाङ्महापथु। केवि टाके।' –ऋ २. 'घडला पराभव कसा, जो मृत्यु जयी तया हि, शांतनवा।'–मोकर्ण ५.३. २ तिनें. 'तेथ प्रत्युत्तरें वोली। श्रीकृष्णें जे चावळिली। तया व्यक्ती जाली। अष्टदशा।' –ज्ञा १८.७४. ३ 'त्या'चें कवितेंतील रूप. 'तया शोकें घायाळ हृदय होतां।' –र ११. यालाच ला, चा, नें इ० प्रत्यय लावतात. उदा० तयाला=त्याला; तयाचा=त्याचा. 'तयाचा हा शौरी नियतच अहो होय विकला।' –सारुह ८.१७६.

**तया(य्या)र**—वि. १ परिपूर्ण झालेला, केलेला, बनविलेला; ज्याचा कांहीं एक अंश करावयाचा राहिला नाहीं असा ( जिन्नस, गोष्ट इ० ). २ ( कोठें जाण्यास, एखादें कार्य करण्यास ) उद्युक्त; सिद्ध; सज्ज; उत्सुक. ३ ( व ) सशक्त; लठ्ठ; धष्टपुष्ट. [फा. तय्यार्] तयारणें–सक्रि. (काव्य.) तयार, सज्ज ठेवणें, करणें. 'जामदारखान्यांत खजिना द्रव्याच्या पेटया भरल्या। दोर सलींत सहीत कतरा त्या उंटाच्या तयारल्या।' –होला १५१. [ तयार ] तयारी–स्त्री. १ तयार, सज्ज होण्याचा व्यापार, क्रिया, तजवीज. २ बेगमी; तयार होण्यास. सिद्धीस लागणारे जिन्नस, सामुग्री, साहित्य. ३ ( माणसाची एखाद्या गोष्टीची ) सिद्धता; सज्जता. ( एखादें कार्य करण्याबद्दलची मनुष्याची ) खुषी. ४ ( संगीत ) उपस्थिति; ( एखाद्या गोष्टीच्या व्यासंगानें येणारें ) कौशल्य; कसब. 'त्या गवयाची तयारी चांगली आहे. [ फा. तय्यारी ]

**तयारी**—स्त्री. एकखांबी मोठ्या राहुटीचें प्रवेशद्वार. ०च्या मेखा–स्त्रीअव. तंबू उभारण्याची तयारी करतांना ठोकतात त्या सहा मेखा, खुंटया.

**तर्यी**—क्रिवि. ( काव्य. ) त्यावेळीं; तेव्हां; तई. 'तर्यी प्रभुवरा ! तमें सदय कां असे आज हो।' –केका ८१. [ सं. तदा ]

**तर्यी(यिं)हूनि**–क्रिवि. ( काव्य. ) तेव्हांपासून. 'तयिंहूनि कमलांची प्रीति उत्पन्न झाली।' –सारुह २.२९.

**तये**—१ (कवि) त्या. 'तये संगतीची जनीं कोण गोडी।' –राम ४५. २ तिला. 'काय स्त्री बोलती तये बोलवीले।' –रामदासी २.७२. [ती; तया]

**तर**—स्त्री. १ (हेट. कु) होडी; मचवा. तरी पहा. २ (मचवा इ०कानें उतरून जातां येईल अशी) खाडी. ३ (नाविक कु.) खाडींतील होड्या लावण्याची किनाऱ्यावरील सोईस्कर जागा, ठिकाण. ४ पलीकडील बाजू, तीर. 'अर बाधें तर बांधें।' –वैद्यक ७६. [सं. तॄ=तरणें] (वाप्र.) **तरीपार करणें**–सक्रि. खाडीवरून, समुद्रांतून होडी इ० नीं पलीकडे नेणें, पोहोंचविणें.

**तर**—स्त्री. मर्यादा; हद्द. [तीर] **०पार करणें**–हद्दपार करणें.

**तर**—विशेषणास लागणारा तारतम्यवाचक तद्धित प्रत्यय. उदा० गुरु=मोठा; गुरुतर=अधिक मोठा. प्रियतर; दृढतर. [सं.]

**तर**—वि. ओलें; ताजें; रसपूर्ण. 'तर मेव्याचे व खुश्क मेव्याचे खोन.' –रा १०.२९६. [फा. तर्]

**तर**—उअ. जर या उभयान्वयी अव्ययाचें उत्तरगामी उभयान्वयी अव्यय. याचा अर्थ तर्गे झाल्यास, असल्यास, त्याअर्थी इ०; बऱ्याच वेळां तर ह्या शब्दाचा वाक्यपूरक म्हणून उपयोग करितात. अशा वेळीं त्या वाक्यांत कांहीं विशेष अर्थ व जोर येतो. जसें– हो! आतां मी जातों तर=मी सर्वथा जाणार नाहीं. कित्येक वेळां तर हा शब्द त्यानें जोडलेल्या दोन वाक्यांच्या अर्थाचा विरोध दाखवितो. उदा० तुम्ही तर लाख रुपये मागतां व मी तर केवळ गरीब पडलों. यानें संदिग्धता, अनिश्चयहि दाखविला जातो. उदा० मी तें नाटक पाहण्यास आलों तर येईन.' 'मध्यें तर दिसतें आहे,' 'मध्ये तर आणूं नका, लावू नका' या वाक्यांतही सापेक्षता, यदृच्छाघटित, सांकेतिकत्व निर्दिष्ट आहे. परंतु पहा. [सं. तर्हि]

**तरई**—स्त्री. १ गुऱ्हाळात ढेपाळीं ठेवण्याकरितां केलेला लोखंडी वांकडा पत्रा. –ज्ञाको ऊ १८. २ कोष्ट्याचें वस्त्र गुंडाळण्याचें लांकूड. [सं. तरी]

**तरक**—स्त्रीपु. १ (छपराच्या कोपऱ्याला, लांकडी जिन्याच्या बाजूला, शिडीला, धारण इ०कांस) आधार म्हणून दिलेला खांब, तुळई. २ (खांबणी, मोरवा म्हणून झाड इ०कांस लावलेला) लांकडाचा भक्कम तुकडा; धीरा. [फा. हि.]

**तरकट**—न. १ (एखाद्यावर खोटा आळ घेण्याकरितां रचलेलें) कुभांड; कुलंगडें; लचांड; किटाळ. (क्रि० घेणें; सांगणें). २ वेडावांकडा तर्क, कल्पना तर्कट पहा. [सं. तर्क]

**तरकट, तरकटी–ट्या, तरकटबाज**—वि. कुभांडखोर; कंड्या पिकविणारा; तरकट रचणारा; बालंटखोर.

**तरकणें**—सक्रि. तर्कानें जाणणें; ताडणें; अदाज, अनुमान करणें. 'खुणेनें शत्रुवर्म तरकती।' –ऐपो २२३. 'त्याचे डोळे लाल पाहतांच यानें दारू खाल्ली आहे असें मीं तरकलों.' [तर्क]

**तरकणें**—अक्रि. तडकणें; फाटणें. टरकणें पहा 'पाहे पां अत्यंत झाले। दिसे नवां ठायीं तरकेलें।' –एरुस्व १७.१४. २ फुटणें; भेगळणें. 'शीतें ओंठ तरकती।' –दा ३.७.११. [टरकणें; तडकणें; तुल० फा. तराक=फाटण्या–मोडण्याचा आवाज]

**तरकश–स, तर्कश**—स्त्रीपु. १ बाणांचा भाता. 'मुगुट मनोहर कवच धनुर्धर। तरकसी कांचन बाण।' –मध्व ७०. २ (सामा.) शस्त्र इ०कांचें वेष्टन, टोपण, म्यान, कोश. [फा. तर्कश्, तीर्कश्. तुल० गुज. तरकस] सामाशब्द– **०कमान**–स्त्री. भाता आणि धनुष्य. 'येक बंदूक व येक तरकस कमान हे त्यास पाठविले.' –पेद ३.१२३. [तरकश+कमान] **०खांततीर**–एक हत्यार. –वाडबाबा ३.१६७.

**तरकाकडी**—स्त्री. एक प्रकारची उन्हाळी मोठी व लांब काकडी; (विरू.) टरकाकडी पहा. [फा. तर=ओलें+काकटी]

**तरकाफरकी**—क्रिवि. तडकाफडकीं पहा.

**तरकारी**—स्त्री. भाजी. [हिं.]

**तरकी**—स्त्री. अभिवृद्धि; भरभराट; बढती; उत्कर्ष. 'रावसाहेबांचे दौलतेची रोज ब रोज तरकी होते, हे गोष्ट त्यास खूश लागत नाहीं.' –रा १.५२ –वाडथोमा २९८. [फा. तरक्की]

**तरकीब**—स्त्री. युक्ति; उपाय; योजना; चतुराई. 'येऊनि बैसले सभामंडळीं। भक्ति चतुराई येकवटली। वरी तरकीब राजाची।' –दावि ३६६. [अर. तर्किब्]

**तरकीम**—स्त्री. लेखन. 'त्यास साहेबाचे काय सला ते फर्माविली पाहिजे, म्हणोन तरकीम केले.' –रा ३ ७३ [अर. तर्कीम]

**तरकूट**—न. (राजा.) तांदूळ, पोहे इ०कांच्या ठिकाणीं असलेला रव्याचा चरचरीत अंश; भरडा; कण्या; कूट. [फा. तर्+कूट]

**तरंग**—पु. १ पाण्याची लाट, लहर, खळखळ ऊर्मि. 'पैं आटोनि गेलिया सागरु। मग तरंगु ना नीरु।' –ज्ञा १५.५०६. 'उदकावरील तरंग। तरंग उदकाचें अंग।' –तुगा ३७६९. २ (ल.) अनियंत्रितपणानें मनांत एकामागून एक उद्भवणाऱ्या विचारांपैकीं प्रत्येक; क्षणिक विचार; नवी कल्पना; लहर. ३ पाण्यावर येणारा तेल इ०कांचा तवंग, कोशेटा, कोशेरा. ४ दृष्टि अस्पष्ट करणारा, डोळ्यावर येणारा साका, पटल. ५ जलतरंग पहा. ६ बुडबुडा; फुगा. [सं.]

**तरंग**—नपु. १ (गो.कु) देवळांतील देवतेच्या चिन्हाचा खांब, गुढी. २ अंगांत देव संचारणाऱ्यानें हातांत घ्यावयाची काठी; धार्मिक समारंभांतील एक उपकरण; हें मुसळासारखें असून त्यावर देवांचीं चित्रें काढलेलीं असतात. कांहीं सणांत याच्या शेंड्यास वरींच लुगडीं नेसवून तो नाचवितात. नाचविल्यावर अवसर येतो. तरंग घेण्याचा मान ठराविक कुटुंबाकडे असतो. 'आम्ही गांवकर

लोकांनीं नारळ फोडल्याविना देवीपुढें तरंग उभे राहतें तर पहा ?' –सह्याद्री ९२.

**तरंगण**—स्त्री. (राजा) ऐसपैस मांडी घालून अव्यवस्थितपणें बसणें; फत्कल. (क्रि० मारून बसणें) [सं. तॄ; स्तॄ]

**तरंगणें**—अक्रि. १ पाण्यांत न बुडतां केवळ पृष्ठभागावर राहणें; तरणें; तिरणें: पोहणें. 'तरंगावो लागे बुद्धी। विवेकावरी।' –ज्ञा १८.२२२. २ (ल.) बहकणें; (बोलतांना) वहावत जाणें; मुद्दा सोडून भलतेंच बोलणें. ३ (एखादा खटला, वाद इ०) निकाल न लागतां भिजत, लोंबकळत, कुजत पडणें. ४ (मन इ०) संशयांत, संदिग्ध स्थितींत असणें. ५ थांबावणें; कुंठित होणें; थांबणें; थबकणें. ६ (एखाद्या व्यक्तीचा, गोष्टीची) अपेक्षा धरून खोळंबून राहणें; तिष्ठत बसणें, मार्गप्रतीक्षा करीत थांबणें. 'ज्याप्रमाणें वषट्काराचा घोष चालून इंद्रादि देवता सोमपानाविषयीं तरंगल्या असतां ...'–नि ८१६. 'तुमच्यासाठीं ही सर्व मंडळी तरंगली.' [तरंग] ०**तरंगायास लावणें**–(एखादें काम इ०) निकालांत न काढतां लोंबकळत ठेवणें; संदिग्ध स्थितींत पाडणें. **तरंगविणें**–सक्रि. १ ताटकळत, खोळंबून ठेवणें. २ (कार्य इ०) लोंबकळत, भिजत ठेवणें. [तरंगणें]

**तरंगिणी**—स्त्री. नदी. [सं.]

**तरच**—अ. १ म्हणूनच; करितांच; तसें आहे म्हणून (कार्यकारणांचा साक्षात्कार झाल्यानंतर दोन गोष्टींतील परस्पर कार्यकारणभाव मनास पटतो त्या अर्थाचें द्योतक उभयान्वयी अव्यय). 'तूं इतका दुष्ट आहेसना ? तरच ईश्वरानें तुला भिकारी ठेविलें आहे.' २ (अमुक एक अट, गोष्ट) निश्चित, कबूल, नक्की असेल तर; तसेंच झाल्यास. 'माझे रुपये हातावर पडले तरच जाईन.' [तर+च(शअ.)]

**तरंज**—स्त्री. १ पाण्यावरील (तेल इ०कांचा) तरंग; तवंग; पातळ थर; तरंग अर्थ ३ पहा. २ डोळ्यांतील मळ इ०कांचा पातळ पापुद्रा, पटल; भुरी, साका. तरंग अर्थ ४ पहा.

**तरज(जु)मा, तर्जुमा**—पु. १ भाषांतर; दुसऱ्या भाषेंत अनुवाद. २ (मजकूर इ०कांचा) सारांश; मतलब; गोषवारा; गोळाबेरीज. ३ सालांतील उत्पन्न, खर्च व शिल्लक यांची एके ठिकाणीं नोंद; राज्याचें एकंदर उत्पन्न किती व खर्च किती, व फौज किती आणि खंडण्या किती यावयाच्या इ० सर्व प्रकारची एका कागदावर दिलेली माहिती: ताळेबंद. हा एकबेरजी तयार करतात. –इनाम ५१. [अर. तर्जमा, तर्जुमा]

**तरजुमान, तर्जुमान**—पु १ भाषांतराच्या कामावर नेमलेला सरकारी अधिकारी; भाषांतऱ्या. २ दुभाषी; दुभाष्या. [अर. तर्जुमान]

**तरंड**—पु. १ वल्हें. २ तरंगण्यासाठीं केलेला लाकडांचा ताफा. [सं.]

**तरंडक**—पु. होडी; तरंड अर्थ २ पहा. 'ब्रह्मण्य प्रभु दुर्गत दारिद्र्य–समुद्र–वर–तरंडक हो।' –मोवन ४.१२. [तरंड]

**तरडा**—वि. १ शुष्क; रसहीन; जून (भाजी, मिरची, तोंडलें, भाजीपाला इ०). २ पुष्कळदां हा शब्द वय, शुष्कपणा, जूनपणा, चिवटपणा इ० दर्शक विशेषणास पुढें अथवा मागें जोडून आधिक्य दाखविण्यांत येतें. उदा० जून जून तरडा=अतिशय जून; रसशून्य.

**तरडी**—स्त्री. एक वनस्पति. हिच्या दोन जाती असून हिला फळें व फुलें येतात.

**तरण**—न. १ तरणें; तरंगणें; तरून जाणें. –जै ६४.३. 'कंठीं बांधोनि शिळा बाहुबळें जेंवि सागरीं तरण।' –मोकर्ण २६.२८. २ होडी; तराफा; तरण्याचें साधन. [सं.]

**तरण**—न. तांदुळाच्या कण्या, डाळ इ० पुष्कळ पाण्यांत शिजवून व त्यांत तिखट, मीठ, मसाला घालून केलेलें पातळ खाद्य; कांजी; कढण. 'करूनिया पातळ तरण। कुटुंबरक्षण करीतसे।' **म्ह०** नवरा रडतो तरणास आणि वऱ्हाडी रडतात वरणास=जेथें जावयास सुद्धां तरणासाठीं रडावें लागतें तेथें वऱ्हाडी मंडळींना वरण कोठून मिळणार ? मुख्य माणसाची सुद्धा जेथें बरदास्त नाहीं तेथें इतरांस कोण विचारतो ! (तुल.) जांवई रडे अळणास आणि व्याही रडे कळणास.

**तरणा**—वि. १ तरुण; जवान. २ मूल व मोठा माणूस यांच्यामधील वयाचा; अप्रौढ; बाप्या; पोऱ्या. [सं. तरुण] **म्ह०** म्हातार्‍यानें केलें नांव तरण्यानें वाहविलें गांव=कर्तृत्ववान बापाची प्रजा कधीं कधीं नादान निघते या गोष्टीस अनुलक्षून ही म्हण आहे. तरणा पाऊस पहा. सामासिक शब्द– ०**ताठा**–वि. भर ज्वानींत असलेला; चांगला धट्टाकट्टा तरुण व सशक्त; तरणाबांड (मनुष्य). [तरुण+ताठ] ०**पाऊस**–पु. (शेतकऱ्यात रूढ) आठवें नक्षत्र जें पुष्य त्याचा पाऊस. याच्या उलट म्हातारा म्हणजे पुनर्वसुनक्षत्राचा पाऊस. ०**बांड**–वि. जोमदार व धट्टाकट्टा तरुण (पुरुष). [तरुण]

**तरणि-णी**—पु सूर्य. 'तिया मजपाशीं चिद्रत्नांचिया खाणी। परी उपेक्षिल्या जात होतिया तरणी। तुजवीण कृष्णा।' –ज्ञा १०.१६०. 'करून प्रातःस्नान अगोदर वंदुनीयां तरणी।' –प्रला ११८. [सं.]

**तरणि-णी**—स्त्री. नांव; होडी; तराफा; नौका. तरण पहा [सं.]

**तरणी**—वि. तरुणी; युवती. नवीतरणी असादि शब्द रूढ. 'कीं कामविकारांनीं कांपविली कामिनी नवी तरणी।' –मोभीष्म ७.३०. [सं. तरुणी] ०**ताठी**–वि. तरुण व सशक्त (स्त्री).

**तरणूक** —स्त्री (तरून जाणें) अडचणींतून, संकटांतून निभावून जाणें; वर डोकें काढणें; सुटका. [तरणें]

**तरणें**—अक्रि. १ (पाण्यावर) तरंगणें; पोहणें. २ —उक्रि. नदीपार जाणें; पैलतीर गाठणें 'कां बाहीं तरतां वळसा। दाटला जेवीं।' —ज्ञा ११.१८६. ३ (ल.) संकट, प्रपंच इ० कांतून निभावून जाणें; सुखरूप पार पडणें; मुक्त होणें. 'हाणी गुरु शर कठिनहि माझे त्या मुकठिना न वक्ष तरे।' —मोउद्योग १३. १३५. ४ मोक्ष मिळणें; संसारसागर पार होणें; ईश्वरप्राप्ति होणें. [सं. तरण] **तरणोपाय**—पु. १ संकटांतून निभावून जाण्याचा उपाय, इलाज; बचाव. २ अडगत; गत्यंतर; सद्गति. [सं. तरण+उपाय]

**तरंत**—पु. बेडूक. 'जलधींत तरंत अपूर्व तमेचि म्हणोनि परोपरि सर्व तमे।' —आरोतु १२.

**तरतम**—न. १ (दोन वस्तूंतील) सरसनीरसता; श्रेष्ठकनिष्ठपणा; उच्चनीचपणा. २ सारासार विचारशक्ति; विवेचक बुद्धि; तारतम्य. (क्रि० राखणें; पाहणें; ठेवणें). ३ (दोन वस्तूंतील) सरसनीरसता ठरविण्याची क्रिया. [सं. तर+तम] सामाशब्द— **०भाव**—पु. (दोन वस्तूंत ठरविलेला, दिसणारा) उच्चनीचभाव; सरसनीरसता; श्रेष्ठकनिष्ठता ठरविणें; तारतम्य. (क्रि० करणें; ठेवणें; राखणें; मानणें).

**तरतर–रां**—क्रिवि. १ चपळाईनें व वेगानें; तुरतुर (विंचू, कोळी, मुंग्या इ० चालणें); दुडदुड–दुडां (मूल, तट्टू इ० चालणें). २ (सामा ) जलद; चपळतेनें. [ध्व. तर् द्वि.] म्ह० राऊत असे खरमरा तर घोडा चाले तरतरां=काम करून घेणारा खरमरीत असल्यास काम करणारा (गडी) चपळाईनें काम करतो.

**तरतरचें**—अक्रि. (गो.) नांवाजणें; प्रसिद्धि पावणें; गाजणें.

**तरतरणें**—अक्रि. १ (जमीन, चुन्याची कळी, हरभरे इ० भिजल्यामुळें) फुगणें; (तळलेले पदार्थ, झाडें, पानें इ०). फुलणें; फुगणें; फुगून टवटवीत होणें; (फोड, गळू इ०) सुजणें; टापसणें; ताठणें. 'सारमेयाच्या शरिरावरती। गोचिड होउनि तरतरताती।' —अमृत १७. २ (ल) (आनंदातिशयानें) प्रफुल्लित होणें; खुलणें. ३ (ल) (संपत्ति, ऐश्वर्य इ० कानीं) भरभराटणें; तेजीस चढणें. [तरतर]

**तरतरणें** —अक्रि. (एखाद्या गोष्टीविषयीं) आतुर, उत्सुक, उत्कंठित होणें. [सं. त्वर्; प्रा. तर]

**तरतरणें** —अक्रि. (माण.) (विंचू, झुरळ इ० कानीं) तुरतुर चालणें; धांवणें. [तरतर]

**तरतरा**—पु. पैलू पाडलेला हिरा.

**तरतरां**—क्रिवि. (गो.) हरतऱ्हा; नाना तऱ्हांनीं. [तऱ्हा द्वि.]

**तरतरी**—स्त्री. १ (धांवण्यांतील, हालचालींतील) चपळाई; चपलता; त्वरा; चटपट. २ (एखाद्या कार्यांतील, बोलण्यांतील) चलाखी; हुशारी; जोम; उत्साह; मार्मिकता; चुणचुणीतपणा. ३ (चेहरा, झाड, इ० कां वरील) टवटवीतपणा; प्रफुल्लता; तुकतुकी. ४ (बुद्धि, शहाणपण इ० कांची) चपलता; चलाखी; समयज्ञता. ५ हाजीरजबाबीपणा; समयसूचकता [तरतर]

**तरतरीत**—वि. १ चलाख; चपळ; हुषार; चुणचुणीत २ सरळ; धरधरीत (नाक इ०). ३ रोंखलेला; टवकारलेला; उभा केलेला; उभारलेला (जनावरांचा कान इ०) ४ नीट; सरळ; ताठ (शरीर, झाड इ०). ५ (सामा.) उभा या शब्दासह आधिक्य दर्शविण्याकरितां योजतात. जसें तरतरीत उभा=अगदीं सरळ, ताठ. [तरतरी]

**तरट**—न. (घोड्याचा) मोठा चाबूक; असूड. 'जैसा वारु उपलाणी। वश्य करी अश्वसाहणी। मागें तरटांचा कर अणाणी।' —एभा २०.२१६. 'तरटापुढें बरें नाचे। सुतें कांचें मुसळ।' —तुगा ३००३. [फा: 'तरट तु मद्दाकशा।' —राव्य ५.२५.]

**तरट**—न. गोणपाट; पोतें.

**तरट**—न एक फळ. 'मग नेपतीं तरटें तोडोनि त्वरित। कांतेसह बैसले खात।' —भवि ५६.९२.

**तरटी**—स्त्री. १ गोणपाटाचें पोतें, थैला. २ ओझ्याच्या गठ्याला, बैल इ०कांवरून न्यावयाच्या बुधल्याला गुंडाळावयाचा तरटाचा मोठा तुकडा; तरटें —वि. गोणपाटाचें केलेलें; तरटाचें. [तरट]

**तरटी–टें**—स्त्रीन १ (तिरस्कारार्थी) डोकसें; टकलें; बोडकें; टाळकें. नारळाची करटी. [का. तरट]

**तरटी**—स्त्री. खरबुजाची एक जात. हिचा आंतील रंग हिरवा असतो. -कृषि ५७२. खानदेशांत हिला जाम असें म्हणतात

**तर(रं)टी**—स्त्री. एक वृक्षविशेष.

**तरटें** - न. गोणपाटाचा मोठा तुकडा तरटी अर्थ २ पहा.

**तरटें**—न. १ डोकसें; टाळकें; बोडकें; तरटी–टें अर्थ १ पहा. २ (राजा.) टक्कल [फा. तरट] **०ट्या**—वि. टकल्या.

**तरड, डा–डें–तरढें, तरड(ढ)क**—नपु. १ ओलवून दळलेल्या गव्हांचा कोंडा; तराडा. २ (ल.) चऱ्हाट; पाल्हाळ; लांबलचक व कंटाळवाणें भाषण. (क्रि० लागणें; लावणें; मांडणें). **तरडीं पेटणें–लावणें**–रागावणें; क्रोधाविष्ट होणें.

**तरता**—वि. १ तरणारा; तरंगणारा. २ (ल.) बुडण्याची भीति नसलेला; किफायतशीर; फायदेशीर (धंदा, व्यवहार इ०). ३ चांगल्या ठिकाणीं गुंतविलेला; न बुडणारा (पैसा). ४ वसूल देण्यासारखा; न बुडविणारा (ऋणको). [सं. तॄ=तरणें] **०पथ**—पु. सुरक्षित मार्ग; सुटकेचा, संरक्षणाचा, बचावाचा मार्ग, उपाय.

**तरत्या पंथास लागणें**-( एखाद्या संकटग्रस्त, आजारी माणसानें जिवावर बेतलेल्या संकटांतून, आजारातून ) पार पडण्याचीं, निभावण्याचीं, बचावण्याचीं चिन्हें व्यक्त करणें; आजारांतून उठणें; चांगले दिवस येऊं लागणें. **०बुडता**-वि. १ भरभराटीस आलेला किंवा डबघाईस आलेला ( व्यापारी इ० ). २ फायदेशीर किंवा आंतबट्ट्याचा ( धंदा, व्यवहार, रोजगार, काम, प्रकार, मसलत इ० ). [ तरणें+बुडणें ] **-तें बुडतें पाहणें**-( एखाद्या धंद्यांतील, व्यवहारांतील, सल्ल्यांतील ) नफानुकसान विचारात घेणें; बऱ्यावाईट परिणामांचा, उलटसुलट बाजूचा विचार करणें. **-ती खाडी**-स्त्री. नेहमीं ( होडी इ० नीं ) ओलांडतां येणारी खाडी. **तरतें**-वि. ( तरणारें ) वसूल होण्यासारखें; कर्ज न बुडविणारें; घरंदाज ( कुळ इ० ). तरता पहा **०कूळ**-न. कर्ज दिलें असतां बुडविणार नाहीं असें कूळ; खात्रीचें कूळ. **०बंदर**-न. १ ज्यांत पाणी भरपूर असल्यानें गलबतें, होड्या इ० नेहमीं तरंगूं शकतात असें बंदर. २ ज्यांत किनाऱ्यापर्यंत जहाज जाऊं शकेल असें बंदर **०बुडतें**-न. लाभहानि; नफातोटा. -वि. तरता बुडता पहा.

**तरतीब**--स्त्री. १ व्यवस्था; योजना युक्ति तयारी; तजवीज. २ ( एखाद्या कामाची ) निगा; काळजी; काटकसर. ३ ( एखाद्याची ) बरदास्त. ( क्रि० ठेवणें; राखणें; संभाळणें; धरणें; पाहणें ). [ अर. तर्तीब् ]

**तरतु(दू)द**--स्त्री. १ (एखाद्या कार्याविषयींची) साधनें इ०ची तयारी; सिद्धता; जुळवाजुळव; तजवीज; बंदोबस्त. (क्रि० करणें). २ ( मनुष्याची, जनावरांची ) निगा; बरदास्त; काळजीपूर्वक व्यवस्था; दूर्वे नको पाहणें; सोयींचा विचार करणें. ( क्रि० करणें; पाहणें, राखणें; ठेवणें ). ' बाबांच्या मर्जीप्रमाणें तरतूद ठेवून त्यांची सेवाचाकरी करावी बरें. ' -कमं १.४५. [ अर. तरद्दुद् ]

**तरदणें**---अक्रि. ( बे ) खरचटणें; घासटणें.

**तरफ, तर्फ**---स्त्री. १ दिशा; बाजू; कड. २ ( भांडण, कज्जा इ०तील ) पक्ष; बाजू; कड. ' त्याच्या तरफेचें भाषण हा बोलतो. ' ३ ताबा; जिम्मा; राखण; निसबत. ' हा दागिना तुमच्या तरफेस असूं द्या.' ४ हुकमत; अंमल; ताबा ' तुमच्या तरफेच्या स्वारांची हजिरी घ्यावयाची आहे. ' ५ देशाचा एक लहान भाग; कांहीं विशिष्ट संख्याक गांवांचा गट; महाल. अशा कांहीं तरफा मिळून परगणा होतो. देश पहा. ' मराठेशाहींत साठ गांवें मिळून तरफ. ' -गांगा ४२. महालाचा संबंध दाखवावयाचा असल्यास गांवामागें हा शब्द योजतात. उदा० मौजे ओण, तरफ राजापूर. ६ तरफबंदी-पद्धतीखालील जमीनींचा एक वर्ग. [ अर. तर्फ्, तरफ् ] सामाशब्द- **०दार**-पु. १ तरफेंत असलेल्या गांवांचा वसूल करणारा, त्यावर हुकमत चालविणारा अधिकारी; महालकरी. हा मामलतदाराच्या हाताखालीं असतो. -वाडमा १.३. २ शको. ४. १० तरफ म्हणून जो जमीनीचा विशिष्ट विभाग तिचा मालक -वि. पक्षपाती; कैवारी; दोस्त. [ तरफ+दार ] **०दारी**-स्त्री. पक्षपात; कैवार; एखादी बाजू सावरून धरणें; वकीली. [तरफदार] **०बंदी**-स्त्री. १ जमीनमहसुलाची एक पद्धत. हींत गांवांतील शेतजमीनींचे मोठेमोठे भाग पाडून एक एक भाग गांवांतील एकेका कुटुंबास स्वतंत्रपणें लागवड करण्यास दिलेला असतो. यांत कुटुंबांतील वांटण्या येत नसून सबंध कुटुंबाकडील जमीनीच्या साऱ्याला तें एक कुटुंब जबाबदार धरतात याच्या उलट कासबंदी पहा. २ शेताभोंवतीं बांध, कुंपण घातलेला. [ तरफ+बंदी ] **०सानी**-पु दुसरा पक्ष; प्रतिपक्ष. ' वद-अहदीची उर्याक्त दोघा शरिकांनीं करून तरफ-सानीकडे नसीयत-पूर्वक सांगून पाठवावें. ' -रा ७ ३. [ फा. तरफि सानी=दुसरा पक्ष ]

**तरफ**---स्त्री. वाद्याची तार. सारंगी, सतार इ० वाद्यास स्वर भरण्यासाठीं मुख्य तारांच्या खालच्या बाजूस लाविलेली तार.

**तरफ**---स्त्री. १ ( पदार्थ ) जड पदार्थ उचलण्यासाठीं, हलविण्यासाठीं त्याच्या खालीं पहार इ० सारखा घातलेला दांडा; उच्चालक; उत्तोलनदंड; (इं) लिव्हर्. २ दार बंद करण्याकरितां दाराच्या फळ्यांमागें घातलेला, गाडीच्या चाकाच्या गतीस प्रतिबंध करण्यासाठीं घातलेला अडसर; अवरोधक. [ हि. तरक=तुळई, वासा ? ]

**तरफका** (तफरका ?)---वि. गहाळ, अफरातफर झालेला. ' यांचा माल कांहीं तफरका जाहला असेल तो यांचा यांस देणें. ' -वाडबाबा २.१४१. तफरका पहा.

**तरफड-डा, तरफडणें, तरफडाट**---तडफड इ० पहा.

**तरफडा**---पु ( ना. ) धडपड; तिरपीट; धांदल. तडफड पहा. [ तडफड ]

**तरवणें**---सक्रि ( बे. ) थांबविणें. [ का. तरबु=थांबणें ]

**तरबूज**---न. टरबूज पहा. [ फा. ]

**तरबेज-त-द**--- वि. कुशल; वाकबगार; निष्णात; प्रवीण, निपुण. [ अर. तर्बियत् ]

**तरम**---पु. ( मोजणी ) जमीनींची प्रतबंदी ठरविणारा अधिकारी. -स्त्री जमीनीची प्रत, दर्जा; जमिनीचा सारा, आकार; सारा आकारणी. ' तरम ठरवणाऱ्या मोजणीकारकुनाची गांव कऱ्यांनीं सरबराई न केल्यामुळें त्यानें चिडून जाऊन जिराईत जमीनीस बागाइताचा आकार लावून. ' -खेया ३६. [ अर. तर्ह्. म. तऱ्हा; ते. तरमु; ता. तेरिम ] **०बंदी**-स्त्री. मोजणीवरून ठरविलेली जमीनीची वर्गवारी; प्रतवारी. [ तरम+बंदी ]

**तरम-मा**---नपु. ( राजा. कु. ) होडी समुद्रांत ढकलतांना, समुद्रांतून किनाऱ्यावर काढतांना उपयोगांत आणावयाच्या लांकडी तुकड्यां-वाशांपैकीं एक.

**तरमळ, तरमळणें**—तळमळ, तळमळणें इ० पहा.

**तरमुंडी-ड**—स्त्री. गर्दीतून बाहेर पडण्यासाठीं, गर्दीत घुसण्यासाठीं डोकें पुढें करून सर्व शरीरासह जोरानें केलेला प्रवेश; गमन; तुटून पडणें; मुसंडी. (क्रि० देणें). 'भीष्म म्हणे भीम धरा याचि तुम्ही सर्व वीर तरमुंडी।' –मोभीष्म ५.४३. 'शिरति किति पठाण यांच्या झुंडी देऊन तरमुंडी झाले सबळांचे शिपाई लेंडी।'–राला १०४. [ हि. तर=खालीं+मुंडी=डोकें ? ]

**तरमळपणें**—अ. पूर्ण लक्ष्य न देतां -शर.

**तरल**—वि. १ हलणारें; कांपणारें: कंप पावणारें. २ अस्थिर: चंचल; क्षणिक. ३ द्रव: पातळ. [ सं. ]

**तरवटणें**—अक्रि. तारवटणें पहा.

**तरवटा, तरोटा**—पु एक औषधी वनस्पति. त्याला, टहाटळ, टाहकळ; टाकळा असेंहि म्हणतात.

**तरवड**—पु. एक वनस्पति. त्याच्या जातींत बऱ्याच वनस्पती, झाडेंझुडपें यांचा समावेश होतो. याचीं फुलें सुंदर असतात व त्यांचा उपयोग औषधी कामाकरितां व कातडीं रंगविण्याकडे केला जातो. –ज्ञाको –त २४. [प्रा. तरवट्ट] **तरवडी**–वि. तरवडापासून काढलेल्या रंगानें रंगविलेलें ( कातडें ).

**तरवणी**—न. आजाऱ्यास खावयाचें–शिजविलेली डाळ व तांदूळ याचें पाणी: पेज; कांजी. [ तरण+पाणी; तरत पानीयं–तरावणीअं–तरावणी–तरवणी. –भाअ १८३४. ]

**तरवणें**—अक्रि. १ अतिशय उत्सुक, उत्कंठित होणें. २ आनंदभरित होणें. [ सं. त्वरा: प्रा. त्वरा ]

**तरवा**—पु. ( राजा. हेट. कु. ) १ रोप, फुलझाडें, फळझाडें, धान्यें, भाजीपाला इ०चा दुसरीकडे लावण्यास काढलेला रोपांचा पुंजका. २ रोप टाकण्याकरितां तयार केलेला वाफा, जमीन; फुलझाडें, फळझाडें, भाजीपाला लावण्याकरितां भाजून तयार केलेल्या जमीनीचा तुकडा. 'कवल फोडून तरवा करावयास आा ३.' –मसाप २.२.१७९. ३ भाताचें रोप तयार करण्याची जागा. –शे ३.१. [ सं. तरु; हिं. तरव=झाड ? ]

**तरवा**—पु. छत. –बदलापूर ३५.

**तर(ल)वार**—स्त्री. युद्धोपयोगी एक शस्त्र; समशेर; खड्ग; मोठी कट्यार. हें शस्त्र धातूचें केलेलें असून दोन किंवा अडीच फूट लांब असतें. याच्या एका अगर दोन्ही बाजूंस धार असते. तरवारीच्या अलेमान, जवाहीर, तेगा: धोप, निमचा, पट्टा, सडक, सैफ इ० जाती आहेत. 'मर्दानें हो राज्य राखिलें मनसुबीची तरवार।' [ सं. तरवारिः ] ( वाप्र. ) **०उपसून येणें**–चालून येणें; युद्धास, भांडणास सिद्ध होणें. **०गाजविणें–करणें–मारणें**– ( युद्ध इ०कांत ) पराक्रम दाखविणें; शूरपणाचें कृत्य करणें. **–रीच्या धारेवर चालविणें–धरणें–चालविणें**–( एखाद्यास ) कडक शिस्तीखालीं ठेवणें; जरबेंत ठेवणें. सामाशब्द **०बंद**–वि. १ कमरेस तरवार लटकाविलेला (मनुष्य). २ (ल.) नेहमीं युद्धास, भांडणास तयार असलेला. [ हि. ] **०बहादूर-दूर-बहाद्दर-द्दूर**–वि. १ युद्धांत मर्दुमकी दाखविलेला: शूर ( मनुष्य ): रणगाजी. २ ( ल. उप. ) तापट; भांडखोर; क्रूरकर्मा ( मनुष्य ). ३ ( उप. ) पोकळ बढाया मारणारा; बढाईखोर. ४ (ल.) (एखाद्या विशिष्ट कार्यांत, धंद्यांत) नांवाजलेला; प्रवीण; नाणावलेला. [ तरवार+हिं. बहादुर=शूर ]

**तरस**—पु. भय: भीति. 'हे बातेचा तरस मोहिबासारखे इवादती लोकांस न ये हें अज्याईब आहे.' –रा ३.९०. [ फा. तर्स्; तुल० सं. त्रस्=भिणें ]

**तर(रं)स**—पुन. एक मांसाहारी वन्य पशु. याचा आकार कोल्ह्यासारखा असून, रंग करडा असतो व अंगावर पट्टे असतात. पुरलेलीं प्रेतें उकरून खाण्यांत हा पटाईत असतो. हा स्वभावानें भित्रा पण कावेबाज प्राणी आहे. [सं. तरक्ष] **०गांड्या**—वि. ( अशिष्ट ) दिसायला भयंकर पण स्वभावानें भित्रा; भेकड; गांडू.

**तरसणें**—अक्रि. १ थकून जाणें; शिणणें; त्रस्त होणें; वैंगणें; जेरीस येणें: त्रागणें पहा. 'पाण्यावांचुनि फौज तरसली नवाबानें एकून।' –ऐपो २७९. २ व्याकूळ होणें. 'नाहीं पाहिलें तुला तरी जीव माझा तरसे।' –होला १८५. ( हिं. ) उत्कंठित होणें, [ त्रासणें; हि. तरसना; तुल० सं. त्रस्, तृष् ]

**तरसा-शा**—पु. तारसा. खटाऱ्याच्या करळ्यांशीं समांतर बसविलेल्या चपट्या अडवट्यांपैकीं एक. (अव.) तरसे हे खटाऱ्यास ३,४ किंवा ५ असतात. [ सं. तिरस् ? ]

**तरसाट**—वि. ( कु. ) तिरसट पहा.

**तरसाद**—स्त्री. ( गो. ) एक प्रकारची तरवार. [ पोर्तु. तरसादो ] **०बावुडणें**–( गो. ) तरवार फिरविणें.

**तरसाळें**—न. तसराळें; घमेल्याच्या आकारासारखें पसरट व उथळ असें लहान भांडें; कटोरा [ ? +सं. आलय; म. आळें= भांडें ]

**तरळ-ळा, तरळमोडशी**—स्त्री. अजीर्णानें होणारी हागओक; मोडशी: विषूचिका; कुळीक पहा. 'कुळिक तरळ कामिणी।' –दा ३६.२५ 'हिव ज्वर आणि तरळा। ओकिती वऱ्हाडिणी सकळा।'–ह २४.१११ [ सं. तरल ] **०मेढा**–स्त्री. जोराचा रेच; अतिसार; हगवण.

**तरळ**—वि. बद्द; बदबदीत; डबबबीत ( मृदंगाचा आवाज ).

**तरळ**—वि. १ चपळ; चलाख; सुटसुटीत; हलक्या अंगाचा; तरतरीत. २ तरल पहा. [ सं. तरल ]

**तरळ, तरळकी**—वि. तराळ. तराळकी पहा. [ तराळ ]

**तरळीखोर**–पु. गांवचा महार कामगार. –वाडमा २.२५४.

**तरळणें**—अक्रि. (दृष्टि, विचार, बुद्धि इ०) भांबावणें; चंचल होणें; भ्रमणें; चळणें; दिपणें 'प्रमाणाविवेयांचेनि बेंबाळें। पांतां तरळेले वेदांचे डोळें।' –शिशु ९. 'सुग्या पतिस पहाया तसि माजी दृष्टि तरळली लाजे।' –मोअनु ३.६३. २ चंचलपणानें भासणें; प्रकाशणें; चमकणें. 'कीं नेत्रीं बाहुली देखिली। कां ते जळीं प्रतिभा भासली। कीं अकस्मात दृष्टि तरळली। तैसी ब्रह्मीं मूळमाया।' –स्वादि १३.२.९५. ३ खेळणें. 'जे इंद्रियां आणि बुद्धी। माझारिलिये संधीं। रजोगुणाच्या खांदीं। तरळत असे।' –ज्ञा १३.१०४. [सं तरल]

**तरळणें**—अक्रि. १ तरळाच्या, अजीर्णाच्या, मोडशीच्या विकारानें युक्त होणें. २ (ल.) कंटाळा, वीट, किळस इ०नीं युक्त होणें; ओकारी येणें. [तरळ=मोडशी]

**तराई**—स्त्री. डोंगराच्या पायथ्याशीं असलेली दाट झाडीनें युक्त अशी सखल जमीन [तरु+राई; हिं. तराई; सं. तरु–झाड+राजी=रांग]

**तराई**—स्त्री. (खा.) जिनिंग फॅक्टरीचा उद्घाटनसमारंभ. –ज्ञानप्रकाश १७-२-३१.

**तराक**—स्त्री. (जरतारी धंदा) बादलें (चपटें सूत) गुंडाळणारें पोलादी यंत्र; चाती; (इं.) स्पिंडल. –पु. चातीवर काम करणारा मनुष्य.

**तराजू**—स्त्री. १ पदार्थाचें वजन करावयाचें विशिष्ट साधन; ताजवा; तुला; कांटा; तागडी. 'कोणी वणिग्जन विकी तुलिता तराजे।' –र १९. २ (यंत्र.) (तरफ) उच्चालकाचा एक प्रकार. [फा. तराझू]

**तराटचें**—अक्रि. (गो.) मुसक्या बांधणें

**तराठणें**—अक्रि. ताठणें; तटाटणें; ताणलें जाणें. [तराठा]

**तराठा**—पु. १ (बोलण्यांतील, वर्तनांतील) ताठा, तोरा. २ वल्गना; बढाईयुक्त बडबड ३ खरडपट्टी; रागें भरणें; खडसावणी. (क्रि० देणें). [ध्व.]

**तराडा**—वि. शुष्क; रसहीन. (प्र.) तरडा पहा.

**तरांडा**—पु. (कों.) झाडाची लांब व सरळ फांदी; सरळसोट.

**तरांडें**—न. १ जहाज; मोठें तारूं; गलबत 'गनिमाचे मुलखांतील साहुकारी तरांडीं दर्यात असलिया करार करून घ्यावीं, धरून बंदरांत आणावीं.' –मराआ ३५. २ ताफा; पेटा. 'जयां सद्गुरु तारु फुडें। जें अनुभवाचियें कासे गाढें। जयां आत्मनिवेदन तरांडें। आकळलें।' –ज्ञा ७.९८. [सं. तरंड]

**तराणा**—पु. (संगीत) तन, देरे, नाना अशा अक्षरांनीं प्रबंध बांधलेली गायनांतील एक सताल चीज. ही चीज अर्थविहीन असते. जिभेस वळण देण्यासाठीं प्रथम प्रथम हचा उपयोग केला जात असे. पुढें ती गाण्याचाहि प्रचार पडला. [फा. तराना]

**तराणी**—स्त्री. (कर.) तंबी; दटावणी; दपटशा. 'त्यानें तराण्या द्यायाला सुरवात केल्यामुळें मला त्याचा समाचार घेणें भाग पडलें.'

**तराफा**—पु. मोठा ताफा; तरांडा. हा दोन बोटींवर घातलेला ताफा असतो.

**तराय**—स्त्री. (महानु) पद्धति; तऱ्हा. 'विवेका तराय जाली।' –भाए ४८ 'कोकिळांची तराय मोडी।' –भाए ५२. [तऱ्हा]

**तरारणें**—अक्रि. (तरतरणेंचा अतिशय) अतिशय फुगणें, ताठणें; तर्रहोणें [हिं. तरार; तरतरणें]

**तरारां**—क्रिवि. अतिशय तरतर; जलद; अति चपळाईनें तरतर पहा. [हिं. तर्रारा; तरतर]

**तरावट**—स्त्री. १ (व) धुंगी; कैफ; मादक पदार्थानें येणारा अंमल. २ पगडा; अंमल; गुण. 'गोळीची तरावट तीन दिवस राहते.' ३ (व.) तरतरी. तारवट पहा. [तर्री, तार]

**तरावट**—स्त्री. (व.) रोकड; नगद पैसा.

**तरावट**—स्त्री. थंडाई; शीतलता; थंडपणा. [हि.] **०गंगा**—स्त्री. (काशी) गंगेचें थंडगार पाणी.

**तरास**—पु. (गो.) (सोनाराचा) तराजू. [का. तरासु. तुल० सं. तरस्=तराफा, नाव]

**तरास, तरासणी**—पुस्त्री. (पत्यांच्या खेळांत) १ पत्ते, गंजिफा इ० कांची गड्डी करणें. पत्तेकाट. (क्रि० करणें; देणें). २ पत्ते, गंजिफा काटण्याची पाळी [फा. तराश्=काटणें]

**तरासणें**—सक्रि. (पत्यांचा खेळ). (पत्यांची, गंजिफांची गड्डी) काटणें. [तरास; हि. तराशना]

**तराळ**—वि. सावध. –शर.

**तराळ**—पु. १ महार, कोळी इ० हलक्या जातीचा व हलक्या दर्जाचा गांवकामगार हा बारा बलुत्यांपैकीं एक असतो. वेठ नेण्याचें व वाट दाखविण्याचें यांचें काम असतें; बिगारी. २ गस्तवाला; घरटीकार; फिरता पहारेकरी. 'मारौनि विवेकाचा तराळु।' –शिशु ३०४. ३ (बऱ्याच ठिकाणीं हें गस्तीचें काम महाराकडेच असतें त्यावरून). महार; गांवकामगार. 'तेणें बोभाटें तराळ येउनि तयातें पुसति।' –पंच ५.१. [का. तलीर. ते.] **तराळीण–न**–स्त्री. गस्त घालणारी स्त्री 'टिटवी यमाची तराळीन।' –भज ७३. **तराळकी**–स्त्री. तराळाचें काम; हमाली; वेठबिगारी. 'तराळकीचा वयधा नाहीं पाटिलकीचा तोरा!' –पया ८३. [तराळ]

**तराळी**—स्त्री. खळ्यांत धान्य झोडपतांना दाणे इकडे तिकडे उडूं नयेत म्हणून सभोंवार घातलेलें गवताच्या पेंढयाचें वेष्टण, वेढा.

**तरि**—स्त्री. नाव; नौका; होडी; तर. 'बुडे बुडवि सागरीं तरि मुकर्णधाराविना।' –केक ११७. तर, तरी पहा. सं. तृ=तरणें]

**तरिका**—पु. १ चाल; शिष्टाचार. २ सलोखा; सख्य. 'पण्डित प्रधान व नबाब निजाम यांचा तरिका एकासीचा कदिमी पासोन चालत आला, हर्बाबें त्यासी जुदागी नाहीं.' –रा १०.१६५. [अर. तरीका]

**तरिया**—स्त्री. नौका; नाव; तरी. [सं. तरि]

**तरिया**—स्त्री. खळगा. –शर.

**तरी**—स्त्री नाव; होडी; नौका. 'तुज महामृत्यूचिया सागरीं। आतां हे त्रैलोक्यजीविनाची तरी।' –ज्ञा ११.३४८. [सं. तॄ]

**तरी**—स्त्री. १ खाडी. 'समुद्रीं दाट भरितें। ते समुद्रचि भरी तरियातें।' –ज्ञा १३.३०६. 'तरीकरितां मीठ जालें।' –दा ८.३.६. २ जलमार्ग. याच्या उलट खुश्की. ३ पाणी धरणारी जमीन; भातजमीन. [सं. फा.]

**तरीं**—न. (राजा.) रेव; कचकच (अन्न, पोहे इ० कांतील). [का. तरि]

**तरी-(रि)-रीं**—उअ. १ तथापि; तदपि; तसें असूनहि. २ निदान; कमींत कमी. 'मला पोटापुरतें तरी द्या.' ३ (काव्य.) तर. 'अशी तरि कृतज्ञता हरि तुझ्याच ठायीं असा।' –केका ९.. ४ म्हणून; त्यामुळें. 'आम्ही असो नृपसुते तरि कांचनाचे।' –र २५. याच्या जोडीला जरीं शब्द येतो. [स तर्हि] **तरींच**–तरच पहा **तरींपण**–तथापि; असें असूनहि. याच्या जोडीला जरीपण शब्द येतो.

**तरीक-ख**—पु. मार्ग; रस्ता. 'इकडील येकसू व एक–दिलीचा तरीक सावीक होता' –पया ४६८. –क्रिवि. प्रकारें; रीतीनें; म्हणून 'पातशहास सरकारची गरज न दाखवितां सलाह तरीक समर्पक विनंती केली.' –दिमरा १.७ –वि. १ योग्य; तुल्य; समान. 'आणखीही तोफा तरीक जिनसांचा शोध करीत आहों.' –ऐक्रि ९.३ २ दाखल; वजा; सारखा. 'पांच लक्ष रुपये जास्ती नजराणा–तरीख ठराऊन त्याचें काम त्याजवरीच बहाल ठेविलें आहे.' –ऐटि ७.७१. [अर. तरीक्]

**तरीन्**—तारतम्यदर्शक प्रत्यय. (सं.) तर. उदा० कमतरीन् पहा. [फा.]

**तरीह**—उअ. तरी. 'होऊनी निरमत्सरु तूं परतशी येथें तरीह।' –गीतचंद्रिका २.३४. [सं. तर्हि]

**तरु**—पु. वृक्ष; झाड. [सं.] ०**तल**–न. झाडाच्या बुंध्याजवळची जमीन. [सं. तरु+तल=] ०**वर**–पु. मोठें झाड; वृक्षश्रेष्ठ. 'हा तो त्यागतरुवरु। जो गा मोक्षफळें ये थोरु।' –ज्ञा १८.२०७. 'नम्र होती फलभारें तरुवर सारे।' –शाकुंतल ५, पृ. १८७. [तरु+वर=श्रेष्ठ]

**तरु-रूं**—न. १ रोप, रोह. 'भाताचें तरु टाकीलें.' –रा १०.२५९. २ (बे.) उपटरोपा करण्यासाठीं पेरलेला वाफा. तरवा पहा

**तरुण**—वि. तरणा; जवान; युवक, बाल्यावस्था संपून प्रौढ दशेला आलेला. [सं.] सामाशब्द– ०**पण**–न. तारुण्य; यौवन. ०**पिढी**–स्त्री. नवी प्रजा; तरुण लोक. 'देशाची उन्नति व्हावयाची असेल तर ती जोमदार तरुणपिढीच्याच हातून.' –टिसू ९६. ०**सूर्य**–पु. मध्यान्ह; मध्यान्हकाल [तरुण+सूर्य] –**णास्थि**–स्त्रीन. कोमलास्थि; मृदुस्थि [तरुण+अस्थि=हाड] **तरुणी**–स्त्री. तरणी; तरुण स्त्री; युवती; सोळावर्षांपासून बत्तीस वर्षांपर्यंतच्या स्त्रीला तरुणी म्हणतात –धोर १.१३०.

**तरुणोपाय-व**—पु धडगत. तरणोपाय पहा. 'तरीं संताची वर्णावी कीर्ति। तरुणोपाय विश्रांति आन नसे।' [तरणोपाय अप.]

**तरोटा**—पु. टाकळा; तरवटा पहा. हा बंगाल व हिंदुस्थानच्या उष्णभागांत दरवर्षी उगवतो. गजकर्ण व नायटे यांवर याचा उपयोग करितात. याच्या बिया भाजून कॉफीच्या ऐवजीं उपयोगांत आणितात. –ज्ञाको–त २६.

**तरोड**—पु तरवड पहा. –**डी रंग**–पु. तरवडापासून काढलेला कातडीं कमावण्याचा रंग.

**तरोळी**—स्त्री. (व.) १ सखल जागा. २ लहानसें तळें; डबकें. 'पावसाळयांत गावाभोंवतीं पुष्कळ तरोळ्या असतात'

**तर्क**—पु. १ तर्कशास्त्र; न्यायशास्त्र; प्रत्यक्ष, अनुमान इ० कांवरून पदार्थाचा निर्णय समजण्याची विद्या. 'तरी तर्कु तोचि फरशु। नीतिभेदु अंकुशु। वेदांतु तो महारसु। मोदकु मिरवे।' –ज्ञा १.११. २ अटकळणें; अनुमानानें जाणणें, ताडणें. ३ अनुमान; सिद्धांत; अनुमिति; अनुमान, सिद्धांत. (क्रि० करणें; बांधणें). ४ लक्षणदर्शनावरून झालेलें एखाद्या पदार्थाचें, गोष्टीचें ज्ञान, कल्पना; अनुमान 'अविद्या नाशी तर्क। तेरों होये।' –अमृ ६.६३. 'विचार करूं लागलें म्हणजे अनेक प्रकारचे तर्क उत्पन्न होतात.' ५ पूर्वलक्षणावरून भावी गोष्टीचा केलेला अंदाज, अजमास, अटकळ. 'हा तर्क करीत बसण्यापासून आपल्याला लाभ नाहीं.' –कोरकि ३०२. 'यंदा पर्जन्य चांगला लागला त्यावरून स्वस्थता होईल असा तर्क दिसतो.' ६ अक्कल; बुद्धि; मति. 'त्या शास्त्रांत माझा तर्क चालत नाहीं.' ७ कुतर्क; कुकल्पना; मूर्खपणाचा विचार, कल्पना, युक्ति. ८ (ल.) खबर; वर्तमान; वृत्त. 'कोठें तरी कृष्ण लपवावा। बाहेर तर्क कळों न द्यावा।' –ह ३.१६२. [सं.] सामाशब्द– ०**कौशल्य**–न. अनुमान, अटकळ, कल्पना करण्याचें चातुर्य, प्रावीण्य; कल्पनाचातुर्य. [तर्क+सं कौशल्य=कुशलता] ०**गम्य**–वि. तर्कानें जाणतां येणारें; अनुमेय; तर्क्य. [तर्क+सं. गम्य= जाणण्यासारखें] ०**बाज**–वि. वादविवादकुशल; कुशाग्रबुद्धि; धूर्त; मर्मज्ञ. [सं. तर्क+फा. बाज] ०**वाद**–पु. बुद्धिवाद; बुद्धिप्रामाण्य मानणारा वेदांतांतील एक पंथ. (इं.) रॅशनॅलिझम; [तर्क+वाद] ०**विद्या**–स्त्री. १ तर्कशास्त्र; न्यायशास्त्र. २ वादविवादपटुता. ३ अनुमान, अंदाज करण्याची हातोटी, कुशलता. [तर्क+विद्या] ०**शास्त्र**–न. प्रत्यक्ष,

अनुमान इ०कांवरून एखाद्या गोष्टीचा निर्णय, शुद्धाशुद्ध अनुमान करण्याचें शास्त्र; न्यायशास्त्र. तर्क अर्थ १ पहा. ' पाश्चात्य देशांत तर्कशास्त्राचा उदय प्रथम प्राचीन ग्रीक लोकांमध्यें झाला.' –ज्ञाको –त २७. ०ज्ञान–न. अनुमान करण्याची शक्ति. **तर्की** –वि. १ नैयायिक; तर्कशास्त्रज्ञ. २ मार्मिक; धूर्त; मर्मज्ञ; तारतम्यज्ञानी. [ तर्क ]

**तर्कट**—न. १ भलताच तर्क, कल्पना; कुतर्क. २ ( एखाद्यावर आणलेलें ) कुभांड; आळ; बालंट. तरकट पहा. –वि. तर्कटी; कुभांडखोर; कुतर्क काढणारा; कंड्या पिकविणारा. [ तर्क ] **०पणा**–पु बनावटपणा; कुतर्कवृत्ति. ' एतद्देशीय पूर्वजांविरुद्ध पुष्कळच हेकटपणाचा व तर्कटपणाचा मजकूर सांप्रत इतिहासांत आला आहे.' –नि ६१५. [ तर्कट+पणा ]

**तर्कटी**—वि. तर्कट पहा. १ भलताच तर्क काढणारा; कुतर्क करणारा. २ ( गो. ) कुभांड रचणारा; बालंटखोर. ३ ( गो. ) बुद्धिमान; कल्पक. [ तर्कट ]

**तर्कणें**—उक्रि. अटकळ करणें; अनुमानानें समजणें; तरकणें. ऐसे या रुखाचें होणेंजाणें। न तर्के होतेनि वहिलेपणें। –ज्ञा १५.१२१. ' तरी ऐसें तर्कतसे कांहिं । ' –रास २.५२४. [ तर्क ]

**तर्कश**—स्त्रीपु. भाता; तरकश पहा. ' रणभूमिवरि तुला निजवील। रामतर्कशाचा तीर । ' –मध्व ६६. [ फा. ]

**तर्कीम**—स्त्री. लेखन. तरकीम पहा. –रा ३.७३. [ अर. तर्कीम् ]

**तर्क्य**—वि. तर्कानें, अनुमानानें समजण्यासारखें; बुद्धिग्राह्य. [ सं. ]

**तर्जणें**—सक्रि. १ तुच्छ मानणें; धिक्कारणें. ' सहस्र बाहू अर्जुन। जो प्रख्यात तो तर्जुन।' –मोरा घनाक्षरी रामायण ९९. २ सोडणें; टाकणें; त्यजणें. 'येवढें विघ्न आलेंया दारुण। कैसेंआ ठेवावें मनुक्षेपण। अजोनि का न तर्जी प्राणु। पण तर्जिन साच।' –ख्रिपु २.४७.१४. [ सं. तर्ज्=निंदा करणें; तर्जन ]

**तर्जणें**—अक्रि. गर्जणें. -शर

**तर्जन**—न. १ निर्भर्त्सना; निंदा; हेटाळणी; दूषण; टपका. २ दहशत; धाक ' तीचें चिन्ह असें कीं तर्जन आणि ताडनादि जाणवितें। ' –अकक २. गंगाधरकृत, रसकल्लोल ६३. [ सं. ]

**तर्जनी**—स्त्री. १ हाताचें अंगठ्याजवळचें बोट. २ ( तंजा. ) तर्जनींत घालावयाची एक प्रकारची अंगठी. [ सं. ]

**तर्जुत्रें**—सक्रि. ( गो. ) १ पारखणें; अंदाजणें. २ उमगणें; समजणें. [ तर्क ? ]

**तर्जुमा**—पु. भाषांतर; अनुवाद. तरजुमा पहा. ' केवळ व्याकरणशुद्ध व रूढीशुद्ध सोप्या रीतीचा तर्जुमा इकडे उतरला म्हणजे पुरें होतें ' –नि १८९.

**तर्जुमान**—पु. सरकारी भाषांतरकार तरजुमान पहा. [ फा. ]

**तर्णक**—न. वासरूं; वत्स. [ सं. ]

**तर्तीब**—स्त्री तरतीब पहा.

**तर्तूद**—स्त्री. तरतूद पहा

**तर्पण**—न. १ तृप्त करणें; संतुष्ट करणें, ( इच्छा इ० ) पूर्ण करणें, पुरविणें. २ तृप्ति; समाधान; संतोष; संतुष्टता ३ रेलचेल; परिपूर्ति; अतितृप्तता; धालेपणा. ४ ( धर्मशास्त्र ) नित्याच्या ब्रह्मयज्ञांत अथवा श्राद्ध वगैरे विशिष्ट कर्मात देव, ऋषि व पितर यांना उद्देशून उदक देण्याचा विधि. ५ ( वैद्यक ) डोळे इ०कांत ( तूप इ० औषधिद्रव्यें ) भरपूर घालणें. [ सं ]

**तर्पणमुद्रा**—वि. ( ल ) कृपण; कंजूष; हाताचा जड; कद्रू. [ तर्पण ]

**तर्पिणें**—उक्रि. संतोषविणें; तृप्त करणें; तृप्त करणें. ' निजस्तुति तुम्हां रुचे स्तविति त्या वरें तर्पितां। ' –केका ७८. [ सं. तर्पण ]

**तर्पित**—वि. तृप्त झालेला, केलेला; संतोष, समाधान पावलेला; संतुष्ट; तृप्त. [ सं. ]

**तर्फ**—स्त्री. तरफ पहा.

**तर्फात**—स्त्री. अफरातफर. तरफात पहा. –वाग्मा २.४२.

**तर्बेज**—वि. तरबेज पहा.

**तर्मुंड**—न. तरमुंडी पहा. १ डोकें खुपसणें; डोयखुपस. २ लुडबुड. –वि. डोकें खुपसणारा; डोयखुपशा; लुडबुड्या ' जाला तोंडाळ तर्मुंड । आ(?)पापाचांडी । ' –दा ५.१.७६. [ तर+मुंड=डोकें ]

**तऱ्या**—पु. होडीवाला; नावाडी. [ सं. तरी ]

**तऱ्यापोतीं**—वि. ( गो. ) अगदीं सहज फाटणारें ( पान इ० ). [ ध्व. टर्र ]

**तर्र**—वि. तर; ताजें; ओलें; रसपूर्ण. तर ( –वि. ) पहा.

**तर्र**—क्रिवि. तट्ट; अतिशय तरारेल अशा रीतीनें फुगून तट्ट होईपर्यंत; फुटेपर्यंत; जागा न राहण्याजोगें; ( भरणें, पोट–फोड इ० फुगणें ) ' वावडें खाताच दुसऱ्या दिवशीं फोड फुगून तर्र झाले.' [ ध्व. तट्ट ]

**तर्राठ**—वि. ( माळवी. ) तीक्ष्ण. [ तर्र ]

**तर्लुक, तल्लुक**—स्त्री. ( गो. ) माडांच्या राखणीची मजुरी; रखवाली. ' या बागाची तल्लुक कोणाला दिली आहे ? ' [ सं. तल=ताडवृक्ष+कुल=वृक्ष, फळ. हिं. तर्बुल=ताडफळ ? ]

**तर्ष**—पु तृषा; इच्छा; हेतु; वासना. ' पूर्ण करी तर्षातें तेणें पावेन फार हर्षातें। ' –वीरेश्वरकृत गजमुखचरित्र १८. [ सं. ]

**तर्षित**—वि. तृषित; तहानेनें व्याकुळ झालेला. [ सं. ]

**तऱ्हा**—स्त्री. १ प्रकार; भेद; जात. ' लढाई खूब तऱ्हेनें जाली.' –रा १०.१९२. २ रीत; पद्धति; मार्ग. ' आमची पक्ष्याची तऱ्हे

आपण कह्यांतील, ती कांहीं निशाण आली नाहीं.' —रा १२.११५. ३ (ल) परिणाम शेवट. 'पण त्या दोघांच्या दोन तऱ्हा आल्या.' —इंप ५८. [अर. तर्ह्] (वाप्र) **तरतऱ्हा—तऱ्हातऱ्हा करणें**—१ मनस्वी चेष्टा, चाळे, ढंग करणें. २ (कर्माची पष्ठी) (एखाद्यास) अनेक प्रकारांनीं छळणें, त्रास देणें; (एखाद्याची) कुचेष्टा करणें. **तऱ्हेस—तऱ्हीं भरणें, तऱ्हेस पटणें**—भलत्याच गोष्टीच्या नादीं लागणें; हास पटणें; हास्याची लहर येणें. 'तऱ्हे भरोंच नये। मुखाचे नाना उपाये।' —दा ११.५.११. 'हें पोर एकदां तऱ्ही भरलें म्हणजे कोणाचें ऐकत नाहीं.' **तऱ्हेस जाणें**—विक्षिप्त, चमत्कारिक बनणें; स्वैरपणानें, विलक्षण रीतीनें, स्वतःच्या लहरीनें वागणें. **—तऱ्हेस तऱ्हेदेणें**—(एखाद्यास) बेफामपणानें, उच्छृंखलपणानें, स्वैरपणानें, चमत्कारिक रीतीनें वागण्यास प्रवृत्त करणें. सामाशब्द— **०तऱ्हीं**—वि. नाना तऱ्हेचा; विविध; निरनिराळ्या प्रकाराचा. 'वीस पंचवीस तोफानी तऱ्हातऱ्ही येणें नार्णे नबाबानें पाठवावें' —ख ८७१ [तऱ्हा द्वि.] **तऱ्हेचा, तरतऱ्हेचा, तऱ्हेदार**—वि. १ अपूर्व; विलक्षण, नव्या, विशेष प्रकारचा; नवलाईचा. 'हातांत जमिनमिल्लहरच्या आंकणाची तऱ्हेदार दौत घेतलेली आहे' —सुदे ३०. २ सुंदर; सुरेख; दिखाऊ; देखणा 'पानदान चांगलें तऱ्हेदार आहे.' —रा ३.४८७. **तऱ्हेबाज, तऱ्हेखोर**—वि. १ तऱ्हेवाईक चमत्कारिक स्वभावाचा (मनुष्य). २ लहरी; स्वच्छंदी; छांदिष्ट. 'तऱ्हेवाज ती अधींच खिलाडू नवऱ्याच्या गोष्टी ऐकून।' —पला ७८. [तऱ्हा+फा. बाज प्रत्यय] **तऱ्हेवाईक, तऱ्हेवार**—वि. १ विशिष्ट तऱ्हेचा. २ चमत्कारिक; विलक्षण; विचित्र; विक्षिप्त (व्यक्ति, वस्तु). ३ अपूर्व; अप्रतिम; नवीन तऱ्हेचा. ४ (ल.) सुंदर; दिखाऊ. 'तऱ्हेवार कापड. [फा.]

**तऱ्हाट(ठ)णें**—अक्रि. (प्र.) तराठणें पहा.

**तऱ्हाटा—ठा**—पु. ताठा; तोऱ्यानें, ताठ्यानें युक्त वर्तन, भाषण; तराठा पहा. (क्रि० देणें). [तराठा]

**तऱ्हाण**—न (पाणी, चिखल, मूत्र, रक्त इ० इकडे तिकडे सांडल्यानें होणारी) घाण; दुर्गंधी; रवड; ढाण.

**तऱ्हावणें**—अक्रि. (कों.) तरंगणें. [तरणें]

**तऱ्ही, तऱ्हि**—उअ. तरी; तरीहि; तरीं पहा. 'थोंटा बधिर दमेकरी। तऱ्ही ताठा न संडी।' —दा ३.३.३३. 'मेला कंस तऱ्हि कसा, तच्छोकें संजया न मेलों मी।' —मोकर्ण ६.२१. याच्या जोडीचा शब्द जऱ्ही. [सं. तर्हि; म, तरी+हि]

**तऱ्हं, तऱ्हें**—उअ. तरी; तरीदेखील; सुद्धा. 'तऱ्हें प्रबंधलतेची वेलु। वाढती दिसे।' —शिशु २२. 'तऱ्है तयाचें वचन न करिच।' —पंच ३.१९. तऱ्ही पहा. [सं. तर्हि; म. तरीहि]

**तल**—न. १ तळ; बूड; आतील, खालचा भाग. २ जमीन; भुई; तळ; भूमि ३ (समासांत) (एखाद्या अवयवाचा, वस्तूचा) पसरट, सपाट भाग; पृष्ठभाग; तळवा. जसें—चरणतल, पादतल=तळपाय; करतल, हस्ततल=हाता वा तळवा; भूतल, पृथ्वीतल=पृथ्वीचा पृष्ठभाग. ४ (भूमिति) सपाटी; पातळी; पृष्ठभाग. (इं.) प्लेन. [सं.] सामाशब्द - **०दर्शिका**—स्त्री. (वस्तु.) कोणत्याहि जागेची समुद्रसपाटीशीं तुलना करतां उंचसखलता मोजण्याचें यंत्र. (इं) लेव्हलिंग् इंस्ट्रुमेंट. [तल+सं. दर्शिका=दाखविणारी] **०पर्यंत—पु.** पृष्ठभाग; पातळी; सपाट प्रदेश. [तल+सं पर्यंत=बाजू, परीघ] **०पुष्पपुट(करण)**—न. (नृत्य) नर्तकानें उजव्या पायाचीं बोटें जमीनीवर टेंकून त्यावर उभें राहावें व उजव्या हाताचीं बोटें वर एकमेकांस चिकटवून तळहात खोलगट करून हातांचीहीं बोटें वर करावींत. नंतर त्या हाताच्या तळहातावर दुसऱ्या हाताचीं बोटें चिकटवून ठेवावीं. व हे हात डाव्या बाजूस ठेवाव व डावी बाजू किंचित् वांकवावी या सारखी कृति. [तल+पुष्प=फूल+पुट=पुडा+करण=करणें] **०मुख(संयुतहस्त)क्रिया**—स्त्री. (नृत्य) चतुरक हस्त या क्रियेंतील हाताच्या बोटाखालीं असलेला अंगठा दूर करीत करीत हंसपक्ष हात करणें मग असे हे दोन्ही हात शरीराच्या आड न येतां तळहात परस्परांच्या समोर येतील असे ठेवणें इ० क्रिया. **०संस्फोटित(करण)**—न. (नृत्य.) उजवा पाय भराभर उचलून पुढच्या बाजूस खालीं आपटणें व टाळ्या वाजविणें. [तल+सं. संस्फोटित=आपटणें] **तलातल**—न. १ सप्तपातालांपैकीं चौथें. [सं. तल+अतल] २ द्वंद्व युद्धांतील एक प्रकार. यांत एकमेकांच्या तळहातावर तळहातांनीं प्रहार करितात. [तल+तल] **तलावर्त**—वि. घोड्यावर बसणाराचा पाय भोंवऱ्यास लागतो असा भोंवरा असलेला (घोडा) —मसाप ३.१.५८. [तल+आवर्त=भोंवरा]

**तलक**—स्त्री. घटस्फोट, काडीमोड; तळख पहा. [अर. तलक्]

**तलख, तळख**—वि. १ तिखट; जहाल; कडक; तीक्ष्ण. २ चलाख आवेशयुक्त; चपळ; तांतडीनें काम करणारा. ३ (दारूकाम) एकदम जळणारा (तारा) 'हवयांची दारू अंमळ मंद जळणारी व तारे तलख असावे लागतात.' —अग्निक्रीडा ११. ४ तामसी; रागीट; तापट. ५ करारी; बाणेदार. [फा. तल्ख]

**तलखली**—स्त्री. १ ताप आल्यानें होणारी आग; कणकण; तरफड. २ (मनाची) उत्कंठा; उत्साह; अधीरता ३ मानसिक अस्वस्थता; अशांति; तळमळ; मनस्ताप. [तलख]

**तलखलगा**—वि. १ रागीट; जहाल; तामसी; संतापी. २ आवेशयुक्त; तलख; उत्साही; तलख पहा. [तलखली]

**तलखी, तलखाई, तल्खी**—स्त्री. १ (पदार्थांचा, तपकिरीचा, मसाल्याच्या द्रव्यांचा) तिखटपणा; जहालपणा; जलाली; तीव्रता; कडकपणा. २ (सूर्य, अग्नि इ० कांच्या) उष्णतेची तीव्रता; जालीमपणा; जलाली; उष्मा; उकाडा. ३ (ज्वरामुळें होणारी)

रखरख; फणफण; तरफड; काहिली. ४ (ल.) तापटपणा; कडक पणा; आवेशातिरेक; कचका; तलखपणा. 'तल्खी सोडून शांतता धरून वर्तावें.' –ख ३.४७९. [फा तल्खी]

**तलग**—पु. प्रेम. –वि. प्रेमळ. –मनको.

**तलग**—न. १ पिलूं; बालक. 'तलगासीं कमळें। चारा वांटित मराळें।'–ऋ ६१. 'जैसें शारदियेचें चंद्रकळे–। माजीं अमृतकण कोंवळे। ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें।' –ज्ञा १.५६. २ (कु. गो.) कोंबडीचें पिलूं. हें आवरत नाहीं. –बदलापूर ४९२. –वि. लहान; अजड (स्त्री, पुरुष). 'तंव त्या तलगा गौळणी नारी।' –निगा ४०. –मच्व १६०. **तलगी, तलंगी**–स्त्री. १ (माण.) अंडीं घालण्याच्या वयास न आलेली कोंबडी. २ तरुणी.

**तलगणें**—अक्रि. (क) (विशे.) तळपणें; एखादा पदार्थ मिळविण्याचें संधान साधण्यासाठीं त्याभोंवतीं घिरट्या घालणें. तळपणें पहा.

**तलफ**—न. दाराचें झडप, फळी. उदा० एक तलफी=एक झडप असलेलें; दुतलफी=दोन फळ्या असलेलें (दार).

**तलफ**—स्त्री. (गंजिफांचा खेळ) गंजिफाच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. दुसऱ्याच्या हातांतील वजीर इ० पडून आपल्या हातांतील एक्का, दुव्वा इ० पानें हुकूम करण्याकरितां त्या रंगाचें पान आपल्या जवळ नसल्यास आपण जें पान पालथें टाकतों त्यास तलफ म्हणतात; उपडपानी देणी. [अर. तल्फ्]

**तलफ, तल्फ**—स्त्री. वाईट खोड तलब पहा. **तलफी–बी**–वि. अमली; शौकी; कैफी; व्यसनी. [तलफ]

**तलफ**—वि. उध्वस्त; बेचिराख; ओसाड. 'मुन्हारी जगदेवराव सुभा येऊन पुणें जाळून लुटून तलफ केलें.' –इमं ५६. –पेदसमा २१६. [अर. तलफ्]

**तलब**—स्त्री. १ वाईट व्यसन; खोड; चटक; चट. २ व्यसनी मनुष्यास व्यसनाच्या पदार्थाच्या सेवनाची होणारी तीव्र इच्छा, हुक्की. ३ पगार; तनखा; मजुरी; मुशाहिरा. तुंबलेला पगार ४ सावकारानें, सरकारनें कुळाकडे केलेली पैशाची, वसुलाची मागणी, तगादा. 'अविंदाचें राज्य बेदरीं असतां। कागद पाहतां तलब केली।' –तुगा ४४३६. ५ सरकारी बोलावणें; हजर राहण्याबद्दलचा हुकूम; (इं.) समन्स्. 'बोलाविलें तें करोनि तलब।'–दावि २०२. 'हें जाणून त्यास तलब करून हुजूर आणिला.' –चित्रगुप्त ७८. ६ समन्स बजावणाऱ्या, वसुलाचा तगादा करणाऱ्या शिपायाचा रोजमुरा, मजुरी. ७ (सामा.) बोलावण्याची क्रिया; आमंत्रण; बोलावणें. 'देखोनियां राजा संतोष पावला। म्हणे व्यर्थ त्याला तलब केली।' तलफ पहा. ८ वरात; मागणी. 'त्यास आपली तलब रुपये एक हजार.' –वाडबाबा १४१. [अर. तलब्] सामाशब्द– ०**तनखा–तन्खा**–स्त्री. पगारखर्ची. 'पांचशें गोऱ्यांची तलब तनखा वरचेवर तुम्ही पाठवीत जावी.'–दिमरा २ १०६. ०**दार**–वि. १ व्यसनाच्या पदार्थाची तलब ज्यास येते तो. २ पगारदार. ३ पैशाची, वसुलाची मागणी, तगादा करणारा; (इं) बेलिफ्. ४ चौकशी करणारा. **तलबाना, तल्बाना**–पु. १ वसुलाचा तगादा करणाऱ्या सरकारी शिपायास, बेलिफास कुळानें द्यावयाचा भत्ता, रोजमुरा; तगाद्याची दस्तुरी; (इं) प्रोसेस् फी. 'नजराणा व तलबाना वगैरे कुलबाब पाहिजे.' –वाडबाबा १०९. २ (सामा.) रोजमुरा; पगार; मुशाहिरा. 'मोळा रोज प्रत्यह तल्बाना गाडदी यांस द्यावा लागतो.' –ख १.४०४. [फा तल्बाना] **तलबी**–वि. व्यसनी; तलफी पहा. [तलब]

**तलम**—वि. १ बारीक व मृदु (सूत इ०) २ बारीक विणीचें, व मृदु सुताचें; फार पातळ (वस्त्र इ०) ३ नाजूक; सुकुमार; पोशाखी (प्रकृति इ०). [?] सामाशब्द– ०सुती–वि. तलम सुताचें; बारीक विणीचें (कापड, धोतरजोडा इ०) [तलम+सूत] –**माई**–स्त्री. (कापड, सूत इ० कांचा) बारीकपणा; तलमपणा [तलम]

**तलयारी**—पु. (तंजा.) पोलीसपाटील.

**तलवार, तलवारबहाद्दर**—तरवार इ० पहा.

**तलव्वुन**—पु. अनिश्चितपणा; चंचलपणा. [अर. तलव्वुन्] ०**मिजाजी**–स्त्री. अनिश्चितपणा; लहरीपणा. 'रियासतींत मोठी गोष्ट वचनाची कायमी. त्यांत तलवून–मिजाजी आल्यास व इत्लाखी बातल होऊं लागल्यास लाचार!'–ख ७.३५७४. [अर तलव्वुन्+मिजाजी]

**तलाख**—स्त्री. शाप; एक शिवी. तलाख पहा. 'जो कोणी लिहिल्याप्रमाणें न एकें त्याजला शपथ असे, त्याचे आईवर तलाख असे.' –ब्रच ११ . [अर. तलक्=काडीमोड]

**तलाठी, तलाठदार**—पु. सरकारी वसूल गोळा करणारा गांवकामगार; कुळकर्णी. [गु. तलाटी]

**तलातल**—तल मध्यें पहा.

**तलालोरी**—वि. तालबद्ध; मंगल. 'पावा वाहे (वाजे?) तलालोरी नादु उमटे अंबरीं।' –ज्ञागा ३६१. 'मोहऱ्या पांवे तलालोरी। नाचती गजरीं गीत गाती।' –निगा ८८. [ताल+?]

**तलाव**—पु मोठें तळें; सरोवर. [सं. तडाग; प्रा. तलाअ; फा. तलाव; तालाव्]

**तलावा**—पु १ टेहळणी; पहारा; गस्त. 'बारीपलीकडे तलाव्यास फौज रवाना केली.' –ख ८.३९१९. 'पालख्या शिबाय घोडेस्वार। तलावे वर्ती चक्राकार।' –अफला ५०. २ फिरणें; पाय मोकळे करणें; फेरफटका. ३ टेहळणी करीत फिरणारी सैन्याची तुकडी. 'तलावा आला तिकडुन पेशव्यांचा।' –पपो २७६. ४ –क्रिवि. टेहळणी करीत. 'अलाहिदा लस्कर घेउनु तलावा फिरों लागले.' –इमं ९. [तुर्की. तुलावा; फा. तलाया; अर. तलाइअ=टेहळणी करणारी लष्करी टोळी; अर. तिलावा]

**तलाश-स**—पु. १ (एखाद्या गोष्टीचा, मनुष्याचा) शोध लावण्यासाठीं केलेला प्रयत्न; चौकशी; तपास. 'चांगले मर्द झुंजाचे उपयोगी पडे याप्रमाणें तलाश करून ठेऊन पाठविणें.' –रा१.२ ७९. २ वरील प्रयत्नानें लागलेला शोध; पत्ता; मागमूस; तपास [फा. तलाश]

**तलाशी-सी** स्त्री. शोध; तपासणी; झडती; झाडा. तलाश पहा. 'तुम्ही याचे घरीं जाऊन तलाशी घेऊन या' –विक्षिप्त २. ७८. –वि. हरवलेल्या वस्तूंचा शोध करण्याचें ज्याचें काम आहे असा (मनुष्य). [फा. तलाश्]

**तलुग**—न संधान. लालूच. –शर.

**तलखी**—स्त्री. तलखी पहा. [फा.]

**तल्प**—न. शय्या; बिछाना; अंथरूण. 'हीं उपधानें न युक्त या तल्पीं।' –मोभीष्म ११.१३७. २ (ल.) स्त्री; पत्नी. 'गुरु-तल्पग.' [सं.] सामाशब्द– **तल्पगी**-वि व्यभिचारी; मात्रा-गमनी. 'कृतघ्न तल्पगी नारकी। आतित्याई जल्पक।' –दा २.२. ५६. [सं. तल्प+ग] ०स्थान-न. शरीराचा गुह्यभाग. –शर. [तल्प+सं. स्थान]

**तलवाना**—पु. तलवाना पहा. [फा.]

**तलख-ख**—स्त्री. शाप; शपथ; धमकावणी तल्लाख पहा. 'फत्तेसिंगमानी यांणीं तलख लिहून पाठविली। अशी लढाई करा म्हणावें मागें मोहरें नाहीं जाहली।' –अफला ४४.

**तल्लख**—वि १ चलाख; हुशार; चपळ; जहाल २ (व.) तिखट; जहाल; कडक. 'ही तमाखु फार तल्लख आहे.' तलख पहा. [फा. तल्ख]

**तल्लाख**—पु. १ शाप. एक शिवी. तलाख पहा. ही शिवी बाय-कांना लावतात. 'त्याच्या आईवर तल्लाख.' २ घटस्फोट; काडीमोड. ३ शपथ; आणेगा (क्रि० घालणें; असणें; सुटणें; मोडणें). [अर. तलक्]

**तल्लाल-श. तल्लाशी-सी**—तलाश इ० पहा

**तल्ली, तोल्ली**—स्त्री. (गो.) लहान मुलाच्या पायांत घालण्याचा रुपेरी दागिना; तोरडी. [तोरडी]

**तल्लीन-ण**—वि. (एखाद्या गोष्टींत, विषयांत) निमग्न; गुंग; दंग; एकरूप; तद्रूप. [सं. तल्लीन; सं तत्+लीन=बुडालेला]

**तल्लु, तोल्ल**—पु. (गो.) माडांचा राखणदार. तल्लैक पहा. [सं. तल=ताड ?]

**तल्लुक**—स्त्री. (गो.) तल्लैक पहा. माडाची राखण.

**तंव, तव, तवई**—स्त्री. (पित्तादिकामुळें येणारी) तिरि-मिरी; घेरी; मूर्च्छा; वेग्रह्ढि; भोंवळ; तवा. (क्रि० येणें). 'धनुष्या घालितां कव। झोक गेला आली तव। रावणासी।' –मध्व ३७. 'जनकोजी शिंदे यांस तवई येऊन घोड्याखालीं आले.' –भाब ६४. [सं. तमस्=अंधार]

**तव**—पु. आवेश; जोर. तवक पहा. [सं. तवस्=बल]

**तव**—पु.स्त्री. १ पापुद्रा; पातळ पदर; थर; तवंग. २ (डोळ्यावर येणारा) सारा; भुरी. [सं. तवस्]

**तव**—सना. (काव्य) तुझा. 'कैकेयनृपभ्राते दोघे त्यांतील एक तव पक्ष।' –मोकर्ण ४.११. 'तव चरणीं ठेऊनि माथा।' [सं. तव=युष्मत् सर्वनामाच्या षष्ठीचें एकवचन]

**तंव**—क्रिवि. (काव्य) १ तेव्हां; तों. 'तंव के नारदु: भणे।' –शिशु १२३. 'तंव तेथें पातला नारद।' २ तोंपर्यंत; जंव याचें अनुयोगी. 'कृतांत शिवला नसे तंव दिसे बरें पावणें।' –केका ४७. 'मी जंव येईन तंव तूं बैस' ३ तर या अर्थी पादपूरणार्थक अव्यय. 'देह तंव पांचांचें जालें। हें कर्माचे गुणीं गुंथलें।' –ज्ञा १३.११.०२. 'तूं तंव राजा उदार।' [सं. तावत्; तदा] ०पर्यंत पावेतों-क्रिवि तोंपर्यंत. तंवर, तंवरी पहा.

**तवई**—स्त्री. एक प्रकारचें मातीचें भांडें; मातीचा लहान तवा. [तवी]

**तवई**—स्त्री. संकट; विपत्ति; विपत्काल; नाश. (अवई=लोक-वार्ता, कंडी. तवई=प्रत्यक्ष आलेलें संकट. अवाई पहा.) 'सदा-शिवपन्तावर मोठा तवईचा वक्त गुजरला.' –पाब ११. [अवा-ईच्या जोडीला बनविलेला शब्द; तुल० फा. तबाही] म्ह० १ तवई पुरवते अवई पुरवत नाहीं. २ तवईपेक्षां अवई कठीण

**तव(वं)क, तवका**—पु. (काव्य) रागाचा आवेश; त्वेष; संतापाचा आवेग; राग; संताप. 'ऐसें बोलें सनानिली। तंवकें बैठी ठेली।' –शिशु १८६. 'रक्षावा प्राग्ज्योतिष ऐसें बोलोनि वृद्ध तवकानें।' –मोभीष्म ५.५७. 'राक्षस चढूनियां तवका। भीमहृदयीं मारी थडका।' २ आवेश; जोर; शक्ति; सामर्थ्य. 'आला धांवुनि जांबुवंत तवकें झुंजावया लागला।' –अकक २, कृष्णकौतुक ५७. तवका पहा. [सं. तवस्–तपक; प्रा. तवक]

**तवकणें**—अक्रि. कोपाविष्ट होणें; आवेशयुक्त होणें; संक्रुद्ध होणें. 'हो कां जे महाकल्पाचिया अंतीं। तवकलेनि यमें जेउत तेउतीं।' –ज्ञा ११.३४२. [तवक]

**तवक(कु)ल**—स्त्रीन. १ ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठा; ईश्वराचा भरंवसा, आधार. 'आमची तवकल श्रीवरी! कोणेही गोष्टीची फिकीर नाहीं' –ख १.१४२. 'खुदावर तवकुल ठेवून रघुनाथराव यांचे तम्वीचा इरादा केला.' –रा ५.८६. २ (सामा.) भर-वसा; उमेद; आशा. ३ साहस; कचाट; जोखमीचें कृत्य. [अर० तवक्कुल्] ०करणें–जोखमीच काम, साहस करणें. म्ह० तवकल तवाला खुदापर हवाला.

**तवका, तंवका**—पु. १ शक्ति; जोर; आवेश; उत्साह. 'उठवला वोथरे तंवका। तो सुनाट पडे अम्बिका।' –अमृ ६.४६.

'म्हणोनी तवंकें उडी घातली।' –उषा ५५३. २ धैर्य; धीर. 'पैं वैराग्यमहापावकें। जाळूनि विषयांचीं कटकें। अधपर्ली तवकें। इंद्रियें धरिलीं।' –ज्ञा १२.४६. ३ क्रोध; संताप. [ तवक ]

**तवका**—पु. आशा. 'खुशरूा दुनियाईचे आलमांत जितक्या तवक्याच्या शकला आहेत त्या तर्फैन दाखवून हर तद्बिरीनें निफाक पाडावयासी कसूर करणार नाहींत.' –पया ४७८. [ अर. तवक्कुअ=आशा ]

**तवक्षीर–खीर, तवकील–खील**—न. १ बांबू, गहूं, तांदूळ जव इ०कांपासून काढलेलें सत्त्व. २ आरारूटच्या कांद्याच्या बलकापासून काढलेलें एक सत्त्व. हें हलकें व सहज पचणारें असल्यामुळें मुलांस व आजारी माणसांस याची लापशी देतात. [ अर. तबाशीर=बांबूची साखर; तुल० सं. त्वक्=साल+क्षीर=दूध, हिं. तवाखीर; बं. का. तवक्षीर; गु. तवखार; फा. तवाशीर ]

**तवक्कुफ**—पु. खोळंबा; उशीर; अवकाश; तहकूब पहा. 'बिल्फैल आं मेहेरबानांकडून ताण बसावा इतकाच तवक्कुफ.' –रा १९.७३. [ अर. तवक्कुफ् ]

**तवंग**—पु. १ पाण्यावर येणारा, पसरणारा ( तेल इ०काचा ) पातळ थर; तरंग; कोशेटा; तव. 'दानांबु तैलजतवंग सवंग झाले।' –र ५६. २ डोळयांत देणारा भुरीचा पापुद्रा; सारा. 'कामभोगाचे तवंगें। डोळया पातया पातें न लागे।' –मुविराट ३.१३३. **तवंगट**–वि. तवंगांनीं युक्त. [ सं. तवस् ]

**तवजोह, तवजेः**—न. लक्ष्य; अवधान; कृपादृष्टि; मेहेरनजर. 'तर तवजे करून या सोबत स्वारांचा दर्या ठिकाण लग वेऊनि तिकडून आरामसीर हत्ती घेऊन येत त बात केली पाहिजे.' –ब्रच २४. [ अर. तवज्जु=अवधान ]

**तवट**—न. धैर्य; धीर. 'या परी लोहदंतु पडला। स्वामी काई करीतु जाला। घाये बांधले ने तवटें। आपुला सारथी सावदु केला।' –उषा १४१७. [ तव ]

**तवणा**—पु. चरकांत घालून गाळण्यासाठीं केलेली उंसाचीं कांडीं; त्यांची रास. **तवणेकरी**–पु. तवणा करणारा; चरकांत घालण्यासाठीं उंसाचीं कांडीं करणारा मनुष्य. [ तवणा+करणें ]

**तवतवणें**—अक्रि. (अनेक किचकट कामें अंगावर पडल्यानें) कातवणें; चिडणें; जिकीरीस येणें; चरफडणें; तातवणें पहा. [ तव द्वि. ]

**तवताक–ग–ख**—वि. १ साजेसा; अनुरूप; यथायोग्य. २ तयार; सिद्ध. ३ बंदिस्त. ४ रेखीव. [ अर. ताक्=सज्ज, उत्कृष्ट ] **०पणा**–पु. अचूकपणा; अनुरूपता; बिनचूकपणा.

**तवतुक**—स्त्री. १ ( कर. ) त्वरा; लगबग; जलदी. 'तो तवतुक करून आला.' २–क्रिवि. (कर ) लगबगीनें; जलदीनें; त्वरित. 'तवतुक निघा.' [ तवताक ]

**तवना(णा)ळ**—वि. ( गो. ) उधळया; उच्छृंखल; कोणाचाहि दाब नसलेला.

**तवनी–नि**—स्त्री. पेज; कांजी. 'जो पुरवी ब्रह्मविद्येची तवनी।' –भाए ४. 'मरणा भेणें कल्हणी। टाकी अमृताची तवनि।' –ऋ१९.

**तवनो**—स्त्री. १ (महानु.) तावनी; तापविण्याचें भांडें. २ (ल.) पीडा. 'ते आजन्म दुःखकाळिची तवनी। करी ब्रह्मसुकाळांधनी। नाना भवपाश निर्वाणीं। छेदक शस्त्र जे।' –ज्ञाप्र २७. [सं. तपन; प्रा. दे. तवणी ]

**तवर**—स्त्री. मूर्च्छा; भोंवळ; घेरी. तव पहा. (क्रि० येणें).

**तवर, तंवर**—पु. अंकुर; कोंवळा कोंब.

**तवर**—पु. १ वीरश्री; आवेश. ( क्रि० धरणें; बाळगणें ). 'उमतीचा तवर केली झड घालुन तलवार।' –पला ७९ २ जोम; पाणी; तेज. 'शहर पुण्याच्या भररस्त्यामधें भरनवतीचा तवर नवा।' –पला ४.१२. ३ तोरा; ऐट; दिमाख. तऊर पहा. ४ तापटपणा; रागीटपणा; तळखपणा. [ अर. तहव्वुर् ] **तवरी**–वि. १तापट; रागीट. २ तिरसट; कुर्रेबाज. ३ वीरश्रीनें, आवेशानें युक्त; धाडसी. [ तवर ]

**तवर**—क्रिवि. त्या बाजूस; पलीकडील बाजूस; (प्र.) तवार. याच्या उलट अवार=अलीकडील बाजूला.

**तंवर–वरीं–तंवरीं**—क्रिवि. तोंपर्यंत; तोंवर; तोंपावेतों. 'तंवरी रे तंवरी भवगजाचें भान।' –दावि १४९. [ तंववर अप. ]

**तवरक, तव्हरलोक**—क्रिवि. ( व. ) तेव्हां. [ तंव ]

**तवरत**—क्रिवि. (व.) जलदीनें; लवकर; त्वरित.[त्वरित अप.]

**तवरें**—न. ( गो. ) कथील; टीन; निकल.

**तवलें**—न. १ ( गो. ) डोकें. २ लहान तवली.

**तवली**—स्त्री. १ ( खा. व. बे. ) धातूचें, मातीचें पसरट आकाराचें थाळीसारखें भांडें. टवळी, टवळें पहा. २ ( खा ) मडकें; तपेली. 'हांडे, कुंभ, पळया, परात, तवल्या, गुंडे तपेलीं घडे।' –सारुह ३.४३. 'तेव्हां तो सर्प चिरूनशेन तवली ठेविली चुलीवर।' –अफला ७१.

**तवली**—स्त्री. (गो.) टवका काढून नारळास पाडलेलें भोंक; टवळी अर्थ १ पहा. 'तान लागल्या जाल्यार अडसराची तवली मारून दिना.'

**तवल्लुद**—पु. जन्म. 'आमची नियत ईश्वरास मान्य होऊन माधवराव पन्तप्रधान यांचा तवल्लुद झाला.' –रा ५.८६. [ अर. तवल्लुद् ]

**तंववर**—क्रिवि. तोंपर्यंत. [ तंव+वर ]

**तवशी, तवशीण**—स्त्री. (कों. गो.) तवशाचा, कांकडीचा, पावसाळी कांकडीचा वेल. [ सं. त्रपुषी; प्रा. तउसी ]

**तवशें–सें**—न. १ तवशीचें फळ; कांकडी. ही मोटी व लांबट असून आश्विन महिन्यांत होते. –कृषि ५८२. ('अप्पाधप्पा' या

गाण्यांत) 'उतरली तवसं' २ तवसोळी पहा. म्ह० एक हात तवसें नऊ हात वी=अवाच्या सव्वा मारलेली थाप; सात हात लांकूड नऊ हात ढलपी; सांगोसांगी वडाला वांगी.

**तंवसर**—क्रिवि. (कु.) तोंपर्यंत; तंववर.

**तवसळी, तवसोळी**—स्त्री. तवशाचा, काकडीचा कीस, तांदुळाचें पीठ व गूळ घालून केलेलें पक्वान्न. पातोळा पहा.[तवशें+पोळी]

**तवसाड-ळ**—स्त्री. (गो. कु.) एक प्रकारचें भात; तांदुळाची एक जात.

**तवा**—पु. १ पोळया, भाकरी इ० भाजण्याचें लोखंडाचें, मातीचें वर्तुळाकार पसरट असें भांडें. 'भरत रडे मातेचा तो स्नेह हि तापला पर तवा या।' –मोरा हनुमद्रामायण १.४८४. २ कांठ व पदर वर्ज्य करून शेला, शालजोडी इ० वस्त्राचा मधला भाग; वस्त्राचें अंग. ३ (ल.) एकसारखा सपाट व विस्तीर्ण पातळ खडक; कातळ. ४ वृक्ष, खाचखळगे, उंचवटे इ० नीं विरहित असा जमीनीचा प्रदेश; सपाट भूप्रदेश. ५ रत्न इ० कांच्या कोंदणामध्यें रत्नाच्या खालीं बसविण्याचा सोनें, चांदी इ० धातूचा पत्रा; तकट. ६ दौलताबाद येथील किल्ल्यांतील काढताघालता पूल; उभ्या चढणीवर जिन्याच्या तोंडाशीं बसविलेलें तव्याच्या आकाराचें लोखंडी झांकण. शत्रूला येतां येऊं नये म्हणून याच्यावर विस्तव घालीत. ७ ओलांडण्याकरितां नाला, गटार इ० कांवर घातलेला पुलासारखा लोखंडी पत्रा. [सं तप्=तापणें; प्रा. तव; हिं. तवा; फा. ताबा] सामाशब्द– ०तोबरा–पु. १ (तवा आणि तोबरा) (ल.) प्रवासास आवश्यक सामुग्री, सामान; प्रवासाचें साहित्य. २ निर्वाह; उपजीविका. 'इकडे उत्पन्न झाल्यास तवा–तोबरा, न जाल्यास फाका.' –होकै १०५. 'परंतु फौजेचा तवा–तोबरा चालला पाहिजे.' –ख ६. २९१३. [तवा+तोबरा]

**तवा**—स्त्री. मूर्च्छा; घेरी. (विरू.) तव पहा.(क्रि० येणें).

**तंवा**—क्रिवि. (को.) तेव्हां; त्यावेळीं. [तव]

**तवाइ**—स्त्री. १ दंड; भुर्दंड. (क्रि० पडणें; भरणें; येणें). २ (व्यापार इ० व्यवहारांतील) नुकसान; तूट; बूड; खोट. 'आम्ही किती दिवस तवाई सोसावी.' –ख १२.६२७७. ३ संकटाचा प्रसंग; आपत्ति. 'स्वामीवर तवाई मोठी गुदरली आहे.' –ख ११.५९१०. (विरू.) तवई पहा. [फा. तवा–ई]

**तवाका**—पु. गळेबंद; तोक. तोक पहा. 'पायांत बेडी व गळयांत तवाका घालून कैदेंत ठेविलें.' –मसंब ११. [अर. तौक्=गळसांखळी]

**तवा(वां)का**—पु. ताकद; शक्ति; तकवा; सामर्थ्य. तकवा पहा.

**तवाजा-जू**—पु. १ बक्षीस; इनाम; नेमणूक. 'त्यांनीं दहा लक्षांची जहागीर तवाजा करून समजावीश केली.' –रा ५ २९. –रा २२.१०४. २ आदर; सभ्यपणाची वर्तणूक; सभ्य, अदबीचें, आदरयुक्त वर्तन. ३ (चुकीनें रूढ).(मुलें, गुरें इ० कांची)जोपासना; लाड; निगा. [अर. तवाझु]

**तवानणें**—अक्रि. १ (दुखण्यांतून उठल्यानंतर) पूर्ववत् निरोगी, सशक्त होणें. २ सशक्त, निरोगी बनणें; सुदृढ होणें. ३ तवाना, हुषार होणें. [फा. तवाना]

**तवाना**—वि. १ आजारांतून उठल्यावर, अशक्तपणा गेल्यावर निरोगी किंवा सशक्त झालेला; (आजार, दुखणें इ० कांतून) बरा झालेला. २ सशक्त; सुदृढ. 'वाघानें चार रुपये सम्पादून तवाना जाहला आहे.' –ख १२.६३९१. ३ ताज्या दमाचा; हुशार. 'फौज तवानी राखून बुनगेचा बचाव होय तोच अर्थ करावा.' –ख ५.२५०४. (ताजा या शब्दाबरोबर बहुधा उपयोग. उदा० ताजा तवाना). [फा.]

**तवानी, तवानी तलफ**—स्त्री. गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. राजकी देणी नसल्यास व पडचोर हुकूम करावयाचा असल्यास प्रथम नातवानी देणी दिल्यानंतर तवानी देणी द्यावयाची असते. [फा.]

**तवाफ**—स्त्री. प्रदक्षिणा. 'दर्ग्यांत जाऊन तवाफ करून ...' –रा ५.६५. [अर. तवाफ्]

**तवार**—क्रिवि. तवर; पलीकडील बाजूस; याच्या उलट अवार. [सं. तत्=तो+पार=बाजू, किनारा]

**तवारी**—स्त्री. (कु.) चांभाराचें एक हत्यार.

**तवारीख**—स्त्री. १ तारखा. २ इतिहास; बखर. [अर. तवारीख्=तारीखचें अव.] सामाशब्द– ०नामा–पु. इतिहासग्रंथ. 'अगर मुसल्मान कोणी असे तरी मोठे मोठे तवारीखनामे जाले असते.' –एटि १.१८. [तवारीख्+फा. नामा=पत्रक]

**तवालीयत**—स्त्री. जिम्मेदारी; हमीदारी. 'दर्या–मजकूरची तवालीयत.' –वाडसनदा ७७. [अर. तव्लियत्]

**तवी**—स्त्री. एका विशिष्ट आकाराचें धातूचें, मातीचें भांडें. तवली पहा.

**तवीर**—पु. एक प्रकारचें लहान झाड.

**तवें**—क्रिवि. तेव्हां; त्यावेळीं; तंव. 'तवें तया कृष्णा मनी मग वाटल विस्मय.' –गीताचंद्रिका १.२७. [तंव]

**तवेरदार**—पु. लांकूडतोडया; कुऱ्हाडवाला. –ब्रच ५५. [फा. तबर्दार्]

**तवेश-ष**—पु. रागाचा झटका, आवेश; त्वेष. [सं. त्वेष अप; तुल. अर. तैश्] –शी–षी–वि. रागीट; तामसी; संतापी; तापट. [तवेश]

**तव्हय**—क्रिवि. (खा.) तेव्हां. –भात्रे ७.१ ते ४.

**तव्हसन**—क्रिवि. (खा.) तेव्हांपासून. -भात्रै ७.१ ते ४. [तव=तेव्हां+पासुन]

**तशफ्फी**—स्त्री. समाधान; दिलासा. 'तुम्ही आमचे तर्फेनें यांची तशफ्फी व जिल्जोई करावी.' -रा २२ ८५. [अर.]

**तशरीफ-व, तशरीफलयाख**—तसरीफ इ० पहा.

**तशाडी**—स्त्री. (हेट.) नाश; ओसाडपणा. (क्रि० देणें).

**तशांत**—क्रिवि. तशा परिस्थितींत; तसें असतां. [तसा शब्दाच्या सप्तमीचें एव.]

**तशिशा**—पु. घोड्याच्या पायाच्या सुंभास होणाऱ्या नऊ रोगांपैकीं एक रोग. -अश्वप २.२७३.

**तशेला**—वि. तसला; त्या प्रकारचा; त्यासारखा. [तसला अप.]

**तशो**—वि. (को. राजा.) तसा; तशा प्रकारचा. [म. तसा]

**तश्कीस**—स्त्री. (वैद्यक) चिकित्सा. [अर. तश्खीस्]

**तश्रीफ, तश्रीफ**—स्त्री. बहुमानाचा पोशाख तसरीफ पहा. 'बरोबरी लढाईच्या तश्रिफा देऊन रवाना केले.'-सभासद ३०. 'मग हरकारेसी तश्रीफ देऊन रवाना केले.' -इमं ११. [अर.] ०ई-शरीफ-वि. हुजूर. **तश्रीफाखर्च**-पु. स्वारीखर्च. -वाडबाबा १.३५७.

**तश्वीश-स**—स्त्री. १ तोशीस; त्रास; तसदी; घस. तोशीस पहा. 'त्यास एक जरेचे तश्वीश व आजार लागूं न देणें. -रा १५.१५६. २ पीडा. 'रयतीस लायनी सिवीगाली न करणें व तश्वीस न देणें.' -रा १६.२९. [अर. तश्वीश्]

**तष्ट**—न. (अशिष्ट) लचांड; उपाधि; खेंकटें; शुष्ककाष्ठ. [सं. तक्ष्]

**तष्ट, तष्टित**—वि. १ तासलेला; छाटलेला. २ (अंकगणित) संक्षेप देऊन लहान केलेला (अपूर्णांक इ०). [सं. तक्ष्]

**तसदिक**—स्त्री. (व.) चौकशी; तपास. [अर. तस्दीक्]

**तसदिया, तसदी, तस्दी**—पुस्त्री. १ त्रास; तखलीफ; श्रम; मेहनत. २ तंगचाई; अडचण; ओढघस्तता. 'तिचे पोटापाण्याची बहुत तसदी होती.' -भाब १९. ३ कडक कैद. -मदरु १. ४ तगादा. -मनको. [अर. तस्दी]

**तसदूक**—पु. दान. 'नजरा व लोकांचे तसदूक सल्के जाले.' -रा ७.१२३. [तर. तसद्दुक्]

**तसनस, तसनाश-स**—पुस्त्री. नासाडी; धूळधाण; नाश; राखरांगोळी; हानि. 'त्यासी त्याचे तसनस होऊ नये.' -इमं ६. -वाडसमा १.१२४. [अर. तहस्-नहस्]

**तसबी**—स्त्री. मण्यांची, मोत्यांची माळ (सामा.) जपमाळ; स्मरणी. 'हातीं तसबी घेऊनि माळ। डोळे आरक्त केले विशाळ।' -भवि ५.९३. [अर. तस्बीह्=ईश्वरनामाचा जप]

**तसबो(वी)र, तस्वीर**—स्त्री. (एखाद्याच्या चेहऱ्याची, शरीरबांध्याची) हुबेहूब प्रतिमा; छबी; चित्र. [अर. तस्वीर्]

**तसमा-तस्मा**—पु. (ना.) (घराचा) खण; भाग. चश्मा अर्थ ४ पहा.

**तसर**—स्त्री. १ एक क्षुद्र कीटक; पतंग. २ जाडथाभरड्या रेशमाची एक जात. टसर पहा. [सं. त्रसर=धोटा; हिं. तसर] -**राऊ-राव**-न १ एक प्रकारचें जाडें रेशमी कापड. २ जाड्या-भरड्या रेशमाचें-नेसण्याचें एक वस्त्र. [तसर] **तसरी**-वि. तसर रेशिमाचें केलेलें. [तसर]

**तसर**—न. १ ऐनजिनसी साऱ्याच्या ऐवजीं शेतकऱ्यानें सरकारास द्यावयाची वसुलाची नक्त रकम; ही ऐन गल्ल्याच्या एक-चतुर्थांश असे. याला कोंकणांत नक्तखंड म्हणतात. 'चवथाई गल्याचे तसरें दर खंडीस रुपये पंधराप्रमाणें.'-वाडसमा २.२३१. सामाशब्द- ०कोंबडा-भोंपळा-पु. सरकारी अधिकारी सरकारी कामानिमित्त एखाद्या गांवीं गेला असतां त्याच्या सरबराई-करितां गांवकऱ्यांनीं द्यावयाचा कोंबडा, भोंपळा किंवा भाजी.

**तसराळें**—न. उथळ वाटीच्या आकाराचें धातूचें एक प्रकारचें पसरट भांडें. [सं. स्तृ+सं. आलय; म. आळें]

**तसरी**—स्त्री. (कों.) १ वांगीं, मिरच्या इ०कांच्या रोपांस पाणी देतां यावें म्हणून त्यांच्या दोन रांगांमध्यें खणलेली लांबट खळी, खांचण; बागेंतील पाण्याचा पाट. २ पाण्यांतील शिंपाच्या जातीचें दोन पाख्यांचें शिंप; द्विदल शिंप. [सं. स्तर]

**तसरीफ-व**—स्त्री. १ गवई, तमासगीर इ० लोकांस (राजे लोक खूष होऊन) देतात तें मानाचें वस्त्र, पोशाख इ० (सामा.) अहेर; नजराणा. 'पावल्याचा जाब दिधला लिहून। तसरीफ देऊन पाठविला।' -तुगा ४४३६. २ गांवकामगार, सरकारी नोकर इ०कांना बहुमानाचा पोशाख इ० देण्याचा विधि. ३ बहुमानाचीं वस्त्रें, जिन्नस, इ० ४ बहुमानाच्या पोशाखाऐवजीं दिलेलें वतन, जमीन. ५ (गो.) भेट; नजराणा (फळें, मिठाई, इ०चा). [हिं.अर. तश्रीफ्] ०लयाख-वि. नजर करण्यास योग्य (वस्त्र, पोशाख इ०).

**तसरुफाती**—स्त्री. १ अधिकार. 'भोगवटे तसरुफाती चालत आले आहे.' -इमं ४४. २ ताबा; कबजा; भोगवटा. 'फर्मान व भोगवटे याचे कागद होते ते जलाले, व आपण दुकालाकरितां कासीस गेलों होतों त्याकरितां तसरुफाती अजी तागाईत नाहीं.' -रा २०.३१८. [फा. तसर्रुफात्]

**तसरूफ**—पु. १ ताबा; अंमल; कबजा. 'मकर-फरेब करून आपला तसरूफ केला.'-दिमरा १.५४. ४ -वि. स्वाधीन; ताब्यांतील. 'त्यांच्या भरंवशावर येथील रयतेस उजाड करोन लाखों रुपये तसरूफ केले.' -दिमरा २.१८५. [अर. तसर्रुफ्]

**तसलमात, तसल्मि(ली)मात**—तस्लिमात पहा. –वि. (जमाखर्चात) मोघम; अमानत. –शअ. कडोन; मार्फत; गुजारत अर्थ ३ पहा. 'तसलमात श्रीनिवास त्रिंबक कारकून शिलेदार. –वाडसमा १.४०. [अर. तस्लीमात्–तस्लीम=सलाम याचें अव.] **०खातें**–न. एखाद्याला दिलेल्या रकमेचा पक्का हिशेब येण्यापूर्वी ज्या खात्यांत ती रक्कम टाकतात तें खातें.

**तसला**—वि. तसा; तशा प्रकारचा; त्यासारखा. [तसा]

**तसलीम, तस्लीम**—स्त्री. वंदन: प्रणाम; नमस्कार: रामराम; सलाम. 'तसलीम करुनियां जाता झाला।' –अमृत ८८. 'बयाजी शिंदे यांनीं उठोन तसलीम केली.' –भाव ६१. [अर. तस्लीम्]

**तसल्ली**—स्त्री. समाधान; खातजमा. 'परंतु दुसरा सर्दार आल्याखेरीज पातशाहांची तसल्ली होत नाहीं.' –दिमरा १. २५९. [अर.]

**तसवळ**—स्त्री. पात. –बदलापूर २८३.

**तसवीर**—स्त्री. तसबीर पहा.

**तसा**—वि. १ त्या प्रकारचा; त्यासारखा; त्या जातीचा. –क्रिवि. १ तशा प्रकारें; त्या प्रकारानें; तशा रीतीनें; त्या प्रमाणें. २ त्याक्षणीं; त्यासरसा; तत्काळ; लागलीच; ताबडतोब. 'वाघ आला तसा मी घाबरलों.' 'जेवलों तसा आलों.' त्या मार्गानें; त्या दिशेनें; तो मार्ग, दिशा धरून. 'आम्ही असे जातों, तुम्हीं तसे जा.' ४ वाक्यपूरक, वाक्यालंकारार्थक शब्द. 'जो तसा मारीन.' (जसा शब्दाबरोबर उपयोग) [सं. तत्+सदृश; तत्+सम]

**तसू–सूं**—पुन. गजाच्या एक–विसांश किंवा एक–चौविसांश अंशाइतक्या लांबीचें एक परिमाण. साधारणतः अनामिका व मध्यमा यांच्या रुंदी इतकी याची लांबी असते; द्वयंगुळ. [फा.]

**तसेर**—न. नक्त खंड; नक्त सारा. तसर पहा.

**तसेला**—वि. त्या सारखा; त्या प्रकारचा. (प्र.) तसला पहा. [तसला अप.]

**तस्कर**—पु. चोर; लुटारू. [सं.] सामाशब्द–**०विद्या**–स्त्री. चोरी करण्याची विद्या, शास्त्र, कौशल्य: ठकबाजी. 'तुम्ही ठक चोर आणिला घरा। तो तस्करविद्येमाजी पुरा।' –शनि १६४. [तस्कर+विद्या] **तस्करी**–स्त्री. चोरी; तस्कराचें कृत्य. [तस्कर] म्ह० मस्करी करितां तस्करी होते=थट्टेनें चोरून ठेवलेला जिन्नस पुढें चोरीचा जिन्नस होतो.

**तस्करणें**—सक्रि. चोरणें. –माज्ञा ११.५४८. (पाठ.) [तस्कर]

**तस्करनिशी, तस्करनीस**—तजकरनिशी इ० पहा.

**तस्करपंत**—पु. तजकरनीसास विनोदानें दिलेलें टोपण नांव. [तजकर(अप)+पंत]

**तस्करा**—पु. फिर्याद; तकार. तज्करा, तजकरा पहा. 'त्याजवर हुजूर कोणी तस्करा केला कीं...' –ख ७.३६९०. [अर. तजकरा अप]

**तस्त**—न. हात, तोंड इ० धुतांना पाणी सांडण्याचें, थुंकण्याचें रुंद तोंडाचें भांडें; पिकदाणी; गंडूषपात्रक. –राव्य १.२६. 'पंखे, मोरछलें, कितेक निवडीं तस्तें प्रशस्तें पुसे।' –सारह ३.४४. [फा. तश्त्]

**तसदिया, तस्दी, तस्ती**—तसदिया, तसदी इ० पहा. 'येथें वैरणीची तस्दी फार जाली आहे.' –रा ६.३९२.

**तस्दीक**—पु. दान. तसदूक पहा. 'तमाम लोकांनीं सतके नगदी रुपये व खुर्दा व उडीद, तेल, तीळ वगैरे जिन्नस तस्दीक केले.' –रा ७.१२०. [अर. तसद्दुक्]

**तस्फिया**—पु. १ मैत्री; स्नेह. २ समेट; तह. 'रफेशर केला व तस्फियाचा नक्षा ठराविला.' –वाड–कैफियती १००. ३ (ना.) निकाल; निर्णय. [अर.]

**तस्बी**—स्त्री. स्मरणी; जपमाळ; तसबी पहा. [अर. तस्बीह्]

**तस्बी**—स्त्री. स्वरूपसाधर्म्य. [अर. तश्बीह्]

**तस्बीर**—स्त्री. छबी; प्रतिमा; चित्र. तसबीर पहा. [अर. तस्बीर]

**तस्मा**—पु. १ चामड्याची वादी, पट्टा. २ समईखालीं ठेवावयाचा चामड्याचा वर्तुळाकार तुकडा.

**तस्मा**—पु. (ना. व.) घराचा खण; दोन खांबांमधील जागा; तसमा. चश्मा अर्थ ४ पहा. [चश्मा]

**तस्मागर्दन**—वि. चोहोंबाजूंस मान फिरविणारा (घोडा). हा वाईट समजला जातो. –अश्वप १.१०४. [तस्मा=वादी+गर्दन]

**तस्मात**—क्रिवि. १ म्हणून; त्यामुळें; त्या कारणास्तव. २ (गो.) तशांत; तितक्यांत. [सं. तत् या पुल्लिंगी सर्वनामाच्या पंचमीचें एकवचन]

**तश्रीफ, तश्रीफ**—स्त्री. आगमन. 'जूद आं यक्बाल–पन्हांनीं या जिल्ह्यास तश्रीफ फर्मावावी.' –पया ३८७. [फा. तश्रीफ्]

**तस्लमात, तस्लीम, तस्लीमात**—स्त्री. १ वंदन; रामराम; सलाम. २ देणगी; बक्षीस; इनाम. 'समस्त ल्हानथोरीं तस्लीमात बज्या आणिली.' –ऐटि १६५. 'हैदरखान यास पंच हजारीची तस्लीमात जाली.' –रा १.१७९. ३ मोघम खर्ची; खर्चाकरितां अमानत दिलेली रक्कम. 'ती जागा तानाजी येवला याचे तस्लीमातीस दिली आहे.' –रा १२.१८३. ४ तावा; कबजा; दिम्मत 'ज्याचे तस्लमातीस जे हत्यार असेल त्याची चौकशी राखीत जावी.' –भोंकु ४०. ५ उपयोग; उपभोग. तसलमात पहा. [अर. तस्लीम्=याचें अव.]

**तह**—पु. १ दोन युध्यमान पक्षांतील शत्रुत्व नाहींसें होऊन झालेला सलोखा; समेट; सख्य; ऐक्य. २ संमति; अनुमति; मान्यता; पसंति. ३ सरकारी जुजबी कायदा; नियम. ४ वहिवाट; ठराव. ' देशमुखापासून दिवाणांत वसूल घ्यावया तह आहे. ' —इमं १५५. [फा. अर. तहीया=व्यवस्था; सामुग्री ?] सामाशब्द— **०नामा**-पु. तहाविषयींचें करारपत्र; दोन पक्षांतील तहाच्या ठरावाच्या अटींचा लेख. **०बाजारी**-स्त्री. एक कर; बाजारांतील दुकानच्या जागेचें भाडें. ' तफरीफ व तहबाजारी व सायेर रहदारी व भेट.' —वाडबाबा १.३५. **तह ब मोजीब**—क्रिवि. तहाप्रमाणें. ' हिसेदारांचा हिसा तह ब मोजीब देत जावा. ' —वाडसमा १.१५६.

**तह**—पु. गादी, उशी इ०कांवरील आच्छादन, अभ्रा; गादी, उशी इ०कांवरील खोळीस लावलेलें ठिगळ.

**तहकीक**—स्त्री. १ सत्य; निश्चिति; निर्णयात्मक सत्य; खरी हकीगत. ' कांहीं कदीम सनद असेल ते हुजूर आणून दाखवावी त्याजवरून तहकीक होईल. ' —रा १४.४. 'परंतु तहकीक कळेना.' —भाब १२४. २ खात्री. ' तहकीक करून आकार होईल त्याप्रमाणें खर्च लिहिणें म्हणोन. ' —वाडबाबा २.१८८. -वि. निश्चित; खरें. [अर. तह्कीक्] **—कात**—स्त्री. १ चौकशी; तपास; सत्यान्वेषण; शहानिशा. ' सदर्हू गोष्टीची तहकीकात लाविली. ' —रा १८.६०. ' धाकटे नाना व गोविन्द शिवराम तहकीकात करितां तो (=तोतया जनकोजी) थोरात रघोजी असा ठराव झाला. ' —ख २.६३१. २ हकीकत. ' दिघा मजकूराची तहकीकात मनास आणतां. ' -वाडबाबा २.१५. ३ खचिती; खात्री; निश्चितपणा. [अर. तह्कीक् अव.]

**तहकुबी**—स्त्री. कांहीं काळापुरती बंदी; खळ; खंड; थांबवणूक. तकुबी पहा.

**तहकूब-प, तहकूबचिठ्ठी**—तकुब इ० पहा. ' लढाई तहकूब करितों. ' —मराचिथोशा ५०. [अर. तवक्कुफ्]

**तहगिरी, तहगीर**—स्त्री. बडतर्फी; पदच्युति. तगिरी, तगीर पहा. ' न्याहारखानाचें वाईचें ठाणें तहगीर जहालें. ' -इमं ३६.

**तहद-त**—१ पर्यंत; पावेतों; थेट; त्या हद्दीपावेतों. ' पुढेंही श्री अहद रामेश्वर तहद दिल्ली यश देईल. ' —ब्रप २५३. २ तहदच्या जोडीला पर्यंतहि द्विरुक्तीनें लावतात. ' तहद अजंठेपर्यंत. ' —वाडसमा २.१६२. [फा. तह=खालीं+हद्द]

**तहदम**—वि. बेजार; बेदम. ' दोघे पाटील मारून तहदम केले. ' —पेद १८.८८. [अर.]

**तहदल**—वि. (व.) तयार; सिद्ध.

**तहनाल**—न. १ तरवार इ० शस्त्राचें म्यान. —शर. २ म्यानाचें टोंक; म्यानाच्या अग्रास बसविलेलें चांदी इ० धातूचें टोपण. —वाडसमा १.२४९. [फा. तह्नाल्]

**तहबंद**—पु. वार्षिक खर्चाचें अंदाजपत्रक; ताळेबंद. [तह+बंद]

**तहमु(मू)ल**—पु. १ ढिलाई; सहन करणें; सहिष्णुता. 'आपण सबुरी करून तहमूल करावयास तक्सीर केली नाहीं.' —इमं ६७. [अर. तहम्मुल्]

**तहरीर**—स्त्री. १ कारकुनाच्या खर्चासाठीं देशपांडे इ०कांच्या स्वाधीन केलेली गांवकींतील रक्कम; हक्क. मराठी राज्यांत फडणीस व मुजुमदार यांनाहि ही देत असत. २ लिखाण; वर्णन. [अर. तह्रीर्]

**तहरीर**—स्त्री. तक्रार. 'सदरहू मुकदम्यासंबंधीं कागदपत्राचा वाकबगार कारकून मिळण्याविषईं बरीच तहरीर केली. ' —विक्षिप्त २.१३१.

**तहवील, तहवेल**—स्त्री. १ उष्ट्रखाना, पीलखाना इ० अठरा कारखान्यांच्या खर्चाचें सदर. २ अठरा कारखान्यांचा समुदाय. ३ सरकारी कोठी; भांडार. ' जडाव तहवेल पैकीं. ' —वाडमा १.७७. ४ रोकड; नगदी; भांडवल; पुंजी. [अर. तह्वील]

**तहशी(सी)ल**—स्त्रीन. १ वसूली; जमाबंदी; सरकारी सारा वसूल करण्याचें काम. 'तहसिलीस प्यादे सर्कारचे देविले जातील.' —सासंइ-जुलै ९१. २ रयतेनें सरकारास द्यावयाचा सारा; सरकार देणें. ' स्वानुभवाची तहसील निकी । रसद स्वामीसि दिधली शेखीं । ' —भवि ४५.६७. ३ वसूल झालेल्या साऱ्याची रक्कम. ४ कोणापासून व किती सारा वसूल करावयाचा, किती केला इ० माहितीचें कुळकर्ण्याजवळ असलेलें पत्रक. ५ (ना. व.) तालुका. [अर तह्सील्] सामाशब्द— **०दार**-पु. सारावसुलीचें काम करणार अधिकारी; मामलतदार. [फा. तह्सील्दार्] **०दारी**-स्त्री. तहसीलदाराचें काम; हुद्दा; मामलतदारी. [फा.]

**तहा-हां**—क्रिवि. १ तेथें; त्या ठिकाणीं. ' तहां त्यानें दाराशी अहंकाराना झाड हता. ' —मसाप २.१.३१. ह्या शब्दाच उपयोग फक्त सरकारी कागदपत्रांतून व वरिष्ठ अधिकारी कनि अधिकाऱ्याच्या हुद्यापूर्वी किंवा तेली, वाणी इ० व्यापाऱ्यांच्य नांवापूर्वी करतात. उदा० तहा पाटील; तहाचौगुला; तहातेली तहावाणी इ०. २ (कातवडी. ठाणें) तेव्हां; मग; नंतर. ' तह राजा काय बोले. ' —मसाप २.१.३१. [हिं.]

**तहादार**—वि. १ ज्याची घडी अद्याप मोडलेली नाहीं असे (नवें लुगडें, मंदील, शाल, परटाकडून धुवून आलेला अंगरखा वस्त्र इ०); नवाकोरा; कोराकरकरीत. २ (चुकीनें रूढ) ताजा शिळा नसलेला. [फा. तह्=घडी; तह्दर्=नवा]

**तहाहर**—वि. तहादार अर्थ २ पहा.

**तहान**—स्त्री. लहान मुलाच्या डोक्यावर थंडाव्यासाठीं ठेवावयाचा पानांचा ठेचा किंवा दुधाची घडी. (क्रि० घालणें; काढणें)

**तहान**—स्त्री. १ पाणी पिण्याची इच्छा; तृषा; तृष्णा. २ (ल.) इच्छा; आकांक्षा; आशा. 'वसाहतीच्या स्वराज्याविना हिंदुस्थानची तहान कशानेंही भागणार नाहीं.' –केसरी १७.५. ३०. [सं. तृष्णा; प्रा. तण्हा] (वाप्र.) **०घालविणें-मोडणें**–तहान शांत करणें. **तहानेला**–वि. तहान लागलेला; तृषित; तहानेनें पीडलेला. **म्ह०** तहान लागल्यावर विहीर (आड) खणणें=आयत्या वेळीं जरूरीची वस्तु शोधणें; संकट गुदरण्यापूर्वी त्याचा उपाय शोधून न ठेवून आयत्यावेळीं धांवाधांव करणें. सामाशब्द– **०मोड**–स्त्री. १ जनावर, मनुष्य पाणी पीत असतांना त्याची तहान शांत होण्यापूर्वीच त्यास पाणी पिण्यास प्रतिबंध करणें. २ वर सांगितल्याप्रमाणें मोडलेली तहान. ३ थोडेंसें पाणी पिऊन तहान तात्पुरती शमविणें. ४ तृष्णेचें, वासनेचें–ती तृप्त करून–निर्मूलन होणें. [तहान+मोडणें] **०लाडू भूकलाडू**–पु. भूक तात्पुरती शमविण्यासाठीं खावयाचे फराळाचे पदार्थ; लाडू इ० फराळाचा जिन्नस. 'तिनें आपल्या मुलास तहानलाडू भूकलाडू करून दिले.' –लोक २.५०. **तहानणें-नेणें**–अक्रि. (ल.) तहान लागणें; तृषाक्रांत होणें. [तहानणें]

**तहांहयात-द**—क्रिवि. यावज्जीव; आजन्म; आयुष्यभर; मरेपर्यंत (हा शब्द वतन, इनाम, करार इ०कांच्या दस्तऐवजांत योजितात). [फा. ता–हायात्]

**तर्हा**—क्रिवि. (खा.) त्या दिवशीं; तधीं. [सं. तदा]

**तळ**—पु. १ (एखाद्या पदार्थाचा) खालचा भाग, बूड. २ जमीन; जमीनीचा पृष्ठभाग. 'दोन्हीं दळभारां वेषतां। तो प्रद्युम्ने (प्रद्युम्नें) आणीला तळा।' –उषा १४१५. ३ (झाड, छपर इ० कांच्या) खालील जागा, जमीन. 'लपे आत्मभ्रांतिछाया। आपणयां तळीं।' –ज्ञा १६.१०. ४ सैन्य; स्वारी इ०कांची मुक्कामाची जागा छावणीचा गोठ; शिबिर; कँप. (क्रि० घालणें, देणें; मांडणें; धरणें; पडणें; येणें; सोडणें). 'महाराणीसाहेबांचा तळ बडोदें मुक्कामीं ज्या राजवाड्यांत मुक्काम असेल तेथील पाहरे' –बडोदें, राजमहाल, कामगारी–कारकून नियम ७. ५ पृष्ठभाग; सपाट भाग. जसें–हाताचा पायाचा, तळ. 'ऐसे वारी हे सरळ। करचरणतळ।' –ज्ञा १४.१०३. 'पृथ्वीतळ उलथों पहात।' –ज्ञा १.१५६. ६ व्यापारी, प्रवासी, लमाण, गाड्या, घोडीं इ०कांच्या मुक्कामाची जागा, अड्डा. ७ एखाद्या ठिकाणीं कांहीं काळ झालेलें सैन्याचें वास्तव्य; मुक्काम; छावणी; कँप. ८ एखाद्या पदार्थाच्या राशीनें व्यापलेली जागा; पदार्थ ज्या ठिकाणीं असेल ती जागा. (पदार्थ हलवितांना, तेथून दुसरीकडे नेतांना सापेक्षतेनें या शब्दाचा उपयोग करतात). 'आंबे सगळेच नेऊं नकोस, कांहीं तळावर ठेव.' ९ विस्तृत व सपाट भूभाग; मैदान; सपाट प्रदेश. 'या तळाची प्रदक्षिणा चार कोसांची आहे.' बूट, जोडा इ० कांचा खालचा (ज्यावर पाय टेकतात तो) भाग; तळवा; जोड्याच्या तळव्यांतील चामड्याचा तुकडा. ११ (–न.) कुंभाराच्या चाकाच्या मध्याची फळी. १२ नाश; रसातळ. 'मानी मेलाचि जरी दुर्जेय तरि निजशतात्मजरिपु तळा।' –मोस्त्री २. २२. १३ (वणजारी) तांडा. [सं. तल; फ्रें. जि. तलै=खालीं, आंत] (वाप्र.) **०करणें**–मुक्काम करून राहणें; डेरा देणें; बिऱ्हाड लावणें. **०घालून बसणें**–१ (एखाद्या ठिकाणीं) कायम वस्तीच्या इरायानें राहणें, उतरणें; आसन, ठाण मांडणें. २ दुसऱ्याचा पैसा गिळंकृत करून, लबाडीनें बेदरकारपणें स्वस्थ आणि निर्धास्त राहणें. तळ मारणें. **तळची-तळगायाची आग मस्तकास जाणें**–(कर्त्याची षष्ठी) रागानें नखशिखांत संतप्त होणें; अतिशय राग येणें. **तळचें मडकें हाणणें-फोडणें**–(मडक्याच्या उतरंडींतील सर्वांत खालचें मडकें फोडणें) (ल.) मुळावरच घाव घालणें; समूळ नाश करणें. **०झाडणें**–(ल.) (सर्व सामग्री, बेगमी इ०) खाऊन फस्त करणें. **०थांबणें**–(एखाद्याचें) आसन स्थिरावणें; जन्माची सोय लागणें; थाऱ्यास, ठिकाणीं लागणें (कर्त्याची षष्ठी). **०न थांबणें**–(कर्त्याची षष्ठी) एखाद्याच्या पायाला भोवरा पडणें; बूड स्थिर नसणें; भटकभोंवरी करणें. **०मारणें**–तळ घालून बसणें; अर्थ २ पहा. **०लागणें-पडणें**–(कर्माची षष्ठी). (सामग्री, बेगमी इ०) जवळ जवळ फस्त होणें, संपण्याच्या बेतांत येणें. **तळावर बसणें-राहणें**–१ विपन्नावस्थेस येणें; अवदशेस येणें; अकिंचन होणें. २ (ल.) घरीं बसणें; समाईकीच्या वांटणींतील भागास मुकणें (चोर, लुटारू त्यांच्यापैकीं घरीं बसणाऱ्यास लुटीचा कांहींही भाग देत नसत त्यावरून.) ३ धंद्याच्या ठिकाणीं, नेहमीच्या जागीं असणें. (एखाद्यास) **तळावर बसविणें**–एखाद्यास समाईक वांटणींतील भाग न देणें; त्याच्या कपाळीं वाटाण्याच्या अक्षता लावणें. सामाशब्द– **०काठी**–स्त्री. शिडाचें कापड तळाशीं लांब ताणण्याकरितां वापरलेली काठी. **०कोंकण**–न सह्याद्री आणि समुद्र यांमधील देश; कोंकणपट्टीचा दक्षिण भाग; गोवें मुलुख व त्याजवळचा प्रदेश. **०खंड**–न. (कों.) १ जात्याची खालची तळी; (सामा.) जात्याच्या दोन तळ्यांपैकीं कोणतीहि एक याअर्थी खालचें वरचें तळखंड असाहि शब्द प्रयोग करतात. २ खालचा भाग; तळ; उदा० भिंतीचें तळखंड. ३ फणसाच्या चारखंडास आंतून चारीसारखा अंश (पाती) असतो व वर कांटे असतात त्यांच्यामध्ये जो दळदार भाग असतो तो. **०खडा**–पु. खांब ज्यावर बसवितात तो दगड; उखळ्याचा दगड. **०खप**–पु. (माल, व्यापारी जिन्नस इ०कांचा) स्थानिक, तळावर होणारा, गावांतल्या गांवांत होणारा खप. 'या मालाचा तळखप कमी.' –मुंव्या ४१. **०घर**–न. १ घराच्या तळमजल्याच्या खालीं (जमीनीच्या पोटांत) मनुष्य इ०कांस राहण्यासारखें केलेलें स्थळ; खोली; दालन; भुईघर. २ (कु.) माडी

असलेल्या घराचा तळमजला. -शास्त्रीको. ०**घाट**-पु. १ पर्वताचा पायथा. पर्वताच्या पायथ्यालगतचा प्रदेश; घाटबुडी पहा. सह्याद्रीखालचा प्रदेश. [तळ+घाट] ०**चेपणी**-स्त्री. १ धान्याचा कणगा इ० कांचे तळ धान्य इ०कानीं भरून, चेपून सारखें करण्याचा व्यापार. २ एखादें मोठें भांडें, कणगा इ० कांचें बूड व्यापेल इतकें पदार्थ धान्य इ०कांचें परिमाण. 'घागरभर रसानें या काहिलीची तळचेपणी मात्र होईल.' [तळ+चेपणी] ०**जमीन**-स्त्री. भातजमीन. -शे ३.४. [तळ+जमीन] ०**झाडा**-पु. १ (घर, खोली इ०) पूर्णपणें रिकामें करणें. २ खालपासून वरपर्यंत, कोनाकोपऱ्यांतून केलेली, घेतलेली (घर इ०कांची) झडती; झाडा; तपासणी. ३ (खाद्य पदार्थ, धान्याची बेगमी इ०). खाऊन फस्त; चट्ट, निःशेष करणें; (सामा.) (एखाद्या पदार्थाचा, बेगमीचा खाऊन केलेला) चट्टामट्टा; निःशेषता; फन्ना; फडशा. ४ (स्वयंपाक, यज्ञ, इमारत इ०करितां) जमीन झाडून, सारवून, साफसूफ करण्याची क्रिया. ५ (सैन्य इ०काचा) मुक्काम उठल्यानंतर ज्या ठिकाणीं तळ असेल तेथें कांहीं जिन्नस वगैरे राहिला आहे कीं काय हें पाहण्याकरितां केलेला शोध; तपासणी; तळशोधणी. ०**तूट**-स्त्री. व्यापारी जिन्नसांची स्थानिक तूट; तुटवडा. 'तोच माल खरेदी करून पाठवा असें लिहिल्यास त्या निशाणीचा माल बाजारांत तळतूट असल्यास कमी किंमतीचा माल असला तरी ज्यास्त किंमत देऊन घ्यावा लागतो. -मुंव्या ५३. ०**पाय**-पु पावलाचा खालचा भाग; पायाचा तळवा. ०**पायाची आग मस्तकास जाणें**-तळची आग मस्तकास जाणें पहा. ०**पूस**-स्त्री. १ खाद्यपदार्थ खाऊन सप्पा, फस्त, निःशेष करणें; (सामा.) (खाद्यपदार्थाचा खाऊन पाडलेला) फडशा; फन्ना; चट्टामट्टा. तळझाडा अर्थ ३ पहा. २ नायनाट. [तळ+पुसणें] ०**बूड**-१ वृक्ष इ० कांचा बुंधा; तळ; खालचा भाग. 'तंव तंव होती थोराडें। अकर्माचीं तळबुडें। आणि जन्मशाखा पुढेंपुढें। घेती धांव।'-ज्ञा १५.१६८. २ खळ्यांतील, धान्याच्या पेंवांतील (धान्य इ० नें युक्त) गाळसाळ; गदळ; झाडणी. हा महारांचा हक्क असतो. ०**वट**-पुन. १ माळ जमीनीचा प्रदेश; मैदान. २ डोंगराच्या पायथ्यालगतचा सपाट भूप्रदेश. ३ खालचा भाग; अधोभाग. 'ना तरी कढेयातळवटीं। जैसा आपुलाचि बोलु किरीटी। पडिसादु होऊनि उठी। निमित्तयोगें।'-ज्ञा ४ ७५. (इमारत इ०कांचा) पायाचा भाग; पाया. 'पाया शोधूनि धरातळीं। तळवट बांधिला रत्नप्रवाळीं।'-मुसभा २.२३. ०**वटीं**-शअ. खालीं; खालच्या भागांत. 'आकाशचि वर्षे नीर। तें तळवटीं बांधे नाडर।'-ज्ञा १८.३२२. 'कुंकुमातळवटीं टिक लागे।' ०**वणी**-न. (क्व.) जमीनीवरील (नदी, नाले, ओढे, तळीं इ० कांचें) पाणी. 'वळवणी आलें तळवणी घेऊन गेलें.' [तळ+पाणी] ०**वाट**-स्त्री. भुयाराची वाट; चोरवाट. ०**शोधणी**-स्त्री. सैन्य इ० कांचा तळ उठल्यानंतर त्या ठिकाणीं कांहीं राहिलें कीं काय तें पुरतेपणीं पाहण्याची क्रिया; तळझाडा अर्थ ५ पहा. [तळ+शोधणें] ०**सरा-सरी**-स्त्री. खांबाचा तळखडा; उथळा. ०**सांड**-क्रिवि. जमीनीपासून निराळें; तळापासून उचललेल्या स्थितींत (ओझें इ० असणें); जमीनसांड; भुईसांड. [तळ+सांडणें]

**तळहात, तळात-थ, तळाटा-ठा**-पु. हाताचा तळवा. [तळ+हात] ०**हातचा, हातावरचा फोड**-पु.(ल.) अत्यंत प्रिय व नाजूक वस्तु; अत्यंत प्रिय व जिव्हाळ्याची व्यक्ति (तळहातावर झालेल्या फोडास किंचितहि धक्का लागूं नये म्हणून आपण फार जपतों यावरून). **तळहाताच्या फोडासारखें वागविणें-बाळगणें-मानणें**-(एखाद्या वस्तूची, व्यक्तीची) अतिशय काळजी घेणें; जिवापाड जपणें. **तळहाताचा मळ**-पु. (ल.) अल्प श्रमानें होणारें कोणतेंहि काम; सहज लीलेनें करतां येण्याजोगी गोष्ट. 'चित्रें काढणें हें त्याला तळहाताच्या मळाप्रमाणें आहे.' या अर्थी हाताचा मळ असाहि शब्दप्रयोग रूढ आहे.' **तळहाताला केंस येणें**-अशक्य गोष्ट शक्य कोटींत येणें (तळहाताला कधींच केंस येत नसतात त्यावरून हा अर्थ). **तळहाताला केंस न येणें**-असमर्थ नसणें; अंगांत धमक असणें. **तळहातावर शीर घेणें**-जिवाची तमा न बाळगणें; (एखाद्या कार्यासाठीं) मरणहि पत्करण्यास तयार होणें. **तळाची आरी**-स्त्री. (चांभारधंदा) जोडयाचा तळ शिवण्याची आरी. **तळातळ**-न. सप्त पातालांपैकीं चौथें पाताल. तलातल पहा. 'इणें जे नर बुडविले। ते नेले तळातळा।'-जै ६४.१९. [सं. तलातल]

**तळकट**—न. ताम्रन. 'लोखंडाचें तळकट वेळेवर सापडायचें नाहीं.' -अस्तंभा ११६.

**तळकट**—वि. १ तळलेला. २ तळल्याचा वास येणारा(पदार्थ); तळलेल्या पदार्थाच्या वासासारखा (वास). [तळणें]

**तळकट-टी**—नस्त्री. (कों.) १ चटईचा, आंथरीचा तुकडा; (राजा.) तळकर. (गो.) तळकुटें. २ ताडाच्या, माडाच्या झावळीचा उभा चिरलेला अर्धा भाग. [सं. ताल=ताड; तल+कट अल्पार्थी]

**तळकर**—न. (राजा.) आंथरीचा तुकडा; लहान चटई; तळकट अर्थ १ पहा.

**तळका**—पु. १ निजण्याच्या उपयोगाची लहान चटई; आंथरीचा तुकडा; तळकट पहा. 'सांडला माझा फाटका तळका, कशी मज ढेकणें खाली गे।'-एकनाथपदें ? २ चपाती; चांदकी; लाटी. ३ चामडी भाजल्यानें त्वचेला आलेला फोड, फुगोटी. ४ फुगलेल्या पोळीचा पापुद्रा. ५ जोडयाच्या तळाचा फाटून फाटून निघालेला तुकडा; पापुद्रा; (सामा.) कापून निराळा केलेला सपाट, चापट तुकडा; काप. (क्रि० उडणें; निघणें; जाणें; काढणें; घेणें).

६ (उभें पीक असलेल्या शेतांतील) पीक कापलेला भाग; (शेतांतील) पीक नसलेला, मोकळा तुकडा; (सामा.) (पेरणी, नांगरणी, कापणी, निंदणी इ० वाचून राहिलेला) शेत जमीनीचा तुकडा. ७ आंब्याचा अर्धा काप. (क्रि० कापणें; काढणें; निघणें). [तळ]

**तळका**—वि. तळलेला; तळून काढलेला. तळकट पहा. [तळणें]

**तळकाट**—स्त्री. (कु.) झरलेली, झिजलेली वहाण. [तळ]

**तळकुटें**—न. चटईचा ल्हानसा फाटका तुकडा. तळकट पहा.

**तळकें**—न. धान्याची रास कोठारांत भरल्यानंतर जमीनीवर, कांबळयावर, झोन्यावर राहिलेलें थोडें धान्य. धान्य कोठारांत भरण्याचें काम महाराकडून करविल्यास या उरलेल्या धान्यावर त्याचा हक्क असतो. [तळ]

**तळखांबा**—पु. (राजा.) शूद्रजातीय मृत पुरुषाचें (तो ज्या घरांत, जागेंत, मेला असेल तेथें वावरणारें) पिशाच; समंध. याची जागेवर पूजा करावी लागते. [तळ+खांब]

**तळण**—न. १ तळण्याची क्रिया २ तळण्याचा पदार्थ; तळून केलेला पदार्थ खाद्य. ३ तळण्याची कढई. [सं. तलन; प्रा. तलण] **०वळण**—न. तळलेले व इतर पदार्थ; (सामा.) खाद्यपदार्थ. 'तळणवळण केलें कोरकें सिद्ध झालें। त्वरित परम तेथें भात हे वेळियेले।' —सारुह ६.७२. [तळणें+वळणें]

**तळणी, तळणाटोप**—स्त्रीपु. (कों.) कढई. [तळणें; गु. तळणी] **तळणें बोगोणें**—न. (कों.) तांब्याची खोल, बिनकानाची कढई.

**तळणें**—सक्रि. पदार्थ तापलेल्या तेलांत, तुपांत घालून पक्व करणें. २ (ल.) (एखाद्याची निर्दयतेनें) छळणूक करणें; गांजणें. ३ (सूर्याचें ऊन इ० कानें) चटका बसणें; भाजणें; पोळणें; अग्निसंतप्त होणें. [प्रा. तलण; हिं. तलना] **तळता**—वि. तळणारा. **म्ह०** खरचणाराचें खरचतें मग काय गेलें तळतीचें काय गेलें वळतीचें.

**तळत**—पु. (गो.) तळात; तळहात. [तळहात अप.] **०फळें**—न. (गो.) हात पोहोंचण्याइतक्या उंचीवर टांगलेली फळी. [तळत+फळें=फळी]

**तळतळ**—स्त्री. १ (उन्हाच्या प्रखरतेनें होणारी अंगाची) काहली; उवारा; गदका; खितखित. (क्रि० करणें; होणें); (उन्हाच्या प्रखरतेनें येणारी) घेरी; भोंवळ; मूर्च्छा; चक्कर. (क्रि० येणें). २ संताप; क्षोभ; रागाचा आवेश. (क्रि० येणें). ३ (पश्चात्ताप, शोक इ० कानें होणारी मनाची) तळमळ; अस्वस्थता; अशांति. ४ (—स्त्री.) उपद्रव; चिरडीस आणणारें कृत्य; क्षोभजनक गोष्ट. (क्रि० देणें). [तळणें द्वि.]

**तळतळणें**—अक्रि. १ (उन्हाच्या त्रासानें) खितखितणें; उबगणें; डगडगणें; (अग्निताप; क्षुधा इ० नीं जिवाची) घालमेल होणें. २ दुःखानें विव्हळ होणें; तळमळणें. ३ संतापानें चरफडणें; हातपाय आपटणें; शाप देणें. ४ रोगग्रस्तपणामुळें दुसऱ्याच्या जाचामुळें) जीवितास कंटाळणें; विटणें; उबगणें. —शास्त्रीको· [तळतळ]

**तळतळाट**—पु. १ (तळतळाचा अतिशय) संतापाचा, तळतळीचा अतिरेक; चडफड ट; उ.ळफळाट. २ जुलूम, छळ इ० कानें चिडून गेलेल्या माणसानें दिलेला शाप. (क्रि० घेणें; देणें). 'येक शिव्यागाळी देती घेतो तळतळाट गे।' —मध्व ३८५. ३ पराकाष्ठेचा छळ, जुलूम, दडपशाही, जुलूम, छळणूक इ०नीं युक्त अशी स्थिति. (क्रि० करणें; लावणें; मांडणें; होणें). [तळतळ]

**तळतळाविणें**—सक्रि. १ चिडविणें; उपद्रव, त्रास देणें; चिरडीस आणणें. २ गांजणें; छळणें. [तळतळणें]

**तळप**—पु. स्त्रियांचें एक कर्णभूषण. 'गळयांतली टिका किंवा कानांतले तळप असे दोन नग वधूला...देऊन झालेलेच असतात.' —मसाप ४.४.२५५. [तळपणें]

**तळप**—न. (राजा.) १ तळणें. २ तळलेला. पदार्थ तळण पहा. [तळणें]

**तळप**—न. (गो.) खडक; पाषाण; कातळ. [सं. तल]

**तळपट**—न. १ (शाप इ०कानें झालेला होणारा) कुलक्षय; निःसंतान; सत्यनास; निर्वंश. 'म्हणति अदित्यादि सत्या त्या मेल्याचें समूळ तळपट हो।' —मोसभा ५.८७. २ (देश, गांव इ०कांची लुटालूट, जाळपोळ इ०कानीं झालेली) उध्वस्तता; दुर्दशा; नासाडी; बेचिराखी; राखरांगोळी. 'पेंढाऱ्यांनीं या देशाचें तळपट केलें.' ३ (व्यापक) (खाद्य पदार्थाचा खाऊन उडविलेला) फडशा; फन्ना; निःशेषता; चट्टामट्टा. 'त्यांनीं शंभर लाडवांचें तळपट केलें.' [तळ; तुल० हिं. तलपट=नष्टभ्रष्ट] (वाप्र.) **०होणें, वाजणें**—सत्यानास होणें; वाटोळें होणें. **०वाजणें**—(व.) दिवाळें निघणें; दिवाळें वाजणें.

**तळपटी**—वि. १ (गो.) पाषाणयुक्त; निर्वृक्ष. २ रखरखीत; उन्हानें भाजलेला. [गो. तळप=खडक]

**तळपणी**—स्त्री. चकाकणें; तकाकणें; तळपणें; चमकणें; लुकलुकी. 'सोमकान्त कासारजीवनीं। मच्छकच्छपाची तळपणी।' —मुसभा २.५९. [तळपणें]

**तळपणें**—अक्रि. (उन्हाच्या तापानें) भाजणें; पोळणें; तळतळणें; होरपळणें. [तळप]

**तळपणें**—अक्रि. १ (काव्य.) चमकणें; चकाकणें; तकतकणें; झळकणें. 'जे द्वेषाच्या आवर्ती दाटत। मत्सराचे वळसे पडत। माजि प्रमादादि तळपत। महामीन।' —ज्ञा ७.७२. शोभणें; खुलणें. 'मकरकुंडलें तळपती श्रवणीं।' —तुगा १. २ फिरवलें, परजलें जाणें (तलवार इ० शस्त्र). ३ चलनवलन करणें; हालणें. 'पैं पाणियाचिये भूमिके। पाणी तळपे कौतुकें। ते लहरी म्हणती लौकिकें। एऱ्हवीं तें पाणी।' —ज्ञा १३.६०९. ४ (एखाद्या वस्तूभोंवतीं)

घिरट्या घालणें; भोवंडत, तरंगत राहणें; घोंटाळत, गुटमळत राहणें. 'मग हातीं घेऊन असिल्ता। रुक्मिया तळपे रथाभोंवता।' —ह २४.६८. ५ हपापणें. 'कीं मज खायासि गृध्र तळपावे।' —मोउद्योग ९.३७. [तुल० का. तळपु=तेज, प्रकाश]

**तळपी, तळपीण**—पुस्त्री. (राजा.) पदार्थ तळण्याकरितां बसलेला पुरुष; स्त्री व्यक्ति. [तळण-प]

**तळमळ**—स्त्री. १ (ज्वर, शारीरिक, मानसिक दुःख इ० काच्या योगानें होणारी) अस्वस्थता; तडफड; तगमग; चडफड; बेचैन अवस्था; हैराणी. 'तळमळ निववीर रामकारुण्यसिंधु।' —रामदास, करुणाष्टक (नवनीत पृ १७०). २ हुरहुर; चुटपुट; काळजी. ३ पश्चात्ताप; पस्तावा; अनुताप. [तळणें+मळणें ? दे. तडमड]

**तळमळणें**—अक्रि. १ (ताप, दुःख इ० कानीं) हैराण, अस्वस्थ होणें; तडफडणें; चैन न पडणें; चडफडणें; चुळबुळणें; तळमळ होणें. २ चुटपुटणें; हुरहुरणें; चिंतेनें अस्वस्थ होणें; कळकळणें; हळहळणें. 'मच्चित्त कौरवांचे चिंतूनि अ-साधु-वाद तळमळतें।' —मोउद्योग ७.५८. ३ झुरणें; उत्कंठेनें अस्वस्थ होणें. [तळमळ]

**तळमूस**—स्त्री. धुळधाण; नासाडी; उध्वस्त स्थिति; बेचिराखी; कहर.

**तळय, तळई**—स्त्री. (गो.) लहान तळें. [प्रा. तलाई; म. तळें]

**तळयाणें**—अक्रि. (कु.) तळव्याची आग होणें; दुःख होणें. 'धोंडा लागून पाय तळयाला.' [तळ]

**तळंव**—न. (गो.) लग्नांत वधूवरांस एकत्र बसविण्यासाठीं केलेली गादी. [सं. तलिम=गादी; शय्या ?]

**तळवटणें**—सक्रि. दडपणें; दाबणें; तळाला घालणें. [तळवट]

**तळवण**—न. तळलेला पदार्थ. [तळणें]

**तळवा**—पु. हाताचा, पायाचा तळ; तळहात; तळपाय. 'जरी स्वर्गीं नाहीं कळी। तरी शेंडीतें खांडोळी। जरी न देखे पाताळीं, तरी तळवा घासे।' —कथा १.६. 'धरिती अरुणता तळवे।' —मोकृष्ण १६.३५. [तळ] (वाप्र.) **तळव्याची आग मस्तकास जाणें**—नखशिखांत संतप्त होणें; अतिशय संतापणें; तळची. तळपायाची आग मस्तकास जाणें पहा. **म्ह०** तळव्यास लोणी आणि नेत्रास थंडी.

**तळवार**—पु. १ (माण.) चौघुल्याच्या दर्जाचा एक कामगार; पहारेकरी. तराळ पहा. २ एक हलकी जात. [सं. स्थलवार; का. तळवार]

**तळवें**—न. १ (कों.) भाताचे भारे रचून ठेवण्याकरितां जमीनीवर पेंढा, गवत, दगड इ०कांची केलेली बैठक, पायाची रचना. २ भात सांठविण्याची जमीनीवर ठेवावयाची बांबूची मजबूत फोकाट्यांची गोठ घातलेली वर्तुळाकार कणग. हींत एक खंडी भात राहूं शकतें. अधिक सांठवण करावयाचें झाल्यास हिच्यावर पालोटी उभी करतात. [तळ]

**तळवेणें**—अक्रि (राजा.) फार वेळ अनवाणी चालल्यानें होणाऱ्या पायांच्या आगीनें सर्वांग व्यापून व्यथित होणें. तळयाणें पहा. [तळ]

**तळवेमार**—पु. तापलेल्या तव्यावर अनवाणी उभें करून, कड्यावरून खालीं लोटून, तेलांत तळून मारण्याची शिक्षा. 'दरेमार तळवेमार होत। या नाव आधिभूतिक।' —दा ३.७.६३.

**तळशाचें भात**—न. १ तांदुळाची एक जात.

**तळसणें**—उक्रि. १ सप्पा, साफ करणें (फांद्या इ० तोडून झाड-पानें-कांटे इ० तोडून फांदी, जमीन, केंस इ० काढून शरीर इ०). २ काढून नेणें; तोडणें; छाटणें (फांद्या, पानें, झुडपें केंस, इ०). तळासणें पहा. [अर. तलाशी=नाश, छाट]

**तळसाण**—स्त्री. (कों.) पदार्थ तळला जात असतांना येणारा वासः तळणाची घाण, वास. [तळणें+घाण]

**तळ डुंचें**—सक्रि. (गो.) अर्धमुर्धें तळणें. [गो. तळचें=तळणें]

**तळहातणें**—सक्रि. (पाय इ० शरीरावयव) हातांनी रगडणें; चेपणें. 'चरण त्यांचे कोमल चांगले। वनीं हिंडताती एकले। तळहातीन करकमळें।' —रावि १४.७३. [तळहात] (पाठ ?)

**तळाट(ठ)दार, तळाटी-ठी, तलाटीदार**—पु. १ गांवचा तलाठी; कुलकर्णी; सरकारनें नेमलेला कुळकर्ण्यासारखा वसूली कामगार. तलाटी पहा. २ गैरहजर असलेल्या किंवा कामावरून तात्पुरतें बडतर्फ केलेल्या कामगाराच्या जागीं काम करणारा अधिकारी; बदली कामगार. [तलाठी]

**तळाटी-ठी**—स्त्री. तळाठदाराचा, तलाठ्याचा हुद्दा, काम; कुळकरण.

**तळात-थ**—पु. तळहात; हाताचा तळवा; (गो.) तळांत; तळठ; तयठा; तळथा. [तळहात अप.]

**तळाफांटा**—पु. (प्रां.) उधळेपणाचा खर्च; उधळपट्टी; अतिव्यय.

**तळाव**—पु. तलाव पहा.

**तळावडी**—स्त्री. लहान तळें. [तळाव]

**तळावणें**—अक्रि. (उन्हानें अंग, दृष्टि इ०) होरपळणें; करपणें; पोळणें; रखरखणें; तळपणें; उष्णतेची बाधा होणें.

**तळावर्त**—वि. १ चालतांना ज्याचा मागचा पाय पुढच्या पायास लागतो असा (घोडा). —अश्वप १.९७. २ घोड्यावर बसणाऱ्याचा पाय भोंवऱ्यास लागतो असा भोंवरा असलेला (घोडा). —मसाप २.१.५८. तलावर्त पहा. [सं. तल+आवर्त]

**तळावाटी**—स्त्री. (प्रां.) उधळेपणा; अतिव्यय; उधळेगिरीनें अनाठायीं केलेला खर्च, तळफांटा.

**तळासणें**—सक्रि. १ (एखादें काम, क्रिया इ०) मूळापासून, आरंभापासून; यथासांग करणें, बजावणें. या क्रियापदाच्या ऊन प्रत्ययांत धातुसाधिताला (तळसून) जोडून झाडणें, उपटणें, तासणें, रंधणें, कापणें, पुसणें, घेणें इ० क्रियापदांचा उपयोग करतात. उदा० तळासून झाडणें; तळासून कापणें इ० २ तळसणें पहा. हीं दोन्हीं क्रियापदें सामान्यतः एकाच अर्थाचीं आहेत. [तळ=बूड]

**तळी**—स्त्री. (गो राजा.) लहान तळें. [तळें]

**तळी**—स्त्री. १ जातें, घरट इ०कांच्या वर्तुळाकार दोन दगडांपैकीं एक; याअर्थी खालची तळी, वरची तळी असे प्रयोग करतात. २ घरटांतील पीठ ज्याच्यावर पडतें तो घरटाखालचा सपाट दगड, लांकडाची फळी, काथवट. ३ एका ताम्हनांत भंडार, कुंकू, विडा, नारळ इ० ठेवून तीन अथवा त्यापेक्षां अधिक खंडोबाचे भक्त तें ताम्हन कपाळास लावतात व खंडोबाचा येळकोट असें म्हणतात तो प्रकार (क्रि० उचलणें; भरणें). 'घेंडा नाचविलिया वरी। तळी आणिली बाहेरी। फळीं पुष्पीं अति साजिरी। ज्ञानदीपें सोज्वळ।' -एरुस्व १७.३१. ४ (ब्राह्मणेतरांत रूढ) नवरात्राच्या दिवसांत नवपरिणीत वराकडील लोक ताटांत साडी, चोळी, हळदकुंकू, फराळाचे पदार्थ इ० ठेवून नवपरिणीत वधूकडे पाठवितात ती. (क्रि० नेणें; पाठविणें). ५ चिखल, घाणपाणी इ० आंत जाऊं नये म्हणून विहीरीच्या तोंडासभोंवतीं केलेली वर्तुलाकार फरसबंदी, चुनेगच्ची. ६ फुलें, भस्म इ०नीं युक्त असलेलें गुरवाच्या भिक्षेचें ताम्हन. ७ विहीर बांधून काढतांना बांधकाम उभारण्यासाठीं खालीं विहिरींत बसविलेली लांकडी चौकट. ८ (गो.) गणपतीची मूर्ति आणतेवेळीं नारळ, तांदुळ इ०कांची मूर्तिकारास दिलेली भेट. [तळ] (वाप्र.) (एखाद्या कार्याची) **तळी उचलणें, भरणें**-(ल.) तें कार्य करण्यास सर्वांनीं हातभार लावणें; सर्वांनीं मिळून एकजुटीनें एखादें कार्य सिद्धीस नेणें. (एखाद्याची) **तळी उचलणें**-(ल.) सर्वांनीं कट करून (एखाद्यास) हांकून लावणें, पदच्युत करणें. 'कशी उचलली तळी मिळाले ते बाराभाई।' -ऐपो ४११. **तळी-तळी राम गार करणें**-आपणांस इष्ट तें साध्य करून स्वस्थ बसणें; उपभोग्य वस्तूचा उपभोग घेऊन स्वतःची इच्छा तृप्त करून स्वस्थ बसणें; ढेकर देणें. **तळी(ळीं)राम गार होणें-करणें**-(कर्त्याची षष्ठी) (ल.) एखाद्याजवळ गुप्त द्रव्याचा सांठा, घबाड असल्यामुळें त्याच्या मनास स्वस्थता असणें. **तळी भरणें**-१ नारळ, विडा, खारीक, भंडार इ० वस्तूंनीं तळी (उचलण्याकरितां) सिद्ध करणें. २ (कर्त्याची षष्ठी) (एखाद्या दरिद्री मनुष्यास). अवश्य त्या वस्तू, पैसा इ० पुरवून मदत करणें. ३ तळी उचलणें पहा.

**तळी**—स्त्री. भांगेंत साखर इ० पदार्थ घालून केलेलें एक खाद्य.

**तळी**—स्त्री. १ एका गांवानें दुसऱ्या गांवाची आकसानें सूडबुद्धीनें केलेली लुटालूट, मारहाण, जाळपोळ इ०. २ सरकारी नोकरांकडून आपले हक्क, हक्कांच्या बाबी इ० शाबीत, वसूल करून घेण्यासाठीं गांवकऱ्यांनीं केलेला हल्ला. [का. तळिमु=कुटणें, मारणें] ०**गार**-पु. वरील अर्थाच्या तळींत भाग घेणारा मनुष्य.

**तळी**—वि. (नंदभाषा.) पंधरा. 'तळी भुर ला (रुपयांस) चार चिरडया घेतल्या.' [?] ०**आवारू**-वि. (नंदभाषा) सतरा. 'ह्या सातक्याची किंमत तळी आवारू रुपये आहे.' [(नंदभाषा) तळी=पंधरा+आवारू=दोन] ०**उधानू**-वि. (नंदभाषा.) अठरा. [नंदभाषा तळी=पंधरा उधानू=तीन]

**तळील**— वि. १ खालचा; खालील. 'समर्थाचिये पंक्तिभोजनें। तळिल्या वरिल्या एकचि पक्वान्नें।' -ज्ञा १८४८. 'कटीपासुन वरील आंग। अवयव आकारले सांग। मांसोदकें तळील भाग। लवथवित् राहिला।' मुआदि ४.३६. २ बुडाचा. [तळ]

**तळीव**—वि. तळलेला; तळून केलेला. [तळणें]

**तळुक**—स्त्री. (तंजा.) स्त्रियांच्या नाकांतील चमकी. [ता. तलुक; तुल० का. तलुक=चमकणें]

**तळुलें**—न. लहान तळें. -शर [तळें]

**तळें**—न. १ तलाव; सरोवर. २ चंद्राभोवतीं कधीं कधीं दिसणारें मोठें मंडल, खळें. तळें मोठें असतें व खळें लहान असतें. [सं. तल; प्रा. तल] **म्ह०** तळें राखील तो पाणी चाखील.' =सोंपविलेल्या कामापासून, राखावयास दिलेल्या वस्तूपासून मनुष्य आपला थोडाबहुत फायदा करून घेतोच.

**तळौट**—न. तळवट पहा. 'जगा तळौटी तंवचि वेन्हीं। भणों हे भूत धात्री।'-ऋ २२. [तळवट] **तळौटपण-टेपण**-न. १ लहानपण; नीचपण. २ नम्रपणा; विनय. 'तळौटेपणा बाणे। आंगीं हिणावो खेवणें। तें तेंचि करणें। बहुतकरुनी।' -ज्ञा १३. १९४. [तळौट]

**तळ्हान**—(व.) डोंगराच्या पायथ्याचा मैदान मुलुख.

**तळ्हावणें**—अक्रि. तळावणें पहा.

**तळ्ळा**—पु. (बे.) गवताची एक जात.

**तक्षक**—पु. १ पाताळांतील नागांपैकीं प्रमुख नाग; सर्पाची एक जात. 'सत्यप्रतिज्ञ दुर्जय तक्षकसा भीमसेन कोपन हो!।' -मोभीष्म ९.९. २ (ल.) दुष्ट, खुनशी व घातकी मनुष्य. ३ सुतार; सुतारकाम करणारा. [सं.]

**तक्षकर्म**—न. कातरकाम; जाळया इ० कातरण्याची कला. चौसष्ट कलांपैकीं ही एक आहे. [सं. तक्ष्=तासणें+कर्म=काम]

**तक्षण**—न. १ (लांकुड इ०) छाटणें; तासणें, रंधणें. २ (सामा.) सुतारकाम. [सं.]

**तक्षा**—पु. सुतार. [ सं. तक्ष्=तासणें ]

**तक्षीम, तक्षीमदार, तक्षीमदारी**—स्त्री.पु.स्त्री. वांटा, वांटेकरी, वांटणी. तक्शीम इ० पहा. तुकडी. ' त्यांत निमे दोन तक्षीमा दुखणियानी पडले आहेत. ' –पेद ३.१०२.

**तज्ञ**—वि. (प्र.) तज्ज्ञ. (एखाद्या विषयांतील, शास्त्रांतील, धंद्यांतील) माहितगार; पंडित; कुशल (मनुष्य). तज्ज्ञ पहा.

**ता**—संस्कृतांतील एक प्रत्यय. हा नामाला, विशेषणाला लावून भाववाचक नामें बनवितात. हा प्रत्यय लागून झालेलीं भाववाचक नामें स्त्रीलिंगी असतात. उदा० मधुरता=गोडी; मधुरपणा. याप्रमाणें मिष्ट; मनुष्य; पशु, योग्य इ० पासून मिष्टता; मनुष्यता; पशुता; योग्यता इ० भाववाचक नामें होतील. त्व हा प्रत्यय लागून होणाऱ्या भाववाचक नामांतील व ता लागून होणाऱ्या भाववाचक नामांतील फरक त्व मध्यें पहा.

**ता**—(सांकेतिक) तारीख. त॥ पहा

**ता**—क्रिवि. (राजा.) तर. ' ता मग्ये जातस कसो ?'–मसाप २.४.३६८. [ सं. तत्–तर्हि; प्रा. ता ]

**तां**—सना. (काव्य.) त्वां; तूं या सर्वनामाचें तृतीयेचें एकवचन. 'मंगळोत्छाव वाग्देवते। तां वदावें रसाळ कथे।' –वेसीस्व १.६. ' जिणें गरळ पाजिलें अमृत पाजिलें तीस तां।'–केका९१. [ सं. युष्मत्–त्वम् ]

**तां**—सना. (राजा. कों.) तें. [ सं. तत् ]

**ताइताळें**—न. अनेक ताईत एकत्र ओंवून केलेला स्त्रियांचा गळयांत घालावयाचा एक दागिना; ताइताची माळ. [ ताईत+सं. आली=ओळ; सं. आलय; म. आळें ]

**ताइती**—स्त्री. (राजा.) लहान ताईत. [ ताईत ]

**ताइफा**—पु. जमाव; जात [ अर. ] **ताइफेवार**–वि. जातवार. 'मोहतर्फा बाब दुसरी। जाणोनि लिहिजे चतुरीं। ताइफेवार।' –मेस्तक–पुस्तक जमेलेखन ६८.

**ताई**—स्त्री. १ वडील बहीण. २ एक प्रतिष्ठित नांव; बहिणीस किंवा कोणत्याहि स्त्रीस बहुमानानें संबोधण्याचा शब्द. स्त्रियांना सन्मानानें संबोधण्याच्या बाई, मातोश्री या शब्दांप्रमाणें ताई हा शब्दहि कांहीं प्रांतातून नपुंसकलिंगी अनेकवचनीं वापरतात. उदा० ताई आलीं ताई गेलीं इ० तर कांहीं प्रांतांत हा शब्द पुल्लिंगी बहुवचनीं वापरतात. [ का. ताय–यी=आई; हिं. ताई=आत्या, चुलती ] सामाशब्द– ०**आई**–स्त्री. (माण.) एक दैवत. हें मूळचें कोंकणांतील आहे असा समज आहे पण हल्लीं या दैवताचें प्राबल्य माण तालुक्यांतील एक–दोन गांवांतच दिसून येतें. –मसाप ४.४. २५८. ०**बाय**–स्त्री. (गो.) १ बहीण २ भावजई. [ ताई+बाई ]

**ताईं**—(ताओ, ताव याच्या सप्तमीचें एकवचनीं रूप.) (महानु.) (सोने इ० कांस पारखण्याकरितां) ताव देणें; शोधनी. ' ब्रह्मसायुज्य हेमागारिखी। मोक्षकळादि पितळ चोखी। पुन तें ताईं नुतरे अग्निमुखीं। महाप्रळयाच्या।' –ज्ञाप्र ५८५. [ सं. ताप; प्रा. म. ताव ]

**ताईत**—पु. १ सोन्याचा, चांदीचा अर्धचंद्रकार, नळकंड्याच्या आकृतीचा मुलांच्या गळयांत, दंडाला, मनगटाला बांधावयाचा एक बारीक दागिना. ह्यानें मुलास दृष्ट होत नाहीं असा समज आहे. कधीं कधीं हा पोकळ असून यांत मंत्र लिहिलेला कागद, अंगारा असतो. ताइती, ताऊत हीं याचीं लघुत्वरूपें आहेत. २ मुसलमानांच्या थडग्यावरील शवपेटीच्या आकाराचा फुगीर भाग. [ अर. तअवीज़्; तावीज़्; हिं. ताइत] **जिवाचा, गळयांतला ताईत**–अतिशय प्रीतीचा माणूस; कंठमणि. ' कालिदास, भवभूति, बाणभट्ट यांच्यासारखे प्रतिभावान् कवि सरस्वतीदेवीच्या गळयांतले ताईत होत. ' –निचं. गळयांतल्या ताइता तुला मी आंवुळ घालीते। '–पला.

**ताईत**—पु. (दगडी बांधकाम). मोटेच्या थारोळयाचा कण्याखालचा दगड.

**ताऊज–त**—स्त्री. मोठा बांबू; नावेचा, होडीचा बांबू.(विरू.) ताज. ताज अर्थ २ पहा.

**ताऊज–त**—स्त्री. (गो. राजा.) लहान ताईत.

**ताऊस**—पु. १ मोर. २ (वाद्य.) एक प्रकारचें तंतुवाद्य. सतारीस जसा भोंपळा तसा ह्यास लांकडी मोर बसविलेला असतो व त्याच्यावरील भाग कातड्यानें मढविलेला असतो. ह्यास चार तारा असून त्या सा, प, सा, म ह्या स्वरांत मिळविलेल्या असतात. ह्याला सतारीसारखेच पण वीस पडदे असतात. हें वाद्य गजानें वाजवितात. [ फा. ताऊस् ] **ताऊस–इ, तख्त**–न. दिल्लीच्या राजांचें इतिहासप्रसिद्ध मयूरासन.

**ताओ**—पु. (महानु.) ताप; ताव. ' परि लागला ताओ। घडितां न धरी आओ। ' –ऋ १०१. [ ताव ]

**ताक**—न. १ दहीं घुसळून लोणी काढून घेतल्यावर राहिलेला द्रव पदार्थ. 'घरीं कामधेनु पुढें ताक मागे। ' –राम ६३. 'रसिकीं घ्यावी कशास रुचि ताकीं।'–मोभीष्म १०.४. २ सत्त्वहीन, नीरस पेय, पदार्थ. 'झाला घालाया घृत–वर्ण नभाचा परासु कवि ताकीं।' –मोस्त्री ४.३९. [ सं. तक्र; प्रा. तक्क ] (वाप्र.) **ताकाचें पाणी, ताकाचा थेंब**–नपु. १ ताकाचा थोडा अंश; थोडेंसें ताक. २ ताक; ताकवणी, दह्याची कवडी, दुधाची धार, लोण्याचा कण इ० शब्दांप्रमाणें वरील शब्द ताकाचें अतिशय लहान परिमाण, अंश दर्शवितो. **ताका मिठाक गांट**–(गो.) १ ताक व मीठ यांची (कशीतरी) भेट. २ (ल) काटकसर करून कसा तरी केलेला संसार. **ताकाला जाऊन भांडें, गाडगें, लपविणें**– दुसऱ्याजवळ कांहीं मागावयाचें झालें तर तें उघडउघड किंवा सरळ न मागतां

आढेवेढे घेऊन मागणें; दुसऱ्याची याचना करण्याचें पत्करून याचनेकरितां तोंड वेंगाडण्यास कचरणें. **ताकास तूर लागूं न देणें**-(एखाद्या गोष्टीचा दुसऱ्यास) बिलकूल थांग लागूं न देणें; टाळाटाळी करून स्वतःच्या मनांतील विचार दुसऱ्यास समजूं न देणें. **ता म्हणतां ताकभात समजणें**-१ ताकभात शब्द पूर्ण उच्चारला जाण्याच्या अगोदर किंवा त्यांतील ता उच्चारल्याबरोबर पुढील क, भा, त हीं अक्षरें तर्कानें ओळखणें. २ (ल.) स्थळ, काळ, वृत्त व वर्तमान इ० कडे लक्ष देऊन कोणतीहि गोष्ट चटकन तर्कानें जाणणें; त म्हणतां तपेलें समजणें. **(धर्माचें) ताक पिणें**-एखादी वस्तु (तीहि क्षुल्लक) घरीं मिळणारी असून दुसऱ्यापासून तिचा अभिलाष धरणें. ' कोण वर्तणुक कसी रोज स्वदृष्टीनें पहातां। समजुन पुरतेपणें ताक कां धर्माचें पितां। ' -होळा १०८. **म्ह०** १ जिच्या घरीं ताक तिचें वरती गेलें नाक=ज्या बाईच्या घरीं ताक होतें तिला फार तोरा असतो. २ ताकापुरतें रामायण=ताक मिळविण्यापुरतें गोड बोलून ताक देणाऱ्या बाईस खुष करणें. (ल.) आपलें काम साधण्यापुरतेंच दुसऱ्याचें आर्जव करणें. ३ जेवढें ताक (मिळण्याचा संभव असेल) तेवढीच खुशामत; ताक थोडें तर खुशामतहि थोडीच. सामाशब्द- **०कण्या**-स्त्रीअव. गरीबीचें अन्न; जाडेंभरडें जेवण; मीठभाकर. [ताक+कण्या] **म्ह०** ये रे माझ्या मागल्या ताक कण्या चांगल्या=(ल.) कितीहि उपदेश, कानउघडणी इ० केली, मूळची परस्थिति बदलली तरी जो आपला पूर्वीचा हट्ट, हेका, अवगुण सोडीत नाहीं त्याला उद्देशून ही म्हण योजतात. **०कण्याचा**-वि. (उप) अगडबंब; भोपळसुती; झोडकाम्या. [ताक+कण्या] **०घाटा**-पु. ताक व ज्वारीचा भरडा; जाडें भरडें अन्न; ताककण्या; कांदाभाकर. ' ज्या भक्षिती केवळ ताक घाटा। ' -सारुह ३.१६. **०तई-तय-तव-तेय-तेव-त्येय-त्येव-तोय-तोव**-स्त्री. फोडणीचें ताक; कढी; मठ्ठा. [ताक+तोय=पाणी ?] **०पाणी**-न. १ (व्यापक) दहीं घुसळणें, ताक करणें, लोणी काढणें इ० व्यापार. (क्रि० करणें). २ ताक, दहीं इ० ३ जाडेंभरडें अन्न; ताककण्या. ४ (ल.) अल्पाहार; थोडें जेवणखाण. ' शेजारीं दहा पांच ब्राह्मणांचीं घरें आहेत तेथें समयास ताक पाणी मिळतें. ' [ताक+पाणी] **०पिठ्या**-वि. ताक व पीठ येवढया सारख्या लहान बिदागीवरच पुराण सांगणारा (पुराणिक), कथा करणारा (हरिदास); (सामा.) अल्पविद्य; बाताड्या; तुटपुंज्या ज्ञानाचा. [ताक+पीठ] **०पिरा**-वि. १ ताक पिणारा. २ (ल.) घामट; घाणेरडा ओंगळ. 'गौळीयांचीं ताकपीरें। कोण काय पोरे चांगलीं। ' -तुगा ३६८४. [ताक+पिणें] **०मेढ-मेढी**-स्त्री. घुसळखांब. [ताक+मेढ=खांब] **०वणी**-न. फार पाणी घातलेलें, अतिशय पातळ, पाणचट ताक. [ताक+पाणी]

**तांक**—स्त्री. (गो.) ऐपत; सामर्थ्य; शक्ति; ताकद पहा.

**ताँक**—न. (गो.) टोंक. 'शिसपेन्सलीला ताँक काढून आण.' [टोंक]

**ताकट, ताकड**—स्त्रीन. १ ताकाचा अंश शिल्लक असलेलें लोणी. २ तूप, लोणी इ०कांतील ताकाचा राहिलेला अंश. [ताक]

**ताकट**—वि. १ ताकमिश्रित; ताकाच्या अंशानें युक्त (लोणी, तूप). २ ताक पिणारा; ताकपिरा. 'शाहाणपणें वेद मुका। गोपिका त्या ताकटी। ' -तुगा ३२८१. [ताक]

**ता(तां)कडा**—वि. (लहानसहान, किरकोळ कामें करण्यांत) हुशार; चलाख; (प्र.) ताखडा पहा.

**ताकडातुकडा**—पु. (दोरी, वस्त्र, कागद इ०कांचा) लहानमोठा तुकडा. [तुकडा द्वि.]

**ताकडी**—स्त्री. तराजू; ताजवा. (प्र.) तागडी पहा. ' हृदय ताकडीं जोखा तुम्ही। ' -दावि १५९.

**ताकत-द्**—स्त्री. १ शक्ति; बळ; जोर. २ सामर्थ्य; योग्यता; क्षमता. [अर. ताकत्; हिं.] **०दार**-वि. १ (ना.) सशक्त; बलवान; शक्तिमान. २ समर्थ. [ताकत+फा. दार प्रत्यय]

**ताकतीक, ताकीत**—स्त्री. (गो.) ताकीद. [ताकीद]

**ताकतीक**—स्त्री. (गो.) घाई; लगबग. [पोर्तु. ताकीद]

**ताकतीन**—क्रिवि. (गो.) घाईघाईनें; लगबगीनें. [पोर्तु.]

**ताका**—पु. (कृषि.) पिकावर, धान्यावर पडणारा एक रोग. यानें धान्य काळें पडतें. **ताकावणें**—अक्रि. (पीक, धान्य इ०) ताका नांवाच्या रोगानें युक्त होणें. [ताका]

**ताका-गा**—पु. १ मागावरील सबंध, न फाडलेलें कापड; (कापड इ०कांचें) ठाण. २ दोरा; धागा. ३ (ल.) थांग; सबंध; मागमूस. [हिं.; तुल० सं. तंक=वस्त्र; फा. ताका=वस्त्राचा तुकडा]

**ताकाबारी**—स्त्री. खिडकीवरील तक्ता, फळी; शेल्फ. [अर. फा. ताक्=खिडकी+बारी]

**ताकीद-त**—स्त्री. १ खरमरीत, सक्तीचा हुकूम; बजावून सांगणें; सूचना; इशारत. २ जरब; सक्ती. 'तों गिलच्यांची ताकीद भारी. ' -भाब २६. ३ (कायदा) सरकारी आज्ञा; मनाई हुकूम; (इं.) इंजंक्शन्. [अर. ताकीद्] **०चिठी, पत्र**-स्त्रीन. (कायदा) सरकारानें आपल्या अधिकाऱ्यास पाठविलेलें ताकीदीचें पत्र; लेखी हुकूम; (सामा.) वरिष्ठ अधिकाऱ्यानें कनिष्ठ अधिकाऱ्यास दिलेला ताकीदीचा हुकूम; ताकीद. [ताकीद+चिठी, पत्र] **०दार**-पु. १ सरकार इ०कांनीं ताकीद देण्यासाठीं पाठविलेला मनुष्य, शिपाई. २ बाजारबुणगे इ०कांपासून शेत, गांव इ०कांचें रक्षण करण्यासाठीं नेमलेला मनुष्य; रखवालदार. [ताकीद]

**ताकीस**—स्त्री. (गो.) घाई; जलदी.

**ताकूव**—पु. पाटलाग. -शर. [पोर्तु. ताकीत]

**ताकोला**—वि. (राजा.) अप्रौढ; अद्याप पूर्णपणें न वाढलेला; न्यून; अपक्व; विशिष्ट अवस्थेस न पोंचलेला; अपूर्ण. हा शब्द बाप्या, घोडा, बरा इ० शब्दांपूर्वी गुणवाचक म्हणून योजतात. उदा० ताकोला बाप्या=अडबाप्या; बाप्या न झालेला; पोऱ्या. 'हा आतां लेंकरूं नव्हे, ताकोला बाप्या झाला.' ताकोला घोडा=लहान घोडा; अडघोडा, तद्वत्. ताकोला बरा=(दुखण्यांतून उठून) हिंडूंफिरूं लागलेला पण पूर्ण बरा न झालेला (मनुष्य). [अर. ताक्+म. ओला]

**ताक्या**—वि. ताक विकणारा; ताकविक्या. [ताक]

**ता(तां)खडा**—वि. चलाख; हुशार; लहानसहान, किरकोळ कामें करण्यांत निपुण; कुशल; ताकडा. 'त्याली असे जे मुद्राखडीला। झाली असे तांतडि तांखडीला।' -सारुह ६.३५. [अर. ताक्. फा. ताख्त=हल्ला, उठाव?]

**ताग**—पु. १ (कृषि.) आंबाडीसारखें एक झाड; सण. याची लागवड बहुतेक सर्व हिंदुस्थानांत होते. याचें पीक वाखासाठीं व हिरवाळ खतासाठीं करतात. याच्या वाखाचीं पोतीं, सुतळी, दोरखंड इ० करतात. ज्यूटतागापासून कापड (गोणपाट) तयार करितात. -ज्ञाको (त) ३४. २ वरील झाडाचा तंतु; वाख. ०कूट-पु. (ल.) काथ्याकूट; शुष्क वाद. -राको. [ताग+कुटणें]

**तांग**—न. (गो.) १ सोळा पयांचें एक चलन. २ आणेली.

**तांगड**—स्त्री. (जनावराच्या पाठीवर ठेवावयाचें) तेल, तूप इ०कांच्या रिकाम्या बुधल्यांचें ओझें. [तांगडणें]

**तांगडणी**—स्त्री. १ तांगडण्याची क्रिया; (मनुष्य, पशु इ०कांस) घट्ट बांधून टाकणें; जखडून बांधणें. २ इतर लाक्षणिक अर्थी तांगडणें पहा. [तांगडणें]

**तांगडणें**—उक्रि. १ (मूल, पशु इ०कांस) पायाला दोरी बांधून जखडणें. २ (मनुष्य, पशु इ०कांस) खांबाशीं आवळून बांधणें; मुसक्या बांधणें; शृंखलाबद्ध करणें. ३ (ल.) (एखाद्यास) एखाद्या ठिकाणीं कांहीं कामावर गुंतवून, परतंत्र करून, खिळून, आवळून टाकणें; डांबणें. ४ (एखाद्यास त्रास, उशीर होईल अशा रीतीनें) अडकविणें; खोळंबा करणें; खोळंबून धरणें; ताटकळत, टांगून ठेवणें. ५ (एखाद्यास अनेकांनीं अनेक दिशांस) ओढणें; ताणणें; खेंचणें; (एखाद्याची) ताणाताण, खेंचाखेंच, कुतरओढ करणें. 'दोहों घरच्या पाहुण्यास दोहींकडे तांगडतात.' ६ (जनावर, वाहन, पदार्थ इ०कांस) बेदरकारपणें, धसफशीनें, धसमुसळेपणानें वागविणें, वापरणें, उपयोगांत आणणें; अतिशय खपावयास लावणें; (घोड्यास) भरमसाटपणें दामटणें. ७ सांधासांध करून, ठिगळ देऊन (जुन्या टोपल्या, वस्त्रें, चटया इ०) नीट-दुरुस्त करणें. ८ (राजा.) एखाद्यानें आरंभिलेलें काम त्याच्या हातून सिद्धीस न जाईसें झालें असतां दुसऱ्यानें यथाकथंचित् साधून घेणें. -अक्रि. खपणें; रखडणें; काबाडकष्ट, कुत्तेघाशी करणें. 'हा गडी उन्हांत, थंडींत, पावसांत, चिखलांत तांगडतो.' [तं(तां)गडी]

**तांगडतिंगड**—वि. (व.) वांकडेतिकडें.

**तागडॉ**—पु. (गो.) (उप.) दुकानदार. [तागडी]

**तागडी**—स्त्री. तराजू; ताजवा; तोलण्याचें-दोन पारडीं असलेलें साधन.

**तां(तं)गडी**—स्त्री. (उप.) पाय; तंगडी. [हिं. टांगडी]

**तागलवाट**—स्त्री (कु.) आपणांस कंटाळा आला असेल त्या वस्तूचें, जनावराचें विक्री इ० प्रकारानें दूरीकरण; विल्हेवाट. [का. तागुळ=राग? +वाट]

**तागा**—पु. १ नाव, होडी ढकलण्याचा बांबू; डांग. 'आतां महाशून्याचिया डोहीं। जेथ गगनासीचि ठावो नाहीं। तेथ तागा लागेल काई। बोलाचा या।' -ज्ञा ६.३१५. २ (ल.) थांग. [ताज]

**तागा**—पु. १ सर्व अर्थी ताका पहा. २ संबंध; आश्रय; धागा. 'तरी मनुष्यदेहाचा तागा। घेऊनि रुसती जे जगा।' -ज्ञा १६.४०६.

**तांगा**—पु. टांगा; दोनचाकी एक बैलाची किंवा घोड्याची गाडी; टांगा पहा. २ (जुना अर्थ) भाड्याचा खटारा. [हिंदी]

**तागाइत**—न. कागद चिवट करण्यासाठीं त्याला खळ लावण्याचें हत्यार, उपकरण. 'सुऱ्या कातऱ्या जागाइंत। खळीं घोंटाळे तागाईत।' -दा १९.१.१५.

**तागाई(य)त**—शअ. १ पर्यंत; पावेतों; विवक्षित कालपर्यंत. २ पासून. 'मिरजेहून निघाल्या तागायत.' -ख ८.३८५३ [फा. ता-घायत्]

**तागाइत**—वि. तगण्याजोगा; टिकाऊ. -मनको [तगणें]

**तागादणें**—अक्रि. (कों.) (धंदा, काम, संसार इ०कांस). कंटाळणें; विटणें; त्रस्त होणें; वैतागणें. [तगादा]

**तागादा**—पु. (प्र) तगादा. निकड; समेमिरा. तगादा पहा. (क्रि० लावणें; लागण; बसणें; करणें).

**तागी**—स्त्री. तागाची एक बारीक जात. -कृषि ३७३. -वि. तागाचें विणलेलें (वस्त्र). [ताग]

**तागीद**—ताकीद पहा. 'याप्रमाणें तागीद करणें.' -वाडसमा २.९.

**ताज**—स्त्री. १ (पत्त्यांच्या खेळांत) पत्त्यांतील एक डाव; पत्ते; पत्त्यांचा जोड. २ गंजिफांतील एक रंग [फा ताज्; हिं. तास्]

**ताज**—पु. मुगुट; टोप. 'तें समयीं डोकीस ताज व अंगांत अंगरखा व पांढरी सुरवार...' -मदरु १.१३०. २ पुढारी; प्रमुख मनुष्य; नेता. [फा. ताज्=मुकुट]

**ताज**—पुस्त्री. १ (नाविक कों.) उथळ पाण्यांतून होडी ढकलण्याचा लांब वेळू, बांबू; चिव्याची काठी; हा साधारणपणें दहा हात लांब असतो. याच्यावर खाडीची खोली मापली जाते. उदा० दोन ताज खोल=वीस हात खोल. 'स्त्रीनें ताज मारीत ती

होडी थोडक्यांत पडावाला भिडविली.' –कोरकि ३९५. (सामा.) लांब वांबू; याचा फुलें, फळें काढण्याच्या कामीं आंकडीसारखाहि उपयोग होतो. २ मोठ्या जातीचा बांबू; याला माणगा असेंहि म्हण तात. [ गो. ताज ] ०करी–पु. ( कों. नाविक ) ताज टेंकून गलबत चालविणारा. [ ताज ]

**ताजक**—न. (ज्यो) १ कुंडलीवरून ( एखाद्याचें ) वर्ष-फल, मासफल इ० वर्तविणें; भविष्य. २ फलज्योतिषांतील गणिताची शाखा. याच्या उलट जातक. [ हिं; सं. जातक ]

**ताजगी**—स्त्री. १ तजेला; तेजी; भरभराट; ऐश्वर्य. 'सिवाजी राजे यांची ताजगी आतां कानानें ऐकवत नाहीं; ताजगी म्हणजे मोठा पराक्रम म्हणोन दिल्गीर जाहले.'–मदरु १.७७. २ प्रसन्नता; उत्साह; उमेद. ३ सौख्य. [ फा. ताझगी ]

**ताजवा**—पु. सोनें, रुपें इ० तोलण्याचा लहान तराजू, कांटा.

**ताजवा**—पु (गणित) १ गुणाकाराचें चिन्ह; (×) अशी खूण; एखाद्या संख्येनें गुणिल्याचें द्योतक चिन्ह. २ अशा चिन्हानें गुणणें; गुणाकार. ( क्रि० करणें; मिळणें; मिळविणें; चुकणें ).

**ताजा**—पु. घोड्याच्या तोंडांत घालावयाची चामड्याची म्होरकी; अश्वमुखकवच. –राव्यको ५.२०. [ अर. ताझी ]

**ताजा**—पु. १ मोहरमांत मुसलमान लोक हसनहुसेनाविषयीं गातात तें शोकगीत. २ ताबूत; डोला. [ अर. तअझिया ]

**ताजा**—पु. १ प्रफुल्ल; टवटवीत. २ शिळा नसलेला; नवा; नवीन. ३ (ल.) गुटगुटीत; गुबगुबीत; लठ्ठ; धष्टपुष्ट; सतेज ( मनुष्य, जनावर इ० ). [ फा. ताझा ]. **ताज्या घोड्याची गोमाशी**–जोंपर्यंत एखाद्याजवळ संपत्ति आहे तोंपर्यंत त्याची खुशामत, हांजी हांजी करणारा तोंडपुजा मनुष्य; पंक्तिपठाण. ( सामाशब्द ) **०कलम**–न. पत्र लिहून झाल्यानंतर विस्मरण इ० कानें राहिलेला किंवा नवीन सुचलेला मजकूर शेवटीं लिहितात तो [ ताझा+फा. कलम् ] **०तवाना, ताजातवाना–तवान**–वि. प्रफुल्ल; टवटवीत; चपळ; चलाख; अगदीं तैयार ( मनुष्य, जनावर, वृक्ष इ० ). [ ताझा+म. तवाना ] **०रोजगार**–पु. भरपूर, भक्कम पगाराची, प्राप्तीची नोकरी, जागा. [ ताजा+रोजगार=नोकरी धंदा ] **ताजीरोटी**–स्त्री. १ लठ्ठ पगाराची, चांगल्या प्राप्तीची नोकरी. २ खानदानीची, संपन्न स्थिति. ३ सुग्रास भोजन. (ल.) ४ नवपरिणीत वधू इ० [ ताजी+रोटी=भाकरी ] **ताजेंकूळ**–न. श्रीमंत, अब्रूदार, खानदानीचा, पतीचा गृहस्थ. [ ताजें+कूळ ]

**ताजी**—वि. अरबी ( घोडा ). [ अर. ताझी ]

**ताजीम**—स्त्री. ( एखाद्याच्या सन्मानार्थ ) उभें राहणें; उत्थापन; अभ्युत्थान; सलामी. ( क्रि० देणें; घेणें ). 'राजा भीमसेन यास सरकारांत ताजीमवगैरे होती.'–वाडबाबा १.६१. [ अर तअझीम् ] सामाशब्द– **०तवाजू**–स्त्री. ताजीम; बहुमान; आदरसत्कार; मानपान; मानाचीं वस्त्रें अर्पण करणें इ०. 'त्यांस उभयतां रावसाहेबांनीं ताजीमतवाजू देऊन मानपान केले होते.' –रा १०.२१३. [ ताजीम+तवाजू ]

**ताजूब**—स्त्रीपुन. आश्चर्य; चमत्कार; नवल. 'लढाई करून प्रथम फत्ते जाली असतां येकायेकीं अशा तऱ्हेनें दगा जाला हें मोठें ताजूब.'–रा ७.१३४. –वि. चमत्कारिक; नवलपूर्ण; आश्चर्यकारक. [ अर. तअज्जुब् ]

**ताज्या**—वि. ताजानें, बांबूनें गलबत ढकलणारा; ताजकरी. [ ताज=मोठा बांबू ]

**ताट**—न. १ जेवण इ०कांच्या उपयोगाचें उथळ व पसरट धातुमय पात्र; तबक. 'सुचिर क्षुधित ब्राह्मण हां हां म्हणतांहि वाढिल्या ताटीं।'–मोकर्ण २२.८६. २ फांसा, नाकें इ० विरहित अशी पुतळी; ताट, पुतळीचें ताट असेंहि म्हणण्याचा प्रघात आहे. [ का. तट्टे ] (वाप्र.) **ताटाला बसणें**–जेवायला बसणें. 'आतां ह्या सर्व मंडळींनीं आमच्या बरोबरच ताटाला बसावें अशी माझी इच्छा आहे.' –स्वप १२९. **ताटावरचें पाटावर, पाटावरचें ताटावर**–श्रीमंतीचा डौल; श्रीमंताच्या बायका काम न करतां आंळसांत व चैनींत वेळ घालवितात. त्यावरून हा वाक्प्रचार या अर्थी रूढ झाला. **ताटावरून ओढणें–उठविणें** (एखाद्यास) जेवतां जेवतां उठविणें; ( एखादा ) जेवीत असतांना त्याचा अपमान करून त्याला उठविणें– म्ह० ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय एकच. =जेवतांना एखादा जिन्नस ताटांत सांडला काय किंवा वाटींत सांडला काय एकच. कारण तो जेवणाराच्या पोटांतच जाणार. यावरून जेथें दोघांचें हिताहित एक असतें तेथें त्यापैकीं एकाला फायदा झाला काय किंवा दुसऱ्याला फायदा झाला काय सारखाच. 'संभाजी राजे व व्यंकोजीराजे कोणी परके नाहींत. त्यांच्याकडे असलेला मुलूख आपल्याकडेच असल्यासारखा आहे ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय एकच.'–बाजीराव. २ ताटाबरोबरकाठ=जुगार इ०कांत उधळून दिलेला बराच मोठा ऐवज परत मिळण्याच्या प्रयत्नांत उरलासुरला ऐवज खर्च करून टाकणें. ३ सोन्याचें ताट परंतु कुडाचा आधार–आश्रय– उठिंगण=स्वतः चांगला अब्रूदार पण कुसंगतींत असलेला मनुष्य; हलक्या माणसाच्या मुठींत राहणारा चांगला मोठा मनुष्य; चांगला पण अकुलीन माणूस. 'सोन्याचें ताट झालें तरी त्यास कुडाचें उठिंगण पाहिजे'–पेब ४. वाडबाबा २ एका ताटीं जेवणें आणि घांस मोजणें. सामाशब्द– **०काढा–ढ्या**–वि. उष्टें काढणारा. 'मी दासु किंकरू तुझें। देविका–ताट–काढा हें ब्रीदु माझें।'–शिशु ७६. [ ताट+काढणें ] **०पाट**–पुअव. ताटें, पाट इ० मांडून केलेली जेवणाची तयारी. 'ताटपाटाची वेळ असून तशी तजवीज लागूं न शकल्यास मेजाची

तयारी ठेवावी.' –( बडोदें ) स्वारीनियम ७६. [ ताट+पाट ] **०फळें**–न (गो.) ताटें ठेवण्याची फळी. [ ताट+गो. फळें =फळी ] **०शिंगार–ऱ्या**–वि. (उ.) पंक्तिपठाण; आयतें खाणारा; खायाला आधीं व कामाला कधींमधीं याप्रमाणें वागणारा. [ ताट+शिंगारणें=शृंगारणें, शोभा आणणें ] म्ह० आयतमान्या आणि ताट शिंगाऱ्या. **ताटाखालचें मांजर**–न. पूर्णपणें आज्ञांकित मनुष्य; पित्त्या; बगलबच्चा; ओशाळा; मिंधा. 'ते ताबडतोब शांततेच्या ताटाखालचीं मांजरें होऊन जातील, असा सिद्धांत कशावरून काढला तो ! !' –नाकु ३.४३. **ताटेंतबकें** –नअव. ( व्यापक ) ताटें, तबकें वगैरे. [ ताटें+तबकें ]

**ताट**—न. ताजवा, कांटा बरोबर नसल्यानें वजनांत होणारी तफावत, अशुद्धता, अंतर. ताठ अर्थ ३ पहा.

**ताट**—न. गोणपाट. –शर. ताटुक पहा. [ तरट ] ( लिहिण्याच्या चुकीनें 'तरट' चा 'ताट' शब्द बनला असेल ? )

**ताट**—स्त्री. (क.) शेर, सावर इ०कांसारख्या जिवंत झाडाचें कुंपण. हा शब्द स्वतंत्रपणें क्वचित्च वापरतात. साधारणतः शेरताट, साबरताट अशासारख्या समासांत वापरतात. [ताटी]

**ताट**—न. खरबुजाची एक जात; हें आंतून तांबूस असून आकारानें चपटें असतें. –कृषि ५७२.

**ताट**—न. १ ( जोंधळा, बाजरी इ० कांचें ), उभें, जिवंत रोप. २ जोंधळा, बाजरी, बोरु इ०काचें कांड, काठी. 'पोरें न सांगती, पाळती । त्यांसी जाची नानागती । एक मुळावरीं बैसे श्रीपती । ताट हातीं घेऊनियां ।' –ह ७.२२१. [ ताठ, ताड ? ]

**ताट**—न. अजमासें पांच रुपये किंमतीचें 'सोन्याचें' एक नाणें. पुतळीचें ताट असाहि प्रयोग करतात. ताट अर्थ ४ पहा.

**ताट**—न. ( कु. ) स्पष्टार्थ. [ ताठ ? ]

**ताटंक**—न स्त्रियांचें एक कर्णभूषण; तानवडें. 'नाकीं बाळया, राखडया कर्णदेशीं । ताटंकातें गोविती केशपाशीं ।' –सारुह ७.६४. 'कर्णी ताटंकांचा झळाळ ।' –ह १.३५. [ सं. ]

**ताटकळणें**—अक्रि. १ ( बराच वेळ हालचाल न केल्यानें शरीर, शरीरावयव इ० ) ताठणें; ताठरणें; जड होणें. २ ( फार वाचल्यानें, झोंपेमुळें, तिष्ठत बसल्यानें डोळे ) ताठरणें; जड होणें. 'कां बसलासि उगा, जा, नृपमंडल सर्व ताटकळलें कीं ।' –मोभीष्म ६.२७. ३ ( एखाद्याची मार्गप्रतीक्षा करीत, वाट पहात ) तटस्थ बसणें. [ ताट ]

**ताटकळा, ताटकळ–ळी**—पुस्त्री. १ ताटकळल्यामुळें शरीर, शरीरावयव, डोळे इ०कांस येणारा ताठपणा; जाडय; ओढ; ताठरपणा; ताठरता. ( क्रि० बसणें; येणें; भरणें ). २ ( अनेकवचनीं प्रयोग ) हातपाय तापणें; आंगमोडे, अळेपिळे देणें. ( क्रि० देणें; येणें ). [ ताठा ] **ताटकळ्या देत बसणें**– ( एकाद्यासाठीं ) तिष्ठत बसणें.

**ताटका**—स्त्री. १ रावणाच्या बहिणीचें नांव; ताटिका. २ (ल.) जहांबाज, कजाख बायको; त्राटिका. ३ (ल.) धिप्पाड, कुरूप स्त्री. [ सं. ]

**ताटली**—स्त्री. लहान ताट. [ ताट ]

**ताटवा**—पु. १ ( फुलझाडांचा ) वाफा; तक्ता; रांग. तक्ता अर्थ ३ पहा. 'अग्रभागीं उत्तम फुलांचे ताटवे आहेत.' –चित्रसेन गंधर्व नाटक ११. २ फुलझाडांचा मांडव. ताटी अर्थ ५ पहा. [ सं. तट; तुल० का. तट्टी. ताटी पहा. ]

**ताटवा**—पु (व.) तट्या; बांबूची चटई. 'मांडवावर ताटवे घातले.' [ का. तट्टी=बांबूची चटई ]

**ताटस्थ**—वि. स्तब्ध; (प्र.) तटस्थ पहा. [तटस्थ] सामाशब्द– **०मुद्रा, ताटस्तमुद्रा**–स्त्री. ध्यानमुद्रा; (प्र.) तटस्थमुद्रा पहा. 'ताटस्थमुद्रा सकळाकारणें । तेल घालितां विझाला अग्न ।' **०वायु**– पु. मूर्च्छारोगाचा एक प्रकार.

**ताटस्थ्य**—न. १ प्रतीक्षा; मार्गप्रतीक्षा. २ ( भांडणाऱ्या दोन्ही पक्षांबद्दल ) उदासीनवृत्ति; तटस्थपणा; तिऱ्हाईतपणा. ३ ( एखादें कार्य इ०कांची ) थांबणूक; तात्पुरतें बंद पडणें. [ सं. ]

**ताटांक**—न. (प्र.) ताटंक पहा.

**ताटाळें**—न. (कर.) ताटें ठेवण्याचें लोखंडी पट्टयांचें घर. [ ताट+आळें ]

**ताटिका**—स्त्री. ताटका पहा.

**ताटी**—स्त्री. १ कामटयांच्या चौकटीस गवत, पानें इ० बांधून ( दार, खिडकी, कुंपण, भिंत इ०कांस लावण्यासाठीं ) केलेलें आच्छादन; आवरण; झडप. 'चिंता क्रोध मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।' –मुक्ताबाईकृत ताटीचे अभंग. २ मखराची शोभिवंत चौकट. मखर पहा. ३ तिरडी. ४ खालीं काठया बांधून तिरडीप्रमाणें केलेलें( पळसाचीं पानें इ० कांचें ) लांबट ओझें. ५ (फुलझाडांचा) ताटवा; वाफा; मंडप. 'लावण्यवेलीची ताटी लागली । कीं शृंगाराची वांठीवं पाहलेली ।' –शिशु ५९७. ६ कुंपण; वई ( शेर इ० शब्दास जोडून उपयोग ). ताट पहा. 'जयातें अभ्यासाची घरटी । यमनियमांची ताटी । जे मनातें सदा मुठी । धरूनि आहाती ।' –ज्ञा २.३११. ७ ( पेरूची या शब्दाबरोबर उपयोग. उदा० पेरूची ताटी ) पेरूच्या झाडांची ओळ; रांग. [का तट्टी=बांबूची चौकट, मखर; तुल० सं. तट] (वाप्र.) **०कापणें**–१ हातावर तुरी देणें; पोबारा करणें; गुपचुप पळ काढणें; पसार होणें. २ अन्हेर करणें; अंतर देणें. –राको.

**ताटी**—स्त्री. १ मूर्च्छा. 'विषयव्यालें मिठी । दिधलियां तुटी ताटी ।' –माज्ञा १२.२. २ समाधि. [ ताठ ]

**ताटुक**—न. (ना.) झांपा; लहानसें फाटक. [ ताटी ]

**ताद्र(टु)क**—न. जीर्ण गोणपाट. ' ऐक भुसाऱ्याच्या पोऱ्या जाऊन ताग तूं पेरावा। गोणी ताटुक वळावा। ' —ऐपो ५३. [ तरट—ताट=गोणपाट ]

**ताद्रक, तारट्या**—नपु. ( कों. ) लहान रेडा; रेड्क ( अव. ताटे ). —बदलापूर २१.

**ताद्रक**—न. १ जोंधळा, बाजरी इ०कांचें लहान ताट. २ लहान काठी; काद्रक. [ तांट ]

**ता(तां)टोळा, तांट्रळ**—पुन. १ ( प्रां. ) केळीच्या पानांतील मधला दांडा; देंठ. २ जोंधळा, बाजरी इ०कांचें ताट. [तांट]

**तारट्या**—वि. १ ( एखाद्याच्या ) पंक्तीला जेवावयास हजर असणारा; पंक्तिपठाण; कांहीं काम न करतां फक्त जेवणापुरता हजर राहणारा. २ एखाद्या मोठ्या गृहस्थाच्या पंक्तीस बसण्याचा मान असणारा. ' पैं बृहस्पती मुख्य आपण। ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राह्मण। तारियेचे सुरगण। बहुवस जेथें। ' —ज्ञा ९.३२५. [ताट]

**ताठ**—पु. १ ताठरपणा; न वांकणें किंवा वळणें; लवचीकपणाचा अभाव. २ ( अति श्रमामुळें, वराच वेळ बसून राहिल्यामुळें शरीर इ० कांस आलेला ) ताठपणा; जाडय. ३ ( ताजवा इ० कांचें ) वजनांतील विचलन; अशुद्धता; तंतोतंतपणाचा अभाव. ( क्रि० होणें; देणें ). ' ह्या ताजव्याला ताठ इतका आहे कीं एक गुंज टाकली तरी कांटा बराबर ' ४ गर्व; दिमाख; ताठा. —वि. १ ( शब्दशः व ल. ) न वांकणारा; न लवणारा; कडक; न नमणारा; ताठर. ' ना तो संशृतीसि ताठ। वज्रलेप। ' —ॠ ११. २ न बदलणारा; आपलें धोरण न सोडणारा; अचंचल; निश्चयी; करारी. ३ घट्ट; अंगास चांगलें बसणारें; सैल, लहान न होणारें ( वस्त्र, अंगरखा ). ४ ताणलेला; ताणून लांब केलेला ( दोर इ० ). ५ तारवट; ताठरलेला; ओढलेला (डोळा इ०). ६ धष्टपुष्ट; धट्टाकट्टा; मजबूत बांध्याचा. ७ पुरेपूर; भरपूर; तब्बल; पुरता. ' येथून तो गांव ताठ कोसभर आहे. ' ' तो ताठ सहा फूट उंच आहे. ' ८ ठसठसीत; भरदार; घसघशीत ( रोप, ऊंस, धान्य इ० ). ९ अविनयी; गर्विष्ठ. [ सं. दृढ—तड्ढ—ताठ —भाअ १८३२.; तुल० सं. तटस्थ. ] ०**वडा**—पु. १ गुर्मी; मगरूरी. २ दिमाख; ताठपणा. ' उर उघडा घडोघडीं करुन कुच, दाखवितां तुज ताठवडा। ' —प्रला १६२. [ ताठ+वट—ड प्रत्यय ]

**ताठ**—स्त्री. ( कु. ) इरल्यासाठीं तयार केलेली माणग्याची जाळी.

**ताठकळणें, ताठकळी**—ताटकळणें, ताटकळी इ० पहा.

**ताठणें**—अक्रि. १ ( अंग, नळ, शरीरावयव ) भरून येणें; फुगणें; जड होणें. २ ( दोर इ० ) ताणून लांब, सरळ केला जाणें. ३ ( पोट इ० ) फुगणें; फुगून ताठ, घट्ट होणें. ४ गर्वानें फुगणें; मदांध होणें. [ ताठ ]

**ताठणें**—अक्रि. मूर्च्छा येणें. [ ताठी ]

**ताठम**—वि. ( कों. ) ताठर; धष्टपुष्ट; तगडा; सुदृढ. ताठर पहा. ' ताठम टायबाल्टाला वार लागून पडला. ' —रोज्यू ११३. [ ताठ ]

**ताठर**—वि. १ ताणलेला; न वांकणारा; ताणून लांब केलेला ( दोर इ० ). २ वाळलेला; कडकः कोरडा; शुष्क; टणक (कागद, पान इ० ). ३ ( सामा. ) लवचीक नसलेला; न वांकणारा. ४ ( झोंप इ० मुळें ) ओढलेला; तारवटलेला; जड झालेला ( डोळा इ० ). ५ दाट विणीचें; घटमूट; अटस; घट्ट ( वस्त्र, कापड इ० ). ६ भरदार; घसघसीत (रोंप, पीक इ०). ७ भक्कम; मजबूत बांध्याचें ( घर इ० ). ८ ( व्यापक ) अगडबंब; अवाढव्य; भरभक्कम; अवजड; बोजड (ओझें इ०). ९ पुरेपूर; तब्बल. ताठ अर्थ ७ पहा. [ताठ]

**ताठरणें**—अक्रि. (शरीरावयव इ०) ताठ, जड होणें; भरून येणें; ताटकळणें. [ ताठर ]

**ताठा**—पु. १ (दोर, दोरी इ०कांचा) ताण; तणावा; ताठपणा. २ ( अंग, शरीरावयव, काठी इ० कांचा ) ताठरपणा; कडकपणा; लवचीकपणाचा अभाव. ३ ( एकसारखें पहात राहिल्यानें, झोंप येण्याच्या बेतांत असल्यानें डोळ्यांना येणारा ) जडपणा; ओढ; तारवटलेली स्थिति. ४ गर्व; अहंकार; मगरूरी; दिमाख; उद्धटपणा. (क्रि० भरणें). ' हीन देह आणी ताठा। ' —दा २.३.१५. ५ थंडीचा कडका. —शास्त्रीको. [ ताठ ] **म्ह०** नाकीं नाहीं कांटा आणि कोरडाच ताठा=शेखी मिरविण्यासारखें जवळ कांहीं नसणारांचा ताठा अस्थानीं, हास्यापद होय.

**ताठा**—पु. ( गो. कु. ) लांकडाच्या उभ्या काठ्या सरळ व एका रेषेंत राहण्याकरितां किंवा वई, कुंपण इ० ताठ राहण्याकरितां बांधलेली आडवी काठी. [ ताठ ]

**ताठी**—स्त्री. मूर्च्छा; बेशुद्धि. ताटी पहा. ' विषयव्याळें मिठी। दिधलिया नुठी ताठी। ते तुझिये गुरुकृपादृष्टी। निर्विष होय। ' —ज्ञा १२.२. [ ताठणें=जड, बधिर होणें ]

**ताड**—पु. नारळी, पोफळी या जातींतील एक उंच वृक्ष; ताल वृक्ष. हा आफ्रिकेंतून इकडे आला आहे. हें झाड उष्ण व दमट प्रदेशांत होतें. याच्या पानांपासून काढलेल्या तंतूंच्या टोपल्या, परड्या वगैरे करितात. यास पंख्याच्या आकाराचीं पानें असतात. त्यांचे पंखे करतात. याच्या पानांवर अक्षरें कोरून ग्रंथ लिहिण्याचा पूर्वी प्रघात असे. याच्या फुलांच्या देठांतून रस गळतो त्यास ताडी म्हणतात. [ सं. ताल; प्रा. ताड ] सामाशब्द— **ताडभर, तीन ताड उंच**-वि. अतिशय उंच. **ताडाचा बुंधा**-पु.(ल.) धिप्पाड व धष्टपुष्ट मनुष्य; अगडबंब मनुष्य. ०**गोळा**—पु. ताडाच्या फळांतील मगज, गीर. [ ताड+गोळा ] ०**पत्र**—न. १ ताडाचें पान. यावर अक्षरें कोरून लिहीत असत. ' तींच ताडपत्रें आणि त्याच

अक्षरपंक्ति तसें महाराजांचें झालें आहे.' –कमं २.५०. २ ताड पत्राचें स्त्रियांचें एक कर्णभूषण. 'ताडाचीं ताडपत्रें, गळा ल्यायली गळसरी।' –वसा ५५. [ताड+सं. पत्र=पान] ०**फल**–न. ताडवृक्षाचें फळ. ०**माड**–पु. १ ताडाप्रमाणें उंच व सरळ वाढणारी नारळीच्या झाडाची एक जात. –वि (ताडाच्या झाडाप्रमाणें) फार उंच; फाजील उंच. २ फार खोल (विहीर, खड्डा, तळें इ०). [ताड+माड] ०**माड उडणें**–आवेशानें, आनंदभरानें उंच उडया मारणें, बेहोष होणें. ०**माड सुजणें**–(एखाद्यानें) अतिशय, प्रमाणातीत सुजणें. (राजा.) ताडमाडास जाणें.

**ताड**—स्त्री. १ नागलीचा, नाचणीचा पेंढा, गवत. २ कोणत्याहि हलक्या धान्याचा पेंढा, भुसा, फोलकट. [सं. ताड=पेंढी]

**ताडक**—न. ताडाची फांदी, झावळी. [ताड]

**ताडकन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. १ ताड् असा शब्द होईल अशा रीतीनें (चाबूक, चपराक, लाथ इ० मारणें). २ (ताड् असा आवाज करीत) एकदम; चटकन एकाएकीं. खाडकन पहा. [ध्व.]

**ताडचें**—सक्रि. (गो.) वल्हविणें.

**ताडणें**—सक्रि. (चाबूक, छडी, काठी इ० कानीं) मारणें; चोप देणें; प्रहार करणें; शिक्षा देणें. [सं. ताडन]

**ताडणें**—सक्रि. १ (अनुमान, तर्क, कल्पना इ० कांनीं एखादी गोष्ट) जाणणें; समजणें; अटकळ करणें. 'त्याच्या मुखलक्षणावरून म्यां ताडलें कीं तो काम करून आला.' २ तुलना करणें; पडताळून पाहणें; अजमावून पाहणें; तुलना करून खरें-खोटें ठरविणें; पडताळणें (एखादें परिमाण, हिशेब, भाषण इ०). 'मी हें माप पुण्याच्या मापाशीं ताडलें.' 'त्यानें सांगितलेली गोष्ट मी ताडली.' 'हा गुणाकार दुसऱ्या रीतीनें करून ताडून पहा.' [फा.; हिं. ताड=समज]

**ताडताड**—क्रिवि. १ (उडणें या क्रियापदासह प्रयोग) जोरानें आणि वेगानें; उंच. २ आवेशानें; रागारागानें; तावातावानें. (क्रि० उडणें; बोलणें; मारणें). [ध्व. ताड् द्वि.]

**ताडन**—न. मार; चोप; शिक्षा. [सं.]

**ताडपट्टी**—स्त्री. ताडपत्री; तागाचें विणलेलें जाड कापड. 'त्यावर ताडपट्टयांचें आच्छादन केलेलें असतें.' –ऐरापु प्र. ११. ५७३. [ताट=तरट+पट्टी]

**ताडपत्री**—स्त्री. १ तांबडया किंवा इतर रंगाच्या व पांढऱ्या चौकटी असलेलें एक प्रकारचें रेशमी लुगडें. याचा तंजावरकडे प्रचार आहे. २ या प्रकारच्या वस्त्राचा शेला. हा वरील लुगडयाप्रमाणेंच असून लांबीला कमी पण अधिक रुंद असतो. हा स्त्रियांनां व पुरुषानांहि वापरतां येतो. ३ या जातीची पासोडी इ० वस्त्र. ४ रोगण लावलेलें एक प्रकारचें जाड व जलाभेद्य कापड. ताडपट्टी पहा. [ताड+पत्र]

**ताडबाजी**—स्त्री. अनुमानधपका; तर्क; अनुमान; कल्पनेनें ताडणें. [फा. (ताडणें+बाजी)]

**ताडमें**—न. (व.) घोडें; तट्टू.

**ताडव**—न. (कु.) नाचणीचें सुकें गवत; ताड (–स्त्री.) अर्थ १ पहा.

**तांडव**—न. (नृत्य) १ शिवनृत्य; शंकर आणि त्याचे गण यांचें नृत्य; अभिनयपूर्वक नृत्य; वीररसप्रधान मर्दानी नृत्य. 'वामांगीचा लास्य विलासु। जो हा जगद्रूप आभासु। तो तांडवमिसें कळासु। दाविसी तूं।' –ज्ञा १७.८. 'लास्य आणि तांडव। दोन्ही नृत्यांचे भाव।' –ह ५.६६. २ (एखाद्या क्षुल्लक गोष्टीबद्दल) मोहरीचा मेरु, रजाचा गज, राईचा पर्वत करणें; अतिशयोक्ति. ३ थयथयाट; आक्रस्ताळपणा करणें; आदळ आपट करणें. ४ एखाद्या बीजरूप सूत्राचा, गोष्टीचा तिखटमीठ लावून केलेला विस्तार; शब्दपाल्हाळ; अर्थवाद. 'या श्लोकावर ज्ञानेश्वरानें बहुत तांडव केलें आहे.' [सं.] ०**कृष्ण**–पु. १ (तांडव नृत्य करताना शरीर वक्र करावें लागतें यावरून) लंगडा बाळकृष्ण. २ (सांकेतिक) महादजी शिंदे; ह्याचा एक पाय पानपतांत जखमी झाल्यामुळें हा कायमचा लंगडा झाला होता म्हणून यास ह्या औपरोधिक नांवानें संबोधीत. 'तांडवकृष्णाकडे पत्रें पाठवावीं.' –ख ३२६४. [सं. तांडव+कृष्ण]

**तांडवचें**—सक्रि. (गो.) वल्हविण्यास लावणें [गो. तांडचें=वल्हविणें]

**ताडा**—पु. ताळा. १ (एखादा पदार्थ दुसऱ्याशीं) ताडून, तुलना करून पारखणें; बरा-वाईट ठरविणें. (क्रि० पाहणें). 'ह्या सोन्याशीं त्या सोन्याचा ताडा पहा.' 'ह्याचा त्याचा ताडा पाहिला असतां बरोबर होतील.' २ ताळा; पडताळा; मेळ; प्रचीति. (क्रि० मिळणें; पडणें). 'हिशेबाचा ताडा मिळत नाहीं.' ३ जोडीचा, तोडीचा, तोलाचा, बरोबरीचा मनुष्य, पदार्थ; जोड; प्रतिस्पर्धी. 'इचा ताडा कोणाला लागत नाहीं.' 'इचा ताडा निखालस.' (ह्या शब्दाबद्दल ताळा हा शब्द विशेष प्रचारांत आहे). [ताळा; फा. ताडा; म. ताडणें]

**ताडा**—पु. (तलवारीचें) पातें; पान. 'कटयार लोखंडी हरजिनसी ताडयास मुलामा सोनेरी.' –वाडसमा १.७३. [सं. ताल–ताड]

**तांडा**—पु. १ एकापाठीमागें एक असलेल्या, चाललेल्या एका जातीच्या बैल, उंट, मुंग्या इ०कांची रांग, ओळ, समुदाय. २ (विरू.) मनुष्यें, व्यापारी, लमाण इ०कांची टोळी, तुकडी, समुदाय, जमाव. ३ (व.) (पानें इ०चा) मळा; तांडें; तांडोन.

**ताडातुडी**—क्रिवि. एकाएकीं; अकस्मात्; तडकाफडकीं; एकदम. (क्रि० मरणें). 'तो ताडातुडी मेला.' [ध्व. ताड]

**ताडातोड-डी**—स्त्री. १ ( मायलेकरांची, नवराबायकोची, मित्रामित्रांची इ० ) जुलमानें झालेली, केलेली ताटातूट; वियोग; वाताहात; तडातोड. ( क्रि० करणें ); ताटातूट, वियोग करण्याचा व्यापार. २ ( कु. ल. ) तगाद्यामुळें बरीचशीं कामें माथीं मारलीं गेल्यानें होणारी (एखाद्याची) ओढाताण; कुतरओढ; ओढाओढ. [ ध्व. ताड+तोडणें ]

**ताडातोडा**—पु. १ टाणाटोणा; छाछू; मंत्रतंत्र; जादूटोणा; तोडगा. ' विद्या सिकविली पंचाक्षरी। ताडेतोडे नानापरी। ' –दा ५.२.५. २ गाण्याचें, कवितेचें एखाददुसरें कडवें. ' गाणें तर येत नाहीं उगीच ताडातोडा येतो. ' ३ मुख्य पिकांत पेरलेलें दुसरें, दुय्यम पीक; इरड, इरवड पहा. [ ? तोडा=तोडणें; तुकडा द्वि. ]

**ताडाफांटा**—पु. (उधळपट्टीनें उडविलेला पदार्थाचा) फडशा; फन्ना; निःशेषता; उधळपट्टी. [ ? +फांटा=निकाल द्वि. ]

**ताडामोडा**—पु. ( भांडींकुंडीं, दागदागिने, किडुकमिडुक इ०कांची केलेली ) मोडतोड; विक्री. ' कांहीं केला ताडामोडा। विकिला घरींचा पाडारेडा। ' –दा ३.४.१३. 'वडलांच्या वेळची वस्तवानी होती तिचा ताडामोडा करून सरासरी आजपावेतों दिवस लोटले. ' तोडामोडा, तोडमोड, मोडतोड पहा. [ तोडणें+मोडणें]

**ताडित**—वि. १ मार, चोप दिलेला; ठोकलेला; ताडन केला गेलेला; बडविलेला ( माणूस, नगारा इ० ). २ शिक्षा दिलेला. [सं.]

**ताडी**—स्त्री. ताडाच्या पोयीपासून निघणारा मद्योपयोगी द्रव, रस; ताडापासुन काढलेली दारू. ' मोही जसी गजा ताडी। ' –मोकर्ण ३२.४६. [ ताड ]

**तांडी**—स्त्री. १ कापडाच्या दुकानांत विक्रीकरितां मांडून ठेविलेली कापडाच्या ठाणांची रांग; ओळ; रास; ढीग. २ (सामा.) रास; ढीग; समुदाय; तांडा. 'तंवं बनां निंडी। देखीनिली पानांचीं तांडी। ' –शिशु ३११. ' अथवा शरीरातें सांडी। तऱ्ही इंद्रियांची तांडी। हें आपणपयांसवें काढी। घेऊनि जाय। ' –ज्ञा १५.३६४. तांडा पहा. ३ ( गो. ) गर्दी; ताणी.

**ताडुसा**—पु. एक प्रकारचा मासा. –प्राणिमो ८१.

**तांडें, तांडोन**—न. ( व ) नागवेलीच्या पानांचा मळा; तांडा पहा. ' बाऱ्याचें तांडें यंदा सुकलें. ' [ तांडा ]

**तांडेल**—पु. १ गलबतावरील मुख्य नाखवा. याच्या हातीं सुकाणू असतें. २ आरमारावरील खलाशांचा अधिकारी. ३ (वंजारी, लमाण इ०कांच्या तांड्यांतील ) मुख्य मनुष्य; पुढारी. [ तांडा ]

**ताड्या**—पु. ताडी काढणारा. [ ताडी ]

**ताढा**—पु. १ ( व. ) ताठा; ताठपणा. २ ताण. ' जेवणाचा ताढा पडला. ' –वि. तगडा; धिप्पाड; तरणाताठा. 'ताढा जवान.' [ ताठ ]

**ताण**—पु. १ (दोर, वस्त्र इ०कांस ओढ वसल्यामुळें त्याच्या ठिकाणीं येणारा ) ताठपणा; ओढ. ( क्रि० देणें; बसणें; भरणें ). २ ( ल. ) मोठा राग; संतापाचा झटका; फणकारा. (क्रि० येणें). ' वर्माची गोष्ट काढतांच कसा ताण आला.' ३ ( –पुन. ) अविरत श्रम; सततोद्योग; परिश्रम; ( अति श्रमानें शरीर इ०कांस येणारा ) गळाठा; शीण; थकवा; ग्लानि; ओढ. ४ अतिशय, सक्त तगादा; तांतड; निकड; नेट लावणें; अडचणींत आणणें; संकटावस्था प्राप्त होणें. ' रोजमुरा आला नाहीं म्हणून आम्हास ताण बसला. ' ५ तसदी; निकड; तंगी; तारंबळ; चिमटा; तंगचाई. ( क्रि० भरणें; लागणें; बसणें ). ६ अडचण, ओढ होण्याजोगी उणीव; तुटवडा. उदा० दाण्याचा–पिकाचा–पावसाचा–पैक्याचा–ताण. ( क्रि० पडणें ). ७ ( पाऊस ) उघडणें; राहणें; खुलणें; उघाडी; उघडीक. ( क्रि० देणें ). ' पावसानें चार दिवस ताण दिला म्हणजे लष्कर बाहेर पडेल. ' ८ –न. ( एखाद्या कार्यास ) अनुकूल परिस्थिति; योग्य समय; कार्यकाल; ऐन वेळ; संधि. ' भरतीच्या ताणावर महागिरी हकार ' ९ खिडकी, दार इ० कांच्या झडपास अडकविण्याचा पितळी, लोखंडी आंकडा; (इं.) हूक. १० भार; ओझें. ' आपले आंतड्यावर विशेष ताण पडणार नाहीं इतकेंच रोज अन्न खावें. ' [ सं. तन्=लांब करणें; तुल० गु. ताण=ढेंचाई ] ( वाप्र. ) (एखाद्यावर) **ताण तोडणें**–एखाद्यावर तणतणणें; ताशेरा झाडणें. **ताण देणें**–१ लांबणीवर टाकणें; खोळंबा, विलंब करणें. २ लंघन, उपास करणें. -शर. **ताणें ताणें, ताणताण**–क्रिवि. आवेशानें; जोरानें; तणतणा: ( व. ) ताडण ताडण. ( क्रि० जाणें; उठणें; मारणें; उडणें ). सामाशब्द– **०पट्टी**–स्त्री. १ (बांधकाम) कैंचीपैकीं ज्या भागावर ताण पडतो तो ( कैचीचा ) लांकडी भाग. २ (शिंपी) शिवलेल्या कपड्यास मजबुती, ताठपणा आणण्याकरितां लाविलेली कापडाची पट्टी. ' दोहोंकडे दोन ताणपट्या दिल्या आहेत. ' [ ताण+पट्टी ]

**ताण**—न. (कों. कु.) समुद्रास येणारी भरती; खाडींत, नदींत पाणी वर चढणें. ताण अर्थ ८ पहा. ( क्रि० येणें ). [ सं. तन्=पसरणें ]

**ताण–न**—स्त्री. सरशी; चढाई; वरचढपणा. ( क्रि० होणें; करणें ). ' इंग्रजांच्यावर मराठ्यांची ताण झाली. –इंप १३५. [सं. तन्] –वि. चढ; सरस. ' ती तुझ्यावर ताण आहे. '

**ताण**—वि. ( गो ) गबर; श्रीमान.

**ताणणी**—स्त्री. ( तंबू, छत, चांदवा, ताणा इ०कांस ) ताणून ताठ करण्याची, तणावा देण्याची क्रिया. [ ताणणें ]

**ताणणें**—उक्रि. १ ओढणें; लांब करणें; ताण देणें. २ एखाद्यास ) आशा लावून लोंबकळत, तरंगत ठेवणें. ३ ( मनुष्य, जनावर इ०कांस ) प्रमाणाबाहेर राबविणें; तांगडणें; ताबडणें. ४ रागें

भरणें; खरडपट्टी काढणें; खडसाविणें. [ सं. तन्=पसरणें, लांब करणें; हिं. तानना; गु. ताणवुं ] **ताणून, हातपाय ताणून निजणें**– आरामशीर, मनमोकळेपणानें, निश्चिंतपणें झोंपणें. –अक्रि. गमणें; चालढकल, अळमटळम, आज–उद्यां करणें; गुटमळणें. [ सं. तन्= लांब करणें ]

**ताणशेंवचें**—अक्रि. ( गो. ) रागारागानें बोलणें; तणतणणें.

**ताणा**—पु. १ ( विणकाम ) ( मागावर ताणून लांब केलेलें ) उभ सूत; धागा. याच्या उलट बाणा. 'कां तांथुवाचा ताणा। तांथु घालिता ५ ्गा। तो तंतूचि विचक्षणा। होय पटु।'–ज्ञा १८.३६०. २ ( राजा. कों. ) वेल; वेली. ३ ( राजा. ) वेलाच्या प्रत्येक पर्वास फुटणाऱ्या कोंवळ्या तंतूंपैकीं प्रत्येक. यांनीं वेल वृक्ष इ०कांस वेंटाळून धरून राहतो; पागोरा; वेलाची फूट. ४ ( दुधाळपणा, भलेपणा इ० सद्गुणांना कारणीभूत घोडा, बैल इ० जनावराचें) विजवट; अवलाद; मातृपरंपरा; जात. ५ कोळ्याच्या घराचा, जाळ्याचा लांब तंतु. [ सं. तान=तंतु, धागा; म. ताणणें ] ( वाप्र. ) **०काढणें**- ( माण. ) सूत मागावर घालण्याकरितां तयार करणें; उभे दोरे लावून घेणें. सामाशब्द– **०पाजणी**–स्त्री. १ ताण्यास ताठपणा आणण्याकरितां खळ लावण्याची क्रिया. २ ( ल. ) जिकीरीचें, दगदगीचें, त्रासाचें काम. ३ त्रास, दगदग, जाच, कुतरओढ, ओढाताण याअर्थी जिवाची ताणापाजणी असाहि शब्दप्रयोग करतात. [ ताणा+पाजणें ]

**टॉणॉ**—पु. ( गो. ) मोठा दांडा. [ ताणा ]

**टॉणॉ**—पु. मोठी ऊ. [ टेणा ]

**ताणाताण**—स्त्री. १ पुन्हां पुन्हां, जोरानें, धसफस करून ओढणें; ओढाओढ; ओढाताण. २ ( ल. ) मनाची अस्वस्थस्ता; ओढ; व्यग्रता. [ ताणणें द्वि ]

**ताणापणा**—पु. ( क्रोधाचा ) जळफळाट; चडफडाट; फणफणणें; तडफडणें. [ ताणणें+पणा ]

**ताणारी**—स्त्री. ( विणकाम ) मागावर घातलेला ताणा ताणण्याचें साधन, उपकरण. [ ताणा, ताणणें ]

**ताणी**—स्त्री. ( ताणा याचें अल्पत्वदर्शक रूप) उभ्या सुताचा, ताण्याचा कांहीं भाग, तुकडा. [ ताणा ]

**ताणी**—स्त्री. १ (गो.) सुताचा झेला; गुंडी. २ गर्दी; दाटी.

**तात**—पु. १ बाप; पिता; वडील. ' सुरयानी त्यासि म्हणे वदतां हे अशुभ कायहो तात।' –मोआदि ९.४५. 'मागसि तें दुर्योधन कैसें या तापसा जना ताता।'–मोअनु २.११. २ वडील माणसास (उदा० सासरा) आदरानें संबोधावयाचा शब्द. 'सावित्री म्हणे ताता, ऐसा न घडे विचार। तुम्हा तिघांवांचून आधीं न करी भोजन।' –वसा ५६. [ सं. ]

**तांत**—स्त्री. १ तंतु; तार; धागा; बारीक दोरा; तातू. २ मेंढी, बकरी इ० जनावरांच्या आंतड्यांची केलेली बारीक दोरी. ही कापूस पिंजण्याच्या कमानीस बांधतात. ' मजला तात करून कां द्याना।' –भज ५६. [ सं. तंतु ]

**तातकथय्या**—पु. १ नाचतांना होणाऱ्या आवाजाचा वाचक शब्द २ ( ल. ) मुलें खेळतांना करितात ती झिंबड; धिंगामस्ती; धुमाकूळ; थयथयाट; (मुलांचें - मजा मारतांना ) नाचणें, गाणें, खिदळणें इ० नाचरंग. [ ध्व. ]

**ता(तां)तड, ता(तां)तडी**—स्त्री. १ निकडीची वेळ; लवकर होण्याची जरूरी. ( क्रि० लावणें; करणें ). २ घाई; जलदी; लगबग; घायकूत. ( क्रि० असणें; होणें; लागणें ). ' तातडें येवोनि मिळतां तेथ।' -मुआदि ४.१११. 'तातडी जाहली शृंगारासी। काजळ ठायीं ठायीं माखलें मुखासी।' –ह ३१.१९९. ३ निकडीचा हुकूम; देखत हुकूम. ' सुटेल तातडी। पाटील बुवाची। मग पडेल माडी।' -भज ४४. [ तांत ? ] **तातडसार**–वि. १ कामांत गुंतलेला; घाईत असलेला. २ लगबग्या; घायकुत्या; अधीरा. [तातड] **तातडीं, तांतडीं**–क्रिवि. घाईनें; त्वरेनें; लगबगीनें. ' यापरि बोलोनिया तांतडी। हंस सोडिला तये वेळीं।' –कथा १.८.३३. [तातड] **तांतडी**–स्त्री.गर्दी; घाई; निकड. 'जेंचि पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं। प्रचित नाहीं कीं रोकडी। पंचभूतांचीं तांतडी। दोहीकडे।' –दा ९.५.४०. [ तातड ]

**तांतडणें**—अक्रि. घाईत असणें; निकड लागणें; तांतडीनें, त्वरेनें युक्त होणें. [ तांतड ]

**तातणें**—अक्रि. तप्त होणें; तापणें. ' विरहानलें तातली।' –शिशु १९६. ' तातलिये मुसें। मेण निघोनि जाय जैसें।'– ज्ञा ६.२४९. ' तातलों असें अग्नि जाळीं। म्हणोनियां।' –ख्रिपु २.३८.८६. –सक्रि. त्रास देणें; त्रस्त करणें. - शर. [ सं. तप्–तांत; तुल० सं. तप्त–तत्त–तात. –राजवाडे ]

**तातपुरचा-ता**—क्रिवि. प्र. तात्पुरचा. तात्पुरचा पहा. –शास्त्रीको.

**तातरा**—पु. गळथा इ०काच्या खालची पट्टी.

**तात(ता)वणें**—अक्रि. १ ( अनेक कामें, दुःख इ०कांनीं ). त्रासणें; त्रस्त होणें; जिकीरीस येणें. २ ( कांहीं कार्यांत व्यग्र असतांना कोणी कांहीं विचारिल्यास ) रागानें ओरडणें; चिरडीस जाणें; कातावणें. [ सं. तांत ]

**तातविणें**—सक्रि. तापविणें; तावणें. ' पण जो मधु हिंदुस्तानाप्रति। कल्पौरुखेआचा रसु काढिति। अग्निवरउनु कढविति। तातौनियां।' –ख्रिपु २.२२.५५. [ तातणें=तापणें ]

**तातवेळ**—स्त्री. तीव्रता; तीक्ष्णता. ' याच देहीं आपुले डोळां। जंव न भोगिजे मुक्तीचा सोहळा। तरी वैराग्याच्या तातवेळा। कां शिणावें।' –विपू १.२८. [ सं. तप्त ? ]

**तातवेळा-ळां**—क्रिवि. १ त्या वेळीं. ' जुंझ होईल तातवेळा। ' -उषा १.११७. २ त्या उद्देशानें. -मनको. [सं. तावत्+ वेला]

**ताता**—स्त्री. (गो. बालभाषा) झोंप.

**तांतियाळी**—वि. पुष्कळ अंडीं घालणारी (कोंबडी). तांतियाळी व मांसल असे कोंबड्यांचे दोन प्रकार असतात. [गो. तांती=अंडें]

**ताती**—स्त्री. इजा; ताप; बाधा. ' लाठा आइकिजे ईसाइन्यु वीरु। दुजा संभुचा अवतारु। मानु गोसावींयां समानु। म्हणौनि न ये ताती करुं। ' -उषा १०७१. [सं. तम्=श्रमणें-तांत; तुल० सं. तप्त-तत्त-तात. -राजवाडे]

**तांतीं**—न. (गो.) अंडें. [ ] ०पिर्लो-पु. (गो.) मूलबाळ; आबालवृद्ध. ' घरांतील एकूण तांतींपिर्लो आजारी पडले आहेत. '

**तां(ता)तू**—पु. १ धागा; दोरा; तंतु; तार; सूत. ' जैसा फुलाचेनि सांगातें। तांतु तुरंबिजे श्रीमंतें। ' -ज्ञा १८.८२२. २ पिंजलेल्या कापसाचा तार. ३ (बायकी) मुळांसकट उपटलेली व सोळापेक्षां कमी कांडीं नसलेली हरळी गवताची काडी. लग्नानंतर पांच वर्षे मुली ह्याची नवरात्रांत अष्टमीच्या दिवशीं पूजा करितात व हा देवीस अर्पण करितात. ३ (बायकी) एक एक हात लांबीचा रेशमी दोरा. लग्नानंतर नवपरिणीत वधूनें त्याची महालक्ष्मीव्रत म्हणून पांच वर्षे पूजा करावयाची असते. ही पूजा प्रतिवर्षी आश्विन शु. १४, वद्य ८ व १४ या दिवशीं करितात व शेवटल्या दिवशीं हा दोरा बोळवितात. मुलीनें ह्या दोऱ्यास आपल्या लग्नाचें जितकें वर्ष असेल तितक्या गांठी द्यावयाच्या असतात. [सं. तंतु]

**तांतूंत**—सना. (गो.) त्यांत.

**तांतो(त)ड**—पु. (गो.) एक प्रकारची तांबडी मुंगी; चावड.

**तातोबा, तात्या**—पु. बापास किंवा तत्सम वडील पुरुषांस सन्मानानें संबोधण्याचा शब्द. [सं. तात=बाप]

**तातोबाची मढी**—स्त्री. (ना.) (उप.) दुबळा व रोड मनुष्य.

**तात्काल-ळ**—क्रिवि. त्या क्षणीं; लागलींच; (प्र.) तत्काळ. [तत्काळ]

**तात्कालिक**—वि. १ त्या वेळचा; त्या काळचा. २ निकडीचा; त्या वेळीं आवश्यक असलेला. -शर [सं.]

**तात्विक**—न. (तात्विक हें चुकीचें रूप) सार; सारांश; निष्कर्ष; भावार्थ; तत्त्व; तत्त्वांश. -वि. १ तत्त्वाला, सत्याला धरून असलेला; खरा; वास्तविक; न्याय्य; प्रामाणिक. २ तत्त्वशास्त्रासंबंधीं; तत्त्वविषयक. ३ तत्त्वशास्त्रज्ञ. [सं. तत्त्व]

**तात्पर्य**—न. १ (भाषण, गोष्ट, लेख, वृत्तांत इ० कांतील) सारांश; मथितार्थ; भावार्थ; मतलब; अभिप्राय. २ हेतु; धोरण; उद्देश; कारण. [सं.] **तात्पर्यार्थ**-पु. (लेख, भाषण, हकीकत इ० कांतील) सार; रहस्य; निष्कर्ष; तात्पर्य; गोळाबेरीज. [तात्पर्य+ सं. अर्थ]

**तात्पुरचा**—क्रिवि. मुद्दाम; जाणून बुजून; बुद्धिपुरःसर; समजून उमजून; याच्या उलट सहजासहजीं; यदृच्छेनें. ' मी जें नको म्हणतों तें हा तात्पुरचें करतो. ' [सं. तत्पूर्वक, तत्पुरःसर]

**तात्पुरता**—वि. १ त्या वेळेपुरता; हंगामी; चालचलाऊ; ती वेळ निभावण्यापुरता. २ (ना.) मुद्दाम; तेवढ्याच कामाकरितां. ३ (ना.) लगबगीनें. 'रामचंद्रराव कैदेंत गेले हें ऐकतांच मी तात्पुरता येथें धांवून आलों. ' [सं. तत्+म. पुरता (पुरणें)]

**तात्या**—पु. १ (सामा.) वडीलधाऱ्या पुरुषास उद्देशून आदरानें वापरावयाचा, संबोधण्याचा शब्द. २ मुलें पंतोजीस उद्देशून योजतात तो शब्द. ३ (सांकेतिक) पेशव्यांचे एक सेनापति हरिपंत फडके. -ख २४९१. -पया १३३. ' तात्यांत तात्या हरिपंत तात्या। ' [सं. तात] ०पंतोजी-पु. १ मराठी शाळामास्तर; गांवठी शिक्षक. २(निंदाव्यंजक) जुन्या वळणाचा शिक्षक.

**तांत्रिक**—वि. १ तंत्रशास्त्रांतील विधिनियमांप्रमाणें वागणारा; तंत्रशास्त्रवेत्ता; शक्तिउपासक. २ उपासनामार्गीय पूजाविधि, मंत्र इ० जाणणारा व त्यामार्गें वर्तणारा. ३ (जारणमारण, धार्मिक विधि, मंत्र इ० कांच्या) तंत्रासंबंधीं; तंत्रविषयक; तंत्रोक्त. ४ (स्वतःच्या धंद्याचें कलेचें) वरवर, तुटपुंजें ज्ञान असलेला. ५ जीं अंगें वगळतां येत नाहींत तींच ठेवून, बाकीचीं गौण अंगें सोडून केलेला (धार्मिक विधि, कृत्य इ०). ' त्यानें कथा तांत्रिक केली. ' ६ (सामा.) संक्षिप्त रूपानें आचरलेला. ' मार्गी सर्व कामें तांत्रिक करावीं. ' ७ तात्पुरतें; संक्षेपरूप; त्रोटक. ' सांप्रत पैशाची अडचण आहे, खर्च तांत्रिक करा. ' [सं. तंत्र]

**तांथ, ताथु**-थू—पु. (प्र.) तांत; तंतु. तातू पहा. ' केऊता ताथु पटु। सांडील तो। ' -ज्ञा १८.२१९.

**ताथय्या**—पु. धिंगामस्ती; धिंगाणा; थयथयाट. तातकथय्या पहा. [ध्व.]

**ताथवड, ताथोड-र, ताथा**—वि. (कों. ना. व.) १ ताजा; शिळा, वाळका नसलेला. 'काथी ताथी साथी चरुसह चाकवत चुका, ' -अमृत ३४. २ नवा; नवीन; अगदीं अलीकडचा; सांप्रतचा. [फा. ताझ्]

**तार्थोमार्थो**—पु. (गो.) बडेजाव; बरदास्त; पाहुणचार; आतिथ्य. [थाटमाट अप.]

**तां(ता)दळा**—पु. १ (तांदुळाच्या दाण्यासारख्या आकाराच्या) पाषाणास शेंदूर फांसून बनविलेला अवयवरहित, आकाररहित

देव; निरावयवी पाषाणाचा देव (गणपति, म्हसोबा इ० प्रमाणें). 'बाण तांदळे नर्मदे देव।' -दा १९.५.२. 'देवीचा तांदळा फार मोठा व शेंदूरचर्चित अक्राळविक्राळ असा फार भयंकर होता.' -धर्माजी २०८. २ (ल.) बेडौल व वेडेंवांकडें भांडें, पदार्थ. [तांदूळ]

**तांदळॉ**—पु. (गो.) एक प्रकारची पांढरी मासळी. [म. तांदूळ; प्रा. तंदुल=मत्स्यविशेष]

**तांदळी**—स्त्री. नाचणीची एक हळवी जात; हिचा दाणा पांढरा असतो. -कृषि २८३.

**तांदळीपोत**—स्त्री (सोनारी धंदा) तांदुळासारखे बारीक अणकुचीदार सोन्याचे मणी ओंवून त्यांचे दोनपासून पांचपर्यंत सर असे पटवावयाचे कीं सर्व सरांना सामान्य असा जाळीचा मणि त्या सर्व मण्यांच्या मधोमध राहील. अशा तऱ्हेनें केलेला स्त्रियांचा एक दागिना. [तांदूळ+पोत]

**तांदळें**—न. (गो.) तांदुळाचें धुवण. [तांदूळ]

**तादात्म्य**—न. १ (दोन) पदार्थांचें परस्पर अद्वैत, एकरूपता; 'अग्नि आणि अग्नीची ठिणगी या दोहोंच्या तादात्म्यासारखें परमात्मा आणि जीवात्मा यांचें तादात्म्य आहे.' २ आत्मे अथवा भावना यांमधील अद्वैत, एकरूपता; एकतानता, ऐक्यभाव. [सं. तत्=तो+आत्मा]

**तांदुगाधतुरा**—पु. घोडयाचा एक रोग; यांत घोडयाचे दोन्ही पाय सुजून मोठे घट्ट-नारळाप्रमाणें होतात. -अश्वप २.२६०.

**तांदु(दू)ळ**—पुअव. १ एक धान्यविशेष; भात कांडून, साफ करून काढलेले दाणे २ हरीक, राळा, वरी, बरटी, सावा, कांग इ०कांचे भाताच्या तांदुळाप्रमाणेंच तूस काढून साफ केलेले दाणे. ३ उपासाच्या दिवशीं फराळाकरितां, (साळीचे) तांदूळ तुपावर भाजून नंतर शिजवून करतात तो भात; सोजी, धान्यफराळ. ४ तांदुळाच्या आकाराचे सोन्याचे मणी. हे ओंवून तांदळीपोत करतात. तांदळी पोत पहा. (तांदूळ शब्दाचा एकवचनी उपयोग केल्यास एक दाणा असा अर्थ होतो). [सं. तंडुल] **उकडे, उपजे तांदूळ**-पु. (हेट.) भात प्रथम उकडून नंतर तयार केलेले तांदूळ. **सुरय तांदूळ**-पु. (हेट.) भात न उकडतां कुटून तयार केलेले तांदूळ. **०गोटा**-पु. १ (व्यापक.) तांदूळ आणि इतर सर्वसामान्य धान्यें. २ तांदुळाचा दाणा. [तांदूळ+गोटा=दाणा] **०धुणी रोवळी**-स्त्री. तांदूळ धुण्यासाठीं केलेली बांबूची, पितळेची टोपली. **०मांडा**-पु. (बे.) तांदुळाचें पीठ, दूध व साखर यांची तयार केलेली आंबोळी. **तांदुळी हलवा**-पु. खांडव्याच्या वडयाप्रमाणें पक्वान्न; तांदुळापासून केलेलें एक खाद्य; तांदूळ भिजत ठेवून चुरून ते मऊसे शिजल्यावर त्यांत नारळाचें दूध, दालचिनी, खिसमिस घालून ढवळतात व त्याला तुपाचा हात देतात. हें मिश्रण घाटून बरेंच जाड झाल्यावर तुपाचा हात लावलेल्या ताटासारख्या पसरट भांडयांत तें ओततात व थापून त्याचे सुरीनें तुकडे करतात (असें खाद्य). -गृशि १.४१८.

**तांदुळजा-चा**—पु. एक पालेभाजी; चवळाई. या वनस्पतीच्या तीन जाती आहेत. त्यांपैकीं एक भाजीपाल्याकरितां बागेंत लावतात. दुसरी रानटी असून तिचा औषधी उपयोग आहे व तिसरीची धान्याकरितां शेतांत लागवड करितात. तांदुळजाचें धान्य इतर धान्यापेक्षां फारसें कमी पौष्टिक नसतें. -ज्ञाको(त) ४०. [तांदूळ]

**तादृश**—वि. १ त्याच्यासारखा; त्या प्रकारचा; तसा. २ साधारण; जेमतेम; यथातथा; विशेषसा, तितकासा, तितपत, म्हणण्याजोगा नव्हे (चांगला, उपयोगी, सुरेख इ०); अकरणरूपी प्रयोग. जसें:-घोडा घेतला परंतु तादृश नाहीं; रोजगार मिळाला परंतु तादृश नव्हे. 'त्या वेळेस मराठी भाषा तादृश परिपक्वतेस आली नव्हती.' -नि ३१०. ३ अल्पहि; यत्किंचितहि. 'रुमाल घेतला खरा पण त्याचा तादृश उपयोग नाहीं.' [सं.]

**तादूप्य**—न. तद्रूपता; तदाकारिता. [सं. तत्=तो+सं. रूप+आकार]

**ताधड**—स्त्री. (ना.) घाई; धांदल. [तातड]

**ताधरावि(व)णें**—सक्रि. (कों.) (एखाद्यास कांहीं कार्याविषयीं) गर्दी, घाई करणें; त्वरा करून घाबरविणें; घाबरें करणें; तगादा लावून गोंधळून टाकणें.

**तान्**—शअ. (राजा. कुण.) पर्यंत; पावेतों. -मसाप २.३६१.

**तान**—स्त्री. १ (संगीत) सूर; स्वर. २ आलाप; लकेर; स्वरांचा केवळ आरोह करणें. 'गंधर्वांच्या भरिलें होतें नभ सर्व मधुर तानाहीं।' -मोअनु ५.४३. ३ (संगीत) स्वरांनीं रागाचा विस्तार करणें. याचे मुख्य शुद्धतान व कूटतान असे दोन प्रकार आहेत. स्वरसंख्येवरून तानेचे आर्चिक, गाथिक, सामिक व स्वरांतर असे चार प्रकार होतात. शिवाय बोलतान, दूनीची तान इ० प्रकार आहेत. शिवाय औडुव; षाडव व संपूर्ण असेंहि तानेचे भेद मानले आहेत. ४ (अक्षरशः व ल.) एका दमांत, नेटांत केलेली क्रिया; सारखा वर्षाव; झोड; झिंबड. जसें- गाण्याची-शिव्यांची-मारण्याची-बोलण्याची-तान. (क्रि० घेणें; झाडणें). [सं. तान] **०कर्म**-न. १ (संगीत) गायनापूर्वी सूर मिळविण्याकरितां, कंठ साफ करण्याकरतां आलाप घेणें इ० क्रिया; सारेगम करणें; आवाजी लावणें; सूर जमविणें. २ एखादा सूर, आलाप स्वतःशींच गुणगुणणें; तान मारणें. **०बाजी**-स्त्री. १ आलापचारी; तानकर्म अर्थ १ व २ पहा. २ मोठयानें आणि लोंचटपणानें आरडणें; गर्जणें; गाणें. [हिं.] **०मान**-न. १ (एखाद्या कार्यास) योग्य, अनुकूल परिस्थिति; स्थळ आणि काल यांची अनुकूलता; संधि;

ताळतंत्र: रागरंग. 'व्यवहार करणें तो तानमान पाहून करावा.' २ यथायोग्य जुळणी आणि प्रमाणबद्धता; मेळ; जम. ३ गाणेंबजावणें. 'विनोदार्थी भरे मन। शृंघारिक करी गायेन। राग रंग तान मान। करी तो रजोगुण।' –दा २.५.२४. [तान+सं. मान=मापन, प्रमाण]

**तान**—स्त्री. एक वनस्पतिविशेष.

**तान**—स्त्री. १ तहान; तृष्णा; पाणी पिण्याची इच्छा. (प्र.) तहान पहा. २ (ल.) (एखाद्या वस्तूविषयीं, गोष्टीविषयीं) अति लोभ; हव्यास; उत्कंठा; अनावर इच्छा. ३ लहान मुलास होणारा एक उष्णताजन्य विकार. [सं. तृष्णा; प्रा. तण्हा; म. तहान] (वाप्र.) **०घालणें-धरणें**–लहान मुलाच्या तान रोगावर (अंगाला थंडावा येण्याकरितां पानें इ० बांधून) उपाय करणें. सामाशब्द– **०भूक**–स्त्री. १ तहान आणि भूक. २ (व्यापक) शारीरिक गरजा, वासना इ०. 'आपलें दर्शन मला होतांच माझी तानभूक मोडली.' **०मोड**–स्त्री. तहानमोड पहा. **०लाडू**–पु. १ तहान लाडू पहा. २ (गो.) तहान भागणारें पेय. **तानेजणें**–अक्रि. (बे) (जनावर इ०) तहानेनें युक्त होणें.

**तान**—पु. (वि.प्र.) ताण ताण पहा.

**तान**—वि. १ घट्ट; भरदार विणीचें; घटमूठ; मजबूत (कापड, वस्त्र इ०). २ (नंदभाषा) महाग; भारी किंमतीचें; याच्या उलट खोंच=स्वस्त; कमी किंमतीचें. [ताण]

**तान-ना-नी**—वि. १ आईच्या अंगावर दूध पिणारा; (विरू.) तान्हा पहा. २ लहान. 'कां जे कृष्णजननीसि नाहीं। तानें थोर निवडुं।' –रास ३.६०३. ३ नुकतीच व्यालेली (गाय, म्हैस). [सं. तनु=बारीक ?] **०गाभणें-गाभास जाणें**–अक्रि. एक वासरूं, पारडूं इ० अंगावर दूध पिण्याइतकें लहान, तान्हें असतांना गर्भवती होणें (गाय; म्हैस इ०नीं). [तान+गाभ=गर्भ] **०गाभा**–वि. १ वासरूं, पारडूं इ० दूधपितें असतांना गाभण होणारी. लवकर लवकर गाभण होणारी; दर वर्षी विणारी (गाय, म्हैस इ०). २ पहिलें मूल अगदींच तान्हें असतांना सहा सहा महिन्यांनीं गरोदर राहणारी (स्त्री). [तानगाभणें] **०वट, ताना**–वि. (राजा.) तान्हवट, तान्हा पहा.

**तानणें, तानातान**—(विरू.) ताणणें, ताणाताण पहा.

**तानणें**—सक्रि. (माण.) पळविणें.

**तानतान**—क्रिवि. आवेशानें: रागारागानें; त्वेषानें. (क्रि० बोलणें; उडणें; उडी मारणें). तात्ताल पहा.

**तानपणें**—अक्रि. (कु.) लहान मुलास उन्हाळयामुळें विकार होणें. [तान]

**तानवट**—न. (विणकाम) कुकडें (चातीवरील सूत) गुंडाळण्यासाठी व चिवट (सुताची गुंडाळी) तयार करण्यासाठीं केलेली खुंटयांची, मेखांची चौकोनी रचना. [सं. ताण=तंतू+वट प्रत्यय]

**तानवड**—स्त्री. (राजा.) एक फुलझाड. –न. तानवडीचें फूल. [तान=वेल ?]

**तानव(वी)ड, तानवडें**—न. स्त्रियांचें एक प्रकारचें कर्णभूषण; ताटंक. 'तानवडें मणिमंडित कर्णी।' –अकक २ गोसावीनंदनकृत ध्यान ३. 'आपण शयन कीजे नारी। चोळी, तानवडें ठेवावीं दुरी।' –गुच ३१.३६. [तान=एक फूल+सं. वृत्त; प्रा. वट्ट=वडी, गोलाकार ?]

**ताना**—न. (जुन्नरी,) वेल; ताणा. 'हा घेवडयाचा ताना आहे.' तान पहा.

**ताना**—पु. (व.) पुष्कळशा सुताचा पिंडाळा; गुंडी. [सं. तान=सूत]

**ताना**—पु. ताठा. 'गर्वमदें किति धरसिल ताना।' –आपद २५. [सं. तन; म. ताण]

**तानातान**—स्त्री. (प्र.) ताणाताण पहा.

**तानाशा**—पु. १ प्राचीन काळीं होऊन गेलेला एक सम्राट. २ (ल.) चैनी व विलासी मनुष्य; रंगेल गडी. [तानशहा]

**तानीमासी**—स्त्री. (चंद्रपुरी) तान्हें मूल. [तान+लहान पहा.]

**तानीया**—पु. (जरतार धंदा). तार ओढणारा मनुष्य. [ताणणें]

**तानुला**—वि. तान्हुला पहा.

**तानोडें**—न. (व.) तानवडें पहा.

**तान्नावणें**—सक्रि. ताणणें; ताणून बांधणें; मारणें. [ताण; तणावा]

**तान्ह**—स्त्री. तहान; तृषा; तान पहा. 'मृगजलानें तान्ह भागणें किंवा वाळूपासून तेल निघणें जसें अशक्य...' –गीर २०९. [सं. तृष्णा; प्रा. तण्हा; म. तहान] **तान्हावणें**–अक्रि. (राजा.) तहानेनें युक्त, पीडित होणें; तृषित होणें. **तान्हा(ना)ळू**–वि. तान्हेला. तृषित. **तान्हेणें**–अक्रि. (काव्य.) तहानेनें युक्त होणें; तृषाकुल होणें. 'तान्हेजल्या सन्मुख तोय आलें।' –सारुह ७.१०. **तान्हेणें**–अक्रि. (राजा.) तहान लागणें; तहानेनें युक्त होणें; तान्हावणें. **तान्हेला**–वि. १ तान या रोगानें पीडित. २ तहानेला; तृषार्त; तहानेनें व्याकुळ झालेला. 'हातींचें रुधिरूं पीतांतीं तान्हैले। तडस भणौनीं।' –शिशु १०५६.

**तान्हवट**—वि. १ जिचें वासरूं, पारडूं अंगावर पिणारें आहे अशी (गाय, म्हैस, जनावराची मादी). २ (एखाद्या समुदायापैकीं) उत्कृष्ट; मुख्य; उत्तम. ३ (कु.) तान्हा; मातेच्या अंगावर पिणारा, पिण्याइतका लहान.

**तान्हा**—वि. १ आईच्या अंगावर असलेला; स्तनपान करणारा (वत्स, मूल, वासरूं, पारडूं). बाळ; बालक. 'जे तान्हेनि मियां अपत्यें। आणि माझें गुरु एकलौते।' –ज्ञा १५.१९. 'म्हणे माता तान्हया काय झालें।' चिंतामणि–ध्रुवाख्यान (नवनीत पृ.

१११.) २ जिचें वासरूं, पारडूं अंगावर पितें अशी ( गाय, म्हैस इ० जनावरांतील मादी ); ३ नुकतीच व्यालेली ( या अर्थी हा शब्द साधारणपणें जनावराच्या मादीच्या संबंधानेंच वापरतात ). ४ ( सामा. ) लहान; बाल. [ सं. तनु=लहान ? सं.स्तन्य ] **तान्ही ओलवल**–स्त्री. पावसाळ्यांतील पहिल्या पावसानें जमीनीला, शेताला येणारी मागुली, तात्पुरती, थोडीशी ओल. **तान्हुला**–वि. लहान; तान्हें ( मूल इ० ). ' येकटें मही मम तान्हुलें । '–नव १२. ९०. **तान्हे पारठे**–पुअव. आईच्या अंगावर पिणारें मूल व पारठीं, म्हणजे त्याच्याहून मोठीं असलेलीं मुलें समुच्चयानें: ( सामा. ) चिलींपिलीं; लहान मुलें इ०. [ तान्हा+पारठा ]

**ताप**—पु. १ ज्वर; शरीराचा दाहदर्शक विकार. २ (सूर्याची, अग्नीची) उष्णता; तीमुळें झालेली पदार्थाची उष्णावस्था; तप्तता; ऊनपणा. 'त्यासि जळीं होतां निमग्न । जळाचा ताप शमे संपूर्ण । ' –एभा ३.४५५. ३ ( ल. ) क्रोध, लोभ इ० मनोविकारांचा क्षोभ; तीव्रता; उद्दीपित स्थिति. ४ संसारामुळें होणारी दगदग; यातायात. ५ तळमळ; मनाची अस्वस्थता; संताप. ६ (सामा.) दुःख; कष्ट; त्रास. ' तैसें पुढिलाचेनि तापें । कळवळलियें कृपें । '–ज्ञा १६. १५७. ' आलां हतभाग्येच्या पोटाला म्हणुनि भोगितां ताप । ' –मोसभा ७.४३. ७ ( सावकार, राजा, लुटारू; उंदीर, ढेंकूण, इ०कांनीं केलेला ) उपद्रव; छळ; जाच; छळणूक. ' नवपंचकशी काया हरहर तरि तीहि ताप देत असे । ' –कमं २.७१.८ –स्त्री. ( पावसाळ्यांतील, पावसाळ्याच्या थोड्या नंतरचें ) सूर्याचें प्रखर ऊन. ९ ( व. ना. ) शेक; विस्तव; शेकोटी. १० उन्हाळा. ' निरंतरामंद मरंद वाहे । तापांतही यास्तव रिक्त नोहे । '–र ८. [ सं. तप्=तापणें; ताप ] **०येणें**– १ ज्वरविकार होणें. २ ( तंबाखूचा धंदा ) तंबाखूचीं पानें कापून त्यांच्या जुड्या बांधून, दडपून ठेवल्यावर तीं तिसऱ्या–चवथ्या दिवशीं गरम होणें ' तंबाखूस पहिला ताप आला. ' सामाशब्द– **०करी**–वि. तापानें, ज्वरानें आजारी असलेला. **०त्रय–न.** १ प्राणास भोगावी लागणारीं आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक या तीन प्रकारांचीं दुःखें, भोग; त्रिविध–ताप पहा. ' जिव्हारीं आगी सूदली । तापत्रयाची । '–ज्ञा ३. २५४. ' होतां तापत्रयार्त त्वरित भववनीं रक्षिता रानटाचा । ' –केका १२२. २ दारिद्र्यदुःख, दशा; गरीबीच्या यातना. [ ताप+सं. त्रि–त्रय=तीन] **०पोळी**-वि. शब्दादि विषय.–मनको. **तापापह**–वि. तापांचा, दुःखांचा नाश करणारा; तापनाशन. ' भक्तभावभुवनदीप । तापापह । '–ज्ञा १८.८. [ ताप+सं. अप+हन्= नाश करणें ]

**तॉप**—(गो.) (जुगारी लोकांत रूढ) मान्य; कबूल. **तॉपखेस करचें**– ( गो. ) जुगार खेळणें.

**तापक**—पु. वाफेनें चालणाऱ्या यंत्रांतील पाणी तापवावयाचा नळाकार भाग. –ज्ञाको (त) ९३. ( इं. ) बॉयलर्.

**तापट–ड**—वि. १ क्षुल्लक कारणानें संतापणारा; तामसी; रागीट; संतापी. २ चलाख; चपळ; तडफदार. ३ पाणीदार; रगदार; तल्लख ( घोडा इ० जनावर ). याच्या उलट मंद. [ ताप ]

**तापटणें**—न. १ नांगर हांकणाऱ्या शेतकऱ्याचा आंखूड चाबूक, आसूड. लांब चाबकास चाव्हऱ्या आसूड म्हणतात. २ (कांहीं प्रांतांत) चाव्हऱ्या असुडाचा दांडा. [ ताप; चापटणें ]

**तापटा–टी**—स्त्री. ( कों. ) नदीच्या प्रवाहांतून इकडे वाहून नेण्याकरितां केलेली शिडीसारखी लांकडांची रचना; ताफा.

**तापडाई**—स्त्री. १ स्वभावाचा तामसीपणा; रागीटपणा; तापटपणा. २ पाणीदारपणा; तल्लखपणा; चपलता. [ तापट ]

**तॉपण**—न. (गो.) मूठ असलेला दाभण; सामता. [ टोपण ]

**तापणें**—अक्रि. १ ( सूर्य, अग्नि, ज्वर इ० कांच्या योगानें ) पर्वत, शरीर इ० तप्त होणें. २ (ल.) काम, क्रोध इ० विकारांनीं) क्षुब्ध, संतप्त, उद्दीपित होणें; संतापणें; रागावणें. ३ ( ल.) ( दुःख, शोक इ०कांनीं ) तळमळणें; व्याकुळ, घाबरें होणें; पोळणें; 'अनुदिनि अनुतापें तापलों रामराया । ' –रामदास–करुणाष्टक १. (नवनीत पृ. १७०). 'करूं वरि कृपा हरूं व्यसन दीन हा तापला । ' –केका ९. ४ (विषयवासना, तृष्णा) चेतणें; उद्दीपित, क्षुब्ध होणें; विकोपास जाणें. ५ (व.) शेकणें. [ताप] (वाप्र.) **गळा तापणें**–कांहीं वेळ गायन केल्यानें कंठांतून बराच मोठा स्वर निघावा अशी दशा होणें. **तापल्या तव्यावर (पोळी) भाजून घेणें**– एखाद्या कार्यांत दुसरें कार्य सहजासहजीं होण्यासारखें असल्यास अवश्य करून घेणें; वाहत्या गंगेंत हात धुणें. **तापल्या पाठीनें**–क्रिवि. अंगांत उमेद, जोम, ताकद आहे तोंपर्यंत. **म्ह०** तापल्या पाण्याला चव नसते. मैत्रीचा एकदां भंग झाला तर ती पुन्हां पूर्ववत् सुखकारक होत नाहीं.

**तापता, ताप्ता, ताफ्ता**—पु. एक प्रकारचें चमकणारें रेशीम, रेशमी वस्त्र; कौशेय. ' राजश्रीराव यांजकडे दांडलकडी खेळते समई हातास बांधावयास रुमाल तापत्याचा. ' –वाडसमा १.११७. [ फा. ताफ्ता (ताफ्तन्=पिळणें); फ्रें ताफेता; इं. टाफेटा ]

**तापतोबारा**—पु. आगपाखडणें; रागाचें अवडंबर, चडफडाट; बडबड; प्रलाप; तोंडमुख; अपशब्दांचा भडिमार. ( क्रि० करणें; लावणें; मांडणें ). [ ताप+तोबारा; द्वि. किंवा ताप+वार ? ] **म्ह०** तापतोबारा आणि फुटका नगारा.

**तापन**—न. तापविणें. ( ल. ) रागवावयास लावणें; चेतविणें; संतापविणें. [ सं. ]

**तापयोक–ग**—पु. (गो.) सागूचें, साबूदाण्याचें झाड. [ पो. तापिओका ]

**तापविणें**—सक्रि. ( एखादा पदार्थ अग्नि, सूर्याचें ऊन इ० कांच्या संयोगानें ) तप्त, गरम, उष्ण करणें. [ तापणें प्रयोजक ]

**तापस-सी**—वि. (काव्य) तपश्चर्या करणारा; तपस्वी; योगी; ऋषि; साधु. 'तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु। आणि जयाचा अहा कंपु। तापसांशी।' -ज्ञा १८.१०५७. [सं. तप-तापस]

**तापा**—पु. ताफा; तराफा. ताफा अर्थ १ पहा. 'न बुडवि जड सिंधु तोहि ताप्याला।' -मोकी ४.२९. [अर. ताइफा; अर. ताफिह्=भरून वहाणें ?]

**तापाटी**—स्त्री. (कों.) उतापपणा; ताप; उन्हाची प्रखरता. याच्या उलट सावट=छायेची विपुलता. [ताप] **०ची जागा**-स्त्री. जीवर सदोदित ऊन असतें ती जागा.

**तापित**—वि. १ तापविलेला; ऊन केलेला; तापलेला. २ (ल.) (विषयवासना, क्रोध इ०कांनीं) प्रक्षुब्ध झालेला, उद्दीपित झालेला. [ताप]

**तापिष्ठ**—वि. कोपिष्ट; शीघ्रकोपी; रागीट; अतिशय तापट. [ताप]

**ताफता**—पु. एक प्रकारचें चमकदार रेशमी वस्त्र; तापता पहा. 'लाखी, माची, दुरंगी, बहुत ढिग तसे ताफत्या वाफत्यांचे।' -सारुह ३.४१. [फा. ताफ्ता]

**ताफदान रोटी**—स्त्री. एक प्रकारची भाकरी. हिच्या पृष्ठभागावर-आंत तूप जिरावें म्हणून-टोंचे मारतात. -गृशि २.१७

**ताफा**—पु. १ (कलावंतीण व तिचे साजिंदे व वाद्यें यांचा सूर, सनई, संबळ इ० सहित वाजंत्र्यांचा एकत्र) साज; समुदाय; फड; चक्री; मेळ; संच; टोळी. 'रात्रीं कंचन्यांचे ताफे बोलाऊन नाच, रागरंग, आतशबाजी रोषनाई जाली.' -रा ७.२२५. २ घोळका. 'तीस हजार फौज अदकोस पर्यंत ताफाचा ताफा एकदाच आरडाओरडा झाला.' -भाब ६७. ३ चिमण्यांची झुंड. [अर. ताइफा] (एखाद्याचा) **ताफा बसणें**-(ल.) (एखाद्याचें) घर बसणें, कुटुंबनाश होणें; (कर्तापुरुष मेल्यामुळें) घरदार, कुटुंब मोडकळीस येणें.

**ताफा**—पु. १ तापा; नदींतून पलीकडे जाण्यासाठीं फळया, बाज इ० कास भोपळे, घागरी, पिंपें इ० बांधून किंवा तीन चार तरांडीं एकत्र बांधून करतात तें तरण्याचें साधन; तक्त्यांची नाव; तराफा; तरी. तापा पहा. २ लांकडें नेण्याचें पाण्यावरील साधन. तापटी पहा. [अर. ताइफा]

**ताफेवा कोळपा**—पु. (सातारा) कोळप्याचा एक प्रकार; हा उंसाच्या पिकांत चालवितात. कोळपें-पा पहा.

**ताब**—स्त्री. (कु. ना.) बळ; सामर्थ्य, हिंमत; अवसान; प्राज्ञा. 'खानांनीं ताब लढाईची न आणितां माघारें हृदन गढीचा आश्रा धरून आहे.' -दिमरा १.२८८. 'ताब हिंदुंनीं रे, ताब हिंदुंनीं घेतला हिरून।' -ऐपो २३७. 'माझा हात धरायची त्याची काय ताब आहे ?' [फा. ताब्]

**ताब**—स्त्री. (गो.) तावा पहा.

**तांब**—स्त्री. १ लोखंडाचा गंज; तांबरा. (हा तांबडा असल्यानें त्यास ही संज्ञा लावतात). २ सूर्योदय व सूर्यास्त या वेळीं आकाशाला येणारा लालपणा, आरक्तता. ३ गहूं, शाळू यांवर पडणारा एक प्रकारचा तांबडा रोग. ४ कणिकेंत येणारा गव्हाच्या टरफलांचा तांबडा अंश; सांजा. ५ (माण.) तांदुळाचा कोंडा. (गो.) बारीक कोंडा. गुरांच्या अंगावर पडणारी तांबडया रंगाची बारीक गोचीड. कोळवू. ६ सदरील गोचीड पडल्यानें गुरांना होणारा एक विकार. ७ (ल.) (बरेच दिवस व्यासंग, आवृत्ति न झाल्यानें विद्या, कला इ०कांस येणारें) मालिन्य; मंदपणा; मलिनता; उपस्थितीचा अभाव. ८ (गो.) एक पक्षी. [सं. ताम्र=तांबडा; प्रा. तंब] (एखाद्याची) **तांब झडणें**-(एखाद्याची) खरडपट्टी निघणें, काढली जाणें. **०झाडणें**-१ (एखाद्यावर) ताशेरा झाडणें; तणतणणें; जोरानें खडसणें. २ खूप बोलणें; वटवट करणें. **तांबेसांज**-स्त्री. १ सूर्यास्तानंतर तांबडें आकाश होतें ती वेळ; तांबडसाज. २ पहाट; अरुणोदय. (क्रि० फुटणें). [तांब+सांज]

**ताबक**—पु. घोडयाच्या पायाच्या सुंभाचा रोग. -अश्वप २.२७३. [फा.]

**तांबकी**—स्त्री. टिमकी. 'डौंडीची ढवंस ढोला। वीरघंटा तांबकिया।' -शिशु १०२६. [ध्व.]

**तांबकुडय**—स्त्री. तांदुळाची एक जात.

**तांबट, तांबटकर**—पु. तांब्याचीं भांडीं घडण्याचा धंदा करणारी एक जात; त्या जातींतील व्यक्ति. [सं. ताम्र; प्रा. तांब+ट प्रत्यय] **तांबटो**-पु (गो.) (सोनाराचा धंदा) सोनारकीचें एक हत्यार.

**तांबट**—स्त्रीन. (कों. कु.) छपरें इ० शाकारण्याच्या उपयोगी जाडें, तांबडें गवत. तांबेट; कोळंब. [सं. ताम्र]

**तांबट**—न. (ना.) कणकेंतील तांब, तांबूस कोंडा. तांब अर्थ ४ पहा. [सं. ताम्र]

**तांबट**—वि. १ तांबडा; तांबडसर; लाल. २ भगवीं वस्त्रें धारण करणारा. 'जैसे प्रवृत्तिपांथावरि तांबट। तपोनिधि।' -ऋ १८.

**तांबटी**—स्त्री. एक कांटेरी झाड. तांबूट पहा.

**तांबड**—स्त्री. तांबडी जमीन. -वि. तांबडा या विशेषणाचें समासांत पूर्वपदीं येणारें रूप. [तांब+ड प्रत्यय] सामाशब्द- **०तोंडया**-वि. (उप.) इंग्रज (मनुष्य); साहेब; गोरा. 'ह्या तांबडतोंडयास आतां चावूं कां खाऊं, असें त्याला झालें.' -हिं ११९. **०माती**-स्त्री. तांबडी माती. **०सर**-वि. तांबूस; लालसर;

कांहींसा तांबडा. ०सांज–स्त्री. सूर्यास्तानंतर तांबडें आभाळ होतें ती वेळ; तांबसांज. [तांबडी + सांज] तांबडा–पु. स्त्रियांना होणारा एक रोग. –वि. लाल, रंगाचा; रक्त वर्णीय. [सं. ताम्र; प्रा. तांब; तांवड पहा.] ०अबलक-ख–वि. पांढऱ्या अंगावर तांबडे ठिपके असलेला (घोडा). –मसाप २.१.५५. ०आंबा–पु. रातंबा. ०ऊस–पु. तांबडया रंगाचा ऊस. ०एरंड–पु लाल एरंड. ०कंदील–पु. (फोटोग्राफी) अंधाऱ्या खोलींत ज्याच्या साहाय्यानें फोटोग्राफरला कांचा धुतां येतात तो कंदील. ०कुडा–वि. कुडयाच्या झाडाची एक जात; दुसऱ्या प्रकारास काळाकुडा म्हणतात. ०कुमाइत–वि. तांबडया रंगांत तेल्या रंगाची झांक असणारा (घोडा.) –मसाप २.१५५. ०कोळी–पु. अंजिरावर पडणारा एक रोग. ०चिकणा–पु. ज्वारीची एक जात. ०चित्रक–पु. लाल रंगाचा चित्रक. ०ढेंकूण–पु. कापशीच्या बोंडांतील बीं खाणारा एक किडा. ०बोर–वि. १ घोडयाचा एक विशिष्ट रंग; तेल्या कुमाइत; (इं.) चेस्ट्नट्. २ तेल्या कुमाइत रंगाचा. ०बोळ–पु. बोळाची एक जात; (विरू.) रक्त्या बोळ. ०भोंपळा–पु. एक फळभाजी; डांगरीचें पिकलेलें फळ; दुसऱ्या जातीच्या भोपळयास पांढरा किंवा दुध्या भोंपळा म्हणतात. ०माठ–स्त्री. माठ या पालेभाजीची लाल रंगाची जात. ०मुरूम–पु. लाल जातीचा मुरूम; दुसरे काळा, उडया, लोखंडी, दगडी इ० मुरुमाचे प्रकार आहेत. ०मुळा–पु. मुळयाची एक जात. ०लाल–वि. लालभडक; गडद तांबडा; अतिशय लाल. [तांबडा+फा. लाल=तांबडा] तांबडी–स्त्री १ जोंधळयाची एक जात. २ एक प्रकारचें गवत. 'कुंदा गोगडी हराळी। तिकांडी घोडेकुसळी। कऱ्हवेलु मारवेलु गोंडाळी। तांबडी अपार।' –गीता २.५२८६. ३ जमीनीची एक जात. ४ विडयाच्या पानांची एक जात. इचें पान उशीरां तयार होतें. नाशिक जिल्ह्यांत ही जात होते. –कृषि ५२०. ५ केळीची एक जात; या जातीचें केळें तांबडें असून त्याला गोडी फार असते व तें ऊन भाकरीवर वितळतें. –कृषि ४८८. ०कोरं(रां)टी–स्त्री. लाल रंगाचीं फुलें येणारी कोरांटी. ०चंद्रकळा–स्त्री. (विणकाम) किनार कसल्याहि रंगाची असून पोत मात्र तांबडया रंगाचा असतो असें लुगडें. ०दुपारी–स्त्री. दुपारी या फुलझाडाची तांबडीं फुलें येणारी जात; त्या झाडाचें फूल. ०फाजगी-गुंजे–स्त्री. (विणकाम) एक प्रकारचें लुगडें; यांत एक काडी काळी व एक काडी तांबडी उभार व आडवण एक काळी काडी व एक तांबडी काडी असून किनार कोणतीहि असते. ०भाजी–स्त्री. १ (सांकेतिक उप.) मांस. २ (गो.) तांबडी माठ ही पालेभाजी. ०मिरानी–स्त्री. (विणकाम) लुगडयाची एक जात; या जातीच्या लुगडयाच्या पोतात दोन घरें (काडया) काळीं व दोन घरें तांबडीं असें उभार असून आडवण काळें असतें व किनार कसल्याहि तऱ्हेची असते. ०साल-ळ–स्त्री. भाताची तांबडया तुसाची एक जात. ०सुरळी–(विणकाम.) लुगडयाची एक जात; या प्रकारांत, पोतांतील एक घर काळें व एक तांबडें असें उभार असून आडवण सर्व काळें असतें. तांबडें कमळ–न. कमळाची तांबडया रंगाची जात तांबडें फुटणें–पहाट होणें; उजाडणें; (सूर्योदयापूर्वी पूर्वेकडे) आकाश तांबडें होणें; अरुणोदय होणें. तांबडया माडाचें सांडण–न. (गो.) (ल.) थापबाजी करणें.

तांबडणें–तांगडणें, सक्तीनें काम करून घेणें. तावडणें पहा.

तांबडतोब-प–क्रिवि. १ त्याचक्षणीं; लागलीच; तत्क्षणींच (जाणें, पाठविणें). १ जलदीनें; त्वरेनें. ३ कोठेंहि न थांबतां; विसावा न घेता 'मीं पेंढाराचे भयानें निघालों तो तांबडतोब पुण्यास गेलों; मध्यें कोठें उतरलों नाहीं; मध्यें नदीवर उतरून स्नान मात्र केलें.' [हिं. तावड्तोड=लागोपाठ; घडोघडी]

तांवणें–अक्रि. (लोखंड इ० कांवर) जंग येणें; तांवरा चढणें [तांब=लोखंडाचा जंग]

तांबतबारा–पु. (विरू.) तापतोबारा: तापतोबारा पहा.

तांबतोली–स्त्री. (महानु.) एक प्रकारचें तांब्याचें भांडें; तांबली. 'उष्णोदकाची तांबतोली आणीत.' –पूजावसर.

तांबनेल–वि. (राजा.) तांब, जंग चढलेला; गंजलेला: तांबलेला (लोखंडी पदार्थ). [तांब]

तांबर–स्त्री. लाव्हा पक्ष्याची मादी. 'थटकारून किलविलाट करतां तांबर भोवती तोलावे।' –सला ७१.

तांबर–पु. एक जातीचा मासा. –प्राणिमो ८१.

तांब(बा)रणें–अक्रि. १ (डोळा, आकाश, चेहरा, सायंकाळ इ०) आरक्त, तांबडा होणें; तांबुसणें. २ (पीक इ०) तांब या रोगानें युक्त होणें. ३ (लोखंड) गंजणें; तांबऱ्यानें युक्त होणें. –उक्रि. (डोळे) लाल करणें. [सं. ताम्र; म. तांबर]

तांबरा–पु. १ (गहूं, जोंधळा, शाळू, ज्वारी इ० कांवर पडणारा) एक तांबडा रोग. २ (लोखंडाला येणारा) जंग: तांब; (क्व. तांबें, पितळ या धातूवर चढणारा) जंग. [तांब]

तांबल–न. (कु.) तांबुलफळें या एका बैठया खेळांतील तांबडया रंगानें रंगविलेली लांबट लहान पट्टी.

तांबली-लें–स्त्रीन. गृहकृत्यांत अनेक प्रकारें उपयोगी असें एक प्रकारचें धातूचें लहान भांडें. [सं. ताम्र+आलय; म. तांब+आळें] ०ठेवणें–(कर.) (ल.) (चुलीवर भाताचें तांबलें ठेवणें) भात करणें; भात शिजण्यास लावणें. 'सकाळीं उठून तांबलें ठेवावें.'

तांबवशी–स्त्री. खाडयांतून, वाकणांतून आढळणारा तांबडया रंगाचा एका जातीचा लहान मासा.

तांबविणें–उक्रि. जंग, तांब चढविणें, चढूं देणें. [तांबणें]

तांबशीर–क्रिवि. (गो.) पहांटेस; झुंजुमुंजूच्या वेळीं; अरुणोदयीं. [तांब=आकाशाचा रक्तिमा+शीर प्रत्यय]

**तांबसमुशी**—स्त्री. समुद्रांतील मुशी नांवाच्या माशांतील एक जात. [ तांबस+मुशी ]

**तांबसर, तांबा, तांबळ**—वि. (राजा.) तांबूस; लालसर. [ तांब ]

**तांबसाळ**—स्त्री. तांदुळाची एक जात. [ सं. ताम्र=तांबडी+शालि=साळ ]

**तांबळ**—स्त्री. ( राजा. ) ज्यावर गवत वगैरे मुळीं होत नाहीं असा तांबडया जमीनीचा प्रदेश. –वि. तांबसर पहा.

**ताबा**—पु. समुदाय. –मनको.

**ताबा**—पु. कबजा; अंमल; नियंत्रण. [ अर. ताबिअ=अनुचर, परतंत्र ] **ताबींत, ताबीन**–क्रिवि. १ स्वाधीन. ‘ फौजेची पाहणी करून...त्याचे ताबीन लश्कर केलें. ’ –चित्रगुप्त ९५. २ अंकित. ‘ तुम्हांस त्यांचे ताबीन करून पाठविलें आहे कीं ते ज्याप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें करणें. ’ –रा ६.६०३. [ अर. ताबिईन्=अर. ताबिअ अव. ] **ताबीनात**–वि. हुकमी; आज्ञेंतील; खडी; अधिकाराखालील. ‘ ही नेहमी फौज बरकराराची ताबीनात. ’ –चित्रगुप्त १४. ‘सेना घेऊन युद्धप्रसंग व स्वारी करावी व तालुका ताबीनात स्वाधीन होईल. ’ –इमं ८६. [ताबीन] **ताबीनातीति**–स्त्री. व्यवस्था; बरदास्त; सेवा. ‘ सुभेदारानें आपला कबिला देखील दोन महिने त्या जागी राहून आरमाराची ताबिनाति करावी. ’ –मराआ ३६. **ताबे**–वि अधीन; ताब्यांत. ‘ याजवर जशी मर्जी. ताबे मर्जीच्या. विशेष काय लिहावें. ’ –रा ५.९१. [ ताबा ] **ताबेगहाण**–पु. १ ऋणकोचा कांहीं ऐवज, मालमत्ता इ० गहाण म्हणून आपल्या ताब्यांत ठेवून कर्ज देण्याचा प्रकार. अमलगहाण. याच्या उलट नजरगहाण. २ असल्या कर्जाच्या पोटीं गहाण ठेवलेला ऐवज, शेत इ० **ताबेदार**–वि. ताब्यांत असलेला; हुकुमतींत वागणारा; अधीन; बंदा; नोकर. [ताबा+फा. दार प्रत्यय] **ताबेदारी**–स्त्री. १ दास्य; परतंत्रता; परस्वाधीनता. २ नोकरी. [ ताबेदार ] **ताब्याखालीं, ताब्यांत**–अमलाखालीं; आज्ञेंतील; अंकित; कबजाखालीं. ताबीत पहा. [ ताबा ]

**तांबा**—वि. तांबूस; लालसर. तांब पहा. ‘ एकें शुद्धें तांबीं नेपाळी। ’ –दाव २८२. ‘ तांबे डोळे गरगरीत।’ –उषा१७७३. [ सं. ताम्र; प्रा. तंब ]

**तांबारा**—पु. गहूं, ज्वारी, बाजरी इ० पिकावर पडणारा एक प्रकारचा तांबडा रोग; तांब. ‘ गर्वाचा तांबारा पडे। कां अहंतेचा रोग पडे। कीं अधर्माची आळी वाढे। पीक बुडे तेणेंही। ’ –एभा १०.५१५. ‘ कीं पश्चिमधान्यावरी मार्गेश्वरांत। तांबारा अवचित पडियेला। ’ –भवि ५२.२०१. तांबरा पहा.

**तांबावत, तामण, तांबण**—न. ( गो. ) ( विकण्यासाटीं ठेवलेलें ) तांब्याचें सामान. [ तांबें ]

**ताबी**—स्त्री. ( क. ) ताबा; कबजा. ‘ आपले ताबीमध्यें ठेविला. ’ –मब ४०. [ अर. ] **ताबींत**–क्रिवि. ( क. ) हुकुमांत; ताब्यांत; ताबेदारींत. ( क्रि० असणें; होणें ). ताबीन पहा.

**तांबी**—स्त्री. ( डोळे इ० कांची ) लाली; तांबूसपणा. ‘ तांबे कांडवेळीचें रसातु ढाळ सात दिजे तांबी जाये। ’ –वैद्यक ७९. [ तांब ]

**तां( तं )बीट**—न. ( कर. ) गूळ घातलेलें राळयाचें पीठ. ‘ त्यानें तंबीट खाल्लें. ’ [ का. तंबु=ओलें+का. इट्टु=पीठ ]

**तांबीळ**—स्त्री. जिकडे तिकडे तांबडें ( राज्यद्रोह, रक्तपात ) दिसण्याचा रोग. ‘ पण सरकारला संशय फार त्याला तांबीळ झाल्यामुळें जिकडे तिकडे तांबडें दिसतें. ’ –सुदे २७०. [कावीळ वरून अनुकरणानें बनविलेला शब्द ]

**ताबुलफळें**—न. ( कु. ) एका बैठया खेळाचें साधन. हा लांकडी खेळ सावंतवाडीस तयार करतात. ताबल पहा. [ पो ताब्ल; गो. ताबुला=टेबल+फळें ]

**तांबुळ**—न ( व ) ऐरणीदान.

**तांबूट**—स्त्री. १ कोंकणांतील एक डोंगरी झाड. २ वरील झाडासारखेंच पण कांटे नसलेलें, महाबळेश्वराच्या आसपास होणारें एक झाड.

**ताबूत-द**—पु १ शव ठेवण्याची पेटी. शव; प्रेत. ‘ शहाजादयाचा ताबूद व त्याचीं मुलें माणसें येथें पाठऊन देणें. ’–दिमरा १.२५१. २ मुसलमान लोक मोहरमांत मिरवितात ती हुसेनच्या थडग्याची प्रतिमा; डोला; ताजिया. ३ ताबूत नेण्याच्या परवानगीसाटीं मुसलमानांवर बसविलेला मराठयांच्या रियासतींतील एक कर. [ अर. ताबूत् ]

**तांबूल-ळ**—पु. विडयाच्या पानास चुना लावून, कात, सुपारी वेलदोडा इ० घालून केलेली पट्टी; विडा. ‘तांबूलें वोंठ राऊं। हांसतां दांत दाऊं। ’–ज्ञा १३.५६३. २ आपण चावून स्त्री, मूल इ०स देतात तो विडा.–शास्त्रीको. [ सं. तांबूल ] **०श्रावणी**–स्त्री. गांवच्या महाजनास, देवस्कीकडे असलेल्या गांवच्या अधिकाऱ्यास किंवा ग्रामदेवतेच्या इतर व्यवस्थापकास त्या गांवांत नुकतेंच लग्न झालेल्या मनुष्यानें देवतेप्रीत्यर्थ द्यावयाचा नजराणा, भेट. [ तांबूल+सं. श्रण्–श्राणन=देणें ]

**तांबूल**—न. ( राजा. ) ( विरू. ) तांबलें; तांबली; तांबली पहा.

**तांबूस**—वि. कांहींसा तांबडा; तांबडसर; लालसर. [ तांब ]

**तांबूस**—स्त्री. ( गो ) एक प्रकारचें तांबडसर मोठें गवत; ( कों. ) तांबट. ‘ गोठा शिवण्यास तांबूस काडलें पाहिजे. ’

**तांबें**—न. तांबूस रंगाचा एक धातु; हा निसर्गांत पुष्कळ ठिकाणीं विखुरलेला असून, बहुतेक जमीनींत, लोहांश असलेल्या

खनिज पाण्यांत आणि अशोधित धातूंत सांपडतो. ह्याचा पत्रा व तार करतां येते. ह्यापासुन हिरव्या रंगाचे क्षार बनवितात व ते विषारी असतात. [ सं. ताम्र; प्रा. तंब ]

**तांबें**—न. ( जरतार धंदा. ) तांब्याचें रिकामें रीळ.

**तांबेजणें**—अक्रि. ( राजा. ) ( लोखंड इ० ). गंजानें युक्त होणें; तांबणें. [ तांब=जंग ]

**तांबेट**—न. ( कों. ) एक प्रकारचें तांबडें जाडें भरडें गवत; कोळंब; तांबट पहा. हें शाकारणीसाठीं वापरतात.

**तांबेरा**—पु. तांबरा पहा. -वि. तांब गंज चढलेला; जंगलेला. [ तांब ]

**तांबेरी**—वि. १ तांब्याचें ( पान, पत्रा इ० ). २ तांब्याच्या पानानें, पत्र्यानें मढविलेला ( दागिना, तसबीर इ० ). [ तांबें ]

**तांबोटी**—स्त्री. १ विटेच्या आकाराचा ( अखंड भांडें करण्याच्या उपयोगीं ) तांब्याचा रुंद तुकडा. २ पाणी ठेवण्याची न्हाव्याची वाटी. ३ तेल्याचें घाण्यांतील तेल काढण्याचें साधन; भांडें. [ तांबें+वटी-वाटी ]

**तांबोरा**—पु. तांबरा, तांबेरा पहा.

**तांबोल**—पु. विडा; तांबूल. ' वर्जी तांबोल भोजन । ' -दा २.७.३६. [ तांबूल अप. ]

**तांबोळ**—स्त्री. ( तंजा. ) लोखंड, तांबें व चांदीच्या तारा एकत्र पिरगळून लहान मुलांच्या पायांत घालतात ती काडवळी, वाळा. [ तांब+वाळा ]

**तांबोळी**—पु. विडयाचीं पानें, पट्या इ० विकण्याचा धंदा करणारी एक मुसलमान किंवा मराठे जात; त्या जातींतील व्यक्ति [ सं. तांबूलिक; प्रा. तंबोलिअ ]

**तांबोळी**—स्त्री. एक खाण्याच्या उपयोगी कंदविशेष. हा निमुळता असून गोड असतो.

**तांब्या**—पु. भोजनाच्या वेळीं पिण्याचें पाणी भरून ठेवण्याचें विशिष्ट आकाराचें भांडें, हें तांबें किंवा इतर धातूंचेंहि केलेलें असतें. त्यांतून पाणी लहान फुलपात्र, पेला यासारख्या भांडयांत ओतून पितात; कलश [तांबें; का. तंबिगे ] ( वाप्र. ) **०पालथा-उपडा पडणें-घालणें**-( बायकी ) स्त्री रजस्वला, विटाळशी होणें, बसणें. सामाशब्द- **०तांबली-तांबोटी-पंचपात्री**-स्त्री. ( व्यापक. ) पाणी पिण्याचें तांब्या व पंचपात्री वगैरेसारखें लहान भांडें.

**तांम्र**—पु. १ यवन; मुसलमान; पठाण. ' तो तांम्राच्या धामधुमीकरितां परागंदा होऊन गेलें. ' -इमं ११८. ' सांप्रत तांम्रानें बहुत वळवळ आरंभिली आहे. '-वाडशाछ १४.२ (सांकेतिक.) निजाम. २ इंग्रज; युरोपियन. 'तांम्राची बातमी राखावी.' -ख ३३. पया १२८. [ सं. ताम्र=तांबडा ]

**ताब्ल**—न. ( गो. ) १ एका बाजूनें रंगीत असा बांबूच्या कामटीचा तुकडा. २ असले तीन रंगीत तुकडे व साधा तुकडा यांनीं खेळावयाचा एक खेळ. ताबुलफळें पहा. [ पोर्तु. ताब्ल; इं. टेबल ]

**तांभन, तांभणी तामन, तामनी, तामण**—( प्र. ) ताम्हण-णी; ताम्हण पहा,

**तांभारणें**—अक्रि. रागानें भडकणें; बहकणें, लाल होणें. तांबरणें पहा. [ तांब ]

**ताम, तामरा**—तांब, तांबरा पहा.

**तामकुडय**—स्त्री. ( कु. ) भाताची एक जात; तांबकुडय पहा.

**तामगिरी**—वि. तांबेंमिश्रित. ' गैरसाळ तामगिरी । कोणी नवी मुद्रा करी । नाना कपट परोपरी । शोधून पाहावें । ' -दा १०.८.१४. [ सं. ताम्र ]

**तामग्दूर**—क्रिवि. शक्य तोंवर; यथाशक्ति; शक्त्यनुसार; मगदुराप्रमाणें. ' आम्हीही सेवाचाकरी तामग्दूर करण्यास हाजर.' -रा ७.३७. -वाडदुबा १४२. [ फा. ता=पावेतों+अर. मक्दूर= बळ, सामर्थ्य ]

**तामण**—पु. (कों.) एक वृक्षविशेष; याला उन्हाळयांत सुंदर फुलें येतात व याचें लांकूड इमारतीच्या उपयोगी असतें.

**ताम(व)नदस्त**—पु. ( गंजिफांच्या खेळांत ) गंजिफा वाटतांना चूक झाल्यामुळें दंडादाखल वाटणारानें द्यावयाचा दस्त, पानें ( प्र. ) तावनदस्त. [ फा. तावान्=दंड, नुकसानभरपाई+फा. दस्त्=हात ( गंजिफांतील ) ]

**तामरात**—स्त्री. दुरुस्ती; मरामत. ' त्यास तामरातीस वगैरे खर्चास. ' -वाडसमा १.२४. [ मरामत ? ]

**तामवाण**—न. ( कु. ) ताम्हण पहा.

**तामस-सी, तामसीक**—वि. तमोगुणविशिष्ट; तमोगुणविषयक. १ निद्रा, आलस्य, प्रमाद, साहसिकता हीं ज्याच्या ठिकाणीं फार आहेत असा; तापट; कडक; संतापी; चिडखोर; धाडसी; साहसी; बेफिकीर; दुष्ट; लबाड; कपटी; मंदबुद्धीचा; सुस्त; जड ( मनुष्य ). ' परी तामसीं सात्त्विकीं । सुकृतदुष्कृतात्मकीं । '-ज्ञा १५.१७७. २ भयंकर; पाशवी; क्रूर; अति नीच ( कृत्य; आचरण इ० ). ३ उष्ण; दाहक; उत्तेजक; उद्दीपक; मोहजनक; स्तंभक ( औषध, मात्रा, खाद्य पदार्थ इ० ). ४ मूर्ख अज्ञानी; ज्ञानशून्य. ५ अंधारानें भरलेला; काळा; अंधकारमय. [ सं. ] **०गुणी**-वि. तमःप्रकृतीचा; तमोगुणयुक्त स्वभावाचा; अति कडक, तापट ( मनुष्य इ० ). **तामसोपचार, तामसी उपचार**-पु. तीव्र, कडक, भयंकर, राक्षसी, साहसी इलाज, औषधोपचार. [ तामस+उपचार=इलाज ]

**तामसाळ**—स्त्री. १ (कु.) तांबडया रंगाचें एक भात. २ गरव्या जमीनींतील भात. –बदलापूर २८३. तांबसाळ पहा. [ तांबसाळ ]

**तामि(मी)ली, तामील**—स्त्री. ( हुकूम, आज्ञा इ०कांची ) अंमलबजावणी; संपादणी. 'तुझ्या हुकुमाची तामील करण्यांत माझ्याकडून समजून कसूर होणार नाहीं.' –गडकरी, राजसंन्यास ४५. 'हुकुमाची तामिली करण्यांत कुचराई केली तर कोर्टमार्शल होण्याची भीति.' –सन १८५७, पृ १४६. [ अर. तामील ]

**तामील–ळ**—स्त्री. एक द्राविडी भाषा. ही मद्रासच्या बाजूस प्रचारांत आहे. [ सं. द्रविड; प्रा. दमिल; द्रा. तमिळ ]

**तामूल**—पु. १ विचार; बेत. २ दिरंग; दिरंगाई; टाळाटाळ. 'तात्पर्य कीं शरिकांनीं फौज शामील करण्याविषई तामूल करूं नये.' –रा ७.९. [ अर. तअम्मुल् ]

**तामोटी**—स्त्री. (कु.) ताम्हण. [ सं. ताम्र+वटी ]

**ताम्र**—न. १ तांबें; एक धातु. २ (वैद्यक) ताम्रभस्म. –पु. (सांकेतिक) मुसलमान; यवन; म्लेंच्छ. तांब्र पहा. 'ताम्र पराभवातें पाववावें.' –भाव ८४. –वि. तांब्यासारखा आरक्त; तांबडया रंगाचा. [सं.] **०चूड**–पु. कोंबडा. [सं. ताम्र=तांबडा+सं. चूडा=तुरा] **०चूड(हस्त)**–पु. (नृत्य) आंगठा व मधलें बोट यांचीं अग्रें जवळ आणून, तर्जनी वांकवून ठेवून, बाकीचीं बोटें खोलगट केलेल्या तळहातास चिकटविणें. **०पट–पट्टो**–नपुस्त्री. १ राजादिकांनीं ब्राह्मणादिकांस भूमि इ०कांचें दान, इनाम दिल्याबद्दलचा तांब्याच्या पत्र्यावरील कोरलेला लेख; सनद. २ (ल.) शाश्वतीची खात्री, हमी; निरंतरपणा. [ ताम्र+सं. पट्ट ] **ताम्रपट देऊन ठेवणें**– (ल.) कायमचा अधिकार देणें. **०पत्र**–न. १ तांब्याचा पत्रा. २ ताम्रपट पहा [ ताम्र+सं. पत्र=पान, पत्रा ] **०भस्म**–न. १ (वैद्यक) ताम्र; तांब्यापासून केलेलें रसायन, मात्रा; ताम्रप्राणिद. २ (सांकेतिक; विनोदी भाषेंत) पुरणपोळी. **०मुख**–न. तांबडया तोंडाचे वानर. –वि. लालतोंडया; मोंगल; युरोपियन. तांब्र पहा. 'इराणी, दुराणी, ताम्रमुख व शीख आदिकरून यांनीं हौदे चालविले.' **०मुखी**–वि. ताम्रमुख पहा. [ ताम्र=तांबडा+मुख=तोंड ]

**ताम्हण–न**—न. १ संध्या, देवपूजा इ०करतांना पाणी सांडावयास घ्यावयाचें वर्तुलाकार व उथळ भांडें; संध्यापात्र. २ (गो.) विक्रीकरितां आणलेल्या तांब्याच्या नवीन भांडयांचा समुदाय; (गो.) तांबावत; तांबण. [ सं. ताम्र+भांड ? ] **ताम्हणी–नी**–स्त्री. लहान ताम्हन.

**ताय**—पु. १ उष्णता; आंच; ताप. 'वियोगाग्निचे तायें। आटे ना हे।' –ज्ञाप्र ११३२. २ (ल.) आवेश; जोर; ताठा. **तायेताये**–क्रिवि. तावातावानें; आवेशानें. 'बोले तें तें तायेताये। नेणें परमार्थाचि सोये।' –निगा २८१. [ सं. ताप; म. ताव ]

**ताय**—पु. (गो.) कागदाचा जाड पुठ्ठा. [ ताव ]

**तॉय**—न. (गो.) तुरीच्या डाळीची आमटी. [सं. तोय=पाणी]

**तायकि(खि)ळॉ**—पु. (गो.) टाकळयाचें झाड; टाळकिळो.

**तायगुंड**—वि. (गो.) हुषार; कुशल; चतुर. [ ? +गुंड= हुषार; तुल० का. ताईगंडा=बेरकी, वस्ताद ]

**तायताळें, तायती**—ताइताळें, इ० ताइती पहा.

**तायफा**—पु. जमाव; समुदाय; नर्तिका, वाजंत्री इ०कांचा ताफा. ताफा अर्थ १ पहा. 'श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाडयांत सरकारी तायफांचे मुजरे पुणें शहरांत...गाजून राहिले होते.' –नि १५७. [ अर. ताइफा; म. ताफा ]

**तार**—स्त्री १ धातु, रेशीम इ० पदार्थांचा तंतु; तात; धागा; दोरा. २ (भिजलेली कणीक, काकवी, मध इ०सारख्या) अर्धवट द्रव किंवा चिकट पदार्थाचा तंतूसारखा अवयव. ३ (मादक पदार्थाच्या सेवनानें येणारा) अंमल; कैफ; निशा; उन्माद. 'म्हण तार नाहीं आली तार!' –तोवं ९३. ४ (संपत्ति इ०कानें येणारा) ताठा; धुंदी; मद. ५ (पित्ताधिक्य, जागरण इ०कांमुळें) डोळयांस येणारा जडपणा; मंदपणा; अंधेरी. (क्रि० चढणें; येणें; लागणें). ६ (ल.) चित्ताची एकाग्रता; निदिध्यास; तल्लीनता (क्रि० लागणें). ७ मनाचा कल, प्रवृत्ति. –पु. केंस. 'ज्याचे तार (केंस) पांढरे तो (घोडा) युद्धांत उत्तम.' –अश्वप १.२६. ९ (अशिष्ट) (अनेकवचनी प्रयोग) गुह्यभागावरील रोम. (क्रि० उपटणें). 'तारा उपटणारा' असा ग्राम्य प्रयोग. १० (ल.) (संभाषण, वाद इ०कांचें) अनुसंधान; संबंध; संगति; ओघ; धोरण. (क्रि० लावणें; लागणें; धरणें; सोडणें; सुटणें). ११ एखाद्या क्रियेचा संतत क्रम; ओघ; परंपरा; अनुबंध जसें:–कामाची–गाण्याची–पावसाची–नांगरण्याची–लिहिण्याची–वाऱ्याच्या वाहण्याची–तार. (सामा.) प्रवाह; ओघ. (क्रि० लावणें; लागणें). १२ (कधीं पु. उपयोग) तारायंत्रानें आलेली, पाठविलेली बातमी, संदेश (इं.) टेलिग्राम शब्दाला प्रतिशब्द. 'डॉक्टर मुंजे यांनीं तार केली.' –केसरी १७.५.३०. १३ –पु. ताव; आवेश. 'गोविंदरावांनीं ऑफिसच्या रागाचा तार आपल्या पत्नीवर काढला.' [ तार् ] (वाप्र.) (एखाद्याची) **तार ओळखणें–जाणणें**–(एखाद्याच्या मनाचा कल, इच्छा, अभिप्राय, धोरण, तर्कानें जाणणें. (एखाद्याची **तार) राखणें–संभाळणें**–एखाद्याची मर्जी, तबियत राखणें, संभाळणें; मर्जी राखून वागणें. **तार तोडणें**–१ (रागानें, उमेटपणानें) गर्जना करणें; शिरा ताणून बोलणें गर्जणें. २ भलतेंसलतें बोलणें; उद्धटपणानें दुसऱ्याचा अपमान होईल असें बोलणें. (एखाद्याच्या) **तारेस उभा राहणें–तारेनें वागणें, चालणें**–(एखाद्याच्या) मर्जीप्रमाणें वागणें, चालणें. **तारेस उभा करणें**–मर्जीस उतरणें; मनास येणें. **तारेस लागणें, असणें**–एखाद्या गोष्टीच्या इच्छेंत, विचारांत गुंगून जाणें;

त्या तारेंत असणें. सामाशब्द– ०कशी–स्त्री. १ तार काढणें; तारकसाचा धंदा. २ (ल.) तारेप्रमाणें ओढून काढणें; छळ; जुलूम; गांजणूक; जाच. (क्रि० लावणें; मांडणें; करणें). [फा. तारकशी] ०कशीं धरणें-(एखाद्यास) दुःखप्रद अशा जाचांत, काचांत करडया रीतीनें वागविणें; तरवारीच्या धारेवर धरणें; सुळावर वागविणें. [तारकस] ०कस झीक–पु. (जरतार धंदा) विन चापडलेली, नुसती रेशमावर गुंडाळलेली तार. ०कशी–सी–स–वि. १ सोनें, रुपें इ० धातूच्या तारांनीं, कलाबतूनें विणलेलें. '(दिल्ली) शहरांत तारकशी कामें व अनेक प्रकारचे नकशी केलेले पदार्थ फार चांगले मिळतात.' –तीप्र ६८. २ ज्याच्या भोंवतीं तारेचें, सुतळीचें जाळें घट्ट विणलेलें आहे असें (भांडें इ०). ३ तारांचा केलेला –पु सोनें, रुपें इ० धातूची तार काढणारा. [फा तार्कश् (तार+कशीदन्=ओढणें, काढून घेणें)]. ०खिळा–पु. पोलादाच्या, लोखंडाच्या तारेचा खिळा; तारचूक. ०घर–न. तारेनें संदेश पाठविण्याचें सरकारी कार्यालय; तारहापिस; (इं.) टेलेग्रॅफ ऑफिस्. –सन १८५७. पृ. ४२७. ०दान–नी–नस्त्री. (वाद्य) तंबोरा; सतार इ० तंतुवाद्यास लावलेल्या तारा जिच्यावरून ओंवलेल्या असतात ती हस्तिदंताची सछिद्र पट्टी; वांकडा खिळा; घोडी. [फा.] ०फेणी–स्त्री. रवा–सपीटाची तार काढून तिचे चौंगे (वेटोळीं) तुपांत तळून केलेलें एक पक्वान्न. –गृशि १.४०६. [तार+फेणी] ०बंदी–वि. पोतांत सोन्याच्या तारांच्या कलाबतूच्या चौकटी असलेलें (पैठणी इ० वस्त्र). 'मुगी पटणी रेशमी म्यानबंदी। जरी साजिरी पल्लवी तारबंदी।' –अकक २, किंकरकृत द्रौपदीवस्त्रहरण ८१. [तार+बंद] ०ब्रश–पु तारांचा ब्रश; घासून झिलाई (पॉलिश) करण्याची तारेची कुंचली. [तार+इं. ब्रश=कुंचली] तारंतार–क्रिवि. बरोबर; तंतोतंत; पूर्णपणें; सर्वांशीं; एकूणएक. तारोतार पहा. (क्रि० मोजणें; मापणें; पडताळा भरणें, देणें; (ल.) बोलणें; जेवणें). तारायंत्र–न. विजेच्या साहाय्यानें धातूच्या तारेंतून संदेश पोंचविणारें यंत्र; विद्युत्संदेशहारक यंत्र; (इं.) टेलिग्राफ्. तारेची बांगडी–स्त्री. जिच्यावर कथलाची तार किंवा वखें चढविलेला असतो अशी बांगडी. 'दाट बांगडया पाहती (पाहाहातीं?) ताराच्या भरतां कळ सोसली।' –पला ४.३५. तारेवरचा नाच–पु. (कर) १ तारेवर चालणें, नाचणें इ० २ (ल) अवघड व जोखमीचें काम. तारोतार–क्रिवि. १ कांटोकांट; तंतोतंत; बरोबर. 'वांई देशांतील गांव निम्मे निम्मे तारोतार व इसाफती व इनाम तारोतार निम्मे वांटून दिलें असे.' –रा ३.६५ २ लागोपाठ; एकसारखें. 'तारोतार त्यानें दोन महिने खेपा घातल्या.' [फा.तार्]

**तार**—पु. १ पाण्यावर तरण्यासाठीं घेतलेला आधार; तर. 'ऐसा परस्परें आहे जी विचार। भोपळयाचा तार दगडासी।' –तुगा ११०४. २ (गो.) (नदी, खाडी इ० कांचा) उतार. [सं. तॄ=तरणें]

**तार**—पु. (तंजा.) केळीचा लोंगर, घड. [का. तारु=सुपारीचा लोंगर; ता.]

**तार**—पु. १ (संगीत.) षड्ज स्वरापासून निषादापर्यंत (खर्जांत) स्वर गाऊन पुन्हां उंच षड्जापर्यंत घेतात तो आलाप, सूर. २ (सामा.) उंचस्वर. –वि. १ उंच; खणखणीत (स्वर, आवाज, कंठ). २ लखलखीत; चकचकीत; स्वच्छ; टप्पोर. 'कैसें उन्मेखचांदिणें तार। आणि भावार्थु पडे गार।' –ज्ञा ६.१३४. [सं.] ०नाद–पु. दातांच्या मागील उंचवटयांतून उत्पन्न होणारा नाद; ह्याचा उपयोग दूरच्यास हांक मारण्याकडे होतो. मध्यनादाच्या दुप्पटीच्या प्रमाणांत तारनाद असतो. ०षड्ज–पु. (संगीत) मध्यसप्तकांतील षड्ज स्वराच्या ध्वनीच्या दुप्पटीच्या प्रमाणाचा स्वर. ०सप्तक–न. (संगीत) तारनादयुक्त सात स्वरांचा समुदाय; तृतीयसप्तक. [तार+सं. सप्तक=सात स्वरांचा समुदाय] ०स्वर–पु. (संगीत) रागालाप तारसप्तकांतील कोणत्या स्वरापर्यंत जावा याची मर्यादा दाखविणारा तारसप्तकांतील स्वर.

**तॉर**—न. (गो.) कैरी; कच्चा व लहान आंबा. 'हीं तॉरें लोणच्यास योग्य अशीं आहेत.' [सं. तुवर; गो. तोर]

**तारक**—स्त्री. एक फूलझाड.

**तारक**—पु. भोंपळा (ह्याच्या साहाय्यानें ताफे, तरी तरंगत असतात, म्हणून); सांगड. 'गोपीकुच हेचि तारक घेऊन। मीनकेतन पोंहतसे।' –ह १७.५३. –वि. रक्षण करणारा; संकटांतून पार पडणारा; तारणारा; उद्धार करणारा. [सं.]

**तारकटणें**—अक्रि. तारवटणें. १ धुंद होणें. २ (डोळे इ०) जड, सुस्त होणें; तारवटणें पहा. [तार=धुंदी]

**तारका**—स्त्री. १ तारा; चांदणी; नक्षत्र. २ डोळयांतील बाहुली. ३ रागानें खोडकर, द्वाड मुलीस उद्देशून योजावयाचा शब्द (पुराणांत एका राक्षसाच्या स्त्रीचें नांव तारका आहे असें म्हणतात त्यावरून). कदाचित् त्राटिकेचा अपभ्रंश असेल. [सं. ०गुच्छ–पुंज–पु. ताऱ्यांचा समुदाय, पुंजका; नक्षत्रें.

**तारका–खा**—स्त्रीअव. (अशिष्ट) गुह्यभागावरील केंस शष्प; शेंटें. तार अर्थ ९ पहा. [तार] (एखाद्यास) तारका सम जणें-मानणें-मोजणें-लेखणें-जाणणें–(एखाद्यास) अतिशय नीच, हलकें, क्षुद्र लेखणें; केसपटाप्रमाणें मानणें; शष्पवत मानणें. –केवारी–क्रिवि. शष्पवत्; तृणासमान (क्रि० लेखणें मोजणें). [तारका+वारी=प्रमाणें]

**तारका(खा)बारका–खा, तारकापारका–खा**—वि १ आश्चर्यचकित; भांबावलेला; गोंधळून गेलेला; कावराबावरा 'खेडेगांवचा माणूस शहरांत आला म्हणजे तारकाबारका होतो.'

(राग, भय इ० कार्नी) बेहोष; बेताल; बावरलेला; तम्रवग्र झालेला; कावराबावरा. ३ धूर्त; चाणाक्ष; तारकीपारखी ( –वि. ) पहा.

**तारकिट**—पु. तिरकटें तारूं.

**तारकीट**—स्त्री. ( कु. ) तिरपीट; धांदल; त्रेधा; तारांबळ.

**तारकी पारखी, तारक-पारख**—स्त्री. हुषारी; सावधपणा. ' तारखीपारखीनें रहावें तें न करितां मुक्काम करीत खंडण्या घेत चालिले. '–भाव १०२. –वि. १ धूर्त; चाणाक्ष; हुषार; कुशाग्रबुद्धि. २ जागरूक; दक्ष; सावध; हुषार; सावधान. –क्रिवि. सावधपणानें; जागरूकतेनें; सावधगिरीनें; जपून. ( क्रि० वागणें; चालणें; असणें ). [ तर्क+पारख ]

**तारकेबागी, तारकीबारकी**—स्त्री. दुसऱ्याला दाबून, दटावून आपला वरचढपणा मिरविणें; चढेलपणाची, उद्दामपणाची वर्तणूक.

**तारंगण**—न. १ ( लहान मुलाचें ) ओरडणें; हातपाय आपटणें इ० क्रिया. २ ( प्र. ) सर्व अर्थी तारांगण पहा.

**तारघडी**—स्त्री. ( गो. ) शिमग्यांत खेळावयाचा टिपऱ्यांचा एक खेळ.

**तारचिट**—स्त्री. ( गो. ) सोडचिठ्ठी.

**तारट(ठ)णें**—अक्रि. तारवटणें पहा.

**तारण**—न. १ रक्षण; सांभाळ; तारणें; संकटांतून मुक्तता; सुटका. २ कर्ज घेतांना ऋणकोनें सावकाराजवळ, हमी घेणाराजवळ विश्वासाकरितां म्हणून ठेवावयाची पैशांची ठेव, मूल्यवान वस्तु इ०; गहाणाहून हें भिन्न आहे. स्वतःबरोबर दुसऱ्यास एखाद्या व्यवहारांत, धंद्यांत, मामलतींत गुंतवावयाचें असल्यास तोटा इ० च्या हमीबद्दल, विश्वासादाखल त्याजवळ ठेवावयाची रक्कम; हडप. ३ तारणावर कर्जाऊ काढलेल्या रकमेपेक्षां, तारणाच्या किंमतीचा अधिकपणा ही अधिक रक्कम कर्जफेडीची हमी म्हणून मानण्यांत येते. ४ अठराव्या संवत्सराचें नांव. [ सं. ] **०रोखा**–पु. सरकारी रोखा; (इं.) गव्हर्नमेंट सेक्युरिटी.

**तारणें**—सक्रि. रक्षण करणं; संभाळणें; ( संकट, भय, अडचण इ० कांतून ) निभावून नेणें; वांचविणें; सोडविणें; सुटका, बचाव करणं; पार पाडणें. [सं. तारण=रक्षण] **तारता, तारिता**–वि. १ तारणारा; रक्षण करणारा. ' तारता मारता तूंच आहेस ' २ मुक्ति, मोक्ष देणारा. ' तैसा दृष्टादृष्टाचा सखा। धर्मु जाला तो फोकारिजे देखा। तरी तारिता तोचि दोखा–। लागीं होय। '–ज्ञा १६.२२२. ' नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जांविणें। ' –केका ११. **म्ह०** मारत्यापेक्षां तारता अधिक=मारणाऱ्यापेक्षां रक्षण करणारा केव्हांहि अधिक योग्यतेचा होय. **तारित**–वि. १ ( नदी इ० कांतून ) तारून नेलेला; पार, पलीकडे नेलेला. २ ( ल.) रक्षण केलेला; ( संकट, अडचण, भय इ० कांतून) वांचविलेला; मुक्त केलेला; बचावून नेलेला. [ सं. ]

**तारणें**—न. विळयाच्या मुठीला शेंबी, वसवी करण्याला उपयोगी असा लोखंडी जाड खिळा. –बदलापूर १००.

**तारत(द)खाना**—पु. पायखाना; संडास; शौचकूप; शेतखाना. [ अर. तहारत=शुद्धि+फा. खाना=गृह, खातें ]

**तारतम**—न. आतिथ्य. तारतीम पहा.

**तारतम्य**—न. १ ( दोन वस्तू, व्यक्ति इ०कांतील ) श्रेष्ठकनिष्ठभाव; न्यूनाधिक्य; बरेवाईटपणा; उच्चनीचपणा. २ ( दोन वस्तु व्यक्ति इ०कांतील गुण, उत्कृष्टता, दर्जा इ० संबंधीं ) अंतर; तफावत; विषमता; असमानता; भेद. ' पोपट बोलतो आणि मनुष्य बोलतो परंतु त्यांत तारतम्य आहे. ' ३ गुणभेद जाणून उपचारादिकांत बुद्धीचें कौशल्य; विवेक; विवेचक शक्ति; सारासार विचार; धोरण. (क्रि० पाहणें; राखणें; ठेवणें). 'कोणास किती मात्रा द्यावी हें तारतम्य या वैद्याच्या अंगीं आहे.' ४ (एखाद्यास) सामान्य मनुष्यापेक्षां अधिक समजून, असाधारण दर्जा ओळखून केलेला आदरसत्कार, शिष्टाचार, आगतस्वागत. [ सं. तर आणि तम प्रत्ययांपासून झालेलें भाववाचक नाम ] **०भाव**–पु. ( प्र. ) तारतम्य; तारतम्य अर्थ १ व २ पहा.

**तारतळ्या**—स्त्रीअव. बराच वेळ ताटकळत, तिष्ठत बसण्याची क्रिया; कंटाळा येईपर्यंत वाट पहात बसणें. ( क्रि० देणें; देत बसणें ). ' बराच वेळ तारतळया दिल्यावर महंमदभाईची बहीण...आली. ' –मोटे अस्पृष्टाच्या डायरींतील पानें.

**तारती(ति)म**—न. ( पाहुण्याचा ) यथायोग्य सत्कार; आगतस्वागत; आतिथ्य; तारतम्य अर्थ ४ पहा. ( क्रि० करणें; पाहणें; धरणें ). ' तारतिम वरि तोंडाच पुरतें। अंतरा हें येतें अंतरीचें। ' –तुगा ६९९. २ ( कु. ) अक्कल; हुषारी. तारतम्य अर्थ ३ पहा. [ सं. तारतम्य ]

**तारनळा**—पु. दारूकामांतील एक विशिष्ट प्रकारचा नळा. यांत पुष्कळ तारे दिसतात. ' तू तारनळयासारखा उडी मारशील. ' –तोबं ६९. [ तारा+नळा ]

**तारपटी**—स्त्री. तरवारीचें पातें.

**तारपें**—न. एक वाद्यविशेष; नागसूर; पुंगी. ' पावें तारपीं मोहरीं। सींगें डांगा पेंडारी। ' –दाव ७८९.

**तार-बतार**—वि. विकीर्ण; उध्वस्त; पांगापांग, दाणादाण झालेला. ' फौजेवर हंगामा करून फौज तार–बतार करावी. ' –रा ७.२१४. [ फा. तार् द्वि. ]

**तारं(रां)बळ**—स्त्री. १ त्रेधा; धांदल; तिरपीट; गोंधळ; गडबड; व्यग्रता ( लग्न, मुंज इ०कांत ताराबल आवश्यक ऽ.सतें. तें साधण्याकरितां मुहूर्त चुकूं नये म्हणून फार धांदल, घाई करावी

लागते त्यावरून तारांबळ पहा.). 'मी आपुल्या गृहींची एक। तारंबळ होतसे।' -नव २०.५५. २ अडचण; टंचाईची स्थिति; ओढघस्तपणा; खाण्यापिण्याची ददात; आबाळ. [सं. तारा=नक्षत्र+बल=बळ]

**तारली**—स्त्री. (कों.) खाऱ्या पाण्यांतील एक प्रकारचा पांढरा मासा. हा वेंगुर्ल्याकडे आडळतो. या माशांचें खत नारळीस घालतात. -कृषि ७५६. यास संस्कृतमध्यें 'अच्युत' म्हणतात.

**तारल्य**—न. तरलता; चंचलपणा; कंप; कांपरेपणा. [सं. तरल=चंचल]

**तारवट**—वि. (परदेशांतून) जहाजांतून, आगबोटीनें आणलेला; विदेशी; परदेशी. (माल, जिन्नस इ०) याच्या उलट गांवठी=देशांतच बनलेला; देशी. [तारूं=जहाज]

**तारवट**—वि. (दारूच्या कैफानें, ताटकळत बसण्यानें, मादक पदार्थांच्या अंमलानें) धुंद; सुस्त; जड झालेला; तारवटलेला. [तार=धुंदी, अंमल]

**तारवटणें**—अक्रि. १ (मादक पदार्थांच्या सेवनानें) धुंद, बेहोष, उन्माद युक्त होणें; तारकटणें. (ल.) (संपत्ति, अधिकार इ०कांच्या योगानें) मदोन्मत्त होणें; माजणें. 'या ठिकाणीं आपला तोल आपण संभाळला तरी कोणा तरी तारवटलेल्या व्यक्तीच्या मनाचा तोल बिघडून...' -सासं २.१४८. २ (मादक पदार्थांच्या सेवनानें, जागरणानें, रागानें, पित्तानें, उन्हानें) डोळे, चेहरा इ० जड व सुस्त होणें; तर्र होणें; ताठरणें; विस्फारणें; वटारले जाणें. 'आनंदीबाईचे डोळे तारवटले.' -इंप १०४. [तार=धुंदी]

**तारवटी**—वि. १ लांबच्या बंदराहून तारवानें आणलेला (नारळ, सुपारी इ० व्यापारी माल); तारवट पहा. २ (गो.) तारवावर काम करणारा. [तारूं]

**तारवटी**—वि. (गो.) १ मिरच्यांची एक जात; लवंगी (मिरची). २ (ल.) जाज्वल्य; जलाल. [तार ?]

**तारवांत बेडा**—पु. १ जहाजाच्या मानानें जशी सुपारी, त्याप्रमाणें, अतिशय मोठ्या, प्रचंड व्यवहारांत, कार्यांत, धंद्यांत एखाद्याचा असलेला अतिशय लहान भाग. २ इतर (मोठ्या) पदार्थांशीं ताडून पाहतां प्रमाणाबाहेर लहान असणारी, वाटणारी वस्तु. [तारू+बेडा]

**तारसा**—पु गाड्याच्या, खटऱ्याच्या साटींत करळ्यांशीं समांतर व घोडक्याशीं काटकोनांत बसविलेल्या आडव्या लांकडांपैकीं एक. तरसा पहा. [सं. तिरस्]

**तारसा**—वि. १ तारवटलेल्या डोळ्याचा (मनुष्य); ज्याच्या डोळ्यांपुढें तारा तारा येतात असा (मनुष्य). 'तारसें चुलें काणें कैरें।' -दा ३.६.४२. [तार]

**तारसुळी**—स्त्री. (गो.) एक प्रकारची मासळी.

**तारळ**—पु. एक मासा. तारली पहा.

**तारा**—स्त्रीपु. १ नक्षत्र; तारका; चांदणी; आकाशांतील तेजोगोल. २ डोळ्यांतील बाहुली. ३ -पु. उल्का. (क्रि० तुटणें). ४ (दारूकाम.) गंधकांत बाभळीच्या डिंकाचें पाणी अथवा अंड्याचा बलक घालून त्याच्या गोळ्या करून त्या बाण, नळा, इ० कांत घातल्या असतां नक्षत्राकार उडणाऱ्या असंख्य अग्निगोलांपैकीं एक ५ -स्त्री. (ज्यो.) जन्मनक्षत्रापासून कोणत्याहि चंद्रनक्षत्रापर्यंत मोजून आलेल्या संख्येस नऊ या संख्येनें भागून येणारी संख्या. ६ -पु. फरडा, हुषार, वस्ताद, तरबेज, पटाईत, कारकून, शिपाई, कारागीर इ० 'कृष्णसिंग हैबतसिंग तारे।' -ऐपो २२१. 'म्हणे तुम्ही फक्त शिपाई तारा। बाहेरील शत्रु सर करा।' -अफला ४.१४. ७ -पु. सुंदर, देखणा मनुष्य. ८-पु. (नृत्य.) बुबुळानें केलेला अभिनय. धाकृत, भ्रमण, वलन, पातन, चलन, प्रवेशन, समुद्वृत्त, विवर्तन व निष्क्रमण असे याचे नऊ प्रकार आहेत. [सं.] (वाप्र.) **तारे तुटणें**-१ आकाशांत तारे इकडून तिकडे अकस्मात् सरकणें; उल्का पडणें. २(गाण्यांत) चमकणें; प्रावीण्य दाखविणें. (उप.) गर्दभ-गायन करणें. 'काय गाण्याचे तारे तुटतात हो!' **तारे तुटणें-तोडणें**-असंबद्ध, वेडेपणाचें भाषण करणें, मूर्खासारखें बोलणें. 'मूर्खत्वाचे तुटती तारे।' -विक ३. 'या व्याख्यानांत त्यानें काय काय तारे तोडले आहेत म्हणून सांगू!' -विक्षिप्त २.५. सामाशब्द-**ताराकृति (प्राणी)**-पु. एक पृष्ठवंशहीन प्राणी. हा वाटोळा असून यास किरणासारखे सभोंवतीं बारीक अवयव असतात. (इं.) स्टार. हा फिश या वर्गांत येतो. यास किरणरूपी प्राणी असेंहि म्हणतात-प्राणिमो १२. मराठी ६ वें पुस्तक२२०.(१८७५) [तार+आकृति] **तारांगण**-न. १ नभोमंडळ; नक्षत्रमंडळ. २ वेधशाला. ३ खेळ, मजा इ० पाहण्यासाठीं केलेलें उच्चासन, माळा, माचोळा. ४ घराच्या वरच्या मजल्याच्या खिडकीपुढें (हवा खाण्यासाठीं, मजा पाहण्यासाठीं) केलेला लहान सज्जा. ५ (ल.) (सैन्य इ० कांची) दाणादाण; पांगापांग; विकळितपणा; वाताहत; फांकाफांक. 'फौज मोडून तारांगण केलें.' -शारो २८. ६ (कामें, धंदा इ० कांतील) गोंधळ; अव्यवस्था. ७ (सावकाराच्या तगाद्यामुळें कुळाची, अनाथ मुलाची) तारंबळ; त्रेधा; घाबरगुंडी; मनःक्षोभ. ८ (गो.) कौलें घालण्यापूर्वी घरावर तयार केलेलें लांकडी काम. [तारा+अंगण] **ताराधीश**-पु. चंद्र. [तारा+सं. अधीश=मुख्य] **तारापात**-पु. उल्कापात. [तारा+सं. पात=पडणें] **ताराबल-ळ**-न. विवक्षित असलेल्या नक्षत्र ग्रहांदिकाची अनुकूलता; ज्योतिषशास्त्रदृष्ट्या मंगल अशी वेळ. **तारामंडल-ळ**-न. १ नक्षत्रांनीं युक्त असें गगनमंडल; तारांगण अर्थ १ पहा; नक्षत्रमंडळ. २ (सोनारीचा धंदा) स्त्रियांचा गळ्यांत घालण्याचा एक दागिना. दोन्ही फाशांत दोनदोन असे चार मणी लावलेली ठुशांची पेटी

घेऊन तिच्याखालीं एक मणी ओवून त्या तऱ्हेनें एकाबाजूस सव्वीस व दुसऱ्या बाजूस सव्वीस अशा पेट्या घालतात व मध्यंतरीं धागऱ्यांचे थर लाविलेलें मंगळसूत्र घालून हे सर्व एकत्र पटवून हा दागिना तयार करितात. [ तारा+मंडल=वर्तुळ, समुदाय ] **तारामैत्री**-स्त्री. १ कुंडलींतील ग्रहांतील मित्रभाव. 'तिजशीं माझें तारामैत्री मिळाल्याप्रमाणें सख्य जमलें आहे.' -कमं २.६५. २ नुसत्या नजरानजरीनें जमलेलें सख्य, प्रेम. **तारासमूह**-पु. आकाशांत ढगाच्या किंवा धुक्याच्या ठिपक्यांप्रमाणें दिसणाऱ्या अंधुक तेजस्वी पदार्थांचा समुदाय; तेजोमेघ. -ब्रसकृत ज्योतिषशास्त्राचीं मूलतत्त्वें १७९. [ तारा+समूह ]

**तारा**—पु. १ (कों.) (भरतीचें पाणी ओसरल्यानंतर खाडींतून, वांकणांतून होणारा) पायउतार, उतारा. तार पहा. 'भवनदीचा आला तारा। या उतारा प्रसादें।' -तुगा २२२८. २ (कु) ओहोटीच्या वेळीं पाण्यावर दिसणारा खाडींतील जमीनीचा भाग. ३ (हवेंत, पाण्यांत) तरंगणें; तरणें. जसें:- जहाजाचा-महागिरीचा-वावडीचा-घारीचा तारा. [ तरणें, तारणें ]

**तारा**—वि. (व.) काणा; तिरळा; तेरसा.

**ताराज**—पु. मारलूट; जाळपोळ. -वि. उध्वस्त; ओसाड; बेचिराख. 'मुलूख राहिला, तोही ताराज करून मोगल अन्नास महाग होत ऐसेंच केलें जाईल.' -इमं २००. [ फा. ताराज् ]

**ताराजी**-स्त्री. १ मारलूट; जाळपोळ; नाश; विध्वंस. 'त्या संस्थानची ताराजी केली.'-चित्रगुप्त ८. २ खराबी. 'रुद्रवरम् येथें जमियत पोहोंचून ताराजी मांडिली.' -रा ५.१२२. [फा. ताराज्]

**ताराजीर**—स्त्री. तारातीर पहा. [ फा. ताराज् ]

**तारांटचें**—सक्रि. (गो.) आंवळून, घट्ट बांधणें; मुसक्या बांधणें. 'तारांटून बांध मग कितीही धडपड केली तरी सुटणार नाहीं.' [ तराठणें ]

**तारातीर**—स्त्री. (कों.) १ दाणादाण; पांगापांग; फांकाफांक, वाताहत; तारांगण. 'माझें बुडविलें घर। लेकरेंबाळें दारोदार। लाविलीं कहार। तारातीर करोनि।' -तुगा ४०८९. २ त्रास; त्रेधा; ओढाताण; तारंबळ. [ फा. ताराज् ]

**तारांबळ, तारामळ** —स्त्री. मुहुर्त साधण्यासाठीं उडणारी घाई, धांदल. (विरू) तारंबळ; तारंबळ पहा. (क्रि० होणें; उडणें). (कदाचित् मंगलाष्टकें झाल्यानंतर मुहूर्त संपतो तेव्हां 'तदेव लग्नं ...ताराबलं चंद्रबलं तदेव' इत्यादि घाईनें म्हणतात त्यावरून). 'एकंदर राज्याची जरी तारांबळ झाली होती तरी तो कबूल झाला नाहीं.' -नि. [ तारा+बल ]

**तारीख**—स्त्री. १ यवनी, इंग्रजी पद्धतीनें महिन्याच्या पोटीं येणाऱ्या दिवसांपैकीं प्रत्येक; मिति; तिथि. २ इतिहास; तवारिख पहा. [ फा. तारीख् ]

**तारीप-फ**—स्त्री. प्रशंसा; स्तुति; वाहवा; (एखादा पदार्थ, व्यक्ति इ० काच्या) उत्कृष्टपणाचें वर्णन; शिफारस. 'लढाई बहुत तारफेची झाली.' -मराचिथोशा २२. 'अङ्ग्रेज मैत्रकीस बहुतच उत्तम; याची तारीफ काय लिहावी!' -रा १२.१२७.[अर. तअरीफ् ] **०दार**-वि. स्तुत्य; तारीफ करण्यास योग्य; प्रशंसनीय 'तंबुरे...बहुत चाङ्गले तारीफ-दार पाठवावे.' -ऐकिप्र २.६२. [ तारीफ+फा. दार् ] **०लायक**-वि. तारीफदार; प्रशंसनीय. 'परन्तु तारीफलायक चित्रें मेळवून पाठवावीं म्हणून पत्रीं आज्ञा.' -ऐटि १.१३. [ तारीफ+लायक=योग्य ] **तारफेचा**-वि तारीफ करण्यास योग्य. 'मागें बुचडा आरळ झोंक माथ्यावर पदराचा। चार आंगुळें सरळ लपविला चंद्र तारफेचा।' -होला १००.

**तारीफ**—न. आयात व निर्गत मालाच्या जकातीच्या दरांचें कोष्टक; (इं.) टॅरिफ्. (इंग्रजी शब्द अरबी तअरीफ् शब्दापासूनच झाला).

**तारुण्य**—न. तरुणपण; यौवन; ज्वानी; मनुष्याच्या वयाच्या सोळाव्या वर्षापासून चाळिसाव्या वर्षापर्यंतचा काळ. [ सं. ] **-ण्यावस्था**-स्त्री. तरुणपणाची अवस्था; तारुण्य. [ तारुण्य+सं. अवस्था=स्थिति ]

**तारुफळें**—न. (गो.) कोयता, पळे वगैरे लोंबकळत ठेवण्याची अरुंद फळी. ताटफळें पहा. [ ? +फळें=फळी ]

**तारू-रूं**—पु. (काव्य) नावाडी; वल्हवून नेणारा; तरून नेणारा. 'नामाचिया सहस्रवरी। नावा इया अवधारीं। सजूनियां संसारीं। तारू जाहलों।' -ज्ञा १२.९०. -वि. तारक; रक्षक; तारून नेणारा. 'आम्हां-तुम्हांस भववारिधिमाजि तारूं।' -र ४९. [ सं. तॄ-तर; म. तरणें; तारणें ]

**तारुवा**—पु. नावाडी 'तारुवाचे रूपें दीननाथ। काय बोलत तियेसी।' -भवि ५६.५३.

**तारूं**—न. नौका; तिनापासुन पांचापर्यंत शिडें असलेलें गलबत; जहाज. (सामा.) तरण्याचें साधन. 'तैसें भूताकार एकाचे। हें दिठीं रिगे जैं साचें। तेंचि ब्रह्मसंपत्तीचें। तारूं लागे।' -ज्ञा १३. १०८६. 'कीं हें सुखाचीं तारुवें लोटलीं। आक्षे आनंदें उतटलीं।' -दा १.८.३१. [ सं तॄ-तर्=तरणें ] **म्ह०** भटास तारू व गाबत्यास गोरू=योग्य निवड नसणें या अर्थी. **तारवार धाडप**-सक्रि. (गो.) एखाद्या माणसानें बंडखोरीसारखा मोठा गुन्हा केला असतां त्याला पकडून आरमारी कैदेंत ठेवणें. **तारू कुव्यासकट गिळप**—(गो.) (डोलकाठीसह तारूं गिळणें). (ल.) सर्वच्या सर्व गिळणें; सर्वस्व स्वाहा करणें. **०तरांडें**-न. (व्यापक) जहाज; गलबत; लहानमोठें गलबत.

**तारें**—न. १ हुषार, चलाख, धूर्त, मनुष्य, मूल इ०. तारा अर्थ ६ पहा. २ (उप. विरू) वेडगळ, अर्धवट मनुष्य, मुलगा.

३ वेड; वेडेपण; पिसें; म्हातारपणामुळें बुद्धीस होणारा चळ. [तारा] म्ह० आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें=आधींच वेडगळ आणि त्यांत भूतबाधा झाल्यास त्या वेडया माणसाच्या चेष्टा किती वर्णाव्या. तुल० 'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला.' 'आधींच उल्हास त्यांत आला फाल्गुनमास.'

**तारें**—न. वादळाचा, सोसाटयाचा वारा; जवळवारा. हा वारा गलबतास वाईट असतो.[तार]-**वारें**-न. १ (राजा.) गलबताला अनुकूल किंवा प्रतिकूल असा वारा, वाऱ्याची स्थिति. 'गलबत उद्यां येईल कीं परवां येईल हें न कळे; तारेंवारें ह्याच्या स्वाधीन आहे.' २ लहरीपणा; चाळेखोरपणा; नखरा; मिजासखोरी. 'तारेंवारें दोन दिवसांचें.' चंचलपणाची लहर; जसें:- रोजगाराचें-व्यापाराचें-चाकरीचें-तारेंवारें. (क्रि० येणें; चढणें). ३ मोठें अवसान, आवेश; उन्माद. 'कोंकणांत सांपड जेव्हां घालतात तेव्हां कामकऱ्यांस दारू पिऊन भले भले ओरडून तारेंवारें चढलें म्हणजे काम तडक चालतें.' [तार=उन्माद+वारा]

**तारोळा**—पु. १ (आरंभिलेल्या कार्यांत होणारा) अडथळा; खोळंबा; प्रतिबंध; खोळंब्यानें, अडथळयानें उत्पन्न झालेली अडचणीची स्थिति; गोंधळ; त्रास; घोंटाळा. साधारणपणें जेवणखाण, अन्न व प्रापंचिक सामान्य गोष्टी ह्यांच्या संबंधानें हा शब्द उपयोगांत आणतात. जसें:-पावसाचा-धान्याचा-पैक्याचा-सैंपाकाचा-जेवणाचा-संसाराचा-स्नानाचा-तारोळा. पाणी, पाऊस, द्रव्य, धान्य इ०कांची कमताई झाल्यामुळें किंवा जेवण, स्नान, स्वयंपाक इ०कांना कांहीं विघ्न, अडथळा आल्यानें. (सामा.) त्रास; दगदग; क्लेश; गोंधळ; तारांबळ. २ दुर्दशा; कष्टमय स्थिति; विपन्नावस्था. 'आईवांचून मुलाचा तारोळा होतो.' 'घरास आग लागली म्हणजे तारोळा होतो.' 'घरचा धनी मेल्यामुळें कुटुंबाचा, प्रपंचाचा तारोळा होतो.'

**तार्किक**—वि. १ तर्कशास्त्रासंबंधीं; न्यायशास्त्रविषयक. २ संशयी; बुद्धिप्रामाण्यवादी. 'तार्किकांचियां वज्र सांखळा। कीर्ती खांबीं नाळीची अवलिळा। माताइ तें वादी दिग्गजु सकळा। भूमंडळीचें।' -शिशु २५. ३ चतुर; धूर्त; कुशाग्रबुद्धि; तर्कबाज; मर्मज्ञ; मार्मिक. ४ षड्दर्शनांपैकीं कोणत्याहि एका दर्शनाचा अनुयायी; तत्त्वज्ञानी; न्यायशास्त्रज्ञ. ५ तार्किक्य पहा. [सं. तर्क] **तार्किक्य**-न. तर्क, अनुमान करण्याचें चातुर्य; धूर्तपणा; मार्मिकता; बुद्धीची कुशाग्रता. [तार्किक]

**तार्तराम्ल**—पुन. (रसा.) एक अम्लद्रव्य; हें चिंचेपासूनहि काढतात; द्राक्षाम्ल; (इं.) टार्टरिक् ॲसिड. [इं. टार्टर+सं. अम्ल]

**ताऱ्या**—वि. नाव, होडी वल्हविणारा; नावाडी; तारू पहा. [तारणें]

**ताऱ्या**—वि. १ दारूबाज; अंमली; मादक पदार्थांचें व्यसन असलेला. २ कंटाळा येईपर्यंत एकाच गोष्टीची घोकणी, जपमाळ घेऊन बसणारा. [तार=धुंदी]

**तार्ली, तार्ळी, तार्वटी**—तारली, तारवटी इ० पहा.

**तार्सुलें**—न. (गो.) (गरम) पाणी.

**ताल**—पु. (सांडलेलें दूध, रक्त, तेल इ०कांचें) थारोळें; तळें. [हिं. ताल=तळें]

**ताल**—पु. (घर, इमारत इ०कांचा) मजला. 'अस्मानीं मंडप दिला तिन्ही तालांवरी वो।' -तुगा २९१. 'गळीं घेउन प्राणप्रियकरासी तिसरे ताली।' -प्रला १९८. [सं. तल=तळ]

**ताल**—पु. ताडाचें झाड [सं.] ०**तोडणें**-बढाई मारणें; लंब्या लंब्या बाता झोंकणें. सामाशब्द- ०**ताल**-क्रिवि. १ उंचउंच; लंबेलंब; उद्दामपणानें. (क्रि० उडणें; बोलणें; जाणें इ० ऱ्यासह प्रयोग केल्यास लंब्या लंब्या बाता झोंकणें, बडाईखोरपणानें बोलणें असा अर्थ). २ बेतालपणें; बेबंदपणानें; विसंगत; असंबद्ध. 'हा ताल्ताल जातो-गातो.' 'त्याचें बोलणें, गाणें, ताल ताल जातें.' **ताल्ताल बोलणें-उडणें**-१ टाळाटाळीचीं उत्तरें देणें. २ विषयाला सोडून असंबद्धपणानें बोलत सुटणें; भरमसाटपणानें बोलणें. ०**तोडया**-वि. १ बढाईखोर; मोठाल्या बाता झोंकणारा. २ अरेराव; धटिंगण. 'तालतोडयांची पेंढारशाहींत चलती होती.' -राको. [ताल+तोडण] ०**वृन्तहस्त**-पु. (नृत्य.) उद्वृत्त (संवृतहस्त) पहा.

**ताल**—पु. १ (संगीत.) गीत, वाद्य व नृत्य ह्यांच्या क्रियेच्या गतीचें कालदर्शक नियमित प्रमाण; ठेका. (क्रि० धरणें). प्रसिद्ध असे तीस ताल प्रचारांत आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:- केहेरवा, दादरा, तीव्रा, रूपक, पस्तु, धुमाळी, मध्यमावती, गजल, ठेका, झपताल, सूलताल, रुद्रताल, भानुमती, चौताल, एकताल, खेमटा, फरोदस्त, अडाचौताल, झूमरा, दीपचंदी, धमार, सवारी, गजझंपा, तिलवाडा, त्रिताल, पंजाबी, टप्प्याचा ठेका, शिखर, विष्णुताल, मत्तताल व ब्रह्मताल. 'परोपरीचे गर्भ घालुनि नृत्यास रम्य बत्तिस या। करिती ताल धरुनियां...' -कमं ४.१०८. २ हातावर, दंडावर हात मारण्याची क्रिया; टाळी वाजविण्याची क्रिया. ३ सम पहा. ४ (नृत्य.) हाताचा आंगठा व मधलें बोट यांमधील जास्तींत जास्त अंतर. ५ कांशाचें एक वाद्यविशेष (हें काठीनें वाजवितात); एक प्रकारचा टाळ. [सं.] सामाशब्द- ०**तंत्र**-न. (वर्तन, भाषण, मसलत इ०कांतील) सुसंबद्धपणा; संगति; अविरोध; (विरू.) ताळतंत पहा. [ताल+तंत्र] ०**थाक**-पु. गायन व नृत्य यांतील ताल आणि विरामाच्या जागा. 'गात्या नाचत्याचे ताल थाक। स्वयें देख अनुकरे।' -एभा २२.६०८. [ताल+थाक=थकणें, विश्राम] ०**बद्ध-बंद**-वि. तालाला धरून असलेलें (ख्याल, पद, गाणें इ०). [ताल+बद्ध=

ांधलेलें ] ०माल–पु. धोरण; अनुसंधान; तानमान; देशकाल-स्थितीचा मिलाफ; रागरंग; ( विप्र. ) तालामाला; तालामाला पहा. 'ते स्वतः आतां विलायतेला जाणार, तेथील तालमाल पाहा-ार... ' –सासं २.२६४. [ ताल द्वि. ] ०शुद्ध–वि. यथाशास्त्र ालांनीं युक्त; संगीत शास्त्रदृष्ट्या बरोबर असलेलें; स्वैरैक्यानें युक्त पद, गाणें इ० ). ०सुरीं–क्रिवि. ताल व सूर यांना अनुसरून; ाल व सूर यांना न सोडतां; तालसुरांत; शास्त्रशुद्ध. (क्रि० गाणें). ज्ञता–स्त्री. तालासंबंधीं ज्ञान. [ ताल+सं. ज्ञा=जाणणें ] ताला-र्श–पु. ताल व लय दाखविणारें एक पाश्चात्त्य यंत्र; तालमापक. इं. ) मेट्रॉनम्. [ ताल+आदर्श=आरसा ]

**ताल**—पु. प्रयत्न; खटपट. ' महाराजांपुढें तोंड वेंगाडून पैसे मेळण्याचा ताल करण्यापेक्षां, जर त्यांनीं भिक्षांदेहि केली तर धिक उत्तम. ' –विक्षिप्त ३.१८२.

**ताल**—स्त्री. १ ( पाणी अडविण्याकरितां, वळविण्याकरितां त्यावर, शेतांत घातलेला ) बांध, बांधारा. २ नदी इ०कांच्या ांठाच्या बाजूनें बांधलेला धक्का. [ सं. तल ]

**ताल**—पु. ( कों. नाविक ) गलबताच्या नाळीच्या खांद्यास व ऱ्याच्या खांद्यास खालून बारीक लांकडें ठोकितात त्यांपैकीं त्येक. [ सं. तल ]

**ताल**—पु. ( कु. ) ज्यांत भरतीच्या वेळीं पाणी चढतें असा दीकिनाऱ्यालगतचा जमीनीचा भाग. [ सं. तल ]

**ताल**—पु. ( चांभाराचा धंदा. ) खुरा आणि तळ यांमधील ोडयाचा भाग. [ तळ ] ०भरणें–सक्रि. जोडयाचा खुरा व तळ ांमधील भागांत भर घालणें.

**ताल, तालक**—पुन. हरताळ. ( इं. ) आर्सेनिक. [ सं. ] भस्म–न. हरताळ भस्म.

**तालक**—न. टाळें; कुलूप. [ सं. ताल ]

**तालकेंत**—स्त्री. ( गो. ) कागदपत्र इ०कांची नक्कल, प्रत. फा. तालीक ]

**तालमखाना**—पु. एक औषधी द्रव्य; ( प्र. ) तालीमखाना हा.

**तालमी**—वि. कुस्तींत, तालमेंत सराईत, पटाईत असलेला. तालीस ]

**तालमूली**—स्त्री. एक वनस्पतिविशेष. [ सं. ]

**तालव(बा)र**—पुनभव. ( एखाद्यास श्रीमंताप्रमाणें ) आदर-ेक वागविणें; बरदास्त ठेवणें; मानमरातब, तैनात राखणें. (क्रि० र्णे; ठेवणें; राखणें ). –वि. तालेवार; दैववान; भाग्यवंत. [अर ालिअ=भाग्य+फा. वर्=वान प्रत्यय ]

**तालव्य**—वि. तालुस्थानीं, तालुस्थानापासून उत्पन्न होणारा र्ण, उच्चार इ० ) इ, ई, च्, छ्, ज्, झ्, ञ् व श् हे तालव्य ो आहेत. [ सं. ]

**ताला**—पु. कुलूप; टाळा. [ सं. ताल; हिं. ताला; गुज. तालुं ]

**तालामाला**—पु. स्थल व काल यांची अनुकूलता; रागरंग; हालहवाल; तानमान; ( हिशेब, मजकूर, हकीगत इ०कांतील ) मेळ; सुसंबद्धपणा; (उपाय, साधनें, भाग इ०कांचा) मेळ; जुळणी; जम; ताळमेळ. ( क्रि० पाहणें; जाणणें; समजणें; येणें ). [ ताल द्वि. ]

**तालाम्ल**—पुन. ( रसा. ) एक अम्ल; ( इं. ) आर्सनिक् ॲसिड. ' तीव्र नत्राम्लाबरोबर आर्सेनिक् तापविलें असतां त्याचें लौकर प्रांणिदीकरण होऊन तालाम्ल बनतें. ' –ज्ञाको (आ) २९७. [ सं. ताल=हरताल+अम्ल ] तालायित–वि. ( रासायनिक परिभाषा ). एक तालसंयुक्त द्रव्य. ( इं. ) आर्सेइट्. तालित–वि. ( रासायनिक परिभाषा ) एक तालसंयुक्त द्रव्य. ( इं. ) अर्सीनानेट्.

**तालि(ले)वार**—वि. श्रीमंत; भाग्यशील; संपन्न. ' तालिवार कुबेर पैश्याचीं । करूं नये संगत वेश्यांची । ' –प्रला २३१. [फा. तालिअवर् ]

**ताली**—स्त्री. ( क. ) किल्ली; चावी. [ हिं. ]

**तालीक**—स्त्री. १ ( अव. तालका ) ( सरकारी कागदपत्र इ०कांची ) नक्कल; प्रत; प्रतिपत्र. ' तुम्ही तालीक लेहून घेऊन अस्सली खुद खत मशार्निल्हेपासीं फिरावून देणें. ' –रा ८.१६. 'त्याचीं उत्तरें ही आलीं, त्यांच्या तालका करून वडिलांकडे पाठविल्या आहेत. ' –ख ११.६०४५. [अर. तअलीका=परिशिष्ट किंवा अर. तालीक=याद ]

**तालीक**—पु. संबंध. 'महादाजीस देशमुखीस मसुरीचे तालीक नाही. ' –रा १५.१००. [ अर. तअल्लुक् ]

**तालीकचा**—पु. आज्ञापत्र. ' ल्हीस अब्दाल्याचा तालीकचा आला. ' –रा ६.४४५. [ फा. ]

**तालीम**—स्त्री. १ ( मल्लयुद्ध, कसरत, गायन, वादन, नृत्य इ०काविषयीं गुरूपासून घ्यावयाचें ) शिक्षण. २ ( घोडयास निरनिराळ्या चाली ) शिकवणें. ३ (पोपट, मैना इ०कांस बोलण्याबाबत दिलेली ) शिकवण; शिकवणूक. ४ ( नाट्य ) पात्रानें नाटकांतील आपलें भाषण पाठ करून बोलून दाखविण्याची क्रिया; अभ्यास; पुनरुक्तिपूर्वक ग्रहण. ( इं. ) रिहर्सल्. ५ तालीमखाना; व्यायामशाला. ६ व्यायाम; मेहनत. [ अर. तअलीम् ] ०खाना–पु. मल्लयुद्ध, दांडपट्टा इ०विषयीं शिक्षण देण्याकरितां बांधलेलें गृह; व्यायामशाळा; आखाडा. ह्यांत कारलें, गदगा, फरी, मुद्गल, जोडी, लेजीम, छडीपट्टा इ० व्यायामाचीं साधनें असतात. हे सर्व शब्द व कसोटा, एकलंगी, दुलंगी, घिस्सा, तबकफाड, लुकण, लंगोट, कंबरखोडा, स्वारी इ० पेचांचीं नांवें आहेत तीं त्या त्या शब्दांच्या जागीं पहा. [ तालीम+फा. खाना=गृह ] ०बाज–वि. तालीम करणारा;

आखाडयांत जाऊन व्यायाम करणारा; मल्ल; पेहेलवान. [ फा. ] ०बाजी–स्त्री. १ आखाडयांतील व्यायामाची, तालमेची आवड, शोक, नाद. २ ( सामा. ) तालीम; व्यायाम. [ तालीमबाज ]

**तालीमखाना**—पु. एक औषधी वनस्पतीचें बीं. [ हिं. ]

**तालीवंत, तालिव(वा)र**—वि. धनाढ्य; सधन; भाग्यशाली; ऐश्वर्यसंपन्न; श्रीमंत; मातबर. ' एवढा तालिवार त्याची दैवयोगें या रीतीची गत झाली. ' –भाब ६७. तालेवंत–वार पहा. [ फा. तालिअवर् ]

**तालीसपत्र**—न. एक औषधी पदार्थ.

**तालु**—न. तोंडांत वरच्या भागीं असलेला एक अवयवविशेष; याच्या व जिभेच्या संयोगानें तालव्य वर्ण उत्पन्न होतात. –स्त्री. १ मनुष्याच्या डोक्याचा पुढील भाग; ( विरू. ) टाळू. टाळू पहा. २ हजामत करतांना टाळूवर ठेवतात तो केसांचा झुपका; चांदकी. [ सं. ] ०व्रण–पु. तोंडांतील टाळूस झालेला फोड. [ तालु+ सं. व्रण=फोड ]

**तालु(लु)क**—पु. संबंध. 'या अहद–नाम्यासी या शब्दाचा तालुक काय आहे. ' –रा ७.९२. [ अर. तअल्लुक् ]

**तालुका–खा**—पु. १ राज्यकारभाराच्या दृष्टीनें केलेल्या देशाच्या जिल्ह्याच्या विभागांपैकीं एक; पूर्वी एखादा किल्ला किंवा मोठा गांव मुख्यत्वें मानून त्याखालीं आसपासचीं गांवें धरून तालुका बनवीत. २ जमीनदारीपेक्षां लहान असलेला मालकीहक्काखालील प्रदेश. ( तालुकेहाय हें ' तअल्लुक् 'चें फारसी अव. असून तें मुलकी कागदपत्रांतून आढळतें ) [ अर. तअल्लुक ]

**तालु(लु)कदार**–पु. तालुक्याचा मुलकी अधिकारी: मामलतदार; जमीनदार. [ फा. तअल्लुक्दार् ]

**तालूकात**—स्त्री. संबंध. ' दम्यीन त्यांचे तालुकातीचें कलम तहनाम्यांत ल्यावयाचें कारण काय ? ' –रा १९.३०. [ अर. तअल्लुकात् ]

**ताले**—पुअव. दैव; प्रारब्धयोग; नशीब. ' रावसाहेबांचे ताले बुलंद ( =उच्च ) म्हणोनच ते बाजी सर केली. ' –रा १.५२. ' दौलतरावबाबा यांचे ताले विचित्र आहेत. ' –ख १२.६८१७. हा शब्द, दैव, नशीब, प्रारब्ध किंवा अशा अर्थाचा कोणताहि शब्द यासहसुद्धां उपयोगांत आणतात. जसें–दैवाचे ताले. ' संपत्ति मिळणें हे दैवाचे ताले आहेत. ' [ अर. तालिअ ] म्ह० ' असे त्याचे दैवाचे ताले कीं कुत्र्यावर नौबत चाले. ' **तालेवंत**–वि. सुदैवी; भाग्यवान; श्रीमान; लक्ष्मीवंत. [ ताले ] ०वार–वि. दैववान; ऐश्वर्यसंपन्न; वैभवशाली; श्रीमंत ' राजा जनक तालेवार मांडी सीतास्वयंवर. ' –तारामंडळ अंक ३. प्रवेश ३. तालवर ( –वि. ) पहा. [ फा. 'तालिअवर् ] ०वारी–स्त्री. भाग्य; सुदैव; श्रीमंती; संपन्न स्थिति; उत्कर्ष; भरभराटीची स्थिति. [ फा. तालिअवरी ]

**तालोका–खा**—पु. संबंध, तालुक पहा. ' मुतालिकीचे वंशाचा वतनास तालोखा नाहीं. ' –रा ३.११७.

**तॉल्द्**—न. ( गो. ) होडीवरचें आच्छादन; टप. [ पो. तोल्द् ]

**ताल्ल**—वि. ( गो. ) कोरा करकरीत; नुकताच विकत घेतलेला.

**ताव**—पु. १ सोनें इ० धातूस अग्नींत तापवून लाल करण्याची क्रिया; अग्निसंस्कार. २ सोनें, चांदी इ० धातु तापवून लाल करून थंड होऊं दिल्यावर त्यास येणारा रंग; तेज. ३ (ल.) ( एखाद्याचा ) माज, ताठा जिरविणें; खरडपट्टी काढून नमविणें. ( क्रि० देणें ). ४ दुःख. ५ राग; संताप. ' दौलत खराबीस आली म्हणून तावाच्या गोष्टी बोलतो. ' –ख ७.४७१. ६ ( खा. व. ) ताप; ज्वर. ७ आंच. [ सं. ताप=उष्णता; प्रा. फा. ताव; फा. ताब्=उष्णता; फ्रें जि. तव, थव=भाजणें, तापविणें ] ( वाप्र. ) ०देणें–तापविणें. ( एखाद्या वस्तूवर, पैशावर ) **ताव देणें–मारणें**–एखादी वस्तु पळविणें; लुबाडणें; लांबविणें; ( कारकुनी कसबानें ) गिळंकृत करणें. ( एखाद्या खाद्यावर ) **ताव देणें–मारणें**–सपाटून, आकंठ एखादें खाद्य यथेच्छ खाणें; त्या खाद्यावर हात मारणें; त्या खाद्याचा समाचार घेणें. ( एखाद्याला ) **ताव देणें**–१ एखाद्याची खरडपट्टी काढणें; हजेरी घेणें; त्यास दपटशा देणें. २ चांगलें मारणें ( व्यापार इ०कांत ) ०देणें–मारणें–१ व्यापारधंदा इ०कांत नफा मिळविणें; घबाड सांपडणें. २ व्यापार इ०कांत ठोकर, बूड येणें. ( एखाद्या कार्याचा ) **ताव येणें**–एखादें कार्य करण्याबद्दल इसळी, सुरसुरी येणें. ( मिशावर ) **ताव देणें**– ' बरें आहे, पाहून घेईन ' इ० वाचक शब्द बोलून मिशावरून हात फिरविणें. सामाशब्द– ०सुलाख–पु. सोनें इ०धातूस ताव देऊन व छिद्र पाडून पारखणें. ( क्रि० घालणें; उतरणें; निघणें ). [ ताव+ सुलाख ] **तावातावानें**–क्रिवि. रागारागानें; फणकाऱ्यानें; संतापाच्या भरांत. [ ताव द्वि. ]

**ताव**—पु. कागदाचा सबंध बंद, तुकडा; सगळें पान. [ हिं. ]

**ताव**—पु. तावदान पहा. [ हिं. ]

**ताव**—स्त्री. ( कों. ) ( पावसाळा इ०कांत पडणारें ) सूर्याचें मंद ऊन. [ सं. ताप ]

**तावखोबावखुल्यो**—स्त्री. ( गो. ) थट्टामस्करी; कुचेष्टा; टिवल्याबावल्या.

**तावज**—स्त्री. ( गो. ) होडी ढकलण्याचा लहान बांबू. ताज ( कों. नाविक ) १ पहा.

**तावजाळें**—न. (गो. कु.) ताइताळें; ताइतांची माळ. [ अर. ताविझ्=ताईत ]

**तावटणें**—सक्रि. ( व. ) ( एखादी वस्तु इ० ) पळविणें; लांबविणें; लाटणें.

**तावड**—स्त्री. तावडी पहा.

**तावड**—स्त्रीन. (व.) दूध तापविण्याचें रुंद तोंडाचें भांडें. [सं. तप्]

**तावडणें**—अक्रि. (सक्तीनें अथवा आपल्या खुषीनें एखाद्या उद्योगांत, कामांत) एकसारखें खपणें; राबणें; व्यापृत असणें. 'ऐन दोन प्रहरच्या उन्हांत तावडला म्हणून ताप आला.' 'हा मुलगा प्रहरभर पाण्यांत तावडतो.' –उक्रि. तावडणें. १ (एखाद्यास जबरदस्तीनें) कष्टाच्या कामांत गुंतवून ठेवणें; राबवून घेणें; कामास जुंपणें; वेठीस धरणें; तांगडणें अर्थ ३ पहा. २ (एखाद्यास त्रासदायक अशा प्रकारें) खोळंबा करणें; खोळंबून धरणें; डांबून ठेवणें. तांगडणें अर्थ ४ पहा. ३ (घोडा इ० जनावर) दामटणें; धसाफशीनें वापरणें; भरधांव पळविणें; तांगडणें अर्थ ६ पहा. ४ राबविणें; कष्ट करावयास लावणें (उन्हांत, वाऱ्यांत, थंडीत, चिखलांत पाव सांत) दामटणें. तावडणें. [तावडी]

**तावडी**—स्त्री. १ (गुजराथेंत रूढ) नर्मदेच्या कांठीं ज्या ठिकाणीं नर्मदा ओलांडतात तेथें टेकडीवर असलेली धर्मशाळा, चौकी. ज्या तावडींत नावाडी राहतात तिला नावडातावडी म्हणतात. २ (ल.) तावड; अधीनता; पकड; कबजा. ३ (ल.) कचाटा; तडाखा; सपाटा. हल्लीं हा मूळ शब्द प्रचारांतून गेला आहे. मात्र यापासून बनलेले तावडींत, तावडीस, तावडींतून हे शब्द प्रचारांत आहेत. **–डींतून**–क्रिवि. (एखाद्याच्या) तडाख्यांतून; कचाटयांतून; पकडींतून. (क्रि० सुटणें; निघणें). **तावडींत, तावडीस**–क्रिवि. कचाटयांत; सपाटयांत; पकडींत; तडाख्यांत. (क्रि० सांपडणें; पडणें). 'शत्रूच्या तावडीस सांपडलों तो काय करील तें करो.' धरणें, आणणें या शब्दाबरोबर कर्तरी प्रयोग होतो. जसें:– मी शत्रूस माझ्या तावडीस आणलें, धरलें.

**तावडीतासन**—स्त्री. (बुरुडकाम) वीणकामाची आडवी कांब.

**तावण**—स्त्री. (कों.) १ एका दमांत मजल चालून, धांवून जाण्याचा, काटण्याचा प्रसंग; तसा यत्न, नेट. २ ताण; ओढ. (क्रि० पडणें; देणें). [ताण]

**ताव(वा)ण**—स्त्री. दंड; गुन्ह्याबद्दल नुकसानभरपाई; जुर्माना; नुकसान; भूर्दंड. (क्रि० वसणें; भरणें). हा शब्द, लांच खाल्ल्याच्या खोटयाच संशयावरून एखाद्यापासून अन्यायानें वसूल केलेला दंड, किंवा सरकारनें बसविलेला कर, केलेला दंड, अथवा स्वतःच्या नजरचुकीनें किंवा दुसऱ्याच्या चुकीनें झालेलें नुकसान इ० कांसंबंधीं वापरतात. [फा. तावान्]

**तावणें**—उक्रि. १ (सोनें इ० धातु) लाल होईपर्यंत तापविणें. २ (दूध, तूप, पाणी इ०) तापविणें; गरम करणें. ३ (एखाद्यास रागानें, आवेशानें) ताव देणें; खणकारणें; दपटणें; खरडपट्टी काढणें. ४ (ल.) अजमावणें; तपासणें, 'जे अहंभावाचें वोझें सांडुनी। विकल्पाचिया झुळका चुकाउनी। अनुरागाचा निरु ताउनी। पाणिढाळु।' –ज्ञा ७.९९. [सं. ताप; प्रा. ताव; फा. ताब्; हिं. तावना] **तावलेला सुलाखलेला**–वि. सोनें पारखण्याकरितां प्रथम तापवितात व नंतर त्यास एक छिद्र पाडून तें सर्व एकजिन्सी आहे किंवा नाहीं हें पाहतात त्यावरून. कसोटी लावून पारख लेला; पूर्णपणें कसोटीस उतरलेला; अनुभवानें योग्य ठरलेला; **तावून सुलाखून**–क्रिवि. १ अनुभव व परीक्षा पाहिल्यानंतर; कसोटीस लावून योग्य ठरल्यावर. २ अडचणींतून; संकटांतून; दिव्यांतून; विपत्तींतून (पार पडणें, सोडविणें, मुक्त करणें). (क्रि० काढणें; निघणें; जाणें). **तावून सुलाखून घेणें**–(सोनें, नाणें इ०) सक्तपणें कसोटीस लावून व काळजीपूर्वक ताडून-पारखून घेणें. –अक्रि. (अकर्तृक) उकडणें; गदगदणें; गदमदणें; उष्मा होणें. –अक्रि. १ (ऊन, सूर्य यानीं) प्रखरणें; तापणें; तळपत असणें. 'तो तावूनि प्रतापतरणी। दत्तमित्र पाडिला रणीं।' –मुआदि ३३.२३. २ (ल.) (राग इ० कानीं) संतप्त होणें; क्रोधाविष्ट होणें; संतापानें लाल होणें.

**तावणें**—उक्रि. ताणणें. 'क्रोधें स्फुरती ओंठ। भ्रुकुटी ताऊनि तेजिष्ठ।' –मुआदि ३१.१७१. [ताव]

**तावत्**—वि. तितकें; तेवढें. 'यावत्संख्याक ब्राह्मण तूं सांगीतलेस तावत्संख्याक मी आणिले.' –क्रिवि. तोंपर्यंत; तोंपावेतों; तावत्कालपर्यंत. याच्या जोडीचा शब्द यावत्. या शब्दाचा मराठींत स्वतंत्र उपयोग नाहीं. तावत्काल, तावत्कालपर्यंत, तावत्पर्यंत इत्यादि सामासिक शब्दांत मात्र उपयोग करितात. [सं.] सामाशब्द– **०काल–कालपर्यंत**–क्रिवि. तोंपर्यंत; त्या वेळेपावेतों; तितका वेळ. **०पर्यंत**–क्रिवि. विवक्षित कालापर्यंत; विवक्षित स्थळापर्यंत, अंतरापर्यंत; तोंपर्यंत; तेथवर. **तावन्मात्र**–क्रिवि. १ जरूर तितकेंच; तितकेंच; जरूरीपुरतेंच; याच्या जोडीचा शब्द यावन्मात्र २ (व्यापक.) यथातथा; जेमतेम पुरेल इतकें थोडें; म्हणण्या जोगें नसलेलें; माफक; थोडेसें. 'आपण शिके जाऊन। तावन्मात्र शिके जाण। सर्वेचि विस्मृति होय त्यासी।' –गुच १७.२१. 'दुभतें सांगण्याजोगें नाहीं, तावन्मात्र आहे.' [सं. तावत्+मात्र]

**तावतर्क**—पु. (व.) अनुमान तर्क.

**तावता**—क्रिवि. अजूनहि; तरी देखील; इतक्यानेंहि; इतकें असूनहि; यद्यपि; असें असतांहि. [सं. एतावता अप.]

**तावदान**—न. १ (खिडकी, दार, कपाट इ० कांस बसवावयाच्या उपयोगाचें) काचेचें भिंग, तक्ता. 'तावदानें चांगलीं साफ, ज्यांत मंद दिसत असेल तीं न घेणें, साफ असतील तीं घेणें.' –रा १२.१३२. २ कांचेचीं भिंगें बसविलेलें दार, खिडकी इ० [फा. ताब्दान् (ताब+दान्)]

**तावदारकी**—स्त्री. (गो. बे.) जरब; धमकावणी; दपटशा; अंमल गाजविणें; ताव देणें. 'मिऱ्याएवढा पोर पण तावदारकी किती दांडगी।' [ताव+दार प्रत्यय]

**तावदारणें**—अक्रि. (कर.) रागावणें; कावणें; तावणें; तणतणणें. 'तूं किती तावदारलास तरी मीं भ्यायचा नाहीं.' [तावदार]

**तावनदस्त**—पु. (गंजिफांचा खेळ) गंजिफा वाटतांना चूक झाली असतां वाटणाराकडून चुकीबद्दल घेतात तीं पानें. [फा. तावान्=भूर्दंड+फा. दस्त=पत्त्यांतील हात]

**तावनी**—स्त्री. (व.) दूध तापविण्याचें मडकें; दुतली; दुधाणी. [तावणें=तापविणें]

**तावा**—पु. (खा.) तवा पहा.

**तावाण**—स्त्री. भूर्दंड; तावण पहा.

**तावुळा**—वि. आवेशयुक्त. –शर. ? [ताव]

**ताशा–सा**—पु. (वाद्य.) लहान नगाऱ्याच्या आकाराचें चर्मवाद्य; हें दोन–सव्वा दोन फूट व्यासाच्या पितळी किंवा तांब्याच्या पाटीचें तोंड कातड्यानें मढवून तयार करितात. त्या पाटीच्या कडेला स्क्रू बसवितात. ते किल्लीनें पिळून स्वर कमजास्त करतां येतो. हें वाद्य गळ्यांत घालून, दोन हातांत दोन बारीक वेताच्या छड्या घेऊन वाजवितात. हें वाद्य स्वतंत्रपणें किंवा सनईची साथ करतांना वाजवितात. 'वाजे हत्तीवर नौबत ताशाचे भार वाजंतरी।' –ऐपो ४३०. [अर. तास] **ताशेकरी**–पु. ताशा वाजविणारा.

**ताशीर**—स्त्री. (व.) गंमत.

**ताशील**—स्त्री. (राजा.) तपशील पहा.

**ताशीव**—वि. तासून तयार केलेला (दगड, लांकूड इ० पदार्थ) तासीव. [तासणें]

**ताशे(से)रा, ताशिरा**—पु. १ ताशावरची झोड, कडका. (क्रि० झाडणें; झडणें). २ (ल.) बंदुकांची एक फैर; भडिमार; धडाधडी. ३ (ल.) रागानें काढलेली खरडपट्टी; दणकारा; खणकावणें; अपशब्दांचा वर्षाव. ४ भांडणाचा कचका, कडाका. (क्रि० झडणें; झाडणें). [ताशा]

**ताशे(से)रा, ताशिरा**—पु. लांकूड इ० वाकसानें तासल्यानें निघालेल्या ढलप्या; छाट; छाटछूट. (क्रि० पाडणें; पडणें). [तासणें]

**ताशेरा**—पु. (व.) ऐनवेळ; मोका; योग्य संधि.

**तास**—पु. १ अडीच घटिकांचा कालावधि; साठ मिनिटांचा काळ. २ (वाद्य.) घड्याळ; एक वाद्य; अर्धे इंच जाडीचा भाकरीएवढा काशाचा गोल तुकडा. याच्यावर लांकडाच्या मोगरीनें आघात करून ध्वनि उत्पन्न करितात. देवाची आरती करतांना किंवा अडीच घटकांचा कालावधि दर्शविण्याकरितां हा वाजवितात. 'तदुपरि मग सायंकाळिंचा तास वाजे।' –सारुह ५. ४०. 'घटका गेली पळें गेलीं तास वाजे झणाणा।' [अर. तास्]

**तास**—पु. निळ्या रंगाचा एक पक्षी; चास. 'सव्य जाती वायस। अपसव्य जाती तास।' –भारा, बाल १२.२४. [सं. चाष; चास]

**तास**—न. (व. को. कु.) १ नांगरानें किंवा पाभरीनें जमीनीस पडणारी रेषा; कोरणी; घळ; खोबणी. २ (व.) उभ्या पिकाच्या (रोपांच्या) दोन उभ्या ओळींमधील अरुंद जागा; पाट. ३ नदी–ओढ्याचें पात्र; उन्हाळ्यांत नदीच्या प्रवाहाचे जे अनेक बारीक भाग, ओहोळ होतात त्यांपैकीं एक. ४ नांगरानें जमीन नांगरण्याची क्रिया; नांगरणी. 'राजापुरप्रांतीं सात तासें घालावीं तेव्हां ऊंस पेरावा.' ५ (कु.) तिसरी नांगरणी. [सं. सीता. वर्णविपर्यासानें] **ताशीं–सीं लागणें**–(पीक इ०) चांगल्या रीतीनें वाढीस लागणें. **तासावर येणें**–(व.) (जमीन इ०) वहितीस, पेरण्यास योग्य होणें. ०**लोटी**–वि. (व.) शेत ज्या दिशेनें वखरलें असेल त्या दिशेनें केलेली (पेरणी इ०). [तास+लोटणें]

**तास**—पु. १ (सुतारी धंदा). (कों.) हत्यारानें (लांकूड इ०) तासणें; छाटणें; रंधणें. २ तासण्याची क्रिया. ३ (लांकूड खडक इ०कांचा) छाटलेला, तोडलेला, तासून काढलेला टवका; कपरी, तुकडा. 'तेथें सुतारें काढितां तास। तिसी जाहला भूमिवास।' –कथा २.९.११२. 'टेकडीच्या उंच माथ्याचे तास काढून टाकले होते.' –कोरकि १९. ४ खांच; खांड; खाप. ५ (सोनारी धंदा) एक प्रकारची नक्षी. बांगडीवर जो घांसून चौकोनी सपाट भाग करतात तो. (क्रि० मारणें). 'सोनारास त्यावर तास मारण्यास सांग.' [सं. तक्ष्] ०**काम**–न. १ लांकूड, धातूचे दागिने इ० तासण्याचें काम. २ तासण्यानें (लांकूड इ० पदार्थांवर) झालेला संस्कार. तास पहा. ०**कामी–म्या**–वि. (वाकस इ० नीं) तासणारा; तासकाम करणारा. [तासकाम]

**तास**—पु. १ (गो.) पेरणीच्या वेळीं शेतांत चोहोंकडे सारखा चिखल करण्याचें, एका बांबूच्या टोंकास फळी लावून केलेलें शेतीचें एक हत्यार. निवळों. (क्रि० घालणें). –बदलापूर २८७. २ वरील हत्यारानें शेतांतील चिखल सारखा करून शेत समतळ करण्याची क्रिया.

**तास**—स्त्री. (कु.) वल्हविण्याची लांब काठी; लहान बांबू ताज पहा.

**तास**—पु. (माण.) (तुरी इ० पिकांवर) आळ्यांच्या रूपानें पडणारा रोग. –शे ६.२७२. ०**आळ्या**–स्त्रीअव. शेताच्या मार्तीत होणाऱ्या आळ्या. ह्या आळ्या कोंवळें पीक खाऊन टाकतात.

**तासक-की**—नस्त्री. (व.) झांकण्याच्या उपयोगाची पितळी ल्हान ताटली; झांकणी; वेळणी. ' तांब, जांब, खुजे, प्रशस्त तिवया, ताटें नवीं तासकें । ' –सारुह ३.४२.

**तासची-जी**—पु. तासाचे ठेके वाजविणारा. –वाडसमा २.३. [ तास ]

**तासजी**—पु. ताशेकरी; ताशा वाजविणारा. [ ताशा ]

**तासडपट्टी**—स्त्री. १ तासण्याची क्रिया. २ (ल.) खरडपट्टी; रागानें केलेली खरमरीत टीका; कानउघाडणी. ३ हजामत; बोडंती. [ तासणें+पट्टी ]

**तासणी**—स्त्री. १ तासण्याची क्रिया. ( लांकूड इ० ) रंधणें; तासणें; छिलणें इ०. २ लांकूड तासण्याचें सुताराचें हत्यार; वाकस. ३ ( ल. ) बोडंती; डोकें भादरणें; खरडून खरडून हजामत करणें. ४ ( ल. ) खरडपट्टी; तासडपट्टी, निर्भर्त्सना; पाणउतारा. [तासणें]

**तासणें**—उक्रि. १ ( लांकूड इ० ) वाकसानें तासून नीटनेटकें करणें; छिलणें; कापणें; तोडणें; रंधणें. २ जखमी करणें. ' शरनिकरें पार्थतासि तो तासी । ' –मो ३६.३३. ३ खरडून हजामत करणें; भादरणें. ४ (पत्र, अर्ज, हिशेब, यादी इ०) खरडून टाकणें; भरकटणें; फटकारणें; झपाटणें. ५ (एखाद्याची रागानें) निर्भर्त्सना करणें; खरडपट्टी काढणें; हजेरी घेणें; कानउघाडणी करणें. ६ ( अंकगणित ) भाज्यांक भाजकानें भागून अवशिष्ट राहील तो राखणें. ७ ( ल. ) ( गो. ) अपरोक्ष निंदा, कुचेष्टा करणें. ८ (गो.) हातावर तुरी देणें. [ सं. तक्ष्; प्रा. तच्छ्; पं. तच्छणा; गु. तासवुं] (वाप्र ) **तासून निजणें-बसणें**–निश्चितपणें, आरामशीर, निर्वेधपणानें स्वस्थ निजणें, बसणें. सामाशब्द– **तासतूस**–स्त्री. १ लांकूड इ०चें तासणें, छिलणें वगैरे काम. २ (ल.) रिकामटेकडेपणीचा उद्योग; केवळ वेळ घालविण्याच्या उपयोगाचें बिनमेहनतीचें व बिनफायद्याचें काम, उद्योग. **तासी(शी)व**–वि. तासलेला; वाकसानें, रंध्यानें तासून गुळगुळीत, नीटनेटका केलेला; तासून तयार केलेला. [ तासणें ] **तासोपंत**–पु. (उप. सांकेतिक). वपन केलेली विधवा स्त्री; बोडकी. [ तासणें+पंत ]

**तासा**—पु. ताशा पहा. 'आपले ताब्यांत नौबती व तासेतर्फे व रणशिंगें बहुत आहेत. ' –घाको ६. [ अर. तास ] **तासेकरी**–पु. ताशेकरी पहा.

**तासां**—न. ( गो. ) तास; पैलू [ तासणें ]

**तासीर**—स्त्री. १ मनाची प्रवृत्ति; स्वभाव; प्रकृति. ( परंतु कडकपणा, तिरसटपणा, तलखपणा, जहालपणा, रागीटपणा इ०नीं-युक्त या गर्भित अर्थानें प्रायः उपयोग. जसें–' त्याची तासीर काय कठीण हो ! ' २ ( एखादें काम करण्याची एखाद्याची ) विशिष्ट पद्धत; सरणी; तऱ्हा; मोड. ३ बंदुका; तोफा इ०चा भडिमार; फैर; ( विरू. ) ताशेरा. ताशेरा अर्थ २ पहा. ( क्रि० झडणें; झाडणें ).

**ताहनेला**—वि. तहानेला पहा.

**ताहां**—क्रिवि. १ तेथील; तेथचा. तहां पहा. २ ( भि. ) तेव्हां; त्यावेळीं. ' तांहां त्यो पोयरो बोंबलांआं लाग्यो. ' =तेव्हां तो पोरगा बोंबलावयास, ( ओरडावयास ) लागला. ' –भिल्ली १३. ३ इतर अर्थी तहां पहा. [ सं. तदा ]

**ताहाद(दा)र**—वि. ताजा; ताजातवाना. तहादर अर्थ १-२ पहा.

' **ताहान, ताहानमोड, ताहानेला**—तहान इ० पहा.

**ताहाल**—क्रिवि. अद्यापि; आजपर्यंत; आजवर. 'लेकीन अहद पैमानावर नजर देऊन ताहाल हा ख्याल दिलांत न आणिला. ' –ख ७. ३५७१. –रा १०.१८२. [ फा. ता=पावेतों+अर. हाल्]

**ताहांहयात-द**—क्रिवि. हयातीपर्यंत; तहांहयात पहा.

**ताहूद**—न. १ ठराव; करार. ' कादरखान याजकडे तालुका काडोपली दहा लक्ष रुपये ताहूद ठरून सांगितला. '–रा ७.४०. २ खंड ( मक्ता. ) ' तेथील ताहुदापैकीं सर्व हसेबंदी आपण लिहून पाठविली. ' –रा ५.१२६. ' आप्पाजीपंत ... ताहूद चुकवती करितात. ' –पेद २०.५९. ' ताउक्यावर ताहूद केलें तें मोडावें आणि अमानी करावी. ' –रा ५.२३. [ अर. तअह्हुद् ]

**ताहो**—स्त्री. मुलाचें मोठें रडणें; टाहो पहा. [ ध्व. ] **ताही भरणें**–अक्रि. ( मूल इ० ) रडत सुटणें.

**ताळ**—पु. १ संगीत, वाद्य, नृत्य इ० कांच्या गतीचें नियमित कालदर्शक प्रमाण; ताल. ताल अर्थ १ पहा. ' ताळ जातो येकेकडे । ' –दावि २७१. २ टाळी वाजविण्याची क्रिया; टाळी. ३ कांशाचें एक वाद्य; एक प्रकारचा टाळ. 'खण खण खण खण ताळ उमाळे । ' –दावि ११२. ४ हालचाल; फडफड करणें; (कान इ०) फडफडावणें. ' पाठीं निवृत्तिकर्णताळें । आहाळी ते पूजा विघुळे।' –ज्ञा १७.७. ५ ( हिशेब, हकीगत इ० तील ) मेळ; जुळणी; एकवाक्यता; (बोलणें, वागणें, करणें इ० कांतील) सुसंबद्धपणा; विरोधाभाव; धरबंद; मेळ ( बहुधां निषेधार्थी प्रयोग ). ' ऐसें काळीं आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं । '–तुगा ९०६. ६ ( व्यापक. ) ( पदार्थ, वस्तु, शरीरावयव इ० कांचा ) एकजीव; एकजिनसीपणा; मिलाफ; संयोग; एकत्र टिकाव धरून राहण्याची शक्ति. ( क्रि० असणें; धरणें; टाकणें; सोडणें ). [ सं. ताल ] (वाप्र ) **०देणें**–१ एखादा गात असतांना त्याचा ठेका धरणें. २ ( ल. ) ( एखाद्याची ) री ओढणें; त्याला अनुसरणें, मदत करणें. –शर. **०सोडणें**–मर्यादा; धरबंद सोडणें; बेफामपणें वागणें. सामाशब्द– **०तंत, ०तंत्र**, (क) **ताळातंत्र**–पुन. (भाषण, वर्तन, आचार इ० व्यवहारांतील) मेळ; मिळतेपणा; एकवाक्यता; सुसंगतपणा; नेम; परस्परसंगति. [ ताळ+तंत. तंत्र ] **०पत्र**–न. ताल

हें वाद्य; टाळ. ' ताळपत्रांचा निर्घोष । गीत गायन करिती सुरस ।' –मुरंशु ३९. ०**मेळ**–पु. १ ताळतेत. २ तानमान; देश, काल इ०काचा सुयोग, अनुसंधान. [ताळ+मेळ=मिलाफ, जुळणी] ०**विताळ**–क्रिवि. सुर–बेसूर. –शर. ०**वेळ**–पु. तानमान; प्रसंग; परिस्थिति; काळवेळ. ताळमेळ अर्थ २ पहा. ' ताळवेळ तानमानें । प्रबंध कवित्व जाडवचनें । ' –दा ११.६.८. [ताळ+वेळ]

**ताळ**—पु. कुलूप. [सं. ताल; हिं. ताला] ०**पडणें**–(दोघांत) बेबनाव होणें; मतभेद होणें; खटका उडणें. ' स्वधर्म भूमीपति ह्या न सोडी । तो आपली हेकरि हो न मोडी । दोघांमध्यें ताळ पडोन गेलें । ये भीमकीचें परि कार्य जालें । ' –सारुह ८.३५. [सं. ताल= कुलूप; का. ताळ=अडसर]

**ताळ**—पु. लोक; जग. ' निराश्रीत सर्वस्वें आसरा नाहीं तिन्ही ताळीं । ' –ऐपो ४०८ [सं. तल्]

**ताळ**—पु ताडवृक्ष. ' शाळ ताळ निबिड वन । ' –वेसीस्व २.१८. [सं. ताल]

**ताळ**—पु. (घर, इमारत इ० कांचा) मजला; ताल. **सातव्या ताळीं बसणें**–१ घराच्या सर्वांत वरच्या मजल्यावर बसणें. २ (ल.) ऐश्वर्याच्या शिखरावर आरूढ होणें; ऐषारामांत असणें. [तल]

**ताळकुट**–न. (गो.) लहान फांदी. [ताळी, ताळॉ=फांदी, डहाळी]

**ताळचें**—अक्रि. (गो) १ पछाडणें. २ टाळणें.

**ताळवार**—स्त्री. (तंजा) पडवी; वळचण. [ता. ताळ्वारम्]

**ताळा**—पु १ (हिशेब, भिन्नभिन्न हकीगती, गोष्टी, उपन्यास, साधनें इ० कांतील) मेळ; जुळणी; एकवाक्यता; अविरोध; जुळतेपणा; सुसंगतपणा. (क्रि० घेणें; पडणें; पाहणें; मिळणें). ' कदापि नाहीं वचनास ताळा । ' –सारुह ३.१३. ' त्यांच्या कामांचे ताळे कसे घ्यावयाचे ह्या संबंधानें मोहनरावांनीं माहिती करून घेतली.' –कोरकि ४५. २ (केलेल्या भाकिताशीं नंतर घडून आलेल्या गोष्टीचा, आलेल्या अनुभवाचा) मेळ; जुळतेपणा; प्रत्यय; पडताळा; दृक्प्रत्यय; प्रचीति; प्रतीति. (क्रि० येणें; मिळणें).'म्हणोनि येळील न करावें । पाहाणें तें येथेंचि पाहावें । ताळा पडतां राहावें । समाधानें । ' –दा१९.५.१७.' आपल्या उपपत्तीस ताळा मिळतो कीं नाहीं याचा फार विचार न करतां...' –नि ८१६. ३ एखाद्या गोष्टीचा खरेपणा इ० दुसऱ्या प्रमाणानें ताडून, अजमावून पाहण्याची क्रिया; (अंकगणित) उत्तर बरोबर आहे कीं चूक आहे हें पाहण्याची वेगळी रीत. ४ सत्यत्वबुद्धि. –मनको. [सं. ताल] ०**घालणें**–मेळ बसविणें; एकवाक्यता करणें. ' तुका म्हणे ताळा घातला आडाखीं । ठावें होतें सेकीं आडविसी । ' –तुगा १२३८. (एखाद्या गोष्टीचा दुसऱ्या गोष्टीशीं–ह्याचा त्याचा) **ताळा पाहणें–घेणें**–दोन गोष्टींची, वस्तूंची परस्परांशीं तुलना करणें, परस्परांशीं ताडून पाहणें. **ताळ्यास–ताळ्यावर येणें**–नीट मार्गाला लागणें; स्वैरपणा सोडून देऊन सुमार्गानें चालणें; शुद्धीवर येणें. ०**तोळा**–पु ताळमेळ; व्यापक अर्थानें ताळा शब्दाबद्दल वापरतात. ताळा पहा. [ताळा द्वि.] ०**वाळा**–पु. ताळमेळ. –शर. [ताळा द्वि.] **ताळेबंद**–पु. (ताळा पडणारा बंद) १ खतावणी, रोजखर्डा इ० कांवरून गेला महिना, साल इ० कांहीं मुदतीच्या जमाखर्चाचा केलेला हिशेबाचा खर्डा, लिहिलेला झाडा. ताळेबंदावरून पुढील सालचा अजमास (बजेट) करितात. २ जवळील (हातांतील) शिल्लक आणि खर्ची पडलेल्या रकमा, जमेकडील रकमा इ०कांवरून निघणारी शिल्लक यांचा मेळ दाखविणारें खजिन्यांतील पत्रक. ३ प्रांताच्या तपशीलवार हिशेबावरून थोडक्यांत काढलेला सरकारी गोषवारा. –इनाम ५०–५१. **ताळेबंद गोषवारा**–पु. ताळेबंदाचा संक्षिप्त खर्डा, सारांश; टिपण. **ताळेबंदजमा, ताळेबंदीजमा**–स्त्री. जमाबंदीचा सरकारी ठरावानें ठरलेल्या वसुलाचा व मागाहून आढळलेल्या बाबींचा समावेश करणारें सदर. याच्या उलट जमाबंदी जमा किंवा किस्तबंदी जमा. [ताळेबंद+जमा] **ताळेबंदबाकी**–स्त्री. ताळेबंद जमेंतील वर्षाअखेरीची (वसुलाची) बाकी; ताळेबंदजमेंत दाखविलेली वसूल व्हावयाची बाकी रकम. [ताळेबंद+बाकी]

**ताळा**—पु. (माळवी.) टाळा; कुलूप. [सं. ताल; हिं. ताला]

**ताळॉ**—पु. (गो.) गळा; आवाज.

**ताळॉ, ताळी**—पुस्त्री. (गो.) डहाळी; फांदी.

**ताळू**—स्त्री. (कों.) टाळू पहा. [सं. तालु]

**ति**—वि. (प्र.) तीन; संख्यावाचक उपसर्ग, प्रत्यय; जसें– तिमजला, तिकोनी=तीन मजल्यांचा, तीन कोपऱ्यांचा. [सं. त्रिः; प्रा. ति] सामाशब्द–**तिकटणें**–न. १ शेतामध्यें तीन बांध (वरोळया) एका ठिकाणीं असतात तें ठिकाण. २ तीन रस्ते एकत्र मिळतात तें ठिकाण. ३ तीन काठ्या वगैरे एकत्र बांधून केलेली रचना; तिकटी. [त्रिकूट] **तिकटी**–स्त्री. १ तीन काठ्या जुळवून केलेली एक त्रिकोणाकृति रचना. २ त्रिकोण. [सं. त्रिकाष्ठ; प्रा. तिकठ. त्रिकूट] **तिकटें**–न. १ लांकडी त्रिकोण (स्मशानांत अग्नि नेण्यासाठीं, विहिरीतून पदार्थ काढण्यासाठीं इ० केलेला तीन कामट्या, लांकडे यांचा). २ त्रिदळ; त्रिखंड पान (पळस, बेल, निगुडी इ०चें). ३ तीन पानांची पत्रावळ. ४ (पंढरपूरकडे) तिफण; तीन नळकांड्यांची पाभर. ५ लांकडाची तिवई. (गो.) तीन काठ्यांची घडवंची. [सं. त्रिकाष्ठः प्रा. तिकठ. तुल. त्रिकूट] **तिकडी**–वि. तीन कड्यांची. 'जैं कहीं अवचटें । हे तिकडी सांखळ तुटे । ' –ज्ञा १६. ४३८. [ति=तीन+कडी] **तिकळा–ळी–ळें**–वि. तिखुळा पहा. **तिकांडी**–स्त्री. एक गवत. ' तिकांडी घोडेकुसळी । ' –गीता २. ५२८६. [ति=तीन+कांडें=पेर] **तिकांडें–ड्या**–न. मृगशीर्ष

नक्षत्रपुंजांतील तीन तारे; शिवाचा बाण. लुब्धक पहा. [सं. त्रिकांड] **तिकुटी**–स्त्री. त्रयी; तिघांची जोडी; त्रिकूट. ' गुणीं देवां त्रयी लाविली। गुणीं लोकीं तिकुटी पाडिली।'–माज्ञा १८.८१७. [सं. त्रिकूट] **तिकोनी**–वि. तीन कोपऱ्यांचा–कोरांचा–कोनांचा. [सं. त्रिकोण] **तिखई**–स्त्री. तिखंई; एकदम तीन तीन खडे घेऊन सागरगोटे; खडे इ० खेळण्याचा मुलींचा खेळ. याप्रमाणें दुखई; पांचखई इ० संज्ञा. [सं. त्रिक; म. तिक+ई प्रत्यय] **तिकल**–स्त्री. गंजिफांच्या खेळांत अनुक्रमानें लागलेलीं एकाकडे आलेलीं तीन पानें. **तिक्का**–पु. तीन चिन्हें असलेलें गंजिफांचें पान; तिव्वा. **तिखणी**–स्त्री. (घराचे) तीन खण, भाग. –वि. तीन खण असलेलें; तीन खणी (घर इ०). [ति=तीन+खण] **तिखळा–ळी–ळें**–तिखुळा–ळी–ळें पहा. **तिखुळा–ळी–ळें**–वि. तीन मुलगे अथवा मुलींच्या पाठीवर झालेला (मुलगा, मुलगी किंवा सामान्यतः मूल). **तिगस्त**–न. १ गेल्या वर्षाच्या मागचें वर्ष. ' तिगस्त बाकी–वहिवाट इ०. ' २ गंजिफांच्या खेळांतील एक संज्ञा, डावांतील एक विशिष्ट काल; गंजिफांच्या खेळांत तिन्ही खेळणारांचा एक तरी हात होणें. [तीन+फा. गस्त=गत] **तिगस्तां**–क्रिवि. गेल्याच्या मागील सालीं. [तिगस्त] **तिगुण**–वि. १ त्रिगुण. २ तिप्पट. [सं. त्रिगुण अप.] **तिगुणी**–वि. तिहेरी; त्रिगुणात्मक. ' जो अविवेकिया विंधिया। गुंडूनि जीव बाहुलिया। खेळवीतसे तिगुणिया। अहंकाररज्जु।' –ज्ञा १८.९१५. **तिग्रई**–वि. तीन गस्ते असलेलें, एकापुढें एक तीन वठारें असलेलें (घर). **तिघड**–पु. (राजा) तीन आंबे, नारळ इ०चा घड. **तिघड**–वि. (कों.) दर तीन लोटे बांधून झाले म्हणजे एक खापेकडाची जुळी वगळावी अशा रीतीनें लोटे बांधलेली (रहाटाची माळ). –क्रिवि. माळ तिघड होईल अशा रीतीनें (बांधणें). **तिघडी**–स्त्री. १ तिहेरी घडी (कापड, कागद इ०ची). २ तिहेरी घडी घातलेली, तिपदरी वस्तु. –वि. तीन घडया घातलेली. [ति=तीन+घडी] **तिघस्त**–न. तिगस्त अर्थ २ पहा. **तिजवर**–पु. १ तिसऱ्यांदा लग्न करीत असलेला माणूस. २ तीन लग्नें केलेला मनुष्य. [तिजा+वर] **तिधारा–री**–वि. १ तीन धारा–कडा असलेला. ' तिधारां अंदु फीटलियां। चरणींचिआ।'–शिशु ७१६. २ तीन कांठ किंवा काडया असलेलें (धोतर इ०). [ति+धारा] **तिधारी-निवडुंग**–पुन. एक जातीचा निवडुंग. याच्या पेरास तीन कांटयांच्या रांगा असतात; याच्या उलट फडयानिवडुंग. **तिधारें**–न. नकसगाराचें एक हत्यार. **तिपट**–वि. (सामा.) तिप्पट पहा. **तिपटी**–स्त्री. तिप्पट संख्या अथवा परिमाण. **तिपडें**–न. (नाटय) बकऱ्याचे केंस वळून गंगावनाच्या आकाराची स्त्री नटाकरितां तयार केलेली तीनपदरी वेणी. –पौराणिक नाटकाचा काळ. **तिपदरी**–वि. तीन घडयांचें किंवा तीन पदर असलेलें (कापड; दोर इ०).

**तिपाई**–(व.) तीन पायांची घडवंची; तिवई. (बिडाचा कारखाना) डेरा तयार करण्यासाठीं मातींत रोंवण्याचे लांकडी धीरे व गोलाकार लोखंडी गज. **तिपाठी**–वि. तीन वेळां वाचून, ऐकून पाठ म्हणणारा. **तिपांडी**–स्त्री. (कों.) तीन पांड भातजमीनीची प्रत्येक वीस पांडांच्या बिघ्यामागें रयतेस दिलेली जमीनीची सूट. **तिपानी**–स्त्री. एक लहान वेल. श्वास, व्रण, विष यांची नाशक. –वगु ४.१. –वि. तीन पानें असलेलें; त्रिदल (झाड, अंकुर). [सं. त्रिपर्णी] **तिपायी**–स्त्री. तिवई. –वि. तीन पाय असलेलें (जनावर; वस्तु). [तीन+पाय] **तिपिकी**–वि. एका वर्षांत तीन पिकें देणारी (जमीन). **तिपुडी**–वि. १ तीन कप्पे, खण असणारी (पेटी). २ तीन पूड असलेला मृदंग. [सं. तिपुटी] **तिपेडणें**–सक्रि. तीन पेड देणें; वळणें. **तिपेडी–ढी**–वि. तीन पेडांनीं केलेली (दोरी, वेणी इ०). **तिपेरी**–स्त्री. नाचणीची एक हळवी जात. हिच्या काडास तीन पेरें आलीं म्हणजे कणीस येतें. –वि. तीन सांधे, पेरीं असलेलें (बोट इ०). **तिप्पट**–स्त्री. तीन पट संख्या; तिप्पटपणा. –वि. १ तीनदां जमेस धरलेली (संख्या) त्रिगुणित. २ तीन घडयांचें; तिपदरी (कापड इ०) **तिफण–णी**–न.स्त्री. तीन नळया, फण असलेली पाभर, पेरण्याचें यंत्र. [ति+फण] **तिफण**–स्त्री. (व.) चार एकर (जमीन). **तिफसली**–वि. तीन पिकें ज्या जमिनींत निघतात ती जमीन. **तिफांटा**–पु. जेथें रस्ता, नदी किंवा झाडाच्या खोडाच्या तीन बाजू फुटतात ती जागा. **तिफांशी–सी**–वि. १ तीन फाशांनीं खेळावयाचा (सोंगटयांचा एक खेळ). २ तीन फाशांनीं युक्त (दोरी इ०). [ति+फास] **तिबक**–स्त्री. खेळांत विटी उडली असतां खालीं पडण्यापूर्वी दांडूनें तीनदां मारणें. ' डबक दुबक तिबक पोरा त्रिगुण खेळ मांडूं। खेळू विटी दांडू।'–भज ११३. [ति+ध्व. बक्?] **तिबंदी**–स्त्री. दोन वरखां (पानां) चा एक बंद याप्रमाणें तीन बंदांची केलेली कागदाची घडी. **तिब्राद**–वि. (पोर्तु.) तिप्पट. [पोर्तु. त्रेस्दो ब्रादो] **तिमजला–ली**–वि. १ तीन मजल्यांची (इमारत). २ तीन, तिहेरी काठांचा (शेला, धोतर इ०). ३ तीन तळ (डेक) असलेलें (जहाज). **तिय्यम**–वि. तिसऱ्या दर्जाचें. ' दुय्यम, तिय्यम अधिकारी.' –सूर्यग्र ३४. **तिय्या**–पुस्त्री. (पत्त्यांचा खेळ). तिर्री; तीन ठिपक्यांचें पान. [ति=तीन] **तिरकानी–रेघ–ओळ**–स्त्री. कागदाच्या पाडलेल्या चार मोडींपैकीं तीन मोडींमध्यें काढलेली रेघ. [सं. त्रि–तिर्+कान, रेघ] **तिवई**–स्त्री. १ तीन पायांची घडवंची; तिपाई. २ (कों.) तिवटें; भाताचीं रोपें उपटतांना शेतांत बसण्याठीं घेतात ती पायांची तीन घडवंची. तिपाई पहा. [सं. त्रिपदी; प्रा. तिवई] **तिवटणां**–(महानु) तीन वाटा मिळतात ती जागा; चौक; नाका; तिवठा. ' कलियुगाचा तिवटणां.' –भाए १०९. [सं. त्रि+वर्त्मन्; प्रा. तिवट्ट] **तिवटी**–स्त्री.

(गो. कों.) अवयवाची वक्रता. ' पाय तिवटीं पडला. ' [सं. त्रिवर्कि; प्रा. तिवटि] **तिवटें**–तिवई अर्थ २ पहा. **तिवठा**–पु. १ तीन रस्ते मिळतात ती जागा. २ तिवडा अर्थ १,२ पहा [सं. त्रि+वर्त्मन्; प्रा. तिवट्ट] **तिव(वं)डा**–पु. १ मळणी करण्याकरितां खळयाच्या मध्यभागीं पुरलेला खांब. ' हनुमंत तिवडा मध्यें बळें। पुच्छ पाथीं फिरवितसे।' –रावि २०.१९५. २ शेतांत धान्य वारवण्यासाठीं उपयोगांत आणावयाची एक तीन पायांची घडवंची. ३ एक ताल अथवा गति [सं त्रि+पद] **तिवण**–१ त्रिदळ. २ तिहेरी घडी, पदर (कापड, कागद इ० ची). **तिवणता**–वि. (राजा.) तिघडी; तिहेरी; तिपदरी (कागद; कापड वगैरे). **तिवणा**–वि. तीन पानांचा; त्रिदळ. ' त्रिविध अहंकारु जो एकु। तो तिवणा अधोमुखु। डिरु फुटे।' –ज्ञा १५.९५. –एभा ११.१८८. [सं. त्रिपर्ण; प्रा. तिवण्ण] **तिवंधा**–पु. अनेक गांवांच्या सीमा ज्या ठिकाणीं मिळतात ती जागा [सं. त्रि+बंध किंवा वृंद; प्रा. तिबंद] **तिवनी**–स्त्री. (व.) (पळसाचें) त्रिदळ; तिवण. **तिवनें**–न. तिघांचा समुदाय. **तिवनें**–वि. तीन पानांचें. तिवण–णा पहा. [सं. त्रिपर्ण; प्रा. तिवण्ण] **तिवल**–पु. (तीन वेळ) दीड आणा. [तीन+वेळ=अर्धा आणा] **तिवळी**–स्त्री. (गो.) पोटावर पडणारी तीन वळयांची आठी. त्रिवळी पहा. [सं. त्रि+वली] **तिवा**–पु. (गो.) दगडाचा अगर मातीचा केलेला चुलीचा पाय. २ तिव्हा; तिवई; तिनपायी; तिवारी (ज्यावर उभें राहून उपणतात ती). तिवडा अर्थ २ पहा. [सं. त्रि+पदा; प्रा. तिवय] **तिवाट–ठा**-पु. तीन रस्ते एकत्र मिळण्याची जागा. तिवठा पहा. फाटाफूट; ऐक्यभंग. ' केला तुवां देखत भर्तृघात। क्षणें तिवाटा रचिल्या तिघांत।' –वामन, भरतभाव ७. [त्रि+वर्त्मन्; प्रा. तिवट्ट; म. तिवाट] **तिवारा**–पु. (माळवी) तीन दारें असलेला दिवाणखाना. [सं. त्रि+द्वारिका; प्रा. ति+वारिआ; हिं. तिबारा] **तिवारी**–स्त्री. (व.) तिवडा अर्थ २ पहा. तिनपायी (जीवर उभें राहून उपणतात ती) तिवा पहा. **तिवाशी**–वि. तीन वाशांचें केलेलें (घर, खोपट इ० उपहासार्थी). [तीन+वांसा] **तिवाळ**–स्त्री. एकसंध विणलेले तीन पंचे; तीन पंच्यांचें कापड; चवाळें पहा. **तिवाळी**–स्त्री. एक कापडाची जात. -मुंग्या १२३. [ति + आळें] **तिवेती–वेत**–वि. तीनदां व्यायलेली (गाय इ०) [ति+वेत] **तिवेळा-ळां-ळीं**–क्रिवि. तिन्हीवेळां; सकाळीं, दुपारी, संध्याकाळीं; त्रिकाळ. **तिव्वा–वा** पु (गंजिफा, पत्त्यांचा खेळ) तिर्री; तीन ठिपके असलेलें पान. **तिव्हडा, तिव्हा**–पु. तिवडा अर्थ २ पहा. **तिव्हाळ**–पु. (महानु.) तीन रस्ते एकत्र होतात ती जागा; तिवाठा. ' तेथचि तिव्हाळां प्रकास दर्शन।' –ऋ ११८ **तिशिंगी**–वि. तीन शिंगांचा (पशु). [तीन+शिंग] **तिशेंड्या**–पु. (डोक्यावरच्या तीन शेंड्यांवरून) मारवाडी (निंदाव्यंजक शब्द). [ति+शेंडी] **तिसड**–स्त्री. १ तीन वेळां अथवा तिसऱ्यांदा तांदूळ कांडणें. तिसडीनें सडणें. २ (ल.) बारीक चौकशी; छडा [तीन+सडणें] **तिसड-डा-डी**–वि. तीन वेळ सडलेले (तांदूळ). [ति=तीन+सडणें] **तिसढ**–स्त्री. तिसऱ्यानदां करणें (काम इ०) **तिसड**–वि. तीन थानांचें (जनावर). [तीन+सड] **तिसाला–लां**–क्रिविवि. लागोपाठ तीन वर्षासंबंधीं; तीन वर्षाकरितां; त्रैवार्षिक (हिशेब, बाकी इ०). [हिं.] **तिस(सा)रणी**–स्त्री. तिसारणें पासून धातुसाधित नाम. –क्रिवि. तिसऱ्यादा. **तिस(सा)रणें**–सक्रि. तिसऱ्यांदा करणें. –अक्रि. (कोंबडा) तिसऱ्यांदा आरवणें. [तिसरा] **तिसुती**–स्त्री. १ तिहेरी, तीन पदरी–फेरी दोरा; दोरी (जानवे इ० चा). ' तिसुतीला पीळ भरून झाला आहे, आतां नऊसुती करावयाची आहे.' २ तीन कुटुंबांचा आपापसातील लग्नसंबंध. तिरकूट अर्थ ३ पहा. –वि. तीन सुतांची, धाग्यांची, पदरांची (दोरी). [तीन+सुती] **तिस्ती**–स्त्री. (प्र.) तिसुती. (कों.) (जानव्याचें) पातीवर मोजलेलें सूत गुंडाळून ठेवतात ती गुंडाळी. [सं. त्रि+सूत्र, त्रिसुती] **तिहोत्रा**–पु दरमहा दरशेंकडा तीन असा व्याजाचा दर. [तीन+उत्तर]

**तिआं**—सना. त्या. ' तरि माझिया वैरिणी। तिआं केंमिआं।' –शिशु ८१९. [ती] **तिऐ**–तिला. ' तेव्हळीं बाधा जाली। तिऐ रण–देवतेची।' –शिशु ८०८.

**तिउस**—पु. एक झाड. तिवस पहा. ' जसा वृक्ष वाळला तिउस। कीं सर्पानें केला डंश।' –पला ४.३२.

**तिकटी**—स्त्री. (माण.) तिकीट. [इं टिकेट]

**तिकटें**—वि (गो.) अदृढ. ' तुझें प्रत्येक काम तिकटें होत असतें.'

**तिकडचा-ला, तिकडील**—वि त्या जागेसंबंधीं–जागेचा, दिशेसंबंधीं–दिशेचा. [तिकड]

**तिकडा**—वि. (गो.) तिर्कस; तिरका. हा शब्द स्वतंत्र न येतां फक्त समासांत येतो. उदा० वांकडातिकडा. [सं. तिर्यक् ?]

**तिकडून, तिकडने, तिकडोन, तिकून**—क्रिवि. तेथपासून; तेथून; त्याकडून. तिकून हें कुणबाऊ रूप आहे ' घडलें तें मग तिकूनही।' –तुगा ६०६. [तिकडे]

**तिकडे**—क्रिवि. १ त्या बाजूस, दिशेस; त्या जागेकडे. ' जिकडे पाऊस पडतो तिकडे पीक होतें.' २ एखाद्याच्या घरीं या अर्थी. जसें– ' आमचे तिकडे भोजनास यावें.' ३ तेथें: त्या ठिकाणीं. ४ (सांकेतिक) (बायकी) बायकोनें नवऱ्याचें नांव घ्यावयाचें नसतें म्हणून हा शब्द विभक्तीसहित पति या अर्थी योजिला जातो. जसें- तिकडून, तिकडचें इ० =नवऱ्याकडून, नवऱ्याचें इ० ' अशा गडबडीच्या वेळीं तिकडची भेट सुद्धां

शको. ४. १६

व्हावयाची नाहीं... ' -सुमु ११. ' जाणार आज तिकडे मुखि हात माझे । ' -आनंदीरमण. [ तो किंवा ती+कडे ]

**तिकतिकणें, तिकतिकी-तिकतिकीत, तिकाकी**— तकतकणें, तुकतुकणें, तकतकी; तकतकीत. तकाकी इ० पहा.

**तिका**—सना. ( गो. ) तिला. [ ती+का=ला प्रत्यय ]

**तिकाट**—नवि. ( राजा. कुण. ) तिखट पहा.

**तिकीट**—नस्त्री. प्रवेशमूल्य भरल्याची पावती; मूल्यपत्रिका; परवाना; पास ( नाटक, रेल्वे इ०चा ). ' हातीं आल्या फुकट तिकिटा । जाहलें तेंचि मूळ । ' -अर्वाचीन (आठल्ये) ३८६. -नि १२८. [ इं. टिकेट ]

**तिक्त**—पु. १ तीव्रपणा; तिखटपणा २ कडूपणा. -वि. १ तिखट, तीव्र; झोंबणारें. २ कडू. [ सं. तिक्त=कडू ]

**तिक्तग-व**—स्त्री. फोडणीचें ताक; ताकाची कढी; ताकमय पदार्थ; ताकतव. [ ताक ]

**तिख**—वि. १ तीव्र; तीक्ष्ण; अणीदार. 'शरें अति तिखें संहारिलें क्षत्रियां । ' -माधवरामायण, बाल ५१. ' सहावे बाण तिखसाचे । ' -गीताचंद्रिका १.४६. २ तिखट. ' कां मिरयांमाजि तिख । ' -माज्ञा १७.६८. -न. तीक्ष्णपणा. ' उकलतेनि उन्मेखें । प्रज्ञाकुशलतेचि तिखें । ' -ज्ञा १५.१८५. [ सं. तीक्ष्ण; प्रा. तिक्ख ]

**तिखट**—न. १ मिरच्या कुटून केलेली भुकटी. २ मिरच्यांची चटणी. ३ इतर मसाला घालून केलेलें मिरकूड; कूट. ४ (कु.) मसाला. -वि. १ तीव्र; जलाल; तोंड भाजण्यासारखें ( मसाला, मिरी ). २ (ल.) कडक; भयंकर; प्रखर ( उष्णता-सूर्याची अथवा अग्नीची ). ३ तीक्ष्ण; अणकुचीदार ( धार, टोंक, हत्यार इ० ). ' कवजें लोहें तिखटें । हा ऋनुराओ निवटे । ' -शिशु ८४२. ४ चलाख; कुशाग्र; सिद्ध; शीघ्रग्राही ( मनुष्य अथवा त्याची ग्रहणशक्ति; कान, नाक इ० इंद्रियें ). ' गाढवाचें नाक व कान फार तिखट असतात. ' -मराठी ३ पुस्तक पृ. ११०. ( १८७३ ) ५ कडक; वेधक; छद्मी ( भाषण इ० ). ६ ( राजा. ) मधुरता; मिश्रता. ' कलमी आंब्यापेक्षां हा आंबा तिखट लागतो. ' ७ उग्र ( स्वभाव, माणूस ). [ सं. तीक्ष्ण.; प्रा. तिक्ख ] (वाप्र.) -**तिखट जाळ-आग**-अतिशय तिखट. ०**मीठ लावून सांगणें-तोलणें**-फुगवून अथवा बनवून, आपल्या पदरचें, कल्पनेनें कांहीं आंत घालून सांगणें ( गोष्ट इ० ); खुलवून सांगणें. **म्ह०** १ कानामागून आलें शिंगट तें झालें तिखट. २ पुढें तिखट आणि मागें पोंचट=आरंभीं धीट, फुशारक्या मारणारा पण लगेच हातपाय गाळणारा ( मनुष्य ).

**तिखट फक्की**—स्त्री. (वास्तु.) जिभेला झोंबणारी चुन्याची, चुनकळीची पूड.

**तिखटाई**—स्त्री. १ जलालपणा; तिखटपणा; तीव्रपणा; झणझणीतपणा. २ तीक्ष्णता; आवेश; उत्कंठा; उत्साह. [ तिखट ]

**तिखटावणें, तिखावणें**—अक्रि. जलाल अथवा तिखट खाण्यानें जीभ भाजणें. [ तिखट ]

**तिखण्ण, तिखटें**—न. ( गो. ) अतिशय तिखट चटणी. [ तिखट ]

**तिखतिख उजो**—वि. ( गो. ) फार तिखट. [ तिख द्वि. + उजो=आग ]

**तिखमिठा भात**—पु. ( राजा. ) तिखट, मीठ वगैरे घालून फिरून शिजविलेला शिळा भात; फोडणीचा भात; खतखता भात.

**तिखरणें**—सक्रि. धार लावणें; पाजळणें; तीक्ष्ण करणें. तिखारणें पहा. [ सं तीक्ष्ण ]

**तिखले**—वि. तिखट. ' हमामा घाली बारे । आंगीं भरलें वारें । चाखती तिखले चोरें । ' -भज ३३.

**तिखसाण**—न. ( गो. ) तिखटपणा. [ तिख+साण प्रत्यय ]

**तिखसें**—वि ( गो. ) तिखट. [ तिख ] ०**मिखसें**-वि. तिखटमिखट. [ तिखस द्वि. ]

**तिखाडी**—स्त्री. एक प्रकारचें गवत; यापासून रोशेल तेल निघतें. [ सं. तीक्ष्ण ] **तिखाडीची काडी**-पु. ( ना. उप. ) तापट व चिडखोर मनुष्य.

**तिखार**—न. ( सामा. ) तिखें; पोलाद. [ सं. तीक्ष्ण ]

**तिखार**—वि. तिखट; उष्ण; झोंबणारें.

**तिखारणें**—क्रि. तिखरणें; तीक्ष्ण करणें. ' तिखारितो कीं तूं स्वभावें । परतंप । ' -यथार्दी २.२९.

**तिखावणें**—अक्रि. तिखटावणें पहा.

**तिखी**—स्त्री. १ (कों. गो.) दालचिनी. 'मिरी तिखी तेथोनि । येळा काराफुल घेउनि । आणिती तारवें भरूनि । या देसी । ' -ख्रि २.२०.११४. २ ( व. ) सरसू; मोहरी. [ तिख ]

**तिखें**—न. १ पोलाद -ज्ञा १६.२४४. ' तिख्याचे अतितिखट वाण । ' -एभा २३.५७. २ (ल.) धाडस; निर्भीडपणा. ३ ताठा (गर्व, उद्धटपणा, उन्माद इ० मुळें आलेला). [ सं. तीक्ष्ण ] ( वाप्र. ) (**मनीं-अंगीं तीन मण अथवा नव मण) तिखें जळणें**-१ अभिमानाचा ताठा असणें. २ रागानें जळफळणें; हाडवैर धरणें. **तिख्या हाडाचो**-वि. ( गो. ) मजबूत हाडाचा.

**तिखें**—न ( व. ) एक खेळ; फेरमेरें.

**तिंग**—क्रिवि. ( कों. गो. ) ( अशिष्ट ) तेथें.

**तिगड**—पु. ( कर. ) भांडण. ' भले ब्रह्मदेवाचे सुत । नारद अवचित । पांडवनगरींत । लाविला तिगड कौरव पांडवाचा । '

**तिगडू**—पु. ( सांकेतिक ) चोरीचा माल. -गुजा. ४२-४३.

**तिगुळकाय**—स्त्री. ( गो. ) तगळाय, बारकाई.

**तिघावणी नी**—स्त्री. काम, क्रोध, लोभ या तिहींचा समुदाय.

**तिघे**—वि. १ तीन; तीन जण (हा शब्द जिवंत प्राण्यांना व मुख्यतः माणसांना लावतात). २ (सांकेतिक) त्रिगुण. 'पंचविसां जाहली वाव। तिघांचें नुरेचि नांव।'–ह ३.६. [सं. त्रिक?] (वाप्र.) **तिघांच्या तीन वाटा करणें**–फाटाफूट करणें; ऐक्याचा भंग करणें. **तिघेजण, तिघीजणी, तिघेंजणें**–पुस्त्रीन. तिघें–घी–घें.

**तिचा**—सना. त्या स्त्री संबंधाचा.

**तिज**—सना. तिला; तिचा.

**तिजचें**—क्रि. १ (गो.) नारळाची परीक्षा करणें. २ टिकाव, तग धरणें

**तिजणें**—क्रि. (कु.) पैसे चुकते करणें (खंड, सारा इ०चे).

**तिजा**—वि. तिसरा. 'आणि तिजें आडळ करितें। निमालें अर्जुना जेथें। तें मीचि म्हणौनि तूं मातें। पावसी शेखीं।' –ज्ञा १८.१३६४. –पु. मुसलमान लोकांत डोले किंवा ताबूत थंडे झाल्यावर तिसऱ्या दिवशीं जी मेजवानी किंवा उत्सव करतात तो. [सं. तृतीय; प्रा. तिइज्ज] **०गुण**–पु. १ तिसरा गुण. २ (सांकेतिक) ज्ञानयोग. –ज्ञा १६.८८. **तिजाई**–स्त्री. १ तिसरा भाग, हिस्सा, अंश. २ मालकास उत्पन्नाचा तिसरा हिस्सा देण्याच्या करारानें शेताची लागण करतात ती. **तिजाईत**–वि. (कों.) तीनदां व्यालेली (गाय, म्हैस इ०). **तिजांतरा–रा, तिजारा**–वि. दर तिसरे दिवशीं येणारा (ताप). जसें:–तिजारा ताप–तिजारें हींव–तिजारी पाळी. [तिजा + अंतर; तिजा] **तिजांचा**–वि. तिसरे दिवशीं येणारा (ताप). **तिजारत**–स्त्री. व्यापार. 'तीन जहाज आपले विलायतेहून बराय तिजारत गेले होते.' –पदमव १३३. **तिजारें**–न. दर दोन दिवसांनंतर येणारें हींव. तिजारा पहा. **तिजोर**–पु. १ तिप्पट बळ; तीन शक्तींचा संयोग. २ (बुद्धिबळांचा खेळ) एका पगावर तीन मोहऱ्यांचा असलेला जोर. ३ तिहेरी साधन (कांहीं एका कार्याविषयीं). [ति+ जोर] –वि. (बुद्धिबळांचा खेळ) तीन जोर असलेलें (मोहरें, प्यादें). [तिजोर] **तिजोर**–स्त्री. (गो.) आडें ठेवण्यास वासे जोडून केलेली कातरीच्या आकाराची चौकट. [पोतु.?]

**तिजोरी**—स्त्री. १ खजीना, दागदागीने व मौल्यवान वस्तू ठेवण्याची खोली; भक्कम पेटी. २ उत्पन्न; संपत्ति. [इं. ट्रेझरी?] **तिजोरीचा ताबा**–पु. (ल.) उत्पन्नावरील हक्क. 'तिजोरीचा ताबा नोकरशाही सोडण्यास तयार नाहीं.' –के २.१२.३०.

**तिजूल**—पु. (गो.) वीट (माती, सीमेंट इ०ची). [पोर्तु.] **०कार**–वि. वीट करणारा अगर विकणारा.

**तिटकण–न, तिटकारा**—नपु. १ तुच्छता; अनादर; द्वेषभाव; तिरस्कार. २ वीट; कंटाळा; नावड. [तिट! ध्व.; तिट+ कन–कार; तुल० का. तिट्टु=निर्भर्त्सना]

**तिटक(का)रणी**—स्त्री. निर्भर्त्सनापूर्वक वागणूक, तिरस्कारानें वागविणें. [तिटकरणें]

**तिटक(का)रणें**—उक्रि. १ निर्भर्त्सनापूर्वक वागविणें; तिरस्कार करणें. २ अवज्ञापूर्वक नाकारणें, अमान्य करणें; लाथाडणें. [तिटकारा]

**तिटकारा**—पु. तिटकण पहा.

**तिटकारी**—पु. तिटकण पहा. –वि. १ ज्यास लवकर तिटकारा येतो असा; लवकर वीट, कंटाळा मानणारा; कंटाळखोर. २ (ल.) चोखनळ; खंतखोर. [तिटकारा]

**तिटकें**—न. सरपटत चालणारा एक पक्षी.

**तिटली**—स्त्री. तीट; टिकली. 'काजळाची तिटली.' –नि ५०५. [तीट]

**तिटव**—न. (व.) प्रेताच्या पुढें ज्यांत विस्तव घेऊन चालतात तें तिकटण्यावरील मडकें. [ति=तीन+ठाव]

**तिटवी**—स्त्री. एक पक्षी; टिटवी. [ध्व. टिट्]

**तिटा**—पु. (वें.) तिडा; गांठ; गुंतावा. [तिडा]

**तिटा**—पु. (गो.) तिवाटा; तिठा. [ति=तीन+वाटा]

**तिटॉ**—पु. १ (गो.) बाजार. २ बाजारांत दुकान मांडल्याबद्दलचा कर. ३ टिटवी पक्षी.

**तिटॉपोय**—स्त्री. १ लांब पायांचा व लांब मानेचा एक पक्षी; बगळा. २ (ल. उप.) फाजील उंच स्त्री.

**तिटाळी**—स्त्री. (कों.) अग्र; शेंडा; माथा (झाड, टेकडी, उंच घर इ० चा); टिटाळी. [ति=तीन, टाळा=डाहाळी, टाहळ]

**तिटाळी**—वि. तीन मजली; तीन ताली. [ति=तीन+तल–ताल]

**तिट्टजांवचें**—क्रि. (गो.) तत्काल राग येणें.

**तिट्टिटचें**—क्रि. (गो.) खिदळणें. **तिट्टिटॉ**–वि. (गो) खिदळणारा; चंचल स्वभावाचा.

**तिट्टी**—स्त्री. (कर.) (नंदभाषा) चटणी; तिखटाचें तोंडीलावणें.

**तिट्टी**—वि. (गो.) तिहेरी.

**तिठणें**—सक्रि. १ (दोरी वगैरे) गुंडाळून, दुमडून, वेटोळीं इ० वळणें; आढी देणें; तिडणें. २ (वळ, गळू इ०कांवर) फुली मारणें. [तिठा]

**तिठणें**—अक्रि. फांकणें; तिडणें; फेंगाडलें जाणें (लहान मूल किंवा अशक्त मनुष्य यांचे पाय).

**तिठा**—पु. १ तीन रस्ते मिळण्याची जागा. २ दोरी इ० कांस पडलेली आढी, वेढा.

**तिठा**—वि. आखूड; तोकडा; थिटा; कमी.

**तिठो**—पु. १ (गो.) दोऱ्याची दाट शिवण. २ फांटा.

**तिडक-का** —स्त्री. १ तिडीक; तीक्ष्ण व असह्य कळ (शरीरास लागणारी). २ (गो.) राग. [ध्व. तड्]

**ति(त)डकडांवचें** –क्रि. (गो.) भय दाखविणें.

**तिडकणें**—अक्रि. १ दुखणें; खुपणें (शरीर, अवयव इ०); तडतडणें; तिडीक निघणें. ' विषयसुख तिडकायें । ' –भाए १७५. ' कमळापतीनी जननी । परम विव्हल शोकें करूनी । तिडकूं लागले स्तन दोन्ही । ' –ह ११.६५. २ (एखाद्या गोष्टीचा) तिटकारा आला असतांहि. दुःख भोगीत तसेंच राहणें. ३ (कों.) रागानें बोलणें. ४ तडकणें [तिडक]

**तिडका** —पु सापाची एक जात. ' परड खोडसे महाडुळे। शुद्ध नाग सोनसळे । तिडके शेलाटे शंखपाळे । येऊन बाळें झोंबती । ' –कथा ४.४ ३१.

**तिडका**—वि. १ ज्यापासून ठिणग्या उडतात तो; तडतडणारा (कोळसा). २ तीड आलेला; वांकलेला; लवलेला; वक्र. (पलंग, बाज इ०). ३ (राजा.) चिडका; चिडखोर; दुरान्यास तिडण्याचा स्वभाव असणारा.

**तिडकांवचें, तिडकुंचें**—क्रि. (गो.) १ भय, भीति दाखविणें. २ रागानें बोलणें. [तिडक]

**तिडकी**—स्त्री. (काव्य.) ठिणगी. ' माझेआ कोपाग्निचिआं तिडकिआं। उसळती गगणां परौतिआ। ' –शिशु ९१३.

**तिडकेपरमें, तिडीकपरमें**—न. ज्यांत वेदना होतात, तिडका उठतात अशा प्रकारचा परमा.

**तिडणी**—स्त्री. पेंच. –शर [तिडा]

**तिडणूक**—स्त्री. (राजा.) एखाद्यास उगाच चिडविणें; चेष्टा करणें. [तिडणें]

**तिडणें**—सक्रि. अडचणींत घालणें; घट दाबणें; चिरडणें; छळणें; त्रास देणें; गांजणें. ' देवानें तिडलें म्हणून नवस फेडला. ' [का. तड; म तीड=प्रतिबंध]

**तिडणें**—सक्रि. (राजा.) चिरडीवर येऊन अथवा सतत शिवीगाळ करणें; (कों.) चिडणें.

**तिटणें**—अक्रि. वांक येणें; वांकडेंतिकडें होणें; सरकणें (पलंग इ०चा पाय, अवयव); हात, पाय वगैरे ताठणें; तिडकणें (पुष्कळ वेळ घोड्यावर बसल्यानें); गांजून जाणें (आजारीपणा, कर्ज इ०मुळें). [सं. तिर्यक्? म. तीड=वांक]

**तिडतिड**—स्त्री. १ फडफडाट; पिरपीर. २ चिरड; तुसडेपणा; चिरडखोरपणाची स्थिति; त्रास. [ध्व.]

**तिडतिडणें**—उक्रि. १ तडकणें; उलणें; चिडणें; पिरपीर करणें. २ चिडविणें; निष्कारण एखाद्यास उपद्रव देणें. [तिडतिड]

**तिडतिडा**—वि. १ वांकलेला; वांक आलेला. २ खडखडणारा; तडतडणारा ३ तुसडा; चिडका.

**तिडतीड**—स्त्री. क्रोधाच्या आवेशानें अंतःकरणाची व्यग्र दशा.

**तिडा**—पु. १ गुंतागुंत; अढी; मुरड; तिढा; वेटोळें (दोरी इ० कांचें). २ (ल.) गैरसमज; भेद; अंतर. ३ (ल.) खोंच; चूक. ४ अटकाव; अडथळा. [ति=तीन हिं.]

**तिडा-ढा**—वि. बांक आलेला; वांकलेला; स्थानभ्रष्ट. [सं. तिरस्. हि.]

**तिडातीड**—स्त्री. (राजा.) चिरडीवर येऊन शिवीगाळ करणें. [तिडणें]

**तिडांवचें**—क्रि. (गो.) राग आणणें. [तीड]

**तिडाळी**—स्त्री. तीन डोळ्यांचा नारळ.

**तिडी**—स्त्री. (राजा.) तिडा पहा.

**तिडी(डि)क**—स्त्री. १ वेदना; यातना; व्यथा. ' पोटामधें तिडिक उठिली। ' –दा १८.१० २४. २ (ल.) काळजी; कळकळ उत्सुकता. ३ प्रसूतिवेदना. ४ (गो.) राग. ५ तडस. [तिडणें] (वाप्र.) **एके तिडकेनें करणें**–एकदम, एका दमानें करणें. **तिडका खाणें-सोसणें-देणें**–श्रम, कष्ट करणें, सोसणें. **तिडका देत बसणें**–विव्हळणें (व्यथेनें). **तिडका देऊन करणें**-अहोकाट प्रयत्न करून पार पाडणें. **तिडका देणें**–१ प्रसूतिवेदना होणें. २ (ल.) सर्व शक्ति एकवटून जोराचा प्रयत्न करणें. म्ह० १ एक तिडका दे आणि घरची धनीण हो. २ पायाची तिडीक मस्तकास.

**तिडीकपरमें**—न. तिडकेपरमें पहा.

**तिडूं** —न. (कु.) ढुंगण; नितंब.

**तिडोळी**—स्त्री. तीन डोळ्यांचा नारळ. –वि. तीन डोळे असलेला (नारळ)

**तिढणें, तिढा-ढी**—तिडणें, तिडा, तिडी पहा.

**तिढाभाव**—पु. वक्रता; वांकडेपणा. ' मित्रत्वानें वागण्याचें सोडून त्यानें मनांत तिढाभाव धरला आं ' ' –नि १०१०.

**तितउ**—स्त्री. चाळण. [वै. सं. 'सक्तुमिव तितउना पुनन्तो ।' –ऋग्वे १०.६.७१.]

**तितका**—वि. तेवढा पहा. [सं. तावत्+क]

**तितकावा, तितवा**—वि. त्या संख्येचा; त्या पर्यायाचा; त्या पायरीचा. जितकावा शब्दाबरोबर योजतात. [तितका]

**तितपत**—वि. १ तेथपर्यंत; त्या प्रमाणापर्यंत; त्या पायरीपर्यंत. २ तादृश; तितकेंच; तेवढ्यापुरतें. [सं. तावत्]

**तितपर्यंत, तितपावेतो**—क्रिवि. तेथपर्यंत; त्या वेळपर्यंत; त्या स्थलापर्यंत.

**तितंबा**—पु. कुभांड; थोतांड; कट; गुप्त बेत; बंड. (क्रि० मांडणें; माजविणें; करणें; उठवणें). [फा; हिं.]

**तितर-रु**—पु. एक कबऱ्या रंगाचा पक्षी. 'मोर खबुतरें तितर सांवरें मूर्च्छागत पडती।' -ऐपो ३११. [सं. तित्तिर]

**तितला**—वि. (कु.) तितका. तेवढा पहा. [सं. तावत्]

**तितलें**—वि. (गो.) तितकें.

**तितवा**—वि. तितकावा पहा.

**तिताल**—पु. १ वादनसंबंधीं ताल. (तीन ठोके व एक वेळ विराम). २ उच्छृंखल; मनास येईल तसें वागणारें मूल. ३ (व) नकली. [सं. त्रिताल] -वि. अशा प्रकारच्या तालाचें.

**तितालीं**—वि. १ तिताल तालाचा. २ तीन मजली (इमारत) [तिताल]

**तिंतिडिका**—स्त्री. चिंच (झाड व फळ) [सं.]

**तितिक्षा**—स्त्री. सहिष्णुता; सहनशीलता; शांति; क्षमा. [सं.]

**तितिक्षु**—वि. सहिष्णु, सोशीक. [सं.]

**तितो**—स्त्री. (गो.) (बालभाषा). तिलक. [ताट]

**तितुकडा**—वि. तीन तुकडयांचा केलेला.

**तितुका**—वि. (काव्य.) १ तेवढा; तितका. २ पुष्कळ; सर्व. 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।' समर्थसंजीवनी ५२. [सं. तावत्+क]

**तितुणें**—न. मागें जाणें.

**तिंतूर**—पु. (कों.) १ भाडें, वस्त्र इ०कांस पडलेलें बारीक भोंक. २ एक कीटक, किडा. -मराठी ६ वें पुस्तक पृ. २२ (१८७५).

**तिंतूरपाउली**—(महानु.) तिंतुरीच्या पावलानें 'एके तिंतूरवा(पा)उली धावेंति।' -दाव ८७.

**तिंतर**—पु. (गो.) दौत.

**तित्तिर**—पु. एक पक्षी. [सं.]

**तिथचा, तिथणें, तिथपर्यंत, तिथपावेतों, तिथपासून, तिथला, तिथवर, तिथोर, तिथव(वे)रीं**—तेथचा, तेथणें इ० पहा.

**तिथि**—स्त्री. तीथ; दिवस; महिन्याचा तिसावा भाग (दिवस). सूर्य-चंद्र यांच्यामध्यें १२ अंश अंतर पडण्यास लागणारा काळ. [सं.] **तिथिगंडांत**-पु. प्रतिपदा, पंचमी, षष्ठी, दशमी, एकादशी आणि पौर्णिमा किंवा अमावास्या या तिथींचा संधि असेल त्यावेळीं जोडतिथीच्या शेवटची एक व आरंभीची एक अशा दोन घटिकांच्या कालास तिथिगंडांत म्हणतात. -धर्मसिंधु ३. [तिथि+गंड+अंत] **तिथिपर्व, तिथिपर्वणी**-नस्त्री. चांगला किंवा शुभ दिवस (क्रि० करणें; मानणें; पाळणें; धरणें; पाहणें). **तिथिपालन**-न. १ अशुभ तिथीस अमुक करूं नये असा जो धर्मशास्त्रांत सर्व तिथींविषयीं नियम सांगितला आहे त्याचें प्रतिपालन. हे नियम सर्व दिवस न पाळतां विशिष्ट तिथीचे-ती तिथि असेपर्यंतच-पाळणें. २ अमुक तिथीस अमुक करूं नये, अमूक पदार्थ खाऊं नये इत्यादि नियमन. हें विशेषतः चातुर्मासांत स्त्रिया पाळतात. [सं.] **तिथिमिती(थी)स**-क्रिवि. (कों.) विशिष्ट तिथीला-दिवशीं. 'देवालयांत नित्य पुराण होत नाहीं तिथिमितीस होतें.' **तिथिमास**-पु. (विवाह किंवा इतर धर्मिक कृत्यास) शुभ दिवस अगर महिना पाहण्यासंबंधांत म्हणतात (क्रि० पाहणें; नेमणें; ठरविणें; धरणें). **तिथिवासर**-पु. हरिवासर पहा. [सं.] **तिथिवृद्धि**-स्त्री. तिथीचा प्रारंभ सूर्योदयापूर्वी किंवा सूर्योदयाबरोबर होऊन अंत दुसऱ्या दिवशींच्या सूर्योदयानंतर होतो असा दिवस. एकच तिथि दोन दिवस असणें. [सं.] **तिथिक्षय**-पु. (प्र) एक तिथि गळणें. क्षयतिथि पहा. [सं.]

**तिथिल, तिथून, तिथें, तिथोन**—अ. तेथील इ० पहा.

**तिदाणें**—न. (राचा.) स्त्रियांच्या गळयांतील एक दागिना.

**तिंदा**—पु. तीनदां, तीन वेळां.

**तिंदी**—अ. तीन दिवस.

**तिंदुक**—स्त्री. टेंभुरणी (झाड व फळ). 'कदळी तित्रिणी तिंदुक, मालती।' -माधव, रामायण-अरण्यकांड १८.

**तिन**—वि. (प्र.) तीन (संख्या). 'तिन सप्तक संविजे।' -वैद्यक १५. [सं. त्रि] **०तेरा**-वि.क्रिवि. उधळलेले; नाश पावलेले. तीनतेरा पहा. **०न**-(व.) तिसऱ्यांदा; तिसऱ्यानें. **०व्या**-वि. तिसऱ्या. 'तिनव्या मासी कंथाला ठाव। हळदीकुंकवाची लल्लाटी लेव।' (वासुदेवगीतें) -मसाप ६.४६. **०सांज-जा, तिनिसांज-जा, तिन्हीसांजा**-स्त्री. (एव.अव.) संध्याकाळची वेळ; संध्याकाळ. 'किरकिरती रातकिडे। झाल्या तिनिसांजा।' -यशवंत? **०सांजां, तिनि(न्हि)सांजां**-क्रिवि. संध्याकाळच्या वेळीं. **०सान**-स्त्री. (कु.) संध्याकाळ. [तिनिसांज अप.] (वाप्र) **फुटक्या-तिनीसांजा**-ऐनसंध्याकाळीं. **तिनी(न्हि)ताळ**-पु. तीन लोक (स्वर्ग, मृत्यु, पाताळ); त्रिखंड. **तिनि(न्हि)ताळीं**-क्रिवि. त्रिभुवनांत कोठेंहि (नाहीं). **तिनीत्रिकाळ**-अ. तिन्हीं वेळां (सकाळीं, दुपारी, संध्याकाळीं). **तिन्हीप्रस्थान**-गीता, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें (शारीरभाष्य) हे तीन ग्रंथ; प्रस्थानत्रयी. **तिन्ही बंद-ध**-पुअव. मूळ, जालंदर, उड्डियान असे तीन बंध. 'आकुंचूनि अध। देऊनि तिन्हीं बंध। करूनि एकवद। वायुभेदा।' -ज्ञा १८.१०३७. **तिन्ही राम**-पुअव. दाशरथीराम, परशुराम आणि बलराम असे तीन राम. **तिन्ही लोक**-पुअव. स्वर्ग, मृत्यु, व पाताळ. 'तिन्हीलोक गाती सदा आवडीनें।' -राक ८. **तिन्ही वस्त्रें**-नअव. नेसण्याचें, पांघरण्याचें व डोक्यास गुंडाळण्याचें पागोटें वगैरे अशीं पुरुषांची तीन वस्त्रें. 'पुरुषांलागीं सप्त भूषणें। तिन्ही वस्त्र कनकवर्णें। द्वादशांगीं अळंकार लेणें। स्त्रियांस देणें तैसेचि।' -ह ३४.१६२. **तिन्हीस्थानें**-नअव. नेत्र, कंठ आणि हृदय हीं स्थानें (याशिवाय सामासिक शब्द तीनमध्यें पहा). [सं. अप.]

**तिनखारा**—पु. (व.) मोठा राग; घुस्सा. ' तिला नेलें नाहीं म्हणून तिनखारा आला '

**तिपड**—पु. वाकडेंतिकडे थर; तिरपे दोर. ' दगडांत तेढ व तिपड नसावा. ' –मॅरट १०१. [सं. त्रि+पट]

**तिंब**—वि. चिंब; पूर्णपणें भिजलेला; थवथबणारा. (क्रि० करणें; होणें). [सं. तिम्=ओलें होणें]

**तिंब(म)णें**—न. १ एखाद्या स्त्रीस प्रसूतीनंतर दहाव्या दिवशीं तिच्या माहेरून तांदूळ, गूळ तूप इ० कांनीं भरून आलेलें ताट. २ न्हाणवलीच्या चवथ्या व बाळंतिणीच्या दहाव्या दिवशीं तिची ओटी भरून वडे, घारगे करीत असतात तो समारंभ. [तिमणा]

**तिंबणें**—अक्रि. १ पूर्णपणें ओलें होणें; भिजणें. २ मळल्यामुळें उत्तम भिजणें (कणीक). ३ भिजल्यामुळें आंबणें (तांदूळ). ४ (मावळ) रोडावणें; कृश होणें (खावयास पुरेसें न मिळाल्यामुळें मनुष्य, जनावर). –सक्रि. १ पूर्णपणें ओलें करणें (रंगांत अथवा पाण्यांत); भिजविणें; चिंब करणें (पावसांत.) २ कणीक भिजवून चिकट व मऊ होईल अशी चांगली मळणें. ३ (ल) सडकून तुडविणें; चोपणें. ४ आंबवणें (ओलें पीठ). ५ दहीं, दूध, वडे मिसळून बोडण तयार करणें. [सं. तिम्=भिजणें]

**तिंबसणें**—अक्रि. (मावळ) योग्य आहाराभावीं रोडावणें; कृश होणें. [तिंबणें]

**तिंबॉ**—पु. (गो.) (गंधाचा). मोठा टिळा.

**तिबावचें**—क्रि. (गो.) बंदुकीचा नेम बरोबर लागतो कीं नाहीं हें बार उडवून पाहणें.

**तिमण**—न. तेल ह्या शब्दापुढें अतिशयार्थ दाखविणारा शब्द. जसें:– ' पावसाळा आला दाणादुणा, तेल तिमण घेतलें पाहिजे. '

**तिम(मा)णां**—न. (चि.) प्रथम रजोदर्शन, गर्भाधान, प्रसूती वगैरे समयीं माहेरचें सासरीं व सासरचें माहेरीं भोजनसाहित्य, आहेर इ० पाठवितात तें सामान. –मसाप २.४.३६५.

**तिमया**—पु. व्यंकटेश; विष्णु. ' जयजय तिमया कोनेरी। ' [सं. त्रिमल; का. तिरुमल] **तिम(मि)याचा बेल**–पु. नंदीबैल. ' तिमयाचे बैल करीं शिकविले। चित्रींचें बाहूले गोष्टी सांगे। ' –तुगा २८२३. [का. तिम्मय्या=विष्णूचें नांव]

**तिमळी**—स्त्री. एक पक्षी.

**तिमाजी नाईक**—पु. अत्यंत चिक्कु माणूस. (हरि ना. आपटे यांच्या 'मधली स्थिति' कादंबरींतील पात्र).

**तिमाणें**—न. १ शेतांतील बुजगावणें. 'तिमाणें राखण ठेवियले सेता। घालुनिया माथां चुना तया। ' –तुगा ३११. २ (राजा.) खोपटी, झोंपडी याला तिरस्कारार्थी संज्ञा. [का. तिम्मण्णा=नांव]

**तिमांय**—स्त्री. (गो.) सासू; मामी. [पो. ?]

**तिमांव**—पु. (गो.) मामा; सासरा.

**तिमाशी**—स्त्री. (व) खोड; खरडपट्टी. ' आल्याबरोबर तिमाशी काढली त्याची. '

**तिमास्त्रा**—पु. माठ, भाजीची एक जात. –कृषि ६३७.

**तिमिंगिल**—पु. शंभर योजनें लांब असलेला एक कल्पित मासा. हा इतर माशांना गिळतो. राघवतिमिंगिल पहा. [सं.]

**तिमिर**—न. १ अंधार; काळोख; तम. ' त्रितापतिमिरतमारी ' –ज्ञा १७.४२३. २ डोळ्याच्या दोषामुळें येणारें अंधत्व; नेत्ररोग; डोळ्यांतील सारा. (?) 'तिमिरावरुद्ध जैसें। दृष्टीचें तेज भ्रंशे। मग पासींच असतां न दिसे। वस्तुजात। ' –ज्ञा २.५६. [सं.]

**तिमिरेजणें**–अक्रि. १ अंधकारानें व्याप्त होणें. २ तेज मंद. होणें; अंधत्व येणें. ' एऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळें। नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे। ' –ज्ञा ९.७२. [तिमिर]

**तिमोद**—पु. (गो.) एक प्रकारचा आंबा. [पोर्तु.]

**तिम्हण**—न. (व.) डाळीच्या पिठाची थोडया तेलावर केलेली वडी; डाळीच्या पिठाचें धिरडें. ' खरपूस असें एक तिम्हण तव्यावर लाव '

**तिया**—सना. तिला. 'प्रेमामृत जीवचकोरी। लाधलें तिया। '

**तियी**—सना. (खा.) तिचा. 'इयी गोठीपे तियी पक्को भोरुसो आथो. ' =या गोष्टीवर तिचा पक्का भरंवसा होता. –भिल्ली २७.

**तिर**—उद्गा. शेळ्या, मेंढया यांना हांकण्याचा शब्द. [ध्व.]

**तिरकट**—वि. तिरवा; काणा; चकणा (डोळा; माणूस). [सं. तिर्यक्]

**तिरकटी**—वि. तिरकती पहा.

**तिरकत**—पु. (कों.) तीन शिडांचें जहाज; तिरकती तारूं. [सं. त्रि+काष्ठ; म. तिर्+काठी]

**तिरकती**—वि. (कों.) तीन शिडांचें (जहाज). [तिरकत] **०तारूं**–न. तीन डोलकाठ्या असणारें मोठें तारूं. हें मोठ्या समुद्रांत चालतें.

**तिरकमशेट**—पु. १ चकणा, तिरवा, काणा, मनुष्य. २ जवळ भांडवल नसतां आपण मोठे आहोंत असा बहाणा करणारा, लहान शेट, व्यापारी. [तिरका+शेट]

**तिरकस**—वि. वांकडा; तिरवा; (चौकोनांतील कर्णाप्रमाणें) तिरपा. –क्रिवि. वांकडें, तिरपें होईं असें (कापणें, जाणें, पहाणें) [सं. तिर्यक्; प्रा. तिरिक्ख] **०तिगा**–वि. (व.) तिरपगडें; वांकडा.

**तिरका**—वि. १ तिरवा; तिरकस; वांकडा (डोळा). २ तिरवें, तिरळें पाहणारा. [सं. तिर्यक्; प्रा. तिरिक्ख]

**तिरकाठी**—वि. तीन डोलकाठ्या असणारें; तिरकती (तारूं.) [त्रि+काठी]

**तिरकी**—स्त्री. (कों.) एक पै; एकतृतीयांश पैसा. [सं. त्रिका

**तिरकीं-कें** —अक्रि एकाला तिहींनीं गुणीत असतांना उपयोगांत येत असलेली संज्ञा. जसें:-एकें तिरकें तीन. [ सं. त्रिक ]

**तिरकूट**—न. मसाल्याचे अनेक पदार्थ एकत्र कुट्टन केलेलें मिश्रण; चटणी; पूड. 'तिरकुटें नसती अति वाणिचीं '-सारुह ३.५४.

**तिरकूट**—न. १ तिघांची जूट, गट; त्रिकूट. २ तीन कुटुंबांची सोयरीक. उदा० आपल्याकडील मुलगी कोणेकाचे घरीं द्यावी, त्याकडील तिसऱ्याकडे देववावी व त्या तिसऱ्याकडची मुलगी आपल्या घरीं करवावी असा प्रकार.

**तिरकोण-न**—वि. त्रिकोण; तीन कोनांची(आकृति) [ सं. ]

**तिरखा**—स्त्रीअव. ( अशिष्ट ) गुह्यभागावरील केंस.

**तिरगी(ग्री)मिरगी-घी**—स्त्री. १ अरेरावी; तोरा; ताठा. २ अरेतुरे करणें. **०वर येणें**-अरेतुरेवर, मारामारीवर येणें; भांडण लागणें.

**तिरगुणी, त्रिगुणी**—स्त्री. ( व. ) लहान मुलींची साडी. [ सं. त्रि+गुण ]

**तिरगूळ**—पु. ब्राह्मणांची एक जात किंवा तिच्यांतील एक व्यक्ति. या जातीचा विडयाच्या पानांचा धंदा असतो. [ सं. त्रैकूटक-त्रिगुडअ-त्रिगुड=तिरगूळ-राजवाडे, भाअ १८३६ ]

**तिरगो तिणाण्णा करीत हिंडणें**—( क. ) विनाकाम हिंडणें; वणावणा हिंडणें.

**तिरटीम**—स्त्री. १ छळणें; गांजणूक. २ वेडावणें; विडंबन. [ इं. थ्री+टाईम्स ? ]

**तिरडा**—पु. ( राजा. ) एक फुलझाड; तेरडा. याच्या फुलाचें रंग वरचेवर बदलतात. तेरडा पहा. **तिरडें**-न. तिरडयाचें फूल.

**तिरडाफांक**—स्त्री. १ दाणादाण; पांगापांग; पळापळ ( सैन्याची, जमावाची ); कार्यनाश; बिघाड.; धुळधाण; गोंधळ; विचका ( कार्य, योजना इ०चा ) ( क्रि० पडणें; येणें; होणें ). २ कष्टप्रद स्थिति; दमणूक; कुतरओढ; ताप; त्रास. ' त्या द्वाड पोरानें आईची तिरडाफांक केली. ' [ त्रेधा+फांकणें ]

**तिरडी-ढी**—स्त्री. प्रेत वाहून नेण्याची ताटी. ( वाप्र. ) **०उचलणें**-( स्मशानीं पोंचविणें ) एखाद्याविरुद्ध कट करून त्यास काढणें. **०करणें**-तिरस्कारपूर्वक त्याग करणें. **०काढणें**-एखाद्याचें मरण इच्छिणें; मरणाची तजवीज करणें.

**तिरडें**—न. १ रानशेणी ( गोवऱ्या ) करितां टोपली, पाटी. २ गोवऱ्या भरलेली टोपली. ३ टोपलीभर गोवऱ्या इ० वस्तू.

**तिरडें**—न. जिच्यांत भोंक पाडून लहानशी काठी बसवितात अशी फळी; इंग्रजी टीच्या आकाराचें एक आऊत. ( भात लावीत असतांना दाट चिखलांत हिच्यावर शेतकरी ढुंगण टेंकतो ).

**तिरडोळी**—स्त्री. १ नारळाचे डोळे. २ ( निषेधार्थी ) भिकारी. [ त्रि+डोळा ]

**तिरणें**—उक्रि. पोहणें; तरणें. [ सं. तॄ-तरणें; हिं. तिरना ]

**तिरतळ्या**—स्त्रीअक. कंटाळा येईपर्यंत मार्गप्रतीक्षा करणें; ताटकळत बसणें. तारतळया पहा. ( क्रि० देणें; देत बसणें ).

**तिरताळीस, तिरताळ, त्रेताळीस**—वि. त्रेचाळीस ४३ संख्या. [ सं. त्रि+चत्वारिंशत् ]

**तिरतिरा-ऱ्या**—वि. ( राजा. ) १ चंचळ; अस्थिर. २ चुळबुळया; अस्वस्थ; अशांत. [ तरतर, तुरतुर ]

**तिरंदाज**—पु. तीर मारण्यांत कुशल; धनुर्धारी. [ फा. तीर+अंदाज ] **तिरंदाजी**-स्त्री. धनुर्विद्या; शरसंधान. ' तो रावरंभा सरदार बसुन हौद्यांत तिरंदाजींत । ' -ऐपो २८३.

**तिरध(धे)ल**—स्त्री. १ शेतांतील अथवा मळयांतील उत्पन्नाचा खंडकऱ्यानें मालकास द्यावयाचा तिसरा हिस्सा. २ अशा अटीवर घेतलेला मक्ता; खंड. अर्धेल पहा. [ सं. त्रिधा ] **तिरध-(धे)ली**-पु. तिरधेलीनें जमीन करणारा; खंडकरी.

**तिरपगडा-डें**—पुन. फाशांच्या खेळांतलें एक दान; दोन फाशांनीं टाकलेला एक डाव. यांत एका फांशावर एक व एकावर दोन दाणे असतात. **तिरपगडं**-( ल. ) विपरीत. ' सर्व कांहीं तिरपगडं होईल.

**तिरपण-ठिगळो**—वि. (कु.) त्रेपन्न निरनिराळया प्रकारचीं ठिगळें असलेल्या कपडयाप्रमाणें एकच रंग सांगतां येणार नाहीं असा. ( ल. ) पाताळयंत्री.

**तिरपणी-णें**—तुरपणी-णें पहा.

**तिरपणें, तिरपावणें**—अक्र. वांकडें होणें; लचकणें; ताठणें ( अवयव ); अवघडणें; ताठरणें; ( मान. ) मुचकणें. [ तिरपा ]

**तिरपणें**—सक्रि. तुरपणें.

**तिरपणें**—अक्रि. ( व. ) तिरीप पडणें; दिपून जाणें.

**तिरपतकाना-न्हा-न्ही**—वि. तिरळें पाहणारा.

**तिरपतकानी-न्ही**—स्त्री. गोटयांच्या खेळांत, गोटी तिसऱ्यांदा मारणें.

**तिरपन्न**—वि. त्रेपन्न; ५३ संख्या. **तिरपन ठिगळी**-स्त्री. (कु.) चावट, उपद्व्यापी पोर.

**तिरपस**—वि. ( चंद्रपुरी ) आडवा ( लवंडलेला ). ' जेऊन खाऊन तिरपस झाला. '

**तिरपा**—वि. वांकडा; तिर्कस. [ सं. तिरस्; हिं. तीर्छा ]

**तिरपी**—स्त्री. ( व. ) लहानशी खिडकी; झरोका.

**तिरपीट**—स्त्री. १ शीण; थकवा. २ त्रेधा; गडबड; धांदल; तारंबळ. [ त्रिपथ ] **०उडणें**-त्रेधा उडणें; गोंधळ होऊन जाणें.

**तिरपुल्या**—वि. तीन कमानीचा ( दरवाजा. असे दरवाजे बाजारास पूर्वी करीत असत ).

**तिरपेल**—न, एक औषधी तेल. [ इं. टरपेनटाईन ]

**तिरफळ**—स्त्री. (कों.) १ एक झाड. २ –न. त्याचें फळ; चिरफळ पहा [सं. त्रि+फल]

**तिरवांकडा**—वि. १ वांकडातिकडा उभा राहिलेला, पडलेला. २ ओझरता; कलता. [तिर्यक्+वांकडा]

**तिरंवी, तिरमी**—स्त्री. तुरंवी, तुरमी पहा.

**तिरमणें**—नअक्र. (कु.) बळ; शक्ति; सामर्थ्य. 'बरें, काय चिंता, तुझी तिरमणें मी पाहीन.'

**तिरमल्ला–ल्ले–ल्या**—पु. नंदीबैल घेऊन भिक्षा मागणारी कर्नाटकांतील एक जात किंवा तींतील एक व्यक्ति. [का. तिरगणें=फिरणें]

**तिरमाणा**—वि. (क.) तटस्थवृत्ति.

**तिरमारा**—पु. (गो) तिरंदाज. [तीर]

**तिरमिरणें**—अक्रि. तिरमिरी येणें. [तिरमिरी]

**तिरमिरी**—स्त्री. घेरी; भोंवळ; मूर्च्छा. (क्रि० येणें). [का.]

**तिरमी**—स्त्री. १ घेरी; भोंड. (क्रि० येणें). २ उन्हाची झळ. (क्रि० लागणें; पडणें).

**तिरया**—(गो.) एक पशु.

**तिरवट**—वि. तिरपें पाहणारा; तिरळा (डोळा). [तिरवा]

**तिरवड**—स्त्री. (गो.) प्रेत नेण्याची ताटी; तिरडी.

**तिरवड**—पु. (गो) (सोनारकाम). ठोकण्याचा लहान लांकडी हातोडा.

**तिरवा**—वि. १ तिरळा (डोळा); तिरपा पाहणारा; काणा. २ वांकडा; कलता; एका बाजूस असणारा; तिरपा. [सं. तिर्यक्]

**तिरशिंगराव**—पु. १ तिरसट, चिडखोर माणूस. २ फुशारक्या मारून पराक्रमाचा आव घालणारा माणूस.

**तिरशिं(सं)गी**—स्त्री. नित्य सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं अशा तिन्ही वेळां फुलें येणारें एक झाड. [सं. त्रिसंधि]

**तिरसट**—वि. चिडखोर; तुसडा; चिडका.

**तिरसा, तिरवा**—वि. तिरळा; तिरपा (डोळा); तिरव्या डोळयाचा (माणूस).

**तिरसी**—वि. (गो.) तिरवा; काणा.

**तिरसुवाद**—वि. (गो.) तिरसट.

**तिरस्कार**—पु. तिटकारा; अनादर; धिक्कार; हेटाळणी; अवमान. [सं.] **तिरस्कारणें**–सक्रि. हेटाळणें; अनादर करणें; धिक्कारणें; तुच्छ मानणें. [तिरस्कार] **तिरस्कारी**–वि तिटकारी; चिळसखोर; कंटाळखोर; अनादर, धिक्कार मनांत ठेवणारा. [तिरस्कार] **तिरस्कृत**–वि. झिडकारून दिलेला; निंदित; त्याग, अमान्य केलेला; धिक्कारलेला. [सं.]

**तिरस्थळी**—स्त्री. १ काशी, प्रयाग, गया या तीन क्षेत्रांची यात्रा. २ (ल.) इकडून तिकडे होणारे निरर्थक हेलपाटे; त्रासदायक व व्यर्थ प्रवास. ३ वरचेवर लागणाऱ्या पदार्थांची व स्थलांची पांगापांग व गैरसोईची स्थिति; कामाची दाणादाण. ४ मनाची अस्थिरता, चंचलपणा. उदा० 'मी काल येऊन पोंचलों पण अजून माझी तिरस्थळी आहे. [सं. त्रि+स्थळ] (वाप्र.) ०ची यात्रा–स्त्री. काशी, प्रयाग व गया या क्षेत्रांची यात्रा (ल.) दूरदूरच्या व गैरसोयींच्या ठिकाणीं पांगलेलें काम.

**तिरळणें**—अक्रि. फुटणें; तडकणें; पिचणें; तडा जाणें. [तीर]

**तिरळा**—स्त्री. (व.) कुणब्याची एक पोटजात. तिरोळा, तिळोरा, तिळोरी पहा.

**तिरळा**—वि. तिरवा (डोळा अथवा मनुष्य). [सं. तिरस्]

**तिरळातांदळा**—पु. विटीदांडूच्या खेळांत दोन्ही बाजूंनीं खेळणारा एक भिडू.

**तिरळी**—स्त्री. (गो.) दालचिनी.

**तिराईत**—वि. तिरंदाजीमध्यें कुशल. [तीर]

**तिरांटी**—स्त्री. १ (गो.) कागदाचा वंद २ वस्त्राचा अरुंद फडका. चिरटी, चिरोटी पहा.

**तिरायत**—पु. (गो.) तिऱ्हाईत पहा.

**तिरावचें**—क्रि. (गो.कों.) खात्री पुरविणें, करणें.

**तिराहीत**—वि. तिऱ्हाईत; पहा. मध्यस्थ.

**तिरिंग**—पु. एक वनस्पति (गुरांना खाण्यास वैरणीसारखा याचा उपयोग करतात).

**तिरी, तिरीक**—स्त्री. (सोंगटयांचा खेळ) तिसरे घरीं सोंगटी बसायाजोगा पडणारा फांशाचा डाव; तीन. [सं. त्रि]

**तिरीक**—वि. (विणकाम) तीन तारांचा (धाग्यांचा) समुदाय. एक तिरीक. [सं. त्रि]

**तिरीप–म, उन्हाची तिरीप**—स्त्री. १ सकाळ, संध्याकाळचें कोवळें ऊन. (क्रि० घेणें; घेत बसणें). २ कवडसा; खिडकी, दरवाजा यांतून येणारें किरण; ढगांतून येणारें सूर्यकिरण; छटा.

**तिरीम**—न. दृष्टिमांद्य; बुद्धिमांद्य. –पु. सौम्य प्रकाश.

**तिरुका**—पु. एक पैसा; पाव आणा. 'तिरुका अथवा धान्य झडकरी। मी घालते तुझे पदरीं।'–भवि २२.१०३. [ति=तीन+रुका] म्ह० कोंवडीचा खून तिरुका.

**तिरुपन्न, तिरुसष्ट, तिरेचाळ, तिरेचाळीस, तिरेताळ, तिरेताळीस, तिरेपन्न, तिरेसट**—त्रेपन्न, त्रेसष्ट इ० पहा.

**तिरोधान**—न. १ नाहींसा होणें; दडणें अथवा गुप्त होणें. २ झांकण; पदर; म्यान; घर; बुरखा; सामान्यतः आच्छादक पदार्थ. [सं. तिरस्+धान]

**तिरोभाव**—पु. एखादा राग आळवीत असतां त्यांत दुसऱ्या रागाची छाया सामान्य स्वरसमुदायानें उत्पन्न करणें व त्यामुळें मूळ राग झांकून टाकणें. [सं. तिरस्+भाव]

**तिरोहित**—वि. १ नाहींसा झालेला; दडलेला; लपलेला. २ झांकलेला, आच्छादिलेला. [सं. तिरस्+हित]

**तिरोळी**—पु. (बे. कों.) १ गवताचा प्रकार. २ झेंडूची एकेरी फुलांची जात. [तीळ, तिळाच्या फुलांप्रमाणें]

**तिर्कें, थ्रीक**—न. (गो.) सोंगट्यांच्या खेळांतील एक दान (तीन). [सं. त्रि]

**तिर्कस, तिरकस**—वि. तिरपा; वांकडा, वक्र, सरळ, उभा नव्हे असा. [सं. तिर्यक्; तिरस्]

**तिर्कसउंची**—स्त्री. शंकूचा शिरोबिंदु व त्याच्या पायाच्या परिघांतील कोणताहि बिंदु ह्यांस सांधणारी रेषा.

**तिर्धेल**—पु. १ (कों.) शेतांतील उत्पन्नाचा दोनतृतीयांश भाग मालकाला व एकतृतीयांश शेतकऱ्याला असा केलेला ठराव. २ वरील ठराव करणारें कूळ. [सं. त्रिधा]

**तिर्पिंटीन**—न. (गो.) देवदाराचा चीक. [पोर्तु.; इं. टर्पेंटाइन]

**तिर्पुंचें**—क्रि. (गो.) चालतांना पाऊल तिरपें होऊन दुखणें. [तिरपा]

**तिर्फेळीन**—स्त्री. (कु.) त्रिफळाचें झाड. तिरफळ पहा. [सं. त्रिफल]

**तिर्यक्**—वि. १ आडवा; तिरपा; वांकडा. २ –क्रिवि. तिरकस; उतरता. [सं.] **तिर्यक्कोण**–पु. काटकोनाखेरीज सर्व सरळ रेषांचा कोन. **तिर्यक्योनि**–वि. १ पशूपासून अथवा पशुप्रमाणें जन्मलेला. २ राक्षस; पिशाच्च; देव इ० (ज्यांची पंचमहाभूतांपासून उत्पत्ति नाहीं असा). [सं.] **०बाहु**-(नृत्य) नृत्यामध्यें खालून वर व वरून खालीं हात नेत असतां हातांची मधली स्थिति.

**तिऱ्याण्णव**—वि. त्र्याण्णव; ९३ संख्या.

**तिऱ्यांशी**—वि. त्र्यांयशी; ८३ संख्या.

**तिऱ्याहात्तर**—वि. त्र्याहात्तर; ७३ संख्या.

**तिऱ्हड, तिऱ्हफडां**—स्त्री. तिरडाफांक पहा.

**तिऱ्हस्थळी**—स्त्री. तिरस्थळी पहा.

**तिऱ्हळातांदळा**—पु. तिरळातांदळा पहा.

**तिऱ्हा**—स्त्री. तीनपाई लाकडी घडवंची (जीवर उभें राहून ज्वारी इ० उपणतात ती). [सं. त्रि]

**तिऱ्हाइती**—स्त्री. मध्यस्थी; पंचाईत.

**तिऱ्हाइती**—वि. मध्यस्थ अथवा मध्यस्थीसंबंधीं.

**तिऱ्हाईत**—पु. १ मध्यस्थ; पंच. २ पंचांचा अथवा मध्यस्थांचा समुदाय. ३ परका माणूस; त्रयस्थ. –वि. कोणत्याहि पक्षांत नसणारा तटस्थ (माणूस).[मल्याळी तिरायुत; सं. त्रयस्थ]

**तिऱ्हाईतपणा**—पु. निःपक्षपात; उदासीनता; तटस्थ वृत्ति; त्रयस्थपणा.

**तिऱ्हाळ**—स्त्री. तीन पंचांचा तागा; तिवाळ पहा.

**तिल**—पु. १ तिळाचें झाड. २ तीळ. ३ अंगावरचा नैसर्गिक तिळायेवढा काळा ठिपका. [सं.] (वाप्र.) **०तुल्य-प्राय**–वि. अत्यंत थोडा; अल्पप्रमाणवाचक शब्दप्रयोग. **तिलतर्पण**–न. पितृ-पितामहादि पूर्वजांच्या स्मरणानें तिळासह पाणी सोडणें. [सं.] **तिलपात्र**–न. तिळांनीं भरलेलें पात्र (ब्राह्मणाला दान देतात तें). [सं.] **तिलपुष्प**–न. तिळाचें फूल. [सं.] **तिलांजली, तिलांजुली, तिलोदक**–पुस्त्रीन. १ मरण-दिवसानंतर दहाव्या दिवशीं तिलमिश्रित जलानें मृतास उद्देशून 'अश्मा' नांवाच्या दगडावर केलेलें तर्पण. (क्रि० देणें) २ (ल.) सोडणें; टाकणें. त्याग करणें; नांव सोडून देणें (क्रि० देणें). [सं.] (वाप्र.) **तिलांजली घेणें-घेऊन उभा राहणें**–एखाद्याच्या मरणाची वाट पाहणें. (एखाद्याचे नांवावर अथवा त्याचे नांवची). **तिलांजली देणें; सोडणें; सोडून देणें**–(एखाद्या वस्तूची) आशा, हक्क, संबंध सोडणें.

**तिलक**—१ चंदनाचा–गंधाचा टिळा. वाटोळा बिंदु; कपाळ (ल.) उत्तम; श्रेष्ठ; जातींत किंवा वंशांत जो श्रेष्ठ त्यास त्या त्या ठिकाणीं म्हणतात. उदा० रघुकुलतिलक. [सं.]

**तिलककामोद**—पु. गायनशास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत धैवत वर्ज्य; जाति षाडव-संपूर्ण. वादी षड्ज, संवादी पंचम. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर.

**तिलंग**—पु. गायनशास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम; कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति औडुव–औडुव. वादी गांधार. संवादी निषाद. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. (हा सार्वकालिक आहे असेंहि मानतात).

**तिलवली**—पु. लिंगाईत लोकांतील एक पंथ किंवा त्यांतील व्यक्ति. चिलवंत पहा.

**तिलवाडा**—पु. एक ताल; ह्यांत सोळा मात्रा व चार विभाग असतात.

**तिलारी**—पु. (ठाणें) लिंगाईत पंथांत प्रवेश केलेला पंथाबाहेरील हिंदु.

**तिलोरी**—स्त्री. कुणब्यांतील एक पोटजात.

**तिल्ला**—वि. खेळणारा तिसरा; खेळांत पाळीनें तिसरा. मिरी (पहिला), दुल्ला (दुसरा), फड्डी (शेवटचा) पहा.

**तिल्लाणा**—पु. गाण्याचा एक प्रकार; तराणा. [फा. तिलाणा]

**तिल्लोरी**—वि. (मुंबई) जातगंगेनें पांक्त ठरविलेला साल कढ; (अकरमाशा).

**तिल्हड, तिल्हडफांक**—स्त्री. तिरडाफांक पहा.

**तिवट**—न. पागोटें (विशेषतः व्यापारी लोकांचें). (जुन्या कागदपत्रांतून फक्त हा शब्द येतो). 'तिवट खारव्याची.

-वाडबाबा २.४. ' शिरीं तिवट पेच गुंतले। ' -होला २३. [ सं. त्रिपट; प्रा. ति+वड=वस्त्रविशेष ? ]

**तिवतिवीत**—वि. (गो.) सतेज; टवटवीत पहा. [ सं. तेजन ]

**तिवर**—पु. एक लहान झाड; तिवीर; तवीर पहा.

**तिवरा**—पु. अभिमान. ' स्वरूपाच्या दर्पे बहुत। चढला त्यासि तिवरा। ' -निमा १.८३. [ सं. तीव्र ]

**तिवस**—न. एक झाड; याचें लांकूड इमारतीच्या उपयोगी असतें.

**तिवा-व्वा**—पु. गुरांना होणारा एक रोग. [ सं. तीव्र: प्रा. तिव्व ? ]

**तिवा, तिव्वा**—पु. पत्त्यांतील तीन ठिपक्यांचे पान. [ सं. त्रि ]

**तिवा(व)मासा**—पु.( गो. कों. ) देवमासा. [सं. तिमिमत्स्य]

**तिवारी**—पु. पंचगौड ब्राह्मणांपैकीं एक पोटजात. ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यांत या जातीचे बरेच ब्राह्मण असत. [ सं. त्रिवेदी ? ]

**तिवाशा(सा)-शी-सी**—स्त्री. १ तक्या; लोड; गिर्दी; उशी. ' तिवाशी उशी रम्य पीतांबराची। ' -किंसुदाम ४१. ' तिवासिया लोड टाकूनि बैसमी। ' -तुगा. २ गादी; चित्रासन; गालिचा ' लोड तिवासे विस्तारले। ' -मुआदि ४६.५. [ फा. तिवासी=कशीदा काढलेली लहान बैठक ]

**तिवीर**—पु. (कों.) एक लहान वृक्ष. तवीर पहा हा खाडीच्या कडेस उगवतो.

**तिव्ही**—स्त्री. (व.) जनावरास होणारा पायाचा एक रोग. तिवा पहा.

**तिशा**—पु. (ना.) पहिल्यांदा गरोदर असलेल्या स्त्रीस तिच्या गरोदरावस्थेच्या ५ ते ९ महिन्याच्या दरम्यान करण्यांत येणाऱ्या समारंभांत स्त्रीला जें हिरव्या रंगाचें वस्त्र देतात तें; डोहाळतुलीची ओटी.

**तिशी**—स्त्री. १ तीस वर्षांचें वय; तत्कालीन अवस्था. २ तीस सजातीय पदार्थांचा समुदाय. -वि. तीस दिवसांचा (महिना). [ सं. त्रिंशत्; म. तीस ] **म्ह०** विशी विद्या तिशी धन. **तिशीं**-क्रिवि. दिवसाच्या तिसाव्या घटकेला.

**तिष्ठ(ष्ठ)णें**—अक्रि. वाट पाहणें; मार्गप्रतीक्षा करणें; खोळंबणें. [ सं. स्था-तिष्ठ ] **तिष्ठत बसणें-राहणें-असणें**-वाट पहात बसणें; खोळंबून राहणें; प्रतीक्षा करणें; अडून राहणें. ' अश्वमेधादि सुकृतें यासी। फळ घेवूनि तिष्ठती। ' -मुआदि १३.३५.

**तिसकूट**—स्त्री. (राजा. कु.) (मित्रा-मित्रांमधील) गैर समज; तिढा; तेढ. [ सं. तिरस्+कूट ]

**तिसकूट**—वि. (राजा. कु.) मूर्च्छा; घेरी. (क्रि० येणें).

**तिसकूट**—स्त्री. (राजा. कु.) कोंवळे देंठ, शेंडा (लहान झाडाचा); डिकशी.

**तिसकूड**—वि (राजा.) तुसडा; तिरसट; चिरडखोर; तिडतिडा.

**तिसमारका, तिस्मारखां-खान**—पु. १ अंगीं शूरत्व नसतां शूरत्वाचा नुसता आव आणणारा मनुष्य. २ (या नांवाचा पूर्वी एक योद्धा होऊन गेला, त्यावरून विपरीत लक्षणेनें ). अरेराव, करडा, रागीट मनुष्य. ' शाळेचे सरमास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ व तिस्मारखान होते. ' -नि ६५८. -वि. शौर्याच्या; पराक्रमाच्या बाता मारणारा; आव आणणारा. तीसमारका पहा.

**तिसरा**—वि क्रमानें दुसऱ्याच्या पुढचा; तीन नंबरचा; तृतीय. [सं. त्रिस्; हिं. तिस्रा] (वाप्र.) **ह्याचें तिसरेंच एक**-१ ह्या मनुष्याचा विचार, कल्पना, मत अथवा मार्ग तिसरा आहे म्हणजे पहिल्या दोहोंशीं याचें जुळत नाहीं. २ (ल.) विचित्र, विलक्षण मत, मार्ग. **तिसरा पाय**-पु. १ एखादें काम करण्याविषयीं दांडगा उत्साह; हौस; पूर्ण तयारी. उदा० 'जेवावयाला म्हटलें तर तिसरा पाय.' २ फार उतावळी. ' त्याला दाखवाल तें तो सांगेल किंवा सांगाल तें तो दाखवील. त्याला दाखविण्याची मात्र भीड धरतां कामा नये, म्हणजे सांगायला तिसरा पाय ? ' -विकारविलसित.

**तिसरें**-न. सुकण्याच्या बाबतींत तिसऱ्या नंबरची नारळाची पेंड. [ तिसरा ]

**तिसराव-वा**—पु. तिसरा हिस्सा, भाग; (गो.) तिसराय. [ तिसरा ] **तिसरपणांतलों**-वि. (गो.) तिजवर. [तिसरा+पण]

**तिसरी**—स्त्री. (गो. कु.) एका जातीचा शंख; शिंपला. यांत एक प्राणी (मासळी) असतो. (सामा.) मुळा.

**तिसळ**—पुस्त्री. एक मोठें कांटेरी झाड. याच्या फळानें जिभेस मिरमिर लागते त्यांचा मसाल्यांत उपयोग करतात. याच्या वासानें माशाची घाण जाते. तिरफळ पहा.

**तिसावा**—वि. तीस या संख्येचा, अनुक्रमाचा (विषय). [ तीस ]

**तिसी**—स्त्री. (काशी) जवस; अळशी (झाड व धान्य). [ सं. अतसी ]

**तिसी**—तिशी पहा.

**तिस्कनड**—स्त्री. (गो.) भानगड.

**तिस्ती**—स्त्री १ तिपदरी सूत. २ (गो.) चिंधी. [ सं. त्रिसुती ]

**तिस्मारगिरी**—स्त्री. जुलूम. तिस्मारखाँ पहा. ' कैद्यांना नेतेवेळीं पोलीसानें आपली तिस्मारगिरी दाखविली. ' -विक्षिप्त १.२७.

**तिस्सा**—न. (व.) वखराच्या खोडास तीन खुंटया असलेलें आऊत. [ सं. त्रि ]

**तिस्सां**—वि. (साल) नऊ. [अर. तिस्अ]

**तिस्सैन**—वि. नव्वद; ९० संख्या (अरबी सालांकरितां हे शब्द योजितात). [अर. फा. तिस्ईन]

**तिहीं**—(काव्य.) त्यांनीं. ‘ तिहीं अमित काढिल्या नृपमखांत पत्रावळी।’ —केका ७. [ते]

**तिहींउणें, तिहींतिहींउणें**—वि. १ (गुणें, उणें यांच्या घोंटाळ्यावरून कदाचित्?) (त्रिगुण) त्रिविध. २ तिहींनी युक्त. ३ तिहींनीं उणें. —हंको —मनको. [तीन+गुणें, उणें?]

**तिहींची खूण**—स्त्री. (सांकेतिक) गुरु, शास्त्र, आत्मप्रतीति यांची खूण.

**तिहींताळीं**—क्रिवि. १ तीन मजल्यावर. २ तीनहि लोकांत. ‘ तिहीं ताळीं हेचि हाक। म्हणती पांढरा स्फटिक।’ —तुगा ४१०१. [तीन+हि+तल—ताल]

**तिहीरी, तिहेरा-री**—वि. १ तीन पदरी (वस्त्र, दोरी). २ तिप्पट; तिघड (परिमाण, जिन्नस). [हिं तिहरा] **तिहेरी चुलाण**—न. गुऱ्हाळघर, यांत दोन कढविण्याच्या व एक सांठ्याची अशा तीन काहिली असतात.

**तिहीसांज**—स्त्री. (व.) तिन्हीसांज; दिवे लावण्याची वेळ; संधिसमय; संध्याकाळ.

**तिळ**—तीळ पहा. [सं. तिल] (वाप्र. तीळ पहा.)

**तिळई**—स्त्री. तिळांतील एक जात. [तीळ]

**तिळवण**—स्त्री. एक प्रकारचें रोपटें; भाटवण; कानफोडी पहा.

**तिळ्या वेल**—स्त्रीपु. तिळाएवढें लहान फळ येणारी एक वेल.

**तिळतिळी**—स्त्री. चकाकी; तुकतुकी; झिलई. तुळतुळ पहा.

**तिळतिळीत**—वि. तुळतुळीत; चकाकणारा; चांगल्या झिलईचा (मुख्यतः तेलामुळें किंवा घोटल्यामुळें). तुळतुळीत पहा.

**तिळये झाड, तिळयो**—नपु. (गो.) एक प्रकारची वनस्पति.

**तिळसांज, तिळसान**—स्त्री. (गो.) तिन्हीसांजा (पहा); संध्याकाळ.

**तिळॉं**—न. (गो.) एक झाड.

**तिळी**—स्त्री प्लीहा. पाणथरी पहा.

**तिळी**—स्त्री. (कों.) लहान व पांढरे तीळ.

**तिळोरा**—स्त्री. कुणब्यांतील एक पोटजात. तिरळा पहा.

**तिळोरी**—स्त्री. (मुंबई.) झेंडूची एकेरी फुलाची जात [तीळ]

**ती**—सनास्त्री. १ तृतीयपुरुषी स्त्रीलिंगी सर्वनाम. स्त्रीलिंगी शब्दानें निर्देशिली जाणारी व्यक्ति किंवा वस्तु. २ तिरस्कारार्थी पुरुषालाहि लावितात. ‘ म्यां तिला खूब ठकविलें.’ ३ (सांकेतिक) स्वतःची बायको. ‘ तरी ती म्हणतच होती कीं मुलाचें पत्र येऊं द्या आणि मग जा.’ —मोर ६.

**ती**—वि. (काव्य) तीन. ति पहा. ‘ एकैका बाणातें तीं तीं बाणीं तुझा सुत च्छेदी।’ —मोकर्ण १४.३०. [सं. त्रि; प्रा. ति]

**तीा**—१ (सांकेतिक) तीर्थस्वरूप या शब्दाचें संक्षिप्त रूप. २ तिवट; पागोट्याचा एक प्रकार. ३ तिथि.

**तीउर**—पु. काठ; तीर; किनारा. ‘ समुद्राच्या तीउरा गेला।’ —उषा ८५३. [सं. तीर]

**तीए**—सना. (काव्य.) त्या. ‘ आर्तैले डोळे तीए दीशे। धांव घेती।’ —ऋ २५.

**तीकटें**—न. (महानु.) मढयाच्या पुढें धरावयाची शिंकाळी. ‘ तीकटें श्रीकरें धरणें।’ —ऋ १०७. तिकटें पहा.

**तीख**—वि. (कुण.) तीक्ष्ण. तिखट पहा. ‘ उकलतेनि उन्मेखें। प्रज्ञाकुशलतेंचि तिखें।’ —ज्ञा १५.१८५.

**तीगराळें**—न. तीन वाती लावलेला दिवा. ‘ तीगराळें विगटनी। घातली खणोखगी।’ —कालिकापुराण २८.३१. [सं. त्रि+कर+आलय]

**तीचनाट**—स्त्री. (कु.) खेळांत गोटी असेल तेथेंच ठेवण्यासाठीं हा शब्द वापरतात.

**तीज**—स्त्री. १ शुक्ल किंवा कृष्ण पक्षाची तिसरी तिथि; तृतीया. २ (बायकी) चैत्र शुद्ध व वद्य आणि वैशाख शुद्ध तृतीयेचे हळदकुंकू; अक्षयतृतीया. [सं. त्री; गु. तीज]

**तीट**—पुस्त्री. १ दृष्ट किंवा पिशाचबाधा होऊं नये म्हणून लहान मुलांच्या कपाळाला लावलेला काजळाचा टिळा; अंगारा. २ तांदूळ इ० धान्य जाळून वगैरे तयार केलेला लहान मुलांच्या कपाळीं गंधाप्रमाणें रोज स्नानानंतर लावण्याचा पदार्थ. ३ त्याची टिकली. [सं. तिलक]

**तीट**—स्त्रीपु. बांक; वळण; पीळ. तीड पहा.

**तीड**—स्त्री. फटः भेग; चीर. [ध्व. तड्]

**तीड**—स्त्री. १ वांक; तेढेपणा; वक्रता. २ गुंतागुंत; गाठी (दोरींतील); अढी; तिढा. ३ (ल.) गैरसमज (मित्रांमध्यें परस्पर); मतभेद; बेकी. [सं. तिर्यक्]

**तीड**—स्त्री. १ (ल.) आडकाठी; प्रतिबंध; खो; अडथळा; तिढा; अडथळा आणणारी गोष्ट; अडचण (क्रि० येणें; पडणें). २ (हिशेबांत) प्रमाद अथवा चूक. ३ (गो.) कुरापत. (क्रि० काढणें). [का. तड=प्रतिबंध]

**तीथ**—स्त्री. १ तिथि पहा. २ श्राद्धदिन. [सं. तिथि] (वाप्र) **०धरणें-नेमणें-ठरविणें**—लग्न वगैरेचा मुहूर्त निश्चित करणें; कार्याचा दिवस ठरविणें. **०पालन**—१ तिथिपालन पहा. **०वार** —पु. सणवार; शुभवार. ‘ आम्ही नित्य जात नाहीं, तीथवार आला तर जातों.’ **म्ह०** तीथ आहे तर भट नाहीं, भट आहे तर तीथ नाहीं=एखाद्या कार्याला दोन गोष्टींची आवश्यकता असते

पण पुष्कळदां त्या दोहोंपैकीं एकच अनुकूल असते, दोन्ही एकदम नसतात.

**तीथरी**—वि. (महानु.) तीन खण असलेली. ' रचना विशेषें विचित्रीं । हाट चौहोट तीथरी । ' –ॠ २०. [ ती=तीन+थर ]

**तीन**—वि. ३ संख्या. [ सं. त्रि; प्रा. तिण्ण; फ्रें.जि. त्रीन ] (वाप्र.) ०**अडकून सीताराम**–(कर.) एक वाक्प्रचार घोटाळ्यांत पाडणें. 'त्या गृहस्थानें तीन अडकून सीताराम केल्यामुळें आम्हाला कोठें जातां येईना. ०**ताड उडणें**–तीन ताळ उडणें पहा. ०**तेरा नव बारा**–पोकळ, गैरलागू भलभलत्या सबबी सांगणें. ( क्रि० लावणें; मांडणें; सांगणें; बोलणें ) ०**तेरा-तेरा, आठ अठरा**–वि. पांगापांग; दाणादाण; उध्वस्त; फांकलेलें; पांगलेले. ०**तेरा गोष्टी**–स्त्रीअव. १ अरेरावीचें, दांडगाईचें भाषण. २ असंबद्ध, विसंगत भाषण. ३ व्यर्थ बहाणे; केवळ सबबी. ( क्रि० सांगणें ). ०**फातार मांडप**–( गो. ) स्वतंत्र संसार घेऊन बसणें; तीन धोंडे मांडणें; निराळी चूल करणें. [ फातार=फत्तर ] सामाशब्द–०**अग्नी**–पुअव. त्रेताग्नि; दक्षिणाग्नि, गार्हपत्य व आवहनीय हे तीन अग्नी. ' तेथ अग्नि तिनी मूर्तिमंत । ' –एभा २४.२२२. ०**अवस्था**–स्त्रीअव. बाल्य, तारुण्य वार्धक्य. ०**आधार**–स्त्रीअव. ( धर्माचे ) श्रुति, स्मृति, पुराणें इ० आधार. ०**ऋणें**–नअव. देव, ऋषी व पितर यांचीं ऋणें. ही मनुष्यानें यज्ञ, स्वाध्याय व पुत्रप्राप्ति इ०नीं फेडावयाचीं असतात. ०**कर्मे**–नअव. दान, अध्ययन व यजन इ० ब्राह्मणांचीं कर्मे. ०**काणे-ने-न्हे**–पुअव. ( तीन ठिपके. ) फाशांतील प्रत्येक फाशावर एक एक असे तीन संख्येचें दान. ०**काळ**–पुअव १ (व्या.) भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ. २ उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा. ३ सकाळ, दुपार व संध्याकाळ. ०**कानी टोपी**–स्त्री. तीन कोन असलेली टोपी. ०**ग्राम**–पुअव. ग्रामत्रय पहा. ०**ठिकाणीं वांकडा**–वि. १ मान, कंबर, आणि पाय या ठिकाणीं वांकडेपणा असणारा. २ ( ल. ) अतिशय कुरूप; कुबडा. ३ ( ल. ) चिडखोर; तिरसिंगराव; तक्रारी; माणुसघाण्या. ०**ताळ**–पुअव. स्वर्ग, मृत्यु व पाताळ; त्रितल. ०**ताळ उडणें-गोष्टी सांगणें**–उडवाउडवी करून बोलणें; गप्पा मारणें. मगरूरपणानें अथवा उद्धटपणानें बोलणें; गर्व वाहणें; फुशारक्या मारणें. ०**तुकडी**–वि. ( कों. ) ( एकदम तीन तुकडे पडणारी ) अतिशय बारीक व कमजोर ( दोरी, नाडी, फीत ). ०**तुकड्यांची चोळी**–स्त्री. दोन्ही हाताकरतां दोन तुकडे व ( मधल्या ) सर्व अंगाचा एक तुकडा याप्रमाणें केलेली चोळी; अखंड चोळी. ०**दाणे**–पुअव. तीन काने पहा. ०**दिवसाचा भाऊ**–पु. ( ज्याचें फक्त तीन दिवसच सुतक धरावें लागतें असा ) लांबचा भाऊबंद, नातेवाईक. ०**नाड्या**–स्त्रीअव. ( हटयोग ) इडा, पिंगला व सुषुम्ना. ०**माही**–वि. तिमाही; त्रैमासिक. ०**योग**–पुअव. भक्ति, कर्म व ज्ञान हे योग. ०**लिंगें**–नअव. ( व्या. ) पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग. ०**वार**–पुअव. तीन आठवडे. ०**स्थिती**–स्त्रीअव. (पदार्थाच्या) घन, द्रव व वायुरूप तीन अवस्था. ०**हिस्से**–पुअव. ( चारांपैकीं ) तीन भाग. ह्यावरून आधिक्य किंवा अधिकभाग.

**तीप**—पु. ( गो. ) टाईप. [ पोर्तु; तिप ]

**तीब**—स्त्री. ( गो. ) तीर मारण्याकरितां ठेवलेला पदार्थ; टोंचा; लक्ष्य.

**तीर**—न. ( समुद्र, नदी वगैरेचा ) कांठ; किनारा; नदीच्या सभोंवतालचा प्रांत. ' स्पर्धेंत काक नेणें कीं केवळ दूर राहिले तीर।' –मोकर्ण २८.४६. [ सं. ]

**तीर**—पु. १ बाण; शर. 'मागें धांवे वायस हंस पुढें सोडिला जसा तीर। ' –मोकर्ण २८.४६. २ भेग; चीर; भगदाड ( जमीनीस पडणारें ). ३ खांब इ०कांस तिरकस दिलेला धीरा. ४ टेंकू; धीरा. ५ तरफ; उटाळी; पदार्थ उचलण्यासाठीं त्यास लांकूड इ०चा वेतात तो नेटावा. ६ ( नाविक ) डोलकाठीच्या किंवा इतर आधारासाठीं जोड देणारें लांकूड; टेकावा. ७ घराच्या पाख्यास आढयापासून लगीपर्यंत असलेलें जाड लांकूड, वांसा. [ फा. ] सामाशब्द–०**कमठा-कमान**–पुस्त्री. धनुष्य आणि बाण. [ तीर+सं. कमठ; हिं. कमठा=धनुष्य ] ०**गर**–पु. बाण करणारा ( कारागीर ). [तीर+कार ] **तीरंदाज**–पु. धनुर्धारी; तिरंदाज पहा. ०**मार**–पु. १ बाणांचा वर्षाव, मारा; तिंरदाजी. २ बाणांनीं ठार मारणें. ' तीरमार सुर्ळी देती । ' –दा ३.७.७१.

**तीर्थ**—न. १ पवित्र स्थळ; कोणतीहि यात्रेची जागा; पवित्र मानलेल्या नद्यांच्या किनाऱ्यावरील पुण्य क्षेत्र. २ पवित्र नदी. ३ पवित्र नदीचें पाणी; ब्राह्मण किंवा संन्यासी यांचें चरणोदक; देवमूर्तीला स्नान घातलेलें उदक; पवित्र जल; स्नानोदक, पादोदक इ०. ४ पवित्र क्षेत्राची यात्रा. (क्रि० करणें; घडणें). ५ (गौरवार्थी) गुरु; धार्मिक अध्यापक; वडील, पूज्य व्यक्ति. 'तीर्थपाद.' ६ पवित्र प्रदेश, स्थळ. देवतीर्थ; ऋषितीर्थ आणि पितृतीर्थ असे या तीर्थस्थळांचे तीन प्रकार आहेत. बोटांचा अग्रभाग, तळहाताचा बाहेरील (करंगळीकडचा) भाग व आंतील (अंगठयाकडचा) भाग हीं अनुक्रमें त्यांचीं स्थानें होत. देव, ऋषि व पितर यांना त्या त्या स्थानांपासून श्राद्धसमयीं व तर्पण करतांना उदक देतात. तळहाताच्या मध्यभागीं एक चवथें अग्नितीर्थ कल्पिलें आहे. मनुष्य धार्मिक विधींत यांतूनच आचमन करतो, ब्राह्मणाला दिलेलें दान अग्नीनें भक्षण करूं नये किंवा दानाग्नीनें ब्राह्मणाचा हात दग्ध होऊं नये म्हणून त्याच्या हातावर याच ठिकाणीं पाणी सोडतात. [सं.] (वाप्र.) ०**करणें**–१ गंगादि तीर्थांस जाऊन स्नानादि यात्राविधि करणें. २ तीर्थाला भेट देणें.

**म्ह०** १ तीर्थी गेल्यावांचून मुंडण होत नाहीं=बऱ्या बोलानें कोणी ऐकत नाहीं. सोनारानें कान टोंचल्याशिवाय समज पटत नाहीं. २ वाहिली ती गंगा, राहिलें तें तीर्थ=कांहींहि केलें तरी, कोणत्याहि बाजूनें फायदाच. सामाशब्द- ०**काक**-पु. (तीर्थाच्या ठिकाणीं असलेला कावळा). (ल.) लूट करण्याकरितां, डल्ला मारण्याकरितां सर्वदां टपून बसलेला माणूस; उचल्या; गिधाड; छकवणारा. ०**कुंडी-गं(गिं)डी-पात्री**-स्त्री. तीर्थ ठेवण्याचें चंबूसारखें बारीक गळा असलेलें भांडें; तीर्थाचें भांडें. 'हें जाणोनि मानसी। तीर्थगंडी वेई कांतेसी। गंगा प्रोक्षून तिघांसी। भोजन वेई जाणपां।' -दत्तपदें १४७. ०**पंक्ति, तीर्थावलि**-स्त्री. १ पुण्यक्षेत्रांचा क्रम. २ त्या क्षेत्रांची यादी (पूजादि प्रसंगीं म्हणावयाची अयोध्या, मथुरा, माया इ०). ०**पंथ**-पु. १ (गोसावी लोकांतील तीर्थ हें पद नांवाच्या शेवटीं धारण करणारा) एक पंथ, भेद. २ तीर्थक्षेत्राचा मार्ग, वाट. 'प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी।'-होला (भूपाळी १६). ०**पाद**-पु. मोक्षदाता गुरु; गायत्रीचा उपदेश करणारा गुरु; गुरुपदेश देणारा (पिता). ०**प्रसाद**-पु. १ कथाश्रवण, देवदर्शन यांसाठीं आलेल्यास द्यावयाचें देवावरील निर्माल्य, तीर्थ, अंगारा, खिरापत इ०. 'आमच्याकडे आज सत्यनारायण आहे, तर आपण तीर्थप्रसादास या.' २ साधुसंतांनीं भक्तगणास, शिष्यांस अनुग्रहार्थ दिलेलें फळ, तीर्थ, अंगारा इ० पदार्थ. ०**यात्रा**-स्त्री. पुण्यक्षेत्रीं जाणें; तीर्थाच्या ठिकाणीं जाणें; तीर्थाटण; क्षेत्रस्थानचा प्रवास. ०**राज**-पु. १ प्रयाग क्षेत्र. 'तो तीर्थराज प्रगटे जग उद्धराया।'-सारुह ८.१४६. २ समुद्र. ३ (ल.) सद्गुरु. ०**रूप**-वि. १ (प्रत्यक्ष तीर्थच या अर्थी पत्र लिहितांना आरंभीं लिहितात) पिता. २ मातापिता (उभयता); ३ मातापित्यांच्या ठिकाणीं असणाऱ्यास लावावयाची संज्ञा, मायना. ०**वटी-लोटी, तीर्थोटी**-स्त्री. तीर्थ ठेवण्याचें भांडें, वाटी. तीर्थपात्र. [तिर्थ+वाटी] ०**वासी-मू**-पु. १ तीर्थाच्या ठिकाणीं राहणारा गोसावी किंवा साधु. २ तीर्थयात्रा करीत फिरणारा गोसावी; बैरागी. ०**विधि**-पु. तीर्थश्राद्ध; तीर्थाचे ठिकाणीं करावयाचे क्षौर, श्राद्ध, तीर्थपूजन, ब्राह्मणसंतर्पण इ० विधि, धार्मिक प्रकार. ०**श्राद्ध**-न. तीर्थाच्या ठिकाणीं करावयाचें सक्षौर श्राद्ध; तीर्थविधि. ०**स्वरूप**-वि. पत्रांत आई, बाप यांशिवाय इतर वडील नातेवाईकांस किंवा पूज्य वाटणाऱ्या माणसांस लिहिण्यांत येणारी आदराची संज्ञा, मायना. **तीर्थाटन**-न. अनेक तीर्थयात्रा करीत फिरणें. तीर्थयात्रा पहा. **तीर्थोदक**-न. तीर्थ अर्थ २, ३ पहा. **तीर्थोपवास**-पु. यात्रेकरूनें तीर्थाच्या ठिकाणीं गेल्यावर प्रथम दिवशीं करावयाचा उपास. **तीर्थोपाध्याय-पाध्या**-पु क्षेत्राच्या ठिकाणीं असणारा ठराविक उपाध्याय; धार्मिक विधि सांगणारा तीर्थक्षेत्रींचा ब्राह्मण; पंड्या.

**तीव्र**-वि. १ जलाल; झोंबणारा; तिखट. २ (ल.) जालीम; उग्र; भयंकर; प्रखर (आग, स्वभाव). ३ तीक्ष्ण; कुशाग्र (शस्त्राची धार, बुद्धि). ४ मर्मभेदक; खोंचदार (भाषण). [सं.] ०**ऋषभ-गांधार-धैवत-निषाद**-पु. (संगीत) रागांचे प्रकार. शुद्ध ऋषभ इ० पहा. ०**मध्यम**-पु. (संगीत) पांच विकृत स्वरांपैकीं तिसरा स्वर. विकृत स्वर पहा. ०**स्वर**-पु शुद्ध स्वरापेक्षां ध्वनीनें उंच असलेला स्वर. परंतु शुद्ध रि, ग, ध, नि या चार स्वरांचे ध्वनी तीव्र रि, ग, ध, नि स्वरांहून भिन्न नसल्यानें वरील शुद्ध स्वरांसच तीव्र स्वर म्हणतात. **तीव्रा**-स्त्री. १ (संगीत) पहिल्या श्रुतीचें नांव, २ (ताल) सात मात्रा व तीन विभागांचा एक ताल. **तीव्रोष्ण**-वि. १ अत्यंत उष्ण. २ (ल.) कडक; जलाल. [सं.]

**तीस**-वि. ३० संख्या. [सं. त्रिंशत्; प्रा. तीस] ०**मुहूर्ती संक्रांत**-स्त्री. पुष्य, हस्त, मघा, कृत्तिका, अश्विनी, मृग, चित्रा, अनुराधा, मूळ, श्रवण, धनिष्ठा, रेवती, पूर्वा, पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा हीं नक्षत्रें असतां येणारा संक्रांतीचा योग. या संक्रांतीचें फळ मध्यम असतें.

**तीसमारका**-पु. (तीस माशा मारणारा. एका गोष्टीवरून) बाताड्या; गप्पीदास; तोतया. तिस्मारखां पहा.

**तीळ**-पु. १ गळिताच्या धान्यापैकीं एक. यांत काळे व पांढरे असे दोन प्रकार आहेत. तिळाचें तेल निघतें व त्याची पेंड गुरें खातात. रानतीळ म्हणून तिळाच्या झाडासारखें एक झाड असतें. २ शरीराच्या कातडीवरील नैसर्गिक काळा डाग. तिल अर्थ ३ पहा. ३ डोळ्यांतील काळा ठिपका. 'तिळा करितां पुतळी। दिसों लागे।' -दा ८.३.४. 'कां ते नेत्रद्वयांतील बाहुलाबाहुली। त्यांची तीळपुतळीनें सोयरीक केली।' -स्वादि ११.१.५७. -क्रिवि. तिळभर; यत्किंचित्. 'तरी तीळ सनदांचा उजूर न धरितां.'-वाडसमा १.१५३ [सं. तिल] (हा शब्द समासांत आला असतां ऱ्हस्व उच्चारला जातो यासाठीं ऱ्हस्व तीचे सामासिकशब्द व वाक्प्रचार येथें दिले आहेत). (वाप्र.) ०**खाऊन व्रत मोडणें**-(एक तीळ खाल्ल्यानेंहि उपवास मोडतो यावरून) थोडक्या लाभाकरितां वाईट गोष्ट करणें. **तीळ घालून कूळ उच्चारणें**-(गो.) विकत श्राद्ध करणें. ०**तीळ**-१ थोडें थोडें; जराजरा; किंचित्; अल्प. 'औषध नित्य तिळतीळ खात जा.' २ हळू हळू; धीरेधीरे. **म्ह०** शेजीची केली आस आणि तीळतीळ तुटे मास. ०**तीळ जीव तुटणें**-सारखी काळजी, हुरहुर लागणें; अतिशय चिंता वाटणें. 'तिळतीळ तुटे ग जीव सदा चैन नच पडे।' -सत्यविजय. ०**तुटणें**-सोयर, सुतक (तिलांजलीचा) संबंध सुटणें; नातें तुटणें. ०**दान देणें**-१ (मृतमनुष्यास तिलांजली देतात यावरून ल.) तिलांजली देणें; संबंध सोडणें; त्याग करणें. २ एखाद्या पर्व दिवशीं तीर्थाच्या ठिकाणीं स्नान, तिलदान करतात तें. 'ऐसा

श्रीकृष्णार्जुन। –संवादसंगमीं स्नान । करूनि देतसे तिळदान । अहंतेचें।' –ज्ञा १८.१६१९. ०पापड होणें–(अंगाचा) संताप होणें. 'माझ्या आवडत्या अंगाचा तिळपापड होऊन गेला.' –नाकु ३.३९. तोंडीं तीळ न भिजणें–एखादी गुप्त गोष्ट तोंडांत, मनांत न राहणें. तिळीं असणें–१ (एखाद्याच्या) कह्यांत, अर्ध्या वचनांत असणें. २ (व.) एक रास असणें. ३ (व.) ऐकण्यांत असणें. तिळीं थेंब पडणें–(कपाळावरच्या तिळावर घामाचा थेंब पडणें) संतप्त होणें; अतिशय रागावणें. तिळीं येणें–१ दुसऱ्याच्या कह्यांत, सत्तेंत येणें. तिळागुणी होणें; स्वाधीन होणें. 'देव तिळीं आला। गोडें गोड जीव धाला।' –तुगा २०३८. २ अनुकूल होणें; सख्य, प्रेम ठेवणें. 'तीळखा तिळीं ये गूळखा गोडसें बोल.' सामाशब्द– ०काट–न. (कु.) तिळाचें काड; पाचोळा. [सं. तिल+काष्ठ] ०कूट–न. मोहऱ्या, मेथ्या, तीळ इ० कुटून केलेली पूड; एक तोंडीलावणें. ०कोंद–स्त्री. तिळाचें सारण, पुरण. कोंद पहा. ०गूळ–पु. (मकरसंक्रांतीच्या दिवशीं वाटतात ते) गूळ मिश्रित तीळ; शर्करामिश्रित तीळ; हलवा. तिळवण पहा. 'तिळगूळ घ्या, गोड बोला.' ०तुल्य–ल्या–तिळमात्र; तिळप्राय. 'तिळतुल्य नाहीं मनिं डगल्या।' –मध्व २२० 'मशारनिल्हेच्या अमलास अतःपर तिळतुल्या कजिया न करणें.' –वाडशा १.११७. ०पुष्प–न. १ तिळाचें फूल. २ (ल.) डोळ्यांत पडलेला डाग, फूल. ०प्राय–क्रिवि. किंचित; थोडें; अल्प; 'सोमल तिळप्राय खाल्ला असतां विकार होतो.' ०भर–राई–मुळीं देखील; थोडें सुद्धां 'धर्मवासना कांहीं ज्याचें मानसिं तिळभर नाहीं।' –मध्व ५५२.' तुजसम अरोळी देईल तो उणी नाहीं तिळराई।' –राला ९. ०मांडा–पु. (बे.) वर तीळ लावून तयार केलेला मांडा. ०वडी–स्त्री. १ साखर घालून केलेली तिळाची वडी. २ (राजा.) तोंडीलावण्याकरितां तिळाची अनेक पदार्थ घालून केलेली वडी. 'तिखट तिळवडे, सारबिजवडे।' –अमृत ३५. ०वण–स्त्री. (बायकी) लग्न झाल्यानंतर पहिल्या मकरसंक्रांतीस हलवा, तिळाचे लाडू, आहेर वगैरे नवरा–नवरीकडील माणसें परस्परांच्या घरीं पाठवीत असतात तो प्रकार. संक्रांतीच्या सणांतील एक कृत्य; तिळगूळ. [सं. तिल+वायन; म. वाण] ०वणी–स्त्री. १ तिळगूळ. 'भारत कथा संक्रमणीं। निरोपमरूपें तिळवणी।' –मुसभा ३.१५३. २ तिळवण पहा. तिळवा, तिळवा लाडू–पु. तीळ वगैरे घालून केलेला तिळाचा लाडू. 'दृढतर तिळवे हे गोड अत्यंत लाडू।' –सारुह ३.५५. 'तिळवे लाडू अमृतफळें।' –वसा २६. ०संक्रांत–स्त्री. १ मकरसंक्रांत. २ मकरसंक्रांतीला पाटील–कुळकर्ण्यांचा तिळगूळ घ्यावयाचा हक्क. तिळसें गुळसें–न. (ना.) संक्रांतीचा तीळगूळ. ०होम–पु. तिळाच्या आहुती देऊन केलेला होम. तिळाचें कोळ–न. (माण.) तीळ झाडून घेतल्यानंतर त्याच्या राहिलेल्या काड्या. तिळागुणी–नस्त्री. सलोखा; ऐक्य; ऐकमत्य; प्रेमभाव. (क्रि० येणें; असणें; होणें). तिळागुणी येणें–(कोणेकास कोणीएक) अनुकूल होणें; दोघांचा प्रीतिभाव होणें. तिळांजळी, तिळांजुळी, तिळांजुळ, तिळोदक–तिलांजली–जुली इ० पहा. तिळांजळी देणें–तिलांजली देणें पहा. पूर्णपणें संबंध सोडणें. 'जे विषयांसि तिळांजळी देऊनि। प्रवृत्तिवरी निगड वाऊनि। मातें हृदयीं सूनि। भोगितांती।' –ज्ञा ८.१२४. तिळातांदळा–वि. (शिवामूठ, इ० स्त्रियांच्या धार्मिक-विधींत तीळ व तांदूळ एकत्र करतात त्यावरून ल.) मनमिळाऊ 'तुका म्हणे कान्हो तिळयां–तांदळ्या । जिंकें तो करी आपुला खेळ्या।' –तुगा २५४. [तीळ+तांदूळ] तिळेल, तिळयेल–न. (कों.) तिळाचें तेल. [सं. तिलतैल; प्रा. तिलेल्ल; म. तिळ+एल] तिळोदक–न. १ तिलांजलि पहा. 'त्याचें उत्तर कार्य करि प्रभु साश्रु तिलोदक ओपी।' –मो रामायणपंचशती अरण्य १२९. २ श्राद्धामध्यें पितरांना उपचार समर्पण करण्यासाठीं तीळ घालून अभिमंत्रित केलेलें पाणी. ०देणें–(ल.) संबंध तोडणें; त्याग करणें. 'म्हणोनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें। प्रयागमाधव विश्वरूप पहावें। येतुलेनि संसारासि द्यावें। तिळोदक।' –ज्ञा ११.१०. –एभा २१.४८७.

तीक्ष्ण—वि. १ प्रखर; जहाल; झोंबणारा; बोंचणारा; तीव्र अर्थ १ पहा. टोचणारा. २ अतिशय धार असलेलें पाणीदार; (शस्त्र). ३ इतर अर्थीं तीव्र पहा. ४ (ल.) तत्पर; उत्साही; हुषार. [सं.] ०दंड–वि कडक; कठिण; करडा (शास्ता, राजा, न्यायाधीश). तीक्ष्णाई–स्त्री. १ तिखटपणा, कडकपणा. २ प्रखरता; तीव्रता. ३ (ल.) उत्सुकता; तीव्रता; आवेश; कुशाग्रता.

तुआं—सना. द्वितीयपुरुष. (काव्य) तूं या सर्वनामाचें तृतीयेचें एकवचनी रूप. त्वां; तूं. 'तुआं स्नेहों सांडिलें।' –शिशु १०१. [सं. त्वया]

तुई—स्त्री. कलाबतु किंवा जर यांची चोळी इ० कास लावण्याची फीत, कांठ; जर; कलाबतू. [हिं.]

तुक—न. १ महत्त्व; वजन; योग्यता. 'तैसा मी जेतुला आघवा। तेंचि तुक तयां चिया सद्भावा।' –ज्ञा ९.२६१. २ (काव्य) तोल; जोख; वजन. 'द्यावें संभाळूनी समतुक भावें। आपणहि खावें त्यांचे तुकें।' –तुगा ३१. ३ तुलना; बरोबरी. 'विप्रवर सुते क्षत्रिय उतरेल तुझ्या न ह्या ययाति तुकीं।' –मोआदि १०.७०. [का. तूक=वजन, योग्यता]

तुक—स्त्री. ध्रुपदांच्या चार अवयवांची एकत्र संज्ञा.

तुकडा—पु. १ खांड; खाप; शकल. २ (विशेषतः प्रथमपदीं भाकर किंवा रोटी हे शब्द असतां) अन्न; भोजन; जेवण. 'सोडुनि सदन्न सेविल कोण सुधी अशुचि बाळके तुकडे।' –मोउद्योग ११.

४१. ३ (ल.) निर्वाहाचें साधन; पोट; अन्न; दाणापाणी, भाकर. ४ (नांवेडहैद्राबाद.) गव्हाची साधी पोळी. ५ (अंकगणित) वर्तुलखंड. ६ २५-३० हात लांबीचें पागोटें. (कुस्त्यांच्या वेळीं बक्षिसा साठीं देतात तें). [सं. त्रोटक, स्तोक; हिं. टुकडा; का. तुकडि] (वाप्र.) ०तोडून देणें-(नाकारीत असतांना) भीड अथवा मुरवत न धरितां स्पष्ट उत्तर देणें. ०देणें-वाटा, हिस्सा देणें. **तुकडे पडणें**-१ मोठी व चुरशीची चढाओढ लागणें. २ महाग; होणें; दुर्मिळ होणें. (ज्यांचे तुकडेतुकडे करून थोडीथोडी विक्री करतां येईल अशा पदार्थांच्या किंमतीसंबंधींहि योजतात). 'मांजरपाटाचे-धान्याचे-आंब्याचे-गुळाचे-तुकडे पडतात.' **(कामाचे) तुकडे पडणें**-झपाट्यानें, लवकर होणें; चट्कन उरकणें. **(हात, पाय, मान, कमर, पाठ वगैरेचे) तुकडे पडणें**-अति श्रमानें थकून जाणें; मरगळीस येणें. 'चालून चालून पायाचे तुकडे पडले.' **तुकडी**-स्त्री. १ लहान तुकडा. २ लहान टोळी; देश, सैन्य याचा भाग; विभाग. 'तुकडी पुणें-पोटतुकडी तालुके हवेली ...' [तुकडा] **तुकडमोड्या-बाबू**-वि. ऐतखाऊ; भोजनभाऊ; पंक्तिपठाण; काम न करतां खाणारा; आळशी [तुकडा+मोडणें] **तुकड्या**-वि. आगंतुकी अथवा भिक्षा मागून निर्वाह करणारा; आयतखाऊ. (आळशी माणसाबद्दल म्हणतात). [तुकडा] **तुकड्याची चोळी**-स्त्री. खणाचे नऊ तुकडे करून ते जोडून केलेली चोळी. याच्या उलट अखंड चोळी.

**तुकणें**—सक्रि. (काव्य) १ तोलणें; वजन करणें. 'आतां स्वप्नचि हें तुकलें। साचासरिसें।' -ज्ञा ४.१. 'तयाचे तुकीं कोण ऐसा तुकावा।' २ बरोबरी करणें; समान, सारखा असणें. ' 'परब्रह्माचेनि पाडे तुके।'-ज्ञा ६.९०. ३ (ल.) अंदाज करणें; किंमत करणें. 'परब्रम्हरूपीं असा हा तुकावा।' [का. तूक]

**तुकणें**—उक्रि. (ल.) चिंतन अथवा विचार करणें.

**तुकणें**—अक्रि. (संमति अथवा) रुकार देतांना मान डोलणें. 'यजन करितां कौतुकें। तिहीं वेदांचा माथा तुके।' -ज्ञा ९.३०८. 'मान-माथा-मस्तक-शीर तुकणें.' -सक्रि. हलविणें; डोलविणें. 'अहो पुसा आपणचि पढविजे। मग पढे तरी माथा तुकिजे।' -ज्ञा ११.१७. [का. तुकु=डोलणें; हालविणें]

**तुकतुकी**—स्त्री. (प्रकृति निरोगी असल्यामुळें शरीरावर असलेलें) तेज; टवटवी; लाली; तजेला; हुशारी; डौलदारपणा. [दृश्य तकृतक्, तुकृतुक्] **तुकतुकीत**-वि. (तुकतुकीनें युक्त) टवटवीत; ताजातवाना; सुरेख; हुशार; निरोगी.

**तुकना**—स्त्री. (खा.) तागडी. पदार्थ वजन करण्याचें साधन [तुकणें]

**तुकंबरी-बराई, तुकं(कुं)बराई**—स्त्री. तुळशीचें बीं; तुकमरिआ पहा.

**तुकमठ**—वि. (महानु.) वजनांत हलकें; हलकट. 'मेरुपासाव घनवटें। जीं हिंसीं जालीं तुकमठें।' -ऋ ३०. [तुकणें+मठ अल्पार्थी; मठ=मंद]

**तुकमरिआ**—न. सबज्याचें, तुळशीचें बी. तुकंबरी पहा. [फा. तुक्मा+राई?]

**तुकमा, तुक्मा**—पु. १ गुंडीचें काज; बिरडें; गुंडी; बटन. २ डोळ्याची कानी; डोळ्याचा दीर्घवर्तुळाकर दिसणारा भाग. [फा. तुक्मा]

**तुकमें**—न. मुळ्याचें बीं. -मुंव्या ११०.

**तुकवा**—न. महत्त्व; वजन. तुक पहा. 'यजमान पडिला भूमंडळी। त्याचा तूं तुकवा सांभाळी।' -कथा. ३.१४.९४. [तुक]

**तुक(का)विणें**—उक्रि. १ (मान, मस्तक, माथा इ०) डोलविणें; हालविणें. 'मान तुकावीत आखंडल घागऱ्या मंजूळ ऐकोनि।' २ (ल.) संमति, पसंति दर्शविणें. [का. तूकु]

**तुका**—सना. (कु. गो.) तुला. म्ह० १ केलें तुका झालें माका. २ (गो.) तुकाना माका घाल सुण्यास=तुला ना मला घाल कुत्र्याला. ३ (गो.) तुका माका पडाना तुझे बगर जायना=तुझें माझें जुळत नाहीं पण तुझ्या शिवाय माझें चालत नाहीं.

**तुकाई**—स्त्री. देवी; पार्वती; तुळजापुरची अंबाबाई. [तुका+आई] म्ह० तुकाई तुळजापुरीं नायटे मुलुखांत.

**तुकाई**—स्त्री. (काव्य) तोलणें वजन; माप, करण्याची क्रिया. [का. तूक]

**तुकाराम**—पु. एक संत कवि. हा सतराव्या शतकांत होऊन गेला. (वाप्र.) **तुकाराम बुवाची मेख**-न उकलण्या-सारखें कोडें; गूढ (तुकारामाच्या कांहीं अभंगांत जो गूढ अर्थ भरला आहे कीं तो कोणालाच निश्चयपूर्वक उकलतां येत नाहीं यावरून).

**तुकम(कुंब)राई**—तुकमरिआ पहा. [फा. तुक्मराई]

**तुक्कल**—स्त्री. १ एक विशिष्ट आकाराचा पतंग; कनकावळ्या-सारखी एक कागदाची वावडी. २ (व.) सर्पाच्या फणीच्या आकाराचा पतंग. [हिं.]

**तुक्का-का**—पु. १ पात्याऐवजीं तोंडाशीं गोळा असलेला बोथट बाण २ (ल.) गुप्त निंदा; काव्याबाजीचा फटका अथवा टोमणा; व्यंग्यार्थ; व्याजोक्ति. (क्रि० टाकणें; मारणें; ठेवणें). ३ आळ; आरोप. उदा० 'त्या चोरीचा तुक्का हा मजवर ठेवून गेला.' [फा. तुक्का] म्ह० लागला तर तीर नाहींतर तुक्का.

**तुख्म**—न. १ बीज; बीं. २ अंडें. ३ शुक्र; वीर्य. [फा. तुख्म्; तुल० सं. तोक्म?]

**तुखार**—पु. तुषार; थेंब. 'ते तुखारू उसळैले। माथेआं वरी।' -शिशु ७१४. [सं. तुषार]

**तुंग**—पु. १ जमाव; टोळी; समूह; समुदाय. २ (नदीचा) बांध; बंधारा. ३ ज्यांतून नळ नेतात तो हौद; टाकी. ४ विशिष्ट प्रकारचें (कांचेचें, मातीचें अथवा धातूचें) भांडें. यांत तीर्थ, गुलाबपाणी इ० ठेवतात. ५ पखवाजाची गवसणी.

**तुंग**—वि. उंच. 'प्रवृत्तिनिवृत्तीचीं तुंगें। तटें सांडी।' -ज्ञा ७. ७०. २ श्रेष्ठ; मोठा. 'तुज न म्हणों लघु अथवा तुंगा।' -अमृत नवनीत ४०. [सं.] **तुंगता**-स्त्री. उंची. [सं.] **०मापक यंत्र**-न. (शाप.) पर्वतादिकांची उंची मोजण्याचें यंत्र. (इं.) हायड्रोमीटर. [सं.]

**तुंगार**—पु. १ शैवांतील एक पंथ व त्यांतील व्यक्ति २ वसई जवळील एक उंच डोंगर.

**तुच्छ**—वि. १ क्षुद्र; क्षुल्लक; हलका; अल्प. २ हलकट; मान्यता नसलेला; नीच. ३ तिरस्करणीय; निरुपयोगी. [सं.] **०करणें**-हलकें मानणें; झिडकारणें; अवमानणें.

**तुज**—सना. (काव्य) तुला; तुजला. 'अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें।' -केका ११.

**तुजा-जी-जें**—स. (काव्य.) तुझा-झी-झे. 'पार्था सख्या निरंतर परिवृद्ध असो भुजप्रताप तुजा।' -मोकर्ण १२.३०.

**तुझा**—सना. तूं या सर्वनामाची षष्ठी विभक्ति. **तुझिया**-सना. (काव्य) तुझ्या. 'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती।' -केका २७. **तुझ्याच्यान्**-(अशिष्ट.) तुझी शपथ (गळयाच्यान शब्दाप्रमाणें) [तुझीच+आण]

**तुझ्यावस्त**—क्रिवि. (व.) तुझ्याच्यानें-कडून. [तुझ्या+अर. वास्त]

**तुटओल**—न. (कों.) फार दिवस पाऊस न पडल्यानें जमिनीस राहिलेली थोडी ओल. [म. तूट+ओल]

**तुटक**—वि. १ मोडलेला; अडथळा आलेला; तहकूब ठेवलेला, एकसारखा नसलेला (रस्ता, ओळ, कामधंदा). २ विसंगत; असंबद्ध (भाषण, ग्रंथरचना). ३ विस्कळित; वेगवेगळा; फाटाफूट झालेला (एकत्र होण्याच्या पूर्वीचा-कारभार, धंदा). ४ कडक; रागीट; तुसडी; परकेपणा उत्पन्न करणारी (वागणूक, व्यवहार, भाषा). ५ भांडण्याचा, बेबनाव करण्याचा स्वभाव असलेला (माणूस). ६ खंडित; भग्न; अलग; अर्धवट (भांडण, कोटिक्रम, वृत्तांत इ०). ७ अंगावरून तोडलेलें; पारठें (मूल). ८ सोडलेली; संपलेली; मोडलेली (मैत्री, प्रेम इ०). [सं. त्रुट्; प्रा. तुट्ट; म. तुटणें] **०थेंब-पाऊस**-पु. १ थांबून थांबून पडणारा पाऊस. २ बुरबुर. **०मजकूर**-पु. परिच्छेद, भाग, टप्पे इ० पाडलेला तोंडी किंवा लेखी मजकूर; एकसारखा नसणारा मजकूर. [तुटणें]

**तुटका, तुटकाळ**—वि. १ तुटक अर्थ १-३ पहा. २ (समासांत=शरीरावयाशीं जोडून) हात-पाय-बोट-कान-तुटका=ते ते अवयव तुटलेला; छिन्नविच्छिन्न झालेला (माणूस) तुटणें पहा. [तुटक]

**तुटणें**—अक्रि. १ मोडणें; छकलें, तुकडे पडणें. म्ह० नखानें तुटेल त्यास कुऱ्हाड कशास पाहिजे! २ घटणें; कमी होणें; उतरणें; न्यून होणें; कमती येणें. 'ओला चारा नाहींसा होतांच गाईचें दूध तुटलें.' 'त्या मापानें मोजून आणिलेलें ह्या मापानें दोन शेर तुटलें.' ३ मोडणें; तुकडे तुकडे होणें; विस्कळित होणें; फुटणें (एकत्र जमलेला समुदाय, संघ, मंडळ, समाईक धंदा). ४ सुटणें; नाहींशी होणें (मैत्री, संबंध). ५ वेगळे होणें; निरनिराळे होणें, परस्पर भिन्न होणें (एकत्र-सहकार्यानें काम करणारे लोक, मित्रभावानें असणारे). ६ तुटून पडणें; एखाद्यावर चवताळणें; अंगावर येणें; ताशेरा झाडणें. ७ अतिक्रमण, उल्लंघन होणें (जमीनीच अथवा अंतराचें); ओलांडणें, आक्रमणें, चालून जाणें (वाट, अंतर). ८ दिवाळें वाजणें. ९ अशक्त, क्षीण होणें; खालावणें (शरीर, प्रकृति इ०). १० मोडणें; अनासक्त, विमुख होणें (मन; मर्जी इ०). ११ संपणें; मिटणें; तोड होणें, निघणें (भांडण, कलह, भेद यांत). १२ कमी होणें; छाटला जाणें (पगार, सैन्य, कोणतीहि ठरीव रक्कम). १३ (मूल) अंगावरून सुटणें; स्तनपान करण्याचें बंद करणें. [सं. त्रुट्-त्रुटण; प्रा. तुट्टण] (वाप्र.) **तुटून पडणें**-(कामावर) निश्चयानें आणि जोरानें लागणें; (मनुष्याच्या) अंगावर चवताळून जाणें, चालून जाणें; शिव्या देत सुटणें; अतिशय रागावून बोलणें. म्ह० फुटलें मोती तुटलें मन सांधूं न शके विधाता. सामाशब्द- **तुटपटा-ट्टा**-पु. घोडयाच्या तोंडावरील दोन तीन जागीं तुटलेला पांढरा पट्टा. -अश्वप १.९५ [तुटणें+पट्टा] **तुटपाऊस**-पु. कधीं पडतो कधीं पडत नाहीं असा पाऊस; एकसारखा न पडणारा पाऊस; तुटकपाऊस पहा. [तुटक+पाऊस] **तुटपाणी**-पु. (कों.) नुकत्याच उगवून वर आलेल्या लहान पिकास जीव जगण्या इतकेंच दिलेलें पाणी. [तुटक+पाणी] **तुटपुंजा**-वि. १ थोडक्या भांडवलावर धंदा, सावकारी इ० करणारा (मनुष्य). २ अपूर्ण; अपुरा; अल्प (पदार्थ, काम). [तूट+पुंजी] **तुटमिती(व्याज)**-न. मुदलांतून वसूल झालेली रक्कम उणे करून बाकी राहिलेल्या रकमेवर आकारलेलें व्याज; असें व्याज आकारण्याची पद्धत; कटमिति.

**तुटतुटणें**—अक्रि. तुडतुडणें; तडतडणें; उलणें; फुटणें; तडकणें; पिचणें (भाजत अथवा तळत असलेले पदार्थ). [ध्व. तुट्-त्रुट्]

**तुटरा, तुटीर**—वि. १ सहज लवकर तुटणारा (दोर इ०). २ लवकर वर्दळीवर येणारा; भांडणारा; चिरडखोर. [तुटणें]

**तुटसाळ**—वि. तुटरा अर्थ २ पहा. [तुटस+आळ प्रत्यय]

**तुटातुटी-तूट**—स्त्री. मोडणें; भंग; पांगापांग ( मैत्री, सैन्य, व्यापारी मंडळया इ०ची (सामा.) ताटातूट; फुटाफूट; वियोग. [ तुटणें द्वि. ]

**तुटार**—वि. मोडलेला; संपलेला; तोटा आलेला; खलास झालेला. [ तुटणें ]

**तुटार-रा, तुटाड-डा, तुटवडा-ळा, तुटोडा-ळा**—पु. तोटा; उणीव; कमतरता; न्यूनता. तूट पहा. ( क्रि० पडणें; येणें; होणें ). [ तुटणें ]

**तुटारी**—स्त्री. अतिशय अशक्तता ( म्हातारपणामुळें अथवा फार दिवसांच्या आजारामुळें आलेली ); दुबळेपणा. [ तुटणें ]

**तुटावणें**—अक्रि. १ रागानें, दांडगाईनें अंगावर चालून येणें; तुटून पडणें. २ उत्सुकतेनें ( खाण्यावर, कामावर ) धाड पडणें; अधीरतेनें सुरू करणें. ३ (कांहीं पाहण्याकरितां, झोंबाझोंबी करण्याकरितां ) गर्दीनें घुसणें; एकदम पुढें जाणें. ४ मुसळधार ( पाऊस ) गळणें; आभाळ गळणें, कोसळणें [ तुटणें ]

**तुटी**—स्त्री. १ (काव्य) अडथळा; खंड; खळ; अंत. 'तुझिया खेदा होय तुटी । तें म्यां केलें पाहिजे । ' –मुआदि ३२.९४. २ वियोग; वेगळेपणा. ( क्रि० घेणें; करणें; होणें; पडणें ). ' तुम्हां आम्हा तुटी होईल यावरी । ' ३ वैर; वांकडेपणा. ४ कमतरता; तूट. इतर अर्थी तूट पहा. ' त्याचे संसारास पडे तुटी । ' [ तुटणें ]

**तुटीर**—वि. लवकर, सहज तुटणारा, फुटणारा ( दोरा इ० ). [ तुटणें ]

**तुट्या**—वि. ( समासांत नाक, कान, ओठ वगैरे शब्दांशीं जोडून ) तुटलेला; तुटका फाटका. [ तुटणें ]

**तुंड**—न. ( काव्य ) तोंड; चेहरा. ' भीष्म प्रसन्न होउनि करि बहु बीभत्सुवर्णना तुंडें । ' –मोभीष्म ४.२३. –वि. तोंडाळ. –सूर्योदय ३४०. [ सं. ]

**तुडगुडें**—न. लहान मुलांचें खेळणें; खुळखुळा. [ ध्व. ]

**तुडताळ**—स्त्री. ( महानु. ) कुंटीण. ' तै तुडताळांचिआंजीणी । तियां पारुखैलिआं । ' –शिशु ६३६.

**तुडतुडणें**—अक्रि. १ तुडतुड फुटणें (धान्य इ० भाजतांना). तुटतुटणें पहा. २ तिडतिडेपणानें बोलणें; चिडणें; एखाद्यावर तोंड टाकणें; तडतड बोलणें. [ ध्व. तुड् ]

**तुडतुडा**—पु. १ एक रानटी झाड. २ आंब्यावरील किडा; एक उडणारा क्षुद्र जंतु. [ ध्व. ]

**तुडतुडीत**—वि. १ कुडकुड, तुडतुड आवाज करणारा (कडकडां चावीत असतांना अथवा कडंग भाजीत असतांना, दाणे इ०). २ दडस; अशिजा; चांगला न झालेला ( भात ). ३ कठिण; चामट (नारळाचा किंवा भोपळयाचा कीस फार दिवस ठेवल्यामुळें).[ध्व.]

**तुडतुड्या**—वि. चिरडखोर; तिरसट; तुसडा. [ तुडतुडणें ]



**तुडवणी-वणूक**—स्त्री. १ मळणी; पायाखालीं चिरडण्याची क्रिया. २ दुर्दशा; नाश. ' रणतुंबळ घुमतें घायाळ, तुडवणी झाली परगण्याची । ' –ऐपो १८५. [ तुडवणें ]

**तुडवातुडव**—स्त्री. १ जोराची तुडवणी; रौंदळ; चुथडा. २ ( ल. ) जोराची धक्काधक्की; बुक्काबुक्की. [ तुडविणें ]

**तुडव(वि)णें, तुडिवणें**—उक्रि. पायाखालीं चुरडणें; मळणें; चेंदा करणें. ' त्यानें बैठक तुडवून खराब केली.' **लाताबुक्यांनीं तुडविणें**–मारणें. [ का. तुळि ]

**तुडस, तुडसाळ**—वि. ( राजा. ) भांडखोर. तुटरा अर्थ २ व तुटसाळ पहा.

**तुडुकतुडुक**—क्रिवि. दुडदुड; तुरुतुरु. (लहान मुलाचें धावणें इ० ). [ ध्व. ] **म्ह०** वडिलाचें बुड्ख आणि नाचे तुडुकतुडुक= थोडीशी वडीलकी असतांना मोठी शेखी मिरविणें; अरेरावी गाजविणें.

**तुडुंब, तुडुम**—न. घोडयावरचा नगारा; डंका. [ ध्व. ते. तुडुं; का. तुडुबु ] **तुडुंब, तुडुम, तुडुंबंब**–क्रिवि. परिपूर्ण; भरपूर; कांठोकांठ.(क्रि० भरणें; फुगणें). 'ही विहीर तुडुंब भरली आहे.' 'पोट तुडुंब फुगलें.' [ तट+डंब; का. तुंबु ] **तुडुंबणें**–अक्रि. भरपूर भरणें. 'तयावनीं एक तटाक तोयें । तुडुंबलें, तामरसानपायें ।' –र ८.

**तुणणावळ**—स्त्रीन. तुणण्याची, रफू करण्याची मजूरी.

**तुणणें**—सक्रि. रफू करणें; फाटलेल्या वस्त्रांत सुतें भरून तें पूर्ववत् धड करणें; तुरपणें. [ सं. तुन्नन; प्रा. तुण्णण ]

**तुणतुण-तुणां**—क्रिवि.तंतुवाद्याच्या आवाजासारखा आवाज होऊन. [ ध्व. ]

**तुणतुणी**—स्त्री. गुह्येंद्रिय. [ टुण् द्वि. ]

**तुणतुणें-नें**—न. एक पक्षी. [ ध्व. ] **म्ह०** मोर नाचे म्हणून तुणतुणें नाचे. (मोठयाचें अनुकरण लहानास उपहासास्पद होतें यावरून ). **तुणतुणें-नें**–न. गोंधळी लोकांचें एकतारी वाद्य. हें काडीनें वाजवितात. यांतून साथीस उपयोगी असा 'तुणतुण' आवाज निघतो. [ सं. तूणा; प्रा. तुणय; ध्व. ] ( वाप्र. ) ०**वाजविणें-लावणें**–(ल.) ऐकणारांना कंटाळा आला तरी पुन्हां पुन्हां आपलीच हकीगत सांगत सुटणें; आपलीच गोष्ट पुन्हां पुन्हां काढणें; स्वतःचें मत प्रतिपादणें. ' देशांत किती जोरानें विचारक्रांति होत आहे याची या लोकांस दादच नाहीं, आपलें प्रायश्चित्ताचें तुणतुणें ते अद्याप वाजवीतच आहेत. ' **तुणतुण्या**–वि. १ तुणतुणें वाजविणारा ( गोंधळी इ० च्या मागें ). २ (ल.) दुसऱ्याची री ओढणारा; बोलल्या गोष्टीचा मागून अनुवाद करणारा. [ तुणतुणें ]

**तुणवाई, तुणाई**—स्त्री. तुणणावळ पहा. [तुणणें] **तुणीव**–वि. रफू केलेलें, तुणलेलें. [ तुणणें ]

**तुतनायूक**—पु. (गो.) शक्ति; बळ; धमक. 'अंगांत तुतनायूक जास्त.'

**तुत(ति)या**—पु. (गो.) लोखंडी हातोडा.

**तुतातां**—स्त्री. असुडाची, कोरडयाची वादी. [तात]

**तुतारी, तुतार**—स्त्री. तोंडानें वाजविण्याचें एक पितळी वाद्य; लहान करणा; शिंग. 'संग झडती चौघडे शिंगें तुतारा।' –ऐपो १११. [ध्व.] **तुतारजी**–पु. तुतारी वाजविणारा. [तुतारी]

**तुतारी**—स्त्री. (व.) बैलांना हाणायाची काठी; पराणी; टोंचणी.

**तुतिया**—पु. मोरचूद. [सं. तुत्थक; हिं. तूतिया]

**तुतिया**—स्त्री. दोषारोप; आळ. [फा. हिं.]

**तुती**—स्त्री. एक झाड व त्याचें फळ. या फळाचा खाण्याकडे उपयोग होतो. पानें रेशमाच्या किडयास खावयास घालतात. तूत पहा. [अर. तूत्]

**तुत्या**—पु. हातोडी. तुतया पहा.

**तुंद**—वि. १ दुलदुलीत; परिपूर्ण भरलेला; लठ्ठ; चांगला पोसलेला; गुबगुबीत (पशु इ०). 'गोरे तुंद मान हिल्लाल गुलाबी गाल।' –प्रला ११७. २ संतुष्ट; तृप्त झालेला. ३ (संपत्ति, शक्ति व अफू इ० मादक पदार्थांनीं) धुंद; मदोन्मत्त, मदांध. 'हे आमचे यादव तुंद मोठे।' –सारुह ७.४८. –क्रिवि. खच्चून; भरपूर. (क्रि० भरणें). [सं. तुंद; फा तुंद्] **तुंदिल**–वि. ढेरपोटया; पोट सुटलेला; दोंदिल. [तुंद] ०**तनु**–वि. लठ्ठ. 'सुंदरमुख तुंदिलतनु नंदिकेश्वरा।' –शाकुंतल भरतवाक्य.

**तुनं**—सना. (खा.) त्वां; तूं (तूं ची तृतीया). [तूं+नें प्रत्यय]

**तुनुमुनु, तुनुमुनु करून**—क्रिवि. रडतखडत; कसें तरी; आळसत; मंदाईनें; अनेक युक्त्याप्रयुक्त्या करून (काम चालणें, घोडा चालणें, उपजीविका चालणें).

**तुन्न–न्ना**—पु. तोरण्याचें झाड किंवा त्याचें फळ. [सं.]

**तुपकडी–कडया**—स्त्रीपु. एक लहानसें झुडुप. यास लांडगा, चिपड, कुतरी असेंहि म्हणतात. (कु.) तुपकडो. याच्या फळांचा रांधा करून धनगर लोक कांबळयास खळीप्रमाणें लावतात.

**तुपकाडो**—पु. (कु.) एक पक्षी.

**तुपल**—सना. (व.) तुझें (याच्या जोडीस मापल=माझें) 'मापल काढून (काय म्हणून) घेत, तुपल घेऊन ये.' [तू+आपलें]

**तुपला**—सना. तुझा. –बदलापूर ७३.

**तुपाळ**—वि. पुष्कळ लोणी (अर्थात् तूप) निघतें असें (दूध). [तूप+आळ प्रत्यय]

**तुपीकेवण**—स्त्री. (गो.) एक औषधी वनस्पति.

**तुपून**—सना. (घाटी) तुजपासून. –मराठी भाषेचें व्याकरण पृ. १२१. [तूं+पून=पासून]

**तुपें**—सना. तुला. 'साह्य तूं झालासी काय उजें तुपें। आणिक भूतांपें काय मागे।' –तुगा ८९५. [तूं+पें प्रत्यय]

**तुफान**—न. १ वादळ; वावटळ (दर ताशीं ८० मैल वेगाची); जौळ; वायूची क्षुब्धता. २ घोडा, बैल इ० पशु मस्त होऊन ज्या चेष्टा करतो त्या. ३ नाश; उध्वस्तता; दाणादाण; बंडखोरी; नुकसानीचें कर्म. ४ कुभांड; आळ; दोषारोप; कुफराण. 'त्यानें अदावतीनें दर्म्यान तुफान रचून पत्रें तयार केलीं.' –रा ७.९९. 'तुफान घेवोन काय केलें।' –रामदासी २.१. –वि. १ तारुण्यानें मुसमुसलेला. २ खवळलेला; मत्त; क्षुब्ध; अनावर (समुद्र, नदी, घोडा, मनुष्य, कजाख स्त्री). 'आज नदी तुफान आहे.' [अर. तूफान्] ०**खोर**–वि. कुभांडी; बालंट घेणारा. 'तुफानखोर मनुष्याचे संगतीस लागूं नये.' –ऐस्फुले २.५३. **तुफानी**–वि. १ कुभांडखोर. २ क्षुब्ध; दंगखोर. 'भिल्ल कोळी रामोशी वगैरे तुफानी जातीतले लोक.' –गांगा ५६१.

**तुंब**—न. १ बैलानें चालणाऱ्या रहाटगाडग्यास असलेलें दात्याचें चाक. २ आरे ज्यांत बसवितात तो चाकाचा, तुंबा; मांदळा. 'ते रथूं साजिले। कनकतुंब।' –शिशु ५०९. ३ नदीचा बंधारा. 'कीं प्रलयसमुद्राचा तुंब फूटला।' –शिशु १०१६. ४ (राजा.) तुंबारा. ५ रहाटगाडयाचे कनेकडावर रवे बसविण्याची वाटोळी लाती. [सं. तुंब] ०**कता**–पु. (संगीत) गातांना तुंब्यासारखें तोंड फुगविण्याची क्रिया. ०**जोड–जोडी**–पुस्त्री. दोन तुंबे; रहाटगाडग्याची उभी–आडवी चाकांची जोडी. कनेकड व सुळकुंबा यांमध्यें हीं दात्यांचीं चक्रें बसवितात. ०**रहाट**–पु. (कों.) तुंबाचा रहाट; कनेकडास भोंवताली तुंब बसवून त्यास रवे मारून केलेला रहाट. ०**सर–सळ–सड**–पु. (राजा.) गांधीलमाशीची एक जात. ही मोठी व फार विषारी असते.

**तुबक**—नस्त्री. बंदूक; तोडयाची बंदूक. [तुर्की तुपक]

**तुंबडी**—स्त्री. १ शरीरांतील दूषित रक्त किंवा वायु काढावयाचें नळीसारखें यंत्र; रक्तशोषक यंत्र. (क्रि० लागणें; लावणें). 'विष शोषिलें संपूर्ण। दुग्धही गेलें सरोन। सर्वांगींच्या शिरा ओढून। तुंबडी एकचि लागली।' –ह ४.१८४. २ गोसावी, बैरागी इ० चें लांकडी किंवा भोपळयाचें भिक्षापात्र. 'बाजीरावनाना। तुंबडीभर देना।' ३ भोपळा असलेलें एक तंतुवाद्य [तुंबी] ०**भरणें**–१ पुष्कळ जेवणें; आपल्या पदरांत पाहिजे तितकें पाडून घेणें. २ अयोग्यप्रकारें पुष्कळ पैसा खाणें. 'मुक्या जनावराच्या तोंडांतलें काढून तूं आपली तुंबडी भरली, त्याचें पातक कोठेंरे फेडशील?' –रंगराव. ०**लावणें**–१ पिच्छा, पाठ पुरविणें. २ वित्त, शक्ति इ० चें शोषण करणें. **म्ह०** रिकामा न्हावी कुडाला तुंबडया लावी. सामाशब्द– ०**बाबा**–पु. गोसावी (तुंबडी वापरणारा). 'तो तुंबडीबाबा घालीतसे फेरी। नृत्य करी त्यापुढें।'

**तुंबडी**—स्त्री. तंगी; टंचाई. –शर.

**तुंबड्या**—पु. दुध्या भोपळा. [ सं. तुंबी ]

**तुंबणें**—अक्रि. १ जमणें; एके ठिकाणीं सांचणें; गोळा होणें. २ ( पुढें जाण्यास अडथळा झाल्यामुळें पाण्याचा प्रवाह, सैन्य, धंदा, विचार इ० ) निरुद्ध होऊन जमून राहणें; अडकणें. 'बहू तुंबला लोक तो दाटखेटा।' –राक २३. [ का. तुंबु=भरून जाणें; सांचणें ]

**तुंबळ**—वि. ( काव्य ) भयंकर; जोराचें; आवेशाचें; फार मोठें ( युद्ध, भांडण; सैन्य इ० ). 'तुंबळ सैन्य विलोकुनियां लहुशीं मग तो मुनि वाल्मिकि बोले.' –कुशलवाख्यान १७ (मराठी ५ वें पुस्तक पृ. १६१ ). [ सं. तुमुल ]

**तुंबळणें**—अक्रि. ( काव्य ) तुंबणें पहा. 'आधीं कवीचा वाग्विलास। तरी मग श्रवणीं तुंबळे रस।' –दा १.८.१५.

**तुंबा**—पु. १ लांबोडा पांढरा भोपळा; दुध्या भोपळा; कुंड्या भोपळा. २ या भोपळ्याचें केलेलें पात्र; पेला.

**तुंबा**—पु. १ शस्त्राचा, हत्याराचा दांडा ज्यांत बसवितात ती जागा. २ कुदळ, खोरें, कुऱ्हाड इ०चा मागला भाग; माथा. ३ चाकाचा मध्य. यांतून आंसाचीं टोंकें बाहेर निघतात. [ का. तुंबु ]

**तुंबा**—पु. एक लहान झाड. याचीं फुलें शंकरास वाहतात. पानें औषधी आहेत. यास शेतवड, शेतकुंभा व गुमा असेंहि म्हणतात. शेतवड पहा. [ का. तुंबे ]

**तुंबा**—पु. तुमान; विजार; चोळणा. 'तुंबा किनखापी' –वाडसमा १.३५. [ फा. तुंबान् ]

**तुंबा, तुंबारा–डा**—पु. १ बंधारा; बांध; पाणी अडविण्याचें साधन. २ अडविल्यामुळें सांचलेलें पाणी. ३ ( ल. ) तुंबलेलें सांचलेलें काम. ४ तुंबून रहावयाची अवस्था; एकत्र सांठणें; तुंबणें ( पाण्याचें ). ५ पाणी इ० तुंबावें म्हणून मोरी इ० छिद्रांत घालावयाचा बोळा. ६ अवष्टंभ; अवरोध; सांकळ ( रक्ताचें ) 'रक्ताचा भलत्याच ठिकाणीं तुंबारा होऊन त्यामुळेंच ते मृत्यु पावतात. –व्रावि ६५. ७ प्रतिबंध नाहींसा झाल्यामुळें, एक तोंड पडल्यामुळें ( रक्त पाणी इ०चा ) सवेग चालणारा मोठा प्रवाह. ( क्रि० लागणें; धरणें; फुटणें; सुटणें; सोडणें ). 'रक्ताचा तुंबारा लागून रक्तबंबाळ झालें.' ०**सोडणें**–पुष्कळ रक्त, पाणी वगैरे एकदम सुटल्यामुळें वाहूं लागणें. 'तुंबाडा सोडल्यासारखें तोंड वाऱ्यास देऊं नये.' [ तुंबणें ]

**तुंबिका**—स्त्री. भोपळा. 'पडे ज्यापरी अंबिका तातगेहीं। गमे तुंबिका मृत्यु-संसार-डोहीं।' –मुरायुद्ध २४३. [ सं. तुंबी ]

**तुंबिनी**—स्त्री. १ कडू ( पांढऱ्या ) भोपळीचा वेल. 'जैसी तुंबिनीचीं ओलीं फळें। भूमीस आपटितां होती शकलें।' –ह १९.१५४. [सं.] ०**फळ**–न. १ दुध्या भोपळा. २ कडू भोपळा 'तों उदकावरी वह्या दिसती। जेवीं तुंबिनीफळें तरंगलीं।' [सं.]

**तुंबिया**—पु. मुलांचा दागिना. –वसा ३७.

**तुंबी**—स्त्री. १ दुध्या भोपळा. २ पांढरा कडू भोपळा; तुंबिनीफळ. ३ त्याचें केलेलें पात्र; तुंब्या, तुंबा पहा. [ सं. तुंब ]

**तुंबी**—स्त्री. शेतवड. तुंबा पहा. [ का. तुंबे ]

**तुंबुराव, तुंबुरजी**—तंबुरा, तंबुरजी पहा.

**तुमकां**—सना. ( राजा. कु. ) तुम्हाला. [ सं. त्वम+ का प्रत्यय ]

**तुमचा**—सना. तुम्ही या द्वितीयपुरुषाची षष्ठी. [प्रा. तुम्हेच्चय] ( वाप्र. ) **तुमचा, तुमचा तो**–पादपूरक शब्द. ( वरील तुमका व तुमचा हे शब्द दोन्ही लिंगी योग्य ते फेरफार करून योजण्यांत येतात ).

**तुमडी**—स्त्री. तुंबडी पहा. **तुमडीची चाल**–स्त्री. पोवाड्यांच्या चालीचा एक प्रकार. –गापो १०६.

**तुमल**—पु. घोड्याचा एक त्वचारोग. घोड्याच्या अंगावर उठणारा फोड. –अश्वप २.२३३.

**तुमान**—स्त्री. लांब व पोकळ विजार; चोळणा. 'पायीं तुमानी सुरवारा घातल्या।' –ऐपो ५७. [ फा. तुंबान् ]

**तुमार**—पु. १ कागदाचें भेंडोळें; यादी; हिशेबपत्रक लेखी कागद इ० 'अखेर सालीं तुमार झाला त्यावरी आमचे दस्तकत नाहीं.' –पेद १० ३३. [ अर. तूमार ] ०**जमा**–स्त्री.. शेतसाऱ्याची एकंदर जमेची सरकारी यादीप्रमाणें रक्कम. ०**नवीस**–पु. जमाखर्च लिहिणारा. [ अर. तुमार्+नवीश ]

**तुमार**—पु. ताडी विकणारा. 'तुमार व कोळी मच्छीमार.' –वाडबाबा १.३.

**तुमारा**—पु. ( प्रा. ) कोंब; अंकूर; धुमारा.

**तुमुल**—वि. तुंबळ; घनघोर; भयंकर ( युद्ध, भांडण ). [ सं. ]

**तुम्हां**—सना. तूं या सर्वनामाच्या चतुर्थी बिभक्तीचें द्विवचन ( काव्य ) तुम्हाला. 'दिल्ही रविसखें तुम्हां जशि नमूनि सत्राजिती।' –केका ३४. [ तुम्ही ]

**तुम्ही**—सना. तूं या सर्वनामाचें आदरार्थी बहुवचन आणि सामान्यतः अनेक वचन. [ सं. युष्मत्–यूयम् पासून प्रा. तुम्ह ] **म्ह०** तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख–कंठाळी भिंतीला टांगण्यास खुंटी ( मेख ) पाहिजे म्हणून तुम्ही आम्ही एक असा संबंध जोडावयाचा, ताकापुरती आजीबाई. ०**कोण्ही**–तुमच्या पैकीं कोणीतरी.

**तुयाशील**—वि. तुई लावलेलें पंचवीस हात लांबीचें (पातळ ) –कलावंत खातें ( बडोदें ) १३६. [ तुई ]

**तुर, तुरें**—न. तुतारीसारखें एक वाद्य. ' लागलीं अनुद्दतांचीं तुरें जयजयकारें गर्जेती । ' -एभा २०.१८०. [ सं. तूर्य ]

**तुरई**—स्त्री. ( व. ) दोडका ( भाजी ). [ हिं. ]

**तुरई**—स्त्री. १ दोन्ही बाजूंनां टोकें असलेला खिळा; सुरसा. २ (विणकाम) हातमागावरील विणलेलें कापड गुंडाळण्याचें लाकूड, रूळ. [ सं. तुरी ]

**तुरकटी-कठी**—स्त्री. ( विणकाम ) तुरई अर्थ २ पहा. [ तुर+काठी ]

**तुरका(खा)ठी-डी**—स्त्री. तुरीचें पीक काढून घेतल्यावर राहिलेली तुरीच्या झाडाची काडी; ( राजा. ) तुऱ्हाटी. तूरकाठी पहा. [ तूर+काठी ]

**तुरकाण**—न. तुराण; तुर्कस्थान; तुर्कांचा मूळ देश.

**तुरकी(कण)चाल**—स्त्री. घोडयाची एक प्रकारची चाल; तुरतुर-टाकण-चाल; चवडचाल; जलदीनें पण जवळजवळ पाय टाकीत चालणें; धौरितक. [ फा. तुर्की=एक प्रकारचा घोडा; किंवा सं. तुर्+चाल ]

**तुरकेज**—न. ( सुतारी ) खिळे उपटण्याचें हत्यार. अंबूर.

**तुरंग**—पु. तुरुंग; कारागृह; बंदिशाळा; (इं.) जेल. [पोर्तु. त्रोंक]

**तुर(रं)ग, तुरंगम**—पु. घोडा; अश्व. 'तुरंगजातां प्रसिद्धां-। आंत उच्चैःश्रवा मी । ' -ज्ञा १०.२३७. [ सं. तुर्=शीघ्र गमन करणें ] **तुरंगी**-स्त्री. घोडी. [ सं. ]

**तुरंज**—पु. १ नारिंग. २ ( गो. ) महाळुंग; चकोत्रा; तोरज; होरींग. ३ एक औषध; महाळुंगाची साल. **०बीन**-पु. हा एक प्रकारचा चीक असून तो झाडाच्या बुंध्यास चोंचे मारल्यानें निघतो हा साधारण सारक आहे. यास शिरखिस्त असेंहि म्हणतात. -बालरोगचिकित्सा पृ. ३२.. [ फा. ]

**तुरट**—न. ( कु. ) मायफळ.

**तुरट**—वि. एक विशिष्ट अप्रिय रुचियुक्त; तुरटीप्रमाणें चव असणारा; तुरटी, हरितकी, ओली सुपारी इ०च्या चवीसारखा. [सं.तुवर] **०साखरू**-पु. एक प्रकारचा औषधी डिंक. **तुरटाई**-स्त्री. तुरटपणा [ तुरट ]

**तुरटी**—स्त्री. १ एक प्रकारचें क्षारद्रव्य; फटकडी. हिचा उपयोग रंग व औषधांमध्यें करतात. २ (कों) वाळलेल्या कोंवळया आंब्याची करंबुटी. [ तुरट ]

**तुरडा**—पु. ( वाई ) हरळीसारखें गवत. -मसाप ३.३.

**तुरण**—स्त्रीन. तोरणाचें झाड व त्याचें फळ; तोरण.

**तुर(रं)त**—क्रिवि. लवकर; ताबडतोब. [ सं. त्वरित ] **म्ह०** ( व. ) तुरतदान महापुन्=शुभस्य शीघ्रं या अर्थी.

**तुरतुर-तुरां**—क्रिवि. १ जवळ जवळ पावलें टाकीत; लवकर लवकर ( चालणें ). २ वरवर; नाचत बागडत ( चालणें; जाणें ). ३ तुरुतुरु ( बोलणें ) पहा. [ ध्व; सं. तुर्-त्वरा; प्रा. तुर ]

**तुरतुरं, तुरतुरंफुरफुरं, तुरतुर-री**—स्त्री. थोडा वेळ केलेला, दाखविलेला भपका; टुरटुर; औटघटकेची चैन. (क्रि० करणें; लावणें; मांडणें ); (गमतीचा संस्कृतच्या धर्तीवर श्लोक ). ' तुरतुरं फुरफुरं दोन मासं । चंदनं वंदनं दोन मासं । लपनं छपनं दोन मासं । शृंखलं बंधनं दोन मासं । ' =थोडे दिवस चैन, नंतर धरपकड, नंतर तुरुंग याप्रमाणें जाणारें आयुष्य.

**तुरप**—स्त्री. (गो.) बारीक शिवण. [ हिं. तुरपन ] **तुरपणी**-स्त्री. मुरड; दुमड; शिवण्याचा एक प्रकार. **तुरपणें**-सक्रि, वस्त्राचें शेवट आंत दुमडून शिवणें. [ हिं. तुरपना ]

**तुरप(ब)त**—स्त्री. थडगें व त्यावर बांधलेला चबुतरा, इमारत. [ अर. तुर्बत ]

**तुरंबणें**—अक्रि. १ कणसें येणें ( गहूं, ज्वारी इ०स ). २ दुःख करणें. [ तुरंबी ]

**तुरंबणें**—उक्रि. १ मस्तकावर ठेवणें; धारण करणें. २ घालणें; खोवणें; बांधणें; तुऱ्याप्रमाणें खोवणें. ' हीं अपकीर्तींचीं फुलें । कां मस्तकीं तुरंबिसी । ' -मुसभा १३.६२. ३ हुंगणें; वास घेणें. ' सांगा परिमळें काय तुरंबावें । ' -ज्ञा ९.११. [ ? ]

**तुरंबणें**—अक्रि. १ ( कों. ) एके ठिकाणीं राहणें, सांचणें; तुंबणें. ' ओल्या गवतावर पाणी तुरंबत नाहीं. ' २ तिष्ठणें; खोळंबणें; थांबणें. -उक्रि. (कु.) वाट पाहण्यास लावणें; खोळंबून धरणें; तिष्ठत बसविणें; थांबविणें. [ तुडुंबणें ]

**तुरंबणी**—स्त्री. वास; गंध. ' हे खपुष्पाची तुरंबणी । ' -ज्ञा १६.३९.

**तु(तू)रबंबाळ**—पु. ( काव्य. ) अनेक वाद्यांचा एकत्र घोष किंवा ध्वनि. ' ऐसा अद्भुत तूरबंबाळु । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु । ' -ज्ञा १.१३६. [ तुरें+बंबाळ ]

**तुरंबी**—स्त्री. १ तुरमी; तुळस, अंबा, पाच इ०ची मंजरी. २ ओंबी; कणीस; लोंगर; वरला भाग ( राळा, वरी, सांवा, गहूं, तांदूळ, इ०चा ). ३ कोमल अंकुर, शेंडा; डिकशी. [ तुरा ]

**तुरबुरणें**—अक्रि. कुरकुरणें; तक्रार करणें. [ ध्व. ]

**तुरबुरणें**—अक्रि. ( कों. ) टवटवीत दिसणें; नव्या, दाट पानांनीं आच्छादित होणें; ( झाडांस ) नवी पालवी फुटूं लागणें. [ तुरा-तुरंबी ]

**तुरमण**—न. ( गो. ) कोंवळा काजू. [ तुरा ]

**तुरमणा**—पु. अतिशय पानें असलेली डहाळी. [ तुरा ]

**तुरमणें**—न. गोंड; कचोळें; गोंडळ (फूल, फळ इ०चें). [तुरा]

**तुरमा**—पु. ( कों. ) १ अकुर, मोड फुटणें. २ अंकुर; मोड; कोंब. ( क्रि० फुटणें; येणें ). [ तुरा ]

**तुरमी**—स्त्री. तुरंबी पहा. ' जशि सुगंधिक दवण्याची तुरमी । ' -सला ७.[ तुरंबी ]

**तुरमुं(मं)डी**—स्त्री. तरमुंडी पहा. डोकें पुढें करून दिलेला शरीराचा रेटा; मुसंडी; धडक ( क्रि० देणें ).

**तुरये, तुररे**—पुअव. वेलीचे ताणे, तंतू. [ तुरे ]

**तुररी**—स्त्री. तुतारी. ' खिनखिनितीं तुररिआं खरसिंगेसी। ' –शिशु ५२४. [ सं. तूर्य ]

**तुरवठे**—न. ( राजा. ) डोंगरावरील खडकाळ पण उत्तम व्यवस्थेनें लागवडीस आणिलेला जमीनीचा तुकडा; डोंगरपठारावरील शेत.

**तुरवें**—न. तांदूळाची एक जात. तुरियें पहा.

**तुरळ, तुरळतुरळ, तुरळक तुरळक, तुरळततुरळत**—क्रिवि. १ पातळपातळ; विरळविरळ; अंतराअंतरावर; कोठेंकोठें ( उगवलेलें रोप, येणारें पीक, पडणारा पाऊस, दिसणारा पदार्थ इ० ). २ विरळ; पातळ (विणणें, विणलेली वस्तु). ३ एकसारखी नसणारी; खंडित; असंतत; विच्छिन्न ( झोंप, अभ्यास ). ४ दुर्मिळ; क्वचित आढळणारें. [ सं. तरल=विस्तृत; रुंद ]

**तुरळणें**—सक्रि. १ विखुरणें; विरळ करणें ( दाट उगवणारीं रोपें, अतिशय दाटीनें ठेवलेले पदार्थ ). २ विरळ, पातळ विणणें; लांबलांब धागे घालणें. [ तुरळ ]

**तुरा**—पु. १ पागोटें, टोपी इ०कांस लावण्याकरितां मोतीं, फुलें इ०चें केलेलें भूषण, अलंकार; चूड. ' कलगीतुरा शिरपेंच कंठिची पडत होति किरणें। ' –ऐपो ३११. २ राजगिरा; मका; ऊंस इ०स येणारा गुच्छ; झुबका; गोंडा; झेंडा. ३ पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी. ४ एक प्रकारची लावणी. हीमध्यें प्रकृती (स्त्री) वर पुरुषाचें ( देवाचें ) वर्चस्व वर्णिलेलें असतें व नायक हा नायिकेच्या आर्जवांत असतो. या लावणीवाल्यांच्या डफावर तुरा लावलेला असतो. याच्या उलट कलगी लावणी. ५ नथेंतील विशिष्ट ठिकाणचा मोत्यांचा समूह, गुच्छ. ' नथ नाकांतिल उडे तुरे सरजे फुंकरावें। ' –प्रला २३१. [ अर. तुर्रा=झिलमिळणारे पुढचे केंस ] तुऱ्याचे प्रकारः– **०कंठा**–पु. फक्त फुलेंच दिसतील अशा तऱ्हेनें केलेला गुच्छ; फुलांचा मोठा गोल. **०कळीचा**–पु. फुलांच्या कळ्यांचा तुरा; गुच्छ. **०गोल**–पु. फुलांचीं डेखें आंत दुमडून केलेला वाटोळा. **०चक्रीचा**–पु. मध्यें फूल घालून कळ्यांचा गुंफलेला तुरा. **०चीप**–दोहों बाजूस झुबके दिसावे अशा रीतीनें आडवीं डेखें करून पातळ गुंफलेला. **०दुलडी**–पु. दोन पदरी तुरा. **०बुरजी**–पु. बुरजाच्या आकाराचा, वाटोळा व अनेक पदरांचा. **०पट्टी**–पु. फुलें एकावर एक उभीं राहतील अशा रीतीनें मधून ओंवलेला. **०फकडीचा**–पु. दुहेरी किंवा पुष्कळ फुलांच्या लडींचा तुरा. ( वाप्र. ) **०लावणें**–मोठा पराक्रम करणें; कीर्ति, प्रतिष्ठा मिळविणें. **०लावून फिरणें**–दोष अंगीं लागला असतां त्याचें निराकरण होवो अगर न होवो, प्रतिष्ठितपणें मिरविणें.

**तुरेवाला**–वि. कलगी पहा. तुरा या प्रकारापैकीं लावणी म्हणणारा शाहीर. तुऱ्याच्या संप्रदायांतील. [ अर. हिं. ]

**तुराठी**—स्त्री. तुरीच्या झाडाची काडी. तुरकाठी पहा. [तूर+काठी ]

**तुरांबा, तुराआंबा**—पु. मोहोराच्या खालीं धरलेला बारीक आंबा.

**तुरियें**— न. एक जातीचे तांदूळ. तुरवें पहा.

**तुरी**—स्त्री. १ ( विणकाम ) हातमागावरील विणलेलें कापड गुंडाळण्याचें लाकूड, रूळ. तुरई पहा. २ धोटा. [ सं. ]

**तुरी**—स्त्री. १ तगरीचें झुपक्याचें फूल. २ एक कडधान्य. [ का. तोगरी ]

**तुरीय**—वि. चौथा. [सं.] **०यंत्र**–न. दिवस किती आला हें पाहण्याकरितां केलेलें वर्तुल–चतुर्थांशरूप एक काष्ठादिकांचें यंत्र.[सं.]

**तुरीया, तुरीयावस्था**–स्त्री. जागृती, सुषुप्ति व स्वप्न या पलीकडील समाधिरूप चौथी अवस्था. [ सं. ]

**तुरु(रू)क**—पु. तुर्क; यवन; मुसलमान. ' आपण तुरूक गुरु केला। ' –दा १९.६.१३. [ सं. तुरुष्क ] **०होड**–स्त्री. १ पैज. २ पणाचा ऐवज. ' तुम्ही आपले आयुष्यानें धुंद जाला परंतु आम्ही मुलेंबायकांनीं तुरुकहोडीस पडावें इतकें मात्र उरलें.' –भाब ५१. [ तुरुक+होड=पण ]

**तुरुंग**—पु. कारागृह; कैदखाना. [ पो., डच=त्रोंक; फा. ]

**तुरु(रू)त**—क्रिवि. १ लवकर; झटकन; ताबडतोब; सत्वर. २ ताबडतोब; याक्षणीं; त्वरित. ' तुरुतदान महापुण्य म्हणावे कैसा दाता धर्म करी। ' –सला ७५. [ सं. त्वरित ] **म्ह०** तुरूतदान महा पुण्य=मनांत येताक्षणींच किंवा संधि प्राप्त होतांच केलेल्या दानानें अधिक श्रेय मिळतें या अर्थी.

**तुरुतुरु**—क्रिवि. तुरतुर पहा. [ ध्व. ] **०कन–कर**–क्रिवि. दुडदुड ( चाल ).

**तुरुप**—पु. घोडेस्वार. [ इं. ट्रुप ]

**तुरुंब**—क्रिवि. तुडुंब. अतिशयार्थे दाखविण्याकरितां भरणें या अर्थाच्या क्रियापदाबरोबर हा शब्द योजीत असतात. तुडुंब पहा. **०भरणें**–अतिशय, परिपूर्ण कांठोकांठ, तंतोतंत भरणें.

**तुरुष्क**—पु. तुर्कस्थान. तुरकाण पहा. [ सं. ]

**तुरूक, तुरूकस्वार**—पु. घोडेस्वार; ( ब्रिटिश लोकांच्या घोडेस्वारांसच हा शब्द लावतात ट्रूप या इंग्रजी शब्दावरून. तुरुप अथवा तुरुपस्वार अशींहि रूपें आहेत ). [ सं. तुरुष्क; फा. ]

**तुरूक–चाल, तुर्कीचाल**–स्त्री. तुरकीचाल पहा.

**तुरूप**—स्त्री. सौम्य व कोमल (सकाळचें किंवा संध्याकाळचें) ऊन. तिरीप पहा.

**तुरें**—न. १ एक चर्मवाद्य. २ तुतारी. 'आनंदले लोक नरनारी परिवार। शंखभेरीतुरें वाद्यांचे गजर।' –तुगा ३९६. [सं. तूर्य; प्रा. तूर=वाद्य]

**तुर्क**—पु. तुर्कस्तानचा रहिवासी; मुसलमान; अनार्य. [सं. तुरुष्क; प्रा. तुरक्क]

**तुर्काण**—न. तुर्कस्थान. (ल.) –वि. तुर्कांचा ताबा. 'रामाचें वतन जालें तुर्काण।' –भाऐ १०.३.११५.

**तुर्की लाखोरी**—वि. घोड्याचा एक रंग. सर्व शरीर काळया व लाल रंगाचें असून चारी पाय पांढरे व कपाळावर पांढरा मुखपट्टा असलेला (घोडा). –अश्वप १.३०.

**तु(तो)र्केज**—पु. (गो.) सोनाराचें बागीसारखें हत्यार. तुरकेज पहा. [पो.]

**तुर्तातुर्ती–तुर्त**—क्रिवि. ताबडतोब; तडकाफडकी; चुटकी-सरशीं; एकदम. [तुरूत]

**तुर्तुरीत**—क्रिवि. (गो.) लगबगीनें; घाईनें. [तुरतुर]

**तुर्ब(पे)त–ती**—स्त्री. थडगें; समाधि. तुरपत पहा. 'आणि त्यावरी तुर्पेती बांधली।' –रा १५.७. [अर. तुर्बत्]

**तुर्यग–तुर्या**—स्त्री. चवथी अवस्था. तुरिया पहा. 'जे निर्वाण तुर्यग परियेसीं।' –रंयो १.१६२. [तुरीया] **०देवी**–स्त्री. चतुर्थावस्था देवी; तुरीया अवस्थेची अधिष्ठात्री देवता. 'तुर्यादेवी त्रिपुरसुंदरी तीच्या संयोगें।' –देप २०८.

**तुर्ये**—न. एका जातीचे तांदूळ. तुरवें, तुरिये पहा.

**तुर्रकरून**—क्रिवि. (गो.) दुडदुड; लगबगीनें.

**तुऱ्हाटी**—स्त्री. तुराठी पहा. [तूर+काठी]

**तुर्सट**—वि. (गो.) तिरसट.

**तुलई**—स्त्री. गादी. –शर. [सं. तूल ?]

**तुलक**—पुन. कापूस. 'सोमवारी मुलकाला आणि तुलकाला स्पर्श करूं नये.' [सं. तूल]

**तुलग–गा**—पु. १ वाद्याचा ध्वनि. २ प्रतिध्वनि. 'तयाचि तुलगासवें। वीरवृत्तिचेनि थावें।' –ज्ञा १.१२७. [सं. तूर्य]

**तुलंग**—पु. घोड्याची एक चाल. –अश्वप १.१९३.

**तुलतुल**—क्रिवि.लखलख. 'दोन्ही गाल मखमूल। करी नवती तुलतुल।' –पला ४.४२.

**तुलणा–ना**—स्त्री. तुळणा पहा. [सं. तुल्=तोलणें] **तुल-नात्मक**–वि. तुलना केलेला. तुलणें–तुळणें पहा.

**तुलसी**—स्त्री. तुळस; हिंदु लोकांत पवित्र मानलेलें झाड. (समासांत) तुलसी–पूजा–माला–वन–हार. (वाक्प्रचार व सामा-सिक शब्द तुळस शब्दांत पहा). [सं.]

**तुला**—स्त्री. १ तराजू; तागडी. 'तेव्हां आणवि तो तुला त्रिभुवनीं जीला नसे हो तुला.' –आशिबि २९. २ मेषादि बारा राशींपैकीं सातवी राशि. ३ वजन करणें अथवा वजन करून किती हें ठरविणें अथवा अमुक एक आहे हें वजन करून ठरविलेलें परिमाण. ४ बरोबरी; साम्य; समता; सारखेपणा; तुलना. 'भगवान् धर्मासि म्हणे, नाहींच तुला तव प्रतापा या।' –मोभीष्म ११ १५२. ५ धार्मिकविधिपूर्वक आपल्या शरीराच्या भारंभार सोनें, रुपें, साखर इ० ब्राह्मणास देण्याचें कार्य; अशा रीतीनें ठरविलेलें भारंभार सुवर्ण वगैरे. (क्रि० करणें; देणें). [सं] **म्ह०** गाजराची तुला आणि विमानाची वाट=क्षुल्लक गोष्टीबद्दल किंवा थोड्या यत्नाबद्दल मोठें बक्षीस अथवा फळाची अपेक्षा करणें. सामाशब्द– **०कोश–परीक्षा**–पुस्त्री. तुला करण्याचें दिव्य. **०दान**–न. आपल्या भारंभार सोनें, रुपें वगैरे ब्राह्मणास देणें. तुला अर्थ ५ पहा. **०धार**–पु. तराजूची दांडी; कांटा. **०पुरुष**–पु. १ माणसाच्या भारंभार सोनें इ० ची केलेली प्रतिमा. २ त्याच्या भारंभार सोनें इ०. **०मान**–न. वजन करून काढलेलें प्रमाण. **०संपात**–पु. सूर्याचें तूल राशीमध्यें जाणें (ता. २२ सप्टेंबर या दिवशीं सूर्य विषुव-वृत्तावर येऊन दिवस व रात्र यांचें मान सारखें होतें तो काळ).

**तुला**—स्त्री. लगामाचा एक प्रकार. –अश्वप १.१८५.

**तुलित**—वि. १ वजन केलेला. २ तुलना करून पाहिलेला. [सं.]

**तुलीप**—पु. पलंग. [सं.]

**तुले**—न. (खा.) तुला; तागडी.

**तुल्य**—वि. सारखा; समान; बरोबर; बरहुकुम. [सं. तुल्+तोलणें] (समासांत) बल–पराक्रम–धैर्य–धन–विद्या–गति–आयु–प्रमाण–मान–वैभव. **०गोष्ठी**–स्त्रीअव. उपमान; तुलना; उपमिति. (इं.) ॲनॉलॉजी. **०शक्तिकता**–स्त्री. (शाप.) समतोलपणा; बरोबरी. (इं.) इक्वीव्हॅलेन्स. **०परिमाणी**-वि. समान मापाचा, वजनाचा गुरुत्वाचा वगैरे. (इं) मेटॅमेरिक्. **०रूपत्व**–न. सारखाच आकार असण्याची अवस्था. (इं.) इसोमेरीझम्.

**तुवरी**—स्त्री. तुरीची डाळ. तूर पहा. [सं.]

**तुवां**—सना. तूं; त्वां. 'असंख्य खळ संगरीं निजकरीं तुवां मारिले।' –केका ९०.

**तुवालॉ**—पु. (गो) टॉवेल; अंग पुसण्याचा रुमाल. [पोर्तु]

**तुशाखडक**—पु. फुसफुशीत दगड असलेला खडक.

**तुशी**—वि. पिवळसर तांबड्या रंगाचें (वस्त्र).

**तुष**—पु. धान्याचा कोंडा. 'जैसें रंक कां आळुकैलें। तुषांतें सेवी।' –ज्ञा ५.११०. [सं] **तुषकंडणन्याय**–पु. (कोंडा कांडणें निष्फळ असतें यावरून) कोणत्याहि गोष्टीचा काथ्याकूट करणें निष्फळ आहे असें दाखवावयाचें असलें म्हणजे या न्यायाचा उपयोग करतात.

**तुषात**—पु. कोंडा.

**तुषार**—पु. १ वाऱ्यानें वगैरे उडणारे उदकाचे बारीक बारीक कण. बुरबुर; छिटा; शीतलबिंदू. 'ते सत्त्वशुद्धी साद्दाकारें। गुरुकृपामृततुषारें।' -ज्ञा १८.२५९. २ दंव; दहिंवर. [सं.]

**तुष्ट**—वि. धालेला; संतुष्ट; तृप्त; खूष. [सं. तुष्] ०**पुष्ट**-वि. संतुष्ट; खूष. 'राजानें कृपावलोकन केलें म्हणजे प्रजा तुष्टपुष्ट होते.' **तुष्टणें**-अक्रि. संतुष्ट, तृप्त होणें; आनंदित होणें. 'हा तुष्टल्या तत्क्षणीं। तक्षक पडे हुताशीं।'-मुआदि ११.११०.[सं.] **तुष्यतुदुर्जन न्याय**-पु. आग्रह धरायाजोगी जरी गोष्ट आहे तथापि प्रसंग विशेषीं (किंवा दुर्जनाशीं वादप्रसंग आला असतां) उपेक्षा करावी अशी शिष्ट लोकांची रीति, तो न्याय. **तुष्टि**-स्त्री. संतोष; तृप्तता; संतुष्टपणा. [सं.] **तुष्टीभूत**-वि. (काव्य) तृप्त; संतुष्ट; आनंदित. 'मग तुष्टीभूत झाला वक्ता।' [सं.]

**तुसडा**—वि. तिरसट; हेकड; तिरशिंगराव; उद्धटपणानें वागणारा; सर्वदा झिडकारणारा; तिटकारा करणारा. 'असेल जोकां तुसडा मनुष्य। व्हावे तयानेंहि मदीय शिष्य।'-अर्वाचीन २१९. [तुच्छ=तुसडा] **तुसड**-न. (व.) तुच्छतेनें बोलणें. **तुसडेपणा**-पु. त्राशीकपणा.

**तुसळ**—स्त्री. (तांदुळाचा) कोंडा; भूस; तूस. -वि. कोंडा असलेले (तांदूळ). [सं. तुष]

**तुसार-रा**—पु. तुषार पहा. [सं.तुषार अप.]

**तुसार, तुसारधान्य**—न. रबीच्यापूर्वी होणारें खरीपाचें भात, वरी, बाजरी वगैरे धान्य; पीक. [सं. तुष; तूस+धान्य] **तुसारपट्टी**-स्त्री. तुसाराच्या पिकावरील पट्टी; दसरा झाल्यावर जी कुळाकडून वसूल करतात ती पट्टी. **तुसारमाल**-पु. (व.) जवारी, तुरी वगैरे खरीपाचें धान्य.

**तुस्त**—स्त्री. (गो.) स्तुति. (क्रि० चलौप=स्तुति करणें).

**तुह-हा-ही-हे**—सना. (व.ना.खा.) तुझा-झी-झें. 'दूर जागा पाहिला तुहा वारा नाहीं जेठ। घेतलीस लुगडीं अवचित श्रीहरी त्वा कुठें।' -होला ५३.

**तुळई**—स्त्री. १ गृहादिकांचे खण वेगवेगळे करण्याकरितां दोन खांबांवर आडवें बसविलेलें चौरस लांकूड; तुळवट. २ तूळ; एक प्रकारची तराजू. हिला एकच पारडें असून लांब दांडी असते तीवर वजनाचे विभाग पाडलेले असतात. त्या दांडीवर वजनें अडकवून वजन करतात. [का. तळि]

**तुळणा-णी**—स्त्री. १ बरोबरी; सारखेपणा; बरोबरीचा किंवा एकसारखा मनुष्य अथवा पदार्थ; तोड; तुलना. 'तुळणा नाहीं तुझे मती। तुज वंदिती ब्रह्मादिक।' २ साम्य ठरविण्याकरितां एके ठिकाणीं तोलणें; एकमेकांशीं बरोबर आहे किंवा नाहीं हें ताडून पाहणें; अजमास करणें. 'तीर्थें न येती तुळणी। आजि या सुखा धणी।' -तुगा २५८७. [सं. तुलना]

**तुळणें**—सक्रि. वजन करणें; मोजणें; बरोबर मानणें; उपमा देणें अथवा बरोबरी करणें. [सं. तुल्=तोलणें] -अक्रि. बरोबर वजन भरणें; बरोबरी करणें; स्पर्धा करणें; ताडून पाहणें; वजन होणें. 'त्यासीं तुळे हो संग्रामीं। ऐसा नाहीं ब्रम्हांडधामीं।' -मुआदि ६.४.

**तुळतुळ**—स्त्री. (व.) काळजी; चिंता.

**तुळतुळ, तुळतुळीत**—क्रिवि. उत्सुकतेनें; स्थिर चित्तानें; लक्ष लावून; डोळे लुकलुक करीत असतांना. (क्रि० विचार करणें; पाहणें).

**तुळतुळीत**—वि. चकचकीत; तुकतुकीत; तजेलदार.

**तुळं(ळां)बा**—पु. तोळंबा पहा.

**तुळव**—पु. बैलगाडीच्या कण्याच्या प्रत्येक बुटयावर जीं तीन लांकडें असतात त्यांना सामान्य नांव. बाजूच्या दोन्ही तुळवांना सायतुळव व मधल्याला भारतुळव म्हणतात. प्रत्येक तुळवामध्यें एकेक अशीं अनुक्रमें तीन वांकीं बसविलेलीं असतात आणि आखरीवरून टाकलेल्या ढासण्यांनीं (दोऱ्यांनीं) तें सर्व एके ठिकाणीं आवळून घेतलेलें असतें.

**तुळवट**—नपु. १ मुख्यत्वेंकरून मोठें लांब, परंतु चौरस न केलेलें लांकूड; तुळई. २ (ल.) उंच व जाडजूड स्त्री किंवा पुरुष. ३ (ल.) जिकिरीचें, त्रासाचें काम. [का. तळि]

**तुळवणें**—क्रि. वजन करणें. 'कृपाळु दयाळु भूतीं। तुळविलें अंतीं।' -तुगा १२५१. [तुळणें]

**तु(तो)ळबंदी**—स्त्री. वाकी; वाळा. 'अंगद तोलबंदीस्यात्.' [फा.]

**तुळवा**—पु. ब्राह्मणांची एक जात व तींतील व्यक्ति; तुळु. **तुळवी**-वि. तुळव्या ब्राह्मणासंबंधीं (वेष, भाषा इ०). [का. तुळुवा]

**तुळसघुळस**—स्त्री. (व.) तिळगूळ; तिळसंक्रांत.

**तुळस-शी**—स्त्री. हिंदु लोकांत पूज्य मानिलेलें एक झाड; काळी व पांढरी अथवा रामतुळस असे हिचे भेद आहेत. तुळस ही हिंदुस्थानांतच आढळते. (हा शब्द तुळस-सी असाहि वापरला जातो). [सं. तुलसी] (वाप्र.) ०**उचलणें**-शपथ घेणें. ०**उपटून भांग लावणें**-वाईट मनुष्य पदरीं ठेवण्याकरितां चांगल्या मनुष्यास काढून टाकणें. **तुळशीचे मुळांत कांदा लावावा लागणें**-चांगला हेतु सिद्धीस नेण्यास वाईट साधनांचा उपयोग करण्याविषयींची सबब सांगणें. **तुळशींत भांग**-चांगल्यांच्या समुदायांत चुकून एखादा वाईट माणूसहि आढळतो. **तुळशींत भांग व भांगेंत तुळस**-चांगल्या व वाईट गोष्टी एका ठिकाणींच पिकतात. **तुळशीपत्र कानांत घालून बसणें**-ऐकलें न ऐकलेसें करून स्वस्थ राहणें. **तुळशीपत्र ठेवणें**-हक्क

सोडणें. (हलवायाच्या घरावर) **तुळशीपत्र ठेवणें**–परभारें दुसऱ्याची वस्तु तिसऱ्याला देऊन टाकणें. सामाशब्द– **०काष्ठ**–न. तुळशीचें लांकूड. (प्रेताचें दहन करण्यास, उगाळून गंध करण्यास किंवा माळेचे मणी करण्यास याचा उपयोग करतात). **०पत्र**–न. तुळशीचें पान. (ल. सामान्यतः लहान मानलेली दक्षिणा किंवा देणगी). **०मंजरी**–स्त्री. तुळशीचा शेंडा–तुरा. 'कासें दिव्य पितांबर। गळां तुळसीमंजऱ्यांचे हार।' **०वर्ग**–पु. तुळस, सब्जा सारख्या पुष्पांतील दोन आंखूड व दोन लांब असे पुंकेसर असलेल्या झाडांचा वर्ग. **०वात**-स्त्री. (बायकी) कापसाच्या सुताची चार बोटांच्या रुंदीवर सूत गुंडाळून केलेली १२ सुतांची एक वात. ह्या वाती तुळशीच्या लग्नापासून दररोज दोन वाती या प्रमाणें वर्षभर लावतात. **०विवाह**–पु कार्तिक शुद्ध द्वादशीस विष्णूची मूर्ति व तुळशीचें झाड यांचा जो विवाह होतो तो. **०वृंदावन**–न. तुळशीचें झाड लावण्याकरितां केलेली विशिष्ट रचना, ओटा, स्थान.

**तुळा, तुळादान-पुरुष**—तुला, तुलादान इ० पहा.

**तुळाधार**—वि. तराजूची दांडी. तुलाधार पहा. –क्रिवि. बरोबर; यथायोग्य; तंतोतंत; काडीभरहि इकडे तिकडे होणार नाहीं अशा टापटिपीनें. (क्रि०ठरविणें; बोलणें; वागणें). [सं. तुला+आधार]

**तुळाभार**—पु. (गो.) नवस फेडण्यासाठीं नारळ वगैरे पदार्थ माणसाच्या बरोबर वजन करण्याचा प्रकार. –वि. मनुष्याच्या शरीराच्या वजनाइतकें. 'मग रायासि करविलें स्नान। तुळाभारें वेंचिलें कांचन।'–कथा २.१५.८८.

**तुळांबा**—पु. तोळंबा पहा.

**तुळि(लि)का, तुळी**—स्त्री. १ गादी. 'तेथ ध्येय ध्यान बहु सुख। तेचि शेषतुलिका निर्दोख।' –ज्ञा १३.३९२. २ पलंग बिछाना. [सं. तूल=कापूस]

**तुळी**—स्त्री. (कों.) तुळई पहा. [का. तोळि]

**तुळू**—पुस्त्री. एक देश, भाषा व जात. तुळवा पहा. [द्रा.]

**तू**—सना. द्वितीयपुरुषी सर्वनाम (एव.) [सं. त्वम्; प्रा. तुमं. फें. जिप्सी तु, तुमेन] (वाप्र.) **तूं मी करणें, तूं मी बरयेणें**= हमरीतुमरीवर येणें. **म्ह०** १ हूं तर भांडीं घास तूं=सुखावह न होणारें असें काम करण्यास सांगणें. २ केलें तुकां झालें माकां, किंवा तूस करावयाला गेलें तर मस कसें आलें=तुझें वाईट करावयाला गेलों तों उलट माझेंच वाईट झालें.

**तूक**—पु. बालक. 'दृष्टीस तूं दीससि तूकसेरे.' –अकक २. मंगीशकृत राधाविलास ४६. [सं. तोक]

**तूक, तुकल**—स्त्री. एक प्रकारचा कागदी पतंग.

**तूक**—न. (काव्य) १ तोलणें; वजन करणें. २ निष्काचा सोळावा हिस्सा अथवा दोनपूर्णांक एकद्वितीयांश माष. ३ वजन; वजन करून ठरविलेलें परिमाण. 'तूक सकळांचें गोविंदाचे हातीं.' ४ महत्त्व; किंमत. ५ श्लोक इ० चा चवथा चरण; ध्रुपद अथवा पालुपद. ६ अवयव अर्थ ५ पहा. [ते. तुकमु; का. तूक, तुकणें पहा] **कीं तुकणें**–बरोबर तोलणें; तुलना करणें. 'तयाचे तुकीं कोण ऐसा तुकावा.'

**तूज**—सना. (राजा. कों.) तुला. 'कशी आली ही तूज मनुजवाचा।' –र २४.

**तूट**—स्त्री. १ तोटा; कमतरता; न्यूनता; तुटवडा. २ खंड; खळ; विराम; व्यवधान. ३ वियोग; विच्छेद; भेद. ४ फूट; भिन्नभाव; भेद; बिघाड. [सं. त्रुट्=तुटणें] (वाप्र.) **०पडणें**–उणीव भासणें. सामाशब्द– **०ओल**–स्त्रीन. जमिनींतील कमी ओल अथवा ओलावा. तुटओल पहा. **०पाऊस**–पु. मधून मधून अथवा थोडथोडा पडणारा, एकसारखा नसणारा नेहमींप्रमाणें नसणारा पाऊस वळीवाचा पाऊस. तुट पाऊस पहा. **०पाणी**–न. थांबून थांबून अथवा थोडें थोडें दिलेलें पाणी (झाडांना अथवा जनावरांना). **०पुंजी**–स्त्री. अपुरें अथवा उणें भांडवल किंवा मुद्दल. –वि. कमी भांडवलावर चालविलेला (धंदा). **०पुंजीवाला-पुंज्या**–वि. तूटपुंजीवर धंदा करणारा. **०मिती-मुदत**–स्त्री. कटमिती पहा. (क्रि० करणें; देणें). [तूट+मिती]

**तूण, तूणीर**—पु. बाण ठेवण्याचा भाता. 'खणीं शस्त्र अस्त्रें धनुर्बाण तूणी। रथा धांवतां मेदिनी ते दणाणी।' –मुरामायुद्ध १००. 'आश्चर्या अति पावली बघुनियां तूणीर पाठीवरी।' –आनंदतनय, शबर्याख्यान ९. [सं. तूण्=पूर्ण करणें]

**तूत**—स्त्रीन. एक झाड व त्याचें फळ. तुती पहा. 'वरि अलें लिंबु तूतिया खोबरें।' –अमृत ३४. [अर. तूत्]

**तूंतें**—सना. तूं ची चतुर्थी (काव्य.) तुला. 'धृतराष्ट्र नृपा! सांगों आश्चर्य काय मीं तूंतें।' –मोकर्ण १०.१९.

**तूदतोप**—पु. (गो.) जुगारांतील एक पारिभाषिक शब्द. **०करणें**–एकदम सर्व पैसे जुगारांत लावणें.

**तून**—स्त्री. (व.) स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र. 'लाल रंगाची तून विकत मिळते.'

**तून लावणें**—क्रि. (व.) मिरचीची लागण झाल्यानंतर मधली मधली कांहीं रोपें मेल्यास त्या त्या ठिकाणीं नवीन रोप लावणें.

**तू(तु)प**—न. १ लोणी कढविलें असतां त्याचें जें रूपांतर होतें तें; घृत. 'म्हणोनि तूप होऊनि माघौतें। जेवीं दुधपणा नयेचि निरुतें। तेवी पावोनिया जयातें। पुनरावृत्ति नाहीं।' –अ ८.२. २ (ल.) तत्सदृश नारळाचा रस, मांस इ० कांपासून निघणारा स्निग्ध पदार्थ. [सं. (तुप् हिंसायां=मारलेल्या पशूची चरबी हा तूप या शब्दाचा मूलार्थ होय. नंतर हिंसा बंद झाल्यावर दुधांतून घुसळून काढलेल्या पदार्थाला तूप म्हणूं लागले. गाथासप्तशतींत तुप्प शब्द

सांपडतो ); का. तुप्प; प्रा. तुप्पइअ, तुप्पविअ ] म्ह० १ अवशीं खाई तूप सकाळीं पाही रूप. २ (गो.) तूप खाऊन रूप येतां=तूप खाल्लें म्हणून तावडतोब रूप येत नाहीं. सामाशब्द- ०कढणी-स्त्री. लोण्याचें तूप करण्याकरितां केलेलें पात्र. ०खिचडी-स्त्री. १ सोंगटया, नाट इ० खेळामध्यें दुसऱ्याची सोंगटी वगैरे मारली असतां एकदां खेळण्याची पाळी झाली असूनहि आणखी एकवार खेळण्याचा प्रकार. ( क्रि० खाणें; खेळणें ). २ ( बायकी ) मुली चकावयास लागल्यावर जी मुलगी प्रथम उतरते तिला शेवटीं राहिलेल्या दोन मुलींबरोबर पुन्हां चकण्यास जावें लागतें तो प्रकार. 'तुपखिचडीस जाणें' असा रूढ प्रयोग. [ तूप+ खिचडी] तुपट, तुपगट-वि. १ तुपाची चव, वास येणारें (पदार्थ, भांडें, कपडा वगैरे). २ तुपाचा वास लागलेलें; ज्यांत अतिशय तूप झालें आहे असें ( अन्न, पक्वान्न ). ३ तुपाचा; तुपासंबंधीं ( वास, घाण ). ४ उंची व स्निग्ध; उंची व भारी ( तांदूळ ). [ तूप ] तुपटाण-घाण-ठाण-स्त्री. खंवट, वाईट तुपाची घाण. [ तूप+ घाण ] ०तसर-न. समयविशेषीं सरकारी कामाकरितां बळजोरीनें घेतलेलें तूप. ०शिस्त-स्त्री. गांवकऱ्यांपासून बळजोरीनें घेतलेलें तूप अथवा तुपाबद्दलचे पैसे. तुपाचा शितोडा-पु. अतिशय थोडें तूप. तुपाची धार-स्त्री. हवें तितकें अथवा भरपूर तूप. तुपाचें नख-न. थेंबभर अथवा नखभर तूप. पातळ तूप पाण्यांत घालून थिजलें असतां त्याचे गव्हल्यासारखे तुकडे करतात ते.

**तूपकेळें**—न. १ एक फळ. यास पेंढरें असेंहि म्हणतात. 'सुरुचिर रचितैसी लागलीं तूपकेळें।' –र ५३. २ ( तंजावर ) पेरू.

**तूंबू**—पु. ( गो. ) नळ; मोरी. [ पोर्तु. ]

**तूर**—स्त्री. १ एक द्विदल धान्य. २ त्याचें काड. [ सं. तुवरः प्रा. तुअर ] ( वाप्र. ) हातावर तुरी देणें-देऊन पळणें-दुसऱ्यास फसवून पळून जाणें. म्ह० १ तुरीची काठी तुरीवर झाडावी=योग्य ठिकाणीं जें करावयाचें तेंच करावें. २ हातावर तुरी देणें. सामाशब्द- ०काठी-स्त्री. ( सामा. ) तुऱ्हाटी; तुरीचें वाळलेलें झाड. तुरीचें बरट-न. तुरीचें भूस.

**तूर**—स्त्री. १ दोहोंकडे टोकें असणारा खिळा; सुरसा. २ ( विणकाम ) विणलेलें वस्त्र ज्या लांकडाभोंवतीं गुंडाळलें जातें तें लांकूड; कोष्टयाची दांडी.

**तूर्ण**—क्रिवि. ( काव्य. ) तावडतोब; शीघ्र. 'स्त्रीवध निंद्य परंतु ब्रम्होक्तें तूर्ण ताटका मारी।' –मो. परंतुरामायण. बाल. ९. [ सं. ]

**तूर्त, तूर्तचे तूर्त, तूर्तातूर्त**—क्रिवि. १ लवकर; सत्वर; तावडतोब; सध्यां; तत्काळ. ( गो. ) तूर्ताक. 'तूर्त तार्किक तनें मनें। तल्लीन होती।' –दा १४.४.१६. २ तात्पुरता; गरजेपुरता; शको. ४. १९ कायमचा होईपर्यंत काम भागविण्यापुरेसा [सं. त्वरित; हिं. तुरत] तूर्त किंमत-स्त्री. पुढें कांहीं काळ गेल्यानंतर जी रक्कम द्यावी लागणार तिची तूर्त किंमत म्हटली म्हणजे तितक्या काळचें व्याज कापून बाकी राहते ती. तूर्तातूर्त ताकीद-स्त्री. कोर्ट कायमचा निर्णय देईपर्यंत एखादी गोष्ट तात्पुरती करूं नये असा मनाई हुकूम; ( इं ) टेंपररी इंजंक्शन.

**तूर्य**—न. तुतारी; एक वाद्य. [ सं. ]

**तूर्या**—स्त्री. तुरीया पहा. 'तोचि ॐकाराचा लेख। तूर्या म्हणावी यासी।' –भज ९१. [ सं. तुरीय ]

**तूल**—पु. कापूस. [ सं. ]

**तूल**—स्त्री. लांबवणूक; उशीर. 'थोडकियांत बंदोबस्त असतां तूल करून सिसारा वाढवावा हें सलाह नाहीं.' –रा ५.१९८.

**तूला**—स्त्री. (प्र.) तुला. बारा राशींपैकीं एक राशि. या राशींत चित्रा (अर्ध), आणि स्वाती व विशाखा (तीन पाद) या नक्षत्रांचा समावेश होतो. [ सं. ]

**तूष्णीं**—न. अतिशय थोडें परिमाण. –क्रिवि. १ निमूटपणें; मुकाटयानें; बोलल्या–अथवा हालचाल केल्यावांचून 'लघुशंकाचमन करोनीं। तूष्णीं स्नान करा सुमनीं।' –गुच ३६.१२८. २ कोणताहि मंत्र न म्हणतां फक्त क्रिया करण्याच्या वेळीं वापरतात. ३ उगीच; केवळ; एरवीं; सहज; कोणताहि विशेष उद्देश अथवा हेतु नसतांना. [ सं. ]

**तूस**—न. ( नाचणी, साळी इ०चा ) कोंडा; भूस. [ सं. तुष; प्रा. तुस=भुसा ] म्ह० तूस कांडून हातास फोड=बिनफायदेशीर कामांत दुःखें व संकटें सोसणें.

**तूंस**—सना. ( राजा. कों. ) तुला.

**तूळ**—स्त्री. १ मेषादि द्वादशराशींपैकीं सातवी राशि. तुला पहा. २ एकीकडे पारडें असून वजनाचे विभाग दांडीवर कल्पिलेले असतात अशी तागडी. ३ रुपयाला कल्पिलेली एक संज्ञा. [सं. तुला]

**तूळ**—न. जमिनीच्या मोजणीचें लांबीचें परिमाण. [सं. तुल्]

**तूळ**—पु. कापूस. 'जळो तूळ इच्छा अशी ज्यासि नाहीं।' –वामन, नामसुधा १.४२. [ सं. तूल ]

**तूळभंजन**—न. ( गो. ) सत्यनाश; कुलक्षय.

**तृण**—न. गवत किंवा कसलेंहि गवताच्या जातीचें तण. 'काय जिंकियेलें मन। जीविता कामातुरा तृण।' –तुगा १७९७. [ सं.; प्रा. तग–न ] ( वाप्र. ) तृणाची गरज–चाड, तृणाइतकी चाड–मुलींच इच्छा नसणें. तृणाची शेज करणें–संततीकरितां स्त्रीनें नवस करणें; प्रसुत झाल्यानंतर नऊ दिवस गवतावर निजणें. म्ह० १ तृणाला चाड आहे ती त्याला नाहीं=तो कोणालाही आवडत नाहीं; किंवा त्याला कोणी मुलींच चहात नाहीं. २ दांतीं तृण धरणें=अभिमान सोडून शरण जाणें.

सामाशब्द– ०कुट, कुटा–पु. गवताचा पेंढा; चुरा. 'मग असत्य तृणकुटा भरिला।'–ज्ञा ३.२५०. ०ग्राही–पु. तैलस्फटिक. तृणमणि पहा. ०चर–वि. वनस्पतीवर अथवा गवतावर उपजीविका करणारा. 'तृणचरांमाजी देखा। कैसी उभी राहिली पिपीलिका।' ०जलूका–स्त्री. सुरवंटाच्या जातीचा एक प्राणी; उंट. चालतांना हा आपलें शरीर कमानदार करतो आणि मागली जागा सोडण्यापूर्वी पुढच्या भागानें नवीन जागेचें आक्रमण करितो. ह्यावरून जन्मांतरासंबंधीं दृष्टांत देत असतांना हिंदु लोक याचें उदाहरण देत असतात. ०जाती–स्त्री. वनस्पतिगण–कोटी. ०तुल्य–प्राय–वत्–वि. कवडीच्या मोलाचा; निरुपयोगी; व्यर्थ; क्षुल्लक; कसपटासमान. ०धान्य–न. १ गवताप्रमाणें उगवणारें धान्य; नाचणी, वरी, सावा, राजगिरा, राळा, देवभात, बरटी, बरग इ० सारखें धान्य. २ कोणतेंहि बेसुमार वाढणारें धान्य. ०मणि–पु. एक प्रकारचें रत्न; तैलस्फटिक; राळ ज्या वृक्षापासुन होते त्या वृक्षाचा हा अश्मीभूत पदार्थ आहे. हा जाळल्यास अगर चोळल्यास थोडा सुगंध येतो. ०वेटी–गवताची दोरी. ०शत्रु–पु. अनाडी न्हावी; न्हावगंड. तृणांकुर–पु. गवताला फुटणारा अंकुर. 'जैसा मेघ वर्षता साचार। आंगणांत उठती तृणांकुर।' तृणाचा शेक–पु. (गवताचा जाळ गवत जळेपर्यंतच असतो यावरून ल.) क्षणिक टिकणारी गोष्ट. पाण्यावरचा बुडबुडा पहा.

**तृतय**—न. (प्र.) त्रितय; तिहींचा समुदाय; त्रय. [सं.]

**तृतीय**—वि. तिसरा–री–रें. [सं.] ०नेत्र–पु. तिसरा डोळा; कपाळाच्या मध्यभागीं असणारा शंकराचा तिसरा डोळा. ०उघडणें–(ल.) अतिशय संतापणें. ०पंथ–पु. (मुरारेस्तृतीयःपंथः =मुरारीचा तिसराच मार्ग; दोहोंपैकीं त्याचें मत कोणाशींच जुळत नाहीं. मुरारिभट्ट हा जैमिनीच्या पूर्वमीमांसेवरील एक भाष्यकार असून त्याचें मत शबरस्वामी व प्रभाकर यांहून भिन्न होतें यावरून) तिसरा मार्ग, मत, समजूत, कल्पना, अनुमान इ०. म्ह० त्यानें तृतीयपंथ केला=ह्याचें तिसरेंच एक. ०पंथी–वि. दुसऱ्याचे विचार खरे न मानतां आपले खरे समजणारा. ०प्रकृति–लिंगी–पु. षंढ; नपुंसक. ०सवन–न. (सोमायागामध्यें शेवटच्या दिवशीं सोमवल्ली कुटून तिचा रस काढतात. तो रस तीन वेळां काढतात व त्या प्रत्येक वेळेस अनुक्रमें प्रात.सवन, माध्यंदिनसवन व तृतीयसवन असें म्हणतात. या तृतीयसवनांत मंत्र म्हणणारांचा सूर चढा असतो यावरून) १ अतिशय उच्च स्वर, आवाज. २ तिप्पट. ०सवनानें म्हणणें–अतिशय मोठ्यानें ओरडून अथवा कर्कश आवाजानें बोलणें. तृतीया–स्त्री. १ शुक्ल अथवा कृष्ण पक्षाची तिसरी तिथि. २ (व्याकरण) एक विभक्ति (तिसरी) [सं.] तृतीयातत्पुरुष–पु. (व्याकरण) एक समास. दोन शब्दांमधील जेथें तृतीयेचा लोप होतो असा समास. जसें:– कृपावलोकन=कृपेनें अथवा कृपेकरून जें अवलोकन तें. तृतीयाप्रकृति–स्त्री. तिसरी प्रकृति अथवा स्वभाव; तमोगुण. –वि. १ तिसऱ्या प्रकृतीसंबंधीं. २ (उप.) नपुंसक; षंढ.

**तृप्त**—वि. संतुष्ट; समाधानी; आनंद पावलेला. [सं.] तृप्ति–स्त्री. (सामा) तृप्त अवस्था; समाधान; संतोष; प्रसन्नता.

**तृषा, तृष्णा**—स्त्री. १ तहान. २ (ल.) महत्त्वाकांक्षा; लालसा; उत्कंठा. (समासांत) तृषा-कुल–क्रांत–तुर–न्वित–पीडित. [सं.] तृषणें–अक्रि. १ (काव्य) तहान लागणें. २ (अक्षरशः व ल.) उत्कंठेनें इच्छा करणें. [सं. तृष्] तृषार्त्त–वि. तहानेनें अतिशय व्याकुळ झालेला. 'तृषार्ता मरुदेशीं। झळे अमृतें वोळली जैसी।'–ज्ञा १८.१६१. तृषित–वि. तान्हेला; तहान लागलेला. [सं. तृषा] तृषेणें–अक्रि. (काव्य) तहान लागणें. 'तृषेलें मन माझें ओळंग।' [सं.]

**ते**—सना. (काव्य) ती हें प्रचारांतील रूप. ती, ही, जी ह्यांबद्दल काव्यांत ते, हे, जे अशीं रूपें येतात. 'दिक्चक्रीं फिरते सदा गरगरां संभाषणीं येई ते।'–कमं २.५१.

**ते**–सना. तो चें अनेकवचन. स्त्रीनें पतीस संबोधावयाचा शब्द.

**ते**—स्त्रीसनाअव. (काव्य) त्या. 'गुणिये आधिष्टीले हृषीकेशें। ते वांचौनिया।'–ऋ १९.

**तें**—सना. तृतीयपुरुषवाचक सर्वनामाचें नपुंसकलिंगी एकवचन.

**तेआं**—सना. (काव्य) त्याच्या; त्या. 'मग वृतांतु सांगितलें। तें तेआंपुढें।'–शिशु ८८५.

**तेउता**—वि. तसा; तितका; तेवढा. 'श्रोतयाचें चित्त बावरे। तेउतेंचि तो व्यापारे।'–विपू ७.८६. –क्रिवि. तिकडे; तेथें. 'मग जेउती वास पाहिजे। तेउती शांतीचि देखिजे।'–ज्ञा ४.१९१.

**तेंकडी**—स्त्री. (गो) फुलें काढण्याची (लांब व बारीक काठी); आंकडी. उदा० सामकाॅं तेंकडी मरे ताॅं?

**तेकां**—स. (राजा. गो.) त्याला. (कु.) तेङ्काॅं. [तो]

**तेख**—पु. त्वेष; रागाचा झटका; एकाएकीं आलेला राग. [सं. तीक्ष्ण] तेखी–वि. रागीट; तापट; तामसी. [सं. तीक्ष्ण]

**तेंगशी**—स्त्री. (गो. कों.) डिकशी; वृक्षाचा किंवा पानाचा अग्रभाग.

**तेगा-घा**—पु १ वांकडी व रुंद पात्याची तरवार. 'चाळीस हजार पठाण नित्य तेघे चमकती।'–ऐपो १०७. २ अभिमान. –वि. देशांत प्रसिद्ध [अर. तेग]

**तेगार**—पु. १ शेत, घर, गुरें इ० जिंदगी; मालमत्ता. २ वेठण; सरंजाम; सामान (बैलांचें). ३ दिमाख; उद्दामपणा. ४ (कर.) नखरा; थेर; चैन. (क्रि० मिरविणें; लावणें; चालविणें; करणें).

**तेगुरी**—पु. (बे.) एक प्रकारचा वेळू.

**तेचो**—सना. (गो. कों.) त्याचा. [तो]

**तेच्यापरास**—क्रिवि. (कों.) त्याच्यापेक्षां. [तो]

**तेज**—न. १ प्रकाश; कांति; लकाकी; पाणी; झकझकी. २ उष्णता; कडक सूर्यकिरण. 'तोय तेज धूमु। ययां वायूसीं संगमु।' –ज्ञा १८.३०८. ३ वैभव; शोभा; उत्कर्ष. ४ गुण; उपयुक्तता; सत्त्व; प्रताप (औषध इ०चा); जोम; उत्साह; गांभीर्य (भाषण इ० चें). ५ वीर्य; रेत. 'देइन तुज निजकन्या, तव तेजातें परा न सोसील।' –मोअश्व ३.१५. ६ तिखटपणा; तीक्ष्णता; झणझणीतपणा. ७ पराक्रम; सामर्थ्य. 'भावितमःप्रशमीं न क्षमही होऊनि तेज देहिं सके।'–मोसभा ५.१९. [सं. तेजस्] सामाशब्द– **तेजगी**–स्त्री. चकाकी; टवटवी; झांक, पाणीदारपणा. **तेजतत्त्व**–न. १ तेजाचें अधिष्ठान; तेजस्वीपणाचें मूळ; नेत्र, सूर्य वगैरेच्या ठिकाणीं राहणारें आद्यतत्त्व. २ ज्ञान; ज्ञानेंद्रिय. 'जे तेजतत्त्वाची आदी।' –ज्ञा १३.८८. **तेजःपुंज**–वि. सूर्य, रत्न, विद्वान, मानमान्यतेचा पुरुष यांना ही संज्ञा लावतात. **तेजवान्, तेजवंत, तेजोमय, तेजस्वी**–वि. १ शोभायमान; कांतिमान्; उजळ; सतेज; उज्वल. २ (ल.) प्रभाववान्; प्रतापी; प्रतिष्ठित; प्रसिद्ध; सन्माननीय; वाणेदार. **तेजस**–वि. तेजस्वी; प्रकाशवान्. 'पैं कमलायतडोळसा। सूर्यकोटि तेजसा।'–ज्ञा११.६९. **तेजःसंकर्षदेश**–पु. (शाप.) (सर्व प्रकाश एकत्र जमण्याचें स्थान). सूक्ष्मदर्शक भिंगांतून निघणारे किरण ज्या ठिकाणीं केंद्रीभूत होतात तो बिंदु. **तेजस्कर**–वि. तेजस्वी; चकाकित; सतेज. **तेजाकार**–पु. सूर्य. 'कां उदय न कीजे तेजाकारें। तंव गगनचि होऊनि असे आंधारें।' –ज्ञा ११.६९३. **तेजस्वी मासा**–पु. चकचकीत व शोभायमान असे एकावर एक चढलेले खवले अंगावर असणारा एक जातीचा मासा. **तेजाळ**–वि. (काव्य.) १ उज्वल; सतेज; चकचकीत; तेजस्वी. 'तोच पारा परम चपळ। न धरवे कोणा तेजाळ।' २ उमदा; भव्य; छानदार; शोभिवंत. **तेजित**–वि. १ झिलई, उजळा दिलेला. २ धार लावलेला. **तेजोभंग**–पु. १ अपमान; अवमान; अपमानपूर्वक अथवा तिरस्कारपूर्वक वागविणें; होणारा अपमान अथवा फजिती. २ तेजाचा, पराक्रमाचा नाश; वीर्यहानि. 'सरकारी शाळांतून मिळत असलेलें शिक्षण भावी पिढीचा तेजोभंग व निरुत्साह करण्याकरितां मुद्दाम वेडयावांकडया रीतीनें दिलें जात आहे.' –टि ३.१३३. **तेजोमय**–वि. प्रकाशमय; तेजस्वी; पाणीदार; भव्य. **तेजोवध**–पु. तेजोभंग; पाणउतारा. **तेजोवृद्धि**–स्त्री. प्रकाश, कांति, शोभा, मोठेपणा, यश इ० कांची वाढ. **तेजोहानि**–स्त्री. १ प्रकाशाची न्यूनता, कमतरता; पराक्रमाची वाढ खुंटणें; वीर्यनाश. २ अपमान; अवमान; प्रतिष्ठा, नांवलौकिक, कीर्ति यांची हानि. **तेजोऱ्हास**–पु. तेजोहानि पहा. **तेजोमेघ**–न. आकाशामध्यें कापसाप्रमाणें विरळ, तेजोयुक्त भाग दिसतो तो; केंद्रीभूत होण्यापूर्वी तेजाची विरलावस्था; पटल; भूर. (इं.) नेब्युला. **तेजोवहमज्जातंतू**–पुअव. तेजाचें ज्ञान करून देणारे किंवा तेजाचें वहन करणारे ज्ञानतंतु.

**तेज**—वि. तीक्ष्ण; तिखट; चलाख. [सं. तेजस्; फा. तेझ्]

**तेजक**—न. एक औषधी पदार्थ, औषध; तेजबळ.

**तेजबळ**—न. एक औषधी.

**तेजाब**—पु. अम्ल; जस्ती पत्र्यास डाग देण्याकरितां वापरण्यांत येणारें द्रव्य. (इं.) नायट्रिक किंवा हायड्रोक्लोरिक ॲसिड. (वाप्र.) ०**काढणें**–(सोनारी) १ सोनें गाळणें. २ हिणकस सोन्यामध्यें दुप्पट चांदी घालून अल्युमिनमच्या भांडयांत नायट्रिक-ॲसिडच्या सहाय्यानें आंच देऊन शुद्ध सोनें काढणें.

**तेजारो**—न. (राजपुताना) अफूचीं कोवळीं बोंडें चेंचून पाण्यांत भिजत घालून त्यांचा अर्क उतरविलेलें पाणी. या पाण्यानें कैफ येतो. –कृषि ५००. [सं. तेजस्]

**तेजिका**—स्त्री. दालचिनी. 'कर्पूर कंकोळ येळा। लवंगा तेजिका रसाळा।' –गीता १२.३००. [सं. त्वक्; गुज. तज]

**तेजी**—स्त्री. भरभराट; चढ; उत्कर्षकाल (व्यापार, किंमत इ०चा). [सं. तेजस्] ०**मंदी**–स्त्री. भावाचा चढउतार; व्यापारांतील चढउतार; उत्कर्ष व अपकर्ष. [तेज+मंद]

**तेजी, तेजिका**—पु. घोडा. –वि. अरबी (घोडा). 'ऐसें सांघितां भेद अपारू। तेजिअंचे।'–शिशु ९३७. 'सुत तेजी तुरगीचे, नळसम सुंदर कदापि न म्हणावे।' –र २. [फा. ताझी] म्ह० हिमायतीचा गाढव, तेजीस लाथ मारितो.

**तेटर**—वि. (व. घाटी) हेकेखोर. टेटर पहा. [ताठर]

**तेंदू**—पु. एक औषधी झाड. [प्रा. तेंदुअ]

**तेंटो**—पु. (गो.कों.) टिटवी. तिंटॉ अर्थ ३ पहा.

**तेड**—पु. (भि.) कांठ. 'तो खाडी तेडी गियो.' –भिल्ली ११. [तट]

**तेड**—स्त्री. तीड शब्द १, २, ३ पहा.

**तेड**—न. १ तडतडी; एक जातीचा वेल. २ एक औषध; निशोत्तर; याच्या वेली असतात. पांढरें व काळें असे याचे दोन प्रकार फुलांवरून मानितात. ही वनस्पति रेचक असून काळी अधिक तीव्र असते. –वगु ४.९३.

**तेडतिपड**—पु. तिरकेपणा. 'आणि कोपरे गुण्यांत असून बाजूंत तेडतिपड नसावा.' –मॅरट ३७. [तेड द्वि.]

**तेडतें**—वि. तसें; तेवढें; तितकें.

**तेंडफळ**—स्त्री. एक झाड; फळ.

**तेड(ड्)ला**—क्रिवि. (कों. राजा.) तेव्हां. 'येतांना येईल लग्न होऊन तेडला मला खा.' –लोक २.२६. [सं. तदा, तद्वेला]

**तेंडली–ले**—स्त्रीन. (कु.) तोंडली–लें पहा. **तेंडोलें**–न. (व) एक फळभाजी. तोंडलें पहा.

**तेंडवा**—वि. (बडोदें) बिबटया (वाघ). 'जंगलांत वाघ असल्यास कोणते जातीचा, म्हणजे लहान तेंडवा अथवा पटाईत वाघ आहे याबद्दल तपास करावा.' –वाघ–सिंहाची शिकार ८.

**तेडा–डी**—वि. तिडा. १ वांकडा; वक्र. 'आहे ऐकतों रंड कुणी मिळविली तेडी।' –राला ५२. २ वांकडा (स्वभाव). 'परी तो खळ दुर्जन तेडा।'–दावि ३०८. ३ आडवा. [सं. तिर्यक्; पं. हिं. तेढा; सिं. टेडो] ०**बांका**–वि. १ वांकडातिकडा: पिरगळलेला. २ (ल.) तिरसट; तुसडा; चिरडखोर; हेकेखोर. [तेढ+बांक]

**तेडामकोडा**—वि. फंदी; चंगीभंगी. 'तेडेमकोडे समलेवाले भले लोक झाले गर्द चुरा।' –पला ४.१३.

**तेढ**—स्त्री. वांकडेपणा. तीड पहा. 'कवलें सारखीं व चांगलीं भाजलेलीं असावीं...त्यांत तेड व तडे नसावेत.' –मॅरट १२.

**तेढवळ, तेढोळ**—पु. तितका काळ, वेळ. –क्रिवि. तितका वेळ; तितक्या लांब वेळेपर्यंत. [तेवढा+वेळ]

**तेढा–ढे**—वि. तिडा–डी, तेडा पहा. **तेढा(डा)गुणाकार**–पु. दशांशांत केलेला संक्षिप्त गुणाकार. **तेढा(डा)भागाकार**–पु. दशांशांत केलेला संक्षिप्त भागाकार. **तेढीबाकी, तेढेंबाकें**–वि. बांकडें; वेडें वांकडें. 'नासिका किंचित् तेढीबाकी होउन...' –बाय ३.१. 'कांहीं तरी तेढेंबाकें उत्तर देत.' –सुर्योदय ६४. **तेढे वारस**–पु. (कायदा) सरळ वारस नसलेला वंशज. 'तक्ता नि०ब, यांत पेशव्यांनीं सीधे वारस व तेढे वारस यांजकडे इनामें चालविल्याबद्दल उदाहरणें २४ आहेत.' –इनाम १०१.

**तेणीं–णें**—सना. (कु.) त्यांनीं–नें. [तो+नी, नें प्रत्यय]

**तेणेसीं**–क्रिवि. (काव्य) त्याच्यासहवर्तमान. 'येकेक पुच्छीं बांधोन। करी गमन तेणेसीं।'–भाराकिष्किंधा १४.८५. [तेणें+सह]

**तेतपर्यंत, तेतपावेतों**—क्रिवि. तेथपर्यंत–पावेतों पहा.

**तेतीस**—वि. तेहेतीस; ३३ ही संख्या. 'तेतीस कोटी सुरवर। अठ्यासि सहस्र ऋषेश्वर।' –दा ९.५.३१. [सं. त्रयस्त्रिंशत्; प्रा. तित्तीस; हिं. तेतीस] ०**कोटी देव**–पुअव. १ देवांचे तेहतीस वर्ग. 'त्रयस्त्रिंशद्वै देवा अष्टौ वसव एकादश रुद्रा द्वादशादित्याः प्रजापतिश्च वषट्कारश्च।' –ऐब्रा १.१०. २ (सामान्य समजुतीप्रमाणें) देवांची तेहतीस कोटी संख्या.

**तेतुला**—वि. (काव्य) तितका; तेवढा. 'ऐसें चेष्टाजात तेतुलें। आपणची जो।' –ज्ञा ४.१११. (अव.) तेतुलेआं–यां. तितला पहा. 'तेतुलेंआं वासरूं भांते।' –दाव ७४. [सं. तावत्; प्रा. तेत्तुल]

**तेतु, तेतूर, तेतूर**—क्रिवि. (कों. कु.) त्यांत.

**तेथ**—क्रिवि. (काव्य) तेथें. [सं. तत्+स्था] **तेथचा–ला, तेथील**–वि. त्या जागचा–जागेसंबंधीं. [तेथें] **तेथपर्यंत, तेथपावेतों, तेथवर, तेथवेरी**–क्रिवि. १ त्या जागेपर्यंत. २ त्या वेळेपर्यंत, कालापर्यंत. **तेथपासून, तेथून, तेथोन**–क्रिवि. १ त्या जागेपासून; त्या वेळेपासून. (अशिष्ट) तेथने. **तेथें**–क्रिवि. त्या ठिकाणीं, जागीं. [सं. तत्र; प्रा. तथ्थ]

**तेदी(दू)स, तेद्यां**—क्रिवि.(गो.) त्या दिवशीं. [ते(तो)+दिवस]

**तेदो**—वि. (कु. कों.) तेवढा.

**तेदोणां**—वि. (गो.) तेव्हां.

**तेंद्रा**—वि. (व.) वेडेचार करणारा.

**तेधवळ, तेधोळ**—तेढवळ, तेढोळ पहा.

**तेधवां**—क्रिवि. (काव्य.) तेव्हां. 'परमानंदें राया दुर्योधन भूप तेधवां डोले।' –मोकर्ण ७.२७. [सं. तदा]

**तेनक**—पु. (संगीत) प्रबंधाच्या सहा अंगापैकीं मंगलार्थ प्रदर्शक एक शब्द.

**तेनीटोप**—वि (गो.) पदरामध्यें दोन्ही बाजूंस कणसाकृति रेशमी पदर असलेलें (लुगडें). [का. तेने=कणीस]

**तेन्नां**—क्रिवि. (गो.) तेव्हां.

**तेपरू**—वि. (कर. नंदभाषा) तेरा. 'रंगाचा भाव तेपरू आणे आहे.' टेप्र पहा.

**तेफ**—स्त्री. (गो.) ढेप.

**तेंबरी**—स्त्री. (गो.) एक झाड. टेंभुरणी; टेंबरें. याच्या पानाच्या विडया चांगल्या होतात. [प्रा. टिंबरु]

**तेंबी**—स्त्री. (गो.) लहान टेंकडीचा माथा, टोंक; टेंब, टेंभा पहा.

**तेम**—पु. १ (गो.) हट्ट. २ (गो.) मस्ती. 'पोराला तेम किती म्हणून सांगू!' [पो. तीमा] **तेम(मे)ली**–वि. (गो.) वादांत हटला असतांहि आपलें खरें म्हणणारा. [तेम]

**तेमकुली**—स्त्री. (गो.) लहान टेंकडी. [तेंबी; टेंब+कुली=अल्पार्थी प्रत्यय]

**तेमूक**—न. (गो.) शिखर; मस्तक. [तेंब]

**तेयां**—सना. (काव्य) त्या. 'तेया सोनें केतकीचें कूंप। चहूं कडे।' –शिशु २५२. [तो] **तेयांसी**–सना. (काव्य) त्यास; तयास. 'करितां अभंग राहिले तेयासी।' –रामदासी २.१८. [तो]

**तेर**—स्त्री. शेताची तिसरी नांगरणी. [सं. त्रि]

**तेर**—पु. (गो.) मोठा रथ [का.]

**तेरका**—स्त्रीअव. गुह्येंद्रियावरील केंस; तारका पहा.

**तेरडा**—पु. एक फुलझाड. याच्या फुलाचे रंग बदलत असतात. [सं. तेरणा] म्ह० तेरडयाचा रंग तीन दिवस=थोडे दिवस भपका दाखवून एखादें कार्य थांबणें.

**तेरतेर**—पु (गो.) बडेजाव; थाट.

**तेरम**—पु. (कु.) अभिमान; ताठा.

**तेरवडी**—स्त्री. अळवडी; पीठ, मसाला इत्यादि घालून अळवाच्या पानाची तळून केलेली वडी. [तेरें=अळू+वडी]

**तेरवां**—क्रिवि. आजपासून मागच्या किंवा पुढच्या तिसऱ्या दिवशीं. आज, काल (उद्यां), परवां, तेरवां. [सं. तृतीयवासरे]

**तेरवी**—स्त्री. (व.) मृताचा तेरावा दिवस; शुद्ध श्राद्धाचा दिवस. [तेरा]

**तेरशी**—स्त्री. त्रयोदशी. 'भाद्रपद तेरशी दिवस सोमवार त्या दिवशीं, दिवस चढला दोन प्रहर।' -ऐपो १५८. [सं. त्रयोदशी; प्रा. तेरस]

**तेरस**—स्त्री. शुक्ल किंवा कृष्ण पक्षांतील तेरावी तिथि. [सं. त्रयोदशी; प्रा. तेरसी; हिं. तेरस]

**तेरसा**—वि तिरवा (डोळा); तिरवें पाहणारा; तिरसा. [सं. तिरस्]

**तेरा**—वि. १३ ही संख्या. [सं. त्रयोदश; प्रा. तेरा; हिं. तेरह; सिं. तेरह; पं. तेरा; गु. तेर; बं. तेर] **तेराबारा**-पुअव. (ल.) वाद; भांडण; तंटा; उभयतांचे व्यवहारांत असलेली लडथड. [तेरा+बारा] (वाप्र.) **तेराबारा चालणें**-वाद चालणें; कलागत चालणें. **तेरावा-वें**-पुन. मृताच्या तेराव्या दिवशीं करावयाची क्रिया. -वि. क्रमानें मोजलें असतां तेरा संख्या येते असा. [तेरा]

**तेराकी**—स्त्री. (गो.) पत्त्यांनीं खेळण्याचा जुगाराचा एक प्रकार. [तेरा]

**तेरी**—स्त्री. (कों.) तेरें; अळवाची एक जात; रानअळू.

**तेरीख**—स्त्री. तारीख; महिन्यांतील दिवस; मिति. 'तेरीख व पत्रें यांचे सांगण्याखेरीज लेहूं नये.' -मराचिस १८. [तारीख]

**तेरीज**—स्त्रीन. १ एकत्र बेरीज करण्याकरितां क्रमानें मांडलेल्या रकमा. २ अनेक रकमा जुळवून एका सदराखालीं गोळाबेरीज करणें. ३ अशा प्रकारानें केलेली गोळाबेरीज. -न. १ एकत्र बेरीज करण्याकरितां मांडलेल्या वेगवेगळ्या रकमांची मालिका. २ अशा प्रकारच्या रकमा ज्यावर मांडल्या आहेत तो कागद, पत्रक; ताळेबंद; बोटखत. [त्रीज; हिं. तीरज]

**तेरीमेरी**—स्त्री. हमरीतुमरी; अरेतुरेवर आलेलें भांडण. [हिं. तेरी=तुझी+मेरी=माझी] **०वर-तेरीमेरीस येणें-करणें**-एकेरीवर येणें; अरेतुरे करणें. **तेऱ्यामेऱ्याची काणी-कहाणी**-स्त्री. (गो.) इकडचीतिकडची गोष्ट.

**तेरें**—न. तेरी; लागण न करतां आपोआप रुजणारें अळू. यास पिवळें फूल येतें. याचें पान व कांदा लहान असतो. हें रानांत कोठेंहि येतें; रानअळू. **म्ह०** बहिरें ऐके तेरें आणि अचरट मागे सांबारें.

**तेल**—न. तीळ, खोबरें, भुईमूग, चंदन इ० पासुन पेटण्याजोगा निघणारा एक स्निग्ध व द्रवरूप पदार्थ; पदार्थांतील स्निग्ध अंश. [सं.] तैल; प्रा. तेल्ल; आर्मेनियन तेल] (वाप्र.) **०काढणें**-न. १ पिळून, शोषून घेऊन एखाद्या पदार्थाचा रस, सत्त्व काढणें. २ (ल.) खरपूस चोप देणें; कुटणें. **०घेणें**-(स्त्रीविषयीं हा वाक्प्रचार योजीत असतात) आपल्या स्वतःला देवाकडे लावणें; एखाद्या देवाच्या उपयोगाकरिता कसबीण बनणें; गरतपणा सोडून भावीण होणें. दिव्यांतील थोडेसें तेल डोक्यावर घालण्यानें ती आपला उद्देश जाहीर करते. म्हणून लग्न झालेली स्त्री तेल खरेदी करणें या अर्थी 'तेल घेणें' असें म्हणत नसून 'तेल ठेवणें' असें म्हणते व तिला तेल खरेदी करण्यास सांगावयाचें असल्यास 'तेल घे' म्हणून न सांगता 'तेल टेव' असें सांगण्याचा रिवाज आहे. या अर्थी **तेल जिरविणें** असेंहि म्हणत असतात. जसें-' तिनें येउनिया स्वकरीं। तेल जिरविलें आपले शिरीं।' **०चढविणें-उतरविणें**-(बायकी) उष्टया हळदीचे वेळीं वधूपक्षाकडून वरपक्षाकडे आलेलें तेल परटिणीकडून (किंवा ज्याच्या त्याच्या चालीप्रमाणें एखाद्या स्त्रीकडून) वराच्या पावलास, अंगास व डोक्यास आंब्याच्या पानानें तीन वेळ लावणें. आणि तोच अनुक्रम तीन वेळ उलटा करणें:-म्हणजे तेल उतरविणें. **(पाठीला) तेल लावून ठेवणें**-मार खाण्याची तयारी करून ठेवणें. **०लागणें**-(अंगास तेल लावलेला (अभ्यंग) कोणत्याहि कामाला उपयोगी पडत नाहीं यावरून) महाग, दुर्मिळ, अप्राप्त होणें, असणें (मनुष्य, वस्तु इ०). **०घालणें**-(एखाद्या कामांत त्या) कामाची खराबी होईल अशी कांहीं तरी वस्तु अथवा भीड मध्यें घालणें. **म्ह०** १ तेल जळे पीडा टळे. २ तेल गेलें तूप गेलें हातीं धुपाटणें आलें=दोन फायद्याच्या गोष्टी असतां मूर्खपणामुळें हातच्या दोन्ही जाऊं देऊन मनुष्य पुनः कोराकरकरीत राहणें अशा अर्थी योजितात. सामाशब्द- **०कट-कटी, तेलकट**-वि. १ ओशट; स्निग्ध; तेलानें युक्त, लिप्त. २ ज्यांत तेल आहे असा (तीळ, खोबरें, इ० पदार्थ). [तेल] **०क(ग)टणें**-अक्रि. तेलानें भरणें, माखणें; भिजणें (वस्त्र, शरीरावयव इ०). **०कट तजेला**-पु. तुळतुळीतपणा; तेलाची चमक. **०कटाण**-स्त्री. तेलकट घाण-वास. **०कटी**-स्त्री. १ तेलाचा चिकट मळ, वळकट्या. २ ओशटपणा. -वि. तेलकट पहा. **०कार**-पु. (गो.) तेली, तेल काढणारा. **०खिस्का**-पु. (माण.) खेडयांतील मानकऱ्याच्या सुवासिनीला लग्नाचें आमंत्रण देण्याकरितां हळदकुंकू, तेल देतात तें. **तेलगंड**-पु. तेल्याला तिरस्कारानें संबोधतात (न्हावगंड शब्दाप्रमाणें). [तेली+गंड प्रत्यय] **तेलगोटी**-तेलरवा पहा.-गांगा ३३. **०घडी**-स्त्री. जखमेवर घालण्याकरितां तयार केलेली, तेलांत बुडवून केलेली कापसाची घडी. **०घाणा**-पु. १ तेलाची घाणी; तेल काढण्याचें यंत्र. २ (शूद्रादि जातींत) गणपतिपूजनापासून लग्न लागेपर्यंत ब्राह्मणानें करावयाचें धार्मिककृत्य. **तेलची**-स्त्री. १ तेलांत, तुपांत तळलेली गोड पुरी; पुरणाची पोळी. 'तेलच्या आणि फेण्या गुरोळ्या

जाण।' -अफला ५७. २ कणकेंत तेलमिठाचें मोहन घालून त्याची तळलेली पुरी. -गृशि १.३९५. ०**तवा**-पु. तळण्याचा तवा; हा पितळीप्रमाणें असतो. ०**तावन**-स्त्री. (ना.) कढई. ०**तिमण**-न. तिमण पहा. ०**तूप घालणें**-(बायकी) लग्न झाल्यावर पहिलीं पांच वर्षें संक्रांतीच्या दिवशीं तेल, तूप, तिळ-गूळ, हळदकुंकू, विडा इ० जिन्नस घेऊन पांच घरीं नवऱ्यामुलीनें नेऊन देण्याची क्रिया. ०**तूप निरांजन**-(गो.) तेल गेलें तूप गेलें हातीं निरांजन आलें या म्हणीप्रमाणें वाक्प्रचार. ०**दिवाळी**-स्त्री. दिवाळीकरितां पाटलानें तेली लोकांवर बसविलेली तेलाची पट्टी, वर्गणी. ०**धार**-स्त्री. पाटलाला वगैरे देण्याकरितां गांवच्या तेल्यावर बसविलेली तेलाची पट्टी. ०**पक**-वि तैलपक्व; तेलांत शिजवलेलें, तळलेलें. ०**पाषाण**-न. (गो.) काळे तुळतुळीत दगड. ०**फळ-साडी**-नस्त्री. (बायकी) लग्नापूर्वी वराकडून वधूला दिली जाणारी देणगी. लग्न लागण्याचे पूर्वी नवऱ्याकडून नवरीकडे पाठविलेलें तेल, साडी, खोबऱ्याच्या वाट्या, नारळ, हळदकुंकू, फराळाचें सामान, करंज्यालाडू इ० सामान; लग्नापूर्वीचा आपुलकीचें व कौतुकाचें चिन्ह दाखविण्याचा हा पहिला प्रकार आहे. ०**बोळ**-पु. बाळंतिणीसाठीं लागणाऱ्या आवश्यक वस्तू. म्ह० पोराचें पोर गेलें आणि तेलबोळाचें मागणें आलें. ०**मीठ**-न. किरकोळ वस्तु, पदार्थ; 'तेलमिटाखालीं-खारीं' इ० प्रकारानें कारक विभक्तींमध्यें हा शब्द योजितात व ह्याचा अर्थ 'हिंगतूप' अथवा 'हिंगधूप' ह्यासारखा होतो. ०**येवप**-(गो.) (तेल येणें) नवरानवरीकडील एकमेकांकडे तेलहळद येणें. ०**रतीब**-पु. प्रत्येक चालू असलेल्या तेलघाण्याच्या मालकानें द्यावयाचा रोजचा तेलाचा रतीब; कर. ०**रवा-गोटी**-पुस्त्री. कढत तेलांतून रवा, गोटी इ० काढावयाचा एक दिव्याचा प्रकार. तेलांतून वस्तु काढतांना जर हात भाजला नाहीं तर काढणारी व्यक्ति निर्दोषी आहे असें समजतात. दिव्य पहा. -गांगा ३३. -गुजा १३. ०**रांधा**-पु. (माण.) देवतेचा स्थापनाविधि व त्यानंतर देवतेस करावयाचा भात, पोळ्या, तेलच्या इ० पदार्थांचा नैवेद्य. 'गोट्यांना तेल शेंदूर लावून त्याच दिवशीं रात्रीं तेलरांधा करतात.'-मसाप ८.४.२५८. ०**वण**-न. १ तेलफळ पहा. लग्नापूर्वीचा सोहाळा. 'जाहलें तेलवण मुहूर्तें। अलंकार वाहिले समस्त।'-कथा ४.८.५५. २ (आगरी) विवाहसमारंभांत सुपांत दिवे लावून नवरी अगर नवरा यांस ओवाळण्याचा विधि. -बदलापूर ३९. ३ दैवज्ञ ब्राह्मणांत विवाहसमारंभांत विड्याच्या पानाला भोंक पाडून तें डोक्यावर धरून त्यांतून मुलीवर तेल पाडण्याचा विधि. -बदलापूर २३६. **तेलवण काढणें, घालणें**-(ल.) चांगला मार देणें; कुटणें. ०**वरी**-स्त्री. तेलची पहा. 'घाऱ्या पुऱ्या तेलवऱ्या विदग्धा।' -सारुह ६.७८. ०**वात**-स्त्री. दिव्यांत तेल घालणें, वाती करणें, दिवे पुसणें इ० दिवे लावण्याच्या पूर्वीची तयारी. ०**वात करणें**-१ दिवाबत्ती करणें. २ दिव्यांमध्यें तेल व वाती घालणें; दिवे पुसणें. ०**वात घालणें**-(बायकी) (दर शनिवारीं मारुतीस) तेल व वात तेथें असलेल्या दिव्यांत नेऊन घालणें व दिवा लावणें. ०**शिपा**-पु. (नाविक) मोठमोठ्या माशांपासून काढलेलें एक साधारण तेल. नावेच्या बाहेरल्या अंगाला लावण्यास ह्याचा उपयोग करितात. जमाबंदीच्या हिशोबांत या शब्दाबद्दल नुस्ता शिपा येवढाच शब्द आहे. ०**शुभ्रात**-स्त्री. एखाद्या प्रसिद्ध देवळांत नंदादीप लावण्यासाठीं आसपासच्या खेड्यापाड्यांवर सरकारी पट्टी बसवून जमविलेलें तेल. [तेल+शुभ+रात्र] ०**स्टाण-साण**-स्त्री. तेलाची घाण. **तेलस-सर**-वि. १ तेलकट. २ तेलट; ज्यांत तेल जास्त आहे असा. ०**साडी**-तेलफळ पहा. 'मग सावित्रीशीं तेलसाडी नेसविती।'-वसा ४६. **तेलाचा टिकला, तेलाची धार**-थोडकेंसें तेल. **तेलाडे**-पुअव (नवीन बनावट शब्द) जमीनींत तलाचे झरे पाहणारे; तेलपारखी. 'उत्तम वाकबगार पानाडे विहिरीस पाणी कोठें लागेल हें सांगण्यांत पटाईत असतात तसेच इकडे तेलाडेहि असतात'-सासं २.१३२. [तेल] **तेलिया**-पु. एक काळा रंग; तेलासारखा तुळतुळीत रंग. [तेल; हिं.] ०**कुमाईत**-पु. घोड्याचा एक रंग. यांत केस लाल कमी व काळे जास्त असावे, पाय गुडघ्यापर्यंत काळे असावे व कपाळावर पांढरा ठिपका असावा. ०**पंचकल्याण**-वि. चारी पाय पांढरे असणारा तेलिया कुमाईत (घोडा). -अश्वप १.२९. **तेली**-पु. तिळाचें वगैरे तेल काढून त्याच्यावर उपजीविका करणारी एक जात; तिच्यांतील एक व्यक्ति; तेल काढणारा व विकणारा. [तेल] म्ह० तेल्याचा बैल सदां आंधळा. ०**खूट**-पु. गांवच्या तेल्यावर प्रत्येक घाण्याबाबत बसविलेला कर. **तेलीण**-स्त्री. तेल्याची बायको; तेल विकणारी स्त्री. 'तेलिणीशीं रुसला वेडा। कोरडी भाकर खातो भिडा।'-तुगा ३२८८. म्ह० तेलणीशीं रुसला अंधारांत बसला. **तेली तांबोळी**-पुअव. तेली, तांबोळी ह्या जातीच्या आणि इतर हलक्या जातीच्या लोकांस व्यापक संज्ञा; अडाणी बहुसंख्याक लोक; हलके, अशिष्ट लोक. [तेली+तांबोळी] **तेलींरी**-स्त्री. (खा.) तेलांत तळलेली पुरी, तेलची. [तेल+पुरी] **तेल्या**-वि. तुळतुळीत; चकचकणारा. झगझगीत; तुकतुकीत (रंग). २ तेल्याबोर; घोड्याचा एक रंग ३ तेलानें लिप्त. माखलेला; तेलकट. [तेल] ०**कुमाईत**-तेलिया कुमाईत पहा. ०**खार, टाकणखार**-पु. एक क्षार. याला चौकीचा टाकणखार असेंहि म्हणतात.

**तेलंग**-पु. तेलंगण अथवा आंध्रप्रांतांतील रहिवासी. मुख्यत्वेंकरून तेथील ब्राह्मण; तेलंगी. [सं. त्रिकलिंग-तिअलिंग-तिलिंग असा अपभ्रंश होऊन पुन्हां त्रिलिंग असें अपूर्व संस्कृत रूप] **तेलंगण**-न. अर्वाचीन आंध्र देश; तेलगू भाषाप्रांत. तेलंगण हें नांव

मुसलमानांनीं रूढ केलें; याचें मूळचें नांव त्रिलिंग (तीन ज्योतिर्लिंगें असणारा प्रदेश) असें आहे. [सं. त्रिलिंग-तैलंग] **तेलंगभट**-पु. १ तेलंगणांतील ब्राह्मण; तेलंगी ब्राह्मण. २ (तेलंगी भिक्षेकरी ब्राह्मण कांहीं मिळाल्याशिवाय घरांतून जात नाहींत यावरून ल.) भोजनसमारंभांत आगंतुकी करणारा, चिकट, लोचट माणूस. **तेलंगा**-पु. तेलंगणांतील मनुष्य; तेलगू माणूस. [तेलंग] **०शिसवा**-पु. (राजा.) अतिशय काळया जातीचें शिसवी लांकूड. **तेलंगी**-वि. १ तेलंगणांतील लोकांसंबंधीं (चाली, रीति, पेहराव, भाषा इ०). २ तेलंगणांतला (माणूस). ३ मांगांची एक पोटजात; ही खानदेशांत आढळते. -अस्पृ ४७-४८. **०कानडी**-एक जात, ही अहमदनगर जिल्ह्यांत आकोलें डांगणांत आहे.

**तेलंगी**—स्त्री. (बे.) कुत्र्याची टोपी. [का. तेल्गी]

**तेलघोसाळें**—न. घोसाळीचें फळ.

**तेलछाप**—वि. (चांभार धंदा) गाय, म्हैस यांची चरबी लावून कमविलेलें (कातडें).

**तेलदोडका**—पु. (ना.) घोसाळें. तेल घोसाळें पहा.

**तेलमुंगी**—स्त्री. रायवळ वाळलेल्या अनघड लांकडाला लागणारी एक मुंगीची जात. ही लहान व काळसर असून कडकडून चावते. 'मुंगी तेलमुंगी डास देशी।' -दा ३.७.६.

**तेलयांव**-पु. (गो) मोठा नळा; ढापा; आढयावरचें कौल. [पोर्तु.]

**तेली**—पु. माशाची एक जात. -गृशि २.४७.

**तेलीचें झाड-लांकूड**—न. माकडीचें झाड पहा.

**तेल्या**—पु. १ खरबुजावरील एक रोग; यानें वेलावर बारीक कीड उत्पन्न होते व वेल वाळतो. -कृषि ५७३. २ जोंधळयावर पडणारा चिकोटा रोग. -कृषि १७०. [हिं.]

**तव**—पु. गूळ, साखर, मेण इ०कांस सुटणारा द्रव, पाझर; चिकी. २ अशा प्रकारच्या पदार्थाचा स्राव; घाम अथवा घाम येणें. (गो.) तेव. [सं. तेम] **तेवट**-वि. (राजा.) अंगीं फार तेव असणारा; वितळणारा; पाझरणारा (साखर, गुळ इ० पदार्थ). [तेव]

**तेवडी**—स्त्री. एक प्रकारचें झाड. ह्यांतून दुधासारखा चीक निघतो. दुधाणी पहा.

**तेवढा**—वि. १ तितका; तितका मोठा. २ तितका पुष्कळ. याच्या उलट जेवढा. एवढा पहा. [सं. तावत्; प्रा. तेवड] **तेवढाला**-वि. तेवढा. **तेवढेंच खरें**-(व.) तेवढेंच खरें; तेवढेंच पुरें!

**तेवणें**—अक्रि. (दिवा) जळणें; प्रदीप्त होणें; लागणें; जळत राहणें, ठेवणें. 'माझे राउळीं तेविला लांबण दिवा।' -वसा २८. [सं. तेजन]

**तेवणें**—क्रि. (राजा.) (गूळ, साखर इ० कांनीं) तेवानें युक्त होणें; पाझरणें; पाघळणें. [सं. तिम्=ओलें होणें-तेम]

**तेवसू**—वि. (नंदभाषा) नऊ. 'ह्या लुगडयाचा भाव तेवसू आहे.'

**तेवी(वि)**—क्रिवि. (काव्य) तसा; त्या जातीचा; तशा प्रकारचा. याच्या उलट जेवी. 'तेविं मी म्हणौनि प्रपंचीं। जिहीं बुद्धी दिधली कृतनिश्चयाची।' -ज्ञा ९.१५०. [सं. तथा; प्रा. तेवँ]

**तेवीस**—वि. २३ संख्या. [सं. त्रयोविंशति; प्रा. तिवीस; हिं. तेवीस]

**तेव्हडा**—वि. तेवढा पहा. 'आमोलेयांचेआं दळभीडा। पुरतां हातियेरू कैचा तेव्हडा।' -शिशु ८८०.

**तेव्हन**—न. (चांभारी धंदा) चामडें मुरविण्यासाठीं जमीनींत पुरलेला पाण्याचा रांजण.

**तेव्ह(हे)ळीं**—क्रिवि. त्या वेळीं. (गो.) तेवोळया. 'तेव्हळीं सर्वेश्वराअें श्रीचक्र-पाणी। धर्मु लागौनि श्रीचरणीं।' -शिशु ७३०. [तेवेळीं]

**तेव्हां**—क्रिवि. १ त्या वेळेस. २ त्या अर्थी. [सं. तदा; प्रा. ताहे] **०पासून**-क्रिवि. त्या वेळेपासून.

**तेष-षी**—तैष=षी पहा.

**तेसणा-ना**—वि. तेवढा; तितका; तसा. 'अवधारा आवडे तेसणा धुंधुरु। परि महातेजीं न मिरवे काय करूं।' -ज्ञा ९.९. 'तेसनींचि गोवळरुवें।' -दाव १०४.

**तेस्ता**—अ. (कु.) त्या दिवशीं.

**तेह**—सना. त्या. [सं. तत्] **०वेळीं**-क्रिवि. त्यावेळीं; तेव्हां. 'तेहवेळीं कुचपर्वताचां घाटीं। ओळघतां डोळें जालें आयेतुटीं।' -शिशु ५६०.

**तेह, तेहट, तेहणें, तेहे, तेहेणें**—तेव, तेवट, तेवणें इ० पहा.

**तेहीं**—सना. (काव्य) त्यांनीं; त्यांहीं. 'मग आणिकु उपचारु केला तेहीं। तो सांगिजैलु आतां।' -शिशु ७७२. [सं. तत्; म. ते+हीं=तृतीया विभक्तीचा प्रत्यय]

**तेहे(ह)तीस**—वि. ३३; तेतीस पहा. [सं. त्रयस्त्रिंशत्] **०कोटी देव**-पुअव. तेतीस कोटि देव पहा. ८ वसु, ११ रुद्र, १२ आदित्य, प्रजापति व वषट्कार मिळून.

**तेहेवार**—पु. (बडोदें) सण; सुटीचा दिवस. 'तेहेवार उत्सव व वार्षिक सनाबद्दल ...' -कारकुनांच्या कर्तव्यासंबंधीं नियम ५. [हिं.]

**तेळचें**—क्रिवि. (गो.) टेहळणें पहा.

**तैं**—क्रिवि. (काव्य) १ तेव्हां; त्या वेळेस; तई. 'जैं मज मूर्च्छा येत्ये, ब्रह्मांड भ्रमतमेचि तैं कोंदे।' -मोकर्ण ५३५. २ तरी. 'हा न पुसता हे गोठी। तरि देवो सोडिते कां गांठी। तैं कैसेनि

आम्हां भेटी। परमार्थेसीं।' -माज्ञा १७.४२८. ? [सं. तदा; प्रा. तइ] ०लागु-क्रिवि. तेव्हांपासून. 'तैंलागु आम्हां आणि डुडुळां थोर वैर।' -पंच ३.११. ०हून-क्रिवि. तेव्हांपासून; तेथून.

**तैख-खी**—तैष-षी पहा.

**तैजस**—वि. तेजस्वी; सतेज; प्रकाशणारा; भव्य. [सं.]

**तैजस**—वि. तेजतत्त्वयुक्त. 'जागृती विश्व अभिमानी। दोनी जाती मावळोनी। तेव्हां मिथ्या प्रपंच स्वप्नीं। तैजस अभिमानी विस्तारी।' -एभा २८.६९

**तैतिल**—न. ज्योतिषशास्त्रांतील बवादि करणांतील चवथें करण. [सं.]

**तैनात**—स्त्री. १ लष्करी अधिकार; लष्करावरील हुकमत. २ रोजमुरा; पगार; नेमणूक. ३ ताबा; हवाला; दिम्मत; काळजी; बरदास्त; व्यवस्था. ४ हुकुमत; दाब; अधिकार. (वस्तु, व्यवहार, माणसें यांवर). ५ सेवा; चाकरी; नोकरी. 'बाजीरावानें त्या शूर शिपायास आपल्या तैनातींत घेतलें.' ६ नेमणूक; सरंजाम. -वि. स्वाधीन. 'चार पागा त्या बाईच्या तैनात केल्या आहेत.' -मदबा १७१. [अर. तईनात] ०जाबता-पु. अनेक तैनाती लोकांच्या तैनातीच्या ठरावाचीं अनेक कलमें ज्यांत लिहिलीं आहेत असा कागद; तैनातीच्या नेमणुका ज्यांत नमूद आहेत ती वही, कीर्द. **तैनाती**-वि. १ वेतनी; पगारी; तैनात असलेला. २ (एखाद्याच्या) अधिकारांत, हुकुमांत ठेवलेला; स्वाधीन केलेला; दुसऱ्याच्या ताब्यांत दिलेली (सैन्याची तुकडी); सोपविलेला; हवालीं केलेला; ताब्यांत दिलेला (एखाद्याच्या निर्वाहाकरिता-जिल्हा, शहर इ०); तैनात केलेला. ३ मदतनीस; दुय्यम (वसुलीसाठीं नेमलेला). ०फौज-स्त्री. स्वतःच्या खर्चानें फौज ठेवून ती दुसऱ्याला लढाईच्या वेळीं द्यावयाचा शिरस्ता. लॉर्ड वेल्स्लीनें देशी संस्थानांकडून ब्रिटिशांच्या हुकमतीखालीं संस्थानिकांच्या संरक्षणासाठीं त्यांच्या खर्चानें फौज ठेवविली ती. (इं.) सब्सिडियरी आर्मी.

**तैनाल**—न. म्यानाचें शेवटचें टोक; तहनाल पहा.

**तैयार-री, तैयारःच्या मेखा**—तयार पहा.

**तैल**—न. तेल पहा -वि. तेलापासून केलेलें; तेलासारखें. [सं.] ०चित्र-न. तेलाच्या रंगांनीं काढलेलें चित्र. (इं.) ऑइलपेंटिंग. [सं.] ०पक्व-पाचित-वि. तेलामध्यें तळून केलेला (जिन्नस). ०बुद्धि-स्त्री. कुशाग्र, तरतरीत बुद्धि; कांहीं एक विषयाचा यत्किंचित् अंश गृहीत झाला असतां त्या सर्व विषयाला व्यापणारी अशी बुद्धि (तेलाचा बिंदु पाण्यावर पडला असतानां तो पसरतो यावरून). -वि. अशा प्रकारच्या बुद्धीचा; फार विद्वान, हुषार. [सं. तैल+बुद्धि] ०यंत्र-न. तेल वापरून त्यापासून शक्ति उत्पन्न करणारें यंत्र, इंजन. (इं.) ऑईल एंजिन. ०वायु-पु. कर्ब आणि प्राण यांच्या मिश्रणानें उत्पन्न होणारा वायु. (इं.) एथिलीन. **तैलाभ्यंग**-पु. शरीर तेलानें माखणें; स्नानापूर्वी अंगास तेल लावणें; न्हाणें. [सं.]

**तैलंग**—पु. आंध्र प्रांत; तेलंग पहा. [सं.]

**तैलंगण, तैलंगभट, तैलंगा, तैलंगी**—तेलंगण इ० पहा.

**तैवज**—स्त्री. पानसुपारी. आदरातिथ्य; सत्कार. [अर. तवाझु=सन्मान, आतिथ्य] ०खर्च-पु. पाहुण्यांना व भेटीस येणाऱ्या मंडळींना पानसुपारी देण्यासाठीं, सत्कारासाठीं केलेला खर्च. 'तैवज खर्च श्रावणमासाचे उत्साहा बद्दल' -वाडसमा ३.१९३.

**तैष**—पु. त्वेष; रागाचा झटका; आवेश. [सं. त्वेष; अर. तैश्] **तैषी**-वि. अत्यंत त्वेष येण्याचा स्वभाव ज्याचा असा; रागीट; कोपिष्ट (मनुष्य).

**तैसा**—वि. (काव्य) तसा; त्यासारखा; त्या प्रकारचा; त्या मार्गाचा. 'सांग नोहे तो कुसुमचाप तैसा।' -र ? -क्रिवि. तसा; त्या प्रमाणें; त्यासारखा [सं. तादृश; प्रा. तइस; म. तसा]

**तैक्ष्ण्य**—न. १ तिखटपणा; तीक्ष्णपणा. २ आवेश जोर; कडकपणा (उष्णता, स्वभाव यांचा). ३ कुशाग्रता (बुद्धीची). ४ कठोरपणा; कडकपणा (भाषणांतील). [सं.]

**तो**—सनापु. तृतीयपुरुषी पुल्लिंगी सर्वनामाचें एकवचन.

**तों**—क्रिवि. १ तंव (-क्रिवि.) पहा. 'आम्ही हें खाऊं न तों यावें। द्रव्य मेळऊन।' -दा ३.४.२५. २ (काव्य) तर. 'मज तों वाटे न गर्व बंधुरसा।' -मोकर्ण ६.३९. [सं. तावत्, तदा; प्रा. ताव, तो]

**तोई**—स्त्री. सोन्याची अथवा रुप्याची जर, कलाबतू; तोय. तुई पहा.

**तोक**—पु. संतोष; तोख पहा. [अर. तौक]

**तोक**—न. लहान बालक; अपत्य. 'रामानुज नगराला येतां मार्गीं रडे जसा तोक।' -मोरामंत्ररामायण, उत्तरकांड २४६. 'स्वतोक पितरा रुचे।' -केका ८५. [सं.]

**तोकटें जाणें**—क्रि. (कु.) नुकसान होणें.

**तोकडा**—वि. १ आंखूड; कमी; कमी लांबीचा; अपुरा. २ (महानु.) थोडा; अल्प. 'तो तोकडेनि विषयसुखे मानसी। थोर पोळे।' -ज्ञाप्र ७६६. [सं. स्तोक]

**तोख-क**—पु. कुत्र्याच्या वगैरे गळ्यांत घालावयाची (लोखंडाची वगैरे) पट्टी; गळपट्टा; गळफांस. [अर. तौक]

**तोख**—पु. (काव्य.) संतोष; आनंद. 'जाणो राधेला दे खगभगवद्वेणु तोख गानें हो।' -मोवन ४.२९. [सं. तोष] **तोखणाय**-स्त्री. (कु.) लाड; हौस; कौतुक. **तोखणें**-क्रि. १ तोषणें पहा. २ वाखाणणें. -शर. **तोखद**-न. तोषद; आनंददायी.

'भीष्माहि शिखंडी हें द्रुत अगदद्वय तुम्हांसि तोखद हो।'—मोभीष्म १.१४. तोखणी—स्त्री. (गो.) वाखाणणी. तोखवचें—क्रि. (गो.) आनंद पावणें.

**तोंगल-ले**—न. १ भाताचें लोंगर. २ बुगड्या, बाळ्या इ० कर्णभूषणांस लाविलेला मोत्यांचा घोंस, झुपका; मोत्यांचें भोकर; कानांतील अलंकार; लोलक. 'तंव बासींगाचीं तोंगलें झळफळितें श्रीनेत्रांवरि येति।' —ऋ १३७. 'कानीं तोंगलें बरवीं शोभती।' —वसा ३५. [का. तोंगु=लोंबणें; तोंगल=झुबका] ०**बाळी**—स्त्री. भोकरबाळी; स्त्रियांच्या कानांतील झुबकेदार दागिना.

**तोंगल**—पु. श्रीमंत मनुष्य. —शर.

**तोंच**—स्त्री. (गो.) चोंच; टोंच. [सं. चंचु]

**तोज**—न. चोज; आश्चर्य; नवल. [चोज]

**तोटक**—न. एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत बारा अक्षरें व स, स, स, स असे चार गण असतात. [सं. त्रोटक; हिं.]

**तोटका-गा**—पु. तोडगा पहा. 'मंत्र मोहरे तोटके सिद्धि। नाना वल्ली नाना औषधी।' —दा ४.१.२०.

**तोटका**—वि. आंखूड; तोकडा पहा.

**तोटका**—पु. (कों. कु.) देवी (अंगावर येणाऱ्या). [तोडगा] **तोटकेकरी**—पु. देवी काढणारा; देवी याव्या म्हणून शरीरावर तोडगा करणारा. —वि. १ देवी टोंचलेला (माणूस). २ पैशाचिक बाधा होऊं नये म्हणून मंत्रतंत्र, जपजाप्य इ० करणारा; तोडगा पहा.

**तोट(ठ)रा**—पु. १ बकुळीचीं फळें, डाळें इ० रुक्ष पदार्थ खाल्यानें घशाखालीं तो पदार्थ न उतरेल अशी होणारी अवस्था; किंवा घशाला कोरड पडून गिळण्यास होणारा प्रतिबंध. (क्रि० बसणें; लागणें). २ (भात इ० ची) लोंबी अगदीं पूर्णदशेस येणें; कणसाची पक्वदशा. (क्रि० येणें). 'भात तोठऱ्यास आलें.'

**तोटा**—पु. १ हानि; नुकसान. २ कमतरता; उणीव; न्यूनता. (क्रि० बसणें; लागणें). 'न पडो भव्या धार्मी तोटा त्याच्या म्हणे शुभ व्याधा मी।' —मोकृष्ण ४७.४८. [सं. त्रुट्; म. तुटणें] ०**पट्टी**—स्त्री. वसुलाची तूट भरून काढण्याकरितां बसविलेली जास्त पट्टी. ०**रोटा**—पु. (सामा.) तूट; नुकसान; हानि; खराबी. 'तोटा-रोटा करून मी दिवस काढतों.' [तोटा द्वि.] **तोट्याची बाब**—स्त्री. नुकसानीचें काम; नुकसान होईल असा व्यवहार, काम, वस्तु.

**तोटा**—पु. १ (खा.) ज्वारीचें ताट. २ काडतूस. ३ बाण (उडविण्याच्या दारूचा).

**तोटी**—स्त्री. १ कारंजें, मोरी, झारी इ०कांस उदकाची बारीक धार पडावी म्हणून लाविलेली बारीक छिद्राची नळी; नळ. २ चिलकांडी; धार. ३ (गो.) झारी. ४ (मुद्रण.) रूळ ओतण्याचा साचा किंवा मूस. [का. तोट्टु=चोंच?]

**तोटी**—स्त्री. मारवाडी, बोहरी स्त्रियांच्या कानांतील एक दागिना. —गुजा १२६.

**तोट्टी**—स्त्री. (तंजा.) १ टांकी; कुंडी. २ पोहरा; बादली. [का.; ता.]

**तोठरा**—पु. तोटरा पहा.

**तोड**—स्त्री. १ इच्छेप्रमाणें होईनासें झालेलें कार्य इच्छेप्रमाणें होण्याकरितां काढलेली युक्ति; तडजोड; समेट. (क्रि० पाडणें; तोडीवर येणें). २ उपाय; क्लृप्ति; कल्पना; तजवीज; युक्ति; शक्कल; गूढ सोडविण्याकरितां काढलेला मार्ग, उलगडा. (क्रि० पाडणें). 'तो पंचवीस म्हणतो, तुम्ही वीस म्हणतां, सरासरी बावीसांवर तोड पाडा.' ३ सर्वोत्कृष्ट, सरस कल्पना, शोध; अपूर्व कृत्य; वरचढपणा 'ह्या चमत्कारिक यंत्रावर कोण्ही तोड करील काय?' 'हा गवई त्याच्या ध्रुवपदावर तोड करील.' ४ अभावणीच्या अर्धेलीचा खोताच्या वहीमध्यें मांडलेला हिशेब. तोड व थळ ह्या दोन शब्दांमध्यें अर्थदृष्ट्या फरक आहे. पहिल्याचा अर्थ हिशेब असा आहे व दुसऱ्याचा अर्थ प्रत्यक्ष मोजलेली रक्कम असा होतो. प्रथम पिकाची अर्धेल अंदाजानें धरून वहींत मांडण्यांत येते नंतर खोत व कूळ यांच्या परस्पर संमतीनें प्रत्यक्ष वसूल किती घ्यावा हें ठरविण्यांत येतें, याप्रमाणें ठरलेला करार, व ठरविलेला वसूल. ५ एका बाजूनें घडलेला, साफ केलेला धोंडा; एकांगी चौरस दगड; इमारतीस लागणाऱ्या दगडाचा एक प्रकार. ह्याचें मागील तोंड पुढच्या तोंडापेक्षां सुमारें चार इंच कमी असतें. हा एका बाजूनें साफ व घडीव असतो. 'चबुतरे अगर ओटे तोडीच्या दगडाचे बांधतात.' —भू १. ६ (मल्लविद्या) आपल्यावर केलेल्या डावाचा प्रतिकार, त्याविरुद्ध करावयाची क्रिया, युक्ति. ७ लांकूड इ०. तोडण्याकरितां त्यांत कुऱ्हाड इ०नीं छेद करितात, घाव मारतात ती. 'त्या लांकडास वीतभर तोड घेतल्यावांचून तें तुटणार नाहीं.' ८ लांकडाचा, दोरीचा वगैरे तोडलेला तुकडा; तोडणी. ९ बांबूचें नळकांडें. —बदलापूर १३३. १० एक बदललेली चाल (लावणी इ०च्या कडव्यांतून रूढ); पद म्हणण्याची वेगळी धाटणी. [सं. तुड्=तोडणें; प्रा. तोड] ०**करणें**—मात करणें; पुढें जाणें. 'पुढें कित्येकांनीं यावरही तोड करण्याचें मनांत आणलें.' —नि ८. **तोडीवर घेणें**—समेट करणें; तोड पाडणें. **तोडीस नेणें**—वादांतील मुद्द्यांचा निकाल लावणें. **तोडीस तोड देणें**—डावावरडाव करणें.

**तोड**—स्त्री. १ (व्यापक) (एकसारखा, समान) डौल; आकार; प्रकार; मान; माप; सांचा; मूस. 'ह्या तोडीचा घोडा कोठें नाहीं.' २ जोड, बरोबरी करणारी व्यक्ति, वस्तु इ० 'हा बैल त्या बैलाची तोड आहे.' [का. तोडु=जोडी, सारखेपणा]

**तोड**—स्त्री. (तंजा.) कोंदण केलेली हिऱ्याची कुडी. [का.; ता.]

**तोड**—स्त्री. (ना.) (सोंगट्याच्या खेळांत) पहिल्यांदा शत्रूची सोंगटी विशिष्ट प्रकारें मारून आपल्या सोंगट्या घरांत जावयास मार्ग करतात ती. (कर.) तोडी. [तोडणें]

**तोड**—पु. (ना.) अनावर इच्छा; लगट. 'तापानें फणफणणारा इसम पाण्यावर फार तोड करतो.'

**तोंड**—न. १ ज्यानें खातां व बोलतां येतें तो शरीराचा अवयव; मुख; वदन; तुंड. २ चेहरा; हनुवटीपासून डोक्यापर्यंत मस्तकाचा दर्शनी भाग. ३ (सामा.) (एखाद्या वस्तूचा) दर्शनी भाग; पुढचा-अग्रभाग; समोरील अंग. 'या ओझ्याच्या तोंडीं मात्र चांगल्या चांगल्या पेंढया घातल्या आहेत.' ४ (फोड, गळूं इ० कांचा) छिद्र पडावयाजोगा, छिद्रासारखा भाग; व्रणाचें मुख. यांतूनच पुढें पू, लस इ० वाहतात. ५ (कुपी, तपेली, लोटी इ० कांचें) पदार्थ आंत घालावयाचें भोंक; द्वार; मार्ग; मुख. ६ (एखाद्या विषयांत, शास्त्रांत, गांवांत, देशांत, घरांत) शिरकाव होण्याचा मार्ग; प्रवेशद्वार. 'ह्या घराचें तोंड उत्तरेस आहे.' ७ (ल.) गुरुकिल्ली. उदा० 'एखाद्या प्रांताचें, देशाचें किल्ला हें तोंड होय.' 'व्याकरण भाषेचें तोंड होय.' ८ (वारा इ०कांची) दिशा; बाजू. ९ धैर्य; दम; उमेद; एखादें कार्य करण्याविषयींची न्यायतः योग्यता. १० एखाद्या पदार्थाचें ग्रहण किंवा त्या पदार्थाचा एखाद्या कार्याकडे विनियोग इ० कांचा आरंभ त्या पदार्थाच्या ज्या भागाकडून करितात तो भाग. 'भाकरीस जिकडून म्हटलें तिकडून तोंड आहे.' ११ (युद्ध, वादविवाद इ०कांसारख्या गोष्टींची) प्रारंभदशा. 'वादास आतां कुठें तोंड लागलें.' १२ (सोनारी धंदा) हातोडयाच्या सगळयांत खालच्या बाजूस अडिश्रीच्या बुडासारखा जो भाग असतो तो. यानें ठोकलेला जिन्नस सारखा करून घेतात. १३ (सोनारी धंदा) कांबीस गोल आकार देतांनां तिचीं टोंकें जेथें जुळतात तो भाग. १४ (बुद्धिबळें) डाव सुरू करण्याचा प्रकार; मोहरा. 'वजीराच्या प्याद्याचें तोंड.' [सं. तुंड; प्रा. तोंड] (वाप्र.) **०आटोपणें, सांभाळणें, आवरणें**—जपून बोलणें; बोलण्याला आळा घालणें; अमर्याद भाषण, अभक्ष्यभक्षण यांपासून निवृत्त होणें. **०आणणें**—(आटयापाटयांचा खेळ) शेवटची पाटी खेळून जाऊन पुन्हां एक एक खेळत येणें; पाणी आणणें; लोण आणणें. **०आंबट करणें**—(एखाद्यानें) असंतुष्ट, निराशायुक्त मुद्रा धारण करणें. **तोंड आहे कीं तोबरा**—खादाड किंवा बडबडया माणसास उद्देशून वापरावयाचा, 'किती खातोस'' किती बोलतोस' या अर्थाचा वाक्प्रचार. **०उतरणें**—(निराशा, आजार इ०कांनीं) चेहरा म्लान होणें, सुकणें, फिका पडणें, निस्तेज होणें. **०उष्टें करणें**—(अन्नाचा) एखादा-दुसरा घांस, एक दोन घांस खाणें; जेवणाचें नुसतें नांव करणें. **०करणें**—बडबड, वटवट, बकबक करणें; उद्धटपणानें, निर्लज्जपणानें बोलणें. **०करून बोलणें**—निर्लज्जपणें, आपला (लहान) दर्जा सोडून बोलणें. **०काळें करणें**—(उप.) एखादा ठपका, तोहमत अंगावर आल्यामुळें निघून, पळून, निसटून जाणें; हातावर तुरी देणें; दृष्टीस न पडणें (केव्हां केव्हां तोंड हा शब्द वगळला तरी चालतो. जसें:- त्यांनीं काळें केलें). **०गोड करणें**—१ (एखाद्याला) लांच देणें; खूष करणें. २ मेजवानी देणें; गोड खावयास घालणें. **०गोरेंमोरें करणें**—(कोणी रागें भरल्यामुळें, मनास वाईट वाटल्यामुळें) निराशेची, लाजलेपणाची मुद्रा धारण करणें. **०घालणें**—(दोघे बोलत असतां तिसऱ्यानें) संबंध नसतां मध्येंच बोलणें. **०घेऊन येणें**—एखाद्यानें एखाद्यावर सोंपविलेलें काम न करतां त्यानें तसेंच परत येणें. 'असें सर्वांनीं न करावें. जो मामलेदार असें करून तोंड घेऊन येईल त्याचें मुखावलोकन न करितां फिरोन सेवा न सांगतां त्यास घरींच बसवावें.' —मराआ २९. **०घेणें**—१ बोंबलत सुटणें; ताशेरा झाडणें; बोंबलपट्टी करणें. २ तोंडांतून लाल गळावी म्हणून पारा इ० तोंड आणणारीं औषधें घेणें. तोंड देणें पहा. 'मी वैद्याकडून तोंड घेतलें आहे.' **तोंडचा**—वि. १ विरुद्ध, उलट दिशेचा; समोरून येणारा (वारा, ऊन, भरती इ०). २ ज्याची कर्तबगारी केवळ तोंडांतच, बोलण्यांतच आहे, क्रियेंत दिसून येत नाहीं असा. 'तोंडचा शिपाई-कारकून-सुग्रण-खबरदार.' ३ तोंडानें सांगितलेला, निवेदन केलेला; तोंडीं केलेला (व्यवहार, हिशेब, पुरावा इ०). याच्या उलट लेखी. **तोंडचा, तोंडींचा घास काढणें-हिरून घेणें**—१ (एखाद्याची) अगदीं आटोक्यात आलेली वस्तु, पदरीं पडावयास आलेला लाभ हिसकावून घेणें. २ (एखाद्याच्या) अन्नावर पाणी पाडणें; अन्नांत माती कालविणें; पोटावर पाय देणें. **तोंडचा-तोंडींचा घांस देणें**-(ल.) (एखाद्यास) अतिशय प्रेमानें, ममतेनें वागविणें; प्रसंगविशेषीं आपण उपाशी राहून दुसऱ्यास खावयास देणें. **तोंडचा गोड आणि हातचा जड**—बोलण्यांत गोड व अघळपघळ, पण प्रत्यक्ष पैशाची मदत करण्यांत शून्य. **तोंडचा चतुर**—वि. बोलण्यांत पटाईत; वाक्पटु. **तोंडचा जार**-पु. नुकत्याच जन्मलेल्या मुलाच्या तोंडातील फेंस; चिकटा; ओंठावरचा जार; जन्मप्रसंगींचा तोंडावरचा पातळ पापुद्रा (विशेषतः तुझ्या,त्याच्या तोंडाचा जार वाळला नाहीं. =तूं, तो अजून केवळ बालक आहेस.' अशा वाक्यांत उपयोग). **तोंडचा नीट**—वि. १ बोलून भला, चांगला; बोलकाचालका; सौजन्ययुक्त. २ युक्तायुक्त विचार करून बोलणारा. ३ हजरजबाबी; अस्खलित बोलणारा. **तोंडचा फटकळ**-वि. शिवराळ; उघडतोंडया; अश्लील, शिवराळ भाषण करणारा. **तोंडचा रागीट**—वि. जहाल; तिखट; कडक भाषण करणारा. **तोंडचा शिनळ**—वि. १ इश्कबाज, फंदी म्हणून नांव मिळविण्याची इच्छा करणारा; स्त्रियांची खोटी खुशमस्करी करणारा; स्त्रियांच्या कृपेची खोटीच फुशारकी मारणारा. २ निरर्गल व अश्लील भाषण करणारा; शिवराळ. **तोंड(डा)ची गोष्ट**—स्त्री. सहजसाध्य, अतिशय सोपी गोष्ट, काम. 'वाघ मारणें तोंडची गोष्ट नव्हे.' **तोंड चुकविणें**—हातून एखादा अपराध घडला असतां

कोणी रागें भरेल या भीतीनें, काम वगैरे टाळण्यासाठीं चुकारतट्टूपणानें एखाद्यापासून आपलें तोंड लपविणें; दृष्टीस न पडणें; छपून असणें. **०चे तोंडीं**–क्रिवि. प्रत्यक्षाप्रत्यक्ष; तोंडानें; बोलाचालीनें. **०चे तोंडीं व्यवहार**–केवळ तोंडानें बोलून, बोलाचालीनें झालेला, होणारा व्यवहार, धंदा. याच्या उलट लेखी व्यवहार. **०चें पायचें**–न. (कों.) गुरांच्या तोंडास व पायांस होणारा रोग. **०चे हिशेब**–पुअव. कागदांवर आंकडमोड न करितां मनांतल्यामनांत कांहीं आडाख्यांच्या मदतीनें करावयाचे हिशेब. **तोंडचें, तोंडावरचें पाणी पळणें; उडणें, तोंड कोरडें पडणें**–१ (भीतीमुळें) चेहरा फिका पडणें; बावरून, घाबरून जाणें. २ (भीति इ० कांमुळें) तोंडांतील ओलावा नाहींसा होणें. **तोंड टाकणें–टाकून बोलणें**–१ (क्रोधावेशानें) अपशब्दांचा वर्षाव करणें; निर्भर्त्सना करून बोलणें; खरडपट्टी काढणें; अद्वातद्वा बोलणें. 'तूं नोकर–माणसांवर उगीच तोंड टाकलेंस.' २ (घोडा इ०जनावरानें) चावण्यासाठीं तोंड पुढें करणें. 'ह्या घोड्याला तोंड टाकण्याची भारी खोड आहे, ती घालविली पाहिजे.' **०ठेचणारा–फाडणारा**–वि. (एखाद्या) उद्धट, बडबड्या माणसास गप्प बसविण्याची हातोटी ज्यास साधली आहे असा; उद्दामपणानें, गर्वानें बोलणाऱ्या व्यक्तीस रोखठोक उत्तर देऊन चूप बसविणारा. [तोंड+ठेचणें] **०तोडणें**–(ना.) एखादी वस्तु मिळविण्याकरितां एखाद्याच्या पाठीस लागणें; त्याच्यापुढें तोंड वेंगाडणें. **०दाबणें**–लांचलुचपत देऊन (एखाद्याचें) तोंड बंद करणें; (एखाद्यास) वश करणें; गप्प करणें. **०दाबणारा**–वि. लांच देऊन (एखाद्या) प्रतिकूल व्यक्तीस वळविणारा; गप्प बसविणारा. [तोंड+दाबणें=बंद करणें] **०दाबी**–स्त्री. (एखाद्यानें) गुप्त बातमी फोडूं नये म्हणून, प्रतिकूल बोलूं नये म्हणून (त्यास) लांच देऊन त्याचें तोंड दाबण्याची, वश करण्याची क्रिया. 'तो गांवकामगारांची तोंडदाबी करतो.' –गुजा २१. [तोंड+दाबणें=बंद करणें] **०दिसणें**–एखाद्याची केलेली निर्भर्त्सना दुसरी बाजू न कळतां लोकांच्या नजरेस येणें व आपणच वाईट ठरणें (पण ज्याची निर्भर्त्सना केली असेल त्याचें वर्तन सुधारण्याची आशा नसणें). 'मी तुला रागें भरलों म्हणजे माझें तोंड मात्र दिसेल, पण तूं आपला आहे तसाच राहणार' **०देणें**–१ पारा वगैरे देऊन तोंडाच्या आंतील त्वचा सुजविणें; तोंड आणविणें. 'वैद्यबोवा म्हणाले कीं त्याला तोंड दिलें आहे.' २ सैन्याच्या अग्रभागीं राहून शत्रूवर हल्ला करणें ३ (एखाद्याचा) प्रतिपक्षी होऊन राहणें; लढावयाला सिद्ध होणें. ४ (आट्यापाट्यांचा खेळ) शेवटची पाटी खेळून परत येणाऱ्या गड्याकडे पाटी धरणारानें तोंड फिरविणें. ५ एखाद्या गोष्टीला न भितां तींतून धैर्यानें पार पडण्याची तयारी ठेवणें. **०धरणें**–१ अन्नसेवन करण्याची तोंडाची शक्ति आजार वगैरे कारणांमुळें नाहींशी होणें. 'त्याचें तोंड धरलें आहे, त्याला चमच्याचमच्यानें दूध पाजावें लागतें.' २ (एखाद्याची) बोलण्याची शक्ति नाहींशी करणें. ३ (एखाद्याला आपल्या) तावडींत, कबजांत आणणें. 'मी त्याचें तोंड धरलें आहे, तो आतां काय करणार!' **०धुवून येणें**–(उप.) एखाद्याची विनंति कधींहि मान्य होणार नाहीं असें म्हणून फेटाळून लावतांना योजण्याचा तिरस्कारदर्शक वाक्प्रचार. **०निपटणें**–(आजार, उपवास इ० कारणांमुळें एखाद्याचे) गाल खोल जाणें, चेहरा सुकणें. 'महिनाभर हें मूल तापानें आजारी होतें, त्याचें तोंड पहा कसें निपटलें आहे तें.' **०पडणें**–१ सुरवात होणें. 'लढाईस तोंड पडलें.' २ (गळूं इ०कांस) छिद्र पडणें; फुटणें; वाहूं लागणें. **०पसरणें–वेंगाडणें**–१ खिन्नपणाची, केविलवाणी मुद्रा धारण करणें. २ हीनदीनपणानें याचना करणें. **०पाघळणें**–१ न बोलावयाची गोष्ट कोणाएकापाशीं बोलून टाकणें; बडबडणें. २ (ल.) गुप्त गोष्ट बाहेर फोडणें, फुटूं देणें. **०पाडणें**–एखादें कोडें सोडविण्यास, वेढा फोडण्यास प्रारंभ करणें; भांडणास सुरवात करणें. **०पाहणें**–१ (एखाद्याच्या) आश्रयाची, मदतीची अपेक्षा करून असणें. 'आम्ही पडलों गरीब, म्हणून आम्हांला सावकाराचीं तोंडें पाहण्याची पाळी वारंवार येते.' २ (एखाद्यानें) स्वतःच्या शक्तीचा, कर्तृत्वाचा अजमास करणें. 'तूं असें करीन म्हणतोस, पण आधीं आपलें तोंड पहा!' ३ बोलणाराचें भाषण नुसतें ऐकणें, पण त्यानें सांगितलेलें करावयास किंवा केलेला बोध अनुसरावयास प्रवृत्त न होतां स्वस्थ बसून राहणें. 'म्हणती हाणा, मारा, पाडा, ध्या, काय पाहतां तोंडा।' –मोद्रोण ३.१२५. **०पाहात–बसणें**–काय करावें, कसें करावें या विवंचनेंत असणें. **०पिटणें**–बडबड करणें. 'पश्चिमद्वारींचें कवाड। सदा वाऱ्यानें करी खडखड। तैशी न करी बडबड। वृथा तोंड पिटीना।' –एभा १०.२३१. **०फिरणें**–१ आजारानें, पदार्थाच्या अधिक सेवनानें तोंडाची रुची नाहींशी होणें; तोंड वाईट होणें. २ तोंडांतून शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें. 'तो रागावला म्हणजे कोणावर त्याचें तोंड फिरेल ह्याचा नेम नाहीं.' **०फिरविणें**–१ तोंडाची चव नाहींशी करणें. २ शिव्यांचा वर्षाव करीत सुटणें. 'तो रागावला म्हणजे तुमच्यावर देखील तोंड फिरवावयाला कचरणार नाहीं.' ३ (वितळत असलेला किंवा तापविला जात असलेला धातु इ० कानें) रंगामध्यें फरक दाखविणें, रंग पालटणें. 'ह्या तांब्यानें अद्याप तोंड फिरविलें नाहीं, आणखी पुष्कळ आंच दिली पाहिजे.' ४ दुसऱ्या दिशेकडे पाहणें; विशिष्ट गोष्टीकडे लक्ष्य न देतां इतर गोष्टींकडे प्रवृत्ति दाखविणें. ५ गतीची दिशा बदलणें; दुसऱ्या दिशेला, माघारें वळणें. **०फुटणें**–१ थंडीमुळें तोंडाची बाह्य त्वचा खरखरीत होणें, भेगलणें. २ (एखाद्याची)

फजिती उडणें; पत नाहींशी होणें; नाचक्की होणें; अभिमान गलित होण्याजोगा अपमान, शिक्षा इत्यादि होणें. **०बंद करणें**–१ जीभ आवरणें; जपून बोलणें. २ (एखाद्याला) लांच देऊन गप्प बसविणें, वश करून घेणें. **०बंदावर राखणें**–खाण्याला किंवा बोलण्याला आळा घालणें. 'तूं आपलें तोंड बंदावर राखिलें नाहींस तर अजीर्णानें आजारी पडशील.' **०बांधणें**–लांच देऊन (एखाद्याचें) तोंड बंद करणें; (एखाद्यानें) गुप्त गोष्ट फोडूं नये म्हणून पैसे देऊन त्यास गप्प बसविणें. **०बाहेर काढणें**–१ तोंड दाखविणें; राजरोसपणें समाजांत हिंडणें (बहुधां निषेधार्थी प्रयोग). 'तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यानें आज दोन वर्षांत एकदांहि तोंड बाहेर काढलें नाहीं.' २ फिरण्यासाठीं, कामकाजासाठीं घराबाहेर पडणें. **०बिघडणें**–तोंड बेचव होणें; तोंडास अरुचि उत्पन्न होणें; विटणें. **–०भर–भरून बोलणें**–भीड, संकोच, भीति न धरतां मनमोकळेपणानें भरपूर, अघळपघळ बोलणें; दुसऱ्याचें आणि आपलें समाधान व्हावयाजोगें अघळपघळ बोलणें. **०भरून साखर घालणें**–(एखाद्याचें) तोंड साखरेनें भरणें; (एखाद्याच्या) कामगिरीबद्दल, विजयाबद्दल संतोषादाखल त्याचें तोंड साखरेनें भरणें; (एखाद्याच्या) कामगिरीबद्दल गोड, भरपूर मोबदला देणें. **०मागणें**–(आटयापाटयांचा खेळ) लोण घेऊन परत जातांना पाटीवरील गडयास आपणाकडे तोंड फिरविण्यास सांगणें. तोंड मागितल्यावर पाटीवरील गडी आपलें तोंड फिरवितो त्यास 'तोंड देणें' म्हणतात. **०माजणें**–१ मिष्टान्न खावयाची चटक लागल्यानें साध्या पदार्थाबद्दल अरुचि उत्पन्न होणें. २ शिव्या देण्याची, फटकळपणानें बोलण्याची खोड लागणें. **०मातीसारखें–शेणासारखें होणें**–(आजारानें) तोंडाची चव नाहींशी होणें; तोंड विटणें, फिरणें; अन्नद्वेष होणें. **०मिचकणें**–दांत, ओंठ खाणें. **०येणें**–१ तोंडाच्या आंतल्या बाजूच्या त्वचेस फोड येऊन ती हुळहुळी होणें व लाल गळूं लागणें. २ (कर.) लहान मूल बोलूं लागणें. 'आमच्या मुलाला तोंड आलें आहे.'=तो बोलावयास लागला आहे. **०रंगविणें**–१ विडा खाऊन ओंठ तांबडे लाल करून घेणें. २ (ल.) (एखाद्याचें थोबाड) थोबाडींत मारून लालभडक करून सोडणें. **०लागणें**–(लढाई, वादविवाद, अंगीकृत कार्य इ०कांस) सुरवात होणें. 'तेव्हां युद्धास तोंड लागलें.' –इमं २९०. **०लावणें**–१ (वादविवाद इ०कांस) सुरवात करणें. २ प्यावयासाठीं एखादें पेय ओंठाशीं नेणें. ३ **०वाईट करणें**–निराशेची मुद्रा धारण करणें. **०वाईट होणें**–१ तोंडावर निराशेची मुद्रा येणें २ (ताप इ० कांमुळें) तोंडास अरुचि येणें **०वांकडें करणें**–१ वेडावून दाखविणें. २ नापसंती दर्शविणें. **०वाजविणें**–एकसारखें बोलत सुटणें; निरर्थक बडबड करणें; बकबकणें; वटवट करणें; भांडण करणें. **०वासणें**–१ निराशेनें, दुःखानें तोंड उघडणें व तें तसेंच ठेवणें. २ याचना करण्यासाठीं तोंड उघडणें, वेंगाडणें. **०वासून पडणें**–शक्तीच्या क्षीणतेमुळें, उत्साह, तेज, वगैरे नष्ट झाल्यामुळें, गतप्राण झाल्यामुळें आ पसरून पडणें. 'तो पडला सिंहनिहतमत्तद्विपसाचि तोंड वासून।'–मोगदा ५.२५. **०वासून बोलणें**–अविचारानें बोलणें. 'ऐसें स्वसख्यांपासीं कां गे वदलीस तोंड वासून।'–मोउद्योग ११.२०५. **०विचकणें**–दीन मुद्रेनें आणि केविलवाण्या स्वरानें याचना करणें. **०वेटा(डा)विणें**–(काव्य) (एखाद्यास) वेडावून दाखविण्यासाठीं त्याच्यापुढें तोंड वेडेंवाकडें करणें. **०शेणासारखें पडणें**–(लाजिरवाणें कृत्य केल्यानें) तोंड उतरणें; निस्तेज होणें; काळवंडणें. **०संभाळणें**–जपून बोलणें; जीभ आवरणें; भलते सलते शब्द तोंडांतून बाहेर पडूं न देणें; अमर्याद बोलण्यास आळा घालणें. **०सुटणें**–चरांचरां, फडाफडां, अद्वातद्वा बोलूं लागणें. **०सुरू होणें**–वडवडीला, शिव्यांना सुरवात होणें. **०सोडणें**–१ फडाफडां, अद्वातद्वा बोलूं लागणें; अमर्याद बोलणें. २ आधाशासारखें खात सुटणें; तोंड मोकळें सोडणें. **०हातीं–हातावर धरणें**–तोंड सोडणें (दोन्ही अर्थीं) पहा. **तोंडाचा खट्याळ–फटकळ–फटकाळ–फटकूळ–वाईट–शिनळ**–वि. शिवराळ; तोंडाळ; अश्लील बोलणारा. **तोंडाचा खबरदार–बहादर–बळकट**–वि. बोलण्यांत चतुर, हुषार; बोलण्याची हातोटी ज्याला साधली आहे असा. **तोंडाचा गयाळ, तोंडगयाळ**–वि. जिभेचा हलका; चुरचोंबडा; लुतरा; बडबडया; ज्याच्या तोंडीं तीळ भिजत नाहीं असा. **तोंडाचा गोड**–वि. गोड बोलणारा; गोडबोल्या. **म्ह०** तोंडचा गोड हाताचा जड=गोड व अघळपघळ भाषण करणारा पण प्रत्यक्ष कांहींहि मदत, पैसा न देणारा. **तोंडाचा जड**–वि. रेंगत बोलणारा; फार थोडें बोलणारा; अस्पष्ट भाषण करणारा; **तोंडाचा तिखट**–वि. खरमरीत, स्पष्ट, झोंबणारें, कठोर भाषण करणारा. **तोंडाचा तोफखाना सुटणें**–(एखाद्याची) अद्वातद्वा बोलण्याची क्रिया सुरू होणें; शिव्यांचा वर्षाव होऊं लागणें. **तोंडाचा पट्टा सुटणें–चालणें**–अद्वातद्वा बोलणें; शिव्यांचा भडिमार सुरू होणें; **तोंडाचा पट्टा सोडणें**–(एखाद्यानें) शिव्यांचा भडिमार सुरू करणें; जीभ मोकळी सोडणें; (एखाद्याची) खरडपट्टी आरंभिणें. **तोंडाचा पालट**–पु. रुचिपालट; तोंडास रुचि येईल असा अन्नांत केलेला फेरबदल; अन्नांतील, खाण्यांतील फरक, बदल. **तोंडाचा बोबडा**–वि. बोबडें बोलणारा; तोतरा. **तोंडाचा मिठा**–वि. गोडबोल्या; तोंडचा गोड पहा. **तोंडाचा हलका**–वि. चुरचोंबडा; भडभडया; विचार न करितां बोलणारा; फटकळ. **तोंडाचा हुक्का होणें**–(व.) तोंड सुकून जाणें **तोंडाची चुंबळ**–स्त्री. दुसऱ्यास वेडावून दाखविण्याकरितां चुंबळीसारखी केलेली ओठांची रचना; वांकडें तोंड. **तोंडाची वाफ दवडणें**–

१ मूर्खास उपदेश करतांना, निरर्थक, निरुपयोगी, निष्फळ भाषण करणें. २ ज्यावर विश्वास बसणार नाहीं असें भाषण करणें; मूर्खपणानें बोलणें; वल्गना करणें; बाता मारणें. (या वाक्प्रचारांत दवडणें बद्दल खरचणें गमविणें, फुकट जाणें, घालविणें, काढणें इ० क्रियापदेंहि योजतात). **तोंडाचें बोळकें होणें**–(म्हातारपणामुळें) तोंडांतील सर्व दांत पडणें. **तोंडाचें सुख**–न. तोंडसुख पहा. (वरील सर्व वाक्प्रचारांत तोंडाचा या शब्दाऐवजीं तोंडचा हा शब्दहि वापरतात). **तोंडांत खाणें, मारून घेणें**–१ गालांत चपराक खाणें; मार मिळणें. २ पराभूत होणें; हार जाणें. ३ फजिती झाल्यानंतर शहाणपणा शिकणें; नुकसान सोसून धडा शिकणें; बोध मिळविणें. **तोंडांत जडणें**–थोबाडींत, गालांत बसणें (चपराक, थप्पड इ०). **तोंडांत तीळभर न राहणें**–अगदीं क्षुद्र अशी गुप्त गोष्टहि पोटांत न ठरणें; कोणतीहि लहानसहान गोष्ट गुप्त ठेवूं न शकणें. **तोंडांत तोंड घालणें**–१ (ल) प्रेम, मैत्री इ०कांच्या भावानें वागणें; मोठ्या प्रेमाचा, मित्रपणाचा आविर्भाव आणून वागणें. २ एकमेकांचें चुंबन घेणें. **तोंडांत देणें**–(एखाद्याच्या) थोबाडींत मारणें; गालांत चपराक मारणें; **तोंडांत बोट घालणें**–(ल.) आश्चर्यचकित, थक्क होणें; विस्मय पावणें. **तोंडांत भडकावणें**–तोंडांत देणें पहा. **तोंडांत माती घालणें**–खाण्यास अन्न नसणें; अतिशय हाल, कष्ट सोसावे लागणें. **तोंडांत माती पडणें**–१ (एखाद्याची) उपासमार होणें. २ मरणें. **तोंडांत शेण घालणें**–(एखाद्याची) फजिती करणें; (एखाद्यास) नांवें ठेवणें; खरडपट्टी काढणें. **तोंडांत साखर असणें**–(गो.) (एखाद्याचें) तोंड, वाणी गोड असणें; गोड बोलत असणें. **तोंडांत साखर घालणें**–१ तोंड भरून साखर घालणें पहा. २ (उप.) तोंडांत शेण घालणें. 'सावित्रीबाईच्या तोंडांत लोक जेव्हां फारच साखर घालीत, तेव्हां तिनें दोन तीन जुनेरीं एकत्र शिवून जानकीबाईला द्यावी.' –रंगराव. **तोंडांत साखर पडणें**–(एखाद्याला) आनंदाचा प्रसंग, दिवस येणें. **तोंडांतून ब्र काढणें**–(तोंडांतून) अधिक–उणें अक्षर काढणें, उच्चारणें. 'आंतल्याआंत चूर होऊन मेलें पाहिजे, तोंडांतून ब्र काढण्याची सोय नाहीं.' –विकारविलसित. **तोंडानें पाप भरणें, तोंडें पाप घेणें**–लोकांचीं पातकें उच्चारणें; लोकांचे दोष बोलून दाखविणें; वाईट बोलण्याची हौस यथेच्छ पुरवून घेणें; लोकांचीं पापें उच्चारून जिव्हा विटाळणें. 'कैसीं वो मानुसें। सपाइनि परवंसें। तोंडे पाप घेती कांइसें। वायां वीण।' –शिशु २१६. **तोंडापुढें**–क्रिवि. अगदीं जिव्हाग्रीं; मुखोद्गत. **तोंडापुरता, तोंडावर गोड**–वि. मधुर पण खोटें बोलणारा; दुतोंड्या; वरवर गोड बोलणारा व आंतून कपटी असलेला; उघडपणें प्रिय भाषण करणारा व मनांत निराळेंच असणारा. **तोंडापुरता मांडा**–पु. १ भूक भागेल एवढीच पोळी. २ (ल.) जेमतेम गरज भागेल एवढाच जरूर त्या वस्तूचा पुरवठा. **तोंडार मारप**–(गो.) (एखाद्याच्या) पदरांत चूक बांधणें; वरमण्यासारखें उत्तर देणें. **तोंडार ल्हायो उडप**–(गो.) फार जलद, अस्खलित बोलणें; लाह्या फुटणें. **तोंडाला काळोखी आणणें–लावणें**–बेअब्रू, नापत करणें. **तोंडाला टांकी दिलेली असणें**–देवीच्या खोल वणांनीं तोंड भरलेलें असणें; तोंडावर देवीचे वण फार असणें. **तोंडाला पाणी सुटणें**–(एखादी वस्तु पाहून तिच्यासंबंधीं) मोह उत्पन्न होणें; हांव सुटणें. **तोंडाला पानें पुसणें**–फसविणें; चकविणें; छकविणें; भोळसाविणें; भोंदणें; तोंडावरून हात फिरविणें. 'त्याच्यावर देखरेख करावयाला चार माणसें होतीं, पण त्यानें सर्वांच्या तोंडाला पानें पुसून आपला डाव साधला.' **तोंडाला फांटा फुटणें**–मूळ मुद्दा सोडून भलतेंच बोलत सुटणें; हवें तसें अमर्याद भाषण करूं लागणें. **तोंडावर**–क्रिवि. १ समक्ष; डोळ्यांदेखत. २ (ल.) निर्भयपणें; भीड न धरतां. 'मी त्याच्या तोंडावर त्याला लुच्चा म्हणण्यास भिणार नाहीं.' **तोंडावर तुकडा टाकणें**–(एखाद्यानें) गप्प बसावें, प्रतिकूल बोलूं नये म्हणून त्याला थोडेसें कांहीं देणें. **तोंडावर–ला–तोंड देणें**–१ (एखाद्यास) विरोध करणें; विरुद्ध बोलणें. २ (एखाद्यास) उद्धटपणानें, अविनयानें, दांडगेपणानें उत्तर देणें; उत्तरास प्रत्युत्तर देणें. **तोंडावर तोंड पडणें**–दोघांची गांठ पडून संभाषण, बोलाचाल होणें. **तोंडावर थुंकणें**–(एखाद्याची) निर्भर्त्सना, छी:थू करणें; धिक्कार करणें. **तोंडावर देणें**–तोंडांत देणें पहा. 'काय भीड याची या कीं तोंडावरी।' –दावि ३०२. **तोंडावर नक्षत्र पडणें**–(एखाद्यानें) तोंडाळपणा करणें; शिवराळ असणें; नेहमीं अपशब्दांनीं तोंड भरलेलें असणें. 'याजकरितां तोंडावर नक्षत्र पडलेल्या पोरास म्या बोलाविलें म्हणून हे मला शब्द लावीत नाहींत.' –बाळ २.१८२. **तोंडावर पडप**–(गो) थोबाडींत (चपराक) बसणें, पडणें. **तोंडावर पदर येणें**–१ वैधव्य प्राप्त होणें. 'तिच्या तोंडावर पदर आला म्हणून ती बाहेर पडत नाहीं.' २ लज्जेनें तोंड लपविण्याजोगी स्थिति होणें. **तोंडावर मारणें**–(एखाद्याला) पराभूत करणें. **तोंडावर सांगणें–बोलणें**–(एखाद्याच्या) समक्ष, निर्भीडपणें, बेडरपणें सांगणें, बोलणें. **तोंडावरून–तोंडावर हात फिरविणें**–(एखाद्यास) गोड बोलून, फसलावून, भुलथाप देऊन फसविणें; भोंदणें; छकविणें. **तोंडाशीं तोंड देणें**–(हलक्या दर्जाच्या व्यक्तीनें वरिष्ठाशीं) आपला दर्जा विसरून, बरोबरीच्या नात्यानें, अविनयानें बोलणें, व्यवहार करणें. **तोंडास काळोखी**–स्त्री. मुखसंकोच; ओशाळगत; गोंधळून गेल्याची स्थिति; बेअब्रू; कलंक. **तोंडास काळोखी, काजळी लागणें**–(एखाद्याची) बेअब्रू, नाचक्की होणें; दुष्कीर्ति होणें; नांवाला कलंक लागणें. **तोंडास काळोखी–काजळी लावणें**–(एखाद्याचें) नांव

**तिरफळ**—स्त्री. (कों.) १ एक झाड. २ -न. त्याचें फळ; चिरफळ पहा. [सं. त्रि+फल]

**तिरवांकडा**—वि. १ वांकडातिकडा उभा राहिलेला, पडलेला. २ ओझरता; कलता. [तिर्यक्+वांकडा]

**तिरंबी, तिरमी**—स्त्री. तुरंबी, तुरमी पहा.

**तिरमणें**—नअक. (कु.) बळ; शक्ति; सामर्थ्य. 'बरें, काय चिंता, तुझी तिरमणें मी पाहीन.'

**तिरमल्ली–ले–ल्या**—पु. नंदीबैल घेऊन भिक्षा मागणारी कर्नाटकांतील एक जात किंवा तींतील एक व्यक्ति. [का. तिरगणें=फिरणें]

**तिरमाणा**—वि. (क.) तटस्थवृत्ति.

**तिरमारो**—पु. (गो.) तिरंदाज. [तीर]

**तिरमिरणें**—अक्रि. तिरमिरी येणें. [तिरमिरी]

**तिरमिरी**—स्त्री. घेरी; भोंवळ; मूर्च्छा. (क्रि० येणें). [का.]

**तिरमी**—स्त्री. १ घेरी; भोंड. (क्रि० येणें). २ उन्हाची झळ. (क्रि० लागणें; पडणें).

**तिरया**—(गो.) एक पशु.

**तिरवट**—वि. तिरपें पाहणारा; तिरळा (डोळा). [तिरवा]

**तिरवड**—स्त्री. (गो.) प्रेत नेण्याची ताटी; तिरडी.

**तिरवड**—पु. (गो.) (सोनारकाम). ठोकण्याचा लहान लांकडी हातोडा.

**तिरवा**—वि. १ तिरळा (डोळा); तिरपा पाहणारा; काणा. २ वांकडा; कलता; एका बाजूस असणारा; तिरपा. [सं. तिर्यक्]

**तिरशिंगराव**—पु. १ तिरसट, चिडखोर माणूस. २ फुशारक्या मारून पराक्रमाचा आव घालणारा माणूस.

**तिरशिं(सं)गी**—स्त्री. नित्य सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं अशा तिन्ही वेळां फुलें येणारें एक झाड. [सं. त्रिसंधि]

**तिरसट**—वि. चिडखोर; तुसडा; चिडका.

**तिरसा, तिरवा**—वि. तिरळा; तिरपा (डोळा); तिरव्या डोळ्याचा (माणूस).

**तिरसी**—वि. (गो.) तिरवा; काणा.

**तिरसुवाद**—वि. (गो.) तिरसट.

**तिरस्कार**—पु. तिटकारा; अनादर; धिक्कार; हेटाळणी; अवमान. [सं.] **तिरस्कारणें**–सक्रि. हेटाळणें; अनादर करणें; धिक्कारणें; तुच्छ मानणें. [तिरस्कार] **तिरस्कारी**–वि. तिटकारी; चिळसखोर; कंटाळखोर; अनादर, धिक्कार मनांत ठेवणारा. [तिरस्कार] **तिरस्कृत**–वि. झिडकारून दिलेला; निंदित; त्याग, अमान्य केलेला; धिक्कारलेला. [सं.]

**तिरस्थळी**—स्त्री. १ काशी, प्रयाग, गया या तीन क्षेत्रांची यात्रा. २ (ल.) इकडून तिकडे होणारे निरर्थक हेलपाटे; त्रासदायक व व्यर्थ प्रवास. ३ वरचेवर लागणाऱ्या पदार्थांची व स्थलांची पांगापांग व गैरसोईची स्थिति; कामाची दाणादाण. ४ मनाची अस्थिरता, चंचलपणा. उदा० 'मी काल येऊन पोंचलों पण अजून माझी तिरस्थळी आहे. [सं. त्रि+स्थळ] (वाप्र.) ०ची यात्रा–स्त्री. काशी, प्रयाग व गया या क्षेत्रांची यात्रा (ल.) दूरदूरच्या व गैरसोयींच्या ठिकाणीं पांगलेलें काम.

**तिरळणें**—अक्रि. फुटणें; तडकणें; पिचणें; तडा जाणें. [तीर]

**तिरळा**—स्त्री. (व.) कुणब्याची एक पोटजात. तिरोळा, तिळोरा, तिळोरी पहा.

**तिरळा**—वि. तिरवा (डोळा अथवा मनुष्य). [सं. तिरस्]

**तिरळातांदळा**—पु. विटीदांडूच्या खेळांत दोन्ही बाजूंनीं खेळणारा एक भिडू.

**तिरळी**—स्त्री. (गो.) दालचिनी.

**तिराईत**—वि. तिरंदाजीमध्यें कुशल. [तीर]

**तिरांटी**—स्त्री. १ (गो.) कागदाचा वंद. २ वस्त्राचा अरुंद फडका. चिरटी, चिरोटी पहा.

**तिरायत**—पु. (गो.) तिऱ्हाईत पहा.

**तिरावचें**—क्रि. (गो.कों.) खात्री पुरविणें, करणें.

**तिराहीत**—वि. तिऱ्हाईत; पहा. मध्यस्थ.

**तिरिंग**—पु. एक वनस्पति (गुरांना खाण्यास वैरणीसारखा याचा उपयोग करतात).

**तिरी, तिरक**—स्त्री. (सोंगट्यांचा खेळ) तिसरे घरीं सोंगटी बसायाजोगा पडणारा फांशाचा डाव; तीन. [सं. त्रि]

**तिरीक**—वि. (विणकाम) तीन तारांचा (धाग्यांचा) समुदाय. एक तिरीक. [सं. त्रि]

**तिरीप–म, उन्हाची तिरीप**—स्त्री. १ सकाळ, संध्याकाळचें कोवळें ऊन. (क्रि० घेणें; घेत बसणें). २ कवडसा; खिडकी, दरवाजा यांतून येणारे किरण; ढगांतून येणारे सूर्यकिरण; छटा.

**तिरीम**—न. दृष्टिमांद्य; बुद्धिमांद्य. –पु. सौम्य प्रकाश.

**तिरुका**—पु. एक पैसा; पाव आणा. 'तिरुका अथवा धान्य झडकरी। मी घालते तुझे पदरीं।'–भवि २२.१०३. [ति=तीन+रुका] **म्ह०** कोंबडीचा खून तिरुका.

**तिरुपन्न, तिरुसष्ट, तिरेचाळ, तिरेचाळीस, तिरेताळ, तिरेताळीस, तिरेपन्न, तिरेसट**—त्रेपन्न, त्रेसष्ट इ० पहा.

**तिरोधान**—न. १ नाहींसा होणें; दडणें अथवा गुप्त होणें. २ झांकण; पदर; म्यान; घर; बुरखा; सामान्यतः आच्छादक पदार्थ. [सं. तिरस्+धान]

**तिरोभाव**—पु. एखादा राग आळवीत असतां त्यांत दुसऱ्या रागाची छाया सामान्य स्वरसमुदायानें उत्पन्न करणें व त्यामुळें मूळ राग झांकून टाकणें. [सं. तिरस्+भाव]

त्यास त्याविरुद्ध तक्रार करतां न येणें; एखाद्यास अन्यायानें वागवून त्याविरुद्ध त्यानें कागाळी केल्यास त्यास बेगुमानपणें शिक्षा करणें. ' बायकांचा जन्म म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार, म्हणतात तें अक्षरशः खरें आहे.'-पकोधं २ (गो.) तोंडाच्या बाता घरा बाईल भीक मागता=बाहेर मोठमोठ्या गप्पा मारतो पण घरीं बायको भीक मागते. सामाशब्द- **तोंड उष्ट**-न. एखादा-दुसरा घांस खाणें; केवळ अन्न तोंडास लावणें; तोंड खरकटें करणें. [तोंड+उष्टें] **०ओळख**-स्त्री. परस्परांचा विशेष परिचय नसतां, चेहरा पाहूनच हा अमुक आहे असें समजण्याजोगी ओळख; (एखाद्याची) चेहरेपट्टी लक्षांत राहून तीवरूनच त्याला ओळखतां येणें; नांव वगैरे कांहीं माहीत नसून (एखाद्याचा) केवळ तोंडावळाच ओळखीचा असणें. 'एखाद्याला वाटेल कीं बाळासाहेबांशीं त्याची तोंडओळखच आहे. ' -इंप ३७. **०कडी**-स्त्री. १ आंतील तुळयांचीं तोंडें बाहेर भिंतींतील ज्या तुळईवर टेवतात, ती सलग तुळई. २ कौलारू छपराचे वासे ज्या सलग तुळईवर टेकतात ती छपराच्या शेवटीं, टोंकास असलेली तुळई. ३ गुरांचें दावें जिला बांधतात ती कडी. ४ (सोनारी धंदा) दागिन्याची शेवटची कडी, नाकें; ज्यांत फांसा इ० अडकवितात ती ( सरी इ० सारख्या दागिन्याची ) टोंकाची, तोंडाची कडी; ( जव्याच्या ) मण्याच्या वगैरे तोंडाशीं ठेवलेली कडी. ५ ( जमाखर्चाच्या वहींतील जमा आणि खर्च या दोहोंबाजूंचा मेळ. हा मेळ === अशा दुलंगीनें. (दुहेरी रेषेनें) दाखविण्याचा प्रघात आहे. 'वहीची खात्याची-तारखेची-तोंडकडी' असा शब्दप्रयोग करितात. (क्रि० मिळणें; जुळणें; येणें; उतरणें; चुकणें; बंद होणें ). [ तोंड+कडी ] **०कळा**-स्त्री. चेहऱ्यावरील तजेला; कांति; तेज; टवटवी. (प्र.) मुखकळा [ तोंड+कळा= तेज ] **०काढप**-(गो.) उपदंश झालेल्या रोग्यास एक प्रकारचें औषध देऊन त्याच्या तोंडांतून लाळ वाहवितात तो प्रकार. ह्या औषधानें तोंड बरेंच सुजतें. [ तोंड+गो. काढप=काढणें ] **०खुरी**-स्त्री. (ना.) गुरांचा एक रोग. **०खोडी**-वि. तोंडाळ; टाकून बोलणारा; तोंड टाकणारा; अशी संवय असलेला. 'परम अधम रुक्मी हा महा तोंडखोडी।'-सारुह ३.७८. [ तोंड+खोड=वाईट संवय ] **०घडण**-स्त्री. तोंडाची ठेवण; चेहरेपट्टी; तोंडवळा. ' या मुलाची बापासारखी तोंडघडण आहे. ' [तोंड+घडण=रचना ] **०घशीं-सों**-क्रिवि. १ जमीनीवर पडून तोंड घासलें जाईल, फुटेल अशा रीतीनें. ( क्रि० पडणें; पाडणें; देणें ). ' तो तोंडघशींच पडे करतां दंतप्रहार बहु रागें । ' -मो. २. (आश्रय तुटल्यानें ) गोत्यांत; पेचांत; अडचणींत; फजिती होईल अशा तऱ्हेनें; फशीं ( पडणें ). [ तोंड+घासणें ] **०घशीं देणें**-दुसरा तोंडघशीं पडे असें करणें. **०चाटथा**-वि. खुशामत करणारा; थुंकी झेलणारा; तोंडासारखें बोलणारा. **०चाळा**-पु. १ तोंड वेडेंवाकडें करून वेडावण्याची क्रिया. २ वात इ०कांच्या लहरीनें होणारी तोंडाची हालचाल, चाळा. **०चुकाऊ-वू-व्या, तोंडचुकारू-चुकव्या**-वि. ( काम इ० कांच्या भीतीनें ) दृष्टि चुकविणारा; तोंड लपविणारा; नजरेस न पडे असा. [ तोंड+चुकविणें ] **०चुकावणी**-स्त्री. ( एखाद्यापासून ) तोंड लपविण्याची, स्वतःस छपविण्याची क्रिया. **०जबानी**-स्त्री. तोंडानें सांगितलेली हकीगत, दिलेली साक्ष, पुरावा. -क्रिवि तोंडी, तोंडानें [ तोंड+फा. झबान् ] **०जाब**-पु. तोंडी जबाब. **०झाडणी**-स्त्री. तिरस्कारपूर्ण उद्गारांनीं झिडकारणें; खडकावणें; खरडपट्टी काढणें. **०देखणा-ला**-वि. आपल्या अंतःकरणांत तसा भाव नसून दुसऱ्याचें म[illegible] राखण्याकरितां त्याला रुचेल असा केलेला (व्यवहार, भाषण, गो[illegible] इ०); खुशामतीचा; तोंडासारखा; तोंडपुजपणाचा. ' प्राणनाथ, मला हीं तोंडदेखणीं बोलणीं आवडत नाहींत. ' -पारिभौ ३५. [ तोंड+देखणें=पाहणें ] **०देखली गोष्ट**-स्त्री. दुसऱ्याची मर्जी राखण्याकरितां केलेलें, खुशामतीचें भाषण. **०निरोप**-पु. तोंडी सांगितलेला निरोप. ' कृष्णास ते हळुच तोंडनिरोप सांगे । ' -सारुह ४९. **०पट्टा**-पु. ( बायकी ). तोंडाचा तोफखाना; अपशब्दांचा भडिमार; संतापानें, जोराजोरानें बेबंदपणें बोलणें. [तोंड+पट्टा=तलवार] **०पट्टी**-स्त्री. (शिवणकाम) तोंडाला शिवलेली पट्टी. ' योग्य तेवढी तोंडपट्टी कातरावी.' -काप्र. १४. **०पाटिलकी**-स्त्री. १ आपण कांहीं न करतां बसल्या जागेवरून लुडबुडेपणानें दुसऱ्यांना हुकुमवजा गोष्टी, कामें सांगणें ( पाटलाला बसल्या जागेवरून अनेक कामें हुकूम सोडून करून घ्यावीं लागतात त्यावरून ). २ (उप.) लुडबुडेपणाची वटवट, बडबड; तोंडाळपणा. 'दुसरें कांहीं न झालें तरी नुसती तोंडपाटिलकी करण्यास कांहीं हरकत नाहीं.' -आगर ३.६१. [तोंड+पाटिलकी= पाटलाचें काम] **०पाठ**-वि. पुस्तकाच्या सहाय्यावांचून केवळ तोंडानें म्हणतां येण्यासारखा; मुखोद्गत. [तोंड+पाठ=पठण केलेलें] **०पालट**-पुस्त्री. १ (अरुचि घालविण्याकरितां केलेला) अन्नांतील फेरबदल. २ अन्नांत फेरबदल करून अरुचि घालविण्याची क्रिया. [ तोंड+पालट=बदल ] **०पिटी**-स्त्री. १ (वडील, गुरु इ० कांची) आज्ञा न मानतां तिचें औचित्य इ०कासंबंधीं केलेली वाटाघाट; ( वडिलांशीं, गुरूशीं ) उद्धटपणानें वाद घालणें; उलट उत्तर देणें; प्रश्न इ० विचारून अडवणूक करणें. ' गुरूंसी करिती तोंडपिटी । ' -विपू १.५७. २ ( दगडोबास शिकविण्याकरितां, विसराळू माणसास पुन्हां पुन्हां बजाविण्याकरितां, थिल्लर जनावरास हांकलण्याकरितां करावी लागणारी ) व्यर्थ बडबड, कटकट, वटवट. [ तोंड+पिटणें ] **०प्रचिती-प्रचीति**-स्त्री. खुशामत करण्याकरितां (एखाद्याच्या) व्यक्तिमाहात्म्यास, भाषणास, अस्तित्वास मान देणें; आदर दाखविणें. [तोंड+प्रचीति] **०प्रचीत**-क्रिवि. १ तोंडासारखें; खुशामतीचें; तोंडापुरतें (भाषण, वर्तन इ० करणें ). २ माणूस ओळखून, पाहून;

माणसामाणसांत तारतम्य ठेवून (बोलणें, चालणें, वागणें). ०**प्रचीत बोलणारा-चालणारा-वागणारा**-वि. माणसामाणसांत तारतम्य ठेवून चालणारा, बोलणारा, वागणारा. ०**फटाकी-फटाली**-स्त्री. तोंडाची निरर्थक बडबड, वटवट, टकळी. [तोंड+ध्व. फटां! द्वि.] ०**फटाला-ल्या**-वि. मूर्खपणानें कांहीं तरी बड बडणारा; बकणारा; वटवट करणारा. [तोंड+ध्व. फटां!] ०**फटथाळ**-वि. तोंडाचा फडकळ;शिवराळ; तोंडाळ; बातेफरास; अंगीं कर्तृत्व नसून लंब्या लंब्या बाता झोंकणारा. ०**फटथाळी**-स्त्री. शिवराळपणा; तोंडाळपणा; वावदूकता. [तोंडफटथाळ] ०**बडबड्या-बडव्या**-वि. निरर्थक वटवट, बडबड करणारा बकबकणारा; टकळी चालविणारा. ०**बंद-बांधणी**-पुस्त्री. गाडीच्या चाकाच्या तुंब्यावरील बाहेरील बाजूचें लोखंडी कडें, पट्टी. आंतील बाजूच्या कडयास कटबंद असें म्हणतात. [तोंड+बंद=बांधणी] ०**बळ**-न. वक्तृत्वशक्ति; वाक्पटुता; वाक्चातुर्य. 'आंगबळ न चांगबळ देरे देवा तोंडबळ.' ०**बळाचा**-वि. ज्याला बोलण्याची हातोटी, वक्तृत्कला साधली आहे असा; तोंडबळ असलेला; भाषणपटु; जबेफरास. ०**बाग**-स्त्री. (राजा.) चेहरेपट्टी; चेहऱ्याची ठेवण, घडण; मुखवटा. ०**बांधणी**-स्त्री.१ तोंडबंद पहा. २ (ढोरांचा धंदा) कातडयाच्या मोटेच्या सोंडेच्या टोंकाकरितां बाजूला शिवलेला गोट. ०**भडभडया**-वि. तोंडास येईल तें बडबडत, बकत सुटणारा; बोलण्याची, बडबडण्याची हुक्की, इसळी ज्यास येते असा; भडभडून बोलणारा. ०**भर**-वि. तोंडास येईल तेवढा; भरपूर. 'हॅमिल्टन यांनीं खर्चवाढीबद्दल तोंडभर मागणी केली होती.' -केले १.१९८. ०**मार**-स्त्री. १ रोग्यावर लादलेला खाद्यपेयांचा निर्बंध, पथ्य. २ एखाद्यास बोलण्याकरितां तोंड उघडूं न देणें; भाषणबंदी. ३ (ल.) (एखाद्याच्या) आशा, आकांक्षा फोल ठरविणें; (एखाद्याचा केलेला) आशाभंग; मनोभंग; निराशा. (क्रि० करणें). ०**मारा**-पु. १ शेतीच्या कामाच्या वेळीं पिकांत वगैरे काम करतांना गुरांच्या तोंडाला जाळी, मुंगसें, मुसकें बांधणें. २ (एखाद्यास केलेली) भाषणबंदी; खाद्यपेयांचा निर्बंध. ३ (प्र.) तोंडमार. तोंडमार अर्थ ३ पहा. ०**मिळवणी**-स्त्री. १ जमा आणि खर्च यांचा मेळ; तोंडें मिळविण्यासाठीं मांडलेला जमाखर्च. २ ऋणको व धनको यांच्यांतील हिशेबाची बेबाकी, पूज्य. ३ मेळ. -शर. ०**मिळवणी खातें**-न. (जमाखर्चे) कच्चें खातें (याचें देणें येणें सालअखेर पुरें करून खुद्द खात्यांत जिरवितात). ०**लपव्या**-वि. तोंड लपविणारा; छपून राहणारा; दडी मारून बसणारा. ०**लाग**-पु.शिंगें असलेल्या जनावरांच्या तोंडास होणारा रोग; यांत लाळ गळत असते. ०**वळख**-स्त्री (प्र.) तोंडओळख पहा. ०**वळण-वळा**-नपु. चेहरा; चर्या; मुद्रा; चेहऱ्याची घडण, ठेवण; रूपरेखा; चेहरामोहरा; चेहरेपट्टी; मुखाकृति; मुखवटा. [तोंड+वळ=रचना] ०**वीख**-न. (ल.) तोंडानें ओकलेलें, तोंडांतून निघालेलें, विषारी, वाईट भाषण, बोलणें. [तोंड+विष] ०**शिनळ, शिंदळ**-वि. अचकटविचकट, बीभत्स बोलणारा; केवळ तोंडानें शिनळकी करणारा. ०**शेवळें**-न. मुंडावळ. -बदलापूर २७७. [तोंड+शेवळें=शेवाळें] ०**सर**-क्रिवि. तुडुंब; तोंडापर्यंत; भरपूर. ०**सरता**-वि. अस्खलित, तोंडपाठ न म्हणतां येण्यासारखा; अडखळत अडखळत म्हणतां येण्यासारखा (श्लोक, ग्रंथ इ०). -क्रिवि. घसरत घसरत; अडखळत; चुका करीत; कसेंबसें; आठवून आठवून. [तोंड+सरणें] ०**सुख**-न. १ एखाद्यानें केलेल्या अपकाराचें शरीरानें प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें केवळ तोंडानें यथेच्छ शिव्यांचा, अपशब्दांचा भडिमार करून त्यांत सुख मानणें. २ जिव्हा मोकाट सोडून वाटेल तसें बोलण्यांत मानलेलें सुख; यथेच्छ व अद्वातद्वा केलेलें भाषण; (एखाद्याची काढलेली) खरडपट्टी; बोडंती. (क्रि० घेणें). ०**सुख घेणें**-(एखाद्याची) खरडपट्टी काढणें, हजेरी घेणें; (एखाद्यावर) शिव्यांचा, अपशब्दांचा भडिमार करणें. ०**सुटका**-स्त्री. १ जिभेचा (बोलण्यांतील) स्वैरपणा; सुळसुळीतपणा; वाक्चापल्य; जबेफराशी; (भाषण इ०कांतील) जनलज्जेपासूनची मोकळीक. २ भाषणस्वातंत्र्य; बोलण्याची मोकळीक. ३ तोंडाळपणा; शिवराळपणा. ४ (पथ्य, अरुची, तोंड येणें इ० कांपासून झालेली) तोंडाची सुटका, मोकळीक; तोंड बरें होणें; खाण्यापिण्याला स्वातंत्र्य. [तोंड+सुटणें] ०**हिशेबी**-वि. अनेक रकमांचा मनांतल्यामनांत चटकन् हिशेब करून सांगणारा बुद्धिमान (मनुष्य); शीघ्रगणक. **तोंडागळा**-वि. (तोंडानें) बोलण्यात, वक्तृत्वशक्तींत अधिक. 'कीं शेषाहूनि तोंडागळें। बोलकें आथी।' -ज्ञा ९.३७०. [तोंड+आगळा=अधिक] **तोंडातोंडी**-क्रिवि. १ समोरासमोर; २ बोलण्यांत; बोलाचालींत. [तोंड द्वि.] **तोंडाळ**-वि. १ दुसऱ्यावर तोंड टाकणारा; शिवराळ; भांडखोर. 'लटिकें आणी तोंडाळ। अतिशयेंसीं।' -दा २.३.१०. २ बडबडया; वाचाळ. [तोंड] म्ह० हाताळ पुरवतो पण तोंडाळ पुरवत नाहीं=शिवराळ माणसापेक्षां चोर पुरवतो. **तोंडाळणें**-उक्रि. बकबक करून गुप्त गोष्ट फोडणें; जीभ पाघळणें. [तोंडाळ] **तोंडोतोंड**-क्रिवि. तोंडापर्यंत; कांठोकांठ; तुडुंब; तोंडसर. **तोंडोळा**-पु. तोंडवळा; चेहरेपट्टी. [तोंड+ओळा, वळा प्रत्यय]

**तोडक**—न. तोडण्याची क्रिया; तटका; तटका तोडणें; एकदम संबंध तोडून टाकणें; तंटा. 'पहिलेंचि तोडक कां गा नाहीं केलें। आतां उपेक्षिलें न सोडी मीं।' -तुगा ४४४२. -वि. भांडखोर; तुटसाळ; ज्याचें कोणाशीं पटत नाहीं असा. [तोडणें]

**तोंडकणें**—अक्रि. (प्रां.) झाडावर पूर्ण वाढून पाडास येणें (आंबे इ०). [तोंड]

**तोडका-गा**—पु. ( विरू. तोडगा. ) तोडगा पहा.

**तोडगरसुळी**—स्त्री. विवाहसमयीं नवऱ्यामुलीनें घालावयाची एक गरसळी, माळ. [ तोड+गरसुळी=गळेसरी ]

. **तोडगा**—पु. १ भूतबाधा, पिशाच्च, रोग इ० नाहींसे करण्याकरितां करितात तो जादूटोणा; मंत्रतंत्र; छाछू; कुवेडें इ०. ( क्रि० करणें; बांधणें ). २ बागुलबोवा; बुजगावणें. ३ कृत्रिम रीतीनें देवी आणण्याकरितां टोंचणें; देवी काढणें; टोंचणें. ४ ज्योतिषी इ० कांनीं सांगितलेलें शुभाशुभविषयक भविष्य घडून येणें; ज्योतिष्यानें सांगितलेल्या शुभाशुभ भविष्याचा, औषध इ० कांचा आलेला पडताळा; प्रत्यंतर; प्रत्यय; अनुभव. ( क्रि० येणें; उतरणें; पटणें ). 'औषधानें जो गुण येईल म्हणून तुम्ही सांगितलें तो माझ्या तोडग्यास आला.' [हिं.] **तोडगेकरी**-वि. देवी टोंचणारा; तोडगा करणारा. [ तोडगा+करणें ]

**तोडजोड**—स्त्री. १ यंत्राचे भाग सुटे, मोकळे करून पुन्हां जोडण्याची क्रिया. २ तडजोड; समेट; न्याय, निवाडा तोडणें; सलोखा घडवून आणणें; घटवटना. (क्रि० पाडणें). ३ ( एखादा व्यवहार सुरळित चालावयासाठीं योजलेला अडचणींतून मार्ग काढण्याचा) उपाय; शक्कल; हिकमत; युक्तिप्रयुक्ति. ४ सावकाराचा तगादा, वादीची मागणी, हक्क इ० कांचा दोघांच्या संमतीनें देवाणघेवाण करून निकाल लावणें. ( क्रि० करणें; पाडणें; लावणें; लागणें ). ५ ( सामा. ) ( कामें इ० करण्याचा ) उरक; झपाटा; शिताफी; आवरशक्ति; आवर; आटोप आणि हातोटी. ६ (-अव.) युक्त्याप्रयुक्त्या; खुब्याखाब्या; क्लृप्त्या. [ तोडणें+जोडणें ]

**तोडणावळ**—स्त्री. ( लाकडें इ० ) तोडण्याची, फोडण्याची मजुरी, खर्च. [ तोडणें ]

**तोडणी**—स्त्री. १ तोडण्याची, कापण्याची, छाटण्याची, तुकडे करण्याची क्रिया. २ तगादा करणें; खनपटीस बसणें; लकडा लावणें; आग्रह करणें. ( क्रि० लावणें; लागणें ). [ तोडणें ]

**तोडणें**—उक्रि. १ शस्त्रानें, कापण्याच्या साधनानें, अंगबलानें ( एखाद्या वस्तूवर ) घाव घातल्यासारखें करून, ओढल्यासारखें करून, धसकावून, खांडून, खापलून, चिरून, तासून ( तिचे ) तुकडे करणें; छाटणें; जोरानें विभक्त, वेगळा करणें; कापणें ( या अर्थी तोडणें व मोडणें या दोन धातूंतील फरक लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. ज्यावेळीं शस्त्राच्या आघातानें किंवा आकस्मिक शरीरशक्तीनें व जोरानें एखाद्या वस्तूचे तुकडे करितात त्यावेळीं 'तोडणें' हा धातु योजतात. मोडणें या धातूच्या अर्थांत ( पदार्थाच्या ) मूळच्या रूपांत, आकारांत जोरानें अथवा कशाहि रीतीनें छिन्नविच्छिन्नता घडवून आणणें असा ध्वनि असतो. मोडणें पहा ). 'कां शस्त्रवरी तोडलिया।' -ज्ञा ६.३७०. २ ( मूल ) अंगावर पाजण्याचें बंद करणें. 'मूल तोडलें.' स्तन मागें घेणें; काढून घेणें. 'थान तोडलें.' ३ ( एखादी वस्तु देण्याचें ) बंद करणें; ( एखादी वस्तु देण्याचें परिमाण ) कमी करणें. 'क्षुधा तृषा कोंडी। आहारातें तोडी। मारूनियां।' -ज्ञा ६.३४६. 'त्याचें अन्नच तोडलें पाहिजे.' -कोरकि ४१७. ४ ( फौज, खर्च, कारखाना, पगार इ० ) कापणें; छाटणें; कमी करणें. ५ मोडणें; बरखास्त करणें; बंद करणें ( भागीदारीचा धंदा, व्यवहार, मैत्री अथवा इतर संबंध, एके ठिकाणीं जमलेली-संयुक्त असलेली मंडळी, समिति ). ६ ( कलह, भेद, गडबड, दंगा इ० ) मिटविणें; शांत करणें; समाप्त करणें; संपविणें. ७ लचका तोडणें; कुरतडणें व फाडणें; दातांनीं, नखांनीं धरून ओढणें. ८ ( अतिशयोक्तीनें ) ( ढेंकूण, माशा, डांस इ०कांनीं ) चावणें व सतावून, पिसाळून सोडणें; (तगादेदार, भिकारी, काम करून घेणारे इ०कांनीं) खनपटीस बसून, तगादा लावून छळणें; सतावून टाकणें. [ सं. त्रोटन, तुड् ( तोडति ); प्रा. तोड; गु. तोडवुं; हिं. तोडना; सिं. तोडणु ] ( वाप्र. ) **तोडिजणें**-अक्रि तोडतां येणें; तोडणें. 'मग मनोरथुवेलीचीं फळें। हातें तोडिजेंती।' -शिशु ७२. [ तोडणें ] **तोडून घेणें**-सक्रि. खंडानें, मक्त्यानें, इजारा करून (शेत इ०) स्वतंत्रपणें वहिवाटीस घेणें; वेगळें करून, वांटणी करून घेणें. **तोडून देणें**-सक्रि. खंडानें, मक्त्यानें, इजारा करून (शेत इ०) स्वतंत्रपणें वहिवाटीस देणें. सामाशब्द- **तोडमोड**-स्त्री. १ ( कर्जफेड, अडचण इ० कारणांमुळें सोन्याचांदीचे दागिने, भांडींकुंडीं इ० सामान ) मोडून, विकून पैसे करणें. २ दोन विरुद्ध पक्षांतील मतभेदाच्या, आक्षेपाच्या बाबी कमी करून त्यांत तडजोड, सलोखा घडवून आणण्याची क्रिया; तडजोड; तोडजोड; तोड. ३ धान्याच्या रूपानें शेतसारा ठरविण्याची क्रिया. ४ ( सामा. ) (एखाद्या कामांतील) खाब्याखुब्या; मख्ख्या; मर्मस्थानें. (एखाद्या धंद्यांतील ) आडमार्ग; मुरड; आडाखे; (एखाद्या यंत्रांतील) गुंतागुंत; हातोटी; गुरुकिल्ली; मख्खी. ५ मोडकींतोडकीं भांडींकुंडीं, दागदागिने, हत्यारें, किडुकमिडुक इ०. [ तोडणें+मोडणें ]

**तोडमोड**—स्त्री. लिहिणें, बोलणें इ०कांची जी रीत ती. [ मोड द्वि. ]

**तोडर**—पु. १ पायांतील एक दागिना; तोरडी; तोडा. 'हडोपरीं बाउलीं तोडरीं काढिति दैत्यांची।' -दाव ८१. 'लांबु रुळतु असे तोडरु।' -उषा १०८४. 'अंदु तोडराचा झणत्कार।' -वेसीस्व ३.७२. 'तोडर दानवांचा सिसाळीं। वामचरणीं रुळतसे।' -निगा १११. २ हातांतील एक अलंकार. 'तोडर करीं सदा गजेत।' -देवीदास, भामावर्णन. [ का. तोडर=साखळी, सन्मानचिन्ह ] (वाप्र.) **-रीं घालणें**-जिंकणें; वठणीस आणणें; पाडाव करणें. 'कामादिक सहा वैरी। येणें उपदेश शस्त्रधारी। जिणोनि घालितां तोडरीं। मग संसारी अरि नाहीं।' -एभा

९.१०५. 'कामक्रोध जेणें घातलें तोडरीं। विदारिले वरी लोभ दंभ।' -रीं बांधणें-(पायाला बांधणें-कल्पनेनें किंवा तोरड्यांवर मूर्ति काढून) (एखाद्यावर) हुकूम, अधिकार, सत्ता गाजविणें, गुलाम करणें; स्वाधीन करून घेणें; कबज्यांत ठेवणें. 'कलिकाळ तोडरीं बांधोन। लंकेस सुखें नांदेका।'

**तोंडली**—स्त्री. एक वेली व तिचें फळ. [सं. तुंडिकावल्ली] ०भात, **तोंडली(ले)भात**-पु. तोंडलीं, मसाला इ० पदार्थ घालून केलेला भात.

**तोंडलें**—न. तोंडलीचें फळ. हीं फळें तुळतुळीत हिरव्या रंगाचीं, सुमारें इंच-अर्धा इंच जाड व दोन तीन इंच लांब असतात. यांची भाजी करितात. हें गोड, थंड, मलाचा अवरोध करणारें, जड, रक्तपित्त, दाह व सुज यांचा नाश करणारें आहे. हें वुद्धि मंद करणारें आहे असें म्हणतात. -योर १.४२. 'म्हणती सयःकीर्तिप्रज्ञाग्रस्पर्शे तोंडलें कवि त्या। -मोविराट ३.५१. [तोंडली]

**तोंडवळी-ळें**—स्त्रीन. (विरू.) तोंडली, तोंडलें पहा.

**तोडशी**—स्त्री. कासाराचें एक हत्यार. -बदलापूर ९६.

**तोडस**—पु. (गो.) लांकडी खिळा, खुंटी.

**तोडा**—पु. १ (लांकूड इ०) तोडण्याची क्रिया; (फुलें, फळें इ०) खुडण्याची, तोडण्याची, गोळा करण्याची क्रिया. (क्रि० करणें; काढणें; घेणें; उतरणें; तोडणें). २ (लांकूड इ० कांचा) तोडलेला भाग; तुकडा; ठोकळा; ओंडा. 'सुतळीचा तोडा' ३ (बे.) मिरच्या, कापूस इ० काढण्याचा, तोडण्याचा हंगाम. [तोडणें] ०काढणें-आवणाच्या मुरगळलेल्या काड्या बेणणीबरोबर उपटणें. -बदलापूर २९४. ०टाकणें-(गवंडीकाम) विहीरीच्या बांधकामांत, घराच्या भिंतींत-तीं बांधीत असतांना-कोनाडा इ०करितां रिकामी जागा सोडणें. **तोडातोड-डी**-स्त्री. १ सर्रास, सर्वसाधारण किंवा जोराची खापलण्याची, तोडण्याची, छाटण्याची, कापण्याची क्रिया; छाटाछाट; कापाकाप. २ (ल.) (एकमेकांतील व जोराची) सतावून सोडण्याची, छळण्याची, त्रास देण्याची क्रिया. ३ (आईपासून मुलास, नवऱ्यापासून बायकोस कठोरपणानें) तोडणें; दूर ठेवणें; ताटातूट, वियोग करणें. ४ कठोरपणें ताटातूट, वियोग झालेली स्थिति. [तोडणें द्वि.] **तोडामोडा**-पु. १ (मिळकती, दुकानें, धंदा, दागदागिने, सामानसुमान इ०) मोडणें; विकणें; विल्हेवाट लावणें; पैसे करणें. २ (एखाद्या संघटित योजनेच्या, विधानाच्या, कारखान्याच्या अंगोपांगांची) वाताहत, फाटाफूट करून तें बंद, बरखास्त करणें. (क्रि० करणें). ३ (एखादी इमारत, जिन्नस, धंदा इ०) मोडकळीस येणें, आणणें; मोडकळीस येऊं देणें; विस्कळित होऊं देणें; मोडतोड करणें; नाश करणें. ४ विस्कळित, पांगापांग झालेली, उध्वस्त, नासधूस झालेली स्थिति. (क्रि० करणें; होणें). [तोडणें+मोडणें]

**तोडा**—पु १ सोन्याचीं, चांदीचीं-मोहरा, रुपये इ० हजार नाणीं भरलेली पिशवी. -वाडमा १६४. 'श्रावणमासिं खर्चेतो कोट्यावधि तोडा।' -राला २.१०१. २ बंदुकींतील दारू पेटविण्याचा काकडा; जामगी. 'पहाऱ्यास शिपाई उभे पेटवुनी तोडा।' -राला १०१. ३ दोराचा, दोरीचा, सुतळीचा हात-दोन हात लांब तुकडा. ४ कठिण व जाड जरतार. ५ (दारूकाम) फुलबाज्या, बाण इ० बांधण्याच्या उपयोगाचा चिखलांत भिजविलेला सुताचा दोरा, वाख. [तोडणें] **तोड्याची बंदूक**-स्त्री. तोड्यानें, काकड्यानें दारू पेटवून उडवावयाची बंदूक. इच्या उलट चापेची बंदूक. ०**सांखळी**-स्त्री. (बैलगाडीचा धंदा) बैलाच्या गळ्यांत घालावयाची पितळेची सांखळी.

**तोडा**—पु. १ (सोनारी धंदा) हातांत, पायांत घालावयाचा सोन्याचा, चांदीचा एक प्रकारचा दागिना. २ शिंदेशाही घडणीचीच पण क्वचित् पोकळ बनावटी (स्त्रियांच्या) हातांतील सोन्याची जाड सांखळी. ३ (कों.) दरवाज्याच्या मुख्य चौकटीच्या वरच्या चौकटीची वगैरे तोड्यासारखी नक्षी. ४ (पगडबंद) सांखळीच्या कड्यांच्याप्रमाणें केलेलें पागोट्यांतील बांधणीचें काम. ५ लुगड्याच्या कांठांतील कड्यांच्या सांखळीच्या आकाराची विशिष्ट रचना (इं.) डिझाईन. ०**उठविणें**-(चांदीच्या हत्यारांचा धंदा) नग तयार झाल्यावर त्यावर झिलई करणें; तकाकी देणें. **शिंदेशाही तोडा**-पु. एक बोट जाडीच्या चांदीच्या, वर्तुळाकार कड्या करून एका कडीचीं निमुळतीं टोकें दुसऱ्या दोन कड्यांतून गोविलीं जातील अशा रीतीनें त्या कड्या एकमेकांत अडकवून पायाच्या मापाचा हा दागिना करतात. क्वचित् कड्यांना तोंडाशीं मोगरे केलेले असतात किंवा मळसूत्र असतें

**तोडा**—पु. (वाद्य.) सतार वगैरे वाद्यांच्या गतीस शोभणारा स्वरसमूह; तबल्याचा, नृत्याचा एक विशिष्ट बोल.

**तोंडा**—पु. एक पालेभाजी; (विरू.) तोंडया पहा.

**तोंडाक**—न. (गो.) तोंडीलावणें. [तोंड]

**तोडी**—स्त्री. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत व तीव्र निषाद हे स्वर लागतात. वादी धैवत, संवादी गांधार. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर. ह्याचे गुजरी तोडी, विलासखानी तोडी; बहादुरी तोडी इ० प्रकार आहेत. 'महादेव कविराज पुण्यामध्यें रहाती। त्याचे छंद ऐकोनी गुणीजन गाती। बदलुन अंतरी मग उलटे वाहती। तोडीमधें छानपछान करती।'-सला ४. [सं. त्रोटकी; प्रा. तोडइ] ०**थाट**-पु. (संगीत) एका थाटाचें नांव. ह्या थाटांत शुद्ध

षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, तीव्र मध्यम, शुद्ध पंचम, कोमल धैवत व शुद्ध निषाद असे सात स्वर असतात. [ तोडी+थाट ]

**तांडी**—स्त्री. १ तोड; युक्ति. ' डागदार बघती नाडी दवा देत तोडी चालवी जरी बाधा नाहीं जडली।' -ऐपो ४३७ २ (गो.) पानाचा, फळाचा देंठ. उदा० ' दोडक्याची तोडी.' [ तोडणें ]

**तोडी**—स्त्री. मोठ्या पोटाची व लहान तोंडाची बांबूची करंडी -बदलापूर १३३.

**तोंडी**—स्त्री. १ विण्याचा डेरा व दांडी यांच्या सांध्याची जागा. २ सांधा जोडणारी लांकडाची पट्टी. ३ मृदंग, ढोलकें इ० वाद्याचें तोंड. ४ (ना.) विहीरीची पाळ. [ तोंड ]

**तोंडी**—स्त्री. (तंजावरी) लहान घागर; कळशी [ ता. तोंडी, तोंडु=शेंदणें ]

**तोडीची पाटली**—स्त्री. पाटलीचा एक प्रकार. हिला फांसा नसून केवळ तोंडें मिळविलेलीं असतात. याच्या उलट फांशाची पाटली. [ तोडणें+पाटली ]

**तोडीजोडी**—स्त्री. (प्र.) तोडजोड पहा.

**तोडीव**—वि. तोडलेलें; छाटलेलें (लांकूड इ०). [ तोडणें ]

**तोंडोल**—न. (ना.) तोंडलें.

**तोंडोळी, तोंडोळें**—स्त्रीन. (प्र.) तोंडली, तोंडलें; तोंडली पहा.

**तोंड्या**—पु. एक पालेभाजी. तोंडा पहा.

**तोणकॉ, तोंडकॉ**—पु. (गो.) दांडा. [ का. टोण्णे ]

**तोणकावचें**—सक्रि. (गो.) दांडयानें मारणें. **तोणी**—स्त्री. (गो.) आंखुड काठी. टोणी पहा.

**तोणकी**—स्त्री. (गो.) एक लहान माशाची जात; मासळी.

**तोणी-णो**—स्त्री. (गो.) मोठी व बारीक ऊ. टोणा पहा.

**तोतया**—पु. फसवणूक; लबाडी; सोदेगिरी; बनावट लेख, हकीगत; (विशेषतः) गादी, गादीवर हक्क मिळावा म्हणून केलेली बतावणी; फसवणूक; सोदेगिरी. -मोल. -वि. केवळ कांहीं सादृश्या वरून दुसऱ्याचें नांव सांगून, दुसऱ्याची बतावणी करून (राज्या-वर) हक्क सांगणारा; खोटा वारस; ठक; भोंदु; (सामा.) दुसऱ्याची बतावणी करणारा उपटसुंभ, लबाड (मनुष्य). ' तोतया रत्नागिरीस अटकेंत होता.' -वाडसमा २.१२१. [ का. तोताय ] सामाशब्द- **तोतयेगिरी**-स्त्री. (कायदा) आपण दुसरेच कोणी इसम आहोंत असें भासवून केलेली फसवेगिरी; (इं.) पर्सोनेशन्. -घका १८३.

**तो(तों)तरा, तोंतळा**—वि. अडखळत अडखळत, एक एक अक्षर दोन तीन वेळां उच्चारीत बोलणारा; बोलतांना अडणारा, लागणारा; चोचरा. [ ध्व. हिं. तोतला ]

**तोता**—पु. पोपट; राघू. ' मज मैनेचा अंतरंग तोता।' -प्रला १५८. [ हिं. ]

**तोता**—पु. मोरचूत; (प्र.) तुतिया पहा. [ हिं. तूता ]

**तोतो**—स्त्री. (बालभाषा) अभ्यंगस्नान; तेल इ० कांनीं शरीर माखून न्हाणें. [ ध्व. डोकें थापटण्याचा ]

**तोदा**—न. (तिरंदाजाचें) नेम मारण्याचें स्थान; लक्ष्य; संधानबिंदु; निशाण. [ फा. ]

**तोंदेल**—वि. (प्रां.) लठ्ठ; मोठ्या पोटाचा; ढमाल्या; तुंदिल. [ सं. तुंदिल ]

**तोप**—पु. १ (गो.) टोप. २ (कु.) मोठें पातेलें. [ सं. स्तूप; का. टोप्प ]

**तोपची**—पु. तोफखान्याकडील अधिकारी; गोलंदाज. [ तुर्की तोपूची ]

**तोपण**—अक्रि. (गो.) आंत रिघण्याची, घुसण्याची क्रिया.

**तोंपर्यंत-पावेतों**—क्रिवि. तंवर; त्यावेळेपावेतों. [ तों+पर्यंत पावेतों ]

**तोपारो**—पु. (गो.) खर्ची नांवाच्या मासळीचें पिलूं.

**तोपियॉ**—पु. (गो.) सरडा; टोपियॉ.

**तोपुलो**—पु. (कु.) लहान पातेली.

**तोपूल**—न. (गो.) लहान टोप. [ गो. तोप ]

**तोफ**—स्त्री. १ आंत दारू भरून बार काढण्याचें, गोळे फेंक-ण्याचें यंत्र. (क्रि० मारणें). [ तुर्की तोप् ] (वाप्र.) **तोफेच्या तोंडीं देणें**-१ (एखाद्यास) तोफेच्या तोंडासमोर उभें करून त्याच्यावर तोफेंतून गोळा सोडणें; तोफेनें उडविणें; ठार करणें. २ (ल.) (एखाद्यास) संकटाच्या, कठिण परिस्थितीच्या तोंडीं देणें. ३ (एखाद्या कृत्याचे) दुष्परिणाम भोगण्यास पुढें करणें. सामा-शब्द-**तोफखाना**-पु. १ तोफांचा समुदाय. २ तोफा, दारूगोळा इ० युद्धसामुग्री ठेवण्याचें ठिकाण. [ तोफ+खाना=घर, ठिकाण ] **तोफचो**-तोपची पहा. **तोफजी**-स्त्री गोलंदाजी. ' बर्कंदाजी व तोफजी फिरंगी याची निस्सीम म्हणावी तैसी.' -ब्रप ७७.

**तोफा-फां**—वि. नामी; उत्कृष्ट; तलम; दुर्मिळ; मूल्यवान; तऱ्हेवाईक; चांगलें (वस्त्र इ०). [ अर. तुह्फा ]

**तोबत-त**—स्त्री. अपराध न करितां आलेला अपराधाचा आरोप, आळ. (प्र. विरू.) तोहमत; तोहमत पहा. ' अशा निंद्य रीतीनें शरण जाऊन राजा आपल्यावर तोबत आली होती तीपा-सून सुटला.' -इंग्लंडची बखर १२६.

**तोबरा**—पु. १ हरभरे, चंदी इ० आंत भरून घोडयाच्या तोंडाला लावावयाची कातडयाची, पडमाची पिशवी. ' औषध सु-चणक कल्पीं पीतपट पसाहि तोबरा माप।' -मोद्रोण १० ४८. २ टपालवाल्याची पत्रें इ० वाहून नेण्याची पिशवी. ३ (ल.)

आत अतिरिक्त पदार्थ भरल्यामुळें किंवा राग इ०कांमुळें पिशवी-सारखें फुगलेलें तोंड. ४ (बैलगाडी) चाबूक, कुण्या, जुपण्या इ० ठेवण्यासाठीं गाडीस बांधलेली एक पडमाची पिशवी. [फा. तोब्रा] म्ह० तोबऱ्याला पुढें लगामाला पाठीमागें=कामचुकार, भोजनभाऊ, आयतोजी इसमासंबधीं योजतात (खायाला आधीं, कामाला कधीमधीं याप्रमाणें).

**तोबा**—पु. १ वस्त्राला पीळ घालून, मारण्यासाठीं केलेला जाड कोरडा (गर्दी मोडण्यासाठीं हा लोकांना मारतात). 'विठोबा भला मारिला तोबा। कंबर मोडली।' २ अतिशय गर्दी; दाटी. 'यात्रेंत अगदीं तोबा उडून राहिला.' **तोबेमार**—पु. तोब्यानें मारणें; तोब्याचा मार. [तोबा+मार]

**तोबा, तोबा तोबा**—उद्गा. (मुसलमानांत रूढ) पश्चात्तापाचा, दुःखाकुलतेचा हाय। हाय!, अरेरे! या अर्थाचा उद्गार. 'बहु हाय! हाय! म्हणति प्राकृत बुध हंत! हा! यवन तोबा।' —मोभीष्म ४.१४. [अर. तौबा; फा. तोबा]

**तोमर**—पुन. घुसळावयाच्या रवीच्या आकाराचें एक लोखंडी आयुध. [सं.]

**तोय**—न. पाणी; उदक. 'फळ तोय वर्जून समस्त। निराहार बैसला रघुनाथ।' [सं.] सामाशब्द- ०**तारी**—स्त्री. (पाण्यांतून तारून नेणारी) नाव; होडी. 'तुझी तोयतारी त्वरें आणि तीरीं।'—वेसीस्व प्रस्तावना पृ. १३. [तोय+तारणें] ०**द**—पु. मेघ; ढग. [सं. तोय=पाणी+सं. दा=देणें] ०**राशी-शि**—पु. पाण्याचा सांठा; समुद्र; सागर; उदधि. 'जननिजनक पुत्री तात सीताविलासी। वचननिगम त्याचा आडवा तोयरासी।'—मुरामा अरण्यकांड २१. [सं. तोय+राशि=रास]

**तोय**—स्त्री. कलाबतूची विणलेली जाळीदार पट्टी; जर. तुई, तोई पहा.

**तोर**—स्त्री. (कु.) तूर पहा. [हिं.]

**तोर**—न. (कु. हेट. राजा.) कोंवळा कच्चा आंबा; कैरी. [सं. तुवर=तुरट; तुल० का. तोरे=पक्व]

**तोर**—पु. आंब्याचा मोहोर. [तुरा]

**तोरंजन**—न. ईड; ईडलिंबू; महाळुंग. [फा तुरंज]

**तोरड**—पु. (काव्य.) तोडा; पुरुषांचें एक पादभूषण; (विरू.) तोडर; तोडर पहा. 'हत्तीचे पायीं तोरड।'—ऐपो १४. **तोरडीं घालणें**—जिंकणें; दमन करणें; पाडाव करणें; कबजांत आणणें. तोडरीं घालणें पहा. 'जयाची कामना धांवडी। काळ घातला तोरडीं।'

**तोरड**—पु. अंबाडीचा कोरडा, असूड. -बदलापूर ९३.

**तोरडी**—स्त्री. स्त्रियांचें एक पादभूषण. हें सामान्यतः चांदीचें असतें. 'पायीं सांखळ्या तोरड्या।' [तोडर]

**तोरण**—न. १ (घराच्या) पुढील दरवाजाच्या चौकटीची वरची आडवी पट्टी; गणेशपट्टी. २ समारंभ, उत्सव इ० आनंदप्रसंगीं घर, मांडव इ० कांच्या प्रवेशद्वाराजवळ आंब्याचीं पानें, डाहाळ्या, फुलें इ० दोरींत ओवून बांधतात तें मंगलचिन्ह. 'वोस गृहीं तोरण बांधिलें। कां उपवासी अन्नें लिंपिलें।'—ज्ञा १३.४६९. ३ होळीवर, देवादिकांवर बांधतात ती नारळ, खोबऱ्याच्या वाट्या इ० कांची माळ. ४ तराजूचा कांटा ज्यांत इकडून तिकडे हलतो तें दुबेळकें. [सं.] सामाशब्द- ०**टक्का**—पु. लग्नमंडपावरील कर. [तोरण+टक्का] ०**भेट**—स्त्री. लग्नावरचा कर, पट्टी.—शर. [तोरण+भेट=नजराणा] ०**वेस**—स्त्री. लग्नकार्यांत घराच्या मुख्य दरवाज्यावर केळीचे खुंट लावून केलेली कमान. सामान्यतः ही कमान महारांनीं त्यांच्या पोस्ताच्या हक्काबद्दल उभारावयाची असते. [तोरण+वेस=दरवाजा, प्रवेशद्वार]

**तोरण**—स्त्री. एक कांटेरी फळझाड. हें करवंदाच्या झाडासारखें असून डोंगराळ प्रदेशांत होतें. यास फुलांचे तुरे व पिवळट रंगाचीं फळें येतात. —न. वरील झाडाचें फळ, हें खाण्यास चांगलें लागतें; हें तुरट, आंबट, उष्ण व गुरु असून रक्तपित्तनाशक, कफ व वात यांचा नाश करणारें व सारक आहे. गांगेरुक म्हणून तोरणाची एक दुसरी जात आहे. —वगु ४.१५.

**तोरणा**—पु. हळवार, हलक्या जमीनींतील भात. —बदलापूर २८३.

**तोरणें**—न. (कों.) रहाटगाडग्याच्या कनेकडाचें पुढलें टोंक ज्यावर ठेविलेलें असतें व ज्याच्या खालून बैल फिरत असतो तें लांकूड. याच्या जवळच कनेकडांत तुंब घातलेलें असतें. 'तोरणावर कनेकड फिरतें.'

**तोरप, तोराप**—न. (कु.) (नेहमींच्या पद्धतीप्रमाणें) आवगी न करितां भाताचें पीक घेतां यावें म्हणून भाजून तयार केलेली जमीन; असल्या जमीनींत उभें असलेलें पीक.

**तोरमली-ल्ली**—स्त्री. अपक्व व कनिष्ठ जातीच्या हिऱ्याची एक जात. सिलोन बेटांत यास तुरमली म्हणतात; संस्कृत भाषेंत यास गंधर्व व वैद्यक ग्रंथांत वैक्रांत म्हटलें आहे. ही पांढरी, हिरवी किंवा निळी असते; हिच्या निरनिराळ्या रंगांवरून माणिक्यकल्प, ब्रिझिलीपन्ना, श्वेत, नीलकल्प, पेरिडाट, सायबेराइट; ड्रायव्हाईट, स्कोर्ल् अशा हिऱ्या जाती पडल्या आहेत.

**तोरमी**—स्त्री. एक वाद्यविशेष. 'पावे तोरमी मोहरीं।' —दाव ७०. [सं. तूर्य]

**तोरवणी**—न. (कु.) धान्य पेरल्यानंतर शिंपावयाचें पाणी.

**तोरा**—पु. (संपत्ति, सौंदर्य इ०कांच्या) अभिमानाचा आविर्भाव; दिमाख; ऐट; डौल; गर्व. 'संपत्तीचा त्यापुढें काय तोरा।' —वामन, स्फुट श्लोक (नवनीत पृ. १३४.) [हिं.; तुल० का.

तोर=प्रामुख्यानें वावरणें ] ०मिरविणें-दिमाख, ऐट दाखविणें; गर्वानें वावरणें. **तोरेदार**-वि. गर्विष्ठ; दिमाखखोर; ऐटबाज; डामडौली. [ तोरा ]

**तोरांज**—न. ( गो. ) पपनस. तुरंज पहा.

**तोरें**—न. १ वनस्पति वगैरे पाण्यामध्यें कुजून त्यापासून (त्यांत स्नान करणारांच्या किंवा तें पिणारांच्या अंगास) कंडू उत्पन्न करण्याचा गुणधर्म; तें पाणी प्याल्यानें, त्यांत स्नान केल्यानें अंगावर उठणारी कंडू, सूज इ० २ ( गो. ) गरोदर स्त्रीस येणारी सूज. ३ ( गो. ) पांढरा रंग. ' गणपतीस तोरें केव्हां काढणार ? '

**तोरो**—सना. ( नामपुरी, बागलाणी ) तुझें.

**तोर्राइ**—वि. ( गो. ) खरपूस भाजलेला.

**तोल**—पु. १ वजन करणें; वजन करण्याची क्रिया. २ वजन करून पदार्थाचें समजलेलें मान, परिमाण. ३ कल; झोंक. 'राधेयपताकेचा होता मार्गेचि तेधवां तोल।' –मोकर्ण ७.४०. ४ (कांहीं जिन्नस तोलतांना ) गिऱ्हाइकांस हवा असेल तेवढया वजनाचा जिन्नस देऊन लोकरीतीप्रमाणें आणखी थोडासा जिन्नस वर देतात तो. ५ ( सामा. ) तुलना; बरोबरी; तुलनेस, जोडीस जुळणें; समानता. ' मालोजीस मनसब देऊन तुमच्या तोलाचें करतो. ' ६ (ल.) महत्त्व; मोठेपणा; वजनदारी; भारदस्तपणा. ' राष्ट्राचा केवल तोल।' –संग्रामगीतें १०८. ७ –न. वजन करण्याचें परिमाण, माप, वजन. उदा० शेर, मण, तोळा, मासा इ०. [सं. तुल्=वजन करणें ] (वाप्र.) ०देणें–( दुसऱ्याचा अपराध, अपकार ) सहन करणें, पोटांत घालणें; गम खाणें; गई, क्षमा करणें; ( दुसऱ्याच्या मतास मान देऊन, आपलें मत बाजूस ठेवून त्याच्या मतास ) मान्यता, अनुमति, संमति देणें; आपला हेका सोडणें. ०मिळविणें–(जरतार धंदा) वजन पडताळून पाहणें. ०लावून चालणें–ठमकत ठमकत, नखऱ्यानें, छाती काढून चालणें. ०संभाळणें–समता, साम्य, समतोलपणा राखणें. झोंक जाऊं न देणें, इकडेतिकडे न झुकणें. **तोलाचा**–वि. १ बरोबरीचा; सारख्या दर्जाचा, किंमतीचा, हिंमतीचा; जोडीस अनुरूप. २ (ल.) बहुमोल; भारी. म्ह० जसा वारा वाजेल तसा तोल द्यावा=परिस्थितीप्रमाणें वर्तन ठेवावें. **तोलास तोल घेणें-देणें**–१ भारंभार घेणें, देणें. २ (ल.) (द्रव्यव्यय, शौर्य, वक्तृत्व इ० बाबतींत दुसऱ्याशीं ) बरोबरी करणें; टक्कर देणें; स्पर्धा करणें. तोडीस तोड देणें पहा सामाशब्द– ०दार–वि. १ (संपत्तीचा खर्च इ० बाबतींत) टक्कर देण्यास, स्पर्धा करण्यास, तोलास तोल देण्यास, बरोबरी करण्यास तयार असलेला; बरोबरी करण्याची हिंमत असलेला; याच्या उलट फुसका; क्षुल्लक; किरकोळ; क्षुद्र. २ भारी; प्रचंड. ' भागानगरकर मोगल फौज तोलदार सामान पुरा आहे.' –वाडशाछ १.२. ३ वजनदार; मातब्बर; भारदस्त; अब्रूदार; मानमान्यतेचा; प्रतिष्ठित. [ तोल+फा. दार ] ०दारी–स्त्री. १ तोलासतोल देण्याची शक्ति; स्पर्धा; ईर्षा; बरोबरीच्या नात्यानें वागण्याची हिंमत २ (क्व.) प्रतिष्ठितपणा; प्रतिष्ठा; भारदस्तपणा; वजनदारपणा; मानमान्यता. [ तोलदार ] म्ह० तोलदारीचा हेवा आणि सनकाडीचा दिवा=आपल्यापेक्षां उच्च दर्जाच्या माणसाशीं, अंगीं पात्रता नसतांहि स्पर्धा करणें ( मूर्खपणा होय ). **तोलासन**–न. (योग) दोन्ही पायांचे चवडे जमीनीवर टेंकून बसावें. दोन्ही पाय एकाशीं एक जुळवून, दोन्ही हात जमीनीवर टेंकून आसन उचलावें. यास डोलासन किंवा तोलासन म्हणतात. –संयोग ३५३. [ तोल+सं. आसन=बसणें, बैठक ]

**तोलणें**—उक्रि. १ वजन करणें; जोखणें. २ मनानें, बुद्धीनें (एखाद्या पदार्थाची, व्यक्तीची ) किंमत, महत्त्व, लायकी, वजन इ० ठरविणें; अंदाजणें. ३ ( एखादें कार्य इ० एखाद्यास ) झेंपणें; तडीस नेण्याचें सामर्थ्य असणें; आटोक्यांत असणें; चांगल्यारीतीनें करतां येणें; पेलणें. ' तुमच्यानें तोलवेल तेवढेंच घ्या. ' ४ तुलना करणें; ( दोन जिन्नस, व्यक्ती इ०ची परस्पराशीं ) तुळणें. ' जिंकी कपटी जी श्री श्रीद–श्रीशीं विशंक तोलावी। ' –मोसभा ४.११. –अक्रि. ( अक्षरशः व ल. ) झुकणें; कलणें (एकाबाजूस) झोंक खाणें; वांकणें. [ सं. तुल्=वजन करणें ] **तोलन**–न. १ वजन करणें; जोखण्याची क्रिया. २ (ल.) (दोन पदार्थांत) तुलना करणें. [ सं. ] **तोलीव**–वि. १ वजन केलेलें; तोललेलें; जोखीव; याच्या उलट मोजीव; मापीव. २ ( ल. ) मोजकें; परिमित; माफक; योग्य प्रमाणांत असलेलें. [ तोलणें ]

**तोल्द**—न. ( गो. ) होडीवर तयार केलेलें वर्तुळाकार छप्पर.

**तोल्ली**—स्त्री. ( गो. ) कोंवळी सुपारी.

**तोंवर**—पु. ( राजा. ) ज्यामध्यें आंबटपणा आला नाहीं अशी आंब्याची कोंवळी कैरी. तोर पहा.

**तोंवर-री**—क्रिवि. १ त्यावेळेपावेतों; तोंपर्यंत. २ तावत्काल; तितकावेळपर्यंत; जोंवर याचा उत्तरगामी शब्द. [तों+वर]

**तों(तो)वरी**—स्त्री. ( कों. ) खाऱ्या पाण्यांतील माशाची एक जात.

**तोवर, तो(तों)वरी**—पुस्त्री. ( को. ) कोंवळा कोंब, देठ; अंकुर; तुरा; डिकशी; अंकुर, तुरा फुटणें. ( क्रि० फुटणें; येणें ). ' सोमवल्लीचे तोवर। तेंचि सोमपान मधुर। ' –कथा ३.८.१३९. [ तुरा ]

**तोवसोळी**—स्त्री. ( गो. ) तवसें किसून केलेलें एक खाद्य. [ तवसें ]

**तोश**—स्त्री. जोर; हिंमत; बळ. ' शत्रू तोशीनें जोरीनें चालोन येत आहे. ' –ख ७.३५८९. [ फा. तोश् ]

**तोश**—पु. सशाच्या अंगावरील लव, लोंकर. 'शशोर्णं तोशनामकं।' –राव्यको २.३०. [फा.]

**तोश(ष)क**—स्त्री. (व.) गादी [फा. तूशक्=अंथरूण]

**तोश(शे)खाना**—पु. कोठार; जामदारखाना; वस्त्रागार; सरकारी खजिना. 'तोशेखाना पाहिला त्यांत साडेसातशें रुपये नगद आणि कांहीं पोशाख होते.' –रा ५.१८०. [फा. तोशखाना=वस्त्रागार]

**तोशीस**—स्त्री. १ (राजा, सावकार, चोर, इ०कांनीं केलेला) उपद्रव, छळ; जुलूम; (सामा.) छळणें व त्रास देणें; त्रस्तस्थिति; जिकीर. (क्रि० लागणें; देणें; लावणें). २ झीज; नुकसान; घस. 'जवाहीर इंगरजाकडे गाहाण आहे तें फरोक्त करणार परंतु सरकारचें तोशीस लागेल.' –समारो १.१४९. [अर. तश्वीश्]

**तोष**—पु. आनंद; समाधान; मनाचें सुख; प्रसन्नता. 'जो घ्राणसंगें विषादु। तोषु देता।' –ज्ञा २.११७. [सं.] **तोषक**–वि. तोष देणारें; समाधानकारक; आनंद, प्रसन्नता देणारें; आल्हाददायक. [सं. तोष+सं कृ=करणें] **तोषण**–न. आनंदित, समाधानयुक्त, प्रसन्न करणें. [सं.] **तोषणें**–अक्रि. संतुष्ट, आनंदित, प्रसन्न होणें; समाधान पावणें. 'न्याहाळितां तोषला अंतरीं।' –उक्रि. (क.) संतुष्ट करणें; आनंदित, प्रसन्न करणें. 'तोषौनि प्रसादु घेईजे। अतिथीचा –ज्ञा १६.१४८. [सं. तोषण] **तोषित**–वि. संतुष्ट, प्रसन्न, आनंदित केलेला. [सं.]

**तोषक**—स्त्री. बैठक; बिछाना; अंथरूण. 'गाद्या तोषक लोड टेंकुनि मनीं मानीतसे वैभवा।' –देवनाथकृत विधिनिंदा ७. [फा. तूशक्=अंथरूण, बसकण]

**तोष्ट–स्ट**—न. तगादा; लकडा; निकडीची मागणी. 'आम्हांस समस्तांस कर्जपट्टीचे तोष्ट लाविले आहे.' –वाडबाबा २.३५१. [त्वष्ट]

**तोसदान, तोस्तान**—न. १ काडतुसें, बंदुकीची दारू इ० सामुग्री ठेवण्याची कंबरेस बांधण्याजोगी चामड्याची पिशवी; २ दप्तर ठेवण्याची कापडाची पिशवी. ३ शेतकऱ्याजवळची सामानसुमान ठेवण्याची पिशवी. –वि. अगडबंब; गलेलठ्ठ. [फा. तोशा+दान्] (एखाद्याचें) **तोसदान वाढणें**–१ (एखाद्याचा) बडेजाव, ऐश्वर्य वाढणें. २ (एखाद्याची) देवपूजा, जप इ० प्रस्थ वाढणें. ३ (एखाद्याचें शरीर) लठ्ठ व ढब्बू होणें.

**तोसीस**—स्त्री. नुकसान; तोशीस.

**तोस्तदान**—न पिशवी; (प्र.) तोसदान पहा.

**तोस्तान**—न. (कर.) तगादा; लकडा; निकड. तोष्ट पहा. 'माझ्यामागें तोस्तान लावूं नको.' [त्वष्ट]

**तोहमत**—स्त्री. १ खोटा आरोप; आळ; बालंट; किटाळ. २ (व्यापक.) (व्यापार इ०कांत आलेला) तोटा; ठोकर; नुकसान; दुर्दैवाचा घाला; अनर्थकारक, दुःखदायक, हानिकारक गोष्ट, प्रसंग. [अर. तुह्मत्]

**तोळ**—पु. (गो.) १ टोळ. २ चिंचोळा व लांब पन्हळ.

**तोळबंदी**—स्त्री. हातांत घालण्याचा वांकीसारखा स्त्रियांचा एक दागिना. 'तोळबंदीया दारवंटें।' –कालिकापुराण २७.५८.

**तोळंबा**—पु. १ (काव्य.) जाड, अवजड दिसणारा खांब. २ खांबाखालील उथळें, उखळी, तळखडा. 'पद्मरागाचे तोळंबे। पायीं दडपिले मरगजस्तंभें।' –मुसभा २.२७. –ह ३४.१२०. ३ (व्यापक) (दिसण्यांत असाधारणपणें, विशेष) जाड व भरदार असा हात, पाय, झाडाचें खोड इ०. ४ धष्टपुष्ट, गरगरीत, भरदार, व गोंडस शरीर. ५ गवंड्याचा ओळंबा; लंबक. [तुळा=तुळई]

**तोळा**—पु. (सोनें, चांदी इ० मौल्यवान पदार्थांचें) वजन करण्याचें, वजनाचें एक परिमाण. हा सोळा माषांचा किंवा ऐशी रतींचा असतो असें ग्रंथांत वर्णन आहे. त्यावरून याचें वजन १०५ (ट्रॉय) ग्रेन होतें. व्यवहारांत जवाहिऱ्याचे बारा माष (मासे) मिळून तोळा होतो त्यावरून त्याचें वजन २१० ग्रेन ठरतें. निरनिराळ्या व्यापाराच्या प्रांतीं, शहरीं तोळ्याचें निरनिराळें परिमाण आहे तें पुढें दिलें आहे– पुणें, अमदावाद १९३॥ (ट्रॉय) ग्रेन, अहमदनगर १८८॥ (ट्रॉय)ग्रेन. सिंधप्रांत १८७॥(ट्रॉय)ग्रेन. जालना १८४॥ (ट्रॉय)ग्रेन. मुंबई १८० (ट्रॉय) ग्रेन. कलकत्ता १७९.६६६६६. –छअ १९८. [सं. तुल्] ०**मासा**–(प्रकृति, स्वभाव इ० कांचा) चंचलपणा, नाजूकपणा दर्शविणारा शब्दसमूह. 'ह्याची प्रकृति–रोगाची भावना तोळामासा आहे.'=ह्याचा स्वभाव, ह्याची प्रकृति अगदी क्षुल्लक कारणानेंहि बिघडण्याइतकी नाजूक आहे. ०**मासा पाहणें**–कृपण, हाताचा जड असणें. **तोळेवरी**–क्रिवि. (ना.) एखादें काम करण्याचे नांवानें मात्र भोपळ्या एवढें शून्य अशा अर्थी. 'गोष्टी करावयास सांगा मात्र, देणेंघेणें मात्र तोळेवरीच!'

**तौकल**—स्त्रीन. (प्र.) तवकल पहा.

**तौकीर–ल, तौखीर–ल**—न. तवकीर इ० पहा.

**तौताक**—तवताक पहा.

**तौनूक**—क्रिवि. नुकतांच; आतांच; थोड्याच वेळापूर्वी.

**तौंपर्यंत, तौंपावेतों, तौंवर**—क्रिवि. तोंपर्यंत, तोंपावेतों, तोंवर पहा.

**तौर**—पु. तोरा; डौल; दिमाख; गर्व.

**तौरी**—वि. रागीट; चिडखोर; तापट; (प्र.) तवरी पहा.

**तौर्यत्रिक**—न. नृत्य, गीत व वादन या तिहींचा समुदाय. 'तौर्यत्रिकांसहित आणुनि पत्तनातें।' –वीरेश्वरकृत रुक्मिणीस्वयंवर २७. [सं.]

**तौल्य**—न. बरोबरी; साम्य; सारखेपणा; अनुरूपता; तुल्यता. [सं.]

**तौस, तौसें**—न. (राजा.) (विरू.) तवशी, तवसें पहा.

**त्यक्त**—वि. टाकलेला; सोडलेला; त्याग केलेला; सोडून, टाकून दिलेला. [सं.] **त्यक्तोदक**-वि. ज्यानें एखाद्या गोष्टीवर पाणी सोडलें आहे, नांव टाकलें आहे, संबंध सोडला आहे असा. 'अंगीं वैराग्यविवेकू। ब्रह्मालागीं त्यक्तोदकू।' -एभा १.१६५. [त्यक्त+उदक=पाणी]

**त्यज(जि)णें**—सक्रि. टाकणें; सोडणें; त्याग करणें. 'तैं कांहीं न त्यजे अधिकें। गोवींचि पडे।' -ज्ञा १८.१३१. [सं. त्यज्=टाकणें] **त्यजनीय**-वि. टाकण्यास, सोडण्यास योग्य. [सं.] **त्यजिणें**-सक्रि. सोडणें; टाकणें; त्याग करणें; टाकून देणें. 'पूर्वी धर्म न रुचला त्यजिला निपटूनि तो जसा कुचला।' -मोकर्ण ४९.११

**त्यंट**—क्रिवि. (कों.) तिकडून.

**त्यहांठीं**—क्रिवि. (कों.) तेथून. 'मे तुला त्यहांठीं खाऊ घेऊन येन.' -लोक २ २३.

**त्या**—सना. १ तो, तें या सर्वनामाचें सामान्यरूप. २ ती या सर्वनामाचें अनेकवचन.

**त्याकां**—सना. (कु.) त्यांना.

**त्याग**—पु. १ सोडणें; टाकून देणें; वर्जणें. २ (वेदांत). कर्मफल सोडून देणें. 'यया कर्मफलत्यागातें। त्यागु म्हणती पैं जाणते। एवं त्याग संन्यास तूतें। परिसविले।' -ज्ञा १८.१२५. ३ दान; अहेर; बिदागी; संभावना. 'पदोपदीं नाना त्याग।' -एरुस्व १५.१२८. ४ गोंधळी, भराडी, डौरकरू इ॰ कांना त्यांच्या कामाबद्दल द्यावयाची बिदागी, मजुरी. [सं.] **॰भोग**-पु. उपभोगणें व दुसऱ्यास देणें, दान करणें [सं. त्याग+भोग=उपभोग] **त्यागाभोगापुरता**-वि. उपभोग घेण्यास व दुसऱ्याला देण्यास, दान करण्यास पुरेल इतका (पैसा, संपत्ति, धान्य इ॰). [त्यागभोग+पुरणें] **त्यागणें**-सक्रि. १ सोडणें; टाकणें; वर्जणें. २ (काव्य) टाकणें; उत्सर्ग करणें (मल, विष्ठा इ॰). 'लांगूल उभारूनि धाविन्नला वृषभ। त्यागिलें वीरें लेंडचि त्यावेळीं।' [त्याग] **त्यागी**-वि. १ संसार व सांसारिक बंधनें ज्यानें टाकिलीं, तोडिलीं आहेत असा (मनुष्य); विरक्त; वैराग्ययुक्त. २ दान देणारा; दानशूर. ३ सोडलें, त्याग केला आहे ज्यानें असा (मनुष्य). (समासांत) फलत्यागी=फलाचा त्याग केला आहे ज्यानें असा; -कर्मत्यागी-गृहत्यागी-देशत्यागी इ॰. [त्यागणें]

**त्याजण**—न. (कु.) एक दागिना.

**त्याजी**—वि. देणारा; दान करणारा; दानशूर. 'त्याजी जो धनदापरी सुकृत जें त्या जीव ऐसें गणी।' -र २. [सं. त्यज्]

**त्याज्य**-वि. टाकण्यास, सोडण्यास, त्याग करण्यास, वर्ज्य करण्यास, टाकून देण्यास-योग्य, शक्य, इष्ट, आवश्यक. 'पैं त्याज्य त्यजावयालागीं। जाणावी जरी अनुपयोगी।' -ज्ञा १६.२१४. [सं.] **॰स्वर**-पु. (संगीत) विवादी स्वर.

**त्यापक्षीं, त्यापेक्षां**—क्रिवि. त्या कारणावरून; त्यामुळें; सबब. [तो+पक्ष]

**त्यापासून**—क्रिवि. (काव्य.) तव्हांपासुन. 'त्यापासुनि देहानें वाचेनें प्रेमयुक्त चित्तानें। विप्रासि रौक्मिणेया मी पूजितसे सदैव चित्तानें।' -मोअनु ७.१०५.

**त्याले**—सना. (खा.) त्याला. [त्याला]

**त्यांशीं**—सना. (साष्टी कोळी) त्यांतून. 'त्यांशीं युगभद्र भद्र काय निघाला।' -मसाप १.२.२०.

**त्यास**—क्रिवि. त्याकारणामुळें; त्यास्तव; म्हणून; त्यामुळें; तशांत. -पया २४७.

**त्यांहां**—क्रिवि. (कों. राजा.) तेथें.

**त्याहांठीं**—क्रिवि. (कों. राजा.) तेथून.

**त्याहास**—सना. (व.) त्यांना.

**त्यांहीं**—सना. (काव्य) त्यांनीं. 'त्यांहींच ते सकळ पूरितकाम केले।' -र ३. [तो, ते]

**त्याहींआ**—सना. (खा.) त्यांचा. [तो]

**त्याहीस**—सना. (व.) त्यांना.

**त्यैचो**—सना. (कु.) त्यांचा.

**त्यो**—सना. १ (कुण.) तो. २ (कों. राजा गो.) त्या.

**त्रपा**—स्त्री. १ लाज; विनय; मर्यादशीलता. २ संकोच; ओशाळगत; लाजरेपणा; ओशाळीक [सं.]

**त्रय**—न. तीन वस्तु, व्यक्ती इ॰कांचा समुदाय; त्रिकूट; त्रिवर्ग. [सं.]

**त्रयस्थ**—वि. तिऱ्हाईत; पक्षभेदातीत; (दोघांपैकीं) कोणत्याहि पक्षास न मिळालेला; तटस्थ.

**त्रयी**—स्त्री. १ (व्यापक) तिघांचा समुदाय. 'गुणीं देवा त्रयी लाविली। गुणीं लोकीं त्रिपुटी पाडिली।' -ज्ञा १८.८१७. २ बाप, आजा व पणजा असे अनुक्रमानें येणारे तीन पूर्वज. ३ आई, आजी व पणजी या तिन्ही समुच्चयानें. ४ ऋक्, यजुस् व साम हे तीन वेद. ५ राजनीतीच्या आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दंडनीति या चार प्रकारांपैकीं दुसरा प्रकार. यासच धर्मविद्या किंवा धर्माधर्मविचार असें म्हणतात. आन्वीक्षिकी, वार्ता व दंडनीति हे शब्द पहा. [सं.] (वाप्र.) (एखाद्याची) **त्रयी उद्धरणें**-(एखाद्याला) आईबापावरून शिव्या देणें; त्याचे पितर उद्धरणें. सामाशब्द- **॰धर्म**-पु. ऋग्यजुस्साम या तीन वेदांत सांगितलेला धर्म; वेदोक्त कर्ममार्ग. 'म्हणऊनि मज एकेविण। हे त्रयीधर्म

अकारण।' 'हे यज्ञयाग तिन्ही वेदांनीं विहित असल्यामुळें या मार्गास त्रयीधर्म असें जुनें नांव आहे.' -गीर २८७. [त्रयी+धर्म] **त्रयीमध्यें उगवलेला**-वि. १ तिन्ही वेदांत पारंगत असलेला. २ (उप.) चोरी, चहाडी व शिनळकी या तीन गोष्टींत कुशल असलेला.

**त्रयोदश**—वि. १ तेरा. २ तेरावा. [सं. त्रयोदशन्] ०**गुणी विडा**-पु. पान, सुपारी, काथ, चुना, लवंग, वेलदोडा, जायफळ, जायपत्री, केशर, बदाम, कस्तुरी, कंकोळ व खोबरें या तेरा पदार्थांनीं युक्त असा विडा. **त्रयोदशाक्षरी मंत्र**-पु. तेरा अक्षरांचा 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र. **त्रयोदशा**-पु. मरणानंतर तेराव्या दिवशीं करावयाचें मृताचें श्राद्ध; (विरू.) तेरावा; तेरावें. [सं. त्रयोदश=तेरा+अहन्=दिवस] **त्रयोदशी**-स्त्री. हिंदु महिन्याच्या शुक्ल व कृष्ण पक्षांतील तेरावी तिथि. [सं.]

**त्रसरेणु**—पुस्त्री. उन्हाच्या कवडशांत दिसणारा अत्यंत सूक्ष्म रजःकण. हा तीन द्व्यणुकें मिळून सिद्ध होतो. हें वजनाचें अत्यल्प व सूक्ष्म परिमाण मानलें आहे. आठ त्रसरेणूंची एक लीक्षा व ५४ लीक्षांचा एक यव होतो. [सं.]

**त्रस्त**—वि. १ त्रासलेला; गांजलेला; उद्विग्न; जिकीरीस आलेला. २ भ्यालेला; घाबरलेला. [सं.] **त्रस्त(दृष्टि)**-स्त्री. (नृत्य.) वरच्या पापण्या वर व खालच्या खालीं ठेवून बुबुळें सारखीं फिरविण्याचा अभिनय.

**त्र(त्रा)हाटणें, त्राहटणें**—उक्रि. १ मारणें; नायनाट करणें. 'अहंकारातें त्रहाटी।' -ज्ञाप्र १३८. २ (वाद्यें, नगारा इ०) मोठयानें वाजणें, वाजविणें. 'आज्ञापितां दुर्योधनें। रणभेरी त्रहाटिल्या।' ३ सैन्य इ० सिद्ध करणें. -मनको. [सं. तड्]

**त्रांगडें**—न. कुलंगडें; लचांड. 'त्याच्या गळयांत त्रांगडें आलें.' [सं. त्रि+अंग]

**त्रागा**—पु. दुसऱ्याचें नुकसान व्हावें म्हणून किंवा दुसऱ्यावर ठपका यावा म्हणून संतापाच्या भरांत स्वतःलाच दुखापत करून घेणें किंवा स्वतःची हानि करून घेण्यास तयार होणें; डोक्यांत राख घालणें (क्रि० करणें). याच्या उलट झांसा. यांत दुसऱ्यापासून पैसे इ०उकळण्याकरितां इजा करण्याची धमकावणी दिलेली असते. झांसा अर्थ १ पहा. [गु. त्रागुं]

**त्राटक**—न. डोळे ताठ उघडून एकाच पदार्थाकडे, डोळयांना पाणी येईपर्यंत नासाग्राकडे, इष्ट ध्येयाकडे दृष्टि लावण्याची योगशास्त्रांतील क्रिया. -संयोग ३५५.

**त्राटिका**—स्त्री. १ एक राक्षसी. २ (ल.) कजाख स्त्री. [सं. ताटका]

**त्राण**—न. १ रक्षण; सांभाळ. २ रक्षण करण्याचें साधन; आधार. 'एवंगुण लक्षण। सात्त्विक भोज्य जाण। आयुष्याचें त्राण। नीच नवें हें।' -ज्ञा १७.१३१. ३ नरकापासून तार मुक्ति; मोक्ष. ४ अतिशय जोराचा, नेटाचा, सर्व शक्ति एकव केलेला प्रयत्न. 'एक शर सोडोनियां त्राणें। कर्णनंदन उडविल -जै १८.७९. ५ संतापानें, त्वेषानें केलेली आदळआप आरडाओरड इ०, हातपाय झाडणें व चडफडणें. ६ (जीर्ण व वस्तु, दुबळा मनुष्य, जनावर इ०कांत) राहिलेला, शिल्लक अ लेला दम; जीव; जोर; धडधाकटपणा; सत्त्व; ताकद; सार. [त्रा-त्राण]

**त्रांण**—पु. वत्ता; खलांतील घोटणा. 'पारा घालि घालि निबूरसें घळिजे। गारा फोडुनु घालीजे। त्रांणें।' -वैद्यक ४.

**त्राता**—वि. रक्षण करणारा; सांभाळ करणारा; संकटां सोडविणारा; तारणारा; वाली; रक्षणकर्ता. [सं. त्रा=रक्षण करणे

**त्राय**—स्त्रीन. १ रक्षण. २ बळ; जोर; सत्ता; सामर्थ्य. 'इ विवेकाची त्राय फेडिली। वैराग्याची खाली काढिली।' -३.५५२. ३ आधार; आश्रय. ४ किंमत. ५ (ल.) कथा. 'पै व णिया आणि जया। मेळु नाहीं धनंजया। तो पाहुनी पिसेया कैची त्राय।' -ज्ञा १८.६६७. ६ व्यवहार. 'मोक्षचि बंध होरे तरी मोक्ष शब्द कां साहे। अज्ञानाघरिं त्राये। वाउगी याची -अमृ ३.१२. [सं. त्रा]

**त्रास**—पु. १ (सूर्य, अग्नि, उग्र औषध, ज्वर, क्रोध, दुष्ट लो इ०कांपासून होणारा) उपद्रव; पीडा; दुःख. २ कंटाळा; वी किळस; अप्रीति; जिकीर. ३ भय; भीति. 'युद्धीं सदा हि ज नरसिंहाचा पार्थभृग धरि त्रास।' -मोकर्ण २.८. [सं. त्रस्-त्रा (वाप्र.) **त्रास त्रास करणें**-जुलुमाविरुद्ध बोभाटा, ओ करणें. **त्रास त्रास देणें**-अतिशय छळ करणें; जुलुमानें सतावू हैराण करून सोडणें. **त्रासणें**-उक्रि. १ कंटाळणें; त्रस्त हों जिकीरीस येणें; जर्जर होणें; बेजार होणें २ त्रस्त करणें; त्र देणें. 'ते ते शत्रु म्हणूनि मी त्रासी। सर्पतुल्य निर्धारें।' -मुआ ५.४१. ३ भिणें; भय पावणें. 'सौमित्रि त्रासे शापास। जै मंडुक सापास।' -मोरा घनाक्षर रामायण १२३. [त्रास **त्रासविणें**-सक्रि. त्रास देणें; गांजणें; छळणें; त्रस्त, जर्जर कर सतावणें. [त्रासणें] सामाशब्द-**त्रासक**-वि. त्रासदायक; कंटा वाणें; जिकीरीचें; त्रास देणारें. **त्रासभूत**-वि. १ अत्य जाचक; त्रासदायक; जुलमी; कंटाळवाणें; उपद्रवकारक झाले २ जुलमानें त्रस्त झालेला; छळलेला; गांजलेला; जिकीरीस आले [त्रास+सं. भूत=झालेला] **त्रासि(सी)क**-वि. १ त्रास देणार छळणारा; गांजणारा; जुलूम करणारा; दुःख देणारा. २ चिर खोर; चिडणारा; चरफडणारा. ३ एकलकोंडा; एकांतप्रिय; सम जास उबगलेला. [त्रासणें] **त्रासित**-वि. भ्यालेला; भयभ झालेला. [सं.]

**त्राहाटक**—वि. पूरक, कुंभक, रेचक व केवल कुंभक या प्राणायामाच्या चार प्रकारांतील चौथा प्रकार. ' पूरक कुंभक त्राहाटक रेचक। यथाशास्त्र युक्तीचेनि सम्यक। ' –स्वादि ९.३.२३. ' रेचक पूरक कुंभक। सर्वेचि सोडिती त्राहाटक। ' –ह १६.६४. [ सं. त्रस् ]

**त्राहा(ह)टणें**—उक्रि. १ (काव्य.) मोठयानें वाजविणें; (नगारा इ० वाद्यें) बडविणें. ' त्राहाटिल्या निशाणभेरी। गगन गर्जे मंगळ तुरीं। ' –एरुस्व ७.७०. –मुआदि २३.११९. –ह २२.८७. २ आपटणें; थापटणें.' आवेशें भुजा त्राहाटिती। विसणैले हांका देती। ' –ज्ञा १.१३३. ३ सिद्ध करणें. ' खचित पताका माहिपत्रें। त्राहाटलीं नेणों मयंकपत्रें। ' –वेसीस्व ६.७५. ४ चढविणें; पसरणें. ' रामपूजेची सामग्री। छेत्रें त्राहाटलीं तयावरी। ' –वेसीस्व ८.११९. [ सं. त्रस् ]

**त्राहाटविणें**—सक्रि. प्रतिष्ठेस चढविणें. ' पांडवें बापुडीं। वांज केलीं फिरती वेडीं। धांवोनिया काढी। अंगसंगें त्राहाटविलीं। ' –तुगा २८१. [ त्राहाटणें प्रयो. ]

**त्राहित्राहि**—उद्गा. रक्षण कर! रक्ष! रक्ष! या अर्थाचे भ्यालेल्याचे उद्गार. त्राहे त्राहे; त्राय त्राय; त्राह्य त्राह्य अशींहि या शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें रूढ आहेत. ' नंद-नंदना त्राहित्राहि मजसी। '–सुसु १९. [सं. त्रा=रक्षण करणें या धातूचें आज्ञार्थाचें द्वितीयपुरुषी एकवचन, द्वि. ] **०त्रासणें**–अक्रि. अतिशय कंटाळणें; जिकीरीस येणें; त्रस्त होणें; बेजार होणें; जर्जर होणें. **त्राहि भगवन्**–उद्गा. ' परमेश्वरा! या संकटांतून मला सोडीव! माझें रक्षण कर! ' या अर्थाचे भ्यालेल्याचे उद्गार. [ सं. त्राहि=रक्षण कर+भगवान्=ईश्वरा ] **त्राहि भगवन् करणें, करून सोडणें**–(एखाद्यास) त्याच्या तोंडून.' ईश्वरा, मला या त्रासांतून–संकटांतून सोडीव ' असे उद्गार निघण्याइतकें सतावून, त्रासवून सोडणें; जर्जर करणें. दे माय धरणी ठाय करून सोडणें. **त्राहेत्राहे**–उद्गा त्राहित्राहि पहा. ' म्हणे भरत हा राम। त्राहे त्राहे मेघश्याम। ' –वामन भरतभाव २६.

**त्रि**—वि. तीन. विशेषतः समासांत उपयोग. जसें– त्रिपद–त्रिभुवन–त्रिलोक–त्रिकाल इ०. [ सं. ]

**त्रिक्**—न. १ तिहींचा समुदाय; त्रय; त्रिकूट; त्रिवर्ग. २ (अंकगणित) एकापेक्षां अधिक अशा कोणत्याहि संख्येला तीन या आंकडयानें गुणतांना योजावयाची संज्ञा. जसें:–तीन त्रिक् नऊ, पांच त्रिक् पंधरा. ३ पाठीच्या कण्याचा खालचा भाग; माकडहाड. ४ जेथें तीन रस्ते, तीन नद्या, तीन पदार्थ, जिन्नस एकत्र मिळतात, होतात असें स्थान. [ सं. त्रि ]

**त्रिक**—न. (कर.) (विणकाम) रहाटाच्या तीन फेऱ्या होतील इतकें सूत. ' एक त्रिकभर दोरा मला दे. ' [ त्रि ]

**त्रिकटु**—पुन. सुंठ, मिरें व पिंपळी ह्या तीन औषधींचा समुदाय. [ सं. त्रि+कटु ]

**त्रिकप्रसव, त्रिप्रसव**—वि. एकामागून एक असे तीन मुलगे होऊन नंतर जन्मलेलें (अपत्य). हें अशुभ मानितात. [ सं. त्रि+प्रसव=जन्न ]

**त्रिकरण**—न. कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें व अंतःकरण अशा तीन प्रकारच्या करणांचा, इंद्रियांचा समुदाय. ' जरी भक्ति असे दृढेंसी। त्रिकरणसहमानसीं। तोचि लाधे ईश्वरासी। ' –गुच २.२७८. [ सं. त्रि + करण = इंद्रिय ] **त्रिकरणशुद्धि**–स्त्री. तन, मन, धन या तिहींची शुद्धि.

**त्रिकर्ण**—वि. दोन कान असूनहि एका कानास एक देंठ फुटलेला असतो असा (घोडा); घोडयाचा हा दोष अशुभ मानिला आहे. –मसाप २.१.५७. [ सं. त्रि+कर्ण=कान ]

**त्रिकर्म-कर्में**—नअव. ब्राह्मणांच्या षट्कर्मांपैकीं क्षत्रियादिकांना विहित असलेलीं अध्ययन, दान, व याजन हीं तीन कर्में. [ सं. त्रि+कर्मन् ] **त्रिकर्मी**–वि. ब्राह्मणांच्या षट्कर्मांपैकीं अध्ययन, दान व याजन हीं तीनच कर्में करण्याचा अधिकार असलेला (क्षत्रिय, वैश्य इ०). [ त्रिकर्म ] **त्रिकर्में**–नअव. नित्य, नैमित्तिक व काम्य अशीं तीन प्रकारचीं कर्में. [ त्रि+कर्म ]

**त्रिकांड**—वि. १ तीन पेरीं असलेला (ऊंस, बांबू इ०). २ तीन प्रकरणें, भाग असलेला (ग्रंथ, कोश). ३ कर्म, उपासना व ज्ञान हीं कांडें, प्रकरणें असलेला (वेद). ' तुझ्या अनुहताचा डमरू। सर्व शब्दें करीं गजरू। वेदानुवादें निरंतरू। त्रिकांडीं थोरू गर्जत।' –एभा १९.२. [ सं. त्रि+कांड=भाग ] **०वेद**–पु. कर्म, उपासना व ज्ञान या तीन कांडांनीं युक्त असा वेद. ' ज्ञानभक्तिकर्मकांड। वेद त्रिकांडनेमस्त। ' –एभा २०.७१. **त्रिकांडया**–पु. तिकांडें–डया पहा. **त्रिकांडया बभरू**–पु. (ल.) पराक्रमी योद्धा. भीमाचा नातू त्रिकांडया बभरू ह्याजवळ युद्धसामुग्री म्हणजे फक्त तीन बाण असत यावरून अतिशय शूर अशा योद्धयाला उद्देशून हा शब्द योजितात.

**त्रिकाल-ळ**—पुअव. १ भूत, वर्तमान व भविष्य हे तीन काळ. २ सकाळ, दुपार व संध्याकाळ ह्या दिवसांतील तीन वेळा. –क्रिवि. १ सकाळ, दुपार व संध्याकाळ अशा तीन वेळीं. २ भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळीं. (सामासांत) त्रिकाल–पूजा–स्नान–नैवेद्य संध्या–भोक्ता–भोजी–स्नायी–रक्षक इ० [ सं. त्रि+काल ] **०दर्शी**–वि. योगादिबलानें भूत, भविष्य व वर्तमान जाणणारा, दाखविणारा; सर्वज्ञ. [ सं. त्रि+काल दृश्= पहाणें ] **०ज्ञ–ज्ञाता–वेत्ता**–वि त्रिकालदर्शी पहा. [ सं. त्रि+काल+ज्ञा=जाणणें ] **०ज्ञान**–न. भूत, वर्तमान व भविष्य या तीन काळांचें (यौगिक बलानें होणारें) ज्ञान. **त्रिकाळी**–क्रिवि. उशीरा;

माध्यान्ह होऊन गेल्यावर बऱ्याच वेळानें; विशेषत: जेवणाच्या वेळीं हा शब्द वापरतात. जसें–त्रिकाळीं भोजन केल्यामुळें प्रकृति ढळली. त्रिकाळाचा, त्रिकाळानें अशा विभक्तिप्रत्ययांत रूपांचाहि या अर्थी प्रयोग करितात. [त्रि+काल]

**त्रिकाळी**—स्त्री. एक फुलझाड. तिरशिंगी पहा.

**त्रिकास्थि**—न माकडहाड. त्रिक् अर्थ ३ पहा. [सं त्रिक+अस्थि=हाड]

**त्रिकीं**—क्रिवि. एक या संख्येस तीन या संख्येनें गुणतांना योजावयाची संज्ञा. जसें:–एकें त्रिकीं तीन. त्रिक् पहा.

**त्रिकुट**—न. प्र. त्रिकूट पहा. इडा, पिंगला व सुषुम्ना या तिहींचा ऐक्यभाव.–हंको. **त्रिकुट शिखर**–न. योगाभ्यासमार्गो तील एक चक्र. 'त्रिकुट शिखरीं येऊनि जाणें।'–अंबाबाई रामदासी.

**त्रिकुटी**—स्त्री. १ तिघांचा समुदाय; त्रिकूट. 'हे गुणेंद्रिय धोकटी। देह धातूंची त्रिकुटी।'–ज्ञा १३.१०६८ २ चोरी, चहाडी व शिंदळकी ह्या तीन अवगुणांचा समुच्चय. 'त्रिदोषीं सांडिलें शरीर। त्रिकुटीं फिटलिया नगर। त्रिदाह निमालिया अतर। जैसें होय।'–ज्ञा १६.४३९.

**त्रिकूट**—न. १ तिघांचा समुदाय; त्रिवर्ग; त्रयी. २ तीन शिखरें असलेला पर्वत. ३ इडा, पिंगला व सुषुम्ना या तिघींचा समुदाय, ऐक्य. ४ चोरी, चहाडी व शिंदळकी ह्या तीन अवगुणांचा समुच्चय; त्रिकुटी अर्थ २ पहा. 'संचीता दळवी त्रिकूट जळवी दुर्वासना खालवी।'–वामनविराट ७.१. ५ एक कार्य करणाऱ्या, एका मताच्या तीन माणसांची जूट, गट. ६ (वैद्यक) सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें एकत्र केलेलें समभाग चूर्ण.–योर १.१७०. [सं.त्रि+कूट=समुदाय]

**त्रिकूट**—वि. ज्याच्या ललाटावर ओळीनें तीन भोवरे आहेत असा (घोडा). हा उत्तम समजला जातो.–अश्वप १.२५.

**त्रिकें**—क्रिवि. एकाहून अधिक अशा कोणत्याहि संख्येस तीन या संख्येनें गुणतांना योजावयाचा शब्द. त्रिक्, त्रिकी पहा.

**त्रिकोण**—पुन. १ तीन सरळ रेषांनीं मर्यादित अशी एक समतल आकृति; तीन बाजू असलेली सरळ रेषाकृति.–महमा ७. २ (सामा.) तीन कोन असलेली वस्तु. ३ –वि. तीन कोन असलेला; तिकोनी (पदार्थ, आकृति इ०). [सं.त्रि+कोण] सामाशब्द– **०मिती**–स्त्री. (गणित) गणितशास्त्रांतील एक विभाग. त्रिकोणाच्या दिलेल्या विवक्षित अवयवांवरून राहिलेल्या अवयवांचा निर्णय करणें हें या विभागाचें कार्य आहे. याचा उपयोग मुख्यत: ज्योतिषशास्त्र, मोजणीशास्त्र व नौकाशास्त्र यांत होतो. (इं.) ट्रिगॉनॉमेट्री. [सं. त्रिकोण+मिति=मोजणें] **०यात्रा**–स्त्री. प्रयागक्षेत्राजवळ विंध्याचलीं विंध्यवासनी, महासरस्वती व महालक्ष्मी, या देवतांचीं स्थलें आहेत त्यांची यात्रा.–तीप्र ९८. [त्रिकोण+यात्रा=जाणें] **–णासन**–न. कूर्मासन घालून बसल्यानंतर पाय पसरीत पसरीत ढुंगणापासून सुमारें एक हात लांब अंतर पडेल असे दोन्ही पायांचे पंजे दूर करावे म्हणजे हें आसन होतें. या आसनानें कमरेचे बंद मजबूत होतात.–संयोग ३३१. [सं. त्रिकोण+आसन=बसणें] **–णी–कांच–भिंग**–स्त्रीन. (पदार्थ.) घनत्रिकोणाकार भिंग; याचा प्रकाशाचें पृथक्करण करण्याकडे उपयोग करतात. (इं.) प्रिझम्.

**त्रिखंड**—न. स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तीन लोकांचा समुदाय. –वि. तीन तुकडे पाडलेला. 'कृष्णें बाण सोडिला पाहीं। शूळ तोडिला तीं ठायीं। सर्वेचि पाडिला भोई। तीं ठायीं त्रिखंड।'–एरुस्व १२.११७. [सं. त्रि+खंड=तुकडा, भाग]

**त्रिखुंट**—वि. तीन कोपरे, खुंट असलेला. [त्रि+खुंट]

**त्रिगण**—पु. १ मनुष्यानें आयुष्यांत साधावयाचे धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ. २ मनुष्यांच्या देव, मनुष्य व राक्षस या तीन कोटि, प्रकार, वर्ग. [सं. त्रि+गण=समुदाय]

**त्रिगत**—पु. (नाट्य.) विदूषक, सूत्रधार व पारिपार्श्विक यांच्या संवादाचा, नाटकांतील भाग.–भरतमुनिप्रणीत नाट्यशास्त्र, भानुकृत भाषांतर अध्याय ५ पृ. २३. [त्रि=तीन+सं. गत=गेलेला]

**त्रिगतिक**—वि. स्थलचर, जलचर व व्योमचर अशा तीन प्रकारचे (प्राणी).–मुलांचा व्यवहारकोश.

**त्रिगुण**—पुन. १ (वस्तु, प्राणी इ०कांच्या ठायीं असलेले) सत्त्व, रज व तम हे तीन प्राकृतिक गुण. 'तै प्राणिये तंव स्वभावें अनादिमायाप्रभावें। त्रिगुणाचेंनि आघवें। वळिले आहाती।'–ज्ञा १७.५६. २ माधुर्य, ओज व प्रसाद हे वाङ्मयांतील तीन गुण.–मुलांचा व्यवहारकोश. –वि. तिप्पट. [त्रि+गुण] **–णातीत**–वि. सत्त्व, रज व तम या तीन गुणांनींहि अलिप्त; ब्रह्मस्वरूप; ब्रह्मीभूत 'स्थितप्रज्ञ भक्तिमान् किंवा त्रिगुणातीत पुरुषांचीं भगवद्गीतेंत इतरत्र जीं वर्णनें आहेत तींहि याच अवस्थेचीं आहेत.'–गीर २४७. [सं. त्रि+गुण+अतीत=पलीकडे गेलेला] **–णात्मक**–वि. तीन गुणांनीं बनलेली; त्रिगुणरूप (माया, प्रपंच इ०) [सं. त्रि+गुण+आत्मा]

**त्रिगूळ**—पु ब्राह्मणांतील एक पोटजात तिरगूळ पहा.

**त्रिघात**—वि. (गणित) एका संख्येस त्याच संख्येनें दोनदां गुणून आलेला गुणाकार. घन (गणित) पहा. [सं. त्रि+घात=गुणणें]

**त्रिचरण**—विपु. अग्नि. अग्नीस तीन पाय असल्याचें वेदादि ग्रंथांत वर्णन आहे त्यावरून अग्नीस हें नांव आहे. तीन पाय असलेला. 'मग त्रिचरण चेतविला। आकाशपंथ धावती ज्वाळा।' [सं. त्रि+चरण=पाय]

**त्रिजग, त्रिजगत्, त्रिजगती**—नस्त्री. स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक; त्रैलोक्य 'तें दान या त्रिजगतीं । राजस पै ।' –ज्ञा १७.२९३. 'त्याचे खेळ ऐकतां वरिष्ठ। भक्त होती त्रिजगतीं।' 'आक्रमी स्वचरणें त्रिजगातें।' [सं. त्रि+जगत्]

**त्रिजात**—न. दालचिनी, तमालपत्र व वेलदोडे हे मसाल्याचे तीन पदार्थ समुच्चयानें.

**त्रिज्या**—स्त्री. (भूमिति) वर्तुळाच्या मध्यापासून परिघांतील कोणत्याहि बिंदूपर्यंत काढलेली सरळ रेषा. [सं.]

**त्रितय**—न. तिघांचा समुदाय; त्रय; त्रिकूट. [सं.]

**त्रितात्त्विक**—वि. (रसा.) ज्याच्या घटनेंत तीन जातींचीं तत्त्वें आहेत असा (पदार्थ). [सं. त्रि+तत्त्व]

**त्रिताप**—पुअव. आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक अशीं तीन प्रकारचीं दुःखें; त्रिविधताप. तापत्रय पहा. 'ऐसें कलुषकरिकेसरि। त्रितापतिमिरतमारी। श्रीवीरवरनरहरी। बोलिले तेणें।'–ज्ञा १७.४२३. –अफला ५९.[सं. त्रि+ताप=दुःख, पीडा]

**त्रिताल**—पु. (वाद्य.) एक ताल, ठेका. ह्यांत सोळा मात्रा व चार विभाग आहेत. [त्रि+ताल=ठेका]

**त्रितिकांड्या**—पु. (अशिष्ट) (प्र.) त्रिकांड्या. त्रिकांड्या पहा. [त्रिकांड्याबद्दल चुकीनें रूढ]

**त्रिदंडी**—पु. १ संन्याशांतील एक प्रकार. ह्या प्रकारांतील संन्यासी हा शिखा, सूत्र व कच्छ या तीन वस्तूंचा त्याग करीत नाहीं व यास पुन्हा गृहस्थाश्रमांत येतां येतें. अशी समजूत आहे. २ (ल.) काया, वाचा व मन या तिघांवर ज्यानें ताबा मिळविला आहे असा तपस्वी पुरुष. ३ तीन दंड धारण करणारा. [सं. त्रि+दंड=काठी; निग्रह, ताबा]

**त्रिदल-ळ**—वि. १ तीन दलें, पानें असलेलें; तिपानी. २ देंठावर तीन पानें असलेलें (बिल्वपत्र इ०). [सं. त्रि+ दल=पान] ०पूजा–स्त्री. त्रिदळानें, बिल्वदळानें केलेली शंकराची पूजा. 'त्रिदलपूजा रुद्राभिषेक। त्या पुण्यास पार नाहीं।' [सं. त्रि+दल+पूजा]

**त्रिदश**—पु. देव; सुर. 'मोहिलींसहवधू त्रिदशांचीं। आमुची न नवलें मृदशांचीं।' –वामन वेणुसुधा १.५. 'त्रिदशाः विबुधाः सुराः' –अमर [सं.]

**त्रिदाघ-ह**—पुअव. आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक दुःखें; त्रिविधताप; तापत्रय. 'त्रिदाह निमालिया अंतर। जैसें होय।' –ज्ञा १६.४३९. [सं. त्रि+ दाघ-ह=ताप, उष्णता]

**त्रिदिन**—न. तीन दिवसांचा अवधि, काळ. [सं. त्रि+दिन=दिवस]

**त्रिदोष-ख**—पुअव. १ कफ, वात आणि पित्त हे शरीरांत असणारे तीन दोष, धातु. 'त्रिदोषीं सांडिलें शरीर।' –ज्ञा १६.४३९. २ वात, कफ व पित्त या शरीरांतील तीन दोषांचा एकाच वेळीं झालेला क्षोभ; सन्निपात. 'धातयाही गेलिया शरण। त्रिदोषीं न चुके मरण।' –ज्ञा १६.२५५. 'असतां अपराध आणों नये मुखां। वदतां त्रिदोखा पात्र झाले।' –व ५४२. [सं. त्रि+दोष] ०वायु-विकार–पु. त्रिदोषांचा क्षोभ. त्रिदोष अर्थ २ पहा.

**त्रिधा**—स्त्री. (प्र.) त्रेधा. त्रेधा पहा.

**त्रिधा**—वि. तीन प्रकारचा; त्रिविध. 'एवं कर्म कर्ता ज्ञान। या तिहींचें त्रिधा चिन्ह। दाविलें तुज सुजन–। चक्रवर्ती।' –ज्ञा १८.६८९.–एभा ३.७८. –क्रिवि. तीन प्रकारानीं; तीन मार्गांनीं. [सं.]

**त्रिधातुक**—न. कफ, वात व पित्त या तीन धातूंनीं बनलेलें शरीर. 'ऐसा जो भक्तु होये। तयाचें त्रिधातुक हें जें जाये। –ज्ञा ११.६९९. [सं. त्रि+धातु]

**त्रिधारी निवडुंग**—पु. निवडुंगातील एक भेद. याला तीन धारा असून धारेच्या कडेवर काटे असतात. याचीं मोठमोठीं बेटें होतात. यांतून पुष्कळसा पांढरा चीक निघतो. याच्या चिकांत सोमल शुद्ध करतात. मुंबईकडे दिवाळीच्या दिवसांत याचे तुकडे करून त्यांत वाती पेटवितात. –वगु ४.२.

**त्रिनयन, त्रिनेत्र, त्रिलोचन**—वि. तीन डोळे असलेला; (शंकर, महादेव). [सं. त्रि+नेत्र, नयन, लोचन=डोळा]

**त्रिपताक(हस्त)**—पु. (नृत्य). हाताचीं सर्व बोटें सरळ पसरून किंचित् आंखडून व करंगळीजवळचें बोट वांकवून करितात तो अभिनय. [सं. त्रि+पताका+हस्त] **त्रिपताका**–स्त्री. पांच बोटांचे तीन भाग (दोन दोन बोटांचे दोन, व अंगुष्ठाचा एक, असे) करून निशाणाचे तीन फरारे करणें. 'त्रिपताकाचिया खुणा।' –भाए ४५५. [सं. त्रि+पताका]

**त्रिपद**—न. तीन पदांचा, शब्दांचा समूह; तत्, त्वम्, असि या तीन पदांचा समुच्चय. 'जंववरी त्रिपद शोध न घडे।'–परमा २.१३. [सं. त्रि+पद=शब्द] –वि. १ तीन पाय असलेला. २ तीन चरण असलेला (श्लोक, कविता). ३ (अंकगणित) उणें, अधिक चिन्हांनीं संयुक्त अशी तीन पदांनीं युक्त (संख्या इ०). [त्रि+ पाय=पद, चरण] ०भूमि–स्त्री. (विष्णूनें वामनावतारांत बलि राजाजवळून घेतलेली) तीन पावलांची जमीन म्हणजेच स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक. [त्रि+पद=पाऊल+भूमि=जमीन] ०शोधन–न. तत्, त्वम् व असि या तीन पदांची चिकित्सा, शोध, समीक्षा.

**त्रिपदा**—स्त्री. तीन पदांचा गायत्री छंद. 'त्रिपदा, त्रिकाळीं अर्घ्य देतां। त्रैविद्या तत्त्वतां त्या नांव।' –एभा ११.१३३७. [त्रि+पद=ओळ] ०जप–पु. गायत्री मंत्राचा जप. 'त्रिपदाजपें पवित्र

पूर्ण । या लागीं वेदांचें निवासस्थान।' -एभा ११.१३८०. [ त्रिपदा+जप ]

**त्रिपदी**—स्त्री. तीन पायांची घडवंची; तिवई [सं. त्रि+पद]

**त्रिपन्न**—वि. त्रपन्न पहा.

**त्रिपर्ण**—पु. पळसाचें झाड. याला एका देंठावर तीन पानें असतात म्हणून हें नांव. -वि. तीन पानें, दळें असलेला.[सं. त्रि+ पर्ण=पान ]

**त्रिपाद**—पु. अभि. [ सं. त्रि+पाद=पाय ]

**त्रिपाद**—पु. एका राशींत ज्याच्या तीनचतुर्थांश अंशाचा समावेश झाला आहे असें कृत्तिका, पुनर्वसु इ० नक्षत्र. -वि. एका राशींत ज्याच्या तीन चरणांचा समावेश झाला आहे असें कृत्तिकादि नक्षत्र. [ सं. त्रि+पाद=पाव भाग ] ०**लागणें**-त्रिपाद नक्षत्र असतांना मरण येणें, मृत्युपावणें. हें अशुभ मानिलें आहे. **त्रिपादभूमि**-स्त्री. त्रिपदभूमि पहा.

**त्रिपार्श्व**—पु. प्रकाशाचें पृथक्करण करण्याच्या उपयोगाचें कांचेचें-तीन कडा असलेलें-भिंग;(इं.)प्रिझम्. [सं.+त्रिपार्श्व=बाजू]

**त्रिपुच्छ**—मसक पहा.

**त्रिपुट-ताल**—पु. (ताल) कर्नाटकी संगीतांतील एक ताल. याचे मात्राप्रकार ६, ८, ९, १०, ११, १३, असे आहेत. त्रिताल पहा.

**त्रिपुटी**—स्त्री. (वेदांत) एक जर नसेल तर बाकीच्या दोहोंची सिद्धि होणार नाहीं अशा तऱ्हेनें एकमेकाशीं संबद्ध असलेल्या तीन गोष्टींचा समुच्चय; कर्ता, कर्म व क्रिया अशा संबंधानें परस्परांशीं संबद्ध असलेला तिघांचा समुदाय. त्रिपुटी अनेक आहेत. जसें:- परमेश्वर, आत्मा व जगत; ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान; ध्येय, ध्याता व ध्यान;; कर्ता, कर्म व क्रिया; दृश्य, द्रष्टा व दर्शन; ब्रह्म, माया व जीव; लक्ष, लक्षिता व लक्षण; साध्य, साधक व साधन; उपमा, उपमेय व उपमान; तस्यैवाहम्, तवैवाहम् व त्वमेवाहम् इ० 'परी अज्ञानाच्या पटीं। अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी। तेथ चितारणें हे त्रिपुटी। प्रसिद्ध जे कां।' -ज्ञा १८.४६०. 'भ्रमाची त्रिपुटी वाढवी सदा।' -एभा २.४५९. 'ध्येय ध्याता ध्यान। ज्ञेय ज्ञाता ज्ञान। नुरे भज्य भजक भजन। म्हणे त्रिपुटी जपें गेलि विसरोनि। तटस्थ वाणी निगमाची।' 'परमेश्वर, आत्मा, जगत् या त्रिपुटीच्या स्वरूपाबद्दल सदर शास्त्रांच्या ज्या नव्या नव्या कल्पना प्रसिद्ध होत आहेत......' -टिले ४.४८४. [ सं. त्रि+पुट ] ०**कारण**-न. त्रिपुटी. 'जेथे ज्ञेय ज्ञाता ज्ञान निश्चित। ध्येय ध्याता ध्यान नाठवत। त्रिपुटीकारण नाहीं जेथें। निजे तेथें निज बाळा।' [ त्रिपुटी+कारण ]

**त्रिपुंड्र**—पुन. शैव आपल्या कपाळावर भस्माचे आडवे तीन पट्टे ओढून करितात तें चिन्ह; रामानुजपंथी वैष्णव आपल्या कपाळावर गोपीचंदनाचे तीन उभे पट्टे लावून करितात तो तिलक, चिन्ह. -वि. कपाळावर भस्माचे आडवे पट्टे किंवा गोपीचंदनाचे तीन उभे पट्टे धारण करणारा. [ सं. त्रि+पुंड्र=पट्टा ] ०**धारी**-वि. कपाळावर त्रिपुंड्र धारण करणारा; रामानुजपंथीय वैष्णव. [ सं. त्रि+पुंड्र धारिन्=धारण करणार ]

**त्रिपुर**—न. एक प्रांत. याचें आधुनिक नांव टिप्पेरा असें आहे.

**त्रिपुर**—पु. १ या नांवाचा एक दैत्य. यास शंकरानें मारलें. २ त्रिपुरासुराचीं तीन नगरें. -शर. 'त्रिगुण त्रिपुरीं वेढिला।' -ज्ञा १७.२. ३ कार्तिकी पौर्णिमेस देवापुढें दीपमाळेवर अथवा इतरत्र कापूर इ० कांचा लावतात तो मोठा दिवा. ४ शिवरात्रीस स्त्रिया शंकरापुढें लावितात त्या वाती, दिवे. ५ देवळासमोर उभारलेला दीपस्तंभ, दीपमाळ. [ सं. ] -**रारि**-पु. त्रिपुराचा नाश करणारा; शंकर. 'नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगितलें जें।' -ज्ञा १८.१७५१. [ सं. त्रिपुर+अरि=शत्रु ] **त्रिपुरी पुनवपौर्णिमा**-स्त्री. कार्तिक शुद्ध पौर्णिमा. या दिवशीं देवळांत त्रिपुर लावतात. **त्रिपुरोत्सव**-न. कार्तिकी पौर्णिमेस देवालयांत त्रिपुर लावून करतात तो दीपोत्सव. [ त्रिपुर+उत्सव ]

**त्रिपुरुष**—पुअव १ बाप, आजा व पणजा अशा तीन पिढ्या समुच्चयानें. २ बाप, आजा व पणजा या तीन पुरुषांपैकीं कोणीहि एक. [ त्रि+पुरुष ]

**त्रिफणी**—स्त्री. तीन फण असलेली पाभर. तिफण-णी पहा.

**त्रिफला-ळा**—स्त्रीपु. हिरडा, बेहडा व आवळकाठी यांचें समभाग चूर्ण. [ त्रि+फल=फळ ]

**त्रिबुनाल**—पु. (गो.) न्यायासन; जज्ज कोर्ट. [ पोर्तु. इं. ट्रायब्यूनल् ]

**त्रिबिया**—स्त्री. पायांतील एक दागिना. 'दांड त्रिबिया चरणीं ल्याली नूपुरवाळे।' -वसा १५.

**त्रिभंग**—पु. ( शरीर इ० ) तीन ठिकाणीं वांकणें, वांकविणें. 'त्रिभंगी उभा सावळें रूप ज्याचें। वसावें मनीं सर्वदा ध्यान त्याचें।' -संवि २२.४५. 'या हेतु रासरंगि। ठाण मांडुनी त्रिभंगि।' -रास १.२७. [ सं. त्रि+भंग=मोडणें, वांकणें ]

**त्रिभज्या**—स्त्री. त्रिज्या.

**त्रिभाग**—पु. चुना, वाळू व ताग हे तिन्ही मिसळून केलेला लगदा; रद्दा; चिखल. 'त्रिभागामधें खडा असे। त्रिभागासारिखाचि भासे।' -दा ८.५.४६. [ त्रि+भाग ]

**त्रिभांतर**—पु. ग्रहाचा सूर्यांतरकोन सूर्याच्या पूर्वेस किंवा पश्चिमेस ९० अंशांचा झाला म्हणजे त्याला त्या दिशेचें त्रिभांतर म्हणतात. -सूर्य २४. [ सं. ]

**त्रिभुवन**—न. स्वर्ग, मृत्यु व पाताल हे तीन लोक; त्रैलोक्य; त्रिजगत्. 'कां तीर्थे जियें त्रिभुवनीं।' -ज्ञा १.२६ [ सं. त्रि+

भुवन=लोक, जग] **त्रिभुवनकीर्ति(रस)**-पु. एक आयुर्वेदीय मात्रा. हिंगूळ, बचनाग, सुंठ, मिरीं, पिंपळी, टाकणखार व पिंपळमूळ हीं समभाग घेऊन, एकत्र करून व खलून झालेल्या मिश्रणास तुळशीचा रस, आल्याचा रस व धोत्र्याचा रस यांच्या तीन भावना (पुटें) द्याव्या म्हणजे हा रस तयार होतो, हा ज्वर व सन्निपात यांचा नाश करितो. -योर १.३७४. **त्रिभुवनगोसावी**-पु. शंकर, राम व दत्तात्रेय हे अवतार किंवा मच्छिंद्रनाथ, जालंदरनाथ अथवा एखादा विख्यात साधुपुरुष त्याच्या संबंधीं योजावयाचा शब्द. 'तो राम त्रिभुवनगोसावी। काय एक करूं न शके।' [त्रिभुवन+गोसावी]

**त्रिभोनलग्न**—न. (ज्यो.) पूर्वक्षितिजापासून ९० अंशावर असलेलें किंवा पूर्वक्षितिजापासून तिसऱ्या लग्नाचें स्थान.

**त्रिमल्ल-मल्ली**—पु. कर्नाटकांतील एक शूद्र जात व तींतील व्यक्ति. तिरमल्ली पहा.

**त्रिमात्रका, त्रिमात्रा**—स्त्रीअव. ॐ काराच्या अकार, उकार व मकार ह्या तीन मात्रा. 'कां जे एकाक्षरपणेसीं। त्रिमात्रकेचिये कुशीं। प्रणवु होतां गर्भवासीं। सांकडला।' -ज्ञा १८.१५१०. [सं. त्रि+मात्रा]

**त्रिमाळिक**—वि. तीन मजले असलेलें; तिमजली (घर, इमारत इ०). 'तरी त्रिमाळिकें धवळारें। करावीं कां।' -ज्ञा ५.११४. 'वर्षाकाळीं पर्जन्य धाडी। त्रिमाळिकें पाडी धवळारें।' -एभा २१.८४९. [सं. त्रि+म. माळा=मजला]

**त्रिमि(मी)र**—न. (काव्य) अंधार; (प्र.) तिमिर. 'वारलें हें झाड त्रिमिराचें।' [सं. तिमिर अप.]

**त्रिमूर्ति**—पु. ब्रह्मा, विष्णु व शंकर हे तिघे मिळून झालेली मूर्ति; रूप; दत्त. [त्रि+मूर्ति] (ख्रि) ईश्वर, पुत्र व स्पिरिट या तिघांची बनलेली मूर्ति. [इं. ट्रिनिटि]

**त्रियंच**—स्त्री. घारी; एक प्रकारची पुरी. 'त्रियंच नाम घारी बरवंट। व्रजपुरीसीं।' -ऋ ८२

**त्रियुक्पद**—वि. तीन पदें असलेला; तीन पदांचा; त्रिपद (-वि.) अर्थ ३ पहा. [सं. त्रि+युज्=जुळणें+पद=संख्या]

**त्रियोदश-शी**—स्त्री. (प्र.) त्रयोदशी. त्रयोदशी पहा.

**त्रियोदशा**—पु. तेरावें; (प्र.) त्रयोदशा. त्रयोदशा पहा.

**त्रिराजिक**—पु. एक दागिना. -देहु ४५.

**त्रिरात्र**—न. तीन दिवस व तीन रात्रींचा अवधि; तीन अहोरात्रांचा समुदाय. -क्रिवि. तीन अहोरात्रपर्यंत. 'कन्येनें मातेचें अशौच त्रिरात्र धरावें.' [सं. त्रि+रात्रि] **-आंतला**-वि. जो मेला असतां त्रिरात्र अशौच पाळावें लागतें असा (सगोत्रज).

**त्रिराम**—पुअव. दाशरथी राम, परशुराम व बळिराम. -मुलांचा व्यवहारकोश. [सं. त्रि+राम]

**त्रिराशी**—स्त्री. (अंकगणित) त्रैराशिक पहा.

**त्रिरुच्चारित**—वि. १ तीनदां उच्चारलेलें. २ (ल.) निश्चित; ठाम; न बदलणारें; निर्धाराचें; खात्रीचें. [सं. त्रि=तीन वेळां+उच्चारित=उच्चारिलेलें, बोललेलें]

**त्रिरूप**—वि. त्रिविध; तीन प्रकारचा. 'तैसें तिहीं गुणीं तप। येथ जाहालें आहे त्रिरूप।' -ज्ञा १७.१९७. [सं. त्रि+रूप]

**त्रिलोक, त्रिलोकी**—पुस्त्री. त्रैलोक्य; स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक. [सं.] **त्रिलोकांत झेंडा लावणें-मिरवणें**-तिन्ही लोकांत नांव गाजविणें, गाजणें.

**त्रिवट**—पु. (ताल) संगीतांतील एक ताल. त्रिताल पहा.

**त्रिवर्ग**—पु. १ मनुष्यमात्रानें आपुल्या आयुष्यांत साधावयाच्या चार पुरुषार्थांपैकीं धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ. 'तेथ त्रिवर्गाचा अणुआरु। आडऊ निघाला जो अपारु। तो महाभारत प्राकारु। भोंवता केला।' -ज्ञा १८.३६. २ उत्कर्ष, साम्यावस्था व ऱ्हास या राज्याच्या, राष्ट्राच्या तीन अवस्था. ३ प्रकृतीचे, स्वभावाचे सत्त्व, रज व तम हे तीन गुण. ४ त्रिफळा (हिरडा, बेहडा व आवळकाठी). ५ तिघेजण; (माणसांचें) त्रिकूट. 'आम्ही त्रिवर्ग.' [सं. त्रि+वर्ग]

**त्रिवली-ळी**—स्त्री. पोटाला पडणाऱ्या तीन वळयांचा, वळकुट्यांचा समुदाय. 'सागरीं लहरींची नव्हाळी। तैसी उदरीं त्रिगुण त्रिवळी।' -एरुस्व १.३६. 'त्रिवळी मग तयेची स्पष्ट मोडोनि गेली।' -सारुह २.२८. [सं. त्रि+वली=ओळ, वळकुटी]

**त्रिवाचा**—वि. (काव्य) त्रिवार; तीन वेळां दिलेलें, उच्चारलेलें वचन, गोष्ट, शब्द; निश्चित, ठाम अभिवचन, गोष्ट, शब्द. 'तो हा हरिविजयग्रंथ। दुजा नाहीं विपरीतार्थ। सत्य सत्य त्रिवाचा।' -ह १.११४. 'जानकी आणीन हें प्रमाण। सत्य सत्य त्रिवाचा।' -रावि १७.११८. -क्रिवि. निश्चितपणें; निश्चयेंकरून; पूर्णपणें; खात्रीपूर्वक. [सं. त्रि+वाचा=वाणी, बोलणें]

**त्रिवार**—क्रिवि. तीन वेळां; तीनदां. हा शब्द निश्चय, संकल्प, वचन, अपराध, दंड, धर्म, शिक्षा, बोध, उच्चारण इ० शब्दांसह समासांत खचित, निश्चित, निःसंदेह, ठाम, सक्त, जोराचा, नेटाचा इ० अर्थानें योजतात. [सं. त्रि+म. वार] **०पुण्य**-न. 'मी देतों, अर्पण करितों' अशा अर्थाचे शब्द गंभीरपणें तीन वेळां उच्चारून दिलेलें; अर्पण केलेलें पुण्य. [त्रिवार+पुण्य]

**त्रिविक्रम**—पु. १ (बायकी) गोपा. २ बारशाच्या दिवशीं मुलाचें नांव ठेवतांना बायका कुंची घातलेला नारळ पाळण्याच्या खालूनवर, वरून खालीं देतात तो. ३ विष्णूचें नांव. [सं. त्रि+विक्रम]

**त्रिविध**—वि. तीन प्रकारचा; तीन स्वरूपाचा. (समासांत) त्रिविध-दान-पापपुण्य-स्नान इ०. =तीन प्रकारचें, स्वरूपाचें म्हणजे कायिक, वाचिक व मानसिक दान, पुण्य, पाप इ०. शिवाय

सात्त्विक, राजस, तामस आणि आध्यात्मिक, आधिदैविक, आदिभौतिक इ० दुसरे तीन प्रकारांचे गट आहेत. ते त्या त्या शब्दांच्या अर्थामध्यें पहावे. ' तेंचि ज्ञानत्रयवशें। त्रिविध कर्म जें असे। ' –ज्ञा १८.५८५. [सं. त्रि + विधा = प्रकार, जाति] **०अवस्था**–स्त्री. जीवाच्या तीन अवस्था; जागृति, स्वप्न व सुषुप्ति. **०आहार**–पु. सात्त्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारचा आहार. **०कर्म**–न. संचित, क्रियमाण व प्रारब्ध असें तीन प्रकारचें कर्म. **०तप**–न. कायिक, वाचिक व मानसिक अशा तीन स्वरूपाचें तप. **०ताप**–पु. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असें तीन प्रकारचें दुःख; पीडा; तापत्रय. आध्यात्मिक ताप म्हणजे देह, इंद्रियें व प्राण यांच्यापासून होणारा ताप किंवा स्थूल व सूक्ष्म शरीरामध्यें होणारा आधिव्याधिरूप ताप होय. ' देवापासूनि तो आधिदैविक। मानस ताप तो अध्यात्मिक। भूतापासाव तो भौतिक। या नांव देख त्रिविधताप। ' –एभा २२.३०९. आधिभौतिक ताप म्हणजे स्वशरीराहून भिन्न अशा दृष्टिगोचर प्राण्यांपासून होणारा त्रास. आधिदैविक ताप म्हणजे दैवी प्रेरणेनें, दैवी क्षोभापासून होणारा ताप. उदा० अतिवृष्टि, अनावृष्टि, भूकंप, शीतोष्णादिकांचा अतिरेक इ०. ' तुका म्हणे त्रिविधताप। मग जाती आपोआप। ' 'हा त्रिविधताप करि भग्न वपु विरहाग्नि तुझा जाळी। ' –देप १०. [सं. त्रिविध+ताप= दुःख; पीडा] **०देह**–पु. स्थूल, सूक्ष्म व कारण असा तीन प्रकारचा देह. **०दानें**–नअव. सात्त्विक, राजस व तामस अशीं तीन प्रकारचीं दानें. **०नायिका**–स्त्रीअव. वयाच्या मानानें केलेले स्त्रियांचे तीन वर्ग, प्रकारः–मुग्धा, मध्या व प्रौढा. **०परिच्छेद रहित**–वि. देश, काल आणि वस्तु या तीन परिच्छेदांनीं रहित; देश, काल व वस्तु या तीन परिच्छेदापलीकडे गेलेला; दिक्कालाद्यनवच्छिन्न. [सं. त्रिविध+परिच्छेद+रहित] **०परीक्षा**–स्त्री. (वैद्यक) दर्शन (=चर्या पाहणें), स्पर्शन (=नाडी पाहणें) व प्रश्न (=चौकशी करणें) या तीन प्रकारांनीं वैद्यानें करावयाची रोग्याची परीक्षा. **०प्रारब्ध**–न. तीन प्रकारचें प्रारब्ध; अनिच्छा प्रारब्ध, स्वेच्छाप्रारब्ध व परेच्छाप्रारब्ध; दैव. [त्रिविध+प्रारब्ध=दैव] **०मंगल**–न. अंगीकृत कार्य निर्विघ्न पार पडावें म्हणून त्या कार्याच्या आरंभीं केलेला आशीर्वादात्मक (=आशीर्वाद मिळावा म्हणून देवांची प्रार्थना करणें), वस्तुनिर्देशात्मक (=एखाद्या पूज्य पुरुषाचें, कृत्याचें ध्यान करणें), आणि नमस्कारात्मक (=कुलदेवता, गुरु इ०कांना नमस्कार करणें) असा तीन प्रकारचा विधि. **०लक्षणा**–स्त्री. जहत्, अजहत् व जहदजहत् अशी तीन प्रकारची लक्षणा. जहल्लक्षणा; अजहल्लक्षणा व जहदजहल्लक्षणा हे शब्द पहा. [सं. त्रिविध+लक्षणा] **०संबंध**–पु. अभिधान संबंध, लक्षणासंबंध आणि व्यंजनासंबंध अशा तीन प्रकारात्मक संबंध. अभिधानसंबंध म्हणजे वाच्यवाचकसंबंध किंवा शब्द शब्दार्थ संबंध (=शब्द व त्यांचा अर्थ यांमधील संबंध) या संबंधावरून एखाद्या वाक्याचा केवळ शब्दशः अर्थ प्रतीत होतो. लक्षणासंबंध म्हणजे लक्ष्यलक्षकसंबंध (=शब्दांनीं पर्यायानें सुचविलेला अर्थ व शब्दाचा वाच्यार्थ या परस्परांतील संबंध) यानें लाक्षणिक किंवा अलंकारिक अर्थ प्रतीत होतो. उदा० सारागांव=गांवांतील लोक. व्यंजनासंबंध म्हणजे जो अर्थ सांगावयाचा त्या अर्थाच्या पदाचा वाक्यांत उपयोग न करतां प्रकारांतरानें त्या अर्थाचा बोध करावयाचा. जसें:–' ग्राहवती नदी ' येथें नदींत मगर आहेत या अर्थानें नदीस स्नानास जाऊं नको असा अर्थ घ्यावयाचा असतो **०प्रतीति**–स्त्री. गुरूपासून मिळालेलें, शास्त्राभ्यासानें प्राप्त झालेलें व स्वतः निरीक्षणानें मिळविलेलें असें तीन प्रकारचें ज्ञान, अनुभव. [सं. त्रिविध+प्रतीति=ज्ञान, अनुभव]

**त्रिविधाहंकार**–पु सात्त्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारची स्वतःची जाणीव; परमेश्वरापासून अथवा बाह्य विश्वाहून आपण वेगळे आहोंत ही भावना; अहंकारत्रय; अहंकार पहा. [सं. त्रिविध+अहंकार=मीपणा]

**त्रिविष्टप**—न. स्वर्गः इंद्रलोक. ' नारायण अजित जसा अजित तसाचि त्रिविष्टपीं नर तो। ' –मोभीष्म ३.२८. [सं.]

**त्रिवृत्करण**—न. तिहींचें मिश्रण; तीन सूक्ष्म मूलतत्त्वांचें मिश्रण. ' या तिहींच्याच मिश्रणानें म्हणजे त्रिवृत्करणानें पुढें सर्व विविध सृष्टि निर्माण झाली. ' –गीर १८२. [सं.]

**त्रिवेणी**—स्त्री. १ प्रयाग येथील गंगा, यमुना व गुप्त असलेली सरस्वती या तीन नद्यांचा संगम होऊन झालेला प्रवाह. ' प्रवेशला कोण असे त्रिवेणी। ' –सारुह २.९८. २ तीन पेडांची गुंफलेली वेणी, केशरचना [सं. त्रि+वेणि] **०चा**–वि. (सोनारांचा धंदा) सोनें, चांदी व तांबें या तीन धातूंच्या तारांनीं बनविलेला (वाळा, अंगठी, सळा इ०).

**त्रिवेणी**—स्त्री. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, कोमल धैवत व तीव्र निषाद हे स्वर लागतात वादी ऋषभ, संवादी पंचम. हा सायंकाळीं गातात. [सं.]

**त्रिशंकु**—पु. १ त्रिशंकु राजा हा पृथ्वी व स्वर्ग या दोहोंमध्यें अधांतरीं लोंबत राहिला होता असें पुराणांत वर्णन आहे त्यावरून धड इकडेहि नाहीं आणि धड तिकडेहि नाहीं अशी ज्याची अवस्था झाली आहे असा मनुष्य. २ दक्षिणेकडील एक तारकापुंज. –वि. तीन खिळे मारलेला (उंबरठा इ०). ' काय बहु बोलों सुभटा। सांगितलिया निकृष्टा। नरकाचा दारवंटा। त्रिशंकु हा। ' –ज्ञा १६. ४३०. [त्रि+सं. शंकु=खिळा]

**त्रिशती**—स्त्री. १ तीन शेकड्यांचा, तीनशेंचा समुदाय. २ देवीच्या प्रीत्यर्थ तीनशें ब्राह्मणांस पूजा करून जेवावयास घालण्याचा विधि [सं. त्रि+शत=शंभर]

**त्रिशिख**—वि. तीन शिखरें, तुरे, डोकीं असलेला. [ सं. त्रि+ शिखा=शिखर, तुरा, मस्तक ]

**त्रिशिंगी**—स्त्री. एक फूलझाड; तिरशिंगी-संगी; ह्या झाडाचीं फुलें सकाळ, दुपार व सायंकाळ अशा तिन्ही वेळीं उमलतात. हिचीं फुलें निळसर, पांढरीं व पंचरंगी असतात तिरशिंगी-संगी पहा. [ सं. त्रिसंधि ]

**त्रिशुद्धि-द्धी**—स्त्री. १ (एखादें कागदपत्र इ०) तीन वेळां तपासून शुद्ध केलें आहे हें दर्शविण्याकरितां त्या अर्थाची त्यावर मारलेली टीप. २ त्रिवार शुद्ध झालेली स्थिति. 'मी ऋणत्रयापासून त्रिशुद्धि। मुक्त झालों भगवंता।' ३ तीन वेळां प्रतिज्ञापूर्वक, शपथपूर्वक उच्चारून, सांगून झालेली (एखादें वचन; गोष्ट इ०कांची) शुद्धता; सत्यता; निश्चितता; सांगता. 'पिता निंदी त्रिशुद्धि। पिशाच होय दुरात्मा।' ४ तीन वेळां स्नान करून, धुवून, घासून, तापवून, कोणताहि एखादा पदार्थ शुद्ध करण्याचा प्रकार करून झालेली (व्यक्ति, वस्तु इ०कांची) शुद्धता. ५ तीन वेळां, तीन ठिकाणीं स्नानें घालून झालेली विटाळशीची शुद्धता. ६ कायिक, वाचिक व मानसिक शुद्धता, शुद्धीकरण. -वि. तीन वेळां तपासून, शुद्ध करून बरोबर, खरें ठरविलेलें. हा शब्द सरकारी कागदपत्र, अर्ज इ० कांवर-तो पूर्णपणें मुकर करण्यांत आला आहे हें दर्शविण्याकरितां-लिहितात. -क्रिवि. खरोखर; निश्चयेंकरून; त्रिवार खरें. 'म्हणूनि आखरामाजि सांपडे। कीं कानावरी जोडे। हें तैसें नव्हे फुडें। त्रिशुद्धी गा।' -ज्ञा ६.३१६. 'तरी मी प्राण त्याजीन आधीं। हें त्रिशुद्धी जाणपां।' -मुवन १.११०. [ सं. त्रि+शुद्धि ]

**त्रिशूल-ळ**—पुन १ तीन फाळ असलेलें शंकराचें एक आयुध. २ (सोनारी धंदा) शंकाराच्या त्रिशूळाच्या आकाराचें, लोखंडी तारेचें सोनाराचें एक हत्यार. याच्या तीन टोकांत वज्रटीकेचे तीन मणी अडकवून डाक देतां येतो व टीक तयार करतां येते. [ सं त्रि+शूल=सुळ ]

**त्रिसंधान**—न. दोन दोन दर्भांच्या दोन जुळया घेऊन त्यांची दोरी वळून अशाच पुन्हां दोन जुळया दोन वेळ घेऊन त्यांची तीन ठिकाणीं सांधून वळलेली यज्ञयागांतील समिधांचें जुडगें बांधण्याची दोरी. 'इध्मा बर्हि त्रिसंधान। करोनियां परिस्तरण।' -भाराबाल २.७०. [ सं त्रि+संधान ]

**त्रिसंधि**—स्त्री. एक फूलझाड. (प्र.) तिरशिंगी-संगी. पहा. [ सं. ]

**त्रिसंध्या**—स्त्री. १ दिवसाचे तीन संधिकाल; प्रभात, मध्यान्ह व सायंकाळ. २ दिवसाच्या तीन संधिकालीं केलेली संध्या; त्रिकालसंध्या. [सं. त्रि+संध्या] **०यात्रा**—स्त्री. गया क्षेत्रीं गायत्री तीर्थी प्रातःकालीं, सावित्री तीर्थी माध्यान्हीं व सुरस्वतीतीर्थी सायंकालीं स्नान, संध्या व जप करणें या विधीस त्रिसंध्यायात्रा म्हणतात. -तीप्र १३७. [ सं. त्रि+संध्या+यात्रा ]

**त्रिसरेणू**—पु. त्रसरेणु पहा. 'त्रिसरेणूपासोनि जाण। लव निमिषदिनमान। संवत्सरवरी सावधान। गणी मी संकर्षण काळगणना।' -एभा १६.२१९.

**त्रिसीं**—क्रिवि. ताठपणें; धडधाकटपणें. 'पांगुळेआतें चरण येती। सापजें जैसीं त्रिसीं उडती। जे होते मुके ते बोलती। सुस्वर शब्द।' -खिपु १.३५.४६ [ सं. त्रिक्=माकडहाड ? ]

**त्रिसुती**—स्त्री. (कर.) जानव्याचें सूत तीन पदरी करून त्यास पीळ घालण्याची क्रिया. तिसुती पहा. [ त्रि+सूत ]

**त्रिस्तनी**—वि. तीन स्तन असलेली (गाय, म्हैस). [ त्रि+ स्तन ]

**त्रिस्तर**—वि. (भूगर्भशास्त्र) तीन थरांचा. [ सं. त्रि+स्तृ ]

**त्रिस्थळी**—स्त्री. १ काशी, प्रयाग व गया या तीन तीर्थांची यात्रा. २ (ल.) एकाच कामासाठीं अनेक ठिकाणीं जाण्याचा प्रसंग; इकडून तिकडे निरर्थक हेलपाटे घालावे लागणें. ३ (ल.) (वरचेवर लागणाऱ्या पदार्थांची, स्थलांची एखाद्या स्थलापासून) लांब व गैरसोईची स्थिति; (काम इ०कांची) पांगापांग; विस्कळितपणा; मनाची दगदग व अस्थिरता. (विरू.) तिरस्थळी. तिरस्थळी सर्व अर्थी पहा. [ त्रि+सं. स्थल=ठिकाण ] **०यात्रा**—स्त्री. त्रिस्थळी अर्थ १ पहा.

**त्रिक्षार**—पु. (वैद्यक) सज्जीखार, जवखार व टाकणखार हे तीन क्षार -योर १.१७५. [ त्रि+सं. क्षार=खारट पदार्थ ]

**त्रीपण**—वि. त्रेपन्न. 'दळ त्रीपण क्षौणी।' -उषा ८१२. [ त्रेपन्न अप. ]

**त्रीपदा**—स्त्री. गायत्री; (प्र) त्रिपदा. 'ब्रह्मा जपत होता जो त्रीपदा।' -उषा १८४३. [ सं. त्रिपदा ]

**त्रीपन्न, त्रीपन्न टिकलीचा, त्रीपन्न मंगळीचा**—त्रेपन्न इ० पहा.

**त्रीसष्ट**—वि. (प्र) त्रेसष्ट पहा.

**त्रुटि-टी**—स्त्री. १ अठरा निमेषांचा काळ. 'गरुडा, नेई न लागतां त्रुटी।' -मुआदि ५.६१. 'तंव तो उतरला उदरांत। त्रुटिमात्र न लागतां।' २ चुटकी. 'त्रुटी न वाजतां अर्जुन। जात सुरेशप्रस्थमार्ग लक्षून।' -ह ३२.२२५. 'तोहि छेदिला त्रुटि न वाजतां।' -कीर्तन १.२५. ३ खंड; प्रतिबंध; अडथळा. 'धर्मपालनांत किंचितही त्रुटि खपत नाहीं.' -पप्रे १५२. ४ नाश. -शर. ५ शंका. -शर. ६ लव; अणु; लेश. [ सं. ]

**त्रुटित**—वि. तुटलेला; निराळा, वेगळा झालेला; तोडलेला; अपूर्ण. [ सं. त्रुट् ]

**त्रेचा(ता)ळीस**—वि. चाळीस आणि तीन; ४३ संख्या. [ सं. त्रिचत्वारिंशत् ]

**त्रेता, त्रेतायुग**—स्त्रीन. चार युगांतील दुसरें युग; कृत, द्वापर व कलि हीं बाकीचीं तीन युगें होत. ह्याचा अवधि बारा लक्ष शहाण्णव हजार वर्षांचा असतो. 'त्रेतायुग बारा लक्ष शाह्ण्णौ सहस्र।' –दा ६.४.१. [ सं. ] **त्रेतायुग**–न. त्रेता पहा.

**त्रेताळीस**—वि. त्रेचाळीस. [ गु. त्रेताळीस ]

**त्रेतीस**—वि. तेहतीस; तीस आणि तीन: ३३ संख्या. [ सं. त्रयस्त्रिंशत; प्रा. गु. तेत्रीस ]

**त्रेधा**—स्त्री. ( शक्तीपेक्षां बरेंच मोठें काम अंगावर पडल्यामुळें, बरींच कामें उपस्थित झाल्यामुळें एखाद्याची होणारी ) धांदल; धांवपळ; गोंधळ; गडबड; तारांबळ; ओढाताण; ( श्रमानें आलेला ) शीण; भागवटा; ताण; ( भीति इ० कानीं उडालेली ) धांदल; तिरपीट; गाळण; घाबरगुंडी; पांचावर धारण (क्रि० उडणें). –क्रिवि. तीन मार्गानीं, प्रकारांनीं, पद्धतींनीं. [ सं. त्रि+धा ]

**त्रेपन्न**—वि. पन्नास व तीन; ५३ संख्या. **०टिकलीचा–मंगळीचा, त्रेपन्नी**–वि. ( अशिष्ट ) जारास, जारपुत्रास उद्देशून द्यावयाची एक शिवी; मात्रागमनी; रंडापुत्र.

**त्रेवटी डाळ**—स्त्री. चणे, तुरी आणि उडीद इ० एकत्र मिश्रित डाळींचा समुदाय. 'त्यांत त्रेवटी डाळ या रीतीनें भरली होती.' –मराठी बीजगणित १८५. [ स. त्रि+वृत–पुट ]

**त्रेसष्ट, त्रेसट**—वि. साठ आणि तीन; ६३ संख्या. [ सं. त्रिषष्टि ] **त्रेसष्टी**–स्त्री. फाशांच्या खेळांत पडणारा एक डाव. छ तीन नऊ.

**त्रेह(हा)त्तर**—वि. सत्तर आणि तीन; ७३ (प्र.) त्र्याहात्तर.

**त्रैकालिक**—वि. भूत, वर्तमान व भविष्य या तीन काळांसंबंधीं ( ज्ञान इ० ). [ सं. त्रिकाल ]

**त्रैगुण्य**—न. सत्त्व, रज व तम या तीन गुणांचा समुदाय. [ सं. ]

**त्रैधर्म्य**—न. धर्म, अर्थ व काम ही त्रयी, या तिहींचा समुदाय. [ सं. ]

**त्रैमूर्ति**—स्त्री. ब्रह्मा, विष्णु व महेश या तिघांची मिळून झालेली मूर्ति; दत्तात्रेय. [ त्रि+मूर्ति ]

**त्रैराशिक**—न. ( अंकगणित ) आद्यंक, मध्यांक, व अंत्यांक किंवा प्रमाण, फल व इच्छा अशीं प्रमाणांचीं तीन पदें दिलीं असतां चौथें फल म्हणजे इच्छाफल काढण्याची रीत. ज्या दिलेल्या प्रमाणांतील तीन पदांवरून चौथें पद काढावयाचें असतें त्या तीन पदांना आद्यंक, मध्यांक व अंत्यांक अथवा इच्छांक; आदि, मध्य व अंत किंवा इच्छा; आदि, प्रमाण व इच्छा हीं नांवें आहेत. त्रैराशिकाचे समत्रैराशिक आणि व्यस्त अथवा विलोम त्रैराशिक असे दोन प्रकार आहेत. [ सं. ]

**त्रैलोक्य**—न. स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक; त्रिभुवन [ सं. ] **०चिंतामणी**–पु. १ ( वैद्यक ) एक रसायन, मात्रा. २ साधारणपणें सर्व रोगांवर उपयोगी पडणारें औषध. [ त्रैलोक्य+चिंतामणी ] **०विस्तार**–पु. त्रैलोक्यास व्यापून असणें; सर्वव्यापकता; विश्वव्यापकत्व. –वि. विश्वव्यापी; सर्वव्यापी. [ त्रैलोक्य+विस्तार ]

**त्रैलौकिक**—वि. स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तीन लोकांसंबंधीं. [ सं. ]

**त्रैवर्गिक**—वि, धर्म अर्थ व काम या त्रिवर्गासंबंधीं; त्रिवर्गविषयक. [ सं. ]

**त्रैवार्षिक**—वि. तीन वर्षांसंबंधीं; तीन वर्षांनीं एकदां होणारा. [ सं. ]

**त्रैविद्य**—वि. ऋग्वेदादि वेद जाणणारा. [ सं. त्रि+विद्या ]

**त्रैविद्या**—स्त्री. ( वेदांत ) भगवद्गीता, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें हे तीन ग्रंथ. [ सं. ]

**त्रैविध्य**—न. त्रिविधता; त्रिविधपणा. तीन प्रकारचा. 'एवं सत्त्वरजतमा । तिहींची एवढी असे महिमा। जे त्रैविध्य आदि ब्रह्मा। अंतीं कृमी।' –ज्ञा १८.५२५. [ सं. ]

**त्रोटक**—न. उपनाटक. –शर.

**त्रोटक**—वि. संक्षिप्त; संक्षेपात्मक; थोडक्यांत सांगितलेला, लिहिलेला; सारांशरूप. [ सं. ]

**त्रोटणें**—उक्रि. ( काव्य ) तोडणें; विभागणें; निराळें, वेगळें वेगळें करणें; तुकडे करणें. [ सं. त्रुट्–त्रोटन ] **त्रोटन**–न. ( सूत इ० ) तोडण्याची क्रिया; तुकडे करण्याची क्रिया; विभागणी. [ सं. ] **त्रोटित**–वि. तोडलेला; विभागलेला; निराळा, वेगळा केलेला; तुकडे केलेला. [ सं. ]

**त्रोहिहेऽ**—उद्गा. (ना.) म्हशीला हांकण्यासाठीं म्हणावयाचा शब्द. [ ध्व. ]

**त्र्यणुक**—न. तीन द्व्यणुक मिळून होणारें परिमाण. [ सं. ]

**त्र्यंबक**—पु. १ तीन डोळ्यांचा देव; शंकर. २ शिवधनुष्य. 'वोढूनि धनुष्याची ओढी । त्र्यंबक मोडिलें कडाडी।' –एभा ११.७३५. [ सं. त्रि=तीन+अंबक=डोळा ] **–केश्वर**–पु. १ शंकर. २ बारा ज्योतिर्लिंगांपैकीं नाशिकाजवळचें एक सुप्रसिद्ध ज्योतिर्लिंग.

**त्र्यस(जाति)**—पु. (संगीत, वाद्य) ज्यामध्यें पहिला विभाग तीन मात्रांचा असावा लागतो असा दक्षिणेकडील तालाचा एक प्रकार.

**त्र्यायेंशी, त्र्याय(यं)शी**—वि. ऐशी आणि तीन; ८३ संख्या. [ सं. त्र्यशीति ]

**त्र्याण्णव**—वि. नव्वद आणि तीन; ९३ संख्या. [ सं. त्रिनवति ]

**त्र्याहात्तर**—वि. सत्तर आणि तीन; ७३ संख्या. [ सं. त्रिसप्तति ]

**त्र्याहिक**—पु. तीन तीन दिवसांनीं येणारा, चौथे दिवशीं येणारा ताप; त्र्याहिक ज्वर. –वि. १ तीन दिवसांसंबंधीं. २ तिसऱ्या दिवसाविषयींचा; तृतीयदिनसंबंधीं. [ सं. ] **०ज्वर**–पु. दर चौथ्या दिवशीं येणारा ताप. [ सं. त्र्याहिक+ज्वर=ताप ]

**त्व**—भाववाचक नामें साधण्याकरितां संस्कृत नामें व विशेषणें यांना लावावयाचा प्रत्यय. त्व प्रत्यय लागून झालेलीं भाववाचक नामें नपुंसकलिंगी असतात. 'ता' प्रत्यय लावून भाववाचक नामें साधण्याचाहि एक प्रकार आहे. परंतु हीं होन्ही प्रकारचीं नामें पुष्कळ अंशीं पर्यायवाचक असलीं तरी त्यांत कांहीं अपवाद आहेत व भाववाचक नामें साधतांना कांहीं ठिकाणीं 'ता' तर कोठें 'त्व' हाच प्रत्यय विशेषेंकरून लावतात. भाववाचक नामाचा 'ता' प्रत्यय विशेषतः विशेषणांसच लावतात आणि 'त्व' हा प्रत्यय जरी विशेषणांसहि लावितात तथापि मुख्यत्वेंकरून नामांस लावण्याचा प्रघात आहे. दुसरें असें कीं 'ता' प्रत्यय लागून झालेलीं नामें गुणवाचक असतात जसें:–योग्यता, आर्द्रता, उष्णता इ० तर 'त्व' लागून, हुद्दा, कार्य, स्थिति, आयुष्यांतील निरनिराळें वयोमान इ०चीं दर्शक भाववाचक नामें बनतात. उदा० राजत्व, प्रधानत्व पंडितत्व, मित्रत्व, पितृत्व, बालत्व, वृद्धत्व, तरुणत्व इ०. तिसरें असें, कीं 'ता' व 'त्व' हे दोन्ही जरी गुणधर्मदर्शक भाववाचक नामांचे प्रत्यय आहेत, तरी 'त्व' लागून झालेल्या नामांसच विशेष प्राधान्य आहे हें पुढील उदाहरणांवरून दिसून येईल. जसें:–लघुता, गुरुता, द्रवता, महत्ता, अज्ञानता, दातृता इ० रूपांपेक्षां लघुत्व, गुरुत्व, दातृत्व, महत्त्व, अज्ञानत्व, इ० रूपेंच अधिक रूढ व सरस आहेत. चौथें असें कीं, 'ता' हा अधिक रूढ प्रत्यय आहे तर 'त्व' हा अधिक भारदस्त प्रत्यय वाटतो. जसें:–दुष्टता, आम्लता, मिष्टता, तीक्ष्णता कटुता, क्षारता हीं रूपें दुष्टत्व, आम्लत्व, मिष्टत्व इ० रूपांपेक्षां अधिक रूढ आहेत परंतु दुष्टत्व, आम्लत्व हीं रूपें अधिक भारदस्त वाटतात.

**त्वक्**—स्त्री. शरीरावरील चामडी; कातडी; (झाडाची) साल; (फळाचें) सालपट; त्वचा; (समासांत) त्वगिंद्रिय–त्वक्क्षीर–त्वगंकुर–त्वक्पत्र इ० [ सं. ] **०पक्ष**–वि. किडयांतील एक वर्ग. या वर्गातील किडयास त्वचेचे बनलेले चार पक्ष असतात; ते पातळ असून त्यावर शिरा असतात; मध वगैरे द्रव शोषण करण्याजोगें तोंड असतें व दाढा चावण्याजोग्या असतात. –प्राणिमो ११५. [ सं. त्वक्+पक्ष=पंख ] **०पापुद्रा**–पु. शेंवडयाच्या त्वक्पेशींतून स्रवणाऱ्या पदार्थाचें शरीराभोवतीं तयार होणारें एक अखंड पटल; (इं.) क्यूटिकल. –शाको क १९०. [ त्वक्+पापुद्रा ] **०प्रत्यक्ष**–न. स्पर्शानें होणारें ज्ञान. [ सं. त्वक्+प्रत्यक्ष=ज्ञान ] **०शास्त्र**–न. त्वचेच्या रचनेचा व रोगांचा विचार करणारें शास्त्र; (इं) डरमेटॉलॉजी. **०शून्यवात**-पु. स्पर्शज्ञान नाहींसें करणारा वातविकार. [ सं त्वक्+शून्य= +वात ] **०क्षीरा**–स्त्री. तवकीर. [ सं. त्वक्+क्षीर=दूध ] **त्वगामय, त्वग्रोग**–पु. खरूज, शिबें इ०; त्वचेला होणारा रोग; कोरडी खपली. [ सं. त्वक्+आमय=रोग ] **त्वगिंद्रिय**–न. स्पर्शज्ञान करून देणारें ज्ञानेंद्रिय; स्पर्शेंद्रिय. [ त्वक्+इंद्रिय ] **त्वग्रोग**–पु. त्वचेसंबंधीं रोग; त्वगामय पहा. [ त्वक्+रोग ] **त्वग्व्रण**–पु. त्वचेला झालेला व्रण, जखम, फोड इ० याच्या उलट मांसव्रण, अस्थिव्रण. [ सं. त्वक्+व्रण=जखम, फोड ]

**त्वचा**—स्त्री. १ (शरीरावरील) चामडी, कातडी. २ पंचज्ञानेंद्रियांपैकीं स्पर्शज्ञान करून देणारें ज्ञानेंद्रिय; स्पर्शेंद्रिय. ३ (झाडाची) साल. ४ (फळाचें) सालपट; टरपल; साल. ५ (सर्पाची) कात; मेंग. 'त्वचा पायें शिरीं। हालेयाही फडे न करी।' –ज्ञा १६.१२६. [ सं. ] **०रंध्र**–न. (शरीराच्या) चामडीला असलेलें अत्यंत सूक्ष्म छिद्र. यांतून शरीरांतील घाण घाम इ०कांच्या रूपानें निघून जाते. [ त्वचा+सं. रंध्र=छिद्र ]

**त्वत्**—सना. तूं. (समासांत) त्वद्गृह=तुझें घर, त्वत्सदृश=तुझ्यासारखा; त्वत्कृत=त्वां केलेलें इ० [ सं. ] **त्वदीय**–वि. तुझा; तुझ्या मालकीचा; तुझ्यासंबंधाचा. 'त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णी पडो।' –केसरी. [ सं. ]

**त्वंपद**—न. (तत्व.) तूं (जीव) हा शब्द; अल्पज्ञ, अल्पशक्तिमान् असा वाच्य जीव तो; शुद्ध ब्रह्म जेव्हां मलिनसत्व प्रधान रजस्तममिश्रित व कामकर्मादिकांनीं दूषित अशा अविद्येचा स्वीकार करतें तेव्हां तें 'त्वंपद' या शब्दानें दर्शविलें जातें. 'जैसें त्वंपद हें आघवें। तत्पदार्थी समावें।' –ज्ञा ११ ६४८. 'यया सर्वांसि आश्रय त्वंपद। तोचि जीवात्मा बंध।' –सिसं ३. १९१. [ सं. त्वम्=तूं+सं. पद=शब्द ]

**त्वंपदार्थ**—पु (तत्व.) १ परमात्म्यापासून निघालेला व पृथक्, निराळा असलेला आत्मा; जीवात्मा. 'त्वंपदार्थ तो जीवात्मा। तत्पदार्थ तो परमात्मा।' २ दुसऱ्याचें व्यक्तित्व, स्वतंत्र अस्तित्व कबूल करणें, निर्दिष्ट करणें. [ सं. त्वं+पदार्थ ]

**त्वंपुरा**—पु. शंखध्वनि; बोंब; आरडाओरडा. 'त्वंपुरा सागरोत्पन्नः' इत्यादि शंखाच्या स्तुतिपर श्लोकाच्या 'त्वं पुरा' या आरंभींच्या शब्दांवरून लक्षणेनें हा अर्थ. [ सं. त्वं+पुरा ]

**त्वरा**—स्त्री. १ (सामा. क्रियेची) चपळाई; जलदपणा; वेग; घाई, शीघ्रपणा. 'उठतां बहु त्वरेनें कोठें जातां असें तुम्हा देवी।'

—मोसंशयरत्नमाला १. (नवनीत पृ. ३४९) २ (स्वभाव इ०कांचा) तरतरीतपणा; हुषारी; तलखपणा. [सं.] (वाप्र.) **०करणें**—घाई करणें. **त्वरणें**—अक्रि. (काव्य.) घाईत, त्वरेंत असणें. [त्वरा] **त्वरेवर येणें**—(एखादें काम इ०) लवकर, झटपट करणें; झपाटणें. **म्ह०** झरझर त्वरेस मोल आहे. **त्वरित**—क्रिवि. त्वरेनें, जलदीनें; घाईनें; झटपट; लवकर. 'प्रभुची आज्ञा होतां पार्थ प्रखरेषु सोडुनी त्वरित।' —मोकर्ण ४९.४०. (समासांत) त्वरितगामी—त्वरितभाषी—त्वरितदान इ० विशेषण व क्रियाविशेण यांसारखा उपयोग होतो. [सं.] **०गामी**—वि. जलद चालणारा; शीघ्रगति. [सं.] त्वरित+गामिन्=जाणणारा] **०भाषी**—वि. जलद, घाईनें बोलणारा. [सं. त्वरित+भाषिन्=बोलणारा] **त्वरेकरी**—क्रिवि. त्वरेकरून; त्वरेनें; जलदीनें. [त्वरा+करणें]

**त्वला**—सना. (ना.) तुला. [तुला अप.]

**त्वष्ट**—पुन. (एखादें काम करण्याबद्दल दुसऱ्यास केलेला) त्रासदायक तगादा, घाई; उपद्रवकारक आग्रह; (सामा.) त्रास; उपद्रव; लचांड (क्रि० लावणें; करणें; देणें; लागणें; होणें). —वि. 'किल्ले गुणवंतगड येथें खाली करून द्या म्हणून उभयतांही राजश्री कान्होजी शिरके यासीं त्वष्ट लाविलें त्याजकरितां.' —शारो ११९. —वि. तासलेला; तासून बारीक केलेला; रंधलेला; तोडलेला. [सं. त्वष्ट=तासलेला, रंधलेला]

**त्वष्टा**—पु. १ विश्वकर्मा. २ ब्रह्मदेव. ३ सुतार. [सं.] **०कासार**—पु. हिंदूंतील कासारजातींतील एक पोटजात अथवा तींतील व्यक्ति.

**त्वां**—सना. (काव्य.) तुवां; तूं या सर्वनामाचें तृतीयेचें रूप.

**त्वाच प्रत्यक्ष**—न. त्वक् प्रत्यक्ष पहा. [सं. त्वाच= त्वचेचा +सं. प्रत्यक्ष=ज्ञान, अनुभव]

**त्वाष्ट्र**—वि. त्वष्ट्याचा पुत्र वृत्र यावरून. भयंकर; क्रूर; उग्र. [सं. त्वाष्ट्र=एक दैत्य]

**त्वेष**—पु. आवेश; रागाची इसळी; संताप; अवसान; स्फुरण; तैष पहा. [सं.] **त्वेषी**—वि. १ रागानें जळफळणारा; तापट. २ आवेशयुक्त; ज्याला अवसान, स्फुरण आलें आहे असा. तैषी पहा. [सं. त्वेष]

---

# थ

**थ**—वर्णमालेंतील सतरावें व्यंजन व त या शब्दाचा महाप्राणोच्चार. अक्षरविकासः—याच्या पांच अवस्था असून पहिली अशोकच्या गिरनार शिलालेखांत; दुसरी व तिसरी राजा यशोधर्मन् याच्या मंदसोर येथील शिलालेखांत (सन ५३२) आढळते. चवथी देवल (छिंदवंशी लल्ल राजा सन. ९९२), धार (राजा भोजरचित कूर्मशतक काव्य, ११ वें शतक), आणि उज्जनी (उदयादित्य, ११ वें शतक) येथील लेखांत आढळते. हिच्यापासून प्रचलित पांचवें रूप बनलें आहे.

**थकडे**—क्रिवि. (कु) तिकडे.

**थकणें**—अक्रि. १ दमणें; शिणणें; भागणें; थकवा येणें. २ शक्ति क्षीण होणें; बेजार होणें (म्हातारपण, रोग इ०कांमुळें). ३ मति गुंग, कुंठित होणें. ४ दिवाळें निघणें; पैसा नसल्यामुळें व्यापार थांबणें, चालेनासा होणें. ५ बुडणें; उगवेनासें होणें (कर्जाऊ दिलेली रक्कम, पैसे). [सं. स्थग्; प्रा. थक्क; हिं.] **०भागणें**—अक्रि. थकणें; दमणें; बेजार होणें. **थकलें कूळ**—न. दिवाळें वाजल्यानें किंवा अतिशय गरीबीनें कर्ज फेडण्यास असमर्थ असलेला मनुष्य, कुटुंब अथवा कूळ.

**थकवा**—पु. अतिश्रमानें इंद्रियांना येणारी ग्लानि किंवा शिथिलता. [थकणें]

**थकीत, थक्कित, थक्कीत, थक्क**—वि. (काव्य) १ चकित; आश्चर्ययुक्त. 'थक्कित होउनि जन हे पाहती हर्षें परमार्थ।' —मुक्तेश्वरकृत कटिबंध पृ. ४. २ गोंधळलेला; बावरलेला; गुंग झालेला; गडबडलेला. ३ आकस्मिक; अद्भुत [सं. स्थगित; प्रा. थक्क]

**थँञ्**—क्रिवि. (राजा.) तेथें. **०सर**—क्रिवि. (राजा.) तेथपर्यंत. **०सून**—क्रिवि. (राजा. कु.) तेथून.

**थट**—पुस्त्री. १ समुदाय; जमाव; गर्दी (मनुष्य, जनावर इ० कांची); चेंप; रगडा. (क्रि० लागणें). २ दाट रचना; मांडणी. (क्रि० जमणें; बसणें; मिळणें; बनणें; होणें). [प्रा. दे. थट्ट; का. थट्टु=समूह] **०कारणें**—उक्रि. १ रचना करणें; व्यवस्थेनें लावणें, ठेवणें, घालणें (पोशाख इ०); विशेषतः देखाव्यासाठीं व्यवस्थेनें मांडणें, रचणें. २ उत्तम रीतीनें, थाटानें, सफाईनें संपविणें; करणें.

**थटणें**—अक्रि. दिमाखानें चालणें, बोलणें, अथवा वर्तणें; सजणें; नटणें. [थट-थाट] **थटकारणें**—अक्रि. स्वतःचा दिमाख मिरविणें; डौल घालणें; ऐट करणें; थाटमाट करणें. [थट]

**थट्टा, थट्टामस्करी, थट्टेखोर, थट्टेबाज, थट्टेबाजी**—ठ्ठा पहा. **थट्टेघाईक**—वि. विनोदी (भाषण करणारा, भाषण).

**थट्टी**—स्त्री. १ (संस्थान, राजा इ० चीं); गाई, म्हशी इ० जनावरें; गोशाला; गोखाना; जनावरांचें खातें (अठरा कारखान्यांपैकीं एक). २ गुरें बांधण्याची जागा. [प्रा. थट्टि=जनावर] **म्ह०** कोठी थट्टी पागा पोट भरायाची जागा. **०खाना**—पु. थट्टीसंबंधीं व्यवहार. **थट्या**—पु. गोशाला.

**थड**—स्त्री. १ किनारा; तीर; कांठ; कड. २ (ल.) सिद्धि; समाप्ति; शेवट (काम, धंदा यांचा). ३ नदीच्या बाजूचें खोरें; दरी. जसें:—गंगाथड—भीमथड [सं. तट] (वाप्र.) **थडीस**

लावणें–नेणें–आणणें–घालणें–पोहोंचविणें–सिद्धीस, शेवटास नेणें. **थडीस लागणें–जाणें–येणें**–शेवटास जाणें. **ही थड ना ती थड**–निराश्रितपणाची स्थिति; इकडे आधार नाहीं व तिकडे आधार नाहीं अशी स्थिति.

**थंड**—वि. १ गार; शीत. २ दाहशामक (औषध, जेवणांत पदार्थ). ३ (ल.) सुस्त; धीमा; मंद; सावकाशीचा; आळशी; सौम्य; समप्रकृतीचा. ४ शांत; स्वस्थ (देश, वस्तु स्थिति). ५ शांत झालेले; स्थिर (डोळे, मन इ०). ६ कमजोर (ताप); ढिलें (काम). ७ भूतखेत इ० उपद्रवरहित (घर, जागा). ८ (ल.) नपुंसक (मनुष्य). [सं. स्तब्ध; प्रा. थड्ड] (वाप्र.) **०करणें**–१ विसर्जन करणें. २ ताबूत वगैरे नदींत बुडविणें. **०पाणी ओतणें**–(ल.) एखादें कार्य बंद पाडणें. एखाद्याचा उत्साह भंग करणें. [हिं.] **०होणें–पडणें–पावणें**–मरणें. 'उत्तम लोकासि तुझा सेवक होऊनि थंड पावेल।' –मोभनु ८.४१. **थंडक**–न. दाहशामक औषध किंवा उपाय. [हिं.] सामाशब्द- **थंडगार**–वि. १ अति शीतल (वारा, हवा, पाणी, वस्तु); गार. २ स्थिर; शांत ३ संतोषी; समाधानी (हृदय, आत्मा). ४ मेल्यामुळें थंड झालेला, गारठलेला. [थंड+गार] **०वेळ**–स्त्री. १ सकाळ, संध्याकाळचा समय. २ (ल.) स्थिर व शांत वेळ (स्वतःच्या प्रकृतीची वगैरे). **थंडा**–वि. थंड (अर्थ २ ते ८) पहा. [हिं.] **थंडाई**–स्त्री. १ शीतलता. २ (ल.) तापहारकता; दाहहारक गुण (औषधांचा). ३ सालसपणा; सौम्यता; मंदी; सुस्तता; औदासिन्य; दुर्लक्ष्य. ४ उपशम; शांति; उतार. ५ थंड औषध. ६ कुसुंबा. ७ बदाम, गुलाबकळी, खसखस, काकडीच्या बिया व संवयीप्रमाणें भांग वगैरे एकत्र वाटून दूध साखर घालून केलेलें एक पेय. **थंडाफराळ**–पु. केवळ थंड पाणी पिऊन, हवा खाऊन राहणें (थंड उपहार). **थंडाय**–(गो.) ओलावा; गारठा. **थंडावचें**–(गो.) थंड करणें; समाधान करणें. **थंडावचें लिखित**–न. शांततेचा तह. **थंडावणें**–अक्रि. १ थंड, शांत होणें (मनुष्य, विकार, इच्छा, प्रकृति इ०). २ दमट होणें; सरदून ताठरपणा नाहींसा होणें (कागद, कापड यांचा). **थंडावा**–पु. (उन्हानंतरचा) हवेचा थंडपणा; सुख; आराम; स्वस्थता; सुटका (दुःख अथवा क्षोभ यानंतर). उतार; उपशम; प्रशम. [हिं.] **थंडेथंडे**–क्रिवि. १ सावकाश; हलकें हलकें; ढिलाईनें. २ थंडवेळीं(रात्रीच्या, सकाळच्या वगैरे वेळीं प्रवास करणें). [थंड] **थंडोसा**–पु. थंडावा पहा. [थंड] **थंडथापोटानें**–क्रिवि. शांतपणानें; रागांत नसतांना. **थंडी**–स्त्री. १ थंडपणा; गारठा (हवेचा, पदार्थाचा); सर्दी. 'खंडी बळ बहु कांपवि. पडसी जाणों सदुःसहा थंडी।' –मोकर्ण ३३.२. २ थंडीची भावना. (क्रि० भरणें; वाजणें). ३ तापहारकता (औषधांची अथवा पदार्थाची). ४ उपशम, उतार (रोगाचा); त्या पासून होणारें सुख, स्वस्थता. [हिं] **०कातरा**–पु. थंडीनें होणारा त्वग्विकार. **थंडीचा ताठा**–पु. कडकडीत गारठा (हवेचा). **थंडीचें पिल्लूं(लूं)**–न. थोडा वेळ पडलेली किंवा साधारण बेताची थंडी. **थंडीवाऱ्याचा**–क्रिवि. थंड व सदे वारा वहात असतांना; गारठा पडला असतांना. 'तुला ताप येतो आहे थंडीवाऱ्याचा बाहेर हिंडू नको.' [थंडी+वारा]

**थडक**—स्त्री. ठोकणें; ठोठावणें; थाप मारणें; रट्टा; धक्का; थाप; धडक; ठोकर; आघात. 'चक्रदेव धरिला केशीं। थडक हाणोन उराशीं। कारुषासी पाडिलें।' –एरुस्व ९.३९. [ध्व. थड्; सं. तड्] **थडकूं**–स्त्री. धडक. 'प्रलभयरवां झोंबी जाली। कीं संहार समुद्रा थडकूं घेतली।' –शिशु १०४२.

**थडकणें**—अक्रि. १ एखाद्या वस्तूवर आदळणें; एकदम थांबणें. २ आदळणें; आपटणें (पाणी, वारा). [थडक]

**थडकणें**—अक्रि. १ थांबणें; प्रवासाच्या शेवटास येणें; वेग कुंठित होणें. २ पोहोंचणें; योग्य पेढीवाल्यास पावणें (हुंडी). [सं. स्तंभित; प्रा. थड्डिअ]

**थड–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि. १ धडक, रट्टा इ० चा ध्वनि होऊन. २ झटक्यानें; थरकांप होऊन. [ध्व.]

**थडका**—पु. धडका; रपाटा; टक्कर; आघात. 'राक्षस चढूनिया तवका। भीमहृदयीं मारी थडका।' [थडक]

**थडगें**—न. शव जाळलेल्या किंवा पुरलेल्या जागीं केलेलें बांधकाम. [सं. स्तब्ध; प्रा. थड]

**थडथड–थडां**—क्रिवि. १ जलदीनें मारलेल्या ठोशांचा ध्वनि होऊन. २ कांपत; हालत. (क्रि० कापणें; हालणें; भिणें; जीव–अंग–ऊर–हृदय इ० उडणें). [ध्व. थड् द्वि]

**थडथड**—स्त्री. कांपरें; थरथरी. [ध्व.]

**थडथड, थडथडी, थडथडणें, थडथडाट, थडाडणें**—थरथरणें इ० पहा.

**थडथडाट**—थडथड पहा [थडथड]

**थडथडीत**—वि. फडफडीत; नीरस; मऊ नसलेला(भात इ०).

**थडथाद**—क्रिवि. अलिप्तपणानें; कूटस्थपणानें. [सं. तटस्थ्यात्]

**थडवा**—पु. १ लहान तळें. 'भवसिंधुचा थडवा केला। बोलविला पाहिजे।' –तुगा ३६६८. २ (ना. व.) कांठ (नदीचा); कांठावरील जमीन. [थड]

**थडा**—पु. दुकानदाराची बसण्याची जागा; गादी. [हिं.]

**थडा**—पु. घाट.

**थडाड**—पु. १ जोरानें व रागानें लाताडण्याची, मारण्याची क्रिया; मोठ्या आवाजाचे व एकामागून एक दिलेले ठोसे, लाथा. २ पराकाष्ठेची धडपड अथवा कापरें. [ध्व. थडथड] **थडाडी**,

**थडाथड-थडां, थडाडून**-क्रिवि. थडथड ( -क्रिवि.) पहा.

**थडाथडी**-स्त्री. १ जलदीनें मारलेल्या लाथा, बुक्या, छडया, ठोसे इ० २ मोठें कापरें; थरथरी. [ ध्व.; थड ! थड ! ]

**थडाव**—पु. आसरा; निवांत जागा. 'स्वर ऐकुनया कोकिळा घेती वनीं थडाव।' -पला १७.४२. थडिवा पहा. [ थड ]

**थडिवा**—पु. (महानु.) कांठ; आसमंतांतील प्रदेश. ' तयाचें पडलें रण थडिवा प्रभासाचिये। ' -भाए ६८. [ थड ]

**थडी**—स्त्री. तीर ( नदीचें ); मर्यादा; कांठ; किनारा. ' तुका म्हणे धांवती थडी। न घेती उडी आंत कोणी। ' -तुगा १६८. [ तट-ड, थड ]

**थडी**—स्त्री. (कु.) गोणांची उंच लाविलेली रांग; थटी. कांहीं जडवस्तूंची एकावर एक ठेवून केलेली रचना. [ प्रा. थड= समूह; का. थट्टु ] **०मारणें**-भिंत घालणें. -शे २.९

**थडीचा**—वि. उत्तम जातीचा, पैदासीचा ( सशृंग पशु ).

**थडें**—न. १ धड, कलेवर, प्रेत. ' आत्म्याविण थडें रोकडें। शरीराचें।'-दा १६.८.११. २ थडगें पहा. [ सं. स्तब्ध; प्रा. थड ]

**थडे, थकडे**—क्रिवि. (कु.) तिकडे; त्या बाजूस.

**थणी**—वि. थनी पहा.

**थंतरमंतर**—न. १ जादूटोणा; मंत्रतंत्र. २ दुरुस्ती; डागडुजी (जुन्या घराची अथवा वस्तूची-कांहीं वेळ उपयोगी पडण्याकरितां ). ४ समजाविणें; मनधरणी करणें: ( शांत करण्यास किंवा मर्जी संपादन करण्यास ); नीट करणें. [ सं. तंत्रमंत्र ]

**थतरवितर**—वि. (कु.) भ्रमिष्ट.

**थति**—न. ( खा. ) काशाचें ताट. थाटी पहा.

**थत्त**—उद्गा. तिरस्कार, अधीरपणा दाखविणारें उद्गारवाची अव्ययः हट् हट्; छे ! छे; शी शी. [ ध्व. ]

**थत्तुरमत्तुर**—वि.( व. ) मोठया कष्टानें, कसा तरी बनविलेला. थंतरमंतर अर्थ २ पहा. [ सं. तंत्रमंत्र ]

**थना**—पु. ( कों. ) छाती; स्तन; थान. [ सं. स्तन ]

**थनी**—स्त्री. घोडयांतील एक खोड, गोम. -वि. छातीवर स्तनाकृति मांस असलेला ( घोडा ). -अश्वप १.९४. [ प्रा. थण; म. थाम ]

**थपकटा, थपकड-डा, थपकण, थपथप, थपथपणें थपथपीत, थपथप-थपां**—थब इ० पहा.

**थप(क)कील**—स्त्री. धपकन् बसणें-पडणें: थप आवाजानें ढुंगणावर पडणें; थपकल घालून बसणें. ( क्रि० मारणें; घेणें ). [ ध्व. थप् ]

**थपडाक, थप्पड**—स्त्री. चपराक; थापट; ठोंसा; चापट. [ ध्व थप् ] **थपडखाऊ, थपडखाईक**-वि. १ थपडा खाणारा २ ( ल. ) दुसऱ्याच्या छंदानें चालणारा; थापडखाईक.

**थपथप-थब**—क्रिवि. आर्द्र पदार्थांपासून बिंदुशः जलादि थपथप अशा आवाजानें गळतः टिपकत. **थपथप(ब)णें**-क्रि. वस्त्रादिकांपासून उदकादि थपथप गळणें. **थपथपीत**-वि. आंतून थपथप पाणी इ० गळत आहे असें ( शरीर, वस्त्र इ० ).

**थपाटी**—स्त्री. चपराक; चपाटी; थापटी; चापटी. [ थप ]

**थपाथप-थपां**—क्रिवि. थपथप इ० पहा.

**थपिया**—पु. ( ताल. ) विवक्षित तालाच्या एका आवर्तनाचे पखवाजावर काढिलेले समग्र बोल. [ ध्व. थप् ]

**थपी**—क्रिवि. पालथ्या बाजूनें (ठेवलेली वस्तु) याच्या उलट कुडती. ( क्रि० लावणें; बसविणें; लागणें; पडणें ) [ सं. स्थापित ]

**थप्प**—क्रिवि. ( गो. ) एकदम बंद. [ सं स्थापित; प्रा. थप्पिअ ] **०जांवचें**-क्रि. ( गो. ) बंद पडणें.

**थप्पा, थापा**—पु. लाखेच्या आंगठ्या करावयाचें लकारी लोकांचें एक हत्यार.

**थप्पी**—स्त्री. ( व. ) लहान रास, ढीग. वजनदार वस्तूंची एकावर एक ठेवून केलेली रचना.

**थबकट, थबकड-डा**—वि. १ सपाट; चापट; बसका. २ बसकट; नकटें ( नाक ). [थापट] ( वाप्र. ) **थबकट बसणें**-एकदम जोरानें ढुंगणावर बसणें. [ ध्व. ]

**थबकड**—स्त्री. (कु.) बसकण; बैठक; बसण्याचा प्रकार. ' थबकड मारून बसलों. ' [ थब ]

**थबकड**—स्त्री. थप्पड; चपराक; ठोंसा. ( क्रि० मारणें; देणें; चढविणें ).

**थबकण**—स्त्री. थपकील पहा. ( क्रि० मारणें; घेणें ).

**थबकणें**—अक्रि. एकदम उभें राहणें; थांबणें (मनुष्य, पशु); मध्येंच थांबणें. [ स. स्तंभ्; प्रा. थंब ] **थबकून**-क्रिवि. मध्येंच थांबून. **थबकविणें**-उक्रि. थोपविणें; थांबविणें; एकदम उभे करणें. [थबकणें]

**थब(प)कें**—वि. ( गो. ) थबकड; चपटें.

**थबडा(रा)क**—स्त्री. थप्पड; चापट; चपराक. [ ध्व. ]

**थबथब-थबां**—क्रिवि. थबथब असा पाणी इ० गळण्याच्या आवाजाचा ध्वनि होऊन. ' नाना सुगंध परिमळें। थबथबां गळती गंडस्थळें। ' -दा १.२.११. [ध्व.] **थबथबणें**-अक्रि. टिपकणें; टपटप् गळणें; टपटपीत ओलें असणें. **थबथबीत**-वि. टपटपीत ओलें. पाणी गळण्याइतकें ओलें; भिजलेलें; आर्द्र.

**थबलक**—न. ( गो. ) मुस्कट.

**थबाथब-थबां**—क्रिवि. थबथब पहा.

**थबावणें**—क्रि. थबथब वहाणें; वाजणें. 'चबाविती थबाविती। कालवे पाट। ' -दा १६.४.२५. [ ध्व. थब् ]

**थमन**—न. १ उपशम होण्यासाठीं किंवा दुःख कमी पडण्यासाठीं दिलेली वस्तु. २ उपशम; उतार. ( क्रि० पडणें; होणें; बसणें ). [ सं. स्तंभन; प्रा. थंभण ] **थमणें**-अक्रि. उतार पडणें; स्थिरावणें [ सं. स्तंभन ] **थमान**-स्थानावर थेणें.

**थंय**—क्रिवि. (कु. कों.) तेथें. **थँयसर**-क्रिवि. (कु.) तेथें. **थंयसून**-क्रिवि. (कु.) तेथून.

**थयकार, थयथय-थय्या, थया, थयथय्याट, थयमान, थयला-ली**—थै इ० पहा.

**थयथय-थाट**—पु. १ नाचणें, मौजेनें ओरडणें इ० प्रकार; २ संतापाचें व्यक्त चिन्ह. [ ध्व. ]

**थयथयात**—वि. आनंदी; मौजा मारणारा. -शर.

**थर**—पु. १ पापुद्रा; पडदा; स्तर; मढवण ( गिलावा, लेप, रंग इ०ची ). २ रास; ढीग (फळें, फुलें, पानें, शेण, भार्डी इ०ची). ३ समुदाय; समूह. ४ या शब्दाचा प्रत, जात, वर्ग वगैरे अर्थी कांहीं विवक्षित शब्दांबरोबर उपयोग करतात; जसेः-पुणें-मुंबईथर= पुण्यामुंबईकडील जिन्नस, रत्न इ०; ब्राह्मण-कुणबी थर=ब्राह्मण कुणबी इ०कांस योग्य असे ( पोशाख, कपडे इ० ); काळे, कुंप, जांबे-थर=काळे इ० रंगाचे खडक. [ सं. स्तृ-स्तर; फा. ] (वाप्र.) **थरास जाणें, येणें**-कोणत्या तरी शेवटास पोहोंचणें ( काम ). 'त्याचा माझा वाद पडला आहे मग कोणत्या थरास जातो पहावें.'

**थर-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. अंगावर रोमांच, शाहारे उभे राहतील असें; कांपरें भरून; थंडी-थरकांप होऊन. ( क्रि० कापणें; भिणें ). [ ध्व. ]

**थरकणी**—स्त्री. कंप; थरकांप.

**थरकणें**—अक्रि. थरथरणें; कांपणें; थंडीनें अंग हलणें; भीतिनें कांपू लागणें. 'अधर स्फुरती जेवीं पवनें। पद्मपत्रें थरकती।' -मुआदि १६.१२८.[ध्व.]

**थरकांटा**—पु. रोमांचः पुलक. ( क्रि० येणें; उभा राहणें; होणें ).

**थरकांप**—पु. १ भीतीनें अतिशय कापणें; कंपातिशय. २ भीतीनें कंपित होणें. -क्रिवि. शरीर कंपित होईल अशा रीतीनें. 'मी थरकांप भ्यालों-झालों. **थरकांपणें**-क्रि. थरथर कापणें.

**थरकावणें**—क्रि. कांपविणें. 'पायें थरकावी जगती तळीं।' -मुआदि ३३.६. [ थरकांप ]

**थरडी**—स्त्री. ( मा. ) गंध ठेवण्याची उथळ लहान वाटी, तबकडी.

**थरणी**—स्त्री. ( कों. ) १ चिखल व धोंडे यांचा थर ( बांध इ० कांवरील ). २ थर रचण्याची क्रिया. [ थर ]

**थरणें**—अक्रि. निरोगी होणें; बळावणें. [ सं. स्थिर् ]

**थरणें**—अक्रि. थांबणें; स्थिर होणें. ठरणें पहा. 'असंवर बळाची उकळी। वारू न थरती भूमंडळी।' -गीता १.३२८. [सं. स्थिर्]

**थरत**—क्रिवि. कंप होत; थरथरां कांपत. **थरत-भिणें-कांपणें**-अक्रि. ( राजा. ) भीतीनें कांपत असणें; कंप होईसें भिणें; अतिशय भीति बाळगून असणें.

**थरथर-थरां**—क्रिवि. भीतीनें कांपत; अंगावर रोमांच येऊन व कांपतकांपत. (क्रि० कांपणें; भिणें; हींव येणें). [ध्व. प्रा. दे. थरथर]

**थरथरणें**—अक्रि. थरथर कांपणें; कंप सुटणें. [ थरथर ]

**थरथराट**—पु. भयंकर थरकांप. 'मुष्टिघाताचिया ध्वनि। थरथराटें थरके धरणी।' -मुसभा ७.४०. [थरथर+आट प्रत्यय]

**थरथरी**—स्त्री. कंप; थंडीनें थडथडणें; रोमांचसहित कंप. ( क्रि० लागणें; सुटणें ).

**थरपील, थरपा**—नपु. ताडाच्या फांदीचा बुंधा. [ थरू ]

**थरभरें**—न. (कों.) अंबोशी नांवाची वनस्पति व तिचीं पानें ( हिची चटणी करतात ).

**थरविथर**—वि. बरेंवाईट; उत्तम निकृष्ट.

**थरार-रा, थराथर-थरां**—क्रिवि. अतिशय कांपरें भरेल अथवा रोमांच उठतील अशा रीतीनें. (क्रि० कांपणें; भिणें). [थरथर]

**थरारणें**—अक्रि. अतिशय कांपणें; थरथरणें. 'लावण्याचा सरोवरीं। मुखकमलाचें पातें थरारी।' -शिशु १८७. [ थरथरणें ]

**थरारी**—स्त्री. अतिशय कंप. थरथरी. ( क्रि० सुटणें ).

**थरासन**—न. ( राजा. ) स्थिरता; टिकाव. [ सं. स्थिरासन ]

**थरी**—स्त्री. (व. खा.) दुधावरील मलई; साय. [ सं. स्तर; प्रा. दे. थर=मलई ]

**थरू-रूं**—पुन. (कों.) (कोयता, कुऱ्हाड इ० ची) मूठ; दांडा. [ सं. त्सरू; प्रा. थरु ]

**थरोटा**—पु. एक प्रकारचा मासा.

**थरोथरीं**—क्रिवि. थरावर थर याप्रमाणें 'कर्पूर आन्थीरिला थरोथरीं।' -मुआदि २८.९३. [ थर ]

**थर्त** क्रिवि. ( गो. ) थरकांप होऊन; थरत पहा.

**थर्मामि(मे)त(ट)र**—न. उष्णतामापक यंत्र. [ इं. थर्मो ( थर्मास )=उष्णता+मीटर=मापक ]

**थर्र**—क्रिवि. एकदम शहारे अथवा शिसारी येईल अशा रीतीनें. [ध्व.] **थल**—स्त्री. शेतांतील उत्पन्नाचा वांटा, हिस्सा. -पु. स्थान; स्थल [सं. स्थल] **थलकरी**-पु. जमिनीचा मालक; भूमिया; जमीनदार. ह्याच्या विरुद्ध उपरी (कूळ). **थलझाडा**-पु. खेडेगावांतील जमीनीचा तक्ता, पत्रक. थळझाडा पहा. **थलभरी-वाईक**-पु. जमीनदार. याच्या उलट उपरी कूळ ). [थल+भरी=वाईक प्रत्यय]

**थलथल-थलां**—क्रिवि. फोपशा वस्तूच्या होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन; स्थूल शरीराचा मनुष्य चालत असतांना होणाऱ्या थलथलीप्रमाणें. [ ध्व. ]

**थलथल**—स्त्री. फोपशेपणा: बिलबिली (कुजलेल्या फळांची); ढिलेपणा; हलणारी स्थिति.

**थलथलणें**—अक्रि. थलथल हालणें (पातळ चिखल, लिब लीबीत मांस); पातळ, गलगलीत, बरबरीत, लिबलिबीत असणें; (कुजकीं फळें, पीठ इ०). [ध्व. थल ! थल ! ]

**थलथलीत**—वि. थलथल हालणारें (स्थूलपणामुळें इ०); गलगलीत; बरबरीत; लिबलिबित. [थलथल]

**थलींगाग**—न. (कों. गो.) मासे पकडण्याचें जाळें.

**थवा**—पु. समुदाय; जमाव (मनुष्य, जनावरें, पशु, पक्षी, इ० चा) मंडळी; समूह; सैन्याची टोळी. 'उठतां कुरुवीरांचे लागों देती जना न थाक थवे।'—मोभीष्म ८.१८. [सं. स्तोमक; प्रा. थोवक; थवक; म. थोक–थवा]

**थवीक**—स्त्री. हुषारपणा; कुशलता; हातोटी: युक्ति: चतुरता; बुद्धिमत्ता: उपजतबुद्धि; कर्तृत्वशक्ति. [फा.]

**थळ**—पु. १ बन; लागवड (ऊंस, सुपारी, केळी, मिरच्या इ०ची) २ (कों.) भूतांनीं पछाडलेली जागा; विशेषप्रसंगीं भूतांची जमण्याची जागा. ३ (क.) मर्यादित जागा, स्थळ. ४ अर्धेलीनें खोतास द्यावयाचा उत्पन्नाचा भाग. ५ एका जमीनदाराच्या किंवा कुळाच्या एकंदर मिळून जमिनी, शेतें. ६ घोडा, बैल इ० ची त्यांच्या गुणावरून ठरविलेली जात; बिजवट. ७ थारोळें; तळें. 'तैसें बहुतीं बहुतकाळ सेवसेवूनि केलें थळ।'—मुरंशु ४१५. ८ (गो.) देवस्थानची पंचक्रोशी. [सं. स्थल; प्रा. थल] (वाप्र.) **०घेणें, देणें, नेमणें, ठरविणें, मागणें**—जमीनीच्या मालकीचीं अथवा बांधाचीं भांडणें तोडण्यास कबूल करणें; देणें; नेमणें इ०. सामाशब्द– **थळकर**—पु. (कु) गांवच्या देवस्थानच्या मांडणींतील निरनिराळया स्थानावरील अधिकारी. **थळकरी**—पु. मिरासदार. **थळझाडा, थळवारझाडा, थळवारपत्रक**—न. १ गांवच्या खेडुतानीं वहितीस घेतलेल्या अथवा दिलेल्या जमीनींची नोंद, नोंदणीचा तक्ता. २ (सामा.) यादी. जसें:– शेतांचा–मळयांचा–कुळांचा–गांवांचा–थळझाडा. **थळपत्र**—न. गोत, देशक, न्यायाधीश व राजा या मार्फतचा निवाडा. –गांगा ६०. **थळभरीत**—न. १ एखाद्या ठिकाणीं माल विकत घेणें व भरणें. २ निर्गत मालावरील कर, जकात. ३ (क.) माल विकत घ्यावयाचें ठिकाण किंवा त्या ठिकाणचा माल. **थळमोड**—स्त्री. १ एखाद्या जागीं थांबून, माल उतरून विकण्याची जागा. २ आयात मालावरील जकात. ३ (क.) माल विकत घ्यावयाची जागा किंवा त्या ठिकाणचा माल. ४ तळ अथवा बिन्हाड हालविणें; जागा सोडणें. **थळव(वा)डी**—स्त्री. मळणीची जागा; खळें. **थळवाईक**—वि. उंसाच्या मळयाचा मालक. **थळवार**—क्रिवि. थळांच्या अथवा निरनिराळया शेतकऱ्यांच्या अनुक्रमानें (हिशेब इ०). **थळवारझाडा-पत्रक**—पुन. थळझाडा पहा. **थळवारी**—स्त्री. शेतजमीनीचें क्षेत्राच्या अनुक्रमानें तयार केलेलें पत्रक, नोंद. याच्या उलट कुळवारी. सामाशब्द– **थळकोंकण**—पु. (कों.) घाटाखालील प्रदेश; तळकोंकण. **थळचीपूजा**—स्त्री. (गो.) पंचक्रोशींतील लोकांनीं बांधलेली देवपूजा. **थळथांबर्णा**—स्त्री व्यवस्था.

**थळाचा**—वि. चांगल्या खाणीचा, जातीचा (सशृंग पशु, घोडा, कुत्रा). [थळ] **थळिक**—पु. शेतकरी; गांवकरी. [थळ]

**थळी**—स्त्री. थळ पहा.

**थळी**—न. पात्र; अलंकार; वडी.

**थळे**—वि. १ (गो.) पंचक्रोशींत राहणारे नोकरचाकर. २ (गो.) ग्रामदेवतेस कौल वगैरे लागणारा नवस.

**थळि(ळी)व**—न. अलंकार; वडी; पात्र; कोरीव काम. 'कापुराचें थळिव। नुरेचि आगीची बरव।'—अमृ २.४२.

**थळीव**—वि. कोरलेलें; टोंचलेलें; ठोकलेलें (पत्र्यावर काढलेली आकृति किंवा ठोकलेला पत्रा); याच्या उलट बेटींव. [थळणें]

**थळीक**—वि. (गो.) ठळक. [अप.]

**था**—स्त्री. १ तळ; पाया; तळची जमीन. २ ठिकाण; जागा; ठाय. 'भणौनि शिशुपालवधी कथा। जे भक्तीरसाची था।'—शिशु ३०. [सं. स्था–स्थ; प्रा. था]

**थाउ**—पु. ठिकाण; तळ; ठाय. 'तैं नवरस द्वीपींचा थाउ लाभे।' माज्ञा १०.७. [सं. स्था]

**थाऊ**—वि. स्पष्ट; प्रांजळ.

**थाऊक**—न. भांडेंकुंडें; ठावकें [सं. स्था]

**थाक**—स्त्री. १ (काव्य.) गोंधळ; घोंटाळा. २ –पु. गाण्यांतील अवसान, विसावा, थांबण्याची जागा. (क्रि० तुटणें). 'नृत्यांत अप्सरांचे तोडिति हृत्सहचि सर्व थाक थवे।'—मोअनु ५.४४. ३ थकवा. (क्रि० लागणें). ४ ठिकाणा; पत्ता; थांग. 'उठतां कुरुवीराचे लागों देती जना न थाक थवे।' - मोभीष्म ८.१८. [सं. स्था]

**थाक**—पु खोली; थांग; तळ. [सं. स्था: प्रा. थग्घ=तळ, खोली; हिं. थाह]

**थाकणें**—अक्रि. (आव्य.) थकणें; भागणें; दमणें.

**थाकणें**—क्रि. (कर. नरभाषा) देणें; विकणें.

**थाकी**—स्त्री. रीत: पद्धत; शैली. (कार्य करण्याची, भाषणाची); डौल; चाल. (वाप्र.) [सं. स्था] **०उतरणें–साधणें–आणणें**—अनुकरण, नक्कल, विडंबन करणें.

**थांग**—पु. १ नेमकी जागा; माग (हरवलेल्या व शोधलेल्या वस्तूचा). २ (ल.) खोली; ठाव (पाणी, एखाद्याचें ज्ञान, संपत्ति, गुण इ०चा). [सं. स्था] (वाप्र.) **थांगणें**—थांग लागणें. 'शास्त्रांसीहि पडे भ्रांति। नाहिं थांगला।'—रत्न ७.५.४. **थांग**

पाहणें–समुद्राची खोली मोजणें. ०लावणें–पाडणें–पत्ता लावणें; शोध करणें.

**थांग(गा)दोरा, थांग(गा)पत्ता**—पु. (व्यापक) पत्ता; सुगावा; मार्ग; ठाव; छडा.

**थांगपूस**—पुस्त्री. (खा.) पत्ता; बातमी; माहिती (हरवलेल्या वस्तूची). (क्रि० लागणें; लावणें). [थांग+पुसणें]

**थांगा**—पु. १ थांग पहा. २ जागा; आधार (राहण्याकरितां अथवा कांहीं ठेवण्याकरितां).

**थांगाथांग, थांगारणी, थांगारणूक**—स्त्री. चालचलाऊ रचना, व्यवस्था, मांडणी; सामान्य मिरवणूक. [थांग]

**थांगारणें**—सक्रि. १ व्यवस्थेनें लावणें; जागच्याजागीं ठेवणें (वस्तु इ०). २ दुरुस्ती करणें; नीट करणें. ३ हवालीं, स्वाधीन करणें. [थांग]

**थांगी**—पु. चोरांचा साथीदार, चोरीचा माल ठेवणारा. [हिं.]

**थाट**—पु. डौलाचा, दिखाऊ थाटमाट, रचना (सैन्य, डेरे, थवे, ढग, पिकें इ० ची). (सामा.) डामडौल; शोभा; भव्यपणा; ऐट; वैभव; दिखाऊपणा. 'बोलण्याचा–गाण्याचा–वाजविण्याचा–नाचण्याचा–सभेचा–मंडपाचा–थाट. [सं. स्था] (वाप्र.) **थाट करणें**–नटणें. ०बसणें–(घोड्यावर) ताठ, सरळ रेषेंत बसणें. ०माट–मांड–पु. १ उपकरणांची माडणी; डामडौलाची जुळणी. २ (राहण्याच्या हेतूनें, सुखवस्तीसूचक) व्यवस्थेशीर मांडणी (सामानाची, कामाची); व्यवस्थित मोठा पसारा. (क्रि० करणें; पडणें; बसणें). ३ पोषाख, अलंकार घालणें; नटणें. (एखाद्या प्रसंगाकरतां); डौलानें बाहेर पडणें; डौल; शोभा; दिखाव.

**थाट**—पु. छपराची ताटी किंवा शाकारण्याकरितां तयार केलेली साटी. [ताट–टी]

**थाट**—पु. टोळी; जमाव; मंडळी. 'गजांचिया थाटावरि। सिंह चालती जया परी।' –गीता १.३३२. 'थाट पुढें शत्रुचा देखोन हाट करुनीयां साठ तुरुंगा।' –ऐपो १२१. [प्रा. दे. थट्ट= समूह]

**थाट**—पु. (संगीत) सात सुरांची रचना; स्वरानुरोधानें रागाचें वर्गीकरण.

**थाट**—न. (खा.) ताट.

**थाट**—वि. १ दाट व घट्ट विणीचा (कपडा, दोर इ०). २ (ल.) घट्ट; खंबीर; बळकट (मनुष्य, प्राणी). ३ साधा; निखालस; खडखडीत. [फा. तट्ट]

**थाटणें**—सक्रि. व्यवस्थेनें लावणें; सजविणें; रचना करणें; देखावा करणें; तयार ठेवणें; जमणें. 'वेळेवर सैन्य तयार थाटलें।' –विक २६. थाटानें चालविणें (व्यवहार, संसार); शहाणपणानें योजना करणें (कल्पना, मसलत यांची) : (सामा.) रचणें; सज्ज करणें; मांडणें. 'थाटले सदा गायक। अभिमानानें हुंबारिति देख।' [थाट]

**थाटबंद**—पु. चौकट; साटी (छप्पर इ० ची). [ताट+बंद]

**थाटर**—स्त्री. (खा.) साटी.

**थाटली**—स्त्री. तबक; (चांदीची) ताटली.

**थाटा**—पु. एक झाड; कारवीची जून, जाड काठी याचा उपयोग कुंपणाकडे करतात. २ कांठ; पदर.

**थाटी**—स्त्री. १ वाटीच्या आकाराचें धातूचें पात्र. २ (कु.) गंधाची तबकडी. ३ (व.) काश्याचें ताट; परात.

**थाटी**—स्त्री. सैन्य. 'तिये थाटी ओळघैला। नायक शिरोमणी।' –शिशु १०३५. २ टोळी; जमाव; मंडळी; समुदाय. 'नागविल्या थाटी। उरीं नेदीच लंगोटी।' –तुगा १४८९. [प्रा. थट्ट; म. थाट]

**थाटी**—स्त्री. फांस.

**थाटुळणें**—क्रि. (व.) थंडीनें आखडणें.

**थाड–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि. एखादी वस्तु दुसऱ्या वस्तूवर आपटून होणाऱ्या ध्वनीसारखा ध्वनी होऊन; चाबकाचा छडीचा, चापटीचा आवाज होऊन. [ध्व.]

**थाडथाड**—क्रिवि. छडी, चाबूक, लाथा इ० मारण्याचा आवाज होऊन. [ध्व.]

**थांडगी**—पु. (गो) विशिष्ट कृत्यें करणारा शूद्र.

**थाडा–डी–डें**—वि. (ना.) अपक्व (फळ).

**थाण**—न. (प्र.) थान; ठाण; कापडाचा तागा. [सं. स्था]

**थाणखूण**—स्त्री. (गो.) खाणखूण.

**थाणू**—पु. (गो.) स्थाणू (महादेव). –वि. रागीट. [सं. स्थाणु; प्रा. थाणु]

**थाणें**—न. (गो.) १ एक प्रकारचा कपडा; ठाण. २ ठाणें. [सं. स्था] ०दिवचें–आसन ठोकणें. **थाण्यावेलों दिवों**–(गो.) ठाणदिवा.

**थातंबणें**—क्रि. १ तसेंच ठेवणें; थोपविणें. 'एऱ्हवीं प्राप्तें मतांतरें। थातंबूनि आंगभरें। बोलिजैल तें न सरे। तुम्हांपाशीं।' –ज्ञा १३.३१८. २ निसरणें. [सं. स्तंभ्]

**थातारचें**—१ (गो.) फूस लावणें. २ शांत करणें.

**थातूंमातूं, थातुरमातूर, थाथूंमाथूं, थाथोमाथों**—न. थंतरमंतर पहा. [सं. तंत्रमंत्र]

**थान**—न. १ कापडाचा तागा; ठाण. २ एक तुकडा. जसें:– मोहराचें–पितळीचें–हिऱ्याचें–हुंडीचें–थान. [सं. स्था]

**थान**—न. जागा, ठिकाण; स्थळ. [सं. स्थान; प्रा. थाण]

**थानपति**–पु. अधिकारी. [सं. स्थान+पति]

**थान**—न. स्त्रीची छाती; स्तन; आमा; जनावराचें थान. 'मज पाजायां प्रेमें पय पळ धरिती तिर्ची न थिर थानें।' -मो उद्योग १०.८१. [सं. स्तन] (वाप्र.) ०**गुंतणें**-(कांहीं रोगानें) स्तनांतून दूध येण्याचें बंद होणें. ०**देणें**-अमा प्यावयास देणें; पाजणें. ०**विसरणें**-थानाची आठवण न होणें. (मुलास, वासरास) आईला प्यावयाची नैसर्गिकबुद्धि नसणें. सामाशब्द- ०**करीण**-स्त्री. मुलाला पाजणारी बाई, दाई. ०**तुटा-तुटका**-वि. (थानापासून तुटलेलें) अंगावर न पिणारें; आई पासून दूर केलेलें व दुधाकरितां दाईच्या स्वाधीन केलेलें (मूल). ०**तोड**-स्त्री. ताटातूट; संबंध तोडणें. ०**मोड**-स्त्री. प्यावयास दाईकडे देणें; अंगावर दूध नसणें. **थानवा-वें**-वि. अंगावर पिणारें; थान पितें (मूल). [थान] **थानसी-थनी**-वि. ज्याच्या छातीवर थान आहे असा (घोडा). [थान]

**थानमान**—पु. १ मानसन्मानानें वागविण्याची पद्धत; आदर सत्कार. २ थाटमाट. तानमान पहा. [सं. स्थान+मान]

**थानमान**—न. ठावठिकाण. 'देवासी नाहीं थानमान। कोठें करावें भजन।' -दा १९.५.२१. [सं स्थान+मान]

**थाप**—स्त्री. १ थापटी; थापड; रपाटा; चपराक; हाताचा रट्टा. (क्रि० देणें). २ लाटेचा तडाखा. (क्रि० चालणें; बसणें; बसविणें). ३ पाण्याच्या धडकेकरितां बांधलेला बांध, भिंत. ४ भुलवणूक; झोला; चापाचापी; बाता मारणें. (क्रि० देणें; मारणें). ५ छाप; वरिष्ठपणाचा ठसा. ६ पोहण्यांत पाण्यावर केलेला प्रहार. ७ पखवाज, तबला इ०वर त्यांतून आवाज निघेल असा हाताचा हलका प्रहार (गाण्याबजावण्या बरोबर). जसें:– गाण्यावाजविण्याची थाप. ८ एखाद्या कुंभाराची मातीचीं भांडीं करण्याची विशेष पद्धत–रीत. ९ मडकीं तयार करण्याकरितां कमाविलेल्या मातीचा गोळा. १० (गो.) शेणाची रास. ११ केळीचे खुंट एकमेकांस जोडून पाण्यावर तरंगण्यासाठीं केलेला ताफा. १२ कलावंतणीचा मेळा. १३ (शेणाचा) पोहो [सं. स्था] (वाप्र.) **थाप मारणें**-१ थोबाडींत देणें. 'बळें थाप मारून मुगूट नेला।' -राक १.४५. २ फसविणें; चकविणें. **थाप-थापा देणें**-कांहीं तरी सांगून आपलें काम करून घेणें; राग शमविणें. सामाशब्द- **थापवेन्हीं**-चपराकेसरशीं. 'जे दैत्यांचां कुमरीं। मारिजेतीं थापवेन्हीं।' -शिशु १४९.

**थाप**—स्त्री. चापा, पाळ वगैरे मिळून होणारा कानाचा बाह्य भाग. टापशी बांधतात तो भाग. 'लवलवित फडकावी। फणी फणे कर्णेथापा।' -दा १.२.१३.

**थापझिरा**—पु स्वच्छ पाणी येण्याकरितां नदीच्या पात्रांत हातांनीं खणलेला खळगा.

**थापट**—स्त्री. चापट; थप्पड; हाताचा रट्टा. [सं. स्थापित; प्रा. थापिअ] ०**उगारणें**-चापट मारण्याकरितां हात वर करणें. **थापट पडप**-(गो.) पांच रुपये बक्षीस मिळणें.

**थापटणें**—सक्रि. १ थापट, चापट मारणें. २ (ल.) गोडी-गुलाबीनें वळविणें; शांत करणें; कुरवाळणें. ३ (थापटून) अंगावर सामान घालून तयार करणें (घोडा, बैल). ४ दंड ठोकणें (अंगीं पराक्रम, बळ आहे असें दाखविण्यासाटीं). 'चढले रथीं भुजांतें भ्राते भीमादि सर्व थापटुनि।'-मोभीष्म १.११३. ५ जागच्या-जागीं दाबणें. 'मन राखे हातीं घेउनियां काठी। इंद्रियें थापटीं फाकों नेदी।' -तुगा २१२३. [ध्व. थप्प; सं. हस्तस्फटनं-हत्थथापटणं-अत्थ्थापटणं-थापटणें-भाअ १८३५.]

**थापटणें**—न. १ कुंभाराचें मडकीं घडावयाचें हत्यार. २ वस्तरा लावण्याचा कातड्याचा तुकडा. ३ गवंड्याचें गिलावा इ० ठोकावयाचें हत्यार.

**थापटावचें**—क्रि. (गो.) चापट मारणें. थापटणें पहा. [थापट]

**थापटॉ वाजवप**—(गो.) चपराक मारणें. [थापट]

**थापटी**—स्त्री. १ चापट; थप्पड. २ गोंवरी (शेणाची). 'घातल्या इंद्रेचिया थापटिया।' -स्वादि २.२.३. ३ मुलांस शिक्षा करण्याची छडी. ४ गवंडी लोकांची गिलावा ठोकण्याची ठोकणी; कुंभाराचें मडकीं घडण्याचें लांकडी हत्यार. ५ उपयोग अथवा हलवणूक यासंबंधीं मनाईची घरावरील, जिनसावरील सरकारी खूण. ६ (व.) चपटें कौल. [थाप]

**थापटीव**—वि. १ थापटलेलें; कुंभाराच्या थापटण्यानें घडलेलें. २ थापटीवर थापटून केलेली (पोळी इ०) याच्या उलट घडीव; लाटीव. ३ थापटून केलेली (गोंवरी इ०). [थापटणें]

**थापड, थापडणें, थापडीव**—थापट इ० पहा.

**थापडवाईक, थाबड(बाड)वाईक**—वि. १ थपडा खाणारा. २ दुसऱ्याच्या छंदानें चालणारा; मिंधा. ३ भोळा; मूर्ख; सहज फसणारा (मनुष्य). ४ थापा, गप्पा मारणारा; गप्पीदास. [थापड+वाईक]

**थापडी**—स्त्री. थापट; चापट; रट्टा. [थाप] **इधर थापडी उधर थापडी**-सगळीकडून थपडा बसणें.

**थापणें**—सक्रि. १ चापट करणें, थापटणें. २ चिकटसा मारणें (भिंतीवर चिखल इ०कांचा गोळा); लिंपणें. ३ कुरवाळणें; गोंजारणें. [थाप]

**थापणें**—सक्रि. स्थापणें; उभारणें; निश्चित करणें. [सं. स्थापन; प्रा. थप्पण]

**थापलणें**—सक्रि. शीड असलेलें तारू वल्ह्यानें थांबविणें, वळविणें. [थाप]

**थापविहिरा**—पु. थापझिरा पहा.

**थापा**—पु. १ ढेंकळें मोडण्याचें लांकडी हत्यार. २ लाखेच्या आंगठ्या करण्याचें हत्यार. ३ (कों.) गोंवरी. ४ टेकडीच्या

माथ्यावरील अथवा टेकडीच्या बाजूला असलेली सपाट जमीन, पठार. 'आली थाप्यावरती झाडी असमान फाडी साहेब फडफडी हेलावे घेई तीन मजले गेले सुर्या दिसला नाहीं।' –ऐपो ४३४. [थापणें]

**थापाट**—न (कु.) चापटी; थप्पड. [थाप]

**थापाथापी**—स्त्री. खोट्यानाट्या गोष्टी सांगणें; थापा मारणें; थापेबाजी.

**थापाथुपी**—स्त्री. भुलथापा.

**थापी**—स्त्री. १ गिलावा वगैरे लावण्याची, साफ करण्याची एक प्रकारची लांकडी करणी. २ गवंड्याची ठोकणी. ३ (राजा.) शेणाची गोवरी. ४ (उतरंड इ०). व्यवस्थित लावून ठेवण्याची क्रिया. [थापटणें] ०**करणी**–(विटांचें बांधकाम) बांधकामांत माती अथवा चुना सफाईनें बसविण्याचें साधन. ०**कौल**–न. उंच कांठ असलेलें कौल. हातांनीं माती थापून केलेलें कौल (याच्या उलट नळीचें चाकावरील कौल). **थापीचें माप**–न (धान्य इ०) मोजण्याची एक तऱ्हा; मापास शीग देऊन हातांत पडेल असें माप ज्यांत देतात तो प्रकार.

**थांब**—न. (गो) शेतांत नवें उगवलेलें रोप. [सं. स्तंब]

**थांबडें, थामडें**—न. (ल.) ताट; बशी. 'आपले थांबडें भरून घेणें, भरणें.'

**थाबणें**—सक्रि. थापणें पहा. थापटणें.

**थांबणें, थामणें**—अक्रि. १ उभें राहणें; विश्रांति घेणें; खोळंबणें; राहणें; वाट पाहणें. २ (एखादें काम) कांहीं काळ बंद होणें; तहकूब होणें. [सं. स्तंभ्=उभें राहणें; स्तंभन; प्रा. थंबण]

**थांबविणें, थामविणें**—सक्रि. थोडा वेळ बंद ठेवणें; थांबण्यास लावणें; खोळंबविणें; तिष्ठत ठेवणें; उभें करणें (मनुष्य, काम, वस्तु). 'श्वसित ही न थामविलें।' –अकक गंगाधर, रसकल्लोल २२. [थांबणें प्रयो.]

**थाय**—पु. अहंकार. [थैय् थैय्]

**थायली**—स्त्री. (व.) ताटली; लहान परात. [सं. स्थालि]

**थाया**—पु. (दूध, रक्त, पाणी इ० सांडून झालेलें) लहान डबकें; थारोळें.

**थाया**—पु. १ थैया; रागानें आदळआपट करणें; लाथा मारणें. (क्रि० घेणें; घेऊन बसणें; करणें). २ हट्ट; छंद; ध्यास. 'म्हणे बाळकें घेतला थाया। तो साच करूनि दाखवी माया।'–मुआदि १.८३. [थाय] (वाप्र.) ०**भरणें**–हट्ट करणें. 'थाया भरूनि करूं काय तुजें दिसेना।' –हरिराजकृत मुद्गलाचार्य विरचित रामार्याचें भाषांतर २१.

**थार**—पु. १ विश्रांतीचें, वस्तीचें ठिकाण; (शब्दशः व ल.) बिऱ्हाड; आश्रम; आधार; थारा; ठिकाण; आश्रय. 'वैकुंठीचा थार केला तिनें।' –ब ४६७. २ एकसूत्रीपणा; ताळ (भाषण, वर्तणूक यांतील). 'त्याच्या बोलण्यांत, करण्यांत थार नाहीं.' ३ जागा; तळ, हमी; जामीन. जसें:- 'व्याजास–मुद्दलास–अन्नास–दाण्यास–वस्त्रास–पैक्यास–थार.' [सं. स्थान, स्थिर] (वाप्र.) ०**नसणें**–(जागा न सांपडणें) वाण असणें (अन्न, धान्य इ०ची). **थारीं बसणें–पडणें**–(शब्दशः व ल.) वसती करणें (वस्तु, मनुष्य, पिशाच यानीं). **मडकें थारीं बसणें**–स्थिर व निर्भय स्थिति प्राप्त होणें.

**थार**—क्रिवि. (काव्य.) ठार पहा. 'कुंभकर्णे प्रासिलें थार.' शको. ४. २४

**थारचें**—क्रि. (कों. गो.) थांबणें; स्थिरावणें.

**थारणें**—अक्रि. १ स्थिर होणें; थांबणें; विश्रांति घेणें; स्थिरावणें; टिकणें. 'हो सेतु स्वयशतोय थाराया।' –मोकर्ण २१.७. २ राहणें; नेटानें चालू ठेवणें. [सं. स्था; स्थिर्]

**थारळें**—न. थारोळें पहा.

**थारा**—पु. राहण्याची जागा; आश्रय; आधार. 'तैसा स्वधर्मु जरी लोपला। तरी सर्व सुखांचा थारा मोडला।' –ज्ञा ३.११०. [सं. स्था; स्थिर्] (वाप्र.) ०**मोडणें**–राहण्याच्या जागेचा नाश करणें. **थारीं थांबणें**–स्थिर राहणें. **थाराथार**–स्त्री. स्थिरता; घट्टपणा; स्तब्धता. [थारावणें]

**थारापलेलें**—वि. (गो.) ठरविलेलें.

**थारामारा**—पु. ठावठिकाण; पत्ता. 'पाडियेला ठायीं तुझा थारामारा। अवघा दातारा लपसी तो।' –तुगा १२२७.

**थारावचें**—क्रि. (गो.) थांबविणें. [सं. स्था]

**थारावणी**—स्त्री. राहणी; वसती; वास्तव्य. [थारावणें]

**थारावणें**—अक्रि. १ स्थिरावणें; ठाकणें; राहणें; विसावणें. २ उभें राहणें; वसणें; नांदणें. –सक्रि. स्थिरावणें; नियमित करणें; उभें किंवा शांत राहण्यास लावणें. [थारणें] **थारावप**–क्रि. (गो.) शांत करणें.

**थारी**—स्त्री. (बागलाणी) तांब्या.

**थारू**—न. लोखंडी रहाटगाडग्याचें पाणी पडण्याकरितां केलेली पत्र्याची योजना.

**थारेपालट**—पु. राहण्याची जागा बदलणें; स्थलांतर. [थारा+पालट]

**थारोळ–ळा–ळें**—पुन. १मोटेचें पाणी जेथें प्रथम पडतें, जेथें मोट रिकामी होते ती दगडांनीं बांधलेली कुंडीवजा जागा. २ (ल.) डबकें; डोह (पाणी, रक्त, दूध इ० सांडल्यानें झालेला). ३ विस्तव ठेवण्याकरितां जमिनींत खणलेली खळगी. 'कुत्रें थारोळ्यांत बसलें म्हणजे सात जन्म आठवितें.' ४ गुऱ्हाळांतलें काहिलीखालचें राखेचें भोसकें; चुलाण्याचें तोंड. ५ दुधाणें; दूध तापविण्यासाठीं जमीनींत तयार केलेलें कुंड. [सं. स्था]

**थाल**—पु. शेताचा मगदूर; उत्पन्न. ' शेतकीचा थाल पाहून ' –मसाप २.१४०.

**थालणें**—अक्रि. प्रकाशणें. –मनको.

**थाली**—स्त्री. १ अन्न शिजविण्याचें भांडें. २ ताट; परात. ३ (ना. व.) तपेली किंवा लोटा; तांब्या. ४ (तंजावरी) गडू. ५ तबकडी. ' करीं कनक झारी शोभली। तीवरी ठेविली कनकथाली।' –जै ७२.५६. [सं. स्थाली। प्रा. थाली] **थालीठावकें**–न. भांडींकुंडीं. **थालीपीठ**–न. भाजणीचा केलेला एक रुचकर पदार्थ

**थाव**—पु. ठाव; थांग; अंत; बळ; पार. ' सिंधूचा तरि थाव लागल कधीं रत्नासि संख्या घडे।' –निमा १.४७. [ठाव]

**थावटणें**—अक्रि. राहणें; स्थिरावणें; थोपावणें. [सं. स्थावर]

**थावडा**—पु. (कों.) थावडा; शेणी; शेणांत भाताचा कोंडा घालून थापलेली लहान गोवरी. [थापटणें]

**थावणें**—अक्रि. स्थिरावणें; बळावणें; जोरावणें. 'मग थावली ते वाहटुळी। सैंघ घेऊनि घर डहुळी।' –ज्ञा ६.२२६. [सं. स्था]

**थावर**—पु. १ (तेल कढविण्याची) कढई; घमेलें. २ मोठी पळी. ३ उलथणें (मोठें). [सं. स्था]

**थावरणें**—सक्रि. १ तात्पुरतें उभें करणें; उभारणें (दुरुस्ती करून). २ थांबविणें; थांबवून धरणें. ३ धीर देणें; कायम राखणें (धीर, उत्साह इ०). ४ आटोपणें. ' लक्ष्मण सुमंत्र तेव्हां धैर्यानें बाष्पपूर थावरती।'–मोमंत्ररामायण उत्तरकांड २४२. [सं. स्थावर]

**थावरणें**—अक्रि. १ स्थिर होणें; आसरा मिळणें. २ डोकें पुन्हां वर काढणें (व्यापार इ०कामध्यें); गेलेली शक्ति, अवसान पुन्हा परत येणें (आजारी मनुष्य इ०चें). [सं. स्थावर]

**थावा**—पु. बळ; आधिक्य. –हंको.

**थावी**—स्त्री. तळ; ठिकाण. [ठाव]

**थावें–वो**—पु. ठाव; थांग. [ठाव]

**थावून**—(गो.) ऊन, हून या अर्थाचा प्रत्यय. उदा० खंय थावून आयला=कोठून आलास. [ठाव+ऊन, हून]

**थाळ**—स्त्री. १ गोवऱ्यांची, नारळाच्या सालींची वगैरे स्वयंपाकाकरितां रचलेली रास; झगरें. २ ओझें नेण्यानें तापणें; गरम होणें (डोकें, कमर, पाठ यांमध्यें); (पोटामध्यें) उपासानें किंवा तापानें होणारी जळजळ. (क्रि० येणें; उठणें; होणें). ३ चटका; होरपळा (विस्तवाजवळ बसण्यानें बसणारा). ४ उष्णतेची, शिणाची, बधिरतेची भावना (पुष्कळ वेळ एका ठिकाणीं बैठकीनें, घोड्यावर बसण्यानें इ०). (क्रि० येणें) ' माझ्या अंगाला बसून बसून थाळ आली ' ५ दूध, स्नानाचें पाणी तापविण्याची ओबडधोबड चूल; चुलाणें किंवा त्याची जागा. ६ घाण पाणी वगैरेचें थारोळें. ' पोरानें मुतून काय थाल केली–भरवली. ' [सं. स्था]

**थाळण**—स्त्री. १ थाळ (पहिले चार अर्थ) पहा. २ (खा.) मोटेचें पाणी ज्यांत पडतें तें थारोळें.

**थाळणें**—(विरू.) थळणें पहा.

**थाळरें**—न. (राजा.) थारोळें पहा.

**थाळल**—न. थाळण अर्थ २ पहा.

**थाळा**—पु. १ जेवणाचें वगैरे मोठें ताट. ' जेवणारानें मांडला थाळा, पण वाढणाराचा जाईना चाळा. ' २ लग्नामध्यें नवऱ्यामुलीला देण्याकरितां दागिन्यानें भरलेलें ताट. [सं. स्थाली] (वाप्र) ०**बसणें**–चांगलें व जोरदार पीक येणें. ' पिकाचा–धान्याचा–शेताचा थाळा बसला. ' ०**भरणें**–नवरी मुलीस सुनमुखाच्या वेळीं सर्व दागिने घालणे. ०**वाजणें**–(खाद्य पदार्थ, पैसा इ०). संपणें. ०**वाजविणें**–कोणत्याहि गोष्टीची द्वाही फिरविणें. (बायकी) मूल जन्मास आल्या बरोबर कांशाचा थाळा वाजवून आनंद प्रदर्शित करणें. सामाशब्द– ०**तांब्या**–पु. ताट व गडवा (गरीब लोकांची संपत्ति). (क्रि० घेणें; नेणें; विकणें= गरीबाचें सर्वस्व घेणें इ०). **म्ह०** घेतला थाळा चालला जेवावयाला=आगंतुक मनुष्याच्या वर्णनपर. ०**वाटी**–स्त्री. (ल.) समूळ नाश; मालमत्तेचा नाश; निर्वंश (थाळा व वाटी एकमेकांवर वाजविली असतां जेवण्याचें संपलें असें सूचित होतें यावरून.) **थाळी**–स्त्री. १ लांकडें आणि विस्तव ठेवण्याकरितां जमिनीमध्यें खणलेली खळी, चर, चूल. २ लहान थाळा. [सं. स्थाली] ०**पिटणें**–चोहींकडे प्रसिद्ध करणें. **थाळी ठावकें**–न. (व्यापक) ताटवाटी इ०.

**थालिऊ**—वि. (महानु.) स्थळीं आकारलेला. ' निवृत्तीचा थालिऊ। ' –भाए २५१. [सं. स्थल]

**थिऑसफी**—स्त्री. (धार्मिक) ईश्वरविषयक ज्ञान; ब्रह्मज्ञान किंवा आत्मज्ञान. ही एकोणिसाव्या व विसाव्या शतकांतील सर्व पृथ्वी वर पसरलेली एक आध्यात्मिक चळवळ आहे व ती थिऑसॉफिकल सोसायटी नांवाच्या सर्वराष्ट्रीय संस्थेच्या द्वारानें चालविली जात आहे. [इं. थिऑस=ईश्वर+सोफिया=ज्ञान] **थिऑसोफिस्ट**–पुवि. थिऑसफी नांवाच्या विशिष्ट पंथाचा अनुयायी.

**थिएटर**—न. नाटकगृह. [इं.]

**थिकटें**—वि. व्याप्त.

**थिकटणें**—क्रि. व्याप्त होणें.

**थिकडें, थिगळ, थिगळणें, थि(थिं)गळी**—ठिकडें, ठिगळ, इ० पहा.

**थिंकणें**—अक्रि. चरफडणें; शोक करणें; रडणें. ' म्हणवुनि पुढें मांडियेली आळी। थिंकोनियां चोळी डोळे तुका।'–तुगा ११२८.

**थिकी**—स्त्री. (गो.) ठिकी पहा.

**थिकुलें**—वि. १ थोडें. २ लहान. [सं. स्तोक]

**थिगरी**—स्त्री. (गो.) कपाळाची करवंटी. [ थिगळ ]

**थिगळ-ळी**—न. ठिगळ; डाग. 'सौंदणी फेडी थिगळी। वस्त्रांचिया।' -ज्ञा १३.४६५. [ सं. स्था; प्रा. थिग्गल ]

**थिगळ**—वि. चेंगट; दीर्घसूत्री; मंद; जड; सुस्त [सं. स्थगित]

**थिगळणें**—ठिगळणें पहा.

**थिगळी**—स्त्री. ठिणगी.

**थिंगा**—क्रिवि.( गो. ) ( कुण. ) तिकडे; त्या तिथें.

**थिगूर**—पु. ( गो. ) गोडया पाण्यांतील एक मासा.

**थिजणें**—अक्रि. १ गोठणें; थंडीमुळें घट्ट होणें. २ निश्चल होणें (मरणसमयीं डोळे इ०). ३ (ल.) तल्लीन होणें; ध्यान, आश्चर्य, चमत्कार, गोंधळ यांत गढून जाणें. 'थिजले बघून तुम्हा' -विक ६५. **थिजण्याचा बिंदु**-पु द्रवपदार्थ ज्या उष्णमापनावर घनस्थितींत जातात तो बिंदु. [ इं. फ्रीझिंग पाइंट यास प्रतिशब्द. ] **थिजविणें**-सक्रि. गोठविणें; घट्ट करणें. [ थिजणें ]

**थिजें**—क्रिवि. सांप्रत; सध्या.

**थिटा-टी-टें**—वि. १ आंखूड; अरुंद; अपुरा; अल्प; कमी. 'प्रसाद पट झांकिती परि परा गुरूचें थिटें।' -केका ९५. २ दोषयुक्त; उणीव असलेलें. [ सं. त्रुटित ]

**थिण(न)गी**—स्त्री. ठिणगी पहा.

**थित**—वि. १ जवळ असलेलें; मूळचें. 'राखों जातां शिष्यातें। गुरुपणही घाडिलें थितें।' -अमृ २.१२ .[ सं. स्थित ]

**थित**—वि. (काव्य) नीच, हलका. 'चित्तें म्हणे अहा म्यां हारविलें हातिचेंहि भव्य थितें।' -मोकर्ण ५.१. [ सं. स्थित ]

**थिता**—वि. व्यर्थ; वायां.

**थितें**—वि. १ अल्प; थोडे सुद्धां. 'म्हणोनि सार थिता, सुगुण न लोपी।' -मोकर्ण २१.३७. २ स्थिर. 'जें थितें हें डहुळलें। मानस माझें।' -ज्ञा ३.१४. [ सं. स्थित ]

**थित्या**—क्रिवि. थोडक्यांत. 'थित्या अनुभव दुराविजे।' -अपरोक्षानुभव १२.१८९.

**थिपकणें, थिपका, थिपणें, थिपथिप, थिबकणें, थिबका**—ठिपकणें, ठिपका, ठिपणें इ० पहा.

**थिप(ब)डी**—स्त्री. (उष्णता कमी करण्याकरितां) डोक्याला तेल चोळणें, थापटणें इ० क्रिया. ( क्रि० घालणें ) [ ध्व. ]

**थिप(ब)णें**—अक्रि. (व.) निथळणें; थेंबथेंब गळणें. [ध्व.]

**थिबथिब**—क्रिवि. थिपथिप, थबथब. [ ध्व ]

**थिबा**—पु. (व.) धाब्यांतून पावसाचें पाणी गळतें तें; तशा पाण्याची गळती.

**थिर, थिरथिर**—उद्गा. शेळया इ०नां हांकलतांना वापरावयाचा शब्द [ ध्व. ]

**थिर**—वि. १ स्थिर; निश्चल. 'सभ्य थिर जें गंभीर।' -वेसीस्व ५.१७. २ बळकट. [ सं. स्थिर ]

**थिरकणें**—अक्रि. डौलानें, थाटानें चालणें.

**थिरणें**—अक्रि. स्थिर उभें राहणें. 'पार्थाचा धैर्य न दे रिपुदमनीं त्या नदा शर थिराया।' -मोकर्ण ३६.४५. [सं. स्थिर]

**थिरथिर-रां**—क्रिवि. १ चंचलपणें. २ मंदमंद. 'थिर थिर थिरावे नाच। प्रेमळ भक्तांचा।' -दा १४.४.१७. [ सं. स्थिर ]

**थिरबिटी**—स्त्री. पातळ, जलप्रचुर द्रव्य; बिरबिटी; बिरबिरीत शेण; पातळ लोणी, चिखल; ज्यांत पाणी फार पडलें आहे असें पीठ.

**थिराई**—स्त्री. ( अशिष्ट-थीर ) शांतता; स्थिरता; स्तब्धता; निवांतपणा. स्थीर पहा. [ सं. स्थिर ] **०खालीं**-क्रिवि. शांततेनें; स्तब्धपणानें; सौम्यतेनें, थंडपणानें. ( क्रि० घेणें; करणें; चालणें ).

**थिरावणें**—उक्रि. थांबणें; थांबविणें; राहणें; राहविणें; विश्रांति घेणें; चालू ठेवणें; स्थिर होणें. [ सं. स्थिर ]

**थिरेंथिरें**—क्रिवि. थंडपणें; शांतपणें. थिराईखालीं पहा.

**थिल्लट**—वि. १ मंद; थंड; दीर्घसूत्री; चेंगट (मनुष्य, काम, व्यवहार). २ पातळ व विरळ धाग्याचा (कपडा). ३ क्षुद्र; नीच; घाणेरडा; बेअब्रूचा; हलकट. ( मनुष्य, वर्तणूक, भाषण ). [सं. शिथिल] **-टाई**-स्त्री. १ मंदपणा; थंडपणा; निष्काळजीपणा; सुस्ती. २ (कापडांतील) धाग्यांचा विरळपणा. ३ हलकटपणा; नीचपणा; घाणेरडेपणा.

**थिलथिल, थिलथिलणें, थिलथिलीत**—थलथल इ० पहा.

**थिल्लर**—न. तळें; डबकें. 'आणि मनीं तरी आठविजे। थिल्लरोदकातें।' -ज्ञा ७.१५२. 'काय थिल्लरींचें पाणी।' -तुगा ७००. -वि. (ल.) उथळ बुद्धि; अल्पज्ञ; मंद (मनुष्य). [ सं. शिथिलतर ] **थिल्लरोदक**-न. डबक्यांतून सांचलेलें पावसाचें पाणी. 'जान्हवीस न्हावया थिल्लरोदक।'

**थिवथिव**—स्त्री. ( पावसाचें ) थेंबथेंब पडणें. [ ध्व. ]

**थीक**—न. ( गो. ) खोटें रत्न. [ ठीक ]

**थीत**—वि. १ निश्चित. २ (ल.) व्यर्थ. [ सं. स्थित ]

**थीर**—वि. १ (काव्य) शांत; स्तब्ध; सौम्य; निवांत, गंभीर (मनुष्य, वारा, समुद्र, पाणी). 'सोहं दुडी वाहोनी चाले थीर।' -ब २९४. २ शांत झालेली ( साथ, भांडण ). स्थिर पहा. [ सं. स्थिर ] **०थीर**-क्रिवि. हळू हळू. 'रामरथ गजभारीं। थीर थीर मिरवे।' -वेसीस्व ७.८०. **०थावर**-नस्त्री. कायमपणा; स्थिरता; स्तब्धता. -वि. स्थिर; निश्चित; कायम; विश्रान्ति असलेला. [ स्थिर+स्थावर ]

**थीरु थीरु**—उद्गा. थांबा थाबा! 'राहा राहा थीरु थीरु म्हणत।' –उषा ८२७. [सं. स्थिर, स्थिर]

**थींव**—न. (कों.) नेमलेली, ठरविलेली, ठरीव जागा. [सं. स्थान]

**थुः, थूः**—उद्गा. (निंदाव्यंजक) छीः! थूः! 'थु ऐसें बोलीलें तोंडावरी।' –रामदासी २.१४५. [ध्व.]

**थुई**—स्त्री. थुंकी. [ध्व.]

**थुईथुई**—स्त्री. झिमझिम; बुरबुर (पावसाची). –क्रिवि. झिमझिम; थिवथिव; थेंबथेंब (पाऊस पडणें). 'कारंजीं कैशी दिसती। उडतांना थुइथुइसा शब्द करिती।' –रत्नप्रभा ४२. [ध्व]

**थु(थुं)कणें**—उक्रि. पिंक, थुंकी बाहेर टाकणें, टाकविणें [ध्व. थू] **तोंडावर थुंकणें**–छीः थूः करणें.

**थुकदांणी(दाडी)**—स्त्री. (गो.) पिकदांणी (दाडी).

**थु(थुं)करणें**—सक्रि. थुंकणें. [थुंकणें]

**थु(थुं)का, थु(थुं)की**—पुस्त्री. तोंडांतील द्रव, पिंक. 'माघ्यानीं थुंकिता सूर्यावरी। तो थुंका पडेल आपणाचवरी।' –दा ९ ३.२७. [थू] (वाप्र.) **थुकला थुका चाटणें**–निंदापर, वाईट शब्द, वचन, आश्वासन परत घेणें. **थुका घालणें**–शाळेंतल्या मुलास थोडा वेळ बाहेर जावें लागल्यास त्यास एका दगडावर थुंकावयास लागे व थुंकी वाळेपर्यंत परत यावें लागतें. **०घालून काम करणें**– (थुंकी वाळेतों करणें) जलद काम करणें. **०झेलणें**–हांजी हांजी करणें; गुलामाप्रमाणें चाकरी करणें. **०तोंडावर उडविणें**– छीः थूः करणें; निंदा करणें; शिव्या देणें. **०तोंडावर घेणें– उडणें–येणें**–हांसें, फजीती करून घेणें. **०न ओलांडणें**– दुसऱ्याच्या छंदानें वर्तणें. **थुक्यानें भिजती चांदण्यानें वाळती**–निःसत्त्व; निकस जमीन (जी लवकर ओली होते व वाळते). सामाशब्द– **०पात्र**–न. पिकदाणी. **थुंकीझेल्या**–वि. खुशामत्या; हांजी हांजी करणारा. **थुक्याचें काजळ**–न. क्षुद्र व कुचकामाची वस्तु.

**थुंगा**—पु. (व) जमाव; मेळा. 'बायांचे थुंग्यावर थुंगे गेले.'

**थुंगुश्शा**—क्रिवि. (मुलींत रूढ) खेळ चालू असतां कांहीं काळ रजा म्हणून जातांना देण्याची सूचना. (क्रि० घालणें) [ध्व. थूः]

**थु(थुं)टा, थुंटण**—वि. थोटा; थोंटण.

**थुडथुड**—स्त्री. (थंडीनें भरणारें) कांपरें; कांप. [ध्व] **थुडथुडा**–क्रिवि. थडथड (थंडी वाजून आल्यानंतर). (क्रि० येणें, वाजणें; हिंवानें अंग उडणें, दांत वाजणें, अंगावर कांटा येणें).

**थुडंथुडा**—स्त्री. (व.) छीः थूः; फजिती. 'त्याची जिकडे-तिकडे थुडंथुडा झाली.'

**थुत्तर**—न. गालफड. **थुत्रींन देणें**–श्रीमुखांत भडकाविणें.

**थुथु**—स्त्री. छीःथूः; उपहास; निर्भर्त्सना. (क्रि० करणें; मांडणें; लावणें; होणें; लागणें). [ध्व.]

**थुथुल्या, थुथो, थुथ्यो**—पु. (इटीदांडु आणि इतर खेळ) सावध नसल्याचें दर्शविणारा शब्द. (हातास थुंकी लावून ती वाळेपर्यंत खेळांत नसल्यासारखें वागणें). [ध्व.]

**थुमकाल, थुमेकाल–र, थुमोकले**—(गो.) (इडापिडा टळो अशा अर्थी) घातलेल्या शपथांचें निरसन करणें; अपशब्दाचा परिहार.

**थुमशाण**—न. (कु.) थैमान.

**थुरटा**—पु. काळोख. 'आकाशीं दाटली धुवांची धुई। तोचि हा थुरटा दिसे।' –कमुरा २३.७०. [म. धूर?]

**थुरथुरविणें**—सक्रि. टवकारणें; उभारणें; (केस, कान, डोळे). भयंकर रीतीनें पाहणें. [ध्व.]

**थुरा**—पु. (गोंडी) (जनावरांच्या) शिंगाचें केलेलें वाद्य. [सं. तूर्य]

**थु(ठु)ली**—स्त्री. भरड दळलेले गहूं; सांजा. [हिं.]

**थुवर**—स्त्री. थोर नांवाची वनस्पति, ही कुंपणा साठीं लावितात.

**थुळेंवचें**—क्रि. (गो.) तोखणें; संतोष पावणें.

**थू**—पुस्त्री. थुंकी. 'कीं सुज्ञहि न असे जे घेती भरवुनि निजास्य ते थूनी।'–मोसभा १.५०. –क्रिवि. थुंकण्याचा आवाज; करून

**थूक**—स्त्रीन. थुंकी पहा.

**थू थू**—उद्गा. छीः थूः [ध्व.]

**थू फोडप**—सक्रि. (गो.) गुप्त गोष्ट उघड करणें.

**थूळ**—वि. सूक्ष्म नव्हे तें. [सं. स्थूळ]

**थें**—चतुर्थीचा प्रत्यय. 'तीयेथें भोगिलें नागवला।' –उषा १४४७. [तें]

**थेकुटें–डें, थेकुलें**—वि. १ लहान. 'तैसी सद्बुद्धि हे थेकुटी। म्हणों नये।' –ज्ञा २.२३८. २ आंखूड; अपरें; ठेंगणें; थोटा. [स. स्तोक]

**थेट**—वि. अस्सल; चोख; शुद्ध; खरा. 'बोली महाराची थेट मराठी।' –दामाजी. –क्रिवि. १ बरोबर; हुबेहूब; यथान्याय. २ नीट; लागलाच; न थांबतां; न बदलतां; न वळतां; सरळ. (समासांत) थेट–पैठणी–नगरी–दौलताबादी–काश्मिरी=खरा पैठण इ० ठिकाणीं तयार झालेला; जिनसाचें नांव पुढें लावून; जसें:– थेट सनंग–डागिना–भांडें–जिन्नस. [सं. तत्रस्थ; हिं.] सामाशब्द– **०खरेदी**–स्त्री. माल तयार होणाऱ्या ठिकाणीं केलेली खरेदी. **०चा**–वि. त्याच जागचा. **०आंक**–पु. अस्सल आंकडा अथवा

खूण( मालाची ). ०पट्टी-स्त्री. खरेदी केलेल्या मालाची मूळ ठिकाणची यादी, नोंद; बीजक. ०लष्कर-पु तंत्र ठोकणारा.

**थेटम**—पु. (व.) थाटमाट; नखरपट्टा; चटीपटी.

**थेटर**—न. नाटकगृह. [इं. थिएटर]

**थे(थें)टा**—वि. आंखूड; कमी लांबीचा; अपुरता; थोटा. थिटा पहा. [सं. त्रुट्]

**थेंटें, थेंटपडसें**—न. सर्दी; थंडी. (क्रि० येणें; लागणें; होणें). 'येईल पुढें थंट पडसें आयुष्याचा नाश।' -निगा ९७.

**थेंब, थेंबका-टा-डा, थेंबोरा, थेम, थेमका-टा**—न. १ बिंदु; टिपका. २ प्रळयकाळचा मेघ. [सं. स्तिम्-स्तेम] म्ह० थेंबें थेंबे तळें साचतें खडयाखडयानें डोकें फुटतें. **थेंबा थेंबी**-क्रिवि. थेंबथेंब 'पड पड पावसा थेंबाथेंबी.'

**थेंबु(बो)टा**—पुन. (काव्य) लहान थेंब; बिंदु. 'थेंबुटा सागरीं मिळाला।' -दा ८.६.४३. [थेंब]

**थेर**—पु. १ माकडाचा खेळ करणारा; एक जात. २ स्त्रीच्या वेषांत नाचणारा मुलगा. याला राधा म्हणतात. ३ नक्कल; विडंबन; अनुकरण. (क्रि० करणें; आणणें; माजणें; नाचणें).४ -न. तऱ्हेवाईक, विलक्षण, बेअब्रूचा मनुष्य. -नपु. ५ गोरचेष्टा, चाळे; (थेर लोकांच्या वागणुकीवरून). [सं. स्थविर] (वाप्र.) ०करणें, **थेरथेर करणें**-नांवालौकिकाची चाड न धरतां लोक नांवें ठेवतील अशा प्रकारें वागणें; नाजूकपणाचा आव घालणें; तऱ्हतऱ्हा करणें. सामाशब्द- **थेरभोरपी**-पुअव. डोंबारी; खेळकरी; तमासगीर; कोल्हाटी. **थेरीण**-स्त्री. थेर अर्थ २ पहा.

**थेर, थेरडा**—वि. खप्पड; जर्जर; म्हातारडा (मनुष्य); (गो.) थेरयो. [सं. स्थविर]

**थेरयो-त्रो**—पु. (गो.) अंगावर खवले असलेला साप. हा आपल्या अंगाची गुंडाळी करून स्वतःचा बचाव करतो.

**थेरूं**—न. थरूं; दांडा; मूठ (कुऱ्हाड, पावडा इ० ची). [सं त्सरु]

**थें(थां)वचें**—सक्रि. (गो.) ठेवणें.

**थेवनींक्री**—पु. (गो.) व्याजानें पैसे घेऊन व्यापार करणारा. [ठेव]

**थेळ**—न (गो.) १ स्थळ. २ देवस्थाना सभोंवार असलेली लोकवस्ती. [सं. स्थळ]

**थैं**—क्रिवि. (कों.) तेथें.

**थेंक, थैथै**—उद्गा. गुरें हांकण्याचा शब्द. 'गाय निघाली खाऊं साळी। थै, थै म्हणतां ओढाळी।' -कथा २.१०.११३. [ध्व.] म्ह० थैक म्हणतां ब्रह्महत्या=क्षुल्लक गोष्टीचा भयंकर परिणाम होणें.

**थैकार, थैथय्या, थैथय्थाट, थैथैय्या, थैथैयाट, थया**—पु. मोठा आनंद; आनंदीआनंद; नाचणें; गाणें; खेळणें. 'हैकार थैकार, जैकार। तळप चवरें चमत्कार।' -भारा किष्किंधा ९.४४. [ध्व.] **थैय्या घेणें**-१ गडबडा लोळणें, ओरडणें इ० प्रकारें संताप व्यक्त करणें. रागानें अथवा अभ्रं रपणानें नाचणें. २ सगळ्या घागऱ्या हालवून एकसारखें नाचण. जोराचा यत्न करणें. (क्रि० घेऊन बसणें; करणें). **थैथै, थैथैयां**-क्रिवि. मोठ्या आनंदानें; उल्हासानें; खिदळून (नाचणें, उडया मारणें); आनंदानें नाचतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. 'नाचवितों थैथै तेथें।' -संग्रामगीतें ४६. (क्रि० नाचणें; करणें). [ध्व.]

**थैबड**—न. १ कपाळावर केलेला औषधाचा अथवा गंधाचा लेप. (क्रि० देणें; लावणें). २ गुठळी (रक्ताची); लपका (लाळ, शेंबूड इ०चा); पोपडा (सारवलेल्या जमीनीवरील शेणाचा); घाणीचें लहानसें थारोळें. [थापटणें]

**थैमान**—पु रडणें; ओरडणें; आदळआपट; गोंधळ (लहान (लहान मुलांचा). (क्रि० करणें; मांडणें; घालणें) [ध्व; थैथै]

**थैला**—पु. १ पोतें अथवा मोठी पिशवी. २ खोळ (उशी इ०ची). [हिं. ठेलना] **थैली**-स्त्री १ पिशवी. २ सैन्यांतील शिपायांची अन्न, कपडे. इ० ठेवण्याची पिशवी. ३ (ल.) थोराकडून थोराकडे जाणारें येणारें पत्र. 'आतां तुकोजीरावाना एक थैली लिहा.' -ईप ७२.

**थो**—स्त्री. (कु) खेळांतील तात्पुरती विश्रांति; थुश्शो. [ध्व.]

**थोई, थोय**—स्त्री. थुथुल्या पहा. (क्रि० घालणें; पडणें).

**थोक**—पु. १ रेशमाचें एक परिमाण; चार कळ्या अथवा लहान काटक्यांना गुंडाळून होईल इतकें रेशमाचें परिणाम; दहा काळयांचा गुंडा. २ ठोकळ; कापसाचा गठ्ठा. [सं. स्तोमक; प्रा. थोवक]

**थोक, थोकविकरी**—ठोक इ० पहा. **थोकबंद**-वि. पूर्ण; सर्व; परिपूर्ण (रकम, बेरीज).

**थोकडें**—वि. १ लहान. २ आंखूड. ३ थोडें; अल्प. 'पांडवाचे सैन्य निपटचि थोकडें,' -गीताचंद्रिका १.१०. [सं. स्तोक]

**थोकणें**—सक्रि उभें राहावयास, थांबावयास लावणें. -अक्रि. १ (काव्य) थांबणें; बंद होणें; स्थिरावणें. 'कीं थोकले कैवल्यनिधानु।' -शिशु ५८. २ गुप्त होणें. ३ येऊन ठेपणें. ४ लहान होणें. [सं. स्था]

**थोकताळा**—पु. ठोकताळा पहा.

**थोकलें**—वि थोकडें; लहान. [सं. स्तोक]

**थोकवणें**—सक्रि. थांबविणें. [सं. स्था]

**थोंगणें**—सक्रि. गाणें म्हणणें. -शर. [ध्व]

**थोंगींथोंगीं**—क्रिवि. ठायींठायीं. 'थोंगींथोंगीं इतर। राजे जे तयांचे भार।' -गीता १.३४०. [सं. स्तोम]

**थोंट, थोंटण**—न. १ खुंट; खोड (झाड इ० चें); थोंटा. २ ताट; धाट (कडयाचें).

**थोट, थोंट**—न कुभांड. -पु. ठक. -शर.

**थो(थों)ट, थोंठ**—वि. नीच व अडमुठा; दांडगा; झोड (कर्ज परत करण्याच्या वेळीं भांडणारा) 'थोट उद्धट लंपट।'-दा २.३.३०. **म्ह०** उखळ सासू थोंट जवाई. **थो(थों)टाई, थोंठाई**-स्त्री. नीचपणा; पाजीपणा; दांडगाई.

**थो(थों)टा, थोंटक**—वि. हातपाय इ० तुटलेला; वरचा शेंडा, झुपका गेलेलें; खोड झालेलें (झाड); लांडा झालेला. [सं. स्थगु; हिं. ठूंट; सिं. ठूंटो] **०पि(पिं)पळ**-पु. (ल.) ज्याला मुलेंबाळें; बायको, घरदार नाहीं असा मनुष्य; सडेसोट. **थों(थों)टावणें**-अक्रि. १ कुंठित होणें; स्तब्ध होणें. 'मौनपणें वाचा थोंटावल्या चारी। ऐसें तुझें हरी रूप आहे।'-तुगा ३७५७. २ निर्वेल होणें. 'नुसुधेपणें थोटावला। अनुभव जेथ।'-अमृ ५.५८. [थोटा] **थोट्ट(ठू)क**-न. खुंट; थोंटण. [थोंट]

**थोडा**—वि. अल्प; थोडका. [सं. स्तोक] **थोडका**-वि. अपुरा; पुष्कळ नाहीं असा; अल्प; लहान. [सं. स्तोक] **थोडकावणें**-अक्रि. कमी होणें; तुटणें; घटणें; ऱ्हास होणें (परिमाण, संख्या, जोर इ०चा). -सक्रि. कमी करणें. [थोडका] **थोडक्यांत**-क्रिवि. थोडया वेळांत, जागेंत; संक्षिप्तपणें; लवकर. [थोडका] **थोडाच**-वि. क्वचित्; विरळा. 'पण त्यांचें प्रेमपूर्वक अध्ययन करणारा थोडाच मनुष्य सांपडेल.'-नि ५५५. **०थोडका**-वि. अल्प प्रमाणाचा; बराच थोडा; अगदीं माफक. **०थोडा**-क्रिवि. अल्प प्रमाणानें. **(जीव)थोडा थोडा होणें**-काळजी वाटणें. **थोडाफार-बहुत**-वि. थोडकासा; अल्प; किंचित्.

**थोतरणें**—सक्रि. (व.) सुजणें; वर येणें. 'वाऱ्यानें त्याचें तोंड थोतरलें आहे.'

**थोत(द)री**—स्त्री. तोंडाची एक बाजू; गाल; थोबाड

**थोंत(थ)ली**—स्त्री. फोपसेपणा; स्थूलता. [सं. स्थूल]

**थोतांड**—न. १ कल्पित गोष्ट; खोटा हक्क; खोटें दाखविलेलें कारण; कुभांड; नाटक. (क्रि० रचणें; मांडणें). 'पंचभूतांचें थोतांड। तुच्छ वाटे।'-दा १.९.१५. २ पाखंड; लबाडी. [?] **०मत**-न. पाखंड. (क्रि० माजविणें; पसरणें; वाढविणें; काढणें; उठणें; निघणें; माजणें). **थोतांडी-ड्या**-वि. थोतांड माजविणारा; पाखंडी.

**थोंती(थी)ल**—वि. स्थूल; लठ्ठ. [सं. स्थूल]

**थोंथली**—स्त्री. मेदोवृद्धीमुळें त्वचेस येणारा शिथिलपणा. [सं. स्थूल]

**थोथाड-डी**—थोतांड-डी पहा.

**थोद्री**—थोतरी पहा.

**थोप**—स्त्री. १ थांबविलेली, आटोपून धरलेली स्थिति; (होडी इ०ची); थोपवून धरणें. २ पाण्याची थाप; धक्का; बंधारा. ३ मुक्काम; टप्पा; विरामस्थान. 'ह्या डोंगरांत चढतांना तीन थोपी घ्याव्या लागतात.' ४ मुक्कामाचें कारण. ५ (ल.) शेवट; सीमा; मर्यादा. (क्रि० राखणें; संभाळणें; टाळणें; टळणें). ६ घट्ट उभें राहणें; दम धरून असणें; जागा संभाळणें. (क्रि० राखणें, ठेवणें; धरणें; संभाळणें; बुडविणें; बुडणें, नाश करणें, होणें). आणीबाणीची वेळ, पत संभाळणें; अब्रूचें जतन. 'एवढया रुपयांनी माझी थोप धरली.' [ध्व. सं. स्था] **थोपटणें**-सक्रि. १ थापटणें; हळू हळू थापडणें. २ फुस लावणें; थापटून, गोंजारून वश करणें. [सं. स्फोटनं] **०टीव**-वि. थोपटून आकार आणलेलें, घडलेलें (मडकें, मातीचें चित्र, पोळी, गोंवरी इ०). (वाप्र.) **थोप राखणें-ठेवणें-धरणें**-पूर्वस्थितीत चालविणें, राखणें, संभाळणें (राज्य, संस्था, मनुष्य, पशु, वस्तु).

**थोपणें**—उक्रि. १ थांबणें; थांबविणें; टेकू अथवा नेटावा देणें, दवविणें; आधार देणें; मूळ स्थितींत ठेवणें. २ मदत करणें, करविणें, साहाय देणें. ३ (पालखी, डोली इ०) खालीं ठेवणें; उचलणें. (उचलावयाच्या वेळीं दुसऱ्याची मदत लागते म्हणून पालखीवाल्यांत हा शब्द रूढ आहे). ४ थोपटणें. ५ गति थांबणें. 'बंधूसहित होता मार्गे। तया स्थानीं थोपला।'-मुआदि २९.१५७. [सं. स्तुभ्=थोब=थोप+णें]

**थोपविणें**—सक्रि. थोपणें प्रयो. पहा.

**थोपाथोपी**—स्त्री. थांबविणें; शांत करणें; शमविणें; कांहीं वेळ दाबांत ठेवणें (भांडण, सावकाराचा तगादा); थोपवाथोपव; समजावणी. [थोपणें]

**थोंब**—पुन. गुच्छ; झुपका; गेंद; तुरा; पुंजका (गवत, वनस्पति यांचा). २ (व.) लहान झाडांचा समुदाय. [सं. स्तोम]

**थोंब**—न. स्तोम; ढोंग. 'वेगळेंच थोंब तयानें केलें।'-ह १०३९. [सं. स्तोम]

**थोब(बा)वाईक, थोपट(ड)वाईक**—वि. कोणीही जातां येतां ज्याला चपराका माराव्यात असा माणूस

**थोबणें**—अक्रि. लाजणें. 'आंगचेनि दळभिडें। पांतां चंद्रबिंब थोबडें।'-शिशु ४०७ [सं. स्तुभ्; स्तोभ]

**थोबाड-डी थोबकाड**—नस्त्री. गालफड; थोतरी पहा. (कुरूपपणा, स्थूलपणा, घाणेरडेपणा इ० दर्शक निंदाव्यंजक शब्द व चपराकांची भीति दाखविण्याकरितां योजण्याचा शब्द. [सं. स्थपुट] (वाप्र.) **०णें**-सक्रि. १ तोंडांत चपराक, चापटी मारणें. २ (ल.) बिघडणें; विसकटणें; पराजित करणें. [थोबाड; सं. स्तुब्धानम् -शर] **०फोडणें**-१ तोंडांत मारणें. २ चांगली अद्दल घडविणें. **०रंगविणें**-तोंडांत मारणें. **थोबाडांत माती घालणें**-शरमविणें.

**थोम**—पु. (व.) रोपाचा बुडखा; ठोंब. आमच्या शेतांतील गव्हाचा थोम मोठा आहे. [सं. स्तंब]

**थोमाळणें**—सक्रि. शांत करणें; शमविणें; थोपटणें; गोंजारणें.

**थोय**—स्त्री. थुथुल्या पहा. (क्रि० घालणें; पाडणें).

**थोय**—न. (तंजा.) अंग (लुगड्याचें). [सं. स्था]

**थोर**—वि १ मोठा; स्थूल. २ (ल.) श्रेष्ठ; पूज्य; सन्मान्य; वय, ज्ञान, कुल, पदवी, अधिकार इ०नीं मोठा 'थोर थोर म्हणती पळा।' –दावि २८१. (काव्य.) परिमाणानें, संख्येनें मोठा; फार; बहुत; अतिशय 'आई थोर तुझे उपकार।' [सं. स्थविर; स्थूल; फ्रें. जिप्सी–थुलो] (वाप्र.) **०करणें**–(दिवा) मालविणें. **-थोरा-थोरल्या घरचा**–(उप.) मोठ्या कुलांतील म्हणजे महार अथवा परवारी. सामाशब्द- **०की**–स्त्री. थोरपणा. **०काकडी**–स्त्री. तवसें; मोठी काकडी. **थोर मोठा**–स्त्री. श्रेष्ठ; मोठा; सन्मान्य; पूज्य; उच्च वर्गातील **थोरचें**–सक्रि. (गो.) बांधावर चिखल घालणें. **०टें**–वि. मोठें. 'तिथें स्थनमंडळें निन्हां थोरटीं।' –शिशु६५८. **०ला**-वि. १ (तुलनात्मक). मोठा; उच्च. २ वयानें वडील; अधिकारानें श्रेष्ठ. **०ला–कुंवर**–पु. १ थोरला मुलगा. २ (ल.) पुनर्वसु नक्षत्राला शेतकरी वर्गातील रूढ शब्द. तरणा पहा. **०ली पत्री**–स्त्री. जायपत्री. **०ली पहाट**–स्त्री. रात्रीचे तीन वाजल्यापासून सूर्योदयापर्यंतचा काळ. **०ले घर**–न. १ मोठें घर. २(ल.) तुरुंग; दारूचें दुकान; छिनालवाडा. **०लोक**–अव. अंमलदार. 'थोर लोक भूमीं काढिले।' –दावि २८१. **थोरवकी, थोराई**–स्त्री. मोठेपणा; ऐश्वर्य; मानमरातब; भव्यपणा; थोरपणा; कीर्ति. 'थोरीव नावडे किमपि दासा।' –दावि ९१. **थोरीवमान**–पु. मोठेपणा. 'थोरीवमानाची उठतां आवड।' –दावि ३८. **०वट**–वि. १ मोठ्या आकाराचें. २ मोठ्या खानदानीचा (मनुष्य इ०). ३ (ल.) मोठा; ऐश्वर्यवान; प्रौढ; सभ्य. ४ मोठेपणा. 'मानितां कृष्णाचा थोरवट। व्यर्थ तुम्ही।' –कथा १.१२.४८. **०वी, थोरी, थोरवाई**–स्त्री. १ मोठेपणा; ऐश्वर्य; भव्यता; मानमरातब. २ वयामुळें प्राप्त झालेला मोठेपणा, मान. ३ कीर्ति; नांवलौकिक; प्रतिष्ठा; श्रेष्ठता; महत्त्व. 'मित्रथोरवी व्यर्थ दाविता।' –कचेसुच ३. **थोराड**–वि. १ मोठा; बळकट; घट्ट; दांडगा; धीट. २ वयाच्या मानानें अधिक वाढलेला. ३ सामान्य असावा त्यापेक्षां मोठा. [थोर+हाड] **थोराववा**–पु. १ थोरपणाची जाणीव; अहंता; थोरवी. २ महत्त्व; विस्तार. **थोरावणें**-अक्रि. १ मोठे होणें; वाढणें. 'माझेनि आंगें थोरावेल। मज ते नांवरूप करील।' –एरुस्व ५.४९. २ बांधा, स्थूलपणा, मान्यता, गर्व, महत्त्व इ०कांनीं वाढणें. 'दिवसंदिवस अधिकच परी। व्यथा शरीरीं थोरावे.' **थोरी**–वि. मोठी. 'थोरी उठिली उत्कंठा।' –खिपु १.१.१२०.

**थोर**—स्त्री. थुवर पहा.

**थोरि**—स्त्री. कड; कांठ. 'तंवं कुचतटाचिआं थोरिआं। देओ न पुरती।' –शिशु ६५५.

**थोरी**—वि. थोरवी, मोठेपणा. 'हा रे किर्ती दळांची थोरी। कवणुंसें कवणां भारीं।' –शिशु १०३०.

**थोरीवडा**—वि थोरपणाचा.' दारिद्र्यें चिवडाचि सर्वे, दवडा थोरीवडा पांवडा। –आसुदा ४९.

**थोरू**—न. (कु. गो.) कोयत्याची लांकडी मूठ; थरू पहा.

**थोवेकार**—पु. १ (महानु.) सवंगडी. 'तंव थोवेकारीं भणितलें गोपाळीं।' –दाव ७१. २ स्तोमकरी; पथकी.' मेळविले थोवेकारीं। कडवां पारीं।' –शिशु ५०२. [सं. स्तोम+करी]

---

# द

**द**—व्यंजनमालेंतील अठरावें व्यंजन. अक्षरविकासः–या अक्षराच्या एकंदर सात अवस्था असून शेवटचें वळण पहिल्याच्या अगदीं उलट बनलेलें आहे. याची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील लेखांत, दुसरी पभोसा येथील लेखांत (खि.ख.पूर्व पहिल्या शतकाच्या सुमारास), तिसरी महाक्षत्रप शोडास याच्या वेळच्या मथुरा येथील जैन लेखामध्यें, चवथी कुशानवंशी राजाच्या वेळच्या (इ.स. १ लें व दुसरें शतक) मथुरा येथील लेखांत, पांचवी राजा यशोधर्मन् याच्या वेळच्या (इ.स. ५३२) मंदसोर येथील लेखांत आणि सहावी जपानमधील होर्युजी येथील मठांत सांपडलेल्या ताडपत्रावरील उष्णीषविजयधारी या ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या संपूर्ण वर्णमालेंत (इ. स. सहावें शतक) सांपडते.

**द, दकार**—(सांके) १ हा शब्द अथवा हें अक्षर इतर वर्णाच्या लोकांकडून ब्राह्मणांस जाणाऱ्या पत्रांच्या माथ्यावर लिहीत. हें दंडवत (=साष्टांग नमस्कार) सुचवितें. २ शंकरवाचक किंवा कल्याण म्हणून पत्राच्या प्रारंभीं ब्राह्मणाकडून इतर वर्णीयांस जाणाऱ्या उलट पत्रांत (आशीर्वादाबद्दल) वापरीत.

**द**—वि. देणारें. (सामासांत) सुख–द; दुःख–द; मोक्ष–द; धन–द, मान–द; इ० (=सुख देणारें, दुःख देणारें इ०) [सं.]

**दईत**—पु. दैत्य; राक्षस. [सं. दैत्य]

**दउंडी**—स्त्री. डांगोरा; वातमी जाहीर करणें. [ध्व. सं. डिंडिम]

**दऊड**—स्त्री. धांव; पळ; शर्यत. (क्रि० मारणें). [सं. धाव् हिं.] **दउडणें**–अक्रि. पळणें; धावणें; दौड.

**दऊत**—स्त्री. चिनीमाती, कांच, धातु इ०चें शाई ठेवण्याचें. पात्र; मषीपात्र. [अर. दवात]

**दखणी**—वि. (गु.) दक्षिणी लोक (विशेषतः महाराष्ट्रीय). [सं. दक्षिण]

**दखल**—पु. १ प्रवेश. 'लढाई न होतां किल्ल्यांत दखल झाला.' –राज ५.६२. २ ढवळाढवळ. ३ ताबा. 'कुल राज्य आपलें, देखील कर्नाटकहि आपणांस सारें दखल आहे.' –चित्रगुप्त १२०. –वि. १ (हिशेबांत इ०) प्राप्त झालेला; पोहोंचलेला. २ मांडलेलें; लिहिलेलें. ३ ज्ञात; परिचित; श्रुत (एखादें काम, गोष्ट). (क्रि० करणें; देणें; सुचविणें; कळविणें). 'राजबीज खरें हें...सर्वांस दखल आहे.' –राज ८.१९८. [अ. दख्ल] **०गिरी**–स्त्री. १ माहिती; परिचय; प्रावीण्य (काम, ज्ञान इ०संबंधीं). 'चारशें वर्षेपर्यंत कोठें दखलगिरी अगर नांवही नाहीं.' –वाडबाबा २.१५. २ देखरेख, नजर ठेवणें (कामकरी लोकांवर). (क्रि० राखणें; ठेवणें). ३ बातमी देणें; माहिती सांगणें. (क्रि० करणें; देणें). ४ ढवळाढवळ; मध्यें पडणें. 'बापाजी मुसल्मान यासी दखलगिरी करावयास गरज नाहीं.' –राज १५.२९. ५ (ल.) उत्पन्न. 'तुम्हास कांहींच परगणेयांत दखलगिरी न जाली.' –राज १.२३१. **०बाज–ज्**–वि. (विशेषेंकरून कागदपत्रांत) कागदोपत्रीं समाविष्ट; माहीत असलेला; अनुभवांत असलेला; दाखल केल्यानंतर नमूद. 'त्यापैकीं मजुरा द्यावयाचे करार केले ते दखलबाज बार केले असेत.' –वाडसमा १.१७५. २ नमूद केलेला; प्रविष्ट केलेला. (समासांत पुढील शब्दांशीं जोडून दखलबाद–कलम–जमा–खर्च–मजकूर–रकम). [अ.] **०दाद**–स्त्री. १ (विशेषेंकरून सरकारी कागदपत्रांत रूढ). मिळविलेली माहिती; अनुभव. २ (निकालांत न लागलेल्या प्रकरणांची) नोंद; टिपण. (क्रि० करणें). [अ.]

**दखल**—स्त्री. (व.) इजा; अपकार; धक्का. 'गाडी पडली पण आम्हास दखल झाली नाहीं.'

**दखीण**—स्त्री. दक्षिण दिशा. 'वीघ्नेश्वरा दखीण भागें।' –उषा ९.९४. –पु. २ (गो.) दक्षिणेचा वारा. [सं. दक्षिण]

**दख्खन**—पु. नर्मदेच्या दक्षिणचा आर्यावर्त देश; दक्षिण हिंदुस्थान. [सं. दक्षिण; प्रा. दक्खिण]

**दंग**—स्त्री. (गो.) कांठ (समुद्राचा, नदीचा किनारा, धोतराची किनार).

**दंग**—पु. १ कागद तयार करतांना जुनें तरट, सण, जुने कागद इ० कुटण्याचें एक हत्यार. २ डंग; ढेकी (चुना, पोहे इ० कुटण्याची). [ध्व.]

**दंग**—वि. १ आश्चर्यभरित; चकित; दिङ्मूढ; विस्मित; सर्द. २ (निंदाव्यंजक) संतुष्ट; खूष; समाधानी. ३ निमग्न; चूर; गर्क; गुंग. [फा.]

**दगटली**—स्त्री. (तंजा.) दगडी (पदार्थ ठेवण्याची). [दगड]

**दगड**—पु. १ धोंडा; फत्तर; शिला; शस्त्रावांचून सामान्य प्रयत्नांनीं फुटत नाहीं व पाण्यानें विरघळत नाहीं असा पृथ्वीचा अवयवभूत पदार्थ. २ न्हावी लोकांचा वस्तऱ्यास धार लावण्याचा दगड; निष्णा. –स्त्री. मोठा खडक; शिला. हा शब्द आणि या दर्जाचे इतर शब्द उ० दगडमाती, धोंडा, माती, कपाळ इ० शब्द, जेव्हां एखाद्या माणसाची बुद्धि, ज्ञान, मालमत्ता वगैरे कुचकामाची आहे असें दाखवावयाचें असतें तेव्हां उपयोगांत आणतात. जसें:– त्याला काय येतें दगड ! त्यापाशीं काय आहे माती. –वि. (ल) अज्ञ; अडाणी; मूर्ख; मंद बुद्धीचा (माणूस). 'बोधुनि दगडासि कां न भागावें।' –मोउद्योग ११.७७. [सं. दृषद्; का. दक्कड= मजबूत] (वाप्र.) **०उचकणें**–(ल.) एखाद्यावर तुफान रचणें; एखाद्याविरुद्ध मसलत करणें. **०उचलणें–घेणें–हातीं–घेणें–फेकणें–मारणें, दगडमार करणें**–(ल.) रागानें वेडावून जाणें; बेफाम रागावणें. **दगड खाऊन दगड जिरविणें**–(कर.) अतिशय सशक्त किंवा प्रखर कोठ्याचा असणें. **०चहूंकडे टाकून पाहणें**–प्रत्येक उपाय अथवा युक्ति योजून पाहणें; सर्व दिशांनीं प्रयत्न करणें. **०टाकून ठाव पहाणें–घेणें**–तळ शोधणें अथवा खोली काढण्याचा प्रयत्न करणें; खुबीदार प्रश्न विचारून दुसऱ्याच्या मनांतील विचारांची अटकळ करणें. **दगडन् धोंडे**–(बायकी) सटरफटर क्षुद्र गोष्टी. **दगडाखालीं हात सांपडणें–गुंतणें** कांहीं दुःखकारक अडचणींत, पेंचांत, नुकसानकारक कामांत, सांपडणें. **दगडा खालून हात काढून घेणें**–अडचणींच्या कामांतून स्वतःस युक्तीनें मोकळें करून घेणें. **दगडाचा दोर होत नाहीं**–भलत्याच वस्तूपासून भलत्याच वस्तूची अपेक्षा करणें या अर्थी. **दगडाची साल काढणें, दगडाचा दोर काढणें**–दुष्कर, अद्भुत किंवा अशक्य गोष्ट करणें. **दगडाचें नांव धोंडा धोंड्याचें नांव दगड**–जेव्हां एखादी गोष्ट इतकी स्पष्ट असते कीं तिच्या संबंधाचा वाद फुकट असतो अशा प्रसंगीं योजतात **दगडापरीस ई(वी)ट मऊ**–(हाल अपेष्टा इ०) दोन स्थितींची, गोष्टींची तुलना करून त्यांतल्या त्यांत एक बरी असें दर्शविणें; निरुपाय म्हणून मोठ्या संकटापेक्षां लहान संकट पत्करणें. **दगडाशीं गांठ पडणें**–कठोर, गळग्रह अथवा न देतें कूळ इ० कांच्या तावडींत सांपडणें. **दगडाशीं भांडणें**–बलाढ्य शत्रु, मोठी अडचण, कठिण काम इ० कांशीं झगडणें. **दगडास पाझर आणणें–येणें–फुटणें–निघणें, दगडास पान्हा आणणें**–नैसर्गिक नडी, अडचणी न जुमानतां आपले हेतू सिद्धीस नेणें; कठिण हृदयाच्या अथवा कंजूष मनुष्यास द्रव आणणें; अशक्य गोष्ट घडवून आणणें; दगडापासून दूध काढणें. सामाशब्द– **०खाण–णी**–स्त्री. दगडांची खाण. **०घाशा**–वि. १ हेंगाडा; रानटी अडाणी; अकुशल (न्हावी, कारागीर इ०). २ ओबडधोबड, वाईट आकाराचा (जिन्नस). **०घाशी**–स्त्री. १ कठिण, श्रमाचें काम. २ (माण.) दळण्याचें काम खेरीजकरून इतर काम न ऐकणारी स्त्री. –वि. १ श्रमदायक, कष्टकारक, कठिण व

दु:खदायक (काम). २ कष्टाळू; हट्टन, तट्टन, झट्टन मेहनत करणारा; उद्योगी. ३ त्रासदायक रीतीनें हट्ट करणारा; आग्रही; घासाघिस्या. [ दगड+घासणें ] **दगड(डी)चौथ**–स्त्री. गणेशचतुर्थी. (या दिवशीं जर चंद्र पाहिला तर चोरीचा आळ येतो म्हणून तो टाळण्यासाठीं दुसऱ्यांच्या घरावर दगड फेंकण्याची जुनी पद्धत होती यावरून रूढ). **०छाप**–पु. शिळाछाप; लिथोग्राफ या इंग्रेजी शब्दास प्रतिशब्द; तें यंत्र; किंवा लिहिण्याची तसली तऱ्हा. **०तळी**–स्त्री. उचलून दुसरीकडे नेतां येण्याजोगें दगडाचें भांडें; दगड कोरून तयार केलेलें ताट, वाटी, दगडी (कढी इ० पातळ पदार्थ ठेवण्याची). **०पोळ**–स्त्रीन. (चुना, माती विरहित) नुसत्या दगडांची घातलेली भिंत, गडगा. [ दगड+पोळी ] **०पोळें**–न. नकली अथवा खोटें पोवळें. **०फूल**–न. पावसाळ्यामध्यें दगडांवर (अथवा लांकडावर) उगवणारी पांढरी वनस्पति. हिचा औषधांत व मसाल्यांत उपयोग करतात. रंग पांढराकाळा मिश्र असतो. [ सं. गिरिपुष्पक; हिं पत्थर का फूल; बं. शैलेज; गुज. पत्थरफूल; तेलगु-शैलेयमनेदव्यमु; फा. दहाल ] **०फोड**–स्त्री. कठिण आणि कष्टाचें काम; महत्प्रयासाचा उद्योग. वि. १ कठिण; अवघड; दु:खदायक श्रमाचें (काम). २ परिश्रमी; जबरदस्त; प्रचंड (निश्चयाचा प्रयत्न अथवा वर्तन). ३ जोराचें; जाचक; कडक; कटु; राग आणणारें (भाषण). ४ सडसडून पडणारा (पाऊस); भडिमाराचा; तडाक्याचा (मारा). **०फोडीचें काम**–अतिशय अवघड अथवा श्रमाचें काम. **०फोड्या**–वि. १ दगड फोडणारा. २ दगडफोड (–वि.) पहा. ३ हट्टी; आग्रही. कपाळफोड्या पहा. **०मय**–वि. (अप्रशस्त पण रूढ) ज्यामध्यें फार दगड आहेत असा; दगडाळ; (देश, जागा इ०). **०माळ ०रान**–पुन. दगडांनीं व्यापलेलें, भरलेलें (रान, जमीन, ओसाड प्रदेश) **०शिवणी**–स्त्री. (बायकी.) एक खेळ. यांत एका मुलीनें डाव घेऊन बाकीच्या मुलींनीं दगडावर उभें राहावयाचें व त्या मुली आपआपले दगड बदलीत असतांना डाव घेणाऱ्या मुलीनें त्यांनां शिवावयाचें व ज्या मुलीस ती शिवेल त्या मुलीवर डाव जाऊन पूर्वी जिच्यावर डाव होता तिनें दगडावर उभें राहून खेळावयास लागावयाचें. **०सर**–स्त्री. पावसाची जोराची सर, वृष्टि. [ दगड+सर=वृष्टि ] **०ळ-डाळ**–वि. दगडांनीं भरलेली; लहान लहान गोटे असलेली; दगडमय (जमीन). **म्ह०** बायको तोंडाळ, शेत दगडाळ. **दगडाचा माच, दगडाची माचण**–पुस्त्री. दगडांचा अथवा खडकाचा थर. **दगडाची छाती**–स्त्री. १ (ल.) साहसी, निर्भय, बेदरकार; धैर्यवान् व सोसक मनुष्य. २ धारिष्ट अथवा प्रचंड धैर्य; दृढनिश्चय; दिलेरी. (क्रि० करणें). **दगडांचें पेंव**–न. १ दगडांनीं भरलेलें पेंव. २ (ल.) कठिण; असाध्य काम (लग्न वगैरेचें) करण्यास, सहन करण्यास कठिण व त्रासदायक असें काम, गोष्ट. **म्ह०** दगडाचें पेंव घालतां खळबळ काढतां खळखळ=तयार करण्यास व निस्तारण्यास दोहींसहि अवघड अथवा त्रासदायक काम, गोष्ट. **दगडावरची रेघ**–स्त्री. कधीं न पुसला जाणारा ठसा; न मोडणारी चाल; न फिरणारें शासन; खोटे न ठरणारे शब्द; वज्रलेप, कायमची अथवा खात्रीची गोष्ट; याच्या उलट पाण्यावरची रेघ. **दगडी**–वि. १ दगडाच्या जातीचा; दगडाचा केलेला; दगडासंबंधीं. २ दगडमय; दगडाळ. **दगडी आंबा**–पु. एका जातीचा आंबा. याची साल जाड असून हा पिकावयास फार दिवस लागतात. **दगडी काव**–स्त्री. कावेची कठिण जात; लोखंडी काव. **दगडी कोळसा**–पु. खाणींतून निघणारा कोळसा; हजारों वर्षांपूर्वी पृथ्वीवरील अरण्यें व वनस्पती भूकंपादि कारणानें भूगर्भात गाडल्या गेल्यावर त्यांच्यावर अनेक रासायनिक क्रिया होऊन त्यांपासून हा कोळसा बनतो. **दगडी जोंधळा–शाळू**–पु. जोंधळ्याची एक जात. याचें कणीस भरदार असून दाणा कणखर असतो. **दगडी निंबू** न. निंबाची एक जात. याची साल जाड असते. याचा उपयोग रंगांत वगैरे करतात. हें खाण्याजोगतें नसतें. **दगडी मुरूम**–पु. १ मुरमाची कठिण जात. २ दगडाचे फोडून केलेले लहान लहान तुकडे; बारीक खडी. मुरूम पहा. **दगडी सुपारी**–स्त्री. सुपारी पहा. **दगडी हळद**–स्त्री. गर्द तांबडया रंगाची हळदीची कठिण जात. **दगड्या**–वि. १ जड; ठोंब्या; मूर्ख टोणपा. २ (मुलांच्या खेळांत) संख्या पुरी करण्याकरितां घेतलेला काल्पनिक मुलगा; पित्र्या; (कों.) जवरामसणा. **दगड्या धोंड्या**–पु. दांडगाईनें मनुष्याचें अथवा वस्तूचें नांव विचारणारास उत्तरादाखल दिलेलें त्या मनुष्याचें अथवा वस्तूचें नांव.

**दगडी**–स्त्री. १ दगडाचें भांडें. २ (ल). बायकांच्या छातीवरील कठीण गांठ; अवाळू.

**दगदग**—स्त्री. १ खवदव; उपद्व्याप; त्रास; कष्टकारक, त्रासदायक श्रम; कंटाळा येण्याजोगा परिश्रम; महत्कष्ट. (क्रि० काढणें). २ काळजी; कळकळ [ ध्व ? ] **दगदगणें**–अक्रि. शिणणें अथवा वीट येणें; त्रासून दमून जाणें; भागणें; गळून, थकून जाणें.

**दगदगा**—पु. दरारा, भीति उत्पन्न करण्याचा गुण.

**दगदगी**—वि. कळकळीच्या, काळजीच्या अंत:करणाचा; सदा चिन्ताक्रांत; सदा शंकेखोर; संशयी. [ दगदग ]

**दगदणें**—अक्रि. (व.) दगदगीमुळें त्रस्त होणें; त्रासणें; श्रमणें. 'विदेसीं बहु दगदला। विश्रांती घ्यावया आला।' –दा ३.४.२७. [ दगदग ]

**द(दं)गदावा**—पु. १ (राजा.) हक्क; वारसा; दावा; स्वत्वसंबंध. २ गैरमर्जी; आकस; राग; वैर.

**दंगल**—पु. १ अव्यवस्थित मंडळी, जमाव (गाणारे, नाचणारे इ०कांचा); गर्दी; कल्होळ. २ कुस्त्यांचा फड. ३ धुमाकूळ; धांगडधिंगा; धामधूम; दंगा; आरडाओरड. [ फा. ]

**दगल**—स्त्री. फसविण्याची युक्ति; लबाडी; लुच्चेगिरी; विश्वासघात; निमकहरामी; कपट. [अर. दघल्] **०फसल**—स्त्री. मुद्दाम, जाणूनबजून केलेली लुच्चेगिरी; कपट; दगाफटका. [दगल द्वि.] **०बाज, दगाबाज**—वि. लुच्चा; कपटी; विश्वासघातकी; निमकहराम; फसव्या. **०बाजी, दगाबाजी**—स्त्री. कपट; ठकबाजी; सोदेगिरी; हिकमतगिरी; विश्वासघात; अप्रामाणिक अथवा कपटाचीं कृत्यें.

**दगलचें**—अक्रि. (गो.) नासणें; डागळणें. [डागळणें]

**दगला सामान**—पुअव. नरमिना, छीट, शेले, सूत, ताफता वगैरे वस्त्रें. [हिं.]

**दगा, दगाफटका**—पु. १ कपट; लबाडी; खोटा व्यवहार; ठकबाजी; लुच्चेगिरी. २ भय; कूटघात; अपाय; धोका; धोक्याची अथवा गुप्त नुकसानीची जागा. ३ जादू, विष, मूठ (यांपैकीं जेव्हां एकादें मरणाचें किंवा आजारीपणाचें कारण आहे अशी कल्पना असते तेव्हां हा शब्द योजतात) ४ कपटाचा अथवा दग्याचा वहीम; फसवेगिरीचा संशय. 'तुमच्या मनांत दगा गेला.' [फा. दघा] **दगाई**—वि. दगेखोर. 'पांच पन्नास दगाई होते ते काढून दिले.' —होकै ११६. [फा. दघाई] **०खाणें**—फसणें. **०देणें—करणें**—फसविणें; घात करणें. **दगेखोर**—वि. दगलबाज; लुच्चा; कपटी; अप्रामाणिक. **दगेखोरी**—स्त्री. दगलबाजी; विश्वासघात. **दगेबाज—बाजी**—वि. दगलबाज—जी पहा. [फा.]

**दंगा**—पु. १ गडबड; गोंधळ; धांवाधांव; पळापळ (बंडाची, स्वारीची इ०). २ (एखाद्या सांथीनें केलेला) नाश; कहर. ३ (मुलांची) आरडाओरड; उपद्रव; तंटा; झगडा; बखेडा; भांडण. ४ ओरड; गलबल (असंतुष्ट कामकरी लोकांची). ५ अनर्थ; राग; जळफळ; आदळआपट. [हिं.] **०धोपा**—पु. गलबल; गडबड; ओरड; हुल्लड; धामधूम.

**दगागणें**—अक्रि. १ कचरणें; नमणें; गळणें; खचणें; कचकणें; बुडणें; भिऊन माघार घेणें. २ दमणें; भागणें; नाश होणें; कोलमडणें; पडणं (अपघात इ० मुळें). [दगा]

**दगावणें**—अक्रि. १ पेंचांत सांपडून नाश पावणें; कांहीं कपटानें किंवा अकस्मात घाला पडून अथवा विश्वासघातानें मरणें. २ धोक्यांत सांपडून नाश पावणें; मरणें. [फा. दघा] **दगेमात**—स्त्री. विश्वासघाताचें अथवा कपटाचें महत्कृत्य अथवा पराकाष्ठा; कपटप्रबंध. [फा, दगा+मात]

**दगेदगे**—उद्गा. हत्तीला पुढें हांकलताना योजावयाचा शब्द. [ध्व.]

**दग्ध**—वि. १ जळलेलें; भाजलेलें. २ (ल.) करपलेलें; नासलेलें; बिघडलेलें; सर्वस्वीं कुजलेलें; भ्रष्ट झालेलें; कलंकित किंवा दूषित झालेलें; नाश पावलेलें. 'मन दग्ध क्रियेचे ठायीं।' [सं.] (वाप्र.) **०णें**—उक्रि. भाजणें. 'परि तें बीजें जैसीं दग्धलीं।' —ज्ञा ४.८३. सामाशब्द— **०तिथि**—स्त्री. अशुभ; अपवित्र तिथि. [सं.] **०पटन्याय**—पु. जळलेल्या कपड्याप्रमाणें निरुपयोगी. जगत् शून्य व मिथ्या आहे हें बोलतांना उदाहरणाकरितां योजलेला शब्दसमुदाय. **०योग**—पु. अशुभ, अमंगल योग. बुधवारीं तृतीया, मंगळवारीं पंचमी, गुरुवारीं षष्ठी, शुक्रवारीं अष्टमी, सोमवारीं एकादशी, शनिवारीं नवमी व रविवारीं द्वादशी या तिथी आल्या असतां हा योग मानितात. **०व्य**—वि. जाळावयाचें; जळण्याजोगें; जळणारा; खाक होणारा. **०शर्करा**—स्त्री. १ मिठाईचा एक प्रकार. २ जाळलेली साखर; मद्यांना रंग देण्याच्या कामीं हिचा उपयोग करतात (इं.) कॅरॅमल. **०हस्त—स्ती**—वि. दैवहीन; विनभरभराटीचा; उतरत्या पायरीचा; अपयशी (मनुष्य, काम); प्रतिकूळ (दैव); दुर्दैवी; अवलक्षणी; अपशकुनी; उजाड (देश, गांव, घर, जागा). याच्या उलट पद्महस्त. **०हस्ती**—वि. वाईट नशीबाचा; दुर्दैवी.

**दचक**—स्त्री. १ आकस्मिक भास. २ (ल.) भीति; धक्का; अचका. (क्रि० बसणें). [ध्व. ?] (वाप्र.) **०खाणें**—भीति वाटणें. 'तेणें दचक खाऊनि मानसीं।' —दावि ३६८. **०णें**—अक्रि. १ बुजणें; बिचकणें; चमकणें; धक्का बसणें (भीतीमुळें मनास). २ थक्क होणें; चरकणें; भेदरून जाणें; आश्चर्यचकित होणें. 'दचकति नृप सारे देखतां अंतरंगीं।' —वामन, सीतास्वयंवर ८. **०ला**—पु आकस्मिक धक्का; धसका (भीतीचा, दुःखाचा). (क्रि० भरणें; होणें; जाणें). **दचका**—पु. (मनाला बसलेली) भयाची, दुःखाची, आकस्मिक छाप; धक्का; आघात; वचक; भीति. (क्रि० बसणें). [दचक]

**दचकला**—पु. चरावयास सोडलेल्या गुराच्या एका बाजूच्या पुढच्या व मागच्या अशा दोन पायांस मिळून बांधलेली दोरी; कळवा.

**दचकळी**—स्त्री. लहानशी उचकी. [ध्व.]

**दच(चा)ड**—वि. (व.) अंगापिंडानें जबर; मजबूत; दांडगा. 'मुलगी मुलाहून दचड सापडली.' [हिं. सज्जड]

**दचडणें**—उक्रि. (ना) आदळणें; आपटणें. [ध्व.]

**दचाडणें**—सक्रि. (व.) पुढें चालावयास भाग पाडणें. [डच्चू ?]

**दच्चावून**—क्रिवि. (व.) भक्कम; पूर्ण; पुरेपूर; भरगच्च; खच्चून. 'दच्चावून भरलेलें पोतें उचललें.'

**दंडम**—न. (गो.) शेंकडा दहा टक्के इतकें जमीनीवरील कराचें उत्पन्न. [पो. डेसिमा]

**दटणें**—उक्रि. भारावणें; दडपणें; जोरानें दाबणें. 'देह दुःखाचेनि डोंगरें। दाटिजो पां परि भारें। चित्त न दटे।' —ज्ञा ६.३६९. [का. दट्टिसु; हिं. डाटना]

**दटावणी-ण**—स्त्री. जरब: धमकावणी; दरडावणी; दहशत. [ का. दट्टिसु ]

**दटा(व)विणें**—सक्रि. भीति घालणें; दरडावणें; दहशत घालणें; खडसणें; खरडपट्टी काढणें; धमकी देणें. ' दटावुनहि देशि बा अमृत नेदिजे घातुके।' –केका ९० [ का. दट्टिसु ]

**दट्टा, दट्ट्या**—पु. १ बूच; झांकण. २ ( ल. ) खडसावणी; खरड; दांडगाई; धमकी; उग्र भाषण; नेट. ३ दडपण (क्रि० देणें). [ का. दट्टिसु ]

**दट्ट्या**—पु. ( सोनारी धंदा ) सांखळीच्या कडयांचा मधला फुगीर भाग उठून येण्याकरितां उपयोगांत आणावा लागणारा खिळा.

**दट्ट्या**—पु. इंजिनच्या पंचपात्रांत ( सिलिंडरांत ) मागेंपुढें जाणारा व वाफेच्या प्रसरणशक्तीमुळें गति उत्पन्न करणारा धातुमय रूळ; ( इं. ) पिस्टन.

**दंड**—पु. १ काठी; सोटा; छडी; सोडगा; दंडा. २ मार; शिक्षा ( शारीरिक ). ३ शिक्षा म्हणून घेतलेला पैसा; याचे राजदंड, ब्रह्मदंड जातिदंड असे तीन प्रकार आहेत. सरकारी न्यायपद्धतीनें गुन्हा शाबीत झाला म्हणजे शिक्षेदाखल सरकारांत भरावयाचा पैसा. ४ खांद्यापासून कोंपरापर्यंतचा हात. ५ केलेल्या, पाडलेल्या भागांच्या खुणांकरितां शेतांत किंवा बागांत घातलेला मातीचा उंचवटा; बांध; गडगा; पाणी जाण्यासाठीं दोहों बाजूंस उंचवटा करून पाडलेली सरी, पाट; ( बे. ) नदीकिनारा; कांठ; ( वस्त्राचे ) दोन तुकडे जोडण्याकरितां घातलेली शिवण. (क्रि० घालणें). [प्रा. दंडी=जुन्या वस्त्राचा सांधा] ६ लांबी मोजण्याचें परिमाण, चार हातांची काठी. २००० दंड म्हणजे एक कोस. ७ वेळेचें परिमाण, चोवीस मिनिटें. ८ पैलवानांच्या व्यायामाचा एक प्रकार; जोर. ' आनंत्या नित्यनेम उठतो दंड सवाशें काढितो।'–ऐपो ६७. (यावरून) एखादें कठिण काम अथवा प्रचंड उद्योग. ( क्रि० काढणें; पेलणें ). ९ क्रमानें उतार असलेली किंवा निमुळती पण लांबट टेंकडी, सोंड (पर्वताची ). १० डोंगराच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत असलेला उतार, ओघळ, अरुंद वाट; दंडवाट ११ पर्वताच्या रांगेची एक लहान शाखा; डोंगराच्या माथ्यापासून तों पायथ्यापर्यंत वांकडीतिकडी गेलेली खडकांची ओळ. १२ (कवाईत वगैरे प्रसंगीं केलेला) सैन्याच्या रचनेचा एक प्रकार; रांग; फरा; व्यूह. ' तया दंडीं क्षोभलें। लोकत्रय।'–ज्ञा १.१६५. १३ ताठ उभें राहण्याची अवस्था. १४ जिंकणें, ताब्यांत, कह्यांत आणणें. १५ अपराधाबद्दल शिक्षा म्हणून घेतलेलें द्रव्य, पैसा; जातींत परत घेण्यासाठीं दिलेलें प्रायश्चित्त. १६ रताळीं, ऊस इ०लावण्याकरितां मातीचा केलेला लांबट उंचवटा, वरंबा. १७ तडाका.'निंदा निस्तेज दंडी । कामलोभावर पडी।' –ज्ञा १३.४९४. १८ हिंसा. ' ऐसा मनें देहें वाचा। सर्व संन्यासु दंडाचा।' –ज्ञा १३.३१०. १९ पाठीचा कणा. 'माजी उभारलेनि दंडे। शिरकमल होय गाढें।' –ज्ञा ६ २०२. [सं.] ( वाप्र. ) **०आवळणें, बांधणें, दंडाला काढण्या लावणें**–चतुर्भुज करणें; कैद करणें. **०थोपटणें**–१ कुस्ती खेळण्यापूर्वी दंड ठोकणें; कुस्तीस सिद्ध होणें. २ ( ल. ) साहसानें अथवा कोणासहि न जुमानतां एखादें कार्य करण्यास उभें राहणें. **०थोपटून उभें राहणें**–( ल. ) वाग्युद्धास तयार होणें. **०दरदरून फुगणें**–आपल्याशीं कुस्तीला योग्य असा गडी पाहिला म्हणजे पहिलवानाचे दंड स्फुरण पावून फुगणें. **०फुरफुरणें**–मारामारीची, कुस्तीची वगैरे उत्कट इच्छा होऊन दंड स्फुरण पावणें. **०भरणें**–तालीम वगैरेमुळें दंड बळकट व जाड होणें. **०भरणें**–शिक्षेदाखल पैसा देणें. **दंडास दंड लावून–घांसून**–क्रिवि. बरोबरीच्या नात्यानें; सारख्या सन्मानानें. **दंडाला माती लावणें**–कुस्तीला तयार होणें (कुस्तीपूर्वी दंडास माती लावतात). दंडपासून साधित शब्द– **दंडादंडी**–स्त्री. मारामारी; काठयांची झोडपाझोडपी; कुस्ती; झोंबी. [ दंड ]

**दंडायमान**–वि. १ ( अखंडित काठीप्रमाणें ) निर्मर्याद; अपार ( वेळ, काळ ). २ मध्यें पडलेला; आडवा पडलेला, पसरलेला. [ सं. ] **दंडारणा**–पु. सोटा; सोडगा; बडगा. –वि. जाड; स्थूल; घन ( वस्तु ); बळकट; मजबूत; जाड ( मनुष्य, पशु ). **दंडारा-ळा**–वि. (शिवण) ज्यास दंड घातला आहे असें; मध्यें शिवण असणारें (वस्त्र, कपडा). [ दंड ] **दंडावणें**–अक्रि. थंडीनें अथवा अवघड श्रमानें ताठणें (शरीर, अवयव). [दंड] **दंडासन**–न. आळसानें ( जमीनीवर ) पाय ताणून पसरणें, निजणें; सरळ हातपाय पसरून आळसानें पडणें. ( क्रि० घालणें ). [सं. दंड+आसन] **दंडार्ह**–वि. दंडय; दंड करण्यास योग्य. [ सं. ] **दंडित**–वि. १ शिक्षा केलेला; दंड केलेला. २ (ल.) निग्रह केलेला; वश केलेला; मारलेला; ताब्यांत आणलेला. [ सं. ] **दंडिता**–वि. शिक्षा करणारा; मारणारा; शिक्षा करितो तो. [ सं. ] **दंडिया**–पु. १ बारा ते पंधरा हात लांबीचें धोतर, लुगडें २ बाजाराचा बंदोबस्त करणारा छोटा अधिकारी; पोलीस मुकादम. [ हिं. ] **दंडी**–पु. १ दंड धारण करणारा; संन्याशी. २ द्वारपाल. ३ –स्त्री. अर्ध्या दंडापर्यंत बाह्या असणारी चोळी. [सं.] –वि. १ दंड धारण करणारा. २ दंड म्हणजे उभी जाड शिवण असलेला (कपडा). **दंडी**–स्त्री. मेण्यासारखें, चार माणसांनीं उचलावयाचें टोपलीचें वाहन. डोंगर चढतांना हींत मनुष्य बसतो व हमाल ही खांद्यावर वाहतात. [हिं.] **दंडुका**–पुस्त्री. (काव्य) हाताचा पुढचा भाग. –मोको. **दंडुका, दंडुकणें, दं(दां)डूक, दंडोका**–पुन. सोटा; बडगा; दांडकें; काठी; लांकडाचा लहानसा जाड तुकडा; शिपायाच्या हातांतील सोटा. [ सं. दंड ] **दंडुकेशाही**–स्त्री. मारहाण किंवा जुलूम करून अंमल गाजविण्याची पद्धति; पाशवी बल; दांडगाई. ' पोलिसांची दंडुकेशाही

अलीकडे फारच बोकाळली आहे.'—केसरी १६-४-३०. **दंडुक्या**—वि. काठीनें मार देण्यास संवकलेला; दांडगा; जबरदस्त. **दंडेरा**—वि. दंडारा पहा. **दंडेल—ली**—वि. दांडगा; अंरराव; अडदांड; झोंड; मुख्यत्वें, जो कर्ज परत फेडण्यास नाकबूल असतो तो; दंडुक्या (मनुष्य). **दंडेली**—स्त्री. अंररावीची वर्तणूक; दंडेलपणा; दांडगाई; जबरदस्ती; अन्याय; सामर्थ्याचा दुरुपयोग (मुख्यत्वें देणें न देण्यासंबंधीं). **दंड्य**—वि. १ शिक्षा करण्यास योग्य. २ दंड करण्यास योग्य. [सं] **दंडयाप्रमाणें**—क्रिवि. शिरस्त्याप्रमाणें. सामाशब्द- ०**थडक**—स्त्री. खांद्याच्या बाहेरच्या भागानें केलेला आघात. [सं. दंड+थडक] ०**दास**—पु. दंडाबद्दल गुलाम होऊन राहिलेला मनुष्य. [सं] ०**धारी**—पु. यम. 'नुपेक्षी कदां कोपल्या दंडधारी।' —राम २७. —वि. १ हातांत काठी असलेला. २ (ल.) संन्यासी. ०**नायक**—पु. कोतवाल; पोलिसांचा अधिकारी. 'सव सारीतु पातीनिर्ले। दडनायका पाशीं।'—शिशु ५०४. ०**नीति**—स्त्री. १ नीतिशास्त्र; नीति; संसारांतील वर्तुणुकीचे आणि व्यवहाराचे कायदे, नियम. यालाच दंडनीति, अर्थशास्त्र, व्यवहारशास्त्र, दृष्टार्थशास्त्र, हे जवळजवळ पर्यायशब्द आहेत. २ (कायदा) शिक्षा करून दाबांत ठेवण्याचें शास्त्र. हें राजनीतीच्या चार भागांपैकी चवथें होय. ३ अर्थशास्त्र, आन्वीक्षिकी पहा. [सं.] ०**पत्र**—न. न्यायांत खोटा ठरला म्हणजे त्यापासून दंड घेण्याचें पत्र. [सं.] ०**पक्ष (करण)**—न. (नृत्य) पाय ऊर्ध्वजानु करणें व त्यावर उजवा हात लताख्य करीत राहणें. [सं.] ०**संयुतहस्त**—पु. (नृत्य) हात हंसपक्ष करून बाहू पसरून एका हातानें दुसऱ्या हातास एकदां कनिष्ठिकेपासून आरंभ करून आंतील बाजूनें बाहेरच्या बाजूस विळखा घालणें; नंतर कनिष्ठिकेपासूनच पण बाहेरील बाजूनें प्रारंभ करून आंतील बाजूस विळखा घालणें. [सं.] ०**पाणी**—पु शिव; यम. —वि. ज्याच्या हातांत दंड आहे असा; धट्टाकट्टा व दांडगा; गलेलठ्ठ व झोंड; आडदांड. [सं.] ०**पाद—(आकाशी, चारी)**—वि. (नृत्य) नूपुरपाय पुढें पसरून क्षिप्त करणें म्हणजे कुंचित पाय उचलून दुसऱ्या पायाच्या बाहेरील बाजूस पोटऱ्यांचें स्वस्तिक होईल अशा प्रकारें टांचेच्या भारावर टेकणें व मग तें स्वस्तिकांतील पाऊल उचलून पसरणें व खालीं टाकतांना अंचित करून दुसऱ्या पायांत अडकविणें. [सं.] ०**पारुष्य**—न. १ कडक, कठोर शिक्षा. २ काठीनें हल्ला करणें; छडया मारणें; ठोंसे देणें; मारणें (हात, पाय, शस्त्र इ० कांनीं). ३ (कायदा) हल्ला; भय प्रदर्शक रीतीनें हात किंवा काठी उगारणें, मारणें. [सं.] ०**पूपिकान्याय**—पु. (उंदरानें काठी नेली त्या अर्थी तिला बांधलेली पोळी खाल्ली हें उघडच होय यावरून) कार्यकारण, अंगउपांग, प्रधानअप्रधान यांचा न्याय; ओघाओघानेंच प्राप्त झालेली गोष्ट. उदा० राजाचा जय झाल्यानंतर त्याच्या सेनेचा जय अर्थातच दंडपूपिकान्यायानें होतो. [सं. दंड=काठी+पूपिका=पोळी+न्याय] ०**प्रणाम**—पु. साष्टांग नमस्कार; लोटांगण. 'दंड प्रणाम करोनिया।'—गुच ९.९. ०**प्राय**—वि. दंडासारखा; साष्टांग (नमस्कार). 'करी दंडप्राय नमन।' —गुच ४१.१४. ०**फुगडी**—स्त्री. (मुलींचा खेळ) परस्परांच्या दंडांना (किंवा खांद्यांना) धरून उभ्यानें फुगडी खेळण्याचा एक प्रकार. [दंड+फुगडी] ०**फुराई—फु(पु)रोई**—स्त्री. १ दंडासाठीं केलेली जप्ती; दंड. २ (अधिकाऱ्यानें) बेकायदेशीर बसविलेला दंड; बेकायदेशीर दंड बसविणें. (क्रि० घेणें; देणें; भरणें). ०**वळी, कोपरवळी**—स्त्री. (व.) (दंडावरची) वांक; स्त्रियांचा एक अलंकार. [दंड+वेली] ०**वाट**—स्त्री. १ (उजाड, भयाण असा) लांबच लांब रस्ता; जवळपास गांव, वस्ती नाहीं असा रस्ता. २ टेकडयांच्या कडेनें गेलेली अरुंद पायवाट. ३ एकमेकास मिळणारे रस्ते. ०**वान्**—वि. काठी, दंड, वेत्र इ० हातांत घेणारा. [सं.] ०**विकल्प**—पु. शिक्षेची अदलाबदल; शिक्षा कमी द्यावी कीं अधिक द्यावी याविषयीं विचारणा. [सं.] ०**सरी**—स्त्री. (बागेमध्यें) पाणी जाण्याकरितां खणलेला लहानसा पाट, चर, खाचण; तसऱ्यांच्या बाजूचा पाट. [दंड+सरी] ०**स्नान**—न. घाई घाईनें केलेलें अर्धवट स्नान; नद्यादिकांच्या ठिकाणीं अंग न चोळतां केवळ दंड मात्र भिजतील अशा प्रकारचें केलेलें स्नान; काकस्नान; पाण्यांत एक बुचकळी मारून केलेलें स्नान. [सं.]

**दंड**—वि. हट्टी; उद्धट; हेकट; झोंड; जबरदस्त.

**दडक-ग**—स्त्री. (गो.) पावसाची मोठी सर. [ध्व.]

**दंडक**—पु. १ चाल; संवय; प्रघात; पद्धति; संप्रदाय; परिपाठ; वहिवाट; नियम. 'ऐसा ज्याचा दंडक। अखंड पाहाणें विवेक।' —दा १९.१०.१३. २ (काव्य) एकसमवृत्त; अक्षरें २७; गण न, न, र, र, र, र, र, र, र, यति शेवटीं. ३ दळण वळण; वागणूक. ४ (भयाण आणि ओसाड असा) लांब रस्ता; लांबट जागा. ५ बाहु; हात. 'हा तुझा निववुं दंडक राया। जो समर्थ खळदंड कराया।' [सं. दंड]

**दडकण**—न. (कों.) दावण्याकरितां ठेवलेलें वजन; चेपण; दडपण. [सं. दृढ]

**दडकणें**—सक्रि. १ (कों.) दडपणें; वर वजन ठेवून दाबणें. २ (ठांसून) चेपणें. [दडपण]

**दंडकारण्य**—न. नर्मदा आणि गोदावरी या नद्यांमधील अरण्यमय प्रदेश. दंडक राजाच्या नांवावरून. [सं. दंडक+अरण्य]

**दडकुली**—स्त्री. १ लपंडावाचा खेळ. २ स्वतःस लपविणें; फरारी होणें; दडी मारणें. (क्रि० देणें; मारणें). [दडणें]

**दडग**—न. (गो.) कपारी; खडकाळ डोंगर. [का. दडी=ताटी]

**दडंगा**—पु. (व) आरडाओरडा; दंगा; अव्यवस्था, दांडगाई. 'एवढया दडंग्यांत आम्हाला कांहीं सुचेना.' [दंगा]

**द(दं)डगी**—स्त्री. अग्नीची ज्वाळा. 'पंचाग्नीची दडगी। खोलवीजती शरीरालागीं।' –ज्ञा १७.२५५.

**दंडगें**—न. सोडगा; दंडा. [सं. दंड]

**दडगें अळूं**—न. अळवाची मोठी व पांढरी एक जात.

**दंडगोल**—न. पंचपात्र. [सं.]

**दडण**—स्त्रीन. १ लपण्याची जागा; लपण्याची खळी, गुहा; कपार. २ आसरा. [का. दड–तट, किनारा]

**दडणी–णें**—स्त्रीन. १ खोदणाराचें, नकसगाराचें एक हत्यार. २ (सोनारी धंदा) सांखळीच्या कडीचा खडबडीतपणा जावा म्हणून टोकाशीं अर्धवर्तुळाकार असा किंचित् वांकविलेला जो मोळा त्या कडीवर ठेवून वरून ठोकतात तो. **दडणें**–कडीचा खडबडीतपणा घालविणें.

**दडणें**—अक्रि. लपणें; छपून राहणें. स्वतःस लपविणें; गुप्त राहणें. 'किति पडती किति दडती कितिएकांचीं धृतायुधें गळती।' –मोकर्ण ४५.१८. [का. दडी=ताटी, तट्टी]

**दडणें**—सक्रि. दाबणें; दडपणें; (क.) (दागिना इ० कांवर ठसा) ठोकणें.

**दंडणें**—सक्रि. १ (मुख्यतः मार देण्याच्या रूपानें) शिक्षा करणें. 'म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील। तयातें काळु दंडील।'–ज्ञा ३.११२. २ (काव्य) पैशाच्या रूपानें दंड करणें; खंडणी बसविणें. ३ मारणें; निग्रह करणें; दमन करणें (वासना, मन इ० प्रायश्चित्त तप इ० कांनीं). 'बाहेरल्या वेषें उत्तम दंडिलें। भीतरीं मुंडिलें नाहीं तैसें।' ४ (क.) योग्य होणें; साजणें; शोभणें. [सं. दंडन]

**दडदड–डां**—क्रिवि. जलद चालतांना, पळतांना, पायानीं होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन; दुडदुडां. 'चालिला दडदडा।' –दावि ७.२.९५. [ध्व.]

**दडदडणें**—अक्रि. दडदड आवाज करून चालणें; धांवणें; दुडदुड पळणें. [दडदड]

**दडदडाट**—पु. मोठ्या शब्दाचा आवाज धडधड असा (पुष्कळ धावणाऱ्याच्या पायांचा इ०). [ध्व]

**दडदडीत**—वि. भरड; मोठें; जाड; दणगट; कठिण (गळूं, कातडी, वस्त्र इ०) याच्या उलट पातळ; सुरेख; बारीक. [सं. दृढ; हिं. डाट]

**दंडन–ना**—नस्त्री. १ (शारीरिक) शिक्षा; शासन. २ खंडणी; दंड घेणें. ३ (ल.) मारणें; दमन, निग्रह करणें, (वासना इ०). [सं.]

**दंडनीय**—वि. १ शिक्षेस पात्र; शिक्षार्ह. २ (द्रव्यरूप) दंड करण्यास अथवा खंडणी घेण्यास योग्य. ३ निग्रह, संयमन करण्यास योग्य. [सं.]

**दडप, दडपण**—न. १ दाबण्याकरितां ठेवलेलें वजन; भार; ओझें; चेपण. २ (ल.) निग्रह; संयमन; धाक; दाब. ३ (ल.) मनावरचें ओझें, वजन; भार. 'मायेनें घालूनि दडप।' –दावि ७.२.९. [दडपणें] **म्ह०** सुनेला दडपण सासू. **दडपणदास**–पु. (ना.) ऐतखाऊ; ऐदी.

**दडपणें**—सक्रि. १ दाबणें; चेपून संकुचित करणें; चेपणें. 'भोगींद्राचें फणीमंडळ। वटबीज भारें दडपिलें।' २ दाबांत ठेवणें; अमलांत आणणें; वश करणें; जुलूम करणें. ३ (ल.) छपविणें; लपविणें (काम, अपराध). ४ (ल.) सपाटून खाणें. [सं.दृढ; हिं. डाट]

**दडपून**–क्रिवि. हा शब्द जोर, चपळाई, भरपूरपणा इ० अर्थ दाखविण्याकरितां निरनिराळ्या क्रियापदांशीं योजितात. **०घालणें–भरणें–बसविणें**–चिकार, ठांसून भरणें. **०पळणें–धावणें, चावणें–हाकणें**–चपळाईनें, सपाटून धांवणें, चालणें, हांकणें. **०जेवणें–खाणें–पिणें**–पोटभर किंवा चेपून खाणें, पिणें. **०निजणें–पडणें**–पुष्कळ पांघरूण घेऊन निजणें. **दडपशाही**–स्त्री. सत्तेच्या जोरावर गरीबांच्या हक्कांवर, सुखावर गदा आणणारी पद्धति; जुलमी अंमल; अरेरावी; अन्यायानें एखादी (विशेषतः राजकीय) चळवळ दाबून टाकणें; दांडगेपणा [हिं.] **दडपश्वमे**–क्रिवि. खरी माहिती नसली तर आयत्यावेळीं सुचेल तें कांहीं तरी सांगून वेळ मारून नेणें.

**दडपा**–पु. १ दडपण. २ रास अथवा ढीग (प्रवासी लोकांच्या गांठोड्याभांड्यांचा, बिछायतीचा अथवा एके ठिकाणीं टाकलेल्या, अव्यवस्थितपणें पडलेल्या वस्तूंचा). ३ (ताप आला असतांना घाम येण्यासाठीं घेतलेलें) जाड पांघरूण. ४ (व) गाडींतील सामानाची गाडींत केलेली सोयीस्कर रचना. [दडपण]

**दडपॉ**—पु. (गो.) एक प्रकारचा पक्षी.

**दडपादडप–पी**—स्त्री. १ लांबविणें; पळविणें; लबाडीनें व गुप्त रीतीनें व्यवस्था लावणें. (दुसऱ्याच्या मालमत्तेची). २ कमी दर्शविणें; दिखाऊ सबबी सांगून हलकें करणें; छपवाछपवी करणें (दुसऱ्यांचे अपराध इ०). ३ दाबून टाकण्याची क्रिया. [दडपणें]

**दडपींव**–वि. दाबलेलें; चेपटलेलें. [दडपणें]

**दडप्या**—स्त्रीअव. स्वाती नक्षत्र व त्यांत पडणारा पाऊस (कारण हा पाऊस पिकांना खालीं दाबतो).–वि. दडपश्वमे करणारा; दडपणारा. [दडपणें] **दडप्यास लावणें**–(व.) बिनहक्काची वस्तु दडपून उपयोगांत आणणें.

**दडबडाविणें**—सक्रि. भीति घालणें; धाक दाखविणें; आवेशानें दम देणें; धमकावणें; खडसावणें; खडकावणें. [म. दडपणें; हिं. दाट देना]

**दंडवत**—न. १ (पूजा करतांना अथवा नमस्कार घालतांना) शरीर जमीनीवर दंडासारखें पसरणें; साष्टांग नमस्कार. 'तैसें माझें दंडवत। निरोप सांगतील संत।' –तुगा ५५५. २ शूद्रांनीं पत्रांत नमस्कार याअर्थीं लिहिण्याची विशेष संज्ञा. **दंडवत पडणें**–साष्टांग नमस्कार घालणें. 'दंडवत पडले धरणीसी।'–दावि ३०३.

म्ह० अटकळल्या देवा दंडवत=एकादें अरिष्ट सुपरिणामकारक बनल्यास योजतात.

**दडवादडवीं**—क्रिवि. लगवगां; झराझर; त्वकर. 'गुढीकारु पुढें पाठविला। तो दडवादडवीं गेला संप्रधारू।' –कालिका १७. २१. [ दवडणें=धावणें ]

**दडयादडीं**—स्त्री. (महानु) लपंडाव. 'भणऽ्ग्नि चालिजे दडवादडीं। हा मंत्रूची नोहे।' –शिशु ४८०. [ दडवणें ] –क्रिवि. दवडादवडी; तातडातातडी; दडवादडवीं. 'दडवादडी धांवतां। उत्कंठा आलेया वहुता।' –ऋ १००. [ दवडणें ]

**दडविणें**—सक्रि. छपविणें; लपविणें. ( मुखत्वेंकरून एखाद्या आडोशाच्या खालीं अथवा मागें ठेवून ); लपविणें पहा. [ दडणें प्रयो. ]

**दडस**—वि. मजबूत; टिकाऊ; दणकट; जाड विणीचें व घट्ट ( वस्त्र इ० ). याचे उलट पातळ, सुरेख, नाजूक. २ भरींव भरपूर. [ सं. दृढ; हिं. दट ]

**दंडळणें**—सक्रि. १ डळमळणें; चळणें; गडबडणें. 'नाना चमत्कारें बुद्धि। दंडळू लागे।' –दा ५.२.३३. २ भयानें कापणें; घाबरें होणें. [ दंड+वळणें ? ]

**दडा**—पु. १ बूच; नाक, कान इ० च्या छिद्रांत बसलेला प्रतिबंधक मळ; दट्या; (ल.) अडथळा, अवष्टंभ. २ विश्वास; भरोंसा; खात्री; आश्वासन. ३ लपून, छपून बसणें; लपून बसण्याची जागा; दडण. 'याचा दडा हुजूर राहील.' –वाडबाबा १५८. ( क्रि० मारणें ). ४ छपून बसलेली सैन्याची टोळी. ५ ( छपून दरोडा घालणारा ) पेंढारी –शास्त्रीको ६ चेंड्ड [ दडणें ]

**दडाडा, दडादड-डां**—क्रिवि. धावतांना जोरानें पाय वाजवीत; दडदड करीत; दुडदुडां. (क्रि० धावणें; चालणें) [ ध्व. ]

**दडादडी**—स्त्री. १ लपणें; दडणें; लपून बसण्याचा सपाटा. २ लपंडाव नांवाचा खेळ. [ दडणें ]

**दुंडा**—पु. (कों.) डोंगराची पुढें आलेली सोंड, पुढें आलेला निमुळता भाग. [ दंड ]

**दंडा**—पु. लाठी; काठी. [ सं ] **दंडाईत**–पु. छडीदार; भालदार 'लघू लाघवी वेग दंडाइतांचे।' –मुरायुद्ध ९१. –वि. दांडगा; झोंड; अडदांड; धट्याकट्या बांध्याचा. [ दंड ]

**दंडार**—न. ललित दंढार पहा.

**दडी**—स्त्री. दडणें; छपून किंवा लपून राहणें; दडण; बुडी; डुब; गुप्तपणें राहणें. 'आपण आदिपुरुषीं दडी। मारून राहे।' –दा १.३.६. ( क्रि० देणें; मारणें ). [ दडणें ]

**दंडी**—स्त्री. १ दिंडी; वृत्ताची एक जात. (प्र.) दिंडी पहा. २ एक तंतुवाद्य, हें एका भोंपळ्यास कळकाची पोकळ दांडी बसवून केलेलें असतें. **०गाण**–पु. ( दंडीवर गाणारा ) गाणाऱ्या भिक्षेकऱ्यांची एक जात, व्यक्ति. दिंडीगाण पहा. **०गाणें**–न. दंडीवर म्हणण्याचें गाणें. [ दिंडी ]

**दंडींद**—न. एक ( मासे पकडण्याचें ) जाळें; हीं जाळीं तयार झालीं म्हणजे पाण्यात वापरण्यास घेण्यापूर्वी सिमेंटच्या पाण्यांत उकळून शिंपीच्या चुन्यानें माखतात व मग आईन झाडाच्या सालीनें रंगवितात.

**दंडोक**—पु ( चंद्रपुरी ) लग्नसमारंभांतील ठराविक कृत्यें. [ सं. दंडक=रीत ]

**दंडांतर**—पु. ( कों. ) माशांची एक जात. हे आक्टोबर, नोव्हेंबरमध्यें पकडतात.

**दंडयाप्रमाणें**—क्रिवि. शिरस्त्याप्रमाणें.

**दढा**—न. (व.) ढेकूळ; नांगरानें न फुटलेला शेतांतील जमीनीचा भाग. [ सं. दृढ ]

**दढार**—स्त्री. (व. ना.) ललित. दंडार पहा. खेडेगावांत करमणुकीकरितां कांहीं शिकविलेल्या मुलांकडून नाच, गाणें व मधून मधून सोंगें व भाषणें इ० करविण्याचा प्रकार हिचे दंडगी व भाग वती असे दोन जुने प्रकार. असून अलिकडे नाटकी दंढार नांवाचा एक तिसरा प्रकार निघाला आहे; ललित.

**दणकट**—वि. १ जाडेंभरडें; मजबूत ( कापड ). २ बळकट; मजबूत; कणखर; राकट; आडदांड (माणूस इ०). [ सं. दृढवत् ? ]

**दणकणें**—अक्रि. लोकांच्या बोलण्याचा, टीकेचा विषय होणें; वाईट तऱ्हेनें प्रसिद्ध होणें. [ दणका ]

**दण कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. पायानें जो दणदण आवाज होतो तसा ध्वनि होऊन; दणादणां. [ ध्व. ]

**दणका**—पु. १ आवाज होणारा आघात, प्रहार; ठोसा; घाव; ठोका. २ गर्दी; गडबड; दंगा; धुमश्चक्री; गलबलीचा खेळ, उत्सव; तडाखा; धडाका; कडाखा (वाद्यें, तोफा, बंदुका, मेजवानी इ० कांचा ). ३ लोकांतील भुमका; वदंता; बातमी; बोभाटा. ४ अधिक पैसा खर्चून प्रसिद्धि व्हावयाजोगा जो विवाहादि समारंभ वगैरे करतात तो. [ ध्व. दण ] **०माजणें**–१ गोंगाट करणें. २ धुरोळा उडणें. **०मारणें**–प्रचंड प्रयत्न करणें; जोरानें झगडणें ( विशेषतः यशाची पर्वा न करितां–आपल्यापेक्षां अधिक शक्तिमानाबरोबर ). **दणक्याचें लग्न**–न. अधिक पैसा खर्चून प्रसिद्धि व्हायाजोगा केलेला लग्नसमारंभ.

**दणकारणें**—सक्रि. खडसावणें; दणगारणें पहा.

**दणकावि(व)णें**—सक्रि. १ (दणदण असा आवाज होईसें) मारणें; सडकणें; ठोकणें. २ दणक्यानें, थाटानें विवाहादि समारंभ करणें. ३ खडसावणें; अंगावर जाऊन ओरडणें; घटपट, अरेरावी यांचा उपयोग करणें; अवडंबर घालणें, करणें; प्रतिकाराचे नेटाचे पण व्यर्थ प्रयत्न करणें. [ दणका ]

**दणकाहलका**—पु. १ (हलका=एक प्रकारचा पखवाज) पुष्कळ पडघम, मृदंग व वाद्यें यांचा तडाखा. २ (यावरून) गलगा; बडबड; दंगा; गोंगाट; बोभाटा; गवगवा; प्रसिद्धि. [दणका+हलका]

**दणकें-गें**—न. दणका अर्थ २ पहा.

**दणगट**—वि. दणकट पहा.

**दणगा**—पु. १ कडकडाट; दणका; मोठा आवाज (तोफांचे गाडे इ० ओढून नेतांना होणारा). २ दणक्याचा समारंभ. 'घेउनि आंदण गेह्या शौरि निघे, कंस करि महां दणगे ह्या।' –मोकृष्ण १.२७. [ध्व.]

**दणगारणें**—सक्रि. १ खडसावणें; खडकावणें; कचकून शिव्या देणें. २ (क.) दणकाविणें याबद्दल चुकीनें उपयोग. दणकारणें पहा. [दणका]

**दणदण-दणां**—क्रिवि. पायांचें दणदण आपटणें, तोफांचा धडाका, जड धोंड्यांचे आघात, कांडण इ० च्या मोठ्या व दण अशा आवाजासारखा आवाज होऊन. [ध्व] **दणदणणें**–अक्रि. १ दणदण आवाज होणें; मोठ्या गर्जनेनें धडाडणें (तोफा, बंदुका इ०). २ अंगावर जाऊन क्रोधानें ओरडणें; ताव झाडणें; जळफळणें. ३ दणदण पाय वाजणें; ह्यादरणें (माडीवरून जलद चालतांना माडी); दुमदुमणें; प्रतिध्वनि उत्पन्न होणें (तोफा, वाद्यें इ० कांच्या धडाक्यानें घर, गुहा इ० मध्यें). ४ एकाच्या तोंडून दुसऱ्याच्या तोंडी जाणें; सर्वत्र पसरणें (स्तुति, निंदा). ५ (फोडणी इ० चा) घमघमाट सुटणें. ६ गलबला होणें; गलका होणें (सैन्य, लोकांची गर्दी इ० चा). ७ धडधड जळणें (शेकोटी, टेंभा); प्रकाशणें; धगधगणें (सूर्य, ऊन्ह). **दणदणाट**–पु. १ दणदण असा मोठा व एकसारखा होणारा आवाज; दणका (समारंभ, वाद्यें इ० चा). २ फोडणी इ० च्या वासाचा घमघमाट. तळलेल्या पदार्थांचा उग्र वास; घमघमाट. ३ माडीवरून चालतांना अनेक पावलांचा होणारा आवाज. **दणदणीत**–वि. १ थाटामाटाचें; धामधुमीचें; दणक्यानें केलेलें (लग्न, समारंभ). २ उग्र; तीव्र; सर्वत्र पसरलेला (फोडणी वगैरेचा वास). ३ धडधडां जळणारा. ४ (दिवा, टेंभा). दणदणणें पहा. **दणदण्या**–वि. दणदणां चालणारा.

**दणव**—पु. (बे.) दमणूक; दमछाकी; दमछाट. [दमणें]

**दणवणूक**–स्त्री. (बे.) दणव पहा.

**दणाणणें**—अक्रि. १ दणदणाटणें; जोरानें दणदणणें. २ भयभीत होणें; आश्चर्यचकित होणें; गडबडणें. [ध्व.]

**दणाणा, दणाण**—पु, १ मोठा दणदण आवाज; दणदणाट (पावलें, तोफा इ०). २ भीतीचा दरारा; वचक. (क्रि० बसणें). [ध्व.]

**दणादण-दणां, दणाण**—क्रिवि. (चालतांना पावलें इ० चा) मोठ्यानें दणदण आवाज करीत. 'फुगडी खेळूं दणादणा।' [ध्व.]

**दणादणी**—स्त्री. (ना.) धक्काबुक्की; गुद्दागुद्दी.

**दणावणें**—अक्रि. वांकणें; मोडणें; नम्र होणें; दबणें. [दणव]

**दंत**—पु. १ दांत; तोंडांतील चावावयाचा अवयव. २ हस्तिदंत; सुळा. ३ पर्वताचें शिखर, सुळका, पुढें गेलेली बाजू. [सं.; जि.फ्रें. दंत; पोर्तु. दनेस; ग्री. ओडोन्स; लॅ. डेन्स; लिथु. दन्तिस्; गॉ. टुन्थुस्; प्राज. झन्त; कँब्रोब्रिटन. दन्त्] सामाशब्द- ०**कथा-गोष्ट**–स्त्री. लोककथा; काल्पनिक, तोंडातोंडी चालत आलेली किंवा शास्त्रप्रमाणविरहित गोष्ट. ०**कांति**–स्त्री. दांतांची प्रभा, तेज. ०**काष्ठ**–न. दांत घासण्याची लिंब इ० झाडाची लहान फांदी, काडी. ०**चूर्ण**–न. दांत घासण्याची पूड, राखुंडी; दांतवण. ०**धावन-प्रक्षालन**–न. राखुंडी इ०नीं दांत घासणें. ०**पंक्ति**–स्त्री दांतांची कवळी, रांग. ०**पटी-पाटी**–स्त्री. (काव्य) दांतांची कवळी; बत्तिशी. 'दंतपाटी उखळली।' –दा ३.५.३९. ०**परीक्षक**–पु दांतांचा वैद्य; दंतवैद्य. ०**परीक्षा**–स्त्री. दांतांच्या रोगांची परीक्षा. ०**भग्न**–वि. दांत मोडलेला, पडलेला असा (मनुष्य). म्ह० दंतभग्नो भवेत् दादा (पूज्य)। ०**भग्नोच्चार**–पु. दांत पडल्यामुळें होणारा अस्पष्ट शब्दोच्चार. ०**मंजन**–न. दांत घासण्याची पूड. ०**रोग**–पु. दांतांचा रोग. ०**विष**–न. दांतासंबंधीचें विष. ०**वैद्य**–पु. दंतपरीक्षक; कृत्रिम दांत बसविणारा वैद्य. ०**व्रण**–पु १ हिरडीस होणारा फोड. २ (शृंगारिक) दांतानें केलेली खूण. 'दंतव्रण करि गाला.' –सौभद्र अंक ३. ०**शुद्धि**–स्त्री. दांत घासणें; दांतांचा स्वच्छपणा. ०**स्थान**–न. (व्याकरण) ऌ तवर्ग, ल, स इ० वर्णांचे उच्चार मुखाच्या ज्या स्थानापासून (दांतांपासून) निघतात तें स्थान. ०**हर्ष**–पु. १ दांतांचा नाजुकपणा (आंबट पदार्थ खाण्यामुळें येणारा); दांत आंबणें. २ (चावण्यासाठीं) दात शिवशिवणें. ०**क्षत**–वि. दातांनीं चावलेलें. –न. १ चावा. २ (शृंगारिक) स्त्रीपुरुषांनीं परस्परांस दातांनीं केलेले (चुंबनादिप्रसंगीं) व्रण; नखक्षत हें फक्त पुरुषांनींच करावयाचें असतें. **दंतांतर** न. १ दोन दांतांतील अंतर. २ (त्यावरून) थोडेसें अंतर; भेद; फरक. म्ह० क्वचित् दंतांतरो मूर्खः। **दंतावली**–स्त्री. दांतांची ओळ; बत्तिशी. **दंतावळ**–पु. हत्ती. –शर. **दंताळ-ळा**–वि. ओठांच्या बाहेर किंवा पुढें दांत असलेला, आलेला. **दंताळ-ळें**–न. १ (कों. कृषि) बीं पेरल्यानंतर त्यावर माती लोटण्यासाठीं लांब दांते असलेलें आऊत. २ कुळव. [दंत+आलय] **दंती**–पु. १ हत्ती. 'दंतीं म्यां देवदंती धरुनि मुरडिला शैल कैलास गाढा।' –आसी ३२. २ –स्त्री. जयपाळ. ३ केंस विंचरण्याची फणी. ४ एक झुडप. ५ चाक. –वि. दांत अथवा दांते असलेली (फणी, चाक). **दंतुर**–वि. १ दांत पुढें असलेला. २ दांते किंवा खंड असलेला (किनारा वगैरे). दंताळ (–वि.) पहा. **दंतुरचक्र**–न. दांते असलेलें चाक. **दंतोच्चार**–पु. (दंत्य वर्णांचा) दांतांपासून होणारा उच्चार. –वि. दांतांतून उच्चारण्याजोगा (उच्चार इ०).

**दंतोच्छिष्ट**–वि. दांतांनीं चावलेलें; कुरतडलेलें; उष्टें केलेलें ( फळ, अन्न इ० ). *दंत्य*–वि. १ दांतासंबंधीं. २ दांतांतून निघणारा ( उच्चार ).

**दं(द)त**–पु. ( कों. गो. ) जंत.

**दत्त**—पु. १ ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तींचा अवतार; दत्तात्रेय २ वाणी जातींतील एक आडनांव. ३ दैवप्राप्त वस्तु; प्रारब्ध; नशीब. 'तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता। म्हणऊनि चिंता उपजली।'–तुगा २८६७. ४ देणगी. 'हरी दत्त देईल तें शीघ्र घ्यावें।' –कर्नेसुच १३. ५ नेमलेलें काम, धंदा; वृत्ति; नशिबानें आलेलें (काम). 'दान मागणें हें भिक्षुकाचें दत्तच आहे.' [सं.] ०**जयंती**–स्त्री. मार्गशीर्ष शु. पौर्णिमा; दत्तात्रेयाचा जन्मदिवस. **दत्तात्रेय, दत्तात्रय, दत्त अवधूत**–पु. दत्त १ पहा. अत्रि ऋषीचा पुत्र. हा काशीला स्नान, कोल्हापुरास भिक्षा व माहूरला निद्रा करतो अशी दंतकथा आहे. –वि. (ल.) दिगंबर; उघडा बंब. **दत्तात्रेयाची फेरी–स्वारी**–जो मनुष्य नेहमीं भटकतो व जो नक्की कोठें सांपडेल तें सांगता येत नाहीं, अशा माणसाचें भटकणें अथवा अवचित आगमन यास म्हणतात. **दत्त म्हणून उभें**–वि. अकल्पित रीतीनें येऊन उपस्थित झालेलें. –न. दैव; लाट; भाग्य; भोक्तृत्व; दैवगति; साथ. ०**म्हणून उभें राहणें**–( स्वयंपाक सिद्ध होतांच दत्तात्रेय कोल्हापुरास अकस्मात् भिक्षेस येतात अशी दंतकथा आहे. त्यावरून) एखाद्या कार्याच्या सिद्धीसाठीं खटपट न करतां केवळ उपभोगापुरतें किंवा मनीं–मानसीं नसतां एकाएकीं आयत्या वेळीं येऊन हजर होणें असा अर्थ.

**दत्त**–वि. १ दिलेलें; बक्षिस केलेलें; देऊन टाकलेलें. ( क्रि० करणें, होणें ). २ दत्तक दिलेला ( मुलगा ). [ सं. ] ( समासांत ) ईश्वर–देव–दत्त=देवानें, ईश्वरानें दिलेलें. ०**पत्र**–न. ज्यांत दत्तविधान नमूद आहे किंवा दत्तक घेण्यादेण्याचा अधिकार दिला आहे किंवा देण्याचा आशय आहे असा लेख. ०**पुत्र, दत्तक**–पु. दत्तक दिलेला अथवा घेतलेला मुलगा. औरसपुत्र नसल्यास नांव चालविण्यासाठीं व पिंडोदकक्रियेच्या हेतूनें जो पुत्र प्रतिनिधि होतो तो पुत्र; बारा पुत्रांतील सातवा; पुत्रत्वाच्या रूपानें एखाद्याच्या मांडीवर दिलेला मुलगा. ( क्रि० देणें; घेणें ). ०**या दत्त्या**–पु. ( निंदाव्यंजक ). दत्तकपुत्र. ०**विधान**–न. दत्तक पुत्र घेण्याचा धार्मिक विधि; विध्युक्त अनुष्ठान. **दत्तात्मा**–पु. दुसऱ्यांना आपले आईबाप समजून राहणारा पोरका मुलगा; स्वयंदत्त. बारा पुत्रांपैकीं दहावा. **दत्तादत्त**–वि. दिलें–घेतलेलें. **दत्तापहार**–पु. दिलेलें दान, किंवा वस्तु परत घेणें; अपहार करणें. **दत्तापहारक, दत्तापहारी**–वि. दिलेलें दान, वस्तु परत घेणारा. **दत्तोपंत, दत्तोबा**–पु. ( विनोदानें ) दत्तक मुलगा. [ सं. ]

**दंद**—न. भांडण; बेबनाव; वैमनस्य; द्वैतभाव; बाहुयुद्ध. ( क्रि० धरणें; लावणें; मांडणें; ). [ सं. द्वंद्व ]

**दंदशूक**–पु. साप. 'कीं यशवंत विनतानंदन। दंदशूक ऐकोन तटस्थ।' –ह १८.१७. [ सं. ]

**ददाची विद्या, ददाची बाराखडी**—स्त्री. फक्त देण्याची गोष्ट, क्रिया. घघाची विद्या पहा. [ देणें ]

**ददा(धा)त,ददाती**—स्त्री. १ उणीव; तोटा; वाण; कमतरता; ओढगस्तपणा; आपत्ति ( अन्न, वस्त्र इ०ची ). ( क्रि० पडणें; प्राप्त होणें; होणें; भोगणें ). २ कष्ट; त्रासदायक श्रम, काम; दगदग. 'त्या कामाची ददात केली पण झालें नाहीं.' [ सं. ददाति ]

**दंदावा**—पु. द्वेष; आकस; चुरस. ( क्रि० धरणें; चालविणें; लावणें; मांडणें; पडणें; लागणें ). [ सं. द्वंद्व+म. दावा ]

**दंदास**—पु. त्रास; शीण; कष्ट. ( क्रि० येणें; आणणें ). [ सं. द्वंद्व+त्रास ]

**दंदिया**—पु. योद्धा; जवळ दांडकें बाळगणारा पुरुष. 'कां दंदिया हतियेरा। न विसंबे भांडारा।' –ज्ञा १३.५०१. [सं. दंड]

**दंदी**—वि. १ द्वेषी; आकसखोर; वैरी; चुरस वाढविणारा; शत्रुत्व बाळगणारा; वादी; भांडखोर. 'ज्यासी वंदावें त्यासी निंदी। मैत्री सांडोनि होतसे दंदी।' –तुगा ४४२२. [ सं. द्वंद्व ] ०**दुशमन**–वि. कट्टा वैरी; द्वेष्टा. ०**दुशमनगिरी**–स्त्री. वैर; शत्रुत्व.

**दंदे दरफडे**—पुअव आत्मश्लाघा; गर्वोक्ति; शेखी; बढाई. ( क्रि० गाणें ).

**दद्रु**—पु. दाद; खरूज; गजकर्ण; इसब. [ सं. ]

**दधि**—न. राळ अथवा टरपेन तेल.

**दधि**—न. दहीं. दूध विरजलें असतां होणारा पदार्थ. [ सं. ] ०**काला**–पु. गोकुळअष्टमी अथवा एखाद्या धार्मिक उत्सवाच्या शेवटीं दहीं व लाह्या मडक्यांत एकत्र कालवून तें मडकें फोडतात व तो प्रसाद सर्वांस वाटतात तो प्रसंग; गोपाळकाला. ०**कुल्या**–स्त्रीअव. १ भरपूर दहीं. २ ( यावरून ल. ) चमचमीत मेजवानी. [दधि+कुल्या=पाट] **दध्योदन**–न. (काव्य) दहींभात. [ दधि+ओदन ] ०**लिल**–नवनीतजन्य; लोण्यापासून बनलेलें. ( इं. ) ब्यूटिरील.

**दधिवामन**—पु. एक प्रकारचा शालिग्राम.

**दधून**—न. ( शाप. ) पाराफिन वर्गांतील एक ज्वलनशील वायु. ( इं. ) ब्युटेन.

**दनका, दनकाविणें, दनकारणें, दनकें–गे, दनगारणें, दनदन, दनदनणें**—दणका इ० पहा.

**दनगट**—दणगट पहा.

**दनपार, दॉनपार**—पु. ( गो. ) दुपार; दोनप्रहर.

**दनुज**—पु. दानव; दैत्य; असुर; कश्यपपत्नी दनु हिची संतति [सं.]

**दन्ना**—वि. मोठा; अगडबंब; अवाढव्य; प्रचंड; राक्षसी; अफाट; विस्तीर्ण (इमारत, झाडें, पिकें, ओझें, काम, अरण्य इ०). [धन्य]

**दन्ना**—वि. गोंगाटाचा; गलबलीचा; दंगलीचा. 'दन्ना बाजार भरला.' 'दन्ना पाऊस पडतो.' 'दन्ना लढाई–भांडण–कज्जा–वारा–गर्जना.' [दणदण ! ध्व.]

**दप**—स्त्री. (गो.) दवा. (क्रि० धरणें).

**दप–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि. जड किंवा भारी वस्तु जमीनीवर एकदम पडली असतां होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन; रपदिशीं. (क्रि०पडणें; मारणें; वाजणें). [ध्व.]

**दपकाविणें, दबाविणें**—उक्रि. भीति घालणें: धमकावणें; खडसाविणें; भोसडणें. [दाब]

**दपटगिरी–निशी**—स्त्री. जबरीनें अथवा हावरेपणानें हिरावून घेणें; सांपडेल ती वस्तु दडपणें, उपटणें; जबरदस्ती; जुलूम. [दडपणें+फा. गरी, गिरी, नविसी]

**दपटणें**—सक्रि. १ चोंदणें; कोंदणें; दाबून भरणें; रेटणें; जोरानें दडपणें; खुपसणें. 'कळत कळत जो काळ–व्याळमुखीं प्रकट बाहुला दपटी।' –मोकर्ण ६.७२. २ (ल.) दामटणें; पिटणें; रवाना करणें (घोडा, मनुष्य इ०). ३ खडसावणें; खडकावणें; धमकावणें; दहशत घालणें. ४ हिरावून घेऊन गिळंकृत करणें; उपटणें (दुसऱ्याची मालमत्ता, जागा इ०); जबरीनें उपभोगणें (स्त्री, बायको); आत्मसात् करणें; डल्ला मारणें; गट्ट करणें; अफरातफर करणें; दडपणें; गिळंकृत करणें. ५ (वाद किंवा युद्धांत) दुसऱ्यास जिंकणें. [दडपणें] **दपटून जेवणें**–आकंठ, घशाशीं येईल इतकें जेवणें. **दपटून निजणें**–सपाटून झोंप घेणें. **दपटून शिरणें**–जोरानें आंत घुसणें. **दपटश(शा)हा, दपटशा**–पु. १ जोराची खडसावणी; खरडपट्टी; भोसडपट्टी; भयंकर धाक, तंबी, धमकावणी; भीति घालणें; धमकावणें (क्रि० देणें; बसणें). २ गर्दी; तगादा, निकड, (कामाची). (क्रि० बसणें; पडणें; लावणें; लागणें; घालणें). जोराची निकड लावणें; बोकांडीस बसणें. (क्रि० काढणें; घालणें; देणें). सामान्यतः कर्माच्या षष्ठीबरोबर जसें:–घोडयाचा–बैलाचा–चाकराचा दपटशहा काढला. **दपटशा बेरीज देणें**–घाईनें व सरासरीनें बेरीज करणें. [दपटणें] **दपटशाही**–स्त्री. तंबी; धमकावणी. [दपटणें] **दपटया**–वि. १ (अन्न) दडपून भरणारा, कोंबणारा, खाणारा; आकंठ जेवणारा. २ हिरावून घेऊन पळून जाणारा; जुलमानें घेऊन आत्मसात् करणारा. ३ वाटेल तें काम कसें तरी दडपून पुरें करणारा. [दडपणें] **दपटश्रमे**–वि. दपटया पहा. –क्रिवि. दपटून.

**दपणें**—अक्रि. (कों.) लपणें: दबून बसणें; दडणें. [दडणें]

**दंपति–ती, दंपत्य**—स्त्री. नवरा व बायको; लग्नाचें जोडपें; मेहूण. [सं.] **०कलह**–पु. १ नवराबायकोचें भांडण. २ (यावरून ल.) गोंगाटाचें व रागाचें पण पोकळ भांडण; अकांडतांडव. **०पूजन**–न. धार्मिक विधीच्या समाप्तीस केलेली ब्राह्मण पतिपत्नींची पूजा; उमामहेश्वर किंवा लक्ष्मीनारायण यांच्याप्रीत्यर्थ, वस्त्रालंकार इ० उपचारांनीं केलेलें ब्राह्मणदंपतीचें पूजन. **०भोजन**–न. (देवताप्रीत्यर्थ किंवा व्रतसांगतासिध्यर्थ). ब्राह्मण पतिपत्नीस घातलेलें भोजन. **०वायन**–न. वरीलसारख्या प्रसंगीं दंपत्यास दिलेलें वाण.

**दपनें**—न. (महानु.) रोप. 'श्रृंगाराचें दपनें सिंपें।' –शिशु ३१९. [सं. द्विपर्ण–दुपर्ण–दपर्ण]

**दपमारणें**—क्रि. (गो.) १ दबा धरून बसणें. २ डोळे झांकून निजणें. [दवणें]

**दपाटा**—पु. दपटशहा पहा. [दपटणें]

**दप्तर, दप्तरखाना–दार–इ**०—दफ्तर इ० पहा.

**दफन** – न. (प्रेतास द्यावयाची) मूटमाती; प्रेत पुरण्याची क्रिया. –वि. पुरलेलें. [अर दफ्न्] **दफन(ण)णें**–पुरणें. 'अफझल्खानाकडील मूडधे दफणाऊन टाकावे.' –ऐस्फुले ७२.

**दफा**—स्त्री. १ कलम. 'इंग्रजांनीं सात दफेची या(द)–दास्त पाठविली.' –राज ७ ३. २ अमुक वेळां असें दाखविणारा प्रत्यय. 'तीन दफा, पाच दफा.' [अर दफ्आ=वेळ]

**दफ्फा**—पु. (गो.) १ ढलपा. २ मातीचें ढेकूळ. [ढलपा, ढेप]

**दफाते**—स्त्री. (जुन्या लिखाणांत) कागदाला पाडलेल्या तीन सळांपैकीं पहिल्या सळाच्या मध्यापासून तिसऱ्या सळाच्या मध्यापर्यंत ओढलेली रेघ. [अर. दफ्आत्]

**दफातें**—न. स्मरणवही; जिच्यांत पत्रें, सनदा, घडलेल्या गोष्टींची बारनिशी व नोंद किंवा टांचण केलेलें असतें अशी वही. [अर. दफ्आत्] **०खर्च**–पु. जादा किंवा किरकोळ खर्च. **०जमा**–स्त्री. जादा किंवा किरकोळ जमा.

**दफिना**—पु. पुरलेलें द्रव्य; निक्षेप; गुप्त धन; कुणगा [अर.]

**दफे**—न. प्रतिकार; शिक्षा; हटवणूक; अडवणूक. 'वेढा राणोजी घोरपडयाचा मारून काढून दूर दफे केला.' –राज १५.१९. [अर. दफ्अ] **०करणें**–हांकलून देणें. **०होणें**–हांकलला जाणें.

**दफेदार**—पु. १ देशी घोडदळांतील एक कनिष्ठ अधिकारी; शिपायांचा नाईक; सैन्याच्या मोदीखान्यास बैल पुरविणारा कंत्राटदार किंवा अधिकारी. ३ सरपट्टेवाला [फा. दफ्अदार्]

**दफेरफे**—स्त्री. फडशा; फेड (कर्जाची); तोड; व्यवस्था; सफाई; निर्वाह (कामधंद्यासंबंधीं) –वि. व्यवस्था लावलेलें; फेडलेलें. [अर. दफ्अ–रफ्अ]

**दफ्तर**—न. १ लेख; संग्रह; सरकारी कागदपत्रांचें पुडकें; त्या पुडक्यांचा बांधलेला रुमाल; फडक्यांत बांधलेला लेखी कागदांचा गठ्ठा. २ शाळेंतील मुलांचें पाटीपुस्तकें इ० ठेवण्याचें फडकें, पिशवी. ३ लेखनसंग्रहाची कचेरी (दफ्तरखाना); कचेरी; हपीस.[अर. दफ्तर्] **०खाना**-पु. दफ्तर अर्थ ३ पहा. **०णी-नी**-स्त्री. १ कागदांचें फडकें किंवा रुमाल; बांधणीचा पट्टा अथवा दोरी. २ असें बांधलेलें पुडकें. 'चित्रांची दफ्तरनी तयार झाली म्हणौन विनंति होती.' -पेद १८.५७. **०दार-नीस, दफ्तरी**-पु. जुन्या राज्यांतील एक अधिकारी; याचें काम फडणीसानें तयार केलेल्या रोजकीर्दीवरून हिशेब जमवून व व्यवस्थेनें लिहून महिन्यास संक्षेपानें तें हुजुरास पाठविण्याचें असे. हल्लींच्या कलेक्टरच्या हाताखालील एक देशी अधिकारी; चिटणीस; दप्तरखान्यावरील मुख्य अधिकारी; कागदपत्रांची काळजी घेणारा अधिकारी. **०दारी-निशी**-स्त्री. दफ्तरदाराचें काम. **०बंद**-पु. दफ्तरांतील कागदपत्र नीट व्यवस्थेनें ठेवणारा कारकून. -वि. जुळवून, व्यवस्थेनें ठेविलेलें. **०हिशेब**-पु. हिशेबाचा एक प्रकार, याचे रोजकीर्द, नेमणूक, बेहेडा, अजमास, झडती, ताळेबंद, घडणी, तर्जुमा, सरंजाम यादी, ठरावपट इत्यादि ९ प्रकार आहेत. -इनाम ४६

**दफ्ती**—स्त्री. (काशी) पुष्टिपत्र.

**दबकणें**—अक्रि. १ टेंकीस येणें; कचरणें; नम्र होणें; ओझ्याखालीं वांकणें. २ (ल.) धाक बसणें; स्तब्ध राहणें; गाय होणें; भिणें; दबणें; घाबरणें; नमणें. ३ दडणें; दबा धरणें; थांबणें. [सं. दापनं]

**दबकर**—पु. मांगांतील एक पोटजात. बेळगांव जिल्ह्यांत ही पोटजात प्रामुख्यानें आढळते. -अस्पृ.

**दबका**—पु. १ खोलगट जमीन; तळ; खोलगा अथवा खळगा; तळवट जागा. २ पोटांतील अन्नाचें ओझें, जाडय. (क्रि० बसणें). ३ धबका; धपका; रपाटा. [दबणें]

**दबकावणी-णें**—दबावणी, दबाविणें पहा

**दबकें**—न. (सोनार-कासार धंदा) पत्रा सपाट, सारखा करण्याचें एक हत्यार. [सं. दा-दापनम्-दाबणें]

**दबडका-गा, दबडघा-शा**—पु १ कामांची धांदल; एकसारखी गर्दी; लोकांची, पाहुणे इ० ची सारखी ये जा. २ (ल.) कामाची निकड. ३ जोराचें, मोठ्या आवाजाचें खडसावणें. [दबणें ?]

**दबडा-डें**—पुन. तेल, तूप इ० ठेवण्याचा चामड्याचा बुदला; बुदली; डबडें. [डबडें]

**दंबडी, दंबणें**—दमडी, दमणें इ० पहा.

**दबणें**—अक्रि. १ दबकणें अर्थ १ पहा २ (ल.) खचणें; दबले जाणें; आहारीं जाणें; हार जाणें; भिणें; ताब्यांत जाणें (भीति, दुखणें, जुलूम इ० नीं). ३ मेटें मोडणें; मुरमुसणें. ४ लपून बसणें, दडणें; दबा धरणें. [सं. दा-दापनम्-दाबणें; हिं. दबना]

**दबदब-दबां**—क्रिवि. ढिल्या ताणाच्या किंवा फुटक्या नगाऱ्याच्या आवाजासारखा आवाज होऊन. [ध्व.]

**दबदबणें**—अक्रि. दबदब आवाज होणें. [ध्व.]

**दबदबा**—पु. १ भीति; दरारा; आदर; जुलूम, दहशत इ० मुळें झालेला परिणाम. (क्रि० बसणें; पडणें; पाडणें; देणें). २ इभ्रत; ऐश्वर्य; मोठेपणा; अधिकार; वैभव; डौल; हुकमत. 'होळकर शत्रूला दबदबा।' -ऐपो २३३. [अर. दब्दब; सं. दापनम्-दाबणें]

**दबदबीत**—वि. १ मऊ; दबणारें; गलगलीत; बिलबिलित (अन्न). २ अशा अन्नानें खूप भरलेलें (पोट). (आकंठ पोट भरलें असतांना हा शब्द लावितात). (क्रि० भरणें). ३ पेरणीस योग्य अशा भिजलेल्या जमीनीसहि म्हणतात. 'जमीन दबदबीत भिजली, बीं पेरा.' ५ दबदब पहा. ६ (गो.) पातळ; दाटसें (कालवण). [ध्व.]

**दंबरपेंबरणें**—अक्रि. (गो.) अति गर्वानें वागणें.

**दबविणें**—सक्रि. १ जोरानें दडपणें; संकुचित करणें; दाबणें, खालीं दाबणें; आवळणें. २ (ल.) जुलूम करणें; जरब देणें; धमकावणें. [दबणें]

**दबा**—पु. हल्ला करण्याच्या किंवा उडी टाकण्याच्या तयारीनें नेम धरून बसण्याची क्रिया. दडणें; आड लपून बसणें. [दबणें]

**दबाजा, दबाटका**—पु. (गो.) दबदबा अर्थ १ पहा.

**दबाबा**—पु. दबदबा पहा. [हिं.]

**दबाव**—पु. १ भीति; धमकावणी; खडसावणी; दहशत. २ दबदबा अर्थ १ पहा. ३ दबदबा अर्थ २ पहा. ४ दारवठ्यावर अथवा झांकलेल्या गटारावर घातलेला आडवा तुकडा (लांकडाचा अथवा दगडाचा); भिंत अथवा टेंकू यांवर ठेवलेला आडव्या तुळवटाचा शेवट. ५ वजन; दडपण्याची क्रिया. [दबणें] **०णी**-स्त्री. धमकावणी; दबकावणें; दटावणें; धमकी.

**दबाविणें**—सक्रि. धमकाविणें; भीति घालणें, दाखविणें (धमकी देऊन, शिव्यागाळी करून); दबकावणें; दहशत घालणें. [दबाव]

**दबीर**—पु. युक्त्याभिज्ञ; राजचिटणीस. डबीर पहा. [फा. दबीर्]

**दबेल**—वि. १ दरारा बसलेला; भ्यालेला; जुलूम इ० नीं दबलेला; दुसऱ्याच्या मुठींत असणारा; ओशाळा; मिंधा; (ल.) परावलंबी. [दबणें]

**दब्ब**—क्रिवि. (पोट भरणें या शब्दाशीं जोडून) आकंठ; फार भरल्यासारखें; दबदबीत अर्थ २ पहा. याचा विशेषणासारखा व नामासारखाहि उपयोग होतो. उदा० पोट दब्ब झालें किंवा पोटांत दब्ब झालें आहे. [ध्व.]

**दंभ**—पु. १ ढोंग; स्तोम; देखावा; सोंग. २ पोकळ, तोंडाचें ब्रह्मज्ञान. [ सं. ] **दंभी**–वि. ढोंगी; दांभिक; पोकळ डौली.

**द(दं)माशी–स्ती**—पु. सारवान; उंट हांकणारा.

**दभ्र**—वि. क्षुल्लक; तुच्छ; अल्प. ' भीष्म म्हणे गांधारे पांडव पंडित खरे न दभ्र–मती। ' –मोविराट ४.५९. [ सं. ]

**दम**—पु. आत्मसंयमन; इंद्रियदमन; सहनशीलता; मनोविकार दाबांत ठेवणें. [सं.] **दमक**-वि. दाबणारा;सहन करणारा; सहनशील.

**दम**—पु. १ श्वास. (ल.) प्राण; जीव. २ धाप; हवावी; सुसकारा; प्रमाणाधिक श्वासोच्छ्वास; कष्टानें श्वास टाकणें. ३ स्वतः-बद्दलची फाजील कल्पना; अहंमन्यता; अहंकार; महत्त्वाकांक्षा; गर्व; बढाईखोरपणा. ४ क्षण; पळ. ५ जोम; हिम्मत; निश्चय; विश्वास; तेज; धीर. ६ शक्ति; सत्व; चांगलेपणा; सामर्थ्य, गुण (औषधांचा). ७ श्वास कोंडून धरण्याची शक्ति; अवसान. 'तुझा दम मोठा म्हणून तूं बुडून राहतोस.' ८ कायम ओलसरपणा, दमटपणा (जमीनीचा). ९ एखाद्या वाद्यांतील हवा (वाजविण्यासाठीं कोंडलेली, भरलेली). १० वाफ देणें (मंदाग्नीवर ठेवलेल्या अन्नास). ११ धूम; पखवाज, संबळ इ०कांचा खर्जे सूर. १२ हिम्मत; जोम; शक्ति; धीर; दृढनिश्चय; सहनशक्ति इ० उठावणी करण्याची, प्रोत्साहित करण्याची, पाठपुरावा करण्याची शक्ति (संपत्ति, अधिकार, उद्योग यांची); व्यापारधंद्यांतील भरभराट; किफायत; व्यापारांतील ऐपतगिरी; गब्बरपणा. १३ धान्याचा सकसपणा; केळीं वगैरे पदार्थांचा (पोटांत) पुष्कळ वेळपर्यंत भूक न लागतां राहण्याचा गुण; जुन्या, वापरलेल्या वस्तूंची अधिक टिकण्याची शक्ति; पुष्कळ वेळ जळत राहण्याची दारुकामाची शक्ति; न तापतां पुष्कळ वेळ बार उडण्याची (तोफ, बंदूक इ०) शक्ति. १४ झुरका (गुडगुडी, चिलीम इ०चा). (क्रि० घे॑; पिणें; खेंचणें; ओढणें; लावणें). १५ जोर; शक्ति. 'पावसानें पिकास दम आला.' १६ धमकी. [सं. दम्; फा.] (वाप्र.) **०कोंडणें**–१ श्वास कोंडणें; श्वासाचा अवरोध होणें. २ हिंमत, उत्साह खचणें. **०खाणें**–१ थांबणें; श्वास घेणें; थोडा वेळ स्वस्थ बसणें. २ वाट पाहणें; धीर धरणें. **०घेणें**–थांबणें; विश्रांति घेणें. **०छाटणें**–१ श्वासाचा निरोध करणें; श्वास कोंडून धरणें. २ धीर धरणें; सहनशीलपणा धारण करणें. ३ श्वासोच्छ्वास अनियंत्रित चालणें; गुदमरणें; घाबरे होणें. 'कफामुळें दम छाटत नाहीं.' **०टाकणें–सोडणें**–१ आशा, विश्वास, धैर्य सोडणें. २ श्वास घेणें; विश्रांति घेणें. **०देणें**–१ धैर्य देणें; प्रोत्साहित करणें; उत्तेजन देणें. २ धमकी देणें; धाकदपटशा दाखविणें. ३ जोरानें खडसावणें; भोसडणें. ४ क्षणभर विसावा घेऊं देणें. **०धरणें**–१ श्वासावरोध करणें; धीर धरणें. २ थांबणें; विसावा घेणें. ३ धैर्य धरणें. ४ कांहीं वेळ वाट पाहणें. **०पाहणें**–(एखाद्याच्या) अवसानाची, शक्तीची परीक्षा घेणें, करणें. **०भरणें**–धमकावणें; खडकावणें; तंबी देणें; भेडसावणें; दहशत घालणें; ताकीद देणें. **०मारणें**–१ झुरका घेणें (गुडगुडी इ० चा). २ आपल्या करामतीची पराकाष्ठा करणें. ' पुन्हां एकदां दम मार म्हणजे तो धोंडा सरकेल. ' ३ गट्ट करणें; दाबणें (पैसा, अन्न इ०). **०लागणें**–जीव खालींवर होणें; जलद, कष्टानें श्वास घेणें; धाप लागणें. **०सुटणें**–धैर्य, विश्वास नाहींसा होणें; धीर खचणें. **दमादमानें**–सावकाश; शांतपणें; हळू हळू; थांबून. **दमावर धरणें**–घाईशिवाय किंवा न थकतां एकसारखें काम करणें. **एका दमानें**–क्रिवि. एका श्वासानें अथवा अव्याहत प्रयत्नानें; एका सपाट्यांत. **दमास येणें**–थकणें. सामाशब्द– **०छाट**–पु. श्वासोच्छ्वास निरोधाची शक्ति; पुष्कळ वेळ दम कोंडून ठेवणारा माणूस. **०छाटगोळा**–पु. कुलपी गोळा; बाँब. **०छाटतोफ**–स्त्री. गरनाळ. **०छाट माणूस–मनुष्य**–पु. पुष्कळ वेळ अवरोध करण्याची शक्ति असलेला मनुष्य. **दमट, दमकट–कल**–वि. १ ओलसर; आंबटओलें; कुंद; आर्द्र (जमीन इ०). २ हिरवी; रसभरीत (फांदी). **०टणें**–अक्रि. १ ओलसर असणें. २ ओलसर होणें. **०दाटी**–स्त्री. धाकदपटशा. **०दार**–वि. १ ओलसर; दमट (जमीन). २ ओलट; हिरवें (लांकूड); जमीनींतील भट्टींत तयार केलेला व दमानें जळणारा (कोळसा); सकस; कसदार (धान्य); नफा होणारें; फायदेशीर (काम, धंदा). ३ धाडसी; अंगांत तेज किंवा पाणी असणारा; नशीबवान; निश्चयी. ४ धीराचा; सहनशील; उत्साही; दीर्घोद्योगी. ५ पैसेवाला; भांडवलवाला; पैशाची ऊब असणारा (सावकार). ६ पुष्कळ वेळ वापरूनहि दणगट, मजबूत राहणारी (वस्तु, वस्त्र). **०दिलासा**–पु. उत्साह; धीर; समाधान. **०विक्री, दमाची विक्री**–स्त्री. उधारीचा धंदा; उधारीची विक्री. **०सर**–वि. दमट पहा. **०सर्द**–वि. १ थंड. २ नामोहरम; पराजित; हतप्रभ. ' अमर्यादकांस शासनें करून ...दमसर्द केलें.' –राज ८.१२५. **०सुट**–क्रिवि. पहाटेच्या वेळीं.

**दमकुल**—न. (व.) मातीची शेगडी.

**दमडी**—स्त्री. पैशाच्या चौथ्या हिश्याचें किंवा दहा, बारा कवड्यांच्या किंमतीचें एक नाणें. [ सं. द्रम्म ] **दमडीकरितां सौदा मोडणारा**–वि. थोडक्याकरितां सर्व कार्याचा नाश करणारा. **०पूत**–पु. अतिशय चिक्कू; कवडीचुंबक. [ दमडी+पूत= मुलगा ] **०चा**–वि. गरीब; हलका; क्षुद्र (मनुष्य, वस्तु, काम). **०वर चमडी करणें–काढणें–मिळविणें**–थोड्या भांडवलावर पुष्कळ नफा मिळविणें.

**दमणी**—स्त्री. (ना. खा.) एक लहान बैलगाडी; छकडा. [ फा. दामन ]

**दमणें**—अक्रि. १ थकणें; भागणें; कंटाळणें. २ अनुकूल होणें; वश होणें. ३ (ल.) पुष्कळ वेळां पीक काढल्यानें जमीन, शेत इ०

निकस होणें. ४ एखादी वस्तु वापरल्यामुळें जीर्ण होणें; झिजणें. ५ कुंद, सर्द, दमट होणें; आंबटओल असणें (वस्त्र, लांकूड इ०). ६ शरीरावरील केस किंवा शेतांतील गवत एकदा उपटल्यावर पुन्हां न उगवणें. [दम]

**दमदम-दमां**—क्रिवि. १ घमघम आवाज. २ सुगंधाचा घमघमाट. **दमदमणें**-अक्रि. १ ढोल इ० चा दमदम असा आवाज होणें. २ सुगंधी पदार्थाचा घमघमाट सुटणें. [ध्व ]

**दमदमा**—पु. १ मोठा नगारा, नौबत, तोफा इ० चढविण्याचा उंचवटा; मेढा; टप्पा. २ तोफखाना. [अर. दम्दमा ]

**दमदमाट**—पु. १ नगाऱ्यांचा किंवा अनेक वाद्यांचा मोठा आवाज २ उग्र किंवा मधुर वासाचा घमघमाट. [दमदम]

**दमदमीत**—वि. १ घमघमीत (वास). २ तृप्त करणारें; चमचमीत; भरपूर (अन्न, जेवण). ३ भरपूर; आकंठ भरलेलें (पोट). [दमदम]

**दमन**—न. १ वठणीस आणणें; वश करणें; दाबून टाकणें; रग जिरविणें; खोड मोडणें; संयमन. २ वश किंवा नियमन करणारी शक्ति, कारण. सामासांत-इंद्रिय-दुष्ट-रोग-काम-क्रोध-दमन. [सं.] **०पौर्णिमा**-स्त्री. चैत्री पौर्णिमा. या दिवशीं कामदेव संबंधीं उत्सव करितात. **दमनीय**-वि. वश करण्याजोगें; ताब्यांत येण्यासारखें; स्वाधीन करून घेण्यासारखें. **दमित**-वि. वठणीस आणलेला; वश केलेला; ताब्यांत आणलेला; जिंकलेला; नियमन केलेला. [सं.] **दमी**-वि. वठणीस आणणारा; वश करणारा; ताब्यांत आणणारा; नियमन करणारा. [सं.]

**दमन**—न. गाडीचा टप; दमान. [फा. दामन्]

**दमनक**—न. दवणा (वनस्पति). [सं.]

**दमविणें**—सक्रि. १ वश करणें; शमविणें; ताब्यांत ठेवणें; जिंकणें; दाबांत ठेवणें. 'इतर शास्त्रांचे बोल बहुत। येकाच वचनें दमवी वेदांत।' २ थकविणें; भागविणें. [दमणें प्रयो.]

**दमळ-ट**—न. (गो.) अभ्राच्छादित आकाश; तुफान.

**दमा**—पु. १ श्वासरोग. (क्रि० दाटणें; भरणें; लागणें; कोंडणें). २ जोराचा श्वासोछ्वास; धाप (पळण्यामुळें लागलेली). [फा.] **दमेकरी**-वि. श्वासरोग असलेला; श्वासरोगी. [दमा+करी]

**दमान-ण**—न. १ (नाविक) शिडाची दोरी; शीड; शिडाचा मागचा (काठीजवळ येणारा) भाग. २ वाऱ्यासमोरची बाजू. [सं. दाम=दोर; फा. दामन्]

**दमामा**—पु. १ मोठा नगारा; नौबत. [फा. दमामा]

**दमामा**—पु. १ बकमाल; कडाबीन २ गडगा; धमधमा; मेढा; (तोफेसाठीं रचलेला) टप्पा. [फा. दमामा]

**दयदय असणें**—क्रि. (व) दारिद्र्यामुळें कोणत्याहि गोष्टीची तूट असणें. [दे ! दे !]

**दयन पाहाटे**—क्रिवि. (व.) मोठया पहांटेस. [सं. उदयत् प्रभात]

**दया**—स्त्री. १ करुणा; अनुकंपा; कळवळा. २ कृपा; मेहेरबानी. ३ विशेषतः देवानें केलेली कृपा, अनुकंपा (समासांत) दया-कर-निधान-निधि-समुद्र-सागर-इ० =दयाळु (माणूस). [सं.] **म्ह०** दया उधार ,खता रोकडी. **०दया, दयांदयां, भयाभया, दयाभया**-क्रिवि. दया ! दया ! असें ओरडत दारोदार भीक मागत फिरून. (क्रि० करणें; करीत फिरणें, जाणें). **दयांदयां**-स्त्री. केविलवाणी स्थिति. **दयांदयां होणें**-अतिशय करुणास्पद स्थितीस येणें. **०धर्म**-पु. नैतिक व धार्मिक कृत्यें; आचारविचार. (क्रि० करणें; होणें). **०भूत-रूप**-वि. दयाशील; दयेची मूर्ति; मूर्तिमान् दयाच असा (मनुष्य इ०). **०मय**-वि. दयेनें पूर्ण; दयाशील; कृपाळु. **०माया**-स्त्री. सामान्यतः दया; कृपा; माया; ममता. (क्रि० येणें; असणें; करणें; ठेवणें; राखणें). **०राम मुकुंददासाचे नातू**-पुअव. (ल.) एखादा अतिशय श्रीमंत मनुष्य (व्यंगोक्तीनें) अतिशय दरिद्री मनुष्य. **०लु-ळू**-वि. कृपाळु. **०वान्-वंत, दयाळ**-वि. कृपाळु; मायाळु. **०शील**-वि. दयाळु स्वभावाचा; दुसऱ्यावर नेहमीं दया करणारा. **०हीन**-वि. निर्दय; निष्ठुर.

**दयावती**—स्त्री. (संगीत) पांचव्या श्रुतीचें नांव. [सं.]

**दयासा**—पु (चांभारी धंदा) घोडयाच्या तंगाची वादी.

**दयित**—पु नवरा. [सं.] -वि. आवडता; प्रियकर; जिवलग.

**दयिता**—स्त्री. बायको; आवडती स्त्री; पत्नी. [सं.]

**दर**—पु. १ किंमत; भाव; निरख. २ प्रमाणांत, किंमतींत ठरलेली संख्या किंवा परिमाण. उदा० 'शंभर ब्राह्मणांस हजाराचे दरानें लक्ष रुपये द्या.' [फा.] **दर येणें**-किंमत चढणें.

**दर**—स्त्री. (कों) कांठ; किनारा (शेत, नदीचा). [सं. धरा; हिं.]

**दर**—पु. भीति; भय. 'स्वभक्त सुरपादपा हरि नसेचि सत्या दर।' -केका ६१. [सं.]

**दर**—क्रिवि. १ प्रत्येक; एकएक; हरएक. 'दर माणूस, दरगांव.' २ (गो.) पासून ह्या अर्थाचा प्रत्यय. 'थन्नदर' =तेव्हांपासून. [फा. दर्=आंत] **०किनार**-अ. बाजूस; एकीकडे. 'ते सर्व दरकिनार राहून ...' -ख ७.३५६७. **०कूच**-क्रिवि. प्रत्येक मजलेस; मजल मारीत मारीत; कूच-दरकूच; दरमजल. **दरमजल**-क्रिवि. दरकूच पहा. **दरम(मा)हा**-पु. प्रत्येक महिन्याचा पगार, वेतन; प्रत्येक महिना. -क्रिवि. प्रत्येक महिन्याच्या महिन्यास; प्रतिमासीं. [फा. दर्माह्] **दरमहा करणें**-महिन्याचा पगार ठरविणें. **दररिकीब**-स्त्री. (ल.) सैन्याचा दरेक हल्ला. [दर+रिकीब] **दरवक्त, दर्वक्त**-क्रिवि. प्रत्येक वेळेस; सदोदित;

नेहमीं. मौजे केळगांव यास दर्वेक्त मुजाहीमकाय सबब होत असतां ?'–राज ११ ३९. **दरसदे–सदे**–क्रिवि. दरशंभरी; दर-शेंकडा. 'जहागीर दरसदे ४० प्रमाणें.'–वाडसमा २.६६. [फा. दरसद] **दरहर**–क्रिवि. प्रत्येक; प्रत्येकांत. [फा.] **०साल**–क्रिवि. प्रत्येक वर्षी.

**दर**—पु. शंख. 'वाजत होता संतत दर, जाणों विष वचो-गृहीं वमला।' –मोसभा ३.३३. 'वाजविला दिव्य देवदत्त दर, मोविराट ४ २. [सं.]

**दर**—पु. १ (व.खा.) (खांब, खुंटा इ० पुरण्याकरितां जमीनींत खणलेला) खड्डा; भोंक; बीळ. २ दरी. ३ (सोनारी) मण्याचें टरफल अर्धवर्तुळ करण्याची गडीमधील वाटी. [सं.] **म्ह०** दराची माती दरास पुरत नाहीं.

**दर**—पु. (गो.) बळी. [?]

**दरक**—पु. १ विचार; बेत; मनीषा.' उगीच नादीं लाऊन ठेवावें असा इतर सरदारांचा दरक.'–ख ११७८. २ पद्धत; सरणी. [अर. दर्क्]

**दरक**—पु. वंशपरंपरागत सरकारी मोठ्या अधिकाराची जागा; श्रेष्ठ अधिकार, हुद्दा. हे आठ प्रकारचे आहेतः–दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखाननीस, चिटनीस, जामदार, पोतनीस. [अर.] **०दार–दरकी असामी**–वि. दरक धारण करणारा अधिकारी. यांचे प्रकारः–फडणीस, मुजुमदार, दिवाणजी, बक्षी, सबनीस, वांकनीस, कारखाननवीस, हशमनीस, पोतनीस, गोट-गस्ते, मुनशी, पागनीस, बारनीस, गडनीस, सभासद, दफ्तरदार, रक्तवान, मोईनदार, पोतदार इ०. **०पट्टी**–स्त्री. दरकदारांवरील सरकारी कर; मुख्यत्वें देशमुख, देशपांडे यांच्या जमीनीवरील दहा वर्षांनीं एका वर्षाच्या जमाबंदीइतका द्यावयाचा कर. **दरकुटें**–न. (निंदाव्यंजक) दरक अथवा सरदारी. –देवनाथ. [अर. दरक]

**दरकार, दर्कार**—स्त्री. अडचण; जरूरी; गरज; पर्वा; आवश्यकता; काळजी; प्रयोजन; संबंध. 'सिद्दी मर्द माणूस याची दरकार आहे.'–वाडसमा २.४. [फा.]

**दरकाल**—न. (कु.) कफाचा बेडका.

**दरकुट–टा**—पु. दरी; दडून बसण्याची जागा. 'कीं विवेक सींहाचा दरकुटा।'–ऋ ५९ [दर]

**दरकैंबचें**—अक्रि. (गो.) भिणें; दरारा बाळगणें. [सं. दर=भीति]

**दरखास्त–स, दरखाष**—स्त्री. १ (कायदा) विनंतीअर्ज; मागणी अर्ज; मागणी; साक्षीदार किंवा दस्तऐवज दाखल करण्या-करितां करावयाचा अर्ज. २ फिर्याद. [फा. दरख्वास्त]

**दरखोती**—स्त्री. १ करार; बोली; ठराविक दरानें मक्ता घेणें. २ उभ्या पिकाचा मक्ता; इजारा. [दर=किंमत+खोती]

**दरगा, दर्गा**—पु. मुसलमानांची नमाज पढण्याची जागा; इदगा; कबरीची, पीराची जागा; मशीद. [फा. दरगाह]

**दरगाह**—पु. दरबार; राजसभामंडप. 'त्यांणीं आदिलशाही दरगाहाशी रुजुवाती करून ...'–इ ९८. [फा. दरगाह्]

**दरगुजर–गुदल**—स्त्री. दुर्लक्ष; क्षमा; कानाडोळा; चाल-ढकल. [फा. दर्गुज़र्]

**दरज, दरजगिरी दरजा–र्जा**—दर्जे इ० पहा.

**दरजबंदी**—स्त्री. (ना.) चुन्यानें किंवा चिखलानें भिंतीच्या विटा, दगडांच्या भेगा इ० भरून काढणें. [दर=भेग+बंदी]

**दरजबाब–जाब**—पु. उत्तर. [फा. दर्जेजबाव] **०नामा**–पु. उत्तरपत्र.

**दरठरोती**—स्त्री. दर ठरविणें; (यावरून) जमाबंदीची तपासणी. [हिं. दर+ठराना]

**दरड–डी**—स्त्री. नदीकांठचा उंचवटा; उंच किनारा, कांठ, तीर; उभी चढण; डोंगराचा तुटलेला कडा. [सं. दर+ड प्रत्यय] **०वट**–वि. खांचखळगे, उंचवटे, दरडी इ० असलेली (जमीन). [सं. दरद्+वत्]

**दरड–डी**—नस्त्री. १ (कों. कु.) दाट वाढणारें गवत. 'दरडी माथेनें घांसे।'–पंच १.९. २ ऐचण; ऐतण. [दरड–तेथील गवत व जागा ?]

**दरडाई**—स्त्री. खडसावणी; धमकी; दाट; धाक; दहशत. (क्रि० देणें). [दरडावणें]

**दरडाविणें**—सक्रि. खडसावणें; धमकावणें; रागावणें; धाक घालणें. [दे.]

**दरद, दर्द**—स्त्रीपु. १ दुःख; विकार; रोग (विशेषतः हाडीं खिळलेला). २ (ल.) काळजी; कळकळ; आस्था; खन्त; कींव; जिव्हाळा; भीड. ३ (ल.) मुद्दा; खोंच; मर्म. 'तुजमधें बहुत भरल्या इष्की दर्दा।'–प्रला २३०. ४ सौंदर्य; तत्त्व (भाषण, लेख इ० मधील). ५ (कु.) फोडांतील पू. [फा. दर्द्] **दरद-वंत**–वि. काळजी बाळगणारा; लक्ष देणारा; सावध; आस्था बाळगणारा. [फा. दर्दमन्द] **म्ह०** गरजवंत तो दरदवंत.

**दरद**—पु. हिंगूळ. [सं.]

**दरदगिरी**—स्त्री. दर्जेगिरी पहा.

**दरदर–रां, दरदरून**—क्रिवि सपाटून; भरपूर; फसफसून (जमीन किंवा पीठ ह्यांत पाणी घातलें असतां किंवा ताक घुसळत असतां किंवा अंगास घाम फुटला असतां होणारी स्थिति). (क्रि० फुगणें; फुलणें; घाम येणें; ऊब येणें; पुरुळ उठणें; जबरदस्त झोंप येणें)

**दरदरणें**– अक्रि. १ फेंसाळणें; वर येणें; फुगणें (घुसळतांना ताक इ०). २ भीतीनें घाम फुटणें. [दरदर]

**दरदरा**—पु धाक; भीति; दरारा; जोराची खडसणी; अधिकाराची छाप; भयभीतपणा; भीतीचें कारण. 'त्या वाटेनें दरदरा नाहीं, खुशाल जा.' [ सं. दर=भीति ]

**दरदरीत**—वि. पातळ. 'दरदरीत पाण्या–। माजी रांधियेल्या कण्या।' –तुगा ६८२. [ दरदरणें ]

**दरदाम**—पु. विकत घ्यावयाच्या वस्तूची किंमत व तिच्या संबंधाच्या इतर गोष्टी यांस व्यापक शब्द; भावबीव; किंमत वगैरे. [ फा. दर=किंमत+दाम=पैसा ]

**दरदी-दर्दी**—वि. १ दरदवंत पहा. २ दुसऱ्याच्या गुप्त गोष्टी, बिंगें जाणणारा; मर्म, मख्खी जाणणारा; (गाणें इ० मधील) रसज्ञ; सौंदर्य, तत्त्व जाणणारा; त्याची आवड असणारा; मर्मज्ञ; तज्ज्ञ. 'आम्ही तर दर्दी इश्काचे भुकेलेले प्राणी।'–प्रला १६४. [फा. दर्द ]

**दरपटाण**—स्त्री. ( राजा. कु. ) उग्र, घाण वास. [दर्प+घाण]

**दरफडणें**—अक्रि. आदळआपट करणें; चरफडणें; जळफळणें. [ ध्व. ]

**दरबंदी**—स्त्री. पिकाची आणेवारी; गांवाच्या वसुलाचें पत्रक. [ दर+बंदी ]

**दरबार**—पु. १ राजाची कचेरी; राजसभा; राजकीय कारभारी मंडळी राजास भेटण्याची जागा. २ (ल.) लोकांची सभा. ३ सरकारनें कचेरी अथवा सभा भरविणें व भेटी इ० घेणें. ( क्रि० करणें ). ४ ( बडोदें ) संस्थानी सरकार. दरबारमार्फत जरूर ते अधिकार देण्यांत येतात.' –स्वारीनियम १५. [ फा. दर्बार् ] **०खर्च**–पु. १ दरबारचे, सरकारचे अधिकाऱ्यांना दिलेला पैसा ( लांच ); कारकुनी; अंतस्थ. २ दरबाराकरितां लागणारा पैसा. **०चा कुत्रा–दरबारी कुत्रें**–पुन. ( व्यंग्यार्थी ) बक्षीस वगैरे देऊन काम करून घेण्यासारखे दरबारांतील चोबदार, वकील इ० अधिकारी. **०तोंड**–न. दरबारमधील ( लांचखाऊ ) अधिकारी. ( क्रि० भरणें; दाबणें; चेपणें; धरणें; संभाळणें ). **०मशहूर**–वि. १ दरबाराशीं परिचित; दरबारी लोकांशीं घसट असणारा. २ जाहीर (वाईट कामाविषयीं); सर्वत्र जाहीर (गोष्ट, काम). [ फा. दर्बार्+अर. मशहूर ] **दरबारी**–वि. १ दरबारासंबंधींचा; विशेष शिष्टाचारास अनुसरून असा (व्यवहार,बोली,मनुष्य इ०). २ (ल.) पोकळ;खोटा; बरकरणी. ३ वैभवसंपन्न; राजसभेचा घटक. [ फा. ] **०कानडा**–पु. ( संगीत ) एक राग. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. अवरोहांत धैवत वर्ज्य. जाती संपूर्ण–षाडव. वादी ऋषभ, संवादी पंचम. गायनसमय मध्यरात्र. शास्त्रकारांच्या मतें हा शुद्ध कानडा होय. याचे कौशी, अडाणा, जयमिनी, हुसेनी असे अनेक भेद आहेत. **०गडी**–पु. दरबारांत, सभेंत हुषारीनें व तडफेनें काम करणारा नोकर; तरतरीत, हजरजबाबी सेवक. **०जोडा**–पु. ( ल. ) जुना, फाटका जोडा ( कोणी चोरून नेला तरी चालेल असा ).

**दर-बि-दर**—वि. भणंग. 'आपले वडिलांस दर–बि–दर केलें.' –पक्तोघे. –क्रिवि. दारोदार. [ फा. दर्–बि–दर् ]

**दरभाऊ**—पु. एका स्त्रीच्या दोन नवऱ्यांस म्हणतात; भोंडेभाऊ. [ दर=भोंक किंवा किंमत+भाऊ ]

**दरवठा**—पु. ( गो. ) दरवाज्याचा उंबरठा. [ दारवठा ]

**दरवड मुशी**—स्त्री. मुश नांवाची समुद्रांतील माशाची एक जात.

**दरवडा, दरवडेकरी, रवडेखोर**—दरोडा इ० पहा.

**दरवंद**—पु. ( गो. ) दरवाजा; लाकडी चौकट.

**दरवळ**—पु. उग्र वास (अत्तर; कांदा, जळणारें कातडें, केंस इ० कांचा). **दरवळणें**–अक्रि. उग्रतेनें व दूरवर पसरणें ( वास, विशेषतः सुगंध ).

**दरवाजा**—पु. १ घर इ०कांत जाण्यायेण्याकरितां भिंतींत ठेवलेला मार्ग; दार; द्वार; तें लावण्याच्या लांकडी फळ्या, कवाड. २ दारवठा. ३ ( ल. ) अंतःप्रवेशाचें साधन. ४ शरीराचीं उत्सर्गद्वारें; नवद्वारें पहा. दार; भोंक; छिद्र. ५ तोरण. [ फा. दर्वाझा ] **०कोंडणें–दाबणें–धरणें**–उगम, उद्‌गम कोंडणें; राबता बंद करणें. **०मोकळा टाकून राज्य करणें**– (चोर इ०कांपासून ) सुरक्षिततेच्या अथवा निर्भयपणाच्या बुद्धीनें राहणें, वागणें. **दरवाजकरी, दरवान–दर्वानकरी**–पु. देवडीवाला; द्वारपाळ; पहारेकरी; द्वाररक्षक. [ फा. दर्वान् ]

**दरवारी, दरवारीपत्रक**—स्त्रीन. १खेडयांतील जमीनीच्या जमाबंदीचें पत्रक २ दराचें किंवा भावांचें, किंमतीचें पत्रक.

**दरवेश-शी**—पु. १ मुसलमानांतील भिकाऱ्यांची फिरती जात व तीपैकीं एक व्यक्ति. हे वाघ, अस्वलें, माकडें इ० चा तमाशा लोकांस दाखवितात व घरोघर पैसा उकळतात. 'दरवेशियानें सांगता साचार। लोकांसी सलाम करी वानर।' २ फकीर. [ फा. दर्वेश् ] **दरवेशी**–स्त्री. दरवेशाचा धंदा; फकीरी.

**दरसवाद**—क्रिवि.(गांवच्या किंवा शेतांच्या)शिवारांत. [फा.]

**दरसाविणें**—सक्रि. (काव्य) सुचविणें; दर्शविणें; ( व्याजोक्तीनें ) दाखविणें. [ सं. दर्शन ]

**दरहिकायत**—क्रिवि. समक्ष. [ फा. ]

**दरा**—पुस्त्री १ खोरें; दरी; टेकडयांमधील सखल भाग; कुहर; घोल. २ ( ल. ) पोट. [सं ]**म्ह०** ज्या गांवीं भरे दरा तोच गांव बरा. **०खोरा**–पु. दरेंखोरें; खांचर; खळगा; ओघळ; भगदाड. [दरा+खोरा] **दरींखोरीं, दऱ्याखोऱ्यांत पडणें–उतरणें–जाणें–घालणें–पाडणें**–(ल.) दरिद्री होणें; नुकसानींत येणें; अन्न जाणें; दारिद्रांत टाकणें; गुरफटणें.

**दरा**—पु. ( कुंभारी धंदा कों. ) खड्डा; खळगा; चाकावरून मडकें काढलें म्हणजे तें ज्या खळग्यांत ठेवून थोपटतात तो खळगा. –बदलापूर ६६. [ सं. दर=छिद्र ]

**दराज्**—स्त्री. ( कु. ) लांकूड साफ करण्याचें यंत्र.

**दराज**—वि. दीर्घायु; कायम; धिप्पाड; दीर्घ; जास्त. 'दराज काय लिहिणें ! मुस्ताक जाणिजे हे किताबती.' –रा ११.२९. [ फा. दराझ् ]

**दराठा**—पु. जोराचें व धमकावणीचें भाषण; धमकावणी धाक; दरारा. ( क्रि० लावणें; मांडणें ). [ दरारा ]

**दराडणें**—अक्रि. खडसावून अगावर जाणें; दरडाविणें; आरडाओरड करणें; धाकधपटशा दाखविणें. [ दरडाविणें ]

**दराब**—पु. नाणें पाडणारा. भाइसंइ ८५. [ अर. झर्राब् ]

**दरारणें**—अक्रि. दरदरणें पहा.

**दरारा**—पु. १ जोराचें खडसावणें; धमकी. २ धाक; दबदबा; भीति; अधिकार इ०ची छाप ( क्रि० दाखविणें; बसविणें; बसणें ). 'कौरव भट भीतिकथन होय सुरांतहि महा दरारा हो।' –मोभीष्म ४.५०. [सं. दर; हिं. ]

**दरारां, दरारून**—क्रिवि. दरदरां, दरदरून पहा.

**दरिद्र**—न. १ गरीबी; निष्कांचनता; कंगालपणा. २ अभाव: न्यूनता; वाण; कमतरता. (अन्न, वस्त्र इ० जरूरीच्या पदार्थांची). –वि. गरीब; गरजू; कंगाल. 'आशा ज्यास दरिद्र तोचि समजे नैराश्य पै बाणतां।' (वामन स्फुटश्लोक ७४, नवनीत पृ. १४२. [ सं. ] **०दशा–दरिद्रावस्था**–स्त्री. गरीबीची, हलाखीची स्थिति. **०दामोदर**–पु. अत्यंत गरीब माणूस; ज्याच्या घरीं अठरा विश्वे दारिद्र्य आहे असा मनुष्य; दरिद्र्यांचा राजा. **०नाम संवत्सरे**–अत्यंत भिकारी अथवा त्याची स्थिति यांस लावावयाचा शब्द. **दरिद्रित**–वि. गरीबी आलेला; दैन्यावस्था प्राप्त झालेला. **दरिद्री**–वि. १गरीब; कंगाल, निष्कांचन. २ नीच: कद्रू; कंजूष; चिक्कू. ३ ( ल. ) अपुरा; न्यून; सडसडीत; रोडका; भिकारी इ०. **०नारायण**–पु. दरिद्रांचा कनवाळू; (ल.) महात्मा गांधी. **दरिद्री हाड**–न. गरीब हाड; गरीब आईबाप किंवा कूळ यांत जन्मलेला माणूस; हलक्या पैदाशीचें गुरूं.

**दरिया, दरियागर्क, दरियाव, दरियावर्दी, दरियाफून, दरियाफूती**—दर्या पहा.

**दरी**—स्त्री. लहान दरा; दोन टेकड्यांमधील खोल भगदाड; भेग; चीर. [ सं. ]

**दरी**—स्त्री. ( व. ) सतरंजी. 'दरी साहेबांच्या घरची आहे.' [ फा. हिं. ]

**दरी**—स्त्री. ( आगरी ) भातशेतीच्या बांधानजीक जो केर कचरा ( वेणून ) निघतो तो.

**दरीं अयाम**—क्रिवि. ( जुन्या कागदपत्रांत आढळणारा शब्द ). ऋतुंत; काळांत; आणीबाणीच्या वेळीं. [ फा. दरीन् अयाम ]

**दरीं, दरीन**—क्रिवि. ( जुन्या कागदपत्रींच येणारा शब्द ). ह्यामध्यें; यांत. [ फा. दरीन् ]

**दरीन**—क्रिवि. यांत. [ फा. दरीन् ]

**दरींबाब**—क्रिवि. या बाबतींत. [ फा. दरीन्–बाब ]

**दरींवख्त**—क्रिवि. या वेळीं. [ फा. दरीन् वख्त् ]

**दरींविला**—क्रिवि. या वेळीं; सांप्रत; मध्यंतरीं; या दिवसांत. [ फा. दरीन् विला ]

**दरींसूरत्**—क्रिवि. या गोष्टींत; या स्थितींत. [ फा. दरीन् सूरत् ]

**दरुणी(नी), दरुणी महाल**—पु. १ अंतःपुर; जनाना; जनानखाना. २–न. ( विशेष अर्थ ) सातारकर महाराजांच्या खास नेमणुकीस वस्त्रें, अलंकार, जमीनी, मोकासे किंवा रोख पैसा दिलेला खर्ची लिहिण्याचें मराठी दप्तरांतील सदर. [ फा. दरूनी= आंतील ] **दरुणीमहालकरी–पु.** अंतःपुरांतील अधिकारी ( यास दिवाणजीहि म्हणत ).

**दरुबंकी**—पु. अंतर्द्वारपाल. [ फा. ]

**दरु(रू)शन-षण**—पु. (काव्य.) पाहणें; दर्शन; अवलोकन; भेट. 'तुला कैसें देईल दरुषण।' –चिंतामणि कवि, ध्रुवाख्यान १२, ( नवनीत पृ. ४१२ ). 'ज्याचे घ्यावया दरुशन। महा प्रयत्नें करुनिया।' [ सं. दर्शन ]

**दरेटी**—स्त्री. इमारती वगैरेच्या दगडांवरील जकात.

**दरेमार**—पु. पर्वताच्या दरींत लोटून देऊन मारणें; कडेलोट. 'दरेमार तळवेमार होत।' –दा ३.७.६३. [ दरा+मार ]

**दरोग**—वि. खोटा; मिथ्या; बनावट. 'त्यावर इन्साफ करितां दरोग-बातील दिसोन आलिया उपेरी दूर केला. –रा २०.४७. [ फा. दुरोघ् ]

**द(दा)रोगा, दरोगेकरी**—पु. १ कचेरींतील मुख्य अधिकारी, देखरेख करणारा, पाहणी करणारा; खात्याचा मुख्य; पैरवी करणारा अधिकारी; मुकदम. 'महमद–पन्हा दारोगा हर्कान्याचा यास हुकूम जाला.' –रा ७.१००. २ साऱ्याचा पैसा देण्यापूर्वी ( चुकता होण्यापूर्वी ) शेतांतील उत्पन्न काढून नेण्यास प्रतिबंध करण्याकरितां नेमलेला अधिकारी; पोलिसांचा मुख्य अधिकारी; कोतवाल. ३ देखरेख; व्यवस्था; पाहणी; ताबा; हुकमत. [ फा. दारूघा ] **दरोगेगिरी–स्त्री.** दरोग्याचा अधिकार, काम.

**दरोडा**—पु. १ दरोडेखोरांचा हल्ला; घरधन्यास न जुमानतां बलात्कारानें घर लुटण्याची क्रिया. चोरांचा समुदाय टोळी.

(कायदा) पांच किंवा अधिक इसमांनीं कोणा मनुष्यास जीव घेण्याची वगैरे भीति घालून त्याच्या ताब्यांतून जंगम माल नेणें (पिनल कोड). (क्रि० मारणें; घालणें). [हिं.] **दरोड(डे)करी, दरोड(डे)खोर**–पु. चोरांच्या टोळींतील एक मनुष्य.

**दरोबस्त**—वि. एकूणएक; सर्व; अपवादाशिवाय सर्व; तमाम; संपूर्ण; कुल; इत्थंभूत; बिलकुल; झाडून सर्व. [फा.]

**दरोळ, दरोळणें**—दरवळ, दरवळणें पहा.

**दर्क, दर्कदार, दर्कपट्टी, दर्कार, दर्की असामी, दर्खास्त, दर्गा**—दरक इ० पहा.

**दर्गाह**—क्रिवि. केव्हांहि; हर्गीज. 'तुम्ही मौजे मजकुरचे वाटेस दर्गाह न जाणें.' –रा ११.३६. [फा. दर्गाह्]

**दर्ज, रज**—पु. (सुतारी) लांकूड साफ करण्याचा मोठा रंधा. [दर=भेग ?]

**दर्ज, दरज**—स्त्री. १ (दगडांच्या, विटांच्या दोन थरां-मधील इ०) भेग; चीर; फट; सांधा; शिवण (क्रि० करणें). २ (ल.) फूट; वितुष्ट. 'तुम्हांकडील उणें पडावें असें बहुतांचें मतें आहे. याजकरितां कोणाचे बोलण्यास दरज न चालेसें करावें.' –ख ५.२४४७. [फा. दर्ज़्] **दर्ज करणें**–चुन्यानें भिंतींतील भेगा भरून काढणें. **दर्जगिरी**–स्त्री. १ भिंत इ० तील भेगा चुन्यानें भरणें; टिपगिरी. (क्रि० करणें). २ (ल.) पत्रांत दोहों ओळींच्या मधील जागेंत चुकून राहिलेला मजकूर जो लिहितात तो.

**दर्ज**—पु. १ समावेशक. २ लिहिण्याची जागा. –वि. १ लिहिलेलें. २ दाखल. [अर.] **०करणें**–लिहिणें.

**दर्जा**—पु. १ पदवी; पद; अधिकार; पायरी; योग्यता; सर-कारी अधिकार, जागा. २ मुद्दा; गोष्ट. 'हे सर्व दर्जे नबाबयांचे ध्यानांत आहेत.' –रा १९.९१. [अर. दरजा]

**दर्जी, दरजी**—पु. शिंपी. [फा. दर्झी]

**दर्द, दर्दी, दर्बार, दर्बारी, दर्बार महशूर**—दरद, दर-बार, इ० पहा.

**दर्दुर**—पु बेडूक. 'जळीं दर्दुरा नावडे पद्मगंधू।' –मुरायुद्ध १५९. [सं.]

**दर्प**—पु. १ गर्व. २ धीटपणा; धाडसीपणा; बेगुमानपणा; साहस; निधडा उत्साह. ३ उग्र वास. ४ धाक; दरारा; छाप; आदरयुक्त भीति; दाब. ५ प्रतिबिंब. 'दर्पणी पुरुषु दर्पु लाही। परि शिरहीनु दर्पेनि कायी।' –गीता १. २०५. [सं.]

**दर्पटाण**—स्त्री. (गो.) घाण; उग्रगंध. दरपटाण पहा.

**दर्पण**—न. आरसा; अयना. 'प्रत्यक्षासी काय यावें गा प्रमाण। पाहतां दर्पण साक्ष काई।' –तुगा १२१६. [सं.]

**दर्पेश**—क्रिवि. पुढें. 'मुलाजमृतीचा मज्कूर दर्पेश केला.'–रा १.१८७. [फा.]

**दर्भ**—पु. १ यज्ञ, होमहवन यांत वापरण्याचें एक प्रकारचें पवित्र गवत. 'होईल तृणांत तृणसम यज्ञविहित तज्ज्ञमहित दर्भ कसा।' –मोभीष्म १२.५०. २ (ल.) जळालेलें, शुष्क झालेलें पीक. 'शेत करपून दर्भ झालें.' [सं. दर्भ; हिं. डाभ–ब; गु. डाभ–भो; सिं. डभु; पं. दब्भ] (वाप्र.) **०घेऊन उभा असणें**–दुसऱ्यास कांहीं इजा करण्याच्या संधीची वाट पाहणें. सामाशब्द– **०शिखा**–स्त्री. १ (दर्भाची काडी पेटवून इच्छित विषयाच्या पाठीस लागण्याचा एक मंत्र आहे त्यावरून) पिच्छा; तगादा; ध्यास. (क्रि० पाठी-मागें, पाठीशीं लावणें; बसणें). २ (ल.) न संपणारा पाठलाग; न चुकवितां येण्याजोगा त्रास, रोग, प्लेग. इ० [सं.] **दर्भासन**–न. दर्भाचें केलेलें आसन. **दर्भ्या**–पु. १ अन्त्यविधि चालविणारा ब्राह्मण; कार्टा. २ (ल.) दुर्दैवी; दरिद्री अपशकुनी माणूस.

**दर्भक**—पु घोड्याच्या पायास होणारा एक रोग. –अश्वप २.३८.

**दर्भदिवी**—स्त्री. चंद्रज्योत. –हंको.

**दर्म्यान, दर्मियान**—वि. दलाल; मध्यस्थ; जबाबदार; जामीन. 'दरम्यान मसुर घेऊन करा भरपाई, सोडा आम्हांला नानाला धाडिलें पत्र घ्यावी खंडणी होऊं दे सल्ला।' –ऐपो २३६. –क्रिवि. १ मध्येंच; मध्यंतरीं; ज्याचा रुकार घेणें जरूर त्याचा सल्ला न घेतां स्वतःच एखादें काम करणें. 'मला विचा-रिल्यावांचून दर्म्यान पागोटें कां नेलेंस.' २ (कों.) चिकटून; लागून; जवळ. 'भलतया कर्मी जाण। आपण राहतो दर्म्यान। बद्धतेसी कारण। तेंचि होय।' –सिसं ६२. [फा. दर्मियान्] **०गेणें**–मध्यस्थी करणें **०की-गिरी**–स्त्री. जामीनकी; मध्यस्थी. 'दर्म्यानकी बाळाजी शेट वगैरे मंडळी करीत आहेत.' –ख १०.५२९६. 'ते आमचे सेवक...त्यांची दर्म्यानगिरी तुम्हांकडे नाहीं.' –चित्रगुप्त ६९. **०दार**–पु. मध्यस्थ. 'दर्म्यान्दाराकडील लबाडी असेल, विचारानें घ्यावें.' –ख १०.५६१.

**दर्या, दर्याव, दरिया**—पु. १ समुद्र; मोठी नदी; सरोवर; पाण्याचा मोठा साठा, विस्तार. कचभुजचे गुराबेची लढाई साल-मजकुरी दर्यात होऊन' –वाडसमा १.११. २ (कु.) मोठी खाडी. [फा. दर्या] **दर्याई**–वि. समुद्रावरील; आरमारी. 'दर्याई व खुशकी फौजा.' [फा.] **दर्याक मारप**–सक्रि. (गो) समु-द्राला बळी देणें. **दर्याखोबरें**–न. खोबऱ्यांतील एक जात; झेरी-गोठला. –मुंव्या १४९. **०गर्क**–वि. समुद्रानें बुडविलेली (गांव, जमीन). **दर्यांत–दर्यामें खसखस**–पु. अतिशय मोठ्या वस्तूंशीं अगदीं क्षुल्लक वस्तूची तुलना. **दर्यांदर**–वि. (गो.) चांचा; लुटारू. **०महाल**–पु. नदी, सरोवर इ०कांच्या कांठीं बांध-लेला वाडा. **०वर्दी**–पु. खलाशी; नाविक; खारवा; नावाडी. [फा. दर्या-नवर्द+ई] **०विस**–वि. समुद्रकांठचा. 'दर्याविस तालुके मजकूरचे...' –समारो २.२.

**दर्याफ्त-स, दर्याफ्ती-सी**—स्त्री. आकलन; समजणूक; चवकशी; निर्णय; शोध; निकाल; समजावणी; खात्री. 'दक्षिणेतील एजंट याजकडे सर्व सरंजामांची दर्याप्ती होऊन वगैवारी करण्यास आरंभ झाला.'—इनाम ४२. [फा. दर्याफ्त]

**दरावणें**—सक्रि. (व.) बैलगाडी जोरानें पळविणें; दवडाविणें; धावडणें. [म. दवडणें-दवरणें; हि. दवडाना]

**दर्वाजकरी, दर्वाजा, दर्वेशी, दर्वान**—दरवाजकरी इ० पहा.

**दर्वी**—स्त्री. पळी; चाटू. [सं.]

**दर्वेवचें**—सक्रि. (गो.) भय बाळगणें; क्षिति बाळगणें. [सं. दर=भीति]

**दर्श**—पु. १ अमावास्या. २ या दिवशीं करावयाचें श्राद्ध. [सं.] ०**पूर्णमास**-पु. तेत्राग्नि (अग्निहोत्र) धारण करणाऱ्या अग्निहोत्र्यानें पौर्णिमा व अमावास्या याच्या नंतरच्या प्रतिपदेस करावयाचा याग.

**दर्शक**—वि. १ दाखविणारा; सांगणारा. २ (बीजगणित)घातप्रकाशक. ३ पाहणारा; प्रेक्षक; परीक्षक. ४ शास्त्र, कला इ० चा ज्ञाता; तज्ज्ञ; मर्मज्ञ. [सं.] ०**सर्वनाम**-न. नामाच्या मागें येणारा नामाचा निदर्शक शब्द; हा; तो. जसें:-'हा घोडा चांगला आहे.' 'तो मनुष्य चालतो आहे.'

**दर्शन**—न १ अवलोकन; पाहणें. २ स्वप्न; दृष्टांत. ३ धर्मसंबंधीं अथवा तत्त्वज्ञान संबंधीं सहा पंथ. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा. या शिवाय बौद्ध, जैन इ० मतें. 'न कळसी दर्शना धांडोळितां।'—तुगा ९२५. ४ (देव, देऊळ इ०ची) भेट; पहाणें; अवलोकन. ५ (ल.) दृष्टि. 'ना ना मावळतंनि तपनें। नेइजती लोकांचीं दर्शनें।'—ज्ञा १५.३६६. [सं.] -(**दृष्टि**)-स्त्री. (नृत्य) विशिष्ट वस्तूकडे विशिष्ट तऱ्हेनें पाहणें. याचे पुढील आठ प्रकार आहेत.— साचीकृत, अनुवृत्त, आलोकित, विलोकित, उल्लोकित, अवलोकित, प्रलोकित इ०. ०**कोन**-पु. (ज्योतिष) दोन दर्शनरेषा मिळून झालेला कोन. **पट्टि**-स्त्री. दार, खिडकी इ० च्या वर नकशी केलेली लांकडाची पट्टी. ०**प्रतिभू**-पु. जामीन; हमीदार. ०**रेषा**-स्त्री (ज्योतिष) एखाद्या पदार्थाकडे पाहत असतां डोळ्यांपासून पदार्थापर्यंत काढलेली जी रेषा ती. ०**संतुष्ट-संतोष**-वि. केवळ दर्शनानें तृप्त झालेला. ०**संतोषी**-वि. १ देखणा; डौली; चांगला दिसणारा. २ (ल.)कपाळकरंटा; देखणा पण कुचकामाचा; पोकळ दिखाऊ. ३ दर्शनानें तृप्त. **दर्शनी**-वि. १ पाहण्यासंबंधीं. २ देखणा; सुंदर; आल्हादजनक मुद्रेचा; दर्शनसंतोष. ३ दिखाऊ; देखाव्यासाठीं केलेला. जसें:- दर्शनी-घडी-खिडकी-दार-लुगडें इ० ४ समोरील; पुढील; अगदीं समोर दिसणारी (वस्तु). 'दर्शनी भिंत, बाजू.' ०**अंग**-न. १ वस्तूची चांगली, सुरेख बाजू. २ दिसणारी, पुढील, समोरील बाजू. ३ (ल.) दिखाऊ बाजू. ०**काम**-न. दिखाऊ, सुरेख, डामडौलाचें किंवा झळकफळक काम; समोर दिसणारें काम. ०**दरवाजा**-पु. पुढचा दरवाजा; महाद्वार. ०**देखावा**-न. (वास्तु.) पुढील बाजू, समोरील दृश्य भाग. फ्रंट इलेव्हेशन या इंग्रजी शब्दास प्रतिशब्द. ०**पट्टी**-स्त्री. दर्शनपट्टी पहा. ०**भिंत**-स्त्री. पुढची भिंत. ०**हुंडी**-स्त्री. पहाण्याबरोबर पटविण्याची हुंडी.

**दर्शनीय**-वि. पाहण्यासारखें; सुरेख; सुंदर; प्रेक्षणीय; मनोहर.

**दर्शविणें, दर्शाविणें**-उक्रि. १ दाखविणें; भासविणें; जाणविणें (अस्पष्टपणें, असंदिग्धपणें). २ सुचविणें; खुणाविणें; अंदाज करणें; अटकळ बांधणें; निर्देश करणें; समजाविणें; वरवर दाखविणें (अन्योक्तीनें, संकेतानें). [सं. दर्शन] **दर्शित**-वि. पाहिलेलें; दाखविलेलें. [सं.] **दर्शी**-वि. पहाणारा; द्रष्टा; दाखविणारा. (समासांत) गुण-छिद्र-दूर-दोष-परिणाम-सूक्ष्म-तत्त्व-दर्शी. [सं.]

**दल**—न. १ पान; दळ. २ फुलाची पाकळी. ३ भाग; हिस्सा (विशेषतः अर्धा). ४ सैन्य; लष्कर. [सं.]

**दलणें**—अक्रि. द्वेष करणें. -मनको [दे]

**दलदपट**—वि. मजबूत; बळकट; धिप्पाड; सशक्त (माणूस, जनावर); टिकाऊ; मजबूत; भक्कम; अवाढव्य (इमारत, खांब, कापड); जंगी; राक्षसी; जाड (पोळी, वस्तु). [धिप्पाड]

**दलदल-ली**—स्त्री. १ पाणथळ जमीन; रुपण; रेवण; चिखड; चिखलाची जमीन. २ पाणथळपणा. -क्रिवि. (ना.) लटलट हालत; थरथर कांपत. [हिं.] ०**णें**-अक्रि. थरथर, लटलट हलणें; कांपणें (पातळ सरस, पाक, रुपण, तक्तपोशी केलेली जमीन, भिजविलेलें पीठ, थलथलीत मास इ०). **दलदलाट**-पु १ पावलांनी तुडविण्याचा आवाज (जनावर, माणूस इ०कांच्या). २ अतिशय दलदलीतपणा. **दलदलात**-वि. १ दलदलीनें युक्त (जमीन). २ (ल.) शिथिल; लटलट हलणारें (शरीर); थलथलीत (मांस); फोपशा.

**दलन**—न. १ दळणें. २ फोडून तुकडे करणें; पीठ करणें; चुराडा करणें. [सं.]

**दलबादल**—न. सैन्य अथवा ढग यांचा जमाव; प्रचंड सेनासमूह. (क्रि० पडणें; जमणें; निघणें; भरून येणें). **दलबादल डेरा**-पु मोठा व शृंगारलेला डेरा (लष्करी अधिकाऱ्याचा). -वि. मोठा; भव्य; जंगी; प्रचंड; अनेक वस्तूंनीं भरलेला. उदा० 'दलबादल-डेरा-कारभार-कारखाना. [हिं. दल+बादल; फा. दिल्बादिल्]

**दलभंज(ग)न**—न. १ घोड्याचें अशुभ चिन्ह; यांत तोंडावर (किंवा पुठ्यावर) पांढरा पट्टा असून त्यांत काळा किंवा तांबडा भोंवरा असतो. या अशुभ चिन्हामुळें धन्याची संपत्ति नष्ट होते अशी समजूत आहे. २ (ल.) दुर्दैवी; फुटक्या नशीबाचा (माणूस). [सं]

**दळभार**—पु. १ सैन्याचा समुदाय; सर्व सैन्य; शक्ति: जोर: बळ. २ पायदळ (अश्व–गज–भार या प्रमाणें). [सं.]

**दळशिंगार**—पु. जीनगर, सैन्यांतील घोड्यांचे खोगीर व चामड्याचीं कामें करणारा. [सं. दल+शृंगारी]

**दलान**—न. दिवाणखाना; दालन. [फा.]

**दलामालकी**—स्त्री. १ दुसऱ्याच्या कामांत, धंद्यांत बिन-फायदेशीर ढवळाढवळ किंवा भागीदारी; हात घालणें. २ लांडा कारभार; फाजील लुडबुड. ३ त्रासदायक काम; कंटाळा येण्याजोगी खटपट: बारीकसारीक त्रास. [दलाली+मालकी]

**दलाल**—पु. अडत्या; मध्यस्थ; गिऱ्हाईक व दुकानदार या उभयतांचा व्यवहार मध्यस्थपणें बोलाचालीनें साधून देणारा माणूस. [अर. दल्लाल्] **म्ह०** दलालाच्या अंगावर घोडे पडत नाहींत= खालचा अधिकारी मुख्य अधिकाऱ्याच्या कामासाठीं जबाबदार नसतो. **दलाली**–स्त्री. १ अडत्याचें काम. २ त्याची मजूरी; अडत; अडतीची मिळकत. ३ माल वजन करण्याकरितां, माप घेण्याकरितां पडलेला कर; जकात. [फा.]

**दलित**—वि. १ दळलेलें; भरडलेलें. २ फोडलेलें; तुकडे केलेलें; चुरडलेलें; मोडलेलें. ३ तुडविलेले, खालीं ठेवलेले, चेपलेले, दाबलेले–हलकी जात, वर्ग; इं. डिप्रेस्ड क्लासेस यास प्रतिशब्द. [सं.]

**दलिद्दर**—वि. (व.) १ दरिद्री. २ चिक्कू. [सं. दरिद्र; हिं.] **०खाना–वाडा**–पु. १ (ना.) भिकारचोट माणसाचें घर. २ कंजूषपणाचा कारभार.

**दलेल**—स्त्री. (व.) शिक्षा; दंड; अद्दल. [अद्दल?]

**दलोंसे**—पु. (गो.)नारळाचा पाणी घालून काढलेला रस, दूध. [सं. दल+रस]

**दल्हें**—न. दळ्हें पहा.

**दव**—पु. १ वणवा; दावानल. २ अरण्य; वन. [सं.]

**दंव**—न. १ हिमतुषार; दहिंवर; रात्रीच्या समयीं जमीनीमध्यें गारठा उत्पन्न होऊन हवेंतील आर्द्रतेमुळें भूतलावर थेंब पडूं लागतात ते. २ दलदलीत जमीनीपासून निघणारा पाझर.[सं. द्रव]

**दॅवकारँ**—न. (गो.) देवाच्या नांवानें घातलेलें ब्राह्मणभोजन.

**दॅवचार**—पु. (गो.) एक पिशाच. [देव+चार–चाळा= पिशाच]

**दवड**—स्त्री. धाव. दौड पहा.

**दवडणें**—उक्रि. १ पळणें; धावणें; शीघ्र गमन करणें. २ भरधांव धांवण्यास लावणें; घालविणें; जबरदस्तीनें दामटणें; ताबडतोब रवाना करणें (निरोप, पत्र इ०).'श्रीनें रक्षक देवर शुचिभक्त परंतु दवडिला रागें।' –मोरा परंतुरामायण अरण्य २३. १.१३३. ३ सोडून देणें; फेंकून देणें; उधळणें; नासणें; उडविणें. ४ (ल.) (चांगलें नांव, कीर्ति, पैसा) गमाविणें; घालविणें; हरविणें: नाहींसें करणें (दूषण, संकट, रोग, दिवा) काढून टाकणें; नाहीसे करणें. 'असता दीपु दवडिजे।' –ज्ञा १.२४७. [सं. धाव्; हिं. दवडाना, दवडना] १ **म्ह०** तोंडावाटे काढावें आणि देशांतरास दवडावें. २ **म्ह०** हातचें दवडा आणि पळत्याचे पाठीस लागा. **दवडादवड–दवडी**–स्त्री.धांवाधाव; निकडीचें पाठविणें; रवानगी; धांवपळ.

**दवंडाळ**—वि. (बायकी) गप्पिष्ट; वाताड्या. [दवंडी]

**दवंडाळणें**—अक्रि. (व.) भलतीकडे झोके खाणें; मागेंपुढें करणें. 'पाळणा दवंडाळतो.' [दंडळणें]

**दवंडी**—स्त्री. १ डांगोऱ्याचें ढोलकें; ढांडोरा. २ (त्यावरून) जाहीर करण्याची बातमी. ३ (ल.) प्रसिद्धि; बभ्रा; दुर्लौकिक; डांगोरा: जाहीरनामा. [सं. डिंडिम=एक वाद्य; हि.] **दवंड्या**–पु. दवंडी पिटणारा.

**दवणशीर**—स्त्री. टांचेवरची मोठी शीर; धोंडशीर.

**दवणशेवती**—स्त्री. शेवतीची एक जात. हें झाड वीत–दीड वीत उंच वाढतें. याचें पान नक्षीदार असतें. यास वास फार असतो; पिवळी व पांढरी अशा हिच्या दोन जाती आहेत. फूल गेंदाप्रमाणें असतें. [दवणा+शेवती] **दवणशेवतें**–न दवण शेवतीचें फूल.

**दवणा**—न १ एक सुवासिक वनस्पति; याचा सुगंधी पदार्थांत उपयोग करतात: पानें गाजराच्या पानांसारखीं असतात. वास फार उग्र. याचीं झाडें घराच्या आसपास लावल्यानें घरांत सर्प येत नाहीं. सर्पाच्या विषावर दवण्याच्या मुळ्या व पानें खावींत अगर रस काढून घ्यावा; गुरासही गुण येतो. २ चैत्र महिन्यांत दवण्यानें कुलदेवतेची पूजा करण्याचा विधि. 'आज आमचे घरीं दवणा आहे, तुम्ही जेवावयास या. ३ गांडवळ; काड्. 'दुतोंडें दवणें श्रावण मासीं। मागूं गेलें शेषकन्येसीं.' [सं. दमनक; का. दवन] **०पुनव–पोर्णिमा**–दवणा अर्थ २ पहा.

**दवणा, दवा**—पु. (बे.) १ गुरांचा दलाल. २ नाइकिणींच्या पाठीमागें वाद्यें वाजविणारा माणूस. **दवणेगिरी**–स्त्री.(गो.) कुंटिणपणा.

**दवणें**—न. दवणा अर्थ ३ पहा.

**दवणें**—न. (गो.) दवंडी.

**दवदव**—स्त्री. दगदग; त्रास; खस्त; काळजी; दुःख; परिश्रम. (क्रि० काढणें; करणें; पुरवणें; पाडणें; निघणें). [देव! देव! फा. दवादौ–दव=श्रम, कष्ट?]

**दवना**—पु. दवणा पहा.

**दॅवपण**—न. (गो.) अंगांत वारें आल्यासारखें करून जें देवकृत्य करतात तें. [देव+पण]

**दवरचें**—अक्रि. (गो.) ठेवणें; राखणें.

**दवरणें**—न. (गो. कों.) रस्त्याच्या बाजूनें ओझीं ठेवण्याकरितां बांधलेला ओटा, कट्टा. –उक्रि. (कों.) (ओझें) खालीं ठेवणें.

**दवलत, दवलतज्यादा, दवलतदार**—दौलत इ० पहा.

**दवली**—स्त्री. (कु.) नारळाच्या नरोटीची पळी; डवली; डाव. [डवली]

**दॅवस्पण**—न (गो.) व्रतवैकल्य. [देव]

**दवा**—स्त्री. औषध; औषधीद्रव्य. [अर. दवाअ] ०**खाना**–पु. औषधालय. [फा.] ०**दारू**–स्त्री. औषधपाणी. [हिं.]

**दवात**—स्त्री. (काशी) दौत. [अर.]

**दवादवी**—पु १ जासूद; हर्कारा. २ आचारी; पाकपरिकर्मी. [फा. दवादव्=धांवाधांव]

**दँवारणें**—अक्रि. दंवानें दमट होणें. [दंव]

**दँवारा**—पु. दंवामुळें पिकणारे सावे. [दंव]

**दवाली**—स्त्री. (व) उमेद; ईर्षा. 'मग त्यानें दवाली उचलली व काम शेवटास नेलें.' [फा. दवादव=श्रम]

**दवासन**—न. १ घोडयाच्या गळयांतील दोहींकडे बांधावयाचें चऱ्हाट; गळबंद. २ (ल.) आडकाठी.

**दव्हणें**—अक्रि. (व.) (गुरांची) धार काढणें. [दोहणें]

**दश**—वि. दहा संख्या. (समासांत) दश–रात्र, दशावतार, दश–दिशा. [सं. ग्री. डेकॅ; लॅ. देसेम्; गॉ. तैहुन्; आर्मो. डेक; हिब्रू. देअघ्; लिथु. देझिंथिस्; स्ला. देस्यति; फ्रें. जिप्सी देश; आर्मेनियन लसे] **दशक**–पु. १ दहांचा समुदाय. २ (गणित.) घेतलेले–धरलेले दहा. ३ दर शेकडां दहा. **दशक चढविणें**–वर्चस्व स्थापणें, बसविणें. **दश–कंठ–कंधर–ग्रीव–मुख**–पु. रावण. [सं.] ०**कामजव्यसन**–न. काम (इच्छा) यापासून उत्पन्न होणारे दहा दुर्गुण:–शिकार करणें, जुवा खेळणें, दिवसां निजणें, शिव्या देणें; रांडवाजी, दारू पिणें, नाचणें, गाणें, खेळणें, ढोंगीपणा इ०. ०**ग्रंथ**–पुअव. वेद व त्याचीं उपांगें; संहिता, ब्राह्मण, आरण्यक, आणि शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंटु, निरुक्त, छंद, ज्योतिष. [सं. दश+ग्रंथ] ०**ग्रंथी**–वि. वरील दशग्रंथ पढलेला. ०**दानें**–नअव. दहा दानें; गो, भूमि, तिल, सुवर्ण, घृत, वस्त्र, धान्य, गूळ, लवण (मीठ), रुपें. ०**दिशा**–स्त्रीअव. या पुढील प्रमाणें आहेत:–पूर्व; पश्चिम, दक्षिण, उत्तर या मुख्य दिशा, व आग्नेयी, नैर्ऋत्य, वायव्य, ईशान्य या चार उपदिशा, आणि ऊर्ध्व व अधोदिशा. –क्रिवि. सर्व दिशांना–बाजूंना; सर्वत्र; चहूंकडे (क्रि० पळणें; फाकणें). ०**देह**–पुअव. (वेदांत) दहा देह. 'चारी पिंडीं च्यारी ब्रह्मांडीं। ऐसी अष्ट देहाची प्रौढी। प्रकृतिपुरुषांची वाढी। दशदेह बोलिजे।'–दा ८.७.४१. ०**नाडी**–स्त्रीअव. (योग.) दहा नाडया: इडा, पिंगला, सुषुम्ना, गांधारी, जीवनी, दशतुंडी, दीक्षा, बाणदशा, शंखिनी, आणि सौक्षिणी या दहा. –कथा ७.१.८६।८७. ०**नाद**–पुअव. चिणी, चिंचिणी, घंटा, शंख, तंत्री, ताल, वेणु, मृदंग, भेरी व मेघ (याचा नाद, रव). 'तया कमळाचया सुगंधें। जीवभ्रमर झुंकारे दशनादें।'–स्वादि ९.५.३६. ०**नाम संन्यासी**–पु.अव. गिरी, पुरी, भारती, आनंद, चैतन्य, पर्वत, सागर इ० संन्याशाचे दहा पंथ. ०**पाद**–पु. कुरली, झिंग्या खेंकडा इ०. दहा पायांचे कीटक, प्राणी. (इं.) डेकॅपोडा. ०**पिंड**–पु. अव. मृत मनुष्यास पहिल्या दिवसापासून दहा दिवसपर्यंत दररोज एक किंवा दहाव्या दिवशीं एकदम द्यावयाचे भाताचे दहा पिंड. ०**भुजी**–स्त्री. दहा हातांची दुर्गादेवी. ०**मुख**–पु. रावण. ०**मूळ**–न. दहा वनस्पतींच्या मुळांपासून केलेलें औषध हीं मुळें:– बेल; टाकळा, टेंटू, शिवण, पाडळ, साळवण, गोखरू, पिठवण, डोरली व रिंगणी अशीं आहेत. ०**रथ ललिता–रथ थळी**–स्त्री. आश्विन कृष्ण चतुर्थीच्या रात्रीं करावयाचें एक व्रत, तत्संबंधीं गणपतीपूजन. ०**रात्र**–न. दहा दिवस, रात्री; दशाह. ०**वंत**–पु. (शीखधर्म) स्वतःच्या उत्पन्नाचा धर्मासाठीं एकदशांश भाग द्यावयाचा. ०**विध**–वि. दहा प्रकारचें. ०**हरा–हार**–पु. दशाहरा पहा. **दशम**–वि. दहावा. **दशमग्रह**–पु. (विनोदानें) जांवई. **दशम-द्वार**–पु. (योग.) १ पोत; एखादी जखम वाहण्याकरितां उघडी रहावी म्हणून तींत जी वात घालतात ती. २ ब्रह्मरंध्र (शरीरास नऊ द्वारें आहेत तीं सोडून टाळूवरील). ३ (सांकेतिक) गुद. **दशम-भ्रांती**–स्त्री. मोजतांना एखादा मनुष्य आपणा स्वतःस विसरतो त्यावेळीं म्हणतात. गोष्टींत दहाजणांची मोजणी करतांना मोजणारा स्वतःस विसरला त्यावरून). **दशमानपद्धति**–स्त्री. मेट्रिक सिस्टिम या इंग्रजी शब्दास प्रतिशब्द. या पद्धतींत मीटर हें परिणाम धरलें जातें व इतर परिमाणें दसपटीनें अगर दहाव्या हिश्शानें चढत उतरत जातात. १ मीटर=१.१ यार्ड-वार. ०**मांश**–पु. १ दहावा भाग; दशांश. २ (ल.) टाइथ या बायबलांतील इंग्रजी शब्दास प्रतिशब्द. 'त्यानें अब्राहामापासून दशमांश घेतला.' –हिब्री ७.६. **दशमी**–स्त्री. १ चैत्रादि महिन्यांच्या दोन्ही पक्षांतील दहावी तिथि. २ दशमी दशा; मानवी जीवयात्रेचा शेवटचा अथवा दहावा भाग. **दशांक**–पु. दहाचा आंकडा. **दशांक चिन्ह**–न. नागाच्या फणीवरील दहाच्या आंकडया सारखें चिन्ह. **दशांग**–न. चंदनादि दहा सुगंधीद्रव्यांचा धूप. **दशांगुळें**–नअव. १ दहा बोटें. 'तो परमात्मा दशांगुळें उरला।' २ आठव्या महिन्यांत गर्भास दहा बोटें उत्पन्न होतात म्हणून गर्भवती स्त्रीचा त्यावेळीं करावयाचा एक संस्कार. ३ दोन हातांच्या दहा बोटात घालावयाचा एक दागिना. 'पोल्हारें विरुद्या दशांगुळिं वळीं गजोंनियां पोंचटें।'–अकक २ अनंत–सीतास्वयंवर ३९. **दशांतला**–वि. ज्याचें सुतक दहा दिवस धरावें लागतें अशा नात्यांतला.

**दशावतार**–पुअव. मत्स्य, कच्छ, वराह, नारसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध व कलंकी हे दहा अवतार. **दशावतारी**–र–पु. १ वरील दशावतारांचें सोंग घेणारा, नाटक करणारा. ' खेळतां नेटकें दशावतारी । ' –दा ६.८.११. २ वरील दशावतारांचीं ज्याच्यावर चित्रें आहेत अशा खेळण्याच्या गंजिफा. याचाच चंगकांचनी हा एक प्रकार. **दशावधानी**–वि. एकाच वेळीं अनेक गोष्टींचें व्यवधान ठेवणारा. **दशांश**–पु. दहावा हिस्सा. **दशांश अपूर्णांक**–पु. ( गणित ) दहा किंवा त्याचा कोणता तरी घात, ज्या अपूर्णांकाचा छेद असतो तो. **दशांश–गुणाकार – भागाकार – मिळवणी–वजाबाकी–भांजणी–त्रैराशिक– पंचराशिक**–पु. दशांश अपूर्णांकांचा गुणाकार, भागाकार इ०.**दशांश चिन्ह**–न. अमुक संख्या दशांश अपूर्णांक आहे हें दाखविण्यासाठीं त्या अपूर्णांकाच्या मागें केलेलें ( . ) असें चिन्ह. **दशाह**–पु. १ सुतकाचे दहा दिवस. २ दहा दिवसांचा काळ. **दशाहरा–हार**–पु. १ ज्येष्ठ शुद्ध दशमी. या दिवशीं गंगा अवतरली. या दिवशीं बहुधा पुढील दहा योग येतात. ज्येष्ठमास, शुक्लपक्ष, दशमी, बुधवार, हस्तनक्षत्र, व्यतीपात, गर करण, आनंद योग, कन्येचा चंद्र व वृषभेचा रवि. २ ज्येष्ठशुद्ध प्रतिपदेपासून दशमीपर्यंतच्या दहा दिवसांचा काळ व त्यांतील गंगोत्सव. **दशेंद्रियें**–नअव. पांच ज्ञानेंद्रियें ( डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा ) आणि पांच कर्मेंद्रियें (हात, पाय, वाणी, गुद व उपस्थ)मिळून दहा इंद्रियें. **दशोपनिषदें**–नअव.–ईश,केन, कठ, मुंडक, मांडुक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक व प्रश्न.

**दंश**—पु. १ नांगी मारणें; डसणें. २ चावा, डांस. ३ (ल.) मुद्दा; खोंच; वर्म; मर्म ( भाषणाचें कामाचें ). ' हा दंशु जंव नये हातां । ' –ज्ञा ९.१३६. ४ (ल.) आकस; डाव; डुरस; अदावत; हाडवैर. ५ (ल.) ग्रंथांतील कठिण भाग; गूढाभिप्राय. ६ डांस; वनमक्षिका. ' कौरवभट दंश मशक विजयधनुर्वल्लि काय ती चवरी । ' –मोभीष्म ११.५३. [सं.] **दंशक**–वि. डसणारा. **दंशन**–न. चावा; डसणें; दंश. **दंशित**–वि. चावलेला; डसलेला. **दंशी**–वि. १ चावणारा. २ मत्सरी; खुनशी; मनांत द्वेष धरणारा; डंखी.

**दशाकु**—पु. दहांचा समुदाय-दशक. ' तेवींचि दशाकुही मेळविजे । महातेजांचा । ' –ज्ञा ११.२३९. [ दश ]

**दशन**—पु. दांत. [ सं. ]

**दशमी**—स्त्री. कणीक अथवा जोंधळे, बाजरी इ० च्या पीठामध्यें दूध घालून केलेली भाकरी; ही फळांचे रसांत पीठ भिजवून किंवा पीठ भाजूनहि करतात ( ओवळयानें खाण्यास पूर्वी ही चालत असे ). [ सं. दह्=भाजणें ]

**दशमी**—दहावी तिथी. - वि. दहावी. ०**दशा**–स्त्री. माणसाच्या आयुष्यांतील शेवटची अवस्था.

**दशा**—स्त्री. १ अवस्था; स्थिति. २ आयुष्यांतील बाल्य, तारुण्य इ० अवस्था, स्थिति. ३ दैन्य, अडचण, दुःख, त्रास इ०ची स्थिति; वाईट दिवस. ' आतां तेंचि करंटा म्हणतील मला असी दशा आली । ' –मोकर्ण ६ २४. ४ ( ज्योतिष ) जन्मकालीन ग्रहांची स्थिति: सुखदुःखादि फल प्राप्त होण्यास कारणीभूत ग्रहांची स्थिति; उदा० महादशा, अंतर्दशा पहा. ५ दशीचें अव कापडाचे न विणलेले शेवटचे दोरे, सुतें. उदा० दशांचें पागोटें, धोतर [सं ] ०**वचप**–अक्रि. ( गो. ) निलाजरा होणें.

**दशाश्व**—पु. चंद्र. –शर. [ सं. ]

**दशी**—स्त्री. कापडाच्या टोंकाचा न विणलेला दोरा, सूत. ( विणकाम ) रकटनच्या पुढें चार बोटें नुसता असलेला उभार. [ सं. दशा ] **म्ह०** कांबळयाची दशी आणि पासोडया ऐशी=एक कांबळयाची दशी ऐंशी पासोडयांपेक्षां थंडी निवारण्याच्या कामीं अधिक असते. ०**वाहणें**–शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं चंद्राकडे जुन्या वस्त्राची दशी फेकतात व जुनें वस्त्र घे व नवें वस्त्र दे असें म्हणतात ती क्रिया. **दशांचें पागोटें**–न. सुटया दशा असलेलें पागोटें. **दशीर**–स्त्री. ( गो. ) दिव्यांतील वात.

**दष्ट**—वि. चावलेला. [ सं. ]

**दस**—वि. दहा. [सं.] **म्ह०** १ दसकीलकडी एकका बोजा= प्रत्येकानें थोडथोडा हात भार लाविला तरी सर्वांमिळून मोठें कार्य होतें. २ दस गेले पांच उरले=आयुष्याचा बराचसा भाग गेला व थोडा राहिला. **दसक**–पु. दहांचा समुदाय. ०**दोनबारा**–पुअव. फांशांवरील बारांचें दान (दोहोंवर पांच पांच व एकावर दोन ठिपके). ०**नहाण–न्हाणें**–न. लग्नानंतर दहाव्या दिवशीं जोडप्यास घालावयाचें अभ्यंग स्नान. ०**नामा**–पु.पंचामार्फत चौकशी. ०**पिंड**–दशपिंड पहा. ०**प्यादा**–दोन फांशांवरील प्रत्येकीं पांच व एकावर एक असें मिळून अकरांचें दान. **दसक**–पु ( अंकगणित ) १ हातचे घेतलेले दहा. २ वरचष्मा; वरचढपणा; वचक; वर्चस्व. (क्रि० चढणें; घेणें; ठेवणें; बसविणें; चढविणें; बाळगणें). **दसम**–स्त्री. (गो.) दशमी तिथि. **दसरात पंचरात**–स्त्री. एक प्रकारचें दिव्य; यांत फिर्याद किंवा साक्ष दिल्यानंतर दहापांच दिवसांत फिर्यादीचीं मुलें किंवा गुरेंढोरें मेलीं तर तो खोटा व न मेलीं तर खरा समजून चौकशी करण्यांत येई. ०**वंदन**–न. दसनहाण पहा.

**दसकत**—स्त्री. दस्कत पहा.

**दसकों**—वि. (गो.) १ दोन्ही पक्षांतर्फे खेळणारा. २ चहाडखोर.

**दसडी**—दसोडी पहा.

**दसरंग**—पु. (कुस्ती) एक डाव; आपणाला कोणी खालीं घातल्यास आपला एक हात जोडीदाराचे पोटाखालीं घालून आपण त्याच बाजूनें फिरून जोडीदारास चीत करणें. आपला एक पाय जोडीदाराच्या पिंडरीवर घालून जोडीदाराची पिंडरी आपल्या त्याच पायाच्या पंज्याच्या सांध्यानें धरावी व आपण त्या बाजूनें फिरून जोडीदारास चीत करावें.

**दसरा**—पु. आश्विन शुद्ध दशमी; विजयादशमी; हिंदूंचा एक मोठा सण. या दिवशीं राम, रावणावर चढाई करण्याकरितां निघाले म्हणून, तसेंच हा देवीचा सण आहे म्हणून नवरात्र झाल्यावर या दिवशीं शमीचें व शस्त्रांचें पूजन करून मोहिमेवर जावयाचें असा मराठेशाहींत क्रम असे. [सं. दशाह] **म्ह०** दसऱ्यांतून जगेल तेव्हां दिवाळीचा दिवा पाहील. **०झडापट्टी**—स्त्री. दसऱ्याच्या दिवशीं नवीन निशाण उभारावयाचें असतें त्याबद्दलचा कर. **०पट्टी**—स्त्री. १ दसऱ्याच्या दिवशीं बसविलेला जमाबंदीचा हप्ता. २ दसऱ्याच्या खर्चाकरितां निराळा काढलेला देवस्थानच्या उत्पन्नाचा भाग. **०बकरा**—पु. १ दसऱ्याच्या दिवशीं बळी द्यावयाचा बोकड. २ दसऱ्याच्या दिवशीं पाटील, कुळकर्णी यांचा हक्क म्हणून द्यावयाचा बोकड अथवा बकरें. **दसऱ्या वाजप**—पु. एक मोठें वाद्य (दसऱ्याला वाजणाऱ्या पुष्कळशा वाद्यांच्या नादावरून).

**दसाडें**—न. १ दशी पहा. २ तेलाच्या घाण्यांतील तेल पुसून काढण्याकरितां केलेला सुताचा, कापसाचा बोळा; जाडेंभरडें कापड. [सं. दशा]

**दसोडी**—स्त्री. (निंदाव्यंजक) कापडाची, वस्त्राची दशी 'तुका म्हणे तुझी नलगे दसोडी।' —तुगा ८४७. 'तोडावें जेंवि लीलेनें कंबलाच्या दसोडिला।' —मो. अंबरीषाख्यान २३ (नवनीत पृ. ३६३). [सं.]

**दस्कत, दस्खत**—नस्त्री. १ हस्ताक्षर. २ सही; निशाणी. 'त्याजवरी शिक्का दस्कत तुम्ही करीत जाणें.' —वाडबाबा १.१४७ ३ हस्ताक्षराचें पत्र. [फा. दस्त्‌+खत्]

**दस्कला**—पु. चामडयाचा बंद. [अर.]

**दस्त**—पुन. १ कर; पट्टी; सारा. २ (गंजीफा) हात (चार पानांचा). ३ (ल.) ताबा; हक्क; सत्ता; अधिकार; अम्मल. 'डोलेझांक करून तसेंच देशास कजिया सोडून यावें तर तमाम दस्त उठेल.' —रा ३.१४९. ४ (जुन्या कागदपत्रांत) हात. ५ (व.) जुलाब; ढाळ. ६ शेला; दुपट्टा. ७ कैद. 'दस्त करा शिवराजाला।' —ऐपो १४. [फा. दस्त=हात] **दस्त करणें**—जबरीनें घेणें; पकडणें; कैद करणें; जिवंत धरणें. सामाशब्द— **०अंमल**—पु. गांवचा वसूल, हिशेब. **०ऐवज**—पु. (कायदा) अक्षरें, अंक किंवा खुणा या साधनांनीं पुरावा म्हणून उपयोग व्हावा या इरायानें कांहीं गोष्ट व्यक्त केली आहे असा लेख; हातचा कागद; प्रमाणपत्र; हक्कपत्र; कबाला; करारनामा; सही; ज्याच्या योगानें एखादा मनुष्य कायद्यांत बांधला जातो अशी कोणतीहि गोष्ट (लेख, तोंडीं वचन, खूण, हमी, लिहिलेला कागद इ०). (इं.) डॉक्युमेंट. [फा. दस्त-आवीझ्] **दस्तक**—न. १ परवाना. २ (कु.) तोंडी अगर जबानी पुरावा. ३ जकातमाफीचें सरकारी पत्र. ४ आज्ञापत्र. 'मार्गी मुजाइम न होतां सुखरूप जाऊं देणें म्हणोन दस्तक.' —वाडबाबा २.१४५. [फा.] **०खत**—न. १ हातचा लेख; सही. २ राजाची सही. ३ सही, शिक्का किंवा तो करण्याचा अधिकार. **०खत दप्तर**—न. सह्या घेण्याची व दप्तर ठेवण्याची कचेरी. **०गिरी**—स्त्री. १ मदत; साह्य 'श्रीमंत माझी दस्तगिरी करतील.' —रा १.१५७. २ स्नेह; कृपा. **०गीर**—वि. कैद; बद्ध. 'दस्मालबेग दस्तगिरींत आला.' —दिमरा २.२६. **०दराजी-झी**—स्त्री. जुलुम; त्रास. 'बाजे विलायत सिवा मलऊत नामें आपल्या दर्कबजेत आणून दस्तदराजी करितो.' —रा १६.७६. **०नी**-स्त्री. (चिलखताच्या) मुठीची दोरी. [फा.] **०बाज**—पु. १ दस्तक; परवाना; कौल; अभयपत्र. २ अभयहस्त. [फा.] **०पा(पे)शी**—पु. हस्तस्पर्श. **०बाकी**—स्त्री. १ जमीनीचा सारा गोळा करून जमाखर्चे दप्तरी दाखल न केलेली रक्कम; (मामलेदाराच्या) हातीं राहिलेली बाकी; याच्या उलट शिस्तबाकी=योग्य येणें असलेली बाकी. २ शिल्लक (जवळ असलेली). **०बोसी**—स्त्री. हस्तचुंबन. [फा.] **०माल**—पु. भुजवस्त्र —शर. **०रस**—पु. बंदोबस्त; जप्तरस. 'दस्तरस सर्व आपला आहे.' —ऐटी २.७२. **०रुमाल**—पु. खिशांतील हातरुमाल. 'वैराग्याच्या वेगानें फडकणाऱ्या भगव्या झेंडयाला दारूबाजाचें तोंड पुसण्याचा दस्तरुमाल केला.' —गडकरी—राजसंन्यास ७५. [फा. दस्त+रुमाल्]

**दस्तकी**—पु. (व.) लवाजमा, रुसूम किंवा पोलिटिकल पेन्शन घेण्याची सनद ज्याच्या नांवानें असते तो (घराण्यांतील मुख्य मनुष्य).

**दस्तन**—स्त्री. सैन्यांतील संख्येचें विशिष्ट परिमाण; मराठयांच्या फौजेंत ११ शिपायांची एक कुंपीन, १०० कुंपीनीची एक पलटण, ११ पलटणींचा एक कंपू, व ११ कंपूची एक दस्तन. [फा.]

**दस्ता**—पु. १ चोवीस कागदांची गड्डी. २ बंदुकीचा मागचा लांकडी भाग. ३ सैन्याची तुकडी. ४ दस्त अर्थ २ पहा. ५ बत्ता. ६ मूठ; पकड; भाता. ७ तुंबा. [फा. दस्ता]

**दस्ताकी**—स्त्री. बाकी; शिल्लक. [फा.]

**दस्ताना**—पु. १ हस्तत्राण; गोधाचर्म; धनुष्याच्या दोरीचा आघात हातास लागूं नये म्हणून कोंपरापासून बोटापर्यंतचा चामडयाचा, लोखंडी हातमोजा. २ हातचे दहा. [फा.]

**दस्तायवज, दस्तावेज, दस्तैवज**—पु. दस्तऐवज पहा. **दस्तायेवजी, दस्तैवजी**-वि. विश्वसनीय; प्रमाणभूत; लेखी;

दस्तऐवज होण्यासारखा (लेख, भाषण इ०). [फा.] ०वायदा-पु. लेखी करार.

**दस्तार**—स्त्री. पागोटें. [फा दस्तार] ०बदल-स्त्री. पगडी बदलून मैत्री करणें; पगडभाई होणें. ०बंद-पु. पगडीवाला. 'पलटणांपैकीं दस्तारबंद.' -ख ८.४४०८.

**दस्ताविणें**—सक्रि. लुबाडणें; हिसकून घेणें; हात घालणें. [फा. दस्त्]

**दस्ती**—स्त्री. १ चाल; रीत; मार्ग; पद्धत; तऱ्हा; ठसा, छाप; स्वभावसूचक अथवा ओळखण्याचा विशेष; ऐट; लक्षण; पद्धत. 'त्याची दस्ती नाहीं कोणाला।' -ऐपो ३२६. २ (कुस्ती) पवित्र्यानंतरची सलामी. (क्रि० करणें). ३ दसऱ्याचा नजराणा. [फा. दस्त=हात]

**दस्ती**—वि. सरकारी कर बसविण्यास योग्य (झाड, शेत इ०). [फा. दस्त्=हात] ०बाद-वि. कर माफ असलेला. ०बूज-स्त्री. गंजिफांच्या खेळांतील एक शब्द.

**दस्तुरी**—स्त्री. १ मजुरांना काम मिळवून देण्याबद्दल घेतलेली अडत; कर; जकात. २ रस्तापट्टी; नाकेंपट्टी; नाकें. ३ (कु.) ओझें; सामानसुमान; बाडबिछात [फा. दस्तुर्+ई]

**दस्तूर**—पु. १ पूर्वापार वहिवाट; पद्धत; चाल; प्रघात. २ जकात; कर. ३ नियम; कायदा. ४ हस्ताक्षर; लेख; लेखक किंवा त्याची निशाणी. ५ कारकुनाची सही. ६ नमुना (सरकारी कागदाचा). ७ परवानगी. [फा.] ०अम्मल-पु १ सरकारी कायदा. २ कायदेशीर शिरस्ता; वागण्याचा नियम. म्ह० दस्तूर अम्मल कीं अम्मल दस्तूर=कायद्याप्रमाणें अंमल कीं स्वतःच्या लहरीप्रमाणें कायदा. ०खुद-वि. स्वतःच्या हातानें लिहिलेलें (पत्र, कागद इ०). याच्या उलट कारकुनानें लिहिलेलें. [अर.]

**दस्तूर**—पु पारशी धर्मगुरू.

**दस्तेकरी**—पु विडयांची पानें संभाळणारा नोकर [फा.]

**दस्यु**—पु. १ असुर. २ चोर. ३ दास [वै. सं.]

**दहं**—अ. संख्येच्या मांडणींत उजवीकडून डावीकडे दुसरें स्थान; दशमाचें स्थान. [सं. दश]

**दहक**—पु. १ शेंकडा दहा; शेंकडा १० चा दर. २ पट्टी; कर. ३ दहावा हिस्सा. ४ पत्त्यांतील दश्या; दहिल्या. ५ दसक पहा. [सं.दशक] ०पट्टी-स्त्री. इनाम जमीनी सोडून इनामदाराकडून अवांतर उत्पन्नावर घ्यावयाचा कर. हा दर दहा वर्षांनीं वसूल करतात.

**दहन**—पु. अग्नि.-न. जळणें; दाहन पहा. [सं.] **दहनीय**-वि. जळण्यास योग्य; ज्वालाग्राही.

**दहर**—वि. (व) द्रोही. [सं. द्रोह]

**दह(हि)ल्ल-ल्या**—पु. (पत्त्यांतील) दश्या; १० ठिपक्यांचें पान.

**दहशत**—स्त्री. भीति; धास्ती; धाक; भय; धडकी. [अर. दह्शत]

**दहा**—सवि. १ एक संख्या; १०. २ (ल.) चारचौघे (लोक, समाज). 'धर्मा होइल दहांत कुत्सा हें।' -मोभीष्म ११.७३. [दश पहा. सं. दश; लॅ. डेसेम; हिं. दस; सिं. डह]

**दहा**—पु. दाह; जळणें. [सं. दह्]

**दहाक**—न. एक गोंडी वाद्य. हें मोठ्या डमरूसारखें असतें. [ध्व.]

**दहाट**—वि. तळख; जलाल; तापट; तामसी. 'अचाट जाट ते दहाट आट काट मीळती।' -अकक २. अनंत सीतास्वयंवर २३. [धीट?]

**दहिंवड**—पु. एक वृक्ष.

**दहिंवर**—पु. दंव; हिम. [दंव] ०णें-दंवयुक्त होणें; दंवारणें.

**दहीं**—न. विरजलेलें दूध. [सं. दधि] **दहींखाऊं कीं महींखाऊं**=मनाची संदिग्धावस्था. **दहींमहीं करणें, खाणें**-टंगळमंगळ करणें; कांकूं करणें. **दहीं दहिंकवडी**-स्त्री. खडबडीत व अतिशय पांढरी कवडी. 'दहींकवडया टाकून प्रश्नांचीं उत्तरें यावीं।' -अरुणोदय १५. **दहींकाला**-पु. उत्सवाच्या अखेरच्या दिवशीं एका मडक्यांत दहीं व लाह्या घालून ती हंडी टांगतात व मग ती फोडून त्यांतील हातीं लागलेला भाग देवाचा प्रसाद म्हणून खातात तो. **दहींभात**-पु. दह्यात कालविलेला भात. **दहींहंडी-दह्(ह्यां)डी**-स्त्री. दहीं ठेवण्याचें मडकें. **दह्याची कवडी**-स्त्री. दह्याचा गोळा.

**दहूत**—स्त्री. दउत पहा.

**दहेलज**—स्त्री. (ना.) घराच्या, वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या आंतील बाजूला असलेली खोलीवजा बैठक; देवडी. [सं. देहली]

**दळ**—न. १ दल अर्थ १ ते ४ पहा. २ ओंव्याचें औषधी चूर्ण. ३ सत्त्व; सार; मगज; गर, गाभा; रस (फळें, पानें, जमीन यांतील). ४ फळांतील मगज; गर; जाडी (कागद, पान, हिरा इ०ची). ५ कीट; घाण; फळांतील आठळी (टाकून देण्याची). ६ कवच -हंको. [सं. दल] ०खुंट-पु. (विणकाम) वैलीच्या पुढचा खुंट. ०दार-वि. जाड; गिरदार; सत्त्वांशयुक्त; भरदार; कसदार (फळ इ०). ०भार-पु. १ सर्व सैन्य. २ पायदळ. ०वयी-वई-वायी, दळवै-वी-पु. १ सेनापती. 'असोहे आठइ। भाव राउळीचे दळवइ।' -ऋ ६६. २ एक आडनांव. ३ हैदरच्या पूर्वी म्हैसूरच्या मुख्य प्रधानाची पदवी. [सं.दलपति; दलवाही] ०वट-वटा-पु. १ तुडविलेली स्थिति; वर्दळ; तुडवणी; राबता. 'ह्या वाटेला फौजेचा दळवटा आहे.' २ दळणवळण; एकमेकांशीं संबंध; येजा.

३ तुडवणीची खूण; माग. (क्रि० काढणें; लावणें; निघणें; लागणें). ०वाड-वाडें-पु (काव्य) समुदाय; सैन्य; गर्दी; जमाव 'ढांडोळितां उपमेचें दळवाडें।'-ऋ १८. -वि. संपूर्ण. ०वेपण-न. सेनापतित्व. ०शिंगार-पु दलशिंगार पहा.

**दळण**—न. १ दळणें. २ दळावयाचें, दळलेलें धान्य; वैरण. ३ (राजा.) दळणवळण; डळण; परिचय; समागम. ४ (ल.) रेंगाळत केलें जाणारें काम. ५ आचरण. -शर. [सिं. दलन] ०**करी-करीण**-पुस्त्री. धान्य दळणारा-री. ०**कांडण-भरडण**-न. दळण, कांडण यांस व्यापक शब्द; मोलकरणीचीं घरांतील ढोबळ कामें ०**वळण**-न. परिचय; जाणेंयेणें; ओळख; समागम; व्यवहार. [दळण+प्रकर्षात्मक वळण=परिचय] **दळणावळ, दळाई**-स्त्री. दळण्याची मजूरी, मोल **दळणें**-सक्रि. पीठ करणें; चूर्ण करणें (धान्य इ०चें). म्ह० दळील तो भरील करील तो पावील. **दळर**-न. १ (राजा.) दळणें. 'गीत जैंवि दळपात।' -मोकर्ण १२.१६. २ दळण्याचें धान्य; दळण. ३ दळण्याचें मोल; मजुरी.

**दळदपट**—वि. दलदपट पहा.

**दळभद्या**—वि. भित्रा; दुर्दैवी.

**दळभिड**—पु. १ समुदाय. २ कांती; प्रकाश. 'आंगचेनि दळभिडें।'-शिशु ४०७.

**दळमळ-मळण-मळीत**—डळमळ इ० पहा.

**दळया, दळद्या**—पु. लाडू. दळिया पहा. -वि. १ दळण्याला योग्य. (जाड व मोठा तांदूळ इ०). २ (निंदार्थी) बायकांची दळण कांडणाचीं कामें करणारा (पुरुष). ३ रडक्या (हरिदास); दळभद्रा. [दळणें]

**दळवटणें**—उक्रि. १ नुकसान होईलसें तुडविणें (शेत, जमीन) खराब होणार नाहीं असें तुडवून दाबणें. २ मोठा होणें; मळणें; मळविणें (जनावरें, माणसें, इ० जाऊन रस्ता). ३ वाईट प्रकारानें वागविणें; दामटणें (जनावर, वस्तु); कामानें, वापरण्यानें (जनावर, वस्तु) वठणीस आणणें; नरम करणें; माणसाळणें. ४ वहिवाटणें; संवय लावणें; आपलेसें करणें. ४ (काव्य) एकत्र.

**दळा**—पु. १ (कों.) डोंगराच्या कडेचा साफ केलेला व पेरणीसाठीं भाजून तयार केलेला जमीनीचा तुकडा (नाचणी धान्या करितां, भाजीपाल्याकरितां). ही जमीन नांगरतां येत नाहीं, कुदळीनें खणावी लागते. २ शेतामध्यें उंदरांनीं पाडलेलें बीळ किंवा त्यांनीं पीक खाल्ल्यामुळें पडलेली रिकामी जागा. ३ (ल.) पिकामधील रिकामी राहिलेली जागा. ४ भाजीपाल्याकरितां बागेंत वरवंडी घालून तयार केलेला तुकडा. [सं. दल]

**दॅळॉ**—पु. (गो.) पर्णविरहित झाड. [सं. दल]

**दळाकांडा**—पु. दळणकांडण; बायकांचीं किरकोळ कामें; आडकाम; मोलकाम. म्ह० दळाकांडा करावा आणि शिनळांचीं पोटें भरावीं. [दळण+कांडण]

**दळिद्र-द्री**—दरिद्र-द्री पहा.

**दळिया**—पु. दळ्याचा लाडू. हा गव्हाचा रवा, भाजून त्यांत तूप, साखर इ० घालून करतात. [दळणें]

**दळी**—स्त्री. दळा अर्थ १, २ पहा.

**दळुबाई दळु**—दळतांना म्हणावयाच्या ओंवीचा एक चरण. (यावरून) रडकें गाणें, वाचणें -वि. रडया; भित्रा; कर्तृत्वशून्य. [दळणें]

**दळें-ळूंहें**—न. १ दळा अर्थ १, २ पहा २ (विणकाम) दळखुंट व बैली यांना जोडणारी दोरी. [दळ]

**दळें**—न. कवच; साल; टरफल; आवरण; तरवारीचें म्यान. 'मग देहाहंतेचें दळें। सांडूनि एकेचि वेळे।' -ज्ञा १५.२५८. [सं. दल]

**दळ्या**—वि. १ षंढ; रडया. २ दळून भाकर करण्याच्या उपयोगी मोठा करडा (तांदूळ). ३ दळया लाडू. [दळणें]

**दक्ष**—पु. पार्वतीचा बाप. दक्ष प्रजापति. -वि. १ हुशार; योग्य; कुशल; चतुर; सावध; तत्पर; समर्थ; निष्णात. 'प्रिया बसविली शिरीं मुनिपथीं कसा दक्ष हा।' -केका १०३. २ उजवा-वी-वें. 'प्रतिविंध्य दक्षभुज ती (गदा) भेदुनि भूकुक्षि भेदिती आली।' -मोकर्ण ५९.२८. [वै. सं. दक्ष्=समर्थ असणें]

**दक्षण, दक्षणणें, दक्षणा, दक्षणी**—दक्षिण इ० पहा.

**दक्षणी-दक्षिणी**—वि. दक्षिणेतला; दाक्षिणात्य; (विशेषत:) महाराष्ट्रीय

**दक्षिण**—स्त्री. १ दक्षिण दिशा. पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां उजव्या बाजूची दिशा. २ दक्षिणेकडील वारा. -वि. १ उजवा. 'सोडी घनास्त्र योजुनि तद्दक्षिणपार्श्वं भूमितळ फोडी।' -मोभीष्म १२.१०. २ दक्षिणेकडील. ३ (ल.) हुशार; कुशल; चपल; उदार; अनुकूल. [सं. दक्षिण; हिं. दखिन; सिं. डखिणु; का. टेंकण; इं. डेक्कन] **दक्षिणचा दिवा**-(दक्षिणेकडे वात करून लावलेला दिवा दुर्दैव ओढवितो यावरून) कुलाची बेअब्रु करणारा मनुष्य. **दक्षिणणें**-अक्रि. दक्षिणायनाच्या उन्हानें, दक्षिणेकडच्या बाजूनें जळणें-करपणें. (झाडें, फळें, इ०). (वाप्र.) **दक्षिण बाधणें**-पोफळ इ० वृक्षाचें कांडें दक्षिणायनसंबंधीं (दक्षिणायनांतील) उन्हानें करपून जाणें. ०**सुटणें-वाहणें**-दक्षिणेकडील वारा वाहणें. सामाशब्द- ०**अक्षांश** पु विषुववृत्ताच्या दक्षिणेकडील अक्षांश. ०**गोल**-पु. तूळपासून मीनपर्यंतच्या सहा राशी; राशीषट्क. ० **दवाजा-द्वार**-पु. १ (यमलोक त्या दिशेला आहे या वरून ल.) तुरुंग; कारागृह. २ दक्षिणेकडील दार. ३ (ल.) यमलोक. ०**पालवी**-स्त्री. (कों.) दक्षिणेच्या वाऱ्यासाठीं व उन्हासाठीं मोकळी ठेवलेली, न पेरतां राखलेली जमीन. ही हलकी जमीन समजली जाते; याच्या

उलट उत्तरपालवी. ०**मार्ग**–पु. एकताल. आठ मात्रा प्रमाण. ०**वारा**–(कु.) दक्षिण दिशेकडून वाहणारा वारा. हा ४, ६ दिवस वाहात राहिला तर तुफान होतें. ०**संगीतपद्धति**–स्त्री. ही मद्रास इलाखा व म्हैसूर संस्थान ह्या ठिकाणीं प्रचलित आहे. **दक्षिणांग**–न. शरीराची उजवी बाजू. **दक्षिणापथ**–न. दक्षिण देश; दख्खन. **दक्षिणाभिमुख**–वि. दक्षिणेकडे तोंड असलेला. 'दक्षिणाभिमुख निजूं नयें वसूं नये.' –**णायन**–न. १ कर्क संक्रांतीपासून मकरसंक्रांती पर्यंतचा काळ. २ विषुववृत्तापासून दक्षिणेकडे सूर्याचें जाणें; सूर्याचें दक्षिणेकडे जाऊन चरम मर्यादेवर म्हणजे मकर रेषेवर पोंचणें. त्या वेळेस सूर्याचा प्रकाश मागें हटत जाऊन उत्तरध्रुवापासून २३॥ अंश दूर राहतो. –**णायनमार्ग**–पु. १ दक्षिणायनाचा मार्ग; कर्कवृत्तापासून सूर्याचा मार्ग. २ पितृलोकाचा मार्ग; धूम्रादि मार्ग पहा. –**णावर्त-वर्ती**–वि. उजव्या बाजूस वळणारा, प्रदक्षिणेप्रमाणें वळणें असणारा ( शंखावरील नागमोडी रेषा, स्क्रूचे पेंच, जिन्याच्या पायऱ्या, शरीरावरील भोंवरा इ० ). ' होय न तें शंखशतें जें शिव एकेंचि दक्षिणावर्तें । ' –मोउद्योग ४.८४. **दक्षिणी**–वि. दक्षिणेकडचा; दक्षिणसंबंधाचा ( उत्तरहिंदुस्थानांत महाराष्ट्रीय लोकांस म्हणतात ). **दक्षिणोत्तर**–वि. दक्षिणेकडून उत्तरेकडे जात असलेला, पसरलेला. **दक्षिणोत्तरवृत्त**–न. एखाद्या जागेची मध्यान्ह रेषा.

**दक्षिणा**—स्त्री १ ब्राह्मणादिकांस धर्मकृत्यप्रसंगीं द्यावयाचें द्रव्य; दान इ० ( सोमयागांत दक्षिणा म्हणून गाई दान देत असत व त्या देतांना दक्षिणेकडून नेत त्यावरून शब्द रूढ झालेला (पुढें गायींच्या ऐवजीं पैसा आला ). २ दक्षिण दिशा. ३ व्रताची पूर्णता, सांगता. ४ ( ल. ) लांच; नजराणा. [ सं. ] **म्ह**० १ भात भक्षणा पोळी दक्षणा. २ पं दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा= काम पुष्कळ पण मोबदला कमी.

**दक्षिणाचार**—पु. शाक्तांच्या दोन पंथांपैकीं एक. यांचा आचारविधि शुद्ध व वेदांस मान्य असा मानला जातो. याच्या उलट वामाचार. [सं.]**दक्षिणाचारी**–वि. वरील पंथाचा अनुयायी.

**दा**—पु. ( गो. ) ( बालभाषा ) मार. ०**करचें**–मारणें; मार देणें.

**दा, दां**—अ. एखाद्या संख्यावाचक शब्दास किंवा बहु, अनेक, किती, जितका इ० शब्दांना पुढें जोडावयाचा–तितके वेळां या अर्थाचा–आवृत्तिवाचक प्रत्यय. जसें:– एकदां=एक वेळ, दोनदां= दोन वेळां; तीनदां; चारदां; अनेकदां. कितीदां=किती वेळां त्याच प्रमाणें पहिल्यांदा=पहिल्या वेळीं, प्रथम; दुसऱ्यांदा; तिसऱ्यांदा; चवथ्यांदा इ० पहिल्येंदा, दुसऱ्येंदा अशींहि रूपें रूढ आहेत. 'पांचदां मीं आलों पण तूं भेटला नाहींस, असें म्यां कितीदां यावें ? ' [ प्रा. दा=तावत् ]

**दा**—( कों. ) दादा या अर्थीं विशेषनामास लावावयाचा प्रत्यय. दादा याचा संक्षेप. जसें:–केशवदा=केशवदादा. [ दादा ]

**दाअपसाअ**—पु. पारितोषिक; दान. ' दीन्हले दाअपसाअे भाटा राओ पुसे प्रधाना मातु । ' –**धवळे**–पूर्वार्ध ४. [सं. दाय+ प्रसाद; प्रा. दाअपसाय ]

**दाइण**—स्त्री. दाई पहा. ' हुजरे, जासुद, चोपदार, दाइणी वगैरे लोकांचा जुन्या कारकीर्दींत स्वतंत्र कारखाना नव्हता. ' –ऐरा प्रस्तावना ४५.

**दाइमी**—स्त्री. १ शाश्वती; चिरस्थायीपणा; टिकाऊपणा. २ कायमची देणगी. दाईम पहा. [ अर. ]

**दाइया**—पु. इच्छा. 'इंग्रज दक्षणचा दाइया ठेवून न होण्याचे मन्सबे बांधितात व खूब मकरदी जाणतात. ' –रा १०.१६७. [ अर. ]

**दाई**—स्त्री. १ लहान मुलास पाजण्याकरितां ठेवलेली स्त्री; उपमाता. २ प्रसूतीच्या वेळीं बाळंतिणीची सुटका करणारी कुशल स्त्री; सुईण; (इं.) नर्स; मिड्वाईफ. ३ पडदा, जातिनिर्बंध इ० कारणांमुळें कोर्टकचेरींत हजर राहूं न शकणाऱ्या स्त्रीला शपथ देणारी व तिची जबानी घेणारी प्रारंभींच्या ब्रिटिश अमदानींतील सरकार-नियुक्त स्त्री. ४ ( गोंडी. ) आई. –विवि ८.१.३. [ सं. धात्री; प्रा. धाई; फा. दाया; गो. दाइ ] **दाईमा**–स्त्री. १ आईस, आईच्या ठिकाणीं मानलेल्या, असणाऱ्या स्त्रीस उद्देशून योजावयाचा आदरार्थी शब्द. २ ( दाई न ठेवतां ) आपल्या मुलास स्वतःच अंगावर पाजणारी माता. ३ (तिरस्कारानें.) नेभळट, दुबेल स्त्री, पुरूष. [ दाई+मा=आई ]

**दाई(इ)ज**—वि. १ एका कुळांत जन्मल्यामुळें वडिलोपार्जित मिळकतीचा बनलेला भागीदार; हिस्सेदार; दायाद; भाऊबंद. ' अवलाद अफलाद दाइज अगदीं नाहीं ' –वाडबाबा २.३६. २ सगोत्र नात्यामुळें सुतक सोयेर–बाळगणारा; अशौचसंबंधी आप्त; ( पुरुष, स्त्री इ० ). ३ ( ल. ) हितशत्रु; मत्सर, द्वेष करणारा; अशुभचिंतक. [सं. दायाद] ०**गोत्रज**–पुअव. एकगोत्रोत्पन्न आप्त; नातलग; भाऊबंद. [दाईज+सं. गोत्रज=गोत्रांत जन्मलेला] ०**जण, दाईजण**–पुअव. १ ( समुच्चयार्थी ) वंशपरंपरागत मिळकतींतील वारसदार; भाऊबंद; दायाद. ( दाईजण हें रूप चुकीनें वापरण्यांत येतें). २ (समुच्चयार्थी.) (सरकारी कागदपत्रांत) वंशपरंपरा अधिकार असलेले (सरकारी) गांवकामगार; या अर्थी 'समस्त दाईजण' असाहि शब्द रूढ आहे. [ दाईज+जण=व्यक्ति ]

**दाईते**—न. खंडणी. ' दाईते घेत होते. ' –शिचप्र ३९. [ सं. दाय ]

**दाईम**—वि. कायमचा; नेहमींचा; सतत असणारा, राहणारा; दायम. ' तूं दाईम हालाल्खोर आहेसी. ' –रा १५.३१.

'व त्याच पत्रांत दाईम सलूख आहे.' -ऐटि ४८. [अर. दाइम्] ०कूळ-न. कायमचें, कायमची वस्ती करून राहिलेलें कूळ, शेतकरी इ०. [दाइम+कूळ] **दाईमी**-स्त्री. १ शाश्वती; चिरस्थायीपणा; कायमपणा; टिकाऊपणा; दायमी. २ कायमची देणगी. ३ कायम धारा. ४ जन्मठेपेची शिक्षा झालेला गुन्हेगार, आरोपी. -वि. कायमचा. [दाईम]

**दाईमुदई**—पुअव. वादी व प्रतिवादी. 'हर्दो जन दाई-मुदई बोलाऊन आणून.' -रा २०.६०. [अर. दाई=बोलावणारा+ मुद्दई=तंटा करणारा]

**दाऊदखानी**—वि. (दाऊदखानावरून पडलेलें नांव) १ एक प्रकारचा गहूं. २ एक विशिष्ट प्रकारचा हार, माळ. ३ एक आडनांव. [दाऊदखान]

**दाक**—स्त्री. (गो.) द्राक्ष. [सं. द्राक्ष]

**दाकवचा-ता, दाकोचा-ता, दाखवता**—पु. एक शूद्र जात व तींतील व्यक्ति; ब्राह्मण आणि गवळीण यांच्या संबंधापासून झालेली प्रजा. डाकुता, डाकोचा इ० पहा.

**दाँकॉ**—पु. (गो.) पाय; (कों.) डोका.

**दाखयलिपय**—स्त्री. (गो.) लपवालपव; उडवाउडव. 'तॉ माका उत्तर दिना दाखयलिपय करतां.' [दाखविणें+लपविणें]

**दाखल**—वि. १ येऊन पोहोंचलेला; आगत; आलेला; प्रविष्ट झालेला; शिरलेला. 'कोणी चोरून ठेवील, आणि दाखल सरदारास जहालियानें शासन करावें.' -सभासद २३. २ (जमाखर्च, रोजनिशी इ० कांत) नमूद; नोंदलेलें; प्रविष्ट, रजिष्टर केलेलें. ३ माहीत असलेला; श्रुत; ज्ञात; अवगत (विषय, गोष्ट, हकीगत) ४ समान; सारखा; प्रमाण. 'चेऊल शहर दंग्यानें मोडून उद्ध्वस्त होऊन जंगलादाखल जाहलें होतें.' -रा ३.५१७. 'ऐशास पंढरपूर तूर्त शहरादाखलच आहे.' -ख १०.५२००. -शअ. प्रमाणें; सारखें. 'आम्ही जरी केलें नाहीं तरी केल्यादाखल समजा.' 'शिंदेही कैदेदाखल आहेत.' -ख १०.५५१७. [अर. दाखिल्] ०होणें-१ हजर होणें; प्रविष्ट होणें. २ रहावयास जाणें. 'सर्व डेरेदाखल झाले.'

**दाखला**—पु. १ (एखाद्या गोष्टीच्या विशदीकरणासाठीं घेतलेलें त्या गोष्टीसारखेंच) उदाहरण; दृष्टांत; उपमा; नमुना. 'कावळा करकरला म्हणून झाड मोडत नाहीं हा कावळ्याचा दाखला त्यानें तुला दिला.' 'तुमचे दाखल्यांनीं लोकांनीं करावें तें दुसरे अगोदर करितात आणि तुमचें कांहींच नाहीं.' -ख ५. २७१७. २ (एखाद्याचा) प्रत्यक्ष अनुभव; पडताळा; प्रतीति. 'जी सहस्रशीर्षयाचें दाखले। कोडीवरी होताति एकिवेळे।' -ज्ञा ११.२६९. 'तुम्ही शकुन सागितला त्याचा दाखला आला, तो माझ्या दाखल्यास आला.' ३ पायंडा; उदाहरण; वहिवाट. 'आम्ही चाकरी करूं तेव्हां दाखला पडत जाईल.' -एस्फुले ६२. 'आलेले खलिते मागील दाखल्याप्रमाणें बरोबर आहेत किंवा कसें हें खानगी कारभारी यांनीं पहात जावें.' -(बडोदें) अहेरबहुमान पोषाखाचा नियम ८. ४ (एखाद्या विधानास पुष्टी देणारा) पुरावा; आधारभूत गोष्ट, प्रमाण. 'ह्या वाटेनें वाघ गेला याचा दाखला हीं येथें पाऊलें उमटलीं आहेत.' ५ (पुराव्यादाखल हजर करतां येईल असें) प्रमाणपत्र; पावती; नोंद. 'तसेंच जीं पत्रें बंद करण्याविषयीं हुकूम होईल त्याची खबर कापडी जामदारखान्याकडे देऊन माहितीचे यादीवर तसा दाखला ठेवावा. -(बडोदें)राजमहाल कामगारी कारकुनाच्या कर्तव्यासंबंधीं नियम ३. ६ (एखाद्याच्या) लायकीबद्दल पत्र; भलामणपत्रक; शिफारसपत्र ७ हक्क; अधिकार. [दखल] (वाप्र.) ०घेणें-(एखाद्या गोष्टीपासून व्यक्तीपासून) धडा घेणें; बोध घेणें. ०पटणें-(एखादें भविष्य इ०काचा) प्रत्यय, अनुभव, पडताळा येणें. ०येणें-(एखादी गोष्ट) पुराव्यानें, प्रमाणानें सिद्ध होणें. **दाखल्यास उतरणें**-(एखाद्याच्या) अनुभवास जुळणें. सामाशब्द- ०दुखला-पु दाखला; दृष्टांत इ० [दाखला द्वि.] ०मुकाबला-पु. पुरावा पुष्टि देणारी, समर्थन करणारी गोष्ट. [दाखला+अर. मुकाबला]

**दाखलेचिठी-पत्र**-स्त्रीन. १ (एखाद्याची लायकी, शील, इ० बद्दलचें) शिफारसपत्र; भलामणपत्रक. २ (विशेषार्थानें) महार रामोशी इ०कास दिलेलें शिफारसपत्र. [दाखला+चिठ्ठी, पत्र] -लेवाईक-वि. १ उदाहरणें देऊन, दृष्टांत सांगून स्पष्ट, विशद केलेलें. २ ज्याच्या खरेपणाविषयीं कांहीं तरी प्रत्यय आला आहे असा. 'हा ब्राह्मण दाखलेवाईक प्रश्न सांगतो.' -लेशीर-वि विश्वसनीय; सप्रमाण; व्यवस्थित. 'आमचे दौलतींत हालीमार्जी होत गेल्यामुळें कागदपत्र दाखलेशीर राहिला नाहीं.' -रा १.३१०

**दाखवणूक**—स्त्री. १ (केलेला, दाखविलेला, बोललेला थोडासा नमुना, मासला; नमुन्यादाखल केलेली (भाषण, दाखविणें, करणें इ०कांची) थोडीशी कृति. (क्रि० दाखविणें). २ (कांहीं वस्तु, स्थळ इ०) दाखविण्याकरितां घेतलेली, दिलेली मजुरी ३ (एखाद्यास फसविण्याकरितां केलेला) खोटा आविर्भाव, देखावा; हूल; हुलकावणी; ढोंगीपणाचें कृत्य. [दाखविणें]

**दाखवा**—पु. (एखाद्यानें) ओझरतें तोंड दाखविणें; दृष्टीस पडणें; देखावा. (क्रि० दाखविणें). 'त्यानें घरांत येऊन दाखवा मात्र दाखविला आणि निघून गेला.' [दाखविणें]

**दाखवि(व)णें, दाखिवणें**—सक्रि. १ (अक्षरशः व लक्षणेनें) (एखादा जिन्नस इ० दुसऱ्यास) दिसेल, दृष्टीस पडेल असा करणें; दर्शविणें २ (खेळ, नाटक, तमाशा इ०) प्रेक्षकांच्या नजरेसमोर करणें. ३ (एखादी गोष्ट कोणेकास) प्रत्ययास आणून देणें; समजावून, विशद करून सांगणें. [सं. दृश्; प्रा. दक्ख]

**दाखाळा**—पु. (महानु.) दाखला. 'भणऔनि दाखाळा पांतुसें। सर्वेदळाचा।' -दाव ३६६. [दाखला]

**दाग, दागणी, दागणें**—डाग, डागणी, डागणें इ० पहा

**दाग**—पु. १ डाग; भाजल्याची, चटका दिल्याची खूण; जनावरावर संख्येचा आंकडा इ०चा डाग मारणें; डाग पहा. २ खाणाखुणा. [सं. दह्-दग्ध. फा. दाग्; दाघ्; हिं.] **०चेहरा**-पु. शरीरावरील खाणाखुणांचें टांचण. 'दाग-चेहरे करून रोजमरे कितेकाचे जारी जाले.' -रा ७.५४. [दाग+चेहरा] **०तसिया**-पु. घोडयांच्या व स्वारांच्या निशाण्यांची नोंद. 'त्यापैकीं कांहीं स्वार जमा करून सरकारांत दागतसिये जाहाले आहेत.' -पेद १०.७६.

**दांग**—न. अरण्य; जंगल; रान. डांग पहा. 'मग काळकूट-कल्लोळीं कवळिले। नाना महाविजूंचे दांग उमटले।' -ज्ञा ११. २१७. 'मग ते अविद्याजुंबाडेंसीं जें विशाळ। ते दागीं जाऊनि राहिले।' -स्वादि १०.४.२५. [डांग; हिं.]

**दांग**—स्त्री. १ फांदी; शाखा; डाहळी. डांग (-स्त्री.) अर्थ ९ पहा. 'त्याचा काय उपयोग सांग। वृथा सांवरीची दांग।' -मुरंशु २३९. २ (गो.) दोन पायांमधील अंतर; टांग; ढांग. डांग (-स्त्री.) अर्थ ७ पहा. 'दांग मारून पलीकडे जा.' [डांग]

**दांगट**—न. डोंगरांतील चोरवाट. 'माधुर्याचीं दांगटे आझोड ती धैयातें।' -भाए १९५. [दांग+ट]

**दांगट**—पु. एक जात. 'डोहर भाट बुरुड रजक। दांगट मोचे-करी खाटिक।' -स्वादि ६.५.३८.

**दांगडो**—पु. (व.) दांडगाई; धिंगामस्ती; धांगडधिंगा. [धागडा]

**दागदागिने**—पुअव. अलंकार व चीजवस्त; दाग, डागिना पहा. 'दागदागिने, लत्ताकपडा...नुसत्या लत्ता म्हण पाहिजे तर.' -मूकनायक. [डाग+डागिने-दागिने]

**दागदार**—पु. (बडोदें) मस्त हत्तीजवळ घोडा नेणारा स्वार (खेळया).

**दागदु(दो)जी**—स्त्री. डागडुजी पहा 'जुने (जीन) कामास येईजोगते असतील ते दागदोजी करवून नीट करावे.' -ख ७. ३३४७.

**दागन**—नस्त्री. (मनुष्य, जनावर इ०कांस) डाग देण्याचें हत्यार. [डागणें; दाग]

**दांगा**—पु. नूतन पल्लव. -शर. दांग, डांग पहा.

**दांगों, दांकों**—पुअव. (गो.) खेंकडयाचे पाय. दांग पहा. 'कुल्ले दांगों.' [दांग]

**दांगाण**—न. जंगली, डोंगराळ प्रदेश; अरण्य; डांगाण पहा. 'मग म्लेंच्छांचे वसौटे। दांगाणे हन कैकटे। कां शिबिरें चोहटे। नगरीच ते।' -ज्ञा १७.२९४. [डांग-डांगाण]

**दागिनदार**—पु.(राजा) मालक; धनी.[दागिना+दार प्रत्यय]

**दागिना**—पु. डागिना पहा.

**दांगूट**—न. (गो.) लहान पाय, टांग. [गो. दांग= पाय, टांग]

**दागोळ**—पु. (कों.) एक प्रकारचा मासा.

**दा(दां)घ**—पु. दाह; दहन; जळणें. [सं. दाघ्; फा. दाघ्= जळल्याची खूण, डाग]

**दाच्छगा, दाछेना**—पु. (ना. व.) एक प्रकारचें दंतमंजन; दांतवण. [दांत+छानणें]

**दाजी**—पु. १ एखाद्याविषयीं, एखाद्याशीं आदरपूर्वक बोल-तांना त्याच्या नांवापुढें जोडून वापरावयाचा शब्द. उदा० शंकर-दाजी. २ (एखाद्यास) आदरपूर्वक संबोधण्याचा, उल्लेखण्याचा शब्द, व्यवहारिक नांव. 'आकल गुंग कशास्तव जाहाली कां बोलतना दाजी।' -सला ७२. ३ (खा) वडील दीर. - भाअ ७.१. ते ४. [दादा+जी=बहुमानार्थी प्रत्यय] **दाजीबा फडके**-पु.(या नांवाच्या एका माणसावरून ल.) हळुवार, नाजूक, चोखनळ मनुष्य.

**दाट**—स्त्री. निकड; गर्दी; दाटी. 'बहुतकरूनि निःशब्द। दाट न रिघे श्वापद।' -ज्ञा ६.१७६. -पु. १ जोर. २ (मुद्रण) छापावयाचा फॉर्म आवळतांना द्यावयाचा कांडयांचा दाब. -मुद्रण-दर्पण २६. -वि. १ जड; घट्ट (प्रवाही, सद्रव पदार्थ) 'रबराच्या झाडांतून दाट चीक निघतो तोच रबर होय.' २ जाड; बारीक, पातळ नसलेला (कागद फळा इ०). ३ घट्ट विणीचें; घटमूट (कापड, वस्त्र इ०). ४ गच्च; अडच; आवळ; तंग होणारा; अटस (अंगरखा, लहान छिद्रांतील मोठी खुंटी इ०). 'या छिद्रात ही खुंटी दाट होते.' 'हा अंगरखा माझ्या अंगांत दाट होतो.' ५ गडगच्च; घनदाट; गर्दीनें, चेपाचेपीनें, रेटारेटीनें, खेटाखेटीनें अस-लेला (जनसमूह, झाडें, पाऊस, जिन्नस इ०). 'ह्या झाडांची लावणी दाट झाली.' ६ अखंड. 'जेथें आत्मा नाहीं दाट। तेथें अवघें सरसपाट।' -दा १७.३.१४. ७ (ल.) अतिशय घरो-ब्याची; गट्टीची; परिचयाची; सलगीची; पक्की (ओळख, मैत्री, दळणवळण, प्रेम इ०). 'गोविंदरावांचा व माझा दाट परिचय आहे.' ८ सर्वत्र, विश्रुत झालेली; लोकांत प्रचुरपणें पसरलेली (वदंता, बातमी, गोष्ट इ०). 'वार्ता दाट आली.' -वाडशा २५. ९ अतिशय; पुष्कळ. 'सुगरणी गौळणी चकवाचकवी दाट।' -ऐपो २४२. 'दाट पराक्रम तुमचा साहेब अफाट कीर्ति।' -ऐपो २६९. -क्रिवि. बळेंच; मुद्दाम; दादन. -शर. [का. दट्ट] **०धमक**-वि. घटमूठ. **०धमकट**-वि. १ मजबूत; धट्टाकट्टा;

बळकट; जोमदार (मनुष्य, शरीर इ०). २ ऐवजदार; सकस; घणसर; भरीव. [दाट+धमकट=मजबूत] ०पणा–पु. १ घट्टपणा; जाडपणा. २ आधिक्य; (ल.) अतिपरिचय. 'हें वोळखीचेंनि दाटपणें। बहुत घडलें।' –ज्ञा ११.५५४. ०पातळ–वि. कांहीं ठिकाणीं दाट तर कांहीं ठिकाणीं विरळ असलेला; कमजास्त प्रमाणाचा. 'पेरा कोठें कोठें दाटपातळ उगवला.' [दाट+पातळ]

**दाटका**—पु. दपटशा; बळजबरी. –वि. थोडा; जेमतेम. 'दाटका उतार.' –ख ४१२८.

**दाटण**—स्त्री. १ दाटी; गर्दी; खेंचाखेंच: दाटीमुळें झालेली अडचण; रेटारेट. 'अशी दाटण कां करितां? दूर दूर बसा.' घोडया राउता दाटण पाहीं पाहीं त्या मुकुंडया झाल्या।' –ऐपो ८३. २ (पातळ, सद्रव पदार्थांचा) दाटपणा; जाडपणा; घट्टपणा. [का. दट्टणे; म. दाटणें]

**दाटणी**—स्त्री. १ गर्दी; दाटी; रेटारेट. 'दाटणी जाली हो राजांगणीं।' –दावि४९५. २ विपुलता; रेलचेल; लयलूट. 'तेथ महानंदाची दाटणी।' –ज्ञा १६.१२. ३ (द्रवपदार्थाचा) घट्टपणा; दाटपणा. ४ (कापड इ० कच्च्या गांठीची, गांठोडयाची बांधण्याची) कसणी; आंवळावयाची दोरी. ५ दडपण. –शर. ६ (क.)दाट, घट्ट होण्याची दाटण्याची क्रिया. [दाटणें] म्ह० १ वरण दाटणी आणि बायको आटणी. २ (व.) गहूं घालावा दाटणीं बायको घालावी कांचणीं=गहूं कणगी इ० कांत दाटून ठेवावे व बायको जरबेंत ठेवावी. सामाशब्द– ०वाटणी–स्त्री. गर्दी; गर्दीची, अडचणीची, चेपाचेपीची स्थिति; दाटीवाटी; चेपाचेप: खेटाखेट. 'दाटणीवाटणी करूं नको.' 'दाटणीवाटणींत जाऊं नको, बसूं नको.' [दाटणी द्वि] **दाटणीं वाटणीं**–क्रिवि एकमेकांस रेटून; खेटून; दाटी करून; दाटीवाटीनें; दाटूनदुटून (क्रि० बसणें; निजणें; पडणें; असणें). **दाटणीवाटणीनें**–क्रिवि. खेटाखेट. चेपाचेप करून; दाटीनें; दाटूनदुटून; दाटी वाटीनें. 'दाटणीवाटणीनें बसावें निजावें इ०'

**दाटणें**—अक्रि. १ (द्रव पदार्थ इ०) घट्ट, दाट होणें; (तांदूळ, साबुदाणा इ० शिजतांना) घन, दाट होणें; आवळणें. २ (लहान भांडयांत भात, साबुदाणा इ० शिजतांना) अडचणणें; अडचणल्यामुळें टणक होणें. ३ गर्दी, चेपाचेप होणें; चिमटणें; खेटणें. 'दैत्यां दानवांचिआं लोथां। दाटला वसुंधरेचा माथा।' –शिशु १४७. –ज्ञा ९.२१६. 'तेयापासोनि पातकें जेतुलीं। संसारा लोकासी घडलीं। तीं येतुकीं दाटलीं। तुझ्या अंगीं।' –ख्रिपु २.४९.१३३. ४ (अंगरखा इ० अंगाला) तंग, घट्ट, आवळ होणें; चिकटून बसणें; (लहान जागेंत मोठा पदार्थ समाविष्ट झाल्यामुळें तो त्या जागेंत) गच्च बसणें; अडचणणें. 'ह्या छिद्रांत ही खुंटी दाटते.' ५ भारानें दडपलें, दाबलें जाणें. 'तरी सांगें कां न दाटिजे। धनुर्धरा।' –ज्ञा ३.१७७. ६ भिणें. 'जरी चोरां सभा दाटे। अथवा मीना गळु घोटे।' –ज्ञा ७.९४. ७ (ल.) (आनंद, राग, शोक इ० भावना अनिवार झाल्यानें गळा, हृदय इ०) भरून येणें; सद्गदित होणें; कोंडला जाणें. 'प्रेम–शोक दाटणें' 'कंठ दाटणें.' ८ (गर्व इ०कानें) फुगणें: ताठणें; भरणें; चढणें. 'जे होते बळवंत आपण असों ऐशा मदें दाटले।' –मोकृष्ण ५८.२५. ९ भरून जाणें; व्याप्त होणें; व्यापून असणें 'कीं ब्रह्मगोल वाटे विशिखांहीं दाटला तडा खातो।' –मोभीष्म६.४६. १० अडकणें; अडकून पडणें. 'स्थळीं नावा जिया दाटिजे। जळीं तयांचि जेवीं तरिजे।' –ज्ञा १७.३६६. ११ (व.) भोसडणें; खरड काढणें; धमकावणें. १२ चिकटून बसणें. 'लेंकुरवें बापातें दाटिती। दादिया हलो नेदिती।' –ख्रिपु २.४२.६०. –सक्रि. १ (महानु.) पुसणें; पुसून स्वच्छ करणें; परिमार्जणें 'चंदनें श्रीकर उल्हाळिले। वरि उष्णोदकें प्रक्षाळिले। सर्वेचि निर्मळा आंचळें दाटिले। सेवकजनीं।' –ऋ ८८. २ दाबणें; दडपणें. 'दाटिजो पां परि भारें। चित्त न दटे।' –ज्ञा ६.३६९. ३ खुपसणें; जोरानें आंत शिरकविणें. 'नाहें नावडोनि कांहीं। कामादिकांच्याचि ठायीं। दाटिली जेणें डोई। आत्मचोरें।' –ज्ञा १६.४४५. [दाट; का. दट्ट, दट्टिसु] **दाटून**–क्रिवि. १ मुद्दाम; बळेंच; जाणूनबुजून; बुद्धिपुरस्सर. २ (ल.) खोटेपणानें. काव्यांत दटुनि असेंहि रूप येतें. 'म्या त्याचें कांहीं केलें नसतां त्यानें दाटुन कज्जा काढिला.' ३ उगाच; निष्कारण; विनाकारण. 'देव म्हणे राया तूं दाटुनि धरितोसि कां विषादास।' –मोभीष्म ११.८. ४ (व.) धमकावून: धाकदपटशानें. **दाटदुपट**–स्त्री. (ना.) धाकदपटशा. **दाटबळें**–क्रिवि. मुद्दाम; बळेंच; जबरीनें; दाटून पहा. [दाटणें+बळ] **दाटोदाटीं**–क्रिवि. १ बळेंच; सक्तीनें; जबरदस्तीनें. 'रामायण लिहावयासाठीं। श्रीरामें पुरविली पाठी। श्रीराम संचरोनि पोटीं। दाटोदाटीं लिहवित।' –भारा किष्किंधा १.९. २ उत्सुकतेनें; उत्कंठित होऊन. 'मम अधरामृताची वाटी। बळें लावितसे वोठीं। जो न घे दाटोदाटी। अमृतासाठीं जो न ये।' –मुरंशु २४९. ३ गर्दीनें; जोरानें; त्वरेनें. 'लग्न लागलियापाठीं। कायसी यादवांची गोष्टी। कार्य करूं दाटोदाटी। आम्ही जगजेठी असतां।' –एरुस्व ६.३५.

**दाटा**—पु. १ (सामा.) दट्टया; पाचर; चोंदी; बूच. (क्रि० भरणें; घालणें; बसविणें). २ (पाटणीच्या खालील) कडयांमध्यें बसविलेला आडवा दट्टया, लांकडी पट्टी. 'वरोदाची लांबी दहा फुटापेक्षां अधिक असल्यास त्यामध्यें सहा फूट लांबीवर दाटे बसवावे।' –मॅरेट ६०. ३ (ल.) धमकी; दटावणी; दपटशा; दाट. ४ वल्हें अडकविण्याचा खुंटा. ५ (नाविक कों.) (गलबताच्या) नाळींत अगदीं पुढील भागास कांठाच्या किंचित् खालीं आडीं घालून त्यावर फळया ठोकून केलेली तक्तपोशी, पाटणी; गलबताचा माळा. नाळीकडे हरएक कामास जाण्यासाठीं याचा

उपयोग होतो. शिवाय याच्याखालीं स्वयंपाकहि करितात. [ दाट ]

**दाटांवणें**—सक्रि. ( गो. ) दाट, घट्ट करणें. [ दाट ]

**दाटी-टि**—स्त्री. १ (जनावरें, मनुष्यें, वस्तु इ०कांची) गर्दी; खेंचाखेंच; चेपाचेप; भीड. 'करिती युधिष्ठिराच्या ज्या ज्या गर्जोनि वाहिनी दाटी।' –मोभीष्म ९.२. 'दाटी व्योमघटीं सुरां, सुख लुटी घेती जटी धूर्जटी।' –वामन, वनसुधा ४. ३१. २ समुदाय; थवा. ३ ( साप इ० कांची ) लहरी; विळखा; पकड. 'जरि भवभुजंगाची दाटि। जियेचेनि संकेतें उठी।' –ज्ञा ७६. ४ ( ल. ) दाट मैत्री; घरोब्याचा, सलगीचा संबंध, व्यवहार; घसरट. ५ (अंधार इ० काचा) घनदाटपणा; काळेकुट्टपणा; घनता; निबिडता. ६ (द्रव पदार्थाचा) दाटपणा; घट्टपणा; ( कागद, कापड, फळी इ० काची) जाडी; जाडपणा. ७ (अंगरखा इ० कांचा) तंगपणा; आवळपणा; ( तंग वस्त्र इ० धारण करणाराची होणारी ) चेपणु-कीची, चेंबलेली, दाबलेली स्थिति. ८ ( वदंता, बातमी, मत इ० कांची ) लोकांतील साधारण व्यक्ति; प्रसृतता; प्रसिद्धि. ९ (एखादा विषय, भाषण, लेख, इ० कांतील ) मुख्य मुद्दा; रोंख; भर. 'सर्व दाटी हिंदुस्तानचे मनसुबी यांवर आहे.' –रा ३.४५०. दाटण पहा. **०वाटीनें-वाडीनें, दाटावाडीनें**–क्रिवि. दाटून दुटून; एकमेकांशीं खेटून; दाटी, अडचण करून; दाटणीवाटणीनें; कशी तरी दाटी सोसून. ( क्रि० राहणें; निजणें ). 'कसें तरी दाटीवाटीनें आजची रात्र एथेंच निजूं.' [ दाटी द्वि. ]

**दाटुगा**—वि. १ श्रेष्ठ; मोठा. 'केवळ सात्त्विक तूं पैं गा। तापसांमाजी होसी दाटुगा। न साहवे युद्धवेगा। पळोनि मागा जासील।' –एरुस्व ११.२. २ बलवान; दांडगा; सामर्थ्यवान. 'धीटु दाटुगा दमनशीलु। युधामन्यु तो प्रळयानळु।' –गीता १. ४३४.

**दाटोळा**—पु. ( ना. व. ) गर्दी; दाटी; दाटण. [ दाट+ ओळा प्रत्यय ]

**दाठर**—वि. कठिण; निबर. ताटर पहा. [ सं. दृढतर–दढअर–दढार–दाठर–भाअ १८३२ ]

**दाठरणें**—अक्रि. ( आंबा न पिकतां, गळू न पुवळतां ) टणक, कठिण होणें; घट्ट, निबर होणें; दाढरणें. [ दाठर ]

**दाठा**—पु. ( ना. व. ) दारवठा; उंबरठा; दरवाजा.

**दाड**—स्त्री. ( सुतारी बे. ) पेंच पाडण्याचें हत्यार.

**दाड**—स्त्री. दाढ पहा.

**दाड**—वि. १ ( व. ) दुष्ट; द्वाड; दांडगा. 'कशास हा दाड तुम्हांस व्हावा।' –सारुह ८.१३. २ ( व. ) नावडें; बाधक; अपायकारक. [ द्वाड ]

**दांड**—पु. १ वेळूची लांब काठी; दांडा. २ पट्टा खेळण्याचा सराव करण्याची काठी. ३ शेताची मर्यादा दाखविणारा उंच बांध. ४ टेंकडीचा, डोंगराचा कणा, दंड, रांग. ५ उंचवटयावरून सखल प्रदेशाकडे पाटानें पाणी नेण्याची सारणी, प्रणाली, दंड. ६ (व.) (धोतर, लुगडें इ०कांचे दोन तुकडे जोडणारी) एक प्रकारची जाड व लांब शिवण. (क्रि० करणें). ७ (शेतांमधून, शेताच्या बाजूनें) रह-दारीकरितां सोडलेला जमीनीचा लांब पट्टा. ८ जमीनीचा, मार्गाचा लांबलचक, रखरखीत व ओसाड पट्टा. ९ ( फार वेळ एकाच स्थितींत बसण्यानें अंगाला येणारा ) ताठरपणा; ताठकळा. ( क्रि० भरणें ). 'बसून बसून पाठीला दांड भरला.' १० ( प्रां. ) मळयां-तील ) वाफा, ताटवा. ११ ( –पुन. प्रां. ) ( शिक्षा म्हणून केलेला दंड; ( विरू. ) दंड. ( क्रि० मारणें ). १२ चोवीस हात लांबीचा बांध; चोवीस हात लांबीचें परिमाण. –कृषि २१३. १३ चित्त्याच्या गळपट्टयापासून कंबरपट्टयापावेतों पाठीच्या कण्या-वरून बांधण्याची वेणी घातलेली सुताची दोरी. –चिमा १३. १४ ( गो. ) ( आटयापाटया ) सर्व पाटयांना मधोमध विभाग-णारी रेषा; दंड; सूर. १५ (ना.) पाळण्याचा साखळदंड. १६ एकेक मोतीं. –शर [ सं. दंड ] ( वाप्र. ) **०काढणें**–( मनुष्य, जनावर इ०कांस ) खूप राबवून घेणें; तांगडणें; ताण देणें; पादाडणें. सामाशब्द–**०पट्टा-टा**–पु. १ एका हातांत काठी व दुसऱ्या हातांत पट्टा घेऊन खेळावयाचा एक मर्दुमकीचा खेळ. ( क्रि० खेळणें; करणें ). २ सदर खेळ खेळण्याचें हत्यार. [ दांड+पट्टा ] **०पाळें**–न. लांकडाची मूठ बसविलेलें लांकडी पाळें. **०पेंडोळा-ळें**–पुन. १ ( प्रदेश, जमीन इ०कांची ) सीमा; मर्यादा; शींव; हद्द; परस्परसंबंधाची जागा; निकटपणा; संबध. २ ( ल ) विवाह अथवा इतर संबंधांतील (दोन्ही पक्षांची) अनुरूपता; योग्यतेचा सारखेपणा; सारखी लायकी. ( क्रि० मिळणें; पुरणें; लागणें ). [ दांड+पेंडोळा=हद्द, बांध ] **०मेंड**–पुस्त्री. सीमा; हद्द; शींव; मर्यादा. 'त्या गांवची दांडमेंड मारुतीच्या देवळापर्यंत आहे.' [ दांड+मेंड=मर्यादा, सीमा ] **०यारी**–स्त्री. ( नाविक कों. ) काठीस ज्या मुख्य याऱ्या शृंगारवितात त्यांच्या शिवाय आणखीहि बारीक दोरीच्या उपयाऱ्या असतात त्यांपैकीं प्रत्येक. [ दांड+यारी ]

**दांड**—पु. ताठरपणा. –वि. दांडगा; अडदांड; अडमुठा; मस्त. 'दांडभांड गुराखी तुम्ही।' –रासक्रीडा २२.

**दांडक(ग)णें**—उक्रि. ( दांडक्यानें ) बडविणें; चोपणें; झोडणें; झोडपट्टी करणें. [ दांडकें ]

**दांडक(ग)पण**—न. दांडगेपणा; अडदांडपणा; अडमुठेपणा; उद्धटपणा; असभ्य वर्तन. [ दांडगा ]

**दांडक(ग)मत**—न. हट्टानें स्वतःच्याच मताचा पुरस्कार करणें; हटवादीपणा; हेकेखोरपणा. [ दांडगा ]

**दांडका, दांडकें-गें**—पुन. हात, दोन हात लांब वेळूचा तुकडा; दांडू; सोडगा. [ दांड ]

**दांडग(क)मस्त**—वि. दांडगा; आडदांड; अडमुठ्ठा; उद्धट; उर्मट. [ दांडगा+मस्त ]

**दांडगा**—वि. १ भक्कम; मजबूत; राकट. २ धटिंगण; मस्त व आडदांड; दंडेल; रगडया; अडमुठ्ठा. ' अहर्निशहि भांडला त्रिनवरात्र जो दांडगा । ' –केका ३५. ३ हटवादी; हेकेखोर; हेकड. ४ धीट; साहसी. ५ प्रचंड; राक्षसी; अवाढव्य; अजस्र ( प्राणी, वस्तु इ० ). ६ जाडेंभरडें; ओबडधोबड; तलम नसणारें ( सूत, वस्त्र इ० ). ७ भरपूर; विपुल; पुष्कळ; जोराचा ( पाऊस, पीक, वारा इ० ). [ दांड+गा प्रत्यय ] **०उतार**-पु. फक्त उंच व बळकट मनुष्यासच कसें तरी उतरून जातां येण्याजोगा नदी, खाडी इ०कांचा उतार; खोल व कठिण उतार [ दांडगा+उतार ] **०धिंग**-वि. आडदांड; रानवट; अडमुठ्ठा; राकट; रगडया; धटिंगण.

**दांडगाई, दांडगावें-गावा**—स्त्रीनपु. १ दांडगेपणाचें भाषण, वर्तन. २ स्वेच्छाचार; स्वैर वर्तन; छांदिष्टपणा; उनाडकी. ३ मस्ती; धिंगाणा. [ दांडगा ]

**दांडगी**—स्त्री. ( गो. ) वालाचे वेल चढवावयासाठीं वेलाजवळ उभी केलेली मोठी काठी. [ दांडगें ]

**दांडगेला**—वि. १ कांहींसा मजबूत; बळकट. २ थोडा राकट; उर्मट; उद्धट. [ दांडगा ]

**दांडणें**—उक्रि. शिक्षा करणें; ( प्र. ) दंडणें.

**दा(दां)डदपट**—स्त्री. ( चोर, थकलेलें कूळ इ०कांस भिवविण्याकरितां केलेलें ) क्रोधयुक्त, कठोर भाषण; आक्रसताळा; धाकदपटशा; दटावणी; धमकावणी. [ दांड-कें+दपटणें ]

**दांडपन्न**—न. ( गो. ) मधली भिंत.

**दांडपेंड**—स्त्री. ( व. ) दळणवळण. दांडापेंडा पहा.

**दांडय**—स्त्री. ( कु. ) माशाची एक जात

**दांडरॉ**—पु ( गो. ) १ केळीच्या पानाचा दांडा; दांडोरा. २ केळीचें संबंध पान, डांग. [ दांड-डा ]

**दांडरूब**—न. धर्मशास्त्र. ' आगमु निन्हां दांडरूब । जाणपणें न पिएति आंब । ' –शिशु ८४. [ सं. दांड=दंडासंबंधीं+रूब= रूप–शिशु टिपणी ]

**दांडवण-न**—स्त्री. खवल्या माशाची एक जात; कन्हेरी. –बदलापूर १३२.

**दांडसाकाळ**—पु. ( कु. ) एक पिशाच्चदैवत.

**दांडसाळ, दांडळ**—स्त्री. चाळ; लांबचलांब इमारत; (विरू.) दांडेसाळ. दांडेसाळ पहा. [ दांडा+शाला=घर ]

**दांडळणें**—उक्रि. ( युक्तीनें, कपटानें ) फसविणें; चकविणें; भुरळ पाडणें; भुलविणें; भोंदणें. [ दांड. दंड=लिंग, यावरून अश्लील प्रयोग ]

**दांडळणें**—अक्रि. ( उंमे पीक इ०काचा दांडा, देंठ ) जाड व मोठा होणें. [ दांडा ]

**दांडा**—पु. १ ( वेळू इ०काचा ) जाड व आंखूड तुकडा, काठी. २ ( पळी, ओगराळें, वेळणी इ०कांची हातीं धरण्याची ) मूठ; ( कुदळ, कुन्हाड, वाकस इ० हत्यार धरून काम करावयाचें म्हणून त्याच्या नेढयांत घालतात तो) लांकडाचा गोल दंड, काठी. ३ पाट इ० कांचें पाणी जमिनींत न जिरतां वहावें म्हणून जमीनीपासून उंच बांधलेली सारणी, प्रणाली; ( व. ) मोटेचें पाणी बागेंत निरनिराळया ठिकाणीं नेणारा पाट. ४ (मनुष्य इ०काच्या) पाठीचा कणा. ५ (समुद्र, खाडी इ०कांत तारूं, गलबत यास अडथळा होण्याजोगा) रेती, खडक इ०कांचा दंडाकार उंचवटा; दांडी. ६ (डोंगर, टेकडी इ०चा ) कणा; दंड; उंचवटयाची चिंचोळी व अरुंद रांग. ७ नाकाचा कपाळापासुन शेंडयापर्यंतचा उंच भाग. ८ ( नदीचा) धक्का. ९ (समुद्रांत गेलेला) जमीनीचा लांब व चिंचोळा पट्टा. १० केळीचा घड. ११ केळीच्या पानाच्या मध्यांतून जाणारा देंटाचा लांब भाग. १२ ( नथ इ० दागिन्यांचा ) आंकडा. १३ (जमीन, इमारत इ०कांचा ) मुलका, शेंडा. १४ माघी पौर्णिमेस होळीच्या स्थानीं उभा रोंवतात तो एरंडाचा सोट. १५ ( घराचा ) वांसा; कडी; बहाल; तुळवंट. १६ यंत्र फिरविण्यासाठीं मूठ बसविलेली काठी. –शर. १७ ( गो. ) कुळागराचा तुकडा. १८ ( गो. ) शूद्र स्त्रिया नाकांत लोंबता घालतात तो एक दागिना. १९ (गो. ) चार हातांचें लांबीचें एक परिमाण. २० ( तंजा. ) भेंडाचा केलेला एक त्रिकोणाकृति अलंकारविशेष. हा अलंकार स्त्रिया लग्न इ० मंगलप्रसंगीं वापरतात. २१ ( विणकाम ) तातू जोडण्यासाठीं जी सांध असते तींत घालण्याचा वेळूचा एक तुकडा. २२ ( नाविक. कों. ) गलबतास बाहेरच्या अंगास कांठाखालीं वीतभर अंतरावर नाळव-यापर्यंत दोन्ही बाजूस ठोकतात ती लांकडाची गोल अथवा चौकोनी पट्टी. २३ ( अशिष्ट ) लिंग; शिश्न ( विशेषतः घोडयाचें, लांब असअसणारें ). दांडी पहा. [ सं. दंड; हिं. डांड, डांडा; गु. डांडो ] (वाप्र.) ( घराचे ) **दांडेवासे मोजणें**-( एखाद्यानें ) कृतघ्न होणें; उपकारकर्त्याचे उपकार विसरून त्याच्या नाशास प्रवृत्त होणें, नाश चिंतणें. **म्ह०** दांडयानें पाणी तोडलें म्हणून निराळें होत नाहीं= खरी, जिवलग मैत्री लोकांनीं कितीहि कलागती लाविल्या तरी नाहींशी होत नाहीं. सामाशब्द– **०ईत**–वि. दांडगा; उर्मट; धसकट; आडदांड. [ दांडा ] **०पेंडा, पेंडोळा**-पु. दाट परिचय, ओळख. दांडपेंडोळा पहा. **०मेंडा**-पु. शींव; हद्द; सीमा. दांडमेंड पहा. **दांडकरी**-पु. (राजा. कु.) ( सांकेतिक ) ( महाराच्या हातांत नेहमीं काठी असते म्हणून ) महार; ब्राह्मण

सोंवळयांत असतांना महार शब्द न उच्चारतां दांडकरी म्हणतात. **दांडेपंडित**–पु. शास्त्राचें अध्ययन न करतांहि उत्कृष्ट वादविवाद करणारा व प्रसंगविशेषीं दंडादंडी, काठयांनीं मारामारी करण्यास तयार असलेला बळकट व हुषार मनुष्य. [ दांडा+पंडित ] **दांडेपाट**–पु (धरण्याकरितां) दांडा, मूठ असलेला पाट, तिवई इ० [दांडा+पाट] **दांडेपान्हवण-ळ**–न. १ गाय, म्हैस इ० कांस काठीनें बडवून पान्हवण्यास,दूध द्यावयास लावणें. २(ल.) (एखाद्यास) मारून, बडवून त्याचें मन वळविणें; आपलें म्हणणें कबूल करण्यास भाग पाडणें. ३ (सामा.) झोडपट्टी; मार. [ दांडा+पान्हवणें ] **दांडेपाळ**–स्त्री पाणी वाहून नेण्याकरितां, तसेंच शेतांत खेळविण्याकरितां उंच बांधलेला जो दांडा, त्याची पाळ, कड. [दांडा+पाळ] **दांडेपाळ-पाळें**–स्त्रीन. मूठ बसविलेलें लांकडी पाळें. [ दांडा+पाळें ] **दांडेपूर्णिमा, दांडेपुनव**–स्त्री. माघ शुद्ध पौर्णिमा. ह्या दिवशीं होळीचा दांडा रोंवतात म्हणून हें नांव. [ दांडा+पूर्णिमा, पुनव ] **दांडेबोर**–स्त्री. बोरीची एक जात. –न. या जातीच्या बोरीचें फळ. **दांडेभुसा**–दांडेविंड पहा **दांडेमार**–पु दांडयानें, काठीनें झोडपणें; बडविणें; चोपणें; मारणें; (क्रि० करणें ) [दांडा+मार] **दांडेमोडाक**–न. (कु.) माशाची एक जात. **दांडेविंड**–न. (कों.) नदींत मासे पकडावयाचें एक प्रकारचें जाळें; याची दोन्हीं टोकें दोन दांडयांस बांधलेलीं असतात. (ह्रा शब्द विशेषतः रत्नागिरीकडे रूढ आहे. हर्णैच्या बाजूस याच अर्थी दांडेभुसा हा शब्द वापरतात). **दांडेसाळ**–स्त्री. अलंग; चाळीसारखें लांबचलांब घर; चाळ; पागा; बराक. [ दांडा+शाला=घर ] **दांडेस्वार**–पु. आजारांतून नुकताच उठून काठीच्या साहायानें हिंडूंफिरूं लागलेला मनुष्य; हिंडता फिरता रोगी. [ दांडा=काठी+स्वार ]

**दांडार(व)णें**–अक्रि. थंडी, श्रम इ०कानीं शरीर ताठरणें; ताट कळणें. [ दांडा ]

**दांडाग**—पु. १ (मनुष्य इ०काच्या) पाठीचा कणा. २ (माड, केळ इ० कांच्या) पानाच्या मधोमध असणारा टोंकापर्यंतचा देठाचा लांब भाग. ३ नाकाचा कपाळापासून शेंडयापर्यंतचा उंच भाग; दांडा. ४ दांडा या शब्दाच्या कांहीं इतर अर्थीहि योजतात. दांडा पहा. [ दांडा ]

**दांडाविणें**—सक्रि. काठीनें बडविणें; ठोकणें; चोपणें; मारणें. [ दांडा ]

**दांडाळणें**—सक्रि. काठीनें बडविणें; मारणें; दांडकणें.

**दांडाळवत**—न. (कों.) मध्यें दांडारा पण अग्र नसलेलें केळीचें पान, काप, तुकडा. अग्राच्या पानाला आगोतली किंवा मोनई म्हणतात. [ दांडा ]

**दांडी**—स्त्री. १ पालखीच्या वर वांकविलेला, मागें व पुढें सरळ असलेला व दोन्ही बाजूंस (पालखी) उचलणारांनीं धरावयाचा वांसा, दांडा: (ल) पालखी. ' सर्वे साति लक्षां दांडिया । बारा लक्षु तेजिया । ' –शिशु २३४. २ (नांगर, वखर, कुळव, इ० आउतांचा) सोट, काठी. ३ गाडीची धुरा ४ घोडयाचें शेंपूट; घोडयाच्या शेंपटीचा बुडखा; ढुंगणाजवळचा शेंपटीचा भाग. 'घोडियांच्या दांडया तोडल्या. ' –रा १५.२०६. –विठ्ठलसीतास्वयंवर ६.१६. ५ (अशिष्ट) घोडयाचें शिस्न. ६ वस्त्रें इ० वाळत घालण्याकरितां उंचावर आडवी बांधलेली काठी, बांबू इ० ७तांब्याच्या जुन्या ढब्बूवरील दोन सरळ आडव्या रेघांपैकीं प्रत्येक रेघ. असला दुदांडी ढब्बू छत्रपति शिवाजी महाराजांनीं काढला होता. त्याच्या एका बाजूस दोन आडव्या रेघा असून दुसऱ्या बाजूवर तीन ओळींत अनुक्रमें 'शिव' 'राजछत्र' 'पति' हीं अक्षरें असत. ८ तराजूचीं पारडीं ज्याला अडकवितात तो आडवा दांडा. (ल.) तराजू; ताजवा. ९ समुद्रांत लांबवर गेलेला जमीनीचा चिंचोळा भाग; दांड. उदा० (मुंबईजवळील) कुलाब्याची दांडी. १० वल्ह्याचा पतिंगा, दांडा; यावरून वल्हेकरी; नावाडी. ११ छत्री, पंखा इ० कांस धरण्याकरितां लाविलेला दांडा, मूठ. १२ वीणा, सतार इ० तंतुवाद्यांचा डेऱ्याच्या, भोंपळयाच्या वरचा तारा बसविलेला लांकडाचा भाग. १३ लांकडाचा तासलेला लांब तुकडा; वांसा; तुळवट. १४ मोठी व लांबवर पसरलेली लाट. १५ (महानु.) बेडी. ' काळ लोहाचां दांडीं । आधारु कां घालवे । ' –भाए ५९७. १६ कान; कडी (धरण्याची) १७ ओलावा शोषून न घेणारी व लौकर सुकणारी थळ जमीन; उंचवटयावरील वालुकायुक्त, बरड जमीन. [ दांडा लघुत्वानें ] ०**पूर्णिमा-पुनव**–स्त्री. माघ शुद्ध पौर्णिमा. ह्या दिवशीं होळीचा दांडा रोंवतात म्हणून हें नांव पडलें; दांडेपूर्णिमा पहा [दांडी+पूर्णिमा, पूनव] ०**वाला**–पु १ तराजू हातांत घेऊन माल तोलून घेणारा व देणारा. २ वाणी; व्यापारी; उदमी.

**दांडू**—न. विटीदांडू इ० खेळांतील खेळण्याची लहान काठी, दांडकें. [ दांड ]

**दांडुका, दांडूक, दांडोका**—पुन. १ लहान काठी; दांडू. २ फरा इ० मापावरून फिरवावयाचें दांडकें. ३ आंखण्याचा रूळ. ४ लहान सोटा. दांडका, दांडकें पहा. [ दांड ]

**दांडूपणा**—स्त्री. (व.) दांडपणा; दांडगेपणा. [दांड+पणा]

**दांडूल**—न. (वे.) कुळागराचा तुकडा, दांडा. [ दांडू ]

**दांडोरा**—पु. १ दवंडी; डांगोरा; डंका. (क्रि० पिटणें; फिरविणें ). २ प्रसिद्धि; जाहीर करणें. [ सं. डिंडिम; हिं. ढिंढोरी ]

**दांडोरें**—न. (सुतारकाम) ढेकळें फोडण्याचें फळया जोडून केलेलें हत्यार. [ दांड=काठी ]

**दांडोली**—स्त्री. (काव्य.) दौंडी; डांगोरा पहा. (क्रि० पिटणें; फिरविणें ). ' जवळ असतां बोलाबोली । शोभनामाजीं वाढेल कली । निकरां जाईल दांडोली । आम्हा आणि रुकमिया । '

**दांडोळ-ळी**—स्त्री. (प्रां.) १ ओळ, रांग; पंगत. जसें:– एका दांडोळीनें निजणें-पडणें-बसणें-उभें राहणें. २ अरुंद व लांबचलांब इमारत; (विरू.) दांडळ. दांडळ पहा. [दांडा+ओळ]

**दांडोळा**—पु. (प्रां.) पानाचा मधला दांडा; देंठ; कणा दांडारा.

**दाढ**—स्त्री. दांताच्या कवळींतील शेवटच्या मोठया दांतांपैकीं प्रत्येक. यांचा उपयोग अन्नाचें चर्वण करण्याचा आहे; 'बळानें काढूं ये मणि मकर-दाढेंत दडला।'-वामन-स्फुटश्लोक (नवनीत पृ. १३३). [सं. दंष्ट्रा; प्रा. दाढा; गु. दाढ; हिं. डाढ; सिं. डाढ] **दाढ बांधणें**-१ (मंत्र-तंत्र इ० कांच्या योगानें एखाद्याची०) अन्न इ० खाण्याची शक्ति नाहींशी करणें. 'माझें लेंकरूं अलीकडे जेवीनासें झालें आहे. जखिणीनें त्याची दाढ बांधली यांत शंका नाहीं.' २ (एखाद्याचें) तोंड, बोलणें बंद करणें; (एखाद्यास) निरुत्तर करणें. **दाढ सुद्धां न माखणें**-(एखाद्याच्या) एका दाढेला अन्न इ० सुद्धां न पुरणें; खाद्य पदार्थानें थोडीशी सुद्धां तृप्ति न होणें. **दाढेंत सांपडणें**-(एखाद्याच्या) तावडींत, कचाटयांत, पेंचांत सापडणें. सामाशब्द- **०बंद**-पु. (चित्त्यास) तोंड उघडतां न यावें म्हणून तोंडास घातलेला सुताच्या दोरीचा फांस. 'खाण्याचे वेळीं दाढबंद जरा सैल करितात.'-चिमा १८. [दाढ+बंद=बांधण्याची दोरी] **०भर**-वि. खातांखातां दाढ भरेल इतकें -शास्त्रीको. 'यंदा ऊंस दाढ भर खावयास मिळाले नाहींत.' **०शृंखळ**-वि. दाढांबरोवर बाहेरच्या अंगास किंवा गालावर भोंवरा असलेला (घोडा). -अश्वप १.९७. [दाढ+सं. शृंखला=साखळी] **०सांख(क)ळ**-स्त्री. १ दाढांना होणारा एक विकार. २ (घोडयाच्या) दाढेच्या सांध्यावर असलेला भोंवरा. हा अशुभ मानतात. -वि. दाढेच्या सांध्यावर भोंवरा असलेला (घोडा); दाढशृंखळ पहा. [दाढ+सांखळी]

**दाढ**—स्त्री. (कों.) १ भाताचें रोप करावयासाठीं भाजलेली जमीन, शेताचा तुकडा. २ (ल.) भाताचें रोप करण्यासाठीं जमीन भाजण्यासाठीं तिच्यावर घातलेला गवत, झाडोरा, इ० ३ (ल.) वरीलप्रमाणें भाजलेल्या जमीनींत झालेलें भाताचें रोप. ४ (उत्तर-देश) ज्यांत भात पेरून त्याचीं रोपें उगवल्यावर तेथून उपटून दुसरीकडे लावतात तें शेत [सं. दग्ध; प्रा. दड्ढ]

**दाढरणें**—अक्रि. (आंबा, गळूं इ०) पिकल्यावांचून टणक, कठिण होणें; दाठरणें. [सं. दृढतर]

**दाढा**—वि. (काव्य.) धीट; पराक्रमी; प्रतापी; बलाढय; गाढा. [सं. दृढ; प्रा. दढ]

**दाढावणें**—अक्रि. (व.) रागावणें. 'तो माझ्यावर भला दाढावला.'

**दाढी**—स्त्री. हनुवटीवरील केंस. [सं. दाढिका; प्रा. दाढिआ] (वाप्र.) **०करणें**-हनुवटीवरील केंस काढणें; चेहऱ्याची हजामत करणें. **०करविणें**-न्हाव्याकडून तोंडावरील, हनुवटीवरील केंस काढविणें; चेहऱ्याची हजामत करविणें. **दाढीचा गधडा**-पु (तिरस्कारार्थी) लांब दाढी असलेला मनुष्य. **दाढी, दाढी होटी धरणें, दाढीला हात लावणें**-(एखाद्याची) विनवणी करणें; काकुळतीनें प्रार्थना करणें; खुशामत करून वश करणें. 'ओटी पसरोनि धरितों मी दाढी। नरकांतुनि काढी येकदांचें।'-मध्व ८३. **दाढी धरून टाचा, पाय तुडविणें**-(एखाद्यास) बाह्यात्कारीं स्तुतीनें मोहवून आंतून (त्याचें) अनिष्ट करणें; मैत्रीचा आविर्भाव दाखवून घात करणें. **दाढीस कांदे बांधणें**-एखाद्याची फजिती, अप्रतिष्ठा करणें. (एखाद्याची) **दाढी हालविणें**-एखाद्याला रागानें दपटशा देणें; एखाद्याच्यावर ताशेरा झाडणें, एखाद्यास चिडविणें; डंवचणें. **घडी घडी लांब दाढी करणें-मांडणें**-घडी घडी रागावणें, संतापणें. (रागावलेला मनुष्य दाढीवरून हात फिरवीत असतो त्यावरून हा अर्थ) **म्ह० १** एकाची जळते दाढी दुसरा तीवर पेटवितो विडी; (एकाच्या मिशीला आग लागली दुसरा म्हणतो मला दिवा लावूं दे)=दुसऱ्याच्या संकटाचा विचार न करितां त्यापासूनसुद्धां कठोरपणानें स्वतःच यत्किंचित् फायदा घेऊं पहाणाराविषयीं तिरस्कारानें ही म्हण योजतात. २ दाढीस वेगळें आणि डोईस वेगळें (कोण देतो?) =मिळावयाचें तितकें मिळाल्यावरहि जर कोणी मनुष्य कांहीं तरी सबबीवर जास्त मागूं लागला तर त्याला जास्त कोण देणार? **०पाहून वाढणें**-बाह्य स्वरूपाकडे, पोषाखाकडे पाहून त्याला अनुरूप मानपान, आदरातिथ्य करणें. सामाशब्द- **०डोई**-स्त्री. दाढी आणि डोकें यांची हजामत. (क्रि० करणें). [दाढी+डोई] **०दीक्षित**-वि. (ल). दाढीवाला; मुसलमान [दाढी+सं. दीक्षित=यज्ञ, अग्निहोत्र इ०कांची दीक्षा घेतलेला] **०मिशांचा**-वि. दाढी आणि मिशा असलेला. **०वाला**-वि. मुसलमान. 'दिल्लीचा दाढीवाला।'-संग्रामगीतें १२३. **दाढुक**-न. (व.) १ दाढीवरून बांधलेला कपडा, वस्त्र. 'दाढुक बांधल्यानें तो ओळखूं आला नाहीं.' २ दाढीला झालेलें गळूं. ३ (ना.) (तिरस्कारार्थी) दाढी. [दाढी+ऊक प्रत्यय] **दाढेल**-वि. मोठी दाढी असलेला. **दाढया**-वि. (तिरस्कारार्थी) लांब दाढी असलेला; दाढीवाला. [दाढी]

**दाढी**—स्त्री. (कों.) भाताचें बीं पेरण्यासाठीं भाजतात ती जमीन; दाढ पहा. [दाढ]

**दाढेरूं**—न. दाढेजवळ हिरडीला झालेला फोड. [दाढ]

**दाढेल**—न. (कों.) वडे इ०कांचें तळण तळून शिल्लक राहिलेलें तेल; बढेल. [सं. दह्-दाढ+तेल]

**दाढ्या**—पु. दाढेचा एक विकार; रोग. [ दाढ ]

**दांण**—स्त्री. ( अन्नानें नित्यशः भरावयाचें उदररूप पात्र ) ( तिरस्कारानें ). खादाड माणसाचें पोट. [ फा. दान=स्थान, आगर. बहुधां समासांत उपयोग उदा० अत्तरदान, पानदान ]

**दांण**—न. (गो.) आंब्याच्या कैऱ्या मिठाच्या पाण्यांत घालून ठेवण्याचें लांकडी गोलाकार पात्र; डोण. [ सं. द्रोण; प्रा. दोण ]

**दाणयां**—वि. (गो.) अंगावर लांब पट्टे असलेला (वाघ); ढाण्या.

**दाणा**—पु. १ धान्य. २ धान्याच्या समुदायापैकीं, कणांपैकीं प्रत्येक कण, नग, व्यक्ति. ३ धान्यकणाप्रमाणें असणारें मोत्यें, मणि, बीज, डाळिंबाचें वीं इ०. ४ बरफी इ०काच्या ठिकाणीं साखर जमून जे कण होतात त्यांपैकीं प्रत्येक. ५ (कागद, चामडें इ०काच्या गुळगुळीत पृष्ठभागावर येणारी बारीक कणासारखी फुगोटी, टेंगूळ, नक्षी. ' खराऱ्याच्या आकाराच्या एका हत्यारानें कातडें उभें, आडवें, किंवा चोहोंकडून घासतात; म्हणजे त्यावर दाणा उमटतो. ' —ज्ञाको क २६३. ६ ( कापड इ० कांच्या गांठीतील ) प्रत्येक नग. ७ उत्कृष्ट व एकेक नगानें विकले जाणाऱ्या आंब्यांपैकीं प्रत्येक नग. ' आम्बे मुरंब्यास दाणे शुमार पन्नास. ' —रा २२.१०५. ८ किरमिजी रंगाचा कण ९ सीताफळाच्या सालीवरील डोळ्यांपैकीं प्रत्येक. १० एक प्रकारची जाडी साखर. [ सं. धान्यक—दाणअ—दाणा. तुल० फा. दाना ] ( वाप्र. ) **दाणे टाकून कोंबडे झुजविणें**-पदरचें खर्चून मुद्दाम भांडणें लावणें. **म्ह**० उतरंडीला नसेना दाणा पण दादला असावा पाटील राणा. सामाशब्द— **०गल्ला**—पु. धान्य; धान्याचा सांठा, कोठार. **०गोटा**—पु. ( व्यापक ) धान्यधुन्य; धान्य, डाळी आणि इतर तत्सदृश जिन्नस. **०पाणी**—न. १ निर्वाह; पोट भरणें; उपजीविकेचें, निर्वाहाचें साधन. २ ईश्वरानें नेमून ठेवलेलें अन्नोदक. ' आमचें दाणापाणी तुमचे पदरीं आहे म्हणून आम्हांस तुम्ही पोशितां. ' ३ दाणागोटा; चारापाणी ४ मृताकरितां एक वर्षपर्यंत ब्राह्मणास पोंचविण्याचें धान्य व पाणी. [दाणा+पाणी] **०साखर**—स्त्री. फुल साखर काढून घेतल्यावर खालीं राहणारी तांबूस साखर कृषि ४८२. **दाणेआळी**—स्त्री. १ धान्याच्या दुकानांची पट्टी, गल्ली. २ (पुणें ल.) वेश्यावस्ती. दाणेबाजारांत वेश्यांची वस्ती आहे यावरून. **दाणेकरी**—पु. घोड्याच्या पागेला दाणा पुरविणारा मराठ्यांच्या अमदानींतील लष्करी अधिकारी. —वि. १ संसाराच्या निर्वाहास पुरून विकण्यास उरेल इतकें धान्य ज्याच्या जवळ आहे असा. २ धान्य विकणारा; दाणेवाला; धान्यव्यापारी. **दाणेदार**—वि. १ ज्यांत दाणा उत्पन्न झाला आहे, भरला आहे असें (कसणी इ०). २ कणीदार; रवाळ. ३ ज्याच्या पृष्ठभागावर दाणे उठले आहेत असा ( कागद, चामडें इ० ). [ फा. दानादार् ]

**दाणा**—वि. १ धूर्त; शहाणा; चतुर; दूरदर्शी; चाणाक्ष. २ ( व्यापक. ) उत्कृष्ट; गुणवान; उत्तम; फार चांगला ( मनुष्य, जनावर). 'मुलगा दाणा आहे.' 'पादशाहीस वर्तमान कळलें तेव्हां बोलिले कीं दुस्मान दाणा गेला. ' —मराचिथोशा ८५. [ फा. दाना ]

**दाणावणें**—अक्रि. (घोड्यानें) फार दाणा खाल्यामुळें (तो) कांहीं विकारानें, आजारानें युक्त होणें. [ दाणा ]

**दाणादाण**—स्त्री. १ पांगापांग; वाताहात; पांगणी; फांकाफांक; सैरावैरा पळणें; भणाणणें. २ विस्कळितपणाची, गोंधळाची, पांगापांग झालेली स्थिति. —वि. विकीर्ण; विस्कळित; सैरावैरा पळत सुटणारा. [ फा. दाना—दाना ] **म्ह**० कोंबडी मेली पिलें दाणादाण. **दाणादीन**—वि. धूळधाण झालेला; नष्ट. —शर

**दाणालाख**—स्त्री. बोर, पिंपळ इ० झाडापासून निघणारी एक प्रकारची लाख.

**दाणी**—पु. १ धान्यावरील कर वसूल करणारा अधिकारी. ' येतुकेआ दाणी लोकू मेळुनु । बावृतिस्मु घ्यावया आले ठाकुनु । ' —खिपु २.१८.७४. २ सरकारास धान्य पुरविणारे. ३ कराच्या रूपानें येणारें सरकारी धान्य ज्याच्या ताब्यांत असे तो अधिकारी. ४ ( वरील पेशावरून पडलेलें ) एक आडनांव. ५ धान्याचे व्यापारी [ दाणा ]

**दाणी**—स्त्री. ( गो. ) डागणी; सळई. [ दाहणी ]

**दाणी**—स्त्री. ( एखादा जिन्नस ठेवावयाचें ) पात्र, उपकरण, (सं.)आलय या अर्थाचा फारसी प्रत्यय. उदा० अत्तरदाणी, गुलाबदाणी, चहादाणी. [ फा. दान् ]

**दाणूस**—स्त्री. ( गो. ) गाडीची चौकट; साटी.

**दाणोडा**—पु. (ना. ) धान्य अस्ताव्यस्त सांडणें. [ दाणा ]

**दांत**—पु. १ चावण्याच्या, फाडण्याच्या उपयोगी तोंडांतील दृश्य अस्थिविशेषापैकीं प्रत्येक; दंत. २ ( ल. ) ( फणी, करवत, दंताळें इ० कांचा ) दांता; फाळ; नांगराचें टोंक; डंगाचें टोंक. ३ हस्तिदंत 'सहदेव नकुळ घेउनि दांतीं सिंहासनीं पृथा बसली।' —मोशांति ५.४३ ४ द्वेषबुद्धि; मत्सर; दावा; डाव; दंश. 'त्याचा दांत आहे. ' ' तो दांत राखितो. ' [सं. दंत; पहा. हिं. दांत; सिं. डंदु ] ( वाप्र. ) **—उठणें**—दांतांनीं धरलेल्या पदार्थावर दांताच्या खोलगट खुणा उमटणें. **०ओठ खाणें—चावणें**- रागानें दांतांवर दांत घासणें; दांतांनीं ओंठ चावणें; अतिशय चिडणें; रागावणें. **०काढणें — दाखविणें** — दांत विचकून, फिदिफिदी हंसणें. **०किची खाणें**—(ना.) (राग इ० कानीं) कचाकच, कडकड दांतचावणें. **०किरकिटीस येणें**— विपन्नावस्था, अन्नान्नदशा प्राप्त होणें; अति निकृष्ट परिस्थितीनें ग्रस्त होणें. **०खाऊन—ओठ खाऊन**—मोठ्या रागानें व अवसानानें. ' नरवर गरधरखरतर शर करकर दांत खाउनी सोडी । ' —मोशल्य २.८४. **०खाऊन—चावून अवलक्षण करणें**-(प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसतां) रागाचा दुबळा आविर्भाव आणून, शिव्याशाप देऊन स्वतःचें हंसें

करून घेणें. ०**खाणें-चावणें**-(रागानें चडफडून, झोपेंत) दांतांवर दांत घासणें. 'कोपें खातात दांत बा हेर।' -मोत्री ४.२६. ०**खीळ-खिळी बसणें**-१ (सन्निपातादि दोषांमुळें) वरील दांत व खालचे दांत एकमेकांस घट्ट चिकटून बसणें. 'रामनाम घेतां तुझी बैसे दांतखीळ।' -एकनाथ २ (ल.) निरुत्तर होणें; एखाद्या पुढें बोलतां न येणें. ०**खोचरणें**-दांताच्या फटींत, खळग्यांत काडी, कोरणी घालून अडकलेले अन्नाचे कण इ० काढणें. ०**झिजणें**-(ल.) निष्फळ उपदेश केल्यानें, केलेल्या विनवण्या व्यर्थ गेल्यानें, शिकविलेला विषय मूर्ख विद्यार्थ्यास न समजल्यानें तोंडाला फुकट शीण, श्रम होणें. ०**धरणें-असणें-ठेवणें-राखणें-बाळगणें**- (एखाद्याशीं) द्वेष, अदावत, मत्सर करणें; (एखाद्यावर) डाव धरणें; पूर्वीचें शल्य मनांत ठेवून (एखाद्याच्या) नाशासाठीं टपून बसणें. ०**निसकीस येणें**-त्वेष, स्फुरण, आवेश इ० कार्नी युक्त होणें; जिवावर उदार होणें. 'मल्हारराव यांचे इरेनें दातनिसकीस येऊन मोठमोठे खेतांत येऊन जीवाभधिक केली.' -भाव ११. [दांत+सं. निकष=घासणें] ०**पडणें**-(एखाद्याची) फटफजिती, नाचक्की होणें; पराजित, फजित होणें. ०**पाजविणें**-एखादी वस्तु (विशेषतः खाण्याची वस्तु) मिळण्याजोगी नसतां तिच्याबद्दल उत्कंठित, आतुर होणें. ०**पाडणें**-(एखाद्याची) फजिती करणें; (एखाद्यास) वादांत पराजित करणें; टोमणा मारणें; निरुत्तर करणें.' इतका खोटें बोलणारा तूं असशील असें मला वाटलें नव्हतें. नाहींतर दोन चार साक्षी ठेवून तुझे चांगले दांत पाडले असते.' -त्राटिका अंक ४, प्र. ३. ०**पाडून हातावर देणें**-(अशिष्ट) (एखाद्याची) कंबख्ती काढणें; पारिपत्य करणें; उट्टें फेडणें (विशेषतः धमकावणी देतांना उपयोग). ०**लागप**-(गो) पैसे पदरीं असणें; गबर असणें; खाऊन पिऊन सुखी असणें. ०**वठणें-लागणें**-उच्चारलेला शाप(एखाद्यावर) फलद्रूप होणें. 'त्याच्यावर त्या चेटकीचा दांत वठला'=त्याला चेटकीच्या शापाचें वाईट फळ मिळालें, त्याला शाप भोंवला. ०**वासणें**-(ल.)हातीं घेतलेलें कार्य शेवटास नेववत नाहीं म्हणून निराश होऊन स्वस्थ बसणें. ०**वासून पडणें**-१ आजारानें अशक्त होऊन अंथरुणास खिळणें. २ मेहनत फुकट गेल्यानें हिरमुसलें होऊन बसणें. दांत वासणें पहा. 'वासुनि दांत मुखांत दहांत पडे मति गाढ तमीं पचली।' -वामन-सीतास्वयंवर ११. ०**विचकणें**-१ उपहास करून हंसणें. 'जो ऐसा प्रभु त्या जना न विचकूं दे दांत, बाहे रहा। वैकुंठींच सदा...' -मोरोपंत. 'प्रेमदांत पावुनियां श्रम दांत क्षुद्र विचकिती कीं जे।'-भक्तमयूरकेका ६५. २ याचना करणें; कांहीं जिन्नस मिळविण्याकरितां एखाद्यास विनविणें. ०**होंठ खाणें-चावणें**-दांत ओंठ खाणें पहा. **दांतां ओठांवर जेवणें**-चोखंदळपणानें जेवणें.**दांतांखालीं घालणें-धरणें**-(एखाद्यावर) करडा, सक्त अंमल चालविणें; कडकपणानें वागविणें; अतिशय छळणें; गांजणें. **दांतांची मिरवणूक काढणें**-(कर.) (एखाद्यानें) स्वतःचें हंसें करून घेणें. **दांताचें विष**-न. मत्सरानें, जळफळाटानें काढलेले विषारी उद्गार; शाप; अभिशाप; शिव्याशाप. **दांताचें विष बाधणें**-१ (एखाद्याचे) शापोद्गार फलद्रूप होणें; दांत वठणें लागणें पहा. २ दुसऱ्यास बाधेल असा शाप देण्यास समर्थ असणें. **दांतांच्या कण्या करणें**-१ विनवण्या, याचना करून व्यर्थ उपदेश करून, शिकविण्याचा निरर्थक खटाटोप करून दांत झिजविणें; तोंड शिणविणें. २ अनेकवार सांगणें, विनविणें. 'एक कांबळा पासोडी द्या म्हणून दांतांच्या कण्या केल्या.' -नामना ५४. **दांतांच्या-कण्या घुगऱ्या होणें**-व्यर्थ याचना करून, उपदेश करून, शिकविण्याचा निरर्थक खटाटोप करून तोंड शिणणें; फार व निरर्थक बोलावें लागणें. 'हांका मारता मारतां माझ्या दांतांच्या कण्या झाल्या.' -पकोघे. **दांतावर मारावयाला पैसा नसणें**-अगदीं अकिंचन, निर्धन असणें, होणें, बनणें; जवळ एकहि पैसा नसणें. **दांतावर मांस नसणें**-१ (ल.) पैशाचें पाठबळ नसणें; दारिद्र्यानें ग्रस्त होणें. २ (दुसऱ्याशीं) भांडण्याचें, (दुसऱ्यास) इजा करण्याचें सामर्थ्य अंगीं नसणें. 'उगीच भरीस भरल्याप्रमाणें लग्नांत खर्च केला. आपल्या तर दांतांवर मांस नाहीं. कुटुंब एवढें थोरलें... असें शंकर मामंजींचें रडगाणें चालू होतें.' -पकोघे. **दांतास दांत लावून असणें-निजणें-बसणें-रहाणें**-तोंड मिटून, कांहीं न खातां, उपाशीं असणें, निजणें, बसणें इ०. **दांतीं येणें, दांतावर येणें**-(एखाद्या) कार्यांत अपयश येणें; (व्यापार इ०कांत) नुकसान, तोटा येणें. **दांतीं तृण-तण-कडब्याळ धरणें**-मान तुकविणें; नम्रपणा स्वीकारणें; शरण येणें; पराजय कबूल करणें. **दांतीं बळ धरणें**-अतोनात मेहेनत, धडपड, नेट करणें; प्रयासानें, नेटानें काम करणें. **दांतीं येणें**-१ (एखाद्यावर) रागानें दांतओंठ खाणें; दांत ओंठ खाऊन भांडण्यास प्रवृत्त होणें. 'येकीस येकी ढकलून देती। येताति येकीवरि एक दांतीं।' -सारुह ७.६०. २ फार अडचणींत, पेचांत, येणें, सांपडणें. (एखाद्याचे) **दांत त्याच्याच घशांत घालणें**-(एखाद्याची) लबाडी बाहेर काढून त्याच्या पदरांत माप घालून त्याची फजिती करणें; (एखाद्याची) लबाडी त्याच्यावर उलटविणें. **सोन्यानें दांत किसणें**-(ल.) पैशाच्या राशींत लोळणें. **हसतां हसतां दांत पाडणें**-हंसून, गोड गोड बोलून फजिती करणें, टोमणे मारणें, निरुत्तर करणें, कुंठित करणें. **दांत कोरून कोठें पोट भरत नसतें**-भलत्याच कामीं चिक्कूपणा करून चालत नाहीं. मोठ्या कार्यास क्षुद्र साधन पुरत नसतें; क्षुल्लक बाबींत काटकसर करून मोठा खर्च भागत नसतो. **आपलेच दांत आपलेच ओंठ**-१

शको. ४. २९

शिक्षा करणारा आपणच आणि ज्याला शिक्षा करावयाची तोहि आपल्यांतलाच अशी स्थिति असते तेव्हां भांडणारे दोन्ही पक्ष निवाडा, शिक्षा करणाराला सारखेच जवळचे स्वकीय असल्यामुळे दोहोंपैकीं कोणाचेंहि बरेंवाईट करतां येत नाहीं अशा वेळीं योजतात. २स्वतःच्याच दुष्कर्माचें फळ भोगतांना स्वतःलाच दोष द्यावा लागतो. खावयाचे दांत वेगळे, दाखवावयाचे दांत वेगळे–हत्तीला देखाव्याचे बाहेर आलेले मोठे सुळे आणि चावण्याकरितां तोंडांत निराळे असलेले असे दोन प्रकारचे दांत असतात त्यावरून वर दाखवावयाचें एक आणि मनांत भलतेंच असावयाचें अशा रीतीचें ढोंग. म्ह० दांत आहेत तर चणे नाहींत. आणि चणे आहेत तर दांत नाहींत. =पूर्ण सुदैव कधींहि लाभत नाहीं, त्यांत कांहीं तरी कमीपणा असतोच. एक गोष्ट अनुकूल आहे, पण तिचा उपयोग होण्यास जी दुसरी गोष्ट आवश्यक असते ती अनुकूल नसते अशा वेळीं योजतात. सामाशब्द– ०इळा–पु. दांतरा, दांत पाडलेला कोयता. ०कडी–स्त्री. (राजा.) दांतखिळी. (क्रि० बसणें). ०कस–स्त्री. (तोंडातून निघालेले) शब्द; उद्गार; भाषण; विशेषतः अशुभसूचक शब्द, भाकित इ० बत्तिशी पहा. (क्रि० बांधणें; लागणें). [दांत+कस] ०कस(सा)ई–पु. नेहमीं अशुभ भविष्यें सांगणारा व ज्याचीं तसलीं अशुभ भविष्यें खरीं ठरतात असें मानलें जातें असा मनुष्य. [दांत+कसाई=खाटिक] –कसळ–ळी–कसाळ–ळी, किसळ–ळी–स्त्री. १ एक सारखें, नेहमीं दांत खाणें, शिव्याशाप देणें, ताशेरा झाडणें इ० युक्त दुर्भाषण. २ अभद्रसूचक, अशुभ भाषण, अमंगल भाषण; बत्तिशी. (क्रि० बांधणें). –वि. १ नेहमीं दांत खाणारा; शिव्याशाप देणारा; ताशेरा झाडणारा. २ नेहमीं अनिष्ट, अभद्र, अशुभ भविष्य सांगणारा. बत्तिशी वठविणारा–रें (व्यक्ति, भाषण). दांतकसाळीस येणें–दांत खाऊन असणें, येणें. 'दांतकसाळीस येऊन... इंग्रज ... आला.' –रा १०.८१. [दात+कसाला=आयास, श्रम, छळ] ०किरकंड्या–स्त्रीअव. (व.) दांत खाणें; शिव्याशाप देणें; दांत किरकीट अर्थ १ पहा. 'दांतकिरकंड्या खाल्ल्या माझ्यावर.' ०किरकोट–किरकिटी–स्त्री. १ दांत खाणें; शिव्याशाप देणें. (क्रि० देणें). २ (ल.) हट्टानें, घुमेपणानें मौन धरून स्वस्थ बसणें. (क्रि० देणें). ३ (बायकी भाषा.) आर्जव, विनवण्या, गयावया करून उसनें मागणें; दांतांच्या कण्या करणें (तिन्ही अर्थी अनेकवचनी प्रयोग). [दांत+किरकीट=ध्व. दांत खाण्यानें होणारा शब्द] ०केणें–न. (एखाद्याचें) नेहमींचें, नित्याच्या जेवणाचें अन्न, भक्ष. [दांत+केणें=धान्य, भाजीपाला इ० व्यापारी जिन्नस] ०कोरणें–दांतांत अडकलेला पदार्थ, अन्नाचे कण इ० कोरून काढण्याची चांदी, तांबें इ० धातूची अणकुचीदार, लहान व बारीक सळई. ०खिळी–खीळ–स्त्री. १ सन्निपातामुळें वरचे व खालचे दांत परस्परांत घट्ट बसून तोंड उघडतां न येणें. (क्रि० बसणें; मिटणें; लागणें, उघडणें). २ न बोलणें; मौनव्रत. [दांत+खीळ=खिळा] ०घशीं–क्रिवि. तोंडघशीं. 'या रांडा घरघाल्या सख्या तूं पडशी दांतघशीं।'–सला १०. [दांत+घसणें] ०चिना–पु. दांत घट्ट करण्याचें औषध; दंतमंजन; (विरू.) दारशिणा; (व.) दाच्छना पहा. [सं. दंत+शाण] ०पड़का–गा–पड्या–वि. १ ज्यांचे दांत पडले आहेत असा. २ दांत पडल्यामुळें विरूप दिसणारा. [दांत+पडणें] ०वडा–पु. (गो.) लहान मुलास दांत आल्यानंतर, त्याच्यावरून ओंवाळून मुलांकडून लुटवावयाच्या वड्यांपैकीं प्रत्येक. ०वडे काढप–(गो.) मुलास दांत आल्यानंतर लहान लहान वडे त्याच्यावरून ओंवाळून ते मुलांकडून लुटविणें. ०वण–न. १ एक टोंक चावून शेवटास गोंडेदार केलेली, दांत घासण्याची बाभळ, निंब इ० झाडाची लहान काडी. २ दंतमंजन; दांत घासण्यासाठीं केलेली पूड. (व.) दातवन. ३ दांतचिना; दांतांस लावून ते काळे करण्याचें औषध. [सं दंतवणी; प्रा दंतवण; गुज. दांतवण] ०वाकें–न. शेतीच्या कांहीं आउतांचे, अवजारांचे दांते आंत वांकविण्याचें एक हत्यार [दांत+वांकणें]

**दांत**—वि. १ दमन केलेला; जिंकलेला. २ ज्यानें इंद्रियांवर ताबा मिळविला आहे असा; संयमी. 'बहु शांत दांत विषयविरत तापसी महा।'–शापसंभ्रम अंक १. 'शांतदांत तपस्वी पूर्ण। शुची धर्मिष्ठ हरिभजनीं मन।' [सं.]

**दांतकें**—न. दांतें असलेलें शेतकीचें एक आऊत; दांताळें. [दांत]

**दांतर**—स्त्री. एक औषधी वनस्पति.

**दांतरखिंड**—स्त्री. तोंडांतले दांत पडून झालेली खिंड. [सं. दंतुर+म. खिंड; दांत+खिंड]

**दांतरडें**—न. काळ्या जमीनींतील गवत निंदण्याचें औत. –कृषि २७२. [दांत]

**दा(दां)तरा**—पु. १ (कोयता, चाकू इ० कांच्या धारेला पडलेला) कातरा; खांड; खांडोरें. २ (राजा. कु.) दांता या शब्दाच्या बहुतेक अर्थी रूढ असलेला शब्द. [दांत]

**दांतरा–ऱ्या**—वि. वरचे दांत ओंठाच्या पुढें असलेला (मनुष्य). [सं. दंतुर]

**दांतरी**—स्त्री. १ म्हातारपणीं उगवणारा, येणारा एक दांत. (क्रि० उगवणें; फुटणें). २ लहान मुलास नुकताच आलेला दांत. (क्रि० उगवणें; फुटणें). ३ विरळ दाणे असलेलें धान्याचें कणीस. ४ मधून मधून दांते मोडलेली फणी, दांताळें इ० [दांत] ०करणें–चिडून (एखाद्याच्या) वसकन अंगावर येणें; खेंकसणें.

**दांतव्या**—पु. (बे.) (सुतारी धंदा.) कानशीचा एक प्रकार, ही कानस निमगोल असते. [दांत]

**दांतवला-लें**—न एक हस्तिदंती दागिना. -**शर**. -वि दांताचा केलेला; हस्तिदंती. 'अस्थीचा वीटाळ होतां स्नान केलें। चुडे दांतवलें कासयासी।' -रामदासी -स्फुट अभंग ३३. (नवनीत पृ. १५१).

**दांतळणें**—उक्रि. (कों.) दांते बसविणें; (रहाटगाडग्याचें तुंब इ०) दात्यांनीं युक्त करणें; दांते पाडणें. [दांत]

**दांतळी**—स्त्री. भांडें भरतां, नेतां येण्याच्या सोयीकरितां त्याच्या गळयास बांधलेली शिंकाळीसारखी दोरी; दांताळी; शिंकाळी.

**दाता**—वि. १ देणारा २ दान करणारा; दानशील; उदार; दान करण्याचा स्वभाव असलेला. 'सत्यसंकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ।' -तुगा ३७३८. [सं. दा-दातृ=देणारा] **म्ह०** देई तो दाता न देई तोहि दाता.

**दांता**—पु. १ फणी, तिफणी, करवत, रहाटगाडगें इ०कांस असलेल्या दांताच्या आकाराच्या अवयवांपैकीं प्रत्येक. (क्रि० पाडणें; घालणें; करणें). २ शेतांतील चिखल सारखा करावयाचें एक प्रकारचें दांताळें. ३ ज्याला केळीं लागतात त्या देंठासारख्या केळयांच्या फणीच्या अवयवांपैकीं प्रत्येक. ४ (व्यापक.) केळयांच्या फणांतून (फणीच्या दांताप्रमाणें) लोंबणाऱ्या केळयांपैकीं प्रत्येक. ५ केळफुलांतील एक लवचिक, लोंचट, तंतूच्या आकाराचा अवयवविशेष; पोग्यांत असतांना केळयाच्या टोंकापासून लोंबणारा तंतुसमूह; केसर; फूल. ६ पुरें न भरलेलें, मध्यें थोडका गीर असलेलें केळें. ७ (क.) कपची; ढलपा; ढलपी; (क्रि० निघणें). ८ (मुंबई) न विभागला जाणारा पदार्थाचा कण. ९ (गो) जमीन उकरण्याची लांकडी फळी. १० (गो.) शेवया, चकल्या इ० करण्याचा सांचा. [दांत] **दांतेकड**-न. (कों.) रहाटगाडग्याच्या तुंब्यास जोडलेलें, दांते पाडलेलें लांकूड. [दांता+कडी] **०दांतेफळी**-स्त्री. (राजा.) शेतांतील चिखल सारखा करण्याचें दांते बसविलेलें एक अवजार; दांता अर्थ २ पहा. [दांता+फळी]

**दांताड-डी**—नस्त्री. (तिरस्कारार्थी) बत्तिशी; दातांची कवळी; दांतावळी. (क्रि० पाडणें; फोडणें; उतरणें; मारणें, देणें; हालविणें; विचकणें). [दांत]

**दातार**—वि. (काव्य.) उदार; दानशूर; धनी; दाता. 'धांवे तुकयाचा दातार आळंगिला वेगीं।' -तुगा १२२. [सं.दातृ]

**दांतावणी**—स्त्री. (कों.) तुंबे इ० दांतळण्याची क्रिया. [दांताविणें]

**दांताव(वि)णें**—उक्रि. दांतळणें; दांता बसविणें; दात्यांनीं युक्त करणें (रहाटाचें तुंब इ०). -**अक्रि**. (एखाद्यावर) रागानें दांतओंठ खाणें; जळफळणें. [दांत] **दांतावून बोलणें**-दांत ओंठ खाऊन बोलणें.

**दांताळ**—न. (जमीन सारखी करण्याचें, जमीनीवरील गवत इ० गोळा करण्याचें, बागाईत व जिराईत शेती या दोहोंसहि उपयोगी) दांते असलेलें एक आऊत: दंताळें; फण. [दांत + सं आलय=घर: म. आळ-ळें]

**दांताळ**—वि. वरचे दांत पुढें ओंठाबाहेर आलेला (मनुष्य); दंताळ. २ नेहमीं अनिष्ट, अशुभ बोलणारा, भाकित करणारा. [दांत] **०पुरी**-स्त्री. (ल.) १ दंतावली; दांतांची कवळी; दंतपंक्ति. २ दांत ज्यांत बसलेले असतात त्या हिरडया; दाढा. [दांत+पुरी=नगर] **०पुरी ओसाड होणें**-दांत पडून तोंडाचें बोळकें होणें.

**दांताऱणें**—उक्रि. १ दांत लावणें; दांतांनीं चावणें, कुरतडणें, ओढणें, हिसडा देऊन तोडणें. २ फाजील बडबड करून (एखादी) गुप्त गोष्ट न कळत बाहेर फोडणें; तोंड पाघळणें.

**दांताळी**—स्त्री दंतपंक्ति; बत्तिशी. 'वर्ती करून दांताळीं। श्वान पुत्र हाडें चगळी।' -दा ५.३.६१. [दांत+सं. आली= रांग, ओळ; अथवा सं. आलय-घर; दांत+म. आळी]

**दांताळी**—स्त्री. भांडयास बांधलेली शिंकाळी. दांतळी पहा.

**दांताळें**—न. फणीसारखें दांते असलेलें शेतकीचें एक अवजार. यानें मळयांत पीक पेरल्यानंतर वाफे व सऱ्या तयार करितात. दाताळ पहा. [दांत]

**दांतिरा**—वि. दांत पुढें आलेला; दंताळ; दांताळ. 'दांतिरें बोचिरें घानाळ।' -दा ३.६.४३. [सं. दंतुर]

**दांतुरडी**—स्त्री. १ (तिरस्कारार्थी.) दांताडें; दंतावळी (अनेकवचनीं प्रयोग). 'दांतुरडया काढून हांसतोस काय!' २ (लहान मुलास आलेला) नवीन लहान दांत (अल्पार्थी प्रयोग). [दांत]

**दांतुरी**—स्त्री. (महानु.) (थंडी इ० कार्नी) दांत वाजणें; कुडकुडणें. 'दांतुरी पंचभूताची।' -भाए ६०२. [दांत]

**दातूर**—पु. एक वृक्षविशेष.

**दातृत्व**—न. उदारपणा; औदार्य; दानशूरता; दातेपणा. [सं.]

**दा(दां)तें**—न. (गो.) जातें.

**दांतोणी**—स्त्री. (गो.) फणी. [दांत]

**दांतोन**—न. (व.) दांतवण; दंतमंजन. [दांतवण]

**दांतोरी-रें**—स्त्रीन. दांत; दांताडें; दंतपंक्ति. -**शर** [दांत]

**दांतोळा**—न. एक प्रकारची मासळी.

**दांतोळ्यो**—स्त्री. (गो.) दांतवडा पहा.

**दांत्या**—पु. तपकिरी रंगाच्या मुंगीची एक जात.

**दांत्या**—पु. सर्व अर्थी दांता पहा.

**दात्याळ**—न. खत ओढण्याचें दांते असलेलें पावडें; दाताळ, दांताळें पहा. [दांता]

**दांत्रा**—पु. करवत, फणी इ० कांचा दांता. -वि. दातरा: दांताळ; दांतरा (-वि.) पहा. [ दातरा ]

**दांत्रां**—नअव.(गो.)विळीचे अणकुचीदार दांत.खवणीचा दांत.

**दात्री**—स्त्री. ( कु. गो. ) एक झाड. याच्या पानास कांटे असतात [ दांत ]

**दाथर**—पु. १ ( दोन पदार्थांमधील ) गवत-पाल्याचा थर; मोदक इ० वाफेनें शिजवितेवेळीं पातेल्यांत पाणी घालून त्यांत गवत, पानें इ० कांचा घालतात तो थर. -ज्ञा ९.३३१. ' विष्ठा मूत्राच्या दाथरीं । नवमासवरी उकडिजेति । ' -एभा ७.१४७. २ उकाडा; उबारा; वाफारा. ३ थर. ४ बांधकाम करतेवेळीं दगड, विटा इ० कांवर देतात तो मातीचा, चुन्याचा थर. ५ दद्रु; दराद; नायटा. [ सं. दृढ+स्तर ] **०वडा**-पु. (ना.) आंत पाणी असलेल्या भांड्याचें तोंड वस्त्र इ० कानें बांधून भांड्यांतील वाफेवर शिजवलेला नरम वडा; फुंडका. [ दाथर+वडा ]

**दाथरा**—पु. नायटा; दराद; दाथर अर्थ ५ पहा.

**दाथर्दा**—स्त्री. आच्छादन. दादरा अर्थ १ पहा.

**दाद**—स्त्री. १ दुर्बलानें वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आपली तक्रार कळविण्यासाठीं मिळविलेला प्रवेश, मुलाखत; वर्दी. २ तक्रार; फिर्याद. ( क्रि० लावणें; लागणें ). ३ ( वरिष्ठ अधिकाऱ्यानें तक्रार इ० ऐकून केलेला ) तक्रारीचा बंदोबस्त, इलाज, उपाय. ( क्रि० देणें).४ न्याय; इन्साफ. ' हा चालवून तुमची किस्त अदा करावी तर न्याय-दाद नाहीं. ' -रा ५.१३७. ५ ( कायदा. ) पक्षकार स्वतःच्या हक्काबाबत कोर्टाकडे करतो ती मागणी, विनंति. [ फा. दाद्; सिं. दादु ] **०घेणें**-तक्रार ऐकून न्याय देणें. **०देणें**-अधीन होणें; स्वतःवर दुसऱ्याचा पगडा बसवूं देणें; (एखाद्यापुढें) स्वतःचा कमीपणा कबूल करणें. ( अकरणरूपीं प्रयोग केल्यास व दाद या शब्दाच्या मूळच्या अर्थास अनुसरून ) तक्रारीकडे दुर्लक्ष करणें, तक्रारीचा बंदोबस्त न करणें असा अर्थ; त्यावरून (ल.) न जुमानणें; न गणणें; हार न जाणें. ' हा झोंबी खेळण्यांत अथवा कोणत्याहि कामांत कोणास दाद देत नाहीं. ' ' किल्ल्यावर गोळीबार फारच केला पण किल्ल्यानें दाद दिली नाहीं.' **दाद ना फिर्याद**-अन्यायाबद्दल तक्रार करण्याची अथवा न्याय मिळविण्याची अडचण, गैरसोय, पंचाईत इ० कास उद्देशून योजावयाचा वाक्प्रचार. सामाशब्द- **०पुस**-स्त्री. (कु.) चौकशी; विचारपूस. [ दाद+पुसणें=विचारणें ] **०महाल**-पु. लोकांच्या तक्रारी ऐकण्याचा दिवाणखाना, जागा. [ दाद + महाल = दिवाणखाना ] **दादी फिर्यादी**-वि. न्याय, दाद मागणारा. 'या उपरी कोणी दादी-फिर्यादी आल्यास हुजूर पाठवावें. ' -रा ७.२९.

**दाद**—स्त्री. गजकर्ण; दराद. [ सं दद्रु; प्रा. दद्दु; हिं. दाद ]

**दादगा-ग्या**—पु. ( तंजा. ) पुरुष; पुरुषमंडळी. [दादला ?]

**दादड**—न. गजकर्ण; दराद. [ दाद ] **दादडणें**-अक्रि. ( शरीर ) गजकर्ण इ० कानीं विकृत होणें. [ दादड=गजकर्ण ]

**दादड**—स्त्री. (कों.) १ भातांत उगवणारें जाडें-भरडें गवत. २ भातांतील जाडें पळिंज, न भरलेलें लोंबट.

**दादभाई**—पु. दायाद: भाऊबंद. [ दायाद+भाई ]

**दादर**—पु. जिना; सोपान. ' आईकें प्राणाचा हात धरूनी । गगनाची पाउटी करूनी । मध्यमेचेनि दादरेहुनी । हृदया आली।' -ज्ञा ६.२७१. २ जिना बंद करावयाजोगें जिन्याच्यावर आडवें पाडावयाचें दार, लांकडी झडप. ३ नदी इ०कांवर, खालून वहातें पाणी राखून केलेला लांकडी, दगडी पूल; (सामा.) पूल. ४ (प्रथम मुंबईत रूढ ) शिडीसारखा काढतां-घालतां येणारा लांकडी जिना. [ सं. दर्दर ? प्रा. दे. दद्दर=शिडी; गु. दादर ]

**दादर**—न. १ गजकर्ण; दराद. २ घाम इ०कानीं शरीरावर उठणारा दाट पुरळ, गांध. [ सं. दद्रु ]

**दादर**—स्त्री. ( खा. व. नाशिक ) शाळू; जोंधळा; जोंधळण. रब्बीच्या पिकापैकीं एक पीक.

**दांदरघाई**—स्त्री. ( व. ) कांघाई; कांगावा. ' तूं आपली दांदरघाई लावूं नकोस. '

**दांदरणें**—अक्रि. ( ना. व. ) घाबरून जाणें; भीतीनें गोंधळून जाणें; धांदरणें. धादरणें पहा.

**दादरा**—पु. १ भांड्यांतील पदार्थ झांकलेला रहावा म्हणून भांड्याच्या तोंडास पान, वस्त्र इ०कांचें बांधतात तें आच्छादन. २ धूर बाहेर जावा, किंवा घरांत उजेड यावा म्हणून घराच्या छपरास ठेवावयाचें छिद्र, गवाक्ष; धाब्यांतील झरोका. ३ (राजा). ( ल. ) अतिशय थंडीमुळें कानांस बसणारा दडा; कान बंद होणें; कानठाळी. ( क्रि० बसणें ). ४ जिना बंद करण्यासाठीं जिन्यावर आडवें पाडावयाचें दार, झडप; दादर. ५ खिडकी; भोंक; भगदाड ६ ( व. ) जिना; दादर पहा. [ दादर ]

**दादरा**—पु. (संगीत). एक ताल. याच्या सहा मात्रा व दोन विभाग असतात. [ सं. दर्दरिका; प्रा. दद्दरिया=वाद्यविशेष; सिं. दादुरु ]

**दादरी**—स्त्री. (सोनारी) चांदी, सोनें इ० तोडण्याची छिनी. [ सं. दु-दर, दर्दर ]

**दादरी**—स्त्री. ( क. ) पूल; दादरा पहा.

**दादरी**—स्त्री. एक जंगली झुडप.

**दादला-ल्या**—पु. १ नवरा; पति. दादुला पहा. २ (गो.) पुरुष; नर. [ दादा+ला प्रत्यय ] **म्ह०** दादल्यापेक्षां बायको मोठी मुसळ घेऊन लागे पाठीं. सामाशब्द- **०बाइकें-बाइलें, ०बायकें-लें**-न. नवराबायको; पतिपत्नी. [ दादला+बायको ]

**दादलोजी**-पु. नवरा; पति. [दादला+जी( आदरार्थी ) प्रत्यय ]

**दा दा**—उद्गा. गाडी हांकतांना बैलानें चालावें म्हणून त्यास देण्याच्या इशाऱ्याचा शब्द. 'हरिरी, पोपो; दा दा, ह्या ह्या!' शब्द. [ ध्व. दा द्वि. ]

**दादा**—पु. १ वडील बंधु; धनी; मालक; प्रतिष्ठित गृहस्थ; वडील मनुष्य इ०कांस आदरानें संबोधण्याचा, किंवा बोलतांना त्याच्यासंबंधीं योजावयाचा शब्द. व्यावहारिक नांव 'कृष्णंभट दादा, रामाजीपंत दादा, इ०' २ राघोबादादा. याव १२. २१७. ३ (क.) मोरोबादादा फडणीस. -ख ३२५०. ४ (ल.) बैल. -हाच मुलाचा बाप. 'कृषिकर्मी जुंपिले जसे दादा।' [ लहान मुलांचा प्रथम ध्वनि-दा; दा. तुल० सं. तत. इं. डॅड; डॅडी. ] **०बाबा-पुता-करणें**-सौम्य, गोड भाषणानें एखाद्याचा राग घालविण्याचा प्रयत्न करणें; लुलुपुतु करणें; आर्जव करणें म्ह० दादाचें बळ वहिनी जाणें=दिरानें भावजयी-मार्फत भावाला वळवावें, कारण तिला त्याचा स्वभाव ठाऊक असतो याअर्थी.

**दादा**—पु. मवाल्यांचा पुढारी. -वि. (मुंबई-मजुरांत रूढ). लुच्चा; मवाली; लब्धप्रतिष्ठित. **०गिरी**-स्त्री. लुच्चेगिरी; फसवेगिरी.

**दादी**—स्त्री. स्त्रीला आदरानें संबोधण्याचा, उल्लेखिण्याचा शब्द. [ दादा; सिं. दादी ]

**दादुरडी**—स्त्री. एक जातीचा वेल.

**दादुला**—पु. (काव्य). १ दादला; नवरा; पति. दादला पहा. 'उनसुं कलना नव्हे तो भला। खसम अहंकार दादुला।' -तुगा ११६. २ मर्द; वीर; शूर पुरुष. 'एकां उभयांचि प्राण गेले। चांगांचे दांत बैसले। बिरुदांचे दादुले। हिंवताती।' -ज्ञा १.१३५. [ दादला ] **दादुलेपण**-न. १ नवरेपणा; नवऱ्याचा हक्क. २ स्वामित्वाचा अधिकार. 'खांडेधुआवन मागे अंतराळीं। कवडें उकळीं भूतळीं। रोटी मागे सातें पाताळीं। दादुलेपणें।' -शिशु १६२. ३ पुरुषत्व; मर्दपणा; पौरुष. 'जळो तुमचें दादुलेपण। नपुंसकाहूनि हीन।' -एरुस्व ८.६. [ दादला+पण प्रत्यय ]

**दादूपंथी**—वि. दादू नांवाच्या सत्पुरुषाचा अनुयायी; दादूच्या संप्रदायाचा. [ दादू+पंथ=मार्ग, संप्रदाय ]

**दादोड**—(गो.) डांस, ढेकूण चावल्यानें आलेली गांध. दादड पहा.

**दान**—न. १ देणें; देण्याची क्रिया; धर्मादाय; बक्षीस, देणगी देणें. (समासांत) 'विद्यादान-धनदान-कन्यादान इ० २ (कायदा). कांहीं मोबदला न घेतां एखाद्यानें दुसऱ्यास आपली स्थावर किंवा जंगम जिनगी, मिळकत फुकट, धर्मार्थ देऊन टाकण्याचा व्यवहार. -घका ३६. ३ (सामा.) स्वतःच्या मालकीची वस्तु दुसऱ्यास निरपेक्ष बुद्धीनें देणें; देणगी; बक्षीस; धर्मदाय. ४ (सोंगट्यांच्या खेळांत) फासे घरंगळत जमीनीवर टाकून ते स्थिर झाल्यावर त्यांच्या वरील पृष्ठभागांवर दिसणाऱ्या ठिपक्यांची संख्या; डाव. जसें:-पवबारा तेरा, छ तीन नऊ, दस दोन बारा इ० (क्रि० पडणें; देणें). ५ माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळांतून वाहणारा मद. [ सं. ] म्ह० (गो.) दानावर दक्षिणा =दक्षिणेवांचून दानाची सांगता होत नसते त्यावरून मोठ्या नुकसानीच्या भरीस आणखी थोडेसें नुकसान झाल्यास ही म्हण योजतात. सामाशब्द-**०धर्म**-पु. (व्यापक). पुण्यप्राप्त्यर्थ केलेलें दान; ब्राह्मणभोजन, विहिरी खणणें, धर्मशाळा, देवळें बांधणें इ० परोपकाराचीं धार्मिक कृत्यें; परोपकारार्थ केलेला द्रव्यव्यय; दान देण्याचें धर्मकृत्य. [ दान+धर्म ] **०पत्र**-न. देणगीपत्र; देणगीखत; जमीन इ०कांचें दान केलें असतां तें चालावें म्हणून दाखल्यासाठीं करून दिलेलें पत्र, सनद. 'दानपत्र धरिलें महानुभावें।' -दावि ४२१. [ दान+पत्र=कागद ] **०पात्र**-वि. विद्या, तप इ० गुणांमुळें दान देण्यास योग्य असलेला (ब्राह्मण, मनुष्य). [ दान+सं. पात्र=भांडें; (ल.) योग्य स्थान ] **०प्रतिभू**-पु. (कायदा) विकलेल्या मालाबद्दल, कर्जाऊ-उसनवार दिलेल्या पैशाबद्दल ठेवावयाचा जामीन; मालजामीन पहा. [ दान+प्रतिभू=जामीन ] **०विधि**-पु. १ दान करण्याचा, देण्याचा विधि. २ कर्जे द्यावें कीं देऊं नये यासंबंधीं विचार. 'दानविधि व अदानविधि हे दोन प्रकार धनकासंबंधीं होत.' -ज्ञाको (क) १११. [ दान+विधि ] **०वीर**-वि. सढळ हातानें दान करणारा; दान देण्यांत उत्साही; कर्णासारखा उदार. [ दान+वीर ] **०शील**-वि. दानधर्माकडे मनाचा कल, प्रवृत्ति असलेला. [ दान+शील=स्वभाव ] **०शूर**-वि. दान देण्यांत शूर, उत्साही; दानवीर. **दानाध्यक्ष**-पु. दानधर्मखात्यावरील मुख्य अंमलदार. [ दान+अध्यक्ष ]

**दान**—स्त्री. (व.) रस्ता; चाकोरी.

**दानखड**—न. (हैद्रा. व.) लुगडें.

**दानत**—स्त्री. १ धर्मबुद्धि; उदारपणा. २ सद्वर्तन; नेकी; सचोटी; प्रामाणिकपणा. यानत असेंहि रूप आढळतें [ अर. दियानत् ] म्ह० जशी दानत तसें फळ=आपल्या शीलाच्या बरेवाईटपणावर मनुष्यास बरें किंवा वाईट फळ मिळतें. सामाशब्द- **०दार**-वि. प्रामाणिक; शीलसंपन्न; सचोटीचा. [ दानत+फा. दार प्रत्यय ] **०दारी**-स्त्री. प्रामाणिकपणा; सचोटी; नेकी.

**दानव**—पु. (कश्यपपत्नी दनु हिचा पुत्र) दैत्य; असुर; राक्षस. [ सं. ]

**दानवा-वें, दानवार**—पुन. गांडूळ; काडू; गांडवळ; दवणा.

**दाना**—वि. शहाणा; सुज्ञ; चतुर; दाणा (-वि.) पहा. 'त्यास आपण दाना दूरंदेशी आहेत.' -ख ९.४०३०. 'आप दाना सरदारहो.' -ऐमं १८६. [ फा. दाना ]

**दानाई**—स्त्री. अक्कल; शहाणपण; सुज्ञपणा. 'ह गोष्ट करणें दानाई व दूरन्देशीपासोन दूर आहे.' -रा २२.६१. [फा.]

**दानाकेश**—पु. थंडीच्या दिवसांत वापरावयाचें,लव असलेलें व कलाबतूचें काम केलेलें एक प्रकारचें ऊबदार वस्त्र; संकेशचर्म. [फा. दानहकेश]

**दानाधिसपट**—स्त्री. (गो.) दाणादाण; वाताहत.

**दानाफान**—स्त्री. (व.) दाणादाण.

**दानी**—वि. दाता; देणारा; उदार. (समासांत) मोक्ष-जीव-वरदानी-सुख-दानी इ० [सं.]

**दानीय**—वि. १ दान देण्यास पात्र, योग्य (मनुष्य); दानपात्र. २ देण्यालायख (वस्तु इ०). [सं.]

**दान्य**—वि. १ दान देण्यास योग्य; दानपात्र. २ (ल.) भिकारी. 'पहिल्या पांयरीं पाय दिला, तिंथ दान्य भेटला, दान मागूं लागला' -बदलापूर ८३. [दानीय अप.]

**दाप**—पु. दाब पहा.

**दापका**—पु. (व.) सांपळा; पिंजरा.

**दाप खूट**—पु. (व.) खाचर, गाडी इ०कांचा सांगाडा, बैठक आंखाला जोडणारा मधला लोखंडी, लांकडी खुंट; दाबखीळ. [दाब+खुंट]

**दापणें**—सक्रि. १ दाबणें; दटावणें; दपटशा, जरब देणें. २ नाश करणें; ठार मारणें. 'दापिति अन्योन्य बळें वीर जसे व्याघ्र धेनुकळपातें।' -मोकर्ण ३०.७७. 'भटासि भट संगरीं परि न कातरां दापिती।' -केका ७९. ३ इतर अर्थासाठीं दाबणें पहा. [सं. दम्]

**दापणें**—सक्रि. देवविणें. [सं. दापन=देवविणें]

**दांपत्य**—न. १ पतिपत्नीसंबंध; वधुवरनातें; स्त्रीपुरुषाचें परस्पर नातें. २ जोडपें; पतिपत्नी; मेहूण. [सं.]

**दापित**—वि. १ शिक्षा दिलेला, सांगितलेला (मनुष्य). २ कोर्टानें निवाडा, निकाल करून देवविलेला (जिन्नस, देणें इ०) [सं.]

**दापिता**—वि. १ धमकी, दटावणी, जरब देणारा. 'शक्रासही प्रतापें मदिषूंचा दापिता महानिकर।' -मोभीष्म १२.६७. २ हट्टी; गर्विष्ठ. 'दापीतेआं देवांचा जगदळा। झळाळिआं देवांचा पाळा। तूं गोपिनाथा।' -शिशु १५५. [दापणें]

**दाप्य**—वि. १ ज्यास शिक्षा द्यावयाची असा; शिक्षा देण्यास योग्य (मनुष्य). २ (न्यायाधीशानें) निवाडा, निकाल करून द्यावयाचा (जिन्नस इ०). [सं.]

**दाब**—पु. १ दडपण; वजन. 'त्या पत्रावळीवर कांहीं तरी दाब ठेव म्हणजे ती उडणार नाहीं.' २ (कागद इ०) दाबून ठेवण्याचें साधन; चाप; ज्यावर दाब घालून, दार, छत्री, खिशांतील घड्याळ इ०कांची उघडझाप नियंत्रित करितात तें खुंटी, खिळा, घोडा, कमान इ०कांसारखें साधन; दाबखीळ; दाबेखीळ. ३ दडपणें; खालीं घालणें; रेटणें; पायमल्ली. ४ दवकावणी; दबावणी; धमकावणी; दटावणी; खडसावणी. ५ धाक; दरारा. 'लहान मुलांना कोणाचा तरी दाब पाहिजे.' ६ रुबाब; दबाबा; सलाबत. ७ पोतावर पट्टी बांधण्याकरितां केलेली कापड इ०काची पट्टी; अंडवृद्धीचा उपद्रव असल्यास आंवळण्याकरिता केलेला चांदी इ०धातूचा पट्टा. (क्रि० घालणें; बांधणें). ८ (गंजिफांच्या खेळांत) दुसऱ्याची तलफ दाबण्याचा एक प्रकार. ९ (शाप.) एका पदार्थास ढकललें असतां, दुसऱ्याचें पहिल्यावर उलट कार्य घडतें आणि त्यामुळें दोहोंच्या संलग्न ज्या प्रेरणेचें कार्य घडूं लागतें ती क्रिया. -यंस्थि २. (इं) प्रेशर. १० चेपणी. (इं.) कॉम्प्रेशन. ११ -स्त्री. (स्त्रिया, देवांच्या मूर्ति इ०कांच्या) कंबरेंत घालण्याचा सोनें, रुपें इ० धातूचा पट्टा, मेखला. 'मणि खचितां दाब रविद्युति घंटापंक्ति रम्यनादा बरवी।' -मोकृष्ण ३.६. -शिवदि १६७. [हिं. दाब; तुल० सं. दम्, दभ्=पुढें रेटणें] सामाशब्द- ०**काम**-न. (मातकाम) माती तयार केल्यावर सांच्यांत गोळा दाबून आकृति तयार करण्याचें काम. [दाबणें+काम] ०**खीळ, दाबेखीळ**-स्त्री. १ ज्यावर दाब घालून दार, छत्री, खिशांतील घड्याळ इ० कांची उघडझांक नियंत्रित करितां येते तें खुंटी, खिळा, घोडा, कमान इ०सारखें साधन. दाब अर्थ २ पहा. २ गाडीचा आंख व आखरी यांना जोडणाऱ्या दोन लोखंडी खिळ्यांपैकीं, खुंट्यांपैकीं प्रत्येक; (सामा.) पदार्थामधून जाऊन त्यांना आंवळून धरणाऱ्या खुंट्यांपैकीं प्रत्येक. [दाब+खीळ=खिळा, खुंटी] **दाबाचा प्रेस**-पु. कांहीं वस्तू कागद इ० दाबून ठेवण्याकरितां केलेलें यंत्र दाबणयंत्र; कागद छापल्यावर त्याच्या दोन्ही बाजूंस टाईपांचा दाब उठलेला असतो व असल्या स्थितींत पुस्तक बांधल्यास तें फार बोजड होतें, म्हणून कागदावरील दाब जाण्यासाठीं त्यांना या प्रेसांत, दाबांत ठेवावें लागते. -मुद्रण ७९. **दाबाचें कलम**-न. झाडाच्या कलमाचा एक प्रकार; घडवंचीसारख्या उंच वस्तूवर खापरी कुंडी आंत माती भरून ठेवून तींत झाडाची फांदी दाबून बसवितात व त्या फांदीस मातींत मूळ फुटलें म्हणजे तें झाड मोठें वाढवून लावतात असा कलम करण्याचा प्रकार. -कृषि ६८६.

**दांबडणें**—सक्रि. तांगडणें; सक्त मेहनत करून घेणें; फार राबवून घेणें; दामटणें; दपटणें; पिटणें (जनावर इ०). ताबडणें पहा.

**दाबण**—न (एखादा पदार्थ, कागद, पत्रावळ इ०) दाबून ठेवण्याकरितां (त्यावर) ठेवलेलें वजन; जड पदार्थ इ० [दाबणें]

**दाबण**—न. (गो) अतिशय कोंवळा फणस; कुयरी. 'फणसाला अद्याप दाबणें आलीं नाहींत' [दांब]

**दावण**—पुन. (गो) (सोनारी) बारीक मण्यास भोंक पाडण्याचें हत्यार. दाभण पहा.

**दाबणी**—स्त्री. दाबण्याची क्रिया. [ दाबणें ]

**दाब(भ)णें**—न. (गो.) दारूच्या उपयोगी पडणारें एक प्रकारचें मातीचें भांडें.

**दाबणें**—सक्रि. १ ( एखादा पदार्थ हात इ०कांनीं ) दडपणें; वजन घालून दडपून ठेवणें; चेपणें. २ धमकावणें; दटावणें; दपटशा देणें; भेडसावणें. ' ज्याच्या अंगीं खरी वीरश्री आहे त्यास प्रसंगीं लोकांनीं अनेक गोष्टींनीं दाबिलें तथापि तो राहणार नाहीं.' ३ (ल.) (एखादी गोष्ट) गुप्त राखणें; दडपून ठेवणें; छपविणें. ' साधूंस दुसऱ्याचें उणें समजलें असतांहि दाबितात. ' ४ ( गंजिफांच्या खेळांत ) दुसऱ्याच्या तलफेवर दाब घालणें. –शास्त्रीको. ५ गिळंकृत, गट्ट करणें; लुबाडणें. 'मंडळाची त्यानें पांचशें रुपयांची रक्कम दाबली. ' ६ (हात दाबणें) लांच देणें; फितविणें. [ सं. दम्; म. दाब ] **दाबदडप**–स्त्री. धमकावणी, दटावणी, दपटशा, दंडेली इ० उपायांनीं (एखाद्याला) दडपून टाकण्याचा यत्न. [ दाबणें+दडपणें ] **दाबदुबी, दाबीदुबी, दाबदूब**–स्त्री १ दाटदपट; धाकदपटशा; ( एखाद्यास ) सामदामादि उपायांनीं दाबून टाकणें; दहशत. २ ( गंजिफांच्या खेळांत ) एकाची तलफ दुसऱ्यानें दाबावी अशा संकेतानें गंजिफा खेळण्याचा एक प्रकार. [ दाबणें द्वि. ] **दाबदोब**–स्त्री. इभ्रत; दाब. सलाबत; रुबाब. [ दाब द्वि. ] **दाबादाब–दाबी**–स्त्री. १ (कागदाचा, कापसाचा गठ्ठा, गांठ इ०) दाबण्याची, दडपून बांधण्याची, आंवळण्याची क्रिया २ (जमीन, गच्ची इ०) ठोकण्याची, चोपण्याची, पिटून टणक करण्याची क्रिया. ३ (एखादी गोष्ट) गुप्त राखण्याची, छपविण्याची, दडपून ठेवण्याची क्रिया. ४ धमकावणी; धाकदपटशा; दटावणी. ५ दाबांत, धाकांत ठेवणें. ६ ( दुसऱ्याचे पैसे इ० ) गिळंकृत करणें; लुबाडणें. [ दाबणें द्वि. ]

**दाबरोब**—क्रिवि. धाकदपटशा देऊन. ' करूनि घेतलियां सार्थकचि आहे। साधी संसारीं भला जो सोय। नातरी वायां सिणतचि राहे। दाबरोब कायदा राखा म्हणे। ' –दावि ७८३.

**दाबा**—पु. दाब पहा. ०**देणें**–१ झांकून ठेवणें. २ (मालक इ० पासून एखादी वस्तु इ०) चोरून, लपवून ठेवणें; चोरणें; लांबविणें.

**दाबाडणें**—सक्रि. १ (एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थाखालीं) दाबून, दडपून ठेवणें. २ ( पैसा, वस्त्र इ० ) उपयोग न करतां उगीच संग्रहीं ठेवणें; दडपून ठेवणें. ३ ( एखादी गोष्ट, व्यवहार इ० ) छपविणें; दडपणें; दाबून ठेवणें. ४ ( चोरलेली वस्तु इ० ) लपवून ठेवणें; हाताळणें; लांबविणें. ५ धमकावणें; दटावणें.–शर. [ दाब+आड प्रत्यय ]

**दाबुक**—पु. (महानु.) तबला ? 'जेथ आनंदरसें डुलती। जठरीं वंशजा जाती। दुमदुमा दाबुक वाती। संसारावरी। ' –शिशु ३२०. [ ध्व. धबक ]

**दाबेखीळ**—स्त्री. दाबखीळ पहा.

**दाबोटा साखर**—स्त्री. साखरेचा एक प्रकार. दुपेटा साखर. –मुंव्या १४.

**दाब्या**—वि. (हात, तोंड ) दाबणारा; लांच देणारा. –राको २२८. [सं. दम्]

**दाभ**—स्त्री. ( कों. ) घागऱ्या इ०कांनीं युक्त असलेलें स्त्रियांचें एक कटिभूषण; घागऱ्यांचा करगोटा.

**दाभ**—पु. दर्भ. [ सं. दर्भ; प्रा. दब्भ ]

**दाभडी–दाबाडी पटणी**—स्त्री. पटणी तांदुळाची एक जात.

**दाभण**—पुन. गोणपाट इ० शिवावयाची मोटी व जाड सुई. ' मज धिक्कारी हृदयीं झाले ते शब्द सर्व दाभण गा। '–मोआदि २२.३४. [ दाभ किंवा दबणें; तुल० का. दब्बण ] ०**कांठी**–वि. १ दाभणाएवढया अरुंद किनारीचा ( धोतरजोडा इ० ). २ दाभणाच्या जाडीच्या ( मिशा ). [ दाभण+कांठ ]

**दाभणकोंकें**—न (गो.) स्त्रीसंभोग; रतिसुख.

**दाभनळें**—न. बैलाच्या गळयांत घालावयाची गोंडयांची माळ. [ दाभ=घागऱ्यांची माळ+नळें ]

**दाभाखिळा, दाभेखिळी**—पुस्त्री. दाबखीळ पहा.

**दाभाड**—न. १ जबडा; ( विरू. ) जांभाड. २ (ल.) कुसूं झिजूं नये म्हणून त्याला मारलेली लोखंडी पट्टी.

**दांभिक**—न. ढोंग; दंभ; अवडंबर; सोंग.–वि. ढोंगी; लुच्चा; ( धार्मिकपणा, संपत्ति, विद्वत्ता इ०कांचें ) अवडंबर, सोंग करणारा. [ सं. ]

**दाभोटा**—पु. घोडयाच्या पायाच्या घोटयावरील आच्छादन; गुल्फत्राण. गुल्फत्राणं तु दाभोटा। '–राव्य ५.२७. [फा.]

**दाभोटा**—पु. मोठें पोतें; (विशेषतः) साखरेचें पोतें. हें दुहेरी व उलटसुलट तोंडें बंद केलेलें असतें. [ सं. दम् ]

**दाभोळी लारी**—स्त्री. दाभोळ बंदराच्या टांकसाळींत पाडलेलें पूर्वकालीन लारी नांवाचें नाणें. –रा २१.७९. लारी पहा. [ दाभोळी=दाभोळ गांवची+लारी=एक जुनें नाणें ]

**दाम**—पु. १ पैसा; रोकड. २ किंमत; मूल्य; मोल. ' दाम रोख काम चोख. ' ३ एक जुनें तांब्याचें नाणें. हें नाणें मूळचें तांब्याचें होतें परंतु पुढें ते चलनांत राहिलें नसून केवळ हिशेबाच्या सोयीसाठीं याचा जमाखर्च इ०कांत उपयोग होऊं लागला. अकबराच्या कारकीर्दींत दाम तांब्याचा असून त्याचें वजन १ तोळा ८ मासे ७ रति होतें व चाळीस दामांचा रुपया मानला जात असे. औरंगजेबाच्या वेळीं ४६$\frac{1}{2}$ दामांचा रुपया मानीत. त्यानंतरच्या काळीं एका रुपयाची किंमत ८० व ९० दाम यांच्या दरम्यान मधून मधून बदलणारी अशी होती. उत्तर हिंदुस्थानांत साधारणपणें एका पैशाचे पंचवीस दाम मानितात. कोठें कोठें तीस दामांचा आणा मानितात तर कांहीं ठिकाणीं साठ

दामांचा आणा हें प्रमाण आहे. –कर्णेश्वर शिलालेख (शके ११०२) यांत हा शब्द आहे. 'राजा करी तैसे दाम। चाम तेही चालती।' –तुगा ३६६०. [सं. द्रम्म; प्रा. दम्म=सोन्याचें नाणें ग्री. ड्राक्म्न] म्ह० १ दाम करी काम बिबी करी सलाम=सर्व गोष्टी पैशानें साध्य होतात, किंबहुना स्त्रीसुद्धां पैशानें वश करतां येते. सामाशब्द– ०चुंबक-जोड-जोडया–वि. कृपणपणा करून पैशाशीं पैसा जोडणारा; कवडीचुंबक. ०चोरी–स्त्री. (क्व.) पैशाची चोरी. याच्या उलट चामचोरी=गुरेंढोरें चोरणें. ०जड–वि. फार किंमतीचें; महाग. ०दुक(का)ळ–पु. पैशाचा, रोकडीचा तुटवडा. ०दुप(प्प)ट-दुसा–स्त्री. व्याजासहित झालेली मूळ मुद्दलाच्या दुप्पट रकम. [दाम+दुप्पट=द्विगुणित] ०दुपटीचा नियम–पु. धनकोनें ऋणकोपासून कोणत्याहि एका वेळीं मुद्दलापेक्षां अधिक व्याज न घेण्याबद्दलचा हिंदु धर्मशास्त्राचा नियम. दामाजीपंत–पु. १ (सांकेतिक) (पैसा हीच एक व्यक्ति समजणें) पैसा; रोकड. –ख ३२.४७. २ पंधराव्या शतकांतील एक साधुवृत्तीचा कमाविसदार. दामोदर–न. १ ऐश्वर्यसंपन्न महाल, दालन. 'तंव देखिलें महाद्वार। जेथ एकवीस खनांचें दामोदर।' –शिशु ३३७. २ हवेली; इमारत; मंदिर. 'सोळा सहस्र अंतःपुरें। गगनचुंबित दामोदरें।' –महिकथा १.९७. –वि. श्रीमंत; धनाढ्य; द्रव्यसंपन्न; गर्भश्रीमंत [दाम=पैसा+सं. उदर=पोट] दामोदरपंत–पु (सांकेतिक) पैसा. दामाजीपंत पहा. 'दामोदरपंतांचें ठिकाणच नाहीं.' –ख ३२५५. [दाम+उदर+पंत]

**दाम**—न. १ दावें; दोर. २ फुलांची माळ; पुष्पहार. [सं. दामन्] दामोदर–पु. (दाव्यानें बांधलें आहे उदर, कंबर ज्याचें तो) श्रीकृष्ण. [दाम=दावें+उदर=पोट]

**दाम, दवाम**—अ. चिरायु; दीर्घायु; चिरंजीव. [अर. दाम= चिरायु असो] ०अक्काळ हू–उद्गा. नेहमीं तुमची कृपा राहो. ०इक्बाल हू–उद्गा. त्यांचें सुदैव व वैभव हीं चिरायु होवोत. [अर. दाम इक्बालुहु] ०एखलास हु–उद्गा. त्याचा विश्वासूपणा व स्नेह चिरायु असो. –रा १५ २५२. [अर. दाम इख्लासु हु] ०दस्त–एकूण एक. ०दौलत–स्त्री. भरभराट; वैभव; ऐश्वर्य; संपन्नता. [दाम+दौलत=संपत्ति, वैभव] ०दौलत हू–त्याचें राज्य चिरायु असो; एखाद्याची नेहमीं भरभराट होवो. [अर. दाम दौलतहु] ०महबत हू–उद्गा. तुमचा प्रताप कायम राहो. मुलूक हु-मुल्क हु–उद्गा. त्यांचें राज्य चिरायु होवो. [अर. दाम मुल्कुहु]

**दामकांठ**—पु. (नाशिक) जरीच्या किनारीचा एक प्रकार. [फा. दामन्=किनार]

**दामगा**—पु. भातांतील एक (जाडीभरडी) जात.

**दामट**—स्त्री. (राजा.) (आकाशांत ढग इ० आल्यानें पडणारी) अंधारी; काळंबन; झांपड; मळभ (क्रि० पडणें). [दमट]

**दामट**—वि. दमट; ओलसर. [दमट; दम=ओलेपणा]

**दामटणें**—सक्रि. १ (मनुष्य, जनावर इ०कास) पिटाळणें; त्वरेनें, वेगानें चालावयास लावणें; शक्तीबाहेर पळावयास लावणें; दापटणें; पादडणें. २ खडकावणें; दणकावणें; धमकावणें; खरडपट्टी काढणें; ताशेरा झाडणें. ३ (एखादा जिन्नस, जनावर इ०) धसकेपणानें वापरणें, वागविणें; दामटी वळविणें; करणें. ४ दुसऱ्याची वस्तु बळेनें वापरणें, उपभोगणें. [सं. दम्; म. दम]

**दामटा**—पु (प्रां.) १ थापटून चापट व वाटोळा केलेला पदार्थ. उदा० भाकरी, गोंवरी इ० २ (गाय, बैल इ० कांच्या गळ्यापासून लोंबणारी) पोळी, सास्ना. [सं. दम्; म. दम]

**दामटी**—स्त्री. १ लहान भाकर. २ गोंवरी. ३ चपटा पैसा, रुपाया. ४ (सामा.) दाबून चपटा, थापटून व वाटोळा केलेला पदार्थ. [सं. दम्–दाम+टी] (एखाद्याची) दामटी वळणें–कृश होणें. पोटाची दामटी वळणें–(उपासमार, अशक्तता इ० कांमुळें) पोट खपाटीस जाणें.

**दामटीव**—वि. १ दामटलेला; वेगानें सोडलेला (घोडा इ०). २ तांतडीनें, निकडीनें पिटाळलेला (जासूद इ०). [दामटणें]

**दामणी**—स्त्री. (बडोदें) स्त्रियांचा बिंदीसारखा एक दागिना. –जव्हेरखान्याच्या अंतर्व्यवस्थेचे नियम. (पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या) पृ. ६. [सं. दामन; गु. दामणी; फा. दामन्=किनार]

**दामणें**—उक्रि. (गो.) १ दाबणें; चेपणें; चेंबटणें. २ ठोकणें; ठांसणें; मारणें. [दम]

**दामणें**—(प्रां.) (जनावर इ०) खुंटयाशीं बांधून ठेवणें; डांबणें. [सं. दामन्=दावें; दामन=बंधन]

**दामनगीर**—वि. फिर्यादी; दावा लावणारा; दावेदार (मूळ अर्थ वस्त्राचा पदर, कांठ धरून ठेवणारा). [फा. अर. दामन्= किनार+गीर]

**डॉमळॉ**—पु. (गो.) मुंगळा; डोंगळा.

**दामाशाई-ही**—स्त्री, १ (पूर्वी कोणी दामसाह नांवाचा व्यापारी होता. त्यानें आपला बुडितकाळ आला असतां आपल्या सावकारांना दिलेल्या प्रमाणशीर वांटणी वरून) दिवाळखोर, बुडत्या कुळाच्या सावकारांना त्याच्या कर्जाच्या मानानें त्या कुळाच्या मालमत्तेंतून मिळणारी हिस्सेरशीनें वाटणी, हिस्सा. २ बरोबर हिस्सेरशी; प्रमाणशीर वांटणी. 'तरी धरणाचे पाण्यानें ज्यांची पाणथळ जमीन भिजेल त्याजपासून निमेऐवजाची दामाशाई बसेल त्याप्रमाणें पैका देवणें.' –थोमारो २.१८. [हिं. दामसाह]

**दामिनी**—स्त्री. विद्युत्; वीज. [सं.]

**दामी**—स्त्री. कर; सारा; कराची आकारणी. [हिं. दामी तुल० सं. दम्]

**दामुखा, दामोका–खा**—पु. बाभळीचें बीं; बाभळीच्या शेंगेंतील दाणा. ' निखळ तांबियाचें नाणें। देवों रिघे दामोक्यायेसणें। तेणें आपुलेनि दातेपणें। मानी टेंगणें बळीतें।' –एभा ५. १५९. **दामोका**–पु. पैसा. –शर. [ दाम ]

**दामोटी**—स्त्री. (व.) बाभळीचें बीं; दामोका.

**दामोदर**—दाम पहा.

**दाय**—पु. वारसांना वांटून द्यावयाची मिळकत, जिंदगी; पितृधन; (एखाद्या) वारसाचा हिस्सा, वांटा. याचे हिंदुधर्मशास्त्रानुसार अप्रतिबंध व सप्रतिबंध (दाय) असे दोन प्रकार आहेत. 'प्रभु दीनबंधु, भूसुर हा दीन, न होय पात्र कां दाया।'–मोकृष्ण ८.१६१. –मोउद्योग ६.५. [सं.] सामाशब्द– **दायजी, दायाद**–विपु. १ वारस; पितृधनांत हिश्शाचा हक्कदार; वांटेकरी २ (यावरून ल.) अशौचादि अधिकार बाळगणारा जवळचा नातलग; भाऊबंद. ' रेव धरून झाल्यार दायजी, मित्र, सोयरे वगैरे मंडळी वराला विड्याच्या पानांतून मुठींत कांहींतरी...नजराणा देतात.' –मसाप ४.४.२५४. [सं. दायाद; म. दाईज] **दायदु**–पु दायाद. ' नव्हे आमुचा दायदु। जरि भणे तुम्हा मीचि बंधु।' –ऋ ४३. [दायाद] **०प्राप्त**–वि. पित्रादिकांचा, दायाच्या वाटणींत मिळालेला, आलेला (दास). दासांतील एक प्रकार; **०भाग**–पु. १ मृत माणसाच्या जिंदगीची वारसदारांत वांटणी, विभागणी. २ वडिलोपार्जित मिळकतींतील हिस्सा. ३ दायतत्त्व व दायक्रम (वारसाहक्क) या संबंधीं जीमूतवाहन यानें लिहिलेला व बंगाल्यांत हिंदु कायद्यांत प्रमाण असलेला ग्रंथ. **०विभाग**–पु. दायभाग अर्थ १, २ पहा. **दायाद**–पु. १ वारसदार; वडिलोपार्जित मिळकतीचा दाईज. २ (ल.) पुत्र; मुलगा. ' कृपाचि जननी तुझी सकल जीवं दायाद या।' –केका ९७. ' त्यावरि देवनदीनें दायादाचे गुणौघ आठविले।' –मोभीष्म ११.१२६. ३ भाऊबंद; जिंदगीचा वाटेकरी. ' कीं खळ दायाद गळा कापी।' **दायाधिकारी**–पु. समाईक कुटुंबाच्या मिळकतींत हिस्सा विभागून मागण्याचा अधिकार असलेला पुरुष. [ दाय+अधिकारी ]

**दाय**—स्त्री. (गो. कु.) भात वाढण्याची सपाट चमच्याप्रमाणें उथळ टवळ्याची पळी. [डाय–व] **म्ह०** दाय असोन हात कित्याक लासतां=सरळ मार्ग सोडून आड मार्गानें कां जाता?

**दाय**—स्त्री. (गो.) एक वनस्पतिविशेष; डाय.

**दाय**—स्त्री. १ (खा. व.) डाळ. २ डाळीचें वरण. [डाळ अप.]

**दायक**—वि. १ देणारा. (समासांत) सुख–दुःख–शुभ–कल्याण–संपत्ति–मंगल–मोक्ष–दायक इ० २ (काव्य.) उदार; दाता; दानशूर. ३ दायाद. [सं.]

**दायठा**—पु. (कों.) बरड; पूर्वसालीं भाजलेल्या राबाच्या जागीं बीं पेरून राब तयार केलेली जागा. –बदलापूर २९४.

**दायण**—न. (गो.) मासळीची एक जात.

**दायतें**—न. देणें; देव, पिशाच, भिकारी, नोकरचाकर इ० कांना दरसाल द्यावयाचें वस्त्र, पैसा इ० [दाय]

**दायम, दायमी**—दाईम दाइमी पहा.

**दायदौलो**—पु. (गो.) एक वनस्पतिविशेष.

**दायरा**—स्त्रीपु. १ एक प्रकारची टिमकी; खंजिरी; डफ. २ मुसलमानांची स्मशानभूमि. [अर. दाइरा]

**दाया**—पु. मिळकतीवरील हक्क. [सं. दाय]

**दाया**—पु. दावा; वैर. [हिं.]

**दायी**—वि. देणारें. समासांत उत्तरपदीं उपयोग जसें:–सुखदायी इ०. दायक पहा. [सं. दायिन्]

**दायी**—स्त्री. दाई पहा. ' स्नेहें शिशुला देइल मातेहुनि अधिक काय सुख दायी।' –मोशांति ७.५४. [सं. धात्री; म. दाई]

**दार**—न. १ दरवाजा; (घर इ०कांमध्यें) प्रवेश करण्याचा रस्ता, वाट, मार्ग, द्वार (अक्षरशः व ल.) २ निघण्याची, बाहेर जाण्याची वाट; दारें; निकाल. ३ साधन; रीत. [सं. द्वार; प्रा. दुवार, दुआर; बं. दोयार; हिं. दुआर; झें. द्वर; ग्री. थुर; लॅ. फोरस्; गॉ. दौर; भाज. तोर; स्लॅ. द्वेरी; लिथु. दूर्यस्; हि. दोर–स; इं. डोअर] (वाप्र.) **दारचा**–वि घरापुढें, परसांत लावून वाढविलेला (भाजीपाला, फळें इ०); घरचा. **दारचें अळूं**–न परसूं, बाग इ०कांत मुद्दाम लागवड केलेलें अळूं. पांढर अळूं; काळें अळूं कासाळूं, दडगें अळूं, खाजाळूं इ० दुसरे अळवाचे प्रकार आहेत. **दाराकडे जाणें**–(ना. बायकी) मोरीवर जाणें. **दारांत हत्ती झुलत असणें**–एखाद्याची वैभवसंपन्न स्थिति असणें; गजांत लक्ष्मी असणें. **दारीं जाणें–बसणें–लागणें**–(बायकी) शौचास, परसाकडे जाणें इ०. **दारीं जाणें**–दुखवटा घेऊन जाणें; मृत मनुष्याच्या आप्तांचा समाचार घेण्यास जाणें. सामाशब्द–**०कूस**–स्त्रीन. दाराच्या चौकटीची बाही, कुसूं. [दार+कूस] **०कसा**–स्त्री. भाद्रपद महिन्यांत गौरीप्रीत्यर्थ दाराच्या बाजूंवर काढतात त्या आकृतींपैकीं प्रत्येक. **०कारु**–पु. द्वारपाळ; द्वाररक्षक; दौवारिक. ' मंत्री, पुरोहित, सेनापति, युवराजा, दारकारु ...... ' –पंच ३.७. **०कुसूं**–न. दाराचें कुसूं. **०कोंड**–पु. १ आपले पैसे द्यावे म्हणून धनकोनें ऋणकोस, त्याच्या कुटुंबीयांस दाराबाहेर व्यवहार, दळणवळण करण्याबाबत केलेली आडकाठी, प्रतिबंध. २ (व) कुचंबणा; कोंडमारा. [दार+कोंडणें] **०कोंडी**–स्त्री. (महानु.) दारलावणी; अडथळा; आडकाठी. ' भूगोळकाचा मढी। केंवि कीजे दारकोंडी।' –भाए ५९५. [दार+कोंडणें] **०खंडें**–न. मिठागर इ०च्या बांधावर

ठेवलेलें द्वार; मार्ग. [ दार+खंड ] ०ढवळणें–न. ( कों. ) लग्न-समारंभांत नवरानवरी घरांत शिरतांना स्त्रिया त्यांना थांबवितात व गाणें गातात तो प्रकार. ०धरणें–णी–नस्त्री. लग्नविधींतील नवऱ्या मुलाच्या बहिणीनें करावयाचा एक शिष्टाचार. ह्याला अनुसरून वर लग्नास निघतेवेळीं, त्याची बहीण दारांत उभी राहून त्याजजवळ 'तुला होईल ती मुलगी माझ्या मुलास दिली पाहिजे' असें मागणें मागते. [दार+धरणें] ०फळणी–फळी–स्त्री १ (अक्षरशः) घरांत कोणी रहावयास न उरल्यानें घर बंद करण्याची क्रिया; दाराला कुलूप लागणें; घर ओसाड पडणें. (ल.) २ दिवाळें वाजणें; सत्यानाश, निर्वंश होणें. 'मागच्या दुष्काळांत कित्येकांच्या दार-फळ्या झाल्या.' [ दार+फळणी वंद करणें ] ०बंद–पु. ( ना. ) दरवाजावरील मातीचा गलथा, पुढें आलेला भाग. ०भाजी–स्त्री. माठ ही पालेभाजी. ०वि–दार–क्रिवि. दारोदार. [हि] ०वंट–पु. उंबरठा; वेस. ०वटा–ठा–वंटा–ठा, दारिवठा–पु. १ उंबरठा; उंबरठ्याजवळची, उंबरठ्याखालची जमीन. 'राहुनि दारिवठ्यांत हांका मारी दुरोनि राजाला।' –श्रियाळ चरित्र. २ दारावरचा माथा; कपाळपट्टी. ३ किल्ला, गांव इ०कांचा दरवाजा, वेस. 'कीं मोक्षगडाचा दारवटा। उघडला तो।' –ऋ ५९. 'तैसा दारवठा उघडीला। सैन्यसमुद्र लोटला।' –उषा ११२८. म्ह० सोन्याचे दारवठे होतील आणि कपाळास लागतील. ०वठा(ठे)कार–वठेकरु–वि. १ द्वारपाल; द्वाररक्षक. 'आपण जाला दारवठेकारु।'–उषा ८६२. 'दारवठाकारें दार प्रतिषेधिलें।' –पंच १.२६. २ (ल.) उंबरठे झिजविणारा; (एखाद्याच्या घरीं) खेपा घालणारा. –शर ०वंड–पु. ( महानु. ) दरवाजा. 'सोलौनि कीजेति दारवंड त्रिशाळ।' –शिशु ७६५. [ दार+वंड= प्रत्यय ] ०वालो–वि. ( गो. ) देवडीवाला; द्वारपाळ. [ सं. द्वार पाल; प्रा. दारवाल ] ०वांटा–वरात. –स्त्रीगीत ६० ०शीक–न. (राजा.) पदार्थ इ० ठेवण्याकरितां दाराच्या चौकटीवर बस-विलेली फळी; उतरला. ०शीग–स्त्री. ( कु. ) दिवा ठेवतां यावा म्हणून दारकसास ठोकलेली खुंटी, खिळा इ०. ०संका–( महानु ) दरवाजाची कड, बाजू. 'सर्वज्ञ दोन्ही दारसंका दोन्ही श्रीकरीं धरूनि एकु श्रीचरण वक्षेस्थळावरि ठेविति।' –पूजावसर. [ द्वार+शाखा ]

दार–पु. भार्या; पत्नी; बायको; दारा. [ सं. ] ०ग्रहण–न. विवाह; लग्न. ०परिग्रह–पु. विवाह; लग्न.

दार–वि. ऐपतदार; श्रीमंत. याच्या उलट नादार; गरीब. [ फा. दार् ] ०नादार–वि. ऐपतदार–गैर ऐपतदार; श्रीमंत–गरीब. 'याकरितां दार–नादार पाहून घेणें तें घ्यावें.' –पया ५७. [ दार+नादार=गरीब ] ०बाकी–स्त्री. ऐपतदाराकडील शिल्लक येणें. 'त्यापैकीं दारबाकी असेल ते रुजू करून सरकारांत देतील.' –समारो १.२७२

दार–(एखादी वस्तु) 'धारण करणारा, बाळगणारा, नेणारा इ० अर्थाचा फारशी भाषेतील प्रत्यय. सामान्यतः हिंदी भाषेतून मराठींत आलेल्या शब्दास हा प्रत्यय जोडून सामासिक शब्द बनतात. जसें:–जमादार, फौजदार, चोबदार, भालदार, चौकी-दार, रंगदार, गोलदार, अणीदार, जोरदार इ०. [ फा. दार् ]

दारचिना–पु. दारशिणा; एक प्रकारचें दंतमंजन; दांतवण. [ सं दंतशाण ]

दारठा, दाड्डा–पु ( व. ) दरवाजा; दार; उंबरठा. दारवठा पहा.

दारण–स्त्री. ( खा. ) दरवाजा; दरवाजाची चौकट

दार(रु)णा–पु. कफवातामुळें केंस येण्याची जागा कठिण होऊन खाजते व ती रुक्ष होऊन त्या ठिकाणीं चट्टे, भेगा पडतात तो विकार. –योर २.४२८. उंदरी; चाई. [ सं. दारुणा ]

दारन–न. ३ भाग कार्बन, ६ भाग हायड्रोजन, १ भाग ऑक्सिजन यांच्या रासायनिक मिश्रणानें होणारें ज्वालाग्राही द्रव्य. ( इं. ) ॲसिटोन. दारिन पहा. –सेंपू २.

दारभ्य–शअ. ( चुकीनें रूढ ) पासून. –ख ९९२. (संस्कृत-मधील अकारान्त पुल्लिंगी व नपुंसकलिंगी नामांना लावावयाचा पंचमीच्या एकवचनाचा त् प्रत्यय व आरभ्य=आरंभ करून (उदा० दिनात्+आरभ्य=दिनादारभ्य) या दोन शब्दांनीं हा शब्द चुकीनें बनला आहे. जन्मापासून याबद्दल जन्मादारभ्य असें म्हणतात. मूळचें जन्मादारभ्य हें संस्कृत मानलें गेलेलें रूप चूक आहे ).

दारमदार–पु. १ ठराव; करार; करारमदार. २ तह; सलोखा. 'स्वामीसी कोणेही प्रकारें बिघाड न करावा व होऊं न द्यावा, दारमदारानें चालावें.' –रा १.१९. [ फा. दार्–मदार् ]

दार(श)शिणा–पु. दंतमंजन; दारचिना. [ सं. दंतशाण ]

दारहळद–स्त्री. एक औषधी. दारुहळद पहा.

दारा–स्त्री. बायको; पत्नी; भार्या. 'जेव्हां होय दारा हरण। न विचारितां आत्मकारण। वेंचिती प्राण स्त्रीलोभें।' –एरुस्व १३.३८. [ सं. ] ०सुत–पुअव. बायको आणि मुलेंबाळें. [ दारा+सं. सुत=मुलगा ] दारेषणा–स्त्री. १ पत्नी मिळावी अशी इच्छा. २ ( स्वतःच्या ) बायकोवरील प्रेम. [ दारा+सं. ईषणा= इच्छा ]

दाराटी–स्त्री. ( महानु. ) दरोडा. 'इंद्रियें घेती विषयाची दाराटी।' –भाए ५०८.

दाराढ्य–न. दृढपणा; दाढर्य. –शर. [ सं. दार्ढ्य ]

दारिद्य–न. गरीबी; निर्धनता; दरिद्रीपणा. 'दारिद्यमित्रा वसती शरीरीं। माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी।' –अन्योक्ति ५ वें पुस्तक. [ सं. ]

**दारिन**—न (शाप.) (इं.) ॲसिटोन. दारन पहा. –ज्ञाको (अ) १७८.

**दारिल**—न. २ भाग कार्बन, ३ भाग हायड्रोजन, १ भाग ऑक्सिजन याच्या रासायनिक मिश्रणानें होणारा मूलक (रॅडिकल्). (इं.) ॲसेटिल्; –सेंपू २.

**दारिवटा–ठा**—पु. दरवाजा; दार; उंबरठा. दारवटा–ठा पहा.

**दारी**—स्त्री. (व. तिरस्कारानें) स्त्री; बायको. 'दारी पळाली-म्हणून वाचली.' [हिं. दारी=स्त्री गुलाम. (सं. दारापासून)]

**दारु**—न लांकूड; काष्ठ. 'जळीं तुंबिका दारु तैसा तरंगे।' –मुरायुद्ध ३४. [सं. तुल. तरु, द्रु: ग्रीं. दौरु; ग्री. दोरुः गॉ. त्रिउ; इं. ट्री; लिथु. देर्वा] **०चिनी**–स्त्री. दालचिनी. **०यंत्र, दारुकायंत्र**–न. लांकडी बाहुली. 'जैसें चेष्टे सूत्राधीन। दारुयंत्र।' –ज्ञा १.८१. **०रूप**–वि. लांकडाचा; लाकडासारखा. 'म्हणे स्तंभीं दारुरूप। दारूमध्यें चित्स्वरूप।' –वामन–नृहरिदर्पण ९७. **०हळद**–स्त्री. एक औषधी काष्ठविशेष. ही वेल हिमालय, अफगाणिस्तान यांत होते. तसेंच आसाम आणि पूर्वबंगालपासून तेनासरीमच्या प्रदेशांतहि ह्या वेली आढळतात. हिचें लांकूड हळदीप्रमाणें पिंवळया रंगाचें असतें. त्यापासून रसांजन नांवाचें औषध तयार करितात. –वगु ४.१९. दारुहळदीच्या मुळयांपासून पिवळा रंग काढतात. –ज्ञाको (द) ७६. [दारु+हळद: सं. दारुहरिद्रा; हिं. दारुहालदी]

**दारुण**—वि. १ घोर; भयंकर (युद्ध इ०). 'चैद्य मीनले सन्नद्ध। होईल युद्ध दारुण।' –एरुस्व ५.३७ २ कठोर; मर्मभेदी; रागाचें (भाषण.) ३ क्रूर; हिंस्र; रानवट (मनुष्य). ४ जालीम; जबरदस्त; कडक. (सामा.) भयंकर; कठिण; दुःसह. 'आलें तुज जवळि मरण। यम गांजितिल दारुण।' [सं.] **०नक्षत्र**–न. मूळ, आश्लेषा, आर्द्रा व ज्येष्ठा या नक्षत्रांपैकीं प्रत्येक.

**दारुणा**—पु दारणा पहा.

**दारुस्ती**—स्त्री. (कु.) वस्तु ठेवण्यासाठीं दाराच्या चौकटीवर बसविलेली फळी; फडताळ; उतरला: दारशीक.

**दारू**—स्त्री. गंधक, सोरा व कोळसा यांचें विवक्षित प्रमाणांत केलेलें मिश्रण; बारूत–द. हें ज्वालाग्राही असून स्फोटकहि आहे. दारू बंदुकी, फटाकडा, सुरुंग इ०कांत ठासतात. हिच्या स्फोटकपणाचा शोध इ. स. १३१३ मध्यें लागला. [फा. दारू] **०चा डल्ला**–पु. दारू हातांत घेऊन लोकांच्या अंगावर पेटवून फेकण्याकरितां बांधलेला, केलेला गोळा. **०चा बाण**–पु. (ना.) एक शस्त्रविशेष. याला एक मोठी व पोकळ मूठ असून तींत दारू भरलेली असते. पुढें तरवारीसारखें तीक्ष्ण पातें असतें. मुटींतील दारू पेटविल्यानें पातें सारखें हालतें व आसपासचे लोक कापले जातात. –नागपूर म्युझियम. सामाशब्द– **०काम**–न. १ आतशबाजी; अग्निक्रीडा. २ आतशबाजीची सामग्री; दारू आंत घालून बनविलेले नळे, चंद्रज्योती, बाण इ० वस्तु. [दारू+काम] **०खाना**–पु. १ दारूचें कोठार. २ दारू करण्याचा कारखाना. ३ दारूकाम; आतशबाजी. 'दारूखाना सुटला रात्रीं नऊ वाजतांनीं।' –गापो ७४. [दारू+फा. खाना=घर] **०गोळा**–पु. युद्धांत उपयोगी पडणारें दारू, तोफेचे गोळे इ० सामान.

**दारू**—स्त्री. १ मद्य; एक प्रकारचें मादक पेय. २ औषध. [फा. दारु] (वाप्र.) **०ठासणें**–रगडून, गटागट, ढसढस दारू पिणें. **०पिकविणें**–पिण्याची दारू तयार करणें. **०चें फूल**–न कडक, निर्भेळ, गाळलेली दारू. सामाशब्द– **०कलाली**–स्त्री. १ दारू गाळणें. २ दारू गाळण्याबद्दलचा कर. आबकारी अर्थ १, २ पहा. [दारू+कलाली] **०खाना**–पु. दारूचा पिठा, गुत्ता. [दारू+फा. खाना] **दारुड्या**–वि. दारूबाज· अतिशय दारू पिणारा. [दारू] **०फुल्सरा**–पु. फुलचेरी (पांडेचरी) येथील फिरंग्यांकडील मद्य; शराब: गाळलेली दारू. 'फिरंगी गोरे व किरस्ताव जदीद ... यांस दारूफुल्सरा नेहमी पाहिजे ...' –वाडसमा २.३००. **०बाज, खोर**–वि. खूप दारू पिणारा; मद्यपी; दारुड्या. [दारू+बाज, खोर प्रत्यय]

**दारें**—न. १ पाटाचें पाणी आंत नेण्याकरितां बाग, मळा इ० कांच्या कुंपणास पाडलेलें दार, छिद्र, मार्ग. २ पाट इ० कांचें पाणी बाहेर, दुसरीकडे नेण्याकरितां, सोडण्याकरितां त्याच्या बांधास ठेवलेलें दार, छिद्र. ३ भट्टीचें अग्निद्वार. ४ शौचकुपाचें मागील दार. ५ दरवाज्यांतील दिंडी. ६ (सामा.) बाहेर जाण्याचा लहानसा मार्ग, द्वार, तोंड. [दार] **०करी, दारोळ्या**–वि. पिकास, बागाइतास पाणी देण्याकरितां (कुंपणाचें, पाटाचें) दारें उघडणारा व बंद करणारा. [दारें+करणें]

**दारोगा**—पु. १ दरोगा (सर्व अर्थी) पहा. २ दरोग्याचें काम; देखरेख ठेवण्याचा अधिकार. [फा. दारूघा; बं. दारोगा=पोलीस अधिकारी] **दारोगगी, दारोगी**–स्त्री. दारोग्याचें काम; आधिपत्य. 'नजीबखानास तोफखान्याची दारोगी सांगावी.' –रा ६. ४८३. [दारोगा] **दारोगेगिरी**–स्त्री. दरोगेगिरी पहा. [दारोगा]

**दारोटा–ठा**—पु. दारवठा पहा.

**दार्ढ्य**—न. १ दृढता; बळकटपणा; कठिणपणा. २ घनता; (इं.) डेन्सिटी. ३ खंबीरपणा; पक्केपणा; निश्चलता; स्थैर्य. [सं. दृढ]

**दार्वम्ल, दार्वाम्ल**—न. (रसा.) लांकडाच्या निर्जल ऊर्ध्वपातनापासून तयार केलेलें अम्ल; (इं.) ॲसेटिक् ॲसिड. [सं. दारु=लांकूड+अम्ल]

**दार्शनिक**—पु. दर्शनशास्त्रज्ञ. –वि. दर्शनविषयक; दर्शनासंबंधीं. [सं.]

**दार्ष्टांतिक**—वि. १ दृष्टांतास लक्ष्य असा; दृष्टांत, उपमा इ० कांचा विषयभूत; दृष्टांत देऊन स्पष्ट केलेला. २ दृष्टांतोपयोगी; दृष्टांतांत योजण्यास योग्य (कल्पना, अलंकार इ०). ३ दृष्टांत, उपमा इ० कां संबंधींचा. [सं. दृष्टांत]

**दाल**—पु. एक किंवा दोन बोटें रुंदीचा नक्षीदार विणलेला सुती किंवा रेशमी कांठ, किनार, झालर, फीत; मगजी यांत कधीं जरहि असते. 'दाल सुती गज सुमार.' –पेद १८.१७३. [फा. दोआल्]

**दाल**—स्त्री. चामडयाचा कमरपट्टा; रुंद पट्टा. [फा. दोआल्]

**दाल**—पु. (गो.) एक प्रकारचें फूल. [पो. दालिया]

**दालचिनी**—स्त्री. एका झाडाची सुकविलेली औषधी साल. हिचीं झाडें पश्चिम व दक्षिण हिंदुस्थान, तेनासरीम व सिलोन या प्रदेशांत होतात. हीं झाडें तीन वर्षांचीं झालीं म्हणजे त्यांची साल काढून उन्हांत वाळवितात. तीच दालचिनी होय. झाडांच्या मुळयांचें व फळांचें तेल काढितात. त्याचा खाण्याकडे व औषधांत उपयोग करितात. दालचिनी मसाल्यांतहि घालतात. [सं. दारुचिनी; हिं. दालचिनी; बं. दारुचीनी; फा. दार्चीनी]

**दालच्या**—स्त्रीअव. तुरीची व हरभऱ्याची डाळ आणि मांस यापासून तयार केलेलें एक प्रकारचें सांबारें. –गृशि २.५०. [दाली. डाळ]

**दालव**—न. (कों.) मासे धरण्याचा धंदा, व्यवसाय. [सं. जाल; फा. दोआल्]

**दालदी**—पु. (कों.) कोळी, दर्यावर्दी, नावाडी अशी जात हे बहुधा मुसलमान असतात. 'देवगड येथील दालदी व गाबीत कसबी भंडारी आहेत.' –समारो २.१९६. -वि. दालदासंबंधीं: मासे धरण्याच्या उपयोगाची (होडी, मचवा इ०). [दालद] **म्ह०** भट्टास तारवें दालद्यास गोरवें=भलत्याच माणसानें भलताच धंदा करणें मूर्खपणा होय.

**दाल(ला)न**—न. घर, वाडा इ० कांतील एकसारखा लांब असा कित्येक खणांचा प्रदेश; मोठी खोली; दिवाणखाना; सभामंडप; सोपा; (इं.) हॉल. [फा. दालान्]

**दालन**—न. उंसाच्या चरकाचें वरचें तकट. –शर

**दाली**—स्त्री. १ ज्यांत तलवार अडकवितात तो कमरपट्टा; पडदळें. २ (ल.) दुसऱ्यास आव्हान करण्याकरितां धारण करावयाचें चिन्ह; शिपायाचें एक चिन्ह. (क्रि० बांधणें; धरणें). 'धन्यावर दाली धरून क्रिया सोडून आला चालून ...।' -ऐपो ३३१. [दाल] **दाली बांधणें**–१ (एखाद्यास) जिंकण्याला अभिमानानें सज्ज होणें. 'बांधोनिया पुण्यावर कंबर चढती दाली। हिंदुपद घेईन म्हणतो निजाम अली।' –ऐपो २३१. २ जहागीर देणें. ३ (वरिष्ठानें) कनिष्ठाच्या कमरेस पडदळासह तरवार बांधणें. हा एक प्रकारचा सन्मान मानला जात असे. **०बंद**–वि. १ दालीला तलवार लटकावून सज्ज झालेला. २ दाली हें आव्हानसूचक चिन्ह धारण केलेला. [दाली+फा. बंद; प्रत्यय]

**दालें**—न. संवळाच्या किंवा एकत्र जोडलेल्या दोन नौबतींच्या दोन नगाऱ्यांपैकीं प्रत्येक.

**दालें**—न. (गो.) पारडें; टोपलें. [डाल]

**दाळा**—पु. (काव्य) दादला; नवरा; पति. 'दाळा सेजे नावडे निजे जगझोडीचे चाळे।' –तुगा २९६. [दादला] **म्ह०** (व.) दाळयाहुन दाळा देवानें दिला=जेव्हां मुलगा नवऱ्यापेक्षांहि आपल्यावर जास्त सत्ता गाजवितो तेव्हां आई मुलास उद्देशून म्हणते (नवऱ्यावर ताण).

**दाव**—पु. १ जंगल; अरण्य; वन. २ पेटलेलें रान; वणवा; दावानल. [सं.] **दावाग्नि, दावानल–ळ**–पु. अरण्य जाळीत सुटलेला अग्नि; वणवा. 'तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि। जाय तो विझोनि आपसया।' –तुगा ३४२४. [सं. दाव+अग्नि, अनल= विस्तव]

**दांव**—न. १ (राजा.) फणसाचा देंठ, डेख. संख्यावाचकशब्दास जोडून समासांत उपयोग. जसें:–दुदांव=दोन फणसांनीं युक्त देंठ; तिदांव=तीन फणस लागलेला देंठ. २ (गो) अळवाच्या पानाचा देंठ. ३ (गो.) वेलु. ४ (गो.) बारीक मुळी. दांवें पहा. [सं. दामन्]

**दावकू(खू)ल**—न. (गो.) पंजा.

**दावचक्र**—न. बैल फिरूं लागले म्हणजे वरच्या बाजूस फिरणारें, खालीं दांत असलेलें (बिडाच्या पाणरहाटांतील) बिडाचें चक्र.

**दावचें**—अक्रि. (गो.) तकतकणें; दिसणें; दर्शविणें; खुलून, उठून दिसणें. 'निळया अंगावर पांढरीं फुलें उत्तम दावतात.' [दावणें]

**दावडा**—पु. पाणरहाटावरील गाडग्यांची माळ ज्यावरून फिरते तें लोखंडी चक्र.

**दावण–न**—स्त्री. अनेक दावीं ज्यास जागोजागीं बांधलेलीं आहेत असा (गुरें बांधण्याचा) लांब दोर. २ (ल.) दाव्यांनीं बांधलेल्या जनावरांची ओळ, रांग; कैदी, गुन्हेगार इ० कांची ओळ; माणसांची ओळ, रांग [सं. दामनी, दामन्; प्रा. दामण-दावण; सिं. दामणु] **०देणें**–(अनेक चोर, भामटे इ० कांची) ओळच्या ओळ एकाच वेळीं ठार मारणें; रांगेंत उभें करून कत्तल करणें. 'सरकारानें चोरांची एकदांच दावण दिली तेव्हांपासून चोरी नाहींशी झाली.'

**दावण**—स्त्री. १ (अंगरखा इ०कांचा वर्तुळाकार) घोळ; घेर; फेर. 'जिना उतरूं लागले. श्रीमंतांच्या झग्याची दावण मागले पायरीवर पडली.' –हब २६. २ डोंगराची बाजू, कड. [फा. दामन्] **दावण(न)गीर**–वि. १ वस्त्राचा पदर धरून

ओढणारा. २ (ल.) दावेदार; दामनगीर पहा. 'तुमचा दावनगीर होईल.' –जोरा ८३. [फा. दामन्–गीर]

**दावण(न)मलगी**—स्त्री. दवण शेवंतीचें झाड. –शास्त्रीको.

**दावणा**—वि. १ दर्शनीय; दिसण्यांत चांगला. 'जिंकिला न वचे कव्हणा। पर जिंके जो आंगवणा। साधका हाचि दावणा। मिरवणा आर्थी।' –गीता १.११३३. २ दाखविणारा. –शर [दावणें]

**दावणी**—वि. दावणीचे; दावणींतील (बैल इ०). [दावण]

**दावणें**—उक्रि. (काव्य. अशिष्ट). दाखविणें; दर्शविणें. 'हो कांहीं, हांका हय, घडल्यासि वधीन शांतवन, दावा।' –मोभीष्म १०.७९. [सं दर्शय्; प्रा. दाव] **दावूं निघणें**—दिमाखानें; थाटमाटानें दाखविण्यास लागणें. 'स्वआतिथ्य कौशल्य दावूं निघाली।'

**दावल**—स्त्री. (एखाद्या गोष्टीचें केलेलें) ढोंग; बतावणी. (क्रि० दाखविणें). [दावणें]

**दावल मलीक**—पु. १ दावलमलीक नांवाचा मुसलमान अवलिया. 'कित्येक दावलमलकास जाती। कित्येक पीरास भजती।'–दा १४.७.३२. २ याच्या अनुयायांपैकीं एक. तुल० दावलभक्त. हे लोक आपलें तोंड ओरबडून विद्रूप करितात व भिक्षा मागून पोट भरतात. [दावल+मलिक्]

**दावला मोरस**—स्त्री. समुद्रकांठीं होणारी एक खारट पालेभाजी. ही घोळीसारखी असते. हरभऱ्याची डाळ घालून ही भाजी करितात. हिचें रायतें, भजीं इ० प्रकार करितात. –वगु ४.१८.

**दावली**—स्त्री. गवत खुरपून, तळसून काढण्याचें हत्यार; खुरपें. [फा. दाव्]

**दावली**—स्त्री. वासरूं इ० बांधावयाचें लहान दावें. [दावें अल्पत्व]

**दावलें**—न. (गो.) १ पितळेची उथळ पळी, डाव. २ गळसरींत मध्यभागीं गोंवतात तो सोन्याचा, मोत्याचा खोलगट दागिना. [डावलें]

**दावा**—पु १ द्वेष; वैर; मत्सर; शत्रुत्व. 'कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं।' –केका २१. 'आमरण पांडवासी माजा निर्विघ्न चालिला दावा।' –मोगदा ९.१५. २ भांडण तंटा; कज्जा. ३ (एखाद्या वस्तूवरील) मालकी; न्याय्य अधिकार, हक्क. 'हें घर म्यां तुला दिलें, याजवर माझा दावा राहिला नाहीं.' ४ (कायदा) न्याय मिळविण्याकरितां, हक्क प्रस्थापित करण्याकरितां दिवाणी कोर्टात चालविलेला खटला, कज्जा, फिर्याद; (इं.) प्लेंट्. ५ दुसऱ्याच्या विरोधामुळें (एखाद्या पदार्थावर) स्वत्व प्रतिपादन करण्याचा व्यापार. 'तो अलीकडे या गांवावर दावा सांगतो.' ६ मागणी. 'राजे आपलें इमान राखून ऐवज अदा करितील तरी व्याजाचा दावा करणार नाहीं.' –पया ४०० ७ हल्ला. 'बळकट झालें म्हणजे...दावे दरवडे करावे.' –मराअ २२. ८ सापाचा डंख. 'सर्प बारा वर्षे दावा राखितो.' [अर दआवा; गु. दावो] (वाप्र.) **०उगवणें–घेणें**–(एखाद्यानें केलेल्या अपकारांचा) सूड उगविणें; (एखाद्यानें) केलेल्या अपकारांचें उट्टें काढणें. **०गाणें–सांगणें**–(एखाद्यावर) सूड उगविण्याबद्दल धमकी देणें. **०तोडणें**–कज्जा मिटविणें; (हक्कासंबंधी भांडणाचा) निकाल लावणें. **०धरणें**–द्वेष करणें; मत्सरबुद्धि बाळगणें; डाव, दांत धरणें. **०रद्द करणें**–फिर्याद काढून टाकणें **०लावणें**–१ शत्रुत्व पुकारणें; भांडणें. २ फिर्याद गुदरणें **०साधणें**–१ यशस्वी रीतीनें सूड उगवून घेणें. २ फिर्याद जिंकणें 'म्हणे तुकयानें साधिला दावा। न्याय सांगावा कवणासी।' **उभा दावा**–पु. खडें वैर; तीव्र शत्रुत्व. **म्ह०** जावा जावा आणि उभा दावा. **दुस्मान दावा**–कट्टें वैर; हाडवैर. सामाशब्द– **०दरफडा**–पु. आरडाओरड करून धमकावणें; दपटशा देणें खडसावणें; चरफडाट; दंडेलीचें, उर्मटपणाचें बोलणें. (क्रि० करणें मांडणें; कर्माची षष्ठी योजतांना गाणें ह्या धातूचा प्रयोग) [दावा+दरफडणें] **०द्वेष**–पु. मत्सर; वैर; (सामा.) मत्सर; द्वेष बुद्धि. (क्रि० होणें; करणें) [दावा+द्वेष] **०हेवा**–पु. मत्सर व द्वेष. (प्र.) हेवादावा. [दावा+हेवा] **दावेकरी–खोर–दार**–वि. १ मत्सर, द्वेष, शत्रुत्व करणारा; वैरी. 'चहूं पादशहांचे आपण दावेदार.' –सभासद ४५. 'पति नव्हे हा दावेकरी पूर्वील जन्मांतर साधिलें।' २ (एखाद्याजवळ आपल्या) हक्काची मागणी करणारा; हक्क सांगणारा; हक्कदार. ३ धनको. ४ पूर्वीच्या काळीं फिर्यादीनें गावचपंचायती पुढें फिर्याद केली व पंचायतीने जर त्याचें भांडण मिटविलें नाहीं व त्या फिर्यादीस सरकाराकडे अपील करण्याची ताकद नसली तर तो शेजारच्या गांवीं जाऊन राही व तेथून स्वतःच्या गांवांत लुटालूट करीत असे, तशा प्रकारचा (मनुष्य). [फा. दआवा–दार] **दावेदारी, दावेखोरी**–स्त्री. १ शत्रुत्व; वैर; द्वेष. २ (एखाद्याविरुद्ध) हक्क असणें; सांगणें; हक्कदारी. **दावेदावी**–वि. द्वेष, मत्सर करणारा; वैरी. [दावेदार] **दावेदुश्मन, दावेदुस्मान**-पु. शत्रु; वैरी; मत्सर, दावा करणारा.

**दावाळूं**—न. एक प्रकारचें पांढरें अळूं. ह्याचें मूळ गड्ड्यासारखें नसून अनेक मुळखंडांचें बनलेलें असतें. हें अळूं पाण्याच्या खोबणींतून, खाचणी–घळींतून लावतात. [दाम=दोर+अळूं]

**दाविणें**—सक्रि. (काव्य) दाखविणें; दावणें पहा. 'तुम्हां करुनि दाविली शिवुनि गळ सत्या दरें।' –केका ६२. [सं. दृश्–दर्श]

**दावें**—न. गुराच्या गळयास अडकवून खुंट्यास, दावणीस बांधतात तो दोर. 'बांधे तयाच्या उदरास दावें।' –सारुह १.७४. [सं. दामन्; पं. दांउ; हिं. दांव] **दाव्यास दावें असणें**–(गाय, म्हैस इ० ची) संतति न विस्तारणें; एकेरी असणें. 'त्या गाईची संतति उगीच दाव्यास दावें आहे.' **दाव्यास दावें देणें**–गाय, म्हैस इ० अशक्त झाल्यामुळें किंवा इतर कारणामुळें एखाद्यास पोसण्यास दिली असतां त्यानें तिचें वेत (वासरूं) मात्र धन्यास देणें (व या अटीवर तिचें दूधतूप इ० काचा उपभोग घेणें). 'ही म्हैस मला पोसवत नाहीं, तूं पोस आणि व्याली असतां मला दाव्यास दावें दे.'

**दावें**—न. १ कच्चा फणस; (झाडावर असलेल्या फणसासंबंधींच हा शब्द योजतात). २ आळवाच्या गड्याला, कंदाला फुटलेलें मुळखंड; दाव पहा. ०**फणस**–पु. फणसाची एक जात; ह्याच्या मुळाच्या फांगाड्याना फळें येतात.

**दाशा**—पु. १ पातळ भिंतीला मजबुती आणण्यासाठीं मधून मधून तींत जीं आडवीं किंवा कैचीप्रमाणें लहान लांकडें चिणतात त्यांतील प्रत्येक. २ छपराचे वांसे भिंतीवर ज्या आडव्या पाखाडीवर, तुळईवर टेकतात त्या तुळईला आधार म्हणून भिंतीच्या गर्भात जे खांब रोंविलेले असतात त्यांपैकीं प्रत्येक. [हिं. दासा]

**दाशाळ**—पु. (बे.) जास्वंद. [फा.]

**दाशिरूं**—न. बटीक; दासी. –शर. दासरूं पहा. [सं. दासी तिरस्कारार्थी]

**दाष्ट, दाष्टिक**—वि. कठोर भाषणादिद्वारां दुसऱ्यास जाचण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा (मनुष्य); खाष्ट; दुष्ट; द्राष्ट पहा. 'लोकीं बहु दाष्टिक ही ऐसी न सुनेसि कंप दे सासु।' –मोभनु ७.५३. **म्ह०** दाष्टास देव धारजणा.

**दास**—पु १ हलक्या कामें करण्यासाठीं ठेविलेला चाकर, नोकर; सेवक; गुलाम. (सामासांत) गृहदास; भगवद्दास; अर्थदास इ० २ गुलाम; दासीपुत्र. हिंदुधर्म शास्त्रान्वयें गुलामांचे पुढील १५ प्रकार आहेत:–गृहजात=दासीपासून; क्रीत=विकत घेतलेला; लब्ध=मिळालेला; बक्षिस किंवा आंदण आलेला; दायादुपागत=वडिलार्जित आलेला; अनकालभृत=दुष्काळांत विकत घेतलेला; आहित=एखाद्यानें ठेवलेला; ऋणदास=कर्जफेडीच्या मोबदला घेतलेला; युद्धप्राप्त=लढाईंत जिंकून घेतलेला; पणेजित=पणांत जिंकलेला; तवाहम्=स्वयंप्रेरणेनें बनलेला; शरण आलेला; प्रव्रज्यावसित=स्वकर्मत्याग करणारा योगी; कृत=कांहीं काळपावेतों राहिलेला; भक्तदास=अन्नाकरितां बनलेला; वर्याहृत=स्त्री गुलामाबरोबर लग्न केलेला; आत्मविक्रयी=स्वतः देह विकून झालेला. ३ शूद्राच्या नांवापुढें लावावयाचें उपपद. ४ चौथ्या (शूद्र) वर्णाचा मनुष्य. ५ (देवतेचा दास, सेवेकरी) साधु; संतः भगवद्भक्त; देवाचा उपासक. उदा० शिवदास; विष्णुदास; रामदास. 'मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसें।' –तुगा २१०८. ६ (सांकेतिक) समर्थ रामदास. 'दास डोंगरीं राहतो।' ७ रानटी, असंस्कृत, अनार्य माणूस. [सं.] ०**पणाची शिक्षा**–स्त्री. (कायदा) सक्तमजुरीच्या कैदेची शिक्षा. (इं) पीनल्‌ सर्व्हिटयूड. **दासानुदास**–पु चाकराचा चाकर; दासाचा दास; गुलामाचा गुलाम. पत्र इ०कांत विनंति करणारानें, नम्रपणानें बोलणारानें आपला अत्यंत हलका दर्जा दर्शविण्यासाठीं स्वतःस लावून घ्यावयाचें उपपद. [दास+अनुदास]

**दास, दासरी**—पु. दक्षिणहिंदुस्थानांतील एक विशिष्ट भिक्षेकरी; हा विष्णूचा उपासक असतो. [दास]

**दासट-टें**—वि. दाहक; नाशकारक; कष्टदायक. 'बोल हतियेराहूनि तिखट। दिसती अग्निपरिस दासट।' –ज्ञा ११.४६३. [सं. दह्] ०**पण**–न. १ दाहकपणा. २ उद्धटपणा. ३ सेवाधर्म; दास्य.

**दासरी**—स्त्री. १ दासी. २ कुणबीण. –खिपु.

**दास(सि)रूं**—न. गुलाम; दासी; बटीक. 'अगा प्राकृताही राया। आगीं पडे जे धनंजया। ते दासिरूंहि कीं तया। समान होय।' –ज्ञा १८.१४०३. [सं. दासी, दासेर]

**दासी**—स्त्री. १ सेविका; चाकरी करणारी स्त्री; बटीक; गुलाम; स्त्रीदास. २ शूद्राची स्त्री; कुळंबीण. ३ रखेली; नाटकशाळा; राख. 'मल्हाररावाची दासी बोलली दिनभर बसा डेऱ्यांत।' –ऐपो ३२४. [सं.] ०**पुत्र**–पु १ दासीपासून, रखेलीपासून झालेला मुलगा; कडू संतति; अनौरस मुलगा. ३ वेश्यापुत्र. 'दासीसुता नाहीं पितयाचा ठाव।' –तुगा ८६२. [दासी+पुत्र] ०**योग**–पु. अनौरस स्त्रीशीं गमन; अपवित्रसंबंध; वेश्यागमन. 'शूद्रस्त्रीसी संग। नित्य असे दासीयोग।' –गुच २८.११. [दासी+सं. योग=मिलाफ, जुळणें]

**दास्त**—स्त्री. बरदास्त; काळजीपूर्वक रक्षण; निगा; शुश्रूषा. (क्रि० करणें; राखणें; ठेवणें).' जखमांची दास्त लष्करांत न होय, म्हणून बंकापुरी पाठविले आहेत.' –ख ६.२८३२. [फा. दाश्त्]

**दास्तन**—स्त्री. गोष्ट; कथा; मजकूर. [फा.]

**दास्तान**—न. १ धान्य इ० सांठविण्याची क्रिया; सांठवणूक. 'जिन्नस फरोक्त करणें, जर किमतीस फारच अजमासे तोटा येऊं लागल्यास दास्तान करून टेवणें.' –रा १२.११३. २ धान्य इ० कांचा सांठा; गल्ला; निधि. 'सरकारचें दास्तानापैकीं तूर्त गोळे काय फर्म्यास येतील हे द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे.' –ख १२.६२४४. 'या घरांत पन्नास खंडींचें दास्तान आहे.' ३ धान्य इ० कांचें कोठार; कोठी. 'नख्त नाणें व गल्लेचें दास्तान वगैरा जिन्नस.' –चित्रगुप्त ३५. 'दारुगोळा, तोफा वगैरे किल्ल्यावर राहील, परंतु दास्तानी आहे तो आमचे कुटुंबास द्यावा म्हणोन अर्ज.' –वाडबाबा १.५८. ४ (बंदरावरील) मालाची वखार; गोदाम;

जहाजावरील कोठी, माल भरण्याची जागा. ५ ( सामा. ) जेथें धान्य इ० सांठवितात तें स्थळ, भांडें. ६ जहाजावरील माल, ओझें. ७ निगा; बरदास्त; काळजीपूर्वक रक्षण. ( क्रि० लावणें; ठेवणें ). दास्त पहा. ८ गाठोडें. -पया २८३. [ फा. दाश्तन् ] ०दार-वि. १ कोठीवरील मुख्य अंमलदार; कोठारी. २ धान्य इ० कांचा सांठा ज्याच्याजवळ आहे असा संपन्न ( मनुष्य ). [ दास्तान+फा. दार प्रत्यय ] ०महाल-पु. गल्ला, कोठी इ०कांचा महाल. -शिदि ४३८.

**दास्ताना**—पु. काठी खेळतांना हातावर मार बसूं नये म्हणून मनगटापासून कोपरापर्यंत बांधावयाचा चामड्याचा पट्टा. पूर्वी हा पट्टा लोखंडी असे परंतु तरवारींऐवजीं काठ्यांचा उपयोग होऊं लागल्यामुळें चामड्याचा पट्टा, प्रचारांत आला. -संव्या ६५. ( सं. ) अंगुलित्राण. -शब्द ? [ फा. दाश्तन् ]

**दास्य**—न. सेवाचाकरी; नोकरी; गुलामगिरी; चाकरी; दासपणा. ' दास्य करी दासाचें । उणें न साहे तयाचें । ' -तुगा७२६. [ सं. ] **दास्यक**-वि. सेवा करणारा; सेवक. ' नेणती गोप्य गुरुदास्यका । ' -गुच ३.२०. [ दास्य+सं. प्रत्यय क=करणारा ] **दास्यत्व**-न. दास्य या शब्दाबद्दल चुकीनें रूढ झालेला शब्द. ' गुरुदास्यत्व करिती अनुदिन । ' [ दास्य ] **दास्यभक्ति**-स्त्री. उपासनामार्गातील नवविध भक्तिरूप साधनांचें सेवानामक सातवें अंग. [ दास्य+भक्ति ]

**दास्री**—पु. १ बहुरूप्यांतील एक भेद. २ ( ल. ) निर्लज्ज, हलकट मनुष्य. दासरी पहा. [ सं. दास; का. दासरी ]

**दास्वन**—स्त्री. (प्र.) जास्वन. जास्वन पहा. [जास्वन अप.]

**दाह**—पु. १ जाळण्याची, जळण्याची क्रिया; दहन; जाळणें. ' अग्निदाहो न संभवे । ' -ज्ञा २.१४६. ' प्रेताचा दाह केला आणि मग स्नान केलें. ' २ रोगजन्य शारीरिक उष्णता; तप्तता; ताप; तलखी, जळजळ. ' ज्वरानें आज भारी दाह होतो. ' 'दाह झाला म्हणजे मगजास किंवा मणक्याच्या रज्जूस विशेष चेतना होऊन हातपायांस आंचके येतात. ' -बालरोगचिकित्सा १४. ३ तीक्ष्ण व उष्ण मद्य प्राशन करण्यानें होणारा, उष्णता उत्पन्न करणारा रोग. हा सात प्रकारचा आहे. यानें रक्त प्रकुपित होतें, अंग तापतें, तहान लागते, डोळे लाल होतात, अंगावर विस्तव पसरल्यासारखें वाटतें. -योर १.७१४. ४ ( ल. ) संताप. ५ आग; भडका. दाहा असें अशुद्ध रूपहि प्रचारांत आहे. [सं.] ०जाळ-पु. उन्हाच्या झळीमुळें प्रखरतेमुळें होणारा ( शरीराचा ) दाह; जळजळ, आग. [ सं. दाह+म. जाळ ]

**दाहक**—पु. (काव्य.) अग्नि; विस्तव; पावक. -वि. १ जाळणारा; दहन करणारा. २ ( रसा. ) जाळणारा; ( इं. ) कॉस्टिक्. [सं.] ०पालाश-पु. एक तीव्र अल्कली; (इं.) कॉस्टिक पोटॅश्. ह्याच्या पांढऱ्या कांड्या असतात. हा हाताला बुळबुळीत लागतो. [ दाहक+( रसा. )पालाश=( इं. ) पोटॅश् ] ०सिंधु-पु. ( रसा. ) सिंधुचा ( सोड्याचा ) दाह करणारा एक संयोग. ( इं. ) कॉस्टिक सोडा. [ दाहक+( रसा. ) सिंधु ]

**दाहट**—वि. १ धीट; धाडसी. २ चपळ; तलख; तरतरीत; [ धट्ट ] म्ह० अति सोंवळा तो ओंवळ्या खाय दाहट बायको निघून जाय.

**दाहणें**—उक्रि. ( काव्य. ) जाळणें. [ दाह ]

**दाहन**—न. भाजणें; जाळणें. [ सं. दहन याचें प्रयोजक रूप ]

**दाहनी**—स्त्री. ( रसा. ) भाजण्याचा चमचा. ( इं. ) डिफ्लेग्रेटिंग् स्पून्.

**दाहवा ग्रह**—पु. १ (ल.) नेहमीं त्रास देणारा, खाष्ट मनुष्य. २ जांवयाला थट्टेनें म्हणतात. आकाशांत नऊ ग्रह निरनिराळ्या राशींत असतात पण जांवई कन्यारूप राशींत असून त्रास देतो यावरून ' जामातो दशमो ग्रहः '

**दाहा**—पु. ( प्र. ) दाह. दाह पहा. [ दाह अप. ]

**दाहा**—वि. दहा. १० संख्या. (वाप्र.) **द-दाहांचा हात**-पु. दहा जणांचे, एकजुटीनें असलेल्या जनसमूहाचे हात; संघशक्तीचा द्योतक वाक्प्रचार. म्ह० दहांचा हात दुष्मनावरहि पडे नये=संघशक्ति ही इतकी आचाट असते कीं प्रत्यक्ष शत्रूला सुद्धां दिला तोंड देण्याचा प्रसंग येऊं नये. **दाहीजण**-पुअव. गावातीळ वंशपरंपरागत हक्कदार. **दाही दिशा**-स्त्रीअव. १ दशदिशा. २ (ल.) सर्व जग. **दाहीदिशा मोकळ्या असणें** -जगांत कोठेंहि आडकाठी नसणें; सर्वत्र स्वतंत्रता असणें.' या जगांत एकाच गोष्टीची जरूरी. ती प्राप्त करून घेण्यासाठीं दाही दिशा मोकळ्या आहेत. ' -भयंकर दिव्य.

**दाहाट**—वि. धीट. दाहट पहा.

**दाहिजा**—पु. १ दहा जणांची, विशेषतः दहा शिपायांची टोळी, समूह. २ ( राजा. ) कुळारग गांवात कुळांच्या सत्तेखालीं नसलेला खोताच्या ताब्यातील जमीनीचा प्रदेश; सार्वजनिक जमीन. ३ दहा माणसांचें कुटुंब; मोठें कुटुंब. [ दाहा ]

**दाहित**—वि. जाळलेलें; जाळून काढलेलें; दग्ध. [ सं. दह् ]

**दाही**—स्त्री. ( विरू. प्र. ) द्वाही. द्वाही पहा. [ द्वाही अप. ]

**दाही**—अ. कोणत्याहि रकमेस दहानीं गुणतांना योजावयाचा शब्द. जसें:-चारदाही चाळीस; सातदाही सत्तर. [ दाहा ]

**दाहीदुराई**—स्त्री. द्वाहीदुराई पहा.

**दाहोतरा, दाहोत्रा**—पु. १ दरसाल दरशेंकडा दहा हा व्याजाचा दर. २ केळीं, नारळ इ० जिन्नस विकतांना दर शंभरामागें दहा जिन्नस वर देण्याचा विक्रीचा प्रकार. [ म. दहा+सं. उत्तर=अधिक, वर ]

**दाह्य**—वि. १ पेट घेणारें; ज्वालाग्राही. २ जाळावयास योग्य, शक्य; ज्वलनीय. [सं.]

**दाह्या**—पु. (ना. चांदा). जिन्याखालील जागेंत केलेली लहान खोली.

**दाळ**—स्त्री. १ डाळ; द्विदल धान्य भरडून, फोलकटें काढून तयार करितात ती. २ डाळकण; चुरी. ३ डाळीचें वरण. [सं. दल] (वाप्र.) **०गळणें-शिजणें-विकणें**-(एखाद्याच्या) लबाडया, कावे, कपट, डावपेंच इ० फलद्रूप होणें; भरभराटीस येणें; काम साधणें; लाग लागणें. सामान्यतः अकरणरूपीं योजितात (एखाद्यानें) **दाळ नासणें-व्यर्थ खाऊन गमाविणें**-१ (मूल, बायको इ० कार्नी) निरुपयोगी आळशी बनणें, २ उर्मट, बेमुर्वतखोर बनणें. **आपल्या पोळीवर दाळ ओढणें**-स्वतःचाच फायदा करून घेणें; स्वार्थी, आपलपोटें बनणें. सामाशब्द- **०कण-चुरी**-पुस्त्री. दाळीचे कण, चूर. **०गपु**-वि. १ डाळभात गट्ट करणारा. २ (ल.) गेलेलङ्; लङनिरंजन; मूर्ख. ' रजोगुणाचा पडला पडप। अवतारिकार्चे नेणतां स्वरूप। दाळगपु हा वदतां भूप। अवघे हांसती विनोदी।' -दावि २५४. [दाळ=अन्न+ध्व. गप्=खाण्याचा आवाज] **०गोटा**-पु. डाळींतील न भरडला गेलेला सबंध दाणा, गोटा. [दाळ+गोटा] **०पठिया**-वि. अतिशय सौम्य स्वभावाचा; गरीब (मनुष्य). [दाळ+पीठ] **०पाठ-रोटी**-नस्त्री. साधें जेवण; (पोटाला अवश्य असलेली) भाजीभाकर. (क्रि० देणें; चालविणें; मिळविणें). **०भाजी**-स्त्री. डाळ घालून केलेली भाजी **०भोपळा**-पु. भोपळा घालून केलेलें डाळीचें वरण, आमटी; डाळ घालून केलेली भोपळयाची भाजी. **म्ह०** दाळरोटी सब बात खोटी **०वांगें**-न. वांगीं घालून केलेलें डाळीचें वरण.

**दाळ**—पु. (गो.) एकावर एक लावून, रचून ठेवलेल्या वस्तूंचा समुदाय; चळत. डाळणें पहा. **दाळचें**-सक्रि. (गो.) (वस्तु इ०) एकावर एक रचून ठेवणें; डाळणें. ' घरांत आणल्यानंतर सर्व भारे भिंतीला टेकून दाळून ठेव.' [गो. दाळ=चळत]

**दाळकांड**—पु. (बायकी) जुन्या लुगडयाचा फाडून काढलेला तुकडा. [सं. तल; दल-ल+खंड]

**दाळवा**—पु. (ना.) डाळें पहा.

**दाळसांड**—स्त्री. (व.) हेळसांड; हयगय. ' आमची अशी दाळसांड करूं नको.'

**दाळिंब, दाळिंबपाक, दाळिंबी, दाळीम**—डाळिंब इ० पहा. (देशावर डाळिंबाच्या ऐवजीं दाळिंब शब्द अधिक प्रचारांत आहे.) [सं. दाडिम]

**दाळी**—स्त्री. (गो.) बांबूची केलेली लहान टोपली; परडी. डाली, दालें पहा.

**दाळी**—स्त्री. (गो.) एक प्रकारचा दागिना.

**दॉळूक**—न. (गो.) एक प्रकारची मासळी.

**दाळें**—न. डाळें पहा.

**दाक्षणी, दाक्षणा**—स्त्रीपु. (तंजा) मुसलमानी विवाहित स्त्रिया दांत काळे करण्याकरितां वापरतात तें दंतमंजन; दांतवण; दाखशिणा, दाखिउना पहा. ' तुरकांतील संकेत कन्यापणीं दाक्षणा लावणें नाहीं.' -म. ऐ. शि. १९०७ तंजावर.

**दाक्षायणी**—स्त्री. दक्षाची मुलगी; पार्वती. [सं.]

**दाक्षिणात्य**—वि. दक्षिणेकडचा (रहिवासी); दक्खनचा, दक्षिणी; दखनी [सं.]

**दाक्षिण्य**—न. १ सरळपणा; चोखपणा. २ हुशारी; दक्षता; ३ हातोटी; चातुर्य. [सं. दक्षिण]

**दि॥**—(संक्षेप) तर्फेच्या. दिमत पहा.

**दिऊ**—पु. दिवस. ' दिये दिउनि जन्मले। पांडव हे।' -ज्ञा ११.१६८. [सं. दिवस; देप्रा. दिअ]

**दिक्, दिग्**—स्त्री. १ दिशा. २ मर्यादा. ३ दहा संख्येचा वाचक शब्द. (समासांत) दिक्पाल; दिग्भेद; दिक्साधन. [सं.] **०अंत**-पु. १ (दिगंत) दृश्य क्षितिज. २ पृथ्वीचा शेवट; तिचा सीमांतप्रदेश; अंतिम टोंक. **दिगंतीं जाणें**-सर्व पृथ्वीवर पसरणें; चोहोंकडे फैलावणें (कीर्ति, सुवास, इ०). ' या राजाची कीर्ति दिगंतीं गेली.' **०अंतर**-न. (दिगंतर) लांबचा, परका देश-दिशा; दूरदेश. ' दिगंतरावरून माल आला.' **अंतरीं**-क्रिवि. पृथ्वीच्या अगदीं शेवटाच्या सीमेपर्यंत; दिगंतीं (कीर्ति इ० पसरणें) (येथें अंतर हा शब्द अंत याअर्थी चुकीनें योजिला आहे). **०अंबर**-वि. (दिगंबर) १ दिशा हेंच वस्त्र नेसलेला-म्हणजे नागवा; नग्न. २ महादेव. ३ दत्तात्रेय. ४ परमहंस संन्यासी. ५ या नांवाचा जैन धर्मांतील एक पंथ. **०अंश**-न. (दिगंश) सूर्य तारे किंवा इतर ग्रह हे क्षितिजाच्या ज्या बिंदूंत उगवतात किंवा मावळतात तो बिंदु आणि क्षितिजावरील पूर्व किंवा पश्चिम बिंदु यांमध्यें जो कंस होतो तो. (इं.) को-ॲम्प्लिट्यूड. **०कंठ**-पु. (दहा दिशांवरून, दहा तोंडांचा) रावण. **०गज**-पु. (दिग्गज) १ पृथ्वीच्या अष्ट दिशांस असणारा व तीस आपल्या डोक्यावर उचलून धरणारा एकएक हत्ती. ऐरावत, पुंडरीक वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत सार्वभौम, प्रतीक अशीं त्यांचीं नांवें आहेत. ' पृथ्वी डळमळील म्हणोनि। दिग्गज ठेविले दडपण।' -ह्यादि १३.४.२५. २ (ल.) सुंदर व धिप्पाड माणूस. ३ जाडा पंडित; बडाविद्वान्. ४ (थट्टेनें) अवाढव्य, राक्षसी, दांडगा माणूस. **०चक्र**-न. सर्व जग; अखिल विश्व. ' दिग्चक्रीं तेज न माये।' **०दर्शन-प्रदर्शन**-न. १ किंचित् निर्देश; सुचना; दर्शन; दिशा दाखविणें.

२ स्वरूप, पद्धति इ०ची स्थूल कल्पना आणून देणें; सामान्य माहिती. ०दाह–पु. क्षितिजावरील तांबडेपणा, तांबडा प्रकाश. ०पाल–पु. दिशेचा स्वामी. हे दहा दिशांचे दहा आहेत–इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, सोम, ईशान, अनंत व ब्रह्मा. ०बंधन–न. १ (जादु) एक नजरबंदीचा प्रकार. दिशा भारण्याचा जादूगार करीत असलेला देखावा. २ (तंत्रशास्त्र) संध्या, जप इ० कर्मांत करावयाचा एक विधि. ०भ्रम–भ्रमण–पुन. पृथ्वीवर कोठेंहि भटकणें; दिशोदिशीं फिरणें; दिशाभूल. ०भ्रांत–वि. हरवलेला; दिशा चुकलेला; अज्ञात प्रदेशांत फिरणारा. ०मंडल–न. दिशाचक्र. ०लव–पु. दिंगश पहा. ०विजय–पु. १ दशदिशा, सर्व जग जिंकणें (सैन्यबलानें किंवा विद्येनें). २ (उप.) अशिष्ट, बेताल कृत्य; वेडेपणाची आडदांडपणाची प्रवृत्ति; आकसताळा; दंगा; बंड. 'त्या पोरानें दिग्विजय मांडला.' ०विजयी–वि. पृथ्वी जिंकणारा; जगज्जेता; बलाढ्य वीर. २ (उप.) व्यसनी; बदफैली; दुराचारी; अर्वाच्य. ०व्यापी–वि. सर्वव्यापी; सर्वप्रसिद्ध; जागतिक.

**दिक, दिक्क**—स्त्री. १ काळजी; परवा; भीड. 'येथें दिक् कोठें आहे! राज्य बुडतें ही काळजी कोठें आहे.' –ख १०.५३४३. २ अडथळा. 'शिंदे बहुत वाढले आहेत, कांहीं दिक्क राहिली नाहीं; तर शिंदे यांस जरब बसे असा मन्सबा योजिला आहे.' –ख १०.५३४४. –वि. १ क्षीण; बेजार; दमलेला; आजारी. 'हगवणीनें दिक्क झाले आहेत.' –ख १०.५२७३. २ त्रस्त; विटलेला. 'अंतर्यामीं नबाब बहुत दिक्क व विचारांत.'–रा ५.१६२ ३ खप्पा; नाखूष. 'वयनींची मर्जी खर्चाची वोढ पडल्यामुळें दिक्क आहे.' –ख ११.६००९. ४ थक्क; चकित. [अर. दिक्क] ०हरकत–स्त्री. अडथळा. 'हे करून दिले इनामती कोणी दिक् हरकत करणें निसबत नाहीं.' –रा ३.५०२.

**दिक्कत दिक्कतखोर**—दिक्कत, दिक्कतखोर पहा.

**दिक्कत, दिक्कत**—स्त्री. १ सूक्ष्म दोष; शंका; अडचण; हरकत; आक्षेप. 'इंग्रज दोनी दौलतींत (निजामाच्या व पेशव्यांच्या) पाय घालतात यांत दिक्कत नाहीं।' –ख १२.६८३४. २ कबूल करण्यांत कांकूं, अडचण, हरकत. 'जन्मला प्राणी मरणार ह्या विषयीं दिक्कत काय?' ३ तंगी; टंचाई. 'पाण्याचे दिकतीनें आणि उष्णकाळ भारी म्हणून आठशें माणसें मरण पावलीं.' –दिमरा २.८७. [अर. दिक्कत्] ०खोर–वि. १ आढेवेढे घेणारा; फांटे फोडणारा; हेकेखोर; संशयी; शंकेखोर; अडचणी काढणारा मनुष्य. २ नाकारलें जाण्याजोगें (नाणें); दिक्कत अर्थ २ पहा. मला 'दूर जायाचें आहे दिक्कतखोर रुपया देऊं नका.' ०हरकत–स्त्री. अडथळा इ० दिक्कती–वि. दिक्कतखोर पहा.

**दिक्कत**—वि. (ना.) आजारी; अंथरुणाला खिळलेला. दिक्क पहा.

**दिखाऊ**—वि. १ बाहेरून सुरेख, चांगला दिसणारा (माल, माणूस इ०) २ पोषाखी; खरी ताकद नसणारा. [दिसणें. हिं.]

**दिगर**—क्रिवि १ तसेंच; आणखी; जास्त; पुढें; शिवाय; भलतें; उलटें; नंतर. २ अन्य; इतर. 'मध्यें कोण्ही जो दिगर करील त्यास तंबी करूं.' –रा १.४८. ३ भलतें. 'बाद कर्नेल गाडर याचें बोलणें व नजर पहिली राहिली नाहीं? जबाब दिगर, सवाल दिगर करूं लागले.' –ख ७.३५७४. ४ उलट; विरुद्ध. 'तरी हे भाऊकडील सरंजामी गांवाचा बंदोबस्त करितील. आपणांकडून येविशीं दिगर जाबसाल नसावा.' –ख ११.५६५४. ५ इनाम, सरंजामी खेड्यांस लावतात. याच्या उलट खालसा 'दाहा गांव दिगर आहेत पांच खालसा आहेत.' [फा. दिगर्=इतर] ०नंबर–न. जादा अथवा किरकोळ फेरिस्त; सामान्य खातें ०बाद–वि. १ अवांतर. 'दिगरबादे चौकी बादशहाचें अडीच तीनशें मैल' –इमं १९९. २ (कायदा) जमीनीचा मालक म्हणून सरकारकागदीं असलेलें एका इसमाचें नांव रद्द करून त्या ठिकाणीं दुसऱ्याचें नोंदणें. –लँड रेव्हेन्यू कोड ०मजकूर–अ. शिवाय, दुसरा: ताजा मजकूर. पत्रांतील दर कलमाच्या प्रारंभीं लिहितात.

**दिगरजान**—वि. जीवश्च कंठश्च; जानी. (प्र.) जिगरजान पहा. [फा. जिगर्+जान्]

**दिगी**—स्त्री. (गो.) आधारासाठीं लावलेला टेकू.

**दिग्रत**—शअ. नंतर. –शर. [फा. दिगर]

**दिघडा**—वि. उभट; उंच; दीर्घ. 'दिघडु ना खुजटा।' –ज्ञा ११.२७७. [सं. दीर्घ: प्रा. दिग्घ]

**दिघळें**—स्त्री. (महानु.) बरचीसारखें एक शस्त्र. 'विचाराचेनि दिघळें खोचावा संसारशत्रु।' –भाए २४४.

**दिङ्निर्णय यंत्र**—न. ज्याच्याद्वारें दिशा ओळखतां येतात असें यंत्र; नाविक कंपास. (इं.) मॅरिनर्स कॉंपस. [सं.]

**दिठा**—पु. १ द्रष्टा; पाहणारा (माणूस) 'आपणपें द्रष्टा। न करितां असे पैठा। आतां जालाचि दिठा। कां करावा।' –अमृ ७.२१६. २ (ल.) आत्मा. [सं. द्रष्टा; प्रा. दिट्ठा] ०वणें–अक्रि. दृष्टावणें; दृष्ट लागून नासणें. [दिठा]

**दिठी, दिठि(ठी)वा**—स्त्री. १ (काव्य) दृष्टि; पाहणें; नजर. 'तुझा उजू दिठिवा पडे।' –शिशु ११४. मग संभ्रमें दिठीसेने। घालितसे।' –ज्ञा १.१६७. २ कृपादृष्टि. 'तुमचे या दिठिवेयाचिये बोले। सांसिनले प्रसन्नतेचे मळे।' –माज्ञा ९.४. ३ दर्शन; देखावा. (क्रि०घालणें). [सं. दृष्टि; प्रा. दिट्ठि] ०असणें–(व.) ऐकण्यांत असणें; (व.) तिळीं असणें असाहि एक पर्याय आहे. ०भरणें–अक्रि. पाहणें. –शर. दिठें–वि. पाहिलेलें; दिसलेलें; अनुभूत. 'तैसें आपणपें नाहीं दिठे।' –ज्ञा ५.११२.

**दिठोणा**—पु. (प्रा.) तीळ; [ हिं. दिठौणा=तोंडावरचा तीळ; सं. दृष्टि+व्रण ]

**दिंड**—न. १ कापडाचा गठ्ठा, बस्ता ( हा साधारणतः लांबट बांधलेला असतो ). २ नागपंचमीच्या दिवशींचें पुरण घालून केलेलें पक्वान्न; गाठोडें. ३ नवऱ्यामुलाकडील मंडळीस केलेला आहेर ( पाठवणीच्या दिवशींचा ). ४ कुळव, पाभर, कोळपें इ० आउतांचा आडवा लांकडाचा तुकडा. ५ (सामा.) लांकडाचा ठोकळा, ओंडा. ६ खांब; खुंट. ७ ( विणकाम ) चातीच्या ( स्पिंडल ) मध्यभागीं, रहाटावरील दोरी, पट्टा अडकविण्यास केलेली जागा. हें सुतास अगर कापडास, चिकट पदार्थ लावून चातीच्या मध्यभागीं एक गुंडाळीसारखें केलेलें असतें. ८ ( गो. ) केळीचें कालें. [ का. दिंडु ]

**दिंड**—स्त्री. लहान दार. दिंडी पहा.

**दिडका-ता**—वि. १ एक आणि अर्धा मिळून झालेलें; दीड पट (माप इ०). 'राजापुरी शेरापेक्षां संगमेश्वरी शेर दिडका आहे.' २ एक तुकडा सबंध व दुसरा अर्ध्या रुंदीचा असणारी (पासोडी). याच्या उलट शालजोडी. ही दुहेरी किंवा सारख्या रुंदीच्या दोन फर्दांची असते. 'नारायणगांवी पासोडया दिडक्या असतात.' ३ दीडपदरी घडीचें ( वस्त्र ). 'हें धोतर दिडकें करून पांघर.' [ दीड ]

**दिडकी**—स्त्री. १ एक पैसा; दीड दुगाणी नाणें. २ उजळणीचा एक प्रकार; दिडाचा पाढा; दिडकें. [ दीड ]

**दिडकें**—न. १ दीड अथवा याचा कोणताहि एकेरी गुणाकार; दिडाचा पाढा. २ ( गुळाची अडत ) हमालांस दीड मणामागें कांहीं एक ठराविक हमाली देतात. त्यापेक्षां जास्त माल भरला तर त्याबद्दल दीडपट हमाली द्यावी लागते ती. [ दीड ]

**दिडदांडी**—स्त्री. मधल्या कांट्यापासून एक भाग आंखूड आणि एक लांब अशी जी ताागडीची दांडी ती. [ दीड+दांडी ]

**दिडदुमता**—वि. दिडका.

**दिंडवळ**—न. (बे.) देवनाळ; एक प्रकारचें बोरूसारखें झाड. [ का. दिंडळ ]

**दिंडा**—पु. हें एक रानझाड आहे. याच्या दोन जाती असून ज्याझाडाच्या काठ्या उंच न होतां जमीनीबरोबर असतात त्यास दिंडी म्हणतात व ज्याच्या काठ्या उंच जातात त्यास दिंडा म्हणतात. दिंड्याची काठी सोळा हात लांब असते.—वगु ४.२२. याची काठी गरम करून आपटली असतां स्फोट होऊन आवाज होतो. [ का. दिंड ]

**दिडी, दिडीकाडी, दिडें, दिडोत्रा**—दिढी इ० पहा.

**दिंडी**—स्त्री. १ मोठ्या दारास केलेली लहानशी झांप, दरवाजा. [का. दिड्डि] ०**दरवाजा**—पु. दिंडी असणारा मोठा दरवाजा. हा मोठ्या वाड्यांना असतो.

**दिंडी**—स्त्री. १ लहान तंबोरी; एक वाद्य; वीणा. 'हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें।' —तुगा ३४७. २ मिरवणुकीमधील निशाणावर हनुमान इ०कांचें काढलेलें चित्र, आकृति किंवा तें निशाण. ३ ( देव, ग्रंथ इ०ची ) मिरवणूक; भजनी मेळा; छबीना. ( क्रि० काढणें; मिरविणें; निघणें; चालणें; फिरणें ). ४ मराठी काव्यांतील एक वृत्त. [ का. दिड्डि ] ०**गाण**—पु. १ दिंडी वाद्य वाजवून भिक्षा मागणारा. 'वासुदेव दिंडीगाण। प्रसाद मागूं आले जाण।' —ललित. २ दिंडी या वाद्यावर म्हणावयाचें गाणें. ०**पताका**—स्त्रीअव. १ वाद्य वगैरे. २ यावरून ( समुच्चयार्थी ) मूर्तीची मिरवणूक. ( मंडळी, पताका, दिंड्या, झांजा मिळून ); पताका, मृदंग इ० घेऊन मूर्तीच्या अथवा देवळाच्या भोंवतालीं प्रदक्षिणा घालणाऱ्या लोकांची मिरवणूक. ( क्रि० काढणें; मिरवणें; निघणें; घालणें; फिरणें ). 'दिंडीपताका बहुवम। विठ्ठल नामें होतसे घोष।' —संवि ९.१७. [ दिंडी+पताका ]

**दिढी**—स्त्री. एक आणि अर्धा; दीडपट. [ दीड ] ०**काढी-वाढी**—स्त्री. पेरणीच्या वेळीं दिलेलें धान्य पीक आल्यानंतर दीडपटीनें घेण्याचा करार किंवा अशा करारावर दिलेलें कर्ज. ०**बाद्-वजा सूट**—स्त्री. (मुलकी, वसुलीमध्यें) एकतृतीयांश सूट. **दिढें**—शअ. दिडक्यांमध्यें दिडानें गुणतांना योजलेला शब्द. उदा० दहा दिढें पंधरा. **दिढोतरा-त्रा**—पु.दरमहा दर शेंकडा दीड प्रमाणें व्याजाचा दर.

**दिति**—स्त्री. दैत्यांची आई; अदिति देवांची आई याच्या उलट. [ सं. ]

**दिदवान** —पु पहारेकरी. [ फा. दीदवान् ]

**दिदार**—पु. चेहरा. —वि. देखणा. [फा. दीदार्] **दिदारू**—वि. देखणा पण नादान; वरून दिसावयास सुंदर परंतु पोकळ; टाकाऊ; निरुपयोगी ( कापड, वस्तु, जनावर इ० ). [ फा- ]

**दिधणें**—सक्रि. ( काव्य ) देणें. 'धर्म म्हणे उद्योगीं जो दिधला तोचि भद्र महिवर हो।' —मोभीष्म १.९६. [ सं. दा ]

**दिधन** —न एक औषध; रसायन.

**दिन**—पुन. दिवस. [ सं. ] ०**कर**—पु. सूर्य. 'काय दिनकरा। कोंबडयानें केला खरा।' —तुगा ११७६. [सं.दिन+कर] ०**चर्या-कृत्य**—स्त्रीन. १ रोजचा क्रम, राहणी; नित्याची राहणी, खर्च; प्रत्येक दिवशीं करावयाचें काम, कार्यक्रम. २ कसा तरी दिवस घालविणें; पोट भरणें. ३ रोजनिशी, डायरी इ०. [ दिन+चर्या ] ०**निर्वाह**—पु. दिनचर्या अर्थ २ पहा. [ दिन+निर्वाह ] ०**मणि-णी**—पु. सूर्य; दिनपति; दिनेश. 'भीमकी उल्हासे कमळिणी। कृष्ण दिनमणी देखिलिया।' —एरुस्व ५.३०. [दिन+मणि] ०**मर्यादा**—स्त्री. १ सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काळ. २ कालमर्यादा.

३ सूर्यास्त; सायंकाळ. [दिन+मर्यादा] ०मान–न. १ दिनमर्यादा अर्थ १ पहा. दिनावधि; एक दिवसाचा काळ; दिवसाची लांबी. 'मावळला दिन। मोकाम गीर नदीवर झाला।' –ऐपो ८१. २ परिस्थिति; काळवेळ. 'रोजगारानें चार पैसे मिळतील असें दिनमान राहिलें नाहीं.' [दिन+मान] ०रजनी–क्रिवि. दिवसां आणि रात्रीं; रात्रंदिवस; एकसारखें; सतत. [दिन+रजनी] ०वृध्दि–स्त्री. दोहों सूर्योदयांस एक तिथि भोगायाजोगी जी तिथीची वृद्धि ती; चंद्र व सूर्य यांमध्यें बारा अंशांचें अंतर पडावयास एक संपूर्ण दिवसापेक्षां अधिक काळ लागल्यास दुसऱ्या दिवशीं सूर्योदयीं तीच तिथि असते. अशा वेळीं दुसऱ्या दिवसास दिनवृद्धि झाली असें म्हणतात. [दिन+वृद्धि] ०शुध्दि–स्त्री. चांगला मुहूर्त; कोणताहि अशुभ अथवा कुयोग नसणें. [दिन+शुद्धि] ०क्षय–पु. सूर्योदयानंतर लागून द्वितीयसूर्योदयाचे पूर्वी संपणारी तिथि; सूर्योदयास एक तिथि असतां दुसरा सूर्योदय होण्यापूर्वीच चंद्र व सूर्य यांमध्यें बारा अंशांपेक्षां अधिक अंतर पडल्यास तिसरी तिथी लागते व मधलीचा लोप होतो तेव्हां म्हणतात. [दिन+क्षय] **दिनांत**–पु. संध्याकाळ; दिवसाचा शेवट. [दिन+अंत] **दिनावधि–धी**–स्त्री. १ एक दिवसाचा काल. २ दिरंगाई; आज उद्यांची चालढकल; विलंब; उशीर. [दिन+अवधि] **दिनें देवडें**–क्रिवि. रोजच्यारोज; एकसारखें, रोज नवीन. 'दिनें देवडें, चोळी लुगडें तिळभर नाहीं चुका। घर नंदाचें गोकुळ नांदे जणुं दुसरी द्वारका।' –पला ८१.

**दिनवाशी**—वि. (गो.) गरीब; दरिद्री. **दिनवास**–पु. (गो.) गरिबी; दारिद्र्य. [सं. दीन+वास]

**दिनार**—पु. एक जुनें नाणें. हें चांदीचें, सात किंवा दहा ग्राम वजनाचें असे नसेंच सोन्याचेंहि असे. याची किंमत साधारणतः ,ंचा; मनामध्यें थें तेंहिं ठेवा दिनारि सोनटके देखिले।' –पंच स्वस्थता; विवं- ‍नार; ग्री. दीनारियस]

वि. (काव्य) देणें. दीन्हणें पहा.

**दि(दी)पक**—पु. १ दिवा. २ (संगीत) एक राग. [सं.]

**दिपडें**—वि. तेजस्वी: सतेज. 'नाजुक रुपडें दिपडें ठिकडें जिकडे तिकडे असकारा।' –पला ४.१२. [सं. दीप्=चमकणें]

**दिपणें, दिपावणें**—अक्रि. १ अतिशय प्रकाशामुळें, तेजामुळें दृष्टि स्थिर न राहणें; चक्क होणें; अंधेरी येणें. २ अपूर्व किंवा अद्भुत गोष्ट पाहिल्यामुळें चकित होणें. ३ ज्या तेजानें किंवा प्रकाशानें दिसत असतें तें नाहींसें झाल्यामुळें अंधत्व येणें. [सं. दीप्, दीपन]

**दिपत, दिपवत, दिपवात**—स्त्री. १ देवापुढें तूपवात लावून ठेवलेला दिवा; सांजवात; तेलवात. (क्रि० लावणें; धरणें). २ (वांई) गाय, म्हैस प्रथम व्याली म्हणजे तिच्या दुधापासून केलेल्या तुपाचा दिवा देवापुढें लावणें. याप्रमाणें दिवा लावून होईपर्यंत त्या जनावराच्या दुभत्याचा उपभोग घेत नाहींत. [दीपवात]

**दिपत्कार**—वि. उजेड करणारा. 'दिव्या दिव्या दिपत्कार.' –मसाप २.२३३. [सं. दीप्]

**दिपरक्षा**—स्त्री. (गो.) दिव्यांची रांग; दीपमाला. [दीप+आराधना]

**दिपवा**—पु. (कों.) सारा दिवस ढगांची अंधारी असतांना मध्येंच थोडा वेळ ढगांमधून येणारे सूर्याचे किरण, पडणारें ऊन. [सं. दीप्=प्रकाशणें]

**दिपवाळी, दिपावळी**—स्त्री. दिवाळी पहा. [दीप] **०चा पाडवा–ची प्रतिपदा**–पु. कार्तिक शुद्ध प्रतिपदा; दिपवाळींतील मुख्य दिवस; कार्तिक वर्षारंभ. **०चें ओवाळणें**–न. दिपवाळींत पहिल्यानें ओवाळून घेण्याचा हक्क, मान (हा खोताचा एक मान असे).

**दिपाचा कवडा**—पु (ल.) वृद्ध, अशक्त किंवा कुटुंबांतील नाकर्ता माणूस; केवळ नांवाला धनी असा मनुष्य. [दीप+कवडा=सावली]

**दिपु(पो)ष्ट, दिपुष्टेल**—न. दिवा विझल्यानंतर राहिलेलें तेल. [दीप+उष्टें]

**दिपु(पो)ष्टाण**–स्त्री. विझविलेल्या दिव्याच्या वातीपासून सुटणारी घाण. [दिपुष्ट+घाण]

**दिबंखुरी–रें, दिमखुरी–रें**—वि. (गो.) लहान मुलांचें रांगणें. [दिंबी+खुर]

**दिंबो–मी**—स्त्री. १ (गो.) गुडघे मोडून बसणें. २ गुडघा.

**दिमक, दीमक**—पु. वाळवी; कसर. [सं. वल्मीक, वर्मीक; हिं. दीमक; फा. ?]

**दिमत, दिमतदार–वार**—दिम्मत इ० पहा.

**दिमाख**—पु मगरूरी; तोरा; डौल; गर्व; भपका. 'वेखीचा दिमाख शिकोनियां दावी। हिऱ्याऐसी केवीं गारगोटी।' –तुगा ३८५१. [अर. दिमाघ्] **०चोट्टा**–वि. (ना.) गर्विष्ठ; अहंमन्य. **०दार**–वि. १ चढेल; डौली; मगरूर. २ (ल.) अतिशय सुरेख; डौलदार. [फा.]

**दिम्मत**—स्त्री. १ जिम्मा; हवाला; काळजी; निस्बत; कारभार; व्यवस्था; ताबा. 'कोशलदार बंदर मुंबई दिंमत इंग्रज.' –वाडसमा २.१. 'याचे दिमती करणें.' –रा १५.६७९. २ तैनात; सेवा. ३ स्वाधीन, ताब्यांत असलेली सैन्याची तुकडी. [अर. झिम्मत्] **०दार**–वि. ताबा, सत्ता, व्यवस्था ठेवणारा. **०वार**–वि. ताब्यांत असलेला; हुकमांत वागणारा. –क्रिवि. ज्यांच्या दिमतीस वस्तु, मनुष्यें दिलेलीं असतात त्यांच्या नांववार (केलेली यादी इ०). **दिम्मती**–वि. ताब्यांतील; दिमतींत असलेला.

**दिय**—पु. दिवस. ' आम्ही येतुले दिया याची मातुहि नेणों।' –ज्ञा ६.४२८. [सं. दिन]

**दिरं(रिं)ग, दिरिंगाई**—पुस्त्री. उशीर; विलंब; रेंगाळणी; लांबण. ' उजूर व दिरंग केलिया मुलाहिजा होणार नाहीं.' –रा १५.२२२. [फा. दिरंग्]

**दिरगदारी**—स्त्री. अडचण; विपत्ति. गिरिबदारी पहा. [फा. गिरिफ्दारी शब्दावरून–मोल.]

**दिर(रि)म**—पु. १ दोन आणे किंमतीचें चांदीचें नाणें. 'सरकारचा दामदिरम तफावत न करणें. ' –रा २०.३०२. २ चवलीभार. ' दररोज अर्धा दिरीम हिरडा व अर्धा दिरीम सेंदेलोण मिळून द्यावें. ' –अश्वप १.१६१. [फा. दिरम्]

**दिरसाल**—वि. पाठविलेलें; धाडलेलें. [अर. द–इर्साल]

**दिल–ल्**—पुन. हृदय; अंतःकरण; मन. [फा. दिल्] (वाप्र.) **०फांकणें–फांकटणें**–अस्वस्थ होणें; बेचैन होणें; गोंधळून जाणें. **म्ह०** दिलमे चंगा तो काथवटमें गंगा=अंतःकरण शुद्ध, पवित्र असल्यास पवित्र गंगा आपणाजवळ असल्याप्रमाणेंच होय. सामाशब्द– **०आरामी**–स्त्री. आनंद; खुशाली; मनाचा संतोष; शांतवन. ' तुम्ही आपली खुशालखबर लिहून दिल् आरामी करीत जाणें. ' –रा २२.६५. **०कुल**–वि. हिरमुसलेला; कष्टी; श्रमी; लज्जित. ' दिलकुल बसले जिकडिल तिकडे सन्मुख एकहि येईना। ' –पला ८५ **दिल्खा**–क्रिवि. मनाप्रमाणें; यथास्थित. ' तुम्ही व राव पंतप्रधान खातर्जमेनें दिल्खा तदारूक अमलांत आणावा. ' –दिमरा १.७. [फा. दिल्खाह्] **०खुलास–सा**–पु. शुद्धभाव; मनाचा मोकळेपणा; समाधान. ' दिल्खुलाशानें जाब दिला नाहीं. ' –सभासद ३९ [अर. खिलास्=शुद्धता] **०खुशी**–स्त्री. १ आनंद; संतोष; तृप्ति; चित्ताची प्रसन्नता. २ रुकार; संमति; इच्छा; आपखुशी; पसंती. [फा. खुशी] **०गर्मी**–स्त्री. प्रेम, प्रीति; लोभ. 'दिल्गर्मी करून...कुशल वर्तमान पुसिलें.' –पदमव ७८. [फा. गर्मी] **०गिरी**–वि. दुःख; खेद; खिन्नता; बेदिली. **०गीर**–वि. दुःखी; कष्टी; खिन्न; असंतुष्ट; गांजलेला. **०जम(मा)ई**–स्त्री. खातरजमा; चित्तशुद्धता; मनाची मिळणी; मैत्री. ' भाऊची मार्फत महादजी शिन्देची दिल्जमाई केली. ' –पदमव ७७. **०जमीयत**–स्त्री. समाधान; खातरजमा; निःसंदेहता; निःसंशयता. ' तर मोहीबीं दिल्जमीयतीनें आपले कदीम ठिकाणास यावयाचें...केलें पाहिजे. ' –रा ३.९१. [अर. जमीयत्] **०जोई**–स्त्री. सांत्वन; समाधान. ' तुम्ही आमचे तर्फेनें यांची तशफ्फी व दिल्जोई करावी. ' –रा २२.२५. [फा. दिल्जोई] **०ताजगी**–स्त्री. चित्तसंतोष; अंतःकरण आनंदविणें; मन प्रसन्न करणें. ' आपली खैरखुशी कलमी करून दिलताजगी करीत असलें पाहिजे. ' –रा १०.१६५. **०ताजा**–वि. नवीन, ताजें प्रेम असणारा; नूतन प्रेमसंपादन केलेला; प्रेमाची नव्हाळी व भर असलेला. **०दप्त(फ्त)र**–न. स्मृतिपट; आठवणींचें हृदयरूपी संचयस्थान. **०दर्या**–वि. उदारधी; गंभीर (मन). ' दिल्पाक दिल्दर्या इलाही मेहेर्बान खान. ' –ब्रप ३०७. [फा.] **०दार**–वि. उदार; मनमिळाऊ; सहृदय; मोठ्या मनाचा. [फा.] **०दारी**–स्त्री. १ उदारता; धीटपणा; खंबीरपणा; सहृदयता; धीर. २ उत्तेजन; खातरजमा. ' संचणीचा वक्त आहे तक्वा–दिल्दारी पाठविणें. ' –रा १६.३३. 'मावळे लोक तमाम याची दिल्दारी करून.'–बाडशाछ १.११६. **०दिलासा**–पु. धैर्य; उत्तेजन; भरंवसा; उत्साह; आश्वासन. (क्रि० देणें). ' दिलदिलासा देतें मी सखया फारच सुख मानी. ' –पला ४.१२. **०देही**–स्त्री. उत्कटता. ' कित्येक सरदार कामकाजाविषयीं दिलदेही करीत नाहींत. ' –रा ५. १५७. [फा. दिल् दिही] **०न(नि)शीन**–वि. १ पसंत. २ अवगत; श्रुत. ' अजराह यगानगत दिल्निशीन जालें तें कलमी केलें असें. ' –पया ४६३. [फा. दिल्निशीन्] **०पाक**–वि. पवित्र; शुद्ध अंतःकरणाचा; कपटरहित; सरळ; निष्पाप. –ब्रप ३०७. **०पाकी–खी**–स्त्री. अंतःकरणाची शुद्धता; सरळता; निखालसता; निष्कपटता. ' आम्ही दिलपाखीनें मशाकत करून ...' –द्वमं ११. **०भ(ब–व)र**–पु. प्रियकर; दयित; वल्लभ. ' सुंदरा म्हणे दिलभरा राजआंबीरा हासून मसी बोला जी। ' –होला १६९.' आगे सखे लोभ करावा, दिलभर पलंगी असावा. ' –सला १४९. –क्रिवि. मनाची तृप्ति होईपर्यंत. **०भर(रं)वसा–भरोसा**–पु धीर; खातरी; उत्तेजन **०भरी**–स्त्री. समाधान; खात्री; उत्तेजन. 'तमाम रयतेची दिलभरी करून लावणी होय तें करणें. ' –रा १.३४६. **०सफाई–साफी**–स्त्री. मनाची निखालसता, निःशंकता. ' पुन्हां दिलसाफीचा फमांन उभयतांनीं बादशहापासून [illegible] केला. ' –प्रामस ३२. **०हवाल**–वि. अस्वस्थ; त्रस्त मन विवंचना असलेला **०हवाली**–स्त्री. मनाची अ चना; काळजी.

**दिलरुबा**—पु. (वाद्य) ताऊस या वाद्याचा मोर काढिला म्हणजे हें वाद्य बनतें. तारा, पडदे व त्यांची मिळवणी सर्व ताऊस वाद्याप्रमाणें. हें गजानें वाजवितात. हे वाद्य अलीकडील, सुमारें २५ वर्षांतील आहे.

**दिलवर**—न. १ (कों.) मासे पकडावयाचें जाळें; याचा घेर १००।१२५ फूट असतो. २ दिलावर पहा.

**दिलवाण**—स्त्री. (तंजा.) पणती. ' ठाणवीवर दिलवाण ठेवतात. ' [दिवे+लावणें]

**दिलावर**—वि. धीर; शूर; धाडसी. –पदमव ८५ **दिलावरी, दिलदिलावरी**–स्त्री. धैर्य; धाडस; आत्मविश्वास; खात्री; शांतवन; आश्वासन.

**दिलासा**—पु. आश्वासन. दिलदिलासा पहा. 'दिलासा करून बराबर घेऊन जाणें.' –सभासद १८. 'तुम्ही कुळांचा दिलासा करून कीर्दे अबादानी करून सुखरूप राहणें.' –वाडबाबा २.४२. २ हेतु; अर्थ: मनांतील इच्छा.

**दिली**—वि. जानी; जिवाभावाची (दोस्ती). 'दोन उम्दे मनुष्य दिली दोस्ती जाहीर करावयास रवाना करीत आहों।' –पअ ६५. [फा. दिल्]

**दिलेर**—वि. धाडसी; शूर; धीट. [फा. दिलीर] **दिलेरी**–स्त्री. शौर्य; धाडस; धैर्य. [फा. दिलीरी] **दिलेरीरुस्तुमी**–स्त्री. धैर्य; शौर्य: साहस; धीटपणा. 'शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी रुस्तुमीची.' –पयाव १८०.

**दिलोजान**—न अंत:करण; मन.

**दिल्ली**—स्त्री. एक शहर: हिंदुस्थानची राजधानी. ०**चा सोदा, दिल्लीकर–वाला**–पु पटाईत चोर; अस्सल भामटा. ०**गुरगाबी जोडा**–पु. साध्या प्रकारचा मारवाडी जोडा. ०**झिगवाली तऱ्हेचा जोडा**–पु वर जरीचें नक्षीकाम केलेला मारवाडी जोडा. ०**दरवाजा**–पु. १ उत्तरदिशेकडे असलेला दरवाजा किंवा वेस. २ शोभेच्या दारूच्या कमानदार झाडाचा एक प्रकार.

**दिवई**—स्त्री. आषाढी अमावास्येचा दीपोत्सव. [दिवा]

**दिवई**—स्त्री. (कों.) लहान नारळ येणारी माडाची एक जात. [सं. द्वीप=बेट; बाहेरून, बेटांतून आलेली जात ?]

**दिंवखुरे**—अक्रि. (गो.) गुडघ्यानें चालणें; रांगणें. [दिंबी=गुडघा]

**दिंवचे**—सक्रि. (गो.) देणें. [सं. दा]

**दिवज**—न. (गो.) मातीच्या दिव्यांची पंचारती. शूद्र लोक जत्रेच्या दिवशीं हींत तेलवात घालून, प्रज्वलित करून देवळासभोंवती प्रदक्षिणा घालतात. [दिवा]

**दिवटा**—पु. १ (कों.) मोठी मशाल; मोठा पेटविलेला काकडा; पोत. 'मग वाचेचा तो दिवटा।'–ज्ञा १८.३५८. 'मायबंधूनें दिवटा लाविला। तिही लोकीं उजेड केला।' –नव १८.४०. २ मशालची–जी. ३ (ल.) कुटुंबास काळीमा लावणारा माणूस. ४ भविष्य सांगणारा भिक्षेकरी; जोशी. [दिवा] **दिवटाळें**–न. दिवा ठेवण्याची घडवंची. **दिवटी**–स्त्री. १ लहान मशाल. २ नारळाची करवंटी एका काठीच्या टोंकास बसवून तींत तेलांत भिजविलेल्या चिंध्या पेटवून केलेला हिलाल. ३ गोंधळी लोकांची गोंधळाचे वेळीं लावावयाची लहान मशाल (खंडोबाच्या देवळांतील). [दिवा] **दिवटी जोहार–सलाम**–पु. संध्याकाळीं दिवेलावण्याच्या वेळीं राजे लोकांस सेवकांनीं करण्याचा रामराम, प्रणिपात. [दिवटी+जोहार, सलाम] ०**बुदली**–स्त्री. पेशवाईतील मशालीचा मान. 'दिवटी बुदलीची जहागीर।' –ऐपो ४३. **दिवट्या**–पु. १ मशालजी. २ (ल.) कुळबुडव्या मनुष्य.

**दिवट्या वाघ, दिवटें**—नपु. चित्ता.

**दिवठ(ठा)ण**—न. घरांतील दिवा ठेवण्याची जागा; लांकडाची समई. [सं. दीप+स्थान]

**दिवड**—नपु. आधेलें; मोठया पण निरुपद्रवी, पाण्यांत राहणाऱ्या सापाची एक जात; निर्विष जलचर सर्प. 'नागसर वाजविला दिवडापाशीं। जयापरी।' –सिसं ८.१८०. [सं. द्विपद ?]

**दिवताल–नाल–नाली, दिवलाणी**—स्त्री. (व.) पणती; दिवा ठेवण्याची लाकडी पाटी. [सं. दीप+तल]

**दिवली**—स्त्री. १ लांब दांडयाची लोखंडी पणती; दिवेलावणें; लहान दिवा; पणती. २ तेल अथवा तूप काढण्याचें दांडीचें भांडें. [दिवा]

**दिवशीं**—स्त्री. (गो.) तांदळाच्या कण्यांचें केलेलें एक पक्वान्न. [का. दोशे]

**दिवस**—पु. १ एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा काळ. २ सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काळ. ३ एका दिवसांत काम करण्याचा ठराविक काल. ४ रात्रीच्या उलट, प्रकाशमय काल; उजेडाचा काल ५ (ल.) सूर्य. ६ मृताची उत्तरक्रिया. ७ (ल.) नशीब; सद्दीचा काळ. 'त्याचे दिवस फिरले.' ८ (ल.) आयुष्य. 'त्याचे दिवस थोडे राहिले.' ९ (बायकी) गर्भारपण; गरोदरावस्था. 'मला कांहीं दिवस गेल्यामुळें तिला मस्तकीं पर्वत पडल्यासारखें झालें आहे.' –रत्न २.१. [सं.; फ्रें.जि. दिवेस] ०**करणें**–मृत माणसाचें क्रियाकर्म करणें. 'दिवसहि तेथेंच केले पाहिजेत.' –आगरकर. (वाप्र.) ०**काढणें–घालणें–ढकलणें–दवडणें–रगडणें–लोटणें–सारणें**–अडचणींत, कष्टांत दिवस कंठणें. ०**देऊन**–क्रिवि. दिवसाउजेडीं; संध्याकाळच्या आंत. **दिवस जातो पण बोल उरतो**–काल निघून जातो पण वाईट भाषणें कायम राहतात. ०**चढणें**–सूर्य वर येणें. ०**डोईवर येणें**–दुपारचे बारा वाजणें; भर दोन प्रहर होणें; माध्यान्ह होणें. 'दिवस कसा डोईवर आला होता.' –के १.७.३०. ०**झाडावर आला**–सूर्य थोडासा वर आला. ०**दारीं आला–दारीं बाहेर आला**–दिवस उगवला; सूर्य उगवला; सकाळ झाली. ०**फिरणें**–वाईट काल येणें; अवदशा येणें; आपत्ति येणें. 'सध्या आपले दिवस फिरले आहेत–रूपाजी म्हणाला.' –स्वप. ०**मागें पहातात**–काळ वाईट आला आहे, उलट फिरला आहे. **दिवसाउजेडीं–सकट–पूर्वी**–क्रिवि. दिवस मावळण्यापूर्वी; संध्याकाळ होण्याच्या पूर्वी. **दिवसानें डोकें काढलें**–नुकताच दिवस उगवला आहे; सूर्य वर आला आहे. **दिवसाबरोबर**–क्रिवि. सूर्योदया–किंवा सूर्यास्ताबरोबर; बरोबर सकाळीं किंवा सायंकाळीं.

**दिवसा मशाल लावणें-पाजळणें**-१ दिवसा दिवे लावणें; उधळपट्टी करणें; अनीतीचीं कृत्यें उघडपणें करणें ( दारूपिणें, जुवा, रंडीबाजी इ० ). २ एखादें महत्कृत्य करणें. **दिवसावर नजर देणें, दिवसासारखा होणें**-काळाप्रमाणें वागणें; वारा येईल तशी पाठ फिरविणें; काळवेळ पाहून वागणें. **अजून पहिला-प्रथम-पूर्व दिवस आहे**-अजून प्रारंभासारखीच स्थिति आहे, तींत फरक नाहीं. **दुसऱ्या दिवसावर नेणें**-थांबविणें; तहकूब करणें; काळांतरावर टाकणें. **नवा दिवस उगवणें**-जिवावरच्या दुखण्यांतून बरें होणें किंवा महा संकटांतून पार पडणें. **मागला प्रहर दिवस राहतां**-दुपारच्या तीन वाजतां; एक प्रहर दिवस शिल्लक असतांना. **वर्षायेवढा दिवस**-१ उत्तरायणांतील मोठे दिवस. २ कंटाळवाणा दिवस. **म्ह०** १ जेथें जावें तेथें डोईवर दिवस. २ चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे=प्रत्येकाचा चालता काळ केव्हां तरी येतो. ३ दिवस गेला रेटारेटी चांदण्यां रात्रीं कापूस वेठी=सर्व दिवस फुकट घालवून रात्रीं कामास लागणें. सामाशब्द- **०गत**-स्त्री. ठरलेल्या काळापेक्षां जास्त उशीर लावणें; विलंब; कालहरण. ( क्रि० लावणें; लागणें ). **०गति-गतीवर लोटणें-घालणें-टाकणें**-लांबणीवर टाकणें. ' कां दिवसगती करितां जा. ' -दावि ७.२८९. **०गुजारा-गुजराण**-पुस्त्री. दिवस कसाबसा घालविणें; गरीबीनें चरितार्थ चालविणें. ( क्रि० करणें ). **०पाणी**-न. ( व. ) थंडपाणी. **०बळ**-न. दिवसाचा उजेड, प्रकाश, काळ; उजेडाचा, प्रकाशाचा काल. याच्या उलट अंधार. **०भऱ्या**-वि. कसें तरी टंगळमंगळ करून दिवस भरणारा कामकरी ( मजूर ). [ भऱ्या=भरणारा ] **०मजुरी**-स्त्री. रोजमजुरी, फक्त एक दिवसाचा करार; याच्या उलट नियमित महिनेवारी किंवा सालवारी चाकरी. **०मावळी**-स्त्री. दिवस मावळल्या बरोबर जिचीं पानें मिटतात अशी वनस्पति. **०राती**-क्रिवि. ( काव्य ) रात्रंदिवस; सतत चोवीस घंटे. **दिवसां**-क्रिवि. दिवस असतांना; सूर्यप्रकाशांत; याच्या उलट रात्रीं; काळोखांत. [ दिवस ] **०उजेडीं**-क्रिवि. सूर्यप्रकाश असतांनाः भरदिवसां. **०ढवळ्या**-क्रिवि. धडधडीत दिवस असतांना; भरदिवसां. **०दरोडा**-पु. देखत देखत, राजरोस, धडधडीत जुलूम. ( राजसत्तेचा किंवा भीडमुर्वतीच्या माणसांचा ) **०दिवाळी**-स्त्री. उधळपट्टीची राहणी; बेसुमार खर्च करणें. **दिवसांध**-पु घुबड. ' कीं दिवसांधासि भेटला तरणी । ' -मोकर्ण २.१६. **दिवसान दिवस-दिवसें( सीं )दिवस**-क्रिवि. दिवसामागून दिवस जातात तसें वाढत उत्तरोत्तर अधिक होत; जसजसे दिवस जातात तसतसें; सतत; एकसारखें. **०भऱ्याचा**-वि. १ सगळ्या दिवसासाठीं; सगळ्या दिवसाच्या बेगमीचें. **०वडा**-पु. ( कु. ) एक दिवसाची मजूरी.

**दिवसळई, दिवसळी**—स्त्री. गंधकाडी; आगकाडी. [ दिवा+सळई; गु. दियासलाई ]

**दिवसें**—न. दिव्याच्या अमावास्येला केलेलें कणकीचें किंवा तांदुळाच्या पिठाचें दिव्याच्या आकाराचें एक पक्कान्न. ( कों. ) निवगरी; निवग्री; फळ. 'कीं विप्र पुरोडाश, क्षत्रकुळें त्या पुढें जशीं दिवसीं ।' -मोउद्योग १३.८१. [ दिवा ]

**दिवळ**—न. ( कों. ) दिवड पहा.

**दिवळा**—पु. १ ( गो. ) नांगरलेल्या जमीनींतील मातीचीं ढेकळें फोडण्याचें लांकडी औत.

**दिवळी**—स्त्री. १ ओलाणदिवा, ठाणवई इ० मध्यें ठेवावयाचें टवळें; लहान चाडें. २ तेल काढावयाची उभी पळी. ३ पणती. [ सं दीप ]

**दिवा**—पु. १ दीप; तेल व वात यांच्या साहाय्यानें प्रकाश देणारें साधन; अलीकडे वीज, धूर यांच्या साहाय्यानेंहि हें प्रकाशसाधन होतें. २ दिवली अर्थ २ पहा. टांगण्याचादिवा, लांबणदिवा, ओलाणदिवा. हे दिव्याचे आकारावरून प्रकार पडतात. ३ लग्नांतील कणकेचा केलेला दीप. ४ वैशाख महिन्यांतील अश्विनी आदि करून पांच नक्षत्रांनीं युक्त असे दिवस (दिवेपंचक). ५ दिवसें पहा. ६ (ल.) मूर्ख; अज्ञानी. [ सं. दीप, दीपक; प्रा. दीवओ, अप. दीवड; हिं. बं. दिया; पं. दीवा; सिं. डिओ] **०लागत नाहीं**-बेचिराख, उजाड होणें ( प्रांत, गांव ). **०लावणें**-वाईट कृत्यांनीं प्रसिद्धीस येणें; अपकीर्ति करणें. **०सरसा करणें**-वात पुढें सारणें किंवा तिचा कोळी झाडणें. ( वाप्र. ) **दिवे ओवाळणें**-(उप.) कुचकिमतीचा समजणें; क्षुद्र लेखणें; तिरस्कार दाखविणें. ' अहाहा ! दिवे ओवाळावे त्या प्रीतीवर. '-त्राटिका. **दिव्यानें दिवस काढणें-उजेडणें**-रात्रभर जागणें. **दिव्यानें रात्र, दिवस काढणें-लोटणें**-रात्र जागून काढणें; अतिशय आजारी असणें. **दिव्या-वातीनें शोधणें**-प्रत्येक कानाकोपरा बारकाईनें शोधणें. **दिव्यास निरोप-पदर-फूल-देणें**-दिवा मालविणें. **म्ह०** १ घरांत दिवा तर देवळांत दिवा=आधीं पोटोबा मग विठोबा या अर्थी. २ दिव्याखालीं अंधार=प्रत्येक चांगल्यागोष्टींत कांहीं तरी दोष असतो या अर्थी. सामाशब्द- **दिवारात्रीं**-क्रिवि. ( काव्य ) अहोरात्र. **दिवालावू-लाव्या**-वि. ( ल. ) कुप्रसिद्ध; ज्याच्याबद्दल फार बोभाटा झाला आहे असा. (साधित शब्द ) **दिवे, दिवेपंचक**-पु. दिवा अर्थ ४ पहा. [ दिवा ] **दिवेओवाळण्या-ळा**-वि. दिवे ओवाळण्यास योग्य; मूर्ख; दिवटा. **दिवेल**-न. १ दिव्यांतील तेल. २ ( गु. ) एरंडीचें तेल; एरंडेल. पूर्वी एरंडल दिव्यांना वापरीत. **दिवेलाग(व)ण-णी**-स्त्री. १ दिवे लागण्याची, संध्याकाळची वेळ. २ दिवे लावणें; उजेड करणें; प्रकाश पाडणें. ' महामोह सांजवेळेंचा वेळीं । प्रबोधाची दिवेंलावनी केली । ' -शिशु ६..

**दिवे लावणी**–स्त्री. (ल.) उजाड प्रांतांत, गांवांत वस्ती करणें; गांव वसविणें. **दिवे लावणीचा कौल**–उजाड प्रांतांत, गांवांत वस्ती करतांना कांहीं काळपर्यंत कर वसूल न करण्याबद्दलचें सरकारी आज्ञापत्र, हमी, कौल. **दिवेलावणें**–न (तांब्याचा) लहान दिवा. **दिवे सलामी**-स्त्री दिवटीजोहार पहा. संध्याकाळीं, दिवे लावणीच्या वेळीं बारगीर, मानकरी इ० लोक राजादिकास जो मुजरा करतात तो. **दिवेसळई–सळी**–स्त्री. गंधक लावलेली तागाची काडी; आगकाडी. दिवसळई पहा. **दिव्या उजेडी–उजेडीं**–क्रिवि. दिव्याच्या उजेडानें. **दिव्या उजेडीचा**-वि. दिव्याचा उजेड असल्यावेळचा. **दिव्याची आंवस–अमावास्या**–स्त्री. आषाढी अमावास्या. या दिवशीं दिव्यांची पूजा करतात. व दिव्याच्या आकाराचें पक्वान्न करून नैवेद्य दाखवितात व खातात.

**दिवा**—क्रिवि. दिवसां; उजेडीं. 'दिवा लग्न, दिवा मुहूर्त' [सं.] ०**कीर्ति**–पु. १ (ल.) न्हावी; नापित. २ खालच्या वर्गाचा माणूस; ज्याचें नांव रात्रीं घेऊं नये असा. **दिवांध**–पु. घुबड; दिवाभीत मनुष्य. 'न पाहंती जाले दिवांध।' –यथादी १.९०.

**दिवाण–न, दिवाणजी**—न. १ मुख्य प्रधान; कारभारी; कायदेमंडळांतील मंत्री. (इं.) मिनिस्टर २ मोंगली अंमलांत जमाबंदीखात्याचा प्रांतांतील मुख्य अधिकारी, कारकून. [अर. दैवान; फा. दीवान्] (वाप्र.) ०**चें तेल पदरांत घेणें**–कांहींहि नुकसान होवो आपल्या धन्याची देणगी स्वीकारणें. सामाशब्द– ०**असामी**–स्त्री. १ चरितार्थाकरितां असलेली सरकारी नेमणूक; सरकारी नोकरी, चाकरी. २ सरकारी कामगार. ०**इ–आम**–पु. प्रजेचे अर्ज ऐकण्याचा दिवाणखाना; सार्वजनिक दरबारची जागा. ०**इ–खास**–पु. बादशहाची खाजगी बैठकीची जागा; खाशांची बैठक. ०**खाना, दिवाण**–पु. १ राजसभागृह. २ अर्ज ऐकण्याची न्यायदानाची सदर कचेरी. मंत्र्याचें सभास्थान. 'तुका म्हणे धरुनि हात। नाही नेलें दिवाणांत।' –तुगा १४१५. ३ बैठकीची जागा; कचेरी. ४ सरकारी कर–मागणी. (क्रि० फेडणें; चुकविणें; देणें; फडशा करणें; फिटणें; चुकणें). ५ सरकार; मुख्य सत्ता. 'खोतीचें वतन दिवाणांत बहुत दिवस आहे.' 'निपुत्रिकांचें मिरास तें दिवाणाचें.' –रा८.४९. [फा. दिवानखान] ०**गिरी**–स्त्री. दिवाणाचें काम; प्रधानकी; वजिरात. ०**चावडी**–स्त्री. न्यायकचेरी; सरकारी काम करण्याची जागा; सरकारी कोरट कचेरी. (क्रि० करणें; पाहणें; भोगणें; नेणें; आणणें; घालणें; देणें). ०**दरबार**–पु. १ राजसभा; न्यायकचेरी. २ सरकारी न्यायसभेकडून चौकशी. 'या गोष्टीचा दिवाण दरबार झाला.' ३ (ल.) कुप्रसिद्धि; बोभाटा. ०**दस्त–देणें–धारा–सारा**–नपु. सरकारी कर; शेतसारा; सरकारदेणें. 'ग्रामस्थ म्हणती त्या अवसरा। देणें लागतो दिवाण धारा।' 'दिवाण दस्त भारी यामुळें रयत लावणी करीत नाहीं.' –थोमारो २.१. ०**दुयम**–पु. नायबदिवाण; मुख्य दिवाणाच्या हाताखालचा अधिकारी.

**दिवाणा–ना**—वि. १ वेडा; पिसाटलेला. २ मूर्ख; निरंकुश. 'दिवानें क्यों गफलतमें पडा। हरिमें नहि कुछ बडा।' [फा.] म्ह० (हिं.) देख दिवानें अपना सौदा. **दिवाणसा–साहेब**–स्त्री. (बायकी) नवऱ्याची बहीण; नणंद.

**दिवाणी**—वि. १ मुलकी (कचेरी, खटला, बाब) याचे उलट फौजदारी. २ खाजगी किंवा सार्वजनिक हक्कांसंबंधाचा (इं. सिव्हिल. [फा. दिवानी] ०**अदालत**–स्त्री. मुलकी कचेरी. ०**झांप**–पुअव. (कों.) लहान जातीच्या ताडाच्या फांद्या; सरकारी ऐन जिनसी कर म्हणून द्यावयाच्या लहान फांद्या. ०**विषय**–पु. मुलकी बाब.

**दिवातें**—न. (कों.) शेतांत काम करीत असतांना खावयाकरितां मजुरानें नेलेलें अन्न; न्याहारी: शिदोरी. [सं. दिवा+अद्= खाणें]

**दिवादांडी**—स्त्री. समुद्रांत धोक्याची सूचना दाखविणारा दिवा असलेलें उंच घर; दीपगृह; दीपस्तंभ; (इं.) लाईटहाऊस [दिवा+दांडी]

**दिवा दिवसं–सें**—न.(व.) खळें पुजणें; रासुंडा करणें. दिव्‌दिवूसें पहा.

**दिवाभीत**—पु. १. घुबड. २ (ल) चोर. ३ (ल.) लाजाळू. [सं. दिवा=दिवसा+भीत=भ्यालेला]

**दिवार–ल–ळ**—स्त्री १ भिंत. 'शहर पन्हाचे दिवालनजीक मुक्काम केला.' –दिमरा २.९८. २ (शिंपी धंदा) टोपीची उंची. [फा. दीवार्–ल्] ०**गिरी**–स्त्री. भिंतीला लावावयाचा दिवा; शामदान; त्याचा आंकडा. ०**तोडी**–वि. तट फोडणारी (तोफ).

**दिवाळखोर**—वि. उधळ्या; दिवाळें काढणारा. [दिवाळें+खोर] ०**नारायण**–पु. १ दिवाळखोर. २ अतिशय खर्चिक, सढळ हाताचा मनुष्य. म्ह० दिवाळखोरनारायण त्यावर बहुतांचें ऋण. ०**खोरी**–स्त्री. १ उधळपट्टी. २ दिवाळें वाजण्यासारखी स्थिति. **दिवाळा–ळ्या घोडा–घोडी**–पुस्त्री. १ ज्याच्या चंदीमुळें मालकाचें दिवाळें निघेल असा, फार खर्च लागणारा घोडा. २ (ल.) मोठा व सुंदर घोडा–डी.

**दिवाळी**—स्त्री. १ अश्विन वद्य त्रयोदशी (धन त्रयोदशी) पासून कार्तिक शुद्ध द्वितीये(भाऊबीजे)पर्यंतचा सण. या सणांत विष्णूनें नरकासुरास मारलें त्यासाठीं दीपोत्सव, लक्ष्मीच्या प्राप्तीसाठीं लक्ष्मीपूजन इ० करतात. २ मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा. या दिवशीं थोरली–देवांची, गुरांची–दिवाळी. या दिवशींहि दिव्यांची आरास करतात. ३ (ल.) चंगळ; ख्यालीखुशाली; चैन. ४ (ल.)

(मेजवानींतील) पक्वान्नांची चंगळ; रेलचेल. 'आज त्याचे घरीं लाडवांची दिवाळी झाली.' [सं. दीपावली; प्रा. दीवाली] म्ह० असेल त्या दिवशीं दिवाळी नसेल त्या दिवशीं शिमगा. **दिवाळसण**-पु. लग्न झाल्यानंतरच्या पहिल्या दिवाळीस जांवई व त्याच्या घरची मंडळी बोलावून त्यांना मुलीच्या बापानें मेजवान्या, पोशाख, देणगी इ० देणें. (क्रि० करणें; देणें). ०**चा दिवा**-दिवाळी. ०**चें साल**-न. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला सुरू होणारें वर्ष; व्यापारी वर्ष; याशिवाय दुसरीं मृगसाल व पाडव्याचें साल. ही होत. म्ह० दसऱ्यांतून पार पडेन तेव्हां दिवाळीचा दिवा पाहीन=सध्याच्या अडचणींतून पार पडूं द्या, मग पुढें पाहूं.

**दिवाळी**—स्त्री. कडू दोडकीचा वेल. हा भाद्रपद-आश्विनांत फुलतो. पानें औषधी असतात.

**दिवाळें-ळूं**—न. १ (जुन्याकाळीं दिवाळें काढावयाचें असतां, तें काढणारा आपल्या दुकानाच्या उंबऱ्यांत-दारांत एक शेणाचा दिवा लावून ठेवीत असे त्यावरून) नादारी; भांगोरें; सावकारांना देण्यासाठीं जवळ कांहीं नसतें, देणेदार कफल्लक बनतो ती अवस्था. (क्रि० निघणें; वाजणें; काढणें). २ (ल.) कंगालपणा; कांहीं नसणें; दारिद्य. ३ संपणें; सरणें (जिन्नस, खाद्यपदार्थ); केलेलें अन्न संपून यजमानाची जी फजीती होते ती. ४ (गो.) निंदा; टवाळी. (क्रि० मारप). [दिवाळी] ०**वाजणें**-नादार बनणें; कर्जबाजारी होणें; नापत गाजणें.

**दिवाळें**—न. दिवाळीचें, कडू दोडकीचें फूल, फळ; कडू दोडकें.

**दिवी**—स्त्री. १ ठाणवई; लामणदिवा; दिवली पहा. २ (सामा.) दिवा. 'दिहा दिवीं। मीं तिहीं लोकीं लावीं।' –शिशु ८९८. 'एवं माध्यान्हींची दिवी। तम धाडिना दिवो दावी।' –अमृ ६.९५ ३ मशाल. 'तयां तत्त्वज्ञां चोखटां। दिवी पोता साची सुभटा।' –ज्ञा १०.१४२. [दिवा]

**दिवें**—न. एक प्रकारच्या झाडाचें तिखट मूळ. हें डांग प्रांतांत खातात.

**दिवो**—पु. १ दिवा. २ दिवस. 'जिये गांवींचा पहारु दिवोवेरी।' –ज्ञा ८.१५५. [दिवा]

**दिव्दिव्सें**—न. (व.) खळ्यांतून दाणे घरी आणतांना खळ्यांत केला जाणारा समारंभ. यांत कणकीचे दिवे करून ते तेथें थोडा वेळ पाजळत ठेवून नंतर धान्यांत मिसळतात. [सं. दीप]

**दिव्य**—न. १ आपल्या सत्याची साक्ष पटवून देण्यासाठीं विशिष्ट देहदंडाची कृति करणें; शपथेचा एक प्रकार; निर्णयाची एक कसोटी. पूर्वी पंचायतीचा किंवा सरकारी न्यायकचेरीचा निकाल मान्य न झाला तर जें दिव्य करीत तें पुढीलप्रमाणें-कढईंतील गरम तेलांत अगर तुपांत सोन्याचा लहानसा तुकडा टाकून तो तापला म्हणजे हाताच्या बोटांनीं बाहेर काढणें. यावेळीं बोटास इजा न झाली तर काढणारा-दिव्य करणारा (वादी किंवा प्रतिवादी) खरा ठरे व इजा झाल्यास खोटा ठरे. याशिवाय दिव्याचे आणखीहि प्रकार असत ते-तुला, अग्नि, अप्, विष, कोश इ० होत. (क्रि० काढणें; घेणें; करणें). 'का दिव्याकरवी करविजे। दिव्य जैसें।' –ज्ञा १८.१३२९. २ (ल.) कडक परीक्षा; जलाल कसोटी; कठिण प्रसंग. [सं.] ०**उतरणें**-कसोटीस उतरणें; खरा ठरणें. ०**लागणें**-खोटा ठरणें. **दिव्यांतून-दिव्यास उतरणें**-दिव्यांतून, मोठ्या संकटांतून सुरक्षितपणें बाहेर पडणें.

**दिव्य**—वि. १ दैवी; स्वर्गीय. 'तो धांवला घटोत्कच दिव्य निधानस्थ यक्षसा राया।' –मोभीष्म ५४९. २ अतिशय सुंदर; सुरेख; लावण्यसंपन्न. ३ लोकोत्तर; अलौलिक. 'दिव्यौषध जैसें रोगिया।' –ज्ञा १७.३९३. [सं.] ०**उत्पात**-पु. दैवी चमत्कार-तारा तुटणें, वीज पडणें, प्रकाश दिसणें इ०. ०**कळा**-स्त्री. घशांतील गांठ. ०**चक्षु-दृष्टि**-नस्त्री. अज्ञान; दृष्टीआड असणाऱ्या वस्तू पाहण्याची दैवी दृष्टि; ज्ञानदृष्टि.-वि. १ अशी दृष्टि असणारा. 'तुवां सहजें दिव्यचक्षु केला।' –ज्ञा ११.२९१. २ सुंदर दृष्टि असणारा. ०**तेज**-न. सूर्य. 'उजळोनि दिव्य तेजा हातिवा।' –ज्ञा १६.२३. ०**देह**-पु. १ अलौकिक, तेजस्वी देह; स्वर्गांत राहणाऱ्याचें अमलीन, निर्जर शरीर. २ (ल.) सुदृढ व सुंदर शरीर. ०**देही**-वि. दिव्यदेह असणारा. ०**पक्ष**-वि. एकरंगी व ज्याच्या अंगावर कोठेंहि भोंवरा नाहीं असा (घोडा). हा सुलक्षणी समजतात. –अश्वप १.९१. ०**पादुका**-स्त्रीअव. देव किंवा ऋषि यांनीं आपल्या भक्तास दिलेल्या व ज्या घातल्या असतां इच्छित स्थळीं सहज जातां येतें अशा खडावा. ०**प्रकाश**-पु. १ दैवी, स्वर्गीय प्रकाश. २ आत्मज्ञान. ०**बाण**-पु. दैवी शक्तीचा बाण; आपलें काम करून परत भात्यांत येणारा असा बाण. हा रामाजवळ होता अशी कथा आहे. ०**रस**-पु. अमृत. ०**रूप**-न. १ सुंदर रूप; लावण्य; दिव्यदेह. २ आत्मा. ०**वर्ष**-न. देवांचें वर्ष; ब्रह्मदेवाचें वर्ष. 'अनेक दिव्य सहस्रवर्षीं। तप करिती महाऋषी।' –गुच २.२२५. ०**सुमनवृष्टि**-स्त्री. स्वर्गीय फुलांचा वर्षाव; स्वर्गांतून होणारी फुलांची वृष्टि. (देवांना आनंद झाल्यावेळीं अशी वृष्टि होते). ०**स्थान**-न. स्वर्ग; स्वर्लोक; देवस्थान; देवलोक. ०**ज्ञान**-न. १ अतींद्रिय ज्ञान. २ ईश्वरी ज्ञान. ३ आत्मज्ञान. ०**ज्ञानी**-स्त्री. दिव्य ज्ञान असणारा. **दिव्यान्न**-न. देवान्न पहा. **दिव्योपदेश**-पु. ब्रह्मज्ञानाचा उपदेश.

**दिशा**—स्त्री. १ दिग्विभाग; पूर्व, पश्चिम इ० आठ दिशा. आकाशाची पृथ्वीची बाजू. २ प्रांत; प्रदेश. ३ रीत; प्रकार; मार्ग (कामाचा इ०). 'या लिहिण्याची एक वार दिशा दाखवून द्या म्हणजे

हिशेब आकारून देईन. [सं.] (वाप्र.) ०कोंडणें-१ अवष्टंभ होणें. 'मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे।' -दा ३.६.३०. ०दाखवणें-संकेत, मार्ग दाखविणें; सूचना देणें; थोडें समजावून देणें. ०फाकणें-फुलणें-पालटणें-(आकाश) प्रकाशानें प्रफुल्लित होणें; उषःकाल होणें; उजाडणें. ०भारणें-बांधणें-मंत्रसामर्थ्यानें चोहोंकडचा प्रवेश, लोक यांची नजरबंदी करणें; कोणास आपलें कृत्य कळणार नाहीं असें करणें. दिशेस जाणें-(प्र.) बहिर्दिशेस जाणें; शौचास जाणें. 'आज दोन वेळ दिशेस जावें लागल्यामुळें दोन स्नानें घडलीं.' चारहि दिशा मोकळ्या होणें-सर्व जग मोकळें असणें (कोठेंहि भटकणें; भीक मागणें इ० करितां) किंचितहि आडकाठी नसणें. दश-दिशा पळणें-कोणीकडेहि पळणें; पांगापांग होणें; त्रेधा उडणें. सामाशब्द- ०चक्र-न. क्षितिज. 'अथवा दशदिशा समाकुळ। दिशाचक्र।' -ज्ञा ११.३१५. ०बंधन-दिशा भारणें पहा. ०भूल-भुली-स्त्री. १ दिशा, वाट चुकणें. २ (ल) गोंधळ उडणें; होणें; भुरळ पडणें. ०भूली-वि. दिशा चुकलेला; भ्रांतचित्त.

**दिर्शी**—शअ. फट्, खट्, चर् इ० अनुकरणवाचक शब्दांपुढें तो तो ध्वनि दाखविण्याकरितां हा प्रत्यय जोडतात. उदा० खाड-ताड-दिर्शी.

**दिशींच, दिशीं**—क्रिवि. (कों.) १ दिवसाउजेडीं; दिवस असतांना. २ (ल.) योग्य वेळीं; वेळेवर; उशीर न लावतां. 'यंदां पावसाचें अळमटळम् दिसतें. बेगमीविषयीं दिशींच जपावें.' [दिवस]

**दिष्ट, दिशवा**—स्त्रीपु. (गो.) नजर; दृष्ट पहा. [सं. दृष्टि]

**दिस**—पु. दिवस. 'ते त्या दिसा पासुनि नित्य देवी। अनन्यभावें कमलेस सेवी।' -सारुह २.१७. [सं. दिवस] ०कीर्ण्या-वि. रात्रीं चावला तर मनुष्य सूर्यकिरण बघणार नाहीं, ताबडतोब मरेल इतका विषारी, रंग काळा, हातभर लांब असा साप. खडेनाग. -बदलापूर ३४७. [दिवस+किरण] ०गत-स्त्री. दिवसगत पहा. दिसंदीस-क्रिवि. दिवसानुदिवस; दिवसेंदिवस. 'दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे।' -राम ११४. ०पट-क्रिवि. (गो.) सर्व दिवस. ०पट्टा-क्रिवि. रोज. ०मावळी-स्त्री. दिवस मध्यें पहा. ०वड-क्रिवि. १ सर्व दिवस; दिवसभर. २ दररोज; रोजीं. 'ऐसें विचारुनि दिसवडि येक येक बेडुक दे।' -पंच ४.२.

**दिसणें**—सक्रि. १ नजरेस येणें; दृष्टीस पडणें. २ अनुमानानें ज्ञान होणें; कळणें; समजणें. 'यंदाच्या पावसावरून पुढें सस्ताई होईल असें दिसतें.' ३ भासणें; वाटणें. ४ रागरंग दिसणें; आशा वाटण्यास लागणें; आव, डौल दाखविणें. ५ स्पष्ट, स्वच्छ, व्यक्त असणें; उघड असणें. ६ मनाला वाटणें. 'तो येतां-जातां-देता दिसत नाहीं.'=तो येईल-जाईल-देईल असें मला वाटत नाहीं. [सं दृश्; प्रा. दिस्स; हिं. दिसना; सिं. डिसणु] दिसून येणें-कळणें, उमगणें; सिद्ध होणें. दिसता-वि. १ दिसणारा. २ पाहणारा. 'दिसतेनविण दिसतें। अदृश्य जें।' -ज्ञा १५.७५. म्ह० (व.) दिसायला साधीभोळी काखेंत पुराणाची पोळी=वरून भोळी पण आंतून कपटी.

**दिसल**—पु. (गो.) शेत कापणाऱ्याची रोजंदारी. [दिस]

**दिसां**—क्रिवि. (काव्य) १ दिवसां २ दिवसांत. 'जाला तो केवळ दाहा दिसां।' -रामदासी २.८७. [सं. दिवस] ०घडी-क्रिवि. (कु.) सूर्यास्तापूर्वीं; दिवसाच्या वेळीं. ०ढवळ्या-दिवसाढवळया पहा. ०ढवळ्या दरवडा, दिसांदेहा-दरवडा-दिवसा दरोडा पहा. ०दिवाळी-स्त्री. दिवसां दिवाळी पहा. दिसा पट-टी-क्रिवि. दशदिशा; सैरा वैरां. 'महाभ्रांती जीवीं धरोनी। जाहाले दिसापट।' -खिपु १. २१.७९. -पु नाश; धुळधाण. ०वडा-(गो) दिवसावडा पहा.

**दिसेंदिस-सें**—क्रिवि. दिसंदीस पहा. 'दिसेंदिस गेलें आयुष्य। न मिळे पाहतां।' -दावि १७९. 'शशिबिंब दिसेंदिसें। हारपत अंवसे। नाहींचि होय।' -ज्ञा १२.१०८.

**दिसो(स्सो)ड**—क्रिवि. दिसवड पहा.

**दिह**—पु. दिवस. 'सत्यलोकीं दिहाचि दिन थोकला।'-ज्ञा १.१५८. [सं. दिवस; प्रा. दिअह, दीह] दिहेंदिहूं-क्रिवि. दिवसें-दिवस. 'कैसीं दिहें दिहूं उंसावली। वैदर्भी हें।' -शिशु ८३७.

**दिह**—पु. गांव; ग्राम. [फा. दिह्] दिहात-पु गांवांचा समुदाय; एका मालकाचीं अनेक गांवें असतां योजतात. [फा. दिह् याचें अरबी अनेकवचन] दिहाती जमा-स्त्री. गांव जमाबंदी.

**दी॥**—(संक्षेप) दीक्षित.

**दी**—पु. (अशिष्ट.) दिवस. 'एथौनी जादवांचे दी भले।' -शिशु ७०. [सं. दिन]

**दीकरा-री**—पुस्त्री. (खा.) मुलगा-गी. डिगरा, डिकरी. [गुज. दिकरो-री]

**दीख**—पु. (गो.) डिंक पहा

**दीठ**—स्त्री. (काव्य) १ दृष्टि; नजर; अवलोकनशक्ति. २ (व. ना.) दृष्ट; दिठी पहा. [सं. दृष्टि; प्रा. दिट्ठि]

**दीड**—वि. एकपूर्णांकएक द्वितीयांश; एक आणि अर्धा. [सं. द्व्यपार्ध; प्रा. दिवड्ढ; हिं. डेढ] ०कानाचा-वि. बहिरट; ०डोळ्याचा-वि. आंधळसर. ०पायाचा-वि. लंगडा. ०हाताचा-वि. थोटा. ०चतुर-शहाणा-वि. शहाणपणाचा अभिमान मिरविणारा; मूर्ख, बेअक्कली मनुष्य. ०दमडीचा-वि. क्षुद्र; हलका; कमी योग्यतेचा. ०दांडी-स्त्री. खोटा तराजू; दिड-दांडी पहा.

**दीढ, दीढवतुर-दमडीचा**—दीड मध्यें पहा.

**दीदार**—न. (मुंबई) तुफान.

**दीन**—पु. १ इस्लाम; मुसलमानी धर्म. 'हजरतांनीं दीनचा पक्ष सोडून मऱ्हाठियांचा पक्ष धरिला आहे हे गोष्ट मुसलमानीस ठीक नाहीं.'–दिमरा १.२६७. २ लढाईमधील मुसलमानांचा आवेशाचा शब्द; युद्धगर्जना. 'बोलो दीन–दीन!' [अर. दीन्] **०इमान**–पु. धर्म. 'हिंदूंचें राज्य झालें त्या दिवसापासून आमचा दीन–इमान सर्व बुडाला.' –दिमरा २.७९. **०दारी**–स्त्री. ईश्वरभक्ति. **०दुनिया**–स्त्री. १ सारें जग; समाज. 'तुम्ही शाबूत तर दीन–दुनियेचें भय नाहीं.' –ख १.१७०. २ धर्म आणि लोकव्यवहार. 'दीनदुनिया खातरेंत नाहीं.'

**दीन**—वि. १ नम्र; गरीब; लीन. २ अनुकंपनीय; दुर्बल; दुबळा केविलवाणा (स्वर, मुद्रा इ०), ३ गरीब; दरिद्री; गरजू. [सं.] **०दयाळ**–वि. दुःखी आणि गरीब यांवर दया करणारा (ईश्वर, राजा इ०). **०नाथ**–पु. अनाथांचा रक्षक; कैवारी. **०बंधु**–वि. दीनदयाळ. **०वत्सल–दीनानुकंपी, दीनाभिमानी**–वि. दीननाथ. **०वदन**–वि कींव येण्यासारखा; तोंड उतरलेला; केविलवाणा. **०वाणा–णी**–वि. दीनवदन; केविलवाणा; करुणा उत्पन्न करणारा. **०हत्यारा–री**–वि. गरीबांचा काळ. **दीनोद्धार**–पु. १ (काव्य) गरीबांचा त्राता; दीनानाथ. 'दीनोद्धारा जगद्गुरु।' २ गरिबांचा उद्धार; दीनावन. [दीन+उद्धार] **दीनोद्धारक, दीनोद्धर्ता**–वि. दीनांचा उद्धार करणारा.

**दीन्हणें**—सक्रि. (काव्य) देणें. दीह्नणें असेंहि रूप येतें. 'जरी पाए श्रीचरणां वेधले। हात दास्यासि दीह्नले।' –ऋ २६. 'तें वेळीं देवें आफाऊनु। भीमा दीन्हला सर्वमानु।' –शिशु ९२४. [सं. दत्त; प्रा. दिण्ण, दिण्णेल्लय]

**दीप**—पु. १ दिवा; प्रकाशसाधन. २ दिव्याचें आधान; लामण दिवा. ३ (ल.) प्रकाशक वस्तु, व्याख्यान, लेखन, विवरण; फोड (वर्णन इ०). उदा० ध्यानदीप, चित्रदीप इ० (पंचदशीमध्यें ध्यानदीप, चित्रदीप, नाटकदीप, कूटस्थदीप, तृप्तिदीप अशीं पांच प्रकरणांचीं पांच नावें आहेत). ४ (संगीत) एक राग. दीपक पहा. हा राग आळविल्यास दिवे लागतात अशी समजूत आहे. 'दीप भूपकल्याण तूं गातां प्रकाश साऱ्या स्थळीं पडती।' –प्रला २३७. **०क**–पु. १ दिवा. 'दीपपणें दीपकीं। तेज जैसें।' –ज्ञा १३.८९२. २ गाण्यांतील एक राग. या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ वर्ज्य व अवरोहांत निषाद वर्ज्य. जाति षाडव–षाडव. वादी षड्ज. संवादी पंचम, गानसमय सायंकाल. ३ काव्यांतील एक अलंकार. दृष्टांतांत उपमान, उपमेय आणि साधर्म्य यांत बिंब–प्रतिबिंबित भाव असतो. परंतु दीपकांत औपम्य गम्य असतें व धर्म एकच असून त्याचे संबंधी कांहीं प्रस्तुत व कांहीं अप्रस्तुत असतात. उदा० 'अचल करींच असावा व्यवहारीं शब्दसंगरीं सदसि।' ४ मदन. –वि. १ प्रवृद्ध करणारा; फुलविणारा; चेतविणारा. २ पाचक; वर्धक (औषध, अन्न). 'दीपक औषधें वस्तुतः शक्ति न वाढवितां केवळ पचनव्यापार तत्काळ चेतवितात.' सामाशब्द– **०कलिका**–स्त्री. दिव्याची ज्योत. 'पैं होऊनि दीपकलिका।' –ज्ञा १४.२५७. **०कल्याण**–पु. (संगीत) एक राग. दीपक अर्थ २ पहा **०किट्ट**–न. दिव्याची काजळी. [सं.] **०गृह**–न. दिवादांडी पहा. **०चंदी**–स्त्री. १ होरीसारिखी गाण्यांतील एक चीज. २ (ताल) एका तालाचें नांव. यांत चौदा मात्रा व चार विभाग असतात. **०दर्शन**–न. १ संध्याकाळीं दिवे लावतांक्षणीं दिव्यास करावयाचा नमस्कार. २ ती वेळ; दिवे लावणी. **०दान**–न. और्ध्वदेहिक संस्काराच्या वेळीं ११ व्या दिवशीं द्यावयाच्या दानांपैकीं एक दान; इतर धार्मिक व्रत–वैकल्याच्या प्रसंगीं ब्राह्मणास करावयाचें दिव्याचें दान. **०पूजा**–स्त्री. दिव्याची पूजा दिव्याची आंवस पहा. **०माला**–स्त्री. दिव्यांची रांग. **०माळ**–स्त्री. १ दिव्यांची ओळ. २ देवळापुढें उत्सवांत दिवे ठेवण्यासाठीं बांधलेला दगडी खांब. ३ (उप.) उंच व किडकिडीत (सुरेख नसणारी) स्त्री. ४ एक झाड; माथेशूळ. हें झाड सरळ पुरुषभर उंच वाढतें. पानें कात्रेदार. यास हाताचे अंतरावर मुळापासून एकावर एक, फुलांनीयुक्त असे झेंड्र लागतात. या झेंड्वर तांबूस रंगाचीं बारीक फुलें येतात. –वगु ४.२२. **०मूळक**–न. दिव्याची मूळ ज्योत. 'नातरी दीपमूळकीं। दीपशिखा अनेकीं।' –ज्ञा १४.५५. **०वड्ड**–पु. लहान दिवा. 'कीं दीपवड्ड अंधकार प्रकाशु करी।' –खिपु १.१.६९. **०व(वा)त**–स्त्री. (कों.) देवळांत दिवे लावणें; देवळांतील दिवे लावणी. **०वती**–स्त्री. दिवा. 'प्रतापाची दीपवती। उजळोनी।' –शिशु ७३९. **०वृक्ष**–पु. १ दिव्याची ठाणवाई; खांब. २ झुंबर; दिव्याचें झाड. **०शाखा**–स्त्री. दोन तीन फांटे असलेली मशाल, टेंभा. **०शिखा**–स्त्री. दिव्याची ज्योत. 'दीपशिखा अनेकीं।' –ज्ञा १४.५५. **दीपावलि**–स्त्री. १ दिवाळी. २ दिव्यांची रांग. दिवाळी पहा. **दीपाराधन**–न. आरती. 'दीपाराधनें निलांजनें। देव ओवाळिजे जनें।' –दा १६.५.२७. **दीपन**–न. १ पेटविणें; चेतविणें प्रज्वलित करणें (शब्दशः व ल.). 'जें अग्नीचें दीपन। जें चंद्राचें जीवन।' –ज्ञा १३ ९२६. २ भूक वाढविण्यासाठीं औषध; शक्तिवर्धक औषध. ३ ताप; आग. 'आंगीं न लावा गे चंदन। तेणें अधिकचि होतसे दीपन।' –एरुस्व ५.७२. **दीपिका**–स्त्री. १ दिव्याची ठाणवाई. २ लहान मशाल; समई; दिवटी. 'तरी दीपिका पाजळाव्या सत्वर।' –रावि २७.६५. ३ ज्योती. 'जे प्रपंचाची भूमिका।

विपरीतज्ञानदीपिका। सांचली ते।' -ज्ञा १५.८२. **दीपोत्सव**-पु. १ दिवाळी सण. दिवे लावण्याचा उत्सव. २ रोशनाई. ३ दिवाळें; नादारी. **दीप्त**-वि. १ पेटलेलें; चेतविलेलें; प्रज्वलित; उज्वल. २ चकाकणारें; प्रकाशणारें. ३ (ल.) सुरेख; नामी; उत्कृष्ट. **दीप्ति**-१ उजेड; प्रकाश; तेज; कांति. 'कनकासवें जैसी कांति। कीं सूर्या सवें जैसी दीप्ति।' -एरुस्व १.११. २ अग्नि. 'दीप्ति जठरीं किरीटी। मीचि जालों।' -ज्ञा १५.४०७. **दीप्तिमान्**-वि. कांतिमान; तेजस्वी.

**दीप**—न. पृथ्वीचा भाग; खंड; बेट; द्वीप. 'या दीपीचेआ भाषामधे तैसी। बोली मराठी।' -ख्रिपु १.१२५. [सं. द्वीप]

**दीपी**—पु. समुद्र. -मनको.

**दी-पेस्तर**—क्रिवि. उद्यां; पुढें. 'हें दीपेस्तर रोशन होईल.' -इंम ६८. [फा. दी=काल+पेस्तर]

**दीर**—पु. नवऱ्याचा भाऊ. [सं. देवर; प्रा. दिअर]

**दीर्घ**—वि. १ लांब (काळ, स्थान या संबंधांत). बराच काळ. टिकणारा; बरेंच विस्तृत लांबीचें स्थल व्यापणारा. २ लांब; बराच वेळ चालू असणारा; बराच काल लागणारा. (उच्चार, स्वर). ३ खोल; गंभीर; भारी (विचार). [सं] सामाशब्द- ०**काष्ठ**-न. लांकडाचा लांब तुकडा; तुळई. ०**कोषिका-कोषी-शी**-स्त्री. शिंप. ०**चतुरस्र**-न. समांतरभुजचौकोन; रुंदीपेक्षां लांबी अधिक असणारा चतुष्कोण. -वि. समांतरभुज चौकोनासारखा. ०**छंदी**-वि. अतिशय नादिष्ट. ०**जीवी**-वि. फार आयुष्य असणारा; चिरंजीव. ०**तम**-न. १ (काव्य) घोर, निबिड अंधार. २ (ल.) घोर, अतिशय अज्ञान. 'बोले त्यजूनि अतिदीर्घ तमातमातें.' ०**दंड**-वि. साष्टांग (नमस्कार). 'दीर्घदंड नमस्कार घालूनि।' -सप्र ३.७०. ०**दर्शी**-वि. १ दूरदृष्टीचा; मागचा पुढचा विचार करून वागणारा; मोठा धूर्त. २ भविष्यज्ञानी. ०**दृष्टि**-वि. १ धूर्त; शहाणा. २ दूरवर पाहणारा. दीर्घदर्शी पहा. ०**द्वेषी**-वि. हाडवैरी; फार काळ पर्यंत मनांत दंश ठेवून सूड उगविण्याची संधि पाहणारा. ०**निद्रा**-स्त्री. मृत्यु; काळझोंप. ०**प्रयत्न**-पु. आटोकाट, अविश्रांत, चिकाटीचे यत्न. ०**वर्तुल-वर्तुलाकार-वर्तुलाकृति**-वि. लंबवर्तुलाकार; जिला दोन केंद्रें असून त्या केंद्रांपासून परिघांतल्या कोणत्याहि बिंदूपर्यंत अंतराच्या बेरजा समान असतात अशी आकृति. अंडाकृति. ०**शंका**-स्त्री. मलविसर्जन; शौच; परसाकडे जाणें. याच्या उलट लघुशंका (लघवी). ०**संधानी**-वि. १ व्यापक विचाराचा; दूरवर लक्ष ठेवणारा. २ महत्त्वाकांक्षी; आकाशाला गवसणी घालूं पाहणारा. ३ सर्व ठिकाणीं संधानें बांधणारा. ०**सूत्र**-न. विस्तार; चरपटपंजरी; वेल्हाळ. (क्रि० लावणें). ०**सूत्र-त्री**-वि. चेंगट; विलंबी; उशीर लावणारा. 'सत्य वदति कैचें राज्य क्लीबास दीर्घसूत्रास।' -मोशांति ३.१८. ०**स्वर**-पु. १ आ, ई, ऊ ॠ, ॡ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर. हे उच्चारावयास दोन मात्रांचा काळ लागतो. २ लांब सूर; मोठा आवाज. **दीर्घायु-आयुष्य**-वि. चिरंजीव; चिरायु; पुष्कळ दिवस जगणारा. **दीर्घोच्चारण**-न. लांब उच्चार; रेंगत बोलणें.

**दील**—दिल पहा. 'एक वेळ तुमचा दील कच्चा जाहला म्हणोन तुम्ही शिपाई नव्हेत कीं काय?' -हब २५. [फा. दिल्]

**दीव**—न. १ द्वीप. २ दीव बंदर. [सं. द्वीप]

**दीस**—पु. दिस; दिवस. [सं. दिवस] **म्ह०** भरे पोटा आणि जारे दीसा.

**दीक्षा**—स्त्री. १ एखादें व्रत वगैरे घेतलें असतां त्याच्या प्रारंभापासून समाप्तीपर्यंत तत्संबंधीं केलेलें नियमाचरण. (क्रि० घेणें). २ आचरणाची रीत; नेम; क्रम. (क्रि० धरणें). 'अलीकडे यानें दीक्षा बरी धरली आहे.' ३ (ल.) मोठ्या कामांत पडणें, तें अंगावर घेणें. (क्रि० घेणें). ४ एखाद्या पंथाचा किंवा कलेचा स्वीकार करणें, अनुयायी बनणें. (क्रि० करणें; होणें). ५ व्रत. 'असेचि धरली नयच्युतदमार्थ दीक्षा करीं।' -केका १६. ६ उपदेश; शिक्षण. 'विडी ओढण्याची आपणांस कोणी दीक्षा दिली?' [सं.] ०**गुरू**-पु. दीक्षा देणारा, शिकवण देणारा, उपदेश देणारा पुरुष. 'बरवेयां देवां दीक्षा गुरु।' -शिशु १५२. **दीक्षित**-पु. १ सोमयाग करणारा; ज्यानें यज्ञ केला आहे असा पुरुष किंवा त्याचा वंशज. 'तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं। इंद्रियकर्माचिया आहुती।' -ज्ञा ४.१२७. २ (ल.) धर्मकृत्यांत गुंतलेला किंवा कला-कौशल्य, शास्त्र यांत प्रवीण असलेला. ३ (ल.) कुशल; अतिशय हुषार; मर्मज्ञ.

**दु**—दोन या शब्दाबद्दल समासांत पूर्वपदीं योजावयाचें रूप. जसें:-दुकलमी, दुकसबी, दुखंड, दुभाषी, दुतर्फा इ० ('दोन' या अर्थी समासांत पूर्वपदीं हा शब्द योजून अनेक सामासिक शब्द बनतात त्यांपैकीं बरेचसे पुढें दिले आहेत). [सं. द्वि; प्रा. दु, दो. हेम १.९४] **दुअमल**-पु. एकाच गांवावर असलेला दोन निरनिराळ्या सरकारांचा अंमल. असला प्रकार मराठे व मुसलमान यांच्या राजवटींत होई. **दुअमली गांव**-पु. (मराठे व मोंगल, मराठे व निजाम, मराठे व हैदर अशा) दोन सरकारांच्या अंमलाखालील गांव. **दुआब**-पु. दोन नद्यांच्या चिमट्यामधील संगमाच्या अलीकडचा प्रदेश. गंगा व यमुना यांच्या मधील दुआबास अंतर्वेदी असें म्हणतात. [सं. दु+अप्; फा. दो-आब्] **दुकटा**-वि. दुसरा; बरोबर कोणी सोबतीला आहे असा (हा शब्द एकटा या शब्दाप्रमाणेंच बनला असून एकटा या शब्दाबरोबर त्याचा उपयोग करितात). 'ही वाट एकट्या-दुकट्यानें जावयाजोगी नाहीं.' 'तूं एकटाच जा, दुकटा कोण देऊं?' **दुकटें**-न. (राजा.) गवताला

जें दोन फांट्यांचें केसर येतें तें. **दुकटें**–न. (चि.) जुनें लुगडें इ०कास अवश्य तितक्या लांबीच्या घड्या घालून व दोऱ्यानें शिवून तयार केलेलें पांघरूण; दुपटें; दुट्टा. **दुकड**–वि. (व.) अर्धवट; अर्धा. 'पोळी दुकड काची राहिली.' **दुकंडा**–पु. दोन गंड्यांचें, दोन कवड्यांचें चलन; दोन गंडे; टोली. 'दर चौकास दर बैलास कवडी दुकंडा प्रमाणें राजश्री यशवंतराव पवार याचे अमलांत घेऊन रखवाली करीत होतों.'–वाडबाबा १.२५. [दु+गंडा] **दुकडी**–वि. (धरण्याकरितां) दोन कड्या असलेलें (भांडें). [दु+कडी] **दुकल**–स्त्री. (गंजिफांचा खेळ) दुक्कल पहा. **दुकलमी**–वि. १ दोन रकान्यांत दोन पक्षांनीं, व्यक्तींनीं लिहिलेलें; दोन लेखण्यांनीं लिहिलेलें (पत्रक). २ दोन कलमांचें, परिच्छेदांचें (पत्र, ठराव इ०). **दुकसबी**–वि. दोन धंद्यांचें, कसबांचें, कामांचें ज्ञान, कौशल्य असलेला. २ (ल.) हुशार; कर्तबगार. **दुकॉ**–पु. (गो.) दुव्वा; दुक्का पहा. **दुकांटी**–वि. दोन कांट्यांचें (कुलूप, टाळें). **दुकांठी**–वि. दोन डोलकाठ्यांचें (जहाज, गलबत). **दुकांड**–स्त्री. (कों.) दोन हात लांबीचें बारीक (जाळण्याच्या उपयोगाचें) लांकूड. [दु+कांडें] **दुकानी**–वि. दोन काने असलेली; दारू पेटवण्याचीं दोन भोकें असलेली (बंदूक). [दु+काना] **दुकानी**–वि. उचलण्याकरितां दोन कान, कड्या असलेलें (भांडें इ०). [दु+कान] **दुकाम**–न. पुन्हां करावें लागलेलें काम; दुहेरी त्रास.(क्रि० करणें; पडणें; होणें). **दुकामी**–वि. दुकसबी पहा. **दुकित्ता**–वि. एकाच मजकुराचीं दोन (पत्रें, कागद इ०); अस्सल बरहुकूम नक्कल; दुहेरी. 'तुम्ही सांडणीस्वाराबरोबर व खिज्मतगाराबरोबर अशीं दुकित्ता पत्रें पाठविलीं.' –ख १०.५५०८. **दुकी**–स्त्री. (मुलांत रूढ) शाळेंत क्रमानें तिसरा येणाऱ्या मुलाच्या हातावर मारतात त्या दोन छड्या. **दुकुल**–न. युग्म; जोडी. 'नारी कुंजरांचीं दुकुलें। राजवल्लभें।'–ऋ ६९. [सं. दु+कुल] **दुक्कल**–स्त्री. १ (गंजिफांचा खेळ) राजा, वजीर व त्या खालील ओळीनें असतील तीं पानें समुच्चयानें; राजा व वजीर हीं पानें पडून गेल्यावर त्या खालील हुकूम जे ओळीनें असतील ते समुच्चयानें. दुकलींत शेवटचें जें पान असेल तो हुकूम असतो त्याशिवाय वरील सर्व पानें दुक्कल होत. २ द्वय; जोडी. ३ कागदाचा पतंग. ०**जळणें**–(गंजिफांचा खेळ) आपणांकडे खेळण्याची पाळी आल्यावर आपणाकडे असलेली दुक्कल खेळावयाची राहून जर आपण देणी देणें अथवा दुसरा खेळ खेळलों तर तीं दुक्कलींचीं पानें निरुपयोगी होतात. अशा वेळीं दुकलीच्या पानांतील शेवटचें पान हुकूम होतो व तोच उपयोगांत आणतां येतो. **दुक्का**–पु. दोन चिन्हें ज्यावर आहेत असें गंजिफांतील पान; दुव्वा; दुरी. **दुखंड**–वि. १ दोन भागांत विभागलेलें, छेदलेलें. –क्रिवि. दुभंग (दोन तुकडे होतील अशा तऱ्हेनें; कापणें अथवा तत्सदृश क्रियापदांबरोबर योजतात (क्रि० करणें; होणें). [दु+खंड=भाग, तुकडा] **दुखणी**–वि. दोन खणांची (इमारत, घर इ०). 'इतर नगरांची उभवणी। तिखणावरी पांचखणी। त्यांहीमाजी असती दुखणी। द्वारकापट्टणीं तें नाहीं।' –एरुस्व ३.१३. [दु+खण=गाळा] **दुखांदा**–पु. (राजा.) वृक्षाच्या खोडाला दोन मोठ्या खांद्या जेथें फुटलेल्या असतात तो भाग. [दु+सं. स्कंध] **दुखांबी**–वि. १ दोन खांबांच्या आधारावर उभारलेलें (घर, दालन इ०). २ दोन खांबांवर उभारलेला (तंबू, राहुटी). [दु+खांब] **दुखुरा**–वि. खुरावर खुराच्या आकाराचें अवाळू असलेला (घोडा). हा अशुभ मानितात. [दु+खुर] **दुगण-न**–स्त्री. (संगीत) ठाईचा निमपट काल; नेहमीं ध्रुपद गाण्यास जो काल लागावयाचा त्याच्या अर्ध्या कालांत तें गाणें किंवा वाजविणें. [दु+गुण=पट] **दुगणी**–स्त्री. (गो.) तांब्याचें एक जुनें नाणें; दुगाणी. **दुग(घ)स्त**–न. (गंजिफांचा खेळ). गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. जेव्हां खेळणारांपैकीं फक्त दोघांचे हात झाले असतील तेव्हां योजतात. तिघांच हात झाल्यास तिगस्त होते. **दुगांडी**–स्त्री. घोडी. –वि. घोडा. **दुगाणी**–स्त्री. तांब्याचें एक जुनें नाणें; अर्धा पैसा. 'न लाभतां तो न मिळे दुगाणी।'–अकक २. हरिराजकृत मुद्गलाचार्यविरचित रामार्याचें भाषांतर १०२. **दुगाणी**–स्त्री. जनावराच्या मागच्या तंगड्यांपैकीं प्रत्येक (अनेक वचनांत प्रयोग); दुलाची. ०**झाडणें**–(घोडा, गाढव इ० जनावरानें) लाथा झाडणें, मारणें. 'खाडिलकरांच्या गद्यावर अशा दुगाण्या झाडलेल्या पाहून मी खवळून गेलों.'–नाकु ३.४५. **दुगामा**–स्त्री. घोड्यास शिकवावयाची एक चाल. या चालींत घोड्यानें वाढती चवडचाल चालून मानेस खमदार ठेवून पायांस लोंच करून चेहरा दोन्ही बाजूंस डोलता राखावयाचा असतो. –अश्वप १.१९४. **दुगून**–स्त्री. (प्र.) दुगन-ण पहा. **दुघई**–वि. दोन दालनांची; दुसोपी (घर, इमारत इ०). [दु+म. घई=रुंदी, गर्भी] **दुघड**–स्त्री. (कों.) रहाटगाडग्याच्या माळेस दोन दोन लोटे बांधून मध्यें एका लोट्याची जागा वगळावी असा लोटे बांधण्याचा प्रकार अथवा तशी रचना. –वि. दोन दोन घडे, गाडगीं अशा रीतीनें बांधलेली, दोन दोन घडांची (रहाटगाडग्यावरील माळ). –क्रिवि. दोन दोन याप्रमाणें, प्रकारानें (बांधलेली). [दु+घडा=लहान घागर, गाडगें] **दुघड**–पु. (राजा.) आंबे, फणस इ० कांचा दोन फळांचा घड. [दु+म. घड=गुच्छ, घोंस] **दुघड**–वि. दोन; जोडीच्या. 'शेक सगड्या करूं लागल्या चंचळ नारी दुघडा।' –पला ७८. **दुघड, दुघड ओनाम्या**–वि. १ दोनदोनदां ज्यास पाठ द्यावा लागतो असा. २ (ल.) मंद; मठ्ठ बुद्धीचा; ठोंब्या; दगडोबा; अक्षरशत्रु. ३ अडाणी; अनाडी; अडमुठ्या (काम करणारा, मजूर इ०). [दु+घडी] **दुघडी**–स्त्री. १ दुहेरी, दुमडून केल्यामुळें

होणारी घडी. २ दुहेरी घडी केलेलें वस्त्र, कागद. -वि. दुहेरी घडीचें (वस्त्र, कागद इ०). [दु+घडी] **दुघस्त**-न. दुगस्त पहा. **दुचश्मी-चश्मो-चस्मा**-वि. १ दोन्ही डोळे समोर दिसतील अशा रीतीनें काढलेलें (मनुष्य इ० काचें चित्र). २ दोन खणांचें (घर, इमारत इ०). [दु+चश्मा] **दुचाळा**-पु. १ कातर चिमटा इ० दोन टोकांच्या हत्यारांपैकीं प्रत्येक. २ (ल.) पेंच; अडचण; कचाटी; किंकर्तव्यमूढ स्थिति; द्वैतभावना. 'एके घाई खेळतां न पडसी डाई। दुचाळयानें ठकसील भाई रे।' -तुगा २४३. [दु+चाळा] **दुजाइन**-वि. (कों.) दोनदां व्यालेली (गाय, म्हैस इ०). [दु+जनन] **दुजांतरा, दुजांत्रा, दुजारा**-वि. दोन दिवसांनीं येणारा (ताप). **दुजोडी**-स्त्री. दोहोंकडील दोन्ही तुळयांचीं टोकें एका खांबावर येतील असे मधोमध खांब देऊन दोन सोप्यांची केलेली एक सोप्याची रचना. [दु+जोड=जुळणी] **दुजोर-रा**-पु. (बुद्धिबळांचा खेळ) एका पगावर एकाच वेळीं असलेला दोन पगांचा जोर. [दु+जोर] **दुजोरा**-पु. (एखाद्यानें केलेल्या भाषण इ० रूप क्रियेस दुसऱ्यानें तत्सदृश क्रियेनें दिलेलें) अनुमोदन; टेकू; पाठबळ; पुष्टि. 'ठरावास दुजोरा देणारा कोणी न मिळाल्यामुळें मांडणारास तो परत घ्यावा लागला.' [दु+जोर] **दुटपी-टप्पी, दुटप्या**-वि. १ दोहोंकडे ज्याचा कल आहे असें; संदिग्ध (भाषण, वर्तन.). 'दुटप्पी बोलत असलें म्हणजे जो पक्ष खरा होईल तिकडे मिळावयास सांपडतें?' २ दोहों बाजूस ज्याचा झोंक आहे असें संदिग्ध भाषण, वर्तन करणारा. [दु+टप्पा=पायरी, धीरण] (वा प्र.) **दुटपी-टप्पी सांगणें**-थोडक्यांत, दोन टप्प्यांत सांगणें. ०**टपी-टप्पी**-वि. खालचें व वरचें टप, चांदण्या असलेला (तंबू इ०). [दु+टप=तंबूवरील आच्छादन, चांदणी] **दुटांकी**-वि. दोन टांकानीं-लेखण्यांनीं, व्यक्तींनीं लिहिलेलें. **दुटांकी**-वि. दोनच टांके देऊन लाविलेला (द्रोण इ०) [दु+टांका] **दुटाळा**-स्त्री. एक प्रकारचें वाद्य. 'गिडिविडिया दौडका दुटाळा। घंटा जेगटें मृदंग।' -कृमुरा ४०.११. 'टाळा दुटाळा पणवे बुरंग।' -माधवकृत रामायण, बालकांड ६१. **दुटी-दुट्टी**-वि. दुहेरी; दुंडा; दुमडलेला. **दुट्टा**-पु. १ दुबंदी कागद; दुंडा. २ (विणकाम) हातमागावर विणलेलें दुहेरी सूत. **दुटा**-पु. (खा.) कापूस भरून केलेलें पांघरण्याचें वस्त्र; दुलई; दुपटा. **दुडाळ**-न. दोन डाळिंब्या ज्यामध्यें असतात असें तूर, हरभरा इ० सारखें धान्य; द्विदल धान्य. [दु+डाळ] **दुतर्फा-र्फी**-वि १ दोन सरकारांच्या अंमलाखालचा (प्रदेश, प्रांत). २ दोहाती; दुहेरी अमलाचें (राज्यतंत्र, सरकार). ३ दोन्ही पक्षांस, बाजूस सारखें लागू पडणारें (भाषण इ०). 'हा दुतर्फा बोलणें बोलतो.' 'दुतर्फा कज्जा-मोकदमा-साक्षीपुरावा.' (दुतर्फा हें विशेषण अविकारी आहे). [दु+अर. तर्फ्=बाजू] **दुतर्फा**-क्रिवि. दोन्ही बाजूंस; दोहों बाजूस, कडांस धरून, व्यापून. 'नदी दुतर्फा भरून चालली आहे.' [दु+तर्फ=बाजू; फा दोतरफ्] **दुतार-तारी, दुतू**-वि. रेशीम इ० कांचे दोन तंतू एकत्र वळून त्यानें विणलेलें (वस्त्र इ०). [दु+तार=तंतु, धागा] **दुतुकडा**-वि. दोन तुकड्यांचा असलेला, केलेला, बनलेला. **दुतोंडी-ड्या**-वि. १ दोन तोंडें असलेला (सरपटणारा प्राणिविशेष.) २ (ल). एकदां एक व दुसऱ्यांदा निराळेंच बोलणारा, वर्तन करणारा. 'तुका म्हणे जन दुतोंडी सावज। सांपडे तिकडे सहज धरी।' ३ दोन्ही टोंकास, बाजूंस घडून, तासून चौकोनी केलेला (दगड इ०). [दु+तोंड] **दुतोंडें**-न. १ दोन्हीकडे दोन तोंडें असलेला सर्पातील विशिष्ट प्रकार. २ दोन तोंडांचा, डोक्यांचा सरपटणारा प्राणिविशेष. [दु+तोंड; सं. डुण्डुभ] **दुतोंडेपणा**-पु. दोन्ही पक्षांकडून बोलण्याची संवय, स्वभाव. 'बायकांना एक तोंड दिलें असतां त्या दुतोंडेपणा कां आचरतात.' -नपुक ९. [दुतोंडी] **दुतोंड्या**-वि. दुतोंडी अर्थ २ पहा. **दुथडी**-स्त्री. दोन थडया, किनारे असलेली; नदी. 'तैसी अहंममतेचिये लवडसवडी। मातें न पवतीचि बापुडीं। म्हणोनि जन्ममरणाची दुथडीं। डहुळितें ठेलीं।' -ज्ञा ९.६२. -क्रिवि. (नदी इ० कांच्या) दोन्ही तीरांस व्यापून; दोन्ही थडयांवर; कांठोकांठ; तुडुंब (भरलेली) 'नदी वाहतां दुथडी। झाल्या प्रेतांच्या दरडी। वोडणें कमठें पुष्ठी गाढी। गज करवडी महाग्राह।' -एरुस्व १०.८०. 'या नदीच्या दुथडी ऊंस लाविला आहे.' [दु+थडी] **दुदांडी**-वि. १ दोन दांडयांचें चिन्ह ज्यावर आहे असा (पैसा). २ दोन दांडे, मुठी असलेलें. [दु+दांडी] ०**दांव**-पुन. (गो.) दोन फणस लागलेला देंठ. [दु+दांव=देंठ] **दुदिल-ला, दुदील, दोदील**-वि. १ दुलग; दोहींकडे संधान बांधणारा; दुटप्पी. 'व येथें जे दुदिले आहेत तिकडील दंगियामुळें उठोन येतील, त्यांची गूज मोडेल.' -रा १.३३९. २ साशंक; चंचल. 'लटक्या कल्पना मनांत घालून दोदील करावे ऐसें करणार करितात.' -रा १९.८५. [फा. दूदिला, दूदिल्; दु=दोन+फा. दिल्=मन] **दुधट**-वि. दुटप्पी. -राको ६०. **दुधड**-वि. अस्पष्ट; संदिग्ध; दुटप्पी. २ (ल.) वाईट; खराब; खंवचट; कुत्सित (मनुष्य, भाषण, वर्तन इ०). **दुधड, दुःधड**-क्रिवि. धडापासून मस्तक वेगळें होईल अशा रीतीनें (मनुष्य, जनावर इ० छाटणें, कापणें).(सामा.) दुभंग; दोन तुकडे, भाग होतील अशा तऱ्हेनें (तोडणें, विभागणें). 'मोहासी मर्मेंचि तोडिलें। दुःखासि दुःधडचि केलें। शोकास खंडून सांडिलें। येकीकडे।' -दा ५.९.४५. [दु+धड=मस्तकहीन शरीराचा भाग] **दुधार-धारी**-वि. १ दोन धारा असलेला (चाकू, तरवार इ० हत्यार). २ दोन कडीं एकत्र करून, जोडून केलेली (बांगडी इ०). 'उदार मजवर दुधार आणवा पन्हेदार लेऊन चुडे।' -पला ४.३६. [दु+धार=कड, शस्त्राची तीक्ष्ण कड] **दुधारा रोखण**-स्त्री.

(सुतारीधंदा. (कु) लांकडाच्या दोन्ही बाजू गुण्यांत असून त्यास कडेस विशिष्ट अंतरावर रेघ आखण्याचें सुताराचें हत्यार. **दुधावी**- वि. (यंत्रशास्त्र) ज्या तैलयंत्रांतील (ऑईल एंजिनमधील) चारी क्रिया दोन धावांत होतात असें (ऑईलएंजिन्): (इं) टू स्ट्रोक् सायकल् (एंजिन). -ज्ञाको (ए) १३. [दु+धांव=पळणें] **दुपट**- स्त्री. द्विगुणित परिमाण. 'सावकारींत पैशाची दुपट जाली.' -वि. द्विगुणितः मूळच्या परिमाणाइतकें, संख्येइतकें वाढलेलें (परिमाण, संख्या). [दु+पट] **दुपटकरी, दुपट्टेकरी**-पु. (कों.) खोताला ठरीव एनजिन्नसी साऱ्याच्या दुप्पट देणारें कूळ. **दुपटा-ट्टा-ट्टें**- पुन. खांद्यावरून टाकावयाचें, घ्यावयाचें दोन पाटांचें वस्त्र; उपवस्त्र; दुपेटा; शेला. **दुपटी**-वि. द्विगुणित; दुप्पट. **दुपटें**-न. दोन, तीन अंगवस्त्रें एका ठिकाणीं शिवून पांघरण्याकरितां करितात तें वस्त्र. **दुपत्ती**-स्त्री. (गंजिफांचा खेळ) सर्व खेळ संपल्यावर अखेर उतरणाराजवळ राहिलेलीं एकाच रंगाचीं दोन पानें. [दु+पत्ता=पान] **दुपदरी** वि. १ दोन्ही शेवटांस जरीचे, रेशमाचे पदर असलेलें (पागोटें, लुगडें). २ दुहेरी केलेलें (वस्त्र). ३ दोन तार, तंतू एकत्र करून वळलेली, दुहेरी करून वळलेली (दोरी, दोरा इ०). [दु+पदर] **दुपरतणी**-स्त्री. (राजा.) तात्पुरता बरा झालेल्या आजारानें, रोगानें घेतलेली उलट, माघार. 'रोग दुपरतणीस पडला.' [दु+परतणी=परत येणें, माघार, उलट] **दुपरतणें**-अक्रि. (राजा.) बरा झालेला आजार इ० कुपथ्यादिकांमुळें पुन्हां परतणें, पूर्ववत् होणें. **दुपाखी**-वि. दोन पाखीं असलेलें (घर, सोपा इ०). **दुपा(पे)टा**-पु. (विरू.) दुपटा. दुपटा-पट्टा पहा. **दुपाठी**-वि. दोनदां वाचून किंवा ऐकून श्लोक, ग्रंथ इ० ज्यास पाठ म्हणतां येतो असा. [दु+पाठ=पठन] **दुपाडगी**-वि. (चंद्रपुरी) दुपाखी. **दुपांडीं**-क्रिवि. दोन पायांनीं. -शर. **दुपानी**-स्त्री. १ (गंजिफांचा खेळ) खेळाच्या शेवटीं जीं दोन चोर (हुकूम नसलेलीं) पानें राहतात तीं; दुपत्ती. २ -वि दोनच पानें फुटलीं आहेत अशा अवस्थेंतील (अंकुर, पेरलेलें बीं). [दु+पान] **दुपानी लता**-स्त्री. (कों.) एक वेली; मर्यादा वेल; हिचीं पानें बकरीच्या खुराच्या आकाराचीं असतात. **दुपायी**-वि. दोन पायांचा. [दु+पाय] **दुपायीं येणें**--अक्रि. १ (घोडा) मागील दोन पायांवर उभा राहणें. २ संतापून जाऊन भांडावयास प्रवृत्त होणें. **दुपार**-स्त्री. दिवसाच्या मध्यभागाचा, मध्यान्हाचा काल; दोनप्रहरची वेळ. [दु+प्रहर] **०उरकणें -काढणें -गुजरणें- घालविणें -टाळणें -ढकलणें- रगडणें-लोटणें**-दुपारचें जेवण उरकणें, पदरांत पाडणें. **०ची सोय करणें-काळजी वाहणें**-रोजच्या जेवणाची व्यवस्था करणें, काळजी वाहणें. **०ची मात्रा**-स्त्री. (ल.) दुपारचें जेवण. (क्रि० घेणें; आत्म्याला देणें). **०चीं सावली**-स्त्री. क्षणभंगुर, थोडया काळांत नाश पावणाऱ्या गोष्टीबद्दल योजावयाचा वाक्प्रचार. उदा० श्रीमंती, संपत्ति, तारुण्य इ०. पाण्यावरचा बुडबुडा पहा. **दुपारां-रीं**-क्रिवि दुपारच्या, मध्यान्हाच्या वेळीं. **भरल्या दुपारीं**-क्रिवि. ऐन दुपारच्या उन्हाच्या वेळीं; भर दुपारीं; दुपारच्या ऐन भरांत (अशा वेळीं मुलांनीं रडूं नये, बाहेर जाऊं नये म्हणून निषेधार्थीं वाक्यांत हा वाक्प्रचार योजतात). **दुपारीं तिपारीं**- क्रिवि. दुपारच्या उन्हांत; ऐन दुपारीं; बाहेर पडावयास अयोग्य अशा मध्यान्हसमयीं किंवा त्याच्या अलीकडेपलीकडे. 'लहान मुलास दुपारींतिपारीं बाहेर नेऊं नये' **दुपारी**-स्त्री. एक फुलझाड. याचीं फुलें दुपारीं उमलतात म्हणून हें नांव. दुपारीच्या पांढरी, तांबडी, पिवळी अशा तीन जाती आहेत **दुपारें**-न. हिचें फूल. वास नसतो. -वगु ४.२५. **दुपाहर**-स्त्री. (काव्य) दुपारः दोनप्रहरची वेळ. 'निपजलें अन्न तैसें। दुपाहरीं कां येरें दिवसें।' -ज्ञा १७. १५५. [दु+प्रहर] **दुपिकी**-वि. वर्षांतून दोन पिकें देणारी (जमीन). [दु+पीक] **दुपुडी**-वि. १ दोन पुडें, खातीं, खाने असलेला (डबा, करंडा, पानपूड इ०). २ दोन्हीं तोंडें चामडयानें मढविलेलें (चर्मवाद्य). ३ दोन पुडांची, घडीची (पोळी). [दु+पूड=खाना, पाखें] **दुपूत**-पु. (गो.) संतति; मुलेंबाळें. [दु+पूत] **दुपेट**-वि. (गो.) दुप्पट. **दुपेटा**-पु. दरबार, सभा इ० ठिकाणीं जातेवेळीं अंगावर घ्यावयाचें भारी वस्त्र; दुपटा; शेला. **दुपेटा**-पु. दुपटकरी पहा. **दुपेडी**- वि. दोन पेडांनी वळलेली (दोरी, दोरा). **दुपोडी पोळी**-स्त्री. दोन पुडांची, घडीची पोळी. **दुप्पट**-स्त्री. एखाद्या रकमेची मूळच्या इतकीच झालेली वाढ; द्विगुणित वृद्धि. -वि. द्विगुणित **दुफसली**-वि. वर्षांतून दोन पिकें देणारी; दुपिकी. (जमीन). [दु+फसूल्=पीक] **दुफळी**--स्त्री. एकजूट फुटून, फुटाफूट होऊन दोन पक्ष, तट होणें, पडणें. [दु+फळी=पक्ष, तट] -वि. दोन फळयांचा केलेला. **दुफांटा**-पु. (वृक्ष, नदी, रस्ता इ० कांस) ज्या ठिकाणीं दोन फाटे फुटतात तो (वृक्ष, नदी, रस्ता इ० कांचा) भाग, प्रदेश; बेचक. **दुफांटी काठी**-स्त्री. डेळकी; डेळी; बेळकी. **दुफाड**-स्त्री. (कों.) एखाद्या पदार्थाचे दोन विभाग, तुकडे होतील अशा रीतीनें लांकूड, भोपळा इ० मोठे पदार्थ चिरणें, फोडणें, फाडणें इ० क्रिया. वि.-चिरून, फाडून, फोडून ज्याचे दोन तुकडे झाले आहेत असा. [दु+फाडणें] **दुफांशी**- वि. १ दोन फाशांनीं खेळावयाचा (सोंगटयांचा विशिष्ट खेळ). २ ज्याला दोन फांसे आहेत असा (दागिना). [दु+फांसा] **दुफोड**-स्त्री. (एखाद्या पदार्थाचे) चिरून, फोडून दोन तुकडे करण्याची क्रिया; दुफाड -वि. चिरून, फोडून दोन तुकडे केलेला. 'जरासंदतरूचीं गर्वफळें। झाडिली पैती यदुपाळें। दुफोडीं करविलीं करतळें। भीमसेना करवी।' -शिगु ८५३. [दु+फोडणें] **दुबक**-स्त्री. जनावर चरावयास सोडतांना त्याचे दोन पाय बांधणें; कळता. (क्रि० घालणें). **दुबक**-स्त्री. (इटीदांडूचा खेळ)

विटीवर दुसऱ्यांदा टोला मारण्याचा प्रकार **दुबकणें**–उक्रि. १ (जनावर चरावयास सोडतांना त्याला) दुबक घालणें, कळवा देणें. २ बुकलणें; खुबलणें; बडविणें. [ दुबक ] **दुबकी**–स्त्री. दुपकी पहा. **दुबंदी**–स्त्री. १ घोडयाच्या पुढच्या दोन पायांस करितात ती नालबंदी. २ प्रत्येक घडींत दोन वरख अशा दुमडून दोन घडया घातलेला देशी सबंध अथवा अर्धा कागद. [ दु+बंद ] **दुबंधा–धी**–वि. दोन रंगांचे कांठ असलेलें; गंगाजमनी (लुगडें इ०) 'दुबंधा क्षीरोदकीं। वाणे परी अनेकीं । दिसती तरी तितुकीं। सुतें आथी।'–अमृ ७.१४७. **दुबाजू**–क्रिवि. दोन्ही बाजूंस,बाजूंकडून. 'स्वारी निघाली म्हणजे दुबाजू सलाम होतात.' [दु+बाजू= दिशा.] **दुबार–बारां**–क्रिवि. दोनदां; दोन वेळां. [ फा. दूबार्; सं. द्विवारम् ] **दुबारी**–वि. १ ज्यास वर्षातून दोन वेळां फळें, फुलें इ० कांचा बहार येतो असा (वृक्ष इ०). २ दोन बार, आवाज व्हावयाजोगी दारू ज्यांत भरली आहे असा (फटाका, बंदूक इ०). ३ दोन पट्टीं एकत्र जोडून केलेला दुपेटा (भारी किंमतीच्या दुपेटयालाच हें विशेषण लावितात. –शास्त्रीको). [ दु+बार ] **दुबाशी**–वि. दुभाषी पहा. –खिपु. **दुबाही**–क्रिवि. दोन्ही बाजूंनीं. 'दांतही आन होती। परि अपाडें सानेजती। जैसी दुबाही बैसे पांती। हिरेयांची।'–ज्ञा ६.२६३. [दु+बाही=बाजू] **दुबाळकें**–न. दुबेळकें पहा **दुबे**–वि. १ ब्राह्मणांतील एक आडनांव. २ दोन वेदांत पारंगत असलेला; द्विवेदी [सं. द्विवेदी] **दुबेरजी**–वि. १ कांहीं विशिष्ट कारणामुळें केव्हां केव्हां रकमांचे दुबार जमाखर्च करावे लागतात व पक्क्या हिशेबांत त्या जमाखर्चाचा दुबारपणा घालवून एकबेरजीच्या रीतीनेंच तो पक्का हिशेब आकारितात असा जमाखर्च लिहिण्याचा विवक्षित प्रकार, तद्विशिष्ट कागद इ०; जमाखर्च, हिशेब, लिहिणें, कीर्द, कारकून इ० शब्दापूर्वी उपयोग. जसें:– दुबेरजी–जमाखर्च–हिशेब इ० २ दुसऱ्याच्या तर्फे, दुसऱ्याकरितां रक्कम घेऊन ती जमेला नोंदून त्याला पाठवितात आणि त्याच्याकडून ती रक्कम पावल्याचें व जमाखर्चांत जमेकडे नोंदल्याचें कळल्यावर खर्चाकडे लिहितात त्या प्रकारानें लिहिलेली (रक्कम इ०). [दु+बेरीज] **दुबेळकें**–न. झाडाच्या दोन खांद्या जेथें फुटतात तेथील (झाडाचा) मधला चिमटयासारखा भाग; शेवटाला दोन फांटे असलेली काठी. **दुबैली**–वि. जीस दोन बैल लागतात अशी (गाडी, काम इ०) [ दु+बैल ] **दुबोटी गंध**–न. (कपाळास) दोन बोटांनीं लावलेलें गंध. [ दु+बोट+गंध ] **दुबोल्या**–वि. १ चंचल वृत्तीचा; अस्थिर बुद्धीचा; ज्याचें मन हेलकावे खातें, गुटमळतें असा; धरसोड करणारा. २ प्रसंग पाहून वागणारा; रागरंग पाहून वर्तन करणारा. [ दु+बोलणें ] **दुभरंवसा, दुभरोसा**–पु. (एखाद्या गोष्टीविषयींचे) होय अथवा नाहीं असे दोन भरंवसे असणें; संदिग्धता; अनिश्चितपणा; वानवा. २ (एखाद्या गोष्टीचें) द्विविध, अनिश्चित, संदिग्ध स्वरूप. [ दु+भरंवसा ] **दुभं(भां)ग**–वि. मध्यें कांहीं अडथळा आल्यानें, वस्तु आडवी आल्यानें, मध्यांतून गेलेल्या रेषेनें दुभागला गेलेला. 'मध्यें बेट पडल्यानें नदीचा प्रवाह दुभंग झाला आहे.' [दु+भंग–भांग] **दुभाग**–वि. दोन भाग झालेला; दोन तुकडे करून विभागलेला. [ दु+भाग=तुकडा ] **दुभागणी**–स्त्री. दोन भाग करण्याची, दुभागण्याची क्रिया. **दुभागणें**–उक्रि. दोन भाग करणें, होणें. [ दु+भाग=तुकडा, हिस्सा ] **दुभांगणें**–उक्रि. दुभंग करणें, होणें. मधून रेघ, रस्ता इ० पडून दोन भागांत विभागणें. जसें–होडीनें पाणी, पायवाटेनें शेतांतील पीक इ० [ दु+भांग ] **दुभाव**–पु. १ (विरू.) दुजाभाव; दुजाभाव पहा २ (गो.) शंका; संशय. [ दु+भाव=हेतु ] **दुभावणें**–अक्रि. (गो.) संशय घेणें; शंका येणें, काढणें, वाटणें. [ दुभाव ] **दुभावी**–वि. (गो.) दुजा भावानें वागणारा; संशयी. [दुभाव] **दुभावीक**–वि. (गो.) दुजाभाव उत्पन्न करणारा. [ दुभाव ] **दुभाषी–ष्या**–वि. दोन भाषा जाणणारा: (यावरून) उभयतां व्यवहार करणाऱ्यांस एकमेकांची भाषा समजत नसल्यास त्या दोघांची भाषा अवगत असलेला त्यांचा मध्यस्थी. हा एकाच्या एका भाषेंतील भाषणाचें दुसऱ्या भाषेंत भाषांतर करून दुसऱ्यास सांगतो. (इं.) इंटरप्रिटर् [ दु+भाषा ] **दुभास**–पु. १ (एखाद्या गोष्टीचा, वस्तूचा होणारा) द्विविध भास, ग्रह, ज्ञान. २ (ल.) गैर समजूत; उलट समजूत; चुकीचा ग्रह. [ दु+भास=दिसणें; ज्ञान होणें ] **दुभा(भे)ळकें**–न. दुबेळकें पहा. **दुभेदी**–वि. दुटप्पी. [दु+भेद] **दुमात्राकाना–कौ**–नस्त्री. १ 'कौ' हें अक्षर लिहितांना, लिहावयास शिकतांना लहान मुलें उच्चारतात ते कौ च्या वर्णनाचे शब्द. २ (ल.) (सांकेतिक.) दोन्ही–एका खांद्यावरून वाहिलेलें व खांद्याच्या पुढें व मागें लोंबणारें ओझें; दुमोटलें. ३ –वि. ज्यानें दुमोटलें खांद्यावर घेतलें आहे असा (मनुष्य). [ दु+मात्रा+काना+कौ ] **दुमारा–रे**–पुन. १ सैन्य इ०कावर तोफा इ० कांनीं एकाच वेळीं दोन दिशांनीं होणारा मारा. २ (ल.) भाषणादिकांत दोन्ही बाजूंनीं पडणारा पेंच; कचाटी; कोंडें; कातर; चिमटा. [दु+मारा] **दुमारी–ऱ्या**–वि. १ दोन प्रकारांनीं, दिशांनीं मारा, आघात करणारें (शस्त्र इ०). २ दोन बार करणारी, दोनदां उडणारी (बंदूक). [दु+मारा] **दुमाळी**–वि. पाकळयांचीं दोन वर्तुळें ज्यांत आहेत असें (फूल). [ दु+माळ=पाकळयांचीओळ, वर्तुळ ] **दुमुखी**–पु गोल हातोडा; खोलण्या पहा. [दु+मुख] **दुमुतवज**–पु. दुरोख; दुटप्पी वर्तन. 'ये विषयीं दु–मुतवजे करितात.'–पया १२३. [ दु+अर. मुतवज्जिह् ] **दुमोट–मोटली–मोटलें**–स्त्रीन. खांद्यावर घेण्याच्या सोयीचें, दोन मोटा एकत्र बांधून करितात तें ओझें.' [ दु+मोट, मोटली, मोटलें ] **दुमोळी**–वि. दोन पाखीं

असलेलें (छप्पर); दुपाखी छप्पर असलेलें (घर). [दु+मोळ= घराचें छप्पर.] **दुरकानी रेघ-ओळ**-स्त्री. पत्र इ० लिहितांना कागदास चार सारखे सळ, रकाने पाडून दोहों बाजूंचे दोन सळ समासादाखल सोडून मधल्या दोन रकान्यांत ज्यास पत्र लिहावयाचें त्याचें नांव इ० लिहिण्याकरितां काढलेली रेघ. [दु+रकाना ओळ, रेघ] **दुरंगी**-स्त्री. प्रतिपक्षाची सई होण्यापूर्वी एका पक्षाच्या पक्क्या व कच्च्या दोन्ही रंगांच्या सोंगट्या घरांत गेल्या म्हणजे हा डाव होतो. **दुरंगी**-वि. दोहों बाजूंस दोन निरनिराळे रंग असलेला दिलेला (पदार्थ, वस्त्र इ०). [दु+रंग] **दुरस्तां**-क्रिवि. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं; रस्त्याच्या दोन्ही बाजू व्यापून दुतर्फा ओळीनें. 'चालेति दासीगण हे दुरस्ता।'-सारुह ८४३. -पाब ५१. 'दुरस्ता झाडें लाविलीं आहेत.' [दु+रस्ता] **दुरा**-वि. १ संख्येनें, परिमाणानें दुप्पट, दुहेरी केलेला; दुमडलेला. **दुरी**-स्त्री. दोन चिन्हें, टिंबें असलेला पत्ता; दुव्वा. 'एक दुरी काढून ठेवून तिचे पानलागी खेळूं लागले.'-सुदे २६. **दुरूक**-पु. १ फांशावरील दोन टिंबें. -मोल. २ दोन पगें चालून तिसऱ्या पगीं सोंगटी बसायाजोगा डाव.-शास्त्री. **दुरूक, दुरोख-खी**-वि. १ दोन दिशांनां रोख असणारा; दोन दिशा दाखविणारा. २ (ल.) दोन डगरींवर हात ठेवणारा; दोन्ही बाजूंस लाग लावणारा; दुलग; दुटप्पी. 'इकडील मातबरांचीं लक्ष्यें दुरोख झालीं आहेत.'-मदबा १.३१. ३ रंगाची वेलबुटी इ० ज्याच्या दोन्ही बाजूंस, अंगास उठली आहे असें छापील (वस्त्र इ०). [दु+रोख=टप्पा, दिशा] **दुरूकशह, दुरोखशह**-,(बुद्धिबळांचा खेळ). घोडा इ० मोहोऱ्याचा प्रतिपक्षीयांच्या वजीर इ० मोहोऱ्यावर उडी पडायाजोगा राजास दिलेला शह.' दुरूक शह न सोसे'-ख १२१२. [दु+रोख+शह] **दुरो**-स्त्री. (कृ.) दुसरी नांगरणी. 'आजूबाजूच्या गांवांतील शेतांतून उमज, दुरो होऊन तास काढणं चाललं आहे?-सह्याद्रीच्या पायथ्याशीं ११८ **दुरोखी**-वि. दुरोख पहा. **दुरोजा**-पु. दोन दिवसांचा खर्च. 'चाळीस पन्नास हजारांचें जवाहीर व कापड यार्णे फौजेस दुरोजा पुरणार नाहीं.'-रा १२.९०. [दु+रोज=दिवस] **दुऱ्हा**-वि. दुप्पट; दुहेरी.-तुगा. **दुलग**-वि. १ दुरोख; दुटप्पी; दोन्ही पक्षांकडे संबंध ठेवणारा. 'संभाजी राजे यांचे लक्षी राहिले व दुलग आहे ऐसें पाहून दूर करून...'-मराचिथोशा ३२. २ दुलंगी (रेघ) पहा. [दु+लग्न=संबंध] **दुलंगी**-स्त्री. घोड्याच्या खोगिरावर सामान भरावयासाठीं घातलेली पिशवी, पडशी. [दु+अलंग] **दुलंगी**-वि. १ वरचेवर रंग पालटणारा; लबाड; दुटप्पी; खोटा. 'प्राणसखा म्हणे नार दुलंगी। बहु युक्तीनें भोगून पलंगीं।'-पला४.१७. २ कळलाव्या; कज्जेदलाल; आगलाव्या. [दोन+अलंग=ओळ] **०ओळ-रेघ**-स्त्रि. (जमाखर्चात) जमाखर्च पुरा झाला असें दाखविण्यासाठीं त्याखालीं मारलेली U -- अशी आडवी रेघ. (क्रि० मारणें; ओढणें; करणें). **दुलंगी पेंच**-पु. कुस्तींतील एक पेंच. **दुलडी**-स्त्री. स्त्रियांच्या गळ्यांत घालण्याचा दोन सरांचा एक दागिना. 'ताईत सांखळी गळाची दुलडी। बाजुबंद जोडी हातसर।'-तुगा २९५९. 'पेटयांचें येकदाणें, तदुपरि दुलडी कंठदेशीं तयेच्या।'-सारुह ६.२३. [दु+लड=सर] **दुलंड**-वि. दोन्ही पक्षांशीं विश्वासघात, बेइमानी करणारा. **दुलंडी-दी**-पु (कों.) एका गांवांत राहून दुसऱ्या गांवीं शेती करणारा मनुष्य. **दुलांकूडपण**-न. एकमेकांवर घासलीं जाणारीं दोन लांकडें तीं समुच्चयानें. 'दुलांकुडपण सांडिलें। आणि आगीपणें मांडिलें। तैंचि आगी जालें। इंधन कीं।'-अमृ ७.३२. **दुलाचा, दुला(ली)च्या, दुलंच्या**-स्त्रीअव. दुगाण्या; जनावराच्या मागच्या लाथा; दुमच्या. (क्रि० झाडणें). **दुलावा-वी-व्या**-वि. इकडची गोष्ट तिकडे व तिकडची इकडे सांगून कज्जा लावण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा; कळलाव्या; आगलाव्या. [दु+लावणें] **दुल्लड**-स्त्री. स्त्रियांचें एक दोन पदरी कंठभूषण. '३३ दुल्लडी मोत्यांची.'-वाडसभा १.५७. दुलडी पहा. **दुल्लडी**-वि. दोन पदरी; दोन सर असलेलें. **दुवक्त-वक्तां-वख्तां**-क्रिवि. १ सकाळीं व संध्याकाळीं अशा वेळीं. २ (सामा.) दोनदां; दोन वेळां. 'नित्य घरीं दुवख्ता पाणी भरावें, मग जे होणार तें होतच आहे.' -रा ८.२०१. 'संमेलन सकाळ व दुपार असें दुवक्त भरलें होतें.' -केसरी १४.६.३०. पृ. ३. [सं. दु; फा. दू-वक्त] **दुवारणें**-उक्रि. दुसारणें पहा. **दुवारा**-वि. दोनदां सडलेला, कांडून स्वच्छ केलेला (तांदूळ). [दु+वार=वेळ] **दुवारें**-न. (राजा.) एकवार कांडलेल्या साळी पाखडल्यानंतर तांदूळ अधिक स्वच्छ व्हावे म्हणून त्यांना पुन्हां कांडतात ती क्रिया. [दुवार] **दुवाळ**-स्त्री. (विणकाम) एकसंध विणलेले दोन पंचे; दोन पंचांचें कापड; वातिळ, चवाळें पहा. **दुवाळणें**-अक्रि. (कु.) एकदां सांगितलेली हकीगत पुन्हां सांगताना किंचित् फेरबदल करून सांगणें. [दु+वेळ] **दुवेत**-न. १ (गाय, म्हैस इ० जनावरांची) दुसरी प्रसूति. २ (गाय, म्हैस इ० जनावरांस) दुसऱ्या प्रसूतीच्या वेळीं झालेलें वासरूं; पारडूं. ३ (ल.) (संतापानें म्हणतात) खोडसाळ व द्वाड मूल. [दु+वेत= विणें; प्रसूति] **दुवेत-वेती**-वि दोनदां व्यालेली (गाय, म्हैस इ०). [दु+वेत] **दुवेळां-वेळीं**-क्रिवि. दोन वेळां; सकाळीं व संध्याकाळीं; दुवख्तां. [दु+वेळ] **दुवोत्रा, दुहोत्रा**-वि. दुहोतरा पहा. **दुव्वा**-पु. गंजिफांतील, पत्त्यांतील दोन ठिपक्यांचें पान. **दुशाख**-स्त्री. हंडयांतील दिवे, मेणबत्त्या लावतां येण्यासाठीं एका टोंकास दोन-तीन वांकडीं लोखंडी शिंगें लावलेली काठी. प्रसंगविशेषीं मशालीसारखाहि हिचा उपयोग होतो. [दु+शाखा= फांदी, फांटा] **दुशाल-दुशाला**-स्त्रीपु. दुहेरी शाल, शालजोडी.

'शालु रंगलाल वर पिवळी दुशाल. '–पला ४.४२. 'मृदुशय्येवर जी पहुडावी ओढुनि तलम दुशाला।'–विक ५२. [गु. दुशाल] **दुशिडी(मढागिरी)**–पु. दुकाठी, दोन डोलकाठ्यांचें, शिडीचें गलबत. **दुशि(शी)कडे**–क्रिवि. १ दोन्ही बाजूस, अंगांस. २ दोन्ही दिशांनां. **दुशिंगी**–वि. (गो.) दोन शिंगें असलेलें (जनावर इ०). [दु+शिंग] **दुशोला**–पु. जोड शामदान. 'मोमबत्तीचे दुशोला, येकशोला याप्रमाणें जिन्नस ...'–रा ७.१५६. [दु+ अर. शुअ्‌ला=ज्योत] **दुसड**–स्त्री. (राजा.) तांदूळ स्वच्छ व्हावे म्हणून ते दुसऱ्यांदा कांडण्याची, सडण्याची क्रिया. [दु+ सडणें=कांडणें] **दुसड–डा–डी**–वि. १ दोनदा कांडून स्वच्छ, निर्मळ केलेले (तांदूळ). २ (वर्षांतून) जिच्यांतून दोन वेळां पीक काढलें जातें अशी (जमीन); वर्षाचें पहिलें पीक काढल्यानंतर त्याच जिराईत जमिनींत त्याच वर्षी काढलेलें (दुसरें पीक इ० दुसोटा पहा). **दुसडी**–वि. दोनच आचळ जिला आहेत अशी (बकरी इ०). [दु+थड=स्तन, आचळ] **दुसढ**–स्त्री. (प्रां.) (सामा.) (एखादें काम इ०काची) पुन्हां केलेली आवृत्ति; दुसारणी. [दु+ सडणें] **दुसरणी**–क्रिवि. पुनः; दुसऱ्यांदा; दुसऱ्यानें. **दुसरणी, दुसरणं**–दुसारणी, दुसारणें पहा. **दुसरद**–स्त्री. दोन सरहद्दी. **दुसरा**–पु. दोन सरांचा, दुपदरी हार. 'हा निळयांचा दुसरा। या बुद्धी हातु घातला विखारा। कां रत्नें म्हणोनि गारा। वेंचीजेंवि।'–ज्ञा ९.१४८. [दु+सर] **दुसा**–वि.) खालच्या दाढा आणि दोन दांत आलेला (बैल). **दुसांजा**-क्रिवि. (राजा.) जेवणाच्या दोन्ही वेळीं; सकाळीं व संध्याकाळीं; दुवेळां. [दु+ सांज] **दुसाड–डा–डी**–वि. दोनदां कांडून स्वच्छ केलेला (तांदूळ); दुसड पहा. **दुसार**–अ. सोंगट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. (क्रि० उठणें; निजणें; जाणें). **दुसारणी**–स्त्री. (कों.) एकवार नांगरलेली जमीन दुसऱ्यांदा नांगरण्याची क्रिया; दुसरण्याची क्रिया. [दुसारणें] **दुसारणी**–क्रिवि. पुन्हा; दुसऱ्यांदा; दुसरणी (–क्रिवि.) पहा. **दुसारणें**–अक्रि. (कों.) कोंबड्यानें पहांटस दुसऱ्यांदा आरवणें. **दुसारणें**–उक्रि. (एखादी गोष्ट) दुसऱ्यांदा क्रियेचा विषय करणें; तीच गोष्ट पुनः करणें. जसें:–शेत पुन्हा नांगरणें, पुस्तक पुन्हा वाचणें इ० **दुसाला–ली**–वि. दोन वर्षांचा; चालू व गतसालाचा. 'दुसाला–वसूल–हिशेब–उत्पन्न इ०' (हें विशेषण लिंगवचनांनीं अविकृत राहतें) 'परगणे पाटोदें येथील हिशेब सन संमान दुसाला दप्तरीं विल्हे लावला नव्हता–'–वाडबावा २.८५. 'या गांवची वहिवाट दुसाला आम्ही केली.' [दु+साल=वर्ष] **दुसोटा**–पु. (देशांत रूढ) नुकतेंच काढून घेतलेल्या पिकाच्या जमीनींतून लागलीच पुनः घेतलेलें पीक. दुसड पहा. 'दुसोट्याचा–हरभरा–गहूं–जमीन–शेत–वावर. **–ट्याची–दुसवट्याची पेरणी**–स्त्री. दुसोट्याची पिकाची पेरणी. 'दुसवट्याच्या पेरणी करतां जमिनी वजविल्या पाहिजेत.'–शे ३.५. **–ट्याचें पांक**–न. मागलें पीक. **दुहस(ज)मी, दुहज्मी**–वि. १ दोन कान, दोन डोळे इ० सर्व मुखावयव दिसायाजोगें व भिंत इ०काकडे पृष्ठदेश (मागील बाजू) असलेलें भिंत इ०कावर काढलेलें (चित्र); दुचश्मी अर्थ १ पहा. याच्या उलट एकचश्मी, एक डोळी इ० २ जें दोन्हीकडे लागू पडतें असें (वाक्य, शब्द इ०). ३ जें एका रूपांत थोडासा फेरबदल करून दुसऱ्या रूपात सहज दाखवितां येईल असें (चित्र, आकृति आंकडा, इ०) जसें:–थोडासा फेरबदल केल्यास तीन या आंकड्याचा चार हा आंकडा व नऊ या आंकड्याचा सहाचा आंकडा बनतो त्याप्रमाणें. ४ दोन कामीं योजतां येणारा; दोन कामीं उपयोगी पडणारा (चाकर, घोडा, जनावर, जिन्नस इ०). [दु+अर. हस्‌] ०**मत**–न. वैकल्पिक मत. **दुहातां बगली**–वि. (मल्लखांब.) मल्लखांबाच्या बगली उडीचा एक प्रकार. मल्लखांबाच्या बाजूचा हात बगलीप्रमाणें बांधून, दुसरा हात बगलीप्रमाणें न लावतां मल्लखांबाच्या पुढच्या अंगास लावावा. नंतर बगलीप्रमाणें अंग उडवून मल्लखांबास पाय लावून साध्या बगलीप्रमाणें पकड बांधावी व हात सोडून उठावें. नंतर पुनः त्याचप्रमाणें दोन हाताची बगल करीत जावें म्हणजे ही उडी होते. –व्यायाम–मे १९२३. [दु+हात+बगली] **दुहार**–स्त्री. (प्रां.) १ दुसारणी; दुसारण्याची क्रिया. २ दोन ठिकाणीं असलेला, चालविलेला (रोजगार, व्यवहार, शेती इ०). [दसार] **दुहारणी**–स्त्री. आवृत्ति; पुनः तेंच काम करणें; दुसारणी. **दुहारणं**–(विप्र.) दुसारणें पहा. **दुहांशी**–वि. दोन्ही बाजूंना, कडांना नक्षीदार किनार, हांशे लावलेली (शाल इ०); याच्या उलट चौहाशी. (दु+हाशिया=काठ, किनार] **दुहाळ**–स्त्री. (कों.) एकसंधि विणलेली दोन पंचांची जोडी, दुवाळ पहा. **दुहिरी, दुहेरा–री**–वि. १ दुपदरी (वस्त्र इ०). २ दुप्पट; द्विगुणित (काम, श्रम इ०). ३ दोहोंनीं बनलेलें. **दुहेरी इष्टराशि–राशिक**–पुन. (गणित.) ज्यांत अज्ञात, अव्यक्त संख्या दोन किंवा दोनदां घ्याव्या लागतात तें इष्टराशिक. [दुहेरी+इष्ट+राशि] **दुहिरी उखालक**–पु. कात्री, आडकित्ता, चिमटा, सांडस इ०सारखी जोडतरफ (इं.) डबल् लिव्हर्. –यंत्रि ६६. **दुहिरी चौकट**–स्त्री. बाह्यांनीं दोन चौकटी जोडून केलेली चौकट; जोड चौकट. **दुहिरी डागिना**–पु. दोन अवयव असलेला डागिना. **दुहिरी प(फा)सोळाचा**–वि. शरीरानें जाडाजुडा असलेला; लठ्ठ; गुबगुबीतः मजबूत बांध्याचा; दुहेरी हाडाचा, अंगकाटीचा (मनुष्य). **दुहिरी पाहरा**–पु. दोन शिपाई मिळून असलेला, दोन शिपायांचा पाहरा, चौकी; जोड पाहरा. **दुहिरी वहिवाटवही**–स्त्री. (जमाखर्चात) दुहेरी जमाखर्च. **दुहिरी सरकत**–

स्त्री. (गणित) दुहिरी सरकत वांटणी. **दुहिरी हाडाचा**-वि. जोड फांसळीचा; चांगल्या अंगाबांध्याचा, हाडपेराचा. **दुही**-स्त्री. द्वैत; याऱ्यी; दुई; बेकी; द्वंद्व; भांडण. **दुहेरा**-वि. दुहिरी. **दुहेरी**-वि. १ दुपदरी. २ दोन प्रकारचा. ०**तारे**-पुअव. एकाच केंद्राभोंवतीं किंवा एकमेकांभोंवतीं फिरणारे दोन तारे; (इ.) बायनरी स्टार्स्. ०**तारायंत्र**-न. तारेच्या दोन्ही टोंकांला एकाच वेळीं संदेश देणारें तारायंत्र. ०**पाट**-पु. (पत्त्यांच्या खेळांत खेळ) इस्पिक राणी-चौकट गुलाम किंवा किलवर राणी-बदाम गुलाम या प्रकारचे दोन जोड (दोन विझिकें). ०**वक्रीभवन**-न. प्रकाशकिरणाची भिन्न पदार्थांतून जातांना दोन वेळां होणारी मार्गच्युति. (इं.) डबल रिफ्रॅक्शन. ०**शह**-पु. (बुद्धिबळांचा खेळ) बुद्धिबळांच्या खेळांत एखाद्या मोहऱ्याच्या पगांत असलेलें आपलेंच दुसरें मोहरें खेळून दोन्ही मोहऱ्यांचा प्रतिपक्षीय राजावर एकदम केलेला मारा. **दुहोतरा, दुहोत्रा**-पु. दरमहा दरशेंकडा दोन टक्के व्याजाचा दर.

**दु**—अ. अभाव, निकृष्टपणा, दुष्टपणा इ०कांचें वाचक दुर् उपसर्गाबद्दल समासांत योजावयाचें मराठी रूप. जसें:-दुकाळ=दुष्काळ; वाईट काळ; दुबळा=बलहीन; दुर्बळ. [सं. दुर्; दुः, दुस्; प्रा. दु] **दुआळणें**-उक्रि. (महानु.) दुखविणें; पिटणें; पीडा देणें. 'तंव हडपिनी वारिकी दुआळिलीं।' -शिशु ५५८. [दुआळी] **दुआळी**-स्त्री. पीडा; क्लेश; दुर्बुद्धि; पीडा करण्याची बुद्धि. -मनको. [दु=वाईट+आळी हेतु, इच्छा ?] **दुपत**-स्त्री. दुवेत; गर्भपात होणें; दुपावणें; नासवणें; (प्र.) दुवेत पहा. **दुकळ**-पु. १ दुकाळ; दुष्काळ; महागाई; महर्गता. २ (सामा.) (एखाद्या पदार्थाची) अतिशय दुर्लभता व्हावयाजोगें स्वल्पत्व; उणीव; कमीपणा; अभाव. 'कोंकणांत लांकडास दुकळ नाहीं.' दुकाळ पहा. [सं. दुस्+काळ; प्रा. दुकाळ] **म्ह०** दुकळांत तेरावा महिना. **दुकळणें, दुकळावणें**-अक्रि. (क्व.) (निदार्थी) (दुष्काळ इ० कांमुळें मनुष्य इ० कानीं) अन्नाविषयीं हापापणें; लोलुप होणें; बुभुक्षित होणें (अधाशाप्रमाणें खाणारास किंवा घरीं यथेच्छ खावयास असूनहि घरोघर जेवणास जाणारास उद्देशून निंदार्थी प्रयोगांत उपयोग). 'नाहीं दुकळलों अन्ना। परि या मान जनार्दना।' -तुगा १०४८. 'असले वाईट आंबे खावयास मी केवळ दुकळावलों नाहीं.' [दुकळ] **-ळाचा पाया**-पु. १ दुष्काळाचें पूर्वचिन्ह. २ (व्यापक) नाशाचें, दारिद्र्याचें पूर्वलक्षण. **दुकळा**-वि. (गो.) दुष्काळांतला; दरिद्रीपणानें वागणारा. [दुकळ] **दुकाळ**-पु. १ महागाई; दुष्काळ. २ (सामा.) (एखाद्या वस्तूची, पदार्थाची) दुर्लभता; अभाव; **टंचाई**; उणीव. दुकळ दोन्ही अर्थी पहा. [सं. दुष्काल; प्रा. दुकाल] **म्ह०** १ दुकाळीं माळी सुकाळीं साळी=सुकाळाच्या वेळीं साळयाच्या धंद्याचें महत्त्व वाढतें तर दुकाळांत माळयाला महत्त्व येतें. २ (कर.) दुकाळांत खाल्लें आणि भांडणांत काढलें. **दुःकाळ**-पु. (महानु.) दुकाळ. 'दारूणसंसारुदुःकाळीं। जेणें परमानंदाची रांकधनी केली।' -शिशु ५. **दुकाळणें**-अक्रि. महाग, दुर्लभ, दुर्भिळ होणें. [दुकाळ] **दुकाळ्या**-वि. दुष्काळग्रस्त; दुकाळानें पीडित झालेला. 'त्यांस असें जहालें कीं, दुकाळियास मिष्टान्न मिळतें तसें जहालें.' -भाव १८. [दुकाळ]

**दुःख**—न. १ दुःसह, अनिष्ट अनुभव; पीडा; क्लेश; यातना; वेदना. 'जी वेदना आपल्याला प्रतिकूल तें दुःख.' -गीर ९६. २ अडचण; त्रास; कष्ट; रोग; त्रासदायक गोष्ट. ३ उपदंश; गरमी. ४ खेद; शोक; पश्चात्ताप. ५ (गो.) अश्रु; आंसु. [सं.] (वाप्र.) ०**घोटणें**-दुःख करणें; शोक करणें. 'बोलता असे दुःख घोटिती।' -कीर्तन १.२७. ०**पाहून डाग देणें**-१ दुःखाचें बीज शोधून तेवढ्याच जागीं इलाज करणें. २ ज्या मानानें अपराध असेल त्याच मानानें शिक्षा करणें. ०**मानणें**-(एखाद्या गोष्टीबद्दल) वाईट वाटणें; विषाद, खेद मानणें; शोक करणें. ०**वेशीस बांधणें**-(गांवच्या वेशीला बांधलेली वस्तु सर्वांस दिसते यावरून) (आपलें) दुःख, अडचण सर्वांना कळविणें; आपलें संकट, त्रास, पीडा लोकांमध्यें जाहीर करणें. **दुःखाचा वांटा उचलणें**-(एखाद्याच्या) दुःखांत वांटेकरी होणें. **दुःखावर डाग-डागण्या देणें, फासण्या घालणें-टाकणें**-दैववशात् दुःख पावलेल्या मनुष्यास मर्मभेदक भाषणानें आणखी दुःख देणें; जखमेवर मीठ घालणें, चोळणें. **दुःखाचा प्राणी**-पु ज्याला जन्मभर संकटें व दुःखें सोसावीं लागलीं असा मनुष्य; ज्यावर एकामागून एक दुर्दैवाचे घाले आले असा मनुष्य; जन्मांतहि सुखाचें वारें न मिळालेला मनुष्य. याच्या उलट ऐश्वर्याचा प्राणी. **दुःखाचा वांटा**-पु. कपाळीं, वांट्यास आलेलें दुःख, भोग; खडतर दुर्भाग्य. (क्रि० उचलणें; घेणें; सोसणें; भोगणें). **दुःखाचा वांटेली-विभागी**-वि. (प्रत्यक्ष, सहानुभूतीनें एखाद्याच्या) दुःखांचा वांटेकरी झालेला; समदुःखी. **दुःखें पावें**-क्रिवि. अतिशय कष्ट व त्रास सोसून; मोठ्या प्रयासानें. सामाशब्द- ०**कारक**-वि. ज्यापासून दुःख होतें असें; दुःखद; दुःखदायक. [दुःख+सं. कारक=करणारें] ०**दाटणी**-स्त्री. १ एका मागून एक दुःखें कोसळणें; दुःखपरंपरा. २ दुःखाकुलता; दुःखाची वाढ, आधिक्य. [दुःख+दाटणें] ०**दायक**-वि. (दुसऱ्यास) दुःख देण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा. [दुःख+सं. दायक=देणारें] ०**परिणामी-पर्यवसायी**-वि. ज्याचा शेवट दुःखकारक, शोककारक झाला आहे असें (नाटक, गोष्ट इ०). (इं.) ट्रॅजिक्. याच्या उलट आनंदपर्यवसायी; (इं.) कॉमिक्. 'ही गोष्ट दुःखपरिणामी आहे.' -पाव्ह. प्रस्तावना पृ. १. [दुःख+परिणामी, पर्यवसायी=परिणत

होणारें अंत पावणारें ] ०प्रद-वि. दुःखदायक. [दुःख+सं. प्र+दा= देणे ]

**दुकर**—स्त्री. (गो.) डुकरीण.

**दुकान**—न. १ विक्रीसाठीं ते ते पदार्थ मांडून बसण्यासाठीं केलेलें घर, जागा; विक्रीची जागा; मांडामांड. २ सोनार, लोहार, कांसार इ०कांचें ते ते पदार्थ घडण्यासाठीं केलेलें घर, कारखाना. ३ (.) विकण्यासाठीं मांडून ठेवलेल्या पदार्थांचा समुदाय. ४ लोहार, सोनार, कांसार इ०कांची उपकरणसामग्री. 'मी दुकान आटोपून येतों.' 'तुम्ही गोफ करविणार असलां तर मी दुकान घेऊ येतों.' ५ कांहीं एक व्यवहारार्थ अनेक पदार्थांचा पडलेला, मांडलेला पसारा. 'तुम्ही पोथ्यांचें दुकान मात्र मांडून ठेवितां, शास्त्रार्थ व हींच ठरत नाहीं.' ६ (गो.) दारूचा पिठा; गुत्ता. ७ वस्तूंचें मांडलेलें प्रदर्शन; बाजार. [अर; दुक्कान्; फा. दुकान; म. दुखण-राभा] (वाप्र.) ०घालणें-स्थापणें-रचणें-मांडणें-१ (अक्षरशः) पदार्थांच्या विक्रीसाठीं मांडामांड करणें २ (ल.) (एखाद्या स्त्रीनें) प्रसिद्धपणें द्रव्य घेऊन व्यभिचार करूं लागणें; कसबिणीचा धंदा करूं लागणें; अनाचारानें वागणें. ०पसरणें-पसारा मांडणें. 'रे! काय दवाग्निपुढें पसरूनि दुकान कानन रहातें।' -मोउद्योग १३.१०८. ०मोडणें-दुकान बंद करणें; धंदा, व्यापार इ० गार न निवृत्त होणें. ०वाढणें-(एखाद्याची) गिऱ्हाईकी वाढणें; धंदा, व्यापार भरभराटीस येणें. सामाशब्द- ०कार-पु. (गो.) दारू विकणारा. ०दार-पु. दुकानाचा मालक; दुकान चालविणारा माणूस; वाणी. ०दारी-स्त्री. दुकानदाराचें काम, धंदा; व्यापार-धंदा. [फा. दुकान्दारी] ०दारी फैलाविणें-(गोसावी, वेश्या इ० कांनीं) लबाडयांचें जाळें पसरणें; अनेकांवर पाश टाकणें. ०पट्टी-स्त्री. दुकानावरील, व्यापारावरील सरकारी कर. ०सरकत-स्त्री. दुकानांतील भागीदारी. [सरकत=भागीदारी] ०सरकती-वि. दुकानांतील भागीदार.

**दुकार**—पु. (ल.) एक आणा.

**दुकूल**—पु. १ रेशमी वस्त्र. २ उंची वस्त्र. 'बळ पूजिलें कसें हो बहुमूल दुकूल रत्नहारांनीं.' -मोआदि ३२.८. [सं.]

**दुकोर**—पु. (गो.) डुकर. [डुकर]

**दुक्खा(क्खे)रा**—वि. उपदंशानें, गरमीनें पीडित झालेला. [दुख]

**दुख**—न. (कों.) अश्रु. 'सकळाचे रुदन येकवटले। दुखाचे लोळ मिसळले।' -ख्रिपु २.५०.३८. दुःख पहा. [सं. दुःख; गो. दुःख; दुक] **दुखां गाळप**-(गो.) आंसवें गाळणें; अश्रु ढाळणें.

**दुखणाईत**, **दुखणारू**—वि. आजारी; रोगानें पीडलेला; बीमार; बेजार. [दुखणें]

**दुखणें**—पु. शारीरिक व्यथा; विकृति; अस्वस्थता; आजार; व्याधि; पीडा; रोग. 'ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मज दहा दुखणीं।' -मोकृष्ण ८३.१३. [सं दुःखन; प्रा. दुक्खण] (वाप्र.) ०काढणें-१ दुखण्याची व्यथा सहन करणें. 'दुखणें काढावें पोरांनीं आणि भूक काढावी गुरांनीं.' २ एखाद्याच्या आजारांत त्याची शुश्रूषा करणें. ०घेणें-१ आजारी होणें. २ आजारी असल्याचें ढोंग करणें; बळेंनें दुखणें आणणें. **दुखण्याचें अंग असणें**-अंगांत आजाराचा थोडा-फार अवशेष असणें; आजार पूर्णपणें बरा झालेला नसणें. **दुखण्यास पडणें**-आजारी होणें. म्ह० देणें आणि दुखणें हीं कोणासहि आवडत नाहींत. सामाशब्द- **दुखणेकरी**-पु. दुखणाईत मनुष्य. ०बाहणें-न. (व्यापक) ताप, आजार इ०. [दुखणें द्वि.]

**दुखणें**—अक्रि. (शरीरावयव इ०) वेदना, व्यथा इ०नीं युक्त होणें.

**दुखरण**—स्त्री. (कों.) (सामा.) इजा; दुःख; व्यथा; वेदना. [दुःख]

**दुखरा**—वि. नाजुक; थोडयाशा इजेनें दुखणारा; अधु (शरीरा-अवयव, इंद्रिय).

**दुखरूं**—न. (राजा.) एखादें क्षुल्लक दुःख; दुखणें. जसें:- टोंचल्याजागीं पुवळणें, नखुरडें इ०. याच्या उलट रोग. [दुःख+रूं क्षुद्रतादर्शक प्रत्यय]

**दुखवटा**—पु. १ स्वकीय मनुष्य मेल्यानें प्राप्त होणारी दुःखावस्था; अशौच; सुतक. २ मृताच्या पुत्रादिकांस त्याचे आप्तजन अशौचनिवृत्तीनंतर वस्त्रें इ० देऊन त्यांचें दुःखपरि-मार्जन करितात तो विधि; अशीं वस्त्रें. अशीं वस्त्रें पूर्वी सरकारांतून मोठमोठया सरकारी अधिकाऱ्यांच्या किंवा सरदारांच्या मुलांस मिळत; व निरनिराळया राजपुत्रांस निरनिराळया राजांकडून मिळत. (क्रि० करणें; नेणें; देणें; काढणें). ३ शोकप्रदर्शन. ४ (कों.) शोक; दुःख. 'सुखवटयास सारे आहेत दुखवटयास कोणी नाहीं. [दुःख]

**दुख(खा)वणें**—अक्रि. (शरीरावयव इ०) व्यथित होणें, इजा पावणें; दुःखयुक्त होणें. -सक्रि. दुखविणें पहा. -शास्त्रीको [दुःख]

**दुख(खा)विणें**—उक्रि. १ दुर्भाषण, अपकार इ० कानीं मनुष्यास व्यथित करणें, दुःख देणें. २ खणणें, उकरणें, चेंगरणें, खरडणें, खापलणें, कापणें इ० प्रकारें इजा करणें; शारीरिक पीडा देणें. ३ (फळें, झाडें, जमीन इ०) पृष्ठभागावर किंचित जाया करणें. [दुःख]

**दुखाणूं**—न. (गो.) गळूं. [दुःख+अणूं प्रत्यय]

**दुखापत**—स्त्री. १ चेंचणें, कापणें, ठोसा देणें, आघात करणें इ० प्रकारची इजा; दुखणें. २ यामुळें होणारें दुःख, यातना; वेदना. ३ (कायदा) शरीरास वेदना, रोग, अथवा विकार होईल असें कृत्य. (इं) हर्ट्. [सं. दुःखं+सं. आपत्=पडणें–आपत्ति]

**दुखारणें**—अक्रि. (कों.) खेद विषाद पावणें; दुःखी होणें; मनस्तापानें पीडणें. [दुखार=दुःख+सं. कार–आर प्रत्यय]

**दुखार्ती**—स्त्री. रोग; शारीरिक अस्वस्थता; इजा; दुःख.

**दुखाळू**—वि. १ नेहमीं आजारी असणारा. २ उपदंशाचा, गरमीचा विकार असलेला. [दुःख+आळु प्रत्यय]

**दुःखित, दुःखी**—वि. ज्यास दुःख झालें आहे असा; दुःख पावलेला; शोकग्रस्त; खिन्न. [सं.]

**दुखी**—स्त्री (राजा.) (गांवांतील, कुटुंबांतील) सर्वसाधारण आजार, रोग. उदा० पोटदुखी, कपाळदुखी. [दुःख]

**दुःखीप्राणी-जीव**—पु. १ दुःख पावलेला, खिन्न मनुष्य; दुःखी. २ दुःखाचा प्राणी पहा.

**दुखींवाही**—स्त्री. दुखणें–वाहणें पहा.

**दुखेस्त**—वि. (गो.) दुःखदायक. [दुःख]

**दुखोटा**—पु. दुखवटा पहा.

**दुख्खा(ख्खे)रा**—वि. (सांके) उपदंशानें पीडलेला. [दुःख]

**दुगदुगी**—वि. १ धुगधुगी; मरणोन्मुख अवस्था. धुगधुगी पहा. 'तूं दुगदुगीचा प्राण तुझ्यारे मी ममतेला शोकलें।'-होला ११५. [ध्व.]

**दुगला-ळा**—वि १ अति दुर्बळ. २ रोड; कृश. ३ टेंगणा. ४ अशाश्वत; नश्वर. 'काय कीजती चेइलेपणीं। स्वप्नींचीं तियें बोलणीं। तैशी जाण ते काहाणी। दुगळीचि ते।' –ज्ञा १५.२१८.

**दुग्ध**—न. १ दूध; क्षीर २ रुई, वड इ० झाडांचा पांढरा दुधासारखा द्रव, चीक. [सं.] ०**शर्करा**-स्त्री. (रसा.) सस्तन प्राण्याच्या दुधापासून काढलेली साखर (इं) लॅक्टोज्. –सेंपु २. ३९०. [दुग्ध+सं. शर्करा=साखर] **दुग्धाम्ल**-पुन. (रसा.) दुधापासून निघणारें, दुधांत असलेलें अम्ल; (इं.) लॅक्टिक् ॲसिड् [दुग्ध+(रसा) अम्ल=ॲसिड]

**दुग्धा**—स्त्रीपु. १ अनिश्चितता; शंका; भ्रांति. (क्रि० असणें; दिसणें; वाटणें). 'हे जिवंत असतां त्यांचे राज्यांतील माणसांस दुग्धा पडेल.'-मराचिसं २५. २ कासकूस; धरसोड: कांकू: द्विविधता. 'त्यांची जाण्याची अद्यापि दुग्धा दिसते.'–क्रिवि (सामा) अनिश्चितपणें; संदिग्धपणें; मोघम; अळमटळम. [सं. द्विधा]

**दुघड**—वि. १ (व.) हट्टी. २ मूर्ख; दुष्ट. 'दुघड नार नवऱ्याला शिकवी म्हणे वेगळे निघा।'–पला ८५ 'रांड बेढंगी दुघडी।' –पला ८३. दु(=दोन)च्या पोटांत दुघड पहा. [सं. दुर्घट; प्रा. दुग्घड]

**दुघाड भरणें**—अक्रि. (व.) अतिशय श्रम केल्यानें अंग दुखूं लागणें; तारवटणें. [सं. दुर्+घट्–घाट–घाड]

**दुचमळ**—स्त्री. (भांड्यांतील पाणी इ० द्रव पदार्थ) हलण्यानें बाहेर येण्याची स्थिति; हिसळणें. डुचमळणें डचमळ पहा.

**दुचमळणें**—उक्रि. (भांड्यांतील पाणी इ०) हिसळणें; हलविणें; ढवळणें. डचमळणें पहा. –अक्रि. हलणें; हिसळणें. [डुचमळणें]

**दुचित्त**—वि. खिन्न मनाचा. (प्र.) दुश्चित्त पहा.

**दुच्ची, दुच्छी**—स्त्री. (गो.) बार मारण्याचा एक प्रकार.

**दुजा**—वि. १ क्रमानें दुसरा. 'एक्या पदें भूमि भरूनि थोडी। पायें दुज्या अंडकटाह फोडी।' –वामन, वामनचरित्र १.३१. २ आणखी; आणीक; दुसरा; अन्य; इतर. 'मरे येक त्याचा दुजा शोक वाहे।' –राम १६. 'येकया ग्रंथें निश्चय केला। तो दुजयानें उडविला।' –दा ७.९.४. ३ भिन्न; वेगळा; निराळा; परका. 'मला तुम्ही दुजा मानूं नका.' 'त्यजि असु तो गमला दुजा न देहें।' –मोरा पुष्पिताग्रा श्रीरामायण कल्पलता १५.१.३६६. [दु=दोन+जा प्रत्यय?] ०**भाव**-पु. १ मनाचा दुटप्पीपणा; आंत एक बाहेर एक अशी वृत्ति. २ मीतूंपणा; भेदबुद्धि; हा माझा, हा परका असें लेखण्याचा स्वभाव, वृत्ति; परकेपणाची भावना; आपपरभाव. ३ मतभिन्नता; मतभेद; कल्पनेंत, समजुतींत फरक, अंतर. [दुजा+भाव]

**दुजाई-यी**—पु. शत्रु; वैरी. 'प्राणाशीं दुजायींच्या दाउन ऊर्ध्व वाट माघारें फिरती।' –ऐपो २६९. [दुजा]

**दुजाख मिजास**—स्त्री. मोठा गर्व, ऐट; दिमाख. [फा.]

**दुजागी**—स्त्री. जुदागी; वेगळीक; अंतर. जुदागी पहा. 'सबब गुलाम कादरारी तुम्ही दुजागी न करितां त्यास सामील असोन आमचे मसलतींत यावें.' –जोरा १२६. 'शिंदे होळकर यांची दुजागी राजेरजवाड्यांत दाखवून होळकरांची कमती पाडिली.' –होकै ७३. [जुदागी वर्णविपर्ययानें]

**दुजें**—न. द्वैत; भेदभाव. 'तैसें आपलें अद्वयपण। मी जाणतसें दुजेनवीण।' –ज्ञा १५.४३८. 'तुका म्हणे देवें। दुजियाचें पोतें न्यावें।' –तुगा १४१८. [दुजा]

**दुटा**—वि. टेंगू; खुजा. –शर. [फा]

**दुटी**—स्त्री. (महानु.) एक प्रकारचें वस्त्र. 'म्हाइंभटांची दुटी अंगीकरणें।' –ऋ १०९. दुटें पहा.

**दुटें**—न. १ गवंड्याची मापण्याची पट्टी; इमारत बांधण्यापूर्वी जमिनीवर काढलेला आराखडा, नकाशा, खुणा. ३ (ल.) (वागण्याकरितां घालून दिलेला) नमुना; नियम; साचा; कित्ता. 'त्या दुटयाप्रमाणें चाल–वाग–अस–कर.'

**दुटें**—न. १ (जकातींत) एका बैलास नेतां येईल त्याच्या निम्में ओझें (विशेषतः धान्याचें); अर्धें ओझें असलेली गोणी. २ जनावराच्या पाठीवर लादून. वाहून नेण्याच्या सामानास गुंडाळावयाची दोऱ्या असलेली गोणपाटाची पिशवी. ३ घोडयाच्या जिनावर टाकावयाची, सामान ठेवण्याची एक प्रकारची पिशवी; पडशी. ४ धोटें पहा. -शास्त्रीको.

**दुटें**—न. दुमडलेला कागद; दोन घडयांचा, पानांचा कागद. [दु=दोन]

**दुटटा**—पु (कों.) १ घडी केलेला कागद; दुंडा. (इं.) फोलिओ. २ (विणकाम.) सुताची दून, दुमड; दुहेरी सूत.

**दुठरुं**—न. (कों.) गळूं इ०पुरतें पिकल्यावांचून फुटल्यामुळें पुन्हां भरून येतें तें. [दु+ठावर=गळूं]

**दुड**—स्त्री. (कु.) मातीची घागर. दुडी पहा. [दु+घट]

**दुंड**—न. १ झाडाचें खोड; बुंधा; बुडखा. २ (ल.) उंच मनुष्य. [दुंडा; गुज. दुंड=मूळ, बुंधा]

**दुडकारीं**—क्रिवि. फांशांच्या खेळांतील एक संज्ञा; दुक्कीनें जावयाजोग्या पर्गीं; दुक्कारीं. [सं. दु=दोन; फा. दुडु]

**दुडकी, दुडकी चाल**—स्त्री. १ बैल, घोडा इ०कांची चौक आणि चौखूर यांच्या दरम्यानची चाल; दुडदुड धांवणें; चाल पहा. २ मृदंगाचा धूम वाजविण्याचा एक प्रकार; दुगण पहा. [ध्व. दुड्दुड्; का. दुडकी; तुल० सं. द्रुतक -राजवाडे -भाअ १८२४.]

**दुडता-ती**—वि. दुहेरी केलेलें; दुपदरी घडी घातलेलें (वस्त्र इ०). [दु=दोन]

**दुडदुड-दुडां, दुडुदुड**—क्रिवि. जवळ जवळ आणि अतित्वरित पावलें पडतील अशा प्रकारें (चालणें, धांवणें); दुडकी चालीनें; तुरुतुरु पहा. 'विठोबा मला मूळ धाडा। धांवत येइन दुडदूडां।' [ध्व. दुड; तुल० सं. द्रुतंद्रुतं -भाअ १८३४.]

**दुडवकार**—वि. (गो.) पैसेवाला; धनिक. [का. दुड्डु=पैसा, धन]

**दुडवांक**—न. (नाविक कों.) दुंडें, आखूड वांक. याचें एक टोंक कमानीचें असतें व दुसरें सरळ असतें. तळाच्यावर वांकांच्यामध्यें टोंक येईल अशा प्रमाणांत दुडलेल्या भागांत हीं घालावीं लागतात. [दुडणें+वांक]

**दुंडा-डी**—पुस्त्री. १ मध्यें दुणून, न कापतां संलग्न ठेवलेलीं (पोथी इ०कांचीं) दोन पत्रें, पानें. २ (कागद, पोळया, कडब्याच्या पेंडया, दोरा इ०कांचीं) जोडी. -वि. १ दुहेरी केलेला (सुईंतील दोरा). २ दोन पृष्ठांचा, बंदांचा (कागद). ३ दुप्पट; दुहेरी.

**दुंडा**—वि. (व.) थोटा (हात इ०).

**दुडाण, दुडाणचाल**—स्त्री. घोडयाची एक चाल. घोडयानें चारी पाय एकदम उचलून उडी टाकल्याप्रमाणें भरधांव पळणें. चाल पहा.

**दुडी**—स्त्री. घागर; कळशी. 'दुडीवरी दुडी। चाले मोकळी गुजरी।' -तुगा ११४७. 'घृतामधाच्या दुडी।' -कृमुरा ७५.२९. दुड पहा. [दु+घट]

**दुंडी**—स्त्री. गडबड; दांडगाई; दंगा; बंड; अंधेर. -पया ९१ [सं. द्वंद्व; हिं. दुंद.]

**दुडी**—स्त्री. (व) मोठा डवरा; मोठें कोळपें. दिंड पहा.

**दुंडु**—पु. (ना. बालभाषा) वाद्यें; वाजंत्री. [सं. दुंदुभि; हिं. दुंद]

**दुडुदुडु**—क्रिवि. दुडदुड पहा.

**दुडुम**—पु. नगाऱ्याचा, डंक्याचा आवाज. [ध्व. सं. दुंदम=नगारा] ०**धौशा**-पु. मोठा नगारा.

**दुड्डू, दुड्डू**—पु. १ पैसा हें तांब्याचें नाणें. (कानडी प्रांतांत याची मूळ किंमत एकतृतीयांश आणा होती. कारण एका पैशाच्या ४ पै असा हिशेब करीत). २ पैशाचा एकचतुर्थांश किंमतीचें नाणें. -शाको. ३ (ल.) धन; संपत्ति; ऐवज; मिळकत. [का. दुड्डु] ०**दिवप सोरो पिवप**-(गो.) रोखीचा व्यवहार करणें. ०**वोखदाक पडप**-(गो.) अन्यायानें मिळविलेला पैसा घरांत दुखणीबाहणीं उत्पन्न होतात त्यांतच खर्च होतो; तो सुखानें उपभोगण्यास मिळत नाहीं. ०**वदप**-पैसे ठरविणें. ०**नासून पापी**-पैसे नसल्याकारणानें पापी होणें, किंमत कमी होणें. ०**दितलो सोरो पितलो**-पैसे देणार, दारू पिणार.

**दुडथा**—पु. १ मातीची मोठी घागर; घडा. दुड, दुडी पहा २ (ल.) मोठया पोटाचा मनुष्य.

**दुड्ढाचार्य**—पु (निंदार्थी) अंगीं विद्वत्ता नसून पंडित म्हणून प्रौढी मिरविणारा मनुष्य; शेकोजी. लब्धप्रतिष्ठित मनुष्य. 'तुमचें लोकांनीं ऐकावें असे तुम्ही कोण दुड्ढाचार्य!' [का. दोड्ड=वृद्ध, प्रतिष्ठित+आचार्य=पंडित. तुल० दोग्धृ=भाडोत्री कवि+आचार्य राजवाडे इ. ऐ. १.३५६.] **दुक्कारीं**-क्रिवि. फाशाच्या खेळांतील एक सज्ञा; दुक्की जावयाजोगें.

**दुढ्ढी**—स्त्री. १दुफांशी सोंगटयांच्या खेळांत पडणारें दोहोंचें दान. २ (ल.) दोन रुपये, पैसे इ० परिमाणाची दक्षिणा. 'त्यानें दुक्की दुक्की दक्षिणा दिली.' [सं. दु+वृत्ति, वर्ति; का. दुक्कि=दोन]

**दुण**—वि. दुप्पट. [सं. द्विगुण]

**दुणकाम**—न. एखादें काम प्रथमतःच यथास्थित न केल्यामुळें तें मोडून पुनः मुळापासून करावें लागतें त्या प्रकारचें काम. [दुण+काम]

**दुणणें**—सक्रि १ दुहेरी घडी घालणें; दुमडणें. २ दुप्पट करणें; दोहोंनीं गुणणें; द्विगुणित करणें. 'मास दुणा तिथी गणा

एक उग्र नक्षत्र जाणा.' ३ (राजा.) एका खळींत लावलेली मिरची, वांगीं इ०कांचीं रोपें वाढूं लागलीं म्हणजे त्यांना परस्परांची अडचण होऊं नये म्हणून दोन दोन रोपांच्या मध्यें माती घालून, दाबून तीं एकमेकांपासून दूर करणें. ४ (कों.) एकदां सरळ नांगरलेली जमीन पुन्हां तिरप्या दिशेनें नांगरणें.

**दुणता**—वि. दुघडी; दुहेरी; दोन घडया घातलेला. [दुणणें]

**दुणवटणें, दुणावणें**—अक्रि. दुप्पट होणें. 'रोषें प्रेम दुणवटे। पढियंतयाचेनि।' -ज्ञा ९.१८. [दुणा]

**दुणा**—वि. दुप्पट; द्विगुणित. 'पैं प्रियाचिया गोष्टी। दुणा थांब उठी। आवडी गा।' -ज्ञा १२.१६०. 'अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें।' -राम ६५. [सं. द्विगुण; प्रा. दुउग] म्ह० आळशास दुणें काम आणि कृपणास दुणा खर्च.

**दुणाणें**—उक्रि. (क.) वाढणें; विकोपास जाणें. (प्र.) दुणावणें; दुणाविणें पहा.

**दुणावणें**—अक्रि. १ (सामा.) दुप्पट होणें. 'दुणावे वीं देतां किमपि न सरे लेशहि कदा।' -वामनपंडित-स्फुट श्लोक ९ (नवनीत पृ. १३४). २ (ज्वर, पाऊस, मनोविकार इ०) वृद्धिंगत होणें; वाढणें. 'उपमेरहित हनुवटी। पाहतां प्रेम दुणावे पोटीं।' -एरुस्व १.५६. 'सुख या संतसमागमें। नित्य दुणावे तुझिया नामें।' -तुगा ७०८.

**दुणाविणें**—उक्रि. १ (एखादी गोष्ट, क्रिया) पुन्हां करणें; (विशेषतः) दुसारणें; दुव्हारणें. २ दुमडणें; दुहेरी, दुपदरी घडी घालणें. ३ दोहोंनीं गुणणें; दुप्पट करणें. ४ (एखादा पदार्थ, परिमाणांत) दुप्पट करणें. ५ (बातमी, साक्ष, पुरावा, वदंता इ०) खरी, पक्की, निश्चित करणें, पडताळणें.

**दुणी**—स्त्री. दुप्पटः द्विगुणित वृद्धि, वाढ. 'तरी दूध डेरे भरले रांजण। काय ते भरून दावि दुणी।' -तुगा २०. [दुणा]

**दुणेवरी**—वि. (काव्य) दुप्पटीपेक्षां जास्त.

**दुणें**—अ. कोणत्याहि संख्येस दोहोंनीं गुणतांना योजावयाचा शब्द. जसें:- चारदुणें आठ; बेदुणें चार.

**दुंतणें**—उक्रि. दुमडणें; घडी घालणें.

**दुतरा, दुत्रा**—पु. (गो) एक वनस्पति; धोत्रा.

**दुतली**—स्त्री. (व. ना.) दुधाचें मोठें भांडें; दूध तापविण्याचें मातीचें भांडें. [सं. दुग्धालय]

**दुता**—पु. शस्त्राचें म्यान. [फा. दोता=वस्त्र विशेष]

**दुताडा**—पु. (तिरस्कारार्थी) सावकार, सरकार इ० कानें तगादा लावण्यासाठीं कुळाकडे पाठविलेला उद्धट, त्रासदायक दूत. धुताडा पहा. [दूत=निरोप नेणारा +डा निंदार्थी प्रत्यय]

**दुतु**—पु. १ उरस्त्राण; अंगरखा. २ पलंगपोस. [हिं.]

**दुतेर**—न. (कु.) लांकडें सरळ करण्याचें एक हत्यार.

**दुदंग**—न. (गो.) भंडारी लोक माडावरून सूर (ताडी) काढण्यासाठीं वापरतात तें पांढऱ्या भोंपळयाचें केलेलें भांडें. [सं. दुग्ध; गो. दुद.]

**दुदरोग**—पु. मिरचीवरील एक रोग -कृषि ५७०. [गुज]

**दुदरोळ**—स्त्री. एका जातीचा वेल.

**दुदा**—पु. शस्त्राचें म्यान. दुता पहा. -राव्य ४.१२.

**दुदाव(वि)णें**—उक्रि. (गाय, म्हैस इ० कांस) भीति दाखवून, पाठलाग करून, पिटाळून लावणें.

**दुदिया**—पु. पिण्याचें एक मादक औषध. (प्र.) दुधिया पहा.

**दुदिरमण**—वि. (गो.) लठ्ठ; स्थूल देही; भोंपळयासारखा (मनुष्य). [गो. दुदी=भोंपळा]

**दुदी**—पु. (गो.) दुध्या भोंपळा. [दुधी]

**दुंदुभि**—पु. १ एक मोठें चर्मवाद्य; नौबत; नगारा. 'अद्भुत तीन असे जे दुंदुभि ताडोनि फोडिले होते।' -मोसभा १.९०. २ साठ संवत्सरांपैकीं छप्पन्नावा संवत्सर. [सं.]

**दुदुरली**—स्त्री. एक वेली. हिचीं पानें लहान असून चवीस गुळमट लागतात. हिला रुईच्या फुलासारखीं फुलें येतात. -वगु ४.२३.

**दुधरी**—स्त्री. (कों.) एक भाजीचा वेल.

**दुधली**—वि. पाटीसारखी; मोठी टोपली एवढी. 'ढाल दुधली फिर्या लोखंडी एकूण' -वाड बाबा २.४२.

**दुधयाल**—पु. चवळीच्या जातीपैकीं एक वेल. चवळीचें दुसरें नांव. -कृषि ३३६.

**दुधाऽघोंट**—स्त्री. (गो.) सोडतां येत नाहीं व धरतां येत नाहीं अशी गोष्ट. [द्विधा+गोष्ट]

**दुधाणी**—स्त्री. पायाचे सांधे धरणाऱ्या चाळकबाऊ नांवाच्या विकारांत (पायाच्या) घोटयावर बांधतात ती मंतरलेली गारगोटी.

**दुर्धा**—स्त्री. (बडोदें) पायांच्या घोटयावर घालावयाचा स्त्रियाचा एक दागिना. -जनि पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या पृ. ७.

**दुनन, दुंभारन**—क्रिवि. (व.) दुसऱ्यानें; दुसऱ्यांदा. [सं. द्विगुण]

**दुनवणी**—स्त्री. पुनः नांगरणें; आडवें नांगरणें. 'जप तप नांगरणी। न लगे आटी दुनवणी।' -तुगा ३६०. [सं. द्विगुणी]

**दुन(नि)या**—स्त्री. जग; लोक; पृथ्वी; इहलोक. 'अलम-देश-दुनिया नजरेच्या टापूंत आणून देण्याइतकी एकादी लाट उभी चढली...'-गडकरी-राजसंन्यास ५. [अर. दुन्या] म्ह० १ धनावांचून दुनिया पंगू=पैशावांचून जगांत चालत नाहीं. २ दुनिया झुकती पण झुकविणारा पाहिजे=नादीं लागणारे, भुलणारे लोक जगांत पुष्कळ आहेत पण त्यांना नादीं लावणारा पाहिजे. (हिं.)

दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये. ३ दुनिया दुलंगी आहे =लोक दुतोंडे असतात. ०दार-पु. पृथ्वीपति. [फा. दुन्यादार्] ०दारी-स्त्री १ ऐहिक सुख; राज्यभोग. 'परन्तु दुनियादारी किस्मतींत थोडे दिवस होती.-ऐटि ३.१७. २ संसार; व्यवहार; लोकाचार. (क्रि० करणें). [फा. दुन्यादारी]

**दुनियाई, दुन्याई**—स्त्री. जग. 'याची बद्नामी दुनियाईत जाली.' -रा ५.२०.

**दुनी**—वि. दुप्पट 'बळ दुनी शरणागता। स्वामी वाहों नेदी चिंता।' -तुगा १६४. [सं. द्विगुणी]

**दुनी**—वि. दोन्ही. 'तेह वेळीं मा-भगौणिन घसरें चालतां। दुनी देहडी आंगें घालितां।' -शिशु ५६२.

**दुप(भ)ती**—वि. दूध देणारी (गाय, म्हैस इ०). [सं. दुग्धवती] ०गाय-धेनु-स्त्री. १ दूध देणारी, भाकड न झालेली गाय. २ (ल.) ज्याच्यापासून नेहमीं थोडाबहुत फायदा होतो असा उदार मनुष्य; नेहमीची खाण. म्ह० दुभत्या गाईच्या लाथा गोड. ०ध्यानवा-स्त्री. (अशिष्ट) दुभती धेनु.

**दुपक**—वि. १ अंशतः दोन दिवस (तिथी इ०) आल्यामुळें त्या तिथीचें धर्मकृत्य आज करावें कीं उद्यां करावें इ० वादाला पात्र झालेली (तिथि). २ ज्याविषयीं दोन मतें, मतभेद आहे असा (मुद्दा, तिथि, आचारसरणी इ०). [दु+पक्ष=बाजू]

**दुपकी**—स्त्री. चरतां चरतां जनावरानें दूर जाऊं नये म्हणून त्याच्या दोन पायांस बांधितात ती दोरी; कळवा.

**दुपट**—न. (व.) उपरणें. दुपट्टा पहा.

**दुप(भ)तें**—न. १ (व्यापक) दूध देणारें, घरीं पाळलेलें जनावर. २ दूध, दहीं, तूप इ०. ३ दूध काढणें, विरजण लावणें, लोणी काढणें इ०काम; दुधाबाबत कामकाज. 'तुमच्या घरीं दुपतें कोण करतो?' ४ (ल.) ज्याकडे सदासर्वदा पाहिलें पाहिजे, ज्याची अत्यंत काळजीपूर्वक निगा ठेवावी लागते अशी गोष्ट, धंदा, मूल, दुखणें इ०. [सं. दुह्]

**दुपवणें**—अक्रि. (व.) (स्त्रीचा) गर्भपात होणें; नासावणें; दुवेतणें; धुपावणें पहा.

**दुपेटा**—पु. शेला. दुपटा, दुपट्टा पहा.

**दुपेटा**—वि. साखरेची एक जात. दावोटा साखर पहा.

**दुब-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. डुबकन, धबकन पहा [ध्व.]

**दुबका**—पु (कों.) बुक्की; ठोसा; बुदका. [ध्व. दुब्]

**दुबजी**—स्त्री. (गो.) स्त्रियांचें लुगडयाच्या आंतून परकरासारखें नेसावयाचें वस्त्र.

**दुबदुबणें**—अक्रि. (फुगलेलें पोट, ढेरपोट, पिकलेलें कलिंगड इ० हातानें थापटलें असतां) दुबदुब वाजणें. [ध्व. दुब्]

**दुबदुबीत**—वि. १ हातानें थापटलें असतां दुब्दुब् आवाज करणारें (कलिंगड, ढेरपोट इ०). २ (ल.) संदिग्ध; निश्चितपणें खरी वा खोटी न ठरलेली; उडत आलेली (बातमी, वर्तमान इ०). [ध्व. दुब्]

**दुबळवाडा-डी**—पुस्त्री. दैन्य; दारिद्य; लाचारपणा; दुबळेपणा; अगतिकत्व. (क्रि० एखाद्यावर पडणें; एखाद्याची होणें). 'तयातें साम्याचिये वाढी। ऐक्याची सांडे कुळवाडी। तेथ भेदाचिया दुबळवाडी। नेणिजे तो।' -ज्ञा ७.१७९. [दुबळा]

**दुबळा**—वि. १ विद्या, संपत्ति इ० बलानें हीन; निराधार; अगतिक; दरिद्री; लाचार; सामर्थ्यहीन. 'लाहान थोर दुबळीं पाबळीं। गांवजेवण सकळ सकळीं।' -सप्र १४.१५. २ रोड; अशक्त; निर्बल. [सं दुर्बल; प्रा. दुब्बल] **दुबळ्या देवाची दीपमाळ**-स्त्री. १ एखाद्या क्षुद्र देवापुढें दगड रचून, दांडी रोवून केलेली ओबडधोबड दीपमाळ. २ (ल) दुबळ्या, पंगु अथवा दरिद्री नवऱ्याची दुबळी बायको. ३ उंच, किडकिडीत, कुरूप मनुष्य. **दुबळेचार**-पु (गो.) दुबळेपणा. [दुबळा]

**दुबळा**—पु. मुंबई इलाखा व बडोदें संस्थान यांत आढळणारी एक हलकी जात. -ज्ञाको (द) १२९.

**दुबळें**—न. दैन्य; लाचारपणा; नष्टचर्य; अगतिकत्व. 'चार वर्षे मीं दुबळें भोगिलें.' [दुबळा]

**दुंबा बकरा**—पु. काबुली डोंगरांत असणारा एका जातीचा बकरा याची शेंपूट मोठी, गोल, कापसाच्या गिरदीसारखी चरबी भरलेल्या चकतीप्रमाणें असते. याचें मांस खातात. -गृशि २.५. [फा. दुम=शेंपूट+बकरा]

**दुबी(भी)राजा**-पु. (गोटयांचा खेळ) (सांकेतिक) दुसरा नेम मारणारा.

**दुबोटा**—पु. एक हलक्या प्रकारची साखर; दावोटा साखर, दुपेटा पहा.

**दुभणी**—स्त्री. १ पान्हा. २ दूध काढणें; दोहन. 'कामधेनूचीं दुभणीं। निःकामासी न लगती।' -दा १.४.२६. [सं. दोहन]

**दुभणें**—अक्रि. १ (म्हैस इ० कार्नी) धार काढतांना दूध देणें; पान्हवणें. 'वोरसोनि लोभें। विष काय अमृतें दुभे।' -अमृ ७.९९. 'वांझ गाई दुभती। देवा ऐसी तुझी ख्याती।' -तुगा ६२९. २ (ल.) (ताड, माड इ० वृक्षापासून) रसस्राव होणें. ३ (ल.) (जखम, फोड इ०) पुवळणें; वाहूं लागणें. ४ (एखादा व्यवहार, व्यापार क्रिया इ०) आपापलें फळ देऊं लागून चालू असणें. -उक्रि. (कों.) दूध, धार काढणें; (विरू.) दुहणें. [सं. दुह्] म्ह० ज्याही पाहुणा आला तरी रेडा दु

निकडीची, अडचणीची वेळ असली तरी अशक्य गोष्ट शक्य होत नाहीं.

**दुभती, दुभतें, दुभतोगाय-धेनु**—दुपती, दुपतें इ० पहा. 'शास्त्रांची दुभतीं। पोसिती घरीं।' –ज्ञा १३.११३०. 'दुर्लभ लोकीं जसें सुरभीचें दुभतें।' –मोकृष्ण ४४.३. [सं. दुह्]

**दुभाळु**—वि. दुधाळ; पुष्कळ दूध देणारी. 'सर्व तीर्थे हरि दुभालु धेनुवा।' –मुक्ताबाईचा गाथा १३. [सं. दुह्]

**दुभीनणें**—१ (काव्य.) दोहणें; दूध देणें. 'दुभीनली जगापुरतें। श्रीकृष्णगाय।' –ज्ञा १८.१६८९. २ दूध काढणें. 'ते कृष्णगाये दुभीनली कैशी।' –गीतार्चंद्रिका १८.७८. [दुभणेंचें कर्मणि रूप]

**दुम**—वि. मध्यम; दुय्यम. [फा. दुयुम्]

**दुम**—स्त्री. शेंपूट; पुच्छ. [फा. दुम्] **०करणें**–धूम ठोकणें; पळ काढणें; पाठ दाखविणें. 'म्हणती ठकडा रे कान्हा। लावी घांस भरी राना। दुम करि तो शाहणा। पाठोवाटीं तयाच्या।' –तुगा २३०. **०दार**–वि. शेंपूट असलेला; सपुच्छ. [फा. दुम्दार्] **दुम्दारी**–स्त्री. १ पाठपुरावा; मदत, पाठबळ. (क्रि० ठेवणें; राखणें). 'घोरपडे दुम्दारीस होते.' –शिचप्र ४४. २ पिछाडी. 'कडपेकरांचें पथक दुम्दारीस होतें.' –ख ४.१८३७. 'दुमदारीस सरलष्कर वगैरे सरंजामी पथकें नेमून दिले.' –मराचिथोशा ६०. ३ पिछाडीची फौज. 'पाठीमागील दुम्दारी अस्तमानचे सुमारास जागा सोडून गेली.' –ख ८.४०२६. [फा. दुम्दार्]

**दुम, दुय(व)म**—वि. दुय्यम पहा. **दुमजला-लीं**-वि. दोन मजल्यांचें (घर); दोन मजले डेक असलेलें (जहाज, आगबोट इ०); दुहेरी; दोन कांठ, संजाफ असलेलें (वस्त्र इ०). [दु+मजला]

**दुमची**—स्त्री. १ घोडयाच्या शेंपटीखालून जाणारा खोगिराचा बंद; लडी. 'गिलच्यास पगडी नाहीं व घोडयास दुमची नाहीं.' –भाब ९. २ (जनावराची मागची) तंगडी; लाथ; दुगाणी (अनेकवचनी प्रयोग) ३ (ल.) निकड; तगादा. (क्रि० लावणें; करणें) [फा. दुमूची] (वाप्र.) **०उचलणें**–अनेक कचाटे घालून (एखाद्याची) उचलबांगडी करणें. **०पुरविणें**–(आपलें कार्य साधण्यासाठीं एखाद्याची) पाठ, पिच्छा पुरविणें. **०सोडविणें**–(एखाद्यास) नामोहरम करून पळ काढावयास लावणें. 'त्यांणीं आपले हिमतीनें कंदाहाराचा पातशहा दुराणी गिलच्यायाची पगडी व दुमची सोडविली ते मर्यादा अजुनी चालते.' –भाब ९. **दुमच्या झाडणें**-(घोडा, गाढव इ० कानीं) लाथा मारणें; दुगाण्या झाडणें.

**दुमटणी**—स्त्री. दुमडण्याची, घडी घालण्याची क्रिया. [दु+मोडणें] **दुमटणें, दुमडणें, दुमतणें, दुमतविणें**–उक्रि. दुहेरी घडी करणें; दुणणें.

**दुमड**—स्त्री. १ दुहेरी घडी; सुरकुती; दुणी; दूण. (क्रि० घालणें.) २ (दुमडण्यानें वस्त्र इ० कास पडणारा) सळ; मोड; दूण. [दु+मोड] **दुमडणें**–उक्रि. दुमटणें.

**दुमडदुम**—क्रिवि. (ना.) तांतडीनें; लगबगीनें; थेट; परभारें.

**दुमण**—न. (कों.) १ भात झोडतेसमयीं कवळ, आयंडा बांधण्याकरितां घेतात ती दोरी. २ भात इ०कांची झोडण्याकरितां बांधलेली पेंडी, आयंडा.

**दुमणी-नी**—स्त्री. (कों. प्रां.) १ (घोडा इ० जनावराची) मागची तंगडी; लाथ; दुगाणी. (क्रि० झाडणें; उचलणें; लागणें). २ (जनावराचें) ढुंगण; ढिमोरा; चौक. [फा. दुम=शेपटी] **०मारणें**–(माण.) घोडयावर बसल्यानंतर त्यानें लौकर चालावें म्हणून त्याला टांचेनें बरगडीवर मारणें.

**दुमता**—वि. दुमडलेला; घडी केलेला. **दुमती**–स्त्री. दुमड. 'मुदनीप्रमाणें दुमती करून वळलेला भाग वर ठेवून दोन्ही शेंडे त्या खाडयांत मजबूत पुरतात.' –चिमा १२. [दुमोड]

**दुमदुम**—क्रिवि. डुमडुम. [ध्व दुम्]

**दुमदुमणें**—अक्रि. १ घुमणें; घुमघुमणें; दणदणणें; घोषणें; गाजणें. 'पुष्पांजली मंत्रघोष जयजयकार। दुमदुमी अंबर तेणें नादें।' –तुगा ८१. 'निद्राबळें घोरूं लागला। तेणें दिशा दुमदुमल्या।' 'शंख करी तेणें लंका। दुमदुमली समस्त।' –रावि १४.२२८. २ (सुगंध इ०) हवेंत पसरणें; दरवळणें; घमघमणें. ३ (काव्य.) (भावना इ० मनांत) उचंबळणें; प्रक्षुब्ध होणें. 'हृदयीं मद मत्सर दुमदुमती। वाचाबळें जन गोविती।' [ध्व. दुम् द्वि.]

**दुमदुमी(मि)त**—वि. १ फुगलेलें; तडस लागलेलें; फुगून ताठ झालेलें (पोट इ०). २ गोंडस; भरदार; टुणटुणीत (बैल इ०) ३ गबर; ऐपतदार, गडगंज (मनुष्य इ०) ४ दरवळणारा; घमघमणारा (सुगंध इ०). -क्रिवि. खच्चून; कोंदून. 'अवघें जगचि महासुखें। दुमदुमित भरलें।' –ज्ञा ९.२००. [दुमदुमणें]

**दुमनी**—स्त्री. दुमणी पहा.

**दुमळावचें**—सक्रि. (गो.) त्रास देणें.

**दुमाडी**—स्त्री. (गो.) धांदल; गोंधळ.

**दुमान, दुमाणूं-नूं**—न. (गो.) करट; गळू. 'तंव मनुष्य आणि मोन जातींतें। दुमानें करटें जाहालीं सकलातें।' –ख्रिपु १.१६.८७.

**दुमाला, दुम्बाला**—पु. १ मागची बाजू; पिच्छाडी. २ (ल.) दुजोरा; मदत; पाठबळ. (क्रि० देणें; एखाद्याचा दुमाला राखणें; ठेवणें; उचलणें; संभाळणें; पुरविणें). ३ पाठलाग; पिच्छा. 'पाखांडयांनीं पाठी पुरविला दुमाला। तेथें मी विठ्ठला काय बोलों।' –तुगा ८९२. 'एक ससा पैदा झाला त्यानें कुतरियाच

दुमाला घेऊन कुतरा मारिला.' –भाअ १८३४. ४ रुंदी: विस्तार; भिंतींत झांकला जावयाचा भाग; खोली ( चिरा, इमारतीचा दगड, तोंड, फाड इ० कांसंबंधीं ). दुमालदार पहा. 'डबर मिळतील तितके समचतुष्कोन चांगल्या दुमाल्याचे, उचलण्याजोगे असावे.' –मॅरट २. [फा. दुम्बाला] (वाप्र.) ०धरणें, धरून असणें–( एखाद्याजवळ ) आश्रयार्थ, रक्षणार्थ येऊन राहाणें; ( एखाद्याला ) चिटकून असणें. –०पुरविणें–मदत देणें: साहाय्य करणें. ०सोडणें–( एखाद्यास दिलेला ) आश्रय काढून घेणें. दुमाल्यावर असणें–( एखाद्याच्या ) पाठीशीं ( उत्तेजन, हुकूम, मदत देण्याकरितां ) असणें. –पाब १२. दुमाल्यावर पाठविणें–( एखाद्याच्या ) पाठलागाकरितां पाठविणें. दुमाल्यास लावणें–१ खालीं लिहिणें: जोडणें.

**दुमाला**—वि. १ दोन मालक असणारा गांव,वतन. २ जमीनमहसुलासंबंधी सरकारच्या हक्कापुरता कोणा मनुष्यास सर्वांशीं अगर अंशत: दिलेला हक्क. 'पुणें तालुक्यांत दुमालेगांव पंचवीस आणि खालसा पौणशे.' ३ सरकारखालसातीकडे नसुन लोकांकडे पर भारें माफीनें चालणारा गांव, जमीन इ०. याचे इनाम, सरंजाम, इसाफत, अग्रहार, पासोडी, हाडवळा, खैरात, बालपरवर्षी, नानपरवर्षी, सरदेशमुखी, चौथाई, जाहागिर, मोकासा, साहोत्रा, वेचणी, गिराणी, पसाइत, चाकराइत, वजीफा, गिरास, सौदिया, वांटा इ० बावीस प्रकार आहेत –इनाम २५. ४ स्वाधीन; हस्तगत. 'मौजे मजकूर हा गांव यांचे दुमाला करून... ...' –वाडसमा २ ९५. ५ पूर्वीच्या मालकाचा निर्वंश झाल्यावर सरकारजमा होणारें (इनाम) [ दु=दोन+माल=मत्ता; फा. दुबाल् ] **दुमाला, दुबाला, दुमाळा–ळे**–क्रिवि. ताब्यांत. 'पैकीं नीम चावर आपले दुमाला केले आहे.' –शिवचरित्र साहित्य २.१६३. 'कुलबाब, कुलकानू दुबाला असे' –शिवचरित्र साहित्य २.१६३. **दुमाल अम्मल**–पु. दोन सरकारांचा अम्मल; सरकारी व जहागिरी असे दोन अम्मल; दोन मालकांचा ताबा. [ दुमाला+अम्मल ] **दुमाल झाडा**–पु. १ दुमाले गांवांची यादी. २ दुमाल जमिनींच्या मालकीसंबंधीं सरकारी चौकशी. **दुमालदार**–पु. दुमाले गांवाच्या ( दोन ) मालकांपैकीं प्रत्येक; इनामदार. 'माजगांव तर्फ सातारा हा गांव दुमालदारखेरीजकरून बाकी सुभाकडील अम्मल बेगमीबद्दल पेस्तर सालापासून लावून दिला.' –वाडसमा १.३६. **दुमाल पत्र**–न. नवीन अम्मलदार आला असतां इनामदारास जुन्या अंमलदारापासून आपल्या इनामांचें इनाम पत्र लिहून दाखल्यादाखल आणावें लागत असे तें. –भाअ १८३२. **दुमाले(ल)गांव**–पुन. १ दोन मालकांच्या अमलाखालचा गांव. २ पुढें सरकारजमा होणारा गांव; (सामा.) खालसा गांव. [ दुमाला+गांव ] **दुमाले(ल)पत्र**–न. हुंडी बरोबर खुलाशाबाबत दिलेलें पत्र; जोडलेलें पत्र [ दुमाला+पत्र ] शको. ४. ३४

**दुमाली**—वि. दुतर्फी.

**दुमाळदार**—वि. (गो.) त्रास देणारा.

**दुमाळॉ**—पु. (गो.) अतिशय त्रास.

**दुमेळावा, दुर्मेळावा**—पु. दुर्योग; कुयोग; अडचण. 'तैसीं कर्मे दुवाडें। तयां जन्मांतरची कडे। दुर्मेळावे येवडे। कर्मा मार्जी।' –ज्ञा १८.६६. [ दुर्=वाईट+मेळावा=मेळ; बनाव. ]

**दुय(य्य)म**—वि. १ दुसऱ्या प्रतीचा; गौण; मध्यम. २ (अधिकाऱ्याच्या) हाताखालचा; खालच्या दर्जाचा ( अधिकारी ). [फा. दुयुम्] ०पुरावा–पु. ( पुराव्याचा कायदा ) सरकारी सहीशिक्क्याच्या नकला किंवा यंत्राच्या साहाय्यानें मूळावरहुकूम काढलेल्या प्रती इ०नीं दिलेला पुरावा; मुळावरून केलेल्या व रुजवात घेतलेल्या नकलेचा पुरावा; ज्यानें मूळ लेख वाचला आहे त्यानें तोंडीं सांगितलेला मजकूर; ( इं ) सेकंडरी एव्हिडन्स्.

**दुर्**—अ. दुष्टपणा: वाईटपणा, कठिणपणा, दु:ख इ०कांच्या वाचक शब्दापूर्वी योजावयाचा उपसर्ग. जसें:–दुराचार=वाईट वर्तणूक; दुर्लभ=मिळण्यास कठिण; दुस्सह=सहन करण्यास कठिण इ०. याची संधिनियमानुरूप दुर्, दुम्, दुष्, दुश् इ० रूपें होतात. जसें:– दुर्लभ दुष्कर, दुश्चल, दुस्सह, दुस्साध्य, दुराचार, दुरंत इ. हा उपसर्ग जोडून अनेक सामासिक शब्द बनतात. त्यांपैकीं कांहीं येथें दिले आहेत. **दुरंत**–वि. १ अपार; अनंत; अमर्याद: अंत लागण्यास कठिण असा ( मोह, माया इ० ). २ अतिशय कठिण; तीव्र (दु:ख इ० ). [ दुर्+अंत=शेवट ] **दुरतिक्रम**–वि. १ ओलांडून जाण्यास कठिण: दुस्तर: दुर्लंघ्य. २ असाध्य. [ दुर्+अतिक्रम=ओलांडणें ] **दुरत्यय–यी**–वि. १ नाश करून टाकण्यास कठिण. २ प्रतिबंध करण्यास, टाळण्यास कठिण; अपरिहार्य. ३ असाध्य ( दु:ख, आजार, रोग इ० ). अप्रतीकार्य ( अडचण, संकट ). ४ मन वळविण्यास कठिण असा ( मनुष्य ): दुराराध्य. [ दुर्+अत्यय=पार पडणें, जाणें इ० ] **दुरदृष्ट**–न. दुर्दैव; वाईट अदृष्ट 'कीं आड आलें दुरदृष्ट माझें।' –सारुह १.१०. [ दुर्+अदृष्ट ] **दुरधिगम्य**–वि. १ समजण्यास कठिण; दुर्बोध; दुर्ज्ञेय. २ दुष्प्राप्य: मिळण्यास कठिण; दुर्गम. [ दुर्+सं. अधि+गम्=मिळविणें ] **दुरभिमान**–पु. पोकळ, वृथा, अवास्तव अभिमान; फाजील गर्व. [दुर्+अभिमान] **दुरवबोध**- वि. दुर्बोध; गूढ. [ दुर्+सं. अव+बुध्=जाणणें ] **दुराकांक्षा**–स्त्री. दुष्प्राप्य वस्तूचा अभिलाष. [ दुर्+आकांक्षा=इच्छा, अभिलाष ] **दुराग्रह**-पु हट्ट, लोकविरोध, शास्त्रविरोध, संकटें इ०कांना न जुमानतां एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविण्याचा हट्ट: अनिष्ट आग्रह. 'न सुखद दुराग्रह सखा हा सर्वाऽनर्थ गेह टक राया।' –मोकर्ण ४६.५०. [ दुर्=वाईट+आग्रह=हट्ट ] **दुराग्रही**-वि दुराग्रह धरण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा: हेकेखोर: हटवादी; हट्टी [ दुराग्रह ] **दुराचरण, दुराचार**–नपु. निंद्य, वाईट, वागणूक;

दुर्वर्तन; दुष्ट आचरण [ दुर्=दुष्ट+सं आचरण=वर्तन] **दुराचरणी**, **दुराचारी**–वि. निंद्य, वाईट, दुष्ट वर्तनाचा; वदफैली [दुराचार] **दुरात्मत्व**–न. १ दुष्ट अंतःकरण; मनाचा दुष्टपणा. २ दुष्ट कृत्य. 'किमपि दुरात्मत्व घडलें।' [दुर्=दुष्ट+आत्मा=मन] **दुरात्मा**–वि. दुष्ट मनाचा (मनुष्य); खट; शठ. [दुर्+आत्मा] **दुराधर्ष**–वि. जिंकण्यास, वर्चस्वाखालीं आणण्यास कठिण. [दुर्+सं. आ+धृष्=जिंकणें] **दुराप**–वि मिळविण्यास कठिण; दुर्लभ; अप्राप्य. 'राया, भीष्माला जें सुख, इतरां तें दुराप, गा, स्वापें।' –मोभीष्म६ २९. **दुराप(पा)स्त**–वि घडून येण्यास कठिण; दुर्घट; असंभाव्य. 'वाळूचें तेल काढणें ही गोष्ट दुरापस्त आहे.' [दुर+सं. अप+अस्= ] **दुराराध्य**–वि. संतुष्ट, प्रसन्न करण्यास कठिण, अशक्य; मन वळविण्यास कठिण 'मोक्षु दुराराध्यु कीर होय। परि तोही आराधी तुझे पाय।' –ज्ञा ११.९९. [दुर्+सं. आराध्य] **दुराशा**–स्त्री. निरर्थक, फोल, अवास्तव आशा; दुष्प्राप्य गोष्टीची आशा दुष्टवासना 'आम्हास अन्न खावयास मिळेना आणि पालखींत बसण्याची दुराशा धरावी हें चांगलें नव्हे.' 'दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणी।' –राम १६८. [दुर्+आशा] **दुरासद**–वि. कष्टानें प्राप्त होणारें; जिंकण्यास, मिळण्यास कठिण. [दुर+सं. आ+सद्=मिळविणें] **दुरित**–न. पाप; पातक; संचितकर्म. 'पुन्हां न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो।' –केका ११९. [दुर्+सं. इ=जाणें] **दुरुक्त**–न. वाईट, दुष्टपणाचें, अश्लील भाषण. [दुर्+सं. उक्त=बोललेलें; भाषण] **दुरुक्ति**–स्त्री. वाईट भाषण; शिवी; अपशब्द; दुर्भाषण; अश्लील बोलणें. [दुर्+उक्ति=बोलणें] **दुरुत्तर**–न. अपमानकारक, उर्मटपणाचें उत्तर; दुरुक्ति. [दुर्+उत्तर] **दुरुद्धर**–वि. खंडण करण्यास, खोडून काढण्यास कठिण असा (पूर्वपक्ष, आक्षेप, आरोप). 'या सिद्धांतावर दोष दिला हा सर्वांस दुरुद्धर आहे.' [दुर्+सं. उद्+धृ=काढून टाकणें; वर, बाहेर काढणें] **दुरूह**–वि दुर्बोध; गूढ; अतर्क्य. 'ईश्वरानें सृष्टि कशी उत्पन्न केली हें सर्वांस दुरूह आहे.' [दुर्+सं. ऊह्=अनुमानणें] **दुर्गत**–वि. गरीब; दीन. दरिद्री; लाचार. 'झांकी शरपटलानीं आढय जसा दुर्गतांसि वस्त्रांनीं।' –मोभीष्म ९.६५ [दुर्+सं. गत=गेलेला] **दुर्गति**–स्त्री. १ दुर्दशा; वाईट स्थिति; संकटाची, लाजिरवाणी स्थिति; अडचण; लचांड. २ नरक; नरकांत पडणें. [दुर्+गति=स्थिति] **दुर्गंध-गंधी**–पुस्त्री. घाण; वाईट वास. –वि. घाण वास येणारें [दुर्=वाईट+सं. गंध=वास] **०नाशक**–वि. (रसा.) दुर्गंधाचा नाश करणारें; (इं.) डिओडरंट्. [दुर्गंध+सं. नाशक=नाश करणारा] **दुर्गंधिल**–वि (रसा.) आर्सेनिक व मेथिल यांच्या संयोगापासून बनलेला विषारी, दुर्गंधी (पदार्थ) (इं.) कॅकोडिल्. **दुर्गम**–वि. जाण्यास कठिण (स्थळ, प्रदेश इ०). [दुर्+सं. गम्=जाणें] **दुर्गुण**–पु. वाईट गुण; दोष; अवगुण; दुर्मार्गाकडील कल. (क्रि० आचरणें). [दुर्+गुण] **दुर्गुणी**–वि. वाईट गुणांचा; अवगुणी; दुराचरी; दुर्वर्तनी. [दुर्गुण] **दुर्घट**–वि. घडवून आणण्यास, घडून येण्यास, सिद्धीस नेण्यास कठिण. [दुर्+सं. घट्=घडणें, घडवून आणणें] **दुर्घटना**–स्त्री. अशुभ, अनिष्ट गोष्ट घडणें; आकस्मिक आलेलें संकट, वाईट परिस्थिति. [दुर्+सं. घटना=स्थिति] **दुर्घाण**–स्त्री. दुस्सह घाण; ओरढाण; उग्रघ्राण. [दुर्+घाण] **दुर्जन**–पु. वाईट, दुष्ट मनुष्य. [दुर्+जन=मनुष्य, लोक] **दुर्जय**–वि. १ जिंकण्यास कठिण. २ दुस्साध्य; दुस्तर. [दुर+सं. जि=जिंकणें] **दुर्जर**–वि. पचविण्यास, जिरवळण्यास कठिण. [दुर्+सं. जॄ=जिरणें] **दुर्दम**–वि. दमन करण्यास, वर्चस्वाखालीं आणण्यास कठिण. 'तिला इंग्लंडांतील प्रबल व दुर्दम प्रजाजनांच्या अडथळ्याशिवाय दुसरें कोणतेंच नियमन नसे.' –पाले ६. [दुर्+दम्] **दुर्दर्श**–वि. दिसण्यास, पाहण्यास कठिण; अतिशय अस्पष्ट. [दुर्+सं. दृश्=पाहणें] **दुर्दशा**–स्त्री. अवनतीची, अडचणीची, संकटाची, वाईट, दुःखद स्थिति; दुर्गति; दुःस्थिति. 'भिजल्यामुळें शालजोडीची दुर्दशा जाली.' [दुर्+दशा=स्थिति] **दुर्दिन**–न. १ वाईट दिवस. २ अकालीं अभ्रें आलेला दिवस. ३ वृष्टि. –शर. [दुर्+सं. दिन=दिवस] **दुर्दैव**–न. कमनशीब; दुर्भाग्य. 'कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें।' –मोसंशयरत्नमाला (नवनीत पृ. ३४९). –वि. कमनशिबी; अभागी. [दुर्+दैव=नशीव] **दुर्दैवी**–वि. अभागी; कमनशिबी. [दुर्दैव] **दुर्धर**–पु. एक नरकविशेष. [सं.] **दुर्धर**–वि. १ धारण, ग्रहण करण्यास कठिण. २ दुस्साध्य; दुष्प्राप्य. ३ (काव्य) (व्यापक) बिकट; खडतर; असह्य; उग्र; कठिण. 'तप करीत दुर्धर। अंगीं चालला घर्मपूर।' ४ भयंकर; घोर; भयानक. 'महादुर्धर कानन।' [दुर्+सं. धृ=धरणें, धारण करणें] **दुर्धर्ष**–वि. दुराधर्ष; दमन करण्यास, वर्चस्वाखालीं आणण्यास कठिण; दुर्दम्य; अनिवार्य. [दुर्+धृष्=जिंकणें, वठणीवर आणणें] **दुर्नाम**–न. अपकीर्ति; दुष्कीर्ति; बदनामी. [दुर्+सं. नामन्=नांव] **दुर्निमित्त**–न. अन्याय्य, निराधार कारण, सबब, निमित्त. [दुर्+निमित्त=कारण] **दुर्निर्वह**–वि. १ दुःसह; असह्य; सहन करण्यास कठिण; निभावून जाण्यास, पार पडण्यास कठिण(अडचण, संकट). २ दुस्साध्य; दुष्कर; [दुर्+सं. निर्+वह्] **दुर्निवार, दुर्निवारण**–वि. १ निवारण, प्रतिबंध करण्यास कठिण; अपरिहार्य; अनिवार्य २ कबजांत आणण्यास कठिण; दुर्दम्य. [दुर्+नि+वृ] **दुर्बल–ळ**–वि. १ दुबळा; अशक्त; असमर्थ. २ गरीब; दीन; दरिद्री. 'ऐसें असतां एके दिवशीं। दुर्बळ द्विज आला परियेसीं।' –गुच ३८.७. [दुर्+बल=शक्ति] **दुर्बळी**–वि. (काव्य.) दुर्बळ पहा. **दुर्बुद्ध**–वि. १ दुष्ट बुद्धीचा; खुनशी वृत्तीचा. २ मूर्ख; मूढ; मंदमति; ठोंब्या. [दुर्+बुद्धि] **दुर्बुद्धि**–स्त्री. १ दुष्ट मनोवृत्ति; खुनशी स्वभाव;

मनाचा दुष्टपणा. 'दुर्बुद्धि ते मना। कदा नुपजो नारायणा।' –तुगा ७९८. २ मूर्खपणा; अनिष्ट परिणामकारक बुद्धि –वि दुष्ट मनाचा; दुर्बुद्ध पहा. [ दुर्+बुद्धि ] **दुर्बोध**–वि. समजण्यास कठिण ( ग्रंथ, भाषण इ० ). [दुर्+बोध्=समजणें, ज्ञान] **दुर्भग**–वि. कमनशिबी; दुर्दैवी; भाग्यहीन. [ दुर्+सं. भग=भाग्य ] **दुर्भर**–वि. भरून पूर्ण करण्यास कठिण; तृप्त करण्यास कठिण (पोट, इच्छा, आकांक्षा). 'इंद्रियें वज्रघातें तपे उष्ण वरी ज्वाळ। सोसिलें काय करूं दुर्भर हें चांडाळ।' –तुगा ३५४. –न. ( ल. ) पोट 'तरा दुस्तरा त्या परासागरातें। सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें।' –राम ८०. [ दुर्+ सं. भृ=भरणें ] **दुर्भक्ष्य**–वि. खाण्यास कठिण, अयोग्य; अभक्ष्य. [ दुर्+सं. भक्ष्य=खाद्य ] **दुर्भाग्य**–न. कमनशीब; दुर्दैव. –वि. दुर्दैवी; अभागी. [दुर्+सं. भाग्य=दैव] **दुर्भाव**–पु १ दुष्ट भावना; कुभाव; द्वेषबुद्धि. २ ( एखाद्याविषयींचा ) संशय. वाईट ग्रह; ( विरू. ) दुष्टभाव. [ दुर्+भाव=भावना, इच्छा ] **दुर्भाषण**–न. वाईट, अपशब्दयुक्त, शिवीगाळीचें बोलणें; दुर्वचन पहा. [ दुर्+ भाषण=बोलणें ] **दुर्भिक्ष**–न. १ दुष्काळ; महागाई. २ ( दुष्काळ इ० कांत होणारी अन्नसामुग्री इ० कांची ) टंचाई; कमीपणा; उणीव. [ सं. ] **०रक्षित**–वि. दासांतील एक प्रकार; आपलें दास्य करावें एतदर्थ दुष्काळांतून वांचविलेला ( दास, गुलाम इ० ). –मिताक्षरा–व्यवहारमयूख दाय २८९. [ दुर्भिक्ष+सं. रक्षित=रक्षण केलेला ] **दुर्भेद**–वि. बुद्धीचा प्रवेश होण्यास कठिण; दुर्बोध. 'तैसे दुर्भेद जे अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय।' –ज्ञा ६.४५९. [ दुर्+सं. भिद्=तोडणें ] **दुर्भेद्य**–वि. फोडण्यास, तुकडे करण्यास कठिण ( हिरा; तट ). [ दुर् +सं. भेद्य=फोडण्यासारखा ] **दुर्मति**–स्त्री. १ दुर्बुद्धि; खाष्टपणा; कुटिलपणा. २ मूर्खपणा; खूळ; वेडेपणा. –पु. एका संवत्सराचें नांव. –वि. १ दुष्ट बुद्धीचा; खाष्ट स्वभावाचा. २ मूर्ख; खुळा; वेडा. [ दुर्+मति=बुद्धि, मन ] **दुर्मद**–पु. दुराग्रहीपणा; हेकेखोरी; गर्विष्ठपणाचा हट्टवादीपणा. 'किती सेवाल धन दुर्मदा' –अमृतपदें ५८. –वि. मदांध; मदोन्मत्त; गर्विष्ठ. 'सावियाचि उतत होते दायाद। आणि बळिये जगीं दुर्मद।' –ज्ञा ११.४८०. [ दुर्+मद=गर्व ] **दुर्मनस्क, दुर्मना**–वि. खिन्न; उदास मनाचा. विमनस्क; दुःखित. [ दुर्+ सं. मनस=मन ] **दुर्मरण**–न. ( वाघानें खाऊन, पाण्यांत बुडून, सर्प डसून इ० प्रकारांनीं आलेला ) अपमृत्यु; अपघातानें आलेलें मरण; अमोक्षदायक मरण. [ दुर्+मरण ] **दुर्मि(र्मी)ल–ळ**– वि. मिळण्यास कठिण; दुर्लभ. [दुर्+सं. मिल्=मिळणें] **दुर्मुख**– पु. एका संवत्सराचें नांव. –वि. १ घुम्या; कुरठा; तुसडा; आंबट तोंडाचा. २ तोंडाळ; शिवराळ; शिनाळ जिभेचा. 'दुर्मुखी स्त्रीचा त्याग करून। संन्यास ग्रहण करावा।' [ दुर्+मुख ] **दुर्मुखणें**– अक्रि. तोंड आंबट होणें; फुरंगुटणें; गाल फुगविणें; ( एखाद्या कार्याविषयीं ) उत्साहशून्यतेची चर्या धारण करणें. 'खायास म्हटलें म्हणजे हांसत येतात आणि उद्योगाचें नांव घेतलें म्हणजे लागलेच दुर्मुखतात.' [ दुर्मुख ] **दुर्मुखला**–वि. आंबट चेहऱ्याचा; घुम्या; कुरठा; तुसडा. [ दुर्मुख ] **दुर्मेधा**–वि. १ मंदबुद्धीचा. २ दुष्ट स्वभावाचा; दुर्मति. [दुर्+सं. मेधा=बुद्धि] **दुर्योग**–पु. सत्तावीस योगांतील अशुभ, अनिष्ट योगांपैकीं प्रत्येक. [ दुर्+योग ] **दुर्लंघ्य**–वि. १ ओलांडता येण्यास कठिण; दुस्तर (नदी इ०). २ मोडता न येण्यासारखी, अनुल्लंघनीय (आज्ञा, हुकूम, शपथ इ०). ३ निभावून जाण्यास कठिण (संकट, अडचण इ०). ४ घालविण्यास, दवडण्यास, क्रमण्यास, नेण्यास कठिण (काळ, वेळ इ०). [दुर्+सं. लंघ्य=ओलांडावयाजोगें ] **दुर्लभ**–वि. मिळण्यास कठिण; अलभ्य; दुर्मिळ; दुष्प्राप्य; विरळा. 'अलीकडे आपलें दर्शन दुर्लभ जालें. **दुर्ललित**–न. चेष्टा; खोडी. 'आमच्या विविध दुर्ललिताबद्दल गुरुजींनीं कसें शासन केलें...' –आश्रमहारिणी ७. [ दुर्+सं. ललित=वर्तन, चेष्टा] **दुर्लक्ष**–न. लक्ष नसणें; हयगय; निष्काळजीपणा; गफलत; अनवधान. –वि. १ लक्ष न देणारा; अनवधानी; गाफील; बेसावध. 'तुम्ही गोष्ट सांगितली पण मीं दुर्लक्ष होतों म्हणून ऐकिली नाहीं.' २ दिसण्यास, समजण्यास कठिण; 'ईश्वराचें निर्गुण स्वरूप दुर्लक्ष आहे.' [दुर्+सं. लक्ष्य] **दुर्लक्षण**– न. १ ( मनुष्य, जनावर इ० कांचें ) अशुभसूचक लक्षण, चिन्ह; दुश्चिन्ह; दोष; वाईट संवय; खोड; दुर्गुण. 'हा घोडा लात मारतो एवढें यामध्यें दुर्लक्षण आहे.' [दुर्+लक्षण=चिन्ह] **दुर्लक्षण–णी**– वि. १ दुर्लक्षणानें, वैगुण्यानें युक्त ( मनुष्य, घोडा इ० ). (विरू ) दुर्लक्षणी. २ दुर्गुणी; दुराचारी; दुर्वर्तनी **दुर्लक्ष्य**–वि. १ बुद्धीनें, दृष्टीनें अज्ञेय; अगम्य. २ दुर्लक्ष इतर अर्थी पहा. [दुर्+सं लक्ष्य] **दुर्लौकिक**–पु. अपकीर्ति; दुष्कीर्ति; बेअब्रू; बदनामी; कुप्रसिद्धि. [ दुर्+लौकिक=कीर्ति ] **दुर्वच, दुर्वचन, दुर्वाक्य**–न. १ वाईट बोलणें; दुर्भाषण; अशिष्टपणाचें, अश्लील, शिवीगाळीचें भाषण. २ अशुभ, अनिष्टसूचक भाषण. [ सं. दुर्+वचस्, वचन, वाक्य= बोलणें ] **दुर्वह**–वि. १ वाहण्यास, नेण्यास कठिण. २ सोसण्यास, सहन करण्यास कठिण [ दुर्+सं. वह्=वाहणें, नेणें ] **दुर्वाड**– वि. अतिशय मोठें; कठिण. –शर. प्रतिकूल [ दुर्+वह् ] **दुर्वात**– उलट दिशेचा वारा. 'तुज महामृत्यूचिया सागरीं। आतां हे त्रैलोक्यजीविताची तरी। शोकदुर्वातलहरी। आंदोळत असे।' –ज्ञा ११.३४८. [ दुर्+सं वात=वारा ] **दुर्वाद**–पु. वाईट शब्द; दुर्वच; वाईट बोलणें; भाषण. 'हां गा राजसूययागाचिया सभासदीं। देखतां त्रिभुवनाची मांदी। कैसा शतधा दुर्वादी। निस्तेजिलासी।' –ज्ञा ११.१०१. [ दुर्+वाद=बोलणें ] **दुर्वार**–वि. दुर्निवार; अनिवार्य; टाळण्यास, प्रतिकार करण्यास कठिण; अपरिहार्य. २ आवरतां येण्यास कठिण; अनिवार; अनावर. [ दुर्+वारणें ]

**दुर्वास**-पु. १ (व.) सासुरवास; कष्ट; त्रास; जाच. [दुर्+वास=राहणें] **दुर्वासना**-स्त्री. वाईट इच्छा; कुवासना; दुष्प्रवृत्ति. [दुर्+वासना] **दुर्विदग्ध**-वि. विद्येंत न मुरलेला तथापि विद्येचा गर्व वाहणारा; अर्ध्या हळकुंडानें; पिवळा झालेला. [दुर्+सं. विदग्ध=विद्वान्] **दुर्विपाक**-पु. वाईट परिणाम. [दुर्+सं. विपाक=परिणाम] **दुर्विभावनीय**-वि. समजण्यास, कल्पना करण्यास कठिण. [दुर्+सं. विभावनीय=कल्पना करतां येण्यासारखें] **दुर्वृत्त**-वि. दुराचारी; दुर्व्यसनी; दुर्वर्तनी. [दुर्+सं. वृत्त=वागणूक] **दुर्वृत्ति**-स्त्री. दुराचरण; भ्रष्टाचार; बदफैली. [दुर्+सं. वृत्ति=वर्तन] **दुर्व्यसन**-न. दुराचरणाची संवय; द्यूत, मद्यपान, वेश्यागमन इ०कांसारखें वाईट व्यसन. 'दुर्व्यसन दुस्तरचि बहु सुज्ञासहि फार कंप देतें हो' -वत्सलाहरण. [दुर्+व्यसन] **दुर्व्यसन-नी**-वि. वाईट व्यसन, संवय लागलेला; दुराचारी; बदफैली. (प्र.) दुर्व्यसनी. **दुर्व्रात्य**-वि. अतिशय दुष्ट; व्रात्य; खोडकर; खट्याळ; (मुलगा अथवा त्यांचें आचरण). [दुर्+व्रात्य=खोडकर, द्वाड] **दुर्हृद**, **दुर्हृदय**-वि. वाईट, दुष्ट मनाचा. [दुर्+सं. हृद्, हृदय=मन] **दुर्ज्ञेय**-वि. समजण्यास कठिण; गूढ; गहन. 'ही पद्धत कशी सुरू झाली असावी हें समजणें दुर्ज्ञेय आहे.' -इंमू ७६ [दुर्+सं. ज्ञेय=समजण्याजोगें] **दुःशक**-वि. करण्यास कठिण; अशक्यप्राय. [दुस्+सं. शक्=शकणें] **दुःशकुन**-पु. अपशकुन; अनिष्टसूचक चिन्ह. [दुस्+शकुन] **दुश्शील**, **दुःशील**-वि. वाईट शीलाचा; दुराचरणी. [दुस्+शील] **दुश्चरित्र**-न. पापाचरण; दुष्कृत्य. [दुस्+चरित्र] **दुश्चल**-वि. (अक्षरशः व ल.) पुढें जाण्यास, सरसावण्यास, चालण्यास कठिण. [दुस्+सं. चल्=चालणें] **दुश्चि(श्ची)न**-वि. १ (काव्य) अयोग्य, चुकीचा, अपराधी (माणूस, कृत्य). 'अंगुष्ठ धरुनि मस्तकपर्यंत। अखंड दुश्चित आचरलों।' २ खिन्न; उदास; दुःखी. 'राजा प्रजा पिडी। क्षेत्री दुश्चितामी तोडी।' -तुगा२९८४. [सं. दुश्चित अप] **दुश्चित्त**-वि. १ खिन्न; दुर्मनस्क; दुःखित; उदास; उद्विग्न. 'अबदुल्याची खबर ऐकतां मनांत झाले दुश्चित।' -ऐपो १३२ २ क्षुब्ध. 'परी कुंडलिनी नावेक दुश्चित्त होती। ते तयातें म्हणे पतौती।' -ज्ञा ६.२३८. [दुस्+चित्त=मन] **दुश्चित**-वि. (काव्य) खिन्न; दुःखी; उदास; दुश्चित्त अर्थ २ पहा. 'डोळे लावुनियां न होतों दुश्चित। तुझी परचीत माव होती।' [दुश्चित्त अप.] **दुश्चिन्ह**-न. अशुभ, वाईट लक्षण; अपशकुन. 'दुश्चिन्हें उद्भवलीं क्षितीं। दिवसा दिवाभीतें बोभाति।' [दुस्+चिन्ह] **दुश्शाप**-पु. वाईट, उग्र, खडतर शाप. [दुस्+शाप] **दुश्शासन**-पुविना. दुर्योधनाचा भाऊ. -वि. व्यवस्था राखण्यास, अधिकार चालविण्यास कठिण. [दुस्+शासन=अधिकार चालविणें] **दुष्कर**-वि. १ करण्यास कठिण; बिकट; अवघड. 'म्हणोनि अभ्यासासि कांहीं। सर्वथा दुष्कर नाहीं।' -ज्ञा १२.११३. २ दुष्परिणामकारक. -मोल. [दुस्+सं. कृ=करणें] **दुष्कर्म**-न. वाईट, पापी, दुष्टपणाचें कृत्य; कर्म. [दुस्+कर्म] **दुष्कर्मा**, **दुष्कर्मी**-पु. दुष्ट कृत्य करणारा; पापी; दुरात्मा. [दुस्+कर्मन्] **दुष्काल-ळ**-पु. अतिवृष्टि किंवा अनावृष्टि होऊन पिकें बुडून अन्नाची वाण पडते तो काळ; दुकाळ; महागाई. 'जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला। कां भणगा दुष्काळु पाहला।' -ज्ञा ११.४२८. [दुस्+काल] **म्ह०** दुष्काळांत तेरावा महिना=दुष्काळांत वर्षाचे बारा महिने काढतां काढतांच मुष्कील पडते. अशा वेळीं अधिक मास (तेरावा महिना) आला म्हणजे संकटांत भर पडते असा अर्थ **दुष्कीर्ति**-स्त्री. अपकीर्ति; बदनामी; बेअब्रू. [दुस्=कीर्ति] **दुष्कृत-ति**-नस्त्री. १ पापकर्म; वाईट कृत्य. 'आणि आचरण पाहातां सुभटा। तो दुष्कृताचा कीर सेल वांटा।' -ज्ञा ९ ४१६. २ कृतींतील, वागणुकींतील दुष्टपणा. [दुस्+कृत-ति] **दुष्प्रतिग्रह**-पु. जो प्रतिग्रह(दानाचा स्वीकार) केला असतां, स्वीकारणारा अधोगतीस जातो तो; निंद्य प्रतिग्रह; अशुभप्रसंगीं केलेलें दान स्वीकारणें; वाईट कृत्याबाबत स्वीकारलेलें दान इ० उदा० वैतरणी, शय्या, लोखंड, तेल, म्हैस हे दुष्प्रतिग्रह होत. [दुस्+सं प्रतिग्रह=दान स्वीकारणें] **दुष्प्राप-प्य**-वि. दुर्लभ; मिळण्यास कठिण; विरळा; दुर्मिळ. [दुस्+सं. प्र+आप्=मिळविणें] **दुस्तर**-वि. तरून जाण्यास, पार पडण्यास कठिण. 'समुद्रापेक्षां हा संसार मला दुस्तर वाटतो.' -न. (ल.) संकट. 'थोर वोढवलें दुस्तर। तुटलें सामुरें माहेर।' -एरुस्व ८.५५. [दुस+सं तॄ=तरणें] **दुस्पर्श**-वि. स्पर्श करण्यास कठिण, अयोग्य. [दुस्+सं. स्पृश्=स्पर्श करणें] **दुस्संग**-पु. दुष्टांची संगत; कुसंगति. [दुस्+संग] **दुस्सह**-वि. सहन करण्यास कठिण; असह्य. [दुस्+सं. सह्=सहन करणें] **दुस्सही**-वि. (प्र.) दुस्सह दुस्सह अप] **दुस्साध्य**-वि. १ सिद्धीस नेण्यास, साधावयास कठिण. 'थोर वय झाल्यावर विद्या दुःसाध्य होते.' २ बरा करण्यास कठिण (रोग, रोगी). आटोक्यांत आणण्यास कठिण (शत्रु, अनिष्ट गोष्ट, संकट इ०). [दुस्+सं. साध्य=साधण्यास सोपें] **दुस्स्वप्न**-न. १ अशुभसूचक स्वप्न. २ (मनांतील) कुतर्क, आशंका, विकल्प. [दुस्+स्वप्न] **दुस्स्वभाव**-पु. वाईट, दुष्ट स्वभाव. -वि. वाईट, दुष्ट स्वभावाचा. [दुस्+स्वभाव]

**दुरकी**—अ. १ एक या संख्येस दोहोंनीं गुणतांना योजावयाचा शब्द. जसें-'एकं दुरकी दोन' २ (फाशांच्या खेळांत) दोन घरांवर; दोन पडले असतां मरेल अशी.

**दुरकी, दुरकी चाल**—स्त्री. दुडकी पहा.

**दुरगुसला, दुरगूस**—पु. धिंगामस्ती; धांगडधिंगा; धुडगूस पहा.

**दुरटा**—पु. तोफ, बंदूक इ० चा वर्षाव; बंदुकीच्या गोळी-बाराची फैर; तोफांची सरबत्ती; बाण इ०कांचा वर्षाव, भडिमार. 'मुसलमानांचे स्वार पुढें येतांच त्यांच्यावर त्यांनीं गोळया व जेजालांचे दुरटे चालविले.' –हिं १९०. दुऱ्हाटी पहा.

**दुरडी**—स्त्री. १ तांदूळ इ० धुण्याच्या उपयोगाची दुहेरी विणीची बुरडी टोपली. २ धरण्याकरितां वर्तुळाकार दांडा बसविलेली फुलें ठेवण्याची परडी. ३ (सामा.) किरकोळ कामाच्या उपयोगाची बुरडी टोपली; पाटी.

**दुरढी**—स्त्री. १ (कों.) दुफाशी सोंगटयांतील फाशांचें दोहोंचें दान; दुढ्ढी. २ (ल.) दोनाचें (पैसे, रुपये इ०) दान; भिक्षा; दुढ्ढी पहा.

**दुरण**—पु. (कुण.) द्रोण. [द्रोण अप.]

**दुरणें**—सक्रि. दूर करणें; घालविणें. 'डाग लागतो परी यशाला शिवरायाच्या तो दुरवा।' –वाग्वैजयंती-पानिपतचा पोवाडा. [दूर करणें]

**दुरदुर**—स्त्री. थोडा वेळ मिळविलेली कर्तृत्वाची ऐट; दिमाख; डुरडुर; फुरफुर. (क्रि० लावणें). [ .]

**दुरदुरी**—स्त्री. (राजा.) करंगळीपेक्षां कमीअधिक जाड अशी पाणी इ० कांची पडणारी, झिरपणारी धार. [ध्व.]

**दुरंदेश-शा-शी**—वि. दूरदृष्टि; दूरवर विचार करणारा; धूर्त. (क्रि० पाहणें). 'आपण दाणा व दुरन्देश आहेत.' –रा १०.२१३. 'बाळाजीराव काय दुरन्देश होते!' –रा ५.८६. [फा. दूर्+अन्देशा]

**दुरंदेशा-शी**—पु. दूरदृष्टि; दूरवर केलेला विचार; धूर्तपणा. (क्रि० पाहणें). 'परंतु करणारांनीं मात्र बहुत दुरन्देशा पाहून चालत असावें.' –रा ८.२२८. [फा. दूर्+अन्देशा]

**दुरधा**—वि. (राजा.) पूर्णपणें न पिकलेलें (फल इ०).

**दुरबिनीत**—न. (हेट. कों. नाविक) गलबताच्या झाडीच्या आंतून लांबच्या लांब मारलेल्या फळयापैकीं प्रत्येक. दुरमीण पहा.

**दुरबीन-ण**—स्त्री. दुर्बीण पहा.

**दुरभीराजा**—पु. दुबी, दुभ्भीराजा पहा.

**दुरमीण**—स्त्री. (नाविक. कोंकणी) गलबतास आंतील अंगास मजबुती येण्यासाठीं वांके, दुवांके, झाडया यावरून कांहीं अंतर सोडून जाडया फळया ठोकतात त्या. या फळया नाळ ते वऱ्या पर्यंत ठोकतात.

**दुरवा, दुर्वा**—स्त्रीअव. एक प्रकारचें पवित्र मानलेलें गवत; हरळीचा तीन पातींचा शेंडा प्रत्येक. हें गणपतीस वाहतात; (सामा.) हरळी. दूर्वा पहा. [सं. दूर्वा]

**दुरवी**—स्त्री. एक प्रकारचा वेल.

**दुरशी-सी, दुरशिवल**—वि. विटाळशी; अस्पर्श; रजस्वला. दूरशी पहा. [दूर+अशी]

**दुरस्त**—वि. (प्र.) दुरुस्त. दुरुस्त पहा.

**दुरळ**—वि. खडतर; कडक; उग्र; कडकडीत (दैवत इ०). 'खंडेराव दैवत दुरळ। प्रचीत दाविली तत्काळ।' –ह ९.२००. 'चंद्र सोदर सये गरलाचा। भाव काय समजे दुरळाचा।' –सारुह ३.१११.

**दुरा**—पु. नवी खणलेली विहीर.

**दुराई**—स्त्री. (प्र.) दुराही; द्राही; शपथ; हरकत; (कु.) दुराय. दुराही पहा.

**दुराणी**—वि. अफगाणांचा एक वंश; त्या वंशांतील एक व्यक्ति. अब्दाली असेंहि नांव आहे. [फा दुर्रानी]

**दुरांदु(दू)रचा**—वि.(राजा.) दूरदेशाहून कधीं नव्हत आलेला; दूरदेशचा. [दूर]

**दुराय**—स्त्री. (कु. गो.) शपथ; आण. दुराई, दुराही पहा.

**दुरालभा**—स्त्री. एक औषधी वनस्पति; धमासा. [सं.]

**दुरावणें**—अक्रि. वियोग होऊन दूर राहणें, पडणें, जाणें. 'तैसीं दोन्ही दुरावलीं। जे प्राप्ती तव अलग ठेलीं।' –ज्ञा ६.४३५. [दूर]

**दुरावणें**—सक्रि. (बे.) जमीन दुसऱ्यांदा नांगरणें.

**दुरावा**—पु. १ दूरपणा; अंतर. २ (दूरदेशीं भोगावे लागणारे) कष्ट. [दूर]

**दुराही**—स्त्री. करूं नये असें कर्म कोणी करूं लागल्यास, हुकूम, कायदा मोडूं लागल्यास त्यास अडविण्याकरितां राजा, सरकार इ०कांच्या नांवानें घालतात ती शपथ; द्राही. दुराई पहा. 'हें करूं नको सरकारची दुराही आहे.' [सं. दुर्+हार] **०बांधून टाकणें**-एखादी वस्तू, घर इ०कांच्या उपयोगाबाबत सरकारी मनाईचें द्योतक असें चिन्ह, ती वस्तु, घर इ० कांवर बांधणें. **०मोडणें**-सरकारच्या नांवानें केलेल्या मनाईचें उल्लंघन करणें.

**दुरिकें**—वि. दूरचें; लांबचें.

**दुरिच्यादुरीं**—क्रिवि. (प्र.) दूरच्या दूर; फार दूर.

**दुरीं**—क्रिवि. दूर; दूर अंतरावर.

**दुरींग**—न. १ (गो.) दुर्ग; किल्ला. २ तट; कोट; गडगा. ३ शिमग्याच्या दिवसांत साजरा करण्याचा एक उत्सव. [दुर्ग]

**दुरीदराज**—१ परागंदा होणें; पांगापांग; पांगणी. 'रयेता बेदील होऊनु वाडी पडते वाडी पडली म्हणिजे दुरीदराजला गेली.' –इमं ४८. २ बेचिराखी. –वि. परागंदा झालेला; देशोधडीस लागलेला. –क्रिवि. फार दूर; दूरच्या दूर. [फा. दूर्+दराझ्=दूर-दूर, कुठें तरी]

**दुरील**—वि. फार दूरच्या ठिकाणचा; लांबचा. [दूर]

**दुरुदुरु**—क्रिवि. खळखळ; झुळझूळ (ओढा इ० वाहणें). [ध्व.]

**दुरुस्त**—वि. १ यथायोग्य; निर्दोष; बरोबर; नीट. २ अचूक; बरोबर. ' नेमिला जागा दुरुस्त मारणार असे. ' -मराआ ३५. ३ (कायद्यांत) फेरबदल, सुधारणा केलेला (कायद्याचा नियम इ०). (क्रि० करणें). [फा. दुरुस्त्] **दुरुस्ताई**-स्त्री. दिलसफाई. ' परस्पर दुरुस्ताई होय तर उत्तम आहे.' -जोरा ५. [दुरुस्त] **दुरुस्ती**-स्त्री. दोष काढून पूर्ववत करण्याची, सुधारण्याची क्रिया; डागडुजी; जुनें काम खराब झालें असल्यास तें सुधारण्याची क्रिया; नीट करणें. [दुरुस्त]

**दुरू**—स्त्री. (राजा.) दूर्वा.

**दुरूग**—न. चैत्र महिन्यांत स्त्रिया गौरी बसविण्याकरितां लांकडाची, मातीची किल्ल्यासारखी करितात ती आकृति. [दुर्ग अप.]

**दुरून**—क्रिवि. फार लांबून; दूर अंतरावरून. [दूर] **म्ह०** दुरून डोंगर साजरा.

**दुरूस्त**—वि. दुरुस्त पहा.

**दुरेवर्चे**—सक्रि. (गो.) नांगरणें. दुरावणें पहा.

**दुरोण**—पु. (प्र.) द्रोण. [द्रोण अप.]

**दुरोत्तर**—न. (काव्य) शिवी; दुरुत्तर पहा, ' ऐकोनि तयाचीं दुरोत्तरें। लज्जित तुकयाचें अंतर।' [दुरुत्तर अप.]

**दुरोदर**—न. सोंगट्या, द्यूत खेळणें. [सं.]

**दुर्ग**—पुन. किल्ला. ' उभारिलीं दुर्गे दारवंटे फांजी। कोटि चर्या माजी शोभलिया।' -तुगा १००; -ख ३४३९. [दुर्+सं. गम्=जाणें] (वाप्र.) ०**जीर्ण**-सक्रि. (महानु.) (किल्ला) जिंकणें. 'विषयाचे गिरि दुर्गजीर्णे।' -भाए १६१. [दुर्ग+जिर्णे=जिंकणें] ०**पौळी**-स्त्री. (किल्ल्याच्या) तटाची भिंत. 'विरीं वानरीं वेढिजे दुर्गपौळी। नळीं पाडिती अग्नियंत्रें खळाळी।' -मुरामा ६.५१. [दुर्ग+पौळी=कठड्याची भिंत] ०**यंत्र**-न. (व्यापक). किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलेल्या तोफा इ०. [दुर्ग+यंत्र]

**दुर्गा**—स्त्री. शंकराची स्त्री; पार्वती; अंबिका. [सं.] **दुर्गाष्टमी**-स्त्री. दुर्गेच्या जन्मदिवसाची तिथि; आश्विन शुद्ध अष्टमी; (सामा.) शुद्ध पक्षांतील अष्टमी [दुर्गा+अष्टमी]

**दुर्गा**—पु. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग. याचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारास षड्ज, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र धैवत, कोमल निषाद व तीव्र निषाद हे स्वर लागतात. ऋषभ, पंचम हे स्वर वर्ज्य आहेत जाति औडुव-औडुव. वादी गांधार, संवादी निषाद. हा रात्रीच्या दुसऱ्या प्रहरांत गातात दुसऱ्या प्रकारांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात. गांधार व निषाद हे स्वर वर्ज्य. जाति औडुव-औडुव वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर.

**दुर्गोडी**—स्त्री. स्मशान; मसणवट (यांत दुर्गेचें किंवा शंकराचें देऊळ असतें यावरून रूढ) कल्याण गांवीं स्मशानास अद्याप हें नांव आहे [दुर्गा]

**दुर्बिण, दुर्बीण-न**—स्त्री. दूर अंतरावरील पदार्थ पहाण्याचें एक यंत्र. यांत असलेल्या अंतर्गोल व बहिर्गोल भिंगामुळें आपणांस दूरच्या वस्तू स्पष्ट दिसतात व जवळच्या वस्तू मोठ्या दिसतात. [फा. दूर्बीन्]

**दुर्वा, दुर्वाव्रत, दुर्वाष्टमी**— (प्र.) दूर्वा, दूर्वाव्रत, दूर्वाष्टमी इ० पहा.

**दुर्वाडी**—वि. असमंजस; मूर्ख. 'तुं बोल्तां लाजेसिना। दुर्वाडिया। भिकारिया। तुझेया घरिं कैचें ब्राह्मणभोजन।'-पंच २.४. [सं. दुर्वादी]

**दुर्वास**—पु. एका ऋषीचें नांव. हा फार शीघ्र कोपी व खादाड असे यावरून, शीघ्रकोपी माणूस; खादाड माणूस. [सं. दुर्वासस्]

**दुऱ्हा**—क्रिवि. दूर. 'एऱ्हवीं स्वामि दुऱ्हा असिका। मीं केंवि उरें।'-ऋ ५३. 'कुळेंसीं जो पाठमोरा। वेदाज्ञेसीं दुऱ्हा।' -ज्ञा १३.६९६. [दूर]

**दुऱ्हाई**—स्त्री. दुराही पहा.

**दुऱ्हाटी**—स्त्री. लांब पल्ल्याची बंदूक, तोफ.

**दुऱ्हावणें**—अक्रि. दुरावणें; नाहींसें होणें. ' नमस्कारें जन्म मरण। दुरी दुऱ्हावे।' -दा ४.६.१९. [दुरावणें]

**दुल(ला)ई**—स्त्री. १ आंत थोडा कापूस घालून मंजाब इ० लावून पांघरण्याकरितां केलेलें शोभिवंत वस्त्र; पातळ रजई. २ शिंपल्यास आंतील बाजूस लागून असलेला मौक्तिकजंतूचा मांसल भाग. [सं. दुल्=हालणें; मऊपणा, हालचालदर्शक प्रत्यय; प्रा. दुल्ल=वस्त्र]

**दुलदपाय खुलदपाय**—पु. घोड्यास होणारा एक रोग. यानें घोड्याच्या पुढील पायावर फोड येतात. -अश्वप २.३१८.

**दुलदुलीत**—वि. लठ्ठ; पुष्ट; गुबगुबीत. [दुलदुल]

**दुलदुलें**—न. घोड्याचा एक अलंकार. [दुलदुल]

**दुलद्दल**—वि. मऊ; मृदु. ' अरे सख्या रे करीं पिवळी कळी दुलद्दल। गुलगुलित आसी नादर विरळा।'-प्रला ९३ [सं. दुल्=हालणें; दुल्=हालचाल दाखविणारा शब्द]

**दुला, दुल्हा**—पु. १ पंजा हातांत घेऊन ताबुतापुढें नाचतांना मुसलमान लोक कत्तलच्या रात्रीं हसनच्या मृत्यूचा शोक करीत हिंडतांना उच्चारतात तो शब्द हुसेन हा त्याच्या विवाहाच्या आदल्या रात्रीं (कत्तलच्या रात्रीं) यझीदकडून मारला गेला. मूळचा शब्द हिंदी दुल्हा असा असून त्याचा नवरा असा अर्थ आहे. २ उद्धट व दांडगा मनुष्य. [हिं. दुल्हा=नवरा]

**दुला, दुल्ला**—पु. ( जुगारी खेळ ) दुसरा; दुसऱ्यानें खेळणारा. याच्या उलट मिरी=प्रथम खेळणारा. [ दु=दोन ]

**दुलाव**—स्त्री. ( कों. ) फडताळ; भिंतींतील कपाट.

**दुलुंगे करणें**—सक्रि. ( ढोरांचा धंदा ) आसूड आखूड झाल्यास लांबविणें. [ दुलग, दुलंगी ]

**दुल्लड**——स्त्री. दु मध्यें दुलड पहा.

**दुल्लभ**—वि. दुर्मिळ; दुर्लभ. ' जेणें पाविजे परलोक। परम दुल्लभ जो। ' –दा २.४.५ [ दुर्लभ अप. ]

**दुल्ला**—पु. १ दुला पहा. २–वि. शूर; बेडर; बेफिकीर. ' भाऊसाहेब अशारीत दुल्ला। दादु महातानें हत्ती पुढें नेला। ' –ऐपो ११९.

**दुल्हा**—पु. नवरा; नवरदेव. [ हिं. ] **०देव**—पु. ( गोंडी ) गोंडी नवरीचा एक देव. याचा आकार पायांतील पिळाच्या वाळयासारखा असतो. [ हिं. दुल्हा+देव ]

**दुवम**—वि. दुय्यम; दुसऱ्या प्रतीचा; मध्यम. 'दुवम जमीन तीन चावर एक पांड. ' –वाडबाबा १.२०३. [ फा. दुयुम ]

**दुवल**—पु. रुपयाचा सोळावा भाग; एक आणा. [ दु+वेळ ]

**दुवली**–स्त्री. आणेली. [ दुवल ]

**दुवस्वा**—वि. दोन घोडे ठेवणारा. 'दुवस्वा स्वार.'–वाडमा १.३३३. [ फा. दू+अस्वा ]

**दुवळ**—वि. ( कों. ) दोन पेड एकत्र करून वळलेली; दुपेडी ( दोर, दोरी ) [ दु+वळ ]

**दुवा**—पु १ ज्या अनेक कडया एकमेकांत अडकवून सांखळी करितात त्यांपैकीं प्रत्येक कडी. २ पत्त्यांतील, फांशांतील दोन ठिपक्यांचें चिन्ह. **दुवाई**–स्त्री. भेद [ सं. दु. फा. सिं. दुओ ]

**दुवा-दुआ**—पु. आशीर्वाद; ईश्वरानें एखाद्याचें बरें करावें या बद्दलचें अभीष्टचिंतन; ईश्वराजवळ केलेली प्रार्थना. ' प्रत्यक्ष दिवस उगवलियावरि फकीर आला. त्यानें फळ दिलें. दुवा देता जाला कीं फळ आपले स्त्रीस भक्षावयास देणें. '–भाव ५२. ' जर वजीर कबूल करितील तर दुनिया आपल्यास दुआ देईल. '–रा ६.६२१. [ अर. दुआ ] **०गीर, द्वागीर**–वि. हितेच्छु; शुभचिंतक; निष्ठावंत. ' आम्ही हजरतीचे दुवागीर '–चित्रगुप्त ४६. ' तुम्ही बादशाहीचे दुवागीर. '–पाब ९. ' ऐसेच हरघडी खत किताबत पाठवून फकिराचे खबर घेत असले पाहिजे, आम्ही द्वागीर असों. ' –ब्रप ३०७. [ फा. ] **दुवागो**—पु. ( कोर्टांतील अर्जांत रूढ ) अर्जदार; अर्ज, विनंति करणारा. [ फा. दुआगो ]

**दुवाड**—वि. द्वैत; द्वैतरूप. –मनको. [ दु=दोन+वाड=वाट ]

**दुवाड**—वि. १ द्वाड; खोडकर; व्रात्य; द्वाड पहा. ' गुरुकृपें आपणा वोळखीना दुवाड। '–दावि २४. २ कठिण; अवघड; दुर्घट. ' तेवीं आवडे तैसा सांकडु। आचरतां जरी दुवाडु। तरी स्वधर्मुचि सुरवाडु। परत्रींचा। ' –ज्ञा ३.२२५. [ द्वाड अप. ] **०वाणा-वाणी**–वि. द्वाडवाणी पहा.

**दुवाली**—स्त्री. ( व ) तबल्याची वादी.

**दुवासन**—न. घोडयाच्या गळयांत बांधलेली दोन्हीकडे ताण असलेली दोरी. दवासन पहा.

**दुवासी**—स्त्री. ( कों. ) फार कडक दारू.

**दुवाळा**—पु. ( गो. ) डोहळा.

**दुवाळी**—स्त्री. क्लेश; कष्ट; पीडा. ' तरी दुवाळी कोणा न व्हावी। कवणाची भंवई नुचलावी। '–ज्ञा १३.२६६. [ दु, दुर्=वाईट+आळी=आगळीक, पीडा. ]

**दुवाळी**—स्त्री. १ एखादी गोष्ट दुसऱ्यांदा सांगतांना तींत फेरफार केला आहे असा होणारा समज. २ द्वैत. [ दु=हीन+आळी=ओळ ]

**दुवेतणें**—अक्रि. ( कों. ) ( स्त्री ) नासवणें; ( स्त्रीस ) पोटचें उमळणें; गर्भपात, गर्भस्राव होणें; पूर्ण मास न होतां प्रसवणें; वाखा होणें. [ दुवेत ]

**दुशमन, दुश्म(स्म)न, दुश्मान**—पु १ शत्रु; वैरी. २ सर्वसाधारण शत्रु [ फा. दुश्मन् ] **म्ह० १** दाहाचा हात दुशमनावरही पडूं नये=दहा माणसांनीं एकटया शत्रूवरहि हात टाकूं नये. २ दुशमन असावा पण दाणा असावा=शत्रु पुरवेल पण तो समंजस, उदार, असावा. **दुशमनकी, दुशमनगिरी, दुशमनगरी, दुशमनी**–स्त्री. १ वैर; शत्रुत्व; द्वेष. २ शत्रुत्वाचें, द्वेषमूलक कृत्य, वागणूक. **दुशमनदावा**–पु. ( सामा. ) द्वेष; मत्सर; वैरबुद्धि ( क्रि० करणें; धरणें; बाळगणें; पाळणें ). [ दुश्मन्+दावा ]

**दुशिलावा-व्या**—वि. आगलाव्या; कळलाव्या; कज्जेदलाल.

**दुश्मन, दुस्म(स्मा)न**—पु. शत्रु; दुशमन पहा. **दुश्मनगी दुश्मनगिरी, दुश्मनी**–स्त्री. वैर; शत्रुत्व. 'ज्याप्रमाणें पानिपताचे समयीं सर्व हिंदुस्थान मिळून दक्षण्यांसी दुश्मनगी केली तेच अवस्था आतां जाली आहे. ' –दिमरा १.२२६. ' जों पावेतों इंग्रेजाचें पारपत्य होत नाहीं तों पावेतों इंग्रेजासीं खुली दुश्मनी करावयास भितात. ' –रा १२.२३. [ दुश्मन् ]

**दुष्ट**—वि. १ दुसऱ्याचा घातपात करावा किंवा तें न जमल्यास मत्सर तरी करावा अशा स्वभावाचा; वाईट बुद्धीचा. २ पापी; दुराचारी; नीच; अनाचारी. ३ दावेदार; शत्रु. ' मी आलों असतों पण माझा दुष्ट तेथें आहे. ' ४ खराब; दोषयुक्त ( हवा, ठिकाण इ० ). [ सं. ] **०प्रतिग्रह**–पु. ज्यापासून दान घेऊं नये म्हणून सांगितलें आहे अशा अपात्र व्यक्तीपासून स्वीकारलेलें दान; अमंगल प्रसंगीं स्वीकारलेलें दान. जसें:– शय्यादान इ० दुष्टहेतुमूलक दानाचा स्वीकार करणें; दुष्प्रतिग्रह पहा. [ दुष्ट+सं प्रतिग्रह=दान स्वीकारणें ] **०बुद्धि**–स्त्री. पापवासना; अधमपणाची बुद्धि. –वि.

पापी; नीच; अधम; वाईट बुद्धीचा. [ दुष्ट+बुद्धि ] **०भाव**–पु. १ मत्सर; द्वेष; शत्रुत्व. २ कुभाव; गैरसमज; विकल्प. [ दुष्ट+भाव ] **०मानस**–न. दुष्ट बुद्धि; दुष्टपणा; नीचपणा. –वि. पापी; अधम; दुष्ट अंतःकरणाचा. [दुष्ट+मानस=मन] **०व्रण**–पु. १ गळूं; फिसकें; बेंड. २ नाडीव्रण. [दुष्ट+सं. व्रण=फोड, जखम ] **०स्वप्न**–पुन. १ अशुभसूचक स्वप्न. २ (मनाला डवंचणारी) अनिष्ट शंका, कल्पना. [दुष्ट+सं. स्वप्न] **दुष्टाई**–स्त्री. १ दुष्टपणा; नीचपणा; अधमपणा. २ खराबपणा; घाणेरडेपणा; दोषयुक्तता. ३ मत्सर; द्वेष; दावेदारी. (क्रि०,करणें; धरणें; बाळगणें). याअर्थी दुष्टावा, दुष्टायकी हेही शब्द रूढ आहेत. **दुष्टात्मा**–वि. दुष्ट अंतःकरणाचा; पापी; अधम. [ दुष्ट+सं. आत्मन्=मन ] **दुष्टायकी**–स्त्री. दुश्मनगिरी; शत्रुत्व; द्वेष; दावेदारी. **दुष्टावा**–पु. १ दुष्टपणा. २ दावेदारी; वैर; द्वेष. 'सरकारनें खादीचा दुष्टावा कां करावा?' –के १.७३.०. **दुष्टोत्तर**–न. दुरुत्तर; उद्धटपणाचें, अपमानकारक, शिवीगाळीचें उत्तर.' बोले सदां दुष्टोत्तर । जेणें खोंचें जिव्हार।' [ दुष्ट+उत्तर ]

**दुस**—पु. प्रमेय. –शर.

**दुस**—न. १ वस्त्र. 'जे आकारजातीचें दुस । घडी केलें।' –ज्ञा १५८३. २ आच्छादन; आवरण. 'वायू भवंतें आकाश। वरी सत्वाहंकाराचें दुस । वरी महत्तत्वाचा आश्लेष । असे जे कां।' –सिसं १.१५२. ३ तंबू 'कृष्ण निघाला वेगेंसी । आला प्रभास क्षेत्रासी । तेथें पुजोनि सोमनाथासी। दुसें चौपाशीं दिधलीं।' –एरुस्व १४.८ [ सं. दूश्य=तंबू ]

**दुसग, दुसगाई**—स्त्री. (राजा.) मत्सर; द्वेष; विरोध; भांडण; घासाघीस; कचाकची; वितुष्ट. 'घरांत बायकांच्या दुसगीमुळें संसार नासला' [ दु=दोन+संग ] **म्ह०** दुसगीचा पाहुणा उपाशी मेला=ज्या घरांत नवराबायकोंत वितुष्ट आहे त्या घरांतील पाहुण्याची स्थिति फार चमत्कारिक व संकोचाची होते. कारण नवऱ्याचा पाहुणा बायकोला खपत नाहीं, व बायकोचा पाहुणा नवऱ्याला खपत नाहीं.

**दुसम(मा)न,दुसमानकी,दुसमानगिरी,दुसमानी**— दुशमन इ० पहा.

**दुसरा**—वि. १ क्रमानें पहिल्याच्या पुढचा २ निराळा; भिन्न; वेगळा; अन्य. ३ आणिक; शिवाय; इतर; आणखी कोणी. –क्रिवि. शिवाय; आणखी; ( हें क्रियाविशेषण कर्ता अथवा कर्म यांच्या लिंगवचनाप्रमाणें फिरतें ). 'आला तो आला दुसरा ( दुसऱ्या ) मला शिव्या देऊन गेला. **दुसऱ्याचें घर दाखविणें**–अमक्याच्या घरीं जा असें सांगून ( एखाद्यास ) हांकून देणें. **दुसऱ्याचें घर निघणें**–(एखाद्या स्त्रीनें) लग्नाचा नवरा सोडून दुसऱ्या पुरुषाच्या घरीं त्याची बायको म्हणून राहणें. 'कोळयांच्या बायका जातींतल्या जातींत व्यभिचार करतात व दुसऱ्याचें घरही निघतात.' –गुजा ५९. **दुसऱ्याचें पागोटें गुंडाळणें**–(एखाद्याला) फसविणें; चकविणें. **दुसऱ्याच्या तोंडानें जेवणें**–स्वतंत्र विचार करण्याची अक्कल नसल्य मुळें दुसरा सांगेल त्याप्रमाणें वागणें, बोलणें, करणें. **म्ह०** दुसऱ्याच्या डोळयांतल कुसळ दिसतें पण स्वतःच्या डोळयांतल मुसळ दिसत नाहीं=मनुष्याला दुसऱ्याचा क्षुल्लक दोष सहज दिसतो पण स्वतःचा ढोबळ दोष दिसत नाहीं. **०घरोबा**–पु. (मराठवाडयांत रूढ)दुसरें लग्न; मोहतूर. **०फुटावा**–पु.गवत एकदां कापल्यानंतर त्याला पुन्हां होणारी फूट. **दुसरेंबालपण**–न. म्हातारपण. 'दुसरें बालपण म्हणजे म्हातारपण जितकें आपणांस नकोसें वाटतें तितकेंच पहिलें वाटेल यांत शंका नाहीं.' –विचावि ५४. **दुसरेपणा**–पु. (गो.) बिजवराशीं लग्न. **दुसऱ्यान–नें**–क्रिवि. पुन्हां; दुसऱ्या वेळी.

**दुसरें**—न. द्वैत; भेदबुद्धि. 'तें कर्म कीर ब्रह्माकारें । जालें तेणेंही न सरे। जें करीतेणेंसी दुसरें। आहे म्हणौनि।' –ज्ञा १७३७४.

**दुसवास**—पु. १ वाईट संगत. २ ( राजा. ) दुसग–दुसगाई. दुस्वास पहा. [ दुस्=वाईट+वास किंवा सहवास ]

**दुसा**—पु. (महानु.) तंबू; राहुटी. दुस अर्थ ३ पहा. –धवळे, पूर्वार्ध ८८ [ सं. दूश्य=तंबू; प्रा. दूस ]

**दुसेनेर**—न. बुट्टीदार कापड. –वाडसमा २.२८.

**दुस्त**—न. भरजरी वस्त्र. –पया ३४.

**दुस्ता**—पु. १ वस्त्राचीं सुतें विरळ झाल्यानें मध्ये मध्ये जो चाळणीसारखा विरळपणा होतो तो. २ मानाचीं पाच वस्त्रें समुच्चयानें.

**दुस्मन, दुस्मनकी, दुस्मनगिरी, दुस्मनी**—दुशमन इ० पहा. 'लढाईचा इरादा धरून मी वागत नसतां दुस्मनीच धरून वांकडेपणा करितात, त्यांची समजूत व्हावी कशी?' –गोखचि शाब ३४.

**दुस्मान**—पु. ( गो. ) शत्रु; वैरी. [ फा. दुश्मन् ] **दुस्मानकाय**–न. (गो.) शत्रुत्वः वैर.

**दुस्वाशी**—वि. १ (गो.) अधाशी. २ मत्सरी.

**दुस्वास**—पु. ( कुण. गो. ) द्वेष; मत्सर; हेवा; असूया.

**दुस्सर**—स्त्री. (खा.) जूं; जोखड. –भाऐ ७. १ ते ४.

**दुस्सा**—पु. (व.) खोडास दोन खुंट्या मारलेलें वखर, आऊत; एक प्रकारचें कोळपें.

**दुस्सा**—पु. (व) ढुस्सा; ठोंसा.

**दुहर्डी**—स्त्री. (गो.) भावाची, बहिणीची मुलगी; धुवडी.

**दुहणें**—उक्रि. १धार काढणें. –अक्रि. २ (काव्य) दूध देणें. [सं. दुह्–दोहन] **दुहणावळ**–स्त्री. ( दुभत्या जनावराची ) धार काढण्याची मजुरी. [ दुहणें ]

**दुहिता**—स्त्री. मुलगी; कन्या.

**दुहेतणें**—अ. अकालीं प्रसवणें; धुपावणें. दुवेतणें पहा.–राको २८६.

**दुहेस**—न. दुखणें.

**दुळ(ळा)गेस**—पु (गो.) पाणी घालून काढलेला नारळाचा रस. [दु=दोन+वेळ+रस]

**दुक्षी**—वि. (प्र.) दुःखी. 'धनी महाराज दुक्षी झाले काय वदले हंबीर।' –ऐपो ३४६. [दुःखी अप.]

**दूक**—स्त्री. (कडब्याच्या पेंढया, विटा इ० कांची) जोडी.[दु=दोन]

**दूख**—स्त्रीन. (गो. क.) दुखणें; दुखी; दुःख. ०होणें–आजारी होणें.

**दूज**—न. (गो.) बारांचा समुदाय. डझन. [पो. दूझिआ]

**दूड**—स्त्री. १ दुपदरी गळसर, माळ; स्त्रियांचें एक कंठभूषण. 'सोनें दूड करण्यास दर तोळा रुपये १५। प्रमाणें.' –वाडसमा १.७२. [सं. दु सिं. दुरी] २ दोन घागरींची जोडी. (कावडीवांचून पाणी वाहतांना प्रयोग). 'एके घागरीनें पाणी केवढा वेळ आणावें दुसरी घागर दे म्हणजे दूडची दूड आणतों.' दुड, दुडी पहा.

**दूड**—स्त्री. गोचीड; खिरड.

**दूड**—पु. (राजा.) भातांत उगवणारें एक प्रकारचें गवत.

**दूण**—स्त्री. १ दोन्ही कांठ एकमेकांस जोडून (वस्त्र इ०) शिवणें; दोन बाजू किंवा कडा एकत्र जोडल्यानें होणारी शिवण; दंड. २ वस्त्र, कागद, दोरी इ० कांस दुणल्यामुळें पडणारा सळ, मोड, मुरड. ३ (कों.) एकवार नांगरलेली जमीन पुन्हां नांगरणें; दुसरी नांगरट. (क्रि० घालणें; करणें). ४ घडी; दुमड; मुडपा. ५ दुप्पटपणा (प्रमाणाचा). ६ (गो.) (सोंगटयांचा खेळ). एक–एक मिळून होणारे दोहोंचें दान. –वि. दुप्पट. 'अचपळ गुणगूणीं बैसली प्रीति दूणी।' –दावि १५८. [सं. द्विगुण]

**दूत**—पु. १ (एखाद्यास) बोलावून आणण्याकरितां, पत्र देण्याकरितां, निरोप सांगण्याकरितां पाठविलेला मनुष्य; निरोप्या; जासूद. बातमीदार. जसें:– देवदूत, विष्णुदूत, शिवदूत, यमदूत. २ वकील; शिष्टाई करण्याकरितां पाठविलेला मनुष्य. 'बहु सत्कृतिनें न जसा कार्याच्या सिद्धिनें निवे दूत।' –मोअश्व १.७२. [सं.]

**दूतिका, दूती**—स्त्री. १ निरोप देऊन पाठविलेली, निरोपाची ने आण करणारी स्त्री; एकांत मैत्रीण; सजणी; नायक व नायिका यांची मध्यस्थी करणारी सखी. 'दूती नसे ही माला। सवतचि भासे मला।' –मानापमान. २ दासी; स्त्रीनोकर. 'दूती जाणविती स्वामिणीतें।' –रावि ४.३४. [सं.]

**दूदा**—वि. घोडयाचा एक विशिष्ट रंग –अश्वप १.२७. [फा. दूदु=धूर]

**दूध**—न. १ अपत्यपोषणार्थ मातेच्या स्तनांत उत्पन्न होणारा पांढरा रस; दुग्ध; क्षीर. २ वृक्ष, वनस्पति इ० कांतून निघणारा पांढरा रस, चीक. ३ नारळ इ० कांच्या चवांतून निघणारा पांढरा रस. ४ धान्याच्या कोंवळया कणसांतील दाण्यांतून निघणारा पांढरा रस. ५ (राजा.) दुधू; स्तन. [सं. दुग्ध; प्रा. दुद्ध; फ्रें. जि. थुद; आर्मेनियन. लुथ] (वाप्र.) ०निघणें–(गाय, म्हैस इ० कानें) दूध देऊं लागणें. **दुधाची तहान ताकानें घालविणें–ताकावर भागविणें**–इष्ट ती वस्तु साध्य होत नाहीं असें पाहून तिच्यापेक्षां निकृष्ट वस्तूच्या लाभानें संतुष्ट होणें; मोटी गोष्ट साध्य न झाल्यास तिच्या पेक्षां कमी दर्जाची गोष्ट साध्य करून समाधान मानणें. **दुधांत साखर पडणें**–दूध स्वभावतःच मधुर असतें. त्यांत साखर टाकल्यास त्याची गोडी अधिकच वाढते. त्यावरून आधींच चांगल्या असलेल्या गोष्टींत दुसऱ्या चांगल्या गोष्टींची भर पडणें. **दुधानें धुणें**–निर्दोष असणें. 'हें त दुधानें धुपलेलें आहे. **दुधानें धुपलेला**–वि. पूर्णपणें निर्मळ; निष्कलंक; सोज्वळ. **दुधान जेववून ताकान आचवप**–(गो.) आधीं गोड नंतर कडू (भाषण इ०) करणें. **दुधास–ला टणें**–(गाय, म्हैस इ०) कमी दूध देऊं लागणें. **दुधास–ला फुटणें**–(गाय, म्हैस इ०) पुष्कळ दूध देऊं लागणें. **एखाद्याच्या ओठावर दूध दिसणें–वाळलेलें नसणें**–(तिरस्कारार्थी) (तो) वयानें अतिशय लहान असणें; प्रौढ नसणें. (त्याला) जगाचा बिलकूल अनुभव नसणें. **दुधाचा थेंब**–अतिशय थोडें दूध; दुधाचें अत्यंत थोडें परिमाण. जसें:–तुपाचें नख, ताकाचें पाणी, तेलाची धार, दह्याची कवडी. इ० तूप, ताक, तेल व दहीं यांचें अल्पपरिमाण दाखवितात तसें. **प्रथम, पहिल्या धारेचें दूध**–(तान्ही गाय, म्हैस इ० कांचें) प्रथमचें दूध; चीक. **म्ह०** १ दुधानें तोंड भाजलें म्हणजे मांजर ताक सुद्धां फुंकून पितें=एकदां अद्दल घडल्यावर मनुष्य अगदीं साध्या गोष्टींतहि फाजील शंका व सावधगिरी बाळगतो २ मेले म्हशीस दूध बहु (फार). ०कणीण–स्त्री. लहान मुलास दूध पाजण्याकरितां ठेवलेली दाई. **०कलमी**–स्त्री. एक वनस्पति. दुधणी, दुधाणी पहा. **०कोल्ड्रिंक**–न. दुधांत बर्फ व सरबत टाकून केलेलें पेय. [दूध+इं. कोल्ड+ड्रिंक=थंड पेय] **०खुळा**–वि. १ आईबाप इ० कांनीं लाड केल्यामुळें जो प्रौढ झाला तरी पोरकटपणा करतो तो. २ भोळसर; मेषपात्र; अजाण. [दूध खुळा=वेडा] **दुधक**–पु. माणकांत फिका, दुधासारखा पांढरा रंग पसरल्यासारखा दिसतो तो दोष. [दूध] **दुधगा**–पु. (राजा.) कोंवळें दूध, नुकत्याच व्यालेल्या गाईचें दूध प्याल्यानें वासरांना होणारा एक विकार. [दूध] **दुधड**–वि. दूध देणारी; दुधाळ. 'बहु दुधड जरी जाली म्हैस गाय। तरी होईल काय कामधेनु।' –तुगा २२९४. [दुध] **दुध(धा)णी**–स्त्री. दुधासारखा पांढरा

चीक येणारी, फुलें येणारी एक वनस्पति. हिला कुंभा, तुंबा, देवकुंभा, शेतवडा, शेतवड, दुधकलमी, तेवडी इ० दुसरीं नांवें आहेत. २ दूध तापविण्याचें भांडें. दूधकलमी पहा. [दूध] **०दुभतें**–न. १ (व्यापक) दुभतीं जनावरें. 'आम्ही शहरांत दूध-दुभतें बाळगीत नाहीं.' २ दूध, दहीं, ताक, तूप इ०. ३ दुभत्या जनावरांची जोपासना कशी करावी, दुभत्याचे पदार्थ शास्त्रीय पद्धतीनें कसे बनवावे, त्यांचे गुणधर्म कोणते इ० गोष्टींचें विवेचन करणारें शास्त्र.–ज्ञानो द १०४. [दूध+दुभतें] **०पाक**–पु. दूध आटवून तांदळाची केलेली खीर. **०पिता**–वि. दूध पिणारा, आईच्या अंगावर पीत असलेला (बाळ). [दूध+पिणें] **०पेढा**–पु. दुधाचा पेढा. **०पोहे**–पुअव. १ दुधांत कालविलेले पोहे. २ उकळी आलेल्या दुधांत धुतलेले पोहे टाकून त्यांत साखर व आटीव दूध घालून केलेलें खाद्य –गृशि ४३१. **०भाऊ**–पु. (मुलास) पाजणाऱ्या दाईचा मुलगा. [दूध+भाऊ; गु. दूधभाई] **०भात**–पु. मेजवानीचा विनयानें उल्लेख करण्याचा शब्द. **०भाताची क्रिया**–स्त्री. एका ताटांत दूधभातावर जेवून मैत्री जाहीर करणें, मैत्रीची शपथ घेणें. 'दूधभात हात देऊन क्रिया घेतली.'–अष्टप्रधानांचा इतिहास १८५. **०भोपळा**–पु. दुध्या भोपळा; पांढरा भोपळा; एक फळभाजी याच्या उलट तांबडा भोपळा. **०भोपळी**–स्त्री. दुध्या भोपळ्याचा वेल. **०मांडा**–पु. (बेळ) दुधांत साखर घालून, त्या दुधाचा बोळा तापल्या तव्यावर वारंवार फिरवून करतात ती अंबोळी. **०मोगरा–री**–पुस्त्री. १ नाचणीची एक गरवी जात. हिचा दाणा पांढरा शुभ्र असतो –कृषि २८३. २ शाळूचा एक भेद. **०मोगरा**–पु. (ना.) तगर. **०वडी**–वि. दुधाच्या (वडीच्या) रंगाचा. 'दूधवडीची करडि कांबरीं। रोवेचीं सोनेखैरीं।'–दाव २८९. साधित शब्द– **दुधवणी**–न. पाणी मिसळलेलें दूध. [दूध+पाणी] **दुधवणी, दुधावणें**–स्त्रीन. १ दूध तापविण्याचें भांडें. २ दूध तापविण्याकरितां जमीनींत केलेला खड्डा. [दूध] **दुधशिरी**–स्त्री. (गो) उपरसाळ; उपळसरी; अनंत मूळ. **दुधळी**–स्त्री. (गो.) दूधपाक. [दूध] (वाप्र.) **दुधाचा जोर**–पु. निरोगी आईच्या, दाईच्या जोमदार दुधानें येणारी शक्ति, पुष्टि; दुधाचा गुण. **दुधाचे दांत**–पुअव. बाळपणांत येणारे दांत. (क्रि० येणें; निघणें; फुटणें; होणें). 'इकडे वधूचे दुधाचे दांत पडूं लागतात' –भा ८०. **दुधाणा–णी**–पुस्त्री. दूध तापविण्याचें मातीचें भांडें. दुधणी पहा. 'घरांत गेली ठेऊं दुधाणा।'–दावि २३६. [दूध. प्रा. दे. दुद्धिणी=भांडें] **दुधाणी**–स्त्री. एका जातीचें झाड. दुधणी पहा. [दूध] **दुधाधारी**–वि. दुधावर राहणारा; दुग्धाहारी. [दुधा+आहारी अप.] **दुधापाण्याचा निवाडा**–पु. दूध आणि पाणि याच्या मिश्रणांतून दूध व पाणी निराळें करणें. अशी शक्ति हंसपक्ष्यांत असते असा कविसंकेत आहे. यावरून अनेक गोष्टींच्या खिचडीतून ग्राह्य तेवढाच भाग घेणें व त्याज्य भाग सोडून देणें. हंसक्षीर न्याय; क्षीरनीरविवेक पहा. **दुधाळ–ळू**–वि. पुष्कळ दूध देणारी (गाय, म्हैस इ०). [दूध+आळ–ळू–प्रत्यय] **दुधाळूं**–न. पांढरें अळू. [दूध+अळू] **दुधिया**–पु. १ एक प्रकारचें मादक पेय, औषध; भांगेचीं पानें वाटून त्यांत दूध, साखर व मसाला घालून केलेलें पेय. २ दुध्या भोपळा. 'कडुदुधिया माखिला। गुळें जैसा।'–ज्ञा १३.४६८. **दुधी**–स्त्री. एक वनस्पती. हिचा वेल तोडला असतां त्यांतून दुधासारखा पांढरा चीक निघतो. हिला लांबट शेंगा येतात. वासरांच्या दुधगा रोगावर हिचा उपयोग होतो. –वगु ४.२८. **दुधीण, दुधी**–स्त्री. (कों.) दुध्या भोपळ्याचा वेल. [दूध; प्रा. दे. दुद्धिअ; गु. दुधी] **दुधू**–पुन. (बालभाषा.) १ दूध; २ स्तन [दूध] **दुध्या**–पु. १ दुधिया; भांगेपासून केलेलें मादक, दूध मिश्रित पेय. २ दुध्या भोपळा. याच्या पांढरा, मुग्या इ० जाती आहेत. [दूध; प्रा. दुद्धिअ] **०हलवा**–पु. दुध्या भोपळा किसून, धुवून त्यांतील पाणी निथळल्यावर तुपांत परतून दुधांत शिजवून साखर घालून केलेलें पक्वान्न. –गृशि १.४१९.

**दूनीची तान**–स्त्री. (संगीत). चिजेची जी लय सुरू असेल तिच्या दुप्पट लयीमध्यें घेतलेली तान. [दूण–न=दुप्पट]

**दूम**–पु. १ शेंपूट; पुच्छ. २ (कर) (ल.) पत्ता; तपास; शोध. (क्रि० लागणें). [फा. दूम्] (वाप्र.) ० **निघणें–बाहेर –पडणें**–(एखाद्याचा) भुसा पडणें; फार त्रास, कष्ट होणें; पादाडलें जाणें. **०पुरविणें**–(एखाद्याचा) पिच्छा पुरविणें; गळीं पडणें; खनपटीस बसणें. दु–**दूमोदूम**–क्रिवि. (व.) लागलीच; ताबडतोब; पाठोपाठ. 'दुमोदूम मनुष्य धाडला आणायला' [दूम द्वि.]

**दूम**–वि. १ दुसऱ्या, मध्यम, दुय्यम प्रतीचा; मध्यम. अवल= उत्कृष्ट, पहिल्या प्रकारचा व शीम=कनिष्ठ, तिसऱ्या प्रकारचा यांच्या जोडीनें प्रयोगांत रूढ. 'जमीन अवल, दूम, सीम तिही प्रतीची.'–वाड–समा १.३७. २ दुय्यम; हाताखालचा (अधिकारी इ०). मदतनीस. [फा. दूयुम्]

**दूर**–क्रिवि. पुष्कळ अंतरावर; लांब. वि. १–(काल, अंतर, संबंध, नातें इ०कांच्या बाबतींत) लांबचा; निकटचा, जवळचा नव्हे असा. २ असंभवनीय; दुरापास्त दुर्घट. ३ बडतर्फ; नोकरीवरून काढलेला. [सं. दूर; फा. दूर; फ्रें जि. दूर] **०करणें**–१ (एखाद्यास) बडतर्फ करणें; नोकरीवरून काढून टाकणें. २ (अडचण, संकट इ०) नष्ट करणें. ३ (अधिकार, सत्ता वगैरे) काढून घेणें; जप्त करणें. 'यांची पेशवाई दूर करून ...'–सभासद ८. ४ लांब लोटून देणें, परकेपणा दाखविणें, बाळगणें. 'दूर न करती यास्तव कल्याणा।'–दावि २८४. **०धरणें–पाहणें**–

(एखाद्यास) ममत्व सोडून परका लेखणें; (एखाद्याकडे) परकेपणानें पाहणें. **दूरच्यादूर**–क्रिवि. फार लांबवर; दूर अंतरावर; दूरवर. 'कीर्ति प्रगटली दूरच्यादूर.।' **दूरत:**–क्रिवि. दूरून; लांबून. **म्ह०** दुरून डोंगर साजरे.–डोंगर दुरून हिरवेगार व रमणीय दिसतात पण जवळ गेलें असतां रुक्ष व भयाण दिसतात. यावरून, पुष्कळ गोष्टी दुरून चांगल्या दिसतात व त्यांच्यासंबंधीं आदर वाटतो. पण प्रत्यक्ष जवळ जाऊन त्या बारकाईनें पाहिल्या तर त्यांच्यांत पुष्कळ दोष आढळतात, व त्यांचा कंटाळा येतो. क्वचित् या म्हणीला 'जवळ जातां कांटेकुटे' असा उत्तरार्ध जोडण्यांत येतो. (सामाशब्द.) **०दर्शन**–न. १ दूरदृष्टि; दीर्घदृष्टि; दूरवर विचार करणें. २ दूरदर्शीपणा; दूरदर्शित्व. [दूर+सं. दर्शन=पहाणें] **०दर्शी–दृष्टि–द्रष्टा**–वि. १ दूरवर, खोल विचार करणारा पहाणारा. २ भविष्यदर्शी; भविष्यचिंतक. ३ दीर्घदृष्टीचा [दूर+सं. दृश्=पहाणें] **०दस्त दुरदस्त**–वि. दूरचा; लांबचा. लाहोर प्रांत दूरदस्त आहे.'–इम २६७. [फा. दूरदस्त] **०दृष्टि**–स्त्री. १ खोलवर, दूरवर विचार करण्याची शक्ति; कुशाग्रबुद्धि. २ दीर्घदृष्टि; भविष्यकाळावर नजर ठेवून काळजीपूर्वक विचार करणें. [दूर+दृष्टि] **०द्रष्ट**–न. दुर्दैव; नशीब. 'न लागतां माझा शोध कपी सारे म्हणती ते हारे दूरद्रष्टा।'–मोरा १.३३२. [दु +अदृष्ट] **०वर**–क्रिवि. लांबवर; खोलपणानें; दूरदृष्टीनें (क्रि० पाहणें, विचार करणें, नजर देणें). 'महादेवा देई दूरवरी दृष्टी।नको करूं कष्टी मुनीश्वरा।'–मध्व.५८३. **०विचार**–पु. दूरदृष्टि; दूरदर्शित्व. **०विचारी**–वि. दीर्घदर्शी; दूरवर विचार करणारा. [दूरविचार] **दूरशी–सी**–वि. रजस्वला; विटाळशी; अस्पर्शी. 'दुष्ट म्हणे स्वसभेला तुजला नेतोंचि दूरसी अस कीं।'–मोसभा ५.६. 'स्त्री दूरशी झाल्यावर पांचवे दिवसापासून ...'–गृहवैद्य १५. **दूरश्रवणयंत्र**–न. दूरच्या माणसाशीं बोलण्याचें यांत्रिक साधन (इं.) टेलिफोन. [दूर+सं. श्रवण=ऐकणें+यंत्र] **दूरस्थ**–वि. दूर असलेला; लांबचा; दूरदेशीं असलेला. [दूर+सं. स्था=असणें, उभें राहणें] **दूरीकरण**–न. दूर करण्याची क्रिया, दूर करणें; वियोग. [सं.]

**दूरदेशी**—स्त्री. दूरदृष्टि; दूरदर्शित्व. 'पुढील संकट दूरदेशीनें जाणून ...'–इमं २५६. [हिं. दूरंदेशी; फा. दुर्+अंदेशा]

**दूरावणें**—अक्रि. दूर जाणें, दुरावणें पहा. 'नको दूरावूं तूं कठिण पद बा दे त्यजुनिया।' [दूर]

**दूरीं**—क्रिवि. (काव्य.) दूर; लांब अंतरावर. [दूर]

**दूर्वा**—स्त्रीअव. एक प्रकारचें पवित्र मानलेलें गवत. हें गणपतीस प्रिय आहे. पूजेव्यतिरिक्त या गवतास 'हरळी' म्हणून उल्लेखितात. हिचीं मुळें सदां सर्वकाळ ओलीं राहतात. या तृणाचा उल्लेख ऋग्वेदांतहि आढळतो. –ज्ञाको (द) १३७. [सं.] हें गवत औषधी आहे **०व्रत**–न. (बायकी) स्त्रियांनीं दूर्वांची पूजा करण्याचें एक व्रत. **दूर्वाष्टमी**–स्त्री. भाद्रपद शुद्ध अष्टमी हा दूर्वाव्रताचा दिवस असतो. [दूर्वा+अष्टमी]

**दूर्वेगूष**—वि. घोड्याचा एक विशिष्ट रंग. यांत घोड्याचें सर्व शरीर लाल असून त्यांत काळ्या रंगाचें मिश्रण असतें. शेंडी, आयाळ, दूम, हातपाय काळे व कान सफेत असतात. –अश्वप २९.

**दूल**—पु. (कों.) मुलाच्या कानांत घालण्याचा एक दागिना डुल पहा. [सं. दुल्=हालणें, डोलणें]

**दूशेर**—स्त्री. (खा.) ऊं; जोखड.

**दूषक**—वि. १ दोष लावणारा; निंदक. २ दूषित करणारा. [सं.]

**दूषण**—न. १ दोष लावणें; निंदा करणें; दोष, न्यून काढणें. २ आढळलेला, लादलेला, दोष; न्यून. ३ ठपका; आक्षेप. ४ बिघडविणें; दूषित करणें. ५ (कुमारीला, स्त्रीला) भ्रष्ट करणें; कौमार्य, पातिव्रत्य भंग करणें. ६ न पाळणें; मोडणें (वचन, करार). [सं.]

**दूषणार्ह–दूषणीय, दूष्य**—वि. निंदेस पात्र; निंद्य; दोषार्ह. [सं.]

**दूष(षि)णें**—उक्रि. १ दोष, न्यून काढणें. 'त्याचा पूर्वपक्ष म्यां दूषिला.' 'काव्य करावें म्यां नच वचकावें दूषितो, परि लघुस।'–मोस्फुटआर्या नवनीत २५४. २ दोष, कलंक लावणें, लागणें. कलंकानें दोषानें युक्त करणें; कलंकित होणें; करणें. 'या पोरानें अकर्म केल्यामुळें आमचें घर दूषलें.' [सं. दूषण]

**दूषित**—वि. १ दोष लावलेलें; निंदित; आक्षेप घेतलेलें. २ बिघडलेलें; भ्रष्ट, दोषयुक्त झालेलें; कलुषित; कलंकित (शब्दश: व ल.) [सं.] **०ताप**–पु. दोषी, विषारी ताप; (इं.) सेप्टिक् फीव्हर. 'माझ्या पत्नीला दूषित ताप येत आहे म्हणून ती जरा घाबरली आहे.'–सुवे १३७.

**दूष्य**—वि. दूषणीय पहा.

**दूष्य–दूश्य**—न. तंबू. [सं.]

**दूस**—पु. १ वस्त्र. २ तंबू; डेरा. दुस पहा. [सं. दूश्य; प्रा. दूस]

**दूस**—पु. प्रमेय. –शर.

**दूह**—स्त्री. (गो.) मुलगी; कन्या; धू; दुहिता. [सं. दुहिता; प्रा. दुहिआ]

**दृक्–ग्**—स्त्री. दृष्टि; नजर. कमलदृक्, दृक्कर्म, दृग्गोचर, दृग्विषय, दृक्कर्ण, दृगध्यक्ष, दृग्विषय इ० सामासिक शब्दांत दृष्टि, डोळे, या अर्थानें उपयोग. जसें:–कमलदृक्=कमलाप्रमाणें डोळे आहेत ज्याचे तो. दृग्गोचर=दृष्टीला दिसणारा इ०, शिवाय एतद्दृक्,

तद्दृक्, दोषदृक्, निपुणदृक्, इ० समासांत पहाणारा अशा अर्थानें उपयोग. जसें:-एतद्दृक्=हें पाहणारा, दोषदृक्-दोष पाहणारा. [सं. दृश्] सामाशब्द-०प्रत्यय-पु. प्रत्यक्ष पाहिल्याचा पुरावा; दृष्टि प्रमाण; (क्रि० पाहणें; दाखविणें; दृक् प्रत्ययास आणणें; उतरणें). [दृक्+सं. प्रत्यय=अनुभव, प्रचीति] ०पात-पु. नजर टाकणें; फेकणें; दृष्टिक्षेप; पाहणें. [दृक्+सं. पात=पडणें] ०सूत्र-न. दृष्टिपथ; दृष्टीची रेषा. [दृक्+सं. सूत्र=धागा, मार्ग] ०क्षेपमंडळ ०क्षेपवृत्त-न. (ज्यो.) त्रिभोन लग्नां (नव्वद अंशां) तून जाणारें लंबवृत्त. दृश्य क्रांतिवृत्ताच्या सर्वोच्च बिंदूंतून जाणारें याम्योत्तरवृत्त. दृग्गोचर-वि. डोळयांनां दिसणारें; दृश्य; दिसणारें; दृश्यमान. [दृक्+सं. गोचर] दृग्गोल-पु. १ बुबूळ. २ (ज्यो.) दृङ्मंडल पहा. [दृक्+गोल] दृग्ज्या-स्त्री. (ज्यो.) नताश ज्या. दृङ्मंडल, दृग्वृत्त, दृग्वलय-न. (ज्यो.) लंबवृत्त; खम ध्य वृत्त. दृङ्मात्र वि. ज्ञानमात्र. 'जेणें ज्ञान सज्ञान होये। दृङ्मात्र दृष्टीतें विये। प्रकाशाचा दिवो पाहे। प्रकाशासि। -अमृ ७.२७३. [दृक्+सं. मात्र प्रत्यय]

दृग्राड—वि. (राजा.) अवाढव्य; अजस्र; फार मोठा; अवजड; जगड्वाळ. (सामान्यतः वस्तूच्या संबंधीं प्रयोग). [सं. दीर्घ+आड प्रत्यय]

दृढ—वि. १ (अक्षरशः व ल.) पक्का; घट्ट; कठिण; ज्याचें भेदन, छेदन व चलन करणें कठिण आहे असा. 'हा दृढ पाषाण आहे; हा शस्त्रानें फुटणार नाहीं.' 'तोफेच्या गोळयानेंहि भोंक न पडेल अशी दृढ भिंत घालावी.' २ निश्चित; कायम; मुकर. ३ ठाम; पक्का; स्थायिक. ४ पुरतेपणीं निश्चित केलेला; पक्क; अविचल (बेत, विचार, निश्चय). 'निश्चय दृढ असला म्हणजे ईश्वर कृपा करितो.' ५ (सामा.) पक्का; चिवट; चिकट. ६ मनात पक्की ठसलेली, बिंबलेली. 'एकदां ऐकलेली गोष्ट पुनः ऐकली म्हणजे दृढ होते.' या शब्दापासून अनेक सामासिक शब्द बनले आहेत व बनवितां येतात. जसें:-दृढनिश्चय-निर्धार-संकल्प= पक्का, ठाम निश्चय. -वि. पक्कया निश्चयाचा, निर्धाराचा (मनुष्य) दृढप्रयत्न-अतिशय नेटाचा प्रयत्न, प्रयत्न करणारा. तसेंच दृढसंकेत दृढसंधान-नियम-विश्वास-वैर-निष्ठा-व्रत-तप-सख्य-प्रेम-भक्ति धैर्य-वचन-अनुसंधान-पातिव्रत्य-सौभाग्य इ०समास होतात. दृढ-तनु-शरीर-देह, दृढांग=बळकट शरीराचा (मनुष्य, पशु इ०). सामाशब्द-०चित्त-पु. एकाग्र चित्त; काळजीपूर्वक दिलेलें लक्ष. (क्रि० करणें; देणें). [दृढ+चित्त=मन] ०प्रतिज्ञ-वि निश्चयी: कितीहि संकटें आलीं तरी निश्चय शिथिल न होऊं देणारा. [दृढ+प्रतिज्ञा=निश्चय] ०भाजक-पु. (गणित) खालीं बाकी उरूं न देतां कांहीं संख्यांस निःशेष भागणारी दुसरी सर्वांत मोठी संख्या; विवक्षित संख्यांचा सर्वांत मोठा साधारण विभाजक. [दृढ+सं. भाजक=भागणारा] ०भाव-पु ठाम, पूर्ण भक्ति, श्रद्धा, प्रेम. [दृढ+सं. भाव=श्रद्धा, प्रेम] ०मुष्टि-वि. १ चिक्कू; कृपण; कद्रु; कंजूष; हाताचा जड. २ लगामाचा एक प्रकार. -अश्वप १८५. [दृढ+सं. मुष्टि=मूठ] ०संधि-वि. १ घट्ट विणीचें; घटमूट. २ दाट; घनदाट; मध्यें फट, विरळ जागा नसलेला. [दृढ+सं. संधि= जोड, सांधा] दृढीकरण-न. १ पक्कें करणें. २ (ख्रि.) रोमी व इंग्लंडीय चर्चमध्यें बाप्तिस्म्याच्या वेळीं लहान मुलांच्या तर्फे जीं वचनें देण्यांत येतात त्यांच्या पूर्ततेची जबाबदारी मुलांनीं प्रौढ झाल्यावर स्वतःवर घेण्याचा विधि. (इं.) कन्फर्मेशन्. -सा. प्रा. १२१. 'पूर्ण ख्रिस्ती होण्याकरितां हीं दोन सांक्रमेंतें म्हणजे बाप्तिस्मा व दृढीकरण हीं अवश्य आहेत.' ई. वि. १७८. [सं.] दृढोत्तर-वि. जास्त बळकट; मजबूत. [सं. दृढतर अप.]

दृढावणें—अक्रि. दृढ, पक्का होणें; बळकट, मजबूत होणें. 'जशी जशी भक्ति दृढावते तशी तशी ईश्वरकृपा होते.' [दृढ]

दृढा(ढि)वा—पु. १ दृढपणा; बळकटी; पक्केपणा. २ निश्चय. 'निद्रन्चिया वा नवचे। ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे।' -ज्ञा ६.३४७. [दृढ+वा भाववाचक प्रत्यय]

दृति—स्त्री. सुगंध; सुवास. 'पवळेंयां चिआं दृती। जावडे फालओनि नीगुती।' -शिशु ५९०.

दृप्त—वि. गर्वानें ताठलेला, फुगलेला. [सं.]

दृप्त(दृप्ता)—स्त्री. (नृत्य.) दृष्टीमध्यें निश्चलता, विकसितपणा व सात्विकता दाखविण्याचा अभिनय. हा अभिनय उत्साहवृत्तीस अनुकूल आहे.

दृश्य—वि. १ दिसणारें. २ बाह्य; बाहेरील (अंग). -न. (ल.) जग. 'तरी तें आपणयापुढें। दृश्य पघळे येवढें।' -अमृ ७.८७. -पु (अंकगणित.) दिलेली किंवा गृहीत संख्या. [सं.] ०काव्य-न. ज्या काव्याचा अनुभव नटनटींनीं रंगभूमीवर केलेल्या अभिनयानें घेतां येतो तें; नाटक, सिनेमा. याच्या उलट श्राव्य काव्य. [दृश्य+काव्य] ०प्रसरण-न (पदार्थ.) पदार्थाचें प्रत्यक्ष झालेलें प्रसरण; (इं.) ॲपरंट् एक्स्पॅन्शन्. ०महत्त्व-न. (ज्यो.) नुसत्या डोळयांस दिसणारा मोठेपणा. [दृश्य+सं. महत्त्व=मोठेपणा]

दृश्यमान—वि. दिसूं लागणारें; नजरेपुढें असलेलें; दिसणारें. [सं.]

दृष्ट—स्त्री. १ दृष्टि, नजर. २ ज्याच्या वाईट नजरेनें मनुष्य, वस्तु इ० भारला जाणें व त्यास पीडा होणें. (क्रि० होणें, लागणें). 'लहान मुलांनां व सुंदर स्त्रीपुरुषांनां दृष्ट लागते.' -वि. पाहिलेलें, दिसलेलें; दिसणारें. [सं.] सामाशब्द- ०कूट-न. कोडें; गूढ; कूटप्रश्न. ०चोर-पु. (प्र.) दृष्टिचोर; दृष्टिचोर पहा. ०दोष-पु. प्रत्यक्ष, दिसणारा, ढळढळीत अपराध, चूक, दोषीपणा. याच्या उलट अदृष्टदोष=प्रारब्धानें घडलेला दोष, आलेली आपत्ति. 'दृष्ट

दोष नसतां व्याधी आली ईश्वरास शरण जावें.' २ प्रत्यक्ष दिसणारें पाप; आयुष्यांत (एखाद्याच्या) हातून घडलेलें पाप. याच्या उलट अदृष्टदोष=मानसिक, आत्मिक पाप. ३ -वि ज्याचा दोष नजरेस, आढळण्यांत आला आहे असा [दृष्ट+दोष=अपराध] ०पात-पु. (प्र.) दृष्टिपात; दृष्टिपात पहा. ०फोड-पु (प्र.) दृष्टिफोड; दृष्टिफोड पहा. ०बंध, ०बंधन-पुन. (प्र.) दृष्टिबंध, दृष्टिबंधन; दृष्टिबंध, दृष्टिबंधन पहा. ०भरू-वि. (प्र.) दृष्टिभरू; दृष्टिभरू पहा. ०भेट-स्त्री. १ मरणोन्मुख मनुष्याचे दूरचे पुत्रादिक आप्तेष्ट येऊन त्याची जी शेवटची भेट घेतात ती. 'माझ्या नाडी आटोपत चालल्या त्यास पुत्राची दृष्टभेट करवा.' २ कुशलप्रश्न, संभाषण इ० कानें विरहित अशी केवळ दर्शनमात्रानें होणारी भेट, गांठ, नजरानजर; दृष्टादृष्ट (प्र.) दृष्टिभेट 'त्यांची आमची काल दृष्टभेट मात्र जाली. अजून बोलायास फावलें नाहीं.' [दृष्ट+भेट] ०मणी-पु दृष्ट लागूं नये म्हणून लहान मुलाच्या हातांत, गळ्यांत बांधतात तो पांढरे ठिपके असलेला काळा मणी. [दृष्ट+मणि] ०विकार-पु. (प्र.) दृष्टिविकार पहा. दृष्टादृष्ट-स्त्री. परस्पर दर्शन, पाहणें; नजरानजर; दृष्टिभेट. [दृष्ट+अदृष्ट=न दिसलेलें, न पाहिलेलें] दृष्टार्थ-पु. १ दिसणारी वस्तु; दृष्टीचा विषय. २ ऐहिक जीवनांतील (एखादी) उपभोगाची, अनुभवाची गोष्ट. -क्रिवि इहलोकच्या फायद्याकरितां, सुखाकरितां [दृष्ट+स. अर्थ=वस्तु, गोष्ट] ०कर्म-न. ऐहिक जीवनांतील फायद्याकरितां, सुखाकरितां करावयाचें कर्म. ०वाद-पु. जें जें इंद्रियगम्य असेल तेवढेंच सत्य असें प्रतिपादन करणारा संप्रदाय, मत. [दृष्टार्थ+सं. वाद=प्रतिपादन, मत] ०वादी-वि दृष्टार्थवादाचा पुरस्कार करणारा. [दृष्टार्थवाद] ०शास्त्र-न. दिसणाऱ्या किंवा इंद्रियग्राह्य गोष्टींचें शास्त्र; ऐहिक जीवनविषयक शास्त्र. याच्या उलट धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, व्यवहारशास्त्र, दंडनीति हे शब्द पहा. [दृष्टार्थ+शास्त्र] दृष्टोत्पत्तीस-क्रिवि. नजरेस; निदर्शनास; पाहण्यांत; आढळण्यांत; प्रत्यक्ष अनुभवास (क्रि० येणें) 'ही गोष्ट जेव्हां माझ्या दृष्टोत्पत्तीस येईल तेव्हां खरी वाटेल.' [दृष्ट+उत्पत्ति]

**दृष्टस्वप्न**—न. भयसूचक, पुढील अनर्थसूचक, अपशकुनी दुःस्वप्न. 'परिणामी काय होईल तें प वीं दृष्टस्वप्न आहे.' -पेद १०.६४.

**दृष्टाळणें, दृष्टाव(ळ)णें**—अक्रि. दृष्ट लागणें; दृष्टीचा वाईट परिणाम होणें; वाईट मनुष्याची नजर बाधणें. [दृष्ट]

**दृष्टांत**—पु १ दाखला; उदाहरण. 'चेंडु पडे आणि उटे तसाची। दृष्टांत हा सत्पुरुषास साची। मृत्पिंड जो त्या उठणेंच नाहीं। दृष्टांत हा केवळ दुर्जनाही।' -वामननितिशतक २ अनुभव प्रचीति; पडताळा. त्यानें प्रश्न सांगितला तो माझ्या दृष्टांतास आला.' 'त्याचा मला दृष्टांत आला.' ३ भूतभविष्यादि गोष्टींचें सूचक, दैवीस्वप्न. 'ऐसें जाणूनि रुक्मिणीपति। कौतुक केलें कैशा रीती। महादाजी पंतासी। दृष्टांत रात्रीं दाखविला।' ४ एक साहित्यालंकार; दृष्टांतालंकार पहा. दृष्टांतालंकार-पु (साहित्य.) एखादा विशेष प्रकृतार्थ विशद करण्याकरितां विशेष अप्रकृतार्थाचें जें उदाहरण देतात तें. 'आस्फालितां ही स्वकरें नराहे। चेंडु असा तो उसळेच पाहे। विपत्तियोगें पडले जरी कां। तें धैर्य नोहे तरि साधुला कां!।' -वामननितिशतक.

**दृष्टांतिक, दृष्टांती**—वि. दृष्टांत म्हणून दावण्यास योग्य (श्लोक इ०); दृष्टांतांतील. [सं.]

**दृष्टावा**—पु. १ स्वप्नरूपानें होणारा देवता इ० कांचा साक्षात्कार; दृष्टांत. २ अनुभव; प्रचीति; पडताळा. [दृष्ट]

**दृष्टाळा**—वि. (राजा.) ज्याची नजर, दृष्ट बाधते असा (मनुष्य इ०); वाईट नजरेचा. [दृष्ट]

**दृष्टि**—स्त्री. १ नेत्रगोलस्थित जें पहाण्याचें इंद्रिय आहे त्याची वृत्ति, कार्य, तिनें झालेलें ज्ञान; पाहण्याचें सामर्थ्य; नजर. २ (ल.) (एखाद्या गोष्टीकडे द्यावयाचें) लक्ष; अनुसंधान. 'निरंतर शास्त्राकडे दृष्टि ठेवावी तेव्हां शास्त्र येतें.' 'त्यास पागोटें द्यावयाचें खरें परंतु माझी दृष्टि चुकली.' ३ (ल.) सत्, असत् जाणण्यास कारणीभूत असलेली मनोवृत्तिः (एखाद्याकडे पहाण्याचा, एखाद्याशीं वागण्याचा) रोख; कल; मनोवृत्ति. 'अलीकडे त्याची दृष्टि फिरली.' ४ (राजा.) पाषाणाच्या देवाच्या मूर्तीस रुपें इ० काचे बसवितात त्या डोळ्यांपैकीं प्रत्येक. ५ दृष्ट; वाईट, बाधक नजर. दृष्ट २ पहा (क्रि० होणें; काढणें). 'राधा म्हणत्ये हा! मज पुत्रवतींचीच लागली दृष्टि।' -मोस्त्री ५.५. -वि. पाहणारा; दर्शी पहा. समासांत उपयोग जसें. गुणदृष्टि; स्थूलदृष्टि; दोषदृष्टि इ०. [सं.] (वाप्र.) ०ओळखणें-(एखाद्याच्या) नजरेवरूनच, चेहऱ्यावरून त्याचें मनोगत ओळखणें. ०काढणें-उतरणें-ओवाळून टाकणें-एखाद्यास वाईट दृष्टीची झालेली बाधा मंत्रतंत्र, तोडगा इ० कानें काढून टाकणें. ०खालून जाणें-(एखादी गोष्ट, वस्तु इ० एखाद्याच्या) डोळ्याखालून, नजरेंतून जाणें; स्थूलपणें माहीत असणें. 'ज्यांचें दृष्टीखालून गेलें। ऐसें कांहींच नाहीं उरलें।' -दा १६.९. ०घालणें-१ डोळा मोडणें, मिचकावणें, डोळ्यानें इशारा करणें. २ (एखाद्या गोष्टीकडे) काळजीपूर्वक पहाणें, लक्ष देणें, मन लावणें. 'स्वर्गांगनेसीं जरि साम्य आली। परंतु तेथें दृष्टी न घाली।' -रामदासी २.४३. ०चढणें-गर्वानें फुगणें; उन्मत्त होणें; डोळ्यांवर धूर येणें. ०चुकणें-विसरणें; गोंधळून जाणें; घोटाळ्यात पडणें. ०चुकविणें, चोरणें-(एखाद्याच्या) डोळ्यास डोळा न देणें; नजरेस पडण्याचें टाळणें. ०टाकणें-नजर मारून टाकणें; नजरबंद

करणें. 'कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे। हा दृष्टिबंधु निफजे। परी नवल लाघव तुझें। जें आपणपें चोरें।' –ज्ञा १४.५. **०ठेवणें देणें–राखणें**–(एखाद्या गोष्टीची, वस्तूची) काळजी घेणें; लक्ष देणें. 'ठेवीना गर्भींही दृष्टिस ती नीट जळहि सेवीना।' –मोअश्व ४.८. **०देखणें**–(काव्य) पाहणें. **०निवळणें**–१ बिघडलेले, आलेले डोळे पूर्ववत् स्वच्छ होणें. २ (ल.) गर्व, ताठा, उन्माद नाहींसा होणें. **०पडणें, होणें, लागणें**–(एखाद्याच्या) वाईट नजरेची बाधा होणें; दृष्ट होणें. **०फांकणें**–१ गोंधळून जाणें; भांबावून जाणें. २ नजर बेताल, ओढाळ होणें. **०फाटणें**–(एखाद्याच्या) आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, हेतु इ० वाढणें, विस्तृत होणें. **०फि णें**–१ राग येणें. 'येतां दृष्टी त्याची फिरली म्हणे।' –रामदासी २.९८. २ ताठा चढणें; गर्व इ०नें दृष्टि अंध होणें; धुंदी चढणें. **०बंद करणें**–नजर भारून टाकणें; मोहून टाकणें: नजर बंद करणें; दृष्टि चोरणें. **०भर पाहणें**–पोटभर, डोळे भरून. तृप्ति होईपर्यंत, मनसुराद पाहणें. 'पाहा जा सदृढ दृष्टि भरूनि।' –दावि ४६. **०मरणें**–तीच वस्तु अनेक वेळां पाहिल्यानें, तीच गोष्ट अनेक वेळां केल्यान, तिच्याबद्दलची भीति, आश्चर्य, हिडिसपणा इ० वाटेनासें होणें. 'माडावर चढून चढून भंडाऱ्याची दृष्टि मेलेली असते.' **दृष्टीची मु त राखणें**–(एखाद्याच्या) भावनस मान देणें; (ग्न द्यास) न आवडेल अशी गोष्ट त्याच्या समक्ष न करणें. **दृष्टीचें पारणें फिटणें**–जें पाहण्याविषयीं उत्कठा आहे तें पाहण्यास मिळाल्यानें समाधान पावणें. **दृष्टींत न आणणें**–न जुमानणें. 'ऐसें वदोनि आणित नव्हतासि च बा परामि दृष्टींत।' –मोगदाप्रस्थानिक २.२०. **दृष्टींत न येणें**–(एखाद्यास) तुच्छ लेखणें; कःपदार्थ मानणें. 'ज्याच्या दृष्टींत न ते सहसुत पांडवबळी न कंसारी।' –मोकर्ण ६.६६. **दृष्टीनें शिवणें**–डोळयांनीं पाहणें. 'म्हणतो नाहीं शिवलों दृष्टि करुनिही धराधवा हविला।' –मोआदि २.३. **दृष्टीस पडणें**–आढळून येणें: नजरेस येणें; अनुभवास येणें. **दृष्टीस फांटा फुटणें**–दृष्टि फाटणें; दृष्टीचें सामर्थ्य वाढणें. 'जैसें डोळयां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे।' –ज्ञा १.२३. **चार दृष्टि होणें**–भेट होणें; नजरानजर होणें. **अडव्या दृष्टीनें पाहणें**–वांकडया, काण्या डोळयानें पाहणें. **दृष्टीचा अंमल**–पु. १ पाहण्यांत, नजरेंत आलेला काळाचा अवधि. 'हा दरिद्रयाचा श्रीमंत झाला हें माझ्या दृष्टीच्या अंमलांतलें.' २ नजरेचें कार्यक्षेत्र. कर्तबगारी. 'चित्र काढणें हें दृष्टीच्या अमलांत.' **दृष्टीचा खेळ**–पु. नजरेनें, दृष्टीनें करावयाची चमत्कृतिपूर्ण कुशलतेची गोष्ट; नजरेचा खेळ. 'पाहून लिहिणें, चित्र काढणें, इ० दृष्टीचे खेळ आहेत.' **दृष्टीचा खोटा–पापी**–वि. दुसऱ्याचें चांगलें पाहून मनांत जळफळणारा; मत्सरबुद्धीचा. **दृष्टीचा पसारा**–पु. डोळयांनां दिसणारें विश्व. **त्या दृष्टीनें**–त्या धोरणानें, बुद्धीनें. 'पुत्राकडे पुत्रदृष्टीनें पाहिलें असतां ममता वाटते, नाहींतर सर्व एकच आहे.' म्ह० १ दृष्टीआड सृष्टी आणि वस्त्राआड जग नागवें=जें आपल्या देखत घडत नाहीं त्याला आपण जबाबदार नाहीं व त्याचा प्रतिकार करणेंहि कठिण. २ (व.) दृष्टी माया भाता भूक=दृष्टीस मूल पडलें कीं माया उत्पन्न होते, व भात पाहिला तर भूक लागते. दृष्टीसमोर कांहीं वाईट घडलें तर वाईट वाटतें. सामाशब्द–**०अभिनय**–पु. (नृत्य.) पापण्या, पापण्याचे केस, बुबुळें, बाहुल्या व भिवया यांच्या मदतीनें केलेला अभिनय. याचे प्रकार ३४ आहेत. तेः– कान्त, भयानक, हास्य, करुण, अद्भुत, वीर, बीभत्स, शांत, स्निग्ध, हृष्ट, दीन, क्रुद्ध, दृप्त, भयान्वित; जुगुप्सित, विस्मित, शून्य, लज्जित, म्लान, विषण्ण, शंकित, मुकुल, कुंचित, जिह्म, अभितप्त, ललित, अर्धमुकुल, विभ्रांत, विप्लुत, आकेकर, विकसित, मध्यममद, अधमपद व त्रस्त. **०कोन**-पु. विचार करण्याचें, पाहण्याचें धोरण, रोंख, मनोवृत्तिः विचारसरणी. (इं.) अँगल ऑफ् व्हिजन्. 'आमचा दृष्टिकोन भिन्न असल्यामुळें त्यांनीं योजिलेली भाषा आम्हांला साहजिकच पटत नाहीं.' –मसाप २.२ १११. [दृष्टि+कोन] **०गुण**–पु. नजरेनें पाहिल्यामुळें पाहिलेल्या वस्तूंचें, मनुष्याचें बरें वाईट करण्याची (एखाद्यांतील) विशिष्ट शक्ति. **०गोचर**–वि. डोळयांनां दिसणारें; पाहतां येणारें; दृष्टीस पडणारें. [दृष्टि+सं. गोचर] **०चरित**–क्रिवि. जाणूनबुजून, बुद्धिपुरस्सर केलेलें (पाप इ०). –ज्ञाको (क) १३८. [दृष्टि+सं. चरित=आचरलेलें] **०चोर**–पु. दुसऱ्याचा डोळा चुकवून चोरण्याचा, पळण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा मनुष्य. [दृष्टि+चोर] **०देखत–तां**–क्रिवि. समक्ष; पहात असतांना; डोळयांदेखत. [दृष्टि] **०पथ**–पु. दृष्टीची रेषा, टप्पा. [दृष्टि+सं. पथिन्=रस्ता] **०परीक्षा**–स्त्री. (वैद्यक शास्त्र) रोग्याच्या डोळयांवरून, दृष्टीवरून रोगाची चिकित्सा करणें. [दृष्टि+परीक्षा] **०पात**–पु. १ (एखाद्या वस्तूवर, मनुष्यात ) नजर पडणें, वळणें; अवलोकन. २ नजर बाधणें; दृष्ट लागणें. [दृष्टि+सं. पात=पडणें] **०पिंड**–पु. डोळयांतील पारदर्शक भिंग; (इं) लेन्स्. 'कांहीं मुलांस जन्मतः दृष्टिपिंडास विकार होऊन, त्या पिंडाची पारदर्शकता नाहींशी होते.' –बालरोग चिकित्सा १२६. [दृष्टि+पिंड] **०फोड**–स्त्री. १ बारीक पाहणी; चौकशी. २ डोळयांस त्रास होईल अशा प्रकारचें जिकीरीचें काम; डोळेफोड सर्व अर्थी पहा. –वि १ डोळयांनां त्रास, ताण देणारें (कलाकुसरीचें काम, किचकट लिखाण इ०). २ (क.) डोळयांस हिडिस दिसणारें; ओंगळ. [दृष्टि+फोडणें] **०बंध–बंधन**–पुन. मंत्रसामर्थ्यानें डोळे भारून टाकणें; नजरबंदी 'कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे। हा दृष्टिबंधु निफजे।' –ज्ञा १४.५.

[दृष्टि+सं. बंध, बंधन=बांधणें]० भरु–वि. देखणा; सुंदर; डोळ्यांत भरणारा. [दृष्टि+भरणें] ०भेट–स्त्री. १ आसन्नमरण मनुष्यास त्याच्या लांबच्या पुत्रादिक आप्तांची झालेली शेवटची दृष्टादृष्ट. २ दृष्टादृष्ट; नजरानजर. [दृष्टि+भेट] ०मंडल–न. दृग्वलय; दृङ्मंडल; खमध्यवृत्त. [दृष्टि+सं. मंडल=वर्तुळ] ०मणी–पु. लहान मुलास दृष्ट होऊं नये म्हणून त्याच्या गळ्यांत, मनगटाला बांधावयाचा कांचेचा पांढऱ्या ठिपक्यांचा काळा मणि. ०मर्यादा–स्त्री. मनुष्याच्या डोळ्यांना जेव्हढा पृथ्वीचा भाग दिसूं शकतो तेवढी जागा; दृष्टीच्या टप्प्यांतील भूभाग; क्षितिज; काळीधार; चक्रवाल. [दृष्टि+मर्यादा=सीमा] ०रचना–रचनेचाउभार–स्त्रीपु. (काव्य) डोळ्यांनां दिसणारा इहलोकचा, सृष्टीचा पसारा. ०विकार–पु. १ वाईट मनुष्याची (लहान मुलास) नजर लागून झालेली बाधा. २ दृष्टीचा रोग; डोळे बिघडणें. [दृष्टि+विकार=बाधा] ०ऱ्हस्वता–स्त्री. लांबचें न दिसणें; (इं.) शॉर्टसाइट्. हा विकार मुलांनां सात ते नऊ वर्षांपर्यंत होतो. एकाग्रतेनें पाहण्यानें अगर वाचनानें हें व्यंग चांगल्या मनुष्यांसहि नवीन होऊं लागतें. –ज्ञाको (अं)९५. [दृष्टि+सं. ऱ्हस्वता=आंखुडपणा] ०हेळा–स्त्री. कृपाकटाक्ष. 'जयाचिये दृष्टिहेळाचि संसारू। निरसोनि जाय।' –विपू २.२८. दृष्ट्यगोचर–वि. अदृश्य; न दिसणारें. [दृष्टि+सं. अगोचर–इंद्रियगम्य नव्हे असें]

**दृष्टिवा**—पु. (महानु.) अवलोकन; नजर. 'सहज सरळ सुहावा। ।।. दाताराचा दृष्टिवा।' –ऋ ३६. [दृष्टि]

**दृष्टोळा**—पु. वाईट नजर; दृष्ट अर्थ २ पहा. [दृष्टळणें]

**दृष्ट्या**—क्रिवि. १ डोळ्यांनीं; नजरेनें; प्रत्यक्ष. 'मी दृष्ट्या पाहीन तेव्हां मला खरें वाटेल.' २ दृष्टीनें, हेतूनें; धोरणानें. समासांत उत्तरपदीं विशेष उपयोग. जसें:–कामदृष्ट्या, क्रोधदृष्ट्या, लोभदृष्ट्या, मोहदृष्ट्या, कृपादृष्ट्या=अनुक्रमें काम, क्रोध, लोभ, मोह व कृपायुक्त नजरेनें. मित्रदृष्ट्या=मित्र या दृष्टीनें; मित्र म्हणून. शत्रुदृष्ट्या=शत्रूच्या नजरेनें. लोकदृष्ट्या=लोकांच्या दृष्टीनें, मतानें. शास्त्रदृष्ट्या, दोषदृष्ट्या, पुत्रदृष्ट्या, द्वेषदृष्ट्या, पापदृष्ट्या, वस्तुदृष्ट्या इ० [सं. दृष्टि या शब्दाचें तृतीयेचें एकवचन]

**देआवे**—(काव्य) यावें. 'तेह वेळीं तेआची देआवी बळी। महा–काळासी।'–शिशु ४९६ [देणें पहा.]

**देऊपांशेरी**—स्त्री. १ व्यापारी लोक जिन्नस मोजून घेण्याचें एक व देण्याचें एक अशीं निरनिराळीं वजनें व मापें ठेवतात. त्यांपैकीं घ्यावयाचें माप मोठें असतें व यावयाचें माप लहान असतें. त्यांपैकीं यावयाचें माप. एक पांचशेरी वजन. मूळ वजनापेक्षां हें कमी असतें. त्यामुळें खोटें माप गिऱ्हाइकास देतां येतें २ यावरून (ल) अतिशय कृपणपणा. –वि. (ल.) कृपण. याच्या उलट घेऊपाशेरी.

**देऊळ**—न. देवघर; देवालय; मंदीर. [सं. देवालय; प्रा· देउळ; फ्रेंजि. देवेल (देव, स्वर्ग); आर्मे. लेवल (देव); पोर्तु. देवेल.] ०घांट–स्त्री. १ मंदिरांतील घंटा; २ (ल.) बडबड्या, बढाईखोर माणूस ०राऊळ–न. मंदिर व राजवाडा. म्ह. देवळीं रावळीं तीनदा=अनेक यत्न केल्याशिवाय हातीं घेतलेलें काम सोडूं नये. ०वाडा–पु. देवळाभोंवतालचें सेवक राहावयाचें आवार.

**देकार**—पु. १ दक्षिणा; दान; धर्मादाय; देणगी. 'जगीं मान्य केलें हा तुझा देकार। कीं कांहीं विचार आहे पुढें।'–तुगा १२७८. २ (व.) लग्नांतील अहेर. ३ (गो.) एक खंडी भाताचे तादुळ करण्याबद्दल भाताच्या रूपानें देण्याची मजुरी. (क्रि० देणें, करणें, वांटणें). [देणें+कार]

**देख**—पु. १ दर्शन. २ देखावा (क्रि० दाखविणें)–स्त्री. (गो.) कित्ता; वळण; चाल. ताणँ म्हजी देख घेतल्या. [सं.दृश्]
०दुखी–खगा–वि. मत्सरी; हेवेखोर;

**देखणा**—वि. सुंदर; मोहक; छबडा. 'जानकीचे देखणे नेत्र। सांडोनियां क्षराक्षर।'–भावार्थ किष्किंधा १३.५९. –पु. पाहणारा; डोळस माणूस. 'मार्गी अंधासारिखा। पुढें देखणाही चाले जैसा।' –ज्ञा ३.१५६. देखणाऊ–वि. डौली; दिखाऊ; पोशाकी; सुंदर पण कुचकामाचा. देखणिक–स्त्री. दृष्टोत्पत्ति; दृष्टी. 'बुद्धी तेजापासूनि झाली। म्हणोनि दखणिकेला आली।' -सिसं २३.

**देख(ग)चा, देवकें**–पुन. डेचकी; स्वयंपाकांतील मोठें भांडें. डेग पहा. [फा. देग्]

**देखणें**—न. १ जमीनींत पुरलेलें गुप्तधन; ठेवा. 'येक दाविती देखणीं।'–दावि ६४. २ भपका. 'देखणें दाखविती आदरें। मंत्र फुंकिती कर्णद्वारें।'–दा ५.२.२९. ३ प्रकाश; दृश्य; देखावा. 'तेवीं लचकलिया दिठी। मग देखणें जें जें उठी।'–ज्ञा १४.८४. 'म्हणोनि किरीटीसि दोहीं परी। तें देखणें देखे आंधारीं। –ज्ञा ११ २३५ ४ दृष्टि; अवलोकनशक्ति; नेत्र. 'शस्त्रांपासाव तेज तळपे। तें देखोनि देखणें दिपे।' –गीता १.३३३.–सक्रि. १ पाहणें. 'त्या या कर्णाचें भुजबल, खलबल जलधिमाजी देखाल।' –मोकर्ण २ ११. २ ध्यान देणें; मनन करणें. ३ शोधणें; चौकशी करणें; हेरणें; तपासणें. [सं. दृश्; द्रक्ष; प्रा. देक्ख हिं. देखना; फ्रेंजि दीख; आर्मे. लेख पोर्तु. दिक, दिकेदार, देकार; तुल० लिथु. झेरकोलास=आरसा; ग्री. देरको; हिब्र्यू दिअरकैम=मी पाहतों.] ०पण–न. ज्ञानदृष्टि; पाहण्याची शक्ति; ज्ञान 'वेदींचें बृहत्साम सूत्र। जें देखणेपणें पवित्र।'–ज्ञा. १३.६८ म्ह०–१ देखनेमे ढब्बू चलनेमे शिवराई=दिसण्यांत पुष्ट पण कामाला निरुपयोगी. २ (व.) देखला वडा उपास मोडा=भूक नसतांहि कुणी कांहीं खातांना पाहून तें खावयास मागणें. ३ देखल्या देवा दंडवत=सहजगत्या. भक्तिपूर्वक नव्हे. केलेला नमस्कार.

**देखत**—क्रिवि. १ पाहतांना; बघतांना. डोळ्यांसमोर; प्रत्यक्ष २ (ल.) जिवंत, हयात असताना; हयातींत; आयुष्यांत; जिवंत पणीं. 'माझ्या देखत मुलाचें लग्न व्हावें, मी डोळे झांकल्यावर मग वाटेल तें होवो.' ३ उघड उघड; स्पष्टपणें. 'देखत देखत मुदई-' पेद १०.८०+१ 'देखत सोदा, देखत दिवाळखोर आणि त्यास रुपये देऊन बसलास,' देखतच्यापुढें खालील शब्द जोडतात. जसें—देखत सोदा, लुच्चा, लबाड, हरामी इ० [देखणें] ०कामा्या—वि. चुकारतट्टू (नोकर); फक्त दृष्टिसमोर काम करणारा. ०खेवों-क्रिवि. पाहण्याबरोबर; पहातांक्षणीं. 'ऐसें भृंगारियाहि उपजे। देखःखेवों।' —ज्ञा ६.१७०. [देखत+क्षण] ०चिट्ठी-पत्र क्रिवि. पत्र पाहतांक्षणीं. ०चोर-वि दृष्टिसमोर चोरी करणारा; अट्टलचोर ०देखतां-क्रिवि. पाहतां पाहतां; जाणतां जाणतां. 'देखत देखतां आत्मघातु। घडला जेया।' —ऋ. ८. ०भुली-भूल-स्त्री. १ नजरबंदी; दृष्टिभ्रम (जादूगीराचा). (क्रि० करणें, पाडणें, पडणें). २ नजरचूक; ०हुकूम-क्रिवि. हुकूम पहातांच. ताबडतोब.

**देखतां**—क्रिवि. १ पहातांना; डोळ्यांदेखत. २ (ल.) जिवंत असतांना; हयातींत.

**देखता**—पु. पाहाणारा; द्रष्टा. 'भरुनि प्रपंचाचा घोंटु। कीजे देखतयाचि देखतां द्रष्टु।' —ज्ञा १६.५०.

**देखभट्टी**—स्त्री. गुरूपासून शिक्षण न घेतां नुसतें पाहून पाहून शिकण्याची कळा, रीति. यासारखेंच ऐकभट्टी. उ० 'मी कांहीं चित्रें करावयास कोणापाशीं शिकलों नाहीं; करितों ही शुद्ध देखभट्टी आहे.' [देखणें+भट्टी] देखभट्टीचें ज्ञान—न. वरील रीतीनें गुरुशिवाय मिळविलेलें ज्ञान.

**देखरेख**—स्त्री. नजर ठेवणें; चौकशी; पाहणी; पैरवी.

**देख(खा)वा**—पु. १ किंचित् नमुना; दिग्दर्शन; दाखविलेली चुणुक; ईषन्मात्र प्रकाशन. 'पावसानें देखवा मात्र दाखविला.' २ दर्शनी भाग-बाजू; दृश्य; दृश्यभाग. ३ दृष्टिविषय. ४ (इमारत) दर्शनी देखावा=समोरील भाग. फ्रंट एलीव्हेशन. बाजूचा देखावा= बाजूचा भाग. साइड एलीव्हेशन. इ० [देखणें]

**देखाऊ**—दिखाऊ पहा.

**देखी**—स्त्री. (काव्य) अनुकरण करण्याकरितां अवलोकन, पाहणी; कित्ता; वळण. 'जे आचरतां आपणपेयां। देखी लागल लोका यया।' —ज्ञा. ३.१५४ (क्रि० लागणें). [देखणें] ०चा-वि. अनुकरण करणारा. ०चें-वि. वरवर दिसणारें. 'देखीचें तें ज्ञान करावें तें काई।' —तुगा २८१०.

**देखीनें**—न. (कों.) (संसर्गजन्य असल्यामुळें) देवीचा रोग. (क्रि० येणें)

**देखील-द-ल, देखून**—क्रिवि. १ सुद्धां; हि २ (तुलना करतांना जोर द्यावयाचा असल्यास) सुद्धा. उ० राजादेखील त्याच्या पाया पडतो ३ तसेंच. ४ सह; मिळून; समावेश करून; उ० या शेतास देखील बाबती पांच मण भात पडतें.' 'बटीक देखील पोरें असामी तीन.' —वाडबाबा २.१९१ ५ (गो. देखून) मुळें; कारणें; म्हणून; यासाठीं. [फा. दाखिल्]

**देखीव**—वि. १ पाहिलेलें; स्वावलोकनानें माहीत असलेलें. याच्या उलट ऐकीव. २ आनंदकारक; पाहण्यास संतोषदायक; दिखाऊ [देखणें]

**देखीवखीं**—क्रिवि. (व.) तोंड देखलें; वरकरणी.

**देखूं(श)सकणें**—१ पाहूं शकणें; सहन करणें. (मत्सरी माणसाकडून); सह्य असणें; पाहवणें; उ० 'कोणाचें कल्याण याला देखूं शकत नाहीं.' 'जो संतां न देखूंसके अपवित्र। त्याचे रागें गीध फोडिती नेत्र.' २ मत्सर बुद्धीनें पाहिले जाणें. 'सखा धाडिला राम माझा वनासी। न देखो शके त्या जगज्जीवनासी।' [देखणें +शकणें]

**देखोदेख-खी**—क्रिवि. १ चढाओढीनें; ईर्षेनें. म्ह० देखोदेखी कुले शेखी—दुसऱ्याचें पाहून अनुकरण करणारा. २ पाहून पाहून. ३ एखाद्याच्या दृष्टिदेखत; हातोहात. [देखणें द्वि.]

**देखोदेखी-वेखी, देखावखी-वाखी**—स्त्री. अनुकरण; स्पर्धा; चढाओढ उ० 'बापाचे देखोदेखीनें मुलगा चोर झाला.' —क्रिवि १ वरवर; स्पर्धेनें; चढाओढीनें. २ दुसऱ्याचें पाहून. 'अंतरींचा भाव काय कळे लोकां। एक मानी एका देखोवेखीं.' —तुगा १६५१. [देखणें]

**देग**—स्त्री. धातूचें मोठें भांडें. डेग पहा.

**देग(गु)ण**—न. (गो.) मातीचा उंचवटा.

**देघ**—स्त्री. देणे घेणें; सावकारी; पैशाचा व्यवहार. [देणें+घेणें]

**दे(धा)ज**—न. (कों.) (खालच्या वर्गात) लग्नांत मुलाच्या बापानें मुलीच्या बापास द्यावयाचा पैसा-हुंडा; कन्याशुल्क. 'ताक-वीकीतियां गौळणी। देजासि वैकुंठ मनी।' —शिशु २०७. 'न घडेचि कव्हणें बोलें। तंव वेळीं जुंझांचें देज दीन्हलें।' —शिशु ४४१. [सं. दा]

**दे(टु)जा**—पु. (गो.) खूण. ०मारप-क्रि. नांव कमी करणें; नांव गाळणें.

**देट-ठ**—पु. १ राजगिरा किंवा माठाची भाजी. (झाडाच्या देठांची, कांडाची). २ पान, फूल, फळ यांचा आधारभूत दांडा. ३ तंबाखूच्या पानांतील शिरा [सं. दृढ ?]

**देटपुळी**—स्त्री. पाठीच्या कण्यावरील गळू किंवा काळपुळी. [देठ+पुळी]

**देटवा**—पु. देंट अर्थ १ पहा. भाजीचा देंठ. 'मालत्या बोटवे शुभ्र देटवे।'—अमृतसु ३५.

**देंटी-(ठी)**—स्त्री. (राजा.) १ कमळ इ०चा देंठ. २ बिव ळ्याची, पानवेलीची एक जात. ३ अळू, कमळ इ०च्या देंठाची भाजी किंवा रायतें, कोशींबीर. ४ माठ इ० झाडांच्या कोंवळ्या देठांची भाजी. —गृशि पृ १३४ [देंठ]

**देट-ठ-देंठ**—पु. १ फळ, फुल वगैरेचा दांडा. 'परी तंव भाग्य उत्तराचे देंटीं। शांतीफळें मिरवलीं।'-नव १६.१४१. २ (ल.) आधार; थारा; पाया; टेंकू; जोर. 'हे नित्य उत्सव करतात हें अवघे पैशाचे देटीं.' देठ—कळवळणें, पिळणें, फिरणें, देंठाला पीळ पडणें=माया येणें, आंतडयाला पीळ बसणें. ०चा . णें-कुळापासून निराळा निघणें; पडणें. **देंटीं ठेवणें**— आश्रय स ठेवणें. **देंठीं लागणें, देंठावरयेणें**—वाढीस भरभराटीस येणें; जम बसणें (धंद्याचा); फळदायी होणें. **देंठीं लावणें**—१ मुळापर्यंत जाणें. उगम शोधणें; माग काढणें. २ सोंपविणें; हवाली करणें (काम) **०चा तुटलेला**—वि. नवशिक्या; नवतर (माणूस); अपक्व **०गण**—पु (व.) झाडावरील कच्या फळाचा समूह. **०सुटा**—वि. परिपक्व; पूर्ण पिकलेलें; पिकून गळावयास झालेलें (फळ, इ०) **देंठांचें, देंठी पान**—न. १ पानवेलीची एक जात; तिचें पान; हें हिरवट, मऊ, विशेष लांब व कमी तिखट असतें. २ (कों.) अळवाचें पान.

**देट्टांग**—न. (गो.) चवली. [दीड+तांग]

**देठॉ**—पु. (गो.) खांब. [सं. स्था]

**देड**—न. (गो.) बात.

**देंडारी**—स्त्री. १ वांती; उलटी; खाकरणें आणि कुंथणें. (क्रि० देणें). २ (ल.) (गिळंकृत, लांच इ०) पैसा परत करणें; ओकणें. (नेहमीं अनेकवचनीं देंडाऱ्या असा प्रयोग). [ध्व.]

**देणगी**—स्त्री. १ बक्षीस; दान, इनाम २ (कायदा) कांहीं मोबदला न घेतां दुसऱ्याला फुकट दिलेली स्थावर किंवा जंगम मिळकत. (क्रि० देणें) [देणें]

**देणावळ**—स्त्री. चाकरी केल्याबद्दलचा पैसा; यावयाचा पैसा; मजूरी; भाडें; पगार. [देणें] **म्ह०** जशी देणावळ तशी धुणावळ= जसा दाम तसें काम.

**देणी**—स्त्री. १ (गंजिफा) डावांत नुसता वजीर आला असतां तो हुकूम करण्यासाठीं त्या जातीचें दुसरें हलकें पान टाकून विरुद्धपक्षाकडील राजा पाडावयाचा व आपला वजीर हुकूम करावयाचा ही क्रिया. याप्रमाणेंच खालील पानेंहि सर करावयाकरितां करावयाची क्रिया. २ (ल) मुलगी. [सं. दा. म. देणें]

**देणें**—न. १ कर्ज; ऋण. २ देणगी. ३ (ल.) कृपा. 'अरे देणें दिधलें हें रघुरायें।'—दावि ३२ [सं दा.] **०करी-दार**—वि. कर्जदार; ऋणको. **०घेणें**—न. देणेघेणें पहा.

**देणें**—सक्रि. स्वाधीन करणें; हवाली करणें; देणगी देणें; बहाल करणें; एकाकडून दुसऱ्याकडे जाणें. सोंपविणें; मान्य करणें; कबूल करणें; पुढें करणें; ठेवणें; स्वसत्तेचा निरास करणें, इ० सदर्भावरून अर्थ होतात. जसें:—**कान, चित्त देणें**—लक्ष देणें; मन लावून ऐकणें. **आज्ञा, रजा, निरोप देणें**—१ जाण्यास परवानगी देणें. २ कामावरून दूर करणें. **खांदा देणें-लावणें**—१ मदत करणें. २ प्रेताला खांद्यावर वाहून नेणें. **ढाळ देणें**—तेज पसरविणें (मोती इ०वर) **वाट देणें**-सवड देणें; जागा करणें. **लढाई देणें**—युद्ध करणें; सामना देणें; दोन हात करणें. कृत्य घडलें असतां कर्मावर कर्त्याचा स्वत्वसंबंध न मेल तेव्हा ऊन प्रत्ययांत सकर्मक धातूंस जोडून देणें याचा स्वार्थी प्रयोग होतो. जसें:—एवढें मला लिहून दे—खणून दे इ० म्हणजे माझ्यासाठीं वरील गोष्टी कर. टाकणें, सोडणें इ० वर्ज्यनार्थक धातूंच्या पुढें 'ऊन' प्रत्यय लावून पुढें देणें याचें रूप ठेवलें असतां तत्संबंधापासून आपण केवळ पूर्णपणें मोकळें होणें हा अर्थ निघतो उदा० याची मैत्री मी सोडून दिली. 'ऊन' प्रत्ययांत धातुसाधितापुढें देणें शब्द आला असतां त्या त्या क्रियेविषयीं परवानगी देणें; प्रतिबंध न करणें; असा अर्थ होतो. जसें:—मला जाऊं दे; ढेंकूण निजूं देत नाहींत. [सं. दा-दास्यति-दाससति-दास्यहि-दा न:-दासइ-दाहइ-दाइ दे; फ्रेंजि. दा; पोर्तु. जि दिणार, दिणेलार; झें. दा; ग्री दिदोमि =ददामि, ल्या दामि; हिब्रू. देविम्; कॅबो त्रि दोवि. ऊॅसे. दिंघ] **म्ह०** १ देणें नास्ति घेणें नास्ति—कोणाच्या भानगडींत न पडणें. २ दे माय धरणी ठाय होणें; संकटसमयीं मनाचा धीर सुटणें; पुरे पुरेसें होणें.

**देता**—वि. सढळपणें देणारा; उदार. [सं. दा] **०घेता**—वि. १ देण्याघेण्याचा व्यापार करणारा सावकार; नियमितपणें कर्ज घेऊन वेळच्या वेळीं फेडणारा. २ सढळ, खर्चीक हाताचा. उदा० कर्णासारखा कोणी एलीकडे देता घेता राहिला नाहीं. **०घेता खटखट**—स्त्री. पैशाच्या देण्याघेण्याच्या व्यवहारांतील खटपट, त्राम, भानगड संसारांतील त्राम. **०वणा-ना**—वि देण्यासारखा; देणारा; देण्याची संवय असलेला; याच्या उलट घेतावणा. **देतां घेतां**—क्रि. योग्य व्यवहाराच्या वेळीं किंवा नंतर

**देदीप्यमान**—वि. पराकाष्ठेचा तेजस्वी; चकचकीत; प्रकाशित [सं]

**देनगी**—स्त्री देणगी पहा.

**देनलेन**—पु देणे घेणें पहा

**देणेघेपा**—स्त्री. ज्यात लभ्यांश नाहीं अशी त्रासदायक देवघेव. [देणे+घेणे]

**देवाकवदिया**—पु. घोड्याचा रोग ( काळजाजवळ मोठाले फोड होतात ). –अश्वप २.३३०. [ बद ]

**देय**—वि. १ द्यावयाचें; देण्यास योग्य किंवा दिलेंच पाहिजे असें. 'मागों नको न देया हेया हे धेनु गाधिज्या माजी.' –मोआदि ३२.१२. २ बाकी; शेष. –राव्य ८.९. [ सं. ]

**देयकार**—पु. ( गो. ) शूद्रभट. [ देणें ]

**देर**—पु. दीर पहा. 'कामक्रोध देर मारिती हे लाता ।' –मध्व ३२७. [ सं. देवर ] **देराणी**–स्त्री. जाऊ. [ देवरपत्नी ]

**देर–देरी**—स्त्री. विलंब; उशीर; खोळंबा. ( क्रि० लावणें; करणें; लागणें ). 'एक घडीचें देर न करणें.' –रा १५.३६०. [ फा. देर् ] **०कशी**–स्त्री. दिरंगाई. 'असी देरकशी होणें खुश्नुमा दिसण्यांत येतें कीं काय ?' –रा ७ ८१.

**देल्ल**—पु. ( गो. ) उंबरठा. [ सं. देहली ]

**देव**—पु. १ ईश्वर; देवता. २ परब्रह्म; परमेश्वर; आदितत्त्व; शिव जगन्नियंता. ३ मूर्ति; लांकूड दगड, धातु इ० कांची मूर्ति; जींत विधिपूर्वक देवत्वाची प्रतिष्ठापना केलेली असते अशी मूर्ति. ४ स्वर्गांत राहणारे इंद्रादि दिव्य पुरुष. ५ (नाटक, काव्य) राजा; श्रेष्ठ. 'तो सहदेवहि देवा ! येतां त्वत्सूनुच्या कृपाणातें । क्षितिवरि पाडी ...' –मोकर्ण १४.२८. ६ यक्ष, किन्नर इ० उपदेव. अंगांत येणारें वारें. [सं. दिव्=प्रकाशणें; झें. दीव्, दएव=देव; ग्री. झ्यूस, थिऑस्; लॅ. जोव्हिस्; प्रा. आइस्लंडीक. तीवर=देव; प्रा. ज. झिओ; लिथु. देवस्; स्ला. दीना=दिवस] (वाप्र.) **०देव करितां**–क्रिवि. पुष्कळ प्रयत्न, हांजीहांजी, प्रार्थना करून. **०दिसणें**–( व. ) हाल होणें. 'बायको मेल्यावर देव दिसतील.' **०देव्हाऱ्यांत नसणें**–मालक( मन ) ठिकाणावर नसणें. **०नवसाला पावणें**–इच्छित फळ मिळणें. 'भूप म्हणे कर्णा हा जरि अर्जुन देव पावला नवसा ।' –मोविराट ३.८८. **०पावणें**–मनाजोगी गोष्ट घडणें. **०बाप्पा करणें**–(बालभाषा) नमस्कार करणें. 'तो देवबाप्पा कर म्हणाला त्याबरोबर तिनें हात जोडून नमस्कार केला.' –मुदे ५. **०होऊं लागणें**–अरेराव, दंडेल होऊं लागणें, होणें. वरचढपणा गाजविणें. **देवाकडे जाणें**–मरणें. **देवाचें नांव घेणें**–कार्याला प्रारंभ करणें. **देवाची(चे)आण, देवाचेण**–स्त्री. देवाची शपथ. **देवाच्यान**–देवाची आण, शपथ. **देवानें ड वा देणें**–नकार मिळणें ( उजवी=रुकार ); मनांत कांहीं हेतु धरून मूर्तीच्या डाव्या–उजव्या अंगास फुलें किंवा अक्षता चिकटवितात. त्या वरील प्रमाणें पडल्या असतांना समजावयाचा प्रकार. **देवानें भरणें, धरणें**–भरणें मध्यें पहा. **देवानें मारणें**–देवाची अवकृपा होणें. **देवावरची तुळस, फूल, बेल काढणें–उचलणें**–१ देवावरील निर्माल्य काढणें २ शपथ घेण्याचा एक प्रकार. **देवावर हवाला घालणें–देणें**–देवावर विश्वास टाकणें, भरंवसा ठेवणें; सर्वस्वी अवलंबून असणें. **देवावर हात ठेवणें**–शपथ घेणें. **देवाशीं बसविणें**–(गो.) अंगांत वारें, देव आणण्यास सांगणें. **देवास–ला करणें**–देवाची करणी. देवाची इच्छा याअर्थी एखादें अघटित कार्य घडून आलें असतां तोंडांतून निघणारा उद्गार. **देवास घेवणें**–शत्रूवर संकट आणण्यासाठीं देवाला बांधणें. **देवासारखा बसणें**–चुपचाप बसणें **न देवाय न धर्माय**–कोणत्याच चांगल्या कार्याकरितां (पैसा, श्रम) उपयोगी न पडणें. **देवास शिताळ देणें**–देवाला स्नान घालणें **म्ह०** १ मानला तर देव नाहीं तर धोंडा. २ (बायकी) देव नाहीं देव्हारीं, धुपाटणेवाला उडया मारी. ३ देव देतो आन् कर्म नेतं. ४ देवाचें नांव आणि आपला गांव=दुसऱ्याच्या नांवावर स्वतःचा फायदा करणें. सामाशब्द– **०ऋण**–न. देवाचें कर्ज. हें यज्ञयागादिकांनीं फेडतात व त्यामुळें मनुष्यास सुखप्राप्ति होते. याप्रमाणें दुसरीं ऋषिऋण व पितृऋण हीं अनुक्रमें अध्ययन व तर्पण यांनीं फेडावयाचीं असतात. **०ऋषि**–पु देवर्षि; नारद. [ ऋ.प. ] **०कला–ळा**–स्त्री. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर तींत येणारें तेज, वैभव, शक्ति इ०. देवासारखें ओज, कांति. [ सं. ] **म्ह०** टाकीचे घाव सोसावे तेव्हां देवकळा पावावी. **०कांचन**–न. कांचन फूलझाडांतील एक जात किंवा त्याचें फूल. **०कापशी–कापशीण**–स्त्री. कापसाच्या झाडांतील एक प्रकार. याचें फूल जांभळें असतें. याच्या कापसास देवकापूस म्हणतात. याच्या बोंडांत वेणीसारखी एक मोठी धी असते. –कृषि ३८३. **०कार्य**–न. १ देवाची पूजा. २ कुळधर्मानुसार कुळदेवतेची पूजा, अनुष्ठान, जेवण इ० **देवकी**–स्त्री. देवस्की पहा. –वि. देव किंवा पिशाच्च यांच्यापासून घडणारी पीडा, बाधा, उपद्रव, भाकीत, शकुन इ० **देवकी चमत्कार**–पुअव. देव पिशाच्च यांचा चमत्कार. याच्या उलट (किंवा याला जोडून) राजकी, अस्मानीसुलतानी याप्रमाणें. **०कुंडी**–स्त्री. (व.) लग्नाचे अगोदरचे दिवशीं बोहल्याच्या जवळ शास्त्रोक्त रीतीनें ठेवावयाचीं मडकीं. **०कुंभा**–पु. ( कों. ) कुंभा किंवा दुधाणी नांवाचें फूलझाड. **०कृति–कृत्य**–स्त्रीन. १ ईश्वरी करणी; दैविक घटना. २ धार्मिक कृत्य, विधि. **०केळी**–स्त्री. सामान्य कर्दळी नावाचें फूलझाड. **०खर्च**–पु. देवपूजेचा खर्च किंवा या खर्चाकरितां बसविलेला कर. **०खळ**–अव. (ना.) (तिरस्कारार्थीं) घरांतील देवाच्या मूर्ती. **०खोली**–स्त्री. देवघर. **०गण**–पु. जन्मनक्षत्रावरून मनुष्याचे देव, मनुष्य व राक्षस असे तीन वर्ग करतात त्यापैकीं प्रथम. मनुष्यगण पहा. **०गणपत**–न. ( सोंगट्यांचा खेळ) देवाला द्यावयाचा पहिला हात, दान. **०गत–ति**–स्त्री. १ नशीबाचा फेरा; दैवयोगानें प्राप्त होणारी दशा, स्थिति. २ (ल.) मृत्यु. ३ (गो.) विटाळशी असतांना मेलेल्या स्त्रीचें पिशाच्च. –वि. दैवी ( कृत्य, नाश इ० ). **०गाय**–स्त्री. मखमली किडा;

गोसाई. मृगाच्या पावसांत यांची उत्पत्ति होते. ०गांधार–पु एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य. जाति औडव–संपूर्ण. वादि षड्ज, संवादी पंचम. वेळ दिवसाचा दुसरा प्रहर. ०गिरी–पु. १ एक राग यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण वादी षड्ज. संवादी पंचम, गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. हा बिलावल रागाचा एक प्रकार आहे. २ दौलताबादचें जुनें नांव. ०गुरु–पु. बृहस्पति. ०गृह–घर–न. १ देव ठेवण्याची खोली. २ मंदिर. ०घाई–स्त्री. देवापुढें ढोल वाजविण्याची विशिष्ट गति, प्रकार. ०घाट–पु. देवळास जाण्यासाठीं बांधलेली वाट–रस्ता. ०चार–पु. ग्रामदेवीचें दूतरूपी पिशाच्च; पिशाच्चगण. [सं. देव+चारः देवाप्सरस] ०जन–पु. देवळांतील चाकरनोकर. ०जी–जी घसाडा–पु. १ माकडाच्या खेळांतील पुरुषाचे कपडे घातलेला माकड. यांतील माकडीणीला रत्नी म्हणतात. २ (ल.) अडाणी, कुरूप माणूस; विद्रूप मनुष्य. म्ह० (व.) देवजीघसाडया पुंजाइ पाद्री–नवरा हाणमार करणारा व बायको गरीब असें जोडपें. ०झाड–न. (कों.) देवानें किंवा पिशाच्चानें झपाटलेला मनुष्य. ०ठिकें–न. गांवांच्या सीमांचा तंटा देवापुढें दिव्य करून तोडल्यामुळें महाराला (इनाम) मिळालेली बिन साऱ्याची जमीन. ०डांगर–पु. काळा भोंपळा; चाकी. हें फळ दुध्या, मुगा अथवा मुगवा, काशीफळ यांच्याहून निराळें आहे. ०डांगरी–स्त्री. १ देवडांगराचा वेल. २ घोसाळीचा वेल. ३ देवताड. ०त–न. १ देव. २ (ल.) लाडका; आवडता. [सं. दैवत] ०तरु–पु. १ पिंपळ, मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष, हरिचंदन यांना उद्देशून लावतात. २ जुनें व पवित्र असें कोणतेंहि झाड. ०तवार–पु. (रा) कुळदेवतेच्या पूजेचा दिवस. [देव+सं. तिथिवार – त्योहार – तेहवार – तवार] ०ताळा–वि. फाजील कर्मठ; देवदेव करणारा. ०ताळें–न फाजील कर्मठपणा. ०तीर्थ–न. तीर्थ पहा. ०त्तर–त्रा–स्त्र–न. (कायदा) देवाला दिलेली मिळकत, देणगी. ०त्रयी–स्त्री. ब्रह्मा, विष्णु, महेश. 'जयातें देवत्रयी कहीं नायक।' –ज्ञा ११.१४७. ०त्व–न. देवपण. देवाची स्थिति; अवस्था. ०दत्त–पु. १ पांच उपप्राणांपैकीं एक. 'ज्याकरितां जांभया येती। तो म्हणावा देवदत्त।' –यथादी १८.१००४. २ अर्जुनाचा शंख. 'जातां कुरुकटकावरि वाजविला दिव्य देवदत्त दर।'–मोविराट ४.२. ३ एक विशेषनामः बुद्धाचा मेहुणा. –वि. १ देवानें दिलेलें. २ कोणीएक; कोणी तरी उदाहरणार्थ घेतलेली व्यक्ति. 'देवदत्त लड्डू न दिवसा खात नाहीं.' ०दया–स्त्री. १ परमेश्वरी कृपा. २ (ल.) देवाच्या दयेनें प्राप्त झालेली संपत्ति; गुरेंढोरें, मालमत्ता, मुलेंबाळें इ०. ०दरबार–न. १ देऊळ. २ सभामंडप. याच्या उलट राजदरबार. 'देवदरबारीं खोटें बोलूं नये.' ०दर्शन–न. १ देवाचें दर्शन. २ विवाहानंतर सपत्नीक देवाच्या भेटीस जाणें; लग्नानंतरची ओव्हर–वधूवरयात्रा. ०दार–दारू–पु. हिमालय इ० ठिकाणीं उत्पन्न होणारा वृक्ष. हा फार उंच व दिसण्यांत सुंदर असतो. हा शें–दोनशें वर्षें वांचतो. जसजसे हे वृक्ष जून होतात तसतसे बळकट होऊन उपयुक्त होतात. याचें इमारतीलाकूड होतें. यापासून टर्पिनतेल काढतात. लाल, तेल्या, काष्ट इ० याचे प्रकार आहेत. ०दारी–वि. देवदाराच्या लांकडाचें केलेलें; देवदारासंबंधीं ०दाली–स्त्री. देवडांगरी. ०दासी–स्त्री मुरळी; भावीण; दक्षिणेंत देवास वाहिलेली कुमारिका असा अर्थ रूढ आहे. हिचा धंदा देवाची सेवा व नृत्यगायन करणें. ०दूत–पु. (ख्रि.) १ देवाचा दूत–निरोप्या जासूद. २ देवाची सेवा करून त्याचा हुकूम बजावणारा स्वर्गीय बुद्धिविशिष्ट आत्मा; (इं.) एंजल याचा पर्याय 'जेव्हां मनुष्याचा पुत्र आपल्या वैभवानें येईल व त्याजबरोबर सर्व देवदूत येतील तेव्हां तो आपल्या वैभवी राजासनावर बसेल' –मत्त २५.३१. ०देव–पु. १ देवपूजा; धार्मिक विधि, आचार किंवा पूजाअर्चा. (क्रि० करणें). २ देवांचा देव; विष्णु, महादेव. ०देव करणें–पूजाअर्चा करणें; कळकळीनें प्रार्थना करणें; अतिशय श्रम करणें. ०देवक–न. देवक पहा. ०देवतार्चन–न. देवतार्चन पहा. ०देव्हारा–पु. पुष्कळ देवता, सिद्धपुरुष, साधु यांची भक्ति, प्रार्थना इ० करणें (दुखणें वगैरे संकटाच्या निवारणाकरितां). 'देवदेव्हारे केले बहुत। औषधासी नाहीं गणित।' ०द्वार–न. १ मंदिराचें दार. २ मंदिर; देवस्थान; पवित्र जागा; धार्मिक कृत्यें करण्याची जागा. ०धर्म–पु. १ देवदेव; देवपूजा वगैरे. २ कांहीं इष्ट सिद्धीविषयीं किंवा अनिष्ट निरसनार्थ कुलग्रामदेवतादिकांस नवस करणें, कौल लावणें इत्यादि. ३ नैमित्तिक धार्मिक कृत्य. याच्या उलट नित्यधर्म. ०उठविणें–दुसऱ्यानें पिशाचादि क्षुद्र देवतांमार्फत उत्पन्न केलेली पीडा वगैरे दूर होण्याकरितां शांति वगैरे सारखीं कृत्यें करणें. देवाधर्माचा–वि. देव, पिशाच यांच्यापासून उत्पन्न झालेला (रोग इ०). याच्या उलट अंगरोग. देवाधर्मानें टाकलेला–वि जातिबहिष्कृत; धर्मबाह्य. ०धान्य–न. १ ज्याचा नैवेद्य देवास अर्पण करावयाचा असें धान्य (तांदूळ, गहूं इ०). २ रानांत आपोआप उगवणारें देवभात वगैरे धान्य. ०धूप–पु. देवापुढें लावावयाचा सुवासिक धूप. ०नदी–स्त्री. १ (काव्य) गंगा; भागीरथी नदी. 'धर्म म्हणे धर्मा ज्या देवनदी प्रसवली महाभागा।' –मोशांति ६.३०. २ आकाशगंगा. ०न(ना)ळ–पु. बोरूची एक जात. 'मीं जाण देवनळही स्वकरीं धराया।' –र २७. ०नागरी–स्त्री. बालबोधी (संस्कृत) लिपि; संस्कृत भाषेची व ग्रंथांची लिपि. [देवनगर] ०निंदक–वि.

देवांची निंदा करणारा; नास्तिक. ०निंदा–स्त्री. देवांची निंदा. ०पण-पणा–पुन १ देवधर्म अर्थ २ पहा. २ देवपणा. ३ (गो.) अंगांत येऊन प्रश्नांचीं उत्तरें देणें. ०पळहा-ळहें–स्त्रीन कापसाची एक जात; देवकापशी; देवकापूस. –कृ६८. (टीप) ०पाट–पु देवाचा व पूजा करण्याकरिता बसण्याचा पाट. ०पाण–न. (कु.) नैमित्तिक देवस्की; देवपणा ०पिसा–वि. देवासाठीं वेडा झालेला ०पिसें-पिसा-शी–नस्त्री फाजील धर्मनिष्ठपणा. ०पूजा–स्त्री देवतार्चन पहा. ०पूजा वाढणें–(ल.) मगरूर होणें; थोडीशी प्रतिष्ठा वाढल्यामुळें फुगणें. 'गांड भरे आणि देवपूजा वाढे' ०पुरी–स्त्री. १ वाटेल त्या येणाऱ्याजाणाऱ्यास मोकळीक असलेलें घर. २ (ल.) धर्मशाळा. ०प्रतिष्ठा–स्त्री १ मंदिरांत केलेली नव्या मूर्तीची स्थापना २ विवाहादि संस्कारांच्या आरंभीं करावयाची देवताची स्थापना; देवक बसविणें. ०प्रश्न–पु. १ देवाला कौल लावणें. २ (फलज्योतिष) ग्रह पाहणें. (क्रि० करणें; पाहणें; येणें; उतरणें). ०बाभ(भू)ळ–स्त्री. कंकर; कंकरी; काळी बाभूळ. सामान्य बाभळीसारखा हिचा वृक्ष मोठा होत नाहीं. फुलें पिवळीं असतात या झाडास लाख येते. पिसाळलेल्या कुत्र्याच्या कोल्ह्याच्या विषावर उपयोगी आहे. देवबाभळीचें मूळ थंड पाण्यात १ ते ४ तोळेपर्यंत उगाळून त्यांत पाणी घालून पाजावें हें प्रत्यहीं दोनदा याप्रमाणें ७ दिवस द्यावें. पथ्य करावें –वगु ४.३०. ०बुध्द–स्त्री १ देवाविषयीं आस्तिक्यबुद्धि २ चराचर विश्व देवमय पाहण्याची दृष्टि. याच्या उलट पाषाण-पर्वतबुद्धि ०ब्राह्मण–पु १ यात्रेच्या सांगतप्रीत्यर्थ ब्राह्मणभोजन घालणें. २ यात्रेच्या ठिकाणीं देवाची पूजा व ब्राह्मणभोजन करणें. ३ लग्न मुंजीचेपूर्वी प्रथम जेवण करतात तें. ०भक्ति–स्त्री. १ देवाची सेवा २ (कों.) पिशाचउपद्रव नाहींसा करण्यासाठीं अंगारा लावणें; आपल्या अंगी पिशाच्चाचा संचार करून घेणें इ० ०भक्त्या–वि पंचाक्षरी; मांत्रिक; देवऋषी. ०भात–न. आपोआप उगवणारें भात एक उपधान्य. हें डोंगरांत पाणथळ जागीं पिकतें. उपवासाच्या दिवशीं खातात. ०भाषा–स्त्री संस्कृत भाषा. ०भूमि–स्त्री १ पवित्र भूमि २ यज्ञयाग करावयाची किंवा जीमध्यें नद्या, मंदिरें वगैरे आहेत अशी पवित्र जागा, प्रांत ०भोळा–वि साधासुधा निरंतर देवसेवेंत निमग्न असल्यामुळें जगातील उलाढालीशीं संपर्क नसलेला; सात्त्विक (माणूस). ०मंगळ–वि ज्याच्या कटीवर, उरावर शिरावर व कपाळावर मिळून चार पाच भोंवरे असतात असा (घोडा) –अश्वप १९० ०मण-मणि–वि ज्याचें ऊर सोडून वरीलभागीं कंठाचे खालीं भोंवरा आहे असा (घोडा). हा शुभलक्षणी होय –अश्वप १९२. 'बाहात्तर खोडी परी देवमण करी।' –तुगा १६७५ ०मत–वि देवाकडे सर्वस्वीं लक्ष असलेला. धार्मिक. ०मय–वि. देवरूप बनलेला. ०माणूस–पु. निरुपद्रवी, विश्वासु, निष्कपटी माणूस. ०मातृक–वि. पावसाच्या पाण्यानें जेथें पीक होतें असा (देश). याच्या उलट नदी-जलमातृक. ०मासा–पु. एक प्रकारचा मासा; याची लांबी ४५ ते ८० फूट असून हा मांसाहारी आहे. जबड्याची उंची माणूस उभा राहील इतकी असते. हा शेपटीनें मोठ्या नावा फोडतो. याचें तेल व जबड्याचें हाड उपयुक्त व किंमतवान असतें. ०मुलुक–पु. नर्मदेच्या उत्तरेकडील हिंदुस्थान देश याच्या उलट राक्षसी मुलुक= दक्षिणहिंदुस्थान. ०यज्ञ–न. जेवणाच्या पूर्वी करावयाचा एक यज्ञ; वैश्वदेव. पंचमहायज्ञ पहा. ०यात्रा–स्त्री. देवाची मिरवणूक. ०यान–न. देवाकडे नेणारा मार्ग; उत्तरायण. ०योनि–स्त्री. उपदेव; विद्याधर, अप्सरा, यक्ष, राक्षस, गंधर्व, किन्नर, पिशाच, गुह्यक, सिद्ध, भूत इ० ०रपण–न. देवऋषी, मांत्रिकपणाचें काम, धंदा. ०राज–पु इंद्र. ०रुखा–पु. ब्राह्मणांतील एक पोटजात. ०रुखी–स्त्री. १ मंदिरांतील गाभारा. २ (कु.) (देवळांतील देव ठेवण्याचा) कोनाडा. ०रुषी-शी-ऌशी–पु. देवभक्त्या पहा. ०ऌशी–पु. अंगांतील भूत काढणारा मांत्रिक. ०रुसकी-रसका-ऌसकी–स्त्री. देवरसपण पहा. ०रूपी–वि. देवाच्या रूपासारखा; देवाच्या रूपांतील **देवर्षि**–पु. स्वर्गांतील ऋषि. यांत नारद, अत्रि, मरीची, भरद्वाज, तुंबुरु इ०चा समावेश होतो. 'शक्र म्हणे कर हरिहर-विजयाचें आशुगान देवर्षे।' –मोविराट ६.२४ **देवल-लक**–पु. १ देवापुढें ठेवलेली दक्षिणा इ० वर उदरनिर्वाह करणारा ब्राह्मण. २ दक्षिणा घेऊन धर्मकृत्यें करणारा; भिक्षुक. ३ गुरव. 'कुंभार देवळक तथा धनगर।' –स्वादि ५. ३५. ०लंड–वि. १ देवास तुच्छ मानणारा. २ नास्तिक. ०लोक–पु. स्वर्ग. ०वाणी–स्त्री. १ संस्कृत भाषा. 'देववाणी गीर्वाण संस्कृत।' –दावि ३८९. २ आकाशवाणी. ०वेल–स्त्री. मकाळची वेल ०वृक्ष–पु. देवतरु पहा. ०व्रत–पु. भीष्माचार्य. 'अतुळें पितृप्रसादें मंडित देवव्रता असामान्य।' –मोकर्ण ५०.७४. ८४८. ०शिल्प–न. मूर्ति, रथ, यज्ञकुंड वगैरे संबंधाचें शिल्प. ०सभा–स्त्री इंद्रसभा. ०साख–पु. एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी षड्ज. संवादी मध्यम. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. हा एक कानड्या रागाचा प्रकार आहे. ०सायुज्य–न. देवात लय होणें; विलीन होणें. ०साळी–स्त्री. (व) देवभात; न पेरतां उगवलेल्या साळी. ऋषिपंचमीला याचे तांदूळ खातात. **देवस्थ**–वि. (राजा. कु.) देवाला दिलेली, वाहिलेली (जमीन, उत्पन्न इ०). **देवस्की**–स्त्री १ देवभक्ति पहा. २ गावदेवतेचा वार्षिक उत्सव. ३ देवाला कौल लावणें. ०स[illegible] –पु पुण्यभूमि. ०स्थान–न. १ पुण्यभूमि. २ देवाला अर्पण केलेली जमीन किंवा उत्पन्न. ३ देवाचें संस्थान.

०स्थापन-ना-नली देवप्रतिष्ठा पहा. **देवस्व-स्त्र**-न देवस्थान अर्थ २ पहा. **देवळ**-न. देऊळ; मंदिर. [सं. देवालय] **देवळची घांट**-स्त्री देऊळघांट पहा. **देवळी**-स्त्री. १ देवरुखी पहा. २ लहान देऊळ. **देवळो**-पु भावीण; तिची संतति. यांच्याकडे दिवे लावणें, वाद्यें वाजविणें इ० कामें पिढीजात असतात. यांची स्वतंत्र जात मानितात. **देवाईल**-न. देऊळ. 'बरें जालें तुझें केलें देवाईल। लेकरें वाईल उपेक्षिली।' -तुगा ६५५. **देवांगण**-न. १ देवळांतील अंगण. २ त्या अंगणांत उभे राहून घ्यावयाची शपथ. 'शून्याची देवांगणें। प्रमाणासी।' -अमृ ७.१०२. ३ गंधर्व नगर. ४मिथ्या कल्पना. **देवांगना**-स्त्री. १ स्वर्गातील अप्सरा. २ भावीण; देवळी; देवदासी. **देवागार**-न. (काव्य.) देवघर **देवांग**-न. (महानु.) पीतांबर. 'काढिलीं देवागें चांग रत्नें कनक भरिएले परिएळा।' -धवळे पूर्वार्ध ३९. **देवाधर्माचा**-वि. देवाधर्मासंबंधीं; पवित्र; धार्मिक (काम, वस्तु, व्यक्ति) **देवाधिदेव**-पु. १ देवदेव अर्थ २ पहा. २ विष्णु, महादेव. **देवनांप्रियः**-१ देवाचा लाडका. २ संन्यासी. ३ (ल.) मूर्ख **देवान्न**-न. १ देवभात पहा. २ पक्वान्न इ०उत्तम अन्न. 'निंदिती कदान्न इच्छिती देवान्न। पाहाताती मान आदराचा।' -तुगा २८२७. **देवापगा**-स्त्री. देवनदी; भागीरथी; गंगा. [सं. देव+आपगा] **देवापुढचा(पुढें)देव**-पु. १ महादेवापुढचा नंदी. २ (ल.) मूर्खशिरोमणी. **देवार्चन, देवावाहन, देवोत्थापन**-देवता खालीं पहा. 'जनार्दनस्वामी करिती देवार्चन।' -रामदासि २.७२. **देवालय**-न. देऊळ; मंदिर. **देवाज्ञा**-स्त्री. (ल.) मृत्यु. (क्रि० होणें; येणें). **देवींधर्मी**-क्रिवि. १ देवधर्मामध्यें. 'पाटाची बायको देवींधर्मी उपयोगी पडत नाहीं.' २ देवधर्माला, व्रत वैकल्यें किंवा धार्मिक आचारविचार, धार्मिक उपाय, उपचार करून; प्रश्न पाहून. (क्रि० पाहणें, विचारणें). 'हें संकट टळावें म्हणून देवींधर्मी विचारून पहा.' **देवोत्थान**-न. चातुर्मास संपल्यावर कार्तिक शुद्ध एकादशीस विष्णूचें जागें होणें आणि उठणें. या एकादशीस प्रबोधिनी एकादशी म्हणतात [सं.]

**देवक**—न. १ विवाहादि कार्याच्या आरंभीं गणपति, सप्त मातृका वगैरेंचें पूजन करून स्थापना करावयाची असते त्यास म्हणतात. २ शूद्रादिजातींमध्यें विशिष्ट वनस्पति अगर प्राणी यास देवाप्रमाणें मानितात त्यास म्हणतात. ३ वनस्पति किंवा जीव या सृष्टवस्तूंपैकीं जेव्हां एखाद्या वस्तूवरून, अमेरिका, आफ्रिका, आस्ट्रेलिया, आशिया वगैरे देशांमधील पुष्कळ रानटी जातींमध्यें एखाद्या खऱ्या किंवा मानलेल्या सजातीयाचें नांव ठेवलें जातें तेव्हां त्या वस्तूस देवक असें म्हणतात. (इं) टोटेम. (क्रि० बसणें; धरणें). [सं. देव+क=क्षुद्र प्रतिकृति] ०प्रतिष्ठा-स्थापन-स्त्रीन. वरील (देवक अर्थ १) प्रमाणें देवतांची स्थापना व पूजन करणें. **देवकोत्थापन**-न विवाहादि मंगल समारंभ आटोपल्या नंतर करावयाचें वरदर देवताचें विसर्जन

**देवघेव**—पुस्त्री. व्यापार; कामधंदा; व्यवहार; व्याजबट्टा. [देणें, घेणें]

**देवचें**—क्रि. (गो.) उतरणें; खालीं येणें.

**देवड**—स्त्री. अनुक्रम; परंपरा; रांग; पुनरावृत्ति. (क्रि० लावणें; चालविणें; बसविणें; लागणें; बसणें). ०चाल-स्त्री. जलद व दुडकी चाल (घोड्याची, माणसाची). ०मार-पु. भडीमार; फैर (तोफ, बंदुक इ०ची).

**देवडाकाटी**—वि. (नंदभाषा) तीस; ३० संख्या.

**देवडी-ढी**-स्त्री. १ दाराजवळची ओटी; शिपाई, नोकरचाकर इ० बसण्याजोगी जागा. २ उंबरा. ३ (ल) चौकी; पहारा 'देवढीवरावर सराफखाना।'-ऐपो. २१५. [देहली]

**देवडें-ढें**-न. वांकडें. देहुडा पहा. 'देवडें पद उभारुन थाहे।' -साह्ह १.७३.

**देवढा मांडणें**—अक्रि. (व) धामधूम, प्रस्थ माजविणें.

**देवढा**—वि. १ अधिक. -हंको २ दिडपट. 'अगा देवढी वाढी लाहिजे। तेथ मोल देतां न धाइजे।' -ज्ञा १८.५९९.

**देवणी, देवतां**—स्त्री. (गो.) उतरण्याची, खालीं येण्याची क्रिया.

**देवता**—स्त्री. १ देव; दैवत; प्रतिमा. २ देवपणा; ईश्वरी सत्ता. ३ इंद्रियांचा अभिमानी ईश्वरांश. उदा० चक्षुरिंद्रियाची देवता सूर्य. **देवतार्च(र्जे)न**-न. १ देवाची पूजा. २ पूजेचीं उपकरणीं. **देवतात्थापन**-न. देवतेचें विसर्जन. देवकोत्थापन पहा. ०प्रसाद-पु देवाचा प्रसाद-कृपा. ०वाहन-न. मूर्तीत देवत्वाची प्रतिष्ठा करणें. [देवता+आवाहन]

**देवथांब**—न (गो.) भाटीवरील तण. [देव+सं स्तम्ब]

**देवन**—पु. जुगार; द्यूत. 'देवनकर्ता मजशीं मनुष्य सभाग्य कोणता आहे।' -मोसभा ४.८. [सं. दिव्=द्यूत खेळणें]

**देवबा**—वि. सदोदित देणारा; खर्चीक. याच्या उलट घेवबा. [देणें+बा]

**देवर**—पु. दीर पहा. 'चुके न परिसार्थक श्रम न देवराचा करी।'-केका ८४. [सं. देवर]

**देवळी**—स्त्री. १ कोनाडा. २ लहान देऊळ (खास देवासाठीं केलेलें, ज्यांत पुजाऱ्यानें सुद्धां उभें राहतां कामा नये असें). ३ भाविणीची संतति. [देव]

**देवाईल-इलें**-न. देऊळ. [सं देवालय]

**देवाघेवा**—पु. देवघेव पहा.

**देवाणघेवाण**—न. १ देवघेव; व्यवहार; व्यापार; देण्याघेण्याची क्रिया. २ उसनें वाण; उसनें फेडणें. (फायदा, तोटा,

इ० ). ३ थोडे फार देणें किंवा घेणें; थोडीफार सूट देऊन वगैरे केलेली तडजोड. [ देणें घेणें ]

**देवातपत्र**—न. भलावणपत्र पहा. [ देणें+पत्र ]

**देवारणें**—न. १ ( राजा. ) डोकीवरचें ओझें ठेवण्याकरितां रस्त्याच्या बाजूनें अर्ध्या अर्ध्या कोसावर बांधलेला ओटा. २ (ल.) अर्धकोस.

**देवारी**—वि. माल विकणारा. [ देणें ]

**देवालेवा**—पु. देवघेव पहा. [ हिं. ]

**देविक**—दैविक पहा.

**देवी**—स्त्री. १ देवाची स्त्री; मुख्यत्वें दुर्गा किंवा भवानी. २ अव. मसूरिका; फोडया; विस्फोटक; एक रोग. आग्या, कथल्या, चिघळ्या, कांथिविऱ्या, खेळत्या, घागऱ्या, मसुऱ्या, सीतळा असे यांचे प्रकार आहेत. यांच्या प्रतिबंधाकरितां दंडावर टोंचलेली लस. यास कुंभाराच्या देवी किंवा माता म्हणतात. ( क्रि० येणें; काढणें; कानपर्गे: ठकणें ) [सं.] **०चा थाट**–पु अंगावर पुष्कळ दाट देवी येणें. **०जागविणें**–देवीचें एक व्रत; देवीपुढें जागरण करणें. **म्ह०** ( बायकी ) १ देवी रडते हगतां प्रसन्न होयगे भक्ता=( निंदार्थी ) फाजील स्वार्थीपणा. २ देवी देवळांत पण नायटे मुलखांत=दुर्गुण किंवा दुष्कृत्यें पुष्कळ लांबवर पसरणें.

**देवी**—स्त्री. १ राणी; कुलीन स्त्री. २ (ल. नाटकांत) स्वतःची स्त्री; पत्नी. 'भीम म्हणे देवीला सांगा, ती जरि म्हणेल सोडीन ।' –मोवन ९.५९. ३ (गो.) घाडीण. [ सं. ]

**देवूळ**—न देऊळ. [ सं. देवालय ]

**देव्हड-डा-डे-ढे-ढी, देव्हडाचरण**—देहुडा, देहुडाचरण पहा.

**देव्हडी**—वि. अधिक. 'तेथ शब्दांकुर वरिपडी। श्रोत्रा वाढी देव्हडी।' –ज्ञा १५.१००.

**देव्हडें**—वि. अधिक. 'तेथ देव्हडे भोंवत वळसे।' –ज्ञा ७.७७.

**देव्हारा**—पु. १ देवाचें सिंहासन (मूर्ति ठेवण्यासाठीं, लांकडी, रुपेरी इ०). २ (ल.) डौलाची पूजा; ढोंग. ३ कळवळ्याचें, भक्तीचें प्रदर्शन करणें. [ सं. देवगृह ] (वाप्र.) **फेलावणें, माजणें, वाढणें**–कवडीमोल मनुष्याची नस्ती प्रतिष्ठा वाढणें. माजविणें, वाढविणें, मांडणें=देवरूपीपणाचें ढोंग करणें. **देव्हाऱ्यांत देव नाहींसा होणें**–भीति किंवा आश्चर्यानें मन ठिकाणीं नसणें. **देव्हाऱ्यांत बसविणें** ( ... )**डणें**– ति भक्ति, प्रीति करणें. सामाशब्द– **देव्हारघर**–न. देवघर; देव्हारा ठेवावयाची खोली, जागा. [ देव्हारा+घर ] **देव्हारचौकी**–स्त्री. (महानु.) देवघरांतील चौरंग. 'देव्हारचौकिये बिजे केलें।' –भाए ५७. **देव्हारें**–न. १ देव्हारा अर्थ २ पहा. ( क्रि० मांडणें, माजविणें ). २ जीवर फार प्रीति केली जाते अशी व्यक्ति, वस्तु. 'त्या बायकोचें त्यास देव्हारें आहे.' ३ जागृत देवपणा ( व्यक्तींतील, मनुष्यांतील ). ( क्रि० माजविणें, वाढविणें ). 'जेजूरीस जागृत देव्हारें आहे.' 'त्याच्या अंगीं देव्हारें आहे.'

**देश**—पु. १ प्रांत; प्रदेश; भाषाभेदानें भिन्न झालेला प्रांत. 'देशासारखा वेष' २ जागा; स्थान. 'वृक्षाचे मूळदेशीं सेचन केलें म्हणजे अग्रदेशींहि टवटवी येते.' ३ योग्य स्थान; सभोवतीची परिस्थिति, भूमि. 'देश काल पाहून काम करावें.' ४ सह्याद्री, बालाघाट, कर्नाटक व गोदावरी नदी यांमधील देश. ५ (ज्योतिष) औरस चौरस १०० योजनें यांनीं व्याप्त असा भूभाग. ६ परिसीमायुक्त भूमिभाग. जसें– देश (महाराष्ट्र, कर्नाटक देश इ०); प्रांत (पुणें, वाई प्रांत इ०). याखेरीज सुभा, परगणा, तालुका, जिल्हा, महाल, कसबा, पेटा, पुठा, मौजा समत, तरफ, टप्पा, मजरा, मुजरी इ० आणखीहि भूमिभाग आहेत. यांची माहिती त्या त्या शब्दाखालीं पहाणें. [ सं. दिश्=दाखविणें. तुल० ग्री. दिश्; ग्री. देइक्नुमि; लॅ. दिकेरे; गॉ. तैहन; प्रा. ज. झीगॉन; लिथु. झेन्कास=खूण; आर्मे. लेशी; लेशवाव (गांव) ] ( वाप्र. ) **०घेणें, आपला देश घेणें**–आपल्या स्वतःच्या कामांत लक्ष घालणें. **देशाचा पाटा वरवंटा होणें**–बेचिराख, ओसाड करणें. **देशीं जाणें**–स्वदेशास जाणें. ( सामाशब्द ) **०कार**–पु. एक राग. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात. जाति औडुव–औडुव. वादी धैवत. संवादी गांधार गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. –वि ( गो. ) देशावरचा. **०कारण**–न. देशभक्ति; राजकारण **०कालवस्तुपरिच्छेदरहित**–वि. काल, स्थळ इ० वस्तूंनें अनिश्चयात्मक अथवा अनिर्वचनीय म्हणजे सर्वव्यापी, शाश्वत, अशरीर असें ब्रह्म, आत्मा, ईश्वर इ० **०कुळकरण**–न. देशकुळकर्ण्याचें काम. **०कुळकरणी**–पु देशपांडया; महालांतील प्रत्येक गांवच्या कुळकर्ण्यांवरील मुख्य वतनदार कुळकर्णी. याचें काम कुळकर्ण्यांचा व खोतांचा हिशेब तपासण्याचें असतें. **०चौगुला**–पु देशमुखाच्या हाताखालील अधिकारी **०ठक**–वि. अट्टल सोदा; महा ठक. **०त्याग**–पु. १ देशांतर. २ हद्दपारी. **०द्रोह**–पु. स्वदेशाचा विश्वासघात. **०द्रोही**–वि देशद्रोह करणारा **०धडी-धडीस**–क्रिवि. देशोदेशीं भीक मागत फिरण्याची स्थिति. 'नाना हव्यासांची जोडी। तृष्णा करी देशधडी।' –तुगा ३५५. **०धर्म**–पु. १ देशाचा धर्म. २ स्थानिक आचारविचार, चालरीत. **०पांड्या-डे**–पु. देशकुळकर्णी पहा. **०परिच्छेद रहित**–वि. ( ब्रह्माचें विशेषण ) देश, काळ इ० मर्यादेच्या बाहेर । **०भक्त**–वि. देशाची सेवा करणारा. **०भाषा**–स्त्री. देशाची भाषा. बोलण्याची, लोकभाषा. **०भाषाज्ञान**–न. अनेक भाषांचें ज्ञान. **०भ्रमण**–न. निरनिराळ्या देशांत फिरणें; मुशाफरी; पर्यटण; प्रवास.

०मर्यादा–स्त्री. १ देशांतील आचारविचार; संप्रदाय; नियम; पद्धति. २ देशाची सीमा. ०मूख–पु. १ परगण्याचा वतनदार अधिकारी. हा परगण्यांतील सर्व पाटलांवरील मुख्य असतो. २ (विनोदानें) सोनाराचें कांकता नामक हत्यार. ३ (ल) हुलगा. (कारण यास देशांत फार चाहतात). ४ वतल (ओतल) मधून पाणी काढण्याचें मडकें. ५ (विनोदानें) पिकदाणीसारखा उपयोग करण्याचें मडकें. ६ (व.) लग्नांत आणलेलें मडकें. ०मुखी–स्त्री. १ देशमुखाचें काम किंवा अधिकार. २ महालांतील नक्त जमाबंदीवर शेंकडा सात आणि धान्यावर शेंकडा तीन असा कर. ०मुखीण–स्त्री. १ देशमुखाची बायको. २ (व.) वाकळ; गोधडी. ०लेखक–पु. देशकुळकरणी पहा. ०वटा–पु. हद्दपारी; देशत्याग. 'मोक्ष तो पाहातसे वास। रिद्धिसिद्धि देशवटा त्रास।' –तुगा ७२७. ०वर–वर(ऊर)करी–देशावर–वरकरी पहा. ०वही–स्त्री. लोकांच्या नांवांची यादी, चोपडी. 'काळाची देशवही। वाचितां माझे नांव नाहीं.' –भाए १५१. ०वळू–वि देशी; खेडवळ. ०व्यवहार–पु. देशधर्म पहा ०साया, शाया–वि माळवी; सोरटी. 'आणिकें देशशाया सांगडी। कोसी कनकवर्गी।' –दाव २८१. ०सेविका–वि. १ देशाची सेवा करणारी (स्त्री). २ स्वयंसेविका. ०स्थ–वि १ ब्राह्मणांतील एक पोटजात. २ देशात राहणारा. ०स्थी–वि. देशस्थासंबंधीं (व्यवहार इ०). देशाउर–देशावर पहा. 'तो देशाउरें निघाला।' –पंच १.३९. देशाचार–पु. देशधर्म पहा; शास्त्रप्रमाण नसताहि एखादे देशामध्यें शिष्टपरंपरेनें चालत असलेला आचार. देशाटन–न. देशभ्रमण पहा. 'कल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार' देशांतर–न. १ परदेश; दुसरा देश; (धर्मसंबंधीं बाबींत) साठ योजनें दूर असणारा अथवा नदी–पर्वतानें तुटक झालेला असा देश. हा परका समजला जातो. २ याम्योत्तरवृत्तापासून पूर्वेकडील अथवा पश्चिमेकडील अंतर. देशांतरीं जाणें, देशांतर करणें–प्रवास करणें देशाधडी–धडीस–देशधडी पहा. देशाभिमान–पु. देशाचा अभिमान; स्वराष्ट्राविषयीं तळमळ, प्रेम, जिव्हाळा. 'खरा देशाभिमान म्हणजे आपल्या देशातील लोकांची निकृष्टावस्थेचीं कारणें शोधून तन्निवारणार्थ उद्योग करणें. –टिसू १०७. देशावर–पु. १ देशोदेशीं भीक मागत फिरणें.' २ –न. अशा रीतीनें मिळविलेली भिक्षा. ३ परदेश; परदेशी व्यापाराचा, पेठेचा गांव. ४ परदेशी, आयात माल.५ परदेशच्या व्यापारी, किंमतीसंबंधीं बातम्या देशावरास-देशावरीं जाणें–१ देशपर्यटन करणें. २ देशोदेशीं भिक्षा मागत फिरणें. देशावरकरी–कर–पु. देशोदेशीं भिक्षाटण करणारा माणूस देशाळू–वि (व.) देशावरचा; मोठ्या शहरांतील. देशिक–पु १ प्रवासी; मुशाफर; परदेशांत फिरणारा. २ आत्मज्ञानोपदेशक सद्गुरु. ३ समूह; थवा. 'ऐसां कव्हणी नाहीं अभिचरिकू। जो होमीं कोकिळांचा देशिकू।' –शिशु ८८३. देशी–वि. १ घाटावरील देशासंबंधीं. २ (समासात) त्या त्या देशासंबंधीं. जसें:– पुणेदेशी; एतद्देशी इ० २ मराठी भाषा; देशातील भाषा. 'देशियेचेनि नागरपणें।' –ज्ञा १०.४२. ११३ देशीकार–वि. मराठी भाषेच्या आकाराचें; मराठी भाषेमध्यें रचलेलें, बनविलेलें. 'केलें ज्ञानदेवें गीते। देशीकार लेणें।–ज्ञा १०.१८०५. [देशी+आकार] देशी-ताल–ताल पहा. देशीय–वि. देशी अर्थ १ २ पहा. देशी संगीत–न. निरनिराळ्या देशातील लोकांच्या अभिरुचीप्रमाणें प्रचलित असलेलें संगीत. गान पहा. देशोधडी–धडीस–देसधडी, धडीस–क्रिवि. देशधडी पहा.

देस—पु. १ देश अर्थ १ पहा. प्रदेश, प्रांत. 'शिरवळ सुपे देस।' –ऐपो ९. २ तुच्छतादर्शक शिवी. –शास्त्रोको. ३ एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार व धैवत स्वर वर्ज्य. जाति औडुव–संपूर्ण. वादी ऋषभ संवादी पंचम. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. [सं. देश] ०क–पु. पिढीजात वतनदार; सरकारी अधिकारी; प्रायः देशमूख. ०कत–की–नस्त्री. देसकाचें काम, अधिकार; देसाईपणाचा हक्क. 'कागल प्रांताची पूर्वी देसकत होती ...' –मराचिथोरा ४१. ०कू–(महानु) समूह. 'आईकैल श्रोतयाचा देसकू।' –भाए १६ ०गौड–पु. एक राग. ह्यांत षड्ज, कोमल ऋषभ, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. गांधार व मध्यम स्वर वर्ज्य. जाति औडुव–औडुव. वादी धैवत, संवादी ऋषभ. गानसमय प्रातःकाळ. ०धड–स्त्री. देशत्याग करण्यासारखी विपत्ति. ०धूळ–स्त्री. अतिशय विपन्नावस्था; पूर्ण कंगाली, दुःख. ०वट–देवाळ, देसोळी–वि. घाटावरील, देशावरील मनुष्य, प्राणी यांच्यासंबंधीं. ०वटा–पु. १ देशाटण; मुशाफरी; प्रवास; देशातर. 'कीं मानिला प्रभुमनें तो दसवटाहि उत्सव नवासा।' –मोवन १०.७०. २ हकालपट्टी; हद्दपारी. 'दुःखास तो देसवटाच द्यावा.' –अकक २ –हरिराजकृत मुद्गलाचार्य विरचित रामार्याचें भाषांतर १००. देसाई–य–पु. देशमुखासारखा परगण्याचा वतनदार अधिकारी. (व) देशमुख–देशपांड्याचे वडील मुलास टोपण नाव. देसी–पु. एक राग. ह्या रागात षड्ज; तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहात गांधार व धैवत वर्ज्य. जाति औडुवसंपूर्ण. वादी षड्ज संवादी पंचम. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर. देसूर–पु. मांगांतील एक पोट जात. ही खानदेश जिल्ह्यांत आढळते. –अस्पृ ४७. देसुरी–वि. देशावरील. 'तिखटाचा गोळा खाणारे देसुरी लोक अधिक बळकट असतात' –सहस्रबुद्धे शिक्षणमीमांसा २०४. देसोधडी, देसोधडीस–देशधडी इ० पहा.

**देसोटा**—पु. (व) हकालपट्टी; खो. देशवटा पहा.

**देस्त**—न (गो.) किल्ला; वळण देख पहा.

**देस्सेंदेंत**—पु. (गो) वंशज; पोर्तुगीज व देशी ख्रिस्ती यांच्यामधील मिश्र विवाहापासून निर्माण झालेल्या गोव्यातील युरेशियन वर्गास पोर्तुगीजांचे वंशज या अर्थानें हें नांव रूढ आहे. [पोर्तु; इं. डिसेंडंट]

**देह**—पु शरीर. काया; अंग 'नोळखवे म्यां धरला हातीं। देहा दीप माया लाविली वाती।' –तुगा ३६८. [सं.] (वाप्र) **०उगाळणें**–(चाकरी इ० कामीं) शरीर झिजविणें. **०कारणीं लावणें**–एखाद्याच्या कार्याकरितां स्वदेह खर्च करणें, कामास लावणें. **०टाकणें–ठेवणें–पाडणें**–मरणें **०लोटणें**–मूर्च्छा येणें. **देहांत असून विदेही**–जीवन्मुक्त. **देहांत दंड पडणें**–अपराधाबद्दल शिक्षा भोगल्यानें पश्चात्ताप होणें. **देहावर असणें**–शुद्धीत असणें. **देहावर–गाणें–गीत–अभंग–पद–लावणी–कवन**–दोन अर्थाचें काव्य. याचा उत्तानार्थ शरीर विषयक असतो व गूढार्थ आत्मा किंवा ब्रह्म यासंबंधीं असतो **देहावर नसणें**-मन ठिकाणावर नसणें. **देहावर येणें**–१ शुद्धीवर येणें 'देहावरी येथें म्हणती।' -गुच ५३.६. २ रानटी खोड्या अथवा बेबंद चाली टाकून देणें. **देहीं देवपण दाखविणें–आणणें–येणें**–(एखाद्यानें) मनुष्यरूपी असूनहि, याच जड देहावस्थेंत आपल्यांत दैविक आत्मीय सत्याचें ज्ञान किंवा ब्रह्मज्ञान आहे अशी लोकांस प्रचीति आणून देणें. **म्ह०** देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्=प्राण तरी द्यावा किंवा ध्येय तरी साध्य करावें सामाशब्द– **०खंड**–न. साडेतीन हातांचें शरीर. 'जें देहखंडा नाम आत्मा।' –ज्ञा १८ ५६७. **०त्याग**–पु मरण. **०त्रय**–न स्थूल, लिंग व कारण या तीन प्रकारचा देह. 'तैसें ज्ञानाग्नि जाळिले। देहत्रयीं निरसलें।' **०दंड–दंडन**–पुन. तपानें केलेलें देहाचें संयमन. २ फांशीची शिक्षा **०दृष्टि**–स्त्री मानवी दृष्टि. उदा० 'देहदृष्टीनें पाहिला असतां प्रपंच सत्य दिसतो' **०द्वय**–न स्थूल आणि सूक्ष्म देह. **०धर्म**–पु शरीराचीं कृत्रिम व नैसर्गिक कामें, मलमूत्रविसर्जन इ० **देह धर्मानें करणें**–शौचास जाणें. **देहधारी**–वि शरीरी; मूर्तिमान्. **०पात–प्रयाण**–पु. शरीराचें पतन; मरण; देहावसान. 'आणि नियता अंतःकरणीं। तूं जाणि जसी देहप्रयाणीं।' –ज्ञा ८ ५. **०प्रारब्ध**–न नशीबाचा भोग शरीरभोग **०बुद्धि–भाव**–स्त्रीपु. १ जीवबुद्धि. देहावरील आसक्ति; अहंभाव; मीपणा. याच्या उलट आत्मबुद्धि. २ (काव्य) चित्ताची सावधानता देहाभिमान; देहतादात्म्य. **०बुद्धि राहणें**–(व) धडगत राहणें. **०भान** न. चित्तशुद्धि; स्वतःची जाणीव; चित्तानुसंधान. मन ठिकाणावर असणें,शांत असणें; विचारशक्ति असणें. (क्रि० असणें; येणें; विसरणें; जाणें). **०भाव**–पु. देहाभिमान. देहबुद्धि पहा. **०यात्रा**–स्त्री. १ देहाचा चरितार्थ; उपजीविका. (क्रि० चालणें; होणें; निभणें). २ आयुष्य; जीवनक्रम. (क्रि० संपणें=मरणें). **०वान**–वि. देहधारी पहा. **०विसर्जन**–न. देहत्याग पहा. **०शुद्धि**–स्त्री. १ प्रायश्चित्तानें शरीराची शुद्धता करणें. २ देहभान पहा. **०संकल्प**–पु. प्राण पणास लावून काम करणें; निकराचा प्रयत्न. **०संग**–पु. देहाचा अहंकार. **०स्वभाव**–पु. १ देहधर्म १ पहा. २ मनुष्याचा नैसर्गिक स्वभाव; जन्मप्रकृति वागण्याची पद्धत. **देहडा**–पु. देह. 'पुरला साठी देहाडा। ऐसें न म्हणे न म्हणे मूढा।' –तुगा २६८४. **देहांत**–पु. मृत्यु. **देहांत प्रायश्चित्त**–न. मृत्युदंड. **देहांतर**–न. दुसरा जन्म किंवा दुसरा जन्म घेणें; परकाया प्रवेश; एका देहांतून दुसऱ्या देहांत प्रवेश करणें. **देहातीत**–वि. देहाच्या पलीकडे; अदेह झालेला. **देहात्मवाद–दृष्टि**–पुस्त्री. अनात्मवाद; जडवाद; देहालाच आत्मा मानणें. **देहात्मवादी–दर्शी**–वि. जडवादी. **देहात्यय**–पु. देहत्याग. **देहादिक कर्म** न. ब. १ देहधर्म पहा. 'देहादिक कर्मे अभिमान वाटे। तया मी कैं जोडे नारायण। २ दया, माया, प्रीति इ० मनाच्या वृत्ती. **देहाभिमान, देहाहंकार**–पु. शरीराचा अभिमान. **देहाभिमानी, देहाहंकारी**–वि. देहाभिमान धारण करणारा **देहावसान**–न. मृत्यु. **देही**–वि. १ देहासंबंधीं. २ देहधारी पहा. –पु देहांत राहणारा जीवात्मा. 'हे रजोगुणाचें दारुण। देही देहियासी बंधन।' –ज्ञा १४.१७३. **देहे–दंड–बुद्धि–भान–शुद्धि–स्वभाव**–देहदंड–बुद्धि इ० पहा. 'ज्ञात्यासीं आणि जिंकिलें। देहबुद्धीनें।' –दा १९.४.२६

**देह**—पु दिवस. 'देख बोळंबा इंद्रु न चरे। तेजीं तिमिर न शिरे। जें देहाचें आधारें। चर्मचक्षुसीं।' –ज्ञा ८ ८९. [सं. दिवस

**देह, देह**—पु. गाव. 'मसूर परगणाची दरमुखी देह सत्तावन आपले वडील करीत होते.'–इमं ३३. 'एकूण तेवीस देह येथील. –वाडसमा ६.११४. [फा. दिह्] **देह–ब–देह**–गांवोगाव. 'देह ब देह लावणी करील'–रा १६ ४२. **देहाय, दहेहाय, देहाये**–पुअव. १ गावें; गावगना. 'जकायती बंदरें व देहाय परगणे मजकूरें वतन करार करून दिले असे.'–वाडबाबा१.१२ **०झाडा–पत्रक–वारझाडा–बाकी–वसूल**–देह झाडा इ० पहा. **देहझाडा–पट्टी**–स्त्री. खेडगावचें नोंदपत्रक **देहवार**–क्रिवि. गाववार **देहेवार झाडा–पत्रक**–पुन. देहझाडा पहा. या प्रमाणें इतर सामासिक शब्द देहेवार–इजार–पट–जमाबंदी–बाकी–वसूल इ०

**देहंदगी, देहनगी**—स्त्री. देणगी पहा. 'बक्षिसें आणि देहंदगी.' –भाद १८३४. –राव्य ८.८८. 'देहनगी कापड धर्मादाय.' –भाइत्रै १०.३.११८. 'धर्मादाव देहनगी.' –रा ६.३१९ [सं. दा]

**देहलज**—स्त्री. (व.) देवडी. [देहली]

**देहली**—स्त्री. दार. देवडी पहा. 'बीजें करितां देहली । पवित्र कीजे.' –ऋ ६०. 'जे शोभवी प्रत्यह देहलीला.' –सारुह १.५९. [सं.] ०**दीप**–पु. दारांत लावलेला दिवा. ०**दीपन्याय**–पु (ज्याप्रमाणें उंबऱ्यांतील दिवा ओटीवर आणि घरांत सारखा प्रकाश देतो त्याप्रमाणें) भाषणाचा एखादा भाग मागच्या व पुढच्या भाषणास सारखाच लागू पडतो तेव्हां हा न्याय योजितात.

**देहुडा**—वि. वांकडा; वक्र. यास वांकडा हा शब्द जोडतात. म्हणजे द्विरुक्ति होते. [दीड] ०**चरण**–वि. एका पायावर भार घेऊन उभें राहून दुसऱ्या पायाचें पाऊल उचलून त्या पायावर टेंकिलें असतां वक्र होणारा पाय. 'देहुडा चरण वाजवीतो वेणू। गोपीका रमणू स्वामी माझा।'

**देहुडी**—स्त्री. देवडी. [सं. देहली] ०**वान**–पु. द्वारपाळ; देवडीवाला.

**दैत**—वि. (व.) अतिशय धीमा; चेंगट; आळशी.

**दैत्य**—न. भारतीय पुराणग्रंथांतील ए वंश, जात; दितीची प्रजा; देवाचे प्रतिपक्षी; दानव; असुर; राक्षस. [सं.] ०**युग**–पु. दैत्यांचें युग. ब्रह्मदेवाचीं बारा हजार वर्षें किंवा मनुष्यांचीं चार युगें. **दैत्यांशी**–वि. ज्याच्या शरीरामध्यें, हाडींमासीं, रक्तामध्यें राक्षसी अंश आहे असा क्रूर; रानटी; असंस्कृत; पशुवृत्तीचा.

**दैदीप्यमान**—वि. देदीप्यमान पहा.

**दैन, दैनिक**—वि. १ दिवस संबंधीं. २ रोजचा; नित्याचा. [सं. दिन] **दैनंदिनगति**–स्त्री. आपल्या आंसासभोंवती पृथ्वीची रोजची प्रदक्षिणा; ही चोवीस तासांत होते [सं.] **दैनंदिनप्रलय–कल्पांत**–पु. ब्रह्मदेवाच्या प्रत्येक दिवसाच्या शेवटीं होणारा जगाचा प्रलय (ब्रह्मदेवाचा दिवस=त्रेचाळीस कोटि वीस लक्ष वर्षें) 'जो याचा दिनांत। तोचि दैनंदिनकल्पांत। तैं ब्रह्म मायें अंत। संहरे लोकत्रय।' [सं.]

**दैन**—न. दैन्य पहा. (क्रि० भोगणें; सोसणें). [सं.] ०**भाक्या**–वि. गयावया, प्रार्थना करणारा; रड गाणारा (भिकारी). ०**वाणा दैन्यवाणा**–वि. कींव येण्यासारखा; लीन; दीनवाणा. **दैना**–स्त्री. दैन्य; दुर्दशा; दशा; अपेष्टा; हाल; फजीती. 'माझी दैना होणार भारी। ह्यास्तव संसारीं वांचलें।' [सं. दैन] **दैना करणं**–(स्वतःचे, दुसऱ्याचे) हाल करणें; दुःख देणें, भोगणें. **दैना भाकणें–सांगणें–दाखविणें**–आपली निकृष्ट स्थिति एखाद्यास समजावून देणें; याचना करणें; गयावया, प्रार्थना करणें.

**दैनिक**—वि. १ दररोजचें (काम इ०). दैन पहा. २ दररोज निघणारें (वर्तमानपत्र). 'प्रेस ॲक्टान्वयें स्वराज्य दैनिकाजवळ दोन हजाराचा जामीन सरकारनें मागितला.' –के १७.६.३०. [सं.]

**दैन्य**—न. १ गरीबीमुळें आलेला दीनपणा; प्रतिकूल परिस्थिति; गरीबी. २ हीनपणा; हलकेपणा; उणेपणा. 'दे शैव वैष्णवाला वीं वैष्णव जेवि दैन्य शैवाला।' –मोभीष्म ५.१३४. [सं.] ०**करणें**–भीक मागणें. 'मग निर्दैव निघे किरीटी। दैन्यचि करूं।' –ज्ञा ९.३११. ०**प्रदर्शन**–न. १ लोकांपुढें दीनपणा मांडणें, दाखविणें. २ आपली दुःस्थिति दाखवून याचना करणें. (क्रि० करणें).

**दैबार**—पु. (गो.) सैन्यसमूह.

**दैयर**—पु. एक पक्षी.

**दैर्घ्य**—न. दीर्घता; लांबी. [सं.]

**दैव**—न. १ नशीब; प्रारब्ध; विधिघटना. २ जातपंचायत–गंगा; जमात; स्वजातीय लोक. [सं.] (वाप्र.) ०**उघडणें–उपटणें–खुलणें**–भरभराट होणें; सुखाची प्राप्ति होणें; चांगली ग्रहदशा येणें. ०**उभें राहणें**–दैवाचा जोर होणें; प्राक्तनाचा परिणाम घडणें; नशीबानें अकस्मात् सुखदुःखाचा प्रसंग येणें. ०**काढणें, दैवास चढणें**–भरभराट होणें; पुढें येणें. **दैवणें** अक्रि. दैववान् होणें; उत्कर्षास चढणें. 'वानूं लाधलों तें दुणेन थावें। दैवलें दैव।' –ज्ञा १६.३१. ०**फिरणें**–नशीब प्रथम चांगलें असतां वाईट स्थिति होणें; वाईट दिवस येणें. **दैवाची परीक्षा करणें–पाहणें**–एखाद्या गोष्टींत पडलें असतां धोका आहे असें समजूनहि ती गोष्ट करण्याचें साहस करणें; प्रयत्न करून पाहणें. **दैवाच्या नांवानें हांका मारणें**–नशीबाला बोल लावणें. **दैवांतून उतरणें**–नष्ट होणें; नामशेष होणें (माणूस, वस्तु). **दैवानें उचल करणें–यारी येणें–हात देणें**–नशीबानें मदत करणें. **दैवानें उपट खाणें**–(दैव) पराकाष्ठेचें अनुकूल होणें. **दैवानें ओढ घेणें, दैव ओढवणें**–वाईट (नुकसानीची) गोष्ट करण्याकडे प्रवृत्ति होणें. **दैवानें धांव घेणें–करणें**–चांगल्या किंवा वाईट गोष्टीकडे अकारण प्रवृत्ति होणें. **दैवानें माग घेणें–पाहणें–सरणें–हटणें**–नशीब फिरणें. **दैवावर हवाला देणें**–नशीबावर सोंपविणें; नशीबावर भिस्त टेवणें. **दैवास येणें**–नशीबी येणें; दैवानें एखाद्यावर येणें, गुदरणें. **दैवास रडणें**–नशीबाच्या नांवानें हाका मारणें; प्राक्तनास दोष देणें, बोल लावणें. **म्ह०** १ धड कांट्यावर घालून दैवास रडणें. २ दैव देतें आणि कर्म नेतें=भाग्यानें झालेला उत्कर्ष कांहीं चुकीनें नाहींसा होणें. ३ मनसा चिंतितं कार्यं दैव मन्यत्तु चिंतयेत्=मनानें कांहीं एक ठरविलें असतां नशीबानें दुसरेंच घडतें. सामाशब्द– ०**गत–गति**–स्त्री. देवगत पहा. ०**दशा**–स्त्री. १ नशीब; प्रारब्ध; नशीबाचा फेरा. 'जशी दैवदशा असेल तसें घडेल.' २ भाग्य किंवा वाईट स्थिति. ०**प्रश्न**–पु. फलज्योतिष; भविष्य; भाकित सांगणें. (क्रि० सांगणें; पहाणें; पुसणें; करणें, उतरणें; प्रत्ययास येणें). ०**फुटका**–वि. दुर्दैवी; कमनशीबी. ०**योग**–पु. दैवघटित; दैवाचा

अनुकूल किंवा प्रतिकूलपणा (आकस्मिक, अकल्पित गोष्ट घडली असतां म्हणतात). **दैवयोगें करून**–क्रिवि. अकस्मात्; यदृच्छया; नशीबानें. **दैवरेषा**–स्त्री. ललाट रेषा; ब्रह्मलेख (कपाळीं लिहिलेला) प्राक्तन; विधिलिखित. **०वश**–वि. नशीबाच्या आधीन. **०वशात्–वशें**–क्रिवि. दैवयोगेंकरून; दैवगतीमुळें. **०वाणी**–देववाणी पहा. **०वाद**–पु. मनुष्याचें सुखदुःख, यशापयश इ० सर्व नशीबावर अवलंबून आहेत असें मत; नशीबावर सर्वस्वीं हवाला ठेवण्याचें मत. याच्या उलट प्रयत्नवाद. **०वादी**–वि. वरील मताचा; नशीबावर हवाला ठेवणारा. **०वान्**–वि नशीबवान्; भाग्यवान. **०विपाक**–पु. नशीबाचा खेळ. **०हत**–वि. कमनशीबी; अभागी. 'दैव हत कुणबी उन्मत्त। अपशब्द बोलत तुकयासी।' 'अहा कैसा मी दैवहत प्राणी' –बालबोध पहिलें पुस्तक. **०हीन**–वि. अभागी; दैवहत. **०ज्ञ**–वि. १ ज्योतिषी: भविष्य सांगणारा; जोशी. २ एक ब्राह्मण जात. यांचा धंदा सोनारीचा. **दैवागळा, दैवा आगळा**–वि. (काव्य) थोर नशीबाचा; दैववान्. 'एवढी हांव तो दैवाआगळा। म्हणऊनि करी।' –ज्ञा १०.३३२. **दैवाचालेख**–पु. दैवरेषा पहा. 'दैवाचा लेख पाठमोरा। मला अंतरला म्हणुनियां तुज ऐसा मोहरा।' –प्रला १५९. **दैवाचा**–वि. नशीबवान्. **दैवाचा खेळ**–पु. नशीबाचा खेळ. **दैवाचा पुतळा**–पु नशीबवान्; भाग्यशाली. 'जाणें भक्तीचा जिव्हाळा। तोचि दैवाचा पुतळा।' –तुगा २३१०. **दैवाचा भोपळा**–पु. कमनशीबी; दुर्दैवी (भोपळा हलका व पोकळ असतो यावरून). **दैवाची कहाणी**–स्त्री. दुर्दैवाची कथा, गोष्ट. **दैवाचे ताले**–पुअव. भाग्य; दैव; दैवरेषा. ताले पहा. 'असे त्याचे दैवाचे ताले कीं कुत्र्यावर नौबत चाले!' [दैव+अ. ताला] **दैवात्**–क्रिवि. यदृच्छेनें; दैववशात्. **दैवाधीन–दैवा पुरोधी–दैवानुसारी–प्रधान**–दैववश पहा. **दैवावरचा खेळ**–पु. यत्न केल्यानंतर नशीबाच्या हवाल्यावर ठेवलेली गोष्ट.

**दैव**—वि. देवापासुन झालेला, देव संबंधीं दैविक; दैवी. [सं. देव] **०वाणी**–स्त्री. १ संस्कृत भाषा; देववाणी. २ आकाशवाणी. **०विवाह**–पु. लग्नाच्या आठ प्रकारांपैकीं एक; अष्टविवाह पहा सालंकृत कन्यादान करणें.

**दैवत**—न. १ देव; देवता. २ (ल.) अत्यंत लाडका, आवडता माणूस, पदार्थ. ३ पूज्य, वस्तु; देवतुल्य गोष्ट. [सं.]

**दैवर**—पु. दंव; दहिंवर. [दहिंवर] **०णें**–दंवानें भिजणें.

**दैविक**—न. भाग्य; नशीब. –वि. १ नशीबासबंधीं. २ देवापासून झालेला; देवाचा; देवतेसंबंधीं; दैवी. [सं. दैव]

**दैवी**—स्त्री. मंत्र, तंत्र, प्रार्थना इ० कार्नी रोग इ० वर उपचार करण्याचा प्रकार, पद्धति. –वि. देवासंबंधीं; दैविक पहा. याच्या उलट मानुषी, आसुरी. [सं.] **०संपत्ति**–स्त्री. सात्त्विक स्वभाव, वृत्ति; दया, अनुकंपा इ० गुण. **०सृष्टि**–स्त्री. ब्रह्मदेवानें निर्माण केलेलें जग. याच्या उलट विश्वामित्रसृष्टि.

**दैशिक**—वि. प्रादेशिक; देशविषयक; स्थलासंबंधीं; प्रांतिक, राष्ट्रीय, स्थानिक इ० [सं.]

**दैष्टिक**—वि. १ प्रारब्धवादी. २ दैवासंबंधीं. [सं.] **०वाद**–पु. प्रारब्धवाद; दैववाद. **०वादी**–वि. दैववादी.

**दैहिक**—वि. देहासंबंधीं; शारीरिक; कायिक. [सं.]

**दो-दों**—वि. दोन. 'मुळी कल्पना दों रुपें तेचि जाली।' –राम १७२. 'दो दिवसांची तनु हे साची।' –राला ८५. [सं. द्वि; प्रा. हिं. दो]

**दोआब**—पु. दोन नद्यांच्या मधील प्रदेश; अंतर्वेदी. दुआब पहा. [सं. द्वि.+आप; हिं. दो+आब]

**दोकडा**—पु. १ दुगाणी; अर्धा पैसा. २ (मोत्याच्या वजना मध्यें) एकशंभरांश चव. ३ (सावकारीमध्यें व्याजाचा हिशेब करतांना) एकशंभरांश रुपया किंवा एक कच्चा. गुजराथेंत एक रुपयाला १०० दोकडे असें प्रमाण आहे. चव आणि कच्चर्थ १६ पहा.

**दोकयो**—स्त्री. (गो.) लहान पाय. [गो. दोंको=पाय]

**दोख**—पु. दोष; टपका; न्यून. 'ऐसें जाणतांही दोख। अव्हेरू ना।' –ज्ञा १.२६३. [सं. दोष; हिं. दोख]

**दोखाड**—स्त्री (व.) उणीव; तोटा. 'यंदा जवारीची दोखाड येणार.' [दोख+आड प्रत्यय; तुल० म. दुष्काळ]

**दोगला**—वि १ मिश्र जातीचा; लेकवळा. २ (ना.) दुतोंड्या; अविश्वासु. [फा. दाग्ल्, दोघ्ला=संकरज]

**दोंगुली**—स्त्री. (गो.) लहान डोंगर. [डोंगर]

**दोघे, दोघी-घ्या, दोघें-घीं**—पुस्त्रीनअव. दोन; दोनजण (विशेषतः सजीव प्राण्यांविषयीं, त्यांतल्यात्यांत माणसांविषयीं उपयोग करितात). [सं. द्वि; प्रा. दो; प्रा. दे. दोग्ग=जोडी] **म्ह०** दोघांचें भांडण तिसऱ्याचा लाभ. **दोघुलेपण**–न. १ दोघामधील प्रेम; एकरूपता. 'हा ठावोवेऱ्ही वियोगभेडें। जें बाळ तरि जगायेवढें। वियालीं परी न मोडे। दोघुलेपण।' –अमृ १.६. २ द्वैत.

**दोचौ**—वि. दोनचार. 'दोचौ दिवसांत किल्लाही घेतला.' –भ.ब २७.

**दो टक्यानें धड**—वि. बळकट; धडधाकड.

**दोटा**—पु. (व.) बाभूळ वगैरे झाडाच्या काटयांचें एक परिमाण. सात काटयांचा एक दोटा.

**दोड**—वि. (अशिष्ट) द्वाड; खोडकर; खटयाळ. [द्वाड अप]

**दोड-डा**—पु. १ (राजा.) कापसाचें बोंड. 'आणि पळहेचा दोडा।' –अमृ ७.२६३. २ वेलदोडा. ३ कच्चें फळ. 'वायांविण तुटे दोड। मान सुख इच्छी भांड।' –तुगा २८७७. ४ शेवरी, रुई किंवा मांदार याचें फळ. 'दोडा अर्कतरूचा अमृतफलस्वाद दावितो थोडा।' –मोकृष्ण ८७.३४. ५ अफूचें बोंड. –कृषि ४९८.

**दोंड**—न. (व.) बाजरीचें कणीस.

**दोडका**—पु. १ एक जातीचें भात. २ दोडकीचें फळ; शिराळें. याच्यांतील कडू जातीचा औषधांत उपयोग होतो. 'शाकात प्रवर जसें पथ्यहि तैसें न दोडकें चव दे।' —मोविराट ५.४७, [का. दोड्ड+काई] **दोडकी**—स्त्री. दोडक्याचा वेल. **दोडकें भात**—न. दोडका जातीचें भात.

**दोडी**—स्त्री. हरणदोडी; एक वनस्पति.

**दोड्डाचार्य**—पु. दुड्डाचार्य पहा.

**दोण, दोणी**—स्त्री. १ गुरांना पाणी पाजण्याची कुंडी; टाकें. २ (अशिष्ट) दोणा; मोठें पोट; दोंद. (क्रि० भरणें; ठासणें; दाटणें; रिकामें होणें). ३ (कु.) द्रोणाच्या आकाराची लहान होडी; होडगें. ४ (गो.) द्रोण. [सं. द्रोण; प्रा. दोणी] **दोणगें**—न. लहान दोण; लांकडी डोणी.

**दोणा**—पु. १ दोंद; मोठें पोट. दोण अर्थ २ पहा. २ द्रोण. [दोण]

**दोतुकी-तूक**—वि. (संगीत) गायनांत ज्याला अस्ताई व अंतरा हीं आहेत, पण आभोग नाहीं असें दोन अवयवांचें ध्रुपद. —हार.

**दोंद**—वि. १ मोठें, वाढलेलें पोट. (क्रि० येणें; वाढणें; झडणें). 'तो उत्सव दोंदीं न ब्रह्मांडसमीं धरें, किती वदों दीन।' —मोकृष्ण ४८.८. 'जैसा दोंद्रीकोंदी गुर्जर देशस्थ विप्र चुरम्यांतें।' —मो. २ (ल.) एकदम मिळालेली संपत्ति, लौकिक, दर्जा, बढती इ०. (क्रि० वाढणें). [सं. तुंद; का. तुंदी; प्रा. हिं. पं. तोंद; ग्री. टुंद] **दोंद येणें**—१ तृप्ति होणें. २ पोट वाढणें; मोठें पोट होणें. **दोंदावर दोंद येणें**—भरून वाहाणें; पुरावर पूर येणें (संपत्तीचे पाट). **म्ह०** आईजीचे (किंवा सासवेचे) दोंदावर बाईजी (किंवा जावई) उदार. **दोंदिल**—न. दोंद; मोठें पोट. **दोंदाळ, दोंदी, दोंदाल, दोंद्या**—वि. ढेरपोटया; मोठया पोटाचा. तुंदिल पहा. 'आशारसें दोंदिलु। जाला सांता।' —ज्ञा ७.१६८.

**दो-दील**—दुदिल-दील पहा.

**दोन**—वि. २ ही संख्या. विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी याचें दोहो असें रूप होतें. जसें— दोहोंस; दोहोंनीं. [सं. द्वि; प्रा. दुवे; बं. फ्रेंजि. दुइ; ग्री. दुओ; लॅ. दुओ; गॉ. त्वोस्; अँसॅ. त्वि; स्ला. दुव; लिथु. दु; हिब्रय द, दो, दि] ०**जिवांचा निवाडा होणें**—सुखरूप बाळंत होणें; हातींपायीं सुटणें. ०**डोळे शेजारी भेट नाहीं संसारी**—जवळ जवळ राहात असून ज्यांच्या गांठी क्वचित् पडतात अशीं माणसें. ०**डोळ्यांची भीड**—समोर असतांनाच फक्त प्रेम; वरपांगी प्रेम. ०**दिवस**—थोडे दिवस; कांहीं काळ. **म्ह०** १ दोन दिवस सासूचे दोन दिवस सुनेचे=प्रत्येकाला चांगले दिवस येतात. ०**दिवसाचा**—थोडे दिवस टिकणारा; हंगामी; अशाश्वत (सोबती, संपत्ति, अधिकार इ०). ०**बोटें स्वर्ग उरणें**—अतिशय गर्वे वाहणें. ०**हाताचे चार हात होणें**—लग्न होणें. ०**तोंडया-बारी-बोलया-मान्या**—दुतोंड्या इ० पहा. ०**प्रहर**—पु. मध्यान्ह; दुपार पहा. ०**प्रहरची काळजी**—पोटापाण्याची चिंता. **दोन्नी-न्ही**—वि. दोन हि. 'दोनी वरुषें बुडी मारिली।' —दा ३.४.१६. [सं. द्वीनि] **म्ह०** दोन्ही दरडीवर (कांठावर) हात ठेवणें, टेकणें= दुटप्पीपणा. **दोन्हीसांज**—क्रिवि. (सकाळीं व संध्याकाळीं) जेवणाच्या दोन्ही वेळेस, वेळेकरितां.

**दोपण**—न. द्वैत; भिन्नपणा. [दो=दोन+पण]

**दोबराद; दोब्राद**—वि. (गो.) दुप्पट; दुबार. [सं. द्विवार; पोर्तु. दोब्रो]

**दोब्राद**—न. (गो.) नारळाच्या झाडाचें उंची मद्य. (बेवड्या-प्रमाणें) [पोर्तु. दोब्रोदा]

**दोभ**—पु. (कु.) आंचळ; सड. [सं. दुह्; म. दुभणें!]

**दोमदोम**—उद्गा. दावलमल पीराचे भक्त अथवा मुसलमान फकीर यांचा भिक्षा मागण्याच्यावेळचा सवालाचा शब्द. दमदम, दमसाहेब, असेंहि म्हणतात. [ध्व.] ०**करीत फिरणें-जाणें**—दारोदार, देशोदेशीं भिक्षा मागत फिरणें; भीक मागणें.

**दोमूख**—न. (गो.) संगम. [दो=दोन+मुख]

**दोय**—स्त्री. १ (गो.) करवंटीची पळी; डाव. २ डोकें; डोई. डोय पहा.

**दोर**—पु. १ काथ्या, वाक, अंबाडी, ताग इत्यादि झाडांच्या सालीचे लांब तंतू. २ (राजा.) केळ, अंबाडी, भेंडी इ०कांच्या सालीची किंवा तंतूची वळलेली दोरी. ३ (ल.) नासलेलें दहीं, गूळ इ०मधील तार, तार येण्याची अवस्था; चिकटण. [सं. दोरक; प्रा. बे. दोर; हिं. दोर; फ्रेंजि. दोरी] **दगडाचे दोर काढणारा**—वि. युक्तिवान्; उद्योगी. **दोरक**—पु. १ शिवण्याचा दोरा. २ दोर अर्थ १ पहा. दोरखंड; दोरी. [सं.] ० **कस**—पु. १ गाडी, मोट इ०नां बांधावयाचा दोर; नाडा; चऱ्हाट. २ बारीक दोरी. —न. एकत्र बांधलेल्या पुष्कळशा दोऱ्या. ०**खंड**—न. १ जाड दोर; सोल. २ दोराचा तुकडा. ३ कालाचा (केळीच्या गाभ्याचा) तंतु. ०**खंडें**—नअव. गलबताचे दोर; जाड दोर. ०**गुंडा**—पु. सालींचें किंवा दोरीचें भेंडोळें (शाकारण्याच्या कामीं उपयोगी). **दोरडें**—न. (कों.) १ जाड किंवा मोठा दोर; दोरखंड. २ (निंदार्थी) दोराचा तुकडा (वाईट, निरुपयोगी दोरासंबंधीं योजतात). **दोरणी**—स्त्री. दोरी. **दोरत्व**—न. दोरपणा; दोर असण्याची स्थिति. 'दोरत्व दृष्टि अचळ झालें।' —सिसं ९.९७. **दोरवा**—पु. १ अंगांत उभ्या जाड रेघा असलेला कपडा; कापडाचा एक प्रकार. २ (कों.) तडा; चीर; भेग; दगड इ०कामध्यें असणारा दोरा. **दोरा**—पु. १ सूत (शिवण्याचें); वळीव, पिळदार सूत. २ तडा, भेग. दोरवा अर्थ २ पहा. ३ (ल.) लहान झरा; झिरण. 'या विहिरीस

तळयाचे दोरे आहेत.' ४ (ल.) जोड; संबंध; आप्तपणा; धागा-दोरा. 'हे जर आमचे जातीचे असतील तर यांचा आमचा कांहीं तरी दोरा असेल.' 'त्या दरबारांत आमचा कांहीं दोरा होता म्हणून जातांच पाय शिरकला.' ५ (ल.) गुप्त कारस्थान. 'हळूच लावले सारे दोरे।' –ऐपो २५१. ६ नारूचा किडा; तंतु ७ वृषणापासुन शिश्नापर्यंतचें सूत्र. ८ (पदार्थ इ० च्या) शरीरास लागलेल्या किडीचा मार्ग किडीच्या संचाराची रेषा. ९ गोगलगाई-सारख्या चिकट द्रव टाकणाऱ्या प्राण्याची उमटलेली रेषा. १० एक प्रकारची बांगडी, दागिना 'वेगळे निघतां घडीन दोरेचुडा।' –तुगा २९५९ ११ (ना.) पोटांतील आंतडी [दोर] ०वंजणें–(चांभारी धंदा) दोरा, घांसणें. [वंजणें=चोपडणें] दोरावणें–अक्रि. १ दोरा रेषा, शिरा, तड असणें (लांकूड, धोंडा, मोती इ० मध्यें). २ दोराळ, चिकाळ होणें; तंतु सुटणें (नासलेला पदार्थ, तिंबलेली कणीक इ० मध्यें). दोराळ–वि. (राजा.) दोरमय; तंतुमय. (गरा, दहीं इ०). दोरी–स्त्री. १ बारीक दोर. २ जमीन मोजणीचें एक परिमाण. २० परतन. ८० किंवा १२० बिघे. ३ एक लहान मासा. ४ (सोनारी-सुनारी धंदा) ःचाचा एकअष्टमांश भाग; सूत. [दोर] ०सैल देणें–सोडणें–ढिली करणें–लगाम, ताबा, नियम इ० ढिला करणें; स्वतंत्रता देणें. ०सूत–क्रिवि. सरळ; ओळंब्यांत; सरळ रेषेंत. (क्रि० जाणें; असणें). 'हा मार्ग येथून दोरीसूत पुण्यास जातो.'

**दोर्दंड**—पु. (काव्य) बाहुदंड; भुजदंड; खांद्यापासून कोपरापर्यंतचा हात. [सं. दोस्=बाहु+दंड]

**दोलहणा**—पु. टोमणा; आळ. 'तंव तो हरि म्हणे निजांगने वो। लइ नीच कां देसील दोलहणे वो।' –तुगा १४१. [सं. दोलनम्]

**दोला**—पु. १ झोंपाळा; झुला; झोका. २ डोली. [सं.] ०यंत्र–न. (वैद्यक) तेल, रस काढण्याचें यंत्र. दोलयात्रा–स्त्री. देवाला दोलांत बसवून काढलेली मिरवणूक. दोलायमान–वि. १ हलणारें; डोलणारें. 'शिरःकंपामुळें कर्णभूषणें दोलायमान होतात.' २ डळमळीत; घुटमळणारें; चंचल (चित्त).

**दो** —पु. (गो.) फार पातळ कागद.

**दोवलों**—पु. (गो.) १ डवली. २ एक वनस्पति. ०करणें–लुडबुड करणें.

**दोशिण**—स्त्री. (गो.) जास्वंद.

**दोशीं**—विक्रिवि. (गो.) दोहों बाजूंनीं; द्विधा. [दो]

**दोष**—पु. १ वैगुण्य; न्यून; खोड; उणीव (माणूस, जनावर, वस्तु यांतील). २ पाप; अपराध; कायदा मोडणें; दूषणीयता; निंद्यता. ३ (वैद्यक) शरीरांतील रसांचा क्षोभ; वातपित्तादि विकार; व्याधि; रोग. 'सद्वैद्यें जैसे दोषा। अंगलीना।' –ज्ञा १६.४२. ४ लेख, भाषण यांतील व्यंग. याचे तीन प्रकार आहेत–पद (शब्द) दोष, अर्थ दोष व वाक्यदोष. [सं.] ०उडणें–आरोप, टपका, नाशाबित होणें. ०देणें–काढणें–आणणें–लावणें–ठेवणें–व्यंग काढणें; बोल लावणें; वाईट म्हणणें; आरोप करणें. दोषणें–उक्रि. दोष देणें; नांवें ठेवणें. सामाशब्द– ०दृष्टि–स्त्री. छिद्रान्वेषण; केवळ दोषच पाहण्याची दृष्टि. –वि. दोषदृष्टीनें पाहणारा. ०वारण–न. दोष दूर करणें. दोष दोष–पु दोष देणें न देणें; नियता आणि अनियता. 'जेथें सर्वच एकसारखे अज्ञान आहेत तेथें दोषादोषाचा विचार कोठला?' दोषानुवाद–पु. चहाडखोरी; दुसऱ्याचे दोष बाहेर काढणें, सांगणें. दोषारोप–पु. १ एखाद्यावर दोष लागू करणें; दोष देणें. २ आरोप; आळ. दोषी–वि. १ अपराधी; गुन्हेगार. २ उणीव, दोष असलेला.

**दोषा**—स्त्री. (काव्य) रात्र. 'दोषा प्रवर्तेली सबळ। ब्रह्मांड करंडा भरलें काजळ।' –क्रिवि. रात्रीं. [सं.]

**दोस**—पु. (गो.) गोड आंबा. –शिली २.३५. [पोर्तु.]

**दोसीना**—स्त्री. घोड्याच्या छातीवर मध्यभागीं असलेली दुसऱ्या रंगाची रेघ. –अश्वप १.१०१.

**दोस्त, दोस्तदार**—वि. १ मित्र; स्नेही. २ (ल.) प्रियकर; यार. [फा. दोस्त्, दोस्त्-दार] ०दारी, दोस्ताई, दोस्ती–स्त्री. १ मैत्री; दोस्तपणा. २ (ल.) अनीतीचें, अधर्म्य प्रेम; पापी प्रेम.

**दोह, दोहन**—पुन. दूध काढणें; दोहण्याचा व्यापार. [सं. दुह्] दोहणें–उक्रि. दूध, धार काढणें. 'टाकून धेनू गृहभास दोहे।' –सारुह १.६४. दोहनीय–वि. दूध काढण्यास योग्य; दुभती. दोहवा–पु. दूधदुभतें. 'मंजुळ वेणु वाहे लुब्धल्या धेनुवा। नंदाघरीं दोहवा पूर्ण वाहे।' –निवृत्तिनाथगाथा ५९.

**दोहडावणें**—अक्रि. निरोप देणें; दवडणें; धाडणें. 'करनाटकी चादरा देऊनु दोहडावले.' –इमं ७. [दवडणें?]

**दोहद**—न. १ गरोदर स्त्रीची इच्छा, वासना; डोहाळा. 'दोहद कैसा सुंदरि, सांग तुझें काय इच्छितें स्वांत।' –मोभवरामायण, उत्तरकांड २३३. २ (ल.) झाडांना बहर येण्यापूर्वीची स्थिति; त्यांची मनीषा, वांछा. 'अशोकास स्त्रियांचा पादाघात हें दोहद आहे आणि बकुलास दोहद मद्याची गुळणी.' [सं.]

**दोहरा, दोहा, दोहोरा**—पु. हिंदुस्थानी काव्यांतील एक छंद; कविताजाति. [हिं.]

**दोही**—स्त्री. १ द्वाही; दवंडी; जाहीर घोषणा 'अब्दालीयाणें तेमुरशहा बसविला, त्याची दोही फिरविली.' –रा १.२५५. २ खबर; बातमी. 'त्यानें कचेरीस येऊन दोही दिली.' –रा १५.१०७. ३ शपथ. 'बाईची व आमची चित्त शुद्ध नाहीं यामुळें आम्ही दोही दिली.' –रा ६.११६. [अर. दुआई]

**दोहीं, दोहो**—वि. (काव्य) दोन. [सं. द्वि] **दोहींघरचा पाहुणा उपाशी**–दोन्ही डगरींवर हात ठेवणारा पडतो, फसतो या अर्थी. **दोहीपरती लग्न**–न. (ना) स्वतःच दोन्ही पक्षांचा खर्च करून केलेलें लग्न **दोहींसांज**–क्रिवि. दोन्हीसांज पहा. [दोन+सांज] **दोहो जिवांचा, दोहो जिवांचें माणूस**–स्त्रीन. गर्भार स्त्री. **दोहो टक्यानें खड**–वि. बळकट; दणगट. **दोहोत्रा**–पु. दरमहा दरशेंकडा दोन दराचें व्याज. **दोहो बापाचा**–वि. १ व्यभिचारी मातेचा; जारज; अकुलीन. २ द्व्यामुष्यायण.

**दोहीला**—वि. (व.) द्रोह करणारा. [सं. द्रोहः प्रा. दोह]

**दोहेरा**—वि दुहेरी [हिं] ॰**पट**–पु. (कुस्ती) जोडीदाराच्या दोन्ही गुडघ्यांच्या लवणींत हात घालून आपलें डोकें पोटास टेकून जोडीदारास एकदम आपटणें. [दुहेरी+पटकणें]

**दोहो माडवांचा वऱ्हाडी**—पु. १ वधू व वर या दोन्ही पक्षामध्यें सारखाच वावरणारा; मध्यें लुडबुड करणारा. २ (निंदार्थी) लग्न आणि और्ध्वदेहिक या दोहोंमध्यें सारखाच भाग घेणारा. ३ (ल.) ज्याला त्याचें स्वतःचें कांहीं तत्त्व, मत नाहीं असा.

**दौड**—स्त्री. १ दवडणें; दुडकी; धांव (क्रि॰ मारणें). २ लष्करी चाल, स्वारी, मोहीम. ३ दौडचाल; घोडयाची दौडत जाण्याची चाल. दौड याचें सामान्यरूप दवड. [सं. द्रुत; ध्व. दुड] **दौडणें**–अक्रि. धांवणें; पळणें. **दौडादौडी**–स्त्री. धांवपळ; इकडे तिकडे धावणें; धांवाधांव.

**दौडका**—स्त्री. एक प्रकारचें वाद्य. 'गिडिबिडीया दौडका दुटाळा।'–कमुरा ४०.११ [ध्व. दौड]

**दौंडा, दौणशीर, दौणशेवती-तें, दौणा**–दवंडी, दवणशीर, दवणशेवती-तें, दवणा इ॰ पहा.

**दौंडाळ**—वि. गप्पिष्ट. बाताडया. दवंडाळ पहा. 'अशी रांड दौंडाळ गळयांतुनी लमाची होती। कशास केल्या दोघी रडाया उशान पायती।'–पला ७६.

**दौत**—स्त्री. शाईचें भांडें; मषीपात्र. दऊत पहा. [अर. दवात] **दौतींत घाणा घालणें**–१ (दौतींत लेखणी तिरपी राहिली असतां घाण्याच्या लाटप्रमाणें दिसते त्यावरून) दौतींत कलम बुडवून ठेवणें. २ (ल.) भिजत घोंगडे ठेवणें. ॰**पूजा**–स्त्री. १ दिवाळीमध्यें सराफ, व्यापारी इ॰ करतात ती दौतीची पूजा. सोनें, वही व दौत हीं तीन प्रतीकें अनुक्रमें महालक्ष्मी. महासरस्वती व महाकाळी यांचीं आहेत. २ (ल.) (विशेष लिहिण्यासाठीं दौतींत टाक बुडविण्याची फक्त मजुरी) नुसतें नांवाला भाडें; नाममात्र भाडें.

**दौत्य**—न. १ दूताचें काम; संदेश, निरोप नेणें, आणणें. २ वकिली; शिष्टाई. [सं. दूत–दौत्य]

**दौर**—पु. घेर; परिकर. [अर. दौर्]

**दौरा**—पु. फिरती; प्रवास; परिभ्रमण. [अर. दौर्=वर्तुळाकार गति. अर. दौरात्=चक्र]

**दौर्बल्य**—न. कमजोरपणा; दुबळेपणा; अशक्तता; असामर्थ्य. [सं.]

**दौलत**—स्त्री १ संपत्ति; पैसा. २ वैभव; ऐश्वर्य; समृद्धि. ३ जहागीर; राज्य. 'शहाजी राजे यांनी दौलतेमध्यें पुणें परगणा होता.'–सभासद ५. 'हे दौलत कजेरोगानें निरंतर ग्रस्त.'–पया ३४३. ४ सैन्य. 'झाडून बुणगेसुद्धां दौलत गर्द जाली.'–ख ११.६०८६. ५ सल्तनत; साम्राज्य; गादी. 'आपल्या आपल्यांत भांडून दौलत बुडविली हा लौकिक कशाला पाहिजे.' –रा १३.६९. [अर. दौलत्] **–तीचा खांब**–वि. १ ज्याच्या बळावर कुटुंब किंवा राज्य भरभराटीस येतें तो; दौलत कमावणारा किंवा राखणारा. २ मुख्य मुत्सद्दी. –इमं २३६. **–तीस बाळवी लागणें**–संपत्तीस, ऐश्वर्यास ओहोटी लागणें. ॰**काहीरा**–स्त्री. विजयी राज्य. 'दौलत काहिरमध्यें मुलूक आला.' –रा१८.५५. ॰**ज्यादा-जादा**–स्त्री. १ राजदरबारातील भालदाराचा, राजास उद्देशून 'राज्य भरभराटीस येवो' या अर्थी जयजयकारवाचक शब्द. २ तमाशांतील नाच्यास उत्तेजनार्थ व चढाओढीमध्यें बक्षीस दिल्यानंतर तो करतो तो जयजयकार. ३ (ल) तमाशांत नाच्या–पोराशीं अगर कलावंतिणीशीं भरसभेंत केलेली शृंगारचेष्टा. (क्रि॰ करणें; होणें). ॰**जादा होणें**–प्रतिष्ठा वाढणें (सरकारदरबारीं). 'त्याची दौलत जादा झाली!' ॰**दार-वान्-वंत**–वि. १ श्रीमंत; संपत्तिमान २ सत्ताधीश; राज्याधिकारी. 'पाहते अर्थी दौलतवंतास कोणी एक गोष्टीनें सुख नाहीं.'–ख१२१५. ॰**खा**–वि. राज्याचा मित्र; हितेच्छु 'महाराव जानोजी केवळ निखालस, सर्व प्रकारें दौलतखा स्वामींचा आहे'–रा१.१४८. ॰**बंकी**–पु. महाद्वारपाल. –राव्य १.१४. ॰**मदार**–संपत्तीचें माहेरघर; ऐश्वर्याची खाण (जुन्या कागदपत्रांतील एक पदवी).

**दौहित्र**—पु. १ मुलीचा मुलगा. २ दौहित्र प्रतिपदा: आजे पाडवा (आश्विन शुद्ध प्रतिपदेस करतात) [सं] ॰**प्रतिपदा-श्राद्ध**–न. दौहित्र अर्थ २ पहा.

**द्याज**—न कन्याशुल्क; वधूदक्षिणा. देज पहा.

**द्यानत**—स्त्री. शुद्ध वासना; दानत. [अर. दियानत]

**द्यावापृथिवी**—स्त्री. स्वर्ग व पृथ्वी. [सं.]

**द्याहा**—क्रिवि (अशिष्ट) दिवसां; दुपारीं [सं. दिवस, दिह] ॰**ढवळ्या**–क्रिवि. भर–धडधडीत दिवसां. दिवसाढवळया पहा.

**द्यु**—न. १ आकाश; स्वर्ग. २ दिवस [सं.]

**द्युजीवा, द्युज्या**—स्त्री. ध्रुव आणि ग्रह यांच्यांतील अंतर; अहोरात्र समांतरवृत्ताची ज्या. [सं.] **द्युज्या चापांश**–पु आकाशांतील ताऱ्यांचें ध्रुवापासून अंतर. **द्युगत्रवृत्त**–न. ग्रु–अहोरात्र समांतरवृत्त.

**द्युति**—स्त्री. कांति; तेज: प्रकाश. [ सं. ]

**द्युमणि**—पु. सूर्य. [ सं. ]

**द्यूत**—न. फाशांनीं खेळणें; जुगार; जुवा. [ सं. ] **०कार**–वि. जुगारी.

**द्योतक**—न. चिन्ह; गमक. –वि. १ द्योतविणारा; प्रकाश पाडणारा. २ स्पष्ट करणारा; दाखविणारा. [सं.] **द्योतणें**–अक्रि. (काव्य) (शब्दशः व ल) प्रकाश पाडणें. [ सं. द्योतन ]

**द्योतन**—न. १ चकचकीत, झगझगीत, देदीप्यमान करणें. २ स्पष्ट करणें; उघड दाखविणें. ३ (ल) शब्दावांचून इतर लक्षणांनीं होणारें अर्थप्रकाशन, ज्ञान. 'ही नाडी आज पित्ताधिक्याचें द्योतन करिते.' [सं.] **द्योतमान**–वि. प्रकाश पाडणारें; चकचकणारें. **द्योतविणें**–उक्रि. १ प्रकाशित करणें. 'जयाची प्रभा द्योतवीते नभातें। करी त्या म्हणे मी प्रभूच्या स्तवातें।' २ स्पष्ट करणें; उघड करणें. **द्योतित**–वि. १ प्रकाशित; दीप्त. २ सुबोधित; दर्शित.

**द्रम्म**—पु. १६ पणांचें एक नाणें; सुमारें सोळा पैसे; पावली. [ सं.; तुल० ग्री. ड्राक्म; इं. ड्रॅम ]

**द्रव**—पु. १ रस; पदार्थांतील नैसर्गिक ओलावा, आर्द्रता, जलांश. २ पाझर; स्राव; द्राव; गळणें; थिबकणें. ३ वितळणें; गालन; द्रावण; द्रवरूप अवस्था (घट्ट पदार्थाची, अग्निसंयोगानें). ४ (ल.) दयेचा, कोमलतेचा पाझर. 'वरी अमृत घोटितां द्रव न येचि बापा जिला।' –केका १०४. [सं]**०गुरुत्वमापक**–न. (पदा.) प्रवाही द्रव्याचें गुरुत्वमापन करण्याचें यंत्र. (इं.) हायड्रोमीटर. **द्रवण**–न. १ द्रावण; पातळ होणें; विरघळणें; वितळणें; रस, द्रव होणें; पाझरणें; गळणें; स्रवणें (द्रावण हें कर्तरी रूप आहे). **द्रवणें**–अक्रि. १ विरघळणें; वितळणें; रस होणें. २ (ल.) दयेनें हृदयास पाझर फुटणें; अंतःकरण मृदु होणें. **द्रवित**–वि. १ वितळलेलें; विरघळलेलें; पातळ केलेलें. २ पाझर फुटलेलें; गळलेलें; थिबकलेलें (द्रावित हें कर्मणी रूप). **द्रवीकरण**–न. घट्ट पदार्थ पातळ स्थितींत आणणें. **द्रवीभवन**–न. वितळणें; द्रवस्थितींत येणें. **द्रवीभूत होणें**–१ द्रव पावणें; पातळ होणें. २ दया येणें; मन विरघळणें 'अर्जुना तुझें चित्त। जऱ्ही जाहलें द्रवीभूत।' –ज्ञा २.१८३.

**द्रविड, द्रविडी**—द्राविड–डी पहा.

**द्रव्य**—न. १ धन; संपत्ति; मालमत्ता; पैसा. 'द्रव्येण सर्वे वशाः'=द्रव्यानें हवा तो मनुष्य वश होतो. २ वस्तूंतील मूलभूत घटक, तत्त्व, अर्थ, विषय, पदार्थ, प्रकृति. ३ सृष्टीचें मूलतत्त्व. हीं तत्त्वें नऊ मानितात. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, काळ, दिशा, मन व आत्मा; पंचभूतात्मक वस्तु. ४ औषध; औषधी वस्तु. ५ (व्या.) ज्यास लिंग, वचन, विभक्ति इ० लागतात असा शब्द. याच्या उलट अव्यय. ६ घटक; अवयव; अंगभूत पदार्थ; बाब; विषय; मुद्दा. उदा० औषधी–सुगंधी–होम–द्रव्य. ७ (रसा.) जागा व्यापणारा व पृथ्वीनें आकर्षिला जाणारा पदार्थ, वस्तु; जडपदार्थ. ८ (पदा) भौतिक जगांतील वस्तू ज्यापासून बनल्या आहेत ते सूक्ष्म कण प्रत्येकीं. ९ (यंत्र.) जी इंद्रियगोचर असून जीस कांहीं आकार व वजन असतें म्हणजे जीपासून कांहीं प्रतिबंध होतो ती वस्तु. –यंस्थि १. १० (सामा.) पदार्थ; वस्तु. [सं.] **द्रव्याचा धूर निघणें**–पुष्कळ श्रीमंत असणें; घरीं लक्ष्मी पाणी भरणें. **द्रव्याचे उबेनें उडी मारणें**–पैशाच्या बळावर वाईट, धाडसी काम करण्यास प्रवृत्त होणें. **द्रव्याचे धुडके उडविणें–करणें**–पैसा उडविणें, नासणें, उधळणें. **द्रव्यावर ताव देणें**–पैसा गिळंकृत करणें, दाबणें. सामाशब्द– **०दृष्टि**–वि. द्रव्यादृष्ट याचें अपभ्रष्ट रूप. द्रव्यादृष्ट पहा. **०दृष्टि**–वि. द्रव्यावर लक्ष देऊन, द्रव्य मिळेल तरच काम करणारा; स्वार्थी. [ द्रव्य+दृष्टि ] **०वाचक**–पु. (व्या.) नामाचा एक प्रकार; पदार्थाचें किंवा वस्तूचें नाव; पदार्थवाचक नाम. उदा० दहीं, दूध, तेल इ०. **०वाद**–पु. पंच स्वाविषयींचें मत; सृष्टि पंचभूतात्मक मानणें. **०वादी**–पु. वरील तत्त्वाचें प्रतिपादन करणारा. **०वान–शाली**–वि. श्रीमंत; धनवान्. **०हीन**–वि. गरीब; निर्धन. **द्रव्यादृष्ट–दृष्टि**–नस्त्री. नशीबाची, भाग्याची अनुकूलता; द्रव्ययोग असणारें चांगलें नशीब, भाग्य. 'मोठी विद्या असली, मोठा पराक्रम असला तरी द्रव्यादृष्ट असल्यावांचून पैका कांहीं मिळायाचा नाहीं.' –वि. पैसा मिळण्याचे संपत्तियोगाचें (नशीब, भाग्य). [ द्रव्य+अदृष्ट=नशीब ] **द्रव्यानुकूल्य**–न. संपदा; समृद्धि; स्वास्थ्य; द्रव्यसामर्थ्य. **द्रव्येषणा**–स्त्री. १ द्रव्याची इच्छा; द्रव्यासाठीं धडपड. २ स्वतःच्या पैशावर, मालमत्तेवर प्रेम.

**द्रष्टव्य**—वि. पहाण्यास शक्य, योग्य; पाहण्याजोगें. [ सं. ]

**द्रष्टा**—वि. १ पहाणारा. 'ते दावी मज द्रष्टयातें। दृश्य करूनि।' –ज्ञा १८.११२१. 'अधर्म द्रष्टयासही पातक लागतें मग करणारास लागेल यांत काय संशय.' २ (ल.) ज्ञाता; जाणणारा. 'इंद्रियें सर्व अचेतन आहेत, तद्द्रष्टा जीव.' ३ साक्षात्कार झालेला. 'मंत्रद्रष्टा ऋषि.' **द्रष्टृत्व**–न. १ पाहण्याची शक्ति, साधन. २ अत्युच्च दृष्टि; दूरवर पाहण्याचें सामर्थ्य. [ सं. ]

**द्राख**—स्त्री. द्राक्ष पहा.

**द्रावें–भें, द्रावा–भा**—स्त्रीपु. मिरीं आणि मीठ घालून केलेलें कालवण (भाताची पेज, भाजीचें पाणी या प्रमाणें); गरगट; ढपळवणी. [ द्राव ]

**द्राव**—पु. पाझर. द्रव पहा. 'शिवतला चंद्रकरीं। सोमकांतु द्रावो धरी।' –ज्ञा ११.२४८. [ सं. ] **द्रावक**–वि. द्रवविणारें; वितळविणारें; विरघळविणारें. [ सं. ] **द्रावण**–न. १ द्रवणाचा

व्याप र. द्रवण पहा. २ (वैद्यक) द्रावक; विरघळविणारें द्रव्य; गर्ळू इ० वाहविणारें औषध. ३ (रसा.) द्रावक अथवा द्रवकारी रस. **द्रावणोष्णता**-स्त्री. कोणताहि पदार्थ विद्रावित करण्यास लागणारी उष्णता. घन पदार्थ द्रव स्थितींत येण्यास लागणारी उष्णता.

**द्राविड**—पु. १ मद्रासपासून कन्याकुमारीपर्यंतचा देश व त्यांतील लोकसमाज. २ द्राविडी भाषा (कानडी, तेलगू, तामिळ, मल्याळम् इ०) बोलणारांचा प्रदेश व बोलणारा समाज. ३ एक ब्राह्मणवर्ग व त्यांतील व्यक्ति. पंचद्राविड पहा. -वि. द्राविडी पहा. [सं] ०कच्छ-पु. द्राविड लोकांची कासोटा घालण्याची तऱ्हा. -डी-प्राणायाम-पु. १ (उजव्या हातानें समोरून नाकाशीं हात न नेतां, डोक्याच्या मागच्या बाजूनें हात नेऊन प्राणायामासाठीं नाकपुडी धरणें या विचित्र तऱ्हेवरून ल.) आडमार्गानें सांगण्याची, वागण्याची तऱ्हा; वक्रमार्ग; लांबचें वळण. 'वेताळपंचविशी हा ग्रंथ मूळचा संस्कृत, त्या भाषेंतून याचा तर्जुमा फारशी भाषेंत झाला, तींतून इंग्रजींत, इंग्रजींतून मराठींत! केवढा द्राविडी प्राणायाम हा!' -नि. २ जवळचा मार्ग न घेतां केलेला लांबलचक, कष्टप्रद व निष्फळ प्रवास; लांबचा रस्ता, मार्ग. **द्राविडी**-वि. द्रविड ब्राह्मण किंवा देश याविषयीं. म्ह० द्राविडो लुडबुडाम्यहम्=जें पाहिजे तें एकदम न मिळतां त्यासाठीं इकडून तिकडे व तिकडून इकडे हेलपाटे घालावे लागणें (एकदां एक द्रविड ब्राह्मण पेशव्यांची भेट घेऊन दक्षिणा मिळवावी म्हणून श्रीमंतांचा शोध करीत सासवडाहून पुरंदरास व तेथून पुन्हां सासवडास असे हेलपाटे घालून त्रासला त्याचें वर्णन त्यानें पुढील कवितेंत केलें आहे- 'गडाच्च सास्वडं यामि सास्वडाच्च पुनर्गडम्। गडसास्वडयोर्मध्ये द्राविडो लुडबुडाम्यहम्।' त्यावरून).

**द्रावित**—वि. विरघळविलेलें. द्रवित पहा. [सं]

**द्राव्य**—वि. वितळविण्यास, पातळ करण्यास, विरघळण्यास योग्य. [सं.]

**द्राष्ट**—वि. खाष्ट; खटयाळ; दुष्ट; वाईट स्वभावाचा; दाष्ट पहा. [सं. दुष्ट]

**द्रा(द्रां)क्ष**—स्त्री. १ अंगूर; द्राक्षाची वेल व तिचें फळ; ही वेल लावल्यापासून तीन वर्षांनीं लागवडीस येते. हिंदुस्थानांत हिरवी, काळी, पांढरी अशा हिच्या जाती आहेत. बेदाणा, मनुका, खिसमिस अशीं सुक्या द्राक्षांचीं नांवें आहेत. द्राक्षें पित्तशामक, रक्तवृद्धिकारक आहेत. द्राक्षाच्या रसाचा आसव मोडशीवर देतात. लाकडाचा काळा रंग करतात. [सं. द्राक्षा] ०शर्करा-स्त्री. द्राक्षापासून केलेली साखर (इं.) डेक्स्ट्रोस. **द्राक्षा**-स्त्री. द्राक्ष पहा. [सं.] **द्राक्षापाक**-पु. १ द्राक्षांचा केलेला औषधी पाक. २ (ल.) (साहित्य) काव्य, प्रबंध, व्याख्यान इ० श्रवण होतां होतांच त्यांतील रस, गुण, स्पष्ट कळणें; या प्रकारचें काव्यादिभाषण (द्राक्षांतील रसाप्रमाणें त्यांतील रस बाहेरून दिसणें). याच्या उलट नारिकेलपाक. **द्राक्षारस**-पु. १ द्राक्षांचा रस. २ द्राक्षाची दारू; द्राक्षासव. **द्राक्षाम्ल**-न. द्राक्षामध्यें आढळणारें अम्ल. (इं.) टार्टरिक ॲसिड यास प्रतिशब्द. **द्राक्षारिष्ट**-न. द्राक्षापासून तयार केलेलें एक औषध. **द्राक्षासव**-न. द्राक्षापासून केलेलें एक आसव, मद्य. **द्राक्षी**-स्त्री. द्राक्षाची वेल. द्राक्ष, द्राक्षा पहा. 'द्राक्षीचिया तरी बुडा। दूधचि लाविजे।' -ज्ञा १८.५९६. **द्राक्षें आंबट**-(ल.) जी गोष्ट प्रयत्नानें साध्य होत नाहीं ती वाईट अशी मनाची समजूत करणें (इसापनीतींतील कोल्ह्यास उडया मारूनहि उंच मांडवावरचीं द्राक्षें मिळालीं नाहींत या गोष्टीवरून).

**द्रुत**—पु. (ताल) अर्धमात्रांचा काल; ताल देण्यामधील विश्रांतीचा विवक्षित अल्प काल. -वि. १ विरघळविलेलें. द्रवित पहा. २ जलद; त्वरित. [सं.]

**द्रुति**—स्त्री. १ सुगंध; मकरंद; सुवास. 'जैसी पिकली द्रुती आदरें। बोभात निघे।' -ज्ञा १३.३०४. २ द्रवणें ३ जलदगति. ४ पळून जाणें. -शर [सं.] ०वंत-वि. सुगंधी; सुवासिक. 'आणि ते टाळुकंचें पुष्प द्रुतिवंत। तो ख्रिस्तु स्वामी।' -ख्रिपु १.३४.४७.

**द्रुम**—पु. झाड; झुडूप; वनस्पति. 'निगमागमद्रुमफळ। फलप्रद।' -ज्ञा १८.२. [सं.]

**द्रुष्ट**—वि. द्राष्ट पहा. [सं. दुष्ट]

**द्रेकाण**—पु. (ज्यो.) राशीच्या तिसऱ्या भागाचा अधिपति. [सं. ग्री. देकनॉस]

**द्रेष्काण**—पु. (ज्यो.) राशीचा दशांशात्मक विभाग. [सं. ग्री. देकनॉस]

**द्रोण, द्रोणा**—पु. १ पळस वगैरे पानांचें, पातळ पदार्थ ठेवण्याचें, चुया टोंचून केलेलें एक पात्र. २ लांकूड, दगड, लोखंड इ० कोरून केलेलें, गुरांना पाणी पाजण्याचें किंवा नदी तरून जाण्याचें पात्र; डोणी. ३ (धान्य इ०) मोजण्याचें माप; अर्धा मण. 'जोडी सातमजदार द्रोणमित व्रीहि पंधरा दिवसीं।' -मोवन ८.३. ४ द्रोणाचार्य; महाभारतांतील कुरुगुरु. [सं.] **हातापायाचे द्रोण होणें**-हातपाय आंखडणें. **द्रोणकाक**-पु. १ गिधाड. २ डोम कावळा. ०माशी-स्त्री. साधी माशी (द्रोणावर बसते म्हणून). ०वत-न. द्रोणाच्या उपयोगी पान. **द्रोणी**-स्त्री. डोणी पहा.

**द्रोह**—पु. १ वैर; शत्रुत्व. २ खोडसाळपणा; अपकार; मत्सर; आकस. ३ एखाद्याचें अनिष्ट केल्यामुळें त्यानें दिलेला अभिशाप; तळतळाट. [सं.] ०चिंतन-न. आकस बाळगणें; वैर करणें; शत्रुत्वाची भावना ठेवणें. **द्रोही**-वि. १ द्रोह करणारा; वैरी. २ अभिशापास पात्रभूत. ३ खुनशी.

**द्वंद्व**—न. १ (मनुष्य, पशु इ०चें) जुळें; युग्म; जोडी. २ दोघांचें युद्ध; कुस्ती; (यावरून) भांडण; तंटा; कलह. 'मग कांहीं

प्रजा त्याला मिळेल कांहीं प्रजा आम्हाला मिळेल आणि मोठेंच द्वंद्व माजून राज्याचें वाटोळें होईल.' –तारामंडळ १.५. 'त्वा शेत चारिलें पक्षिया। भलें द्वंद्व साधिलें।' –पु. (व्या.) एक समास; उभयान्वयी अव्ययानें जोडले जाणारे दोन शब्द. उदा० शेलापागोटें. [सं. द्वंद्व=जोडी] ०युद्ध–न. दोघांतील लढाई; कुस्ती; लढाईचा प्रकार.

**द्वय**—न. जोडी; युगल; युग्म. समासांत दुसऱ्यापदीं योजतात. उदा० पुस्तकद्वय; जोशीद्वय. [सं.] ०खुरी–वि. दुखुरी पहा. [सं.]

**द्वाड**—वि. दुष्ट; खटयाळ; उपद्रवी; खोडकर. [सं.] ०चाळा–पु. खोडी; अपकारक चेष्टा. ०मेला–वि. (बायकी) रागाचा शब्द; द्वाड पहा. ०वाणा–णा–वि. (निंदार्थी) कुत्सित; खटयाळ; द्वाड. ०स्वाड–वि. द्वाड. [द्वाड द्वि]

**द्वादश**—वि. १ बारा. २ बारावा. [सं.] ०विधपुत्र–पुअव. कायदेशीर बारा पुत्र किंवा वारस. यांचीं नांवें–औरस, क्षेत्रज, दत्त, कृत्रिम, गूढोत्पन्न, अपविद्ध, कानीन, सहोढ, क्रीत, पौनर्भव, स्वयंदत्त, शौद्र. इ० ०स्थान–न. जन्मकुंडलींतील बारावें स्थान. ०स्थानीं असणें–(कुंडलींत गुरु ग्रह द्वादशस्थानीं असणें मोठें अनर्थकारक असतें त्यावरून) पराकाष्ठेचें वैर असणें. **द्वादशांश**–पुअव. (अंकगणित) दशांशपद्धतीप्रमाणें अंक मांडण्याची एक पद्धत. **द्वादशांश गुणाकार–बेरीज वगैरे**–दशांशपद्धतीप्रमाणें द्वादशमान पद्धतीप्रमाणें करावयाचे गुणाकार वगैरे. **द्वादशी**–स्त्री महिन्याच्या प्रत्येक पक्षांतील बारावी तिथि. [सं.]

**द्वाप(पा)र**—पु कृत, त्रेता द्वापार आणि कलि या चार युगांपैकीं ८६४००० वर्षांचें तिसरें युग. [सं.]

**द्वामुष्य, द्वामुष्यायण**—न. द्यामुष्यायण पहा.

**द्वामां(मां)श**–पु. संदिग्धपणा. –वि. मोघम. –क्रिवि. अनिश्चित. द्यामुष्यायण अर्थ ३ पहा.

**द्वार**—न. १ वाट; मार्ग; दार अर्थ १ पहा. २ शरीरांतील उत्सर्ग मार्ग, छिद्र; विशेषतः गुह्यछिद्रें 'अप नद्वार' ३ (ल.) जागा; स्थान; कारण; तोंड. 'माझी सर्व विपत्ति त्यानें दूर केली आतां रड गायास मला द्वार राहिलें नाहीं.' ४ साधन; वाट; युक्ति; मार्ग. [सं.] ०निवणें–चार दिशांनीं मुलें यात्रेस बाहेर जाऊन गांवांत परत येतात त्यावेळीं त्यांनीं काढलेल्या मिरवणुकी. गांवचे लोक या मुलांना सामोरे जाऊन त्यांना गांवांत वाजतगाजत आणतात. ०देवता–स्त्रीअव. १ मुख्य देवतांच्या दरवाजावरील देवता. २ (ल.) ज्यांच्यातर्फे राजा, उमराव किंवा मोठे लोक यांच्याकडे प्रवेश मिळूं शकतो असे दारावरील अधिकारी. ०पाल–पु. द्वाररक्षक; देवडीवाला; पहारेकरी. ०पूजा–स्त्री. १ द्वारदेवतांची पूजा. २ (ल.) दारीं हेलपाटे घालणें अथवा जोडे झिजविणें. ०शाखा–स्त्री. दाराची एक फळी. ०संकोच–पु. १ दाराचा अरुंदपणा २ (ल.) शिरकाव होण्यास कठिण; प्रवेशाची अडचण.

**द्वारका**—स्त्री. श्रीकृष्णाची राजधानी; त्यामुळें बनलेलें तीर्थक्षेत्र [सं] **द्वारकेचें केणें**–न (द्वारकेचा माल ल.) श्रीकृष्ण. 'द्वारकेचें केणें निश्चित। पंढरीस आलें चोजवत।'

**द्वारां**—शअ. तर्फे; मार्फतीनें; कडून; मध्यस्थीनें; पासून. 'पत्र–पुत्र–मित्र–स्त्री–द्वारां.' [सं. द्वार]

**द्वारावती**—स्त्री. १ द्वारका क्षेत्र. २ गोपीचंदन. हें द्वारकेंत सापडतें.

**द्वाली**—स्त्री. चामडयाचा पट्टा; कातडयाचा कमरबंद [फा. दोआल्, दूआली.] ०बंद–वि. कमरपट्टा बांधलेला शिपाई.

**द्वाही**—स्त्री. शपथ, हरकत. दुराई दुराही पहा. हिचे पुढील प्रकार आहेत–कालकृत=कांहीं काळपर्यंतची बंदी. स्थानकृत=जागा बदलण्यास बंदी. याप्रमाणें देश–प्रवास–कर्मकृत इ० ०फिरविणें–फिरणें–दवंडी पिटणें; जाहीरनामा लावणें. ०दुराही–स्त्री. १ राजाच्या अथवा सरकारच्या हुकुमावरून केलेली रयत लोकांतील एकमेकांच्या व्यवहार भाषण वगैरेसंबंधीं बंदी, प्रतिबंध २ (सामा) द्वाही. 'तो द्वाही दुराही करून गेला.' [हिं. दुलाई]

**द्वि**—वि. दोन [सं] ०गुण–वि. दुप्पट; दोनदा. –पु. (संगीत) स्थायी स्वरापासून आठवा स्वर. ०घात–पु. एका संख्येला त्याच संख्येनें गुणून आलेला गुणाकार; वर्ग. ०चरण–वि. दोन पायांचा; द्विपाद. ०जिह्व–वि. १ दोन जिभांचा (साप) २ (ल) खोटें बोलणारा; लुच्चा; चहाडखोर ०तत्त्ववाद–पु. परस्पर विरोधी तत्वांपासून जगांतील सर्व गोष्टींचा खुलासा करिता येतो असें प्रतिपादन करणारें मत. **द्वित्त**–वि. दुप्पट; दुहेरी; जोड (अक्षर). उदा० क्क, च्च. **द्वित्व**–न. द्विरुक्ति; पुनरुच्चारण (अक्षर किंवा शब्द यांचें). **द्विदल–ळ**–न फुटून दोन अर्धे होणारें धान्य. उदा० दाळ, कठण. –वि. दोन पाकळयाचा–पानांचा–भागांचा–कळयाचा इ० **द्विधा**–स्त्री. मतभेद; दुमत. –क्रिवि. १ दोन जातीचें. २ दोन मार्गांनीं, रीतींनीं. ३ दोन तुकडयांत (विभागलेलें); दुभंग. 'मन द्विधा होतें.' **द्विपक**–वि. दोनदां शिजविलेलें. ०पद–पाद–वि. १ दोन पायांचा; द्विचरण. (प्राणी, माणूस, पक्षी इ०). २ (अंकगणित)दोन संख्यांचा. ०पितृक–वि. दोन बापांचा; दत्तक (मुलगा). ०भास्मिक क्षार–पु. जड धातूंचीं कर्बनत्रिदें पालाशकर्बनत्रिदांत विरघळून तयार होणारा क्षार. ०मथिल आमिन–पु हा फार जड वायुरूप आहे. यास माशासारखा वास असतो म्हणून यांस मत्स्यगंधवायु असेंहि म्हणतात (इं.) डायमेथील अमाईन ०मुख–पु. अग्नि. –वि. दोन तोंडें असलेला. ०मूल्य–वि. दोन परमाणुयुक्त. (इं.) डायटोमिक. ०युक्तपद–वि. (बीजगणीत) दोन संख्यांचा; दोन संख्यांचें; दोन अवयवांचें (संयुक्त पद). ०रद–पु. हत्ती. 'विद्युद्योद्यान-द्विरद।' –ज्ञा १८.७. –रागमन–न. माहेरून सासरीं दुसऱ्यांदा

जाणें; दुसरी खेप. [ द्वि.+आगमन ] **द्विरावृत्ति**-स्त्री. दुसरी आवृति. **द्विरुक्त**-वि दोनदां बोललेलें, म्हटलेलें; पुनरुक्त. **द्विरुक्ति**-स्त्री. १ पुनरोच्चारण. २ पुनरुक्ति. ३ दुहेरी शब्द जसें गडगड धडधड, ददाति. **०रेफ, रेफकू**-पु भ्रमर. -ज्ञा १३.२८६. **द्विर्द्वादश, द्विर्द्वादशक**-न. ( वधूवरांच्या पत्रिका पाहतांना ) एकाची रास दुसऱ्याच्या राशीपासुन बारावी येते व तेथून पुढें मोजल्यास पहिल्याची दुसरी येते त्यावेळीं हा योग असतो. सबंध राशीमंडलानें वियुक्त. **द्विवचन**-न. ( व्या. ) दोन पदार्थ किंवा व्यक्ती दाखविणारें वचन. **०विध**-वि. दोन प्रकारचा. 'तैसाचि द्विविध रसु। उपजवी प्रीतिग्रासु।' -ज्ञा २.११८. **०शफ**-वि. दोन-दुभागलेल्या खुरांचा. **०समत्रिभुज**-पु. (ग) दोन सारख्या भुजांचा त्रिकोन. समद्विभुज त्रिकोण. **०स्वभाव**-वि. दोन प्रकृतींचा, स्वभावाचा (मिथुन कन्या, कुंभ, मीन या राशींचें विशेषण).

**द्विज, द्विजन्मा**—पु. १ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य (याची मुंज म्हणजे दुसरा जन्म होतो, त्यावरून ). २ कोणताहि अंडज प्राणी ( पक्षी साप, मासा इ० यांचा अंडें फुटल्यावर होणारा दुसरा जन्म होतो यावरून ). ३ दात ( दोनदां येतात म्हणून ). -वि. दोनदा जन्मलेला. [ सं. ] **०कुल**-न. १ पक्षिकुल; पक्षिजाति. २ ब्राह्मणकुल-जाति. **द्विजराज**-पु. १ चंद्र. २ ब्राह्मणश्रेष्ठ.

**द्वितीय**—वि. दुसरा. [ सं. ] **०केंद्र**-न ( ज्यो. ) ग्रहाच्या कक्षेतील सूर्यास अत्यंत दूरच्या बिंदूपासूनचें अंतर. **०संबंध**-पु ( पुरुषाचा ) दुसरा विवाह; पुनर्विवाह. **०सवन**-न. १ वेद पठणांतील मध्यमसवन. २ प्रथमसवनावरचा, किंचित् चढविलेला स्वर. **द्वितीया**-स्त्री. १ दोन्ही पक्षांतील दुसरा दिवस-तिथि. २ ( व्या. ) दुसरी विभक्ति. या विभक्तीचे मराठींतील प्रत्यय-एक वचन स, ला, तें; अनेकवचन स, ला, ना, तें. [सं.] **०तत्पुरुष**-पु. (व्या.) जेथें द्वितीयेचा लोप होतो तो समास. उदा० विप्रताडन.

**द्वीप**—न. १ बेट; सर्व बाजूंनीं पाणी असलेली कोणतीहि जमीन. २ पृथ्वीच्या सात मोठ्या भागानाहि म्हणतात. त्या पैकीं जंबु द्वीपाचे दहा भाग केलेले आहेत. सप्तद्वीप पहा. [ सं. द्वि+ अप् ] **०कल्प**-पु. तीन बाजूंनीं पाणी असलेली जमीन.

**द्वेधा**—द्विधा पहा.

**द्वेष**—पु. १ मत्सर; हेवा; आकस. २ वैर; दावा; अप्रीति; राग. ( क्रि० करणें ). [सं ] **०उगविणें**-वैर करणें; सूड उगविणें, घेणें. **०वागविणें**-मत्सर, वैर करणें. 'इतका द्वेष वागवीत मनीं। परी लौकिकार्थ बैसे कीर्तनीं।' **द्वेषक, द्वेष्टा**-वि. द्वेष करणारा; शत्रुत्व बाळगणारा; खुनशी. **द्वेषणें**-सक्रि. १ वैर बाळगणें, दावा धरणें. २ न आवडणें. **द्वेषबुद्धि-भाव**-स्त्रीपु. वैर; आकस; वैराची, सुडाची भावना. **द्वेषित**-वि. ज्याचा द्वेष केला आहे असा. **द्वेषी**-वि. वैरी; मत्सरी; उपद्रवी; त्रासदायक (मनुष्य, खाद्य पदार्थ, औषध इ०). **द्वेष्टा**-वि. द्वेष करण्याचा स्वभाव ज्याचा आहे असा. **द्वेष्य**-वि. द्वेष, हेवा, तिरस्कार करण्याजोगा.

**द्वैत**—न. १ भिन्नता (मत, भावना, संकल्प इ०ची). २ नावड; विलगपणा; भेदभाव. ३ भेदवाद-म्हणजे ब्रह्म आणि जग, जीव आणि शिव, आत्मा व परमात्मा हीं निराळीं, भिन्नभिन्न आहेत असें मत; जीवात्मा व परमात्मा हे भिन्न मानणें. 'किंवा प्रवर्तला त्या द्वैता अद्वैतवाद साराया।' -मोभीष्म ९.५०. याच्या उलट अद्वैतवाद. [सं.] **०भाव**-पु. १ मनाचा दुटप्पीपणा; मत, अभिप्राय यांचें भिन्नत्व; प्रेमात, प्रीतींत द्वैधीभाव; स्थितीचा, जीवाचा दुजाभाव; भेद; भिन्नता. 'द्वैतभावास घातलें पाणी। जैसें दुधांत मिळे धारवणी। न दिसे परतून सर्वथा।' २ द्वैत अर्थ ३ पहा. **०भावना**-स्त्री. १ नावड; भिन्नभाव; तिरस्कार. २ द्वैतभाव अर्थ १ पहा **०मत**-न. द्वैत अर्थ ३ पहा. **०वाद**-पु. द्वैतमत मानणें. **०वादी**-वि. द्वैतभाव मानणारा. **द्वैती संप्रदाय**-पु. माध्वमत. 'परब्रह्म व जीव काहीं अंशीं एक व काहीं अंशीं भिन्न मानणें परस्पर विरुद्ध असुन असंबद्ध होय. म्हणून दोन्हीही सदैव भिन्नच मानिले पाहिजेत संपूर्ण अथवा अंशतःहि त्यांचें ऐक्य होणें शक्य नाहीं असें रामानुजाचार्यानंतर निघालेल्या तिसऱ्या संप्रदायाचें मत आहे त्यामुळें त्यास द्वैती संप्रदाय असें म्हणतात.' -गीर १६.

**द्वैध-द्वैविध्य**—न. द्वैत अर्थ १ पहा; विरुद्धता; मतभेद; भिन्नता; भेद. [ सं. द्विधा ]

**द्वैरथ**—न. दोघां रथ्यांचें युद्ध. -मोकर्ण [ सं. द्वि+रथ ]

**द्वैरुक्त्य**—न. द्विरुक्ति करणें; द्विरुक्ति; दोनदां बोललें, म्हटलें गेल्याचा गुण अथवा स्थिति. [ सं. द्वि.+उक्ति ]

**द्व्यर्थ, द्व्यर्थक**—वि. १ दोन अर्थ असणारा; दोन तऱ्हेनें व्याख्या केला जाणारा; दुटप्पी; दुहजरी. २ दुहेरी उपयोगाचा किंवा परिणामाचा; दोन भिन्न गोष्टी साधणारा. [ सं द्वि+अर्थ ]

**द्व्यर्ध**—पु. ( संगीत ) स्थायी स्वरापासून चौथा स्वर. [ सं. द्वि+अर्ध ]

**द्व्यामुष्यायण**—पु. १ मुंज झाल्यानंतर दत्तक गेलेला मुलगा. २ जारज पुत्र; दोन बापांचा मुलगा. ३ यावरून मोघम, संदिग्ध, दुटप्पी भाषण; संशयित किंवा अनिश्चित गोष्ट, कृत्य. -क्रिवि. सदिग्धपणें; संशयितपणें. [ सं. द्वि+अमुष्य+अयन ]

**द्व्याहिक**—वि. १ रोज दोनदां भरणारा किंवा मध्यें दोन दिवस जाऊन तिसऱ्या दिवशीं येणारा ( ताप ). **ज्वर पहा.** २ दोन दिवसांच्या संबंधीं. [ सं. द्वि+अहन् ]

# ध

**ध**—वर्णमालेंतील एकोणविसावें व्यंजन. अक्षरविकासः–याची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार शिलालेखांत, दुसरी कुंडेश्वर लेखांत (इ. स ६६१). तिसरी उज्जयिनी येथील लेखांत (इ स. ११ वे शतक) व शेवटची उरिया लेखांत (इ. स. १२०८) आढळते.

**ध**—(सांकेतिक). धरणें. **ध चा मा करणें**–(सांकेतिक) (आनंदीबाई पेशवे हिनें राघोबादादा याच्या हुकुमांतील धरावें या शब्दांत 'ध' चा 'मा' करून मारावें असा फरक केला होता अशी समजूत आहे त्यावरून) मूळच्या लेखांत नवीन व स्वतःस फायदेशीर असा महत्त्वाचा मजकूर लबाडीनें घुसडविणें.

**धक, धग**—स्त्रीपु. १ (विस्तवाची) आंच; शेक; झळ; ताप. 'मी धक घेणार आहे.' २ पेटलेला विस्तवः अग्नि; जाळ; ज्वाला. ३ (गर्व, प्रौढी, भावना इ०कांची) गुरमी; जहालपणा; तीव्रता ४ (गो.) संताप. जळफळ. ५ (कु) अंगांतील बारीक ताप; कडकी. [सं. दह् चें द्वितीयपुरुषी आज्ञार्थी रूप. 'दग्ध' हें ऋग्वेदांत 'जाळ' या अर्थानें येतें. –मसाप १.२.२२; बं. धक्; गु धक=तहान; का. दग]

**धकटा**—वि. (प्र.) धाकटा; धाकटा पहा. [धाकटा अप.]

**धक(ग)टी**—स्त्री. (कु.) बारीक ताप; कडकी. [धक]

**धघटी-टें**—स्त्रीन. (कों.) शेकोटी; आगटी. [धक]

**धकणें**—अक्रि. १ निर्वाह, निभाव होणें; निभावून जाणें. 'महाराजांचा कारभार प्रजेच्या दुर्दैवानें धकला गेला.' –विक्षिप्त २ ३९. २ (ना. व.) (अन्न, जेवण) घशाखालीं उतरणें; पोटांत जाणें; खपणें. 'तिळ विंगळ भाकर न धके।'–विक ७९. ३ (व.) (आगगाडी, वाहन इ०) चालू होणें, धक्क्यावरून हालणें. 'गाडी आतांच धकली.' ४ हकललें, लोटलें जाणें. 'जितके हरिभजनाला चुकाल। तितके यमाजीकडे धकाल।' –अफला ६२. [सं. दक्ष्= वृद्धौ, शीघ्रार्थेच; सिं. धिकणु=लोटणें]

**धकधक**—न. १ धडकी; धागधुग; भीति. २ काळजाच्या ठोक्यांचा आवाज; धडधड. 'सर्पाचें नांव घेतांच माझ्या उरांत धकधक होतें.' [ध्व. धक् द्वि; हिं. धकधकी]

**धकधक-धकां**—क्रिवि. धागधुग, माटमुट, (जीव) वरखालीं होणें. –उद्गा. (सांकेतिक.) हत्तीनें जोरानें चालावें म्हणून माहुताने योजावयाचा शब्द. [ध्व. धक् द्वि.]

**धकधकणें**—अक्रि. ऊर खालींवर होणें, उडणें; धडधड करणें. [धकधक]

**धकलवार, दकलवार**—पु. मांगांची एक पोटजात, व तींतील व्यक्ति ही जात सोलापूर, खानदेश व उत्तरमहाराष्ट्रांतील संस्थानें यांत आढळते –अस्पृ ४७.

**धका, धक्का**—पु. १ एकदम, आकस्मिक लागणारा हिसका; ढका: गचका; हिसडा: आंचका. (क्रि० लागणें: लावणें). २ (एका पदार्थाचा दुसऱ्यावर झालेला, केलेला) प्रहार: आघात; तडाखा. ३ (ल.) (एखादा व्यवहार, पदार्थ इ०कांत झालेली, आलेली) अनिष्टापत्तिः नुकसानी: खराबी; हानि. 'यंदा पाऊस चांगला न पडल्यामुळें पिकास धक्का बसला.' ४ (पाणी, वारा इ०कांचा नेट साभाळण्यासाठीं गलबत इ० किनाऱ्यास लागण्याच्या सोयीसाठीं) नदी, समुद्र इ०कांच्या किनाऱ्यावर बांधलेली भिंत, चौथरा, कट्टा. ५ प्रवाशानां विसाव्यासाठीं, ओझीं इ० खालीं उतरून ठेवण्याच्या सोयीची (डोंगर इ०कांतील) रस्त्याच्या बाजूनें केलेली ओट्यासारखी ओबडधोबड रचना. ६ आगबोट, आगगाडी इ०कांतून माल उतरून घेण्याचें ठिकाण. 'रेलवेच्या धक्क्यावर आमचा माल पडून आहे.' ७ उंच रस्त्याच्या, कडेलोटाच्या कडेला बांधलेली कटड्याची भिंत, वरवंडी. ८ (एखादा पदार्थ) विद्युज्जागृत करण्याचें, वीज भरण्याचें यंत्र (यास स्पर्श केला असतां धक्का बसतो म्हणून हें नांव). ९ धोका; भय; संकट. [सं. धाक=आधार, धीर, खांब; सिं. धकु, धिको; हिं. धक्का; गु. धक्को; का.] ०**धक**–स्त्री. १ इजा, मोडतोड, फूटतूट होण्याची भीति. २ जिकीरीचें, दगदगीचें, ओढाताणीचें काम; खटाटोप; खवदव; उपद्व्याप. [धका द्वि.] ०**धका**–स्त्री. (परस्परांत होणारी) धक्काबुक्की; रेटारेटी; झोंबाझोंबी; झोंटधरणी. 'हे धकाधकीचीं कामें। तिक्षण बुद्धीचीं वर्में।' –दा १९ ७.१९. 'राजकारणाच्या धकाधकींत नेमस्तपक्षांतल्या पुढाऱ्यांचा कासोटा त्यांनीं सोडला तरी हरकत नाहीं.' –सुदे ६९. [धका द्वि.] ०**धकीचा मामला**–पु दगदगीचा, भानगडीचा, झोंबाझोंबीचा, खटाटोपाचा व्यवहार, काम. 'धकाधकीचा मामला। कैसा घडे अशक्ताला।' –दा १९.१०.२२. ०**बुक्का-बुकी, धकीबुकी**–स्त्री. (कों.) धक्के आणि बुक्या यांचा मार (क्रि० देणें; करणें; मारणें). [धका+बुका] **धकेचपेटे**–पुअव. १ टोले आणि ठोसे; धक्काबुक्की; मारहाण. 'व्याप आटोप करिती। धकेचपेटे सोसिती।' –दा १५.३.७. २ नुकसान; तोटा; घस. ३ बोलाचाली; अपमान; निंदा. 'धकेचपेटे सोसावे।' –दा १५.६. २२. [धका+चपेटा]

**धकाधक**—स्त्री. ऊर, छाती जोरानें धडधडणें. [ध्व; धक द्वि.]

**धकाधक-धकां**—क्रिवि. ऊर जोरानें धडधडत असतां. [ध्व. धक् द्वि.]

**धकावणें**—अक्रि. १ (अक्षरशः व. ल.) धक्का, अचका, हिसका बसणें. २ (ल.) (सामा.) नासणें: बिघडणें; खराब होणें; नुकसानींत, आंतबट्ट्यांत येणें; बसणें; खालावणें. 'रोजगार-व्यवहार-उदीम-चाकरी-अधिकार-धकावला.' ३ (पोहणारा, होडी

इ० प्रवाहाच्या सपाट्यांत सांपडून ) वाहवणें; वाहवलें जाणें. ३ कचणें; कचरणें; खचणें; गळणें. [ धका ]

**धकावणें** —उक्रि. १ पुढें रेटणें, लोटणें; ढकलणें. ' घोडे पुढें धकावूनी नाना-। सहवर्तमान पुण्यांत आले राउत। ' –ऐगो २५२. २ हिसडा, आंचका, हबका देणें; हिसडणें. [ धका ]

**धकी**—स्त्री. ( कों. ) धक्का; हिसका; हिसडा; हबका. ' येथून धक्या मारून बाहेर काढून दिला तर कशाला पुसता ' –विवि ८.११ २०६. [ धका ]

**धको**—पु ( कु. ) बसण्याच्या उपयोगाचा भिंतीचा पुढें आलेला भाग; धक्का.

**धक्क**—न. भीतीमुळें हृदयाला बसणारा धक्का; धडकी; धस्स. –क्रिवि. धडकीनें; उरांत धस्स होऊन. [ ध्व. ]

**धक्क**—वि. १ धिराचा; निश्चयाचा; चिकट; संकटास न डगमगणारा; धट्टाकट्टा; धडधाकट; काटक ( मनुष्य, जनावर); धड; मजबूत; टिकाऊ; दमदार ( दागिना, वस्त्र इ० ). २ लखलखीत; लख्ख; तेजाळ; तेजस्वी ( हिरा, रत्न, शोभेचें दारूकाम इ० ). ३ लख्ख; चकचकीत; उजळ आणि चांगला ( रुपया इ० नाणें ). [ ध्व. ]

**धक्क**—क्रिवि. लख्ख ( उजाडणें; उजेड पडणें ). [ ध्व. ]

**धक्कड**—वि. दांडगा; गेलेल्या; धिप्पाड.

**धक्का**—पु १ हिसका; हिसडा; आंचका. २ ( एका पदार्थानें दुसऱ्यावर केलेला ) आघात; तडाखा; प्रहार. ३ भयंकर दुःख इ०कानीं हृदयाला भरणारी धडकी; ऊर धडाडणें ' मातेला धक्का बसला। लागे ती नित्य झुरायला। ' –विक१८. ४ संकट; धोका; भय. ' आधीं गाजवावे तडाखे। तरि मग भूमंडळ धाके। ऐसें न होतां धक्के। राज्यास होती। ' –राजे संभाजीचरित्र ९. ५ रस्त्याच्या कडेलोटाच्या बाजूनें बांधलेली कठड्याची भिंत, वरवंडी. ' धक्क्याच्या भिंती सुक्या दगडाच्या बांधतात. ' –मॅरट ४४. इतर अर्थी धका पहा. [धका. ध्व ] **०बुक्की**–स्त्री. धकाबुकी पहा. [ धक्का+बुक्का ]

**धक्की**—स्त्री. धकी पहा.

**धग**—स्त्री. १ (विस्तवाची) उष्णता; शेक; आंच २ शेकोटी; आगटी. ३ ( गो. ) संताप. क्रोध; जळफळाट इतर अर्थी धक पहा. [ सं. दग्ध–धग्ग–धग–भाइ १८३४ ] **०खांक**–स्त्री. (गो.) क्षयरोग. [ धग+खांक ]

**धगचें**—अक्रि. १ ( गो. ) जळफळणें; संतापणें. २ कृश, क्षीण होत जाणें; झुरणीस लागणें; ( मनास ) धक्का बसणें. [ धग(गो.)= संताप, जळफळाट ]

**धग-ी-टें**—स्त्रीन. १ आगटी. २ ( गो. ) कडकी; बारीक ताप. [ धग ]

**धगड**—पु. १ जार; भडवा; यार; उपपति. ' जड प्रपंच धगडालागीं। ' –दावि ७५. 'म्हणे प्रदोष करत्ये न माती करत्ये. त्या मेल्या धगडाला मात्र घेऊन बसत्ये. ' –सागोप्र २.३. २ ( अशिष्ट, निंदार्थी ) नवरा, पति. ' पोरी, आज मुके देतांना तोंड असें वाकडें करतेस पण उद्यां नवरा ( आजोबा इथें थोडयाशा ग्राम्य भाषेत धगड असें बोलत ) मुके घेऊं लागला म्हणजे कसें करशील. ' –बहुकलेली तरुणी ६. ३ ( एखाद्याचें ) निर्दालन, पराभव करणारा; उरावर बसणारा; पुरें पडणारा; डोक्यावरचा मनुष्य इ० ' हा पंडितांचा धगड आहे. ' ' मंडूर हा पंडु रोगाचा धगड आहे. ' [ सं. ध्रुव; हिं. धगडा ] **म्ह**० जेथें दगड तेथें धगड.

**धगडी**—स्त्री. रखेली; रांड; जारिणी; नाटकशाळा. हा शब्द धगडीचा=रांडलेक, रांडेचा या ग्राम्य शिवीच्या रूपानेंच विशेष रूढ आहे. ' फुगडी फू, उघडी हो। न होसी उघडी तरी मग धगडी तूं। ' –ब५९०. ' धगडीचा बटकीचा लवंडीचा। ' –दा १७.६.२०. [ धगड; तुल० गुज. ]

**धंगडे**—पुअव. फाजीलपणाचे, व्रात्यपणाचे, चाळे; ढंग, चेष्टा; ढंगड्या. [ ढंग ]

**धगध** —न. धकधक पहा.

**धगधग**—स्त्री. १ अग्नीचा भडका; डोंब; भडभड पेटणें. २ (ल.) मिरची इ० तिखट पदार्थानें शरीरावयवाची होणारी आग; भडका. ३ ( ज्वर इ० कानीं होणारी अंगाची ) लाही; तलखी; लखलख; फणफणाट. [ धग द्वि. ]

**धगधग**—उद्गा. (सांकेतिक) हत्तीला जोरानें हांकलतांना योजावयाचा शब्द. धकधक–धका अर्थ २ पहा.

**धगधगणें**—अक्रि. १ ( काळीज ) धडधडणें; जोरानें उडूं लागणें. २ (विस्तव, आगटी इ०) भडभड पेटणें; रसरसणें; प्रज्वलित होणें. ३ चकाकणें. ' एरिका जेकां परिघाकृती। वज्रप्राय धगधगिती। ' –एभा ३० १६०. ४ (ताप इ० कानीं अंग) फणफणणें; तलखीनें युक्त होणें; अतिशय कढत होणें. [ धगधग ]

**धगधगीत**—वि. १ प्रज्वलित; प्रदीप्त; रसरसून, भडाडून पेटलेला ( विस्तव इ० ). ' धगधगीत निखाऱ्यावर पाणी टाकलें म्हणजे त्याचा सर्वस्वी कोळसा होतो. ' –भा १६३. २ (ताप इ० कानीं ) फणफणणारें; अतिशय कढत झालेलें (अंग). ३ (पुण्य, तप इ० कांच्या योगानें ) तेजस्वी; प्रभावशाली; तेज पुंज; कडकडीत. ' धगधगीत पुण्यरासी। माहांपुरुष। ' –दा ११ ४.९. ४ जळफळणारा; चरफडणारा. ' प्राणासी मुकला तृणावर्त। कंस परम चिंताक्रांत। धगधगीत मनामाजीं। ' –ह ५.१२९. [ धगधगणें ]

**धंगधोत्र, धंगधोत्रकी**—ढंगधत्तुरा इ० पहा.

**धगमोडें**—वि. ( गो. ) किंचित् ऊन; कोमट ( पाणी इ० ). [ धग+मोडणें ]

**धगळचें**—अक्रि. ( गो. ) डगळणें, ढगळणें पहा. [ढगळणें]

**धगागणें**—अक्रि (अग्नि इ०) प्रदीप्त होणें; प्रखरतेनें जळणें; धगधगणें. 'पुढें धूम्र त्यागीं धगागीत आगीं।' -राक १. ९०. 'चंद्र धगागी तापें। गंगा जरी बोळिजे तापें।' -कालिका-पुराण ४.९८. [धगधगणें]

**धगाटा**—पु. १ (विस्तवाची) अति प्रखर धग. २ भड-भडाट; भडाड; भडका; प्रखर अग्नि. [धग]

**धगावणें**—अक्रि. (विस्तवाच्या) धगीनें होरपळणें; (अग्नीनें) पेटणें; चेतणें; शिलगणें. [धग]

**धगी**—स्त्री. (विस्तवाची) धग; झळ; उष्णता; आंच 'तया धगीं सेंध पळिपे। क्रोधाग्नि तो।' -ज्ञा १७ २९४. [धग]

**धंगुचें**—अक्रि. (गो.) खंगणें; कृश होणें. [धग(गो)= कडकी]

**धगें**—न. अकटी; गवत, पाचोळा इ० पेटवून केलेली शेकोटी; धगटें. [धग]

**धगेधगे**—उद्गा धकधक पहा.

**धत्रोट**—वि उद्दाम व असभ्य वर्तन करणारा; धश्चोट पहा

**धज**—स्त्री. १ डौल; ऐट; चांगली ढब; लकब; हातोटी. २ (विशेषत: अंगाच्या बांध्यांचा रूपाचा) देखणेपणा; रेखीवपणा; लावण्य; रूप ३ घोडयाचा उंचपणा; घोडयाच्या मानेचा ऐटदार बांक ४ धाडस [सं ध्रज्=गती: हिं धज=डौल स्वरूप; गु धज= सुरेख देखणा] ०देणें-(एखाद्या कार्यास) खांदा, नेट, धीर देणें: (एखादें काय करण्यास) पुढें सरसावणें. ०मारणें-(गर्दीतून) घुसणें; वाट काढणें; मार्ग काढून पुढें येणें. ०दार-वि. १ भव्य; सुरेख (मनुष्य इ०); घाटदार; उमदा व टसटसीत (दागिना, जिन्नस इ०). याच्या उ ट किरकोळ; क्षुद्र इ० २ (ल.) उदार सढळ हाताचा; दानशूर; सत्कार्यप्रेमी. [धज+फा. दार् प्रत्यय]

**धज-जा**—नस्त्री. (प्र) ध्वज; ध्वजा; निशाण, पताका; झेंडा [सं ध्वज-जा अप गु. धजा]

**धजणें, धजावणें**—अक्रि. १ (गर्दीत) जोरानें घुसणें; वाट काढणें सरसावणें २ (एखाद्या कार्याचा) चिकाटीनें पिच्छा पुरविणें; (एखाद्या कार्यांत) मन घालणें, लावणें. ३ एखादें काय करण्यास) धाडसानें पुढें येणें; सरसावणें. 'वाघ येतांच पुढें पाऊल टाकण्यास कोणी धजेना.' ४ (पीक, रोप इ०) तरतरणें, टवटवणें; जीवदार होणें. [सं. ध्रज्=जाणें]

**धजरा**—पु नखरा; दिमाख; ऐट; झोंक. 'दावी बाजराई धजरे। पुढें मागें शिपाई हुजरे।' -प्रला ११२. [धज=ऐट, डौल]

**धजा**—स्त्री निशाण; झेंडा; ध्वजा. [सं. ध्वजा अप]

**धजाव**—पु. १ (पीक इ० कार्नी) जोरानें तरतरणें, टवटवणें; फोंफावणें; जीव धरणें. 'पाऊस नसल्यामुळें शेतांत धजाव नाहीं.' २ नखरा; छिचोरपणा; छानछोकी; नखरा. [धज]

**धजावणें**—अक्रि. १ (एखादें धाडसाचें कार्य करण्यास) पुढें येणें; सरसावणें; पुढाकार घेणें. 'ती (गोष्ट) करण्यास कोणीहि पुढें धजावत नाहीं.' -टिले ४.२१. २ धजणें इतर अर्थी पहा. [धजणें]

**धजी**—स्त्री. (लंगोट तयार करण्याचा) कापडाचा तिकोनी तुकडा; कापडाची घडी. 'रुमाली अगर लंगोटाची धजी बनेल तितका शरीराचा भाग झाकूं शकेल अशी आहे कीं नाहीं तें पहाणें.' -बडोदें-पहिलवान लोक व त्यांच्या कुस्त्याचे नियम ११. [हिं. धज्जी=कापडाचा, कागदाचा तुकडा]

**धट**—पु. १ तराजूची दांडी; रोंवलेला मोठा तराजू, कांटा. 'ऐसें हें अनुभवाचेनि धटें। साचें जया।' -ज्ञा ६.५३ 'धट रोंवूनि रमानायक। पारडयामध्यें घातला।' -भवि ३१.५६. 'मेकॉले साहे-बांनीं...कलकत्ता मुक्कामीं एक भला मोठा धट लावून एके पारडयांत आरबी, फारसी व संस्कृत ग्रंथ यांचे गठ्ठे ... घालून....' -नि ९४१. २ गाडींत, खटाऱ्यांत बारदान भरतांना गाडीचा मार्ग तोल जाऊं नये म्हणून मागील बाजूस जमीनीपासून साटीच्या बावखंडास टेंकून पुढच्या शिपायाप्रमाणें उभें करावयाचें दुबेळक्याचें लाकूड, टेंकू. ३ (मुलकी खात्यातील) मोजणीपत्रकांतील तपशील, त्याचें पत्रक ४ निश्चय. -मनको. -हंको. [सं. बं. धट] ०घेणें-घेऊन बसणें-धरणें धरून बसणें; सक्त तगादा लावणें. ०लागणें-चालणें-(एखादी क्रिया, गोष्ट) अव्याहत चालू असणें, केली जाणें. ०लावणें-(खाणें, पिणें, बोलणें, चालणें, लिहिणें, वाचणें इ० सारखी क्रिया) बेसुमार व अव्याहत करीत राहणें (पुष्कळशा मालाचें वजन करणें असल्यास मोठा धट रोंवून बराबर टराविक हप्त्यानें वजन करितात त्यावरून हा अर्थ). **धटास लावणें**-एखाद्या खाजगी, वैयक्तिक क्षुल्लक गोष्टीची शहानिशा करण्याक-रिता, पदरीं घालण्याकरिता ती जाहीरपणें लोकापुढें माडणें.

**धट**—वि. धीट; दांडगा; धटिंगण; धट पहा. 'धटु झोंबोनि हरी शेत। वेव्हत तो झाला।' -एभा २३.१३२. 'टोणपा तोंड धट उद्धट।' -दा २ ३.३२ 'धटासी आणावा धट।' -दा १९ ९.३०. [म धृष्ट] म्ह० (व) धट खाई मिटाई गरीब खाई गचाडया.

**धट**—क्रिवि. अगदीं नीट; सरळ; तडक. थेट (जाणारा रस्ता, मनुष्य).

**धटडाधोंगडा**—वि. जाडाभरडा; मजबूत; धटमूट (कपडा, हांथरी इ०) [धट]

**धटा(टिं)गण, धटिंग, धटकुला**—वि. उर्मट व आड-दांड; दाडगेश्वर (मनुष्य). [हिं.]

**धटाल्या**—वि. अडमुठा; धसफशा; धसमुसळेपणानें वाग-णारा, काम करणारा [धट]

**धटिंगण**—पु पुरुष. 'खेळतां नेटकें दशावतारी। तेथें येती सुंदर नारी। नेत्र मोडिती कळाकुसरी। परंतु अवघे धटिंगण।'

–दा ६.८.११. -वि. उर्मट व दांडगा (मनुष्य). [तुल० गुज. धतिंग=ढोंगी]

**घटी, घट्टी**—स्त्री. १ स्त्रियांचें नेसण्याचें एक प्रकारचें रेशमी वस्त्र. 'आपादपर्यंत नेसली घटी।' –दावि १२१. 'पाटाऊ म्यानवेगा तडप आणि घटया भेद खणायिताचे।' –सारुह ३.४१. २ नेसण्याचें वस्त्र. 'कासे पितांबराची घटी।' –भूपाळी गणपतीची. ३ धोतर इ०काचा जाड कांठ, किनारी. ४ चिंधी. [सं घटी; बं. धडि=धोतर]

**घट्ट**—वि. १ धीट; साहसी; बेडर. २ उर्मट; दांडगा; आडदांड; धटिंगण. ३ नीट; सरळ; तडक; थेट जाणारा (रस्ता) [सं. धृष्ट]

**घट्टाई**—स्त्री. उद्दामपणा; धटपणा; उर्मटपणाची धिटाई 'जो कवळ धटाईनें भुताशीं सामना करील त्याची ... फजिती होण्य चा संभव आहे.' –नि २१८. [ध ]

**धट्टाक(ख)ट्टा**—वि १ निरोगी; निर्दोष प्रकृतीचा; शाबूद अवयवांचा. 'डोंगिगो हा म्हातारा होता तरी धट्टाकट्टा होता.' –पाव्ह ११. २ मजबूत अंगकाठीचा; जाडाजुडा; सशक्त; ताजातवाना. [धट]

**घट्टी**—स्त्री. धटी पहा. 'सुशोभिते नेसुनि पाह धटी।' –राजवाडे, ग्रंथमाला –लक्ष्मीनारायण कल्याण नाटक.

**घड**—न. १ शिराविरहित शरीर; कबंध. 'घाये हाणोनि धड तुटे। या परिमळाचें।' –शिशु ८४२. 'देवा! जयद्रथाचें सांपडलें परि नसेचि धड धड तें।' –मोकर्ण ५.१७ २ गळ्यापासून खालचा शरीराचा भाग [हिं. धड] **धडांत टाकणें–घालणें–उतरणें–गिळणें**–(पैसा, लांच इ०) गिळंकृत करणें पचवणें खालीं लोटणें. **म्ह०** (व) धड देवळांत चित्त खेटरांत. **०मुंडांकित**–वि. धडें व डोकीं यांनीं युक्त. 'धडमुंडांकित धरणी। अर्धक्षणीं करतील।' –एरुस्व ८.५७ [धड+सं मुंड=डोकें+सं अंकित=युक्त]

**धड**—न. निरोगीपणा; प्रकृतीचें स्वास्थ्य; आराम.

**धड**—स्त्री. १ (पदार्थ इ०कांची डावी, उजवी इ० शब्दांनीं निर्देशण्यासारखी) बाजू; तोंड. २ (जातें इ० उंचवट्यांची) कड. कांठ, किनारी.

**धड**—वि. १ चांगला; शाबूत; अव्यंग; अखंड; दोषरहित मोडतोड, फुटतूट न झालेला; कामास उपयोगी असें 'कांडिखळीं रुतलीं गाये। धड भाकड न पाहे।' –ज्ञा १६ १४२. 'अन्योन्य व्यंगुलही राहो देती न धड कलेवर ते।' –मोद्रोण ३.३२. 'म्हणे एकही धड नाहीं त्यांत। दूषणें बहुत दीसती।' –ह ३३.१९३. २ श्रीमंत; गबर; धनसंपन्न. ३ शुद्ध बुद्धीचा; शहाणा. 'धडचि पिसें करावें। पिसेंचि उमजवावें।' –दा ९ ८.१५ [सं. दृढ, प्रा. दढ] (व.प्र.) **०गांडीनें**–क्रिवि. सुरक्षितपणें, जिवनिशीं; अब्रूदारपणानें सहीसलामत; इजा; नुकसान न होतां. **धडाना गोडाना**–वि. १ अगदींच सामान्य प्रतीचा; भिकार; निरुपयोगी; टाकाऊ; खैराती. २ संदिग्ध; मोघम; अनिश्चित. **धडांत ना भाकडांत**–चांगल्या कोटींतीलहि नाहीं व त्याज्य कोटींतीलहि नाहीं असा. (यावरून) एखादी गोष्ट, काम, कला, क्रिया इ० पूर्णपणें केल्यासच निचा उपयोग, अनेक अर्धवट केलेल्या गोष्टींचा उपयोग होत नाहीं असा अर्थ. **म्ह०** १ एक ना धड भाराभर चिंध्या=नेसायला एखादें धडच वस्त्र लागतें, चिंध्यांच्या भाऱ्याचा नेसायला उपयोग होत नाहीं. २ धडच कांटयावर–कुंपणावर घालूं नये=चांगल्याची खराबी नाश करूं नये 'मुलाला शिकवलांत घालून तुडविलात, धड नेऊन कुंपणावर घातलेंत.' –नामना १२. सामाशब्द– **०गत–गति**–स्त्री. आशा वाटण्याजोगें, बरें लक्षण; ठीक चिन्ह; निभावण्याजोगी, आशाजनक स्थिति, दशा (अकरण रूपात प्रयोग). 'हा पोर पंधरापासून भाडूं लागला, याची कांहीं धडगत दिसत नाहीं.' 'ह्या रोग्याची धडगत दिसत नाहीं.' 'आपली धडगत लागावयाची नाहीं' –टि ४ २३१ [धड+गति] **०धाकट-ड**-वि. १ मोडतोड, फूटतूट, चिरफाड इ० न झालेलें; शाबूत; अव्यंग (भांडें, वस्त्र इ०). २ निकोप, निरोगी प्रकृतीचा; धट्टाकट्टा (मनुष्य). [धड] **०धोपधोपट**–वि. १ धड; शाबूत. सुस्थितींत असलेला; भक्कम. भरींव; ऐवजदार; ठसठशीत (दागिना, वस्त्र, भांडें, कपडा इ०) २ (ल) धट्टाकट्टा; सशक्त व निकोप प्रकृतीचा [धड] **०बरें–भलें**–न. (विवाहित मुलगी, व्यवहार धंदा इ० कार्य) स्थिरस्थावर होणें; सुस्थितींत असणें; सुरळितपणें चालणें. [धड+बरें, भलें=चांगलें] **०भलें**–न. १ धडबरें पहा. २ ठीक चिन्ह; आशाजनक स्थिति; धडगत 'त्या रोग्याचें धडभलें दिसत नाहीं' **०वांकडा**–वि. सरळ अथवा वांकडा; अखंड किंवा मोडलेला; बरोबर किंवा चूक; स्पष्टस्पष्ट. [धड+वांकडा] **०सोबती** पु शेवटपर्यंत टिकणारा मित्र; अखंड मैत्री बाळगणारा सोबती. 'तेहि आमचे धड सोबती आहेत.' –पेद ३.१८. **धडाधोंगडा**–वि जाडाभरडा व टिकाऊ; दणगट (कापड, वस्त्र इ०) [धड+धोंगडा=जाडेंभरडें वस्त्र, कपडा]

**धड**—क्रिवि स्पष्टपणें; रोखठोक; निश्चितपणें (सांगणें बोलणें); स्पष्ट; ऐकूं जाईल असें (वाचणें इ०). चोखपणानें; सचोटीनें; निर्भीडपणें (वागणें, चालणें); पुरतेपणीं; जसें पाहिजे तसें; पूर्णपणें (सामान्यतः अकरणरूपांत योजितात) 'गोपहि पडले शवसे, कोणाच्या मनिं न धीर धड लेश वसे।' –मोकृष्ण १६.२४. 'हा मला धड सांगत नाहीं, तुम्ही विचारून घ्या.' 'हा धड लिहीत नाहीं आणि धड पढतहि नाहीं.' 'हा पुरुष धड मूर्ख नव्हे धड शहाणा नव्हे.' **०इकडे ना तिकडे**–क्रिवि. (कर) मध्येंच

लोंबकळत; भिजत घोंगड्याप्रमाणें; त्रिशंकूप्रमाणें; पूर्णपणें कोण त्याच बाजूस नसलेल्या स्थितींत.

**धडक-का**—स्त्रीपु. १ (अक्षरशः व ल.) तडाखा; आघात; धक्का; थडक; टक्कर. (क्रि० मारणें; घेणें; लागणें; बसणें). 'धडक मारिली नारदा।' –भज ११२. २ (ल.) धडकी, भीति इ० कार्नी काळजाला बसणारा धक्का. (क्रि० भरणें). ३ (व्यापार इ० कांत येणारी) बूड; ठोकर; घस; नुकसान. (क्रि० बसणें).

**धडक**—क्रिवि. (हें ध्वन्यनुकारी क्रियाविशेषण अनेक प्रसंगीं अनिर्बंधपणें योजितात. त्यामुळें याचा निश्चित असा एकच अर्थ देतां येत नाहीं. संदर्भावरूनच स्पष्ट अर्थ कळणें शक्य आहे) (व्यापक.) (भय, शंका, दैव इ० कार्नी) प्रवृत्तीचा, गतीचा, क्रियेचा संकोच, अवरोध, विराम न होतां; थेट; सरळ; अविरोध; न थांबतां; एकदम; सपाट्यानें इ०. (येणें, जाणें, मरणें इ०) जसें:–महामारीनें धडक माणसें मारतात. यांत धडक=असंख्यांतपणें असा अर्थ, तो चोर धडक घरांत शिरला. यांत धडक=न कचरतां, एकदम असा अर्थ; तो वीर शत्रूवर धडक धांवतो. या वाक्यांत तो वीर शत्रूवर तुटून पडतो असा अर्थ. येणेंप्रमाणें धडक-बोलतो–चालतो–मारतो इ० काचे अर्थ ध्यानांत येतील. हा मार्ग धडक काशीस जातो या वाक्यांत धडक=नीट, सरळ, थेट असा अर्थ संदर्भावरून सहज कळेल. [ध्व.]

**धडकण**—स्त्री. धाक; धास्ती; धडकी; भीति; जरब (हा शब्द धाक, धास्ती याच अर्थानें योजितात पण वरील दोन शब्दां-पेक्षां हा कमी रूढ आहे). 'माझ्या पोटांत धडकण भरली.' 'त्याला कांहीं धडकण नाहीं.' [धडक-स्त्री २ ऱ्या अर्थी]

**धडकणें**—अक्रि. १ (विस्तव, दिवा इ०) जोरानें, भड-क्यानें भडभड पेटणें, जळणें, धडधडणें. 'धडकली उद्विग्नतेची ज्वाळा।' –मुआदि १९४३. 'रथ थडकले, भडकले हय, शस्त्रज-वन्हि धडकले वरते।' –मोद्रोण ३.३२. २ (ल.) (ताप इ० कार्नी अंग) फणफणणें; अतिशय तापणें; (काम, क्रोध इ० विकार) क्षुब्ध होणें, चेतणें. ३ (हृदय इ० कार्नी) धडकीनें युक्त होणें: धडधडणें. 'वाघाचा शब्द ऐकतांच माझ्या उरांत धडकलें.' ४ डाकोडाक, टांकोटांक, उभ्या पायीं येणें, जाणें, येऊन पोंचणें, उपस्थित होणें; थडकणें. ५ मोठा, धड्धड् असा आवाज करून (तोफ, बंदूक इ०) उडणें; सुटणें; धडधडाट होणें; धडधड वाजणें 'सुरवर किन्नर देव दुंदुभी आनंदें धडके।' –दावि ३३५. 'भेरी धडकल्या शशिवदना ते क्षणीं। ऐकतां त्रास उपजे कर्णी।' –ह २२ २६ –दावि २२५ ६ (धक्का इ० कार्नी) आपटणें; आद-ळणें; धडक लागणे, बसणें. [धडक] **धडकून**–क्रिवि. सपाट्यानें: धडधडून: जोरानें. पुष्कळअंशीं धडक (–क्रिवि.) प्रमाणेंच या शब्दाचा क्रियापदांबरोबर उपयोग करितात. [धडकणें]

**धड-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. १ आकस्मिक व मोठा धड् असा आवाज होईल अशा प्रकारें; धाडकन. (क्रि० पडणें इ०). 'माडीवरून पोर धडकन खालीं पडलें.' २ आग, विस्तव एकदम, भडकन पेटतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० पेटणें; उडणें). [ध्व.]

**धडकफ(भ)डक**—वि. स्पष्ट; सडेतोड; रोखठोक; कपट, डावपेंच इ० रहित (बोलणें, बोलणारा); सरळ; धोपट मार्गाचा; धोपटमार्गी (वागणारा, वागणें), अकृत्रिम; उघडवाघड; बिनपड-द्याचा; निष्कपट (वर्तन, व्यवहार इ०). [ध्व.]

**धडकवणी**—न. धडाक्यानें पडणारा, मुसळधार पाऊस. वळीवाचा पाऊस; पा साळा सुरू होण्यापूर्वीचा एकाएकी येणारा जोराचा पाऊस. [धडक+पाणी]

**धडका**—पु. १ धडक(–स्त्री)सर्व अर्थी पहा. २ आवाज; बार. 'दमामे चौघड्या वाजती। धडके भांड्याचे गाजती।' –दावि ५०४.

**धडका**—क्रिवि. धडक (–क्रिवि) पहा. 'जळे दृश्य धडका वैराग्य कडका।' –दावि ३१३.

**धडका**—वि. शाबूत; मजबूत; घड. (वस्तु इ०); निरोगी प्रकृतीचा; धडधाकट; धट्टाकट्टा (मनुष्य, जनावर इ०). [धड वि]

**धडकाधडकी**—स्त्री. एकमेकाची मर्यादा, भीड इ० सोडून आवेशानें, जोराने केलेलें, झालेलें भांडण; वाद; खडाजंगी, खडका-खडकी. [धडक द्वि.]

**धडकावणें**—अक्रि. १ न कचरतां, निर्भीडपणें बोलणें; कड-कडून, कचकावून, भडभडां बोलणें. २ धसकावून, झपाट्यानें, धडकेसरशीं जाणें, शिरणें. [धडक]

**धडकाविणें**—अक्रि. १ (घोडा इ०) पिटाळणें; दपटणें; बेफामपणें हांकणें; भरधांव सोडणें. २ (एखादें काम इ०) झपा-ट्यानें, उत्साहानें, जोरानें करणें. ३ कडकावून, धसकावून बोलणें; खरडपट्टी काढणें. ४ (विस्तव इ०) धडकून, भडभड, जोरानें पेटविणें, प्रज्वलित करणें. [धडक]

**धडकी**—स्त्री. १ (भीति इ० कार्नी होणारी) छातीची धड-धड. (क्रि० भरणें). 'पाहुनि ज्याला प्रजाजनाच्या धडकी भरते हृदयांत।' –प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले. २ (भीति, दुःख इ० कार्नी) हृदयाला बसलेला धक्का; दचका; धसका; धस्स. ३ धक्का; हिसका; ढका; रेटा. [धडक]

**धडंग**—वि. मोटा; दांडगा; धट्टाकट्टा.

**धडंगदिशीं**—क्रिवि. धडकन; धाडदिशीं. 'दार धडंगदिशीं लावून चालता झाला.' –कोरकि ४२०. [ध्व.]

**धडडड**—क्रिवि. तोफ इ० कांच्या भडिमारानें होणाऱ्या आवाजास रखा आवाज होऊन. (सामा.) फिरून फिरून व मोठ्यानें होणाऱ्या आवाजाचें अनुकरण. [ध्व.]

**धडणी**—स्त्री. काढणी. -शर

**धडंनर**—वि धनत्तर पहा.

**धडधड**—स्त्रीन. भीति इ०कानीं काळीज जोरानें उडूं लागलें असता भासमान होणारा आवाज [ध्व. धड् द्वि ]

**धडधड-धडां**—क्रिवि. १ भडभडा पेटलेल्या ज्वाळा इ० कांच्या, पुष्कळ पावलांच्या आपटण्याच्या, कडकडाट, खडखडाट इ०कांच्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० वाजणें; चालणें; धावणें इ०). धडाधड पहा. २ ऊर जोरानें उडतांना होतोसा भासणाऱ्या आवाजानें. 'म्हणोनि उरांत होत धडधडा।' -दावि २४४ 'गंधर्वभयें काळिज धडधड उडतें करें पहा गे हें।' -मोविराट १.१७८. [ध्व. धड् द्वि.]

**धडधडणें**—अक्रि. १ ऊर धडकीनें युक्त होणें; जोरानें उडणें. 'धडधडणाऱ्या छातीनें आनंदरावानीं प्रश्न विचारला!' -इंप १४. २ (वृक्ष, इमारत इ०) धड धड असा आवाज करून कडाडून पडणें; कडाडणें. ३ जिन्यावरून घाईघाईनें उतरताना, माडीवरून चालताना (पुष्कळ पावलांचा) धडधड असा आवाज होणें. ४ (विस्तव इ०) भडभड, धडकून, रसरसून पेटणें; भड कणें; धडकणें. [धडधड]

**धडधडाट**—पु. धड धड असा आवाज; गर्जना; धडाड पहा. 'धडधडित धडाडी धडधडाटें धडाडी।' -दावि २७८. 'रणवाद्यांचा कडकडाट। तोफांचा धडधडाट।' -वाग्वैजयंती, विहिरींचा कलकलाट [ध्व धडधड; तुल० गुज. धडधडाट]

**धडधडी**—स्त्री. धडधड; धडकी.

**धडधडीत**—क्रिवि. १ निक्षून; साफ निखालस; स्पष्टपणें. 'ही मुलगी धडधडीत म्हणते मला हा दादला नको.' २ उघड-उघड; निःसंशयः निर्विवाद. अगदीं प्रत्यक्ष. 'हा धडधडीत चोर, हा तुम्ही चाकरीस ठेवतां कशाला?' 'धडधडीत फुटकें भांडें कशाला ध्यावें.' -वि. धडधाकट; धट्टाकट्टा; बळकट. 'घोडे माणूस धडधडीत चांगलें मजबूत बाळगून चाकरी एकनिष्ठपणें करीत जाणें.' -वाडममा १.२६६.

**धडनी**—स्त्री. घोड्याची काढणी; काढणी अर्थ २ पहा.

**धडपड, धडफड. धडबड**—स्त्री. १ (काम इ० करतांना रागानें, अडाणीपणामुळें केलेली) आदळआपट; पाय आपटणें; चडफडणें. २ (हुडपणानें, अविचारानें एखाद्या व्यवहारांत) ढोबळ चूक करणें; घसरणें. ३ खटाटोप; परिश्रम; खटपट; खवदव; दगदग. ४ (उंदीर इ०नीं केलेली) खडखड; खडबड. [ध्व.] म्ह० (व) धडप धाडवा अवसेचा पाडवा=आदळ आपट करणाऱ्या सुनेला उद्देशून सासूनें वापरावयाची ही म्हण आहे.

**धडप(फ)डणें, धडबडणें**—अक्रि. १ (संताप इ०कामुळें) हातपाय आदळणें, आपटणें; चरफडणें. २ (शारीरिक दुःख इ०कांनीं) तडफडणें; तळमळणें; बेचैनपणें वळवळणें; लोळणें. ३ पराकाष्ठेची खटपट, प्रयत्न, खटाटोप करणें. ४ अव्यवस्थित रीतीनें पडणें. -शर. [सं. अध उत्पतनं-धडपडणं-धाड पडणें-धडपडणें. -भाअ १८३५; म धडपड] **धडपडून उठणें**-खडबडून, एकदम उठणें, उडून उभें राहणें.

**धड(फ)डाट, धडबडाट**—पु. पराकाष्ठेची, अतिशय जोराची धडपड. धडपड पहा. [धडपड]

**धडप(फ)ड्या**—स्त्रीअव (शारीरिक दुःख, संताप इ०कांनीं) हातपाय आपटणें; तडफडणें; चडफडणें. (क्रि० देणें; खाणें). [धडपड]

**धडपा, धडूपा**—पु (बायकी) जुनें लुगडें इ०कांचा फाडून काढलेला मोठा तुकडा, फडकें; (माण.) धडफा. [धटी, धडी पहा. फा. दप.]

**धडपु(फु)डा**—वि. निश्चयात्मक; खरी; धडधडीत. 'धड-पुडी भगवत्प्राप्ती। होऊन चुके अधोगती।' -दा ३.१०.७०. -क्रिवि. खरोखर; निश्चयानें. [म. धड+सं. स्फुट=स्पष्ट]

**धडफड**—स्त्री. धडपड पहा.

**धडफडणें**—अक्रि. १ (हात, पाय इ०) अव्यवस्थितपणें पडून आपटून आवाज उत्पन्न होणें. 'म्हणे पायो धडफडील। तरी स्वामीची निद्रा मोडेल।' -ज्ञा १३.२५६. २ धडपडणें पहा. [धडफड]

**धडफुडा**—वि. १ प्रज्वलित; प्रदीप्त. 'तेथ मनबुद्धीचिया कुंडा। आतु ज्ञानाग्नि धडफुडा। साम्य तेचि सुहाडा। वेदि जाणें।' -ज्ञा ९.२४१. २ पक्का; खरा; स्पष्ट; खरोखरीचा; निश्चयात्मक. 'यालागीं हरिकीर्तनीं गोडी। जयासि लागली धडफुडी। त्यासि नाना साधनाच्या वोढी। भोसावया सांकडीं। कारण नाहीं।'-एभा ५ ३५६. 'ते संश्लिष्टता जागिजे धडफुडी। संलग्न ते सुलीनता।' -स्वादि ४.४ ५४ -क्रिवि. १ खरोखर; स्पष्ट; प्रत्यक्ष. 'जे जे रमना सेवी गोडी। ते ते हरिरूपें धडफुडी। स्वादा येऊनि रोकडी। ब्रह्मार्पण परवडीं निजभोग अर्पी।' -एभा २.३७४. 'हुवां न धरावें भीडा। शापु द्यावा धडफुडा।' -कालिकापुराण १४.१६१. २ सत्वर; जलदीनें; त्वरेनें. 'होय धडफुडें देह बुद्धया।' -रंयोवा ४.३२८. ३ हातोपातीं. -मनको. [म. धट+स्फुट=स्पष्ट]

**धडफुला**—वि. १ धडपुडा सर्व अर्थीं पहा. २ पूर्ण. -शर ३ कुशल; चतुर. -शर. ४ पोकळ. -शर. -क्रिवि. सत्वर; जलदीनें.

**धडबड**—स्त्री. धडपड पहा.

**धडबडणें**—अक्रि धडपडणें पहा.

**धडबडावणें**—सक्रि. (गो.) हाकून लावणें; धुडकावून देणें. [धडबड]

**धडबडावणी**—स्त्री. (गो.) घालवून देण्याची क्रिया; हकालपट्टी. [गो. धडबडावणें=घालविणें]

**धडबडत्या**—वि. दुर्लक्ष करून, बेफिकीरपणें टमकत चालणारा. [धडबड]

**धडबिया**—पु (गुज) नाचणीचें गुजराथी नांव; या जातीच्या नाचणीचें कणीस गोंडयासारखें असतें. -कृषि २८३.

**धडल्याव**—वि. (कु.) अवाढव्य; फार मोठा व बेढब. अगडबंब; धडल.

**धडवई**—पु बाजारांत येणारा माल तोलण्याच्या कामावरील अधिकारी. -स्त्री. (क.) वरील अधिकाऱ्याचें काम, हुद्दा. [धडा+वाही]

**धडवत, धडवती, धडवर्तोल्य ख**—धडोत इ० पहा

**धडवन**—वि (मराठवाडा) जामिनकी निश्चितपणा इ० ची खात्री असणारी. -निजामविजय ३० ७ ३१.

**धडवना**—वि. निधडा; निर्भय.

**धडशी**—स्त्री. धडक; टक्कर; धक्का; ढुश्शी.

**धडस-स्सा**—वि. धड; वैगुण्यरहित; शाबूत; अविकल; मोडतोड न झालेला. 'याचा एक हात धडसा आहे आणि एक खुळा आहे.' धड=चांगला अव्यंग+असा=असलेला] **०खडस-खडसा**-वि. पूर्णपणें धडधाकट; धड; शाबूत [धडसा द्वि]

**धडसी**—क्रिवि. धैर्यानें. 'धडसी चाले बिनधोक।'-संग्राम गीतें १०१. धड+असी]

**धडा**—पु. १ विवक्षित मुदतींत तयार करण्यास पंतोजीनें शिष्याला नेमून दिलेला, पाटी इ० कांवर लिहून दिलेला पाठ. २ (पुस्तक इ० कांतील) पाठ 'तिसऱ्या पुस्तकांतील शेवटला धडा वजनाविषयीं आहे.' ३ (ल) (एखाद्यास) वर्तनाच्या बाबतींत घालून दिलेला नियम; शिस्त; उदाहरण; (काम इ० करण्याकरितां घालून दिलेली) पद्धत; सरणी वहिवाट; रिवाज. 'कासया पडिला जी धडा। उगाचि वेडा आणि वांकडा।' -तुगा ७१६. 'यजमान धडा घालून देतो त्याप्रमाणें गुमास्ते वागतात' ४ हिय्या; हिंमत; धाडस; निश्चय. 'आतां मनाचा धडा करून करंजा खातों.' -कफा २. ५ (एखादी वस्तु मिळाल्यानें) विवक्षित कालपर्यंत ती मिळविण्याविषयीं होणारी निश्चितता. 'एक पितांबर घेऊन ठेविला म्हणजे बारा वर्षांचा धडा होतो.' [सं. दृढ?] **०घेणें**-शिकणें; बोध घेणें.

**धडा**—पु. १ दहा शेरी वजन केलेल्या मालाचें परिमाण. २ तराजूच्या एका पारडयांत (ज्यात पदार्थ घ्यावयाचा तें) भांडें इ० ठेवून कांटा समतोल करण्याकरितां दुसऱ्या पारडयांत टाकलेलीं वजनें इ० अभंड; पासंग. 'तराजुआ निवृत्तिचा। धडा बांधौनि तीर्थाचा। जरि कांटा कलताए देवाचा। जेउता रामठु।' -ऋ ३९. 'तुळे उभवुनि धडा। कनक भरितां परडा।' -मुवन (हरिश्चंद्राख्यान नवनीत पृ. १९०) ३ मण, दोनमण इ० सारखें एकदांच वजन करावयाचें असल्यास व त्या परिमाणाचीं वजनें जवळ नसल्यास लहान परिमाणाच्या वजनानें तितक्याच वजनाचे दगड इ० मोजून घेऊन त्यांनीं बाधतात तें मोठें वजन ४ (व.) सपाटा; तडाखा. 'हुपाचा धडाच लावला.' ५ (पेंढारी इ० लुटारूंची) टोळी. ६ समायिक जमीनीचा, मालमत्तेचा वांटा हिस्सा, भाग. ७ (जरतार धंदा) पंचवीस ते ३० तोळे वजनाचा ताब्याचा रूळ घेऊन त्यावर जरतार गुंडाळतात व त्या तांब्याच्या रुळासह त्याचें केलेले वजन [सं. धट=ताजवा; हिं धडा=वजन, जोख, जथा, टोळी; गु. धडो=वजन; सि. धडो]

**धडा**—पु. (महानु) घडा; घागर. 'तो कैसा दिसताए कांतला। जैसा अमृतरसाचा उ्तिला। कीं श्रेष्ठेने धडा घातला। रेवांतासी।' -शिशु ९९४.

**धडा**—पु (राजा.) किनाऱ्यावर गलबत, पडाव, टेवण्याची आच्छादित जागा, ठिकाण. 'गलबत भाडयानें न देतां धडयावर ओढून टेवलें आहे.'

**धडा**—पु. (भाजीपाला इ० कांची) पेंढी.

**धडा-धडी**—पुस्त्री. (कु) घराचें जोतें इ० कांची कड.

**धडा**—पु. १ (तंजा) तोफ २ तोफेचा बार. **धडबाजी**-स्त्री. १ तोफेचा भडिमार. २ (ल.) शिव्यांचा भडिमार, वर्षाव. [धडा]

**धडा**—पु. पोटांत होणारा एक रोग. -मनको

**धॅडॉ**—पु. (गो) वधुवरांच्या बरोबर असलेला सेवक; धेंडा.

**धडाका**—पु. १ (बंदूक, तोफ, दारूकाम यांचा) आवाज; स्फोट; धडधडाट; (सामा) मोठा कडाक्याचा आवाज; कडकडाट. २ (सामा.) आवेश, झपाटा व गडवड यांनीं युक्त असें कोणतेंहि दृश्य. जसें:-काम इ० करण्याचा सपाटा, तडाखा, चपळाई, झपाटा; वादळ इ० कांचा जोर, क्षोभ, तडाखा; (साथ, रोग इ० कांनीं मांडलेला) सपाटा; सप्पा; धुमाकूळ; जोराचा उपद्रव; (लढाई इ० कांतील) धुमश्चक्री; खणका; दणदणाट; धूमधडाका; कल्लोळ. (क्रि० मांडणें; मारणें). इतर उदाहरणांकरितां तडाका शब्द पहिल्या अर्थाखेरीज करून पहा. तडाका-खा व धडाका हे दोन शब्द सर्वसाधारण अर्थी व अनेक रूढ अर्थी एकमेकांशीं जुळतात हें खरें असलें तरी त्या उभयतांत एक सूक्ष्म फरक आहे तो असा कीं तडाका शब्दांत जोर, आवेश यांचा वाढता प्रकर्ष ध्वनित होत असतो तर धडाका शब्दांत मोठया आवाजानें सहित असा जोर, आवेश, सपाटा इ० अर्थ अभिप्रेत असतो. [हिं. धडका] **-केबाज फुलबाजी**-स्त्री. (शोभेचें दारूकाम) इंग्रजी फुलबाजीचा एक प्रकार.

**धडाखडा**—वि. १ निरोगी; निकोप प्रकृतीचा; धट्टाकट्टा. २ सुदृढ; बळकट अंगकाठीचा.

**धडाड-डा**—पु. धडाक्याचा मोठा आवाज; धडधडाट; तोफेच्या भडिमाराचा, इमारत, झाड इ० कडाडून पडण्याचा, धड धडणाऱ्या ज्वाळांचा, मोठ्या स्फोटाचा होणारा दणक्याचा आवाज; खणका. [ ध्व. ]

**धडाडणें**—अक्रि. १ ( तोफ, बंदूक इ० उडतांना ) धड धड असा मोठा आवाज होणें. २ ( वृक्ष इ० ) कडाडणें; कडाडून पडणें. ३ ( अग्नि इ० ) धडधडणें; जोरानें, धडकून पेटणें. ' डोंगरें धडा डिती । तेथ अरूप पारखी रडती । आठै आगें पोळतीं । वसुंधरेची । ' –शिशु ७४८. ' ते मुळीं पेटली श्रीकृष्णसंकल्पें । धडाडली ब्रह्म शापें । ' –एभा १.२३३. ' जैसा प्रळयकाळींचा दावाग्नी । महा वातें धडाडी । ' मुसभा १४.९१०. ४ ( कों. ) ( जमीन इ० ताप त्यामुळें ) भेगलणें; दुभंग होणें. ५ (ऊर) जोरानें उडणें; धडधडणें.

**धडाडां**—क्रिवि. धडधड–धडां पहा. ' बहुसाल वायें दडाडां धडाडा । ' –राक १.२.

**धडाडी**—स्त्री. १ धडधड; धड धड असा आवाज. ' तडाडी थडाडी भडाडी धडाडी । ' –राक १.८८. २ नेट; जोर; नेटाचा, उत्साहाचा, धाडसाचा प्रयत्न; तडफ. [ धडाडणें [

**धडाधड**—स्त्री. तोफांच्या धडधडाटानें युक्त अशी युद्धादि क्रिया; धडाधडी पहा. ' रोवला रणखांब होती धडाधड । ' –ऐपो १२६. [ धडधडणें ]

**धडाधड-धडां**—क्रिवि. १ ( इमारती कोसळतांना, सोंसा ट्याच्या वाऱ्यानें झाडांवरून फळें इ० पडतांना, मुसळधार पाऊस पड तांना, बंदुकांची फैर झडतांना, भराभर चपराका, तडाखे लगाव तांना ) सातत्यानें, एका पाठीमागून एक, लागोपाठ मोठा आवाज होईल अशा प्रकारें. ' त्याच्या तोंडावर धडाधड शंभर चपराका चढ विल्या. ' २ सातत्यानें; लागोपाठ; एकसारखें; धडक पहा. या अर्थी हा शब्द योजिल्यास ह्यानें अभिप्रेत असलेला ध्वनि कल्पनेनेंच ओळखावा लागतो असें पुढील उदाहरणांवरून दिसून येईल जसें:– महामारीनें धडाधड माणसें मरतात; धडाधड उडया मारून धांवला; धडाधड चोऱ्या होऊं लागल्या; धडाधड–कर्जे काढितात–उचापत खातात–काळीज उडतें–बोलतात–पळतात–खर्च करितात इ०. [ध्व. धड द्वि.] **धडाधडणें**–अक्रि. (नांव इ०) गाजणें; (कीर्तीचा) डंका इ० वाजणें; दुमदुमणें. ' काय तयाची कीर्त सांगावी ? साहेब नाम धडाधडी । ' –ऐपो १३४.

**धडाधडी**—स्त्री. लागोपाठ मोठा आवाज करून होणारी क्रिया, गोष्ट; तोफा, सोटे इ०कांच्या सातत्यानें होणाऱ्या आवा जानें युक्त असें युद्ध इ०; गलबला; किलकिलाट इ० नें युक्त अशी खणकाखणकी, मारामारी, बाचाबाची, कचाकची इ०; हातोडा इ० कानीं ठोकण्यानें लागोपाठ होणारा मोठा आवाज. [ध्व.; धड द्वि.; गुज. धडाधडी=मारामारी]

**धडाल**—क्रिवि. ( ना. व. ) धडकून; बिन दिक्कत; बेधडक; राजरोस; सर्रास. ' आतां धडाल पुनर्विवाह होतात ' [ ध्व; हिं. धडाम=पडण्याचा आवाज ]

**धं(धां)डाळी**—स्त्री. हगवण; ढेंढाळी.

**धडिंग, धडिंगण**—वि. धटिंग, धटिंगण पहा.

**धडी**—स्त्री. १ विवक्षित वजनाचें, शेरांचें माप. हें निरनिराळ्या ठिकाणीं भिन्नभिन्न वजनाचें असतें. २ मण इ० प्रमाणांचा करून ठेवलेला दगड इ०; धडा अर्थ ३ पहा. ३ ( जरतारी धंदा ) धडा अर्थ ७ पहा. ४ वजन करण्याचा कांटा; तराजू. 'सज्जन कसाई मांस विकितां । त्याची लाविसि धडी । ' –दत्तपद ४७. [सं. धट=ताजवा; हिं. सिं. धर्डी=पांचशेरी ] **धडीनें पैसा मोजणें**–श्रीमंतीस पार नसणें; पैशांत लोळणें; अलोट पैसा बाळगणें.

**धडी**—स्त्री. १ धोतर, लुगडें इ० वस्त्राचा रेशीम, जरतार इ० कांचा कांठ, किनार, ' लुगडयाची धडी रुंद आहे. ' २ (ना.) छपरी; पडवी; पडवीचा काठ. ३ चिंधी. ०**पगडी**–स्त्री. (व्यापक.) सभा, समारंभ इ० प्रसंगीं पुरुषानें घालावयाचा शेला, पागोटें इ० पोषाख. [ धडी+पगडी ]

**धडी**—स्त्री. १ तुकडा, भाग. २ ( डोंगरांतील ) घाट; बारी. ' आली सातपुडयाची धडी तोफगाडी दाटली घोडी । ' –ऐपो ४३३. [ धडा ]

**धडीपडी**—स्त्री. बरे वाईट, सुखदुःखाचे दिवस; अडीअड चण. 'बाबा रे, कष्ट करूनहि या राज्यांत अन्न मिळत नाहीं, धडी पडीला पैसा नाहीं. ' –खेया १३. [ धड=चांगला+पड=पडलेला]

**धडुत, धडूत**—न. नेहमीं, रोज नेसावयाच्या उपयोगाचें वस्त्र. धडोत पहा. ' अंगास फाटकीं तुटकीं धडुतें मिळण्याची सुद्धां पंचाईत. ' –नि १५०. **धडुतेपण**–न. धडुतीचीं वस्त्रें, लुगडीं इ० ' आदिपासूनि स्वर्गारोहण । अटरा हातांचें प्रमाण । मोजून देई धडुतेपण । ' –मुआदि १३.४४.

**धडूत, धडुती, धडुतांची वस्तू**—धडोत इ० पहा.

**धडूत**—वि. शोभिवंत. –शर.

**धडें**—न. ( गो. ) एक मासळी; ( गो. ) पेड.

**धडेल**—वि. अगडबंब; अवाढव्य; लड्‌ठ; बेढब व मोठें ( शरीर, मनुष्य, प्राणी इ० ). ०**मौला**–पु. अगडबंब मनुष्य. –राको. २४२. [ धडेल+मौला ]

**धडेवांटप**—न. एकत्र कुटुंबांतील सर्व हक्कदारांच्या जमी नीची स्वतंत्रपणें प्रत्येकाची केलेली फाळणी. [ धडा+वांटप ]

**धडोत**—न. १ नेहमीं नेसावयाच्या उपयोगाचें वस्त्र, लुगडें इ० २ ( सामा. ) जाडेंभरडें, मजबूत वस्त्र. [ धड+वस्त्र–धडवत ]

**धडोती**—स्त्री. १ रोज वापरण्याच्या उपयोगाचा, जाडा भरडा कपडा, कपडालत्ता. 'नवरा धडधाकट धडोती देणारा असला तरी पुरे' —मोर ३५. २ (कपडेलत्ते इ०कांचा) नेहमींचा वापर, उपयोग. [धड+वत; धट+ओत-शर; तुल० का. दड्डति] ०**ची वस्तु-वस्त**—स्त्री. नेहमीं वापरावयाच्या उपयोगी वस्तु, वस्त्र इ०. ०**चें पाट(ड)गें**—न. (उप. ल) कामसू व सुदृढ, निकोप प्रकृतीची बायको. ०**लायख**—वि. नित्य वापरण्यालायख, धडोतीला लायख (वस्त्र इ०) [धडोती+फा. लायख]

**धडौता**—वि. १ धड; श्रीमंत. 'वस्त्रें बाह्य पांगुरता। तरि हा श्लेषु घडता। जरि देवांचा तो आंतु धडौता। बाहीरि दीनु।' —ॠ ६९. २ अखंड; मोडतोड न झालेलें; धड; पूर्ण; दोषरहित; अव्यंग; साग. 'अर्जुना आघवियाची मातृ अंतःकरणें। धडौता आहासि।' —ज्ञा १०.४९ 'मागील अल्पस्वल्प। देवोनि धडौता केला नृप। आतां मागुती मांडूनि तप। पुण्यजोडी जोडणें।' —मुआदि २०.१५४. ३ सवस्त्र; सुशोभित. 'जयाचा महिमा पांघरोनि जाहला। धडौता वेदु।' —ज्ञा ११.७१. ४ टिकाऊ; सुरक्षित. 'उद्धवदेखा तुमचा मती। यादवाची राणीव धडौती।' —शिशु ४७७. [धड]

**धडौतें**—न. धड वस्त्र; धडोत.

**धड्ड**—वि. मड्ड; ठोंब्या; निर्बुद्ध; आडमुठा; दांडगा; धटिंगण. 'मी तों महाराजाचा धड्ड पुराणिक। न ये बोलूं क्य गोड मधुर।' —दावि ४०४. [का. दड्ड]

**धड्ला, धलूडा**—वि. (खा.) म्हातारा; वृद्ध. [म. थेरडा; सं. स्थविर; गु. धयडो=म्हातारा]

**धण**—स्त्री. १ एकाचें नुकसान, नाश होऊन, प्रयत्न इ० विफळ होऊन दुसऱ्यास अकल्पित, अनायासें होणारा लाभ; दुसऱ्याची झालेली चैन, भर. 'त्यानें कपाळकूट करून पैसा मिळविला पण शेवटीं चोरांची धण झाली.' २ समृद्धि; संपन्नता. धन पहा. ३ इच्छा. (क्रि० पुरणें). धणी (—स्त्री.) पहा. [सं. धन=द्रव्य, धणी पहा.] (वाप्र.) ०**करणें-होणें**—आपसांतील दुहीमुळें तिसऱ्याचा विनाकारण लाभ, फायदा होणें. ०**घेणें**—मनसोक्त, पोटभर खाणें; (खाद्य इ०कांचा) समाचार घेणें. 'एकानें मोठमोठे लाडवांचे तुकडे करून गट्ट केले, दुसऱ्यानें चटण्या, सांभारीं यांची धण घेतली.' —बाळ. ०**पुरणें**—इच्छा तृप्त होणें; संतोष, समाधान होणें. ०**पुरविणें**—(एखाद्याची) इच्छा तृप्त करणें; एखाद्यास संतोषविणें. ०**पुरस्तुर**—क्रिवि. तृप्ति होईपर्यंत; मनसोक्त; पोटभर. [धण+पुरणें+तोंवर]

**धणक(ग)ट**—वि. १ मजबूत; जाडाभरडा (कागद, वस्त्र इ०). २ (ल.) धडधाकट; दणकट; मजबूत; धट्टाकट्टा; जोमदार; दणगट (मनुष्य).

**धणंगणें**—अक्रि. (खाद्य, पेय इ०कावर) ताव मारणें; चैन, बहार, चंगळ करणें; अधाशीपणानें व मौजेनें खाणें. 'धणंगायला पाहिजे चांगलें दोन शेरांचें आणि काम नको करावयाला काडीचें.' [धण=विपुलता]

**धणगर, धणगरी**—(प्र.) धनगर इ० पहा.

**धणधणणें**—अक्रि. (विस्तव इ०) धडधडणें; जोरानें पेटणें; प्रज्वलित होणें. [ध्व. धणू द्वि.]

**धणधणीत**—वि. धगधगीत; धडधड पेटलेला; प्रदीप्त; प्रज्वलित. [धणधणणें]

**धणधोप, धणधोपट**—वि. धणकट; (प्र.) धडधोप, धडधोपट.

**धणा**—पु. कोथिंबिरीचें बीं; धना. याचा मसाल्यांत उपयोग करितात. 'धणे ... विशेषेंकरून पित्तशामक आहेत.' —गृशि १.३१८. [सं. धान्याक; प्रा. धणा-ना]

**धणी**—स्त्री. १ इच्छा; आशा; हौस. (क्रि० पुरणें; पुरविणें). 'तरि तुझी पुरवीलचि तो धणी।' —वामन नृसिंहदर्पण ९८. 'मुक्ताफळ सुपाणी। वायसा लागली खाणी। तयासी सांडून धणी। घेती अमेध्याचि।' —दावि २८५. २ तृप्ति; समाधान. 'देवा तुजऐसा निजगुरु। आजि आर्ती धणी कां न करूं।' —ज्ञा ३.२१. 'धर्म म्हणे माझी धणी। पुरली नामाची आयणी।' —वेसीस्व ११.८९. 'माझिये जातीचा मज भेटो कोणी। फेडावया धणी आवडीची।' ३ धन्यता. 'जलधि-मध्य पुरींत तिचा धणी। वधुनि दे मज आत्मसुखें धणी।' —वामन —लोपामुद्रासंवाद २८. ४ ठेवा; अपूर्व, अकल्पित लाभ; धण. 'परमसुखाची हे लाधलीसी धणी।' —निगा ६. ५ विपुलता; समृद्धि. [सं. धाणि; प्रा. धणि=तृप्ति, संतोष] **धणीचा**—वि. पुरेसा; पोटभर; यथेष्ट. 'दृश्य देखतां शिणले नयन। धणीचें घ्यावया कृष्णदर्शन।' —एरुस्व ७.२२. ०**भर-वरी**—क्रिवि. (काव्य) पोटभर; यथेच्छ; तृप्ति होईपर्यंत; मनसोक्त; धनभर. 'पाहीन धणिभरी चरण झाडीन केशीं' —रामाचाधावा भक्तिमार्गप्रदीप ४८. 'श्यामकर्ण नेऊन देईं। धणीवरी पाहे श्रीकृष्णा।' —जै १५.१४५. 'स्मरूं, बाहूं, पाहूं धणिवरि उभा राहिल कधीं।' —र ५८.

**धणी**—पु. १ मालक; धनी; यजमान. धनी पहा. 'तुका म्हणे एक। धणी विठ्ठल मी सेवक।' —तुगा ८२४. २ नेता; पुढारी; अधिपति. 'हें सत्य परि प्रबळहि बळ दुर्बळ जरि रणीं धणी दूर।' —मोसंशयरत्नमाला १४. (नवनीत पृ. ३५०.) [सं. धनी; गुज धणी=मालक; नवरा] ०**गोसावी,-जोग**—पु धनी गोसावी इ० पहा.

**धणू**—पु. धनुष्य; (प्र.) धनु. —शर. [सं धनुस्]

**धतरमतर**—वि. (कु.) अनिश्चित; डळमळीत; धरसोडीचें; उडवाउडवीचें (भाषण इ०) 'प्रत्येक कामांत त्याचें बोलणें धतरमतर असतें.'

**धंतरमंतर**—न. मंत्रतंत्र; जादूटोणा; टाणाटोणा; छांछू. थंतरमंतर. अर्थ १ पहा. –घाको १८२. [तंत्रमंत्र अप. मंत्र अप द्वि.]

**धताल-ल्या, धत्ताल-ल्या**—वि १मनांतली गोष्ट बेलाशक बोलून जाणारा: भडभड्या; हवीं तशीं वचनें अविचारानें देणारा. २ (क.) धोताल, धौताल. [ध्व. धत्]

**धताली**—स्त्री. १ अविचाराचें, घिसाडघाईचें बोलणें, बडबड. २ अविचारानें हवीं तशीं वचनें देऊन ठेवणें. [धताल]

**धत्तु(त्तू)र**—पु. एक वनस्पति; धोत्रा. याचें बीं मादक व विषारी असतें. 'धत्तूर हा कनक नाम सदा धरीतो।' –र २७. [सं. धत्तूर; हिं. धतूरा; गुज. धतरो, धंतरो]

**धत्तु(त्तू)रा**—पु. १ अंगठा; अभाव; फसवणूक. 'न्याय असा जगतीं दिसे कीं। चाकरा मलीदा मिळे धन्याला धत्तरा हाती।' २ धोत्रा. धोत्र्याचें बीं घातलेलें पेय. 'कृष्णें सर्वांसि पाजिले धतुरे।' –मो. [सं. धत्तूर] ०**दाखविणें-देणें**– (अशिष्ट) फसविणें; भोंदणें; तोंडावरून हात फिरविणें; धंदरणें; मुंडणें (धोत्र्याचें बीं विषारी व मादक असतें. खाद्य पदार्थांत तें घालून एखाद्यास खावयास देऊन त्या गुंगी आणतां येते व असें करून त्यास लुबाडतां येतें यावरून हा अर्थ).

**धत्तुरिन**—न. विषारी धोत्र्यांत असलेला एक अल्कोद. (इं.) अॅट्रोपिन्. [धत्तूर]

**धत्त्या**—पु. (व.) बोजा; भार. 'कामाचा धत्त्या उरावर बसला.'

**धंत्र, धंत्रम**—न. (व.) (दुसऱ्याचें) धोरण; आधीनता; तंत्र अर्थ ६ पहा. [तंत्र अप.] **धंत्रीं, धंत्रमीं-लागणें**– (व.) (एखाद्याच्या तंत्रानें वागणें, नादीं लागणें.

**धंदधद**—पु. ढंग; सोंग; रंग.

**धंदर**—स्त्री. आशा.

**धंदरणें**—सक्रि. भुलविणें; थापा मारून, पोकळ आश्वासनें देऊन फसविणें, भोंदणें; तोंडाला पानें पुसणें. **धंदराधंदरं प्रवर्तति**–तंत्रमंत्र यावरून थं मं धंतर मंतर इ० सारखा बनविलेला व गोंधळ. फसवेगिरी, टाणाटोणा, छांछू इ० अर्थानें रूढ असलेला वाक्प्रचार. [धंदरणें द्वि +सं प्रवर्तते=चालू आहे]

**धंदराधंदरीचा**–वि. फसवेगिरीचा: जादुटोण्याचा; थंतरमंतराचा.

**धंदरा-ऱ्या**—वि. धांदल्या; गडबड्या; गोंधळ्या; भ्रांतिष्ट. [धंदरणें]

**धंदा**—पु. १ उद्योग; काम. 'अवघा धंदाची लागला। दिवसेंदिवस काळ गेला।' –रामदास, भक्तिपर अभंग ४ (नवनीत पृ. १५६). २ पोटाचा उद्योग: रोजगार; वृत्ति; चरितार्थाचा व्यवसाय [सं. धन=पैसा+सं. दा=देणें: –भाअ १८३३; हिं धंदा; गुज धंदो] ०**रोजगार**–पु (व्यापक) पोटापाण्याचा उद्योग, व्यवसाय, नोकरी इ० [धंदा+फा रोझ्=दिवस] **धंदेवाईक**– वि. १ उद्योग, रोजगार करणारा. २ धद्यांत पडलला [धंदा]

**धंदेशिक्षण**–न निरनिराळे उद्योगधदे, हस्तव्यवसाय इ० कासंबंधींचे शिक्षण; औद्योगिक शिक्षण. याच्या उलट बौद्धिक शिक्षण. [धंदा+शिक्षण]

**धन**—न. १ पैसा; संपत्ति: द्रव्य; वित्त; (सोनें, चांदी, गुरें ढोरें, घरदार जमीनजुमला इ०) मालमत्ता. २ द्रव्याचें साधन; ज्यामुळें पैसा मिळतो तें. उदा० विद्या, शास्त्र, कला इ० (समासांत) कीर्ति–गृह–पुत्र–पाप–पुण्य–शौर्य–गो–पशु–कल्प–वित्त–मान– धन; तपो–यशो–धन; इ०. ३ अत्यंत प्रियवस्तु. ४ मौल्यवान् वस्तु ५ (गणित) बेरजेचें चिन्ह (+) मिळवावयाची संख्या; अधिक संख्या. 'एका दिशेस कार्य करणाऱ्या प्रेरणा धन (+) चिन्हानें दर्शविल्या' –यंस्थि ७. ६ विजेचा एक प्रकार. 'धन-विद्युत्.' याच्या उलट ऋणविद्युत् [सं.] (वाप्र) **धन लावणें-पाडणें**–(उप.) उत्कर्ष पावणें; वैभवास चढणें; मानमरातब मिळणें (विपरीत लक्षणेनें योजतात). 'पंचवीस वर्षे झालीं आतां पुढें विद्या करून धन लावाल हें समजत आहे.' ०**पुरणें**–कांहीं एक पदार्थ मनमुराद उपभोगिल्यानें आशा पूर्ण होणें **म्ह**० १ धन असे पाताळीं तर तेज दिसे कपाळीं=पैसा जवळ असला कीं तोंडावर साहजिकच तेज चढतें. २ विशीं विद्या तिशीं धन=विद्या संपादन करण्याचें वय वीस वर्षें व पैसा तीस वर्षांपर्यंत मिळतो. ०**कनकसंपन्न**–वि. (अप रूपें) धनकनक, धनक कनक सोनें, पैसाअडका यांनीं समृद्ध; भरपूर श्रीमंत. [सं] ०**कुबेर**–पु. अतिशय श्रीमंत मनुष्य; पैसेवाला; लक्षाधीश. [सं.] **धनको-धनकोनाम**–पु. पैसे उसने देणारा; सावकार; कुळांना कर्जाऊ रकमा देऊन त्याकडून व्याजासह मुद्दल घेऊन व्यवहार करणारा: उत्तमर्ण. याच्या उलट रिणकोनाम. 'धनकोनाम तुकावाणी। रिणको नाम विठ्ठल धणी।' **धनकोरिणको**–न. (धनको आणि रिणको) १ कर्ज देणारा व कर्ज घेणारा यांमधील संबंध; सावकार व कुळ यांमधील व्यवहार. २ देणेदार; अधमर्ण. 'मी तुझे धनकोरिणको लागत नाहीं.' [धन+रिण] ०**गर्वी**–वि. पैशाचा, श्रीमंतीचा ताठा असणारा. ०**गाडा-गाढा**–वि. श्रीमंत; धनवान; पैसेवाला. [धन+गाडा=समृद्ध] ०**चळ**–पु. १ पैशाचें वेड; द्रव्यलोभ. २ पैसा गेल्यामुळें लागणारें वेड. ०**चिन्ह**–न. अधिक (+) चिन्ह. **धनतर, धनंतर, धनवत्तर**–वि. १ श्रीमंत; समर्थ; बलिष्ठ; थोर.

'कुबेराला कर्ज देण्याइतका धनत्तर तुझा बाप.' -एक. २ गडगंज; मुबलक; पुष्कळ; भरपूर (पीक, पाणी इ०). 'आमच्या विहिरीला उन्हाळयांत सुद्धा धनत्तर पाणी असतें.' ३ खूप मोठा; विस्तृत; विस्तीर्ण (वाडा, पटांगण, देश इ०). 'भले भले धनंतर वाडे हवेल्या जागा।' -ऐपो ४२३. ४ हुषार; चलाख; कुशल. [सं. धनवत्तर] ०तृष्णा-स्त्री. पैशाची हांव; लोभीवृत्ति. ०तेरस-त्रयोदशी-स्त्री. अश्विन वद्य त्रयोदशी; या दिवसापसून दिपवाळी सुरू होते. व्यापारी या दिवशीं लक्ष्मीची पूजा करतात. अपमृत्यु टळण्यासाठीं यमास दीपदान करावयाचें असतें. बायकांचा नाहण्याचा हाच दिवस असतो. [सं. धन+त्रयोदशी; प्रा. तेरस] ०द-पु. कुबेर; श्रीमंत; लक्ष्मीपुत्र. 'धर्मा जी धनदसभा तीही शतयोजनायता रम्या।' -मोसभा १.३१. -वि. दाता; धन देणारा. [सं. धन+दा] ०दर्प-पु. पैशाचा अभिमान; श्रीमंतीचा ताठा. [सं] ०दौलत-धान्य-स्त्री. (व्या.) संपत्ति; मालमत्ता; पैसाअडका, दागदागिने, घरदार, शेतीवाडी, गुरेंढोरें इ० इं. इस्टेट. 'जैसें तुकयाचें धनधान्य समस्त। ओढोनि गेलें जेथचें तेथें।' [धन+दौलत, धान्य] ०पिशाची-स्त्री. १ पैशाचें रक्षण करणारी हडळ. २ (ल.) अति लोभी कद्रू स्त्री ०पिसा-वि. पैशाचा अति लोभी: पैशाचें वेड असलेला ०पुत्र-पु. गर्भश्रीमंत; मोठा धनवान. 'तैसेचि धनपुत्रा आटिता दुष्टें।' -दावि ३९. ०मद-न. संपत्तीचा गर्व; ताठा. (क्रि० येणें; चढणें; होणें). 'चोरा थोरासम करी उपकार। धनमद चोरि फार।' -मानापमान. ३.१. -वि. पैशामुळें उन्मत्त झालेला; धनमस्त. ०मस्त-मत्त-वि. संपत्तीनें ताठलेला; उन्मत्त झालेला. ०मस्ती-स्त्री. पैशानें अंगीं येणारा उन्मत्तपणा. ०माल-पु धनदौलत. 'ज्यानें धनमाल सोडिला।' -ऐपो ९७. ०रमणापति पु. १ कुबेर. २ श्रीमंत माणूस. [सं.] ०रेषा-रेघ-स्त्री (हस्तसा.) मनुष्याच्या तळहातावरील एक विशिष्ट रेषा. यावरून पैसा किती व केव्हां मिळेल तें सांगतात. (क्रि० उपटणें; उमटणें). 'त्याची धनरेषा उपटली म्हणून पैसा मिळूं लागला.' ०लाग-लाभ-पु. द्रव्यलाभ; पैसा मिळणें. (क्रि० लागणें; मिळणें; सांपडणें). ०लुब्ध-वि. (काव्य.) संपत्तीचा फाजील लोभी. धनपिसा. 'कीं धनलुब्धाचें तत्त्वज्ञान। परधन हरणार्थ।' धनलोभ-पु. धनाचा, द्रव्याचा हव्यास. ०लोभी-वि. पैशाची इच्छा करणारा; हांवरा. [सं.] ०वंत-वान-स्त्री. ज्याच्यापाशीं पुष्कळ पैसा आहे असा. ०व्यय-पु. पैशाचा खर्च. ०व्यवहार-पु. १ पैशासंबंधींची देवघेव, कारभार. २ पैशासंबंधीं खटला, निवाडा. ३ दिवाणी दावा, कारभार. धनशेट-पु. (उप.) धनाढ्य व्यापारी किंवा पेढीवाला; धनत्तर. ०संचय-पु. पैशाचा सांठा. [धन+संचय] ०संपत्ति-स्त्री. पैसाअडका. ०संपादन-न. पैसा कमावणें; धनार्जन. धनागमन-न. धनप्राप्ति. 'धनागमनीं अति कष्ट। धनरक्षणीं कष्ट श्रेष्ठ।' -एभा २३.१७६. धनागमनागमन-न. धनाचें येणेंजाणें. 'अथवा धनागमनागमनीं। प्रबळ लोभ उपजे मनीं।' -एरुस्व ९३.२९. धनाढ्य-वि. धनवान; श्रीमंत. [सं. धन+आढ्य] धनार्थी-वि. पैशाचा गरजू. [सं. धन+अर्थ] धनांध-वि. पैशानें उन्मत्त झालेला. [सं. धन+अंध] धनात्यय-पु. पैसा जाणें; संपत्तिनाश. [स. धन+अत्यय] धनाध्यक्ष-पु. खजिनदार; कोशाध्यक्ष. धनाशा-स्त्री. पैशाची आशा. संपत्तीची इच्छा; द्रव्याची हांव. धनेश्वर-वि. श्रीमंत; मातबर; तालेवार; संपन्न; संपत्तिमान. [धन+ईश्वर] धनेषणा-स्त्री. द्रव्येषणा; द्रव्याचा लोभ, इच्छा. [धन+ईषणा] धनोत्पादक-वि. संपत्ति, पैसा आणणारा; मिळविणारा. 'बॅरिस्टरी वगैरे धंदे उंसाच्या चरकाप्रमाणें धनोत्पादक नव्हत.' -टि २.४२.

धन—स्त्री. धण पहा. 'एकट्या विधवेची सर्व धन व्हावी!' -के २६.७.३०.

धन—न. (माण.) धणे; धने.

धन—पु. १ धनुष्य. 'त्या पार्थकरिच निजेले धन।' -गीताचंद्रिका १.३०. २ बारा राशींपैकीं नववी रास; धनु राशि. [सं. धनुस्] ०कुटा-पु उंदीर पकडण्याचें धनुष्यासारखें एक साधन, सांपळा. ०कुंबी-स्त्री. खडे मारण्याचें धनुष्य; गलोल. ०कुली-स्त्री. १लहान धनुष्य; धनुकली. २ (कों.) गलोल; धनकुंबी. ३ धनुष्याप्रमाणें शरीर किंवा अंग वांकणें. ०वई-वि. धनुर्धारी. इंद्रधनुष्या सितें। कवण धनवई न घालिजे ते।' -अमृ ६.२५.

धनकट-गट—वि. १ धणगट; खरबरीत; खरखरीत; जाड (कागद, कापड). २ मजबूत; घट्ट; दणकट; दणगट पहा.

धनगणें—क्रि. १ आग भडकणें. २ धगंगणें पहा.

धनगर—पु. एक अब्राह्मण जात व तींतील व्यक्ति; मेंढपाळ. हे मेंढया पाळण्याचा धंदा करतात. [सं. धन+कर] ०की-स्त्री. धनगराचा धंदा. [धनगर+की धंदेवाचक प्रत्यय] धनगरी-वि. धनगरासंबधीं; धनगराचें धनगर लोकांस उपयोगी (कापड; लोणी वगैरे). ०वेड-न. कमालीचा मूर्खपणा.

धनचिडी—स्त्री. एक पक्षी. [धन+चिडी=पक्षी]

धनंजय—पु. १ अग्नि. 'राम धनंजय तुम्ही कापूर, तृण, तूल, काष्ठ, घृत तैल।' -मोरामंत्ररामायणयुद्ध ३१०. २ एक वायु; पंच उपप्राणांतील जांभई उत्पन्न करणारा शरीरस्थ पांचवा वायु. 'न सोडी मेलियाही शरीरा। धनंजय नामक सर्वगत तो वारा।' -यथादि १८.१००५. -एभा १२.३२०. ३ अर्जुन. 'आतां महदादि हे माझी माया। उतरोनिया धनंजया।' -ज्ञा ७.६८. [सं.]

धनपाग—न. (कों.) एक प्रकारचें जाळें. [पाग=जाळें]

**धनफस**—न. (प्रां.) खुंट; खोड.

**धनभर**—क्रिवि. यथेच्छ; पोटभर; मनाचें समाधान होई-पर्यंत. धणभर, धणिभरी पहा. 'करिं घेऊन पंचारति प्रभुला धन-भर ओंवाळुनी।' –ऐपो ३०७. [धण–न=इच्छा+भर]

**धनवटे**—वि. (व.) बेवतनी;

**धनवड**—न. लुगडयाचें एक वाण, प्रकार. यास रेशमी किनार साडेचार पुंजी व मध्यें एक रुइफूल पांढरें असतें. धनवडी पहा. **धनवडा–टी**–वि. १ धनवड–ट मुलुखांतील, प्रदेशांतील (हा प्रदेश नाशिकपासून पूर्वेकडे ३० मैलांवर सुरू होई). २ कर्नाटकांतील धनवड गांवचें (लुगडें, शेला, पागोटें, जोट इ०). **०दांडगा**–वि. (धनवडांतील माणसाप्रमाणें) अरेराव; दांडगेश्वर (माणूस).

**धनवंत्री**—धन्वंतरी पहा. 'धनवंत्र्याचिये अंगीं सत्ताबळ। व्याधि ते सकळ तोडावया।' –तुगा १५८०.

**धनवर-वरीं**—क्रिवि. धणीवरीं; यथेच्छ. धनभर पहा. 'त्या सभाग्याचें घरीं म्या धनवर लाडू खाल्ले.'

**धनसाळ**—स्त्री. तांदुळाची एक जात. [धने+माळ]

**धना**—पु. (गु.) धने; धन्याक; कोथिंबीरीचें बीं; धणा. [सं. धान्याक]

**धनाजाणें**—(ना. व) (गाय, म्हैस इ०) जनावर गर्भार राहणें; गाभण राहणें; फळणें. 'त्याची म्हैस धना गेली.' [?सं. धन; धृ–धवन+जाणें]

**धनश्री**—स्त्री. (संगीत) गायनांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्रऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र-धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य. जाति औडव-संपूर्ण, वादी पंचम. संवादी षड्ज. गान समय दिवसाचा तिसरा प्रहर. [सं.]

**धनिष्ठा**—स्त्री. तेविसावें नक्षत्र; एक नक्षत्रपुंज. [सं.] **०पंचक**–न. दर महिन्यांत येणाऱ्या धनिष्ठा, शततारका, पूर्वा-भाद्रपदा, उत्तराभाद्रपदा रेवती या पांच नक्षत्रांस धनिष्ठा पंचक म्हणतात. हें पंचक अशुभ आहे.

**धनी**—पु. १ मालक; स्वामी; यजमान. २ जबाबदार माणूस; कर्ता पुरुष; ज्यास शास्त्र, रूढी वगैरेमुळें अधिकार प्राप्त झाला आहे असा लायक माणूस. 'उगवणीस धनी तुम्ही रहाल तर याला रुपये देतों.' 'तुम्ही बोलायाचे मात्र धनी हातानें कांहीं व्हावयाचें नाहीं.' 'ब्राह्मण यज्ञोपवीताचा धनी.' –वि. समृद्ध. 'ऐसा शिष्य तया स्थानीं। बुडला असे प्रवाह पाणी। गुरूची वृत्ति झाली धनी। उदकें पूर्ण परियेसा।' –गुच १६.६०. [सं. धनिन्] **म्ह०** धन्याचें नांव गण्या चाकराचें नांव रुद्रोजीबाबा पाटील=हलकें काम करतांना मोठ्या आकांक्षा धरण्यासंबंधीं म्हणतात. २ धनी ना गोसावी=बेवारसी घर, जमीन, माल इ० ३ धन्याला धतूरा आणि चाकराला मलीदा=योग्य हक्कदाराला कांहीं मिळत नाहीं त्यावेळीं वापरतात. **०गोसावी–मी**–पु. (व्यापक अर्थानें) मालक; यजमान; स्वामी; अधिकारी. **०जोग**–वि. हुंडी विकत घेणाऱ्यास–ज्याच्या नांवाची ती असेल त्यास–जिचे पैसे द्यावयाचे असतात अशी (हुंडी).(इं.) ऑर्डर. याच्या उलट शहाजोग=ज्याच्या हातीं ती असेल त्यास द्यावयाची. (इं.) बेअरर. [धनी+योग्य] **धनीण**–स्त्री. मालकीण; यजमानीण; धन्याची बायको. [धनी स्त्री.] **म्ह०** धनिणीस धक्का कुंटणीस टक्का. **धनीधावण्या**–वि. काळजी वाहणारा; जबाबदारी घेणारा. रक्षणकर्ता; सहाय्यकारी. 'गरिबांचा धनीधावण्या ईश्वर.' **धनीपण–णा**–नपु. मालकी हक्क; स्वामित्व 'धनीपणा पडला आईकडे.' –मृ ३९.

**धनी**—स्त्री. इच्छा; हेतु. धणी पहा. (क्रि० पुरणें). 'धनी न पुरे पाहातां तयाच्या स्वरूपाची धाटी। आज नांदतें सदन सख्यांनो वोस लागतेंग पाठी।' –होला ११३.

**धनु**—पुन. १ धनुष्य. 'मुमळाचें धनु नव्हे हो सर्वथा। पाषाण पिळितां रस कैंचा।' –तुगा ४२१०. २ कापूस पिंजण्या-साठीं वापरण्यांत येणारें धनुष्य. ३ वर्तुळाचा अर्धा भाग; वर्तुल-खंड. ४ मेषादि राशीपासुन नववी रास ५ चार हातांचें परिमाण; चार हात लांबी. 'धनु रे धनु भणतु। राऊतें बरवतांति।' –शिशु ५६५. **धनुकणें**–उक्रि. (कापूस) पिंजणें, कांतणें. **धनुका**–धनुष्य. 'पांच सतें धनुका। उचलीली येके वेळें।' –उषा १३. **०कली**–१ लहान धनुष्य. २ धनकुंबी; गलोल. ३ कापूस पिंजण्याचें धनुष्य. **धनुःफल, धनुष्फलक**–न. वृत्त परिघाच्या विवक्षित खंडाची मापणी; वर्तुलखंडाचें माप; ज्याफल. [सं.] **धनुरासन**–न. पोटावर उपडे निजून हात पाठीकडे नेऊन पाय उचलून दोन्ही पाय दोन्ही हातांनीं टाचांशीं घट्ट धरावे. नंतर डोक्याकडे व पायाकडे तोल निरनिराळया वेळीं झुकेल असें करावें. त्याच्यायोगें अन्नपचन होतें. **धनुर्गुण**–पु. धनुष्याची दोरी; ज्या. [सं.] **धनुर्धर–धारी**–वि. १ धनुष्य धारण करणारा; धनुष्यानें लढणारा; तिरंदाजी करणारा. 'तेथ बाणवरी धनुर्धर। वर्षताती निरंतर।' –ज्ञा १.१६६. २ (ल.) शास्त्र, कला इ० कांत निपुण; पंडित; तज्ज्ञ. [सं.] **धनुर्मध्य**–पु. (धनुष्याचा मध्य) धनुष्याच्या दोरीस ज्या ठिकाणीं बाण लावितात ती जागा. [सं.] **धनुर्मार्ग**–पु. वक्ररेषा [सं.] **धनुर्मास**–पु. १ (ज्यो.) धनुराशींत सूर्य येतो तो काल. यावेळीं धन संक्रांत असते. २ (ल.) या राशीस सूर्य असतां सकाळीं धनुर्लग्न आहे तोंपर्यंत देव नैवेद्यादि पूर्वक करावयाचें भोजन; झुंझुरमास. [सं.] **धनुवाड, धनुवाड**–धनुर्धारी; धनुष्य धारण करणारा. 'दोघे धनुवांडे संपूर्ण। तुज मारिती विंधोन बाण।' –भारा किष्किंधा १.३५. 'धर्मु तो अवघयां वडिलु। अर्जुनु धनुवाडा कुशलु।' –गीता १.३१४.

**धनुर्वात**-पु. ज्यांत शरीर धनुष्याकृति होतें तो वातविकार. याचे अंतरायामवात व बहिरायामवात असे दोन प्रकार आहेत. [सं.] **धनुर्विद्या**-स्त्री. लक्ष्य भेदण्याचें व तीर मारण्याचें शास्त्र; धनुष्य वापरण्याची विद्या. [सं.] **धनुर्वेद**-पु. एक उपवेद; धनुर्विद्या; भारतीयांचें युद्धशास्त्र. या वेदांत शस्त्रें, अस्त्रें, युद्ध करण्याचे प्रकार, वाहनें इ० अनेक गोष्टींचें विवेचन केलें आहे. 'आइकें कुटिलालकमस्तका । धनुर्वेदत्र्यंबका ।' -ज्ञा १०.२१५. [सं.] **धनुशाखा**-स्त्री. एक वेलि. हिच्या तंतूपासून धनुष्याच्या दोऱ्या करीत. **धनुष्कोटि**-पुस्त्री. १ धनुष्याचें टोक. २ रामेश्वराजवळचें एक तीर्थस्थान. **धनुस्तंभ**-पु. शारीरिक विकार; एकाएकीं झटका येऊन अंग धनुष्याप्रमाणें वांकणें; धनुर्वात.

**धनुष्य**—न. १ धनु; तिरकामटा; बाण मारण्याचें एक साधन. २ इंद्रधनुष्य. ३ चार हात लांबीचें (मोजण्याचें) परिमाण. 'फिरउनि गरगर तुरगा उडवि धनुःशत जसा खगेश्वर उरगा।' -मोकृष्ण १०६. 'शत धनुष्य प्रमाण पुष्पावती।' ४ परिघाचा एक खंड. (वाप्र.) ०**कंठीं घालणें**-पराभव करणें. 'घालुनि धनुष्य कंठीं सहदेवा अभय दान दे हांसे' -मोकर्ण ६.५२. **धनुष्यास गुण चढविणें-दोरी लावणें**-धनुष्य सज्ज करणें; बाण सोडण्याची तयारी करणें, सोडणें, मारणें. 'मग उठिला वीर कर्ण। आपुलें संपूर्ण बळ वेंचून। धनुष्यास चढविला गुण। नानाप्रकारें करूनियां।' -ह २६.८०.

**धनू**—न. (खा.) गव्हाचें कोंवळें रोपटें, रोह. 'घालुनी वेण्या, पाठीवर लांब, खोविलें त्यांत धनू छान।' -काव्यकेतकी पृ ४८. [धन]

**धने**—पुअव. कोथिंबिरीचें बी. धणा-ना; मसाल्याचा एक पदार्थ. [सं. धन्याक, धान्याक; हिं. धनिया; बं. धने; गु. धाणा; तेलगु. धाणीपापु]

**धनेधने**—उद्गा. धन्यधन्य.

**धनेरी लगाम**—पु. घोड्याचा एक विशेष प्रकारचा लगाम. यास लहान कांटे असतात. लगाम पहा.

**धनेश्वरी**—स्त्री. गायन शास्त्रांतील एक रागिणी. धनाश्री पहा.

**धन्न**—न. (गो.) धरण.

**धन्नी**—स्त्री. (गो.) धरणी; भूमि; पृथ्वी

**धन्य, धन्यता**—स्त्री. भाग्यावस्था; सार्थकता; साध्य गांठलेली स्थिति; कळस होणें; मोक्ष. **धन्यता करणें**-धन्य मानणें; धन्यवाद देणें. 'तर त्यानीं तुझी किती धन्यता केली असती.' -चंद्र ७६.

**धन्य**—वि. १ सुखी; दैववान पुण्यवान; २ कृतकृत्य: समाधान पावलेला; ३. श्रेष्ठ; पवित्र; पावन. 'यज्ञासाठीं भूमी नांगरिता धन्या। सांपडली कन्या सीतादेवी।' -मोसीता गीत-उद्गा. गौरवाचा, शाबासकीचा उद्गार. शाबास! भले. [सं] ०**वाद**-पु. आभार; दुवा; स्तुति. (क्रि० देणें; गाणें). ०**करणें**-गाढा पराक्रम करणें. ०**गाणें-देणें**-स्तुति करणें; आभार मानणें. ०**वाटणें**-स्वतःबद्दल स्वतःच्या कृत्याबद्दल अभिमान वाटणें.

**धन्वंतरी**—पु. १ समुद्रमंथन करितांना निघालेल्या चौदा रत्नांपैकीं एक; देवांचा वैद्य. २ (ल.) कुशल, चतुर, यशस्वी, पटाईत वैद्य. 'तुझ्यासम नसेचि या भ्रमगदासि धन्वंतरी।' -गो.वा. कानिटकर. ३ औषधांचा बटवा; वैद्याची औषध-पेटी, पिशवी. [सं]

**धन्वयी, धन्वा, धन्वी**—धनुर्धर पहा.

**धँप**—स्त्री. (गो.) दोन पावलांमधील अंतर; टांग.

**धपकणें**—अक्रि. धपकन; धबदिशीं, एकदम आवाज होऊन पडणें. [ध्व. धप.]

**धप-कन-कर-दिनीं-दिशीं**-क्रिवि. (पदार्थ, माणूस इ०) खालीं पडण्याच्या आवाजाचें अनुकरण होऊन. (क्रि० पडणें; मारणें; वाजणें.). धब-कन इ० पहा.

**धपका**—पु. १ हिसका; धक्का; चपाटा; रट्टा; ठोसा. २ काठी, तलवार इ०चा फटकारा; काठीचा मार. ३ धडकी, दुःख, निराशा यानीं हृदयास बसणारा धक्का; धसका पहा. (क्रि० भरणें; बसणें). ४ मोठी जाड भाकरी; थालीपीठ. [सं. धप्; गु. धपको.] **म्ह**० धपका सोसवतो पण टिपका सोसवत नाहीं= एखादा मार सहन करतां येईल पण अब्रूला लागलेला धक्का सोसतां येणार नाहीं.

**धपकाविणें-वणें**—उक्रि. १ रट्टा लगावणें; तडाखा मारणें; २ तलवार कुऱ्हाड इ०कांच्या प्रहारानें तोडणें. 'वाटेस चोरांनीं धपकावलें आणि पैका नेला.' [धपका.] **म्ह**० विचारी तो विचारी धपकावी तो लष्करी.

**धपघाई**—स्त्री. १ धप, असा आवाज (पावसाचा, ठिबकण्याचा). (क्रि० लावणें; करणें; लागणें; होणें; चालणें). २ डफघाई पहा. [ध्व. धप+घाई]

**धपटणी**—स्त्री. (गो.) बडबड; थोपटणें; धोपटणें [धपाटा]

**धपटणें, धपाटणें**-अक्रि. मारणें; ठोकणें; बडविणें. धोपटणें पहा. [ध्व. धप]

**धपला-ली**-पुस्त्री. ढलपा; लांकूड, दगड, भिंतीचा गिलावा इ०चा गळून, तुटून अगर फुटून पडलेला तुकडा. ढलपा पी पहा.

**धपाटा**—पु. १ थालीपीठ. धपका पहा. 'आमच्या घरीं धपाटे केले होते' 'त्यानें अर्धा धपाटा खाल्ला.' २ तळहाताचा प्रहार; मार; चापट (पोटाचा, शरीराचा) **धपाटा वळणें-होणें**-पोट खपाटीस जाणें [धप]

**घपाटें**—न. भाजणीची भाकरी; थालीपीठ. घपाटा अर्थ १ पहा.

**घपाधप-घपा**—क्रिवि. एकामागून एक दिलेले तडाखे, रट्टे यांच्या होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. 'वाऱ्यानें या आंब्याचे आंबे धपाधप पडूं लागले.' [ध्व धप द्वि ]

**धपेला**—पु. १ जिकीरीचें किंवा कष्टाचें काम; दगदग. 'हा बैल नागराच्या धपेल्याखालीं घातला म्हणजे याची मस्ती जिरेल' २ जाडेंभरडें, भरमसाट काम; ढोरकाम.

**धप्प, धप्पा**—स्त्रीनपु रट्टा; तडाखा; तलवार, काठी यांचा प्रहार [ध्व. धप.]

**धप्पा**—न. ढलपा. (क्रि० निघणें; उडणें; जाणें; पडणें; फुटणें; फोडणें; काढणें).

**धप्पाधपी, धप्पेबाजी**—स्त्री. एकामागून एक असे एक सारखे मारलेले रट्टे; जोराची हातपिटी; मारामारी; बुक्काबुक्की; कुटाकुटी. [धप्]

**धबक-का**—पु. १ वार: प्रहार; थापड. 'ध ध धबका रोकडा जाला ज्ञानबोध।' -दावि २१४. २ धब असा आवाज घपका पहा. 'बहुत वाद्यांचे धबक।' -दावि ५०४. 'वाजेत तेथें धबके कराचे।' -सारुह ६.६८. [ध्व. धब्] **धब-कण-कन-कर-दिनीं-दिशीं, धबकणें, धबकाविणें**-धपकन इ० पहा. **धबकणें**-उक्रि. धबके देणें; बदडणें. [धबक]

**धबघाई**—स्त्री. धपघाई, डफघाई पहा.

**धबडगा-शा**—पु. दबडगा पहा. 'कसें तरी ओबड धोबड काम करून वेळ मारून नेण्याची क्रिया.' 'त्यापेक्षां विचवडी धबडगा करून एक दोन भले खासे बत्ते (भात शिजविलेले हंडे) उतरून लोकाची कुरकूर मिटवीत कां नाहींत.' -नि ९४७.

**धबदूल**—वि. १ लठ्ठ; धिप्पाड; स्थूल; गबदूल. २ घट-मूट; बळकट. गबदुल पहा. [का. दप्प, धप्प=जाड+दूल प्रत्यय]

**धबधब-धबा**—क्रिवि. १ उंचावरून पडणाऱ्या पाण्याच्या झोताचें किंवा नारळादि फळांच्या झाडावरून खालीं पडण्याच्या आवाजाचें अनुकरण. 'धबधब धबधब वाजे तंबुरा रे।' -दावि ४३१. २ धबधब अशा आवाजाचें अनुकरण. ३ जोरानें; मोठ्यानें. 'यशोदा चहुंकडे धांवत। आळोआळीं कृष्ण पाहत। धबधबा वक्षःस्थळ बडवित। थोर आकांत जाहला।' -ह ५.१२३. ४ धमधमा पहा. [ध्व.]

**धबधबा-बी**—पुस्त्री. १ धोधा: उंचावरून पडणारा पाण्याचा लोट, झोत 'गिरसप्पाचा धबधबा.' [ध्व.]

**धबधबीत**—वि. १ गुबगुबीत पहा. २ (गो.) पातळ (तोंडीलावणें).

**धबय**—वि. (गो.) स्थूलतनु स्त्री; ढब्बी

**धबंगस**—वि. (गो.) अति स्वतंत्र.

**धबला**—पु जाडेंभरडें व भक्कम कापड, वस्त्र. 'भक्ती धबला टाचघोळ जाला वैराग्य बाणली चोळी।' -दावि ४९८. धोंगडा पहा. -वि. जाडेंभरडें व मजबूत (कापड). म्ह० गांड फाटे पण धबला ना फाटे. [का. दप्प, धप्प=जाडेंभरडें+ला प्रत्यय]

**धबाटको**—पु (गो) भीति; दरडावणी [दबणें]

**धबाधब-धबां**—क्रिवि. एकामागून एक आदळून पडणाऱ्या पदार्थांच्या आवाजाचें अनुकरण; धपाधप, धबधब पहा. [ध्व. धब्, द्वि.]

**धबाधबी**—स्त्री. १ लहान मुलांचा एक चेंडूचा खेळ; रपा-रपी; चेंडू पाठींत मारण्याचा खेळ. २ मारामारी; रट्टे देणें, घेणें. 'तो जर धबाधबी करूं लागला तर मग कसें करशील?' -बाळ २. १५२. [ध्व.]

**धबाफळ**—न विद्रूप दिसण्याइतका लठ्ठ माणूस, जनावर; धूड; भारी प्रस्थ. [ध्व धब्+फळ]

**धबाबणें**—अक्रि. धब् धब् आवाजानें खालीं पडणें. 'शुष्क जळाचें चळाळ। धारा धबाबे खळाळ।' -दा ११.७४.

**धबाबा**—पु. पाणधबधबा. -क्रिवि धबाधब पहा.

**धबाला**—वि. (कर.) लठ्ठ; स्थूल; ढमाली (स्त्री.) 'धबाली बाईच्या हातून काय काम होणार?' [का. दप्प, धप्प=जाड]

**धबुला**—वि. १ लठ्ठ; जाड; मोठें (फळ). २ ठेंगणा आणि आडव्या अंगाचा; गिड्डा: जाडजूड (माणूस+जनावर). [धवला]

**धबेला**—पु. धपेला पहा.

**धब्बल**—स्त्री. रपाटा; धपाटा; टोसा; धबका. [ध्व. धब्]

**धब्बल**—वि धष्टपुष्ट; लठ्ठ; दणकट; धबदूल पहा.

**धब्बा**—पु (व. ना.) डाग. 'धोतरावर धब्बा पडला.' [हिं.]

**धब्बें**—न. (राजा.) चांगला भरदार व पिकलेला आंबा.

**धम**—पु. मृदंग, संबळ यांचा खरजातला आवाज देणारा भाग; संबळाच्या डाव्या हाताकडील भागाचें नांव. हें भांडें उजव्या बाजूच्या भागापेक्षां आकारानें दीडपट मोठें असतें. बंब; धुम [ध्व.]

**धमक**—स्त्री १ हिंमत; धैर्य; स्वसामर्थ्याची जाणीव. 'एका दमानें ही घाटी चढून जाईन अशी धमक बाळगली होती पण मधींच थकलों.' २ शक्ति; बळ (सामान्यत्वें) 'एवढें मोठें ओझें उचलायाची माझे अंगीं धमक नाहीं' ३ (पाठ, पोट, फरा इ० मध्यें) उठणारी कळ: तिडीक; शिणक, उसण: शिळक; चमक. वरील प्रतिशब्द व धमक यांत असा फरक दाखविता येईल कीं धमक म्हणजे विशेषतः विंचवाच्या नांगीची वेदना, भाजलेल्या जागेची जळजळ, तापाची हळू हळू वाढणारी आग, अर्धशिशीसारखा ठणका या प्रकारचें दुःख होय (क्रि० निघणें; उठणें;

येणें; भरणें; चालणें; बसणें). ४ फुलें, अत्तर यांचा दरवळ किंवा दमट जमीनीचा दर्प. 'फुलांची धमक साऱ्या घरांत भरली, पसरली.' 'मिरच्यांची धमक नाका-घशांत गेली.' 'बाहेरल्या सर्दीची धमक आंत येती.' ५ आगीची किंवा तापाची जळ. ६ झगझगाट; लखलख (सोनें, हिरे याची). [ हिं. धमका ]

**धमकदारी**-स्त्री. १ ताठा. 'मोहनरावांना, अटी मान्य नाहींत असें धमकदारीनें उत्तर दिलें.' -कोरकि ४२०. २ धमक; हिंमत; कुवत. 'जी धमकदारी बोलून दाखविली ती बोलून दाखविल्याबद्दल तुमची तुम्हाला लाज वाटेल.' -कोरकि ६३. [धमक +दारी प्रत्यय ]

**धमक**—क्रिवि. एक अतिशयत्व द्योतक शब्द; पिवळा व गोरा गडदपणा दर्शविणारें अव्यय. 'पिवळा, गोरा धमक.' 'गांधील माशी म्हणते माझें अंग कसें सोन्यासारखें पिवळें धमक आहे.'

**धमकट**—न. दांडपणा. 'ते महा धीट रागीट। तिचें मोडारे धमकट। बांधोनि आणावी बळकट। शस्त्रास्त्रेंसीं।'-कथा ५.१७.४१. -वि. १ मजबूत; टिकाऊ; दणगट (पदार्थ). २ लठ्ठ आणि सशक्त; काटक; घटमूट. म्ह० बायको धमकट दादला कसपट. [ धमक+ट प्रत्यय ] **धमकटी**-वि. १ धीट व चावट; फाजील (स्त्री.) 'माते माझे चावूनि अधर। चुंबन देती वारंवार। मज कष्टविती थोर। धमकटी मिळोनी।' -ह ७.१५५. २ दांडगी; उन्मत्त, 'तरण्या धमकट्या तेथें वागती।' -दावि ४१६.

**धमकटणें**—क्रि. (गो.) कफ भरून येणें. [ धमकटा ]

**धमकटा-कटणी**—पुस्त्री. (गो.) कफदाटणी. [ दम ]

**धमकणें**—अक्रि. (शीर) उडणें; खालवर होणें; स्फंदणें. [ धमक; हिं. धमकना ]

**धमकणें**—उक्रि. रट्टे लगावणें; मारणें; ठोकणें, धबकणें. धुमकणें पहा. [ धमका ]

**धमकणें**—सक्रि फुंकर घालून, भाता चालवून अग्नि प्रज्वलित करणें. [ सं. ध्मा ]

**धमकणें**—अक्रि. वाजणें; धमधम असा आवाज करणें. 'पैलाड भुईतूनि सीतळ। धमकतां मानिलें आहे जळ।' -दावि ३४१. [ ध्व. धम ]

**धमकणें**—अक्रि. भिणें; धाकणें. 'तदाकारें थोरें निशिदिन मनामाजि धमके।' -दावि २२३.

**धमकेर**—वि. (गो.) विशाल. [ धमक ]

**धमका**—पु. रट्टा; ठोसा; फटका; बुक्का; धपाटा. [ध्व. धम्]

**धमका-की**—पुस्त्री. १ तापानें अंग मोडून येणें; कणकण (तापाची). २ पाऊस थांबल्यानंतरचा उकाडा. ३ धमक पहा.

**धमका-की**—पुस्त्री. दहशत; दबकावणी; मुद्दाम बतलेली भीति, भय (मारण्याचें, नुकसान करण्याचें). ०देणें-एखाद्याला धाक दपटशा देऊन दहशत घालणें. [ धम. हिं. ] **धमकावणी**-स्त्री. दहशत घालण्याची क्रिया; दटावणी; दबकावणी. **धमकाविणें**-उक्रि. १ धमकी, दहशत घालणें; दटावणें. २ रागें भरणें; कानउघाडणी करणें.

**धमणी**—स्त्री. वर आच्छादन असलेली बैलगाडी. धमनी पहा. [ गु. धमण=छप्पर ] **०गाडी**-स्त्री. दुरख्याची गाडी; सारवट गाडी.

**धमधकट**—वि. दणगट; धड.

**धमधम-धमा**—क्रिवि. पडघम, नगारा यांचा अथवा पोकळ भागावर चाललें असतां जो आवाज होतो तसा आवाज होऊन. [ ध्व. धम; सं. धमधमाय; प्रा. धमधम ]

**धमधमा**— १ खंदकाचे बाजूनें तोफा लावण्यासाठीं रचलेला मातीचा बांध; मोरचा; बुरूज. 'फौज पळोन धमधमियांपावेतों आली.' -भाब १०९. २ उंचवटा; टेंकाड; उंच ओटा; मनोरा; (एखाद्या भागाचें निरीक्षण करण्यासाठीं) टेहळणीची, मोक्याची जागा; चढण. ३ पाण्याचें उंच टाकें; हौद; कारंजाचा हौद (पाणी सांठवून नळांतून सोडण्यासाठीं) कुंडें; टाकें. 'आगगाडीच्या पुढच्या अंगास जो वाफेचा धमधमा असतो त्यावरून दूरचे पदार्थ पाहिले असतां . .' -मराठी ६ वें पुस्तक (१८७५ पृ. ४८. ४ किल्ल्यावर चढण्या-उतरण्यासाठीं भिंतीला जोडून केलेलें उतरतें बांधकाम, टेकाड. [ फा. दम्दमा ]

**धमधमणें**—अक्रि. १ डबडब वाजणें; (फुगलेलें पोट, नगारा इ०कानीं) आवाज करणें. २ सळसळणें. 'घंगाळांत ऊन पाणी धमधमत होतें.' -इंप ४३. [ धमधम ]

**धमधमीत**—क्रिवि. धमक; पिवळा; रंगाचा अतिशय दर्शक शब्द. कधीं गोरा, पांढरा या शब्दांमागेंहि लावतात. 'धमधमीत पिवळा.'

**धमन**—न. (चांभारी) काळा रंग वर चढविलेलें कातडें.

**धमनी**—स्त्री. १ शरीरांतील एक रक्तवाहिनी; शीर; नाडी. 'धमनी दिसती तुझ्या या माझ्या शोकवन्हिच्या धमनी।' -मोमंत्ररामायण युद्ध ३७३. २ शरीरांतील ज्ञानतंतू; मज्जारज्जु. (इं.) नर्व्ह. ३ फुंकणी. 'सरला सुतेंशजा ती झाली धात्रेयिकाचि हो धमनी।' -मोवन ९.२९. [ सं. ध्मा-धमन=नी ]

**धमनी**—स्त्री. बैलगाडी; सारवट गाडी; एक्का. धमनी पहा. (गुजराथेंत दमणी बैल फार जलद जातात यावरून दमणी गाडी) -धमणी गाडीवाचक शब्द मराठींत आला असें एक मत आहे. -भाअ १८३२). [ गु. धमण=छप्पर ]

**धमाका**—पु. एक फटाक्याची जात. -मुंव्या ११८.

**धमाटणें**—उक्रि. रपाटा, ठोसा, बुक्की देणें; बदडणें; मारणें. [ धमाटा ]

**धमाटा**—पु. रट्टा; तडाखा; धपाटा. [ध्व. धम+आटा प्रत्यय]

**धमाटा-टो**—पु. (कु.) १ गुराखी लोक आपल्या हातावर गोंवरी किंवा ससाची लेंडी इच्या विस्तवानें डाग घेतात तो. २ मनगटावर भाजून काढून घेतलेला फोड. [ सं. ध्मा ]

**धमाधमी**—स्त्री. १ मुलांचा चेंडूचा एक खेळ; धबाधबी. २ मारामारी; ओढाताणी; झोंबाझोंबी; झटापट. [ ध्व ]

**धमामा**—पु. १ मोठा नगारा; एक वाद्य. 'दमामे धमामे कर्णे शंख भेरी।' –रामदासी २.१८३. २ (ल.) बोभाटा; डंका; प्रसिद्धि; जाहीर करणें; (क्रि० करणें; वाजविणें; होणें; वाजणें). [फा. दमामा ]

**धमामा**—पु. १ कारंजाला, नळाला पाणी पुरविण्यासाठीं केलेली उंच टांकी; धमधमा. २ मातीचा गारा, चिखल (बांधकामासाठीं केलेला). ३ (चूल, चित्रें वगैरे करण्यासाठीं) भिजवून तयार केलेली माती. ४ गच्ची; कट्टा; उंच ओटा ( पडका बुरुज, मनोरा इ०चा ). ( क्रि० घालणें; रचणें; बांधणें; करणें ). [ धमधमा पहा ]

**धमार-ल**—पु. १ गायनांतील एक ताल; यांत चौदा मात्रा व चार विभाग असतात. २ या तालांतील पद, चीज. [ हिं. ]

**धमाल**—वि. अवाढव्य; स्थूल; गबदूल; ढमाल पहा.

**धमावणें**—उक्रि. फुंकणें. 'ओंकारें कमलासनु। तो कैसा धमावा।' –गीता २.२२२७. [ सं. ध्मा ]

**धमासा**—पु. एक कांटेरी वनस्पति; ही औषधी आहे. यापासून एक प्रकारची साखर निघते. [ सं. धन्वयवास, धन्वयास. गु. धमासो ]

**धम्मक लाडू**—पुअव. धपके; रट्टे; बुक्यांनीं मारणें. 'धम्मकलाडू तेल काढू।' –मुलांचें गाणें. [ ध्व. ]

**धम्माल**—पु. घोड्याची एक चाल. –अश्वप १.१९३.

**धम्मिल्ल**—पु. अलंकार, फुलें इ० गुंफून घातलेली वेणी. 'जाणों कृष्णपक्षाची निशा। धम्मिल्ल माथा।' –कथा४.७.४४. [सं.]

**धंय**—न. (कु. गो.) दहीं. [सं. दधि; म. दहिं] **०कालो**-पु. ( दहिकाल' ) जत्रा.

**धय्या**—पु. (कर.) (पत्त्यांतील, गंजिफांतील) दहा ठिपक्यांचें पान; दश्शा. [ दहा ]

**धर**—पु. १ अडकवून, निरोधून ठेवण्याची, टिकविण्याची शक्ति; (शब्दशः व लक्षणेनें). चिकटून राहण्याची, धारण करण्याची, जडण्याची शक्ति. 'वायुमुळें हाताचा धर गेला.' 'त्या आंब्याला धर नाहीं मोहोर येतांच पडतो.' 'चुना जुना झाला म्हणजे त्याचा धर नाहींसा होतो.' 'त्याचे बुद्धीला धर नाहीं एक श्लोक दहा वेळां सांगितला पाहिजे.' २ तोलून धरण्याची, आधारण्याची, वर सहन करण्याची शक्ति (पायांची, पायांतील वस्तूंची); आधार. 'कड्यावर बांधकाम केल्यावर चांगला धर लागेपर्यंत कड्याखालची जमीन उकरून खालीं उतरावें लागते.' –मॅरेट १७. 'या विहिरीला धर चांगला आहे.' ३ खळ; तहकूब करण्याची, दाबून धरण्याची शक्ति (प्राण्याचे व्यापार, मलमूत्रविसर्जन इ०); संयमनशक्ति. ४ कष्ट मानसिक त्रास सोसण्याची शक्ति; तग; टिकाव. ५ (बोलण्यात, वागण्यांत, विचारांत एकवाक्यता; सुसंगति; व्यवस्थितपणा; मेळ. 'त्याचे भाषणास धर नाहीं, आतां एक बोलेल मग एक बोलेल.' ६ धीर. (क्रि० सुटणें). 'धर सर्वांचाहि जेधवां सुटला।' –मोगदा १.२. ७ जम; घडी; बस्तान. 'इकडे अद्यापि पक्का धर बसला असें त्यास वाटत नाहीं.' –सूर्यग्र ८ पर्वत. 'जो धैर्ये धरसा, सहस्रकरसा तेजें तमा दूरसा।' –र ४. ९ (समासांत) धारणकरणारा; ठेवणारा; पाळणारा. उदा० जल-चक्र-गंगा-धर इ० [ सं. धृ ] **०लाहणें**-टिकाव धरणें; तुलनेस येणें. 'मेणिका तारा उर्वशी। वोळी धर न लहाती कन्हर्णी दीसीं।' –शिशु ३३१. **०सुटणें**-धैर्य नाहींसें होणें. 'शहाजणें केली परंतु लश्करचा धर सुटला.' –भाब ८८.



**धरण**—न. १ बांध; बंधारा; नदी-ओढ्याचा प्रवाह अडवून पाणी सांठविण्यासाठीं बांध घालतात तो; पाणी अडविण्यासाठीं बांधलेली भिंत. २ समुच्चयानें नऊ आणे; पाव होन. ३ गरोदर स्त्रीचा गर्भपात होऊं नये म्हणून तिच्या गळयांत विशिष्ट औषधी मुळी बांधतात ती. (क्रि० बांधणें). ४ सुमारें चोवीस गुंजांइतकें वजन. ५ धारण करणें; बाळगणें ६ आश्रय; टेंकण; धरणें अर्थ ३ पहा. **०फुटणें**-(अश्लील.) विटाळशी होणें-बसणें. **०मूळ**-न. (कों.) झाडाचें मुख्य मूळ (जमीनींत अधिक असणारें); मुळाचा मोटा भाग.

**धरणकरी**—पु. धरणें धरून बसणारा (कर्जवसुलीसाठीं,) धरणेकरी-दार. **धरण खांब**-पु. १ घराच्या जमीनीपासून आढ्यापर्यंतचा खांब; धारण. २ (ल) कुटुंबाचा आधारस्तंभ; पोषणकर्ता; कर्तामाणूस

**धरणगांवी**—वि. खानदेशांतील धरणगांवासंबंधीं; धरणगांवचा ( दोरवा इ० वस्त्र ). [ धरणगांव ]

**धरणी**—स्त्री. शैली; धाटणी; वळण; सरणी; पद्धत; तऱ्हा ( लेखन, भाषण, वर्तणूक इ०ची ). [ धरणें ]

**धरणी**—स्त्री. १ पृथ्वी; जमीन; भूमि; धरित्री. 'झालें रामराज्य काय उणें आम्हांसी। धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी।' –तुगा ३९७. २ सबंध भूगोल (जमीन आणि पाणी यांसह) पृथ्वी. [ सं. ] **०वर पडणें**-मृत्युशय्येवर पडणें; मरणाच्या दारीं असणें. (मरतांना पलंग इ० वरून माणसाला भुईवर टेवतात त्यावरून रूढ.) **म्ह०** दे माय धरणी ठाय. **०कंप** पु. भूकंप; पृथ्वीच्या पोटांत द्रव्यक्षोभ होऊन पृष्ठभाग हालण्याची क्रिया. [सं.] **०तल**-न.

भूपृष्ठ: जमीन. [ सं. ] ०धर-पु. पर्वत. 'थरथरला धरणीधर मानीला खेद ' –मारुतीची आरती. [ सं. ]

**धरणी**—स्त्री. १ धरण्याची क्रिया. २ धरणें; धरण्यासाठीं आलेली पोलिसांची तुकडी; अटक. **धरणीची मुलगी**–स्त्री. लग्नासाठीं पळवून आणलेली मुलगी. **धरणीचें लग्न**–न. ज्यांत नवरी पकडून आणलेली आहे असें लग्न. बळजबरीचें लग्न.

**धरणें**—उक्रि. १ पकडणें; मुठींत, हातांत ठेवणें. 'तो हातीं काठी धरून उभा राहिला.' २ निसटूं नये म्हणून दाबून ठेवणें; जोरानें पकडणें. 'पानें वाऱ्यानें उडतील म्हणून पायाखालीं धरलीं आहेत.' ३ सांठविणें; मनांत ठेवणें; लक्षांत ठेवणें. 'हा सर्वांचा हितोपदेश मनांत धरतो.' ४ पकडून ठेवणें; अटकेंत ठेवणें; कह्यांत, ताब्यात ठेवणें. म्ह० धरीन तर डसेल सोडीन तर पळेल. ५ मनांत आणणें; बनविणें; कल्पिणें ( शास्त्रज्ञान, विद्या, कला, खुबी, युक्ति इ० ) 'तूं मनांत जो अंक धरशील तो मी सांगतों.' ६ एखादा क्रम, नियम, शिस्त, व्रत पाळणें; विशिष्ट गोष्ट, काम अंगिकारणें; कांहीं एक उद्योगादि नियमानें करूं लागणें. 'त्यानें सांप्रत प्रातःस्नान धरलें आहे.' 'त्यानें शिव्या द्यावयाचें धरलें आहे.' ७ मानणें; समजणें; पाहाणें. ८ विशिष्ट कामीं योजणें, लावणें, गुंतविणें. 'हा बैल रहाटाखालीं धरा म्हणजे चांगला होईल.' ९ मानणें; समजणें; अमुक गोष्ट अशी आहे असा मनाचा ग्रह करून घेणें; अशा ग्रहानें वागणें ( गोडी, आवड ) लावून घेणें. १० आपल्या कबजात मालकींत, ताब्यांत घेणें. (जमीन, शेत). ११ विचारांत, लक्षांत, मनावर घेणें; महत्त्व देणें. 'हा शिव्या देतो हें तुम्हीं धरूं नका.' १२ अवलंबणें; स्वीकारणें; अनुसरणें; घेणें ( पक्ष, बाजू, भूमिका, वृत्ति ). १३ योजणें; करणें (घाई, त्वरा). 'त्वरा धरली, उशीर धरला.' १४ संपादणें; प्राप्त करून घेणें; मिळविणें (सामर्थ्य, बळ). १५ बाळगणें; घेणें (धास्ती, भीति, अवमान). १६ पुरस्कारणें; प्रतिपादणें ( कार्य, मत. इ० ). १७ पकडणें; उघडकीस आणणें, ( चोरी, लबाडी, इ० ) १८ समाविष्ट करणें; हिशोबांत धरणें. 'त्या पन्नासामध्यें हा धरला कीं...' १९ पाळणें; आचरणें:(अनुष्ठान, उपास, व्रत ). 'धरिला असेल सत्यासह ज्यां जरि धर्म।' –मो अश्व ३.७२. २० चालविणें; पुढाकार घेणें ( गोंधळ, कथा, तमाशा इ०चा ) २१ आवड असणें, घेणें; एखाद्यावर ममता करणें. 'आई मुलास, गाय-वासरास, नवरा-नवरीस धरतो–धरीत नाहीं.' [सं धृ] **धरून बसणें**–हट्ट करणें; हेका न सोडणें; चिकटणें; घट्ट धरणें. ( मत, मागणी, निश्चय, इ० ). **धरून सोडून**–क्रिवि. मधून मधून; धरसोडपणें; अनिश्चिततेनें; चंचलतेनें ( वागणें, बोलणें ). **धरून सोडून वागणें**–वेळ प्रसंग पाहून, संभाळून, धूर्तपणानें एखाद्याशीं वागणें. 'कपटी पुरुषाबरोबर धरून सोडून वागावें लागतें.'

**धरणें**—अक्रि. १ चिकटून राहणें; बसून राहणें; वियुक्त न होणें. 'त्या भिंतीस गिलावा धरत नाहीं.' २ बहार किंवा फळें येणें; निर्माण होणें; धारण केले जाणें. 'यंदा आंबे पुष्कळ धरले; 'भिंतीवर खपले धरले.' ३ फळें टिकणें. 'समुद्रतीरचे माड बहुत धरतात.' ४ गर्भार राहणें; गाभण असणें ( जनावर ). ५ गात्र विकृत होणें; अंग लुलें पडणें; हालेना–चालेनासें होणें. 'माझे वायूनें हातपाय धरतात.' 'गांवोगांव गुरें धरलीं.' ६ स्मरणांत राहणें 'तुम्ही गोष्ट सांगितली परंतु मला धरली नाहीं' ७ ठरली असणें; निश्चित केली जाणें. 'ब्राह्मणाला स्नान धरलें आहे.' 'ज्वरास लंघन, पित्तास अन्य उपचार धरला आहे.' ८ वारणें; निवारली जाणें (पाऊस, थंडी–कपड्यानें, घोंगडीनें). 'घोंगडीनें पाऊस धरत नाहीं आणि पासोडीनें थंडी धरत नाहीं. ९ थांबणें; स्थिर राहणें. 'तन्हीं रणमदें मातलें। राऊंत धरतीचिना।' –शिशु ९७१. [ सं. धृ ]

**धरणें**—न. १ अपराध्यास पकडण्यासाठीं सशस्त्र पाठविलेली टोळी, धरपकड; अटक. २ ऋणको पैसे देत नसल्यास त्याच्या दाराशीं धनकोनें किंवा त्याच्या माणसानें तगाद्याला बसणें; दार अडविणें; उंबरा धरणें. ( सामा. ) तगादा. 'म्हणौनि जे विहित जया जेणें। फिटे संसाराचें धरणें।' –ज्ञा १८.९३१. ३ देव प्रसन्न करून घेण्यासाठीं, आपलें इच्छित कार्य सफळ व्हावें म्हणून देवळाच्या दाराशीं उपाशी बसून राहाणें ( क्रि० बसणें ). ४ पकड; पगडा. 'वेथें संशयाचें जिणें। वेथें संशयाचें धरणें।' –दा ५.१०.१९. ५ ( गो. ) सोनाराचें एक आयुध. ६ आवड 'मनें घेतलें धरणें। भजनमार्गीं।' –दा १४.७.८. ७ अटकाव; आकर्षण; नजरबंदी. आपुलेनि प्रसन्नपणें। दृष्टीसि मांडीति धरणें।' –ऋ १८. [ सं. धृ ] **धरणें घेणें**–हट्टानें मागणी करणें; इच्छित वस्तु प्राप्त होईपर्यंत जागेवरून न हालणें सत्याग्रह करणें. 'नूतन राजाचे प्रजाजन त्याच्या आयुष्यवृद्धीकरितां परमेश्वराजवळ धरणें घेतात.' –उषा ग्रंथमालिका. १८. ०**धरणें–धरून बसणें**–पैसे मागण्यासाठीं ऋणकोच्या दारांत बसणें; एखादी गोष्ट साध्य करून घेण्यासाठीं, मागणी मान्य होण्यासाठीं दार अडविणें. 'अन्याय दुसरा। दारीं धरणें बैसलों।' –तुगा ५१६. ०**येणें**- १ यमाचें (मरणाचें) बोलावणें येणें. २ अटक करण्यासाठीं राजदूत येणें. **धरणेकरा-दार**–पु. १ धरणें धरून बसणारा माणूस. २ हट्टी, लोचट भिकारी. 'हा भिकारी कसला, धरणेकरी.' ०**पारणें**–न. १ एक दिवस जेवणें व एक दिवस उपास करणें याप्रमाणें करण्याचें व्रत. 'तीर्थें व्रतें उपवास। धरणें पारणें म.डिलें।' –दा ३ ३.३३. २ (ल.) आयुष्याच्या गरजा न भागणें, दारिद्र्यामुळें नेहमीं अन्न न मिळणें. ३ कर्जफेडीसाठीं एक दिवस उपास, दुसऱ्या दिवशीं जेवण असें चालविणें. पूर्वी फौजेला पगार मिळत नसला म्हणजे ती सेनापतीच्या दारात बसे तेव्हा सेनापतीला धरणें पारणें ( उपास ) पडे

**धरती-त्री**—स्त्री. १ पृथ्वी; भूमि; जमीन. 'धरतीवरल्या पतिव्रतांना.' –तुफान ६२. 'धरलन् धरती बसले पारती।' –मसाप (भोंडला) २.२६. २ भूगोल. ३ विशिष्ट प्रदेश. [सं. धरित्री]

**धरती**—स्त्री. (कों.) जास्त मादक दारू.

**धरती-र्ती**—स्त्री. विशिष्ट तऱ्हा; पद्धत; रीत; प्रकार; प्रथा. जसें:– 'पुणें धरती.' 'सातारा धरती.' 'कोल्हापूर धरती.' [धरणें]

**धरदमार**—पु. (कर्ना. लमाणी) दरोडा. [धर+दे+मार]

**धरधरणें, धरधरावणें**—अक्रि. १ आजारांतून उठणें; प्रकृति सुधारणें; उत्साह वाटणें; पूर्वस्थितीवर येणें. २ टिकाव धरणें; टिकून राहणें; सोसणें; सहन करणें; निभावणें; तगणें. [धर+धरणें]

**धरनेम**—पु. (भाषण, वर्तन, इ०त) एकसूत्रीपणा; संबद्धता; निश्चितपणा. [धर+नेम]

**धरपकड**—स्त्री. १ संशयित, गुन्हेगार, चोर इ० माणसांना एकामागून एक पकडण्याची क्रिया; अटक. 'गांवांत धरपकड चालली.' २ (ल.) (हिशेबांत चूक, फसवेगिरी) उमगून येणें; धरली जाणें. [धरणें+पकडणें] **धपकडीचा**–वि. लोकांना मोहांत पाडणारा; जाळ्यांत, संकटांत लोटणारा (व्यवहार, भाषण, हकीकत इ०)

**धरफड-धरफडणें-धरफडाट-धरफड्या**—धडफड इ० पहा.

**धरबंद-ध, धरबंधन**—पुन. १ नेम; नियम; बंधन; नियंत्रण; कायदा; ठराविक मर्यादा, प्रमाण. 'कसें लिहावें तो मला एक धरबंध करून द्या सतरा वेळा सतरा प्रकार सांगूं नका.' २ एकसूत्रीपणा; सुसंबद्धता; मेळ (भाषण, वर्तन यांत). ३ भुताखेतास मंत्रतंत्रादींनीं नियंत्रित करणें. ४ बंधनाचा उपाय. ५ परिमितता; प्रमाणबद्धता. [म. धरणें+बांधणें] **धरबंधावर आणणें–बसविणें**–भुताखेताला धरबंद घालणें; त्याचें नियंत्रण करणें. खुंटविणें.

**धरबांध**—स्त्री. १ धरपकड; अटक (सरकारी शिपायांनीं कोणेकास केलेली). २ धरबंद अर्थ ३ पहा.

**धरबिगार, धरवेठ**—स्त्री. बिनमजुरीनें, बळजबरीनें माणसास काम करावयास लाविणें, काम करून घेणें. बिगार, वेठ पहा.

**धरम**—पु. धर्म पहा. [सं. धर्म; हिं. गु. धरम] **०धक्का**–पु. १ व्यर्थ खटाटोप; निष्फळ प्रयत्न; विनाकारण परिश्रम; कार्य न होतां फुकट त्रास, कष्ट, मेहनत; सार्वजनिक, परोपकाराच्या कामांत पडणारे श्रम, बसणारा चट्टा. (क्रि० बसणें; मिळणें). 'तोडा जाऊनी खोडा येईल बसेल एखादा धरमधका.' –राला ८५. २ (नगरी) तडाख : मार; त्रास. 'परिस्थिति परिस्थिति म्हणून तुम्ही जिला म्हण।। ती राजापासून रंकापर्यंत साऱ्यांच्याच मागं सारखी लागली आहे. तिच्या धरमधक्क्यांतून कोणी म्हणता कोणी सुटलें नाहीं.' –फाटक नाट्यछटा १. ३ ओझीं वाहणाऱ्या माणसाना थकल्यावर ओझीं ठेवण्यासाठीं वाटेंत बांधलेला ओटा. [सं. धर्म+म. धक्का] **०पेटी**–स्त्री. दानधर्माचे पैसे टाकण्यासाठीं ठेवलेली पेटी; धर्मपेटी.

**धरमार**—पुस्त्री. (गो.) हाणमार; मारामारी; ठोकाठोकी. [धरणें+मारणें]

**धरमेळ**—पु. (भाषण, वर्तन यांची) एकसूत्रता; संबद्धता; ताळतंत्र. [म. धरणें+मेळ]

**धरवणी**—न. (गो.) धरमैर, धरमर. पावसाचें धरलेलें पाणी (कौलावरून गळणारें); सांठविलेलें पाणी. 'धरवणी वेंचें सरे। तैसें भोगें प्राचीन पुरे।' –ज्ञा १८.९६५. [म. धरणें+पाणी]

**धरवर**—वि. (ना.) अनामत.

**धरसवर**—स्त्री. १ गृहव्यवस्था; संसार; टापटीप. 'घराच्या धरसवरेहून घरधनीण ओळखावी.' २ पाहुणचार; आतिथ्य. 'अतिथि आला त्याची धरसवर करावी हा गृहस्थपणा होय.' ३ व्यवस्था; रीत; पद्धत 'अमक्याचे येथें जेवणाची धरसवर चांगली आहे.' ४ निगा; सांभाळ; काळजीनें वापर (मुलें, गुरेंढोरें इ०ची). [म. धरणें+सावरणें]

**धरसांड**—स्त्री. १ हातांत घेऊन टाकणें; सुरू करून अपुरे तेपणीं बंद ठेवणें. २ अस्थिरपणा; डळमळीतपणा; द्विधावृत्ति; चंचलता. धरसोड पहा. [म धरणें+सांडणें]

**धरसोड**—स्त्री. १ कांहीं धरणें, कांहीं सोडणें असा प्रकार; चंचलता; द्विधा वृत्ति; अस्थिर बुद्धि. 'नवी तऱ्हा प्रघातांत आणतांना धरसोड फार होते.' –विवि ८.७.१२५. २ विचारपूर्वक, निश्चित योजना (निषेधार्थी प्रयोग). 'तूं बोलतोस परंतु तुझ्या मागील आचरणावरून तुझ्या बोलण्यांत धरसोड दिसत नाहीं.' [धरणें+सोडणें]

**धरा**—स्त्री. धरित्री; धरणी पहा. 'धरावांचूनि अनारिसी मतिचि नेणें।' –ज्ञा ११.६८६. 'वराहरूप धरिलें गाढें। धरा प्रतापें धरिली दाढे।' –तुगा २५२७. [सं.] **०कुमारी**–स्त्री. सीता. **०तल-ळ**–न. १ पृथ्वी; भू पृष्ठ. २ वरचा भाग; बाह्यांग. **०तळीं**–क्रिवि. पृथ्वीवर; पृथ्वीच्या पाठीवर 'तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें। भार वाही शीण धरातळीं।' –तुगा २९७०. **०धर**–पुस्त्री. पर्वत. 'वर्षति धराधरावर धाराधरसे मरुत्सुतीं निकरें।' –मोमंत्रसुंदर ९१. **०धरेंद्र**–पु हिमालय पर्वत. **धराधिपाल**–पु. (पृथ्वीपति) राजा. **धराधीश**–पु. पृथ्वीचा मालक, सार्वभौम राजा. 'धराधीश बोलती ज्यास प्रजा।' –चिंतामणि ध्रुवाख्यान (नवनीत पृ ४११.) **धरामर**–पु. भूदेव; ब्राह्मण. 'घरचं ईश धरामर केले।' –एभा ४.२४४. 'कीं महाक्रतु केले थोर। विपुल हस्तें पूजिले धरामर। तरीच स.गाते

घेऊनि सर्वेश्वर। नंदयशोदा जेवित।' -ह ५.८७. [ धरा+अमर ] ०रूह-पु. वृक्ष. ०लोक-पु. (काव्य) पृथ्वी; तिन्ही लोकांपैकीं एक; मृत्युलोक. [ सं. ] ०सुर-पु. भूदेव; ब्राह्मण. 'धरासुरतपःफळें त्वरित धांवलीं जीं वना।' -केका ८०. [ सं. धरा+सुर ]

**धराधर-धरी**—स्त्री. पकडापकड; धरपकड; अनेकांना एकदम धरण्याचा व्यापार (पोलिसांचा). [ धरणें द्वि ]

**धरित्री**—स्त्री. पृथ्वी; धरा पहा. [सं.]

**धरिया**—पु. पोलादी टोंक बसविलेला बांबूचा भाला. -खानगीखातें नोकर लोकांच्या पोषाखासंबंधीं नियम ४१.

**धरी**—वि. (गो.) (आटयापाटयांचा खेळ) धरणारा; अडविणारा; शह देणारा. [ धरणें ]

**धरू**—पु. १ (चांभारी) हत्यारांची मूठ. २ निग्रह. 'मनाचा हन मारु। कां पवनाचा धरु।' -ज्ञा ६.२८९. [धरणें]

**धरून**—क्रिवि. १ (वाच्यार्थ) पकडून; स्वाधीन ठेवून. २ समावेश करून. ३ (अशिष्ट) (स्थल कालवाचक) पासुन जसें:- **कालचें धरून**-कालपासुन. **मुळा धरून**-मुळापासून सकट. **चैत्राधरून**-चैत्र महिन्यापासून. काव्यांत धरूनि असेंहि रूप येतें. 'कवडा धरूनि कोटीधन। जेणें केलें मदर्पण।' -एभा ११.१२१२. [ धरणें ] ०सोडून-क्रिवि. संदिग्धपणें; दुटप्पी. 'यंदा लग्न करतों कीं न करतों हा एकहि निश्चय सांगू नका. धरूनसोडून बोलत जा म्हणजे प्रसंगानुरूप करतां येईल.'

**धरेंत्र**—क्रि. (गो.) अति घाम येणें.

**धरोपरी**—स्त्री. (महानु.) धरण्याची परी, प्रकार. 'त्यागाची धरोपरी घरींच असतां।' -भाए २२९. [ धरणें+परी ]

**धरौना**—वि. खालचा. [ सं. धरा ]

**धर्कल**—न. (गो.) दाटलेल्या थुंकीचा पुंज. दरकाल.

**धर्तरी**—स्त्री (प्र.) धरित्री पहा.

**धर्ता**—वि. १ धारक; धारणकरणारा; बाळगणारा. 'आतां मी एक भूतातें धर्ता।' -ज्ञा ९.८३. २ पकडणारा; धरणारा. [सं धृ]

**धर्ती**—स्त्री. तऱ्हा; प्रकार. धरती पहा. 'तिची मूळची रचना सुटून ती अगदीं परकी जी इंग्रजी भाषा तिच्या धर्तीवर पडणें.' -नि १०८. [ सं. धृ ]

**धर्धर**—स्त्री. (कर.) गडबड; घुळबूळ; 'तुझी धर्धर बंद कर' [ ध्व; किंवा धरणें द्वि. ]

**धर्म**—पु. १ धार्मिक विधियुक्त क्रिया, कर्म; परमेश्वरासंबंधींचें कर्तव्य; ईश्वरोपासना; परमेश्वरप्राप्तीचीं साधनें; परमेश्वरप्राप्तीचा मार्ग, पंथ. 'करितो धारण यास्तव धर्म म्हणावें प्रजांसि जो धरितो।' -मोकर्ण ४१.८१. २ मनुष्यप्राण्यास सदाचरणास लावणारे व परमेश्वरचिंतनाचा मार्ग दाखवून देणारे ख्रिश्चन, यहुदी, हिंदु, इस्लामी वगैरे पंथ. 'मुख्यमुख्य नीतितत्त्वांबद्दल सर्व धर्मांची एकवाक्यता आहे.' ३ शास्त्रांनीं घालून दिलेले आचार, नियम; पवित्र विधी, कर्तव्यें. पंचपुरुषार्थांपैकीं एक. ४ दान; परोपकारबुद्धीनें जें कोणास कांहीं देणें, किंवा जें कांहीं दिलें जातें तें; दानधर्माचीं कृत्यें; परोपकारबुद्धि. 'अंधळयापांगळयांस धर्म करावा.' 'महाराष्ट्रीयांपेक्षां गुजराथ्यांत धर्म अधिक.' ५ सद्गुण; शास्त्रोक्त वागल्यानें अंगीं येणारा नैतिक, धार्मिक गुण. 'कर्तव्यकर्म, नीति, नीतिधर्म किंवा सदाचरण यांसच धर्म असें म्हणतात.' -गीर ६५. ६ स्वाभाविक गुण; गुणधर्म; नैसर्गिक प्रवृत्ति. 'गाईनें दुध देणें हा गाईचा धर्म आहे.' 'पृथ्वीस वास येणें पृथ्वीचा धर्म.' ७ कर्तव्यकर्म; रूढी; परंपरेनें, शास्त्रानें घालून दिलेला नियम. उदा० दान करणें हा गृहस्थ धर्म, न्यायदान हा राजाचा धर्म, सदाचार हा ब्राह्मणधर्म, धैर्य हा क्षत्रिय धर्म. याच अर्थानें पुढील समास येतात. पुत्रधर्म-बंधुधर्म-मित्रधर्म-शेजारधर्म इ० ८ कायदा. ९ यम. 'धर्म म्हणे साध्वि बहु श्रमलीस स्वाश्रमासि जा मागें।' -मोविराट १३.६५. १० पांडवांतील पहिला. 'कीं धर्मे श्वानू सरता। केला सर्वथा स्वर्गलोकीं।' -एभा १.१०९. ११ धर्माचरणाचें पुण्य. 'ये धर्मेचि, पुत्र स्त्री कोष रथ तुरग करी न सांगातें।' -मोभीष्म ११.२६. १२ (शाप.) गुणधर्म; स्वाभाविक लक्षण. 'दोन किंवा अधिक पदार्थांचें एकमेकांवर कार्य घडून त्यांपासुन जेव्हां असा नवा पदार्थ उत्पन्न होतो कीं त्याचे धर्म मूळ पदार्थांच्या धर्मांपासून अगदीं भिन्न असतात, तेव्हां त्या कार्यास रसायनकार्य असें म्हणतात.' -रसापू १. (वाप्र.) **धर्म करतां कर्म उभें राहणें-पाठीस लागणें**-दुसऱ्यावर उपकार करावयला जावें तों आपल्यावरच कांहींतरी संकट ओढवणें. **धर्मखुंटीस बांधणें**-(जनावराला) उपाशीं जखडून टाकणें; ठाणावर बांधून ठेवणें. [ धर्मखुंटी ] **धर्म जागो**-उद्गा. (विशिष्ट गोष्टीचा संबंध पुन्हां न घडावा अशाविषयीं) पुण्य उभें राहो. **धर्म पंगु**-(कलियुगांत धर्म एक पायावर उभा आहे. त्याचे तीन पाय मागील तीन युगांत गेले. यावरून ल.) धर्म अतिशय दुबळा, अनाथ आहे या अर्थी. **धर्मआड कुत्रें होणें**-दानधर्माच्या आड येणाऱ्याला म्हणतात. **धर्माचा**-१ धर्मासंबंधीं (पैसा, अन्न इ०). २ मानलेला; उसना; खरा औरस नव्हे असा (पुत्र, पिता, बहीण इ०). ३ फुकट; मोफत. 'धर्माची राहण्याला जागा दिली आहे.' -पारिभौ २७. **धर्माची वाट बिघडणें-मोडणें**-एखाद्या दानधर्माचा ओघ थांबणें, थांबविणें. **धर्माचे पारीं बसणें**- १ दुसऱ्याचे पैसे खर्चीत रिकामटेकडें बसणें; धर्मावर काळ कंठणें. २ सद्गुणांचें चांगलें फल मिळणें; सदाचारामुळें चांगले दिवस येणें. ३ सदोदित दानधर्म करणें. धर्मकृत्यें आचरणें. **धर्मावर लोटणें-टाकणें-सोडणें**-एखाद्याच्या न्यायबुद्धीवर सोंपविणें. **धर्मावर सोमवार सोडणें**-स्वतः झीज न सोसतां परभारें होईल तें

पाहणें. -संम्ह. **धर्मास**-क्रिवि. (कंटाळल्यावरचा उद्गार ) कृपा करून; मेहेरबानीनें; माझे आई ! याअर्थी. ' माझे रुपये तूं देऊं नको पण तूं एथून धर्मास जा ! ' ' मी काम करतों, तूं धर्मास नीज. ' **धर्मास भिऊन चालणें-वागणें-वर्तणें-करणें**-धर्माप्रमाणें वागणें. **धर्मास येणें**-उचित दिसणें; पसंतीस येणें; मान्य होणें. ' मी तुला सांगायचें तें सांगितलें आतां तुझे धर्मास येईल तें कर.' **म्ह०** १ धर्मावर सोमवार=(दानधर्म करणें). कांहीं तरी सबबीवर, लांबणीवर टाकणें. -मोल. २ धर्माचे गायी आणि दांत कांगे नाहीं. ३ आज मरा आणि उद्यां धर्म करा. ४ धर्मादारीं आणि मारामारी. ५ धर्मस्य तत्वं निहितं गुहायाम्=धर्माचें रहस्य गुहेमध्यें ठेवलेलें असतें ( गूढ. किंवा अज्ञेय असतें ). धर्माचें खरें तत्त्व गहन, अगम्य आहे. ६ धर्मस्य त्वरिता गतिः=धर्मास विलंब लावूं नये या अर्थी. सामाशब्द- ०**आई-माता**-स्त्री. (ख्रि.) कांहीं चर्चेसमध्यें लहान मुलांचा बाप्तिस्मा होतो तेव्हां त्यांस ख्रिस्तीधर्मास अनुसरून वळण व शिक्षण देण्यांत यावें म्हणून त्यांच्या मातेहून भिन्न अशी जी स्त्री आपणावर जबाबदारी घेते ती. ( इं. ) गॉडमदर. ' प्रत्येक मुलीला एक धर्मबाप व दोन धर्म आया पाहिजेत. ' -साप्रा ९०. ०**कर्ता**-पु. १ धर्म करणारा; परोपकारी माणूस. २ न्यायाधीश; जज्ज. ३ ( दक्षिण हिंदुस्थान ) देवळाचा व्यवस्थापक, कारभारी. ०**कर्म**-न. १ वर्तन; आचार; एखाद्याचीं कृत्यें. कर्मधर्म पहा. 'ज्याचें त्यास धर्मकर्म कामास येईल.' २ शास्त्रविहित कर्मे, आचरण; धार्मिक कृत्यें. [सं. धर्म+कर्म] ०**कर्मसंयोग**-पु. प्रारब्धयोग; कर्मधर्मसंयोग पहा. ०**कार्य-कृत्य**-न. धार्मिक कृत्य; परोपकाराचें कार्य; ( विहीर, धर्मशाळा इ० बांधणें, रस्त्यावर झाडें लावणें; देवळें बांधणें; अन्नसत्रें स्थापणें इ० ). २ धार्मिक विधि, व्रत; धर्मसंस्कार. [ सं. ] ०**कीर्तन**-धर्माचें व्याख्यान-प्रवचन-पुराण. '.किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धि गेलें। ' -ज्ञा १८. १७९२. [ सं. ] ०**कुढाव**-पु. ( महानु. ) धर्मरक्षक. ' कीं धर्मकुढावेनि शार्ङ्गपाणी। महापातकांवरी सांधीतली सांघनी। ' -शिशु ३५. [ धर्म+कुढावा=रक्षण ] ०**खातें**-न. १ धर्मासाठीं जो खर्च करितात त्याचा हिशेब ठेवणारें खातें; धार्मिक खातें. २ धर्मार्थ संस्था; लोकोपयोगी, परोपकारी संस्था. [ सं. धर्म+खातें ] ०**खूळ-वेड**-न. धर्मासंबंधीं फाजील आसक्ति; अडाणी धर्मभोळेपणा; धर्माबद्दलची अंधश्रद्धा. [ म. धर्म+खूळ ] ०**गाय**-स्त्री. १ धर्मार्थ सोडलेली गाय. धर्मधेनु पहा. २ चांगली, गरीब गाय. ' काढोळाचें संगती पाहे । क्षणभरी गेलिया धर्मगाये। ' -एभा २६.४२. ०**ग्रंथप्रचारक**-पु. (ख्रि.) ख्रिस्ती धर्म शास्त्र व तत्संबंधीं इतर पुस्तकें विकणारा, फेरीवाला; (इं.) कल्पोचैर. ' सदानंदराव काळोखे यांनीं एक तप धर्मग्रंथप्रचारकाचें काम मोठ्या प्रामाणिकपणें केलें. ' [ सं. धर्म+ग्रंथ+प्रचारक ] **धर्मतः**-क्रिवि. धर्माच्या, न्यायाच्या दृष्टीनें; न्यायतः; सत्यतः; खरें पाहतां. ०**दान**-न. दानधर्म; धर्मादाय. ' एक करिती धर्मदान । तृणासमान लेखती धन। ' [ सं. ] ०**दारीं कुत्रें**-न. परोपकाराच्या कृत्यास आड येणारा (नोकर, अधिकारी); कोठावळा. ०**दिवा-दिवी**-पुस्त्री. धर्मार्थ लावलेला दिवा. ' जे मुमुक्षु मार्गींची बोळावी। जे मोहरात्रीची धर्मदिवी। ' -ज्ञा १६.६५. ०**द्वार**-न. कौल मागणें; ईश्वराला शरण येणें. [ सं. ] ०**धेनु**-स्त्री. १ धर्मार्थ सोडलेली गाय. ' ऐसेनि गा आटोपे । थोरिये आणतीं पापें । धर्मधेनु खुरपें। सुटलें जैसें। ' -ज्ञा १६.३२९. २ हरळी; दुर्वा. -मनको [ सं. ] ०**ध्वज**-पु. १ धर्माची पताका; धर्मचिन्ह; धर्माचा डौल, प्रतिष्ठा; ( क्रि० लावणें; उभारणें; उभविणें; उडणें ). २ ( ल ) धर्माचा फाजील पुरस्कर्ता. [ सं. धर्म+ध्वज ] ०**ध्वजी**-वि. धर्मनिष्ठेचा आव आणणारा ढोंगी-भोंदू माणूस. ०**नाव**-स्त्री. येणाऱ्या-जाणारानीं तरून जावें म्हणून नावाड्यास वेतन देऊन नदीवर जी धर्मार्थ नाव ठेवलेली असते ती; धर्मतर; मोफत नाव [ धर्म+नांव ] ०**निष्पत्ति**-स्त्री. कर्तव्य करणें; धर्माची संपादणूक. [सं] ०**नौका**-पु. धर्मनाव पहा. ०**न्याय**-पु वास्तविक न्याय; निःपक्षपात, धर्माप्रमाणें दिलेला निकाल. ' तुम्ही उभयताचें वृत्त श्रवण करून धर्म न्याय असेल तो सांगा. ' [ धर्म+न्याय ] ०**पत्नी**-स्त्री. १ विवाहित स्त्री. -ज्ञा१८.९४२. २ सशास्त्र (अग्निहोत्रादि) कर्माकरितां योग्य अशी प्रथम विवाहाची ( दोन तीन पत्न्या असल्यास ) ब्राह्मण स्त्री. [ सं. ] ०**पंथ**-पु १ धर्माचा, परोपकाराचा, सदाचरणाचा मार्ग. ' सदां चालिजे धर्मपंथ सर्व कुमति टाकोनि। ' 'धर्मपंथ जेणें मोडिले। त्यास अवश्य दंडावें। ' २ धार्मिक संघ, समाज. ' ख्रिस्तीधर्मपंथ. ' [ सं ] ०**परायण**-वि.क्रिवि. १ परोपकारार्थ; धार्मिककृत्य म्हणून; धर्मासाठीं. २ धर्मार्थ; मोफत; ( वेचणें, काम करणें ). ३ पक्षपात न करतां; धर्मावर लक्ष ठेवून ( करणें; सांगणें; बोलणें इ० ). ' धर्मपरायण बोलणारे पंच असल्यास धर्मन्याय होईल. ' ०**परिवर्तन**-न. ( ख्रि. ) धर्ममतें बदलणें; धर्मांतर. ( इं. ) कॉन्व्हर्शन. ' नारायण वामन• टिळक यांचें १८९५ सालीं धर्मपरिवर्तन झालें. ' [ सं. धर्म+परिवर्तन ] ०**पक्षी**-पु. धर्मोपदेशक; पाद्री; पुरोहित. ' तो जातीचा धर्मपक्षी होता. ' -इंग्लंडची बखर भाग १.२७२. [ धर्म+पक्षी=पुरस्कर्ता ] ०**पिंड**-पु. १ पुत्र नसणाऱ्यांना द्यावयाचा पिंड. २ दुर्गतीला गेलेल्या पितरांना द्यावयाचा पिंड. [ धर्म+पिंड ] ०**पिता**-पु. धर्मबाप पहा. ०**पुत्र**-पु. १ मानलेला मुलगा. २ उत्तरक्रियेच्या वेळीं पुत्र नसलेल्यांचा श्राद्धविधि करणारा तज्जातीय माणूस; धार्मिक कृत्यांत पुत्राप्रमाणें आचरणारा माणूस ' धर्मपुत्र होऊनि नृपनायक। ' -दावि ४९१. ३ दत्तक मुलगा, इस्टेटीला वारस ठरविलेला. ०**पुरी**-स्त्री. १ तपस्वी, विद्वान

वगैरे ब्राह्मण ज्या क्षेत्रांत राहतात तें क्षेत्र; धार्मिक स्थल. २ ज्याच्या घरीं पाहुण्याचा नेहमीं आदर सत्कार केला जातो तें घर; पाहुण्यांची वर्दळ, रहदारी असणारें घर. [सं.] ०पेटी-स्त्री. धर्मादाय पेटी: धर्मार्थ पैसे टाकण्यासाठीं ठेवलेली पेटी. (देऊळ: समाधि; धर्मार्थ संस्था वगैरे ठिकाणीं) [सं धर्म+पेटी] ०पाई-०पोवई-स्त्री. १ प्रवाशांसाठीं, गरिबांसाठीं अन्न पाणी वगैरे फुकट मिळण्याची केलेली व्यवस्था; धर्मार्थ अन्नोदक दान. २ अशी व्यवस्था जेथें केलेली असते तें ठिकाण; अन्नछत्र; धर्मशाळा. ०प्रतिष्ठा-स्त्री. १ धर्माचा गौरव; सन्मान; डौल. २ धर्माची स्थापना. 'धर्मप्रतिष्ठा तो सिध्दु। अभयहस्तु।' -ज्ञा १.१३. [सं.] ०प्रधान-वि. १ धर्मरूप पुरुषार्थाविषयीं तत्पर; धार्मिक वृत्तीचा. २ धर्म ज्यांत प्रमुख आहे असा (विषय, हेतु इ०). ०बंधु-पु. मानलेला भाऊ; भावाच्या जागीं असणारा माणूस; स्वतःच्या धर्माचा अनुयायी; स्वधर्मीय. [सं.] ०बाप-पु. (ख्रि) कांहीं चर्चेसमध्यें लहान मुलांचा बाप्तिस्मा होतो तेव्हां त्यांस ख्रिस्तीधर्मास अनुसरून वळण व शिक्षण देण्यांत यावें म्हणून जबाबदारी घेणारा पित्याहून निराळा पुरुष. (इं.) गॉडफादर. 'ज्या प्रत्येक मुलाचा बाप्तिस्मा करावयाचा आहे त्याला दोन धर्मबाप व एक धर्मआई पाहिजे' -साप्रा ९०. [धर्म+बाप] ०बुध्दि-स्त्री. धर्म करण्याची मनाची प्रवृत्ति; धर्माचरणाविषयीं आस्था. 'या चोराला तुम्ही गरीब मानून घरीं जेवायला घालितां ही धर्मबुद्धि कामाची नव्हे.' [धर्म+बुद्धि] ०भोळा-वि. १ धर्मावर अंधश्रद्धा असणारा, परम धार्मिक. २ (अनादरार्थी) धर्मवेडा; कट्टर सनातनी. (इं.) सुपरस्टिशस. 'बॅरिस्टर, या धर्मभोळया खुळचट लोकांत तुम्ही आपल्या बाईफला एक मिनिटहि ठेवणं म्हणजे तिच्या सगळ्या लाइफचं मातेरं करण्यासारखं आहे.' -सु ८. ०भ्राता-पु. धर्मबंधु पहा. ०मर्यादा-स्त्री. धर्मानें घालून दिलेली मर्यादा, बंधन, शिस्त; धार्मिक नियंत्रण. [सं.] ०मार्ग-पु. धर्माचा, सदाचरणाचा, परोपकाराचा मार्ग. [सं.] ०मार्तंड-पु. १ धर्माचा श्रेष्ठ अनुयायी; पुरस्कर्ता; धर्मभास्कर; एक पदवी. २ (उप.) धार्मिकपणाचें अवडंबर, ढोंग माजविणारा 'भीतोस तूं कशाला, मोडाया हें सुधारकी बंड। आहोंत सिद्ध आम्हीं पुण्यपुरींतील धर्ममार्तंड।' -मोगरे. ०युध्द-न. युद्धशास्त्राच्या नियमाप्रमाणें चाललेली लढाई; सारखें संख्याबल; सारख्या शस्त्राअस्त्रांनीं सज्ज अशा दोन पक्षांमधील न्यायीपणाचें युद्ध; न्याय्ययुद्ध; निष्कपट युद्ध 'तों अशरीरिणी वदली उत्तर। धर्मयुद्ध नव्हे हें।' -पांप्र ४५ ३९. [सं] ०राज-पु. १ यमधर्म. २ जेष्ठ पांडव, युधिष्ठिर युधिष्ठिर हा फार सच्छील असल्यामुळें त्याला धर्माचा अवतार समजत. ३ (ल) धर्मनिष्ठ, सात्त्विक मनुष्य ४ धर्माप्रमाणें भोळाभाबडा माणूस [सं.] ०राजाची बीज-स्त्री. कार्तिकशुद्ध द्वितीया; भाऊबीज; यमद्वितीया. [सं धर्मराज+म. बीज] ०राज्य-न. ज्या राज्यांत सत्य, न्याय आणि निःपक्षपात आहे असें राज्य; सुराज्य; सुखी राज्य [धर्म+राज्य] ०लग्न-न. धर्मविवाह पहा. ०लंड-वि. (अश्लील) नास्तिक; धर्मकृत्यें न करणारा; धर्माला झुगारून देणारा. याच्या उलट धर्ममार्तंड 'सदर ग्रंथांत महाराष्ट्र धर्मलंड अतएव त्याज्य असें एका गंथानें म्हटलें आहे.' -टि ४. [सं. धर्म+लंड=लिंग] ०लोप-पु. धर्माची ग्लानी; अधर्माचा प्रसार. [सं.] ०वर्णा-पु. (कुंभारी) तिलांजळीच्या वेळचा कुंभारी मंत्र. -बदलापूर ७२. [धर्म+पाणी] ०वाट-स्त्री. १ शरण आलेल्या शत्रुवर दया दाखवून त्यास करून दिलेली वाट. 'तुज युद्धीं कैंचें बळ। धर्मवाट दिधली पळ।' -एरुस्व ११.३७. २ खुला, मोकळा, बिनधोक, अनिर्बंध रस्ता, मार्ग. [सं. धर्म+वाट] ०वान्-वि. धार्मिक; परोपकारी; सदाचरणी; सात्त्विक. [सं.] ०वासना-स्त्री. दानधर्म, धार्मिक कृत्यें करण्याची इच्छा; धर्मबुद्धि. [सं. धर्म+म वासना] ०निधान-न. धर्माचा खजीना, ठेवा, सांठा. 'रचिलीं धर्मनिधानें। श्रीनिवृत्तिदेवें।' -ज्ञा ११.९. [सं.] ०विधि-पु. धार्मिककृत्य, संस्कार [सं.] ०विपाक-पु. धार्मिक कृत्यांचा परिणाम, फल. सत्कृत्यांचें फल. विपाक पहा. [सं.] ०विवाह-पु. गरिबाचें स्वतःच्या पैशानें करून दिलेलें लग्न; धर्मादाय लग्न. [सं.] ०वीर-पु. १ स्वधर्मार्थ प्राणार्पण करणारा; धर्मासाठीं लढणारा. 'स्वधर्मरक्षणाकरितां मृत्यूच्या दाढेंत उडी टाकणाऱ्या धर्मवीराची ती समाधि होती.' -स्वप १०. २ धर्माचें संरक्षण, संवर्धन करणारा; धर्माचा वाली; ही एक पदवीहि आहे. 'धर्मवीर चंद्रोजीराव आंग्रे.' ३ (ख्रि) रक्तसाक्षी. (इं.) मार्टिर. [सं.] ०शाला-ळा, धर्मसाळ-स्त्री. वाटसरू लोकांना उतरण्याकरितां बांधलेलें घर; धर्मार्थ जागा; पांथस्थांच्या विश्रांतीची जागा. 'मठ मंडप चौबारी। देखे धर्मसाळां।'-ऋ २०. [धर्म+शाला] ०शाळेचें उखळ-न. (धर्मशाळेंतील उखळाचा कोणीहि उपयोग करतात ल.) वेश्या; पण्यांगना. म्ह० धर्मशाळेचे उखळीं येत्याजात्यानें कांडावें. ०शास्त्र-न. १ वर्णाश्रम धर्माचें प्रतिपादक जें मन्वादिप्रणीत शास्त्र तें. आचार व्यवहारादिकांसंबंधीं नियम सांगणारें शास्त्र, ग्रंथ. २ समाजाच्या शिस्तीसाठीं, धार्मिक आचरणाकरितां, सामाजिक संबंधाकरितां (लग्न वगैरे संस्थांबद्दल) विद्वानांनीं घालून दिलेले नियम किंवा लिहिलेले ग्रंथ. धर्माविषयींचें विवेचन केलेला ग्रंथ. ३ ख्रिस्तीधर्माचें शास्त्र. (इं.) थिऑलॉजी. याचे सृष्टिसिद्ध (नॅचरल), ईश्वरप्रणीत (रिव्हील्ड), सिद्धांतरूप (डागमॅटिक), पौरुषेय (स्पेक्युलेटिव्ह), व सूत्रबद्ध (सिस्टिमॅटिक) असे प्रकार आहेत. ४ (सामा.) कायदेकानू [सं.] ०शास्त्री-वि. धर्मशास्त्र जाणणारा. [सं.] ०शिला-स्त्री. सती जाणारी स्त्री पतीच्या चितेवर चढतांना ज्या दगडावर प्रथम उभी राहते तो दगड. या ठिकाणीं उभी असतां

ती सौभाग्यवायनें वाटते. ही शिला स्वर्गलोकची पायरी समजतात. 'धर्म शिळेवर उभी असतांना थोरल्या माधवराव पेशव्याची स्त्री रमाबाई हिनें नारायणराव पेशव्यांचा हात राघोबांच्या हातीं दिल्याचें प्रसिद्ध आहे.' –ज्ञाको (ध) ४४. 'धर्मशिळेवर पाय ठेविता दाहा शरीरा का करितो।' –सला ८३. ०**शिक्षण**–न. धर्माचें शिक्षण; धार्मिक शिक्षण. 'ज्या धर्म शिक्षणानें पुरुषाचा स्वभाव अभिमानी, श्रद्धाळु, कर्तव्यदक्ष व सत्यनिष्ठ बनेल तें धर्मशिक्षण –टिसु ११६ ०**शील-ळ**–वि. शास्त्राप्रमाणें वागणारा; धार्मिक सदाचरणी; सद्गुणी. [सं.] ०**श्रद्धा**–स्त्री धर्माविषयीं निष्ठा; धर्मावर विश्वास. 'राष्ट्रोत्कर्षास धर्मश्रद्धा पुढाऱ्यांच्याहि अंगीं पाहिजे.' –टिसु ११७. ०**संतति-संतान**–स्त्रीन. १ कन्यारूप अपत्य (कारण कन्या कुटुंबाबाहेर जाते). २ दत्तक मुलगा. [सं.] ०**सभा**–स्त्री. १ न्याय कचेरी; न्यायमंदिर; कोर्ट. २ धार्मिक गोष्टींचा निकाल करणारी मंडळी; पंचायत. [सं.] ०**समीक्षक, ०जिज्ञासु**–पु. (ख्रि.) धर्मासंबंधानें विचार करणारा; शोध करणारा; पृच्छक. (इं.) एन्कायरर. 'धर्म समीक्षकांच्या शिक्षकांना उपयोगी पडतील अशा पुस्तकांची बरीच जरूरी आहे.' –ज्ञानो ७.५.१९१४. [सं.] ०**संमूढ**–वि. कर्तव्य कोणतें हें ज्यास निश्चित कळत नाहीं असा. –गीर २५. ०**संस्कार**–पु. धार्मिक संस्कार; धर्मविधि. ०**संस्थान**–न. १ पुण्य क्षेत्र; धर्माचें, सदाचरणाचें स्थान. २ पूजा, अर्चा वगैरे करण्यासाठीं ब्राह्मणास दिलेलें गाव; अग्रहार. ३ (व्यापक) धर्मार्थ, परोपकारी संस्था, सभा. ०**संस्थापन, ०स्थापन**–न. १ नवीन धर्मपंथाची उभारणी. 'धर्म स्थापनेचे नर। हे ईश्वराचे अवतार। जाले आहेत पुढें होणार।'–दा १८.६.२०. २ धर्माची स्थापना; धर्मजागृति [सं.] ०**सिद्धांत-स्वीकार**–पु. (ख्रि.) उपासनेच्या वेळीं आपल्या धर्मश्रद्धेचें आविष्करण करण्याकरितां विवक्षित सिद्धांतसंग्रह म्हणून दाखविणें. (इं.) कन्फेशन् ऑफ फेथ. [सं.] ०**सिंधु**–पु. धर्मशास्त्रावरचा एक संस्कृत ग्रंथ यांत अनेक धर्मकृत्यांचें विवेचन केलेलें असून शुभाशुभ कृत्यांचा निर्णय सांगितला आहे. पंढरपूरचे काशिनाथ अनंतोपाध्याय यांनीं इ. स. १७९१ त हा रचिला. ०**सूत्रें**–नअव. ज्ञान व कर्ममार्ग यांची संगति लावून व्यावहारिक आचरणाची सांगोपांग चर्चा करणारा प्राचीन ग्रंथ. सूत्रें पहा. [सं.] ०**सेतु**–पु. धर्ममर्यादा. [सं.] ०**ज्ञ**–वि. १ धर्मशास्त्र, विधिनियम उत्तम प्रकारें जाणणारा. २ कर्तव्यपर माणुस; कर्तव्य जागरूक. **धर्माआड कुत्रें**–न. सत्कृत्याच्या, परोपकाराच्या आड येणारा दुष्ट माणूस. धर्मदारीं कुत्रें पहा. **धर्माचरण**–न. धार्मिक आचार; सदाचरण. [स. धर्म+आचरण] **धर्माचाकांटा**–पु. सोनें वगैरे मौल्यवान जिन्नसाचें खरें वजन लोकांस करून देण्यासाठीं विशिष्ट स्थळीं ठेवलेला कांटा; धर्मकांटा. वजन करवून घेणाऱ्यांकडून मिळालेला पैसा धर्मादाय करतात. **धर्माचा पाहरा**–पु. सकाळचा प्रहर (सुर्योदयापूर्वी दीड तास व नंतर दीड तास). **धर्माची गाय**–पु (धर्मार्थ मिळालेली गाय). १ फुकट मिळालेला जिन्नस. म्ह० धर्माचे गायी आणि दांत कां गे नाहीं =फुकटचा जिन्नस किंवा काम क्वचितच चांगलें असतें. २ कन्या; मुलगी (कारण ही दुसऱ्यास द्यावयाची असते). –वि. गरीब निरुपद्रवी मनुष्य. **धर्मात्मा**–पु. (धर्माचा आत्मा, मूर्तिमत धर्म). १ धर्मशील, धार्मिक प्रवृत्तीचा माणूस. २ धर्म करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा. ज्यानें अनेक धर्मकृत्यें केलीं आहेत असा. [सं.] **धर्मादाय-व**–पु. १ धर्मार्थ जें दान तें; देणगी; भिक्षा. २ सरकारांतून धर्मकृत्यासाठीं प्रतिवर्षी काढून ठेवलेली रक्कम; या कामीं ठराविक धान्य देण्यासाठीं दर गावाला काढलेला हुकूम. –वि. मोफत; फुकट; धर्मार्थ. –क्रिवि. धर्म म्हणून; दान देण्याकरितां; धर्मार्थ. ०**टाकणें-सोडणें-देणें**-धर्मार्थ देणें; दानधर्मासाठीं आपला हक्क सोडणें. **धर्मादाय पट्टा**–स्त्री. देऊळ, उत्सव इ० चा खर्च चालविण्यासाठीं किंवा एखाद्याच्या मदतीसाठीं, लोकांवर बसवितात ती वर्गणी. **धर्माधर्मी–धर्मीनें**–क्रिवि. धार्मिक व उदार लोकांच्या मदतीनें अनेकांनीं धर्मार्थ हात लाविल्यानें; फुकट; स्वतः पैसा खर्च करण्यास न लागतां. 'लेखक टवून लिहिलें तर पुस्तक होईल नाहींतर धर्माधर्मी ग्रंथ तडीस जाणार नाहीं.' [सं. धर्म द्वि.] **धर्माधर्मीवर काम चालविणें**-पैसा खर्च न करतां फुकट काम करून घेणें. **धर्माधर्मीचा**–वि. धार्मिक लोकांकडून मिळविलेला; धर्मार्थ (फुकट) मिळविलेला; अनेकांनीं हातवोट लावल्यामुळें संपादित (पदार्थ, व्यवहार). **धर्माधिकरण**–पु. १ धर्माचारांचें नियंत्रण. २ शास्त्रविधींची पाळणूक होते कीं नाहीं हें पाहाण्यासाठीं, नीतिनियमांवर लक्ष टेवण्यासाठीं खातें, सभा. ३ धर्मशास्त्राची अंमल बजावणी. ४ सरकारी न्यायसभा; न्यायमंदिर. **धर्माधिकार**–पु. १ धर्मकृत्यांवर देखरेख करण्याचा अधिकार. धार्मिक गोष्टींवर नियंत्रण. २ न्यायाधीश. धर्माधिकरण पहा. [धर्म+अधिकार] **धर्माधिकारी**–पु. १ धर्मासंबंधीं गोष्टी पहाणारा वरिष्ठ अधिकारी. धर्माधिकरणाचा अधिकारी. २ न्यायाधीश. **धर्माध्यक्ष**–पु. सरन्यायाधीश; धर्मगुरु; राजा. [धर्म+अध्यक्ष] **धर्मानुयायी, धर्मानुवर्ती, धर्मानुसारी**–वि. १ धर्माप्रमाणें चालणारा, वागणारा; सद्गुणी; सदाचरणी. २ एखाद्या धर्मपंथातील माणूस. **धर्मानुष्ठान**–न १ धर्माप्रमाणें वर्तन; पवित्र, सदाचारी जीवन. २ धार्मिक संस्कार, विधि. ३ धार्मिक कृत्य; सत्कृत्य. **धर्मार्थ**–क्रिवि. १ परोपकार बुद्धीनें; दान म्हणून: देणगी म्हणून. २ मोफत; फुकट. **धर्मार्थ जमीन**–स्त्री धार्मिक गोष्टींसाठीं दिलेली जमीन (देवस्थानास किंवा धर्मादायास दिलेली); इनाम जमीन.

**धर्मालय**—न. १ धर्मस्थान; धर्मक्षेत्र; ज्या ठिकाणीं धार्मिक कृत्यें चालतात तें स्थळ. 'जें धर्मालय म्हणिजे। तेथ पांडव आणि माझे।' –ज्ञा १.८६. २ धर्मशाळा. **धर्मावतार**–पु. अतिशय सत्वशील व पवित्र माणूस; प्रत्यक्ष धर्म. [धर्म+अवतार] **धर्मासन**–न. न्यायासन; न्यायाधीश बसण्याची जागा; न्यायदेवतेची जागा. **धर्मित्व**–वि. गुणित्व. 'जे धर्मधर्मित्व कहीं ज्ञानाज्ञाना असे।' –अमृ ७.२८३. **धर्मिष्ट**–वि. धार्मिक; सत्त्वशील, सदाचरणी. **धर्मी**–वि. १ धर्मानें वागणारा; सदाचरण ठेवणारा; न्यायी; सद्वर्तनी. २ ते ते गुणधर्म अंगीं असणारा. (विषय, पदार्थ) ३ धर्मीदाता; उदार; धर्म करणारा **धर्मीदाता**–पु. धर्मकरण्यांत उदार, मोठा दाता (भिक्षेकऱ्यांचा शब्द). **धर्मोडा**–पु. स्त्रियांचें एक व्रत; चैत्र महिन्यांत ब्राह्मणाच्या घरीं धर्मार्थ रोज नियमानें एक घागरभर पाणी देणें. [धर्म+घडा] **धर्मोपदेश**–पु. धर्माची शिकवण; धर्मासंबंधी प्रवचन, उपदेश. **धर्मोपदेशक**–पु. गुरु; धर्माचा उपदेश करणारा. **धर्मोपाध्याय**–पु. धर्माधिकारी. **धर्म्य**–वि. १ धर्मयुक्त; धर्मानें संपादन केलेलें; धर्मानें मिळविलेलें; धर्मदृष्ट्या योग्य. 'उचित देवोद्देशें। द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें।' –ज्ञा १७.३६०. २ (महानु.) वंद्य. 'जें पांता जालीं धर्म्यें। वित्त रागासि।' –ऋ २०. **धर्म्यविवाह**–पु. धर्मशास्त्रोक्त विवाह; सर्व धार्मिक संस्कारांनिशीं झालेला विवाह.

**धर्षण**—न. १ दांडगाई; धिटाई; अरेरावी. २ बलात्कार (स्त्री संभोग); बळजबरीनें उपभोग. [सं.]

**धर्षणें**—उक्रि. जबरी संभोग, बलात्कार करणें; भ्रष्ट करणें. [धर्षण]

**धलपट, धलपा-पी**—ढलपट. ढलपा पहा.

**धव-धवाड**—न. (महानु.) बीळ, भगदाड. 'मुष्यक करितीं धवें।' –भाए ४९१.

**धव**—पु. पति; नवरा; भर्ता. समासांत उपयोग. जसें:–रमाधव, सीताधव; माधव. [सं.]

**धवक**—वि. (गो.) अति आंबट.

**धवकडी**—स्त्री. (व.) १ धाक; रागाचा आविर्भाव. २ धसाडा; धक्का; रट्टा. 'एक धवकडी दिली.'

**धवट**—न. (गो.) प्रेतावर, मढयावर घालण्याचें पांढरें वस्त्र. [सं. धवल]

**धवड**—पु. (कु) धावड. १ घिसाडी; लोहार; एक लोखंड शुद्ध करण्याचा धंदा करणारी जात. २ (ल.) अडदांड मनुष्य, पशु. 'तो धवडू असें आवेशला। तेयांवरी तुम्हीं राअ चाला।' –शिशु ४८९. [सं धू=धुणें; किंवा ध्मा=फुंकणें]

**धवडी**—वि. बेडौल; बेढब. [धवड] **०काम**–न. १ लोहार काम; घिसाड्याचें काम. २ कलाकुसर न लागणारें, घणठोकीचें काम.

**धवताल-ल्या**—वि. खर्चिक; उधळ्या; अव्यवस्थित. धोताल पहा.

**धवधनी**—क्रिवि. अधिक जोमानें.? 'अनंगु धवधनीं। सिंपनें खेळतुसें।' –शिशु ६८१.

**धवधवीत**—क्रिवि. पिंवळा, गोरा व पांढरा या वर्णाचा अतिशय दर्शक शब्द. 'धवधवीत पिंवळा–गोरा–पांढरा'

**धवराळ**—स्त्री. चिता. मोठी आग, डोंबाळा. 'धवराळ जळूं लागली.' –ऐपो १४८.

**धवल-ळ**—वि. पांढरा; शुभ्र; धवा; ढवळा. 'विवेक हंस शुद्ध धवळ। त्यावरी तुझें आसन अचळ।' –रावि १.२९. [सं.] **०धाम**–वि. शुभ्रकांति. 'अथवा धवळधाम गोक्षीर। कर्पूरगौर पंचवक्त्र।' –एभा १३.९५.

**धवला-ळा**—पु. १ एक गाण्याचा प्रकार. ढवळा–ळे पहा. लग्नप्रसंगीं ध(ढ)वळे म्हणण्याची कांहीं जातींत चाल आहे. 'चहूं देहीं धवळा गाइली चित्कळा।' –दावि ३७. महानुभावी धवळे बरेच उपलब्ध आहेत. 'श्रीचक्रधराचे शिरीं धरौनिया श्रीचरणु धवळे गाइजताये।' –धवळे पूर्वार्ध १. २ (गो.) गप्पागोष्टी; चकाट्या. [धवल] **धवलारा**–स्त्री. (आगरी) लग्नसमारंभांत गाणें म्हणणारी स्त्री. –बदलापूर ३५.

**धवलार-ळार**—न. १ चुनेगच्ची घर; हवेली, मोठा वाडा. प्रासाद. 'तरी लोकांचीं धवळारें। देखोनियां मनोहरें।' –ज्ञा ३.२२३. 'तेथें सुरतरूंचीं वनें अपार। कामधेनूचीं बहुत खिल्लारें। चिंतामणीचीं धवलारें। कैलासीं भक्तालागीं दिधलीं।' 'जाळित सुटला धवळारें। थोर थोर राजागारें।' –निमा १.५. 'तों एके दिवशीं अभ्यंग करूनी। उभी राहिली धवलारीं जाऊनी।' –नव २०.१७. –वि. शुभ्रवर्ण; पांढरी शुभ्र. 'ऐसीं नगरमंडीतें देउळें। देखे गोक्षीर धाम धवळारें।' –ऋ १७. [सं. धवल+आगर=गृह]

**धंवशा, धंशा, धंवसा**—स्त्रीपु. १ कीर्ति. धौंशा पहा. 'धंवशा वाजे त्याचा.' –ऐपो १२७. २ एक लावणीचा प्रकार. [सं. धवल+सा प्रत्यय]

**धवसर**—वि. (गो.) पांढरट. [धव=पांढरा+सर]

**धवसाण**—वि. पांढरट, पांढरा शुभ्र.

**धवळ**—वि. (गो) पातळ.

**धवळणें**—उक्रि. १ पांढरा, स्वच्छ करणें. २ प्रकाशित करणें. 'तो कवि ह्या काव्याचा जीं हीं त्रैलोक्य धवळिलें सारें।' –कर्म १.५. 'हरिभजनें हें धवळिलें जग। चुकविला लाग कळिकाळाचा।' –तुगा २१४९. 'चंद्रकिरणीं धवळिलीं आंगें।' –मुवन ६.३३. [धवल]

**धवळणें**—क्रि. (गो.) ढवळणें पहा.

**धवा**—वि. पांढरा; शुभ्र. धवल पहा. **०फल-फूल**—वि. (कु.) पांढरें स्वच्छ (बर्फासारखें).

**धवाळी**—टवाळी पहा. 'करितां धवाळी जन्म गेला ॥' —व्यनि ३८.

**धवेटी**—वि. पांढरीं स्वच्छ वस्त्रें वापरणारा. [सं. धवा]

**धशा-इशा**—वि. १ दांडगा; आडदांड; रानवट (मजूर, नोकर, इ०). २ धसमुसळेपणा करणारा; अडदांडपणें काम करणारा; अकुशल. [धस!] **०खशा- ०फशा**—क्रिवि. निष्काळजीपणानें आणि दांडगाईनें; उद्दामपणें (काम करणें, बोलणें, लिहिणें इ०). [ध्व.] **धशीफशी**—क्रिवि. १ उधळेपणानें, अविचारानें; अव्यवस्थितपणानें (खर्चणें, वापरणें). २ धशाफशा पहा. [ध्व. धस द्वि.]

**धश्चोट**—वि. वाटेल तेथें खाणारापिणारा; वाटेल तसें वागणारा, अव्यवस्थित, आडमुठ्या, आडदांड (माणूस), रानवट, बेशिस्त. धश्चोटगिरीचें वर्णन पुढील विनोदी श्लोकांत आहे. 'सुखाभोज्या, मठानिद्रा, अती विषयलंपटा। दीर्घद्वेषी, (दीर्घवादी), बहुक्रोधी धश्चोटं पंचलक्षणं।' [धस+चोट]

**धष्ट. धष्टपुष्ट**—वि. खावयास प्यावयास भरपूर मिळाल्यामुळें लठ्ठ झालेला; गुबगुबीत; निकोप; सशक्त; धट्टाकट्टा (माणूस, जनावर). 'प्रेमाचें भोजन नित्य करीत। धष्टपुष्ट दिसतसे।' [धष्ट+ पुष्ट किंवा पुष्ट द्वि.]

**धस**—पु. १ खुंटी; टोंक; अग्र; खिळा; कुसळ किंवा दुसरा एखादा पुढें आलेला, अणकुचीदार पदार्थ (ज्यामध्यें अडकून वस्त्र इ० फाटेल असा). 'या खुंपणाचा धस लागून धोतर फाटलें.' २ अविचारी, उद्धट, आडदांड माणूस. 'जया न कळे उपदेश। धस ऐसें त्या नांव।'—तुगा २९१३. ३ दरड; कपारी; उभा उतार (नदी तीर, डोंगराची बाजू इ० प्रमाणें). 'दोन्ही बाजूचा कडा उंच असून त्याचे धस अगदीं उभे तुटलेले.'—विवि ८.१.१९. ४ ज्वारीचें ताट, खुंट, अवशिष्ट मुळखंड; थोंठ; फण. 'नसे पल्लव लंबित धस उभा परि कोण छ्याया।'—दावि १८६. ५ भीति, दुःख इ० हृदयाला जो धक्का बसतो तो. (क्रि० होणें). ६ (व) बीळ; भोंक. 'आजवर केलें तें धसांत गेलें.'—स्त्री. जोराची मुसंडी; हल्ला; चाल (क्रि०मारणें). [ध्व. धस! प्रा. धस] **धशीं-धसास-धसावर-घालणें-लावणें-देणें**—१ साहसी, कठोर उपाय योजून एखादें काम बिघडविणें; युक्ति न लढविणें. २ अपकार करणें; छळणें. **धसास लावणें**—शेवट करणें; कड पाहणें; तडीस नेणें. **धस देणें-मारणें**—धज देणें, मारणें पहा. **धसावर धस घालणें**—अपकारावर अपकार करणें; एकसारखें छळणें. **धसक**—धसकफसक पहा. **धसकट**—न. लहान धस; कुसळ; धस अर्थ ४ पहा. 'रुतले अंगांगीं कांटे धसकट।'—विवि ८.९.२२०. —वि. १ जाडेंभरडें; भसाड. २ (ना) अडाणी; आडदांड. **धसकधट्या, धसकनंदन**—पु. १ दांडगाईनें कोणतेंहि काम करणारा माणूस; आडदांड माणूस; आदळआपट करणारा माणूस. २ अकुशल कामकरी; हेंगाडा, अडाणी कारागीर. **धसकट्या, धसक्या, धसकटराव**—पु. १ दांडगेश्वर; आडदांड; अडाणी (मजूर, कामकरी). २ धश्चोट पहा. धसमुसळ्या; धसफशा. [धसकट, धस] **धसकणें**—उक्रि. १ हिसकणें; जोरानें ओढणें; हासडणें (कांट्याकुट्यावरून वस्त्र इ०). २ जोरानें घालणें; खुपसणें; भोंसकणें; आडदांडपणें शिरकवणें. —अक्रि. अडकणें व फाटणें; आवाज होऊन फाटणें. २ काडदिशीं मोडणें (काटकी, फांदी). ३ दगड इ०. उलथून पडणें. [प्रा. धस; हिं. धसकना] **धसकफसक**—स्त्री. बेदरकार, बेफाम वर्तणूक. धसाफशी पहा. —क्रिवि. घाईघाईनें; निष्काळजीपणानें; उद्धटपणानें (बोलणें; लिहिणें; वाचणें वगैरे). [धसक द्वि.] **धसकमुसळा**—पु. (ना.) आडदांड (मनुष्य); धसमुसळा पहा. **धसका**—पु. १ आकस्मित भीति, दुःख, इ०नें मनाला बसलेला धक्का, चरका. २ तलवारीचा फटकारा; काठीचा तडाखा; हाताचा रट्टा; धबका. ३ हिसका, हिसडा. [धस; धसक प्रा. धसक] **धसकावणी**—स्त्री. तासणी; तोडणी; छाटणी. **धसकाविणें**—उक्रि. १ जोरानें, रागानें खच्ची करणें; तोडणें; ओढणें; सपासप तोडणें; छाटणें; खच्ची करणें. २ अडथळ्यांना न जुमानतां हिसडे देऊन ओढणें; फरपटणें. **धसकावून बोलणें**—भीडभाड न ठेवतां स्पष्ट, निर्भीडपणानें बोलणें. [धस] **धसणें**—अक्रि. १ जोरानें शिरणें; घुसणें; जाणें; एकदम बसणें; भोंक पाडणें. 'शपथ पुरःसर दीप्तज्वलनज्वालांत जाहली धसती।'—मोमंत्रयुद्ध ७४०. २ धजणें पहा. ३ धसाला लावणें. ४ अतिशय मन, लक्ष लावणें (अभ्यास, काम याकडे). —उक्रि. जोरानें (आंत, पुढें, कडे) ठोकणें; घालणें; ठासणें; शिरकवणें; सारणें. [धस; हिं. धसना; गु. धसको] **धसदार, धसाव, धसावणें**—धजदार, धजाव वगैरे पहा. **धसधस**—स्त्री. १ धडधड. (जिवाची-उराची-धसधस). २ (ल.) भीति; धास्ति. 'मला त्या वाटेनें जायाला धसधस वाटते.' [ध्व. धस द्वि.] **धसधसां**—क्रिवि. १ धडधड उडून; जोरजोरानें (उडणें). 'काळीज धसधस करतें, उडतें' 'जीव धसधस करतो, ऊर उडतो.' 'गांवढेकरी उंदराचा ऊर धाकानें धसधसां उडूं लागला.'—छत्रे (इसाबनीति). २ कडाडदिशीं मोडून, फाटून, तुटून, कोसळून, पडून, फुटून, इ०. **धसधसणें**—अक्रि. धसधस होणें; धडधडणें, उडणें. (जीव, काळीज, ऊर, छाती, हृदय). [धस+धस] **धसफस-फूस**—स्त्री. (भांडण सुरू होण्याच्या आधींची) चरफड, आदळआपट; घालून पाडून बोलणीं; कुढें भाषण. [ध्व. धस द्वि.] **धसमस**—(कों.) धामधूम. **धसमुसळा-ळ्या**—वि. १ गेलेल्ल; ढोण्या; ठोंब्या. २ दांडगाईनें निष्काळजीपणें काम करणारा; आडदांड. धसक्या पहा. 'हा धसमुसळ्या दिसतो.'—नाम ८. [धस+

मुसळ] घसरड-स्त्री. (कों.) नदीकांठची, टेकडीवरची उभी उतरण; दरड. [घस=पडण्याचा आवाज+रड प्रत्यय] घसाडा-वि (व.) जाड; खरबरीत (सूत, गवत, कोणताहि पदार्थ). २ दांडगा; घसमुसळ्या (माणूस). -पु १ (ल.) चापटी; थपाटा; रपाटा २ (ना.) रागानें बोलणें; धमकावणें. 'कमळी फार हट्ट करूं लागली पण मी जेव्हां एक घसाडा दिला तेव्हां बसली गप.' ३ बाट्कः खुंट; घस; चोय. ४ हिसका; धक्का. घसाघशी-स्त्री कापाकापी तुकडे तुकडे (करणें); छाटाछाट; एकदम, जोरजोरानें कापणें, तोडणें. [ध्व.] घसाघस-सां-क्रिवि. १ खसाखस, सपासप फटाफट, तडातड (तोडणें, मोडणें, फाडणें; इ०). 'परि तोडिलेचि वर्जीं तृण धरितेंही अगा घसाघस ते।'-मोऐषिक १.४. २ धड-धड होऊन (जीव-काळीज करणें, उडणें). ३ ओक्साबोक्शीं (रडणें). ४ चटकन (निसरणें). [ध्व. घसघसचा अतिशय] घसा फशी-स्त्री. १ हिसकाहिसकी; निष्काळजीपणाचें काम; ओढाताण; आदळआपट. २ भांडणापूर्वीची चरफड; घसफस पहा. ३ कापाकापी; छाटाछाटी (करणें-तासणें) [ध्व. घस द्वि.] घसा-फसा-क्रिवि. घशाफशा पहा. घसाल-ली-ल्या-वि. घसक धत्या पहा. घसासा-पु. घसघस; छातीचा ठोका. 'पडति बहुत तेव्हां रुक्मियाचे घसासे।'-सारुह ७.४ [घस द्वि.] घसाळ-पु. १ विसराळू. घसाळ जाणें-विसरून जाणें. 'परि बोलत बोलत प्रेमभावें। घसाळ गेलों।'-ज्ञा ११.१६१. २ दांडगा; आडदांड; घसाल; घसकनंदन. ३ अविचारी; वेडा. 'केवी घसाळ म्हणो देवा तूतें। तरी अधिक हा बोलु।'-ज्ञा१०.३२०. ४ मोठा; प्रचंड. 'नामें एवढें घसाळ देणें।'-एभा ६.६. [घस+आळ प्रत्यय. (तुल० प्रा. दे. घसल=विस्तीर्ण] घसी-वि उतावीळ. घशा पहा. घस्स-न. भीति, दुःख यांचा हृदयास, मनाला बसलेला धक्का; आघात, धडकी. धक्का पहा. [ध्व. घस] घस्समस्सळ-वि. घसमुसळा पहा.

घसमगज-पु. पीठ, मसाला इ० घालून केलेलें लाडू वळण्यासाठीं सारण. [घस+मगज]

धा-वि. १०; दहा. 'ता धा वीस रुपये कसेव कमावशी.' -मसाप २.४.११०. [सं. दश] धा जण-वि. १ दहाजण. २ (ल.) सर्वेजण; पुष्कळ माणसें. धा जणांचें घर-(मुलेंबाळें, बायका पुरुष वगैरे) पुष्कळ माणसें असलेलें कुटुंब; मोठें कुटुंब. 'मुलगी धा जणांच्या घरांत द्यावी; धा जणांच्या घरांत आणखी एखादा सहज खपेल.' म्ह० (गो.) धा जणाचो मासो जागक्या जागीं कुसप=अनेक माणसांच्या मालकीचा जिन्नस सर्वांच्याच चालढकलींत नाश पावतो.

धा-अ. संख्यावाचक विशेषणास वेळ, प्रकार, प्रसंग अशा अर्थी लावितात. जसें. एकधा, द्विधा, त्रिधा, चतुर्धा, इ० [सं.]

धाइणें-अक्रि. १ तृप्त होणें; संतुष्ट होणें. धाणें पहा. 'अगा देवढी वाढी लाहिजे। तेथ मोल देता न धाईजे।' -ज्ञा १८. ५९९. [सं. प्रे-घ्रात; प्रा. धाय=तृप्त]

धाइणें-अक्रि. राहाणें; धरणें; ठरणें. 'काय परीक्षा बघूं असली ज्वानी नवी तरणी। इथे प्राण धाइना हवी मग मद्दिन्याची वरणी।' -प्रला १००. [सं. धा]

धाऊ-पुस्त्री. एक प्रकारचा तांबडा दगड; गेरू; धाव पहा. [सं. धातु; प्रा. धाउ=गेरू इ०]

धाऊ-पु. (कों.) तास पक्षी.

धाऊंधाऊं-क्रिवि. (व.) (धांवून धांवून) वारंवार;पुन्हां पुन्हां. [धावणें]

धाऊस-स्त्री. एक फुलाचें झुडप.

धाए-स्त्री. दाई; धात्री. 'प्रकृती धाए सूदली।' -शिशु ९१. [सं. धात्री; प्रा. धाई]

धाक-पु. भय; धास्ती; दहशत, जरब; वचक; दरारा. (क्रि० बाळगणें; धरणें; राखणें). 'तैसा कौरवां अशेखां। धाकु तुझा।' -ज्ञा २.२१५. (वाप्र) धाक दाखविणें-भीति, दहशत घालणें; दरारा ठेवणें. ०फिटणें, ०उडणें-भीति जाणें; दरारा न वाटणें. 'तेंवीं त्याचा समूळ धाक। फिटून गेला तत्काळ।' -नव २४. १४९. 'चालला शिंदा दखनचा धाक उडाला।' -ऐपो ४३३. धाक लावणें-भीति वाटेल असें करणें, वागणें; धाक दपटशा दाखविणें; जरबेंत ठेवणें. 'तूं असतां मत्पक्षीं लाविन मी धाक लोकपाळाला।' -मोभीष्म ११.१९. [हिं.] ०दरारा-पु. दहशत; वचक; जरब; भीति आणि धास्ती. (क्रि० पडणें; असणें; बसणें; बाळगणें; धरणें;राखणें). धाक ना धोका-कांहीं भीति, आदर नसणें; मुळींच धास्ती न वाटणें. पूर्ण निर्भीड, निर्भय, बेडर वृत्ति. ०धुकी, ०धूक-स्त्री. धाकडधुकड पहा.

धाकटा-ला-वि. (वयानें, उंचीनें, अधिकारानें योग्यतेनें) लहान, कमी. 'उद्यां धाकल्या भाऊसाहेबांचा वाढदिवस हाय.' -इंप ८. धाकटा-(याचा अधवा, मधवा या शब्दांबरोबर उपयोग करण्याच्या वेळीं) शेवटचा; सर्वात लहान; कमी प्रतीचा. धाकटपण-णा-नपु. धाकटपणा, धाकुटपणा १ लहानपणा. २ हलकेपणा; अपमान.' आपलेंचि आपणु। कांहि सांधी धाकटपणु।' -शिशु १४५. ०कुंवर-पु (शेतकरी) पुष्य नक्षत्र, अष्टम नक्षत्र. याच्या आधींचें जें पुनर्वसु नक्षत्र त्याला 'म्हातारा कुंवर' म्हणतात. ०मालेंबर-न. एक प्रकारचें झाड. याची उंची एक वीतपासून एक हातपर्यंत असून पान एक बोट रुंद व तीन चार बोटें लांब असतें. ०वाडा-पु. धाकटी धनीण, राणी (शाहू छत्रपतीची धाकटी राणी सगुणाबाई हीस म्हणत). -शारो. धाकटे सरकार-पु. १ धन्याचा मुलगा, वारस. २ युवराज; राजाचा

थोरला मुलगा. 'आपण ज.ऊन धाकट्या सरकारास भेटावें.' -रत्न ३.२.

**धाकटें**—न. (कु; राजा) मूल.

**धाकड**—वि. १ खरबरीत, जाड, मजबूत (कापड). २ आडदांड; ठोकळा; जाडजूड; बळकट; धीट (मनुष्य). 'मारोनि बनकर्म धाकड। आणिलें पाज.तकाचें झाड।' -शिशु ४५१. ३ धैर्यवान् धीट. 'महाप्रळयो जेथें। धाकडांसी।' -ज्ञा १.१३१. [सं द्राविड] ॰धुकड-क्रिवि. धडधडत; उडत (छाती); धागधूक: मोटमूट पहा. ॰धाकड-वि. जाडेंभरडें (कापड) भरभक्कम, जाडजूड (माणूस). धाकड पहा.

**धांकण-णें**—न. (गो) झांकण; ढाकण पहा.

**धाकणें**—अक्रि. १ भीति पावणें; घाबरणें; वचकणें; गडबडणें; भयचकित होणें. 'कीचक बळाच्या सामर्थ्यें। राजे धाकती सभोंवतें।' -मुविराट ४.१०. २ दिपणें; दबणें. 'सवाई तेजा पुढें धाकलें।' -ऐपो २५०. ३ (व.) हेवा करणें. माझ्या भाग्याला धाकतो.' [धाक]

**धाकधुकी, धाकधूक, धागधुगी धागधूग**—स्त्री. १ धुगधुगी पहा. २ छाती धडधडणें, उडणें. ३ भीति; काळजी.

**धाकॉ**—पु (गो.) दहिल्या; दहा अंकाचा पत्ता. [धा]

**धाका-की-कू**—वि. (कुण.) लडिवाळपणाचें नांव. [सं. धाक=बैल, आधारखांब]

**धाकाबुकी**—स्त्री. धक्काबुकी पहा.

**धाकिनणें**—अक्रि. धाकणें पहा. 'मी धाकिनलां मनामाजी।' -भाए ६२.

**धाकुटपण, धाकुटपणा**—नपु. लहानपणा; धाकटपणा पहा.

**धाकुटा-ला**—वि. १ धाकटा, धाकला पहा. 'स्त्री केली परी धाकुटी। धीर न धरवे पोटीं।' -दा ३.३.१४. 'हे असो वडील धाकुले। आदिकरूनि।' -ज्ञा १.१८३. २ सेवक; दास-दासी; नोकर चाकर. 'तंव तो लक्ष्मीकांतु। धाकुटियासी बोल करितु।' -शिशु १७६.

**धाकू**—स्त्री. (गो.) द्राक्षविशेष.

**धाकूडपणीं, धाकटेलपणीं**—वि. (गो) (पहिली बायको जिवंत असुन) बिजवराशीं केलेला (विवाह) [धाकटेपण]

**धाकुटा**—वि. धाकट; दणकट; अकाळविकाळ. 'रावणासारीखें धाकुटें।' -उषा ८.७३. [धाकड]

**धाकूट**—धाकुटा-ला पहा. 'तियें चिरोटें धाकूट।' -मसाप २.२३.

**धाँग**—न. (गो.) आघातामुळें मस्तकावर उठलेलें टेंगूळ. [डांग]

**धांगड-डी**—स्त्री. उद्धट, आंडदांड, मुलगी, स्त्री; खोडकर घोडी. (व.) कजाग व पुरुषी वळणाची स्त्री. 'सोडी वेगीं माझी दाढी। जाय वेगीं धारा काढीं। बहु माजलीसी धांगडी। ओढाओढी करितेसी।' -ह ७.७३. २ गैरशिस्त वर्तनाची स्त्री. 'परी धर्मपत्नी धांगडी। पोसितां जरी एकी वोढी। तरी कां अपरवडी। आणावी आंगा।' -ज्ञा १८.९४२. [दंगा]

**धांगड**—न छत्रीवर घालण्यासाठीं केलेली (केतकी इ०) पानांची पत्रावळ. छत्रीचीं पानें.

**धांगड**—वि. १ जाडेंभरडें, खरबरीत (कापड, सूत, इ०). २ दांडगा, अकुशल; धसमुसळा (माणूस, काम) ३ धिप्पाड; मोठाड; जाडजूड; बळकट (माणूस, जनावर). ४ अगडबंब, गैरवाजवी मोठा (पदार्थ). ॰धिंगड-वि. ओबडधोबड; अडाणी; बेडौल (काम). ॰धिंगा-पु १ ज्यास ताळतंत्र नाहीं असें वर्तन; दाडगाई; गोंधळ; चाळे: धिंगामस्ती 'धिंगाबाई धिंगा गे। अवघा धांगडधिंगा गे।' -एकनाथ. २ धांगड मुलगी; आडदांड, धसकट्या पोर.' धीट धांगड्या धांगडधिंगा।' -अमृत २४. **धांगडणें**-उक्रि. धिंगडणें; नाचणें; उड्या मारणें; खिदळणें; बागडणें इ०. धांगड धिंगा घालणें. **धांगडा, धांगडो, धांगला**-पु. दाडगाई; गोंधळ; दंगा; आरडाओरड. (क्रि० करणें; वाजणें; लावणें; मांडणें; उठवणें).

**धागधुगी, धागधूग**—स्त्री. धाकडधुकड पहा.

**धागा**—पु. १ दोरा: सूत: दोरी: सूत्र २ नातें, संबंध, सोयरीक धागादोरा. ३ हरवलेल्या वस्तूचा तपास लावण्याचें साधन. माग; खाणाखुणा. 'सोडली पुण्याची जागा तोडिल्या धागा भडकल्या पागा कालवा झाला।'-ऐपो ४३३. [हिं धागा; सिं. धागो] **कच्च्या धाग्याची रयत**=अतिशय आज्ञाधारक व गरीब रयत. **कच्च्या धाग्यांत असणें-वागणें**-दास होणें; अतिशय आज्ञाधारक, गरीब असणें. **कच्च्या धाग्यानें बांधणें**-अगदीं आज्ञेंत, कह्यांत ठेवणें. **धाग्यावरून ताग्याची परीक्षा**-शितावरून भाताची परीक्षा याप्रमाणें. ॰दोरा-पु. १ संबंध (नात्याचा, स्नेहाचा, सारखेपणाचा). (क्रि० असणें). २ पत्ता; ठावठिकाण. (क्रि० लागणें).

**धांगोडा**—पु. लोकांत (बदकर्माचा) बोभाटा होणें; छीःथूः होणें.

**धागोस**—क्रिवि. (गो) गडगंज; भरपूर; मुबलक.

**धाट**—न. (कु) अगदीं अडाणी, रानवट लोकांचा गांव; रानटी गांव.

**धाट**—स्त्री. हल्ला; धाड. 'बळेंचि निघात करी परघात कुटील चि धाट जनावरि घाले।' -दावि ४३२. [सं. धाटी]

**धाटण, धाटणी, धाटी**—स्त्री. १ तऱ्हा; पद्धत: रीत: चाल; धरती; 'सोंगाची बतावणी बेमालूम करण्याची धाटणी साधली

पाहिजे.' –विवि ८.८.१५५. 'याची पुराण सांगण्याची धाटणी दुसऱ्यास साधत नाहीं.' [सं. धाटी]

**धाटा**—पु. १ वीतभर रुंदीचा आणि चार पांच हात लांबीचा पट्टा. डोकें व कान यांस बांधण्यासाठीं, टोपी–पागोटें यांवरून लपेटण्यासाठीं वापरतात. (क्रि० घेणें; बांधणें); पंचा. २ प्रसुतीनंतर कंबर, पोट बांधण्यासाठीं बायका वापरतात तो पट्टा. [धट]

**धाटा**—वि. १ धट्टाकट्टा; मजबूत 'मी धाटा मोठा विचक्षण।' –एभा २३.७६०. २ खंदा; प्रवीण 'जरी पोंहणार मोठा धाटा।' –यथादी १८.२२६४. [सं. धृष्ट; म. धट्ट] ०**मोटा**–वि. १ लठ्ठ; मजबूत; धट्टाकट्टा. 'परघातकी धाटामोटा। वाटा पाडी।' –दा १९.३.९. २ आजारांतून उठून पूर्वीप्रमाणें सशक्त झालेला. ३ ओबडधोबड; खरखरीत; (वस्त्र; अन्न; पदार्थ).

**धाटा**—पु. कडब्याचें ताट. –शे. शेतकरी ३.३.

**धाटी**—स्त्री. (व.) पट्टा. धाटा अर्थ १ पहा.

**धाटी**—स्त्री. १ मार्ग; प्रकार; पद्धत; धाटणी; वर्तावयाची रीत; ठेवण. 'धाटी कथा निरूपणाची।' –दा २०.४.१७. २ एक चाल; छंद; वृत्त. 'कवि कवित्वाचा प्रबंध। कवि नाना धाटी मुद्रा छंद।' –दा १.७.१७. अश्वधाटी पहा. ३ फांस; पाश. 'मगसंयमाची धाटी। सूनि मुरडिलीं उफराटीं।' –ज्ञा १२.४७. [सं.]

**धाटी**—स्त्री. हल्ला; धाड पहा. [सं.]

**धाटी**—वि. धीट; उद्धट; धट पहा. 'कांइसे धाटे राऊळ काढिलें। कांहीं जाणसि ना।' –शिशु १८०.

**धाड**—स्त्री. १ चाल; हल्ला; परचक्र; दरवडा; घाला; एकदम येणारा, पसरणारा, नाश करणारा. हल्ला संकट (उदा० शत्रूचा हल्ला, चोरांचा दरोडा, टोळ, अग्नि यांपासून नाश). (क्रि० घालणें; मारणें; पडणें; बसणें). 'तुम्हावरी येत आहे धाडी।' –नव २५.१०. 'अग्नीची धाड त्याचे घरावर पडून सर्वस्व जळलें.' 'या गांवावर नुकतीच टोळांची धाड आली होती' २ परके लोक, पाहुणे. मुलें, भिकारी इ०चें टोळकें, जमाव. यांचें एकदम येणें. ३ रोग; आपत्ति; विकार (क्रि० होणें; भरणें; पडणें). 'त्याला येथें येण्यास काय धाड भरली आहे?' ४ त्रासदायक, हट्टी मुलालाहि लावतात. [सं. धाटी; प्रा. धाडी] ०**पडणें**–(उगीच अडचणी सांगणाऱ्या बद्दल वापरतात). संकटांत असणें; आपत्ति ओढवणें. 'तुला काय धाड पडली आहे एवढें ओझें उचलावयास.' ०**बडवणें**–धाड भरणें. 'काय धाड बडवली आहे त्याला?' –माटे–अस्पृश्यडायरी पानें. ०**घोडा**–पु. १ सुंदर व मोठा पाणीदार घोडा (गरीबास हा बक्षीस दिला असतां त्याच्यावर एक धाडच पडल्यासारखें होतें यावरून). २ आडदांड व लठ्ठभारती पोरगा; ढमाली, रानवट स्त्री. **म्ह०** धाड पडावी पण चीत पडूं नये=आपणावर टोळधाड इ० घाले आले तरी हरकत नाहीं पण चित्रा नक्षत्राचा पाऊस मात्र पडूं नये (कारण हा पाऊस नव्या पिकाला मारक आहे).

**धाड**—स्त्री. (गो.) वाघाची वाट, माग.

**धाड**—स्त्री. मागावरील हत्या, (ज्यांत फणी बसविलेली असते ती चौकट). वस्त्र अडकविण्याचें साधन.

**धाडकन–कर–दिशीं**—क्रिवि. धाड असा आवाज करून (धोंडा इ० पडणें; मनुष्य जमीनीवर आदळणें; तोफ उडणें; कांहीं वाजणें). [ध्व.]

**धाडणें**—उक्रि. १ पाठविणें; पाठवून देणें; रवाना करणें; (माणूस, कागद, निरोप इ०). २ गमावणें; घालवणें. 'पूर्वजांचें जोडलें। आपणचि होय धाडिलें। जरी आजि शस्त्र सांडिलें। रणीं इये।' –ज्ञा २.१९७. ३ वजा करणें. 'कां धाडलिया एका एकु। वाढे तो शून्य विशेखु।' –ज्ञा १८.१२१२. [सं. ध्राड्; प्रा. धाड=बाहेर पाठविणें]

**धाडधाड**—क्रिवि. १ घण मारण्याच्या आवाजासारखा; विहिरी, घरें, इमारती, कोसळून पडलीं असतांना होणाऱ्या-आवाजासारखा. २ सपाट्यानें, पटापट (रोगानें पटापट माणसें मरणें). ३ जोरानें (उर, काळीज धडधडणें). [ध्व. धाड द्वि.]

**धाड धोपट**—स्त्री. धोडधोपट पहा.

**धांडय**—स्त्री. (गो.) एक प्रकारची गोडया पाण्यांतली मासळी.

**धाडवा**—पु. (ना.) धडाका; घाई; सतत त्रास. 'तिला विटाळाचा भारी धाडवा; इतर बाया महिन्यानें बसतात तर ही महिन्यांतून दोनदां.' [धडका पहा]

**धाडस**—न. धारिष्ट; हिय्या; निर्भयतेनें पुढें जाणें. [धाड]

**धाडस, धाडसी–शी**—वि. धीट; हिंमतवान; साहसी जोखमीचें काम अंगावर घेणारा.

**धांडळ–धांडाळ**—वि. जाड, उंच, निबर (कडब्याचें, जोंधळ्याचें ताट). २ (ल.) उंच सडपातळ; किडकिडीत माणूस. [दंड–दांडा–धांडा]

**धांडळणें, धांडुळणें, धांडोळणें**—उक्रि. (हरवलेला पदार्थ) शोधणें; हुडकणें; धुंडाळणें; नीट लक्षपूर्वक पाहणें (वस्तु, वस्तूसाठीं घर, पेटी इ०). धुंडाळणें पहा. 'घर धांडुळलें, गांव, धांडुळला, दागिना धांडुळला, धांडुळली, इ०.' [प्रा. ढंढोल्ल]

**धांडा**—पु. १ (व. खा.) ज्वारीचें, कडब्याचें ताट; धाट. २ बैल; सांड; खोंड. 'धांडा घेऊन वावरांत जा.' [सं. दंड; म. दांड, दांडा]

**धांडाळी**—स्त्री. हगवण. ढेंढाळी पहा.

**धाडी**—स्त्री. हल्ला; धाड पहा. 'हे विवशी धाडी नेऊन टाकिजे।' 'हे प्रपंचाची धाडी। अभंग हे।' –ज्ञा १३.९९२ [सं. धाटी; प्रा. धाडी]

**धार्डी**—स्त्री. (व.) घसा; घाटी.

**धाडी**—स्त्री. (मावळ.) बांबूच्या कामटयांचें गवत भरून केलेलें झडप; तट्टी; छपरी.

**धाडी**—पु. १ शिक्षकाजवळ गायन न शिकलेला गवई. अताई पहा. २ मुसलमानांचा एक वर्ग किंवा त्यांतील एक इसम. हे लोक राजे, सरदार इ० लोकांच्या नोकरींत असून स्वारी बाहेर निघाली असतां यजमानाच्या स्तुतीचीं गाणीं म्हणत पुढें चाललेले असतात; (सामा.) भाट, गवई; गवयांचा ताफा. 'नृत्यांगना त्या नाचती। धाडी नटवे गायन करिती।' –जै ८४.८' 'धाडी गवई गाणार तमाशा नाच कचेरीला।' –गापो ७८.

**धाडी**—स्त्री. आपल्या भावाची किंवा नवऱ्याच्या भावाची (दिराची) मुलगी; पुतणी; ध्वाडी. 'धाडया भाच्या आणिल्या सर्व साल्या।' –सारुह ६.१५.

**धाडीज, धाडील**—न. धारिष्ट; हिंमत; धाडस पहा.

**धांडुळणें**—उक्रि. धांडोळणें. धांडळणें पहा.

**धांडोडा, धांडोरा, धांडार, धांडोळा**—पुनपु. डांगोरा; दवंडी. 'अशी ताकीद करून धांडोरा पिटवून काढून दिलें.' –भाब ३६. [सं. दिंडीरव]

**धांडोळणें**—उक्रि. शोधणें; हुडकणें; तपास करणें. धुंडाळणें पहा. 'मोळिकारां धांडोळितां रानें। जेवि मोळिए जोडलें बावनें।' –ऋ १०. **धांडोळणी, धांडोळा**—स्त्री. शोध; तपास. 'आतां करा धांडोळणी। उखेमंदिरीं।' –कथा १.७.९. 'घेती डोहामाजीं धांडोळा। एक बडविती वक्षस्थळा।' –ह १३.१४९.

**धांड्या**—वि. (व.) मोठा (पूर) हें विशेषण फक्त पुरासच लावतात. [सं. दंड]

**धाण**—न. १ मोठें जळाऊ लांकूड. २ तांदूळ धुवून निघालेलें पाणी. धुवण.

**धाणक**—स्त्रीपु. एक डोंबारी जात व तींतील व्यक्ति. 'इनाम दिले कोल्हाटणी खेळ करणारासी। दोन हजार धाणके गरिबासी।' –गापो २५.

**धाणस**—न. (गो.) फणसाचे गेर वांटून केलेली गूळ मिश्रित भाकरी.

**धाणें**—न. (गो.) वल्हें अडकविण्याची खुंटी. [सं. धा–धान]

**धाणें**—अक्रि. संतुष्ट, तृप्त होणें; पाहिजे तें मनमुराद मिळाल्यामुळें समाधान होणें; (काव्यांत योजितात, भूतकाळीं योजतात). 'ऐसे शेषामृतें धाले। कीं अमर्त्यभावा आले।' –ज्ञा ४.१५३. 'पोट धालें मग वेतसे ढेंकर। भक्तीचें तें फार तुळसी दळ।' –तुगा २६. धाइणें पहा. [सं. ध्रात; प्रा. धाय]

**धात**—स्त्री. १ (पुरुषाचें) वीर्य; रेत. २ धातु; मूळ. 'गुंड वेष्टण ऐसें धात। हें व्याकरण जाणावें संस्कृत।' –राजवाडे (ग्रंथमाला शके १८२७) ४. [सं. धातु] ०फुटणें–१ वयांत येणें. २ कांहीं रोगामुळें मूत्रनिसर्गादिप्रसंगीं रेत स्खलन होणें.

**धात**—स्त्री. नाचाचा प्रकार. 'कुकुथारी कुकूथारी कु धिलांग उलटी धात।' –दावि ३७.

**धात**—स्त्री. १ कल्पित गोष्ट. २ युक्ती; खुबी; बेत. 'प्रवीण सर्वांहुनि हा विधाता। कदापि याच्या न कळेत धाता।' –सारुह २.३८. [सं. धा=ठेवणें]

**धांत, धांतळी**—स्त्री. (कों.) वस्त्राची लांबलचक चिंधी.

**धातकी**—स्त्री. एक वनस्पति; धायटी; इजपासून डिंक निघतो व फुलांपासून रंग तयार करितात. फुलें औषधींत्त्या स्तंभक आहेत –ज्ञाको ध. ४५. 'मेथिका, धातकी, काली, उपलसरी, बीजपूरक यांचा पिंड तेजाची वृद्धि करणारा होय.' –अश्वप २.८.

**धातफळ**—न. दृष्टांत; मासला. 'असो ऐका हो वचन येकादें। धातफळ दाविल्या परीनें।' –दावि २७१. [सं. धा]

**धातमात**—स्त्री. १ युक्तिप्रयुक्ति; तर्क; अनुभव. 'प्रकृतीची धातमात न चले पैं तेथें।' –दावि १७५. २ मंत्रतंत्र धंतरमंतर. 'मनीं कामना चेटकें धातमाता।' –राम १८०. ३ कल्पित व चत्कारिक गोष्ट. 'वरकड होसी तूं कैं ज्ञानें। धातमात कवित्व बोधणें।' –ब ३९१. 'प्रसंगीं बोलाव्या अनेक धातमाता।' –दा ४.२.१०. [धात=धातु+मात=गोष्ट]

**धाता**—पु. १ ब्रह्मदेव; सृष्टी उत्पन्न करणारा. 'जगत्कर्ता धाता सहज उपजे नाभिकमळीं।' –सारुह १.५८. २ पिता; पालन, पोषण करणारा. 'माता धाता ऋक्षराजाचि त्यातें।' –मुराकिष्किंधा १८. ३ मालक; बाळगणारा (वस्तु इ० कांचा). ४ साठ संवत्सरांतील दहावें संवत्सर ५ (ज्यो) ध्रुवमत्स्यापैकीं एक तारा. [सं. धातृ]

**धातु**—पुस्त्री. १ पुरुषाचें रेत; वीर्य; धात. २ सोनें, रुपें, तांबें; लोखंड इ० जास्त विशिष्ट गुरुत्वयुक्त, अपारदर्शक व एक प्रकारच्या चकाकीनें युक्त अशा खनिज पदार्थांपैकीं प्रत्येक. ३ पैसा; द्रव्य; धन. 'कोणी धातूचा न करिती स्पर्श।' –दावि ४०१. 'तेव्हां कळेल कीं अमके महाल अमके धातु।' –ऐपो २५३. ४ शरीरांतील कफ, वात, पित्त या तत्त्वांपैकीं प्रत्येक. ५ शरीरांतील रक्त, मज्जा, वसा, मांस, अस्थि मेद व रेत या सात घटकांपैकीं प्रत्येक. 'धातूंचे समुद्र उलंडी। मेदाचे पर्वत फोडी। आंतली मज्जा काढी अस्थिगत जे।' –स्वानुदिन ९.४.७५. ६ पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश इ० पंचमहाभूतांपैकीं प्रत्येक. ७ पंचमहाभूतांच्या

स्पर्श, रूप, रस, गंध व तेज या गुणधर्मांपैकीं प्रत्येक. ८ मनशीळ, काव, पारा, गंधक, अभ्रक इ० सारखा पदार्थ. ९ (महातु) गेरू. काव. 'एकें धातुचिआं उटी घेतें।' -दाव ७७ १० (तत्त्व.) अहंकार. 'या अहंकारासच तैजस, अभिमान, भूतादि, धातु अशीं दुसरीं नांवें आहेत.' -गीर १७२. ११ (संगीत.) चिजेचे निरनिराळे भाग. अवयव ५ अर्थी पहा. [सं] (वाप्र.) ०फुटणें- १ कांहीं रोगामुळें मूत्रविसर्जनादि प्रसंगीं आपोआप गळण्याइतकें वीर्य पातळ होणें. २ वयांत येणें. सामाशब्द- ०कर्मविद्या-स्त्री. धातूंचें शोधन करण्याची विद्या; शास्त्र: (इं) मेटॅलर्जी [धातु+कर्म+विद्या] ०काम-न. धातू ओतून अगर हातोड्यानें ठोकून त्याच्या निरनिराळ्या सुंदर वस्तू बनविण्याचें कारागिरीचें काम. [धातु+काम] ०क्रिया-स्त्री. किमया 'हातींचा परीस टाकोनियां। साधूं जावें धातुक्रिया। सगुण मूर्ति सांडोनियां। निर्गुण वायां कां कथिसी।' -ह २१.२२० [धातु+क्रिया] ०जन्यपदार्थ-पु. (रसा.) धातूपासून बनलेला संमिश्र रासायनिक पदार्थ; (इं.) मेटॅलिक् कॉम्पाउंड. -सेपू २ १०० [धातु+सं. जन्य=उत्पन्न होणारा+पदार्थ] ०पात-पु. वीर्यस्खलन: रेत गळणें. [सं धातु+सं. पात=पडणें] ०पुष्ट०पोषण-वि. धातु पुष्ट करणारें, बलवर्धक, पौष्टिक (खाद्य, औषध). [धातु+सं पुष्ट=वाढलेलें; सं. पोषण=वाढणें, पोसणें] ०पोषण-न. १ (शरीरांतील) सप्त धातूंचें पोषण, वर्धन; बलवर्धन. २ (ल.) खुशामत; तोंडपुजेपणा; टाळाटाळ, बकवा, गोड गोड भाषण इ० करून खोटा उत्साह उत्पन्न करणें, धीर देणें. 'लोभ भय दम्भ मानार्थ। धातुपोषण बोलती बहुत।' -मुसभा ५.१२४. 'धातुपोषणार्थ समाधान केलें.' -जोरा १७. -वि. बलवर्धक; पौष्टिक. [सं. धातु+पोषण] ०पोषणाचें बोलणें-पोषणाच्या गोष्टी, ०पोषण-बोलणें-गोष्ट-भाषण-थापेबाजी; खुशामत, आर्जव इ० युक्त बोलणें; गुळखोबरें; गुळमुळथापडी. ०मय-वि. सोनें, चांदी, तांबें इ० सारख्या धातूंचें बनविलेलें. [धातु+सं. मय प्रत्यय] ०माक्षिक-न. लोखंड व गंधक यांच्या संयोगापासुन बनलेलें एक खनिज द्रव्य. [धातु+माक्षिक] ०मेह-पु. १ मूत्रावाटे धातु, वीर्य गळण्याचा मूत्ररोग. २ वीर्यमिश्रित मूत्र. [सं. धातु=वीर्य+सं. मेह=मूत्र, मूत्ररोग] ०योग-पु रसायन. 'येक औषधी प्रयोग। येक देती धातुयोग।' -दावि ६४. [धातु+सं. योग=जुळणें, जोडणें] ०राशी-पु. अस्थि, रक्त, मांस वगैरे सप्त धातूंचा समुदाय; (ल.) शरीर; देह. 'अथवा एकांतरा कृच्छ्री। चाद्रायणें मासोपवासीं। शोषोनि गा धातुराशी। करिती तपें।' -ज्ञा १७.३६४. [सं. धातु+राशी=समुदाय] ०रूप-वि. (रसा) ज्यांस धातूचें स्वरूप आहे (असें मूल द्रव्य). 'सोयीकरितां एकाकी पदार्थाचे धातूरूप व अधातुरूप असे दोन वर्ग करितात.' -रसापू ६. [सं. धातु+रूप] ०वाद, धातुर्वाद-पु. १ किमया; सुवर्णविद्या: सोनें करण्याची विद्या 'नातरी जें धातुवादाही न जोडे। तें लोहींचि पंधरें सांपडे।' -ज्ञा ६.३४. 'अतर्क्य नेत्रांतरें नेणें। कां धातूवादें सर्वस्व घेणें।' -एभा २३.२०७. २ अशोधित धातु शुद्ध करणें. -ज्ञाको क १५३. ३ रसायनशास्त्र. [धातु+वाद] ०वादी, धातुर्वादी-वि. १ किमया करणारा. 'जो सोधोनि भवपारदु। अनादि रससिध्दु। तो लाधला शब्दवेधु। जेणें धातुवादिये।' -अमृ ५. 'टिपरें धातुर्वादी खोटे।' -दावि ४७४. २ रसायनशास्त्रज्ञ; खनिजपदार्थांचें, रसायनांचें ज्ञान असणारा. [धातुवाद] ०विकार-क्षय-पु. धातुक्षीणतेचा, क्षयरोगाचा एक प्रकार. [सं. धातु+सं. विकार=रोग; क्षय=क्षीण होणें] ०विद्या-स्त्री. (रसा.) अशुद्ध धातूपासून शुद्ध धातु काढण्याची विद्या. [धातु+विद्या] ०शलाका-स्त्री. धातूची सळई, कांब. [म. धातु+सं. शलाका=सळई] ०साम्य-न. कफवातादि शरीरांतील धातूंची समता, योग्य स्थिति. 'जागणें जरी जाहलें तरी व्हावें ते मितलें। इतुकेनि धातुसाम्य संचलें। असेल सुखें।' -ज्ञा ६ ३५१. [सं. धातु+सं साम्य=सारखेपणा] ०स्खलन-न. रेतस्खलन; वीर्यपात. [सं. धातु+सं. स्खलन=गळणें] ०स्तंभक-वि. वीर्याचें स्तंभन करणारें (औषध इ०). [सं. धातु+सं. स्तंभक=थांबविणारें] ०स्पर्श-पु तांबें, पितळ, सोनें, रुपें इ० धातूंचा स्पर्श. (ल) (अकरणरूपीं प्रयोग केल्यास) १ अठरा विश्वे दारिद्र्य. 'याच्या घरांत धातुस्पर्श नाहीं.' २ (अकरणरूपीं प्रयोगांत) दागदागिने मुळींच नसणें. 'त्या बायकोच्या अंगास धातुस्पर्श म्हटला तर नाहींच.' [धातु+स्पर्श] ०क्षय-पु. धातुविकार पहा.

**धातु**—पु १ क्रियापदाचें मूळरूप; ज्याला प्रत्यय लावून क्रियापद बनवितां येतें तो शब्द. जसें:-कृ, वद्, करणें; बोलणें, चालणें इ० २ शब्दाचें मूळ; ज्याचे पुढें पृथक्करण करतां येत नाहीं असा शब्दांतील मूळ अवयव. इं. रॅडिकल, रूट. 'कितात्र शब्दांत कृ त् ब् हा धातु.' [सं.] ०नाम-न. क्रियावाचक नाम [धातु+नाम] ०पाठ-पु. धातूंची यादी, कोष्टक. [धातु+पाठ] ०रूप-न. धातूपासुन बनलेलें रूप; क्रियापदाचें रूप. जसें:-जातो, गेला, करतो, निजतो इ० [धातु+रूप] ०साधित-न. धातूवरून साधलेला, बनलेला (शब्द इ०). उदा. कृत, कृत्वा. यांत नाम, विशेषण व अव्यय असे भेद आहेत; कृदन्त पहा. [धातु+सं. साधित=बनविलेला, साधलेला]

**धातुर्वास**—पु. (व.) मनांत नसतांहि, होत नसतांहि, परिस्थितीमुळें एखादी गोष्ट करणें भाग पडणें.

**धात्रा**—पु. ब्रह्मदेव; धाता 'तयां ते जिणै जरसु तु। तरी तूं असती पांतु। हा ठा ॐ वेन्हीं विपरितु। असा धात्रा जोडला।' -शिशु ७४०. [सं. धातृ]

**धात्री**—स्त्री. १ दाई; लहान मुलास पाजण्याकरितां ठेवलेली बाई. 'राधा धात्रीच गमे कर्णाच्या न जननी शरीरा या ।'–मोकर्ण २२.३६. २ जन्मभूमि; पृथ्वी; धरित्री. 'थरकत वरि नौका भंगली तेवि धात्री ।'–मुराबाल ९६. 'तूं ब्रह्मकटाह धात्री । हें कळलें फुडें ।'–ज्ञा १०.१५२. ४ आंवळी; आवळ्याचें झाड. 'नारद म्हणे पृथुरायातें । धात्रीमहिमा सांगतो तूतें ।' –मक ५ १५०. ५ आवळकाठी. [सं.] ०फळ–न. आवळा. 'डाळिंब धात्रीफळ आणि केळें ।'–रामायण बालकाण्ड ४४ माधव महाराष्ट्र कवि ५१.

**धांद**—स्त्री. कापडाची चिंधी; अरुंद पट्टी; धांदोटी –पु (व) मध्यम जाडीचा लांब दोर. 'धांद तुटल्यामुळें पाणी काढणें बंद झालें.'

**धांदड**—स्त्री जखरी; जुलूम; सक्ति. 'मन निजकल्पना कडाडी । नावरी धांदडी त्रैलोक्या ।' –एभा २३.६७८.

**धांदरणें**—अक्रि. १ घाबरणें; भयभीत होणें; भीतीनें गोंध ळून जाणें. २ चोळवटणें; घासणें.

**धांदल, धांदलाट्टी, धांदलाधांदल**—स्त्री. १ (वस्तु, व्यवहार, कामें इ० ची) अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा; गडबड. 'तुमच्या गडबडीमुळें माझ्या लिहिण्याची धांदल.' २ मनाची व्यग्रता, त्रेधा, तारंबळ. ३ गलबला; गोंधळ; धामधूम; गर्दी; वंगा-धोपा ४ डावपेंच; छक्केपंजे; गौडबंगाल (क्रि० करणें; लावणें). [हिं. धांधल्; सिं. धाधील]

**धांदली-ल्या**—वि. नेहमीं गोंधळ, धांदल करणारा;; भांबा-वणारा; गडबड्या; गोंधळ्या. [धांदल]

**धांदा**—पु. १ व्यवहार; घडामोड. 'पैं जीवाचिया बोधा । गोचरू जो हा धांदा । तो जीवलोकशब्दा । अभिप्रावो ।'–ज्ञा १५. ३४६. २ दोरा. ३ अवडंबर. ४ उद्योग; काम; खटपट; धंदा. 'म्हणौनि ब्रह्मनामश्रद्धा । सांडूनि कीजे जो धांदा । हें असो सिणु नुपधा ।'–ज्ञा १७.४२२ [प्रा. धंदा]

**धादांत**—पु. (यमकानें वेदांत या शब्दाशीं जुळणारा पण उलट अर्थाचा बनविलेला शब्द). प्रत्यक्षप्रमाण; अनुभवसिद्ध, बुद्धिग्राह्य सिद्धांत; आत्म प्रतीति; स्वानुभव; स्वतःचा तर्क; वैय-क्तिक मत. 'जें वेदशास्त्राचें सार । सिद्धांत धादांत विचार ।' –दा ५.६.२७ 'आम्हास तुमचें वेदांत न कळे आम्ही आपले धादां-तावर चालतो' –क्रिवि. धडधडीत; उघडउघड; मूर्तिमंत; प्रत्यक्ष; स्पष्ट 'हा धादांत चोर, लबाड, सोदा' [वेदांत या शब्दाशीं यमकानें जुळणारा, उलट अर्थाचा, बनविलेला शब्द] म्ह० धादां-ताला सिद्धांताची गरज नाहीं=जी गोष्ट उघड दिसत आहे ती सांगण्याला, दाखविण्याला शास्त्राच्या पुराव्याची जरूरी कशाला?

**धादांवणें, धादावणें**—अक्रि एखाद्या पदार्थाबद्दल उत्सुक, उत्कंठित होणें; हपापणें; खाखावणें; आधासणें. 'कांहीं होतीं धादावलीं । तींहि मेलीं अजीर्णें ।' –दा ३.५.९. 'बुद्धानें द्वितीय संबंधाविषयीं जसें धादावून जावें.' –नि ७२३. [धादांत]

**धादांती**—वि. शास्त्राधार न पाहतां मनाला पटणाऱ्या तत्त्वा-नेंच वागणारा; प्रत्यक्षवादी; बुद्धीप्रामाण्यवादी. 'धादांत्यालाहि पाझर फुटावे असा हिच्या कवित्वाचा प्रभाव विलक्षण आहे.' -महाराष्ट्र–सारस्वत ६२. [धादांत]

**धांदी, धांदोटी**—स्त्री. १ चिंधी; कापडाची अरुंद पट्टी; फडकें; वस्त्राचा तुकडा. [म. धांद]

**धादुडा**—पु. (महानु) चिंधी, धांदी पहा. 'धादुडा दुधडा गौळनी । जिंजें मानुषें होतीं सिहानीं ।' –शिशु ६७६.

**धांदुळणें**—उक्रि (विप्र) ढांढुळणें, धांडळणें.

**धादूस**—वि. समाधान पावलेला; तृप्त झालेला; धालेला. [प्रां.]

**धांदोटी**—स्त्री. चिंधोटी; लहान चिंधी, धांद. [धांद]

**धादोशी**—वि. (कु.) समाधानी.

**धादोस**—वि. (गो.) भरपूर; पुष्कळ; मुबलक अधळपधळ. ०पण–न. (गो.) समाधान; तृप्ति. [धादोस]

**धाधाटा**—पु वाऱ्याचा सोसाटा, धों धों वाहणें. धुधाटा पहा.

**धाधावणें**—धाना. खाखावणें; आधासणें; धादांवणें पहा.

**धाधावणें**—अक्रि. (महानु.) धावपळ करणें; धांवत सुटणें. 'उखरडा धाधाविलें । मंडळीकु निघालें । सर्वे सारीतु पातीनिलें । दंडनायकापाशीं ।' –शिशु ५०४. [सं. धाव्=पळणें]

**धांधावणें**—अक्रि. (व.) गांगरून जाणें.

**धांधुळणें**—उक्रि. (विरू) ढांढुळणें; धांडळणें; ढांढुळणें पहा.

**धा(धां)धू**—क्रिवि. १ कडाकड, धडाधड असा आवाज करून (वाद्यें वाजणें; तोफा उडणें; वारा वाहणें इ०). ठांठू पहा. –स्त्री. १ तोफा, वाद्यें इ०कांचा धडधडाट; कडकडाट. २ जोराचें, कडा-क्याचें भांडण; कचाकची; खणाखणी.

**धान**—न. १ साळ; भात. २ भाताचें रोप. ३ (रोप इ० कांचा) दांडा, देंठ. 'केतकीचें धान आणि उंबराची साल सम-भाग घेऊन चूर्ण करावें.' –अश्वप २.५०. ४ धणे. [सं. धान; बं. धान; गु. धान=धान्य] ०गवत–न. ज्यास धान्य येतें असें गवत. उदा० गहूं, बाजरी, ज्वारी इ०कांचें गवत. 'उदाहरणार्थ रानगवतें व धानगवतें हा धडा पावसाळ्यांतच घ्यावा.' –अध्या-पन ७४. [धान+गवत] धानाष्टक–न. धणे, वाळलेला किंवा ओला पुदिना व मसाला यांचें एकत्र मिश्रण करून गूळ घालून केलेली चटणी.' –गृशि ३१८. [धान+अष्टक=आठांचा समुदाय]

**धानाधिस्पट होणें**-क्रि. (कु.) धुळधाण होणें.

**धाना**—पु. (महानु) दाणा; कण. 'एता आदित्य वासरीं । कस्तूरिअेचें धाने पुण्ये करी ।' –शिशु १९४. [सं. धान]

**धाना**—स्त्रीअव लाह्या. [सं.]

**धानान**—क्रिवि. (व.) जाणूनबुजून. [ध्याऱ्यानें]

**धानावंत**—न. धान्याचें केलेलें पक्वान्न. 'षड्रसें धानावंतें। अपूपें नामें अमितें।' –वेसीस्व ११.१११. [ धान+वंत ]

**धानी**—स्त्री. (खा.) लाही. [ सं. धाना; बं धाना ]

**धानी**—स्त्री. शहर; नगर. 'रावो जैसा स्वप्नीं। रंकपणें निघे धानी।' –ज्ञा १४.१५४. [ सं. ]

**धानी**—न. (कों. कु.) लोखंडी सळई.

**धानी**—पु. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग. ह्यांत षड्ज, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद हे स्वर लागतात. ऋषभ व धैवत हे स्वर वर्ज्य आहेत. जाति औडुवऔडुव. वादी गांधार, संवादी निषाद दिवसाचा तिसरा प्रहर हा गानसमय आहे. हा सार्वकालिकहि समजतात. [ सं. ]

**धानोऱ्या**—स्त्रीअव. धान्यविशेष. 'ज्यानि धानोऱ्या आणाव्या। रांडापोरारे घालाव्या।' –ऐपो ५३. [ धान ]

**धाम्न**—स्त्री. (गो.) खांब; धारण. [ धारण ]

**धान्य**—न. १ भात, गहूं, बाजरी, इ० मनुष्याच्या शरीरपोषणाच्या उपयोगाचा पदार्थ; दाणागोटा. तांदूळ, गहूं, ज्वारी इ० तृणधान्यें हरभरा, तूर, उडीद इ० द्विदल धान्यें व करडई, तीळ, जवस इ० तैलधान्यें असे धान्याचे तीन मुख्य वर्ग आहेत. २ नवरात्रांत देवीपुढें किंवा चैत्रांत गौरीपुढें थोडथोडा मातींत गहूं किंवा भात यांचीं जीं लहान रोपें करतात तीं समुच्चयानें. ३ दसऱ्याच्या दिवशीं पागोट्यांत, टोपींत, खोवण्यांत येणारा गहूं, भात इ०कांच्या रोपांचा तुरा. ४ धणे. [ सं. धान्य; गु; धान्य ] (वाप्र.) **०झटकणें**–धान्य साफ करणें, वारवणें. **०हुडकणें**–सक्रि. शोधणें; निवडणें; धुंडणें. पद्धति–एक लांब लोखंडी गज जमीनींत मारून व त्याचा वास घेऊन अमुक ठिकाणीं धान्य पुरलें आहे असें नेमकें सांगणें. 'लष्करांतील कित्येक लोकांचा धान्य हुडकून काढण्याचा धंदाच होता.' –ख १०५५. **अठरा धान्यांचें कडबोळें**–न अठरा पहा सामाशब्द– **०देश**–पु. पुष्कळ धान्यें पिकणारा, सुपीक देश. [ सं. ] **०पंचक**–न. गहूं, तांदूळ, सातू. तीळ व मूग हीं शंकरास लाखोली वाहण्यास योग्य अशीं धान्यें. [ धान्य+सं. पंचक=पाचांचा समूह] **०पंचकाथ। काढा**–पु. धणे, वाळा, सुंठ, नागरमोथा आणि दालचिनी यांचा काढा. [धान्य=धणे+सं. पंचक=काढा] **०पलाल न्याय**–पु. धान्य म्हटलें म्हणजे त्यामध्यें त्याचा पेंढाहि अंतर्भूत होतो. त्यास वेगळें महत्त्व नसतें. राजाला जिंकल्यावर प्रजाहि स्वाभाविकपणें जिंकल्या गेल्या असें मानण्यास हरकत नाहीं. यावरून एखादी मुख्य गोष्ट साध्य, सिध्द झाल्यावर तदनुषंगिक बारीकसारीक गोष्टी आपोआपच साध्य, सिध्द होतात. [धान्य+सं. पलाल=पेंढा, गवत] **०फराळ**–पु. उपवासाच्या दिवशीं धान्य भाजून केलेले, कोरडे खाद्य पदार्थ इ०कानें केलेला फराळ. [धान्य+फराळ] **०भिक्षा**–स्त्री.धान्याची मळणी होत असतांना भिक्षुक गांवोगांव फिरून मिळवितात ती धान्याची भिक्षा, बलुतें. [धान्य+भिक्षा] **०माप**–न. धान्य मोजावयाचें माप, परिमाण. उदा० शेर, पायली इ०. **०वणवा, वी**–पुस्त्री. अकस्मात् धान्य जळून खाक होणें. 'अग्न लागला शेतीं। धान्य वणव्या आणि खडखुती। युक्ष दंड जळोनि जाती। अकस्मात।' [ सं. धान्य+म वणवा ]

**धाप-पा**—स्त्री. १ दम; जोराचा श्वासोच्छ्वास. 'सुर्ती निन्हां धापसी। तूं ते बोलां पाहे हृषीकेशी।' –शिशु ८६. 'धापा भरतां पोटें चोळिलीं। श्वासोच्छ्वासें मूर्छित।' –जैअ ५७.४८. २ दमा; श्वास; दम्याची व्यथा. 'पंडुरोग माझा बंधु। जो अपार दुःखाचा सिंधु। तयाची धाप नामें वधू। जी करीत कंठरोधन।' –जैअ ४९.३२. 'तुकयाचें लग्न केलें असतां। परि नवरीस होती धापेची व्यथा।' [ हिं. ] **धापा देणें-टाकणें-दाटणें**–श्रमामुळें जोरजोरानें श्वासोच्छ्वास करणें. 'तो हरकारा पातला वेत धाप।' –दावि ३८ 'धापें दाटला राधात्मज।' –मुआदि ४१.५२. **०करी-धापेकरी-धापकरू-धापाळ, धाप्या**–पु. दम्याचा उपद्रव ज्यास होत असतो तो; दम्याळ; दमेकरी मनुष्य. **०कांप**–स्त्री. अस्वस्थता. 'बुजाली वैराग्याची वोरप। जिराली मनाची धांपकांप।' –ज्ञा १७.२३१. [ धाप+कांपणें ]

**धाप**—स्त्री. (विटीदांडूचा खेळ इ०कांत रूढ). मर्यादारेषा. **०खाणें**–(विटी, चेंडू, कवडी इ०) मर्यादा रेषेच्या, हद्दीच्या पलीकडे जाणें.

**धाप**—स्त्री. सरडयाच्या जातीचा एक प्राणी; धापट पहा. 'भोंगे गांधली भिंगोरी। बेडूक धापा।' –दावि २४४.

**धापट**—न. कांडलेल्या भातांतून निघणारा भुसा; चूर, चूर्ण.

**धापट**—पु. सरडयाच्या जातीचा एक सरपटणारा प्राणी; धाप.

**धापट**—स्त्री. (भोंवऱ्यांचा खेळ.) फिरावयासाठीं टाकलेला भोंवरा न फिरतां राहण्याची स्थिति

**धापटी**—स्त्री. (उपवास, आजारीपण इ०कांमुळें पोटास लागलेली) खपाटी; दामटी. (क्रि० वळणें, होणें.) पोटाची धापटी असा प्रयोग.

**धापड**—वि. (कों.) अगदीं रुक्ष; उरवार; बरड. (भातजमीन). **०घट**–स्त्री. (कों.) पाटाचें वगैरे पाणी मिळत नमून केवळ पावसाच्या पाण्यावर पीक देणारी जमीन. –कृषि २१०.

**धापडधुपड**—क्रिवि. चुटपुटतें; अपुरें; तृप्ती न होईल अशा रीतीनें. (पोट भरणें, जोगावणें इ०सह व जनावरासंबंधीं योजतात). चुटपुटतें पोट भरणें, चारा खाणें, खाऊं घालणें.

**धापडा-डें**—पुन. (व.) जाड थालीपीठ.

**धापणें**—अक्रि. १ धापा टाकण्याच्या अवस्थेस पावणें; दम लागणें; धापेनें युक्त होणें. [ हिं. धापना ]

**धापणें**—अक्रि. ( प्रा. ) तृप्त होणें.

**धापणें**—सक्रि. ( गो. कु. ) ढापणें; झांकणें. [ ढापण ]

**धाँपर**—न. ( गो. ) गुडघा; ढोंपर.

**धापलणें**—अक्रि. जोरजोरानें श्वास टाकण्याच्या अवस्थेस पावणें. धापा टाकणें; धापणें. [ धाप ]

**धापसणें**—अक्रि. ( महानु. ) धापा टाकणें; धापलणें; धापणें; गडबडीनें, जलदीनें जाणें. ' जा तुम्ही एकी धापसियां। तुम्हां लागीनिलिआं गो–मासिया । तरि वारां जा कां । ' –शिशु २१९. [ धाप ]

**धांपळ, धांप**—स्त्री. ( गो. ) द्विदल धान्याच्या दाण्याचा अर्धाभाग.

**धाँपळॉ**—पु. ( गो. ) मोठें छिद्र.

**धापा**—पु. १ एक प्रकारचें गवत. २ चपटया जातीचें मोठें कौल; ढापा १ त्या अर्थी पहा. ०**करणें**–( कों. ) नाश, खराबी, विध्वंस करणें.

**धापाटा**—पु. ( व. ) थालिपीठ; धापडा. धपाटा पहा.

**धापी**—स्त्री. (गों.) उखळींतील पोहे परतण्याचा चपटा पळा.

**धापू–पो**—क्रि. फुकट; व्यर्थ; निरर्थक. ०**होणें**–अक्रि (कु.) १ मरणें. २ हरवणें. ३ फुकट जाणें. –मसाप ४.४.२८०.

**धापेवचें**—क्रि. ( गो. ) धापा टाकणें; धापलणें. [ धाप ]

**धापोडा**—पु. ( व. ) १ आंगावर एखाद्या ठिकाणीं सूजून वर आलेली जागा. २ ( व. ना. ) थालिपीठ; धापड.

**धाप्या, धाप्याचाकांदा**—पु कोचिंदा पहा.–वगु ४.३१.

**धाब**—न. माडी; धाबें. [ हिं. धाबा ]

**धाबटी**—स्त्री. दामटी; धापटी पहा.

**धाबडणी**—स्त्री. ( कों. ) मोकळया फळयांची माळया-सारखी पाटणी; माळा.

**धाबडधिंगा**—पु धांगडधिंगा; गोंधळ; दंगामस्ती. [ध्व. तुल. गुज. धाबडाधंगु=दंगामस्ती ]

**धाबडी**—स्त्री. ( कु. ) धाबळ; लोंकरीचें नेसावयाचें वस्त्र. [ म. धाबळी. ]

**धाबलवडा–डी**—पुस्त्री. एक प्रकारचा वडा.

**धाबळ–ळी**—स्त्री. १ ( कों. ) सोंवळयांत नेसावयाचें लोंक-रीचें जाडेंभरडें वस्त्र; धाबडी. २ पांघरण्याच्या उपयोगाचें लोंकरीचें जाड वस्त्र. ३ ( कों. ) काथ्याचा हातांनीं वळून केलेला पेळू.

**धाबळ**—स्त्री. कबुतरांना रहाण्याकरितां करितात तें घर, खुराडें, ढाबळ.

**धाबाधुबी**—स्त्री. ( ना. ) एकमेकांना धबाधब चेंडू मार-ण्याचा मुलांचा एक खेळ; धबाधबी १ त्या अर्थी पहा. [ ध्व. धब् द्वि. ]

**धाबें**—न. १ घरावर केवळ मातीचा पेंड घालून करितात तें आच्छादन. २ केवळ मातीच्या पेंडाचें आच्छादन असलेलें घर. ३ (राजा. कुण.) छाती. –मसाप २.४.३६१. [ सं. स्था; हिं. धाबा; गुज. धाबुं ] ०**दणाणणें**–भीतीनें घाबरून जाणें; गर्भगळित होणें; गाळण उडणें. **धाब्यावर बसविणें**–१ ( एखाद्याचें ) सर्वस्व हरण करून ( त्याला ) भिकेस लावणें. ' परंतु चुलत्यानें घरांत भाउबंदकी करून सुभानजीला धाब्यावर बसविलें. ' –स्वरापरि १७८. २ एखाद्यापासुन द्रव्यादिक घेउन ( त्यास ) हिंगो दाख-विणें. ०**घर**–न. धाब्याचें घर.

**धाबोटा**—पु. ( कों. ) साखरेचें पोतें, गोण; दाभोटा.

**धाम**—स्त्री. १ ( गो. ) रोगाची साथ; २ ( ल. ) कोणत्याहि गोष्टीचा अनेकांस एकदम लागलेला नाद, व्यसन, इसळी वेड, खवखव. ' गांवांत तापाची धाम आली आहे. '

**धाम**—न. १ घर; स्थान; ठिकाण. 'जीजी परममंगळ धामा। सकळ देवदेवोत्तमा। ' –ज्ञा. ३.२८. ' नमें राम तें धाम सोडून यावें। ' –राम ४८. २ ( ल. ) शरीर; देह ३ रूप तेज; प्रकाश; प्रभाव. ' मार्कंडेय अगस्त्य प्रेक्षिति येऊनि सांवळें धाम। ' –मोकृष्ण ८४.२. ४ –पु. बदरीनाथ, जगन्नाथ, द्वारका, रामेश्वर या हिंदूच्या अत्यंत पवित्र अशा तीर्थस्थानांपैकीं प्रत्येक. [ सं. ]

**धामक**—न. ( कों. ) वटवाघुळ.

**धामगड**—पु. ( निंदार्थी. ) माध्यंदिन किंवा यजुर्वेदी गृहस्थ. धाम्या. –मोल. [ धामा. ]

**धामण–णी**—स्त्री. १ माशाची एक जात. २ वरील मासा ज्यांत राहतो तो शिंपला.

**धामण–णी**—पुस्त्री. एक वृक्षविशेष. याचें लांकूड चिवट असून इमारतीस उपयोगी असतें. –वगु ४.३२. याच्या सालीच्या तंतू-पासून कागद व दोर करितात. –ज्ञाको. ध ५५. [तुल. गुज. ध्रामण]

**धामण**—स्त्री. सर्पाची एक जात; अधेला पहा. ह्या जातीचा सर्प आपली शेंपटी गुराच्या नाकांत घुसडून ती जोरानें बाहेर काढतो असें म्हणतात. ' आशा मनशा हो धामणी। ' –भूपाळया २४. [ हिं. धामिन ]

**धामणणें**—अक्रि. धामण सर्पाच्या दृष्टीनें ( गुरें इ० ) पीडित होणें. [ धामण=सर्पविशेष ]

**धामण्या**—पु. एक सर्पविशेष. हा धामण व नाग यांच्या संयोगापासून उत्पन्न होतो असें म्हणतात. [ धामण ] **धामण्या पोपट**–पु. पोपटाची एक जात.

**धामधूम**—स्त्री १ दंगल; गोंगाट; गडबड; गोंधळ; अपूर्व प्रकारानें उडालेली खळबळ. २ धुमश्चक्री; बंडाळी. ' त्या धाम-धुमीचीं तुसतीं वर्णनें ऐकून अंगावर शहारे येतात. ' –टिळे ४.४.१७८. [ हिं. ] **म्ह०** धामधूम बलोंका राज.

**धामना**—वि. (व.) थोडया काळसर रंगाचा. 'धामना तांदूळ आम्हांस नको. सफेत पाहिजे.' 'आमच्या धामन्या बैलाला जोडी घ्यायचा आहे.'

**धामा**—पु. एखादी गोष्ट अनेकांनीं एकदम करण्याची उठणारी लाट, सपाटा, सांथ; धाम अर्थ २ पहा. जसें–मागण्याचा–जेवण्याचा–रडण्याचा–धामा.

**धामा**—पु. (कों.) गुराखी लोक आपल्या हातावर गोवरी किंवा सशाची लेंडी यांच्या विस्तवानें डाग देतात तो. धमाटा अर्थ २ पहा.

**धामा-म्या**—पु. १ गबाळया. २ (उप) माध्यंदिन, यजुर्वेदी गृहस्थ. 'आधीं ते देशावरचे धामे पहा. त्यांना मुलीच मिळण्याची मारामार.' –खरादं १३. **धामेपणा**–पु. गबाळेपणा; अव्यवस्थित वागणूक. 'कोंकणांत जितकी टापटीप तितका इकडे (देशावर) धामेपणा.' –उषा ग्रंथमालिका ४.

**धामीण**—स्त्री. सर्पाची एक जात; धामण. 'वासना धामिणी पडिली गळां।' –दा ३.१०.५ [हिं. धामिन]

**धामोडा**—पु. (ना.) पुळी. [सं. ध्मा ?]

**धामोडा**—पु. एक वृक्षविशेष; धावडा 'आन धामोडे याची साली।' –सूत्रपाठविचार २१०. 'लागतां चंदनाचा पवन। खैर धामोडे होती चंदन।' –एभा ३० ३४.

**धाम्या**—वि. १ (उप.) यजुर्वेदी. –मोल. २ (खा.) बावळट; गबाळ. ३ (व.) चिक्कू; कृपण.

**धाय, धायमाय**—स्त्री. १ रडण्याची मोठी आरोळी, टाहो; आकांत; ओक्साबोक्सीं रडारड; हंबरडा. (क्रि० मोकलणें; फोडणें; घेणें; घालणें). 'अनुर्धाचीया माया रखुमावंतीया। मोकलीली धाया। रात्रीमाजी काइ जालासी। सादु दे कां रे पुत्रराया।' –उषा ७२७. 'दुःशासन मोकली धाय। म्हणे गेले हातपाय।' –मुआदि ४४.७. 'बायकोसाटीं मीं धाय घेऊन बसलों आहे.' –कोरकि ११८. २ धापा. 'गंधर्वे हुस्तीं वें कुऱ्हाडे। कर्णा अंगीं भेदले गाढे। रथ टाकूनिया एकीकडे। धाय टाकीत राहिला॥' –मुवन १२.९७. ३ हृदय; अंतःकरण. 'कवणातें मी मोकलूं धाय?।' –मुवन ७.१२७. ४ धीर; धैर्य. 'मग धाय टाकुनी रडे माये॥' –ब ५५३. [सं. हृदय=(द+द=ध)=धाय–भाअ १८३३.] **०धाय रडणें, धायींधायीं रडणें**–ढळढळां, आक्रोश करून रडणें. 'रडवील कोण रणरंगीं। यवनांना धायी धायी। यापुढें॥' –विक १०. **०कंप**–पु. संकल्पविकल्प; धरसोड. –मनको। धाय=हिय्या, धीर, निश्चय+कंप=कापणें, धरसोड करणें]

**धाय**—स्त्री. दाई; धात्री. [धाई] **०पण**–न. दाईपण; पालनपोषण; दाईचें काम. 'हें रजोगुण माणसाचे। समूळ आसुरियेचे। धायपण ययाचें। अविद्या केलें॥' –ज्ञा ३.२४३. [धाय+पण] **०बंधु**–पु. धात्रीपुत्र. 'जरासंदाचा धायबंधु आगळा। तो उखरडा विभांडिला।' –शिशु ५७५.

**धाय**—स्त्री. तृप्ति; संतोष; समाधान.

**धायखंडी**—स्त्री. शस्त्रविशेष; तलवार 'मिळौनि नाकवसेंआं नाकवसें। धायखंडी हाणतांति सरिसें।' –शिशु १०६३.

**धायटी, धायफूल**—स्त्रीन. पुरुष, दोन पुरुष उंच वाढणारें एक झाड. हिचीं फुलें लवंगासारखीं असून हिरवीं असतात; त्यांचा उपयोग औषधांत व रंगाकडे होतो. –वगु ४.३२. [सं. धातकी; हिं. धायकेफल; बं. धाइफुल; गु. धावणी; कर्ना. धायीफूल; ते. धातुकीपूड] **०फूल**–न. एक औषधी; धायटीचें फूल.

**धायटी**—स्त्री. एक वृक्षविशेष

**धायरूं**—न. गुरें व घोडे यांना होणारा एक रोग.

**धाया**—स्त्री. दाई; उपमाता. 'अर्धीचि फळीं आस तुटिया। कर्मे आरंभावीं धनंजया। परावें बाळ धाया। पाहिजे जैसा॥' –ज्ञा १८.१७२. 'भक्तीपाशीं भावना जाये। तैसी धांविन्नली धाये।' –एरुस्व १९०.

**धार**—स्त्री. १ तलवार, कोयता, विळी, चाकू इ० हत्यारांची तीक्ष्ण कड, तीक्ष्णपणा; चौकोनी लांकूड इ० कांची सरळ कड. २ पर्वत, डोंगर इ० कांची माथ्यावरची अगदीं उंच कड, कडा. ३ (ल.) तीक्ष्ण, तल्ख, तापट, कडक स्वभावाचा माणूस. ४ डोंगराची रांग, ओळ. ५ क्षितिज; क्षितिजाची काळी रेषा; दृष्टिमर्यादा. 'दिवस धारेस आला. **०करणें**–१ (शस्त्र इ० कास) धार लावणें, तीक्ष्ण करणें. २ शौर्याचीं कृत्यें करणें; पराक्रम गाजविणें. **०धरणें**–(एखाद्यास तोंड देण्यास) सिद्ध होणें, सज्जणें. **०पडणें**–(एखाद्यावर कामें इ०कांचें) ओझें, बोजा पडणें; धाड पडणें या अर्थी चुकीनें रूढ. **०बंद करणें**–(मंत्र इ०कानें शस्त्राची) धार बोथट करणें; निकामी करणें. **०मारणें**-तलवार गाजविणें, पराक्रम करणें. **धारेवर आणणें–धरणें**–कडक शिस्तीनें, करडेपणानें वागविणें; सक्त अंमल गाजविणें. **धारेवर येणें**–(एखादें काम इ०) कडक शिस्तीखालीं चालू होणें, राहणें. **धारेवर वागणें**–सावधपणानें, दक्षतेनें, मागेंपुढें पाहून वागणें; कष्टाचा आणि धोक्याचा मार्ग चोखाळणें. **धारेवरचा वाघ**–पु. (अशिष्ट.) कोणीहि, जवरा या अर्थानें रूढ. जसें:–हें काम तूं करीनास तर धारेवरचा वाघ करील? तुला न हाक मारूं तर धारेवरच्या वाघाला हांक मारूं? सामाशब्द– **०करी**–पु. योद्धा; पराक्रमी पुरुष; तरवारबहाद्दर. 'पाटणकर घोरपडे निंबाळकर तलवारीचे धारकरी।' –ऐपो ४३९. [धार+करणें] **०कस**–पु. धारेला लावून केलेली पारख; (ल.) सक्ती; तगादा. [धार+कस] **०कशी धरणें**–धारेवर धरणें; सतावून सोडणें; सक्त तगादा लावणें. 'पोरानें खाऊकरितां मला फारच धारकशीं धरलें.' **०कशीं धरणें–टाकणें–ढकलणें–देणें–लावणें–सोडणें–धारको धरणें–**

मोठ्या संकटांत, पेचांत आणणें. ०तीर्थ-न. (प्र.) धारातीर्थ; धारातीर्थ पहा. ०बंद-स्त्री. १ शस्त्राची धार बोथट करण्याचा मंत्र. २ -वि. शस्त्राची धार बोथट करण्याचें मंत्रसामर्थ्य असणारा. ३ -पु. (वागणुक भाषण इ० कांतील) धरबंद, ताळमेळ, ताळतंत्र, संबद्धता. [धार+बंद] ०बोळ, मेर-पुस्त्री. (कु) सुसंबद्धता; ताळमेळ (भाषण, वर्तन इ० कांतील) (अकरणरूपीं प्रयोग). ०बोळ-क्रिवि. कांठोकांठ; तुडुंब; भरपूर (पाणी इ० द्रव पदार्थ भरणें) ०राव-पु. १ तरवारबहाद्दर, शूर योद्धा. या अर्थाची पदवी. 'धारराव शिंदे.' -रा १९ ८१ 'धारराव स्वागारदार संसारमोह सांडुनी... स्वप्राणावरि उदार झाले.' -अमृत ५४. २ (उप.) पराक्रमाच्या पोकळ बाता मारणारा; बढाईखोर. धारोधार-क्रिवि. तुडुंब; कांठोकांठ. [धार द्वि.]

धार—स्त्री. १ जोराचा, वेगाचा (नदी इ०काचा) प्रवाह. 'तों धारेमाजीं निश्चितीं। नाव गेली तेधवां।' -ह ९.२६९. 'भोंवरे वळणें आणि धार।' -दा ३.७.५२. २ पाणी इ० पातळ पदार्थ वरून पडत असतांना, पाऊस पडत असतांना, फुटक्या भांड्याच्या छिद्रांतून द्रवपदार्थ बाहेर पडतांना पाणी इ०चा दिसणारा दोरीसारखा आकार. ३ तेल, तूप इ० पातळ पदार्थ बाजारांत विकण्यास आल्यास त्यांतील कांहीं भाग हक्क म्हणून घेण्याचा पाटील, कुळकर्णी इ० गांवकामगारांचा (पूर्वीच्या काळीं असलेला) मान; तेल, दूध वगैरे विकत घेतलें असतां पूर्ण माप झाल्यानंतर वर्तावळा म्हणून घ्यावयाचा थोडासा अंश. ४ धान्य उफणतांना जें हलकें धान्य राशीच्या पलीकडे जाऊन पडतें तें. ५ तेल, तूप इ० द्रवपदार्थाचा किंचित् अंश. जसें-दह्याची कवडी, पाण्याचा थेंब; तेलाची, तुपाची धार. ६ (गाय, म्हैस इ० जनावरांचें) दूध काढणें. 'धारेची वेळ झाली.' [सं. धारा] ०उष्ण, धारु(रो)ष्ण-वि. धार काढतांना (दुधास) असणारा उबटपणा ज्याचा निवाला नाहीं असें ताजें (दूध). असलें दूध बलवर्धक व धातुपौष्टिक असतें. 'जेंवि श्वानचर्म पात्राप्रती। गोक्षीर भरिती धारोष्ण।' -भाराबाल ११.२८. [धारा+सं. उष्ण] ०काढणें-पिळणें-(गाय, म्हैस इ० जनावराचें) दूध काढणें. ०देणें-उंचावर उभें राहून (धान्य इ० स्वच्छ करण्याकरितां) टोपलींतून एकसारखें धारेनें खालीं ओतणें, वारवणें. ०धरणें-(विपार, मोडशी इ० उतरण्यासाठीं) मस्तकावर थंड पाण्याची धार सतत पडेल असें करणें. ०पडणें-(ल) पाहिजे तितकें द्रव्य, धान्य इ० आकाशांतून (घरांत) येऊन वर्षाव होणें, पाऊस पडणें. 'तुम्ही फार खर्च करावयास सांगतां तर माझ्या घरीं कांहीं पैशाची धार पडत नाहीं.' ०फुटणें-(गाय, म्हैस इ०काला) पुष्कळ दूध येऊं लागणें. ०मारून न पाहणें-(एखाद्याला) अगदीं कस्पटाप्रमाणें लेखणें, हिंग लावूनहि न पुसणें, ढुंकूनहि न पाहणें. ०लागणें-फार वाहूं, गळूं लागणें; गळती, बुळकी लागणें. जसें:-पावसास धान्यास, गुळास, डोळ्यास, नाकातोंडास, गांडीस धार लागली. चारही धारा तोंडांत पडणें-अनेक मार्गांनीं लाभ होणें; विलासाच्या, उपभोगाच्या सर्व गोष्टी मिळणें. म्ह० चारही धारा कोणाच्या तोंडांत पडत नाहींत=सर्व सुखें, चांगल्या गोष्टी एकाच्याच वांट्यास कधीं येत नाहींत. धारभर-क्रिवि. थोडेसें, अगदीं थोडें (दूध, तूप तेल इ० द्रव पदार्थ). कवडी पहा. (सामाशब्द) ०चिं(ब)गोल-न. (कों.) धान्य वाऱ्यावर उफणतांना धान्याच्या राशीच्या पलीकडे पडणारा कोंडा, भूस, फोल, हलकें धान्य. [धार+कों. चिंब+गोल]०वणी-न. १ दूध तापवितांना त्यांत जें थोडेसें पाणी घालतात तें. 'जैसें दुग्धामाजी धारवणी। उदक थोडें घालिती।' -भवि ३.३३६. २ (पाट, प्रवाह इ०काचें) धारेनें पडणारें, वाहणारें स्वच्छ पाणी. 'डोणींतील पाणी आणूं नकोस; चांगलें धारवणी आण.' [धार+पाणी] ०वसा-पु पाण्याचा, नदीचा जोराचा प्रवाह. 'ते नेणपणाच्या वळसां। बुडोनि गेले गा सहसा। येक कर्ममार्गाचें धारवसां। पडिले जन्ममृत्यूच्या।' -रंयोवा १.४६९. ०शींव-स्त्री. नदीच्या प्रवाहानें ठरलेली (गांव, शेत इ०काची) मर्यादा, सीमा. हींत बदलहि होत असतो. 'सायखेड व चांदोडी यांची धारशींव आहे.' [धार+शींव=सीमा]

धारक—पु. १ धाक; दरारा; वचक. २ युद्ध; लढाई; धारकीं-धरणें-१ धाकांत ठेवणें; धारेवर वागविणें; धारेवर धरणें. 'अल्प अन्याय क्षमा न करी। सर्व काळ धारकीं धरी।' -दास २.१.५६. २ (घोडा. इ०) मंडळावर धरणें, फेरफटक्यास नेणें. 'जैसें कोल्हेरीचें वारु। न येती धारकीं धरूं।' -अमृ ७.४.

धारक—वि. धारण करणारा; धरणारा; बाळगणारा. समासांत उत्तरपदीं योजतात. जसें:-आज्ञाधारक=आज्ञा पाळणारा. वज्रधारक, शस्त्रधारक, वेत्रधारक, दंडधारक. [सं. धृ]

धारकें—न. दोरीचें झिरमोळ्या असलेलें विणकाम केलेलें बैलाच्या शिंगांभोंवतीं बांधलेलें वेष्टण. [धारें]

धारजणगुण-धारजिण गुण-पु. मनुष्य; जनावर इ०काचा धारजिणें होण्याचा गुण. [धारजिणें+गुण]

धारज(जि)णा—वि. अनुकूल; शुभकारक; उपयोगी पडणारा. (सेवा; निगा; त्रास; खर्च इ०कांचें) फल देणारा (देव, राजा, मनुष्य, जनावर, धंदा, शेत इ०). 'तुम्हांला नसे नाम तें धारजीणें।' -कंचेश्वर-सुदामचरित्र पृ २. 'हें शेत आम्हांला धारजिणें नाहीं असें पाहून सोडून दिलें.' धारजिंग पहा. म्ह० १ दुष्टास देव धारजिणा. २ मेसादेवी चोरास धारजिणी. ३ कसा बास गाय धारजिणी.

**धारज(जि)णें**--न. (मनुष्य, राजा, देव इ०कांची सेवा केली असतां त्यांनीं) फलद्रूप होण्याचा दैवयोग; आनुकूल्य (जनावर, धंदा, शेत इ०कांच्या संबंधांत त्रास घेतला असतां, पैसा खर्च केला असतां त्याचें) फल मिळण्याचा दैवयोग. ' मला गुराचें धारजिणें नाहीं. ' -**धारजण्यास येणें**-धारजिणें होणें. [ सं. धृ-धरणें+जिणें=जीवन ]

**धारण**—स्त्री. १ (धान्य इ०चा) खरेदीविक्रीचा चालू दर, बाजारभाव ' लष्करांत धारण इस्तकबीलपासून सात शेर आठ शेर. ' -भाव १४. २ दुष्काळ; महागाई. ' धारणेनें मुलें मेलीं । ' -दावि ३७७ [ सं. धृ; का. धारणि; गुज. धारण=वजन ] **पांचावर धारण बसणें**-( भीति इ०कानें ) गर्भगळित होणें, घाबरून जाणें. रुपयास पांचशेर धान्य म्हणजे अत्यंत महागाई होणें, दुष्काळ पडणें अशी स्थिति होती त्यावेळचा वाक्प्रचार. बहुधा सैन्यांतील. **म्ह०** धारण आणि मरण कोणास समजत नाहीं.

**धारण**—न. १ धरणें; संभाळणें; अंगीं बाळगणें; धारण करणें. ' या नांव धृति संपूर्ण । विद्याधारण धृति नव्हे । ' -एभा १९.४४४. ' शरसंधानसमर्थी डाव्या हातानें धनुष्य धारण करावें लागतें. ' २ घेणें; उचलणें; स्वीकारणें. ( रीतभात, चाल, मार्ग इ० ) [ सं. ]

**धारण**—स्त्री. समजूत; कल्पना. ' जीवींचिये ऐसी धारण । म्हणोनि पुसावया । जाहलें कारण । ' -ज्ञा ६.३३६. [ सं. धृ-धारणा ]

**धारण**—पुस्त्री. ( कों. व. ) टेंकू; आधारस्तंभ (घराचा अगर इमारतीचा): मोठा, मुख्य खांब. ' रात्रि तैसें पाहलें । हें धारणा जेवीं एक जालें । ' -ज्ञा १४.३५५. ' जेवीं आरें धारण गिळिला । ' -एभा २३.२५९ २ (ल.) (राज्याचा, संसाराचा भार ज्याच्यावर असतो तो ) कर्ता पुरुष; आधारस्तंभ.

**धारणपारण, धारणें पारणें**—न. एक दिवसाआड भोजन व एक दिवसाआड उपवास करणें. (प्र.) धरणेंपारणें. धरणेंपारणें पहा. [सं.] **धारणापारणा**—स्त्री. क्रमानें एक दिवस उपवास व एक दिवस भोजन करण्याचें व्रत; धरणेंपारणें. [धारणा+पारणा]

**धारणा**—स्त्री. १ स्मरणशक्ति; बुद्धि. ' ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा । ' -दा ११.६.१९. २ अष्टांग योगांतील आठ अंगांपैकीं एक; श्वासनिरोध, चित्तैकाग्रता व सर्व नैसर्गिक वासनांचा निग्रह इ० ' तये स्वरूपीं चित्ता । निर्धारेंसी धारणा धरितां । ' -एभा ७.३५. ' न करितां ध्यान न करितां धारणा । तो नाचे कीर्तनामाजी हरी । ' -तुगा २४३३. ३ धैर्य; धीर; मनाचें स्थैर्य. ' यदृच्छा आहारू न मिळे । तरी धारणेसि न टळे । ' -एभा ८.३३. ४ तऱ्हा; ढव; विशिष्ट, योग्य पद्धत. ५ सरळ मार्गाचा दृढ अवलंब. ६ चिवटपणा. -पदाव १२२. ६ (व.) कष्ट करण्याची मार्पे; बत्ता. [ सं. धृ-धारणा ) **०पटु**-वि. स्मरण शक्तीचा धड. [ धारणा+सं. पटु=कुशल ]

**धारणान्वितता**—स्त्री. ( प्रबंध, संगीत. ) धारणाशक्ति.

**धारणी**—स्त्री. (कों.) आधाराचा लहान खांब; लहान धारण. [ धारण ]

**धारणेंपारणें**—न. धरणेंपारणें पहा.

**धारन**—स्त्री. (व.) एक शाकभाजी.

**धारवट**—न. धोरण.

**धारवाडी कांटा**—पु. १ कर्नाटकांतील धारवाड शहरचा कांटा; (ल.) तंतोतंत वजन करणारा कांटा. २ (ल.) वागण्याचें, काम करण्याचें चोख, समतोल, निःपक्षपाती धोरण.

**धारसा**—पु. १ नदी इ०कांचा जोराचा प्रवाह, धार, वहाण्याची गति. ' तमाचे धारसे वाड । सत्त्वाचें थिरपण जाड । किंबहुना हे दुवाड । मायानदी ॥ ' -ज्ञा ७.७९. ' लोटला प्रेमाचा धारसा । ' -कालिका १७.३८. २ (महानु.) ( शस्त्र इ०कांचा ) वार, घाव. ' पडतां खांडेआं चा धारसा । दाटतु लोहाचा वळसा ।' -शिशु १०५२. ३ कड; धार; रांग. ' मुजऱ्यास धारसा धरावा तैसा फरा बांधोन फौज उभी राहिली. ' -भाव ११३. ४ रूढी; वहिवाट. ५ ( रत्नागिरीच्या बाजूस ) डोंगराच्या कडयाचा कांठ, कड, धार.

**धारसें**—न. धरण. -मनको.

**धारा**—पु. १ (भाडें, विक्री, चाकरी, धंदा इ० व्यवहाराविषयींचा) संप्रदाय, शिरस्ता, वहिवाट, नियम. 'शिवाजी महाराज यांचे वेळचे धारे यांनीं राज्य चालवावें.' -मराचिथोशा३२. ' दहा कोसांस एक रुपया द्यावा असा आमच्या गांवांत भाडयाचा धारा पडला आहे.' २ (शेत जमीन, बागाईत इ०कांवरील) सरकारी कर, वसूल, सारा. [ सं. धृ; म. धारा; प्रा. धार. हिं. धारा; गु. धारो ] सामाशब्द- **०करी**-पु. धारेकरी पहा. [ धारा+कर ] **०पेंडाळा**-पु. १ (व्यवहारांतील, बोली करण्याचा, मोल ठरविण्याचा) नेहमींचा, साधारणपणें पडलेला शिरस्ता, वहिवाट, नियम. २ पूर्वापार, परंपरागत पध्दत, वहिवाट. ' शेताचा धारापेंडोळा त्या कुणब्यानें मिळविला. ' ३ (ल.) कुटुंबाचा वंशपरंपरागत लौकिक, सोयरीकसंबंध, लागाबांधा इ०. ( क्रि० मिळणें, पटणें, लागणें, मिळवणें, दाखविणें, लावणें ). ' तुमचा आमचा धारापेंडोळा मिळाला म्हणजे मुलगी देईन. ' [ धारा=सरकारी साऱ्याची रकम+पेंडोळा=शेताची मर्यादा, बांध ] **०सभा**-स्त्री. (गु.) कायदेमंडळ; कायदेकौन्सिल. ' या गाऱ्हाण्यांची दाद लावण्याच्या त्या कालच्या मार्गाचेच हल्लींच्या काळीं न्यायखातें, धारा सभा असे भाग पडले आहेत.' -पाले १५. [धारा=नियम+सभा; गु. धारासभा] **धारापहसान**-न. सरकारनें कृपेनें कमी केलेला

सारा. [धारा+अर=इहसान्=कृपा, उपकार] **धारेएहसानी**-वि जीवरील सारा कमी केलेला आहे अशी (जमीन इ०). [धारे एहसान] **धारेकरी**-पु. ज्याला सरकारसारा भरावा लागतो असें कूळ; धाऱ्यानें जमीन घेणारा; इजारदार. यास खरेदी, विक्री, गहाण इ०कांचे सर्व हक्क असतात. खोती गांवांत खोतातर्फे धारेकरी धारा भरतो. धारेकरी खोतास नफा देत नाहीं. **धारेपेंडोळें**-न. धारापेंडोळा पहा. **धारेबंदी**-स्त्री. सरकारी शेतसारा ठरविणें. -वि. बांधलेल्या, ठरींव धाऱ्याचें शेत, कूळ. [धारा+बंदी] **धारेमाप**-न. ऐनजिनसी सारा घेण्याचें सरकारी माप. [धारा+माप] **धारेशुध्दि**-वि. धाऱ्याला, वहिवाटीला धरून असलेलें; कायदेशीर; रीतसर असलेला. [धारा+शुद्ध=बरोबर]

**धारा**—स्त्री. १ (शस्त्र इ०काची) तीक्ष्ण कड, धार. 'तंव दापतियां धारांचें। सुदर्शन काढिलें डांबेचें।' -शिशु १०७८. २ (शस्त्र इ०कांचें) पातें, पान. 'लोखंडाचें एक शस्त्र त्याला तीन धारा।' -भज ४७. [सं.] **०तीर्थ**-न. (ल.) (तरवारीची धार म्हणजेच एक तीर्थ मानलें आहे; कारण शस्त्रांनीं चाललेल्या युद्धांत मेलेला शूर पुरुष स्वर्गास जातो अशी समजूत आहे त्यावरून). रणांगण; समरभूमि. 'राजा शिवसिंग धारातीर्थीं देहविसर्जन करून शिवशिव म्हणत शिवलोकास गेला.' -संभाजी. 'धारा तीर्थास निघे ती साधाया जणों महापर्व।' -विक ६७. [धारा+तीर्थ] **०तीर्थीं पडणें**-युद्धांत मरणें; लढतां लढतां मरणें.

**धारा**—स्त्री. १ धार; पाणी, पाऊस इ० जोरानें पडतांना, फुटक्या भांड्यांतून पाणी, द्रवपदार्थ गळतांना दोरीसारखा दिसणारा पाण्याचा, द्रवपदार्थाचा आकार. २ प्रवाह. ३ वर्षाव. 'मजवरी फिरली हे दैवदुर्वारधारा।' -सारुह ३.७३. ४ विवाहसमारंभांतील स्वर्णाभिषेकाचें द्रव्य. ५ (ल.) संतति; प्रजा. [सं.] **०घालणें**-(मेघांनीं) मुसळधार पाऊस पाडणें. 'घाली धारा मेघ कडाडिला माथां। वरी अवचिता देखियेला।' सामाशब्द- **०दत्त** -वि. उदक सोडून दिलेलें, दान केलेलें (इनाम, जमीन इ०). 'कसबे वाई परगणे मजकूर येथें धाराइत इनाम, दिला असे.' -वाडगाछ ३७. [धारा] **०ग्र(गृ)ह**-न उन्हाळ्यांत उपयोगाचें, कारंजीं इ० साधनांनीं थंडपणा आणलेलें, लताकुंजाचें केलेलें घर. 'ऐसीं धाराग्रहे सिंचणांरि। वागितां स्थलु जाईल विस्तारी।' -शिशु ६३४. [धारा+सं. गृह=घर] **०दत्त**-वि हातावर पाणी, उदक धारा सोडून दिलेलें (दान इ०). 'पर्वादि पुण्यकाळीं अथवा महाक्षेत्रीं सदक्षणाक धारादत्त ग्राम अथवा भूमि देणें ती द्यावी.' -मराआ २५ [धारा+सं. दत्त=दिलेलें] **०धर**-पु. ढग; मेघ. 'नाना धाराधर धारीं। झळंबलिया वसुंधरी। उठिजे जेवीं अंकुरीं। नानाविधीं।' -ज्ञा १३.१०५३. [सं धाराधर; धारा+धर=धरणारा] **०धरकाळ**-पु. पर्जन्यकाळ; पावसाळा; वर्षा ऋतु. 'धाराधरकाळें। महानदी उचंबळे।' -ज्ञा १४.२११. [धाराधर+काळ] **धारावर्त**-पु. मुसळधार पाऊस; एकसारखा व जोरानें पडणारा पाऊस. 'साधु देवाळ्या जातां। पर्जन्यें पीडिला धारावर्तो।' -एभा ११.१५०९. [धारा+सं. आवर्त] **धारावाहिकबुध्दि**-स्त्री. एकाच विषयाच्या ठिकाणीं बराच वेळ तदाकार झालेली चित्तवृत्ति. [धारा+वाह+बुध्दि] **धाराशिव**-स्त्री. नदीच्या प्रवाहानें ठरलेली दोन गांवांच्या; शेतांच्या मधली सीमा, हद्द.

**धारा**—स्त्री. (घोडा) चौखुरी पळविणें; घोडदौड. -राज्यको ५.३०. [सं.]

**धारा**—वि. (वयानें) लहान; कनिष्ठ. 'येथ सत्त्व तें उत्तम। रज तें मध्यम। तिहींमाजीं तम। साविया धारें।' -ज्ञा १४.१३९. 'मोठा सर्वातहि हा होय महावीर पांडव, न धारा।' -मो भीष्म १२.२२. [प्रा. धार=लहान, छोटा]

**धारागें**—न. धुराडें; चुलीचा धूर स्वयंपाक घरांतून बाहेर जाण्यासाठीं भिंत, छप्पर इ०मध्यें ठेविलेलें असतें तें भोंक. धारें पहा.

**धारिया**—पु. १ गोराड जमीनींतील गवत निंदण्याचें, तण काढण्याचें एक औत. -कृषि २७२. २ तीक्ष्ण कोयता लावलेला बांबू. -गुजा ६८. [धार]

**धारिष्ट**—न. कार्यापासून भयानें पराङ्मुख न होण्याबिषयीं अंतःकरणाचा दृढरूप गुण तो; धीटपणा; साहस; धैर्य; हिम्या. 'सर्प हातीं घेण्याचें मी धारिष्ट करीन पण दुसऱ्यास मार देण्याचें मला धारिष्ट होत नाहीं.' [सं. धाष्ट्यै] **०वान**-वि. धीट, धीराचा; दमदार; निग्रही; धाडसी; निर्भय; छातीचा; खंदा; साहसी.

**धारी**—स्त्री. धार; धोतर, पातळ इ० वस्त्राची रंगीत किंवा साधी किनार; वस्त्राचा कांठ. 'त्या धोतरांच्या विलसेत धाऱ्या।' -सारुह ६.५१. [सं. धारा-म. धार. प्रा. हिं. धारी] **०दार**-वि. धारी, कांठ असणारें, किनारीचें (वस्त्र). [धारी+दार प्रत्यय]

**धारी**—वि. (समासांत) धारण करणारा; बाळगणारा; घेणारा. जसें:-रूपधारी, यज्ञोपवीतधारी, अवतारधारी, दंडधारी. [सं. धारिन्]

**धारूळ**—न. (व.) गहूं पेरण्यापूर्वी शेताला जी वाही, उतार देतात ती. धारोळा पहा.

**धारें**—न. उजेड पडण्यासाठीं व धूर जाण्यासाठीं वर भिंतीस किंवा छपरास पाडलेलें भोंक, खिडकी; गवाक्ष. धाराणें, धुराणें °ज्ञा.

**धारें**—वि. लहान धारा पहा. **वडीलधारें**-लहानमोठें.

**धारेशुद्ध**—वि. शिष्टसंमत चालीरीतीप्रमाणें चालणारा (मनुष्य). चाललेला (विधि) [धारा=चालरीत+शुद्ध]

**धारोणी**—धारवणी पहा.

**धारोष्ण**—धार-धारुष्ण पहा.

**धारोळ**—न. (व) तिरपें वखरण. धारूळ पहा

**धार्मिक**—वि. १ धर्माचरण करणारा; सत्त्वशील; धर्मात्मा. २ धर्मानें सांगितलेलें; [सं.] **०उत्सव**–पु. धर्मांत सांगितलेला सग; धार्मिक स्वरूप असणारा उत्सव. 'प्राचीन काळचे सर्वच हिंदूंचे उत्सव धार्मिक स्वरूपाचे होते.'–ज्ञाको (ध) ६८. [मं. म]

**धार्य**—वि. १ धरण्या, पकडण्याजोगें; मावण्याजोगें; आधारण्यासारखें. २ घेण्याजोगी, अनुसरण्यास योग्य पद्धत. ३ धारण करण्यास, वापरण्यास योग्य. [सं.]

**धार्ष्ट्य**—न. धीटपणा; धट्टपणा; अमर्यादशील वर्तन, किंवा भाषण. [सं.]

**धाल**—स्त्री. (गो.) सुकण्यांत दुसऱ्या नंबरावर असलेली नारळाची पेंड, घड, घोस.

**धालचें**—क्रि. (गो.) डुलणें; डोलणें. [मं. दोल्]

**धालप**—न. (गो.) डुलणें.

**धाला**—पु. १ (गो.) गर्भ्याच्या पद्धतीचा पौष महिन्यांत खेळावयाचा शेतकरी स्त्रियांचा खेळ.

**धाला**—वि. तृप्त झालेला; समाधान पावलेला; संतुष्ट झालेला. [धाणें-भूतकाळ धातुसाधित] **०साला**–वि १ धाला पहा. २ लवकर, सहज तृप्त झालेला. [धाला द्वि.] **०धाकटा**-वि. १ लहान आणि आटोपशीर; लहानगा व नीटनेटका. लहान पण टुमदार. २ लहान पण सोयीचें, सुखी (घराणें, जागा). 'मुलीला स्थळ धालेधाकटें पहावें' **धाले धन्याचा लेक**–पु मोठयाचा, श्रीमंताचा मुलगा **धालेपण**–न. तृप्ति. 'तेणें आनंदाचेनि धालेपणें। साभिप्राय अंतःकरणें।' –ज्ञा ६.९. 'धालेपणाचे ढेंकर। स्वानंद देती जेवणार।' –एरुस्व १५.२.

**धाला**—पु. (गो.) डोल्हारा. [धालचें=डोलणें]

**धालारा**—पु. (गो.) डोल्हारा.

**धालावचें**—क्रि. (गो.) हालविणें; डोलविणें.

**धाव**—पुस्त्री. १ एक प्रकारचा मऊ आणि तांबडा दगड; गेरू; काव. २ माकडें तोंडास तांबडा रंग लावतात तो.

**धाव, धांव**—स्त्री. १ धूम; पळणें; शर्यत; जोरानें चालण्याचा प्रकार. (क्रि० मारणें, ठोकणें, मोडणें, जिरणें, खचणें, संपणें). २ पळण्यानें आक्रमिलेली जागा, अंतर, मजल. 'एथून त्याचें घर धांवभर आहे.' ३ गाडीच्या चाकाच्या परिघाला बसवितात ती लोखंडी पट्टी. (क्रि० मोडणें). ४ मोटेचे बैल ज्या उतरणीनें चालतात ती वाट; मोटेचा उतार. ५ (ल.) सामर्थ्याची, संकल्पाची, परमावधि; मनाची तयारी, उडी. 'ह्या लग्नास हजार रुपये खर्चू इतकी आमची धांव.' ६ जास्तींत जास्त अपेक्षा, कल्पना. 'आमच्या मतें सणगास पांच रुपये पडावे पण तूं फार धांव मारतोस.' ७ प्रगति; जाण्याची, वाढण्याची मर्यादा. 'अंधळयाची धांव कुडापावेतों; सरडाची धांव कुंपणापर्यंत.' ८ आश्रयस्थान; आसरा; माहेर. 'मुलाची धाव आईपावेतों; मनुष्याची धांव राजापर्यंत.' 'तयां मीवांचूनि धांव। आनौती नाहीं।' –ज्ञा १२.७९. [सं. धाव्] **धांव घेणें**–१ पळण्यास आरंभ करणें. २ धांवत, जलदीनें जाणें. **०घालणें**–जोरानें धांवून जाणें. 'तैसाचि मित्रदेवहि पार्थावरि धांव आग्रहें घाली।' –मोकर्ण १७.३. 'धांव घालीं आई। आतां पाहातीस काई।' –तुगा ८३३. **०करू**–पु. १ धांवणारा पळणारा. २ पाठीराखा. [धांव+करणें] **०चाल**–स्त्री. (कों.) जोराची चाल; धावत जाणें.

**धांव**—स्त्री. बीळ; भोंक (साप, उंदीर यांचें). 'काय मुख पेंव श्वापदांची धांव।' –तुगा ९०४.

**धांव**—न. (गो.) कुंपणाचें दार.

**धावड**—पु. १ लोखंड काढणारी, तयार करणारी एक जात. इकडे बहुधां हे मुसलमान ससतात. २ शिसाडी; लोखंडाचें काम करणारा. [सं. ध्मा=फुंकणें]

**धांवड, धांवण**—स्त्री. (कों.) मजल. (क्रि० पडणें; मारणें). 'आज मला दहा कोसांची धावण पडली त्यामुळें मी थकलों.' [धांव]

**धावडणें, धांवडणें**—उक्रि. १ (काव्य धांवणें) पळावयास लावणें; पळविणें; पिटाळणें; दामटणें. 'वहनें धांवडीत सत्वरा। कौरव प्रवेशले नगरा।' –मुआदि २९.१३८. २ घासणें; सारवणें. 'तया शक्ति चक्राचां तगटीं। धावंडि जे क्षुद्रानदाची पीठी।' –भाए ५४८. –अक्रि. १ पळून जाणें. २ पळ काढणें. [धावड]

**धावडा**—पु. (ना.) एक जंगली झाड, वृक्ष. जळाऊ व इमारती लांकडासाठीं याचा उपयोग होतो. याचा डिक चांगला असतो. 'तेथें पळस धावडे। मोहो खैर बेहाडे।' –कालिका २२.११.

**धांवडावणी**—स्त्री. (गो.) हकालपट्टी. [धावडणें]

**धावडी**—वि. १ धावड जातीच्या संबंधीं; धावडानीं केलेलें. २ लोखंडी (तवा, इ०) **०तवा**–पु. लोखंडाचा तवा. 'पुरण पोळयाकरितां एक धावडी तवा खरेदी करावयाचा होता'–खरादं ६३. **०लोखंड**–न. धावडानीं केलेलें लोखंड, हें घनवर्धनीय असतें.

**धावडी**—स्त्री. (व.) धामट रंगाचा कठाण्या तीळ.

**धावण-णी**—स्त्री. १ पाठलाग (जोराचा) 'साचळ होतां बळियाडें। धांवणियासी निघाले।' –देवसंत ९. २ धावणें; पळ; धूम; धावण्याची क्रिया. 'मेरूचे शिखरीं पडियेली खाण। तेथें लोभ्यानें काढियेली धावण।' –ब ५९८. ३ सैन्य, जमाव इ०चें धांवणें; कूच, मोहीम; मंडळीची धांवपळ. ४ रक्षण. 'मार्गी तुवां केलें विघ्न। आणि करीन म्हणसी भक्षण। यात्री कोणपक्षियांचें धावण। करील मी येथें निमालिया।' –जैअ. ७७.६८. ५ उपाय; धांवाधांव; इलाज. 'अहो सखिये हंसणी। कांहीं करावी धावणी। जंव देव पंचप्राणी। सांडिला नाहीं।' –कथा

१.४.१८०. [ धांवणें ] ०करणें–उठावणी करणें; धांवाधांव करणें. 'वजीर कर त्यात धांवणी।' –ऐपो ८५. ०धुपणी–स्त्री. १ घाईनें बेफामपणें धांवण्याची क्रिया. पळापळ. [ धावणें द्वि. ] २ धांवण्याचे श्रम करणें. धावणेंधुवणें पहा.

**धावण-न**—न. १ स्वच्छ करणें, धुणें. 'दंतधावन.' 'नंदीग्रामी तूं राहून। केलें वल्कलांचें धावण।' –जैअ ३५.८०. [ सं. धावन ]

**धावणें-धांवणें**—अक्रि. १ अतिशय वेगानें चालणें; पळणें; २ रक्षण करण्यास, मदतीस जाणें; धांवून येणें. 'वधिला कर्ण, समक्षचि कोण्हीही धांवले न तन्मरणीं।' –मोकर्ण ४५.२१. [ सं. धावन् ] ०धुपणें–अक्रि. १ धावण्याचे श्रम सोसणें. २ गर्दीनें, घाईनें धावत जाणें; निष्फळ हेलपाटे मारणें. धावणीधुवणी पहा. [ म. धांवणें. द्वि. ]

**धावणें, धांवणें**—न. १ धरण्यासाठीं किंवा रक्षणासाठीं पाठलाग करणारी फौज, लोक. रक्षण करण्यासाठीं, मदतीसाठीं धांवणारा, शिपाई, दूत; रक्षक. ( क्रि० लावणें, धाडणें ) 'कीं चोरीं मारितां अरण्यात। एकाएकीं धांवणें धांवत। त्याच्या सुखासी नाहीं अंत।' –ह ११.१७४. २ धांवा; मदतीकरितां विनति; प्रार्थना. 'परतें सारून वैभव। भक्तांच्या धांवण्या धांवे देव।' 'कैं कृपा करसी नेणे मज धावणें।' ३ स्वारी; दौड; मोहीम, 'सर्वेचि मागर्धे धांवणें केलें। मथुरेवरी पूर्ववत।' –ह २२.१२९. ४ गति; धांव. 'पै द्विजसेवेपरौते। धांवणें नाहीं शूद्रातें।' –ज्ञा १८.८८४. ५ रक्षण; मदतीसाठीं धांवणें; पाठलाग. 'सुभद्रा हरूनि नेली पार्थे। वेगीं निघा धावणीयातें।' –मुआदि ४७.१०५. 'तया वेळीं नाहि कोणि केले धावणें' –स्त्रीगीत. [ सं. धाव्–धावन ] धावण्यास येणें–पोहोंचणें–पावणें–धावणें–१ साह्य करण्यास धांवत जाणें; एकदम सरसावणें; पुढें येणें. 'धांवधांव धांवण्यास म्हणती विनवुन सांबाला।' –ऐपो ३०७. २ पळणारास गांठणें, धरण्यासाठीं मागें लागणें.

**धावना दोरा, धावदोरा, धावरादोरा**—पु लांब लांब टांके घेऊन घातलली शिवण (क्रि० घालणें) जुजबी शिवणें; कच्ची शिवण. [ म. धांवणें+दोरा ]

**धावता धोटा**—पु. प्रत्यक्ष हातांनीं न फेकतां हातांनी दिलेल्या यांत्रिक झटक्यानें किंवा धक्कयानें फेकला जाणारा मागांतील धोटा. ( इं ) फ्लाय शटल. 'सुमारें पन्नास वर्षे धावत्या धोटयाची कल्पना निघाली होती.' –टि १८.

**धावती**—स्त्री. (कों.) १ धावण्याची क्रिया. २ घाईनें इकडे तिकडे धांवणें. कूच. ३ धांवाधांव; गडबड [ धांवणें ] ०नजर–स्त्री. पदार्थांचें सूक्ष्म निरीक्षण न करतां वरवर त्यांच्यावर फिरविलेली दृष्टी; ओझरती नजर; विहंगमावलोकन

**धावतेंपाणी**—न. संथ नसणारें, वाहणारें पाणी. २ जोरानें वाहाणारें पाणी; लोंढा. [ धांवणें+पाणी ]

**धावदवडा**—पु. १ धांवाधांव; पळापळ; येरझारा. २ इतस्ततः, अनिश्चितपणें धांवणें; भटकणें. ( क्रि० करणें; लावणें; पडणें; लागणें ) [ धांवणें+दवडणें ]

**धावदोरा**—पु. पक्क्या शिलाईपूर्वी घालावयाची कच्ची शिवण. धावता दोरा पहा.

**धावधपटी**—स्त्री. ( गों. ) धांवपळ; पळापळी. [ धांवणें ]

**धावधूप**—स्त्री. यातायात; दगदग; श्रम. [ धांवणें+धुपणें ]

**धावन**—न. धांवणें; पळणें. धावण–णी पहा. 'धांवन करूनि रक्षी भीष्मापासूनि आजि भाच्यातें।' –मोभीष्म ८.३८. [ सं. धाव्=पळणें ]

**धावन**—न. धुणें; स्वच्छ करणें. 'दंतधावन,' 'अंगधावन,' इ० [ सं. धू=धुणें ]

**धावना, धावनिक**—पु. ( महानु. ) धांवणारा ( पुढेंपुढें करणारा ) सेवक; नोकर, चाकर. 'धावनापवनु।' –शिशु ५०. 'ऐसें जगळदरणेयांचीया धावनिका हातीं देति' –ऋ १३६. [ धावन ]

**धावनी**—स्त्री. उठवणी; उत्तेजन. 'कटाक्षाची अणी। रूपे हृदयपाषाणीं। तऱ्हीं नव्हेंची धांवनी। मन्मथासी।' –शिशु ४१९. धावणी पहा. [ सं. धाव्=पळणें ]

**धावनी**—स्त्री. धुणी पुसणी; घासणी; चोळणी इ० उपचार. 'विरहानल न मनी धावनी।' –शिशु २८२. [ सं धू=धुणें ] ०करणें–धुवून टाकणें. **धावनौषध**–न. धुण्यासाठीं औषध. (इं.) लोशन.

**धावय**—पु. १ सापाची एक जात. रंग भुरकट, नऊ दहा फूट लांब हा शेपटी तोंडांत धरून गाडीच्या चाकाप्रमाणें चालतो. –बदलापूर ३४९. 'हें जाणौनि जैसा प्रौढी। जो दृष्टीसवेंचि विष फेडी। तो धावेया हरिगारुडी। पातला कां।' –राज्ञा २.७२.

**धावरा**—वि. १ चपळ; धांवणारा; वेगवान. २ जलद चालणारा; धांवण्याचा स्वभाव असणारा ( मनुष्य, पशु ). [ धांवणें ] ०गुणाकार–पु. गुणाकाराचा एक प्रकार, याच्या उलट बैठा गुणाकार. गुण्याला गुणकाच्या प्रत्येक स्थानांतील संख्येनें गुणून गुणाकार उजवीकडून डावीकडे मांडित जाणें. [ धांवणें+गुणाकार ] ०भागाकार–पु. भागाकाराचा एक प्रकार. याच्या उलट बैठा भागाकार. [ धांवणें+भागाकार ]

**धावरीमुंगी**—स्त्री. एक जातीची मुंगी. ही लहान, काळी व जलद चालणारी असते.

**धांवरें**—न. एक त्वचेचा रोग, खरजेचा एक प्रकार. 'कोणाचे अंगास होता नारू। कोणासि जाहलें होतें धांवरूं।' –भवि २४.६९. २ घोडे, गाई इ० जनावरांना होणारा एक रोग. [ धावणें ]

**धावरें**—न. खोकड, साळी, उंदीर इत्यादींचें बीळ.

**धावरें अळूं**—न. दूर पसरणारी एक अळवाची जात.

**धावशी, धावस**—स्त्रीपु. एक क्षुद्रुप.

**धावसरें**—न. (कु.) रोगाची सांथ.

**धावा, धांवा**—पु. १मदतीला धांवून येण्यासाठीं(परमेश्वराची) केलेली विनवणी, प्रार्थना. 'सर्व प्रकारीं करी धांवा.'–ज्ञा १८. १७५९. 'नाहीं माझा धांवा पडियेला कानीं। कोठें चक्रपाणी गुंतलेती.' २ प्रार्थनेचें पद, गाणें. [म. धांवणें; हिं.] ०**मांडणें**–मदतीला (धांवा! धांवा!) धांवून या अशा आरोळ्या मारणें–ठोकणें. (सामाशब्द) ०**करी**–पु. धांवा धावा अशा आरोळ्या मारणारा; मदतीची याचना, प्रार्थना करणारा. –**धांव**–स्त्री. घाईनें इकडे तिकडे पळणें; पळापळ; गडबड; गोंधळ, मदतीची खटपट. एखाद्या गोष्टीवर ताबडतोब उपाय करण्यासाठीं धांवपळ करणें. [धावणें] –**दवडा**–धावदवडा पहा.

**धांवाडा**—पु. धांव; पळ; मजल. धांवडण पहा. (क्रि० मारणें). [धांव]

**धावाडय़ाचा वाघ**—पु. दुसरीकडचा, फिरस्ता वाघ.

**धावित्रणें, धावीनणें**—धांवणें, पहा. 'धावित्रला अंतरसाक्षी। गजेंद्रा कारणें।'–दा ४.७.२७. 'प्रेमभरें वेडैली। मनें आलिंगावेयां धावीनिली।' –शिशु ६०७.

**धावुंधावुं**—क्रिवि. (धांवून धांवून) कळकळीनें आस्थेनें. 'किती पुसुं डोळे धावुधावु तुझ्या शेल्यानें।'-होला १३०.

**धाशत, धासत**—स्त्री दहशत; धास्ती; भीति; धास्ती पहा. 'मी प्रतापी रावण धाशत देवादिकां।'–पला ४३. 'केवढा दर्प थरथर कांपे धासत वैऱ्याला।'–ऐपो १७७.

**धावें**—न (नगरी) भिंतीला चोरानें पाडलेलें भोंक. –गुजा ५०.

**धासधूस**—स्त्री. १ धडधड; धागधुग; माटमूट. (क्रि० जीव करणें, होणें). २ भीति; धास्ती. (क्रि० वाटणें). [ध्व. धस!धुस!]

**धासरा**—पु. धक्का; धसका. ढासरा पहा. (क्रि० घेणें–धरणें)

**धासळणें, धांसळणें**—अक्रि. १ एकदम, धडधड आवाज होऊन खालीं पडणें; कोसळून खालीं येणें; ढांसळणें; (भिंत, बांध, ढीग). २ तुकडे तुकडे होणें (यंत्राचे). ३ कोसळणें; धोधो पडणें (पाऊस, फळें वगैरे). ४ फिसकटणें, मोडणें; (बेत, योजना). कोसळणें पहा. हें क्रियापद सकर्मकहि वापरलें जातें. [ध्व. धांस]

**धास्त-स्ती**—स्त्री. १ दहशत; भीति. (क्रि० पाळणें, बाळगणें, धरणें.) २ काळजी; चिंता; घोर. 'आमचा भाऊ अद्याप येत नाहीं म्हणून आम्हाला मोठी धास्त लागली' ३ भीतीपासून मनावर झालेला परिणाम; धसका 'पोरानें वाघ पाहिल्यापासून किंवा आई मेल्यापासुन धास्त घेतली म्हणून झिरणीस लागला.' [अर. दहशत] (वाप्र.) ०**खाणें–घेणें**–भिऊन जाणें. ०**खोर, धास्त्या**–वि. सदैव भीति बाळगणारा, फार भित्रा इसम. ०**धोका**–पु. (व्यापक) १ भीति; काळजी. २ संकटें; दुःखें; अडचणी; आपत्ति; धोके.

**धास्तावणें**—अक्रि. १ भीति, दुःखामुळें बुद्धिभ्रंश होणें; भांबावणें; गांगरणें. [धास्त]

**धाळ**—पु. (गो.) भेग; फट. [सं. धार=खोल जागा?]

**धिक्**—उद्गा. धिक्कार, व्यर्थतादिमूलक तिरस्कार विधानाचें द्योतक. तुच्छता; किळस; तिटकारा; वीट इ० भावना दाखविणारें अव्यय. 'अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें।' –केका ११. –वि. हलकें, कमी दर्जाचें; तुच्छ. 'आपल्या जिण्यास धिक् समजून समर्थांनीं धिःकारलेल्या भिक्षापात्राचा त्यानें स्वीकार केला.' –विवि ८.८.१४२. [सं.]

**धिक्कार**—पु निंदा; तुच्छता, तिरस्कार, तिटकारा करणें; धुडकावणें. 'खून, अन्याय व पाप ह्यांच्या पायावर उभारलेल्या सत्तेचा वरून परमेश्वर व खालून लोक धिक्कार करीत असतात.' –भाऊ ३६. [सं. धिक्+कार]

**धिक्कारणें**—उक्रि. तुच्छ मानणें; तिरस्कारणें; निंदा करणें; झिडकारणें. 'आणि जगातें धिक्कारिती।'–ज्ञा १६.३२८. 'धिक्कारूनी गोष्टि मातेसि सांगे। कौसल्येच्या ये गृहा सानुरागें।'–वामन भरतभाव १५. [सं. धिक्कृ=धिक्कार]

**धिक्टि, धिमिक्टि**—न. मृदंगाचा आवाज. [ध्व.]

**धिंग**—स्त्री. क्षोभ; दंगल; लोकांचा दंगा; खळबळ; जनक्षोभ. –पु. धूम; गजर; घमंड दंगल. 'टाळ मृदंग चंग उपाग। मेळऊनि करावा कथेचा धिंग।' –स्वानु ८.४.३०. [धिंगा]

**धिंग**—वि. १ उदार; खर्चिक; उधळ्या; पैशाविषयीं सढळ. २ व्यसनाधीन; बाहेरख्याली; दुराचारी; बेबंद; छट; असन्मार्गासक्त. ३ तृप्त; संतुष्ट; प्रीत (यांत निंदा ध्वनित आहे). 'धूर्त तूर्त धावोन आला। धिंगबुद्धीनें धिंग जाला।' –दा १४.४.१९. ४ धिप्पाड; अवजड; बळकट; मजबूत; उंच आणि दांडगा. ५ जागृत; तेजस्वी; कडक. 'नरसीपुरी देव धिंग। गुप्त आहे।' –रामदासि २.१०१.

**धिंगड, धिंगाड**—वि. विद्रूप दिसण्या इतका मोठा व अजस्र (मनुष्य; प्राणी). –न. (निंदार्थी) १ उंच; बेढब; ढंगळ –स्त्री. २ दांडगी; धटिंगण मुलगी; नागडीउघडी राहाणारी मोठी मुलगी; घोडी; टोणगी; भोपळ देवता. [धिंग]

**धिंगडणें**—अक्रि. उनाडक्या करणें; दंगामस्ती करणें; उड्या मारणें; खिदळणें; नाचणें; दंगल करणें; ओरडणें; बाजार मांडणें. धांगडणें पहा.

**धिंगणें**—उक्रि. धिक्कारणें. 'स्वांगीं भोगरता म्हणोनि धिंगित्या कांताहि पातिव्रता।' –अकभा ३मंराधा ६. [धिग्]

**धिगधिग-धिगां**—क्रिवि. ( जिणें शब्दाबरोबर उपयोग ). सर्वांना धिक्कारीत आयुष्य काढणें; सदां असंतुष्ट, असुखी राहणें. [ धिक् द्वि. ]

**धिंगा, धिंगाडा-णा**—पु. १ धांगडधिंगा. ( क्रि० घालणें; मांडणें ). 'त्यावर हा धिंगा.' -विवि ८.८.१५८. २ आक्रस-ताळेपणा; आकांडतांडव, केंस ओढणें, लोळणें, ओरडणें इ० प्रकार (बायका मुलांचे ). ३ धांगडधिंगा पहा. **धिंगामस्ती**-स्त्री. १ दंगामस्ती, दांडगाई करणें; जोर दाखविणें; मारामारी. २ खोड्या; धांगडधिंग्याचा खेळ; धुमाकूळ. दंगामस्ती पहा.

**धिंगाई**—स्त्री. उधळेपणा; खर्चिकपणा; धिंगपणा. [ धिंग ]

**धिगावणें**—अक्रि. भीति वाटणें, घाबरणें. 'धास्तीनें धिगाऊन संभाजीराजे यांचें निशाण घेतलें.' -पेद १०.५०.

**धिगी**—स्त्री. १ ( गो. ) टेंकू; टेंकण; वजन खालीं येऊं नये म्हणून लावतात ती मेढ. 'माड कलल्यास, उन्मळून पडूं नये म्हणून धिगी लावतात.' २ कैची; मोरवा; आडव्या तुळयांची चौकट; ( इं. ) कपल. [ सं. स्थगु ]

**धिगी, धिग्य**—धिक् पहा. 'धिगी ऊठ गे ऊठ नष्टे खटयाळे।' -आकृ १६. 'दुःशिला खळा धिग्य रे जिणें।' -रामसुतात्मज ( द्रौपदी वस्त्रहरण १२१ ).

**धिग्ग**—वि. ( गो. ) उंच धिप्पाड. धिंग पहा.

**धिंचें, धिकें, धिचो**—न. ( गो. ) टीच. 'धिकेंभर लांब.'

**धिटाई**—स्त्री. १ धीटपणा; धाडस; निर्भयता. २ उद्धटपणा. [ धीट ] म्ह० धिटाई खाई मिठाई आणि गरीब खाई लाथा.

**धिटाव, धिटींव-वा**—नस्त्री. धिटाई पहा. 'जे धिटींवा करूनि भवादृशां। पढियंतया होआवें।' -ज्ञा ९.२३. 'थोर धिटाव। हे सद्गुरुकृपा।' -दावि ३१३.

**धिट्ट**—वि. फाजील धीट; उद्धट दिसेल इतका धीट; अतिशय धट. [ धीट, धट ]

**धिंड**—स्त्री १ एक शिक्षेचा प्रकार. सार्वजनिकरीत्या गुन्हे-गाराची केलेली अप्रतिष्ठा. (त्याला पांच पाट काढून गाढवावर बस-वीत व शेपटीकडे तोंड करीत व वाजतगाजत गांवांतून मिरवीत नेत ). ( क्रि० काढणें; भोंवडणें; मिरवणें; फिरवणें ). २ अशी धिंड काढलेला माणूस. ३ जाहीर अप्रतिष्ठा; मानहानि; उपहास. ( शिव्यागाळी, मारहाण इ० प्रकारें ). ४ ( तिरस्कारार्थी ) वाईट माणसाच्या येण्याजाण्याच्या वेळीं म्हणतात. 'या दुष्टाची धिंड बाहेर निघेल तेव्हां मी घरांत येईन.' धिंडका पहा. **धिंडका**-स्त्री. ( धिंड काढण्यालायक व्यक्ति ) नेहेमीं मिरवूं पाहणारी व पुढेंपुढें करणारी तिरस्करणीय व्यक्ति. 'तिकडे जाऊन आपली धिंडका तेथें बसूं द्या.' -कीचकवध.

**धिंडवडा, धिंडोडा**—पु. १ बदकर्माचा बोभाटा, जाहीर अप्रतिष्ठा करणें; अशी अप्रतिष्ठा, फजीती झालेली स्थिति. ( क्रि० काढणें ). २ कुप्रसिद्धी; बदलौकिक. ( क्रि० होणें; वाजणें ) 'त्या गोष्टीचा गांवभर धिंडवडा झाला.' 'त्या मनुष्याचा सर्व शहरांत धिंडवडा वाजला आहे.' [ धिंड+वडा प्रत्यय; हिं. धंडोरा ]

**धिंडावणें**—अक्रि. (एखादा आपल्या मनाविरुद्ध बाहेर गेला असतां निंदार्थी ) धिंड काढणें; फिरणें; भटकणें; घराबाहेर जाणें. 'जेवायचें होतांच आलास कामाचे वेळेस कोणीकडे मसणांत धिंडा-वलास.' [ धिंड ]

**धिंडी**—स्त्री. धिंड पहा.

**धिणोशी**—स्त्री. ( गो. ) एक माशाची जात.

**धिंद्**—धिंड पहा.

**धिधिकट**—पु. मृदंगाचे बोल. धिक्किट पहा. 'धिधिकट धिधिकट कट बिकट तान तं चणाणी। -दावि ४१८. [ध्व.]

**धिंधी**—स्त्री. गर्दी; दाटी. 'दाट पारकीयांची धिंधि।' -उषा १५०.१७०१.

**धिप्पाड-धिप्पाड**—वि. खूप उंच व बळकट; मजबूत व उंच बांध्याचा ( माणूस, जनावर, वृक्ष इ० ).

**धिबडी**—स्त्री. १ ( राजा. ) दाटी; गर्दी; मोठा घोळका, जमाव. २ धिंगामस्ती; दांडगाई; धांगडधिंगा. [ ध्व ]

**धिबडी, धिमडी**—स्त्री. ( कु. ) खंजिरी, डफ. [ध्व. धिम्]

**धिंबडी**—स्त्री. १ चंगळ; (जेवणांत खाद्यपेयें इत्यादिकांची) लयलूट; विपुलता. २ दंगामस्ती; मजेचा धुमाकूळ; रंगेलपणाची दंगल; मजा; धिबडी पहा. [ ध्व. धिम् ] **दमडीवर धिंबडी**-थोडक्यांत चैन, मजा; अत्यल्प साधनावर आनंद, मौज करणें.

**धिबिडगा**—स्त्री. धबडगा; कामाची गर्दीः पसारा, धांदल.

**धिम**—पु. वाद्य इ० चा विशिष्ट आवाज. 'धिमि धिमि दुंदुभि वाजति.' -दावि ४१३. [ ध्व. ] **०किटी**-१ मृदंगाचे बोल. २ नृत्यांतील बोल; ठेका; नूपुरांचा आवाज. 'धिमकिटी धिमकिटी तकथा विचित्र। रागगौल्ता संगीत शास्त्र। नृत्यकळा देखोनि देवांचे नेत्र। पातीं हालवूं विसरले।' -ह १.१३. **०भेरी**-स्त्री. एक वाद्य, नाचाचा ताल धरतांना निघणारा वाद्याचा आवाज. 'धिमिकी धिमिकी धिमभेरी झननन झांनन झनत्कारी।' -राला ३८.

**धिमडी**—स्त्री. १ (गो.) तुरमुंडी; डोक्यानें जोरानें ढकलणें. २ डफ.

**धिमा, धिम्मा**—वि. १ शांत प्रकृतीचा; थंड; विचारी; गंभीर; निश्चयी; धीर. २ नरम; सहनशील; धीर धरणारा ३ (प्रशं-सार्थी ) संथ; सावकाश; गर्दी, घाई नसलेला; मंद; मट्ठ; जड

४ फार उंच न चढलेला पण भरदार (मृदंगाचा स्वर); हलके; सावकाशपणें (वाचणें, गाणें, म्हणणें). [हिं. धीमा; तुल० सं. धीमत्]

**धिमाई, धिम्माई**—स्त्री. १ थंडपणा; शांतपणा; विचारीपणा; गांभीर्य; निश्चयीपणा. २ शांतता; सौम्यता; सहनशीलता. ३ संथपणा; सावकाशी. ४ मठ्ठपणा; जडपणा. [हिं.]

**धिमिकी**—स्त्री. धिम; वाद्याचा, नृत्याचा आवाज. 'धिमिकी धिमिकी धिमभेरी–झननन झांनन झनत्कारी।' –राला ३८. [ध्व. धिम]

**धिया**—पु. १ हिय्या; धैर्य; धीटपणा; शौर्य. २ खंबीरपणा; दृढनिश्चयीपणा; नेट; जोर; हिंमत; ताकद. (क्रि० धरणें; देणें; येणें; फुटणें). [सं. धृति; प्रा. धिइ; म. हिया]

**धिर**—पु. शूर; धीर पहा. 'नरवर धिर त्यांतें देखतां शीघ्र आली।' –माधवरामायण बाल २१.

**धिरडें**—न. एक आंबोळीसारखा छिद्रयुक्त खाद्य पदार्थ. **पाठीचें–हाताचें–धिरडें–काढणें–निघणें**–खूप मारून एखाद्याच्या पाठीचें हाताचें कातडें धिरड्यासारखें ढिलें करणें; खरपूस मारणें. [इडरी–धिडरी–धिरडी ?]

**धिरणें**—अक्रि. १ धीर, दम धरणें; धिरानें घेणें; थांबणें, उतावळी किंवा घाई न करणें; वाट पहाणें. 'तुम्ही जर वर्ष दोन वर्षे रुपयांस दम धिराल तर घेतों.' 'पांचशें रूपयेपावेतों मला भलता कोण्ही धिरेल.' २ (सामा.) थांबणें; खोळंबणें. ३ (राजा.) वर्ज करणें; टाळणें; सोडणें; वांचून राहणें (मद्य, मांस, इ०) [धीर]

**धिरा**—पु. १ आधार; टेंका (तुळई इ०कास खांबासारखा). २ (ल.) उत्तेजन; धीर; कृपादृष्टी; आश्रय. ३ खांब, मोटेच्या विहिरीचा (टेंकण दिलेला). [धीर]

**धिरा, धिरे, धिरेधिरे, धिराधिरे**—क्रिवि. आस्ते; सावकाश; हळूहळू; काळजीनें. 'नकोरे होऊं घावरा तूं दिलभरा धिराधिरा तुझ्यावरी अधीं रंग शिंपितें।' –अफला ७८. [धीर]

**धिराई**—स्त्री. (ना.) धीर; धिम्मेपणा.

**धिरावा**—पु. (व.) आधार; खाचराची फडी ठेवण्यासाठीं तीन किंवा दोन पायांचें लांकूड लावतात तें.

**धिरासा**—पु. १ आश्रय; टेंकू; आधार. २ धीर; आश्वासन; उत्तेजन. (क्रि० देणें; येणें). [धीर]

**धिलांग, धतिगण**—पु. भजनाचे वेळीं निघणारा मृदंगाचा आवाज, ध्वनि. 'धिलांग धतिगण रे।' –दावि १७५.

**धिवंस**—पु. (गो.) एक प्रकारची मासळी.

**धिंवसा, धिसा**—पु. (काव्य.) १ भीति; भय. 'हिंसेचा पडे धिंवसा।' –सिसं ६.९८. २ धैर्य; धीर. 'दुर्योधनु संतोषावा। सैन्यातें धिंवसा होआवा।' –गीता १.७५६. ३ उत्कंठा; हव्यास; इच्छा. 'आतां पुरला आम्हां धिंवसा। आत्मबोधाचा।' –ज्ञा ३.७. ४ आवांका; अभिमान. 'ऐसा धिंवसा धरोनि चित्तीं।'–मुंरंशु ७०. [तुल० सं. अध्यवसाय–राजवाडे भाअ १८३४] **धिंवसेकर**–वि. इच्छा करणारा. 'पैं गा मनुष्यांचिया सहस्रशां। माजि विपाइलेयाचि धिंवसा। तैसें या धिंवसेकरां बहुवसां। माजि विरळा जाणें।' –ज्ञा ७.१०.

**धिष्ण्य**—पु. स्कंध सोडून सहा अंगुळें बाहूचा जो प्रदेश तो; घोड्याचा एक अवयव. –अश्वप १.६२.

**धिस**—उद्गा. शी! शी! हुर्यो! हुर्यो! हाड! हाड! इ० हांकलून देतांना योजावयाचे उद्गार. [ध्व.] ०**पिटाविणें**–आरडाओरड करून, फजीती करून पिटाळून लावणें.

**धी**—स्त्री. बुद्धि; मन; मति. [सं.]

**धीट**—वि. १ धट्ट; धाडसी; छातीचा. २ उद्धट; दांडगा; ढालगज. 'बाहेरी धीट जसी। दाटुगा पति कळासी।' –ज्ञा १३. ५०५. [सं. धृष्ट; प्रा. धिट्ठ] **म्ह०** धीट नीट लाखाच पीठ=(व.) जी कुणाला भीत नाहीं धीट असते तिला म्हणतात. ०**पाठ**–पु. भक्तिपर नसणारें शीघ्रकाव्य. 'सीघ्रचि कवित्व जोडिलें। दृष्टि पडिलें तेंचि वर्णिलें। भक्तिवांचून जें केलें। त्या नांव धीटपाठ।' –दा १४.३,१०.

**धीटणें**—अक्रि. धीट होणें; धीर करणें. 'मग सावधपणें धीटला राव।' –दावि १८२.

**धीटत्व**—न. धीटपणा; धाडस. 'मी सिद्ध जाहलें तुज वरावया। परम धीटत्व करूनियां। पत्र लिहिलें नेणतपणें।' –ह २३. १५३.

**धीड**—स्त्री. धाड; झुंड. 'पोटीं घालूनि माल भरती। सावध पहारे देती भवतीं। तों तस्कर धीडी शतानुशती। येऊनियां पोंचले।' –नव २५१८. धाड पहा.

**धीणानुरोध**—पु. घोड्याच्या नाकास होणारा रोग. खरणी पहा. –अश्वप२.१३७.

**धीमातिताला**—पु. एक ताल. तिलवाडा पहा.

**धीमान**—वि. बुद्धिमान्; शाहणा; जाणता. [सं.]

**धीमार**—स्त्री. एक कोळी जात व तींतील व्यक्ति. ढीमार. [सं. धीवर; हिं.]

**धीर**—पु. १ पुष्कळ वेळ वाट पहाण्याची, सहन करण्याची, चिकाटी धरण्याची ताकद; दम; सहनशीलता; शांतपणा; स्थिरपणा; टिकाऊपणा; (क्रि० धरणें; येणें; सुटणें; फुटणें; फाटणें; सोडणें; टाकणें इ०). 'तुम्हीं दोन वर्षे रुपये नाहीं दिले तरी मला धीर आहे.' 'धीर तो कारण। साह्य होतो नारायण।' –तुगा २४३१. 'श्रमले श्रमले समरीं पळहि धरी धीर हरि न रथ न करी।' –मोशल्य ३.९५. **म्ह०** धीर असेल पोटीं तर बरें होईल शेवटीं. २ धर; आवरशक्ति; बंधन; दाब. तोंडाला धीर=बोलण्याला,

खाण्याला मर्यादा. जिभेला धीर=जीभ आवरणें. पायांला धीर= पायांत ताकद ( बराच वेळ थांबण्याची, उभें राहण्याची इ० ). शौचाला धीर नाहीं=अतिसाराचा विकार असणें. ३ ( बोलण्यांत. करण्यांत, चालण्यांत ) शाश्वती; सातत्य; स्थीरता. ४ टिकण्याचा गुण; मजबुती; घट्टपणा (घोडा, घर, खांब, गादी, कापड, कागद यांत ). ५ धारिष्ट; धैर्य. ' धरीरें मना धीर धाकासि सांडी ।' –राम २७. ६ विश्वास (संकट परिहाराबद्दल). ' दुसऱ्याचे धिरावर कोणतेंहि काम आरंभूं नये. ' –वि. १ धैर्यवान् ' राज्य श्री स्त्री सुत हे क्लीबाला काय होय जो धीर । ' –मोशांति ३.६७. २ गंभीर; उदात्त. ' तेथुनि सरस्वतीचीं तीर्थें सेवीत जाय तो धीर ।' –मोमंभा ३.१७. ३ दमदार; उतावळा नसणारा. म्ह० धीर तो गंभीर उतावळा तो बावळा. ४ निश्चयी; करारी. [ सं. धैर्य; प्रा. धीर ] ०करणें–हिंय्या करणें; धाडसाचा प्रयत्न करणें. ०चेपणें–धैर्य, विश्वास पुन्हां प्रस्थापित होणें; भीति जाणें; भीड मोडणें. ०देणें–प्रोत्साहन, उत्तेजन देणें. ०निघणें–धैर्य, निश्चय टिकणें; धैर्य, विश्वास न मावळणें. धिराचा–१ दमदार; निश्चयी करारी. २ धैर्यवान्; धाडसी. धीरानें घेणें–दम धरणें. ' जरा धीरानं घेशील तर सर्व सांगतों. ' –स्वप ३२.

**धीर**—पु. १ टेंका; टेकू; नेट. २ ( ल ) आश्रय; आधार. धिरा पहा.

**धीरट**—वि. धैर्यवान्; धीराचा. ' धर्म धरी धार धारणा धीरट। निरालंब पीठ सौख्य शोभा। ' –निवृत्तिगाथा १३.

**धीरणें**—अक्रि. धीर देणें. ' धीरोन गणेंद्र युक्ति साधी । ' –दावि ४०६.

**धीरा**—पु. धिरा पहा.

**धीरावती**—वि. धैर्यवान (स्त्री); धैर्यवती. 'धीरावति आणि सती । ' -एरुस्व ४.१०.

**धीवर**—पु. एक कोळी जात. तींतील व्यक्ति. हे मासे धरण्याचा धंदा करतात. [ सं. ]

**धीवसा**—पु. धैर्य; धिवसा पहा. ' मेघाची जळवृष्टि फार पडते कैसा धरूं धीवसा । ' –अकभा २. द्वादशमास(बसव) २८. 'पंचमीं स्त्री शूद्र अन्ययाति तरणोपाय धींवसा । ' –स्वादि १.१.२७.

**धुइ**—स्त्री. ( माण ) शपथ. ( क्रि० घालणें ). थुश्शो. [ थुई= थुंकी ]

**धुई, धुकट**—स्त्रीन. धुकें; जमीनीजवळ येणारें पातळ अभ्र ' जैसी अंधारी रात्र पाही । त्याही वरी दाटे धुई । ' –भाराबाल ४.३८. ' धुकटा करवीं धरविलें । अगाध पाणी ।' –दा २०.८.२३. 'धुईचे गोडी व खारी असे दोन प्रकार आहेत. –कृषि १६७. [ सं. धूम; गु. धुई–ओ–वो ]

**धुकट**—न. ( कों. ) धूर; धुई. –क्रिवि. अस्पष्टपणें; अंधुकरीतीनें ( दिसणें ). [ धूम; धुकें ]

**धुकटा**—पु. ( नंदभाषा ) तंबाखू.

**धुकटावणें**—अक्रि. (धूर लागणें) १ नाकाडोळयांत धूर गेल्यामुळें व्याकूळ होणें. २ तिरसट, दुर्मुखलेला, सुतकी असणें. –क्रि. १ धुरी देणें. २ व्याकूळ करणें. [ धुकट ]

**धुकटी**—स्त्री. ( प्रा. ) धुरी.

**धुकटी, धुमटी**—स्त्री. ( गो. ) तंबाखू.

**धुकटी**—स्त्री. न्हाव्याची वस्तरे ठेवण्याची पेटी, पिशवी. धोकटी पहा.

**धुकटें**—न. धुकट; धुकें. ' धूर आणि धुकटें येती । वायुसवें । ' –दा १३.९.३३.

**धुकधुक, धुकधुकणें, धुकधुकी**—धुगधुग, धुगधुगणें, धुगधुगी पहा. 'भयें या बंधूच्या हृदय परि यीचें धुकधुकी । ' –सारुह ७.८६. ' तया धुकधुकी वाटे सदां । ' –दावि २४३. 'ऐसें सुधन्वा बोले निःशंक । तों माधवोदरीं धुकधुक । '-जै १९ १२४.

**धुकधुकी**—स्त्री. एक अलंकार. हा वक्षस्थळावर घालतात. ' मुक्ताशेखर पोंहच्या धुकधुक्या हीरांगदें उज्वलें । ' –सारुह ३. ४२. ' धुकधुकी वाहणें बाळलेणींची । ' –दावि १८. [ हिं. ]

**धुकमुक, धुकमुकु, धुकडमुकड**—क्रिवि. धडधड, माटमूट; धाकधूक. (क्रि० वाटणें; करणें; जीव. काळीज). –स्त्री. धडधड.

**धुकलणें**—क्रि. ( गो. ) ढकलणें.

**धुकाट**—पु. ( राजा. ) धूर.

**धुकाटें, धुकें**—न. आकाशांत जमणारें धुरासारखें जलबिंदूंचे पटल; धुई; धुकट पहा.

**धुंकार**—स्त्री. गर्जना; आरोळी. ' धुंकार कराया सजल्या ।' –संग्रामगीतें ३१. [ ध्व. धुं+कृ–कर ]

**धुंगटी**—स्त्री. ( गो. ) तंबाखु; धुकटा; धुकटी, धुमटी.

**धुगधुगणें**—अक्रि. धडधडणें धडधड करणें. –अकर्तृक उदा० ' माझें पोटांत धुगधुगतें. ' [ धुगधुग ]

**धुगधुगा**—पु. ( गो. ) भय; भीति. धुगधुगी पहा.

**धुगधुगी**—स्त्री. १ ( व. ) फार हळू नाडी उडणें, हालचाल होणें; मरण्याच्या वेळची स्थिति; थोडासा जीव असणें; गळयाशीं आलेला प्राण. २ छाती उडणें; धडधड. ३ गळयावरची, कंठमण्याच्या खालची खळी. ४ गळयांतला, वक्षस्थळावर रुळणारा अलंकार. कंठीचा लोलक. 'धुगधुगी किंमत रुपये ११५.'–समारो १.७१. धुकधुकी पहा. [ ध्व. प्रा. धुकाधुक; सं. धुगधुगाय ]

**धुडक**—न. ( व. ) फडकें. धुडका पहा.

**धुडकणें, धुडकाविणें**—उक्रि. धुडकाविणें पहा.

**धुडका, धुडकी**—पुस्त्री. १ धुडका; धांदोटी, उडणारी चिंधी; धडकी. २ ( अनेकवचनीं प्रयोग ) फाटकीं तुटकीं भिकार वस्त्रें. **धुडके, धुडक्या उडविणें-करणें**–( चिंध्या चिंध्या करणें) पूर्णपणें पराजित, फजीत करणें; अगदीं फटफजीती उडविणें **धुडक्या**-पु. ( व. ) मोठें फडकें. धडपा पहा.

**धुडका**—पु. धडकी; भीति. ' चोराचिया धुडका मनीं। वसे ध्यानीं लांछन। ' –तुगा ३१९६. [ धडका ]

**धुडकावणी**—स्त्री. हकालपट्टी; पराजय; फजीती;धुडकाविणें.

**धुडकाविणें, धुडाविणें**—उक्रि. १ जोरानें आरडाओरडा करून, शिव्या देऊन बाहेर घालविणें; हांकलून देणें; पिटाळणें. २ पराभूत करणें; नामोहरम करणें. ३ वाटेस लावणें; न मानणें, न ऐकणें.

**धुडकूस, धुडगूस-धुडगुसला**—पु. १ वाटेल तसें गर्दीनें, जोरानें चालणें, नाचणें, लोळणें, तुडविणें; (बिछाना इ०) चुरडणें; सुरकुत्या पाडणें, चोळामोळा करणें. २ धसमुसळी, दांडगी, अपायकारक वागणूक, व्यापार. दांडगाई; धिंगाणा; दांडगाईचे खेळ, चाळे; धिंगामस्ती; (क्रि० घालणें; मांडणें). ' मनुष्यास बट्टा आणणारी गुलामगिरीची चाल ज्यावेळीं या वसुंधरेवर राजरोस धुडगूस घालीत होती. ' –माझीपण हीच गत १३. ३ दांडगाई, धिंगामस्ती यामुळें झालेला चोळामोळा, चुराडा, नास, दुर्दशा ( वस्तु, कपडे इ० कांची ).

**धुडगा**—पु. ( कों. ) खेकडा.

**धुंडणी**—स्त्री. तपास; शोध; (क्रि० करणें ). [ धुंडणें ]

**धुंडणें. धुंडाळणें**—उक्रि. शोधणें; हुडकणें; झडती करणें; हरवलेला पदार्थ बारकाईनें पाहणें. ढुंढाळणें पहा. ' कोण त्याचा पार पावला धुंडितां। पुढें विचारितां विश्वंभरा। ' –तुगा २२०४. [ सं. ढुंढणम्; हिं. ढूंढना; सिं. ढुंडणु ]

**धुडमूस**—पु. धुडकूस पहा.

**धुडवणी**—स्त्री. पोकळ; रिकाम्या डौलाचा; वायफळ प्रकार, गोष्ट.

**धुडवणें, धुडावणें**—धुडकाविणें पहा. ' आसपास आधीं घेवून थडवा। असल जवळ कोणी तिजला धुडवा। ' –पला ४. १०. ' जीवें न मारावें धुडाऊनी यावें। ' –रामदासी २.३१. ' विजेसिंग यानें राज्यलोभें त्यास धुडावून अगदीं ...... भारी संस्थानें हस्तगत केलीं. ' –भाब ७.

**धुंडाळा**—पु. कसून शोध; निरलस शोध; झडती; पाहाणी. ( क्रि० करणें; घेणें ). [ धुडाळणें ]

**धुंडिलराजा**—पु. (कर.) चिटकोबाचा पाट डोकीवर घेऊन पाऊस पडावा म्हणून घरोघरीं नाचवा हिंडणारा मुलगा (मराठ्यांत रूढ). ' धुंडिलराजा आला आहे, त्याच्या अंगावर पाणी घाल, धुंडिलराजाला एक पैसा दे. '

**धुंडु**—पु. ( ना. ) एक वाद्य. ढुंडु पहा.

**धुड्डा-धुरडा**—पु. (ना.) धूळ; धुरळा. ०**उडविणें**–धूळधाण करणें; फडशा पाडणें; नि:पात करणें.

**धुड्डाचार्य धुड्ढाचार्य**—पु. ढुड्ढाचार्य पहा.

**धुड्डी**—स्त्री. ( ना. ) धुळवड.

**धुण**—न. धुवण पहा. ' नातरी तक्रचि गुसळिलें। अथवा धुणचि सेविलें। सावकाश। ' –दा ६.२.३. [ धुणें ]

**धुणकणें, धुनकणें**—उक्रि. पिंजणें; स्वच्छ करणें (कापूस). धनुकणें पहा. [ धनु ]

**धुणफुण**—स्त्री. १ विंचू इ० चावल्यामुळें होणारी फुणफुण; चुणचुण; आग; वेदना. २ धुसफूस; जळफळ. [ ध्व. ]

**धुणारा**—पु. ( सांकेतिक ) परीट; कपडे धुणारा. ( वांई कऱ्हाडकडे बायका रात्रींच्या वेळीं परीट शब्द उच्चारीत नाहींत). –वि. धुणें करणारा. ' ज्या धूतलेंच बहु धूतिल हो धुणारी। ' –सारुह ६.६७. [ धुणें ]

**धुणावळ**—स्त्री. १ ( कपडे ) धुण्याची मजुरी २ धुण्याची क्रिया; व्यापार; धुणें. म्ह० जशी देणावळ तशी धुणावळ=जसा पैसा तसें काम. [ धुणें+वळ प्रत्यय ]

**धुणी**—स्त्री. १ पूर्णपणें धुणें; घासणें; स्वच्छ करणें; धुतलें जाणें; धुपणी. ' सकळ पापां होऊनी धुणी। ' –एभा २.५२८. २ ( ल. ) निःशेषपणें जाण्याचा व्यापार (शरीर, शेत इ० मल, रोग, खत इ०कांचा); लुबाडणी; नागवण; सफाया होणें; नाश. 'कर्माकर्मा धुणी सहजेंचि।' –एभा ५.४८४. 'अतिसारामुळें शरीराची धुणी झाली.' 'पोरानें रांडछंदास लागून घराची धुणी केली. ' ३ धुण्याची जागा. ४ निवारण; दुष्परिणामाची, संकटाची टाळणी; निरसन. ' म्हणे मी तुम्हां न देखिलें मुनी! वायां शापिलें मजलागुनी। तरी या शापाची धुणी। कैसेन होय। ' –कथा २.७.११८. [ धुणें ]

**धुणी**—स्त्री. १ गोसाव्याची आगटी; धुनी; धुमी; अग्नीची जागा. हींतून सारखा धूर निघत असतो व तो गोसावी घेत बसतो. ' धुणींत टाकिलें सर्वेंचि। ' –दावि २६२. २ अग्नीचा खळगा, खांच. [ सं. धूम ] ०**घालून बसणें**–(ल.) आपली मागणी पुरवावी म्हणून हट्ट धरून बसणें. ०**पाणी**–न. सलगीची मैत्री; जिवश्चकंठश्च मित्र; ऋणानुबंध. (पूर्वजन्मींचे हे गुरू आणि शिष्य असून धुणी पेटविणें, पाणी आणणें वगैरे गुरूचें काम शिष्य करी अशी समजूत त्यावरून ). **धुणी पाणीचा सोबती**–पु. अगदीं सलगीचा मित्र.

**धुणें**—सक्रि. १ ( पाण्यानें वस्त्र, पात्र इ० ) घासून स्वच्छ करणें. २ (ल.) नागविणें; उघडा करणें; पूर्णपणें स्वच्छ, साफ करणें

हें क्रियापद सकर्मक असलें, तर भूतकाळीं कर्त्याप्रमाणें ( जेव्हां कर्म शरीर किंवा शरीरावयव असेल तेव्हां ) सुद्धां चालतें. उदा० 'मी हात धुतलों, पाय धुतलों, अंग धुतलों.' [ सं. धू; प्रा. धुण; सिं. धुअणु ] **धुनलें जाणें**-( घर ) लुबाडलें जाणें; आंतील जिन्नस, पैसा इ० नेण्यांत येणें. 'माझे सर्व घर धुनलें जाईल।' -विवि ८. ११.२१०. **धुतलेला तांदूळ, धुतलेलें मोतीं**-पुन. १ सुंदर, सशक्त, टवटवीत, सतेज चेहऱ्याच्या माणसास म्हणतात. २ शुद्ध; स्वच्छ; निर्मळ; निर्दोष. **धुतलेला विंचव**-पु. कोळशाप्रमाणें काळाकुट्ट माणूस. **धुतांच जाणें**-थोडया वेळांत, दिवसांत निरुपयोगी होणें; कमी किंमतीचा, योग्यतेचा असणें.

**धुणें**—न. (समुच्चयानें) धुवावयाचें वस्त्र, कपडे. **लोकांची धुणीं धुणें**-नेहमीं दुसऱ्याचे दोष काढीत बसणें; दोषैकदृष्टी असणें. (वाप्र.) **धुणें झाडणें**-कोणतेंहि वस्त्र स्वच्छ धुऊन झाल्यावर तें वाळत टाकण्यापूर्वी त्याचा पिळा उलगडून, कांठ साफ करणें व झटकणें. ०**पाणी**-न. बायकांच्या रोजच्या गृहकृत्यांस (व्यापकार्थी) शब्द. कपडे धुणें, पाणी आणणें, सारवणें इ० काम. [सं धू]

**धुतकारणें, धुतकाविणें**—उक्रि. हिडिसफिडीस करणें; तिरस्कारानें व उद्धटपणें अव्हेरणें; छीःथूः करणें व हांकलून लावणें (माणूस, जनावर, इ०ला). [ सं. धूत्कार; हिं. धुतकारना ]

**धुतरा**—न. ( राजा. ) धोतरा. 'उतरे एकहि न कसीं कनकासीं कोटि भांडतां धुतरे।' -मोकृष्ण ८३.८१. [ सं. धत्तूर ]

**धुतरें**—न. सनई, सूर इ० वाद्यांच्या दांड्यास खालीं ( धोतऱ्याच्या फुलासारखा ) बसविलेला पितळेचा भाग. [ धुतरा ]

**धुतरेल**—स्त्रीन. धोतऱ्याचें तेल. [ धुतरा+तेल ]

**धुतशीर्ष**—न. (नृत्य) नृत्यामधील एक अभिनय. खालच्या बाजूस डोकें वाकविणें. उद्विग्नता, विस्मय, शून्य मन इ० गोष्टी ह्या अभिनयानें दर्शित करतात. [ सं. ]

**धुताडा**—पु. अवधूत; नागडया आणि घाणेरडया गोसाव्यास निंदेचा शब्द. ( ल. ) अगडबंब; दांडगा; उन्मत्त माणूस. [ धूत+आड प्रत्यय ]

**धुताडा**—पु. सावकाराकडून आलेला उपद्रव्याप दूत, दुताडा पहा.

**धुतारणें**—उक्रि. फसविणें; लुबाडणें; ठकविणें; भुलविणें. 'दाउनि फळ जळ ऽ पिंति वदति प्रिय मानसा धुताराया।' -मोआदि ५.७८. [ सं. धूर्त ]

**धुतारा**—पु. १ ठक; लबाड; लुच्चा; भोंदू. २ भविष्य सांगणारा; ज्योतिषी; मांत्रिक; चेटक्या. 'धुतारे लोक हे भोळे लोकांस कपट करून फार फसवितात.' -बाको १८१. धतुरा पहा. [ सं. धूर्तय्. प्रा. धुत्तार; गु. धुतारो ]

**धुतीपुती, धुतीपोती**—स्त्री. १ स्वतःचीं आंतडीं धुवून टाकणें; एक योगसाधनाचा प्रकार. २ स्वतःला धुणें आणि शुध्द करणें; ( क्रि० करणें ). [ धुणें-धूत सं. पूत ]

**धुत्कार**—पु. १ फुत्कार ( सापाचा ). २ धुतकारणें; भेडसावणें; हेटाळणी. [ ध्व.; धुत् ! तुल० सं. धूत्कार ]

**धुत्कारणें, धुत्काविणें**—उक्रि. धुतकारणें पहा.

**धुत्या**—पु. ( व. ) अकल्पित येणारा मनुष्य. 'धुत्या येऊन उभा'

**धुत्रमशाई**—वि. १ भपक्याचा, थाटमाटाचा; दणकेबाज ( देखावा ). कडाक्याचा, डौलाचा परंतु कुचकामाचा. ( अनियंत्रितपणें मनुष्यें, व्यापार, वस्तु, काम, इ०संबंधानें योजतात ). [ धूर्त+शाई ]

**धुत्रा**—पु. धोतरा. [ सं. धत्तूर ]

**धुंद**—वि. १ अंधुक, मंद दृष्टीचा ( आजारानें ). 'ह्या ज्वरानें धुंद झाला.' २ गुंग, शुद्धीवर नसलेला ( औषध, अमली पदार्थ यामुळें ). ३ उन्मत्त; चढेल ( पैसा, अधिकार यामुळें ) 'तुम्ही आपले ऐश्वर्यानें व हिमतीनें व इर्षेनें धुंद जाहाला !' -भाव २३. ४ गर्क; (एखाद्या विषयांत) गढलेला; मग्न. ५ आच्छादित; दाट; धुईचें; धुम्र (आकाश, दिशा). -पु. गर्व. 'लागतां आधिकचि उठे धुंद।' -दावि ६४. -स्त्रीन. बंड; अंदाधुंदी; जुलूम. 'धुंदचि मांडिलें सिरोन गांवीं।' -दावि २३२. 'टोपीवाले फार हरामी त्यांणीं बहु धुंद केली।' -ऐपो ३५९. [ सं. धूमद ? हिं. धुंध; सिं. धुंधुं ] ०**कार**-पु. अंधकार. 'नगरी धुंधकार पडला।' -ऐपो ९५. ०**न**-न. धुंद करणारें. 'अशाश्वती ह्या हो धुंदन।' -अफला ६१.

**धुंद**—स्त्री. (वाद्यादिकांचा) एकसारखा स्वर; गुणगुण, अविरत शब्द. [ वैसं. धुन=आवाज करणारा ] ०**बांधणें-भरणें**-एखाद्या वस्तूचा बराच काळ सारखा नाद लागणें; ध्यास घेणें.

**धुंदकणें**—क्रि. धुंद होऊन चालणें. 'गोसावी धुंदकत चालला।' -ऐपो ११९. [ धुंद ]

**धुंदर**—पु. काजवा. 'सूर्यापुढें जैसे धुंदर। विनयकापुढें पादोदार।' -पांप्र २७.१२६. [ सं. धुंधुमार=एक किडा, इंद्रगोप ]

**धुंदर**—वि. वृध्दापकाळामुळें निकामी, विसराळू. [ धुंद ]

**धुंदाई धुंदाधुंदी धुंदावा, धुंदावें**—स्त्रीपुन. १अव्यवस्था; बजबजपुरी; गोंधळ; अंदाधुंदी; बंड. २ ( सामा. ) दंगल; गोंधळ; दंगा [ हिं. धुंधाई ]

**धुंदाट, धुंवाट**—वि. १ सरळ; थेट; नीट (रस्ता) २ उग्र; दांडगा ( माणूस ); जोराचा, सोसाट्याचा ( वारा ).

**धुंदाट-ड**—पु. ( व. ) जोराची वावटळ; झंझावात. धुधाट.

**धुंदावणें**—अक्रि. वारा पिऊन बेभान होणें.

**धुंदावा**—पु. तर्क; अंदाज; कयास; अटकळ; अनुमान; अंधुक कल्पना; संभाव्य अनुमान. ( क्रि० बांधणें–धरणें–सांगणें ) [ धुंद=अंधुक ]

**धुंदाळणें, धुंदाळा**—धुंडाळणें; धुंडाळा पहा.

**धुंदी**—स्त्री. १ मद्यादि सेवनानें चढलेला कैफ, निशा, अंमल. २ दृष्टीचा अस्पष्टपणा, अंधुकपणाचा विकार. ( क्रि० येणें ). ३ संपत्ति इ०नें चढलेला उन्माद; गर्व; ताठा. ४ आवरण; आच्छादन ( आकाश, दिशा यांस ) ' मोठा कडाखा जाला; धुराची व धुळीची धुंदी जाली. ' –भाब १२. ४ धुंदाई पहा. [ धुंद ]

**धुंदुर्मास**—पु. ( अप. ) धनुर्मास पहा.

**धुंदूक, धुंदूकधुंदूक, धुंदूकमुंदूक, धुंदूसमुंदूस धुंदूमुंदू**—क्रिवि. झुंजूमुंजू; अंधुकपणें; अस्पष्टपणें; अस्वच्छपणें. ( दिसणें ) ' तुम्हांस सूर्यास्तसमयीं जसें धुंदूकमुंदूक दिसतें तसें दिवसाहि मला चाळिशीमुळें दिसतें. ' –स्त्री. प्रभात; अगदीं पहाट; अरुणोदय; दिवसाची पहिली दिशाफांक. ( क्रि० फुटणें; होणें ). ' मी धुंदूकमुंदूक होतांच निघालों तों प्रहर दिवसास घरीं आलों. ' [ धुद द्वि. ]

**धुंदेरा**—पु. ( तिलोरी, महार ) प्रेताबरोबर नेलेला भात, किंवा त्याची शिंकाळी. हा भात मृताचा मुलगा स्मशानांत मयताच्या तोंडांत घालतो. –बदलापूर ६१, १७२.

**धुधा**—स्त्री. तोफांचा दणका; वाद्यांचा गजगजाट; कडकडाट. पावसाचें किंवा धबधब्याचें धोधो असें मोठ्यानें आपटणें; सोसाट्याच्या वाऱ्याचा आवाज. इ० [ ध्व. ]

**धुधाट**—वि. मोठा आवाज करणारा. ' गर्जति वीर धुधाटसमीरण ते रणधीर उताविळ झाले। ' –लहुकुशाख्यान १६ ( मराठी ५ वें पुस्तक ).

**धुंधाट-ड-धुधाटा**—स्त्रीनपु १ वाऱ्याचा सोसाटा, झपाटा; वाऱ्याचा झोत; वावटळ. ' बळें धुधाट सुटला वारा। ' –दावि २५२. ' तुम्ही पर्वत धरा पोटासीं। माझे अंगवातें धुधाटेसीं। समुद्रात पडाल। ' २ धूत्कार; ओरडणें ( पक्ष्याचें ) ' दिवाभीतांचें धुधाट तेथें। पिंगळे थोर किलबिलती। ' –ह ११.१९३ [ ध्व ]

**धुधु** –क्रिवि अंधुकपणें; अस्पष्टपणें (दिसणारे पदार्थ ) [धुंद]

**धुधुका**—पु. धुम्याची रांग; धुधुकार. ' मिरवताभे सातिआचां धुधुका। ' –शिशु ५२९.

**धुंधुकार-धुधुकार**—पु १ अंधकार, अंधार. ' अवघा धुंधुकार पडला। ' –ऐपो ९७. २ धुकें.

**धुधुःकार, धुधुकार, धुधुक्कार, धुधुकार**—पु. सापाचें फुसफुसणें, फुत्कार. ' उठविलें आसवारू। जैसें काळकुटाचें धुधुकारू। ' –शिशु ९३२. ' फडके गोंडीचा फणीवर । धुधूकार टाकी। ' –दा १.२.१७. (क्रि० करणें; टाकणें; देणें). [ध्व. धुधु]

**धुधुटणें**—अक्रि. फूत्कार टाकणें; करणें. ' तंव जाळीये व्याळ धुधटी। देखतां भयभीत पोटीं। ' –मुहरिश्चंद्राख्यान –नवनीत २०५. [ ध्व. ]

**धुधुविणें, धुंदुविणें**—अक्रि. फुत्कार टाकणें. धुधुकार करणें. ' कां कालिया नाग धुंधुवातु। ' –ज्ञा १८.७१२. ' मोझेन आपुलें वेत केलें फणिधरु धुंदुवित। ' –ख्रिपु १.१५.१३५. [ ध्व. धुधु ]

**धुंधुरु**—पु. १ काजवा; धुंदर पहा. ' अवधारा आवडे तेसणा धुंधुरु। परि महातेजीं न मिरवे काय करूं। ' –ज्ञा ९.९. २ दिवटीचा पोत. [ सं. धुंधुमार ]

**धुधुवाटा**—पु. १ फूत्कार; धुधुकार. ' जेथ सावजांचां धुधुवाटीं। ' –शिशु ३१४. २ जोराचा प्रवाह (वाऱ्याचा); झंझावात धुधाट पहा. ' आंगिचेनि धुधुवाटें। वायो न मोडी तनकुटें। ' –शिशु ४८७.

**धुधुवातणें**—अक्रि. फूत्कार करणें; धुधुविणें. ' कामविखें विखारा सर्पिणी धुधुवातातीं। ' –दाव ४४९.

**धुधुळिया** –वि. १ अंगावर धूळ उडालेला. २ धुधुलिया मधुकरा। ' –भाए ४३७. २ फेंकलेला; उडलेला. 'फुन धुधुळियां कटाक्षु न कढे। कव्हणीं परी। ' –शिशु ७१२. [ सं. उध्दूल ]

**धुन**—स्त्री. ध्वनि; आवाज. ' प्रेमसुखाची निद्रा सखीला धुन ऐकुन आलि हो। ' –प्रला १७५. [ सं. ध्वनि ]

**धुनक, धुनूक**—स्त्री. रुचि; चव; छटा; चुणूक; स्वाद. 'कल्याणामध्यें मल्हाराची धुनक.' २ अस्पष्ट आवाज (अंतरावरून येणारा) . ( क्रि० येणें; निघणें ). ३ अस्पष्ट आणि हळू आवाज, नाहींसा होत जाणारा ध्वनि ( क्रि० चालणें). ४ लोकांत उठलेली अफवा; भुमका; कुणकूण. (क्रि० निघणें). ५ नुसती थोडी ओळख, पुसट कल्पना. ६ धुंदूक. ७ ( व. ) नाद; व्यसन. ' तरुण वयांत त्याला निराळीच धुनक होती, त्याचें नोकरीकडे विशेष लक्ष नव्हतें. ' [ सं ध्वनि किंवा धु यति ]

**धुनकणें**—उक्रि. पिंजणें ( कापूस ). धनुकणें पहा.

**धुन(नु)कणें**—अक्रि. १ प्रकाशित होणें; (दिशा). २ स्वच्छ होऊं लागणें (मेघाच्छादित अथवा ढगांनीं भरलेलें आकाश). धुनक अर्थ २ पहा.

**धुन(नु)कणें**—अक्रि. १ प्रतिध्वनि देणें, करणें; दनकणें; दणाणून सोडणें. (दिशा, आकाश, गगन, रान, डोंगर, देश इ० तोफा इ०च्या आवाजानें). २ फैलावणें; पसरणें; उठणें वर्तमान, बातमी, गोष्ट ). ३ धुमसणें; विकोपाच्या स्थितींत जात असणें ०. डण. इ० ). [ धुनक+ध्वनि ]

**धुनकवणें**—अक्रि. ( व. ) कापूस पिंजणें. धुनकणें पहा.

**धुनकारणें**—अक्रि. ( व. धुंद होणें; धूळ, धूर दाटणें. ' अभाळ धुनकारलें आहे तेव्हां लवकरच पाऊस पडेल. '

**धुनकारणें, धुनकाविणें**—उक्रि. हांकलून देणें; उडवून लावणें; पिठाळून लावणें. झिडकारणें; रागानें बोलणें. 'ऐकुन उत्तर अवघे क्षोभले क्रोधें धुनकारुन त्याला।' –पला ५.

**धुनावळ**—स्त्री. धुणावळ पहा. 'धुनावळीचा नमस्कार। पाहून केला अंगिकार।' –मध्व ३२८.

**धुनी**—स्त्री. १ गोसाव्याचा धूर निघणारा विस्तव; ज्यावर तो धूर घेत बसतो ती धुमी; आगटी; धुणी पहा. बैरागी लोक विस्तव अखंड ठेवतात. २ सर्दी झाली असतां विस्तवावर हळदीची पूड टाकून त्याचा धूर नाकातोंडांत घेतात ती धुरी. ३ धूमीचा खळगा–खड्डा. ०देणें–(धुरी देणें). मडक्यांत मिरच्यादिकांचा धूर करून ज्यास धुनी द्यावयाची त्याच्या तोंडाशीं नेणें, अथवा त्याचेंच तोंड मडक्याशीं नेणें. [सं धूम; हिं.]

**धुनी**—स्त्री. नदी. 'प्रणमन करि रंगीं ते धुनी मेघनीला।' –आसी ७५. [सं. धू]

**धुनी**—स्त्री. १ क्षालन; नाश. 'गंगाचरणीं करी पातकांची धुनी। पाउलें तीं मनीं चिंतिलियां।' –तुगा ३५७. 'जन्मली उद्धरावया अवनी। महादोषांची करीत धुनी। चालली पूर्व समुद्रा।' –निगा १११. २ पाणी देणें (शस्त्राला). 'जयाचेआं खांडे करावे यां धुणी। न पुरें प्रलय मेघांचें पाणी।' –शिशु १०७९. [धुणें]

**धुनूं**—न. (गो.) (बाल भाषा) वाद्य.

**धुनूक**—स्त्री. धुनक पहा.

**धुनूकधुनूक**—स्त्री. पहांटसमय, उषःकाल; प्रभात; झुंजुमुंजू (क्रि० फुटणें; होणें). धुंदूकचें अप. रूप. धुंदूकधुंदूक पहा.

**धुपट**—वि. १ धुवट; कोरेपणा नाहींसा झालेला आहे असें. २ धुवून ठेवलेलें; उपयोगास योग्य असें (वस्त्र). ३ धुतलेलें; स्वच्छ; घाण नव्हे तें. [धुणें]

**धुपट**—पु. (ना. व.) धूर; धूप पहा. 'चुलींत जाळ कर, घरांत फार, धुपट दाटलें आहे.' [धूम]

**धुपटणें, धुपाटणें**—न. धूप जाळण्याचें भांडें; धुपारती.

**धुपटणें**—धोपटणें पहा.

**धुपणी**—स्त्री. १ स्त्रियांचा एक रोग. धातुक्षयाची विकृति याचे दोन प्रकार पांढरी व तांबडी (क्रि० लागणें). २ सर्वस्व लुबाडणें; नागवण; धुणी पहा. [म. धुपणें]

**धुपणें**—अक्रि. १ धुवून निघणें; स्वच्छ होणें. (पाऊस, नदीचा प्रवाह इ०मुळें जमीन, अतिसारादि रोगामुळें शरीर, चोर दरोडेखोरांमुळें गांव इ०). २ वाहून जाणें. ३ खंगणें; ऱ्हास पावणें; झिजत जाणें; (दुःखानें शरीर) हलकें हलकें क्षीण होणें. [सं. धू.–धुवन]

**धुपणें**—अक्रि. १ धुमसणें; हळूहळू पेटणें. 'क्रोध लोभादि धुपे अगिटी।' –एभा १८.२९६. २ (ल.) रेंगाळणें. (आजार) रुदखुदं चालणें (धंदा); काम. ३ नासणें; खराब होणें. (फार पिकानें जमीन, इ०). ४ मनांत कुढणें, झुरणें (क्रोध, मत्सर, इ० कोंडल्यामुळें). 'मोठ्या सवतीस मुलगा होतांच धाकटी धुपूं लागली.' [सं. धूप्=उष्ण करणें]

**धुपवणी**—स्त्री. धुपाच्या धुरानें पदार्थ सुगंधित करण्याची कृति; वास देणें. [म. धूप]

**धुपवणी**—स्त्री. खरडणी; लुबाडणी. धुणी पहा.

**धुपविणें**—सक्रि. धुपणी करणें; स्वच्छ करणें. [धुपणें]

**धुपविणें**—उक्रि. धुपाच्या धुरावर पदार्थ ठेवून सुगंधित करणें. [धूप]

**धुपा**—पु. १ एक प्रकारचें गवत. २ लव्हाळें.

**धुपांगरा–धुपांगारा**—पु.धूप–उद जाळण्यासाटीं आणलेला निखारा (देवापुढें). २ शिजतांना करपलेला भात. [धूप+अंगार]

**धुपाचें झाड**—न. एक झाड.

**धुपाटणें**—न. धूपपात्र; धूप जाळण्याचें भांडें; धुपटणें पहा. [सं. धूप] 'जसा देव तसें धुपाटणें=मनुष्याच्या अधिकाराप्रमाणें त्यास अहेर, नजराणा करणें, मिळणें.

**धुपाडें**—न. (गो.) धुपाटणें. [धूप]

**धुपारती, धुपारत, धुपार्ती**—स्त्री. १ देवाला आरती ओवाळणें, धूप, दीप, नैवेद्य, आरती इ० उपचारयुक्त पूजा. २ धूप जाळावयाचें पात्र; धुपाटणें; हलकारती. ३ संध्याकाळची पूजा–आरती. ४ (ल.) खरडपट्टी; निंदा; हजामत. ५ (ल.) मानपत्र इ०प्रकारें सन्मानाची बोळवण. 'नामदार साहेबांची धुपार्ती होईतों लोकांनीं त्यांचें स्वागत करण्यास चुकूं नये.' –टि १. ३४९ [धूप+आरती]

**धुपावणार**—वि. (गो.) धुपाटणें घेणारा, जाळणारा.

**धुपावणें**—अक्रि. (गो.) धूप जाळून सुगंध उत्पन्न करणें. [धूप]

**धुपावणें**—अक्रि. अकालीं गर्भपात होणें; नासावणें. [धुपणें]

**धुपाळ**—न. धूप जाळावयाचें पात्र. धुपाटणें. [धूप+आलय]

**धुपाळी**—स्त्री. एक झाड.

**धुपेल**—न. १ उद, धूप इ० पासून काढलेलें सुवासिक तेल. 'हळदि आंगी उटणें चोपलें धुपेलें माथा माखीती।' –स्त्रीगीत २०. २ (गो.) अत्तर. [धूप+तेल]

**धुबकन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि. कापसाचा गठ्ठा फणस वगैरे पडतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण. धबकन पहा. क्रि० पडणें; वाजणें). [ध्व.]

**धुंबलणें**—क्रि. (कर.) मारणें; बडविणें. 'गप बैस नाहींतर धुंबलून पिट्टा पाडीन.' [ध्व.]

**धुमक**—स्त्रीपु. (को.) नळवायु; पोटांत वायगोळा उठतो तो.

**धुमक–का**—पु. बुक्की; धमकलाडू. [ध्व. धुम]

**धुमकणें**—सक्रि. ठोकणें; बुकलणें; बदकणें. [ धुमक ]

**धुमकूस**—पु धुडगूस पहा. [ ध्व. धूम ]

**धुमड**—स्त्री. १ बेकैद; दंगलीचा; अव्यवस्थित व्यापार; गडबडीचा खेळ; लाथाबुक्या; बुकलाबुकली; ओढाताण; खिदळणी. २ चंगळ; रेलचेल; अतोनात विपुलता; समृद्धि; झिंबड. 'आज लाडवांची धुमड उडाली.' 'पावसानें धुमड लावली आहे.' [ धूम ]

**धुमणें**—अक्रि. १ जाळ न होतां जळणें; धूर निघणें. २ (ल.) धुमसणें; (भांडण इ०) पेटत राहणें; जळफळणें. ३ रोग पडणें (अंब्यावर); खार पडल्यामुळें करपणें (आंबे इ०).

**धुमधाम**—स्त्री. आरडाओरड; दंगल; गोंधळ; गोंगाट; धाम धूम पहा. [ हिं. धूमधाम ]

**धुमरा**—वि. एकदम न पेटतां धुमसणारें (सरपण); धुराचा, धुमसणारा. [ धूम ]

**धुमशा**—पु. १ गडबडीची, दंगलीची मौज; आडदांडपणाचा खेळ. धुमकूस; धुमड; धुमश्चक्री; धुमाकूळ; धुमाळी. २ दाणादाण; पूर्ण पराभव; धांदल; गोंधळ; गडबड (फौजा, माणूस यांची). ३ निरलस, उत्कंठेचा प्रयत्न, उपाययोजना; जोराची हालचाल. ४ कडाका; जोर (भांडण इ०चा). [ धूम ]

**धुमशान, धुमश्चक्री**—स्त्री. १ पदार्थांची विपुलता; झिंबड; उधळेपणा होण्याइतकी चंगळ (खाद्यपदार्थांची, दारूकामाची, खेळाची, पावसाची, पिकांची इ०). २ दांडगाई; गोंगाटाचा खेळ. धुमाकूळ; धांगडधिंगा; अव्यवस्थितपणा. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). [ धूम+चक्र ]

**धुमस**—पु. धुडगुस; धुमशा पहा. 'वनदेवता यक्षिणीपाळे। धुमसें घालिती गदारोळे।' –मुआदि ३६.५६. [ ध्व. ]

**धुमस**—पु. चोपणी; ठोकणी; जमीन चोपण्याचें उभ्या दांड्याचें आऊत. चोपणीला आडवा दांडा असून तिनें बसून ठोकतां येतें. धुमस जड असून उभ्यानें ठोकतात. [ ध्व. धुम; हिं. धमस ]

**धुमसणें**—उक्रि. १ ओबडधोबड कुटणें (तांदूळ). २ कचकावून बुकलणें; ठोकणें; हाल हाल करणें. 'दूतीं चालविला बांधोनि यमपाशीं। धुमसिती दंडें सावकाश।' –स्वानु ३.१.३५. ३ निष्काळजीपणानें, बलात्कारानें घालणें, वापरणें, उपयोग करणें, वागविणें; कामास लावणें (प्राणी, वस्त्र, वस्तु); गुधडणें; घोसळणें; खुंदडणें. 'हें वस्त्र धुमसून दहा महिने जाईल.' 'हा बैल तुला धुमसून वीस वर्षे जाईल.' [ धुमशा ]

**धुमसणें**—अक्रि. १ धूर निघणें; धुमणें. २ (ल.) पेट घेणें: हळूहळू वाढत असणें; (भांडण, कलह) धुसफुसणें; आंतल्याआंत चडफडणें; फणफणणें (मनुष्य). [ धूम ]

**धुमसाडणें**—सक्रि. (व.) १ अंगमस्तीनें एखाद्या मनुष्यावर हल्ला करून त्याला जमीनीवर लोळविणें. २ नांगरानें जमीन फोडणें, उकरणें. [ धुमणें ]

**धुमसाधुमशी**—स्त्री. सर्वसाधारण, परस्पर बुकलाबुकली; एकमेकांना मारणें. [ धुमसणें ]

**धुमसाधुमसी, धुमस धुमसून**—क्रिवि. बलात्कारानें; झपाट्यानें; तडाख्यानें; जोरानें; धसकाफसकीनें; दांडगाईनें (वापरणें; कांडणें; कुटणें; रडणें इ०). [ धुमसणें ]

**धुमा**—पु. १ मृदंगाचा, पखवाजाचा मागला भाग; मागलें तोंड. पुडा पहा. २ वाद्यांचा गजगजाट; उच्च स्वराचें आणि गजगजीत वादन. (क्रि० गाजवणें). **धुमाचापुडा**–धुमा. अर्थ १ पहा. [ धूम ]

**धुमा**—पु. १ पराजय अथवा पळापळ (सैन्याची). २ नासधूस; निर्दाळण; धूळदाण; पायमल्ली; दुर्दशा. (क्रि० करणें, उडवणें). [ धूम ]

**धुमाकूळ**—पुस्त्री. १ दांडगेपणाचीं कृत्यें; धिंगामस्ती (शाळेंतील मुलांची). २ खिंकाळणें; उड्या मारणें; दुगाण्या झाडणें; (घोड्याचें) (क्रि० लावणें; मांडणें). ३ दाणादाण. धुमशा पहा.

**धुमाचक्कर, धुमाचक्री, धुमाश्चक्री**—धुमश्चक्री पहा.

**धुमाड**—पु. वाद्याचा गजर, नाद, 'करिती धुमाड सोऽहंहंसें।' –एभा १२.१०. [ ध्व. ]

**धुमाड**—पु. उत्कर्ष; भर; जोराचा उठाव. 'तारुण्याचेनि धुमाडें।' –भाए ३४२. धुमारा पहा.

**धुमाड-डा**—पु. धुमाकूळ; गोंधळ; धुमाळी; धामधूम; गडबड. 'जेथें विषयाचा धुमाड।' –एभा २९.५८१. [ धूम ]

**धुमाडा**—पु. धुमा, धुमाचा पुडा पहा.

**धुमाडी**—स्त्री. (महानु) धुळवड; गुलाल बुक्का इ० उडविणें. 'धुमाडि करितातित मधुकरा।' –शिशु २८६.

**धुमाधार**—क्रिवि. धूम! धूम! धो! धो! मुसळधार (पाऊस इ० पडणें). –स्त्री. १ संतत धार (पावसाची). २ धूळधाण; वाताहत. 'दिल्लीपत पातशाहीची फौज मारून कुल धुमाधार केली.' –भाब २७. 'धुमाधार अनिवार मार भर बंबाच्या फटकाऱ्यांचा।' –ऐपो १९८. [ धूम+धार ]

**धुमाफळी**—स्त्री. ताळतंत्र सोडून केलेलीं कृत्यें. धुमाकूळ, धुमाळी यापेक्षां थोडा निराळा अर्थ. (क्रि०करणें; लावणें; मांडणें). [ धूम ]

**धुमारा**—पु. (राजा.) अंकुर; कोंब; बळकट, जोमदार अशी झाडाची फूट. 'जुन्या झाडाच्या खोडावर नवे धुमारे फुटल्यानें.' –तुफान (प्रस्तावना ५८,)

**धुमास**—न. दमास्कस. एक कापडाची जात. याचे पडदे वगैरे करतात किंवा कोचावर बसवितात. [ अर. दमश्क ]

**धुमाल**—पु. चोपणी. धुमस पहा.

**धुमाळ**—स्त्री. एक ताल. धमार पहा. यांत मात्रा आठ व विभाग चार असतात.

**धुमाळ**—न. (कु.) १ दशावताराच्या खेळांतील मंगलाचरण. २ गोंधळ; धुमाळी.

**धुमाळी**—स्त्री. १ गोंधळ; धांदल; क्षोभ; दंगा; गडबड; अव्यवस्थित व जुलमाचें वर्तन. 'लुटीची आवई घातली आणि धुमाळी मांडली.' –भाव १४८. २ चैन; चंगळ; झिंबड; नासधुसीची, दंगलीची मौज; धांगडधिंग्याची बहार; धुडगूस; धुमाकूळ पहा. ३ खेळ; धुळवड. 'धुमाळी खेळती मधुकरी। प्राणनाथेंसी।' –शिशु २८४. ४ हल्ला; घाला. 'नृपावरी धुमाळी।' –दावि १६८. ५ भांडण; कलह. 'साज सकाळीं नित्य धुमाळी दोघी समतोली।' –पला ७७. [धूम]

**धुमाळी**—स्त्री. १ चाकाची धाव. २ उतरण; मोठा, उभा उतार.

**धुमाळी**—वि. १ धुमाळ तालासंबंधीं, सारखा (ध्रुवपद, चाल, गति). २ अखंडित; चालू असलेली; चपल (गति, गतिमान पदार्थ). –स्त्री. ताल. धुमाळ पहा.

**धुमी**—स्त्री. धूर निघणारा विस्तव, ज्यावर गोसावी धूर घेत बसतो ती. गोसाव्याची आगटी–शेगडी. धुनी पहा. [धूम]

**धुमूंकसे**—क्रिवि. धुमूक अशा आवाजानें. नृत्यघोषानें; रुमझुम. 'धुमूंकसे हानतीं गजरें मनकटां वरी।' –शिशु ४०४. [ध्व]

**धुमें**—न. धुकें; धुकट. [धूम; गु. धुमेर]

**धुम्म(धुम)धुमकार**—पु. दणदणाट; मोठा ध्वनि. 'जाला धुम्मधुमकार।' –दावि ३३४. [ध्व.]

**धुया**—पु. धीटपणा; धिया पहा. 'बैसेंति धुयां। मानुषां वरी।' –शिशु ९०१.

**धुवेंफुल्ल**—वि. (गो.) पांढरें सफेत; शुभ्र. [धू–धुव+फुल्ल]

**धुर**—पु. १ गांवाची अथवा शेताची मर्यादा अगर सीमा. २ प्रमुख; पुढारी; सेनापति; धुरंधर. 'धुर रणीं होय विन्मुख। तेव्हांचि त्याचें काळें मुख।' –एरुस्व १२.५६. 'पडतां देखोनि मुख्य धुर।' –मुवन ३.३३. –स्त्री. १ गाडीचें जूं. 'चला जाऊं रे सामोरे। पुढें भेटों विठ्ठला धुरे।' –तुगा ६८१. २ अग्रभाग. 'पडली देखतां मुख्य धुर।' –रावि ३१.२१३. [सं. धुर्] **धुरकरी**–पु. (खा.) गाडी हांकणारा. **धुरखीळ**–स्त्री. गाडीच्या दांडीच्या शेवटास लांकडाची जी खीळ घालतात ती. [धुर+खीळ]

**धुर**—वि. अढळ, निश्चित. [सं. ध्रुव]

**धुरकट**—न. १ धुरानें बसलेली काजळी, काळेपणा, घाण २ धुकें. –वि. धूर लागलेलें; धुरानें बांधलेलें, खराब जाहलेलें. [धुर+कट प्रत्यय] –क्रिवि. अस्पष्ट तर्‍हेनें; असंदिग्धपणानें; अंधुक (दिसणें).

**धुरकटणें**—अक्रि. धूर लागणें; धुरकट होणें; धुरानें खराब होणें; मळणें. [धुरकट]

**धुरकटाण**—स्त्री. धुरकट वास. [धरकट+घाण]

**धुरकटाविणें**—उक्रि. धुरकटण्यास लावणें; धूर देणें.

**धुरकापरी, धुरकापुरी**—स्त्री. एक प्रकारचें जाळें. धूरकपूर पहा. 'तटतटीत चोळी जाई फाटुन धुरकापरी।' –प्रला १४२. 'मदनपुरानें उरीं कंचुकी धुर कापुरी दाविली।' –प्रला १०२. [हिं. कपरधूल]

**धुरट, धुरटणें, धुरटाण**—धुरकट, धुरकटणें, धुरकटाण पहा.

**धुरटेजणें**—अक्रि. धुरकटणें. 'धुरटेजेना धूमकल्लोळ।' –एभा २८.३४२.

**धुरत**—स्त्री. (व.) १ स्मरण; आठवण. २ धोरण; शहाणपण. [सं. धृत, धूर्त]

**धुरतावा**—पु. १ धूर्त बुद्धीनें तर्क करणें, अनुमान काढणें. अटकळ; अंदाज. (क्रि० बांधणें; धरणें). 'अंधळा धुरतावा बांधतो' धुरताव्यानें चालतो. २ धूर्तपणा; शहाणपणा. 'अंगीं धुरतावा असावा' ३ लक्ष; काळजी; चित्त, नजर. इतर अर्थी धुर्तावा पहा. [सं. धूर्त]

**धुरंदळ**—न. धुराचा लोट; धुराटी. [धूर+दळ]

**धुरंधर**—वि. १ (ल.) शहाणा; हुशार; निपुण; पूर्ण प्रवीण; उत्कृष्ट रीतीनें योग्य, तरबेज. २ (व्यापक) उमदा; भव्य; सुरेख; टुमदार; उत्कृष्ट (पशु, इमारती, पिकें, जमीन देश इ०). ३ राजकार्यादि व्यवहाराचा भार मुख्यत्वें ज्यावर असतो तो. 'होईल सुख संसारी। राज्य दिधलें धुरंधरी।' –गुच ४१.११. ४ दीर्घ; प्रचंड; थोर. 'गौण्यरूपें असती गुरु। ठाव असे अगोचरु। अनुष्ठान धुरंधरू।' –गुच १७.५. [सं. धुर्+धृ=धरणें]

**धुरधुरणें**—क्रि. पुढें येणें; अग्रभागीं असणें. 'आणि हिंसाविषय पुढारी। कुकर्मे संगें धुरधुरी।' –ज्ञा १५.१७२. [सं. धुर्+धृ–धरणें]

**धुरपण**—न. धूर निघणें (जसें–जळत्या लांकडाचें). धूर निघणारें द्रव्य (जसें:–ओली लांकडें इ०). [धूर]

**धुरपणें**—अक्रि. धूर करणें; धूर देत जळणें (लांकूड इ०) धुमसणें. [धूर]

**धुरपतगौरी**—स्त्री. (धुमसणारी गोंवरी) सदां चडफडणारी खडसावणारी, त्रास देणारी (मुख्यत्वें) स्त्री.

**धुरफोड्या**—पु. खाणींतून दगड काढणारांची जात व तींतील व्यक्ति; बेलदार; सुरुंग्या.

**धुरमार**—पु. धुरी; धुरी देणें. 'बोलाविजा पंचाक्षरी। धुरमार पीडा करी।' –दा ३.७.३७. [धूर+मारणें]

**धुरमुरचें**—क्रि. ( गों. ) झुरमुरचें पहा.

**धुरला-ळा**—पु. धूळ; माती (बारीक) रस्त्यावर जमलेली, उडालेली धूळ. ०**मरणें**–पाणी पडल्यानें धूळ जमीनीवर बसणें. [ धूळ ]

**धुरवट, धुरवटणें, धुरवटाण**—धुरकट पहा.

**धुरवड**—स्त्री. ( कों. ) धूर होणें; दाटणें. [ धुर+वड प्रत्यय ]

**धुरवड, धुरवडणें**—( चुकीनें ) धुळवड पहा

**धुरवडा**—पु. वर उडणारी अथवा रस्त्यावर दाट बसणारी धूळ. धुळवरा, धुळोरा पहा.

**धुरवणी**—न. धुरकटलेलें पाणी. [ धुर+पाणी ]

**धुरवळा**—पु. पदार्थांवर बसलेला केर. धुरवडा पहा. [धुरोळा]

**धुरसणें**—क्रि. अग्रभागीं ठेवणें. ' जेवीं धुरसोनि दिठी। शूर रणामाजी उठी। ' –एभा ३.४०१. [ सं. धुर ]

**धुरसा**—पु. अग्रभाग. [ सं. धुर् ]

**धुरळणें**—सक्रि. धुळीनें युक्त करणें; शिंपडणें; फवारे उडविणें; पसरणें; फेंकणें ( धूळ अथवा तसलेंच हलकें द्रव्य ). ' खस खशीला पंचवीस पाट्या धूळ धुरळली, खात धुरळला. ' [ धुळ ]

**धुरळा**—पु. धुळ; धुरला पहा. ' तों बहुलक्ष यूथपति आले गगनीं भरला धुरळा। ' –मोरामायणपंचशती १९५. ०**देणें**–धुरळणें. ' कांद्याचे रोपांस चिमटगी देऊन धुरळा दिल्यावर पाणी द्यावें. ' –शेतकी–शेतकरी ३.४. ०**घालणें**–( डोळयांत ) धुळ घालणें; भुरळ पाडणें. ' निजबळें मळा बोढिले धुरळे घालुन। ' –देप ९२.३.

**धुरा**—पु. १ धुर पहा. २ गांवची, शेताची हद्द, सीमा; बांध. ३ सीमेवरील वस्तु, पदार्थ. ' गावचा धुरा हा धोंडाच. ' ४ (ल.) ठराविक काळ; नेमलेली मर्यादा; आयुष्य. ' ऐशीं नव्वद वर्षें झालीं असुन नाहीं भरला धुर। ' –पला १.१३.२७. 'रोख्याचा धुरा,' 'धुरा भरला,' 'धुऱ्याचे तीन हप्ते बाकी राहिले.' ५ मुदती वा शेवटला हप्ता. ६ मर्यादारक्षक. ' समीप वनस्फुरा। ते म्हणे भक्ति क्षेत्रिचा धुरा। ' –ऋ ८७. ७ आघाडी. ' धुरां निजशस्त्र देऊनि त्यासी। ' –एभा २८ ६३३. ८ (व.) पाठीचा कणा. 'तापानें तुझा धुरा उघडा पडला. ' ९ मुख्य; पुढारी; सेनापति. थोर; श्रेष्ठ पुरुष. 'मुदलाची धुरा।' –उषा १६०५. मुख्य धुरा ज्या मारिल्या। ' –एभा ११.१३८६. 'पुण्याविषयीं पाठिमोरा। साधु संता पाहुनि झुरा। तया आपणचि दिसे धुरा। पृथ्वीमध्यें।'–सिसं ४९. १० गाडीचा आंख, कणा. ११ जूं; जोखड; गाडीचा पुढला दांडा. धुरी पहा. १२ ( ल. ) जोखीम; जबाबदारी; मुख्य भार. [ सं. धुर–रा ]

**धुरा**—पु. (तिरस्कारार्थी) (कु) धुरंधर पहा. [सं. धुर्य–धूर]

**धुराटी, धुराड–डी**—स्त्री. १ धुराचा लोट; ढग. २ (धुरा मुळें) काळोखी, अंधार; अंधुकता. ३ ( सामा. ) धुरकटपणा.

**धुराड**—वि. धुराच्या, जोखडाच्या बाजूस अधिक जड (गाडी). ' गाडी धुराड आहे. '

**धुरांडखुंटी**—स्त्री. धुरा ( गाडीची ).

**धुराडी, धुरांडी**—स्त्री. ( कों. ) १ गाडीचें जोखड. २ ज्यांवर जोखड ठेवतात ते दोन उभे दांडे, प्रत्येकीं. शिपाई.

**धुराडें, धुरांडें**—न. १ घरांतील धूर बाहेर पडण्यास आढयाला, भिंतीत ठेवलेलें भोंक; धावें. २ धूर जाण्यासाठीं केलेला नळ, चिमणी. [ धूर+आड प्रत्यय ]

**धुराणी**—स्त्री. ( कों. ) जोखडाच्या शेवटाकडील खुंटी, खिळ. [ धूर+आणी ]

**धुरावणी**—धुरवणी पहा.

**धुराविणें**—उक्रि. धुरकटाविणें पहा.

**धुराळा**—पु. धुरळा पहा.

**धुरी**—स्त्री. धूर. १ पायाचा शिरदळ; पाउलाचा वरचा भाग. २ जोडयाचा, वाहणेचा पुढील भाग; धूर. ३ गाडी, नांगर इ०ची दांडी; धूर; धुरा. ४ गाडीवान, सारथी बसण्याची जागा. ( क्रि० बसणें ). ' रथीं राजा धुरेसि बाहुक। ' –कथा १.१.१०३. ५ भार; जबाबदारी. ' तैसेनि त्याग स्वीकारी। वाहतां इंद्रियांची धुरी। ' –ज्ञा १८.५०५. ' ह्या राज्यशकटाची धुरी पूर्वीप्रमाणें आपल्या अंगावर घ्यावी. ' –चंद्र २०१. [ सं. धुर् ]

**धुरी**—स्त्री. औषधी द्रव्यें अग्नींत घालून जो धूर करतात तो. ( क्रि० देणें ). ' भ्रांति हिताहित न कळों दे मोहुनि मानसा धुरी तीतें। '–मोशांति ३.७८. [धूर] ०**देणें**-(ल.) १ भोंदणें; ठकविणें; छकविणें; फसविणें. २ गुन्हा कबूल करून घेण्यासाठीं, शिक्षा देण्यासाठीं मिरच्या इ० जहाल पदार्थांच्या धुरावर माणसाला ठेवणें, त्याच्यावर धूर सोडणें. ०**घालणें**–बाळंतीणीस वावडिंगांचा अथवा कांद्याच्या–लसणीच्या पातीचा, ओंव्याचा धूर देणें. **धुरी**–पु. ( मुलांस ) अंगारा लावणारा.

**धुरी**—स्त्री. ( गो. ) वाघाची वाट. धाड पहा.

**धुरीण**—वि. १ प्रवीण. धुरंधर पहा २ नायक; मुख्य. ' त्या सभेच्या धुरीणाचा महत्त्वाचा खरा, पण स्पष्ट निर्दिष्ट नाहीं असा मुद्दा असतो. ' –इंमू २७८. | सं. ]

**धुरुई**—स्त्री. नांगर. –**चा बैल**–पु. नांगराचा बैल.

**धुरू**—पु. १ जकातीकडील एक अधिकारी. २ एक जात व तींतील एक व्यक्ति

**धुरू**—पु. १ ध्रुव तारा. ' तो धीर सत्त्वाचा महामेरु। अढळ पदीं जैसा धुरू। ' –हरिश्चंद्र (नवनीत १८३). २ उत्तानपादपुत्र; ध्रुवबाळ. ' धुरु लेकरूं बापुडें दैन्यबाणें। ' –राम ११७. –क्रिवि.

चिरकाल; कायम; अखंड. ' कुंभपाकीं वस्ती करूं। होय धुरु कुळेंसी। ' –तुगा २८६६. [ सं. ध्रुव ]

**धुरे**—वि. अग्रगण्य; श्रेष्ठ. ' तुका म्हणे इच्छा पुरे। ऐसी धुरे हे विठ्ठले। '–तुगा १०५३. –क्रिवि. पुढें; प्राधान्यानें. ' ते बुद्धि धुरे करूनी। कर्म करिती चित्त देउनी। ' –ज्ञा ५.६१. [ धुरा ]

**धुरें**—न. लांकूड; धूर निघणारे लांकूड. ' तेथें निवडेना धुरें कीं चंदन। तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं। ' [ धूर ]

**धुरेपटक**—न. आउताचा दांडा व जूं आवळण्याची दोरी.

**धुरेकट**—न. जूं व गाडीच्या दांडया एकत्र आवळणारी दोरी.

**धुरेकरी**—पु. १ धुरेवर बसून गाडी हांकणारा; सारथी. २ नांगर वगैरे आऊताची जोखडाजवळची जोडी. [ धूर+करी ]

**धुरोडा, धुरोळा**—पु. हवेंतील, रस्त्यावरील धूळ. [ सं. धूलि ]

**धुरोडा**—पु. १ धुराचा लोट. २ धुराडें पहा.

**धुरोळें**—न. धूर जाण्यासाठीं छपराला केलेले भोंक; धुराडें. [ धूर ]

**धुर्ताई, धुर्तावा**—पु. धूर्ताई पहा.

**धुर्य**—वि. धुरंधर पहा.

**धुऱ्या**—वि. १ धुरेकरी पहा. २ चिखल्यापासुन सुमारें पांच फुटांवर भोंक पाडून एक फूट लांबीचें लांकूड बसवितात तें. –बदलापूर २८७. **धुऱ्यावर ठेवणें-बसविणें**-( ना. ) जाणून बुजून दुर्लक्ष करणें उपेक्षा करणें. [ सं. धूर्–रा ]

**धुलाई**—स्त्री. वस्त्रें धुण्याबद्दलची मजुरी; धुण्याचें मोल; धुणावळ. [ धुणें हिं. ]

**धुल्ल**—पु. ( गो. ) धूळ.

**धुव**—न. धूर. ' परीधुर्कंटलें धुपधुपी मोठें। धुवें थिकटें दिग्मंडळ। ' –एभा ५.१७२. [ धूर ]

**धुवट**—वि. १ धुतलेलें; कोरें नव्हे असें ( वस्त्र. ) २ धुतलेला; पारोसा नव्हे व घालण्यास उपयोगी. ३ धुतलेला, मळकट, घाण नव्हे असा. ' एखादा धुवट फडका असला तर द्या. ' ४ पवित्र कारक; शुद्धिदायक. ' ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें। केलीं येणें। ' –ज्ञा १८.१०१७. ५ निर्मल; पवित्र. ' सभ्या भला भला विधु लाजेल तुझ्याचि मानसा धुवटा। ' –मोसभा ५५५. ०घडीचा–वि. स्वच्छ आणि घडी घातलेला; परीट घडीचा; न वापरलेला, न मळलेला ( कपडा ).

**धुवडी**—स्त्री. ( राजा. कु. ) पुतणी. ध्वाडी पहा.

**धुवण**—न. तांदूळ इ० ज्यांत धुतले आहेत असें पाणी; धूण. ' धुवण देऊन घेतलें अमृत। कीं अजापाल्टें ऐरावत। '–ह ४.२०. [ धुणें ]

**धुवणें**—उक्रि. ( काव्य ) क्षालन करणें; स्वच्छ करणें. धुणें पहा. [ सं. धावन; प्रा. धुवण ]

**धुंवता**—वि. ( गो. ) फिरता.

**धुवप**—न. ( गो. ) १ धुणें. २ धुणावळ. –क्रि. धुवणें पहा.

**धुंवर**—वि. ( गो. ) धुकट, धुराचा.

**धुंवरी**—स्त्री. ( गो. ) १ धूर निघण्याची शेगडी. २ धुरासाठीं केलेला जाळ. ३ धूर.

**धुंवरें**—वि. धुराचें लांकूड. ०नक्षत्र–न. ( गो. ) धूमकेतु.

**धुववणी**—न. धुण्याचें पाणी. धुवण पहा. [ म. धुणें+पाणी ]

**धुंवा, धुवा**—पु. १ मोड; पराजय; पळापळ ( सैन्याची ). २ फाकाफांक; पांगापांग; वाताहात; नाश; विध्वंस; धुमा. ( क्रि० करणें; उडवणें; काढणें; उखाडणें ). **धुवाधाण**–स्त्री. धूळधाण पहा. [ धूम ]

**धुवा**—पु. ( व. ) धूर. [ सं. धूम; हिं. धूंआ ]

**धुवा**—वि. धुवट; धुतलेलें; स्वच्छ. 'धुवा–रेशीम–सूत–दाळ तांदूळ-साखर. ' ' साखर पिठी धुवा. ' –ऐरापु ५.३०५.

**धुवाटी**—स्त्री. ( महानु. ) धुकें. ' कर्म मार्गे धुवाटी। आंधारैली ब्रह्मयाची दृष्टी। ' –भाए ६७१.

**धुवाडी**—स्त्री. (माण.) पुतणी; ध्वाडी. पहा. [सं. दुहित्री–धोडी ? ]

**धुवाधार**—स्त्री. १ जोरानें आणि पूर्णपणें स्वच्छ करून नेणें; सफा करणें ( मुसळधार पावसाप्रमाणें ) २ ( ल. ) लुबाडणें; नागविणें; बुचाडणें; उघडा करणें [ धुणें+धार ] –क्रिवि. धुपून जाईसें; धो धो ( मुसळधार पाऊस पडणें ).

**धुवार**—स्त्री. धूमयुक्त; वाफा निघणारें; धुरानें व्याकूळ. ' आधींच द्रव्यें चुरमुरी। वरि परिवडिजती मोहरी । जियें घेतां होती धुवारी। नाकें तोंडें। ' –ज्ञा १७.१४६. धुंवर पहा.

**धुवारोटी**—पु. कृपण; चिक्कू; कंजूष. भाकरी पाण्यांत बुडवून तें पाणी पिणारा. छायारोटी पहा.

**धुवा साकर**—स्त्री. धुवून स्वच्छ केलेली साखर. ' टाकुनियां धुवासाकर। गुळ कां व्हावा प्रियकर। ' –अफला २.

**धुवाळों**—वि. ( गो. ) डोहळा पहा.

**धुवो**—स्त्री. ( गो. ) मघा ( नक्षत्र ).

**धुव्वा**—धुवा पहा.

**धुव्वाधार**—स्त्री. ( व ) अग्नीवर तूप टाकून धूर निघाला म्हणजे तो अग्नि अन्नशुद्धीकरितां पंक्तींतून फिरविण्याचा विधि. [ सं. धूम्र=धारा ]

**धुशारें**—न. बुक्का; सुगंधी पूड. 'हरिकथेसी तत्पर। गंधे माळा आणी धुशार। ' –दा २.७.३२. ' परिमळ धुशार उधळती। ' –वेसीस्व ३.५७. धुसर पहा. [ सं. धूसर ]

**धुशा-सा**—पु. एक लोकरीचें वस्त्र; घोंगडी; पांघरण्याची घोंगडी; ब्लँकेट. धुसा पहा. [ हिं. धुस्सा ]

**धुश्श**—वि. काळा या वर्णाचा अतिशय दर्शक प्रत्यय; अत्यंत (काळा). जसें–काळा धुश्श. ढुस्स पहा. [सं. धूसर?]

**धुस**—(महानु) धस्स पहा. 'तैंची माझांजीवें धुस गेलें।' –शिशु १२५.

**धुसकट**—स्त्री. नासधूस; वाताहात.'त्याच पोरटयानें आमच्या खळयाची धुसकट केली.'

**धुसकाफुसका**—वि. अशक्त; लेचापेचा; हलका; निर्जीव; कमजोर; नादान (मनुष्य, कपडा, दोरा, भाषण, कृत्य) **धुसकीं-फुसकीं**-नअव. व्यंगें; दोष; वर्मे; उणींदुणीं. (क्रि० काढणें). [धुसका द्वि.]

**धुसधुस**—स्त्री. १ कुरकुर; रागाची जळफळ; धुसफुस. २ ठसठस; वेदना (जखम, फोड इ० कांच्या). ३ सर्पाचें फुसफुसणें. ४ रुखरूख; काळजीमुळें होणारी अस्वस्थता. 'रात्रंदिवस जिवास धुसधुस होऊन एथें हें पक्वान्न खाणें नको.' –छत्रे–इसापनीति.

**धुसधुसणी**—स्त्री. धडधडणें; ठसठसणें; ठणकणें; फुसफुसणें इ० [धुसधुसणें पासून नाम].

**धुसधुसणें**—अक्रि. १ ठुसठुसणें; ठणकणें;वेदना होणें (जखम, फोड यांमध्यें). २ कुरकुरणें; कुरबुरणें. धुसफसणें पहा. ३ रागानें फूत्कार सोडणें. ४ आंतल्याआंत (मनांत) चरफडणें; जळफळणें 'क्रोध महिषासुर केवळ। काम वेताळ धुसधुसित।' ५ जोराचा श्वासोच्छ्वास टाकणें, घेणें. 'देहास करितां स्पर्श सहज सर्वांगीं श्वास धुसधुशी.' –प्रला २५२ [ध्व. धुस! धुस!]

**धुसफुस, धुसफुस**—स्त्री. कुरकुर; चडफड; तडफड; उघड उघड होणाऱ्या भांडणाच्या पूर्वीची बोलाचाली. 'रघोजी रेसि-डेंटशीं धुसपुशी करूं लागला.' –विवि ८.७.१३५.

**धुसफसणें – धुसफुसणें**—अक्रि. १ बोलाचाली होणें; उत्तरें–प्रत्युत्तरें देणें; वर्दळीवर येणें. २ धुसमुसणें; जळफळणें. 'गोदीनें धुसफुसत येऊन धाडकन आईपुढें आंग टाकलें.' –मोर ३३. [धुसफुस]

**धुसमसणें, धुसमुसणें**—अक्रि. धुमसणें. १ स्फुंदणें; हुंदके दाबण्याचा प्रयत्न करून रडणें. २ चरफडणें; कुरबुरणें; आंतल्या-आंत रागावणें; मुसमुसणें. 'समुद्र सदा सुप्रसन्न। योगी सदा प्रसन्न वदन। केव्हांही धुसमुशिलेपण। नव्हे जाण निजबोधें।' –एभा ८.४२. [ध्व]

**धुसमुस**—स्त्री. १ कुरकुर; पुटपुट; चरफड. २ तोंडातोंडी बोलाचाली; झटापट. 'घरांत कारभार पाहण्याविषयीं धुसमुसी चालल्या.' –विवि ८ ९ १७०. [ध्व.]

**धुसर**—पु. गुलाल, बुक्का इ० उधळावयाचें द्रव्य; सुगंधी द्रव्य; धुशर.

**धुसा**—पु. घोंगडी; प्रांवरण्याचें वस्त्र. धुशा पहा. [हिं. धुस्सा]

**धुस्कारा**—पु. फूत्कार (सर्पाचा, रागावलेल्या माणसाचा). (क्रि० टाकणें; सोडणें; देणें). [ध्व. धुस]

**धुळ**—धूळ पहा. [सं. धूलि] **०कट-वट**-वि. धुळीनें भर-लेला; मलिन झालेला. **०धाण**-स्त्री. दुर्दशा; धूळधाण पहा. (क्रि० उडविणें). 'जो प्रकटतां अर्धक्षणीं। करी धुळधाणी वृत्तीची।' –एभा २३ ३०८. **०धुळ**-वि. धुळीचा; धुळीनें भरलेला.' धुळ-धुळवाणी बसला। टकमकागे पाहाय। माझा वेडा तमसा जोगी।' -भज ४७. **०पट**-स्त्री. १ दुर्दशा; नाश. (क्रि० होणें; उडणें; करणें). २ फजीती. 'या पंडितानें सर्व पंडितांची धुळपट करून दिली.' **०पट्टी**-स्त्री. खरडपट्टी; ताशेरा. (क्रि० काढणें). [गु. धुळपडी=धिक्कार] **०वट-वाड**-स्त्री. १ धुळीनें माखलेली जागा. २ धूळ. [धूळ] **०वट**-स्त्री. ज्या जमीनीवर उन्हाच्या तापानें खाऱ्या पाण्याचा मिठासारखा पांढरा पापुद्रा येतो व जमीन पांढरी भुरकट दिसते ती जमीन; खाऱ्या जमीनीचा एक प्रकार. –कृषि २११. **०वड-वडी**-स्त्री. १ होळीनंतरचा धूळ फेकण्याचा दिवस; फाल्गुन वद्य प्रतिपदा. २ या दिवशीं करावयाच्या धूळ फेकणें इ० गोष्टी, खेळ. 'आज धुळवडीस कोण गांवास जातो!' ३ (कु.) रंगपंचमीचा दिवस. ४ धुळीची जागा.

**धुळवडणें**—उक्रि. १ धुळवडीच्या दिवशीं चिखल, माती एकमेकांच्या अंगावर टाकणें. २ (सामा.) धूळ फेकणें; धुळीनें मारणें. **०वरा, धुळारा, धुळोरा**-पु. बारीक माती; धूळ (आकाशांत उडणारी, रस्त्यावर दाट पडणारी). **धुळवाड, धुळवाडणें**-धुळवड; धुळवडणें. **०वाड-डी**-धुळवड पहा. 'परागें धुळवाडी खेळिजे। जाउडेयाचेनि पाणिअ सिंपिजे।' –शिशु २७५. **०वाफ**-स्त्री. पावसानें धुरळा बसला नाहीं त्या पूर्वी जी पेरणी करितात ती.

**धुळा**—स्त्री. (माळवी) धूळ.

**धुळाप**—स्त्री. (गो.) १ धुराळा; धूळ. २ पाऊस पडण्या-पूर्वी ज्यांत बीं पेरून ठेवतात असें शेत. [धूळ]

**धुळारा**—पु वाऱ्यानें उडालेली धूळ; धुराळा. 'अविद्येचे धुळारे उठती।' –पांप्र ८.५१.

**धुळाक्षर**—न. १ लिहिण्यास शिकतांना पूर्वी मुलें धुळ-पाटीवर जीं काढीत असत तीं अक्षरें. २ धुळाक्षरें (श्री पासून ज्ञ पर्यंत), अंक इ० [धूळ+अक्षर]

**धुळी**—स्त्री. १ माती; धूळ.' अंकुरें घेऊनि ते धुळी। लाविली माळीं आपुल्या।' –ह १८.५६. २ (ल.) नाश. 'केली संसाराची धुळी।' –दावि ४०३. [धूळ] **धुळिकोट**-पु. मातीचा कोट, परीघ. 'जें जिणारें धुळिकोट।' –भाए १९४.

**धुळीवरचें सारवण**—न. (ल.) अस्थिरता; अशाश्वतता; पाण्यावरचा बुडबुडा. (धुळीवर सारवण बसत नाहीं यावरून).

**धुळोरा, धुळौरा, धूं**—पु. धुरळा. 'तैसा धुळौरा अंतराळीं। सत्यलोकुवरुन्हीं।' –शिशु ५४२. 'उपजेल मायेचा धुळोरा। माजी नोळखिती येरयेरां।' –मुआदि २८.१०९.

**धू**—स्त्री. (ना.) धूर. 'हें असो दीपाचिये सिद्धी। अवघड धू आधीं।' –ज्ञा १८.७८०. [सं. धूम; हिं. धूंआ].

**धू**—स्त्री. (कु.) मुलगी. 'एक होती ऊ तिला झाली धू.' [सं. दुहितृः प्रा. धूआ]

**धूइजणें**—(जुनें रूप) धुणें पहा. 'सुधाकराचा खांदवखालीं। धूइजेती कापुराची सुआंळीं।' –शिशु ६३३.

**धूजड**—वि. (ना.) बैलगाडींत पुढच्या बाजूस ओझें फार झाल्यामुळें बैलांच्या मानेवर जिचा भार पडला आहे अशी (गाडी). [सं. धुर्=जूं+जड]

**धूड**—स्त्री. एक वनस्पति.

**धूड**—न. १ अवाढव्य, अजस्र माणूस. २ जंगी, प्रचंड साप, जनावर इ० 'असुरां काळ भासे विक्राळ पुढें। पसरी मुख एक चावितो धुडें।' –तुगा ४७८. ३ मोठें झाड (विशेषतः पाडलेलें). ४ लांकडाचा मोठा ओंडा, खडक इ० ५ (खा.) शेतांतील मूळखंड. –भात्रे ७.१ ते ४. [सं. अध्यूढ ?]

**धूडकूस**—धुडगूस पहा. 'नाटकगृहांत धूडकूस घालावा.' शेक्सपीयर नाटयमाला तुफान प्रस्तावना ४०.

**धूण**—न. १ तांदूळ धुतलेलें पाणी; धुवण. 'नाना काबाड बडविलें। ना तरी तक्रचि गुसळिलें। अथवा धूणचि सेविलें। सावकास।' –दा ६.२.३. २ डाळ इ०चें पाणी; पाणचट आमटी, वरण. [धुणें]

**धूत**—वि. १ धुतलेलें. २ स्वच्छ, साफ केलेलें; जोरानें निपटलेलें. 'अति अढळ सत्यधूत वाणी।' –एभा ३.५२७. ३ क्षुब्ध; कंपित; थरथर कांपणारा; (भीतीनें) हलणारें; कांपणारें; धुत पहा. [सं.] **०वस्त्र**–न. सामान्य सोंवळ्याच्या उपयोगी, धुवून वाळविलेलें वस्त्र.

**धूत**—उद्गा. (ना.) छत्; हुडुत्; धिक्कारदर्शक उद्गार. [ध्व.]

**धूत्कार**—पु. फूत्कार (सापाचा). (क्रि० टाकणें; देणें; करणें). [ध्व. सं.]

**धूधू**—पु. धुधुःकार; जागें करण्यासाठीं योजावयाचा ध्वनि. धुधु पहा. 'म्हणऊनी धू धू करी घेउनी। जागें करी जननी त्या गरुड ध्वजाला।' –आक्र १३. [ध्व.]

**धून**—स्त्री. १ लांबलेला घुमणारा ध्वनि; गुणगुण; झणकार (वाद्यतंतूचा किंवा लांबच्या संगीताचा). २ ध्वनिमिश्रण; ध्वनीचा छटा, झांक. 'हा शुद्ध सारंग नव्हे ह्यांत किंचित मल्हाराची धून मारते.' ३ लोकांत गुणगुण, कुणकुण. (क्रि० निघणें, उठणें) [सं. ध्वनि.]

**धून**—स्त्री. (विणकाम.) कापड गुंडाळण्याचें चौकोनी लांकूड.

**धूप**—पु. १ धूर देणारा ऊद इ० सुगंधी पदार्थ. 'नाना धूपाचा अग्निप्रवेशु।' –ज्ञा १६.१०७. २ ऊद इ० सुगंधी द्रव्यांचा धूर; हवा स्वच्छ व सुगंधी करण्यासाठीं धूप जाळतात. ३ (सामा.) उदबत्ती. ही पूजेच्या वेळीं लावितात. –स्त्री. सूर्यप्रकाश; ऊन. [सं. धूप्] **०घालणें**–१ (झपाटलेल्या माणसाच्या अंगांतील) भुतानें बोलावें म्हणून त्याच्या पुढें ऊद जाळणें. २ (ल.) मोठ्या नम्रतेनें, अजीजीनें आर्जवणें; विनंति करणें; प्रार्थना करणें (एखाद्यास–त्यानें बोलावें म्हणून). ३ (अकरणरूपी प्रयोगासारखा). न जुमानणें; मर्जीप्रमाणें न वागणें. **०दाखविणें**–चाळविणें; झुलविणें; कांहीं न देणें. सामाशब्द– **०आरती**–स्त्री. (देवापुढें) धूप, दीप इ० ओवाळणें. (प्र.) धूपारती. **०काडी**–स्त्री. धूप चोपडलेली काडी; उदबत्ती; उदकाडी. [सं. धूप+काडी] **०घाल्या**–वि. एकसारख्या कलागती लावून भांडण चालू ठेवणारा; कळलाव्या. [स. धूप+घालणें] **०दीप-वात**–पुस्त्री. धूपआरती पहा. **०साळा**–स्त्री. एक झाड. ह्यापासुन लोबान काढतात.

**धूपणें, धूपविणें**—क्रि. धूप लावणें, देणें; धूपानें सुवासित करणें. 'तदुपरि सकळें हीं मंदिरें धूपवीलीं।'–सारुह ६.१३. [धूप; हिं धूपना]

**धूपित**—वि. धूपानें सुवासित केलेला. [सं.]

**धूम**—स्त्री. १ धांव; दौड; शर्यत; पळ. (क्रि० मारणें; ठोकणें). 'थाट चाले गाई गोपाळांची धूम। पुढें कृष्ण राम तया सोयी।' –तुगा ३२. २ (ल.) उत्सुकता; धाडस; धैर्य; साहस. ३ चैन; चंगळ; रेलचेल; अतिशयता (हा शब्द फार व्यापक अर्थानें वापरतात). 'आंब्यांची–लाडवांची–तुपाची–उदमाची–धूम.' 'पावसानें धूम केली.' 'पेंढाऱ्यांनीं मुलखांत धूम मांडली.' 'क्षणभर पंतोजी गेला म्हणजे पोरें धूम मांडतात.' 'दरोडयाची अथवा चोरांची धूम.' 'पाहुण्यांची धूम.' 'गाण्याची-नाचण्याची–खेळण्याची–धूम.' ४ हल्ला; गर्दी. 'एकदम हत्यारें उपसुन आमच्यावर धूम केली.' –वज्राघात ९७. ५ संहार; बंडाळी; दंगा; गोंधळ; गर्दी; गडबड. 'हरि करिकुळीं परबळीं करि तो अतुल प्रभाव कवि धूम।' –मोशल्य २.५०. –क्रिवि. कडाक्यानें; झपाट्यानें; तल्लीनें; जोरानें; कांहीं विचार न करतां. 'पाऊस धूम पडतो.' 'धूम काम चाललें.' 'जरीमरीनें धूम माणसें मरूं लागलीं.' 'तो धूम लोकांस मारतो–तोडतो–शिव्या देतो.' 'धूम फौज पळाली-घोडा निघाला-तोफा सुटल्या.' [हिं.] **०ठोकणें**–पळ काढणें; सूं बाल्या करणें. **०पाहणें**–पाणी, बल पारखणें; कसोटीस लावणें (आटोप, मर्यादा, शक्ति, धाडस इ०). **एका धुमावरचा** (गांव इ०)–एका धांवेच्या अंतरावर असलेला. **०धडक**–क्रिवि. धीटपणानें; झपाट्यानें, सपाट्यानें; तडाक्यानें; रगडून;

कचकावून ( जाणें, करणें, बोलणें ). ०धडाका-खा-पु. १ झपाट्याचा, जोराचा, सपाट्याचा, तडाख्याचा, व्यापार, कार्य. 'प्रपंच अवघा धूमधडाका।' -टिक १७५. २ (सामा.) ओरडणें; दणदणणें; गर्जना करणें; एखादा मोठा गलबला; गंभीर घुमणारा आवाज, गोंगाट. (क्रि० करणें; लावणें; मांडणें; चालणें; लागणें ). 'तोफांचा धूमधडाका' ०धाम-स्त्री धामधूम; गडबड; आरडाओरड -घाको १८३. [हिं.] ०योनि-पु. मेघ.

**धूम**—स्त्री. १ गाण्यांत पखवाज, मृदंग, संबळ इ०कांचा निघणारा खर्ज सूर; असा सूर निघण्याचें स्थान; वाद्याचा असा अवयव. धुमा पहा. २ गर्जना (तोफांची, सिंहाची). [ध्व.]

**धूम**—स्त्री. (कु.) मळणीच्या वेळीं खांब्यांत दावण अडकविण्यासाठीं एक वाटोळें विणलेलें वेलीचें कडें.

**धूम**—पु. धूर; वाफ. 'तोय तेज धूमु। ययां वायूमीं संगमू।' -ज्ञा १८.३०८. [सं. धूम; ग्री. थूमॉस; लॅ. फ्यूमुस; प्राज. दौम, तौम; लिथु. दूमै; स्ला. दूमू; हिब्रूयू, दुलुइम्ह=ढग] ०केतु-पु. शेंडे नक्षत्र. 'गगनीं उगवले त्रिविध केतु। दंडकेतू धूमकेतू।' -एभा ३०.५९. केतु. [सं.]

**धूमश**—वि. धुरकट रंगाचें. 'कृष्णांबराचें प्रावरण। धूमशरक्त सुलोचन।' [सं.]

**धूमा**—पु. दंगा; गडबड; गोंधळ. धूम पहा. 'आणिक दूत अर्व खर्व। करती धूमा।' -प्रला ९. [हिं धूम]

**धूमाकुळ**—पु. धुराचा समुदाय ऐसी मनबुद्धिकरणीं। सभोंवती धूमाकुळाची कोंडणी।' -ज्ञा ८.२३१. [सं. धूम+कुल]

**धूमाग्नि**—पु. मंदाग्नि: अग्निमांद्य; अपचन. [सं.]

**धूमादिमार्ग**—पु पितृलोकाचा रस्ता; दक्षिणायनमार्ग. हा अंधाराचा मार्ग आहे. याच्या उलट अर्चिरादिमार्ग.

**धूम्र**—पु. धूर; धूम. 'मद मत्सर धूम्रमेळें। एकाचे झांकले डोळे।' -एरुस्व १५.१२४. -वि. धुरकट रंगाचा; धुरकटलेला; मळकट; काळसर. [सं.] ०पत्र-न. (थट्टेनें, सांकेतिक) (धुराचें पान) तंबाखू. [सं.] ०पान न. १ धुनीवर उलटें टांगून घेऊन धूर पिणें; धूर पोटांत घेणें; योग्यांचा तपश्चर्येचा एक प्रकार. 'गोरांजनें धूम्रपानें। साधिती पंचाग्नी।' -दा ५.१.२५. २ (सांकेतिक) विडी ओढणें; हुक्का पिणें. 'धूम्रपान घेऊं नये।' -दा २.२.२५. ०मार्ग-पु. धूममार्ग पहा. १ पितृयाण; नरकाचा रस्ता. याच्या उलट आर्चिरादि तेजोमार्ग. 'पहिल्या मार्गास अर्चिरादि व दुसऱ्यास धूम्रादि मार्ग अशीं नावें आहेत.' -गीर २९२. २ (ल.) यातायातीचा, कष्टाचा मार्ग.

**धूर**—पु. १ जळत्या लांकडांतून निघालेला कोळशाचा अंश २ जिल्हई; मुलामा (सोनें, चांदी इ०वरील). ३ (ल.) ममता; तन्मयता; एकतानता, तल्लीनता. 'त्याचा त्या कामांत धूर आहे.' ४ धुंदी. 'विद्येचा-गर्वाचा-धनाचा किंवा पैशाचा-अधिकाराचा-धूर.' ५ एकाच ठिकाणीं फार वेळ बसल्यामुळें किंवा ओझ्याच्या भारामुळें येणारी कळ. (क्रि० उठणें; निघणें; लागणें; होणें). ६ तिखट-मसाल्याचे पदार्थ खाल्यानें नाकातोंडांतून जे उष्ण भपकारे सुटतात ते. 'मुखीं घालितां अतितिखटीं। नाकीं तोंडीं धूर उठी।' -एरुस्व १४.१०९. करपट ढेंकर ७ आकाशाची अभ्राच्छादित स्थिति; धुकें; मळभ. (क्रि० उठणें; निघणें; होणें). [सं. धूम्र] ०देणें-दाखविणें-(ल) फसविणें; ठकविणें; चकविणें. 'त्या लफंग्यानें त्याला चांगलाच धूर दिला.' धूराबर धरणें-गांजणें; निर्दयपणें वागविणें; छळणें. ०निघणें-गुप्त बातमी थोडीशी बाहेर येणें, किंचित् कळणें. -ख ४९३३.

**धूर**—स्त्री. १ जोखडाचीं शेवटें प्रत्येकी; गाडीचा, खटाऱ्याचा दांडा; गाडीचा अग्रभाग: धुरे व जूं मिळून होणारा भाग; गाडीच्या दांड्याचा अग्रभाग. २ वहाणेचा पट्टा; बुटाचा तोंडाजवळचा पृष्ठभाग; धुरी ३ पावलाचा फुगीर पृष्ठभाग; जोड्याचा कमानीजवळचा पृष्ठभाग; धुरी. ४ (काव्य) अग्रभाग. 'हात पसरूं ऐशा धुरे। ज्याचें कल्पांतीं नसरे।' ५ सप्तह; भार. 'अमर्त्यव्याळांचे धूर महाबळ धाडिले।' -मोराघनाक्षर रामायण ३७. -वि. १ पुढारी; नायक; श्रेष्ठ. 'मुख्य धूर रणीं लागल्या हातां। येर कटक जिंकिलें न झुंजतां।' -एभा ११.८८३. धुर अर्थ २ पहा. २ प्रमुख; प्रधान. [सं. धुर्] ०पट्टक-न. जूं आणि दांड्याचें टोंक यांना बांधणारा बंद; धुरेकट. ०करी-पु. १ हांकणारा. २ अनेक जोड्या असलेल्या औताच्या जोड्यांतील जोखडाजवळची, धुरेजवळची जोडी. धुरकरी पहा. ०काढणें-मार्गदर्शक होणें; पुढाकार घेणें. 'मोह नदीची थोर कढाडी। माझी समळ जळ प्रबळ वोढी। शिंतोडा न लागतां धूर मी काढी। परापरथडी तत्काळ।' -एभा १२ ५७७ ०खीळ-स्त्री. गाडीच्या दांड्याची खीळ. धुरखीळ पहा. ०जड-स्त्री. (ना.) धूजड पहा. ०पट्टी-स्त्री. दांड्यांच्या शेवटील आडवी पट्टी.

**धूरकपूर**—न. एक प्रकारची जाळी, कापड. धुरकापरी पहा. [हिं. कपरधूल]

**धूर्त**—वि. १ हुशार; कुशाग्र बुद्धीचा; चलाख; चाणाक्ष. २ लबाड; लुच्चा; कावेबाज. [सं.] धूर्ताई, धूर्तावा-पुस्त्री. १ धूर्तपणा; हुशारी; चातुर्य; चाणाक्षपणा. २ लबाडी; फसवेगिरी; लुच्चेगिरी. [सं. धूर्त]

**धूला**—पु. दंडोरा; दंगा; गडबड दुला पहा.

**धूलि**—स्त्री. धूळ पहा. [सं.] ०प्रक्षेप-पु. शिंतोडा उडविणें; दोषारोप; वाईट टीका करणें. [सं.] ०वंदन-न. धुळवडीच्या दिवशीं धूळ, चिखल टाकण्याचा खेळ. [सं.]

**धूव**—स्त्री. (गो. कों.) कन्या, मुलगी. [सं. दुहितृ-प्रा. धीआ; धूआ] म्ह० बोले सुने आणि लागे धुवे.

**धूसार**—न भंडार; हळद. धूसर पहा. 'धूशरें सूर्य झांकोळला।' -दावि १०९.

**धूसर**—वि. धुरकट; करड्या रंगाचा. -न. १ धुकें; धुंदी. 'झड झडाटें सुटला वायो। तेणें धूसर दाटलें।' -मुवन २.३९. २ पूड; चूर्ण; धूलि. 'वरि बुकियाचें धूसर। अत्तर कस्तुरी केशर।' -निगा ११९. [सं. धूसर]

**धूळ**—स्त्री. १ बारिक माती; धूलि. २ (ल.) गोंधळ; भांबावलेली स्थिति. ३ दुर्दशा; नाश; विध्वंस; पराजय; मोड (सैन्याचा). ४ (सामा.) ऱ्हास; नाश; नष्टप्राय स्थिति. [सं. धूलि] ०**उडणें**—(शेत, गांव, मुलुख, घर यामध्यें) ओसाड पडणें. ०**चारणें**—(धुळीस तोंड लावणें) एखाद्यास चीत करणें; पराभव करणें; मानभंग करणें. ०**फुंकणें**—(कमी चारा असलेल्या जमिनींत गुरें करतात त्याप्रमाणें) अन्नान्न दशेप्रत जाणें; पोटाला न मिळणें. **धुळीचे दिवे खात जाणें**—मोठ्या बेअब्रूनें दुस्थितींत भिक्षा मागत फिरणें. **धुळीचे दिवे लावणें**—दुलौकिकानें प्रसिद्धीस येणें; वाईट कृत्य करून पुढें येणें. **धुळीस मिळणें**—समूळ नाश होणें. **धुळीस मिळविणें**—नायनाट करणें; रसातळास नेणें. 'मराठेशाही मी पार धुळीला मिळविली. आतां मी खराखुरा सम्राट झालों.' -स्वप १३४. **धुळींत रत्न सांपडणें-मिळणें**—अनपेक्षित लाभ होणें; अचानक एखादी चांगली गोष्ट लाभणें. सामाशब्द- ०**अक्षर**—न. धुळाक्षर पहा. ०**कोट**—पु. (धुळीचा, मातीचा कोट) बाहेरील तटबंदी; मातीचा कोट (किल्याभोंवतालचा). ०**दर्शन**—न. १ हातपाय धुवून तयारीनें देवदर्शन करण्यापूर्वी प्रथम दुरूनच-रस्त्यातूनच देवाचें दर्शन घेणें; देवाला केलेला नमस्कार. २ मोठ्या माणसाची भेट. ३ उभ्याउभ्या, जातांजातां भेट; ओझरतें दर्शन, भेट. 'माझें वृत्त समजून न घेतां धूळदर्शनींच शिव्या देऊं लागला.' ०**दशा-धमासा-धाण-धाणी, धूळपट-पट्टी**—स्त्रीपु. १ पराजय; पराभव; दाणादाण (सैन्याची). 'परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी।' -विक ७. २ गोंधळ; फजिती; नाचक्की; (भांडकुदळ, लवांडखोर माणसाची). ३ नाश; भंग; बिघाड (बेत, योजना यांत). ४ उध्वस्तपणा; ऱ्हास; पडझड (शहर, देश यांची). ५ अव्यवस्था; धुळीस मिळणें; दुर्दशा. 'पोरापाशीं सावकारीस हजार रुपये दिले होते त्यांचा त्यानें धूळधमासा करून टाकिला.' ०**धमाया**—स्त्री. (दादर) यंवत्यंव; दगडधोंडे, फालतू गोष्टी; फुशारकी. ०**पट्टी, पट**—स्त्री. खडसावणी; खरडपट्टी; तासडणी. (क्रि० काढणें; उडविणें; मांडणें; करणें). [धूळ+पट्टी] ०**पाटी**—स्त्री. धुळाक्षरें शिकणाऱ्यासाठीं वर धूळ पसरलेली लाकडाची फळी. दगडी पाट्या निघण्यापूर्वी या पाट्या प्रचारांत असत. ०**पेरणी**—स्त्री. पाऊस पडण्यापूर्वी केलेली पेरणी. -कृषि २२३. ०**भेट**—धूळदर्शन पहा. 'लाटसाहेबांच्या धूळभेटीचा प्रसंग म्हणजे देशी संस्थानिकांना मोठा आनंदोत्सवाचा वाटतो.' -केसरी. ०**वाफ**—स्त्री. (धुळीत पेरणी) १ पाऊस पडण्याच्या सुमारास अथवा पावसाची पहिली सर पडल्यावर व धूळ पूर्णपणें बसण्यापूर्वी केलेली पेरणी. २ अशा रीतीनें पेरलेलें भात इ०. [धूळ+वाफ]

**धृत**—वि. धरलेलें; पकडलेलें. समासांत- धृतधैर्य-निश्चय-संकल्प-संन्यास; धृतोत्साह. [सं.] ०**व्रत**—वि. एकनिष्ठ; संकल्पाप्रमाणें वागणारा. ०**राष्ट्र**—पु. १ दुर्योधनाचा पिता. २ (ल. निंदार्थी) जन्मतः अंध; अंधळा माणूस. [सं.]

**धृति**—स्त्री. १ स्थैर्य; धैर्य; निश्चय. -ज्ञा ६.३७६. 'भुलला धर्म युतिला धृतिला मतिला तिच्या तथा स्तुतिला।' -मोवन १३.७८. २ धरणें; धारणा; जवळ असणें; ठेवणें. ३ सत्तावीस योगांपैकीं आठवा योग. [सं.]

**धृपद**—न. ध्रुपद पहा.

**धृव**—पु. ध्रुव पहा.

**धृवक**—न. ध्रुपद. 'धृवक कामोद' -दावि १४९.

**धृष्ट**—पु. उद्धट; दांडगा. 'अहा निपट धृष्ट मी प्रभुवरासि कां लाजशी।' -केका १६. [सं.]

**धेक**—पु. (गो.) १ दरारा; धाक. दबाजॉ पहा. २ ढेंकर.

**धेक, धेकण**—पु. (गो.) गर्जना. [ध्व.]

**धेंकर**—पु. (गो.) ढेंकर पहा.

**धेंगसॉ**—पु. १ (गो.) धमकी; धाक; दम. ०**घालप**—चिडून बोलणें; खेंकसणें; दरडावणें.

**धेड**—पु. १ एक हलकी जात व तींतील व्यक्ति. दक्षिणेंत बहुधा महाराला ही संज्ञा लावितात. २ (ल.) एक शिवी; वाईट कृत्य करणारा. 'तूं ब्राह्मण आहेस कीं धेड!' -ऐप ५८७. ०**कबका**—पु. (धेडांचें भांडण) (ल.) आरडाओरडीचें, निकराचें भांडण. ०**कावळा**—पु. कावळ्याची एक जात. हा अगदीं काळा असतो. यास डोंबकावळा, महारकावळा असेंहि म्हणतात [धेड+कावळा] ०**गा**—पु. (तुच्छतेनें) धेड. ०**गुजरी**—वि. अनेक भाषांची सरमिसळ जींत आहे अशी (भाषा). अनेक भाषांची खिचडी. 'पण कित्येक बहाद्दर तर असे आहेत कीं मराठी धेडगुजरी भाषा तोंडांत बसण्याचें कारण जें इंग्रजीचें ज्ञान त्याचाहि पण त्यांस गंध नसतो.' -नि २३. [धेड+गुजरी] ०**वाडा**—पु. १ धेड लोकांचा मोहला; महारवाडा. 'धेडवाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें।' -तुगा २९६. २ (ल.) कडाक्याचें भांडण; बाचाबाची; आरडाओरड. (क्रि० माजविणें; मांडणें). ३ (ल.) गोंधळ; अव्यवस्था. [धेड+वाडा] ०**सुगी**—स्त्री. १ शेतकरी लोकांचें धान्य तयार होण्यापूर्वी धेडांनीं आपले बलुत्याचें

मिळालेलें बाजारांत विक्रीस आणलेलें, विकलेलें धान्य (अर्थात तें बाजार भावापेक्षां स्वस्त दरानें विकावें लागतें त्यावरून). २ (ल.) अल्पकाळ टिकणारी पण अतिशय स्वस्ताई. [धेड+सुगी]

**धेंड, धेंडें**—न. १ अवजड आणि अवाढव्य शरीराचा माणूस: धूड. 'अनंत ब्रह्मांडें। एक्या रोमीं ऐसें धेंडें।' २ मोठा, प्रसिद्ध माणूस; श्रेष्ठ, प्रतिष्ठित माणूस: बडें प्रस्थ; मोठा विद्वान, वजनदार माणूस; विद्या, पराक्रम, शौर्य इ० मध्यें श्रेष्ठ. 'अर्जुना येसणें धेंडें। प्रज्ञापसरेंसीं बुडे।' –ज्ञा १८.२८९. 'ज्याच्यात पाणिनी कालिदास ... वगैरे असंख्यात धेंडें निपजलीं ...' –नि १०३. ३ वेडगळ; अचरट माणूस. [हिं. ढेंढा–डा=ढेरपोटया; ढेंढ–मूर्ख] म्ह०(गो) धेंड धेंडलों पाऊस शेंड्लों, धेंडल्या आवै म्हातारा शेळें ऊन खातली.

**धेंडरवाळी**—स्त्री. (व.) कराष्टमीपासून दिवाळीपर्यंतचे दिवस. यांत एक एक दिवा दररोज जास्त लावण्याची पद्धत आहे. कराष्टमी पहा.

**धेंडलॉ**—पु. (गो.) दिवाळींतील गुराख्यांचा एक उत्सव. कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं गुराख्यांचीं मुलें कृष्णाच्या मूर्तीची डोक्यावरून मिरवणूक काढतात व नाचत घरोघर हिंडतात. [धेंडा]

**धेंडशी-सी**—स्त्री. एक भाजीचा वेल; दिलपसंत. **धेंडसें**–न. त्या वेलीचें फळ. (खा) ढेमसें; दिलपसंत.

**धेंडळणें, धेंडाळणें**—अक्रि. ढाळ होणें. ढेंडळणें पहा.

**धेडा**—पु १ (कु. हेट.) विवाहांत मधुपर्क करतेसमयीं वराच्या शेजारीं दुसरा मुलगा सोबतीस बसवितात तो; पाणजांवई. २ (गंजिफांचा खेळ) सुरख्याबरोबर जें हलकें पान हुकूम होत असतें तो. म्ह० नवऱ्याला मिळेना काट (कट) धेडा मागतो वरण.

**धेंडा**—पु. १ वरातीच्या दिवशीं वधूवरांस खांद्यावर घेऊन कुल देवतांचीं नांवें घेऊन नवरीच्या माडवांत नाचतो तो माणूस. 'धेंडा नाचवील कृष्णनाथा। रसाळ कथा पुढें आहे।' –एरुस्व १६. १६६. २ धेंडा नाचविण्याचा कुलाचार, प्रकार; नवरा–नवरीस खांद्यावर घेऊन नाचणें. (क्रि० नाचविणें). 'धेंडा नाचविला निश्चित। तों दळ सिद्ध जाहलें समस्त।' –ह २४ १७२. म्ह० टाळ गेला मांदळ गेला माझा धेंडा नाचूं द्या=मनुष्य एखाद्या गोष्टीची वेळ निघून गेली असतां ती करावयास पहातो तेथें योजितात. ०नृत्य–न. नवरा–नवरीस दोन्ही पक्षांकडील माणसें घेऊन नाचतात तो प्रकार: धेंडा नाचविणें.

**धेंडा**—पु दोंडी. 'धेंडा फिरवूनि वानरफौजु।'–कमुरा ४७. ११७. ०पिटणें–द्वाही, दवंडी पिटणें.

**धेंडा, धेंड**—वि. दांडगा; मस्त. 'आमची बनी म्हणजे गुरा धेंडा आहे.'

**धेंडाळी, धेंडोळी**—स्त्री. डरंगळ; हगवण; शौचास वारंवार होणें हा रोग. ढेंढाळी पहा.

**धेंडी, धेंडा**—स्त्री. बायकांच्या दागिन्याचा एक प्रकार (विशेषतः कर्णभूषण); तानवड. 'कानीं धेंड्या आणिक वेल- बाळ्या मोत्यांचे सर।' –अफला ५५.

**धेंडी**—स्त्री. (गो. कु) नवरीची पाठराखीण. धेंडा पहा.

**धेंडें**—न. समुदाय. 'आणि बाह्येंद्रियांचें धेंडें। पिढूनि विधीचेनि दंडें।' –ज्ञा १८ ८३५. [दिंड]

**धेंडवाळी**—स्त्री कोलित; कोलती. 'पिशाह्यातीं धेंडे वाळी।' –एभा १०.५६८.

**धेंडोली-ळी**—स्त्री. बलिप्रतिपदेच्या, कार्तिक शुद्ध प्रतिप- देच्या दिवशीं गुराखी आपल्या गुरांच्या भोवतीं गवताच्या चुडीनें ओवाळतात ती गवताची चूड. (गो.) धेंडलॉ पहा.

**धेड्या**—पु. धेडगा पहा.

**धेंड्या**—पु धेंड याचें तिरस्कारार्थी रूप.

**धेणें**—उक्रि. धरणें. (भूतकाळीं प्रयोग). 'तरि मौन धेलेंचि अर्जुनें।' –गीता २ १६२८. कधीं कधीं घ्येलें असेंहि रूप येतें. 'नपुंसकें ब्रह्मचर्य घ्येलें।' –गीता १.१३८९. [सं. धृ]

**धेन**—न. (राजा. कुण.) चित्त; लक्ष; ध्यान पहा.

**धेनवा**—स्त्री. ध्यानवा पहा.

**धेनु**—स्त्री. गाय. 'नातरी हे धेनु हें श्वान। एक गुरु एक हीन।' –ज्ञा ५.९४. [सं.]

**धेनूधा**—स्त्री गाईची कांस; ओटी. 'त्वयश म्हणेल किति सुरधेनूधा सदृसासि दुभशील।' –मोवन २.१००.

**धेप**—स्त्री. (गो.) टांग.

**धेपॉ**—पु. (गो.) ढेंकूळ. [ढेप]

**धेर**—पु. घोड्याचा रंग. –अश्वप १.२८.

**धेसापिटे**—क्रिवि. दशदिशा; हातापिटी. 'आलें रे आलें भणत। धेंसापिटें जालें राउत।' –शिशु ९६६.

**धैंकाला**—पु. (कु.) जुनीं नाटकें ज्यांत होतात अशी जत्रा; उत्सव. [दहि+काला]

**धैप**—स्त्री. मोठें पाऊल; लांब टांग; धेप.

**धैर्य**—न. १ धीर; दम, धृति; निश्चय; अढळपणा. २ धाडस; धडाडी. धीर पहा. ३ टणकपणा. 'पृथिवी सांडी जरी धैर्यातें।' –दाव ३९३. [सं.] –वि. धैर्यवान्. 'तरी धनुर्धरा धैर्या। निकें अवधान देईं बा धनंजया।' –ज्ञा ९.९७. **०भंग**–पु. निराशा; निरुत्साह; हिरमोड; हिंमत खचणें. [सं. धैर्य+भंग] **०वान–शाली**–वि. सोशीक; दृढनिश्चयी, धैर्याचा. **धैर्याचा**–वि. धैर्य- वान्; धीराचा. **धैर्यावलंबन**–न. (धैर्यावलंबन) निश्चय, धारिष्ट याचा अवलंब करणें; धैर्य धरणें. [धैर्य+अवलंबन]

**धैवत**—पु. सप्तस्वरांपैकीं सहावा स्वर. [ सं. ]

**धो**—उद्गा. एक विशिष्ट आवाज (जिन्नस इ० पडण्याचा). [ध्व.] **०कन-कर-दिनीं-दिशीं, धोकरसा**-धो ! कर असा, एखादी जड वस्तू खालीं पडतांना होणारा आवाज.

**धो**—स्त्री. गाडीच्या चाकास बसविलेली लोखंडी धाव-पट्टी.

**धो**—स्त्री. खेळण्याचें हत्यार. -संव्या ६८.

**धोक**—न. वेड. -बदलापूर १३५.

**धोक**—वि. १ मोठा; लठ्ठ; दणकट ( माणूस ). २ मजबूत ( वस्त्र ). [ हिं. धोकड ]

**धोक**—पु. (नाशिक) विणण्यास उपयोगी असा न उकललेला सुताचा गुंडा; थोक.

**धोंकटी, धोंगटी**—स्त्री. १ न्हाव्याची-वस्तरे ठेवण्याची कातड्याची पिशवी. 'पायीं घालुन वाहणा अडकवी कक्षेप्रती धोंकटी। ऐसा नापिक वेष तो धरि हरी दासाचिये संकटीं।' -कीर्तन १.६७. २ शरीररूपी पिशवी. 'हे गुणेंद्रिय धोकटी। देह धातूंची त्रिकुटी।' -ज्ञा १३.१०६८. ३ दोन कप्प्यांची पिशवी; पडशी.

**धोकड**—वि. बळकट; धाकट-ड. [ हिं. ] **०धाकड**-वि. धाकड धोकड पहा.

**धोंकडा**—पु. ( राजा. ) ( निंदार्थी ) अगडबंब, लठ्ठ माणूस. [ धोकड ]

**धोंकणार**—वि. ( गो. ) ( दारू ) पिणारा; ढोसणारा; सुराभक्त.

**धोकणी-नी**—स्त्री. ( ना. ) चिंता; चुटपुट; हुरहुर; फिकीर. 'मला रात्रंदिवस परिक्षेची धोकनी आहे.'

**धोकणें**—अक्रि. जमणें; गोळा होणें. 'धाकें धाकें धोकला रंग अवघा।' -दा १४.४.१९.

**धोकर**—पु. ( व. ) दगा.

**धोकरा**—पु. ( गो. ) म्हातारा. [ गु. डोकरा ]

**धोंकसुचें, धोंगसप**—क्रि. ( गों. ) ( काठीनें ) ढकलणें; ढोसणें.

**धोका, धोखा**—पु. १ भीतीचें कारण; भय; संकट. 'त्या वाटेनें चोरांचा, वाघांचा कशाचा कांहीं धोका नाहीं.' 'नाना धोके देहबुद्धीचे। नाना किंतू संदेहाचे।' -दा १.१.३६. २ काळजी; चिंता; अनर्थाची शंका; कुकल्पना. 'दिवटा सरवदा भाकून गेला। अंतरीं धोका लागला।' -दा ३.७.५९. 'त्या मार्गानें तूं खुशाल जा कांहीं धोका बाळगूं नको.' ३ आपत्ति; ओढवलेलें संकट; वाईट प्रसंग; बंडाळी; दंगा; खरें झालेलें भय. 'पुढें मागुता धोका आला। यमयातनेचा।' -दा ३.५.५१. 'यशवंतरावच्या धोक्यांत मी अनकाईवर होतों.' ४ व्यापारांत तोटा; बूड; दुर्दैवाचा फटकारा. शको. ४. ४५ 'त्या व्यापारांत मला दोन हजाराचा धोका बसला.' ५ (ल) झोंका. [ हि. धोखा; गु. धोको ] **०देणें**-फसविणें; ठकविणें.

**धोका**—पु. दस्ता; कापूस पिंजतांना तांतीवर मारायाचा ठोकळा.

**धोकावणें**—क्रि. धोका येणें; दगावणें. 'स्वहित न घडे आशील धोकावला।' -दावि ४४०. [ धोका ]

**धोकाळ**—पु. ( कों. ) मोठा धडधड जळणारा विस्तव; प्रज्वलित अग्नि.

**धोंगटी**—स्त्री. धोकटी पहा.

**धोंगड**—वि. १ खरबरीत ( कापड, चटई, बैठक ). २ ओबड धोबड; अकुशल; घसमुसळें ( काम, युक्ति ). 'तेथ मी ज्ञाता हे धोंगडी युक्ती। स्फुरे निश्चितीं सूक्ष्म दंभें।' -एभा २३.२३९. ३ बेढब; अडाणी; असंस्कृत ( माणूस ). 'तीन नेत्र विषकंठ धोंगडा।' -अकक २ -भस्मासुराख्यान २५. 'मी तो महाराजांचा धोंगडसा वाणी।' -दावि ३३२. [ हिं. धोकड ]

**धोंगडा, धोंगडें**—नपु. दणकट, जाडेभरडे कपडे; चिरगूट, कापड, वगैरे. 'वस्त्र नेसलीसे धोंगडा।' -मसाप १.२. **म्ह०** गांडी धोंगडा पोटाला तुकडा.

**धोंगस**—पु. ( गो. ) सुरत; संभोग.

**धोट**—न. धोटा पहा.

**धोट**—वि. धुवट.

**धोटणें**—उक्रि. ( कों. ) अधाशीपणानें, एकसारखें पुष्कळ प्रमाणानें पिणें. ( क्रि० लावणें ). [ ध्व. धोट, धोट ]

**धोटनी**—स्त्री. ( व. ) लोचटपणा.

**धोटा**—पु. १ अधाशीपणें आणि पुष्कळ प्रमाणानें पिणें; गटगटां पिणें. ( क्रि० लावणें ).

**धोटा-टें**—पुन. १ ( विणकाम ) उभ्या सुतांत आडवे धागे टाकण्याचें साधन; कापडांत आडवें सूत घालण्यास ज्यांत कांडी भरून ठेवतात व जें उभ्या दोऱ्यांतून इकडून तिकडे आडवें फेंकतात तें. २ गुरांना औषध पाजण्याचें नळकांडें. 'बैलाला धोट्यानें तेल पाजा.' ३ पोकळ नळा; पिचकारी. 'घेओनी कनकाचे धोटे। सिंपताती एकें जवटें।' -शिशु ६६९.

**धोड**—स्त्री ( व. ) निबर; टणक; कडक; कोंवळा नसलेला. दोड पहा. 'रोड बदरिची फोड जोडतां वोढवितो मुरू धोड.' -अमृत सुदामचरित्र १०.

**धोंड**—स्त्री. १ मोठा जड धोंडा; दगड; खूप मोठी शिळा; खडक. 'हे देहदुर्गीचे धोंड। इंद्रियग्रामींचे कोंड।' -ज्ञा ३. २४२. २ (ल.) व्यापारांत आलेली बूड. ३ सरकारनें लादलेला फार मोठा कर ४ मोठें संकट; दुःख. ५ दडपणारी काळजी; चिंता. 'उरावर धोंड-गळयावर धोंड-डोईवर अथवा माथ्यावर

धोंड.' ६ मोठा आळ, आरोप. ७ ओझें; भार. ' हिंदुस्थान दिवसेंदिवस अधिकाधिक दरिद्री होत असून हिंदुस्थान इंग्लंडच्या गळयांत एक बोजड धोंड झाली आहे.' –टिव्या.(वाप्र.)०**डोकीवर चढविणें-देणें-वळविणें, धोंड पडणें, येणें**–१ अतिशय द्रव्यनाश होई असें दरवडा इ०. संकट प्राप्त होणें. 'या व्यापारांत पांच हजारांची मजवर धोंड पडली.' २ एखाद्या मनुष्यावर बळेंनें लादणें (काम). ३ कांहीं मागणीविषयीं एखाद्याकडून जुलमानें कबुली घेणें; रुकार मिळविणें. ०**गळ**-वि. दगडमय. जींत धोंडे पुष्कळ आहेत अशी (जमीन). ०**दिवस**–पु धर्मकृत्यास योग्य अशा दोन तिथीमधला तिथीवृद्धीमुळें येणारा दिवस. भाकड दिवस. ०**फूल**–न. दगडफूल; पावसाळयांतील दगडा–लाकडावरची फुलासारखी उगवण. ०**फोड्या**–वि. १ पाथरवट. २ (ल.) दगडफोडया पहा. ०**भट्टी**–स्त्री. स्नान केलें नसून स्नान केल्यासारखें दिसण्यासाठीं गंध, भस्म इ०कांनीं आपलें शरीर सजविणें; स्नानाशिवाय गंध लावणें. (क्रि० करणें). ' येतो हा धोंडभटी द्विज करुनि सदा तीर्थे यावा पदांचे।' –मसाप ४.३.१६८. –आगर ३.१०. [धोंडा+भटी किंवाधोंडभट ब्राह्मण] ०**महिना–मास**–पु. पुरुषोत्तममास; अधिकमास; मलमास (या महिन्यांत धर्मकृत्यें होत नाहींत म्हणून). ०**मार**–पु. धोंडयांची मारामारी; धोंडयांनीं मारणें, खाल्लेला मार; दगडमार. ०**वणी**–न. (चव, लज्जत येण्यासाठीं) ज्यांत ठिकरी विझविली आहे असें ताक; ठिकरी तापवून चटका दिलेलें ताक. (निंदार्थी) ठिकरीचा वास लाविलेलें ताक; ताक्तव. [धोंडा+पाणी] ०**वाण, वायण–वण**–न. १ अधिकमासांत ब्राह्मणांस दिलेलीं वायनें. २ दिंड; आंत पुरण घालून उकडलेला कणकेचा गोळा; धोंडा पहा. अधिक महिन्यांत याचें वाण देतात. ३ अधिक महिन्यांतील ब्राह्मणभोजन. ०**शीर**–स्त्री. मोठी शीर. १ पायाच्या टाचेवरची शीर. २ हाताची शीर. ३ कानाजवळची शीर. [धोंड+शीर] **धोंडा**–पु. १ दगड. 'आम्हांसि न या तोंडा दावावें नृपपदावरि पडो धोंडा।' –मोकृष्ण ५०.२३. २ अधिक महिना; हा प्रत्येक अडीच वर्षांनीं येतो. ३ अधिक महिन्यांत वायनासाठीं, ब्राह्मणभोजनासाठीं केलेला कणकेचा पुरण घालून उकडलेला गोळा; एक पक्वान्न. ४ (ल.) मूर्ख; दगड; अक्कलशून्य माणूस. ५ कठिण हृदयाचा मनुष्य; निर्दय, पाषाणहृदयी माणूस. **म्ह**० १ देखला धोंडा घेतला कपाळीं=अतिशय चिडखोर आणि आततायी माणसास लावतात. २ पावला तर देव नाहीं तर धोंडा. ३ धोंडा टाकून पहावा पडला तर आंबा नाहीं तर धोंडा. **धोंडा लोटणें–घालणें**-एखाद्यावर मोठें तुफान आणणें; कचाटें घालणें. **धोंडे खणून काढणें**–पाया खणून काढणें; निर्मूलन करणें; पाळेंमुळें खणून काढणें; उखडणें; काढून देणें; एखाद्यानें अजीबात निघून जावें म्हणून हात धुवून त्याच्या पाठीस लागणें. **धोंडे मारूं लागणें**–१ एखाद्यावर चालून जाणें; मारावयास धांवणें. २ (उप.) वेडा होणें; वेड लागणें. **धोंड्याखालीं हात सांपडणें**–पेचांत, अडचणींत येणें. **धोंड्याचे दोर काढणें**–१ कृपणापासून पैसे, पाषाणहृदयी मनुष्यापासून दया मिळावयास झटणें; अशक्य गोष्ट करावयाचा प्रयत्न करणें. २ अनुरूप साधनाचें सहाय्य नसतां मोठ्या खुबीनें आणि निश्चयानें मोठे उद्देश सिद्धीस नेणें. **धोंड्यावर धोंडे घालून करणें**–द्रव्यादि सहाय्य नसतां नाना प्रकारचे प्रयत्न करून एखादें कार्य करणें; नाना प्रकारच्या युक्त्या योजणें. **धोंड्यावर धोंडे घालणें**–निष्फळ प्रयत्न करणें; उपयोग नाहीं अशा गोष्टी करणें. **धोंड्याशीं कपाळ घासणें**–स्वतःस व्यर्थ शिणविणें (मूर्खास शिकविण्यांत इ०). **हातीं धोंडे घेणें**–अतिशय चिडणें; मारावयास उठणें. **पायावर धोंडा ओढून घेणें**–एखादें लचांड पाठीशीं लावून घेणें. **पायांवर धोंडा पाडून घेणें**–आपल्या अन्नांत माती पाडून घेणें, स्वतःवर संकट आपत्ति ओढवून घेणें. **चार ठिकाणीं धोंडे टाकून पाहणें**-स्वकार्यसाधनार्थ अनेक स्थळीं अनेक प्रयत्न करून पाहणें. **वाटोळा धोंडा**–पु. दुसऱ्याच्या पेचांत कधींच न सांपडणारा असा धूर्त माणूस. दगड शब्द पहा. **धोंडाळ**–वि. १ दगडाळ; खडकाळ. २ एकप्रकारची काळी जमीन; हींत धोंडे फार असल्यानें आंत पाणी राहूं शकतें, म्हणून पिकास फार चांगली समजतात. **धोंडी**–स्त्री. मोठा दगड; धोंडा; धोंड.

**धोडकारा**—पु. (गो.) एक लहान जातीचा मासा. याच्या मस्तकांत तीन दगड असतात अशी समजूत आहे. **म्ह**० धोडकाराच्या कपाळांत तीन गुंडे (दगड)=(कों.) पळसाला पानें तीन या अर्थानें

**धोडा**—पु. (गो. हेट) कच्चें फळ. दोड–डा पहा.

**धोडावचें**—क्रि. (गो.) टोकणें; ठोठावणें. **म्ह**० (गो.) धोडावन फणसुल पिकवप=(बदडून फणस पिकविणें) मारूनमुटकून वैद्यबुवा बनविणें.

**धोडावणी**—स्त्री. (गो.) टोक; टोकणी; ठोठावणी.

**धोंडावणें, धोंडाविणें**—अक्रि. एखाद्यास विशिष्ट काम करण्याविषयीं टोंचणी लावणें; बळेंनें प्रवृत्त करणें.

**धोडी**—स्त्री. (जुन्नरी.) पुतणी. धाडी पहा. [सं. दुहितृ–दुहिता–प्रा. धीआ–धूआ]

**धोडीं**—स्त्री. (गो.) एक मासळी.

**धोंडी**—स्त्री. आकार. –मनको.

**धोडो**—पु. (गो.) कांकडा; पोत; चूड.

**धोड्या**—पु. एक प्रकारचा पांढरा मासा. याच्या कपाळांत तीन पांढरे दगड नेहमीं सांपडतात असें म्हणतात. धोडकार पहा. (गो.) धोड्यारो

**धोण**—न. १ झाडाचें खोड; बुंधा. २ ठोकळा; ओंडा; ढोण पहा.

**धोणका, धोणा-ण्या**—वि. अडाणी; अशिक्षित; गांवढळ; आडदांड. ढोण्या पहा.

**धोणकी, धणकुटी**—स्त्री. (गो.) अति रक्तस्राव झाल्यामुळें होणारी मृत्युसूचक वेदना.

**धोणकें**—न. (गो.) ज्या कणसास एक पु ा दाणा नाहीं असें कणीस.

**धोणा**—पु. १ ठोकळा; ओंडा; धोण. २ (कु.) वल्हीं अडकविण्याचा दांडा.

**धोणी**—स्त्री. धुण्याची जागा; धुण्याचा दगड. [धुणें]

**धोणी**—न. ज्यांत धुणें धुतलें आहे असें पाणी; धुवण. [धुणें+पाणी]

**धोण्या**—पु. माकडांच्या टोळीचा म्होरक्या.

**धोत**—पु. १ झोत; लोल; पाण्याचा धबधबा. २ आगीचा लोट; झोत. [ध्व.]

**धोत**—स्त्री. ओंजळ; दुप्पट पसा.

**धोतघडीचा**—वि. धुवट; स्वच्छ आणि घडी घातलेला; परिटघडीचा. [धुन+घडी]

**धोतर**—न. पुरुषाचें नेसावयाचें, पांघरावयाचें वस्त्र. (क्रि० नेसणें). 'हातीं देवोनि कन्यापुत्र। नळराय काढिला बाहेर। दीधलेंसे येक धोतर। नेसावया।' –कथा १.९.२९. [सं. धौत्र; सिं. धोती, धोत्यो] **०सोडून नाचणें**-मोठा आनंद प्रदर्शित करणें; आनंदानें बेहोष होणें. **०जोडा**-पु. एक सलग विणलेली धोतराची जोडी. **०बडव्या**-पु. धोतरें धुणारा ब्राह्मण, चाकर; शागीर्द (तुच्छतेनें वापरतात).

**धोतरपाडवा**—पु. (अप.) दौहित्र प्रतिपदा.

**धोतरा**—पु. एक फुलझाड व त्याचें फूल, बीं. हें विषारी असतें. [सं. धत्तूर] **०घालणें-देणें**-(स्त्रीस) धोतऱ्याचें बीं, विष देणें (भ्रमिष्ट होण्यासाठीं, वेड लागण्यासाठीं. या वेडांतील बडबडणें भविष्यसूचक असतें अशी समजूत आहे). **०येणें-होणें**-धोतऱ्याचे विषामुळें बडबडणें, भ्रमिष्ट होणें. **धोतरेल**-न. धोतऱ्यापासून काढलेलें तेल. [धोतरा+तेल]

**धोतरा**—वि. वेडा; पिसाट; निर्बुद्ध; मूर्ख; अजागळ (माणूस).

**धोतऱ्या**—वि. धोत्र्या पहा.

**धोताटी**—स्त्री. (बे.) आंबे उतरण्याचें साधन; आंकडी.

**धोताल-ल्या**—वि. १ फार खर्चिक; सढळ हाताचा; उदार; दानशूर (चांगल्या व वाईट अर्थी). २ सढळ; भरपूर; अनियंत्रित (खर्च). ३ वचनें देण्यांत, गप्पा मारण्यांत अघळपघळ. ४ तोंडाळ; अव्यवस्थित; व्यसनी; बेछूट वृत्तीचा. [धोत]

**धोती**—स्त्री. (काशी) धोतर पहा. [हिं.]

**धोतीपोती**—पु हटयोगसाधनापैकीं एक प्रकार. मुखावाटे पांढरें स्वच्छ फडकें गिळून तें गुदद्वारानें (आंतील भाग स्वच्छ करून) बाहेर काढणें. धुतीपुती पहा.

**धोत्र, धोत्रजोडा-बडव्या**—धोतर इ० पहा. 'निरावलंब कडयावरी। धोत्र ध्वजा लावणें।' –सप्र ३.३६. **०पात्र**-न. १ वस्त्रें पात्रें (व्यापक रीतीनें). २ धोतरें आणि तसल्या दुसऱ्या वस्तू.

**धोत्रा**—धोतरा पहा.

**धोत्र्या**—पु. १ धोत्रें धुणारा ब्राह्मण; शागीर्द. धोतऱ्या पहा. २ (चोळणा नेसणारे ब्राह्मणेतर ब्राह्मणास निंदेनें म्हणतात) ब्राह्मण; धोतर नेसणारा.

**धोंदर**—वि. फुगीर; सुजरा.

**धोंदर, धोदरी, धोदरा**—स्त्रीपु. फुगवटा; फुगीरपणा; सूज. (क्रि० येणें; चढणें; जाणें; उतरणें; बसणें).

**धोदरणें**—अक्रि. सुजणें; एकदम मोठें होणें; फुगणें.

**धोदराट**—पु. एकदम पुष्कळ आलेली सूज. (क्रि० चढणें; येणें).

**धोंदराट**—पु. मोठा धडधडणारा विस्तव; धोकाळ.

**धोदरी**—स्त्री. (व.) भोंक, छिद्र. या पावसानें तेथें धोदरी पडली.'

**धोदऱ्या-ल्या**—पु. (राजा. व.) फोपशा. 'तो नुसता धोदल्या आहे झालं; त्यांत ताकत विलकूल नाहीं.'

**धोंदवडा**—पु. (महानु) नळकांडें; पिचकारी; धोटी. 'मकरंदाची धोंडवडें। नागवीति समयातें।' –भाए ४३६.

**धोदशी-सी**—स्त्री. (प्रां.) थलथलीतपणा; फुगीरपणा; फोपशेपणा.

**धोदा-धा**—पु. उंचावरून पडणारा पाण्याचा लोट, लोंढा; धबधबा; धोत. [ध्व.]

**धोदाट, धोधाट, धोधाटा**—पु. १ पाण्याचा लोंढा; धोत. २ आगीचा डोंब. ३ वाऱ्याचा मोठा झोत; सोसाटा. ४ बंदुका, तोफा इ० कांचा धूमधडाका; धाडधाड आवाज. [ध्व. धोदा]

**धोदाणा-ना**—पु. १ पाणी इ०कांचा जोरदार प्रवाह; वेगानें वाहणें. (क्रि० लागणें; लावणें) २ मोठ्या आवाजाची पिपाणी.

**धोदारणें**—अक्रि. फुगणें; धोदरणें पहा.

**धोधाटणें**—अक्रि. १ अतिशय पिणें; गटगटा ढोसणें. २ तहानेनें व्याकूळ होणें. [ध्व.]

**धोधाणी**—स्त्री. १ (कों.) धबधबा. २ (ल.) क्षतादिकांतून चालणारा मोठा रक्तप्रवाह.

**धोधावणें**—अक्रि. एकदम खालीं कोलमडून पडणें; आदळणें. [ध्व.]

**धोंधो**—स्त्री. धबधबा, जोराचा पाऊस इ० कांचा आवाज. [ध्व.]

**धोंधों, धोधो, धोधोधो**—क्रिवि. पाण्याच्या धबधब्याच्या, जोराच्या पावसाच्या, तोफ इ० कांच्या होणाऱ्या आवाजाचें अनुकरण. 'धोंधों जे हे लागले येथ वाहों।' –विवि ८.३.५९. [ध्व. सं. अंधः अंधः]

**धोनशा**—वि. (प्रां.) लठ्ठ; फोपशा; ढमाल्या; थलथलीत; फुगीर; सुजलेला.

**धोनशी**—स्त्री. (प्रां.) फोंपशेपणा; थलथलीतपणा; फुगीरपणा; थोंथली.

**धोनारणें**—क्रि. (महानु.) मुरगाळणें. 'धोनारिती चोखोट मन्मथचिये।' –भाए ४०७.

**धोन्यामेळा**—पु. (कु.) लग्नांतील एक कुलाचार.

**धोप**—स्त्री. १ लांब व सरळ तरवार. –शिदि १५४. २ वरील तरवारीच्या सपाट अंगानें मारलेला, किंवा दोन्ही हातांनीं काठी धरून मारलेला फटका, तडाखा, रपाटा, वार. ३ (ल.) (झाड इ०चें) फताडें पान, पात. 'ह्या केवढया पानाच्या धोपी ह्या!'

**धोप**—स्त्री. (कों.) धोपटी पहा.

**धोप**—अ. पांढरा शब्दास जोडून येणारा अतिशयत्व दर्शक प्रत्यय. जसें:–पांढरा धोप.

**धोप**—स्त्री. (कर.) उत्साह; उमेद. 'तुझी धोप तर बघूं या.'

**धोप**—वि. अखंड शाबूत; मजबूत; (विरू.) धडधोप.

**धोपट**—न. भाकरी; थालीपीठ. धुपट पहा. 'समर्थासी कपटबुद्धीनें आमंत्रण दिधलें। समर्थें सजगुन्यांचें धोपट करविलें।' –सप्र १८.११.

**धोपट**—वि. धुवट; धुतलेलें; (विरू.) धुपट पहा.

**धोपट**—वि. सरळ; मोठा, फार दळणवळणाचा (रस्ता); -क्रिवि. सरळ; तडक; थेट. (क्रि० जाणें; बोलणें; पळणें;चालणें) [? सं. अधः=खालीं+सं. पद=पाय=धोपड=धोपट–भाअ १८३५.] **०मार्ग**–पु. १ राजमार्ग; ज्यानें गेलें असतां चुकण्याचा संभव नसतो असा, सरळ रस्ता; याच्या उलट आडमार्ग; आडवाट. 'धोपट मारग लागलासे गाढा। मज काय पीडा करा तुम्ही।' –तुगा ९५४. २ (ल.) नेहमींची, परंपरागत चालत आलेली रीत, पद्धत, शिस्त. 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपटमार्गा सोडूं नको।' –अफला ६०. 'शहाण्यानें धोपट मार्ग सोडून वर्तन करूं नये.' –टि १.३५१. [धोपट+मार्ग] **०मार्गी**–वि. १ धोपट मार्गानें चालणारा; वागणारा. २ (ल.) सरळपणाचें, चोख वर्तन ठेवणारा; छक्केपंजे माहीत नसलेला; स्पष्टवक्ता; निर्भीड. [धोपटमार्ग]

**धोपटणें**—सक्रि. काठी, दांडा इ०कानीं (पदार्थ, मनुष्य इ०कास) बडविणें; मारणें; चोपणें; ठोकणें. 'असें मृदु म्हणोनि बा! मज न धोपटा कापुसा।' –केका ८८. [ध्व. धप्प. सं. अधः=खालीं+सं. स्फोटनम्–फोडणें=धोफोटणें–धोपटणें –भाअ १८३५]

**धोपटी**—स्त्री. १ वस्तरे इ० उपकरणें ठेवण्याची न्हाव्याची चामडयाची बगलेंत मारतां येण्यासारखी पेटी, धोकटी. २ पडशी; दुतोंडी पिशवी. 'धोपटी जयाची गोणी एवढी। सकळ साहित्य वाटया भांडीं।' –दावि २३२. [धोकटी; गुज. धोभटी]

**धोपटीव**—वि. काठीनें, दांडयानें बडविलेला (कपडा, साल, काथ्या इ०). [धोपटणें]

**धोपणें**—अक्रि. १ ऊन आणि श्रम यांमुळें व्याकुळ होणें; अतिशय तान्हेलें होणें; तृषाक्रांत होणें. 'दुःशासनासि वधितों मी भीम गजासि धोपला हरिसा।' –मोकर्ण ४५.८. 'यामुळें तो थकेल व उन्हाचा कडाका असल्यानें... धोपून जाईल.' –सुकौ ६४. २ (ल.) (एखाद्या गोष्टीकरितां) अतिशय उत्कंठित, उत्सुक, आतुर होणें; नितांतपणें खुरखुरणें. ३ व्याकुळ, दुःखित होणें. 'धर्ममर्यादेच्या संकोचें धोपले।' –मोरोपंत–सीतागीत–(नवनीत (पृ.) २६१.) 'वियोगाग्नि मज जाळितसे या कष्टें धोपलें।' –होला ९८. [सं. धूप्]

**धोपर**—न. गुडघा; ढोपर पहा. [ढोपर] **०संध्या**–स्त्री. गुडघ्यापर्यंत पाय धुणें. 'धोपर संध्या रे करा। चला जाऊं रे जेवणाला।' –ऐपो ४२. [धोपर+संध्या]

**धोंपळा**—पु. (गो.) एक सर्पविशेष; (गो.) भिंवण.

**धोंपळा**—पु. मोठें छिद्र; भगदाड.

**धोपा**—पु. (ना. व.) अळू.

**धोपाटी**—स्त्री. दोन्ही हातांनीं काठी धरून (जनावर इ० नां) जोरानें मारलेला रपाटा; फटका; तडाखा; वार. [धोप]

**धोपारधडा**—पु. (गो.) भरमसाटपणानें; कसें तरी, अव्यवस्थितपणानें काम करण्याची पद्धत; चालढकल. 'सारखें मोज. धोपारधडा करून काय फायदा!' [ढोपर+धडा]

**धोबड**—स्त्री. (मालेगांवी) म्हैस, डोबड.

**धोबड**—वि. १ (कों.) बोजड आणि जाडाभरडा; (एखाद्या कार्याच्या दृष्टीनें) अयोग्य मोठा असलेला (जिन्नस, लांकूड, वस्त्र). 'लेखणी धोबड म्हणून अक्षर धोबड येतें.' २ ओबडधोबड; अडाणीपणाची, अकुशल (एखाद्या वस्तूची बनावट, कारागिरी इ०). [का. दोप्प–धोप्प=जाडी ?]

**धोबी**—पु. कपडे धुण्याचा धंदा करणारा; परीट. [ सं. धू= धुणें; धौतिक–धौबीअ–धोबीअ–धोबी–भाअ १८३५; सिं. हिं. धोबी; गुज. धोभी ] **०पछाड**–पु. (मल्लविद्या) एक डाव. ( प्रतिपक्ष्यास धुण्याच्या वस्त्राप्रमाणें आपटून चीत करणें ). प्रतिपक्ष्याच्या बगलेंत आपला खांदा देऊन फिरून पाठीवरून त्यास पाडतात असा डाव. [ धोबी+पछाड

**धोबी**—पु. ( कों. ) एक पक्षी. हा झाडावरील किडे खातो. यास बाणपाखरूं असेंहि म्हणतात.

**धोबीण**—स्त्री. धोब्याची स्त्री; परटीण.

**धोम्या**—पु. ( माण. ) धोतरबडव्या; शागीर्द, धडू.

**धोय**—न. ( कर. ) दहीं. [ दहीं अप. ]

**धोय**—क्रि. (काव्य) १ धुई. 'भीतर मैला कवमिठोर भर उपर धोय।' –तुगा ४२९. २ धुणें या धातूचें प्रत्यय लावण्यापूर्वीचें रूप. 'प्रातः काळीं कांता बैसे अंगधोया।' –रामदासी २.११०.

**धोयटा**—पु. ( माण. ) एक वनस्पति.

**धोया**—पु. ( हेट. नाविक. ) खुंटीच्या आकारासारखें लांकूड.

**धोया, धुव्या**—वि. उघडानागडा; अवधूत. 'नागडधोया'

**धोरडा**—पु. ( झाडाची साल, वस्त्र इ०कांची ) चिरफळी; चिंधी, धांदोटी, चिरोटी. (क्रि० काढणें; निघणें). **०काढणें**–(ल.) (एखाद्यास) नागविणें; लुबाडणें. **०निघणें**–(ल.) (एखादा) नागवला, लुबाडला जाणें.

**धोरण**—न. १ तोंड; दिशा; संधान; नेम; रोख. 'मोरच्याचें धोरण किल्ल्यावर आहे.' 'मद्रागिरीचें धोरण कोणत्या बंदराकडे आहे!' २ केवळ नजरेनें पाहून ( एखाद्या गोष्टीच्या ) स्वरूपाविषयीं केलेला अंदाज, अजमास; तर्क; अटकळ बांधण्याची बुद्धीची चतुरता; खरा तर्क; अनुमानशक्ति. 'याच्या बोलण्याचालण्यावरून हा चोर असेल असें माझ्या धोरणांत येतें.' 'हें शेत चार खंडी पिकावें असें आम्हांस धोरण दिसतें.' ३ ( बोलतांना, एखादी गोष्ट करतांना करावयाचा ) मागचा पुढचा विचार; पोंच; संधानरूप अंतःकरणवृत्ति; सारासार विचार 'पूर्वी बोललों काय आणि आतां बोलतों काय हें धोरण त्यास राहात नाहीं.' ४ ( एखाद्याच्या भाषण, वर्तन इ०कांवरून त्याच्या ) उद्देशाची, अंतस्थ हेतूची तर्कानें कळून येणारी दिशा, रोख, स्वरूप. 'हा बोलण्यांत साधुपणा दाखवितो पण याचें धोरण निराळें आहे.' ५ सावधानतेची नजर, दृष्टि; लक्ष्य; काळजी. 'हे गडी काम करितांना जोगवतील तर तुमचें धोरण तिकडे असूं द्या.' ६ ( मनाचा, विचाराचा ) कल; झोंक; रोख. 'त्याचें प्रपंचाकडे धोरण.' 'त्याच्या अंतःकरणाचें धोरण कळत नाहीं.' ७ (एखाद्याच्या अंगीं असलेली एखादें काम करण्याची ) हातोटी; विशिष्ट पद्धत; सरणी; शैली. 'नाना फडनीसांचें राज्य करण्याचें धोरण दुसऱ्यास येणार नाहीं.' 'ही कशाची पतिव्रता, पतिव्रतेचें धोरणच निराळें.' ८ धारा; व्यवहार इ० कांतील संप्रदाय; वळण; वहिवाट. जसें– दरबारचें धोरण; सभेचें धोरण. ९ पूर्वापार चालत आलेली पद्धत; मोड; रीत. जसें–लिहिण्याचें–हिशेबाचें धोरण. १० –पु. मार्ग; रस्ता. 'कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं। धोरणू पडिला।' –ज्ञा ६.१५४. [ सं धूर्=अग्रभाग; किंवा सं. धारणा; किंवा सं. धुर्=जाणणें; सं. धोरण=वाहन ? ] **०शुद्ध**–वि बिनचूक धोरणाचा; धोरणाला धरून असलेला; पद्धतशीर. [ धोरण+शुद्ध= बरोबर ]

**धोरणी**—वि. दूरवर विचार करण्याची बुद्धि ज्यास आहे असा; धूर्त; दूरदृष्टि असलेला. अनुसंधानी; तर्क बांधण्यांत हुषार. धोरण पहा. [ धोरण ]

**धोरणें**—सक्रि. ( कवि. ) मैथुनद्वारां ( स्त्रीस ) उपभोगणें; संभोग करणें.

**धोरवटा**—पु. ( प्रां. ) धोरण या शब्दाच्या कांहीं अर्थी योजितात.

**धोरें**—न. ( विप्र ) धारें. धारें पहा.

**धोल**—पु. ढोल.

**धोलकें**—न. ( गो. ) ढोलकें; लहान ढोल.

**धोलचें**—अक्रि. ( गो. ) डुलणें. डोलणें पहा.

**धोलारो**—पु. ( गो. ) डोलारा पहा.

**धोलेरा**—पु. ( गुज. ) अफूचा दोडा; बोंड. –कृषि ४९८.

**धोवट**—न. धुण्याची क्रिया. 'करितां वस्त्राचें क्षाळण। स्वच्छपण धोवटीं।' –एभा १९.२६३. –वि. १ शुद्ध; निर्मळ. २ धुवट; धुतलेला. [ धुवट ]

**धोवळार**—न. चुनेगच्ची घर; मंदिर. धवळार पहा. 'थोरलिया धोवळारां जातांचि गा। दाता भेटला रामु गा।' –दावि ४९९. [ धवळार ]

**धो(धों)शा, धौ(धौं)शा–सा**—पु. १ मोठी नौबत; नगारा. २ ( ल. ) डंका; गाजावाजा; बोभाटा. (क्रि० गाजविणें; होणें). ३ निशाण; ध्वज. ४ ( ल. ) मोठा लौकिक; नांव; बडेजाव; गाजावाजा; प्रसिद्धि. ५ हल्ला; रणकंदन. 'चोहोंकडून हर! हर! म्हणोन घोडे घातले; एकच धौशा केला.' –भाब १२१. ( नवीप्रत ) ६ मर्दुमकी; पराक्रम; यशाचा झेंडा. 'या प्रमाणें यश संपादून धौशा गाजवून जनकोजी शिंदे शहाजणें वाजवीत गोटास चालले.' –भाब १३५. [ ध्व. हिं. धौंसा–नगारा ] **०लावून**–क्रिवि. (ल.) वाजतगाजत व निशाणें फडकावीत ( जाणें, येणें इ० ). 'मी कांहीं तुम्हासारखा र र करीत येणार नाहीं. मी गेलों तर धौंशा लावूनच येईन.'

**धोशा, धौ(धौं)शा-सा** —पु. १ (एखादें कार्य करण्याविषयींचा) नेटाचा, झटून केलेला, निकराचा प्रयत्न; आवेश व परिश्रमयुक्त कार्य; (एखाद्या गोष्टीवर, कार्यावर) तुटून पडणें; निकराचा हल्ला. (क्रि० लावणें) 'चार दिवस लढाईचा धोशा लावला तेव्हां किल्ला सही झाला.' २ (एखाद्याशीं केलेली) उद्दामपणाची, दंडेलीची वर्तणूक; काच; जाच; छळ. 'नवऱ्यानें मला धौसा लावला आणि त्याच्या धौशानें मी वाळल्यें.' 'त्याच्या धौशामुळें त्याच्या बायकोनें जीव दिला.' ३ धाक; भीति. 'धोशा धुळपाचा अति आनंदराव रणशूर।' -ऐपो ४५१. ४ मनाला लागलेली टोंचणी; ध्यास; धोसरा; ससेमिरा. 'येऊनजाऊन भाषांतराचा धौशा.' -नि १९५. ५ सपाटा; तडाखा; टोका; सारखा क्रम. जसें:-पेरणीचा-कापणीचा-नागरण्याचा-पढण्याचा-लिहिण्याचा-कांहीं एक करण्याचा-धोशा. 'मग्रून त्यानें पाण्याचा धोशा लावून द्यावा' -विवि ८.८.१५३. [हिं. धौस=धमकी, चढाई, आक्रमण] **०बाळगणें**-भीति, धाक, धोसरा वाटणें.

**धोष, धोष्ट्या**—वि. (कों) सुस्त; मंद आणि अजागळ; गबाळ्या; आर्प स्वभावाचा; गैदी राहणीचा (मनुष्य).

**धोस**—पु. (गो.) त्रास; जाच. [धोशा]

**धोसचें**—सक्रि. (गो) त्रास देणें; छळणें. [धोस]

**धोसणी**—स्त्री. टोंचणी; ढोंसणी [ढोंसणी]

**धोसरा**—पु. १ धाक; मनाला बसलेला धक्का; भीति; (विरू.) ढोंसरा; ढसरा. (क्रि० घेणें; धरणें). २ नाद; हट्ट. [ढोंसरा]

**धोसा**—पु लोंकरीचें एक प्रकारचें जाडेंभरडें कापड; धुस्सा. [हिं. धोसा. गुज. धोसो]

**धोळ**—पु (कों.) अग्नीच्या ज्वाळांचा लोळ, लोट.

**धोळती**—स्त्री. (व.) धोटनी; लोचटपणा.

**धौकडी**—स्त्री. (ना.) भूलथाप.

**धौत**—वि. १ धुतलेला; स्वच्छ केलेला; निर्मळ. २ पवित्र. 'आणि तीर्थें धौतें तटें। तपोवनें चोखटें।' -ज्ञा १३.६११. [सं.] **धौतांबर**-न. धुतलेलें वस्त्र; पांढरें, स्वच्छ वस्त्र. 'स्वच्छ शय्येवर धौतांबर।' -प्रला १६९. [सं. धौत+सं. अंबर=वस्त्र]

**धौतल-ल्या**—वि. उदार; खर्चीक; धोताल पहा. 'भलाच धौतल्या दिसतोस.' -बाळ २.१८३. **धौतलपणा**-पु. उदारपणा; धौतालपणा.

**धौति**—स्त्री. शरीरांतर्गत भागांची शुद्धि. -संयोग ३५५. धोतीपोती पहा. [सं.]

**धौरा**—पु. इजिप्तमधील एक धान्य. 'लोक धौऱ्याचे हिरवे दाणे मक्याप्रमाणें भाजून खातात.' -ऱुपनि २२७.

**धौर्तिक, धौर्त्य**—क्लीन. धूर्तपणा; कपट; लबाडी; सोदेगिरी; शाठ्य. [सं.]

**ध्याई**—स्त्री. (बे.) १ मन. २ पोट. ३ छाती.

**ध्याणें**—सक्रि. ध्यान करणें; चिंतन करणें. 'ध्यावें बरें हरिचिया पदपंकजातें।' 'जयास हृदयीं ध्याये उमावर।' [सं. ध्यान]

**ध्यात**—वि. चिंतिलेला; ज्याचें ध्यान केलें आहे असा; विचार केलेला. [सं. ध्यै]

**ध्यातव्य**—वि. १ ध्यान करण्यास, चिंतण्यास योग्य, शक्य; चिंतनीय. २ विचारांत घेण्यासारखा, विचारार्ह. [सं.]

**ध्याता**—वि. ध्यान, चिंतन, मनन करणारा; ध्यानकर्ता. [सं.]

**ध्या दिवसा**—क्रिवि. (अशिष्ट) भरदिवसां; दिवसाढवळ्या; धाहाढवळ्या पहा. 'ध्या दिवसा लेका सवास्त पडलाइस ढोरावाणी घोरत!' -माटे-अस्पृश्यांच्या डायरींतील पानें.

**ध्यान**—न. १ मनन; चिंतन. २ (विशेषतः) अष्टांग योगांतील वृत्तिनिग्रहरूप अंग, प्रकार; मनाची एकाग्रता. ३ विषयाचें आकलन करण्याची शक्ति; लक्ष्य. 'ही गोष्ट ध्यानांत येत नाहीं.' ४ ईश्वराची मूर्ति किंवा चित्र इ० कांत आयुधभेद, वीरासनादि स्थितिभेद, उग्रता, सौम्यपणा इ० विशिष्ट गुणयुक्त दाखविलेलें स्वरूप, मुद्रा. 'हें ध्यान उग्र आहे, तें ध्यान सौम्य आहे.' 'सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेवूनिया।' -तुगा १. ५ परमेश्वराचें, एखाद्या देवतेचें स्वरूपवर्णन करणारी कविता, पद इ०. ६ (व्यापक) विशिष्ट रूप; ढब; मोडणी; डौल; चिन्ह; तऱ्हा; पद्धत. 'दोघे जण सावकारी करितात परंतु तें ध्यान निराळें हें ध्यान निराळें.' 'आजच्या गाण्याचें ध्यानच कांहीं निराळें.' ७ (उप) गबाळ व भोळसट मनुष्य, द्वाड व घाणेरडा मुलगा. 'श्रीमंताच्यापुढें हें ध्यान कां उभें राहणार?' -अस्तंभा १९१. ८ लक्ष्य; सावधगिरी; अवधान. 'हे गडी खेळतील, विरंगुळतील तिकडे ध्यान असूं द्या.' ९ स्मरण; आठवण स्मृति. 'ही गोष्ट मी ध्यानांत ठेविली.' १० शरीरावयवांची विषयग्रहणाविषयीं जागृति; भान जाग्यावर असणें; शुद्धि. 'मी निजून उठलों आहें अजून पुरता ध्यानावर आलों नाहीं.' ११ आवड; पसंति. 'म्यां जें केलें तें त्याच्या ध्यानास येत नाहीं.' [सं.] **ध्यानांत घेणें, आणणें**-(एखादी गोष्ट) विचारांत, लक्ष्यांत घेणें. **ध्यानांत येणें**-(एखादी गोष्ट) पसंत पडणें; आवडणें; बरी अशी वाटणें. 'हें ऐकून मसलत सर्वांचे ध्यानांत आली.' -भाब ५. **ध्यानास लागणें**-(एखाद्या गोष्टीचा) ध्यास लागणें; (एखादी गोष्ट) डोक्यांत घोळविणें **ध्यानींमनीं**-क्रिवि. (ध्यानांत-मनांत) १ अंतःकरणाच्या अनेक अवस्थाभेदांच्या ज्या वृत्ती त्यांपैकीं एका वृत्तींत (अकरणरूपीं प्रयोग). 'आज पाऊस पडेल हें माझ्या ध्यानींमनीं नव्हतें म्हणून मी छत्रीवांचून बाहेर पडलों.' २ अवस्थाभेदांनीं होणाऱ्या ज्या अंतःकरणाच्या अनेक वृत्ती त्या सर्वांना व्यापून.

'याच्या ध्यानींमनीं सर्वदा खेळ, म्हणून स्वप्नांत चावळला तरी बारा, तिरपगडें इ० बोलतो.' [ध्यान+मन] सामाशब्द- ०धारणा- स्त्री. १ (एखाद्या वस्तूचें, मनुष्याचें) बाह्य स्वरूप, चर्या, मुद्रा. २ एकाग्रतेनें केलेलें चिंतन, मनन. (क्रि० धरणें; करणें). [ध्यान+धारणा] ०निष्ठ-वि. ईश्वर स्वरूपाचें ध्यान करण्यांत तत्पर, गढलेला; एकनिष्ठ. [ध्यान+सं. निष्ठा=निश्चययुक्त श्रद्धा] ०मुद्रा- स्त्री. १ देवतेचें ध्यान करतेवेळीं धारण करावयाची मुद्रा, शरीराची ठेवावयाची विशिष्ट स्थिति, बैठक, आसन. २ ध्यान करतेवेळीं होणारी भ्रुकुटी वांकडया होणें इ० प्रकारयुक्त मुद्रा; चर्या. [ध्यान+सं. मुद्रा=चर्या] ०योग-पु. ईश्वरप्राप्तीचें ध्यानरूप, साधन; अमूर्तचिंतन. [ध्यान+योग] ध्यानस्थ-वि. १ ईश्वराचें ध्यान करण्यांत निमग्न झालेला, गढून गेलेला. 'देव आणि भक्त। तन्मय अति ध्यानस्थ।' २ (अशिष्ट ध्यानस्त) विचार करण्यांत गुंग झालेला; विचारमग्न. 'तुम्हीं गोष्ट सागितली तेव्हा मी ध्यानस्त होतों म्हणून ऐकिली नाहीं.' [ध्यान+सं. स्था=उभें राहणें]

**ध्यानणें**—अक्रि. उमजणें; समजणें; उमगणें; जाणणें. 'गोसावी मनांत ध्यानला.' -मसाप १.२.२३. [ध्यान]

**ध्यानवा**—स्त्री. (अशिष्ट) गाय; धेनु. [धेनु]

**ध्यानका**—स्त्री. कुरूप, दिडीस, दिसणारी धिप्पाड (पुरुषी थाटाची) स्त्री. [ध्यान]

**ध्यानी, ध्यायक**—वि. (ईश्वराचें) ध्यान, चिंतन करणारा. 'ध्यायक हृदयीं हृदयस्थ।' -भूपाळी गणपतीची ४. [सं.]

**ध्यास**—पु. (एखादी गोष्ट, व्यक्ति इ० कांचा) क्षणमात्रहि विसर पडत नाहीं असा अंतःकरणास होणारा भास; घोकणी; जपमाळ. 'पोरानें आईचा ध्यास घेतला.' 'लग्न करावें असा ह्यास दोन वर्षें ध्यास लागला आहे परंतु होत नाहीं.' [सं. अभ्यास ?]

**ध्येन**—न. (कुण. माण.) ध्यान; लक्ष. 'आतां ध्येनांत येऊं लागला.' -बाय २.३. ध्यान पहा.

**ध्येय**—वि. १ ध्यान करण्यास, चिंतण्यास योग्य. 'अनुदिनि जननीच्या चिंतनीं ध्येय जे कां।' -मुरा बाल ४७. २ साध्य, प्राप्त करून घ्यावयाची (गोष्ट इ० उद्दिष्ट; अंतिम हेतु). -न. आयुष्यांतील इतिकर्तव्य; अंतिमसाध्य; इष्टसिद्धि. [सं.]

**ध्रुपद**—न. १ (संगीत) संगीतांतील चिजेचा एक प्रकार. अस्ताई, अंत्रा व आभोग असे यांत तीन भाग असतात. ध्रुवपद अर्थ ३, ४ पहा. २ (गाण्याचें, पदाचें) पालुपद, अकडकडवें. एखाद्याच्या मागें ध्रुपद धरणें-(एखाद्याच्या मागें उभें राहून, ध्रुपद पालुपद म्हणून) गाण्याची साथ करणें, त्याची री ओढणें. 'हरिकीर्तन करितां नित्य। तुकया मागें ध्रुपद धरित।'

**ध्रुपद्या**—पु. हरिदासामागें उभें राहून त्यास ध्रुपद, पालुपद म्हणूं लागणारा; त्याची साथ करणारा. [ध्रुव+पद]

**ध्रुव**—पु. १ पृथ्वीच्या उत्तरेस असणारा एक अढळ तारा. 'नोहेचि समुद्रा प्रवाहो। नुटीचि ध्रुवा जावों।' -ज्ञा १८४२१. २ पृथ्वीच्या किंवा खगोलाच्या आसांच्या दोन टोकांपैकीं प्रत्येक. 'उत्तर-दक्षिण ध्रुव.' ३ (ज्यो.) सत्तावीस योगांपैकीं बारावा योग. ४ सूर्य वंशांतील उत्तानपाद राजाचा पुत्र. 'ध्रुव धृव खरा स्तवा उचित होय विश्वास तो।' -केका ६५. ५ गाणें, पद इ०कांचें पालुपद; ध्रुपद; अकडकडवें. ६ (ताल.) एक मात्राप्रमाण. ध्रुवताल पहा. -वि. १ शाश्वत; निरंतर. 'ध्रुव सुख नसेचि कैंचा जय कैंचें राज्य कीर्ति जोडावी।' -मोशल्य १.५२. 'श्रीगुरु म्हणे त्या अवसरी। सुवासिनी होय ध्रुव।' -गुच ३२.१३७. २ स्थिर; अढळ; अचल. 'हृदय शुद्धीचिया आवारीं। आराध्यु तो निश्चल ध्रुव करी।' -ज्ञा १३.३८५ [सं.] सामाशब्द- ०ताल-पु. (संगीत) कर्नाटक संगीत पद्धतींतील एक ताल. याचे मात्रा प्रकार पाच आहेत ते येणें प्रमाणें. ११, १४, १७, २३, २९. [ध्रुव+ताल] ०पद-न. १ ध्रुवाला दिलेलें अचल स्थान; ध्रुव ताऱ्याचें स्थान. 'रुसला ध्रुव कवतिकें। बुझाविला देऊनि भातुकें। ध्रुवपदाचें।' -ज्ञा १०,१८. २ (ल) शाश्वत टिकणारें, वैभवाचें उच्च स्थान, पद. ३ (संगीत) पद, गाणें इ०कांचें पालुपदाचें कडवें; (विरू.) ध्रुपद. ४ (संगीत) चीजेचा एक प्रकार. ह्यात देवतांची स्तुति, ऋतुवर्णन, सृष्टिसौंदर्य, वीर-शृंगारादि रस इ० विषय असतात. ही चीज बहुधा गंभीर प्रकृतीच्या रागांत व प्रौढ भाषेंत रचिलेली असते व चौताल, सुलताल, तीव्रा, ब्रह्मताल इ०कात गाइली जाते. [ध्रुव+सं. पद=स्थान] ०पदीं बसविणें-उक्रि. १ (एखाद्यास) शाश्वत, स्थिर असें स्थान देणें. २ उच्चस्थानीं बसविणें; वैभवाला पोंचविणें. ०मत्स्य-पु. (ज्यो.) लघुऋक्ष किंवा लघुऋक्षांतील दोन मुख्य ताऱ्यांपैकीं एक. दुसरा मुख्य तारा ध्रुव होय. 'सप्तर्षि, नरतुरंगम ध्रुवमत्स्य, ययाति वगैरे राशींची ओळख मुलांना करूनि देतां येईल.' -अध्यापन २००. [ध्रुव+सं. मत्स्य=मासा] ०लोक-पु. स्वर्गलोकाप्रमाणें असलेला ध्रुव ताऱ्याचा लोक. [ध्रुव+लोक=जग] ०वृत्त-न. ध्रुवापासून २३॥ अंशावर असलेलें विषुववृत्ताशीं समांतर असें कल्पितवृत्त. विषुववृत्तापासून उत्तरेस व दक्षिणेस असलेलें ६६॥ अंशांवरील अक्षांशवृत्त. [ध्रुव+सं. वृत्त=वलय, वर्तुळ]

**ध्रुवाकर्ष प्रेरणा**—स्त्री. (ज्यो. पदार्थ) मध्यबिंदूकडे ओढणारी प्रेरणा, शक्ति. (इं.) सेंट्रिपीटल फोर्स. [ध्रुव+आकर्ष=ओढणें+सं. प्रेरणा] **ध्रुवात्मक**-वि. (पदार्थ) ज्यामध्यें चुंबकासारखें आकर्षण उत्पन्न केलें आहे असा; ध्रुवसंपन्न झालेला, केलेला (धातुमय पदार्थ, शलाका इ०). [ध्रुव+आत्मा] **ध्रुवांश**-पु. (ज्यो.) खस्थ गोलाचें (त्याला जवळ असलेल्या) ध्रुवापासूनचें अंशात्मक

अंतर. [ ध्रुव+अंश ] **ध्रुवीभवन**-न. १ ( एखाद्या पदार्थाची, धातूची, दुसऱ्या पदार्थावर रासायनिक क्रिया होऊन तो पदार्थ ) ध्रुवसंपन्न चुंबकासारखा आकर्षणयुक्त बनणें. २ प्रकाशलहरींच्या कंपनामध्यें फरक होणें. ( इं. ) पोलरायझेशन. 'ध्रुवीभूत किरण वेगवेगळया बाजूमध्यें निरनिराळे गुणधर्म दाखवितो. -ज्ञाको ध ८६. [ सं. ] **ध्रुवोत्सारप्रेरणा**-स्त्री. मध्यापासून दूर लोटणारी प्रेरणा. ( इं. ) सेंट्रिफ्यूगल फोर्स. [ ध्रुव+उत्+सार्=दूर, वर लोटणें+प्रेरणा=शक्ति, जोर ] **ध्रुवोन्नति**-स्त्री. ( ज्यो. ) ध्रुवाची ( एखाद्या ) पातळीपासून अंशात्मक उंची; ध्रुवाचा उन्नतांश. [ ध्रुव+सं. उन्नति=उंची ] **ध्रुवोन्मुखता**-स्त्री. ( चुंबकाचीं दोन टोकें अनुक्रमें ) उत्तर व दक्षिण या दिशांकडे आकर्षिलीं जाण्याचा चुंबकाचा गुण. -मराठी ६ वें ( १८७५ ) पुस्तक, पृ. ७८. [ ध्रुव+सं. उन्मुखता=तोंड समोर, पुढें करणें, असणें ]

**ध्रुवक**—पु.( ज्यो. ) ज्या अंकांस कांहीं संस्कार करून विवक्षित तिथि, ग्रह इ० काढतां येतात ते अंक; कच्चें गणित.

**ध्रुवा**—स्त्री. पृथ्वी; वसुंधरा. [ सं. ]

**ध्वज**—पु. देवालय, राजवाडा इ०कांपुढें उंच स्तंभ उभारून त्याजवर विशिष्ट चिन्हानें युक्त असें वस्त्र लावतात तो; राजादिकांच्या स्वारीपुढें यश चिन्ह म्हणून चालविला जाणारा विशिष्ट चिन्हांकित वस्त्रानें युक्त असा लहान, मोठा स्तंभ; झेंडा; पताका; निशाण. 'तया ही वरी अष्टादशु। तो आपैसा मांडला कळसु। उपरि गीतादिकीं व्यासु। ध्वजें लागला।' -ज्ञा १८.४१. [ सं. ] **०लावणें**-१ विद्या, शौर्य इ०कांनीं मोठी कीर्ति संपादन करणें; नांव गाजविणें, कमाविणें. २ ( उप. ) कुप्रसिद्धि पावणें; अपकीर्ति मिळविणें. सामाशब्द- **०पात-भंग**-पु. पुंशक्तीचा, पौरुषाचा, अभाव; क्लीबत्व; षंढपणा; नपुंसकत्व. [ ध्वज=लिंग+सं. पात=पडणें+भंग=मोडणें ] **०स्तंभ**-पु. ध्वजाचा स्तंभ; खांब; निशाणाची काठी. [ ध्वज +सं. स्तंभ=खांब ] **ध्वजाय**-पु. घराच्या जमीनीच्या लांबी-रुंदीवरून आठ प्रकारचे आय सांगितले आहेत त्यापैकीं एक. आय अर्थ ४ पहा. [ ध्वज+आय ]

**ध्वजा**—स्त्री. १ निशाण, ध्वज पहा. 'तुका म्हणे सुख घेतलें गोपाळीं। नाचती कांवळीं करुनी ध्वजा।' -तुगा ३०. २ वर्षप्रतिपदेच्या दिवशीं उभारतात ती गुढी. [ सं. ] **ध्वजांगें**-क्रिवि. हातांत निशाण धरतांना जो आकार होतो त्या स्थितींत. 'ध्वजांगें उचले बाहु आवेशें लोटिला पुढें।' -दावि ४७३. [ ध्वजा+अंग=अवयव ]

**ध्वजापर्वणी**—स्त्री. गुरु सिंह राशींत संक्रांत होतो तो सिंहस्थाचा दिवस. या दिवशीं त्र्यंबकेश्वरीं गोसाव्यांचे बरेच आखाडे ( निरनिराळया ध्वजांचे ) येतात. [ ध्वजा+पर्वणी ] **ध्वजारोप-रोपण**-पुन. १ वर्षप्रतिपदेच्या दिवशीं गुढी उभारण्याचा विधि. ध्वजा अर्थ २ पहा. २ ( सामा. ) निशाण रोवणें, उभारणें; झेंडा लावणें. [ ध्वजा+सं. आरोप, आरोपण=रोवणें, उभारणें] **ध्वजावंदन**-न. ( राष्ट्राच्या ) निशाणाला सामुदायिक वंदन करण्याचा विधि; झेंडावंदन. -के १६.४.३०. [ ध्वजा+सं. वंदन=नमस्कार करणें ] **ध्वजाहृत**-वि. १ युद्धांत जिंकून आणलेला ( दास इ० ). २ अविभाज्य धनाचा एक प्रकार. [ ध्वज+सं. आहृत=आणलेला ]

**ध्वजिनी**—स्त्री. सेना; सैन्य. -वि. सीमेचा एक प्रकार; ही वृक्ष इ०कांनीं चिन्हित असते; कारण वृक्षादिक प्रसिद्धपणें ध्वजासारखे आहेत. -मयूखदायविभाग पृ. २४८, [ सं. ]

**ध्वनणें**—सक्रि. सांगणें; दर्शित करणें. 'ज्या उपदेशाच्या पोटीं। वर्णाश्रम परिपाटी। न साडिता होय माझी भेटी। तेही गोष्टी ध्वनिलीसे।' -एभा १३.७१७. [ सं. ध्वनन ]

**ध्वनन**—न. १ आवाज करणें. २ ( एखादी गोष्ट ) फलितार्थानें, प्रत्यक्ष त्या शब्दांत न बोलतां, अर्थापत्तीनें सुचविणें; दर्शित, ध्वनित करणें. जसें:-आंब्यास मोहोर आला, कोकिळा ओरडूं लागल्या असें बोलल्यावरून वसंतऋतु आल्याचें ध्वनन होतें. [ सं. ]

**ध्वनविणें**—सक्रि. वाजविणें. 'धर्मराज कुंतिकुमर अनंत-विजय-ख्यात-शंख ध्वनविता जाला।' -शिवरामकृत गीतचंद्रिका १.१६. [ सं. ]

**ध्वनि-नी**—पुस्त्री. १ श्रोत्रेंद्रियास आकलन करतां येणारा शब्द; आवाज. 'देखा काव्य नाटका। जें निर्धारितां सकौतुका। त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका। अर्थध्वनि।' -ज्ञा १.७. 'परब्रह्मीं उठली जे ध्वनी। आदिजननी तेचि तूं।' -ह १.१३. २ वाच्यार्थाहून इतर अर्थ सूचित करण्याचा वाक्य इ०कांच्या ठायीं असलेला गुण; गर्भितार्थ. काव्याचा व्यंग्यार्थबोधक एक प्रकार. ३ स्पष्टपणें न ऐकिलेलें वाक्य इ०; संदिग्ध, संशयित गोष्ट; संशय; अफवा; कुजबुज. 'तरि अगा ऐशिया ध्वनी। ह्मणे थारा देशी हो मनीं।' -ज्ञा ८.१२३. 'हा चोर आहे असा ध्वनि मात्र आम्ही कर्णोपकर्णी ऐकतों परंतु आमचा निश्चय होत नाहीं.' ४ भावार्थ; अभिप्राय; सूचित, ध्वनित केलेला अर्थ. 'हे अष्टधा भिन्न कैसी। ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं।' -ज्ञा ७.१७. ५ ज्यापासून निश्चित असा अर्थ स्पष्ट होत नाहीं असें संदिग्ध, मुग्धार्थयुक्त वाक्य. 'आजपर्यंत सरकारांत दादच नव्हती पण आतां चोरांचें परिपत्य करितो असा नुकताच ध्वनि निघाला आहे, होईल तेव्हां खरें.' [ सं. ] **०द्वार**-न. श्वासनलिका. [ ध्वनि+सं. द्वार ] **०प्रक्षेपक-यंत्र**-न. ध्वनि दूरवर वाहून नेणारें यंत्र; ( इं. ) ब्रॉडकास्टिंग् मशिन्. [ ध्वनि+सं. प्रक्षेपक=फेंकणारें+यंत्र ] **०मंजूषा**-स्त्री.

कंटनाल; नरडें. (इं.) व्हॉइस्‌बॉक्स. ०लेखनयंत्र, ध्वन्यनुकारी यंत्र—न. मेणाच्या, कथिलाच्या फिरत्या तबकडीच्या पृष्ठभागावर ध्वनीचें लेखन करून, त्या मूळच्या ध्वनीस पाहिजे तेव्हां उत्पन्न करून देणारें यंत्र. (इं.) फोनोग्राफ्. –ज्ञाको (ध) ८८. [ध्वनि+सं. लेखक=लिहिणारें+सं. अनुकारी=अनुकरण करणारें+यंत्र] ०विकार—पु. आवाज बसण्याचा एक विकार, रोग. [ध्वनि+सं. विकार=रोग] ०विद्या-शास्त्र—स्त्रीन. (पदा.) ध्वनीचे गुणधर्म, सिद्धांत इ०कांचें विवेचन करणारें शास्त्र. (इं.) अकॉस्टिक्स्. [ध्वनि+सं. विद्या, शास्त्र] ध्वन्यर्थ—पु. ध्वनित, सूचित केलेला, गर्भित अर्थ; व्यंग्यार्थ. [ध्वनि+अर्थ]

**ध्वनित**—वि. १ वाजविलेला. २ सूचित, गर्भित (अर्थ इ०). ३ अस्पष्ट; संदिग्ध; गूढ. ‘नातरी झकवीतु आहासी माते। कीं तत्त्वचि कथसी ध्वनितें।’ –ज्ञा ३.१६. ४ संक्षिप्त; त्रोटक. ‘बहुत बोलतां वाढेल ग्रंथ। ध्वनित बोलतां न कळे अर्थ।’ -पांप्र ३६.९. ५ काव्यरूपानें, अलंकारिक रीतीनें दर्शविलेला; सांगितलेला (अर्थ, गोष्ट). [सं.] ०करार—पु. मूकपद्धतीनें एखादी गोष्ट कबूल करण्याचा (शब्दांहतकाच बंधनकारक) प्रकार. –ज्ञाको (क) १०३. ध्वनितार्थ—पु. सारांश; संक्षेपानें सांगितलेली गोष्ट. ‘ते कथा सांगता समस्त। तरी वर्णावें लागेल भारत। पसरेल असंभाव्य ग्रंथ। यालागि ध्वनितार्थ बोलिलों।’ –ह ३२.१३६. [ध्वनित+अर्थ]

**ध्वंस, ध्वंसन**—पुन. (मोडणें, फुटणें, जळणें इ० कारणामुळें एखादा पदार्थ इ०कांचा झालेला) नाश; नासाडी; निर्दलन; जमीनदोस्त होणें, करणें. ‘जनाज्ञानांधकाराचा ध्वंस करण्याची परम दीक्षा धारण करून. ....’ –नि २१. ‘मी गेलों तर मागें संसाराचा ध्वंस होईल.’ [सं. ध्वंस्=नाश करणें]

**ध्वंसणें**—उक्रि. नष्ट, जमीनदोस्त, उध्वस्त, नाश करणें. [सं. ध्वंसन]

**ध्वंसित, ध्वस्त**—वि. नाश पावलेला; उध्वस्त, जमीनदोस्त केलेला; धुळधाण झालेला. [सं.]

**ध्वाडी**—स्त्री. पुतणी. ‘विटोजी गावडे याची बायको सुर्याजी येवले याची ध्वाडी.’ –वाडबाबा २.३८. धाडी–धोडी पहा.

**ध्वांत**—न. अंधार; काळोख; अंधकार. ‘जसें ध्वांत सुर्यागर्मी नाश पावे।’ [सं.]

**ध्वान**—पु. ध्वनि; आवाज; शब्द. [सं.]

**ध्वांक्ष**—पु. कावळा. ‘हांसोनी एक हंस ध्वांक्षासि म्हणे तुझ्या गती शतशा।’ –मोकर्ण २८.३४. [सं.]

---

# न

**न**—व्यंजनमालेंतील विसावें व्यंजन. अक्षरविकास:—या वर्णास तीन अवस्थांतून गेल्यावर सांप्रतची अवस्था प्राप्त झाली. पहिली अशोकाच्या गिरनार लेखांत; दुसरी कुशानवंशी राजाच्या वेळच्या मथुरा येथील लेखांत (इ०सन पहिलें शतक) व तिसरी मेवाडचा गुहिलवंशी राजा अपराजित याच्या काळच्या कुंडलेश्वर लेखांत (इ. सन ६६१) दृष्टीस पडते. आजचा न हैहयवंशी जाजल्लदेवाच्या वेळच्या लेखांत (इ. सन १११४) ओळखूं येतो. –ओझा प्रा.

**न**—पु. नकार. ‘त्वद्वदनोत्थ न पडला अर्थिजनाच्या कधींहि कानीं न।’ –मोउद्योग १०.७४.

**न**—अ. १ निषेधार्थी, नकारार्थी शब्द; नाहीं. ‘पार्थाचे शर न हे शिखंडीचे।’ –मोभीष्म ११.१०४. ‘अति स्वार्थबुद्धी न रे पाप सांचें।’ –राम ९. २ नका; नको. ‘न याल न या.’ ‘न याल न या.’ [सं.] (वाप्र.) न चा पाडा, पाढा, फाडा नन्नाचा पाढा—पु. नकार; कोणतेंहि काम करावयास सांगितलें असतां नाकारणें; नाहीं म्हणणें. नचा पाढा वाचणें–सांगणें–घट(ट्ट)करणें–घोकणें—नेहमीं प्रत्येक गोष्ट, काम नाकारणें; प्रत्येक कामास, गोष्टीस नकार देणें. ‘ह्याला नचा पाढा पाठ आहे.’ =प्रत्येक गोष्टीला, कामाला त्याचा नकार आहे. सामाशब्द–नकळा—वि. (प्रां.) न जाणणारा; अजाण –क्रिवि. नकळत, नजाणतेपणानें. [न+कळणें] नकिंचन—वि. अकिंचन; दरिद्री; कंगाल. [न+सं. किंचन=कांहींहि] नकार—पु. नाहीं म्हण ण्याची क्रिया; निषेध; नाकबुली. याच्या उलट होकार. (क्रि० करणें, देणें). ‘मी त्याजजवळ रुपये मागितले परंतु त्यानें नकार केला.’ २ (हुंडी इ० काचा) स्वीकार न करणें; न स्वीकारण्याबाबत हुंडीवर मारलेला शेरा. [सं. न+कार] ०घंटा—पु. अभाव; वाण; नसल्याची खूण. ‘घरांत वाजे नकारघंटा।’ –अमृत, सुदामचरित्र २९. [नकार+घंटा] नजाणपणें—क्रिवि. अजाणपणें; नकळत. ‘प्राचीन ग्रामपंचायतीची पद्धत जाळल्याकारणानें जाणून अथवा नजाणपणानें माजविलेली कज्जेदलाली...’ –खेया २७.

**न न**—उद्गा. १ नाहीं, नाहीं; नको, नको; नाकारणें; मनाई करणें; नाकबूल करणें. (क्रि० करणें; सांगणें; म्हणणें; बोलणें). २ एकाच वाक्यांत दोन नकार असल्यास त्या वाक्याचा करणरूपी किंवा होकारार्थी अर्थ होतो; दोन न प्रस्तुतार्थ दृढ करितात. ‘न पुरी न कटककोपें उग्रा गरळाभिच्या कुळा व्याली।’ –मोवन १२.३४.

**न**—उभ. १ त्याच त्याच दोन शब्दांमध्यें ते शब्द जोडण्याकरितां योजावयाचा—नें, सह, बरोबर, मागून इ० अर्थाचा–शब्द.

जसें:- पैसा न पैसा; रुपया न रुपया; दमडी न दमडी (जमतो, मिळवितो. खर्चतो); झाड़ा न झाड़, घरा न घर (टिपत जा); पायरी न पायरी (चढत जा); पावला न पाऊल (सरकत गेला); मागा न माग (चोराचा शोध लावला); दिवसा न दिवस, वर्षा न वर्ष इ० २ आणि, व, अन् जसें:- घोडा न बैल; ढाल न तलवार; तो न मी (बोलतांना ह्या न निराळा न उच्चारतां जोडीपैकीं पहिल्या शब्दासच जोडून व अर्धवट न् असा उच्चारण्याची पद्धत आहे). [आणि; अन्]

**न॥**—(संक्षेप) १ नग. २ नजीक. ३ नंतर. ४ नफर. ५ नमस्कार. ६ नाईक इ०

**नई**—स्त्री. (कों. राजा. कु. चि. व क.) नदी. ' नई हो कां भलतैसी थोरी । परी गंगा जैं अंगिकारी । तैंचि तियें सागरीं । प्रवेशु-गा । ' —ज्ञा १७.३२४. [सं नदी; प्रा. णई; सिं. हिं. नइ] **म्ह०** इकडे नई तिकडे वई=इकडे नदी तिकडे कुंपण; इकडे आड तिकडे विहीर या अर्थी पेंचाची, अडचणीची, कुचंबणीची स्थिति.

**नइस**—स्त्री प्रेत वाहून न्यावयाची तिरडी. 'नईस न्यावयास ब्राह्मण तेलंग केले.' —रा ६.५. [अर. नअ्श]

**नउखा, नउबत, नउली**—नौखा; नौबत; नौली इ० पहा.

**नऊ**—वि. ९ ही संख्या; नव पहा. [सं. नव; बं. नय; हिं. नौ झें. नव; ग्री. नेऑस; लॅ. नोव्हुस्; ऑस्क. नुवूला; सॅक्स. निवे; निव; लिथु. नौयेस्; स्ला. नोवूउ; हिब्र्यू. नुआ] **०स्थायी-भाव**-पु. प्रेम, उत्साह, शोक, विस्मय, भय, हास्य, जुगुप्सा, क्रोध आणि निर्वेद ह्या नऊ मनोवृत्ती. [नऊ+सं. स्थायीभाव] **०हस्तवाद्यें**-नअव. झांज, टाळ, चिपळी, करताळ, जलतरंग, घंटा, तास, घुंगुर व घागऱ्या.

**नकटा**—वि. १ ज्याचें नाक कापलेलें आहे असा. २ आखूड, चपटया, बसक्या नाकाचा. ३ (ल.) कांहीं अंशीं अपुरी, दोष-युक्त राहिलेली, व्यंग गोष्ट, कार्य इ० [हिं. नकटा; नाक+कटा= काटणें; प्रा. णक्क=नाक; हिं नक] **नकटयापुढें नाक खाजविणें**—नकटयास नकटा म्हणून खिजविणें; मुद्दाम खिजविणें; वेडावणें. **म्ह०** १ नकटीच्या लग्नाला सतराशें विघ्नें=प्रथम नकटया मुलीचें लग्न लौकर जुळत नाहीं, जुळलें तरी त्यांत अनेक अडचणी येतात. यावरून आधींच दुष्कर असलेल्या कामांत अडचणीवर अडचणी येणें. २ नकटें व्हावें पण धाकटें होऊं नये=शरीरानें व्यंग असलेलें चालेल पण धाकटा मान, धाकटेपण येऊं नये. कारण धाकटयाची प्रतिष्ठा कोणी ठेवीत नाहीं, त्याला नेहमीं अरेतुरे करतात, कामें सांगतात व हलकें लेखतात, तसें नकटयाचें होत नाहीं. ३ सुरसुरू सापिका आणि नकटा निरुका. **०चकटा**-वि. कुरूप आणि हिडीस, ओंगळ दिसणारा. [नकटा द्वि.]

**नकटें**—न. (खा.) अर्ध्या पावशेराचें माप; निपटें: पिटकें; १० तोळ्यांचें वजन; नवटाक; नवटकें.

**नक(ख)तरी**—पु. (गो.) शेतांत दैवकृत्यें करणारा शूद्र; नक्षत्रांवरून ज्योतिष सांगणारा. [सं. नक्षत्र]

**नकतेल**—न. एक प्रकारचें तेल. —मुंव्या १५०. नखतेल पहा.

**नकला**—नखला पहा.

**नकराई**—स्त्री. १ हुंडी नाकारल्यामुळें भरावी लागणारी नुकसानी; (गु.) नकरामण. २ हुंडी नाकारणें; नकार; नकाराई पहा. [म. नकार]

**नक(क्क)ल**—स्त्री. १ एखादा लेख, दस्तऐवज इ० कांची बर-हुकूम केलेली प्रत; मूळ प्रतीवरून केलेली, तिच्या बरहुकूम दुसरी प्रत. २ कोणत्याहि वस्तूबरहुकूम केलेली प्रतिकृति, आवृत्ति, प्रतिमा. ' सरकारी कॉलेजाच्या नकला होऊन राहिलेल्या कॉलें-जांस ... ' —टि ३.३५. ३ (एखाद्याच्या) भाषण—वर्तनादि प्रकारांचें केलेलें हुबेहुब अनुकरण; कित्ता. ४ हास्यकारक, चमत्कृतिजनक, गमतीची गोष्ट इ० ' आज देवालयांत मोठी नकल झाली. ' ५ पहिली, मूळ प्रत ' दगडावर जी नकल छापावी तिच्यासारख्या साऱ्या नकला निघतात. ' ६ (नाटय)नाटकांत पात्रानें बोलावयाचें भाषण. ' माझी नकल पाठ आहे. ' —स्त्रीन. (एखादा राजवंश, कुटुंब इ० कांचा झालेला) समूळ नाश; नामशेष होणें; निर्वंश; फक्त कथेच्या रूपानें, इतिहासांत अवशिष्ट राहणें. ' संवस्थान देव-दुर्ग किलीच नाईक याजकडे होतें त्यास त्याचें नकल जाहालें. ' —वाडसमा २.११५. ' कित्येकांचीं घरें बसलीं, कित्येकांच्या नकला जाहल्या. ' —पाब ४९. ' त्या राजाची नकल झाली. ' [अर. नक्ल्] **०नविशी-निशी**-स्त्री. नकलनवीसाचा हुद्दा, काम. [फा. नक्ल्+नवीस्] **०नवीस-नीस**-पु. लेख, कागदपत्र इ० कांच्या नकला, प्रती करणारा कारकून. [फा. नक्ल्+नवीस्]

**नक(क्क)लणें**—सक्रि. १ नकल, अनुकरण करणें. 'त्या काळची शिष्टभाषा तो सहज नकलण्याचा प्रयत्न करतो' —राजवाडे—ज्ञाने-श्वरी प्रस्तावना पृ. १७. २ प्रत करणें, लिहिणें.

**नकली, नक्ली**—वि. १ अस्सलासारखा दिसणारा दुसरा, अनुकरण करून केलेला (पदार्थ, वस्तु इ०). २ दिखाऊ; कृत्रिम; टाकाऊ. ' बाजारी जिन्नस नेहमीं नकली असावयाचा. ' —माना-पमान ३४. ३ गमतीची; मजेदार; चमत्कृतिजनक (गोष्ट, भाषण, गोष्टी सांगणारा). 'बहुरूप अर्धनारीश्वरसा तद्भक्त हाहि नक्ली बा।' —मोविराट ३.८४. ४ खोटा; बनावट. —स्त्री. अस्सल लुगडयासारखें दिसावयाजोगें लुगडें. [नकल. फा. नक्ली] **०नाणें**-न. कोणी इसम फसेल असें अस्सल नाण्याप्रमाणें बनविलेलें नाणें; खोटें नाणें. **०पदार्थ**-पु. दुसऱ्याला फसविण्याच्या इराद्यानें एखाद्या पदार्थाप्रमाणें केलेला दुसरा बनावट पदार्थ.

**नकलीलावणें**—सक्रि. (माण.) मेंदी लावणें. [नख]

**नकल्या**—वि. १ नकली; गमतीच्या गोष्टी सांगणारा. २ विदूषक. ३ (दुसऱ्याची) नक्कल करून दाखविणारा; सोंगें आणणारा. [नकल]

**नकवाणी**—स्त्री. (ना. व.) अप्रतिष्ठा: कमीपणा; हलकेपणा; लाज; शरम; लाजिरवाणें वाटणें. नक्वाली पहा.

**नकशा**—पु. १ (सामा.) (जमीन, इमारत इ० कांचा) आराखडा; नकाशा; कागदावर काढलेला नमुना, आकृति. २ कारागिरीचें, नकशीचें शिल्पकाम; खोदकाम; विणकाम; नक्षी; वेलबुट्टी. ३ (ल.) सर्वांनीं व खाणण्याजोगें काम इ०; भपका; थाट; डौल; वैभव; नखरा. 'त्यांनीं प्रयोजनाचा नकशा केला.' ४ (ल.) दुसऱ्याच्या ईर्षेनें केलेलें वरचढपणाचें कृत्य; वरचढपणा. 'तूं शंभर खर्च करशील तर मी दोनशें खर्च करून तुजवर नकशा करीन.' ५ (ल.) तोरा; महत्त्व; प्रतिष्ठा. 'सभेस जातां पण नकशा गमावूं नका बॅर!' [अर. नक्श; हिं. नक्शा; गु. नकशो; गो. नकस]

**नकशिकणी**—स्त्री. एक वनस्पति नाकशिकणी पहा.

**नक(ख)शी**—स्त्री. नखें काढण्याचें न्हाव्याचें हत्यार; नराणी. (प्र.) नखशी. [नखशी]

**नकशी, नकसगिरी**—स्त्री. कारागिरीचें, कलाकुसरीचें, कौशल्याचें खोदकाम, शिल्पकाम; वेलबुट्टी; कशिदा; नक्षी. -वि. (क.) वेलबुट्टीदार; नक्षीदार. [अर नक्श] **०ची दोरी**-स्त्री. (विणकाम) नकशी उमटविण्याच्या आटणीला जी दोरी असते ती. **०दार**-वि. वेलबुटीचें; कलाकुसरीचें; कारागिरीचें: नकशी असलेलें. [नकशी+फा. दार् प्रत्यय]

**नकशीव**—वि. नकशी काढलेलें; जाळया, वेलबुटया, चित्रें कोरलेलें, खोदलेलें (काम); कोरीव: कलाकुसरीचें. [नकसणें]

**नकसकंगोरा**—पु. १ नक्षीदार, कोरीव, खोदीव कंगोरा, कड, गोलची, खांचणी इ०; (सामा.) नक्षीदार कोरीव काम. २ (अनेकवचनी प्रयोग) नखरा; चोखंदळपणा; तोरे मिरविणें [नकशा+कंगोरा]

**नकसकाम**—न. नक्षीकाम; बारीक कळाकसुरीचें काम. [नकसणें+काम]

**नकसगिरी**—स्त्री. १ नक्षीकाम. २ नक्षी काढण्याचें कौशल्य [अर. नक्श+गिरी प्रत्यय]

**नकसणें**—उक्रि. नक्षी करणें; कोरणें; नक्षी काढणें; वेलबुटया, कशिदा काढणें.

**नकसुद-सूद**—वि. (गो.) १ मोजकीं, निवडक कामें करणारा. २ नाजूक; निवडक.

**नका**—क्रि. एखाद्या क्रियेच्या निषेधार्थक बहुवचनी कर्त्यास उद्देशून द्वितीयपुरुषी आज्ञार्थी योजावयाचें एक क्रियापदाचें रूप जसें—बोलूं नका; करूं नका; जाऊं नका. इ० [नको अव.]

**नका(क्का)दुवा**—पु. कवडयांनीं खेळावयाचा एक खेळ; एकी बेकी. [हिं. नक्का=एक्का+दुव्वा]

**नकारणी**—स्त्री. नाकारण्याची, नकार देण्याची क्रिया. [नकारणें]

**नकारणें**—उक्रि. १ स्वीकार, मान्य न करणें; नाकारणें; नकार देणें; नाकबूल होणें. २ (हुंडी इ०) न स्वीकारणें. 'पेढीनें हुंडी नकारली.' याच्या उलट सकारणें. [नकार; हिं. नकारना]

**नकाराई**—स्त्री. १ हुंडी न स्वीकारली गेल्यामुळें द्यावी लागणारी नुकसानी, दंड; सामान्यतः सकाराई या शब्दाला जोडून प्रयोग करितात. जसें:—सकाराई नकाराई भरून घेईन—ग्रावीलागेल. २ हुंडी नाकारणें; न स्वीकारणें.

**नकाल**—वि. १ नकल्या. २ (ल.) नाटकी; ढोंगी; कपटी. [अर. नक्काल्=नकल्या]

**नकाशा**—पु. १ (सामा.) चित्र; (स्थळ, देश, इमारत, जमीन इ०कांची) सप्रमाण रेखाकृति, आराखडा, नमुना. नकशा पहा. २ हकीकत; अहवाल; बातमी. 'लढाईचे आणून नकाशे।' —ऐपो २१८. ३ (व.) मोक्याचें ठिकाण, जागा; उंचवटा. 'तुमचे घर अगदीं नकाशावर आहे.' [अर. नक्शा]

**नकाशी**—स्त्री. (प्र.) नकशी. नकशी पहा. —वि. नक्षी; नक्षीदार; कोरीव; (प्र.) नकशी, नकशीदार. —पु. नक्षीचें खोदकाम, शिल्पकाम, कलाबतूचें काम करणारा.

**नकास**—पु. गुरें विकत घेणारानें दलालास द्यावयाची रकम; बाजारदस्तुरी; जकात. 'सालाबाद तूप व तांदूळ भाडें व नकासची (जकातीची) शिबंदी...' —ग्रोमारो २.७१. [अर. नख्खास=गुरांचा बाजार]

**नकास**—पु. (प्र.) नकशा, नकाशा पहा. **०काम**-न. १ नकाशाची कृति. नकशीचें, कलाकुसरीचें काम; शोभिवंत, कोरीव, खोदीव काम. 'त्या दिवाणखान्याचें नकासकाम चांगलें आहे.' **०गार**-पु. धातूंवर कोरीव नक्षीकाम करणारा.

**नकासणें**—उक्रि नक्षीकाम करणें; कोरणें; खोदणें; कशिदा काढणें. नकसणें पहा.

**नकाहत**—स्त्री. अशक्तपणा. 'आमचे प्रकृतीस आतां कांहीं येक आराम आहे परंतु नकाहत फार.' -रा २२.२१. [अर. नकाहत्]

**नकी-क्की**—वि. १ (संगीत) गायनामध्यें नाकानें काढलेला सूर. [हिं. नक=नाक]

**नकी-क्की**—वि. १ अगदीं बरोबर: तंतोतंत (वजन, माप, प्रमाण इ०). २ अंतर न ठेवितां निखालस सांगितलेली; निश्चित; पुन्हां फेरबदल जींत होणार नाहीं अशी (किंमत, भाषा, अट इ०). ३ खात्रीची; खरी; संशयरहित; यथातथ्य (हकीकत,

विधान). ४ चांगला: शुभ (शकुन इ०) [अर. नकी=शुद्ध, स्वच्छ, चांगला]

**नकीत**—न. (कु.) खाद्यपानरहित उपोषण. [नक्त अप.]

**नकीतुवा**—पु. नकादुवा पहा.

**नकीब, नकीबदार**—पु. ललकाऱ्या; हुजऱ्या; भाट. 'भालदार चोपदार नकीब।' —देवनाथ, कटिबंध ६.१. 'लागलीच नकीब पाठवून सर्व फौजेंतील लोकांस वरील मसलतीप्रमाणें ... दिला' —थोरले मल्हारराव होळकर चरित्र १६१. [अर. नकीब्]

**नकीब(बे)दी**—स्त्री. (विरू. प्र.) नेकीबदी. नेकीबदी पहा. [नेकीबदी]

**नकील**—स्त्री. उंटाच्या नाकांतील लगामाची दोरी अडकविण्याची कडी; वेसण. -वि. नाकांत अडकविलेलें. [हिं. नकेल; हिं. नक=नाक+कील=खिळा ?]

**नकुतला**—वि. (माण.) अपूर्व; विलक्षण; अद्भुत; अपरूप. [सं. न कुतः ?]

**नकुल**—पु. १ पांच पांडवांपैकीं चौथा. २ मुंगूस. [सं.]

**नकुसलें**—वि. (व.) क्षुल्लक; क्षुद्र; किरकोळ. 'नकुसल्या कामासाठीं तंटा केला.' [नको+असलें फा. नकम्=क्षुद्र, वाईट ?]

**नकूच**—वि. क्षुद्र; क्षुल्लक; किरकोळ. 'नकूच गोष्टीकरितां सरकारचें मन दूषित होण्याजोगे लेख ते मुळींच लिहीत नाहींत.' —विविक्षित ३.१४९. [नको+चें=असें; फा. नकस्=क्षुद्र]

**नकेत्र**—न. (गो.) नक्षत्र [नक्षत्र अप.]

**नको**—क्रि. १ द्वितीयपुरुषीं निषेधार्थी आज्ञार्थी रूप. जसें:—तूं जाऊं नको. याचें आज्ञार्थी द्वितीयपुरुषाचें बहुव न नका असें होतें. जसें:—बोलूं नका; जाऊं नका इ०. २ एखाद्या क्रियेचें प्रयोजन, इच्छा, आवड इ०कांचा अभाव दर्शविणारें क्रियावाचक रूप. जसें:—मला कोणताहि पदार्थ नको त्याना काम करायास नको; हें उघड करून दाखवायास बहुत आयास नको.' अनेकवचनी नकोत असें रूप होतें. जसें:—मला हे पदार्थ नकोत; त्यांना कोणतींहि कामें करावयास नकोत. —क्रिवि. निषेधार्थी. नको असावा. [सं. न्यक्कृ-नक्क-नक्कृ- नकम् - नकिः निपात—राजवाडे; भाअ १८३४: नकाम्यः; नक्तैव्यम्-नकाअव्व-नकाव-नकाउ-नको. —रा. लेसं २.४२; न+कृ-राज्ञाच्या; नखउ, नक्कु—जो. प्रौबो. न+कुरु. ?] **नको नको होणें**—(एखाद्या गोष्टीचा) वीट येणें; तिरस्कार अनासक्ति उत्पन्न होणें. **म्ह०** नको नको आणि पायलीचें चार्‍हो

**नक्कद**—वि. (गो) रोख; नगदी. [अर. नक्द]

**नक्कल, नक्कली, नक्कल्या**—नकल, नकली, नकल्या इ० पहा.

**नक्कस**—स्त्री. (ना.) पत्त्यांचा एक जुवा.

**नक्का**—पु. १ नाक. २ (ल.) नक्षा; ऐट; दिमाख; तोरा (क्रि० उतरणें; दाबणें; मोडणें). ३ (कवड्यांचा खेळ). उताणी पडलेली कवडी. [नाक; हिं.]

**नक्कार**—वि. (खा.) वाईट.

**नक्की**—वि. नकी पहा.

**नक्की कस**—पु. (मल्लविद्या) कुस्तींतील एक डाव; जोडीदाराच्या बाहेरील बाजूनें बगलेंत हात घालून तोच हात जोडीदाराच्या मानेवर घालून जोडीदाराला पिळगटून चीत करणें.

**नक्को**—क्रिवि. (कों.) (प्र.) नको. नको पहा. 'तुमचा संसार नक्को मला।' —मसाप २.२८.

**नक्टी**—स्त्री (ना.) कापसाच्या बोंडांतून कापूस काढून घेतल्यावर राहिलेला बोंडाचा भाग.

**नक्त, नक्तभोजन, नक्तव्रत**—न. दिवसभर उपास करून रात्रीं जेवण करण्याचें एक व्रत. [सं. नक्तं=रात्र।

**नक्तं**—क्रिवि. रात्रीं; रात्रीच्या वेळीं. [सं. नक्तम् ग्री. नाक्टिस्, नॉक्स्] **०चर**—वि. १ (अक्षरशः) रात्रीं फिरणारा. २ राक्षस. 'त्यातें बहु मायावी नक्तंचर आर्ष्यशृंगि तो खपवी।' —मोभीष्म ९.१७. ३ चोर. [सं. नक्तं+चर्=चालणें, फिरणें] **०दिव**—क्रिवि. रात्रंदिवस. 'धम्मिल्ल अंधतमरूपभासे। वक्त्रेंदु नक्तंदिव हा प्रकाशे।' —सारुह ७.१३५. [सं. नक्तं+दिवा] **नक्तभोजी**—वि. दिवसा उपोषण करून रात्रीं भोजन करणारा. [सं. नक्त+सं. भुज्=खाणें]

**नक्त, नक्द**—न. नगद; रोकड नाणें; नगद पहा. 'म्हातारीची तोड नक्तीवरच काढावयास आज्ञा व्हावी.' —ख ११. ५६६६. [अर. नक्द्] **०गाव-खंड**—पु. खोताला कुळांनीं खोतीचें उत्पन्न गल्याच्या रूपानें न देतां दस्ताच्या कांहीं पटीइतकी रक्कम सरकारठरावाप्रमाणें देणें. **०नेमणूक**—स्त्री. रोकड मुशाहिरा. [नक्त+नेमणूक] **०बाब, नक्दबाब, नकीबाब**—स्त्री. कुळानें सरकारास रोकडीच्या रूपानें द्यावयाचा कर. **नक्तीशिरस्ता**—पु. नाण्याच्या स्वरूपांत ठरविलेला जमीनीचा वसूल. **नक्तीचे दुमाले**—पुअव. वर्षासनें, नेमणूक व रोजिना हे तीन दुमाले.

**नक्तेल**—न. १ एक औषधी तेल. २ टरपीण तेल; टर्पेंटाइन्. नखतेल पहा.

**नक्र**—पु. १ मगर; सुसर. 'संकल्पविकल्पांचे मीन। निंदेच्या सुसरी दारुण। ब्रह्मद्वेषाचे नक्र पूर्ण। सागरीं जाण तळपती।' —एभा २.९९. 'परि पृथ्वी सोडीना जाणों व्रत घेतलेंचि नक्रानें।' —मोकर्ण ४८.५६ २ घोरपड. —शास्त्रीको. [सं.] **नक्राश्रू**—पुअव. १ मगराचे अश्रू; मगर आपल्या भक्ष्यास खातांना त्याच्याबद्दल दुःखानें अश्रु गाळतो असें म्हणतात. त्यावरून (ल.) खोटे अश्रु गाळणें; वरपांगी दुःख प्रदर्शित करणें. (क्रि० ढाळणें; गाळणें). जुन्या कारागिरांच्या स्थितीबद्दल नक्राश्रु ढाळण्याचा धंदा सोडून देऊन ... यांत्रिक कारखाने घालण्याकडे आम्ही लक्ष देत गेलों

तरच आमच्या व्यापाराचें पुनरुज्जीवन होणार आहे.' –आगर ३.९९. [नक्र+अ्रु; इं. क्रॉकोडाइल् टियर्स यावरून]

**नक्वाली**—स्त्री. (व.) लाज; शरम. नकवाणी पहा.

**नक्श**—पु. प्रतिष्ठा; नांवलौकिक; वजन. नकशा पहा.'आपला नक्श राहून योजिला मन्सुबा सिद्धीस पावे ते गोष्ट करणें.' –इमं २०२. 'व नक्श सर्वांवर बैसोन अवघ्या हिंदुस्थानचा बंदोबस्त होऊन येईल.' –इमं २७४. [अर. नक्श्]

**नक्शा**—पु. १ नकाशा; आराखडा. 'तमाशा–सैर करण्याचे बहाण्यानें येऊन येथील नक्शे लिहून घेतले.' –दिमरा १.३०२. २ कार्यक्रम; बेत; विचार. 'जखमत्राडीचे मैदानांत भेटीचा नक्शा ठरविला.' –मराचिथोशा ६३. ३ व्यूह. 'फौज जरब खाऊन होती तथापि त्यांणें नक्शा बांधून उभे राहिले.' –होके ५६. ४ दिमाख; प्रतिष्ठा; वजन. नकशा पहा. [अर. नक्श्, नक्शा] ०**उतरविणें, उतरून टाकणें**–मानखंडना करणें; दिमाख, तोरा नाहींसा करणें. 'नाहींतर तुझाही नक्शा उतरून टाकीन.' –चंद्रग्र- २. **नक्शी, नक्शीदार**–नक्शी इ० पहा.

**नख**—नपु. एक सुगंधी औषधी द्रव्य; नखला. [अर. नखत्]

**नख**—पुन. १ मनुष्याच्या हातांच्या, पायांच्या बोटांच्या टोकाला असणारें शिंगाच्या जातीचें पातळ कवच. २ पशूच्या, पक्ष्याच्या पंजाला असणारें तीक्ष्ण अणकुचीदार हाड; पंजा. ३ खवल्या मांजराच्या अंगावर असलेल्या खवल्यांपैकीं प्रत्येक. ४ नखांतील विष; नखविष. (क्रि० बाधणें; लागणें; धावणें). ५ थेंब; अगदीं थोडें प्रमाण (तूप इ० चें). 'कुंकवाचें नख.' ६ (सोनारी) खरवईच्या दुसऱ्या टोकाशीं असणारी नखाकृति लोखंडी मूठ; ही गडवे घडण्याच्या उपयोगी असते. [सं. नख; प्रा. नह; हिं. नह; सिं. नहु; पं. नहुं; पोर्तु. जि. नई] (वाप्र.) ०**दृष्टीस न पडणें**–(एखाद्या कुलीन स्त्रीनें) बाहेर मुळींच न दिसणें, पडणें; पडद्याच्या आंत राहणें; अति मर्यादशीलपणानें वागणें, 'ती मराठमोळ्यांतील स्त्री आहे, तिचें नख तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं.' ०**देणें–लावणें**–ठार करणें. 'नीतीला नख देणारे।' –संग्रामगीतें ९. ०**नख बोलणें**–दिमाखानें, ऐटीनें, कुरेबाजपणानें बोलणें. ०**लावणें**–(लहान अर्भक इ० कांच्या कोमल गळयाला) नखांनीं दाबून जीव घेणें, ठार करणें. नख देणें पहा. 'माझे मर्यादेची रेख। पृथ्वी न विरवी उदक। उदकातें तेज देख। न लवी नख शोषाचें।' –एभा २४.१३९. 'अरिहि न करिल असें त्वां केलें, कां नख न लाविलें जननी।' –मोउद्योग ११.२३. ०**शिरणें**–शिरकाव होणें; चंचुप्रवेश होणें. **नखांबोटांवर काम करणें**–नाजुकपणाचा आविर्भाव, दिमाख करून काम करणें. **नखांबोटांवर खेळविणें–चाळविणें**–(एखाद्यास) मूलथाप देणें; चाळविणें; झुलविणें; भुरळ पाडणें. **नखांबोटांवर चालणें**–ठमकत, ठमकत, मिजासीनें चालणें. **नखांबोटांवर जेवणें**–चाखतमाखत, चोखंदळपणानें जेवणें. **नखांबोटांवर दिवस मोजणें**–(एखाद्या गोष्टीची) अत्यंत आतुरतेनें वाट पहाणें, प्रतीक्षा करणें. **नखाला आग लागली**–(अजून सारें अंग जळायाचें आहे). संकटावर, संकटें येण्यास नुसती सुरवात झाली, अजून पुष्कळ संकटें यावयाचीं आहेत; **(एखाद्याच्या) नखीं दोष नसणें, नखाला माती न लागणें**–(एखादा) अत्यंत शुचिर्भूत, निष्कलंक, पवित्र असणें. **नखीं पातक लागूं न देणें**-पापापासून अलिप्त राहणें; यत्किंचितहि पाप न करणें. 'नको लागों देऊं किमपि विमळे पातक नखीं।' –सारुह ७.१४६. **नखें चावीत–कुरतुडीत–वाजवीत बसणें**–१ निरुद्योगी, रिकामटेकडेपणानें असणें; उद्योगधंदा न मिळतां असणें. २ कुंठित, हिरमुसलें होऊन बसणें. **नखोनखीं सुया मारणें**–शिक्षेचा एक प्रकार. 'नखोनखीं सुया मारिती। या नांव आदिभूतिक।' –दा ३.७.७१. **जेथें नख नको तेथें कुऱ्हाड लावणें**–साध्याच साधनानें काम होईल अशा ठिकाणीं मोठमोठीं साधनें, शक्ति उपयोगांत आणणें. **आपलींच नखें आपणांस विखें**–आपल्याच दुष्कृत्यांनीं स्वतःवर आलेलीं संकटें. **म्ह०** जेथें नखानें काम होतें तेथें कुऱ्हाड कशाला. =जेथें क्षुल्लक, अल्प साधनानें, शक्तीनें काम होण्यासारखें असेल तेथें मोठें साधन शक्ति कशाला योजावी? 'नखहि नको ज्या कार्या, त्या काढावा कशास करवाल।' –मोभीष्म ४.४६. साधित शब्द– **नखभर**–वि. नखावर मावण्याइतकें; अत्यंत थोडें. 'नखभर तूप.' **नखाएवढा**–वि. अगदीं लहान; चिरकोळ; क्षुल्लक (जिन्नस, काम, कर्ज, अपराध, मनुष्य इ०). 'मेला नखाएवढा जीव नाहीं.' -नामना १२. **नखाची जीभ**–स्त्री. नखाखालील नाजूक त्वचा; जिव्हाळी. सामासिक शब्द– ०**खुरपा**–वि. नखानें खुरपून काढतां येण्याजोगा (कोवळ्या नारळांतील मगज इ०). [नख+खुरपणें] ०**जीन**–न. (राजा.) नखें काढण्याचें न्हाव्याचें हत्यार; नऱ्हाणी. [नख+फा] ०**मूळ, नखरुं, नखरूं**–न. नखाच्या जवळ होणारा फोड, सूज इ० विकार. [नख+मूळ] ०**पाणी**–न. ज्यांत मनुष्यानें नखें बुडविलीं आहेत असें धार्मिक कृत्यास निषिद्ध मानलेलें पाणी. [नख+पाणी] ०**विख, विष**–न. १ नखांतील विष; नखांत एक प्रकारचें विष असून फार खाजविलें असतां खाजविलेल्या भागास तें बाधतें. 'खाजवूं नकोस, नखविष बाधेल.' २ नखांतील विष बाधून झालेला व्रण, जखम. (क्रि० बाधणें; लागणें; धावणें). 'नखविख आणी हिंगुर्डे। बाग्ट आणी वावडें।' –दा ३.६.४८. [नख+विख] ०**शिखपर्यंत, नखशिखांत**–क्रिवि. पायांच्या नखांपासून शेंडीच्या अग्रापर्यंत; आपादमस्तक; सर्व शरीरभर. 'दर पंधरवड्यास जरी नखशिखांत क्षौर केलें तरी त्याबद्दल आम्ही त्यास

दोष देणार नाहीं.' -आगर 'वाघास पाहतांच नखशिखपर्यंत कंप सुटला.' [नख+सं. शिखा=शेंडी+पर्यंत, अंत] ०क्षत-न. १ नखानें (शरीर इ०कांवर) काढलेला ओरखडा. २ (प्रणयलीलेंत) नखाचा ओरखडा, वण उमटणें. 'नखक्षतानें मृदु किण्वंती नवनवगुण रागिणी। धरावी हृदयीं कवटाळुनी।' -राला ३६. दंतक्षत पहा. [नख+सं. क्षत=जखम, ओरखडा] **नखाग्रीं**-क्रिवि. १ नखाच्या टोंकावर. 'व्रजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा' -केका ५. २ (ल.) लिहितांना चटकन् आठवेल इतका पाठ असलेला (धडा, श्लोक इ०). जिव्हाग्रीं पहा. [नख+सं. अग्र=टोक] **नखोदक**-न. नखवणी पहा. [नख+उदक=पाणी]

**नखजणें**—उक्रि. १ वस्त्र इ०काला घातलेल्या टिपेचे टाके साफ बसावे म्हणून त्यावरून नख फिरवून ते दाबणें. २ नखानें घासून गुळगुळीत करणें. ३ (क.) नखानें ओरबडणें; बोचकारणें. [नख]

**नखणें**—उक्रि. नखी नांवाच्या हत्यारानें कापणें;

**नखतेल**—न. १ एक औषधी तेल. नखल्याचें तेल. २ टरपेन; टर्पेंटाइन. ३ पेट्रोलियम व दगडी कोळसा यांपासून काढलेलें तेल; (इं.) नाफ्था. 'त्यांतून निघणारें पाणी, डांबर आणि नखतेल जमविण्याकरितां रिटार्टस मध्यें ग्राहक जोडितात.' -सेंपू १०५. [अर. नखत्; फा. नफ्त्; इं. नॅफ्था+तेल]

**नखत्र**—न. नक्षत्र पहा. [नक्षत्र अप.]

**नखर**—न. नख. 'यां दुःसहें धनंजयशस्त्रें हरिचीं गजा जशीं नखरें।' -मोसभा ७.८५. [सं] **नखरणें**-उक्रि. १ नखानें लावणें; कोरणें (कपाळावर गंध इ०). २ नखानें ओरबडणें; खाजविणें. [नखर]

**नखरा**—पु. १ (स्त्रीनें) चित्ताकर्षणासाठीं केलेला शृंगारचेष्टाप्रदर्शक खोटा हावभाव; नटणें; मुरडणें; वस्त्र-भूषणादिकांचा रचनाविशेष; चटीपटी; नट्टापट्टा. 'तैसी वेणिफणी कराहि नखरे कांहीं नसो रे उणें।' -कंम ३.८७. २ (ल) ऐट; दिमाख; मिजास; नक्षा; गमजा. 'नखरांहीं नृहरि चिरी जें उर पविचा उरों न दे नखरा।' -मोकर्ण ६.७०. [फा. नख्रा; हिं. नखरा; सिं. नखिरो] **नखराई**-स्त्री. (नगरी) नखरा, नट्टापट्टा करणारी स्त्री. 'मग त्या नाजूक नखराईला घरांत चुलींत विस्तव घालतां आला नाहीं तरी चालेल' -फाटक, नाटयछटा. [नखरा+आई] **नखरेदार, नखरेबाज**-वि. १ नट्टापट्टा, नखरा करणारी; भपकेबाज; ऐटबाज; मिजासखोर; दिमाखाचा. २ ऐटदार; डौलदार सुंदर. 'पातळ नखरेदार मुलायम फुल चौकडीचें।' -प्रला ९६. **नखरेबाजी, नखरेयाजी**-स्त्री. ऐटबाजी; विलासीपणा; मिजासखोरी; नट्टापट्टा करणें; पोकळ भपका; ऐट करणें. नखरा पहा. **नखरी**-स्त्री. (क.) नखरेबाज स्त्री; चालक भवानी. [नखरा]

**नखरूं**—न. (कु.) नखुरडें.

**नखरूड**—न. १ नखाजवळ येणारी सूज; नखमूळ पहा. २ (निंदार्थी) फार वाढलेलें आणि त्यामुळें बेढब दिसणारें नख. [नख]

**नखलणें**—उक्रि. १ नखांनीं, बोटांनीं (केंस इ०) विंचरणें. २ नखजणें पहा. ३ नख लावणें. 'खुडुं नको प्रीतीचा नखलुन देंठ।' -प्रला १९०. [नख]

**नखला**—पु. एक सुगंधी औषधी द्रव्य; नख. हें एका जनावराचें नख असतें असें म्हणतात. [अर. नखत्]

**नखला**—पु १ एक प्रकारचें वळवट; खिरींत घालण्याचा गव्हल्यासारखा पण नख टोंचून केलेला पदार्थ; नखुला, नखोला. २ लहान मुलांचा एक दागिना; वाघनख. [सं. नख; बं. नखी; गुज. नखला; का. नख; व्याघ्रनख]

**नखलामी**—स्त्री. (गो.) १ नुकसानी; खराबी. २ अपशकून. ३ शिक्षा.

**नखशी**—स्त्री. १ नखजीन; नराणी. २ नखुरडें; नखमूळ. [नख]

**नखसिकणी**—स्त्री. एक प्रकारची भाजी.

**नखसूं**—न. १ नखें काढण्याचें हत्यार; नराणी; नखशी. २ नराणीनें नखाला लागणारी जिव्हाळी. [नख]

**नखसू, नखसूय**—स्त्री. १ नखसूनें नख काढतांना लागलेली जिव्हाळी. २ नखरूड. [नख]

**नखाळणें**—उक्रि. नखानें काढणें; सोलणें. नखलणें पहा. 'शिरा पानाच्या मी नखाळल्यें।' -प्रला १७०. [नख]

**नखी**—स्त्री. १ सतार इ० तंतुवाद्याच्या तारा छेडण्याकरितां तर्जनी, करंगळी ह्या बोटांत घालण्याचें तारेचें तिकोनी वेटोळें, मुदनी. हिचे एकेरी, दुहेरी, तिहेरी, पिळाची, पोतेची, स्प्रिंगची इ०. प्रकार आहेत. त्यावरून. २ (ल.) गाण्यांतील उंच, चढा सूर. जसें:-नखींत गाणें, म्हणणें ३ नागवेलीचीं, विडयाचीं पानें खुडण्याचें, अफूच्या बोंडास चिरा पाडण्याचें एक हत्यार. ४ (पशुपक्ष्यांचें) नख; पंजा. ५ वेलाच्या अंकुराचा, पागोऱ्याचा आकड्याच्या आकाराचा अग्रभागीं असलेला अवयव; धुमारा. ६ (वासरूं इ०कांच्या) खुराचा नखाप्रमाणें पुढें येणारा भाग; खुरकी. 'प्रत्येक गेळाच्या शेवटीं एक एक नखी असते.' -मराठी तिसरें पुस्तक पृ. १२७. (१८७३). खुराचा दुभागलेला प्रत्येक भाग. ७ (जनावरांच्या, कोंबडयांच्या) टांचेच्यावर असलेलें शिंगाच्या आकाराचें अवाळू, अवयव; गेळ. ८ जनावरांच्या पायास होणारा पायखुरीसारखा एक रोग -शे १०.१३२. ९ निश्चय. -मनको. -शर १० आश्रय; आधार. 'किंबहुना शास्त्रविखीं। एकहि न

लाहातीचि नखी। म्हणूनि उखिंविखी। सांडिली जिहीं।' -ज्ञा १७.३९. ११ गति; प्रवेश. (क्रि० लागणें). 'मनाची नखी न लगे। जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे।' -ज्ञा १२.४१. १२ टांकी. 'तरी अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निराळें। नखी लागेल ढाळें ढाळें। वैराग्याची।' -माज्ञा ६.५७. १३ सूक्ष्म भाग; थेंब; अल्प प्रमाण. 'दंतोष्ट संपर्की। नलगे रसनेची नखी।' -ऋ ७९.-अमृ ६.९७. १४ (व. ना.) फळाला जेथें देंठ लागलेला असतो तो फळाचा भाग, तोंड. १५ (विडी धंदा) विडी वळल्यावर वरचें तोंड मुडपून बंद करतात व खालच्या बाजूस दोरा बांधून खालच्या तोंडाला फक्त एकच नख रोवून देतात तो दाब. १६ कासाराचें ओळी करण्याचें एक हत्यार. -बदलापूर ९६. -वि. नखें असलेला (प्राणी, जनावर). [नख] **नख्या बाहेर काढणें**-(कर) खरें स्वरूप प्रकट करणें; (एखाद्यावर) उलटणें. (वाघ, मांजर इ० प्राणी इतर प्राण्यास मारतांना आपलीं नखें बाहेर काढून कार्यभाग करतात त्यावरून हा अर्थ). नखी अर्थ ४ पहा. ०**झुल**-स्त्री. (कर.) (विटीदांडूचा खेळ) नखाएवढ्या अंतराची झुल.

**नखी**—स्त्री. (विणकाम) धोतर इ०कांच्या कांठास असलेली रेशीम इ०काची अगदीं बारीक धार, कड; किनारीचा कडेचा भाग. [फा. नख़्=दोरा]

**नखी**—स्त्री. धुतलेलें रेशीम.

**नखो**—स्त्री. एक सुगंधी औषधी द्रव्य; नखला पहा.

**नखी**—स्त्री. लुगड्या चा एक प्रकार; नकली.

**नखुरडा**—पु. (देशांत रूढ) नखसूय पहा. -वि. १ नखानें खरवडून काढता येण्याजोगा (कोंवळ्या नारळांतील मगज इ०). २ नेहमीं (नखांनीं) खाजविणारा; बोचकारणारा. [नख]

**नखु(खो)रडें, नखु(खो)रडा**—नपु. नखांत होणारा एक रोग; नखमूळ पहा.

**नखुलणें**—सक्रि. नख लावणें; तोडणें. नखाळणें पहा. -शर. [नख]

**नखु(खो)ला**—पु. (विरू.) नखला; नखला अर्थ १ पहा. [नख]

**नखुली**—स्त्री. खेळणाऱ्या दोन पक्षांनीं परस्परांच्या नखांत नखें घालून खेळावयाचा लहान मुलींचा एक खेळ. [नख]

**नखुलें**—न. (व.) नखमूळ पहा. [नख]

**नखूर**—न. १ (प्रां.) पायाच्या, हाताच्या बोटाचें नख. २ (पशुपक्ष्यांचा) पंजा. नख अर्थ १, २ पहा. [नख]

**नखेजणें**—उक्रि. (विरू.) नखजणें पहा.

**नखेत्र**—न. (गो.) नक्षत्र. 'स्वर्गु सृष्टि तुवां केला मात्रें। केला चंद्रु सूर्यु नखेत्रें।' -ख्रिपु १.१.६. [नक्षत्र अप.]

**नखोडा**—पु. नकासगाराचें हत्यार. -शर.

**नखोदा**—पु. गलबतावरील मुख्य अधिकारी, मालक. नाखवा पहा. 'नखोदाचा हिशेब हुजुरकारखानियांत केला जाईल.' -वाडसमा २.३. [का. नाखुदा]

**नखोरा**—पु. (शरीर इ० कांवर) नखानें काढलेला ओरखडा; बोचकारा; नखक्षत. [नख]

**नखोला**—पु. (बायकी) वळवट; नखला; नखुला. [नख]

**नखत**—न. रोकड; रोख नाणें; नक्त (-न.) पहा. **नखत-याती**-नख्ताचें बहुवचन. -इमं ४४.

**नख्वाही**—स्त्री. अनिच्छा; इच्छा नसणें. 'ख्वाही नख्वाहि इत्येते इच्छानिच्छे प्रकीर्तिते।' -राव्यको ८.२९. [न+फा. ख्वाहिश्=इच्छा, मागणी]

**नग**—पु. १ पर्वत. २ झाड; वृक्ष. 'जयावरी होय निगा नगांची। सदैव विश्रांति खगामृगांची।' -र ५२. 'दशस्यंदनातें म्हणे प्राण जातां। नगीं पैल ते कावडी तातमाता।' -मुरामा बाल १.२०. ३ अरण्य. 'करी तशा घोर नगीं तपाला।' -नरहरि गंगारत्नमाला ५६. (नवनीत पृ. ४२२). [सं. नग; न+गम्=जाणें] **नगाधिप, नगाधिराज**-पु. पर्वतश्रेष्ठ हिमालय. [नग+सं. अधिप, अधिराज=श्रेष्ठ] **नगारि**-पु. पर्वतांचा शत्रु: इंद्र. [नग+सं. अरि=शत्रु] **नगारिशत्रु**-पु. इंद्राचा शत्रु, इंद्रजित्; वृत्रासुर.

**नग**—पु. १ डोईत घालण्याचा स्त्रियांचा एक दागिना. -शाको. 'वेणीचे जे नग सर्वही करीन। नको धरूं सीण मनीं कांहीं।' -तुगा २९५९. २ (सामा.) रत्न; दागिना; अलंकार. 'नग पाहतां जैसें सुवर्ण। तसा त्रिजगद्रूप मी नारायण।' -ह १६.१५९. 'रडतां काढिले पांच सात नग। वस्त्राखंडीं मग बांधीले म्यां।' -मोसीतागीत ५७. (नवनीत पृ. २५८) ३ (वस्तु, उपकरणें इ० कांची मोजदाद करताना) वस्तु; डाग; रकम; जिन्नस. 'सरी, पाटल्या वगैरे मिळून सर्व १० नग आहेत.' ४ लेखनांत हत्तींच्या संख्येचा निर्देश करतांना संख्यावाचक शब्दापूर्वी योजावयाचा शब्द. जसें:-हत्ती नग दहा. ५ अंगठींत बसविलेला हिरा, खडा. 'चोज काय भुवनत्रय पोटीं। वाहसी नग तसा नग बोटीं।' -र ५९. ६ कच्च्या रेशमाची लड. याच्या उलट कंकरी. **नगास नग देणें**-एका जिन्नसाबद्दल दुसरा (कसाही) जिन्नस देणें. ०**झाडा**-पु. डागांची, नगांची, जिन्नसांची मोजदाद; गणती करणें; जिन्नसांचा हिशेब. [नग+झाडा=गणती करणें] ०**नगोटा-टें**-पुन. (व्यापक) जडजवाहीर; दागदागिने वगैरे; लहानमोठे नग इ०. 'नगनगोटे घडवायाचे मज कौतुक मोठें।' -होला ८०. [नग+नगोटा=जवाहीर, अलंकार] ०**वज**-पुन. (व्यापक) दागदागिने; जडजवाहीर वगैरे; नगनगोटें इ०. 'आतां कैची वेणीफणी। आतां

नाहींत लुगडीं लेणीं। न्हाण नगवज पाविणी। भोगेल कैचें।' –स्वादि २.१.६०. 'जवाहीर नगवज द्यावे.' –पेद ६.६६. 'त्याजपाशीं रोकड विशेष नाहीं, परंतु हजार–पांचशांचा नगवज आहे.' [नग+ऐवज ?]

**नग**—पु. कापसाचें वजन करण्याचें एक परिमाण. हें २४ पौंडांचा एक मण याप्रमाणें आठ मणांचें असतें.

**नग**—क्रि. (कुण. माण.) नको पहा. 'नग नग पसून जाऊं तुं नारी।' –मृ ८. 'नग, नग, तुझा हुद्दाबिद्दा मला कायबी नग.' –बाय २.२. [सं. नकि(वर्जनेनिपात:)-नगि–नग. –भाअ १८३४]

**नंग**—पु. १ प्रतिष्ठा; नांवलौकिक. 'धण्यासी निष्ठेनें वर्तोन आपले नंगानें राहोन कीर्ति सम्पादोन घेतल्या.' –रा ८.१५७. २ दरारा. 'आधींच तुमचा नंग त्या रानीं. धास्ती मुळेंच त्यास जरब.' –ख ८४१. [फा. नङ्ग] **०नामोश**–पु. १ ख्याति; कीर्ति. 'तुमचे नंगनामोश तुमचे वडीलाप्रमाणें व्हावे, हेंच स्वामीस अगत्य.' –रा ८.१३६. २ पराक्रम. 'त्याचप्रमाणें आमचे बाबानीं राजश्री राणबासाहेब नेणते होते त्यास हातीं घेऊन भाऊपणें चालोन नंगनामोश करून सेवा केली.' –इमं १८८. [फा. नंग्+अर. नामूस]

**नगज**—पु. हत्ती. [सं.]

**नंगडें**—न. (बे.) ताप.

**नगत(द)नारायण, नगननारायण**—पु. (विरू. प्र.) नगननारायण पहा.

**नगद**—न. रोकड; रोख नाणें; पैसा. –वि. निवडक; उत्कृष्ट; अस्सल; पहिल्या प्रतीचा; शेलका. जसें:–नगद–आंबे–भांडीं–सगेंगें–निवाला–जेवण–खाणें–पक्वान्न [अर. नक्द्] **०होऊन बसणें**-(स्वत:च सर्व मालमत्ता होऊन बसणें) दिवाळें निघणें; नादार होणें. **०दागिने**–पुअव. भारी, मौल्यवान दागिने; जे मोडून पैसे करतां येतील असे दागिने. **०पैसा**–पु. रोख पैसा; रोकड. **०माल, नगदा(दा)माल**–पु. १ रोकड, दागदागिने इ० तोडमोड करून पैशांत, नाण्यांत रूपांतर करतां येण्यासारखी मालमत्ता. २ (ल.) अनेक पदार्थांच्या समुदायांतील, जिंदगींतील निवडक, उत्तम, शेलका भाग, पदार्थ इ०. **०विकरा, विक्री**–स्त्री. १ रोख किंमत घेऊन केलेली विक्री. २ रोख किंमत घेऊन केलेल्या विक्रीचें उत्पन्न. 'आज तुला नगदविक्री काय झाली ?' **–दानगद**-क्रिवि. रोखीनें; रोखीच्या व्यवहारानें. [नगद द्वि] **–दानगदा**–वि १ उत्कृष्ट; निवडक; शेलका; नगद (–वि) पहा; नगदमाल पहा. २ –क्रिवि रोखीनें; रोखीच्या व्यवहारानें. [नगद द्वि.]

**नगदा**—पु. कासेच्या बागडीचा एक प्रकार. [हिं.]

**नगदी**—स्त्री. रोकड; रोख नाणें; पैसा. –वि. १ रोख; नक्त. 'जागीर व नगदी देणें कबूल करून....' –रा ६.५७६. 'कुच नगदी चंदी।' –विवि ८.८.१५८. २ रोखीसंबंधीं; पैशासंबंधीं; महसूल, जमाबंदी इ०कांसंबंधीं जसें:–नगदी–ताळा–दप्तर–वसूल–बाकी व्यवहार–शिल्लक– हिशेब– पोतें–वही–काम–लिहिणें–कारकून. **०असामी**–पु. विरक्त मनुष्य. 'कोणी वदती हो ध्यानासी आणा। नगदी असामी दोघे जाणा। कृष्णदास तो प्रपंच करीना। रामदास हा विरक्त।' –दावि २४७. **०कारकून–गुमास्ता**–पु. देशपांड्याच्या हाताखालचा रोखीच्या व्यवहाराचा हिशेब ठेवणारा कारकून. **०खातें**–न. जमाबंदीखातें; मुलकी खातें. 'मराठी राज्यांत लष्करी व नगदी अगर जमाबंदी खात्यांत खूप बहर होता.' –टि १.३३३. **०बाब**–स्त्री. जमीनीवरील सरकारी वसुलाच्या दरावर ठरविलेला दर बिघ्यामागें द्यावयाचा एक कर, यांत निरनिराळ्या जिल्ह्यांत निरनिराळ्या वसुलाच्या बाबी समाविष्ट केल्या जातात. **०भांडवल**–न. रोख पैशाच्या रूपाचें भांडवल. **०मुलकी**–वि. प्रांतांतील, जिल्ह्यांतील सर्वसाधारण कारभार व जमाबंदी या संबंधाचा (कारकून, लिहिणें, काम, वही इ०). [नगदी+मुलकी] **०वसूल**–पु. नाण्याच्या स्वरूपांतील वसूल. 'दरसालच्या वास्तविक उत्पन्नाच्या एकतृतीयांश नगदी वसूल घेणें.' –गांगा ८. **०शिरस्ता**–पु. रोख नाण्याच्या स्वरूपांतील सरकारी वसुलाचा ठराव. [नगदी+शिरस्ता] **०सामान**–न. रोख पैसे; रोकड.

**नगन**—स्त्री. शत्रूच्या, सरकारच्या कचाट्यांतून शहरास, गांवास सोडविण्याकरितां गावांतील श्रीमान् लोकानीं शत्रूस सरकारास देऊं केलेली रकम. –विल्सनकोश [सं. नग्न; नागवण ?]

**नगन(द)नारायण**—पु. १ (उप.) गळेलठ्ठ, नागवा मनुष्य. नागवा मोठा माणूस. २ अकिंचन, दरिद्री, कफल्लक, मित्रहीन मनुष्य. [नग्न=नागवा+नारायण]

**नगर**—न. १ मोठ्या वस्तीचें व सर्व पदार्थ जेथें मिळूं शकतात असें ठिकाण; शहर. 'म्हणे दक्षिण देशिं महिलारोप्य नाम नगर.' –पंच १.५. २ (विशेषार्थानें) अहमदनगर, सातारा, इ० ३ अहमदनगर. [सं.] सामाशब्द–**०करी**–वि. शहरवासी; शहरी; नागरी. 'गांवढेकरी उंदीर आणि नगरकरी उंदीर.' –छत्रेकृत इसापनीति. **०तळ**–न (काव्य.) जीवर नगर वसलें आहे ती जमीन. 'नगरतळ दणाणिते। भयंकर घोष किंकाटत।' [नगर+तळ=खालची बाजू] **०नायक**–पु. शहरांतील मुख्य सावकार, पेढीवाला; नगरशेट. [नगर+सं. नायक=पुढारी] **०नायकी**–स्त्री. नगरनायकाचा हुद्दा, काम. [नगरनायक] **०पाल**–पु. कोतवाल; पोलीस. [नगर+सं. पाल्=रक्षण करणें] **०पालिका**–स्त्री. शहराचें आरोग्य, शिक्षण इ० बाबींचा कारभार करणारी स्थानिक संस्था; (इं.) म्युनिसिपल कमिटी. [नगर+सं. पाल्=रक्षण, पोषण करणें] **०पिता**–पु. नगरसंस्थेचा, म्युनिसिपल कमिटीचा सभासद;

(इं.) सिटीफादर्. [नगर+सं. पिता=बाप] ०प्रदक्षिणा-स्त्री. १ देवाच्या मूर्तीची, छबिन्याची शहराच्या भोंवतालीं काढलेली मिरवणूक. २ शहराभोंवतीं, सर्व शहर फिरणें. ३ (ल.) रिकामपणीं गांवभर (भिक्षा मागत, देवदर्शन करीत) हिंडण्याची क्रिया. [नगर+सं. प्रदक्षिणा] ०भवानी-स्त्री. १ गांवभर भटक्या मारणारी, रिकामटेकडी स्त्री. २ वेश्या. 'अपशकून करण्यासाठीं रुक्मासानी या नगरभवानीला उभें केलें.' -महाराष्ट्र १७.४.३०. [नगर+(उप)भवानी=देवी] ०भवान्या-पु. आळशी, बेढंगी, बदफैली मनुष्य. 'पण तूं रे?-तूं रे नगरभवान्या नाच्ये पोऱ्ये घेवोनी।' -केक १५५. [नगरभवानीचें पुल्लिंगी रूप] ०भोजन-न. (व.) गांवजेवण. ०रचना-स्त्री. शहराची सर्व सोयी व्हाव्यात अशी मांडणी; शहराची व्यवस्थित पद्धतशीर मांडणी; (इं.) टाउनप्लॅनिंग. ०लेखक-पु. कुळकर्णी. 'नगर लेखकांच्या दिव्यमंदिरीं।' -सप्र १.२३. ०शेट-पु. गांवचा पुढारी; श्रेष्ठी; मोठा व्यापारी. ०हेर-पु. (काव्य) शहरांतील गुप्त बातमी काढणारी टोळी, तींतील व्यक्ति. 'म्हणे सत्य बोलिला नगरहेर।' [नगर+हेर=गुप्तपणें बातमी काढणारा] नगराध्यक्ष-पु. शहराच्या स्थानिक संस्थेचा, म्युनिसिपल कमिटीचा अध्यक्ष; (इं.) प्रेसिडेंट. [नगर+अध्यक्ष=मुख्य] नगरी-स्त्री. लहान नगर; गांव. [सं.] -वि. अहमदनगरचा. 'नगरी रेशीम भरणें.' [नगर=अहमदनगर] ०पैसा-पु. अहमदनगर येथील प्राचीन राजवटींतील पैसा. नगरीय-वि. शहरासंबंधीं; नगरासंबंधीं. [नगर]

**नंगा**—वि. १ वस्त्रहीन; नागवा; नग्न; दिगंबर. २ (ल.) निर्धन; अकिंचन; दरिद्री; कफल्लक. ३ (ल.) बेफिकीर; निर्लज्ज; अब्रू नसणारा. 'फिरस्त्यासारख्या नंग्या लोकांशीं उद्योगी कुणबी शेतकरी भांडण्याला तयार नसतो.' -गांगा १२५. [सं. नग्न; हिं. नंगा] म्ह० नंगेसे खुदा बेजार; नंगेसे खुदाभी डरता है=नंग्या माणसाला ईश्वरहि भितो. ०नाच-पु. बेताल, अश्लाघ्य, निर्लज्जपणाचें वर्तन; धांगडधिंगा; धुडगूस. 'जलक्रीडेच्या निमित्तानें मेनकेचा नंगानाच भारतांत जो दाखविला आहे तोच अत्यंत योग्य आहे.' -नाकु ३.३८. [नंगा+नाच] ०नाच घालणें-स्वैरपणें, निर्लज्जपणें वाटेल तसें वागणें. नंगी समशेर-तरवार-स्त्री. १ नागवी, म्यानांतून बाहेर काढलेली तरवार. 'ऐटबाज पोशाख हातामंदि नंगी समशेर।' -मृ १८. २ (ल.) सुंदर व चपळ स्त्री.

**नगारखाना**—पु. १ चौघडा, नगारे इ० ठेवण्याचें ठिकाण; वाद्यांचा कारखाना. २ चौघडा वाजविणाऱ्यांचा संच, ताफा. ३ देऊळ, वाडा इ० कांच्या प्रवेशद्वारावर ठराविक वेळीं चौघडा इ० वाजविण्यासाठीं बांधलेली स्वतंत्र खोली. [फा. नकारा+खाना]

**नगारची(चि)-जी**—पु. नगारा वाजविणारा माणूस; वादक. 'मी तों महाराजाचा दीन नगारचि।' -दावि ४५३. 'म्हणोन डेरियास येऊन फत्ते नगारचीस आज्ञा केली कीं कुचाची नौबत सुरू करा.' -भाब ८. [फा. नकारची]

**नगारा**—पु. १ एक मोठें चर्मवाद्य; नौबत; डंका. हें एक लोखंडी लहानमोठ्या पसरट तोंडाच्या व निमुळत्या बुडाच्या भांड्याचें तोंड चामड्यानें मढवून तयार करितात; हें लांकडी टिपऱ्यांनीं वाजवितात. २ (ल.) मोठें पोट. [अर. नकारा] ०करणें-नगारा वाजविणें. 'म्हणतांच नगारचीनें नगारा केला' -भाब ८. ०भरणें-(ल.) पोट भरणें; भरपूर जेवण होणें. ०मढविणें-नगाऱ्यावर कच्चें कातडें ताणून बांधणें. ०वाजणें, नगाऱ्यावर टिपरू पडणें-(एखादी गोष्ट, व्यक्ति) लोकांत गाजणें; कुप्रसिद्धीस येणें, पावणें. ०वाजविणें, नगाऱ्यावर टिपरू टाकणें-(एखादी गोष्ट, व्यक्ति इ०), चव्हाट्यावर आणणें; जगजाहीर करणें. म्ह० नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काय जाई.

**नगि(गी)ना**—पु. १ रत्न; आंगठींत बसविण्याचा हिऱ्याचा खडा. 'सारी अमदाबाद बघाया लोटली सैना। इश्क नगिना।' -सला २०. २ (ल.) कोणतीहि उत्तम, सुरेख, उत्कृष्ट वस्तु. 'विश्वासराव नानाचा पुत्र नगीना।' -इपुस्त्रिपो १३५. 'काय नगिना लेखणी हो!' [फा. नगीन्]

**नगिनी**—क्रिवि. नागवेपणीं; नग्नपणें; नग्नीं. 'नगिनी यावें नगिनी जावें वरती लवलाही।' -(मरतिकाची लावणी) मसाप १.१.३. [नग्न]

**नगीण**—स्त्री. (गो.) एक वृक्ष; नोगीण.

**नगीननागवा**—वि. अगदींच नागवा; सर्वथैव नग्न. [नग्न+नागवा]

**नगे**—क्रि. (अशिष्ट.) नको. अनेकवचन नगेत. [नग]

**नगोटा-टें**—पुन. रत्न; जवाहीर; दागिना; नग अर्थ २ पहा. स्वतंत्रपणें किंवा नग या शब्दापुढें जोडून उपयोग करितात. जसें:-नगनगोटा. [नग]

**नगोली**—स्त्री. (खा.) धाब्यावरील जिना व गच्ची.

**नग्गा**—वि. नंगा; नागवा; नग्न. [सं. नग्न; प्रा. णग्ग]

**नग्दी**—वि. १नगदी पहा. २ जरतारीचें काम केलेलें. 'सौवर्णतांतवं नग्दी' -राव्यको २.२९.

**नग्न**—वि. १ वस्त्रहीन; नागवा; नंगा. 'जैसे आपण नग्न भांडकें। जगातें म्हणे।' -ज्ञा १८.१३५. २ (ल) दरिद्री; कफल्लक; अकिंचन. [सं.] ०चक्षु-पु. साधा, उघडा, भिंग, दुर्बिण इ०कांचें साहाय्य नसलेला डोळा, नजर; (इं.) नेकेड आय्. 'नग्नचक्षूनें या क्षीरपथाकडे पाहिलें असतां, चोहोंकडे धुकें पसरलें आहे कीं काय असा भास होतो.' -आगरकर निबंधसंग्रह, आमचें काय होणार. [नग्न+सं. चक्षुस्=डोळा] ०दिगं(गां)बर-

वि. अगदीं पूर्णपणें नागवा; नगीननागवा. [नग्न+सं. दिगंबर= दिशा हेंच वस्त्र ज्याचें तो, नग्न] ०दीक्षा–स्त्री. नागवें राहण्याचें व्रत. (क्रि० घेणें). कांहीं विशिष्ट वर्गांतील गोसावी ही दीक्षा घेतात. [नग्न+दीक्षा=व्रताचा स्वीकार] ०दीक्षाधारण–न. नग्न दीक्षा स्वीकारणें, अंगीकारणें. (क्रि० करणें) [नग्न+दीक्षा+ धारण=धारण करणें; स्वीकारणें] ०दीक्षाधारक-दीक्षाधारी–वि. नग्नदीक्षेचा स्वीकार केलेला; नग्नदीक्षा धारण करणारा. [नग्नदीक्षा+सं. धारक, धारी=धारण करणारा] ०वस्त्र–न. लंगोटी; केवळ नागवें राहूं नये म्हणून लोकोपचारार्थ धारण केलेलें वस्त्र. 'काशायांबर नग्नवस्त्र। संन्याशासी हें पवित्र।' –सप्र ३.१६.

**नग्निका**—स्त्री. वयांत न आलेली, कौमार्यांत असलेली मुलगी. [सं.]

**नच-चि**—शअ. नाहीं; मुळींच नाहीं. 'त्या अंगा नचि इच्छिती रसिक ते भूषा विधीतें खरे।' –ऋ.मं २.६५. [सं. न+च]

**नचक, नचकल**—स्त्री. फुटकी, वरचा फुगीर भाग उडालेली कवडी.

**नचननु**—न. कांकू; नानू; कानकून; कांकरणें. [सं. नच= नाहीं+ननु=संशयवाचक अव्यय]

**नंज**—न. (बे.) बाळंतिणींना होणारा वात. [का. नंजु= मेंदूचा वात]

**नजद**—पु. घोडयाच्या पायास होणारा एक रोग. –अश्वप २.२८२.

**नजदीक**—क्रिवि. जवळ; नझ्दीक; नजीक. [फा. नझ्दीक]

**नजन**—पु. डोळा; नयन. –शर [सं नयन]

**नजर**—स्त्री. १ दृष्टि; नदर. 'माझ्या नजरेस जो पडेल त्याची मी आहुती घेई.' –विवि ८.८५५. २ धोरण; उद्देश; पहाणें. 'अवरंगजेबास ठायीं ठेवावें ही नजर शिवाजीची.' –ख ७.३२५९. ३ (ल.) कृपादृष्टि; लक्ष्य; कृपावलोकन; आनुकूल्य. 'विचारास त्या लोकांची नजर पावली नसली तर... अवहेलना न करितां...गुण ते बोलावे.' –मराआ १५. ४ इच्छा; हांव. 'नजर भारी! होनाचें नाणें! लकाराशिवाय बोलीच नाहीं असा प्रकार.' –ख ७.३२५९. ५ वाईट व बाधक दृष्टि; दृष्ट. लोभी, कामी दृष्टि. 'त्यांची नजर आपली तुझ्यावर.' –मोर ३५. ६ (ल.) तर्क; अवलोकन करण्याची शक्ति. 'त्यांत माझी नजर बराबर चालली नाहीं.' –विवि ८.१.१८. ७ निगा; काळजी. [अर. नझ्र्; हिं. गु. नजर] ०करणें–निगा ठेवणें. 'संग्रह करावा. याची बरी नजर करावी.' –मराआ १२. ०टाकणें–(एखाद्या वस्तूकडे) ओझरतें पहाणें. 'या अर्थावरून नजर टाका.' –भक्त मयूर केकावली २. ०देणें–(एखादी गोष्ट) विचारांत घेणें. ०धरणें– इच्छा करणें. 'कदाचित् त्याचे वंशजांनीं त्यामागें हरामखोराची नजर धरली तर त्यास त्याच वृत्तीचें बल होणार.' –मराआ २४. ०न पुरणें–(एखादी गोष्ट) दृष्टीच्या, शक्तीच्याबाहेर कक्षेबाहेर (विस्तृत, गूढ, मोठी, बहुसंख्याक) असणें. ०पडणें– (एखाद्याची) दृष्ट लागणें; बाधणें. –विचावि २३०. ०फांकणें– १ दृष्टि विस्तृत होणें. २ (एखाद्याची) महत्त्वाकांक्षा, लोभ इ० वाढणें. ०मरणें–(तीच तीच गोष्ट पुनःपुनः केल्यानें तिच्या बद्दलचें) भय, आदर, किळस इ० नष्ट होणें; (एखादी गोष्ट) दृष्टीला पूर्ण परिचित होणें. 'या संबंधानें बऱ्याच लोकांची अजून नजर मेली नाहीं.' –आगर ३.४३. **नजरेंत-नजरांत आणणें**– ताब्यांत आणणें; डोळ्यांसमोर ठेवणें; लक्ष्यांत घेणें. 'नजरांत आणिला कारभार।' –दावि ३१. **नजरेंत धरणें**–पर्वा करणें. 'हम्बीरराव यांणीं दिलेलखान नजरेंत धरला नाहीं.' –सभासद ६४. **नजरेस पडणें**–दिसणें. **नजरेस येणें**–१ पसंत पडणें. २ माहित होणें; दृष्टीस पडणें; लक्षांत येणें. (वाप्र.) **नजरे(रे)चा खेळ**–पु. १ केवळ दृष्टिक्षेपानें, एकदां नजर टाकण्यानें होणारें काम, गोष्ट; किरकोळ सुलभ काम २ मुख्यतः दृष्टीनेंच साध्य असलेलें काम, विषय. उदा० चित्रकला, तिरंदाजी, लेखन. ३ दृष्टीचें अद्भुत, विलक्षण, आश्चर्यकारक कृत्य, काम. जसें:–अतिशय सूक्ष्म अक्षरें, चित्रें काढणें; बारीक शिवणें; घडयाळाचीं सूक्ष्म यंत्रें बसविणें इ० ४ चांगली बळकट दृष्टि, पराकाष्ठेची तारतम्यदृष्टि लागणारी गोष्ट. दृष्टीचा खेळ व नजरेचा खेळ हे शब्द एकमेकांबद्दल पर्याय म्हणून योजतात व तसें करणें इष्ट आहे. कांहीं मात्र वर दिलेल्या अर्थाप्रमाणें उपयोगांत आणितात. दृष्टीचा खेळ पहा. **नजरेचीबाधा**–दृष्ट. 'आज रामूला नजरेची बाधा झाली.' **नजर(रे)चें पाप**–न. प्रत्यक्ष (एखादी वाईट गोष्ट) पहाण्यानें होणारें पाप; पाहण्याचें पाप. (एखादी विशिष्ट गोष्ट नजरेआड घडल्यास खपते पण समोर घडल्यास खपत नसते अशा वेळीं उपयोग). **नजरेनें**–क्रिवि. समक्ष; प्रत्यक्ष. 'त्यासही येथील विचार नजरेनें दाखवून जो विचार सांगणें...' –पेद ३.१८३. **नजरेनें पाषाण उलणें**–फार वाईट नजर असणें. दृष्टि या शब्दांतील इतर वाक्प्रचार पहा. सामाशब्द– ०अंदाजा–पु. नजरेनें पाहणी करून (पीक इ०कांचा), केलेला अंदाज; (सामा.) डोळ्यांनीं पाहून एखाद्या वस्तूचें मान, परिमाण ठरविणें; अशा रीतीनें ठरविलेला अंदाज, अटकळ. 'नजर–अंदाजा–पाहणी–मोजणी–मोजदाद– अजमास–पडीत– वहीत–पीक–बार–किंमत–वजन.' [नजर+ अंदाज] ०एनायत–स्त्री. कृपादृष्टि. 'नजर एनायत फर्माऊन.' –रा१६. १३८. ०कैद–स्त्री. साधी अटक. [नजर+कैद] ०गहाण-गाहण– . गहाण ठेवलेली मिळकत सावकाराच्या ताब्यांत न राहतां ऋणकोजवळच राहते असला गहाणाचा एक प्रकार; ह्या प्रकारांत

ऋणकोनें मी जातीनें कर्ज फेडीन न फेडल्यास सावकारानें माझी विवक्षित मिळकत विकून तिच्या किंमतींतून आपलें कर्ज सव्याज फेडून घ्यावें असें लिहून द्यावें लागतें.' –घका ३०. याच्या उलट अमलगहाण, ताबेगहाण. [नजर+गहाण] ०**गुजार**–स्त्री. परीक्षा; पारख. 'आपण राजियांनीं नजरगुजर करून एक एक माणूस पाहून ठेवावें.' –सभासद २१. –वि. डोळ्याखालून घातलेलें; गेलेलें; पारखलेलें; दृष्टिगोचर झालेलें. 'तसेंच तटसरनोबत ..जे ठेवणें ते बरे मर्दान कबिलेदार विश्वासु असे पाहून नजरगुजार करून ठेवीत जावे.' –मराआ२८. [नजर+फा. गुझार=गुझाश्तनचें अज्ञार्थी रूप] ०**गुजारत-गुजारा**–स्त्रीपु. नजरानजर; दृष्टादृष्ट; भेट. 'त्याची व आमची नजरगुजारत होईल तेव्हां काय बोलणें तें बोलूं.' [नजर+गुजारत, गुजारा] ०**चूक**–स्त्री. दुर्लक्षामुळें, नकळत, घडलेली झालेली चूक, दोष; दृष्टिदोष. [नजर+चूक] ०**चोर**–पु. धूर्तपणानें, कावेबाजपणानें नजर चुकविणारा; दृष्टीस पडण्याचें टाळणारा. [नजर+चोर] ०**दौलत**–स्त्री. लक्ष्मीची कृपादृष्टि. –राव्यको ८.६७. [नजर+दौलत] ०**पापी**–वि. वाईट, पापी, दुष्ट नजरेचा. ०**पारख**–स्त्री. १ पाहतांक्षणींच, बाह्यस्वरूपावरून (एखाद्या गोष्टीची, व्यक्तीची) केलेली परीक्षा, अनुमान. २ पाहतांक्षणीं, बाह्यस्वरूपावरून अनुमान, तर्क करण्याची शक्ति, चातुर्य. [नजर+पारख=परीक्षा] ०**पाहणी**–स्त्री. केवळ नजरेनें पीक, जमीन, धान्याची रास इ०कांचा केलेला अजमास, अटकळ. [नजर+पाहणी] ०**बंद**–पु. १ नजरबंदी करणारा; गारुडी. २ (कों.) नजरबंदी पहा.–क्रिवि. साध्या अटकेंत; ज्याच्या हालचालीवर सक्त नजर आहे अशा स्थितींत. 'बादशहानें नजरबंद केलें.' –मराचिथोशा ३. [फा. नझर्बंद] ०**बंदी**–स्त्री. १ दृष्टीला भुरळ पाडणें; जादुगिरी; हातचलाखी. 'ही जादूची नजरबंदी कुणि कुठें कशी केली?' –वाग्वैजयंति, गुलाबी कोडें २ नजरकैद; साधी अटक. [फा. नझर्बंदी] ०**बाग**–पु. १ घर, राजवाडा इ०कांसमोर शोभेकरितां केलेला सहज दृष्टीस पडावयाजोगा बाग. 'पांच कैदी नव्या वाड्यांतील नजरबागेंत आणून त्यास समक्ष रूळ ढोराप्रमाणें त्यांचेकडून ओढवले.' –विक्षिप्त २.१०१. २ गच्चीवर, खिडकीपुढें फुलझाडांच्या कुंड्या वगैरे ठेवून केलेली बागेसारखी टुमदार रचना. ०**बाज**–वि. १ सूक्ष्म नजरेनें परीक्षा, निरीक्षण करण्यांत कुशल. २ हेर; टेहळणी करणारा. –ऐटी १.४४. 'शहरांत नजरबाज लोक ठेवून...'–मरिउनि २.२००. ३ डोळे मोडणारा, मारणारा; नेत्रसंकेत करणारा. [नझर्बाझ] ०**बुलंद**–स्त्री. कृपादृष्टि. 'गरिबांवर नजरबुलंद झाल्यानें आपलेंच गांव आहे.' –पदमव १७. ०**भूल**–स्त्री. पाहण्यांत झालेली चूक; डोळ्यांना पडलेली भुरळ; नजरचूक. [नजर+भूल=चूक, मोह] ०**मासला**–पु. नुसत्या नजरपहाणीनें मिळालेला मासला, नमुना. नजरअंदाजा या शब्दाबद्दल योजितात. ०**मुबारक-रकी**–स्त्री. शुभदृष्टि; कृपादृष्टि. [नजर+अर. मुबारक्=शुभ, मंगल] ०**मोजणी**–स्त्री. मोजण्याच्या कोणत्याहि साधनाचा उपयोग न करतां केवळ नजरेनें केलेली मोजणी. 'नजर मोजणी करावयाचा शिरस्ता आहे' –मसाप २.२.१४१. [नजर+मोजणी] ०**मोजबा**–पु. चौकशी; पाहणी. –वाडसभा २.२.३५. ०**हुजूर**, **नजरेहुजूर**–क्रिवि. प्रत्यक्ष (राजाच्या, हुजुराच्या) समक्ष, दृष्टीखालीं; समोर. [नजर+हुजूर] **नजरानजर**–स्त्री. परस्परांनीं एकमेकांस पाहणें; दृष्टादृष्ट; भेट. [नजर द्वि.]

**नजर**—स्त्री. १ वरिष्ठाची कृपा संपादन करण्यासाठीं त्यास भेट म्हणून दिलेली वस्तु; उपायन. (क्रि० करणें). २ बडे लोक मुलाखतीच्या वेळीं परस्परांस भेट म्हणून देतात त्या वस्तूंपैकीं प्रत्येक; नजराणा. (क्रि० करणें). ३ बापाच्या गादीवर, हुद्यावर बसतेसमयीं मुलानें सरकारास अगर सरकारच्या प्रतिनिधीस द्यावयाची जुन्या राजवटींतील खंडणी. मराठी अमलांत ही खंडणी फक्त जहागिरदार अगर इतर सरकारी नोकर यांच्याकडून घेतली जात असे. दत्तकाच्या बाबतींत मात्र ती सर्वांकडून घेतली जात असे. ४ (ल.) भेट; मुलाखत. ५ (सामा.) भेटीची वस्तु; अहेर; नजराणा. नजराणा पहा. [अर. नझ्र] सामाशब्द– ०**कारखाना**–पु. घाटाजवळ राजापुर तालुक्यांत जंगलांतील लांकडें तोडण्याचा दिलेला मक्ता. –मोल. ०**खोलाई**–स्त्री. शेतांतील पीक कापण्याची परवानगी मिळण्याकरितां खेड्यांनीं, गांवांनीं द्यावयाचा कर. ०**गलबत-जहाज**–न. गलबतांवरील कर. [नजर+गलबत] ०**घी**–न. सरकारी नोकरांच्या बरदास्तीकरितां गांवकऱ्यांनां द्यावें लागणारें तूप. [नजर+हिं. गुज. घी=तूप] ०**तोफेजात**–स्त्री. नजराणा. 'इंग्रेज नजर–तोहफेजातशिवाय सव्वीस लक्ष रुपये दर्साल हुजरांत देत होते.' –ऐटि १८. ०**नजराणा**–पु. (व्यापक) कनिष्ठांनीं वरिष्ठांना सादर, अर्पण केलेल्या वस्तू इ०; बड्या लोकांनीं भेटीच्या वेळीं परस्परांस नजर केलेल्या वस्तू; नजर अर्थ १, २ पहा. [नजर+नजराणा] ०**नियाज-न्याज**–पु. नजराणा. 'हल्लीं तुम्हाशी भेटीचा पैगाम करितील व नजर–नियाज कबूल करितील.' –पया ८१. 'खुर्शीवर शहाजादेस बसवून तमाम सर्दारांनीं नजर–न्याज केले.' –ख ८.४२२५. [नजर+फा. नियाझ्] ०**पट्टी**–स्त्री. १ धान्याचा प्रत्येक खंडीमागें द्यावा लागणारा कर. २ नजर म्हणून द्यावयाची रकम जमविण्यासाठीं बसविलेली पट्टी, वर्गणी, कर. [नजर+पट्टी] ०**पागा**–स्त्री. नजर देण्याकरितां ठेवलेल्या घोड्यांची पागा. 'एक घोडा त्यांस द्यावयाचा तो नजरपागेपैकीं देणें.' –वाडसमा १.१५८. [नजर+पागा] ०**भेट**–स्त्री १ सरकारी अंमलदारास प्रथम भेटीच्या वेळीं दिलेला नजराणा. २ जमाबंदीच्या वेळीं प्रत्येक पाटलानें सरकारास द्यावयाची एक रुपयाची नजर. [नजर+भेट]

०मुबारक-ख-स्त्री. भेटीचा नजराणा; मंगल अभिनंदनपर भेट. 'त्याचपासून नजर-मुबारखी घेऊन पुढें मुलुकास कौल सादर केला.' -इस १ चांदबिबी १०. [ नजर+अर. मुबारक्=शुभ; मंगल ] ०स्वारी-स्त्री. पिकांवरून घोडदळ, पायदळ इ०कांची स्वारी नेऊं नये म्हणून शेतकऱ्यांनीं स्वारीवाल्यांस द्यावयाची खंडणी. [ नजर+स्वारी ]

**नजराणा**—पु. १ वरिष्ठांची मर्जी संपादण्याकरितां दिलेली भेटीची वस्तु; उपायन. २ समान दर्जाच्या माणसांनीं भेटीच्या वेळीं परस्परांस दिलेल्या वस्तू ३ ( विशेषार्थानें ) पूर्वीच्या अमदानींत एखाद्यास इनाम, वारसा हक्क, जहागिर, मोठा हुद्दा इ० देण्याच्या प्रसंगीं त्याजपासून सरकारास मिळालेली खंडणी. ही खंडणी देणारानें स्वखुषीनें द्यावयास पाहिजे पण पुढें सरकार बऱ्याच वेळीं सक्तीनें वसूल करी. शिवाय मांडलिक राजापासून घेतलेल्या जादा खंडणीस किंवा रयतेपासून वसूल केलेल्या जादा वसूलास हा शब्द लावीत असत. ४ ( कायदा ) स्थावर मिळकत वहिवाटीस घेण्यासाठीं नवा पट्टा करतेवेळीं त्या मालकास देतात तो ऐन जिन्नस किंवा नक्त ऐवज. -लँड् रेव्हिन्यु कोड. नजर पहा. [ अर. नझ्राना ]

**नजला**—पु. १ कांहीं विकृतीमुळें डोक्यांतून वाहणारें पाणी. ( क्रि० डोळयांत, डोळयावर उतरणें ). २ ( कित्येकांच्या मतें ) डोळयांतून पाणी वाहण्यापूर्वी होणारी डोळयांची जळजळ. [ अर. नझ्ल्=पडसें, सर्दी, गळ; नुसूल=खुपरी ]

**नजॉ**—क्रि. ( गो. ) होत नाहीं. [ सं. न जायते ]

**नजा होणें**—क्रि. ( कु. ) उत्साह नसणें; अंग मोडून येणें.

**नजाफत**—स्त्री. सुबकपणा. 'नजाफत व कारागिरी व चांगली वस्त पूर्वी आपण पाहिली आहे तशी आतां कांहीं दृष्टीस पडत नाहीं.' -ऐटि २९६. [ अर. नझाफत् ]

**नजारत**—स्त्री. नाझीराचें, नाझराचें काम, हुद्दा. [ अर. नझारत् ]

**नजीक-ख, नज्दीक**—क्रिवि. नझ्दीक; जवळ; सन्निध; समीपभागीं. 'आजी तागाईत दूर कर्नाटकांत होतों. हाली नज्दीक आलों असों.' -रा १५.२१. -शअ. जवळ; सन्निध. 'नजीक नदी' (=नदीजवळ). -रा १५.२५२. 'नजीक समाधी' (=समाधीजवळ). -रा १५ १५४. [ फा. नझ्दीक् ]

**नजीब**—वि. ( कुळाचा, स्वभावाचा ) थोर; उच्च. -स्त्री. हिंदी शिपायांची एक तुकडी, वर्ग. [ अर. का. ]

**नजीस**—वि. १ कंजूष; कृपण; चिक्कू. २ रागीट; तापट; तिरसट; चिडखोर. ३ त्रास देणारा; द्वाड. कधीं कधीं खडतर व खचरट या शब्दांच्या बऱ्याच अर्थी चुकीनें उपयोग करितात. [ अर. नजिस्=घाणेरडा, ओंगळ ]

**नजुमी**—पु. ज्योतिषी. 'नजुमियास बोलावून साअत पांच घटका रात्रीची ठरली.' -रा ५.२७. [ फा. नुजूमी ]

**नजूम**—पु. ज्योतिष; ग्रहांची स्थिति; शुभाशुभ काल. 'आमचें येथें नजूम विशेषकरून जाचून पाहण्याचा सांप्रदाय नाहीं.' -रा ७.१९३. [ अर. नुजूम् ]

**नजूस**—वि. कृपण; कद्रु. नजीस पहा. [ अर. नजिस् ]

**नझूल**—पु. ( व. ) सरकारी गांवठाणाची जमीन. [ अर. नुझ्ुल=बेवारसी ठरल्यामुळें सरकारजमा झालेली मिळकत, जमीन ]

**नझ्दीक**—क्रिवि.शअ. जवळ. नजीक पहा. [ फा. ]

**नञ्**—अ. न या अव्ययाबद्दल संस्कृत व्याकरणांत योजलेला पारिभाषिक शब्द. [सं.] ०समास-पु. त्याचा अभाव, त्यापासून भिन्न, तदभावविशिष्ट असा अर्थ विवक्षित असतां संस्कृत स्वरादि व व्यंजनादि शब्दांच्या मागें अनुक्रमें अन् व अ या वर्णाचा योग होऊन होणारा एक प्रकारचा समास. जसें:-अब्राह्मण=ब्राह्मण नव्हे तो, ब्राह्मणाहून भिन्न; अज्ञान=ज्ञानाचा अभाव, ज्ञानाभावविशिष्ट असा ( मनुष्य ); अनंत; अनादि; अनुपम; अनुचित; अधीर; अकाल; अनाथ इ०. या समासाचे नञ्तत्पुरुष व नञ्बहुव्रीहि असे दोन प्रकार आहेत. उदा० अज्ञान=ज्ञानाचा अभाव. हा नञ्तत्पुरुष समास होय. परंतु अज्ञान=ज्यास ज्ञान नाहीं असा; ज्ञानाभावविशिष्ट ( मनुष्य इ० ). हा नञ्बहुव्रीहि समास आहे.

**नट**—पु. एक जात व तींतील व्यक्ति; डोंबारी; कोल्हाटी; बहुरूपी; नट हा स्त्रिया इ०कांचा वेष धारण करून नाचतो, दोरीवर चालणें, उडया मारणें इ० अनेक प्रकारचे खेळ करून उपजीविका करतो. नाच्या पोऱ्या; सोंगाडया. -ज्ञा १४.२९०. 'कृष्णा दारोदारीं नटसा कां मी सुयोध नाचेन?' -मोभीष्म १.१०३. २ ( नाटय ) नाटकांत स्त्रीपुरुष-भूमिकेचें काम करणारा मनुष्य; नाटकी पात्र. ३ नटण्याची संवय, स्वभाव असलेला मनुष्य. ४ उनाड, व्रात्य, कपटी, हरामी मनुष्य. 'ठस ठोंबस खट नट। जगभांड विकारी।' -दा २.३.३२. ५ चेष्टा; हावभ व. 'वदतां ररदीसिस दावि नटें।' -अकक २. किंकरकृत शुकरंभा संवाद २०. ६ वेष; अवतार; रूप; सोंग. 'धरोनिया रुद्राचा नट। नंदीवरी जाहला उपविष्ट।' -कथा २.१२ २४. [ सं. नट; सिं. नटु ] नटामाजी नेटकी जाया-( सुंदर अशा पुरुषनटानें सुंदर स्त्रीचा वेष धारण केला असतां तो जसा कृत्रिम असतो व त्या भूमिकेंतील तशी सुंदर स्त्री जशी दुर्लभ असते त्यावरून ) दिसण्यांत अतिशय सुंदर पण बनावट व दुर्लभ अशी वस्तु. (तुल०) 'कीं नटामाजील कामिनी! कीं तममयकुहूची यामिनी। कीं अजाकंठिचे स्तन दोन्ही। तैसे प्राणी व्यर्थ ते।' -ह १६.३२. सामाशब्द-०खट-वि. लुच्चा; सोदा; हरामी. [ नट+खट; हिं. नटखट ] ०धारी-वि. नाटकी. 'पाहून लुब्धलों तुसी आतां किती दिवस

चाळिवसी नटधारी।' -होला ८९. [नट+धारी=धारण करणारा] ०**नर्तक**-पुअव. (व्यापक) नट, डोंबारी, कोल्हाटी, नाचणारे, सोंगाडे इ० समुच्चयानें. [नट+सं. नर्तक=नाचणारा] ०**नागर**-वि. नटून, सजून गांवभर हिंडणारा. -शर. [नट+] ०**नाच**-पु. १ उल्लास; उत्कर्ष; प्रताप; आधिक्य. 'हें असो या चिन्हांचा। नटनाचु ठायीं जयाच्या। जाण ज्ञान तयाच्या। हातां चढे।' -ज्ञा १३.२१५. २ हावभाव; अभिनय; अंगविक्षेप. 'मातें गाती वानिती। नटनाचें रिझविती।' -ज्ञा १६.३६१. [नट+नाच] ०**नाटक-की**-पु. १ नाना प्रकारचे चमत्कारिक खेळ करून दाखविणारा परमेश्वर, श्रीकृष्ण इ० देवता. २ नाटकी; सोंगाडया माणूस. 'नटनाटक टक बालट हरि न ठाउक मज मी न नवी।' -रासक्रीडा १३. ०**नाट्य**-न. १ नाटक इ० खेळ; सोंगें. 'नटनाट्य केलें तुम्ही याचसाठीं। कौतुकें दृष्टि निववावी।' -तुगा. २ बतावणी; सोंग. 'तरी कां वंचतुक सुमनासि वो। नट नाट्य बरें संपादू जाणसी वो।' -तुगा १४२. ०**बाज**-वि. १ दिमाखानें, ताठयानें, नटून चालणारा; अक्कडबाज; नखरेबाज; नटवा. २ दांडगा व धसकट (मनुष्य). [नट+फा. बाझ प्रत्यय] ०**बाजिंदा**-वि. नटबाज पहा. [नट+बाजिंदा] ०**बाजी**-स्त्री. १ दिमाखदारी; अक्कडबाजी. २ नटवेपणा; नखरेबाजी; नखरा. [नट+बाज] ०**बाट**-वि. लुच्चा; सोदा; हरामी. [नट+बाट=लुच्चा] ०**मोगरा**-पु. नटणारा मनुष्य. 'नटणारे छानछोकी नटमोगरे फारच बोकाळले आहेत.' -इंप १५५. [नट+मोगरा] ०**राज**-पु. १ तांडवनृत्य करीत असणारा शंकर, त्याची मूर्ति; नटेश. २ अर्धनारी नटेश्वर, उजवें अंग पुरुषाचें व डावें स्त्रीचें असें स्वरूप. ०**वर**-पु. (गु.) नटांत श्रेष्ठ; कृष्ण; शंकर; परमेश्वर. नटनाटकी पहा. [नट+सं. वर=श्रेष्ठ] **नटाई**-स्त्री. लुच्चेगिरी; सोदेगिरी; कपट. (क्रि० करणें) **नटाईस-नटाईवर येणें**-लबाडी, लुच्चेगिरी करणें. **नटेश, नटेश्वर**-पु. १ परमेश्वर; नटवर. २ नटराज पहा. [नट+सं. ईश, ईश्वर] **नटोवा**-पु. (महानु.) नट; नटवा पहा. 'आंगीचीआं रवरवां। ढळतां कैसा सांगावा। जैसा रणरंगाचा नटोवा सराऊं करितुसे।' -शिशु १००४. [नटवा]

**नट**—पु. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, निषाद हे स्वर लागतात. अवरोहांत गांधार व धैवत वर्ज्य. जाति-संपूर्ण औडुव. वादी मध्यम व संवादी षड्ज हे स्वर आहेत. हा रात्रीच्या दुसऱ्या प्रहरीं गातात. ०**बिलावल**-पु. (संगीत) एक राग. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र, गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी मध्यम. संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर होय. ०**मल्लार**-पु. (संगीत) एक राग. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत व कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी मध्यम, संवादी षड्ज. हा रात्रीच्या दुसऱ्या प्रहरांत गातात.

**नटकणें**—क्रि. न टिकणें; न राहणें. -ज्ञा ८८३. 'वाग्व्यापार थके, उगीच न टके, कांपे तनूनें धके।' -आसु १८.

**नटका**—वि. नटणारा; नटवा नखरेबाज. 'जो नर नटका। हरि वदनीं नयेचि घटका।' -आपद ३९. [सं. नटक=नट]

**नटंग-गें**—न. (प्रां.) १ गुडघा; नडगी-गें. **नटंगावर नेसणें**-(धोतर, लुगडें इ०) गुडघ्याच्या वर नेसणें. २ (ल) असभ्यपणानें, शिष्टाचाराला सोडून नेसणें.

**नटणा**—स्त्री. (महानु.) लीला. 'चरतें चरितें दूरि गेली। तेयोनि ब्रह्मेनि नेलीं। मग सर्वज्ञनाथें नटणा केली।' -दाव २६०. 'जगजोती जे अनादिशक्ति। अधींच पातली कराया वस्ति। नटणा करूं पाहती भक्तिमुक्ति। आग्रह सकळांचा सफळ हो।' -दावि ४४३. [सं. नटन; म. नटणें]

**नटणें**—अक्रि. १ सजणें; वेषभूषा करणें; अलंकार, वस्त्रें इ० कांनीं सुशोभित बनणें. 'अगनावेष येतो नटून। रंग तुझा लुटावया।' -नव २०.१०८. २ (एखाद्याचा) वेष, रूप, धारण करणें; भूमिका घेणें. 'तें साकारपणें नटें नटीं। कार्यालागीं।' -ज्ञा ४.४८. 'तुझें प्रतिबिंबस्वरूप जाण। स्वयें नटेल हुताशन।' -रावि १५.१३६. 'मी अज अजित सर्वेश्वर। मीच नटलों चराचर।' ३ खेळणें; नाचणें. 'जैसा गोकुळीं नाचतां मुकुंद। सर्वहि नटों लागले।' -दावि ९४. 'नटे नाटकू त्रीकुटामाजि कैसा।' ४ डौल मिरविणें; दिमाख दाखविणें. 'तयां कर्मत्यागु न घडे। जे कर्तव्य मनीं सांपडे। वरी नटती तें फुडें। दरिद्र जाण।' -ज्ञा ३.६५. ५ ठमकणें; नखऱ्यानें, नटूनथटून, ठमकत चालणें. -उक्रि. नाचविणें; खेळविणें; खेळ दाखविणें. 'स्वमायेचें आड वस्त्र। लावूनि एकला खेळवी सूत्र। बाहेरी नटी छायाचित्र। चौऱ्याशीं लक्ष।' -ज्ञा १८.१३०३. [सं. नटन] **नटूनथटून**-क्रिवि. १ दिमाखानें; डौलानें; ऐटीनें. २ सजून; थाटमाट, नट्टापट्टा करून. (क्रि० चालणें; बसणें). 'नटुनि थटुनि नाचति हे सौभद्र अंक ५. [नटणें द्वि. नटणें+थटणें] **नटतकला**-स्त्री. नाट्यकला. 'भरतशास्त्र नटतकळा। ताळस्वर भेद सकळा।' -निमा १.१४८. [नटणें+कळा=कला]

**नटणें**—क्रि. १ नाकबूल जाणें (विशेषतः लबाडीनें). २ नाकारणें; मान्य न करणें; कचरणें; कांकूं करणें. 'हा पांच रुपयाला नटला.' [हिं. नटना=नकार दर्शविणें]

**नटतिया**—पु. नाटककार. -शर. सोहिमह.

**नटन**—न. १ नटाचें काम; अभिनय; वेष, रूप धारण करणें. २ क्रीडा; लीला. 'देतों दैवें स्वर्गेहीं नटन करुनि आम्हास दावी

प्रसिद्धी । ' –अकक २ मंगीश,राधाविलास ८४. ३ नृत्य; नाचणें. [ सं. ]

**नट(टु)वा**—पु. १ डोंबारी जात. २ नाचणारा; सोंगाड्या; नाच्या; नट अर्थ १ पहा. ' नृत्यांगना त्या नाचती । धाडी नटवे गायन करिती । ' –जै ८४.८. ३ ( ल. ) नटणारा; नखरेबाज; छेलछबेला. [ नटणें ] **नटवाई**–नटवी पहा. **नटवेपणा**–पु. नखरेबाजपणा; ऐटबाजी; छिचोरपणा. ' श्रीमंती सर्वांच्या नजरेस पडावी म्हणून बायकांचा नटवेपणा श्रीमंताना जसा हवासा वाटतो ... ' –मानापमान ३३. [ नटवा ]

**नटविणें**—सक्रि. १ वस्त्र, अलंकार इ० कांनीं सजविणें; वेषभूषेनें सुशोभित करणें. २ ( नाटकांतील ) भूमिका इ० करणें, वठविणें, संपादणें. ३ नाचविणें; नाचावयास लावणें. ' फटवी रामासि असा दशतुंडासी महामुखें नटवी । ' –मोरा मंत्ररामायण अरण्य ४७. [ नटणें ]

**नटवी**—स्त्री. १ नखरेबाज, अक्कडबाज स्त्री. २ नाचणारी, अभिनय करणारी, सोंगाडी स्त्री; नटी. [ नटवा स्त्री ]

**नटिनी, नटी, नटीण**—स्त्री. ( नाच, तमाशा इ० कांत ) सोंग घेणारी, नाचणारी स्त्री; नर्तकी. [ सं. नटिनी, नटी ]

**नटिया**—पु. ( काव्य ) सोंग घेणारा; नट. ' नटिया एकचि एकला । गायन्याग्रांचें सोंग अवगला । भीतरील खेळया जेणें वोळखिला । तयाचा फिटला वृथा भ्रमू । ' –एभा ११.८६५. [ नट ]

**नटी**—स्त्री. १ सूत्रधाराची पत्नी. २ नाटकांत काम करणारी स्त्री; स्त्रीपात्र. ३ नर्तिका; नाचणारी; कलावंतीण. [ सं. ]

**नटुवा**—पु. ( विप्र. ) नटवा पहा.

**नट्टापट्टा**—पु. १ ( बाहेर जाण्याच्या वेळीं ) वेणीफणी करणें; केस विंचरणें; चांगले अलंकार, कपडे घालणें. २ नटणें; मुरडणें; छिचोरपणाची वेषभूषा; नखरा; चट्टीपट्टी. ' नट्टापट्ट्यांत दंग, मुखि लावोनि रंग, वर्णु ढंग किती तरि नाना । ' –विनोद नाटक [ नट+पट; सं. नृत्य प्रवृत्त=नट्टपअट्ट –मसाप २.३.२३९ ]

**नठारा**—वि. ( प्रां ) वाईट; निकामी; गयाळ; रद्दी; रद्दड. ' तो अत्यंत नठारा माणूस आहे. ' [ सं. नष्टतर; प्रा. णट्ठ ]

**नठयाळ**—वि. द्वाड; नष्ट; नाठयाळ; नाठाळ. ' कपटी कुटीळ गाठयाळ । कुटें कुचर नठयाळ । ' –दा २.३.२३.

**नड**—पु. ( कु. ) भाताच्या रोपांत येणारा पोकळ दांडा. [ सं. नड=एक प्रकारचें जाडेंभरडें गवत ]

**नड**—स्त्री. १ अडथळा; प्रतिबंध; हरकत; अडचण; व्याघात; व्यवधान. २ उपाधि; त्रास; उपसर्ग; उपद्रव. ( क्रि० पडणें; होणें ). ' त्याच्या घरीं पाव्हण्यांची नड फार आहे. ' ३ गरज. ( क्रि० काढणें ). ' माझी एवढी नड काढाल तर पहा. ' [ सं. नड्=गर्दी, दाटी होणें, सांचणें ]

**नड**—स्त्री. ( गो. ) १ पिशाच्च. २ पिशाच्चाची बाधा. [ नडणे ]

**नडग-गी-गें**—पुस्त्रीन. १ ( देशावर, उत्तरेकडे रूढ ). अस्वल; रीस. २ ( ल. ) वयस्क, जरठ मनुष्य.

**नडगी-गें, नडघा**—स्त्रीन. १ गुडघा. नटंग पहा. २ पायाची नळी; नळगुडी. ३ पुढें आलेलें हाड. ' ढोंपराचें–कोंपराचें, बोटाचें नडगें. ' **नडग्यावर लागणें**–जिव्हाळीं लागणें. [ नड=नळ ? का. नडगि ]

**नडगें**—न. ( कों. ) कणिंग; कणगी.

**नडघा-घी-घें**—पुस्त्रीन. अस्वल. नडग पहा.

**नडघें**—न. १ तबल्याचें एक परडें; खोड. २ ढोलाप्रमाणें एक चर्मवाद्य. ' डोल नडघें गिडिबिडें चंग । गुजगुजें झांझ नगारा उपांग । ' –स्वादि १०.२.४६.

**नडणी**—स्त्री. १ ( कु. राजा. हेट. गो. ) शेतांतील पिकांत उगवणारें निरुपयोगी व पिकास घातुक असणारें गवत. रान; खुराड. ( क्रि० काढणें ). २ पिकांत उगवलेलें निकामी गवत काढणें; बेणणी. ' या शेताची नडणी करावयाची आहे. ' [ सं. नड, नडिनी ]

**नडणें**—अक्रि. १ गुंतणें; अडकणें; लागणें; गच्च, घट्ट होणें; अडकणें; दाटणें. २ नड, अटकाव, प्रतिबंध मोडा इ०कानीं युक्त होणें; रोधिला जाणें; आड येणें; प्रतिरुद्ध होणें. ३ ( घोडा इ० कानें ) आड करणें; अडणें, भीती इ०कांमुळें पुढें न सरणें. ४ कुंठित, स्तिमित होणें; खुंटणें. ५ त्रासदायक, उपद्रवकारक होणें, असणें. [ सं. नड्=गर्दी होणें; का. नडु=अडचण येणें ]

**नडणें**—सक्रि. ( राजा. कु. ) पिकांतील, बागेंतील निकामी गवत, कुंदा काढणें; तणणें; बेणणें; शेतांतील आधींच्या पिकाच्या धसड्या, धसकटें, रान काढणें. [ सं. नड=एक प्रकारचें जाडें गवत; सं. नडिनी ]

**नडनाच**—पु. १ उत्कर्ष; प्रकर्ष; आधिक्य; नटनाच पहा. ' हा वायु चंचळ परि तुमचे आज्ञेचा । नडनाच चालवी । '–स्वादि १३.१.१०१. २ मिष. –मनको, –हंको. [ सं. नट+नाच ]

**नडपी**—स्त्री. ( गो. ) शेतांतील निकामी गवत, कुंदा काढणारी स्त्री. [ ( राजा. कु. ) नडणें; ( गो ) नडप ]

**नडविणें**—उक्रि. १ नडणें, अडथळा, प्रतिबंध करणें; आड येणें. २ दुखापत, इजा करणें. [ नडणें ]

**नडाव**—पु. ( क. ) १ अडचण; नड; प्रतिबंध; अडथळा. २ त्रास; उपद्रव; उपसर्ग. [ नड ]

**नड्डा-ड्डी**—पुस्त्री. ( ना. व. ) घसा; नरडें; नरडी. [ नरडा, नरडी अप. ] **०फाडणें**–( ना. ) आक्रोश करणें; ओरडणें; घसा खरडणें.

**न(ने)णतू**—वि. ( गो. ) नेणता; अजाण; बालिश. [ नेणणें= न जाणणें ]

**नणद, नणंद**—स्त्री. नवऱ्याची बहीण. ' दीर–नणंदा–जावें साध्वी न त्यागिनी स्वपतिभक्ति। ' –मोमंत्ररामायण. उपसंहार ५. [ सं. ननान्दृ; प्रा. णणंदा; बं. ननद, ननंदा; हिं. ननद, ननदी; सिं. निणुन; पं. नणान ]

**नणदया, नणंदा, नणदाई**—पु. ( कु. प्रां. ) नणंदेचा नवरा. [ नणंद ]

**नणदवडा, नणदावा, नणंदावा**—पु. ( कों. कु. ) नणंदेचा जाच, छळ, अरेरावी. ' आई घरांत भावजईला फार छळते नणंदावा पुरा गाजवते अशीहि तिच्या नांवानें ओरड झाली. ' –बहकलेली तरुणी १४. [ नणंद ]

**नणदु(दो)ली**—स्त्री. ( काव्य ) नणंद.

**नत**—वि. नम्र; वांकलेला; ओणवा झालेला. –न. ( नृत्य ) नृत्यांत डाव्या उजव्या बाजूस मान न वळवितां नुसती पुढें वांकविण्याचा अभिनय. [ सं. ] **०जंघा**–स्त्री. ( नृत्य ) नृत्याच्यावेळीं पाय अंचित केला असतां टाचेवर भार पडतो तेव्हां जंघा किंचित् वांकते ती स्थिति. [ नत+सं.जंघा=मांडी ] **०नासिका**–स्त्री. ( नृत्य ) नृत्यांत नाकाच्या नाकपुडया वारंवार जवळ आणणें. [ नत+सं. नासिका=नाक ] **०पार्श्व**–पु. ( नृत्य ) नृत्यांत कोणत्याहि एका पायावर शरीराचा तोल संभाळीत असतां वांकलेला, खालीं गेलेला, त्या बाजूचा शरीराचा भाग. [ नत. सं. पार्श्व= बाजू ]

**नत, नतभाग, नतांश**—पुन. ( ज्यो. ) खमध्यापासून इष्ट प्रदेशापर्यंतचें उतरतें चक्रांश; खमध्यापासून ग्रहापर्यंतचें अंतर; पहाणाराच्या स्थळीं खस्वस्तिक आणि खस्थ पदार्थ ह्यांमध्यें जो कोन होतो त्याला खस्थाचे नतांश म्हणतात. –धारपकृत सूर्यमाला १६.

**नतद्रष्ट, नतद्रक्ष, नतदक्ष**—वि. १ अति कृपण; पराकाष्ठेचा कंजूष; कवडीचुंबक. ' कांहीं येक कळे दक्षा। मनोगत नतद्रक्षा। काय कळे। ' –दा १२.२.११. ' परंतु नतद्रष्ट सरकारनें १९१० सालच्या प्रेस आक्टाच्या वेताळाला त्यांच्या काळपत्राचीहि आहुती दिली. ' –सासं २.३९६. २ खाष्ट; दुष्ट. [ ? न+तत्+रक्ष ? नत+दृष्ट ? ]

**नतनाडिका**—स्त्री. ( ज्यो. ) ज्योतिषशास्त्रांतील मध्यान्हानंतरची व मध्यरात्रीपूर्वीची जन्मघटिका. [ नत+सं. नाडिका ]

**नंतर, नंतरें**—क्रिवि. मग; पश्चात्; मागाहून; तेव्हां –शअ. ( एखादी क्रिया इ०कांच्या ) मागाहून, पश्चात; वर. जसें:–त्या नंतर; केल्या–गेल्या–घेतल्या–बोलल्यांनंतर. ' मरणानंतरें स्वर्गवास। वेरें माझिया भोगिती। ' –मुसभा ८.१०३. [ सं. अनंतर ]

**नति**—स्त्री. १ नमन; वंदन. २ नम्रता. ३ ( ज्यो. ) त्रिभोन लग्नाचें अंशात्मक लंबन; स्थानभेदांश. [ सं. ]

**नति(ती)जा–ज्या**—पु. १ फळ; परिणाम; शेवट. ' असें जो करील त्याचा हा नतीजा म्हणोन डांगोरा पिटवावा. ' –मराआ २९. २ शिक्षा. ' सांवतास तुम्ही आम्ही मिळोन नतिज्या द्यावा. ' –रा १३०. ' ऐशियास गनिमास नतीजा पावावा लागतो.' –वाडशाछ ४. [ अर. नतीजा; हिं. नतीजा ]

**नत्र**—पु. वातावरणांतील एक मुख्य घटक; ( इं. ) नायट्रोजन. **नत्राम्ल**–पुन. एक तीव्र अम्ल; ह्यांत चांदी, तांबें इ० धातू विरघळतात; ( इ. ) नायट्रिक् ॲसिड्. [ नत्र+सं. अम्ल ]

**नथ**—स्त्री. १ नाकांत घालण्याचा स्त्रियांचा एक दागिना; नासामणि. –राव्य २.१३. २ नाकांत घालावयाचें, नाकांतून द्यावयाचें औषध ( तूप इ० ). [ सं. नाथ=वेसण; प्रा. णत्था=वेसण; सिं. नथ; का. नत्तु ] **नथडा**–पु. मोठी नथ. [ नथ ] **नथनी, नथ(थि)णी**–स्त्री १ नथ; ( व. ) लहान नथ; ( तंजा. ) चमकी. ' नाकीं नथनी झुमकेदार । आंगीं तारुण्याचा बाहार। ' –होला १२७. ' सुवासिनी बायका डावे नाकांत रुप्याची नथणी घालतात. ' –गुजा ३१. २ ( बैल, रेडा इ० जनावरांच्या नाकांत घातलेली ) वेसण; नाथ. ३ कुलुपांच्या अभावीं दरवाजाच्या कोयंडयांतून कडी निघू नये म्हणून ( कोयडयांत ) अडकविलेलें लोखंडी वेटोळें. ४ तरवारीच्या मुठीला अडकविलेलें लोखंडी वेटोळें, कडी. [ हिं. नथनी ]

**नथु, नथ्या**—वि. नाक टोंचलेला ( मुलगा ). ( मुलगा जगत नसल्यास नवीन मुलाचें नाक टोंचतात व त्यास नथू–नथ्या असें नांव देतात ). [ नथ ]

**नथूशाई**—वि. एका विवक्षित जातीचा ( हिरा, रत्न, लालडी, माणिक इ० ). [ नथूशाह या प्राचीन काळीं होऊन गेलेल्या धनाढ्य गृहस्थाच्या नांवावरून ]

**नथ्थी**—वि. ( ना. ) एकत्रित केलेलें ( कागदपत्र ). ( क्रि० करणें ). [ नथ ]

**नद**—पु. मोठी नदी. उदा० शोण, सिंधु, ब्रह्मपुत्र इ०. सप्तनद पहा. ' होय नदी नद पाणी। एकचि जेवीं। ' –ज्ञा १८.३३१. [ सं. ] **नदीश्वर**–पु. समुद्र. ' वेला सांडोनि नदीश्वर। ' –रावि २५.१२१. [ नद+ईश्वर ]

**नंद**—पु. ( राजा. ) बाळंतिणीस होणारा वायु; उन्माद वायु; ' त्या बाळंतिणीस वाऱ्यांत बसवूं नका, नंद होईल. '

**नंद**—पु. १ ( तिरस्कारार्थी ) विचारशून्य व बेफिकीर मनुष्य. २ केवळ मूर्ख. [ सं. आनंद; ? सं. नन्दी ? ]

**नंद**—पु. ( कु. ) गर्व; मद; माज; धुंदी; आढ्यता. ' खरडपट्टी काढली तेव्हांच त्याचा नंद उतरला. '

**नंद**—पु. पुराणप्रसिद्ध एका गवळी राजाचें नांव; कृष्णाचा धर्मपिता. [सं.] **नंदाचें गोकूळ**-न. (ल.) मुलेंबाळें, गाई, म्हशी व कुटुंबांतील माणसें इ० कांनीं, आनंदानें गजबजलेलें घर, कुटुंब. 'हें घर म्हणजे नंदाचें गोकूळ असें वाटतें.'

**नंद, नंदी**—पु. विवाहविधींतील अंत:पटावर कुंकवानें काढलेलें स्वस्तिक. [सं.] **नंदाचा, नंदीचा पासोडा-शेला**-पु. नंद काढलेला अंत:पट. ०**कोल**-पु. एक प्रकारचें स्वस्तिकचिन्हांकित निशाण. 'नंदकोले नाना निशाणें। तळपताती माहिनिशाणें।' -दावि २७१. ०**कोलकाठी**-स्त्री. नंदकोल निशाणीची काठी. 'नंदकोलकाठी निशाणासहित। घेऊनि भाविक पोवा सांगत।' -दावि ४८८.

**नंद, नंदकी**—पुस्त्री. (सांकेतिक) (नंदभाषा.) (व्यापारांत, दुकानदारांत, रूढ). १ दलाल. -शर. २ दलालास द्यावयाचें वेतन; दलाली. ०**थाकणें-ठेवणें**-गुप्तपणें दलाली मिळविणें. ०**भाषा**-स्त्री. बाजारांत (दलालाच्या) नोकरांना, गिऱ्हाईकांना समजूं नये म्हणून व्यापारी लोक एक सांकेतिक भाषा उपयोगांत आणतात, तिला नंदभाषा असें म्हणतात. या भाषेंतील सांकेतिक संख्यावाचक शब्दांचे अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहेत. केवली=एक; अवारू=दोन; उधानू=तीन; पोकू=चार; मुद्र=पांच; शेली=सहा; पवित्र=सात; मंगी=आठ; तेवसू, लेवनू=नऊ; अंगुळ्=दहा; एकड्=अकरा; रेघी=बारा; तेपरू=तेरा; चोपड्=चौदा; तळी=पंधरा. तळी या शब्दांपूर्वी अनुक्रमें एक, दोन, तीन, चार या अर्थाचे शब्द 'तान' या शब्दानें जोडून सोळा, सतरा, अठरा, एकोणीस हे शब्द बनतात. जसें-भुरका तान तळी=सोळा; अवारू तान तळी=सतरा; उधानू तान तळी=अठरा; पोकू तान तळी=एकोणीस; काठी=वीस. भुरका तान काठी=एकवीस; अवारू तान काठी=बावीस येणेंप्रमाणें. बिटी=शंभर; ढकार=हजार. नाण्यांसंबंधीं शब्द असे:-भुरका=एक रुपाया; फाटा=आणा; अवारू फाटे=दोन आणे; मंगी फाटे=आठ आणे; तळी फाटे=पंधरा आणे; दुकार=एक आणा; चकार=दोन आणे; पकार=चार आणे; टाली=अर्धा रुपाया, अधेली; ढोकळा=एक पैसा या संकेतांत बरेच पाठभेदहि आहेत. वरील सांकेतिक शब्द योजून पुढील अभंग रचलेला आढळतो. 'मुद्र (५) वदनाचा उधानु (३) नेत्रांचा। अंगळ् (१०) हातांचा स्वामि माझा। १। मुगुट जयाचा। केवळया (१) आगळी काठी। (२०) पवित्र (७) तळवटी। चरण ज्याचे। २। ढकार (१०००) वदनाचा आला वर्णावया। जिव्हा त्याच्या चिरल्या वर्णवेना। ३। शेली (६) वेढावली पोकू (४) मौनावली। अंगुळ्मंगी (१०+८=१८) थकली नकळे त्यासी। ४। सद्भावें शरणा अवारू (२) जोडून। खेचरविसा म्हणे स्वामि माझा। ५।' [नंद+भाषा]

**नंदई**—पु. (व.) नणंदेचा नवरा; नणदोई. नणंदा पहा.

**नंदक**—पु. विष्णूचें खड्ग. [सं.]

**नंदणें**—अक्रि. १ आनंद करणें; हर्ष होणें; सुखी असणें. २ नांदणें; (गो.) नंदचें. 'नंदति नि:शंक वनांत शृंगी।' -जगन्नाथ (शक १६६९). (राजवाडे-ग्रंथमाला) [सं. नंदन]

**नंदन**—पु. १ मुलगा; पुत्र. 'हा भीष्मु गंगानंदनु।' -ज्ञा १.१०५. २ ६० संवत्सरांपैकीं सव्विसावा संवत्सर. -न. १ स्वर्गलोकीं असलेलें उपवन नंदनवन; इंद्राची बाग. २ आनंदविणें; सुखविणें; आनंद देणें. [सं.]

**नंदपुडी, नंदपूड**—स्त्री. अनेक औषधांचें चूर्ण, पूड.

**नंदबहिरी**—पु. मूर्ख, ठोंब्या, शुंभ, ढोण्या मनुष्य.

**नदर**—स्त्री. १ नजर; दृष्टि; नजर पहा. 'नदरे न पडन मी जरी। जाईल मर्जि ग तरी।' -यशवंत, (यशोधन) न्याहारीचा वखत. २ संधि; संधान. 'नबाब तर्वारीस हात घालावयासि गेला, ती नदर राजियानें धरून वार केला.' -सभासद २८. [अर. नझर्; म नजर] ०**चूक**-स्त्री. नजरचूक पहा. ०**गुजरात**-स्त्री. नजरगुजारत पहा.

**नंदश-स**—स्त्री. (कों. राजा.) नणंद.

**नंदा**—स्त्री. शुक्ल पक्षांतील प्रतिपदा, षष्ठी, एकादशी या तिथी या तीन तिथींस नंदा तिथी अशी ज्योतिषशास्त्रांत संज्ञा आहे. -ज्योतिषसार ९. [सं.] ०**तिथी**-स्त्री. (ज्यो.) नंदा पहा.

**नंदा**—स्त्री. नणंद. -अव. नणंदा. 'नंदा जावा भावाप्रती। देवापरि मानीतसे।' -नव १८.२३. [सं.]

**नंदादीप**—पु. देवापुढें अहोरात्र जळत राहणारा, ठेवलेला दिवा; अक्षयदीप. 'नाना देवांचीं जें स्थानें। तथें नंदादीप घालणें।' -दा २.७.२३. [आनंद+दीप=दिवा]

**नदाफ**—पु. पिंजारी. [अर. नद्दाफ्]

**नदारद-त**—स्त्री. (या शब्दसंहतीचा मूळचा फारसी भाषेंतील अर्थ 'त्याच्या जवळ नाहीं.' असा आहे. परंतु बोलतांना पुढील भिन्न अर्थांनीं या शब्दसंहतीचा उपयोग केला जातो) १ (साधारणपणें) नकारदर्शक शब्द; नन्ना. 'पैसा नदारत, खायलाहि नदारत.' २ खर्चून गेलेला; फस्त केलेला; फडशा पाडलेला. 'लांकूड तर नदारद.' -पेद २१.६९. ३ नाहींसा, नष्ट झालेला; गत; लुप्त. ४ न दिलेला; बाकी राहिलेला. 'किल्याचे नदारद फाजील किल्ले यांजकडे शिल्क सव्वातेराशे रुपयें राहिली असे.' -थोमारो १. ३४८. ५ पार फडशा; कुल फडशा; बेबाक करणें. 'नदारदची याद दप्तरची भरण्याची सर्कारचे मोर्तबानसी होती ते मशारनिल्हेनीं दाखविली.' -रा ६.५१८. [फा. नदारद्=त्याच्याजवळ नाहीं]

**नंदाळ**—न. (खा.) स्नानाचें पाणी ठेवण्याचें गंगाळ. [सं. नंदा=ल्हान मडकें+आलय; हिं. नंदोला. किंवा का. नर्ने=न्हाणें+आलय=आळें नंदा-नंदिनी=गंगा+आलय]

**नंदाळ-ळें, नंदाळा-ळी**—नपुस्त्री. (तिरस्कारार्थी) (उप.) ाड व मोठी भाकर.

**नंदाळें**—न. (खा.) खापराची परात.

**नंदिकेश्वर**—पु. शंकराचें वाहन; नंदी. [सं.]

**नंदिनी**—स्त्री. १ कामधेनु; सुरभिकन्या. 'करितां शोध कळे हीं उटजीं सुरधेनु नंदिनी आहे'—मोआदि ३२.९. २ मुलगी; कन्या. 'निरखित जनकाची नंदिनी राघवातें।'—मुरा अयोध्या १२. [सं.]

**नदी**—स्त्री. पाण्याचा मोठा प्रवाह; मोठ्या प्रवाहास, सरोवरास, समुद्रास मिळणारा ओढा. [सं.] **म्ह०** नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ पाहूं नये=केवढीहि मोठी नदी असली तरी तिचा उगम एखाद्या लहानशा ओहोळांत किंवा अतिशय अडचणीच्या, वाईट जागीं असतो. त्याचप्रमाणें एखाद्या परमपूज्य ऋषीचा जन्म अतिशय हीन कुलांतहि असूं शकेल. यावरून पूज्यपणा, पवित्रता हीं पूर्वपरंपरेवर अवलंबून नसतात तर व्यक्तीच्या अंगच्या गुणावर अवलंबून असतात; किंवा मोठ्याचा मागचा इतिहास पाहण्याचा प्रयत्न करूं नये, तो चांगला नसावयाचाच. **०गर्क**—वि. नदीच्या पुरांत, पाण्यांत बुडणारी, बुडालेली (जमीन इ०). —बदलापूर ३६८. [नदी+अर. घर्क़=बुडालेला, मग्न] **०तीर**—न. नदीचा कांठ, किनारा. [नदी+सं. तीर] **०पति, नदीन, नदीप**—पु. नद्यांचा पति; समुद्र; सागर. 'नदिपतिरिपुचा तो तात भंगोनि गेला।' [नदी+पति; नदी+सं. इन=ईश; नदी+सं. पा=पालन, रक्षण करणें] **०बुड**—वि. नदीगर्क पहा. 'परंतु तें रान नदीबुड झालें व कोणी विकत घेतल्यामुळें त्यास कायमचें कुंपण लागलें आहे.'—खेया २. [नदी+बुडणें] **०मातृक**—वि. नद्यांच्या पाण्यानें, कालव्यांनीं सुपीक बनलेला; (पिकाकरितां) पाटस्थळावर अवलंबून असलेला (प्रदेश, देश इ०). याच्या उलट देवमातृक=(पिकाकरितां) पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेला. [नदी+सं. मातृ=आई] **०वड**—पु. यज्ञोपयोगी वृक्ष. उदा० उंबर, पिंपळ, पळस, शमी इ०. यज्ञवृक्ष पहा. [नदी+वड]

**नंदी**—पु. १ शंकराचें वाहन जो बैल तो; हा कामधेनूचा पुत्र असून शिवगणांपैकीं एक आहे; शंकराच्या देवळासमोर, मूर्तीसमोर बसवितात ती दगडाची बैलाची प्रतिमा. २ (ल.) मूर्ख, ठोंब्या, टोणपा मनुष्य; सांभापुढचा. [सं.] **०पुत्र**—पु. (ल.) टोणपा; ठोंब्या; दगडोबा. [नंदी+पुत्र=मुलगा] **०बाळ**—पु १ नंदीबैलाला मिरविणारा व त्याचे खेळ करणारा मनुष्य. २ (ल.) ठोंब्या, दगडोबा, निरक्षर मनुष्य. [नंदी+बाळ] **०बैल**—पु. १ संकेतानें होय नाहीं इ०अर्थानें मान हलविण्यास शिकविलेला व जो वस्त्रलंकार इ०घालून (मालकाच्या) उपजीविकेकरितां घरोघर फिरवितात असा बैल. 'नंदीबैला गुबु गुबु गुबु!' 'आला बग नंदीबैल आइ जाऊं दें। सोड शको. ४. ४८ आतां लवकरि मज मौज पाहुं दे.' २ नंदीबैल फिरवून उपजीविका करणारी जात. 'नंदिबैल, बहुरूपी, भोरपे ... मानभाव इत्यादि भिकारी लोक पांचशेवर आहेत.'—खेया ७२. ३ (ल.) मूर्ख, बेअकली, ठोंब्या मनुष्य. 'तुम्ही व ते मराठे असून त्यांची क्लृप्ति तुम्हास कशी कळली नाहीं यावरून तुम्ही शुद्ध नंदीबैल आहां.'—बाजीराव. 'मी एक शब्द सुद्धां त्या नंदीबैलाजवळ बोलणार नाहीं.'—भयंकरदिव्य.

**नंदी**—पु. अंतःपटावर काढलेलें कुंकवाचें स्वस्तिक; नंद पहा. [सं.] 'नंदीरेखातें लक्षावें।'—दावि. ३३. **नंदीचा पासोडा, शेला**—पु. नंदाचा पासोडा इ० पहा.

**नंदुली**—स्त्री. (तिरस्कारार्थी) नणंद. 'दुष्टवृत्ती नंदुली सदा द्वेष करी। नांदों मी संसारीं कोण्या सुखें।'—तुगा २९५८. नणदुली पहा. 'नंदुले कं कंदुले गांजु नको मला। उद्यां जाशील सासऱ्या तेव्हां तीच गत तुला।'—वऱ्हाड गाणें.

**नंदोई**—पु. (खा.) नणंदेचा नवरा; नणदोई पहा. [नणंद; हिं. नंदोई]

**नंद्या**—पु. नंद; दलाली मिळविणारा; दलाल. [नंद=दलाली]

**नंद्या**—पु. नंदी; बैलोबा; मूर्ख. [नंदी]

**नधाड**—न. (व.) फुटल्यामुळें निरुपयोगी झालेलें भांडें. 'दोन नधडें घरांत होतीं तीं मोडीत दिलीं.' [न+धड]

**न न**—उद्गा. नको! नको! नाहीं नाहीं! नाकारणें; अमान्य करणें; नकार देणें. (क्रि० करणें; सांगणें; म्हणणें; बोलणें).

**ननबटल**—पु. (बे.) एक फुलझाड; तगर; अनंत. [नंदबटला]

**ननाटा, ननाटी-ठी**—पुस्त्री. सर्पाची एक विशिष्ट जात.

**ननिबाळ**—स्त्री. केळीची एक जात. [हिं. नन्हा=लहान+का. बाळे=केळ]

**नन्ना**—पु. नाहीं नाहीं, नको नको म्हणणें. नन पहा. [न, ना नच्या बाराखडींतील पहिलीं दोन अक्षरें] **०चा पाढा**—पु. प्रत्येक गोष्टीला नकार देणें; नाहीं नाहीं म्हणणें. 'नन्नाच्या पाढ्यांचीं पद्यें कोणास पहावयाचीं असतील तर तीं खाडिलकरांचीं पदें पहावीत.'—नाकु ३.३. **०चा पाढा वाचणें**—प्रत्येक गोष्टीला नकारार्थी उत्तर देणें. **०म्हणणें**—हालणें, कांपणें. 'डोळे रुसले कांहि न बघती नन्ना म्हणते मान।'—शारदानाटक.

**न(नु)न्नुबाळ, निन्निबाळ**—पुन. १ लहान मुलास लडिवाळपणानें संबोधण्याचा शब्द. २ (उप.) मोठ्या मुलास उपहासानें लावावयाचा शब्द; कुकुबाळ दोन्ही अर्थी पहा. [हिं. नन्हा=चिमुकला+बाळ]

**नपटा**—स्त्री. वेळूच्या नळींत जाईल असा किंचित आंखूड दांडा करून तिच्या तोंडीं आसाणा इ०कचें फळ घालून आवाज काढावयाचें करितात तें एक यंत्र, बंदुक; फटकफळी; नेपटी.

**नपड**—स्त्री. (राजा.) परस्परांचें न पटणें; बेबनाव; वांकडें· [न+पडणें, पटणें]

**नपतेल**—न. टर्पेटाइन्. नखतेल पहा. [इं. नॅफ्था+तेल]

**नपवणें**—अक्रि. न पावणें; न लाभणें; न पोहोंचणें. 'पडे तर्यी हे नपवे अपाया।' –सारुह १.३०. 'परी शिंकें नपवेसि करीं।' -ह ६.८३. [न+पावणें]

**नपश्चात**—वि. (गो.) नष्ट, धुळधाण झालेलें; ज्याचें नांव सुद्धां उरलें नाहीं असें. [न=नाहीं+सं. पश्चात्=मागें]

**नपश्चातचें**—नक्रि. (गो.) नाहींसें, नष्ट करणें; निर्मूलन करणें; कांही सुद्धां शिल्लक न ठेवणें. [गो. नपश्चात]

**न पुत्रो न पुत्री**—क्रिवि. १ (मुलगा किंवा मुलगी) एखाद्या गोष्टीची संदिग्धता, अनिश्चितता इ०चा वाचक वाक्प्रचार. 'आमच्या कार्याचा निश्चय होत नाहीं; अद्यापि न पुत्रो न पुत्री दिसते.' २ नरो वा कुंजरो वा! संदिग्धपणें. 'न पुत्रो न पुत्री असें सांगावें.' –मदमं ४५.

**नपुश(इय)क**—वि. (प्र.) नपुंसक; नपुंसक पहा. 'गर्भांध आणी नपुश्यक। या नाव आध्यात्मिक।' –दा ३.६.३९.

**नपुंसक**—पुन १ जो स्त्री नव्हे आणि पुरुषहि नाहीं असा मनुष्य; हिजडा; तृतीयप्रकृति; षंढ. २ पराक्रमहीन, गांडु, दुबळा पुरुष. –वि. शब्दांच्या तीन लिंगांपैकीं एक. व्याकरणांतील तृतीय म्हणजे पुल्लिंग व स्त्रीलिंग यांहून भिन्न अशा लिंगाचें. नपुंसकलिंग पहा. [सं.] **नपुंसकाच्या हातीं पद्मीण-रंभा**–उपभोग घेण्यास असमर्थ अशा व्यक्तीच्या हातीं अतिशय सुंदर, बहुमोल अशी वस्तु (पडणें, राहणें इ०); विजोडपणा. **नपुंसकत्व**–न. नपुंसकपणा; संभोगविषयक दुबळेपणा. नपुंसकत्व सात प्रकारचें आहे. –योर २.७१२ **नपुंसकलिंग**–न. ज्या नामेंकरून प्राणिवाचक अथवा अप्राणिवाचक पदार्थांच्या पुरुषत्वाचा अथवा स्त्रीत्वाचा बोध होत नाहीं परंतु जीं सामान्येंकरून सर्व जातीचीं अथवा त्या जातींतील एखाद्या व्यक्तीचीं वाचकें असतात त्यांस अथवा त्यांचें नपुंसकलिंग म्हणतात. जसें:–माणूस, ढोर, कुत्रें, लांकुड, तेल इ० –मराठी भाषेचें व्याकरण २६. [नपुसक+लिंग]

**नपूर**—स्त्री. अपुरेपणा; कमतरता; उणीव; तुटवडा; न्यूनता [न+पुरणें]

**नपेक्षां**—उद्गा. नाहीं पेक्षां; नाहीं तर. 'गोविंदा आला तर बरें नपेक्षां तूं निघून जा.' –भाअ १८३४. [अनपेक्षां=नपेक्षां– –राजवाडे भाअ १८३४. न+पक्षीं ?; अनपेक्ष्य]

**नप्ता**—पु. नातू. [सं. नप्तृ]

**नप्त्री**—स्त्री. नात. [सं.]

**नप्पस**—वि. (ना.) नपुंसक; षंढ; शेळपट. [नपुंसक]

**नफख**—पु. घोड्याच्या पायास टांचेजवळ होणारा एक रोग. –अश्वप २.२८२. [अर. नफीस=नाजुक]

**नफतेल**—न. नखतेल, नपतेल पहा. 'दगडी कोळसा, नफतेल शिलाजित वगैरे पदार्थ तिसऱ्या वर्गांत मोडतात.' –मराठी सहावें पुस्तक पृ. ११३. (१८७५)

**नफब**—न. (ना.) चोरानें पाडलेलें भगदाड.

**नफर**—पु. १ घोड्याची चाकरी इ० हलकीं कामें करण्यासाठीं ठेविलेला नोकर, सेवक, गडी. 'सर्वस्व घ्यावया सवचोरू। सवें धांवे होऊनि नफरू। तैसा रजोगुणाचा विचारू। कामना संसारू वाढवी।' –एभा १३.१३६. –घाको ६९. 'हिलालखोर साहेबाचा नफर आहे इतबाराचा। मज रातीं जागावयाचा। हुदा दिधला जी।' –समर्थकृत दिवटा ३. २ व्यक्ति; जण; इसम. 'नफर मज्कूर हुजूर आल्यावर जें द्यावयाचें तें पावेल.' –रा ३. ३८७. 'अभयपत्र नफर मज्कुराचे नांवें दिलें असे.' –बाडबाबा २.३७. ३ डाग; नग. 'दर नफरास एकेक रुपया दिला.' ४ उंट; उंटाची संख्या लिहावयाची असतां संख्यावाचकांपूर्वी योजावयाचा शब्द. 'उण्ट नफर पंचवीस.' –पया ३. 'चार उंट नफर मयत जाहाले.' –थोमारो १.१८. ५ उंटावरील कर. 'उंटाला नफर, बैलाला सर ...... (कर या अर्थी) शब्द उपयोजिला जातो.' बदलापूर ३६३. [अर. नफर्] **०गत**–क्रिवि. इसमवार. 'कीर्द खतावणी नफरगत सबनिसांनीं घालावी.' –वाडबाबा १. १८१. [नफर्+सं. गत] **नफराई**–स्त्री. हलकी चाकरी; सेवा. 'लेकराचे लेकरीं पटेलगी खाऊन दिवाण–नफराई करून सुखी असो.' –मकुइ ३.२५. [नफर]

**नफरी**—स्त्री. हलकी सेवा, चाकरी. 'साहेबीं आपणास हातीं धरून पांढरीवरी बैसवून आपल्या हातें नफरी घेतली पाहिजे.' –वाडसनदा १८४. -वि. मोलाची; भाडोत्री; टाक भाड्याची. 'लश्करचाकरी नफरी, काम मनाजोगें होणार नाहीं. याजकरितां जावें तरी खांसा लश्कर घेऊन जावें.' –वाड–सनदा १८४. [नफर]

**नफा-फ्फा**—पु. १ व्यापार, दुकानदारी इ० व्यवहारांत खर्चवेंच फिटून व्याजमुद्दलासुद्धां ऐवज उगवून वर जो पैसा मिळतो तो; किफायत; फायदा. २ (ल.) फायदा; लाभ; प्राप्ति. 'व्यर्थ श्रम केल्यांत काय नफा आहे.' [अर. नफ्अ] **नफेची, नफ्याची बाब**–स्त्री. १ किफायत राहून विकली जाईल अशी जिन्नस; भारी, मौल्यवान जिन्नस. २ (ल.) जेणेंकरून फायदा होईल अशी गोष्ट; हिताची, कल्याणाची गोष्ट, उपदेश. ३ स्वभावतःच भारी असलेली वस्तु; जसें:–सोनें इ०; टिकाऊ, नाश न पावणारी वस्तु. सामाशब्द– **०तोटा**–पु. १ (अंकगणित) नफा आणि तोटा. २ खरेदीविक्रींतील नफा व तोटा या दोन बाबींवर

उभारलेलें अंकगणितांतील एक प्रकरण. [ नफा+तोटा ] ०नुक-सान–न. फायदा व तोटा. ( क्रि० पाहणें; समजणें; आकारणें; अजमावणें ). [ नफा+नुकसान ] नफेबाज–वि. कुशलतेनें शक्य तेवढा नफा उकळणारा. [ फा. ] नफेबाजी–स्त्री. नफेबाजपणा; मिळेल तेवढा ज्यास्त नफा मिळविण्याची लागलेली खोड. [नफे बाज ]. नफेवारी–क्रिवि. लाभावारी; नफा म्हणून; काढेवारी; काढयावारी; वर; आणखी. [ नफा ] नफेशीर–वि. फायदेशीर. [ नफा ]

**नफांत**—क्रिवि. ( गो. ) झुंजुमुंजु वेळीं; पहांटेस.

**नफी**—स्त्री. बडतर्फी. ' यामुळें शंकरराव यांजवर दौलाची मर्जी खफा होऊन तालुक्यांची नफी करविली. ' –रा ७.७२. [ अर. नफी ]

**नफेरी**—स्त्री. एक प्रकारचें वाद्य; एक प्रकारची तुतारी. ' सनया नफेरिया बुरंगें। ' –मुवन १२ ५९. ' कर्णे नफेऱ्या हत्ती घोडे। ' –वेसीस्व ३.५६. ' काहळा नफेरी वाजंत्री। ' –दावि ६९. [ फा. नफीर् ]

**नफ्फर**—पु. ( कर. ) उंट. ' नफ्फर खात्याला चार रुपये खर्च टाका. ' [ नफर पहा. ] ०खाना–पु. उष्ट्र खाना.

**नबदा**—पु. दरमहा पगारापैकीं कापून ठेवलेली रक्कम. ' बार-माही चाकरी, दसमाही कबज, रोजमरा व नबदे किल्ले मजकूरचे शिरस्तेप्रमाणें हजिरी गैरहजिरी मनास आणून कबज करून पाव-वीत जाणें.' –थोमारो १.३५८. [ फा. नेबाद ? ]

**नंबदा**—पु. ( प्र. ) नमदा. नमदा पहा.

**नंबर**—पु. १ अनुक्रमांक; अनुक्रम. २ संख्या. ३ शेत; शेताचा अनुक्रमांक; सर्व्हे नंबर. ४ ( चांभारी ) चपला इ० कांवर आकारमानदर्शक अनुक्रम; आंकडा मारण्याचें हत्यार. [ इं. ](वाप्र.) ०मारणें–आंकडे टाकणें; अनुक्रमांक घालणें. ०येणें–पाळी येणें; वेळ येणें. नंबरी माल–पु खरा माल, शिक्केमोर्तब असणारा माल. शंभर नंबरी सोनें–अगदीं उत्कृष्ट, पहिल्या प्रतीचें सोनें. सामाशब्द– ०छपाई–स्त्री. ( घोडे, झाडें इ०कांवर ) नंबर टाकणें; छापणें. [ नंबर+छपाई ] ०दार–पु. १ ( ना. ) शेताचा मालक. २ सरकारशीं पैशाच्या बाबतींत देवघेव करणारा. ०वार–क्रिवि. ( ना. ) अनुक्रमानें; नंबराप्रमाणें. [ इं. नंबर+वार=प्र. प्रमाणें ] ०वार खर्डा–पु. गांवच्या तलाठयानें गांवच्या शेतांची त्यांच्या अनुक्रमानें केलेली यादी, प्रत, त्यांतील पीक इ० तपशिलाचा तक्ता. [ नंबरवार+खर्डा=हिशेबाचा तक्ता ]

**नबळा**—वि. नेभळा; दुबळा; निर्बल. [ सं. निर्बल; गु. नबळुं ]

**नबा(वा)ब**—पु. १ मुसलमानी राजा; संस्थानिक. २ मोठा श्रीमंत माणूसः बडा उमराव. [ अर. नुवाब, नव्वाब् ] –बी अंमलदार–पु. बडा अंमलदार; मोठा अधिकारी नोकरशाहींपैकीं प्रत्येक. ' अलीकडे रेव्हिन्यू खात्यांतील नबाबी अंमलदारांस असें वाटूं लागलें कीं... ' –टि १ १.४१८.

**नबाबात**—स्त्री. १ वजिरी. ' सादत कुलीखानास नबाबात सांगितली. ' –ब्रप ६६. २ नबाबाची पदवी, अधिकार; मोठेपणा. [ अर. नूबाब ]

**नबाश**—पु. मृताचीं थडगीं उकरून तेथील अलंकार आण-णारा माणूस. [ अर. ]

**नबी**—पु. भविष्यज्ञ; ज्योतिषी. [ अर. नबी ]

**नंबुद्री, नंबु(बू)री**—पु. मलबारांतील एक उच्च ब्राह्मण जात व तींतील व्यक्ति.

**न बोलणें**—न. अनिर्वचनीय वस्तु ( ब्रह्म ). ' तिणें बोल बोलणें मोडिलें। समूळ मौनातें तोडिलें। त्यावरी निरूपण घडलें। न बोलणें बोलें बोलवी। ' –एभा १.२९. [ न+बोलणें ]

**नभ**—पुन. १ आकाश; अंतराळ; अस्मान. –ज्ञा १४.९. ' नादें कोंदलें अंबर। शब्दाकार नभ झालें। ' –एरुस्व ६.२९५. २मेघ; ढग. [ सं. नभस् ] ०कट–न. अभ्रखंड; लहान ढग. ' नभ-कटें धुकटें कट पाभळी। ' –दावि ८६. ०चुंबित–वि. गगनचुंबित; आकाशाला भिडणारा; अत्यंत उंच. [नभ+सं. चुंबित] नभस्तल–न. आकाश. [सं. नभस्+तल=तळ] नभ(नभो)मंडप–पु. (काव्य) आकाशरूपी मंडप. ' नभमंडप तेणें उजळला। ' [ नभस्+मंडप ] नभोमंडल–न. ( काव्य. ) ज्यांत मेघ संचार करितात तो अंत-राळाचा भाग; आकाश. ' होमधूमशामळें। जालें नभोमंडल काळें।' [ स. नभस्+मंडल ] नभोवाणी–स्त्री. आकाशवाणी. 'ऐसें वदोनि उठली जाया तों जाहली नभोवाणी। दुष्यंता काय करिसि समजावी आपुली सती राणी। ' –मोआदि ११.७९. [ सं. नभस्+वाणी=बोलणें ]

**नभर**—स्त्री. ( गो. ) तूट; नपूर. [ न+भरणें ? ]

**नभवति नभवति, नभोति नभोति**—वि. ( अशिष्ट ) नभूतो न भविष्यति या अर्थी चुकीनें रूढ.

**न भूतो न भविष्यति**—वि. पूर्वीं कधीं झाला नाहीं व पुढें कधीं होणार नाहीं असा; अलौकिक. ' परी वाल्मिकासारिखा कवेश्वर। न भूतो न भविष्यति। ' –दा १६.१.७. ' तेव्हां संग्राम झाला निगुता । न भूतो न भविष्यति। ' –जै ८२.३३. [ सं. न=नाहीं+भूतः=झाला+न=नाहीं+भविष्यति=होईल ]

**नम**—पु. १ वांकणें; नमणें; नम्र होणें. २ पडतें घेणें. ( क्रि० खाणें; घेणें; येणें; जाणें ). ३ उतार. ' अशा प्रकारच्या पटाईत तुळईच्या २० फूट लांबीस तीनचतुर्थांश इंच या मानानें नम यावा. ' –मॅरट ६०. –वि. ( खा. ) कमी; कमती. [ नमणें=नम-स्कार करणें; वांकणें ]

**नॅम**—स्त्री. ( गो. ) नवमी.

**नमक**—न. मीठ; निमक पहा. [ फा. हिं. नमक; ]

**नमःकार**—पु. अग्नींत आहुति टाकतांना नमः म्हणून केलेला उच्चार. ' नमःकारेंसी अवदान । मंत्रोच्चारें टाकीत। ' [ नमः+कार ]

**नमणें**—उक्रि. १ वांकणें; लवणें; वांकविलें, मुरडिलें जाणें ( लांकूड इ० ). २ नम्र होणें; वंदन करणें. ' तें मिया श्रीगुरु कृपा नमिलें। आदिबीज ।' –ज्ञा १.२०. ३ ( एखाद्यापुढें ) मान वांकविणें; हात जोडणें; हार जाणें; शरण येणें; पड खाणें. ४ ( गर्व, राग, संताप, रोग इ० ) शांत होणें; कमी होणें; ओसरणें. [ सं. नम् ]

**नमता**—वि. वांकणारा; कमी, शांत झालेला; पडता. [नमणें] **नमतें घेणें** -पड, माघार घेणें; आपला हेका कमी करणें.

**नमदा, नम्दा**—पु. १ खळींत, डिकांत लोंकरीचा लगदा करून लादून, दाबून केलेलें जाड कापड; जाड बुर्णूस; ( इं. ) फेल्ट. २ काथ्या, जाडी लोंकर इ० भरून केलेली गादी; पायपुसणें. ' सतरंजीची पट्टी टाकावी व त्यापुढें दोन नमदे टाकून प्रवेशद्वारास मच्छरचा पडदा लावावा। ' –ऐरापुप्र ११.६०३. ३ घोडा, हत्ती इ०कांच्या खोगिराखालील जाड बुर्णुसाची गादी. [ फा. नमद् ]

**नमन**—न. १ वंदन; नमस्कार. २ लवणें; वांकणें; नम्र होणें. ३ कीर्तन, पुराण इ०कांच्या आरंभीं ईश्वरस्तुतीपर श्लोक इ० म्हणण्याची क्रिया;तमाशा, लावण्या इ०च्या आरंभीं करण्यांत येणारें वंदन. ४ (ल.) आरंभ; सुरुवात; प्रस्तावना. [ सं. ] **०करणें–लावणें**-(सामा. ) ( एखाद्या कामाचा ) आरंभ करणें. **०होणें, लावणें**-( एखादें कार्य ) आरंभिलें जाणें. **नमनांत घडाभर तेल जाळणें**-( एखाद्या कार्याच्या ) आरंभालाच जास्त वेळ, पैसा खर्च करणें.

**नमविणें**—सक्रि. १ वांकविणें; लवविणें. २ नम्र करणें; शरण येण्यास, हात जोडण्यास लावणें; जिंकणें; वठणीस आणणें. [नमणें]

**नमश्री**—स्त्री. ( गो. ) सुरवात; प्रारंभ. [ सं. नमः+श्री ]

**नमस**—स्त्री. १ ( कु. गो. ) देवालयांतील मूर्तीचा नैवेद्य इ० कांचा खर्च करितां यावा म्हणून देवालयाला इनाम दिलेली जमीन. २ ( गो. ) शिपाई लोकांची वतनवाडी.

**नमसि(स्यि)त**—वि. नमस्कार इ० कांनीं पुजिलेला.

**नमस्करणें**—सक्रि. (महानु.) नमणें; नमस्कार करणें; वंदणें. ' ते नमस्करूं अमृत संजीवनी। श्रीदेववाणी। ' –ऋ १. [ सं. नमन्+कृ ]

**नमस्कार, नमस्या**—पुस्त्री. १ हात जोडून व डोकें लववून करतात तें वंदन; ( सामा. ) अभिवादन; नमन. (क्रि० करणें, घालणें ). २ ब्राह्मण परस्पर सत्कारार्थ हात जोडणें इ० युक्त करितात ती क्रिया. [ सं. नमस्+कार ] **०करणें**-( ल. ) सोडून देणें; त्याग करणें; रजा घेणें; रामराम ठोकणें. ' म्यां आजि पासुनि शपथ करुनि नमस्कार सच्छला केला। ' –मोवन ८.३६. ( एखाद्यास) **नमस्कार असो**-( एखाद्या ) नांवहि घेणें नको.

**नमस्कारणें**—उक्रि. नमस्कार करणें; वंदणें; नमन करणें. ' तया परमपुरुषालागीं। अष्टौ भावाच्या अष्टांगीं। नमस्कारोनि मग प्रत्यंगीं। सेवा संतोषें निवेदी। ' –मुआदि १.६. [नमस्कार] **नमस्कारित, नमस्कृत**-वि. नमस्कार केला गेलेला; वंदिलेला. [ सं. ] **नमस्कार्य, नमस्य**-वि. नमस्कार करण्यास योग्य; वंदनीय; वंद्य; पूज्य. [ सं. ]

**नमस्ते**—१ तुला नमस्कार असो या अर्थाचें संस्कृत वाक्य. ' नमस्ते प्रभो क्षेमयात्रे नमस्ते । ' २ ( संघव्यायामांतील ) नमस्कार करण्याची क्रिया; तीबद्दलचा हुकूम. –संव्या ३९. [ सं. नमः=नमस्कार असो+सं. ते=तुला ]

**नमाज**—स्त्री. १ मुसलमानांची ईश्वरप्रार्थना; निमाज. ( क्रि० पढणें; करणें ). २ ( ल. ) अंगलट आलेली, गळयांत पडलेली एखादी अनिष्ट गोष्ट; लचांड; लिगाड; ब्याद; भार, संकट वाटण्यासारखें जनावर इ० (क्रि० पडणें; घालणें). 'ती मामलत आणि पांच घोडे ह्या दोन नमाजी गळयांत पडतांच दिवाळें वाजलें.' [ फा. नमाझ् ] **म्ह०** ( मुसलमानांत रूढ ) नमाज करायला गेलों आणि गळयांत मशीद आली=चांगली गोष्ट करायला गेलों पण माझ्यावर अनिष्ट ओढवलें. **०बंद**–पु. (मल्लविद्या) कुस्तींतील एक डाव ( नमाजाच्या बैठकीप्रमाणें हा डाव बांधावयाचा असतो म्हणून हें नांव रूढ. मौलाअली प्रतिपक्ष्याबरोबर कुस्ती खेळत असतां नमाजाची वेळ झाली म्हणून हा डाव घालून नमाज पढले अशीहि यासंबंधीं आख्यायिका आहे).जोडीदाराच्या आपल्याकडील हाताचें मनगट धरून त्या हातावरून आपला पाय घालून आपल्या दुसऱ्या मांडीच्या जांघाडांत तोच हात धरून व जोडीदाराच्या हातांत घातलेला आपला गुडघा जमीनीवर टेकून जोडीदारास या डावानें चीत करितां येतें. [ नमाज+बंद ]

**नमान**—न. ( कु. ) चोख उत्तर.

**नमार**—वि. (बडोदें) तांदुळाची एक वन्य जात. 'ऋषीधान्य–सांवा व नमार या दोन जातीचे तांदूळ... ' –ऐरा १४४. [ सं. नीवार ]

**नमासक**—क्रिवि. ( बागलाणी ) त्या ठिकाणीं.

**नमिणें**—उक्रि. ( महानु. ) नमस्कार करणें; नमणें पहा. 'तो ईश्वरादिचरणकमळीं। नमिनु नागार्ज्जुनु । ' –शिशु ६. [ नमणें ]

**नमित**—वि. वंदिलेला; नमस्कार केलेला. [ सं. ]

**नमिता**—वि. नमस्कार करणारा. ' ऐशिया जी गणनाथा। मीपणें कैंचा नमिता। अकर्ताचि जाहला कर्ता। ग्रंथविस्तारा। ' –एभा १.१६. [ नमणें ]

**नमुद**—स्त्री. दर्शन; मुकाबला. ' उद्यापासून दोन हजार फौज मोंगलाच्या नमुदास प्रातःकालीच पाठवीत जावी. ' –पेद ७७. [फा. नमूद]

**नमुदी**—स्त्री. रोख. 'ज्याजवर नमुदी असेल त्यास शामील होऊन त्याचा बचाव करावा. ' –रा ७.९. [फा. नमूद्]

**नमु(मो)ना**—पु. १ नकाशा; आराखडा. २ मासला; आदर्श; उदाहरण. ३ नक्कल; प्रतिमा. ४ प्रकार; तऱ्हा. [फा. नमूना]

**नमूजी**—पु. ज्योतिषी. नजूम पहा. [फा. नुजूम्]

**नमू(मो)द**—पुस्त्री. प्रसिद्धि; जाहिराणा; प्रख्याति. ' स्वामी ज्यास हातीं धरितील त्यांस नमुदांत आणितील. ' –रा १.१५४. ' आतां निश्चयच जाहला कीं इंग्रजांचे नमुदीस बाकी राहिली नाहीं. ' –ख ८.४३५३. –वि. १ ( सरकारी कचेऱ्यांतून, कागदपत्रांतून रूढ ) निर्दिष्ट केलेली; नोंदलेली; दाखल केलेली; रुजु. २ (ल.) मुकर; निश्चित. ' सदर प्रमाणें न झाल्यास लढाई नमूद आहे. ' –इनाम १४४. ३ प्रसिद्ध; प्रख्यात. ' दौलतीस धक्का बसलियावर प्रस्तुत दुन्याईत नमूद तुम्ही व्हाल. ' –रा ५.१९. ४ देखणा; सुरेख; भव्य; थाटमाटाचा. ५ राजी; कबूल; तयार. 'मी त्याला नमूद आहे. ' [फा. नमूद्]

**नमो**—उद्गा. नमस्कार. ' ॐ नमो जी आद्या । ' –ज्ञा १.१. **०नमः**–अ. नमस्कार असो, नमन करतों या अर्थी संस्कृत अव्यय. [सं. नमः] **०नमो**–स्त्री. नमस्कार; वंदन; अभिवंदन (क्रि० करणें). [सं. नमः द्वि] **०नमो करणें**–(एखाद्याबद्दल) अतिशय आदर, भीड दाखविणें, राखणें. **०नारायण**–उद्गा. गोसावी लोकांनीं परस्परांना नमस्कार करतांना, इतरांनीं गोसाव्यांस नमस्कार करतांना उच्चारावयाचे शब्द; (प्र.) नमोनारायणाय. [सं नमः=नमस्कार+सं. नारायणाय=नारायणाला] **नमोस्तु**–१ नमस्कार असो या अर्थी योजावयाचे संस्कृत शब्द. ' जलमय तीर्थेंहि तशीं संतचि फलती नमोस्तु ते म्हणतां । ' –कीर्तन १.४. २ (व.) परस्परांस नमस्कार करतांना महार लोक योजितात तो शब्द. [सं. नमः+अस्तु=असो]

**नमोदा**—पु. आंखणी; आराखडा; नमुना; नमूद. ' जैसा जैसा जेथ कायदा । जैसी जैसी जेथ मर्यादा । त्या प्रमाणे कामाचा नमोदा करिती ग्रामस्थ । '–पैमा. [नमूद]

**नम्दा**—पु. लोकरीचें जाड बुरुंस. नमदा पहा. 'हत्तीचे गाशे व नम्दे व भार्केस वगैरे आहे नाहीं पाहोन नवें तयार करावें. ' –ख ७.३३४७ [फा. नमद्]

**नम्र**—वि. १ (भार, ओझें इ० कार्नी) वांकलेला, लवलेला. ' तरुवर सुफलांच्या आगमीं नम्र होती । ' –वृक्षान्योक्ति, कृष्णशास्त्री चिपळुणकर. २ विनयशील; लीन; आज्ञाधारक. [सं.] **नम्रता**–स्त्री. विनय; लीनता. [सं.] **नम्रतु**–स्त्री. (महानु) नम्रता. ' तरूंची देखौनि नम्रतु । ' –दाव १२८. **नम्रबुद्धि**–स्त्री, विनयशीलता; लीनपणा; मनाचा सौम्यपणा; गरीबपण. –वि. विनयशील; लीन; सौम्य स्वभावाचा; आज्ञाधारक. [नम्र+बुद्धि=मन] **नम्राय**–स्त्री. (गो) नम्रता; विनय. [नम्राई]

**नय**—स्त्री. (चि. कों. राजा) नदी; नई पहा. ' गुरुवश नसतों तरि अरिरुधिराच्या कां विनिर्मितों न नया । ' –मोसभा ६.९. ' यांच्या क्रिया विलोकुनि. म्हणतिल पंकप्रसुति हाय नया । ' –मोआश्रम ३.६७. [सं. नद, नदी]

**नय**—पु. १ नीति–न्यायशास्त्र; नीति; न्याय; सन्मार्ग; सच्चेपणा. २ मार्गदर्शकत्व; पुढारीपण; नेतृत्व. ३ राजनीति; राज्यकारभार; (संस्था, राज्य इ०कांचें) अनुशासन. [सं. नी–नय]

**नयन**—न. नेणें; वाट दाखविणें; मार्गदर्शक होणें. [सं. नी]

**नयन**—पुन. डोळा; पाहण्याचें इंद्रिय; दृष्टि. [सं.] **नयनीं–नयनांतें उदक येणें**–डोळयांत अश्रू उभे राहणें; अश्रूंनीं डोळे भरून येणें. 'दर्भनिर्मित नया शयनातें । देखतां उदक ये नयनातें । ' –वामन भरतभाव ५१. सामाशब्द–**०पट्टा**–पु. नेत्रकटाक्ष. ' फिरवी गर र र र र र र र र नयन पट्टा दुधारी । ' –नामना ७९. **०बेटी**–स्त्री. डोळयांतील बाहुली. –देवनाथ. **०सुख**–न. डोळयाचें, दृष्टीचें सुख; नयनानंद. [नयन+सुख] **नयनोपांत**–पु. डोळयाच्या बाहेरच्या अंगचा कोन; नेत्रप्रांत; अपांग. [नयन+सं. उपांत]

**नया**—स्त्री. (हेट. नाविक) काठीच्या व कलमीच्या दोऱ्या लावण्यासाठीं असलेली गलबताच्या बाहेरील दांडी.

**नयायिक**— वि. (प्र.) नैय्यायिक पहा. [नैय्यायिक अप.]

**नये**—क्रि. एखाद्या अप्रासंगिक अनिष्ट क्रियेचा सौम्यपणानें निषेध कर्तव्य असतां धातूच्या तां अथवा ऊं प्रत्ययांत रूपापुढें योजावयाचें निषेधार्थी क्रियापद. जसें:–त्यानें हें काम करतां नये, करूं नये. याचें नयेत असें अनेकवचनाचें रूप होतें व तें सकर्मक क्रियापदासह योजिलें तर कर्माप्रमाणें व अकर्मक क्रियापदासह योजिल्यास कर्त्याप्रमाणें फिरतें. जसें:– त्यानें हे आंबे खाऊं नयेत; त्या बायका येथें बसूं नयेत. पण पुष्कळ वेळां नयेत या बहुवचनी रूपाकडे दुर्लक्ष करण्यांत येतें व नये असेंच रूप योजिलें जातें. नये पूर्वी योजावयाच्या ' तां ' व ' ऊं ' प्रत्ययांत धातुसाधिताविषयीं इतकेंच सांगता येईल कीं त्या दोहोंत फारच थोडा फरक आहे व जेथें एखादी क्रिया लाभकारक, फायद्याची नाहीं म्हणून तिचा निषेध करणें असेल तेथें ' तां ' प्रत्ययांत रूप योजावें, व क्रिया अयोग्य, चूक असल्यामुळें निषेध कर्तव्य असल्यास ' ऊं ' प्रत्ययांत धातुसाधित योजावें. शिवाय ' तां ' प्रत्ययांत धातुसाधितास म्यां, मला, त्वां, तुला, त्यानें, त्याला इ० कर्त्याची अपेक्षा असते, तर ' ऊं ' प्रत्ययांताला म्यां, त्वां, त्यानें इ०. तृतीयांत कर्त्याचीच अपेक्षा असते. [न+येणें]

**नय्या**—पु (कर.) (गंजिफा-पत्त्यांचा खेळ). नऊ ठिपक्यांचें पान; नव्व्या. [ नऊ ]

**नर**—पु. १ मनुष्य. २ (माणूस, जनावर, पक्षी इ०तील) पुरुष; पुरुषजात; सर्वजातीय पुरुष व्यक्तिमात्र. ३ (तुंबजोड इ०) जोडीच्या पदार्थांतील मोठा पदार्थ. ४ अर्जुन. 'वत्सांच्या बहु शोकीं कृष्णा बुडतां तिला म्हणे नर तो।' -मोमंभा १.१६. ५ पुराणपुरुष; आदिपुरुष; परमपुरुष. ६ घोडा. 'कोतल नर कोतवाल वारण मगनमस्त किल करित।' -ऐपो २००. ७ (ल.) मळसूत्री खिळा; दाराच्या झडपांनां असलेल्या लोखंडी पट्टींत-मादींत बसणारा चवकटीचा खिळा. ८ (ल.) उंसाच्या चरकांतील तीन लाटांपैकीं मधली किंवा दोन लाटांतील उजवी लाट; नवरा ९ वुद्धिबळांतील सोंगटी. १० (मुद्रण) (ल.) टंकक्रुतींत पोलादी खिळयावर घासून तयार केलेला ठसा; इं. पंच्; याच्या उलट मादी=मेट्रिस. ११ मोती डोळयासमोर धरल्यास आंतील बाजूस चिरल्यासारखी दिसणारी रेघ; करवा पहा. १२ अंकुर; कोंब. -शे ३.६. १३ (कु.) वाशांतील, वाळलेल्या कळकांतील उभा घट्ट तंतु. १४ नखाच्या मुळावरचें उचकटलेलें कातडें. १५ (ज्यो.) उन्नतांश ज्या. [सं. नर=पुरुष, मनुष्य; फा. नर् ] (वाप्र.) **०मोडून नारायण घडणें**-(एखादी वस्तु इ०) घडणें व मोडणें व पुन्हां घडणें; त्याच त्याच गोष्टीची घडामोड करणें. **नराचा आंख**-पु. (बिडाचा कारखाना) उंसाच्या चरकाच्या मधली वृत्तचिती किंवा नर बसविण्यासाठीं त्याच्या मधोमध असलेल्या भोंकांत बसविण्याचा आंख. **नराचें चाक**-न. (बिडाचा कारखाना) चरकांतील वरची पाटली आणि मधली वृत्तचिती यांच्या दरम्यान बसविण्याचें दंतुर चाक. **नरो वा कुंजरो वा**-(अश्वत्थामा या नांवाचा मनुष्य कीं हत्ती युद्धांत मारला गेला हें मला माहीत नाहीं अशा प्रकारचें गुळमुळीत उत्तर धर्मराजानें द्रोणाचार्यास देऊन त्यास चकविलें त्यावरून) एखाद्या गोष्टीविषयीं पूर्ण अज्ञान, औदासिन्य इ० दर्शविण्याकरितां दिलेलें संदिग्ध उत्तर; कानावर हात ठेवणें; माहीत नाही असें दाखविणें. **म्ह०** १ नरा हराहुन्नरा=मनुष्याला हजारों धंदे व क्लृप्त्या करतां येण्यासारख्या आहेत. २.(हिंदी) नर करे तो नरका नारायण होजाय= मनुष्यानें मनावर घेतलें तर तो वाटेल तें कार्य करूं शकेल, किंबहुना तो ईश्वरहि बनूं शकेल. सामाशब्द-**०कपाल**-न. (मृत) माणसाच्या डोक्याची अस्थिमात्रावशिष्ट कवटी. [सं. नर+सं. कपाल=कवटी] **०कुंजर**-पु. १ गणपति; गजानन; गजवदन. 'ते कंबल आणि अश्वतर। त्याहीं हृदयीं चिंतिला नरकुंजर।' -कथा ५.६.१२४. २ नरश्रेष्ठ; मनुष्यांत श्रेष्ठ; नरवर. [सं. नर+ कुंजर=हत्ती] **०केसरी**-पु. १ नरसिंह. २ सिंहाप्रमाणें शूर मनुष्य; नरश्रेष्ठ. [सं. नर+केसरिन्=सिंह] **०जन्म**-पु. मनुष्ययोनि; मनुष्याचा जन्म. 'नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी।' -राला ८७. [नर+जन्म] **०तनु**-स्त्री. मनुष्यदेह. 'दैवें नरतनु सांपडली मूढा कशि तुज भुल पडली' -शिवदिन केसरी (नवनीत पृ. ४४६) [नर+सं. तनु=देह] **०तबेला**-पु. (व.) फक्त, पुष्कळ पुरुषच राहतात अशी जागा; पुरुषांचें वठार. [नर+फा. हिं. तबेला] **०तुरंगम**-पु. (ज्यो.) एक नक्षत्रपुंज. 'सप्तर्षि, ध्रुवमत्स्य, ययाति, नरतुरंगम वगैरे राशींची ओळख मुलांना करून देतां येईल.' -अध्यापन २००. [नर+ सं. तुरंगम=घोडा] **०त्व**-न. पौरुषत्व. 'नराच्या ठायीं नरत्व। अहंभाविये सत्व।' -ज्ञा ७.३५. **०देव-पति**-पु. मनुष्यरूपांतील देव; राजा; नृपति. 'कां तया नरदेव म्हणो नये।' -दावि ३०५. [नर+सं. देव, पति] **०देह**-पु. नरजन्म; मनुष्याचें रूप. नरतनु पहा. 'नरदेह वायां जाय। सेवीं सद्गुरूचे पाय।' -तुगा ४४९७. [नर+देह] **०नारायण**-पुअव. विष्णूच्या अंशापासून उत्पन्न झालेले दोन प्राचीन ऋषी. यांचेच अवतार पुढें अर्जुन व श्रीकृष्ण हे झाले अशी पुराणांतरीं कथा आहे.-शर. अर्जुन व श्रीकृष्ण. 'नरनारायण सेनानी, ज्या जगतीं जोड दिसेना।' -विक ७४. [नर=अर्जुन+नारायण=श्रीकृष्ण] **०पट्टी, पाटी**-स्त्री. आटे पाडावयाची वस्तु घट्ट धरणारें यंत्र. यांत दोन बाजूस हात व मध्यें चपटा भाग असतो. चपटया भागांत निरनिराळया आकारमानांचीं भोंकें असतात. [नर(=नर अर्थ ७ पहा)+ पट्टी, पाटी] **०पति**-पु. १ राजा. २ पायदळांतील सैनिकांचा मुख्य. -हंको. [नर+पति] **०पशु**-पु. (निंदार्थी) पशूप्रमाणें वर्तन करणारा; मूर्ख व अधर्मी मनुष्य; दांडगा व निर्दय मनुष्य; नराधम. [नर+पशु] **०पातें**-न. नखें काढण्याचें यंत्र; नराणी. **०बलि**-पु. १ यज्ञांत बलि द्यावयाचा मनुष्य. २ ज्यांत मनुष्यास बळी देतात तो यज्ञ; नरमेध. [नर+सं. बलि=आहुति] **०भू**-स्त्री. प्राचीन काळीं हिंदूंना माहीत असलेल्या जगाचा मध्यभाग; मध्यवर्ती देश; भरतखंड. [नर+सं. भू=जमीन, पृथ्वी] **०मादी**-स्त्री. १ जोडीच्या दोन पदार्थांतील (युग्मांतील) पुरुष व स्त्री. उदा० पायांत घालावयाचे जोडे, बूट, अंगरख्याच्या बाह्या, उंसाच्या चरकांतील लाटा इ०. यांपैकीं नर मोठा असतो व मादी नरापेक्षां किंचित् लहान असते; दोन वस्तू मिळून होणाऱ्या पदार्थांपैकीं नर हा भारी असून मादींत शिरणारा असतो. उदा० बिजागरीचा खिळा, कुरडईच्या सोऱ्यांतील दट्टया इ०. २ जोडीच्या दोन पदार्थांतील स्त्रीपुरुषसंबंध; लहानमोठेपणा. ३ (व्यापक) (दोन पदार्थ, व्यक्ति इ० कांतील) श्रेष्ठकनिष्ठभाव; तरतमभाव; बरेवाईटपणा; उजवा-डावा प्रकार. 'मोत्यांत नरमादी असतच आहे.' ४ उंसाच्या चरकांतील लाटा. ५ बिजागरी. ६ एक प्रकारचें कुलूप. [नर+मादी; फा. नर्मादा] **०मेध**-

पु. मनुष्ययज्ञ; ज्यांत नरबली देतात तो यज्ञ. 'युद्धांत पराभव होऊं नये म्हणून प्राचीन ग्रीक, गॉल, सेमाईट व हिंदु लोक नरमेध करीत असत.' –ज्ञाको न २६. [नर+सं. मेध=यज्ञ] **०यान**–न. मनुष्यांनीं वाहून नेण्याचें वाहन, बसून जाण्याचें साधन. उदा० पालखी, मेणा, डोली, रिक्षा इ०. 'अश्वगजादि आरोहण। शेषशयन गरुडासन। महामहोत्सव नरयान। रथोत्सव जाण करावा।' –एभा २९.२६०. [नर+सं. यान=वहन, वाहन] **०योनि**–स्त्री. नरजन्म; मनुष्ययोनि. [नर+सं. योनि=जन्म] **०लवंग**–स्त्री. लवंगांची एक जात. –मुंव्या १५०. **०वर**–वि. नरश्रेष्ठ; थोर; उदार (मनुष्य). 'नरवर कृष्णासमान।' –स्वयंवर नाटक. [नर+ सं. वर=श्रेष्ठ] **०वाहन**–न. नरयान पहा. [नर+सं. वाहन] **०सिंह, नरश, नरशि(सि)य**–पु. १ विष्णूचा चवथा अवतार. 'भाऊनि नरसिंया केला नवस। तो प्रगटोनि स्वप्नीं वदे मातेस।' –दावि १९. २ (ल.) सिंहासारखा उग्र व पराक्रमी पुरुष; पुरुषश्रेष्ठ. [नर+सं. सिंह] **०सिंहजयंती**–पु. नृसिंहावताराचा दिवस; वैशाख शुद्ध चतुर्दशी. [नरसिंह+जयंती=जन्मदिवस] **०सिंहावतार**–पु. दैत्यांचा राजा हिरण्यकशिपु याचा वध करण्यासाठीं श्रीविष्णूनें धारण केलेलें सिंहाकृति मनुष्याचें रूप, अवतार. [नरसिंह+अवतार=प्रकट होणें, रूप घेणें] **०सिंहावतार घेणें**–(ल.) अतिशय रागावणें; कोपाविष्ट होऊन उग्र स्वरूप धारण करणें. **०हर-हरदेव**–पु. नरसिंह अर्थ १ पहा. [नर+हरि, हर, हरदेव] **०हरदेवाची पालखी**–स्त्री. नरसिंहाची पालखी. हिला उचलण्याचें पुण्य स्वतःला लाभावें म्हणून हिच्या दांडयास खांदा लावण्यास भक्तमंडळी फार उत्सुक असते. तेव्हां साहजिक गोंधळ, अव्यवस्था होते. २ (त्यावरून ल.) जें काम करावयाला बऱ्याच लोकांची मदत अवश्य आहे व ज्याची जबाबदारी कोणा एका विशिष्ट व्यक्तीवर नसते व जें काम चांगल्या रीतीनें झाल्याची किंवा न झाल्याची कोणी पर्वा करीत नाहीं असें–अर्थात वेळीं अवेळीं, केव्हां तरी कसें तरी व्हावयाचें–काम; अव्यवस्थित रीतीनें केवळ लोकांच्या मर्जीनुरूप घडून येणारें काम, गोष्ट; बारभाई कारभार. **०हरी**–पु. नरसिंह. [नर+सं. हरि=सिंह] **नराधिप, नरेंद्र, नरेश, नरेश्वर**–पु. राजा; नृपति. –१५.४५. 'तो बोलता झाला शुकयोगींद्र। परिसता नरेंद्र परीक्षिती।' –एभा १.१८३. [नर+सं. अधिप, इंद्र, ईश, ईश्वर=श्रेष्ठ, पालनकर्ता, रक्षणकर्ता] **नरेंद्रमंडळ**–न. मॉंटफर्ड सुधारणान्वयें दिल्लीस स्थापन केलेलें हिंदी संस्थानिकांचें मंडळ; राजांची सभा. (इं.) चेंबर ऑफ् प्रिन्सेस्. [नरेंद्र+मंडळ=सभा, समिति] **नरोत्तम**–पु. १ नारायण; पुरुषोत्तम. २ –वि. नरश्रेष्ठ; मनुष्यांत उत्तम असलेला. [नर+उत्तम] **नरोबा**–पु. नरसिंह; नरहरि. 'नरोबाची कृपादृष्टी। जाल्या कोण्ही नाहीं कष्टी।' –मध्व २०६.

**नरक**–पु. यमनगरींतील विष्ठा, रक्त, पू इ०घाण पदार्थांनीं भरलेली, पापी लोकांनां यातना भोगण्याची जागा. याचे ८४ प्रकार आहेत. पापी लोकांसाठीं मृत्यूनंतरचें स्थान, लोक. २ (ल.) विष्ठा; मल; घाणीचा संचय; (सामा.) विष्ठा; गू. ३ विष्णूनें मारलेला एक राक्षस. ४ (ख्रि.) ईश्वरी सहवासाचा व तज्जन्य आध्यात्मिक अनुग्रहाचा अभाव. 'विरह तुझारे नरक भयंकर। भासे प्रलयानल पेटे।' –उसं २९३. ५ (ख्रि.) सैतान व दुरात्मे यांचें वसतिस्थान. 'तुझें संपूर्ण शरीर नरकांत टाकलें जावें यापेक्षां तुझ्या एका अवयवाचा नाश व्हावा यांत तुझें बरें आहे.' –मत्त ५.२९. [सं.] (वाप्र.) **०अंगावर घेणें**–(एखाद्याचें) वाईट, दुष्कीर्तिकारक काम अंगावर घेणें. **०उपसणें**–(एखाद्याच्या) घाणेरड्या गोष्टी, कृत्यें बाहेर काढणें; (एखाद्या) घाणेरडया गोष्टीची, प्रश्नाची शहानिशा, चर्चा करणें. **०तोंडांत सांठविणें**–तोंडांत नेहमीं अपशब्द, ग्राम्य शब्द भरलेले असणें; नेहमीं ग्राम्य, अश्लील, शिविगाळीचें भाषण करणें. **–काची वाट दाखविणें**–(एखाद्यास) दुर्मार्गप्रवृत्त करणें; वाईट उदाहरण घालून देणें. **–काची सामुग्री**–स्त्री. १ (नरकवासास पात्र करणाऱ्या) दुष्कृत्यांचा समुदाय. २ (रागानें) संसार. ३ (रागानें) नकोशी, तिरस्करणीय गोष्ट,काम. **–काचें खापर-टोपलें**–न. १ विष्टेनें भरलेलें टोपलें. २ खापर. ३ (ल.) कर्ज; आंतबट्ट्याचा धंदा; तिरस्कारणीय, नकोशी गोष्ट, काम, लोकापवाद, अपकीर्ति इ०. (क्रि० येणें; फुटणें; डोइवर येणें; फुटणें; घेणें). **–कांत जीभ घालणें**–१ खोटें बोलणें. २ घाणेरडया गोष्टींचें अभिवचन देणें. **–कांत धोंडा टाकून शितोडा घेणें**–१ घाणेरडीं कृत्यें करण्यांत पुरुषार्थ, समाधान मानणें. २ वाइटाशीं संबंध ठेवून त्याचा वाईट परिणाम भोगणें. **–कांत पचणें**–घाणेरडया, किळसवाण्या जागेंत, परिस्थितींत खितपत पडणें. **–कानें अंग भरणें**–(ल.) कर्जाखालीं बुडणें; पराकाष्ठेचें कर्जबाजारी होणें. **–कासारखा घाणेरा**–वि. नरकाप्रमाणें तिरस्कारणीय, नकोसा वाटणारा (दारुडया, तगादेदार, धरणेकरी, गळग्रह, नकोशी गोष्ट इ०). **–कासारखें घाणणें**–(एखादी गोष्ट, व्यक्ति इ०) नरकाप्रमाणें तिरस्कारणीय वाटणें. **–कीं धजा-ध्वजा लावणें**–ज्यामुळें नरकांत श्रेष्ठपणा गाजेल अशीं घाणेरडीं कृत्यें करणें. **लोकांच्या नरकांत बुडणें**–लोकांचें पराकाष्ठेचें देणें होणें; लोकांच्या कर्जांत बुडणें. सामाशब्द– **०कुंड**–न. १ पापी मनुष्य मरणोत्तर ज्यांत खितपत पडतो असें नरकाचें कुंड. अशीं ८६. कुंडें आहेत. २ (ल. तिरस्कारार्थी) स्त्रीचा गर्भाशय. 'नऊ मासपर्यंत प्राण्यास नरककुंडांत वास घडतो.' [सं. नरक+कुंड] **०केस**–पुअव. (मुलास) उपजत असलेले, गर्भावस्थेंत आलेले, जन्मल्यापासूनच असलेले केस. [नरक+केस] **०चतुर्दशी**–स्त्री. विष्णूनें

नरकासुराचा वध केला तो आश्विन वद्य चतुर्दशीचा दिवस. या दिवशीं पहांटेस चंद्रोदयीं अभ्यंगस्नान करून यमतर्पण करावयाचें असतें. [ नरक=नरकासुर+चतुर्दशी ] ०पाल-ळ-पु यम. ' स्तुत होय स्व:पाळा केव्हां जी जी म्हणे नरकपाळा । ' -मोसभा ६.९१. [ नरक+सं. पाल्=रक्षण करणें ] ०वणी-न. घाणेरडें व दुर्गंधयुक्त पाणी. [ नरक+पाणी ] ०वास-पु १ नरकांत राहणें. २ ( ल. ) गर्भवास. ३ ( एखाद्या ) घाणेरडया किंवा आपत्ति भोगाव्या लागणाऱ्या जागेंत राहणें. ४ अधर्मस्थल. [ नरक+वास=राहणें ] नरकाड-डी, नरकड-स्त्री. घाणीची व दुर्गंधयुक्त जागा; गुखाडी. ' सोंगाच्या नरकाडीं । तुका वोडोनिया सोडी । ' -तुगा २८१९. [ नरक ]

**नरकाडी**—स्त्री. फजिती. ' शूरांहूनि मानिलें लंडी । तरी युध्यप्रसंगीं नरकाडी । ' -दा १३.१०.१७.

**नरकीचा कांदा**—पु. सर्पदंशावर देण्यास उपयोगी असा एक कंद. या वेलास लहान मिरचीएवढीं व कानांत घालण्याच्या पोंवळयाच्या बाळीसारखीं लाल रंगाचीं फळें येतात. याच्या वेलास रानमिरचीचा वेल असेंहि म्हणतात. -वगु ६.५१.

**नरगसी कलिया**—पु. एक प्रकारचा कलिया. हा कोंबडीचीं पिलें व भाज्या घालून करितात. -गृशि २.६७. [ फा. नरगिस्?+ अर. कलिया ]

**नरगा, नर्गा**—पु. वेढा; जर्गा पहा. [ तु. नर्गह्; नर्ग ]

**नरघा**—पु. एक वाद्य; तबला. -( बडोदें ) कला १३६. [गु. नरघा=एक प्रकारचें वाद्य ]

**नरटवणी**—न. नारळाच्या नरोटीनें भरतां येण्याइतकें (ओढयाचें, विहीरीचें कमी झालेलें) उथळ पाणी. [नरटी+पाणी ]

**नर(रो)टी, नरवटी-वटें, नरंवटी-टें**—स्त्रीन. १ मनुष्याच्या डोक्याची कवटी: कवटीचें हाड; नरकपाल. २ नारळाची करोटी, करवंटी. [ नर+वाटी, नारळ+वाटी ]

**नरटेल**—न. नारळाच्या नरटया जाळून काढलेलें तेल. [ नरटी+तेल ]

**नरड, नरडपें-व**—पु. (कु.) गुरांना होणारा एक प्रकारचा घातुक रोग. यानें फार गुरें मरतात. काळपुळी. -शेतकी-शेतकरी ३.६. [ नरडी ]

**नरडणें, नर्डणें**-सक्रि. नरडी दाबणें; ठार मारणें [ नरडें ]

**नरडी-डें**—स्त्रीन. १ घसा; अन्नमार्ग. २ गळयाच्या वरल्या भागीं दिसणारा, पुढें येणारा भाग; घाटी; गळा; कंठमणी. ' बळकटसुत-शोक-व्याघ्र धरी नृपहरिणाचें नरडें । ' -मोरा रामायण पंचशती ४६. ' हो सावध काळानें जों नाहीं घातलें मुखीं नरडें । ' -मोद्रोण १.४२. [ सं. नर्दी=शब्दकरणारी; हिं. गु. नरडो ] ( वाप्र.) ०घेणें-ठार मारणें. ' अभावाची घेतली नरडी । धाकें उदर तडाडी । ' -दा ५.९.४६. ०दाबणें-( एखाद्याचा ) गळा दाबून जीव घेणें. ०धरणें-१ ( एखाद्यास ) जेवणास खोळंबा करणें. २ गळा धरणें;संकट आणणें; नरडीस बसणें. ०फोडणें-(एखाद्याचा) गळा कापणें, दाबणें, मारणें. ०बसणें-घसा बसणें, कोंदणें; आवाज न निघणें. ०वाजणें-श्वासोच्छ्वास करतांना घसा घरघर वाजणें ( दमेकरी इ०कांचा वाजतो त्याप्रमाणें ). नरडीचा घोंट घेणें, नरडीचें रक्त पिणें-ठार मारणें; जीव घेणें. ' तुझ्या नरडीचा घोंट घ्यावयास कोणी उरलें नाहीं असें कां तूं समजतोस ? ' -उषःकाल. नरडीला हात घालणें-जीव घेणें; ठार मारणें. ' त्याच वेळीं बाजीच्या नरडीला हात घालावा, असा त्या मंडळींना त्वेष चढलेला होता. ' -स्वप १४८. नरडीस नख देणें-( लहान मूल उपजतांच त्याचा ) गळा दाबून ठार मारणें. नरडीस बसणें-खणपटीस बसणें; पिच्छा पुरवून, तगादा करून, सतावून सोडणें; गळग्रह घालणें; गळीं पडणें.

**नर(रा)णी, नऱ्हाणी**—स्त्री. न्हाव्याचें नखें काढण्याचें हत्यार. [ सं. नखहरणी; प्रा. णहरणी ]

**नरद**—स्त्री. बुद्धिबळें, फांसे इ०कांच्या खेळांतील सोंगटी. ' आमचें जुग विसकटतांच नरद ठार केली. ' -भाब १७ (टीप). ' मानव नरदा दिवस यामिनी फांसे धरिले करीं । ' -विक ८५. [ फा. नर्द ]

**नरनरणें**—अक्रि. पडसें येणें.

**नरपुडा**—वि. मरतुकडा; रोडका.

**नरम**—वि. १ मृदु; कडक नसलेलें; गुळगुळीत; मुलायम. २ ( ल. ) कठोर, जहाल नसणारा; गरीब; सौम्य; लीन; मवाळ. ३ भोळा; साधा; बावळट. ' असल्या नरम पुढाऱ्यांमुळें लोकांच्या फायद्यापेक्षां त्यांचें नुकसानच जास्त होतें ... ' -टि २.१२९. ४ बायकी; बुळा. ५ स्वाभाविक तेज, कडकपणा, तीक्ष्णपणा इ०कांत कमी असलेला उदा० कोंबट ( पाणी इ० ), तीक्ष्ण धार नसलेलें ( शस्त्र इ० ). ' शस्त्राचें पाणी नरम आहे. ' कमी चकाकीचा; मंद कांतीचा ( रुपाया, मोत्यें इ० ). ' हा रुपाया नरम आहे. ' [ फा. नर्म्. गुज. नरम ] ०पडणें-होणें-( बाजारभाव इ० ) कमी होणें; उतरणें; मंदीस येणें. ' बँकेच्या व्याजाचे दर वाढविण्याचा अंतस्थ हेतु नरम पडणाऱ्या हुंडणावळीला हात देण्याचा आहे ' -के २.१२.३०. ' शेअर्सचे भाव नरम पडले. ' -के १०.६.७.३०. ०येणें-( एखादा मनुष्य इ० ) स्वभावानें गरीब बनणें; सौम्यपणानें वागूं लागणें. ' आतां हा फारच नरम आला. ' -पारिभौ २३. ( एखादें ) काम नरम करणें-काम फत्ते करणें. -इमं २५३. सामाशब्द- ०गरम-वि. फार उन्ह किंवा फार थंड नाहीं असें गरम नरम पहा. ०चारा-पु. १ कोंवळा चारा; गवत. २ ( ल. ) खावयास नरम, मृदु असलेला,

फार चावावा न लागणारा खाद्यपदार्थ. ३ उंची व नाजुक खाणें, अन्न. [ नरम+चारा ] ०छापी–वि. जुना झालेला व ज्यावरील छाप, ठसा विरूप, खराब झाला आहे असा ( रुपाया इ०नाणें ). [ नरम+छाप ] ०डोकें–न. मऊ केंस असलेलें व हजामत करतांना मुलींच त्रास न पडणारें डोकें. –मानरम–वि. अतिशय नरम; फार गुलगुलित; अत्यंत कोमल; सौम्य. [ नरम द्वि. ] –मानरमी–स्त्री. मृदुपणा; सौम्यपणा; कोमलता; मवाळपणा; याच्या उलट गरमागरमी. [ नरम द्वि. ]

**नरमणें**—अक्रि. ( वारा, पाऊस, विकार, संताप, ताप इ० ) कमी, मंद, सौम्य होणें; कमी तीव्र होणें; मंदावणें. ' वारा–पाऊस–राग–नरमला. '

**नरमद्या, नर्म(र्ब)द्या, गणपती**—पु. नर्मदा नदींत सांपडणारा तांबूस रंगाचा गणपती म्हणून पूजिला जाणारा दगड. [नर्मदा+गणपति]

**नरमविणें**—सक्रि. शांत, सौम्य, मंद करणें; शमविणें; नरम, हलका, सुसह करणें. [ नरमणें ]

**नरमाई**—स्त्री. मृदुपणा; नरमपणा; कोमलता; सौम्यपणा; सुसहता; मवाळपणा; मऊपणा. [ नरम; गुज. नरमाई–स ]

**नरमावणें**—अक्रि. १ नरम, सौम्य होणें. २ ( ल. ) शांत, सुसह, कमी, मंद होणें; मंदावणें; थंडावणें. नरमणें पहा. [ नरम ]

**नरमिना**—पु. १ रेशीम. २ रेशमी कापड, वस्त्र इ०. ' खजिना व कापड नरमिना उंटावर चालत होतें. ' –भाव ७१. ' नरमिन्याचीं दिंडें सर्वे शिकारखाना । ' –निगा ३२५. [ फा. नर्मीना, नर्म् ]

**नरमी**—स्त्री. नम्रता; नरमाई.

**नरवरी**—वि. नरवर नांवाच्या शहरीं बनलेला ( लोखंडी जिन्नस, अडकिता, तरवार इ० ). 'हरतऱ्हेचे मार यावे । तावूनियां तप्त तवे । मोठमोठाले नरवरी नवे । उभे करावे त्यावरी । '–अफला २५. [ नरवर=एक शहर ]

**नरवा**—स्त्री. घाण्यांतून गाळलेलें तेल जींत पडतें ती खाच. –बदलापूर २६६.

**नरवा**—पु. कर वसुलीची एक पद्धत; ही रयतवारी पद्धत आहे. ' तिसऱ्या पद्धतीचें नांव नरवा. ती रयतवारी पद्धत असून ... पेटलाद परगण्यांत ती अजून चालू आहे. ' –बडोद्याचे राज्यकर्ते ३५८. ०दार–वि. ज्यांनीं प्रथम खेड्यांची वसाहत करून जमीन लागवडीला आणली त्यांपैकीं प्रत्येक. –बडोद्याचे राज्यकर्ते २५८ ( टीप ).

**नरवेल**—पु. एक वनस्पति.

**नरशा, नरशियां**—पु. नरसिंह पहा. [ नरसिंह अप. ]

**नरशा**—पु. ( व. ) नवस करून झालेला मुलगा. शको. ४. ४९

**नरस**—वि. साधारण; कनिष्ठ प्रतीचें; ( प्र. ) निरस पहा. [ सं. नीरस; हिं. गुज. नरसुं; म. निरस ]

**नरसाळें**—न. तेल इ० द्रव पदार्थ भांडें इ०कांत ओतण्याचें साधन; गळणी; नाळकें; चाडी; नसराळें.

**नरसिंग**—न. ( वाजविण्याचें ) एक प्रकारचें शिंग; तुतारी. [ हिं. ]

**नरसें**—न. ( राजा. ) स्वतःच्या छंदानें चालण्याचें वेड; हेकडपणा; गाठेपणा; दुराग्रहीपणा अथवा त्याची लहर. ( क्रि० चळणें; चालणें; आठवणें; उडणें ). ' त्याचें नरसें चळलें तर तो कोणाचें ऐकणार नाहीं. '

**नरसोबा**—पु. नरसिंह या शब्दाबद्दलची व्यावहारिक संज्ञा. ' नागोबानरसोबा ' [ नरसिंह ]

**नरांडी**—स्त्री. १ पाण्याचा निकाल करण्यासाठीं काढलेला पाट; नाला; गटार. ' नरांडींतून नदीच्या पुराचें पाणी आंत घुसलें. ' २ गळा; अन्ननलिका; घसा; घांटी; नरडी. ३ (क.) नळांडी. नळांडी पहा.

**नराणी, नऱ्हाणी**—स्त्री. नखें काढण्याचें हत्यार. [ सं. नखहरणी; प्रा. णहरणी; गुज. नराणी ]

**नरांबा**—पु. एक झाड. याचें लांकूड इमारतीकामास उपयोगी आहे. –वगु ४.३६.

**नरी**—स्त्री. नारी; स्त्री; बायको. [ सं. ]

**नरी**—स्त्री. ( जोडे इ०शिवावयाच्या उपयोगाचें ) बकऱ्याचें कमावलेलें, रंगविलेलें कातडें. [ हिं. गु. नरी ]

**नरीस**—न. ( गो. ) कूस; टोंक.

**नरोटी–टें, नरेटी**—स्त्रीन. १ माणसाची अस्थिमय कवटी; करोटी. २ नारळाची कवटी. ' अहा सांडून रत्नवाटी । हातीं घेतली कैसी नरोटी । '–नव १८.३२. ३ (ल.)अतिशय थोडें दूध देणारी गाय, म्हैस. [नर+वाटी ?] ०लागणें–(विहीर, नदी इ० कांतील) पाणी नरटीनें काढावें लागण्याइतकें कमी होणें. नरटवणी पहा. ' विहिरीला, नदीला, उन्हाळ्यांत नरोटी लागते. ' ०हातांत येणें–भीक मागावयास लागणें; दारोदार होणें. ०हातांत येणें–( एखाद्याच्या जवळ ) मिळकतींपैकीं त्यास कांहींहि न मिळणें, उरणें; भीक मागण्याचा प्रसंग येणें. ' स्नेही–शेजाऱ्यांत जर इस्टेटीची वाटणी होऊं लागली तर मालकाच्या हातीं नरोटीच यायची ! ' –सत्तेचे गुलाम ३.

**नर्डणें**—सक्रि. नरडी दाबणें; ठार मारणें. नरडणें पहा. ' पडे देह दर्डा विवेकासि वर्डा । करा लोभ नर्डा विकल्पासि भर्डा । ' –दावि ४५५. [ नरडणें, नरडें ]

**नर्तक**—वि. १ नाचणारा; नाचकाम करणारा. २ नाच्या; नट. ] सं. नट ]

**नर्तकी**—स्त्री. १ नाचकाम करणारी स्त्री; कलावंतीण; नृत्यांगना. २ नटी. [ सं. ]

**नर्तन**—न. १ ( नृत्य ) मनोरंजनार्थ अनेक अवयवांचें नियमबद्ध व सताल चलनवलन करून दाखविण्याची क्रिया; नृत्य; नाच. ' नर्तेता, हर्षवर्धना, करीना प्राणी । नच दुजा अभागी त्यासम जगिं कोणी । ' —टिक २ ( संगीत ) नर्तकानें गाणें म्हणून त्यांतील रस व भाव अंगविक्षेपानें व अभिनयानें प्रगट करण्याची क्रिया. [ सं. ]

**नर्द**—स्त्री. नरद; सोंगटी. नरद पहा. ' गंजीफा सतरंज चोपड नर्दे तें नर्देही सांगजे । ' —सारुह ३.४६. [ नरद अप. ]

**नर्देव, नर्दैव**—वि. दुर्दैवी; करंटा. ' जेथें उदंड जाणीव । तेचि तितुके सदेव । थोडे जाणीवेनें नर्देव । होती लोक । ' —दा १५.३.६. [ निर्दैव अप. ]

**नर्म**—न. खेळ; क्रीडा; करमणूक. [ सं. ]

**नर्मद्या**—पु. १ ( अप. ) नर्बद्या. नर्मदा नदींत सांपडणारा तांबडया रंगाचा गणपतीचा बाण; नरमद्या गणपति पहा. ' लिंगें सूर्यकांत सोमकांत । बाण तांदळे नर्बदे । ' —दा ४.५.६. ' रुविच्या लांकडांचे देव पोवळ्यांचे देव । बाणतांदळे नर्मदे देव । ' —दा १९.५.२. २ ( ल. ) गोटा; दगड; मूर्ख; ठोंब्या. [ नर्मदा ]

**नर्मसचिव**—पु. खुशमस्कऱ्या. ' माझ्या ठिकाणीं हिलाच मस्करी करण्याकरितां नर्मसचिव करून ठेवा म्हणजे झालें. ' —कमं १.३६. [ सं. नर्मन्=करमणूक+सं. सचिव=प्रधान ]

**नर्माई, नर्मी**—स्त्री. सौम्यपणा; मवाळपणा; लीनता. नरमाई पहा. ' सांप्रत तुमचें पत्र बहुत नर्माईचें राजे जैसिंग यांचे भेटीबद्दल कळलें. ' —रा ७.२. [ म. नरमाई; फा. नर्मी ]

**नर्मीना**—पु. मऊ, तलम व उंची रेशमी कापड. नरमिना पहा. [ फा. नर्म् ]

**नर्मोकपास**—स्त्री. ( गु. ) देवकापशी. —कृषि ३८३. [ नर्म+कपास=कापूस ]

**नर्स**—स्त्री. १ लहान मुलांना सांभाळण्यासाठीं ठेविलेली बाई; दाई. २ रोग्याची शुश्रूषा करणारी स्त्री; रुग्णपरिचारिका. ३ सुईण; बाळंतपणाच्या वेळीं मदत करणारी स्त्री. [ इं. ]

**नऱ्हाणी, नऱ्ही**—स्त्री. नराणी, नरी पहा.

**नल**—नळ पहा.

**नलक**—न. मृदु अस्थि; कोमलास्थि; कूर्चा. [ सं. ]

**नलकट**—वि. ( व. ) निर्लज्ज.

**नलगे**—क्रि. १ नको, लागत नाहीं. आवश्यकता, प्रयोजन नाहीं या अर्थानें योजावयाचा शब्द याचें अनेकवचन नलगेत. प्रथमांत पदार्थ, आणि आयला, आयाला, आवयाला, आया, आवया, आवा या प्रत्ययांत धातुसाधितासह प्रयोग करितात. जसें:—मला साखर नलगे; जेवावयाला, जेवावया, जेवावें, जेवणें नलगे इ० ' कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा । ' —दा ३.३.११. ' वादळामुळें गलबतावरील सर्व स्त्रिया घाबरून गेल्या हें सागणें नलगे. ' —कोरकि ७४. ' सुज्ञास ज्यास्त लिहिणें नलगे. ' २ सयुक्तिक, सुसंगत संभवनीय नाहीं अशा अर्थानेंहि योजितात. ' तसा दिवस पुन्हां यावा नलगे. ' [ न=नाहीं+लागणें=जरूर, अवश्य असणें ]

**नलद**—पु. वाळा नांवाचें सुगंधी गवताचें मूळ. ' शुद्ध सवांग कुश नलद परि उपभोगोचितत्व नलदासी । ' —मोवन ४.७५. [ सं. ]

**नलसुरी**—पु.घोडयाचा एक रोग. यानें घोडयाच्या पोटांतून मैल निघतो. याला असहाल असेंहि म्हणतात. असहाल पहा. —अश्वप २.१९६.

**नलिका**—स्त्री. नळी. [ सं. ] **नलिकास्थि**-न. दीर्घास्थि; लांब हाड. [ नलिका+सं. अस्थि=हाड ]

**नलिन**—पुन. कमळ; पंकज. [ सं. ]

**नलिनी**—स्त्री. १ कमळाचा समूह. २ कमळांनीं भरलेलें तळें, ठिकाण इ० ३ कमळाचा देंठ. [ सं. ] ०**पत्र**–न. कमळाचें पान; कमलपत्र. ' प्रपंचीं रहावें नलिनीपत्र जैसें । अलिप्त हें असें पाहील त्याला । ' [नलिनी+सं. पत्र=पान] ०**पद्मकोश (संयुतहस्त)**–पु. ( नृत्य. ) पद्मकोशहात करून एका हातानें दुसऱ्या हातास आधीं करंगळीपासुन आंतून बाहेर विळखा घालणें व मग करंगळीपासून बाहेरून आंत विळखा घालणें इ० अभिनययुक्त क्रिया. [ नलिनी+सं. पद्म+सं. संयुत=जोडलेला+सं. हस्त=हात ]

**नलिस्त**—वि. वाईट; नीच; दुर्गुणी. [ फा. नारास्त= नालिस्ती=नालिस्त अप. ]

**नल्याख**—वि. नालायक; द्वाड; खटयाळ. ' बहुत मानेल तो ल्याख । वरकड जाणावे नल्याख । '-दावि ३५२. [नालायक–ख]

**नव**—वि. १ नवीन; नवें; नूतन. ' नव नव नवल कराया न धरी लेशहि इचीच आळस भा । '—मोसभा १.१०. 'या नव नवल नयनोत्सवा । ' —मानापमान २ कोमल; चिमुकलें; लहान. 'श्याम चतुर्भुज मुकुट कुंडलें । सुंदर दंडल नव बाळ । ' —तुगा ४२४०. [ सं. नव. इं. नव; ग्री. नेऑस्; लॅ. नोवुस्; ऑस्क. नुवल; अँसॅ. निवे, निव; गॉ. निउयिस्; लिथु. नौयेस्; स्लॅ. नोवु; हिब्रयू. नुअ ] ०**कीर्द**–स्त्री. प्रथम लागवड. ' नवकीर्दीस कोठें कोठें नांगरीत होते तें काम सोडून या धंद्यास लागले. ' —ख ९५९. —वि. नवीनच लागवडीस आणलेली ( जमीन ). [ नव+फा. कीर्द्; फा. नौकीर्द् ] ०**खरीद**–वि. नव्यानें खरेदी केलेलें. ०**गंध**–पु. नवीन, ताजा सुवास. ०**घड**–वि. नवीन घडलेलें; नवट ( भांडें ). [ नव+घडणें ] ०**चांद**–पु. १ आमावास्येनंतर नवीनच,

प्रथम दिसणारा चंद्र; शुद्ध द्वितीयेचा चंद्र. २ अमावास्या (इं.) न्यू मून. [ नव+चांद=चंद्र ] ०जवान–वि. १ तरुण; ज्वानींत आलेला. २ अनभिज्ञ; नेणता; अजाण. ' बहुतकरून सर्व नव्जवान आहेत. ' –रा५.५४. [नवँ+फा. जवान्=तरुण; फा. नव्जवान् ] ०जवानी–स्त्री. १ तारुण्य; नवयौवन; ज्वानी. २ नेणतेपणा; अजाणपणा. ' तत्रापि नवजॅवानी आहे. कोणेसमयीं काय करील कळत नाहीं. ' –ख ८.३९२६. [ नवजवान ] ०जीवन–न. १ पुनर्जन्म. २ चरित्राचें, आयुष्यक्रमाचें पालटलेलें स्वरूप; नवचैतन्य; नवी उमेद; स्फूर्ति. [ नव+सं. जीवन ] नव(वे)तर–वि. अलीकडील; अलीकडचा; नवा. –क्रिवि. अलीकडे. नवथर पहा. [ गु. नवतर ] नवथर–ळ–वि. अलीकडचा; नुकताच होऊन गेलेला, अस्तित्वांत आलेला; अलीकडील काळांतील. –क्रिवि. अलीकडे; नव्यानें; नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वी. ' सूर्याला दुसरी स्थलांतर करण्याची गति असून तिनें सूर्यमाला शौरिनामक पुंजाकडे जात असते असें डॉक्टर हर्शल ह्यास नवथर आढळलेलें आहे. ' –सूर्य ३९. ' पण त्या नवथरच इकडे आल्या असल्यामुळें कोणाशींही विशेष सलगीनें बोलणें त्यांना शक्य नव्हतें. ' –नपुक २६. [ नव+थर ] नवथळ–पुस्त्री. (ना. व.) तरुण पिढी; तरुण मंडळी. [ नवथर ] ०दिगर, नौदिगर–न. १ ( सरकारी अंमलदारांत रूढ ) अनिष्ट फेरबदल; भांडणाला व हुकूम, करार इ० मोडण्याला प्रवृत्त होणें; वितंडवाद; विरोध; हरकत; तक्रार. ( क्रि० करणें; लावणें; मांडणें; घडणें; पडणें ). ' करार जाहला असतां त्यास नव्दिगर करावें म्हणावें हें कसें घडेल. ' –रा ३.२०६. २ (केलेला) ठराव, करार इ० नाकबूल करणें; ( त्याबाबत ) बदलून जाणें; भलतेंसलतें, कमजास्त बोलणें. ' कांहीं नौदिगर करून बिघाड करूं म्हणाल तर आम्ही तुमचे रफीक नाहीं. ' –रा १.५२. ' ह्यांत आम्ही नवदिगर केल्यास सरकारचे गुन्हेगार होऊं. ' ३ (क्व.) –वि. नाकबूल; बेइमान. 'मी ऐकेनच ऐकेन, नवदिगर व्हावयाचा नाहीं. ' [फा. नव्=नवीन+फा. दिगर्=दुसरें, इतर] ०दौलत्या–वि. नुकताच, नव्यानेंच श्रीमंत झालेला, वैभवास चढलेला; अधन्याचा, उपटसुंभ श्रीमंत. [नव+दौलत] ०धान्य–न. १ नवें धान्य, दाणागोटा. २ (राजा.) दर वर्षी पिकणाऱ्या नवीन धान्याच्या भक्षणाचा संस्कार; कुळाचार. ३ तांदुळाची एक जात. [ नव+धान्य ] ०नवती–स्त्री. तारुण्याची आरंभदशा; यौवनारंभ; मुसमुसणारें यौवन. ' नवनवती आली रसा. ' [ नव+नवती=तारुण्य ] ०निगादास्त, नौनिगादास्त–स्त्री. १ नवी फौजबंदी, फौजभरती; नवीन ठेवलेली फौज. ' परंतु प्रस्तुत नौनिगादास्त करीत आहेत. ' –रा १.५६. ' नवनिगादास्तीचें लोक त्रिकूट. ' –रा ७.७१. २ तयारी. [ फा. नव+निगादास्त ] ०निशात–निशित–वि. नुकतीच, नवीन धार लावून तीक्ष्ण केलेला; नवीनच पाजविलेला, परजलेला. ' देवा नवनिशतीं शरीं । वावरोनी यांच्या जिव्हारीं । ' –ज्ञा २.४८. [ नव+सं. निशित=तीक्ष्ण ] ०पंकज मालिका–स्त्री. ताज्या, नव्या कमलांची माळ. ' कपटनागर सुंदर बालिका । करयुगीं नवपंकज मालिका । ' –मुराअरण्यकांड २१. [ नव+सं. पंकज=कमल+सं. मालिका=माळा ] ०पाषाणयुग–न. (भूशास्त्र) अत्यंत प्राचीन पाषाणयुगाचा उत्तरार्ध; (इं.) निऑलिथिक एज्. [ नव+पाषाण=दगड+युग ] ०पुसती, पुस्ती–स्त्री. नवें लेखन. ' पुनरपि मार्गी काढी जें धर्मरहस्य जेंवि नवपुसती । ' –मोवन १३.७०. [ नव+म. पुस्ती ] ०भक्त–वि. १ नव्या गोष्टींचा शोकीन. २ नवीन देवाचा भक्त ? नुकतेंच धर्मांतर केलेला, बाटगा, बाटलेला या अर्थी चुकीनें रूढ. [ नव+सं. भक्त= भजणारा, आवड असणारा ] ०यौवना–स्त्री. नवतरुणी; तारुण्यकलिका; तारुण्याच्या भरांत आलेली स्त्री. [ नव+सं. यौवन= तारुण्य ] ०रंगडा–वि. नित्य नवा रंग, तऱ्हा करणारा. ' नवरसांचा रसिक । नवरंगडा मीच एक । ' –एभा १२.१९७. [ नव+ रंग ] ०रान–न. नुकतीच, प्रथमच लागवडीस आणलेली जमीन. [ नव+म. रान ] ०रोज, नौरोज–पु. १ नवीन वर्षाचा आरंभदिन. २ पारशांची वर्षप्रतिपदा. ३ मोंगल बादशाहा आपल्या राज्यारोहण दिनापासून जो नवीन जुलुस सन सुरू करीत त्याच्या आरंभींचा दिवस. ४ जुलुस सनाच्या आरंभींच्या दिवशीं करावयाचा उत्सव, समारंभ वगैरे. ' अकबरानें ज्या वेळीं आपला दिन ई इलाही नांवाचा नवीन धर्म प्रचारांत आणला त्यावेळीं नवरोजचा सण सुरू केला. ' –ज्ञाको (न) ३८. [ फा. नव्रोझ् ] ०वधू–स्त्री. नुकतेंच लग्न झालेली मुलगी; नवी नवरी, ' नववधू प्रिया मी बावरतें । ' –तांबे. [ सं. नव+सं. वधू ] ०विद्वेषी–वि. पुराणप्रिय; सनातनी; सुधारणेचा द्वेष करणारा. ' सुधारक आणि नवविद्वेषी असे समाजामध्यें दोन पक्ष उत्पन्न होऊन ... ' –टि १.३४०. [ नव+सं. विद्वेषी=द्वेष करणारा ] ०शिका–खा–वि. १ नुकताच शिकूं लागलेला; ( एखाद्या ) व्यवहारांत, धंद्यांत नुकताच पडलेला; नवखा. २ (कु.) प्रथमच गरोदर झालेली ( स्त्री, जनावर ); प्रथमतः लागास आलेलें, फळ धरणारें ( फणस इ० झाड ). ३ अद्भुत; विलक्षण; असाधारण; अपूर्व. [ नव+ शिकणें ] ०शीक–ख–वि. नुकताच शिकूं लागलेला; नवशिका अर्थ १ पहा. [ नव+शिकणें ] ०सर–वि. नवीन; अलीकडचा. –क्रिवि. अलीकडे; नुकतेंच; थोडया दिवसांपूर्वी. नवथर पहा. [नव+सं. सदृश] ०स(सा)रणी–स्त्री. दुरुस्त करणें; नवा दिसेलसा करणें. [ नवसरणें ] ०हिंदु–वि. (गो.) पुन्हां हिंदुधर्मांत आलेला; धर्मांतर केलेला ( हिंदु ); शुद्धीकरण होऊन हिंदु झालेला. ' पणजी येथील न्यायाधिशानें नवहिंदूंनीं जन्मनोंदणीची नोंद न केल्यामुळें खटले भरले. ' –के २,१२.३०. [ नव+हिंदु ] नवांकित–पु.

नवीनच दीक्षा दिलेला शिष्य. ' विश्वनाथ नामा पंडित। खंडित ज्ञानी अखंडित। आशंका खंडोनिया नवांकित। प्रेरिला अंकित उत्तरपंथें। ' –सप्र १०.२९. [ नव+सं. अंकित ] **नवान्न**–न. नव धान्य सर्व अर्थी पहा. [ नव+अन्न ] ०**पूर्णिमा**–स्त्री. नवें धान्य खाण्यास सुरवात करण्याचा दिवस. हा प्रायः कोंकणांत आश्विन शु. १५ व देशांत माघ शु. १५ हा असतो. कोंकणांत तांदूळ व देशांत गहूं हीं मुख्य असल्यानें कोंकणांत व देशांत वर सांगितलेल्या भिन्न भिन्न तिथींना हा कुळधर्म केला जातो. अन्यत्र नवी, नवें पहा. [ नवान्न+सं. पूर्णिमा ] **नवोढा**–स्त्री. १ नवीन लग्न झालेली, नवपरिणीत स्त्री; नववधू. ' सुंदर वनिता प्रिया नवोढा। ' –अमृत ५२. २ अनुपभुक्त स्त्री; अक्षतयोनि; लग्न होऊन अद्याप पुरुषप्राप्ति न झालेली स्त्री. [ नव=नव्यानें+सं. ऊढ=विवाहित ]

**नव**–वि. नऊ. नऊ संख्या. ' हे नवरत्नमाळा गोमटी। जो घाली सद्गुरूच्या कंठीं। ' –एभा १०.२३८. [ सं. नव; गुज. नव; झें. नवन्; ग्री. एन्नेअ; लॅ. नोव्हेम्; गॉ. निउन; अँसॅ. निगन्, प्राज. निउन; अज. नेउन; प्राप्र. नेविन्त्स; स्लॅ. देवन्ति; लिथु–देव्यन्ति; हिब्रयू; नओइ; कँब्रि–नव् ] ०**कुलपांचें तारूं**– न. लढाऊ गलबत. ' विलायत जंजिरा नवकुलपांचें तारूं। ' –विवि ८.३.५४. ०**तुकड्यांची चोळी**–स्त्री. नऊ तुकडे जोडून केलेली चोळी; इच्या उलट अखंड चोळी, तीन तुकड्यांची चोळी. **म्ह**० नवव्या दिवशीं नवी विद्या. सामाशब्द– ०**कोट (टी)नारायण**–पु. १ कोटयाधीश; अतिशय श्रीमंत मनुष्य. ' पण हे विचारांचे नवकोटनारायण आचाराच्या बाबतींत मात्र सुदाम्यापेक्षां दरिद्री आसतात. ' –प्रेम २१. २ ( विपरीत लक्षणेनें ) अतिशय दरिद्री; कंगाल मनुष्य. –शास्त्रीको. [ नव+कोट+नारायण ] ०**कोटी कात्यायनी( येणी )–चामुंडा**–स्त्रीअव. नऊ कोट देवी, कात्यायनी, चामुंडा. ' नवकोटी कात्यायेणीचा विचार। पिंडीं कोठें। ' –दा ९.५.३१. ' पहावया श्रीकृष्णाचें लग्न। सकळ दैवतें निघालीं सांवरोन। नवकोटी चामुंडा संपूर्ण। चालती वेगें तेधवां। ' –ह २४.१०५. [ नव+कोटी+कात्यायनी, चामुंडा ] ०**कोण** -पु. ( भूमिति ) नऊ कोपरे असलेली व नऊ बाजूंनीं मर्यादित आकृति. –वि. नऊ कोन असलेली. [ नव+सं. कोण] ०**खंड –खंडें**–नअव. १ पृथ्वीच्या नऊ खंडांचा समुदाय. इलावृत्त, भद्राश्व, हरिवर्ष, किंपुरुष, केतुमाल, रम्यक, भरत, हिरण्मय व उत्तरकुरू हीं नवखंडें होत. दुसरेहि पाठभेद आहेत. ( अ ) भरत, वर्त्त ?, राम ?, द्रामाळा ( द्रमिल, द्रामिल ? ), केतुमाल, हिरे ( हीरक ? ), विधिवस ?, महि आणि सुवर्ण. ( आ ) इंद्र, कशेरु, ताम्र, गभस्ति, नाग, वारुण, सौम्य, ब्रह्म, भरत हे नऊ भाग. –हंको. ' नवखंडें सप्तद्वीपें। छपन्नदेशींच्या रायांचीं स्वरूपें। ' –ह २८.६४. [ नव+सं. खंड=तुकडा, पृथ्वीचा भाग ] ०**खंड पृथ्वी**–स्त्री. जींत नऊ खंडें आहेत अशी पृथ्वी. ' नवखंड पृथ्वी व द्द्यावें खंड काशी. ' ' नवखंड पृथ्वीचें दान. ' ०**खणी**–वि. नऊ खणांची. ' दुखणी काय नवखणी माडी नलगे धरा नखेंदु खणी। ' –मोकृष्ण ८३.१३. ' लावण्याची सकळ संपदा सहज उभी नवखणी। ' –पला ४.३४. [ नव+खण ] ०**गजी**–पुस्त्री. १ ( नऊ गजी ) नऊ गज लांबीचा सोपा. राजदरबारचा भव्य दिवाणखाना; कचेरी; सदर. ' राजा नवगजींत बैसला। ' –ऐपो १७. २ तंबू; डेरा. 'बाडें सुंदर खाबगे · नवगज्या सिद्धाच होत्या घरीं। ' –सारुह ३.४५. ' तमाम येऊनु नऊ गजी आसपास येऊनु उतरीले '–इमं ७. नवगोजी पहा.[ नव+ गज=एक परिमाण ] ०**गुण**–पुअव. बुद्धि, सुख, दुःख, प्रयत्न, इच्छा द्वेष, संस्कार, पुण्य व पाप असे न्यायशास्त्रांत सांगितलेले नऊ गुण. 'बुद्धि सुख दुःख प्रयत्न। इच्छा द्वेष संस्कारण। पुण्य पाप नवगुण। बोलिजेती। '–विउ ३.४. –वि. नऊपट. ०**गुण**–वि. नऊ दोऱ्यांचें ( यज्ञोपवीत इ० ). नऊ फेऱ्यांचें.' ' नवगुण तव कंठी ब्रह्मसूत्र प्रभा जे। ' –मुरा बालकांड ११३. [ नव+सं. गुण=दोरा ] ०**गोजी**–पु. डेरा. शामियाना. ' उतर तर्फेसी नवगोजी देऊनु उतरिले.' –इमं ७. ०**ग्रह**–पुअव. १ सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहू व केतु हे नऊ ग्रह. २ ( उप. निंदार्थी ) जूट; टोळकें;टोळी; कंपू. **३**–न. मंगलकार्यारंभीं करतात ती नऊ ग्रहांची पूजा; ग्रहमख. ' दोन्हीं घरीं नवग्रहें झालीं। देवदेवकें पूजिलीं। ' –कालिका१६.४१. [ नव+ ग्रह] ०**चंडी**–स्त्री. १ देवीची आराधना ( विशेषतः तिच्या स्तोत्राचें, सप्तशतीचें नऊ वेळां पठण करून केलेली). 'जर मला पुत्रप्राप्ति झाली तर देवीची नवचंडी करीन. ' –रत्न १.३. २ नवरात्र; नवरात्र पहा. [ नव+सं. चंडी=देवी ] ०**छिद्रें**–नअव. नवद्वारें पहा. ०**जणी**–स्त्रीअव. १ नऊ स्त्रिया. २ ( ल. ) नवविधाभक्ति. ' अत्यंत शाहाण्या सुवासिनी। आणिक आल्या नवजणी। कृष्णाची खुतखावणी। त्या जाणोनी वर्तती। ' –एरुस्व १६.४३. ०**ज्वर**–पु. दूषित तापाचा एक अतिशय तीव्र प्रकार; हा ताप नऊ दिवसांच्या मुदतीचा व प्रायः घातुक असतो. [ नव+सं. ज्वर=ताप ] ०**टकें**– न. शेराच्या अष्टमांशाचें, ( कैली ) अर्ध्या पावशेराचें माप. [नऊ+ टांक] ०**टांक**–न. अदपावाचें वजन. नवटकें पहा. [नव+टांक; गुज. नवटांक; गो नवटांग] ०**द्वारें**–नअव. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुदद्वार व मूत्रद्वार अशीं मानवी शरीराचीं नऊ द्वारें, छिद्रें. ' नवद्वारें देहीं। तो असतुचि परि नाहीं। ' –ज्ञा ५.७५. ०**नाग**–पुअव. १ पुराणांतरीं वर्णिलेले अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक व कालीय या नांवांचे नऊ नाग, सर्प. २ नऊ हत्ती. [ नव+सं. नाग=सर्प, हत्ती ] ०**नागसहस्रबळी**–वि. नऊ हजार हत्तींचें बळ असलेला. [ नव+ सं. नाग=हत्ती+बळी=बलवान ] ०**नागसहस्रशक्ती**–स्त्री. नऊ

हजार हत्तींचें बळ. ' आंगीं जियेस नवनागसहस्रशक्ती । ' –आपू ३९. [ नव+सं. नाग=हत्ती+सं. सहस्र=हजार+सं. शक्ति=बळ ] ०**नागोऱ्या**–पु. ( ना. ) चेंडूलगोऱ्यांचा खेळ. ०**नाथ**–पुअव. मच्छिंद्र, गोरक्ष, जालिंदर, कानीफा, चरपटी, नागेश, भरत, रेवण व गहिनी. हे नवनारायणाचे अवतार मानतात. प्रकाश, विमर्श, आनंद, ज्ञान, सत्यानंद, पूर्णानंद, स्वभावानंद, प्रतिभावानंद, व सुभगानंद असाहि पाठभेद आहे. –नव १.३९. ते ४३. –**ज्ञाको** ( न ) ३७. ०**नारायण**–कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस, व करभाजन. –नव १.२९ ते ३०. ०**नारीकुंजर**–पु. नऊ स्त्रियांनीं आपल्या शरीरांस निरनिराळया प्रकारें पीळ व मुरड देऊन ( कृष्णाच्या उपयोगासाठीं ) बनविलेली हत्तीची आकृति. [ नव+सं. नारी=स्त्री+सं. कुंजर=हत्ती ] ०**निधि–धी**–पुअव. कुबेराचे नऊ खजिने. त्यांचीं नावें:–महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व. 'मोल तुमचिया या श्रीचरणरजाचे न होय निधिनवही । ' –मोमंभा १.११२. [ नव+सं. निधी=खजिना, सांठा ] ०**महाद्वारें**–नअव. नवद्वारें पहा. ०**महारोग**–पुअव. राजयक्ष्मा, कुष्ट, रक्तपिती, उन्माद, श्वास, मधुमेह, भगंदर, उदर व मूतखडा हे नऊ दुर्धर व भयंकर रोग. [ नव+सं. महारोग=मोठा, भयंकर रोग ] ०**रंगी**–वि. नऊ रंगांनीं युक्त ( पदार्थ ). ०**रत्नराजमृगांक**–पु. ( वैद्यक ) एक औषधी रसायन. [ नव+रत्न+राजन्+मृग=हरिण+अंक=चिन्ह ] ०**रत्नें**–नअव. हिरा, माणिक, मोतीं, गोमेद, इंद्रनील, पाच, प्रवाळ, पुष्कराज, वैडूर्य किंवा तोर्मली हीं नऊ प्रकारचीं रत्नें ' नवरत्नांची आंगठी. ' ०**रत्नांचा हार**–पु. स्त्रियांचा गळयांत घालण्याचा एक बहुमोल हार. ०**रस**–पुअव. (साहित्य) साहित्यशास्त्रांत वर्णिलेले शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र आणि शांत या नांवांचे नऊ रस. 'जी दैविकीं उदार वाचा। जैं उद्देशु दे नाभिकाराचा । तैं नवरससुधाब्धीचा। थावो लाभे। ' –ज्ञा १०.७. ' ज्ञाता जो सरसावला, नवरसां–माझारि शृंगारसा। ' –र ५. [ नव+सं. रस ] ०**रसिक**–वि. चलाख; तरतरीत; आवेशयुक्त; नऊ रसांनीं भरलेलें, पूर्ण (गान, कवन, कथा, वर्णन, ग्रंथ, श्लोक, गवई, कवि, वक्ता इ० ). [नवरस] ०**रात्र**–न. १ (सामा.) नऊ अहोरात्रांचा समुदाय. २ (विशेषार्थानें) चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंतचा काल (रामाचें नवरात्र); तसेंच आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंतचा नऊ दिवसांचा काल. ( देवीचें नवरात्र ) यास शारदीय नवरात्र असें म्हणतात व हेंच अधिक रूढ आहे. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून चंपाषष्ठीपर्यंत सहा दिवस खंडोबाचें नवरात्र असतें. ३ वरील कालांत करतात तो देवाचा, देवीचा उत्सव, पूजा. [ नव+सं. रात्रि=रात्र ] ०**लक्ष**–वि. ( काव्य ) नऊ लक्ष. ' आकाशांत नवलक्ष तारे आहेत. ' [ नव+लक्ष=शंभर हजार ] ०**लक्षणें**–नअव. आचार, विनय, विद्या, प्रतिष्ठा, तीर्थदर्शन, निष्ठा वेदपठन, तपस्या व दान हीं ब्राह्मणाचीं नऊ लक्षणें. –शर. ०**लाखा–ख्या**–वि. ज्याच्याजवळ नऊ लक्ष रुपये आहेत असा; लक्षाधीश; अतिशय श्रीमंत. ' आपुल्या तुम्ही घरचे नवलाखे मिजाजी। ' –प्रला १७५. [ नव+लाख=शंभर हजार ] ०**विध**–वि. नऊ प्रकारचें. [ नव+सं. विधा=प्रकार, भेद ] ०**विध भजन**–न. नवविधा भक्ति पहा. ' नवविधभजन घडो । तुझिये स्वरूपें प्रीति जडो । ' ०**विध रत्नें**–नअव. नवरत्नें पहा. ०**विधा भक्ति**–स्त्री. श्रवण=ईश्वराचें गुणवर्णन, चरित्रें इ० ऐकणें; कीर्तन=ईश्वराचें चरित्र वर्णन करणें, वाचणें; स्मरण=ईश्वराचे गुण, चरित्र इ० आठवणें; पादसेवन=ईश्वराचे पाय धुणें, चेपणें इ० सेवा; अर्चन=पूजा करणें; वंदन=नमस्कार करणें; दास्य=चाकरी करणें; सख्य=ईश्वराशीं सलगी करणें; आत्मनिवेदन=ममत्व सोडून ईश्वरास सर्वस्व, स्वतःला अर्पण करणें. या नऊ प्रकारानीं करावयाची ईश्वराची भक्ति, सेवा. ' श्रवण कीर्तन स्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । हे भक्ति नवविधा पै । ' –विपू ५.२३. –दा १.१.३. [ सं. नवविधा=नऊ प्रकारची+भक्ति=सेवा ] ०**सर**–वि. नऊ सरांचा ( हार इ० ). नव+सर ] ०**सुती**–स्त्री. जानवें करण्यासाठीं नऊ पदरी वळून केलेला दोरा. [नव+सूत=दोरा] **नवांकित**–वि. पुठ्ठ्यावर नवाच्या आंकडयानें चिन्हित ( घोडा ). [ नव+सं. अंकित=चिन्हानें युक्त ] **नवास्र**–वि. नवकोण पहा. [ नव+सं. अस्र=कोण, कोपरा ]

**नव**—अ. ( काव्य. ) न; नच; नये. ' गो–धनीं बहु पुढें नव जावें। ठाव एकचि धरूनि थिजावें। ' –वामन–वेणुसुधा २२. –मुवन १.१२. –सारुह २.१३. [ सं. न वै, नैव; प्रा. णवि ]

**नवकरी**—स्त्री. चाकरी; सेवावृत्ति. नौकरी पहा. ' नवकरीस जावयालागोनि तंटा। ' –दावि ३१४.

**नवका**—वि. ( प्र. ) नवखा. नवखा पहा.

**नवखा**—वि. १ नवीन; अपरिचित. ' मग मला काय नवखीसारखें विचारितेस ? ' –मृ २५. २ ( एखादा व्यवहार, धंदा इ० कांत ) अनभ्यस्त; सराईत न झालेला; गैर वहिवाटलेला; नवा. [ नव ]

**नवगण**—स्त्री. ( गोदी इ० ठिकाणीं हमालामध्यें रूढ ) मोठे, वजनदार पदार्थ, पीप इ० उचलण्यासाठीं उपयोगांत आणतात तो वासा व दोरखंड, किंवा शिंकें ( विरू. ) नवघण.

**नवगण्या**—वि. नवगण, दोरखंड इ० कानीं वजनदार पदार्थ उचलणारा ( मजूर ). [ नवगण ]

**नवघड**—नवघण पहा.

**नवघण**—स्त्रीन. दोन–चार माणसांनीं उचलून न्यावयाजोगें ओझें उचलण्याचा दोर बांधलेला दांडा; भक्कम वांसा; ओझें उचलतांना त्याखालीं घातलेला वांसा. –पया २८९.

**नवच(ज)णें**—अक्रि. (काव्य) न जाणें. 'झालें नेत्राचें उन्मीलन। उठिलें अंतःकरण। परी अनुभवाचें अवतरण। तें न वंचेचि।'–विपू २.२. –दा ४.३.२३.' सद्‌गुरु बैसल्या आसनीं। शिष्यें न बैसावें नेहटूनी। दूरी नवजावें तेथूनी। नयनोन्मीलनीं रहावें।'–एभा १७.३१७. –स्वादि ११.४.३४. [न+वचणें= जाणें]

**नवचे**—क्रि (काव्य) न वेंचे=कांहीं एक खर्च होत नाहीं, कांहीं दाम पडत नाहीं, कांहीं जात नाहीं अशा अर्थाच्या शब्दसंहतीचें अपभ्रष्ट रूप.

**नवंट**—वि. १ ज्याचा नवेपणा अद्याप गेला नाहीं असा (पदार्थ इ०). २ नुकतेंच कापलेलें, तोडलेलें (लांकूड इ०). ३ नवीन; नवा. [सं. नव; म. नवा]

**नवटणें**—क्रि. न वाटणें. 'मज कोन्हांचें कांहीं नवटे।'–शिशु १३६. 'पुत्राचेनि स्नेहें मोठें। आपुलें कांहींच नवटे।' –विपू ७.१२९. [न+वाटणें]

**नवत(ता)रणें**—सक्रि. फार जुनें झालेलें घर इ० कांस थोडें-बहुत नवें सामान घालून नवें दिसेलसें करणें. [नवतर. नव+उतरणें]

**नवति-ती**—स्त्री. नव्वद. [सं.]

**नवती**—स्त्री. १ तारुण्यदशा; यौवन; तारुण्याचा भर; ज्वानी २ वसंत ऋतूंत नागवेलीस नवीं पानें फुटण्याची अवस्था;(सामा.) नवी पालवी. 'नवतीचीं पानें खावयास चांगलीं.' ३तरुणी.–शर. [नव]

**नवद्**—वि. (विरू.) नव्वद; ९० संख्या. नव्वद पहा.

**नवदर**—पु. (मल्लविद्या) कुस्तींतील एक डाव. ह्यांत जोडी दाराच्या बरगडीजवळून आपला हात घालून त्याच्या धरलेल्या मनगटाला पिरगटून त्याला चीत करितात. [हिं. नौना=वांक-विणें ?]

**नवनीत**—न. १ लोणी; ताजें लोणी. –ज्ञा १.५१. 'घरा-मधें अर्भकरूप रांगे। पदोपदीं जो नवनीत मागे।' –सारुह १. ६१. 'मंथनेंवीण जरी निवडे नवनीत। तरी सद्‌गुरुवांचोनि पर-मार्थ। ठायीं न पडे जीवांसी।'–रावि १.४३. २ सार; सार-भूत अंश. [सं.] **०नीतवत्**–वि. लोण्यासारखा (मऊ, गुळ-गुळीत). विशेषतः स्तनांना उद्देशून प्रयोग. –क्रिवि. लोण्या-प्रमाणें. [सं. नवनीत+सं. वत् प्रत्यय=प्रमाणें, सारखा]

**नवंबी**—स्त्री. (कों.) नव्या लावणीची पानवेल.

**नवम**—वि. नववा. [सं] 'ठायीं न पडे जीवांसी। अभि प्रावो सातेंशति। तो एकलाचि नवमीं।' –ज्ञा १०.३१.

**नवमी**—स्त्री. चैत्रादि महिन्यांच्या प्रत्येक पधरवड्यांतील नववी तिथि. [सं.]

**नवरकळा**—स्त्री. लग्नसमारंभांत अभ्यंग, वस्त्रें-भूषणें इ० कांनीं नवऱ्या मुलास आलेलें विशेष तेज, कांति, टवटवी. [नवरा+ कळा=तेज]

**नवरंगे**—वि. १ केशरी वस्त्र वापरणारे. २ एक आडनांव. [नवरंग=केशरी वस्त्र –राजवाडे ग्रंथमाला]

**नवरजाती**—पु. (माण.) लग्नसमारंभांत नवरानवरीस घाल-ण्याचा चर्मी जोडा. नवरजोडा पहा.

**नवरजोडा**—पु. (चांभारी धंदा) लग्नप्रसंगीं नवऱ्या मुलास घालावयास घेतात तो जर्मी जोडा. [नवरा+जोडा]

**नवरदेव**—पु. विवाहसमारंभांत नवऱ्या मुलास उद्देशून गौर-वानें योजावयाचा शब्द; वर; नवरा मुलगा. [नवरा+देव]

**नवरभान**—न. (कातकरी) नवरानवरीचे वडील एकमेकांना भेटल्यानंतर पंचांना दारू पाजण्याचा विधि. 'सकाळीं नवरा-नवरीचे बाप भेठतात तेव्हां नवरभान काढा असा पंच आग्रह धरतात.'–बदलापूर ११९.

**नवरस**—पु. (कों.) नवरा पहा.

**नवरा**—पु. विवाहयोग्यता आल्यापासून विवाह होईपर्यंतच्या अवस्थेंतील पुरुष; लग्नास योग्य झालेला मुलगा; वर. २ नवरदेव; नवरामुलगा; वर. ३ पति. ४ उंसाच्या चरकांतील मधली लाट, नर; नर अर्थ ८ पहा. ५ मळसुत्री खिळा नर. नर अर्थ ७ पहा. [सं. नववर=नोवरा; पोर्तु. जि. रोन, रोम] **म्ह०** नवरा मरो कीं नवरी मरो, उपाध्याला दक्षिणेशीं प्रयोजन. **०नवरी**–स्त्रीअव. १ वर आणि वधू. २ उंसाच्या चरकांतील नर व मादी अशा दोन लाटा. [नवरा+नवरी] **म्ह०** नवरानवरी एक वऱ्हाडी जागचे लोक. **०मूल**–पु. नवरा मुलगा; वर. [नवरा+मूल]

**नवरी**—स्त्री. १ वधू. २ विवाहयोग्यता आलेली, उपवर मुलगी. ३ (खा.) पत्नी; बायको (प्रायः ऋतुस्नात न झालेल्या विवाहित मुलीस उद्देशून योजतात) ४ उंसाच्या चरकाच्या दोन लाटांपैकीं किंचित् लहान असलेली लाट; मादी. ५ दाराच्या झड-पांनां असलेली लोखंडी पट्टी; मादी. [सं. नववरिका–नोवारिका–नोआरिआ–नवरिआ–नवरी–मसाप १.२.१०]

**नवरी**—स्त्री. (सांकेतिक) पैसा. 'नवरी कोट (एक कोट रुपये) पावली.' –रा ३.२२०.

**नवरी**—स्त्री. (व.) ज्वारी खुडण्याची मजुरी देण्याची टोपली. 'आज खुडणाचा भाव किती नवऱ्या आहे'

**नवरीस**—स्त्री. (कों.) नवरी पहा.

**नवल**—न. १ आश्चर्यकारक, विलक्षण, अद्‌भुत गोष्ट; चम-त्कार; सांगण्याजोगी, ऐकण्याजोगी नवी गोष्ट. 'नम्रत्वहि नवल नव्हे न जुना बहु नासिकेशि ज्या श्वित्र।' –मोसभा ५.६०. २ आश्चर्य; अचंबा; कौतुक; कुतूहल.(क्रि० वाटणें). 'नवल गावींची

रवडी। कैसी देवां धर्माची आवडी।' –शिशु ५८६. 'सारथि बृहन्नडा ज्या तद्विजयें करुत बायका नवला।' –मोविराट ६.७३. –वि. आश्चर्यकारक; विलक्षण; अद्भुत. 'परी नवल त्याचें लाघव। अभंगीं घातलें माझें नांव। शेखीं नांवाचा निजभाव। उरावया ठाव नुरवीच।' –एभा १.९९. [सं. नव; हिं. नवल=सुंदर, मनोहर] म्ह० (व.) नवलाची बायको कवलाचें घर=स्वतःची प्रशंसा करणाऱ्या स्त्रीस उद्देशून म्हणतात. ०अभ्दुत–अपरूप–विशेष–वि. नवें आणि आश्चर्यकारक; नवीन आणि विशेष; कांहीं तरी विलक्षण, अपूर्व (खबर, वार्ता इ०कांच्या पुसतपासांत उपयोग). –न. आश्चर्यकारक, अद्भुत, विलक्षण गोष्ट. नवल अर्थ १ पहा. [नवल+अद्भुत–अपरूप–विशेष] ०कथा–स्त्री. १ अद्भुतगोष्ट; नवल. २ कादंबरी; (इं.) नॉव्हेल. [नवल+कथा; गुज. नवलकथा] ०पण–न. १ नवेंपण; नवीनपणा; कौतुक. 'ते वेळीं कृतकृत्यता जगभरे। तेथ अध्यात्माचें नवलपण पुरे। कर्माचें काम सरे। विरमे मन।' –ज्ञा ७.१७७. २ अनोळखण; अनोळखीपणा. –मनको [नवल] ०परी–स्त्री. (काव्य.) आश्चर्य; नवल. 'मग भ्रताराप्रति हे नवलपरी। कथितां दोघेहि हरुषले।' –दावि २२. 'शूर्पकर्ण षण्मुख जयाचे नवलपरीचे सुत।' –प्रला ६. –वि. अद्भुत; आश्चर्यावह; विलक्षण; नवल वाटण्यासारखें; चमत्कारिक. –क्रिवि. आश्चर्यकारक रीतीनें; विलक्षण तऱ्हेनें, प्रकारानें. [नवल+परी=प्रकार] ०विदानी–पु. नवल घडवून आणणारा; अद्भुत कृति करणारा. आश्चर्य करणारा. 'कैसा नवलविदानी। पुतळियां चालेंति वळनवाहानी।' –शिशु ७७१. [नवल+विदाणी–नी=चतुर; धूर्त इ०] ०विशेष–न. नवल अद्भुत पहा. नवल वाटण्यासारखी एखादी गोष्ट; विशेष उल्लेखण्यासारखी, सांगण्यासारखी एखादी हकीकत, समाचार. नवलाई–स्त्री. आश्चर्यकारक, अपूर्व, अलौकिक, नवल वाटण्यासारखी गोष्ट; नवल. [नवल] नवलार–न. नवल; आश्चर्य. –शर. नवलाव–लावा–पु. १ चमत्कार; नवल; आश्चर्य; अलौकिक गोष्ट; नवलाई. 'पातया पातें मिळे। कीं द्रष्टृत्व सैंध पघळे। तिये उन्मळितां मावळे। नवलावो।' –अमृ ७.१८४. 'ब्राह्मणप्रतापाचा नवलावो। तिही आज्ञाधारक केला देवो।' –एभा १.१७०. २ फरक. [नवल]

**नवलकोल**—पु. एक प्रकारचा भाजीच्या उपयोगाचा गड्डा; अलकोल पहा. याचा वास किंचित उग्र असतो. [इं. नोएल्, कोल्=कोबी]

**नवलपरी**—स्त्री. १ खणाळ्याची एक जात. २ नवल पहा.

**नवलाई**—स्त्री. १ एक पिशाच्चदेवता; जखीण पहा. 'नव लाई देवी म्हणे गुरुदेवें नवलें केली।' –सप्र ५.१८. –खेया ५६. २ (सामा.) ग्रामदेवता.

**नवली**—स्त्री. १ (सुखाच्या राहणीनें शरीराला, पावसाच्या पिकाला, आजारानंतर रोग्याला, खावयास मिळाल्यानें क्षुधिताला येणारी) तेजगी; कांति; टवटवी; नूर. (क्रि० पालटणें; फिरणें). 'बाळा नीजविली परंतु नवली तोंची बहिर्देखिली।' –अकक २ विठ्ठलकृत रसमंजरी ७. 'पाऊस लागताच शेताची नवली पालटली.' २ वृत्ति; मनाचा कल; स्वभाव. 'तुझी सुखधामा नवली। कशि फिरलि जिला जगत्रयी मानवली?।' –मोकृष्ण ३९.४५. 'श्रीरंगपटनापासून नवली फिरऊन बेइमान जाहाला आहे.' –पेद १०.६०.

**नवलु**—न. (महानु.) नवल; आश्चर्य. 'पुन तें अवस्था नवलु आइका।' –शिशु १७२. –शिशु २१. [नवल]

**नववा, नव्वा**—वि. क्रमानें मोजतांना आठव्यानंतर येणारा. [सं. नवम]

**नवशा**—वि. नवस करणारा. 'यात्रांच्या निमित्तानें जमणारे हौसे, नवसे, गवसे यांच्या गलबल्यांत देशहितवाल्यांनींहि आपलें गाठोडें पुढें टाकलें आहे हें उचित होय.' –खेया ५७. [नव]

**नवशी(सी)क**—वि. नवसाचा; नवससंबंधाचा. [नवस]

**नवस**—पु. १ इच्छित कार्य सिद्धीस जावें म्हणून देवाची प्रार्थना करून कार्यसिद्धि झाल्यास देवास (एखादी) वस्तु अर्पण करण्याची प्रतिज्ञा. 'दूर प्रिय जन वसती। देखाया करिति नित्य नवस नव सती।' –मोकृष्ण ४७.७७. २ त्या प्रतिज्ञेंतील अर्पणविषयभूत पदार्थ. [सं. नमसित; प्रा. णमसिअ; णवसिअ. (सं. नमस=अनुकूल; कृपादृष्टियुक्त)] म्ह० (व.) नवसाचा भोपळा चारीवाटा मोकळा=नवस करून झालेल्या मुलाच्या दुर्वर्तनाबद्दल म्हणतात. २ 'जरी नवसें पुत्र होती। तरी कां करावा लागे पती।' –तुगा. (वाप्र.) (एखादी गोष्ट इ०काविषयीं–बद्दल–करितां–साठीं–स्तव, एखाद्या गोष्टीचा) नवस करणें–एखादी गोष्ट सिद्धीस नेण्याबद्दल ईश्वरास प्रार्थणें व कांहीं वस्तु अर्पण करण्याचा संकल्प करणें. २ (ल.) (एखाद्या गोष्टीबद्दल) मोठ्या उत्कंठेनें याचना करणें; ती गोष्ट अत्यंत उत्सुकतेनें इच्छिणें. ०देणें–(व.) मार देणें. ०पुरणें–(एखाद्याचें) इष्ट कार्य (नवस केल्यामुळें) सिद्धीस जाणें. ०फळास येणें–इष्ट मनोरथ सिद्धीस जाणें. 'आजि पुरले नवस।' –तुगा. ०फेडणें–नवस फळाला आल्यावर, पूर्ण झाल्यावर देवास वस्तु इ० अर्पण करण्याची जी प्रतिज्ञा केली असेल ती पार पाडणें. –साचा–वि. नवसानें प्राप्त झालेला. –साचा नाऱ्या–पु. (व.) (उप.) नवस करून झालेला मुलगा (हा पुढें वाईट निघाल्यास त्याला उद्देशून योजण्याचा वाक्प्रचार). –सास पावणें–(नवस केलेल्या देवतेनें नवस करणाराचे) मनोरथ पूर्ण करणें. नवसें मागितलें, मुळावर आलें–(मुलगा व्हावा म्हणून नवस केला त्याप्रमाणें मुलगा झाला पण तो आईबापांच्या मुळावर आला या अर्थी) अतिशय उत्सुकतेनें इच्छिलेली वस्तु

नुकसानकारक झाल्यास हा वाक्प्रचार योजतात; (व.) नवसाचा नाऱ्या. सामाशब्द- ०देव-पु. ज्यास नवस केला असेल तो देव; नवसाला पावलेला देव. 'श्रृद्धाचारीचे पूजिले देव। नवसदेवाहि दिधलें गौरव।'-दावि ३३. ०नवसणें-नवस करणें; नवसणें पहा. 'कवण नवस नवसूं आतां। कृष्ण नाथ प्राप्तीसी।'-एरुस्व २.४२. ०सायास-पु. (एखाद्या कार्याच्या सिद्धीकरितां करावा लागणारा) नवस; ईश्वराराधना व शारीरिक कष्ट इ०; दुःखकष्ट; हाल-अपेष्टा; प्रयत्न इ०. [नवस+आयास]

**नवसणें**—उक्रि. (देवता इ०कास) नवस करणें; नवसा विषयीं, यात्रा, पदार्थ इ० विषयीं प्रतिज्ञा करणें. 'द्वारावतीची कुल्देवता। स्मरूनि नवसिली शत्रुघाता।'-मुसभा १५.२७८. -आमा २६. [नवस]

**नवसरणें, वनसारणें**—उक्रि. १ (घर इ०कांची) दुरुस्ती; डागडुजी करून नवें दिसेलसें करणें. २ (सांगितलेली गोष्ट विसरून जाऊं नये म्हणून) पुनःपुनः सांगणें. 'तुमची गोष्ट तो विसरला असेल तरी नवसारून या.' [नव+सरणें; नवसर]

**नवसागर**—पु. (रसा.) कल्हई लावण्याच्या कामीं वापरावयाचा एक क्षार. अमोनिया व क्लोरिन यांच्या संयोगानें बनलेला एक क्षार. हा खनिज आहे. इं. अमोनियम क्लोराइड. [सं नवसार; गुज. नवसार; अर. हिं. नवसादर]

**नवसिआ**—वि. (महानु) नवस करणारा. 'हरिचंदनाचे फोक। सोलौनि कीजेति दारवंड त्रिशाक। वरि सेंदुरें विनायक। नवसिआंचे।'-शिशु ७६५. [नवस]

**नवसी**—वि. नवस करणारा. 'मळमूत्रद्वारें। होऊनि ठाकती खोंकरें। नवसियें होती इतरें। माझिया निधनीं।'-ज्ञा १३.५७१. [नवस]

**नवसीक**—वि. नवससंबंधाचा; नवशीक पहा. [नवस]

**नवसीय**—वि. नवस केलेलें (दैवत). 'रिचविती जळतकुंडीं। लाविती चेडयाच्या तोंडीं। नवसियां देती उंडी। बाळकांची।' -ज्ञा १७.९७. [नवस]

**नवसुलॉ**—वि. (गो.) नवसानें झालेला. [नवस]

**नवळका**—वि. नवीन; अपूर्व; विलक्षण; नवलपूर्ण; चमत्कारपूर्ण. [नवल]

**नवा**—वि. १ नवीन; नूतन; अस्तित्वांत येऊन फार दिवस झाले नाहींत असा. २ (एखाद्या कार्यांत, व्यवहारांत, धंद्यांत) नवशिका; अनभ्यस्त; (नवशिक्या माणसास अनुलक्षून) अंगवळणी न पडलेलें (त्याचें कार्य). 'या कामांत तो नवा आहे आणि हें कामहि त्यास नवें आहे.' ३ उपयोग इ०कांनीं मलिन, अस्ताव्यस्त, जर्जर, जुना न झालेला. 'ही शालजोडी नवी आहे.' ४ अभूतपूर्व; अपूर्व; अपरिचित; अदृष्टपूर्व. 'आज नवें झाड पाहिलें' 'आज यांनीं नवाच श्लोक म्हटला.' ५ न उपभोगिलेला, उपयोगिला गेलेला. 'ही स्त्री अजून नवी आहे कोणी भोगिली नाहीं.' ६ नुकतीच ज्यानें (कार्याचीं, कारभाराचीं) सूत्रें हातांत घेतलीं आहेत असा (कारभारी, त्याचा कारभार) -शास्त्रीको. ७ तरुण. नव पहा. [सं. नव; प्रा. नवओ; सिं. नओ; हिं. नया; फ्रें. जि. नेवो] (वाप्र.) ०जुना करणें-जुना बदलून नवा घेणें, करणें (करारनामा, हिशेब, करार, अंमलदार इ०). ०जुना होणें-नवीनपणा, नवखेपणा नाहींसा होणें; परिचित होणें; वहिवाटला जाणें. **नवीजुनी ओळख**-स्त्री. पुन्हां नव्यानें करून घेतलेला, नवा केलेला जुना परिचय. **नवीजुनी सोयरीक**-स्त्री. पुन्हां नव्यानें जोडलेला (एखाद्या व्यक्तीचें मरण इ०सारख्या कांहीं कारणामुळें तुटलेला) संबंध, सोयरीक. **नवी नवती**-स्त्री. नवयौवन; तारुण्याचा भर; ऐन ज्वानी; नवनवती पहा. **नवी नवरी**-स्त्री. १ नुकतेंच लग्न झालेली मुलगी. २ (उप.) स्वाभाविकपणें जी गोष्ट माहीत असायला पाहिजे ती माहीत नसलेला, माहीत नसल्याचा आव आणणारा, लाजाळु मुलगा, मुलगी. **नवी नवाई, नवी नवा(व्हा)ळ, नवी नवलाई, नवो नवाळी**-स्त्री. १ नव्यानें, नुकतेंच निघालेलें (प्रतिवर्षी होणारें) धान्य, फळ इ०; नवान्न. 'हे पेरू पाठवायाजोगे नव्हेत परंतु नवीनवाळ म्हणून पाठवावे.' २ वर्षाच्या नवधान्याच्या, नवीन निघालेल्या फळांच्या भक्षणाचा योग, क्रिया. ३ (ल.) नवीन, अपूर्व व सुंदर वस्तु. **नवें जग**-न. अमेरिका व ओशियानिया हीं दोन खंडें. यांचा शोध अलीकडेच लागल्यानें त्यांस हें नांव आहे. **नवेंजुनें**-न. १ (राज्य इ०कांत) जुने अधिकारी काढून नवीन नेमण्याचा प्रकार. २ जुन्या वस्तू देऊन नवीन घेण्याचा, परस्पर बदलण्याचा प्रकार. **नवें टाकणें**-(ना.) नवीन उपक्रम सुरू करणें; दीर्घकालानंतर एखादी गोष्ट करणें. **नव्या उमेदीचा**-वि. तारुण्याच्या जोमानें, उत्साहानें व महत्वाकांक्षांनीं परिपूर्ण; (अजून) जगाचे कटु अनुभव ज्याला आले नाहींत असा उत्साही व महत्वाकांक्षी (तरुण मनुष्य). **नव्याची पुनव**-स्त्री. आश्विनांतील व माघी (मार्गशीर्ष-शास्त्रीको ?) पौर्णिमा; नवान्नपूर्णिमा पहा. **नव्याच्यानें, नव्यानें**-क्रिवि. प्रथमच; नवीन म्हणून. 'या रणपटु योद्धयाची ओळख आमच्या स्वराज्यावरील कादंबऱ्या वाचणारांना नव्यानें करून देण्याची आवश्यकताच नाहीं.'-स्वप ५९. **नव्याजुन्याचा मेळ**-नवे आचार, नवे विचार त्यांचें सार व जुन्या आचारविचारांचा विचार करून योग्य असेल तें घेऊन ऐक्य करणें. **नव्या(वे)ताण्याचा**-वि. १ विणून तयार होऊन फार दिवस झाले नाहींत असें (वस्त्र इ०). २ अशा वस्त्राचें सूत इ० म्ह० १ नवें नवें जेवी सर्वें=पाहुणा नवीन आहे तोंपर्यंत घरमालक त्याला बरोबर पंक्तीला घेऊन कांहीं दिवस जेवतो, पुढें

परिचय झाल्यावर मात्र हेळसांड व्हावयास लागते. २ नवें नवें नि खाटल्याभवतें भवें. ३ नवी विटी नवें राज्य, नवी विटी नवा डाव. (विटीदांडूच्या खेळांत विटी बदलून नवी घेतली तर सर्वच बदलतें त्याप्रमाणें) =एखाद्या कारभारांत नवीन कारभारी आला तर त्याचें सर्वच तंत्र नवीन असतें. ४ जुने डोळे आणि नवे चाळे, तमाशे. ५ नवां दिवशीं नवी विद्या. ६ नव्याचे नऊ दिवस=कोणतीहि गोष्ट नवी आहे तोंपर्यंत (कांहीं दिवस) लोक तिचें कौतुक करितात. त्या वस्तूचा नवेपणा व लोकांचें कौतुक फार दिवस टिकत नाहीं. सामाशब्द- **०आडसाली**-वि. उंसाचा एक प्रकार. नवीन लागवड केलेला एक वर्षाआड पीक देणारा उंस. **०करकरीत**-वि. अगदीं नवा; पूर्णपणें नवा; कोरा करकरीत; करकरीत पहा. **०तरणा-तरणाफोक**-वि. जवानमर्द; ज्वानींत असलेला; तारुण्याच्या भरांत असलेला (पुरुष). **०नूतन**-वि. अगदीं नवा; कोरा करकरीत. [नवा+सं. नूतन=नवा]

**नवा**—वि. नववा-वें. 'आठ सगुण ब्रह्म। नवे निर्गुण ब्रह्म।' -दा ७.३.८. 'नवा महिन्या तुम्ही देखाल बालासी।' -रामदासी २.१०३. [नव=नऊ]

**नवाई**—स्त्री. १ नवल; अद्भुतता; आश्चर्य; अपूर्वता. 'आतां ऐसियाहीवरी काई। सांगों व्याप्तीची नवाई।' -ज्ञा १५.४११. 'कैसी देवाची नवाई। अपायचि झाले उपायीं।' -शिसं ७.२९. २ अद्भुत; अपूर्व; आश्चर्यकारक गोष्ट, लीला; चमत्कार. 'ते हंसरूपाची नवाई। अभिनव कांहीं बोलवी।' -एभा १३.१३. ३ नवेपणा. 'अभिनव संपत्तीची थोराई। आणि आवडीची नवाई।' -वेसीस्व ७.४५. ४ (तारुण्य इ०कांची) तेजगी; टवटवी. 'काय सांगूं मी ह्या रूपाची नवाई।' ५ -वि. नवीन; नवा. 'ऐका नवाई उपासना।' -दावि १. [नवा; गुज. नवाई]

**नवाज**—वि. कनवाळू; पोशिंदा. 'आम्हीं पदोपदीं महाराज। अन्याई गरीबा नवाज। चालवा स्नेहाचीं लाज। मागणें हें स्वामीराज।' -होला १३४. [फा. नवाझ्]

**नवाजखानी-णी**—वि. तीक्ष्ण धारेचें. 'ढाल फिरंग नवाजखाणी निशंग गगन लकेरी खुण।' -ऐपो १०९.

**नवाजणी, नवाजणूक**—स्त्री. १ स्तुति; वाखाणणी; प्रशंसा; परामर्ष; पोषण. [नवाजणें]

**नवा(वां)जणें**—उक्रि. १ स्तुति, प्रशंसा, वाखाणणी करणें. 'अंतरें राखितां राजी। भलत्यास भलता नवाजी। अंतरें न राखतां भाजी। मिळणार नाहीं।' -दा १५.५.२०. २ प्रतिपाळ, रक्षण, लालन पालन करणें; परामर्ष घेणें. 'कृपादृष्टि पाहुनी गरिब नवाजी गे।' -मध्व ३८५. ३ पारितोषिक देणें; सत्कार करणें. 'त्यार्नी ऐसा सिष्टाचार केल्यानंतर यार्नी त्यासच नवाजिलें.' शको. ४. ५० -रा ६.३१४. 'अबुदल सदरें नवाजिला।' -ऐपो १०. [फा. नवाझ्; हिं. नवाझ्ना]

**नवाजश-नामा**—पु. कृपापत्र; शिफारसपत्र.

**नवाजस**—स्त्री. १ वाखाणणी; स्तुति; प्रशंसा. २ परामर्ष. नवाजणी पहा. [फा. नवाझिश्]

**नवाजिक**—वि. नामांकित; अपूर्व; अलौकिक. 'माह्रा बळियें पराक्रमी। जितुके पुरुषार्थी विक्रमी। राजे नवाजिक नामी। मिथिळेश्वरें आणिले।' -वेसीस्व ३.३. 'मानवा नवाजिक तनु मिळाली परि विफळा करिशीरे।' -राला २५. [नवाजणें]

**नवाजी**—स्त्री. स्तुति; प्रशंसा. 'त्या करेंकरुनि अर्जुनवाजी। खाजवी करुनि नित्य नवाजी।' -वामन, पार्थभाग्य २. -वि. नामांकित; प्रख्यात. 'त्रैलोकीचे नवाजी। अणसुट निर्मळ च्यारि वाजी। स्वेतवर्णी तेजःपुंजी। तया रथासी शोभले।' -वेसीस्व ८.१०९. [फा. नवाझी]

**नवाजीस**—स्त्री. स्तुति; तारीफ; प्रशंसा. 'महाराजांनीं नवाजीस करून वस्त्रें जवाहीर बक्षीस इनामगांव दिला.' -मराचिथोशा ८०. -वि. १ गौरविलेला. 'संताजी घोरपडे पूर्वी महाराजाचे नवाजीस.' -मराचिथोरा ४६. २ आश्रित; मेहेरबानींतला. 'आम्ही लोक त्यांचे नवाजीस.' -पेद ३.८४. [फा. नवाझिश्]

**नवाट-ठ**—वि. नवट पहा.

**नवाटकें**—न. शेराच्या अष्टमांशाचें माप; नवटकें पहा.

**नवाडा**—वि. (ना. व. खा.) नवखा; अपरिचित; परका. 'नवाडा मनुष्य घरांत आला.' [नवा]

**नवाण-न**—न. तांदुळाची एक जात; नवान्न पहा. [नवान्न]

**नवानवशीं, नवानवसानें**—क्रिवि. पुष्कळ नवस इ० करून (जन्मलेला मुलगा इ०); फार प्रयत्न, कष्ट, सायास करून (केलेलें, साध्य असलेलें काम, गोष्ट). [नव+नवस] **नवा नवसाचा** -वि. १ ज्याकरितां पुष्कळ नवस इ० केले होते असा (मुलगा इ०). २ (ल.) अतिशय कष्टानें मिळविलेला, साध्य केलेला (पदार्थ, गोष्ट इ०).

**नवाब**—पु. नबाब पहा.

**नवायी**—स्त्री. १ नवल; अपूर्वता; नवाई पहा. 'उद्धवा या कलियुगाच्या ठायीं। तुझ्या भाग्याची परम नवायी।' -एभा १७.७१. २ नवीनपणा. 'हेंचि आर्तार्च्याविषयीं। आर्तीतें प्रकाशी पाही। आर्ते ऐसे मग त्याच्याठायीं। नांवाची नवायी उपतिष्ठे।' -एभा १९.२७१. [नवाई]

**नवार**—स्त्री. १ तीन-चार बोटें रुंदीची आणि पुष्कळ लांब असलेली, पलंग विणण्याची सुती जाड पट्टी; नाडा; नुवार. 'एक नवारीची खाट, त्यावर एक चवाळ्यासारखें कांहीं तरी टाकलेलें.'

-वज्राघात ८७. २ (चांभारी धंदा) कातडें घोटण्यासाठीं असलेला जाडाभरडा कपडा. [फा. नवार्, नुवार्]

**नवारणें**—उक्रि. (राजा.) (पलंग इ०) नवारीनें विणणें. [नवार]

**नवासा**—पु नातू. [फा.]

**नवाळ**—स्त्री. (विरू.) नवीनवाळ; नवा नवीनवाळ पहा. -वि. नवीन; नवा. 'फुल भोगा नूतन नवाळें। मऊ माशुक मधुर मवाळें।' -प्रला १६६. [नवा]

**नवाळी**—स्त्री. एक जंगली फूलझाड; नेवाळी; रानजाई.

**नवाळी**—स्त्री. १ प्राप्ति. 'जीवांसि करीं नवाळी। कैवल्य सुखाची।' -दाव ४५३. २ कृपादृष्टि; मेहेरनजर. 'तुझी जालिया नवाळी। करिसी अज्ञान खंडोळी।' -कथा १.१.२१. ३ अपूर्वता; नवल; अद्भुत गोष्ट; चमत्कार. 'एक असें भूमंडळीं। एक असे आकाशपोकळीं। ऐसी त्या युद्धाची नवाळी। दोघे दाविती पार्थातें।' -जै ३७.९२. 'जया पुण्याची नवाळी। सुख दावी' -सिसं ८.१९५. ४ गोडी; इच्छा. 'तरी पावेन नवाळी ब्रह्मसुखाची।' 'मग नामघोषें पिटोनि टाळी। आनंदली भक्तमंडळी। म्हणती तुकयासी पावला वनमाळी। अनुपम्य नवाळी दिसत।' ५ हंगामातील धान्यांचा, फळांचा पहिला बहर. ६ तारुण्याचा भर; ऐन ज्वानी. ७ नवीनपणा; नवेपणा. ८ टवटवीतपणा; तेजगी. -मनको. [नवा]

**नॅवाळें**—न. (गो.) रुप्याचा, सोन्याचा कमरपट्टा.

**नविस्ता**—पु. पत्र; लिखित; लिखाण. 'याचा नविस्ता आला असेल.' -पया ४८८. [फा. नविश्ता]

**नवी**—अ. एकाला नवानें गुणतांना योजावयाचा शब्द. जसें-एके नवी नऊ. [नव=नऊ]

**नवीन**—वि. नवा; नूतन. [सं.] **०मत**-न. १ नव्या, आधुनिक पंडितांचें मत. २ सुधारणावाद्यांचें मत; सुधारकी मत; नवमत. [नवीन+मत] **०मुद्रा**-स्त्री. नवीन, अपरिचित व्यक्ति, वस्तु इ०काबद्दल योजावयाचा शब्द. [नवीन+सं. मुद्रा=चेहरा]

**नवीस-श**—अ. लिहिणारा या अर्थाचा फारसी प्रत्यय. जसें:-फडनवीस, अर्जनवीस, चिटनवीस, पोतनवीस, सबनवीस इ० नीस असेंहि याचें रूप होतें. उदा० चिटनीस, फडनीस इ०

**नवीसंदा, नविशिंदा**—पु. कारकून; लिहिण्याचें काम करणारा. 'एक नवीसंदा ... दिनचर्येची अखबार लिहिण्याकरितां रवाना करून.' -रा ५.१०५. 'फडावर कोणी नविसिंदा नव्हता.' -भाइ १८३४. निविसिंदा पहा. [फा. नवीसन्दा]

**नवें**—न. १ दरवर्षी होणारें धान्य इ०खाण्याच्या वेळीं करावयाचा संस्कार, कुळाचार; नवान्न पहा. २ (कों.) नवान्नपौर्णिमेच्या, आश्विन शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं नव्या भाताचीं लोंगरें, आंब्याचीं पानें हीं एका कामटीच्या ताटीवर बांधून घराच्या मुख्य दारावर बांधण्यासाठीं करतात तें तोरण; नवधान्याचें तोरण. [नवा]

**नवें**—अ. एक या अंकाखेरीज इतर अंकांना ९ या संख्येनें गुणतांना योजावयाचा शब्द. असें:-बे नवें अठरा; चार नवें छत्तीस इ० [नव=नऊ]

**नवेंतर**—वि. अलीकडचें. नवतर-थर पहा. -क्रिवि. नव्यानें; अलीकडे. [नवा]

**नवेद्य**—पु. देवास अर्पण करतात तें अन्न. (प्र.) नैवेद्य; नैवेद्य पहा. [नैवेद्य अप.]

**नवोड**—वि. अफूच्या पिकाकरितां राखून ठेवलेल्या जमीनींत पावसाळ्यांत ज्वारीचें पीक काढून पुढें जींत अफू करितात अशी जमीन. -कृषि ५०३. [सं. नव+ऊढ]

**नव्याण्णव**—वि. नव्वद व नऊ; ९९ या संख्येबद्दल योजावयाचा शब्द. [सं. नवनवति; तुल. गुज नव्वाणुं] **०वाटांनीं-हिश्यांनीं**-क्रिवि. बहुतेक; बहुत अंशीं. 'हें नव्याण्णव हिश्यांनीं-वाटांनीं घडायचें नाहीं.' **नव्याण्णवाचा फेरा**-पु.(एका तपस्वी व आत्मचिंतनपर मनुष्यास नव्याण्णव रुपयांची एक थैली सांपडली त्यामुळें त्याला शंभरावा रुपया मिळविण्याची इच्छा झाली. तो हळु हळु भ्रष्ट होत होत अखेरीस पूर्ण भ्रष्ट बनला. या बोधप्रद गोष्टीवरून) गुरफटून टाकणारी, वाढत जाणारी वासना, लोभ, हांव.

**नव्या नवसाचा, नव्या नवसानें, नव्या नवशीं**—(प्र.) नवानवसाचा इ०; नव, नऊ नवानवसाचा इ० पहा. [नवसाचा अप.]

**नव्यायशीं, नव्यांशी**—वि. ८९; एकुणनव्वद संख्या. [सं. नवाशीति]

**नव्वद**—वि. ९०; नऊ दशक. [सं. नवति]

**नव्वा**—वि. नववा. [नववा अप.]

**नव्हणें**—अक्रि. न होणें, नसणें या अर्थी क्रियापद. नव्हता नव्हे, नव्हेस इ० रूपांतच उपयोग. 'देवा गोठीचि हे ऐकतां। बोधु उपजतसे चित्ता। मा ऊनुभवें तल्लीनता। नव्हेल केवीं।' -ज्ञा ६.३३१. [न+होणें] **नव्हतां**-धातुसाधित अव्यय. न होतां. 'सम्पूर्ण दिवस नव्हतां हातीं। अंड येक फोडिलें।' -मुआदि ४.३४. 'तूझा प्रसाद नव्हतां मज याच काळीं।' -वामन-रुक्मिणीपत्रिका १४. **नव्हता**-वि. नसणारा; नसलेला. 'नव्हतेनि वल्लभें। आहेवपण कां शोभे।' -अमृ ६.६३. **नव्हसी**-नससी; नाहींस. 'श्रीकृष्ण भणे तो तूं नव्हसीं। जै वैदर्भिअे ते प्रणउँ आलासी।' -शिशु १०७०. **नव्हीजे**-क्रि. न होईजे; होणार नाहींस. 'एवं न करितां भगवद्भजन। अंतीं नव्हीजे पावन।' -दा ७.१०.२३. [न+होईजे]

**नव्हती**—स्त्री. नवती पहा.

**नव्हाट**—वि. नवीन; नवट. 'नव्हाटें जुनाटें वनें दाटथाटें' —राक १.५४. [नवट]

**नव्हांड**—स्त्री. वाण; तुटवडा; अभाव: (अन्न, धान्य इ० कांचा उडालेला) फन्ना; चट्टामट्टा. (क्रि० पडणें; होणें). 'धान्याची–गुळाची–तुपाची–अन्नाची–पैक्याची–नव्हांड.' [न+ होणें]

**नव्हाळी**—स्त्री. नवाळी. १ नावीन्य. अपूर्वता; नवलाई. 'वाणितां वनमाळी। शब्दसुखाची होए नव्हाळी।' –शिशु २३. 'ऐसी भजनभावाची नव्हाळी। सेवकाजवळीं स्वामी तिष्ठे।' –एभा ३.३४७. २ प्राप्ति. 'मग पावेन नव्हाळी। ब्रह्मसुखाची।' –विपू १.१. 'उत्तम गुणाची मंडळी। सत्त्वधीर सत्त्वागळी। नित्यसुखाची नव्हाळी। जेथें वसे।' –दा १.८.२२. ३ गोडी 'सेवावया स्वानंदनव्हाळी।' –एभा २८.२२२. 'किंवा क्षीरोदधीसी नव्हाळी। अजादुग्धाची।' –रास ५.८०७. ४ बहर; भर. 'कीं प्रथमवयसाकाळीं। लावण्याची नव्हाळी। प्रगटे जैसी आगळी। अंगनाअंगीं।' –ज्ञा १.४२. ५ कांति; तेजगी. 'करूनी निजकुळाची होळी। सरस्वतीतीरीं वनमाळी। टेंकोनि बैसला पिंपळातळीं। चरणनव्हाळी आरक्त।'–एभा ३०.२१३. नवाळी सर्व अर्थी पहा. [नवाळी]

**नव्हे**—क्रि. न होय, होत नाहीं. नाहीं इ०अर्थानें योजला जाणारा शब्द. 'जैसें अमृत नव्हे जुनें।' –दाव २९. 'नरदेह पावल्या जाण। आपणचि नव्हे ज्ञान।'–एभा २५.४१८. 'ही गोष्ट नव्हे तेव्हां अवघेच व्यर्थ.' –पेद ३.६३. याचीं भिन्न भिन्न पुरुषवाचक रूपें थोडीं घोटाळयाचीं असल्यामुळें तीं पुढें दिलीं आहेत. जसें:–मी नव्हे, नव्हें; तूं नव्हेस, नव्हस; तो, तीं तें नव्हे; आम्ही नव्हों; नव्हे; तुम्ही नव्हां, नव्हांत, नव्हे, नव्हेत; ते, त्या, तीं नव्हेत, नव्हत. 'आतां सद्गुरुते कैसे। नव्हेति इतरां गुरु ऐसे।' –दा ५.१.४५. –दा ११.२.३२. (या क्रियापदाच्या उपयोगासंबंधीं एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, कर्त्याचें अस्तित्व, स्थानिक संबंध इ० संबंधानें याचा प्रयोग होत नसून कर्त्याचे गुण, जात, स्वभाव, प्रकार, रूप इ० कांच्या संबंधाच्या वाक्यांतच याचा उपयोग होतो. जसें:–तो गतवर्षी मेला. तो आतां नाहीं. या वाक्यांत कर्त्याचें अस्तित्व किंवा अभाव=नसणें विवक्षित आहे म्हणून येथें 'नव्हे' चा उपयोग होणार नाहीं. तसेंच 'तो त्या घरीं–शहरीं नाहीं. या वाक्यांतहि 'नव्हे' चा उपयोग होणार नाहीं पण पुढील वाक्यांत नव्हेचाच उपयोग केला पाहिजे. 'नाहीं' या क्रियापदाचा प्रयोग केल्यास चालणार नाहीं. जसें:– हा काळा नव्हे, हा पाषाण नव्हे; हा मनुष्य नव्हे–ब्राह्मण नव्हे–गोलाकार नव्हे. [न+होय]

**नशणें**—अक्रि. नाश पावणें; नष्ट होणें; नाहींसें होणें. 'बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजीं समाये। ऐसेनि कल्पकोडी जाये। परी न नशे।' –ज्ञा १७.५९. [सं. नश्=नाश पावणें]

**नशा**—स्त्री. १ कैफ; धुंदी; गुंगी; निशा. २ कैफ येणारा अंमली पदार्थ; निशा. ३ मादकपणा; कैफाचा गुण. [अर. नशा] ०**करणें**–अंमली पदार्थाचें सेवन करणें; दारू इ० पिणें. ०**खोर**–वि. कैफी; अंमली; दारूबाज. [फा. नशा–खुर्]

**नशिअ(ह)त, नशयत, नशित–द**—स्त्री. १ उपदेश; समजावणी; सल्ला २ शिक्षा. 'या कोंडतापुढें खोटी साक्ष दिली असतां त्याचे इनसाफ व नशियद याविषयीं ...' –न्यासे २९९. २ तंबी. ४ (व.) अद्दल. [अर. नसीहत्] **नशीहतपूर्वक**–क्रिवि. निक्षून. 'म्हणोन नशीहतपूर्वक आज्ञा केली.' –पया ६६.

**नशीन**—वि. आरूढ, बसलेला या अर्थाचा नामास जोडावयाचा फारसी प्रत्यय. जसें:–तख्त–नशीन्=सिंहासनारूढ; गादी नशीन–जहन् नशीन इ० [फा. निशीन्=बैस]

**नशीब**—न. १ नेमणूक. २ वांटा. ३ दैव; प्रारब्ध. [अर. नसीब्] ०**उघडणें–उचकटणें**–भाग्य उदयाला येणें; चांगले दिवस प्राप्त होणें. ०**फुटणें**–मोठी आपत्ति येणें; अभागी असणें, होणें. ०**शिकंदर असणें**–(एखाद्याचें) दैव चांगलें, भरभराटीचें, बळकट असणें. –स्वप २२४. **नशिबाचे ताले**–पुअव. कर्मानुसार घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी; दैवयोग; प्रारब्ध. [नशीब+ अर. तालिअ; फा. ताले=ग्रह, दैव] इतर वाक्प्रचार दैव शब्दामध्यें पहा. ०**वंत–वान–वाला**–वि. सुदैवी; भाग्यवान. 'हजारो पदरामधें उमराव नशिबवाला।' –ऐपो २४१. [नशीब+वंत, वाला, वान प्रत्यय]

**नशेकची**—वि. १ चोपदार. २ व्यवस्थापक. 'नशेकची येऊन लोक परतोन नेले' –रा ६.४७२.[अर. निशाक्=व्यवस्था]

**नशेत**—स्त्री. १ उपदेश; समजावणी. 'दुर्गंकर राजे यांनी परशुराम पंतास बहुत नशेत करून लिहिलें आहे.' –ख ४.१५६७. २ शिक्षा. नशिअत पहा.

**नश्वर**—वि. नाश पावणारा; अशाश्वत; न टिकणारा; नाशवंत; हंगामी. 'देहें उतराई होऊं गुरुसीं। तरी नश्वरता या देहासी। नश्वरें अनश्वरासी। उत्तीर्णता केंवी घडे।' –एरुस्व ५.९३. 'जेवढा दृश्य पदार्थ तेवढा नश्वर.' [सं.]

**नश्वरता**—स्त्री. अशाश्वतपणा; नाशवंतपणा; क्षणभंगुरता. [सं.]

**नष्ट**—वि. १ नाश पावलेला; नाहींसा, जमीनदोस्त, धुळधाण झालेला; विध्वंसित. २ दुसऱ्याचा नाश, वाईट करण्याचा स्वभाव असणारा; दुष्ट; द्वाड; निर्दय; कठोर. 'तुका म्हणे नष्टा। अबोलण्या

तुझ्या चेष्टा।'–तुगा १४१९. [सं.] ०खर्च–पु. (गो.) निरर्थक, घातुक, अनवश्यक खर्च. 'जत्रेंत नष्टखर्च जास्त असतो.' ०चर्य–र्या–नस्त्री. दुर्दैव; हीन–दीन स्थिति; कष्टदशा; उतरती कळा. [नष्ट+चर्य, चर्या] ०दिन–दुर्दिन; वाईट दिवस. 'नैषधा कवणेक नष्टदिनीं। विसर पडला शौचाचमनीं।'–कथा १.९.३. ०धन, नष्टैश्वर्य–वि. निर्धन; दरिद्री झालेला. [नष्ट+धन, ऐश्वर्य=संपत्ति] ०प्रभाव पराक्रम–वीर्य–वि. निर्वीर्य; दुबळा; निर्बल झालेला. ०बुद्धि–वि. कमकुवत बुद्धीचा; कमी समज असणारा; ज्याची बुद्धि नष्ट झाली आहे असा. [नष्ट+बुद्धि] ०वंश–वि. निर्वंश झालेला. ०विवेक–वि. विवेकशून्य; अविचारी; अविवेकी. [नष्ट+सं. विवेक=विचार] **नष्टात्मज**–वि. (ज्याचा) एकहि मुलगा जिवंत राहिलेला नाहीं असा; निपुत्रिक बनलेला. [नष्ट+सं. आत्मज=मुलगा] **नष्टेंद्रिय**–वि. ज्याचीं इंद्रियें शिथिल, निर्जीव झालीं आहेत असा. **नष्टोपाय**–वि. दैवहत; अगतिक झालेला; ज्याचे उपाय कुंठित झाले आहेत असा. [नष्ट=नाहींसे झालेले+उपाय]

**नष्ट**—न. (संगित. पारि.) इच्छित स्वरांपैकीं अमक्या प्रकारच्या स्वररचनेचें स्वरूप अमक्या अमक्या स्वरांचें आहे असें सांगून ते स्वर काढून दाखविणें. [सं. नश्]

**नष्टाई**—स्त्री. दुष्टपणा; हरामखोरी; दगलबाजी; कपट. 'खान नष्टाई करणार नसला तर...'–सूर्योदय २९९. [नष्ट=दुष्ट, कपटी]

**नष्टोळा**—वि. (कु.) दुष्ट; द्वाड; नीच; कपटी. [नष्ट=दुष्ट]

**नस**—पुस्त्री. १ मोठ्या आंतड्याचा एक भाग, जो वायु इ० कांनीं फुगतो असा; नळ. २ शीर; अशुद्ध रक्तवाहिनी; नाडी. ३ स्नायु. ४ नराणी. [सं स्नसा; प्रा. णसा; अर.] ०घेणें–तोडणें–(रक्तवाहिनी कापून) रक्तस्राव करविणें. ०धरणें–दाबणें–(चालू असलेलें काम, व्यक्ति इ०) कुंठित करणें; अटकाविणें; थांबविणें.

**नस**—स्त्री. १ नाकानें हुंगण्याचें औषध. २ तपकीर. [सं. नस्य; हिं.]

**नसकोणा**—वि. (कु.) ज्याच्या अंगीं कांहीं गुण नाहींत असा ठेंगणा व रोड मनुष्य. [नसणें]

**नसंटणें**—अक्रि. (महानु.) न मावणें; न समावणें. 'कीं मागिला श्रमाची धांप। भीतरीं नसंटे उमप। तेणें दाटतसे बाहेर। कंठीं येउनी।'–ज्ञाप्र ९२६. [न+साठणें]

**नसंडणें**—उक्रि. न सांडणें; न सोडणें. 'नाहीं आर्ति निर्वेदु। न संडी विषय संदु।'–ऋ ७. [न+सांडणें]

**नसणें**—अक्रि. न असणें; अभाव असणें. 'अहंता मनीं पापिणी ते नसोंदे।'–राम २४. [न+असणें] **नसल्या बसल्या** शिळका करणें–(व.) उठतां बसतां कोणाची ना कोणाची कुरापत काढणें.

**नसता**—वि. १ अस्तित्वांत नसलेला; अविद्यमान. 'हठें बाई कैसी धरुनि बससी गोष्टि नसती।'–सारुह ६.१२२. २ खरी, प्रत्यक्ष नसलेली; खोटी; निराधार. 'हा कर्मभोग ओढवला सायासी। नसतेंच विघ्न हें।'–शनि ६८. 'ईश्वर होतां पाठमोरा। नसतींच विघ्नें येतीं घरा।' ३ अनावश्यक; फाजील; अवास्तव. 'तूं फार करितोसि टवाळी। नसतीच चढविली कळी।'–शनि ७०. जसें:–नसता कारभार=उगाच लुडबुड करणें; नसता खर्च=अवास्तव, उगाच आलेला खर्च; नसता उपद्रव=कारण नसतां, स्वतःचा दोष नसतां झालेला त्रास. ४नुकसानीचा; तोटयाचा. जसें:–नसता उद्योग–धंदा–व्यवहार–व्यापर. ५ गरीब; अकिंचन; दरिद्री. ६ (गरीबाच्या येथें गडीमाणसें नसतात. त्यास जर श्रीमंतांना पानसुपारी, मेजवानी इ० देण्याचा प्रसंग आला तर तो थट्टेनें, उपरोधानें आपल्या अविद्यमान, लटक्याच गड्याला नसत्या म्हणून हांक मारून करण्यास सांगतो अशा अर्थी) नसणारा; लटुपुटीचा (माणूस, गडी). 'अरे नसत्या! गुडगुडी भरून आण, राव बसले आहेत.'–क्रिवि. वांचून; विना. -शर. म्ह० असल्याचे विकार नसल्याचे घोरंकार=श्रीमंताना चैन कराविशी वाटते तर गरीबास कावाडकष्ट करावे लागतात.

**नसद्धी**—वि. (महानु.) नुसती; एकटी. 'निगालेआं यदुपती। न शोभेची द्वारावती। जेवी नसद्धी शांती। विवेकेंविणु।'–शिशु ५३८. [सं. न+सत्+हि]

**नसनखवडा**—वि. माणूसघाण्या; मत्सरी; एकलकोंडा; जनद्वेषी. [नसणें+खवडा] म्ह० नसनखवडा आणि शेजार दवडा.

**नसनस**—स्त्री. (व.) किरकिर; कटकट; लसलस. 'भारी नसनस करते ती.'

**नसर(रू)ड**—स्त्री. (निंदार्थी) अशक्त, हट्टी व कोडग्या पोरास तिरस्कारानें संबोधण्याचा शब्द. –वि. शरीरांत पराक्रम नसून ज्याला बोलल्याचालल्याची लाज नाहीं असा कोडगा (मनुष्य).

**नसरता**—वि. अग्राह्य, अमान्य, निरुपयोगी, ज्यावांचून कांहीं अडत नाहीं असा. 'तो मी नसरता केला काम। क्रोधा आणिला उपशम।'–एभा ४.१२६. [न+सरता]

**नसराणा–णी**—वि. १ (उप.) लुच्चा; सोदा; वस्ताद. २ (उप) द्वाड; उनाड. ३ स्वार्थी; मतलबी [अर. नस्रानी=ख्रिश्चन]

**नसल**—न. कुलाचें, वंशाचें बीज; प्रजा; संतान. 'राजाचें नसल नाहीं म्हणोन आईसाहेबांनीं साफच सांगितलें.'–रा ६. ३४९. –वि. औरस नसलेला; दत्तक. 'पादशाही नसलावरी छत्र धरील.'–शिचप्र ४० [अर. नस्ल्] **नसलन् बाद नसल**–क्रिवि. वंशपरंपरा. [नसल+बाद=नंतर+नसल]

**नसवणें**—अक्रि. न सहवणें; सहन न होणें. ' स्वास्थ्याला मुनिमनांत ही नसवे। ' –मोमंभा ३.८०. [न+सहणें; नसहे]

**नसाणा-ना-न्या, नसानखोर**—वि. ( वना. ) १ किर-किऱ्या; चिडखोर. २ एकलकोंडा; तुसडा.

**नसाय**—वि. ( गो.) १ असह्य. २ अप्रिय; नावडता. 'सवतीचीं पोरें नेहमींच नसाय झालेलीं असतात. ' [ न+सं. सह्य=सहन करण्यास शक्य. ]

**नसांव**—न. ( गो. ) कुटुंब; बीज; प्रजा. [ पोर्तु. नासाओ ]

**नसिहत, नस्यत**—स्त्री. शिक्षा; शासन; पारिपत्य; नशिअत पहा. [अर. नसीहत्]

**नसीं**—शअ. ( काव्य ) निशीं या प्रत्ययाबद्दल योजतात. –ऋ ९३. 'स्वसंपत्तीनसीं तेथें तया। प्रतिस्थापना।' –स्वादि १०.३.४१.

**नसीदा**—नसीहत पहा. ' शत्रूस नसीदा देऊन पारिपत्य करीत असें करणें. ' –वाडसभा १.१३.

**नसीन**—वि. बसलेला; नशीन पहा.

**नसीब, नसिबाचे ताले, नसीबवंत**—नशीब इ० पहा.

**नसीयत**—स्त्री. शिक्षा. नशिअत, नसीहत पहा. ' या उपर साटकास हरवजेनें नसीयत करून ब्राह्मणाची मुली सोडून देवणें. ' –वाडशाछ १०४.

**नसीहत, नसेत-द्**—स्त्री. १ उपदेश; सल्ला; समजावणी. २ शिक्षा; शासन. ' सामें सांगतां नायकत, तेव्हां दण्डें सांगावें... यास्तव सबुरीच केली आहे, पुढें राजदर्शन जाल्यावरी जे नसीहत करणें ते हुजुरून करूं. ' –रा ३.३३३. –रा १५.२९८. नशिअत पहा. [ अर. नसीहत्]

**नसुधा**—वि. साक्षात; केवळ. 'ऐसा जुगानजुगांचा रथु। नसुधेया तेजाचा झळफळीतु।' –उषा ११०५. 'तिये विद्येचें नसुधें। भांडार तूं।'–गीता १ ५०९. २ नुसता; फक्त. ' किंबहुना मुखरूपें नसुधा। आस्वादिजे श्लेष्मेयांचा बाधा।' –भाए ७६३. नसद्धि पहा.

**नस्कांत**—क्रिवि. ( गो. ) पहांटेस.

**नस्कुटा**—वि. कृश; रोड; क्षीण. [ नसणें+कुटा प्रत्यय ]

**नस्त**—न. १ नदी, खाडी इ०कांच्या मुखाशीं समुद्रांत असलेला वाळूचा दांडा; अडवण. २ ज्यावर समुद्राच्या लाटा आपटतात अशा डोंगराळ, खडकाळ प्रदेशाची रांग. ३ ( कु.) जहाजें समुद्रांतून खाडींत नेण्या-आणण्याची वाट; खाडीचें तोंड; खाडीच्या तोंडासमोरील समुद्राचा भाग.

**नस्त**—वि. ( प्र. ) नष्ट; नष्ट पहा. [ नष्ट अप. ]

**नस्तर**—न. शस्त्रक्रिया करण्याचा लहान चाकू; टोंकाला तिरपी धार असलेली लोखंडी सळई; नराणी. [ फा. निश्तर् ] ०मारणें–नस्तरानें लहान काप काढणें, लहान जखम करणें.

**नस्ता**—वि. (प्र.) नसता; नसता पहा.' नस्ता कवीचा व्यापार। तरी कैंचा अस्ता जगोद्धार। ' –दा १.७.२१.

**नस्य**—न. १ ( नाकानें ) हुंगण्याचें औषध. २ तपकीर. ३ हुंगणें; नाकांत घालणें. –वि. नाकासंबंधीं; नाकानें ओढण्याचें; नाकांत घालण्याचें. [ सं. ]

**नस्वरीत**—क्रिवि. त्वरित; सत्वर. ' आर्त जीवींचें जाणती। तया भेटती नस्वरीत। ' –निगा १६४.

**नह(हा)क**—क्रिवि. अन्यायानें; निष्कारण; ( प्र. ) नाहक; नाहक पहा. ' कां खवळविला नहाक हा कहरी।' –मोविराट ६९.

**नहर**—पु. २ पाण्याचा पाट, नळ; कालवा. ' दिल्लीचा नहर दरोबस्त तयार करवून पुन्हां नहर जारी करावा. ' –दिमरा २. ३९. ' नहर शुष्क जाहले ते जारी जाले नाहींत. ' –रा ५.१११. २ ( शहरांतील ) घाण पाणी वाहून नेणारी मोरी, गटर, सारणी. ३ हौद. –शर. [ अर. नह्र् ]

**नहरणी**—स्त्री. नराणी. [ हिं. नहरणी; सं. नखहरणी; प्रा. णहरणी ]

**नह(हे)ला, नहल्या, नहाला**—पु. गिलावा करण्याची गवंड्याची लहान करणी: थापी.

**नहलू, नह(हि)ल्या**—पु. (गंजिफा, पत्ते यांतील) नऊ ठिपक्यांचें पान; नवल्या. [ नऊ ]

**नहाडणें, नहाडा**—( प्र. ) नाहडणें, नाहडा. नाहडणें, नाहडा पहा.

**नहाण**—न. १ ( अंगास तेल वगैरे लावून, अभ्यंग करून केलेलें, घातलेलें ) स्नान; आंघोळ २ प्रथम रजोदर्शन;ऋतुप्राप्ति. [ सं. स्नान; प्रा. ण्हाण; हिं. नहान; तुल० का. नने=ओले, आर्द्र होणें. ] ०घालणें–(लहान मुलास तेल इ० लावून )स्नान घालणें; न्हाऊं माखुं घालणें. ०पदास येणें–(मुलगी)ऋतुस्नात होण्याच्या वयांत येणें. न्हातीधुती होणें. ०घर–न. स्नानाची खोली, घर; नहाणीघर. [ नहाण+घर ]

**नहाणणें**—सक्रि. स्नान घालणें; नाहणणें पहा. ' कीं पाणिअें नहाणिला। काळकूटाचेनि। ' –शिशु ९९९. [ नहाण ]

**नहाणवली, नहाणी**—नाहणवली, नाहणी पहा.

**नहाणें**—अक्रि. १ (विशेषत: तेल अंगास लावून ) स्नान करणें. २ रजस्वला होणें; अस्पर्श, विटाळशी होऊं लागणें, बसणें. ' मी आज वर्षभर नहात आहे. ' –नामना २०. [ सं. स्नान; हिं. नहान; गु न्हावुं ]

**नहाब-बी**—पुस्त्री. नुकसान; हानि; खराबी. [ अर. नह्ब ]

**नहावी**—पु हजाम; ( प्र. ) न्हावी पहा.

**नहाळकट**—न. ( कों. ठाणें ) लहान ओढा; नाला.

**नहिना**—पु. नेत्र; डोळा; नयन. –शर. [ सं. नयन ]

**नहिला**—पु. (कों.) गवंड्याची थापी. नहला पहा.

**नही**—स्त्री. नदी; नई पहा. [ सं. नदी; प्रा. णई ] **०राखणा**–पु (गो.) नदींत राहणारा लहान जातीचा एक मासा. –मसाप ३.३. **म्ह०** इकडे नही तिकडे वही.

**नहू**—वि. (व.) नव्वद. [ तुल० गुज. नेवुं ]

**नहून**—अ. उलटपक्षीं; नाहीं तर; नाहीं पेक्षां. –के २.१२. ३०. [ न+होऊन ]

**नहे(ह्य)ला**—पु. नहला पहा.

**नहोन-नी**—क्रिवि. न होऊन; नमून. 'कांहींच नहोन असणे। या नांव साधक।' –दा ५.९.२२. 'निळा म्हणे एकला एक। नहोन एक ना अनेक।' –निगा १२५.

**नळ**—पु. १ स्थूलांत्राचा, मोठ्या आंतड्याचा वरचा भाग (जो वायू इ०कानीं फुगतो तो). २ जमीनींतून पाणी बांधून आणण्यासाठीं, मोरीचें पाणी वाहून नेण्यासाठीं दगड, माती, किंवा लोखंड, तांबें इ० धातूंचा फुंकणीच्या आकाराचा करितात तो. ३ नहर; झांकलेलें गटार. ४ (पाणी वाहून नेण्याचा) पाट; सारणी; नाला. ५ (गो.) पोटांतील आंतड्यास होणारा एक विकार. ६ मोठी नळी. ७ पन्हळी. ८ नळा पहा. ९ नळी पहा. १० निषध देशाचा एक प्राचीन राजा ११ एक वानर. 'नळनीळ जांबुवंत। अंगद सुग्रीव बिभीषण भक्त।' १२ अखंड कौल; नळा. –न. १ कमलाचा देंठ; नाल. २ (ल) नाभिकमलाचा देंठ; नाळ; वार. [ सं. नल ] **०गांठ एक होणें**–(पोटांतील) नळ कठिण होण्याचा विकार होणें. **नळांत भरणें**–(उपाशी पोटीं किंवा श्रम केल्यावर) उन्ह्यानें पाणी प्यायल्यानें तें (पोटांतील) नळांत जाऊन नळ दुखूं लागणें. सामाशब्द–**०क(कु)ट,-कु(कां)टें-कं(कां)डें-कांडी**–नस्त्री. एक बाजू बंद व एका बाजूस भोंक असलेली वेळू लांकूड, धातू इ०कांची पोकळ नळी. [ नळ+कट=लघुत्वदर्शकप्रत्यय; सं. कांड=तुकडा, भाग ] **म्ह०** कुत्र्याचें शेंपूट ६ महिने नळकांड्यांत घातलें तरी वांकडें तें वांकडेंच=स्वभाव कांहीं केल्या पालटत नसतो. **०काठी**–स्त्री. बोरू. [ नळ+काठी ] **०कुटी**–स्त्री. १ पायाचें गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचें लांब नळीसारखें हाड २ (कागद इ०कांची) लहान वळकुटी; नळी; नळकांडी. ३ (गो.) गोल कौलाचा तुकडा. [ नळ+कुटी ] **०कूट**–न. नळकांडें. **०कूत**–न. (कों.) नळगूत पहा. **०गुटी-डी**–स्त्री. नळकुटी अर्थ १ पहा. [ नळ+गुटी ] **०गूत-द, नाळगूत**–न जलोदराच्या वर्गातील एक रोग. यांत शरीरास बेंबीपासून छातीपर्यंत सूज येते. **०पट**–न. १ तिरस्कारानें बेंबीस लावावयाचा शब्द. जसें:– नळपट फुगलें-सुजलें-बाहेर पडलें. २ शिस्न. ३ नळकांडें; लहान नळी; नळाचा तुकडा. [ नळ+पट ] –वि. १ प्रमाणाबाहेर लांब. २ ढिला; सैल; पोकळ (अंगरखा, दागिना इ०) [ नळ+पट ] **०पटणें**–न. (तिरस्कारार्थी) नळपट (–न.) अर्थ २ व ३ पहा. **०पट्या, नळपटनारायण**–वि. १ (गबाळ्या–वेंड्यासारखें) बेंबीच्या खालीं धोतर नेसणारा. २ लांबट व मोठ्या पोटाचा मनुष्य; नगननारायण. [ नळपट; नळपट+नारायण ] **०पट्टी**–स्त्री. (पूर्वी शहरदुरुस्तीसाठीं सरकार अशी पट्टी घेई) घरांत नळानें पाणी आणल्याबद्दल भरावा लागणारा पैसा; पाणीपट्टी. **०वडी**–स्त्री. झांकलेलें गटार; मोरी; नहर; नळांडी पहा. **०वात-वायु-वाट**–पुस्त्री. पोटांतील नळांत विकृति होऊन उत्पन्न होणारा वायु. यानें पोटांत गुबारा धरतो. [ नळ+सं. वात; वायु=वारा ] **०संग्रहणी**–स्त्री. आंतड्यांचा एक विकार; आंत्रदाह; पोटांतील नळाचा एक रोग. [ नळ+संग्रहणी=एक आंत्रविकार ]

**नळकणें**—अक्रि. (व.) निसटणें; पळून जाणें.

**नळंगणें**—अक्रि. (कर.) (फार जेवल्यानें पोट इ०) जड होणें; जाड्य येणें.

**नळणी**—स्त्री. १ कमलिनी; नलिनी. 'पुण्यपापाविरहित सकळां अधिपती। द्रष्टा परी नळणी अलिप्त गति।' –तुगा ४७८. २ नायिकेचा एक प्रकार. 'नां तरी नळनी जाति तन्वंगी। जो अहर्नीसीं भोगी।' –भाए ६९०. [ सं. नलिनी अप. ]

**नळनळ**—क्रिवि. टळटळ; तकतक; तळतळ. '**पोट–गलांड–**फोड–नळनळ करतें.'

**नळनळी**—स्त्री. तुळतुळीतपणा; तकतकी (चेहरा, गळूं इ० कांवरील).

**नळनळीत**—वि. तुळतुळीत; तजेलदार. 'घोडा काळा निळा बोर नळनळीत।' –ऐपो १३९. मोटा व चकचकीत दिसणारा; टळटळीत; डिळडिळीत (फोड, गळूं इ०).

**नळपाक**—पु. १ स्वादिष्ट व उंची पदार्थांची, खाद्यांची पाकनिष्पत्ति २ सात्विक व पौष्टिक पदार्थांचें बनविलेलें पक्वान्न; याच्या उलट भीमपाक, तामस पदार्थांचा पाक (नळ व भीम हे दोघेहि पाकक्रियेंत कुशल होते. त्यांच्या कुशलतेंतील भेद वरील अर्थांत दाखविला आहे). [ नळ=नळ राजा+सं. पाक=स्वयंपाक ]

**नळसडा**—वि. (कों.) वडा.

**नळा**—पु. १ अखंड गोल कौल; नळ्यासारखें, वाटोळें कौल. २ एक शोभेचें दारुकाम; हें बांबूच्या नळकांड्यांत किंवा मातीच्या कोठ्यांत दारू भरून करितात. हातनळा, बीडनळा, मोतियानळा, चमेलीनळा इ० याचे प्रकार आहेत. 'पुढें वाद्यांचा गजर। भडिमार नळ्यांचे।' –ह २४.१३३. 'मोठे बाणहि चंद्रज्योति मधुनी त्या फूलबाज्या नळे।' –केक १४१. ३ गाडीच्या चाकांचें ओंगण ठेवण्याचें बांबूचें नळकांडें. ४ (सामा.) (बांबू इ०कांचें) नळकांडें. 'अस्थींचें नळे निरपे। शिरांचे हीर वोरपे।' –ज्ञा ६.२३४.

[ नळ ] ५ गुरांना औषध पाजण्याचें वेळूचें नळकांडें. ६ गुडघ्यापासून घोटयापर्यंतचें हाड; नळ. ७ धान्य पेरण्यासाठीं पाभरीस लाविलेल्या कळकाच्या नळयांपैकीं प्रत्येक. ८ (व.) ( उंदीर इ०काचें ) बीळ. ९ ( भांडयाचा कारखाना ) पाणी तापविण्याच्या बंबांतील धुराडें. [ नळ ] म्ह० गाडयाबरोबर नळयाला यात्रा= मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टींनांहि त्या त्या स्थितींतून जावें लागतें.

**नळांडी**—स्त्री. १ मोरी; झांकलेलें गटार. २ ( चुन्याची घाणी इ०कांतील ) चाकाच्या गतीनें पडलेला खोल मार्ग, चाकोरी. ३ नदी, ओढा इ०कांच्या पात्रांत प्रवाहानें पडलेली ओघळ. ४ सडकेच्या बाजूनें पाणी वाहून जाण्याकरितां केलेली सारणी. ५ पन्हळ. ६ (ल.) डोंगरांतील अरुंद खिंड. ७ ( सामा. ) अरुंद गल्ली, मार्ग. ८ नळी.

**नळाळी**—स्त्री. अतिशय नळनळीतपणा; चकाकी; तकाकी. [ नळनळी ]

**नळिका**—स्त्री. नळी. ' जैसी ते शुकाचेनि आंगभारें। नळिका भोविन्नली एरी मोहरें। ' -ज्ञा ६.७६. [ सं. नलिका ]

**नळिन**—न. कमल; नलिन. ' जैसें शुभ्र सतेज नळिन।' —रास १.१११३. [ सं. नलिन ]

**नळी**—स्त्री. १ (सामा.) दोन्ही तोंडें पोकळ असून मध्यें पोकळ असणारा धातूचा, लांकडाचा, वेळूचा लांब तुकडा. नळ पहा. २ बंदूक; ज्यांत दारू ठासतात तो बंदुकीचा भाग; नलिका. ३ मूत्रनलिका. ४ श्वासनलिका; अन्नमार्ग; गळा; कंठ. ' पहा त्या हिरण्यकश्यपें आपुलियेचि नळीं। बसविला नरसिंह पाचारुनी। ' —निगा ५३. ' वासनेहातीं बांधवी नळी। ' —तुगा २७९९. ५ ( विणकाम ) धोटा; गणा किंवा कांडी ज्यांत ठेवतात तें टोपण; कोश. ६ (कु.) फुंकणी. ' नळी फुंकिली सोनारें। ' ७ मोरी; गटार. ८ गुडघ्यापासून घोटयापर्यंतचें हाड; नळगुडी; नडगी. ९ ( हात, पाय, मांडया यांच्या ) लांब हाडांपैकीं प्रत्येक. १० नाकपुडीचें छिद्र. ११ नळीच्या आकाराचें कौल. याचें एक तोंड जास्त रुंद व दुसरें किंचित निमुळतें असतें. १२ पाभरीच्या फणास बसविलेल्या बांबूच्या पोकळ तुकडयांपैकीं प्रत्येक. याचें एक टोंक फणाच्या भोंकांत व दुसरें चाडयांत बसविलेलें असतें व यांतून बीं जमीनींत पडतें. १३ डोंगरांतील अरुंद खिंड, मार्ग. १४ (ल.) बंदूकवाला ( बार, घोडा इ० शब्दांच्या लाक्षणिक अर्थाप्रमाणेंच हा अर्थ आहे). १५ (गो.) पळ; धूम. [ नळा ] ०**काढप**-(गो.) पळ काढणें; धूम ठोकणें. **नळीचें वऱ्हाड करणें**-(स्वतःची) तुंबडी भरणें; तळीराम गार करणें. **नळीं नख देणें, नळी दाबणें**-१ ( एखाद्याच्या ) पोटावर पाय देणें, निर्वाहाचीं साधनें नष्ट करणें. २ निष्ठुरतेनें वागविणें. ०**निमटणें**-नरडी दाबणें; प्राण घेणें. ' सूर्योदयो जाहल्यापाठीं। समूळ अंधारातें घोंटी। खद्योताची नळी निमटी। नक्षत्रकोटी तत्काळ गिळी। ' -एभा १३.४२२. **नळीवर नेसणें**-( धोतर, लुगडें इ० ) गुडघ्याच्यावर नेसणें. **नळीचें कुलूप**-न. जुन्या काळचें वाटोळें गांवठी कुलूप. हें लांब सळईच्या किल्लीनें उघडतें. याच्या उलट विलायती तऱ्हेचें. ' बेडकीचें ' कुलूप. **नळीचें पीस**-न. बारीक निमुळत्या नळीच्या आकाराचें साळूचें पीस. ' सड, केंस, लव, पिसें, नळयाचीं पिसें ... इतके आच्छादनाचे प्रकार आहेत. ' -मराठी ६ वें पुस्तक, पृ. ८ ( १८७५ ). **नळीदार कौल-कऊल**-न. मातीचें अर्धनळीच्या आकाराचें कौल; याच्या उलट थापीव कौल. **नळीदार चोळणा**-पु. पायांच्या नडग्या झांकणारी, घोटयापर्यंत लांब असलेली विजार, पायजमा. **नळया गंधक**-पु. कांडीच्या आकाराचा गंधक.

**नळुंडी, नळौंडी, नळ्हांडी**—स्त्री. नळांडी पहा.

**नक्ष-क्षा**—पु. १ छाप; वजन; नांवलौकिक; दरारा; नक्श पहा. २ नक्शा पहा.

**नक्षण-न**—न. (ना.) नखें काढण्याचें हत्यार. नराणी पहा.

**नक्षत्र**—न. १ तारा; तारका. २ चंद्राच्या कक्षेंत असलेल्या सत्तावीस तारकापुंजांपैकीं प्रत्येक. ह्या सत्तावीस तारकापुंजांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत-अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, ( २८ वें अभिजित् ) श्रवण, धनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, व रेवती. ३ भूचक्राच्या सत्तावीस विभागांपैकीं प्रत्येक; तेरा अंश व वीस कला इतकें अंतर ओलांडण्यास चंद्रास लागणारा काळ. ४ (गो.) जन्मटिपण. [ सं. ] ( एखाद्याच्या ) **तोंडावर नक्षत्र पडणें**-( सारखी ) बडबड, वटवट करण्याचा स्वभाव असणें. ' याच्या तोंडावर नक्षत्रच पडलें आहे जसें ! हा मेला काय पाहिजे तसलें अभद्र बडबडतो. ' -अतिपीडचरित. **पायावर नक्षत्र पडणें**-नेहमीं भटकत राहणें; फिरणें. **हातावर नक्षत्र पडणें**-चोरी करण्याची संवय असणें. सामाशब्द- ०**गंडांत**-न. अश्विनी, मघा व मूळ या नक्षत्रांच्या आरंभींच्या दोन घटका व रेवती, आश्लेषा व ज्येष्ठा या नक्षत्रांच्या शेवटच्या दोन घटका अनुक्रमानें मिळून चार घटकांचें एक अशीं तीन गंडांतें होतात त्यांपैकीं प्रत्येक. हीं जन्मकालास शुभाशुभ आहेत तीं येणेंप्रमाणें:-अश्विनी, मघा व मूळ यांच्या पूर्वार्धांत जन्म झाल्यास पित्यास अनिष्ट व रेवती, आश्लेषा व ज्येष्ठा यांच्या उत्तरार्धांत जन्म झाल्यास बालकास अनिष्ट होत. [नक्षत्र+गंडांत] ०**दर्शन**-न. १ ( संध्याकाळीं ) नक्षत्र, तारे दिसूं लागणें. २ (ल.) नक्षत्रें दिसूं लागतात ती संध्याकाळची वेळ. [ नक्षत्र+दर्शन ] ०**नाथपति**-

पु. नक्षत्रांचा स्वामी; चंद्र. [ नक्षत्र+नाथ, पति ] ०**नाम**–न. जन्मनक्षत्रावरून ठेवलेलें नांव. [ नक्षत्र+नाम ] ०**मंडल**–न. तान्यांनीं व्याप्त असलेलें नभोमंडल. [ नक्षत्र+सं. मंडल+वर्तुळ ] ०**माला**–स्त्री. १ सत्तावीस मोत्यांचा हार. २ २७ नक्षत्रांची सारणी, यादी. [नक्षत्र+सं. माला=माळ] ०**माळ–ळा**–स्त्रीअव. १ विवाहादि प्रसंगीं एका उंच काठीला·कागद, पितळपान इ०कांच्या फुलांच्या माळा बांधून समारंभाच्या मिरवणुकींत पुढें चालवितात ती. या नेहमीं मिरवणुकीच्या दोन्ही बाजूस दोन असतात. २ देवांच्या पुढें शोभेसाठीं मांडून ठेवितात ती चांदीपितळेचीं लहान भांडीं समुच्चयानें. 'नाना उपकर्णे नक्षत्रमाळा। नाना वस्त्र सामुग्री।' –दा ४.५.२३. [ नक्षत्र+माळ–ळा ] ०**यंत्र**–न. वेधयंत्र; सूर्य व इतर तारे यांची क्षितिजापासुन उंची मोजण्याचें यंत्र. [ नक्षत्र+यंत्र ] ०**वासर**–पु. आषाढ, भाद्रपद व कार्तिक या महिन्यांतील शुक्लपक्षाच्या द्वादशी तिथींचा अनुक्रमें अनुराधा, श्रवण व रेवती या नक्षत्रांशीं योग असतो असा दिवस. हरिवासर अर्थ २ पहा. [नक्षत्र+सं. वासर=दिवस] ०**विद्या**–स्त्री. ज्योतिष शास्त्र; ग्रहगणितशास्त्र. ०**सूची**–वि. ज्योतिषशास्त्राचें ज्ञान नसून केवळ नक्षत्रें माहीत आहेत म्हणून स्वतःस ज्योतिषी म्हणविणारा मूर्ख (मनुष्य). [नक्षत्र+सं. सूचि]. **नक्षत्रांचा घड**–पु. तारकांचा पुंज; नक्षत्रपुंज. 'अब्जादि तडतड गिरीवरि खडखड। नक्षत्रांचे घडघड लोले व्योमीं चांदवा।' **नक्षत्रासारखा**–वि.(नक्षत्राप्रमाणें) सुंदर; रूपवान; लावण्ययुक्त. 'जन्मनक्षत्राच्या उपजत जोरावरच नक्षत्रासारख्या मुली मिळविण्याचे दिवस गेले ते.' –भा ३३.

**नक्षा**—पु. नकशा पहा. १ कीर्ति; नांवलौकिक. 'आज भाऊ मारिला थोर नक्षा झाला।' –ऐपो ३३६. २ ताठा; वरचढपणा; अभिमान; घमेंड. इतर अर्थी नक्शा पहा. [ नक्शा ] ०**उतरणें**–दिमाख, तोरा नाहींसा होणें; घमेंड जिरणें. ०**उतरविणें**–घमेंड जिरविणें; दिमाख, गर्व नाहींसा करणें.

**नक्षी**—स्त्री. वेलबुट्टी; चित्रविचित्र काम; नक्शी, नक्शी पहा. [ नक्शा ] **नक्षीचा मोळा**–पु. (सोनारी) दागिन्यावर नक्षीकाम करण्याच्या उपयोगाचा मोळा; खिळयासारखें हत्यार. ०**दार**–वि. वेलबुट्टीदार; नक्षी केलेलें. [ नक्षी+फा. दार् प्रत्यय ]

**ना**—अ. १ पक्षांतरबोधक अव्यय; हें दोन शब्दांच्यामध्यें योजतात व त्याचा अर्थ दोन्हींचा नकार दर्शविणें असा होतो. उदा० बाप ना माय; दिवस ना रात्र; गांवांत घर ना रानांत शेत. २ द्विरुक्त क्रियाविशेषण किंवा सर्वनाम यांच्यामध्यें योजिलें असतां जर तर, तें नाहीं तर हें, हें नसलें तर तें, असा अर्थ होतो. उदा० कांहीं ना कांहीं=कांहीं तरी; कांहीं. कोणी ना कोणी= कोणीतरी, कोणी एक (माणूस). कधीं ना कधीं=कधीं तरी; एखादें वेळीं. कसा ना कसा; केव्हां ना केव्हां; कोठून ना कोठून इ०. ३ नकारार्थी क्रिवि. जसें:–तो देईना, येईना–घेईना इ०. 'सवर्म हृदयकल्हारीं। तेथ कारुण्यवेळच्या भरी। लागला म्हणोनि लहरी। भांजेचिना।' –ज्ञा २.७१. ४ कांहीं संशयावरून उत्पन्न झालेल्या आश्चर्याचें द्योतक; प्रश्नाच्या निश्चित कथनाच्या शेवटीं येणारें अवधारणोच्चारित अव्यय. उदा० तूं येतोस ना ? देतोस ना ? तूं येतोस, होय ना ? मी जातोंना, वाचतोंना. ५ वर्तमान कृदंतापाठीमागून येणारें अतिरिक्त अव्यय. उदा० असतांना, खातांना, बसतांना. राजापुरकडे अशा नाचा अर्थ नकारार्थी होतो. उदा० खाताना, बसतांना=न खातां, नबसता इ० ६ कालवाचक क्रियाविशेषणानंतर अतिरिक्त अव्यय म्हणूनहि येतें. जसें:–एव्हांना, तेव्हांना, केव्हांना=आंता, या क्षणीं इ०. ७ नामांच्या व सर्वनामांच्या द्वितीयेच्या व चतुर्थीच्या अनेकवचनांस लागणारा प्रत्यय. उदा० झाडांना, त्यांना. ८ नकारार्थी फारशी प्रत्यय. हा शब्दांच्या प्रारंभीं लागतो. उदा० नाखूष; नापसंत; नापीक. –स्त्री. १ नाकारणें; नाहीं म्हणणें. (क्रि० करणें; म्हणणें; बोलणें). नाना करणें–म्हणणें=वारंवार अथवा पुष्कळदां नाकबूल करणें. २ नकार; मनाई; असंमती. 'माझी कांहीं त्या गोष्टीस ना नाहीं.' –उअ. १ किंवा अथवा, असें नाहीं तर. 'ना तें आनंदाचें रसायणु। भवरोगियांसी।' –शिशु ५८. 'पूर्वी क्षीरसिंधूची बाळा। नेसली क्षीरोदक पाटोळा। ना तो पहावया कृष्णसोहळा। कांसे लागला क्षीराब्धी॥' –एरुस्व ७.४४. २ परंतु; कीं. [ सं. न, ना ]

**नाइकडा, नाइकव(वा)डा, नाइकी, नाइटा, नाइरी**— नायकडा इ० पहा.

**नाइकिजणें**—उक्रि. न ऐकणें; नायकणें. 'जो नाइकिजतां नादु। जो असौरभ्यमकरंदु।' –ज्ञा १५.७४. [ न+ऐकणें ]

**नाइलाज**—पु. निरुपाय; अनन्यगतिकता; लाचारी. –वि. निरुपाय; अनन्यगतिक; लाचार. [ ना+इलाज ]

**नाई**—स्त्री. १ एक वनस्पति. २ एक लता.

**नाईक**—पु. मुख्य; म्होरक्या; टोळीचा नायक; मजुरांचा मुकादम; ओरशीर (ओव्हरसिअर). २ भाड्यानें द्यावयाच्या घोडे, गाड्या मजूर इ० कांच्या अड्याचा मालक, व्यवस्थापक. ३ ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यांतील कार्पोरलच्या दर्जाचा बिनसनदी अधिकारी. ४ ब्राह्मण जातीच्या सराफास लावली जाणारी मोठेपणाची पदवी. जसें:–बाबूजी नाईक बारामतकर. ५ (गो.) शूद्र लोकांतील एक पोटजात; (माण.) रामोशी. ६ मराठे व इतर सैन्यांतील लहान अंमलदार; पत्तिनायक. –बाडसमा २.१६४. [ सं. नायक ]

**नाईब**—पु. दुय्यम; नायब पहा. [ अर. नाइब् ]

**नाऊ, नाहू**—पु. न्हावी. [ हिं. ]

**नाऊळ**—स्त्री. एक वेल. हिच्या पानाच्या खालच्या बाजूस कूस असतें. पानांची भाजी करतात.

**नाक**—पु. स्वर्ग. 'तें नाक ( नासिका ) नाक ( स्वर्ग ) माझ्या चित्ताचें हा विमूढ लाजेना।' –मोमंरा किष्किंधा १.१०. [ सं. ]

**नाक**—न. १ घ्राणेंद्रिय; नासिका. २ ( ल. ) धान्य, बटाटे इ०काला ज्या ठिकाणीं मोड येतो ती जागा; डोळा. ३ सुई, दाभण इ० काचें भोंक; नेडें. ४ ( कुटुंब, सभा इ० कांचा ) मुख्य उत्कृष्ट मनुष्य; देशांतील मुख्य शहर किंवा किल्ला. 'पुणें हें देशाचें नाक आहे' ५ नथेकरितां नाकास पाडलेलें भोंक, छिद्र. 'नाक तुटणें, बुजणें.' ६ धीटपणा; दम; खात्री. निलाजरेपणा; उजळ माथा. 'तेथें मी कोणत्या नाकानें जाऊं.' ७ अब्रू; चांगली कीर्ति, नांव. 'माझें नाक गेलें, गमावलें.' [सं. नासिका; प्रा. णक्क; फ्रेंजि. नख; पोजि. नकी ] ( वाप्र. ) ०**ओरबडणें**–नाकांतील अलंकार हिसकून घेणें. ०**कापणें**–खोडकी, गर्व जिरविणें; पराभव करणें; ( **आपलें** ) ०**कापून दुसऱ्यास अपशकुन, अवलक्षण करणें**–दुसऱ्याचें नुकसान व्हावें म्हणून आपला स्वतःचा नाश करून घेणें. ०**कापून पाटावानें पुसणें**–एखाद्याची मोठी अप्रतिष्ठा करून नंतर थोडा सन्मान करणें. ०**खाजविणें**–चिडविणें. ०**खालीं पडणें-पाडणें-होणें**–गर्व नाहींसा होणें, करणें; मानहानि होणें. ०**गुंडाळणें**–आपला कमीपणा, पराभव कबूल करणें; शरण जाणें; क्षमा मागणें. ०**गेलें तरी भोकें राहिलीं आहेत असें म्हणणें**–पुन्हां निर्लज्जपणें बोलणें, वागणें; मागील गुन्ह्याची लाज सोडून चालणें. ०**चिरून मीठ भरणें**–एखाद्यास फजीत करणें; नकशा उतरविणें. ०**घासणें**–१ आर्जव, खुशामत करणें; हांजी हांजी करणें. २ क्षमा मागणें; चूक कबूल करणें. ०**चेचणें-ठेचणें**–१ फजीती, पारिपत्य होणें, करणें. २ नक्षा उतरणें; खोड मोडणें. ०**जळणें, नाकांतले केस जळणें**–फार दुर्गंधि येणें. ०**झाडणें**–१ नाक चेचणें; तिरस्कार दाखविणें; ताठा, गर्व, उतरविणें. २ नाक शिंकरणें. ३ घोडा इ० जनावरानें जोरानें नाकांतून वारा काढणें. ०**तोंड मुरडणें**–नापसंति दर्शविणें; नांवें ठेवणें. ०**तोडून कडोसरीस खोवणें**–भीक मागण्याकरितां लाजलज्जा सोडून देणें; अगदीं लोंचट बनणें. ०**धरणें**–वाट पहावयास लावणें; खोळंबा करणें. ०**धरल्यास किंवा दाबल्यास तोंड उघडणें**–एखाद्यास पेंचांत धरल्याशिवाय तो आपल्या म्हणण्यास कबूल होत नाहीं या अर्थी. (नाक व तोंड यानीं श्वासोच्छ्वास होतो. त्यापैकीं एक दाबलें तर दुसरें उघडावेंच लागतें ). ०**धरून बसणें**–( प्राणायामावरून ) धार्मिक कृत्यांत गुंतलेला असणें, वेळ घालविणें. ( ल. ) कर्तव्य न करतां वेळ गमावीत बसणें. ०**पुड्या पिंजारणें-फुलविणें-फुगविणें, फुरफुरविणें-फेंदरणें**–रागानें खेकसणें; अंगावर जाणें; नाक फुगवून राग दाखविणें. ०**फेडणें**–नाक शिंकरणें. ०**मुठींत धरून जाणें**–निरुपायास्तव, नाइलाजानें शरण जाणें; अभिमान सोडून जाणें. ०**मुख्यापुढें खाजविणें**–चिडविणें; क्षोभविणें. ०**मुरडणें-मोडणें**–नाक वाकडें-तिकडें करून नापसंति दाखविणें. ०**मुठ्या हाणणें**–( व. ) हिणविणें; नाराजी दर्शविणें. 'नाकमुठ्या हाणूं हाणूंच बेजार, स्वतः तर काम होईना.' ०**मोडणें**–फजीती उडविणें; गर्व उतरविणें. ०**लावून(करणें)**–क्रिवि. धिटाईनें; निलाजरेपणें. ०**वर करणें-वर करून चालणें-वर असणें**–१ दिमाख, ताठा, गर्व, निर्लज्जपणा दाखविणें; वरचढ असणें. २ स्वतः दोषी असतांनाहि दिमाख दाखविणें; शरम न वाटणें. ०**वाहणें**–पडसें येणें. ०**सावरणें**–( बायकी ) मूल जन्मल्याबरोबर त्यास न्हाऊ घालतांना त्याच्या नाकांत तेलाचे एकदोन थेंब सोडून त्याच तेलाच्या हातानें नाकाच्या वरच्या भागापासून शेवटपर्यंत हलकें चोळणें. **नाकाची घाण मरणें-जाणें**–१ संवईमुळें किंवा पडशामुळें वास न येणें; संवय होणें. २ ( ल. ) वाइटाचा तिरस्कार न येणें. **नाकांत काड्या घालणें**–चिडविणें; टोमणे मारणें; कुरापत काढणें; (एखाद्यास) चीड येईल असें कृत्य करणें. 'हरिच्या पुनःपुन्हां कां काड्या नाकांत घालिशी शशका' –मोसभा ४.८४. **नाकांत काड्या जाणें**–रुसणें; चिडणें; राग येणें. **नाकांत दम येणें**–( माळवी )नाकीं नऊ येणें. **नाकांत बोलणें**–नाकातून, गेंगाण्या स्वरांत शब्द काढणें; अनुस्वारयुक्त बोलणें ( कोंकणी लोकांप्रमाणें). **नाकातोंडाची गुंजडी करणें**–( नाक, तोंड आवळून, चंबूसारखें करून ) राग किंवा नापसंति दाखविणें. **उंच्या नाकानें ( करणें, बोलणें, वागणें, फिरणें )**–मिजासीनें, निलाजरेपणानें, (करणें इ० ). **नाकानें कांदे-वांगीं सोलणें**–१ नसता, खोटा शुचिर्भूतपणा दाखविणें; उगीच पातिव्रत्याच्या गोष्टी सांगणें. २ एखादे वेळीं फार चोखंदळपणा करणें पण एरवीं वाटेल तसें वागणें ( ढोंगीपणा दाखवितांना वापरतात ). **नाकापेक्षां मोतीं जड होणें**–( एखाद्याच्या अंगचा खरा गुण लोकांच्या अपेक्षेहून कमी आहे असें निदर्शनास आल्यावर योजतात ) एखाद्या गौण वस्तूला अधिक महत्त्व प्राप्त होणें; कनिष्ठ दर्जाचा मनुष्य वरिष्ठाहून वरचढ होणें; ( नाकास शोभा आणण्याकरितां मोतीं असतें पण तें जड झालें तर नाकास इजा होईल यावरून ). तुल० सासूपेक्षां सून अवजड. **नाकाला जीभ लावणें**–तिरस्कार दाखविणें; गर्व, ताठा, दिमाख दाखविणें. **नाकाला झिमोटा घालणें**–तिरस्कार दाखविणें; नाक मुरडणें. **नाकावर असणें**–अगदीं तयार असणें. 'राग कसा त्याच्या अगदीं नाकावर आहे.' **नाकावरची माशी तरवारीनें हाणणें**–( व ) लवकर राग येणें. **नाकावर निंबु घासणें-पिळणें**–प्रतिपक्ष्यास न

जुमानतां आपलें कार्य साधणें; प्रतिपक्ष्यास चीत करणें. **नाकाला पदर लावणें, लागणें**-१ लज्जेनें, अपकीर्तीमुळें तोंड झाकणें. २ घाणीचा तिरस्कार करणें. **नाकावर टिचणें**-१ एखाद्याचे पैसे ताबडतोब देणें. २ काकूं न करतां, अडथळ्यास न जुमानतां एकदम देणें, करून टाकणें. **नाकावर पदर येणें**-१ वैधव्य येणें. २ लाजेनें लपून एकांतवासांत बसणें. **नाकावर पाय देणें**-विरोधाची पर्वा न करणें; प्रतिपक्ष्यावर मात करणें. **नाकावर बोट ठेवणें**-गुप्त ठेवण्यास किंवा गप्प बसण्यास सांगणें; ( रागानें किंवा अन्य कारणानें एखाद्यास ) दबकावणें. **नाकावर माशी बसूं न देणें**-अतिशय चिडखोर, क्रोधी असणें; अपमान किंवा तिरस्कार अगदीं सहन न होणें; थोडें देखील उणें बोललें न सोसणें. 'जागृदवस्थेंत जसी नासाग्रीं बैसली नरा माशी।' -मोगदा ५.२. **नाकावर म्हशीनें पाय देणें**-नाक नकटें, बसकें, चपटें असणें. **नाकावर वाट करणें**-विरोधास न जुमानतां काम सिद्धीस नेणें, करणें; नाकावर पाय देणें. **नाकाशीं सूत धरणें**-अगदीं मरणोन्मुख होणें ( मरतांना श्वास आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां नाकाशीं सूत धरतात ). **नाकास चुना लावणें**-नाकावर लिंबू पिळणें, पाय देणें पहा. 'सोसे कुब्जा मृत्यु, न अयशाचा सोसवे चुना नाकीं।' -मोद्रोण २१.५८. **नाकास पदर येणें**-बेअब्रू होणें; लाज वाटणें;मानखंडना होणें. **नाकास मिरची झोंबणें**-एखादी गोष्ट मनास लागणें; वर्मी लागणें. **नाकासमोर जाणें**-अगदीं सरळ मार्गानें जाणें. **नाका-होंटावर जेवणें**-चाखतमाखत खाणें; चोखंदळपणानें जेवणें. **०दुराही, नाकधुऱ्या काढणें**-१ अति नम्रपणानें विनविणें; शरण जाणें; क्षमा मागणें. 'सद्गति दे म्हणुनिच तो जाणा काढी मयूर नाकधुऱ्या।' -भक्तमयूरकेकावली प्रस्तावना. २ कृतापराधाबद्दल प्रायश्चित्त भोगणें. **नाकीं नव-नळ येणें**-१ अतिशय कंटाळणें; दमणें; भागणें ( कामानें, श्रमानें ). २ ( नऊ इंद्रियांची शक्ति नाकांत येणें ) मरणाच्या दारीं असणें. **नाकीं वेसण घालणें**-एखाद्यास कबजांत, कह्यांत ठेवणें. **नाकीं-नाक(का)चा बाल**-अत्यंत आवडता, जिवलग, मोलवान् माणूस; गळ्यांतील ताईत; मोठ्याच्या परम प्रीतींतील दुर्जन ( नाकांतील केंस काढतांना फार त्रास होतो म्हणून त्यांस फार जपतात त्यावरून ). **म्ह०**(व.) १ नाक नकट तोंड वकट=कुरूप, अष्टावक्र अशा माणसास उद्देशून म्हणतात. २ नाकांत नाहीं कांटा, रिकामा ताठा-(बायकी, सोलापुरी) ३(गो.)नाक गेल्यावर काय मामा चवरी गोंडा हाय=निलाजरा मनुष्य आपली कितीहि अब्रू गेली तरी पुन्हां नाक वर करतोच. सामाशब्द- **०चिबा**-वि. बसल्या नाकाचा; नकटा. **०तोडा-ड्या**-पु. १ एक मोठ्या जातीचा टोळ. २ गवत्या टोळ( नाक तोडतो यावरून ). **०दुर-राई, ०धुरई-धुराई-धुरी**-स्त्री. १ पश्चात्ताप दाखविण्यासाठीं नाक घासणें. 'माझ्या अपमानाबद्दल त्यानें किती जरी नाकधुऱ्या काढल्या तरी...बोलायची नाहीं.' -बाबं ४.३. २ (ल.) नम्रतेची विनंति (क्रि०काढणें). **०पट्टी**-स्त्री. (मल्लविद्या) जोडीदाराच्या कानावरून व गालावरून आपल्या हाताची पोटरी जोडीदाराच्या नाकपुडीवर दाबून वर दाब देऊन त्याला चीत करणें. **०पुडी**-स्त्री. नाकाचें एक पुड; नासारंध्र. [सं. नासापुट] **म्ह०** (व.) नाकपुडींत हरिकीर्तन=लहान जागेंत मोठें कार्य करावयाचें झाल्यास म्हणतात. **०भुंकन**-वि. नाकावर भोवरा असलेला ( घोडा ). नासिकावर्त पहा. -मसाप २.५७. **०मोड**-स्त्री. नकार दर्शविणें; तिरस्कारयुक्त नापसंती. **०वणी**-न. १ तपकीर; नस्य. २ नाकांत ओतावयाचा तीक्ष्ण पदार्थ. 'नाकवणी चुनवणी।' -दा ३.७.६८. 'एका देती नाकवणी। काळकुटाचे।' -ज्ञाप्र २९५. [नाक+वणी=पाणी] **०शिंकणी**-स्त्री. एक वनस्पति; भुताकेशी; हिच्या पानाच्या वासानें शिंका येतात. **०शिमरो**-वि. १ ( गो. ) नकटा. २ निलाजरा. [नाक+शिमरा=बसकें] **०सूर**-पुअव. नाकांतून बाहेर पडणारी हवा, श्वास. ( क्रि० वाहणें; बंद होणें ). **०सुरॉ**-वि. (गो.) नाकांतून येणारा (आवाज); गणगणा; गेंगाणा. **नाकाचा दांडा-वासा**-पु. नाकाचें लांबट हाड. **नाकाचा पडदा, नाकाची पडदी, नाकाची भिंत**-पुस्त्री. दोन नाकपुड्यांतील पडदा. **नाकाचा शेंडा-नाकाची बोंडी**-पुस्त्री. नाकाचा अग्रभाग. **नाकाचो कवळो करप**-(गो.) कंटाळणें. **नाकाटणी, नाकाटी**-स्त्री. रग जिरविणें; नक्षा उतरविणें; खरडपट्टी काढणें; नाक खालीं करावयास लावणें. (क्रि० करणें). [नाक+काटणी] **नाकाटणें**-नाकाटणी करणें. **नाकाड-डा**-नपु. ( निंदार्थी ) १ मोठें नाक. २ डोंगराचा पुढें आलेला नाकासारखा भाग. 'या नाकाडाचे पलीकडे आपला गांव आहे.' ३ भूशिर; जमीनीचें टोंक. ४ आंब्याच्या फळाचा मागील बाजूचा नाकासारखा उंच भाग. **नाकाड-ड्या**-वि. मोठें आणि कुरूप नाक असणारा. **नाकाडोळ्याचा(कानाचा) वैद्य**-पु. साधारण, कामचलाऊ वैद्य. वैद्यकविद्येंत फारसा वाकबगार नसलेला वैद्य; वैदू. **नाका डोळ्यानें सुरेख**-वि. सुस्वरूप; देखणा; रेंखीव बांध्याचा. **नाकादाई**-स्त्री. ( व. ) खोड. खरडपट्टी. ( क्रि० काढणें). 'खूप नाकादाई काढली आधीं, मग जेवूं घातलें.' **नाकावर रडें**-न. रडण्याची तयारी, तत्परता; लवकर रडूं येणें. **नाकावर राग**-पु. चिडखोरपणा; ताबडतोब रागावणें. **नाकींचें मोतीं**-न. नथ; बुलाख. 'नाकींचें मोतीं सुढाळ।' -ह ५.१९७. **नाकील**-वि. सरळ, लांब व सुंदर नाक असणारा. नाकेला पहा. **नाकु(को)स्ती, नाकु(को)र्छे**-स्त्रीन. नापसंति; नकार दाखविण्याकरितां तिरस्कारानें नाक मुरडणें. ( क्रि० मारणें; देणें; हाणणें). **नाकेल-ला**-वि. नाकील पहा. 'नाकेला अन् गुलजार। सांवळा

नि सुंदर भासे।' -बाल शिवाजी. **नाकोटा-टें**-पुन. (निंदार्थी) नाक.

**नाकटा**—वि. नागडा; नम्र. [सं. नग्न]

**नाकटी**—स्त्री. (गो.) दीड पावशेराचें माप.

**नाकबुली**—स्त्री. अमान्यता; कबुली नसणें; परवानगी न देणें. [फा. नाकबूल] ०**स येणें**-नाकारणें; कबूल न करणें. **नाकबूल**-वि. १ इच्छा न करणारा; कबुली न देणारा; नाखूष. २ नापसंत; प्रतिकूल; असंमत.

**नाकर्ता**—वि. अक्षम; दुर्बल; अयोग्य. [सं. न+कर्तृ-कर्ता]

**नाकशी**—स्त्री. नखुरडें. नाखशी पहा.

**नाकसचे**—सक्रि. (गो.) नखांनीं ओरबडणें.

**नाकसबी**—वि. अकुशल; अनिपुण; अडाणी. [न+कसबी]

**नाकस(स्व)र**—पुन. एक वाद्य; गारुडयाची पुंगी (नागाला गुंगविण्या, झुलवण्यासाठीं). [नाग+स्वर]

**नाकस्ता**—पु. १ न्यूनता; तूट; तोटा; नुकसानी. (क्रि० काढणें; भोगणें; सोसणें; खाणें; घेणें; पडणें; होणें; येणें). २ गोंधळाची, घोंटाळयाची स्थिति; घाबरगुंडी. [अर. नाकिस्] **नाकस्त्याचें साल-वर्ष**-नुकसानीचें, कठिण वर्ष.

**नाका**—पु. १ नाकें; दोन अथवा अधिक रस्ते जेथें मिळतात ती जागा; तिठा; चौहाटा. २ रस्त्याचा शेवट, टोंक. ३ जकातीचें ठाणें; दस्तुरी घेण्याची जागा. ४ पोलीस चौकी. इतर अर्थी नाकें पहा.

**नाका**—पु. (कासारी धंदा) कळशीसारख्या भांडयास जे करकोचे असतात त्यांपैकीं पहिल्यास पालव व दुसऱ्यास नाका म्हणतात. -बदलापूर ९७.

**नाकां**—अ. (गो. चि.) नको. ०**पुरॉ**-वि. (गो.) पुरेवाट

**ना-काबली**—स्त्री. कर्तृत्वशून्यता; नाकर्तेपणा. -होकै १६. **ना काबील**-वि. कर्तृत्वशून्य; नालायक; निरुपयोगी. 'अहमदशाह यास बादशाही झाली तो केवळ ना-काबील.' -भाब २१. [फा. ना+काबिल]

**नाकार, नाकारणी**—पुस्त्री. नकार; नाकबुली पहा. 'तुम्ही माझे गोष्टीचा नाकार करूं नका.' [नाकारणें]

**नाकार**—वि. निरुपयोगी; असमर्थ; अकर्तृत्वाचा. 'नाकार असतील त्यांस किल्ल्यांत न ठेवणें.' -वाडबाबा १.२०१. नाकारा पहा.

**नाकारणें**—उक्रि. १ नापसंत म्हणून अमान्य करणें. २ खोड ठेवणें (पदार्थ, कृति इ०स). नकारणें पहा.

**नाकारा**—वि. नाकार; वाईट; निरुपयोगी; कवडीमोल; निकृष्ट. 'ऐसा नाकारा कशास पाहिजे म्हणून दिला.' -रा ५. २०. 'वरून जुडी चांगली दिसते, परंतु आंत बहुत नाकारी.' -ख ११.६०११. [फा.]

**नाकि(की)र्द**—वि. बिनलागवडीची; पडीक (जमीन). [फा. नाकर्द्] **नाकिर्दीस येणें**-विनालागवड पडणें; वहीत न होणें; पडीत राहणें. **नाकिर्दसार**-वि. लागवडीस अयोग्य; नापीक. -वाडथोमा २.७. **नाकिर्दीचा**-वि. नाकिर्द पहा.

**नाकुली**—स्त्री. मुंगुसवेल. [सं. नकुल]

**नाकुवत**—वि. दुर्बल; अशक्त; कमकुवत. [फा. ना+अर. कूवत]

**नाकूच-च्छ**—वि. निपरुयोगी; नाकारा पहा. [हिं. ना+कुछ]

**नाकूस**—वि. १ अप्रयोजक. नाकर्ता पहा. २ किंचित; थोडका; अल्प. [अर. नाकसी]

**नाकें**—न. १ नाका पहा. २ रस्त्याचा किंवा घरांच्या ओळीचा, गल्लीचा शेवट; चव्हाटा. ३ डोंगरी किल्ल्याच्या चढावाचें वळण. ४ तटबंदी गांवाच्या नागमोडी रस्त्याचा कोंपरा, टोंक. ५ दस्तुरीचें, जकातीचें ठाणें. ६ थांबण्याचें ठिकाण. [हिं. नाका] **नाकेदार**-पु. दस्तुरी वसूल करणारा कारकून; नाकेवाला, 'ठाणेदार व नाकेदार होते, त्यास मशारनिल्हेकडून आदर न जाहले.' -वाडथोमा २.५२. ०**बंदी**-स्त्री. १ येण्याजाण्याचे रस्ते, मार्ग अडविणें, रोखणें; जाण्यायेण्यास प्रतिबंध. (क्रि० करणें; होणें). २ जकात, दस्तुरी यांची जमा; गल्ला. [नाका+बंदी]

**नाकेशर**—न. नागकेशर पहा.

**नाखट्टू**—वि. १ नाकुवत पहा. २ आळशी: अव्यवस्थित; बिखट्टू. [हि. ना+खट्टू=मजुर]

**नाखवा, नाखु(खो)दा**—पु. १ जहाजावरचा मुख्य अधिकारी; कप्तान; तांडेल; मुख्य नावाडी. २ (कों. नाविक) कोळी, दालदी वगैरे जातीचा गलबतावरील मुख्य. [फा. नाखुदा]

**नाखशिणें, नाखी**—न. (गो.) नऱ्हाणी; नखें काढण्याचें हत्यार. [सं. नखशीर्ण]

**नाखशी**—स्त्री. (गो.) नखाखालीं होणारा फोड; नखुरडें. नाकशी पहा.

**नाखळ**—वि. दुष्ट; नाठाळ; त्रासदायक (मनुष्य, पशु).

**नाखाटॉ**—पु. (गो.) पिसारा.

**नाखिवा**—स्त्री. (महानु.) नखुले-ली; खाण्याचें पक्वान्न. 'नाखिवा माळतिया सळिवें। इत्यादि वळिवट्ट बरवें।' -ऋ ८२. [नख]

**नाखु(खू)श-ष**—वि. अप्रसन्न; असंतुष्ट; नाराज; रुष्ट. (क्रि० असणें; करणें). 'ये गोष्टीस उजूर कराल तरी स्वामी नाखुश होतील' -वाडशाछ २०. [फा. ना+खुश्] ०**करणें**-वर्जणें; धिक्कारणें; तिरस्कारणें.

**नाखूट**—न. (कु. गो.) नख. ०**भर**-वि. नखभर; अगदीं थोडें.

**नाग**—पु. १ फणी असलेला साप; याचा रंग काळसर चकचकीत किंवा पिवळसर असतो, कांहींच्या फणीच्या मार्गे १० सारखी आकृति असते; लांबी ३ ते ६ फूट; हे विषारी असतात. २ एक उपदेवता, कमरेवरचा भाग माणसाचा व खालचा सापाचा असें स्वरूप. ३ विषमूल; बचनाग. ४ पंच उपप्राणांपैकीं एक. 'नाग नामक प्राण म्हणती । उद्गार ज्या करितां येती।' –यथा १८. १००३. ५ हत्ती. 'वृद्धहि सिंह महामदमत्ताही काय गा ढळे नागा।'–मोभीष्म १ ७८. ६ शिसें. ७ बायकांचा डोकींत घालावयाचा एक नागाकृति अलंकार. 'नाग मुदी कंकण । त्रिलिंगीं भेदली खुण ।'–अमृ ९.१२. –न. (ज्यो.) दहावें करण. [सं.] ०**कन्या**—स्त्री. १ पौराणिक नागांपैकीं अर्धमनुष्याकृति स्त्री, स्त्रीजात. २ (ल.) फार सुंदर, लावण्यवती स्त्री; नागीण. ०**कुंडल**–न. १ नागाचें वेटोळें. २ या आकाराचा कानांतील एक अलंकार. ०**कुडा**–पु. आल नांवाचें झाड. –कृषि ४१५. आल पहा. ०**कूळ**–न. १ नागपंचमीच्या दिवशीं बत्तिसशिराळे येथें आढळणारें सापासारखे लहान प्राणी; नागपंचमीच्या दिवशीं निघणारा साप. २ नागपंचमीस जमीनीवर काढलेली शेण किंवा गंधाची नागाकृति. ०**केश(स)र**–१ एक औषधी झाड व त्याचें फूल; यांत काळें व तांबडें अशा दोन जाती आहेत. नागकेशर हे लवंगेएवढें, काळें व थंड असून याचा मसाल्यांत उपयोग करतात, तांबडें हें गुणांनीं उष्ण आहे. [सं. नाग+केशर; बं. नागेश्वर; ते. नागकेशरालु; ता. नागल] ०**चंद्रकोर**–स्त्री. बायकांच्या डोकींतील एक अलंकार. ०**चंपक-चांपा**—पु. १ एक फुलझाड, हें कोंकण–कर्नाटकांत होतें, वृक्ष मोठा, पानें मोठीं, लांकूड मजबूत. यास फुलें ७ । ८ वर्षांनीं येतात. पाहण्यास सुंदर, वासास मधूर. फूल तळहाताएवढें असतें. २ नागदवणीसारखें एक फुल झाड, यास पिवळया रंगाचीं फुलें येतात. ०**चाटया**–पु. नागपंचमीस जेवावयास बोलाविलेला मुंजा. [नाग+चाटणें] ०**जोडी**–स्त्री. (ल.) संगनमत. 'त्यासी नागजोडी करून नामाजीनें आपणासी बेइमान होऊन.'–इमं ५६. ०**झरी**–स्त्री. लहान ओहोळ, ओढा, नाला. [नाग+झरा. तुल० काश्मी. नाग=झरा] ०**दवण**–स्त्री. अननसाच्या झाडासारखें झाड. पातीं एक वीत पर्यंत रुंदीचीं व रंगानें पांढरीं असतात. झाडाच्या मध्यभागीं तीन हात लांबीचा दांडा येतो. त्यावर लांबट पांढरीं फुलें येतात, यांत बिया असतात. सर्पविषावर नागदवणीचें मूळ थंड पाण्यांत उगाळून प्यावें म्हणजे वांती होऊन विष उतरतें. [सं. नागदमनी] ०**दाळी**–स्त्री. (तंजा.) फडया निवडुंग. ०**दिवाळी**–स्त्री मार्गशीर्ष शुद्ध पंचमी. या दिवशीं कणकेचे नाग करून त्यांची पूजा करतात. ०**दिवे**–(व.) थोरली दिवाळी. नागदिवाळी पहा. ०**नाथ**–पु १ बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक; अवंढया नागनाथ २ या नांवाचा नाथपंथी सिद्ध. ०**पंचमी**–स्त्री. श्रावण शुद्ध पंचमी. या दिवशीं नागाची पूजा करतात. ०**पाश**–पु. १ एक अस्त्र; लढाईंत शत्रूस मंत्रानें बांधण्याचा पाश. २ नागाकार, वर्तुळाकार बंधन; यास वरुणपाशहि म्हणतात. –मोकर्ण ३३.३१. ०**पूजा**–स्त्री. नागाची पूजा (नागदिवाळीस आणि नागपंचमीस करण्याची). ०**फण**–पु. (नृत्य) एक हस्त–अंग विक्षेप. –सनईवादन (बडोदें) १.१७. ०**फणा**–स्त्री. सर्पाची फडा ०**फणी**–वि. नागफणीच्या आकाराचा (खिळा). ०**फणीचा खिळा**–पु. चिपखिळा; नागाच्या फणीच्या आकाराच्या डोक्याचा खिळा. ०**फणी**–स्त्री. एक काटेरी वनस्पति; फडया निवडुंग; हिच्या अंगावर सर्पाच्या अंगासारखे खवले असतात, हें झाड लहान व नागाच्या फणीसारखा या झाडाच्या वरील शेंडयाचा आकार असतो; निवडुंग. ०**फणीचाफा**–पु नागचंपक पहा. ०**फांसा**–पु. १ (सोनारी धंदा) सरी वगैरेचा नागाच्या फणीसारखा अडकविण्याचा एक फांसा. २ नागपाश पहा. 'यासी धरूं नागफांसा।'–उषा ६१८. ०**बंद-ध**–पु. १ नागाचें तोंड असलेला कंबरपट्टा. 'मार्जी नागबंदी शोभा। स्मरतां उभा जवळी तो।'–भूपाळी ३. 'हातीं फरश धरिलासी। नागबंध कटीसी।'–गुच १.४. २ दढपाश; नेसणें सुटूं नये म्हणून खोवण्याची सुपारी, सोंगटी. 'पीळीव नागबंध पोवीलें।'–उषा १०८३. ३ (तंजा.) स्त्रियांच्या दंडांतील एक अलंकार. ०**बलि-बळी**–पुस्त्री. १ सोळा संस्कारांपैकीं एक. स्त्रीचें गर्भाधान झाल्यानंतर गर्भधारणा होत नसल्यास, कर्त्याच्या हातून याजन्मीं अथवा पूर्वजन्मीं सर्प मारला गेला असल्यास त्यामुळें गर्भधारणेस होणारा प्रतिबंध नाहींसा होण्यासाठीं करावयाचें कर्म. २ नागाला मारल्या बद्दलची शांति. ०**बळ**–स्त्री. नारायणबळ पहा. अतिशय आजारी किंवा मरणोन्मुख माणसावरील अरिष्ट नाहींसें व्हावें म्हणून करावयाचा विधि. 'नागबळ नारायणबळी केली जाऊन त्रिंबकेश्वरी।' –पला ९८. ०**बाळी**–स्त्री. बायकांच्या कानांतील बाळयांचा एक प्रकार. 'नागबाळया फर्गिद्रबाळया हातीं हातसर।'–अफला ५५. ०**बिंब**–न. सूर्यास किंवा चंद्रास ग्रहण असेल त्या दिवशीं ब्राह्मणाला दान करावयाची राहूकेतूच्या प्रतिमेसहित सूर्य अथवा चंद्राची धातूची प्रतिमा. ०**मणी**–पु. नागाच्या डोक्यांतील (काल्पनिक) विषघ्न मणि. या मण्याचा फार मोठा प्रभाव आहे असें मानतात. ०**मल्ली**–स्त्री. जाई; फुलवेलीचा एक प्रकार. ०**मुडो**–स्त्री. (गो.) एक अलंकार. नागमोड पहा. ०**मोड**–स्त्री. १ नागाच्या आकाराची बांगडी. २ नागाच्या वळणासारख्या वांकडया रेषा वळण, मार्ग, धोरण. (क्रि० घालणें; साधणें). ०**मोडीचा पितांबर नेसणें**–नागवें असणें. ०**मोडी**–वि. सर्पाकृति, नागाच्या गतीप्रमाणें वळणें घेऊन गेलेला, वांकडा, वळणदार (कांठ, मार्ग, बांगडी, नदी इ०). ०**लतिका**–स्त्री. नागवेल पहा. 'कां न फळतांहि सार्थका। जैसिया नागलतिका।'–ज्ञा १८.६३२. ०**लोक**–

पु. १ नागांचें वसतिस्थान; पाताळ. २ नाग नांवाचें एक प्राचीन राष्ट्र व जाति. महाराष्ट्रांत प्रथम यांची वस्ती होती असें कांहीं मानतात. ०वल्ली, वेल–स्त्री. विड्याच्या पानांची वेल; पानवेल. याचीं काळी व वेठी पानें हे दोन प्रकार. कोल्ह्याच्या विषावर नागवेलीचें मूळ पाण्यांत बारीक वाटून दिलें म्हणजे वांती होऊन वीष उतरतें [सं. नागवल्ली; हिं. बं. गु. नागरवेल; का. नागरवल्ली] ०वसा–पु. (कों.) नागोसा पहा. ०स(सू)र–नपु. १ गारुड्याची पुंगी. 'नागसर वाजविला दिवडापाशीं।' –सिसं ८.१८०. २ नागस्वर पहा. ०स्वर–पु. (तंजा.) सनई. **नागन**–नागीण पहा. 'कसुन तीर नेला उराशीं नवळी गवळी जशी नागन।' –पला ४.३३. [हिं.] **नागिनी, नागीण, नागी**–स्त्री. १ नागकन्या. 'नागीपुत्र इरावान् सत्कीर्ति सरस्वती सदरविंद।' –मोभीष्म ८ २९. **नागीण**–स्त्री. (बडोदें) एक बायकी दागिना; कंठा. –ऐरापुविवि १२५. **नागवा**–स्त्री. सर्पस्त्री; सापाची मादी; नागीण. **नागोत्र–त्रा, नागोदर**–न. १ बायकांच्या कानांतील एक दागिना. 'नागोत्रे श्रवणीं विराजति फुल्या त्या दूहिरी सांखळ्या।' –अनंतसीस्व ४३. 'कर्णी लेइलीं कर्णपत्रें। रत्नखचित नागोदरें।' –कथा २.११. ९२. २ पाटी (गळ्यांतील दागिना) किंवा इतर दागिने यांवरील नागाचा छाप, ठसा. [नाग+उदर] **नागोबा**–पु नाग. म्ह० ऐत्या पिठावर (बिळावर) नागोबा=दुसऱ्याच्या श्रमाचें फल आयता उपभोगणारा (मुंग्यांनीं तयार केलेल्या वारुळांत नाग आयता जाऊन राहतो यावरून).

**नांगट**—न. (कों.) जमीन खणण्याची कुदळ. जेथें बैलांचीं आउतें चालत नाहींत तेथें नांगटीनें जमीन खणून बी पेरतात.

**नागटा–डा**—वि. १ नागवा; नग्न; उघडा. २ (ल) म्यान नसलेली (तलवार); दोरा न ओंवलेली (सुई); पर्णविरहित (झाड); छप्पर नसलेलें (घर). तारा नसलेलें (तंतुवाद्य); बिनबांधणीचें (पत्रक–पुस्तक); अलंकारविरहित, बुच्चें (कान, नाक इ०); अभ्र्याशिवाय (उशी इ०); सामानाशिवाय (घर इ०). [सं. नग्न; प्रा. नगाओ; पं. हिं. नंगा; सिं. नंगो; गु. नागो; ओ. नागा] ०गोसावी–पु. नंग्या गोसाव्यांचा एक पंथ. ०स्वार्थ–पु. अगदीं ढळढळीत, स्पष्ट दिसून येणारा स्वार्थ. –गीर ७५.

**नांगडा–डी**—पुस्त्री. १ विंचवाची नांगी; खेकड्याचा आंकडा; विशिष्ट माशाची नखी. २ रग; ताठा. (क्रि० जिरविणें). [नांगी]

**नागडधोया**—वि. उघडा नागडा; अवधूत. धोया पहा.

**नागपुरथर**—पु. (नगरी कोष्टी) नागपुरी; नागपूर पेठेसारखा लुगड्याचा एक प्रकार. मधला पोत कोणताहि व रेशमी किनार, त्यामध्यें नक्शी करवत व चार गोमी, गोम मोठी. [नागपुर+थर=तऱ्हा]

**नागर**—न. सुंठ.

**नागर**—पु. गुजराथेमधील ब्राह्मणांची एक जात व तींतील व्यक्ति. –वि. १ नगरा–शहरासंबंधीं. २ (ल.) हुषार; चतुर; जाणता; चाणाक्ष; धूर्त. 'ना तरी नगरांतरीं वसिजे। तरी नागराचि होईजे।' –ज्ञा १.४१. ३ नागरिक; नगरवासी. 'नागरां देवां खोंबकरू।' –शिशु १५२. ४ सुरेख; सुंदर; सुसंस्कृत. 'भूमंडळींच्या कन्या नागर।' –ह २६.१४५. ५ लबाड; अनीतिमान्. [सं. नगर] ०चुडा–बांगड्या. 'सुढाळ मुक्तें कांठोकांठ। नागरचुडा नागरे।' –वेसीस्व ९.१४०. ०पण–न. १ सुंदरता; सौंदर्य; कांति; तेज. 'देशियेचेनि नागरपणें। शांतु शृंगारातें जिणे।' –ज्ञा १०.४२. २ ऐश्वर्य; मोठेपणा. 'जो आपुलेनि नागरपणें।' –ज्ञा २.३६३.

**ना(नां)गर**—पु. १ शेतीची जमीन उकरण्याचें लोखंडी फाळ असलेलें औत; जोत; हल. 'करीं घेतला नागरु।' –उषा १४१. २ नांगरखुंटा. ३ गलबत स्थिर करण्यासाठीं पाण्यांत टाकण्याचा सांखळीनें बांधलेला लोखंडी मोठा, वजनदार आंकडा, गळ. यासारखें इतर साधन. साध्या होड्यांनां नांगर म्हणजे एक दोरी लावलेला दगड असतो. ४ (ल.) जाड टांकाची लेखणी; फणीचा जाड दांता; खुंट. [सं. लांगल; प्रा. णंगर; सिं. लंगरु; हिं. गु. लंगर; पं. नंगल, लंगल; का. नेगल; फ्रेंजि. ननरी] (वाप्र.) ०उचलणें–टाकणें–सोडणें–शेतकाम सोडणें (जुलुमामुळें वगैरे). (अमक्यावर) ०धरणें–जुलूम करणें. **नांगरास पाळ**–(नांगरतांना एखादें झाडाचें मूळ आडवें आल्यास नांगर अडतो त्यावरून) दिरंगाई लावण्यास, रेंगाळण्यास कांहीं तरी क्षुद्र कारण पहाणें; एखाद्याला त्याच्या शब्दांत पकडणें. म्ह० जेथें जावें तेथें नांगरास पाळ. ०की–स्त्री. नांगरणें; नांगरण्याचा व्यापार. ०खुंट–न. १ ज्यांत फाळ बसविला जातो तो लांकडाचा ठोकळा. २ नांगर. –बदलापूर २८६. ०चिनी–स्त्री. (बे.) रानांत आपोआप होणारें रताळें. ०जोत–न. गांवच्या खोताला वेठ चाकरीच्या हक्काबद्दल दिलेली वस्तु; अर्धेलीनें खोताच्या नांगरास दोन बैल व एक मनुष्य एक किंवा अधिक दिवसपर्यंत देणें; खोताच्या उपयोगासाठीं दिलेली बैलजोडी किंवा नांगर. ०ट–ठ–ड–स्त्री. १ नांगरलेली जमीन. २ (कर.) नांगरण्याची मजुरी. ३ नांगरण्याची क्रिया. –वि. नांगरलेली (जमीन). ०डा–नांगारदो–पु. (माण हेट. कु.) नांगराचा जूं बांधण्याचा दोर. ०णी–स्त्री. १ नांगरकी. २ जहाज नांगरणें; नांगर टाकून गलबत थांबविणें. ०णी दुणणी–स्त्री. पुन्हां पुन्हां नांगरणें; आडवें उभें नांगरणें. ०णें–सक्रि. १ नांगरानें शेत उकरणें. २ नांगर पाण्यांत सोडून गलबत थांबविणें. ३ (ल.) त्रास देणें; काळीज खणून दुखविणें. ४ (कों.) कुदळीनें खणणें. ०णें दुणणें–सक्रि. आडवें उभें नांगरणें; पुन्हां पुन्हां नांगरणें. ०दांत–पु. नांगराचा फाळ. 'सर्वेचि परतावया पाहत। पायीं घातला नांगरदांत।'

-एल्स्व १०.५०. ०पंचमी-स्त्री. (अशिष्ट) नागपंचमी. या दिवशीं नांगरणें बंद असतें. ०पट्टी-स्त्री. दरेक नांगरावरचा सरकारी कर. ०बंदी-स्त्री. जमीनीऐवजीं चालू असलेल्या नांगरावर पट्टी बसविण्याची रीत; शेतकऱ्यास त्याच्या इच्छेप्रमाणें लागवड करूं देणें. ०मोड्या-वि. (निंदार्थी) नांगऱ्या; शेतकरी. ०रान-न. १ नांगरलेली जमीन. २ जिराईत; काळी जमीन. ०वट-ठ-ठी-स्त्री. नांगरलेली जमीन. ०वाडा-पु. १ (गलबताचें) नांगर टाकण्याचें स्थान; बंदर. २ बलबताचा नांगर टाकणें; गलबत नांगरणें. ०वाळ-पु. (बे.) फाळाची कडी; जानवें अर्थ ४ पहा. [नांगर+वाळा] ०वेठ-स्त्री. कुळाकडून वेठीनें शेत नांगरून घेणें; सरकारी किंवा सरकारी अधिकाऱ्यांची जमीन मजुरी न देतां नांगरून घेणें. नांगरजोत पहा. नांगरी-स्त्री. लहान नांगर. नांगरे कोमफळ, नांगऱ्ये-न. (कों.) एक प्रकारचें कोनफळ किंवा गोराडूं. नांगरचिनी पहा. नांगऱ्या-वि. १ नांगरण्याच्या कामांत पडलेला; नांगरासंबंधीं; नांगरास लावलेला (माणूस, पशु). २ (ल.) खेडवळ; गांवढळ. ३ शेतकाम करण्यासारख्या वयाचा (गडी). ४ वडील; पुढारी (कुटुंब, कुळ, जाती, समाजांतील). ५ पाटीलकीचा अधिकार असलेला. ६ तिरस्कारानें वणजारी लोकांस म्हणतात. नांगऱ्या ऊंस-पु. जमीन नांगरीत असतां नांगरानें पडलेल्या सरींत कांडें खोवून लागण केलेला ऊंस -कृषि ४५६. नांगोर-पु. (अप.) नांगर.

**नागरगोंडा**—पु. लग्नापूर्वीच्या अवस्थेंतील मुलगा (नागव्यानें फिरण्याच्या वयाचा). 'नंदघरिंचे नांगरगोडे। कन्हडे येथें आले धेंडे।' -मध्व ६३५.

**नागरफणी**—स्त्री. नाग; बायकांच्या डोक्यांतील दागिना. 'फरा आणि नागरफणी।' -वेसीस्व ९.१३१. [नागफणि]

**नागरमोथा**—न. एक सुवासिक वनस्पति व तिचें मूळ. [सं. नागरमुस्ता; हिं. पं. नागरमोथा; बं. नागरमुता; सिं. गु. नागरमोथ; उ. नागरमुथा]

**नागरिक**—पु. नगरांतील रहिवासी; शहरवासी लोक. -वि. १ शहरासंबंधीं. २ जाणते; सुसंस्कृत; नागर पहा. 'देश म्हणजे काय हें ज्यांना कळतें असे मध्यम वर्गांतले नागरिक योद्धे पुढें येतात तेव्हां देशरक्षणास लागणारी ईर्षा व अभिमान सैन्यांत जागृत होतो.' -टिसू १०६. नागरिकत्व-न. नागरिकपणा; नागरिकाची वृत्ति, गुण, हक्क इ०.

**नागरी**—वि. १ नागर ब्राह्मणासंबंधीं. २ नगरासंबंधीं; शहरची (भाषा, लिपि इ०). ३ देवनागरी पहा.

**नागल**—वि. श्रीमंत. 'नागलें देखोनि चांगलें बोले। आपुलें वंचूनि त्यापुढें खुले।' -तुगा ३०५७. [नागर]

**नागलकुडा**—पु. एक प्रकारचें कुड्याचें झाड.

**नागला**—पु. (राजा.) एक फुलझाड.

**नागला, नागली**—स्त्री. एक धान्य; नाचणी.

**नागवण-वणूक, नागवणें**—स्त्रीन. १ लुटालूट; दरोडा; लुबाडणें. (चोर, राजा इ०नीं). २ सरकारी खंड; दंड. 'मग राजा पुसेल आपणाकारण। तरी पडेल नागवण तें वेऊं।' -भवि ५४. १५४. ३ व्यापारांतील तोटा. ४ (सामा.) द्रव्यहानि; बुडणूक. (क्रि० घेणें; घालणें). ५ द्रव्यापहारामुळें होणारी दुर्दशा; लुबाडल्यामुळें झालेली अवस्था. 'न पाविजे कदा उन्मत्त झालिया। दंभ तोचि वायां नागवण।' -तुगा २१. ६ लूट. 'विषयदेशींचें नागवणें। आणीत जे।' -ज्ञा १८.४६४. -एल्स्व १२.३८. [नागविणें] म्ह० (गो.) समर्थाची सांठवण दुर्बळाची नागवण. नागवणा-वि. नागविणारा. 'नाहीं माझे मनीं। पोरें रांडा नागवणी।' -तुगा ३११७. नागविणें-उक्रि. १ नागवें, वस्त्रहीन करणें. -ज्ञा ११.४६९. २ लुटणें; जुलूम करणें; लुबाडणें; बुचाडणें. 'साध्वी शांति नागविली।' -ज्ञा ३.२९१. ३ फसविणें. 'नागविले भगवे योगी। समाधिभ्रंम।' -ज्ञा १६.२९८. -अक्रि. लुटला, लुबाडला जाणें. 'बहु पांगविलों बहु नागविलों। बहु दिस झालों कासावीस।' -तुगा १५०५. [नागवें करणें]

**नागवणें**—अक्रि. आटोक्यांत न येणें; नाटोपणें; अनावर होणें. -ज्ञा २.१२४. 'इंद्रियद्वारें मन धांवें सैरे। नागवे करितांचि कांहीं।' -तुगा ११४५. [न+गावणें=सांपडणें; सं. नागम्]

**नागवसा**—पु. (कों.) नागोसा पहा.

**नागवा**—वि. १ नग्न; वस्त्रहीन; नागडा; उघडा; विवस्त्र. २ गरीब; दरिद्री; उघडा; पोरका. ३ दिवाळखोर; धंद्यांत बुडालेला. [सं. नग्न; प्रा. णग्गो; फ्रेंजि. नंगो; आर्मे. नूगलेल] नागवें कोल्हें, नागवी सवाशीण भेटणें-अकल्पित लाभ होणें. 'की भेटला कपटमिष साक्षात् कोल्हाचि नागवा याला।' -मोसभा ४.६५. नागवें नाचणें-१ अतिशय आनंदानें बेहोष होणें. २ वाटेल तसें अप्रतिबंध वर्तन करणें; स्वैर वागणें. नागव्या गोष्टी सांगणें-करणें-निर्भीडपणें, स्पष्ट, उघडउघड बोलणें. ०पाऊस-पु. उन असतां पडणारा पाऊस. नागवें-न. १ न्यून; तूट; वाण; उणेपणा; वैकल्य. २ उघडा भाग; अरक्षित भाग. ०उघडें-न. नग्नता. (ल.) उघडकीस आलेल्या (निंदास्पद) गोष्टी. उदा० त्या दारोड्याचें नागवें उघडें सारें समजलें. ०उदाहरण-न. भिकार, क्षुद्र, किरकोळ दृष्टांत, दाखला. नागा-वि. नंगा; नागडा. नागीवा-नागवा पहा. 'क्षण एक नागीवा पायीं। नचलवे तयाकरितां कांहीं।' -तुगा ७०२. [नांगवा]

**नागा**—पु. १ तहकुबी; खोळंबा; विलंब; खंड; अंतर (कामांत, गतींत). २ खाडा; मोडा; गैरहजेरीचा दिवस. 'कधीं भोगितो कधीं जातो नागा।' -होला १५७. [तु. फा. नाघा; हिं. नागा]

**नांगा, नांगाडा**—पु. १ विंचवाची नांगी ( क्रि० मारणें ). २ खेकडयाची नखी, आंकडा; यानें तो वस्तु धरतो. ३ नांगाड पहा. [ नांगी ] **०मारणें**–१ टोमणा मारणें; नाकांत काडया घालणें. २ कार्यनाश होईल असें भाषणादि करणें. **नांगाड–डें**–पुन. १ कोंबडयाच्या, जनावराच्या पायाची अणकुचीदार नखी; खुराचा नखाप्रमाणें वाढणारा निरुपयोगी भाग. २ नांगा पहा. [ नांगी ]

**नांगॉटॉ**—पु. ( गो. ) शेतकीचें एक हत्यार, नांगट पहा.

**नागागा**—पु. फुटाणा; भाजलेला हरभरा. ' नागांची पूजा केली, जवळ नागाणे, लाह्या, दुध इ. ठेविलें ' –नागाची कहाणी २२. [ नाग+दाणा ]

**नागारी**—पु. १ गरूड. २ मोर. [ सं. नाग+अरि ]

**नागारी**—पु. भाटासारखा एक स्तुतिपाठक.'बंदीजन मागध नागारी।' –दाव ३१४. ' भाट नागारी वर्णिती। ब्रीदें रायांचीं वाखाणिती। ' –गीता १.४८६. [ नगारा ]

**नागावा**—पु. नागवण पहा. नागीवा पहा. 'सरकारचे खिलारी यासी,कजिया करून नागावा करावयास प्रयोजन काय ?' –वाडशाछं ११८.

**नांगाळी**—स्त्री. एक प्रकारची वेल.

**नांगा**—स्त्री. १ नांगा अर्थ १,२ पहा. ( क्रि० मारणें ). २ गुरांच्या, कोंबडयांच्या इ० ) पाया–खुराजवळील बोटासारखा अवयव; नखी, नांगडा, नांगाड पहा. ३ शेर किंवा थुवर, थोर याची डिरी. ४ कोवळा कोंब, अंकुर. ' पिण्याच्या पाण्यांत शेराच्या नांग्या टाकून तें पिण्यास निरोगी करून टाकलें ' –के १९.४.३०. **०टाकणें**–हात पाय गाळणें; हतवीर्य होणें; मिशा खालीं करणें. ' पण दरबारचा नुसतें बोलावणें येतांच आतां आपली धडगत नाहीं असें पाहून त्यानें नांगी टाकली. ' –नाटयकथार्णव. **०मारणें**–टोमणा मारणें. **०लागणें,रुतणें**–( एकाद्या कामांत, जागेवर ) जम बसणें; पाऊल रोवणें. **नांगी न राहणें**–समूळ नष्ट होणें; शिल्लक न राहणें, न उरणें. ' त्याचे घरीं गुरांची नांगी राहिली नाहीं. ' =गुरें राहिलीं नाहींत.

**नांगें**—न. मेथीचें डेळकें–दुबळकें वेचकें. [ नांगी ]

**नागेशावळ**—स्त्री. देवापेक्षां प्रकृतीला श्रेष्ठ मानणारा व कलगी लावण्या म्हणणारा शाहीरांचा एक वर्ग. याच्या उलट हरदासवळ.

**नांगोडा**—पु नांगा, नांगाडा अर्थ १, २ पहा.

**नागोरची**—स्त्री. (व. घाटी) लगोऱ्या; चेंडू लगोरीच्या खेळांतील मध्यभागीं मांडलेली लांकडाच्या ठोकळयांची, दगडांची अगर विटांची एकमेकांवर रचलेली उभी हार–रचना.

**नागोला–ळा**—वि. ( व. ना. ) नागवा. **०भोद्ला–वि.** ( व. ) नागवा–डा. [ नागोला द्वि. ]

**नागोवा**—पु. नागवण नागावा पहा. ' तो सुख दुःखांचा नागोवा ' –ज्ञा १३.८५. ' तो नागोवा राजा आणवी। ' –एभा १.२११.

**नागोल–सा**—पु. ( कों. ) १ ज्यामध्यें दरवाजाचीं वरचीं कुसें अडकवलेलीं असतात असा उंबरठा, त्याजवळची फळी. दरवाजाच्या या जागेवा कांहीं ठेवण्यासाठीं उपयोग होतो. २ दाराच्या चौकटीवर,दाराच्या चौकटीच्या रुंदीइतका दीर्घ चतुष्कोनी कोनाडा; उतरला; ( उंची वीतभर ). ' नागोशावर सांगशी पहा. ' ३ मुळकुंबा तोरणाशीं उभा केल्यानंतर तो तसा राहाण्यासाठीं व फिरण्यासाठीं अर्धवर्तुलाकृति भोंक असलेलें जें लांकूड बांधतात तें. ४ ( राजा. ) नागवसा; जोखडाच्या मधोमध बसविलेल्या खिळा ( इसाडा बांधण्याची दोरी अडकण्यासाठीं )

**नाघाण–न–णी–नी**—क्रिवि. नाहकपणें; चुकीनें; अकारण; अन्यायानें; गैरशिस्तपणें.[फा. ना–गाह्=अकस्मात्; हिं. नागहानी]

**नाच**—पु. १ नर्तन; नाचणें. २ वेश्यादिकांचा हावभाव गानासहित तालावर पादविक्षेपरूप व्यापार तो. [ सं. नृत्य; प्रा. णच्च; बे. नाचिवा; पं. नच्च-नचणा; सिं. नचणु; हिं. गु. नाचना] **०नाचावा लागणें, नाचणें**–अनेक प्रकारची खटपट करणें ( लग्नादि कार्यांत ), **०मांडणें**–धांगडधिंगा घालणें. **नाचवा–नाचव**–स्त्री. १ इकडे तिकडे हालविणें; थारेपालट करणें. २ चंचलपणा; अस्थिरता. **नाचकरी**–पु. नर्तक; नाचणारा; नाच्या. **नाचण, नाचणघुंगरी–टिपरी**–स्त्री. १ नर्तिका. २ नखरेबाज, नटवी स्त्री; रंगेल; छिनाल, छबेली स्त्री. **नाचण–णा**–वि. नाचणारा. **नाचणी**–स्त्री. नर्तकी. 'जेथ रंभे ऐशिया नाचणी।' –ज्ञा ९.३२३.'ब्रह्मचर्यापुढें नाचणी ।'–दा ७.९.२१. **नाचणें**–अक्रि. १ नाच, नृत्य करणें. २ उडया मारणें; धांगडधिंगा घालणें; बागडणें ( घोडा, मूल ) ३ ताठयानें, हातवारे करून बोलणें. ४ हुरळून जाऊन, मोठया आशेनें, हर्षानें बोलणें.'अमकें करीन तमकें करीन असें तो नाचत होता.' ५ अतिशय आनंद होणें. **म्ह०** १ लग्नामध्यें खरचण्यापेक्षां नाचणें फार २ नाचतां येईना म्हणून अंगण वांकडें. आपणांस एखादें काम चांगलें करतां आलें नाहीं म्हणजे आपला उणेपणा झांकण्यासाठीं कांहीं तरी वस्तूंत खोड काढणें. ३ मोर नाचतो म्हणून लांडोरहि नाचते. **नाचणें उडणें, नाचूं उडूं लागणें**–खिदळणें; धांगडधिंगा घालणें. **नाचत उडत**–क्रिवि. खिदळत, आनंदानें उडया मारीत. (कोणेकाचे) **पुढें पुढें नाचणें**–त्याला जो जो पदार्थ ज्या ज्या वेळीं पाहिजे त्या त्या वेळेस त्वरेनें देणें; खुशामत करणें; हांजी हांजी करणें. **नाचरा**–वि. १ नाचणारा; चाळे करणारा. २ उगाच न सांगतां खटपट

करणारा; लुडबुडया; पुढें पुढें करणारा ( माणूस ). ३ उतावीळ; अविचारी. म्ह० अर्धी बाई नाचरी तिचे पायांत बांधली घागरी. **नाचरी**–स्त्री. १ नखरेबाज; छिचोर स्त्री. नाचण पहा. २ पाय झाडणें; थैमान घालणें; धिंगाणा करणें; पाय आपटणें; खुरानें जमीन उकरणें. ' माशा डसतात त्यामुळें गाईला नाचरी लागली' **नाचरेपणा**–पु. १ ( निंदार्थी ) नाचण्याची खोड. चाळे करणें. ' या नाचरेपणाच्या मुळाशीं स्त्रीशिक्षणाची कळकळ ही खरी नसून कांहीं तरी करून लब्ध प्रतिष्ठित बनण्याची हांव हीच आहे.' –केले १.१४०. **नाचविणें**–सक्रि. १ नाचावयास लावणें. ( मनुष्यें, बाहुल्या इ० ). २ उडया मारावयास लावणें ( घोडा, इ०स ). ३ इकडे तिकडे करणें; वेडें वांकडें हलविणें, फिरविणें. ' पुच्छ नाचवि कडोविकडी।' ४ दपटणें; नेट लावणें; घाई करणें; सक्ती करणें; त्रासदायक रितीनें अमलांत आणणें. ५ वारंवार स्थलांतर करणें. [नाचणें. हिं. नचवाना, नचाना] **नाच्या, नाच्या पोऱ्या**–पु. नाचकरी पहा **नाचाविणें**–क्रि. नाचविणें पहा.

**नाचकंड–कण, नानकण**—न. १ लहान हत्यारांचा संच (नखें काढण्याची नराणी, चिमटा, कातर इ०). २ काटे वगैरे उपटण्याचें हत्यार किंवा साधन. ' मग अवेलीनें नाचकंड घेवूनि करीं। काटे उपटिले ते अवसरीं।' ३ नराणी. [? फा. नाचख़्=कुऱ्हाड+खंड. सिं. नञ्किणो.]

**नाचकुच–कुचकुच**—न. (मुलींचा खेळ) एका बाजूकडील मुलगी वस्त्राखालीं लपवून तिला दुसऱ्या बाजूकडील म्होरक्यानें 'नाचकुच कां कुचकुच ' म्हणून विचारावयाचें. त्याला उत्तर लपलेल्या मुलीनें कुचकुच असें द्यावयाचें व तिच्या शब्दावरून तिला ओळखलें तर डाव जिंकला. [ ध्व ]

**नाचकें**—न. (झारी इ०च्या ) तोटीचें भोंक किंवा लहान छिद्र भांडयास झारीसारखें केलेलें लहानसें छिद्र. म्ह० नाचक्यांतून निघतो कऱ्ह्यांत जातो=उडवाउडवी, टाळाटाळी करणाऱ्या माणसासंबंधीं म्हणतात. ( गारुडयाच्या जादुगारीवरून ). [ सं. नासिका ]

**नाचक्की**—स्त्री. १ अप्रतिष्ठा; मानहानी; पच्ची; फजीती. २ भांडण; बिघाड; बेबनाव; फाटाफूट; वितुष्ट. [ का. नाचिके=लाज, शरम ]

**नाचणकांड**—न. नाचणीचें गवत.

**नाचणा–णी**—पुस्त्री. एक प्रकारचें धान्य. हें कोंकणांत व देशांत गरीब लोकांत फार खपतें. याचा दाणा बारीक मोहरीसारखा असून वर्णहि तसाच असतो. नाचणीचे भाकरी, आंबील, खापर पोळी इ० अनेक पदार्थ करतात. नाचणींत बारीक व जाडा असे प्रकार आहेत; याचे इतर प्रकार आहेत. जसें:– आश्विनगोरी, काळपेरी, गंधडया, गरवी अंबणी, गरवीशेतगौरी, गौरीचा हळवा, जाबरी, जोगीण, रत्नी, लोया, शेतभाडगरा, साठेरी, हळवी अंबणी, हळवी गौरी वगैरे. ( हेट. ) नाचणे. [ ? ] **नाचणे कुंबरी**–स्त्री. श्रेष्ठ जातीचा नाचणा. कुमरी पद्धतीनें पिकविलेली नाचणी. कुंबरी, कुमरी पहा. **नाचण्याचा हुरडा**–पु. भाजून खाण्यासाठीं पूर्णपणें पक्व होण्याच्यापूर्वी नाचण्याचीं तोडलेलीं कणसें.

**नाचा पाडा–फाडा**—पु. ( न मध्यें ) नचा पाडा पहा.

**नाचार**—वि. १ गरीब; कंगाल; दरिद्री. २ लाचार; असमर्थ; अनाथ; निराधार; दुर्बळ. ' वर्ते यांच्या बुद्धी तो नर पावेल सत्य नाचारा।' –(सखारामतनय ) रुस्व ५८. नाचार आणि लाचार या दोहोंत फरक करावयाचा झाल्यास तो असा:–नाचार= गरीब; दरिद्री. लाचार=अगतिक. [ फा. ना–चार् ] ०गत, **नाचारी**–स्त्री. १गरीबी; कंगाली; दरिद्रता. २ लाचारी; नाइलाज; निरुपाय; निराधार स्थिति. –वि. नाचार; गरीब.

**नाचारा**—पु. संसार

**नाचीज**—वि. व्यर्थ; निष्फळ. ' रिकामें बैसोन लोकांहातीं नाचीज खावबून काल व्यर्थ न गमावणें।' –इमं १०५. [ फा. ना–चीज़् ]

**नाच्छो**—उद्गा. खेळांतील तात्पुरती तहकुबी; थुश्शो.

**नाछड**—क्रिवि. प्राप्त होत नाहीं.

**नाज**—पु. (व.) दाणा; धान्य; अनाज. ' तुमच्यापाशीं नाजाचा किती सांठा आहे ? ' [ सं. अन्न; हिं. अनाज ]

**नाजकाई–य**—स्त्री. १ नाजुकपणा; मृदुता; कोमलता. २ सूक्ष्मता; बारीकपणा; तलमपणा. ३ चांगलेपणा; सुरेखपणा; खुमाशी. ४ विचक्षणपणा; चोखनळपणा. [ नाजुक ]

**नाज(जो)र, नाझर**—पु दिवाणी कोर्टांतील एक अधिकारी. [अर. नाझिर् ]

**नाजरीबाजार**—पु. मिनाबाजार. ' तमाम पुरुषांनीं घरांत रहावें व बायकांनीं दुकानावर माल विकावा, बायकांनींच जाऊन खरेदी करावी, पुरुष मिळून एक पातशहा निगाहबाजी त्या बाजारांत घोडीवर बसून, मोतद्दार खिस्मत्गार सुद्धा बरोबर कोणी नाहीं, नसावें त्याचें गांव नाजरी–बाजार. ' –गोख- चिशाव ६. [नाजरी= बाजार ]

**नाजल**—वि. अवतरणारा; अवतीर्ण. ' त्यासही कुराण शरीफ कलामुल्ला किताब नाजल आली; त्यांत दाखला कीं आतां पैगंबर होणार नाहींत व किताबही येणार नाहीं. ' –ऐस्फुले ६५. [ अर. नाझिल् ]

**नाजागीर**—वि. जीर्णत्वादि दोषामुळें अनुपयुक्त झालेला ( पदार्थ इ० ). [फा. ना–जा=निरुपयोगी, अयोग्य+गीर प्रत्यय]

**नाजीब**—न. पायदळ पलटण. नजीब पहा.

**नाजीर**—न. (ख्रि ) परमेश्वराप्रीत्यर्थ स्वतःस सर्वस्वीं वाहून घेतलेला यहुदी पुरुष. ' तो मुलगा गर्भावस्थेपासून मरेपर्यंत देवाचा

नाजीर राहील.' -शास्ते १३.७. [हिब्रयू. नेझ(झी)र=स्वतःस वाहून घेतलेला]

**नाजू(जु)क**—वि. १ कोमल; सुकुमार; नरम; हलकेपणानें, काळजीनें वापरण्याच्या उपयोगाचा; कष्ट सहन न करणारा. 'नाजुक साजुक कळी प्रफुल्लित पातळ पुतळी टेंगणी।' -अफला ७८. २ अशक्त; दुर्बळ; बारिक; हलका (मनुष्य, वस्तु). ३ पातळ (पोळी इ०). ४ दिखाऊ; सुरेख; सुंदर (वस्तु). ५ कुशलतेचें (काम). ६ गुप्त (गोष्ट इ०); जनानी; बायकासंबंधीं (काम). ७ चोखंदळ; दिमाखाचा. [फा. नाझुक्; सिं. नाजुक] ०**काम**—न. १ नाजूकपणाचें काम; युक्तीचें व कौशल्याचें काम. २ गुप्त वेश्यागमन; परदारागमन; रंडीबाजी. ३ लांच घेणें. ०**खर्च**—पु. १ गुप्त व्यसनांस लागणारा खर्च; रंडीबाजीला लागणारा पैसा. २ लांचलुचपतीचा खर्च. ०**जागा**—स्त्री. मृदुभाग; (विशेषतः) गुह्येंद्रियाची कोमल जागा; गुह्येंद्रिय. ०**जेवण**—न. १ खाण्यांत चोखंदळपणा. २ थोडेंसेंच जेवण; फार भूक नसणें. जेवण कमी असणें. ०**मसलत**—स्त्री. खाजगी खलबत, विचारविनिमय; गुप्तपणाची, मुत्सद्देगिरीची, युक्तीची अशी योजना.

**नाट**—पुन. १ तुळई. (व.) मोठी मयाळ; लाट. 'घराच्या नाटेखालीं जेवण्यास बसणें अशुभ मानतात.' २ विशाळ, अवजड, आकार. [हिं.]

**नाट**—पु.न. १ अडथळा, अपशकुन करणें; हटक; प्रतिकूलता; नड; अडचण. 'आजचा दिवस नाट लागला.' 'मुळींच भेटलासी आतां। नाट लागलें संचिता।' -तुगा १२८. २ दुर्दैव; अभाग्य; अननुकूलता; एखादी बिघडविणारी, नासणारी, अपकारक, अडथळा आणणारी, इजा इ० करणारी अशी योजना, शक्ति.' आज काम व्हावयाचें परंतु आज काय नाट लागलें तें समजेना.' -वि. अमंगल; अशुभ; अननुकूल; आडफाटया; नुकसानकारक (वेळ, मुद्दा इ०). [सं. नष्ट; प्रा. णट्ठ] ०**भाजणें-जाळणें**—अमंगलता, अननुकूलता काढून टाकणें, तिचा नाश करणें. म्हणजेच बोहणी करणें; एखादी गोष्ट हिंमत बांधून छातीनें करणें. ०**बाट**-पु. १ कमनशिबाची गोष्ट, अपराध, दोष, कालिमा, डाग, उणीव इ० बद्दल व्यापक शब्द. (क्रि० असणें; पडणें; भाजणें; जाळणें). २ आढळून आलेला दोष, अपराध; लावलेला बोल, डाग किंवा कालिमा; कलंक. (क्रि० आणणें; ठेवणें; येणें; पडणें). [नाट+बाट] **नाटलाबाटला**—वि. बाट लागलेला; बहिष्कृत; कलंकित. 'पंचांपुढें येणाऱ्या बखेडयांत नाटल्याबाटल्यांच्या खटल्यांची संख्या जास्त याचें कारण जातिभेद' -गांगा ३२.

**नाट**—पु. १ ठावठिकाण; स्थान. 'तयाचिये भजनाचे नाटीं।' -ज्ञा १०.१०९. 'जाळूं न शके नाटे लागी।' -एभा २८ ३६९. २ प्रदेश; देश; नाड. [द्रा. नाडु, नाड]

**नाट**—पु. १ नृत्य; नाच. २ एक हलकी जात: नाटकासारखे खेळ करणारी जात. 'उग्रगंधा अरूप गौळणी। नाट जातीच्या हस्तिणी। तयांसी लुब्ध हे चक्रपाणी। ही बाळपणींची स्वलीला।' -जै ९.५९. [सं. नट]

**नाट**—पुन. १ कवडयांचा एक खेळ. २ या खेळांतील (पांच) कवडया. ३ या खेळासाठीं ओढलेल्या रेघा, काढलेली आकृति, कोष्टक; हा खेळ खेळावयाचा पट -स्त्री (कु) गोटयांच्या खेळांतील एक शब्द. मारण्याकरितां गजरा गर्र करून फिरवितात तो. 'गोटी नाटीस लाव.'

**नाट**—पु. १ ज्या कुळाकडला घेण्याचा पैसा उगवेनासा झाला असें कूळ; दिवाळखोर कूळ. २ एखाद्या दोषामुळें कुळास लागलेला बट्टा. -वि. १ दिवाळखोर; नादार; धुळीस मिळालेला; पैसा देण्यास असमर्थ; लुच्चा; उडवाउडवी करणारा (ऋणको). २ सर्वस्वीं नष्ट; पूर्णपणें नाश झालेला; बेपत्ता; ज्याचा मुद्दापत्ता नाहीं असा; फरारी. -क्रिवि. गोंधळाच्या मनःस्थितींत; अशरण स्थितींत. [? सं. नष्ट] ०**करणें**—चोरून नेणें; पळविणें; उपटणें. ०**जाणें-येणें**-बुडणें; तूट येणें; वचन दिलेली, अपेक्षित मदत अथवा चाकरी करण्यास हयगय करणें; नाकबुलीनें, नाकारानें, ओढून धरणें. 'हा दोहो रुपयाला नाट गेला.' 'रुक्मा तो परि नाठ ज उनि वेदे नाहींच तां जिंकिला।' -कृकौ ९७.

**नाट**—क्रिवि समुद्राचे आंत दूरवर; जमीनीपासून दूर. 'गलबताची नाळ नाट लाव.'

**नाटक**—नपु १ सोंग घेऊन करण्याचा खेळ: एखादी गोष्ट (ऐतिहासिक, कल्पित किंवा पौराणिक) अनेक स्त्रीपुरुष पात्राकडून प्रत्यक्ष घडल्याप्रमाणें करून दाखविणें; नाट्यरूपक दशरूप लक्षणांतील दहा प्रकारातील नाटक हा पहिला प्रकार आहे उदा० शाकुंतल नाटक, वेणीसंहार नाटक. २ काव्यातील एक प्रकार. ३ ढोंग; सोंग; बतावणी. 'पुरुषोत्तमरावाच्या पत्नीसमोर त्यांनीं चागलेंच नाटक केलें.' ४ फजीती; तमाशा; बेअब्रूची गोष्ट. 'नाटक झालें जन्माचें मनिं काहो येइना।' -शारदा १.१ -वि. नाटकी; खेळ करणारा. [सं. नट्=नाचणें; अभिनय करणें] ०**गृह, नाट्यगृह-मंडप-मंदिर-शाला**—नस्त्री. १ नाटकाचे प्रयोग व इतर खेळ पाहण्याकरिता प्रेक्षकांच्या सोयीची अशी बांधलेली इमारत. (इं.) थिएटर. ०**शाला-ळा**—स्त्री. १ रंगमहाल; खास महाल; जनानखाना; अंतःपुर. २ (समुच्चयार्थी) उपस्त्रिया; रखेल्या. ०**शाळ-ळा, साळ**—स्त्री एखादे पोरीस विकत घेऊन, नाचणें, गाणें इ० शिकवून उपभोगार्थ ठेवितात ती; नर्तकी; रखेली; राख; ठेवलेली बायको. 'संभाजी राजे याचे पुत्र शिवाजीराजे व येसूबाईसाहेब व आणखी नाटकशाळा.' -मराचिसं २६ **नाटकी**—वि. १ नटाचें काम करणारा; नाचणारा; नट. २ (ल.) ज्याच्या

कृतीचा थांग लागत नाहीं असा. 'तैसा श्रीकृष्ण सर्वचित्तचालक। जो मनोबुद्धीचा प्रवर्तक। तेणें मांडिलें कौतुक। परम नाटकी श्रीहरी।' –ह ४.३७. २ आंतल्या गांठीचा; वर एक व आंत एक असा. 'हा कारभारी मोठा नाटकी आहे.' ३ ढोंगी; दिखाऊ; खोटा; बहुरूपी. ४ (गो.) नकल्या. ५ नाटकीय; नाटकासंबंधीचें; नाट्यविषयक. **नाटकी–कया**–पु. छचोर माणूस.

**नाटक**—वि. (व.) नाठाळ; अटक करण्यास कठिण. 'ती गाय फार नाटक आहे.' [न+अटक]

**नाटन**—न. वेष; सोंग; सोंग घेणें; रंगभूमीवर नाटक, खेळ करणें; नाच. [सं.]

**नाटपेट–ड**—वि. अगोदर हंशील न भरलेलें; पत्र लिहिणारानें तिकीट न लावतां पेटींत टाकलेलें (पत्र इ०). [इं. नॉट–पेड]

**नाटा–ठा**—वि. वाईट; खराब; दुष्ट; गचाळ. हा शब्द फारसा प्रचारांत नाहीं. म्ह० साठी बुद्धि नाठी. [नाट किंवा न+स्था?] **०ळ, नाठळ, नाठ्याळ**–वि. १ वाईट; दुष्ट; लबाड (माणूस). 'भलेतरी देऊं गांडीची लंगोटी। नाठाळाच्या काठी देऊं माथा।' –तुगा २१०८. २ खोडसाळ; अडेल; द्वाड; त्रासदायक (पशु इ०). [सं. अनास्था+आल प्रत्यय. –भाअ १८३२. –राजवाडे] **०ळणें, नाठळणें**–अक्रि. दुर्गुणी, दुष्ट द्वाड होणें, असणें (मनुष्य, पशु). **०ळी, नाठळी, नाठ्याळी, नाटा(ठा)ळकी, नाठळकी**–स्त्री. वाईटपणा; दुष्टपणा; द्वाडपणा; खोडकरपणा (माणूस, पशु यांचा).

**नाटानाट करणें**—सक्रि. (कर.) थोडक्यांत चांगलें करणें.

**नाटि**—स्त्री. १ (महानु.) संरक्षणाचें कार्य. 'तरि तीयेचेया प्राणाची नाटी। कवणा दीधली।' –भाए ११९. २ चाकरी; नाटिकराची वृत्ति.

**नाटि–टी, नाटिकर–कार**—पु. १ (माण) मुलकी (वसुली) खात्यांतील शिपाई. २ चाकर; दास; संरक्षक. 'या लागीं दयाळुवाचे घरीं। मी सदा नाटि काम करीं।' –एभा १७.१२९. 'त्यांचा स्वयें जगदीश होऊनि नाटीकार। संतांसाठीं धरी नाना अवतार।' –स्वादि ८.२.७४. [द्रा. नाट–नाड=देश; ता. नाट्टकार=पाटील]

**नाटिका**—स्त्री. १ लहान नाटक. 'रूपकाचे जसे दहा प्रकार आहेत, तसे नाट्यशास्त्रांत उपरूपक म्हणून एक प्रकार आहे; अशीं उपरूपकें १८ आहेत, त्यांतील नाटिकाच तेवढी प्रचलित मराठी भाषेंत आहे. २ नर्तकी. [सं.]

**नाटी**—स्त्री. १ (खा.) सुती लुगडयाची जात; हलक्या जातीचें लुगडें; बांड. 'नेसली अंगीं, अंगि आंवळून, नाटिचें लुगडें तें छान।' –काव्यकेतकी ६४. २ (व.) पांढरें पातळ. 'काळया बायकोस नाटी फार शोभते.'

**नाटेवार**—पु. नाटिकर पहा.

**नाट्य**—न. १ नाचणें, हावभाव (अभिनय) करणें, गीत गाणें, सोंग घेणें इ० नाटकाचे प्रकार करणें. २ वाद्य वगैरेच्या साथीसहित सोंगांची बतावणी करणें, गाणें, नाचणें इ०. नृत्य वाद्यकला; 'नट नाट्य केलें तुम्ही याचसाठीं। कवतुकें दृष्टी नीववावी।' ३ (सामा.) नाटक; नाटकाचा प्रयोग; एकाद्या सरस व सुसंगत कथाभागाचें अनुकरण करून तो साभिनय करून दाखविणें. [सं.] **०छटा**–स्त्री. १ एक साहित्य प्रकार. एखाद्या विवक्षित प्रसंगीं होणाऱ्या मनुष्याच्या मनःस्थितीचें चित्र त्याच्याच शब्दांत दाखविणें. मनुष्याच्या स्वभावांतील विसंगतता दर्शविणारी एकाकी संभाषणपद्धति, स्वगतभाषण. **०शास्त्र**–न. नाटकाचें शास्त्र मनुष्याच्या क्रियांचें, भावांचें व आयुष्याचें ध्येयात्मक प्रदर्शन करणारें शास्त्र. –ज्ञाको (न) ७७.

**नाठविणें**—उक्रि. (काव्य) न आठविणें; न स्मरणें. 'कारे नाठविशी कमलनयन वासुदेव।' –आप २३. 'कारे नाठविसी कृपाळु देवासी।' –तुगा २६७५. [न+आठविणें]

**नाड**—पु. १ (ल.) संकट; अडचण; प्रतिबंध; बाध; अहित; घात; नाश; गोता; विघ्न. –एभा १९.५०४. 'करावा कैवाड। नाहीं तरी आला नाड।' –तुगा ३५५. २ (ल.) फसवणूक; फसगत. 'नाड पावला पारखी थोरु।' –मुआदि ७.८१. –वि. फसवणारा; लुबाडणारा. [नड, नाडणें] **०क**–वि. नाडणारा; बाधक. 'जरी उदंड दंडक झाला। तरी तो त्याला नाडकचि।' –निगा २७६.

**नाड**—न. १ (कु.) नळा; कळकाचें नळकांडें. यांत डिंक, भस्म इ० ठेवतात. २ (न.) जनावरांना औषध पाजण्याचा नळा; धोटें.

**नाड**—स्त्री. १ नाडी; शरीरांतील रक्त ज्या शिरातून वाहतें ती धमनी; आंतडयाची नळी. २ नाडी (हाताची); रुधिराभिसरणक्रियानिदर्शक रक्तवाहिनीचें कार्य. (क्रि० पहाणें). ३ फीत (इजारीची). ही साधारण चार फूट लांब असते. ४ (फलज्यो.) नाडी; घटका; नक्षत्रांचा एक भाग. ५ (ल.) लांब पोट. ६ (व.) घोडयाच्या पाठीचा कणा. ७ (गो.) नागलीचें, कणीस नसलेलें काड. ८ (गो.) गुदद्वाराजवळची शीर; आंतडें. [सं. नाडी] (वाप्र.) **०आटपणें**–१ मरणोन्मुख होणें; रुधिराभिसरणक्रिया थांबणें. २ (ल) एखादें कार्य शेवटास नेण्यास असमर्थ होणें; त्या कामीं थकणें **०दाखविणें**–रोगपरीक्षा करावयाकरितां वैद्यास नाडी दाखविणें. **०पाहणें**–रोगपरीक्षेकरितां नाडी कशी चालते तें हात लावून निरीक्षण करणें; प्रकृति पाहणें. **०सांपडणें**–युक्तिप्रयुक्तीनें एखाद्याचा स्वभाव ओळखणें. सामाशब्द– **०बंद**–पु. ब्रह्मचारी: केव्हांहि स्त्रीसंग, संभोग न करणारा, न केलेला माणूस. 'नाडबंदा आजवर तूं व्रतस्थ राहिलास। नाहीं

दुसरीचा उर उघडा करून पाहिलास।' -प्रला १९९. ०वंद्रां-स्त्री. ब्रह्मचर्य; स्त्रीसंग न करणें.

**नाडकरणी-कर्णी, नाडगीर**—पु. १ जिल्ह्याचा पिढिजाद हिशेबनीस, कुळकर्णी; महाराष्ट्रांतील देशपांड्यासारखा कर्नाटकांतील वतनी पिढीजात अधिकारी. २ एक आडनांव. [द्रा. का. ता. नाड्=देश+सं. कर्णिक]

**नाड-गंवडा-गौंड-गौडा**—पु. १ महाराष्ट्रांतील देशमुखासारखा कर्नाटकांतील एक अधिकारी. २ नाडगौंडाचा एक हक्क, सर्व चौथाईवर शेंकडा तीन टक्क्याप्रमाणें होणारी रक्कम. चौथ पहा. [का. नाडु+गौडा=पाटील]

**नाडगो**—वि. फसविणारा; लुबाडणारा. नाडक पहा. [नाड]

**नाडणूक**—स्त्री. १ बुचाडणें; लुटणें, लुबाडणें; फसवणूक. नागवण पहा. २ अतिशय फसविणें; नागविणें; नाश करणें. ३ (संकटांत, अडचणींत सांपडल्यामुळें) दुर्दशा होणें; जुलमाखालीं दडपलें जाणें; छळ; गांजणूक. [नाडणें]

**नाडणें**—उक्रि. १ लुबाडणें; नागवणूक करणें. 'त्यांचीं वस्त्रें आणि वित्त। तिये घेती गा समस्त। ऐसे नाडिले बहुत। मार्गस्थ त्यांहीं।' -कथा २.१३.४०. २ अतिशय फसविणें; ठकविणें. ३ छळणें; गांजणें; त्रास देणें; अडवणूक करणें ४ कचाटयांत आणणें; संकटांत घालणें-पाडणें; गोत्यांत आणणें. 'नाडले वेदपाठक धनलोभें।' -एभा २३.२४१. ५ वैभव, सुख, ऊर्जितदशा नाहींशी करणें; बुडविणें. 'आपण त्या पोरीस नाडून मरून गेला.' -अक्रि. १ छळ, नाश होणें; बुडणें; संकटीं पडणें (तोटा, लूट, नागवण वगैरेमुळें). 'शिंदळीच्या सर्वे पतिव्रता नाडे.' 'यापरी नाडलों तरी लोचनांतरीं नीज जी भरली.' -विक ९. २ फसणें. 'मूर्खी नाडणें ते ठायीं।' -एभा १३.६२१. ३ मुकणें. 'निजलाभासी नाडणें।' -एभा ५.५३०. [नड. सं. नह्=बांधणें?]

**नाडपेन-पॅन्न**—न. (गो.) डोंबाऱ्यांचा खेळ.

**नाडर**—पु. थिल्लर; डबकें. 'कां नाडरचि भरे शोषे।' -ज्ञा १५.३८७. [का. नाडु=देश]

**नांडरी**—स्त्री. चिंध्या. -बदलापूर १२८.

**नाडवळ**—न. (कों.) (तेली) जांगी व ढोक यांनां जोडणारी खांबणी. ही जांगींत मुठ्याबरोबर उभी घट्ट बसविलेली असते. [नाड]

**नाडा**—पु. १ मोठा व जाड दोर; चऱ्हाट; मोटेचा वरचा दोर; समदुर; गाडा, रथ इ० ओढावयाचा दोर: गाडीवरील सामान बांधण्याचा दोर; नावेची ओढण, पाग; गलबताचें दोरखंड. -एभा ११.१५३१. २ मोहरमांत मनगटास बांधावयाचा रंगीत दोरा; इजारीची नाडी; नवार; कोल्हाटयाची, नाडेभोरप्याची खेळ करण्याची दोरी. ३ चामडयाचा पट्टा. ४ (कों.) कोल्हाटी, बहुरूपी यांचा खेळ करण्याचा खांब, बांबू, कळक. ५ धोटें; गुरांना औषध पाजण्याचें नळकांडें. ६ डोक्यावर उभें राहण्याची क्रिया. ७ मंतरलेला दोरा; प्रसादाचा गंडा. ८ वेणीचा अगवळ. 'नाडा सरस्वतिजळ त्रय एक वीची।' -अकक २, मेराधा १६५. [सं. नाडी] ०पसरणें-अव्यवस्थित व्यवहार असणें; गोंधळ घालणें; पसारा मांडणें. ०पुडी-स्त्री. अबीर, गुलाल इ० कांची पुडी व तिच्यावर बांधलेली रंगीत दोरी. हे देवास वाहतात. 'सटवाईला नाडापुडी वाहिली'

**नाडां**—न. (कु.) खेकडे पकडण्याचें एक साधन.

**नाडिमंडल**—न. खस्थ विषुववृत्त; नाडीवृत्त. [सं.]

**नाडिय**—पु. मगर; नक्र. 'धरितां नाडिय सावज। उद्धरिला पशुगज।' -मध्व ४८०. [नाडी]

**नाडी**—स्त्री. नाड-डा. १ नाड अर्थ १ ते ३ व नाडा अर्थ ५ पहा. २ झाडाचा खुंट; ताट; काड. ३ (चोवीस मिनिटें) एक घटका. ४ नक्षत्रांचे तीन वर्ग. प्रत्येकांत नऊ नक्षत्रें आहेत. यांना आदि, मध्य, अंत्य असें म्हणतात. ५ (वैद्यक) शरिरांतील कफ, पित्त, वात हे त्रिदोष दाखविणाऱ्या रुधिराभिसरणनलिका, प्र. ६ (व.) शेताची लांबट पट्टी; निमुळतें वावर. [सं.] ०आकर्षण करणें-होणें- ०गोळा करणें-१ मरतांना नाडी आंखडणें; मरणोन्मुख होणें. २ (ल.) नाश करणें; केला जाणें. ०चक्र-न. १ नाडीसमूह, संघ; नाभीपाशीं मिळणाऱ्या नाडयांचें वर्तुळ. २ एक फलज्योतिष चक्र, आकृति; तीन नाडयांत मांडलेलीं २७ नक्षत्रें यांत असतात. नाडी पहा. ०चा फटकळ-वि. व्यभिचारी; बाहेरख्याली (पुरुष). ०परीक्षा-स्त्री. प्रकृति जाणण्यासाठीं नाडी पहाणें व ती पाहून रोग ओळखणें; (क्रि० करणें; पाहणें). ०मंडल-वलय-वृत्त-न. आकाशाचें विषुववृत्त. ज्या महावृत्ताची पातळी भूगोलाच्या अक्षाशीं लंबरूप असते त्याला विषुव किंवा नाडीवृत्त म्हणतात. -सूर्यमा ११. ०व्रण-पु. भगेंद्र; भगंदर रोग. ०ज्ञान-न. नाडी पाहून रोगाची परीक्षा; ती पाहून रोग समजण्याची कला, नाडीपरीक्षा. 'नाडीज्ञान जयाचें सरोगबंधू चतुष्पद गणावे।' -र २.

**नाडु-डू**—पु. नाश; घात; हानि. -शर. नाड पहा. [नाडणें]

**नाडे, नुडार**—पु. मांगजातींतील दोर वळणारी एक पोटजात; वस्ती, ठाणें, बेळगांव व दक्षिण महाराष्ट्र. -अस्पृ ४७. [नाडा]

**नाडेकरी-बहु(हो)रुपी-भोरपी**—पु. दोरखंडावर, बांबूवर नाचकाम करणारी जात; डोंबारी; कोल्हाटी. (गो.) नाडेपेन्न; भोरीप. [नाडा] **नाडे भोरीप-भोरूप**-न. नाडकरीचा खेळ; दोरावर नाचणें इ०.

**नाडेपेन्न**—पु. (गो.) नाडेकरी; बहुरूपी.

**नडेसावज**—न. सुसर; मगर; नाडिय पहा. 'म्हणे रे तूं अभिलाषी खोट। नाडें सावज होशील।' –कथासा ७१६७. तेच नाडे सावजें पैं।' –ह २६.१५७. [ नाडा+सावज ]

**नाडया**—वि. नाडणारा; फसव्या. नाडक पहा.

**नाणक, नाणें**—न. चलन; पैसा; देवघेवीचें साधन; नाण्याची किंमत प्रत्येक नाण्यांत असलेल्या धातूच्या किंमतीवर अवलंबून असते, नाण्याची स्वतः किंमत करतां येत नाहीं. तर त्यावरून फक्त इतर पदार्थांची किंमत केली जाते –टि १.७६ २ मुद्रा, मोहोर पुतळी, पैसा इ. रूप द्रव्य. [स. नाणक] **०परीक्षक**–पु. नाण्याची पारख करणारा; पोतदार. **०परीक्षा**–स्त्री. नाण्याची पारख करणें. **०शास्त्र**–न. जुनीं नाणीं मिळवून त्यांवरून इतिहास संशोधणें. या शास्त्राचा इतिहासास फार उपयोग होतो. मुद्राशास्त्र. **नाणवट**–न. १ टांकसाळींतून निघणाऱ्या अनेक जातींच्या नाण्यांचा जमाखर्च. यांत नाणेउतार, कम, सौदागिरी जिन्नस इ० सर्व बाबी येतात. –भह १८३४. २ नाणें. नानवट असेंहि रूप येतें. 'खरें नानवट मिरवेतीचें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥' –तुगा २०१२. **नाण(णा-णें)वटी-ट्टी नाणेवट्टी**–पु (गु.) सराफ, नाणें वटाविणारा. नाणवटी, नानावटी असें गुजराथी लोकांत धंद्यावरून पडलेलें आडनांव आहे. –स्त्री. सराफीचा धंदा. **नाणवटा**–पु. नाणें विक्रीची जागा नानवटा पहा. **नाणेझाडा-मेळ**–पु. (सराफी) रोजच्या तसेंच ठराविक मुदतीच्या निरनिराळया सदरांखालील नाण्यांच्या रकमांच्या देवघेवीसंबंधीं हिशेब; तसा हिशेब काढणें. (क्रि० काढणें; लावणें; मिळवणें; निघणें; लागणें; मिळणें) **०बाजार**–पु नाण्यांचा व्यवहार चालण्याचें स्थान. 'व्यापार खालावत आहे. तरी नाणें बाजार महाग करणें इष्ट नाहीं.' –के २.१२.३० **नाणेभिड**–स्त्री. नाण्यांची अडचण, टंचाई; नाण्याची बाजारांत कमतरता, दुष्काळ. **नाणेवार**–क्रिवि. निरनिराळया प्रकारच्या नाण्यात किंवा नाण्यांच्या रूपानें ( दर्णे, घेणें ). उदा० नाणेवार भरणा-इरसाल-पावती-शिल्लक. **०वारी**–वि. निरनिराळया चलनांत असलेल्या नाण्यांसंबंधीं; चलनांनीं युक्त, बनलेलें.

**नाणा-णें**—पुन. एक जंगली झाड. याचीं पानें शिताफळीच्या पानांएवढीं मोठीं असून लांबट असतात; लांकूड इमारती कामास उपयुक्त. हीं कोकणांत फार होतात यांपासून स्थळांना नांवें पडलीं आहेत. उदा० नाणेघाट, नाणेमावळ, इ. **नाणावणें**–अक्रि. १ नांवाजणें. २ नांव काढणें; विख्यात होणें. **नाणावलेला**–वि. नांवाजलेला; विख्यात.

**नाणु**—न. अफूच्या बोंडाचा चिरा पाडून, रस काढण्याचें. नाणीसारखें हत्यार.

**नात, नातीण**—स्त्री. मुलाची किंवा मुलीची मुलगी. 'वयें आजोबा माझे दिसतां। नात दिसे मीहि।' –शारदा ३.३. [ सं. नप्त्री; प्रा. णत्तिआ ] **०जांवई-जांवय**–पु नातीचा नवरा. **०सून**–स्त्री नातवाची बायको. **नातरूं-वंड, नातुंड, नातोंड**–न. मुलाचा किंवा मुलीचा मुलगा किंवा मुलगी. 'मारूं दिलीं कसीं हो भीमास रणांत आठ नातुंडें।' –मोभीष्म ९.७. [ सं. नप्तृ; प्रा. णत्तु ] **नातुरवाळा**–वि. (गो.) नातू, नात असलेला. [ नातु+वाला प्रत्यय ] **नातू**–पु. मुलाचा किंवा मुलीचा मुलगा. [ सं. नप्तृ; प्रा. णत्तु ]

**नात**—स्त्री. ( गो. ) १ कल्पना; अंदाज. २ आठवण ३ माहिती. 'असें घडेल याची मला नातच नव्हती.' [ सं. ज्ञान= ज्ञात=नात ]

**नातक**—पु नाडी मार्ग. –ज्ञा ६.२४८.

**ना तरी**—अ. ( काव्य ) अथवा; किंवा; नाहींतर; पेक्षां; न होऊन. –ज्ञा १.२६. 'ना तरी बोलीजे माहेर। सायुज्य मुक्तीचें।' –दा १.५.१९. [ सं. नहि तर्हि ]

**नातरी**—स्त्री. कोर; कांठ ( दगड इ. चा ). 'दगडांच्या नातरा चिरणीनें घडून बसवाव्या' –तप ४२. [ ? ]

**नातलग**—वि. १नातेवाईक; ज्यांचा परस्परें विवाहादिकें करून शरीरसंबंध आहे ते परस्पर; आप्त; सोयरा; नात्याचा माणूस, संबंधी. २ लांबच्या नात्याचा; दूरचा आप्त. [ सं. ज्ञाति+लग् नातें+लागणें ]

**नातवान**—वि. दुबळ; दरिद्री; अशक्त; असमर्थ. 'रयत नातवान असलिया दाणेपैके द्यावे.' –चित्रगुप्त ३९. –रा ८.८९. [ फा. ना+तवान्; तुल० सं. न+तवीयान् ]

**नातवानी, नातवानकी-गी**—स्त्री. दुबळेपणा; गरीबी; असमर्थता. 'परंतु पदरीं नातवानी आणि घराणियांत पुरुषबळही नाहीं.' –वाडशाछ १५२. 'नातवानगीचा वक्त आपला व मुलखाचा ऐवज कोठें दिसों नये.' –रा ३.५७. [फा. नातवान पहा.]

**नातवानी(नवानी)तलफ**—स्त्री. (गंजिफा) तलफ देण्याचा प्रकार. आपणाजवळ एक पान आहे व त्यावरील दोन पानें पडल्यावर तो हुकूम होणार असून हीं वरील दोन्ही पानें एकाकडे नसून दोघांकडे एक एक आहे. अशा वेळीं आपल्याकडे खेळण्याची पाळी आल्यावर प्रथम एक पान पाडविण्यासाठीं एकाकडे जाणें व त्यानंतर पुन्हां आपणाकडे खेळण्याची पाळी येईल त्यावेळीं दुसऱ्या पानाकरितां दुसऱ्याकडे जाणें.

**नातळणें**—सक्रि. ( काव्य ) स्पर्श न करणें; हात न लावणें. –ज्ञा १३.४७९. –एभा ३.३२०. 'परंतु वदतों जनानुभव नातळो पाप गा।' –केका १०८. [ न+आतळणें ]

**नाताळ-ळें, नाथाळ-ळें**—पु. येशुख्रिस्ताचा जन्मदिवस; तारीख २५ डिसेंबर. पोर्तुगीज लोकांनीं हा शब्द प्रचारांत आणला. [ लॅ. नातालि; इं. नेटल; पोर्तु. नाताल ]

**नातुडणें**—उक्रि. १ (काव्य) स्पर्श न करणें; संसर्गांत येणें. २ न आढळणें-सांपडणें. 'जेआंचे रूपुश्रुतीं नातुडे। तैयां चा पाडु कांइसां।' –शिशु ६८४. ३ न समजणें; न जाणणें. 'नातुडे मुख्य परमात्मा। म्हणौनि करावी लागे प्रतिमा।' –दा १.४.६. आतुडणें पहा. **नातुडविणें**–उक्रि. न पावविणें; न गुंतविणें; न घालणें. –ज्ञा १६.१५०.

**नातूक**—न. १ (गो.) घुबड. २ पिंगळा.

**नाते**—स्त्री. (तंजा.) नात पहा.

**नातें**—न. १ रक्तसंबंध; शरीरसंबंध; यौनसंबंध; सोयरीक; आप्तपणा. २ (कार्यपरत्वें) परस्परसंबंध. (धनी आणि चाकर; गुरू व शिष्य; राजा आणि प्रजा इ० मधला). ३ (व्यापक) विशिष्ट पेषा, दर्जा, संबंध. उदा० सरकारी नातें; सावकारी नातें; व्यवहार नातें. 'जिकडे वपु तिकडे मन युक्त न शोभेल अन्यथा नातें।' –मोभीष्म ४.५. [सं. ज्ञाति] **०गोतें-पोतें**–न. (व्यापक.) संबंध; सोयरीक. **०दार-वाईक**–वि. नातलग पहा.

**ना तें**—अ. (काव्य) नाहींतर; किंवा; ना तरि पहा. 'ना तें सांवळें आकाश पाल्हलें।' –शिशु १०२०. –एभा १.३७.

**नाथ**—पु १ मालक; धनी; प्रभु; स्वामी. जसें:-विश्वनाथ; भक्तनाथ; दीनानाथ इ० (समास). २ पति; नवरा. ३ श्रेष्ठ; वरिष्ठ. 'मुनि सांगे नृपनाथा। जन्मेजया।' –ज्ञा १.४८. ४ नवनाथांतील एक व्यक्ति; नाथपंथ. ५ एकनाथस्वामी. 'नाथाचिया हातें श्रीमुखांत खावी।' –रामदासी २.८१. **०पंथ**–पु. आदिनाथांनीं काढलेला गोसाव्यांतील एक पंथ. यामध्यें मच्छेंद्रनाथ, गोरखनाथ, जलंदरनाथ इत्यादि नऊ प्रसिद्ध साधू होऊन गेले. नवनाथ पहा. **०पंथी**–वि. वरील पंथाचा अनुयायी.

**नाथ**—स्त्री. (खा.) बैलाच्या नाकांतील दोरी; वेसण. नथ पहा. 'अपेट असती वृषभ सात। त्यासी घालील जो नाथ। एकेचि वेळीं।' –कथा ४.११.११२. [सं. नासा.] **नाथणें**–सक्रि. वेसण घालणें. 'तुमचा गोरा नाथला कां?' **नाथाचा बैल**–पु. १ वेसण घातलेला बैल. २ (ल.) ताब्यांतला; हाताखालचा माणूस.

**नाथणें**—उक्रि. नाश करणें; ठार मारणें. –एभा ११.४८२. 'कालिंदीडोह काळा निघुन अवलिला नाथिला नाग काळा।' –किंमुच ७८. २ त्रास देणें; छळणें. ३ व्यापणें; त्रासणें. 'कथा पुराण ऐकतां। झोपें नाथिलें तत्त्वता।' –तुगा ३०६४. [सं. नाथ्]

**नाथणें, नाथिणें**—अक्रि. नसणें. [न+अस्-अस्ति-आथि. न+आथिणें, आथणें. तुल० गु. नथि]

**नाथि-थी**—क्रि. (काव्य) नाहीं. 'म्हणोनि आथीनाथी हे बोली। जें देखोनि मुकी जाहली।' –ज्ञा १३.८७१. [सं. नास्ति] **नाथिला**–नसलेला; लटका; वाईट. 'ऐसें हें सिद्धचि असतां। नाथिली लागे देहअहन्ता।' –दा ८.३.३५. आथिखालीं पहा.

**नाद**—पु. १ आवाज; ध्वनि; शब्द (मुख्यत्वें पुष्कळ वेळ टिकणारा). 'ते दोन्ही नाद भिनले। तेथ त्रैलोक्य बधिरभूत जाहलें।' –ज्ञा १.१२८. २ (ल.) शोक; छंद; वेड; ध्यास. 'अजुन खुळा हा नाद पुरेसा कैसा होइना।' –शारदा १.१. ३ मध्यमा नांवाची वाचा. –अमृ ५.६३. –ज्ञा ६.२७६. ४ श्रवणसुख. [सं. नद्=वाजणें] **नादांत असणें, नादीं लागणें-भरणें, पडणें, लावणें**–एखाद्याच्या विशेष छंदीं लागणें; लगामीं असणें; आशा लावून ठेवणें; कामांत गर्क होणें; गुंतविणें. 'मी गेलों तेव्हां तो लिहिण्याच्या नादांत होता.' 'हा गृहस्थ त्या रांडेच्या नादीं लागला.' **०जाणें**–१ (भांडें वगैरेस तड पडली असतां) आवाज बद्द होणें. २ पत, नांव जाणें; प्रसिद्ध झाल्यामुळें गुप्त गोष्टीचें महत्त्व कमी होणें. **०तुटणें**–वरील प्रकारच्या नादांतून सुटणें, मुक्त होणें. **०दवडणें, घालविणें**–पत, अब्रू, नांव घालविणें. **०लावणें**–छंद, वेड लावणें; अशा लावणें; कच्छपीं, भजनी लावणें; नादीं लावणें. 'त्यानें देतों असा नाद लाविला आहे.' **नादानें नाद**–भांडणापासून भांडण. (क्रि० होणें; चालणें; वाढणें; लागणें). **०खार**–वि. १ नादिष्ट; छंद घेतलेला; भजनीं लागलेला; एखाद्या गोष्टीचा हव्यास घेतलेला; एकदां ज्या नादास लागला त्याच नादानें चालणारा. २ दुसऱ्यास आशा दाखवून आपल्या भजनीं लावणारा; कह्यांत ठेवणारा. **०बिन्दुस्थान, नादस्थान, नादबिंद**–न. १ टाळू. 'प्रथम नादबिंद मिळवणी होता एकांतर।' –भज ५६. २ शरीरांतील निरनिराळ्या ठिकाणाहून नाद उत्पन्न होतो असें ठिकाण. अशीं स्थानें तीन आहेत तीं:-हृदय, कंठ व शीर्ष. **०ब्रह्म**–न. १ नादरूपानें अवतरलेलें ब्रह्म; सुस्वर गायन. २ भजनांतील वाद्यांचा मोठा आवाज; दुमदुमाट. 'टाळ वीणा मृदंगघोष। नादब्रह्माची आली मूस।' ३ वरील वाद्यांच्या घोषामुळें वाटणारा आनंद व त्याचें दिग्दर्शन. 'तंतवितंत घन सुस्वर। ऐसें नादब्रह्म परिकर।' **०लुब्ध**–वि. १ नाद श्रवणामुळें मोहित झालेला; सुस्वरानें गुंग झालेला. २ गायनानें लवकर मोहित होणारा.

**नादाची जाति**–स्त्री. (संगीत) ज्या योगानें एका नादापासून दुसरा नाद वेगळा करतां येतो अशा प्रकारचा प्रत्येक नादाच्या अंगांतील गुण. **०वाद**–पु. १ भांडणाचा; फाजील व्यर्थ असा मांडलेला वाद; गलका; भाषण इ०. (क्रि० करणें; लावणें; लागणें; तुटणें). २ शोक; छंद; दुरासक्ति; वायफळ प्रवृत्ति. **नादावादांत पडणें**–क्षुल्लक लोभांत गुंतणें; नादीं लागणें, भरणें पहा.

**नादावणें**–अक्रि. १ (फुटक्या भांड्याचा) बद्द आवाज होणें; फुटका नाद येणें. २ (ल.) (भांड्यास) ऐब, दोष असणें; फुटकें, व्यंगयुक्त असणें. ३ बाहेर फुटणें; बोभाटा होणें: स्फोट होणें. ४ आसक्त होणें; नादीं, मागें लागणें. ५ नांवाचा बोभाटा, दुष्कीर्ति होणें (व्यभिचार, व्यसन इ०मुळें); लोकांच्या चर्चेचा

विषय होणें. ६ एखाद्याच्या वर्तनामुळें कांहीं नुकसान, तोटा झाला असा समज करून घेऊन त्या माणसासंबंधीं उपरोधिकपणानें रागानें हा शब्द योजतात. नांव गाजविणें, काढणें. उदा० 'गाई हातपान्ह्यास लाविली होती पण मूर्ख नादावला म्हणुन दूध देईनासी झाली.' –सक्रि. वाजविणें, नाद करणें (भांडें इ०चा). **नादसळु**–पु. वैखरी; आदिवाणि, वाचा. –मनको. **नादाळ–ळ्या, नादिष्ट, नादी–नाद्या**–वि. १ छांदिष्ट; ध्यास घेणारा; हट्टी. २ नादखोर; भजनीं, नादीं लागलेला. **नादाळ**–वि. मोठा आवाज असलेलें (वाद्य इ०). 'वाजती नादाळ भेरी।' –वसा ४८ **नादाळी**–स्त्री. १ अपकीर्ति; बभ्रा; दुष्कीर्ति. २ आळ; आरोप; कुभांड; बालंट (क्रि० करणें, घेणें). ३ प्रचंड नाद; गर्जना. [नाद+आळी] **नादित**–वि. वाजणारें; वाजविलेलें; दुमदुमित; ध्वनित. [नाद] **नादेश्वर**–पु. नादब्रह्म पहा. 'गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर।' –तुगा ३७७९.

**नांद, नांदी**—स्त्री. १ नंदाळें; मातीची शेगडी. २ माठीचा मोठा रांजण. ३ ऊंसाच्या घाण्याजवळ रस सांठविण्यासाठीं जमीनींत पुरलेला लोखंडी हौद; मांदाळ. ४ फुलझाडकरितां मातीची मोटी कुंडी. ५ स्नानासाठीं केलेलें मातीचें भांडें. [सं. नदा; हिं नाद]

**नांदणें**—अक्रि. १ राहणें; वास करणें; स्थाईक होणें; सुखानें वसति करणें. 'आम्ही त्या गांवांत सात पिढया नांदलो.' 'सुखें धृतीचिया धवळारीं बुद्धि नांदे।' –ज्ञा ६.३७७ २ सुखानें, भरभराटीनें असणें; पुष्कळ दिवसपर्यंत चांगल्या स्थितींत असणें. 'तूं तें सिद्धचि जो नेणें। तो नांदे सर्वज्ञपणें।' –ज्ञा १७.१४. ३ वसति, गजबजलेलें, भरभराटलेलें असणें (घर, खेडें इ०). ४ उपयोगी असणें, पडणें; टिकणें; चालणें; शेवटपर्यंत सुखानें जाणें. 'त्यानें युक्ति काढिली, ती कांहीं नांदणार नाहीं.' ५ जमणें; समेटानें चालणें; पटणें; जुळणें; सलोख्यानें असणें. 'त्याचें व आमचें नांदत नाहीं.' 'स्त्री नवऱ्याबरोबर नांदते.' ६ कबूल असणें, मान्य होणें. 'तो मुलगी देण्यास नांदत नाहीं.' 'हा दहा रुपयाला नांदत नाहीं.' ७ सांठविणें; वागविणें; सांभाळ करणें. [सं. नंद्=आनंद होणें] **नांदणूक**–स्त्री. १ वसति; रहिवास; स्थाईक होणें; घरदार कुटुंबसुद्धां जी पुष्कळ वर्षे स्थिति ती. 'हे मोहमांदूमी माया सदना। नांदणूकी करितात।' –नव २२.१९२. २ वागणूक. 'ऐसी लोकांची जिये नांदणूक।' –ज्ञा ९.५०७. ३ विवक्षित कालपर्यंत टिकाव (कोणेक राज्यांत, कोणाच्या हाताखालीं). **नांदणें**–न. १ वास; वसति. 'जगद्गुरु महेश्वर प्रभुगिरी जिचें नांदणें।' –केका १०९. २ वस्तिस्थान; राहण्याचें स्थळ. 'कीं तृष्णेचें साजणें। लोभाचें नांदणें।' –भाए ३०९. **नांदता**–वि. १ लोकवस्तीचा, लोकांनीं वसति केलेला (गांव, घर, जागा). २ लागवडीखालीं असलेली; वहित (जमीन). ३ भरभराटी, चलती असणारा (व्यापारी, सावकार, कूळ). ४ (सामा.) पुष्कळ दिवस व चांगल्या रीतीनें राहणारा; टिकणारा; चांगला टिकाऊ. ५ समृद्ध व सुखी (कुटुंब). **नांदतें घर**–न. १ मुलाबाळांनीं भरलेलें व ऊर्जितावस्थेस आलेलें घर, कुटुंब; सुखी व समृद्ध कुटुंब. २ राहतें घर (पडित, बंद नव्हे). **नांदत्या घराची केरसुणी**–स्त्री. स्वतःचा फायदा करून घेणाऱ्या माणसाची पुढेंपुढें करून सेवा करणारा चाकर, गडी. **नांदवट**–स्त्री. (कु.) नांदणूक. **नांदायला जाणें**–(बायकी) नवरी मुलगी पहिल्यानें सासरीं जाणें; पहिल्टकरीण सासरीं जाणें. **नांदविणें**–उक्रि. १ वागविणें; सलोख्यानें सांभाळणें. २ समाविष्ट करणें; अंतर्भाव करणें, ठेवणें; सांचविणें. 'अजांड शतकोटि ज्या उदरिं सर्वदां नांदवा।' –केका १७. ३ रूढ होणें; प्रचारांत आणणें. 'नाहीं तें नांदविलें जेजें। मी तूं जगीं।' –ज्ञा १५ २८०. **नांदाविणें**–उक्रि. १ नांदणें अर्थ २ पहा. २ नांदणें अर्थ ४ पहा. [नांदणें]

**नांदनी**—स्त्री. एक उपयोगी वेल. –बदलापूर १२४.

**नादर**—वि. १ दुर्मीळ; उत्कृष्ट; मौल्यवान्; आश्चर्यकारक. 'डौल ज्वानीचा फूल गुलाबी रूप नादर गुलपरी।' –पला ४. ६०. २ (सामा.) (व.) उत्कृष्ट; फार चांगला. 'आज झुणका लई नादर झाला आहे.' [अर. नादिर्]

**नादर**—स्त्री. गंजीफांतील हलकें पान. [ना+दर=किंमत]

**नादरशाई(ही)रुपया**—पु. विशिष्ट शिक्क्याचा रुपया. –शाको.

**नांद(दु)रुकी–खी, नांदरूक–ख**–स्त्री. एक मोठें वाढणारें झाड. पानें पिंपरीच्या पानासारखीं; याची छाया फार दाट असते. [सं. नंदिवृक्ष]

**नांदा**—पु. (ना) पिरपिर; चाळा. [नाद]

**नांदाड**—पु. (व.) मातीचें विशिष्ट भांडें; नांद पहा. [नांद]

**नादान**—वि. १ नाकर्ता; दुबळा. 'मुख्य धणी तो लहान नादान.' –दिमरा १.५९. २ कुचकामाचा; नालायक; निर्जीव; अज्ञानी; नाकारा पहा. [सं॰ न+ज्ञान; फा. नादान्] ०की, **नादानी**–स्त्री. १ दुबळेपणा; फुसकेपणा; भिकारपणा; अयोग्यता; अपुरेपणा. २ मूर्खपणा. 'कांहीं नादानी आम्हांपासून न जाली.' –रा ३.१२३. [फा. नादानी]

**नादार**—वि. १ देणें, कर्ज देण्यास नालायक ठरलेला (इसम). दिवाळखोर. (इं.) इन्सालव्हंट. २ ज्याची वार्षिक मिळकत शंभर रुपये किंमतीहून कमी किंमतीची आहे असा (इसम). (इं.) पॉपर. ३ (सामा.) अकिंचन; दरिद्री. ४ मासिक फी माफ असलेला विद्यार्थी. [फा. ना+दार] **नादारी**–स्त्री. १ दिवाळखोरी; दारफळणी. २ कंगालपणा; दारिद्र्य. 'राजाचे हाली माजीचे विज्वरामुळें शिरस्ता मोडत आला आणि हक्क रुसुमही झाडून

उगवेना, सबब नादारीस आलों आणि कर्जबाजारी जाहलों.' -रा १३.९१. ३ शाळेतील फीची माफी.

**नादार**—वि. सडा; फटिंग; जरिदा. 'गनीम केवळ खडे नादार.' -भाव ७७. [ना+दारा=बायको]

**नांदाविणें**—उक्रि. नादावणें अर्थ ६ पहा. कांहीं एक चांगलें कार्य बिघडेल असें आपलें अज्ञान प्रकट करणें. 'तो तेथें जाऊन नांदावला असेल म्हणून त्यानें काम केलें नाहीं.' [नाद]

**नांदाळी**—स्त्री. मंतरलेला ताईत, मणी (व्यापारांत तोटा येऊं नये म्हणून); कुराणांतील अक्षरें कोरलेला दगड (गळ्यांत बांधण्याचा). [हिं. नादली]

**नादी**—वि. नाद लागलेला, असलेला; छंदी; नादाळ पहा.

**नादी**—स्त्री. गायनांतले सप्तस्वर? -शर.

**नांदी**—स्त्री. १ नाटकारंभीं सूत्रधारानें ईशस्मरणपूर्वक म्हणावयाचें किंवा प्रेक्षकास मंगल आशीर्वाद द्यावयाचें पद्य. देव, द्विज, नृप यांच्या आशिर्वादांनीं युक्त असें नाटकाचें मंगलाचरण. उदा० 'पंचतुंड नररुंड मालधर' हें पद्य सं. शाकुंतलाची नांदी आहे. २ समृद्धि. [सं.] ०**मुख-श्राद्ध**-न. उपनयन-विवाहादि मंगल कार्याचें प्रसंगीं प्रारंभीं पितरांना उद्देशून करावयाचें श्राद्ध (हें वैदिक नसून सत्याषाढ सूत्रकालापासून सुरू झालें असावें). 'नांदीश्राद्ध देवक विधान। केलें ब्राह्मणाचें पूजन।' -एरुस्व ५.२१. [सं.]

**नांदीचा पासोडा-शेला**-पु. नंदीचा पासोडा पहा. अंतरपट धरावयाचा शेला.

**नांदु**—पु. नांद पहा.

**नांदेट**—स्त्री. (कों.) तगरीचें फुलझाड. -न. तगरीचें फूल.

**नांदेटा**—पु. १ एक फुलझाड; नांदेट पहा. २ सर्पांतील एक प्रकार.

**नांद्या, नांद्याबैल**—पु. १ नंदी बैल पहा. 'विषयी लंपट शिकवी कुविद्या। मनामागें नांद्या होऊनि फिरे!' -तुगा २८४८. २ (ल.) मूर्ख. ३ (ना.) फाजील लाडावलेला मुलगा; मिजासतट्टू. [सं. नंदी=बैल]

**नान**—न. दारू गाळण्यांत चाद्दवर ठेवतात तें टोपाच्या आकाराचें भांडें. -बदलापूर ३१०. [नांद]

**नान**—स्त्री. अन्न; भाकरी. [फा. नान्] ०**कार**-पु. जमीनदार, कानगो इ० स निर्वाहासाठीं दिलेला भत्ता, पैसा, जमीन. 'गढ्या व तालुके वेखील नानकार करून दिल्हे जातील.' -वाडथोमा १.२७०. ०**कुराण, नानोकुराण-न**-न. इमान; प्रमाण; बेलभंडार; अन्नाची शपथ. 'नवाबांनीं निखालसपणें नानकुराण घ्यावें.' -रा ६.३५८. 'सर्व प्रकारें आपलें नानोकुराण करून देतील तेव्हां आम्हीही किल्ल्याविसीं इमान देणें तें देऊं.' -रा ६.३५६. [फा. नान्=भाकर+उ+कुर्आन्=कुराण] ०**खटाई**-स्त्री. एकमिठाई; ही मैद्यापासून पावाच्या पद्धती प्रमाणेंच करतात. -गृशि ५०९. [फा.] ०**पर्वेशी, परवर्षी**-स्त्री. लढाईंत कामास आलेल्यांच्या (ज्यांस वंश नाहीं अशा) बायकांस, सरकारनें निर्वाहार्थ करून दिलेली नेमणूक-देणगी; जानपर्वेशी. [फा. नान्+पर्वरिश्=पालन]

**नानक**—पु. शीखधर्माचा संस्थापक; शीखांचा आद्यगुरु. ०**पंथी-शाही, नानसाई**-पु. नानक याचे अनुयायी; शीख भिक्षेकरी वर्ग. यांच्यातील भिक्षेकरी टिपरीवर टिपरी मारून भीक (पैसे) मागतात; हे फार लोचट भिक्षेकरी आहेत. -गांगा १३३.

**नानकण**—न. नाचकंड पहा.

**नानमुख**—पु. (व. ना.) लग्नाच्या अगोदरचा दिवस; कुणबी लोकांत लग्नाच्या आदल्या दिवशीं गांवांतील देवांस हळद वगैरे नेण्याचा विधि [सं. नांदीमुख] **नानमुख्या**-पु. (व.) वरील विधि करण्याचा मुख्य मान ज्याच्याकडे असतो तो; पुढारी; मुखंड.

**नानवट-टा**—नाणवट पहा. 'मग दंभाचे नानवटा। हीन कसाचा खोटा। विकरा मांडी।' -एभा ५.१०१.

**नाना**—पु. १ नारायण या नांवाचें आदरार्थी संक्षिप्त रूप. २ टोपणनांव, एखाद्याच्या नांवापुढें किंवा स्वतंत्रहि योजतात. जसें:-चिंतोपंत नाना; नाना आले इ० ३ नानासाहेब (बाळाजी बाजीराव) पेशवे, नाना फडणीस, इ०. ४ (खा.) आजा [ध्व. बालभाषा; हिं. नाना=आईचा बाप. तुल० सं. नना=आई]

**नानी**-स्त्री. १ (खा) आजी. २ वडील वृद्ध बायकांसंबंधीं आदरार्थी शब्द. [हिं. तुल० सं. नना=आई; इं. नॅनी=दाई]

**नाना**—पु. एक झाड. नाणा पहा.

**नाना**—पु. नाहीं, नाहीं; नकारार्थक शब्द; निषेध. नाकबूली, नाकारणें, परवानगी न देणें इ० बद्दल शब्दप्रयोग. (क्रि० करणें). [सं. न, न]

**ना ना**—अ. ना तरी; नाहींतर; किंवा; अथवा.-ज्ञा १.२९. -एभा १०.६८७. 'ना ना ते सप्ताद्रि आणि नवनाथ। कीं हे अष्ट दिक्पाळ दिग्गजेसीं समर्थ।' -स्वादि १.१.६१. [सं. ना=नाहीं]

**नाना**—वि. १ पुष्कळ; अनेक. 'जन्म घेईन मी नाना। बहु सोसीन यातना।' -तुगा ११४६. २ निरनिराळे; बहुविध. विविध; भिन्नभिन्न. 'नाना देव्हारा प्रसीध्धु। जे बहुत आइको मंत्रसिध्धु।' -ऋ ६७. नानारूप-वर्ण-रस इ० [सं.] सामाशब्द- ०**त्व**-वि. अनेकत्व. -एभा ११.४३३. ०**परी**-क्रिवि. अनेकप्रकारें. 'क्रियेवीण नानापरी बोलिजेतें।' -राम १०४. ०**प्रकार**-पुअव. विविधजाति, तऱ्हा, प्रकार. ०**प्रकार करणें**-(ल.) रागाचे सर्व आविर्भाव व कृत्यें करणें; रागानें जळफळणें, आदळआपट करणें. ०**प्रकारचा**-वि. सहस्रावधि, हजार प्रकारचा. ०**मत**-

न. १ लौकिक अभिप्राय. २ मतवैचित्र्य; मतांचे प्रकार. ०रत्न-वसुंधरा-स्त्री. (प्र.) बहुरत्नावसुंधरा. अनेक बहुमोल रत्नांनीं भरलेली पृथ्वी. जेव्हां एखादी आश्चर्यकारक गोष्ट घडते तेव्हां ती पाहतांना किंवा नमूद करतांना हा शब्द योजतात. 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना। तुंडे तुंडे सरस्वति। देशेदेशे विभाषास्यात्। नानारत्ना वसुंधरा।' ०वाडें-क्रिवि. पुष्कळ प्रसंगीं; अनेक वेळां. ०विध-वि. अनेक प्रकारचें. -ज्ञा ७.३७.

**नानावटी**—पु १ सराफ. २ जगत्शेट. नाणे-णा वटी पहा.

**नानुटणें**—अक्रि. (व.) अहंपणा, मीपणा वाटणें; मानास चढणें; मी आहे तसा कोणीच नाहीं (अहंविशेषः) असें वाटणें.

**नानू**—स्त्रीन. कां कूं; टाळाटाळी; हांहूं; संदिग्ध भाषण. [सं. न, न. नाना]

**नानेटा-टा-ठी**—पुस्त्री. एक सर्प. नांदेटा अर्थ २ पहा. रंग काळा, अंगावर पट्टे, विषारी नसणारा साप. -बदलापूर ३४७.

**नानोटणें**—अक्रि. (व.) प्रसिद्धि पावणें. 'आमच्या गांवांत पैशासाठीं तो नानोटला आहे.'

**नाप**—न. माप; तोल; वजन; जोख. [सं. माप; हिं. नाप]

**नापणें**—उक्रि. १ मोजणें; मोजून पूर्णभरणें. २ (पैसे टाकण्याच्या) विशिष्ट खेळांतील एक संज्ञा.

**नापत**—स्त्री. बाजारांत (देण्याघेण्याच्या व्यवहारांत) पत, अब्रू याचा अभाव असणें. -वि. पतीच्या व्यवहारांत योग्यता, पत, अब्रू नसणारा (माणूस). [ना+पत]

**नापसंत-द्**—वि. पसंत नसलेला; अमान्य; नावडलेला; अस्वीकृत; अप्रिय. [फा. नापसंद्]

**नापाक**—वि. १ अस्वच्छ; अपवित्र; ओंगळ; घाणेरडा. २ नाकारा पहा. [सं. न+पाक=शुद्ध; फा. ना-पाक्]

**नापातेरा**—पु. १ नापत (विशेषतः व्यापारांत). २ (व्यापक) बेअब्रू झालेली, निंदित स्थिति.

**नापादणें**—उक्रि. न संपादणें. 'कां नापादिता गती।'-ज्ञा १८.११६. [सं. न+आपद्]

**नापास**—वि. १ नापसंत; नाकबूल; अमान्य; रद्द. २ परीक्षा न उतरलेला; न निवडलेला; अनुत्तीर्ण. [ना+इं. पास]

**नाप(पी)क**—(प्र.) नापित पहा.

**नापित**—पु. हजाम; न्हावी; नाई. [सं. नापित]

**नापिकलें**—न. (कों.) नापीक; पाऊस इ०च्या अभावामुळें धान्य न पिकणें; धान्याचा दुष्काळ; पिकाचा अभाव. 'गुदस्तां नापिकलें झालें त्यामुळें बहुत लोक खराबीस आले.' [न+पिकणें]

**नापित्य**—न. न्हाव्याचा धंदा. [सं.]

**नापीक**—न. नापिकलें पहा. -वि. न पिकणारी; बिनउत्पन्नाची; पडीत; वरकस (शेतजमीन). [न+पिकणें]

**नापूस**—स्त्री. १ अनादर; नापत. २ कोणी विचारीत नाहीं अशी स्थिति. [न+पुसणें]

**नापेर**—नस्त्री. १ न पेरलेलें शेत. २ नेहमींची पेरणी न होणें. [न+पेरणें] **नापेरा-री**-पुस्त्री. न पेरणें; (पाऊस इ० काच्या अभावामुळें) नेहमींची पेरणी न करणें.

**ना-पैवस्ता**—वि. न पोंचलेला; अप्रविष्ट. दाखल न झालेला, केलेला. 'त्या पैकीं ना पैवस्ता रुपये दोन.' -रा ६.२३३. [फा]

**नाफत**—स्त्री. कमतरता; उणीव. 'धान्याची नाफत गेली.' नापत पहा.

**नाफरमानी**—वि. १ जांभळ्या रंगाचा; जांभळा. २ अरुण; लालसर; गुलाबी, 'गुलाब तक्ता आणि गुलाला बागामधीं नाफरमानी। त्या रंगासारखी मुसमुसते गडे तुझी पहिली ज्वानी।' -होला १०३. [फा. नाफर्मान]

**नाफा, नाभ-भा**—पु. कस्तुरी मृगाचा अंडकोश; मृगांड; बेंबी कांदा; नाभा. कस्तुरीचे नाफे व विलाईतचे तोफे पाठविले.' -पदमव ९७. -पेद ८.५३. [फा. नेफा; सं नाभि.]

**नाफा**—पु. नेफा; विजारींत नाडी घालण्याची जागा. [फा. नेफा]

**नाफेर**—पु. बदल न करणें; आहे तीच स्थिति राखणें. ०वाला-वि. १ न बदलणारा फेरफार न करणारा. २ (ल.) कट्टर पक्षीय असहकारितावादी; गांधीपक्षाचा.. सत्याग्रहाच्या राजकारणांत हा शब्द गांधीपक्षाच्या लोकांनां निंदार्थी लावीत.

**नाबद-दा**—स्त्रीपु. उसाची गडोरी-पेरें; कर्वा; उंसाचें कांडें. [अर. नबात्=ऊंस; फा. नबात्=साखर]

**नाबद-दी, नाबद साखर**—स्त्री. खडी साखर; 'व्यासवचन इक्षुदंडु। गाळुनि सुरस सारांश गोडु। देशभाषा वळिले लाडु। नाबदेचे आवडी।' -मुसभा १.१९. 'गोड अत्यंत नाबदी साखर। मुखीं घालितां कडकड फार।' -रावि २२.७८. **नाबदचूर्ण**-न. पिठीसाखर; 'अरुवार सोजिया फेणिया। नाबदचूर्णे कोंदलिया।' -मुविराट ८.७१. **नाबदार**-पु. खडीसाखरेचा ढीग. -शर.

**नाबद**—वि. असमर्थ; अक्षम; अयोग्य; अपुरा. [हिं. नाबर=नाकारणारा]

**नाबनाव**—वि. (व.) सर्व; संपूर्ण; एकूणएक. 'नाबनाव माणसें गांवाला गेलीं.'

**नाबर**—वि. नालायक; नामर्द; असमर्थ. नाबद पहा. 'तो घर बांधायाला नाबर नाहीं.'

**नाबनती**—स्त्री. (व.) वैमनस्य; वैर. [न+बनणें]

**नाबालीक**—वि. वयांत न आलेलें (मूल). [फा. नाबालिघ्]

**नाबूद**—क्रिवि. १ नष्ट झालेला; बेचिराख झालेला; बुडालेला; बेपत्ता झालेला; नाहींसा झालेला; नष्टप्राय. (क्रि० जाणें; बुडणें;

होणें; मरणें इ० ). ' रयत शाबूद तर त्यांत आमचें कल्याण ती नाबूद झाल्यास आमची हक्कदारी आम्ही कोठें पहावी ? ' –भा जुऐगो २५. ' नजीबखानास नाबूद करावें हे मसलत त्यांनीं केली. ' –मदबा १.६९. २ पूर्णपणें; साफ. ' गांवीं टोळ येऊन शेतें नाबूद खाऊन नासाडी जाहली.' –सासंइ, जुलै ९४. ३ (क) अपूर्व; न भूतो न भविष्यति. [फा. न+बूद् किंवा नाबरद्=नसलेला]

**नावेजणें**—अकि. (मुंबई) हवेंतल्या ओलाव्यानें पदार्थ कुजूं लागणें.

**नाभ–भा**—पु. कस्तुरी मृगाचा अंडकोश. नाफा पहा.

**नाभ**—स्त्री. १ लांकडांत कुड, फळी इ० भरण्यासाठीं केलेली खांचण. २ (गो.) दुकानाचें दार, चौकट. ३ मांदळा; पिंडी (चाकाची). गाडीच्या चाकाचा तुंबा. नाभि पहा. [सं. नाभि]

**नाभा**—पु. नाभ; चाकाचा मांदळा; पिंडी. [नाभ]

**नाभि**—स्त्रीपु. १ बेंबी; नाळ ज्या ठिकाणीं असते तें छिद्र. –ज्ञा ६.२०९. २ नाभ ३ पहा. ३ मध्यबिंदु; केंद्रबिंदु. [सं.] ०**कमल**–न. १ (काव्य) बेंबी; नाभि (सुंदर कमळाच्या आकाराची). २ रांगोळींतील एक प्रकार. ०**छेदन**–न. नाळ कापणें. ०**नाडी**–स्त्री. नाळ. ०**पाक**–न. नाळ कापल्यावर नाभि सुजून पिकते व पू होतो, कधीं कधीं क्षत पडतें तो रोग; नाभीचा विकार. –बाळरोगचिकित्सा ५१. ०**वर्धन**–न. बेंबीची सूज. **नाभ्य**–वि. बेंबीसंबंधीं.

**नाभि(भी)कर–कार**—पु. १ (काव्य) भिऊं नको असें आश्वासन; याबद्दल उच्चारण्याचा शब्द. –ज्ञा १०.७.' ब्रह्मेया नाभीकारू दीन्हला ।' –दाव ४७७. २ अभयवचन; खात्री; विश्वास. ' मग कृपालु यदुवीर । तयांसी दीधला नाभीकर । ' –ह २६.१८६. ' ऐसा जंव धावा केला । तंव ईश्वरू पावला । सकळिकां दीधला । नाभिकारू । ' –कालिका ११.८३. [सं. ना+भी+कर, कार]

**नाभी**—उद्गा. १ भिऊं नकोस ! –एभा ३०.३४८. ' गरुड येतो फडत्कारें । नाभी नाभी म्हणे त्वरें । ' –तुगा ६७८. २ नाभिकार. ना भी असा तुटक उच्चार करतात. [न+भिणें]

**नाम**—न. १ नांव; वस्तुमात्राचें नांव. २ (व्या.) पदार्थाचें नांव. सामान्य, विशेष, व भाववाचक असे नामाचे तीन प्रकार आहेत. –पु. १ उभें गंध; तें लावण्याचा ठसा; रेघ. (सामा.) गंध; कपाळावर लावण्याचें चिन्ह. २ (ल.) घोडा; कुत्रा इ० कांच्या कपाळावर उभा पांढरा पट्टा असतो तो. [सं. नाम; फा. नाम्] ०**करण**–न. मुलाचें नांव ठेवण्याचा विधि, संस्कार. हा १६ संस्कारांपैकीं एक आहे. ०**गावडा**–वि. (कु.) अशिक्षितांचा पुढारी. ०**घोष**–पु. १ (पूजा इ०च्या वेळीं) देवाच्या नांवाचा केलेला मोठा गजर; नांवाचा घोष. ' मग नामघोषें पिटोनि टाळी । ' २ देवाचें नांव घेणें; भजन. ०**आ**–स्त्री. मान; महत्त्व; कीर्ति. ' वडीलवडीलापासून स्वामीकार्यै प्रसंगें धन्यास संतोषी करून आपली नाम–जा संपादीत आलेस. –रा ८.१३९. [फा. नाम्=नांव+जाह्=हुद्दा] ०**जात–द**–स्त्री. १ नियुक्त, नियोजित अधिकारी. २ नेमणूक; जहागीर. ' कांहीं नामजादा चार पांच लक्ष रुपये मिळतील ऐसें आहे. ' –पया ९४. ३ स्वारी. ' त्यांनीं शिक्र्यांवरी नामजात रवाना केली. ' –रा १५.६. ४ एक पदवी. ' रामाजी माहादेव नामजाद प्रांत साष्टी यास.' –वाडबाबा ३.१९. –वि. १ लौकिकवान; प्रख्यात. ' हुजूर हशम तालुके मजकुरीं नामजाद आहेत.' –वाडसमा ४.१४३. २ नेमलेला; नियुक्त केलेला. ' ते लोक किल्ल्यावर ठेवावयाचे उपयोगी नसल्यास त्यांस दुसरे जागां नामजाद पाठविणें. ' –वाडसमा १.२७८. [फा. नाम्झाद्] ०**जादी**–स्त्री. १ शौर्याचें कृत्य; नांवलौकिक. २ स्वारी; अभिक्रम. ' मग त्यावरी नामजादी करून रताजी रुपाजी जीवें मारिलें. ' –इमं ३४. –सभासद ५४. ०**जोग**–वि. हुंडींत ज्या माणसाचें नांव व वर्णन लिहिलेलें असेल त्याच्यापासून ओळखपाळख न घेतां हुंडीची रक्कम त्याला देतां येईल अशा प्रकारची हुंडी. (इं.) ऑर्डर चेक. याच्या उलट शहाजोग. ०**दार**–वि. १ कीर्तिमान; सुप्रसिद्ध. ' मुसा मुत्रीम नामदार । ' –ऐपो २२२. २ कायदेकौन्सिलचा सभासद. एक बहुमानार्थी पदवी. (इं.) ऑनरेबल. ' नामदार गोखले. ' ०**दारी**–स्त्री. १ कीर्ति; लौकिक. नामजाद–दी पहा. २ कौन्सिलचें सभासदत्व; सन्मानाचा हुद्दा. ०**देव**–पु १ शिंपी जातींतील एक प्रसिद्ध साधु. २ एक शिंपी जातींतील पोटजात. ०**धातु**–पु. नामापासून बनलेला धातु. जसें:–शेवटणें; शेंपटणें; समरसणें. ०**धारक**–वि. १ नेहमीं देवाचें नांव घेऊन मुक्ति इच्छिणारा साधक; भक्तिमार्गी; भजनी. ' एथिचेआ नामधारका । विज्ञापन परिवारिआ मार्गिका । ' –ऋ १०३. ' तरले तरति हा भरंवसा । नामधारकाचा ठसा । ' ०**धारक, नामधारी**–वि. १ नांवाजलेला; प्रसिद्ध; स्वतःचें नांव गाजविणारा. ' आम्हांजवळ दाहा नामधारी सरदार आहेत. ' २ नुसत्या नांवाचा; स्वतः कांहीं एक कारभार इ० करीत नसतां ज्याच्या नांवावर कारभार इ० होतात तो. ३ एकच नांव असलेला; एकाच नांवाचे दोन परस्पर. ४ विद्या, गुण इ० कांहीं नसतां निव्वळ मोठें नांव धारण करणारा. ' हा नामधारक शास्त्री आहे. ' ०**धेय**–न. (काव्य) नांव; नाम. –वि. नांवाचा. ०**ना–नां**–स्त्री. कीर्ति; प्रसिद्धि; ख्याति. ०**नाईक**–पु. (हेट.) आरमारावरचा अधिकारी; यावरून एक आडनांव. ०**निर्देश**–पु. नांवाचा उल्लेख; नांव घेऊन सुचविणें, दाखविणें. ०**निशाण**–वि. प्रसिद्ध; विख्यात ' राजे बहादर नामनिशाण ।' –ऐपो २७७. ०**बुरदा**–वि. (कागदपत्रांत) उपरि लिखित; उपर्युक्त; वर उल्लेख केलेला [फा.] ०**मंत्र**–

शाको. ४. ५३

पु देवाच्या नांवाचा जप. –ज्ञा १७.१०४. **०रूप**–न. नांवरूप पहा **०रूपातीत**–वि. १ नांव, रूप, वर्णन इ०कांच्या पलीकडचा (हीं नसलेला) (देव). 'जें का अक्षर अव्यक्त। असें नावरूपातीत। शब्देवीण आनंदत। निजे तेथें निज वाळा।' २ नांव इ० घालविलेला; दुर्लौकिकाचा; अवनतावस्थेस आलेला. ३ ऐहिक कीर्ति, मान इ० कांची पर्वा न करणारा; ऐहिक लाभांना तुच्छ मानणारा. [नाम+रूप+अतीत] **०वर**–वि. प्रसिद्ध; नांवाजलेलें. **०वाचणी**–स्त्री. नांवनिशी. 'कथितो नामवाचणी सारी।' –अमृत ४४. [नाम+वाचणें] **०वाच्य**–पु. (व्या.) तृतीय पुरुष. **०विधान**–न. नामकरण पहा. **०शेष**–वि. १ ज्याचें नुसतें नांव उरलें आहे असा (मृत, अज्ञातावस्थेंतला माणूस). २ अतिशय निकृष्टावस्थेस पोहोंचलेलें (गांव इ०). **०संकीर्तन**–न. देवाचें नांव घेणें; भजन करणें; नामघोष. **०सरी**–क्रिवि. नामसदृश; नांवासारखें. 'तेही नामाशी नामसरी। म्हणत असतील जरत्कारी।'–मुआदि ४.१६. **०स्मरण**–न. मनामध्यें देवाचें नांव घेणें–आठवणें. **०स्मरण भक्ति**–स्त्री. उपासनामार्गातील नवविधा भक्तीपैकीं तिसरी. **नामा, नाम्नी**–(पुस्त्री)वि. नांवाचा–ची. जसें:– हरीपंत नामा एक पुरुष; गंगा नाम्नी कन्या. **नामांकित**–वि. प्रसिद्ध; विख्यात; लौकिक असलेला. **नामाथ(थि)णें**–अक्रि. १ (काव्य) प्रसिद्धीस येणें; नांव होणें; नांवाजला जाणें. 'आनंदाचेनि नावें। नामाथें पैं।'–सिसं ५.११. २ नांव देणें. **नामाथिला**–वि. नांवाजलेला; नामांकित. 'ऐसे नामाथिले वीर।' –उषा १५९. **नामाभिधान**–न. १ नांव. 'तेथील पांड्या भावीक पूर्ण। महादाजीपंत नामाभिधान।' २ नामांकित माणूस. 'हुजुरातींतले नामाभिधानें।' –ऐपो २६७. [सं. नाम+अभिधान] **नामावलि–ळी–ळ**–स्त्री. नांवांची यादी. मुख्यत्वें शिव, विष्णु इ०कांच्या नांवांच्या यादीस लावतात. 'प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळी गाती।' –होला १७. **नामो**–वि. (गो.) नाम लावणारा. (सारस्वत वैष्णवांना उपहासानें योजतात). **नाम्या**–वि. नाम अर्थ ४ पहा. कपाळावर पांढरा पट्टा असणारा (कुत्रा इ०).

**नामखंडी**—पु. एक प्रकारचा लगाम. –अश्वप १.१८५.

**नामणदिव(नामंदिवा)**—पु. (कर.) नंदादीप. लांबणलामण दिवा पहा.

**नामर्द**—वि. १ भ्याड; बायल्या. २ अशक्त; कमकुवत; अपराक्रमी. [फा. नामर्द्] **नामर्दी, नामर्दुमी**–स्त्री. भ्याडपणा; दुबळेपणा; भित्रेपणा. 'मिरज आम्ही सोडली; कांहीं नामर्दी केली नाहीं.' –ख १.२६५. [फा.]

**नामा**—पु. पत्र; खलिता. ' 'जाहीरनामा, करारनामा' इ०. 'तैमूरशहानीं पातशहास नामा स्नेहवृद्धीचा पाठविला आहे.' –दिमरा १.२१८. [फा.]

**नामा**—वि. वीस (फळांच्या मोजणींत). –पु. ढीग(फळांचा).

**ना–माकूल**—वि. मूर्ख; बेवकूब. –मराआ ३५. [फा. ना+अर. मअकूल्]

**ना–माफकत**—स्त्री. बेदिली. 'यासी व त्यासी ना–माफकत पडली.' –चिरा २४. –वि. बेदील. 'मुत्सद्दी हे सर्व ना–माफकत, कोणाचीही चित्तशुद्धता नाहीं.' –दिमरा १.२०५. [ना+अर. मुवाफकत्=ऐक्य]

**नामावळ**—स्त्री. एक प्रकारचें लुगडें.

**नामी**—वि. उत्कृष्ट; चांगला; प्रसिद्ध; उमदा; सरस; छानदार; नामांकित इ० (अनेक व्यापकअर्थी योजतात). [फा. नाम्]

**ना–मुनासब**—वि. अयोग्य; अनुचित. 'ही गोष्ट हिंदूंचे महजबांत बहुत ना–मुनासब.' –ख ७.३५६७. [फा. ना+मुनासिब्]

**ना–मुराद**—वि. असंतुष्ट; नाराज. 'जयाजी तर मुलुख नामुराद आहे.' –रा ६.६१७. [फा.]

**नामुष्की–मोश–शी(स–सी)**—स्त्री. १ बेअब्रु; अपकीर्ति; नाचक्की; बदनामी. (क्रि० येणें). २ (अनिश्चित) कीर्ति; सन्मान. 'नामोशाचे सरदार' –सभासद ४९. 'दफे होऊन पातशाही नामोश राहत नाहीं.' –इमं ६६. [अर. नामूस्]

**नामूस**—पु. पराक्रम. 'या उपरांत देवनरेचे पाईकें नामूस केला म्हणोन पद ठाकूर पावला.' –मब ३८. [अर. नामूस]

**ना–मोहरम**—वि. १ नष्ट; पराभूत; निराश. २ अपेशी; अयशस्वी. 'सोबतच्या लघु पुरुषाच्या बुद्धीस लागोन नसती नसती कल्पना वाढवोन धण्याचा मन्सबा ना–मोहरम केला.' –रा ८.१२६. [फा. ना+महरूम्=निराश] **नामोहरमी**–स्त्री. १ पराभव. २ अपयश. 'केवळ आपणच दुराग्रह करावा तरी अवघी ना–मोहरमी आपणाकडे येईल.' –भाब ८.

**नाय**—स्त्री. १ एक वनस्पति. म्ह० नाय निरगूड माका ह्या तिहींचा घेइजे फांका आणि उडवाइजे पडलंका. २ एक जातीची वेल.

**नाय**—क्रि. (अशिष्ट) नाहीं. 'होय नाय विचारी घरींचा व्यवहार।' –दावि ३१. [नाहीं]

**नायक**—पु. १ मुख्य; म्होरका; पुढारी; सेनापति; स्वामी; धनी; सूत्रधार. उदा० सेना–ग्राम–नट–नायक. रघुनायक, यदुनायक. –ज्ञा १.१०३. २ मुख्य पात्र, ज्याचें चरित्र काव्य नाटकांत वर्णिलें जातें किंवा ज्याच्या चरित्राच्या अनुरोधानें संविधानक रचलें जातें तो पुरुष. (हा नायिकेचा नवरा असतोच असें नाहीं). ३ (पोवाडा, लावणी इ०) शृंगारिक काव्यामध्यें ज्याचे आश्रयानें शृंगार वर्णितात तो; प्रधान वर्णनीय पुरुष (स्त्रीला नायिका म्हणतात). ४ गळ्यांतील हाराच्या मधलें रत्न. ५

नाईक पहा. ६ पति; स्वामी. 'करुनि वंदन जानकीनायका।' ७ (साहित्य) चार प्रकारच्या नायकांपैकीं प्रत्येक. नायकचतुष्टय पहा. [सं. नी=नेणें, नायक] ०चतुष्टय-न. (साहित्यशास्त्र) धीरोदात्त, धीरप्रशांत, धीरललित आणि धीरोद्धत असे चार-नायक. नायक हा यश, प्रताप, धर्म, काम, अर्थ या उद्दिशंप्रमाणें वागत असल्याचें दाखवितात. ०डा-पु. महारजातीचा म्होरक्या; महारांतील पुढारी. ०वडा-डी, वाडा-डी, नाईक(कु)व(वा)डी-पु. १ पूर्वीचा जमीनमहसूल वसूल करणारा शिपाई. २ (नायकवडा) रामोशी, बेरड, यांचा म्होरक्या, नाईक. ३ जासूद; ४ पायदळांतील किंवा किल्ल्यावरच्या दहा, वीस मनुष्यांवरचा अधिकारी. 'वसंतांची नायकवडी। खोचीति कोकिळांची धाडी।' -भाए ४३४. ५ सेनापति नायक. 'न मिळतां नायकवडी। दळांची आइती थोडी।' -शिशु ४८०. ०वाडी-स्त्री. नायकवाड्याचें काम. नायका-स्त्री. कथानकांतील, काव्यांतील, समूहांतील वगैरे प्रमुख स्त्री; स्त्रीनायक. नायिका पहा. 'जे लक्ष्मी मुख्य नायका। न मनेचि एथ।' -ज्ञा ९.३७६. नायकी-स्त्री. १ नायकाचें काम व हुद्दा. २ मालकी; स्वामित्व. -वि. १ मालकीचें; स्वामित्वाचें. २ पुढारी; मुख्य असलेलें (राज्य, जात). ३ (संगीत) गायनांत निरनिराळ्या रागांतील चीजा म्हणण्याचें गुरूपासून संपादन केलेलें (ज्ञान). नायकी कानडा-पु. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव षाडव. वादी मध्यम संवादी षड्ज. गायनसमय मध्यरात्र. नायकीण-स्त्री. १ नायकाची बायको; नायिका. २ कारखान्यांत दाहा पांच स्त्रियांवर अधिकार, हुकम गाजविणारी स्त्री; मुकादमीण. ३ मालकीण; धनीण; सत्ताधीश स्त्री. ४ नाचणारीण; कलावंतीण; गाणारीण अविवाहित स्त्री; कंचनी; वेश्या. ५ (गो.) वेश्या; व्यभिचारी स्त्री; रखेली. म्ह० नायकिणीच्या पोराळ दिसाची बापुय ना रातची आवय ना=नायकिणीच्या मुलाला दिवसाचा बाप दिसणें शक्य नाहीं व रात्रीच्या वेळीं आई मिळणें शक्य नाहीं. नायको-पु. (कु.) दशावतारांतील सूत्रधार (याच्याकडे फक्त पदें म्हणण्याचें वगैरे काम असतें). नायक्या बैल-पु. बैलांच्या रांगेंतील पुढचा बैल.

**नायकी**—पु. यवनी सालामध्यें दहा, शंभर, हजार इ०संख्येनें फिरणारा शब्द. -शास्त्रीको.

**नायकुट, नायकूत**—पु. (गो.) नाळकूट; जलोदर. नाळगूत पहा.

**नायटा**—पु. दद्रु; गजकर्ण; त्वचेचा एक रोग. म्ह० १ भवानी तुळजापुरीं आणि नायटे पृथ्वीभर. २ देवी देवळांत पण नायटे मुलखांत.

**नायटी**—स्त्री. एक लहानसर झाड. या झाडावर जीं फुलें येतात तीं अंगावर नायटे असतात त्यासारखीं तांबुसरंगी व चापट असतात. (सं.) गजकर्ण. [नायटा]

**नायतॉ**—पु. (गो.) मुसलमानास हिंदु शूद्र स्त्रीपासून झालेला मुलगा.

**नायनाट**—पु. सत्यानाश; सर्वनाश. [? सं. नाम+नष्ट]

**नायब**—वि. १ दुय्यम; सहकारी; मदतनीस; हाताखालचा. (इं.) असिस्टंट. 'नायबदिवाण-तहसिलदार' इ० २ प्रतिनिधि; गुमास्ता (अधिकारी). [अर. नाइब्] ०मुनायब-पु. नायब; प्रतिनिधि; गुमास्ता. [अर. नाइब्-मुनाब्] ०मुनायबी-स्त्री. वकीली; मुतालकी; गुमास्तेगिरी. प्रतिनिधित्व. -ऐटि २.८९ [फा.]

**नायबत**—स्त्री. नायबाचें काम; मुतालिकी. 'त्यांची नायबत आम्ही तुम्हांस देतों.' -दिमरा १.१०९. [अर. नियाबत्]

**नायरी**—स्त्री. एक झाड. नायटी पहा.

**नायरी**—स्त्री. नन्नाचा पाढा; कोणी कांहीं सांगितलें असतां नाहीं म्हणण्याचा मुखामध्यें स्वभावसिद्ध असणारा शब्द; नकार. [नाय=नाहीं+री]

**नायिका**—स्त्री. नायक पहा. १ मालकीण; धनीण. २ पुढारपण घेणारी स्त्री; मुकदमीण. ३ नाटकांतील मुख्य स्त्री पात्र; नायकाची स्त्री किंवा इतर. ४ काव्य अथवा अन्य ग्रंथांतील प्रधान वर्णनीय स्त्री. ५ (साहित्य) इचे स्वीया: परकीया व सामान्या असे तीन प्रकार आहेत. [सं.]

**नार**—पु. १ जुनाट झाडाच्या, लांकडाच्या आंतला गाभा, कठिणांश; गाभा. 'डैलामधीं लाजवी सदां आणुन हरीसारसा। बनलि जणूं हळदिचा नारसा।' -प्रला ११०. २ शिंगाचा गाभा. ३ हृदय; अंतःकरण; आंतील बाजू. [? अर. नार्=मन]

**नार**—पु. १ केळीच्या सोपटांतील धागा; सोपट. २ कमळाचा देंठ. ३ (व.) सिंदीचा फोक. ४ दांडी व जूं एके ठिकाणीं बांधण्याचा दोर. [सं. नाल; का. ता. नार=तंतु] ०पट-न. केळीच्या तंतूपासून विणलेलें वस्त्र.

**नार**—स्त्री. (काव्य) बायको; स्त्री. 'आनंदमय चित्तवृत्ति होतसे हर्षयुक्त पोटीं। नार वाहनीं बसून येतसे सख्याच्या भेटी। -पला ९५. [सं. नारी]

**नारक-की, नारकीय**—स्त्री. १ नरकासंबंधीं; नरकवासी; नरकलोकासंबंधीं. २ नरकांत राहण्यास योग्य. 'कृतघ्न तल्पकी नारकी।' -दा २.३.२६. [सं.]

**नारकत**—स्त्री. (पानमळा) एक आंकडी; सुरी; पानें, वेल इ० तोडण्याचा विळा.

**नारकरणी**—पु. नाडकरणी पहा.

**नारकस**—न. एक प्रकारची कातर, हत्यार. हें छपरबंद वापरतात.

**नारंग-गी**—पुस्त्री. नारिंगाचें झाड व फळ. **नारंग**—न. नारंगीचें फळ; नारिंग. [ सं. नारंग; फा. नारंज् ]

**नारगौडा**—पु. नाडगौडा पहा.

**नारंजी**—वि. नारिंगी रंगाची ( शालजोडी, सखलाद इ० ). –पु. नारिंगी रंग. [ फा. ]

**नारद-मुनि**—पु. १ ब्रह्मयाच्या दहा मानसपुत्रांपैकीं एक. याला लावालावी करून भांडणें लावावयाची खोड होती. २ ( ल. ) भांडणें लावून मजा पाहणारा माणूस; कळलाव्या. [ सं. ]

**नारंद**—पु. लांकूड इ० कांतावयाची सांगड, यंत्र; पेंच पाडण्याचें यंत्र. ( इं. ) लेथ.

**नारबुलें**—न. ( व. ) लहान बुटकुली. ' पाण्याला एवढेंसें नारबुलें घेतलेस ? '

**नारवाटी**—स्त्री. ( व. ना. ) नरोटी.

**नारसिंगी, नारसिंगाळें**—स्त्रीन. केळीची एक जात; हिरवी केळयाची पोटजात; या जातीचें केळें लांबट व रुचकर असतें.

**नारसिंह-जयंति**—नरसिंह इ० पहा.

**नारळ**—पु. १ एक फळ; नारिकेल. २ ( स्त्री. ) नारळीचें झाड; माड. ३ ( ल. ) डोचकें; टकलें; बोडकें. [सं. नारिकेल; सिं. नारेलु] **०हातीं देणें**–१ घालवून देणें; काढून टाकणें. २ जाण्यासाठीं निरोप देणें. **०पंचा हातीं देणें**–काम न करतां विन्मुख परत पाठवून देणें. **०कांकडें**–न. नारळ व त्याच्यासारखे इतर पदार्थ. [ नारळ+काकडी ] **०गळ्या**–वि. मोठें भोंक, भगदाड असलेलें; ज्यांतून नारळसुद्धां गळूं शकेल असें (मोठें छिद्र) (अतिशयोक्तीनें फाटक्या मोडक्या वस्तूस म्हणतात ). **०पाक, नारळी पाक**–पु साखरेच्या पाकांत खोबऱ्याचा कीस घालून बरफीसारख्या केलेल्या वड्या. **०माड**–पु. १ नारळ येण्यासाठीं राखलेलें नारळीचें झाड. याच्या उलट भेंडारमाड=ताडीकरितां राखून ठेवलेलें. २ ( देशावर ) नारळीचें झाड. याच्या उलट इतर ताड इ० झाडें. **नारळाचा चऊ-व**–पु. (कों ) नारळाचा कीस. 'काढला नारळाचा चऊ।' –मसाप २.१. **नारळाची आई**–स्त्री. १ नारळाची करवंटी; नरोटी. २ ( ल. ) ( भिक्षेकरी नरोटी घेतात त्यावरून ) भिक्षापात्र; दारिद्र्यावस्था. ( क्रि० हातीं येणें ). **नारळी**–स्त्री. १ नारळाची अर्धी करवंटी ( भांड्यासारखी उपयोगी ); नरोटी. २ नारळाचें झाड. हें झाड चाळीस पन्नास हात उंच सरळ वाढतें. सह्याद्रीच्या प्रदेशांत माड फार येतात. अव्वल प्रतीच्या झाडास प्रतिवर्षी ५०० पर्यंत नारळ येतात. झाडाच्या प्रत्येक भागाचा उपयोग आहे. सोटापासून खांब, तुळया इ०; चुडतापासून शाकार, सर्पण; खोबरें खाण्याच्या व तेल काढण्याच्या उपयोगी; काथ्यापासून लोड, तक्के, दोऱ्या, गलबतावरील पालें; चटया होतात; पेंड गुरास घालतात; करवंटयांचें तेल औषधी आहे. खोबऱ्याच्या किसापासून मुटेल तेल तयार होतें; तें व्रण, जखमा इ० भरून काढण्यास उपयोगी पडतें. **नारळी कांठ-पदर**–वि पदरामध्यें जरीची नारळाच्या झाडाची नक्षी काढलेलें ( लुगडें, पागोटें इ. ) ' नवीन तऱ्हा नारळी डोईला । पदर पागोटयाची फिरकी । ' –होला १७. **नारळी पदरी पोषाख**–पु. जेथें सन्मानार्थ वस्त्र द्यावयाचें तेथें नारळ देणें. **नारळी झांप**–स्त्री. प्रत्येक नारळीच्या झावळयावरील कर. **नारळीपात्र**–न. नरोटी; नारळी अर्थ १ पहा. **नारळी पुनव-पौर्णिमा**–स्त्री. श्रावणी पौर्णिमा. या दिवशीं पावसाळा संपला असें मानून समुद्राची पूजा करून त्यांत नारळ टाकतात. **नारळी भात**–पु. नारळाचा कीस घालून तयार केलेला भात. **नारळेल**–न. १ नारळाचें काढलेलें औषधी तेल. २ खोबरेल तेल. **नारळ्या**–पु. ( कों. ) समुद्राच्या कडेला मासे खावून राहणारा, पिवळया पायाचा, चोंचीचा व पांढऱ्या रंगाचा पक्षी; हा मारून खातात.

**नारिकेल-ली**–पुस्त्री. नारळाचें झाड. नारळ–ळी पहा. **नारिकेल**–न. नारळ ( फळ ). **नारिकेल पाक**–पु. १ नारळांतलें खोबरें किसून तें साखरेच्या पाकांत घालून केलेलें एक मिष्ट खाद्य; नारळीपाक पहा. २ ( ल. ) ( साहित्य ) नारळाची कवटी कठीण असते यावरून ज्यांतला गूढ अर्थ उकलण्यास बराच परिश्रम लागतो अशा प्रकारचा लेख, प्रबंध, भाषण इ. याच्या उलट द्राक्षापाक. ३ एक औषधी पाक. **नारिकेल-पाकन्याय**–नारळ बाहेरून खडबडीत दिसतो. पण तो फोडण्याचे श्रम घेतल्यावर आंत गोड असें खोबरें सांपडतें. त्याप्रमाणें वरून ओबडधोबड दिसणाऱ्या वस्तूच्या पोटांत शिरलें म्हणजे माधुर्य आढळतें. ' जे गत वृत्तांत अतज्ज्ञ जनांस बाह्यता केवळ नीरस वाटतात, त्यांच्या आंत नारिकेलपाकन्यायानें अत्यंत आल्हादकारक व उत्साहप्रद असा रससंचय असतो. ' –नि. **नारेळ-ळी**–नारळ–ळी–पहा.

**नारा**—पु. १ स्त्रीवेषधारी नाच्यापोऱ्या. २ पति. **म्ह०** 'मी आणि माझा नारा दुसऱ्याचा न लगे वारा. ' **०नाचणें**–बेअब्रू, दुष्कीर्ति होणें. **०नाचविणें**–१ दंगा उपद्रव करणें; गोंधळ घालणें २ स्वच्छंदी वर्तन करणें; थेरें करणें.

**नारा**—पु. नन्ना, नायरी पहा. ( क्रि०करणें, लावणें चालवणें ) [ ना=नाहीं ] **०वारा**–पु. १ नायरी पहा. निष्काळजीपणानें वागविणें; तुच्छ मानणें–करून टाकणें; तुच्छ मानलेली स्थिति. ( क्रि०करणें, करून टाकणें. ) २ उघड, प्रसिद्धि करणें; दुष्प्रसिद्धि. ( क्रि० करणें, होणें, लावणें, लागणें ). [ नारा+वारा ]

**नाराच-ज**—पु. बाण; तीर. –ज्ञा १३.५२०. 'हा तों मानुष पूतळा निजकरीं नाराच हा धूतला।'–निमा १. मोमंत्ररा ११ [ सं. नाराच ]

**नाराज**—वि. नाखूष; असंतुष्ट; अप्रसन्न. [ फा. नाराझ् ]

**नाराजी**—स्त्री. नाखुषी; अप्रसन्नता; असंतुष्टता. [ फा. नाराझी ]

**नाराणूक**—स्त्री. असमाधान. –ज्ञा १६.९२. [न+आराणूक]

**नारायण**—पु. १ विष्णु (देव). म्ह० नरकरणी करे तो नरका नारायण हो जाय. २ ( सांकेतिक ) संन्याशी पैशास म्हणतात. रुपयाला थोरला नारायण व पैशास धाकटा नारायण म्हणतात. ३ ( सांके. ) नारू नांवाचा रोग. ४ संन्याशाला नमस्कार केला असतां आशिर्वाद म्हणून हा शब्द वापरतात. [ सं ] म्ह० अडला नारायण गाढवाचे पाय धरी =अडलेला माणूस क्षुद्रपशूलाहि शरण जातो. ०**तेल**–न. अनेक वनस्पतींपासून काढलेलें एक वातहारक तेल. ०**पात्र**–न. नरोटी; भिक्षापात्र. 'रामचंद्र गणेश ( कानडे ) यानें नारायणपात्र घेऊन भिक्षा मागितली.'–ख. ०**पेठ**–वि. १ मोगलाईंत मोहबूबनगर जिल्ह्यांतील एक गांव. तेथें होणारे ( लुगडें वगैरे ) 'मग नारायण पेठ निघाली।'–अमृत ४९. ०**बल-ळ-ली-ळी**–पुस्त्री. १ नागबल-ली पहा. 'नागबळ नारायणबळी केलीं जाऊन त्रिंबकेश्वरी।'–पला ५४. २ संन्याशाच्या मृत्यूनंतर विष्णुप्रीत्यर्थ करावयाचा एक विधि.

**नारायणी**—स्त्री. ( संगीत ) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार व निषाद वर्ज्य. अवरोहांत गांधार वर्ज्य. जाति औडुव-षाडव. वादी ऋषभ; संवादी पंचम. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

**नारिंग**—स्त्री. नारिंगाचें झाड. फुलांचा वास मधुर असतो. –न. फळ; मुसुंबें, नारंग पहा. **नारिंगी**–स्त्री. नारिंग पहा. **नारिंगी तवशी**–स्त्री. काकडीचा एक प्रकार. **नारिंगें तवसें**–न. नारिंगी तवशीचें फळ; एक जातीची काकडी.

**नारी**—स्त्री. ललना; दारा; बायको. 'पराविया नारी रखुमाई समान। हें गेलें नेमून ठायींचेचि।'–तुगा ६५१. [सं.] ०**कुंजर**–पु. नवनारी (कुंजर) पहा. 'नारी कुंजराचीं दुकुलें। राजवल्लभें।'–ऋ ६९. ०**दूषण**–न. स्त्रियांचे दुर्गुण; हे सहा प्रकारचे मानतात. अनृत, साहस, माया, मूर्खत्व, अविवेकिता, अतिलोभता, अपवित्रत्व किंवा अशौच; शिवाय सातवें निर्दयत्व. 'अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता। अशौचं निर्दयत्वंच स्त्रीणां दोषाः स्वभावजाः।' या दुर्गुणांचा दुसरा प्रकार म्हणजे पान, दुर्जनसंग, पतिविरह, अटन, अन्यगृहवास व स्वप्न ( स्वप्नांत परक्या पुरुषाचा ध्यास घेणें, त्यासह रमणें ).

**नारींग**—न. ( गो. ) नळा ( दारू सामान ).

**नारींव**—वि. नार असलेलें; ज्यामध्यें साठ तयार झालें आहे असें ( लांकूड म्हणजे पक्व व दृढ ). [ नार ]

**नारुकार**—पु. नाकबुली; अमान्यता; अस्वीकार (क्रि० देणें) [ ना+रुकार ]

**नारू**—पु. एक तंतुमय रोगाचा कृमी व हा उत्पन्न होणारा रोग. नारूचे कृमी पाण्यावाटें मनुष्याच्या शरीरांत जातात. [ सं. नाल; म. नार=तंतू. तुल० प्रा. ण्हाऊ=धमनी ] **नारोपंत**–नारूरोगास थट्टेनें म्हणतात.

**नारू**—पु. गांवगाड्यांतील अलुतेदार किंवा अलुते. 'ज्याच्या धंद्यावांचून कुणब्याचें अडत नाहीं किंवा क्वचित् नडतें असा धंदा करणारा.'–गांगा १३. [ का. नाडु=वहित, लागवडीची जमीन; याच्या उलट काडु ] ०**कारू**–पुअव. गांवांतील कारागीर वर्ग; अलुतेबलुते. कारूनारू पहा. [ का. नाडु+काडु ]

**नाऱ्या**—वि. कोणी तरी; कोणीहि मनुष्य. [ सं. नारायण ] म्ह० १ अडला नाऱ्या गाढवाचे पाय धरी. २ नारो हसता केशाक केसो हसता नाऱ्याक= ( गो. ) एकमेकांचे दोष काढणें.

**नाऱ्या**—पु. (व.) नाद; टुमणें. 'जायचा नाऱ्या लावला, घेतला.'

**नाल**—पु. घोडा, बैल यांच्या खुरास मारावयाची लोखंडी अर्धचक्राकार पट्टी. [अर. नअल्] ०**करी-बंद-ध**–पु. जनावराच्या पायास नाल मारणारा. ०**डबा**–पु. १ घोड्याच्या चार नालांचा जोड. २ गावच्या लोहाराजवळून नालांच्या रूपांत घ्यावयाची सरकारी पट्टी. ०**बंदी**–स्त्री. १ नाल लावण्याची मजुरी. २ नालबंदाचा धंदा. ३ (ल.) लढाईवर जाण्याची, घोडदळाची तयारी ( तंग, तोबरा, नाल इ० नवा करून). ४ शागीर्दपेशा माणसाच्या रोजमुऱ्यांतून दर महिन्यास जी कांहीं बाकी राखून ठेवितात व एकंदर अखेर सालीं देतात ती. ५ घोडेस्वारांना मोहिमेवर पाठवितांना किंवा चाकरीवर ठेवतांना त्यांच्या पगारांतील अगाऊ दिलेली रक्कम. –भाब ३१. ६ मुसलमानी अमदानींत सरदार जहागीरदार रयत यांजकडून घोडदळासाठीं कांहीं रक्कम सरकार घेई; पुढें मराठेशाहींत त्याची कायमची पण लहानशी खंडणी करण्यांत आली ती. [फा.] ०**मेख**–स्त्री. १ नालाचा खिळा. २ नालबंदीचें सर्व सामान. ३ नालबंदी वगैरेचा खर्च. 'रोख दोन हजार रुपये नालमेखेचे पाठविले'–ऐस्फुले ६५. [ नाल+मेख ] ०**बाळी**–स्त्री. एक कानांतील दागीना; बाळीचा प्रकार. 'नालबाळ्या अबदागीरबाळ्या तर्केधर।'–अफला ५५. ०**साहेब**–पु. पंजा; मोहरमांत एका उंच काठीला वर पंजा बांधून व त्याला पुष्पमाळा वगैरे घालून गांवांतून मिरवीत नेतात, ही काठी हातीं धरणाराच्या अंगांत दैवी संचार होतो असें समजतात. याला भाविक लोक नालसाहेब म्हणतात. महंमद पैगंबर ज्या घोड्यावरून मक्केहून मदिनेस गेला त्याचा

नाल मिरविण्याच्या पद्धतीवरून ही पद्धत पडली असावी ? [ अर. नआल् ]

**नाल**—स्त्री. एक वाद्य. सामान्य पखवाजाच्या आकारापेक्षां लांबीचें प्रमाण जिचें सवापट असतें व जिला गट्टे नसतात ती. बाकी पखवाजाप्रमाणें.

**नाल**—पुन. कमळाचा देंठ. -न. शरीरांतील शीर; नळी -स्त्रीपु. १ मोरी; गटार; ओढा; नाला पहा. २ नाळ; नाभिनाडी पहा ३ बंदुकीची नळी, 'नाला तुदु बाका सोडुनी देती।'-ऐपो ८२. [सं. नाल] ०**छेद-छेदन**-पुन. नाळ कापणें; नाभिछेदन पहा. **नालातीत**-वि. ज्याच्या बेंबीचा नाळ कापला आहे असा. [सं.]

**नाल**—पु. (देशी इटीदांड्चा खेळ) एक प्रकारचा टोला मारण्याची रीत. [का. नाल=चार]

**नाल**—पु. (बे.) एक प्रकारची भाजी.

**नाल**—पु. (कु.) नारळ.

**नाल**—वि. लुच्चा; छट (मनुष्य); त्रासदायक (जनावर). 'बारा बलोत्यांचीं मुलें नाल जाणा।' -रामदासी २.३८.

**नालकी-खी**—स्त्री. १ एक प्रकारची पालखी; सरदार वगैरे बडे लोक वापरतात. पालखी चार भोयांनीं उचलावयाची असून नालकी वाहण्यास बारा भोई लागतात. 'धनी याम पालखी चाकरास नालकी।' -राला १०८. २ एखाद्याचा अत्यंत गौरव करावयाचा म्हणजे नालकीचा मान द्यावयाचा. हा मान दिल्लीच्या बादशहानें सवाई माधवरावाला वकील-इ-मुतलकाच्या वेळीं दिला होता. महादजी शिंद्यालाहि हा मान होता. ३ राजाची पालखी. 'राव जेव्हां नालकींत बसले।' -ऐपो २१३. [हिं.]

**नालदस्ती**—स्त्री. तक्रार; नालिश पहा.

**नालवा**—पु. पुरांत नदीच्या पाण्यानें किनाऱ्याला पडलेली वांकडी तिकडी चर. [नाला]

**नालस्ती-स्त**—स्त्री. फिर्याद; नालिश पहा. 'दुसऱ्याच्या नालस्तीचा पडदा जगाच्या डोळ्यांवर बांधिला म्हणजे आपली तपासणी अंधळेपणानें व्हावयाची हें उघडच आहे.' -गर्वनिर्वाण ८८. [फा. नारास्त+ई]

**नाला**—पु. १ ओढा; ओहोळ. २ ओढ्याचें कोरडें पात्र. ३ गटार; मोरी; नळ. [सं. नाल]

**नालायक**—वि. कर्तृत्वहीन; अपात्र; असमर्थ; अयोग्य; निरुपयोगी. [फा. ना+लायख] **नालायकी**-स्त्री. अपात्रता; अयोग्यता; असमर्थता.

**नालिका, नाली**—स्त्री. १ नाला; मोरी. २ शीर; नाडी. ३ घटिका; २४ मिनिटांचा काळ. [स.]

**नालिश-शी, नालीश-स, नालिस्त-स्ती**—स्त्री. १ तक्रार; फिर्याद; अर्ज (नुकसानभरपाईचा इ०). (क्रि० सांगणें). 'कोणाची नालीस हुजूर येऊं देणार नाहीं.' -रा ६.६१३. २ नालस्ती; निंदा; चहाडी; गैरवाका समजाविणें. (क्रि० सांगणें). 'सरकारचे मुतसदी रात्रंदिवस नालिशी करितात.' -रा २२.१०४. 'हा माझ्या नालिस्त्या सांगतो.' ३ दोष; दुष्कृत्य; चूक. 'तुझ्या नालिस्ती मला ठाऊक आहेत.' ४ आक्रोश; ओरड. 'एक वेळ नालीश केली त्याची शिफारस करूं लागल्यास ठीक बसत नाहीं.' -रा ५.१७. [फा. नालिश्]

**नाली**—पु. (कों.) एक लहान मासा.

**नालीक**—स्त्री. अग्नेयास्त्र; बंदूक. [सं.]

**नालुंगा**—वि. शूर; बहादर. -शर. 'शिंद्यांचा ज्यानबत्तीस फ्रेंच नालुंगा।' -राला १००.

**नाव**—स्त्री. बसण्याचा झोऱ्या; बोऱ्या; सुताडा; सुतडा; बैठक.

**नाव**—स्त्री. होडी; नौका; तर. -ज्ञा ५.१३. 'सिंधूंत परहिताधिक धरुनि मनीं काय काम नाव रिघे।' -मोभीष्म ६.१४. [सं. नौ; प्रा. णावा] (वाप्र.) **एका नावेंत असणें-बसणें**-एकाच परिस्थितींत, अडचणींत असणें. (इंग्रजी वाक्प्रचाराचें मराठी भाषांतर). 'हिंदु आणि मुसलमान आपण सगळे सध्यां एका नावेंत आहों; आपले हितसंबंध एक आहेत. मग आपण सख्या भावाप्रमाणें प्रेमानें व एक दिलानें कां वागूं नये.' **गाड्यावर नाव, नावेवर गाडा**-नाव तयार केल्यानंतर ती नदीपर्यंत नेण्यासाठीं गाड्यावर घालावी लागते, त्याचप्रमाणें नदीला पूर आला असतां पैल तीराला नेण्यासाठीं गाडा नावेवर घालावा लागतो. म्हणजे परस्परांना कालपरत्वें परस्परांची मदत लागते. किंवा एकदां एक वरचढ, एक खालीं असा सृष्टिक्रम चाललेला असतो. सर्व दिवस सारखे नसतात असा अर्थ. सामाशब्द-०**करी**-पु. नावेकरी; नावाडी. 'नावकरी अवघे द्रव्यवाना नेती।' -रामदासी २.११०. **नावाडी-ड्या, नाविक, नावेकरी**-पु. नावकरी; नाव चालविणारा. **नाविक**-वि. नावेसंबंधीं. **नाविकशिल्प**-न. जहाज बांधण्याची कला. **नावेंतील ओटी**-(कऱ्हाड बाजकी) गरोदर स्त्रीस नावेजवळ नेऊन तिच्याकडून अगोदर नावेची खणानारळानें ओटी भरून मग तिला नावेंत बसवून भरतात ती ओटी (गर्भावर संस्कार होण्याच्या दृष्टीनें हें करतात). **नाव्य**-वि. १ गलबत, नाव जाण्यास योग्य. २ नावेसंबंधीं; नाविक. **नाव्यनदी**-स्त्री. नावेनें जाण्यासारखी नदी.

**नांव**—न. १ नाम अर्थ १, २ पहा. 'नांव तुजें नावचि या संसारांभोधिला तरायासी।' -भक्तमयूरकेका ४०. २ (ल.) कीर्ति; ख्याती; लौकिक; पत; अब्रू; चांगलें नाम. 'सकल म्हणती नांव राखिलें। वडिलांचें।' -दा ३.४.१४. ३ दुर्लौकिक; डाग; कलंक;

बदनामी; दुष्कीर्ति; नापत; (क्रि० ठेवणें). ४ भांड्यावर नांव घालण्याचें कासारी हत्यार.–बदलापूर ९६. ५ नवरा बायकोनें उखाणा घालून घ्यावयाचें परस्परांचें नांव ( क्रि० घेणें ). [ सं. नाम; हिं. नाओं; जुनें हिं. नाऊं; पं. सिं. नाउं; फ्रेंजि. नव; इं. नेम ] ( वाप्र. ) **०करणें**–कीर्ति गाजविणें. **०काढणें**–नांव गाजविणें; प्रसिद्धीस येणें. **०काढणें**–कुरापत काढणें; कळ लावणें. **०घालणें**–उक्रि. ( को. ) नांव घेऊन निर्देश करणें; नांवाचा उल्लेख करणें; नांव घेणें. **०गांव विचारणें**–माहिती विचारणें; सामान्य विचारपूस करणें. **०जळो–भाजो–नांवास हळद लागो**–तळतळाट किंवा शाप देण्याचा वाक्प्रचार. **०ठेवणें व फोडणें**–( बायकी ) खेळांत एखाद्या वेळीं दोन मुलींस एकदम शिवल्याचा प्रसंग येतो तेव्हां डाव कोणी घ्यावा ह्याविषयीं तंटा होतो त्यावेळीं त्या दोन्ही मुली एकमेकांच्या संमतीनें नांवें बदलून ठेवतात, मग त्यांतील एखाद्या मुलीस आपलीं नांवें सांगून तीं त्यांतील कुठलें नांव मागेल तें तिला देऊन उरलेल्या नांवाच्या मुलीनें डाव घ्यावयाचा असतो. **०ठेवणें**–१ दोष देणें; व्यंग काढणें. **म्ह०** नांव ठेवी लोकाला शेंबूड आपल्या नाकाला=दुसऱ्याला ज्या दोषाबद्दल नांवें ठेवावयाचीं तोच स्वतांत असणें. २ जन्मलेल्या मुलाचें नामकरण करणें; **०डहाळ होणें**–( ना. ) बदनामी होणें. **०डाहार करणें**–(व.) नांव बद्दू करणें. **०डालणें**–(परदेशी तेली) प्रेताच्या सारवलेल्या जागेवर केळीचें पान ठेवून त्यावर प्रत्येक मनुष्यानें मयताचें नांव घेऊन कालवलेल्या भाताचा घांस ठेवणें. –बदलापूर २६७. **०धुळींत, मातींत, पाण्यांत इ० जाणें, मिळणें, पडणें**–नांवावर पाणी घालणें पहा. **०नको**–तिटकारा, चिळस, द्वेष दाखविणारा शब्द. **०न घेणें**–अलिप्त राहणें; अंगास संसर्ग न लागू देणें; दूर राहणें; नांव न काढणें. **०नाहीं–नसणें**–(विद्या, पैसा इ० कांचा ) पूर्णपणें अभाव असणें; नांव, निशाण, खूण कांहीं नसणें. **०बदलणें**–नामोशी पत्करणें (प्रतिज्ञेच्या वेळीं योजतात). 'अमूक झालें तर नांव बदलून टाकीन.' **०मिळविणें**–वादविवाद, लढाई इ० मध्यें कीर्ति मिळविणें. **०सांगणें–लावणें–घालणें–देणें**–किंमत, शर्ती ठरविणें. **०सांगणी**–वाङ्निश्चय: कुणब्यांतील वधुवरांचीं व त्यांच्या मात्यापित्यांचीं नांवें जातीच्या सभेमध्यें जाहीर करून लग्न ठरविण्याचा समारंभ. **०सोडणें–टाकणें**–त्याग करणें; संबंध सोडणें; इच्छा न करणें. **नांवाचा**–१ खरा. 'मी तें काम करीन तरच नांवाचा.' २ नामधारी; केवळ नांवापुरता. 'मी जॉन्सनचा नांवाचा मात्र गुरु होतों, खरोखर पहातां तो माझ्याहून वरचढ होता.' –नि ३ चांगलें नांव लौकिक असलेला. **नांवाची बोंब पडणें**–वाईट गोष्टीला कारणीभूत होणें किंवा एखाद्या तक्रारीचा विषय होऊन बसणें. **नांवानें घागर फोडणें**–संबंध तोडणें; मेला असें समजणें. 'तियेचेनि नांवें फोडावी घागरी। नाहीं ते संसारी बहिणी म्हणे।' –ब ४७०

**नांवानें पाणी तावणें, तापविणें**–एखाद्याचा द्वेष करणें, किंवा मरण चिंतणें. **नांवानें पूज्य असणें**–पूर्ण अभाव असणें. 'विद्येच्या नांवानें जरी आवळया एवढें (पूज्य) म्हणतां येणार नाहीं तरी मासला तोच।' –मधलीस्थिति. **नांवानें बोंब मारणें, शंख करणें, खडे फोडणें**–एखाद्या विरुद्ध बोभाटा, ओरड करणें. **नांवानें भंडार उधळणें**–स्तुति करणें. **नांवानें शंख**–पूर्ण अभाव असणें. **नांवानें हांका मारीत बसणें**–दुसऱ्यानें नुकसान केलें अशी विनाकारण ओरड करीत सुटणें. **नांवावर**–१ नांवासाठीं–करितां–मुळें–खातर. २ ( जमाखर्चे ) खात्यावर; नांवें. **नांवावर गोवऱ्या फोडणें–घालणें–रचणें**–एखाद्याचें वाईट करणें–चिंतणें; शाप देणें ( गोवऱ्या प्रेतास जाळण्यास लागतात ). **नांवावर पाणी घालणें**–कीर्तीवर पाणी सोडणें; चांगलें नांव, लौकिक बुडविणें. **नांवावर विकणें**–स्वतःच्या नुसत्या किंवा दुसऱ्या–मोठ्याच्या नांवाचा फायदा घेणें, त्यावर नांव, प्रसिद्धि मिळविणें; खपणें. **नांवास चढणें**–कीर्तिमान होणें; लौकिक वाढणें. **नांवास देखील नाहीं**–शपथेस किंवा नांव घेण्यास देखील नाहीं. याच्या अगोदर 'ज्याचें नांव' हे शब्द जोडतात म्हणजे त्याचा अर्थ अगदीं मुळींच नाहीं असा होतो. 'यंदा पाऊस ज्याचें नांव पडला नाहीं.' **ज्याचें नांव तें**–(नांव घेण्यास अयोग्य अथवा अमंगल म्हणून ज्याचें नांव घेतलें नाहीं तो अथवा तें ) जें पाहिजे असतें अथवा ज्याची आशा केलेली असते तें कधीं न देणाऱ्या, करणाऱ्या मनुष्य–वस्तु इ० संबंधीं योजतात. सामाशब्द– **०कर–री**–वि. १ कीर्तिमान; प्रसिद्ध; नावलौकिकाचा. 'वडिल नांवकर मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती।' –ऐपो ३५८. २ दुसऱ्याचें नांव धारण करणारा; एकाच नांवाचा दुसरा नामधारी. **०कुल**–वि. (ना.) सगळा; एकूण एक. **०ग्रहण**–न. नांव घेणें; उल्लेख करणें; नामनिर्देश ( क्रि० करणें; घेणें; काढणें ). **०ग्रहण टाकणें–सोडणें**–नांव टाकणें पहा. **०ग्रहण ठाऊक नसणें**–नांवा गांवाची कांहींहि माहिती नसणें. **०धारक**–वि. नामधारक अर्थ २ पहा. **०नष्ट**–वि क्रिवि. पूर्णपणें नष्ट झालेला; बेचिराख झालेला; थांग, पत्ता, माग, खुण, अवशेष नसलेला. 'त्याची गाय गुराख्यानें नांवनष्ट केली.' [ नांव+नष्ट ] **०नांगर**–पु. पेरणीच्या वेळीं प्रथम नांगर धरण्याचा व निवाडपत्रांत निशाण्या करतांना प्रथम नांगराची निशाणी करण्याचा पाटील अथवा देशमुख यांचा मान. **०नांव**–वि. (ना.) नावकुल पहा. सबंध सगळा. **०निशाण**–न. सर्व वृत्तांत ( कुल, नांव, गांव इ० ). **०निशाण ठाऊक असणें**–कुलशील परंपरा ठाऊक असणें. **०निशी**–स्त्री. १ नांवांची यादी. २ तींत दाखल केलेलें नांव. 'माझी नांवनिशी काढ' [नांव+फा. नविशी] **०निशीवार**–

क्रिवि. नांवा बरहुकूम; नांवनिशींतील नांवांच्या अनुक्रमानें. (क्रि० घेणें; मागणें). ०**नेम**-१ (फलज्यो.) नांवावरून राशी, गण, नक्षत्र इ० कांची माहिति काढणें. २ अशी काढलेली माहिती. ०**बुडव्या**-वि. स्वतःचा लौकिक, पत, किंमत घालविणारा(मनुष्य वस्तु). ०**र(रा)स**-स्त्री. १ (फलज्यो.) जन्मकालीन नक्षत्राव-रून नांव ठेवणें किंवा व्यावहारिक नांवावरून नक्षत्रनाम काढणें. 'मग बोलाविले ज्योतिषी। भूमी पाहिली चौरासी। तव दक्षा-चिया न.वरासी। घातचंद्र।' -कथा ३.१०.९९. २ अशा तऱ्हेनें काढलेलें नांव, कुंडली इ० (क्रि० काढणें). ३ जन्मनक्षत्रावरून पहावयाचें वधूवरांचें राशीघटित; नांवावरून लग्न जमविणें. (क्रि० काढणें; पाहणें; ठरविणें). ०**राशीस येणें, उतरणें, जमणें-मिळणें**-नांवांवरून वधूवरांचा घटित विचार केला असतां अनुकूलता येणें, कुंडलींवरून लग्न जमणें. [नांव+राशि] ०**रूप**-न. १ कीर्ति; अब्रू; पत. नांव अर्थ २ पहा. 'त्यानें त्या लढाईमध्यें नांवरूप मिळविलें.' 'माझें लपो असतेपण। नांवरूपाशीं पडो खंडन।' २ सार्थक; योग्यस्थानीं विनियोग. 'विद्वानास पुस्तक दिलें असतां त्याचें नावरूप होतें.' ३ नाव आणि आकार; व्यक्तित्व; स्वतंत्र, वेगळें अस्तित्व. 'जैसें समुद्रास मिळतां गंगेचें आप। तात्काळ निरसे नांवरूप।' **नांवलौकिक**-पु. प्रसिद्धि; मोठेपणा; कीर्ति; ख्याति. ०**वार**-क्रिवि. नांवाबरहुकूम; नांवनिशीवार पहा. ०**सकी**-स्त्री. (कु) लौकिक; कीर्ति; प्रसिद्धि. ०**सता**-वि. (कु.) प्रसिद्ध; नांवाजलेला; कीर्तीचा (चांगल्या व वाईट अशा दोन्ही अर्थी योजतात). **नांवानिराळा**-वि. अलिप्त; अलग (वाईट नांवापासून); स्वतंत्र; विरहित. 'ह्या सर्व करून नांवानिराळा.' **नांवारूपास आणणें-येणें**-प्रसिद्धीस-मान्यतेस आणणें-येणें. **नांवें**-(जमाखर्च) खर्चाची बाजू; नांवानें; खर्ची; खर्चाकडे. नांवावर पहा.

**नाव**—निमिष; क्षण. ०**भर**-क्रिवि. क्षणभर. 'परी नावभरी चित्त देईं। बोला एका।' -ज्ञा ६.३३२. -ज्ञा ९.२८१.

**नावगा**—वि. (मद्रास) नागवा पहा. [वर्णव्यत्यास]

**नावड**—स्त्री. अप्रीति; नापसंति; तिटकारा; अरुचि. [न+आवडणें] **नावडणें**-अक्रि. पसंत न पडणें; आवड नसणें. **नावडता, नावडा**-वि. पसंत, आवड नसलेला; नापसंत; अप्रिय. **म्ह**० १ नावडतीची आली पाळी गांवाची झाली होळी. २ नावडीचें मीठ आळणी=नावडत्या माणसानें कांहींहि केलें तरी तें वाईटच लागतें.

**नावली**—स्त्री. सदां नकार; नन्ना. नायरी पहा. [सं न+आवली=ओळ]

**नावळ**—स्त्री. (मुंबई, प्रभु समाजांत) लग्नाची वरात.

**नावांजणी-णूक, नावांजणें, नावाजीस-नावाजी**—नवांजणी पहा.

**नांवाजीक**—वि. १ मर्जीतला. २ थोर.

**नावाड्या**—वि. १ (गो.) नासधूस करण्याच्या स्वभावा-मुळें जेथें जाईल तेथें नांव मिळविणारा. २ दांडगा. [नांव+हाडगॉ]

**नावाणणें**—नावांजणें पहा.

**नावाणिगा**—वि. प्रसिद्ध; नामांकित; नांवाजलेला. -ज्ञा ११.४७३. -एभा १३.१७६. [नांवाजणें]

**नावाणीक**—वि. नावाणिगा पहा. -मब ५१.

**नावाणें**—न. कीर्ति. सोहि० महदनु०

**नावाथणें**—सक्रि. नांवाजला जाणें. 'जे जे वीर नावाथिले। ते ते येणें सर्व जिंकिले।' -जै ६२.१३.

**नावाथिला**—वि. नांवाजलेला. -एरुस्व ११.३५.

**नावानावा, नावेंनावें**—क्रिवि. वारंवार; क्षणोक्षणीं. 'तरी सेवावी ना कां कोडें। नावानावा।' -ज्ञा ४.२१९. [नाव द्वि.]

**नावेक**—क्रिवि. (काव्य.) क्षणभर; थोडा वेळ; अंमळ; थोडेसें. 'पुण्यातें म्हणे उगें। नावेक वेऱ्हीं।' -भाए १८८. 'राजा नावेक स्थिरावला।' -शनिमहात्म्य ११६. [नाव+एक]

**नावो-हो**—पु. नवरा; पति; नाथ. 'जैसा व्यंकटाचळीं नावो। लक्ष्मीचा प्रत्यक्ष।' -मुआदि ४.५६. [सं. नाथ; प्रा. णाह]

**नाव्हगंड**—पु. (निंदार्थी) न्हावी.

**नाऱ्ही**—न्हावी पहा. [सं. नापित; प्रा. नाविअ]

**नाश**—पु. १ विध्वंस; सत्यानाश; उच्छेद; धुळधाण; दुर्दशा; हानि. २ नुकसान; तोटा; इजा. ३ (अंकगणित) उडवणें; काट मारणें; छेकणें; छेदणें. [सं. नश्=नष्ट होणें; फ्रेंजि. नश; आर्मे. नस] **नाशाप्रत पावणें**-नाश होणें; नष्ट होणें. ०**क**-वि. १ नाश करणारा; बिघडविणारा. २ इजा देणारा. ३ नाहींसें करणारा; नाश करण्याचा गुण, स्वभाव असणारा. जसें-पित्तनाशक; कफ-नाशक; वायुनाशक इ०. ०**कारक**-वि. नाश करणारें; नाशक. ०**वंत**-वि. नाश होण्यासारखा; अशाश्वत; बिघडून जाणारा; खराब होणारा; कायम न टिकणारा. ०**वेळ**-स्त्री. (फलज्यो.) १ अशुभकाळ-वेळ. २ मृत्यु; नुकसान; अडचण; तोटा; इ०ची वेळ. **नाशणें**-उक्रि. १ बिघडविणें; खराब करणें. २ विध्वंसणें; हानि करणें; विघात करणें. 'मग नाशून अंधकारातें। उदय पावला भास्कर।' 'नाशावीं अहितबळें एकेंचि शरें तुवांहि शूरतमें।' -मोकर्ण ७.१८. -अक्रि. १ नासणें;. बिघडणें. उदा० दूध नासलें. २ नष्ट होणें; नाश पावणें. -ज्ञा २.१५९. **नाशा**-वि. नासाडी करणारा; द्वाड; नाश करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा; नाशक पहा. 'गोडघाश्या कामनाशा.' **नाशित**-क्रिवि. १ बिघडलेला; खराब झालेला; नासलेला. २ नष्ट; विध्वंस; नाश

झालेला. [सं.] **नाशिनी**-वि. नाश करणारी. **नाशिवंत**-वि. नाशवंत पहा. 'तैसें स्थूलाकारी नाशिवंते। भरंवसा बांधोनि चित्तें।' -ज्ञा ९.१५२. **नाशी**-वि. नाशक पहा. **नाष्टिक**-वि. १ ज्याचा नाश, तोटा झालेला आहे असा. २ ज्याला मालक नाहीं असा (माल).

**नाशाकत**—वि. अशक्त; दुर्बल; निर्बल. [ना+शक्ति]

**नाशह**—पु. (बुद्धिबळें) राजावरचा शह उठविणें. [ना+शह]

**नाशाब**—वि. (ना.) अजाण; नेणता; वयांत न आलेला; अज्ञान.

**नाशिक**—न. १ जनस्थान; नाशिक क्षेत्र. २ नाक. [सं.] (वाप्र.) **ना० त्रिंबकास जाणें, ना० परगणा ओसाड असणें**-नाक बसकें किंवा अपुरें असणें. **नाशिकची कल्हई-जिल्हई आणि पैठणचा आदर**-पोकळ आदर-खुशामत (मनापासून नव्हे). **०कर**-वि नाशिकाचा (रहिवाशी). **म्ह०** शंभर काशीकर एक नाशिककर.

**नाश्टा-स्ता**—पु न्याहारी; प्रातःकाळचें भोजन, [फा. नाश्ता]

**नास**—पु. १ नाश पहा. २ नाश करणारें एक पिशाच्च.[सं. नाश] **नासकवणी**-न. दूषित, नासकें बिघडलेलें पाणी किंवा रस. [नासकें+पाणी] **नासका**-वि. १ नासलेला; नाशित पहा. २ सहज, लवकर नासणारा, बिघडणारा, नष्ट होणारा; न टिकणारा. **नासकें केणें**-न. १ लवकर खराब होणारा, नासणारा (फळें, भाजीपाला वगैरे विक्रीचा) जिन्नस. २ नासलेला अथवा बिघडलेला जिन्नस. ३ (ल.) वाईट किंवा दुबळी वस्तु, प्राणी वगैरे. (उदा० लग्नासाठीं दाखविलेली रोगट मुलगी; विकावयास आणलेला दुबळा तट्टू इ०) [नासकें+केणें=पदार्थ] **नासडा**-पु. पूर्ण नाश-तोटा. नासाड पहा. **नासणें**-उक्रि. १ नाशणें पहा. २ वायां जाणें. 'तरी सांगावें सुहृदीं कथिला जो मंत्र तो न नासेल।' -मोकृवि ८८.६१. ३ गुण किंवा सत्त्व नाहींसे होणें. **म्ह०** 'नासलीं मिरीं जोंधळयाला हार जात नाहींत किंवा जोंधळयाबरोबर विकत नाहींत. ४ -अक्रि. (ल.) मरणें. 'लग्न केलें परी भ्रतार नासला। द्वितावह झाला तोही मज।' -ब ९५. इतर अर्थी नाशणें पहा. [सं. नाशन] **०तू(धू-धो)स-धूळ**-स्त्रीपु. १ अत्यंत नासाडी; सत्यानाश; धूळधाण; दुर्दशा. २ व्यापारांत बूड, तोटा. (क्रि० येणें). [नाश द्वि. +धूळ] **नासरा**-वि. नाशक, नाशा पहा. **०वणी**-न. १ पिकाची नासाडी करणारा पाऊस. २ नासकवणी पहा. **०वीट**-पु. (व्यापक.) नाश; नुकसान; खराबी. (क्रि० करणें; होणें). [नाश+वीट] **नासाड-डा-डी**-स्त्रीपुस्त्री. (नाशाचा अतिशय) पूर्ण विध्वंस; पुरापूर नाश, बूड. नासडा पहा. 'नासाड केले हो आमुचें कर्म।' -दावि ७८४. **नासाड्या**-वि. नासाडी करणारा. **नासावणें**-अक्रि. कमी दिवसाचें बाळंत होणें; धुपावणें; वाखा होणें; गर्भपात होणें; दुवेतणें.

**नास**—स्त्री. १ तपकीर. २ नाकानें ओढण्याचें, नाकांत घालण्याचें औषध- -एभा १०.१६. [सं. नस्य; हिं.]

**नासणा**—पु. (गो.) नाचणा.

**नासपात-ती**—स्त्री. एक प्रकारचें सफरचंदासारखें फळ. [फा. नाश्पाती]

**नासमज, नासमजदार**—वि. १ असमंजस; अपुऱ्या, अर्धवट समजुतीचा; समज नसणारा. २ मतिमंद; मूर्ख. [न समजणें] **नासमज, नासमजदारी**-स्त्री. १ अपुरी समज; अर्धवट ज्ञान. २ मठ्ठपणा; बुद्धीचा जडपणा. **नासमजूत**-स्त्री. गैरसमजूत; वितुष्ट; बिघाड. २ असमाधान; असंतोष; अप्रसन्नता.

**नासरी**—स्त्री. अर्धी दमडी.

**नासा**—स्त्री. १ नाक. 'वनिता अधरीं सुवर्ण फांसा। पडोन मुक्त आलें नासा।' -एरुस्व ७.३९. २ दाराच्या चवकटीचा वरील भाग; दाराचा माथा; कपाळपट्टी. याच्या उलट शिला=उंबरठा. [सं.] **नासाग्र**-न. (काव्य.) नाकाचा शेंडा. **नासाग्रीं दृष्टि ठेवणें**-१ नाकाच्या शेंडयावर दृष्टि खिळविणें. २ एकाग्र चित्तानें देव वगैरेंचें ध्यान करणें. 'नासाग्रीं ठेवूनि दृष्टि। भक्तासी पाहसी कृपादृष्टि।' **०पुट-रंध्र**-न. नाकपुडी. -ज्ञा ६.२३६. **नासार्श**-पु. नाकांत फोड, पुटकुळया येणें; नाकाचा एक रोग. [नासा+अर्श] **नासावर्त**-पु. घोडयाच्या नाकावरील डावीकडचा भोंवरा. उजवीकडे असल्यास जनावर्त म्हणतात. -अश्वप ९७. [नासा+आवर्त] **०वंश**-पु. १ नाकाचा दांडा. २ सरळ नाक. 'आतां कैसा भणों नाशावंसु। जो सर्व अवएओचा कळसु।' -ऋ ९५. **०व्रण**-पु. नाकांतील व्रण, पुळी. **०शोष**-पु. नाक कोरडें पडणें. **नासिक-का**-नस्त्री. नाक. 'नास्तिका देऊनि नास्तिक। उंचावलें तें नासिक।' -एरुस्व १.५८. **नासिकाचूर्ण**-न. (उप. सांकेतिक) तपकीर.

**नासीपूड**—स्त्री. (बे.) तपकीर. [सं. नासा+पुट; म. पूड]

**नासूर**—पु. १ नाकाचा व डोळयाचा आजार. २ भगेंद्र. [अर. नासूर]

**नासुकला**—वि. (व. ना.) यःकश्चित; क्षुल्लक.

**नास्त**—स्त्री. (गो.) दारिद्र्य. उदा० 'नास्त पापा मूळ.' [सं. नास्ति] **०भाकणें**-१ दारिद्र्याचें ढोंग करणें. २ तोटयाचें, नुकसानीचें, अनर्थाचें भविष्य करणें; भावी अनर्थाबद्दल ओरडणें. **०भाक्या**-१ नास्त भाकणारा. २ अवसानघातकी; रडया.

**नास्ति**—नाहीं; नव्हे; मुळीच नाहीं. -ज्ञा १८.१६९४. ना पहा. [सं. न+अस्ति] **०नष्टे विचार**-सर्व गोष्टी होऊन गेल्यानंतर, नाश झाल्यानंतर सुचणारा विचार. **०पक्ष**-पु. १ नाहीं

म्हणणारांची बाजू. २ (पाहिजे असलेली वस्तु) नाहीं म्हणणें; नारा. ३ नकार; नाकबुली; अमान्यता; अस्वीकार. (क्रि० धरणें; घेणें; अंगिकारणें). ४ निकृष्ट प्रतीचा मार्ग; शेवटची स्थिति. उदा० 'भिक्षा मागणें हा नास्तिपक्ष होय.'

**नास्तिक**—पु. धर्म न मानणारा; धर्माप्रमाणें न वागणारा; निरीश्वरवादी; पाखंडी; ईश्वर, वेद, पुराण, परलोक इ०स न मानणारा याच्या उलट आस्तिक -ज्ञा १३.१९. [सं.] **०ता, नास्तिक्य**—स्त्रीन. नास्तिकपणा; नास्तिकमत पहा. **०मत-वाद**—नपु. नास्तिकपणाचें मत व त्याचें प्रतिपादन. याचे कांहीं प्रकार=सौत्रांतिक, योगाचार्य, माध्यमिक, क्षपणक, चार्वाक, भिक्षुशून्य, परिछिन्नात्म, प्रत्यक्ष, क्षणिकविज्ञान, इत्यादि मतें किंवा वाद. **०वाद**—पु. प्राप्तीचा अभाव. -ज्ञा १६.४५१. **०वादी**—पु. नास्तिकमताचा पुरस्कार करणारा; नास्तिक; पाखंडी.

**नाह-हो**—पु. १ नाथ; नवरा; पति. 'ऐसें सकळ सिद्धांचा रावो। देवी लक्ष्मीयेचा नाहो।' -ज्ञा ३.२७३. २ पालक; आश्रयदाता; नाथ. 'परब्रह्मगिरी दुर्गाचा राओ। शरणागतांसीं नाहो।' -शिशु ५१४. [सं. नाथ; प्रा. णाह]

**नाहं**—पु. अहंकाराचा अभाव. 'तेथें अहं हा धूप जाळूं। नाहं तेजें वोवाळूं।' -ज्ञा १५.७. [सं. न+अहं=मी]

**नाह(हा)क**—क्रिवि. १ अन्यायानें; जुलमानें; इजादायक रीतीनें; त्रासदायक रीतीनें. २ कारणाखेरीज; विनाकारण; व्यर्थ; फुकट; उगाच. 'कोणें सतीस छळलें नाहक।' -अमृत ६१. ३ हक्कावांचून; बेकायदेशीर. [फा. ना+हक]

**नाहडणें**—अक्रि. नागवण, लूट, तोटा, नुकसान होणें. [नाडणें]

**नाहडा**—पु. लूट; नागवण; तोटा; नुकसान; नाश.

**नाह(हा)ण**—न. १ नहाण पहा. अभ्यंगपूर्वक स्नान. २ स्त्रीचें प्रथम रजोदर्शन. [सं. स्नान; प्रा. ण्हाण; हिं. न्हाना;] **नाहणणें**—उक्रि. १ (दुसऱ्यास) स्नान-न्हाऊं घालणें. २ (ल.) बुडविणें; फसविणें; लुबाडणें; बुडला-फसला जाणें. 'पन्नास रुपयाला तें कूळ नाहणलें.' **रक्तानें-घामानें नाहणणें**-रक्त, घाम इ०कानीं अंग चिंब होणें, करणें; अतिशय रक्त, घाम वाहणें, येणें. **०माखण**—न. (मुख्यत्वें स्त्रियांचें व मुलांचें) अभ्यंगस्नान; नहाण. **०वणी**—स्त्री. देवाच्या अभ्यंगस्नानाचें पाणी; तीर्थ. [नहाणें+पाणी] **०वली, नाह(हा)णुली, नाहणे(णो)ली**—स्त्री. पहिल्यानेंच रजोदर्शन झालेली स्त्री; प्रथम ऋतुमती, रजस्वला. [नहाण+वाली] **०वेणी**—स्त्री. (तंजा.) स्त्रिया न्हाल्यानंतर पोकळ वेणी घालतात ती. **नाहणी, न्हाणी**—स्त्री. १ देवळांतील तीर्थकुंड; देवळांतील देवस्नानाचें पाणी बाहेर जींत पडतें ती जागा. २ विटाळशीची मोरी; विटाळशीच्या स्नानाची जागा. ३ (सामा.) मोरी; गटार; सांडपाण्याची खांच. 'देह नित्य मूत्राची नाहणी।' -भारा बाल ९.१०. ४ स्नानाची जागा; नहाणीघर; स्नानगृह 'सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं। वैष्णवांचे नाहणीं होईन किडा।' -तुगा ११००. **नाहणें**—अक्रि. १ स्नान करणें; अंग धुणें. 'म्हणोनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें।' -ज्ञा ११.१०. २ रजस्वला होणें; विटाळशी होणें (विटाळशीला चवथ्या दिवशीं स्नान घालतात त्यावरून). 'ती स्त्री पंधरा वर्षें नाहती आहे पण तिला मूल होत नाहीं.' **नाहूं लागणें**—१ विटाळशी होऊं लागणें. २ वयांत येणें; पदर येणें. 'ही स्त्री नाहूं लागली.' **ऊन पाणी-थंड पाणी-गंगा नाहणें**—ऊन, थंड किंवा गंगेच्या पाण्यानें स्नान करणें. **नाहूं घालणें**—१ (लहान मुलास) नाहणमाखण करणें; तेल लावून स्नान घालणें. २ दुसऱ्यास स्नान घालणें. **नाहतीधुती**—स्त्री. १ नहाण येऊन प्रौढदशा पावलेली स्त्री; वयांत आलेली स्त्री. २ नेहमीं वेळच्यावेळीं विटाळशी बसणारी स्त्री. ३ विटाळ न गेलेली, म्हातारी न झालेली स्त्री. **नाहवणी**—न. नाहणवणी पहा. **नाहाण, नाहाणघर**—नहाण, नहाणघर पहा.

**नाह(हा)बी, नाहाब**—स्त्रीपु. १ तूट; नुकसान; खराबी. २ जाळपोळ; लुटालूट; नाश. [अर. नाहिब्]

**नाह(हा)वी**—पु. न्हावी पहा.

**नाहाक**—क्रिवि. नाहक पहा.

**नाहाड, नाहाडणें, नाहाणणें, नाहाण-माखण, नाहाणवली, नाहाणी, नाहाणुली, नाहाणें, नाहाणेली, नाहाणोली, नाहातीधुती, नाहावगंड, नाहावणी**—नाहडणें, नाहड इ० पहा.

**नाहीं**—क्रि. न असणें; नास्तित्व; अभाव. आहे याच्या उलट. -मसाप २.३ ८७. नास्ति पहा. [नास्ति; प्रा. णहि]

**नाहीं**—अभावबोधक अव्यय; न; ना; नव्हे. -मसाप २.१. [नहि] **०करणें**—१ नष्ट करणें. 'नाहीं करील दुर्जन शत्रू।' -मुआदि २७.२०३. २ नाहीं असें दाखविणें. -एभा २८.५०३. **०होणें-सा होणें**—नसल्याप्रमाणें होणें; नष्ट होणें; फडशा होणें; लुप्त होणे. 'झाले जिष्णुपुढें ते मृगराज-समक्ष कलभसे नाहीं।' -मोअश्व ४.२५ **०तरी**—क्रिवि. नाहीं म्हटलें तरी सुद्धां; कमींतकमी; थोडक्यांत थोडकें. 'नाहींतरी पंचवीस पोळ्या खाल्ल्या असत्या.' **०तेंच**—क्रिवि. अशक्य, सर्वथा अयोग्य तेंच; भलतेंच; भलभलतेंच. 'नाहींतेंच सांगतो, बोलतो.' **०पक्षीं-पेक्षां**—क्रिवि. मुख्य गोष्ट न झाल्यास; गौणपक्ष म्हणून; कमी पक्षी; निदान; कसेंहि करून; नाहींतर. 'तुम्ही जातीनें जावें हा मुख्य पक्ष, नाहींपक्षीं आणखी कोणास पाठवा.'

**नाहू**—पु. (क.) न्हावी. **म्ह०** पक्ष्यांत काऊ आणि माणसांत नाहू. [सं. नापित; हिं.]

**नाहूर**—न. मुंबई इलाख्यांत होणारें 'मस्कोडाईन' जातीचें द्राक्ष. -कृषि ५१३.

**नाळ**—नस्त्री. नाल. १ कमळाचा देंठ. ' खंडी नाळापासुनि कमळा मारुत तसा शिरःकमळा।, –मोकर्ण ४९.५२. २ वार; नाडी. ' मुलाची नाळ जन्मल्यावर कापावी लागते. ' ३ (खा.) पितळी फुंकणी. [सं. नाल]

**नाळ**—स्त्री. गलबताचा पुढचा भाग, तोंड. ' आम्ही अमेरिकेकडे नाळ फिरविली. '

**नाळ**—न. १ जनावराच्या पाठीला पडलेलें क्षत. २ बेंबीचें क्षत.

**नाळ**—स्त्री. तोफ. ' गरनाळ, सुतरनाळ, इ. ' [नळ. सं. नाल]

**नाळ**—पुस्त्री. पखवाजाचें खोड. नाल पहा.

**नाळ**—स्त्री. दळतांना जात्याला चिटकून राहिलेलें पीठ. यामुळें जात्याचें भोंक बुजतें. ' नाळ मोड म्हणजे पीठ गळेल. '

**नाळ**—स्त्री. दोन टेकड्यांतील अरुंद वाट; भुयारांतील–जमीनींतील रस्ता; पावसाच्या पाण्यानें डोंगर वगैरे मध्यें पडलेली घळ, खळ. [नाली]

**नाळ**—स्त्री. जुनीं धातूंचीं भांडीं. [? सं. नाली=तासाचे ठोके वाजविण्याचा धातूचा तुकडा]

**नाळक**—न. नळी. ' तेणें नाळकें रस भरे। तो सर्वांगामाजी संचरे। '–ज्ञा ६.२४८. [सं. नालक]

**नाळकूट, नाळगूत–द्**—पुन. १ (कों. गो.) जळोदर. २ एक रोग; नळगूद; नाभीपासून सुरवात होऊन शरीराला आलेली सूज. [नाल=नाडी, नाळ+गद=रोग]

**नाळकें–चें**—न. १ (कों.) नरसाळें (तेल वगैरे ओतण्याचें). २ (गो.) एक माप [सं. नालिक]

**नाळकें**—न. १ धातूच्या भांड्याला झिजून पडलेलें भोंक. २ (व.) फुटकें भांडें.

**नाळकें**—न. १ (प्रा.) नडगी; नळा; नळी (गुडघ्याची); नळगुठी. २ पुढें येणारें हाड (गुडघ्याचें कोपराचें वगैरे). [सं. नाला]

**नाळपड्या, नाळिक, नाळी–ळ्या**—वि. १ नाळ पडलेला; कण्याला जखम झालेला, खरचटलेला व्रण–क्षत पडलेला–(पशु–जनावर). ' काग धांवती जैसे। नाळिक पशु देखोनी। ' –पांप्र ४.१०१. २ (ल.) एखाद्या वाईट गोष्टीची चटक लागलेला, त्या विषयीं आसक्त बनलेला, [नाळ]

**नाळवा**—पु. (गो.) ४०० हातांचें (लांबीचें) माप.

**नाळी**—स्त्री. (महानु.) घटका. ' कीर्तीखांबीं नाळीची अवलीळा। '–शिशु २५. [सं. नाली]

**नाळीक**—न. जुनेंपुराणें, मोडकेंतोडकें, मोडीच्या धातूचें भांडें; नाळकें पहा.–वि. जुनें; फुटकें तुटकें; झिजलेलें. (भांडें) [नाळ]

**नाक्षत्र**—वि. १ नक्षत्रविषयक; नक्षत्रासंबंधी. २ ताऱ्यासंबंधीं. [सं.] ०**दिन, दिवस**–पु. एक नक्षत्र माध्यान्हीं आल्यापासून दुसऱ्या दिवशीं माध्यान्हीं येईपर्यंत जो काळ जातो तो. सौर दिनापेक्षां हा नाक्षत्रदिन ४ मिनिटांनीं लहान असतो. म्हणजे २३ तास ५६ मिनिटांचा असतो; पृथ्वीला आपल्या आंसासभोंवतीं फिरण्यास जो बरोबर काळ लागतो तो. ०**प्रदक्षिणा**–२७ दिवस ७ तास आणि ४३ मिनिटें इतक्या काळांत चंद्रानें पृथ्वीभोंवतीं घातलेली प्रदक्षिणा. निघाल्या वेळच्या नक्षत्राच्या सरळ रेषेंत पुन्हां येणें; विशिष्ट नक्षत्राला उद्देशून प्रदक्षिणा. ०**मास**–पु. चंद्र एका नक्षत्रावरून जाऊन पुनः त्याच नक्षत्रावर येईपर्यंत म्हणजे २७ दिवस ७ तास १३ मिनिटांचा काळ; नक्षत्रप्रदक्षिणा पहा. ०**वर्ष**–न. पृथ्वीचा सूर्यप्रदक्षिणेचा काळ; ३६५ दिवस ६ तास ९ मिनिटें १०॥ सेकंद इतका काळ; निरयन सौरवर्ष.

**नि**—अ. एक उपसर्ग. याचे कांहीं अर्थः १ खातरी; निखालसपणा. २ नकार; अभाव; राहित्य. जसें निकोप; निकामी. ३ अतिशयिता. जसें:– निमग्न; इ०. कधीं हा उपसर्ग निरर्थक, अनवश्यक असाहि लागतो. [सं. निर्]

**नि**—अ. अन्; आणि. ' तो नि तो बाजारांत गेले. ' ' तो आत्माशंभू नि सोडविला। ' –माज्ञा १७.२.

**निा**—(संक्षेप) याचे पुढीलप्रमाणें अर्थ होतात. १ निस्बत=संबंधी; तर्फे. २ निशाणी=खूण; चिन्ह;. निा होन=ज्यावर निशाणी असते असा होन. ३ निम किंवा निस्प=निमा; अर्धा. ४ निविशिंदा=लेखक. ५ निरख=किंमत; भाव. ६ निल्हे=सदरहू; तथा; पूर्वोक्त (हा शब्द नेहमीं मशार शब्दास जोडून येतो.). ' मशार निा '

**निअती**—स्त्री. उत्पत्ति. [सं. नियति]

**निआव्हणें**—क्रि. निर्वाह करणें. –माज्ञाकोश.[नि+आवर्णे=समाविष्ट करणें]

**निउटकें**—न. एक माप; अर्धे चौटकें; शेराचा बत्तिसावा हिस्सा; चिळवें.

**निउता**—वि.क्रिवि. अलीकडे, नुकतेंच. [निगुता]

**निक**—क्रिवि. निश्चयेंकरून. निके पहा. ' फळप्राप्ति होय निक। ' –गुच १९.१९. –माज्ञा १६.४३४. [निष्क=मापणें, वजन करणें=निक्क=निक्क=निक=नीक भाअ १८३३]

**निकट**—वि. जवळचा; शेजारला. 'विरोध आम्हां मागधांत। निकटवास करूं नये। ' –एरुस्व ६.८. [सं.] ०**वर्ती–वासी**–वि. जवळचा; जवळ राहतो तो; जवळ असलेला; आसपासचा; आसमंतांतील. ' भुंके बळें यथेष्ट व्यथित करी निकटवर्तिजनकर्णा। ' –मोकर्ण २७.११.

**निकट**—स्त्री. निकड पहा.

**निकट–टीं**—क्रिवि. जवळ; नजीक; लागून; जवळपास; संनिध; शेजारीं. ' निकट म्हणजे निपट। ' –यथादि ४.१८७.

**निःकंटक**—विन. निष्कंटक पहा.

**निकटणें**—अक्रि. दूर जाणें, राखणें; बाजूला होणें; निघून जाणें (घर, अधिकार, पद इ० पासून). ज्याचें जाणें इष्ट असतें अशाबद्दल योजतात. [सं. निस्=बाहेर, दूर+कट्=जाणें]

**निकटणें**—अक्रि. (काव्य.) जवळ, नजीक, संन्निध येणें. [निकट]

**निकंठ**—वि. कडक; कठिण; कठोर; जालिम (शासन, पथ्य).

**निकड**—स्त्री. १ तड; लकडा; तगादा; हव्यास (क्रि० लावणें). 'सावकारानें पैक्याविषयीं निकड लाविली आहे.' २ तांतडी; जरूरी; अडचण ३ लोट; नेट. 'घायाळ काढावा तरि त्याजकडील फौजेची निकड बसली.'

**निकंड**—वि. मध्यें फांद्या न फुटतां उंच वाढलेलें (झाड). [नि+स्कंध=खांदी; हिंदी. निकंद]

**निकंड**—वि. न खाजरा, खाजणारा; खाज सुटण्याचा बंद झालेला. [नि+कंडु]

**निकण**—न. १ दुसऱ्यांदा मळलेलीं किंवा तुडविलेलीं(जोंधळा, बाजरी इ०चीं) कणसें; पोकळ कणसें. आकण व मदन पहा. २ दाणा होण्यापूर्वीचा कणसाचा भाग.—एभा ७.३३७. [सं. निस्+कण]

**निकण**—वि. १ कणहीन; मळणी झाल्यावरचें धान्यानें न भरलेलें, रिकामें, पोकळ (कणीस). 'वांया निकण भुस काय उपणिसी।'—ज्ञागा २०३. २ किडयांनीं खाल्लें गेल्यामुळें सत्त्वरहित: निःसत्व: फोल (धान्य). ३ कण्या काढून साफ केलेलें; कणी काढलेले; बिनकणीचे (तांदूळ इ०). ४ कांडतांना कूट न होणारे (तांदूळ, गहूं इ०). ५ कणी नसलेलें; हलकें भिकार (तृप). [नि+कण]

**निकणें**—अक्रि. (बे.) लपणें; लिकणें. [का.]

**निकता**—विक्रिवि. नुकता; अलीकडे: थोडया दिवसांपूर्वी. 'तो निकता आला आहे.' 'त्यास निकतें गतवर्षी वेड लागलें.'

**निकती**—स्त्री. सोनार, सराफाचा वजन करण्याचा सूक्ष्म कांटा. [हिं.]

**निकपवचें**—क्रि. (गो.) गांठणें. [निक=नजीक+पवचणें=पोंचणें]

**निकर**—पु. १ कार्य करण्याचा सोईचा मार्ग सोडून क्रोधादि आवेशपूर्वक प्रवृत्ति ती; हट्ट. 'निकर असा नये करूं येत जा खुशाल माझे घरीं।'—होला ११५. २ कहर; गहजब; आकांडतांडव 'मी सहज विनोदें करूनी । बोलिलों जाण रुक्मिणी । तुवां निकरची लावण्यखाणी । केला बहुत आम्हांवरी।'—ह २७.१०६. ३ जोर; आवेश.—ज्ञा ११.५४८. 'आपण निकर करून किल्ला घेतलाच पाहिजे.'—सूर्यग्र ७४ ४ प्रलय; कडेलोट; आत्यंतिक मर्यादेपर्यंतची स्थिति. 'वदले सुरमुनि करितो नररूपें रुद्र काय हा निकर।'—मोभीष्म ३.५८. ५ वाईट परिणाम, शेवट. 'थट्टेचा निकर होईल.'—बाळ २.३०. [निकर्ष] ०**करणें**—निकरास, निकरावर येणें, जाणें, आणणें, घालणें=हट्ट, पराकाष्ठा करणें; अगदीं शेवट लावण्याच्या अवस्थेस पोंचणें, नेणें इ० **निकरा जाणें**—वाढणें; पेटणें; वर्दळीवर येणें. 'निकरा जाईल रांडोळी। आम्हां आणि रुक्मिया।'—एरुस्व ६.९. **बोलण्याचा-मारण्याचा-रडण्याचा, हसण्याचा निकर**—एखाद्या क्रियेचा कडाखा, पराकाष्ठेचा हट्टीपणा; मुख्यत्वें जुलमाचा, अन्यायाचा कडेलोट, जोर इ० 'त्यानें निकर केला मजवर.'

**निकर**—पु. १ समुदाय; समूह; संग्रह; ढीग. 'जैसा कस्तुरियेचा निकरा। नोळखवे पामरा।'—भाए ६७२. 'हा निकर पातकांचा, कैसा केला खलें महा निकर।'—मोसभा ५.३५. २ प्राचुर्य; समृद्धि; लयलूट.' आंब्याचा-धान्याचा-लाडवांचा निकर.

**निकरट**—वि. १ निगरगट्ट. २ कठोर; निष्ठुर. 'निकरट परक्यावाणी मला कां दूर अगदींच टाकीलें। घरीं दारीं कधीं दृष्टी पडेना कुठें रमता येकले।'—होला ११५. [सं. निकृष्ट]

**निकरणें**—सक्रि. निखरणें; निरपणें, निपटणें पहा.

**निकरा**—वि. निरर्थक; व्यर्थ.

**निकरा**—पु. सांठा; संग्रह; ढीग; निकर पहा.

**निकरी**—वि. १ निकर करणारा; हट्टी. २ निश्चयी; करारी; एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविणारा. ३ संतापी; त्रागा करणारा. [निकर]

**निकरु**—पु १ निकर; हट्ट; निश्चय. 'तरि कृष्णा कां आम्हाप्रति । येवढा निकरु।'—रास ३.५५५. २ निश्चय. 'आतां येईल श्रीकृष्ण। म्हणोनि कंठिं धरिले प्राण। मग निकरु केला जाणोन। ना रडल्या झाल्या।'—रास ४.१६. [निकर] **निकरून**—क्रिवि. १ निश्चयानें, खात्रीनें. २ निक्षून पहा.

**निकर्श-र्ष**—पु. १ अतिरेक; पराकाष्ठा; अतिशयपणा (कार्य, विचार इ०संबंधीं). २ हट्ट; मनस्वी हट्ट; निकर पहा. ३ कहर; अनर्थ; त्रास; जुलुम. 'संस्थान उच्छेद करावा हे वासना धरून निकर्श मांडिला आहे.'—वाडशाछ ९८. ४ ऱ्हास; उतरती कळा. याच्या उलट उत्कर्ष. [नि+सं. कृष्-कर्ष] ०**काल**—पु. उतरती कळा; ऱ्हासाचा, अपकर्षाचा काळ, वेळ.

**निकल**—न. एक हलकी धातु. याचीं भांडीं, नाणीं इ० करतात. [इं.]

**निकलणें**—क्रि. निपटणें पहा. [निकाल]

**निकला, निकल्हा-कल्ही**—वि. कल्हई नसलेलें; बिन कल्हईचें (भांडें इ०). [नि+कल्हई]

**निकलाफीस**—पु. (गो.) एक प्रकारचा कलमीआंबा. [पोर्तु]

**निकलून शिकलून**—क्रिवि. (बालभाषा) निपटून; चाटून-पुसुन. 'निकलून शिकलून खाऊं-मग मामा घलीऽजाऊं.'—फाटक नाटयछटा ६.

**निकवडा**—वि. कवडीहि नसलेला; निष्कांचन; दरिद्री; भिकारी. 'जे अनंगु तो पेंधा । निकवडा नुसधा।' –ज्ञा १३. ९८०. [ नि+कवडा ]

**निकवणें**—सक्रि. (बे.) लिकविणें; लपविणें.

**निकवाड**—न. (सोनारी कऱ्हाड) ऐरणीची बैठक. [ निकणें ]

**निकशी-सी**—स्त्री. जिकीर; निकड; आग्रह; तगादा; टुमणें; पाठपुरावा. 'हा ठाववरी शिष्याची निकसी। सद्दाते गुरु आहाती कवणे देशीं।' –ज्ञा ११.६४६. [ निकर्ष ]

**निकशी**—वि. (को.) कडक; स्पष्ट; हट्टी; निक्षी पहा.

**निकशी, निकस-कसी**—वि. १ कस, सत्त्व नसलेलें (धान्य). २ किरकोळ; भिकार; नापीक; रुक्ष (जमीन). ३ मऊ; गरीब; गयाळ. 'विचारें श्रीकृष्णा दिससि मज तूं थोर निकसी।' –सारुह ६.१५४. [ नि+कस ] **निकसणें, निकसून टाकणें**–(व.) हिणविणें; तुच्छ करणें.

**निकष**—पु. कसोटी; परीक्षा. [ सं. ] ०**पाषाण**–पु. कसोटीचा दगड.

**निकसर**—पु. निकर पहा.

**निकळंक**—वि. निष्कलंक; कळंक, डाग, काळिमा नसलेला; शुद्ध; पवित्र; स्वच्छ. [ निष्कलंक अप. ]

**निकळा**—वि. (कों.) स्वाद; चव, रुचि इ०विरहित (भात, भाकरी इ०). [ नि+कला–ळा ]

**निकळा**—वि. (राजा.) निकल्हा; बिन कल्हईचें (भांडें इ०). [ नि+कल्हें ]

**निका**—पु. मुसलमानांतील हलक्या प्रतीचें लग्न; पाट; मोहतूर. 'कुणबिणीची पोर रंगरेजाशीं निका लावण्याचें केलें.'–वाडसमा ३.२५९. [ अर. निकाह् ]

**निका**—वि १ पवित्र; शुद्ध. 'तुझा गोंधळ निका अंबे कोणी वर्णूं न शके हो।' –भज १७. २ चांगला; योग्य. 'येरू म्हणे मुहूर्त आहे निका।' 'राज्यायोग्यचि केवळ तव मात्र करावया बहु निका मी।' –मोभीष्म ११.३. ३ उत्तम; लायक; उत्कृष्ट; सुंदर. ४ बरोबर; नक्की; नेमका. 'हे श्रोतयांची आशंका। पाहतां प्रश्न केला निका।' –दा १०.७.१४६. ५ खरा; सत्य. 'म्हणे जयजय जी रघुनायका । सत्यप्रतिज्ञा शब्द निका। तरी मज वरावें रविकुळटिळका । अंतरसाक्ष जाणोनी।' –वेसीस्व ४.८२. ६ निर्भेळ; शुद्ध; भेसळ नसलेलें. 'हें दूध निकें आहे.' –क्रिवि. स्पष्टपणें; निक्षून; स्पष्ट; उघड; धडधडीत. 'निकें निरोपिलें तुम्ही.' [ अर. नकी–का=शुद्ध; स्वच्छ ]

**निःकांचन**—वि. दरिद्री; गरीब; कंगाल; द्रव्यहीन. [ सं. निः+ कांचन ]

**निकाटणें**—अक्रि. निकटणें अर्थ १ पहा.

**निकांडो**—वि. (गो.) निरुपयोगी; बेकाम. निकाढा अर्थ २ पहा.

**निकाढा**—पु. १ काढयांतल्या चोथ्याचा पुनः केलेला काढा. 'सकाळीं काढा घ्यावा आणि संध्याकाळीं निकाढा घ्यावा.' २ (ल.) निरुपयोगी गोष्ट. [ नि+काढा ]

**निकाम** —वि. पुष्कळ; फार; भरपूर. 'प्रभु आपण होईल कीं दीनत्राणीं निकाम हृय्यास।' –मोमंभा २.८९. [ सं. ]

**निःकाम**—वि. निष्काम; निरिच्छ; निर्लोभ. 'सामर्थ्यैवीण घडेना। निःकाम भजन।' –दा १०.७.१९. [ सं. निष्काम ] ०**बुद्धि**–स्त्री. निर्लोभता; निरिच्छता. –वि. निर्लोभी; निर्हेतुक. –क्रिवि. निर्लोभतेनें; निःस्वार्थ बुद्धीनें.

**निकामी**—वि. १ निरुपयोगी; उपयोगास अयोग्य. २ (क्व) उद्योगरहित; बेकार. ३ आळशी. 'निकामी तो दुःखप्रवाही। वाहतचि गेला।' –दा १९.३.२८. [ नि+काम ]

**निकार**—पु. मानहानि; अपकार. 'कुरुबलनलिनवनातें भीमगज निकार आठवी रगडी।' –मोभीष्म ६.४७. [ सं. ]

**निकार**—वि. खडकाळ. –शर.

**निःकारण**—क्रिवि. निष्कारण पहा.

**निकाल**—पु. १ मोरी इ०कांचें पाणी बाहेर जाण्याची उतरती जागा; पाणी वगैरे बाहेर काढून लावावयाचा मार्ग. नळाचें, मोरीचें तोंड, वाट. २ (ल.) वासलात; खुलासा; उलगडा; स्थिरस्थावर (कामाची). ३ शेवट; परिणाम; निर्णय (खटल्याचा इ०). ४ तडजोड (करणें). [ सं. निस्+कासय; प्रा. णिक्काल= बाहेर घालणें. फ्रेंजि. निकल, नीक=निघणें ] (वाप्र.) ०**लावणें**–१ स्वच्छ करणें. २ शेवट करणें; संपविणें. ३ ठार मारणें. **निकालांत काढणें**–भांडण, प्रश्न, मिटविणें; निर्णय करणें. 'भावाभावांनीं आपापल्यांत संगनमत करून वडिलार्जित इस्टेटीचा तंटा निकालांत काढला.' सामाशब्द– ०**अर्जी**–स्त्री. ज्यावर निकाल झाला आहे असा अर्ज; अधिकाऱ्यांकडून निकाल लागलेला अर्ज. ०**पत्र-पत्रक**–न. १ हुकूम कसे बजाविले, खटल्यांचे कसे निकाल लावले इ० दाखविणारा, मामलेदारानें जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविलेला, नियतकालिक हकीकतनामा; झाडापत्रक. २ चवकशीस दिलेल्या खटल्यांची यादी. ३ (क्व.) शिल्लक खटल्यांची यादी. ४ निर्णयाचा कागद; मसुदा. ०**हुकूम**–पु. (कोर्टानें केलेला) अखेरचा निकाल किंवा दिलेली शिक्षा. **निकालस पत्र**-निखालस पत्र पहा.

**निकाल**—पु. (कुस्ती) एक डाव. जोडीदाराच्या बगलेंतून त्याच्या मानेवर हात घालून आपल्या छातीनें उचलून मारणें.

**निकालस**—विक्रिवि. निखालस पहा.

**निकालस**—वि. (व.) निर्लेप. [ निकाल ]

**निकास**—पु. बाहेर पाठविणें; बाहेर जाणें. निकाल १ पहा. [ सं. निष्कास=निर्गमन ]

**निकासू**—स्त्री. निर्गत मालावरची जकात. [ सं. निष्कास ]

**नि(निः)काळजी**—वि. १ काळजी न बाळगणारा; चिंता विरहित; काळजी नसलेला; निश्चिंत. २ अव्यवस्थित; बेपरवा. निष्काळजी पहा. [ निस्+काळजी ]

**निकाळू**—पु. निर्गत माल; बाहेर पाठविलेला माल. निकासू पहा. –वि. १ जेथून मालाची निर्गत होते असें ( बंदर ). २ बाहेर काढलेला; निर्यात ( बंदर; मिठागर इ० संबधीं शब्द ). याच्या उलट पैसाळू=आयात. [ निकाल ]

**निकाळथा**—पु. ( व. घाटी ) जनावरांचा एक रोग.

**निकिंचन**—वि. दरिद्री; अकिंचन. ' आम्हां सोयरे हरिजन। जनीं भाग्य निकिंचन । ' –तुगा २१८२. [ नि+किं+चन प्रत्यय ]

**निकियापरी**—क्रिवि. चांगल्या प्रकारें. 'तो तुंवा उपचारिलों निकियापरी । ' –विपू २.२२.

**निकी**—स्त्री. चांगुलपण. –वि. निका पहा. –ज्ञा १३.५१२. ' मृत्युकाळ काठी निकी । बैसे बळियाचें मस्तकीं । '–दा ३.९.६.

**निकीब, निकीबदार**—पु. हुजऱ्या; भाट. नकीब पहा. –ख ९.४८२३. [ अर. नकीब् ]

**निकुंचित(भूंवई)**—वि ( नृत्य ) यांत एक किंवा दोन्हीहि भुवया थोडया वक्र करणें. हें प्रकर्म मोट्टायित, कुट्टमित, बिब्बोक व किलकिंचित ह्या स्त्रियांच्या शृंगारभावांत करावें. [ सं. ]

**निकुंज**—पु. दाट झाडी; कुंज. –ज्ञा १८.१०२१. [ सं. ]

**निकुटणें**—अक्रि. ( कों. ) वाळून शुष्क व कठिण होणें ( कापणी केल्याशिवाय शेतांत बराच कालपर्यंत उभें राहूं दिलेलें भाताचें पीक ); धान्यादिक कडंगणें.

**निकुमिकुलें**—न. ( बे. ) लपंडाव. [ का. ( निकणें=लपणें) ]

**निकुर**—पु. १ निश्चय; निकर पहा.–एरुस्व ११.७१. ' रायासि बोले निकुरें । '–वेसीस्व १.६७. २ ( महानु. ) राग; संताप; हट्ट. ' निकुरेंनि परतली कस्तुरी । ' -ऋ ९६. –वि. कठोर. –क्रिवि. निश्चयेंकरून; इतर अर्थी निकर पहा. **निकुरा जाणें**–निकरा जाणें पहा. ' दक्षिणकर धरिला सुंदें । वामकर धरिला उपसुंदें । माझी माझी म्हणतां विवादें । गेले निकुरा । '–कथा ५.१३.१३७. [ निकर ]

**निकुरण, निकूर**—नपु. खरवड; निपटा ( खरकट्या भांडयांचा इ. ). [ सं. निष्कृ=बाहेर काढणें; म. निकुर ]

**निकुरणें**—उक्रि. भांडें इ०कांस चिकटलेला पदार्थ खरवडून काढणें, टाकणें ( मुख्यत्वें नखांनीं, बोटांनीं किंवा हातानें ). [ निकुर ]

**निकृट**—वि. ( अशिष्ट ) १ क्रूर; रानटी; कठोर; निष्ठुर; निर्दय; पाषाणहृदयी. निकरट पहा. २ कृपण. –क्रिवि. किमानपक्षीं; कमींतकमीं; थोडक्यांत थोडकें; निदान. [ सं. निकृष्ट ]

**निकृंतणें**—उक्रि. ( काव्य ) १ कापणें; कातरणें; छाटणें; तोडणें; खुडणें; काटणें; कुरतडणें. २ कत्तल करणें; सप्पा उडविणें; काटाकाट करणें; ठार मारणें. [ सं. निकृंतन ]

**निकृंतन**—न. १ कापणें; छाटणें; कातरणें; ( मुख्यत्वें नखानें ) फाडून टाकणें; छेदन. २ ( ल. ) कत्तल, काटाकाट करणें; तोडणें; नाश करणें; नाहींसें करणें. ' ईश्वरानुग्रहाविणें । नाहीं भवपाश निकृंतन । ' ३ कापण्याचें हत्यार. [ सं. ]

**निकृति**—स्त्री. निरसन; नाहींसें करणें. [ सं. निष्कृति ] –ज्ञा १८.२३२.

**निकृष्ट**—वि. हलका; खालच्या प्रकारचा; अधम; वाईट; उत्तम किंवा मध्यमहि नाहीं असा; क्षुद्र; कनिष्ठ, नीच. –ज्ञा १५. १६९. [ सं. ] **०काल**–पु. अवनतीचा किंवा ऱ्हासाचा काळ. **०पक्ष**–पु. कनिष्ठ, अगदीं शेवटचा पक्ष–पायरी–प्रकार. –क्रिवि. निदान कमींतकमी; निष्कृष्टपक्षीं.

**निकें**—वि. निका. १ नेटकें; बरवें; बरें; नीट; चांगलें. ' पायाचे प्रसादेन कृपेन निकें असो । ' –पंच. ' एवं पक्षत्रया माझारि । निकें काये असे मुरारी । ' –रास ४.३०२. २ खरें निश्चित; नक्की. ' ऐसें वचन कचें बोलिलें । देवीं तें निकें मानिलें । '–कथा १.५.५१. ३ पूर्ण; सर्व. 'आली कष्टदशा, वडो मरणही, कीं तेज गेलें निकें । '–वामन स्फुटश्लोक नवनीत १३४. –न. हित. –माज्ञा २.२८. –उद्गा. बरें; फार उत्तम; ठीक. ' निकें म्हणोनि पंडुनृपती । कुंती नेऊनि एकांतीं । ' –मुआदि २७.२२१. [ निका ]

**निकेतन**—न. निवासस्थान; घर; महाल; प्रासाद; भुवन; मंदिर. ' प्रवेशला निकेतनाप्रति । तों देखिली जैसी पार्वती । ' –पांप्र १.१२१. सामाशब्द - सरस्वतीनिकेतन; शांतिनिकेतन इ० [सं. ]

**निकोंचा**—पु. एक प्रकारचा लोखंडी खिळा. [ ? नि+कोंच ]

**निकोप-पी**—वि. १ निर्दोष; ऐब, तडा, भेग, इ० उणीव नसलेला; न बिघडलेला; न नासलेला. २ पूर्ण अव्यंग; दृढ; मजबूत; भक्कम. ( पदार्थ, वस्तु इ. ) ३ निरोगी; रोगमुक्त; रोगविरहित; व्याधीविरहित. ' देह निकोप असतां । छाया दिसे सकोपता । त्यासी अवधी असे मृत्या । चारी मास । '–कथा ६.१०.१३. ४ निर्दोष; उणीव किंवा अपुरेपणा नसलेला; धट्टाकट्टा; रागादि दोषरहित ( मनुष्य, शरीर, पशु वगैरे ). ५ आधिक्याच्या किंवा न्यूनाच्या दोषापासून, वाईटपणापासून अलिप्त. ' त्यास दहा सहस्रवर्षें पूर्ण । आयुष्य आहे निकोप । ' ६ वाळवी, कीड इ. लागली नाहीं असें ( लांकूड इ. )

**निक्खळ**—क्रिवि. निवळ; केवळ; निखालस; पूर्णपणें. –वि. निर्भेळ; निवळ; केवळ. [ सं. निखिल ]

**निका-की**—निकता-ती पहा.

**निकंदन-णें**—निकृंतन-णें पहा.

**निखट्टू**—वि. १ निरुपयोगी; कुचकामाचा; कवडीमोल; आळशी (मनुष्य). २ (मुख्यत्वें) नामर्द; दुबळा. ३ दाढी नसलेला. [नि+अर. खट्ट=दाढी]

**निखडणें**—अक्रि. १ झडणें; गळणें; खालीं पडणें (झाडाचीं पानें). २ पानें गळाल्यामुळें पर्णहीन; निष्पत्र होणें (झाड इ०). खडणें पहा. [निखळणें]

**निखडणें**—१ निखळणें पहा. २ पांच चार अवयव एकत्र जडून झालेल्या पदार्थाचे अवयव मोकळे करणें. उदा० कोंकणांत आगोटीचे दिवसांत गाडी निखडून ठेवितात. [नि+खडणें]

**निखड्ड**—वि. (गो.) कठीण; प्रखर. उदा० निखड्डावर झोंपल्यामुळें सर्व अंग दुखतें. [नि+सं. खर; म. खड?]

**निखड्ड(ड्डा)ई**—स्त्री. (गो.) प्रखरता; कठिणतर स्थिति; कठोरपणा. 'सवतीचीं मुलें झालीं म्हणून त्यांना निखड्डाईनें वागविण बरें नव्हे.'

**निख(खा)ती**—वि. खत न घातलेली; बिनखताची. [नि+खत]

**निखंदणें**—उक्रि. १ (काव्य) तिरस्कारानें घालवून देणें; हुसकावून देणें; धुत करणें. २ निषेध करणें; तिरस्कार करणें; निंदा करणें. 'केल्यावीण निखंदूं नये। पुढिलांसि कदां।'—दा २.२ १२. 'निखंदूनी बोलिलों नको निंदूं।'—र १३. [? सं. नि+खंडन किंवा नि+खडणें]

**निखर**—वि. प्रखर; जाज्वल्य. [नि+सं. खर] ०**पणा**—पु. प्रखरपणा. 'जयाचिया किरणांचे निखरपणें। नक्षत्रांचे होत फुटाणे।'—ज्ञा ११.२१६.

**निखर**—पु. (व.) निकर पहा. वाईट परिणाम. 'कोणाचीहि उगीच जास्त चेष्टा करूं नये, हंसण्याचा निखर होत असतो.'

**निखरंट**—वि. (व) निर्दय; निकरट पहा.

**निखरड**—वि. (राजा.) नापीक; बिनलागवडीची; रुक्ष; हलकी (जमीन). निरराळ, निपळवट पहा. [नि+खरड]

**निखरणें**—अक्रि. अगदीं नष्ट होणें; पूर्णपणें जाणें (पाऊस, ढग); निरभ्र होणें (आकाश); नाहींसा होणें; स्वच्छ, साफ होणें, (धुकें; धूर; धूळ); स्थिर होणें; निवांत-शांत होणें; थांबणें; पडणें (वारा). (सामा.) स्वच्छ, निर्लेप होणें. [सं. निक्षरण]

**निखरणीचे दिवस**—पुअव. स्वच्छ, निरभ्र दिवस; उन्हाळा. -सक्रि. निरडणें; निपटणें; निरपणें; खरवडणें; खरडून धुवून साफ करणें; (विशेषतः हातानें) खरडणें. **म्ह०** निखरून शिकरून खाई आणि आजोळा जाई. [सं. निक्षरण]

**निखराड**—वि. (कों.) कोरडें; ठणठणीत; बहुतेक खलास (पाणी, विहीर, तळें, नदी, खाडी, ओहट इ०संबंधीं योजतात). निखरड पहा. [नि+खराट]

**निखर्ची**—वि. बिनखर्चाचें; खर्च न लागणारें; बूड, तूट, कमतरता, न्यूनता, नुकसान नसलेलें; तोटयांत नसलेलें. [नि+खर्च]

**निखर्व**—न. दहा सहस्रकोटी; शंभर अब्ज संख्या. [सं.]

**निखळ**—क्रिवि. निक्खळ पहा. -वि. १ निवळ; केवळ; निर्भेळ; अमिश्र. 'येक निखळ नीळाचे। येक अखंड पाचीचे।' –गीता १.४०७. 'निखळ वस्तु निरंतरीं।'–दा ६.२.४१. २ शुद्ध; पवित्र. 'ब्रह्मानंद मुरोनि समुळ। तें ओतलें गुरुरूप निखळ।' –ह ३३.५. ३ संपूर्ण; पुरेपूर. 'तरी तेणें ज्ञानशस्त्रें निखटें। निखळू हा निवटे।'–ज्ञा ४.२०८. -क्रिवि. १ निश्चयपूर्वक; खात्रीनें. 'तुझें स्मरण केलिया निखळ। उतरे संसारसर्प गरळ।'–मुआदि १०.९८. २ फक्त; निवळ. 'अकरा सहस्र गावें गणित। त्याचिमध्यें जाणावे पर्वत। निखळ भूमी उर्वरित। नवसहस्र पै।'–कथा ६.२.८६.

**निखळणें**—उक्रि. १ खिळा निघणें, काढणें; मोकळा करणें, होणें; सुटणें; उखळणें; मोडणें; तुकडे होणें, करणें. २ सैल, खिळखिळीत करणें. ३ (ल.) हांकलून देणें; काढून देणें (जागेवरून इ०); उपटून काढणें, टाकणें. 'होइल हानि कळा या बाळांपासूनि केंवि हा निखळाया।'–मोकृष्ण ३९.६३. -अक्रि. १ (गो.) बाजूला निघणें. २ मरणें. [सं. निस्खलन; नि+खिळणें]

**निखळे खुरपें**—न. (चांभारी) एक जातीचें खुरपें.

**निखाडा**—वि. रिकामा दिवस असल्याशिवाय; खंड न पडलेला; खाडा नसलेला (काळ). [नि+खाडा]

**निखाडा-ड्या-डू**—वि. दाढीशिवाय; दाढीचे केस नसलेला; ज्यास मोठेपणींहि दाढीमिशी येत नाहीं असा (पुरुष). (गो.) निखोडया. [अर. नि+खड्ड=दाढी]

**निखाडा-रा**—पु. ढग नाहींसे होऊन आकाश स्वच्छ होणें. 'पावसानें निखाडा हांटला.' [निखारणें]

**निखाड्या-खांडया**—वि. (गो.) न शिजणारा (दाणा). [न कढणें]

**निखाती**—वि. निखती पहा. खत न घातलेली; बिन खताची.

**निखाद**—पु. निषाद; गायनांतील सात स्वरांपैकीं सातवा. [सं. निषाद]

**निखानेमाचा**—वि. नियमित; नेहमींचा; ठराविक; कायमचा; खात्रीचा; पुनःपुनः येणारा (उकाडा, उचापत, पाहुणा, अतीत, भिकारी, पाऊस, वारा इ० शब्दांबरोबर योजतात). याचा क्रियाविशेषणाप्रमाणेंहि उपयोग करतात. जसें-हा निखानेमाचा येतो, जातो, खातो. [निका, निक्खळ+नेम]

**निखार, निखारओहट**—पुस्त्री. १ अतिशय मोठी ओहटी; वसंत ऋतूंतील ओहोटी. 'आज निखार ओहोट होता म्हणून खाडीस पायउतार झाला.' २ ओहोटीचें पाणी पुरें उतरणें; हें पाणी सुमारें सहा तासपर्यंत ओसरत असतें. चंद्रास्त झाला म्हणजे ओहोटी पूर्ण होते व बारा मिनिटें पाणी तसेंच स्थिर राहतें. -मराठी ६ वें पुस्तक, पृ. २८७ (१८७५) [ निखारणें ]

**निखार**—वि. १ (कों.) पराकाष्ठेची; अतिशय (ओहटी वसंत ऋतूंतील). २ निरभ्र (आकाश). [ निखारणें ]

**निखार**—वि. खार सुकून गेलेलें; क्षार नसलेलें (लोणचें). [ नि+खार ]

**निखारणें**—उक्रि. साफ, नाहींशी करणें, होणें; (पूर्णपणें, निखालसपणें) घालविणें. 'जुलाबानें सूज निखारली.' बहुधा निखारून या रूपानें अनेक क्रियापदांशीं योजतात. जसें:-निखारून नांगरणें, झाडणें, हाकणें, मारणें, धांवणें, जेवणें इ० -अक्रि. १ निखरणें पहा. २ आकाश निरभ्र होणें. [ निक्षरण ]

**निखारणें**—अक्रि. प्रज्वलित होणें; धगधगणें; जळजळीत असणें (निखारा). [ निखारा ]

**निखाररंगी**—वि. निखाऱ्यासारख्या लाल रंगाचा;ज्वाळेच्या रंगाचा; लालभडक. 'हें लुगडें निखाररंगी आहे.'

**निखारा**—पु. जिवंत-जळणारा पेटलेला कोळसा; विस्तव; इंगळ; अंगार. म्ह० आपल्या पोळीवर निखारे कोण न ओढी? ०**देणें**-उपाशी राहणें; भूक मारणें; पोटांतील भुकेची आग न शमविणें; भुकेस न गणतां न खातां राहणें, 'आज तिसरा प्रहरपर्यंत निखारा दिला नंतर जेवलों.' ०**घरावर ठेवणें**-१ एखाद्याचीं दुष्कर्में बाहेर काढून निर्भर्त्सना करणें. २ एखाद्याचें भयंकर नुकसान करणें. **निखाऱ्याचें करणें**-जेवणें; खाणें; पोटांतील आगीकडे लक्ष देणें.

**निखारा**—पु. निरभ्रता; आकाश अगदीं निरभ्र होणें. [ निखारणें ]

**निखालस**—वि. १ स्पष्ट; साफ; निर्भिड; उघड; निश्चित; रोखठोक; सरळ; शुद्ध; निर्मेळ (मनुष्य, भाषण, वागणूक इ०). 'चल सालसपण धरुनि निखालस खोट्या बोला बोलुं नको।' -अफला ६०. २ वेगळा; भिन्न; निराळा; दुसरा; पृथक्. ३ संबंधरहित. 'आमची जागा निखालस आहे.' -क्रिवि. १ निश्चयपूर्वक; स्पष्टरीतीनें; खात्रीनें. 'शिवाजी निखालस आपले पदरींचा गेला.' २ निक्षून; लाभलोभ, भीडभाड न धरितां. ३ निवळ; केवळ; पूर्णपणें; शुद्धपणें; निक्खळ. 'दशस्थ ब्राह्मण निखालस स्वराज्या भिष्ट वृद्धीस जिवाची तमा न धरितां झटले.' -चित्रगुप्त १२३. [ नि+अर. खालिस् ] **निखालसता, निखालसी**-स्त्री. १ खात्री; खचितपणा; निश्चय; ठामपणा. 'त्याचे येण्याची निखालसता कांहीं दिसत नाहीं.' २ संशयनिवारण; खातजेमा. ३ शुद्धभाव; स्नेह. 'हरतऱ्हा होऊन निखालसीचा प्रकार घडेल या अंदेशावर मी बोलतों.' -पया २३६. ०**पत्र**-न. यजीदपत्र; सोडचिठ्ठी. -रा २०.४१९.

**निखिल-ळ**—वि. सर्व; अखिल; सगळा; पूर्ण (संख्या किंवा परिमाण यासंबंधीं योजतात). -ज्ञा १८.४५९. [ सं. ]

**निखूण**—क्रिवि. निक्षून; बजावून; हडसूनखडसून; स्पष्टपणें. [ निक्षून ]

**निखेड**—वि. बिन भेसळीचें; मिश्रणाव्यतिरिक्त (तांदूळ किंवा इतर धान्य). [ नि+खेड=मिसळ ]

**निखोट-ड-डी**—वि. १ दोष, व्यंग, न्यून इ०पासून अलिप्त; निर्दोष; खोड नसलेलें. 'गाय निखोड आहे.' २ चोख. 'हें भात निखोड पटणीचें आहे.' [ नि+खोड ]

**निखोड**—पु. ऐरण, ज्या लांकडाच्या ओंडयामध्यें बसवितात तो ओंडा. -बदलापूर २३१. [ खोड ]

**निखोरडा**—वि. अनाश्रित; अनाथ; मित्रहीन; द्रव्यहीन.

**निख्खळ**—निक्खळ पहा.

**निगई, निगड-डी**—स्त्री. निरगुडी; निर्गुंडी; एक प्रकारचें झाड. याचीं पानें त्रिदळ असतात, ह्यांचा विशेष उपयोग आहे. कोंकणांत बाळंत स्त्रियांना अंग धुणें बाधूं नये म्हणून पाण्यांत टाकतात.

**निगट(ड)णें**—अक्रि. निगडित होणें, असणें; बांधलें जाणें. 'करतटीं निकटीं लघु किंकिणी। निगटल्या नटल्या नटदामिणी।' -दावि ९१. -सक्रि. बांधणें; निगडित करणें. [ सं. निगडन ]

**निगड**—पु. बेडी; पायांतील लोखंडी शृंखला, सांखळी. 'निगड करणें दुःखरूप।' -रंयोवा १.८९८. [ सं. ]

**निगडित**—वि. बांधलेलें; बद्ध; जखडलेलें; संघटित. 'हे नऊ प्रांत कॅनेडियन पॅसिफिक रेलवेनें एकमेकांशीं निगडित झालेले आहेत.' -नस्व १०.

**निगणें**—क्रि. निघणें; बाहेर पडणें. (प्र.) निघणें पहा. 'हेतु जेथ न निगे।' -ज्ञा ८.१५१. 'मग अग्राहाओं धावोनि मंटपांतु। निगता जाहाला।' -ख्रिपु १.९.२६.

**निगता**—क्रिवि. (अशिष्ट) नुकता; निगुता पहा. 'शोकाब्धि दूर आहे निगता आलासि बा परिसरा या।' -मोभीष्म ५.२३.

**निगद-दु**—पु. १ भाषण; बोल. २ निर्धाराची शपथ. -माज्ञा ८.१२४. (पाठभेद). [ सं. निगद ]

**निगद**—वि. निरोगी. [ सं. नि+गद=रोग ]

**निगदणें**—क्रि. बोलणें; सांगणें; कळविणें. -ज्ञा १५.५७. 'जेव्हांपासुनि नारदें निगदिलें मी सर्व सौख्या विटें।' -निगा सुभद्राचंपु ५.४८. [ सं. निगद् ]

**निगदुला**—वि. नखरे करीत थोडेसेंच खाणारा; चोखंदळ; शिष्टपणानें हात आंखडून जेवणारा. [ निका=निश्चित+दुला=दुल्हा, वेडा ]

**निगम**—पु. १ ( गूढ व अगम्य असे मानलेले चारी ) वेद. याच्या बरोबर आगम शब्द येतो. उदा० निगमागम. –ज्ञा १८.२. 'आगमनिगम तुज नेणती कोणी ।' –तुगा ४७८. २ परमेश्वर; देव. ०**रत्नाचळ**–पु. वेदरूप मेरुपर्वत. –ज्ञा १८.३५. ०**वादी**–वि. वेदाला प्रमाण मानणारा. ०**शास्त्र**–न. वेदांतशास्त्र.

**निगम**—पु. १ शेवट; निकाल; परिणाम. २ सुटका. –नाम १९०. [ सं. निर्+गम् ]

**निगमन**—न. १ अनुमान; निष्कर्ष. २ न्यायशास्त्राचा एक भाग. निगमन न्यायशास्त्र पहा. ०**न्यायशास्त्र**–न. सर्वसाधारण सिद्धांतावरून विशेष सिद्धांताचें अनुमान काढणें; विशेषीकरण. ( इं. ) डिडक्टीव लॉजिक. [ सं. ]

**निगरगट्ट–टा–गट्ट**—वि. १ निलाजरा; कोडगा; निर्लज्ज; बेशरम; निर्ढावलेला; कितीहि बोललें तरी ज्याच्या मनावर कांहीं परिणाम होत नाहीं असा. **म्ह**० तूं करीत जा कटकट मी झालों निगरगट. 'मध्वनाथ स्वामी निगरगटा । काय झोंबलासी माझ्या कंठा ।' –मध्व १६७. २ कठोरमनाचा; निर्दय. [सं. निगॄ–निगर= गिळणें+गट्ट किंवा निग्रह+गट्ट ? [

**निगरण**—पु. १ गिळणें; गट्ट करणें. २ (साहित्य.) एक अलंकार. खरा अर्थ छपवून त्याबद्दल कांहींतरी काल्पनिक अथवा लाक्षणिक घालणें. [ सं. नि+गॄ ]

**निगराणी**—स्त्री. ( ना. ) देखरेख; नजर; पाळत; दाब. 'पार्लमेंटची कंपनीच्या कारभारावर निगराणी असे.' –सन १८५७. पृ. १५४. [ फा. निग्रान् ]

**निगर्व–र्वी**—वि. ज्यास गर्व, अहंकार, नाहीं तो; निरहंकारी.

**निगळ**—न. १ ( पाऊस, पाणी गळूं नये म्हणून ) घरावर नवीन छप्पर घालतांना जिची पूजा करावी लागते अशी देवता. 'आज घरशिवणी झाली आहे निगळास नैवेद्य घाला.' २ न गळणें, **निगळ, निगळता**–वि. न गळणारें; ज्यांत पाणी, पाऊस गळत नाहीं असें ( घर इ० ); जलप्रतिबंधक. [ नि+गळणें ]

**निगा**—पु. निघणें; जाणें.

**निगा, निगादास्त, निगाबानी**—स्त्री. देखरेख; जतणूक; काळजी. निघा, निघादास्त पहा. 'या शेताची निगा केली असतां बहुत पिकेल.' 'शेत पेरिलें आणि उगवलें । परंतु निगेविण गेलें ।' –दा ५.३.९. [ फा. निगाह् ] **निगाहबान्**–पु. निगा ठेवणारा; वीक्षक. –राज्यको ९.४.

**निगामीमार्ग**—पु. संकीर्ण कार्याच्या कारणांचें संशोधन करण्याची पद्धति. (इं.) डिडक्टीव मेथडकरितां प्रतिशब्द. –न्यायपद्धति २४७.

**निगाल**—न. घोडयाचा अवयव, गंडखोल. घंटाबंधनापासून कंठाचे खालीं नऊ अंगुळांवर आणि हृदयापासून वर जें स्थान असतें तें. –अश्वप ८६. [ सं. ]

**निगाली**—स्त्री. हुक्का पिण्याची नळी. [ फा. ]

**निगावा**—पु. सुटका; निघणें; निघावा

**निगाळ**—पु. ( तंबाखू किंवा दुसऱ्या पदार्थाची ) दुसऱ्यानें कुट्न आणि गाळून काढलेली, तयार केलेली पूड; चूर्ण. [नि+गाळणें]

**निगी**—स्त्री. निकी; नेटकी. 'अतर्क्य तेथिची रचना निगी पुत्रप्रयोगी करविलें ।' –भाराकिष्किंधा २.७५. [ निकि ]

**निंगी–ग्या**—अ. (कातवडी) निघून (जाणें). 'तर माझे नगरां० तून मी निंगी–ग्या. –मसाप २.१.३०. [ निघणें ]

**निगीर्ण**—वि. गिळलेलें; गिळंकृत केलेलें; स्वाहा केलेल० [सं.]

**निगुतच**—क्रिवि. इतक्यांत; नुकसान. –बदलापूर १३८.

**निगुत–ता–तीं**—क्रिवि. ( काव्य ) १ नुकतेंच; अलीकडे; लवकर; आतांच. 'तुज सांगीतली निगुती ।' –विउ ७.१०५. २ यथार्थ; व्यवस्थित; निभ्रांत; स्पष्ट. 'त्या सांनिध्याची उपस्थिति । वेगळाली सूचिली निगुती ।' –रासपं ५.९७. 'कोण कामना तुझ्या चित्तीं । सांग निगुती मुनिवर्या ।' –नवनीत १८६. 'शिंपी म्हणती नामयातें । प्रत्यक्ष बोलती निगुतें ।' –भवि १४.२५. ३ लक्षपूर्वक; दक्षतेनें; ध्यान देऊन. 'ईश्वर म्हणे पार्वती । ऐकावी निगुती ।' –भबो ३७. ४ नेटानें; निश्चयानें. पुनःपुन्हां; वरचेवर. 'तोंवरी अभ्यास निगुती ।' –परमा ९.३४. –क्रिवि. ( क. ) निश्चयानें; नीटपणें; खचित; निःसंदेह; खात्रीनें. ऐसें बोलोनि निगुती ।' –गुच १५.३२. 'दैत्य लक्षण जाणोनि निगुती ।'–मुआदि ४.१६५. **निगुताई–निगुती**–स्त्री. काळजीनें ठेवणें, वागविणें, उपयोग करणें; लक्ष देणें; काळजी; दक्षता; यथार्थपणा; सावधानपणा; संरक्षणाची योग्य तजवीज; रीति; युक्ति. 'ऐसी निगुती करोनि । आली एकादशी दिनीं ।' –गुच ३५.५३. ( क. ) निगूत.

**निगुरा–ऱ्या**—वि. १ गुरुहीन; ज्यानें गुरु केला नाहीं तो. २ पोरका; अनाश्रित; (आईबापाशिवाय किंवा ज्यास कोणी मार्ग दाखविणारा नाहीं असा मुलगा ). [ नि+गुरु ]

**निगूड**—स्त्री. एक औषधी झाड. [ सं. निर्गुंडी ]

**निगूढ**—वि. गुप्त; अतिशय खोल किंवा गूढ; एकाएकीं आकलन न होणारें किंवा न समजणारें; झांकलेला. 'मनुष्यांच्या अस्तित्वास व बुद्धीस अनुकूल अशीं कारणें या पृथ्वींतील परमाणुसंघांत निगूढ आहेत.' –आगरकर [ सं. नि+गुह्=झांकणें ] **निगूढार्थ**–पु. गर्भित अर्थ; सूचित, ध्वनित अर्थ; एक प्रकारचा उत्तराभास उदा० ह्यानें माझें सुवर्णशत घेतलें अशी फिर्याद केली असतां,

'काय? मी एकटयानेंच घेतलें आहे?' अशा व्यंगानें आणखी कोणी घेतलें असावें अस अर्थ निष्पन्न करणारें (उत्तर).

**निगूत**—क्रिवि. (काव्य.) नुकतेंच; अलीकडे. 'कारे बाळो निगूत इलो। तो तुकां भेटलो हुतो?'–मसाप २ ४.३६८. –वि. (गो.) नीट; दुरुस्त; सरळ. उदा० मोडलेली विळी निगूत करण्यासाठीं लोहाराकडे पाठविली आहे.' (कों.) समूळ; बरोबर उदा० 'त्येकां निगूत नासो करतलों.' (त्याला समूळ, बरोबर नाहींसा करीन).

**निगूत**—स्त्री. १ शहाणपणा; कुशलता; हातोटी; खुबी; हिकमत; योजना. २ काळजी; लक्ष; देखरेख; काळजीनें ठेवणें, संभाळणें, वागविणें. उदा० 'संसाराची निगूत बायकोला असावी.' 'ह्या घोडयाची निगूत केली तर हजार रुपयांचा माल होईल.' वासराची–पोराची–शेताची निगूत. (क्रि० करणें; निगुतीनें ठेवणें). [सं. नि+युज्; युक्ति; युगत; जुगूतप्रमाणें]

**निगृहीत**—वि. नियंत्रित; निग्रह केलेला; संयमित; दाबांत ठेवलेला; प्रतिबंधित; नियमित; निर्बंध घातलेला. [सं.]

**निगोड**—वि. कमी गोड, जितकें पाहिजे त्यापेक्षां कमी गोड; फिकें. 'आज पोळया निगोड झाल्या आहेत.' [नि+गोड]

**निगोरच्या**—पु. एक प्रकारचा खेळ. लगोऱ्या.

**निगोळी**—स्त्री. १ पागोळी; वळचण. २ पागोळयांतून पाऊस गळणें; वळचण गळणें. [सं. नि+गल्=गळणें]

**निग्रम**—पु. (कु.) निरवानिरव करणें; व्यवस्थित ठेवणें. 'ते जिन्नस एकदां निग्रमाक लाव.' [सं. निर्गम?]

**निग्रह**—पु. १ संयमन; प्रतिरोध; दमन; अटकाव; दडपण; दाब. 'निग्रह केल्यानें थकलेल्या कुळांपासून पैसा उगवणार नाहीं म्हणून सोईसोईनें घ्या.' २ निश्चय; दृढता; आग्रह; पक्केपणा (मत किंवा हेतूचा). ३ ताब्यांत घेणें; पकडणें; धरणें; बंदींत टाकणें. 'राजानें दुष्टांचा निग्रह आणि साधूंचें रक्षण करावें.' ४ नियम. [सं.] **०णें**–सक्रि. (काव्य) दाबांत ठेवणें; संयमन करणें; दडपणें. **निग्रहानुग्रह**–पु. एखाद्याला दंड करणें किंवा त्याच्यावर कृपा करणें. **निग्रहानुग्रहसमर्थ**–वि. एखाद्यावर कृपा किंवा अवकृपा करण्यास समर्थ तो (देव, राजा, भूपाल वगैरे). **निग्रहित**–वि. दाबांत ठेवलेला; ताब्यांत घेतलेला; निग्रह केलेला. **निग्रही**–वि. निश्चयी; दृढ; आग्रही; करारी; हट्टी. (चांगल्या व वाईट अर्थानें).

**निग्राणी**—निगराणी पहा.

**निघंट–टू**—पु. १ यास्कानें निरुक्तांत विवेचिलेला वैदिक शब्दकोश. २ (सामा) शब्दकोश. ३ (रूढ) वैद्यकीय कोश. [सं.]

**निघड**—विक्रिवि. (कों.) लागोपाठ; अनुक्रमानें; एका पाठीमागें एक; मध्यें जागा सुटल्याशिवाय (बैल अथवा पाय राहाटाच्या माळेस बांधलेले लोटे) याच्या उलट दुघड आणि तिघड पहा). [सं. नि+घट]

**निघणें**—अक्रि. १ बाहेर पडणें; आंतून बाहेर जाणें. २ पासून दूर येणें; वेगळें, निराळें होणें. ३ उत्पन्न होणें; उद्भवणें; निपजणें; उगवणें. ४ वृद्धिंगत होणें; वर येणें; शेवटीं दिसणें; आढळणें. ५ उमगणें; घडून येणें; घडणें. ६ जोरानें धांवणें; बाहेर येणें (घोडा वगैरे). ७ उत्पन्न होणें; दिसूं लागणें; उमटणें. 'लाखी शाईनें अक्षर चांगलें निघतें.' ८ नाहींसें होणें; ओसरणें; कमी, बडतर्फ होणें. उदा० चाकरी, अधिकार निघाला. ९ (अकर्तृक अ.) ओकलें जाणें. 'त्याला निघालें, त्याला अन्न निघालें अथवा ठेव निघाली.' १० (दुसऱ्या क्रि. शीं जोडलें असतां) लागणें; झडणें; सुरुवात अथवा आरंभ करणें. 'जाऊं निघणें, देऊं निघणें.' [सं. निर्गम्] **निघतें घेणें**–अंग, पाय काढणें; मागें माघार घेणें.

**निघळ**—स्त्रीपु. जात्याच्या आंतल्या खुंटयाभोंवतीं चिकटून राहणारा घांस. [नि+घळणें] **निघळणें**–अक्रि. जात्याच्या तोंडांतून धान्याचा घास बाहेर येणें, गळणें. –सक्रि. जात्यांतून घांलविणें अथवा गाळणें (दळतांना मेखेभोंवतीं जमणारा घास) जात्यांतून घांस बाहेर काढणें; जात्यावर दळतांना सर्व दळण झाल्यावर आंत राहिलेलें सर्व धान्य स्वच्छ झाडून काढणें.

**निघा, निघादास्त–बानी**—स्त्री. काळजीनें देखरेख ठेवणें; नजर; अवधान; लक्ष. (क्रि० करणें; ठेवणें; पाहणें). [फा. निगाह्]

**निघातें**—क्रिवि. १ (काव्य) संघातानें; एकाच वेळीं बरेचसे. २ अचूक; लक्षपूर्वक. 'अदृश्य होऊनी असंख्यात बाण। मारी निघातें।'–मुवन १२.१४८.

**निघावा**—पु. १ बाहेर अथवा पुढें निघणें; निघणें (प्रवासास). २ निघण्याची तयारी. [निघणें]

**निघोट**—वि. संपूर्ण, परिपूर्ण.

**निघोर–री**—वि. निर्भय; निर्धास्त; निश्चित; कुतर्क, संशय वगैरेंपासून अलिप्त. [सं. नि+घोर]

**निघ्न**—वि. अवलंबून राहणारा; आश्रयी; परावलंबी. [सं.]

**निच**—क्रिवि. नित्य; नेहमीं; सदोदित. 'उमेठेआं देवां निचनवा। आठाइतेआं देवां बंबाळु दीवा।'–शिशु १५३. 'निच तुवां येकलेंचि यावें।'–पंचतंत्र. [सं. नित्य]

**निंच**—वि. १ ठेंगणा; बुटका. २ कमी, हलका (स्थिति, किंमत इ० नें). ३ नीच; हलकट; क्षुद्र. [सं. नीच]

**निचकणें**—सक्रि. १ (कों.) हिसक्यानें स्थानापासून अलग करणें; स्थानभ्रष्ट करणें; हालवणें; बाजूला सारणें; कचकावणें; लचकणें; लाथेनें मनुष्याचा अवयव तत्काळ वांकविणें. २ झरणें; पाझरणें; द्रवणें.

**निचकोडा**—पु. (व.) चिमटा (शरीरास हातानें घेतलेला).

**निच(च्च)क्र**—न. कडकडीत उपास.

**निचरणी**—स्त्री. पाझरणें; गळणें; झरणें; रस अथवा चीक बाहेर टाकणें; घाम येणें. [ निचरणें ]

**निचरणें**—अक्रि. पाझरणें; गळणें; गळूं इ० कांतील किंवा पोटांतील मलांश किंवा पदार्थांतील जलांश पातळ होऊन झरून बाहेर पडणें. उदा० गळवांतील पाणी निचरून दे. घाम सुटणें अथवा वाहणें. [ सं. निस्+चर् ] **निचरा**–पु १ निचरणी पहा; पाझर; निर्यात; स्वेद. २ पाझरून जाणारा पदार्थ.

**निचल–ळ**—वि. १ ( काव्य ) अचल; निश्चल. २ ( गो. ) ब्रह्मचारी. –क्रिवि. स्तब्धतेनें; शांत रीतीनें. [ सं. नि+चल् ]

**निचव**— वि. बेचव; रुचिहीन; निरसः फिक्का; शुष्क.[नि+चव]

**निंचा**—वि. निकृष्ट; निंच पहा.

**निचाड–डा**—वि. १ दांडगा; उद्धट; बेमुरवत; अविनय. २ निरिच्छ; निगरजु; निष्काम. -ज्ञा २.२८१. ३ निर्लज्ज; निगरगट्ट. ४ प्रीति, आवड, रुचि, चव या विरहित. ‘ गुळासारखा गूळदगड। परी तो कठिण निचाड।’ –दा ८.५.४७. [ नि+चाड ] **निचाडणें**–बेपरवाईनें वागणें. –एभा १२.१७५.

**निचावणें**—अक्रि. खचणें; दबणें; खालीं जाणें; बसणें; मोडकळीस येणें ( इमारत, खांब इ०. ) [ नीच ]

**निचिंत**—वि. ( काव्य ) निष्काळजी: बेफिकीर: निश्चित. [ सं. निश्चित ]

**निचूळ**—पु. (कु.) फणसाचें झाड अथवा फणस. [सं. निचुल]

**निचेतन, निचेत**—वि. चेतना, वेदनारहित; निद्रा, मूर्च्छा इ०कांमुळें देहभानावर नसलेला; बेशुद्ध. [ सं. निश्चेतन ]

**निचेष्ट**—वि. निश्चेष्ट; निचेतन पहा. [ निस्+चेष्टा ] **निचेष्टित**–वि. बेशुद्ध, निचेष्ट झालेला. ‘ निचेष्टित पडे रघुनंदन।’ –रावि १६.१५.

**निज**—न १ मन. २ निजगुज; विश्वरूप. ३ आत्मस्वरूप; स्वस्वरूप. ‘पाहें पां वालभाचे नि व्याजें। तिया व्रजांगनांचीं निजें।’ –ज्ञा ९.४६५. [ सं. ]

**निज**—वि. स्वतःचें; स्वकीय; आत्मीय; आपलें; (अत्यंत–शर) –नस्त्री. स्वतःचीं कामें ( क्रि० सांगणें; बोलणें ). **म्ह**० निजेवाचून पुजा नाहीं=फुकट कोणी कोणाच्या उपयोगीं पडत नाहीं. [ सं. ] ०**कार्य**–न. १ आपलें स्वतःचें काम. २ ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान मिळविणें. ०**खूण**–स्त्री. विशिष्ट खूण, चिन्ह, लक्षण. ०**गूज**–न. स्वतःचें, खाजगी–गुप्त काम, गोष्ट. ०**जन**–स्वकीयजन अथवा भक्त. आप्त; सोयरेधायरे. –ज्ञा १८.१. ०**जनजित**–वि. भक्ताधीन. ०**जनरक्षक**–वि. आपल्या लोकांचें, भक्तांचें रक्षण करणरा ( ईश्वर ). ०**जनाखिलमंगल**–वि. भक्तांचें संपूर्ण कल्याण करणारा; भक्तांचें मंगळ करणारा. ‘ जय जय देव निर्मळ। निजजनाखिल मंगल। जन्मजरा जलद जाल प्रभंजन।’ –ज्ञा १८.१. ०**ठेवा**–पु. १ स्वतःची पुंजी, मुख्यत्वें स्वतःच्या पाप पुण्यास लावतात. २ ब्रह्मज्ञान. ‘ऐसें म्हणाल तरी निजठेवा। सद्गुरूवीण नाहीं।’ –दा ५.१.१९. ०**ढाळ**–पु. स्वाभाविक गति. ०**तेज**–न. स्वकीय तेज; स्वस्वरूप. ०**त्व**–न. निजरूप. ०**धाम**–न. ( काव्य. ) स्वतःचें घर, निवासस्थान; आत्मस्वरूप; निजतेज. ‘ कृष्णदास जयराम। जे शांतक्षमेचें निजधाम।’ ०**धामास जाणें**–मरणें; दिवंगत होणें. ०**निवाडा**–पु.. आत्मस्वरूपाचा निश्चय. निजस्वरूप भाव. –एभा २.३१६. ०**बोध**–पु. आत्मज्ञान. ‘ जेथें भेटे निर्गुण निजबोध विष्णु स्वरूप.’ ०**मूर्ति–रूप**–वि. स्वस्वरूप; स्वतःसिद्ध. ०**रूप**–न. १ स्वतःचें खरें स्वरूप. ‘ निजरूप इला मी दाऊं कां।’ –सौभद्र अंक ५ २ स्वस्वरूप; चिन्मयकला; शिवात्मा. ०**लोट**–पु. ( काव्य. ) प्रत्यक्ष लाट, जलकल्लोळ. ‘ जो विवेक रत्नाचा किरिट। जो सद्गुण गंगेचा निजलोट।’ ०**वर्म**–न. स्वतःचे ( गूढ ) दोष; रहस्य; गुप्त गोष्ट. ०**वस्तु**–नस्त्री. ब्रह्म. ०**वृत्ति**–स्त्री. स्वधर्म. ‘ तैसी निजवृत्ति जेथ सांडे। तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे। आइका प्रजाहो हें फुडें । विरंचि म्हणे।’ –ज्ञा ३.१११. ०**साधन**–न. १ आत्म्याचें ज्ञान मिळविणें. २ स्वतःचें हित पाहणें, स्वहिताकडे नजर देणें. (क्रि० पाहणें). ०**सार**–पु. मुख्य उद्देश; तात्पर्य. ‘ एऱ्हवीं या लक्षणांचिया निजसारा। मी अपाडे कीर अपुरा।’ –ज्ञा ६.१४०. ०**सुकृत**–पु. आपलीं स्वतःचीं कृत्यें ( पूर्व जन्मांतील किंवा ह्या जन्मांतील ). ०**सुख**–न. १ ब्रह्मसुख. २ स्वतःचें सुख. ०**स्वरूप**–न. निजरूप पहा. ०**ज्ञानी**–पु. आत्मज्ञानी. **निजांगें**–क्रिवि. ( काव्य ) स्वतः; जातीनें. ‘ निजांगें वधोनि दशकंधर।’–स्तोत्रमाला महिपति–पांडुरंगस्तोत्र. **निजाचो**–वि. ( गो. ) स्वतःचा; मूळचा; नैसर्गिक. **निजाचो श्रीमंत**–वि. गर्भश्रीमंत **निजानंद, निजानंदभरित**–वि. स्वतःमध्यें आनंद पावणारा ( ब्रह्म ).

**नि(नी)ज**—स्त्री. झोंप. ‘ तदुक्तिस जन प्रभो जरि निजेमधें चावळे।’ –केका ७३. [सं. निद्रा] **निजगळ**–वि. (ना) झोंपाळू. **निजतीक्रिया**–स्त्री. प्रेत निजल्या स्थितींत पुरणें. –बदलापूर १७२. **निजणें**–अक्रि. १ झोंप घेणें; झोंपणें. ‘टपकण निज. महारपोर रात्र शिळी करतील.’ ( लहान मुलाला लवकर निजविण्यासाठीं म्हणतात ). २ आडवें होणें; कलणें; लोळणें. ३ आजारी पडणें; हांतरुणाला खिळणें. ४ (ल.) मरणें. ५ नाश पावणें; बुडणें; नाहींसा होणें. ( धंद्यांतील भांडवल, धंदा, व्यापार इ० ). ६ भरभराटीस न येणें ( दैव ); मंद चालणें (कामधंदा); नाहींसा होणें ( हुकमत, अधिकार ); बेचिराख, उजाड होणें ( घर, गांव ). ७ संभोग करणें. **निजलेला मेल्यासारखा**–मृतवत निजलेला व मेलेला सारखाच **निजल्या जागीं विकणें**–कारवाईनें आपलें

काम साधणें; बोटावर नाचविणें. **निजून उठणें, उठत असणें** (पहांटेस, लवकर)–प्रातःकाळीं झोंपेंतून उठणें किंवा उठण्याची संवय असणें. **सावकाश निजणें**–शांतपणानें झोंप घेणें; बेफिकीरपणें झोंपणें. **निजविणें**–सक्रि. झोंपविणें; दुसऱ्याला झोंपू देणें आडवें पसरविणें; निजावयास लावणें. **निजसुरा**–वि. अर्धवट झोंपलेला अर्धवट जागा; असावध. 'जेणें देहात्मवादी निजसुरा।' –यथादी १.३८२. **निजानीज**–स्त्री. सामान्यपणें निजणें; सर्वत्रांचें निजणें; शांतता; सामसूम. **निजायाबसायाजोगी**–वि. (बायकी) घरकाम करण्यास योग्य झालेली, वयांत आलेली (स्त्री). **निजाळू**–वि. झोंपाळू; फार, नेहमीं झोंप घेणारा. **निजेला**–वि. निजलेला; झोंपलेला (माणूस). 'निजेल्यामधें पुछय तें लोळताहे।' –राक १.३३. 'त्यांतील एक कलहंस तटीं निजेला।' –र ९.

**निजध्यास**—पु. सतत चिंतन; एकाग्रता. [सं. निदिध्यास]

**निज (जा)वा**—पु. (व) (धार काढतांना लाथ मारते म्हणून) गाईच्या मागील दोन्ही पायांला दोर बांधणें.

**निजोखमी**—वि. जोखीम, धोका नसलेला. [नि+जोखीम]

**निज़ोर-री**—वि. १ दुबेळ; अशक्त. २ आधार, आश्रय, पाठिंबा नसलेला. ३ (बुद्धिबळ) जोर नसलेलें, आधार नसलेलें (मोहरें). ४ जोर असला तरी तो न मानतां मोहरीं वगैरे मारून खेळण्याचा; (डाव) मारामारीचा (डाव) [नि+जोर]

**निझर**—पु. पाझर; झिरपा; झरा. [सं. निर्झर] **निझरणें**–अक्रि. १ पाझरणें; झरणें; झुळ झुळ वाहणें. २ ओलावा सुटणें; घाम येणें; झिरपून जाणें. **निझरपाणी**–न. झऱ्यांतील किंवा पाझरणारें पाणी [निझर+पाणी] **निझूर**–वि. १ हलकी; कमजोर; झिरपून, झरून गेलेली (शेत जमीन). २ निःसत्व; निकस; थकलेला भागलेला (माणूस, जनावर वगैरे).

**निझाड**—वि. निर्वृक्ष; वृक्षविरहित; ओसाड; वैराण. 'वन झालिया निझाडी मग उचलिल्या प्रचंड धाण्डी।' –मुवन १०.१८. [नि+झाड]

**निझाडा**—पु. १ तुटवडा; पूर्ण अभाव. २ स्पष्ट नकार; साफ नाहीं म्हणणें. (क्रि० देणें). 'मी मागितलें परंतु त्यानें निझाडा दिला.' [नि+झाडा=साफ करणें] **निझाडून**–क्रिवि. साफसाफ; रोखठोक; स्पष्टपणें; निक्षून (नाहीं म्हणणें किंवा सांगणें).

**निटली** –स्त्री. एक पायांतील दागिना. 'अनवट निटल्याही जोड त्या जोडव्यांचा।' –सारुह ६.३१.

**निटवंगी**—स्त्री. १ (चि.) अतिशय थकणें; फार दमणें. २ रोगादिकांनीं जर्जर होणें; मरगळ. ३ डोळ्यांत फार झोंप येऊन पेंगणें; सुस्ती. 'अगदीं निटवंग्या आयलों.'

**नि(नी)टस**—वि. नीटनेटका; बांधेसूद; आकारबद्ध; सरळ रेखीव (मनुष्य, वस्तु). [नीट]

**निटाई-ओ**—स्त्री. सरळपणा; नीटनेटकेपणा; आकारबद्धता; योग्य घडण. 'निटाओ स्थूळ शरीराचा।' –गीता २.१८५६. **निटावणी**–स्त्री. बरोबर करणें; दुरुस्ती; सरळ करणें. **निटावणें**–अक्रि. १ सरळ: वेडेंवांकडें असलेलें ठीक करणें; चांगलें; योग्य करणें. २ झटून पडणें; दुसऱ्याची अपेक्षा न धरतां नेटानें पुढें जाणें. ३ (काव्य) सरळ जाणें; पुढें जाणें. ४ वर जाणें; पुढें चालणें. 'निटावले वीर यूथपति। मुखें गर्जती रामनाम।' –जैअ ७४.९७. ५ सुधारणा करणें; पुढें पाऊल पडणें; कुशल; तरबेज होणें. **निटावा**–पु. १ सरळपणा. २ (ल.) बिनचूकपणा; योग्यपणा. ३ नेटावा; टेंकू; आधार; धिरा; नेट: पाठिंबा. (क्रि० देणें). **निटाविणें**–सक्रि. बरोबर करणें; लावणें; रचणें; व्यवस्था लावणें; व्यवस्थित वासलात लावणें. **निटोपा**–पु. निटावा पहा. (क्रि० करणें; लावणें; लागणें).

**निटारिणें**—सक्रि. (महानु.) निवटणें; निडारणें. 'रेहलिया हाडांची मोळी। सुदृढावया बळी। वोढौनि शिरावळीं। निटारिजे।' –ज्ञाप्र ७५२.

**निटाळा**—पु. (कु.) अतिशय कडक उन्हाळा. –वि. कडक उन्हाळ्यांतील.

**निटिल**—न. कपाळ. [सं.]

**निठवें**—न. (कों.) अच्छेराचें माप.

**निठूर**—वि. निष्ठुर पहा.

**निडकणें**—सक्रि. (कु.) पिकून पुष्कळ दिवस होणें.

**निड(ढ-ढा)ळ-ल**—न. कपाळ; ललाट पहा. 'कांठमोरा त्याचे निडळीं रुतला।' –पंच ४.१. 'पाहें पां चंदनाचेनि अंगानिळें। शिवतिलें निंब होते जे जवळें। तींहीं निर्जिवींही देवांचीं निडळें। बैसणी केली।' –ज्ञा ९.४८४. –वि. दुर्दैवी; निराधार. 'मी पांगुळ परदेसी। निढळ पडलों एकला।' –भावि १६.५१. [सं. निटिल; प्रा. णिडाल, णडाल; सिं. निराड़]

**निढळचे, निढळींचे घामाचा**–वि. स्वकष्टार्जित व न्यायानें मिळविलेला (पैसा);

**निडांकी**—वि. डाक न दिलेलें (भांडें, दागिना इ०). [नि+डांक]

**निडार**—वि. निवडक. –न. १ कपाळ. २ (ल.) दृष्टि. 'तेणें तसें नगर तें धरितां निडारी।' –र २०. ३ पक्वदशा. **निडारणें**–सक्रि. १ परिपक्व होणें; भरपूर पीक येणें; कोंब निघणें. 'तिफणी वेगळा दाणा निडारला निघेल।' –स्वानुदिन १०.१.६०. 'निडाराचेनि कोंदाटें। मोतिये नावरतीं संपुटें। मग शिवणी जैशी उमटे। शुक्ति पल्लवांची।' –ज्ञा ६.२६६. २ थक्क होणें. ३ पाण्यानें डबडबणें. 'इतुकें बोलेना तव प्रेमाश्रु उत्तंबलोनि नयन। निडारली दृष्टि।' –स्वादि ६.२.१८. **निडारलेंपण**–न. पक्वता.

**निडी**—क्रिवि. (महानु) समीप; जवळ. 'जेवि निडी गिवीसु आलें। जननिएतें।' –ॠ ६२. **निडें**–क्रिवि. जवळ; समीप. [सं. निकट]

**निडोळ**—वि. डोळ काढून स्वच्छ केलेली (डाळ).

**निढवा**—पु. निळवा नांवाचा ऊंसाचा प्रकार.

**निढळणें**—सक्रि. (काव्य) खालीं पडणें; मोडणें; अडखळणें; सरणें; कोसळणें; कचकणें.

**निढळवाणी**—वि. निराश्रित. –कथासारा १.१५७.

**निढाळ**—वि. ढाळ किंवा उतार नसलेलें; अतिशय कमी ढाळ असलेलें. –क्रिवि. केवळ. 'तेथ चांचल्य निखळ। एकलें ठेलें निढाळ।' –ज्ञा १३.१०८.

**निढाळी**—स्त्री. निढाळ; ढाळ नसण्याची स्थिति.

**निणगा**—पु. भाताची एक जात. निनगें पहा.

**निन**—विक्रिवि. नित्य; नेहमीं; दररोज. 'सवाई साधवराव पेशवे नित मुजरा घेती।' –विज्ञावि. [सं. नित्य]

**नित–नीत**—स्त्री. नीति. [सं. नीति]

**नितकारी**—पु. (कु.) एक पिशाच्चदेवता.

**नितकोर**—पु. भाकरी, पोळी वगैरेचा आठवा भाग; चतकोरच्या अर्धा. [निम+चतकोर]

**नितंतणें**—अक्रि. नितांतणें पहा.

**नितंब**—पुअव. कुल्ले; ढुंगण; कटिपश्चाद्भाग (विशेषत: बायकांचे); कटिभाग; कमरेच्या खालचा मागचा भाग. [सं.] **नितंबिनी**–स्त्री. मोठे व सुंदर नितंब असलेली स्त्री. **नितंबु**–पु. १ खालचा भाग. २ (ल.) पाताळ लोक.

**नितरणें**—सक्रि. झिरपून, गळून, ठिपकून वाहून जाणें, निचरणें. (पाणी किंवा द्रव पदार्थ.) [हिं.]

**नितराम्**—क्रिवि. १ अतिशयीत; पराकाष्ठेचा; अट्टल; अगदीं (चोर, लुच्चा, मूर्ख) २ एकूण एक; सबंध; पूर्णपणें; सर्वस्वी. (नकार दर्शवितांना) [सं.]

**नितळ**—वि. १ स्वच्छ; शुद्ध; गाळ इ. नसलेलें (तेल, पाणी) 'कातळ फोडून नितळ पाणी। आंत बसली कमळाराणी।' २ गुळगुळीत, चकाकीत; तेजस्वी; सफाईदार. [सं. नि+तल]

**नितळ**—न. सप्त पाताळांपैकीं एक; वितल. [सं. नितल]

**नितळणें**—अक्रि. स्वच्छ आणि चकाकीत, तेजस्वी होणें. (चेहरा; डोळे) टवटवीत दिसणें (पीक, झाड झुडुप) नाहींसें होणें, निवळणें (ढग, धुकें) बरोबर, योग्य, चांगलें होणें. (मनुष्य) सक्रि. घासून साफ, चकचकीत करणें. [नितळ] **नितळणा**–पु सोनाराचें जिल्हई देण्याचें हत्यार. **नितळाई**–स्त्री. १ चकाकी; जिल्हई; चकाकीतपणा. २ पारदर्शकपणा; स्वच्छता (द्रव पदार्थांची); (गो.) नितळाय. **नितळयेल**–न. (राजा) वडे तळल्यावर कढईत राहिलेलें तेल. [नितळ+तेल]

**निताणा**—वि. (कर.) बाईलवेडा; बायकोच्या आहारीं गेलेला (मनुष्य). 'निताणा नवरा भेटल्यावर बायका डोयीजड होणारच.'

**नितांत**—वि. अत्यंत; फार; पुष्कळ. -क्रिवि. अधिकपणें; अतिशयपणानें. [सं.]

**निनांत**—पु. उत्कंठा; अधिरता; उतावळी. (क्रि० पडणें; होणें) **नितांत(द)णें**–सक्रि. उतावळी किंवा उत्सुक होणें; अधिर होणें; उत्कट, प्रबल इच्छा करणें; हापापणें; वेड घेणें; हव्यास घेणें; व्याकूळ, ग्रस्त होणें (तहान, भूक, झोंप इ, नीं) म्ह० १ (कों.) नितांतल्या बायकोला बुरांडला दादल्या. २ (व.) नितातल्या शिरी नातू दाला करी=अडला नारायण गाढवाचे पाय धरी.

**निताव**—वि. न तापलेलें (सोनें)

**निती**—नीति पहा. [सं. अप]

**नितेजणें**—सक्रि. धाक दाखविणें; रागें भरणें. 'मग लुसिफरातें नितेजुनु। बोल्ता जाहाला।' –ख्रिपु १.२.९७.

**नितोड**—वि. बिनतोड;

**नित्य**—वि. १ सतत टिकणारें; शाश्वत; नेहमींचा. २ नियमित, एकसारखा घडणारा. –क्रिवि. सतत; नेहमीं; सदां; प्रतिदिवशीं. म्ह० नित्य मरे त्यास कोण रडे. (समास) नित्य–चर्चा–जप–नैवेद्य–पूजा इ. [सं.] **नित्याखालीं पडणें–येणें**–नेहमींच्या संवयींत, अभ्यासांत, परिपाठांत–पडणें, येणें. ०**कर्म–कृत्य**–न. संध्यावंदनादि ब्राह्मणाचीं रोजचीं कामें; रोजचा ठराविक कामधंदा. ०**जागृति**–स्त्री. नेहमींचा जागरूकपणा (योग्यांचा). **नित्यता**–स्त्री. निरंतरपणा; कायमपणा. 'नित्यता ऐमेचि असोनि। ना तरी निश्चित क्षया जाउनी।' –ज्ञा २.१०४. **नित्यदान**–न. रोज द्यावयाचें दान; अशा तऱ्हेनें दिलेली देणगी. ०**नवा**–वि. १ रोजचा नवा; कोराकरकरीत; रोजच्यारोज कांहीं सांगितलें असतां तें विसरणारा; ताजा; सदां नवा. ०**नियम–नेम**–पु. १ शास्त्रामध्यें अमुक कर्म नित्यच करावें असें सांगितलें नाहीं परंतु तें नित्य केलें असतां पुण्य विशेष सांगितलें अशीं जीं गीतापाठादिक नित्य करतात तीं कर्में. २ नित्य करण्याचा आचरण्याचा नियम, परिपाठ. उदा० याचा शिव्या देण्याविषयीं नित्यनियम आहे. ०**नूतन**–वि. नित्यनवा पहा. ०**नैमित्तिक**–वि. नेहमीं आवश्यक म्हणून करावयाचें किंवा प्रसंग विशेषानें उपस्थित झालेलें (धार्मिक कृत्य, एखादें काम इ०). ०**पाठ**–पु. १ रोजचा पाठ, पठन. २ रोजचा नियम, वहिवाट. ०**पाठांतला**–वि. रोजच्या संवयीचा, परिचयाचा; शिरस्त्याचा.

**०प्रलय**–पु. १ प्रत्येक वस्तूचा क्षणोक्षणीं होणारा नाश. २ शरीरांत जशी निद्रा आल्यानें जीवास नित्य प्रलय होतो त्याचप्रमाणें चार युगांची एक चौकडी अथवा पर्याय हजार वेळां गेल्यानें सकल व्यापार ब्रह्मांडीचे बंद पडतात त्याचें नांव. **०ब्राह्मण–भट**–पु रोज जेवावयास बोलाविलेला ब्राह्मण. **०मजूर**–वि. रोजच्या मजूरीवर काम करणारा; हातावर निर्वाह करणारा. **०मुक्त**–वि. सर्व व्यापापासून मुक्त (ईश्वर); जीवन्मुक्त (माणूस). 'दोहिवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर जाणावे।' –दा ७.६.४६. **०रोज**–क्रिवि. दररोज; रोजच्यारोज. **०विधि**–पु. नित्यकर्म. **नित्यशः**–क्रिवि. नेहमीं; सदैव; सदोदित; सतत; वरचेवर. **०शंका**–वि. सदा शंका घेणारा; संशयी. **०श्राद्ध**–न. पितरांप्रीत्यर्थ रोज करावयाचें श्राद्ध. **०श्री-मंगल**–न. नेहमींची भरभराट; उत्कर्ष (मोठया लोकांसंबंधीं योजतात). **०सिद्ध**–वि. १ सदोदित; कायम टिकणारा. २ नेहमीं तयार. **नित्याक**–क्रिवि. (गो.) दररोज; नेहमीं. **नित्याचरण, नित्याचार**–नपु. नेहमींचें आचरण, वागणूक. नित्यविधि पहा. **नित्यांत, नित्यानित्य, नित्यानें**–क्रिवि. एकसारखें; सतत; प्रतिदिवशीं. **नित्यांतला**–वि. दररोजचा; नेहमींचा; अनुभवांतील; परिपाठांतील. **नित्यानंद**–वि. (काव्य) सदां आनंदी; सुखी. 'परब्रह्म तंव नित्यानंद। म्हणोनि नाहीं दुःखसंबंध।' **नित्यानित्य**–वि. १ नेहमींचा व प्रासंगिक. २ शाश्वत व अशाश्वत; कायमचा व कांहीं काळ टिकणारा. [ नित्य+अनित्य ] **०वस्तुविवेक**–पु. १ साधन चतुष्टयांतील पहिलें साधन. २ कोणती वस्तु शाश्वत व कोणती अशाश्वत या विषयींचा विचार. **नित्यावळ**–स्त्री. १ रोज जेवणाऱ्या ब्राह्मणाची पंगत. 'तुम्ही नित्यावळीस या.' २ दररोज जेवणास येण्याचें एकदांच दिलेलें आमंत्रण. (क्रि० करणें; घालणें). 'सेवक बोलती कर जोडून। नित्यावळीचा ब्राह्मण।' –रावि २७.२९. **नित्यें**–क्रिवि. नित्य अर्थ ३ पहा.

**नित्रस**—क्रिवि. त्रासाशिवाय; उपद्रव, कटकट यांच्या विरहित. [ नि+त्रास ]

**निथकर**—पु. नितकोर.

**निथणणें**—अक्रि (राजा.) रागामुळें, श्रमल्यामुळें दांत खात बोलणें; शिरा ताणून बोलणें.

**निथम**—स्त्री. (राजा.) पोटांत आमांश झाला असतां शौचाचे समयीं इंद्रिय ताणलें जाई अशी होणारी अवस्था. याचीं रूपें निथमेस, निथमेला अशीं होतात.

**निथरणें**—अक्रि. निचरणें. नितरणें पहा.

**निथळ**—वि. नितळ (–वि.) पहा. [ हिं. ] **निथळ–ळा**–पु. १ निचरा; निथळलेल्या, निथळत ठेवलेल्या पदार्थांतील द्रवांश निथळून जमलेला जलांश. २ भुरभुर पडणारा पाऊस.

**निथळणें**—अक्रि. थेंब थेंब पडणें; गळणें; ठिबकणें; थेंबाथेंबानें जलांश काढून टाकणें; ओघळणें; थिबथिबणें. 'मग वोली धोत्रीं अंगावरी। निथळत वरी घेतलीं।' –सक्रि. निचरविणें; गाळणें; जलांश काढून टाकणें.

**निथू**—पु. (गो.) थुंकी; लाळ. 'सकाळचॉ निथू केन्नांच गिळचॉ न्हय.' [ थुः ]

**निद**—स्त्री. (गो.) झोंप. [ सं. निद्रा ] **निदणें**–अक्रि. झोंप घेणें; निजणें; लवंडणें. **०सुरा-सुरिया**–वि. १ अर्धवट; निद्रेतला; झोंपेतला. निजसुरा पहा. 'जो परमात्माचि परि दुसरा। जे अहंकार निद्रा निदसुरा।' –ज्ञा ८.३५. 'जन्मा येऊनि कारे निदसुरा। जाय भेटी वरा रखुमाईच्या।' –तुगा २४७१. 'इकडे भीमकाचिये घरीं। इंद्रसेनी बरळे निदसुरी। माता दमयंती अजगरीं। गिळिली म्हणोनि।' –कथा १.१०.३८. २ खोटें; मायिक. 'सर्व सिद्धांताचिया उजारिया। सांडूनियां निदसुरिया। आपलिया हातां चोरिया। आपणचि जो।' –अमृ ५.३९. **निदसुरें**–न. अज्ञान. 'जिहीं लोकांचेनि आधारें। लौकिकेंचि व्यापारें। पण सांडिलें निदसुरें। लौकिकु हें।' –ज्ञा ५.९८. 'म्हणौनि अज्ञान अक्षरें। तुमसूं आतां निदसुरें। परी आन येकु स्फुरे इयेविषीं।' –अमृ ७.८५. [ निद्रा ] **निद्राळू**–वि. झोंपाळू; सदोदित झोंप घेणारा. **निदे(दे)लें**–वि. (काव्य) निजलेलें. 'जो निरंजनीं निदेला। तो आणिकीं नाहीं देखिला।' –अमृ ४.३३. [ निद्रा ]

**निंदक, निंदखोर**—वि. निंदा करणारा; दोषारोप करणारा; दुसऱ्याचे अवगुण सांगणारा; चहाडखोर. **निंदणें**–सक्रि. निंदा करणें; चहाडी करणें; दोष वर्णन करणें. **निंदन**–न. निंदा पहा. **निंदनीय**–वि. निंदा करण्यास योग्य; निंद्य; निंदेस पात्र. **निंदा**–स्त्री. दोषवर्णन; कुटाळी; निर्भर्त्सना; अवगुण सांगणे; शिव्या देणें; दोषारोप करणें; चहाडी. [ सं. ] **०परस्तुति–फलकस्तुति वाक्य**–उपरोधिक भाषण; व्याजोक्ति; स्तुतीचा खोटा बहाणा करून केलेली निंदा. **निंदाखोर–खाऊ**–वि. निंदक पहा. **निंदित**–वि. १ निंदा, निर्भर्त्सना केलेला; दोष दिलेला. २ शास्त्रांनीं निषिद्ध मानिलेला; असंमत. **निंदेजणें**–सक्रि. निंदा करणें. –शर (चांगदेव. पासष्टी ६५.) **निंद्य**–वि. निंदेस पात्र; निंदनीय; दूषणीय; दोषयुक्त.

**निंदण-न, निंदण-न**—न. १ पिकांतील तण काढणें; बेणणें; भांगलणें; कोळपणें. २ पिकांत उगवलेलें अडगवत; तण. [ सं. निर्दलन, नितृण ] **नि(निं)दणी**–स्त्री. भांगलणी; बेणणी; कोळपणी; तण काढणें. [ प्रा. णिंदिणी ] **नि(निं)दणें**–सक्रि. निंदनी; बेणणी करणें; कोळपणें.

**निदर्दी**—वि. १ निष्ठुर; निर्दय; अकरुण. २ बेफिकीर; निष्काळजी; बेदर्द [ नि+फा. दर्द् ]

**निदर्शन**—न. १ पाहणें; दाखविणें; नजर. २ (ल.) अनुभव; दाखला; दृष्टांत; उदाहरण. [सं.] **—ना अलंकार**—पु. (काव्य) जेथें सारख्या अर्थाच्या दोनहि वाक्यांचा अभेद वर्णिला असतो तेथें हा अलंकार होतो. उदा० 'तत्तेजें न गळे परबल तरि,अनलेंहि दुग्धसार थिजो।' —मोभीष्म १.५३. 'राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे ! दरिद्रे ! तें । पाहसि विकावया तूं कशरमौल्यें कसें दरिद्रेतें।' —मोआदि १०.१८. **निदर्शनास आणणें**—घडवून आणणें; अनुभवास आणणें; नजरेखालीं आणणें. **निदर्शनास येणें**—अनुभवास येणें; नजरेस येणें. **निदर्शनीं**—क्रिवि. अनुभवानें; परिणामीं; परीक्षेनंतर; शेवटीं. (क्रि० कळणें; समजणें). 'तूं जी गोष्ट करतोस तिचें फळ निदर्शनीं समजेल.'

**निदळ**—वि. बिनगिलाव्याची; गिलावा काढलेली; उघडी. 'निर्मळजळें भिंती धुतां। जळाची नासे निर्मलता। हात माखती धुतले म्हणतां। भिंतीही तत्त्वतां निदळ केली।' —एभा ३.२४३. [नि+दल]

**निदांक, निदुंक**—अक्रि. (गो.) झोपेंत असणें; झोप घेणें. [सं. निद्रा]

**निदाकणी**—स्त्री. एक घोडयाचा रोग. यांत घोडयाला तहान, झोंप नसते; रोडपणा येतो. —अश्वप २.१७२.

**निदाघ**—पु. १ उष्ण काळ. २ उष्णता; दाह. 'जेणें स्वप्रकाशा कांती चढे। ब्रह्मानंदाचा निदाघु मोडे।'—ज्ञा ११.२२४. ३ (ल.) चिंता; काळजी. [सं.]

**निदांती**—वि. दांते नसलेली (फणी, चाक वगैरे). [नि+दांत]

**निदान**—न. १ मूळ, बीजभूत कारण; प्रारंभींचें, आधींचें कारण. २ परिणाम; अखेर; शेवटची स्थिति, अवस्था; निरुपाय, नाइलाजाची स्थिति; निर्वाण. 'ना तरी असाध्य देखोनि व्याधि। अमृतासम दिव्य ओषधि। वैद्य सूचि निरवधि। निदानींची।' —ज्ञा २.८६. 'हे दोन रुपये निदानास कामास येतील.' ३ अगदीं वरचें किंवा अगदीं खालचें टोंक; स्थिति; अत्युच्च किंवा अति नीच परमावधि; जास्तींत जास्त कमींतकमी (रक्कम इ०). 'त्या धोतरजोडयास दाहा रुपये पडतील हें निदान सांगितलें आहे,पाहिजे तर घ्या.' ४ रोगपरीक्षा; रोग कोणता याचें अचूक ज्ञान; रोगनिरूपणविद्या. आयुर्वेदांत निदानाचीं पांच अंगें आहेत— पूर्वरूप, रूप, लक्षण, चिन्ह, अंत. 'तरी सरोगु काय जाणे। निदान रोगाचें।'—ज्ञा ११.९०. 'राजवैद्यानें राणीच्या आजाराचें निदान वर्तविलें.' ५ शेवट; समाप्ति; मरण. 'पै नित्य सेविला मी निदानीं। सेवकु होय।' —ज्ञा ८.१२३. —एभा १. २२३. [सं.] —क्रिवि. सरतेशेवटीं; अधिकांत अधिक किंवा कमींत कमी (किंमत, अटी); सर्वोपरांतिक; किमानपक्षीं. 'ह्या घोडयाला निदान शंभर रुपये घेईन.' 'हें काम तुला लोटेल तंववर तूं लोट, निदान मी आहें.' [सं.] **०चा**—वि. १ अडचणीच्या वेळेकरितां राखून ठेवलेला; ऐन प्रसंगीं उपयोगी पडणारा. 'नातरी असाध्य देखोनि व्याधी। अमृतासम दिव्य औषधि। वैद्य सूचि निरवधि। निदानींची।' —ज्ञा २.८६. (समासांत) निदानचा—सोबती-मित्र-मात्रा-चिकित्सा-उपाय-वाट इ० २ अखेरचा; शेवटचा; मरण प्रसंगींचा. 'निदानचा प्रसंग-समय-किंमत.' **निदानीं**—सरतेशेवटीं; निर्वाणीच्या प्रसंगीं; निदानपक्षीं. **०निदानची बाजू, निदानबाजू**—स्त्री. शेवटची, अखेरची स्थिति. **०पक्ष**—क्रिवि. निदान; कमींतकमी; किमानपक्षीं. शेवटीं; अखेरची गोष्ट म्हणून; अखेर. —पु. निदान अर्थ २ पहा. 'हा अगदीं निदानपक्षाचा उपयोग सांगितला.' —नि ६०. **०मत**—न. शेवटचें मत, इच्छा, मागणी (खरेदीविक्रीच्या व्यवहारांत). कमींतकमी सांगितलेली किंमत, सवाल. **०वृद्धि**—स्त्री. अतिशय जबर व्याज.

**निदारपण**—न.दरिद्रीपण; कृपणपणा. 'पूजितीं देवतें जोगावी। गुरूतें बोलें झकवी। मायबापां दावी। निदारपण।' —ज्ञा १३.७९५. [उदारच्या उलट ? सं. नि+दृ=जाणें ?]

**निदारुण**—वि. (काव्य.) अतिशय भयंकर; घनघोर; जंगली; रानटी; दारुण पहा. [सं.] —क्रिवि. (प्रां.) निक्षून; धडधडीत; रोखठोक; स्पष्टपणें; उघडउघड (सांगणें, नाकारणें इ०). [नि+दारुण]

**निदावा**—पु. एखाद्याचा ताबा, हक्क नाहींसा करणें; स्वामित्वादि संबंध तोडणें; हक्काची फारकत. 'त्याचा निदावा करून ही जमीन त्यानें घेतली.' [नि+दावा] **०पत्र, निदावेपत्र**—न. हक्क सोडल्याचा लेख; फारकत.

**निदावा**—पु. (गो.) झोंपाळूपणा; एकसारखी निद्रा घेण्याचा स्वभाव. [निद्रा]

**निदिध्यास**—पु. १ एकाग्र चिंतन; निजध्यास; चिंतन; मननाच्या पुढची पायरी; पुनःपुनः केलेला खोल विचार. 'पाठीं हतियेरां आपणयां। निदिध्यासें एक जालिया।' —ज्ञा १५.२६१. २ एखाद्या गोष्टीचा सारखा छंद, नाद. (क्रि०धरणें). [सं.]

**निदिष्ट**—वि. १ आज्ञा केलेलें; शासित. २ दाखविलेलें. [सं. निदिश्-निदिष्ट]

**निंदी**—स्त्री. (व.) १ एकतानता; नाद. 'त्याला नाहीं ऐकूं गेलें; कारण तो आपल्या निंदींत होता.' २ भोंवरा वगैरेची पूर्णगति; गिरकी. 'माझा भोंवरा निंदीवर आला आहे.' निधा २ पहा. ३ (ना.) टकळी; कटकट; एखादी वस्तु देण्याविषयीं पिच्छा पुरविणें. (क्रि० लावणें). [सं. निनाद]

**निदुधी**—वि. दूध न देणारी किंवा कमी दूध देणारी (गाय वगैरे). [नि+दूध]

**निदेश**—पु. १ निर्देश; आज्ञा; शासन; हुकूम. छत्रपति किंवा प्रतिनिधि यांच्या आज्ञापत्रांतून ' निदेश समक्ष ' असा शेरा शेवटीं मारलेला असे. २ दाखविणें; समजूत देणें. ३ धडा; शिकवण. ' ( मुनी ) हरीपदींच लोळती । निदेश चित्त घोळती । '–अकक २ मंधारा १९. [ सं. नि+दिश् ] **निदेशणें**–उक्रि. ( काव्य ) १ आज्ञा करणें; हुकूम करणें, सांगणें. २ समजाविणें; दिशा दाखविणें.

**निदैव**—न. ( काव्य ) दुर्दैव; कमनशीब; दुर्भाग्यता. ' कां निदैवाच्या घरीं । न राहे लक्ष्मी । '–ज्ञा३.१०९. 'तुझें निदैव आम्हीं कवणातें उपमावें । ' [ नि+दैव ]

**निद्रा**—स्त्री. झोंप; नीज; निजणें. [ सं. निद्रा. का. निद्दे ] **निद्राकुल-क्रांत-ग्रस्त-तुर-न्वित**-वि. झोंपेनें ग्रस्त, पीडित झालेला. **निद्राड**-वि. झोंपाळू; निद्राशील; निद्राळू. **निद्राभंग**-पु. झोंपमोड. **निद्राळू-ळू**-वि. झोंपाळू. **निद्रित-स्त-स्थ**-वि. झोंपलेला; झोंपी गेलेला.

**निध**—पु. भांडार; खजिना; निधि. ' हातीं लागला वो युगादिचा निध । '–निगा ८१. [ सं. निधि ]

**निधई-य**—स्त्री. निधाई पहा.

**निधड-डा**—वि. १ आत्मविश्वासी; निर्भय; धाडसी; धीट. २ शूर; पराक्रमी. ' निधडिया वीरां भाग्य चोखडें । '–एरुस्व ९. ६५. ' निधड वीर पडला रणीं । ' ३ समर्थ; निपुण; लायक; योग्य. ४ निःशंक. ' जयाचेनि वाक्य उजिवडे । जाहलें चित्त निधडें । ' –ज्ञा ४.१६९. [निधृष्ट; म. नि+धड] **निधडक**–क्रिवि. निर्भयपणें; धिटाईनें; बेधडक; कां कूं न करतां; बेलाशक; धडक ( क्रिवि. ) पहा.

**निधडा**—पु. १ मनाची खातरी; निश्चय; भरंवसा; नि संदेहता. ' त्यानें जिवाचा निधडा करून शिपायगिरी म्हणावी तैशी केली. '–भाब ११७. २ निश्चितपणा; खातरी; ठामपणा; अगदीं नक्की असणें. ३ सक्त नकार; नाकबुली. ( क्रि० सांगणें; देणें ). **निधड्या छातीचा**-वि. न डगमगणारा; धाडसी; मोठा पराक्रमी.

**निधणी**—स्त्री. बेणणी; निंदणी पहा.

**निधणें**—उक्रि. बेणणें; निंदणें पहा.

**निधणें**—उक्रि. ( प्रां. ) उन्हांत किंवा विस्तवानें तापविणें. –अक्रि. ताप, झळ लागणें ( शरीर, अवयव, जमीन इ०ला )- [ निधा ]

**निधन**—न. १ मरण; मृत्यु. ' मज नित्याचेनि निधनें शिणती । '–ज्ञा ९.१६६. २ कत्तल; नाश; नाहींसें होणें. [ सं. ]

**निधनी**—वि. १ दरिद्री; निर्धन. २ मालक, धनी नसलेला. [ नि+धन-धनी ] म्ह० निधन्या मन आणि निकण्या कण.

**निधय**—स्त्री. निधाई पहा.

**निधा**—पु. १ धग; आहळी ( विस्तवाची अथवा तापविलेल्या वस्तूची ). 'धायें केली रांगोळी । निधा पाताळीं उमटला।' –एरुस्व १०.७०. ' त्या शोकाचा निधा एथ पावत लागतो. ' २ धगीची, उष्णतेची जाणीव; आंच; शेक. 'निधा उमटेस्तोंव शेक. ' ३ पुष्कळ ओझें वाहून नेल्यामुळें अथवा एकाच स्थितींत पुष्कळ वेळ राहिल्यापासून येणारा सुन्नपणा. (क्रि० येणें; उमटणें; भिनणें). ४ शेत जमीनीचा वाफसा, वाफ. ' जमीनीला निधा उमटतो म्हणून हरभरा जीव धरतो.' ५ त्रास. –शर. ( विट्ठल सीतास्वयंवर ४.४९.

**निधा**—पु. १ ( प्रां. ) भोंवऱ्याचें एकाच जागीं गरगर फिरणें; ( क्रि० धरणें ); निंदी अर्थ २ पहा. निधि पहा. २ प्रतिध्वनि. ( शर. –भारा १.१८.११०. )

**निधाई-य**—स्त्री. १ आरडाओरड; गडबड; गोंगाट; गोंधळ; मोठा खटाटोप; बडेजाव; देखावा; भपका; अवडंबर. २ (ल.) मोठी कीर्ति, द्रव्य इ० मिळविणें; दिग्विजय करणें ( निंदार्थीं उपयोग). (क्रि० लावणें; पाडणें; लागणें; पडणें). ' बारा वर्षें रोजगार करून पन्नास रुपये घेऊन आले, मोठी निधाय लावली.' (अव. निधाया योजतात). –वि. धन्य; कृतकृत्य. ' जालों निधाई निधानें । लागलें अनंतगुणरत्न । '–तुगा ४१०६. [ नि+धा ]

**निधाडा**—पु. निधडा पहा.

**निधान, निधि**—नपु. १ कुबेराचा खजीना; द्रव्यसंग्रह; भांडार. हे नऊ आहेत–पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, नंद, नील, खर्व. ' त्यास नऊ निधि व अष्टमहासिद्धि अनुकूल आहेत. ' २ ( सामा. ) ठेवा; सांठा; संग्रह; भांडार. ' कीं निधान सकळ धर्मांचें प्रगटलें असे । '–ज्ञा २.१९१. ३ खनि; खाण. ४ पुरलेलें, गुप्त धन; ठेवा. ' कीं लोटले या दिवसीं । देखे निधानु जेवी ।' ५ पात्र; भाजन; आधार, आश्रयस्थान; ठिकाण. (समासांत) गुण–दया–विद्या–करुणा–पाप–निधान–विधि. ' जेथ राहोनि असती अमर । तें निधान मी । '–ज्ञा ९.२९५. 'विद्वत्ता म्हणजे सर्व गुणांचें निधान.' –नि ३९. [ सं. ] म्ह० धान्य तेथें घुशी निधान तेथें विवशी. **निधिनिक्षेप**–पु. जमीनींत पुरलेलें धन, ठेवा; भूमिगत द्रव्य. मूळचे हे दोन शब्द असून त्यांचा अर्थ निधी= खाणी, व निक्षेप=पुरलेलें द्रव्य असा आहे. ( हा जोडशब्द जुन्या सनदा-कागदपत्रांतून तृण, काष्ठ, पाषाण, निधि व निक्षेप या सर्व हक्कांसह जमीन दिल्या–विकल्याच्या खुलाशाबाबत येतो ). निधिनिक्षेपासहित म्हणजे पुरलेल्या सर्व द्रव्यासह. निक्षेप पहा. [ सं. ]

**निधाय**—निधाई पहा.

**निधारती**—स्त्रीअव. निधाई पहा. ( निंदार्थी ) प्रसिद्ध; प्रशस्त; कीर्तिमान. 'तूं निधारती झालास.' [सं. नि+धृ; निधारित]

**निधाव**—पु. निधाई पहा.

**निधावणें**—अक्रि. १ गुंगणें; झोंपी गेल्यासारखा असणें (भोंवरा). २ (ल.) गंभीर विचारांत मग्न, तल्लीन असणें; गर्क असणें. [ निधा ]

**निधि**—स्त्री. अतिशय वेगानें भ्रमण, फिरणें. 'पै भिंगोरी निधिये पडली। त गमे भूमीसी जैसी जडली।' –ज्ञा १५.१३६. निधा पहा.

**निधोट**—वि. १ (काव्य) अतिशय शुद्ध, पवित्र, स्वच्छ; धुतला तांदूळ. 'स्फटिक शिळेचें पोट। जैसें वैरागर निधोट।' २ (ल.) अतिशय दरिद्री; अनाथ; निष्कांचन. [सं. निर्धूत; म. नि+धोट=धुवत ]

**निनंगत**—क्रिवि. दूर; बाजूला; वेगळा; निराळा; एकीकडे.

**निनगें**—न. (कु.) एक प्रकारचें भात. निणगा पहा.

**निनाद**—पु. १ मोठा नाद, आवाज. 'तैसेचि देखे येरें। निनादें अति नाहिरें।' –ज्ञा १.१४६. २ पडसाद; प्रतिध्वनि. [ सं. ]

**निनावा**—पु. (कों.) दोषरहिततेविषयींची खात्री; निर्वाळा. निधडा अर्थ १ पहा. 'त्याला चाकर ठेवा त्याचा मी निनांवा देतों.

**निनांवा-व्या**—वि. बिन नांवाचा; निनांव्या; निनांवी. [ नि+नांव ]

**निनिर्णे**—सक्रि. आणणें. 'चांदिनेयाचिआं दुपाहारीं। वायां निनिर्ली बाहिरीं।' –शिशु ८३१. [ सं. निनी ]

**निन्निबाळ**—पुन. नन्नुबाळ पहा.

**निन्हव**—पु. १ अपह्नव; गुप्त ठेवणें. (प्र.) निह्नव पहा. तेराव्या वर्षी तर ज्यास क्लीब वेष धारण करून स्ववीर्याचा निन्हव करणें भाग पाडलें ... ' –नि ८७४. २ यज्ञांतील विधि; नमस्काराचा एक प्रकार. [ सं. निह्नु ]

**निपचेत-चित, निपचित**—वि. दमल्यामुळें किंवा थकल्यामुळें चेतनारहित होऊन पडलेला; निचेत; निचेष्ट. (क्रि० पडणें; निजणें; असणें). [ नि+चेतना; सं. निश्चेतन ]

**निपज**—पु. १ उपज; उत्पादन; फळ; प्राप्ति; पैदास; निघालेला माल, वस्तु. २ नफा; मिळकत. [ निपजणें ]

**निपजणें**—क्रि. १ उत्पन्न होणें; पैदा होणें; उपजणें; जन्मणें; निघणें; उद्भवणें. 'तेवीं निपजे जें जें शरीरें। तें तें खरें परब्रह्म।' –एभा २.४४१. २ निघणें; होणें; बनणें; दृष्टोत्पत्तीस येणें. 'आतां शिष्यांचें परीक्षण। निपजेल।' –विपू १.५१. 'बरासा दिसत होतास परंतु सोदा निपजलास.' [ सं. निस्+पद्; प्रा णिप्फज्ज ] **निपजविणें**–उक्रि. उत्पन्न करणें. 'पक्वान्नें निपजवूनि पाठी।' –मुआदि १.८७.

**निपजत**—वि. (कु.) निपचेत पहा.

**निपंजा-जी, निपंतु, निपंत्वंड**—निपणजा-पणजी इ० पहा.

**निपट**—विक्रिवि. १ अतिशय; पराकाष्ठेचा; पूर्णपणें; सर्वथा; निखालस; सर्वांशीं; सर्वस्वीं. 'निपट नागवा' =अजीबात नागडा 'निपट अंधळा'=बिलकूल दिसत नाहीं असा. 'निपटमूर्ख–सोदा'=अट्टल सोदा. निपट–हरामी–गुलाम इ०. 'जरि निपट दरिद्री जो न लाहेचि कांजी।' –वामन, रुक्मिणीविलास ७९. 'अहा निपट धृष्ट मी प्रभुवरासि कां लाजशी।' –केका ६. २ अगदीं; बरोबर; थेट; बिलकूल; खरोखर. 'परी निपट निघेना त्या पुढें बोल कांहीं।' –सारुह ५.३९. 'त्याचें आयुष्य निपटचि थोडें।' –दा १५.८.१. 'जोडा स्वर्ग, स्वर्गाहूनि निपट लाभ भूमिचा थोडा।'–मोभीष्म ९.१३. [प्रा. णिप्पट्ट; हिं. निपट; तुल० सं. निःस्पष्ट–निप्पट–निपट–भाअ१८३४.निपत् ] **०निरंजन**–वि. १ पूर्णपणें पवित्र, अनीति व माया यांपासून अलिप्त असा ज्ञानी व साधुवृत्ति पुरुष. २ (ल.) पक्का सोदा; अट्टल लुच्चा. ३ दिवाळखोर; दरिद्री. ४ फटिंग; उपटसुंभ (मित्र, नातेवाईक, स्त्री, मुलेंबाळें इ० पासून अलिप्त); कोणत्याहि प्रकारचें बंधन नसलेला. [निपट=पूर्ण, सर्वस्वीं+निरंजन=विरक्त, साधु ] **०पटु**–वि. निर्लज्ज; निलाजरा. 'कैसा निपटपटु जाहलासी कान्हयारे।' –राला ५०.

**निपटणा-णें**—विक्रिवि. १ (काव्य.) निवळ; बरोबर; नेमका; योग्य; केवळ. २ निःशेष; पूर्णपणें; सर्वथा. 'आतां यावरी जें बोलणें। तें येणेंचि बोलें शहाणें। जें मौनाचेंही निपटणें। पिऊनि गेलें।' –अमृ ५.५३. [ निपट ]

**निपटणी**—स्त्री. १ खरडणें; घासून, पुसून काढणें; धुणें. २ आटपणें; संपविणें. [ निपटणें ]

**निपटणें**—सक्रि. १ खरडून काढणें; (हातानें किंवा बोटांनीं द्रवपदार्थ) पुसणें; धुणें; घासणें किंवा पुसुन काढणें; जमीन इ० वरून ओलसर किंवा पातळ पदार्थ निःशेष होईल असा हातानें काढणें. 'हें शेण निपटून भर.' २ निपटून टाकणें; किंवा उपहास करून गप बसविणें, निरुत्तर करणें. ३ शिल्लक राहिलेलें काम वगैरे उरकून टाकणें, आटोपणें; समाप्त करणें; निरानिपटा करणें; संपविणें. ४ (ल.) कमी होणें; उतार पडणें; निघून जाणें (ताप, आजार). ५ पुसणें; स्वच्छ करणें. 'हात निपटूनीं मेदिनी–। वरी अंग घाली।' –तुगा १५९. ६ नाहींसे करणें; झाडणें. 'आतां निपटुनि राज्यस्त्रीजीवितपुत्रकामना सोडा।' –मोभीष्म ९.१३. [ निपट. हिं. निपटना ]

**निपटणें**—न. शेवटचें मूल. 'मातेसि आवडे निपटणें। तेवीं उद्धव वृद्धपणींचें तान्हें।' –एभा २८.६९९.

**निपटार-रा**—वि. (निपटलेला) १ अप्रयोजक; निरुपयोगी. २ निर्लज्ज. ३ हीन; निकृष्ट; नीच. 'त्याचें जिणें कुत्र्याहून निपटार आहे.' ४ दुर्गुणी; खराब; कवडीमोल; कस्पटाप्रमाणें मानलेला; निवळ खरवड; गांवची खरूज, घाण. ५ निस्तेज; तेजोहीन. 'आतां हें त्याहूनि निपटारें जाहलें। निवटीं आयितें रण पडिलें। घेई यश रिपु जिंतिलें। एकलेंनि अर्जुनें।' -ज्ञा ११. ४६०. [ निपटणें; हिं. ]

**निपटाशि(वि)पटा, निपटीशि(चि)पटी**—पुस्त्री. १ खरवड; खरपुडया; उरलेंसुरलें अन्न; ताट निपटून शिपटून घेतलेला शेवटचा घांस (लहान मुलांस भरवितांना म्हणतात). (क्रि० करणें). २ जेवण्याचें ताट चाटूनपुसून साफ करणें. ३ ( क्र. ) निरानिपटा पहा.

**निपटून**—क्रिवि. झाडून; साफ; समूळ; लख्ख. 'जें निपटूनि कर्म सांडिजे। तें सांडणें संन्यासु म्हणिजे।' -ज्ञा १८.९२. 'रक्षी साधूचि येतां शरण निपटुनी त्यागितां उद्धतत्त्व।' -मोअंबरीष (नवनीत पृ. ३६०). **निपटूनशिपटून काढणें-घेणें-पुसणें-भरणें-खाणें**-खरडून, धुवून, घासून स्वच्छ, साफ करणें, खाणें. 'मांजरानें भांडयांतील दूध निपटून खाल्लें.' **निपटून शिपटून जेवणें**-( ताटांत वाढलेलें ) चाटून पुसुन खाणें.

**निपटें**—न. अर्धें चिपटें; कोळवें; अदपावाचें माप; एकअष्टमांश शेर. एक कैली माप.

**निपठन**—न. समग्र, आस्थेनें वाचणें; चांगलें पठण करणें. [सं. ] **निपठित**-वि. पूर्णपणें, आस्थेनें वाचलेलें; चांगलें पढलेलें.

**निपणजा**—पु. पणजाचा बाप; आजाचा आजा. [ नि= अधिक, विशेष+पणजा, पणजानंतरची पिढी ] **निपणजी**-स्त्री. पणजा-पणजीची आई; आजा-आजीची आजी. [ नि+ पणजी ] **निपणजा(जू-उ्त्र)ळ**-न. निपणजाचें घर. **निपणतू**-पु. नातवाचा, नातीचा नातू. [ नि+पणतू ] **निपणत्वंड**-न. नातवंडाचें नातवंड.

**निपत(ना)ळा**—पु. निथळा; पातळ पदार्थाच्या तळाला किंवा बुडीं जमलेला भाग; निपटून काढलेला पातळ द्रव्याचा अंश. [ सं. नीप=खालचा, तळचा+तळ किंवा निपटणें+तळ ]

**निपत(ता)ळा**—वि. १ अपमान पावलेला; फजीत झालेला. २ दुसऱ्यापासून पैसा घेतल्यामुळें ओशाळा झालेला. ३ लिप्ताळाबद्दल चुकीनें उपयोग; गुन्ह्यांत सांपडलेला.

**निपनवसा**—पु. ( महानु. ) शहाणपणा. 'मग बोलती निपनवसां। आणआणूं।' -शिशु ८१. [ निपुण+वसा ]

**निपर**—न. ( गो. ) लहान कांकडी किंवा दोडकें.

**निपरजन**—वि. ( राजा. ) निपचेत पहा. ( क्रि० पडणें; असणें; निजणें ).

**निःपरंवसा**—क्रिवि. अविचारानें; बेछूटपणें. 'कोणी गे निःपरंवसा। उघाइली वसंताची दिशा।' -शिशु ८३६. [ ? निः= नाहीं+परवश=परतंत्र ]

**निपराद-ध-धी**—वि. १ दुष्ट; नीच. -एभा ३.४३१. 'बाळ बापा म्हणे काका। तरी कां निपराध पारिखा।' -तुगा ३२४८. २ निरुपयोगी; व्यर्थ. 'रानीं वसती औषधी। तरि कां म्हणाव्या निपराधी।' -तुगा ३५३२. [ ? नि+अपराध ]

**निपराळ**—वि. रुक्ष; शुष्क; कोरडी; पाणी न धरणारी ( जमीन, माती ). [ ( निपळ+आर प्रत्यय ) वर्णव्यत्यास ]

**निपरूस**—वि. मसालेदार; चवदार; रुचकर; स्वादिष्ट; खमंग.

**निपसणें**—सक्रि. १ उपसणें; बाहेर काढणें ( म्यानांतून तलवार वगैरे ). २ उपटणें ( केंस, पंख इ० ). 'एक निपसितो दाढीमिशा।' -भफला २८. ३ ( सामा. ) खेंचून, ओढून बाहेर काढणें.

**निपळ**—स्त्री, १ कोरडी, सुकी, रुक्ष जमीन; नेहमीं कोरडी राहणारी जमीन; पाणी ठरूं न देणारी किंवा विन दलदलीची जमीन. २ कोरडें ठिकाण, जागा. [सं. निप्लव] **निपळ, निपळवट**-वि. पाणी न धरणारी; रुक्ष; कोरडी ( जमीन ). निपराळ पहा.

**निःपक्षपात**—निष्पक्षपात पहा.

**निपाडसा**—वि. १ मागलें; तिसऱ्या वेताचें, विणीचें ( वासरूं ). तान्हा, पाडसा व निपाडसा अशीं तीन वेतें. तान्हा= थान पिणारें. पाडसा=थानावेगळा; पण लहान. निपाडसा= पाडसाहून मोठें; त्यापूर्वीचें वेत. २ तिवेती; तीन वेळां व्यालेली ( गाय, म्हैस, मेंढी ). [ नि+पाडसा ]

**निपाणकाठी**—वि. लुगडयाचा, साडीचा एक प्रकार; पेठ. -खरादे ३४. [ निपाणी=एक गांव+काठ ]

**निपाणी**—वि. ( निपाणी गांवचा ) १ सर्वसाधारण ओढण्याला मध्यम अशा तंबाखूचा एक प्रकार. २ चपलांची एक जात. [ निपाणी गांव ]

**निपाणी**—स्त्री. शेराप्रमाणें असणारें एक झाड. हीं झाडें खानदेशांत विशेष आहेत. याला गेंदासारखीं फुलें येतात व बीं कांद्यासारखें असतें. -वगु ४.४९.

**निपाणी**—स्त्री. १ निर्जल; अपुऱ्या पाण्याच्या पुरवठ्याचा ( देश, गांव, स्थान ). २ विहीर, पाटबंधारा इ०च्या पाण्याची जरूरच नसलेला; एकदाच पावसानें भिजलेल्या जमीनीच्या ओलाव्यानें वर वाढणारा ( ऊंस इ० ). ३ पाणी न घातलेलें, मिसळलेलें; निर्मेळ ( दूध, दारू इ० ) [ नि+पाणी ] **निपाण्याचा**-वि. पाणी न लागणारा; फक्त जमीनीच्या ओलाव्यानें पोसलेला ( वृक्ष इ० ).

**निपात**—पु. १ पडणें; पतन ( समासांत रक्त, दुग्ध, शस्त्र, निपात ). २ मृत्यु; मरण; मरणें. ' कीं तूं मरूं इच्छिसि तो निपात '–वामन, नृसिंहदर्पण ९३. ३ ( व्या. ) नियमबाह्य; अपवाद; नियमानें सिद्ध न झालेला शब्द. ४ अव्यय. [ सं. ]

**निःपात**—पु. संपूर्ण नाश; नायनाट; पूर्ण मोड–क्षय–चुराडा; मारणें, खाणें इ० कांनीं निःशेष होण्याजोगा नाश ( सामान्य वस्तूंचा ). [ सं. निपात ] **निःपातणें**–उक्रि. ( काव्य ) नाश करणें; कत्तल करणें; निर्दालन करणें. ' दानवकुल निःपातिलें. ' [ निपात ]

**निपातणें**—अक्रि. मरून पडणें; मरणें ( विशेषतः ठार मारलें जाऊन ). [ सं. निपातन ]

**निपातन**—न. १ ( व्या. ) नियमबाह्य रचना; अपवाद; निपात. २ खालीं टाकणें; फेकणें; पाडणें. ३ ठार मारणें; चोप देणें; बडविणे. [ सं. ]

**निपातित**—वि. १ नियमाला अपवाद केलेलें; नियमबाह्य; अनियमित. २ खालीं फेकलेलें; पाडलेलें. ३ ठार केलेलें; मारलेलें. [ सं. ]

**निपाल**—वि रुक्ष; कोरडी; शुष्क; जलरहित (जागा, जमीन). निपळ पहा. ' निपाल जागा स्वच्छ सभोंवती सपाट पटांगणें। ' –प्रला १५४. [ निपाळ ]

**निपालवाचा**—वि. ( राजा. ) मागच्या पालवीचा; अखेरच्या वाढीचा; शेवटल्या बाराचा (भोपळा, वांगें इ० भाजीपाला). ' वांग्यास पाणी न मिळतां निपालवाचीं वांगीं लागूं लागलीं. ' [ नि+पालव ]

**निपुटारे**—वि. ( महानु. ) निकृष्ट प्रतीचें; हलकें; सानें. निपटारा, निपोटारा पहा.

**निपुटी–ठी**—वि. पूट न दिलेलें; पुटावांचून तयार केलेलें ( औषध इ० ). [ नि+पुट ]

**निपुण**—वि. निष्णात; कुशल; वाकबगार; तरबेज. [ सं. ] **०पणा**–पु. निपुणता; बारकाई; चतुराई. ' नाना प्रमेयांची परी। निपुणपणें पाहतां कुसरी। ' –ज्ञा १.८.

**निपुत्र–पुत्री, निपु(त्रि)त्रीक**—वि. पुत्रहीन; ज्यास पुत्र नाहीं असा; मुलगा नसलेला. ' निपुत्रिकाचें पहावें न वदन। ' –शिली १४.१६४. [ नि=अभाव+पुत्र ]

**निपुरवटा–ठा**—पु. अपुरेपणा; कमतरता; उणीव; पुरवठा नसणें. [ नि+पुरवठा ]

**निपूटशिपूट**—नस्त्री. निपटीशिप्टी. ' निपूटशिपूट घेई तो आपले आजोळा जाई. '

**निपूर**—स्त्री. अपुरेपणा; कमतरता; उणीव; निपुरवठा. नपूर पहा. [ नि+पुरणें ]

**निपोटारा**—वि. (राजा.) निपटारा पहा. हीन; कमी प्रतीचें. ' तयाहि निपोटारे। काई इश्वरस्मरण। ' –भाए ४८६.

**निपोटी**—वि. १ जींत स्वतःच्या पगारांतून, मजूरीच्या पैशांतून नोकराचाकरास आपला उदरनिर्वाह करावा लागतो अशी, जेऊनखाऊन नसणारी, नक्त पगारी ( नोकरी ). याच्या उलट सपोटी–म्हणजे मजूरी मिळून रोजचें जेवणहि मिळणारी. **निपोटी रुपये**–पुअव. (राजा.) ज्या पगारांत पोटगीखर्चाचा समावेश केला जात नाहीं म्हणजे पगाराखेरीज रोजचा पोटगीखर्च निराळा मिळूं शकतो अशी मजूरी, पगार. [ नि+पोट ]

**निपोताशांत, निपोतशांति, निपुताशांति–शांत**—स्त्री. १ कुलाचें, वंशाचें, जातीचें निर्मूलन. २ (व्यापक) राज्याचा उच्छेद, लय; जंगलाचा किंवा झाडांच्या लागवडीचा नाश, फन्ना; पूर्णनाश. [ नि=नाहीं+पोत=पुत्र+शांति=विश्रांति, स्तब्धता ]

**निप्राण**—वि. अगदीं थकलेला भागलेला; पराकाष्ठेचा अशक्त झालेला; जवळ जवळ निर्जीव झालेला. [ सं. निष्प्राण ]

**निप्राळ**—रुक्ष, शुष्क. निपराळ पहा.

**निप्रूस**—वि. चवदार. निपरूस पहा.

**निफज**—विक्रिवि. ( महानु. ) स्पष्ट. ' म्हणौनि प्रपंच समूळ सहज। नाशिवंत सकारण सजीव। याचें मूळ स्वरूप निफज। सांगो आता। ' –ज्ञाप्र ५७५.

**निफज**—निपज पहा. **निफजा आणणें**–घडविणें; उत्पन्न करणें. ' आगीचें काज पाणी। निफजा जरी आणी। अज्ञान इया वाहणी। मानूं तरी तें। ' –अमृ ७.९७.

**निफजणें**—क्रि. निपजणें; उत्पन्न होणें; तयार होणें. ' तैसीं शुभाशुभें कर्मे। जियें निफजती प्रकृतिधर्में। ' –ज्ञा ३.१७८.

**निफळ**—वि. फलरहित (विशेषतः लाक्षणिक अर्थानें उपयोग). [ सं. निष्फळ अप. ]

**निफाक**—पु. वितुष्ट; वैर. 'नबाब व श्रीमंत उभयतांत निफाक येणें ठीक नाहीं. ' –पया १०९. [ अर. निफाक् ]

**निफांशी**—वि. फांसा किंवा मुदण नसलेली; बिन फांशाची ( पुतळी इ० ). [ नि+फांसा ]

**निफाळा**—पु. नाश; चुरा. ' भिंगाचिया चडळा। पदराचा पुंज वेगळा। करितां जैसा निफाळा। अंगाचा होय। ' –अमृ ५.५९. [ सं. निष्फालन; नि+फाळणें=फाडणें ]

**निफाळी**—वि. फाळ नसलेला; फाळरहित ( नांगर ). [नि+फाळ]

**निंब**—पु. १ लिंबाचें झाड. याच्या तीन जाती आहेत–कडीनिंब, कडूनिंब किंवा बाळंतनिंब व बकाणनिंब. २ कडुलिंब. ' रोग जाय दुधेसाखरे। तरी निंब कां पियावा। ' –ज्ञा ४.२२३. –वि. कडु. ' तूं आत्मज्ञ म्हणसि मम एक मधुर एक निंब विषयज्ञ। '

–मोअनु ४.१२. [सं. निंब; हिं. नीम] (वाप्र.) **०नेसणें**–(बायकी) नवसाचा एक प्रकार. निंबाचे ढाळे कमरेभोंवतीं बांधून अंग झाकणें. नवस फेडण्यासाठीं बायका आपली नम्रता निंबाच्या टाहळयानीं झांकून नवस केलेल्या देवास जातात. तेथें त्यांना आप्तमित्र नेसावयास वस्त्रें देतात. निंबसाडा पहा. **०लावणें–ठेवणें–देणें**–कलंक, कालिमा, डाग आणणें, लावणें; दोष देणें; तुच्छ करणें. **०लागणें**–येणें–कालिमा इ० लागणें.

**निबडणें**—क्रि. मोकळा नसणें; दाटणें (स्वर). 'असो समागमें आलाप केले। तन्हि त्या गोपींचे स्वर निबडले।' –रास ५.२०६. [निबिड]

**निबमा**—पु. (व.) आमंत्रण. [निमंत्रण]

**निबंद–ध**—वि. (अशिष्ट) वचक, दाब नसलेला; मोकाट; स्वैर; अव्यवस्थित. [सं. निर्बंध अप.]

**निबंध**—पु. १ प्रबंध; नियमबद्ध रचना असणारा लेख: लेखी विषयविवेचन; लेख. 'या विषयावर आम्हीं वेळोवेळीं निबंध लिहिले आहेत.' –टिले १.३२१. २ निबंधात्मक ग्रंथ; मोठा लेख; प्रबंध. ३ शेटयेपगा; महाजनकी वगैरे वतन–वृत्ति. ४ कर; जकात; दस्त. –वि. नीट; पक्का बांधलेला; जडलेला; निबद्ध. 'हांसोनि बोलिला वीर गदू। तुझा जरेनें सांधिला सांधू। साधा न बैसेचि निबंधू। फाडुनि शुद्ध करूं आलों।' –एरुस्व ११.३८. [सं. नि+बन्ध्=बांधणें] **०कातळ**–पु. निवळ खडक; खडकाळपणा.

**निबद्ध**—वि. घट्ट बांधलेलें; जखडलेलें; प्रतिबंध केलेलें: निग्रहीत; निबंध; निर्बंध. [सं.] **०गान**–न. (संगीत) ज्या गायनांत चिजा रागांत सताल म्हटल्या जातात तें गायन.

**नि(निं)बर**—न. १ ऊन; सुर्याची उष्णता; ताप. २ (कों.) फुपाटा; कढत राख. ३ स्वच्छ आभाळ; ढग नाहींत अशी स्थिति. [सं. निरभ्र? निर्भर?]

**निबर**—वि. १ जुना आणि चिवट; कोरडा आणि ताठ; जून (झाड, फळ इ०). २ कठिण; मजबूत; घट्ट; टणक (दगड किंवा सर्वसाधारण कोणताहि पदार्थ). 'विघ्न देखोनियां थोर। होय मत्स्य का सुकर। नातरी पाठी करोनि निबर। रूप धरी कमठाचें।' –एरुस्व २.१३. ३ शिळें (अंडें). ४ जुना व खराब झालेला (पदार्थ); वृद्ध; म्हातारा. 'बांधा नंदा निबरा, गोपानीं मानिला सुमंदानिं बरा।' –मोकृष्ण ४४.१९. ५ प्रखर, तीव्र. 'जयाचा रश्मिपुंजु निबरु। होता स्वरूप उखरीं स्थिरु।' –ज्ञा १६.९. [सं. निर्भर–निब्भर–निब्बर] **निबरट–ड**–वि. १ जून; चिवट; जुना; टणक; कोरडा आणि कडक; वृद्धकळा आलेला; घट्ट; मजबूत बांध्याचा इ० (वस्तु, मनुष्य, जनावर). निबर पहा. 'तेआंहीं पासव मज निबरडा। उपमा वज्र कठीणा।' –ऋ ९९. २ जरा निबर, टणक. **०ढोण–धोंड**–वि. अतिशय टणक, कठिण (दगड, फळ, फोड, गळूं, पोट, भाकरी इ०). [निबर+ढोण] **०पणा**–पु. कठिणपणा. 'अथवा स्वाधिकारु बुझे। आपलें विहितही सुजे। परी करि तया उभजे। निबरपणा।' –ज्ञा १८.१८४. **०वय**–न. उतारवय. 'झाला हा निबरवया।' –मोअश्व २.८७.

**निंबरणें**—उक्रि. शिजून तयार झालेल्या भाताची वाफ आंतल्या आंत निवावी म्हणून तो निखाऱ्यावर ठेवणें. [निंबर]

**निबराष्ट–ट्ट**—न. मोकळी, उघडी, जीवर ऊन पडतें अशी जागा, प्रदेश; उन्हाची, ऊन पडत असलेली जागा. [निबर+ट प्रत्यय]

**निंबलोण**—न. दृष्ट काढण्यासाठीं घ्यावयाचे कडू निंबाचीं पानें, मीठ, मोहरी इ०पदार्थ. –एभा २७५२. 'पाहातां रूपाचें बरवेंपण। कोटी मदनाचें निंबलोण। मी वोवाळीन आपुले प्राण। दृष्टी घाली सुंदरा।' –वेसीस्व १.९३. **०करणें**–निंबलोणाचे पदार्थ भोंवतीं ओंवाळणें; दृष्ट काढणें. (क्रि० उतरणें; करणें). 'आपलें ऐसें म्हणावें करितों जीवें निंबलोण।' –तुगा७३४. 'रामदास म्हणे झणी दृष्टि लागे। जीवें निंवलोण करी।' –दावि ७.२.९. [निंब+लवण]

**निंबवड्या**—स्त्रीअव. (कों.) एक प्रकारची भाकरी किंवा घावन. 'खळांत (अंगणांत) मुहुर्तें मेढीजवळ निंबवड्या फिरवितात' –मसाप ४.२५६.

**निंबसाडा**—पु. एक कुळधर्म. साताऱ्याकडे बऱ्याचशा देशस्थ घराण्यांत माघ शुद्ध पौर्णिमेस हा कुलाचार असतो. त्या वेळीं पुरुषांनीं देवीची पूजा केल्यावर तांब्याचा कलश गव्हावर मांडतात, त्यांत पाणी घालून विडयाचीं पानें ठेवून त्यांत देवीची प्रतिमा ठेवतात, जी घरांत सर्वांत वडील सुवासिनी स्त्री असते ती पहिलें नेसलेलें वस्त्र सोडून ठेवून निंबाच्या पानांची साडी नेसते व हातांत दिवटी घेऊन त्या कलशास तीन प्रदक्षिणा करिते. नंतर तिला घरांतील बायका नवें लुगडें आणि चोळी देतात. –मसाप १.३.२५. निंब नेसणें पहा.

**निबळ–ळी**—वि. १ दुबळा; अशक्त; बलहीन; कमकुवत; नाताकद. 'सर्वांगें होति निबळें। विकळपणें।' –भाए २०५. २ सौम्य; मऊ. 'आकारें न होती उगळें स्पर्शीं अति निबळें।' –माज्ञा १७.१२७. [सं. निर्बल]

**निंग्रा**—वि. १ (वय झालें असून) अविवाहित; लग्न न झालेला (वयांत आलेला प्रौढ मनुष्य). २ (कु.) देवकार्यास जेवावयास बोलावलेला लग्न न झालेला मुलगा. [हिं. अनब्याहा]

**निबाकी**—स्त्री. देण्याघेण्याची बाकी शिल्लक न राहणें; बाकी पूज्य होणें; हिशेब पुरा होणें; बाकी नसण्याची स्थिति; निःशेषता. –वि. बाकी नसलेला; देण्याघेण्याच्या शिलकी रकमेपासून मुक्त असलेला; बेबाक. [नि+बाकी]

**निंबाडी**—स्त्री. (व.) निंब झाडाची राई. ' निंबाडींत बाजार भरतो. '

**निबापा**—वि. ज्याचा बाप माहीत नाहीं, अज्ञात आहे असा; सांपडलेला; पोरका (मुलगा). [ नि+बाप ]

**नि(निं)बार**—न. ( कु. बे. कों. ) ऊन; निंबर पहा.

**निंबारा**—पु. एक झाड; निंब लिंबारा पहा. याच्या लांकडाचा इमारतीस उपयोग होतो. हें लांकूड सरळ व लांब असल्यामुळें त्याचे वासे चांगले होतात. [ निंब ]

**निबिड**—न. अरण्य; जंगल. ' जैसा वाकडी घाली घन। तैसा निबिड माजलें।'—मुविराट ६.१०९. —वि. १ दाट; गडद (अंधकार). २ गर्द; दाट (झाडी, बन). ३ मोठा; जोराचा (पाऊस). ४ घनदाट ( मेघ ). ' जैसा प्रळयांबूचा उभडु। बुडवूनि विश्वाचा पवाडु । होय आपणपें निबिडु । आपणचि।'—ज्ञा १६.१३८. ५ गाढ ( झोंप ). ' विकळ निबिड निद्रे कैकया मोहखाणी।' —मुराबाल ५४. ६ लीन; स्निग्ध. ' निर्गुणस्वरूपीं जाला निबिड। ' —दावि २७४. [ सं. ]

**निर्बी**—न. पक्कें नास्तित्व; पूर्ण निर्मूलन; उच्छेद; पूर्णपणें नाहींसें होणें; क्षय होणें; बीजहि न राही असा अभाव. [ नि+बी ]

**निंबी, निंबुणी, निंबूण**—स्त्री. निंबाचें झाड. ( गो. ) निंबीण. [ सं. निंब ]

**निंबु(बू)गी**—स्त्री. चिंबुणी; चिंबवणी; उसाच्या लागणीनंतर सात दिवसांनीं उसास पाणी देतात तें. —कृषि ४५५. याच्या उलट अंबवणी ( पहा ).

**निंबुरडा**—वि. काळसर, हिरव्या रंगाचा. [ निंबूर+डा प्रत्यय]

**निंबुळी**—स्त्री. निंबोळी पहा.

**निंबू**—न. लिंबू; लिंबाच्या झाडाचें फळ. ( सामसांत ) इडनिंबू—साखरनिंबू—कागदीनिंबू. [ सं. निंबू-क ] ०**तोंडावर ठरत नसणें**—गोंडस चेहऱ्यास व तसेंच गुटगुटीत, सतेज घोडा, गाय इ०बद्दलहि म्हणतात.

**निंबूर**—पु. १ पक्व होत आलेलीं बाजारीचीं कणसें; त्यांची ती स्थिति; पक्वावस्था. ' बाजऱ्या चिकें बोळल्या निंबूर झाला. ' 'बाजऱ्या निंबुरावर आल्या. ' २ बाजरीचे भाजलेले कोवळे दाणे; बाजरीचा हुरडा. ' निंबूर हुरडा घेउनि आला। तो ह्या माणकोजी बोधला। ' —भूपाळी [ निंबर=ऊन, ताप ]

**निंबें**—न अव. लिंबें. लिंबाचें लोणचें. ' मग सोवळें विटाळोनी । आलें निंबें घालीं जननी । गौळी भुलले अहंममतेकरूनी। नेणती करणी हरीची । '—ह ९.२५६. [ निंबू ]

**निंबेपण**—न. अनूढावस्था; ब्रह्मचर्य; निंबा पहा.

**निंबोटी**—स्त्री. १ अर्धें लिंबू कापून त्यावर साखर, सैंधव वगैरे घालून विस्तवावर खदखदून तयार केलेलें औषध; हें ओकारी थांबण्यासाठीं देतात. २ अर्धें निंबू. [ निंबू+वाटी ]

**निंबोणी**—स्त्री. १ कडु निंबाचें झाड; निंबूण. ' चांदोबा चांदोबा भागलास का ! । निंबोणीच्या झाडाखालीं लपलास का ? ' २ कडी किंवा कडु निंबाच्या झाडाचें बीं; निंबोळी. [ सं. निंबूक ]

**निबोधन**—न. स्पष्ट, खातरीनें, निश्चितपणें, खरेंखुरें सांगणें. [ सं. ]

**निंबोर**—पु. निंबूर पहा.

**निबोली**—वि. करार किंवा बोली करून निश्चित किंवा कायम न ठरविलेली ( किंमत, दर, अटी, शर्ते इ० ). [ नि=नाहीं+बोली ]

**निंबोळण**—न. (खि.) ओंवाळणी; निंबलोण पहा. —खिपु.

**निंबोळी**—स्त्री. १ निंबाच्या झाडाचें बीं; निंबोणी. ' निंब निंबोळियां मोडोनि आला । तरी तो काउळियांसीचि सुकाळु जाहला । '—ज्ञा ९.४३८. ' निंबोळिया भरें निंब बहरला । सुकाळ जाहला वायसांसीं । '—ब १५०. म्ह० निंबाला आल्या निंबोळ्या आणि कावळ्याला आल्या गळचोट्या. २ पिवळा रंग ( निंबाच्या बियांप्रमाणें, पागोट्याचा वगैरे). —मराठी ३ रें पुस्तक पृ. ६३. (१८७३) ३ स्त्रियांचा सोन्याचा एक दागिना. ४ ( पिंपळीच्या शेंगे प्रमाणें ) जानव्यास दिलेला पीळ किंवा फांस. —वि. निंबोळीच्या रंगाचा; पिवळा. 'अंबराचें चूर्ण दारूमध्यें मिश्रण केल्यास त्यापासुन निंबोळी रंग उत्पन्न होतो. ' —अग्नि १४. [ सं. निंबगुलि, निंबगुलिका—निंबउलिआ—निंबोळ्या—भाअ १८३२ ]

**निब्बर, निब्बराष्ट-ष्ट्र, निब्राष्ट-ष्ट**—निबर, निबराष्ट इ० पहा.

**निभगणें**—अक्रि. तडकणें; भंग पावणें; तडा जाणें ( मातीच्या भांड्यास ). [ नि+सं. भंज्-भग्न ]

**निभणें**—अक्रि. १ ज्या संकटापासुन नाश होण्याची भीति आहे त्यांतून पार पडणें; निभावणें; शेवटपर्यंत चांगल्या प्रकारें टिकणें; तगणें; निभाव लागणें (धोका, अडचण, चाकरी यांमध्यें). ' हें लांकूड तासतेवेळेस मोडेल असें वाटलें परंतु निभलें. ' २ चांगला वाकबगार, माहितगार होणें ( टिकाव धरल्यामुळें ). ' हा लिहिण्याचे कामांत निभला. ' ३ सिद्धीस जाणें; यशस्वी होणें; पार पडणें; शेवटपर्यंत उत्कर्ष होत जाणें. ' हें काम त्याचे हातून निभलें. ' ४ बचावणें; जगणें; वांचणें. ' पावे न कधीं तसाचि शिशु हा निभला। ' —मोकृष्ण ७.३५. [ सं. निर्वहन; हिं. निभना ]

**निभयी**—वि.क्रिवि. पूर्ण; निखालस; सर्वस्वीं; एकंदरीत; पूर्णपणें; निखालसपणें. जसें:—निभयी—वेडा—सोदा; निभयी पाऊस गेला व निभयी पीक बुडालें; निभयी विहीर आटली—दाणा सरला. इ० निभयी याचें अगदीं या शब्दाशीं साम्य आहे. [ नि+भय ]

**निभर**—न. (राजा.) ऊन; ताप. निब्र पहा. **निभरटाण**–न. वाळण्याकरितां उन्हांत घातलेल्या वस्तूंपासून उत्पन्न होणारा, येणारा वास. [ निभर+घ्राण ]

**निभाती**—वि. ज्यांत भाताचे दाणे, भातगोटे नाहींत असे (तांदूळ, करड इ०). [ नि+भात ]

**निभाव**—पु यश; सुखकर प्रगति आणि शेवट; निभावणी; टिकाव; शेवटपर्यंत चांगल्या तऱ्हेनें टिकून राहणें (इसम, वस्तु); निभलेपणा. 'या कामांत माझा निभाव होईल.' [ सं. निर्वाह ]

**निभावणी, निभावणूक**—स्त्री. १ टिकाव धरणें; तगणें; पार पडणें; निभाव; संकटांतून पार पडणें; बचाव; निर्वाह **निभावणी जामीन**–पु. इनाम दिलेल्या जमिनीची लागवड योग्य प्रकारें केली जाईल म्हणून दिलेली हमी, जामीन. **निभावणी सूट**–स्त्री. १ खेडें किंवा जिल्हा उत्कर्षाला, भरभराटीला यावा म्हणून जमाबंदींतून दिलेली पैशाची सूट. २ अडचणीच्या प्रसंगीं (प्रजेला) दिलेली सूट; प्रसंगांतून निभावलें जावें म्हणून दिलेली सूट. [ निभाविणें ]

**निभावणीचें खत**—न. हमी पत्र; मैत्री राखण्यासाठीं केलेला करार. –पया २६४.

**निभावणें**—अक्रि. निभणें पहा. [ सं. निर्वाहन; हिं निभाना; सिं. निभाइणु; पं. निभाउण ]

**निभाविणें**—उक्रि. १ यशस्वी रीतीनें पार पडणें; सुरक्षित व चांगल्या प्रकारें तडीस नेणें, पार पडणें (संकट, अडचण, परीक्षा वगैरेंतून); उरकणें; पूर्णतेस नेणें; व्यवस्थित चालविणें; सिद्धीस नेणें. [ निभवणें ]

**निभीत**—वि. भीतिरहित; निर्भय. 'भूतांविषईं सुविचाराचे योगानें निभीत न होतां जो केवळ धट्टाईनें भुताशीं सामना करील त्याची...फजीती होण्याचा संभव आहे.' –नि २१८. [ नि+भीति ]

**निभ्रांत**—स्त्री. क्रिविवि. (प्र.) निर्भ्रांत पहा. निःशंक; निःसंशय. –ज्ञा २.१६५. 'ऐसें जाणा हो निभ्रांत। देव वैष्णवांचा अंकित।' –तुगा २१९८. 'म्हणौनि केलिया निभ्रांत। सांपडेचि तो।' –ज्ञा १८.९११. **निभ्रांती**–स्त्री. खात्री; निःसंशय.

**निम**—वि. अर्धा; निमा. [ फा. निमा ] **०कंठीदार**–वि अर्धी कंठी (छातीवरील निमगोल पट्टी) असलेला (अंगरखा) **०की**–स्त्री. १ उजळणीचा एक प्रकार. एक पासुन शंभरापर्यंत संख्यांच्या निमपटी पाठ करणें. २ निमकें अर्थ (२) पहा. **०कें**–न. १ घोड्याच्या अथवा बैलाच्या ओझ्याचा अर्धाभाग (मुख्यत्वें आयात–निर्गत मालावरील जकातीसंबंधीं व्यवहारांत योजतात). २ अर्ध, अथवा त्याचा कोणताहि गुणाकार. उदा० १॥, २॥ [ निमा ] **०खाई**–स्त्री. शेतकी, व्यापार, उद्योग इ० व्यवहारांत अर्धा वांटा, हिस्सा. २ शेताच्या उत्पन्नांतील अर्धा वांटा (जमीन कौलानें देणाऱ्याचा अथवा घेणाऱ्याचा). ३ अर्धेल, अर्धुक; अर्धा. निमाई पहा. [ निमा+खाई प्रत्यय ] **०गुंडीचा**–वि. न लागणाऱ्या गुंड्या, मुदनी असणारा (अंगरख्याचा गळा). **०गोणी, निमकगोणी**–स्त्री. (जकातबाब) अर्धी गोणी, धान्याचें पोतें. **०गोरा**–वि. १ कांहींशा गोऱ्या वर्णाचा; थोडा, अर्धवट गोरा. २ ख्रिश्चन; युरेशियन. 'ब्राह्मणेतरास पहिल्यानें जागा द्याव्या. त्यांतहि पहिल्यानें निमगोऱ्यास किंवा आठ आणे युरेजिनास...' –टि ३ २२. **०गोल**–पु. अर्धगोलाकृति; अर्धवर्तुल स्तंभाकार शरीर, आकार; गोळयाचा, पंचपात्राचा अर्धा भाग. –वि. अर्धगोलाकृति, अर्धवर्तुलस्तंभाकार. **०गोल कानस**–स्त्री. (सोनारी धंदा) एका बाजूस गोल व एका बाजूस चपटी कानस. **०चिकणी**–वि. सुपारीचा एक प्रकार. ही जाड व चापट असते; भरडा. **०जरी**–वि. अर्धें कलाबतूचें आणि अर्धें रेशीम, कापूस इ०नीं बनविलेलें, तयार केलेलें; अर्धें जरीचें. **०ताजीम**–स्त्री. (अर्धा मान, अर्धा सत्कार) उठून उभें न राहतां केवळ उठल्यासारखें करून (भेटीस आलेल्याचें) स्वागत अथवा रवानगी करणें. (क्रि० देणें; घेणें). याच्या उलट खडी अथवा पुरी ताजीम. [ निमी+ताजीम ] **०थल**–स्त्री. १ शेताचें अर्धें उत्पन्न; विशेषतः अर्धा वाटा, हिस्सा (जमीन कौलानें घेणाऱ्याचा अथवा देणाऱ्याचा). २ जमीनीचें उत्पन्न वांटून घेण्याकरितां जमीनी कौलानें देणारा आणि घेणारा यांची भागीदारी; सारखी वांटणी; अर्धेलीची पद्धत. [ निमा+थल ] **०थाना**–स्त्री. कापणीनंतर पिकाचें उत्पन्न काढण्याचा प्रकार. सर्व पेंड्या मोजून त्यांतील तीन (एक अगदीं भरदार दाण्याची, एक मध्यम व एक अगदीं फोलकट अशा) पेंढयांचा साधारण उतारा काढावयाचा व नंतर सर्व पेंढयांच्या उताऱ्याचा हिशेब करावयाचा. **०दस्ती**–वि. १ नेहमीच्या रकमेच्या निम्म्यानें कर, खंड बसविलेली (माल, जमीन). २ निमें धान्य देण्याच्या ठरावानें केलेलें (शेत इ०). [ निमा+दस्त ] **०पट**–स्त्री. अर्धा; निमा; अर्धा भाग. [ निमा+पट ] **०पितळी**–वि. (कु.) थोडी पितळ घातलेलें (पायतण). **०शाई**–स्त्री. १ अर्धें करणें. (क्रि० करणें). २ अर्धेली; अर्धा भाग. अर्धेल पहा. **०सरकारी**–वि. सरकारचा कांहीं ताबा असलेली (शाळा, संस्था इ०). 'टिळक विद्यापीठ हें कांहीं सरकारी किंवा निमसरकारी विद्यापीठ नव्हे ...' –केले १.३२. **०सारा**–पु. अर्धा सारा, कर. **०स्तनी**–वि. अर्ध्या बाह्यांचा (अंगरखा); जाकीट; कोपरी. –वाडसमा १.११९. [ निमी+अस्तनी ] **निमा**–पु. अर्धा भाग; अर्ध. –वि. अर्धा. [ फा. नीम ] **निमाई**–स्त्री. निमखाई पहा. **निमें**–स्त्री. अर्ध; एकद्वितीयांश. 'आयुष्य वर्षे शत त्यांत निमें निजेलें।' –वामन, स्फुट श्लोक ६९ (नवनीत पृ १४१). –वि. अर्ध. (विशेषतः समासांत उपयोग). [ फा. नीम ]

**निमे(मो)निम**–वि. अर्धाअर्धा. –क्रिवि. अर्ध्यानें; अर्धेअर्धे करून; अर्ध्या केलेल्या स्थितींत. **निमेशिमे**–क्रिवि. अर्धेमुर्धे; जवळजवळ अर्धे; सुमारें अर्धे. [ निमे ] **निम्मा, निम्माई, निम्मे, निम्मेनिम, निम्मेशिम्मे**–निमा, निमाई इ० पहा.

**निमक**—पु. १ मीठ; लवण. २ (ल.) अन्न; भाकरी. 'ज्याचे निमक खातात त्यांची चाकरी हलाल करितात.' –मराचिथोरा ७६. ३ उपकार. 'असें उभयतां बापलेकांनीं चाकरी करून निमक अदा केलें.' –मदरु १.१६५. [फा. निमक्] **०हराम**–वि. कृतघ्न; उपकार न स्मरणारा; बेइमान. [ फा. निमक्हराम् ] **०हरामी**–स्त्री. कृतघ्नता; उपकार वगैरे न स्मरणें; हरामखोरी. [ फा. ] **०हलाल**–वि. कृतज्ञ; खाल्लेल्या अन्नास जागणारा; विश्वासु; खरा स्वामिनिष्ठ. 'तुमचे लढाईची शर्थ जाहली निमक हलाल आहांत.' –मराचिथोरा ४१. [ फा. निमक् हलाल् ] **नि(न)मकहलाली**–स्त्री. कृतज्ञता; विश्वासूपणा; स्वामिनिष्ठा. 'ईश्वरें त्याचें नमकहलालीवर नजर करून मनोदयानुरूप केलें.' –रा ५ ८६. [ फा. ]

**निमगणें**—उक्रि. (गो.) विचारणें; प्रश्न करणें.

**निमग्न**—वि. १ बुडालेला; आंत गेलेला (पाणी इ० मध्यें). २ (ल.) गुंग झालेला; गढलेला; मग्न; तल्लीन. 'तो गाण्यांत निमग्न आहे.' **निमग्नता**–स्त्री. १ बुडालेली स्थिति. २ तल्लीनता. [ सं. नि+मज्ज् ]

**निमचा**—पु. एक शस्त्र; लहान तरवार (ही वांकडी व टोंकाला चपटी असते); कृपाण. 'घ्या कटयार गदका निमच्या।' –संग्राम २१. 'तोफखाना फोडून निमचाची लढाई झाली.' –रा६.२२८. [ फा. निमूचा ]

**निमज्जन**—न. १ पाणी इ०मध्यें बुडणें, डुबणें; अवगाहन. २ निमग्न होणें [ सं. ]

**निमटणें**—अक्रि. नाहींसें होणें; निमणें. 'नातरी वारयाचेनि आगें झगटली। दीपाची दिठी निमटली।' –ज्ञा ६२८५. –उक्रि. १ मिटून घेणें; लावणें. 'तरी अभाग्य दांतखिळी पाडी। कानाची नुघडी निमटली मिठी।' –एभा १५.१४. २ निमूळ करणें; निवटणें. [ निवटणें ]

**निमणें**—अक्री. (काव्य) १ संपणें; शेवट होणें; विराम पावणें. २ शमणें; कमी होणें; थंड, शांत होणें; हलकें होणें; उपशम होणें; निवणें. 'यालागी सद्गुरू असावा उत्तम। जेणें निमे श्रम संसाराचा।' –ब ३२. ३ (ल.) मरणें. 'तेंचि वायूचें स्फुरण ठेलें। आजि उदक सहज सपाट जाहलें। तरी आतां काय निमालें। विचारीं पां।' –ज्ञा २.१०७. 'माता निमाली परी आगें। पुत्र जिवें वांचला।' –मुआदि ४९.१०५. ४ निमग्न, गुंग होणें. निवणें पहा.

**निमता**—वि. मरणारा. 'बुडतया नदीच धाविन्नलीं। पडतया पृथ्वीच कळवळिली। निमतया मृत्यूनें दिधली। आयुष्यवृद्धी।' –ज्ञा १८.१६२.

**निमताना**—पु. १ पिकाच्या अंदाजाचा प्रकार. शेतांतील सगळया उत्पन्नाची मोजणी करण्याकरिता त्यांतील निरनिराळया भागांतून थोडें थोडें पीक कापून त्यांतील धान्य मोजणें, सामान्यतः थोडया अंशाचा बरोबर निश्चय करून, अनुभव पाहून त्यावरून सगळयाचें अनुमान करणें. (क्रि० पाहणें; घेणें; करणें). २ पूर्वी अनुमानानें निश्चित केलेला आंकडा पुन्हां तपासणें, पाहणें; वजन करणें; पुन्हां मोजणी, पाहाणी, तपासणी इ० ३ दुसऱ्यानें केलेल्या एखाद्या गोष्टीची परीक्षा घेण्याकरितां ती पुन्हां करणें; चांचणी करणें. (क्रि० घेणें; करणें; काढणें; पाहणें). [ फा. ]

**निमती**—स्त्री. (कर.) अधेली, आठ आणे. 'गडयाला रोज दोन निमत्या द्याव्या लागतात.' [ निम ]

**निमंत्रण**—न. बोलावणें; आमंत्रण. [सं.] **निमंत्रणें**–उक्रि. बोलावणें; आमंत्रण करणें; येण्यास सांगणें. [ निमंत्रण ] **निमंत्रित**–वि. बोलाविलेला; निमंत्रण दिलेला; याच्या उलट आगंतुक.

**निमथा**—पु. शिखर; कळस. 'जो मुक्तिपंथें पार्था। चढे मोक्ष पर्वता। तो महा सुखाचा निमथा। वहिला पावे।' –ज्ञा ५ ३५. [ नि+माथा ]

**निमप**—सक्रि. (गो.) ढुंगण धुणें.

**निमा**—पु. अंगरख्याचा एक प्रकार; निमस्तनी. 'जामानिमा.' [ फा. ] **०जामा**–पु. जामानिमा पहा. उंची पोशाख. 'निमाजामा कुडती नेली ते नेदी पुढती।' –मन्व ४०१.

**निमाज, निमाजमत**—स्त्री. (प्र.) नमाज पहा. (क्रि० पढणें). 'जसा कांहीं विश्वामित्र याच्या अगोदर निमाज पढत होता.' –नाकु ३.६६. 'शहरांत जुमियाची निमाजमत यास आले होते' –रा १.१९५. [ फा. नमाझ् ]

**निमाण**—न. (गो.) शेवट [ सं. निर्याण; म. निमणें ] **निमाणें**–क्रिवि. (गो.) शेवटीं.

**निमाणा-ना**—एकंदर जमेवर रुपयास अर्धा आण्याचा जादा कर [ निमा+आणा ]

**निमालेपण**—न. १ मरण. 'जैसे न सांगणें वरी। बाळा पतीसी रूप करी। बोलु निमालपणें विवरी। अचर्चातें।' –ज्ञा १५. ४६८. २ स्तब्धपणा; मौन; मुकेपणा. [ निमणें+पण ]

**निमासुर**—वि. १ सुंदर; सुरेख; लावण्ययुक्त. –एरुस्व १. ५६. 'सुंदर निमासुर वदन। रघुनंदन उभा तेथें।' –ह ५.१६८. 'मुख निमासुर बरवंट।' –वेसीस्व १३.१४. २ तरुण. 'जरी असतासी निमासुर। तरी होता बरवा विचार। मग म्हणे व्रजराजकिशोर। थोर होईन आतां मी।' –ह ८.६४.

**निमाळ**—न. १ माळरान; बरड जमीन. 'मग सत्संगें प्रबळें। सच्छास्त्राचेनि बळें। जन्ममृत्यूचीं निमाळें। निस्तरे रानें।' –ज्ञा

१६.४४१. २ रुक्षपणा; जीवनराहित्य. 'योगशास्त्रा जाले निमाळ।' –भाए ८६. –वि. खरतड; रुक्ष; अडचणीचें. [नि+माळ=रुक्ष प्रदेश]

**निमिख**—पु. निमिष पहा. ' जीवा मेहवनें निमिखा एका। देॐ पांतुसें।' –शिशु १७२.

**निमित्त**—न १ हेतु; उद्देश; मतलब; आशय; अनुसंधान. ' पोट भरावयाचे निमित्तानें माणसें चाकरी करितात. ' २ कारण; सबब; प्रयोजन; आधार. ' असे मेघ ही या निमित्तें सखा हो।' –वामन, वेणुसुधा २.१५.'तो चोरीच्या निमित्तानें फाशी गेला.' ३ कारणीभूत, साधनीभूत गोष्ट. ४ खोटी सबब; बहाणा; सोंग. ' पोटदुखीचें निमित्त करून तो घरीं राहिला. ' ५ खोटा आरोप; आळ. (क्रि० येणें; लागणें; टाळणें; लावणें; आणणें; ठेवणें; घेणें; काढणें ). ' त्यानें चोरी केली नसतां चोरीचें निमित्त आलें. ' ६ चिन्ह. ' देखतों मी निमित्तेंही विपरीतेंचि केशवा।' –गीता (वामन शांडिल्य) ४६. –शअ. सार्टी; करितां; कारणें. 'चोरी-निमित्त मारलें.' ' विद्येनिमित्त श्रम केला. ' [सं.] **निमि-त्ताचा**–१ आरोपास अथवा दोषास कारण होणारा; ज्यामुळें आळ येईल असा ( धंदा; वस्तु वगैरे-जी सकृद्दर्शनीं उत्तम दिसते पण त्यांतील व्यंगामुळें वापरणाऱ्यावर निष्कारण दोष येतो ). २ प्रसंगास उपयोगी पडणारा; बहाण्यास पुरे असलेला, नांवाला पुरेसा. जसें:–निमित्ताची देवपुजा –स्नान –भोजन –दानधर्म. **निमित्ताचा धनी**–वि. वाईटपणा, दोषारोप, बोल सोसणारा ज्याच्यावर दोष ठेवला जातो असा. ' निमित्ताचा धनी केला असे प्राणी।' –नवनीत १४५ **निमित्ताचा साधु**–पु. ढोंगी साधु; वरकरणी साधु. **निमित्ताची बायको–नवरा–चाकर–पुत्र–घोडा–इ०**–नांवापुरेशी, गरज भागण्यास उपयोगी बायको इ० **निमित्ताचें भांडें–पात्र, निमित्ताचें घर**–निंदेचें किंवा दोषाचें निमित्त करतां येण्याजोगा ( मनुष्य, वस्तु, गोष्ट इ०. **निमित्तास**–क्रिवि. देखाव्याकरितां; नांवाला. ' ह्या कामांत कोणी निमित्तास पाहिजे.' **निमित्तावर टेकणें**–निमित्त सापडेल केव्हां म्हणून टपून बसणें. **निमित्तास टेकणें**–एखादें काम बिघडावें म्हणून निमित्त (स्वल्प कारण ) शोधणें. ' त्याच्याशीं अगदीं बोलूं नका, स्वारी काय अगदीं निमित्ताला टेंकली आहे. तुम्ही एखादा शब्द बोलल्यावर लागलीच वाजंत्री सुरू होईल. सामाशब्द– **०कारण**–न. आधारभूत गोष्ट. निमित्त अर्थ ३ पहा. प्रत्यक्ष कर्ता, साधक; विशेषतः सृष्टि निर्माण करणारी देवता, ब्रह्मा; कारण पहा. ' मृत्घटास निमित्तकारण कुलाल. ' **०खोर**–वि. १ खोटया सबबी, बहाणे सांगणारा. २ दोष देण्याची संधि शोधणारा; लहानसहान अपराध शोधून काढण्यासाठीं डोळयांत तेल घालून बसणारा. **०धर्म**–पु. एखादा विशेष अथवा प्रासंगिक विधि, कर्म. **०धारी–भूत**–वि. टिक्याचा, टिळयाचा धनी पहा. **०वाचक धातुसाधित**–न. मूळ धातूस ऊं प्रत्यय लावून होणारा धातुसाधित शब्द. उदा० बोलूं, घेऊं इ० **निर्मित्ती–वि.** केलेला; उत्पादित; कारणीभूत. (समासांत) एतन्निमित्ती, तन्निमित्ती.

**निमित्य**–न. (प्र.) निमित्त. ' दुसऱ्याची बुद्ध ऐकत निमित्याशी।' –ऐपो १५७.

**निमि(मे)ष**—पु. १ निमेष म्हणजे डोळयांचा मिटण्याचा व्यापार व उन्मेष म्हणजे डोळयाचा उघडण्याचा व्यापार. तथापि सामान्यपणें दोन्ही शब्दांचा डोळयाची उघडझांप असा अर्थ होतो. उन्मेष पहा. २ पापणी लवण्यास, डोळयांची उघडझांप होण्यास लागणारा काळ; क्षण. ' कोंडमार केला होता बहु दिस। सोडवी निमिष न लगतां।' –तुगा १०. [सं.] **निमि(मे)षार्ध**–अर्धा क्षण. ' निमिषार्ध जो सत्संग। तेणें संगें होय भवभंग।' –एभा २.२५३. **निमि(मे)षोन्मेष, निमिषोन्मिष, निमिषोन्मिष**–पु. पापण्यांची, डोळयाची उघडझांप; डोळे मिटणें व उघडणें. 'हें सांगो काई एकैक। देखे श्वासोश्वासादिक। आणि निमिषोन्मिष। आदिकरूनि।'–ज्ञा ५.४५. ' प्रीतीनें पाहूं लागला। तो निमिषोन्मिष विसरला।' ' पळ अक्षर निमिषोन्मिषीं हरिचरणासी चिंतावें।' –एरुस्व १६.१. –क्रिवि. १ पापण्यांची उघडझांप करण्यास जेवढा वेळ लागतो तेवढयांत; एका क्षणांत. २ (ल.) तात्काळ. **निमिष्य**–पु. क्षण; (प्र.) निमिष पहा. ' भरतां न भरतां निमिष्य। जाणें लागें।' –दा ३.९.३.

**निमाकलमी**—स्त्री. मोहतरफ्यासारखा एक कर; पण हा केवळ शहरांस लागू असतो.

**निमीलकत्व**—न. (संगीत) गातांना डोळे मिटणें.

**निमीलन**—न. मिटणें. याच्या उलट उन्मीलन. 'जेथ उन्मीलन होत आहे दिठी। तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी। पुढती निमीलनीं मिटी। देत आहाती।' –ज्ञा ११ १४१. [सं.]

**निमुट(ठ)णें**—उक्रि. लय पावणें; झांकणें; मिटणें; निमणें. ' आणि दीपें का सूर्ये प्रगटे। अथवा निमुटलिया देखावेंचि खुंटे। तैसी दिठी नव्हे जे वैकुंठे। दीधली आहे।' –ज्ञा ११.२३४. [निमूट]

**निमुळता**—वि. १ क्रमानें उतरता; गोपुच्छाकृति; सूच्यग्र. २ अरुंद; विंचोळा. ' पायथ्याशीं जमीनीचा एक निमुळता तुकडा आहे. ' [नि+मूल; म. नि+मुळा; सं. निमूलित]

**निमूट–पणें**—क्रिवि. १ गुपचुपपणें; स्तब्धपणें; एकहि शब्द न उच्चारता; शांतपणें. २ स्थिरपणें; न हालतां; एके जागीं बसून. [निमूर=निपचेत]

**निमूर**—वि. १ अदृश्य छिद्र, भोंक अथवा मुरण्याची जागा इ० नसलेलें; छिद्र, भोंक किंवा शोषून घेण्याची शक्ति नसलेला. (बांध, तळें, डबरा वगैरे). २ तडा, भेग किंवा फट, नरमपणा किंवा इतर कोणताहि दोष ज्यांत नाहीं असा. [नि+मुरणें]

**निमूर**—वि. १ पूर्णपणें फन्ना उडालेला; खलास झालेला; खर्च झालेला; संपलेला. २ भानावर नसलेला; देहभाव अथवा शुद्धि नष्ट झालेला; चैतन्यरहित; निपचेत. [ नि+वैसं. मूर=मूढ ]

**निमूळ**—वि. निर्मूळ; मुळासकट नाहींसा. 'तववरी विष वल्लीचा मोड। निमूळ करिती जाणते।' –मुआदि (पाटभेद) ३४.४. [ सं. निर्मूल ]

**निमेष**—न. एक कालपरिमाण; क्षण. निमिष पहा. १८ निमेष=१ काष्ठा; ३० काष्ठा=१ कला; ३० कला=१ क्षण; १२ क्षण=१ मुहूर्त; ३० मुहूर्त=१ अहोरात्र. ०पुट-न. (नृत्य) खालच्या व वरच्या पापण्या एकमेकीस लावणें. राग आला असतां हा अभिनय करतात.

**निमोणा**—पु. नमुना पहा. 'ये जाय ते कसि अहा दिसते निमोणा।' –आनंदतनय, नौकाचरित्र २३. 'घरीं माणसें वसवून कागद गड्यांचे निमोणे येथून आलाहिदा पाठविले आहेत.' –वाडबाबा २.१५७.

**निमोला**—वि. १ बिनमोल; कवडीमोल; निरुपयोगी. 'निमोली संपदा भयविरहित। सर्वकाळ चित्त समाधान।' –तुगा १९८३. २ किंमत दिल्यावांचून मिळणारें; फुकट मिळणारें; मोफत. 'तें भलतेथ निमोलें। न जोडिता आहे जोडलें।' –ज्ञा ९.३८८. [ नि=नाहीं+मोल=किंमत ]

**निमोळता**—वि. निमुळता पहा.

**निमोळी**—स्त्री. विलायती गवतावरील एक परोपजीवी वनस्पति.

**निम्न**—वि. १ खोल; खोलवट. 'पाताळाहूनि निम्न। जियेचिये उंचिये सानें गगन।' –ज्ञा १६.३३१. २ लवलेलें; नम्र. –न. सखल जागा; खड्डा. 'निम्न भरलियाविणें। पाणी ढळोंचि नेणें। तेंवी श्रांता तोपौनि जाणें। सामोरेया।' –ज्ञा १६.१५८ [ सं. ]

**निम्नगा**—स्त्री. नदी. [ सं. ]

**निम्नांश**—पु. (ज्यो.) अपम; क्रांति. [ सं. ]

**निम्नोन्नत**—वि. उच्चनीच; उंचनिच; उंचसखल (जमीन). [ सं. निम्न+उन्नत ]

**निम्हाल**—न. माळरान. निमाल पहा. 'योगशास्त्रां जालें निम्हाळ।श्रीकृष्ण तुवांविन।' –भाए ८६.

**निम्होळ**—वि. (महानु.) निमुळती; घसरगुंडीची. 'कीं निम्होळ संसारवाटेची। विश्रामुशाळा।' –शिशु ३३. [ निमोळती ]

**नियत**—वि. १ नियमित; ठराविक; कायम केलेलें; प्रस्थापित. २ निश्चित; कायम; खचित. ३ सुनिग्रहित; चांगल्या तऱ्हेनें आटोक्यांत ठेवलेलें किंवा दाबांत ठेवलेलें; निग्रही. 'नावेक विरक्तु। जाहला देहधर्मी नियतु। तरि तोचि नव्हे व्यवस्थितु। अधिकारिया।' –ज्ञा ६.३४२. ४ (तत्व.) निश्चयानें फल देणारें असें (कर्म).५ ज्याचा संख्या किंवा व्यापार इ० विषयक नियमांचा कधींहि भंग होत नाहीं असें; नित्याचें; नेहमीचें; ठराविक. 'ऐशास नियता प्रमाणें राऊ मशारनिल्हे यास घेऊन येणें' –वाडशा ५. 'आमच्या घरीं नियत वीस पात्रें होतात, खेरीज आला गेला.' –क्रिवि. खरोखर; नेहमीं; निरंतर. 'म्हणऊनि तूं नियतु। सकळ कामरहितु। होऊनियां ऊचितु। स्वधर्मे रहाटें।' –ज्ञा ३.१५०. [ सं. नि+यम्=स्वाधीन ठेवणें ] ०कालिक–वि. १ (ज्यो.) ज्याची चकाकी निरनिराळया काळीं निरनिराळी दिसते, ते (ग्रह, तारे) –ब्रूस–ज्योतिःशास्त्राचीं मूलतत्त्वें. २ ठराविक वेळीं प्रसिद्ध होणारें; निश्चित समयावर निघणारें (मासिक, त्रैमासिक, वगैरे) (इं.) पिरिऑडिकल. ०पूर्व–(न्याय) कार्य उत्पन्न होण्यास ज्या पूर्वाची आवश्यकता आहे म्हणजे ज्या पूर्वावांचून कार्य उत्पन्न होत नाहीं अशा सर्व विधायक व निषेधक पूर्वांचा समूह. –न्यायप २२. जसें पटास तंतु, घटास मृत्तिका. ०शाबुद्दी–स्त्री. अढळ सद्बुद्धि. –होकै १३.

**नियत, नियेत**—स्त्री. नेत पहा. १ दानत; नीति; शील. 'पठाणास नेक, नियत, धर्मयुद्ध यांची माहिती नसते.' –सुर्योदय ९५. २ बुद्धि; हेतु. 'जशी नियत तशी त्यास बर्कत.' –वाडसनदा १५०. 'शहाजीची नियत साप्रतकाळीं ठीक नाहीं.' –दिमग २.५. ३ –स्त्रीपु. वृत्ति; नेमणूक; नियम. 'भंडारा व नंदादीप चालवावा ऐसा नियेत करून ...' –रा १५.१९५. 'समाधिस्थळीं पूजा पुनस्कार चालिला पाहिजे म्हणून ... त्रिवर्गांनीं आपलाले वेळेस नियत करूनदिल्ही. –वाडसनदा १६८. [ अर. नीयत ]

**नियंता**—वि. नियमन करणारा; शास्ता; अंमल, अधिकार, हुकुमत चालविणारा; समाजाला आळा घालणारा (ईश्वर, यमधर्म). 'तरी विश्व हा अनादि ठावो। येथ नियंता ईश्वरावो।' –ज्ञा १६.२९५. [ सं. ]

**नियतात्मा, नियतमानस**—वि. चित्त, मन यांचें दमन केलेला; मनाला आटोक्यांत ठेवणारा, निग्रही [ सं. ]

**नियति**—स्त्री. १ नियम; नियंत्रण. २ अदृष्ट. दैव. ३ मृत्यु [ सं. ]

**नियंतृत्व**—न. १ नियम; निग्रह; ताबा; दाब; शासन. २ नियमन अथवा शासन करण्याची शक्ति, पात्रता. [ सं. ]

**नियंत्रण-णा**—न.स्त्री. नियंतृत्व पहा. [ सं. ]

**नियम**—पु. १ कायदा; आज्ञा; आदेश; निर्बंध; ठराव; कलम. 'वसंतामध्यें कोकिलांनीं शब्द करावा असा नियम आहे' २ ठराविक चालरीत; वहिवाट. 'आम्ही एकवेळ जेवण्याचा नियम केला आहे.' ३ रूढी; आचारपरंपरा; पद्धत. ४ उपवास, जागर, यात्रा इ० स्वेच्छेनें करावयाच्या धार्मिक गोष्टी, तसेंच आवश्यक

असें धार्मिक कर्म, विधि इ० ५ ठरलेली गोष्ट; संकेत; ठराव. ६ (योगशास्त्र) अष्टांगांपैकीं दुसरें अंग (मनोजय). ७ निग्रह; निरोध. 'एवंमनपवन नियमें। होती दाही इंद्रियें अक्षमें।' -ज्ञा १६.१८५. [सं.] **नियमणें**-सक्रि. नियम, निग्रह करणें. 'स्त्रीविषयीं नियमिजे। नांवें नांवें।' -ज्ञा १७.२१०. **नियमन**-न. निग्रह; दाब; शासन; आळा; बांधा. 'मनाचें नियमन केलें असतां ईश्वरप्राप्ति लवकर होते.' २ अंमल; अधिकार ०**निष्ठ**-वि. कडकडीतपणें, नियमितपणें धार्मिक विधि पाळणारा, करणारा; नेमनिष्ट. ०**निष्ठा**-स्त्री. आवश्यक करावयाच्या नित्यकर्माचें (स्नान-संध्यादींचें) निष्ठापूर्वक पालन; त्या कर्मोविषयीं आदर. ०**पत्र**-न. आज्ञापत्रक; नियमांचा कागद. पत्र पहा. ०**विधि**-पु. नियमासंबंधीं स्थलकाल इत्यादि निदर्शक गोष्टी; नियमाचें दिग्दर्शन. प्राप्त जें कांहीं कर्म त्याचा अमुक कालीं करावें असा अदृष्टार्थ नियम करणें. 'आपत्कालीं पुत्रदान करावें असा नियमविधि जो केला त्याचें दृष्टफल तर संभवत नाहीं.'-मिताक्षरा. ०**शील**-वि. १ नियमनिष्ठ पहा. २ केलेल्या नियमाप्रमाणें नेहमीं वागणारा. ०**संयम**-पु. १ ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांना ताब्यांत ठेवणें. २ अशी निग्रहशक्ति प्राप्त होण्यासाठीं करावयाचे कांहीं विधी, आचरण. (क्रि० धरणें). 'यंदा चातुर्मास्यांत कांहीं नियमसंयम धरले.' **नियमाचा**-वि. १ नियमित; व्यवस्थित; पद्धतवार. २ विचारी; स्थिर; अचंचल. ३ सदाचरणाच्या नियमांनीं वागणारा. 'मोठा गेला नियमाचा!' -क्रिवि. नेमानें; न चुकतां; हटकून; नियमितपणें. 'मी जेवायास बसतों तेव्हां वारा येऊन नियमाचा दिवा जातो.' **नियमित**-वि. १ नेमलेला; नक्की केलेला; ठराविक; ठाम. २ दाबांत ठेवलेला; निग्रहीत; शासित. ३ नेमून दिलेला; निर्दिष्ट; नियत. **नियमी, नियमिष्ठ**-वि. १ नियमनिष्ठ पहा. २ नियमाचा पहा. **नियम्य**-वि. १ निग्रह करण्यास, दाबांत ठेवण्यास, नियमन करण्यास योग्य, आवश्यक. २ ठाम, निश्चित करावयाचा; नेमावयाचा; नियमित करण्यास योग्य. **नियामक**-वि. १ ताब्यांत ठेवणारा; शासन करणारा; निग्रह करणारा. 'गांवींचे देवळेश्वर नियामकचि होती साचार।' -ज्ञा १८.५७०. २ नियमित, ठाम, निश्चित करणारा; नेमणारा; नियंता; नेमणूक करणारा. ३ गति वगैरेचें नियंत्रण करणारें यंत्र (गव्हर्नर). **नियामक मंडळ**-न. शासन करणारी संस्था. (इं.) गव्हर्निंग बॉडी.

**नियामत**—स्त्री. १ दया. २ आनंद; सुख; आराम. ३ धन; मिळकत; बर्कत; भरभराट. [फा.]

**नियाजमंद**—वि. अर्जदार; विनंति करणारा. 'नियाजमंद बाळाजी नारायण नातू' -भाअ १८३८. [फा. नियाझ्मंद्]

**नियाबत, न्याबत**—स्त्री. नायबी; मुतालिकी. 'न्याबतचा खिल्लत.' -दिमरा २.१७. [अर. नियाबत्]

**नियाल**—स्त्री. (गो.) मान्यता. -वि. (गो.) प्रमाणांत राहणारा.

**नियुक्त**—वि. १ नेमलेला; ठरलेला; योजिलेला; अधिकृत. २ ज्यास पुत्रोत्पादनाविषयीं गुरूचा नियोग झाला आहे तो.-मिताक्षरा [सं.]

**नियुत**—न. एक कोटी संख्या; शंभर लक्ष. [सं.]

**नियो**—स्त्री. (गो.) रेती.

**नियोग**—पु. १ नेमणूक अथवा योजना; आज्ञा देणें अथवा अधिकार देणें; योजणें; व्यवस्थित लावणें. २ आज्ञा; हुकूम; आदेश; शासन. ३ प्राचीनकाळीं वंश खुंटू नये म्हणून स्त्रीच्या ठिकाणीं करविलेली प्रजोत्पत्ति; निपुत्रिक विधवेला अपत्योत्पादनार्थ दिलेली शास्त्राज्ञा. दीर किंवा नवऱ्याचा कोणी आप्त याच्याकडून पुत्रप्राप्ति करून घेण्याची पूर्वीं शास्त्रानें सवलत ठेवलेली असे. **नियोगणें**-सक्रि. काम सांगणें; आज्ञा करणें. 'मज म्या नियोगावें स्वामिसेवकत्वें।' -एभा ३ ७५. **नियोगी**-वि. १ नियामक पहा. २ युक्त; योग्य अधिकारी. 'तेथ सत्वें आपल्या आंगीं समीननिमीन भागीं। दोघे केले नियोगी। ब्राह्मण क्षत्रिय।' -ज्ञा १८.८२८.

**नियोजन**—न. १ नेमणूक; स्थापना. २ कारण; प्रयोजन. 'हे गुणचि क्रियाजातां नियोजना।' -ज्ञा १४.२९३. [सं. नि+युज्=योजणें]

**नियोजिणें**—उक्रि. नेमणें; योजणें; ठरविणें; आज्ञा करणें; अधिकार-सत्ता देणें, लावणें. 'नियोजिलीं वितंडें तळासि येती।' -ज्ञा १३.२१. 'नवसें कन्या पुत्र होती। तरि का नियोजिले पति।' [सं. नियोजन]

**निर्**—एक अव्यय आणि उपसर्ग. याचे कांहीं अर्थ. १ खातरी; हमी; आश्वासन. २ नकार; अभाव. [सं.]

**निरउपाय**—निरुपाय पहा. 'निरउपाय झाली गोष्ट कंबर बसली घोरानें।' -ऐपो ४१२.

**निरकामी**—वि. (गो.) रिकामी; निरुपयोगी.

**निरंकार**—विक्रिवि. (चुकीनें अर्थ) (अशिष्ट) १ निराकार; शुद्ध; केवळ; एकटा; निवळ; एकमेवाद्वितीय. २ पूर्णपणें; केवळ; निवळ; सर्वस्वीं. ३ (उपाशी शब्दाच्या पूर्वी जोडून) निखालस; अगदीं पूर्णपणें. 'आज मी निरंकार उपाशी आहे.' [सं. निराकार]

**निरंकुश**—वि. अनियमित; स्वच्छंदी; अनिग्रहीत; ताबा, बंधन, मर्यादा न मानणारा; कोणाचें न ऐकतां वागणारा; स्वैर; बेताल; मोकाट. २ प्रतिबंध-अटकाव विरहित. 'पादशहा याउपरि निरंकुश जाले.' -मराचिसं २४. [सं. निर्+अंकुश] **म्ह०** निरंकुशाः कवयः=कवीस कोणच्याहि प्रकारचा-भाषेचा, व्याकरणाचा

वगैरे प्रतिबंध नसतो. **निरंकुशातृप्ति**-स्त्री. जीवाच्या ज्या सात अवस्था आहेत त्यांतली फलरूप सातवी अवस्था. -हंको.

**निरक्त**—वि. (प्र.) नीरक्त; रक्तहीन; फिका; पांढराफटक; निस्तेज; विवर्ण. [ नि+रक्त ]

**निरख**—पु. १ बाजारभाव; चालू किंमत. 'शेळीचें दूध एकवीस शेर याप्रमाणें लष्करांत निरख आहे.' -ख ८.३९७६. २ ठराव; मर्यादा. [ फा. निर्ख ] ०बंद्-बंदी-पुस्त्री. बाजारभावाची यादी; भावाचा तक्ता. **निरखी-ख्या**-पु. १ बाजारभाव ठरविणारा अधिकारी.

**निरख**—स्त्री. (कों.) पारख. [ निरीक्ष्; प्रा. णिरिक्ख ]

**निरखड**—वि. रखरखीत; रुक्ष. -शर [ नि+रखड ]

**निरखणें**—सक्रि. १ एकाग्रतेनें पाहणें; मनन करणें. २ सूक्ष्मपणें परीक्षा करणें; पारख करणें ( सोनें, रत्नें इ०ची ). ३ (सामा.) पाहणें; अवलोकन करणें. 'मला निरखितां भवच्चरण कन्यका आपगा।' -केका १०. [ सं. निरीक्षण; प्रा. निरिक्खण; हिं. निरखना ]

**निरखी-ख्या**—पु. (ल.) धूर्त, दूरदर्शी माणूस.

**निरंगळी**—स्त्री. जास्त श्रम किंवा उपवास यांमुळें गात्रें शिथिल, जड होणें; सुस्ती; मरगळी; थकव्यानंतरची झोंप. ( क्रि० येणें; भरणें ). 'घटका काळ गेल्यावर मोहनरावांना निरंगळी येऊं लागली.' -कोरकि ४३७. [ ? +गळणें ]

**निरगांठ**—स्त्री. निर्गांठ पहा.

**निरगुंड, निरगुडी, निरगूड**—स्त्री. निर्गुंडी पहा.

**निरग्निक**—वि. ज्यानें श्रौताग्नि किंवा स्मार्ताग्नि धारण केले नाहींत, ठेवले नाहींत असा. -मिताक्षरा [ सं. ]

**निरज**—वि. रजोहीन; स्वच्छ; निर्मळ; धूळरहित. 'निरज करुनि भूमी रेखिल्या रंगमाळा।' -माधवरामायण बाल ३३. [ सं. ]

**निरंजन**—न. १ विद्या; ज्ञान. २ उजाड प्रदेश; एकांत स्थळ. -एभा १.१२६. 'निरंजनीं आम्ही बांधियेलें घर।' -तुगा ४०४३ ३ अरण्य. 'मृत्यूनि आधाधिले। तिहीं निरंजन सेविलें।' -ज्ञा १३.२३. -वि. १ निर्विकल्प; सोज्वळ; निष्कलंक; मायाविरहित; चूक, व्यंग इ० रहित; जन्ममरणादिकांस कारण जें प्रारब्ध तें ज्यास नाहीं असा ( ईश्वर, परब्रह्म ). 'लागे तुझें ध्यान निरंजनाचें।' -सारुह १.३४. २ अस्पष्ट; गुप्त. [ सं. निर्+अञ्जन ]

**निरंजन**—न. आरती ओंवाळण्याचें धातूचें पात्र. निरांजन पहा.

**निरंजनी**—पु. गोसाव्यांतील एक पंथ; हे गोसावी लंगोटी लावतात. निर्बाणी गोसाव्याप्रमाणें नागवे हिंडत नाहींत.

**निरडणें**—उक्रि. खरडून, पुसून काढणें; एका बाजूस सारणें, ढकलणें; निपटणें ( हाता-बोटांनी-एखादा द्रवपदार्थ ).

**निरड(ढ)णें, निरढलणें**—उक्रि. १ पक्कें करणें; पक्कविणें; राबविणें (नवीन, कोरे मडकें इ०). २ (ल.) निरढावण्यास लावणें; निगरगट्ट करणें.

**निरढ(ढा)वणें**—अक्रि. सरावणें; निगरगट्ट होणें; कोडगा बनणें.

**निरढविणें, निरढाविणें**—उक्रि. निरडणें अर्थ २ पहा.

**निरण**—न. १ बेंबी आणि गुह्यभाग यांच्या मधील पोट; ओटीपोट. २ गाई-म्हशीचा गुह्यभाग; जनावराचें स्त्रीजननेंद्रिय; योनी. 'गाईच्या निरणाला हात लाव म्हणजे लौकर गोमूत्र मिळेल.' ०करणें-लवकर प्रसुत होण्याच्या वेळीं ( गाय इ० कांनीं ) जननेंद्रिय शिथिल, विस्तृत करणें.

**निरत**—वि. पराकाष्ठेचा, अत्यंत रत; तत्पर; आसक्त; अनुरक्त. 'जरी स्वधर्मैकनिरत। वर्ताल बापा।' -ज्ञा ३.१०२. [ सं ]

**निरंतर**—वि. १ संबंध असलेला; मध्यें अंतर नसलेला. २ सततचा; नेहमींचा; कायमचा. ३ सलग; अखंड -क्रिवि. १ नेहमीं; सतत; अविरत; एकसारखें. २ अखंड; मध्यें ( स्थलाचें ) अंतर न पडतां; सलग; अगदीं लागून, जोडून, चिकटून. [ सं. ]

**निरतावणें**—क्रि. गोडी घेणें; रत होणें. -मनको.

**निरतिशय**—वि. अतिशयाचा; अधिक; अमर्याद; पराकाष्ठेचा; अतोनात. [ सं. ] -**यानंद**-पु. ब्रह्मानंद.

**निरनिमित्त**—क्रिवि. कारणावांचून; विनाकारण. 'वित्त हरिति निरनिमित्त ठेवुनि चित्त अर्थ यावरी।' -ऐपो ३६९. [ निर् =नाहीं+निमित्त ]

**निरपण**—न. खरवड; धूण ( जेवलेल्या ताटाची ); निपटा; निरपून काढलेला अंश. [ निरपणें ] म्ह० निरपण खाई तें मोठें होई मळयांत जाई तें केळें खाई.' **निरपणी**-स्त्री. निरपण करणें; खरवड, धूण काढणें; निपटणी. **निरपणें**-उक्रि १ निरडणें पहा. ताटांतील निपटून चिपटून काढणें, पुसून, निपटून घेणें. -ज्ञा ६. २३४. 'हा तें सांडिला निरपोनु। धाम निढळींचा।' -कथा ५. १३.१४८. २ (ल.) भोगणें; फेडणें; केलेलें कर्म निस्तरणें; निपटणें; निष्कृति करणें. ३ हिसकून काढणें; खेंचणें; जोरानें उपसणें ( म्यानांतून तरवार, केसाचा गुंता, ओला कपडा इ० दुसऱ्याच्या हातांतून ). ४ खडसावणें; खरडपट्टी काढणें; अतिशय रागावणें. ( या प्रयोगांत तलवार शब्द अध्याहृत असतो ). 'मी बोलतांच त्यानें मजवर निरपली.' [ ? सं. निर्वहन; निर्वपन ] म्ह० भलत्या ठिकाणीं हगावें आणि निरपत बसावें.

**निरपणास**—पु. (गो.) भाजीच्याच उपयोगी पडणारा फणस. [ निरु=पाणी+सं. पनस; म. फणस ]

**निरपत्रप**—वि. निर्लज्ज. 'प्राणत्राणपरायण जिकडे निरपत्रपाग्रगी पळतो।'–मोविराट ४.८०. [सं. निर्+अपत्रपा=लाज]

**निरपराध-धी**—वि. निर्दोषी; गुन्हा नसलेला;साव. –क्रिवि. निर्दोषपणें; विनाकारण; (क्रि० मारणें, हाणणें इ०). [सं.]

**निरपुज**—न. (कों.) एक जातीचें भात.

**निरपेक्ष**—वि.१ निरिच्छ: निःस्वार्थी; निरभिलाषी; निष्काम; अपेक्षा नसलेला. 'वैराग्यनिरपेक्षाचा गळा। गिंवसीत असे।' –ज्ञा १६.२०९. 'जैसी निरपेक्षाची सांगता स्थिति। आशाबद्ध मनीं जल्पती। कां साहदेवमतासीं हेळसती। ज्योतिषी जैसे निजद्वेषें।' २ असहाय; अनाथ; अशरण. ३ सोडून; वगळून-शिवाय. उदा० व्यक्तिनिरपेक्ष. [सं. निर्+अपेक्षा] **निरपेक्षता**–स्त्री. १ निरिच्छपणा निःस्वार्थता. २ पक्षपात नसणें.

**निरबुजणें**—अक्रि. चमकणें; दचकणें; भिणें; बुजणें. [बुजणें]

**निरबुजणें**—उक्रि. भरणें; भरून निघणें; मिटणें; बुजणें; बंद करणें, होणें (भोंक, भेग वगैरे). 'मुखीं आणि नासिका-नयनीं। व्याल निरबुजले रजकणीं।' [बुजणें=ठासून भरणें]

**निरभिमान-नी**—वि. अभिमान, गर्व, ताठा नसलेला; नम्र; विनयी; गुर्मी, चढेलपणा नसलेला. [सं. निर्+अभिमान]

**निरभिलाष-षी**—वि. निरिच्छ; निष्काम; निरपेक्ष पहा. 'अगा आत्मजेच्या विषीं। जिवु जैसा निरभिलाषी।' –ज्ञा १२.१३२. [सं. निर्+अभिलाष]

**निरभ्र**—न. अभ्रराहित्य; मेघ, ढग नसणें. –वि. अभ्ररहित; ढग, आभाळ नसलेलें; स्वच्छ. [सं. निर्+अभ्र]

**निरय**—पु. एका नरकाचें नांव. –ज्ञा १.२६०. 'नोहे यांच्या ऐसा तुका निरयवासी पिसा।'–तुगा १८१६. 'होसी सदा निरय दारुण लोकवासी।' [सं.] **०गति**–स्त्री. नरकवास. 'फारचि वरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच।' –मोविराट १.५६.

**निरयण-न**—न. ग्रहांचें स्थान मोजतांना अयनगति हिशेबांत न घेणें. –वि. अयनगतिहिशेबांत न धरतां केलेलें (पंचांग, कुंडली). [सं. निर्+अयन] **०पंचांग**–न. अयनगति हिशेबांत न घेतां ग्रहलाघवादि ग्रंथांवरून तयार केलेलें पंचांग. **०वर्ष**–न. सूर्य रेवतीच्या योगतारेपासून निघून पुनः त्याच तारेंत आलेला दिसण्याला जो काल लागतो तें वर्ष. –सूर्यमाला ९३.

**निरयास**—वि. आयास, त्रास, श्रम वगैरेशिवाय. 'निरयास गेले रसरायाचे।' –भाए ९९. [सं. निर्+आयास]

**निरर्गल**—वि. बेछूट; स्वैर; बेताल; निरंकुश पहा. [सं. निर्+अर्गला=शृंखला]

**निरर्थक, निरर्थ**—वि. १ अर्थशून्य (शब्द, प्रयोग इ०). २ ज्यांत नफा, फायदा नाहीं असा (धंदा, श्रम). ३ फुकट; निष्फळ; पोकळ. ४ अनावश्यक; निरुपयोगी. –क्रिवि. उपयोगावांचून; विनाकारण. (क्रि० मारणें; बोलणें). [सं. निर्+अर्थ+क]

**निरलस**—वि. आळस, जडपणा, सुस्ती इ० नसलेला; उद्योगी; चलाख; चपल; तलख. [सं. निर्+आलस्य]

**निरवकाश**—वि. १ वेळ, फुरसत नसलेलें. २ मुळींच वेळ शिल्लक नसलेला; मुदत, वेळ संपलेला. ३ जागा, स्थळ नसलेला. 'शून्य सांडोनि निरवकाश। तेंचि कृष्णहृदय सावकाश।' –एरुस्व १.३८. ४ निबिड; दाट; घट्ट. [सं. निर्+अवकाश]

**निरवंकिणें**—सक्रि. निश्चय करणें. –मनको.

**निरवटॉ**—वि. (गो.) साधा; नुस्ता. 'निरवटॉ चा'=दुधाशिवाय केलेला चहा. [सं. निरा=बिन मिश्रणाचें]

**निरवडी**—स्त्री. १ निग्रह; निश्चय. –शिशु ५६८. 'निज आत्मा निर्गुण निरवडी। जाय परती आहेसी तूं वेडी।' –ब २९८. २ चातुर्य; कौशल्य; युक्ति. 'नेणती युद्धाची निरवडी। रणपरवडी माराची।' –एरुस्व ९.२. ३ सावधानता. 'अत्यंत साधूनि निरवडी। मनोजयो आणितां गोडी।' –एभा २९.५९.

**निरवणी, निरवणूक**—स्त्री. सोंपविणें; स्वाधीन करणें. [निरवणें]

**निरव(वि)णें**—उक्रि. १ ताब्यांत देणें; स्वाधीन करणें; सोंपविणें; विशिष्ट सूचनांसह हवालीं करणें; व्यवस्था सांगणें. 'निरवणें धरणें सुखदायका।'–दावि १३२. 'गड निरवितो गडकऱ्याला राज्य निरवितो नेतोजीला।' –ऐपो १७. २ कार्य सोंपविणें; समर्पिणें. 'तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी। मग मज हरि उपेक्षिना।' –तुगा २२०७. ३ पाठविणें; निरोप देणें. 'भीमक शुद्धमति गहिंवरोन। रुक्मिणीसी निरविती।' –ह २४.१७३. ४ देणें; नेमणें. 'हे कन्या त्याचि धन्या कृतिसि निरवली साच त्याचीच भाजा।' –आसी ३१. ५ सांगणें; बजावणें. 'अश्वपति बापें सात वेळां निरविलें।' –वसा ६२. [सं. निर्वर्तन ?] **निरवानिरव**–स्त्री. आटोपाआटप; आवरासावर; प्रवासाला निघतांना किंवा मरतांना घर, मुलें, जनावरें इ० सर्व गोष्टींची विल्हेवाट लावणें; व्यवस्था करणें; अनेक पदार्थांची अनेकाजवळ व्यवस्था लावणें. [निरवणें द्वि.] **निरवानिरवीची वेळ**–स्त्री. अंतकाळ; निर्वाणीची घटिका.

**निरवधि, निरवधिक**—वि. १ अनंत; बहुत; अमर्याद; सीमारहित. 'सुधी म्हणति निरवधी काळ त्यामध्यें दीडपायली।' –ऐपो ३७१. २ निरंतर; सतत; एकसारखा. ३ निःसीम. 'सद्गुरूतें मनुष्यबुद्धी। पाहोंचि नेणे त्रिशुद्धी। सेवे लागीं निरवधी। हर्षानंदीं तत्पर।' –एभा २.३२८. [सं. निर्+अवधि]

**निरवयव**—वि. अवयवविरहित; गात्रविहीन; प्रत्यंग, उपांग नसलेला. 'निराकार निरवयव भेटे परब्रह्म।' [सं.] **०अंक**–पु. (अंकगणित) पूर्णांक; पूर्ण संख्या.

**निरवलंब**—वि. १ आश्रय, आधार नसलेला. २ अवलंबून नसणारा; स्वतंत्र; स्वाधीन; स्वावलंबी. [ सं. निर्+अवलंब ]

**निरवेगळणें**—उक्रि. निराळे ठेवणें; वेगळें, बाजूला करणें. 'आपुली विद्या तीव्र शस्त्र। शत्रुकाननीं निनाशपात्र। ती कार्यार्थि निरवेगळीत स्वतंत्र। तरी देवक्षोभ जाणावा।' –नव १४.१२२. [ निर+वेगळणें ]

**निरशन**—न. १ उपवास. २ कडकडीत, निर्जळी उपवास. [ सं. निर्+अशन ] –वि. कडकडीत; निर्जळी ( उपवास ).'आज त्याला निरशन एकादशी आहे.'

**निरशी-सी**—स्त्री. १ बेचवपणा; अरुचि. २ तिटकारा; वीट; चिळस; नावड; कंटाळा. 'एकच भाजी नित्य होऊं लागली म्हणून तिची निरशी आली.' –वि खरकटी नसलेली स्पर्श न केलेली; उष्टी न केलेली; निर्लेप. [ नि+रस ]

**निरस**—वि. १ दुय्यम; गौण प्रतीचा, गुणाचा. याच्या उलट सरस. 'दिले अटकेवर जरिपटका करितो लखलख। भाले बोथाट्या भाले वरच्छ्या हौदे अंबारी सरशा निरशा।'–ऐपो २४०. 'हें सोनें निरस आहे.' २ बेचव. [ सं नि+रस ]

**निरसणें**—सक्रि. १ फेंकून देणें; दूर, बाजूला सारणें; वर्जणें; काढून टाकणें; घालविणें; नाश करणें: टाकून देणें. 'निज बोधें संसारदुःख। निरसूनि दिधलें निजमुख।'–एभा १०.३४७. 'जेणें नामसंकीर्तन करूनिया। निरसली सकळ प्रपंच माया।' २ मिथ्या ठरविणें, समजणें. 'तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजे सांडवलें। मग तत्त्वता तत्त्व उरलें। ज्ञानियासि।' –ज्ञा २.१३१. 'तुका म्हणे आस निरवली।' –तुगा ५३. –अक्रि. संपणें; जाणें; दूर होणें; गळणें; कायमचें नष्ट होणें. 'जैसी रात्र निरसतां उठती जन।' –रावि ७.८४. 'प्राप्त होतां आत्मज्ञान। भ्रांतितम निरसून जाय स्वयें।' [ सं. निर्+अस्=फेकून देणें ] **निरसन**–न. १ परिहार; निरसण्याचा व्यापार. 'संकटनिरसन.' २ नाकारणें; अस्वीकार; टाकणें; फेंकणें. [ सं. ] **निरसनी**–स्त्री. निरिच्छा; वीट; तिटकारा. निरशी अर्थ २ पहा. 'नेदीच तो निरसनी धरिली मुकुंदें।' –अकक २, कृष्णकौतुक ५०. [ नि+रस ] **निरसित, निरस्त**–वि. फेकलेलें; दूर केलेलें; नाकारलेलें.

**निरसा-सें**—वि. न तापविलेलें; पाणी न मिसळलेलें (दूध) 'तोंड भरून गोड बोल। जैसा निरशा दुधाचा खवा।' –सला ५३. निरशी पहा. [ नि+रस ]

**निरसी**—स्त्री. १ दुय्यमावस्था; गौण दर्जा; गौणता. याच्या उलट सरसी. निरशी पहा. २ (कामानें आलेला) कंटाळा; थकवा: शिथिलता. ( क्रि० येणें ). [ निरस ]

**निरहंकार-कारी**—वि. गर्व, ताठा, नसलेला; नम्र; विनयशील. [ सं. निर्+अहंकार ]

**निरहंमान**—वि. निरहंकार पहा. [ सं. निर्+अहंमान ] **निरहंमानता**–स्त्री. नम्रता. [ सं ]

**निरहर**—न. बुद्धिबळांतील मोहरें. 'तैसें कर्तृत्व अहंकारें। नेघोनि यथा अवसरें। कृत्यजातांची निरहरें। सारिजती।' –माज्ञा १८.१७०.

**निरक्षर**—वि. अक्षरशत्रु; अशिक्षित; अविद्वान् [ निर्+अक्षर ]

**निरा**—पु. ताडाच्या किंवा खजुरीच्या झाडांपासून निघणारा, न अंबलेला रस; एक प्रकारचें मद्य.

**निरा**—पु एक प्रकारचें पांढरें गवत.

**निरा**—वि. शुद्ध; निर्मळ; निरसें; स्वच्छ. 'दिवसानदिवस रंग चढता निरा गहिरा।' –सला ३८. –क्रिवि (व.) अगदीं; नुसता; केवळ. 'तूं निरा वेडा आहेस.' [ हिं. निरा ]

**निराकरण, निराकार-कृति**—नपुस्त्री. १ निरसन पहा. २ खंडन; निवारण; परिहार. [ सं. ] **निराकारणें, निराकरणें**–उक्रि. (काव्य) नाकारणें; निषेध करणें; नाकबूल करणें. 'जें कर्मजात आघवें। एथ निराकारिले देवें।' –ज्ञा २.३७२. 'तो नव्हे तिचा पति म्हणोनि। असें निराकरिति नां येणें शब्दें।'

**निराकार**—वि. आकाररहित: निरवयव ( परमेश्वर, परब्रह्म ). [ सं. निर्+आकार ]

**निरांकार**—पु. एक पिशाच्च. –मसाप ४.४.२८०. –वि. (कु.) विचित्र; वेडसर वृत्तीचा.

**निराकांक्ष**—वि. निरिच्छ; निष्काम. [ सं. निर्+आकांक्षा ]

**निराकृत**—वि. १ झांकून दिलेला. निरसित पहा. २ नाकबूल केलेला; निषिद्ध [ सं. ]

**निराकृति**—वि. (शाप.) अनियमिताकृति: स्फटिक नसलेला; बिन आकृतीचा; ज्याला विशिष्ट आकार नाहीं असा. (इं.) कोलॉइड. [ निर्+आकृति ]

**निराचार**—वि. वेदविहित आचार न पाळणारा; राक्षसवृत्ति; रानटी; अडाणी; जंगली. [ सं. निर्+आचार ]

**निरांजणें**—क्रि. त्रासणें; वैतागणें; कंटाळणें. –तुगा. [ नि+रंजन ]

**निरांजन, नीरांजन**—१ आरती ओंवाळण्याचें पात्र: तूपवातीचा दिवा. 'वस्त्रें अलंकार सुमनें। नाना उपहार बलिदानें। दीपावली नीरांजनें। सावधानें अर्पिलीं।' –एरुस्व ६.८४. २ आरती; ओवाळणी. ( क्रि० करणें ). 'नीरांजनें करिति तीस अनेक नारी।' –सारुह ६.३६. [सं. नीराजन] **०परो**–वि. (गो.) अक्कलशून्य.

**निरांजनी**—स्त्री. (व.) निरांजन पहा.

**निराट**—वि (कु.) झाडांची छाया वगैरे नसलेली; मोकळी; उघडी; उन्हाची (जागा).

**निराधार**—वि. १ निराश्रित; पाया, आधार नसलेली (मनुष्य, वस्तु, इमारत). ज्याला आधाराची, आश्रयाची जरूरी नाहीं असा (ईश्वर). २ अप्रमाण; अविश्वसनीय (बातमी). [सं.]

**निरानिपटा-निपटारा**—पु. १ शिल्लक राहिलेलें काम, भानगडी वगैरे संपविणें, निकालांत काढणें; आरंभिलेला धंदा, गोष्टी वगैरे शेवटास नेणें; खटला, फिर्यादी इ० निकालांत काढणें. (क्रि० करणें). २ स्वच्छ, साफसफाई करणें; चाट्नपुसून लख्ख करणें; निपटून काढणें; वाहून नेणें; लुबाडणें; नाहींसें करणें (जेवलेलें ताट, घरांतील सामान इ०). (क्रि० करणें). [निरा=अगदीं, पूर्णपणें+निपटणें]

**निरानिस्तरा**—पु. निस्तरानिस्तर पहा.

**निरापेक्ष**—वि. निरिच्छ; (प्र.) निरपेक्ष. [सं. निरपेक्ष्य]

**निराभास**—वि. १ भास किंवा दृश्य यांच्या विरहित; असत्य, माया यानीं नियुक्त (ब्रह्म, ईश्वर). याच्या उलट साभास. प्रतिभास पहा. २ कोणत्याहि सादृश्यानें, कल्पनेनें किंवा मानसिक भावनेनें प्रगट करून दाखविण्यास असमर्थ (ईश्वर). 'साकार साभास आभास। चौथें जाणिजे निराभास। याहूनि पर तूं परात्पर हंस। तृणावर्तप्राणहरणा।' –ह २०.१४५. [सं. निर्+आभास]

**निराम**—वि. (वैद्यक) अपचनापासून न उद्भवलेला (ताप, आजार–हा पित्ताश्रित, कफाश्रित इ० असतो). याच्या उलट साम (आमसहित). [सं. निर्+आम]

**निरामय**—वि. १ आजारी नसलेला; निरोगी; आनंदी 'मग निरामय भरित। पावती पद अच्युत।' –ज्ञा २.२७९. २ रोग, सांथ वगैरे नसलेला (देश, जागा). ३ निश्चित; निर्भय; शांत (मनुष्य, निद्रा) ४ त्रास, कटकट नसलेली; निरुपाधिक (जागा, धंदा, नोकरी इ०) 'आनंद अद्वय नित्य निरामय। जेकां निजध्येय योगियांचें।' –तुगा ८२६. [सं. निर्+आमय]

**निरामिष**—वि. १ मांसविरहित. २ लांचलुचपत नसलेली. [सं. निर्+आमिष]

**निरालंब**—वि. निराश्रय; निरवलंब पहा. 'जिहीं सकळभूतांचिया हितीं। निरालंबीं अव्यक्तीं। पसरलिया आसक्ती। भक्ती वीण।' –ज्ञा १२.६०. –न. १ आकाश. –शर. (भारा युद्ध २९.७९.) २ निराकार (परब्रह्म). 'नि लंबींची वाडी। होती त्रिभुवनायेवढी।' –ज्ञा १३.४४. [सं निर्+आलंब]

**निरालय**—वि. अविनाशी; अक्षय; कधींहि नाश न होणारें. [सं. निर्+लय]

**निरालस्य**—न. आळस, सुस्ती इ० नसणें; चपळाई; तडफ. तल्लखी; उद्योगीपणा. [निर्+आलस्य]

**निराविणें**—उक्रि. (कों.) निराळें करणें आणि बाहेर पसरणें; मोकळें करून अलग अलग पसरणें, वाळत टाकणें (कपडे, धान्य इ०–ऊन, हवा लागण्यासाठीं).

**निराश-स**—वि. १ आशाभंग झालेला; आशा नसलेला; हताश; खिन्न. २ निरिच्छ; आशा, इच्छा नसलेला; निरपेक्ष. [सं.]

**निराशणें-सणें**–अक्रि. (काव्य.) आशा सोडणें; हताश होणें.

**निराशता**–स्त्री. निरिच्छता. 'कर्मसंगें निराशता। फळाचिया।' –ज्ञा ४.९३.

**निराशा**—स्त्री. १ आशाभंग; आशा नसणें; हताशा. 'निराशेसारखें सुख नाहीं.'–स्वयंवर ७३. २ निरिच्छपणा; निष्कामता (मोक्षाला, चिरशांतीला ऐहिक आशा, इच्छा हानिकारक असते म्हणून तिच्यापासून मुक्तता). [सं] ०**वाद-मत**–पुन. मनुष्याच्या आयुष्यांत सुखापेक्षां दुःखच जास्त आहे असें मत. (इं.) पेसिमिझम्.

**निराश्रय-श्रयी, निराश्रित**—वि. आश्रय, संरक्षण नसलेला; निराधार पहा. [सं. निर्+आश्रय]

**निरास, निरासन**—पुन. निरसन पहा.

**निरास**—स्त्री. (कुण.) निराशा. 'करितां दान हेंचि मागावयास। नका भार घेऊं करूं निरास।' –तुगा ३४५. [निर्+आशा–आस]

**निरासचें**—क्रि. (गो.) निर्दाळणें. [निर्+अस् निरास]

**निराहार**—पु. १ मुळींच न खाणें; कडकडीत उपवास; निर्जळी. २ निरशन फराळ; नेहमीसारखें अन्न न खातां धान्यविरहित फळें किंवा कांहीं विशिष्ट पदार्थ वगैरे निराळें पण थोडें खाणें. **निराहार-री**–वि. निराहार करणारा; उपवास करणारा. 'म्हणे मज निराहाऱ्या होतें मरण। हा तंव करितो फळभक्षण।' [सं. निर्+आहार]

**निराळ**—न. (काव्य) १ आकाश; अंतराळ; अवकाश. –ज्ञा ११.६७९. 'प्रभेनें निराळ कोंदलें।' –रावि १०.२३. २ निराकार, निराश्रयस्वरूप ब्रह्म. ३ निराश्रित ठिकाण. 'तरी अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निराळें।' –ज्ञा ६.५७. [सं. निरालय] **निराळे पोटीं**–क्रिवि. रिकाम्या पोटानें; अनशीपोटीं.

**निराळा-ळें**—वि. १ वेगळा; स्वतंत्र; विवक्षिताहून इतर; अलग; न जोडलेला. २ दुसरा; वेगळा; अन्य. ३ असंयुक्त; भिन्न; विभक्त; न जमणारा; असदृश; परका. (समासांत) मर्जी–संप्रदाय–रीती–लोका–धर्मा–आज्ञे–निराळा. वेगळा पहा. [सं अन्यतर–अन्यअर–न्यार (+ल प्रत्यय) –न्यारल–निराळ. –भाअ १८३३.]

**निरिच्छ**—वि. इच्छारहित; निराकांक्ष पहा. [ निर्+इच्छा ] **निरिच्छा**–स्त्री. इच्छा नसणें. निराशा अर्थ २ पहा.

**निरिंद्रिय**—वि. १ नपुंसक; प्रजोत्पादनास असमर्थ; षंढ. २ हस्तपादादि इंद्रिय, अवयवरहित; व्यंग असलेला. ३ ( रसा. ) जडपदार्थविषयक. ( इं. ) इनऑर्ग्यानिक. [ सं. निर्+इंद्रिय ]

**निरी**—स्त्री. धोतराची किंवा लुगडयाची चुणी; मिरी; घडी; वस्त्र नेसतांना हाताच्या बोटावर पाडलेली एकावर एक घडी. 'तथापि वोढी उगली निरी हा।' –सारुह १.६८. 'वीरश्रेणी निऱ्याग्रंथीं। सुटली नावरे उभयहस्तीं। प्रणयगुप्त झांकोनि परौती। पळे सत्वर लाजली।' –मुआदि २३.१४२. २ चुणी; घडी. ३ मळसूत्राच्या खोबणींमधील उंचवटा, कडा. ४ चर काच्या कडेच्या लाटांचे पुढें मागें होणारे भाग. [ सं. नीवि ]

**निरीपिरी**—स्त्री. ( व. ) निरवानिरव; आंवराआवर. 'निरीपिरी झाल्यावर मग जेवण करतो.'

**निरीम**—पुन. ( कों. ) गलबत रिकामें असतां तें जरूरीइतकें जड होण्यासाठीं (तें न बुडावें म्हणून) त्यांत घातलेले दगड, लोखंड वगैरे वजन; निलीम. ( इं. ) बॅलस्ट.

**निरीश्वरवाद**—पु. ईश्वराचें अस्तित्व न मानणारें मत. [ सं. ] **निरीश्वरवादी**–पु. या मताचा मनुष्य; पाखंडी.

**निरीह**—वि. १ निरिच्छ पहा. निराश अर्थ २ पहा. २ निरासक्त मनाचा. [ निर्+ईहा ]

**निरीक्षण**—न. लक्षपूर्वक बारीक अवलोकन; तपास; परीक्षा. निरखणें पहा. [ सं. ] **निरीक्षणें**–उक्रि. बारकाईनें पाहणें. निरखणें पहा. 'जिन्हें आपली चवी चाखणें। चक्षु निज बुबुळ देखणें। आहे तया ऐसे निरीक्षणें आपुलें पैं।' –ज्ञा १५.२७२. **निरीक्षित**–वि. बारकाईनें पाहिलेला, तपासलेला, विचार केलेला.

**निरुक्त**—न. १ एक वेदांग. वेदांतील कठिण शब्दांचे अर्थ स्पष्ट करणारें शास्त्र. २ वेदार्थ स्पष्ट करणाऱ्या निघंटु नामक वैदिक शब्दग्रंथावर भाष्य (हें यास्काचार्यांनीं लिहिलेलें आहे). ३ अर्थ स्पष्टीकरण; व्याख्या; शब्दांचें व्युत्पत्तिकथन. निरुक्ति पहा. [ सं. ] –वि. गुणधर्मांचें, परिस्थितीचें ज्यांत विवेचन, स्पष्टीकरण केलें आहे तें; व्याख्यात. [ सं. ] **निरुक्ति**–स्त्री. १ पदार्थाचें स्वरूप समजण्यासाठीं बांधलेलें लक्षण. २ लक्षणादिकेंकरून केलेलें स्वरूपकथन; व्याख्या; वर्णन. 'गुरुशास्त्र आणि तिसरी प्रचीति। चालिल्या निरुक्ती वेदामार्गीं।' –ब २५३. ३ शब्दाची व्युत्पत्तिसिद्धि.

**निरुज**—वि.निरोगी. –ज्ञा १३ १७५. 'कांसवघृतेसि आरोगी। निरुजा रोगी व्हावया।' –एरुस्व ११.३४. [ सं. निर्+रुज; नीरुज ]

**निरुता–ती–तें**—वि. (काव्य) खरें; शुद्ध. 'ज्ञान उपदेशावें निरुतें।' –विपू १.६३. –क्रिवि. खातरीनें; स्पष्टपणें; निश्चयानें; खरोखर; खचित. 'दुर्जे येथें कोणी नाहीं कृष्णाविण। निरुतें जाणोन पुसे देवा।' –तुगा ३५. 'ऐसी असतां उदासवृत्ती। द्वादशवर्षे क्रमिलीं निरुती।' –भवि २२.३१. **निरुतें**–न. खरेपणा; निश्चय. [ सं. नि+ऋत=खरें ]

**निरुती**—स्त्री. १ प्राप्ति. २ निर्णय; निश्चय. 'या निरुती करितां बोला। युगें गेलीं।' –ज्ञा १०.६७. ३ युक्ति; रीत. –माज्ञा १८.१३०. 'ऐशिया समयोगाची निरुती। लाहोनि जे देह टेविती।' –ज्ञा ८.२२१.

**निरुत्तर**—न. उत्तराचा अभाव. 'तुमच्या बोलण्यावर निरुत्तर हेंच उत्तर.' –वि. काय उत्तर द्यावें हें न कळणारा; कुंठित; स्तब्ध. [ सं. निर्+उत्तर ]

**निरुत्साह**—वि. १ उत्साह नसणारा; हताश; खिन्न. २ निर्जीव; हिंमत नाहींशी झालेला. [ सं. निर्+उत्साह ]

**निरुंद**—वि. अरुंद पहा. [ नि+रुंद ]

**निरुद्ध**—वि. बद्ध; बांधलेला; आंवळलेला; कैदेंत टाकलेला; ताब्यांत ठेवलेला, आणलेला. [ सं. ]

**निरुद्योग–गी**—वि. १ उद्योग, कामकाज नसलेला; बेकार; व्यवसायहीन. २ निकामी; आळशी; रिकामा बसणारा. [ सं. निर्+उद्योग ]

**निरुंधणें**—उक्रि. निरोध, प्रतिबंध करणें; अडविणें. 'एक अपानु प्राणीं अर्पिती। एक दोहीं तें निरुधिति।' –ज्ञा ४.१४६. [ निरुद्ध ]

**निरुपकारी**—वि. १ कृतघ्न; उपकार न जाणणारा. २ उपकार न करणारा; दया, कृपा न करणारा; कोणाच्या उपयोगी न पडणारा. [ सं. निर्+उपकार ]

**निरुपचार**—वि. १ कारणाशिवाय; निर्निमित्त. 'आणि निरुपचारा प्रेमा। विषय होय जें प्रियोत्तमा।' –ज्ञा १८.१३४६. २ उपाधिरहित. 'जो निर्गुण निर्विकार। जो निष्कर्म निरुपचार।' –एरुस्व १.२०. [ सं. निर्+उपचार ]

**निरुपद्रव–वी**—वि. १ त्रास, उपद्रव, कटकट न करणारा. २ गरीब; निरपराध. [ सं. निर्+उपद्रव ]

**निरुपम–पम्य**—वि. अप्रतिम; अतुल; अद्वितीय; ज्याला कशाचीहि उपमा देतां येत नाहीं असा. 'जें अद्वितीय उत्तम पवित्रैक निरुपम।' –ज्ञा १.४९. [ सं. निर्+उपमा ]

**निरुपयोग–गी**—वि. १ उपयोगी न पडणारा; कारणीं, कामीं न लागणारा. २ कुचकामाचा; व्यर्थ. [ सं. निर्+उपयोग ]

**निरुपहित**—वि. उपाधिरहित. ज्याच्या मागें कोणतेंहि बंधन, व्याप, अडचण, वगैरे नाहीं असा. 'ऐसें जडाजडव्याप्ती। रूप करितां कैवल्यपती। टी केली निरुपहितीं। आपुल्या रूपीं।' –ज्ञा १५.४४२.

**निरुपाधि, निरुपाधिक**—वि. उपाधि, त्रास यांपासून मुक्त; उघडा; सरळ ( ज्ञान, रूप, हेतु, आत्मा इ० स लावतात ). 'तो गा मी निरुपाधिकु।'–ज्ञा १५.५५७. [ सं. निर्+उपाधि ]

**निरुपाय**—पु अपरिहार्यता; अनन्यगतिकता. 'माझा निरुपाय झाला म्हणून असें कर्म केलें.' [ सं. निर्+उपाय ]

**निरुपाय-यी, निरुपाई**—वि. १ उपाय नसलेला; नाइलाजाचा; अगतिक. २ अपरिहार्य. 'जगदीश्वर कोपला गोष्ट झाली खरिच निरुपाई। म्हणून एकाएकीं सर्वे बुडाली ब्राह्मणबाच्छाई।' –ऐपो ४२०. [ निरुपाय ]

**नि रू**—पु. चुन्याच्या बांधकामावर घांसून त्यास सफाई देण्याकरितां मसाला घालून तयार केलेला बारीक चुना; रुनला. ( क्रि० लावणें ). 'दगड चांगल्या निरूंत बसवावे.' –मॅरट ३७.

**निरू-रें**—वि. १ निर्भेळ; स्वच्छ; निरा (–वि.) पहा. २ निरसें. 'उगा नको रडूं श्रीरंगा यशोदेसी सोडी कैसा। तुझी धरितें हानुवटी मी, निरें दुध पेई पेई।' –होला ३३. [ निरा ]

**निरूढी**—स्त्री. १ लोकाचार; लोकरीति. २ लोकप्रसिद्धि. 'निरूढी जळघट घेईजे शिरीं। तेवीं वंदावे बळिष्ठ वैरी।' –मुआदि ३४.८१. [ सं. ]

**निरूपक**—वि. १ वर्णन, निरूपण करणारा. २ सांगणारा; कथन करणारा; जाहीर करणारा; सुचविणारा. [ सं. नि+रूप् ]

**निरूपण, निरोपण**—न. १ कथा; वर्णन; लक्षण–स्वरूप–प्रामाण्यादिकें करून केलेलें कथन. 'पुराणीं बैसतां जावून। तों निरोपण निघालें।' २ निवेदन; विवेचन; व्याख्यान. 'तुका म्हणे निरोपणीं। शेट झालं ब्रह्मज्ञानी।' [ सं. निरूपण ] **निरूपणीय**–वि. १ वर्णन करण्यास, कथनास योग्य; कथनीय. २ निरोपण्यास, सांगण्यास युक्त; सांगावयाची (गोष्ट). **निरूपिणें**–उक्रि. १ वर्णन करणें; लक्षण–स्वरूपादिकें कांहीं एक गोष्ट कथणें. 'आतां यावरी तो वैकुंटनाथु। देखोनि सखेद पार्थु। कवणेपरी परमार्थु। निरूपील।' –ज्ञा १२७४. २ सांगणें; निवेदन, जाहीर करणें. **निरूपित**–वि. कथन, निरूपण केलेलें; सांगितलेलें. **निरूपिता**–वि. निरोप्या. 'तैसा मी अनुग्रहीतु। साधूंचा निरूपितु।' –ज्ञा १.८२. **निरूप्य**–वि. सांगावयाजोगें; कथन करावयास योग्य; वर्णन करण्यासारखें. निरूपणीय पहा. 'म्हणौनि इये अध्यायीं। निरूप्य नुरेचि कांहीं।' –ज्ञा १६.४६.

**निरेखणें**—सक्रि. निरखणें पहा. [सं. निरीक्षण; हिं. निरखना]

**निरांखी**—स्त्री. आल्यासारखी एक औषधी वनस्पति. ही दम्यावर उपयोगी आहे. मधांत खावयास देतात. –बदलापूर १६३.

**निरोग-गी**—वि. रोग नसणारा; निकोप प्रकृतीचा; धड धाकट. [ सं. ] ०**करणें**–बरा करणें; प्रकृति सुधारणें. 'रामवार्ता निरोगी करी। अल्प मात्र भवार्ता।' [ सं. ]

**निरोध**—पु. १ प्रतिबंध अटकाव; कैद; अडथळा. 'बेझंटबाईचा निरोध करून ... स्वराज्याच्या चळवळीस धोका आणण्यांत शहाणपणा कोणता?' –टि ३.३४१. २ नियमन; संयमन; बंधन; प्रतिकार. [ सं. ] **निरोधक**–वि. १ दाब, आटोका, ताबा, बंधन इ० त ठेवणार; दमन करणारा. २ अटक, प्रतिकार करणारा; अडथळा आणणारा. **निरोधणें**–सक्रि. १ निग्रह, दमन, संयमन करणें. 'परी कर्मेंद्रियप्रवृत्ती। निरोधुनि।' –ज्ञा ३.६४. २ बंधन, ताबा इ०मध्यें ठेवणें; अटकाव; हरकत करणें. ३ रुद्ध करणें; आडवणें; रोखणें. –एभा ६.३२२. 'वर्मे जाणती त्या एकल्या एकटा। बैसतील वाटा निरोधूनि।' –तुगा १४. **निरोधन**–न. १ निग्रह; दमन; दाब; बंधन. २ अटकाव; प्रतिकार; अडथळा. ( इं. ) पिकेटिंग. 'विदेशी कापड विकण्याबद्दल अहमदाबाद स्वयंसेवकांनीं निरोधन करून अन्नत्याग केला.' –के २.१२.३०.

**निरोप**—पु. १ आज्ञा. 'वेदांचिया निरोपा। आन न कीजे।' –ज्ञा १६.४५५. 'ब्राह्मण म्हणे श्रीगुरुसी। जो निरोप घाल मजसी।' –गुच ३८.३५. २ संदेश; मजकूर. ३ जाण्याची परवानगी; रुखसत; जाण्यास दिलेली, घेतलेली परवानगी. ( क्रि० घेणें; देणें ). ४ सन्मानानें केलेला पाठवणी; बोळवण. ५ ( गो. ) शेतकापणीचा परवाना मालकाकडून मिळण्याच्या वेळीं शेतकऱ्याकडून मालकास मिळणारी भेट. [ सं. निरूपण ] **(दिव्याला)** ०**देणें**–दिवा मालविणें. **निरोपानिरोपीं**–क्रिवि. नुसत्या तोंडी निरोपावरून; निरोप आल्या–पाठविल्यावरून. **निरोप्या**–वि. १ संदेशवाहक; निरोप सांगणारा, पोंचविणारा. २ ज्याला परिस्थितीप्रमाणें कामांत फेरफार करण्याचा अधिकार नसून आज्ञेप्रमाणें चालावें लागतें असा. ३ फक्त निरोप सांगण्याच्या उपयोगी; स्वतःची बुद्धि नसणारा.

**निरोपण, निरोपिणें, निरोपित**—निरूपण इ० पहा.

**निरोविणें**—निरोपिणें पहा. १ सोडणें. 'तेथ निरोविलें व्यासें। तें नेदीच हों।' –ज्ञा १८.५५२. २ आज्ञा देणें, सांगणें. 'निरोविलें जैसें सुणें। शून्यग्रामीं।' –ज्ञा ९.५३०. [ निरूपण ]

**निरोळणें**—अक्रि. तयार होणें. 'सहजें निरोळले वाफे चतुरचित्ताचे।' –ज्ञा ६.४९०.

**निरौता-तें**—क्रिवि. वास्तविक; स्पष्ट; निरुता–तें पहा. 'तें निरौता खुणू जाणेती।' –दाव ३३२

**निर्ऋति-ती**—स्त्री. १ नैर्ऋत्य दिशा; दक्षिण आणि पश्चिम या दिशांमधील उपदिशा. २ ( ल. ) नाश; मृत्यु; विपत्ति. –पु. नैर्ऋत्य दिशेची देवता. [ सं. ]

**निर्गणचा**—वि. (निर्गुण परमेश्वराची मूर्ति बनविणारा यावरून ल. ) असमर्थ; अक्षम; नालायक; अयोग्य; निरुपयोगी; अकुशल. ( कारकून, कारभारी, कारागीर इ० ). [ सं. निर्गुण ]

**निर्गत**—स्त्री. १ सिद्धि; यश; सुपरिणाम; आनंददायक निकाल; उलगडा. ' माझ्या हातून या कामाची निर्गत लागेलसें वाटत नाहीं. ' २ निर्गम; सद्गति. –स्त्रीन. १ बाहेर, परदेशीं जाणारा, निर्यात होणारा माल. २ अशा मालावरील जकात. याच्या उलट आयात. [ सं. निर्गति ] –वि. गेलेला; पासुन, कडून आलेला, निघालेला; परतलेला. [ सं. ]

**निर्गंध**—वि. वास नसलेला. [ सं. निर्+गंध ]

**निर्गम**—पु. १ सद्गति. २ शेवट; परिणाम; निकाल. ३ निर्गमन; पुढें अथवा बाहेर जाणें. ४ सुटका; मोकळीक. [ सं. ]

**निर्गमागम**–पु. बाहेर जाणें व आंत येणें; येजा. ' निर्गमागमीं दातारें । जें वोलांडिजती उंबरे । ' –ज्ञा २३.४१५. [ निर्गम+आगम ]

**निर्गांठ**—स्त्री. गांठीचा एक प्रकार; लवकर किंवा सहज न सुटणारी गांट; घट्ट बांधलेली गाठ. याच्या उलट सुरगांठ किंवा निसरगांठ [ सं. निर्ग्रंथि ]

**निर्गुंड–डी, निर्गूंड–डी**—स्त्री. एक झाड. हें दीड–दोन पुरुष उंच वाढतें. याच्या साधी व कात्री अशा दोन जाती असून कात्री निरगुडीचीं फुलें निळ्या रंगाचीं व पानें कातरल्यासारखीं असतात. साध्या निर्गुंडीस पांढऱ्या रंगाचीं बारीक फुलें येतात. काळी निर्गुडी म्हणूनहि एक जात आहे. रानटी निर्गुंडीस वणई म्हणतात. ही औषधी आहे. निगई पहा. [ सं. निर्गुंडी ]

**निर्गुण–णी**—वि. १ गुणातीत; सत्त्वरजतमादि गुणरहित, त्रिगुणांच्या पलीकडचा ( परमात्मा, परब्रह्म ). ' ना ते निर्गुणाचे अवेव । निजगौरव स्वानंदें । ' –एभा १.३८. २ चांगले गुणधर्म, गुण नसलेला ( माणूस, पदार्थ ); गुणरहित. ' जें निगर्वाचें गौरव । जें निर्गुणाची जाणिव । '–ज्ञा ८.१९४. [ सं. ] **०सायुज्य**–न. ब्रह्मसायुज्य; मोक्ष. **०साक्षात्कार**–पु. जीवाचें जीवरूप जाऊन ब्रह्मत्व प्राप्त होणें. परमेश्वराचा अंतर्यामीं साक्षात्कार होणें.

**निर्ग्रंथ**—पु. नास्तिक; आत्मवादी; एक पंथ. –मिताक्षरा. [ सं. ]

**निर्घृण**—वि. निर्दय; निष्ठुर; कठोर अंतःकरणाचा. [ सं. ]

**निर्घोर**—वि. निघोर १ निष्काळजी; बेफिकीर. भयविरहित. ' शिव निर्घोर होऊनि देख । दुरूनि पाहे कौतुक । ' २ निःशंक; कांहीं शंका, भय नसणारा. [ सं. निर्+घोर=काळजी ]

**निर्जन**—वि. १ ओसाड; वस्ती नसलेलें. २ एकांत, निवांत; आड, एकीकडे असलेली ( जागा ). [ सं. निर्+जन ]

**निर्जर**—पु. देव. ' दवीं पुष्पवृष्टी केली । आनंदले निर्जर । ' –भवि १.९९. –वि. १ अमर; अविनाशी. २ जराहीन; म्हातारपण नसलेला. [ सं. निर्+जरा ]

**निर्जल**—वि. १ अगदीं पाणी नसलेला किंवा फार थोडें पाणी असलेला ( देश, प्रांत ). २ ज्यांत पाणीहि प्यावयाचें नाहीं असा ( उपवास ). ३ कोरडा; शुष्क. ४ ( शाप. ) जलरहित; अनार्द्र. ( इं. ) अन्हायड्रस. **निर्जली–ळी, निर्जली एकादशी**–स्त्री. ज्येष्ठ शुद्ध एकादशी; या उपवासांत नित्यकर्मापैकीं संध्येंतील आचमनाच्या पाण्याशिवाय इतर पाणी प्यावयाचें नसतें. [ निर्+जल ]

**निर्जित**—वि. पूर्ण जिंकलेली, दमन केलेली. ' ते बुद्धिसाक्षित्वें निर्जित केली तुंवाचि । ' [ सं. निर्+जी=जिंकणें ]

**निर्जी(र्जि)व**—वि. १ प्राण नसलेला; अचेतन; जड (पाषाण इ०) 'पाहें पा चंदनाचेनि अंगाजिलें । शिवतिले निंब होते जे जवळें । तीहीं निर्जिवीहीं देवांचीं निडळें । ' –ज्ञा ९.४८४. २ अशक्त; दुर्बळ; निःसत्त्व. ' तया देहा म्हणती भेटी । हे सपायी निर्जिव गोठी । ' –ज्ञा १३.१०९७. ३ (ल.) नाजूक; कमजोर. ४ मूर्छित. ' निर्जीव होऊन क्षणेक । ' –गुच ११.८६. [ सं. निर्+जीव ]

**निर्झर**—पु. १ झरा ( पाण्याचा ). ' सोमकांतु निजनिर्झरीं । चंद्रा अर्घ्यादिक न करी । ' –ज्ञा १८.१४. २ जलप्रपात; स्रोत; धबधबा. [ सं. ]

**निर्ढावणें**—उक्रि. १ सहन करण्याची संवय होणें. २(मडकें) पाझरावयाचें थांबणें; पाझरणार नाहीं असें करणें; वहिवाटीमुळें अधिक उपयुक्त होणें. ३ व्यसनादिकांविषयीं निर्लज्ज होणें.

**निर्ण**—न. ( गो. ) मर्म.

**निर्णय**—पु. १ निश्चय; निग्रह. २ सिद्धांत; ठराव. ३ (कायदा) निकाल; निवाडा. [ सं. निर्+नी–नय ] **०पत्र**–न. निकालाचा कागद; निकाल, ठराव, शिक्षा यांचें पत्रक; (इं.) जजमेंट. **निर्णयी, निर्णायक**–न. ( बीजगणित ) कांहीं विशिष्ट बीजगणितांतील फलें. हीं ठराविक नियमांनीं काढतां येऊन विशिष्ट प्रकारांनीं मांडतांहि येतात. (इं.) डिटरमिनंट्स. –वि. १ निकाल, ठराव, निर्णय करणारा. २ निकाल किंवा ठराव करण्याकरितां प्रवृत्त करणारा; निश्चायक; निर्णयास उपयोगी. ३ निश्चित; ठाम. **निर्णायक मत**–न. मतें घेतांना दोन्ही बाजूस सारखीं मतें पडलीं असतां सभापतीनें आणखी एक मत देऊन सूचना निकालांत काढणें शक्य असतें. या सभापतीच्या जादा मताला निर्णायक मत म्हणतात. –सभा ७२. (इं.) कास्टिंग व्होट. **निर्णीत**–वि. १ निर्णय केलेला; ठरविलेला. २ निवाडा, फैसला केलेला; शिक्षा सुनावलेला. **निर्णेय**–वि. निर्णय करण्यास योग्य. **निर्णो**–पु. निर्णय. ' मग निर्णो देती केवळ । त्यजावें ऐसा । ' –माज्ञा १८.१३७.

**निर्णुंचें**—क्रि. ( गो. ) घरीं येणें; भांबावणें.

**निर्तुटक**—न. १ तुटणें; तोडणें; मोडणें ( संबंध, संग, सहवास ). २ भिटविणें; समेट करणें (भांडणाचा). –वि. १ तोडलेलें;

मोडलेलें; विस्कळलेलें. २ निर्णीत; निश्चित केलेलें. [ सं. निर्+त्रुट्; म. तुटणें ]

**निर्तुला**—वि. अद्वितीय; तुलनेस कोणी येणार नाहीं असा; अतुल. [ सं. निर्+तुल् ]

**निर्ददात, निर्दधात**—वि. सुखी; ददात, गरज, अडचण नसलेला; चांगल्या, स्वस्थ स्थितींत असलेला. [ सं. निर्+म. ददात]

**निर्दम**—वि. १ निर्मळ पहा. 'सात लक्ष निर्दम चांदीचीं उंचउंच तीं चौतली।' –पला २४.५१. २ (व.) सबंध; एकजात; एकजिनसी. 'त्याचा घोडा निर्दम काळा आहे.' [? निर्+दम= विसावा ]

**निर्दय-यी**—वि. कठोर; निष्ठुर. निर्घृण पहा. [ सं. निर्=दया]

**निर्दलन-ना, निर्द(र्दा)ळण निर्द(र्दा)ळणी**—स्त्रीनस्त्री. १ संपूर्ण नाश; धुळधाण; नायनाट; पूर्ण घात; उध्वस्त करणें; नासाडी करणें. 'तुझें दळ अवघें निर्दाळण। इंद्रजित गांजिला।' २ टंगळमंगळ; चालढकल; चुकवाचुकव. [ सं. निर्+दल्-निर्दलन ]

**निर्दलित**–वि. नष्ट; नाश, मोड केलेला. **निर्दळणें, निर्दाळणें**–उक्रि. १ नाश, मोड करणें; उध्वस्त करणें; धुळधाण करणें; जमीनदोस्त करणें. 'जे निर्दाळिजे केवळ। गोत्र आपुलें।' –ज्ञा १.२१५. २ रगडणें; दांडगाईनें करणें.

**निर्दिष्ट**—वि. १ वर्णन केलेलें; सूचित; दर्शित; निरूपित. २ बजाविलेलें; आज्ञापित; सांगितलेलें; दाखविलेलें; शासित. [सं.]

**निर्दुष्ट**—वि. अपराध, दोष, व्यंग या विरहित; शुद्ध. [सं.]

**निर्देश**—पु. १ वर्णन; निरूपण; उल्लेख; सांगणें; दाखविणें. २ आज्ञा; हुकूम; आदेश; अधिकारानें दाखविलेली दिशा, मार्ग. [सं. निर्+दिश् ]

**निर्दैव**—वि. अभागी; दुर्दैवी. [ सं. ]

**निर्दोख**—वि. निर्दोष. 'जें जें कर्म स्वाभाविक। तें तें ब्रह्मार्पण अहेतुक। या नांव भजन निर्दोख। भागवत धर्म देख या नांव।' –एभा २.४४५. [ निर्दोष ]

**निर्दोष-षी**—वि. निर्दुष्ट पहा. दोषरहित; अव्यंग; निरपराधी. 'तेंचि कृष्णाचें श्रीमुख। नित्य निर्दोष मिरवत।' –एरुस्व १.५४. [ सं. ]

**निर्द्वंद्व**—न. १ भांडण-कलहाचा अभाव. २ जग आणि ईश्वर एकच, तसेंच जगांतील सर्व वस्तू एकच असा भाव. –वि. १ कलह, भांडण यांपासून मुक्त. २ भेदरहित; परमात्म्याशीं अभेद मानणारा. ३ दुजेपणा, परकेपणा नसणारा. 'पुत्राचे अपराध। जरी जाहले अगाध। तरी पिता साहे निर्द्वंद्व। तैसें साहिजो जी।' –ज्ञा ११.५७३. ४ सुखदुःख, सत्यअसत्य, मानअपमान, इत्यादि द्वंद्वांच्या पलीकडे गेलेला. [ सं. निर्+द्वंद्व ]

**निर्धन**—वि. दरिद्री; कंगाल; गरीब. [ सं. निर्+धन ]

**निर्धात-धातु, निर्धातुक**—वि. १ अंगांत धातु (वीर्य) नसलेला; नामर्द; नपुंसक; वीर्यहीन. २ दरिद्री; निर्धन. [सं. निर्+धातु]

**निर्धार**—पु. १ निश्चय; खातरी; विश्वास. 'कृपालु म्हणोनी बोलती पुराणें। निर्धार वचनें यांचीं मज।' –तुगा ११२४. २ संकल्प, ठाम उद्देश; निश्चय. 'आक्षेप परिहारीं निर्धारू। करितां परशास्त्र विचारू।' –ऋ २३. ३ निकाल; निर्णय; निश्चय (एखाद्या गोष्टीचा, विषयाचा); निःसंदेहपणा. ४ नियम; नेम. ५ आधार; आश्रय. 'सकळ सिद्धीचा निर्धार। ते हे कवी।' –दा १.७.१८. [ सं. ] **निर्धारण**–न. १ निश्चय करणें; ठरविणें; खातरी करून घेणें. २ संदेहाभाव. **निर्धारणीय**–वि. निश्चय करण्यास, ठरविण्यास योग्य; निश्चित करण्यासारखी. **निर्धारणें**–उक्रि. (काव्य) १ निश्चय, निश्चित करणें; ठरविणें. 'देखा काव्यनाटका। जें निर्धारितां सकौतुका।' –ज्ञा १.७. २ निःसंदिग्धपणें जाणणें. 'मग आपसयाचि उमजला। दिशा निर्धारूं लागला।' **निर्धारित**–वि. निश्चित, कायम केलेलें; ठरविलेलें; खात्रीलायक. **निर्धार्य**–वि. निश्चय करण्यास योग्य; ठरविण्याजोगें.

**निर्धास्त**—वि. १ बिनधोक; निर्भय. २ स्वस्थ; निष्काळजी; निर्घोर; बेफिकीर. [ निर्+अर. दहूशत्; म. धास्त ]

**निर्धूत**—वि. १ नागविलेला; लुटलेला; धुतलेला (माणूस, गांव, शेत). २ द्रव्यहीन; कंगाल. –न. (ल.) लुटून फस्त केलेली स्थिति; नागवण; धुतलेलें; धुवून नेलेलें साफ. 'पेंढाऱ्यांनीं त्या देशांत जाऊन निर्धूत केलें.' [ सं. ] ०**पाप**–वि. पापाचें क्षालन झालेला, केलेला (साधू). [ सं. ]

**निर्धूम**—वि. १ धूमरहित; धूर नाहीं असा. 'येणें संतोषविजे निर्धूमु। ज्ञानानळु।' –ज्ञा ८.५१. २ सतेज; स्वच्छ. 'निर्धूम अग्नीच्यामेळीं। कृष्णदीपें दीप उजळी।' –एरुस्व १६.५४. [सं.]

**निर्धोक**—वि. भयरहित; निर्धास्त पहा. [ निर्+धोका ]

**निर्नायक**—वि. शास्ता, पुढारी नसलेला (देश, संघ इ०). [ सं. ] **निर्नायकी**–स्त्री. (नायक नसणें) अंदाधुंदी; बेबंदशाही; अराजकता. 'शिक्षणाच्या बाबतींत हल्लीचा काळ निर्नायकीचा आहे.'

**निर्निमित्त**—वि. निमित्तावांचून; कारणाशिवाय (बोलणें, जाणें इ०). [ निर्+निमित्त ]

**निर्पुट, निर्पुटवाणा-णी-णें**—वि. (व. घाटी) अगदीं स्वच्छ. 'तो महार असून निर्पुटवाणा राहतो.' [ निर्+पुट+वाणा प्रत्यय ]

**निर्पुस**—वि. खरपूस. –शर.

**निर्फळ**—वि. (प्र.) निष्फळ पहा.

**निर्बंध**—पु. १ निश्चय; निर्धार पहा. २ मर्यादा; नियम; कायदा; हुकूम; शासन; आज्ञा; कानू. ३ ताबा; दाब; आळा. [ सं. निर्+बंध ] **निर्बंधक**–वि. प्रतिबंधक.

**निर्बल-ळ**—वि. दुर्बल; अशक्त; कमजोर; शक्तिहीन. [ सं. निर्+बल ] **०पक्ष-पु.** ( कायदा ) फिर्यादीची, खटल्याची कमजोर बाजू; निर्बळ स्थिति. **निर्बळी खेळ-डाव-प्रकार-**पु. ( बुद्धिबळ ) खेळांत निजोरी मोहरीं मारून घेण्याची रीत.

**निर्बाण**—पु. निर्वाण पहा. -वि. घर, कुटुंब; संसार वगैरे नसलेला; फटिंग. [ सं. निर्वाण ]

**निर्बाणी**—पु. गोसाव्यांतील एक पंथ; हे गोसावी पूर्ण नागवे हिंडतात. याच्या उलट निरंजनी पहा. -वि. धाडसी; कोणाची पर्वा न करतां एकटा धडाडीनें पुढें जाणारा, काम करणारा; संकटास, अडचणीस न जुमानणारा [ सं. निर्वाण ]

**निर्बाध**—वि. १ निर्दोष पहा. २ आक्षेप न घेतां येण्यासारखा. ३ निर्धोक; निश्चित; कांहीं बाध नसलेला. ४ शांत; एकांताची; निरुपद्रवी ( जागा ).

**निर्बी**—न. ( बीं चा सुद्धां अभाव ) पूर्ण अभाव; निर्मूलन; उच्छेद. **निर्बीज**-न. बीजहि उरलें नाहीं अशा प्रकारचा नाश; निर्मूलन.-वि. १ बीं नसलेली; बीजरहित ( कांहीं फळें ). 'बेदाणा निर्बीज आहे.' २ संपूर्ण नाश, उध्वस्त केलेला; नायनाट केलेला. 'ढेकूण निर्बीज झाले.' ३ निराधार; आधाररहित अविश्वसनीय ( बातमी, लेख इ० ). 'त्यानें ही गोष्ट निर्बीज सांगितली.' [ सं. निर्+बीज ]

**निर्बुद्ध-बुद्धी, निर्बुज-बूज**—वि. १ मूर्ख; मंद; मठ्ठ.' कां निर्बुज केलें चित्त। सांगें त्वरित मजलागीं।'-भवि १६.१९१. २ ध्यानभ्रष्ट; अज्ञानी; समज न झालेला. [ सं. ]

**निर्बुजणें**—उक्रि. १ दिङ्मूढ होणें; घाबरणें. 'मग एकपण ना दुजें। असें नाहीं हें नेणिजे। अनुभव निर्बुजे। बुडाला जेथें।' -ज्ञा १५.५३४. २ दिपणें. 'विधि निर्बुजला मागें मुरडे।' -एभा १९.२३४. ३ अडखळणें; चुकणें. 'शब्द बोलतां निर्बुजे। तो येक मूर्ख।'-दा १.१८. [ निर्+बुजणें ]

**निर्बुजणें**—अक्रि. कंटाळणें. अगतिक होणें. 'मग अत्यंत निर्बुजोनी। कमलावरी बैसलों येऊनी।' -ह १०.२१४.

**निर्बूज**—वि. १ ( गंजिफांचा खेळ ) ज्याच्या डावाला पानांचा भरपूर पुरवठा लागत नाहीं असा. २ बुद्धिबळांतील संज्ञा. [निर्+बूज]

**निर्बोध**—वि. १ अशिक्षित; न पढविलेला, शिकविलेला. २ उपदेश, शिक्षण मिळालें नसतांहि समजणारा, जाणणारा. ३ शिक्षण, ज्ञान, बोध घेण्याला अयोग्य. [ सं निर्+बोध ]

**निर्भय**—वि. १ सुरक्षित; निर्धोक पहा. २ धीट; न भिणारा. -न. धोका, भीति यांपासून मुक्तता; भयराहित्य. [ सं. निर्+भय ]

**निर्भर**—वि. ( काव्य ) भरपूर; पूर्ण भरलेला; गाढ; अतिशय. जसें:-आनंद-लोभ-निर्भर. 'हरुषें निर्भर उदित। सुप्रसन्नवदनु।' दा १.२.९. -पु. १ एखाद्या गोष्टीचा ध्यास, हव्यास, पिच्छा, पाठलाग; मनाची अतिशय ओढ, कल, निष्ठा. ( क्रि० धरणें; ठेवणें; राखणें ). २ एखाद्या गोष्टींत आनंदाची, आवडीची परिपूर्णता. ३ अतिशय नैपुण्य. ३ विश्वास; भरंवसा; आधार. [ सं. ]

**निर्भत्सणें**—उक्रि. १ निंदा करणें; दोष लावणें. २ तिरस्कार, उपहास, अवहेलना करणें. [ सं. निर्भर्त्सना ] **निर्भर्त्सन-ना**-न.स्त्री. निंदा; उपहास; पाणउतारा; गालिप्रदान. **निर्भर्त्सित**- वि. फजीत केलेला; उपहासित; निंदित; तिरस्कृत.

**निर्भागी**—वि. ( गो. ) अभागी; फुटक्या नशीबाचा. [ निर्भाग्य ]

**निर्भाग्य-गी**—वि. दुर्दैवी; भाग्य, दैवहीन; अभागी. [ सं. निर्+भाग्य ]

**निर्भीड**—वि. १ भीडभाड न ठेवणारा; स्पष्ट सांगणारा; बेमुर्वत; निःस्पृह. २ ( निंदार्थी ) उद्धट; मान, आदर न ठेवणारा. ३ गर्दी, दाटी नसणारें ( स्थळ, जागा ). पहिले दिवशीं रात्रौ समयीं एकांत निर्भीड जेथें।'-सला ५. [ निर्+भीड ]

**निर्भेद्य**—वि. अभेद्य; ज्याचा भेद, छेद किंवा ज्यांत प्रवेश होऊं शकत नाहीं असा; न पडणारा; दमदार; कठिण, वळकट. [ सं. निर्+भिद्-भेद्य ]

**निर्भेल-ळ**—वि. मिश्रण नसणारें; शुद्ध; एकजात; निर्दंभ. (-वि.) पहा. **०स्वराज्य**-न. पूर्ण स्वातंत्र्य; अर्धेमुर्धे स्वातंत्र्याचें नसणारें राज्य; स्वतंत्र राष्ट्राचें स्वराज्य. -टि ३.३२९.

**निर्भ्रांत-ती**—स्त्री. खातरी; विश्वास; खातरजमा; मनाचा निशंःकपणा; निश्चय. **निर्भ्रांत**-वि. निःसंशय; खचित, खातरीचा; निश्चयाचा. -क्रिवि. १ खातरीनें, निश्चयानें. २ कां कू न करतां; न कचरतां; निःशंक; निर्भयपणें. [ सं. ]

**निर्मणी**—स्त्री. ( गो. ) उत्पत्ति; रचना. [ सं. निर्माण ]

**निर्मत्सर**—वि. मत्सरहीन; हेवा, द्वेष नसलेला. [ सं. ]

**निर्मम**—वि. माया, ममता, प्रेम, आसक्ति नसणारा (साधु). -एभा १.१५३. [ सं. निर्+मम=माझें ] **निर्ममत्व, निर्ममता**-नस्त्री. ममत्वाचा अभाव; आसक्ति नसणें; अहंपणा नसणें.

**निर्मल-ळ**—वि. १ मळ, अपवित्रता नसलेला; शुद्ध; स्वच्छ; पवित्र; ( लक्षणेनें व शब्दशः ) माती नसलेलें ( वस्त्र ); ढग नसलेलें ( आकाश ); कपट नसलेली ( बुद्धि ). इ० २ निर्भेळ; मिश्रण, मिसळ नसलेला. [ सं. निर्+मल ] **०वाचणें**-स्पष्ट, सुबोध, घडाघडा वाचणें. 'श्रीमंत महाराज पेशवे वसुनि सकळ पाताड वाची निर्मळ।'-ऐपो २६२.

**निर्मळा**—पु. एक झाड.

**निर्मळी**—स्त्री. १ एक वनस्पति; निवळी. हिचें बीं चपटें व गोल असतें. त्याचें चूर्ण गढूळ पाण्यांत टाकलें तर तें स्वच्छ होतें. ( गो. ) पाण्यासारखा जुलाब होणें; अतिसार. [ सं. निर्मल ]

**निर्मळी**—वि. निमळ या नांवाच्या गांवासंबंधींचा, गांवचा, तेथें होणारा ( गडवा, तांब्या, पंचपात्री, कापड इ०वस्तु ). हा निर्मळ गांव हैद्राबाद संस्थानांत आहे. [ निर्मळ ]

**निर्माण**—वि १ उत्पन्न केलेलें. २ बनविलेलें; तयार केलेलें; परिणाम पावलेलें. ( क्रि० होणें, करणें ). [ सं. ] **निर्मिणें**—उक्रि. १ उत्पन्न करणें; निर्माण करणें ( मनुष्यादि पदार्थ ). २ ( काव्य ) घडविणें; काढणें; तयार करणें; होण्यास लावणें. ' दिशा जाळितो चंद्रमा आजि दाहा । असा निर्मितो या तनु माजि दाहा । ' ३ ( ईश्वरानें ) पूर्वी योजणें; नेमणें; ठरविणें. उदा० ईश्वरानें जसें जसें निर्मिलें असेल तसें तसें घडेल. ' **निर्मित**—वि. १ निर्माण पहा. २ पूर्वी ठरविलेलें, योजिलेलें. —न. दैवलिखित; नशीब; ललाटलेख. ' जसें निर्मित असेल तसें घडेल. '

**निर्माणें**—न. ( गो. ) नांगराची मूठ,

**निर्मानुष**—वि. निर्जन; ओसाड; मनुष्यवस्ती नसलेला ( देश, गांव इ० ). [ सं. ]

**निर्माल्य**—नपु. १ देवाला वाहून शिळीं झालेलीं फळें, फुलें; देवावरचीं काढलेलीं फुलें. ' शिवाचें निर्माल्य तीर्था न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं । ' —तुगा २८३१. २ वास घेतल्यानें, पाय लागल्यामुळें देवास वाहण्यास अयोग्य झालेलीं फुलें इ०. ३ (ल.) मर्जीतून उतरलेला, जुना झालेला, अधिकार—सत्ता—नसलेला माणूस, वस्तु; निर्बळ, तेजोहीन पुरुष. [ सं. ]

**निर्मूल-ळ**—वि. १ मूळ, पाळ नसलेला. २ मुळासुद्धां नाश पावलेला; उपटून काढलेला; निर्मूलन केलेला. ३ आधार नसलेली; बिनबुडाची; अविश्वसनीय; असत्य ( बातमी वगैरे ). [ सं.] **निर्मूल, निर्मूलन**—न. अत्यंत अभाव; पूर्ण नाश; समूळ उच्छेद. ' या रानांत वृक्षाचें निर्मूल झालें. '

**निर्मोचन**—न. विमोचन; मुक्त करणें; सोडणें; मोकळें करणें. [ सं. ]

**निर्मो(मु)ळी**—स्त्री. ( कु. गो. ) १ अजीर्ण; अपचन. २ अतिसार. निर्मळी पहा.

**निर्याण**—न. १ प्रस्थान; प्रवासास निघणें; बाहेर पडणें. २ पुढें अथवा बाहेर जाणें. ३ मोक्ष; निर्वाण. [ सं. ]

**निर्यास**—पु. १ रस, पाणी, चीक, डिंक इ० नैसर्गिक स्राव. (समास) खदीर-गुग्गुल-पिप्पल-वृक्ष निर्यास. २ सार; काढा; अर्क. ' कामतत्त्व निमालें। संगीत सुख बुडालें । निर्यास गेलें । रसरायाचें । ' —भाए ९९. [ सं. ]

**निर्लज्ज**—वि. बेशरम; लज्जाहीन; निलाजरा; उद्धट; दांडगा. [ सं. ] **म्ह०** निर्लज्जं सदा सुखी.

**निर्लेप**—वि. १ अलिप्त; न लागलेला, शिवलेला. २ शिजविल्यावर, भाजल्यावर खरकटा न होणारा; धान्यफराळाचें ( अन्न ) ३ खरकटयाचा स्पर्श नसलेला; अलिप्त ( खाण्याचा पदार्थ ). ४ ( ल. ) शुद्ध; पवित्र. ' तिहीं आपपणें निर्लेप। प्रपंचाचें घेतलें माप।' —ज्ञा ५.१६०. ५ ( निंदार्थी ) जेवणखाण, हौस, डामडौल इ० विरहित ( लग्न, समारंभ इ० ). [ सं. निर्+लिप्-लेप ]

**निर्लोभ-भी**—वि. १ लोभ; लालूच, हांवरेपणा नसलेला. २ निस्पृही; निस्वार्थी [ सं निर्+लोभ ]

**निर्वच**—पु. निर्णय; निश्चय; सिद्धांत. ' प्राप्ता मतांतरां। निर्वचु कीजे । ' —ज्ञा १३.२४०. [ सं. निर्वचन ] **निर्वचणें**—उक्रि. १ ( काव्य ) विवेचणें; वर्णन करणें; उघड करणें. २ सांगणें; बोलणें. ३ निश्चय करणें. ' जो निर्वचूं जातां वाढे । ' —ज्ञा १०.२६८. **निर्वचन**—न. १ व्याख्या; वर्णन; निरूपण. २ वचन; भाषण. [ सं. ] **निर्वचनीय, निर्वाच्य**—वि. व्याख्या वर्णन करण्यास योग्य; सांगण्या—बोलण्यासारखें.

**निर्वंच**—वि. न फसविणारा. ' तैसा प्रलयीं संहारें प्रपंच। तो मिथ्या हा निर्वंच। ' —विउ ६.५७. [ सं. निर्+वंच् ]

**निर्वडी**—स्त्री. कौशल्य; युक्ती. ' तेवी उत्तमोत्तम ज्ञान निर्वडी। ' —एमा २८.६९८.

**निर्वडी**—क्रिवि लगेच; ताबडतोब. 'मारितां न लगे अर्धघडी। तो मंत्र निर्वडी सांगेन। ' —भाराबाल १२.४७. [ सं. निरवधि ]

**निर्वंश**—पु. वंशाचा, कुळाचा नाश; वंशच्छेद; निसंतान. ' झाडा कीजे निर्वंशें । ' —ज्ञा १८.२०८. —वि. संतानहीन. [ सं.] **निर्वंशी कलम**—न. ( राजा ). वंशक्षय झालेल्या पिढींतील पिशाच. त्या वंशाचें घर, शेतवाडी इ० जो वापरतो त्याला तें झपाटतें. **निर्वस, निरोशी**-( गो. ) निर्वंशी कलम पहा.

**निर्वाण**—न. १ निदान; अतिशय निकृष्टावस्था; अंतिम मर्यादेपर्यंत पोंचण्याची स्थिति. २ मोठें संकट; अनर्थ. निरुपायाची, कठिण स्थिति; अनर्थ; शेवट; अखेर. ' वरी जुंझाचें निर्वाण। ' —ज्ञा १८.१५८२. ' निर्वाण मांडतां सिष्यावरी। ' —दावि ४४९. ' पांडवां साहाकारी आडल्या निर्वाणीं। ' —तुगा ४८२. ३ ( ल. ) मृत्यु; मरण. ' हें निर्वाणीचें लेणें। ' —ऐपो १४६. ४ मोक्ष; सायुज्यप्राप्ति. —वि. १ पूर्णपणें गेलेला. २ मृत; नष्ट. ३ मायाजालापासून मुक्त. ४ मावळलेला; अस्तास गेलेला ( खगोल, तारे वगैरे ). ५ परावृत्त; थांबलेला; निवृत्त झालेला. ६ निर्वाणीचा पहा. ७ कठिण; पराकाष्ठेचा; तीक्ष्ण; दारुण; भयंकर. ' कर्णे सोडिले निर्वाण बाण । ' —पांप्र ४५.३५. ८ अत्यंत उच्च दर्जाचा; पराकाष्ठेचा. ' हें काज कीर निर्वाण। परि आणिकही जें कांहीं साधारण । ' —ज्ञा ६.३३९. [ सं. ] **०करणें-१** अतिरेक करणें; शेवटपर्यंत पराकाष्ठेस नेणें. २ शेवटचा, कठिण मार्ग पत्करणें. **निर्वाणचा, निर्वाणीचा**—वि. संकटाच्या किंवा शेवटच्या प्रसंगाकरितां राखून ठेवलेला. **निर्वाणीचा बाण**—पु.

(काव्यांत निर्वाण बाण) अखेरचा उपाय; शेवटीं निरुपायास्तव सोडावयाचा बाण. ०तारू-जबाब-सोबती-मित्र-मात्रा-शस्त्र-शेवटचा रक्षक, उत्तर इ० ०कज्जा-भांडण-कटकट-युद्ध-भयंकर; प्राणघातक; निकराचें. 'पाठीची हिरोन नेली भाज। याहून थोर कवण लाज। करणें निर्वाणीचें झुंज।' -एरुस्व ८.११. ३ कडकडीत; कडक; उग्र; कडेलोटाचें. जसें:-निर्वाण-पथ्य-प्रायश्चित्त-तप इ० ४ कडेलोटाचा शेवटचा; अखेरचा. जसें:-निर्वाण-समय, प्रसंग, काळ, वेळ. ०मठ-पु. कैलास; वैकुंठ इ० मोक्षस्थल. 'गेला निर्वाणमठापाशीं।'-गुच २.२१९.

**निर्वात**—वि. १ शांत; निवांत; कांहीं हालचाल नसलेलें. २ वायु नसलेला; वायुविरहित. -न १ निवात; हवा नसणें. 'आज निर्वात आहे.' २ वायुविरहित जागा. 'तें दीपाचें उपलक्षण। निर्वातींचिया।' -ज्ञा ६.३५८. ३ (शाप) पोकळी; वायुरहित; स्थान. (इं.) व्हॅक्युम. [सं.]

**निर्वाप**—पु. १ पितराना दान; दान. २ एखाद्या यागासाठीं भात वगैरे शिजवितांना त्या यागांतील मुख्य देवतेच्या उद्देशानें शिजवावयास घेतलेले मूटभर तांदूळ इ० [सं.]

**निर्वासन**—न. हद्दपारी; देशांतून काढून देणें, घालवून देणें. [सं.]

**निर्वासन**—वि. निरिच्छ; इच्छा, चिन्ता नसलेला. 'चाळितां वासना अनुक्रम। निर्वासन ब्रह्म प्रकाशे स्वयें।' -एभा २.६९०. [सं. निर्+वासना]

**निर्वाह**—पु. १ चालविणें; कारभार; संपादणूक; निवाडा; निकाल; व्यवस्था; तडीस, सिद्धीस नेणें. 'त्याचा सारा मकाजीनें घ्यावा ऐसा निर्वाह केला.' -वाडबाबा २.४४. २ वर्तणूक; रीत; खरी स्थिति. 'मग सांगितला निर्वाह। चिंता न करा म्हणतसे।' -ब ४६६. ३ तात्पर्य. 'हा उपदेशी मुख्य निर्वाहो।' -एभा ३.३३८. ४ आश्रय देणें; पालन करणें; संरक्षण. ५ भरंवसा. 'परि इस भगवंतीं थोर निर्वाह आहे।' -सारुह २.७६. ६ पार नेणें; खरें करून दाखविणें (प्रमाण दाखवून भाषण, लेख वगैरे). 'मी बोललों, मीं लिहिलें याचा निर्वाह मला करणें प्राप्त आहे.' ७ दूर करणें; उपद्रव न होईल असें करणें (भूक, थंडी, पाऊस इ०त अन्न, वस्त्र इ०नीं). ८ निश्चय. 'तदुपरि मग दोहीं ह्याच निर्वाह केला।' -सारुह २.११३. ९ कार्यक्षमता. 'नसे हें निर्वाहें जननि मज सामर्थ्य भजनीं।' -सारुह २.२२. १० धोरण. 'प्रस्तुत तेणें निर्वाहें। निरूपण आइका।' -ज्ञा १८.५९. ११ उदरनिर्वाह; गुजरा; योगक्षेम. [सं. निर्+वह्] ०करणें-१ पोट भरणें. २ व्यवस्था करणें; चालविणें. **निर्वाहक**-वि. व्यवस्थापक; चालक. २ शेवटास, सिद्धीस नेणारा; निभाव लावणारा **निर्वाहणें**-उक्रि. १ चालविणें; व्यवस्था लावणें; जोपासना करणें. 'निर्वाहती होय धनंजया।' -ज्ञा १७.८४. २ पार नेणें; दूर करणें. ३ राहणें; एका स्थितींत असणें. 'तरी निर्वाहो कां एकसारिखें।'-ज्ञा १५.२४३. **निर्वाहतें**-वि. टिकणारें. 'परी आचरणींही नोहे। निर्वाहतें गा।' -ज्ञा १७.२५२. **निर्वाह्य**-वि. चालू ठेवण्यास, पार नेण्यास, निर्वाह करण्यास योग्य, आवश्यक.

**निर्वाळणें**—उक्रि. १ धुणें; निर्मळ, शुद्ध करणें; प्रक्षाळणें; चकचकीत करणें. 'प्रेमाचेनि भांगारें। निर्वाळूनि नूपुरें।' -ज्ञा १५.४. 'चैतन्याचिया साळें। आवगतें आंग निर्वाळे।' -भाए ६०१. २ निर्मळपणें पूर्ण करणें. 'ग्रंथ नेटका निर्वाळिला।' -एभा २८.२३. -अक्रि. १ (व.) आकाश निरभ्र होणें, निवळणें. २ उत्पन्न होणें. 'तयापासोनि निर्वाळतें। सुखदुःख।' -ज्ञा १३.९७५.

**निर्वाळा**—पु. १ खातरी; विश्वास; समाधान; निर्धास्तपणा. 'हा गडी तुम्ही चाकरीस ठेवा, ह्याचा निर्वाळा मी देईन.' (क्रि० असणें; होणें; देणें). २ निवाडा; निश्चय. 'परिहसे भूपाळा। मि क्षेमेचा निर्वाळा।' -भाए २७३. ३ शुद्धता. ४ परिपक्वदशा. 'कीं विरूढलिया जोंधळा। कणिसाचा निर्वाळा। वेचला कीं आगळा। दिसतसे।' -ज्ञा १४.१२६.

**निर्वाळिलें**—वि. निवडक; शुद्ध. 'मनुष्यदेहेंसीं पंचविसें। निर्वाळिले।' -भाए ५०३.

**निर्विकल्प**—वि. १ हेतु, कल्पना, विकल्प नसणारा; भेदरहित (ब्रह्म, देव). 'निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं। परब्रह्मासी।' -दा ९.१.२ २ जीव आणि ईश्वर, विशेषण आणि विशेष्य, ज्ञेय आणि ज्ञाता यांमध्यें भेद न मानणारा. ३ एकाग्र. 'निर्विकल्प समाधि.' ४ कल्पना, विकल्पविरहित. 'नातरी प्राणापानगति। कीं निर्विकल्प जाहली मति।' -ज्ञा ३.५६. ०समाधि-स्त्री. ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान अशा त्रिपुटीची जींत जाणीव नसते अशी समाधि. याच्या उलट सविकल्प समाधि. ०ज्ञान-न. जेथें वस्तूच्या गुणाची, रूपाची वगैरे जाणीव पूर्णपणें नसते असें ज्ञान. याच्या उलट सविकल्प ज्ञान. [सं.]

**निर्विकल्पता**—स्त्री. विकल्प न उठण्याची स्थिति; भेदरहित ज्ञान. 'सद्गुरु दे निर्विकल्पता। त्यासी उत्तीर्णता कैसेनी।' -एरुस्व ५.९१.

**निर्विकार**—वि. १ फरक, बदल, विकार नसलेला. २ गुण, रूप न बदलणारा, न बदललेला. 'ओं नमो जी यदुवीरा। तूं निर्विकार नोवरा।' -एरुस्व ४.१. ३ (ल.) अचल; स्थिर; विकारशून्य; उदासीन (मन). [सं.]

**निर्विघ्न**—वि. संकट, अडथळा, अडचणी इ०कांविरहित. -क्रिवि. संकट, अडथळा इ० न येतां; सुरळीतपणें; निर्विवाद. [सं.]

**निर्विवाद्**—वि. बिनतक्रार; अबाधित; शंकारहित; भांडण नसलेलें. 'जरी निर्विवाद नव्हैल। निरूपण।' –ज्ञा १३.३२६. –क्रिवि. १ भांडण-तंटा न करतां; बिन तक्रार. २ निःसंशय; खचित. [ सं. ]

**निर्विष**—वि. १ विषरहित ( साप ). २ ( ल. ) राग, अहंकार, मत्सर इ० ज्यानें सोडले आहेत असा. [ सं. ] **निर्विषी**—स्त्री. एक औषधी वनस्पति.

**निर्विषय**—वि. वासना, विषय इ० सोडलेला, नसलेला.

**निर्वीर**—वि. वीर, शूर, पराक्रमी या विरहित ( पृथ्वी ). 'निर्वीरमुर्वीतलम्.' '७२ साल आटोपत आलें तरी परशुराम कोठें हू का चं करीना, तेव्हां जोतीसाहेबांस निर्वीरमुर्वीतलम् होऊन ...।' –नि ४५९. 'निर्वीर झाली क्षोणी.'

**निर्वीर्य**—वि. १ पौरुषहीन; नामर्द; नपुंसक. २ गुणहीन; परिणामकारक नसलेलें ( औषध ). ३ ( ल. ) निर्जीव; भ्याड; तेज, पराक्रम नसलेला. [ सं. ]

**निर्वृत्ति**—स्त्री. १ मोक्ष; मुक्ति. २ पूर्णता; समाप्ति; सिद्धि. ३ अलिप्तता. [ सं. ]

**निर्वेच**—वि. ( काव्य ) न संपण्याजोगा; अखंड; अविनाशी; नाहींसा न होणारा; अक्षय. याच्या उलट सवेच. 'म्हणूनि प्रपंच नव्हे हा निर्वेच।' –विउ ४.७. –वि. ( जमाखर्च ) न खर्चणारा; पुढें शिल्लक राहणारा ( भांडीं; जवाहीर इ० माल ). –भाअ १८३३.१३६. [ निर्+वेंचणें ]

**निर्वेद**—पु. १ किळस; वीट; शिसारी; कंटाळा. २ विरक्ति; वैराग्य. 'निर्वेद हा शब्द प्रायः संसाराबद्दलच्या कंटाळयास किंवा वैराग्यास लावतात.' –गीर ६३५. 'तेहूवळिं पैं एदु। तिये उपनला निर्वेदु।' –भाए ३८७. [ सं. ]

**निर्वेध**—वि. १ निश्चिंत; निर्धास्त; बेफिकीर; निष्काळजी. २ अडथळा, त्रास यांविरहित; निर्बाध. [ सं. ]

**निर्वैर**—न. शत्रु नसणें; वैरराहित्य. –वि. शत्रु नसणारा; कोणाशीं वैर न करणारा; जगन्मित्र. [ सं. ]

**निर्व्यसन-व्यसनी, निर्वेसन**—वि. १ वाईट संवयी, व्यसनें नसलेला. 'सौम्य सात्त्विक शुद्ध मार्गी। निःकपट निर्वेसनी।' –दा २.८ १८. २ ( ल. ) संकट, अरिष्ट इ० पासून मुक्त ( ईश्वर ). [ सं. ]

**निर्व्याज**—वि. निष्कपट; सरळ; निर्दोष. 'तैं कीड झडकरी तुटे। निर्व्याजु होय।' –ज्ञा १८.१५७. [ सं. ]

**निर्हरणाशौच**—न. प्रेतवहनाचा विटाळ.

**निऱ्हां**—क्रिवि. १ केवळ; अगदीं. निरा पहा. 'तरि त्यागु निऱ्हां दुआडु। वरि इंद्रियांचा कैवाडु।' –भाए २२८. २ ( महानु. ) आत्यंतिक; निश्चयाचा. 'निऱ्हा विस्मितु जाली भीमकेचा सुधा मती माना।' –धवळे, उत्तरार्ध २६. [ हिं. निरा ]

**निऱ्हार-री**—निराहार पहा.

**निलक्यां-खा**—वि. ( कु. ) निराळें.

**निलख**—क्रिवि. ( महानु. ) पूर्णपणें; निःशेष. 'करी घटुकामुखु। तरि मनोदंडु तोडी निलखु।' –भाए ४५६.

**निलखी, निलाख**—वि. ज्यांत लाख नाहीं असा ( दागिना ). [ नि+लाख ]

**निलगार**—वि. ( बे. ) सुताला निळीचा रंग देणारा. निळारी पहा. [ नीळ+गार ]

**निलंगी-घी, निलंग(घ)ळी, निलंघणें**—गळून जाणें, निळंगी, निळंगणें इ० पहा.

**निलंघणें**—अक्रि. १ ( काव्य ) दमणें; थकणें; कंटाळणें. २ वीट येणें; नकोसें होणें. [ नि+लंघणें ]

**निलय**—न. जागा; स्थान; आलय. [ सं. ]

**निला**—स्त्री. ( शाप. ) कर्बनत्रिल. ( इं. ) सायनोजेन. [ सं. नील ]

**निलाग-गी**—वि. १ संबंधरहित; निराश्रयी; निराधार. 'अथवा निलागें निसरडा।' –ज्ञा ६.४७६. २ कीड न लागलेलें; बिन किडीचें ( धान्य, लांकूड इ० ). –क्रिवि. पूर्णपणें निरुपयोगी. 'श्रेष्ठ मानूं चतुरानन। तोही निलागचि हीन।' –एभा ५.१८१. [ नि+लागणें ]

**निलाजरा**—न. तांदुळांत सांपडणारें एक प्रकारचें गवताचें बीं. –वि. निर्लज्ज; बेशरम. [ सं. निर्लज्ज ]

**निलाम**—पु. लिलांव. [ पोर्तु. लीलाम; हिं. नीलाम ]

**निलाम, निलीम**—स्त्रीनपु. जहाज समतोल राखण्यासाठीं त्यांत टाकावयाचें वजन. निरीम पहा.

**निलीन**—न. ( शाप. ) ( इं. ) ॲनिलीन. हें सेंद्रिय अनाम्ल असून निळीच्या विध्वंसक उर्ध्वपातनानें मिळतें. यापासून बरेच रंग व ज्वरघ्न औषधांसारख्यांत लागणारीं द्रव्येंहि तयार करतां येतात. –ज्ञाको(न) ३०८. [ सं. नील ]

**निलेख**—क्रिवि. ( महानु. ) निलख पहा.

**निवगरी, निवग्री**—स्त्री. ( कों. ) तांदुळादिकाच्या पिठाच्या उकडीचें वाटीसारखा आकार करून शिजवितात तें पक्वान्न. [ ? सं. नीवार ]

**निवघड**—पु. ( कों. ) सोनार किंवा लोहार यांची लोखंडी ऐरण बसविण्याचा लांकडी ठोकळा.

**निवचें**—क्रि. ( गो. ) थंड होणें; लिवणें; शांत होणें.

**निवटणें**—अक्रि. १ फुटण्याच्या बेतांत असणें; पूर्ण भरदार, पक्व होणें ( फळ, गळू इ० ). २ प्रसिद्ध होणें; नांवालौकिकास

चढणें; पुढें येणें ( चांगल्या किंवा वाईट रीतीनें ). ' हा सोदेगिरींत निवटला. ' ३ तज्ञ, निपुण होणें. ' गदायुद्धीं भीमसेन। निवटला अर्जुन शस्त्रास्त्रीं। ' -प्रांप्र १०.५५. ४ स्पष्ट रीतीनें निश्चित होणें; उमगणें; उघडकीस येणें (काम, गोष्ट, मसलत). [ नि+वठणें ]

**निवटणें**—उक्रि. ( काव्य ) ठार मारणें; नष्ट करणें; निर्मूळ करणें; तोडणें; कापणें. ' कां करुणा केलि हाली। विजयश्रि निवटिली। ' -भाए १११. ' निवटिला राहूचा घसा। ' -एभा ४.२३४. ' दुःशासनें निवटिला पडला लोकक्षयीं जसा तरणी। ' -मोकर्ण ४.७. [ सं. निवर्तन ]

**निवटणें**—अक्रि. स्वच्छ करणें; शोधणें; निवडणें ( कापसांतील सरकी ). [ नि+वटणें=सरकी काढणें; निवडणें ]

**निवटा**—पु. एक जातीचा मासा.

**निवड**—स्त्री. इष्ट पदार्थ निराळा काढणें; वेचणें; छानणें; निवडणूक; पसंती. [ प्रा. णिव्वड ]

**निवड**—स्त्री. नावड; अप्रीति; कंटाळा. ( सामान्यतः आवड शब्दाशीं जोडून उपयोग ). [ नावड ]

**निवड**—वि. १ निवडलेलें; वेचक; पसंत केलेलें; शेलकें; वेंचून काढलेलें. २ वेंचल्यानंतर, चांगला चांगला भाग काढून घेतल्यानंतर राहिलेला गाळ. **निवडक**-वि. निवड अर्थ १ पहा.

**निवडंग-डिंग-डुंग, निवडुंगट**—नपु. एक कांटेरी झुडुप. याचे प्रकारः-तिधारी, फडया, फणेरें, कांट इ० [ सं. स्नुहिदंडः; हिं. सेहुंड; ते. चेमुंड ? ]

**निवडणें**—उक्रि. १ वेचणें. ' वोघ निवडतां निवडेना। गंगमधें। ' -दा ९.३.३५. २ (ल.) निर्णय, निश्चय, निकाल, निवाडा करणें, लावणें; ' चावडिये न्यावो अन्यावो। निवडी वेदु। ' -ज्ञा १६.२९५. ३ निष्णात, निपुण होणें. ' ते वियाजात पढती। यज्ञक्रिये निवडती। ' -ज्ञा १७.७७. ४ पसंतीस येणें; हुडकून काढणें. ' देउनि गुरुपत्नीतें। तूं गुरुभक्तांत जाणता निवडे! ' -मोअश्व ३.३७. ५ घालवून देणें; हाकलून देणें. ' परानिमित्त आपुला नाश। योग्य नव्हे करणें तुम्हांस। म्हणोनि निवडा त्या दोघांस। तरींच कल्याण तुम्हांसी। ' -जै ७६.४३. [ प्रा. णिव्वड=पृथक् होणें. तुल० सं. निवर्तन ] **निवडणी**, **निवडणूक**-स्त्री. १ वेंचणी; पसंती; पसंत करण्याची क्रिया. २ मतदारांनीं उमेदवार निवडून देणें. **निवड पाखड**-स्त्री. (बायकी) धान्यांतील खडे वगैरे काढून, पाखडून स्वच्छ करणें. [ निवडणें+पाखडणें ]

**निवडणें**—उक्रि. निवटणें पहा. ' ऐसा कल्पाल अभिप्रावो। तो सज्ञानासि न घडे भावो। तिहीं निवडूनियां अहंभावो। चिदानंदें पहा हो समाधिस्थ। ' -एभा १३.६५९. [ निवटणें ]

**निवडला**—वि. कसलेला. (प्र.) निवटला. -रंयो २६३.

**निवण**—न. १ डोळ्यांची आग कमी होण्याकरितां त्यांवर ठेवावयाची दुधांत भिजविलेली कापसाची घडी. २ पदार्थ निवत ठेवावयाची ( चुलीजवळची ) जागा.

**निवणें-णी**—नस्त्री. मडक्याच्या खालची काथ्याची, गवताची चुंबळ, बूड ( भांडें कलंडूं नये म्हणून खालती ठेवावयाचें ). -एभा ६.२५७. ' विश्वघटाचें निवणें। प्रेक्षण तें सहज जेथ तसें निवणें। ' -मोकृष्ण ३७.३४.

**निवणें**—अक्रि. १ थंड होणें; उष्णता नाहींशी होणें; कढतपणा जाणें. २ (ल.) हलका, कमी होणें; शमणें; शांत होणें; मिटणें ( राग, दंगल, लोभ, काम इ० ); थंड, शांत होणें ( चिडलेला, रागावलेला माणूस ). ' न निवें अनुजें बोधितां। ' -मोरा ४९. ३ खपणें; संपणें ( तोफेचे गोळे ४ (ल.) आनंदित होणें; विश्रांतीस राहाणें. ' पाहे रम्याश्रमपद सीतासी त्यांत ती निवे कांहीं। ' -मोवन ४.१३३. [ सं. निर्वाण ] **म्ह०** शिजे तों राहवतें निवे तों राहवत नाहीं. **( डोळे-कान ) निवणें**-चित्ताजोगी गोष्ट झाल्यामुळें समाधान होणें. ' तुज दीधलें नाहीं स्तनपाना। या श्रीमुखाचिया चुंबना। आणि निवतीच ना नयना। खेळतां देखोनी। ' -कथा ४.७.१७८.

**निवंतण**—न. (व.) जेवावयास बोलावणें; आमंत्रण. [ सं. निमंत्रण ]

**निवंता**—स्त्री. उणीव; कमतरता; न्यूनता (नकारार्थी प्रयोग) ' भरलीं भांडारें द्रव्यास निवंता नाहीं। ' -प्रला ९२. [ सं. न्यूनता ]

**निवंता**—स्त्री. उसंत; शांतता. [ निवांत ]

**निवरगी**—स्त्री. निवगरी पहा.

**निवरी**—स्त्री. खाऱ्या पाण्यांत होणारें एक झाड. -शे २.९.

**निवर्तणें**—अक्रि. १ माघार घेणें; परतणें; पलट खाणें. २ आटोपतें घेणें; बंद होणें; थांबणें. ३ (ल.) मरणें. ४ नाहींसें होणें. ' पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रमु। तो निवर्तोनि गेला धुमू। ' -ज्ञा ४.१३४. [ सं. निवर्तन ]

**निवर्तक**—वि. मागें फिरविणारा; पिछेहाट करणारा; याच्या उलट प्रवर्तक. **निवर्तन**-न. मागें फिरणें, फिरविणें; परतणें.

**निवर्तन**—न. १ गुजराथेंतील चार बिघे जमीनीचें परिमाण. २ दहा हात लांबीच्या वीस काठ्यांचें मापः औरस चौरस ४००० हात. ३ औरस चौरस तीनशें हात जमीन. -संस्कार कौस्तुभ. [ सं ]

**निवर्तित**—वि. परत फिरलेला.

**निवल-ली**—स्त्री. १ (कु.) शेर; चिकाडा ( एक वनस्पति ). २ एक विशिष्ट झाड.

**निवलकांडें**—स्त्रीन. (कु.) निवडुंग.

**निववणें**—उक्रि. १ थंड, गार करणें (तापलेली वस्तु) २ (ल.) कमी करणें; शमविणें. ३ आनंदविणें; तृप्त करणें; संतुष्ट करणें; शांत करणें. 'प्रियशिष्य धनंजयगुण वर्णुनियां यांसि हृदय निववूं द्या।' –मोविराट ४.१४. ३ (ल.) उतार पाडणें; उपशमन करणें; हलकें करणें. [निवणें]

**निववितें**—वि. (काव्य) शांत करणारें. 'परि आतां चंद्रापासोनि निववितें। जे अमृताहूनि जीववितें।' –ज्ञा ९.२४.

**निवसणें**—अक्रि. जवळ राहणें; वसती करणें. 'म्हणे आम्हां पाशीं तव गुरु विलासी निवसतो।' –र ३५. [सं. निवास]

**निवसणें**—सक्रि. (कों.) कवळाचीं पानें तोडणें. [सं.निर्+वस्–वसन]

**निवळ**—स्त्री. १ पातळ पदार्थांतील जडांश खालीं बसून वर राहिलेला द्रवांश; गाळ बुडाशीं बसुन वर राहिलेला शुद्ध, स्वच्छ पदार्थ २ (गो कु) भाताची पेज किंवा पेजेचें पाणी. ३ ठोक रकम. –वि. १ स्वच्छ; शुद्ध; निर्मळ (पाणी, डोळे, आकाश इ०). २ (ल.) अकपट; अकृत्रिम; शुद्ध; प्रांजळ. ३ नुसतें; फक्त; केवळ. –क्रिवि स्पष्टपणें; स्वच्छपणें; केवळ; निःसंशय; निर्विवाद; प्रांजळपणें; अकृत्रिमपणें; ढोंग, अवडंबर इ० न करतां. 'या पदार्थाचे निवळ दाहा रुपये येतील.' [सं. निर्मल] **०गांठ**–स्त्री. स्वस्थतेची, शांतपणाची गांठ, भेट. २ दिलसफाईची, मोकळेपणाची मुलाखत. **०नितळ**–वि. १ स्वच्छ; शुद्ध; घाण, गदळ याविरहित. २ थंड आणि शांत; स्वस्थ व प्रसन्न; स्वस्थ आणि सौम्य. **०शंख**–वि. १ शुद्ध व शंखासारखें स्वच्छ (पाणी, लोणी). २ (ल.) शुद्ध मूर्ख अथवा टोणपा; अत्यंत दरिद्री (माणूस).

**निवळणी**—स्त्री, (गो.) सोनाराचें एक हत्यार.

**निवळणें**—अक्रि. १ स्वच्छ, तेजस्वी, चकचकीत होणें (डोळे, चेहरा, आकाश इ०). 'डोळे निवळले' 'रात्र निवळली.' २ (ल.) थंड, शांत, स्वस्थ, सौम्य, गरीब होणें (रागावलेला माणूस, जनावर), विचारी, विनीत होणें; सुधारणें (दुर्वर्तनी तरुण). ३ पूर्णावस्थेंत आल्यानंतर चांगलें बनणें (कोंवळया झाडाचा पहिला बहार वाईट निघतो पण पुढें उत्तम निघावयास लागतो त्यास म्हणतात); मुरणें (कोंवळें फळ बेचव असतें त्यावरून); 'सुपारी निवळली.' ४ भिजण्यानें मादक गुण कमी होणें (हरीक, तंबाखू इ० कांचा); स्पष्ट होणें (गोष्ट). ५ निपुण, हुशार होणें; चांगला जम बसणें (एखाद्या कामांत, कलेंत, शास्त्रांत). ६ (चांभारी) केस, कान्ही, वगैरे काढून टाकल्यावर (कातडें) पाण्यांत ठेवल्यानें स्वच्छ होणें. [सं. निर्मलन] **निवळण**–न. १ (कों.) निवण अर्थ १ पहा. २ एखाद्या मिश्रणाचा निवळल्यानंतर वर येणारा द्रव; स्वच्छ रस. ३ गढूळ, द्रव शुद्ध करण्याकरितां त्यांत टाकलेला तुरटीसारखा एखादा पदार्थ.

**निवळी**—स्त्री. १ मिश्रणांतील स्वच्छ पाणी. निवळ पहा. २ ज्याच्या बिया गढूळ पाण्यांत टाकल्या असतां तें पाणी स्वच्छ होतें असें झाड व त्याचें बीं. निर्मळी (–स्त्री.) पहा. ३ एक वेल. ४ (कों.) बैलाच्या शिंगांस बांधलेला दोर, कासरा. ५ चुन्याचें पाणी. ६ (गो.) मुलाचें घरगुती औषध (कुडा, महाळुंग वगैरे ७।८ औषधींसाली घालून तयार केलेला काढा).

**निवळो, निवळॉ**—पु. (गो.) शेतांतील पाणी ढकलून बाहेर लावण्याचें बांबूच्या काठीला बसविलेलें लांकूड व फळी. [निवळ]

**निवा**—पु. (व. ना.) निखारा; जळता कोळसा.

**निवाड-डा**—पु. १ तडजोड; निर्णय; न्याय; निकाल; फैसला; ठराव. २ निष्पत्ति. (इं.) जजमेंट. 'पिकासी निवाडु देखिजे। अधिकाधिक।' –ज्ञा १०.५५. ३ भेद: भिन्नता. 'नाना घनी भूत सुवर्ण। जैसें निहाळितां साधारण। मग अळंकारीं वरवेंपण। निवाडु दावी।' –ज्ञा १.४४. [निवडणें] **दोन जिवांचा निवाडा होणें**–गरोदर स्त्री सुरक्षितपणें प्रसूत होऊन अपत्य व ती वेगळीं होणें, बाळंत होणें. **०पोवाडा**–पु. मुक्तता; सुटका (अडचण, संकट, त्रास इ०पासून –विशेषतः बाळंतपणातून). [निवाडा द्वि.] **निवाडपत्र**–न. (कायदा) निकालपत्र; (इं.) डिक्री.

**निवाडें**—क्रिवि. १ (काव्य) निश्चयानें; हटातटानें. 'नांगर उचलूनिया निवाडें। नेहटूनि पाय ठेविला पुढें।' –एरुस्व १०. ३३. २ खरोखरी. 'गळा मोतीं असोन निवाडें। लोकांचिया गळा पडे।' –ह २१.२२९.

**निवाणें**—न. नाश; नुकसान; इजा; खराबी; तोटा. (क्रि० करणें). [निर्वाण]

**निवांत**—वि. १ स्तब्ध; उपद्रवरहित. 'निवांत स्थळीं बसून ईश्वराचें ध्यान करावें.' २ स्वस्थचित्त; निष्काळजी. 'वरुण राहिला निवांत। पुत्रें चुकविला अनर्थ।' –कथा १.२.११९. –क्रिवि. शांतपणें; स्तब्धपणें; कांहीं एक गडबड, बडबड न करतां. 'तेव्हां क्षण येक रघुनाथ। निवांत न बोले चिंताक्रांत।' 'तूं घटकाभर निवांत बैस.' [सं. निर्वात, निवात]

**निवात**—न. वाऱ्याचा अभाव; वारा नसणें. –वि. शांत; स्तब्ध; वारा नसलेली (जागा). [स.]

**निवांतलें**—न. (सांके) अंगावर उंदीर मुतला असतां होणारा आजार. 'त्याला निवांतलें झालें.' 'निवांतल्याचा उपद्रव–बाधा.' [नीव=वळचण+आंतला]

**निवारक**—वि. निवारण करणारा; अडवणारा; विरोध करणारा.

**निवारण**—न. १ परावृत्त करणें; परत, मागें फिरविणें; दूर करणें. ' तो वाघाचे अंगावर चालून जात होता परंतु मी त्याचें निवारण केलें. ' २ (ल.) बंदी; अटकाव; अडवणूक; टाळणें. ३ निवारणपत्र पहा. **निवारणपत्र**-न. कर्ज मागावयास किंवा तगादा करावयास धाडलेल्या नोकरास तें न मागण्याबद्दल त्याच्या मालकानें पाठविलेला बंदीचा हुकूम. **निवारणीय**-वि. निवारण करण्यास योग्य. **निवारित**-वि. १ मागें फिरलेला; अडलेला; टाळलेला. २ निषिद्ध. **निवार्य**-वि. निवारण करण्यास योग्य; टाळण्या-सारण्या-जोगें. [सं.]

**निवारणें**—सक्रि. १ मागें सारणें; दूर करणें; हटविणें. ' निवारोनि जाय माया। ऐसी छाया जयाची। '-तुगा ७. २ (ल) अडवणें; टाळणें; थोपविणें; न येऊं देणें; निवृत्त करणें. ' जैसा दीपु ठेविला परिवरीं। कवणातें नियमी ना निवारी। '-ज्ञा ९. १२८. ३ बंद करणें; मनाई, निषेध करणें; वारणें. ४ समजूत घालणें. ' आर्ताची स्थिति ऐसी। जिज्ञासू निवारी त्यासी।' -एभा १९.२७४. [सं. निवारण]

**निवारसा**—पु. वारसाचा अथवा दुसऱ्या न्याय्य हक्काचा अभाव; वारसा, हक्क, स्वामित्व, अधिकार इ० नसणें, नसलेली स्थिति. [नि+अर. वारिस्] **निवारस माल**-पु. १ ज्यास वारस नाहीं असा, बेवारसी माल. २ मृत्युपत्रानें किंवा इतर प्रकारें विल्हेवाट न केलेली मालमत्ता. **निवारशी-सी, निवारशीक, निवारीश**-वि. वारस, मालक, चालक, कायदेशीर हक्कदार या विरहित; बेवारशी (जागा, माल इ०). [नि+अर. वारिस्]

**निवारा**—पु. १ आश्रय; आसरा; (ऊन, वारा, पाऊस या पासुन येणारें) संकट, अडचण यापासून प्रतिबंध. २ आश्रयाची स्थिति, स्थान; निर्वात स्थळ. [नि+वारा] **निवाऱ्याचा**-वि. १ आश्रयाखालीं असणारा. २ सुखांत व शांततेंत वाढलेला; आयुष्यांतील धकाधकीचा ज्याला अनुभव नाहीं असा. **निवाऱ्यास बसणें**-वारा नसलेल्या जागीं बसणें.

**निवाला**—पु. (व.) घास. [अर.]

**निवास**—पु. १ राहण्याचें ठिकाण; वसतिस्थान; गृह; घर 'जैसे जळाचे कल्लोळ। आणि कल्लोळीं आथीं जळ। ऐसेनि बसवीतसे सकळ तो निवासु मी। '-ज्ञा ९.२८७. २ वास; वसती; राहणें; बसणें. ' जेथें निवास जगन्नायका। विश्वव्यापका श्रीकृष्णा। ' -एरुस्व ३.४. 'आमचे मनांत काशींत निवास करावा असें आहे.' [सं. नि+वस्] **निवासी**-वि. निवास, वस्ती करणारा; राहणारा; (समासांत). मथुरा-द्वारका-निवासी.

**निवाळणें**—अक्रि. निवळणें पहा. **निवाळलें लोखंड**-न. (थंड झालेलें लोखंड) (ल.) निरोगी, धट्टाकट्टा म्हातारा मनुष्य.



**निविशिंदा**—पु. कारकून. नवीसंदा पहा. 'निविशिंदा लेखकः स्यात्। '-राव्य ८.१.

**निविश्तन**—न. लेखन. ' आं शहामत-पन्हा यांहीं किताबत निविश्तन केली; पोहोंचून त्यामधील मजमून जाहीर जाहला. ' -पदमव ३४. [फा. निविश्तन्] **निविस्ता**-पु. लेख; पत्र. 'निविस्ताही मसूल जाहला होता; जबाब अम्मा येऊन पोहोंचला नाहीं. '-रा ३.९०. [फा. निविश्ता]

**निविष्ट**—वि. १ प्रविष्ट; अंतर्भूत; समाविष्ट. २ स्थिर; बसविलेला; कायम केलेला (बैठक, जागा, अधिकार इ० वर); अधिकृत. ३ निपुण; प्रवीण. ' तो शास्त्रांत निविष्ट आहे. ' [सं. नि+विश्]

**निवी**—स्त्री. नीवि पहा.

**निवीत**—न. माळेसारखें सोडलेलें जानवें (सव्य किंवा अपसव्य नव्हे असें). [सं.]

**निवीसिंदगी**—स्त्री. कारकुनी. -रा २०.३०४. [फा. नवीसंदगी]

**निवृत्त**—वि. १ मागें फिरलेला; परतलेला अथवा परतविलेला. २ परावृत्त; थांबविलेला. ३ (कांहीं कार्य) टाकून दिलेला; अंग काढून घेतलें आहे, किंवा हात आटोपला आहे ज्यानें असा. ४ जीवयोनींतून मुक्त करणारा. [सं.] **०मांस**-वि. मांस न खाणारा; मांसाशन न करणारा. **०रजस्क**-वि. (वय झाल्यामुळें) जिचा विटाळ गेलेला आहे अशी (स्त्री). **०रमण**-वि. ज्याची संभोगशक्ति, प्रजननशक्ति गेलेली आहे असा (पुरुष).

**निवृत्ति-त्त**—स्त्री. १ निवारण पहा. बंद होणें, करणें; निरास; थांबणें; विराम, लय पावणें; राहणें; अडविणें; थांबणें; थांबविणें. (समासांत). आचार-दुःख-खेद-ज्वर-विघ्न-निवृत्ति. ' औषधसेवनानें रोगनिवृत्ति होते. ' २ संसारांतील वस्तुमात्राकडून, विषयांपासून ईश्वराकडे वळणें; अंतःकरण परत फिरणें. ' निवृत्तिसूत्र सोडवणिया। सर्व शास्त्रार्थ पुरवणि या। '-ज्ञा १८.३८. ३ मृत्यु. ४ सांसारिक उपाधींपासून मुक्तता करून घेणें; उपरति; विरक्ति; संन्यास; त्याग. 'वांचूनि स्वर्ग मृत्यु नरकु आथी। तया हेतु प्रवृत्ति निवृत्ती। '-ज्ञा १८.५६६. ५ मुक्ति; मोक्ष; भगवत्प्राप्ति. 'साविया स्वस्त चांगु। निवृत्ती वरी। '-ज्ञा ८.२३७. ६ निवृत्तिमार्ग पहा. **०मार्ग**-पु. एकांतवासाची, ध्यानमग्न अवस्था; जगांतील सर्व उपाधींपासून आणि विहित आचारांपासून परावृत्ति; विहित कर्माचा त्याग. याच्या उलट प्रवृत्तिमार्ग. [सं.]

**निवेदणें**—सक्रि. १ सांगणें; बोलणें; कळविणें; भाषण करणें; कथन करणें. ' म्हणोनि काय काय आतां। निवेदिजेल अनंता। ' -ज्ञा ११.५५५. -मुआदि ४.४९. २ अर्पण करणें; ओपणें; देणें. [सं. निवेदन] **निवेदक**-वि. सांगणारा; निवेदन करणारा.

**निवेदन**–न १ सांगणें; कळविणें; कथन (वरिष्ठ, वडील माणसांस). २ अर्पणें; ओपणें; देणें; वाहणें. ' करी बळी स्वात्म निवेदनातें।' –वामन, वामनचरित्र १.४०. [सं.] **निवेदनीय**–वि. १ निवेदन, कथन करण्यास योग्य. २ अर्पण करण्यास योग्य. **निवेदित**–वि. १ सांगितलेलें; कळविलेलें. २ अर्पिलेलें; दिलेलें. **निवेद्य**–वि. निवेदनीय पहा.

**निवेद्य**—पु. देवाला समर्पण करावयाचा नैवेद्य. [नैवेद्य अप.]

**निवेश**—पु. १ आंत जाणें; प्रवेश; अंतर्भाव. २ आंत घालणें; प्रवेश करणें; स्थापना; ठेवलेली, स्थापन झालेली स्थिति. ' या पंक्तीमध्यें एक अक्षराचा निवेश होत नाहीं. ' ३ (ल.) अंतर्दृष्टि; निपुणता; प्रावीण्य. ' याचा व्याकरणांत चांगला निवेश आहे. ' [सं.] **निवेशन**–न. आंत ठेवणें; स्थापणें.

**निःशंक, निःशक्त निःशब्द**—निश्शंक,निश्शक्त, निश्शब्द पहा. **निःशंकपणें**–क्रिवि. शंका न बाळगतां; निर्धास्तपणें.

**निशस्त** —स्त्री. बैठक. ' दीड प्रहर पावेतों निशस्त राहिली. –रा ५.१४१. [फा.]

**निशा**—स्त्री. १ खातरी; विश्वास; आश्वासन; मनाचें समाधान. (क्रि० करणें; होणें; पुरवणें). 'या गोष्टीविषयीं मला संदेह होता परंतु आज माझी निशा झाली. ' २ पतीची खात्री; हमी; खात्री; जामिनकी. (क्रि० देणें; घेणें; पटविणें; पुरविणें). 'मी पांचशे रुपयांची निशा सावकारी देतों.' ' वसूल घेतला असेल तो वाजवी वजा करून बाकी एवजाची निशा नबाबाकडून घेणें. ' –समारो १३. ३ धालेपणा; मनशामोड; परिपूर्ति; अत्यंत, भरपूर तृप्ति; पुरेपुरें होणें. [फा. निसआ–नसिआ] **०पाती**–स्त्री. १ खात्री; विश्वास. निशा अर्थ १ पहा.(क्रि० करणें; पुरविणें). २ जामीनकी; हमी. (क्रि० देणें).

**निशा**—स्त्री. १ कैफ आणणारा, अमली पदार्थ (मद्य वगैरे). २ कैफ; मद; नशा. [अर. नशा] **०धुंद**–वि. अतिशय कैफ चढलेला. **०पाणी**–न. १ मादक पदार्थाचें सेवन; अंमल; कैफ. (क्रि० करणें). २ मादक पदार्थ; मद्य इ० **०बाज**–वि. नशा करणारा; मद्यपी; कैफी.

**निशा**—पु. बेहोषता; आनंद. ' पत्रें पाठविलीं प्रविष्ट होऊन आमचे चित्ताचा निशा जाहला. ' –ब्रप ३०१. [अर. नशात्= आनंद]

**निशा**—स्त्री. रात्र. ' खद्योत समुदाय निशिं वसे। वीर तैसे वाटीव।' –एरुस्व ५.२९. [सं.] **०कर-पति-पाळ**–पु. चंद्र ' कां शीतळ व्हावया निशापति। विजना हातीं घालविजे। ' **०चर**–वि. १ राक्षस; पिशाच्च. ' जैसें रात्रीच्या अवसरीं। व्यापारिजे निशाचरीं। ' –ज्ञा १६.२७२. २ चोर. ३ घुबड, वटवाघूळ इ० रात्रीं फिरणारे पक्षी प्रत्येकी. **०चरी**–स्त्री. १ चोरी. २ राक्षसी. ' विवेकाचा ठावोचि पुसी। निशाचरी जे।' –ज्ञा ९.१७९.

**निशांत**–पु. रात्रीचा शेवट; अखेरचा प्रहर. ' निशांतीं उगवे चंद्रकिरण। ' [निशा+अंत]

**निशाण**—न. १ ध्वज; पताका; झेंडा. २ बंदूक, बाण इ०नीं नेम धरावयाचें लक्ष्य; चांद. ३ नेम; चिन्ह; खूण; निशाणी.' आमचे व आपले इत्तिफाकानें इंग्रजांचें नांव व निशाण नाहीं सारखे नेस्त नाबूत होतील. ' –रा १०.१८२. ४ नाण्यांवरील पोतदाराची तपासल्याची खूण [फा. निशान्] **०उतरणें**–गोळी बरोबर लागणें; लक्ष्य भेदणें. **०दार-बरदार**–पु. निशाण धरणारा. ' हत्तीवरल्या निशाणदारास पायास गोळी लागली. '–रा ६. १२५. **०बाजी**–स्त्री. नेम मारणें; वेध. **निशाणचा हत्ती**–पु. १ ज्याच्यावर निशाण असतें तो हत्ती. २ पुढारी; नेता.

**निशा(सा)ण**—पु. रणभेरी; डंका; नगारा. ' तयावरी जैत रे जैत। म्हणोनि ध्यानाचें निशाण वाजत। ' –ज्ञा ९.२१७. –एरुस्व ६.२. ' त्रियासि म्हणे चित्ररथ। स्वर्गी निशाण असे वाजत। ' –कथा २.१२ ६१. [प्रा. निःसाण] **निशाणीं घाव घालणें-देणें**–कूच करण्याचा, हल्ल्याचा नगारा वाजविणें. ' हरी भक्तिचा घाव घाली निशाणी। '–राम २८.

**निशाण**—स्त्री. (कु.) शिडी, निशाणी पहा. [सं. निःश्रेणी]

**निशाणा**—पु. (व.) शस्त्राला धार लावण्याचा दगड किंवा चाक; पलसणी. निसणा पहा. [सं. शाण, निशान; प्रा. निसाण]

**निशाणी**—स्त्री. १ खूण; चिन्ह. २ चिन्ह; लक्षण; प्रमाण; सूचना. ३ नाण्यावर खूण करण्याचें एक हत्यार; पंच. ४ (ल.) परिणाम; लक्षण; फल. ' वाघाच्या गुहेंत गेलें असतां मरण्याची निशाणी.' [फा. निशानी] **०होणें**–अमर्याद, परकाष्ठेचें, बेसुमार होणें (वाईट रीतीनें).

**निशाणी**—स्त्री. शिडी; जिना; सोपान; निशीण. 'जे अज्ञानतमाची तरणी। कैवल्यपदाची निशानी। '–दाव ४४. [सं. निःश्रेणी]

**निशान, निशानदार, निशानी**—निशाण इ० पहा.

**निशि-शी**—स्त्री. रात्र. –ज्ञा २.३२४. ' चोरा रुचे निशी। देखोनियां विटे शशी। ' –तुगा ३१४६. [सं] **०गंध**–पु. गुलछबू; एकफूल, फुलझाड. यास रात्रीं विशेष वास येतो. **०दिनि, दीन**–क्रिवि. अहोरात्र. ' चिंताज्वाला निशिदिनि जरी जाळिती मन्मनासी। ' –जन्मभूमि. **०भार्गव**–पु. लक्ष्मीप्रीत्यर्थ दर शुक्रवारीं दिवसां उपवास व रात्रीं जेवण करणें **निशीथ**–पु. मध्यरात्र.

**निशित-निशत**—वि. तीक्ष्ण केलेलें; घासलेलें; पाजळलेलें (निसण्यावर शस्त्र). ' देवा नवनिशतीं शरीं। वावरोनी यांच्या जिव्हारीं। ' –ज्ञा २.४८. [सं.]

**निशीं**—शअ. सह; बरोबर; सहित. 'एका घोड्यानिशीं आलो. ' सुद्धा पहा.

**निशीण**—स्त्री. शिडी; निशाणी. [ सं. निःश्रेणी ]

**नि(निः)शीम**—वि. अमर्याद; सीमा नसलेला; निस्सीम. [सं. निस्सीम अप. ]

**निशें**—न. ( गो. ) कांजी; पेजेचें पाणी.

**निःशेख-ष**—वि. संपूर्ण; समूळ. '[जग हारपे जेथ निःशेष।' –ज्ञा १५.४३६. 'तो पदार्थ निःशेष सरला.' [ सं. निःशेष ]

**निशेंडी-शेंडया**—वि. शेंडी नसलेला (मुसलमान). [ नि+ शेंडी ]

**निशेदार**—वि. हवाला देणारा: पतदार: साखदार; जामीन; हमीदार. [ निशा=हमी ]

**निशेदार**—वि. नशा, अंमल करणारा; निशाबाज. [ निशा= नशा ]

**निशोत्तर**—न. एक औषधी मूळ, तेड.

**निशौंचें**—क्रि. ( गो. ) उतरणें.

**निश्चक्र**—वि. कडकडीत; निर्जळी; निरशन ( उपवास ). 'तेरा दिवस झाले निश्चक्र करितां। न पवसी अनंता मायबापा।' –तुगा ५१२.

**निश्चक्र**—वि. शत्रुरहित; परचक्ररहित. [ सं. ]

**निश्चंद्र**—वि. ज्याची चकाकी नष्ट झाली आहे असें (अभ्रक, भस्म, पारा इ०). [ सं. ]

**निश्चय**—पु १ निर्धार; करार. 'सरकार अधिक पैसा मागतें परंतु द्यावयाचा नाहीं असा निश्चय झाला.' २ निर्णय; ठराव; निकाल; अखेरचा फैसला; ठाम मत. 'दुरून रुपें आहे असा भास झाला, हातीं घेतल्यानंतर शिंपी असा निश्चय ठरला.' ३ विश्वास; पूर्ण खातरी; भरंवसा; श्रद्धा. 'शहाण्या मनुष्याचे वाक्यावर निश्चय ठेऊन चालावें.' ४ खात्रीनें होणारी गोष्टः सिद्धांत; अवश्यंभाविता. 'सूर्यास्तानंतर रात्र होईल या गोष्टीचा निश्चय आहे.' याच्या उलट दैवघटितत्व. –क्रिवि. खातरीनें; न चुकतां; निःसंशय. [सं.] ०**पूर्वक, निश्चयात्मक**–वि. खातरीचा; खचित. निश्चयाचा पहा. –क्रिवि. निश्चय (–क्रिवि.) पहा **निश्चयाचा**–वि. १ न बदलणारा; निर्णीत; अचंचल. २ ज्याबद्दल शंका, प्रश्न उत्पन्न होणार नाहीं असा.

**निश्चल-ळ**—वि. न हलणारा; अचल; निश्चळ; स्तब्ध; स्थिर; एका जागीं खिळलेला. –क्रिवि. स्थिरपणें; शांतपणें. [ सं. ]

**निश्चित**—वि. ठराविक; खचित; कायम. [ सं. निश्चय ] ०**अर्थ**–पु. १ ठराविक, ठाम गोष्ट. २ खातरी. **निश्चिति**–स्त्री. निश्चय. 'जैसी आत्मज्ञानविखीं। जंव निश्चिती नाहीं निकी।' –ज्ञा १८.१५२. –क्रिवि. (काव्य) निश्चयानें; खातरीनें; खचित. 'वशिष्ठें कथिलें निश्चिति।'

**निश्चिंत**—वि. चिंता, घोर, काळजी यापासून मुक्त; निर्चिंत; स्वस्थ; चिंतारहित. 'या लागीं प्रात जर्जर नावे। रिगोनि केविं निश्चिंत हो आवें।' –ज्ञा ९.४९०. [ सं. ] **निश्चिंती**–स्त्री. १ ( अन्नवस्त्रादिकांच्या ) काळजीपासून मुक्तता. २ स्वास्थ्य आणि सौख्याची हमी ( धान्याची बगमी केल्यामुळें ); निर्चिंती

**निश्चेतन**—वि. निश्चेष्ट; बेशुद्ध; भानावर नसलेला.

**निश्चेष्ट**—वि. निश्चल पहा.

**निश्रेणी**—स्त्री. १ शिडी. २ घोडयाच्या कपाळावर एकावर एक अशा क्रमानें असलेले तीन भोंवरे. हें घोडयाचें शुभलक्षण समजतात. –अश्वप १.८६ [ सं. निःश्रेणी ]

**निश्वास**—पु. १ उछ्वास; श्वास बाहेर सोडणें. ( क्रि० देणें; टाकणें; सोडणें ). २ भगवंताच्या निद्रेंतील श्वासापासून झालेले वेद. 'निगदिले निःश्वासें। प्रभूचेनि।' –अमृ ५.११. [ सं. निःश्वास ]

**निश्शंक**—वि. बेशक; बेधडक; शंकारहित; निश्चयाचा; कांकूं न करणारा. –क्रिवि. धीटपणें; न भितां; निर्भयपणें; निश्चितपणें; विश्वासानें. [ सं. ]

**निश्शक्त**—वि. अशक्त; दुर्बळ; कमकुवत. [ सं. ]

**निश्शब्द**—न. ब्रह्म. –वि. स्तब्ध; गुपचुप. –क्रिवि. एकहि अक्षर, आवाज न काढतां. [ सं. ]

**निश्शेष**—वि. पूर्ण; सबंध; सगळा; बाकीरहित. –क्रिवि. पूर्णपणें; बाकी न राहतां; सर्वथा; अगदीं. निःशेख-ष पहा. [ सं. ]

**निषाद**—पु. १ ( संगीत ) सात स्वरांपैकीं सातवा स्वर; नि. २ कोळी, पारधी ही जात व तींतील व्यक्ति. ३ कट्टू, हलकी जात. शूद्र स्त्रीस ब्राह्मणापासून झालेली संतति. [ सं. ]

**निषेध**—पु. १ प्रतिषेध; मनाई; बंदी. २ नकार; परवानगी नसणें; शास्त्राची असंमति. 'न ठारे निषेधु आड। न पडे विधीची भीड।' –ज्ञा १६.१८९. ३ धिक्कार; निंदा. [ सं. ] ०**मुखें**–क्रिवि. नकार घालून; नकारानें ( वर्णन इ० ). **निषिद्ध, निषेधित**–वि. १ शास्त्र आणि समाज यांनीं मनाई केलेलें, वर्जिलेलें; शास्त्रास, रूढीस असंमत; त्याज्य. २ वर्ज्य; अविहीत; मना केलेलें. **निषेधणें**–उक्रि. १ मना करणें; वर्ज्य करणें. २ नाकारणें; नाकबूल करणें; न स्वीकारणें; धिक्कार करणें. 'ज्याचे अभंग निषेधूनि समस्त। द्विजांनीं बुडविले उदकांत।' ३ नाकारणें; नाहीं म्हणणें. **निषेधवृत्ति**–स्त्री. निषेध करण्याची प्रवृत्ति, स्थिति, स्वरूप. याच्या उलट विधिवृत्ति. –वि. १ निषेधाचा; मनाईचा; नकाराचा; अस्वीकार करणारा. २ अभावात्मक; अकरणरूप.

**निष्क**—पु. १ एक सोन्याचें नाणें; मोहोर; दीनार; (ज्यो.) चार रुपये किंमतीचें एक परिमाण. २ एकशेआठ मासे भार सोनें. ३ ( सामा. ) सोनें. [ सं. ]

**निष्कंटक**—न. भय, उपद्रव इ० पासुन मुक्तता; शांततेची, स्वास्थ्याची स्थिति, 'तो शत्रु मेला यामुळें तेथें निष्कंटक झालें.' –वि. १ कांटे नसलेला; कांट्याविरहित. २ (ल.) धोका, भय, उपद्रव, अडचण इ० नसलेलें (राज्य, रस्ता इ०); निर्धास्त. 'कौरव मारुनि देइल निष्कंटक सर्व राज्य आतेला।' –मो [सं.]

**निष्कपट-कपटी**—वि. खोटेपणा, कपट या विरहित; सरळ; प्रांजल; मनाचा मोकळा. [सं.]

**निष्करुण**—वि. दया नसलेला; कठोर; दुष्ट; निर्दय. [सं.]

**निष्कर्म**—वि. १ धर्मकर्म, विधि यांपासुन मोकळा, अलिप्त (तपाचरणी साधु). २ कांहीं धर्म, क्रिया न करतां ईश्वरचिंतनांत मग्न असलेला. ३ (भावी लाभासाठीं) कांहीं काम न करणारा. ४ आळशी; निकामी. [सं.]

**निष्कर्ष**—पु १ सार; तात्पर्य; सारांश (भाषण वगैरेचा). 'निष्कर्ष दोहींहीं। देखिला असे।' –ज्ञा २.१३२. २ तत्त्व; सारांश; मुख्य हेतु; निश्चय; सिद्धांत. 'जयांचे कां निष्कर्ष प्राप्ति वेरीं।' –ज्ञा ६.३२५. ३ शेवट; परिणाम. 'सर्व शून्याचा निष्कर्षु। तो जिया बाइला केला पुरुषु।' –अमृ १.२७. ४ कसोटीचा दगड; कसोटी; निकष.

**निष्कलं(ळं)क-की**—वि. डाग, ठपका, कालिमा, कलंक नसलेला; निर्मळ; शुद्ध; पवित्र; निर्दोष. 'सत्त्वाथिला अति सात्त्विक। निष्कलंक शोभत।' –एरुस्व १.१२. [सं.] **निष्कळंकी अवतार**–पु. (चुकीनें) दहावा कलंकी अवतार.

**निष्कळ**—वि. (क.) कळाहीन; तेज, वैभव, सौंदर्य, टवटवी, तजेला वगैरे नसलेला. [सं. निस्+कला]

**निष्कांचन**– वि. दरिद्री; निर्धन पहा. [सं. निस्+कांचन]

**निष्काम**—वि. १ निरिच्छ; फलाची इच्छा न धरितां केलेलें (कर्म, अनुष्ठान इ०). २ विरक्त; उदासीन. [सं.] **०कर्म**–न. फलाची इच्छा न धरतां केलेलें विहित (कर्तव्य) कर्म. 'निष्काम कर्मानें राष्ट्राला तेज येतें.' –टिसू ४.

**निष्कारण**—वि. १ कारणाशिवाय; अकारण. २ उपयोग, फळ, फायदा इ० नसलेला; व्यर्थ. –क्रिवि. कारण, जरूरी नसतां; आधार, प्रमाण नसतां. (क्रि० बोलणें; मारणें इ०). [सं.]

**निष्कासन**—न. १ बाहेर काढणें. २ बडतर्फी; हकालपट्टी. ३ स्पष्ट, खुलें करणें, सांगणें. [सं. निस्+कास्]

**निष्काळजी**—वि. बेफिकीर; निर्घोर; निश्चिंत; काळजी नसलेला; निकाळजी.

**निष्कृति-ती**—स्त्री. नैष्कर्म्य स्थिति. 'जेणें फलत्यागें निष्कृती। नेलें कर्म।' –ज्ञा १८.२३२. २ मुक्तता; नाहींसें करणें; नाश. ३ निरसन; फेड; परिहार; प्रायश्चित्त (अपराध, नुकसान, इजा इ० केली असतां प्रायश्चित्त घेऊन किंवा प्रतिकृतीनें दूर करणें). 'निष्कृति तुझिये पापासी। श्रीगुरु करील परियेसी।' –गुच २०. ४१. [सं.]

**निष्क्रमण**—न. १ निर्गमन; बाहेर जाणें. २ नवीन जन्मलेल्या मुलास घराबाहेर प्रथम नेण्याचा सोळा संस्कारांपैकीं एक संस्कार. [सं.]

**निष्क्रय**—पु. १ ब्राह्मणास गाय वगैरे दान देण्याऐवजीं तिच्या किंमतीइतकें दिलेलें द्रव्य अथवा इतर वस्तु. २ असली बदली वस्तु, किंवा किंमत ठरविणें, देणें. ३ विक्रय. [सं.]

**निष्टंक**—पु निश्चय; सिद्धांत. 'जीवामाजी निष्टंकु। करिसी जो आत्यंतिकु।' –ज्ञा १८.१२८१. –वि. १ (काव्य) पक्का; दृढ; निपुण; कुशल. 'हें सैन्य असेल निष्टंक। तरी लोटूनि कोटी दुःख। स्वस्थ जाईल माहेरा।' –मुवन ७.११६. २ पूर्ण; अखंड. 'अगा मानस हें एक। माझ्या स्वरूपीं वृत्तिक। करूनि घाली निष्टंक। बुद्धि निश्चयेंसि।' –ज्ञा १२.९७. ३ निःसंशय; निश्चित. 'गुरु ब्रह्म ऐक्य भावो। निजनिर्वाहो निष्टंक।' –एभा ३.३४३. –क्रिवि. १ पूर्णपणें; सर्वतः; दरोबस्त; बाकी अथवा शेष न राहतां. २ सर्वथा; सर्वांशीं; पुरतेपणीं; न्यूनाशिवाय; सर्व बाबतींत. ३ केवळ; निवळ; फक्त; मात्र. [सं. निर्+टंक=टांकी] **निष्टंकणें**–क्रि. १ निश्चय करणें. 'आतां याची बुद्धि वृत्ति। निष्टंकिला कर्मजातीं।' –ज्ञा १८.७३१. २ निश्चयानें लावणें, आरोपणें. 'निष्टंकिती गा मोहें। आंधळे ते।' –ज्ञा १५.३८०.

**निष्टणें**—अक्रि. निसटणें; घसरणें; पळणें; निसटणें पहा. (मुख्यतः जाणें या क्रियापदाशीं योजतात. उदा० निष्टून जाणें). 'प्रपंचापासुन निष्टला। लोभाचे हातींचा गेला। अकस्मात।' –दा ५.९.३७.

**निष्टुक**—क्रिवि. (व.) अगदींच; बिलकुल; थोडें सुद्धां. 'त्यानें निष्टुक न ऐकतां गांवास गेला.' [सं. निस्तुष्]

**निष्ठ**—वि. खिळलेला; आंत बसलेला; निष्ठेनें राहिलेला; अंतःस्थित; अधिष्ठित. (समासांत) मनोनिष्ठ–देहनिष्ठ–घटनिष्ठ. [सं.]

**निष्ठा**—स्त्री. १ दृढ प्रेम, भक्ति; श्रद्धा; दृढासक्ति (मन किंवा हृदय यांची–एखाद्या वस्तूच्या ठिकाणीं). २ विश्वास; भरंवसा; सत्य अशी बुद्धि; निश्चय; अवलंबन. ३ एकसारखी, एका प्रकारची चाल, आचरण, धंदा. ४ कायम ठाण; जम; अधिष्ठान; स्थापना. ५ शेवट; अखेर; परिणाम; निर्णय; मोक्षदायक स्थिति, मार्ग; शेवटची अवस्था. 'ज्ञान ही निष्ठा म्हणजे सिद्धावस्थेंतील अखेरची स्थिति होऊं शकतये.' –गीर ४१२. ६ (काव्य) अवस्था; स्थिति. 'तृषा लागली नाथ ओष्ठामृताची। शरीरासि ज्यावीण निष्ठामृताची।' ७ मार्ग. 'अवधारीं वीरश्रेष्ठा। ये लोकीं या दोन्ही निष्ठा।' –ज्ञा ३.३५. [सं. नि+स्था] **निष्ठावान-वंत**–वि. १ आदर, प्रेम,

असलेला; आसक्त; दृढभाव असलेला. २ विश्वास ठेवणारा; श्रद्धाळु; स्थिर वर्तनाचा; शाश्वत मार्गाचा; अचंचलवृत्तीचा.

**निष्ठुर**—वि. १ निर्दय; क्रूर; कठोर मनाचा. २ कठोर; कडक; कर्णकटु; कर्कश (भाषण इ०). [सं.]

**निष्गा**—पु निशाणा पहा. [सं. शाण–निशान]

**निष्णात**—पु. निपुण; प्रवीण; कुशल; वाकबगार. [सं.]

**निष्पत्ति**—स्त्री. १ पूर्णता; समाप्ति; सिद्धि. 'जया का आथि पूर्ण निष्पती। जेथ रसु धरी व्यक्ति।' –ज्ञा १७.१५७. २ परिपाक; परिणाम; सार; शेवट. ३ उत्पत्ति. ४ (भूमिति) मापन. ५ (सामा.) फळ; लाभ; उपयोग; निष्पन्न पहा. [सं.]

**निष्पन्न**—न. १ उत्पन्न; फळ; लाभ. २ शेवट, परिणाम. –वि. १ उत्पन्न झालेलें. २ पूर्ण झालेला; पक्व. ३ निपुण; ज्ञाता ४ कृतार्थ; प्राप्तपुरुष. 'ऐसियें असाधारणें। निष्पन्नाचीं लक्षणें। आपुलेनि बहुवसपणें। श्रीकृष्ण म्हणे।' –ज्ञा ६.१०७. [सं.]

**निष्पक्षपात**—पु. समतोल वृत्ति; समानपक्षता; एकतर्फी नसणें; कोणतीहि एक बाजू न धरणें. **निष्पक्षपाती**–वि. १ समदर्शी-दृष्टि. पक्षपात न करणारा; तटस्थ. २ (ल) न्यायी. [सं.]

**निष्पादणें**—उक्रि. उत्पन्न करणें; निर्माण करणें. [सं. निष्पादन] **निष्पादन**–न. उत्पादन; निर्माण, उत्पन्न करणें; घडवून आणणें. **निष्पादित**–वि. निर्माण केलेलें.

**निष्पाप-पापी**—वि. पापरहित; पापहीन; निर्दोषी. [सं.]

**निष्प्रभ**—वि. प्रभा, तेज, प्रकाश, कळा नसलेला; तेजोहीन; फिक्का; कळाहीन. [सं.]

**निष्प्रयोजन**—वि. निष्कारण; विनाकारण; आधाररहित; अकारण. 'निष्प्रयोजन एखाद्यास मारूं नये.' [सं.]

**निष्फल-ळ**—वि. १ (ल. व शब्दशः). व्यर्थ; फलहीन; विफल; निरर्थक; २ निरुपाधिक. 'जय जय देव निष्फळ। स्फुरदमंदानंद बहळ।' –ज्ञा १८.४.

**निसका**—वि. (कु.) निर्लज्ज पहा.

**निसखा**—पु. मित्र; दोस्त; सोबती. [नि=अतिशय+सखा]

**नि(निः)संग**—वि. निस्संग पहा. 'नाहीं मर्यादा निःसंग बावरी। मन हें गोविंदीं देह कामकरी वो।' –तुगा १११.

**निसं(स्सं)गळ**—वि. निर्लज्ज; बेशरम. 'अभिमानी आणी निसंगळ। वोडगस्त आणी खळ।' –दा २.३.१८. [निःसंग]

**निसटणें**—अक्रि. १ निघणें; जागेपासुन दूर होणें; जागा सोडणें. २ (ल.) बाहेर निघणें, पडणें (त्रासदायक कामांतुन इ०); अडचणींतून हळूच बाहेर पडणें; सुटणें. ३ फुटणें; उसळणें; फुटून किंवा सुटून जोरानें बाहेर येणें. ४ निसरणें; घसरणें; सरकणें. ५ (व.) पळून जाणें. [सं. निसृष्ट]

**निसडा धोंडा**—पु. शस्त्रास धार लावण्याचा दगड; निशाणा. 'एक गारुडी निसडा धोंडा मांडुनिया जवळी।' –विवि ८.८.१५८.

**निसण**—न. १ (धान्य इ०). निवडणें; स्वच्छ करणें २ निवडलेला, स्वच्छ केलेला भाग. ३ वेंचून, निवडून बाहेर टाकून यावयाचा भाग, गाळसाळ. [सं. निस्+सन्न=गेलेला, टाकलेला?]

**निसण-न-णी, निसन**—स्त्री. शिडी. 'ही नरकद्वाराची निसणी। जीव हिंसा।' –कथा २.१७.७६. [सं. निःश्रेणी]

**निसणा**—पु. निशाणा पहा. [सं. शाण]

**निसणी**—स्त्री. (व.) सहाण. [सं. शाण]

**निसणें**—सक्रि. १ निवडणें; वेंचणें; वाईट भाग निवडून काढून स्वच्छ करणें (धान्य, भाजी इ०). 'तांदूळ, भाजी इ० पदार्थ निसले.' २ सोलणें; छिलणें; साफ करणें; साल, सालपट काढणें. 'मी सकाळपासुन संध्याकाळपर्यंत हजार नारळ निसले.' [सं. निसन्न] ०**टिपणें-टुपणें**-निसणें पहा.

**निसत**—वि. निर्लज्ज; बेशरम; कोडगा; भ्रष्ट; व्यसनी. [निसर्ग सं. निस्+सृ] **म्ह०** १ निसत बाजारी आणि पडला शेजारी. २ निसतां निसतां लाज नाहीं कालचें बोलणें आज नाहीं.

**निसता**—वि. तुसता पहा.

**निसंतान**–न. १ निर्वंश; कुलक्षय. 'बळी अबळातें खाय। हेंचि बाधित जरी होय। मासयां कां न होय। निसंतान।' –ज्ञा १६.३०२. २ मूलबाळ नसणें; झालेलें न जगणें. २ (ल.) नाश; विध्वंस (शिव्याशाप देतांना योजतात). ३ (ल.) फन्ना; चट्टामट्टा; खाऊन फस्त करणें. निरानिपटा पहा. [सं.] **म्ह०** कुसंतानापेक्षां निसंतान बरें. ०**करणें**–(ना.) मोडतोड, विध्वंस करणें. ०**मानणें**–निसंतान होणें (हा एक वाईट शाप आहे). 'तुझें अल्प काळें निसंतान मानें।' –किंकर द्रौपदीवस्त्रहरण २४.

**निःसत्व, निःसंदिग्ध, निःसंदेह**—वि. निस्सत्व, निस्संदिग्ध, निस्संदेह इ० पहा.

**निसपटणें**—अक्रि. निसटणें अर्थ १ते३ पहा.

**निसबत**—स्त्री. १ दिम्मत; हवाला; सत्ता; हुकुमत; देखरेख (मनुष्य, वस्तु, काम इ०वर). 'आमचा घोडा त्याचे निसबतीस आहे.' २ संबंध; नातें. –क्रिवि. संबंधानें; संबंधीं; तर्फेचा; बद्दल. 'गांव–सरकार–देऊळ–निसबत.' 'भिल्लांचें पारिपत्य करावयाची आज्ञा सरसुभा प्रांत खानदेश निसबत नारो कृष्ण यास केली आहे.' –वाडसमा २.१५३. [अर. निस्बत्] **निसबतीचा**–वि. १ मालकीचा; नात्याचा. २ संबंधाचा; संबंध असलेला. 'त्याचे निसबतीचा जाब करून देऊं हें लिहून दिल्हें सही.' –वाडबाबा २.३९. ०**दार**–वि. दिमतदार; ताबा, कबजा, हुकुमत, व्यवस्था ज्याच्या हातीं आहे असा; अधिकारी; कारभारी (मनुष्य). ०**वार**–वि. १ मालकीचा; संबंधीं. २ ताब्यांत, कबज्यांत असलेला. –क्रिवि.

ज्यांच्या निसबतींत माणसें, वस्तू इ० दिलेल्या आहेत अशांच्या नांवांच्या अनुक्रमानें, यादीप्रमाणें (यादी इ०). **निसबद**–स्त्री. दिम्मत; ताबा. निसबत पहा. ' निसबदींत त्याच्या राहसी सदा।' –दावि ४५६.

**निसर**—स्त्री. (गो.) घसर; घसरंड. [सं. निःसृ]

**निसरगांठ**—स्त्री. आखुडगाठ; सुटगांठ; सुरगांठ; लवकर सुटणारी गाठ; एक टोंक ओढल्याबरोबर सुटणारी गाठ. [निसरणें+गाठ] **०देऊन ठेवणें**–(ल.) निसटण्याचें, सुटण्याचें साधन, उपाय राखून ठेवणें; पळवाट ठेवणें; सुटण्याचा, सोडवणुकीचा रस्ता काढून ठेवणें.

**निसरड–ट–ण, निसरणी, निसरंड, निसरडें**—स्त्रीन. १ घसरडी जागा; गुळगुळीत, घसरण्यासारखी झालेली जागा; घसरगुंडी. २ घसरण; घसरडेपणा; शेवाळी इ०कानीं झालेला बुळबुळीतपणा. 'तूं त्या वाटेनें जाऊं नको, तेथें निसरड झाली आहे.' [नि+सं. सृ=सरणें]

**निसरड–डा, निसरट, निसरंड**—वि. बुळबुळीत; घसरडा; घसरण्याजोगा; निसरड ज्यावर झाली आहे असा (वृक्ष, भूमि इ०). ' मग प्रत्याहाराचा अधाडा। जो बुद्धीचिया ही पाया निसरडा।' –ज्ञा ६.५६. [निसरणें]

**निःसरण**—न. निस्सरण पहा.

**निसरणी**—स्त्री. शिडी. [सं. निःश्रेणी]

**निसरणें**—अक्रि. १ घसरणें; सरकणें; निसटणें. ' पंगुहि मेरुवरुनिहि न माथां धरिता यदंघ्रिरज निसरे।'–मोउद्योग ७.८७. २ कमी होणें; ओसरणें. ' पुष्टि लागे विघरों। कांति पाहे निसरों। मस्तक आदरीं शिरो–। भागीं कंप।' –ज्ञा १३.७५६. [सं. निःसरण]

**निसरती**—स्त्री. (गो.) उतरंड. [सं. निःसृ–सर]

**निसरभांवडी**—पु. मुलांचा एक खेळ.

**निसरवा**—पु. १ पीक गोळा केल्यानंतर राहिलेला भाग; सरवा. २ ग्रामजोशानें पंचाग सांगून दारोदारीं मिळविलेलें धान्य. ३ खळयावरचें धान्य काढून नेल्यानंतर महारांनीं वेंचून, टिपून घ्यावयाचें धान्य. [नि+सरणें किंवा सं. निःसारण]

**निसरसांड**—स्त्री. विस्मरण; स्मरणातून जाऊं देणें; विसरणें; काळजी, विचार, भान सोडून देणें; उपेक्षाबुद्धि ठेवणें.(क्रि० करणें). ' अहंतइतकें (सारखें) दुःख नाहीं, निसरसांडीइतकें सुख नाहीं.' [निसरणें+सांडणें]

**निसराड**—स्त्री. निसरड पहा.

**निसर्ग**—पु. १ सृष्टि. २ स्वभाव; प्रकृति. ३ स्वाभाविक, नैसर्गिक अवस्था; सहजस्थिति. [सं.] **०चित्रलेखन**–न. पानें, कळया, फुलें, झाड, वेल, कीटक वगैरे सृष्ट पदार्थांचीं, देखाव्यांचीं, प्राण्यांचीं चित्रें काढणें; (इं.) लँडस्केप पेंटिंग. **०नियम**–पु. सृष्टिनियम; सृष्टीचे कायदे, सिद्धांत. **०वाद**–पु. (तत्त्वज्ञान) बुद्धिप्रामाण्यापेक्षां मानवी नैसर्गिक बुद्धीनेंच ईश्वरज्ञान व नीतिज्ञान होईल असें प्रतिपादन करणारें मत. –ज्ञाको (न)३१०. ' प्रचलित निसर्गवाद जडैक्यवादी नाहीं.'

**निसवणी, निसवील**—स्त्री. कणीस बाहेर पडण्याची, निघण्याची क्रिया; धान्य निसवण्याचा व्यापार. [सं. नि+सृ=प्रसवणें]

**निसवणें**—अक्रि. १ लोंबर, कणीस बाहेर येणें. २ (ल.) चोरी, छिनाली इ० वाईट गोष्टींत निर्ढावणें; दुष्कर्माविषयीं निर्लज्ज होणें; निःसंग बनणें. ३ तरबेज बनणें; पुढें येणें; प्रसिद्ध होणें (लिहिण्यांत, बोलण्यांत इ०). ४ धैर्यानें, धीटपणें पुढें येणें. म्ह० उसवल्याला दोरा घालतां येतो निसवल्यास उपाय काय? [सं. नि+सृ–सव]

**निसवणें**—अक्रि. (माण.) हत्याराला धार चढणें. [सं. निसणा]

**निःसंशय**—वि. निस्संशय पहा.

**निसळ**—वि. निर्दोष. ' जे सदा रितें मोकळे। जैशीं चंदनांगें निसळें। न फळतांही निर्फळें। होतीचि ना।' –माज्ञा १३.२९१. –क्रिवि. पूर्णपणें; निर्भेळपणें; केवळ; निखळ.

**निसळण–णी**—स्त्री. (सोनारी धंदा) गोठ गोल करण्याचें हत्यार.

**निस(सा)ळणें**—उक्रि. उजवणें; जिल्हई देणें; तजेला, चकाकी आणणें.

**निसांठा**—पु. (क.) खर्च होणें; फन्ना उडणें; झाडा, सफा होणें; कोरडा पडणें (खजिना, सांठा). [नि=नाहीं+सांठा]

**निसाण**—पु. निशाण पहा. एक रणवाद्य; डंका. ' कांकणांचां कळरवीं। ते धैर्य धडकु निसाणु लावी।' –भाए ४४४.

**निसाणी**—स्त्री. शिडी. ' तो हा कैवल्यपदाची निसाणी। सकल सीधांतां तरणी।' –ॠ ६. [सं. निःश्रेणी]

***निसार**—स्त्री. (व.) हलकी जमीन. [निःसार]

**निःसार, निःसारण, निःसारित, निःसात्त्विक, निःसीम**—निस्सार, निस्सारण इ० पहा.

**निसा(सां)स–सा**—पु. उच्छ्वास; उसासा. (क्रि० टाकणें; देणें; सोडणें). [निश्वास]

**निसासणें**—अक्रि. १ धापा टाकणें. २ (ल.) जोराचा श्वासोच्छ्वास करणें; सुस्कारा टाकणें (थकल्यामुळें). ३ दमणें; कंटाळणें; त्रासणें. ' तूं गुंतसी गोंविसी कां निसांसी।' –सारुह ८. १०९. [सं. निःश्वस्]

**निसिंदगी**—स्त्री. निवीसिंदगी पहा. ' पेसजी निसिंदगी सरकारांतून मुशाहिरा देऊन चालवीत असत. –रा २०.३०४.

**निसिंदा**—पु. लेखक. ' बालाजी निसिंदा पूर्वी सरकार तर्फेनें होता. –रा २०.३०५. [ फा. नवीसंदा ]

**निसिणें**—सक्रि. ( शस्त्रास ) धार देणें; पाजळणें. ' निसिलें विवेक साहणें । ' –ज्ञा १५.२५९. [ निसणा ]

**निसीगंधी**—स्त्री. निशिगंध पहा. [ सं. निशागंधी ]

**निसुक**—वि. शुष्क. –शर. [ नि+सुकणें ]

**निसुंती**—वि. सुंता न केलेला ( मुसलमान ). [ नि+सुनत ]

**निसुरणें**—अक्रि. स्वैर वागणें; स्वच्छंद, बेकैद होणें; धाक, बंधन, नियम इ० न जुमानणें. [ निसूर ]

**निसुरता, निसुटता**—वि. ओझरता; निसटता; घसरता; चाटून, लागून जाणारा. ( क्रि० दाखविणें; देखणें; पाहणें; मारणें; लागणें; पडणें; जाणें; दिसणें ). [ निसरणें, निसटणें ] **०जाणें–पडणें**–थोडासा लागणें; चाटून जाणें; तिरकस लागणें. **०देखणें दिसणें–पाहणें**–ओझरतें दिसणें; पाहणें.

**निसू**—वि. ( गो. ) निःसत्त्व.

**निसूक–ग**–क्रिवि. ( राजा. ) सरळ; तडक; बिनहरकत; न अडखळतां; थेट ( चेंडू, बाण इ० जाणें, लागणें, मारणें ). ' निसूक गोळी लागली. ' [ नि+चूक ]

**निसूक–ग**—वि. १ निर्लज्ज; कोडगा; बेशरम. ' परि माझा निसुग गर्वे अवधारी । जे फुगूनचि बैसें । ' –ज्ञा ११.५५१. २ उनाड; स्वैर; व्यसनी. ३ आळशी. ' जैसें निसुग पडलें श्वान । –रंयोवा १०.५२५. निसूर पहा. [ ? निःसंग ] **म्ह०** निसक्या माणसाला लाज नाहीं कालचें बोललें आज नाही. **निसुगाई**–स्त्री. १ आळस; निरुद्योगीपणा. २ निर्लज्जपणा. ' निसुगाईचा संतोष । मानी तो येक मूर्ख । ' –दा २.१.१७.

**निसूर, निसूरवाणा–वाणी**—वि. १ निष्काळजी; निर्वेधः निश्चिंत; बेफिकीर; निर्घोर. ' नाहीं हानि परि न राहावे निसूर । न पडे विसर काय करूं । ' –तुगा ५९८. २ जनता, शास्त्र यांची मर्यादा सोडून निर्लज्ज झालेला. ३ निर्दय. [ नि+सुरी ]

**निसूर गांठ**—स्त्री. निसरगांठ पहा.

**निःसृत**—वि. ( प्र. ) निस्सृत; बाहेर निघालेला, पडलेला· पुढें गेलेला; निर्गत. [ सं. ]

**निसोत्तर**—न. निशोत्तर पहा.

**निस्कारणें**—उक्रि. तिरस्कार करणें; तुच्छ लेखणें; तिरस्कारानें नाकारणें; घुडकावून लावणें; हडसाविणें; छी थू करणें.

**निस्तर**—पु. ( गो. ) उपाय.

**निस्त(स्ता)रण, निस्तार**—नपु. १ बाहेर अथवा पुढें जाणें. २ तरणें; पैल जाणें. ३ सुटणें; निसटणें; सुटका. ' मग जिवा देखिला निस्तारू । भवार्णवांतु । ' –भाए ५१. ४ मोक्ष; मुक्ति; सिद्धि. ५ उपाय. –शर. ६ फेड; निस्तरणें. **निस्तरानिस्तर**–स्त्री. आरंभिलेलें काम तपासून, सुधारून शुद्ध करून, पुरें करणें. [ निस्तर द्वि ]

**निस्त(स्ता)रणें**—उक्रि. १ पुरें करणें; पार पाडणें; तडीस नेणें ( एखादें केलेलें काम, चुका दुरुस्त करून, अपुरेपणा काढून टाकून, सफाई–जिल्हई देऊन म्हणजे पुन्हां पहिल्यापासून करून ); चूक सुधारणें. २ निष्कृति करणें; सांवरणें ( केलेलें दुष्कृत्य सुधारण्यासाठीं प्रायश्चित, शिक्षा, दुःख इ० भोगून,त्याचा बरे वाईट पणा सोसून–एखादें काम, कारभार ); दुष्कर्मांचीं फळें भोगणें. ३ ( सामा. ) पार पाडणें. ' हें तूं व्यभिचाररूप कर्म करितोस परंतु निस्तारायास तूं नरकांत जाशील. ' –अक्रि. सुखरूपणें पार पडणें. ' तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरेल । ' –ज्ञा ३.१६६. [ सं. निस्तरण ]

**निस्ता–स्तें**—वि तुसता; केवळ; फक्त; निव्वळ; कोणत्याहि जरूरीच्या वस्तू इ०ची मदत नसलेला; साहित्यभूत पदार्थरहित. ' निस्ता भात कसा जेवूं. '

**निस्ताई**—स्त्री. ( खा.व. ) सावकाशपणा; सवड. [ हिं. ]

**निस्तुंचें**—क्रि. ( गो. ) भिजलेल्या पदार्थांतून पाणी खालीं उतरणें.

**निस्तुष**—वि. १ तूस, कोंडा नसलेला. २ कांहीं शेष, अंश नसलेला; पुरा गेलेला ( रोग इ० ). [ सं. ]

**निस्तू(स्तु)क, निस्ताष**—क्रिवि. १ सर्वस्वीं; अगदीं; निवळ; बिलकूल, निःशेष; अजिबात. ' पाऊस निस्तूक गेला ' २ पूर्णपणें; पुरतेपणीं; सर्वथाः व्यंग, न्यून इ० शिवाय; सर्व प्रकारांनीं, तऱ्हांनीं, अंगांनीं. ' हा कागद निस्तूक फुटतो. ' ' निस्तूक मूर्ख–वेडा–सोदा. ' ३ केवळ; निव्वळ; फक्त. ' हा निस्तूक वैदिक. ' [ सं. निस्तुष् ]

**निस्तेज**—न अपकीर्ति; अपमान. ' निंदा निस्तेज दंडी । कामलोभा वरपडी । ' –ज्ञा १३.४९४. –वि. १ फिका; तेजोहीन; चकाकी नसलेला २ ( ल. ) मंद; निर्बळ; मद्दड; निरुत्साही. [ सं. ] **निस्तेजणें**–अक्रि. ( काव्य ) १ तेजोहीन होणें; फिके पडणें. ' शब्दशस्त्रें माझें तेज । निस्तेजलें धिक्कारें । ' २ पाणउतारा मानहानि, अपमान करणें; फिकें पाडणें. ' कैसा शतधा दुर्वादी । निस्तेजिलासी । ' –ज्ञा ११.१०१. **निस्तेजस्क**–वि. निस्तेज पहा.

**निस्त्याक**—न. १ ( कु. ) कालवण; आमटी; सांभारें (विशेषतः मासळीचें. २ मासळी; मासे [ निस्तें ] **निस्त्याला, निस्त्यास**–क्रिवि. कोरड्यास; भाकरी, भात इ०. बरोबर खाण्यास कोरडेशास पहा. ' आज निस्त्यास काय केलें ?

**निस्पृह–ही, निस्प्रही**—वि. १ बेपर्वा. निरिच्छ पहा. ' धनदाचीहि नसे, मग अन्याची काय निःस्पृहा परवा । ' –मोकर्ण

२९.३१. २ अन्याय अथवा अनुग्रह न करणारा; निःपक्षपाती; समदर्शी; निर्भीड. ३ (अशिष्ट) निराळा; तुटक; भिन्न. 'आमचें बिऱ्हाड निस्पृह आहे.' [सं. निस्+स्पृहा] म्ह० निःस्पृहस्य तृणं जगत्=ज्याला कोणत्याहि वस्तूची इच्छा नाहीं, त्याला जग हें तृणतुल्य तुच्छ होय.

**निस्संग**—वि. एकटा; सोबती, संबंध नसलेला; सर्वसंग परित्याग केलेला (योगी, परब्रह्म). 'संन्याशानें निःसंग असावें.' २ (ल.) सर्व बंधनांपासून, पाश, नियम इ० पासून मुक्त; लोकरीति सोडलेला (वाईट व चांगल्या अर्थी). ३ (विशेषतः) निर्लज्ज; बदफैली; स्वैर. [सं.]

**निःसत्व**—वि. १ अवश्य असणारें तेज, गुण, जोम, जीव, उपयुक्तता, उत्कृष्टपणा, रस, चव इ० नसलेला. २ खोटा; असत्य; असार; अवास्तव. [सं.]

**निस्संदिग्ध, निस्संदेह निस्संशय**—वि. संशयरहित; खातरीचा. -क्रिवि. खातरीनें; निःसंशयपणें. [सं.]

**निस्साण**—न. नगारा; निशाण पहा.

**निस्सार**—वि. निस्सत्त्व पहा.

**निस्सीम**—वि. अमर्याद; पराकाष्ठेचा; अतिरिक्त; श्रेष्ठ दर्जाचा; परमावधीचा (विशेषतः वाईट अर्थी उपयोग). 'निस्सीम-भक्त-उपासक' 'निस्सीम-सोदा-लबाड.' [सं.]

**निस्सुरा**—वि. निजसुरा पहा.

**निस्सृत**—वि. निःसृत पहा.

**निहट**—वि. जवळ; समीप; निकट. 'सरोवरां निहटीं। घातली सोनकेतकीची ताटी।' -शिशु ६५२. [सं. निकट]

**निहटणें**—सक्रि. बळकट धरणें. 'तो उपशमें निहटिला।' -ज्ञा ४.१३२. [सं. नि+हठ]

**निहानिगुतीनें**—क्रिवि. (व.) टापटिपीनें; तजविजीनें. निगुती पहा.

**निहाय**—क्रिवि. १ पासुन-पर्यंत; भर; सर्व; दरेक; प्रत्येकीं. (समासांत) महाल-जिल्हा-खातें-किल्ला-निहाय. २ मध्यें. 'पाटील-महार-निहाय'=पाटला-महारा-मध्यें. [अर. निहायत]

**नि(न्य)हायत**—स्त्री. सीमा; पराकाष्ठा. 'महाराजांनीं अंगेजीची व जातीनिशी मर्दुमीची निहायत केली.' -चित्रगुप्त ३२१. [अर. निहायत्]

**निहारु**—पु. (माहानु.) न्याहाळण्याची क्रिया; टक. याचा भितरु। न साहे निहारु।' -भाए ३९९.

**निहाळणें**—सक्रि. न्याहाळणें; निरखणें पहा. 'जें केव्हां तुझें वदन। निहाळुं आम्ही आतां।'-रास ३.३८. [हिं. निहालना]

**निहित**—वि. १ दिलेलें; स्वाधीन केलेला; २ न्यस्त; निक्षिप्त; ठेवलेलें. [सं]

**निहुळ**—वि. (व.) धिमा; मंद; हळू. 'तिचा हात जलद न चालतां निहूळ चालतो म्हणून कामाला इतका उशीर होतो.'

**निळें**—पु. (गो.) कुणबी स्त्रियांच्या हातांतील निकलची बांगडी.

**निळग(ब)णें**—अक्रि. गळून जाणें; ग्लानि येणें. [गळणें]

**निळंगळी, निळंगी-घी**—स्त्री. ग्लानि; मरगळी; सुस्ती; जडता (उपवास, अति श्रम, एकाच जागीं पुष्कळ वेळ बसणें इ० मुळें आलेली).

**निळंबी**—स्त्री. निळीचें झाड.

**निळवा**—पु. एक जातीचा जोंधळा. याचें ताट बळकट व जाड असतें.

**निळवें**—न. अर्धे कोंवळें; एक छटाक (मापी).

**निळा**—पुस्त्री. टवटवी; तजेला. (चेहरा, स्वरूप यांवरील). -वि. १ मेघासारख्या रंगाचा; सांवळा; श्याम; नील. २ नुसता, एकंजात पाढरा (घोडा). ३ हिरवा; ताजा; कोंवळा (पीक, गवत, बाटूक इ०). ४ टवटवीत. 'पेरिलीं धान्यें सदा निळीं।' -एभा २१८१. म्ह० इळयाचे घायीं निळें कापणें. [सं. नील] ०कोरं(रां)टा-पु. निळ्या कोरंटीचें झाड. ०तुतिया-पु. मोरचूत. ०हिरवा-वि. १ काळा निळा (विष, ताप, इ० मुळें पडलेला). २ विघडलेलें; नासलेलें (तूप, अन्न इ०). (क्रि० पडणें; होणें). **निळांबा**-पु. (व.) मार लागल्यामुळें अंगावर पडणारा हिरवा-निळा घट्टा.

**निळाभ्रूज**—वि. सर्व शरीर पांढरें, दूम व आयाळ पांढरी, त्यांत काळेहि केस थोडे असा (घोडा). -अश्वप. १.३१.

**निळारी**—पु. सुताला निळीचा रंग देणारा; निलगार. [नीळ]

**निळें**—न. १ हिरवें-गवत-धान्य-पीक. २ हिरवेपणा; हिरवळ. [नीळ]

**निःक्षत्र**—न. क्षत्रियांचा नाश; क्षत्रिय नाहींसे करणें.

**निःक्षत्र, निःक्षत्रिय, निक्षेत्री**—वि. क्षत्रिय वर्णाच्या लोकांविरहीत; क्षात्रहीन (देश, जागा, काळ). 'निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला।'-आरती दशावताराची. 'परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली.' [सं.]

**निक्षिप्त**—वि. १ ठेवलेला. २ गहाण ठेवलेला. ३ फेंकून दिलेला. [सं.]

**निक्षी**—स्त्री. कडकपणा; सक्ति; बिनचुकपणा; बारीक दृष्टि; शिस्त. [?सं. निकर्ष] **निक्षी, निक्षीचा**-वि. कडक; करडा; सक्त; न वांकणारा; दुराराध्य (रागांत, निंदेंत उपयोग).

**निक्षुण-न**—क्रिवि. स्पष्टपणें; उघडपणें; हडसून खडसून. (क्रि० सांगणें; बोलणें; करणें; नाकारणें). [सं. नि+क्षुण्ण]

**निक्षेप**—पु. १ ठेवणें; जवळ राखणें. 'ऐसें जगाचें बीज जो संकल्पु। अव्यक्त वासनारूप। तया कल्पांतीं जेथ निक्षेपु। होय तें

स्थान मी।'–ज्ञा ९.२९३. २ गहाण; निधि; ठेव; हवाला. ३ पुरलेलें धन; कुणगा. 'निक्षेप काढिजे पायाळें।' –मुआदि १८.३५. ४ (कांहीं कारणाकरितां) त्याग. 'आहवनीयादि वन्ही। निक्षेपरूपीं हवनीं। यजिती पैं विधानीं फुडे होऊनी।'–ज्ञा १७.३६१. ५ (कायदा) ठरल्याप्रमाणें काम झाल्यावर परत कर ण्याच्या बोलीनें स्वाधीन केलेला माल (इं.) बेलमेंट. [सं. नि+क्षिप्] **निक्षेपणें**–उक्रि. १ (काव्य) टाकणें; फेंकणें. 'सागरीं निक्षेपिता अचळ । भेदूनि चालला पाताळ।' –मुआदि ४.८१. २ (द्रव्य) पुरून ठेवणें. ३ ठेवणें; राखणें.

**निक्षेपी**—वि. (गो.) ऐकलें न ऐकलें असें करणारा; करनकऱ्या.

**नी**—उभ. आणि; व. 'चाकवत आलुशाख नी मेथी।' –मुविराट ८.७३. 'रावसाहेब नी दादासाहेब.' [आणि संक्षेप]

**नीक**—नस्त्री. गटार; नाला. 'तंबूचे बाहेरचे बाजूस पाण्याची नीक काढली असावी.' –(बडोदें) स्वारीनियम ६३. [गु.]

**नीक–का**—निका (–वि.) अर्थ २ पहा. 'फुण आमुसीं नोंकौनि बोलने। हें नीकें नोहणे।'–शिशु ९२०.

**नीच**—न. १ (ज्यो.) ज्या राशींत एखाद्या ग्रहाचें बल अगदीं कमी असतें अशी रास. उच्च स्थानापासून सातवें स्थान. उदा० सूर्याची तूळ रास. २ अशा राशींतील ग्रह; कर्केचा मंगळ. ३ ग्रहाच्या कक्षेतील सूर्याच्या अगदीं जवळचा बिंदु. –वि. १ सखल; उंच नसलेला; निंच; खोल. 'नीच तरी पावेल। भूमिदोषु।'–ज्ञा ६.१८४. २ कमी; हलका (किंमत, दर, गुण, आकृति, जाति, स्थिति इ० मध्यें). 'या झाडापेक्षां तें झाड नीच आहे.' 'हेमगर्भापेक्षां आनंदभैरव नीच आहे.' ३ हलकट; अधम. 'हंसदास म्हणे नीच। आले जन्म हे श्वपच।' –हंको. ४ (संगीत) खरज; खालच्या सुराचा. 'हा पखवाज नीच आहे.' –क्रिवि. खालीं. 'तोफ नीच धरली तर गोळा रेतींत जातो.' –भाब ३. [सं.] **०कृत्य**–न. १ हलकें, हीन काम. २ हलक्या लोकांना, जातींना योग्य असें काम. **०सेवा**–स्त्री. १ हलक्या लोकांच्या हाताखालीं चाकरी; नीच लोकांची चाकरी. २ हलकी नोकरी. **नीचत्व**–न. कमीपणा; हलकेपणा. 'नीचत्व पहिलेंच घ्यावें। आणि मूर्खपण।' –दा ११.५.९. **नीचा**–वि. हलका; नीच (–वि.) पहा.

**नीच**—वि. (काव्य) नित्य; सतत. निच पहा. 'क्षणक्षणीं नीच नवी। दृश्याची चोख मदवी।' –अमृ ७.१२६. –ज्ञा १२.३६. [सं. नित्य; प्रा. णिच्च]

**नीज**—नस्त्री. १ स्वतःचें काम. २ आत्मस्वरूप. 'छंदे आपुलिया नाचत। नीज घेऊनी फिरत गा।' –तुगा ३४८. [सं. निज] **म्ह०** निजे वांचून पुजा नाहीं=दुसऱ्याच्या कामाची कोणी काळजी घेत नाहीं.

**नीज**—स्त्री. (काव्य) झोंप; निद्रा. 'ज्याचा त्रयोदशाब्द न लागोंदे नीज धर्मपुत्रास।' –मोकर्ण ६.५९. 'निजेल्या पर्यंकीं किमपि न लगे नीज नयनीं।' –सारुह ५.१३३. [सं. निद्रा; हिं. नींद] **०मोड, नीदमोड**–स्त्री. झोंपमोड.

**नीट**—वि. १ सरळ; वांकडा नसलेला. 'रानांत जाऊन नीट लांकूड आण.' २ तडक; थेट. 'गुरुसुत बंधु सुहृज्जन गेले स्वर्गासि सर्वेही नीट।' –मोगदा ९.२०. ३ (ल.) बरोबर; योग्य; सदृश (वस्तु, काम). 'दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली।' –सारुह ८.१४२. 'याचें बोलणें नीट आहे.' [का. नेट्टगे=सरळ; नेट्ट] **०करणें**–१ वक्रता काढणें; सरळ करणें. 'त्यानें आपल्या शिष्यास भला नीट केला.' २ बरें करणें; दुरुस्त करणें. **०जाणें**–वांकडा-तिकडा किंवा कोठें न थांबतां जाणें. **०उभा**–वि. ताठ; सरळ उभा; उभासोट. **०करणावळ**–स्त्री. नीट, दुरुस्त करण्याची मजूरी. **०नेटका**–वि. १ यथायोग्य; शोभेसा; चांगला; सुंदर; बांधेसूद; देखणा. २ व्यवस्थित; टापटिपीचा; चकपक; ठाकसठिकस. **०वांकडा**–वि. १ चांगला व वाईट; सरळ व वांकडा; खरा आणि खोटा; शुद्धाशुद्ध; बरोबर आणि चूक. २ चांगला किंवा वाईट; सरळ किंवा वांकडा इ० **०वांकडें करणें**–कमीजास्त, देवाण घेवाण, तडजोड करून बरोबर करणें; मिटविणें (हिशेब इ०). 'सावकाराचें नीटवांकडें करून मी गांवाहून निघालों.' **०वीट**–वि. १ थेट; सरळ; तडक; धोपट. २ (ल.) बरोबर; न्याय्य. 'नीटवीट पंचवीस झाले.' [नीट]

**नीड**—नपु. पक्ष्याचें घरटें; कोटर. 'नीडासि आश्रय तरुवर।' –रावि ४०.७९. –वाक्यवृत्ति ७१०. [सं.]

**नी(नि)डें**—शअ. (महानु.) जवळ. 'होआवे आं श्रीकृष्णां नीडें। एरू रींगे एरां पुढें।'–दाव २०३. 'हें मळमुत्राचें भांडें। म्हणौनि ठाकों न ये या निडें। शिवशिव याचेनि पाडें। आणिक कश्मळ नाहिं।' –भाए ३९८.

**नीत**—स्त्री. (काव्य) नीति; चांगली रीत; लोकाचार. 'तुका म्हणे संतां करूं नये अनृत। पाप नाहीं नीत विचारीतां।' –तुगा २७८३. इतर अर्थीं नीति पहा. –वि. नीतीचा; बराबर; योग्य; सरळ; चांगल्या वर्तनाचा. [सं. नीति]

**नीत**—वि. नेलेला; दूर केलेला. [सं. नी=नेणें]

**नीत**—वि. सततचा; नेहमींचा. –एभा ११.४८३. 'थाट नवे नीत होट लाल करी पानें खाउनी सदां।' –पला ४.३५. [सं. नित्य] **०मजूर**–पु. पोटासाठीं नित्य नियमित मजुरी करणारा; नेहमीं काबाडकष्ट करून पोट भरणारा. **०मजूरी**–स्त्री. १ नीतमजुराचें काम, मजुरी, मेहनत. २ नीतमजुराचें वेतन.

**नीति**—स्त्री. १ व्यवहारशास्त्र; नय, आचार-व्यवहाराचे नियम; शिष्टाचार. २ युक्तता; योग्यता; न्याय्यता; न्याय. ३ सदाचाराचे नियम; सृष्टि-नियम-व्यवस्था. ४ राजनीति-धर्मशास्त्र. ५ नियम; कायदा; मर्यादा; निश्चितपणा; ठराविक परिमाण. 'किंवा मेघधारा वर्षिति। नाहीं नीति त्यातें।' (समासांत) धर्म-प्रपंच-लोक-व्यवहार-शास्त्र-नीति; तसेंचः-अंगद-नारद-बृहस्पति-विदुर-शुक्र-नीति. (=अंगद, नारद इ० व्यक्तींनीं सांगितलेले शास्त्रीय व व्यावहारिक नियम) [सं.] **०भेद**-पु. (सांप्रदायिक अर्थ) प्रमाण-परिमेयादि शास्त्र; तत्त्वभेद. कोणी अर्थशास्त्र तर कोणी वैशेषिक दर्शन असा याचा अर्थ घेतात. 'तरी तर्कु तोचि फरशु। नीतिभेदु अंकुशु।'-ज्ञा १.११. **०मान-वान-वंत**-वि. न्यायनीतीनें वागणारा; सदाचारी; सत्प्रवृत्त. **०शास्त्र**-न. नीतीचें प्रतिपादन करणारें शास्त्र. (इं.) एथिक्स. **०शिक्षण**-न. नीतीचें, सदाचाराचें शिक्षण (शाळांतून दिलें जाणारें). -अध्यापन १०६.

**नीद्**—स्त्री. झोंप. 'तैसा विश्वस्वप्नेंसीं माया। नीद सांडूनि धनंजया।'-ज्ञा १८.४०५. [सं. निद्रा]

**नीध**—स्त्री. १ निधि पहा. २ अतिशय उत्पन्नाची, किंमतीची वस्तु, गोष्ट. 'ही गाय आम्हास मोठी नीध सांपडली.' [सं. निधि]

**नीनिणें**—सक्रि. बाहेर घालणें; घालवून देणें. 'भणौनि बाहीर नीनिले तेणें मीषें। हों काजू।'-ऋ ९१. [नि+नी=नेणें]

**नींब, नीम**—निंब पहा. 'ओवाळौनिआं नींब लोणु।' -दाव ३०९.

**नीम**—पु. (राजा.) भूत, पिशाच्च, प्रेत इ० कांस द्यावयाचा नियमित बलि. (क्रि० देणें, सांडणें). 'यंदा त्या पिशाचाचा नीम द्यावयाचा राहिला म्हणून तुम्हास उपद्रव होतो.' [सं. नियम]

**नीम**—वि. निमा; अर्धा. [फा. नीम्] **०रजावंद**-वि. अर्धप्रसन्न; थोडा अनुकूल. 'सफ्दरजंग यास नीमरजावंद करून आपले लगामी लावावयाचा विचार केला असे.' -पया ७५.

**नीर**—न. पाणी; जल. -ज्ञा ७.९१. -एभा १.१२४. 'नीरक्षीरालिंगनरूपी स्नान तुला तें घालोनी।'-सौभद्र अंक ४. [सं. का. नीरु] **०मोर**-न. फोडणीचें ताकपाणी, ताकांत बरेंच पाणी घालून त्यांत लिंबाचा रस पिळतात व सुंठ, हिंग, मीठ इ० मिसळतात. -गृशि १.४७६. कर्नाटकांत याला 'नीरमज्जिगे' म्हणतात. **०क्षीरविवेक**-पु. क्षीरनीर विवेक पहा.

**नीर**—पु. मासे धरावयाचें मोठें जाळें. 'माशावाणी नीर काढिला आणले धरुन।'-ऐपो २६४.

**नीर**—पु. परिणाम; निकाल; निर्णय; इत्यर्थ; निश्चय; ठराव (पंचायतीचा, चवकशीचा). (क्रि० काढणें; निघणें; घेणें). 'काय बोल ग्रंथाला वाचिक अर्थ काढिना नीर।'-राला १३. **०काढणें**-झाडून, साफ, खरडून काढणें; निकाल करणें. 'गनिनीचा नीर काढावा.'-पेद २१.८. [निरा ?] **निरावर येणें**-१ निकरावर, शेवटच्या उपायावर, अटीवर येणें; शेवटच्या अवस्थेस पोंचणें (आजार, विकार). २ संपुष्टांत येणें; संपावयास लागणें; संपत येणें (काम, वस्तु इ०).

**नीरस**—वि. रसहीन; रुक्ष; बेचव; पाणचट; मिळमिळीत. निरस पहा. [सं. निरस]

**नीरा(रां)जन, नीरंजन**—न. आरती; ओवाळणें. निरांजन पहा. -ज्ञा १६.२१०. 'तेथें गोवळराज नृत्य करिती कृष्णास नीरंजना।' -आपू १५. [सं. नीराजन]

**नील**—पु. एक रंग. -वि. या रंगाचा; निळा (-वि.) पहा.

**नील, नीलकांत-मणी**—पु. माणकाचा एक प्रकार; निळया रंगाचें एक रत्न; शनीचा खडा. हा बहुधा अस्मानी रंगाचा असून कठिणपणाविषयीं हिरा व लाल यांच्या खालोखाल असतो. [सं.] **०कंठ**-पु. १ महादेव; शंकर (समुद्रमंथनांतून निघालेल्या चौदा रत्नांपैकीं हलाहल विष प्राशन केल्यामुळें शंकराचा कंठ निळा झाला). 'तेणें सुखें नीलकंठ तांडव नाचे।'-एभा २.५३६. २ चाष पक्षी; तास. ३ मयूर; मोर; शिखी. **०गाय**-स्त्री. एक जनावर; पांढऱ्या पायाचा काळवीट; रोही; हरिण. **०बंद**-वि. नील रत्नाची केलेली; निळी. 'तों नीलबंद भूमीवरी जगज्जीवन। सहज जाऊन बैसला।'-ह ५.१७७. **०मेह**-पु. निळया रंगाची लघवी; अशी लघवी होणें. **०लोहित**-न. तांबडानिळा. मँगनीज धातु. **नीलोत्पल**-न. निळया रंगाचें कमळ. 'कैसें नीलोत्पलातें रावित।'-ज्ञा ११.६००.

**नीलंड, नीलांड**—पु. एक जंगली प्राणी. -अश्वप २.७. -वि. धर्मलंड; निर्लज्ज. व्यभिचारी. 'लोक नीलंड नीलंड काढुनी नेती पोरी।'-रामदासी १५.२६५.

**नीला**—स्त्री. शरीरांतील अशुद्ध रक्तवाहिनी; शीर. ही स्पर्शाला शुद्ध रक्तवाहिनी (लालशिरे) पेक्षां जास्त उष्ण असते. -सुश्रुत-शारीर ७. [सं.]

**नीलांग**—न. एक उपरत्न. [सं.]

**नीलांजन**—न. मोरचूत. [सं.]

**नीलांबरी**—स्त्री. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत धैवत वर्ज्य. जाति षाडव-संपूर्ण. वादी पंचम, संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर. 'कल्याण गोडी श्रीराग। मुरलींत आळवी श्रीरंग। वसंत पावक पद्मसुरंग। नीलांबर राग वाजवित।'-ह १०.११७.

**नीलि(ळि)का**—स्त्री. (वैद्यक) काळमस; अंगावरचा तीळ; चामखीळ. [सं.]

**नीलिमा**—पु. निळेपणा; निळा रंग; निळीचा, मेघाचा, पाटीचा रंग. 'केशांवर नीलिमा झळकतो.' 'हा नभांत पसरे नीलिमा।' [सं.]

**नीली**—स्त्री. नीळ; निळीचें झाड. (इं.) अनिल [सं.]

**नीलीन**—पु. निळीपासून केलेला पदार्थ. (इं.) अनिलीन.

**नीव**—पुन. एक वृक्ष व त्याचें फळ. न्हीव पहा.

**नीव**—नपु. (कों. राजा.) छपराची आंतील खालची बाजू.

**नीवडा**—वि. नावडता, नावडा पहा. 'नुस्ता पोरवडा, घरीं न कवडा चित्ती बरा नीवडा.' –आग्नु ५.

**नीवी**—स्त्री. निरी; लुगडयाचा पदर, ओचा; केळें. कमरें-भोंवतालचा लुगडयाचा भाग, वेष्टन. [सं.]

**नीशार**—पु. १ हातरण्याचा, पसरण्याचा कपडा. 'नीशारादि पलंगपोस पडदे गाद्या उशा पाहिल्या।' –सारुह ३.४४. २ फर्गोल. –राव्य २.३६. [अर. नशूर=पसरणें (सतरंजी इ०)]

**नीस**—पु. १ सारांश; तात्पर्य; तत्त्वार्थ; निष्कर्ष; निवडून काढलेला चांगला भाग; सार; निवड. (क्रि० काढणें; निघणें). 'आदि वर्तमान जाणसी भविष्य। मागें पुढें नीस संचिताचा।' –तुगा १२९३. २ बारीक चवकशी, तपास; छाननी; विचक्षणा. (क्रि० करणें; काढणें; पहाणें; पुरवणें). [निसणें]

**नीस**—क्रिवि. पूर्णपणें; निखालस; सर्वांशीं. 'नीस नंगा' =सर्व बाजूंनीं (पैसा, शिष्टाचार इ० कामीं) उघडा, दरिद्री. [निसता; निस्तूक]

**नीस**—पु. (राजा.) (श्रमानें किंवा मार बसल्यामुळें पाठ, छाती इ०) ताठरणें; उसण भरणें. (क्रि० भरणें; उतरणें).

**नीस**—न. (कों.) वैर; सूड.

**नीस**—नवीस पहा. हा फारशी प्रत्यय लिहिणारा या अर्थी शब्दापुढें येतो. उदा० पोतनीस–चिटणीस–फडणीस इ०

**नीस**—स्त्री.(गो.) आंत भाताचें शीत नसलेली निवळ पेज.

**नीस**—पु.(गो. कु.) सीमेवरचा दगड. [म. निसणा; गु. [illegible]

**नीसुगा**—वि. आळशी. –शर [निसूक–ग]

**नीळ**—स्त्री. नील. १ निळीचें झाड. २ निळीचा रंग; (गु.) गुळी. ३ नीलमणी. 'हा निळयाचा दुसरा। या बुद्धी हातु घातला विखारा। कां रत्नें म्हणोनि गारा। वेंची जेंवि।' –ज्ञा ९.१४८. ४ शेवाळ; न वाहणाऱ्या पाण्यावरील शेवाळ. –पु. १ सर्व अंग काळें असलेली एक वानरजात. २ रामाचा एक अनुयायी वानर. 'नळनीळ जांबुवंत। अंगद सुग्रीव बिभीषण भक्त.–वि.निळया रंगाचा.[सं.नील] ०**नासणें–रांपणें**, **निळीचा रंग नासणें**–(निळीचा रंग नासला असतां खोटी बातमी उठवावी म्हणजे रंग चांगला होतो अशी समजूत रंगारी लोकांत आहे यावरून). एखादी बातमी निराधार, खोटी म्हणून सांगावयाची असल्यास प्रयोग करतात. ०**रांप**–स्त्री. पु. (ल.) निराधार बातमी; गप्प. 'नील रांप झाला आहे.' ०**वट**–स्त्री. १ हिरवें गवत–कुरण–चरण. २ हिरवळ जागा. ३ हिरवटपणा; निळेपणा. –वि. हिरवट, निळसर; अस्मानी (रंगाचा).

**नीळ**—पुन. घरटें; नीड पहा. 'निघोनी गेला हंस नीळ। वृथा पिटिशी कपाळ।' –मुवन–हरिश्चंद्राख्यान २६५. (नववीत पृ. १९८).

**नु**—अ. १ (कु.) एक आदरार्थी अव्यय. हें संबोधनास लावतात. उदा० बाबानु, काकानु. २ कांहीं शंका प्रदर्शित करण्यासाठीं योजण्यांत येणारें अव्यय. यामुळें वाक्याला प्रश्नाचा जोर येतो. 'लांबातिजे सुरिजें। केवि लाजिजे नु।' –शिशु ४७०. [सं. नु]

**नुकता**—नुक्ता पहा.

**नुकरा, नुकरापलंग**—वि. (घोडयाचा रंग) पांढरें शरीर, त्यांत जर्द व काळे ठिपके असा (रंग, घोडा) –अश्वप १.३२. [अर. नुक्रा=पांढरा रंग (घोडयाचा)]

**नुकसान–नी**—स्त्री. १ तोटा; खोट; बूड; नाश; २ इजा; दुखापत; दुःख; अपकार; खराबी; (इं.) इन्जरी; टॉर्ट. ३ (कायदा) नुकसानीचा पैसा; नुकसानभरपाई. –वि. कुचकामाचा; हलका; भिकारी; कवडीमोल. [अर. नुक्सान्] ०**भरपाई**–स्त्री. एखाद्याचें नुकसान केलें असतां त्याबद्दल मोबदला देणें. (इं.) कॉंपेन्सेशन.

**नुको**—क्रि. (राजा. कुण.) नको. 'असो घाबरो नुको.'

**नुक्ता**—पु. १ सुंदर, मजेदार कल्पना, विचार; लहान, रसभरीत चुटका, गाणें. २ सूक्त; सुभाषित; वाक्य. 'पत्रें लिहिलीं त्यांतील नुक्ते व चुटके उत्तरें यावयाजोगे बहुत लिहिण्यांत आलीं.'–रा ७, खलप २.२६. ३ (व.) तोडगा; इलाज; औषध. 'हिवावर कांहीं नुक्ता ठाऊक आहे?' [अर. नुक्ता]

**नुक्ता**—पु. उंटाच्या नाकांतील वेसण, लगाम.

**नुक्ता**—पु. १ दोषारोप; आळ; ठपका; लादलेला दोष; लावलेला कालिमा. (क्रि० ठेवणें). २ फारशी लिपींतील अक्षराच्या वर किंवा खालीं द्यावयाचें टिंब. [अर. नुक्त]

**नुक्ता**—क्रिवि. इतक्यांत; आतांच; निगुता; नुकता.

**नुखलणें, नुघडणें**—सक्रि. (काव्य) न उघडणें. 'उघडो जाय कवाडा। नुखलेचि न होय निवाडा।' –आपद ८६. 'नुघडती डोळे भक्ताचे।' [नि=खुलणें, उकलणें, उघडणें]

**नुगडणें**—क्रि. न सुटणें; न उद्धरणें. –एभा ११.१०७१. (–शर.)

**नुगलणें**—अक्रि. प्रसन्न न होणें; मोकळें, विकसित न होणें. 'तुझें कांहीं केल्या जननि मन अद्यापि नुगले।' –सारुह ३.९३. [ न+उगळणें, उकलणें ]

**नुगवणें**—अक्रि. न कळणें; नाकळणें; उकलतां न येणें; न सुटणें. 'आणि सिकतेचें वेंट वळून हातें। तेही पाठवा त्या सांगातें। हें जरी कोडें नुगवे तुम्हांतें । तरी रामकृष्णातें धाडिजे।' –ह १४.२३२. [ न+उगवणें, उकलणें ]

**नुथड**—न. नथ. –एभा १३.२२१ ? (–हंको.) [ नथडी ]

**नुनी, नुंगी**—स्त्री. लहान मुलाचें इंद्रिय; बुल्ली; नुन्नी.

**नुनू**—स्त्री. (बालभाषा) झोप; गाई.

**नुन्नी**—स्त्री. (बालभाषा) मुलाचें मूत्रेंद्रिय; बुल्ली. [गु. नानी= लहानी ]

**नुन्नुबाळ**—पुन. नन्नुबाळ पहा.

**नुधवणें**—उक्रि. वर न करणें, न उचलणें. –ऋ ६१. 'ज्याचेनि स्मरणें तत्त्वतां। कमाकर्में नुधविती माथां।' –एभा ५.३०६. [ न+उधवणें ]

**नु(नू)न्य**—न्यून पहा. 'जे सामान नुन्य असेल तें लिहून पाठवीत जाणें.' –वाडसमा २.१०. [ न्यून अप. ]

**नुन्या**—वि. (व.) घरचा. 'तो नुन्या मनुष्य आहे.' [ ? न +अन्य ]

**नुपकर**—वि. असमर्थ. –ज्ञा ९.३८०. (–हंको–पाठभेद) [ न+उपकारी ]

**नुपकरणें**—अक्रि. समर्थ न होणें; कामास न येणें; उपयोगी न पडणें. 'एथ कृपाळूपणा नुपकरे।' २.२३. [ न+उप+कृ–उपकरणें ]

**नुपर**—स्त्री. (वर. ना.) तूट; टंचाई; नपूर. [ न+पुरणें ]

**नुपरतें**—वि. विषयासक्त. 'कनिष्ठ आणि गर्विष्ठ। नुपरतें आणि नष्ट।' –दा २.३.१७. [ न+उपरत ]

**नुपरवण**—स्त्री. (गो.) तूट. [ न+पुरवणें ]

**नुपऱ्या**—वि. टंचाई असणारा; गरजू.

**नुपेक्ष(क्षि)णें**—उक्रि. (काव्य) उपेक्षा, हयगय, दुर्लक्ष, तिरस्कार, कंटाळा न करणें. 'नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।' –राम २८. –अक्रि. दुर्लक्ष युक्त, तिरस्कृत न होणें. [ न+उपेक्षणें ]

**नुपेक्षा**—स्त्री. (काव्य) उपेक्षा, दुर्लक्ष्य न करणें; लक्ष्य देणें.

**नुबगणें**—अक्रि. न कंटाळणें. –ज्ञा १०५५. 'चढल्या आवडी करी भजन। नुबगे मन सेवेसी।' –एभा ११.५७२. [ न+उबगणें ]

**नुमगणें**—अक्रि. (काव्य) १ अदृश्य होणें; नाहींसें, बेपत्ता होणें; पत्ता नसणें. शोध न लागणें. 'कोठें नुमगे मंगळभगिनी. नका शोधूं मतां तरें। नुमगें खरें बुडाल।' –तुगा ३३९२. २ न समजणें; उलगडा न होणें; नुमजणें पहा. 'कोणी नुमगे स्वहितास कसे।' –सन्मित्र समाज मेळा ६ (१९२९). [ न+उमगणें ]

**नुमचवणें**—सक्रि. (काव्य) न फेडणें; परत न करणें. 'आणि दान जया द्यावें। तयातें ऐसेया पाहावें। जया घेतलें नुमचवे। कायसेनहीं।' –ज्ञा १७.२९८. [ न+उमचणें ]

**नुमजणें**—अक्रि. (काव्य) नुमगणें; न कळणें. २ अज्ञात राहाणें; समजून न येणें. [ न+उमजणें ]

**नुमंडे**—वि. नसतें; खोटें. 'मृगजल जेथें नुमंडे। तेथें असे पां कोरडे।' –अमृ ६.६४.

**नुमसणें**—अक्रि. १ न सांगणें; प्रकट न करणें. 'लोभियाचें मन जैसें। जीवु जावो परि नुमसो। ठेविला ठावो।' –ज्ञा १३. २०२. २ नुमजणें पहा. 'देही देहातें नुमसे।' –निगा ६०. ३ उत्पन्न न होणें; न ठरणें 'परि कांहीं केल्या गर्भ नुमसे। उदरीं तिये।' –सिंसं ६.१७९. [ न+उमसणें=सांगणें, प्रकट होणें ]

**नुरणें**—अक्रि. (काव्य) बाकी न राहणें;न उरणें. –मोभीष्म १२.६८. 'दीपकपुराचे मेळीं। जेवी नुरेचि काजळी।' [ न+ उरणें ]

**नुरमैली**—वि. पुलाव्याचा एक प्रकार. 'नुरमैली पुलावा करणें झल्यास चापट रवे ऊर्फ पार्चे वापरावे.' –गृशि २.९.

**नुरा**—स्त्री. (गो.) १ तेज. २ चेहरा; नूर. [ अर. नूर् ]

**नुरा**—वि. चंढल; उन्मत्त. 'निज पराक्रमें मंदिरासि बांधी। धरातळावर सुरापतिसम नुरा, होवुनि अपपरा न जाणसि।' –अमृत ५३. [ ? ]

**नुरी**—स्त्री. एक जातीचा पोपट. [ हिं. ]

**नुरोधी**—वि. बाधक; विरोधी. –माज्ञा १५.२३०. (पाठभेद)

**नुलैत**—क्रिवि. (गो.) नकळत; गुप्तपणें.

**नुसता, नुस्ता–स्था, नुस्त्यास**—निस्ता, निस्त्यास इ० पहा.

**नुसतें, नुस्तें**—न. (गो.) मासळी; मासे. 'गोंयच्या लोकांचे नुस्त्याशिवाय जा ना.' [ निस्तें ]

**नुसदें, नुसधें**—क्रिवि. नुसतें पहा. 'आमुचें ज्ञानचि नुसदें वेथें।' –दा५.१.३५. 'नेसावीं वल्कलें तीं फळजळ नुसधें भक्षणें वृक्षमूळीं।' –निमा १. श्रीरामकर्णामृत ६७.

**नुस्कान–नी**—नस्त्री. नुकसान पहा.

**नूतन**—वि. १ नवा; ताजा. 'इतर कथा नव्हे फुडी। नित्य नूतन इची गोडी।' –एरुस्व १.७. २ तरुण. ३ अलीकडचा. –क्रिवि. अलीकडे; नुकतें. [ सं. ] ०वयस्क–वि. नुकता वयांत आलेला; सज्ञान; बाप्या बनलेला.

**नूपुर**—पुन. पायांतील एक दागिना; घागऱ्यांचा वाळा; तोरडया; पैंजण. ' पायीं तिचे जडित नूपुरयुग्म वाजे । ' –सारुह ८.१३५. [सं.] **०करण**–वि. ( नृत्य ) हात रेचित करून लताख्य करावेत व त्रिक फिरवून उजवा पाय पाठीमागच्या बाजूस नेऊन कुंचित करावा. नंतर जमिनीस न लावितां पायाचा अग्रभाग जमीनीवर लवकर लवकर आपटावा. **०पादिक ( आकाशीचारी )**–वि. (नृत्य ) उजवा पाय पाठीमागें नेऊन अंचित करणें व मग टांच जमीनीस न लावितां पायाचा अग्रभाग जमीनीवर लवकर टेंकविणें. [ सं. ]

**नूर**—( हेट ) नोर पहा.

**नूर**—पु. १ वैभव; ऐश्वर्य; थाट. २ तजेला; चकाकी; पाणी; तेज; कांति; रूप ( दृष्टि, चेहरा इ०चा ). ' तो नूरचि वदनाला। शायदी होय।' –सिसं ४.१८३. [ अर. नूर्=प्रभा ] **म्ह०** (हिं.) एक नूर आदमी, हजार नूर कपडा । लाख नूर गहिना, करोड नूर नखरा । **०पालटणें**–रंग बदलणें. **०मिळविणें**–( व. ) मिळतें घेणें. **कोहिनूर**–पु. ( तेजाचा पर्वत ) एक सुप्रसिद्ध रत्न, हिरा. हा इंग्लंडच्या राजमुकुटांत आहे. **०जहान**–स्त्री. (जगताचें तेज) जहांगीर बादशहाची रूपवती राणी.

**नूर**—पु. एक जातीचा लांबट मोती.

**नृत्य**—न. नाचणें; अभिनय करणें; नाच; गायनांतील रस व भाव, मुखराग व अंगप्रत्यंग यांच्याद्वारा अभिनय करून,अनेक तालांमध्यें नियमबद्ध नाचणें. [ सं. ] **०शाला**–स्त्री. नाचणें, गाणें, हावभाव करणें इ० शिकविण्याची, दाखविण्याची जागा; खेळाची जागा; नाटकगृह.

**नृप, नृपति, नृपाळ**—पु. राजा; भूपति. –ज्ञा १८.४६४ ' नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू । ' –र १०. ' नृपाळाचे स्कंधीं बसुनि मणिबंधीं उतरला । ' –र १२. [ सं. ] **नृपासन**–न. सिंहासन; गादी. ' रायें तुलेंचि दिधलें स्वनृपासना रे । ' –वामन, भरतभाव २५.

**नृशंस**—वि. द्वाड; निंद्य; घातुक; क्रूर; खोडकर; दुखापत, इजा, नाश करणारा. [ सं. ]

**नृसिंह, नृसिंहजयंती**—नरसिंह, नरसिंहजयंती पहा.

**नृसिंहावतार**—नरसिंहावतार पहा. ' कलुशाची गांठ पडल्यावर, ज्यांच्या मसलतीनें त्याला बापाची गादी मिळूं नये असें ठरलें होतें, त्या सर्वांवर संभाजीनें कडक नृसिंहावतार धारण केला. ' –संभाजी

**ने**—अ. पासून या अर्थी प्रत्यय. एकारांत स्थलवाचक क्रियाविशेषणाशीं शेवटच्या मात्रेचा लोप करून जोडतात. जसें:–एथने, तेथने, कोठनें, इकडने, तिकडने इ०दुसऱ्या शब्दाशीं जसाच्या तसा जोडतात. उदा० आतने, बाहेरने, अलाडने, पलाडने इ०. स्थलनामांना हून, ऊन याअर्थी पूर्वागम दाखविणारा प्रत्यय लागल्यानंतर लावतात. जसें:–पुण्यासने, साताऱ्यासनें ( आलों, गेलों इ० ).

**ने**—न. न ( =नाहीं ) या अर्थी योजतात. ' तें दुर्योधन ने घे।' –मोकर्ण ६.३५. [ सं. न ]

**ने**—उभ. (कातवडी, भिल्ली ) आणि; व. ' राजाला ठार मारूं ने राज्य लेवूं. ' –मसाप २.३१. [ गु. ने ]

**नें**—अ. १ तृतीया विभक्तीचा प्रत्यय. ( अव. नीं ). उदा० रामानें, त्यानें, मुलांनीं इ० २ भूतकाळीं सकर्मक क्रियापदाच्या आणि विध्यर्थाचें आवांत रूप ( करावा, द्यावा इ० ) होणाऱ्या क्रियापदाच्या तृतीयपुरुषाच्या रूपाबरोबर हा प्रत्यय योजतात. उदा० केल्यानें, दिल्यानें इ० ( अव. रूप नीं )

**नेआण**—स्त्री. ( नेणें आणि आणणें ). १ फिरून केलेलें, निष्फळ आणि त्रासाचें नेणें, आणणें. २ आसपास, इकडे तिकडे नेणें; हलवाहलब. ( क्रि० करणें ). [ नेणें+आणणें ]

**नेआहा**—पु. प्रतिध्वनि. ' वारा वाजे गरगर । तेणें गर्जेति वन डोंगर । उन्मळुनि पडति तरुवर । नेआहे उठिति आकाशीं । ' –ख्रिपु १.७.६४.

**नेऊर**—नपु. घोडयाचा घोटा. नेवर पहा.

**नेऊर**—पु. खारी पाडलेल्या जमिनीच्या बांधास खेंकडयानें पाडलेलें भोंक. –शेतकी शे २.९. [ सं. नीवर ? ]

**नेक, नेकी**—स्त्री. १ अंतःकरणाचा खरेपणा, शुद्धपणा; प्रामाणिकपणा; सत्यता; ऋजुता. ' अल्पहेतूस्तव किंवा महद्‌हेतूस्तव आपली नेक सोडूं नये. ' २ नेकबाजी; सद्वर्तन; सरळ मार्ग, व्यवहार, आचरण. –वि. १ सद्‌गुणी; प्रामाणिक; विश्वासु; सरळ; खरा; चांगला; नीतिमान् (माणूस, काम). २ योग्य; युक्त. ' घाटाखालीं राहणें नेक नव्हे. ' –पेद ६.३६. [ फा. नेक् ] **नेकीचा**–वि. खरा; नीतिमान; सद्‌गुणी; चांगला; प्रामाणिक. **०खाही**–स्त्री. हितेच्छा. ' नेकखाई जाहीर करणें. ' –रा १७.३१. [ नेक+खाई ] **०जात-जाद**–वि. १ प्रामाणिक; इमानी; सचोटीचा; नेक पहा. ' मराठे लोक कजाखी, बहुत नेकजात, एकदील. ' –मराचिथोरा ७६. २ प्रतिज्ञा पाळणारा; सत्यसंध. ' आतां नेकजात एक जयाजी शिंदे मात्र आहेत. ' –भाब ७. ३ सुशील; अभिजात; साधु. ' तो केवळ नेकजाद प्राप्तपुरुष होता. ' –भाब ५२. [ फा. नेक्झात् ] **०दार**–वि. प्रामाणिक; नेकजात. ' तो पुरुष चाकरीस नेकदार आहे. ' –गोखचिशाब ३७. –क्रिवि. प्रामाणिकपणें. ' असे कामदार नेकदार वागले म्हणून राज्य चाललें. ' –रा ६.५११. **०नजर**–स्त्री. ( पत्रव्यवहारांत ) अनुकूल, मेहरबानीची दृष्टि; कृपादृष्टि. ' साहेबाचे नेकनजर करून सेरी कराची बखेर सलामत असे. ' –रा १५.७६. [ फा. नेकनझर ] **०नाम**–वि. चांगला; प्रख्यात;

कीर्तिमान. 'आणि सर्वात नेकनामही असावें.' –रा ६.३७७. [फा. नेक्+नाम्] ०नामदार–वि. (पत्रव्यवहार) सद्गुणी; कीर्तिमान; प्रख्यात; प्रामाणिक; एक मोठी पदवी (गव्हर्नर, प्रीव्हीकौन्सिल, पार्लमेंटचे सभासद इ० नां असते). (इं.) राईट आनरेबल. ०नामवरी–स्त्री. सुकीर्ति. –जोरा १२९. ०नामी–स्त्री. लौकिक; कीर्ति. 'नेकनामी व बदनामी हे शब्द फक्त मुलांस व अल्प समजुतीच्या बायकांस फसविण्यापुरतेच आहेत.' –इलासुंदरी (मकरंदमाला २०). ०नियत–स्त्री. सुबुद्धि; सद्बुद्धि. –वि. सद्बुद्धीचा. 'टोपीवाल्यांत इंग्रजी बादशाहा बहुत नेकनियत.' –ख ७.३५६४. ०बाजी–स्त्री. नेक, नेकी अर्थ २ पहा. ०बोल–वि. सत्य, खरें बोलणारा. ०राह–स्त्री. सरळ, चांगली राहणी, रीत; चांगलें वळण, चाल. 'नेकराह चाल दाखवून आमच्या राज्याचा आसरा पुरता केला.' –ऐटि ५७. ०सल्ला–स्त्रीपु. खरा, चांगला उपदेश, सल्ला. (क्रि० देणें). 'मुरारराव घोरपडे यांचे विचार करितां बहुत उत्तम आहे. ते सांगतील तें नेकसल्लाच सांगतील.' –पया ८१. –दिमरा १.६७. नेकी–नेकबाजी–स्त्री. नेकमध्यें पहा. नेकीबदी–बादी–स्त्री. नकी बदी (चांगल्या वाईट गोष्टी) दैवी, नैसर्गिक, किंवा मानवी या प्रकारच्या घडणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टी, प्रसंग; बरावाईट प्रकार; अस्मानीसुलतानी; देवकी–राजकी. 'तुम्हास घोडा देतों परंतु नेकीबदी झाल्यास मी भरून घेईन.' 'नेकीबदीचा अंदेशा दोन्हीकडून सेवकाकडे नसावा.' –पया २५६. [नेकी+बदी]

नेक–वि. अनेक याचें अपभ्रष्ट रूप. 'येक नेक नेक येक येक येक येकली।' –दावि ३१७. [अनेक]

नेकी–स्त्री. (हेट.) करंजी (उकडीची). –अव. नेक्या.

नेखवाड–न. ऐरण बसविण्याचा लांकडी ठोकळा.

नेखें–न. (कु.) मिरचीचें देंठ.

नेग(क)पट्टी, नेगाचें–स्त्रीन. (कु.) (निंदार्थी) खाणें-पिणें; जेवणें. (क्रि० करणें; काढणें).

नेगू–पु. (गो.) प्रलय.

नेघणें–उक्रि. न घेणें. –ज्ञा ११.६१०. 'उठे घाणी फुटतां श्रवण। ते दुर्गंधी नेघवे।' –दा ३.१.२०. 'क्षणही विषयसुखातें नेघ।' –आपद २६. नेघजाणें–अक्रि. न घेतलें जाणें. –ज्ञा १५.२९५ (पाठभेद).

नेचा–पु. १ गुडगुडीची, हुक्क्याची नळी. 'त्यांच्याकरितां ताजा गुडाखू भरून त्यानें नेचा त्यांच्यापुढें केला.' –वज्राघात ११२. २ नेटाची बैठक (हुक्का ओढण्याकरितां पुष्कळ वेळ बसावें लागतें यावरून); एखादें काम पूर्ण करण्याकरितां एकसारखें बसणें. (क्रि० देऊन–लावून–मारून–गाडून बसणें; गाडणें) फा. नैचा]

नेचा, नेचरी–पुस्त्री. दांड्याच्या दोहों बाजूंस सुंदर पानें असणारें क्षुद्रप. एक अपुष्प वनस्पति; फर्न. –अध्यापन २०३. 'नेचा हें हातभर उंचीचें झाडरू जिकडेतिकडे उगवतें.' –खेया ४३.

नेजा–पु. भाला. [फा. नेझा] नेजदार–भालाईत; भालेकरी. [फा. नेझेदार]

नेञ–क्रि. (भिल्ली) नाहीं. 'ते हातीं ओ सब्द नेञ पाठ केयो.' –भिल्ली ३१.

नेट–पुन. १ प्रयत्न; श्रम; यत्न; बल. 'मनुष्यानें किती नेट केला तरी काय पर्वत लोटेल?' २ जोर; ताण; दाब; भार. 'तुळईवर नेट पडला म्हणून वांकली.' ३ (ल.) निकड; तगादा (सावकार, भिकारी, खाष्ट मालक इ० चा). 'दमाजी गायकवाड यांजवर गिलचांनीं येऊन नेट बसविला.' –भाब ११५. 'माझे पाठीशीं रुपयाविषयीं सावकाराचा फार नेट लागला आहे.' ४ (ल.) खंबीरपणाचा निश्चय; दम; हिंमत; कार्याचा मोठा उत्साह; चिकाटी. (क्रि० देणें). 'नेट दिल्यावांचून पंचाईत शेवटास जाणार नाहीं.' ५ मोट–विहीरीच्या उभ्या खांबाखालचे कुसुवाचे दगड. ६ सुताराचा अथवा लोहाराचा कारखाना. ७ ज्यावर तासकाम, कापणें इ० करावयाचें असतें तो ठोकळा; खाटकाचा ठोकळा. ८ (सामा.) आधार; मदत. ९ जोर; वेग. १० (कु.) ताठा; अभिमान. 'त्याका काय नेट आसा पण?' ११ (कु.) ताठपणा. 'तुझ्या कमरेक नेट नाय काय?' १२ (महानु.) धडक; भिडणें. 'नावेक घे पां नेटु। येणें आचारविरेंसीं।' –भाए २१९. [? का. नेट्टगे=सरळ; नेट्टी] ३ उत्सुक; तत्पर. 'मुमुक्षू मार्जी अति नेटक।' –एभा १३.७३८. २ नेटाचा; नेटदार. ०दार–वि. १ धट्टाकट्टा; मजबूत; कार्यक्षम; सहनशील (माणूस, जनावर). २ वजन, दाब इ० सहन करण्यास योग्य (तुळई, खांब इ०). ०पाट–पु. १ जोराचा प्रयत्न; दृढ निश्चय. (क्रि० देणें; लावणें; करणें). 'दृढ माडिला नेटपाट् । जाला गर्हिवराचा वोहट्।' –कृमुरा ६६.४१. २ तगादा; निकड; जुलूम. (क्रि० लावणें; लागणें; बसणें). [नेट द्वि.] नेटापाटाचा–वि. १ कठिण व अवजड कामास योग्य; ताण, ओढ सहन करणारा (माणूस, इंजिन इ०). २ धीराचा; नेटाचा; निर्भय. ३ (व्यापक) जड; वजनदार; जंगी (पीक, पाऊस, वादळ, कामाचा धबडगा). नेटबाजीचा–वि. १ आग्रहाचा; तगाद्याचा; निकडीचा; नेटपाटाचा. २ लवकरचा; जवळचा; येऊन ठेपणारा, ठेपलेला. नेटाचा, नेटक–वि. १ निश्चयी; दृढ; धीराचा; स्थिर; नेटदार पहा. 'सेनापती तो सत्विक । भारी बलराम नेटक।' –एरुस्व ५.४०. २ मजबूत; जोरकस; ताकदवान; दमदार (जनावर इ०). नेटणें–अक्रि. १ यत्न करणें; झटणें; जोर करणें; श्रम करणें;

मुख्यत: नेटून या रूपांत दुसऱ्या क्रियापदाशीं जोडतात. जसें:– नेटून चालणें–बोलणें–जेवणें इ०. २ भिडणें; खेटणें; हाताशीं असणें; अगदीं पाठीशीं येऊन ठेपणें. ' लग्न उद्यांवर येऊन नेटलें तथापि कशास अद्यापि ठिकाण नाहीं.' ३ खणपटीस बसणें; निकड लावणें. ४ पलीकडे ढकलणें. रेटणें पहा. **नेटावणें**–अक्रि. जोरानें, तडफेनें कामास लागणें. **नेटावा**–पु. १ नेट; टेका; धिरा. ( क्रि० देणें; लावणें ). ' असें म्हणून जोराचा नेटावा दरवाजाला लावून पुढील संभाषण ऐकण्यासाठीं ती तत्पर होऊन राहिली. ' –स्फूर्ती २.३७२. २ जोराचा प्रयत्न. ( क्रि० देणें ). **नेटी**–वि. ( व. ) नेट करणारा; पिच्छा पुरविणारा. **नेटें**–क्रिवि. ( अशिष्ट ) जलदीनें; तडाख्यानें; लवकर; त्वरित. ' कांगा कोणी न म्हणे पंढरीची आई। बोलविते पाहीं चाल नेटें । ' –तुगा १६१७. **नेटपाटें, नेटेंपाटें**– क्रिवि. १ निश्चयेंकरून. ' तेथें काळाचेनि हटतटें । वृत्ति ब्रह्माचिये वाटें । लावूनियां नेटेंपाटें । चिन्मात्र पेठें विकिली । ' –एभा ११. ९९९. २ हातोहातीं; नेटेबोटें पहा. ३ त्वरेनें. ' पितर नेटेंपाटें धांवती । ' –एभा १९.२३३.

**नेटक**—वि. नैष्ठिक पहा. ' एक ते पंडित वैदिक ते एक। गायत्रीनेटक ब्राह्मण ते । ' –ब ४३४. [ सं. नैष्ठिक ]

**नेटक–का**—वि. नीटनेटकें पहा. १ सुरेख; बांधेसूद; प्रमाण बद्ध. ' असुर पाईचे नेटके । पुढें चमकति कौतुकें. ' ' ते स्वातीस्तव अब्धिशुक्ति पुटकीं मोतीं घडे नेटकें । ' –नवनीत पृ. १३६. २ बरोबर; युक्त; योग्य; अनुकूल. ' परमार्थ साधिला नेटका ' –एभा ३.३१९. ३ सरळ. ' ठकारें पर्वता ऐसा नेटका सडपातळ । ' –मारुतीस्तोत्र. ४ ( काव्य. ) अव्यंग; धड; तरबेज. ' हाताचा–पायाचा–नेटका. ' ' लढणार–झुंजणार–लिहिणार–नेटका. ' ' कृष्ण नेटका झुंझार । बाणीं त्रासिले महावीर । ' –एरुस्व १२.१२३. ५ नीट; चांगला; व्यवस्थित. ' आधीं प्रपंच करावा नेटका । ' –दा १२.१.१. [ नीट; का. नेटी=सौंदर्य, सुरेखपणा ]

**नेटका**—क्रिवि. नुकता; आतां, इतक्यांत; थोडया वेळापूर्वी. ' आमचा बाजीबोबा नेटका जेवाया बैसला । ' –ऐपो ६८.

**नेटकें**—क्रिवि. नीट सरळ; समोर; थेट. ' परी सासुरवाडीस नेटकें जावें । ' –दा ३.२.३७.

**नेटाळू**—पु. ( व. ) पाटील.

**नेटिव–व्ह**—वि. १ देशी; एत्तद्देशीय; युरोपियनेतर मनुष्य. २ ( निंदार्थी ) असंस्कृत; गांवठी. [ इं. ]

**नेटी, नेटका, नेटें**—शअ ( अशिष्ट ) जवळ; समीप; निकट. ' पठाण अगदीं आपल्या नेटका आला. '–सूर्योदय ९२. [निकट]

**नेटुगी–गा**—वि. बांधेसूद; प्रमाणबद्ध; नीटनेटका. –एभा ११.१२८२. ' सहजेंचि नेटुगा दाटुगा । फेडिवेढी नाहीं श्रीरंगा । ' –एरुस्व १५.७८.

**नेटेंबोटें**—क्रिवि. १ निश्चितपणें. नेटेंपाटें पहा. ' जेथें जाणीव खुंटे । तें स्वरूप तुझें नेटेंबोटें । घनानंद चढे ना वोहटे । अपरिमित । ' –परमा ७.१६. २ यथातथ्य. ' तें श्रीकृष्णरूप नेटेबोटें । कवण वर्णु जाणें । ' –भाए ७. –शअ. जवळ; समीप; नेटी.

**नेडा**—पु. ( बडोदें ) रत्नें जडण्यासव रत्नाचें तेज खुलवून दाखविण्यास रत्नाखालीं जडण्याचे कामीं उपयोगी पडणारी विशिष्ट प्रकारें शुद्ध केलेली चांदी. –जनि ( परिभाषिक शब्द ) ७.

**नेडें–ढें**—न. १ सुई, दाभण यांचें नाक; दोरा ओवावयाचें भोंक. ' उंट सुईच्या नेंढयांतून एकवार पार जाऊं शकेल ... ' –गीर ४८९. २ कुदळ, कुऱ्हाड इ०स दांडा बसविण्याचें भोंक. ३ ( ल. ) आधार; टेका; आश्रय. ' विशुद्ध चक्रीं मेरु हा नेडे । तेथें परदीपीं साहित्य जोडें । ' –ज्ञागा ४०७. ' ज्याचें नेढें खबरदार, त्याजवर कोणाचें चालेल बरें. [ का. नेडिगे=खांब ]

**नेण**—न. अज्ञान; नेणीव पहा. –वि. अज्ञानी; अजाण (मूल). –एभा २४.६. ' जाणोनि कासया होसी नेण । ' –मुसभा १३. १७. [सं. न+ज्ञान] ०**पण**–न. १ जाणतेपण इ० ' नेणपण सोडूं नये । '–दा १४.१.४५. २ अज्ञान; न जाणणें. **नेणणें**–न. ( ल. काव्य ) अज्ञान; न जाणणें. ' जे नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यायत्वें मातें दाऊनि । सर्वेंही सर्वी भजौनि । बुझावीतसे जे । ' –ज्ञा १८.१११४. –अक्रि. न जाणणें; न समजणें; न कळणें. **नेणतपण**–न. १ अज्ञान. २ बाळपणांतील अज्ञानावस्था. [नेणणें+ पण ] **नेणता–नेण**–वि. १ अजाण; समज नसणारा; अननुभवी; मूर्ख. ' नेणता भक्त मी तुझा । बुद्धि दे रघुनायका । ' –राम. २ जाणता. [ सं. न+ज्ञान; ज्ञान ] **नेणीव**–स्त्री. ( काव्य ) अज्ञान; अननुभव; अजाणतेपण. ' तोच म्हणावा राया पंडित । सर्व जाणोनि नेणीव घेत । ' [ सं. न+ज्ञान ] **नेणों**–न जाणों. ' कदा नेणों वोढी शरधितुनि काढी शर कदा । ' –र ३.

**नेणसपाड**—पु. ( व. ) हिणवणूक; फजीती; अवहेलना; उपेक्षा. ' जेव्हां तेव्हां असा नेणसपाड करतो. '

**नेणें**—सक्रि. १ घेऊन जाणें; उठविणें; हलविणें. २ वाट दाखविणें; पुढें होणें. [ सं. नी–नय ] म्ह० ज्याचें त्याणें नेलें पाया पडणें वायां गेलें.

**नेत**—स्त्री. १ नियत; बुद्धि. ' ज्याची जशी नेत तसी त्यास बरकत. ' –इमं १०७. २ निष्ठा. ' दौलतराव बाबा यांची नेत धन्याजवळ तसीच असेल. ' –ख १२.६८१७. [ अर. नीयत् ]

**नेत**—पु. ( व. ) नेम; नियम.

**नेतन** —न. ( व. ) एकर, बिघा इ०सारखें जमीन मोजण्याचें एक परिमाण. [ निवर्तन ? ]

**नेतवट**—वि.( महानु. ) मऊ. 'करोनी अशिधाराची उशिशी। शरपंजरीं निजविली जैसीं । नेतवट शय्यारूपें तैसी । वल्लभेवीण।' –ज्ञाप्र ७७२.

**नेता**—वि. १ नेणारा; वाट दाखविणारा. २ व्यवस्था करणारा; पुढारी; कारभारी. ३ पुढारी; प्रमुख; सेनापति. [ सं. नी–नेतृ ] **नेतृत्व, नेतेपणा**–न. १ व्यवस्था; कारभार. २ व्यवस्था करण्याची पात्रता; कर्तृत्वशक्ति. ३ पुढारीपण. 'मोठया कार्याचा, नेतेपणा व्यसनीं पुरुषाकडे ठेवूं नका.' –विग्रा ७४. **नेत्री**–स्त्री. नायिका; पुढारीण.

**नेताळा**—वि. ( कर. ) निमित्ताला टेंकलेला; क्षुल्लक कारण काढून रडणारा ( पोर ).

**नेति**—अ. नाहीं, नाहीं ( अशा तऱ्हेचे उद्गार ). 'वेदपुरुष तरि नेती कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ।'–तुगा १६५३. [सं. न+इति] **०नेति**–उद्गा. नाहीं नाहीं; न जाणत्यासंबंधीं योजतात. 'तो आंथरुणातळवटी दडे । येरु नेति नेति म्हणोनि बहुडे ।' –ज्ञा ९.३७१. 'जेथें नेति नेति श्रुति ।' –दा ७.१०. ५०.

**नेत्र**—पुन. डोळा; नयन. 'जें उपजवी सुखदुःख। नेत्रद्वारें।' –ज्ञा २.११६. [ सं. ] **०मोडणें**–नेत्रकटाक्ष फेंकणें; डोळे मारणें. 'खेळतां नाटकें दशावतारी । तेथें येती सुंदरनारी । नेत्र मोडिती कळाकुसरी। परी ते अवघे धटिंगण।' –दा ६.८.११. **०कटाक्ष**–पु. दृष्टिविक्षेप; वांकडया, काण्या डोळयानें पाहणें. **०कोरान्न**–न. निव्वळ दृष्टिसुख; ज्यांत प्रत्यक्ष वस्तूची प्राप्ति न होतां नुसत्या डोळयानें पाहून समाधान मानावें लागतें तो प्रकार. [ नेत्र+कोरा+अन्न ] **०पल्लवी**–स्त्री. १ एक खुणेची भाषा; डोळयांच्या हालचालीवर, खुणांवर बसविलेली भाषा; नेत्रसंकेत. 'सांग, तुला समजणाऱ्या नेत्रपल्लवीनें आतांच माझें मनोगत तुला सांगून ठेवूं का?' –भा १०७. २ डोळे मिचकावणें; डोळयांनीं खुणा करणें. **०पातें**–न. डोळयाचें पातें. 'ल्वो विसरली नेत्रपातीं । कृष्णमूर्ति पाहातां ।' –एरुस्व ६.२०. **०पालवी**–नेत्रपल्लवी पहा. 'नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा ।' –दा ५.५.२७. **०युगुल**–न. दोन्ही डोळे; नेत्रद्वय. **०रस**–पु. नेत्रगोलपटलांच्या आंतील पारदर्शक पदार्थ. –मराठी ६ वें पुस्तक, पृ. १०३ ( १८७५ ) **०रोग-विकार**–पु. १ डोळयाचा रोग. २ दृष्टीमुळें, पाहण्यामुळें जडलेला विकार. 'प्रीति हा एक नेत्ररोग आहे.' –भा ४१. **०वटी**–स्त्री. बुबुळ; त्यांतील बाहुली. **०विकारमाया**–स्त्री. ( काव्य ) नेत्रकटाक्षानें दृग्गोचर होणारी माया; कृपादृष्टीनें पहाणें. 'त्या दाविती नेत्रविकारमाया ।' **०व्रण**–पु. डोळयांतील किंवा त्याच्या आजूबाजूचा फोड इ० **०संकेत**–पु. डोळयानें खुणावणें; नेत्रपल्लवी. 'दोघांचे आपसांत नेत्रसंकेत झाले.' –मोर २३. **०स्पर्श**–पु. आचमन, प्राणायाम इ० करावयाचें नसेल तेथें हाताच्या बोटांनीं डोळयास पाणी लावणें; कोणत्याहि धार्मिक कृत्याच्या आरंभीचा विधि; डोळयांना पाणी लावणें. **नेत्रांजन**–न. काजळ; डोळयांत घालावयाचें अंजन; सुरमा. **नेत्रांतर**–न. डोळा चुकविणें. 'अतर्क्य नेत्रांतरें नेणें। कां धातूवादें सर्वस्व घेणें।' –एभा २३.२०७. **नेत्रांतील दर्पण, नेत्रदर्पण**–दृङ्मज्जा–मंडळ. ( इं. ) रेटिना. –मराठी ६ वें, पुस्तक, पृ. १०३. ( १८७५ ) **नेत्रार्श**–पु. डोळयाचा एक रोग; नेत्रव्रण. पुरुळ उठणें. **नेत्रोन्मीलन**–न. १ दक्षिणाचारांतील एक विधि; चक्षुरुन्मीलन पहा. २ ( सामा. ) डोळे उघडणें.

**नेदखणें**—उक्रि. न देखणें, पाहाणें. 'जें शास्त्रें वांचूनि आणिकें। प्राणिया स्वमोक्ष नेदखे ।' –माज्ञा १७.३५.

**नेदणें**—उक्रि. ( काव्य ) न देणें. 'जे इये रूपीहूनि सद्भावा। नेदावें निघों।' –ज्ञा ११.६३७. –एभा ८.२२४. [ न+देणें ]

**नेदवणें**—सक्रि. न देववणें. –ज्ञा १२.१२५.' ते तों ब्रह्मादि देवां दशशिरहवनें नेदवे रावणाला।' –निमा १. श्रीरामकर्णामृत ६८.

**नेनणें**—क्रि. न नेणें. –ज्ञा १४.२६९.

**नेपटी**—स्त्री. फटक फळी; नपटी; खेळांतील बंदूक.

**नेपती**—स्त्री. एक फलवृक्ष. **नेपतें**–न. नेपतीचें फल. 'मग नेपतीं तरटें तोडोनि त्वरित । कांतेसह बैसले खात।' –भवि ५६.९२.

**नेपथ्य**—न. ( नाटय ) १ पडदा; पडयामागील पात्रें सजविण्याची खोली; पडद्याच्या मागचा भाग. २ मंडन; वेष; भूषण; सजावट. [ सं. ]

**नेपळ**—स्त्री. कोरडी जमीन, जागा; निपळ पहा.

**नेपा**—पु. नेफा पहा.

**नेपा**—पु. ( व. ) बाणी; पण.

**नेपाल-ळ**—पु. १ एक सारक वनस्पति २ एक देश; हिंदुस्थानचा एक भाग. 'नेपाळेश्वर भाळलग्न चिखला कस्तूरिका मानिती.' काकान्योक्ति. [ सं. नेपाल ]

**नेपाळ**—न. ( कु. ) बंदुकीच्या नळीवरील तोटी बसविण्याची जागा.

**नेपाळ**—वि. १ सपाट; गुळगुळीत; एकसारखी ( जमीन, जागा, भिंत ) २ सरळ; सारखी; उतरती ( जागा ).

**नेपाळणी**—स्त्री. एकसारखी, समपातळ, सपाट करणें. [ नेपाळणें ]

**नेपाळणें**—उक्रि. १ सपाट, एकसारखी, एक पातळीची, मऊ, गुळगुळीत करणें ( जमीन, गच्ची इ० ). २ चोळणें; मळणें; साफ करणें (मनुष्य, पशु यांचें अंग, मिशा, पोशाख इ०). ३ सुरळीतपणें

वाहावयास लावणें. ४ हातानें वाहावयास लावणें, वाहील असें करणें (पातळ पदार्थ). –अक्रि. १ पृष्ठभागावरून सारखा, संथपणें वाहणें. २ थोडथोडी उतरती होत जाणें.

**नेपाळा**—पु. चूळ; थुंका. 'सांडिती तो नेपाळा। पडिघा मीचि।' –ज्ञा १३.४१८.

**नेपाळी**—वि. लाल. 'एकें शुद्धें तांबीं नेपाळी।' –दाव २८२. [सं. नेपाल=तांबें, लालरसायन]

**नेपाळें**—वि. १ सुंदर; लावण्ययुक्त. 'ऐसें रूप नेपाळें। देखौनि चैतन्य भुललें।' –शिशु ४२७. २ शांत. 'पुन तें घननीळ सांवळें। परब्रह्म नेपाळें।' –भाए ८. ३ नितळ; सतेज.

**नेपाळ्या**—वि. नेहमीं साफ करणारा, झाडणारा (आपलें शरीर, पोशाख इ०).

**नेपूर**—न. नूपुर पहा. 'चरणीं गर्जती नेपुरें।' –एरुस्व १.२८.

**नेफा**—पु. विजारीची नाडी घालण्याची जागा, शिवण; नाडपट्टी. 'जास्त उंची पाहिजे असल्यास निराळा नेफा लावावा.' [फा.]

**नेफारा**—पु. (व.) दिमाख; कुर्रा.

**नेब**—नायब पहा. ०**गैबत**–पु. वरिष्ठाच्या गैरहजिरींत काम करणारा दुय्यम अधिकारी -इऐ ५.१०१.

**नेबळ–ळा, नेब(भ)ळट, नेब(भ)ळभट, नेभरा–ळा, नेभा**—पु. १ लठ्ठ; ढील; गबाळ्या; बोजड. २ भोंगळ; अव्यवस्थित (पोशाख, काम इ०); बेबंद; बेशिस्त (भाषण). ३ दुबळा; नामर्द; कमकुवत. [सं. निर्बल]

**नेबाद**—स्त्री. पगारापैकीं दरमहिन्यास थोडी रक्कम सरकारांत ठेवतात ती. 'हरकारा ब्राह्मण यास रुखसत केला. सबब नेबाद ... निघाले ते ...' –थोमारो २.२८१.

**नेम**—पु. १ नियम पहा. –अमृ ५.५०. 'नेमाचा झाला कळस।' २ उद्दिष्ट; हेतु; लक्ष्य; साधन. (क्रि० बांधणें; धरणें; लावणें). ३ माप. (क्रि० घेणें; देणें). [सं. नियम] ०**लावणें**–नियम करणें; मार्ग, रीत लावणें. 'ह्यास्तव अवतरला तुकाराम। साधकास नेम लावावया।' ०**सारणें**–नेमधर्म, नित्याचार उरकणें. 'पार्थें स्नान करून सकळ। नेम आपुला सारिला।' –ह ३२.१७४. ०**धर्म**–पु. शास्त्रानें सांगितलेले धार्मिक आचारविचार, नियम. ०**निष्ठ–ष्ठा–शील, नेमाचा**–नियमनिष्ठ–ष्ठा पहा. 'नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिती।' –होला. ०**पण**–न. नियम; व्रत. 'नेमपण टाळतां अवतारकृत्य संपलें ऐसें जाणिजे।' –दावि ३५. **नेमक**–वि. १ नेमानें वागणारा. 'नेमक निग्रह तापस।' –दा १.८.९. २ मोजकें, परिमित. (भाषण, बोलणें). 'नेमक बोलतां अंतरें। निववी सकळांचीं।' –दा १९.१०.६. ०**पण**–न. नियमित आचरण, वर्तन, शिस्त. 'कांहीं नेमकपण आपुलें। बहुत जनासीं कळों आलें।' –दा१९.३. २३. **नेमका, नेमकाच**–क्रिवि. १ पाहिजे असलेला; नेम धरल्याप्रमाणें बरोबर. (ल.) संकल्प, बेत केल्याप्रमाणें; अपेक्षित तोच २ वेळेवर; प्रसंगोपात्त. **नेमठ–ळ्या**–वि. १ अगदीं नियमाप्रमाणें वागणारा; वक्तशीर; शिस्तीचा; ठाकठिक्या. २ नेमधर्म पाळणारा; अगदीं कट्टर धार्मिक. 'ऐशा रीती भक्त नेमळ। हरुषें वोसंडत तये वेळें।' **नेमाड्या**–वि दगड इ० कांचा अचूक नेम मारणारा. **नेमानेम**–पु. १ योजना आणि निश्चय (ईश्वरी, दैवी). योगायोग; अदृष्ट. २ वहिवाट; चाल; सामान्य नियम; नेहमींचा परिपाठ. **नेमावणी**–स्त्री. १ नोंदणी. 'तुळाजी आंग्रे यांचे कारकीर्दीस नेमावणी करावयाची ताकीद जाहली ...' –थोमारो २.१४२. २ शेत लावणें. –भाद्रिसंत्र ६८. **नेमिष्ठ, नियमिष्ठ, नेमी, नियमी**–वि. नेमळ पहा.

**नेम**—पुन. जमीनींत खणलेला खड्डा (खांब, झाड इ० पुरण्याकरितां). **म्ह**० वांकडे मेढीस वांकडेंच नेम. **नेमणें, नेमविणें**–उक्रि. जमीनींत गाडणें (खांब; झाड इ०). 'सकाळपासून शंभर केळी नेमिल्या.' [सं. नि+यम्]

**नेमणें**—सक्रि. १ लावणें; ठरविणें; निश्चित करणें; स्थापणें (नियम, रूढी). 'तुका म्हणे त्यासी ठाउकें उचित। होईल संकेत नेमियेला।' –तुगा १०८१. २ नियोजित करणें; योजना करणें (जागेवर, अधिकारावर); नेमणूक करणें. 'नेमियले मज शत्रुजयाला। परि तें गेलें सर्व लयाला।' –सौभद्र अंक. १. ३ नेम धरणें; लक्ष्य वेधणें (बाण इ०नीं). ४ नियम करणें; ताब्यांत ठेवणें. 'नमो संतां भक्तां भक्तिणी। जेहीं भवसागरु उतरुनि। इंद्रियांचें सुख नेमुनि। देवचारातें जितला।' –ख्रिपु १.१.६४. [सं. नि+यम्] **नेमणूक**–स्त्री. १ वेतन; पगार; वेतनाची व्यवस्था. 'आम्हाला चारशें रुपये नेमणूक झाली आहे.' २ सेवेबद्दल किंवा कांहीं कामगिरीबद्दल सालीना जें नक्त वगैरे पावतें ती देणगी. ह्याबद्दल कोणास चाकरी करावी लागते, कोणास लागत नाहीं. –इनाम ३१. या नेमणुकीचे पुढील कांहीं प्रकार आहेत–वर्षासन, बिदागी, अम्मल, इनामी जमीन मोबदला, नुकसानभरपाई, ग्रास, पालखी, पगडी इ० ३ योजना; नियोजन; नेमणें (जागेवर, हुद्यावर). ०**बेहडा**–पु. हुजुराकडून मामलेदाराकडे पाठवावयाचे कागद. –इनाम ४९. अजमास पहा.

**नेमस्त**—वि. १ मध्यम; साधारण; सामान्य; मध्यमप्रतीचा. 'तो पंडित नेमस्त आहे.' नेहमीपेक्षां कमी नव्हे असा, किंवा जास्तहि नव्हे असा. २ नियमित; नेमानें वागणारा. ३ मवाळ; आतांचा प्रागतिक. (इं.) लिबरल (पक्ष). याच्या उलट जहाल.

४ बेताचा; बरोबर. ' हा मनुष्य उंच नव्हे, ठेंगणा नव्हे, नेमस्त आहे. ५ निश्चित; स्पष्ट. ' विषयजनित जें जें सुख । तेथेंच होतें परमदुःख । पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे । ' –दा ३.१०. ६५. ६ नेमका. –मुवन २.८१. ' नेमस्त कळेना वचन । नेमस्त नये राजकारण । ' –दा १५.३.१४. [ सं. नियम ] ०करणें–नियुक्त करणें; योजणें. ' अमुक अमुक यांची कन्या वधू नेमस्त केली आहे. ' ( कुंकुमपत्रिकेंत वापरतात ). ' अमक्याचा पुत्र वर नेमस्त केला आहे. ' ०पक्ष–पु. राजकरणांतील नेमस्त विचाराचा ( प्रागतिक, मवाळ ) पक्ष. ( इं. ) मॉडरेट, लिबरल पार्टी. –टि २.१९४. ' कारण त्यांना ( टिळकांना ) नेमस्त पक्षाशीं भांडणें जरी आवश्यक वाटत असलें... , –सुदं ६२.

**नेमळयाणें**—क्रि. ( कु. ) नासणें.

**नेमी-मि**—स्त्री. चाकाची धाव; परिधि. [ सं. ]

**नेमी**—वि. नेमलेला; ठराविक; निश्चित. –क्रिवि. नियमितपणें; नियमानें; नेहमीं; वारंवार. ०खर्च–पु. ठराविक खर्च. [ सं. नियम ]

**नेमोडा**—पु. ( कों. ) नेम ( खड्डा ) खणण्याचें एक हत्यार. [ नेम ]

**नेमोत्तर**—न निश्चित बातमी, हकीकत, भाषण. **नेमोत्तर पत्र–न.** निरोप पोंचल्याबद्दलचें पत्र. –भाअ १८३२. [ नियम+उत्तर ]

**नेर**—पु. ( गो. कु. ) १ शेतांत आपोआप उगवणारें गवत. २ एक हलक्या जातीचें भात. [ सं. नीवर ]

**नेर**—न. गांवाच्या नांवाच्या शेवटीं लागणारा प्रत्यय. जसें–पारनेर, जामनेर, संगमनेर, पिंपळनेर; नदीचें खोरें या अर्थी येणारा प्रत्यय. जसें–कुकुडनेर, मीननेर, भीमनेर, भासनेर; विशेषतः नदी काठचें गांव. जुन्नरपासून चाकणपर्यंत जीं १२ मावळें आहेत त्यांच्या शेवटीं नेर असा प्रत्यय येतो. नांवें–शिवनेर, जुन्नर, मोन्नेर, घोडनेर, भीमनेर, भामनेर, जामनेर, पिंपळनेर, पारनेर, सिन्नर, संगमनेर, अकोळनेर. –मुलांचा महाराष्ट्र २०.

**नेरभार**—पु. माया, किंवा अधिकार दाखवून एखाद्यावर कांहीं लादणें ( काम इ० ). ( क्रि० लावणें ). [ ने (नेणें)+रे(अरे)+भार ]

**नेरवा, नेरा**—पु. १ सोनाराच्या दुकानांतील राख, केर इ० २ सोनाराच्या दुकानांतील राखेंतील, कचऱ्यांतील सोन्याचे कण. झारेकरी लोक हे शोधून काढतात.

**नेरवां**—क्रिवि. तेरवाच्या पुढल्या दिवशीं ( आजच्या पुढील किंवा मागील ); चवथ्या किंवा पांचव्या दिवशीं. आज, उद्यां (काल) परवा, तेरवां व नेरवां असा अनुक्रम लागतो. [ का. नार=चार ]

**नेरावणी**—स्त्री. ( गो. ) ( माती, खडे इ० काढण्यासाठीं ) धान्य इ० पाण्यांत घालून तें एका भांड्यांतून एकदोन वेळां ओतणें. यानें धान्यांतील रेती, खडे खालीं राहतात.

**नेरवणें**—उक्रि. ( कु. ) घोळविणें. नेरावणी पहा.

**नेरोळी**—न. नारिंगाच्या मोहोरापासून काढलेलें तेल. औषधें व सुवासिक तेलें यांकडे याचा उपयोग करतात. –कृषि ७०९.

**नेर्माल-र**—स्त्री. ( गो. ) एक प्रकारचें भाताचें बीं.

**नेव**—स्त्री. एक जातीचा मासा.

**नेव**—अ. ( गो. ) आपण स्वतः

**नेव कदंबा**—पु. कदंबाच्या जातींतील एक झाड.

**नेवता**—पु. आमंत्रण; निवतण ( क्रि० देणें; करणें ). [ सं. निमंत्रण हिं. ]

**नेवर**—नपु. घोड्याच्या घोट्याची खीळ, घोटा. ( क्रि० लागणें ). ' आवरितां नावरे । खूर आठवी नेवरे । ' –तुगा ३०९९. २ हे एकमेकाशीं घासूं नयेत म्हणून त्यांवर बांधलेला चामड्याचा पट्टा, गादी. ( क्रि० बांधणें ).

**नेवरा**—वि. पांढरा ( घोडा, गाय इ०चा पाय, खुर; अशा पायांचें जनावर ).

**नेवरी**—स्त्री. ( बे. गो. ) करंजी; एक पक्वान्न.

**नेवा**—न. पागोळीची आंतील बाजू. –मौज ६.३०. नीव पहा. [ गु. ]

**नेवाणें**—न १ पराभव; नाश. ' अहो रानींचिया पालेखाइरा । नेवाणें करविजे लंकेश्वरा । ' –ज्ञा ११.२३. २ तिरस्कार.

**नेवार**—न. तळयाच्या कांठीं किंवा डोंगरांत आपोआप होणारें भात. –कृषि १८८. [ सं. नीवार ]

**नेवाळ-ळी**—स्त्री. जाईच्या जातीची फुलवेल; रानमोगरी. **नेवाळें**–न. नेवाळीचें फूल.

**नेवाळा-ळ्या**—वि. ( माण. ) विनाकारण विवळणारा.

**नेवेद्य**—पु. निवेद्य पहा. [ सं. नैवेद्य ]

**नेव्हारा**—पु. १ गाऱ्हाणें; तक्रार ( अनेक वचनी प्रयोग ). ( क्रि० गाणें ). २ ( व. ) दिमाख; कुर्रा.

**नेशीव, नेसीव**—वि. १ नेसण्याचा. २ नेहमीं नेसावयाच्या वस्तूंत असणारें; नेसण्यांत असणारें; नेसूं. [ नेसणें ]

**नेष्ट**—वि. ( पंचांग ) अनिष्ट; अभद्र ( ग्रह ). [ सं. न+इष्ट ]

**नेष्टा**—पु. अग्निष्टोमादि सोमयागांतील १६ ऋत्विजांपैकीं एक. [ सं. ]

**नेसण-णें**—न. १ ( ढुंगणाभोंवती ) नेसायाचें कटिसंबद्ध ) वस्त्र. ' सावरितां नेसणीं । हांसे होतुसे । ' –शिशु ५३६. २ अंगाला गुंडाळण्याची, अंगावर चढविण्याची, नेसण्याची क्रिया.

(क्रि० करणें). 'हिचें नेसण होईल तेव्हां पाणी येईल.' [सं. निवस्–निअस्–न्येस–नेस–भाए १८३३] **नेसणें**–उक्रि. (पंचा, धोतर, लुगडें इ० कटिवस्त्र) परिधान करणें; कंबरेभोंवतीं गुंडाळणें. **मुसळ नेसणें**–निर्लज्ज होऊन दुर्भाषण, दुष्कर्म इ० करूं लागणें. **नेसविणें**–उक्रि. १ दुसऱ्याला धोतर वगैरे परिधान करविणें. २ (ल.) (जमाखर्चे) खात्यावर चढविणें, लिहिणें; खातीं मांडणें. 'माझ्या भावाच्या नांवाखालीं ज्या रकमा आहेत त्या माझ्या नांवाखालीं नेसीव.' ३ तपशीलवार खर्च लिहिणें (मुख्य कलम व पोटकलमें इ०सर्व लिहिणें). 'वर अमुक कलम त्याहाया खालीं हीं कलमें नेसवा.' ४ आगीनें पेटविणें; आग लावून देणें (किल्ला, डोंगर, रान, जमीन इ०स). ५ शाकारणें (घर).

**नेसवणी**—स्त्री. साडा; चिरडी. 'ऐसेंआंहीं यांची नेसवणी।' –शिशु २०७.

**नेसुं**—न. नेसण्याचें वस्त्र. 'नेसूं धड चिंध्या नाहीं घरीं।' –दावि ३७८.

**नेस्त**—न. १ नदी, खाडी यांच्या तोंडाशीं समुद्रांत असणारा उंचवटा, वाळूचा दांडा, बंधारा. नस्त पहा. २ समुद्र व खाडी यांच्या सांध्यावरचा प्रदेश.

**नेस्तनाबूत–द**—स्त्री. नायनाट; नाश; निर्मूलन. 'रामसिंगाचें नेस्तनाबूत करून दक्षिणियांहीं पुढें शोखीच्या गोष्टी सांगितल्या...' –रा ६.५७०. –वि. नष्ट; नामशेष; निर्मूल. 'बादशाही नेस्तनाबूद झाल्यानंतर पेंढारी लोक मराठ्यांस येऊन मिळाले.' –हिंलइ २४५. [फा. नीस्त्–नबूद्]

**नेह(हे)टणें**—अक्रि. १ जवळ असणें, येणें; पाठीशीं असणें; नेटणें; भिडणें. 'जैं मुंगी मरण नेहटे। तैं त्या भूचर पंख फुटे।' –कथा ३.८.६०. २ निश्चय करणें; जोर धरणें, करणें. 'हा ठायवरी। नेहटोनि ठेला अंतरीं।' –ज्ञा १४.३११. ३ निकड लागणें; घाई होणें; जोरानें लागणें (झोंप, लघवी, शौचास इ०). ४ गर्दी होणें; फार जवळ जवळ येणें. 'घराशीं घर, माणसाशीं माणूस नेहटला.' ५ दाबणें. 'माजि अंगुळ एक निगे। तेथ टांचेचेनि उत्तरभागें। नेहेटिजे वरि आंगें। पेलल्लेनी।' –ज्ञा ६.१९६. ६ अढळ, बळकट करणें. 'तेथ नेहटूनि आसव। स्वयें होऊनिया सावधान।' –एभा २०.२०३. ७ (ल.) आदळणें. 'तैसें उंचौनि लोटिलें आमें। नेहटती क्रोधाचिये ढेमे।' –ज्ञा १६.३४१. [नेटणें]

**नेहटणी, नेहटबाजी**—स्त्री. जोराचा पाठलाग.

**नेहटणें**—क्रि. लक्ष लावून पहाणें; निरखणें; न्याहळणें. 'नेहटून विचारें पाहातां।' –दा ८.८.५५. [नीट, नेटका]

**नेहटा**—वि. बरोबर योग्य. 'अंगी चंदनाची उटी। तेंच वज्रकवच नेहटी।' –मुरंशु २६. **नेहटीं**–क्रिवि. १ नेटानें. 'धारणा नेहटीं दृढ राखे।' –एभा २०.१९७ 'तरी त्वां वारण उभा करून नेहटीं। जाऊन चोहटीं मारावा।' –भवि ३७.७८. २निश्चयानें; खचित. 'कपटें भोगितां ती नेहटीं। झालीं भगें सर्वांगीं।' –जै ७८.४७. ३ जोराच्या अभ्यासानें. 'महामुद्रा नेहटी साधिती।' –एभा १३.७१३. इतर अर्थी नेट पहा. ४ खेटून; जवळ. 'मग लाज सोडोनि धूर्जटी। तयेसि करीत असे गोष्टी। उमा असतांहि नेहटी। बैसला देवो।' –कथा २.५.६४. [नीट]

**नेह(हे)मी**—क्रिवि. १ सतत; नित्यशः अविरत; नियमितपणें; सदोदित; नेमानें. 'तो नेहमीं पढायला जातो.' २ सदासर्वदा; सर्वथा; कायम; पूर्णपणें; अगदीं. 'हा घोडा तुला नेहमीं दिला.' [सं. नियम?] **०खर्च**–पु. वार्षिक नेमणूक; जमाबंदींतून काढलेला ठराविक खर्च किंवा नियमित वजावाट.

**नेह(हे)र**—स्त्री. (कों.) रुतण; रेवण; रुतणीची पुळण.

**नेहार**—स्त्री. टक; नीट लक्ष; न्याहळणें. 'नेहार देतां आकाशीं। चक्रें दिसती डोळ्याशीं।' –दा ७.४.११.

**नेहारणें**—उक्रि. न्यहाळणें पहा. 'नेहारूनि पाहतां बाळातें।' –दावि १९. [हिं. निहारना]

**नेहारा**—वि. (व.) धीमा; थंडा; जलद काम न करणारा.

**नेहाळणें**—उक्रि. न्याहाळणें पहा. [हिं. निहालना]

**नै**—स्त्री. नदी. पांगुरौनि नैचें उदक। असे नैचि माजी खडक।' –राज्ञा १८.२६९. [सं. नदी–प्रा. नई]

**नैऋत्य**—स्त्री. नैर्ऋती दिशा.

**नैतिक**—वि. नीतिविषयक; नीतीचा. [नीति] **०धैर्य**–न. मनाचा धीटपणा; मनाला पटणारी गोष्ट प्रतिकूल परिस्थितींतहि करण्याचें धाडस. (इं) मॉरल करेज.

**नैन**—न. नयन; डोळा. 'नैनी नैन एक करी भाई नाच काणा।' –बयाबाई रामदासी.

**नैपुण्य**—न. प्रवीणता; कौशल्य; हुषारी. [सं.]

**नैमित्तिक**—वि. १ प्रासंगिक; निमित्तानें उत्पन्न झालेला; सततचा, नियमित नव्हे असा; याच्या उलट नित्य. २ शास्त्रानें प्रसंगविशेषीं ज्याचें विधान केलें आहे असें (कर्म). 'तैसें नित्य नैमित्तिक। कर्म होय स्वाभाविक।' –ज्ञा १८.९७. [सं.]

**नैय्यायिक**—वि. न्याय(तर्क) शास्त्राचा अनुयायी; न्यायशास्त्रांतील तज्ज्ञ. [सं.]

**नैराश्य**—न. निराशा; खिन्नता; आशाभंग; हिरमोड. [सं.]

**नैर्ऋती**—स्त्री. दक्षिण आणि पश्चिम यांमधील दिशा. [सं.]

**नैल**—न. (शाप.) एक रासायनिक मूलद्रव्य. (इं.) आयोडिन. –सांठे, रासायनिक परिभाषा. **०पुत्रिक**–न. याचें एक

संयुक्त द्रव्य. हें पूर्वी जखमांत पू होऊं नये म्हणून लावीत. (इं.) आयडोफॉर्म.

**नैवेद्य**—नपु. १ निवेद्य पहा. देवास अर्पण करावयाचा पदार्थ, द्रव्य. (क्रि० दाखविणें; अर्पणें; समर्पणें ). २ समर्पण; अर्पण. ३ (ल.) जेवण; भोजन. (क्रि० करणें ).' आज नैवेद्यास आमचे घरींच या.' –वि. देवाला अर्पण करावयाचा (पदार्थ). [सं.] म्ह० घरचे देवास नैवेद्य (नको). ०**वैश्वदेव**–पु. १ देवाचा नैवेद्य व अग्नींत करावयाचा नित्याचा चरु होम. २ (ल.) लांच.

**नैशकर**—पु. ऊंस. –भाद्रिसंग्र १७२. [फा. नै–शकर्]

**नैश्वर**—वि. नाशिवंत. –तुगा २९१८. 'नैश्वर विषयांचे भाग्य। कांहीं दिवस दिसे योग्य।' –सिसं ६.१६६. [सं. नश्वर]

**नैश्वर्य**—न. नष्टत्व, ता; नाश. [सं. नश्वर]

**नैष्कर्म्य**—न. १ निष्कामपणा; कर्मापासून अलिप्तता. –गीर ६४८. २ ध्यानधारणादि सर्व कृत्यांपासून दूर राहण्यासंबंधीं मुक्ति, प्रतिफळ; धार्मिकविधिराहित्य. ३ निष्क्रियता. 'म्हणौनि प्रवादु तया नैष्कर्म्यु ऐसा।' –ज्ञा १८.९७८. [सं.]

**नैष्ठिक**—वि. १ निष्ठेचें; निष्ठापूर्वक (धार्मिक आचारविचारांचें आचरण). २ निष्ठावान; अढळश्रद्धेचा, सेवेचा. [सं.] ०**ब्रह्मचारी**–पु. आमरणांत कडकडीत ब्रह्मचर्य पाळणारा ब्राह्मण. ०**ब्रह्मचर्य**–न. आमरणांत कडकडीत ब्रह्मचर्य पाळणें, अविवाहित राहणें.

**नैसर्गिक**—वि. निसर्गापासून, प्रकृतीपासून उत्पन्न झालेलें; मूळचें; स्वाभाविक; सहज. 'कर्म गा नैसर्गिक क्षत्रजातीसी।' –ज्ञा १८.८७८. [सं.]

**नो**—अ. संबोधनाच्या अनेकवचनाचा प्रत्यय. 'अखंड हरिहरि वदा रे बापानो।' –अमृत ५८.

**नोक**—स्त्री. (क.) १ (सुई, काठी इ०चें) टोंक; अणी; फळ (भाल्याचें). 'सखे तूं पातळ पुतळी फोक। नको मारूं नयनाची नोक।' –होला १७८. २ (ल.) मुद्दा; खुबी; तात्पर्य (गोष्ट, भाषण यांतील) ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट, लक्षण; वैशिष्ट्य; विशिष्ट ढब; पद्धत. 'त्याचे बोलण्यांत नोक आहे.' ३ छानी; नोकझोक; नखरा; ऐट. 'करितात कवन गातात मधुर नोकित.' –प्रला १३२. ४ किंचित् सूचना; खोंच; चुणुक; टोला; उपरोध; व्यंगोक्ति. (क्रि० दाखविणें; मारणें; लावणें) झोंबणारें भाषण. 'ऐकोनि स्त्रियेचा नोक थोरू। शस्त्र घेऊनि सत्वरू। धावतां फिटला पीतांबरू। तें नृपवरू स्मरेना।' –एभा २६.७१. 'बरें आजचा दिवस तुम्ही मौजा करा. इतकी नोक मारून गेला.' [फा. नौक्] ०**झो(झों)क**–स्त्री. १ व्यंगोक्ति; टोला. नोक अर्थ ४ पहा. 'अशीं भाषणें नोके–झोकेचीं जाटांनीं हीं भाऊसाहेबांकडे सांगून पाठविली.' –पाब ७. नोकानोकी पहा. २ ढब; नखरा; थाटमाट (पोशाख, भाषण, चालणें वगैरेंत). (क्रि० संभाळणें). 'वक्तृत्व म्हणजे नुसतें बोलणेंच नव्हे, तर उंच व मनोवेधक स्वर, अंगविक्षेपाचा नोक झोक...' –नि २९६. ३ तंटा; भांडण; धकाधकी; झोंबाझोंबी. ४ चुणूक; दाखविलेली झुळूक. (क्रि० दाखविणें). 'हा नोकझोक दाखवून गेला.' ५ इशारा; अंधूक सूचना. (क्रि० दाखविणें). ०**दार**–वि. १ टोंकदार; अणकुचीदार. 'द्रोण केळीचे चांगले दोहों काडयाचे नोकदार लावावे.' –पया २९१. २ झोंबणारें, तिखट; तीव्र (भाषण इ०). ३ ऐटदार; झोकदार; नखरेबाज (वस्तु वगैरे). 'शिपाइबानिचा डौल मजेचा झोक नोकदार।' –मृ १८. ४ खुबीदार. **नोकानोकी**–स्त्री. १ व्यंगोक्तींनीं व खोंचदार सूचना, इषारा इ०नीं झालेली बोलाचाली. २ नोकझोक अर्थ ३ पहा.

**नोकणें**—सक्रि. १ टोंचणें; टोकणें. 'नोकणें सिक्षणें ना काम सांगणें।' –दावि ४५४. २ पराभव करणें; अपमान करणें. 'ते हे चतुर्भुज कोंभेली। जयाचि शोभा रूपा आली। देखोनि नास्तिकीं नोकिली। भक्तवृंदें।' –ज्ञा ६.३२४. ३ दुःख देणें; छळणें; टाकून बोलणें. 'वीर मातले अतिदृप्त। नोकूनि बोलत परस्परें।' –एभा ३०.११०. ४ जिंकणें. 'कळिकाळ नोकूनियां। घेतला पटा।' –माज्ञा १२.८४.

**नोकणें**—सक्रि. कृपादृष्टीनें पाहणें. 'तिया वेळां केवि गमलें। जाणों कूर्मी अपत्या नोकिलें। कां तें चकोरा पाहिलें। जेवि शीतांशीं।' –स्वादि ७.५.९१.

**नोकर, नौकर**—पु. सेवक; चाकर; दास. 'नौकरचे अर्थ नईकर. त्यासी आपण नित्य नई करीत जावी.' –रा ६.६३०. 'इंग्रजी राज्य म्हणजे काय? नोकरांच्या तांडयाचें राज्य.' –टिसू १३२. [फा. नौकर्] ०**इनाम**–न. १ सरकारी नोकरासाठीं दिलेला सरंजाम, इनाम, जहागीर. २ देवालय, समाधि यांची पूजा–अर्चा, दिवाबत्ती, झाडसारवण इ०चालण्यासाठीं दिलेलें धर्मादाय, देवस्थान इनाम. –गांगा ३९. ०**खाना**–पु. नोकरखातें; नोकरांचा कारखाना, संघ, समूह. 'हुकमी नोकर मिळावे म्हणून ज्या शाळा अथवा नोकरखाने काढले आहेत....' –टि ३.१८३. ०**शाही**–स्त्री. १ नोकरांनीं चालविलेली राज्यव्यवस्था; नोकर अधिकाऱ्यांचा अंमल, प्राबल्य. २ प्रबल नोकरअधिकारी वर्ग; अरेराव नोकरवर्ग. ३ जुलुमी नोकरसत्ता; जुलुमी जबरदस्तीचा कारभार. (इं.) ब्युराक्रसी. (हा शब्द लो. टिळकांनीं १९१७ सालीं रूढ केला). ही नोकरशाहीं सत्ता। जनतेची हरिते मत्ता।' –सन्मित्र समाज मेळा पृ. ५ (१९२९). **नोकरीयात**–वि. (सरकारी) नोकरी करणारा. 'ज्या नोकरीयात पहिल्वानास

आखाडयांत रहाण्याची इच्छा असेल. ...' –(बडोदें) पहिलवान व कुस्तो नियम ८.

**नोकल-ळ**—स्त्री. चुकवाचुकव. –एभा ५.१६१. (पाठ. –हंको) [ नोकुणें ]

**नोकाज**—अ. कदाचित्.

**नोकिलेपण**—न. छळ; पराभव; अपमान.

**नोकी**—स्त्री. पराभव. ' कवि हुसेन कलगीवाल्यावर लावी नोकी। ' –ऐपो २३७. [ नोकणें ]

**नोकीचा**—वि. नोकदार पहा.

**नोजोर**—स्त्री. ( भिल्ली ) नजर पहा. ' लोकांहां आखुलापे नोजोर देदी नाहां ... ' –भिल्ली ३६.

**नोट**—स्त्री. कागदी चलन. [ इं ]

**नोटीस**—स्त्री. १ सूचना; विनंतीपत्र. 'मी तुझ्या तपाचा भंग करण्याकरितां अप्सरा–बायका पाठविणार आहे अशी विश्वामित्राला इंद्रानें नोटीस दिली होती कां हो. ' –नारुकु ३०२१. २ जाहिरात. वृत्तपत्रांत सूचना, बातमी. [ इं. ]

**नोडगा, नोडग्या**—पु. १ ( निंदार्थी ) मुसलमान; अविंध. ' नोडग्यांच्या हातांत सांपडणारच नाहीं असें नाहीं. ' –सूर्योदय २१५. २ (ल.) आडदांड माणूस.

**नोडवणें**—अक्रि. पुढें न येणें; प्राप्त न होणें, ' कीं माझिए क्षेत्रवृत्ती। नोडवेचि निर्की। ' –ऋ ५२. –ज्ञा १८.७२२. –सक्रि. पुढें करणें. ' परि म्हणे राजकुमर। दीधल्या मी नोडवी कर। ' –कथा ५.६.९५. [ न+ओडवणें ]

**नोडा**—पु. गुंडीच्या आकाराचा पांढरा शेंडा असलेली लव्हाळाच्या जातीची एक वनस्पति.

**नोंद, नोंदवही**—स्त्री. (सरकारी किंवा व्यापारी) नक्कलवही; जींत नोंद टांचण, टिपण, लेख करतात ती वही; (इं.) रजिस्टर. [ नोंदणें+वही ] **नोंद, नोंदणी**–स्त्री. १ (हुंडी किंवा सरकारी कागद यांची) नक्कल करून ठेवणें. टांचण; लेख.

**नोंदणें**—सक्रि. (हुंडी स्वीकारल्यावर तिची) नक्कल करून ठेवणें; (सरकारी कागद इ०ची) नक्कल करणें; टांचण करणें; लिहून ठेवणें. [ हिं. नोंदना; गु. नोंदूं; सिं. नूंधणु ]

**नोनमिर्च**—स्त्री. (काशी) तिखटमीठ. [ हिं. नोनु+मिरची ]

**नोप**—स्त्री. तेज; शोभा. ओप पहा. ' शृंगारिल्या उत्कट राजवीथी। समस्त शृंगाटक नोप देती। ' –सारुह ६.३. [ वोप ]

**नोबत**—स्त्री. संकट; वाईट प्रसंग. ' पण इतकी नोबत यावी अशी आमची इच्छ नव्हती. ' –विक्षिप्त ३.१६६. [ अर. नौबत् ]

**नोबत-द**—नौबत पहा.

**नोबती**—पु. गजपालक; महात. 'नोबती गजपालकः। ' –राव्य ५.२. [ फा. ]

**नोर**—न. जहाजावरच्या प्रवासाचें, माल नेण्या–आणण्याचें भाडें; गलबताचें भाडें. –शके १०१६ चा शिलाहार ताम्रपट. [ हिं. ] **नोरी**–वि. भाडयाचें (गलबत, इ० ); भाडें घेऊन ताब्यांत घेतलेला; जहाजावर चढविलेला (नेण्या–आणण्यासाठीं घेतलेला माल).

**नोरज**—न. (बे.) डास; चिलट. [ का. नोरजु ]

**नोलकोल**—पु. कोबी, फुलवर वगैरे भाज्यांच्या वर्गांतील एक भाजी (थंडींत येणारी). नवलकोल पहा. [ इं. नोएल+कोल ]

**नोल्लल**—न. (गो.) नारळाचें तेल. [ नारळ+एल-तेल ]

**नोवरा-री**—पुस्त्री. (काव्य) नवरा–री पहा. –शिशु ७२७. ' बापाच्या ऊजवे कडेसि बसली म्या पाहिली नोवरी। ' –र ६.

**नोवुली**—वि. (भि.) नववी. ' गोठ नोवुली ' –भिल्ली २१.

**नोवे**—क्रि. नोहे; होत नाहीं. ' जादवांचिऍ राणिवे। कव्हणाहीं जुंझ नोवे। ' –शिशु १२२. [ न+होय ]

**नोसडणें**—उक्रि. न सोडणें. ' निलाजिरे जिणें हेडसाविती नारी। नोसडीसी तरी सोडीं देवा। ' –ब ५२८.

**नोसंडणें**—उक्रि. न टाकणें. ' दृष्टी नोसंडी क्षणार्धे। ' –एभा ३०.१८०. [ न+ओसंडणें ]

**नोसंतणें**—सक्रि. दूर न करणें; दूर न होणें; न विसंबणें. ' परि नोसंतितां विवसी। भेटी नाहीं निधीसी। ' –ज्ञा १७.३११. [ न+उसंतणें ]

**नोहारवाणी**—स्त्री. (संगीत) एक ध्रुवपदगायनपद्धति. (प्रसिद्ध ध्रुवपद गायक श्रीचंद हा नोहारगांवीं रहात असे त्यावरून).

**नोहे**—क्रिन. नव्हे; नाहीं. 'जें आपेंआपें सांडुनि मन्मथु। वस्य नोहे। ' –ऋ ५६. ' नळें केली हे कोण म्हणे नोहे ? ' –र ९. [ न+होय ]

**नोहोटणें**—अक्रि. माघारें न फिरणें. ' हाती हाला फुलीं। पासवणा जेवीं न घाली। तैसा नोहोटे दुर्वाक्यशेलीं। सेलिला सांता। ' –ज्ञा १३.४९६. [ न+ओहोटणें ]

**नोहोनि**—क्रिवि. न होऊन. 'ऐशा विज्ञानबोधें समरसुनि असें भिन्न नोहोनि भिन्न। ' –निमा १.७. [ न+होणें ]

**नोळखणें**—सक्रि. (काव्य) न ओळखणें; परिचय, माहिती नसणें. ' वर भावीक दिसे साचार। परि तो नोळखतां त्याचें अंतर। ' [ न+ओळखणें ]

**नौ**—वि. नऊ. ९ (संख्या) [ सं. नव ]

**नौ, नौका**—स्त्री. होडी; नाव. 'राजभळा जेवि नौका न साहे।' –दावि १२७. [सं.] **नौकादंड**–पु. वल्हें. **नौकानयन**–न. समुद्र, नदी यांतून जहाज, नाव इ० साधनानें जाणें; नौकेंतून प्रवास. **नौकानयनशास्त्र**–न. नाविक विद्या.

**नौकित्र**—पु. (गो.) लौकिक.

**नौखा, नौगजी, नौघण, नौटकें, नौटांक, नौत(ता)रणें, नौती, नौथर**—नवखा, नवघण इ० पहा.

**नौदिगर**—वि. १ कमजास्त. 'येविशीं नौदिगर न करणें.' –थाडबाबा १.३६१. २ भलतें; निराळें. 'ते जारी असतां दरम्यान नौदिगर सुरत तं तर्फेनें अमलांत आली' –थोमारो १.६५. [फा. नव्+दिगर्] ०सुरत–स्त्री. निराळी तऱ्हा; भलती वागणूक. 'नौदिगर सुरत अमलांत आली.' –थोमारो १.६६.

**नौपटी**—वि. खूप लांब, नऊ पट लांबीच्या साडीचा एक प्रकार. 'साडयाही नौपटीच्या कतिपय लुगडीं जे नवे पांजणीचीं।' –सारुह ३.४१. [नऊ+पट]

**नौबत-द**—स्त्री. १ मोठा नगारा. डंका. २ घटका; काळ; प्रसंग; स्थिति. ३ अडचण; संकट. 'वडिलांतागायत श्रीमंतांची सेवा केली तथपावेतों. आतां नौबत असी उमटली'–ख ६.३१६४. [अर. नौबत] ०गुजरणें-येणें–संकट, प्रसंग, पाळी येणें.'होळकरावर हे नौबत गुजरली सबब खफगीस जागा.' –रा ७. –खलप १.२७. ०झडणें–१ डंका, नगारा वाजणें. २ (व.) बोलणीं बसणे. ०पोहोंचणें–स्थिति, प्रसंग येणें. 'सांप्रत घरांतील फूट पडल्यामुळें या थरास नौबत पोंहचली.' –रा ६.५०. ०खाना–दरवाज्यावरील चौघडयाची जागा. ०घाई–स्त्री. १ जोरानें नगारा वाजणें; (ल.) रणवाद्यें जोरानें वाजणें. २ (ल.) विलक्षण गडबड, गोंधळ, घाई.

**नौरा-री, नौसरण, नौसागर**—नवरा-री इ० पहा.

**नौरुपी**—वि. (गो.) प्रथमच, नवीनच व्यालेली (गाय इ०).

**नौरोज**—पु. पारशी लोकांचा पाडवा. नवरोझ पहा. [फा. नव्-रोझ्]

**नौलि**—स्त्री. एक योगक्रिया.

**नौली**—स्त्री. शेर; थोर नांवाचें झाड; नवली.

**न्यग्रोध**—पु. (काव्य) वड; वडाचें झाड. 'तुज मी वरितें त्वरित। पैल न्यग्रोधतरू दिसत। त्यांत माझें कुलदैवत।' [सं.]

**न्यसणें**—सक्रि. १ (काव्य) टाकणें; फेंकणें; झुगारणें. २ ठेवणें; स्थापणें. 'तैसेनि मार्दवें पाय। भूमीवरी न्यसीतु जाय।' –ज्ञा १३.२५४. [सं. नि+अस्=फेंकणें] **न्यस्त**–वि. १ ठेवलेला; टाकलेला; स्वाधीन केलेला. २ फेंकलेला; त्यक्त. 'पार्थ म्हणे गोविंदा न्यस्तायुध तूंचि पाहिजेस मज।' –मोउद्योग १.४१.

**न्यहा**—पु. १ सुताराचा किंवा लोहाराचा कारखाना. २ (ज्याच्यावर गवत इ० तोडतात असा) लांकडाचा ओंडा. ३ ऐरण. 'न्यहा संतप्त आधार देत। वरुनी घणघाय घेत।' –एभा ३.४३२. [हिं. निहाई=ऐरण]

**न्यहायत**—वि. अत्यंत. निहायत पहा. 'हें ऐकून न्याहायत खुशी जाली.' –पया ४६४. [अर. निहायत]

**न्यहार**—वि. गुळगुळीत; साफ; सपाट; खडबडीत नसलेला. **न्यहारणें**–उक्रि. सारखें, सपाट, साफ करणें.

**न्यहारी**—स्त्री. १ सकाळचा थोडा फराळ; न्याहरी. २ स्वल्प भोजन; फराळ. 'घटकर्णाची घरि कीं खंडी द्विजबाण जैं न्यहारी ती।' –मोकर्ण ११.३४. [फा. नहारी]

**न्यहाल**—वि. १ श्रीमंतीस, मोठया पदवीस, मानास चढलेला, चढविलेला. 'कार्याअंती न्यहाल व्हाल नाहिंतर ठेवाल दूषणें।' –प्रला १०७. २ कृपेंतील; मेहेरवानींतील. [फा. निहाल्] ०करणें–कृपा करणें. 'हंसिणी कधि ग करशिल न्यहाल हंसार्शी।' –प्रला २०८. **न्यहाली**–स्त्री. कृपा; मेहेरबानी; अनुग्रह. [फा. निहाली]

**न्यहाली**—स्त्री. चटई; लहान गादी. 'परांच्या न्यहालीवर खेळल्यें।' –प्रला २२९.

**न्यहाळणें**—सक्रि. बारकाईनें, चित्त देऊन, एकाग्रतेनें पहाणें; परीक्षा करणें. [निहाळणें]

**न्यात-ती**—स्त्री. १ जात; प्रकार; भेद. २ जात; समाज. [सं. ज्ञाति]

**न्याबत**—स्त्री. मुतालिकी. नियाबत पहा. –दिमरा २.१७. [अर. नियाबत्]

**न्याम**—न. (कु. कुण. अशिष्ट) खांब पुरण्यासाठीं खणलेला खळगा; नेम.

**न्यामती**—वि. चैनीखातर केलेला. –शर. [अर. निआमत]

**न्याय**—पु. १ योग्यपणा; रास्तपणा; युक्तता; खरेपणा; तथ्य; यथार्थता. २ खरा निर्णय, निकाल; इन्साफ. ३ नीति. 'न्यायानें जो वर्ततो त्यास भय नाहीं.' ४ (तर्कशास्त्र) वादविवाद किंवा म्हणणें मांडण्याची रीति किंवा प्रकार. हे पांच आहेतः–प्रतिज्ञा, हेतु किंवा अपदेश, उदाहरण किंवा निदर्शन, उपनय व निगमन. ५ (तर्कशास्त्र)संस्कृत वाङ्मयांत जीं षड्दर्शनें आहेत त्यांतील सहावें. यामध्यें अनुमान कसें काढावें यासंबंधी मुख्यतः विवेचन आहे. याचा कर्ता गौतम होय. ६ वचन; शासन; नियम; पद्धत; सामान्य तत्त्व; मूलभूत सूत्र; दाखला; म्हण; उखाणा; दृष्टांतास उपयोगी पडणारी सर्वजनप्रसिद्ध गोष्ट. उदा० देहलीदीपन्याय; काकाक्षिगोलकन्याय; अंधपरंपरान्याय. इ०मराठींत म्हणींनीं जें काम होतें तें संस्कृतांत न्यायांनीं होतें. [सं.] ०सांगणें–

फिर्याद, तक्रार करून इन्साफ मागणें. ' म्हणे तुकयानें साधियेला दावा। न्याय सांगावा कवणासीं।' ०इन्साफ–पु. न्यायनिवाडा. **न्यायतः**–क्रिवि. योग्य प्रकारें; न्यायाला अनुसरून; खरोखर रीतीनें. ०**निष्ठ**–वि. न्यायी; इन्साफी; निःपक्षपाती. ०**निष्ठुर**–वि. न्यायाच्या कामीं भाडभीड न बाळगणारा; निर्भीड. ०**नीति**–स्त्री. न्याय; खरेपणा इ०. ०**मन्सुबी–मन्सोबा**–स्त्रीपु. १ न्यायाधिशापुढें चालू असलेला खटला. २ खटल्याची चवकशी. (क्रि० करणें; पाहणें). [न्याय+अर. मन्सूबा] ०**संगत**–वि. न्यायास धरून असलेला. ०**सभा–मंदिर**–स्त्रीन. न्याय करण्याची जागा, कचेरी; कोर्ट. **न्यायाधिशी**–स्त्री. १ न्यायाधिशाचें काम, अधिकार. २ (बडोदें) न्यायाधिशाची कचेरी; कोर्ट. **न्यायाधीश**–पु. १ न्याय करणारा, देणारा. २ (कायदा) दिवाणी किंवा फौजदारी इन्साफांत कायदेशीर रीतीनें काम चालवून निकाल देण्याचा अधिकार असलेला इसम. (इं.) जज्ज. **न्यायासन**–न. न्यायाधिशाची बसण्याची जागा. **न्यायी, न्यायीक**–वि. १ खरा न्याय करणारा, देणारा. २ नेकीचा; प्रामाणिक; खरेपणा असणारा. **न्यायें**–क्रिवि. (न्यायानें) प्रमाणें; सारखें. ' स्वर्ग नर्केही आतां। येणें न्यायें।' –दा ९.३.३. ' खगन्यायें उड्डाण केलें। तें देखिलें सकळिकीं।' –जै ४४.२७. **न्याय्य**–वि. न्यायाला अनुसरून; योग्य; रास्त; बरोबर; उचित.

**न्यारगीर**—वि मिश्र पदार्थांतून शुद्ध धातू काढणारा. [न्यारा=निराळा+गीर=करणारा]

**न्यारा**—वि. १ वेगळा; निराळा; न जोडलेला; भिन्न. २ दुसरा; स्वतंत्र; असदृश. ३ अलौकिक; विशेष. ' समशेरबहादर रणीं थकले कर्त्याची गत आहे न्यारी।' –ऐपो १३५. [सं. अन्यतर; हिं.; निराळा पहा.]

**न्याव**—पु. (काव्य) न्याय. –तुगा ३६६३. ' न्याव उफराटा दिसे साचारु।' –दावि ९२. [सं. न्याय अप.]

**न्यास**—पु. १ ठेवणें; स्थापणें; निक्षेप; मुख्यत्वें करावयाच्या गणिताचे आंकडे मांडणें; शस्त्रास्त्रावर दैवी मंत्रांचें अधिष्ठान करणें; मनांत, आठवणींत ठेवणें, सोंपविणें. (ठेव, निश्वस्त वस्तु). २ घरधन्याला न दाखवितां त्याच्या परोक्ष घरांतील माणसांच्या हवालीं करून हें मालकास द्या असें सांगून दिलेलें द्रव्य. –मिताक्षरा. ३ जप इत्यादि कर्मांच्या आरंभीं ज्या मंत्राचा जप करावयाचा असेल त्यांतील बीजांचें आपल्या शरीरावयवांच्या ठिकाणीं अधिष्ठान कल्पून त्या त्या शरीरावयवास स्पर्श करणें (धर्मसिंधु–महान्यास, लघुन्यास, षडंगन्यास पहा). ४ मंत्रांनीं देवाच्या मूर्तीच्या अवयवांवर देवत्वाची स्थापना करणें. ५ छाप; ठसा; खूण. ' नखन्यास.' ६ सोडणें; त्यागणें; न स्वीकारणें; त्याग. कर्मन्यास, फलन्यासपहा. [सं. नि+अस्–न्यास] **न्यासणें**–उक्रि. ठेवणें. ' परीचित्तवृत्ति न्यासावी। आत्मरूपीं।' –ज्ञा ३.१८६. ०**स्वर**–पु. (संगीत) ज्या स्वरावर गीत समाप्त होतें तो.

**न्याहरी, न्याहली, न्याहार, न्याहारणें, न्याहारी, न्याहाली, न्याहाळ, न्याहाळणें**—न्यहारी, न्यहाली इ० पहा.

**न्याहा, न्याहो**—पु. ध्वनि; शब्द; कल्लोळ. ' धनुष्यनादाचिया कोटी। न्याहा उठला वैकुंठीं।' –भारा बाल १२.११०. –कथा ७.७.११. [नि+आह्]

**न्याहार**—पु. दृष्टि; कटाक्ष. –एभा ३.४६८. ' न्याहार देतां आकाशीं। चक्रें दिसतीं डोळियाशीं।' [नि+आ+हृ]

**न्याहाळ**—पु. पाहणी. ' उठोनि करी न्याहाळ। मंदिराचा।' –कथा १.६.२००. [न्याहाळणें]

**न्युन**—पु. (शाप.) हवेमध्यें अति सूक्ष्म प्रमाणांत असलेला वायु. हा चेतनारहित वायुवर्गापैकीं एक आहे. यांत अचेष्ट, सौर, न्युन, क्रिप्त, झेन हे वायु येतात. –ज्ञाको (न) ४०८. [इं. निऑन]

**न्यून**—वि. १ कमी. ' ज्ञारेकऱ्याच्या कसबापेक्षां सोनाराचें कसब न्यून.' २ अपुरा, आखूड; उणा. 'तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।' –ज्ञा १.८०. ३ खालच्या, कमी दर्जाचा; हलका (किंमत, उपयोग, पदवी वगैरेंत). [सं.] ०**पडणें**–१ कमी पडणें; वैगुण्य असणें. **न्यूनता**–स्त्री. उणीव; कमीपणा. ०**पूर्ण**–वि. अपुरा किंवा पुरा; अपुरता अथवा पुरता; कमीजास्ती; व्यंग अथवा अव्यंग (शरीरानें, नीतीनें). २ कमी; अपुरें; अधुरें; व्यंग. ' न्यूनपूर्ण पडल्यास हे तुझी सरबरा ठेवतील.' ०**वचन**–न. अपुरा शब्द; वचनांत, बोलण्यांत अंतर, कसूर. ' न्यूनवचन पडेल अवचितां। संपूर्ण अनंता तूं करी।' **न्यूनांग**–न. थोटका; अपुरा; व्यंग अवयव. –वि. असल्या अवयवाचा. [सं. न्यून+अंग] **न्यूनातिरेक, न्यूनाधिक–न्यूनाधिक भाव**–वि. कमी अथवा जास्त. ' मी बोलतों यांत न्यूनाधिक असेल तें काढा.' **न्यूनाधिकभाव, न्यूनाधिक्य, न्यून**–पुन. अंतर; भेद; फरक; तफावत; विप्रतिपत्ति; द्वैविध्य; प्रमाणाबाहेर कमीजास्तपणा.

**न्हई, न्हय**—स्त्री. (कों. कु.) नदी; मोठा ओढा; नई, नै पहा. [सं. नदी; प्रा. णई] **म्ह**० (गो.) न्हंय भोळी, पुण बांय भोळी न्हंय=नदी उघड उघड घात करील पण विहीर अचानकपणें घात करील

**न्हंय, न्होय**—अ. (गो. कु.) नाहीं; नव्हे.

**न्हवणें**—न. ऐरीबरोबर आणलेलीं इतर चार मडकीं. –बदलापूर २३७.

**न्हाऊ**—पु. न्हावी. **म्ह**० माणसांत न्हाऊ आणि पक्ष्यांत काऊ.

**न्हाण, न्हाणघर**—नहाण, नहाणघर पहा.

**न्हाणणें**—सक्रि. नाहूं घालणें. ' न्हाणी क्षतजें कोपें, आणी तैं पार्थलोचनीं पाणी । '—मोभीष्म ३.२७.

**न्हाणवणी, न्हाणुली, न्हातीधुती, न्हावणी**—नाहण-वणी इ० पहा.

**न्हाणी**—स्त्री. स्नानगृह. ' जेथें असे रत्न जडीत न्हाणी । ' —सारुह ६.१८. [सं. स्नान] (वाप्र.) **न्हाणी पाहणें विटाळ येणें**–(बायकी) बाळंतीण झाल्यापासून पहिल्या तीन महि-न्यांच्या आंतच बाहेरची होणें. **न्हाणी पाहणें साप येणें**– (गर्भवती स्त्रीनें साप पाहिल्यास त्याचे डोळे जातात अशा सम-जुतीवरून) बाळंतिणीचे न्हाणींत साप निघणें (असा साप आला म्हणजे त्याची गेलेली दृष्टि फिरून येते म्हणतात). **न्हाणीचा चौक**–पु. (बायकी) लग्नमुंजींत न्हाण्यासाठीं चार पाट मांडून त्यांचे चारही बाजूस चार भांडीं रंग घालून, ठेवून प्रारंभीं एका भांड्यास सूत गुंडाळून चारी पाटाभोंवती त्या भांड्यांच्या भोवतीं तीन वेळां सूत गुंडाळून केलेला चौक. **न्हाणीपूजन**–न. (बायकी) प्रसूत झाल्यापासून तिसरें दिवशीं बाळंतिणीकडून न्हाणीची पूजा करून भिजलेल्या हरभऱ्यानीं ओटी भरून मग न्हाणीवर पांढऱ्या चाफ्याचीं पानें व हरळी वाहतात तो विधि.

**न्हाणें**—अक्रि. स्नान करणें. नाहणें पहा. **म्ह०** १ वधू न्हाली झाली आणि वाफा शिंपला गेला. २ न्हातीचे बाल अन् खातीचे गाल केव्हांहि दिसणारच.

**न्हादल दिसांची**–वि. (गो.) गरोदर.

**न्हावगंड**—पु. (निंदार्थी) न्हावी. [न्हावी+गंड हा कानडी प्रत्यय आहे]

**न्हावण**—न. १ (कर.) गौरीचें गमन. २ गौरी भरून येण्याचा समारंभ (कुणब्यांतील). ' आम्ही न्हावण आणायला जाणार आहोंत. '

**न्हावाण**—न. (कु.) देवावर स्नानासाठीं घातलेलें व तीर्थ म्हणून घ्यावयाचें पाणी; देवाचें तीर्थ; नाहवणी. [न्हाणें+पाणी]

**न्हावी**—पु. हजाम; नापित (पूर्वी याचें काम गिऱ्हाइकाचें अंग रगडून, उटी लावून स्नान घालण्याचें असे त्यावरून). [सं. स्ना-स्नापित; प्रा. ना(न्हा)विअ न्हाविओ-उ; नहापित; बं. नापि; हिं. सिं. नाई]

**न्हावी**—पु. १एक किडा; हा बाभुळ इ०कांच्या कांट्यांचें घर करतो. २ एक लहान काळा पक्षी. **न्हाव्याचें घर**–वरील किड्याचें घर.

**न्हावेर**—पु. (कों. कुण.) पाट; विधवेचा पुनर्विवाह. [सं. नव+वर]

**न्हिद्**—वि. (गो.) झोंप; नीद. [सं. निद्रा]

**न्हीव**—स्त्री. (कों.) एक वृक्ष. दक्षिण कोंकणांत याची मोठ-मोठीं झाडें होतात. यास वाटोळीं फळें येतात. पिकलेलीं फळें गुळ-मट लागतात. फणसाप्रमाणेंच या फळांवर कांटे असतात. नीव पहा.

**न्हेनो**—पु. (गो.) नेणता; अज्ञानी. [सं. न+ज्ञान]